

संतश्रेष्ठ श्रीएकनाथमहाराज विरचित

# श्रीभावार्थरामायण

## खंड पहिला

प्रभु श्रीरामचंद्राची नाथांना
श्रीभावार्थरामायण लेखनाची प्रेरणा

मी नेणे मूळींच्या संस्कृतासी ।
मूर्खपण माझी मिरासी ।
त्या मूर्खाच्या मुखासी ।
श्रीराम ऐसी कथा वदवी ॥

प्रेरिता मी न करी जाण ।
तंव स्वप्नामाजी रामायण ।
श्रीराम विस्तारी संपूर्ण ।
ऊण खूण ग्रंथाची ॥

जागृती माजी वर्तता ।
पुढे प्रकाशे रामकथा ।
दुश्चितपणे ठेवो जाता ।
मज तत्वतां रामायण दावी ॥

केले असतां सुषुप्तीशयन ।
श्रीराम थापटी पाठी आपण ।
म्हणे लिही वेगी रामायण ।
वृथा निजोनि लाभ कायी ॥

रामायण लिहावयासाठी ।
श्रीरामें पुरविली पाठी ।
श्रीराम संचरोनि पोटीं ।
दाटोदाटीं लिहवीत ॥

करू बैसता भोजन ।
ग्रासोग्रासी स्मरे रघुनंदन ।
मागे घालुनि जेवण ।
राम रामायण स्वयें वदवी ॥

[मलपृष्ठ ३ वर पहावे]

अनुक्रमणिका



संतश्रेष्ठ श्रीएकनाथमहाराज विरचित

# श्रीभावार्थरामायण

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका


श्रीरामपंचायतन



कनकदंड छत्रचामर । सहित जानकी सुंदर । दक्षिणे शेषावतार । वामे भरतशत्रुघ्न । सन्मुख तिष्ठे वायुनंदन । जिवलग पूर्ण श्रीरामाचा ॥

## अनुक्रमणिका

श्रीएकनाथमहाराजांचा ‘विजयी पांडुरंग’



मूर्तीच्या पादपीठावरील अस्पष्ट अक्षरांचे परंपरागत वाचन

‘दासा जेवूं घाला न घाला’

## अनुक्रमणिका



संतश्रेष्ठ श्रीएकनाथमहाराज विरचित

# श्रीभावार्थरामायण

## खंड पहिला

अनुक्रमणिका

**संपादन समिती :**

ह. भ. प. कै. श्री. शं. वा. तथा मामासाहेब दांडेकर
ह. भ. प. श्री. धुंडामहाराज देगलूरकर
डॉ. श्रीधर रंगनाथ कुळकर्णी
प्रा. वि. पां. देऊळगांवकर
श्री. बळवंत गिरिराव घाटे, अध्यक्ष
श्री. न. शे. पोहनेरकर, चिटणीस

**प्रथमावृत्ती प्रकाशन :**

श्रीएकनाथ षष्ठी, शके १९०१
८ मार्च १९८०

**प्रकाशक :**

महाराष्ट्र शासन
शिक्षण, रोजगार व युवक सेवा विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**पुनर्मुद्रण :**

नोव्हेंबर २०११

**प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

**मुद्रण :**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय
चर्नी रोड, मुंबई ४०० ००४

**मूल्य : ४०० रुपये**

## अनुक्रमणिका

# निवेदन

महाराष्ट्राची संत साहित्याची परंपरा स्फूर्तीदायक आहे. संतांनी केवळ अध्यात्म शिकविला नाही तर सर्व समाजाचे आंतरिक उन्नयन व्हावे यासाठी साहित्याच्या माध्यमातून प्रबोधनाच्या वाटा दाखविल्या. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वसामान्य समाज हा संतांचे नामस्मरण करता करता कर्तव्याचे पालनही करू लागला आणि संतांच्या नामस्मरणाने मनःशांती मिळवून तो संसाराचे व्यापताप विसरू लागला.

महाराष्ट्रातील संत वाङ्मय हा सारस्वताचा मोठा ठेवा होय. श्री ज्ञानेश्वर, रामदास, नामदेव, जनाबाई, मुक्ताई या संतांच्या साहित्याने महाराष्ट्राचा आत्मा घडविला असे यथार्थपणे म्हणता येईल. २१ व्या शतकामध्येही श्री ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, रामदासांचा दासबोध यांची पारायणे महाराष्ट्रात भक्तीभावाने केली जातात. संतश्रेष्ठ श्री एकनाथ महाराज यांनी जसे श्री एकनाथी भागवत लिहीले तसेच श्री भावार्थ रामायणही लिहीले. संत एकनाथ विरचित श्री भावार्थ रामायण महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या संत वाङ्मय परंपरेचा धागा तुटू नये म्हणून सातत्त्याने संत साहित्याचे मुद्रण करून ते मराठी वाचकांना उपलब्ध करून दिले आहे. श्री एकनाथ महाराज विरचित श्री भावार्थ रामायण १९८० मध्ये महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागातर्फे प्रकाशित करण्यात आले. त्यानंतर अनेक वर्षे या ग्रंथाला सातत्त्याने वाचकांची मागणी होती ती ध्यानात घेऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने जुन्या आवृत्तीचे पुनर्मुद्रण करावयाचा निर्णय घेतला व त्यानुसार श्री भावार्थ रामायणाची नवी पुनर्मुद्रित आवृत्ती आज आम्ही वाचकांना उपलब्ध करून देत आहोत. या आवृत्तीचे संपादन ह. भ. प. कै. मामासाहेब दांडेकर, ह. भ. प. श्री. धुंडामहाराज देगलूरकर यांसारख्या संत वाङ्मयाच्या दिग्गज भाष्यकारांनी केलेले आहे. यावरून या आवृत्तीचे महत्त्व वाचकांना समजू शकेल. ही आवृत्ती पुनर्मुद्रित स्वरूपात वाचकांना सादर करण्यात महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाला आनंद आणि अभिमान वाटत आहे.

स्थळ : मुंबई,
दिनांक ७ जुलै २००७.

**मधु मंगेश कर्णिक,**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

अनुक्रमणिका

# निवेदन

**म**हाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र शासनाने समाजकल्याणाच्या व लोकशिक्षणाच्या बहुविध योजना आखल्या व कार्यान्वित केल्या. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या संतसाहित्याचे अधिकृतपणे संपादन व प्रकाशन करून ते जनसामान्यांस स्वस्त किंमतीत उपलब्ध करून देण्याची योजनाही यांपैकी एक होय. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी भागवत धर्माच्या मंदिराचा पाया घातला आणि तुकाराममहाराजांनी त्यावर आपल्या रसाळ अभंगवाणीने कळस चढविला. ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम, नामदेव, एकनाथ आदी महाराष्ट्राच्या संतमंडळींनी आपल्या साहित्यातून बहुजन समाजास जीवनप्रेरणा दिली, प्रसंगी दिलासाही दिला. शतकानुशतके त्यांनी प्राणपणाने महाराष्ट्र धर्माचे जतन, संवर्धन केले. संतांच्या या कार्याचे राष्ट्ररचनेच्या संदर्भातील महत्त्व लक्षात घेऊन, शासनाने, सुरुवातीसच, तज्ज्ञांच्या सल्ल्याने, या संतांच्या निवडक साहित्यग्रंथांचे शासनातर्फे प्रकाशन करण्याचे ठरविले. या ठरावानुसारच आजवर शासनाने 'ज्ञानेश्वरी', 'तुकारामाची गाथा', 'नामदेवाचे अभंग', 'श्रीएकनाथी भागवत' आदी संतसाहित्याच्या एक वा अनेक आवृत्त्या तज्ज्ञांकडून संपादून घेऊन प्रकाशित केल्या.

'भागवता' खेरीज एकनाथमहाराजांचा ग्रामीण जनतेपर्यंत पोहोचलेला व तिच्या मनास सदैव मोहिनी घालणारा ग्रंथ म्हणजे 'श्रीभावार्थरामायण' होय. नाथांनी त्यात आदर्श राजा, आदर्श प्रजा व आदर्श समाजजीवन यांचा वस्तुपाठच दिला आहे. त्यामुळे त्यांतील आख्यानरूपी कथाभाग हा समाजमनास मोहवितो तर त्यातील उपदेश त्यास मौलिक वाटतो. नाथांचा हा शेवटचा ग्रंथ म्हणजे त्यांच्या साहित्यजीवनाचा साफल्यदर्शक पूर्णविरामच. हा ग्रंथ जसाच्या तसाच वाचकांपुढे शासकीय आवृत्तीच्या रूपाने येणे आवश्यक होते. म्हणून या आशयाची विनंती दिनांक १५ जून १९६० ला श्रीएकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद या संस्थेकडून येताच शासनाने ती स्वीकारली आणि 'श्रीभावार्थरामायणा'ची एक पाठसंशोधित आवृत्ती प्रथम तयार करण्यासाठी श्री. ब. गि. घाटे, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञांची एक समिती नेमली.

या समितीची पहिली बैठक दिनांक ४ फेब्रुवारी १९६१ ला एकनाथ समाधि मंदिर, पैठणला झाल्यापासून दिनांक ६ मार्च १९६९ ला 'रामायणा' ची संशोधित-संपादित प्रत सिद्ध होईपर्यंत या तज्ज्ञ समितीने पद्धतशीरपणे व परिश्रमपूर्वक केलेल्या कार्याचा वृत्तांत या समितीचे अध्यक्ष आणि चिटणीस यांच्या संयुक्त सह्यांनी अन्यत्र दिला आहे. सदर गोष्टींची येथे पुनरुक्ती टाळूनही इथे एवढे म्हणणे मला अत्यावश्यक वाटते की, समितीच्या सर्व तज्ज्ञ विद्वानांनी विशेषतः समिती सदस्य पं. धुंडामहाराज देगलूरकर आणि कै. प्रा. शं. वा. दांडेकर, तसेच चिटणीस श्री. पोहनेरकर यांनी या संपादनात निष्ठापूर्वक केलेल्या कष्टांस तोड नाही. त्यांच्या अपार परिश्रमाशिवाय ही संशोधित प्रत व त्याची मुद्रण प्रत इतकी सर्वांगसुंदर होऊच शकली नसती. शासनाच्या वतीने मी त्या सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. अन्यही ज्या ज्या अनेक व्यक्तींचे साहाय्य, सहकार्य हा ग्रंथ सिद्ध करण्यास उपयोगी पडले त्या सर्वांचा, तसेच या ग्रंथाच्या मुद्रणाच्या बाबतीत शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन विभागाचे संचालक श्री. स. आ. सप्रे, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाचे व्यवस्थापक व त्यांचे सर्व सहकारी यांनी जे सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचाही शासनाच्यावतीने मी आभारी आहे.

हा ग्रंथ प्रामुख्याने बहुजन समाजासाठी आणि भाविक वाचकांसाठीच तयार केला आहे. मूळ ग्रंथाचा आवाका फारच व्यापक होता. त्यातील सर्व बाबींचे मंथन समितीस सर्वथैव शक्य असले तरी

अनुक्रमणिका

सर्वसाधारण वाचकांच्या दृष्टीने इथे अनावश्यक असल्याने संपादकांनी तो भाग या आवृत्तीत अर्थातच आवर्जून गाळला आहे हे योग्यच झाले आहे. तरीही सप्तकांडात्मक रामायणाच्या लोकसमजुतीस धक्का न लावता, संपादकांनी उत्तरकांडाचे नाथकर्तृत्व निर्णायकपणे साधार नाकारूनही त्याचा (परिशिष्टाच्या रूपाने का होईना) या आवृत्तीत अंतर्भाव करून लोकमताचा आदरच केला आहे. अशा प्रकारे समितीने सिद्ध केलेला हा नितांत सुंदर ग्रंथ जनताजनार्दनापुढे सादर करताना शासनास सानंद समाधान वाटते. ज्या वाचकांसाठी हा ग्रंथ तयार केला आहे त्यांना व इतरांसही तो आवडेल असा शासनास दृढ विश्वास वाटतो.

मंत्रालय, मुंबई **सदानंद वर्दे**

दिनांक १३ फेब्रुवारी १९८० शिक्षण, सांस्कृतिक कार्य, युवक सेवा व क्रीडा मंत्री

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका

**निवेदन** ........................................ १०
**प्रस्तावना** ........................................ १८
**कार्यवृत्तांत** ........................................ २३
**हस्तलिखिते : संपादनकार्य** ........................................ २६
**बालकांड** ........................................ ३७
प्रसंग पहिला  दशरथ विजयाभिगमन ........................................ ३७
प्रसंग दुसरा  पुरोडाश विभाग ........................................ ४७
प्रसंग तिसरा  पिंड प्राशन ........................................ ५७
प्रसंग चौथा  कौसल्या दोहद निरूपण ........................................ ६३
प्रसंग पाचवा  कौसल्या दोहद निरूपण ........................................ ७२
प्रसंग सहावा  श्रीराम जन्म प्रसंग निरूपण ........................................ ७७
प्रसंग सातवा  श्रीराम तीर्थयात्रागमन ........................................ ८९
प्रसंग आठवा  विश्वामित्रागमन ........................................ ९४
प्रसंग नववा  श्रीराम वैराग्य ........................................ १००
प्रसंग दहावा  शुक जनक संवाद ........................................ १०८
प्रसंग अकरावा  वसिष्ठ राम संवाद ........................................ १२०
प्रसंग बारावा  ताटिका निर्दलन ........................................ १४८
प्रसंग तेरावा  सुबाहु निर्दलन ........................................ १५८
प्रसंग चौदावा  अहिल्योद्धारण ........................................ १६९
प्रसंग पंधरावा  जानकी जन्मकथा ........................................ १८३
प्रसंग सोळावा  परशुराम युद्धप्रभाव ........................................ १९४
प्रसंग सतरावा  चाप निरूपण ........................................ २१०
प्रसंग अठरावा  चाप कथा निरूपण ........................................ २१८
प्रसंग एकोणिसावा  श्रीराम स्वरूप वर्णन ........................................ २२९
प्रसंग विसावा  धनुर्भंग सीतावरण ........................................ २३८
प्रसंग एकविसावा  दशरथागमन ........................................ २४८
प्रसंग बाविसावा  सूर्यवंश निरूपण ........................................ २५४

प्रसंग तेविसावा  सीमांतपूजन रुखवत भोजन ........................................................................२६१

प्रसंग चोविसावा  श्रीराम मंडपागमन ..............................................................................२७१

प्रसंग पंचविसावा  जानकी पाणिग्रहण ............................................................................२७९

प्रसंग सव्विसावा  श्रीपरशुराम एकात्म बोध ..................................................................... २८६

प्रसंग सत्ताविसावा  श्रीरामजानकी अयोध्या प्रवेश ...........................................................२९४

**अयोध्याकांड ........................................................................................................ ३०४**

प्रसंग पहिला  श्रीराम शस्त्रविद्या प्रदर्शन–भरत मातुलग्राम गमन .......................................३०४

प्रसंग दुसरा  श्रीरामाभिषेक प्रारंभ ..................................................................................३१०

प्रसंग तिसरा  कैकयी प्रायोपवेशन ..................................................................................३१९

प्रसंग चौथा  दशरथ विलाप ............................................................................................३३०

प्रसंग पाचवा  श्रीरामागमन .............................................................................................३४०

प्रसंग सहावा  कौसल्या सौमित्र समाधान ........................................................................ ३४८

प्रसंग सातवा  जानकी लक्ष्मण वनप्रयाण निश्चय ..............................................................३६०

प्रसंग आठवा  श्रीराम वनप्रयाण .....................................................................................३७१

प्रसंग नववा  श्रीराम चित्रकूट निवास.............................................................................. ३८१

प्रसंग दहावा  दशरथ निर्याण ..........................................................................................३९०

प्रसंग अकरावा  भरतविलाप ..........................................................................................३९९

प्रसंग बारावा  भरत गुहक संवाद–गंगातरण.....................................................................४१०

प्रसंग तेरावा  भरद्वाजाश्रम आगमन–भरत पूजन ..............................................................४२२

प्रसंग चौदावा  काकनिग्रह .............................................................................................४३१

प्रसंग पंधरावा  भरत श्रीराम संयोग ................................................................................ ४३८

प्रसंग सोळावा  श्रीराम भरत चित्रकूट समागम–पितृपिंड पर्याय.............................................४४९

प्रसंग सतरावा  भरत समाधान ........................................................................................४५४

प्रसंग अठरावा  भरत अयोध्या गमन ................................................................................४६४

**अरण्यकांड ............................................................................................................ ४७५**

प्रसंग पहिला  चित्रकूटतः दंडकारण्याभिगमन ...................................................................४७५

प्रसंग दुसरा  विराध वध ................................................................................................ ४८१

प्रसंग तिसरा  शरभंग उद्धरण ....................................................................................४९१

प्रसंग चौथा  महामती आश्रमाभिगमन.........................................................................४९७

प्रसंग पाचवा  अगस्तिमुनि संभाषण, शस्त्रग्रहण ...........................................................५०६

प्रसंग सहावा  कश्यपवंशवर्णन गरुड अमृत हरणाभिगमन ...............................................५१५

प्रसंग सातवा  पंचवटी आगमन ...............................................................................५२५

प्रसंग आठवा  शूर्पनखा विरुपकरण ...........................................................................५३५

प्रसंग नववा  राक्षसैः सह युद्ध प्रसंग.............................................................................५४८

प्रसंग दहावा  दूषण वध........................................................................................५५८

प्रसंग अकरावा  त्रिशिरा दूषण खर वध........................................................................५६६

प्रसंग बारावा  रावण शूर्पनखा संवाद ........................................................................५८०

प्रसंग तेरावा  मारीच रावण पंचवटी गमन ..................................................................५८८

प्रसंग चौदावा  मारीच वध ....................................................................................५९७

प्रसंग पंधरावा  लक्ष्मण सीतानुवाद ..........................................................................६०५

प्रसंग सोळावा  रावणेन जानकीहरण .........................................................................६१५

प्रसंग सतरावा  जटायु वध ...................................................................................६२६

प्रसंग अठरावा  सीताया अशोकवन प्रवेश ...................................................................६३७

प्रसंग एकोणिसावा  सीताशुद्धि श्रीराम विलाप ..............................................................६४७

प्रसंग विसावा  श्रीराम पार्वती संवाद .........................................................................६५९

प्रसंग एकविसावा  जटायु उद्धरण ............................................................................६७१

प्रसंग बाविसावा  कबंध उद्धरण ..............................................................................६७९

प्रसंग तेविसावा  श्रीराम ऋष्यमूकाभिगमन ..................................................................६८९

**किष्किंधाकांड.............................................................................................७०१**

प्रसंग पहिला  श्रीराम हनुमत्परिचय ..........................................................................७०१

प्रसंग दुसरा  वाली सुग्रीव जन्मकथन ........................................................................७०९

प्रसंग तिसरा  श्रीराम सुग्रीव सख्य निरूपण..................................................................७१७

प्रसंग चौथा  वाली सुग्रीव विरोधधर्मकथन...................................................................७२७

प्रसंग पाचवा  सुग्रीव भंग स्थापन.............................................................................७३७

प्रसंग सहावा वाली वध ........................................ ७४८
प्रसंग सातवा वाली उद्धरण, सुग्रीव राज्य स्थापन ........................................ ७६०
प्रसंग आठवा सुग्रीव सेना आगमन ........................................ ७७१
प्रसंग नववा सुग्रीव सेना दर्शन ........................................ ७८१
प्रसंग दहावा हनुमज्जन्म कथन ........................................ ७८७
प्रसंग अकरावा सीता शुद्धयर्थ वानर प्रेरणा ........................................ ७९८
प्रसंग बारावा सीता शुद्धयर्थ वानर गमन ........................................ ८०८
प्रसंग तेरावा सीता स्वरूप वर्णन ........................................ ८१८
प्रसंग चौदावा वानर बिल प्रवेश ........................................ ८२६
प्रसंग पंधरावा तापसी हनुमंत संवाद ........................................ ८३४
प्रसंग सोळावा संपाती उद्धरण ........................................ ८४३
प्रसंग सतरावा समुद्र मध्यागमन ........................................ ८५५
प्रसंग अठरावा हनुमंत लंकाभिगमन ........................................ ८६८

**सुंदरकांड ........................................ ८७९**

प्रसंग पहिला लंका शोधन ........................................ ८७९
प्रसंग दुसरा लंका गृहशोधन ........................................ ८८९
प्रंसग तिसरा रावणसभा शोधन ........................................ ९०१
प्रसंग चौथा रावणभुवन प्रवेश ........................................ ९११
प्रसंग पाचवा अशोकवन प्रवेश ........................................ ९२२
प्रसंग सहावा मंदोदरी जन्म प्रभव ........................................ ९३०
प्रसंग सातवा रावण अशोकवन आगमन ........................................ ९४०
प्रसंग आठवा सीता रावण संभाषण ........................................ ९५१
प्रसंग नववा दशरथ कौसल्या सुलग्न ........................................ ९६४
प्रसंग दहावा सीता हनुमंत दर्शन ........................................ ९७२
प्रसंग अकरावा सीता हनुमंत परिचय ........................................ ९८१
प्रसंग बारावा सीता हनुमंत सुखसंवाद ........................................ ९९३
प्रसंग तेरावा किंकर वध ........................................ १००४

प्रसंग चौदावा अखयाकुमर वध........................................................१०१३
प्रसंग पंधरावा इंद्रजित अपमान ........................................................१०२४
प्रसंग सोळावा रावण सैन्य वध ........................................................१०३६
प्रसंग सतरावा रावण हनुमंत संभाषण ........................................................१०४४
प्रसंग अठरावा पुच्छ प्रदीपन........................................................१०५६
प्रसंग एकोणिसावा राक्षसदमन लंकादहन ........................................................१०६५
प्रसंग विसावा पुनरागमने जानकी आश्वासन........................................................ १०८१
प्रसंग एकविसावा नक्र गजेंद्र आख्यान........................................................१०९१
प्रसंग बाविसावा गजेन्द्र उद्धरण........................................................११०२
प्रसंग तेविसावा सीता शुद्धि हनुमंत दर्शन ........................................................१११९
प्रसंग चोविसावा मधुवन विध्वंस........................................................११३०
प्रसंग पंचविसावा हनुमंत आगमन—अंगद संवाद........................................................११४१
प्रसंग सव्विसावा ब्रह्मपत्र प्रबोध ........................................................११५३
प्रसंग सत्ताविसावा हनुमत्पराक्रम वर्णन ........................................................११६२
प्रसंग अठ्ठाविसावा जानकी हनुमंत प्रेम वर्णन........................................................११७१
प्रसंग एकोणतिसावा हनुमत्प्रताप ब्रह्मलेखन पत्र ........................................................ ११८०
प्रसंग तिसावा ब्रह्म लिखित असाळी वध........................................................११९१
प्रसंग एकतिसावा इंद्रजित अपमान तत्सैन्य निर्दलन........................................................१२००
प्रसंग बत्तिसावा रावण गर्व हरण ........................................................१२११
प्रसंग तेहतिसावा ब्रह्मलिखित समास........................................................१२२२
प्रसंग चौतिसावा श्रीराम समुद्र तीराभिगमन........................................................ १२३८
प्रसंग पस्तिसावा प्रधानादि अपमान........................................................१२५०
प्रसंग छत्तिसावा विभीषण अपमान ........................................................१२६२
प्रसंग सदतिसावा विभीषण लक्ष्मण निरुपण........................................................१२७६
प्रसंग अडतिसावा विभीषण आश्वासन........................................................ १२८७
प्रसंग एकोणचाळिसावा श्रीराम समुद्र संवाद ........................................................१२९४
प्रसंग चाळिसावा सेतुबंधन........................................................१३०५

प्रसंग एकेचाळिसावा श्रीराम सैन्य सिंधू परपार प्रवेश ........................................................... १३१६
प्रसंग बेचाळिसावा श्रीराम लंका आगमन ........................................................................ १३२६

# प्रस्तावना

**श्री**एकनाथमहाराजांचा जन्म साधारणपणे शके १४५५ च्या आसपास विद्येचे माहेरघर असणाऱ्या संपन्न पैठण नगरीत एका श्रेष्ठ भगवद्भक्ताच्या कुळात झाला. त्यांचे पणजोबा भानुदासमहाराज हे श्रीविठ्ठलाचे अनन्यभक्त म्हणून प्रसिद्ध आहेत. 'कानडा कर्नाटकु' झालेला परमात्मा पांडुरंग त्यांच्यामुळे पुन्हा महाराष्ट्रात आला. त्या भानुदासांचे पुत्र चक्रपाणी, चक्रपाणींचे पुत्र सूर्यनारायण व त्यांचे पुत्र श्रीएकनाथमहाराज. या कुळात सदाचार व भगवद्भक्ती सुखासमाधानाने नांदत होती. त्याचे संस्कार बाळपणापासून एकनाथांवर झाले. मातापित्यांचे छत्र त्यांच्या शिरावर फार काळ राहिले नसले तरी त्यांच्या वृद्ध आजा-आजींनी त्यांचे प्रेमानें पालनपोषण केले. पुढे त्यांच्या भाग्याने देवगिरीवर अधिकारी असणाऱ्या श्रीजनार्दनस्वामींची व त्यांची भेट झाली. आपल्या एकनिष्ठ सेवेने त्यांनी आपल्या सद्‌गुरूंची कृपा व प्रेम संपादन केले. त्यांच्या सान्निध्यात श्रीएकनाथमहाराजांना ज्ञानभक्तीचा अमूल्य ठेवा तर प्राप्त झालाच पण त्याबरोबरच तत्कालिन शासन व समाज यांचे जवळून दर्शनही झाले.

श्रीजनार्दनस्वामी हे त्या काळी शासनातील एक महत्त्वाचे अधिकारी होते व त्यामुळे त्यांच्याकडे भोवतालच्या लोकांकडून अनेक अर्ज, दरखास्ती, तक्रारी येत, त्यांचे न्यायनिवाडे होत. अनेक वरचेखालचे अधिकारी भेटत. त्यांची वागणूक व लोकांशी व्यवहार पहावयास मिळे. तत्कालिन शासनाच्या खऱ्या स्वरूपाचे दर्शन त्यांना जवळून झाले. एकूण सकळ लोकस्थिती काय आहे हे त्यांना लहान वयातच उमजून आले असावे आणि तिचा पदोपदी होत असणारा ऱ्हास पाहून त्यांचे अंतःकरण व्यथित झाले असावे. त्याचे प्रत्यंतर आपल्याला त्यांच्या वाङ्मयामध्ये पहावयास सापडते. त्यावरून असे दिसते की, सर्व समाज आपले स्वत्व विसरून आंधळेपणाने मानसिक आधारासाठी कुणामागेही धावत होता. समाजातील आदर्श नष्ट झाले होते. तात्कालिक स्वार्थासाठी न्याय, नीती, धर्म, राष्ट्र, संस्कृती, समाज, इतकेच काय पण स्वतःचे कुटुंब यांचाही कोणी विचार करावयास तयार नव्हते. जीवनाला दिशा उरली नाही, कोणती निष्ठा राहिली नाही. जीवनाला अर्थ देणारा तत्त्वज्ञानाचा प्रकाशही लोपून गेलेला होता.

गुरुगृहीचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर श्रीएकनाथांनी तीर्थाटण केले. त्यातही त्यांना समाजस्थितीचे असेच दर्शन घडले असावे. सर्वत्र स्वधर्माचा लोप, अनाचार, स्वार्थ, परकीय दडपणाखाली चिरडला गेलेला समाज, हेच चित्र त्या काळी दिसत असे, असे इतिहासही सांगतो. साधारणतः वयाच्या वीस-एकविसाव्या वर्षापर्यंत श्रीएकनाथांनी बराच देश फिरून हे पाहिले व ते घरी परत आले. वृद्ध आजा-आजी त्यांची घरी वाटच पहात होते. लवकरच त्यांनी श्रीएकनाथांचा विवाह करून दिला व समाधानाने डोळे मिटले. श्रीएकनाथमहाराजांच्या पत्नी गिरिजाबाई या महान साध्वी होत्या. त्या सर्व प्रकारे श्रीएकनाथमहाराजांना अनुरूप होत्या. इतर साधुसंतांच्या मानाने श्रीएकनाथमहाराजांचे सांसारिक जीवन सुखसंपन्नतेचे होते असे वाटते.

पण श्रीएकनाथमहाराजांनी केवळ आपल्या किंवा आपल्या कुटुंबाच्याच सुखाचा विचार केला नाही. त्यांनी विचार केला तो सर्व समाजाच्या सौख्याचा. अज्ञान, अविचार आणि अकर्तृत्व यांत अडकून सत्त्वहीन झालेल्यां समाजाला पुन्हा आत्मोद्धाराचा मार्ग दाखविण्याचे कार्य श्रीएकनाथमहाराजांनी आपल्या सहासष्ट वर्षांच्या आयुष्यात सातत्याने केले. त्यासाठी त्यांनी भूतदया, शुद्ध आचार, खरी भक्ती यांचा प्रचार केला. सत्त्वप्रधान दैवतांची लोकमानसात स्थापना केली, पंढरीच्या वारीच्या द्वारे लोक संघटण केले व मुख्य म्हणजे या सर्वांना आधारभूत असे श्रेष्ठ आध्यात्मिक तत्त्वज्ञान सर्व स्तरांतील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे

अनुक्रमणिका

आवश्यक कार्य आपल्या विपुल व विविध प्रकारच्या वाङ्‌मयाच्या द्वारे केले. अभंग, भारुडे, स्फुटग्रंथ, पौराणिक आख्याने, भागवताच्या एकादशस्कंधावरील विस्तृत टीका व श्रीभावार्थरामायणासारखे रसाळ भगवच्चरित्र इत्यादी त्यांचे वाङ्‌मय लोकादराला पात्र झाले आहे. या वाङ्‌मयाने केवळ त्या काळातील लोकांच्या मनावरच चांगले संस्कार करण्याचे कार्य केले आहे असे नाही, तर आजही फार मोठ्या प्रमाणावर त्या वाङ्‌मयाचे हे कार्य चालू आहे. श्रीएकनाथमहाराजांनी स्वतः तर या हेतूने उत्कृष्ट ग्रंथ लिहिलेच पण त्याबरोबरच ज्ञानेश्वरीसारख्या श्रेष्ठ ग्रंथाचे संशोधन व प्रसार करून आपल्यावर अपार उपकार करून ठेवले आहेत.

त्यांचे चरित्र एका महापुरुषाचे दर्शन घडविणाऱ्या अनेक हृद्य कथांनी भरलेले आहे. आपल्या दयाळू अंतःकरणाने त्यांनी अनेक दुःखितांना वर उचलून हृदयाशी धरले, आपल्या शांत व प्रसन्न स्वभावाने विरोधकांनाही आपलेसे केले, लोकांविषयीच्या करुणेने त्यांना प्रयत्नपूर्वक सन्मार्गाला लावले, आपल्या ज्ञानप्रकाशाने अनेकांची जीवने उजळली व आपल्या भक्तीने भगवंतालाही मोहित केले. यासंबंधीच्या त्यांच्या कथा महाराष्ट्रातील घराघरांतून मोठ्या प्रेमाने सांगितल्या जातात. संसार आणि परमार्थ त्यांच्या ठायी एकरूप झालेला होता. ‘अवघेचि त्रैलोक्य आनंदाचे आतां’ अशा भावसमाधीमध्ये ते मग्न झालेले होते. चालताबोलता भागवतधर्म म्हणजे श्रीएकनाथमहाराज असे त्यांच्याकडे पाहून वाटे.

अशा श्रेष्ठ अवस्थेला प्राप्त होऊनही लोकांच्या कल्याणाविषयी त्यांच्या अंतःकरणात सतत तळमळ होती म्हणूनच त्यांना संत म्हणावयाचे! लोकांची मने शुद्ध झाल्यावाचून समाजातील पापवासना नष्ट होत नसते व ती नष्ट झाल्यावाचून समाजात सुखही निर्माण होत नाही. संतांना ही कारणपरंपरा कळल्यामुळेच त्यांनी आपल्या भोवतालच्या लोकांची मने शुद्ध करण्याचा यथाशक्य प्रयत्न केला. त्यांची ग्रंथनिर्मिती ही अशा प्रयत्नाचाच एक भाग असते. श्रीएकनाथमहाराजांचे ग्रंथही याच भूमिकेतून निर्माण झाले आहेत. आपल्या या जीवनकार्यासाठी त्यांच्या काळाला अनुसरून त्यांनी पुराणकथांचा जरी आधार आपल्या ग्रंथांसाठी घेतला असला तरी त्यांत त्यांच्या काळातील लोकस्थितीचे प्रत्ययकारी दर्शन मर्मज्ञ वाचकांना घडते, विशेषतः श्रीभावार्थरामायणामध्ये तर अधिकच.

त्यांचे दोन प्रमुख मोठे ग्रंथ म्हणजे ‘श्रीएकनाथी भागवत’ व ‘श्रीभावार्थरामायण’. दोन्ही ग्रंथ पुराणावर आधारलेले असले तरी दोन्हींची प्रकृती भिन्न आहे. श्रीएकनाथी भागवत ही श्रीमद्भागवताच्या एकादशस्कंधावरील विवेचनात्मक टीका आहे. त्यात कर्म, भक्ती, ज्ञान यांच्या तात्त्विक चर्चेला प्राधान्य आहे. तो टीकाग्रंथ असल्यामुळे मूळ ग्रंथाला अनुसरणे तेथे आवश्यक होते. पण श्रीभावार्थरामायण ही श्रीएकनाथमहाराजांची तशी एक प्रकारे स्वतंत्र रचना आहे. रामचरित्र जरी प्रारंभी वाल्मीकीने गाइले असले तरी श्रीएकनाथमहाराजांचे श्रीभावार्थरामायण म्हणजे केवळ वाल्मीकिरामायणाचा अनुवाद नव्हे. रामकथेची बाह्य चौकट जरी वाल्मीकिरामायणाचीच असली तरी तिच्यात भरलेले रंग मात्र श्रीएकनाथमहाराजांचे आहेत. त्यामुळे मूळ रामचरित्राला विशेष गोडी प्राप्त झाली आहे. इतर अनेक पुराणग्रंथांचा, काव्यग्रंथांचा, विविध रामायणांचा, हनुमन्नाटकाचा व योगवासिष्ठाचा आधार श्रीएकनाथांनी घेतला आहे. पण त्या सर्वांत श्रीएकनाथमहाराजांचे खास वैशिष्ट्य जर कोणते असेल तर रामकथेतील प्रत्येक प्रसंगात त्यांना दिसून आलेले अध्यात्म. त्याच्या रामायणातील दशरथ हा ‘अहमात्मा’ आहे, कौसल्या ही ‘सद्विद्या’ आहे, सुमित्रा ही ‘शुद्धमेधा’ आहे, तर कैकयी ही ‘अविद्या’ आहे आणि मंथरा ही ‘कुविद्या’ आहे! रामाला गंध लावावयाचे तरी त्यात ‘उगाळोनि अहंपण । सोहं काढिले शुद्ध चंदन ।’ असा

प्रकार आहे! त्यातून नाथांची अध्यात्ममय झालेली दृष्टी तर कळून येतेच पण लोकांनाही सहज जाता जाता अध्यात्म समजावून देण्याची त्यांची तळमळही व्यक्त होते.

श्रीएकनाथी भागवताचे पहिले पाच अध्याय सोडून बाकी सर्व ग्रंथ म्हणजे उरलेले सव्वीस अध्याय हे वाराणशी महामुक्तिक्षेत्रात लिहिले गेले. शके १४९६ मध्ये हा ग्रंथ तेथे पूर्ण झाला. त्याआधी बराच काळ नाथांचे काशी क्षेत्रात या ग्रंथाच्या लेखनासाठी वास्तव्य झाले असले पाहिजे. याच काळात अयोध्येमध्ये श्रीतुलसीदासजी आपले प्रसिद्ध रामचरित मानस लिहित होते. श्रीएकनाथांची व श्रीतुलसीदासजींची भेट होऊन त्यांचे रामायणाच्या लेखनासंबंधी कधी बोलणे झाले किंवा नाही हे कळावयास मार्ग नाही. पण एवढे खरे की, या दोन्ही संतश्रेष्ठांनी आपापल्या भाषेमध्ये अत्यंत श्रेष्ठ प्रतीची रामायणे एकाच काळात रचली आहेत. रामकथेला त्या काळात विशेष बहर आलेला असावा असे त्याच सुमारास भारतातील विविध भाषांतून झालेल्या रामायण रचनांवरून वाटते.

श्रीभावार्थरामायण हा श्रीएकनाथमहाराजांचा शेवटचा ग्रंथ होय. या ग्रंथाचे लेखन चालू असतानाच शके १५२१ मध्ये त्यांनी आपल्या जीवनग्रंथाची सांगता केली! पण ती करीत असता आपल्या या शेवटच्या भव्य वाङ्-मयकृतीने महाराष्ट्राच्या तत्कालिन हतभागी आणि गतोत्साह जीवनामध्ये त्यांनी 'राम' आणला! मराठी मनाच्या देव्हाऱ्यात एका मातृपितृभक्त, स्वधर्मनिरत, लोकहितदक्ष, सत्‌शील, समर्थ व तेजस्वी दैवताची स्थापना केली. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती आणि राक्षसी अन्याय यांच्यापुढे पर्वताप्रमाणे ताठ उभा राहणारा, सामान्य वनचरांमध्ये दुष्टदमनाचे सामर्थ्य निर्माण करणारा आणि देवांचीही बंदिवासातून मुक्तता करणारा आदर्श त्यांनी समाजापुढे ठेवला. श्रीएकनाथांनी ज्या काळात हे कार्य केले त्या काळाच्या संदर्भात त्यांच्या या ग्रंथाकडे पाहिले म्हणजे त्यांचे कार्य किती मोलाचे होते याची थोडीफार कल्पना आपल्याला करता येईल. महाराष्ट्रात पुढे लवकरच श्रीछत्रपती शिवाजीमहाराज यांच्याद्वारे जी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी पावले उचलली गेली त्यामागे या ग्रंथाची प्रेरणा असली पाहिजे असे वाटते.

श्रीएकनाथमहाराजांना आपल्या अवतारसमाप्तीसाठी फाल्गुन वद्य षष्ठीचा त्यांच्या जीवनातील महत्त्वाचा मुहूर्त गाठावयाचा असल्यामुळे हा ग्रंथ अपुरा सोडावा लागला. तरीही तो अपुरा राहणार नाही याची त्यांनी काळजी घेतली अशी भाविकांची समजूत आहे. आपला अपूर्ण ग्रंथ पूर्ण करण्याचे काम त्यांनी आपल्या घरातील एका आश्रित, निर्बुद्ध समजल्या जाणाऱ्या मुलाकडे सोपविले. त्या मुलाचे नाव गावबा. श्रीएकनाथांच्या कृपेने या गावबाने जवळजवळ पंधरा हजार ओव्या अगदी नाथांच्याच शैलीत लिहून हा ग्रंथ पूर्ण केला! सात कांडांपैकी पाच कांडे पूर्ण व सहाव्या युद्धकांडाचे ४४ अध्याय श्रीएकनाथांचे आहेत व उरलेला भाग गावबाने लिहिला आहे अशी समजूत आहे. संशोधकांमध्ये या गावबासंबंधी बरेच वाद आहेत. मध्येच एक अहिरावण आख्यानही जयरामसुत नावाच्या कवीने आपला नामनिर्देश करून घातले आहे! गावबा नावाची कुणी व्यक्ती खरीच झाली काय? गावबा आणि जयरामसुत एकच का भिन्न? श्रीएकनाथमहाराजांचे नातू मुक्तेश्वर यांनीच ग्रंथ पूर्ण करण्याचे कार्य केले असावे काय? असे बरेच वाद त्यासंबंधात आहेत. संशोधकांना त्यात विशेष रस असला तरी सर्वसाधारण वाचकाच्या दृष्टीने गावबाच या अध्यायांचा लेखक आहे. ग्रामीण भागात गावोगाव श्रीभावार्थरामायणाचे वाचन चालते. श्रीभावार्थरामायण हा ग्रामीण जनतेचा सर्वात प्रिय ग्रंथ आहे. नाथांची आकर्षक शैली, प्रभावी व्यक्तिचित्रण, नर्म विनोद, कथेचा ओघ इत्यादींमुळे या ग्रंथाचे वाचन महाराष्ट्रात अत्यंत आवडीने होते. लक्ष्मणशक्तीचे फार मोठे कार्यक्रम साजरे केले जातात. या श्रीभावार्थरामायणप्रेमी भाविकांच्या दृष्टीने गावबाचे समजले जाणारे

अनुक्रमणिका

अध्याय हे या ग्रंथाचे अविभाज्य भाग आहेत. म्हणून ते श्रीएकनाथलिखित नसले तरी या प्रतीमध्ये स्वतंत्रपणे समाविष्ट करण्यात आले आहेत.

दीर्घकालानंतर का असेना पण श्रीभावार्थरामायण संपादन समितीने अभ्यासपूर्वक तयार केलेली ही प्रत आज मुद्रित स्वरूपात पुढे येत आहे हे त्या समितीमधील एक सदस्य म्हणून व संतवाङ्मयावर प्रेम करणारा एक भाविक म्हणून मला आनंदित करणारे आहे. या समितीचे अध्यक्ष श्री. बळवंतराव घाटे व चिटणीस श्री. न. शे. पोहनेरकर यांनी सातत्याने प्रयत्नशील राहून हे कार्य पार पाडले आहे. या समितीमधील प्रारंभीचे एक ज्येष्ठ सदस्य वै. ह. भ. प. श्री सोनोपंत दांडेकर यांचे या प्रसंगी प्रकर्षानें स्मरण होत आहे. त्यांना या प्रकाशन प्रसंगी अत्यंत आनंद झाला असता.

येत्या नाथषष्ठीस ग्रंथाच्या प्रथम खंडाचे तरी प्रकाशन करावयाचेच असा निग्रह करून शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन विभागाचे संचालक श्री. स. आ. सप्रे यांनी हे काम हाती घेतले व त्याप्रमाणे हे प्रकाशन आता होत आहे. अत्यंत सुंदर स्वरूपात हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. द्वितीय खंडाचेही काम लवकरच होऊन भाविकांना व अभ्यासकांना ग्रंथ समग्र स्वरूपात उपलब्ध होईल अशी मी आशा करतो. महाराष्ट्र शासनाने सर्व दृष्टीने मोठा असणारा हा ग्रंथ संपादित करण्यास व मुद्रित करण्यास जे साहाय्य केले त्याबद्दल शासनास धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत.

या ग्रंथाचे स्वरूप, वैशिष्ट्ये, स्वभावचित्रण, भाषा, साहित्य, इत्यादी अनेक अंगांनी विचार करण्यासारखा आहे. दुसऱ्या खंडामध्ये त्यासंबंधी थोडा विस्ताराने विचार होईल.

शेवटी, श्रीएकनाथमहाराजांनी आपल्या ग्रंथरचनेचा जो हेतू सांगितला आहे तो त्यांच्याच शब्दांत आपण पाहू. त्यामुळे या ग्रंथाकडे पाहण्याची योग्य दृष्टी आपल्याला प्राप्त होईल. ते म्हणतात :

**मुख्यत्वें ग्रंथीचें राखावें प्रेम । प्रतिपदीं प्रतिपादावें परब्रह्म ।**
**हाचि कवित्वाचा कवित्वधर्म । श्रोते सप्रेम सुखी होती ॥**

प्रभू रामचंद्रांच्या या दिव्यभव्य चरित्र वाचनाने व श्रवणाने वाचक-श्रोत्यांच्या अंतःकरणात श्रीराममूर्ती ठसो व त्यांचे जीवन उजळून निघो हीच परब्रह्मस्वरूप श्रीरघुनंदनाचे चरणी प्रार्थना करून एकाजनार्दनाची ही वाङ्-मयसेवा पूर्ण करतो.

फाल्गुन शुद्ध ११, शके १९०१ **धुंडामहाराज देगलूरकर**

## अनुक्रमणिका



संतश्रेष्ठ श्रीएकनाथमहाराज



संतश्रेष्ठ श्रीएकनाथमहाराज समाधी दर्शन



नाथभक्त श्रीगावबाजी समाधी दर्शन

## अनुक्रमणिका

**श्रीभावार्थरामायण संपादन समिती**

# कार्यवृत्तांत

**म**हाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर महाराष्ट्र शासनाने अवलंबिलेल्या, जुने संतवाङ्मय संपादून व प्रकाशित करून माफक किंमतीत ते बहुजन समाजास उपलब्ध करून देण्याच्या धोरणानुसार 'ज्ञानेश्वरी', 'तुकारामाची गाथा', 'नामदेवाचे अभंग', 'श्री एकनाथी भागवत' आदी ग्रंथ संपादून प्रकाशित केले आहेत. याच धोरणानुसार व धर्तीवर एकनाथमहाराजांचे 'श्रीभावार्थरामायण' शासनाने संपादून प्रकाशित करावे अशी विनंती श्रीएकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद या संस्थेने जून १९६० मध्ये शासनास केली होती. ही विनंती लक्षात घेऊन शासनाने आपल्या दिनांक ५ डिसेंबर १९६० च्या आदेशाने 'श्रीभावार्थरामायणा' ची संशोधित प्रत संपादित करण्यासाठी पुढील तज्ज्ञांची समिती नियुक्त केली :

(१) श्री. बळवंत गिरिराव घाटे, औरंगाबाद (अध्यक्ष); (२) प्रा. शंकर वामन दांडेकर, पुणे (सदस्य); (३) श्री. धुंडामहाराज देगलूरकर, देगलूर (सदस्य); (४) डॉ. श्रीधर रंगनाथ कुळकर्णी, हैदराबाद (सदस्य) व (५) श्री. नरहर शेषराव पोहनेरकर (चिटणीस).

पुढे, कार्याच्या गरजेनुसार समितीने ऑक्टोबर १९६३ पासून प्रा. वि. पां. देऊळगांवकर, गुलबर्गा यांना समितीचे स्वीकृत सदस्य करून घेतले.

२. शासन निर्णयानुसार समितीने पुढील दिशेने काम करावयाचे होते :

अ) श्रीएकनाथांच्या प्रकाशित प्रतींची पाहणी व तपासणी करणे, (आ) श्रीभावार्थरामायणाची चिकित्सक व अधिकृत प्रत तयार करून शासनास देणे आणि (इ) आवश्यक त्याप्रमाणे संशोधन व प्रकाशनकार्याविषयी योग्य त्या सूचना शासनास करणे.

३. कार्यारंभ म्हणून समितीने आपली पहिली बैठक दिनांक ४ फेब्रुवारी १९६१ ला पैठण येथील श्रीएकनाथमहाराजांच्या समाधि मंदिरात घेतली. यावेळी समितीपुढे 'श्रीभावार्थरामायणा' ची पुढील चार प्रकाशित संस्करणे उपलब्ध होती :

(१) श्री. भा. शं. देवस्थळी संपादित 'सुबोध प्रत' (सन १८८८), (२) श्री. य. वि. देवशास्त्री संपादित 'इंदुप्रकाश प्रत' (सन १९१०), (३) श्री. भा. शं. देवस्थळी संपादित 'निर्णयसागर प्रत' (सन १९१०) आणि (४) श्री. भा. शं. घारपुरे संपादित 'घारपुरे प्रत' (सन १९५७).

४. पण केवळ या प्रकाशित प्रतींवरच संतुष्ट न राहता समितीने महाराष्ट्रातील अभ्यासकांना व अशा कार्यात आस्था असणाऱ्या सज्जनांना वृत्तपत्रांतून आवाहन करून त्यांच्या संग्रही असलेल्या 'रामायणा' च्या हस्तलिखित प्रतीही मिळविल्या. यात सुमारे एक वर्षाचा काळ लोटला तरी महाराष्ट्राच्या विविध भागांतून या आवाहनास चांगला प्रतिसाद मिळाला व समितीस अकरा सज्जनांनी आपल्याकडची महत्त्वाची हस्तलिखिते उपलब्ध करून दिली. याशिवाय, धुळे येथील राजवाडे संशोधन मंडळ व तंजावर येथील

अनुक्रमणिका

सरस्वती महाल ग्रंथालयातूनही समितीने उपलब्ध हस्तलिखिते नकलून मिळविली. या सर्व हस्तलिखितांच्या शेवटच्या पृष्ठांची छायाचित्रे समितीने घेतली असून ती प्रस्तुत ग्रंथात अंतर्भूत केली आहेत.

५. समितीच्या संपादनकार्याची रूपरेषा पुढीलप्रमाणे ठरविण्यात आली होती :

> 'संपादनसंहिता सिद्ध करण्यासाठी सभासदांनी एकेक कांड स्वतंत्रपणे निवडावयाचे. प्रकाशित प्रतींतून व उपलब्ध अशा हस्तलिखितांतून त्या त्या कांडांची पृष्ठे घ्यावयाची. संपादन करताना आणि शब्दनिश्चिती करताना नाथसाहित्य व नाथकालीन भाषाविशेष यांची जपणूक काटेकोरपणे करीत करीत प्रत्येक प्रकाशित प्रतीतून व हस्तलिखितातून प्रत्येक ओवीचे वाचन करावयाचे व आपल्या विवेकबुद्धीने पाठ निश्चित करून ते कांड संपादित म्हणून लिहून काढावयाचे. इतर प्रतींतील शब्द पाठभेद म्हणून तळटिपांतून घ्यावयाचे. जेव्हा टिपांचे प्रमाण फारच वाढू लागले तेव्हा समितीने असा निर्णय केला की, रूपभेद असणारे शब्द तळटिपांतून देण्यापेक्षा अर्थभेद असणारे शब्दच तळटिपांतून घ्यावयाचे. अशा प्रकारे सभासदांचे संहितासिद्धीचे कार्य चालू असतानाच समितीच्या सभा चार महिन्यांच्या अंतराने घेण्यात येत. त्या सभांतून प्रत्येक सभासदाच्या संहिता प्रतीच्या प्रत्येक ओवीचे वाचन होई. प्रत्येक शब्द व त्याचे स्वरूप यावर चर्चा होई आणि एकमताने सिद्धसंहिता तयार होई. सभासदांच्या संहितासिद्ध स्वीकृत शब्दात अशा वेळी बदलही करण्यात येई व तो शब्द तळटिपांत जाऊन क्वचित तळटिपेतील शब्दही अंतिम वाचनात संहितेत घेण्यात येई. संतसाहित्याच्या सेवेत जीवन व्यतीत केलेले श्री. धुंडामहाराज देगलूरकर आणि प्रा. शं. वा. तथा मामासाहेब दांडेकर यांच्या अंतिम निर्णयाने वादग्रस्त शब्दांची सिद्धसंहितेत निवड होई. म्हणजे शक्य तेवढ्या प्रकारे संहितेची प्रत निर्दोष तयार व्हावी ही समितीची दृष्टी होती आणि त्याप्रमाणेच संपूर्ण ग्रंथाची संपादित प्रत तयार झाली.'

अशा प्रकारे, संपादित प्रत संपूर्णतया साक्षेपी चर्चेतून सिद्ध झालेली आहे. दिनांक ४ फेब्रुवारी १९६१ ला समितीची पहिली सभा पैठण येथे श्रीएकनाथांच्या समाधि मंदिरात भरल्यापासून ६ मार्च १९६९ पर्यंत हे संपादनकार्य चालू होते. या कालावधीत समितीच्या एकूण वीस सभा झाल्या.

६. 'श्रीभावार्थरामायणा' ची शासकीय आवृत्ती प्रकाशित होणार ही गोष्ट समितीच्या वतीने सहकार्याच्या आवाहनासह वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाल्यामुळे अनेक अभ्यासकांनी जाहीर रीतीने आणि व्यक्तिशः पत्रे पाठवून संपादनाबाबत सूचना केल्या. अनेक वादग्रस्त बाबी विचारासाठी समितीपुढे आल्या व त्यांवर विचार व निर्णय समितीने केला. त्यांपैकी प्रमुख म्हणजे या ग्रंथाच्या 'उत्तरकांडा' संबंधी सर्व साधकबाधक चर्चा होऊन ते नाथांचे वा गावबाजींचेसुद्धा नाही हे समितीने एकमताने मान्य केले. प्रस्तुत प्रकाशनात त्याचा अंतर्भाव करू नये असाही विचार एक पुढे आला. परंतु, रामायण ग्रंथासंबंधी सप्तकांड रामायण ही लोकसमजूत विचारात घेता 'श्रीभावार्थरामायणा' च्या सिद्धसंहितेत उत्तरकांडाचे नाथकर्तृत्व निर्णायकपणे नाकारूनसुद्धा लोकसमजुतीच्या आदरासाठी 'परिशिष्ट' स्वरूपात का असेना एखादे 'उत्तरकांड' समाविष्ट करण्यात यावे असे समितीस वाटले. आज मुद्रित व हस्तलिखित स्वरूपात हाताशी असलेल्या प्रतींपैकी कंदकूर्ती येथील प्रतीच्या हस्तलिखितातील 'उत्तरकांड' प्रथममुद्रित निर्णयसागर प्रतीतील उत्तरकांडाशी समन्वय साधणारे असल्याने तेच 'परिशिष्ट' म्हणून प्रस्तुत ग्रंथात समाविष्ट करण्यात आले. नाथांनी बहुजन समाजासाठी लिहिलेल्या या कथात्मक ग्रंथात लोकविचारांचा आदर ठेवून समितीने वरील निर्णय घेतला.

अनुक्रमणिका

७. अशा प्रकारे १९६० मध्ये प्रारंभ झालेले 'श्रीभावार्थरामायणा' च्या संशोधनपूर्वक संपादनाचे काम १९६९ च्या अखेरीस संपले. पुढे या संशोधित-संपादित प्रतीची शुद्ध व स्वच्छ मुद्रण प्रत तयार करण्यात आली आणि मुद्रणाच्या नेहमीच्या अडचणी पार करून तयार झालेली ही प्रत आज १९८० मध्ये प्रकाशनार्थ सिद्ध झाली आहे. सुमारे वीस वर्षांचा हा काळ म्हणजे तसा दीर्घच म्हटला पाहिजे. तरीही, 'श्रीभावार्थरामायणा' च्या रूपाने असलेल्या महाराष्ट्राच्या महत्त्वाच्या धार्मिक-सांस्कृतिक ग्रंथाची संशोधित प्रत प्रथमच तयार करण्याची संधी महाराष्ट्र शासनाने समितीस विश्वासपूर्वक प्राप्त करून दिली याबद्दल समितीस धन्यता वाटते व समिती त्याबद्दल शासनाची ऋणी आहे.

८. या ग्रंथाचे दुसरे एक वैशिष्ट्यही लक्षात घेणे योग्य आहे. नाथांचा हा शेवटचा महाग्रंथ व तो बहुजन समाजासाठी कथात्मक असा त्यांनी लिहिला. अर्थात याचा वाचक प्रामुख्याने बहुजन समाजच असणार व आहे. या दृष्टीने नाथांच्या जीवनाचा पूर्णविराम म्हणजे प्रस्तुतचा ग्रंथ. बहुजन समाजाला यातील कथाप्रसंग आणि उपदेश महत्त्वाचा वाटतो म्हणूनच या ग्रंथाला पुन्हा संशोधनाचे अनुमान व तर्काचे पागोरे जोडण्यापेक्षा तो शक्यतो शुद्ध स्वरूपात जनताजनार्दनापुढे ठेवणे हेच समितीचे उद्दिष्ट होते. त्या बाबतीत समितीने शक्य तेवढा प्रयत्न करून शासनाचा आदेश पाळला आहे. आता अभ्यासकांनी व व्यासंगी विद्वानांनीच या प्रयत्नाचे मूल्यमापन करावयाचे आहे.

अखेरीस, ज्या व्यक्ती व संस्था यांनी आपल्याकडील हस्तलिखित प्रती समितीस उपलब्ध करून दिल्या, सूचना व सल्ला वेळोवेळी देऊन समितीशी सहकार्य केले त्या सर्वांची समिती आभारी आहे. तसेच, या ग्रंथाची स्वच्छ व शुद्ध मुद्रण प्रत तयार करण्यास ज्यांनी परिश्रम घेतले त्यांची, त्याचप्रमाणे शेवटी ती इतक्या सुबक स्वरूपात मुद्रित करून दिली ते शासकीय मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन विभागाचे संचालक व मुंबईच्या शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाचे व्यवस्थापक व त्यांचा संबंधित कर्मचारीवृंद या सर्वांचीही समिती नितांत आभारी आहे.

आज नाथषष्ठीच्या पवित्र दिवशी शासनाच्या सहकार्याने व जनतेच्या पाठराखणीने नाथांचा हा ग्रंथ समिती त्यांच्या चरणी विनम्र भावनेने समर्पण करीत आहे.

**ब. गि. घाटे**
अध्यक्ष

**न. शे. पोहनेरकर**
चिटणीस

श्रीभावार्थरामायण संपादन समिती

अनुक्रमणिका

# हस्तलिखिते : संपादनकार्य

**सं**पादन समिती स्थापन झाल्यानंतर 'श्रीभावार्थरामायण' या ग्रंथाच्या हस्तलिखितांसाठी संपूर्ण एक वर्ष पत्रव्यवहार, प्रवास, परिचितांची मध्यस्थी, प्रत्यक्ष भेटीगाठी अशा अनेक स्वरूपांत मराठवाड्यात शोध घेतला. ग्रंथ मोठा असल्याने संपूर्ण व सलग अशी हस्तलिखिते थोडी पण महत्त्वाची उपलब्ध झाली. समर्थ वाग्देवता मंदिर सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, सरस्वती महाल ग्रंथालय, तंजावर, अनेक रामदासी व वारकरी मठ यांतून शोध घेतला. बहुतेक ठिकाणी त्रुटित आणि काही काही कांडे उपलब्ध झाली. श्री. ना. ब. जोशी, विजापूर, श्री. यादवराव कंदकूर्तीकर (आं. प्र.) यांनी केवळ पत्रव्यवहाराने आस्थेवाईकपणा दाखवून हस्तलिखिते पाठविली. हस्तलिखित ग्रंथाचे असे लेखन वर्षानुवर्षे चालत असल्याचे दिसते. त्यातही चातुर्मासासारख्या पर्वकाळात वाचनपठनासाठी म्हणून भाविक अशा प्रकारच्या हस्तलिखितांतून एखाद दुसरे कांड घेऊन जात. परंतु बरेच वेळा परत करण्यात मात्र हयगय होई. म्हणूनही काही काही ठिकाणी पोथी अपूर्ण स्वरूपात असे. ज्यांनी ज्यांनी अशी हस्तलिखिते मिळवून दिली आणि प्रत्यक्ष हस्तगत केली त्यांचा नामनिर्देश त्या त्या प्रतीच्या परिचयात दिलेला आहे. खेरीज उत्तरकांडाच्या श्रीएकनाथ व श्रीगावबा या दोघांच्याही रचनेबाबत समितीला संशय होताच. त्याही दृष्टीने उपलब्ध होणारी व झालेली हस्तलिखिते बहुमोलाची ठरली आणि मूळ श्रीभावार्थरामायण या ग्रंथाच्या रचनेशी उत्तरकांडाचा संबंध नाही हा निर्णय समितीला घेता आला.

उत्तरकांडासंबंधी जी माहिती व हस्तलिखिते उपलब्ध झाली त्यांचा सारांश असा :

१. मुक्तेश्वरकृत .. .. .. उत्तरकांड .. प्रसंग १७

२. मुंगी मठ प्रत .. .. .. उत्तरकांड .. प्रसंग १८

३. अंबेजोगाई प्रत——या प्रतीत उत्तरकांड नाही. ग्रंथ युद्धकांडालाच समाप्त झाला आहे.

४. तंजावर प्रत—१ .. .. .. उत्तरकांड .. प्रसंग १६

५. तंजावर प्रत—२ .. .. .. उत्तरकांड .. प्रसंग १६

६. दैठणे प्रत .. .. .. उत्तरकांड .. प्रसंग १७

७. कंदकूर्ती प्रत .. .. .. उत्तरकांड .. प्रसंग ७८

८. तुळजापूर प्रत .. .. .. उत्तरकांड .. प्रसंग ६०

## मुद्रित प्रती

९. मुक्तेश्वरकृत भावार्थरामायणाचे उत्तरकांड (सं. प्रा. वसंत स. जोशी) .. प्रसंग १८

१०. अनाम कविकृत उत्तरकांड (प्रा. पां. ना. कुळकर्णी प्रतिष्ठान, १९५७)

११. निर्णयसागर प्रत .. .. .. उत्तरकांड .. अध्याय ७७

✲✲✲✲

अनुक्रमणिका

**बोरी प्रत**

उस्मानाबाद—धाराशिव—जिल्ह्यातील लातूर पेठेपासून १५-२० मैल अंतरावरील बोरी या गावी श्री. विठ्ठल सदाशिव माळी वाघमारे यांच्या संग्रहातील ही प्रत. यातील कांडवार कालोल्लेख पुढीलप्रमाणे :

**१. बालकांड. —— शके १७८६ रक्ताक्षी नाम संवत्सरे फाल्गुन शुध १ तद्दिने संपूर्णमस्तु ॥ हस्त अक्षर गोपाळ बळवंत जोसी व राघो बळवंत जोसी मौजें उपळं (माकडाचं) प्रगणे ढोकी याचे असे.**

**२. अयोध्याकांड. —— शके १७८७ क्रोधन नामाद्वे चैत्र शुद्ध ५ तद्दिने संपूर्णमस्तु (हस्ताक्षरनिर्देश वरीलप्रमाणेच).**

**३. अरण्यकांड. —— शके १७८७ क्रोधन नाम संवत्सरे कार्तिक शुद्ध प्रतिपदा ते दिवसीं संपूर्ण. हस्त अक्षर गोपाळ बळवंत व राघो बळवंत ज्योतिषी आडनांव पांचपिपळें मौजे उपळं प्रगणे ढोकी तालुका बारसी.**

**४. किष्किधाकांड. —— शके १७८६ क्रोधन नाम संवत्सरे वैशाख व. २ ते दिनी समाप्त. हस्ताक्षर गोपाळ बळवंत व कनिष्ठ भ्रातृ राघो बळवंत जोशी आडनांव पांचपिंपळें.**

**५. सुंदरकांड. —— शके १७८७ क्रोधन नामाद्वे आश्विन कृष्ण १. हस्ताक्षर गोपाळ बळवंत व राघो बळवंत.**

**कागद व लेखनही सामान्यच.**

✼✼✼✼

**गणेशवाडी (हिंपळगांव) प्रत**

उस्मानाबाद जिल्ह्यातील लातूरपासून १५-२० मैलांवर असलेल्या हिंपळगांव येथील श्री. पंढरीनाथराव तुळशीराम शेळके यांच्याकडील ही पोथी. तशी लेखनात सामान्यच पण पूर्ण. काल व लेखकाची नोंद नाही.

✼✼✼✼

**विजापूर प्रत** संक्षेप 'वि.'

श्रीभावार्थरामायण संपादन समितीने आपल्या संपादन कार्यासाठी जेव्हा महाराष्ट्राला साद घातली आणि हस्तलिखितांची साह्यता करण्याची विनंती केली तेव्हा विजापूरचे श्री. नारायण बळवंत जोशी यांनी आपल्या संग्रहातील दोनच का होईनात पण कांडांची आस्थापूर्वक मागणी पूर्ण केली याबद्दल त्यांचा विशेष उल्लेख करणे प्राप्त.

अनुक्रमणिका

लेखक व लेखनकालाची नोंद नाही. संस्कृत श्लोकांचाही अभाव आहे. मात्र 'कांड' या शब्दाऐवजी 'कंड' असे लेखन आहे. सुंदरकांड पूर्ण तर युद्धकांड अपूर्ण.

****

**तलवडे प्रत** संक्षेप 'त.'

बीड जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यात तलवड या गावी वारकरी परंपरेचे एक शिवराम यांचा मठ आहे. तेथे श्रीभावार्थरामायणाची त्रुटित असलेली प्रत त्यावेळी तेथे असलेले तहसीलदार श्री. शंकरराव पोहनेरकर यांच्या सहकार्याने मिळाली. प्रत जुनी. कागद दौलताबादी. काल व लेखकाचा निर्देश नाही.

**१. बाळकांड—— आकार २६ × १५ सें. मी. 'अध्याय' याऐवजीं 'प्रसंग' असा निर्देश.**

**२. अयोध्याकांड.**

कालनिर्देश कुठेच नाही व लेखकानेही आपला उल्लेख केलेला नाही. एकनाथ परंपरेतील हे हस्तलिखित असल्याने महत्त्वाचे. शके १६०० च्या उत्तरार्धातील लेखन वाटते.

****


**अंबेजोगाई प्रत** संक्षेप 'अं.' व 'जो.'

प्रस्तुतची प्रत श्री. प्रभाकर शंकरराव वारकरी, अंबेजोगाई यांचेकडील असून ती श्री. देवीदास बापूदेव धर्माधिकारी परळीकर यांच्या प्रयत्नाने मिळाली. पोथी संपूर्ण आहे. आकार १३½" × ७¾". कागद चिवट दौलताबादी. लेखन स्पष्ट व सुवाच्य. पृष्ठसंख्या प्रसंगवार वेगवेगळी. अध्यायाऐवजी 'प्रसंग' असा शब्द लिहिलेला आहे. वरील पृष्ठावर 'भावार्थरामायण' असा उल्लेख असला तरी पृष्ठावर मात्र 'प्राकृत रामायण' असे लिहिलेले आहे. या हस्तलिखितांत 'उत्तरकांड' नाही. सहा कांडांची ही पूर्ण प्रत. कांडवार समाप्तिलेख असे :

**१. बालकांड. —— शके १७८८ क्षेय नाम संवत्सरे चेईत्र कृष्ण १३ ते दिवसी समाप्त.**

**२. अयोध्याकांड. —— लेखनकाल निर्देश नाही.**

अनुक्रमणिका



३. **अरण्यकांड. — प्राचीन प्रतीवरला उतार शके १५६२ विक्रम नाम संवत्सेरे माघ वद्य ५ गुरुवार तद्दिनी समाप्त. हाली शके १७८८ क्षेय नाम संवत्सरे भाद्रपद शुक्ल ८ ईदुवारी श्रीरामकृपे संपुर्ण.**

४. **किष्किंधाकांड. — कालोल्लेख नाही.**

५. **सुंदरकांड. — शके १७८९ प्रभव नाम संवत्सरे पऊष शुक्ल ६ सौम्यवासरे ते दिवसीं सुंदरकांड समाप्त.**

हस्त अक्षर सखाराम शेषाद्रि पोतेदार मौजे वरूड वगैरे प्रगणे केज धारूर ह्यांनी लिहिले असे. हा ग्रंथ सांब हिंपळगांवकर यांनी हरिभक्तिपठनार्थ लिहविला असे सन १२७८ फसली.

✼✼✼✼

**तुळजापूर प्रत** संक्षेप 'तु.'

श्रीक्षेत्र तुळजापूर येथील श्री. तांबुळवाडीकर वकील यांच्याकडे असलेली ही प्रत स्थानिक सुहृद व संशोधक श्री. क. भ. प्रयागगुरुजी यांच्या साह्याने हस्तगत झाली. लेखनात शीथिलता आहे. मात्र 'अध्याय' याऐवजी 'प्रसंग' हा शब्द सर्वत्र लिहिलेला आहे. आकार १२ × ८¼". अक्षर ठसठशीत आहे. पहिल्या पाच कांडांच्या शेवटी लेखनकालाची नोंद नाही.

✼✼✼✼


**दैठणे प्रत** संक्षेप 'दै.'

परभणी जिल्ह्यातील ठाकुरबुवाचे दैठणे या गावी श्री. खंडेराव कुळकर्णी जोशी यांच्या संग्रहातील हे हस्तलिखित श्री. गोपाळराव टाकळकर वकील आणि कै. भगवानराव धोंड या परभणीतील दोन स्नेह्यांच्या

अनुक्रमणिका

प्रयत्नाने मिळाले. प्रतीचा कागद दौलताबादी नाही, परंतु जाड व निळसर रंगाचा आहे. अक्षर सुवाच्य. आकार १२½” × ८”.

**१. अरण्यकांड. — शके १७८५ ज्येष्ठ शु. ७ भौमवासर.**



**२. सुंदरकांड. — ‘कांड’ हा शब्द ‘कंड’ असा सर्वत्र लिहिलेला आहे. प्रत्येक पृष्ठाच्या समासातसुद्धा सुंदर ‘कंड’ असेच लेखन. स्वस्ति श्रीनृपशालिवाहन शके १७८६ रुधिरोद्गारि नाम संवत्सरे फाल्गुण वद्ये २ बुधवासरे ते दिनी समाप्त.**

✲✲✲✲

**मुंगी (पैठण) प्रत** संक्षेप ‘मुं.’


पैठणच्या जवळच असलेल्या मुंगी या गावी श्री. वसंतराव आणि श्री. दादासाहेब मुंगीकर यांच्या संग्रहातील काही कांडे श्री. वाळासाहेब पाटील, पैठण यांच्या प्रयत्नाने मिळाली. प्रत सलग नसली व काही कांडेच उपलब्ध झाली तरी संपादनात त्यांचा खूपच उपयोग झाला.

**१. बाळकांड. — आकार १३½” × ७½”. शके १७८८ क्षये नाम संवत्सरे चैत्र कृष्ण १३ ते दिवसीं समाप्त.**

**बाळकांड. — शके १४१८ परिधावी नाम संवत्सर फाल्गुन शुध्द ९ तद्दिनी समाप्त.**

**२. अयोध्याकांड. — आकार १३½” × ७½”. माघ मास गुरुपौर्णिमेसी गुरुपुष्य नक्षत्रेसी पूर्णतेसी परिपूर्ण.**

**३. अरण्यकांड. — शके १७१५ प्रमाथी नाम संवत्सरे उत्तरायणे चैत्र शुक्ल नवम्यां तद्दिने समाप्तं ॥**



**४. किष्किंधाकांड. — श्रीशालिवाहन शके १७१५ प्रमादि नाम संवत्सरे अश्विन कृष्ण पंचम्यां सौम्यवासर पुस्तकं समाप्त.**


वेगवेगळी हस्ताक्षरे व लेखन असले तरी पैठणच्या पंचक्रोशीतील लेखनामुळे ही हस्तलिखिते महत्त्वाची ठरली.

✻✻✻✻

**कंदकूर्ती प्रत** संक्षेप 'कं.'

जुने इंदूर बोधन व आजच्या निजामाबाद जिल्ह्यात (आंध्र प्रदेश) येथील साक्षेपी तरुण संशोधक श्री. यादवराव कंदकूर्तीकर यांनी कंदकूर्ती येथील श्रीरामदासी मठातून प्रस्तुतचे हस्तलिखित मिळवून दिले. पोथीचा आकार ११½" × ५½". प्रतीचे लेखक वेगवेगळे असले तरी प्रत पूर्ण आहे. क्वचित आंध्र लेखनवैशिष्ट्याचा आढळ होत असला तरी प्रतलेखक साक्षेपी दिसतात. कांडांचे क्रमवार समाप्तिलेख पुढीलप्रमाणे :

**१. बाळकांड. — शके १६९० सर्वधारी नाम संवत्सरे आशाढ मासे वद्यपक्षे तृतीयायां भानुवासरे धनिष्ठा नक्षत्रे दिवा अभिजित सुमुहूर्ते शुभ वेळायां समाप्ताः हस्ताक्षर राघो अनंत परंडेकर तत्सूनु नाम्ने भगवंतेन लिखितं प्रस्तुत वास्तव्य पेठ भास्कर नगर कसबे चिटगोपे ग्रामे लेखन समाप्त.**




२. अयोध्याकांड. — शके १७०२ शार्वरी नाम संवत्सरे दक्षिणायने शरदृतौ अश्वीजमासे शुक्ल पक्षे त्रयोदश्यां सौम्यवासरे दीवा अभिजितू काले उत्तराभाद्रपदा नक्षत्रे तद्दिनी आयोध्याकांड लेखन पेठ भास्कर नगर कसबे चीटगोपें सरकार हवेली हस्ताक्षर अनंत सूनुना रघुनाथेंन श्रद्धाया लिखितं पुस्तकं स्वार्थे वा संपादयित्वा.

यापुढे वेगळ्या हस्ताक्षरांत कंदकूर्तीकर श्रीरामात्मजेनच शोभने वत्सरे पठितं सम्यक बाणाष्टाष्ट ॥ गजाननेन पठितं फाल्गुने कृष्ण पक्षे बाणाष्टाष्ट रसाशके ॥

३. अरण्यकांड. —— समाप्ती नेहमीचीच. कालनिर्देश नाही.

४. किष्किंधाकांड. —— स्वस्ती श्रीनृपशालिवाहन षक १६९३ खर नाम संवत्सर उत्तराद्वे शषीऋतौ सहवसंत ऋतौ फाल्गुण कृष्ण पक्षे दशम्यां स्छीर वासरे माध्यान अभिजित मुहूर्ते किष्किंधाकांड लेखन पेठ भास्कर प ॥ चिटगोपे ग्रामी पुस्तकेन राघो अनंतस्य स्वहस्तेन लीखीत्वा ॥ या समाप्तिलेखानंतर पुढे वेगळ्या पण बोरुच्याच बारीक लेखणीने असे लिहिलेले आहे, श्रीरामस्यचरितं चित्त शुध्दये पपाठ वंजरा गोदा संगमस्यांतिके तदा बाणाष्टाष्ट रसाशाके फाल्गुने कृष्णपक्षेच दशम्यां चंद्रवासरे पठणं रामभक्तित : ॥




५. सुंदरकांड. —— शके १६९७ मन्मथ नाम संवत्सरे शरद्रतौ कार्तिक मासे कृष्ण पक्षे द्वीतीयायां गुरूवासरे त्रितीय प्रहरे सुमूहुर्ते शुभवेळायां तद्दिनी पुस्तक समाप्ताः ॥ पुस्तक ॥ सदानंद गुंडो कुळकर्णी मौजे मामडगी परगणे हसनाबाद ॥ हस्ताक्षर राघो बाबुरा (व) भीशे कुळकर्णी मौजे

अनुक्रमणिका

**कोडवली सन्नीध सप्तऋषी हाली वस्ती पेठ भास्कर नगर कसबे चिटगोपे सरकार बेदर ॥ ('सुंदरकांड' याऐवजी मधूनमधून 'सौंदर्यकांड' असेही लिहिलेले आहे).**

**पैठण प्रत :** संक्षेप 'पै.'

चार कांडे पूर्ण असलेली ही पोथी श्री. बाळासाहेब पाटील, पैठण यांच्या हस्तलिखित संग्रहातून उपलब्ध झाली. ही पोथी त्रुटित जरी असली तरी स्थलकालमहात्म्याने महत्त्वाची ठरते. अक्षर सुवाच्य. कागद दौलताबादी, परंतु पृष्ठे जीर्ण. आरंभी व शेवटच्या पृष्ठावर 'हे पोथी अनपूर्णाराम याची असे' असे लिहिलेले दिसते.



**१. बाळकांड. — शके १६७२ प्रमोदि नाम संवत्सरे माघमासे कृष्णपक्षे प्रतिपदा गुरुवासर तद्दिने प्रतिष्ठान गोदावरि तीर नागतीर्थ सन्निधौ बाळकांड लेखन समाप्तिमगत.**

**२. अयोध्याकांड. —— सके १६. . . . . नाम संवत्सरे पौष मासे शुक्ल पक्षे द्वितीया बुधवार.**

**३. अरण्यकांड. —— सके १६७२ प्रमोद नाम संवत्सरे फाल्गुन मासे शुक्ल पक्षे द्वादशी भौमवासरे तद्दिने प्रतिष्ठान गोदावरी तीर नागतीर्थ संनिधौ समाप्तिमगत.**


**४. किष्किंधाकांड. —— शके १६७३ प्रजापती नाम संवत्सरे चैत्र मासे शुक्ल पक्षे दशमी सोमवासर तद्दिने प्रतिष्ठान गोदावरी तीर नागतीर्थ सन्निधौ किष्किंधाकांड समाप्तिमगतम्.**

पैठण प्रतीच्या वरखाली लाकडी फळ्या होत्या. त्यापैकी ग्रंथप्रारंभीच्या फळीवर हाताने काढलेले श्रीरामपंचायतनाचे एक चित्र रेखाटलेले आहे. ग्रंथप्रारंभी श्रीराम पूजेसाठी म्हणून याचा वापर होई. हळदकुंकू आणि फुले-तुळशी यावर वाहिली जात. सव्वादोनशे वर्षांपूर्वीची ही रेखाचित्रकला नमुन्यादाखल या ग्रंथाच्या वेष्टनावर चित्ररूपाने दिली आहे.

****

**तंजावर प्रत** संक्षेप 'तं.'


प्राचीन ग्रंथांचे संपादन करताना तंजावर येथील महाराजा सरफोजीराजे यांनी संग्रहित केलेल्या सरस्वती महालातील बहुमोल हस्तलिखितांचा मागोवा घेणे अपरिहार्य आहे. श्रीभावार्थरामायणाच्या संपादनकार्यातसुद्धा प्रस्तुत ग्रंथ संग्रहाचा बहुमोल लाभ झाला याबद्दल तेथील ग्रंथपाल आणि लेखनिक यांचा ऋणनिर्देश आवश्यक आहे.




**१. बाळकांड. — शेका पंधरासे येक्यांसी आणी सत्तरा । पिंगळा नाम संवत्सरीं अवधारा । फाळगुण मास त्रितिय प्रहरा ग्रंथलेखना समाप्ती ॥ (क्र. १०३८).**

**२. अयोध्याकांड. — लिख्यते भास्कर बनाजी कुळकर्णी होनवाडकर ॥ भाद्रपद मासे कृष्ण पक्षे कीलक नाम संवत्सरे चतुर्थी सौम्यवासरे भरणी नक्षत्रे श्रीमायोरनाथ अभयांबिका संनिधौ कावेरी दक्षण तीरे ग्रंथ समाप्त ॥ (क्र. १०२७).**

**३. अरण्यकांड. — कीलक नाम संवत्सरे दक्षिणायने आश्विन मासे कृष्ण पक्षे आश्लेषा नक्षत्रे तिथी नवमी सौम्यवासरे कावेरी दक्षणतीरे श्रीमयोरनाथ अभयांबा सन्निधौ ग्रंथ समाप्ता ॥ (क्र. १०२८).**



अनुक्रमणिका



किष्किं०का०

रश्रीवामनस्वामिसांप्रदाई ॥ ग्रंथसमाप्तः ॥ ॥ ॥छ॥ ॥छ॥
॥श्रीराम॥ ॥श्रीराम॥ ॥श्रीराम॥ ॥श्रीराम॥ ॥श्रीराम॥ ॥श्रीराम॥

४. किष्किंधाकांड. — शकें सोळासें यकावन कीलक नाम संवत्सर कार्तिक वद्य येकादशी । मंदवासरे । चित्रा नक्षत्रे कावेरी दक्षण तीरे मायूर क्षेत्रे ग्रंथ रामायण किष्किंदाकांड लिख्यते भास्कर बनाजी कुलकर्णी होनवाडकर श्रीवामन स्वामि सांप्रदाई ॥ (क्र. १०२९).




५. सुंदरकांड. — श्री मछके १५८७ क्रोधी नाम संवत्सरे आषाढ शुद्ध एकादशी, शुक्रवारे त श्रीमहालक्ष्मीसन्निध करवीर कोलहापुरस्छ पौराणिक भट्टं भट्टेन लिखितं . . . . . . . . र निवासेन गोविंदाख्यस्य सूनुना भट्टं भट्टेन लिखितं.

****

**टीप.** —– ‘युद्धकांड’ व ‘उत्तरकांड’ यांच्या हस्तलिखितांची छायाचित्रे व कांडसमाप्तिलेख या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडात समाविष्ट केले आहेत.

❁




अनुक्रमणिका

# बालकांड

## प्रसंग पहिला

## दशरथ विजयाभिगमन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

['रामरक्षा स्तोत्र', श्लोक] **चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम् । एकैकमक्षरं पुंसां महापातक नाशनम् ॥ १ ॥**
[नि. इं. घा. सु. या प्रतींत या श्लोकापूर्वी पुढील श्लोक आला आहे :—
'जातो वंशे रघूणां मुनिवरवचनात्ताटकां ताडयित्वा । कृत्वा पुण्यामहल्यां त्रुटितहरधनुर्मैथिली वल्लभोऽभूत् ॥
प्राप्यायोध्यां नियोगात्पितुरटविमगान्नाशयित्वा च वालिम् । बध्वाऽब्धिं रामचंद्रो दलितशतमुखः सीतया युज्यमानः ॥]

ॐ नमो अनादि आद्या । वेद वेदान्त वेद्या । [इं. घा. 'वंद्य'.] वंद्यांहि परम वंद्या । स्वसंवेद्या श्रीगणेशा ॥ १ ॥

**तुझें निर्धारितां रूप । केवल अरूपाचें स्वरूप । तेथ अवेव कल्पितां अमूप । तंव कल्पनेचा लोप स्वरूपीं तुझ्या ॥ २ ॥**

**यालागीं जैसा** [घा. नि. इं. 'जैसा असिसि तैसियासि'; जो. हे पद नाही.] **आहासि तैसियासि । नमन** [भा. 'निरवकासी सावकासी'; मु. जो. घा. कं. 'निरवकाशे सावकाशीं'; तु. नि. 'साकार निराकारासि'; तं. 'निरवकाश सावकाशीं'; त. 'निराकारे आकारासि'.] **निराकारें साकारासि । तंव अंगत्व मुकलें अंगासि । भज्य भजकासि अद्वैत ॥**

**ज्ञानतेजें सतेज फरशु ।** [भा. /१ 'भक्ति वैराग्य अंकुशु'.] **नित्यस्मरणाचा अंकुशु । आनंद मोदकाचा सुरसु । मुखीं** [भा. /१ 'सुरसु घास'.] **सुसी घासु निजभक्तां ॥ ४ ॥**

**ऐसें आइकोनि स्तवन । संतोषला गजानन ।** [भा. /१ 'माझे वदनि वसोनि वदन'; नि. इं. घा. 'माझे वसवोनिया वदन'.] **माझां वदनीं वसुनिवदन । वक्ता वचन स्वयें जाला ॥ ५ ॥**

**ऐसा जाहला सुप्रसन्न । तेणें** [भा. /१ 'विघ्नाचे केलें'.] **विघ्नचि केलें निर्विघ्न । उन्मेखेसि बोलिला आपण । भावार्थरामायण चालवी वेगीं ॥ ६ ॥**

**आतां वंदू सरस्वती । जे** [भा. /१ 'चितचेतना'.] **चित्त चेतना चैतन्यशक्ति । जे सकल स्फूर्तीची स्फूर्ति ।** [भा. /१ तं. जो. 'अमूर्तीची मूर्ती'; मु. नि. कं. 'अमूर्ताची मूर्ती'.] **अमूर्त मूर्ति स्वरूप जिचें ॥ ७ ॥**

**हंसवाहिनी हा** [तं. 'शब्दारूढ'.] **शब्दरूढ । परि ते परमहंसीं आरूढ ।** [घा. 'गुह्यार्थ तें'; मु. 'भावार्थ'.] **गुह्यार्थ जे अतिगूढ । ते दावी** [तं. तु. 'गूढ ग्रंथार्थी'.] **उघड ग्रंथार्थी ॥ ८ ॥**

अनुक्रमणिका

परम हंस [भा. /१ तं. 'अशांसी'; मु. जो 'अंशाअंशी'.] अंशांशी । शोभा शोभे अहर्निसीं । सत्त्वातीत शुद्धतेसी । [तु. 'तोचि शुभ्रांगासि'.] तोचि निजांगासि शुभ्र वर्ण ॥ ९ ॥

ॐकार तो तिचा वीणा । [तु. 'चिन्मात्रा'.] त्रिमात्रा तिन्ही [घा. 'तंत्री'; जो. मु. हे पद नाही.] तंती [जो. मु. कं. नि. घा. इं. 'गहना'.] जाणा । वेदोपनिषद पुस्तक [जो. मु. कं. घा. निः भा. /१ 'जाणा'.] गहना । अर्थवी [भा. /१ नि. इं. 'अर्थना परमार्थता'; कं. 'अर्थवी अर्थ नाना परमार्थता'.] अर्थनाना परमार्थ ॥

ऐसी अगाधत्वें अति सुंदर । प्रभा परमार्थी मनोहर । जेणें प्रकाशे चराचर । मिथ्या जगडंबर [तु. 'स्वभावें'.] स्वप्रभा करी ॥ ११ ॥

ऐसी आइकोनि स्तुति। [भा. /१ 'सुप्रसन्न जाली'; कं. घा. मु. जो. 'सुप्रसन्न सरस्वती'.] सुप्रसन्न होय सरस्वती । स्वभावें तिची [भा. /१ 'वदनस्थिती'; मु. 'स्वस्थी'.] वदनीं वस्ती । या [भा. /१ 'वचनोक्ति तें'; घा. 'वचनोक्तितें'.] वचनोक्ति ते वदवी ॥ १२ ॥

ते म्हणे श्रीराम कथेतें । वेगीं चालवी भावार्थे । सद्भावें होईल सरतें । प्रिय संतांतें मी करीन ॥ १३ ॥

आतां वंदूं [नि इं. घा. 'संत सज्ञन'.] ते सज्ञन । जे [नि. इं. घा. 'आर्त चातकां चिद्‌घन'.] आर्त चातक चिद्‌घन । त्रिविध तापा उपशमन । जे निज जीवन साधकां ॥ १४ ॥

जयांची सहज जालिया संगति। सकळ [तं. 'कर्मी निवृत्ति'; त. 'अकर्मानिवृत्ति'.] कर्मा होय निवृत्ति । स्वधर्म [भा. /१ तु. त. 'स्वधर्म सत्संगती'; जो. 'स्वधर्म सद्‌शांती'.] सत्‌शांती येती । [तु. 'भावार्थ प्रीती'.] भावार्थे प्राप्ती परमार्था ॥

मु. जो. भा. /१ कं. खेरीज इतरत्र 'सत्संगाचें'. संतसंगाचा निजमेळीं । परमार्थ जाय पादहाळीं । लखडोनि ये स्वानंद फळीं । सर्वकाळीं सफळीत ॥ १६ ॥

[तु. 'बीजत्वाचा फेडिजे देठु'; त. 'ना फेडिजे देठु'; कं. जो. मु. 'बीजत्वाचा न फेडिजे देठु'.] बीज त्वचा न फेडिजे देठू । आदि मध्य न कळे सेवटु । [घा. नि. 'स्वानंद रसाळ फळ घोटु'; भा. /१ 'स्वानंद रसाळ फळकटु'; कं. तं. त. मु. 'स्वानंद रसाचा फळ खोटु'; जो. 'स्वानंद रसाचा फळ साटु'.] स्वानंदरसाचा भरे घोटु । अनुभव [तु. 'श्रेष्ठ'.] स्पष्टु [तं. 'संतसंगे'.] सत्संगें ॥ १७ ॥

ऐसिया संतांचें महिमान । आकळे ऐसें कैचें ज्ञान । बाळत्वें बोलिलों तें [घा. 'ते न्यून'.] तें न्यून। द्यावें अवधान कथेसी ॥ १८ ॥

ऐसें आइकोनि [नि. इं. घा. 'वचन स्तवन'.] स्तवन । सुखावले संत सज्ञन । तुझे मनोगतीं आमुचें मन । सदा सावधान ग्रंथार्थी ॥ १९ ॥

आम्हासि आवडे रामकथा । तेथेंहि तूं रसाळ वक्ता । तरी स्तुती सांडोनि आतां । वदे [भा. /१ मु. 'ग्रंथार्थ ग्रंथान्वयें.'; तु. 'ग्रंथार्थअन्वयें'.] ग्रंथार्था अर्थान्वयें ॥ २० ॥

अनुक्रमणिका

**आता वंदू कुळदेवता । जे** [जो. मु. भा. /१ खेरीज इतरत्र 'नामरूपें'.] **नामें रूपें एकनाथा । एकपणाचिये माथां । नांदवी निजभक्तां निजान्वयें ॥ २१ ॥**

**आयिकोनि सद्गुरुची बोली ।** [भा. /१ जो. मु. नि. घा. कं. इं. 'बोध परशुरामे निवटिली'.] **परशराममाता संतोषली । अनेकत्व सांडुनि वहिली । स्वयें उठिली एकत्वें ॥ २२ ॥**

**तें एकरूपें एकनाथा । मूळान्वयें कुळदेवता ।** [नि. 'एकाकारा वांचुनि'.] **एका वांचुनि सर्वथा । द्वैताची कथा** [तु. 'द्वैताची कथा असेना'; जो. 'दैत्याची कथा करू नेदी'.] **करूं नेदी ॥ २३ ॥**

**एकपण जनींवनीं । एकपण मनीं नयनीं । एकपणें त्रिभुवनीं । नांदवी म्हणवुनी कुळदेवता ॥ २४ ॥**

**ब्रह्मा आणि हरिहर ।** [मु. 'त्रिगुणी तिन्ही ते अवतार'.] **त्रिगुणी तिन्ही ते सावत्र । मी** [तु. 'अवगुणाचा'; मु. 'मी त्रिगुणाचा'.] **अगुणाचा परि प्रियकर । केलो साचार एकात्मता ॥ २५ ॥**

**ब्रह्मा आणि हरिहर । त्यांचे खेळणें जगडंबर । मज** [भा. /१ तु. 'खेळाच्या'.] **खेळावया चिदंबर । देउनि प्रियकर कुळदेव्या** [भा. /१ तु. कं. 'केले'.] **केलों ॥ २६ ॥**

**ते जय जय जगदंबा । उदो म्हणे ग्रंथारंभा । श्रीरामकथेची शोभा । अतिवल्लभा मजलागीं ॥ २७ ॥**

**तें भावार्थरामायण । तुजकरितां** [तं. 'निरूपण'.] **निरोपण ।** [घा. 'ते ते'; भा. /१ 'न्यून ते करीन पूर्ण'.] **न्यून तें मी करीन पूर्ण । कथा संपूर्ण संपादी ॥ २८ ॥**

**आतां वंदूं सद्गुरु । जो स्वानंदबोधवज्र पंजरु । ज्याचेनि हा संसारु । होय सुखकरु** [तु 'तरुनिया'; त. 'तरणोपाय'.] **तरणोपाया ॥ २९ ॥**

**जेणें मस्तकीं ठेवितां हातु ।** [तु. 'अहंभाव करी घातु'.] **अहंभावा होय घातु । सोहंभाव होय** [भा. /१ तं. मु. जो. 'सोंह भावा ये प्रांतु'.] **प्राप्तु । दावि** [जो. हे पद नाही; मु. 'अप्राप्तु'.] **अप्रांतु अद्वयानंदु ॥ ३० ॥**

**जन तेचि जनार्दन । जनार्दन सकळ जन । एका जनार्दना शरण । मी-तूं-पण** [नि. 'विरालें चिदन्वयें'.] **चिदन्वयें ॥ ३१ ॥**

**जनार्दना पढिये एकपण । एका पढिये जनार्दन । स्वरूप एक नामें भिन्न । अन्वयशरण या नांवें ॥ ३२ ॥**

**जनार्दन माझें मन । जनार्दन माझें नयन । जनार्दन वदतें** [भा. /१ 'वचन'.] **वदन । वक्ता वचन श्रीजनार्दनु ॥ ३३ ॥**

**जनार्दनु गतीची गती । जनार्दनु** [त. 'जनार्दनु मुक्तीची मुक्ति'; मु. जो. 'मतीची मती'.] **मतीची मती । जनार्दनु** [जो. नि. घा. 'जनार्दनु स्फुरे स्फूर्ती'; मु. 'जनार्दने स्फुरे स्फूर्ती'.] **स्फूर्तीची स्फूर्ति । सकळ वित्पत्ति जनार्दनु ॥ ३४ ॥**

अनुक्रमणिका

निजांगें जो सकळ जन । यालागीं जनार्दन । लिंग देहा करी मर्दन । म्हणउनि जनार्दन वित्पत्ति व्याख्या ॥ ३५ ॥

येथें तो कर्ता मी अकर्ता । हेंहि बोलणें अतिमूर्खता । मी कर्ता तो अकर्ता । हे परममूर्खता सोलीव ॥ ३६ ॥

यापरी मी-तूं पण । दूरी दवडी जनार्दन । [घा. नि. इं. 'बोलवी'; कं. तु. 'म्हणे'; जो. हे पद नाही.] मग भावार्थ रामायण । कथा निरूपण [भा. इं. नि. 'चालविले'; कं. 'चालवी वेगें'.] चालवी ॥ ३७ ॥

अजापासुनी उत्पत्तिहेतु । दशेंद्रियीं अति समर्थु । जन्मला राजा दशरथु । अति विख्यातु तिहीं लोकीं ॥ ३८ ॥

मुळीचें अजत्व लक्षुनि दृष्टीं । अजन्मा राम जन्मला पोटीं ।

हे रामायणीची मूळ [मु. तु. खेरीज इतरत्र 'गोष्टी'.] गोठी । शास्त्रपरिपाठी परमार्थु ॥ ३९ ॥

रावणाचे नित्यांकित । [जो. मु. तु. 'सुरनर'.] सुरवर जाले जी समस्त । ब्रह्मादिकां चिंता अद्भुत । तिहीं रमानाथ प्रार्थिला ॥ ४० ॥

करावया राक्षसां घातु । मी अवतरेन रघुनाथु । रमा मुख्य कलहाहेतु । तिचेनि अंतु निशाचरां ॥ ४१ ॥

तुम्ही सकळही सुरवर । वेगीं व्हावें वानर । आम्ही दोघे धरूं अवतार । सत्य साचार [नि. 'साचार करूं वचनार्थु'.] वचनार्थु ॥ ४२ ॥

फेडावया देवांची साकडी । स्वधर्म वाढवावया वाढी । नामें मोक्षाची उभवावया गुढी । सूर्यवंशा गाढी दशा आली ॥ ४३ ॥

ते सूर्यवंशीं अजाचा सुतु । अहमात्मा जन्मला राजा दशरथु । आयिका त्याचा वृत्तांतु । धर्मयुक्तु स्वधर्मी ॥ ४४ ॥

त्यासि तिघी राणिया प्रबुद्धा । लोकोत्तर अतिप्रसिद्धा । धर्मपत्न्या विशुद्धा । नामानुवादा अवधारा ॥ ४५ ॥

ज्येष्ठ कौसल्या ते सद्विद्या । सुमित्रा ते शुद्ध [तु. 'सुमेधा'.] मेधा । कैकयी ते अविद्या । मंथरा कुविद्या तीपासी ॥ ४६ ॥

उदरा येईल [तु. 'वरदमूर्ती'.] आदिमूर्ति । त्या आधीं [नि. 'नव्हती'; भा. /१ तं. 'नव्हे'; तु. 'नोहे'; जो. 'त्या आधीन नव्हे'.] त्या नव्हे संतती । अपुत्रपणें नृपती । पुत्रार्थी उद्यतु ॥ ४७ ॥

सुख नेदीं राजभवन । सुख नेदी सिंहासन । सुख नेदी भोगस्थान । मानसन्मान सुखनेदी ॥ ४८ ॥

अनुक्रमणिका

सुख नेदी अलंकार वस्त्र । सुख नेदी भोग कलत्र । सुख नेदी [तं. खेरीज इतरत्र ‘छत्र चामर’.] चामरछत्र । स्तुतिस्तोत्र सुख नेदी ॥ ४९ ॥

राजा पोटांतून [नि. इं. घा. जो. ‘भोगी विरक्तु’; तु. ‘पोटांतून विरक्तु’; तं. ‘भोग विरक्तु’.] भोगविरक्तु । यालागी पोटा येईल रघुनाथु । जो अत्यंत विषयासक्तु । त्यासि भगवंतु स्पर्शेना ॥ ५० ॥

जेंवि [त. तु. ‘जेवि’ हे पद नाही’; पै. खेरीज अन्यत्र, ‘अंधळे न देखे पिता’.] गर्भांध नेदेखे पिता । तेंवि विषयी नेणती भगवंता ॥ तोचि त्यांचा प्रतिपाळिता । [भा. ‘देखणे सत्रा त्याही’.] देखणी अवस्था त्यां नाहीं ॥

दशरथा न गमे जनस्थानीं । निघाला पारधी लागोनी । विचरे एकाकी होऊनि । आवडे [पै. त. तु. खेरीज अन्यत्र ‘विजनी’.] वनीं रहिवासु ॥ ५२ ॥

[मु. ‘दुसरियाचा सहसा घातु’.] दुसरियाचा सांघातु । सर्वथा न [मु. ‘मानी’.] मनी दशरथु । हृदयीं [मु. ‘कळवळला’.] प्रगटला रघुनाथु । झाला विरक्तु सर्वार्थी ॥ ५३ ॥

वनीं एकाकी विहार । करी [मु. ‘वनफळांचा आहार’.] वनफळें आहार । नावडे राज्य भोगोपचार । पुत्रार्थी थोर [तु. ‘आपेती’.] साक्षेपी ॥ ५४ ॥

होणारासारिखी बुद्धि । मांडिली [मु. जो. कं. व मु. ‘निशी अवस्था’.] निशीवेळेसी पारधी । अंधारीं श्रावणातें वधी । मातापिता खांदीं कावडीसी ॥ ५५ ॥

लौकिकाची लोकवार्ता । श्रावणें पितरें [कं. नि. त. ‘कावडी ठेवितां’; तं. ‘वृक्षीं कावडी ठेवितां’; मु. ‘पितरें वनीं ठेवितां’; जो. ‘पिते खांदी ठेवितां’.] थडीं ठेवितां । हे तंव मूळ अबद्धकथा । तो मातापिता न विसंबे ॥ ५६ ॥

अंधारीं [कं. मु. ‘अंधमातापिता’; मु. जो. तं. भा. ‘अंध हें पद नाहीं’.] अंधे मातापिता । झाडीं ठेविलीं हे मिथ्या वार्ता । खांदीं घेऊनि तत्त्वतां । जीवनार्थ तो आला ॥ ५७ ॥

[तं. तु. ‘खेरीज इतरत्र ‘बुडबुड’.] भुडु भुडु कमंडलूचा शब्दीं । ध्वनि उठिल्या जलसंनिधीं । दशरथ केवळ [त. ‘शब्दभेदी’.] शब्दवेंधी । [भा. कं. ‘बाणें वेगीं’; तु. ‘बाणीं विंधी सत्वर’.] बाणें वेधीं विंधिला ॥ ५८ ॥

[त. खेरीज इतरत्र ‘घाव’.] घाय लागतां संपूर्ण । काय बोलिला श्रावण । कोणा सभाग्याचा बाण । [तु. ‘रामस्मरण करविलें’; भा. ‘रामश्रवणेंसी आला’.] रामस्मरणेंसी आला ॥ ५९ ॥

श्रावणासी बाण लागतां । नाठवेचि माता पिता । नाठवेचि देहममता । राम स्मरतां देहत्यागी ॥ ६० ॥

[तु. खेरीज इतरत्र ‘अंतरीं’.] अंतीं श्रीरामस्मरण । परमभाग्य हें कल्याण । बाण नव्हे तो ब्रह्म पूर्ण । स्मरणें प्राणु त्यागिला ॥ ६१ ॥

अनुक्रमणिका

दशरथ बोलिला आपण । कोणा [भा. खेरीज इतरत्र ‘कोण्या साधूचें हें वचन’.] श्वापदाचें वचन । माझिया पापांचें निर्दाळण । केलें संपूर्ण श्रीरामें ॥ ६२ ॥

श्रीरामनाम स्वयें आयकितां । रायासी न बाधी ब्रह्महत्या । रामस्मरणें देह त्यागितां । नित्य मुक्तता श्रावणासी ॥

रामनाम [जो. तु. कं. तं. तु. भा. त. खेरीज इतरत्र ‘रामनामें निर्धूत’.] सत्यधूत । एक मुक्त एक पापातीत । ब्रह्महत्येसी दशरथ । अति अलिप्त रामनामें ॥ ६४ ॥

दशरथ जंव येऊनि पाहे । तंव श्रावणु बाणें विंधिला आहे । त्याचीं पितरें पुत्र मोहें । राजा लवलाहे शापिला ॥ ६५ ॥

हृदयीं भेदिला दृढ बाण । रामस्मरणें सांडी प्राण । राजा येउनि पाहे आपण । लागलें दूषण ब्रह्महत्या ॥ ६६ ॥ [त. तु. जो. मु. त. खेरीज अन्यत्र ही ओवी नाहीं.]

[भा. मु. या प्रतींत पहिले दोन चरण असे आहेत : ‘आम्हासी दिधलें पुत्रदुःख । तूंहि पावसी पुत्रशोक’.] त्याचे पितरीं शापिला देख । तूंही पावसी पुत्रशोक । शापें रायासी [तु. खेरीज अन्यत्र हे पद नाही.] जाहला हरिख । मी पुत्रमुख देखेन ॥ ६७ ॥

ब्रह्मशाप नव्हे वृथा । मी पुत्र पावेन सर्वथा । परम आल्हादु दशरथा । आनंद चित्ता [भा. ‘न समाये’.] ओसंडे ॥ ६८ ॥

शाप नव्हे परमामृत । ऐसें उल्हासे रायांचे चित्त । पोटीं प्रगटला रघुनाथ । [जो. मु. भा. तं. तु. त. कं. खेरीज इतरत्र ‘शाप दशरथा सुखरूप’.] शापें दशरथ सुखरूप ॥ ६९ ॥

मज पुत्र जाले इत्थंभूत । ऐसा मानिला निश्चितार्थ । हृदयीं संचरला रघुनाथ । [तु. ‘उद्योगरहित’.] उद्वेगरहित यालागीं ॥ ७० ॥

शाप देखोनि दारुण । तिहीं दोघीं सांडिला प्राण । तिघांसी देउनि दहन । उत्तर विधान करविलें रायें ॥ ७१ ॥

जलचर पक्षियांचे युग्म । तया मीना एकासी [त. ‘मित्र परम’.] मित्रत्व परम ।

तया समान काळें मरणधर्म । जाला तो जन्म मागील ॥ ७२ ॥ [ओवी ७२ ते ७६ कं. तं. भा. जो. मु. या प्रतींत नाहीत.]

आटतां देखोनि सरोवरा । शीतळ निशियेचा [त. खेरीज इतरत्र ‘चंचुभारा’.] भरा । [त. खेरीज इतरत्र ‘चंचु’ हे पद नाही.] चंचू धरूनिया मगरा । अगाध नीरा [त. खेरीज इतरत्र ‘स्नेहें नेतु’.] स्वयें नेता ॥ ७३ ॥

मार्गीं [त. खेरीज इतरत्र ‘वन ते नवखंड’.] वनवाते वनखंड । जेथुनि उसळलें वेळुचें कांड । तें मत्स्यातें लागतां [त. खेरीज इतरत्र ‘चंड’.] तोंड । पडला दुखंड धरणीये ॥ ७४ ॥

अनुक्रमणिका

तेणें दुःखें गृध्री दोघी । देहे [नि. ‘ओपिलें’.] ओपिला [त. खेरीज इतरत्र ‘तयालागीं’.] तये आगीं । तोचि ऋणानुबंध योगी । धरिला तिघीं नरदेहो ॥ ७५ ॥

मत्स्य तेचि श्रावण जनीं । पक्षिये ते जनक जननी । एके अवसरीं निमाली तिन्ही । ऐसी पुराणीं मूळकथा ॥ ७६ ॥

राजा रामनामें दोषातीत । [कं. नि. तु. ‘तरी’; घा. ‘तींही’.] तऱ्ही लोक प्रवृत्ति शास्त्रार्थ । अश्वमेध करी दशरथ । वसिष्ठयुक्त विधानें ॥ ७७ ॥

फेडावया ब्रह्महत्त्या [त. ‘दाग’, इतरत्र ‘डाग’.] दाघ । केला अश्वमेध याग । राजा शुद्ध झाला सांग । परि [जो. ‘राष्ट्रीं भंग’.] राष्ट्रभंग मांडिला ॥ ७८ ॥

जे राज्यीं ब्रह्महत्या घडे । ते राज्यीं पर्जन्य न पडे । शुक्रें धरियलें पाणियाडें । अवर्षण पडे बहुकाल ॥ ७९ ॥

तृणाची काडी न मिळे । उष्णें [तु. ‘राज वाळिलें’.] झाडोरे करपले । वृक्ष [तं. ‘शेंडी वाळलें’; तु. ‘वृक्ष पल्लव करपले’; मु. जो. भा. खेरीज इतरत्र ‘वृक्ष शेंडियास वाळले’.] सशेंडीं वाळले । सरितांचे शोकले जळस्त्रोत ॥ ८० ॥

प्रजा घरोघरीं आक्रंदती । गाई हंबरडा [नि. ‘फाडिती’.] हाणती । द्विजांचीं नित्यकर्में राहती । [तु. ‘हा हा भूत क्षितिभूत प्राणिया’.] हाहाभूत क्षिती प्राणीमात्र ॥ ८१ ॥

देखोनि भूतांची दशा ऐसी । राजा कळवळिला मानसीं । शुक्रें धरियलें पाणियाडासी । त्यासी युद्धासी निघाला ॥ ८२ ॥

दशरथाची शक्ति कैसी । रथ चालिला स्वर्गासी । कैकेयी चालली राया सरिसीं । राहवितां तिसी ते [तं. ‘परि न राहे’; जो. मु. कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] न राहे ॥ ८३ ॥

तुम्ही जाल स्वर्गाप्रती । मी पाहीन स्वर्गसंपत्ति । वसिष्ठ म्हणे न्यावें निश्चितीं । [तु. ‘भविष्य ख्याती’.] भविष्य स्थिती जाणोनि ॥ ८४ ॥

रायासि तिची अतिप्रीती । प्रीतीनें बैसविली रथीं । क्षणार्धे [तं. ‘स्वर्गलोकाप्रती’; नि. ‘शक्रलोकाप्रती’.] शुक्रलोकाप्रती । आला भूपति संग्रामा ॥ ८५ ॥

परम योद्धा श्रीरामजनक । देखोनि शुक्रें घेतला धाक ।
साह्य दैत्यसेना अनेक । दशरथें एके [तु. ‘सकळिक’; कं. तं. ‘एक एक’.] एक खिळिले बाणीं ॥ ८६ ॥

वृषपर्वा तेजोराशि । रायें विरथ केलें त्यासी । मुकुट पाडोनि भूमीसी । मोकळ्या केसीं पळविला ॥ ८७ ॥

अनुक्रमणिका

वृषपर्वा दैत्यनाथु । युद्धीं जाला हताहतु । तें देखोनि दैत्यसेना समस्तु । पळे कुंथतु [त. 'बाणघाई'; भा. 'रणभूमीसि'.] रणघाईं ॥ ८८ ॥

शुक्रें युद्ध केलें अनेंक । दशरथ योद्धा अति अचूक । सिंहनाद करूनि देख । शुक्रा सन्मुख लोटला ॥ ८९ ॥

शुक्रें केलें अलौलिक । [नि. घा. 'अचूक'.] अतर्क्य छेदिला रथाचा आंख । कैकेया बाहो घातला देख । तेणें पराङ्मुख [जो. 'नव्हे राया' मु. 'नव्हेचि राजा'.] नोहे रावो ॥

[तु. 'नाम प्रताप'.] रामप्रताप दशरथा पोटीं । तेणें झाकली शुक्राची दृष्टी । धाकें पळे उठाउठी । दिधली पाठी संग्रामीं ॥ ९१ ॥

ब्राह्मण म्हणोनि [भा. 'रोखिला हातु'.] राखिला हातु । येऱ्हवी करिता तत्काळ घातु । विजयी जाला दशरथु । [तु. 'हर्षे अद्‍भुत सुरवरां', जो. 'हर्ष अद्‍भुत सुरनाथ'.] हरुष अद्भुतु सुरवरां ॥

मोकळें जालें पाणियाडें । तत्काळ तेथें पर्जन्य पडे। फिटलें गायीचें सांकडें । ब्राह्मणीं रोकडें [तु. 'याग करिती'.] मांडिले याग ॥ ९३ ॥

चालिले स्वाहा स्वधाकार । हरिखेले देव पितर । दशरथावरी अपार । [भा. तु. 'सुमनभार'. मु. 'सुमने संभार'.] सुमनसंभार वरुषले ॥ ९४ ॥

अवघे करिती जयजयकार । इंद्रासी आल्हाद अपार । दैत्य पराभविले थोरथोर । तेणें अमरेंद्र संतोषला ॥ ९५ ॥

दिव्यांबर अलंकार । रायासि दिधले अपार । इंद्रें सन्मान केला थोर । अवघे सुरवर [इं. 'संतुष्ट मन'. नि. 'संतुष्ट'.] तुष्टमान ॥ ९६ ॥

पराभविलें दैत्यगुरुसी । अतिअल्हाद बृहस्पतीसी । तेणें सन्मानिलें दशरथासी । धरिले पोटेसी स्वानंदे ॥ ९७ ॥

देव गुरु वरद देत । जे जे तुझें मनोरथ । सिद्धि पावती समस्त । जाण निश्चित नृपनाथा ॥ ९८ ॥

तुज होय पुत्र संतती । ते मी सांगेन श्रेष्ठ युक्ति । याग करावा अयोध्येप्रती । विभांडकाहाती [नि. 'पुत्रेष्टि'. तु. तं. कं. घा. 'पुत्र जन्मा'.] पुत्रजन्यु ॥ ९९ ॥

विभांडिक नित्य वनवासी । तो भेटी नेंदी तुम्हासी । मृगीसुत पुत्र त्यासी । ऋष्यशृंग जयासि निजनाम ॥ १०० ॥

तो [नि. घा. 'प्रमदा मदें वेधवोन'.] प्रमदावेधें वेधून । नगरा आणावा छळून । येतांचि त्याचें आपण । करावें लग्न निजकन्येसि ॥ १०१ ॥

अनुक्रमणिका

तुज नव्हेचि [घा. 'तुज नाहीं गा संतान'. कं. तु. मु. जो. 'तुज नोव्हेचि संतान'.] गा संतान । यालागी तुज मैत्र शांतन । तेणें तुज दिधलें कन्यारत्न । ते शांतनेंसि लग्न करावें ॥ १०२ ॥

इंद्र म्हणे दशरथासी । आणवी या ऋष्यशृंगासी । अप्सरा धाडीन तुजपासी । त्या तत्काळेंसि आणिती ॥ १०३ ॥

युद्धीं रथीं सूदलें बाहूसी । राजा तुष्टला कैकयीसी । देईन जें जें तूं मागसी । ऐसें [तु. कं. 'भाष्य दिधली'; मु. जो. मु. 'ऐसी भाक तिसी दिधली'.] भाकेसि दिधलें ॥ १०४ ॥

तंव ते बोलिली आपण । तुझेनि मज काय न्यून । स्वर्गादि दिव्य भूषण । मी भोगी आपण तुझेनि ॥ १०५ ॥

कल्पतरू पारिजात माळा । तुझेनि शोभती माझे गळा । स्वर्गसुखाचा सोहळा । भोगिजे स्वलीला तुझेनि ॥ १०६ ॥

येणेंचि शरीरें आपण । तुझेनि भोगी स्वर्गभुवन । तुझेनि आम्हा काय न्यून । मी सुखसंपन्न तुझेनि ॥ १०७ ॥

हासोनि बोलिली रायासी । तुम्ही मज दिधलें भाकेसी । हे मी मागेन [म. जो. कं. घा. 'काळ विशेषीं'.] विशेषी । यथाकाळेंसी अनुकूल ॥ १०८ ॥

राजा म्हणे सत्य वचन । हे माझी [कं. घा. 'भाष्यवरदान'; मु. तं. 'भाषावरदान'; तु. 'वरद भाक'.] भाक वरदान । जेव्हां तूं मागसी आपण । तत्काळ जाण मी देईन ॥ १०९ ॥

ऐसी दशरथाची ख्याती । स्वर्गी देव वाखाणिती । दिग्गज [मु. जो. कं. मु. 'वाणिताती'.] वाणिती दिगंतीं । कीर्ति त्रिजगतीं विस्तारली ॥ ११० ॥

[मु. जो. व मु. प्रतींत 'श्री' हे पद नाही.] यशश्रीकीर्ति औदार्य । गुण गांभीर्य अति धैर्य । दशरथाचें वीर्य शौर्य । स्वर्गी सुरवर वानिती ॥ १११ ॥

दैत्य गुरु अदट । त्याचा हरितला प्रताप श्रेष्ठ । वीर दशरथ सुभट । [नि. इं. घा. 'प्रवादु पाठ तिहीं लोकीं'; जो. तं. 'प्रवाहु पाटु'; त. 'प्रताप पुष्ट तिहीं लोकीं'.] प्रवाहे पाटु तिहीं लोकीं ॥ ११२ ॥

उदरा येईल रघुनाथ । सकळ संपदा आल्या तेथ । श्रिया विराजमान होत । श्रीदशरथालागीं ॥ ११३ ॥

स्वर्गीं दशरथ भूपाळ । इंद्रें राहविला बहुकाळ । अतिप्रीतीचा कल्लोळ । दिव्य भोग सकळ भोगविले ॥ ११४ ॥ [या ओवीनंतर तुळजापूर प्रतीत पुढील दोन ओव्या अधिक आल्या आहेत :—
'श्रावणारि कांतेचे मनोरथ । ते ते अमरेश पुरवत । तेणें राजा सुखावत । म्हणे रघुनाथ तुष्टला ॥ १ ॥
यानंतर तो दशरथु । कल्पोनि संततीचा हेतु । पुत्रयाग करू निश्चितु । अयोध्या आंतु जाउनिया ॥ २ ॥]

एवढेनि [मु. 'बहु मानैश्वर्येसी'.] ऐश्वर्येसि । राजा आला अयोध्येसी । मखरें तोरणें चौपासी । नरनारीसि आल्हाद ॥ ११५ ॥

अनुक्रमणिका

घरोघरीं गुढिया उभारिती । पदोपदीं आरत्या करिती । बंदीजन कीर्ति गाती । ओवाळिती धन धान्यें ॥ ११६ ॥

ब्राह्मण जपती शांतिपाठ । भाट गर्जती उद्भट । नरनारी पाहती घनदाट । पायवाटे नेती घडिया ॥ ११७ ॥

दशरथाचा प्रताप गहन । मी बोलिलों अल्प जाण । सकळ आकळितां निरूपण । कथा असाधारण वाढेल ॥ ११८ ॥

[अं. जो. 'अपवाद'.] अफाट न करावा ग्रंथ । ग्रंथीं बोलावा मुख्यार्थ । पदीं दावावा परमार्थ । हा [मु. 'निजस्वार्थ'.] निश्चितार्थ कवित्वाचा ॥ ११९ ॥

एकाजनार्दना शरण । दशरथप्रताप लक्षण । कथा झाली हे संपूर्ण । श्रीरामागमन अवधारा ॥ १२० ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां प्रथमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग दुसरा

## पुरोडाश विभाग

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

राजा पाहे राष्ट्र सकळ । फिटला द्वंद्व [तु. 'फिटला देखे द्वंद्व विटाळ'; मु. 'द्वंद्व दुकाळ'.] दुकाळ । [कं. मु. त. तं. अं 'पाहिला'.] पाहला [मु. 'सर्वत्र'; तं. 'समुखें'; भा. मु. अं. 'समदुःखें'.] समसुख सकाळ । अफळ हे सफळ वृक्ष जाले ॥ १ ॥

प्रजा स्वानंदें निर्भर । [मु. अं. कं. नि. गे. 'गोधना'; घा. गौ. 'गोधन'.] गोधना आल्हाद थोर । अग्निहोत्रें घरोघर । [भा. 'यागा द्विजवर येती'.] याग द्विजवर यजिती सुखें ॥ २ ॥

पृथ्वी धनधान्यें [मु. कं. 'परिपूर्ण'; अं. 'संपूर्ण'.] संपन्न । कोण्हा नाहीं दुःख दैन्य । घरोघरीं वेदाध्ययन । हरिकीर्तन हरिभक्ति ॥ ३ ॥

[तं. 'भूपाळ'.] भूतला येती राघव । यालागी वैकुंठीचें वैभव । पुढें धाडिलें जी सर्व । तेणें शोभा [मु. 'अपार'.] अपूर्व अयोध्येसी ॥ ४ ॥

राजा शोभे सिंहासनीं । अति आल्हाद राजभुवनीं । आनंद न समाये त्रिभुवनीं । आल्या स्वर्गाहुनि [मु. भा. तु. त. 'दिव्यांगना'.] देवांगना ॥ ५ ॥

[तं. भा. अं. 'नमस्कार'; मु. 'नमन केलें'.] तिहीं नमस्कारिलें रायासी । इंद्रें पाठविलें तुम्हापासी । काय [मु. अं. तु. कं. 'अनुज्ञा'.] आज्ञा आम्हासी । त्या [भा. तु. मु. कं. अं. 'कृतकार्यासी'.] कार्यासी प्रेरावें ॥ ६ ॥

[मु. 'राजा म्हणे तया अप्सरासी'.] तुम्ही जावें ऋष्यशृंगापासी । [तं. 'प्रबोधउनी'.] प्रलोभउनि आणावें त्यासी । कळो नेदावें विभांडकासी । [नि. 'अचूक'.] बुद्धि कार्यासी साधावें ॥ [तु प्रतीत ७व्या ओवीनंतर पुढील ओव्या आहेत :––
'ऐसी राजाज्ञा मस्तका । वंदुनी चालित्या नायेका । सुरूप अवलोकितां लोक । चंद्रकलिका हीन गमे ॥ १ ॥
द्वादशवर्षी शोडषवर्षी । आविर्भाव कटाक्षेसी । भुलवावया ऋष्यशृंगासी । वेगीं वनासी चालिल्या ॥ २ ॥
वन अति रम्य गहन । विभांडकऋषीचें निजस्थान । गुंभा दिसे शोभायमान । तपोनिधान ऋषिरावो ॥ ३ ॥
वनीं निर्वेर गजसिंहासी । गौ क्रीडती व्याघ्रेसी । उल्हास अतिशय श्वापदांसी । ऋषि तपासी मोहिले ॥ ४ ॥
वृक्ष सदा फळिले जाण । सरोवरीं निर्मल जीवन । हंस मयुरादिक नर्तन । क्रिडायमान स्वानंदे ॥ ५ ॥
ऐसी ऋषि आश्रमीची स्थिति । देखोनि अप्सरा आश्चर्य करिती । धन्य ऋषि तपाची ख्याती । सर्वांभूती निर्वैर ॥ ६ ॥'] विभांडकु गेला अनुष्ठानासी । एकला ऋष्यशृंग गुंफेसी । प्रमदा आलिया तयापासी । हावभावेसी उद्यत ॥ ८ ॥

त्यासी देखतां दिठीं । ऋष्यशृंग सांडी पर्णकुटी । होतां [तु. 'दृष्टिभेटी भेटीसी'; भा. मु. अं. 'डोळ्या डोळा भेटी'.] डोळियां डोळे भेटी । पळे उठाउठी मृगभावें ॥ ९ ॥

मुख मुरडी मागिलीकडे । परतोनि पाहे तयांकडे । [तु. 'मागुता पलायमान पुढें'.] सवेग पाउली पळे पुढें । [मु. 'राहे राहें'; क. तं. 'राहें राहोनि'.] राहोराहो उडे सत्राणें ॥ १० ॥

अनुक्रमणिका

दुरूनि पाहे दृष्टी । मा कैसेनि होईल भेटी । बोलावयाच्या खुंटल्या गोष्टी । नातुडे दृष्टी [मु. 'मृगभावें'.] मृग वेगें ॥ ११ ॥

जाली विभांडकाची [कं. तु. 'येती वेळ'.] वेळ । प्रमदा गेलिया त्या सकळ । ऋष्यशृंग अति [मु. 'विफळ'.] विव्हळ । आला तात्काळ गुंफेसी ॥ १२ ॥

करितां पितयाचें सेवेसी । प्रमदा आठवती निजमानसीं । कैसे आले होते तापसी । अति [नि. 'विव्हळें'.] विलासी ऋषिश्वरु ॥ १३ ॥

तंव पिता पुसे पुत्रासी । आजी दुश्चित कां मानसी । तो म्हणे आले होते तापसी । तुमचे भेटीसी अति साधु ॥ १४ ॥

त्यांचिया जटांची मवाळी । मनोहर [तं. 'अंगसावळी'; मु. 'अंगें सोज्वळी'.] अंग शैली । मज पळतां तयेवेळीं । अदृश्य तात्काळीं ते जाले ॥ १५ ॥

मी नेघेचि त्यांचें दर्शन । [मु. अं. कं. भा. 'व्यर्थ'.] अविवेकें केलें पलायन । क्षणक्षणा होतसे आठवण । [तु. 'उद्योगपूर्ण'.] उद्वेगी संपूर्ण त्यांचेनी ॥ १६ ॥

येरी न संगती मनीची गोष्टी । त्याची आवडी [मु. 'पोटीं'; तं. अं. तु. भा. 'मोठीं'.] लागली मोठी । केधवां होईल त्यांची भेटी । जिवीं चटपटी लागली ॥

आश्रमा आलिया अतिथि । हे पूजावे अति प्रीति । मी [मु. 'शकलों'; अं. 'वचकलों'.] वंचलों [मु. 'देहभय अशक्ति'; कं. 'देहबुद्धिशक्ति'.] देहभयासक्ति । मज त्यांची भक्ति न घडेचि ॥ १८ ॥

नाहीं पुसिलें आगमन । नाहीं [मु. 'दिधलें'.] केलें अभ्युत्थान । न करीचि पूजा विधान । विमुख सज्ञन म्यां केले ॥ १९ ॥

त्यासी म्यां नाहीं केलें नमन । नाहीं बोलिलों मृदुवचन । देहलोभें ठकलों पूर्ण । विमुख [तु 'अनुतापगहनऋष्यशृंगा'.] सज्ञन म्यां केलें ॥ २० ॥

त्यांची मागुती होईल भेटी । तरी पुसों त्यांच्या गुह्यगोष्टी ।
हृदयीं आवडी [मु. अं. कं. 'बैसली'.] लागली मोठी । केव्हा हे दृष्टी देखेन ॥ २१ ॥

ऐसी करितां तळमळ । तंव जाला प्रातःकाळ । विभांडक अनुष्ठानशीळ । गेला तात्काळ स्नानासी ॥ २२ ॥

[तं. 'येकावेळी तये पर्णकुटी'.] एकाकी पुत्र पर्णकुटीं । [मु. 'देखोनि प्रमदा'.] प्रमदा आलिया उठाउठी । त्यासी देखोनिया दृष्टी । करी गोष्टी [कं. मु. 'साशंक'.] साशंकें ॥ २३ ॥

अनुक्रमणिका

**धैर्य धरूनी उभा ठाके ।** [मु. 'मृगभावें'.] **मृग स्वभावें मागुता चमके । आवडीचेनि भावें** [नि. 'खुडके'.] **अडके । सवेंचि फडके** [तु. प्रतीत या ओवीनंतर पुढील ओवी आढळते :—
'अप्सरा म्हणती करु युक्ति । या जवळीं मृगस्वभाव दिसती । परी विषयलोभासक्ति । तेणेंचि तो लोभावे ॥'] **गजबजिला ॥ २४ ॥**

**तेहीं झणत्कारिला वीणा । नाद संचरला श्रवणा । मोहो उपजला अंतःकरणा । गमनागमना विसरला ॥ २५ ॥**

[मुं. 'घंटापारधी'.] **घांट-पारधी जैसा ।** [तं. 'तिये नादें'; त. कं. 'दिपे नादीं'; मुं. जो. भा. 'दिपे नादें'; मु. 'मधुर नादें'.] **घंटानादें मृगमानसा । भुलवोनिया पाडी फासां । तैसी दशा पावला ॥ २६ ॥**

**टंवकारल्या** [भा. 'पर्णकुटीं'; मु. 'कर्णकुटीं'.] **कर्णपुटी । उचलुनिया** [मु. 'ग्रीवागाठीं'; त. 'वगाडीं'; मुं. जो. तं. 'उचलोनिया बागाठीं'; भा. कं. 'बगाटीं'.] **बाहुवटी । प्रमदा लक्षुनिया दृष्टी । मान त्यांची कंठी घातली ॥ २७ ॥**

**मृगाचा स्वभाव पूर्ण । व्हावें नादा आधीन । जंव जंव आईके गायन । तंव तंव आपण नाचतु ॥ २८ ॥**

**कोण तुमचें वस्तीचें** [मु. 'स्थान'.] **बन । कोणा अर्था येथें आगमन । तुमचे हृदयीं व्यथा कोण ।** [मुं. 'अति तीक्ष्ण'.] **गंडे तीक्ष्ण दिसताती ॥ २९ ॥**

**तुझा माथां** [घा. 'पूर्ण तीक्ष्ण',] **शृंगतीक्ष्ण । तुज ऋष्यशृंग अभिधान । आमुचे हृदयीं गंडे तीक्ष्ण । गंड ऋषी जाण आम्हा म्हणती ॥ ३० ॥**

**आमुचे रतिरमण स्थान । चाख पां तेथील जीवन । म्हणउनि करविती** [भा. घा. 'अधरपान'; कं. 'रतपान'.] **रसपान । देती चुंबन** [तुं. 'अधराते'.] **अधरामृतें ॥ ३१ ॥**

**आमुचें सर्वांग सिद्ध अनुष्ठान । आमुच्या गंडाचें स्पर्शन । करितां सुखसमाधान । म्हणौन आलिंगन देती त्यासी ॥ ३२ ॥**

**आमुचे** [भा. 'वसतीचा'.] **वनींचा फळपाडू ।** [नि. 'म्हणौनि देती'; मु. 'दोनी'.] **देती साखरेचा लाडु । ये वनीं नाहीं सुरवांडु । अति दुर्वाडु अनुष्ठाना ॥ ३३ ॥**

[नि. 'ही आमुचीं'.] **आमचे समाधीची स्थिती । म्हणउनि रतिमुद्रा लाविती । सत्यासनीं बैसविती । जाला वश्यवर्ती स्त्रियांसी ॥ ३४ ॥**

**विसरला आश्रमस्थिती । विसरला आपुली गती । यावें परतोनि मागुती । हेंहि निश्चिती विसरला ॥ ३५ ॥**

**विसरला संध्यास्नान । विसरला जपध्यान । विसरला अनुष्ठान । गमनागमन विसरला ॥ ३६ ॥**

**विसरला स्थितीगती । विसरला प्राप्ताप्राप्ती । विसरला पितृभक्ती । स्त्रियानुवर्ती वर्ततु ॥ ३७ ॥**

अनुक्रमणिका

विसरला निजावस्था । विसरला निजस्वार्था । विसरला तो निज पितां । स्त्रियां तत्त्वतां वश्य केला ॥ ३८ ॥

विसरला वेदाध्ययन । विसरला शास्त्रपठण । विसरला मी कोण । स्त्रियाधीन तो जाला ॥ ३९ ॥ [कं. प्रतीत ओवी ३९ वी नाही.]

क्षणार्धें स्त्रियांचे संगती । वनवासी होय वश्यवर्ती । जे नित्य स्त्रिया सेविती । त्यांची निर्गती कैसेनि ॥ ४० ॥

स्त्रियां वश्य केलें वनवासी । स्त्री किंकर ग्रामवासी । अपभ्रंशु तो स्त्रियापासीं । घातमुक्तिसी स्त्री-संगु ॥ ४१ ॥

स्त्रियांचें दर्शन स्पर्शन । स्त्रियांचे जें जें संभाषण । स्त्रियांची जे जे आठवण । अपभ्रंशु [घा. 'जाण'; नि. 'संपूर्ण'] पूर्ण पुरुषासी ॥ ४२ ॥

नको स्त्रियांचा [मु. 'संगत'; कं. भा. 'जो सांगातु'.] सांघातु । नको स्त्रियांसी [मुं. 'एकांत मात'.] मातु । नको स्त्रियांचा एकांतू । अपघातुपूर्ण पुरुषांसी ॥ ४३ ॥

एवं स्त्रियांचा संगती । ऋष्यशृंग जाला [मु. जो. कं. मु. 'वश्यवर्ती'.] लावण्यवर्ती । भुलोनिया स्त्रियांप्रती । आणिला निश्चिती [मुं. [जो. व मुद्रित 'नगरासी'.] अयोध्येसी ॥ [या ओवीनंतर तुळजापूर प्रतीत पुढील ओवी आढळते :—]
'दशरथ बैसला आसनीं सभेसी । वसिष्ठादिक सकळ ऋषि । ते तंव आणिले ऋष्यशृंगासी । सभेपासी उभा केला ॥'
आणिलें देखोनि ऋष्यशृंगासी । परम आल्हादु दशरथासी । शृंगारिलें नगरासी । गुढिया चौपासी उभविल्या ॥ ४५ ॥

मखरें तोरणें टिळे माळा । वस्त्रें भूषणें लोकां सकळां । शृंगारिलें गाई गोवळां । विभांडिका सोहळा [मुं. जो. कं. मुद्रित 'पुसावया'.] देखावया ॥ [या ओवीनंतर तु. प्रतीत पुढील ओवी आली आहे :—
'यावरी राजा विचार करी । शांतनु माझे घरीं । नोवरी श्रीवसिष्ठ लग्न करी । अति गजरी उल्हासें ॥']

मेळउनि ऋषि सज्ञन । वसिष्ठें निर्धारिलें लग्न । ऋष्यशृंगासी कन्यादान । केलें सुलग्न शांतनेंसी ॥ ४७ ॥

शांतनेंचा पिता शांतन । राजमित्र जीवप्राण । तो आणिला पाचारून । लग्नालागुनि शांतनेच्या ॥ ४८ ॥

राजा दशरथु भाग्यनिधी । वसिष्ठ कुलगुरु सुबुद्धी । विवाह होम लग्नसिद्धी । कार्य त्रिशुद्धि साधिलें ॥ ४९ ॥

विभांडिकु आला आश्रमासी । न देखे ऋष्यशृंगपुत्रासी । ठकुनि नेलें दशरथें त्यासी । [जो. कं. मु. 'अति क्रोधेसी चालिला' हा चरण त. प्रतीत ५५ व्या ओवीच्या शेवटी आला आहे. या ५१ व्या ओवीचें पहिलें तीन चरण केवळ त. प्रतीत आढळतात.] ऐसें मानसीं कळों सरलें ॥ ५० ॥

काल तो दुश्चित होता मानसीं । आश्रमा आले होते म्हणे तापसी ॥ तेहींच नेलें ऋष्यशृंगासी । अतिक्रोधेसी चालिला ॥ [कं. जो. मु. प्रतींत ही ओवी नाही.]

अनुक्रमणिका

आला अयोध्या प्रांतासीं । [मु. जो. कं. व. मुद्रित प्रतींत हे पद नाही.] तंव देखे शृंगारिलें नगरासी । गाई गोवळ शृंगारेंसी । मार्गीं त्यासी भेटले ॥ ५२ ॥

चाळवोनि आणिले माझिया बाळा । कायिसा ये नगरीं सोहळा । पुसतां जाला तो गोवळां । भेटल्या सकळां ग्रामस्था ॥

ते सांगती वृत्तांतु । ऋष्यशृंग भृगीसुतु । त्यासी कन्या देते दशरथु । सोहळा नगरांतु लग्नाचा ॥ ५४ ॥

मूळ धाडिलें विभांडकासी । तो त्या न भेटे वनवासी । विधियुक्त लाविलें लग्नासी । उल्हासेसी दशरथें ॥ ५५ ॥

ऐकतां पुत्रविवाहासी । विभांडकु अति उल्हासी । संतोषला दशरथासी । प्रसन्नतेसी तो आला ॥ ५६ ॥

रावो वेगे सामोरा आला । धावोनि चरणासी लागला । अतीप्रीति आलिंगला । म्हणे भला भला दशरथा ॥ ५७ ॥

सर्व अलंकार भूषणेसी । [मुं. जो. कं. मु. 'वाहिली'.] ओपिले देखोनि ओहरांसी । विभांडकु सुखसंतोषीं । दशरथासी तुष्टला ॥ ५८ ॥

राया जें जें तुझे [मुं. जो. मुद्रित, 'मनोरथ'.] मनोगत । तें तें पुरवीन मी समस्त । म्हणउनि आल्हादयुक्त । पुत्रप्रीती दशरथा प्रिय जाला ॥ ५९ ॥

विष्टरोक्त वरासन । षोडशोपचारी पूजन । केलें चरणतीर्थ प्राशन । ऋषि प्रसन्न रायासी ॥ ६० ॥

शांतनु अतिमित्र रायासी । [तं. 'रोमपाद'.] लोमपाद म्हणती तयासी । अवर्षण त्याचिया देशीं । तेणें दशरथासी प्रार्थिलें ॥ ६१ ॥

विभांडकु द्यावा आम्हासीं । [मु. जो. तं. घा. कं. भा. 'करीन' नि. 'करवीन'.] करील पर्जन्येष्टि यागासी । पीडा निवारिल भूतांसी । गोब्राह्मणांसीं [नि. 'सुख करील'; कं. घा. 'सुखकरी'.] सुखकारी ॥ ६२ ॥

दशरथाची उदार स्थिती । अवंचकु मित्र [मुद्रित 'कार्याप्रती'; भा. 'परमप्रीती'.] कार्यार्थी । लोभ पादाचिया कार्यस्वार्थी । प्रार्थिला निश्चिति विभांडकु ॥

विभांडिकु प्रेमें आपण । म्हणे [मु. 'भावार्थेसी'.] भावार्थी मी तुज आधीन । राया तुझें नुलंघी वचन । करीन यज्ञ लोमपादाचा ॥ ६४ ॥ त. प्रतीत या ओवीनंतर समासात पुढील दोन ओव्या लिहिल्या आहेत :—
'लोमपादें अति अनन्य । ऋषीसी घातलें लोटांगण । स्वामीनें करावें धर्मस्थापन । सकळ पावन तुमचेनि ॥ ६४ ॥
दोघीजणी अतिप्रीति । जाऊनिया देशाप्रती । यज्ञाची यज्ञसमाप्ती । यथास्थिति पै केली ॥ ६५ ॥'
पुढील ओव्यांतून या दोन ओव्यांचा आकडा जमेस धरलेला दिसत नाही. त्यामुळे पुढील क्रमांत उपरोक्त दोन ओव्यांचा अंतर्भाव झालेला नाही.

विभांडकें करितां यज्ञ । राष्ट्रीं वरुषला पर्जन्य । तृणधान्यें मेदिनी पूर्ण । गोब्राह्मणा आल्हादु ॥ ६५ ॥

अनुक्रमणिका

पुजूनिया विभांडकासी । आणिला दशरथापासी । ऋषी येतांचि अयोध्येसी । राये यागासी आरंभिलें ॥ ६६ ॥

वसिष्ठ श्रेष्ठ कुलगुरु । दुजा विभांडकु ऋषीश्वरु । ऋष्यशृंग [मुं. जो. कं. मु. ‘हर्षनिर्भरु’.] हरिखे निर्भरु । यज्ञांगिकारु तेणें केला ॥ ६७ ॥

ऋष्यशृंग म्हणे रायासी । मी पुत्र देईन तुम्हासी । म्हणौनि अति उल्हासी । स्वयें यागासी प्रवर्तला ॥ ६८ ॥

नमुनिया निजपिता । वसिष्ठ वंदुनि तत्त्वतां । दशरथाचिया निजस्वार्था । यज्ञकर्ता ऋष्यशृंग ॥ ६९ ॥

कुंड मंडप वेदि सुलक्षण । इध्मा बर्हि त्रिसंधान । करूनिया परिस्तरण । अग्निस्थापन तेणें केलें ॥ ७० ॥

प्रणितापात्रें परिपूर्ण । आज्यस्थाली बर्हिआस्तरण । स्त्रुक्स्त्रुवा परिमार्जन । केलें [मुं. जो. कं. मु. ‘प्रोक्षण’.] प्रक्षाळण यज्ञोपचारांत ॥ ७१ ॥

ऋष्यशृंगाचें अनुष्ठान । अतिशयें श्रेष्ठ पूर्ण । होम करितां प्रधान । यज्ञपुरुष आपण प्रत्यक्ष जाला ॥ ७२ ॥

गगन झालें दैदिप्यमान । [मुं. जो. कं. तं. मु. ‘परित्या’.] परिसा [भा. ‘सप्ततेजाचें’.] तेजाचें लक्षण । नोहे अतिशीतळ ना अतिउष्ण । स्वानंदपूर्ण निज तेजें ॥ ७३ ॥

वसिष्ठासी विस्मयोपूर्ण । [मुद्रित ‘विस्मय पावे’.] विस्मितु विभांडकु आपण । विस्मयो पावले ऋषीगण । अयोध्येचे जन तटस्थभूत ॥ ७४ ॥

खुंटली श्वासोच्छ्वासाची गती । लगो विसरली नेत्रपाती । ऋष्यशृंगतपाची ख्याती । यज्ञमूर्ति [नि. ‘प्रकटली’] प्रत्यक्ष ॥ ७५ ॥

मागें यज्ञ केले बहुती । ते ते पावले फळप्राप्ती । परि यज्ञें प्रकटे यज्ञमूर्ती । हे केली ख्याती ऋष्यशृंगें ॥ ७६ ॥

उदरा येईल रघुपती । यालागीं यज्ञीं यज्ञमूर्ती । पायसपात्र घेउनि हातीं । ऋष्यशृंगाप्रति देता जाला ॥ ७७ ॥

हा यज्ञ पुरोडांश संपूर्ण । द्यावा राजपत्नीलागी विभागून येणें । पुरोडांशे जाण । पुत्रसंतान होईल ॥ ७८ ॥

येणें प्रसादें पुत्रप्राप्ती । ज्याचेनि पावन त्रिजगती । ऐसी [मु. ‘निर्माण’; तु. ‘जाण’; कं. मु. जो. प्रतीत हे पद नाही.] जन्मेल पुत्रसंतती । जाण निश्चिती रायासी ॥ ७९ ॥

विलंबु न करावा अर्धक्षण । तात्काळ करावा प्राशन । विलंबी उपजेल विघ्न । हें सांगोनि आपण । अदृश्य जाला ॥ ८० ॥

अनुक्रमणिका

अदृश्य जालिया यज्ञमूर्ती । तें पायसपात्र घेउनि हातीं । ऋष्यशृंग दे रायाप्रती । पुत्रार्थी प्रसादु ॥ ८१ ॥

गुह्य सांगे वसिष्ठासी । विलंब करूं नये यासी । समभागें देणे राणियांसी । [मु. जो. कं. व मु. 'विलंबासी अतिविघ्न'; त. 'विलंबापासी अतिविघ्न'.] अविलंबेसी अतिशीघ्र ॥ ८२ ॥

फलं मूलं तथा तीर्थं प्रसादो राघवस्यच शीघ्रमेवानुसेवेत विलंबः कार्यनाशकः ॥ १ ॥

यालागी नांवें तूं वसिष्ठ । कुलगुरु अतिश्रेष्ठ । कार्य साधावें [मु. 'अति' हे पद नाही; तं. त. कं. 'आहे उद्भट'.] अतिउद्भट । विभागी इष्ट विभागें ॥ ८३ ॥

जाणोनि भविष्य स्थिती । वसिष्ठे पायसपात्र घेउनि हातीं । भाग केले यथानिगुती । विभागस्थिति अवधारा ॥ ८४ ॥

कौसल्या भाग परब्रह्म । सुमित्रा भाग भजनोत्तम । कैकेया भाग परमधर्म । भागानुक्रम विभागें ॥ ८५ ॥

कौसल्या ते धर्मपत्नी । सुमित्रा वरिली [मु. 'साध्वी'.] साधु म्हणौनि । कैकेया वरिली [मु,जो. कं. व मु. 'सुंदरपणीं'.] सुंदर म्हणौनि । रूपें [मु. 'रुपयौवन'.] यौवनी गर्विष्ठ ॥ ८६ ॥

कैकेयी म्हणे वसिष्ठाप्रती । मी [मुं. जो. कं. व मु. 'तव'.] तरी राजयाची पढियंती । ज्येष्ठभाग दे मजप्रती । येरे निरुती वारिली ॥ ८७ ॥

ज्येष्ठभाग ज्येष्ठेप्रती । तो केवि ये [जो. मु. 'कनिष्ठेप्रति'.] कनिष्ठे हातीं । जेवी गजाची भूषणस्थिती । अजेप्रती अतिभारु ॥ ८८ ॥

जऱ्ही अमोलिक [मु. जो. कं. व मु. प्रतीत हे पद नाही.] हिरे रत्नें होती । तऱ्ही शालिग्रामासम पूज्य नव्हती ।
तूं जालियाहि पढियंती । ज्येष्ठ [तु. 'भागाथी'.] भागाप्रती अयोग्य ॥ ८९ ॥

[मु. 'ज्येष्ठ भाग'.] ज्येष्ठ दिधला कौसल्येसी । दुजा दिधला सुमित्रेसी । तिजा दिधला कैकेयीसी । तिचा मानसीं अतिक्रोधु ॥ ९० ॥

कांही न चले वसिष्ठावरी । क्रोधें द्वेष गुरूचा करी । विभाग आलियाहि करी । सुख जिव्हारीं असेना ॥ ९१ ॥

मी गेलें होतें स्वर्गाप्रती । म्या भोगिल्या स्वर्गसंपत्ती । ज्येष्ठपिंड न ये माझा हातीं । तो द्वेष चित्तीं गुरूचा ॥ ९२ ॥

करावया पिंड प्राशन । दोघीं केलें शुद्धाचमन । कैकेयी पाहे रायाचें वदन । तव विलंबी विघ्न ओढवलें ॥ ९३ ॥

जे न मानिती गुरुवचन । त्यासी तत्काळसे विघ्न । तेचि अर्थीचें निरुपण । कथानुसंधान अवधारा ॥ ९४ ॥

अनुक्रमणिका

सुवर्चसा अति नाचणी । नाचो आली मद्य सेवुनी । [मु. 'ताल चुंकतां तत्क्षणीं'.] ताळ चुके प्रतिक्षणीं । तीस ब्रह्मेनी श्रापिलें ॥ ९५ ॥

सत्यलोकीं मद्यपान । हे अत्यंत निंद्य जाण । ताळ चुकली आपण । हेंहि लक्षण मद्याचें ॥ ९६ ॥

अमंगल [मु. जो. कं. 'निर्लज्ज उन्माद सुंदरी'; नि. 'निर्लज्ञे उन्मत्ते'; घा. 'निर्लज्ञ उन्मत्त'; तं. 'निरसे उन्माद सुंदरी'; त. 'निर्लजें उन्मदें'.] उन्मत्त सुंदरी । [मु. 'नष्ट पापिणी, होय घारी'.] नष्टे होई पक्षिणी घारी । ताळ चुकोनि जासी चांचरी । तैसें तूं करी परिभ्रमण ॥ ९७ ॥

शाप आइकोनि दारुण । उश्शाप मागे अति दीन । प्रसन्न केला चतुरानन । वरद वचन तो वदला ॥ ९८ ॥

दशरथ याग पुत्रजन्य । तेथें यज्ञपुरुष परमान्न । त्रिधा भागें भागिती अन्न । एक भाग प्राशन [घा. 'तों'.] तुवां करावा ॥ ९९ ॥

ज्येष्ठ भागें तुज नाहीं गती । मध्यभागा न [मु. 'न पावे'.] पवे शक्ति । घ्यावें [तं. खेरीज इतरत्र 'कनिष्ठाकनिष्ठ भागप्राप्ती'.] कनिष्ठ भागाप्रती । तेणें निमुक्ति निजशापा ॥ १०० ॥

हें होईल अयोध्यानगरीं । यालागी ते जाणावी खरी । मोक्षाची प्रथमपुरी । वेदशास्त्रीं निजगजरु ॥ १०१ ॥

काशी मुक्तिक्षेत्र पाही । मेल्यां मुक्ति तिये ठायीं । सगळीं वैकुंठा गेलीं नाहीं । अयोध्येची नवाई अपूर्व ॥ १०२ ॥

[नि. 'काशीहूनि ते'.] काशीहूनि वहिली । [कं. व मु. 'अयोध्येची उदारता भली'.] अयोध्या उदार भली । त्रिवार नगरी वैकुंठा नेली । न मरतां केली सकुटुंबें ॥ १०३ ॥

प्रथम रुक्मांगदें नेली । दुजी [मु. 'शिबीनें'.] शिबीनें ख्याती केली । तिजी [मुं. जो. कं. व मु. 'वहिली'.] श्रीरामें नेली । वैकुंठा [मुं. जो. कं. व मु. 'नेली'.] गेली निज गजरें ॥ १०४ ॥

आणिक चवथेनहि मागुती । अयोध्या जाईल वैकुंठाप्रती । ऐसी वसिष्ठादिकांची ख्याती । अयोध्येप्रती [मु. 'असे पैं'; तु. 'आश्वासन'.] शासन ॥ १०५ ॥

यालागीं [भा. तु. कं. व मु. मु. 'मुक्तिक्षेत्रा'; त. 'मुक्तां क्षेत्रांच्या'.] मुक्तक्षेत्रांच्या शिरीं । अयोध्या जाण प्रथम पुरी । जडजीवा ते उद्धरी । शापु निवारी [घा. कं. मु. जो. 'स्नानमात्रें'. तु. 'क्षणमात्रें'; भा. 'नाममात्रें'.] दर्शनमात्रें ॥ १०६ ॥

ते अयोध्येसी भागप्राशन । केलिया तुझें शापविमोचन । ऐसें बोलिला चतुरानन । अप्सरा आपण घारी जाली ॥ १०७ ॥

ते ऐसी सहस्त्र वरुषें वरी । भोंवे अयोध्येचे महाद्वारीं । यज्ञभागु [तं. 'देतां करी'; भा. 'देखोनि कैकेयी करी'.] देखतां करी । झडप मारी तात्काळ ॥ १०८ ॥

अनुक्रमणिका

कौसल्या [नि. 'सत्य'; घा. हे पद नाही; त. तं. मु. जो. कं. तुं 'सती'.] परम पतिव्रता । तीवरीं [हे पद मुं. व कं. मु. जो. प्रतींत नाही. केवळ त. प्रतीत आढळते.] झेंप न घालवेचि [त. 'तत्त्वतां'.] सर्वथा । सुमित्रा शुद्ध [घा. 'सत्त्वास्था'; त. मु. जो. 'सत्त्वता'; तं. 'तत्त्वतां'; कं. 'सत्त्वतत्त्वता'.] सत्त्वावस्था । तीवरीं तत्त्वतां न घालवे ॥

कैकेयी अति क्रोधायमान । निजभागीं नाहीं मन । रागें पाहे रायाचें वदन । तंव घारी हिरोन भाग नेला ॥ ११० ॥

तोंडावरी हाणे पांखी । हात ओरबडिला नखीं । भागु घालुनियां मुखीं । गेली [जो. कं. घा. 'एकाएकी'.] एकाकी गगनासी ॥ १११ ॥

लोक करिती हाहाकार । एक सवेग विंधिती [जो. कं. घा. 'तीर'.] शर । अवघे पाहती उर्ध्वशीर । थोर चमत्कार सर्वांसी ॥ ११२ ॥

लागतां पाखांचें झडे । कैकेयी उलथोनि क्षितीं पडे । भागु गेला मग रडे । रायाकडे पाहोनि ॥ ११३ ॥

रायासी म्हणे पाहतां काये । येरु म्हणे मी करूं काये । तुझा गर्व तुज [मु. 'आडवा होय'.] आडढायें । तेथें उपाय न चलेचि ॥ ११४ ॥

घारी भागु करितां प्राशन । तुटलें तिचें देहबंधन । खुंटले जी गमनागमन । सुखसंपन्न ते जाली ॥ ११५ ॥

तोचि भागु उपेक्षितां । कैकेयेसी परमावस्था । बाप गर्वाची अतिगर्वता । निजस्वार्था अतिघातु ॥ ११६ ॥

जेवीं उपेक्षितां आत्मज्ञान । अंगी आदले अज्ञान । विषयीं पावती अधःपतन । ते दशा संपूर्ण कैकेयासी ॥ ११७ ॥

कां मायबापु [नि. घा. 'पुसितां'; तं. त. कं. 'पुजितां'.] जितां । पुत्र उपेक्षी [मु. 'हेळसितां' नि. प्रतीत ही ओवी अशी आहे :— 'काय मायबाप बहुत दिवस जितां । पुत्र उपेसी हेळसितां । रडे मेल्यामागें तर्पण करितां । पिंड देतां सद्‌गति ॥'] हेळणतां । रडे मेल्यामागें वपन करितां । पिंड देतां [नि. घा. 'सद्‌गति'; कं. 'सद्‌गद्‌गदी'.] सद्‌गदित ॥ ११८ ॥

तैसी दशा कैकेयेसी । उपेक्षिलें निजभागासी । गेलिया मागें कुसमुसी । उक्साबुक्सी स्फुंदत ॥ ११९ ॥

मी रायाची पढियंती । ते मी अभाग्य जालें क्षितीं । मज नव्हेचि पुत्र संतती । निंद्य सर्वार्थी मी जालें ॥ १२० ॥

माझें रायासी अतिकोड । तें कोण्हाहि न लगे गोड । जळो माझें काळें तोंड । लोक वितंड निंदिती मज ॥ १२१ ॥

ज्येष्ठ-भागु मागतां आवडी । तंव कनिष्ठासीच आली धाडी । मज हे थडी ना ते थडी । निंद्य रोकडी मी जालें ॥ १२२ ॥

स्वार्थें नाडलें मी संपूर्ण । जिवो न लाहो लोकां भेण । मज येते कां वो मरण । रडे दारुण संतापे ॥ १२३ ॥

स्वर्गी जे मी सुरवरां वंद्य । ते मी मृत्युलोकीं [घा. हे पद नाही.] नरनारींसी निंद्य । विभागी माझें भाग्यमंद । [घा. 'पाषाणवत्'.] पाषाणवंध्या मी जालें ॥

जे मी रायाची आवडती । ते तेणेंसी जना नावडती । [घा. 'पाषाणवत्'.] पाषाणवंध्या माझी स्थिति । देव पितरार्थी अति निंद्य ॥ १२५ ॥

धर्मकर्माभिसेचनीं । नव्हे मी रायाची ज्येष्ठ पत्नी । वंचले देव पितरार्चनीं । वंध्या म्हणौनि अतिनिंद्य ॥ १२६ ॥ [नि. घा. या प्रतींत ही ओवी नाही.]

अंधा हातीचें रत्न पडे । ते ज्याचें त्यासी न संपडे । कैकेयी तेणें पाडे । रडे पडे अतिदुःखी ॥ १२७ ॥

केस सुटले मोकळे । गडबडां पृथ्वीवरी लोळे । अश्रुधारा स्रवती डोळे । अति [मु. जो. कं. घा. 'तळमळें'.] विव्हल तळतळी ॥ १२८ ॥

देखोनि कैकेयीचें दुःख । कौसल्या कळवळली देख । हरूनियां तिचें असुख । [घा. 'प्रवर्ते देख उपकारार्थी'; भा. 'प्रवर्ते देख विवेकीं'.] द्यावया सुख प्रवर्ते ॥ १२९ ॥

एकाजनार्दना शरण । जाले यज्ञशेष पिंडप्राशन । पुढील परिसा अनुसंधान । गर्भधान अवधारा ॥ १३० ॥
[नि. घा. ही ओवी पुढीलप्रमाणे :—
'श्रीभावार्थरामायण । एकजनार्दना शरण । जाले येथवर निरोपण । पिंडप्राशन अवधारा ॥'
कं. जो. प्रतींत ही अशी : 'इति श्रीभावार्थरामायण । एकाजनार्दना शरण । जाले पिंडभाग निरोपण । पिंडप्राशन अवधारी ॥' मु. ही ओवी नाही.]

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां द्वितीयप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग तिसरा

## पिंड प्राशन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

[कं. प्रतीत प्रारंभी—
‘उपकारेषु यः साधुः साधुत्वे तस्य को गुणः । अपकारेषु यः साधुः स साधुरित्युच्यते ॥ १ ॥’]
कैकेयी धरुनि पोटेंसीं । कौसल्या संबोखी तियेसी । तूं कां व्यर्थ दुःखी होसी । आम्हा दोघीसी [नि. ‘दुःख’.] सुख एक ॥ १ ॥

एकोदरा सख्या बहिणी । ते मिथ्या सख्यत्वाची कहाणी । दोघे पर्णिजे दोघीजणीं । दुरंतर पाटणी नांदती सख्या ॥ २ ॥ [भा. नि. व घा. प्रतींत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :—
‘एकोदरा सख्या बहिणी । दोघी पर्णिजे दोघीजणी । त्यांसी कांहीं नाही मिळणी । दुस्तर पाटणी नांदती सख्या ॥’]

दोघींसी नाहीं नित्य भेटी । दोघींसी नाहीं नित्य गोष्टी । दोघींसी नाहीं नित्य दृष्टी । मिथ्या चावटी सख्यत्वाची ॥ ३ ॥

दोघींसी नाहीं नित्य संबंधु । दोघींसी नाहीं नित्य संवादु ।
दोघींसी नाहीं नित्यावबोधु । तो सख्यत्व संबंधु अतिमिथ्या ॥ ४ ॥

दोघींसी नाही एकसुख । तें सख्यत्व मानिती मूर्खलोक । तूं कां करिसी व्यर्थ दुःख । आम्हांत्त्वें निजसुख एकावे ॥ ५ ॥

आम्हातुम्हा एक आहेवपण । आम्हातुम्हा एक निजभूषण । आम्हातुम्हा एक [कं. व मु. ‘निजमंडण’.]मंडन । [भा. ‘आम्हा सखेपण पकत्वे’; नि. घा. ‘सख्यपण पकत्वें आम्हांतुम्हां’.] सत्य सखेपण आम्हांतुम्हां ॥ ६ ॥

आम्हातुम्हा एक [तं. खेरीज इतरत्र ‘सांगात’.] सांघातु । आम्हातुम्हा एक भोगार्थु । आम्हातुम्हा एक [नि. घा. ‘कांत’.] एकांतु । [मु. ‘सख्य’.] सत्य सख्यार्थ आम्हांतुम्हां ॥ ७ ॥

आम्हातुम्हा एक नाहो । आम्हातुम्हा एक सद्भावो । आम्हातुम्हा एकात्म स्नेहो । सत्य सख्यान्वयो आम्हातुम्हा ॥ ८ ॥

आम्हातुम्हा एक निवासस्थान । आम्हातुम्हा एक भोगभुवन ।
[नि. ‘एकें सुखें संपन्न’; कै. ‘पकें सुख सुखसंपन्न’.] आम्हातुम्हा एक सुखसंपन्न । सत्य सखेपन आम्हातुम्हा ॥ ९ ॥

आम्हांतुम्हां एकु नित्यत्वें चाळितां । आम्हातुम्हा [कं. नि. घा. ‘नित्य प्रतिपाळितां’.] एकु प्रतिपाळितां ।
आम्हांतुम्हां एक नित्यत्वें न्याहाळितां । हें नित्य सख्यता आम्हांतुम्हां ॥ १० ॥

अनुक्रमणिका

**आम्हांतुम्हां एकु गोसावी । आम्हांतुम्हां एक** [मु. ‘नाथ’.] **निववी । आम्हांतुम्हां एकु जीववीं । हें सत्य पदवी सख्याची ॥ ११ ॥**

**आम्हांतुम्हां एकु पंचभौतिक । आम्हांतुम्हां एकुचि हस्तपादादिक ।**
**आम्हांतुम्हां देखणें एकु । हें अलौकिक निजसख्य ॥ १२ ॥**

**आम्हांतुम्हां एकु** [मु. ‘नाथ’.] **आत्मनाथु । तो सत्यत्वें जाण दशरथु । तूं खेद करिसि** [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] **तो व्यर्थु । आइक वृत्तांतु वो साजणें ॥ १३ ॥**

**पुढिलांचे देखौनि दुःख । सुख मानी** [मु. प्रतींत हे पद नाही.] **तो परममूर्ख । पराचें निरसुनि असुख । द्यावें** [मु. ‘द्यावे सुख साधुत्वें’. भा. ‘द्यावे सुख शुद्धत्वें’.] **निजसुख साधुत्वें ॥ १४ ॥**

**परदुःखें होय सुखी । तो ब्रह्मराक्षस तिहींलोकीं । सदा निंदिजे शास्त्रमुखीं । शुद्ध सात्त्विकी तो** [तु. ‘विटाळिला’; मु. ‘नव्हे’.] **विटाळु ॥ १५ ॥**

**तुं राहसी अपुत्रपणीं ।** [मु. ‘पुत्रपणीं’; तु. ‘आम्हा सुख व्हावे कैसेनि’; भा. ‘आम्ही सुख पावो पुत्रपणीं’.] **आम्ही सुखावो पुत्र जनुनी । तै पूर्वज पडती पतनीं । तो दोष त्रिभुवनीं न समाये ॥ १६ ॥**

**उपजल्या पुत्रा देवो जाता । तो पोसणा म्हणती तत्त्वतां । साधु दोहींच्या निजस्वार्था । अवंचकता परमार्थे ॥ १७ ॥**

उदकस्य रसः शैत्यमन्नस्य स्वादशे रसः । आनुकूल्यं रसः स्त्रीणां मित्रस्यावंचनं रसः ॥ १ ॥

**उदकाची गोडी शीतळता । अन्नाची गोडी आदरता । स्त्रियेची अनुकूलता । अवंचकता मित्र गोडी ॥ १८ ॥**

**आम्हीतुम्ही सख्याबहिणी । ऐसी बोलिली जे कहाणी । करूनि दावावी करणीं । येर बोलणीं अतिमिथ्या ॥ १९ ॥**

**जैसें बोले तैसे करी । त्यातें वंदिजे हरहरी । जे व्यर्थ बोलाची ज्ञानफरारी । ते संसारी पढतमूर्ख ॥ २० ॥**

यथा चिंत्तं तथा वाचो यथा वाचस्तथा क्रिया ॥ चित्ते वाचि क्रियायां च साधूनामेकरूपता [नि. घा. या प्रतींत हा श्लोक नाही.] ॥ २ ॥ [सुभाषित रत्नभांडार सज्जन प्रशंसा, श्लोक ३६.]

**जैसा** [नि. घा. ‘बोले’.] **बोल तैसा क्रियार्थ । तया नांव मुख्य परमार्थ । येर बोलणें तें व्यर्थ । विषयस्वार्थ** [नि. ‘परमार्थी’.] **वचनार्थी ॥ २१ ॥**

**माझें बोलणें सत्यसांग । माझां भागाचा अर्धभाग । सजणी घेई वो सवेग । दोघींचें अभंग सख्यत्व येणें ॥ २२ ॥**

अनुक्रमणिका

एकतां कौसल्येचें वचन । कैकेयी जाहली सावधान । करूनिया शुद्धाचमन । भागार्ध आपण स्वानंदें घे ॥ २३ ॥

मृत पावे अमृतपान । तृषितामुखीं निजजीवन । अंधा उघडलें [मु. 'लोचन'.] नयन । तैसें वचन कौसल्येचें ॥ २४ ॥

रंका लाधलें निधान । अकर्मी पावे [मु. 'ब्रह्मज्ञान'.] ब्रह्मसदन । दुकाळल्या मिळे [मु. 'मिष्टान्न'.] दिव्यान्न । तैसें वचन कौसल्येचें ॥ २५ ॥

पतिव्रते पति-आगमन । अवर्षणीं वर्षे घन । वंध्या पावे पुत्र निधान । तैसें समाधान कैकेयेसी ॥ २६ ॥ [ही ओवी मु. प्रतीत आढळत नाही.]

कौसल्येची बुद्धि समान । समत्वें [मु. 'समत्वे भाग विभाग आपण'.] भाग भागीं अन्यून । कैकेयेसी दे [मु. 'विभागून'.] आपण । सुखसंपन्न सख्यत्वें ॥ २७ ॥

भाग देतां कैकेयेसी । कौसल्या अति उल्हासी । संवतीभाव नाहीं मानसीं । दे उल्हासेसी निजभागु ॥ २८ ॥

जैसी कौसल्येची विधि । तैसीच सुमित्रा सद्बुद्धि । बाप सत्संगाची सिद्धि । दे अर्धार्धी निजभागु ॥ २९ ॥

सत्संगाचें महिमान । करी आपणा समसमान । कौसल्येसंगें सुमित्रा जाण । दे आपण भागार्धु ॥ ३० ॥

सुष्ठु मैत्री कौसल्येसी । म्हणौनी सुमित्रा म्हणती तियेसी । तेणें सुमित्र भावेसी । दे कैकेयेसी भागार्धु ॥ ३१ ॥

जैसा संगु होय जयासी । तैसी बुद्धी होय तयासी । कौसल्येसंगें सुमित्रा [धा. 'तैसी'.] सरिसी । दे कैकेयेसी अर्धभागु ॥ ३२ ॥

आइकोनि कौसल्येचा वचनार्थ । देखौनी भागदानी निजस्वार्थ । वसिष्ठ आनंदे नाचत । स्वयें डुल्लत स्वानंदे ॥ ३३ ॥

[कं. तु. त. भा. या प्रतींत 'न करितां'.] करितां भाग प्राशन । उदरा आला रघुनंदन । धन्य धन्य अयोध्या राजभुवन । येथें स्वानंदघन क्रीडेल ॥ ३४ ॥

उभउनी स्वानंदाची गुढी । नारदाची पडे उडी । नाचों लागे आवडी । सूर्यवंशा गाढी दशा आली ॥ ३५ ॥

सुटेल देवांची बांदवडी । तुटेल नवग्रहांची बेडी । मुक्ति सुखावैल गाढी । सुख सुखाडी पाल्हेजैल ॥ ३६

माझा वाल्मिकाचें वचन । जाहलें प्रत्यक्ष प्रमाण । राम प्रकटला [भा. 'निधान'; तं. त. 'जनीं'.] निज निधान । [धा. 'धनधन्य अयोध्या'.] धन्य जन अयोध्येचे ॥ ३७ ॥

अनुक्रमणिका

लंकेपुढें युद्ध दारुण । राम करील रणकंदन । तें मी देखेन आपण । हरिखें उड्डाण करी नारदु ॥ ३८ ॥

[तं. घा. कं. ‘जेवी त्याची चवी जेविता जाणें’; तु. ‘जेवणाची चवी जेविता जाणे’;] जेवित्याची चवी जेविता जाणें । तेवी वसिष्ठ नारदाचें नाचणें । तें सुख तिहींच भोगणें । थेंरी पाहणें टकमकीत ॥ ३९ ॥

विभांडकु [भा. धा. तु. त. ‘आनंदे मनी’.] आनंद मानी । कौसल्या सती शिरोमणी । तिचेनी पावन जाली अवनी । धन्य त्रिभुवनीं कौसल्या ॥ ४० ॥ [कं. प्रतीत ही ओवी नाही.]

ऋष्यशृंग तियेवेळीं । सुखावला सुखकल्लोळीं । उड्डाण करुनि दे आरोळी । कौसल्या भूतळीं आणील रामु ॥ ४१ ॥

कौसल्येचा शुद्ध भावो । [भा. ‘तद्भावी’; घा. ‘तयीभावी’; तु. ‘भावी’.] ते भावी प्रकटला रामदेवो । धन्य दशरथ महाबाहो । गर्भान्वयो अलौलिक ॥ ४२ ॥

विस्मयो करिती ऋषीश्वर । तटस्थ ठेले [कं. व मु. ‘सुरवर’.] सुरनर । अवघे करिती जयजयकार । भागिला रघुवीर [भा. कं. व मु. प्रतींत ‘चतुर्थभागी’.] चतुर्धाभागी ॥ ४३ ॥

मुख्य द्वेष [घा. ‘सवती मत्सरासी’; तु. त. ‘सवती मत्सरापासी’; कं. ‘वसती मत्सरापासी’.] मत्सरु सवतीपासी । तो मत्सरु नाही कौसल्येसी ।
म्हणौनि श्रीराम आला कुसीं । त्या गर्भवासासी अवधारा ॥ ४४ ॥

सवतीमत्सरु कैकेयेपासी । म्हणौनि हारविले निजभागासी । शुद्ध भावो कौसल्येपासी । तिचे [तां. तु. त. ‘गर्भवासी’.] गर्भासी श्रीराम ॥ ४५ ॥

एक ताट आलें यज्ञ शेषीं । तो एकुचि गर्भ [घा. ‘भाग’.] निश्चयेसी । तो विभागिला चतुर्थ भागेसी । चतुर्विधु त्यासी बोलिजे ॥ ४६ ॥

मुख्यार्ध भाग कौसल्येपासी । [घा. भा. ‘तदर्ध’; तु. ‘तद्भागार्ध’.] तदभंजनार्ध सुमित्रेसी । दोनी अर्धार्ध कैकेयेसी । स्वतंत्र भाग तियेसी असेना ॥ ४७ ॥

पुढां पोटीं होतील पुत्र । ते तिचे नव्हेति स्वतंत्र । यालागीं ते परतंत्र । कैकेयीचरित्र नावडे त्यांसी ॥ ४८ ॥

असो ये पुढीले कथेसी । वसिष्ठें पाचारूनि तिघींसी । बैसवी [भा. घा. नि. ‘देवोनि भाग विभागासी’.] भाग प्राशनासी । म्हणे विलंबासी करूं नये ॥ ४९ ॥

दोघी निजभाग प्राशन । केले न लगतां दशन । कैकेयी भाग प्राशन । करितां उद्विग्न ते जाली ॥ ५० ॥
दोन्ही अर्ध जंव घोंटी । तंव ते बैसले कंठीं । गिळूं जातां अति [नि. घा. ‘संकष्टी’.] संकटीं । घोटितां [नि. घा. ‘घोटी’; कं. ‘कंठी’.] कष्टी घोटेना ॥ ५१ ॥

अनुक्रमणिका

भाग तियेचे नव्हती स्वतंत्र । परभाग गिळो न शके वक्त्र । पांढरे जाले तिचे नेत्र । वमनोद्वार तें जाली ॥ ५२ ॥

परांचे ओझें वाहणें । तें [नि. घा. 'तें आपणासी होय उबगवाणें'; तं. तु. त. कं. 'परासी होय उबगवाणें'.] होये उबगवाणें । तेंवि परभाग घोटितां तिणें । जिवें प्राणें घोटेचिना ॥ ५३ ॥

[कं. नि. घा. त. 'विभागें'. भा. 'विभागी'] द्विअर्धभागें रुंधिली घांटी । [भा. घा. या प्रतींत हे पद नाहीं.] ऐसें वसिष्ठें देखिलें दृष्टी । मंत्रोदक [नि. घा. 'देऊन'; तु. 'दिधले'.] दे उठाउठी । तेणें तें घोटी विभागा ॥ ५४ ॥

सेवितां तें मंत्रोदक । फिटली शंका पावली सुख । पुत्र गर्भाचा संतोष । आत्यंतिक ते पावे ॥ ५५ ॥

साधु असलिया निकट । भलतें निवारे संकट । गर्भ-मंडित जालें पोट । सुख उद्भट कैकेयीसी ॥ ५६ ॥

हरपलें सांपडे रत्न । मर्त्या घडे अमृतपान । तेवीं वसिष्ठोदकें [नि. घा. '. . . . जाण/सुख परम कैकेयीसी'; तं. तु. 'जाण सुखसंपन्न कैकेयेसी'] जाण । सुख परम कैकेयीसी ॥ ५७ ॥

रंक पावे इंद्रासन । अंधक पावे सूर्यभुवन । तेवीं वसिष्ठोदकें जाण । सुखसंपन्न कैकेयी ॥ ५८ ॥ [ही ओवी नि. घा. प्रतींत आढळत नाही.]

यालागीं सत्संगती । दुःख नोव्हे अधोगती । सत्संगाची परमख्याति । नेणो किती उद्धरले ॥ ५९ ॥

> सत्संगेन हि दैतेया यातुधानाः खगा मृगाः । [नि. घा. 'गंधर्वा राक्षसा नागा'; तु. 'तिसरे चरण व ४ था, 'सिद्ध चारण गंधर्वा । पिशाच्येकुष्टमुद्धरेत्'; तं. व त. या प्रतींत आणखी दोन चरण दिले आहेत :— 'विद्याधरा मनुष्येषु तस्मिन् तस्मिन् युगे युगे ॥']
> गंधर्वाप्सरसा नागाः सिद्धचारणगुह्यकाः ॥ ३ ॥ [श्रीमद्भागवत ११.]

[हा चरण नि. घा. या प्रतींत नाही.] या श्लोकाचा पोटी । दैत्य दानव राक्षस सृष्टि । गण गंधर्व मृग पक्षी पुष्टी । सिद्ध चारण कोटि उद्धरले ॥ ६० ॥

मनुष्य लोकीची गोष्टी । सत्संग लाधल्या पाठीं । उद्धरलें कोट्यान्कोटि । सभाग्य सृष्टि सत्संगु ॥ ६१ ॥

धन्य धन्य तो दशरथ । जयासी सत्संग पुरोहित । जयाची काठी मानी आदित्य । तो घरांआंत निजसखा ॥ ६२ ॥

तेणें श्रीवसिष्ठें आपण । तिघींसी करवियलें पिंडप्राशन । एका विनवी जनार्दन । गर्भानुसंधान [नि. घा. 'गर्भविधारण'.] अवधारा ॥ ६३ ॥

[कं. नि. घा. त. 'इति श्रीभावार्थरामायण । एकाजनार्दन शरण । पिंडभाग पिंडप्राशन । जाले संपूर्ण अवधारा ।'; भा. तु. या प्रतींत ही ओवी नाही.]
एकाजनार्दना शरण । जाले पिंडभाग प्राशन । पुढील कथा अतिगहन । श्रोती अवधान मज द्यावें ॥ ६४ ॥

अनुक्रमणिका

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां तृतीयप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग चौथा

## कौसल्या दोहद निरूपण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

आइकोनिया कथा श्रवण । ज्ञाते म्हणती अप्रमाण । नोव्हेचि मुळींचे निरोपण । तिहीं शिवरामायण पाहावें ॥ १ ॥

स्कंद पुसे अगस्ती प्रती । शिवभवानी राम जपती । राम कोण तो त्रिजगतीं । यथा स्थिति मज सांगा ॥ २ ॥

तो म्हणे श्रीराम महिमान । सांगावया मी अति दीन । जेथे वेदां पडे मौन । तें वदावया वदन मज नाहीं ॥ ३ ॥

तुझीयाच ऐसा प्रश्न । सदाशिवा प्रति जाण । पार्वती पुसे आपण । राम तो कोण मज सांगावा ॥ ४ ॥

श्रीरामाची कोण स्थिति । श्रीरामाची कोण गति । श्रीरामाची कोण उत्पत्ति । कोण त्रिजगतीं श्रीरामु ॥ ५ ॥
[नि. घा. या दोन्ही प्रतींत ओवी ५ व ६ यांतील चरण मागेपुढे झाले आहेत.]

कोण श्रीरामाची ख्याती । श्रीरामाची कोण कीर्ति । समूळ सांगावी मजप्रती । पुसे अति प्रीतीं जगदंबा ॥ ६ ॥

जेथ सदाशिव स्वयें वक्ता । मुख्य पार्वती स्वयें श्रोता । तेहे शिवरामायणीं कथा । संदेहार्था पाहावी ॥ ७ ॥

तूं कैसा जालासी [कविता-काव्य करणारा हा अर्थ घ्यावा; नि. घा. 'वक्ता'; भा. तं. कं. 'शिकवता'.] कविता । पुसाल माझी योग्यता । ते मी सांगेन तत्त्वतां । सावध श्रोतां परिसावें ॥ ८ ॥

मी नेणें मुळींच्या संस्कृताशीं । [तं. 'मूर्खपणा मानी मिराशी'.] मूर्खपण माझी मिराशी । त्या मूर्खाचिया मुखासी । श्रीराम ऐसी कथा वदवी ॥ ९ ॥

माझे अंगीं मूर्खपण । माझें मीं जाणें संपूर्ण । न करी म्हणता रामायण । श्रीराम आपण कथा प्रेरी ॥ १० ॥

प्रेरितांही मी न करी जाण । तंव स्वप्नामाजीं रामायण । श्रीराम विस्तारी संपूर्ण । [तं. घा. 'पूर्ण खूण'.] ऊण खूण ग्रंथाची ॥ ११ ॥

जागृतीमाजीं वर्ततां । पुढें प्रकाशे रामकथा । [नि. घा. 'दुश्चितपणें'.] दुचितपणें येतां जातां । राम तत्त्वतां [कं. नि. घा. 'रामायण दावी'.] कथा वदवी ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

करूं जातां फुकट गोठी । त्यामाजी रामकथा उठी । श्रीरामें पुरविली पाठी । खिळिली दृष्टी [भा. 'रामरूपीं'.] रामायणीं ॥ १३ ॥

ऐसियां तुहि न करी म्हणतां । रामु चढे मीपणाचें माथां । मग तो आपुलिया सत्ता । वदवी कथा बलात्कारें ॥ १४ ॥

[तु. 'मी निजल्या बसतां'; नि. 'मज निजलों असतां'; घा. 'मग निजलें असता'.] मज निजेल्या असतां जाण । राम थापटी आपण । म्हणे उठी करी रामायण । तेथ मी कोण न करावया ॥ १५ ॥

यालागीं कथा भूषण दूषण । माझ्या अंगीं न लगे जाण । कर्ता श्रीराम आपण । माझें मीपण तो जाला ॥ १६ ॥

ग्रंथ वंदिती अथवा निंदिती । ते दोघे आम्हा ब्रह्ममूर्ति । हे श्रीजनार्दनाची युक्ती । उपदेश [तु. 'मी निजल्या बसतां'; नि. 'मज निजलों असतां'; घा. 'मग निजलें असतां'.] हा एकांतीं निज गुह्यार्थ ॥ १७ ॥

असो अबद्ध ही रामकथा । पवित्र करी गातां ऐकतां । हे न मने [नि. घा. 'ज्यासी विकल्पता'; तु. 'न म्हणे जयाची विकल्पता'; तं. त. कं. 'ज्या विकल्पता'.] ज्या विकल्पवंता । त्यासी तत्वतां लोटांगण ॥ १८ ॥

> स वाग्विसर्गो जनताघविप्लवो ['संप्लवो'.] यस्मिन् प्रतिश्लोकमबद्धवत्यपि ।
> नामान्यनंतस्य यशोऽङ्कितानि यत् श्रृण्वन्ति गायन्ति गृणन्ति साधवः ॥ १ ॥ [भागवत अ. ५, श्लो. ११.]

अबद्धु [घा. 'कथा रामस्मरणीं'; नि. कं 'रामकथाश्रवणीं'.] रामकथास्मरणीं । वक्ता पावन तत्क्षणीं । श्रोतयांचिया पापा होय धुणीं । अबद्धवाणी पडतांहि ॥ १९ ॥

अबद्धही रामचरित्र । [कं. नि. घा. खेरीज इतरत्र 'महापातकां'.] महापातकियां करी पवित्र । तो रामु गातां माझें वक्त्र । केवीं अपवित्र ज्ञाते म्हणती ॥ २० ॥

कथा वंदिती निंदिती जनीं । ते माउली माझिया दोन्ही । निंदकु तो सखी जननी । मज लागुनि कृपाळु ॥ २१ ॥

जन्म जननीचे करतळ । वरि वरि क्षाळिती बाह्य मळ । निंदकु सबाह्य [नि. घा. 'कळिमळ'; तं. 'सळमळ'; कं 'सकळमळ'.] सकळ । करी निर्मळ निजवदनें ॥ २२ ॥

या लागीं निंदकुचि तत्त्वतां । साह्य सखा परमार्थां । त्या निंदकातें निंदितां । दोषी सर्वथा स्वयें होये ॥ २३ ॥

निंदा म्हणजे परमामृत । निंदा निर्द्वंद्व सुख स्वार्थ । निंदकु न पाहे निजस्वार्थ । अतिसमर्थ परोपकारी ॥ २४ ॥

अनुक्रमणिका

जेथ निंदा सुखरूप समाये । त्याचे मस्तकीं वंदू पाये । धन्य धन्य त्याची माये । जो निंदा साहे निर्द्वंद्व ॥ २५ ॥

[नि. घा. 'आतां किती सुचवूं'.] असो किति सुचू परिहारू । परिहारू तोचि अहंकारू । मी [नि. घा. 'होऊ पाहे'; तु. 'मिथ्याहो पाहे'; भा. 'मी आहे'.] हो पाहे कवीश्वरू । हा अपराध थोरू मज माझा ॥ २६ ॥

आतां रामकथा रामायणीं । तो मी अपराधहिन गणी । झणें निवारा तुम्ही कोण्हीं । [नि. घा. 'घेऊ द्या'.] घेवों धणीं कथामृताची ॥ २७ ॥

तंव श्रोते म्हणती नवलावो । ग्रंथीं साधिला शुद्धान्वयो । परिहार मिसे पहा हो । केला निःसंदेहो ग्रंथार्थु ॥ २८ ॥

याचे मऱ्हाटेचि बोल । परी अमृतातें करिती फोल । क्षीराब्धीहूनि अति सखोल । [नि. घा. 'नित्य नवी बोली स्वानंद सुखाची'; तं. 'नीच नवी बोले स्वानंद सुखें'; भा. 'स्वानंद सुखा'.] निच नवी ओल स्वानंद सुखें ॥ २९ ॥

श्रवणीं ऐकतांचि कथा । सुख उपजताहे चित्ता । धन्य धन्य तूं रसाळ वक्ता । कथा परमार्था निजपूज्य ॥ ३० ॥

तुझेनि मुखें रामायण । श्रीराम [कं. तं. तु. खेरीज इतरत्र 'वदविताहे'.] वदताहे आपण । [तं. तु. त. खेरीज इतरत्र 'परिहारे जाले'.] परिहार झाला ब्रह्मपूर्ण । कथानिरोपण चालवी वेगीं ॥ ३१ ॥

ऐसें आइकोनि संतवचन । निवाला एका जनार्दन । मस्तकी वंदुनियां चरण । ग्रंथ निरोपण अवधारा ॥ ३२ ॥

पुढील कथानुसंधान । केलिया पिंड प्राशन । तिघी जणीं सुखसंपन्न । गर्भसमाधान तिघींसी ॥ ३३ ॥

वसिष्ठ म्हणें रायासी । धर्म मर्यादा आहे ऐसी । डोहळे पुसावे स्त्रियांसी । मागती त्यांसी तें द्यावें ॥ ३४ ॥

शिरीं वंदुनि [नि. घा. भा. 'ब्रह्मवाक्यासी'.] गुरुवाक्यासी । राजा निघाला वेगेंसी । आला कैकेयी भुवनासी । अति उल्हासी पुत्रार्थी ॥ ३५ ॥

कैकेयी गर्भ विलासी । बैसली होती मंचकेसी । येतां देखोनि रायासी । निज शेजेसी पहुडली ॥ ३६ ॥

जेथ भ्रतारा [नि. 'स्त्रियेसी वर्चस्वपण'.] स्त्रीवश्यपण । तेथ मर्यादा राखे कोण । बरवेपणाचा गर्व पूर्ण । त्याहिवरी जाण गर्भिणीतें ॥ ३७ ॥

[नि. 'अमावस्ये रात्री अंधारी पाहीं'; घा. 'जैसी अंधारी'; तु. 'तमा अंधारी रात्री पाहीं'.] आधींच अंधारी रात्री पाही । त्यावरी दाटे धुई । [नि. 'गडदपणें'.] गडद पडे न दिसे कांहीं । तैसी दशा पाही कैकेयीसी ॥ ३८ ॥

अनुक्रमणिका

राजा डोहळे पुसे तयेसी । ते हांसोनि म्हणे रायासी । जरी पुरवाल निश्चयेसी । तरी मी तुम्हासी सांगेन ॥ ३९ ॥

राजा बोले अतिप्रीतीं । तुझी नुल्लंघी वचनोक्ति । तुज म्यां नेलें स्वर्गाप्रती । इंद्रादिकाहातीं गौरविलें ॥ ४० ॥

ऐसें मागें तुझें वचन । नाहीं उल्लंघिलें आपण । आजिचा प्राप्तकाळ पूर्ण । डोहळे संपूर्ण करीन तुझे ॥ ४१ ॥

येरी म्हणे रायासी । डोहळे माझां निजमानसीं । राज्य द्यावें कनिष्ठासी । ज्येष्ठ वनवासी दवडावे ॥ ४२ ॥

दवडावे दूर दिगंतां । जेथ नाइकती अयोध्येची कथा । आणि ज्येष्ठाची कथा वार्ता । नये सर्वथा अयोध्येसी ॥ ४३ ॥

ऐसें विपरीत करितां । तुम्ही म्हणाल हे अधर्मता । तो अधर्म ठेवा माझां माथा । जो वेदाशास्त्रार्था अतिनिंद्य ॥ ४४ ॥

अति निंदेची निंद्य टाळी । ते वाजो माझिये कपाळीं ।
मज निंदिजे लोकीं सकळीं । न आवडे नव्हाळी डोहळीयांची ॥ ४५ ॥

आइकोनि तिचे डोहळे । राजा सर्वांगी [नि. घा. 'कंटाळे'.] कांटाळे । अश्रुपूर्ण झाले डोळे । [नि. घा. तु. 'होय तात्काळ कंपायमान'; त. 'विवेकें तात्काळ कंपायमान'; भा. 'वल्पे तात्काळ'.] विवेकु तात्काळें कंपाय-मानु ॥ ४६ ॥

मनबुद्धि चित्त चांचरे । निश्चयासी आले [नि. घा. 'शहारें'.] शारे । बैसली इंद्रियांचीं [भा. नि. घा. तु. 'द्वारें'.] दांतौरे । प्रलय महापुरें धैर्य [कं. पै. नि. घा. तु. 'गेले'.] गळे ॥ ४७ ॥

इचे डोहळे पुरवितां । नाशु अर्थ-स्वार्थ परमार्था । शेखी उरीनुरे जीवितां । सर्वो सर्वथा अपघातु ॥ ४८ ॥

ऐसी रायासि जाली व्यथा । मग तिसीं न बोलेचि मागुतां । अत्यंत वोचकोनि चित्ता । होय निघतां [नि. भा. घा. तु. 'कंटाळेनि'; कं. 'कंटाळला'.] कांटाळला ॥ ४९ ॥

[नि. घा. 'सवेंचि निघे'; कं. पै. तं. तु. मु. 'मग' हे पद नाही.] मग रिघे सुमित्रेच्या मंदिरीं । तंव ते धावोनि [तु. 'देखताचि आली'; मु. 'तंव ते आली'.] आली सामोरी ।
मस्तक ठेवी चरणावरी । आरत्या करी निंबलोण ॥ ५० ॥

आला देखोनि [नि. घा. तु. भा. "प्राणनाथु", इतरत्र संपादित पाठ.] आत्मनाथु । जीवीं उल्हास अद्भुतु । [नि. घा. भा. 'आनंदे पूर्ण भरित'.] सन्मुख देखोनि निजकांतु । प्रेमाचा अत्यंतु पूर आला ॥ ५१ ॥

घालुनियां वरासन । भक्तिभावें चरणक्षाळण । करी चरणतीर्थ प्राशन । सुमनादि चंदन यथोक्त पूजा ॥ ५२ ॥

अनुक्रमणिका

[वि. 'सुंगध'.] शुद्ध सुवास सुमनमाळा । घाली निज नाथाचिया गळां ।
जोडल्या करी ते काळां । उभी वेल्हाळा निकट ना दूरी ॥ ५३ ॥

गर्भे टवटवी मुखकमळ । शोभे सर्वांग सोज्वळ । गर्भतेजें निज निर्मळ । मिरवे वेल्हाळ सद्भक्तिभावें ॥ ५४ ॥

जोचि भावो निजनाथेसी । तोचि भावो समस्तासी । तेणेंचि भावें [भा. 'निजनाथा'; पै. तु. त. कं. 'नृपदासी'.] नृपनाथासी । पूजी उल्हासीं समसाम्यें ॥ ५५ ॥

भक्तिभावो तिचा वांटा । त्याचां उदरीं केला साटां । [भा. 'तैशाचि चरित्राच्या चेष्टा'; नि. घा. 'तैशा रीतीच्या बाह्यचेष्टा'.] तैशाच तिच्या बाह्यचेष्टा । देखे दृष्टा होउनि रावो ॥ ५६ ॥

देखौनि सुमित्रेचा भावो । अत्यंत सुखावला रावो । इच्या गर्भाचा निर्वाहो । देवादि देवो प्रतिपाळु ॥ ५७ ॥

कैकेयी डोहळीयांचे दुःख । राजा विसरला निःशेख । [तु. 'तिचे चुंबोनिया निजमुख'; पै. त. 'चुंबुनि मुखें मुख'.] तिचें चुंबोनि मुखें मुख । पुसे कौतुक डोहळीयांचें ॥ ५८ ॥

कोण आवडी तुझां पोटीं । तें सांगावी [भा. नि. घा. 'जिवीची गोष्टी'.] गुह्य गोष्टी । येरी सलज्ज अधोदृष्टी । न करी चाउटी बहु बोल ॥ ५९ ॥

ज्येष्ठाची ज्येष्ठ सेवा । ते मज द्यावी नृपदेवा । हेचि आवडी माझिया जीवा । [भा. 'सत्य स्वभावा जाणावें'; नि. घा. 'सत्य स्वभावा प्रीत्यर्थ'; तं. 'सद्भावें प्रियार्थी'.] सत्य सद्भावा प्रियार्थु ॥ ६० ॥

ज्येष्ठ सेवेचें निजसुख । तें मज द्यावें अत्यंतिक । तुम्ही द्यावें हेंचि एक । नावडे आणिक [नि. घा. 'विषय मज'. पै. भा. कं. 'भव विभव'; तु. 'वैभव'; तं. 'भवभाव'.] भोग वैभव ॥ ६१ ॥

नावडे रत्न वस्त्र दिव्यान्न । नावडे राज्य त्रिभुवन । नावडे स्वर्ग [घा. प्रतीत हे पद नाही.] ब्रह्मसदन । ज्येष्ठ सेवनावांचुनि ॥ ६२ ॥

आइका स्वामी प्राणपती । तुझे पाय [नि. घा. 'सेव्य असती'; भा. 'दिव्य आहे तीं'; तं. तु. 'सेविले आहे तीं'.] शिवितले आहती । ज्येष्ठ सेवेची अतिप्रीती । डोहळे निश्चिती हे माझे ॥ ६३ ॥

आइकोनि ऐसें वचन । रायाचें विस्मित मन । इचे डोहळे [भा. 'परमगहन'; क. 'विलक्षण'.] परमगहन । दिसे सुलक्षण सर्वार्थी ॥ ६४ ॥

एक पायसाचें ताट । वसिष्ठें भाग केले चोखट । तिचे डोहळे कां [नि. घा. 'बिकट'; तं. भा. पै. 'विकट'; तु. क. 'विकट'.] विलगट । इचे अतिश्रेष्ठ परमार्थी ॥ ६५ ॥

तिचे भाग नव्हेती स्वतंत्र । परभाग परतंत्र । पोटीचे गर्भ ते सावत्र । यालागीं अपवित्र डोहळे तिचे ॥ ६६ ॥

सावत्र छळिती मातेसी । [भा. या प्रतीत हा चरण नाही.] शनि लाता हाणें छायेसी । ठाउके पडतां सूर्यासी । तूं माता नव्हेसी सर्वथा ॥ ६७ ॥

तैसे सावत्र गर्भ तियेसी । यालागी डोहळे अधर्मासी । निंद्य व्हावें म्यां जगासी । डोहळे [तं. खेरीज इतरत्र 'वदे गर्भासी सावत्र'.] इसी अपवित्र ॥ ६८ ॥

सुमैत्र भाग स्वतंत्र । यालागीं डोहळे अति पवित्र । रायाचे निवाले जिव्हार । हर्षनिर्भर तो जाला ॥ ६९ ॥

मग उठोनि उल्हासेसीं । सुमित्रा आळंगी हृदयेसी । जे जे डोहळे निजमानसीं । ते ते पावसी मदनुग्रहे ॥ ७० ॥

नाना अलंकार भूषण । राजा त्यागी ओवाळून । तिसी करूनि निंबलोण । द्विजां दे दान [नि. घा. 'नाना वस्त्रें'; भा. 'रत्न वस्त्रें'] गजवाजी वस्त्रें ॥ ७१ ॥

आतां श्रेष्ठ रायाची राणी । कौसल्या जे धर्मपत्नी । तेज [पै. नि. घा. कं. 'जो न समाये त्रिभुवनीं । तो गर्भाधानी श्रीराम ।'; भा. 'जो न माये त्रिभुवनीं । तो गर्भाभिदानी श्रीराम ।'] न समाये त्रिभुवनीं । जे गर्भाधानी श्रीरामु ॥ ७२ ॥

जो त्रिभुवनीं न समाये जाण । तो भावार्थी साटवे आपण । सद्भाव जालिया संपूर्ण । ब्रह्मपरिपूर्ण हृदयाकाशी ॥ ७३ ॥

तेथूनि राजा तत्क्षणीं । उत्कंठा कौसल्यादर्शनीं । भुवनी न देखे निज पत्नी । न देखें शयनी पर्यंकीं ॥ ७४ ॥

आइका कौसल्येची स्थिति । अखंड बैसे एकांतीं । न साहे संगु सांगाती । [पै. नि. त. तु. कं. 'गर्भप्रतिति'; घा. 'गर्भाप्रती'.] गर्भप्राप्ती श्रीरामु ॥ ७५ ॥ [भा. नि. घा. त. या प्रतींत या ओवीपूर्वी पुढील ओवी आहे :—
'आइका कैकेयी संभ्रमु । उदरीं संभवला श्रीरामु । पुसतां डोहळियांचे कामु । आने आन वर्तले ॥'
(त. प्रतीतील पाठाप्रमाणे) तु. पै. तं. या प्रतींत ही ओवी नाही.]

नावडे वस्त्र भूषण । नावडे सुमन चंदन । नावडे भोग [घा. 'दिव्यांजन'.] दिव्यान्न । नावडे शयन पर्यंकीं ॥ ७६ ॥

देहीं [त. तु. 'निर्भोग'.] निर्लोभ लक्षण । हेंचि वैराग्य दृढ दारुण । उदरां आला रघुनंदन । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ७७ ॥

आस्था सांडोनिया [नि. घा. 'जाण'.] जन । आवडी वसवी विजन । लेइली गर्भ दिव्यांजन । राम निधान [त. 'प्रगटले'; भा. 'उदरांत'; नि. घा. 'उदराते'.] उदरस्थ ॥ ७८ ॥

करूनी कल्पनेंसी मारू । सेवी निर्विकल्प कल्पतरू । तया तळीं अति आदरू । [नि. घा. 'सुंदरू बैसलीसें'; भा. 'सहजासनीं बैसलीसें'.] सहजासनीं सन्नद्ध ॥ ७९ ॥

गर्भोदरीं बैसली दृष्टी । यालागी वृत्ति उफराटी । आपणा समान देखे सृष्टि । गर्भपुष्टी स्वभावें ॥ ८० ॥

अनुक्रमणिका

यापरी ते राजबाळा । वसवी शुद्ध सुमनशाळा । द्वैत दृष्टी [भा. ‘नेदखे’; नि. घा. ‘न देखे’; तु. ‘अद्वैत दृष्टी’; तं. कं. ‘लागें डोळा’.] न लगे डोळा । सुख सोहळा अद्वैतीं ॥ ८१ ॥

आधींच प्रीती प्रियासी । त्यावरी वसिष्ठ उपदेशी । राजा निघाला वेगेसीं । डोहळीयासी पुसावया ॥ ८२ ॥ [ओवी ८२ व ८३ या ओव्या केवळ तं. प्रतींत आढळतात.]

सेवक सांडोनि बाहेरीं । रिघाला कौसल्येच्यां मंदिरीं । केउती आहे ते सुंदरी । दिशा चाऱ्ही अवलोकी ॥ ८३ ॥

राजा पाहे भोगभुवनीं । तेथ नातुडे धर्मपत्नी । पाहे अति लोभें अवलोकुनी । [क. घा. भा. तं. त. ‘नयनोन्मनीं’ नि. ‘परिते नयनीं न’.] नयनोन्मीलनीं न दिसे ॥ ८४ ॥

पाहतां वैखरीच्या घरीं । तेथ न देखे सुंदरी । मध्यमेचां माजघरीं । पाहतां दूरी दृष्टीसी ॥ ८५ ॥

शोधितां पश्यंती वोवरी । तेथही न देखे निजनारी । चढला परेची उपरी । शुद्धी निर्धारी न लभेची ॥ ८६ ॥

काढोनि द्वैताची अर्गळा । फेडोनि शब्दांची सांखळा । उघडी अद्वैत सुमनशाळा । गुरुवाक्य मेळा निर्धारें ॥ ८७ ॥

तेथ रिघतां अति सांकडी । फेडिली रजतमाचीं लुगडीं । शुद्ध सत्वाचीं भूषणें [कं. तं. भा. नि. घा. ‘आवडी’.] आडी । तेही काढी तात्काळ ॥ ८८ ॥

ऐसा एकाकी [भा. नि. घा. ‘एकला’; कं. तं. पै. तु. ‘लीळा’.] स्वलीळा । रावो प्रवेशे सुमनशाळा । पाहे स्वयें [भा. ‘गर्भिणी कौसल्या’.] सगर्भ बाळा । तंव [नि. ‘तेणेहि’; घा. भा. ‘ते डोळां’; तु. ‘तव तेथेहि डोळा न दिसेचि’.] इही डोळा दिसेना ॥ ८९ ॥

नेत्रीं भरूनिया विवेका । पाहे [नि. घा. ‘देखे निर्विकल्प निजसुख’; त. ‘पाहे निर्विकल्प स्वरूप’; भा. ‘देखे निर्विकल्प तरूरुखा’; तं. ‘निजवृक्ष’; कं. निर्विकल्परुक्षा’.] निर्विकल्प रुखा । तया तळीं बैसली देखा । अति सुरेखा कौसल्या ॥ ९० ॥

राजा पाहे निज तन्वंगी । तेज न समाये अंगींच्या अंगीं । धन्य धन्य हेचि जगीं । गर्भलिंगी सुलिंग ॥ ९१ ॥

[ही ओवी कं. पै. तं. तु. प्रतींत नाही.] कैसी बैसली सहजासनीं । जैसी योगिया लागे उन्मनी । मग राजा पाहता निवाला [भा. नि. घा. ‘निवाला लोचनीं’.] मनीं । धर्मपत्नी सगर्भ ॥ ९२ ॥

तिसीं देखतां गर्भभावें । राजा सर्वांगे निवे । दृष्टी सुखावली सुखावे । जीवु सद्भावें दोंदिल ॥ ९३ ॥ [भा. नि. घा. या प्रतींत ही ओवी नाही.]

जिसी देखतांचि दृष्टी । आनंदे ओसंडे सकळ सृष्टि । तिसी करितां सुख गोष्टी । पडे मिठी [भा. नि. घा. तु. ‘स्वानंदीं’; कं. तं. पै. ‘वेदांतीं’.] परब्रह्मीं ॥ ९४ ॥

मग बैसोनिया नेहटी । हातीं धरिली हनुवटी । झणीं माझी लागेल दृष्टी । डोहळें पोटीं ते सांग ॥ ९५ ॥

अनुक्रमणिका

येरी न पाहे वरुती । [नि. घा. 'दृश्य दृष्टा न देखे स्थिति'; भा. 'दृश्य दृष्टा नये व्यक्ती'.] दृष्टी दृश्य नये हातीं । रामरूपीं [पै. तु. कं 'रचली'; नि. घा. 'रतली वृत्ति'; तं. भा. 'रातली स्थिति'.] संचली स्थिति । व्यक्ताव्यक्ती नेदखे ॥ ९६ ॥

राजा ओसंडला अति प्रीती । मग आलिंगिली दोही हातीं । येरी लागली विदेह स्थिति । [त. भा. नि. घा. 'देह अहंकृति'; पै. 'देहाहंकृति'.] देहाकृति नाठवे ॥ ९७ ॥

उदरीं संभवला विदेही । यालागीं आठवु [भा. नि. घा. 'नाठवे'.] नुठीच देहीं । सबाह्य [नि. घा. 'सबाह्य अंतरी उरली नाही'; भा. 'सबाह्य अंतरीं रिते उरलें नाहीं'.] रितें उरलें नाहीं । [भा. 'व्यापक पाही श्रीरामु'; कं. तु. पै. 'परिपुर्ण पाही श्रीरामु; नि. घा. 'तटस्थ पाही श्रीराम'.] तटस्थ पाही श्रीरामें ॥ ९८ ॥ [या ओवीनंतर तु. प्रतीत पुढील ओवी आली आहे :—
'कैसे करील मेघश्याम । केवी पुरेल पुत्रकाम । सिद्धि पाववील पुरुषोत्तम । आम्हा राम रघुवीर ॥']

राजा म्हणे कटकटा । कैसी अवचटली हे बरबटा । कीं महद्भूत आलें पोटा । नयनीं ताठा [नि. घा. 'चढलाये'.] पडियला ॥ ९९ ॥

कैसे करील मेघश्यामु । कैसे होईल पुत्र कामु । सिद्धि पाववुं पुरुषोत्तमु । आत्मारामु रघुवीर ॥ १०० ॥

रामनाम कर्णपुटीं । ऐकतांचि ते गोरटी । उघडूनि पाहे दृष्टी । देखे सृष्टि [नि. घा. 'राममय'; भा. 'तन्मय'.] श्रीरामु ॥ १०१ ॥

जंव सादरें [नि. 'राव'.] वास पाहे । तंव नयनीं तेज न समाये । मी एकी गर्भिणी येथ आहे । हा आठवु [घा. 'पाहे'; नि. त. क. 'देहे'.] देहीं नाठवे ॥ १०२ ॥

वृक्षवल्ली तृण मंडप । अवलोकितां रामरूप । अशोक पुष्पक नागचंपक । पाहतां एक श्रीराम ॥ १०३ ॥ [कं. प्रतीत १०३ व १०४ या दोन ओव्या नाहीत.]

देखे [नि. घा. 'क्रीडेचे पाडसें'.] क्रीडती पाडसें । पाहतां रामची प्रकाशें । जें जें देखावया बैसे । तें तें दिसे श्रीराम ॥ १०४ ॥ [या पूर्वीच्या दोन ओव्या काही प्रतींत मागे पुढे आलेल्या आहेत.]

जंव तळवटी पृथ्वी पाहे । तंव ते राम जाली आहे । फिटली पार्थिवाची सोये । देही विदेही श्रीरामु ॥ १०५ ॥

जंव अवलोकी दाही दिशा । तंव त्यां पडिला राम ठसा ।
पाहतां न देखे आकाशा । श्वासोच्छ्वासामाजी श्रीरामु ॥ १०६ ॥

उदरीं विदेही संभवला । तोचि सर्वेंद्रियीं ओसंडला । देहाचा पांगु फिटला । प्रपंच जाला [नि. घा. 'ब्रह्मरूप'.] परब्रह्म ॥ १०७ ॥

दोरु सर्प नाहीं जाला । दोरां सर्प नाहीं [तं. नि. भा. घा. तु. पै. कं. 'भेटला'.] भावला । दोरे सर्प नाहीं देखिला । भ्रमें भाविला भुजंगु ॥ १०८ ।

तेवीं ब्रह्में प्रपंच नाहीं देखिला । ब्रह्में प्रपंच नाहीं चाखिला ।

अनुक्रमणिका

ब्रह्में प्रपंच नाहीं आइकिला । भ्रमें भाविला अति भ्रांति ॥ १०९ ॥

प्रपंचु एकु जाला होता । हें समळ मिथ्या वार्ता । पुढां होईल मागुता । [नि. घा. भा. 'हेहि कल्पांतीं घडेना'; तु. 'हेहि वार्ता पै मिथ्या'.] न घडे परिभ्रांता सत्य वाटे ॥ ११० ॥

येचि विषींचा श्लोक । वसिष्ठ बोले अलौकिक । त्याचा अर्थु तात्त्विक । परिस तूं सात्विक सज्ञन ॥ १११ ॥

भ्रमेणाहं भ्रमेण त्वं भ्रमेणोपासका जनाः । भ्रमेणेश्वरभावत्वं भ्रममूलमिदं जगत् ॥ २ ॥

भ्रमें श्रेष्ठत्वें ईश्वर । भ्रमें कर्म धर्म सदाचार । भ्रमें वाढविला व्यवहार । भ्रम मूल संसार निजसत्य ॥ ११२ ॥

जनकादिक मुक्त असती । तेही प्रपंची वर्तती । त्यांच्या प्रपंचाची स्थिति । वसिष्ठ श्लोकोक्ति वदे तें ऐका ॥ ११३ ॥

ब्रह्मत्वं ब्रह्मभुवनं ब्रह्मभूतपरंपरा । ब्रह्माहं ब्रह्म मच्छत्रुर्ब्रह्म सन्मित्रबांधवाः ॥ ३ ॥

जैसा सोनियाचा [कं. घा. प्रतींत हे पद नाही.] रवा घेतां । तो अलंकारा समस्ता । सोनेपणें घे तत्त्वतां । तेवीं व्यवहार मुक्तां परब्रह्मत्वें ॥ ११४ ॥

मुक्तां ब्रह्म मी तूं पण । शत्रु मित्र ब्रह्म पूर्ण । ब्रह्मरूप त्रिभुवन । भूत सनातन ब्रह्मरूप ॥ ११५ ॥

ऐसिया ब्रह्मस्थिति । मुक्त संसारी वर्तती । जिण्या मरण्याची भ्रांती । नाहीं त्यांच चित्तीं ब्रह्मरूपत्वें ॥ ११६ ॥

कौसल्या रामगर्भे निभ्रांत । राजा पुत्रधर्मे कर्मभ्रांत ।
डोहळे तीस पुसतां तेथ । विनोदें विस्मित परमार्थ [घा. 'परमार्थी'; नि. 'परमार्थी परिसा'; तं. 'विस्मित परब्रह्म'.] परिसावा ॥ ११७ ॥

[भा. 'ऐसे हें शिव रामायण'. संपादित प्रत, श्लोक ३ ओव्या ११८. इतर प्रतींत ही संख्या अशी : नि. घा. भा. ३, ११६; इ. सु. ५, ११६; तु. ०—११४; त. ०—११८; तं. ३, ११३; पै. ४, ११६; कं. ३. ११३.]स्वस्ति श्रीरामायण । एकाजनार्दना शरण । डोहळीयांचे निरोपण । विनोदीपूर्ण परब्रह्म ॥ ११८ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां चतुर्थप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग पाचवा

## कौसल्या दोहद निरूपण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

पूर्व कथानुसंधान । कौसल्या उघडीले नयन । डोहळे पुसावया जाण । राजा सावधान स्वयें जाला ॥ १ ॥

कौसल्या राम गर्भें स्वरूप स्थिति । राजा प्रवृत्ति धर्में पुत्रार्थी ।
दोहींच्या संवादाची प्रीती । डोहळे निश्चिती अवधारा ॥ २ ॥

राजा म्हणे [कं. सु. ई. नि. घा. 'स्वमुखें'; तु. 'स्वरूप'.] स्वसुख कांते । काय आवडी आवडे तूंते । वेगीं सांगे डोहळीयांतें । सांडी परतें भ्रमाशीं ॥ ३ ॥

येरी म्हणे मी अवघा रामु । मज माजीं कैंचा भ्रमु । अवतरलों पुरुषोत्तमु । देवांचा श्रमु फेडावया ॥ ४ ॥

आइकोनि शंकिजे रायें । म्हणे इसी जालें काये । आप आपणियातें पाहे । सावध होये प्रिये तूं ॥ ५ ॥

येरी म्हणे नव्हे स्त्री ना पुरुषु । नर वानर ना राक्षसु । [सु. नि. घा. इं. 'ईशाचा जो निज ईश'.] ईशाचाहि मी ईशु । स्वयें [सु. नि. घा. इं. 'परम पुरुष श्रीराम'.] जगदीशु श्रीराम ॥ ६ ॥ [या ओवी नंतर तं. प्रतीत एक संकृत श्लोक आला आहे. तो अशुद्ध लिहिलेला असून 'विषमं दोहद मिनम्' हा त्याचा शेवटचा चरण आहे.]

राजा म्हणे तन्वंगी । काये जालें तुजलागीं । कैंचा भ्रमु भरला अंगीं । पाहे वेगीं मी कोण ॥ ७ ॥

येरी म्हणे माझां ठाईं । मी तूं ऐसें उरलें नाहीं । अधिष्ठान जो विदेही । [सु. इं. नि. घा. भा. तं. कं. 'आत्मा पाही'.] व्यापक पाही श्रीरामु ॥ ८ ॥

दशरथ म्हणे वो कौसल्ये । माझें तुझें लग्न झालें । तैं रावणें अति विघ्न केलें । तें [भा. तं. तु. कं. 'विसरलीस'.] विसरवलें कैसेनि ॥ ९ ॥

नांव ऐकोनि रावण । येरी म्हणें दे दे धनुष्यबाण । करूं लंकेचें निर्वाण । मारूं दारुण राक्षस ॥ १० ॥

पाचारा वनींचे वनचर । मुकुट कुंडलें द्या अलंकार । राज्य देउनि धरा छत्र । वानरभार चालवावे ॥ ११ ॥

केउता गेला रे हनुमंतु । अंगद सुग्रीव जांबुवंतु । अझुनु रावणाचि मातु । जगां आंतु उरलीसे ॥ १२ ॥

अरे हा वज्रदेही निजगडा । [सु. तु. इं. नि. घा. 'पुच्छें'.] पुसें घालोनिया वेढा । लंका जाळुं रे भडभडा । [भा. 'मारूं तड तडा राक्षस'; तु. 'करूं रगडा राक्षसांचा'; सु. इं. नि. घा. 'पाडा तडतडा राक्षस'; कं. तं 'पाडूं तडतडा राक्षसासी'.] पाडूं तढां राक्षसां ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

अमित पाचारा वानर । शिळीं बुजारे सागर । पाडा पाडा हें नगर । निशाचर वसताती ॥ १४ ॥

केउते गेले रे जुत्पति । लंका उलथा हातोहातीं । पाडा पाडा चाऱ्ही भिंती । दुर्ग किती आम्हा पुढें ॥ १५ ॥

अगड भेदू रे सुभटा । पाडा लंकेचिया [तु. 'दारवंटा'.] त्रिकुटा । मारूं रावणा अति दुष्टां । स्वधर्म वाटा [भा. सु. इं. नि. घा. कं. 'रुंधित'.] रुधितुसे ॥ १६ ॥

बाण घेऊनिया स्वांगें । छेदूं कुंभकर्णाचिं [तं. 'अंगें'; कं. 'अष्टांगें'.] टांगें । भेदूं रावणाचीं [तु. त. खेरीज इतरत्र 'सर्वांगें'.] अष्टांगें । भिडतां मागें मी न सरे ॥ १७ ॥

राक्षसांचां शिरकमळीं । [घा. सु. इं. 'खेळूं' हे पद नाहीं.] खेळूं लंके पुढां चेंडू फळी । [सु. घा. इं. 'राक्षस रुधिराच्या'; तु. या प्रतीत पुढील दोन चरण असे आहेत :—'भरू मेदिनीच्या भडोळी । रुधिर कल्लोळी करोनिया ।'] साजुक रुधिराचा कल्लोळीं । तृप्त कंकाळी करूं आजी ॥ १८ ॥

तोडा नवग्रहांची बेडी । सोडा देवांची बांदवडी । उभवा रामराज्याची गुढी । आज्ञा धडफुडी तिहीं लोकीं ॥ १९ ॥

पाचारा बिभीषण पवित्र । [सु. इं. नि. घा. 'करा राज्याभिषेक धरा छत्र'.] राज्यपट्ट धरा छत्र । लंका दिधली त्या स्वतंत्र । [सु. इं. नि. घा. 'यावच्चंद्रसूर्यपर्यंत'; तु. त. 'यावच्चंद्रदिवाकर' कं. 'यावच्चंद्र जंव वसे'.] यावच्चंद्र जंव असती ॥ २० ॥

नाशा रे जनांचीं दु :खें । त्रैलोक्य भरा रे हरिखें । दुमदुमित विश्व सुखें । परम पुरुषें श्रीरामें ॥ २१ ॥

नामें कळिकाळासी शीक । यमलोकां न घालावी भीक । दो अक्षरीं लाविला धाक । यम [नि. 'पराङ्मुख'.] प्रमुख कांपती ॥ २२ ॥

वाचा उच्चारी रामनाम । त्याचे पुरवावे सकळ काम । हरावें [नि. 'जन्ममरणश्रम'.] मरण-जन्म । सहज सम करावे ॥ २३ ॥

नित्य जपे जो हें नाम । तो जाणावा मजचि सम । पुरुषांमाजीं पुरुषोत्तम । सकळहि नेंम तेणें केलें ॥ २४ ॥

रायासी पडिली आशंका । पोटां विवशी आली देखा ।
कीं गर्भीच उठिली ताटिका । [सु. इं. घा. 'तेथिल्या'; तं. नि. 'स्थितिया'; कं. 'तिचिया.'] थितिया सुखा अंतरलों ॥ २५ ॥

येरी म्हणे सुमैत्र नेटका । अझुणु कौंची रे ताटिका । छेदूं छेदूं बाणें एका । जनांच्या सुखा अवरोधी ॥ २६ ॥

राजा म्हणे न चले मंत्रु । गुणिया पाचारा विश्वामित्रु ।
येरी म्हणे केउता गेला सौमित्रु । आला [तं. 'मित्रु'; तु. 'विप्रयागार्थी'.] विप्रु यागासी ॥ २७ ॥

अनुक्रमणिका

वेगें बाण देकां बहु । विंधु मारिच मारूं सुबाहू । आजि राक्षसा करूं [मु. ‘नाश’.] कुहू । हा हा हु हू करितातीं ॥ २८ ॥

राजा करिता हे स्मरण । परशुराम अवतारू जाण । त्याचेनि नामें हरो दारुण । महद्भूत संचार ॥ २९ ॥

येरी म्हणे आइके जामदग्न्या । धनुष्य भंगिलें म्यां प्राज्ञा । विचारी ब्राह्मणां सर्वज्ञा । जाई तुज आज्ञा तपासी ॥ ३० ॥

[मु. प्रतींत ‘राजा म्हणे’ हीं पदे नाहीत.] राजा म्हणे इसी देहीं संचार ताठा । मुखीं सुटलासे फांटा । काइसे डोहळे कटकटा । नेंणो पोटां काय आलें ॥ ३१ ॥ [या ओवीनंतर तं. प्रतीत पुढील दोन ओव्या आल्या आहेत :—
‘रावो येवोनि बाहेरी । सेवक पाचारिला झडकरी । तुम्ही जावें वेगीं वक्त्रीं । वसिष्ठातें सांगावें ॥ १ ॥
कौसल्येसी डोहळे पुसतां । तंव ते बडबडी रामकथा । तुम्ही यावे त्वरित आतां । रक्षा परीक्षा करावया ॥ २ ॥’]

वेगीं पाचारा वसिष्ठु । पंचाक्षरी तो अदटु । रक्षा परीक्षा करील सुभटु । आम्हा श्रेष्ठ कुलगुरू ॥ ३२ ॥ [या ओवीनंतर तं. प्रतीत पुढील दोन ओव्या आल्या आहेत :—
‘आइकोनि सेवक त्वरितु । वसिष्ठासी सांगती मातु । तुम्हा बोलाविलें दशरथु । चला वेगीं राजद्वारा ॥ १ ॥
परिसोनि सेवकांचीं उत्तरें । वसिष्ठ निघाला बाहेर । येउनि कौसल्येचे मंदिर । अति सत्वर प्रवेश जाला ॥ २ ॥’]

येउनि वसिष्ठ जंव पाहे । तंव ते [मु. ‘राममय’; त. ‘रामरूप’.] रामु जाली आहे । म्हणें धन्य धन्य वो माये । वंदा पाये इयेचे ॥ ३३ ॥

सादरें पाहों गेला दृष्टीं । तंव चित्तचैतन्या पडिली मिठी । हरिखें बाष्प दाटे कंठीं । पडिला सृष्टीं मूर्च्छित ॥ ३४ ॥

नेत्रीं अश्रूंचिया धारा । [मु. ‘रोमा फरकती स्वेदांकुरा’; पै. कं. ‘रोमा फरकती स्वेदकरा’; भा. ‘रोमांच फांकती स्वेदांकुरा’.] रोम थरकती स्वेद शरिरा । अंग कांपतसे थरथरा । अवस्था मुनिवरा [मु. ‘अनिवार’.] अनावर ॥ ३५ ॥

रावो म्हणे कांहीं न चले येथें । गुणिया ग्रासियेलों भूतें । कवण सोडवीययातें । म्हणौनि [घा. ‘चिंते’.] चित्तें व्याकुळें ॥ ३६ ॥

म्हणे मी कौसल्येसी आवरू । कीं वसिष्ठा सावध करूं । ऐसा जाजावे नृपवरू । धांवा थोर फोकारी ॥ ३७ ॥

श्रावण वधाचे क्लेश । सोशिले म्या [मु. ‘असोस’; तं. ‘विशेष’.] अशेष । पुढां तेंचि बहुवस । वसिष्ठ दोष हत्येचे ॥ ३८ ॥

[नि. प्रतीत ‘अगा विधातया श्रेष्ठा’; सु. इं. घा. या प्रतींत ‘म्हणे रे विधातिया अदृष्टा.’] म्हणे विधातया दुष्टां । काय लिहिलें अदृष्टां । भूतें ग्रासिलें वसिष्ठां । दोष मोठा मज घडला ॥ ३९ ॥

यज्ञ केला म्यां पवित्र । कुळीं पावेन सुपुत्र । तंव माझारींच हें चरित्र । कैसें विचित्र ओढवलें ॥ ४० ॥

अनुक्रमणिका

अवस्था जिरउनि पोटीं । वसिष्ठें उघडिली दृष्टी । राजा धावोनि झोंबिन्नला कंठी । सृष्टि उफराटी पैं जाली ॥ ४१ ॥

अग्नीसी आली शीतळ कणी । मेरू उलथला वारियांनीं ।
जो काळ कोण्हा दृष्टीसी नाणीं । तो व्याधीनें पीडुनि जिंतिला ॥ ४२ ॥ [ही ओवी केवळ तु. व त. प्रतींत आहे.]

स्वामी वसिष्ठा तुजहि बाधा । हें तव गोष्टी न घडे कदा । पुत्र सुखाआड आपदा । भाग्य मंदा आम्हासी ॥ ४३ ॥

वसिष्ठ म्हणे भाग्यश्रेष्ठ । पोटां आले वैकुंठपीठ । पुरुषोत्तम जाला प्रगट । दैवें [नि. 'उत्कट'.] उद्भट कौसल्या ॥ ४४ ॥

जें जें कांहीं हे वदली । तें तें जाण पां ब्रह्म बोली । ते ते ख्याती करील भली । दसा आली वंशासी ॥ ४५ ॥

मुनिजनांचे ध्येय ध्यान । कीं देवांचे देवतार्चन । जगाचा जगजीवन । राम निधान प्रत्यक्ष ॥ ४६ ॥

राया हें न कळे वर्म । उदरा आलें परब्रह्म । धन्य धन्य आमुचें कर्म । पुरोहित धर्म इये वंशी ॥ ४७ ॥

चरणरजें उद्धरील शीळा । परिणील जनकाची बाळा । आनंदवील लोकां सकळां । श्रीरामु जिव्हाळा जीवाचा ॥ ४८ ॥

याचेनि नामें मुक्ति फुकटा । नगरी नेईल वैकुंठा । रामनाम म्हणतां पापिष्ठां । गति उत्कटा देईल ॥ ४९ ॥

धन्य धन्य सूर्यवंशु । धन्य धन्य अयोध्या देशु । धन्य कौसल्या गर्भवासु । जगन्निवासु पैं आला ॥ ५० ॥

धन्य धन्य येथीचे जन । धन्य दशरथा तुझें मन । धन्य धन्य आमुचे नयन । रामु निधान देखती ॥ ५१ ॥

ऐसें वसिष्ठ सांगतां । टक पडिलें दशरथा । आठवूं नाठवे चित्तां । पुत्रकथा आइकोनि ॥ ५२ ॥

आइकतां ज्याचेनि श्रवणें । पडिले तनुमना भुलवणें । मा काय होईल त्याचेनि दर्शनें । तें सुख जाणे तो एकु ॥ ५३ ॥

रामनामेंवीण कथा । जालिया होत्या अनाथा । त्या केलिया सनाथा । कौसल्या सुताचेनि नामें ॥ ५४ ॥

आइकतां कौसल्येचे डोहळे । दशरथासी सुखाचे सोहळे । तेणें परमानंदे उचंबळे । वंदी तात्काळे वसिष्ठासी ॥ ५५ ॥

अनुक्रमणिका

एकाजनार्दनी उदरा आला । एकाएकी डोहळा जाला । एकपणे प्रसवला । विदेही जाला श्रीरामु ॥ ५६ ॥
[ओवी ५६ व ५७ केवळ 'त.' प्रतीत आढळतात. परंतु एकनाथांच्या इतर ग्रंथांतील संदर्भास त्या सुसंगत असल्यामुळे त्यांचा समावेश संहितेत करण्यात आला आहे.]

पूर्वी पितामहाचा पिता । त्यासीं सुभानु प्रसन्न होता । यालागी सूर्यवंश कथा । आली हातां स्वभावें ॥ ५७ ॥

एकाजनार्दन विनवी संता । ऐसी डोहळियांची वार्ता । आइकतां उल्हास होय चित्तां । त्याची जन्मकथा अवधारा ॥ ५८ ॥

एका जनार्दनी परम । डोहळियांचा अति संभ्रम । अजन्मा जन्मेल श्रीराम । तो [मु. 'जन्म संभ्रम' 'कं. धर्माधर्म'; संपादित प्रत ओव्या ५९. इतर ग्रंथांतील ओवीसंख्या अशी : नि. इं. सु. घा. भा. तं. ५६; तु. '५७'; त. '५९'; पै. '५६'; कं. '५६'.] जन्म धर्म अवधारा ॥ ५९ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां पंचमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सहावा

## श्रीराम जन्म प्रसंग निरूपण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीरामाचा जन्म [तं. नि. इं. घा. 'प्रभाव'; त. 'समुहो'; भा. 'प्रवाहो'.] प्रभवो । पाहो आला सुरसमुदावो । अजन्मा जन्मेल रघुरावो । तो नवलावो पाहों आले ॥ १ ॥

प्रसूति समयो कौसल्येसी । तंव अयोध्येचा चौपासी । विमानें दाटलीं आकाशीं । विबुध वेगेंसी [नि. इं. घा. 'पैं आले'.] येते जाले ॥ २ ॥

सूर्यवंशा येईल रघुनाथु । या लागी माध्यान्हा आला आदित्यु । लग्नीं साधिला अभिजितु । जन्ममुहूर्तु राघवा ॥ ३ ॥

वक्रीं अतिचारी होऊन । वेगें चालोनि आपण । केंद्रीं आणि उच्चस्थान । तेथें ग्रहगण स्वयें आले ॥ ४ ॥

शुद्ध सुमनीं वसंत ऋतु । [तु. 'चैत्रमास'.] मधुमास अति विख्यातु । शुक्लपक्ष नवमी आंतु । जन्म रघुनाथु पावला ॥ ५ ॥

श्रीराम स्वयें अयोनीं । तो स्पर्शला नाहीं जन्म योनी । कौसल्या सन्मुख देखें नयनीं । आश्चर्य [कं. व मु. 'मनीं'.] मानी विस्मित ॥ ६ ॥

नाहीं लागली वेण उद्भट । नाहीं दुखिनलें गर्भपोट । स्वयें श्रीरामु जाला प्रगट । अति उद्भट निजतेजें ॥ ७ ॥

स्वप्रकाशें स्वलीला । [या ओवीतील दुसरा व तिसरा चरण मुद्रित प्रतीत पुढीलप्रमाणे :— 'निजतेजें अति सोज्वळा । घवघवीत घनसांवळा ।'] दिव्य तेजाचा उमाळा । निजतेजें अतिसोज्वळा । देखे डोळां कौसल्या ॥ ८ ॥

जेणें निजतेजें विलासे । मी तूं पणाचा ठावोचि पुसे । जग आत्मत्वें प्रकाशे । सोहळा उल्हासें परमानंदें ॥ ९ ॥

जया तेजाचे निजनिर्धारें । अहं-सोहं समूळ विरे । त्रैलोक्य ब्रह्मत्वें अवतरे । सर्वांगीं भरे स्वानंद [मु. प्रतीत 'कंदु' हे पद नाही; तं. 'स्वानंदकटु'; तु. 'आनंद कंदु'.] कंदु ॥ १० ॥

जया तेजाचिये निजनिष्ठें । विषयांचें विषयत्व आटे । बंध मोक्षाचें बिरडें फिटे । स्वसुखें कोंदाटे [सु. इं. नि. घा. 'स्वयें कोंदाटे प्रब्रह्म'; तं. तु. 'ब्रह्म भुवन'.] आब्रह्मभुवन ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

जया तेजाचिये दीप्ती । रविचंद्र स्वयें हारपती । तेजें प्रकाशें ब्रह्मस्फूर्ति । निर्विषय स्थिति सुख कोंदे ॥ १२ ॥

ऐसें स्वाभाविक सहज । तेजांचें जें निजतेज । तयाची [मु. 'त्याची मूर्ति'; तु. 'त्याचीच मूर्ति'.] चिन्मूर्ती चतुर्भुज । देखतसे चोज कौसल्या ॥ १३ ॥

देखे ठकाराचें ठाण । दोहीं हातीं धनुष्य बाण । करावया [सु. इं. नि. घा. 'राक्षस निर्दळण'; तु. भा. 'दैत्य दळण'.] द्वैत-दळण । ओढी काढुनि विन्यासें ॥ १४ ॥

करावया [कं. तं. 'बंधमोचन'.] बंदीमोचन । [सु. 'नर' हे पद नाही; तं. 'सुरवर ग्रहा'.] सुरनर ग्रहा अभयदान । अभय हस्तें संपूर्ण । विराजमान रघुवीर ॥ १५ ॥

करितां रामनाम स्मरण । जिवासी [कं. त. 'करावया'.] कराया ब्रह्मपूर्ण । स्वयें कृपाळु आपण । वरद हस्तें संपूर्ण वर देतु ॥ १६ ॥

चरणतळीं आरक्त शोभा । लोपीत बाळ सूर्याची प्रभा । जगातें भुवली जगदंबा । तेहि [मु. 'चरणगंगा'.] चरणारंभा भुलली ॥ १७ ॥

माया अतर्क्य सर्वांसी । वेदशास्त्रीं प्रसिद्धि ऐसी । तेहि भुलली चरणासी । जाली दासी सर्वदा ॥ १८ ॥

सनकादिक अति विरक्त । तेहि चरणारविंदीं आसक्त । भ्रमर होउनिया [भा. सु. घा. 'सेवित'; नि. 'सतत'; तु. 'भ्रमत'.] संत । आमोद सेवीत स्वानंदें ॥ १९ ॥

चरणांचिया सामुद्रिकां । न वर्णवती [मु. 'वेद शेषदिका'.] वेदां शेषां । ध्वज वज्र अंकुश ऊर्ध्व रेखा । पायीं [सु. 'पद्मरेखा'.] पद्में देखा यवांकित ॥ २० ॥

चरणतळीं आरक्त शोभा । [मु. 'वरवंटी'; तं. 'वरी टवटवी'; तु. दुसरे चरण पुढीलप्रमाणे 'बरी ऊर्ध्वरेखेची प्रभा'.] वरी शुद्ध शाम प्रभा । इंद्रधनुष्य मिरवे नभा । तैसी शोभा शोभती ॥ २१ ॥

उपासकां यंत्र पूर्ण । तैसी घोटीं त्रिकोण । दोही पायीं नीळवर्ण । विराजमान शोभती ॥ २२ ॥

यंत्रपीठीं वर्ण प्रबळ । तैशा पोटरिया सरळ । अक्षररूपें त्या [मु. 'निसळा'; भा. 'निश्चळा'; तं. 'त्यामाजीं सकळ'; कं. 'शामळ'.] मांसाळ । अति निर्मळ सुकुमार ॥ २३ ॥

जानुचक्रें अति वर्तुळ । जैसे आरिसे निजनिर्मळ । निजात्मस्वरूप सकळ । तेथें तात्काळ प्रतिबिंबे ॥ २४ ॥
[ही ओवी तु. प्रतीत नाही.]

कर्दळी स्तंभाचे शुद्ध सार । त्याहूनि मांडिया सकुमार । लागतां खुपती चंद्रकर । ऐसे अरुवार [त. 'जघन स्वयें'.] जघनद्वय ॥ २५ ॥

अनुक्रमणिका

श्रुति आणि स्मृति । पायीं वाकी गर्जती । अंदु जाण निश्चिती । उपवेद स्थिति विभागें ॥ २६ ॥

वेदांत [मु. प्रतीत 'थोर' हे अधिक पद.] शुद्धशास्त्र । चरणीं गरजतां तोडर । धन्य [सु. घा. 'त्यांचें'.] दैत्यांचे शरीरभार । चरणीं निरंतर तोडरी रुळती ॥ २७ ॥

जगांचें गुह्य श्रीराम पूर्ण । या गुह्यांचें गुह्य लक्षण । तेथें पावों शके कोण । तें सुख संपूर्ण जानकी भोगी ॥ २८ ॥

स्वयें अच्छिद्रत्वें मनोहर । आणि पुढीलांचें आच्छादी छिद्र । तोचि कांसे पीतांबर । तेजें दुर्धर दैदिप्यमान ॥ २९ ॥

पीतांबर श्रीराम कांसेसी । लागला निज भावेसी । तेणेंचि तो अनायासी । गुह्य गुह्यासीं पावला ॥ ३० ॥

नाभी सखोल अतिशयेसी । सहस्राब्द बुडतां ब्रह्मयासी । [तं. 'धांवो निघेचि'; मु. 'ठावों'.] थावो न निघेचि तयासी । होउनि कासाविसी वरतां आला ॥ ३१ ॥

तेव्हां श्रीरामें आश्वासुनि । बैसविला कमळासनीं । त्यासी चतुःश्लोकीं उपदेशुनी । श्रेष्ठ करुनि संस्थापिला ॥ ३२ ॥

तें श्रीरामाचें नाभिस्थान । बैसला देखे कमळासन । त्याचें हृदयींचें महिमान । बोलतां मौन श्रुति शास्त्रां ॥ ३३ ॥

ज्याचें हृदय चिदाकाशीं । आकाश हरपलें स्वकार्येंसी । सिद्ध पावले त्या ठायासी । चिदांशेसी एकत्वें ॥ ३४ ॥

तेथें [सु. घा. 'अनंत'.] अनन्यत्वें मुनिजन । जडोनि जाले अभिन्न । तेचि हृदयी पदक पूर्ण । गुणें वीण लेइलासे ॥ ३५ ॥

सूक्ष्म [सु. घा. 'सूक्ष्मा माजी'.] माजाची अतिथोरी । अभिमान होतां केसरी । देखोनि राममध्य कुसरी । लाजा रानभरी ते जाले ॥ ३६ ॥ [ही ओवी कं. प्रतीत नाही.]

पाहावया श्रीराम मध्य रचना । अभिमान त्यागें पंचानना । मेखळा अंगउनि अंगवणा । मध्यभागीं [पै. नि. घा. 'चित्रत्वें'; तु. 'रत्न'; कं. 'चित्ररत्न'.] चिदत्वें जडले ॥ ३७ ॥

जो अपरंपार अनंत । त्यासी अनुभवी आकळीत । तेवीं मेखळेमाजीं रघुनाथ । दिसे समस्त आकळीला ॥ ३८ ॥

अनुक्रमणिका

जाहलिया [नि. 'निजवस्तु प्राप्ती'.] वस्तुप्राप्ती । सकळ वृत्ति उपरमती । तेवीं क्षुद्र घंटिकांची [घा. 'युक्ति'.] पंक्ती । मेखळेप्रती अधोमुख ॥ ३९ ॥

नाना मतांचा निजमेळा । त्याचि किंकिणी ज्वाळमाळा । यापरी विचित्र लीळा । कटी मेखळा शोभत ॥ ४० ॥

पीतांबराचे उभयभाग । दोहीं अंगीं मुक्त लग । तेणें अंगाचा फिटला पांग । [सु. 'अंगी जे अव्यंग निजांगे शोभा'; घा. 'अंगीची अव्यंग निजांग शोभा'; तं. 'अंगीच अव्यंग निजांगें शोभे'.] अंगीचें अव्यंग निजांग शोभे ॥ ४१ ॥

जयाचें पाहतां वक्षस्थळ । [सु. नि. इं. घा. 'सबाह्य भरित'.] सराभरीत समूळ । तेथें वसती विजनशीळ । जनवन सकळ सम साम्ये ॥ ४२ ॥

पाहतां जयाचा कंबूकंठ । वेदांची ते वाहती वाट । तेथुनिया होती प्रगट । स्व स्ववर्ण वरिष्ठ मर्यादा ॥ ४३ ॥

ॐकारामाजीं वर्ण व्यक्ती । तेंवी मुखामाजीं दंतपंक्ती ।
चौकीचे चाऱ्ही [सु. घा. 'झळकती'.] मिरवती । चिदानंद दीप्ती सोलीव ॥ ४४ ॥

जीव शिव विभाग जनीं । तैसे देखा अधर दोन्ही । ऐक्या आले श्रीरामवदनीं । मीनले मिळणी एकत्वें ॥ ४५ ॥

निवटुनिया [कं. सु. 'नास्तिक'.] नस्तिक्य । अवक्र जे कां [कं. सु. 'आस्तिक'.] आस्तिक्य । तें श्रीरामाचें नासिक । शोभेचें बिक शोभवी ॥ ४६ ॥

[मु. 'चालतां'; तं. 'चंचलता'.] चळतां जितुका वायो जाण । श्रीरामाचे मुख्य प्राण । तेचि वेदांचें [तं. त. 'सुखस्थान'.] जन्मस्थान । त्रिकांडी पूर्ण प्रतापु ॥ ४७ ॥

चैतन्याचें देखणेंपण । त्याचिया डोळां आलें शरण । देखणें देखें देखणा होऊन । देखणेंपण सबाह्य ॥ ४८ ॥

स्वांनंदे निडारली दृष्टी । चिन्मात्रैक देखे सृष्टी । देखणेंपणा आली पुष्टी । दृश्या पाठी-पोटीं दृष्टाचि देखे ॥ ४९ ॥

दीपामागें पडसाई । तैसी डोळियामागें भुवई । व्यंकटी सांडुनिया पाही । राम देहीं विनटल्या ॥ ५० ॥

जयाची विक्षेप भ्रुकुटी । रची ब्रह्मांडाच्या कोटी । तेथे कैची राहे व्यंकटी । अगाध दृष्टी रामाची ॥ ५१

पूर्व उत्तर मीमांसा पूर्ण । तेचि मुख्य श्रीरामश्रवण । श्रवणां श्रवणांचें भूषण । जे निज मंडण वेदान्ता ॥ ५२ ॥

अनुक्रमणिका

कुंडले म्हणताती साकार । एक म्हणती मकराकार । परी तें सत्यत्वें निर्विकार । श्रवणें विकार नासती ॥ ५३ ॥

श्रवणासी संपूर्ण । सावधानता निजभूषण । [सु. घा. या प्रतींत 'सावधानतेवीण जाण' ही पदे नाहीत.] सावधानतेवीण जाण । भूषण तें दूषण श्रवणासी ॥ ५४ ॥

श्रीरामाचें निजश्रवण । वेदशास्त्राशीं भूषण । तेथे रिघो न शके दूषण । पावना पावन [मु. 'पावना पावन श्रीराम'; तं. 'पावना श्रवण श्रवणां'.] श्रवणें श्रवणा ॥ ५५ ॥

जैसें अधिष्ठान निर्मळ । तैसें देखा विशाळ भाळ । [पै. तं. त. मु. व कं. 'ज्याच्या कपाळाची वेळ'.] जयाचेनि सुफळ कपाळ । सुर सकळ वांछिती ॥ ५६ ॥

उगाळुनि अहं [कं. व मु. प्रतींत 'कठिण' हे पद नाही.] कठिणपण । सोहं काढिलें शुद्ध चंदन । तेंहि केलें रामार्पण । चंदनार्चन लल्लाटीं ॥ ५७ ॥

आधिचि तो घनसांवळा । वरी टिळक रेखिला पिंवळा । शोभा शोभली कपाळा । सुरां सकळां स्वानंदु ॥ ५८ ॥

सच्चिदानंद एके मेळीं । तेचि लल्हाटीची त्रिवळी । बोध चंदनाचा परिमळीं । पूजिली निर्मळीं निज सज्ञनीं ॥ ५९ ॥

वाणु मुकुटीचा महिमा । कैंचि उपमा निरोपमा । मुकुट मणीचा गरिमा । नेणें ब्रह्मा आकळु ॥ ६० ॥

राम मिरवे लेउनि लेणें । कीं श्रीराम लेणियाचें लेणें ।
जेवी सोनें सरे सोनटके गुणें । कीं सोनटका सोनेपणें सर्व सरे ॥ ६१ ॥

लेणेनि मिरवे सगुण पण । निर्गुण भूषणाहि भूषण । मुळीं निर्गुण शोभे सगुण । जेवीं लेणें सुवर्ण एकत्वें ॥ ६२ ॥

ऐसिया श्रीरामाच्या पोटीं । रामरूपें देखे सृष्टीं । सृष्टी सबाह्य संपुटी । देखे दृष्टी श्रीरामु ॥ ६३ ॥

ऐसिया देखोनि श्रीरामा । कौसल्येसी आला प्रेमा । त्या सुखाच्या सुखसंभ्रमा । देहधर्मा विसरली ॥ ६४ ॥

अंग सर्वांगें रोमांचित । स्वेदबिंदु [कं. पै. 'लखलखीत'.] खरवित । चित्त चैतन्यीं विरमत । नेत्रीं स्त्रवत आनंदाश्रु ॥ ६५ ॥

स्वानंदु न समाये पोटीं । सुखोर्मी बाष्पु दाटे कंठीं । [मु. 'उन्मिलित'.] उन्मळीत जाली दृष्टी । पडिली सृष्टी मूर्च्छित ॥ ६६ ॥

अनुक्रमणिका

जेंवी केळीतें झगटी पवन । तैसें शरीर कंपायमान । वाचेसी पडिलें महामौन । देहाभिमान विसरली ॥ ६७ ॥

सत्त्वगुणांचें भरितें भरें । तें आपेआप ओसरे । सावधान होउनि चमत्कारें । राम निर्धारें निर्धारी ॥ ६८ ॥

येणें स्वरूपें रघुनाथा । तुज येथ प्रगट होतां । माझा पुत्र तूं हे कथा । लोकीं सर्वथा मानेना ॥ ६९ ॥

होईन कौसल्यानंदन । हें आठवी पूर्ववचन । आईकोनि हांसे रघुनंदन । चमत्कार पूर्ण तुष्टला ॥ ७० ॥

वचन आइकोनि तात्काळ । श्रीराम स्वयें जाला बाळ । बालार्क प्रभा सुनीळ । सुख कल्लोळ जननयनां ॥ ७१ ॥

भक्त माझें ऐश्वर्य ओसंडी । परी चरणामृतीं पडे उडी । तेथ कैसी आहे गोडी । तें आवडी चाखों गेला ॥ ७२ ॥

चरणकमळींचा अंगुष्ठ । करकमळीं धरूनि स्पष्ट । मुखकमळीं करितां प्रविष्ट । गोडी उद्भट लागली ॥ ७३ ॥

आपुली आपणया गोडी । स्वभावें फावली धडफुडी । तोंडीचा अंगुष्ठ न काढी । चोखी आवडीं [मु. 'चुरचुरा'.] चुरचुराटे ॥ ७४ ॥

माझां स्वरूपाची गोडी । भक्तीं भोगिली धडफुडी । चरणामृतीं सुखाच्या कोडी । चोखी आवडी अंगुष्ठ ॥ ७५ ॥

तेंचि लक्षण बाळकांच्या ठायीं । अद्यापी भासत असे पाही ।
निजांगुष्ठ मुखाच्या ठायीं । चोखी लवलाही स्वानंद सुखें ॥ ७६ ॥

यापरी रघुनंदना । देखोनि बाळभावना । कौसल्येसी आला पान्हा । जीवें निंबलोणा करूं पाहे ॥ ७७ ॥

सुरी दुंदुभी त्राहाटिल्या भेरी । देव गर्जती जयजयकारी । वरुषती [मु. 'सुमनांच्या हारी'; तु. 'सुमनें अंबरीं'; तं. 'सुमनाचा शरधारी'.] सुमनांचा संभारीं । चराचरीं आल्हादु ॥ ७८ ॥

आनंदाचे लवडसवडी । नारदाची पडे उडी । सनकादिकांची आडाडी । [मु. 'पडिपाडी'.] स्वानंदपाडी नाचती ॥ ७९ ॥

सिद्ध आले श्रेष्ठ श्रेष्ठ । ऋषि आले झडझडाट । वेद होउनिया भाट । अति उद्भट वाणिती ॥ ८० ॥

योगी संन्यासी घनदाट । पुण्यकाळाचे [पै. तं. तु. व मु. 'दाटले'.] थाटले थाट । तीर्थासी तेथ न फुटे वाट । तिहीं शरयुतट वसविले ॥ ८१ ॥

अनुक्रमणिका

अयोध्येचा हाट-बिदी । स्वयें झाडिती महासिद्धी । रंगमाळा घाली [नि. 'सिद्धि'.] विधि । गुढिया समाधी स्वानंदे उभवी ॥ ८२ ॥

महासामें सुरस गाणीं । चाऱ्ही मुक्ति त्या नाचणी । साही शास्त्रांची पेरवणी । शब्द श्रेणी स्वपक्षे ॥ ८३ ॥

धर्माची [मु. 'पहिली'; तं. 'जाली'.] पाहली पहांट । स्वानंदाची मोकळी वाट । सुखांची पिकली पेठ । समयो श्रेष्ठ साधुनी ॥ ८४ ॥

अनुक्रमणिका

श्रीरामजन्म



**वचन आइकोनि तात्काळ । श्रीराम स्वयें जाला बाळ । बालार्क प्रभा सुनीळ । सुख कल्लोळ जननयनां ॥**

## अनुक्रमणिका

कौसल्येसी पुत्र जाला । स्वधर्मे [तं. सु. घा. ‘वर्धाया’.] वाधावा आणिला । राजा हर्षे निर्भर जाला । ओसंडला स्वानंदें ॥ ८५ ॥

त्राहटिल्या निशाणभेरी । गगन गर्जे मंगळतुरीं । त्रैलोक्य गर्जे जयजयकारीं । घरोघरीं उल्हासु ॥ ८६ ॥

मंगळ जळीं निज निवाडें । राजा स्नान करी वाडे कोडें । तो शिंतोडा लागे जिकडे । पूर्वज तिकडे सुखरूप होती ॥ ८७ ॥

पूर्वज स्वयें सुखी होती । हें आश्चर्य सांगों किती । तेणें जळें त्रिजगतीं । उल्हासती स्वानंदें ॥ ८८ ॥

पुत्रानंदें उदार दृष्टी । सवत्स गोधनाच्या थाटी । अश्वगजरथ धनकोटी । वाटितां सृष्टीं [मु. ‘मागता सरे’.] मागते सरले ॥ ८९ ॥

जन्म पावला रघुनाथ । उदार दान दे दशरथ । मागतां मागणें हारपे तेथ । होउनि कृतार्थ मागण्या विसरे ॥ ९० ॥

दशरथ म्हणे ये समयीं । जो जें मागेल तें देईन पाही । तंव मागतेचि जाले नाहीं । याचकांचा [तं. तु. व मु. ‘याचकां देहीं संतृप्ती’.] देही संतृप्त याञ्चा ॥ ९१ ॥

ऐसें श्रीरामपुत्रमुख । देखतां रायासी परम हरिख । द्विज निर्भर केले देख । तृप्त याचक अतिदानें ॥ ९२ ॥

श्रीरामाचें जातक । दशरथ करी अलौकिक । द्वितीय पुत्राचा हरिख । सद्भावें देख आणिली गुढी ॥ ९३ ॥

सुमित्रा देखे स्वप्न । मज जालें पुत्ररत्न । जागृतीं पाहे सावधान । तंव पुत्र निधान निज शेजें ॥ ९४ ॥

क्षीरसागरीहूनि निघाला । राम कौसल्ये गर्भा आला । पाठीचा शेष पाठी पावला । पाठीं जाला सौमित्रु ॥ ९५ ॥

श्रीरामाची सुष्ठु मैत्री । चालवील निज निर्धारीं । सौमित्र म्हणणें ययापरीं । सुमित्रा उदरीं जन्मला ॥ ९६ ॥

कौसल्येसी सुष्ठु मित्रता । चालवी यालागी सुमित्रा । तोहि आला तिच्या उदरां । सौमित्र खरा येणेंहि ॥ ९७ ॥

लक्ष्मण शेषावतार । अयोनिज [मु. ‘जन्मला निर्धार’.] निज निर्धार । तोहि नातळे योनिद्वार । जन्मव्यवहार स्वलीळां ॥ ९८ ॥

तें देखोनि पुत्रवदन । अष्टांगीं पावली समाधान । मन जालें आनंद घन । सुमित्रा संपूर्ण सुखरूप जाली ॥ ९९ ॥

यापरी आनंद चढोवाढी । हरुषाचिया लवडसवडीं । सद्भावें उभउनि गुढी । रायासी आवडी सुतसुख सांगे ॥ १०० ॥

द्वितीय पुत्राचा [मु. 'प्रभाव'.] प्रभवो । आइकोनि सुखें सुखावे रावो ।
घेउनिया ऋषिसमुदावो । जातकार्थ पाहों स्वानंदें आला ॥ १०१ ॥

फोडिली धनाचीं भांडारें । मुक्त केलीं धान्यकोठारें । त्यागी गाईंचीं खिल्लारें । लुलु दानभरें मूर्च्छित जाली ॥

याश्चा बुडाल्या दानसमुद्रीं । दारिद्र्य विरालें दातृत्वपुरीं । मागत्यांचा दुकाळ नगरीं । घरोघरीं आनंद ॥ १०३ ॥

कैकेयी पुत्रवंती दो पुत्रीं । तिचे प्रसूतीची थोरी । अतिशयेसी नवल परी । निज निर्धारीं अवधारा ॥ १०४ ॥

कैकेयीसी लागली सुषुप्ती । पुत्र जन्मले कैशा रीती । त्या पुत्रजन्मासी गति । तिसी ते स्थिति अलक्ष ॥ १०५ ॥

एक श्रीरामाचा भाग । एक लक्ष्मणाचा विभाग । दोन्ही लीळा विग्रही सांग । योनीचें अंग नातळती ॥ १०६ ॥

सख्या प्रबोधिती कैकेयेसी । दोघे पुत्र जन्मले कुशी । तुझी झोप ऐसी कैसी । पुत्रसुखासी अनोळख ॥ १०७ ॥

कैकेयी पाहे पुत्रमुख । हृदयीं ओसंडेनी हरिख । सापत्नभावाचें सुख । लोकदृष्टी देख [सु. घा. 'पाहती'.] पावती जाली ॥ १०८ ॥

पूर्ण कळवळा नाहीं मना । स्वानंदस्नेहें नये पान्हा । [मु. 'दायी'.] धायेच्यापरी स्तनपाना । लाविले स्तना पुत्र दोन्ही ॥ १०९ ॥

स्वपिंड गर्भ तिचा नोहे । परभाग गर्भ सापत्न माये । त्याचेनि स्तन पाने पाहे । स्वभावें धाय हे जाली ॥ ११० ॥

पुढें सहजचि सापत्न । पुत्र नाइकती तिचें वचन । पुत्राचेनि समाधान । कैकेयी जाण पावेना ॥ १११ ॥

कैकेयीची गर्भस्थिति । पुत्रद्वयांची उत्पत्ती । यापरी जाली प्रसूति । वाधावा रायाप्रती धाडिती जाली ॥ ११२ ॥

स्नेहाचिये लवडसवडी । सकामाचिया आवडी । पुत्रद्वयाची [नि. 'गर्व गोडी'; सु. घा. 'गुढी'; तं. तु. त. 'गर्भगुढी'.] गर्वगुढी । कैकेयी धाडी रायापासी ॥ ११३ ॥

अनुक्रमणिका

पुत्रद्वयांचे प्रिय जन्म । तेणें रायासी सुख परम । उदार हस्तें करूनि धर्म । जातक कर्म तेणें केलें ॥ ११४ ॥
[कं. प्रतीत ही ओवी नाही.]

जेंवी कां चार्‍ही पुरुषार्थ । एके काळें घरां येत । तेवीं चार्‍ही पुत्र दशरथ । जाहला प्राप्त सम काळें ॥ ११५ ॥

[सु. घा. 'चहूं मूर्तिचे'; तु. 'चहूंमूर्ति'.] चहूं मुक्तींचें सुख एक । तेंचि चतुर्धा होऊनि देख । दशरथासी द्यावया सुख । चार्‍ही अलौलिक जन्मले पुत्र ॥ ११६ ॥

सच्चिदानंद तिन्ही जाण । तिहींची प्रकाशक वस्तु चिद्‌घन ।
तेचि चार्‍ही पुत्र पूर्ण । [मु. 'पावला आपण स्वयें रावो'.] सभाग्य आपण पावला रावो ॥ ११७ ॥

प्रणव तेचि वेद चार्‍ही । तेवीं एकचि वस्तु चौं प्रकारी । पुत्रत्वें दशरथाच्या घरीं । सुखकारी सर्वांसी ॥ ११८ ॥

एक सुख नित्य निश्चिती । त्यासी [सु. घा. 'चित्त चतुष्टय'; नि. 'बहुविध चतुष्टय'; तु. 'विद्या चतुष्टय'.] व्यूह चतुष्टय म्हणती । तेचि हे चार्‍ही मूर्ति । पुत्रसुखार्थी दशरथा ॥ ११९ ॥

सकळ [मु. 'जगाचा'.] जीवांचा निज विश्राम । सकळ सुखांचा सुख आराम ।
जो निष्कामाचा पूर्ण काम । तो श्रीराम दशरथात्मज ॥ १२० ॥

सकळ लक्षां [मु. 'अलक्षण'; तं. 'लक्षण'; तु. 'सुलक्षण लक्ष्मण'.] अलक्ष्यपण । जो सकळ लक्षणीं संपूर्ण । तोचि तो लक्ष्मण जाण । सुमित्रानंदन दशरथात्मज ॥ १२१ ॥

ज्याचेनि सकळ पदार्थ । सदा सर्वदा पूर्ण भरित । ते वस्तूते म्हणती भरत । कैकेयीसुत दाशरथी ॥ १२२ ॥

मनुष्य शत्रूंचे हनन । करी तें अल्प शत्रुध्नपण । भवशत्रूंचें निर्दाळण । करितां शत्रुघ्न दशरथात्मज ॥ १२३ ॥

कनिष्ठ कैकेयीनंदन । त्याचें नांव शत्रुघ्न । वसिष्ठें केलें नामाभिधान । चौघे जण दाशरथी ॥ १२४ ॥

श्रीवसिष्ठें आवश्यक । केलें चौघांचें जातक । जन्मपत्रिकेचे लेख । नाम निर्दोष जगद्वंद्य ॥ १२५ ॥

यापरी श्रीराम आणि लक्ष्मण । भरत आणि शत्रुघ्न । चौघेही दशरथनंदन । नामाभिधान जगद्‌वंद्य ॥ १२६ ॥

यापरी श्रीरामाचा जन्म । सांगितला अनुक्रम । निरोपिले [मु. 'जन्मकर्म'.] जन्मधर्म । चरित्रानुक्रम अवधारा ॥ १२७ ॥

अनुक्रमणिका

**येथुनि श्रीरामचरित्र । धन्य तें वाल्मीकाचें वक्त्र । अगाध अनुपम्य विचित्र । कथा पवित्र शतकोटी संख्या ॥ १२८ ॥**

**एकाजनार्दना शरण । पूर्ण जालें जन्मकथन । पुढां स्वानंद निरोपण । श्रोतां अवधान मज द्यावें ॥ १२९ ॥**

**परिसा रामायणीं कथा । अनागत वाल्मीक वक्ता । महापातक्या समस्तां । नित्य मुक्तता श्रीरामें ॥ १३० ॥**
[ही ओवी पै. तं. कं. त. याच प्रतींत आढळते. संपादित प्रत ओवीसंख्या १३०, श्लोक नाही. इतर प्रतींत ओवीसंख्या पुढीलप्रमाणे आहे : नि. इं. सु. घा. १२९; तं. १३०; तु. १२७; त. १३०; पै. १२९; कं. १२८.]

**इति श्रीभावार्थरामायणें बालकांडे एकाकारटिकायां षष्ठंप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग सातवा

## श्रीराम तीर्थयात्रागमन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

धन्य रामायणी सृष्टी । धन्य [त. 'कवित्या वाल्मीकाची वाक्पुटी'.] वाल्मीकाची वाग्वृष्टी । अक्षरीं अक्षर परिपाटी । दोष कोट्यान कोटी नासती ॥ १ ॥

नाशती महापातकें । नाशती महाद्वंद्वदुःखें । रामकथा ऐकतां हरिखें । सुख महासुखें थोरावे ॥ २ ॥

येथुनि श्रीरामचरित्र । [कं. पै. 'पवित्रा करी अति पवित्र'.] अपवित्रां करी अतिपवित्र । कथा कौतुक अतिविचित्र । श्रोतां सादर परिसावें ॥ ३ ॥

श्रीराम जन्मला अयोध्यापुरीं । तंव वीजु पडे लंकेवरी । [तुं. 'भूमि फुटोनि नगरद्वारीं'; मु. 'भूस्फोटन नगरद्वारीं'.] भूस्फोट नगरद्वारी । [सु. घा. 'विघ्नें दुःखकारी उपजती'.] भूकंप नगरी त्रिकुटेसी ॥ ४ ॥

रावण जंव भंद्रीं चढे । तंव मुकुट [तु. नि. 'पायरीवरी'; कं. 'पायावरी'.] पायारवी पडे । वातघातें [सु. घा. 'छत्र पडें मोडें'.] छत्र मोडे । सभेचें उडें सौभाग्य ॥ ५ ॥

कुंभकर्णाच्या घरावरीं । दिवा दिवाभीतें घु घु करी । इंद्रजित आरशाभीतरीं । देखे अशिरीं शरीरा ॥ ६ ॥

मंदोदरीची गळसरी । तुटोनि पडे अग्निवरीं । काढी काढी [मु. 'तीतें काढी जंव'.] जंव सुंदरी । तंव भस्म करी हुताशनु ॥ ७ ॥

ऐसा विघ्नांचा आवर्तु । तेणें राणीवसां आकांतु । येणें [तु. 'होय घातु'; मु. 'राक्षसकुळां घात'.] राक्षसकुळा दिसे घातु । हा हा भूत निशाचर ॥ ८ ॥

रावणु सांगे भयंकरी । दृढ [कं. तु. त. व मु. 'दृढपणें असारे नगरीं'.] पन्नासा रे नगरीं । येथुनि [तं. 'तुम्ही न वजावे दूरी'; मु. 'कोणी न जावे दूरीं'.] वीरीं न वजावें दूरी । अहोरात्रीं सावध ॥ ९ ॥

प्रधानादि सभानायक । तिहीं थोरा घेतला धाक । रावणा लागली धुकधुक । [नि. 'अरिष्ट अत्यंतिक'; सु. घा. 'अरिष्ट आटंक'; तु. कं. 'अरिष्टे अटक देखोनी'.] अरिष्टें अनेंक देखोनि ॥ १० ॥

येरीकडे अयोध्येसी जाण । श्रीवसिष्ठें आपण । चौघां कुमारांचें विधान । संस्कार पूर्ण करिता जाला ॥ ११ ॥

जातककर्म नामाभिधान । कटिसूत्र अन्नप्राशन । चौलकर्म [तं. 'दानधर्म'; कं. 'वाग्दान'.] वायनदान धर्म । केलें संपूर्ण विधियुक्त ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

ऐश्वर्याचेनि [मु. 'ऐश्वर्याचें अविष्कारें'.] अधिकारें । व्रतबंधाचेनि गजरें । दानें सन्मानें सत्पात्रें । सुखी नृपवरें यापरी केलीं ॥ १३ ॥

श्रीरामाचा व्रतबंध । सुखी केले विप्रवृंद । [मु. 'स्वानंदे निघाले दोंद'; तु. 'तृप्तीसी निघालीं स्वानंद दोंदे'.] याज्ञेसी निघालें स्वानंद दोंद । [नि 'डोलत परमानंदें'.] तें परमानंद पावली ॥ १४ ॥

श्रीरामाचें व्रतबंधन । सुखी केले अकिंचन । वणवण [मु. 'निमाली'.] जाली संपूर्ण । मागेतपण मुक्त जालें ॥ १५ ॥

जाहलिया व्रतबंधन । वसिष्ठापासी चौघे जण । आरंभिलें वेदाध्ययन । शास्त्र व्याख्यान वेदान्त ॥ १६ ॥

श्रीराम वेदांचें जन्मस्थान । त्यासी [नि. 'संस्कार मंत्रें'.] निगदमात्रें जाण । [मु. 'पठन जालें शास्त्र संपूर्ण'.] जालें वेदशास्त्र संपूर्ण । अगाधपण प्रज्ञेचें ॥ १७ ॥

यापरी रघुनाथासी जाण । जाली वरुषें पूर्ण । करावया तीर्थाभिगमन । रघुनंदन उद्यतु ॥ १८ ॥

प्रार्थुनि श्रीवसिष्ठातें । त्या सद्गुरूचेनि अनुमतें । आज्ञा पुसोनि दशरथातें । श्रीराम तीर्थातें निघाला ॥ १९ ॥

पाहुनिया सुखसुदिन । स्वस्ति-वादें पुण्याहवचन । सवें देऊनियां सैन्य । सुबुद्धि प्रधान समवेत ॥ २० ॥

दिधलीं अक्षयी भांडारें । सवत्स गाईंची खिल्लारें । नाना [मु. 'नाना प्रकारचीं'.] मेचुचीं वस्त्रें । तीर्थीं रघुवरें वांटावया ॥ २१ ॥

सरें सरिता सिंधुसंगम । पुण्यभूमि पुण्याश्रम । [नि. 'केले प्रयागादि पंचग्राम'; सु. घा. 'कालपग्राम'; 'नंदीग्राम'; त. 'कळाप ग्रामादि पंचग्राम'.] कलाप ग्रामादि पंचग्राम । मार्ग दुर्गम हिमालय ॥ २२ ॥

[सु. घा. 'दूर मार्गीं'.] बदरींमार्गीं पंचप्रयाग । [मु. 'वेदप्रयाग'.] देवप्रयाग शिवप्रयाग । कर्णप्रयाग ब्रह्मप्रयाग । गुप्तप्रयाग पांचवें ॥ २३ ॥

[मु. 'शरयु गंगा सुवर्णभद्रा'; तु. 'शरयु गंडकी शोणभद्र'.] शरयु गंगा शोणभद्र तिन्हीं । हे पूर्वप्रयाग त्रिवेणी । कार्तिकमासीं कृष्णवेणी । मुख्य त्रिवेणी माघस्नान ॥ २४ ॥

वनें तपोवनें शैल्य शिखरें । परम पावने जें जें उरवरें । तीर्थादि तिन्ही पुष्करें । तीर्थें क्षेत्रें विधियुक्त [मु. 'यात्रा' हे पद नाही.] यात्रा ॥ २५ ॥

निमिषारण्य धर्मारण्य । [सु. घा. 'पंचारज्य'.] चंपारण्य ब्रह्मारण्य । महापंथींचें वेदारण्य । ऋषि वेदज्ञ जेथ [तु. मु. 'असती'.] वसती ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

मंदाद्रि आणि विंध्याद्रि । मूळपिठीचा सह्याद्रि । गंगातिरीचा ब्रह्माद्रि । लोकोत्तरीं अतिश्रेष्ठ ॥ २७ ॥

प्राची सरस्वती बिंदुसार । धर्मालय कुरूक्षेत्र । ज्वालामुखी ज्वाला दुर्धर । अति पवित्र पृथोदक ॥ २८ ॥

केलें तिन्ही [सु. घा. 'तिही गंगेचें दर्शन'.] गयांचें दर्शन । धर्मस्तंभाचें स्पर्शन । ब्रह्मयोनीचें अवलोकन । गायत्रीचें ध्यान संध्यावटीं ॥ २९ ॥

ब्रह्मावर्त गोमती तीर । हिरण्य सन्निहित सागर । सागरावर्ती शंखोद्धार । जेथ वेदोद्धार हरि करी ॥ ३० ॥

सप्तपुरीं तीर्थ मार्गे । केलीं बाराही ज्योतिर्लिंगें । प्रभासप्राप्ती सोमनाथयागें । पंचकृष्ण प्रयोगें मूळमाधवु ॥ ३१ ॥

द्वारकेचा कल्याण कृष्ण । दुजा शंखो नारायण । तिजा पिंडारकीं काळकृष्ण । चौथा तो जाण गड दामोदर ॥ ३२ ॥

मुळींचे निज मूळस्थान । मूळ माधव पांचवा कृष्ण । हे [नि. 'हे तंव यात्रा मंडळ गमन'; सु. घा. 'उत्तम यात्रागमन'; कं. 'उमामंडळ'.] उखा मंडळ यात्रागमन । पुण्यपावन सर्वांसी ॥ ३३ ॥

गंडकी यमुना [सु. घा. 'दुसरी'.] सुरसुरीं । तापी नर्मदा मच्छोदरीं । कृष्णा भीमा गोदावरी । दुरितें [तु. 'हरी'.] जयांचेनि ॥ ३४ ॥

मच्छतीर्थ पक्षतीर्थ । [पौ. तां. तु. त. 'शिवकांति विष्णुकांति युक्त'.] शिवकांची विष्णुकांचीयुक्त । [तु. नि. 'त्रिकोण हस्ती'; सु. घा. 'त्रिकाळ हरि'.] त्रिकाळ हस्ती तीर्थभूत । तीर्थ विख्यात कुंभकोण ॥ ३५ ॥

कावेरी प्रतीची ताम्रपर्णी । कृतमाला पयस्विनी । या पंचनदीच्या स्नानीं । भगद्भजनीं दृढ भावो ॥ ३६ ॥

कन्याकुमारी जनार्दन । शेषशायी अनंतशयन । उभय कावेरी श्रीरंगस्थान । परम पावन अगस्त्याश्रमु ॥ ३७ ॥

दर्शनें मुक्ति चिदंबरी पाही । जन्में मुक्ति कमळालयीं ।
मरणें मुक्ति काशीच्या ठायीं । स्मरणें मुक्ति [मु. 'देई अरुणाचल'.] देही अरुणाचळाच्या ॥ ३८ ॥

श्रीराम तीर्था तीर्थभूत । मोक्षाही मुक्ति श्रीरघुनाथ । तोही तीर्थयात्रा करीत । लोकसंग्रहार्थ स्वलीळा ॥ ३९ ॥

जे तीर्थी जें विधान । जे तीर्थी जैसें स्नान । तैसे करूनि दान सन्मान । सुखी सज्जन श्रीरामें केले ॥ ४० ॥

अनुक्रमणिका

रामें सुखी केले महर्षि । रामें सुखी केले संन्यासी । रामें सुखी केले तीर्थवासी । सुखी वनवासी श्रीरामें केले ॥ ४१ ॥

रामें सुखी केले त्यागी । रामें सुखी केले [नि. 'भोगी'; कं. 'यागी'.] योगी । रामें सुखी केले विरागी । [मु. 'सुख संभोगी'.] सुखसंगीं श्रीरामु ॥ ४२ ॥

रामें सुखी केले ब्रह्मचारी । रामें सुखी केले व्रतधारी । रामें सुखी केले नरनारी । राम सुखकारी सर्वांसी ॥ ४३ ॥

रामें सुखी केले तपी । रामें सुखी केले जपी । रामें सुखी केले निर्विकल्पी । सुखस्वरूपी श्रीरामु ॥ ४४ ॥

रामें सुखी केले दिगंबर । रामें सुखी केले वल्कलधर । रामें सुखी केले सदाचार । सुख साचार श्रीरामु ॥ ४५ ॥

रामें सुखी केले अयाचित । रामें सुखी केले अतिविरक्त । रामें सुखी केले धर्मासक्त । राम समस्तां सुखकारी ॥ ४६ ॥

रामें सुखी केले अकिंचन । रामें सुखी केले अतिदीन । रामें सुखी केले सज्ञान । [मु. 'सकळ सुजन सुखकारी'.] सकळ जन सुखकारी ॥ ४७ ॥

रामें सुखी केले कापडी । रामें सुखी केलीं बापुडीं । रामें सुखी केलीं साबडीं । [नि. 'सुखाची कुळवाडी श्रीराम'.] सुखाचिया कोडी श्रीरामभेटीं ॥ ४८ ॥

रामें सुखी केले सेवक । रामें सुखी केले केवळ रंक । रामें सुखी केले लोक । जे भावें सन्मुख भेटों आले ॥ ४९ ॥

रामें सुखी केले विवेकी । रामें सुखी केले एकाकी । रामें सुखी केले त्रिलोकीं । यात्रानुलोकीं स्वलीळा ॥ ५० ॥

यात्रा विधियुक्त प्रकार । स्वलीळा श्रीरघुवीर । नाना जनां दान प्रकार । चतुःसमुद्र सुखी केले ॥ ५१ ॥

द्वारका पश्चिम समुद्र । जगन्नाथ पूर्व समुद्र । उत्तर समुद्रीं मानस सरोवर । [मु. 'दक्षिण समुद्र श्रीसेंतुबंध'; तु. 'दक्षिण समुद्र पै सेतु'; कं. 'दक्षिण समुद्रीं श्वेत सेतु'.] दक्षिण समुद्रीं श्वेत हेतु ॥ ५२ ॥

यापरी समुद्रवलयांकित । तीर्थें करूनियां समस्त । अयोध्ये आला रघुनाथ । सुमुहुर्त स्वानंदें ॥ ५३ ॥

नगर शृंगारिलें नृपवरें । गुढिया तोरणें मखरें । गगन गर्जे जयजयकारें । आणिला गजरें रघुनाथ ॥ ५४ ॥

अनुक्रमणिका

पदोपदीं ओवाळणी । पदोपदी अक्षवणी । पदोपदीं [सु. घा. 'सुख सुवासिनी'; क. 'सुरसवासणी'.] सुवासणी । मंत्रध्वनि प्रयुक्त ॥ ५५ ॥

[मु. 'भाट'.] मागध गर्जती गहिरध्वनी । पुढें नाचती [तं. 'गाणी'; पै. त. कं 'गाणा गाणी'.] नाचणी । कीर्ति वाणिजे बंदिजनी । अयोध्याभुवनीं उल्हासु ॥ ५६ ॥

वसिष्ठां घातलें लोटांगण । दशरथां साष्टांग नमन । चौघां दिंधलें आलिंगन । परम समाधान रायासी ॥ ५७ ॥

अभिवंदिल्या तिघी माता । हरूष दशरथाचिया चित्ता । [मु. 'उत्संगी'.] ओसंगी बैसवी रघुनाथा । सुख समस्तां [मु. 'अपार'.] अनिवार ॥ ५८ ॥

चौघां केलें मंगळस्नान । दिव्यांबर [न. 'प्राधान्य'; पै. तं. कं. 'प्रधान'.] परिधान । दिव्यालंकार चंदन । सुमनीं सुमन शृंगारिलें ॥ ५९ ॥

वसिष्ठवचन प्रमाण । केलें व्रत विसर्जन । द्विजा दिधलें भोजन । दान सन्मान समारंभें ॥ ६० ॥

यापरी तीर्थाभिगमन । करूनि आला रघुनंदन । येथुनि वैराग्य विंदान । श्रीराम आपण विन्यासें दावी ॥ ६१ ॥

येथुनि कथा मनोहर । गुह्यज्ञानें ज्ञानगंभीर । स्वयें निरोपील रघुवीर । वैराग्यविचार मुमुक्षुहेतु ॥ ६२ ॥

मुमुक्षु तरावयां संसार । दाखवी वैराग्य निजसार । धर्मसंरक्षणीं अवतार । [त. 'सप्त'.] सत्य साचार श्रीरामु ॥ ६३ ॥

एकाजनार्दनीं एक । कवीश्वरांचे रंकाचे रंक । त्या मूर्खाचेनि मुखें देख । कथा अलौलिक श्रीरामु वदवी ॥ ६४ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां सप्तमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग आठवा

## विश्वामित्रागमन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीरामु सच्चिदानंदघन ॥ तो [तु. खेरीज इतरत्र 'तोही'.] तंव वैराग्यलक्षण । लोकरक्षणार्थ दावी आपण । दीन जन [तं. त. 'तरावया'.] तारावया ॥ १ ॥

सकळ वैराग्याचें फळ । स्वयें श्रीराम केवळ । तोही वैराग्याचें शील । दावी प्रबळ लोकोपकारा ॥ २ ॥

तीर्थीहूनी आलीया रघुनाथु । नावडे राज्य राज्यार्थु । नावडे लोक [नि. इं. सु. घा. त. 'लोकार्थ'] लौकिकार्थु । विषय स्वार्थु नावडे ॥ ३ ॥

नावडे इंद्रियांचा संग । नावडे इंद्रियांचा भोग । नावडे [त. 'विषय प्रयोग'.] इंद्रिय प्रयोग । अति विरक्त अनुतापी ॥ ४ ॥

नावडे [कं. पै. तं. 'प्रकृति क्रियाकर्म'] प्रकृति क्रियाकर्म । नावडे देहादि [तु. 'देह विदेह धर्म'.] देहधर्म । नावडे विलास संभ्रम । वैराग्यें [तं. 'पूर्ण'.] परम अनुतापी ॥ ५ ॥

नावडे स्त्रियांची भेटी । नावडे स्त्रियांचा गोठी । नावडे स्त्रियां पाहों दिठीं । वैराग्य पोटीं विषयांचें ॥ ६ ॥

नावडे [इं. घा. 'शास्त्रिक'.] शाब्दिक [तु. 'कचावट'; नि. 'चावट'.] कचाट । नावडे [तु. 'चावट'.] चातुर्य वटवट । नावडे अतिवाद खटपट । मौननिष्ठ अनुतापी ॥ ७ ॥

नावडे कळाकौतुक चांग । नावडे नृत्यगीत [नि. तु. 'शुभांग'; घा. 'शुद्धांग'.] सुधांग । नावडे पारधी [त. खेरीज इतरत्र 'राजरंग'.] राजांग । वैराग्यें सांग अनुतापी ॥ ८ ॥

नावडे संग्रहो धनधान्य । नावडे [कं. पै. 'राजसत्ता पदाभिमान'; नि. 'संपदा पदाभिमान'; इं. सु. घा. 'राज्यपर अभिमान'.] राज्यत्व पदाभिमान । नावडे मानसन्मान । वैराग्यें पूर्ण अनुतापी ॥ ९ ॥ [ही ओवी तु. प्रतीत नाही.]

नावडे तया कल्पतरू । तो तंव कल्पनेचा सागरू । [कं. पै. तं. तु. सु. घा. इं. नि. 'कल्पना सबळ'.] कल्पनामेळें संसारू । अति दुस्तरू [त. खेरीज इतरत्र 'जन्ममरणे'.] कल्पनाबळें ॥ १० ॥

केवळ चिंतायुक्त चिंतामणी । चिताचिंता समान दोन्ही ।
चिता [सु. तु. 'निर्जीवा दहिनी'; इं. नि. घा. 'निर्जीवा दाहिनी'.] निर्जिवांचा दहनी । चिंता अनुदिनीं [तं. 'देह जाळी'; तु. 'नित्य जाळी'; त. 'जियातें'.] जित्यातें जाळी ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

नावडे [सु. इं. घा. 'सुवर्ण'.] परिसु धातु अर्थु । अर्थु तितुकाही अनर्थु । ज्याचे पोटीं अर्थु स्वार्थु । त्यासी परमार्थु कदा न [तु. 'न घडे'; सु. इं. नि. घा. 'न भेटे'.] लाभे ॥ १२ ॥

कामधेनु नावडे मनिहुत । तें कामनेचें अधिष्ठान । [सु. इं. नि. घा. 'काम कामें'; तु. 'कामना काम'.] कामना-कामें भवबंधन । वैराग्यें पूर्ण नावडे तेंही ॥ १३ ॥

ऐसे दिव्य भोग समस्त । त्यांसी श्रीराम अनासक्त । [कं. पै. तं. तु. त. खेरीज इतरत्र दोन चरण असे :—— 'सदा वसावी एकांत । अनंत अव्यक्त रहिवासी ॥'] वैराग्यें अति विरक्त । सदा एकांत रहिवासी ॥ १४ ॥

दशरथाचे सत्पुत्र । आइकोनिया विश्वामित्र । ऋषीश्वरांमाजीं अति पवित्र । आला सत्वंर यज्ञसिद्धार्थ ॥ १५ ॥

आला आइकोनि विश्वामित्र । सामोरा धावे नृपवर । लोटांगणी नमस्कार । हरुणें निर्भर गृहा आणी ॥ १६ ॥

घालुनिया वरासन । मधुपर्क विधि [नि. 'विधान'.] गोदान । सुवर्णसुमनीं केलें पूजन । सुखसंपन्न ऋषी जाला ॥ १७ ॥

वसिष्ठा विश्वामित्रा भेटी । आलिंगणीं पडली मिठी । दोघांची एकत्वे [सु. घा. 'ऐक्य जाली दृष्टी'.] एकी दृष्टी । दोघांच्या पोटीं सुख एक ॥ १८ ॥

दोघांचें एक कर्माचरण । दोघांचें एक अनुष्ठान । दोघांचें एक ब्रह्मज्ञान । [मु. 'एकत्वें पूर्ण दोघे जण'.] एकात्मता पूर्ण दोघे एक ॥ १९ ॥

दशरथाचे [सु. घा. 'बैसले विश्वामित्र वसिष्ठ दोन्ही'; नि. 'दोघे बैसले एकासनीं'; त. 'सन्मानीं'.] सभास्थानीं । दोघे बैसले समासनीं । [सु. नि. घा. 'तेणें शोभली ते अवनी'; तं. कं. 'आस्थानीं'.] शोभली तेणें राजधानी । जेवीं गगनीं शशीसूर्य ॥ २० ॥

दशरथु म्हणे विश्वमित्रा । तूं प्रतिसृष्टीचा धात्रा । उद्धरावया कुळगोत्रा । परम पवित्रा आलासी ॥ २१ ॥

धन्य भाग्याचे आजी आम्ही । धन्य अयोध्येची भूमी । जे कृपेनें आलेती तुम्ही । जें [तं. 'जे कृतजन्मीं नभेटा'; त. 'जे कृताश्रमीं न भेटे'; कं. 'जे कृताश्रमी भेटावया'.] व्रत जपें तपें न भेटां ॥ २२ ॥

जेथ संतोषोनि साधु आले । तेथ सकळै कल्याण मुसावलें ।
तीर्थाचें फळ तें हें पाऊलें । भवाब्धीचे भले [सु. घा. 'परतारू'; नि. 'पार उतारू'.] परपार तरू ॥ २३ ॥

जेथ तुमची कृपा पाहे । तेथ भगवंतु [मु. 'अवश्य आहे'.] वश्य होये । जगद्वंद्य तुझे पाये । बहु मी काये अनुवादों ॥ २४ ॥

अनुक्रमणिका

संतोषोनि बोले दशरथ । विश्वामित्रा तुझे [मु. 'मनोरथ'.] मनोगत । सिद्धी पाववीन समस्त । हे निश्चितार्थ मद्वाक्य ॥ २५ ॥

जे जे तुझे मनोरथ । ते जाण म्यां केले कृतार्थ । येणें वाक्यें संतोषयुक्त । स्वयें बोलतु विश्वामित्रु ॥ २६ ॥

दशरथा तुझें औदार्य । धैर्य वीर्य गुणगांभीर्य । तुझिया पुरुषार्थाचें शौर्य । स्वर्गीं सुरवर्य वाणिती ॥ २७ ॥

रणीं [कं. व मु. 'जिंकोनि'.] जिंतोनि शुक्रासी । सुखी केलें [त. 'देवऋषि'.] देवगुरूसी । यश दिधलें इंद्रासी । तूं सूर्यवंशासी मंडन ॥ २८ ॥

आइकोनि ऋषिवचनोक्ति । राजा सुखावला चित्तीं । त्या सुखाचे सुखस्फूर्ती । काया ऋषिप्रति बोलतु ॥ २९ ॥

होओनियां अति विनीत । जोडोनिया दोन्ही हात । ऋषिचिया कृतकार्यार्थ । असे पुसत स्वानंदें ॥ ३० ॥

गायत्री मंत्र कृतकार्या । विश्वामित्रा ऋषिवर्या । तूं आलासी कोणा कार्या । महाधैर्या मज सांग ॥ ३१ ॥

[सु. घा. 'ऋषि म्हणे सूर्यवंशी महावर्या'; नि. 'म्हणे सूर्यवंशी महावर्या'.] सूर्यवंश निजवीर्या । आइके नृपा परोपकार्या । सुरसिद्ध कृतकार्या । मागणें राया अवधारी ॥ ३२ ॥

माझें मागणें नव्हे वित्त । माझें मागणें नव्हे प्राकृत । माझें मागणें श्रीरघुनाथ । यज्ञसिद्ध्यर्थ कृतकार्या ॥ ३३ ॥

आइकोनि ऋषीचें वचन । गजबजिलें रायाचें मन । वीर्य गेलें हारपोन । कंपायमान सर्वांशीं ॥ ३४

सर्पा कपाळीं कांटा नेहटे । साप सुरळीचें पुंस तुटे । मासा जळावेगळा फुटे । तें दुःख [पै. खेरीज इतरत्र, 'वाटे'.] दाटे रायासी ॥ ३५ ॥

चणे वानरांच्या गालींचे । कीं धन जैसें कृपणाचें । भाणें [मु. 'नेले'; त. तु. पै. कं. 'नेदवे'.] नेतां भणगाचें । तैसें मन रायाचें श्रीरामीं ॥ ३६ ॥

प्राण जातां देह विकळ । [सु. घा. 'मन बुद्धी होय व्याकुळ'.] मन मूर्च्छित इंद्रियें बरळ । राम मागतांचि तत्काळ । रायासी [मु. 'केवळ दैन्य तैसें'; कं. 'कळवळ'.] केवळ दशा तैसी ॥ ३७ ॥

वाचेसी पडिलें दृढ मौन । ऋषीसी [मु. 'नेदी'.] नेदवें प्रतिवचन । समयाचें [तं. तु. 'सभेचे'; कं. 'स्वमयाचें'.] चातुर्य-ज्ञान । [तु. 'विचारून'.] विचारून बोलतु ॥ ३८ ॥

यज्ञीं विघ्न करीती राक्षस । मनुष्यमारक अतिकर्कश । राम केवळ [सु. घा. 'बाळवेष'; नि. 'बाळवेष राजस'.] बाळभाष । धनुर्विद्याभ्यास नाहीं केला ॥ ३९ ॥

अनुक्रमणिका

नाहीं रणांगणु देखिलें । नाहीं पूर्वी युद्ध केलें । त्यासी राक्षसेंसी पहिले । युद्धा [मु. ‘करविले’.] दिधलें केवी जाय ॥ ४० ॥

मी केवळ पुत्रकृपण । श्रीरामु माझें निधिनिधान । श्रीराम माझें [सु. घा. ‘केवळ जीवन’; नि. ‘जीवनधन’; तु. ‘निजध्यान’.] जीवधन । तो नेदवें दान राक्षसभक्षा ॥ ४१ ॥

श्रीरामाचा प्रथम संबंध । तेंही राक्षसेंसी द्वंद्व-युद्ध । तुम्हीच विचारा विशद । ज्ञानप्रबुद्ध तुम्हीं [मु. ‘आहां’.] आम्हां ॥ ४२ ॥

श्रीराम केवळ बाळ । नाहीं शस्त्रविद्या प्रबळ । नाहीं मंत्रास्त्र शुद्धशीळ । त्यासी युद्ध तुंबळ राक्षसांतें केवी ॥ ४३ ॥

जें जें मागाल तुम्ही समर्थ । देईन राज्य राजपदार्थ । सेखीं देईन जीवित । परी रघुनाथ नेदवे ॥ ४४ ॥

आइकोनि रायाचें वचन । विश्वामित्र कोपायमान । अत्यंत क्षोभोनियां जाण । काय [मु. ‘आपण वचन’.] आपण बोलतु ॥ ४५ ॥

अरे मी भेटलों दशरथ । द्विजा तुझे [त. ‘मनोगत’.] मनोरथ । आजीच जाले कृतकृतार्थ । ऐसें सभेआंत जल्पसी ॥ ४६ ॥

तेंचि मागतां दान । नेदवे [तु. ‘ब्राह्मणासी’.] म्हणसी आपण । हेंचि मुख्यत्वें कुळदूषण । [मु. ‘दिधलें दान न देववे म्हणसी’; त. ‘दान लांछन मुख्यंत्वें’.] दान छळण मिथ्यत्वें ॥ ४७

सूर्यवंशीं राजे जाण । जे जाले ते [सु. घा. ‘धर्मपरायण’.] धर्मभूषण । त्यांमाजीं तूं [सु. घा. ‘अधर्म दूषण’.] धर्मदूषण । [सु. घा. ‘दिधलें दान तें मिथ्यत्वें’.] दिधलें दान नेदवे म्हणसी ॥ ४८ ॥

हरिश्चंद्रें स्वप्नींचें दान । जागृतीं सत्य केलें संपूर्ण । आपणया विकिलें आपण । दक्षणा वचन सत्यत्वा ॥ ४९ ॥

ते वंशीं तूं जन्मलासी । दिधलें दान मागतां नेदिसी । हें सामर्थ्य तुजचिपासीं । सूर्यवंशासी निंदकु ॥ ५० ॥

येचि वंशीं शिबी जाण । पक्ष्याचें समसमान । निजमांस तुकिलें आपण । परि मिथ्या वचन न [या ओवीनंतर नि. घा. तु. प्रतींत पुढील ओवी आलेली आहे :— येचि वंशीं मुचकुंद जाण । इंद्रा केलें आपण । तेणें युद्ध केलें दारुण । रणकंदन तारकेसी ॥ १ ॥] करिची ॥ ५१ ॥

ते वंशीं जन्मोनि जाण । दान नेदवे म्हणसी आपण । ते वंशीचिया यशासी पूर्ण । तुंवा दूषण लाविलें ॥ ५२ ॥

रुक्मांगदु येचि वंशीं । मोहिनीनें छळतां त्यासी । पुत्राचें शिर देऊनि तिसी । व्रत एकादशी [सु. घा. ‘उल्हासें’.] उद्धारु ॥ ५३ ॥

अनुक्रमणिका

तूंहि ते वंशीं जन्मलासी । पुत्र नेदवे स्वयें म्हणसी । लाज लाविली पूर्वजांसी । [मु. ‘उणें’.] उणीव वंशासी तुझेनि ॥ ५४ ॥

ककुस्थु बैसला शक्राचे स्कंधीं । दैत्य पराभविले युद्धीं । ते वंशींचा तूं त्रिशुद्धी । म्हणसी पुत्र नेदी युद्धार्थ ॥ ५५ ॥

तू रामासी म्हणसी बाळ । हे [सु. घा. ‘हे बुद्धि मुख्यत्वें स्थूळ’.] मूर्खबुद्धि अति स्थूळ । श्रीरामु अवतार निर्मळ । जाण केवळ सुरसाह्या ॥ ५६ ॥

श्रीरामु नव्हे बालक । [मु. ‘राक्षसकुळासी अंतक’.] राक्षसकुळां कुळांतक । स्वधर्माचा संस्थापक । साधूचा आवश्यक साहाकारी ॥ ५७ ॥

राम धनुर्विद्या नेणे । हें वचनचि अप्रमाण । राम विद्या जन्मस्थान । शस्त्रास्त्रजीवन नीजबीज राम ॥ ५८ ॥

राम रणरंग धीर । गुणागुणीं गुणगंभीर । वीराधिराज महावीर । परमशूर श्रीरामु ॥ ५९ ॥

राम मनुष्य नव्हे पाही । राम देहींचे विदेही । श्रीराम चैतन्य विग्रही । रामु स्वदेहीं परब्रह्म ॥ ६० ॥

राया तूं नेणसी निश्चित । श्रीराम मानिसी प्राकृत । वसिष्ठासी पूस हा वृतान्त । तो यथार्थ सांगैल ॥ ६१ ॥

आतां स्वस्ति असो तुम्हासी । सकळ कल्याण श्रीरामासी । मी जाईन स्वाश्रमासी । म्हणौनि ऋषि निघाला ॥ ६२ ॥

वसिष्ठ म्हणे नृपवरा । क्षोभवूं नको विश्वामित्रा । हा प्रतिसृष्टीचा धात्रा । भस्म कुळगोत्रा क्षणार्धें करील ॥ ६३ ॥

धन्य वसिष्ठाचा भावो । सूक्ष्म सुचिल निर्वाहो । जेणें सुखावे ऋषि आणि रावो । तैसा उपावो चिंतिला ॥ ६४ ॥

वसिष्ठ गुह्य सांगे रायासी । शांत करी विश्वामित्रासी । दोघे पुत्र द्यावे त्यासी । दोघे तुम्हापासी क्रीडार्थ ॥ ६५ ॥

गुरूआज्ञा वंदुनि सिसीं । लोटांगण घाली विश्वामित्रासी ।
रामलक्ष्मण दिधले तुम्हासी । दोघे मजपासी क्रीडार्थ ॥ ६६ ॥

विश्वामित्र म्हणे भले । एकें श्रीरामें काय नव्हे केलें । सवें लक्ष्मणासी दिधलें । भाग्य फळलें पैं माझे ॥ ६७ ॥

विश्वामित्रु म्हणे वसिष्ठासी । सत्य सद्‌गुरू तूं सूर्यवंशीं । रक्षिलें दोहींचे धर्मासी । ज्ञाता होसी सज्ञानत्त्वें ॥ ६८ ॥

अनुक्रमणिका

**वसिष्ठ विश्वामित्र रावो । [मु. 'स्वस्थानीं'; कं. तं. त. संपादित पाठ.] स्वस्थानसीं बैसले पहा हो । गाधीसुत जाला निसंदेहो । परम उत्सवो स्वानंदें ॥ ६९ ॥**

**राजा म्हणे जिवलगासी । श्रीरामु पाचारा [नि. घा. 'ऋषिभेटीसी'. संपादित प्रत ओव्या ७३; इतर प्रतींत ओवीसंख्या पुढीलप्रमाणे : नि. घा. ७४; तु. ७२; इतरत्र ७३.] ऋषिपासीं । येरू पातला राजाज्ञेसी । अति वेगेसी विनीतु ॥ ७० ॥**

**लोटांगण वसिष्ठासी । साष्टांग नमन रायासी । चरणीं माथा विश्वामित्रासी । येरे हृदयासी आळंगिला ॥ ७१ ॥**

**ऋषीरामा जाली भेटी । आनंद विश्वामित्राच्या पोटीं । जयजयकारें गर्जत उठी । श्रीरामु दृष्टीं देखोनि ॥ ७२ ॥**

**एकाजनार्दना शरण । जालें गुरुशिष्या दरूषण । ऐथुनि श्रीराम आपण । वैराग्य पूर्ण निरोपिला ॥ ७३ ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां विश्वामित्रदशरथसंवादो नाम अष्टमप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग नववा

## श्रीराम वैराग्य

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

सन्मुख देखोनि श्रीरामु । विश्वामित्राचा मनोधर्मु । सुखावोनिया सप्रेमु । आनंदे परम बोलतु ॥ १ ॥

आजी माझें सार्थक कर्म । आजी माझे [मु. 'सफळ'.] सफळित धर्म । आजी माझें जालें पूर्ण काम । रायें श्रीराम यज्ञार्थ दिधला ॥ २ ॥

ऋषि म्हणे श्रीरामासी । [मु. 'चल जाऊं'.] चाल माझिया आश्रमासी । सिद्धी पाववी स्वधर्मासी । तूं सर्व कर्मासी निजमोक्षु ॥ ३ ॥

राम म्हणे ऋषि समर्था । कांहीं पुसेन मनोगता । कृपा करावी कृपावंता । मी तंव तत्वतां वचनार्थी ॥ ४ ॥

देह तंव अत्यंत [मु. 'अशक्त'.] असंत । देह कर्म तेही नाशिवन्त । कर्म-फळ तेही [कं. व मु. 'क्षयभूत'; पै. तं. 'क्षयीभूत'; तु. 'क्षयेभूत'.] क्षयवंत । सुख कोण येथ देहसंगें ॥ ५ ॥

देह-लोभें आर्तभूत । जो जो विषय सेविजत । तो तो तत्काळ विष्टा होत । सुख कोण येथ [घा. 'देहलोभें'.] देहसंगें ॥ ६ ॥

देहीं काळु लागला नित्य । क्षयों करी अहोरात्र । भोगवी जन्ममरणावर्त । सुक कोण येथे [घा. 'देहलोभें'.] देहसंगें ॥ ७ ॥

देहीं क्षुधेचा मारा नित्य । तृषा पीडी जीवनार्थ । देही देहभय [मु. 'देह भय निभ्रांत'; तु. 'देहभये अत्यंत'; क. पै. 'देहभय अश्रांत'.] आश्रित । सुख कोण येथ देहसंगें ॥ ८ ॥

आइके स्वामी साचार । देह तंव दुःखाचा डोंगर । देह विकल्पाचा सागर । देह तंव महापूर अति तृष्णेचा ॥ ९ ॥

देह [तं. 'विष्टा मुत्राची'.] नित्य मूत्राची न्हाणी । देह [तु. 'नवी नरकाची'; इतरत्र 'तंव नरकाची'.] नव्या नरकाची खाणी । देह तें [मु. तु. 'पोहण घाणी'.] पोहोणी घाणी । रोगाची श्रेणी तें हें देह ॥ १० ॥

देह संदेहाचें सोलीव । देह अहंकाराचें ओतीव । देह विषयांचें भरींव । कृमीचें पेव तें हें देह ॥ ११ ॥

देह द्वंद्वाची निजधरणी । देह दुःखाची निजनिशाणी । देह विकल्पाची पूर्ण भरणी । [नि. 'अरिष्टांची'.] दरिद्राची आरणी तें हे देह ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

देह आशेचा कळवळा । देह [तं. 'मोक्षाचा'; मु. 'अहंकाराचा'; तुं. 'भोगाचा'; कं. 'मोहकाचा'.] मोहाचा आंगवळा । देह [मु. 'अहं ममतेचा'.] ममतेचा निजसोहळा । विकरांचा मळा तें हें देह ॥ १३ ॥

देह कामाचा पर्वत [घा. 'गडू'.] गूढु । देह क्रोधाचा अवघड गडु । देह [घा. 'दोषाचा'.] लोभाचा दुस्तर आगडु । विनाशाचा [मु. 'मठ'; तु. 'मुढ'.] मढु तें हें देह

देह अविद्येचें अधिष्ठान । देह संकल्पाचें साजिर वन । देह मोहकाचें मोहन । मुख्यत्वें अज्ञान तें हें देह ॥ १५ ॥

देह अपवित्राचें मूळ । देह [पै. 'कुचिल'.] कुश्चळा अति कुश्चळ । देह अमंगळा अति अमंगळ । मुख्यत्वें विटाळ तें हें देह ॥ १६ ॥

[तु. 'उत्तमभोग'; मु. 'पहा जो उत्तम पदार्थ'.] उत्तम भोग्य पदार्थ आहे । देह लोभें तो भोक्ता खाये । [तु. 'योगमात्रें' घा. 'क्षणमात्रें'.] याममात्रें ते विष्टा होये । हा देहाचा पाहे परिपाकु ॥ १७ ॥

याम मात्र न लगे देख । तत्काळ होतांची वमक । नरका होऊनियां अधिक । चिळसी दायकु [घा. 'देहसंगें'.] देहसंगु ॥ १८ ॥

नित्य विषयो सेवितां पूर्ण । नीच नवी वाढे वणवण । कल्पांतीं तृप्ती नव्हे जाण । सुख कोण देहसंगें ॥ १९ ॥

क्षुधा नित्य पीडी शरीरी । तृषा ही पीडी [तु. 'त्याचे शिरीं'.] तेचि परी । निद्रा सर्वार्थी मूढ करी । देहसंगा माझारी सुखकोण ॥ २० ॥

त्या देहाची उत्पत्ति । ते मी सांगेन स्वामी प्रति । अपवित्रा अपवित्र मूर्ति । देह संगती सर्वार्थी ॥ २१ ॥

रजस्वलेचा लागतां [नि. इं. घा. 'पालव'.] सेवो । सचैल स्नानाचा उद्भवो । त्या अशुद्धाचा ओतीव देहो । अपवित्र पहा हो समूळीं ॥ २२ ॥

रजस्वला शुद्ध चवथे दिवशीं । तो विटाळू राहिल्या गर्भासी । तोची वाढोनी नऊ मासीं । करी गोत्रासी सुतकी ॥

विटाळें देहाची संभूती । विटाळें देहाची उत्पत्ति । विटाळें देहाची शान्ती । देह भस्मांती सुतक राहे ॥ २४ ॥

देहाच्या अस्थि आणि राख । गंगोदकीं घालितां देख । देतां पिंड तिळोदक । तरी देह सुतक सुटेना ॥ २५ ॥

एवं देह मुख्यत्वें विटाळ । देह तेंची दुःख प्रबळ । आतां गर्भदुःखाचें कल्लोळ । विशद [नि. इं. घा. 'विकळ'; तं. पै. त. 'विव्हळ'.] विवळ अवधारा ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

रजस्वळाचें पूर्ण रुधिर । तेथ पित्याचें रेत मात्र । तेची गोठोनि होय शरीर । मुख्य अपवित्र देहसंगु ॥ २७ ॥

जननी जठराग्नि माझारीं । विष्टेच्या दांथरावरी । मूत्राच्या आधणा भीतरीं । नवमास वरी [घा. 'उकाडिजे'; नि. 'उकडिजे'.] उकाडा ॥ २८ ॥

जठराग्नीच्या तोंडीं । उकडतां गर्भासी उंडी । रस [घा. 'उकाडिता'.] मुसावोनि होय पिंडी । अष्टांगाची कांडी व्यक्ती येती ॥ २९ ॥

विष्टालेपु चहूंकडे । नाकीं तोंडीं जंतु किडे । तें दुःख भोगितां जीवु रडे । अति चरफडे तळमळीतु ॥ ३० ॥

त्वचा नाहीं गर्भ खोळे । तंव मातेसी होती डोहाळे । कट्वाम्ल लवण [नि. 'सेवि ते वेळें'.] सेवितां पोळे । सर्वांग [नि. घा. 'होरपळे'; त. 'हुरपळें' पे. 'हुरळे'.] आहळे गर्भाचें ॥ ३१ ॥

त्रिकाळ भोजन मातेसी । त्रिकाळ दुःख त्या गर्भासी । भोगितां होय कासाविसी । कोणापासी सांगेल ॥ ३२ ॥

नाही वायोचें आगमन । नाहीं [नि. घा. 'मायदाइचें'; त. 'मायेचे'.] मायधायेचें शांतवन । नाहीं स्वजनाचें समाधान । दुःखें संपूर्ण अति दुःखी ॥ ३३ ॥

ते काळींची त्याची व्यथा । ते नेणती माता पिता । तेथ नाहीं नाभीं म्हणता । आपुली दुःखता आपण भोगी ॥ ३४ ॥

प्रसूती काळ अति अटक । गुदद्वारीं अधोमुख । योनीद्वारें आणावया देख । परमदुःख उत्पादी ॥ ३५ ॥

प्रसूतीवात अति प्रबळ । सर्वांगीं लागे एकी कळ । योनीद्वारीं करी तळमळ । प्रसूती तत्काळ होईना ॥ ३६ ॥

वेणेवरी येतां वेणा । [नि. घा. तु. 'दुःख होय'.] दुःखी करी दोघा जणा । मातेंसी न साहे वेदना । गर्भघोळणा ते काळीं ॥ ३७ ॥

ते काळीं विचार करी पूर्ण । आतां जन्मलिया आपण । [नि. 'विषय सेवितां गर्भी गमन'.] विषयास्तव गर्भागमन । तें विषय सेवन करीना ॥ ३८ ॥

सद्गुरुसी रिघोनी शरण । निर्दाळुनी अभिमान । निवारीन जन्म-मरण । तेही आठवण [नि. घा. तु. 'विसरे देही'.] विसरवी देहे ॥ ३९ ॥

गर्भ जन्मोनि बाहेरी पडे । सोहंभाव तत्काळ उडे । 'कोहं' भावें दीर्घ रडे । जन्मल्यापुढें सुख काये ॥ ४० ॥

जन्मकाळापासुनी देख । आयुष्य जातसे अमौलिक । यालागी जो तो पुसे जातक । कोण्ही राहतक पुसेना ॥ ४१ ॥

अनुक्रमणिका

देहासवेंचि जातक । अखंड लागलें आवश्यक । यालागीं सकळीक लोक । मरण धाक सदा वाहती ॥ ४२ ॥

मरणमर्यादा नाहीं देख । गर्भीं गर्भपाताची धुकधुक । उपजतांचि सटवीचा धाक । कोण सुख जन्माचें ॥ ४३ ॥

ज्या ठायाचें घेऊं नये नांव । जो दाखवूं नये स्वमेव । ते योनीद्वारें संभव । कोण गौरव जन्माचें ॥ ४४ ॥ [तु. प्रतीत ही ओवी नाही.]

बाळपणीच्या दुःखशोका । असंख्यत्वें नये लेखा । तेंही सावधान आइका । निजनरका स्वयें भक्षी ॥ ४५ ॥

लाळ थुंका विष्टा मूत्र । त्यामाजीं [नि. 'सदा सदा'.] सदा असे पचत । तेची स्व इच्छा स्वयें भक्षीत । बाळपणीं येथ सुख काये ॥ ४६ ॥

दांत दोष दिठी डोळे । निघती सात महिन्या काळे । तान्हेंपणी दुःख उमाळे । बाळपणीं फळे सुख कोणा ॥ ४७ ॥ [तं. प्रतीत ही ओवी नाही.]

उदरव्यथा करी रुदन । माता मुखीं घाली स्तन । निजव्यथा न सांगवे पूर्ण । सुख कोण बाळत्वीं ॥ ४८ ॥

बाळपणीं दुःख [नि. इं. घा. पै. 'असोस'.] अशेष । तेथ नाहीं सुखाचा लेश । तैसेंचि तारुण्यहि देख । दुःखदायक पुरुषासी ॥ ४९ ॥

तारुण्याचा अति आघात । निःशेष बुडवी निजस्वार्थ । कांही नाठवे परमार्थ । अति उन्मत्त विषयार्थी ॥ ५० ॥

शिणोनि विषयो करी पूर्ण । नीच नवी वाढे वणवण । इंधनीं खवळे हुताशन । तेवी विषय दारुण दुर्भरत्वें ॥ ५१ ॥

नित्य विषयो सेविती । कदाकाळे नसे तृप्ती । आयुष्य गेलें हातोहातीं । हें तारुण्याप्रति [तं. 'तु लक्षण'.] लक्षेना ॥ ५२ ॥

वाढवितां विषय-सोस । नित्य आयुष्या होय नाश । परमार्थ पेठ [तु. खेरीज इतरत्र 'परमार्थ'.] पडे वोस । नाहीं सुख-लेश तारुण्यामाजीं ॥ ५३ ॥

आयुष्याचा नित्य घात । निःशेष नासे परमार्थ । [कं. 'तोहि विषयाचा धरुनी स्वार्थ'; नि. घा. 'तो हा विषयांचा संघात'; तु. 'विषया सांगत'; पै. 'तोहि विषयाचा सांघात'.] तो हा विषयांचा सांगात । तारुण्यांत मुसमुसी ॥ ५४ ॥

तारुण्याच्या पोटीं । अनेक दुःखाचिया कोटी । लावी योषितांपाठी । [नि. घा. 'धनधान्य दृष्टीं लीलुप्ते'.] धन-दृष्टि लोलुप्त ॥ ५५ ॥

अनुक्रमणिका

तारुण्याचिया वाटा । अभिमानें चढें ताठा । अधर्माचा फुटे फाटा । गर्वाचा मोठा फुगारा ॥ ५६ ॥

मी एक चातुर्यसंपन्न । मीच एकु समर्थ सधन । मीच [पै. तं. नि. घा. 'स्वयंपाकी'.] स्वयें पाकी सुब्राह्मण । पवित्रपूर्ण मी एकु ॥ ५७ ॥

जग आघवेंचि अपवित्र । आपण एकु पवित्र । हें तारुण्याचें विचित्र । घातक सूत्र अभिमानें ॥ ५८ ॥

स्त्री अस्थिमांसाचा कोथळा । स्त्री केवळ विष्ठेचा गोळा ।
स्त्री वस्ती-स्थान विटाळा । नरक सोहळा [मु. 'स्त्रीसंगें'.] स्त्री संगु ॥ ५९ ॥

ऐसिया स्त्रीसंगापाशीं । तारुण्य पुरुषातें करी दासी । अखंड सेवी तियेसी । [तु. नि. 'त्याची दशा पेसी अवधारा'; घा. 'चिळसी मानसीं धरीना'.] जेवी जिव्हेपाशीं नित्य थुंका ॥ ६० ॥

तारुण्यरासभ स्त्रियेपाशी । तिचा घरोबा वाहे सिसीं । तारुण्यश्वान स्त्री आज्ञेसी । लाविल्या वसवसी सुहृदांतें ॥

तारुण्य [मु. 'माकड'; तं. तु. त. पै. संपादित पाठ.] वानर स्त्रियेपुढें । ते नाचवी तैसे उडे । ते पाडी तेथें पडे । नाचवी रोकडें निजछंदें ॥ ६२ ॥ [कं. प्रतीत ही ओवी नाही.]

तारुण्य मांजर स्त्री गृहवासी । 'मी येवो' 'मी येवो' म्हणे पायापाशी ।
चाटावया अधरामृतासी । अहर्निशीं टोकत ॥ ६३ ॥

तारुण्य उंदीर स्त्रीचा घरीं । [त. खेरीज इतरत्र 'अष्टौप्रहर'.] अष्टौपहार छिद्रें कोरी । देखतां [त. 'लोपे'; तं. 'पळे'.] लपे छिद्राभीतरीं । तारुण्यावरी सुख कायें ॥ ६४ ॥

तारुण्य लोलूप विषयापासी । तारुण्य स्त्री कामाची दासीं । तारुण्य गर्वे मुसमुसी । [तं. 'तारुण्याचिये संगती'.] तारुण्यापासी सुख कैंचें ॥ ६५ ॥

तारुण्याची ऐसी गति । सुख होईल वार्धक्याप्रती । त्या वार्धक्याची स्थिती । आईका निश्चित सांगेन ॥ ६६ ॥

वार्धक्यीं नाथिलिया आधी । वार्धक्यीं [कं. मु. 'नाथिल्या'; तु. प्रतीत या ओवीचा तिसरा चरण पुढीलप्रमाणे आहे :— 'त्रास मानिती देहसंबंधी'.] नाना व्याधी । वार्धक्यीं भ्रंशे बुद्धि । सुख त्रिशुद्धी तेथ कैंचें ॥ ६७ ॥

जरेचें भय बहुवस । जरा नाशी [तं. खेरीज इतरत्र 'शरीराभास'.] शरीरवेष । धाकें पालटती केश । सुखाचा लेश तेथें नाहीं ॥ ६८ ॥

वार्धक्य देखोनि येतां । समूळ पळणी होये दांता । क्षीण होये इंद्रियसत्ता । सुखाची वार्ता तेथ नाहीं ॥ ६९ ॥

अनुक्रमणिका

वार्धक्य केवळ पाप । तेणें सर्वांगीं सुटे कांप । [कं. नि. पै. 'भेणे बोची हाले लपलप' घा. 'भेणे खोची हले लपलप'; तं. संपादित पाठ.] होट हालेती लफलफ । शब्दाचा प्रताप [नि. घा. 'प्रलाप'.] पोचट [तुं. 'सपाट'.] होय ॥ ७० ॥

[नि. घा. कं. 'तारुण्यापासी समस्त वित्त'; तु. पै. 'तारुण्येसी समस्त वित्त'.] तारुण्येंसी समस्त सेवित । [तु. 'जे का भोगी संपत्य'; मु. 'जे कांता भोगी समस्त'; कं. 'जो कांता भोगी सत्वंत'.] जे कांता भोगी संतत । ते विमुख होय वार्दक्यांत । हा जरेचा येथ बडिवारु ॥ ७१ ॥

वार्धक्यीं जिरेना अन्न । तऱ्ही खावयाची तृष्णा गहन । वृद्धाचें सदा सचिंत मन । सुख कोण वार्धक्यीं ॥ ७२ ॥

वार्धक्यीं शोक समूह । वार्धक्यीं ममता बहू । वृद्धातें बाळें म्हणती बाऊ । हा सुखगौरऊ वार्धक्यीं ॥ ७३ ॥

बाईल [नि. 'नायके'; तु. खेरीज इतरत्र 'वठेना'.] वर्तेना बोला । बाळें दाविती वांकुल्या । जो तो चेष्टवी [मुळा=मुळांत.] मुळा । जरठु खवळला विनोदें ॥ ७४ ॥

जरेचें बळ बहुवस । खोकला लागे अशेष । जवळीं बैसेना माणूस । भोवतें बळसचिडाणी ॥ ७५ ॥

[सु. नि. इं. 'जरा जर्जर कल्लोळें'; कं. घा. पै. 'जरा जरठ कल्लोळें'; तु. 'जरा जठरे कल्लोळें'; त. 'जरा जरठ कल्लोळें'.] जरा जरठु लोळे । शरीराची शक्ति पळे । डोळे होती [घा. सु. इं. 'सरकले'; तु. नि. 'सरकाळे'.] सरक्याळे । तोंडीहुनि लाळे [नि. इं. सु. घा. 'लाळ गळे उरावरी'.] पुरू पेटे ॥ ७६ ॥

मरणें व्यापिलें शरीर । तऱ्ही माझी स्त्री माझें घर । माझे नातु माझे पुत्र । हे ममता फार [मु. 'सोडीना'.] सांडिना ॥ ७७ ॥

जऱ्ही घातला अर्धजळीं । तऱ्ही स्त्रीपुत्रांते न्याहाळी । नातोंडे [सु. 'आपारे'.] आणारे जवळी । ममता मेळीं देहांतु ॥ ७८ ॥

नरदेहींच्या आयुष्यसारा । विषयलोभें केला मातेला । [सु. इं. 'पडला परलोका विचारा'.] परलोका पडिला चिरा । [सु. इं. घा. 'जाय दुर्धरा नरकांत'; नि. 'नरकद्वारा करी गमन'.] नरकद्वारा आंदणा ॥ ७९ ॥

देह बुद्धिचां कल्लोळी मोहममतेचां [सु. इं. घा. 'महामेळीं'; तु. 'महाजळीं'; तं. 'महाजाळीं'.] महाज्वाळीं । परमार्थाची जाली होळी । वृथा रवंदळी [मु. 'नरदेहां'.] उत्तम देहा ॥ ८० ॥

देहीं व्यर्थ विषयसुख । देहें नाशिलें स्वर्गसुख । देहें वंचिलें मोक्षसुख । केवळ दुःख देहसंगु ॥ ८१ ॥

शतवरुषें [पै. व मु. 'विषयासक्ति'.] विषय संगती । एकाही इंद्रिया नव्हे तृप्ती । उत्तमा आयुष्या जाली शांती । केवळ [तं. 'अधोगति'; कं. पै. 'अधःपाती'.] अधोपाती देहसंगु ॥

देह संगामाजीं सुख । म्हणती ते केवळ मूर्ख । देहसंगु तो समूळ दुःख । गर्भ-नरक भोगवी ॥ ८३ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम म्हणे गुरुनाथा । अंगीं देह अहंता नांदतां । सुख कोण राज्यभोगार्था । विषय स्वार्था सुख कोण ॥ ८४ ॥

अहंकारा ऐसा वैरी । बैसला असतां उरावरी । सुख नाहीं गा संसारीं । निजनिर्धारीं निश्चयो ॥ ८५ ॥ [सु. इं. या प्रतींत ही ओवी नाही.]

अहंकारु जडला जीवीं । तो [सु. 'साधुनीं'.] साधनी रिघोनी गोवी । अहंकारु जीवभावीं । उघड नागवी जगातें ॥ ८६ ॥

मुख्य [सु. घा. त. 'घातक'.] बाधक अहंता । तिसी साह्य जाली ममता । [पै. तं. खेरीज इतरत्र 'अहंममता'.] 'अहं' मम न जिणता । सुख [तं. 'स्वार्था'.] सर्वथा असेना ॥ ८७ ॥

जालिया शुद्ध श्रवणें । उपभोग ऐसा देखणें । [मु. 'जे'; तु. 'तेवी'.] जेवी भक्षुनिया वमनें । आतांचि कां सुणें वमुनी गेलें ॥ ८८ ॥

[मु. 'वमनाते स्वये भक्षी श्वान'.] वमन-भक्ष्याचें श्वानवमन । तैसा इहपर भोग संपूर्ण । तो भाग वांछिती सज्ञान । तैं ज्ञातें [नि. घा. या प्रतींत या पदानंतर 'लौकिकी' हे अधिक पद आहे.] पण सटवलें ॥ ८९ ॥

अहंकारु मुख्य वैरी । विषयलोभें चढला शिरीं । तेणें संसार दुस्तर भारी । निजनिर्धारी ऋषिवर्या ॥ ९० ॥

या लागीं निरसे अभिमान । तंव मा न करी रसपान । न करी मिष्टान्न-भोजन । न करी परिधान दिव्यांबरें ॥ ९१ ॥

मी न करी कर्म क्रियाचार । कर्म केवळ शरीराधार । तेथें [तं. 'संचरेल';] संचरे अहंकार । मी पवित्र अति श्रोत्री ॥ ९२ ॥

जेणें पावित्रे ब्रह्मप्राप्ती । ऐसी असेल जरी युक्ति । ते सांगावी मजप्रति । कृपामूर्ति कृपाळुवा ॥ ९३ ॥

मज नसेल अधिकार । तऱ्ही तुम्ही संत सधर । सत्संगतीं दीनोद्धार । ब्रीद साचार संतांचें ॥ ९४ ॥

चंदनाचिये संगतीं । खैर धामोडे चंदन होती । तेवी संतांचिये संगती । ब्रह्मप्राप्ती दीनांसी ॥ ९५ ॥

ऐसे बोलोनि रघुनाथ । उगाचि राहिला तटस्थ । ऋषि राजा लोक समस्त । जाले विस्मित ते काळीं ॥ ९६ ॥

राम वैराग्य समेळी । ऋषीश्वर दाटले भूतळीं । सिद्ध दाटले नभोमंडळीं । मुमुक्षु तें काळीं चातक जाले ॥ ९७ ॥

अनुक्रमणिका

[पै. कं. मु. ‘वैराग्यें बोलिला रघुनाथ’;] वैराग्य बोले रघुनाथ । तेणें सुरनर तटस्थ । सिद्ध चारण चाकाटले समस्त । जाले विस्मित [मु. ‘सुरवर’.] ऋषिवर्य ॥ ९८ ॥

आइकोनि श्रीरामाची गोष्टी । सुख जालें सिद्धांच्या पोटीं । तिहीं केली पुष्पवृष्टी । श्रीराममुकुटीं स्वानंदें ॥ ९९ ॥

नभीं सिद्धांचा जयजयकार । भूतळीं गर्जती ऋषीश्वर । जयजयकार करिती नर । सुखें निर्भर सभा जाली ॥ १०० ॥

सिद्ध बोलती स्वानंदता । आम्हांसी [सु. घा. ‘कोण्यामुखें’; पैं. ‘सर्वथा’; नि. ‘आम्ही त्रैलोक्यीं हिंडतां’; तं. ‘त्रैलोक्यांत’;] त्रैलोक्य हिंडतां । नायकों हे वैराग्यवार्ता । श्रीरामें तत्त्वता सुखी [पै. कं. व मु. ‘केले’; संपादित प्रत श्लोक नाही, ओव्या १०५. इतर प्रतींत ओवीसंख्या पुढीलप्रमाणे : कं. पै. सु. इं. १०४; नि. घा. तं. त. १०५.] केलों ॥

एवं सिद्धस्वानंदेंसीं । आले दशरथाचे सभेसी । ऋषि-राम संवादासी । त्या गुह्यासी परिसावया ॥ १०२ ॥

वसिष्ठ विश्वामित्र दोन्ही । सिद्ध पुजिले संतोषोनि । रायें अत्यंत सुखावोनी । सिद्ध आणि मुनी पूजिले ॥ १०३ ॥

स्वयें येवोनि रघुनाथ । सिद्ध पूजिले श्रद्धायुक्त । ऋषि पूजिले समस्त । पूजिला दशरथ परमार्थ-बुद्धि ॥ १०४ ॥

सुर नर ऋषि सिद्धगण । सभा बैसली सावधान । एका विनवी जनार्दन । पुढें ब्रह्मज्ञान अवधारा ॥ १०५ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां नवमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग दहावा

## शुक जनक संवाद

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

विश्वामित्र उवाच—

न राघव तवास्त्वन्यज्ज्ञेयं ज्ञानवतां वर स्वयैव सूक्ष्मया बुद्धया सर्वं विज्ञातवानसि ॥ १ ॥ [योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण, सर्ग १, श्लोक २.]

**विश्वामित्र म्हणे रघुनाथा । तूं सूक्ष्म बुद्धि अति तीक्ष्णता । ज्ञान ज्ञेय** [पै. कं. मु. 'परमार्था'.] **परमार्थता । स्वभावतां परिपूर्ण ॥ १ ॥**

**ज्ञातयामाजीं ज्ञानवरिष्ठ । त्याचा अनुभव चोखट । तो तुजपासीं दिसे प्रकट । वैराग्य उद्भट ज्ञानगर्भ ॥ २ ॥**

**वैराग्य जें ज्ञानगर्भ । तोचि ज्ञानाचा समारंभ । वैराग्येंवीण ज्ञान दुर्लभ । तें तुज सुल्लभ** [तं. 'स्वभाव'.] **स्वभावता ॥ ३ ॥**

भगवन् व्यासपुत्रस्य शुकस्येव मतिस्तव । विश्रांतिमात्रमेवैतज्ज्ञाता ज्ञेयमपेक्षते ॥ २ ॥

**जैसा शुक व्याससुतु । जन्मापासुनि स्वभावें** [नि. पै. 'स्वभाव मुक्त'; घा. कं. 'जीवन मुक्त'.] **मुक्तु । तैसाचि तूं रघुनाथु । प्राप्त परमार्थु स्वभावें ॥ ४ ॥**

**त्या शुकाचा ज्ञानार्थु । विकल्पें पावला घातु । तोचि गुरुवाक्यें निश्चितु । निजपरमार्थु पावला ॥ ५ ॥**

श्रीराम उवाच—

भगवद्व्यासपुत्रस्य शुकस्य भगवन् कथम् । ज्ञेयेऽप्यादौ न विश्रांतं विश्रांतं च भिया पुनः ॥ ३ ॥

**श्रीराम म्हणें ऋषिवर्या । आइकिलें वाक्य परम आश्चर्या । ज्ञान पावोनि शुकवर्या । विकल्प धरावया कारण काय ॥**

**त्या शुकाची समूळ कथा । मज सांगावी जी स्वामीनाथा ।**
**ज्ञान पावोनि विकल्पता । शुकाचिया चित्तां बाणली कैसी ॥ ७ ॥**

**तोचि विकल्पु पुढती । कैसेनि मावळला चित्तीं । कैसेनि पावला विश्रांति । तेंही मजप्रति सांगावें ॥ ८ ॥**

विश्वामित्र उवाच——

आत्मोदंतसमं राम कथ्यमानमिदं मया । श्रृणु व्यासात्मजोदंतं जन्मनामंतकारणम् ॥ ४ ॥ [योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण २, सर्ग १, श्लोक ६.]

अनुक्रमणिका

**विश्वामित्र म्हणे श्रीरामा । व्यासपुत्राची ज्ञान गरिमा । अगाध विचार-महिमा । नाहीं** [मु. 'सीमा'.] **उपमा अनुपम्य ॥ ९ ॥**

**त्या शुकाचा निज विचार । त्याही विचारांचे निजसार । तुज मी सांगेन साचार । सविस्तर अवधारी ॥ १० ॥**

**जन्मस्वभावें शुकमुक्तु । विवेक वैराग्यें पूर्ण भरितु । तो श्रीव्यासासी न पुसतु । स्वेच्छा वनांत** [त. 'निघाला'.] **निघैता जाला ॥ ११ ॥**

> यं प्रव्रजन्तमनुपेतमपेतकृत्यम् द्वैपायनो विरहकातर आजुहाव ।
> पुत्रेति तन्मयतया तरवोऽभिनैदुस्तं सर्वभूतहृदयं मुनिमानतोऽस्मि ॥ ५ ॥ [श्रीमद्भागवत, स्कंध १, अध्याय २, श्लोक २.]

**शुकें न करितां पाणिग्रहण । न घेतां संन्यास** [घा. 'संन्यास ग्रहण'; नि. कं. 'संन्यास संपूर्ण'.] **पूर्ण । व्यासासी न पुसतां जाण । निघाला आपण सर्वस्वत्यागें ॥ १२ ॥**

**त्या शुकाची पूर्णस्थिति । देखोनि व्यासासी अति प्रीति । तेणें सुखें शुकाप्रति ।** [पै. तं. भा/१ घा. त. कं. 'विरह शक्ति'.] **पुत्रासक्ती धांविन्नला ॥ १३ ॥**

**पुत्रप्राप्तीचें व्यासासी सुख । त्याचें पाहावया** [पै. कं. तं. तु. त. 'पुत्र मुख'.] **मुख । व्यासासी अत्यंत हरिख । ये** [तं. 'एकां'; तु. 'योगी'.] **गा आवश्यक शुका म्हणे ॥ १४ ॥**

**मी शुक नव्हे एक देशी । मी सर्व भूतनिवासी । हे** [मु. 'प्रचिती'.] **प्रतीती यावया व्यासासी । वृक्ष त्या** [मु. 'त्यासी'.] **पासी ओ देती ॥ १५ ॥**

**व्यास बोभाये पुत्रवचनीं । वृक्ष ओ** [मु. 'वदति'.] **देती प्रति वचनीं । तेणें व्यास** [मु. 'सुखावोनि'.] **सुखावे मनीं । पुत्रागमनीं उद्यत ॥ १६ ॥**

**शुका म्हणतांचि जाण । वृक्ष ओ देती आपण । तेणें शुकाचें पूर्णपण । व्यासासी संपूर्ण कळों** [नि. घा. 'आले'.] **सरलें ॥ १७ ॥**

**ऐसें असतां पूर्णपण । त्यामाजी विकल्पाचें विंदान ।**
**मुख्यत्वें स्त्रिवाक्याचें श्रवण । तेणें विकल्प पूर्ण श्रीशुकासी ॥ १८ ॥**

**शुकें स्त्रिया नाहीं देखिल्या दृष्टीं । नाहीं स्त्रियांची** [पै. नि. घा. कं. 'घेतली'.] **संगती भेटी ॥**
**त्यांची अन्योक्ति आइकतां गोष्टी । विकल्प पोटीं शुकाचे ॥ १९ ॥**

**प्रमदा परमार्थ पुसों आली ।** [पै. कं. नि. घा. तु. 'हे'.] **तेधवांचि गुरुत्वा भुली पडली । प्रमदा केवळ प्रमादीं घाली । जिचां बोलीं विकल्पु ॥ २० ॥**

अनुक्रमणिका

प्रमदांप्रति परमार्थु । हा गुरुत्वा अति अनर्थु । त्या अनर्थाचा [नि. घा. तु. 'निजघातु'; त. 'घातु'.] आघातु । श्रीशुका आंतु विकल्पु २१ ॥ [या ओवीनंतर नि. घा. इं. सु. या प्रतींत पुढील ओवी आलेली आहे :—
'परमार्थ गुरुत्वाचा अति अनर्थ । त्या अनर्था अति घात । तो श्रीशुका आंत । असे नांदत सावकाश ॥'
यापुढील संस्कृत श्लोक तं. तु. त. या प्रतीत तो आला आहे.]

[या ठिकाणी पै. प्रतीत आलेला संस्कृत श्लोक अत्यंत अशुद्ध असल्यामुळे व तो शुद्ध करून घेणे शक्य न झाल्याने तो देण्यात आला नाही.] श्लोक . . . . . . . . ॥ ६ ॥

सिद्ध सरोवरा प्रती । नग्न अप्सरा स्नानें करिती । शुक जातां आत्मस्थिती । त्या स्वइच्छा [नि. इं. सु. घा. 'खेळती'.] क्रीडती निर्लज्ञा ॥ २२ ॥

मागोनि व्यास येतां देखती । अप्सरा अति सलज्ज होती । एकी वस्त्रें आड धरिती । एकी बसती उदकांत ॥ २३ ॥

शुक तरुणा [खेरीज इतरत्र 'नग्नगति'.] न गणिती । जातां अप्सरा न लाजती । मी वृद्ध त्यांच्या आज्याचे स्थिती । मज कां लाजती देवांगना ॥

शुकाच्या ठायीं यांची आसक्ति । त्या निर्लज्ञा अवेव [सु. 'विवादती'; नि. घा. 'अवयव दाविती'.] दाविती ।
मी वृद्ध नावडे चित्तीं । यालागीं लाजती स्वर्गांगना ॥ २५ ॥

हाचि अप्सरांचा भावो । हें [सु. नि. घा. 'त्याचें पासीं'.] त्यांचे त्यासीं पुसोन पाहों । हा व्यासाचा अभिप्रावो । तो प्रश्न [पै. कं. सु. नि. घा. 'पर्याव'; त. 'स्पष्ट पर्यावो'; तु. 'प्राकृत पर्यावो'.] पाहो पुसतु ॥ २६ ॥

शुकासी कां नाहीं लाजिल्याती । मज लाजिल्याती कोणे अर्थी ।
हे परम प्रमाण निश्चितार्थी । माझी प्रश्नोक्ति सांगावी ॥ २७ ॥

आइकोनि व्यासाची प्रश्नोक्ति । हांसोनि अप्सरा बोलती । जैसी ज्याची अंतरवृत्ति । तैशा त्याप्रति आम्ही वर्तों ॥ २८ ॥

मुने तुझें ज्ञान भेदानुवर्ति । शुकाची सदा [पै. कं. तु. नि. घा. 'अभेदगती'.] अभेद-वृत्ति । अभेदीं लाजेची अप्राप्ती । भेदाप्रति सलज्ञा ॥ २९ ॥

शुक अभेद केवीं कळला । माझा भेदो कोठें देखिला । जेव्हांचि लाजेचा प्रश्न केला । तेणेंची दाविला भेदु तुझा ॥ ३० ॥

तुज स्त्री पुरुष भेद व्यक्ति । यालागी केली तुवां प्रश्नोक्ति । शुकाची सूक्ष्म अभेद गती । स्त्री पुरुष व्यक्ति देखेना ॥ ३१ ॥

ऐसें आइकतां स्त्रियांचे वचन । मी ज्ञाता व्यास अज्ञान । ऐसा शुकासी ज्ञानाभिमान । हृदयीं संपूर्ण [सु. 'प्रविष्टला'; कं. तु. त. पै. 'प्रतिष्ठला'.] प्रगटला ॥ ३२ ॥

अनुक्रमणिका

बापु स्त्रीवाक्याची ख्याती । ब्रह्मज्ञानाची केली शांती । विकल्पु वाढविला चित्तीं । [खेरीज इतरत्र 'उरली'.] उठली स्फूर्ति मी ज्ञाता ॥ ३३ ॥

मी ज्ञाता तो अज्ञान । ऐसें जेथें स्फुरे स्फुरण । तेथुनी पळे ब्रह्मज्ञान । ज्ञानाभिमान उरे देहीं ॥ ३४ ॥

हिंगु पडतांची रांजणीं । [त. 'गोड पाणी'.] गोडवणी होय हिंगवणी । तेवी विकल्पु प्रवेशता ज्ञानीं । ज्ञानाभिमानीं नुरे ज्ञान ॥ ३५ ॥

दुधीं कांजीचा थेंबु पडे । तंव दुधाचे होती [मु. 'कवडे'; त. 'खडे'.] खवडे । तेवी ज्ञानीं विकल्प जैं चढे । तैं ज्ञान उडे ज्ञानाभिमानें ॥ ३६ ॥

सावधु कनकबीज खाये । तों क्षणमात्रें भ्रांत होये । तेवी विकल्पाचेनि अन्वयें । ज्ञाता होय [पै. मु. 'ज्ञानाभिमानु'.] ज्ञानाभिमानी ॥ ३७ ॥

व्यास अज्ञान भेद दृष्टी । मी सज्ञान ऐक्य पुष्टी । ऐसा विकल्प शुकाचां पोटीं । स्त्री [सु. नि. घा. कं. खेरीज इतरत्र 'साटी'.] वाक्यासाठीं दृढ झाला ॥ ३८ ॥

दीप मावळल्यापाठीं । काजळीची पोहणी उठी । तेंवि ज्ञान जातांचि शेवटीं । अति गर्व उठी ज्ञानाभिमानें ॥ ३९ ॥

[मु. 'स्वयं बुद्धिचे'.] स्वबुद्धीचें विवेक-ज्ञान । विकल्पमात्रें होय क्षीण । गुरुवाक्यें अति निपुण । तें ज्ञान संपूर्ण [मु. 'निश्चये'; त. कं. 'निरापाइ'; पै. 'निरपाई'.] निरोपाधी ॥ ४० ॥

जो ज्ञानानुभवु गुरुचां [तु. नि. घा. 'ठायीं'.] पायीं । तेंची ज्ञान अति अक्षयी । विकल्प न रिघे तये ठायीं । अति अनपायी गुरुज्ञान ॥ ४१ ॥

गुरुवाक्येंवीण जें ज्ञान । तें क्षयरोगी जन्मलें जाण । विकल्पमात्रें सांडी प्राण । अति क्षीण अपायी ॥ ४२ ॥

आचार्यवान पुरुषो वेद । हें वेदवाक्य प्रसिद्ध । गुरुवाक्यें ज्ञान विशुद्ध । [नि. 'प्रजा'.] प्रज्ञा प्रबुद्ध गुरुवाक्यें ॥ ४३ ॥

गुरुवाक्येंवीण सर्वथा । [घा. 'ज्ञानासी ये'.] ज्ञान नासे विकल्पता । हे श्रीशुकाची वेव्यस्था । व्यासासी तत्त्वतां कळों [नि. घा. 'कळो आली'.] सरली ॥ ४४ ॥

श्रीशुकाचें ब्रह्मज्ञान । विकल्पवाक्यें जालें क्षीण । शुक जाला ज्ञानविहीन । तें व्यासासी चिन्ह कळों सरलें ॥ ४५ ॥

व्यास जाणे भेद ज्ञान । तोचि भेदीं अभेद सर्वज्ञ । हें शुकासी न कळे चिन्ह । तेणें विकल्प पूर्ण दृढ धरिला ॥ ४६ ॥

अनुक्रमणिका

**व्यासशुकीं अति आसक्त । क्षणा क्षणा म्हणे परत । तोचि जालिया विकल्पयुक्त । त्यावरी परत न म्हणे व्यासु ॥ ४७ ॥**

[पै. कं. मु. 'व्यास'.] **व्यासें अंतर्यामीं आपण । जाणोनि शुकाचें** [नि. घा. 'ज्ञानेंक्षीण'.] **ज्ञानक्षीण । जेणें पावे ज्ञान संपूर्ण । तें कृपेनें आपण सत्संगु सांगे ॥ ४८ ॥**

श्रीव्यास उवाच ——

जनको नाम भूपालो विद्यते वसुधातले । [मु. प्रतीत या श्लोकाचा प्रथमार्धच आलेला आहे; पै. तं. तु. त. या प्रतींत दोन्ही चरण आले आहेत.] यथावद्वेत्त्यसौ वेद्यं तस्मात्सर्वमवाप्स्यसि ॥ ७ ॥ [योगवसिष्ठ, मुमुक्षु प्रकरण २, सर्ग १, श्लोक १८.]

**व्यास म्हणे श्रीशुकासी । तूं तंव स्वइच्छा जातोसी । अवश्य जाय जनकापासी । निश्चयो पावसी त्याचेनि ॥ ४९ ॥**

**जनकु राजा पृथ्वीचां ठायीं । राज्य करूनि तो विदेही । ज्ञान विज्ञान व्यास सर्वही । परिपूर्ण पाही पूर्णत्वें ॥ ५० ॥**

**जो संदेहो निजमानसीं । त्याचेनि निस्संदेह होसी । समाधान जनकापासी । परमार्थासी परमार्थु ॥ ५१ ॥**

**आपण ज्ञान सांगावें त्यासी । त्यास अज्ञान हें शुकाचां मानसीं ।**
**यालागीं धाडी जनकापासी । श्रीशुकासी निश्चितार्था ॥ ५२ ॥**

पुत्रेत्युक्ते शुकः प्रायात्सुमेरोर्वसुधातले । विदेहनगरीं प्राप्तो जनकेनाभिपालिताम् ॥ ८ ॥ [हा श्लोक मु. प्रतीत नाही; तं. त. तु. पै. या प्रतींत आहे.]

**श्रीशुकाची मनोवृत्ती । म्हणे कळली व्यासाची ज्ञानस्थिती । आतां जनकाची** [पै. मु. 'ज्ञानोक्ति'.] **ज्ञानयुक्ति । तेहि निश्चिती पाहों**

**ऐसे विचारूनि मनीं । मेरूगिरी उतरोनि । जनक नगरी ठाकोनी । तत्क्षणीं तो आला ॥ ५४ ॥**

**नग्न नगरा आंतु जातां । होईल** [नि. घा. 'लोकोपहासकता'; तु. 'लौकिक उपहासकता'; क. त. पै. 'लोक उपहासता'.] **लोकांत उपहांसता । पंथी चीराचा तत्त्वतां । लोक लाजार्था** [कं. तु. व मु. 'कौपिन केली'; तं. त. 'कुपीण'.] **कोपीन केला ॥ ५५ ॥**

रिक्तपाणिर्न पश्येत्तु राजानं देवतां गुरुम् [या श्लोकाचा उत्तरार्धच फक्त मु. प्रतीत दिला आहे; तं. त. पै. या प्रतींत दोन्ही चरण आले आहेत.] ॥ ९ ॥

**केवळ रिक्ता हातीं । भेटो नये रायाप्रति ।** [या ओवीचा उत्तरार्ध मु. प्रतीत पुढीलप्रमाणे :— 'तैसेचि देवालयासी । रिते हस्तेंसी न जावे ॥'] **देवालया रिक्त हस्तीं । साधुसंतीं न वजावें ॥ ५६ ॥**

अनुक्रमणिका

सद्‌गुरुजो कृपामूर्ति । त्यासी भेटों नये रिक्तहस्तीं । हेचि वृद्ध वृद्ध शिकविती । [पै. मु. 'धर्मशास्त्रीं नीति निश्चयें हेंचि'.] धर्मशास्त्र नीति निश्चयो हाचि ॥ ५७ ॥

जनक गुरुत्वें जगद्‌गुरु । तोचि [तं. 'नरेशा'.] नरेंद्रा पां नरेंद्रु । त्यासी रिक्त हस्तें नमस्कारू । करी तो नरू स्वधर्ममंदु ॥ ५८ ॥

जनक निर्लोभ द्रव्यदृष्टी । ऐसा निश्चयो [मु. 'धरूनि'.] करूनि पोटीं । हातीं घेतली [सु. नि. घा. संपादित पाठ, इतरत्र, 'राखोंडी'.] राखोंटी । जनकभेटी लागोनि ॥ ५९ ॥

[मु. 'चीरकटी सूत्रकंठीं'; पै. 'चीरकंठी सूत्रकटीं'.] चिरकुटीं सूत्रकटीं । कौपिन हातीं राखोंटी । राजद्वारा आला उठाउठीं । द्वारपाळीं [नि. प्रतीत हे पद नाही.] दृष्टी देखिला ॥ ६० ॥

ब्रह्मसूत्रेंवीण नव्हे ब्राह्मण । संन्यासी नव्हे दंडेवीण । दिगंबरु नव्हे संपूर्ण । अति विलक्षण वेषधारी ॥ ६१ ॥

यालागी श्रीशुकासी । द्वारपाळ [मु. 'निवारी'; पै. कं. 'वारी'.] वारिती त्यासी । तो म्हणे सांगा रायासी । मी शुक भेटीसीं आलोंसें ॥ ६२ ॥

त्या श्रीशुकाचें मनोगत । मी आलोंसें ब्रह्मभूत । राजा सामोरा येईल येथ । सन्मानयुक्त नेईल ॥ ६३ ॥

ऐसें ज्ञानाभिमानें थोर । श्रीशुकामाजी बांधिलें घर । हें रायासी कळलें अंतर । शुकविकार हृदयस्य ॥ ६४

शुकाची स्वयें घेतां भेटीं । तो विकल्प धरील पोटीं । व्यासु बोलिला जें [पै. कं. नि. घा. 'गोष्टीसाठीं'.] गोठीं । त्या विकल्प पुष्टीं शुकनांदे ॥ ६५ ॥

आपण नेघतां भेटी । जेणें विरे विकल्पगांठी । त्या त्यागाची सांगो गोठीं । जेणें [तु. त. नि. घा. संपादित पाठ; तं. क. पै. 'पुष्टी'.] निजात्मदृष्टी शुक पावे ॥ ६६ ॥

भेटी नेघतां आपण । शुक पावे समाधान । ऐसे साधुनिया विंदान । [नि. घा. 'द्वारपाळासी'.] द्वारस्थेसी वचन रावो बोले ॥ ६७ ॥

द्वारीं उभा महानुभाव । 'संगं त्यक्त्वा सुखी भव' । हा सांगावा अभिप्राव । तो निजानुभाव पाहील ॥ ६८ ॥

द्वारपाळ म्हणे श्रीशुकासी । संगत्यागीं सुखी होसी । हें रायें सांगितले तुम्हासी । येरू निजमानसीं क्षोभला ॥ ६९ ॥

मी काय राज्यभारु वाहे । मज काय स्त्रीसंगु आहे । मी निःसंगु निजनिर्वाहें । सांग जाये रायासी ॥ ७० ॥

हातीची [मु. 'टाकिली'.] सांडिली राखोंटी । तोडोनि [मु. 'टाकिली'.] सांडिली लंगोटी ।
निःसंगु मीचि एक सृष्टीं । मज पाहावया दृष्टीं येवो दे राजा ॥ ७१ ॥

अनुक्रमणिका

द्वारपाळें रायाप्रति । सांगितली श्रीशुकोक्ति । राजा तेंचि सांगे पुढती । संग त्याग स्थितीं सुखी होसी ॥ ७२ ॥

संगत्यागें सुखप्राप्ति । द्वारपाळ सांगे राजोक्ति । आतां कोण संग मजप्रति । [घा. 'ते पाहूं प्रचीती आपुल्या'; नि. तु. पै. 'तें येऊनि नृपति पाहो सुखें'; त. 'आत्मस्थिती पाहो सुखें'.] येऊनि भूपति पाहो सुखें ॥ ७३ ॥

संगत्याग पुढत पुढती । राजा सांगे कोण अर्थी । कोण संग आहे मजप्रति । येरें [नि. घा. 'ते पाहूं निश्चितीं आदरिलें'; त. 'त्याची निश्चितीं आदरिली पाहों'.] तो निश्चिती आदरिला पाहों ॥

मी शुक तो येथ कोण । माझें शुकत्वा काय कारण । वस्तु नाम रूपातीत पूर्ण । शुकीं शुकपण देहत्वें ॥ ७५ ॥

देहाचा माथा शुकपण । तो देह येथ [पै. तु. 'किं विलक्षण'; तं 'विलक्षण'.] किंलक्षण । देहो पांचभौतिक संपूर्ण । त्यामाजीं मी कोण तें [तं. 'साधू पां'.] शोधूं पां ॥ ७६ ॥

देहो पंचभूत साभास । त्या पंचभूतांचा विलास । विवंचूं पा सावकाश । स्व स्वरूपास साधावया ॥ ७७ ॥

पृथ्वी नव्हे मी जडत्वें । जळ नव्हे मी [पै. क. मु. व तं. 'अधोगमनत्वें'.] द्रवत्वें । तेज नव्हे मी दाहकत्वें । अति चंचळत्वें नव्हे वायो ॥ ७८ ॥

रितें दिसे जेथ [घा. 'रितें दिसे तेज जें येथे'; तं. त. 'जेथ तेथें'.] जेथें । तें नभ नव्हे मी शून्यत्वें । मी नव्हे पंचभूतें । याहूनि परतें तें मी स्वयें ॥ ७९ ॥

अहं नव्हे मी देहममत्वें । सोहं नव्हे मी मायिकत्वें । अहं सोहंहूनि परतें । तें मी निश्चितें निजरूप ॥ ८० ॥

ऐसी विवंचितां उपपत्ति । स्व स्वरूपीं पावली वृत्ती । तेणें तटस्थ जाली स्थिती । इंद्रिय प्रवृत्ति [मु. 'निचेष्ठित'.] निश्चेष्ट ॥ ८१ ॥

ऐसा निचेष्ट सप्तरात्रीं । उभा होता राजद्वारीं । [घा. 'निर्विकल्प दशा शरीरीं'; क. नि. पै. 'दंशमशकमत्कुणा माझारीं'; तु. 'दशमशक मुक्तपणा माझारीं'; त. 'मग कुसुम तृणामाझारीं'.] दशम शक्तयुक्त माझारीं । सात रात्रीं अचंचल ॥ ८२ ॥

शुकासी निर्विकल्प समाधी । द्वारपाळ रायासी सांगती आधी । [ओवी ८३ व ८४ पै. क. नं आणि त. या प्रतींत नाहींत.] शुक जाला परिपूर्ण जाला त्रिशुद्धी । अहं बुद्धि हरपली ॥

ऐसें सांगतां द्वारपाळ । विदेही हर्षला प्रबळ । साउमा जावुनि तत्काळ । आणी भूपाळ अंतरगृहा ॥ ८४ ॥ [या ओवीनंतर नि. आणि घा. या प्रतींत पुढील ओवी आलेली आहे :——
'राये उचलोनिया त्यासी । ठेविला पै राजिवसीं । श्रीशुकाची दशा कैसी । पुसे राणियांसी स्वयें राव ॥']

नाना भोग विलासी । शुक निर्द्वंद्व राणी वसीं । विदेहत्व बाणवें त्यासी । ऐसा रायासी निश्चयो जाला ॥ ८५ ॥

अनुक्रमणिका

ब्रह्मत्व बाणलें योगी राजा । जाणोनी उल्हास भूभुजा । सिंहासनीं बैसवुनि वोजा । शुकाची पूजा ब्रह्मत्वें केली ॥

स्वमुखें सांगे श्रीशुकासी । मी जनकु आलों भेटीसी । वचनें शुक जाला उल्हासी । सर्व भावेंसीं नृप नमिला ॥ ८७ ॥

नमूनियां रायाचे श्रीचरण । शुक तटस्थ जाला संपूर्ण । त्याचें देखोनिया लक्षण । तें [पै. सु. नि. घा. त. क. 'अपूर्ण'.] अपक्क आपण नृप मानी ॥

सर्वेंद्रियीं [नि. 'निरत'; पै. इं. घा. क. 'निवृत्त'; तं. 'निर्धूत'; तु. 'निरंत'.] निचेष्टित । ज्ञान नाहीं नित्यमुक्त । तें तें ज्ञान साशंकित । पूर्णत्व तेथ असेना ॥ ८९ ॥

आंळ्यां पाडू लागला झाडीं । सेजे न मुरतां न ये गोडी ।
निःशंक ज्ञान नव्हता जोडी । [मु. 'तटस्थ गाढी अपक्कता'.] तटस्थता गाढी अपक्कपणें ॥ ९० ॥

दधि मंथूनि काढिजें लोणी । तें ठेवितां धरी [पै. कं. तं. 'खौटाणीं'.] खवट घाणी । तेंचि अग्निसंगें तावुनी । सुगंधपणीं सुस्थिर ॥ ९१ ॥

ते [पै. कं. व मु. 'तटस्थता अतिसंपूर्ण'; त. 'तटस्थ आणि संपूर्ण'.] तटस्थ वृत्ति जाण । तेंचि मुख्यत्वें अपक्कपण । सर्वेंद्रियीं चित्त [मु. 'समाधान'; पै. 'चित्सावधान'.] सावधान । तें ज्ञान विज्ञान अति शुद्ध ॥ ९२ ॥

शुकाची तटस्थता मोडे । त्यासी शुद्ध ज्ञान जोडे । ऐसें विचारूनि धडफुडे । निजनिवाडें नृप बोले ॥ ९३ ॥

राजा म्हणे तटस्थ स्थिती । शुका कोठें आहे तुझी वृत्ती । येरु म्हणे आत्मप्रतीती । वृत्ति [तु. नि. 'निश्चिती'.] निवृत्तीं सुखरूप ॥ ९४ ॥

जैसी आत्मस्थिती आहे । तेचि स्थिती डोळां पाहे । तेव्हां दृश्य द्रष्टा चिन्मात्र होये । हा अनभवू पाहे आत्मत्वाचा ॥

शुक जंव आत्मस्थिती पाहे । विस्मयें चाकाटला [तं. 'होये'; कं. तु. नि. घा. पै. 'ठायें'.] राहे । निज देहो नाहीं होये । [इं. घा. 'दृश्यत्वें राहे ब्रह्म पूर्णत्वें'; नि. 'वशत्वें राहे ब्रह्म पूर्णत्वें'; तु. 'दृश्यत्वें राहे परब्रह्मी पूर्ण'; पै. त. कं. 'दृश्यत्वीं राहे परब्रह्म पूर्ण'.] दृश्यत्वीं पाहे परब्रह्म ॥ ९६

जें जें देखों जाय दृष्टीं । तें तें आत्मत्वींच उठी । बाप [घा. 'गुरुत्वाची'.] गुरुवाक्याची कसवटी । दृश्याचिये [मु. 'पोटीं'; पै. कं. तं. 'पृष्टीं'.] दृष्टीं परब्रह्म नांदे ॥ ९७ ॥

स्त्रीपुरुषाचिये व्यक्ति । पूर्ण ब्रह्मत्वें प्रतीती । पशु पक्षी नाना जाती । आत्मस्थिती जग [घा. 'देखे'.] नांदे ॥ ९८ ॥

अनुक्रमणिका

[मु. 'जें जें'] जंव जंव पाहे आत्मस्थिती । तंव तंव सर्वेंद्रियें ब्रह्मप्राप्ती । गुरु वाक्याची परम स्थिती । सभाग्य पावती स्वानंदु ॥

अगाध सद्गुरु गरिमा । ब्रह्मत्व आलें [तं. खेरीज इतरत्र 'इंद्रिय कर्मा'.] इंद्रिय ग्रामा । सहज भेटी [तं. खेरीज इतरत्र 'परब्रह्मा'.] समब्रह्मा । देहधर्मा चिदत्वें ॥ १०० ॥

[पै. कं. तं. 'इंद्रियाचें निजशेजार'; तु. 'निद्रेचें निजशरीर'.] निद्रेचें निजशेजार । तळी धरा [मु. प्रतीत हे पद नाही.] ना वरी अंबर । पहुडणें अति अरुवार । चिद्चिन्मात्र स्वभावें ॥ १०१ ॥

[मु. 'विसरोनीं शेष निमाला'.] विसरु निःशेष निमाला । आठवाचा ठावो पुसिला । सहज सुखें [मु. 'सुखाळु जाला'; तु. 'सुखावला'.] सुकाळु जाला । दुकाळ पडला देहभावा ॥ १०२ ॥

जागृती [मु. 'आली'.] जाली ब्रह्मपूर्ण । स्वप्न जालें चैतन्यघन । सुषुप्ति जाली सुखसंपन्न । हा प्रताप पूर्ण गुरुआज्ञेचा ॥ १०३ ॥

गुरु आज्ञेचा चमत्कारू । श्रवणीं पडतांचि अक्षरू । सुखरूप जाला संसारू । चराचर [मु. 'ब्रह्ममय'.] परब्रह्म ॥ १०४ ॥

गुरुवाक्याचा गौरवो । शुकासी जाहला सहजानुभवो । [घा. 'तेणें आल्हादें शुकदेव'.] तेणें अति आल्हादें पहा हो । साष्टांगी रावो सद्भावें नमिला ॥ १०५ ॥

रायें दिधलें आलिंगन । दोघांचें गेलें दोनीपण । मुसावलें चैतन्यघन । पूर्णत्वें पूर्ण परिपूर्ण जाला ॥ १०६ ॥

[तु. प्रतीत ही ओवी नाही.] पूर्णत्वें पावोनि समाधान । सहज सुटलें आलिंगन । तऱ्ही न दिसे दोनीपण । अखंडत्वें पूर्ण आत्मत्वा [मु. प्रतीत हे पद नाही.] आलें ॥ १०७ ॥

शुक सांगे जनकाप्रति । न कळोनि हे सहज स्थिती । म्या विकल्पु धरिला चित्तीं । मुख्य पूज्य मूर्ति श्रीव्यास ॥ १०८ ॥

व्यासासी स्त्रीपुरुष [मु. 'भिन्न'; त. 'ज्ञान'.] भेदभान । ऐसें अप्सरांचें वचन । आइकोनि विकल्पीं भरलें मन । व्यास अज्ञान स्वयें मानीं ॥

त्या विकल्पाचा समूळ दाहो । तुझेनि वचनें केला पहा हो । धन्य ज्ञानाचा अनुभवो । [मु. प्रतीत हे पद नाही.] मी निःसंदेहो [त. 'भृत्यु वाक्यें'.] भवद्वाक्यें ॥ ११० ॥

द्वारपाळाचा निरोपावरी । माया अविद्या विकल्प बोहरी । तुझे [मु. 'वैभवाची'.] अनुभवाची थोरी । वंद्य सुरवरीं सर्वत्र ॥ १११ ॥

**बापू वाक्याचे** [कं. तं. त. घा. पै. 'तिखटपण'] **तिखट बाण । घायेंवीण छेदिला प्राण । जीव मारुनिया संपूर्ण । पूर्णत्वें पूर्ण मज केलें ॥ ११२ ॥**

**आईकोनि शुकाचें वचन । जनक जाला सुखसंपन्न । येथुनी शुक जाला** [मु. 'सुखपूर्ण';]**संपूर्ण । संतोषें आपण** [मु. 'काय'; तु. प्रतीत चौथा चरण—
'तो संशय आपण स्वयें बोलें ।'] **स्वमुखें बोलें ॥ ११३ ॥**

जनक उवाच——

नातः परतरः कश्चिन्निश्चयोऽस्त्यपरो मुने । स्वयमेतत्त्वया ज्ञातं गुरुतश्च पुनः श्रुतम् ॥ १० ॥ [हा श्लोक मु. प्रतीत नाही. पै. तं. त. तु. कं या प्रतींत आढळतो.]

**जनक म्हणे धन्य धन्य । जें तुज जालें समाधान । हेंचि गुह्याचें गुह्यज्ञान । ब्रह्मसमाधान या नांव ॥ ११४ ॥**

**पूर्वींच तूं ज्ञाननिधि । वस्तु** [घा. 'आपुली'.] **आकळिली निजात्मबुद्धि । गुरुवाक्यें तेचि** [घा. 'बुद्धि'.] **त्रिशुद्धी । निजात्मसिद्धी निश्चित ॥ ११५ ॥**

**जे तूं पावलासी समाधि ।** [मु. 'यावरी ज्ञान सिद्धी'.] **याही वरती ज्ञानविधि । नाहीं नाहीं गा त्रिशुद्धी । निजात्मसिद्धी या नांव ॥ ११६ ॥**

**जे तुज जाली** [पै. कं. व मु. 'आत्मप्राप्ती'.] **आत्मप्रतीती । तेचि श्रीनारायणाची ज्ञानोक्ति ।
तेंचि ज्ञान श्रीकृष्णनाथीं । तेंचि स्थिति मजपासी ॥ ११७ ॥**

**तेचि स्थिति श्रीनारदासी । तेचि स्थिति श्रीयाज्ञवल्कीसी । तेचि स्थिति श्रीव्यासासी । निश्चयेंसी निश्चित ॥**

**स्नेहसूत्रें दीप भिन्न । प्रभा एकत्वें अभिन्न । तेंवि ज्ञात्याचें** [मु. 'कर्मचिन्ह'.] **विचित्र चिन्ह । परिज्ञेय ज्ञान एकचि ॥ ११९ ॥**

**नारदासी नित्य लंगोटी । श्रीकृष्ण वैभवें संपन्न सृष्टीं । दोहींचें ज्ञान कसवटीं । एकत्वें** [नि. घा. 'पुष्टी'.] **उठी सम साम्यें ॥ १२० ॥**

**जडभरत म्हणती जड । याज्ञवल्की ज्ञानरूढ । दोहींचें ज्ञान एकत्वें गोड । ज्ञानीं पडीपाड असेना ॥ १२१ ॥**

**देहो देखतां दोष कोटि । आत्मत्वें पाहतां निर्दोष** [तं. 'दृष्टी'] **सृष्टीं ।
यालागीं देहीं नेठवावी दृष्टी । दोषाची** [नि. 'कोटी'.] **खोटी देहात्मता ॥ १२२ ॥**

**आइकोनि जनकाची गोठी । सुख जालें शुकाचे पोटीं । संशयो गेला उठाउठी ।** [घा. 'स्वानंद दृष्टी'.] **स्वानंद पुष्टी सदोदित ॥ १२३ ॥**

अनुक्रमणिका

[हे दोन श्लोक मु. प्रतीत नाहीत.] अनुशिष्टः स इत्येवं जनकेन महात्मना । अतिष्ठत्स शुकस्तूष्णीं स्वच्छे परमवस्तुनि ॥ ११ ॥
[योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण २, सर्ग १, श्लोक ४२ व ४३.]
वीतशोकभयोऽसौ निरीहच्छिन्नसंशयः । जगाम शिखरं मेरोः समाध्यर्थमनिंदितम् ॥ १२ ॥

**या परी जनकें शुकासी । सांगितलें शुद्ध ज्ञानासी । तेणें विश्रांति जाली [मु. 'रायासी'.] त्यासी । तें सुख वाचेसी न बोलवें ॥ १२४ ॥**

**सुख [पै. तं. तु. त. कं. 'उथळलें'] उलथलें संपूर्ण । [घा. 'संपल्प'.] सकळ संशया जालें दहन । वाचेसी पडिलें महामौन । भय शोक संपूर्ण मावळले ॥ १२५ ॥**

**निमाली [नि. घा. 'हृदयाची आधी व्याधी'; तं. पै. 'हृदय आधी'; त 'हृदयावधी'.] हृदयाची आधी । इंद्रियें निवालीं [नि. 'सुखावबोधीं'.] सुखोद्बोधीं ।**
**विश्रांति पावला त्रिशुद्धि । [मु. 'सुख'.] शुक सुखावबोधीं संतुष्ट ॥ १२६ ॥**

**शुक म्हणे रायाप्रती । मज जाली परम विश्रांति । ते विश्रांति भोगावया एकांतीं । मेरुगिरिप्रती शुक गेला ॥ १२७ ॥**

[मु. प्रतीत हा श्लोक नाही; हस्तलिखितात हा श्लोक आहे.] तव वर्षसहस्राणि निर्विकल्पसमाधिना । दश स्थित्वा सशामासावात्मन्यस्नेहदीपवत् ॥ १३ ॥ [योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण २ सर्ग १, श्लोक ४४.]

**निर्विकल्प निरहंकारी । [मु. 'आसन घालोनि योगमुद्री'.] अचंचळ निर्विकारी । शुक बैसला समाधिवरी । मेरुचां शिखरीं स्वानंदें ॥ १२८ ॥**

**स्नेहेंवीण प्रकाशरूप । निर्वातींचा जैसा दीप । तैसें शुकाचें समाधिस्वरूप । निर्विकल्प या नांव ॥ १२९ ॥**

**शुक म्हणे मी क्षणभरी । सुखें बैसलों मेरू शिखरीं । बाहिर संख्याशास्त्रांतरीं । दशसहस्र पूर्णाब्दें ॥ १३० ॥**

**एवं स्वरूपाच्या ठायीं । मुळीं उदो अस्तु नाहीं । काळु तेथें अटकु पाही । ठेवितां ठायीं [मु. 'टीकेना'; कं. पै. 'ठकेना'.] ढळेना ॥ १३१ ॥**

**आइके श्रीरामा कृपामूर्ति । यापरी शुकाची [मु. 'ब्रह्मप्राप्ति'.] शुकोक्ति ।**
**जनकें आणिली [मु. 'यथास्थिती'.] ब्रह्मस्थिति । आत्मप्रतीती समाधिस्थ ॥ १३२ ॥**

**समाधि आणि [मु. 'उत्थान'.] व्युत्थान । दोही अवस्था [नि. घा. 'बोळवून'.] बोळवण । करूनिया श्रीशुकजाण । जाला संपूर्ण पूर्णत्वें ॥ १३३ ॥**

एकाजनार्दना शरण । शुक सुखें जाला [मु. 'ब्रह्मसंपन्न'.] संपन्न । पुढें [पै. सु. नि. घा. कं. खेरीज इतरत्र 'रामाचें'. संपादित प्रत श्लोक १३, ओव्या १३४. इतर प्रतींत श्लोक व ओवीसंख्या पुढीलप्रमाणे :——

अनुक्रमणिका

नि. इं. सु. घा. ४, १३६; तं. १३, १३२; तु. १२, १३२; पै. कं. १३, १३२.] **श्रीरामातें पूर्णपण । वसिष्ठ आपण निरोपील ॥ १३४ ॥**

**इति श्रीभावार्थरामायण बालकांडे एकाकारटिकायां शुकोपाख्याने श्रीरामविश्वामित्रसंवादे दशमप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग अकरावा

## वसिष्ठ राम संवाद

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

विश्वामित्र उवाच—

तस्य व्यासतनुजस्य मलमात्रोपमार्जनम् । यथोपयुक्तं ते राम तावदैवोपयुज्यते ॥ १ ॥ [योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण २, सर्ग २, श्लोक १.]

**श्रीव्यासाचा विरक्त पुत्र । सांगितलें श्रीशुकाचें चरित्र ।**
**जनकें त्याचा विकल्प मात्र । केला** [कं. व मु. प्रतींत 'निरहंकार'.] **परिहार द्वारपाळद्वारें ॥ १ ॥**

**सज्ञानाचें कृपावचन । द्वारपाळद्वारें जाण । करुनि विकल्पाचें** [त. निर्दालन.] **दहन । पूर्ण समाधान श्रीशुकासी ॥ २ ॥**

**जैसी विरक्ती शुकासी । तैसीच विरक्ति श्रीरामासी । राज्यवैभव नावडे** [पै. नि. घा. त. कं. 'त्यासीं'.] **मनासी । नित्य विषयांसी विरक्त ॥ ३ ॥**

**श्रीरामा** [कं. व मु. 'तुझे ध्यान गंभीर'; तं. पै. 'तुझें ज्ञान गंभीर'.] **तूं ज्ञान गंभीर । शुकाच्या ऐसा निजविचार । तुवांहि करावा साचार । विश्रांतीचें घर विवेकापासीं ॥ ४ ॥**

वासनातानवं राम मोक्ष इत्युच्यते बुधैः । पदार्थवासनादार्ढ्यं बंध इत्यभिधीयते ॥ २ ॥ [योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण, सर्ग २, श्लोक ५.]

**सकळ वासनेची शांति । या नांव गा मुख्य मुक्ति । विषय-वासना-उत्पत्ति । बद्धता निश्चिती या नांवें ॥ ५ ॥**

**देहीं असोनि** [कं. पै. तं. 'देहस्थिती'.] **विदेह स्थिती । जयासी नाहीं विषयासक्ति ।**
**त्यासीचि बोलिजे जीवन्मुक्ति । जाण निश्चिती रघुनाथा ॥ ६ ॥**

[मु. प्रतीत चरणारंभी 'यावरी' हे अधिक पद आहे.] **श्रीरामाचें** [पै. तु. 'निजमनोज्ञ'; कं. 'मनोरत्न'.] **मनोज्ञान शुका ऐसें होऊनि संपूर्ण । विश्वामित्रें सांगावें ज्ञान । तें जाणोनि चिन्ह ऋषि बोले ॥ ७ ॥**

अस्रास्य चित्तविश्रान्त्यै राघवस्य महात्मनः । युक्तिं कथयतु श्रीमान् वसिष्ठो भगवान्स्वयम् ॥ ३ ॥
रघूंणामेष सर्वेषां प्रभुः कुलगुरुः सदा । सर्वज्ञः सर्वसाक्षी च त्रिकालामलदर्शनः [हा श्लोक मु. प्रतीत नाही. पै. तु. त. या प्रतींत आला आहे.] ॥ ४ ॥ [योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण, सर्ग २, श्लोक १३-१४.]

[मु. प्रतीत चरणारंभी 'रामा' हे पद अधिक आहे.] **तुज द्यावया समाधान । उपदेशावया ब्रह्मज्ञान । वसिष्ठ कुळगुरु सर्वज्ञ । सदा संपन्न षड्गुणैश्वर्ये ॥ ८ ॥**

अनुक्रमणिका

**भूत भविष्य वर्तमान । [मु. ‘त्रिकाळ ज्ञाता’.] त्रिकाळ काळज्ञें सर्वज्ञ । अंतर्यामी साक्षी पूर्ण । गुरुत्वें गहन श्रीवसिष्ठ ॥ ९ ॥**

**सूर्यवंशी जें जें उत्पन्न । त्यांसी वसिष्ठ सांगे ज्ञान । वसिष्ठाचें ज्ञान महिमान । हरिहर आपण वंदिती स्वयें ॥ १० ॥**

**ऐसा कुळगुरु [हे पद मु. प्रतीत व कं. प्रतीत नाही.] समीप असतां । मी उपदेशूं नये श्रीरघुनाथा ।**
**वसिष्ठासीच [कं. व मु. ‘अनन्यता’.] अति विनीतता । ज्ञान प्राप्त्यर्थ शरण रीघ ॥ ११ ॥**

**पुढिलांचा शिष्य अति वरिष्ठ । त्यासी चाळवी तों गुरु भ्रष्ट । उपदेशी तों ज्ञान नष्ट । अति पापिष्ट [कं. व मु. ‘प्रलोभें’.] प्रलोभी ॥ १२ ॥**

**कुळीं असतां [नि. घा. ‘सज्ञान गुरू’.] ज्ञानगुरु । त्यासी [नि. घा. ‘त्यागी’.] त्यागवी तो पापी नरू ।**
**स्वयें उपदेशी तो पापाचारू । हा निजनिर्धारू ज्ञानोपदेशा ॥ १३ ॥**

**वसिष्ठ ज्ञानगुरु सूर्यवंशीं । तयाच्या शिष्यासी जो उपदेशी । तेणें जोडिल्या पापराशी । [नि. तु. ‘गुरुत्वें शिष्यासी उपदेशिता’; घा. ‘गुरुत्वें दोषी तद्‌दोषें’; कं. त. ‘गुरुत्वें सदोषी तदोपदेशें’; तं. ‘गुरुवंश दोषी तदोपदोशें’.] गुरुत्व दोषी तदोपदेशें ॥ १४ ॥**

**यालागीं गा रघुपति । पाववया ब्रह्मप्राप्ती । वसिष्ठ [कं. व मु. ‘ज्ञानगुरु’.] कुळगुरु प्रार्थी । तेणेंचि तूं विश्रांती पावसी सुखें ॥ १५ ॥**

**ऐसें सांगोनि श्रीरामासी । विश्वामित्र बोले वसिष्ठासी । पूर्णाधिकारू रघुनाथासी । तूं कां उपदेशीं उदास ॥ १६ ॥**

> वसिष्ठ भगवान पूर्व कच्चित् स्मरसि यत्स्वम् । आवयोर्वैरशान्त्यर्थ श्रेयसे च महाप्रियम् ॥ ५ ॥ [श्लोक ५ व ६ मु. प्रतीत नाहीत. पै. तं. तु. त. या प्रतींत आहेत. योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण २, सर्ग २, श्लोक १६ व १८.]
> यथोपदिष्टं भगवता ज्ञानं पद्‌मभुवा मुहु मुहुः । तदेवोपदिशाद्य त्वं रामायान्ते निवासिने ॥ ६ ॥

**वसिष्ठा तूं कांहीं स्मरतोसी । पूर्वी वैर आम्हा तुम्हासी । तें वैर शांत करावयासी । ब्रह्मा उपदेशी निज गुह्यज्ञान ॥ १७ ॥**

**ज्या गुह्य ज्ञानाचां पोटीं । मी-तूं पणाची मावळे गोष्टी । वैर निमालें उठा उठीं । स्वानंद पुष्टीं आम्हां दोघां ॥ १८ ॥**

**जया स्वानंदाचिये स्थितीं । आम्हां तुम्हां जाहली अति प्रीति ।**
**विकल्पु नुपजे कल्पांतीं । तेंचि श्रीरामाप्रती उपदेशी ॥ १९ ॥**
**तें ज्ञान विसरलों जरी म्हणसी । तरी आठव विसरातें स्वयें ग्रासी ।**

अनुक्रमणिका

**आठवितां आठवें अहर्निशीं । विसरु त्यापासीं असेना ॥ २० ॥**

तज्ज्ञानं स च शास्त्रार्थस्तद्वैदध्यमखंडितम् । सच्छिष्याय विरक्ताय साधो यदुपदिष्यते ॥ ७ ॥ [हा श्लोक मु. प्रतीत नाही; योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण २, स--, श्लोक २०.]

**ज्ञानाची ज्ञानगंभीरी । विरक्त शिष्याचे सुक्षेत्रीं । जें** [तु. 'उपदेशिती'; कं. तं. 'उपनिष्ठें'.] **उपदिष्टे निजनिर्धारीं । ते गुरुत्वीं खरी गुरुगरिमा ॥ २१ ॥**

**काम-क्रोधादि-महाज्वाळें । ज्याच्या शिष्याचें ज्ञान न पोळे । तेणें गुरुत्वें अति प्रांजळें । अदग्ध सोज्वळें तें ज्ञान ॥ २२ ॥**

**शिष्याचे विकल्प समस्त । खंडूनि निर्विकल्प करी** [मु. 'करीत'.] **चित्त । तेंचि ज्ञान अखंडित । शुद्ध शास्त्रार्थ या नांव ॥ २३ ॥**

**शुद्ध शास्त्रार्थ प्रतिपादिती । तेचि सद्‌गुरु उपदेशिती ।**
[कं. व मु. 'ज्या शिष्यासी होय प्रतीति'; त. 'ज्याची शिष्य -- होय प्राप्ती'.] **ज्याची शिष्यासी होय प्रतीती । त्या गुरुत्वाची ख्याती हरिहरां वंद्य ॥ २४ ॥**

**शिष्यासी नाहीं ब्रह्मप्रचीती । शब्दज्ञानें सतेज युक्ती । मनीं विषयांची आसक्ती । तो जाण निश्चिती अशिष्य ॥ २५ ॥**

अशिष्याय विरक्ताय यत्किंचिदुपदिश्यते । तत्प्रयात्यपवित्रत्वं गोक्षीरं श्वदृताविव ॥ ८ ॥ [योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण २, सर्ग २, श्लोक २१.]

**मनुष्यदेहाचिये प्राप्तीं । संसार तरावा गुरुभक्ति ।**
**ऐसा भावो नाहीं ज्याचां चित्तीं । ते जाण निश्चितीं** [तु. 'असत् शिष्यं'; कं. 'अभाग्य'.] **अशिष्य ॥ २६ ॥**

**ज्यांसी संसाराची आसक्ती । लोकेषणेची अतिप्रीती ।**
**ज्यांसी विषयवासना चित्तीं । ते जाण निश्चितीं** [तं. 'अशिष्य'.] **अविरक्त ॥ २७ ॥**

**ऐसियांतें जे उपदेशिती । ते अपवित्र विषयस्थिति । जेवीं श्वानचर्मपात्राप्रति । गोक्षीर** [पै. 'धरिती'.] **भरिती** [तु. 'थारोळी'.] **धारोष्ण ॥ २८ ॥**

इत्युक्ते गाधिपुत्रेण व्यासनारदपूर्वकाः । मुनयस्ते तमेवार्थं साधु साध्वित्यपूजयन् ॥ ९ ॥ [हा श्लोक मु. प्रतीत नाही; योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण २, सर्ग २, श्लोक २३.]

**परशिष्यासी उपदेशन । तें गुरुत्वासी अति दूषण । अशिष्या सांगावें ज्ञान । तें निंद्य संपूर्ण सर्वार्थीं ॥ २९ ॥**

अनुक्रमणिका

**सत्च्छिष्याचा सद्‌गुण । देखोनि सांगावे गुह्य ज्ञान । त्या गुरूंचे गुरुत्व धन्य । परमपावन परमार्थी ॥ ३० ॥**

**हें विश्वामित्राचें वचन । आइकोनिया अति गहन । सिद्धसाधक ऋषी जन । करिती स्तवन धन्य धन्यत्वें ॥ ३१ ॥**

**व्यास नारद याज्ञवल्की । शुक प्रमुख शौनकीं ।**
**विश्वामित्रातें निजमुखीं । धन्य धन्य सकळिकीं पुनः पुनः स्तविजे ॥ ३२ ॥**
[तं. प्रतीत ही ओवी नाही.]

अथोवाच महातेजा राज्ञः पार्श्वे व्यवस्थितः । ब्रह्मेव ब्रह्मणः पुत्रो वसिष्ठो भगवान्मूनिः ॥ १० ॥ [मु. प्रतीत १०, ११ व १२ हे श्लोक नाहीत; योग वासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण २ सर्ग २, श्लोक २४.]
मुने यदादिशसि मे तदविघ्नं करोम्यहम् । कः समर्थः समर्थोऽपि सतां लङ्घयितुं वचः ॥ ११ ॥ [योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण २, सर्ग २, श्लोक २५, २७.]
स्मराम्यखंडितं सर्वं संसारभ्रमशांतये । निषधाद्रौ पुरा प्रोक्तं यज्ज्ञानं पद्मजन्मना ॥ १२ ॥

**जो ब्रह्मज्ञानाचा महामेरु । जो स्वानंद सुखाचा सागरु ।**
**तो बोले वसिष्ठ ऋषीश्वरु । चित्त चमत्कारु वचन ज्याचें ॥ ३३ ॥**

**ब्रह्मापासुनि ज्ञानप्राप्ती । परी ब्रह्मासमान ज्ञान शक्ति । वचनमात्रें ब्रह्मप्राप्ती । सच्छिष्य पावती स्वानंदु ॥ ३४ ॥**

**ज्ञान वैराग्य औदार्य** [तं. 'शांति'; कं. 'वृत्ति'.] **ख्याती । यश श्रीऐश्वर्य स्थिती ।**
**हे साही गुण वसिष्ठीं वसती । भगवान म्हणती तेणें त्यासी ॥ ३५ ॥**

**सूर्यवंशींचा निज सन्मानीं । गुरुत्वें जो मुकुटमणी । रायें पूजिला प्रति दिनीं । जो वरासनीं उपविष्ट ॥ ३६ ॥**

**वसिष्ठें करितां उपदेश । शिष्य तात्काळ होय निरास । ते निराशेची कास । जेणें सावकाश** [मु. 'धरिली असें'.] **घेतलीसे ॥ ३७ ॥**

**वसिष्ठाची महाख्याती । सूर्य जिंतिला दंडशक्ति । तो विश्वामित्राप्रति । उपदेशास्थिति सांगतु ॥ ३८ ॥**

**श्रीराम अधिकार शिरोरत्न । परि नुपसतां ब्रह्मज्ञान । सांगों नये गा आपण । हें मुख्य लक्षण उपदेशी ॥ ३९ ॥**

**सद्‌गुरुतें न प्रर्थितां । शिष्यें अत्यादरे न पुसतां । सांगो नये गा सर्वथा । सांगे तो तत्त्वतां गुरुत्वें मूर्ख ॥ ४० ॥**

**गुरु म्हणे स्वयें शिष्यास । तूं घे माझा उपदेश । तेव्हांच गुरुत्व पडिलें ओस । वाढला असोस गुरुत्वें लोभु ॥ ४१ ॥**

अनुक्रमणिका

शिष्य उपदेशीं उदास भूत । गुरु साक्षेपी उपदेशार्थ । तेणें गुरुत्वा जाला घात । अविवेकें लोलुप्त शिष्यार्थी ॥ ४२ ॥

यालागी न पुसतां आपण । सांगो नये ब्रह्मज्ञान । जऱ्ही श्रीराम अधिकार रत्न । तऱ्ही अप्रश्नीं ज्ञान सांगो नये ॥ ४३

विश्वामित्रा तुझी आज्ञा । माझेनि न करवे अवज्ञा । आतां सांगेन ब्रह्मज्ञाना । साधुआज्ञा मज वंद्य ॥ ४४ ॥

विश्वामित्रा तूं साधुरत्न । सुरनरां वंद्य महिमान । क्षत्री होत्साता [मु. 'ब्राह्मण'; पै. कं. 'ब्राह्मणपण'.] ब्राह्मण्य । स्वज्ञानें संपूर्ण वश्य केलें ॥ ४५ ॥

त्या तुज साधूची निजाज्ञा । हरिहरां न करवे अबाज्ञा । यालागीं मी रघुनंदना । गुह्य ज्ञाना सांगैन ॥ ४६ ॥

माझी तुजिये वैर शांतीं । जें उपदेशिलें प्रजापतीं । तें अखंड [नि. घा. 'स्मेर'; पै. कं. 'स्फुरतें'.] स्फुरे स्फूर्ति । [नि. घा. 'संसार प्रवृत्ति निवर्तक'; तु. 'संसार निवृत्ती दायक'.] संसारवृत्ति निवर्तक ॥ ४७ ॥

तेणें ज्ञानें मी आपण । उपदेशीन रघुनंदन । जया उपदेशासी विघ्न । कल्पांतीं जाण बाधेना ॥ ४८ ॥

विघ्नाचि होय निर्विघ्न । प्रपंचु होय चैतन्यघन । शिष्य होय ब्रह्म पूर्ण । अज्ञान तें ज्ञान होवोनि ठाके ॥ ४९ ॥

ऐसी ऐसिया गुह्य स्थिती । उपदेशीन श्रीरामाप्रति । हे वसिष्ठाची वचनोक्ति । आइकोनि निश्चिती सुखावे राम ॥

मग वसिष्ठासीं [तु. 'रघुनंदन'.] आपण । सद्भावें घाली लोटांगण । अनन्यभावें तुज मी शरण । मी [तु. 'अंकित'; मी 'जाण'.] शिष्य संपूर्ण गुरुवर्या ॥ ५१ ॥

ऐसें सद्‍गदित कृपावचन । करुणा भाकी दीन [तं. 'दीनपणें'.] वदन । स्वामीनें कृपा करावी आपण । मज [नि. घा. 'मज दीना उद्धरावी'.] दीनोद्धारण करावें ॥ ५२ ॥ [कं. पै. व तु. या प्रतींत ही ओवी नाही.]

जेवी दीपें गवाक्षा नित्य दीप्ती । तें गवाक्ष दीपातें नेणती ।
तेवी तुझेनि सूर्यवंशा ज्ञानप्राप्ती । ते तुझी ज्ञानस्थिती नेंणेचि मी ॥ ५३ ॥

तुझें अगाध ब्रह्मज्ञान । तें मी नेणें अज्ञान । तूं कुळगुरु सनातन । म्हणोनि चरण दृढ धरिलें ॥ ५४ ॥
श्रीराम स्वयें चैतन्यघन । देवकार्यार्थ अवतारपूर्ण । करावया धर्मसंरक्षण । [नि. घा. 'मनुष्यपण'; तु. 'मनुष्य होवोनि'.] माणूसपण नटनाट्य ॥ ५५ ॥

तेणें म्हणवितां अज्ञान । ब्रह्मी [मु. प्रतीत हे पद नाही.] ब्रह्मत्व नव्हे न्यून । अथवा म्हणवितां सज्ञान । ब्रह्मीं [नि. घा. 'ब्रह्मत्वपूर्ण'.] ब्रह्मपण अधिक नोहे ॥ ५६ ॥

अनुक्रमणिका

**एवं ज्ञानाज्ञानातीत । श्रीराम स्वयें सदोदित । तोही लोकसंग्रहार्थ । गुरुत्वें वंदित वसिष्ठातें ॥ ५७ ॥**

**देवुनी सद्‌गुरुसी सन्मान । श्रीराम** [नि. घा. 'न पुसतां'; कं. 'पुसें'.] **न पुसें ब्रह्मज्ञान । तैं ज्ञानमार्ग** [सु. नि. घा. 'विछिन्न'.] **उच्छिन्न । स्वयें आपण केला होयें ॥ ५८ ॥**

**करावया दीनोद्धारा । गुरु शिष्य परंपरा । स्थापावया रघुवीरा । कळवळा पुरा ज्ञानमार्गीं ॥ ५९ ॥**

**यालागीं श्रीराम आपण । केवळ होऊनि अज्ञान । गुरुत्वें वसिष्ठासी सन्मान । देवुनि ब्रह्मज्ञान विनीतत्वें पुसे ॥ ६० ॥**

**घेवुनि अज्ञान्यत्वाची बुंथी । केवळ अज्ञान प्रश्नोक्ति । स्वयें पुसतां हे रघुपति । तेही उपपत्ती अवधारा ॥ ६१ ॥**

श्रीराम उवाच——

प्राक्तनं वासनाजालं नियोजयति मां यथा । मुने तथैव तिष्ठामि कृपणः किं करोम्यहम् ॥ १३ ॥ [योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण २, सर्ग ९, श्लोक २३.]

**आइके स्वामी सावधान । जैसें माझें पूर्व** [सु. नि. घा. 'प्राक्तन'.] **प्राचीन । मी त्या प्रारब्धाधीन । स्वयें कर्तेपण मज नाहीं ॥ ६२ ॥**

**पाहतां प्रारब्धाकडे । मी तंव केवळ बापुडें । काय म्यां करावें पुढें । हें धडफुडें लक्षेना ॥ ६३ ॥**

**देहे असतां प्रारब्धाधीन । जेणें होय ब्रह्मज्ञान । तैसी कृपा करावी** [सु. नि. घा. 'परिपूर्ण'.] **पूर्ण । ज्ञानविज्ञान परिपाकें ॥ ६४ ॥**

वसिष्ठ उवाच——

अंते वयसि हे राम श्रेयः प्राप्नोति शाश्वतम् । स्वप्रयत्नोपनीतेन पौरुषेणैव नान्यथा ॥ १४ ॥

**मनुष्य देहें ब्रह्मप्राप्ती । तो देहभावो नसावा चित्तीं । विदेहत्वें परमार्थगति । विवेक सद्‌युक्ति निजपुरुषार्थे ॥ ६५ ॥**

**नर देहा ऐसें गोमटें । शोधितां** [तं. 'त्रिभुवनी'; सु. नि. घा. 'त्रैलोक्यि'.] **त्रिलोकीं न भेटें । देहा ऐसे वोखटें । अत्यंत खोटे आन नाहीं ॥ ६६ ॥**

**वोखटें म्हणोनि त्यागावें । तरी मोक्षसुखा नागवावें । गोमटें म्हणौनि भोगावें । तें अवश्य जावें अधःपाता ॥ ६७ ॥**

**हें भोगावें ना त्यागावें ।** [सु. घा. 'मध्यभागे विभागावें'; पै. तं. नि. 'निज पुरुषार्थ लाभे'; कं. 'निज पुरुषार्थ लाघवे'.] **निजपरमार्थ लाघवें ।** [सु. नि. घा. 'भगवन्मार्गी लावावे'; कं. तं. पै. 'भगवन्मार्गी'.] **मोक्षमार्गें विभागावें । तरीच पावावें परमार्थसुख ॥ ६८ ॥**

अनुक्रमणिका

**आइके बापा रघुनाथा । या युक्तीच्या पुरुषार्था । साधुनि** [सु. घा. प्रतींत हे पद नाही.] **पावावे परमार्था । उपाव अन्यथा असेना ॥ ६९ ॥**

शुभाशुभाभ्यां मार्गाभ्यां वहंती वासनासरित् । पौरुषेण प्रयत्नेन योजनीया शुभे पथि ॥ १५ ॥
स्वं मनः परुषार्थेन बलेन बलिनांवर । अशुभानि च लयम् याति शुभं तस्मादपीतरत् ॥ १६ ॥ [सु. नि. घा. या प्रतींत हा श्लोक नाही.]
जन्तोश्चित्तं तु शिशुवत् तस्मान्नौ चालयेद्वलात् [हा श्लोकार्थ मुद्रित प्रतीत व कं. प्रतीत नाही.] ॥ १७ ॥ [योगवासिष्ठ, मुमुक्षु प्रकरण २, सर्ग ९, श्लोक ३० ते ३२.]

**मनोरथ नानावृत्ति । या नांव वासना सरिता म्हणती । ईमाजीं बुडाले नेणों किती । बळी ते तरती निज पुरुषार्थें ॥**

**शुभाशुभ वासना ओघ । सबळ बळें वाहती अनेग । हें विवेकें मोडोनि सांग । परमार्थी चांग पुरुषार्थ कीजें ॥ ७१ ॥**

**त्या पुरुषार्थाचें लक्षण । अशुभ वासना त्यागून । परमार्थी दृढ राखावें मन । हें मुख्य लक्षण पुरुषार्था ॥ ७२ ॥**

**बाळक लाविजे अभ्यासीं । शनैः शनैः योग्यता होयें त्यासी ।** [नि. घा. 'तेवी आत्मानुसंधानें'.] **तेवी अनुसंधानें चित्तासी ।** [सु. नि. घा. 'सावकासी राखावें'.] **चित्त समरसीं सुखावें ॥**

**अनुसंधान सांडिता चित्ता । वळुनि लावावें परमार्था । ये विषयीं करावें पुरुषार्था । चित्तजयार्था साटोपु ॥ ७४ ॥**

हस्तेन हस्तं संपीड्य दन्तान्दन्तैर्विचूर्णयेत् । अंगान्यंगैरिवाक्रम्य जयेदादौ स्वकं मनः [मु. प्रतीत हा श्लोक नाही.] ॥ १८ ॥ [योगवासिष्ठ, स्थिति प्रकरण, सर्ग १३, श्लोक १८.]

**दांत खावुनि** [सु. घा. 'चित्तानेटी'.] **नेहटीं । लागावें मनोजयाचां पाठीं । हात चुरूनि उठाउठीं । मनोजयो दृष्टीं लक्षावा ॥ ७५ ॥**

**अंगे आवरुनि अंगा । मनोजयो करावा सांग । हाचि परमार्थाचा मार्ग । अति अव्यंग रघुनाथा ॥ ७६ ॥**

**सावधान अहोरात्र ।** [मु. 'चित्तें'.] **मनें लक्षावें चिन्मात्र । हेंचि परमार्थाचें सूत्र । अतिपवित्र निजनिष्ठा ॥ ७७ ॥**
**मनें मन सावधान । मनें मना अनुसंधान । मनें मना निर्दाळण । या नांव पूर्ण पुरुषार्थ ॥ ७८ ॥**

[नि. 'सकळांच्या'.] **सकळ कळांची वित्पत्ति । अनभ्यासें शांत होती । तैसी नव्हे ज्ञानस्थिती । क्षणार्थ प्राप्ति प्रबळें स्वयें ॥ ७९ ॥**

सर्वाः कला विनश्यन्ति अनभ्यासेन राघव । इयं ज्ञानकला राम, सकृज्ज्ञातापि वर्धते ॥ १९ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

अनुक्रमणिका

**वेदशास्त्र** [सु. नि. घा. 'श्रुती'.] **स्मृति पुराण । नाना कळा अति विंदान । अनभ्यासें होय क्षीण । ज्ञानाचें लक्षण ऐसें नव्हे ॥ ८० ॥**

**ज्ञान प्राप्त काळींच जाण । अभ्यासें वीण वाढे पूर्ण । जन्म मरण** [तं. 'संपादित'; इतरत्र 'करी'.] **होय क्षीण ।** [सु. घा. 'तें'; नि. 'तंव तंव'; तं. शेवटचा चरण 'ज्ञानाचें लक्षण ऐसे आहे' असा आहे.] **तंव प्रबळपण ज्ञानाचें ॥ ८१ ॥**

**साधकु ज्ञान सांडूं पाहे । सांडूं जातां अधिक होये । ऐसी ज्ञानकळेची सोयें । सुल्लभत्वें आहे सुखरूप ॥ ८२ ॥**

[कं. व मु. 'ज्ञान सुलभत्वें'; तु. ज्ञानें सुलभ'.] **सुल्लभत्वें ज्ञानप्राप्ती । तर्‍ही कां साधक शिणताती । त्यांसी अनुतापु नाहीं चित्तीं । अवैराग्यें प्राप्ती ज्ञानाची नव्हे ॥**

**भूक नाहीं ज्याचां पोटीं । तो पंचामृत पायें लोटी । तेवीं अवैराग्यें करंटीं ।** [कं. व मु. पाठ 'शुद्ध ज्ञानेसी'.] **सिद्ध ज्ञानाची भेटीं शिणताही नोहे ॥**

**यालागीं गा आपण । महत्त्व सांडूनि संपूर्ण । रंकाचे रंक होऊनि जाण । ज्ञानगवेषण करावें ॥ ८५ ॥**

वरं शरावहस्तस्य चांडालागारवीथिषु । भिक्षार्थमटनं राम न मौर्ख्य हन्त जीवितम् ॥ २० ॥

**हातीं घेऊनिया खापर । ज्ञानार्थ चांडाळाचे घरोघर । भीक मागणें श्रेष्ठ सधर । परि मुर्ख शरीर त्याहूनि निंद्य ॥ ८६ ॥**

**मूर्खत्वें सार्वभौम पूर्ण । तें सोलींव दुःख दारुण । जो ज्ञान पावोनि अकिचन । तो वंद्य** [मु. 'जाण'.] **संपूर्ण ब्रह्मादि देवां ॥ ८७ ॥**

**तें पावावया निज ज्ञान । विवेक** [मु. 'विवेक वैराग्य ज्ञान संपन्न'.] **वैराग्य संपन्न । सद्‍गुरूसी रिघतां शरण । तैं मूर्खपण मावळे ॥ ८८ ॥**

श्रीराम उवाच——

एवं स्थिते बद्धमुक्ते कथमेतज्ञने स्थिते । क्रमो गुरूपदेशस्य स्वात्मज्ञानस्य कारणम् ॥ २१ ॥

**ऐसिया स्थितीं आचार्या । वर्तता** [त. तुं. तं. 'जगजाळ'; कं. व मु. 'जगज्ञाळ'; संपादित पाठ 'जगज्ञाळ' आणि 'जगजाळ' हे दोन्ही पाठ अर्थबोधाच्या दृष्टीने अपुरे ठरतात म्हणून जालमधील 'ल' लिहिण्यात हस्तदोष घडला असावा. या दृष्टीने 'जगज्ञाळ' म्हणजे 'जगद्‌रूपी जाळें' असा पाठ संपादित केला आहे.] **जगज्ञाल माया । कैसेनि तरिजे गुरुवर्या । त्या सांग उपाया** [मु. 'आत्म प्राप्ती लागोनी'.] **निजात्मप्राप्ति ॥**

**गुरुवाक्यें ब्रह्मप्राप्ति । ऐसें श्रुति-शास्त्रें गर्जति । ते प्राप्तीची** [कं. व पै. खेरीज इतरत्र, 'निजस्थिती'.] **नित्यस्थिती ।** [तं. 'सांगावी निश्चिती गुरुवर्या'; कं. व मु. 'पावेन निश्चिती गुरुवर्या करी'.] **पावे ते निश्चिती करी गुरुवर्या ॥ ९० ॥**

वसिष्ठ उवाच—

अनुक्रमणिका

उपदेशक्रमो राम व्यवस्थामात्रपालनम् । ज्ञप्तेस्तु कारणं शुद्धा शिष्यप्रज्ञैव केवला ॥ २२ ॥

**गुरूपदेशाचिया गोठीं । नाहीं ज्ञानाची भरली वाटी । जे शिष्याचे लाविता ओठीं ।** [नि. 'ब्रह्मज्ञान पाठी पावेल'.] **ब्रह्मस्थिती पोटीं वाढेल ॥ ९१ ॥**

**गुरुपाशीं नाहीं ज्ञानगोळा । जे गिळवी** [मु. 'शिष्यासी'.] **शिष्याहातीं तत्काळा ।** [पै. नि. घा. सु. 'गुरूरूपें'.] **गुरुपें नाही धन** [मु. 'ज्ञानधन मोटळा'.] **पोटळा । जो शिष्य जवळा स्वयें दे ॥ ९२**

**गुरुनें देइजे आपण । शिष्यु घे अंजुळी पूर्ण । तैसें नव्हे ब्रह्मज्ञान । अतर्क्य विंदान ज्ञानप्राप्ती ॥ ९३ ॥**

**उपदेशक्रम रघुनाथा । गुरु न सांगोनि सांगता । शिष्य कानेंवीण आइकता । प्राप्ती परमार्था तैं लाभे ॥ ९४ ॥**

[कं. पै. तु. त. 'द्रष्टा दृष्टीं देखे सावधान'.] **दृष्टीनें देखिजे सावधान । तैं कूर्मिचिया पिलियां अमृतपान । दृष्टि तरळतांचि जाण । पडे लंघन तयांसी ॥ ९५ ॥**

**तेवी गुरुशिष्य एकात्मता । शिष्य लाभे परमार्था । अणुमात्र भावो पालटतां । उपदेशीं रिता पडे शिष्यु ॥ ९६ ॥**

**गुरु सांगे गुह्यज्ञान । शिष्यु** [नि. 'तें त्यजुनीं सेवीं गुणवर्ण', सु. घा. 'त्यागुन निर्वाण'.] **सेवीं त्यागुनि वर्ण । वर्णावर्ण देहाभिमान । गेलिया ज्ञान स्वयें लाभे ॥ ९७ ॥**

**सच्चिदानंद निजवार्ता । गुरु सांगे शिष्य स्वार्था ।** [तु. 'शिष्य सांडी स्वार्थ चित्ता'.] **शिष्य स्वार्थें सांडुनि चिंता । तरीच परमार्था पाविजे ॥ ९८ ॥**

**ज्या शिष्याचे चित्तीं चिंता । देह गेहादि अति ममता । तो गुरूपदेशीं नित्य रिता ।** [नि. घा. 'प्राप्ती परमार्था कधीं नव्हे'; सु. 'प्रज्ञा परमार्थां तो नव्हे'; तं. 'प्राप्त परमार्था तें नव्हे'.] **प्रज्ञा परमार्था ते नव्हे ॥ ९९ ॥**

**विषय स्वार्थ ज्याच्या पोटीं ।** [नि. 'तो आस्थेच्या दोन चार गोष्टी'.] **तो आच्छादुनि विरक्तगोठीं । ते प्रज्ञा अतिशयें चोरटी । परमार्थी भेटी होऊचि नेदी ॥**

**या लागीं तात्काळ । पावावया** [तं. 'ब्रह्ममूळ'.] **ब्रह्मप्रबळ । एकी शिष्यप्रज्ञाचि केवळ । परमार्थफळ तेणें लाभे ॥ १०१ ॥**

न शास्त्रैर्नापि गुरुणा दृश्यते परमेश्वरः । दृश्यते स्वात्मनैवात्मा स्वीया सत्वस्थया धिया ॥ २३ ॥ [हा श्लोक मु. प्रतीतं नाही.]

**शिष्यासी नाहीं चित्तशुद्धि । त्यासी शास्त्रें नव्हे आत्मसिद्धी ।**

अनुक्रमणिका

**तो शास्त्र** [मु. 'विकोनिया विषयसाधी'.] **विक्री विषयविधी । हित त्रिशुद्धी नव्हेचि शास्त्रें ॥ १०२ ॥**

[मु. प्रतीत या ओवीचे पहिले दोन चरण असे आहेत :— 'शिष्या चित्तीं विषयासक्ति । गुरूपदेशें नव्हे परमार्थप्राप्ती ।'] **शिष्य चित्तीं विषयासक्त । गुरूपदेशें नव्हे परमार्थ । तो उपदेशुचि जाय व्यर्थ । करी विपरीत ज्ञानगर्वे ॥ १०३ ॥**

**उपदेश स्वयें व्यर्थ गेला । सवेंचि ज्ञानगर्व घेऊनि आला । ज्ञातेपणें ताठा चढला नाइके बोला श्रेष्ठांच्या ॥ १०४ ॥**

**स्वयें उपदेश गेला व्यर्थ । परी वाढला अति अनर्थ । चित्तशुद्धि नाहिं** [नि. घा. 'सत्य'; सु. 'तेथ'.] **जेथ । तेथ परमार्थ कदा न घडे ॥ १०५ ॥**

**चित्त शुद्धी ज्याचां मनीं । तो परमार्थु पावे पाषाणी ।** [नि. 'कळें'.] **नवल चित्त शुद्धीची करणी । दावी जनीं वनीं जनार्दनु ॥**

श्रीराम उवाच—

इयतो दृश्यजातस्य ब्रह्मांडस्य जगत्स्थितेः । मुने कथमसत्ताऽस्ति क्व मेरुः सर्षपोदरे ॥ २४ ॥ [योगवासिष्ठ, उत्पत्ति प्रकरण ३, सर्ग ७, श्लोक ३२.]

**साधक-भावनेचां पोटीं । दृश्य जाळेंसीं ब्रह्मांडकोटी । हरपती उठाउठी । राईच्या पोटीं** [सु. नि. घा. 'मेरु जेवी न भावे'.] **मेरू कें माये ॥ १०७ ॥**

**ब्रह्मभावना सूक्ष्म सपूर । तीमाजीं दिसे चराचर । केवीं हरपे जगडंबर । मशकु गिरीवर गिळी कैसा ॥ १०८ ॥**

वसिष्ठ उवाच—

साधुसंगमसच्छास्त्रपरो भवसि राम चेत् । तद्दिनेनैव नो मासैः प्राप्नोषि परमं पदम् ॥ २५ ॥ [योगवासिष्ठ, उत्पत्ति प्रकरण सर्ग ७, श्लोक ६.]

[सु. नि. घा. पै. त. कं. 'साधुत्वें राहता साधुसीं'.] **सत्त्वें पाहतां साधूसी । मुख्य साधुत्व** [तं. खेरीज इतरत्र 'सद्गुरुसीं'.] **सद्गुरुपासी । तो जें स्वात्मत्व उपदेशी । सच्छास्त्र त्यासी बोलती ज्ञाते ॥**

**तें गुरुवाक्यीं** [नि. त. 'एकात्मता'.] **एकाग्रता । शिष्या जालिया सर्वात्मता ।**

[कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] **तैं दिवसमास न लगतां । योग्य परमार्था तात्काळ होये ॥ ११० ॥**

**तत्काळ होयें योग्यता । हाही विलंबु न साहे** [सु. घा. परमार्था'; त. 'तत्वता'.] **सर्वथा । हृदयीं सिद्धचि निजात्मता । गुरुवाक्यें पाहतां** [त. 'नैराश्य'.] **नैराश्य लाभे ॥**

अनुक्रमणिका

**केवळ तंतु पाहतां दृष्टीं । वस्त्रें लोपती उठाउठी । तेवी सूक्ष्म ब्रह्म लक्षितां दृष्टिं । ब्रह्मांड कोटी मावळती ॥ ११२ ॥**

> शून्यमाकीर्णतामेति मृतिरप्युत्सवायते । आपत्संपदिवाभाति विद्वज्जनसमागमे ॥ २६ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

**पाहतां सूक्ष्म दृष्टि सावधान । शून्याचें हरपें शून्यपण ।** [नि. 'तै जो होय'.] **शून्य होय ब्रह्मपूर्ण । साधु सज्जन समागमें ॥ ११३ ॥**

**जंव जंव नाहीं होये** [नि. 'नश्वर देहो'.] **देहो । तंव तंव सुखाचा** [तं. 'उद्भव'.] **उत्साहो ।** [पै. तं. सु. तु. घा. नि. 'निःशेष होय देहाचा आभाव'.] **देहा होतां अभावो । परमानंद पहा हो सत्संगें ॥ ११४ ॥**

**मरोनिया जो मेला । तो मागतेनि जन्मा आला ।** [तं. 'तेवी'.] **जो जिताची जिवें निमाला । तो सुखी जाला सत्संगें ॥ ११५ ॥**

**सत्संगें ज्या अकिंचनता । तो ब्रह्मादिका वंद्य माथां । त्रैलोक्यवैभवा** [मु. 'म्हणौनि लाथा'.] **हाणें लाता । ऐसी प्रसन्नता सत्संगें ॥ ११६ ॥**

> द्रष्ट्रदर्शनदृश्यानां मध्ये यद्दर्शनं स्थितम् । साधो तदवधानेन स्वात्मानमवबुध्यसे [मु. प्रतीत हा श्लोक नाही.] ॥ २७ ॥ [योगवासिष्ठ, उत्पत्ति प्रकरण, सर्ग ९, श्लोक ७५.]

**सत्संगापरतें श्रेष्ठ । साधन नाहीं येथ । त्या सत्संगाचें महिमेतें । आइक निश्चितें सांगेन ॥ ११७ ॥**

**सत्संगे नाहीं द्रष्टेपण । पुढें दृश्य नाहीं जाण । देखतेवीण दर्शन । तें ब्रह्मपूर्ण रघुनाथा ॥ ११८ ॥**

**दृश्य द्रष्टा दोहीं तें । दर्शन प्रकाशी निश्चितें । तें दर्शन आकळे जयातें । ब्रह्मस्थितीं तयातें अभंग ॥ ११९ ॥**

> इमा घटमठाकाराः पदार्थाः पदशक्तयः । आत्मैव नान्यदस्तीति निश्चयः सम्यगीक्षिणः ॥ २८ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

**साखर कणिका भिन्न भिन्न । परि कणिका साखरचि आपण । तेवी चराचर दृश्यमान । तें ब्रह्म पूर्ण पूर्णत्वें ॥ १२० ॥**

**उंच नीच अळंकार । परी तें एकचि भांगार । तेवीं पाहतां चराचर । वस्तु परात्पर परब्रह्म ॥ १२१ ॥**

**म्हणती घटाकाश मठाकाश । परी तें सहजीं** [मु. 'महदाकाश'.] **सहजाकाश ।**
**तेवीं** [मु. 'दृष्य' 'दर्शनी दृष्टाभास'.] **दृश्य द्रष्टा दर्शनाभास ।** [मु. 'भासतो, चिद्विलास, चिन्मयत्वें'.] भासता चिद्विलास चिन्मयत्वें भासे ॥ १२२ ॥

अनुक्रमणिका

**या निजात्मदृष्टीं पाहतां । विषयीं विषयो ब्रह्मरूपता । तेचि उपपत्ति तत्त्वतां । आइक रघुनाथा सांगेन ॥ १२३ ॥**

येन शब्दं रसं रूप गंधं जानासि राघव । सोऽयं आत्मा परब्रह्म सर्वानापूर्यसंस्थितः [मु. प्रतीत हा श्लोक नाही.] ॥ २९ ॥ [योगवासिष्ठ स्थिति प्रकरण, सर्ग ३७, श्लोक ७.]

**मुख्य विषयो पंचविध । शब्दस्पर्श रूप रस गंध । याची गोडी तो परमानंद । आत्मविद जाणती ॥ १२४ ॥**

**विषयांचें जें गोडपण । तें गोडीचि ब्रह्मपूर्ण । ते गोडीचें जें ज्ञातेपण । तें चैतन्यघन जाणीव ॥ १२५ ॥**

**'यस्यानंदस्य** [मु. 'मात्रा जीवन्ती'; तं. 'मात्रमुपजीवन्ती'.] **मात्रामुपजीवन्ति' । विषय गोडी ब्रह्मस्फूर्ति ।**
**भोक्ता भोगी स्वयें चिच्छक्ती । जाणीव ते निश्चिती परब्रह्म ॥ १२६ ॥**

**यालागीं रघुनाथा । जेणें जाणिजे विषय स्वादता । ते जाणीव** [तं. खेरीज इतरत्र 'आली ज्याच्या हाता'.] **आलीया हाता । तो जाण तत्त्वता** [मु. पाठ 'स्वदेही'; तं. खेरीज इतरत्र 'स्वदेहें'.] **स्वयें ब्रह्म ॥**

श्रीराम उवाच——
येनैव भगवन्धीरा निश्चयेन महाधिया । विशोकाः संस्थितास्तन्मे ब्रह्मन्प्रब्रूहि तत्त्वतः ॥ ३० ॥

**मागील धीर वीर परमार्थी । पावले विशोक ब्रह्मप्राप्ती । ते विशोकाची स्थिती । मज कां** [तं. खेरीज इतरत्र, 'निश्चिती'.] **चित्तीं प्रकटेना ॥ १२८ ॥**

**ऐसी उपदेशी ज्ञानपदवी । जें धैर्यातें धैर्यचि आंगवी ।**
**अंग आंगातें स्वयें हरवी । विशोक** [कं. तं. 'सर्वाभावी'; तु. 'भावी'; पै. नि. इं. सु. घा. 'सर्वभावी'.] **स्वभावीं जेणें मी होये ॥ १२९ ॥**

**ब्रह्मज्ञानाची उपपत्ति । सांगितल्या नाना युक्ति । जेणें सद्य पावें ब्रह्मप्राप्ती । ते मज निश्चिती सांगा स्वामी ॥ १३० ॥**

वसिष्ठ उवाच——
श्रूयतां ज्ञानसर्वस्वं श्रुत्वा चैवावधारयेत् । भोगेच्छामात्रको बंधस्तत्त्यागो मोक्ष उच्यते ॥ ३१ ॥

**आइके बापा रघुवीरा । सांगेन ज्ञानाचिया सर्व सारा । जो श्रवणार्थी चातकु खरा । तो वाक्य सुख सारा झेलुनि घे ये ॥**

**ज्ञानकथा आघवेचि आइकती । परी आइकिलें तें नाचरती ।**
**यालागीं श्रवणाची होय माती ।** [तं. 'परमार्थी', 'प्राप्ती'.] **परमार्थप्राप्ती त्यां कैची ॥ १३२ ॥**

अनुक्रमणिका

पावन कथा ज्ञानगर्भोक्ति । अनवधानें ते श्रवणीं [तु. 'न निघती'; त. 'निघेती'; सु. नि. घा. 'न निवती'.] निमती ।
मां ते चित्तामाजीं कें पावती । मननाची वस्ती उद्वस सदा ॥ १३३ ॥

ऐसेंनि [कं. सु. नि. त. 'निजकथा'.] कथा जे आइकती । ते आइकतांचि नाइकती । तयांसी परमार्थाची प्राप्ती । कदा कल्पान्ती घडेना ॥ १३४ ॥

आइके श्रीरामा सावधान । येथ भोगेच्छा मुख्य बंधन । ते त्यागी तो ज्ञाता पूर्ण । तेथ मुक्तपण सहजचि ॥ १३५ ॥

इच्छात्यागु अति कठीण । जो त्यागी तो विचक्षण । त्याहि त्यागाचें लक्षण । निर्वाणखूण अवधारीं ॥ १३६ ॥

मनें मनातें [घा. 'आक्रमावें'.] आवरावें । मनें मनातें निग्रहावें । मनें मनातें धरावें । मनें मारावें मनातें ॥ १३७ ॥

मनें मनाचा निग्रहो ऐसा । तेथ समूळ निमे आशा । [नि. घा. 'चैतन्याचा ओते देहठसा'; सु. 'चैतन्याचा ओते ठसा'.] चैतन्य ओते देहठसा । प्रपंचु आपैसा परब्रह्म होयें ॥ १३८ ॥

ऐसिया सूक्ष्मा अति युक्तीं । परब्रह्माची सद्यःप्राप्ती । स्वयें परब्रह्मचि आहाती । प्राप्ताप्राप्ती भावाभावें ॥ १३९ ॥

स्वयंभ हृदयीं ब्रह्मस्थिती । ब्रह्मप्रभा इंद्रिय [सु. नि. घा. 'इंद्रियवृत्ति'.] प्रवृत्ती । तें अभावें ब्रह्म नव्हे म्हणती । [सु. नि. घा. 'होती'; तं. पै. तु. त. कं. संपादित पाठ.] सद्भावें प्राप्ती परब्रह्म ॥

त्या सद्भावाची उपपत्ती । निश्चयें सांगेन रघुपती । दृढ धरावी सावधान वृत्ती । हे ब्रह्मस्थिति अभंग ॥ १४१ ॥

शान्तं ब्रह्मवपुर्भूत्वा कर्म ब्रह्ममयं कुरु । ब्रह्मार्पणसमाचारो भवसि ब्रह्म तत्क्षणात् ॥ ३२ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

जेथ काम क्रोध सलोभता । निःशेष नाहीं ते ब्रह्म शांतता । तें शांत ब्रह्म स्वभावता । सबाह्य पूर्णता सर्व देहीं ॥ १४२ ॥
जयासी मी म्हणिजे आपण । तें मीपणें वपुचि चैतन्य । इंद्रियांचें कर्माचरण । तें आचरण पूर्ण ब्रह्मत्वें ॥ १४३ ॥

काया वाचा मनसा आचरण । तें तें सहजें ब्रह्म पूर्ण ।
हे जयासी आकळे खूण । तो तत्काळ जाण परब्रह्म जाला ॥ १४४ ॥

तो तत्काळ परब्रह्म जाला । [मु. 'म्हणत लाज लागली पैं बोला'.] लाज लागली या बोला । [मु. 'स्वयें'.] स्वयंभ ब्रह्मरूप संचला । जाला न जाला ज्ञानाज्ञानें ॥

अनुक्रमणिका

**यालागीं गा रघुनाथा । स्वतःसिद्ध ब्रह्मरूपता । स्वयें स्वयंभ ये हातां । या श्लोकार्था** [तं. 'श्लोकार्थविण लोनीं'; कं. त. 'परिसोनीं'; पै. कं. खेरीज इतरत्र 'निवटोनीं'.] **विनटोनी ॥ १४६ ॥**

ग्राह्यग्राहकसंबंधः समानः सर्वदेहिनाम् । योगिनः सावधानत्वं यत्तदर्चनमात्मनः ॥ ३३ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

**इंद्रियांचें कर्माचरण । सर्वदेहीं समसमान । ते** [मु. 'कर्मयोगी'.] **कर्मीं योगी सावधान ।** [सु. घा. 'चिद्रुपें पूर्ण सर्वदा भोगी'.] **ब्रह्मानुसंधान निजनिष्ठा ॥ १४७ ॥**

**योगी स्वधर्मकर्में करिती । कर्मीं स्फुरें** [सु. घा. 'ब्रह्मप्राप्ती'; नि. 'ब्रह्म प्रचीति'.] **ब्रह्मप्रतीती ।** [सु. घा. 'तोचि परमात्मा निश्चितीं'.] **तेचि परमात्मयाची निजभक्ती । नित्यमुक्ती सावधानत्वें**

**योगी जागृती चित्सावधान । चित्सावधानें देखें स्वप्न ।** [मु. 'सुषुप्तिसुखे समाधान'.] **सुषुप्तीं सुख समाधान । चिद्रुपत्वें पूर्ण सर्वदा भोगी ॥ १४९ ॥**

**ऐसा अवस्थात्रयीं सावधान । हेंचि भगवंताचें भजन । हेंचि परमात्मयाचें पूजन । हेंचि समाधान जीवशिवाचें ॥ १५० ॥**

**ऐसा सद्भावें साचार । जो सावधान निरंतर । त्यासी ब्रह्मरूप चराचर । विषयमात्र चिद्रूप ॥ १५१ ॥**

यदिदं किंचिदाभाति जगज्जालं प्रदृश्यते । तत्सर्वममलं ब्रह्म बहिरन्तर्व्यवस्थितम् ॥ ३४ ॥

**जें जें दिसे दृश्य दर्शन । जें जें विषय भोगायतन । तें तें निर्मळ ब्रह्म जाण । सबाह्य पूर्ण परब्रह्मत्वें ॥ १५२ ॥**

**मां हें एकैक सांगों किती । त्यासी ब्रह्मरूप त्रिजगतीं । सहजें ठसावे रघुपती । तेही उपपत्ती अवधारीं ॥ १५३ ॥**

ब्रह्मविद्ब्रह्मभुवनं ब्रह्मभूतपरंपरा । ब्रह्माहं ब्रह्मच्छत्रुर्ब्रह्म मन्मित्रबांधवाः ॥ ३५ ॥ [मु. प्रतींत हा श्लोक नाही.]

**ब्रह्म दृश्य द्रष्टा दर्शन । ब्रह्म चतुर्दश भुवन । भूत परंपरा ब्रह्मपूर्ण । मी** [मु. 'म्हणणे'.] **म्हणे तें मीपण परब्रह्मत्वें ॥ १५४ ॥**

**ब्रह्मरूपें भासती मित्र । ब्रह्मरूप भासती पुत्र । शत्रु भासती चिन्मात्र । सुहृद समग्र सद्रूपत्वें ॥ १५५ ॥**

**शत्रु मित्र सखे बंधु । हा परब्रह्मीं अपवादु । ब्रह्म केवळ स्वानंदकंदु । परमानंदु परिपूर्णत्वें ॥ १५६ ॥**

[मु. 'ब्रह्मीं'.] **ब्रह्में प्रपंचु नाहीं आइकिला ।** [मु. 'ब्रह्मीं'.] **ब्रह्में प्रपंचु नाहीं देखिला ।** [मु. 'ब्रह्मीं'.] **ब्रह्में प्रपंचु नाहीं स्पर्शिला । भ्रांतीं भाविला निजभावना ॥**

अनुक्रमणिका

अज्ञस्य दुःखौधमयं ज्ञस्यानंदमयज्ञगत् । अंधं भुवनमंधस्य प्रकाशं तु सुचक्षुषः ॥ ३६ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

**भ्रांतासी जग दुःख प्रतीती । ज्ञात्या सुख स्वरूप विश्वस्फूर्ति । अंधा गडद पडे त्रिजगतीं । देखणे देखती स्वप्रकाशत्वें ॥**

सर्वमेव हि ब्रह्मेति भाविते ब्रह्म वै पुमान् । पितेऽमृतेऽमतमयः को नाम नभवेत्किल ॥ ३७ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

**यालागीं जया परमार्थ बुद्धि । ते तोडिती भेदाची विधि । भेदु तोडावया त्रिशुद्धि । भगद्बुद्धि सर्वत्र ॥ १५९ ॥**

**जयां ब्रह्मभावो सर्वा भूतीं । ते स्वयें परब्रह्मचि होती । ते पूर्वीच परब्रह्म आहेती । भावना भ्रांति छेदक ॥ १६० ॥**

**जो करी अमृतपान । तो अमर होयें आपण । जया सर्व भूतीं भगवद्भजन । ते ब्रह्म परिपूर्ण स्वयें होती ॥ १६१ ॥**

**आइके श्रीरामा जगाची स्थिती । परब्रह्म कां परमभ्रांती ।**
**तिसरियाची नाहीं वस्ती । जाण निश्चिती रघुनाथा ॥ १६२ ॥**

**नानाकारें जगाची** [मु. ‘प्रचीती’.] **प्रतीती । तेचि मुख्यत्वें सोलीव भ्रांति । तें भ्रांतीची निजस्थितीं । आईक तुजप्रती सांगेन ॥**

भ्रमेणाहं भ्रमेण त्वं भ्रमेणोपासका जनाः । भ्रमेणेश्वरभावत्वं भ्रममूलमिदं जगत् ॥ ३८ ॥

**अहमात्मा जें मी पण । तें मुख्य भ्रमाचें निजकारण । तूं म्हणणें भ्रम दारुण । मीतूंपणा भ्रममूळ ॥ १६४ ॥**

**देव भक्त दोनी भिन्न । ऐसें जें कां उपासन । हें** [मु. ‘तें ज्ञानाचें मुख्य अज्ञानपण’.] **ज्ञानचि मुख्य अज्ञान । सूक्ष्म भ्रमपूर्ण अतर्क्यत्वें ॥ १६५ ॥**

**ब्रह्म अखंडत्वें पूर्ण स्थिती । तेथ देव भक्त भिन्न मानिती ।**
**हें ज्ञान गुह्य अतिभ्रांति । अतर्क्य निश्चितीं सज्ञाना ॥ १६६ ॥**

**ईश्वर तो अति वरिष्ठ । येरे भूत भौतिकें अति कनिष्ठ । हे भ्रमाचें अति कचाट । येथ श्रेष्ठ श्रेष्ठ भुलविलें भ्रमें ॥**

**दोरीं सर्प जन्मला नाहीं । तो उपजे भ्रांताचा ठायीं । तेवीं ब्रह्मीं जग नाहीं । आभासे पाही भ्रममूळें ॥ १६८ ॥**

**जग देखणें परम भ्रम ।** [मु. ‘जग न देखणें तें परब्रह्म’.] **नेंदखणें तें परब्रह्म । हें** [नि. घा. ‘जाण गुह्य वर्म’.] **ज्ञानगुह्य निजवर्म । तूं पुरुषोत्तम परमात्मा ॥ १६९ ॥**

अनुक्रमणिका

[त. प्रतीत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :— 'तुजिया स्वरुपाचि नाहीं सीमा । तूं आकळ गा परमात्मा । तुजी तुचि पाहे महिमा । अपार अप्रमा रघुनाथा ॥'] **मी तुज** [नि. प्रथम चरण असे आहे : 'मी तुज सांगों परी तूं परमात्मा'; सु. घा. कं. 'तूं' हे पद नाही.] **सांगो तूं परमात्मा । तुझी तूचि पाही महिमा ।**

**तुझिया स्वरूपासी नाहीं सीमा । अपार** [सु. घा. 'अप्रमेया'; नि. 'अप्रमेय'; तं. चवथे चरण पुढीलप्रमाणे आहे :— 'अपार महिमा श्रीरामा ।'] **अप्रमा रघुनाथा ॥ १७० ॥**

**तूं आत्मा आत्मत्वें परिपूर्ण । तूं** [मु. पाठ 'कर्माकर्मविहीन'.] **काळकर्मा विहीन । तुज नाहीं स्थान मान । तें निजलक्षण अवधारीं ॥ १७१ ॥**

आकाशादपि विस्तीर्णः शुद्धः सूक्ष्मोऽव्ययः शिवः । य आत्मा स कथं राम जायते म्रियतेऽथवा ॥ ३९ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

**तुझिया स्वरूपाची निजस्थानीं । आकाश लोपलें कोने कोनीं । पाहतां न दिसे मनीं नयनीं । गेलें हारपोनि मिथ्यत्वें ॥** [तु. प्रतीत ही ओवी नाही.]

**पाहतां स्वरूप शुद्धत्व ।** [तु. 'लाजिलें'; पैं. 'शोधित सत्वें'; नि. घा. 'लाजिलें'; पै. 'शोधितां सत्वें'; सु. 'लाजा लपे साधुसत्व'.] **लाजा लोपें शोधित सत्व । स्वयें** [नि. घा. 'सामावलें महत्वें'; सु. कं. 'स्वयें मावळे महत्व'.] **मावळे महत्तत्त्व । मायेचें सत्व असत्वा आलें ॥ १७३ ॥**

**राईच्या कोटि अंशाप्रति । वस्तु** [मु. 'सावकाशें'; त. 'सावधानें'.] **सावकाश नांदती । अणुमाजीं** [मु. 'सुखस्वरूपस्थिती'.] **सुखस्थिती । वस्तु विश्रांती सावकाशें ॥ १७४ ॥**

**सूक्ष्माहूनि सूक्ष्मसार । जे नित्यत्वें** [मु. 'नित्याक्षर'; क. तं. पै. त. संपादित पाठ.] **निजाक्षर । तें तुझें स्वरूप साचार । जीवशिवत्वें विचार अव्ययीं विरे ॥ १७५ ॥**

**वस्तूसीं नाहीं मातापिता । यालागीं न घडे जन्मकथा । जन्मेंवीण मरणवार्ता । आत्मत्वीं सर्वथा असेना ॥ १७६ ॥**

**एवं जन्म मरणातीत । अपार सुखें सदोदित । त्या स्वरूपा नांव रघुनाथ । जाण निश्चित श्रीरामा ॥ १७७ ॥**

सर्वेषामितिहासानामिदं सारमुदाहृतम् । श्रुतेऽस्मिन्निर्मले यत्स्याज्जीवन्मुक्तत्वमक्षयम् ॥ ४० ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

**वेद वेदांग** [तं. 'महापुराण'.] **पुराण । श्रुति स्मृति शास्त्रें विज्ञान । इतिहासाचें गुह्य ज्ञान । तें हें निरोपण रघुनाथा ॥ १७८ ॥**

**सर्व साराचें सुख सार । तो हा इतिहास साचार । सकळ ज्ञानाचें ज्ञानगव्हर । अति उदार मुक्तत्वें ॥ १७९ ॥**

अनुक्रमणिका

[मु. 'हें निरुपण जीवीं होतें'.] हें निरोपण जैं जीवें घोटे । तैं विषयांचें लाहाणे फिटें । जन्ममरणाचें खत फाटे । भवभाव आटे मृगजळत्वें ॥ १८० ॥

या इतिहासाचें निजवर्म । कर्मचि होयें परब्रह्म । साधकु होयें आत्माराम । नित्यत्वें परम निजमोक्ष जोडे ॥ १८१ ॥

म्यां जें निरोपिलें निरोपण । तें [कं. तु. 'जीवमोक्षाचें'.] जीवन्मुक्ताचें लक्षण ।
तूं [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] तंव आत्माराम आपण । पूर्णत्वें पूर्ण परमात्मा तूं ॥ १८२ ॥

आइकोनि वसिष्ठाचें वचन । श्रीराम स्वयें आपण । आपुलें देखे पूर्णपण । स्वानंदघन सुखरुप ॥ १८३ ॥

होतां स्व स्वरूपीं भेटी । चित्तचैतन्या पडली मिठी । [मु. 'हर्ष बाष्प'.] हरुषें बाष्प दाटे कंठीं । आनंद पोटीं न समाये ॥ १८४ ॥

आनंद हृदयीं न [मु. 'न मायें'.] समाये । तो [मु. 'तो नेत्रीं उलथुं पाहे'.] उलथला नेत्रीं वाहे । [तं. प्रतीत तृतीय चरण पुढीलप्रमाणे आहे :—'कंठीं बाष्प दाटलें पाहे'; इतरत्र संपादित पाठ.] पूर्ण दाटला विस्मयें । देहाची सोयें स्फुरेना ॥ १८५ ॥

प्राण पांगुळला जेथींचा तेथ । कंठ जाला सद्गदित । इंद्रियें उपरमलीं समस्त । पडिलें तटस्थ चिद्रूपत्वें ॥ १८६ ॥

सर्वांगीं रोममूळीं । आली स्वेदुकणिका निर्मळी । मुक्त मोतियांची जाळी । [तं. 'सबाह्य रचिली निजसत्वें'.] पांघुरविली निजसत्त्वें ॥ १८७ ॥

निःशेष नाठवे मी तूं पण । खुंटली वाचा [तं. पै. त. कं. 'तुटलें'.] पडिलें मौन । जीव शिवाचें पुसलें भान । [तु. नि. घा. तं. 'चित्त समाधान पावलें'.] चित्तसमाधान पावला ॥ १८८ ॥

भरद्वाज उवाच—

रामः प्राप्तः परं योगं स्वात्मनात्मनि हे मुने । कथं वसिष्ठदेवेन व्यवहारपरः कृतः ॥ ४१ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

श्रीराम स्वयें चैतन्यघन । जाला स्वस्वरूपीं निमग्न । तयासी व्यवहार [तु. खेरीज इतरत्र 'व्यवहार प्रवीण'.] प्रवर्तमान । श्रीवसिष्ठें आपण केवीं केलें

ऐसें भरद्वाजें वाल्मीकाप्रती । स्वयं पुसिलें अति प्रीतीं । वाल्मीकहि तदर्थी । कथा संगती सांगतु ॥ १९० ॥

वाल्मीकिरुवाच——

यदा परिणतः साधुःस स्वरूपे महात्मनः । विश्वामित्रस्तदोवाच वसिष्ठं ऋषिसत्तमम् ॥ ४२ ॥

अनुक्रमणिका

**तटस्थ देखोनि श्रीरामासी । विश्वामित्र जाला कासाविसी ।**
**तो कळवळोनि वसिष्ठापासी । निजकार्यासी सांगतु ॥ १९१ ॥**

विश्वामित्र उवाच——
हे वसिष्ठ महाभाग ब्रह्मपुत्र महामुने । गुरुत्वं शक्तिपातेन तत्क्षणादेव दर्शितम् ॥ ४३ ॥

**स्वामी वसिष्ठा तूं ब्रह्मपुत्र ।** [कं. सु. नि. घा. तु. त. 'ब्रह्मप्राप्ती'.] **ब्रह्मप्राप्त अति पवित्र । तुझिया गुरुत्वाचें चरित्र । अति विचित्र अनुपम्य ॥ १९२ ॥**

**शक्तिपातें शिष्यो** [सु. नि. घा. तु. 'शिष्योत्तमा'; त. 'शिष्य परमा'.] **परमा । पावविलें न करितां श्रमा । हे तुझ्या गुरुत्वाची गरिमा । अगाध महिमा तिहीं लोकीं ॥**

**तुझिया गुरुत्वाचें वर्म । मिथ्या देहादि इंद्रियें कर्म । शिष्य होये परब्रह्म । हे समाधी परम श्रीरामा ॥ १९४ ॥**
[तु. प्रतीत ही ओवी नाही.]

**शिष्याचिया सकळवृत्तीं । वचनें लाविसी ब्रह्मस्थितीं । शिष्य पावे** [मु. 'ब्रह्मस्थिती'.] **ब्रह्मप्रतीती । शक्तिपातु निश्चितीं या नांव ॥** [सु. प्रतीत ही ओवी नाही; कं. प्रतीत ओवी १९५ व १९६ नाहीत.]

**लव निमिष घटिका मुहूर्तीं । शिष्यासी बाणलिया हे स्थिती ।**
**शक्तिपातु तो निश्चिती । हे परमख्याती गुरुवाक्या ॥ १९६ ॥**

दर्शनात्स्पर्शनाच्छब्दात्कृपया शिष्यदेहके । जनयेद्यः समावेशः शांभवं स हि देशिकः ॥ ४४ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

**वचनें छेदिसी संशयातें ।** [मु. 'निःशब्दें बोधिसी शब्दार्थें'.] **निःशब्द बोधिसी शब्दार्थें । हस्तक मस्तक सामर्थ्यें शिष्य परमार्थें सुखी करिसी ॥ १९७ ॥**

**असो दर्शन स्पर्शन । मुख्य तुझें कृपावलोकन । शिष्यासी सहज समाधान । चैतन्यघन चित्सुखें ॥ १९८ ॥**

[तं. 'चित्तसुखें'.] **चित्सुखें सुखसंपन्न । हें तुझिया कृपेचें आयतन । तुझिया कृपेस्तव पूर्ण । ब्रह्म समाधान श्रीरामीं ॥ १९९ ॥**

**श्रीरामीं पूर्ण समाधि-अवस्था । ठेली कर्मक्रिया कर्तव्यता । पुढील** [मु. 'अवतार कार्यार्था'; पै. 'अवतार कथा'.] **अवतारकार्यता । वसिष्ठा वृथा हों नेदीं ॥ २०० ॥**

इदानीं कृपया रामे व्युत्थानं कर्तुमर्हसि । परे परिणतस्त्वं हि कार्याविष्टा वयं ततः ॥ ४५ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

**स्वामी वसिष्ठा अवधारीं । कृपा करी आम्हावरी । श्रीराम** [नि. 'श्रीराम ये देहावरी'.] **उमजे जया परी । ते युक्ति विवरी स्वसत्ता ॥ २०१ ॥**

अनुक्रमणिका

**सर्व इंद्रियीं सदा उद्बोधु ।** [मु. 'कर्तव्यता'; तं. 'कर्तव्य'.] **कर्म-कर्तव्या नित्य सावधु । माझा यज्ञ होय सिद्धु । तैसा प्रबोधु करी श्रीरामा ॥ २०२ ॥**

**समाधी आणि** [नि. घा. सु. त. 'उत्थान'; कं. पै.] **व्युत्थान । दोही अवस्थांचें तुज ज्ञान । शिष्यासी देसी समाधान । सर्वेचि** [प्रयोजन = कारण.] **प्रयोजन** [सु. घा. 'बोधिसी'.] **प्रबोधासीं ॥**

> स्मर कार्यं मम विभो यदुद्दिश्याहमागतः । प्रार्थितश्चातिकष्टेन राजा दशरथः स्वयम् ॥ ४६ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]
> तं वृथा मा कृथा सर्वं शुद्धेन मनसा मुने । देवकार्यं च रामेरामेऽन्यदवतारप्रयोजनम् ॥ ४७ ॥

**करावया सुरकार्यार्थ । अवतार श्रीरघुनाथ । तो त्वां केला समाधिस्थ । ठेला तटस्थ निर्व्यापारें ॥ २०४ ॥**

**श्रीरामु** [सु. नि. घा. 'होता'.] **राहतां तटस्थ । खुंटला अवतार कार्यार्थ । माझेंहि कार्य येथ । यज्ञसिद्ध्यर्थ राहिलें ॥ २०५ ॥** [तु. कं. प्रतींत ही ओवी आहे.]

**माझिया कार्याचें स्मरण । वसिष्ठा विचारी आपण । दशरथासी प्रबोधन । रामलक्ष्मण मज देवविलें ॥ २०६ ॥** [तु. प्रतीखेरीज इतरत्र सर्व प्रतींत या ओवीऐवजी पुढील दोन ओव्या आलेल्या आहेत :–– 'माझिया कार्याचें स्मरण । वसिष्ठा धरीं आठवण । ज्या लागीं येवोनि आपण । केलें प्रार्थन दशरथाचें ॥ १ ॥
वसिष्ठा तुवांचि आपण । दशरथासी प्रबोधून । मज दिधले रामलक्ष्मण । यज्ञरक्षण करावया ॥ २ ॥']

**तें तुझें वाक्य होईल मिथ्या ।** [सु. नि. घा. 'देवकार्यार्थ'.] **देवकार्य** [तं. खेरीज इतरत्र 'राहील'.] **जाईल** [तु. नि. घा. 'सर्वथा'; कं. 'आता'.] **वृथा । यालागीं श्रीरघुनाथा । कृतकार्यार्था प्रबोधीं ॥ २०७ ॥**

**ऋषि वाल्मीकें आपण । केलें शतकोटी रामायण । तें मिथ्या हों नेदीं वचन । श्रीरघुनंदन प्रबोधीं ॥ २०८ ॥**

> सिद्धाश्रमं मया नीतो रामो राक्षसमर्दनम् । करिष्यते ततोऽहल्यामुक्तिं च जनकात्मजाम् ॥ ४८ ॥
> परिणेष्यति कोदंडभंगेन कृतनिश्चयः । रामस्य जामदग्न्यस्य कर्ता नैच्छित्यमात्मनः (?) ॥ ४९ ॥ [हा श्लोक मु. प्रतीत नाही.]

**अनागत भाष्य अति पवित्र । वदलें वाल्मीकीचें** [कं. त. 'वगत्र'.] **वक्त्र । तें श्रीरामाचें चरित्र । अति विचित्र अवधारी ॥ २०९ ॥**

**ताटिका अति** [सु. नि. घा. 'विकंटक'; तं. त. 'विकट'.] **विंटक । रामें निर्दाळिली** [मु. प्रतीत 'अतिकंटक' असा पाठ आहे.] **कंटक । जनवन केलें निष्टंक । सिद्धाश्रमीं लोक** [तु. 'सदा'.] **सुखें वसती ॥ २१० ॥**

**तें सिद्धाश्रम माझें स्थान । तेथें आणिला रघुनंदन । करूनि राक्षसमर्दन ।** [नि. 'जयो संपूर्ण'; सु. घा. 'यज्ञसंरक्षण'.] **यज्ञ संपूर्ण श्रीरामें ॥ २११ ॥**

**करील अहिल्या उद्धरण । शिवचाप प्रभंजन । जानकीचें पाणिग्रहण । चहूं बंधूंचें लग्न** [मु. प्रतीत 'चरणान्ति स्वानंदें' हे अधिक पद आहे; कं. 'जनकालयीं स्वानंदे'.] **जनकालयीं ॥ २१२ ॥**

अनुक्रमणिका

**जामदग्न्य राम श्रीराम । युद्धीं पावले सुख परम । फरशरामासी उपरम । जाहला परम श्रीरामें ॥ २१३ ॥**

**श्रीरामाचें वनाभिगमन । तेणें दंडकारण्य पावन । तीर्था पवित्रता पूर्ण । श्रीरामचरण शिववंद्य ॥ २१४ ॥**

**समुद्रीं शिळा स्वयें** [कं. त. 'स्वेतु प्रान्ति'; सु. घा. पै. 'सेतुप्राप्ती'; तं. 'स्वेत प्राप्ती'.] **तरती ।** [तु. नि. घा. 'बिभीषणा लंका प्राप्ती'.] **विभीषणु लंकाधिपती । रामनामाचिया ख्याती । त्रिजगती उद्धरील ॥ २१५ ॥**

**सीताशुद्धीचेनि** [तं. तु. खेरीज इतरत्र 'छळें'.] **सळें । निर्दळील राक्षसकुळें । नाम वंदिजे कळिकाळें । तें चरित्र प्रांजळें वसिष्ठा करीं ॥ २१६ ॥**

> यैर्दृष्टो यैः स्मृतो वापि बोधितो यैः श्रुतोऽपियैः । सर्वावस्थागतानां तु जीवन्मुक्तिं प्रदास्यति ॥ ५० ॥ [हा श्लोक मु. प्रतीत नाही.]
> इति कार्यमशेषेण त्रैलोक्यस्य ममापि हि । अनेन रामचंद्रेण पुरुषेण ममात्मनः ॥ ५१ ॥
> नमोऽस्मै जितमेतेन जगज्जीवितहेतुना । वसिष्ठकृपया त्वं हि व्यवहारपरं कुरु ॥ ५२ ॥

**जिहीं अत्यंत आदरेंसी । अवलोकिलें** [नि. घा. तु. 'ऐकिलें श्रीराम चरित्रासी'; पै. तं. त. सु. कं. 'आइकिलें श्रीरामचंद्रासी'.] **श्रीरामचंद्रासी । जें श्रीराम स्मरती अहर्निशीं । मुक्ति त्यांसी अनायसें ॥ २१७ ॥**

**जो सार्थकें करवी श्रीराम श्रवण । जो सार्थकें** [नि. घा. 'नित्य आपण'; सु. 'परम आपण'.] **परिसें आपण ।**
**ते दोघे नित्य** [सु. नि. घा. 'जीवन्मुक्त'.] **मुक्त जाण । इंद्रियाचरण करितांहि ॥ २१८ ॥**

**जयाचे मुखीं रामनामाची वस्ती । जे सदा रामनामस्मरती ।**
**त्यांसी** [तु. 'स्वदेही'.] **स्वदेहेंसी नित्य मुक्ति । इंद्रियार्थी रमतांहि ॥ २१९ ॥**
[कं. प्रतीत ही ओवी नाही.]

**जे अवस्थात्रयीं** [सु. नि. घा. 'नित्यमुक्त'.] **निर्मुक्त ।** [नि. तु. या प्रतींत या ओवीचे पुढील तीन चरण असे आहेत :—'जे सदा राम जपत । श्रीराम स्वयें तेथ । असें क्रीडत स्वानंदें ॥' सु. घा. या प्रतींत याच ओवीचे तीन चरण असे आहेत :——'गृहदारादि विनिर्मुक्त । ते सद्धः श्रीराम स्मरत । श्रीराम तेथें स्वानंदें क्रीडे ॥' त. प्रतीत दुसऱ्या चरणाचा पर्याय 'ग्रहदारीं नव्हती आसक्त' असा दिला आहे.] **गृहदारीं नित्यमुक्त । जे सदा श्रीराम स्मरत । श्रीराम तेथ स्वानंदें क्रीडे ॥ २२० ॥**

**ऐसी त्रैलोक्याची गती ।** [नि. घा. 'श्रीराम चरित्रें तरती'; सु. 'श्रीराम चरित्र प्रतीती'; क. तं. पै. 'श्रीराम चरित्रा प्रति'.] **श्रीराम-चरित्रें प्राप्ती । वसिष्ठा तूं कृपामूर्ति । माझी** [क. पै. तं. तु. त. 'कार्यस्थिती'.] **कार्यसिद्धी श्रीरामें ॥ २२१ ॥**

**श्रीराम पुरुषोत्तम । श्रीराम परात्पर परम । श्रीराम पूर्ण ब्रह्म । नित्य** [सु. नि. घा. 'निष्काम सिद्धी'; त. 'निष्काम'; क. 'निष्कर्म'.] **निष्काम श्रीराम ॥ २२२ ॥**

**त्या श्रीरामाची स्थिती-गती । श्रीवसिष्ठा तुझ्या हातीं । आमुचिया कृपास्थिती । श्रीराममूर्ति प्रबोधी** [या ओवीनंतर पै. व कं. प्रतींत पुढील ओवी आली आहे :—'श्रीराम सदा देवहीन । तरी तयापासी नाही दैन्य । जगाचेनि भाग्यें आपण । श्रीरघुनंदन प्रबोधी ॥' सु. नि. घा. व तु. या प्रतींत थोड्याफार फरकाने ही ओवी आली आहे. तं. प्रतीत ही ओवी नाही.] **॥ २२३ ॥**
**दैवेंवीण भाग्यवंतु । जगीं एक श्रीरघुनाथु । तो वृत्ति पावोनिया येथ । चरित्रार्थ** [तं. 'संवादूं'.] **संपादूं ॥ २२४ ॥**

अनुक्रमणिका

**सर्व** [सु. नि. घा. 'जगीं तूं जयी'.] **जयें विजयी पूर्ण । ऐसा जो कां रघुनंदन । तयासी माझें निज नमन । तो जगज्जीवन जगाचा ॥ २२५ ॥**

**वसिष्ठा आमुचे** [सु. 'कृपेतरी'; नि. घा. 'कृपेवारी'; तं. पै. त. क. संपादित पाठ.] **कृपेंवऱ्ही । श्रीरघुनाथासी प्रबोध करी ।** [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] **जे तो अवतार चरित्र करी ।** [सु. नि. घा. 'तो ये'.] **तयें वेव्हारी प्रवर्तवी ॥**

वाल्मीकि रुवाच—

इत्युक्त्वा स स्थितस्तूष्णीं विश्वामित्रो महामुनिः । वसिष्ठस्तु महातेजा रामचंद्रमभाषत ॥ ५३

**वाल्मीक सांगे भरद्वाजासी । तटस्थ देखोनि श्रीरामासी । विश्वामित्र वसिष्ठासी । रामप्रबोधासी** [तं. 'प्रबोधी'; सु. नि. घा. त. 'प्रयोजी'.] **प्रयूंजी ॥ २२७ ॥**

[सु. नि. घा. 'तंव'.] **एवं विश्वामित्रें आपण । रामानुवाद बोलोन । निजकार्यार्थी** [सु. नि. घा. 'धरोनी'.] **धरी मौन । तें वसिष्ठ सर्वज्ञ जाणोनि बोले ॥ २२८ ॥**

राम राम महाबाहो महापुरुष चिन्मय । नायं विश्रांतिकालो हि लोकानंदप्रदो भव ॥ ५४ ॥

यावल्लोकपरामर्षो निरूढो नास्ति योगिनाम् । तावद्दृढसमाधित्वं न भवत्येव निर्मलम् [मु. प्रतीत हा श्लोक नाही.] ॥ ५५ ॥

**आइके बापा रघुनाथा । तुज काइसी समाधी अवस्था । तूं काळांचा आकळिता । चिदानंदता स्वरूपें ॥ २२९ ॥**

**परिसें आजानुबाहो महाभुजा । हा समाधिकाळु नव्हे तुझा । तूं** [मु. 'त्रैलोक्याधिराजा'.] **त्रैलोक्याधीशु राजा । देव समाजा** [मु. प्रतीत 'समग्रा' हे अधिक पद या पदापूर्वी आले आहे.] **सुखी करी ॥**

**सुखी करी साधुसंत । सुखी करी निजभक्त । सुखी करी लोक समस्त । अवतारचरित अनुक्रमें ॥ २३१ ॥**
**केवळ निष्कर्म राहणें । ते जीवसमाधीचीं लक्षणें ।** [तं. प्रतीत या ओवीचे शेवटचे दोन चरण नाहीत.] **तेंही केवळ अपक्वपणें । परिपक्व चिन्हें आईक ॥ २३२ ॥**

**सर्व भूतांचे गुणागुण । जगाचें दोषदर्शन । दिसतां न मोडे ब्रह्मपण । ते समाधि पूर्ण पूर्णत्वें ॥ २३३ ॥**

**भूतांचें जें** [सु. 'कर्माचरण'; पै. तं. तु. नि. घा. क.] **कर्माचरण । भासतां भासे चैतन्यघन । त्या नांव शुद्ध समाधान । समाधि संपूर्ण या नांव ॥ २३४ ॥**

**ऐसें नव्हता समाधान । केवळ जें तटस्थपण । तें मुग्धभावाचें लक्षण । समाधि संपूर्ण ते नव्हे ॥ २३५ ॥**

**भूतांचे सकळ मळ । जयाचे दृष्टीं होती निर्मळ । तें समाधीसुख कल्लोळ । येरी** [त. सु. नि. घा. 'समूळ भूतादि भाव'; त. 'समळ भूताधि भावें'; कं. 'सकळ भूतादि भावें'.] **समळ भूतादि-भावें ॥ २३६**

अनुक्रमणिका

**आशंका म्हणसी संसार मिथ्याभूत । हें त्याचि करुनि दिधलें येथ । तेथ कैंचे देव कैंचे भक्त । अवतार चरित्र तें कैचें ॥**

**जेथ नाहीं मी तूंपण ।** [कं. सु. नि. घा. 'तेथ'.] **जेथ नाहीं कर्म क्रिया कारण ।**
**समूळ लौकिक नाहीं जाण । लोकसंरक्षण म्हणसी कैचें ॥ २३८ ॥**

**अवधारी गा रघुनाथा ।** [नि. घा. 'ब्रह्म अवतारींची'.] **तुम्हा अवताराची निजसत्ता ।**
**नये जीवांचिया हाता । जऱ्ही यथार्थता मुक्त जाला ॥ २३९ ॥** [या ओवीनंतर सु. नि. घा. या प्रतींत पुढील ओवी आली आहे :—'जया त्रिगुणे मेळें जीवपण । भ्रमें भुलोनि आपण । ब्रह्म म्हणती कैंचें कोण । तया उद्धरण तुझीयेनीं ॥']

**अवताराचें सामर्थ्य पूर्ण । प्रपंचु परमार्थी सावधान । उभयतां दिसों नेंदीं न्यून । तें निजचिन्ह अवधारीं ॥ २४० ॥**

अंतरेको बहिर्नाना अंतर्बोधो बहिर्जडः । अंतस्त्यागी बहिःसंगी लोके विहर राघव ॥ ५६ ॥

अंतर्नैराश्यमादाय बहिराशोन्मुखो हितः । वहिस्तप्तोंऽतराशीतो लोके विचर राघव ॥ ५७ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

[सु. प्रतीत हे पद नाही.] **अंतरीं आत्मा** [सु. नि. घा. 'अद्वेत'; तं. 'अंतरीं आत्मत्वें एक'.] **अद्वितीय एक । तेणें समूळ मिथ्या लोक ।** [सु. नि. घा. या प्रतींत 'बाह्यकर्म' ही पदे अधिक आहेत; कं. 'हे जाणोनी'.] **बाह्यकर्मे संपादी लौकिक । विधिपूर्वक वेदोक्त** [तु. प्रतीत ही ओवी नाही.] **॥ २४१ ॥**

**अंतरीं** [सु. नि. घा. 'केवळ शुद्धबुद्ध'. नि. घा. 'विषयबद्ध'; तु. 'विषयबाधु'; कं. 'विषयांध'.] **शुद्ध बोधु । बाह्य दिसे जैसा विषयांधु । जडत्वें भासे जैसा मुग्धु । दिसे शुद्ध विषयार्थी ॥ २४२ ॥**

**अंतरीं निःशेष विषयत्यागु । बाह्येंद्रियीं विषयभोगु ।**
**भोगितां दिसे जऱ्ही सांगु । तऱ्ही विषयांचें अंग आतळेना ॥ २४३ ॥**

**अंतरीं पूर्ण निराश । बाह्य** [पै. तं. तु. त. 'लुलुकरीं'.] **लोलुपत्वें करी आस । जेंवी मसकेमाजी आकाश । फुगल्या** [नि. घा. 'आभास'; सु. 'भास'.] **साभास अडकलें दिसें ॥**

**अंतरीं निरपेक्ष** [कं. नि. घा. 'निर्मळ'.] **निश्चल । बाह्य नाना अर्थी तळमळ ।**
**लाघवी लोक झकवी सकळ । तैसी कळवळ मुक्तासी ॥ २४५ ॥**

**अंतरीं काम क्रोध निमाले । शांतीचें कल्याण पाहलें । बाह्य क्रोधानळें खवळले । जेवी मृगजळीं मासे मारी ॥ २४६ ॥**

**बाह्य** [सु. नि. घा. 'कार्यकारणावेषा'.] **कार्याकारणें आवेशा ।** [तु. सु. नि. घा. 'गुरुगुरु करीं'.] **गुरुगुरी कां व्याघ्र जैसा । अंतरीं मृदुलोणी जैसा । कोण्हाहि सहसा** [तु. 'रुपेना'.] **खुपेना ॥** [२४७ ते २५७ या ११ ओव्या तु. प्रतीत नाहीत.]

अनुक्रमणिका

**बाह्य दिसे कार्यकर्ता । अंतरीं अकर्ता निजात्मता । मासी कुल्लाळ चक्रीं भंवता । दिसे परी तत्त्वतां हलेना ॥ २४८ ॥**

**प्रपंच आणि परमार्थीं ।** [कं. सु. नि. घा. 'उभयता'.] **उभयार्थी सावधस्थिती । हें अवतारांची अवतारशक्ति । हें तूं निजमूर्ति रघुनाथा ॥ २४९ ॥**

**ऐसिया** [सु. नि. घा. कं. 'ऐसि ऐ गां स्थितीवरी'.] **योगस्थितीवरी । तूंहि निजात्म चरित्रीं । स्वानंदें क्रीडे संसारीं । लोकाचारी अविकळत्वें ॥ २५० ॥**

**जेवीं बुद्धिबळीं वाडेंकोडें । मिथ्या राजा प्रधान हस्ती घोडे । हें जाणोनि खेळ खेळती पुढें । तेवीं मुक्ताकडें भव भावों ॥**

**सोकटियां जीवभाव नाहीं । तऱ्ही मारिले म्हणती पाही । तेवी मुक्त देहींच विदेही । भय नाहीं मरणाचें ॥ २५२ ॥**

**सोकटी निमालिया पाठीं । कोण धर्मात्मा चढे वैकुंठी । कोण पडिलें नरकसंकटीं । निजात्मदृष्टीं भय मिथ्या ॥ २५३ ॥**

**ऐसिये स्थितीवरी । तूंही सुखें संसारीं । स्वानंदें क्रीडा करीं । भय न धरीं श्रीरामा ॥ २५४ ॥**

**राजा प्रधान पशु प्यादे कटक । बुद्धिबळीं अवघे काष्ठ एक । तऱ्ही करिती खेळाचें कौतुक ।** [तं. खेरीज इतरत्र 'संसारिक'.] **तैसा संसार मुक्तासी ॥**

**ऐसिया** [सु. नि. घा. 'योगाची वृत्ती'; तं. 'ज्ञानाची वृत्ति'.] **गा चिद्वृत्ति । रघुनाथा रघुपति । त्वांहि सुखें संसाराप्रति । स्वानंदस्थितीं क्रीडावें ॥ २५६ ॥**
**यापरी अवतारप्रवृत्ति । राखोनि संसारस्थिती । अवतारचरित्र वेदोक्ती । स्वानंद स्थितीं क्रीडावें ॥ २५७ ॥**
[सु. नि. घा. या प्रतींत ही ओवी नाही.]

तस्माद्राज्यादिविषयान्पर्यालोच्य विनश्वरान् । देवकार्यादिसंभारांस्त्यज पुत्र सुखी भव ॥ ५८ ॥

**वोडंबरींचा** [तं. 'आभास फळ'.] **आंबा सफळ । रसु गोड परी मिथ्या मूळ । तेवीं मिथ्या लौकिक सकळ । जाणोनि अविकळ लोक संरक्षीं ॥**

**बहुरुपियाची रावो राणी । नसोनि करी संपादणी । तेवी तूं श्रीराम राजेपणीं । मर्यादारक्षणीं वेदोक्त ॥ २५९ ॥**

**तुवांहि निज अवतारवृत्ति । सुखें संसाराप्रति । धर्ममर्यादा पुराणोक्ति । स्वानंदस्थितीं क्रीडावें ॥ २६० ॥**

अनुक्रमणिका

**तोडी नवग्रहांची बेडी । सोडवी देवांची बांधवडी । उभवी रामराज्याची गुढी । आज्ञा धडफुडी तिहीं लोकीं ॥ २६१ ॥**

**सांडी समाधीची भ्रांति । धनुष्यबाण घेऊनि हातीं । रामनामाचिया ख्याती । त्रिजगती उद्धरीं ॥ २६२ ॥**

**ऐसें वसिष्ठ सांगतां । राम परमानंदीं तल्लीनता । त्याचिया प्रबोधाची कथा । होय सांगता वाल्मीक ॥ २६३ ॥**

वाल्मीकि रुवाच——

इत्युक्तोऽपि यदा रामः किंचिन्नोचे लयं गतः । तया सुषुम्नया सोऽपि प्रविष्टो हृदयं शनैः ॥ ५९ ॥
शक्तिप्राणमनः प्रशांतकरणो जीवः प्रकाशात्मको । नाडीरंध्रसुषुप्तसर्वकरणः प्रोन्मील्य नेत्रे शनैः ।
हृष्टोत्कृष्टवसिष्ठमुख्यविबुधो निर्मुक्तसर्वैषणः । कृत्याकृत्यविचारणादिरहितः सर्वान्प्रतीक्ष्य स्थितः ॥ ६० ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

**या परी श्रीरघुनाथ । वसिष्ठ स्वयें प्रबोधित । राम परमानंदीं लयगत । कार्यकार्यार्थ स्फुरेना ॥ २६४ ॥**

**ऐसें जाणोनियां पूर्ण । तेव्हां श्रीवसिष्ठें आपण । सुषुम्ना नाडीं प्रवेशोन । करी प्रबोधन श्रीरामा ॥ २६५ ॥**

**वसिष्ठ चैतन्यरूप आपण । तेणें चेतना चेतविली पूर्ण ।**
**चेतनें** [कं. व मु. ‘चेतविला’.] **चेतवितां प्राण ।** [मु. प्रतीत हे पद नाही.] **प्राणें सावधान हृदय करणें ॥ २६६ ॥**

**प्राण प्रवेशे सोळा** [त. ‘कळीं’.] **सवडी । तेणें चेतविल्या सर्व नाडी ।**
**तेणें नेत्रांची झांपडी । शनैः शनैः गाढी उघडिता झाला ॥ २६७ ॥**

[मु. ‘उन्मिलीत’.] **उत्फुल्लित दोन्ही नयन । श्रवण जाले शब्दायतन । शरीर जालें सावधान । परी जीवपण असेना ॥ २६८ ॥**
**श्रीरामाचां निजदेहीं । मुळींच जीवपण नाहीं । तो देहींच विदेही । चैतन्य** [घा. ‘चैतन्य निग्रही’.] **विग्रही श्रीरामु ॥ २६९ ॥**

**नातळतां जीव शिवपण । यापरी श्रीरघुनंदन । स्वयें जाला सावधान । वसिष्ठें पूर्ण प्रबोधिला ॥ २७० ॥**

**प्रबोधुनि रघुनंदन । वसिष्ठ** [मु. ‘उन्मिलित केले’.] **उत्फुल्लोचन । विश्वामित्रा आनंद** [पै. खेरीज इतरत्र ‘घन’; कं. ‘पूर्ण’.] **गहन । सुरगण** [कं. पै. ‘संतोषी’.] **संतोषले ॥ २७१ ॥**

**सुखावले ऋषीश्वर । आनंदले मुनीश्वर । अवघे करिती जयजयकार । श्रीरामचंद्र प्रबोधें ॥ २७२ ॥**

**नेदखे गुणदोषदर्शन । नेदखे विधिनिषेध लक्षण । नेदखोनि कर्माकर्मपण । श्रीरघुनंदन प्रबोधी ॥ २७३ ॥**

अनुक्रमणिका

**यापरी रघुनंदन । स्वयें जाला सावधान । तो बोलिला विधिविधान । तें** [नि. 'कथन'.] **सावधान अवधारा ॥ २७४ ॥**

> न विधिर्न निषेधश्च त्वत्प्रसादादहं पुनः । तथापि तव वाक्यं तु करणीयं हि सर्वदा ॥ ६१ ॥
> वेदागमपुराणेषु स्मृतिष्वपि महामुने । गुरुवाक्यं विधिः प्रोक्तो निषेधस्तद्विपर्ययः ॥ ६२ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]
> सर्वे शृणुत भद्रं वो निश्चयेन सुनिश्चितम् । आत्मज्ञानात्परं नास्ति गुरोरपि च तद्विदः ॥ ६३ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

**आइके वसिष्ठा महामुनि । तुझा वाक्यप्रताप करणीं । विधि निषेध हे दोन्ही । मी मनीं नयनीं न देखे ॥ २७५ ॥**

**आइके स्वामी मुनिनाथा । तुझिया गुरुवाक्य समर्थता । कर्म क्रिया कर्तव्यता । मज** [मु. 'सर्वथा'.] **तत्त्वतां उरली नाहीं ॥ २७६ ॥**

**कर्मकार्य कर्तव्यता । मज उरली नाहीं तत्त्वतां । तऱ्ही तुझें वाक्य गुरुनाथा । मज सर्वथा अनुल्लंघ्य ॥ २७७ ॥**

**तुझें वाक्य जैसें तैसें । जें बोलसी अनायसें । तें मज सर्व** [मु. 'सर्वथा आयासें'.] **सायासें । अति विश्वासें** [सु. नि. घा. कं. 'करणीय'.] **करणें होय ॥ २७८ ॥**

**सद्गुरूचें निजवचन ।** [मु. 'प्राणान्ति नुल्लंघी'; कं. 'प्राणान्तें'.] **प्राणांते अनुल्लंघ्य पूर्ण । हेंचि शिष्याचें निजलक्षण । जें परिपाळण गुरुवाक्यें ॥ २७९ ॥**

**वेदशास्त्र स्मृति पुराण । तेथील हेंचि मुख्य लक्षण । जें गुरुवाक्याचें परिपालन । हेंचि विधान** [सु. नि. घा. 'विधीयुक्त'.] **विध्युक्त ॥ २८० ॥**

**गुरुवाक्य-उल्लंघन । हेंचि महापाप दारुण । महापापा प्रायश्चित्त विधान । वज्र पाप पूर्ण गुरु** [मु. पाठ 'गुरुवाक्य अवज्ञा'.] **अवज्ञा ॥ २८१ ॥**

**गुरु अवज्ञा परिपाठी । महापातकें ज्याच्या अंगुष्टीं । ऐशिया पापांच्या उठती कोटी । वज्रपापांची** [तं. सु. नि. घा. 'कोटी'.] **खोटी गुरू अवज्ञा ॥**

**गुरु अवज्ञेची मातु । स्वधर्मकर्मा करी घातु । अंगीं रोकडा वाजे अनर्थु । नरकपातु** [सु. नि. घा. 'अनिवार'.] **अथावी ॥ २८३ ॥**

**सूक्ष्म साराचा सार गुण । सकळ निश्चयाचा निश्चयो पूर्ण । अवघे आइका सावधान । आत्मज्ञान महालाभु ॥ २८४ ॥**

अनुक्रमणिका

सकळ सिद्धांत-मर्यादा । मुख्य ज्ञान आत्मविद्या । येरी अवघियाहि अविद्या । ज्या प्रसिद्धा चवदाही ॥ २८५ ॥

आत्मज्ञानेंविण सकळा । चौदा विद्या चौसष्टी कळा ।
त्या दुःखरूपें अवघिया विकळा । सुखसोहळा आत्मज्ञानीं ॥ २८६ ॥

त्या आत्मज्ञानाचा निज ज्ञाता । त्या सद्‌गुरूहोउनि अधिक सत्ता [कं. पै. सु. नि. घा. 'अधिकता'; त. प्रतीत ही ओवी अशी आहे :— त्या आत्मज्ञानाचा निजदाता । नाहीं देव आणि देवता । तुज वाचुनि तत्त्वता । आणि वक्ता असेना ॥ १ ॥] ।
[सु. नि. घा. 'नाहीं अधिक दैवता'.] नाहीं देवा आणि देवतां । मुख्य गुणातीता तो वंद्य ॥ २८७ ॥

ब्रह्मा आणि हरिहर । तेहि सद्‌गुरूचे किंकर । सद्‌गुरू होवोनिया थोर । नाहीं सत्पात्र तिहीं लोकीं ॥ २८८ ॥

ऐसें बोलतां आपण । प्रेमें ओसंडला रघुनंदन । वसिष्ठाचे श्रीचरण । शिरीं संपूर्ण वंदिले ॥ २८९ ॥

श्रीरामें पादाभिवंदन । वसिष्ठें दिधलें आळिंगण । एका जनार्दना शरण । ब्रह्मसमाधान गुरुशिष्यां ॥ २९० ॥

आइकोनि रघुनाथाची [सु. नि. घा. 'गोष्टी'.] गोठी । चवदा भुवनेंसी वैकुंठीं । टाळी पिटिली उठाउठीं । गुरुमहिमा [सु. नि. घा. 'गोमटी'.] मोठी आइकोनि ॥

सुखी जाले सिद्ध सुरनर । सुखी जाले ऋषीश्वर । अवघे करिती जयजयकार । सुमनसंभार वरुषले ॥ २९२ ॥

दिव्य सुमनांचा सडा । [सु. नि. घा. 'तो विराजे'.] तेजें विराजे चहुकडां । तेणें श्रीराम शोभला गाढा । चिन्मात्र [कं. पै. खेरीज इतरत्र 'चौखडा'.] चोखडा साळंकृत ॥ २९३ ॥

[ओवी २८४ या श्लोकापर्यंतचा भाग तु. प्रतीत नाही.] वाल्मीकिरुवाच—
एतत्ते सर्वमाख्यातं रामचंद्रकथानकम् । अनेन क्रमयोगेन भारद्वाज सुखी भव ॥ ६४ ॥
इति रघुपतिसिद्धिः प्रोदिता या मया ते । वरमुनिवचनाच्चिद्रत्नमाला विचित्रा ॥ [मुद्रित प्रतीत हा श्लोक नाही.]
निखिलकविकुलानां योगिनां सेव्यरूपा । परमगुरुकटाक्षान्मुक्तिमार्गं ददाति ॥ ६५ ॥

वाल्मीक सांगे आपण । भरद्वाजा तूं सावधान । रघुनाथाचें आत्मज्ञान । [सु. घा. 'प्रबोधक्षण अवधारी'; कं. 'प्रबोध लक्षण अवधारीलें'.] प्रबोध लक्षण अवधारी ॥ २९४ ॥

जें जाहलें ज्ञानश्रवण । तयांचें धरुनि अनुसंधान । तुवांहि आपण्याआपण । सुखी संपूर्ण करावें ॥ २९५ ॥

अनुक्रमणिका

ऐसें सांगोनि भरद्वाजासी । वाल्मीक जाला संतोषी । तो वसिष्ठाच्या वचनासीं । अति उल्लासी [कं. व मु. 'स्तवित'.] स्तवितुसे ॥ २९६ ॥

धन्य वसिष्ठाची लीला । वंद्य सुरवरां सकळां । तेणें चिद्रत्नांची वचनमाळा । श्रीरामाच्या गळां बाणली ॥ २९७ ॥

तिचिया चिद्‌गंधासी । [मु. पाठ 'लोधोनिया'.] लोभोनिया अहर्निशीं । कविवर भ्रमर जाले तिसीं । [सु. नि. घा. 'रस आमोदासी सेविती'.] गुंजारवेसी रुणझुणिती ॥ २९८ ॥

तिचिया पावोनि योगासीं । योगी पावले योग्यतेसी । तेणें सुखावोनि अहर्निशीं । देहभावासीं विसरलें ॥ २९९ ॥

बापु गुरुवाक्य कटाक्षें । अलक्ष लक्षेवीण लक्षे । वसिष्ठें निजगुरुपक्षे । निजमोक्षें नांदवी ॥ ३०० ॥

श्रीराम वसिष्ठ काहाणी । हे मोक्षमार्गीची निशाणी ।
मोक्ष येवोनि [तं. 'निघे'] रिघे श्रवणीं । कथा सावधानीं [पै. सु. नि. घा. 'अवधारी'; त. कं. 'अवधारिता'.] आइकतां ॥ ३०१ ॥

य इदं श्रृणुयान्नित्यं गुह्यं रामवसिष्ठयोः । सर्वावस्थोऽपि श्रवणान्मुक्तिमार्गं निगच्छति ॥ ६६ ॥

वेदांत वार्तिक निज जीवन । उपनिषदांचें सार पूर्ण । ॐकार अर्धमात्रा लक्षण । तें हें गुह्यज्ञान वसिष्ठ ॥ ३०२ ॥

श्रीराम वसिष्ठ गुह्यज्ञान । याचें नित्य सावधान । जो सादेरें करी नित्य श्रवण । तो मुक्तत्वें पूर्ण सर्वावस्थीं ॥ ३०३ ॥

ज्यासीं सार्थक वासिष्ठ श्रवण । तो प्रपंचीं वर्ततां जाण । नभा ऐसा अलिप्त पूर्ण । त्यासी कर्मबंधन बाधिना ॥ ३०४ ॥ [तं. प्रतीत ही ओवी नाही.]
वासिष्ठश्रवणीं नित्य वस्ती । त्यासी जागृतीं स्पन्नसुषुप्तीं । सर्वदा वरी मुक्ति । हें गुरुत्वें ख्याती वसिष्ठाची ॥ ३०५ ॥ [तं. प्रतीत ही ओवी नाही.]

जागृतीं वासिष्ठाचें श्रवण । तेंचि स्वप्नीं [मुद्रित प्रतीत हे पद नाही.] मनीं मनन । तेचिं सुषुप्तीं समाधान । हें अगाध ज्ञान वसिष्ठांचें ॥ ३०६ ॥

वासिष्ठ ग्रंथ षट्सहस्त्री । त्यांतील श्लोक सत्याहत्तरी । एका जनार्दने त्यांवरी । [सु. नि. घा. 'ज्ञानार्थकारी'.] ज्ञानार्थे खरी टीका केली ॥ ३०७ ॥

[सु. घा. 'श्लोकाचा जो इत्यर्थ'.] श्लोकान्वयो सत्यार्थु । कर्ता जनार्दन समर्थु । तेथील जो [सु. घा. 'ज्ञानार्थ'; कं. 'अर्थु विषदार्थु'.] ग्रंथार्थु । [सु. नि. घा. 'अर्थ विषद् करीं'; तं. 'अर्थवी अर्थु'.] अर्थवी यथार्थु जनार्दन स्वामी ॥ ३०८ ॥

अनुक्रमणिका

[नि. घा. या प्रतींत ३०९ ओवीनंतर पुढीलप्रमाणे दोन ओव्या आल्या आहेत :—‘कथा ग्रंथार्थे अर्था आली । श्रीराम नामें पाल्हेजली । निज मोक्ष मार्गी ठेली जाली । ज्ञानकांडा केली समाप्ती ॥ १ ॥

पद्प्रमेय उथळ खोलीं । हें जनार्दन चालवी चाली । कवित्वाची सखोल बोली । बोलविता अविकळ जनार्दनु ॥ २ ॥’] **कथा ग्रंथार्थे अर्था आली । पद प्रमेयें उतळ खोलीं । हे जनार्दन चालवी चाली । कवित्वाची बोली बोलवितो ॥**

**एका जनार्दना शरण । वसिष्ठांचें ज्ञान निरोपण । त्याचिये कृपेस्तव जाण । जालें संपूर्ण परिपूर्णत्वें ॥ ३१० ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां श्रीरामवसिष्ठसंवादे ज्ञानगव्हरनिरुपणयोगोनां एकादशप्रसंगः ॥**

संपादित प्रत, श्लोक ६६, ओव्या ३१०, इतर प्रतींत श्लोक ओवी संख्या पुढीलप्रमाणे :—
नि. घा. २९. ३१३; इं. सु. ३०, ३०८; तं. ६२, ३०२; तु. पै. ६६, ३११; त. ६६, ३१३; कं. ६६, ३०८.

अनुक्रमणिका

## प्रसंग बारावा

## ताटिका निर्दलन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

[कं. प्रतीत 'चरितं रघुनाथस्य. . . . . . . . . .' हा श्लोक आहे.] हे रामायणी निजकथा । जैं सादरे आइके श्रोता । तैं पापपुण्या करी घाता । स्वभावता नित्यमुक्त ॥ १ ॥

कथाश्रवणें नित्यमुक्त । [तु. नि. 'हा ही नवलाख'.] हेंही नवल नव्हे येथ । [कं. त. खेरीज इतरत्र 'अक्षरीं अक्र अक्षरार्थ'.] अक्षराक्षरीं अक्षरार्थ । श्रीरघुनाथ-[कं. तं. 'कथार्थ'; तु. 'कथार्थी'.] कथार्थे ॥ २ ॥

पढतां रघुनाथचरित्र । श्रोते वक्ते नित्य पवित्र । धन्य धन्य [सु. नि. घा. त. भा. /१ 'एकती त्यांचें'; तु. 'ऐक त्यांचे'.] आइकतियांचें श्रोत्र । धन्य [भा. /१ तु. त. 'बगत्र'.] वक्त्र वदत्याचें ॥ ३ ॥

धन्य धन्य वाल्मीकमुनी । श्रीरामकथा वदली वाणी । कथा त्रैलोक्यपावनी । भवमोचनीं चरित्रार्थु ॥ ४ ॥

रामनाम दों अक्षरीं । कुंटिणी वंदिजे सुरवरीं । ऐसीं कथेचीं अगाध थोरी । [भा. /१ 'तेणें'.] ते कोणें वैखरी वाणावी ॥ ५ ॥

हे असो पूर्वकथा संबंधी । श्रीरामासी लागली समाधी । ते वसिष्ठ स्वयें उद्बोधी । ते कथा विधी अवधारा ॥ ६ ॥

श्रीराम जाला सावधान । प्रपंच [तु. सु. नि. घा. 'प्रपंचपरमार्थस्थिती] परमार्थी स्थिती समान । हें वसिष्ठाचें पूर्णपण । श्रीरामीं संपूर्ण [तं. 'बिंबला'; भा/१ तु. सु. नि. घा. 'बिंबले'.] प्रतिबिंबलें ॥ ७ ॥

सर्वेंद्रियी चित्तसमाधान । मिथ्या समाधि-व्युत्थान । कर्मक्रिया ब्रह्मपूर्ण । ऐसा सावधान श्रीरामु [मु. प्रतीत हे पद नाही.] जाला ॥ ८ ॥

देखोनि श्रीराम सावधान । विश्वामित्रा आनंद [भा. /१ 'घन'; तु. 'पूर्ण'.] गहन । सुखावोनि सुरगण । केली संपूर्ण पुष्पवृष्टी ॥ ९ ॥

[तु. सु. नि. घा. 'सुरी'] सुरदुंदुभी त्राहाटिल्या भेरी । निशाण त्राहाटिलें राजद्वारीं । गगन गर्जे जयजयकारीं । पूर्ण सुरनरीं आल्हादु ॥ १० ॥

विश्वामित्राचिया यज्ञार्थ । [नि. तु. 'स्वयें जाईल'.] शीघ्रगामी रघुनाथ । वसिष्ठें पाहोनि सुमुहूर्तु । आल्हादें दशरथ प्रयाण करवी ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

करूनिया पुण्याहवाचन । राजा [पै. 'स्वयें'.] सवें सैन्य दे संपूर्ण । तें वसिष्ठें निवारून । राम लक्ष्मण [नि. घा. तु. सु. 'करवी' हे पद अधिक.] रथारूढ ॥ १२ ॥

राजा म्हणे विश्वामित्राप्रती । म्यां आत्मा दिधला तुझ्या हातीं ।
यावरी तूं कृपामूर्ति । जाणसी त्या रीतीं संरक्षी ॥ १३ ॥

वसिष्ठ म्हणे विश्वामित्रासी । तुज गुरुत्व यावें सूर्यवंशीं । धनुर्विद्या सबीजेंसीं । श्रीरामासीं उपदेशी ॥ १४ ॥

आइकोनि वसिष्ठाचे वचन । विश्वामित्रें केले नमन । तूं अंतरात्मा आपण । मनोगत संपूर्ण जाणसी माझें ॥ १५ ॥

जाणोनि माझिया मनोगता । शिष्य करावें म्हणसी रघुनाथा । तुजहिपरता ज्ञाता । आणिक सर्वथा असेना ॥ १६ ॥

आपुलिया सच्छिष्यासी । [सु. नि. घा. 'कोणी न द्यावे उपदेशासी'.] कोण्हा नेदवे परोपदेशीं ।
हें वसिष्ठा साजे तुजचिपाशी । इतरां ऋषींसी [तु. 'अभिमान'; सु. नि. घा. 'अति अभिमान'.] अत्यभिमानु ॥ १७ ॥

वसिष्ठ म्हणे विश्वामित्रासी । मी तूं पण नाहीं आम्हां तुम्हासी । यालागीं तूं श्रीरामासी । अवश्य होसी गुरुत्वें गुरु ॥

दोही मुनींच्या वचनार्था । आइकोनी आल्हादु रघुनाथा । [नि. तु. 'दोहीं मुनीचें निजऐक्यता'.] दोहीतें नमुनीं ऐक्यता । उल्हासें रथा आरुढला ॥ १९ ॥

जीवासवें जैसा प्राण । तैसा रामासवें लक्ष्मण । तेणेंही केलें रथारोहण । धनुष्य बाण तूणीरेंसी ॥ २० ॥

[नि. घा. 'श्रीराम'.] श्रीरामासी करितां प्रयाण । स्वयें दशरथ पाहे शकुन । दोघे द्विज प्रसन्नवदन । फळेंसी संपूर्ण भेटलें ॥ २१ ॥

पूर्ण [नि. घा. कं. 'पूर्ण कलशी'; सु. 'पूर्ण फळेसी'.] कलशेसी सालंकृता । पुढें भेटलिया पंच योषिता । दधिक्षीर नवनीत माथां । गोपवनिता भेटलिया ॥ २२ ॥

[तु. नि. घा. 'अपूर्व'.] अपूप अमृतफळ क्षीरधारी । दध्योदनेंसीं [तु. त. 'वाणें'.] वायन करीं । कडे ['कडे कुमरी हाती नोवरी'; तु. नि. घा. 'हाती कुमर कडे नोवरी'.] कुमरू हातीं नोवरी । पुढां एकी नारी भेटली ॥ २३ ॥

सव्यें जाताती वायस । अपसव्यें जाती [पै. त. 'चास'.] तास । सन्मुख भेटला राजहंस । मुक्ताफळांचा घोंस मुखीं धरूनि ॥ २४ ॥

दक्षिणें जाती मृग कृष्णवर्ण । वामांगगामी मृगी पूर्ण । भरद्वाजाचें वाम उड्डाण । नकुळही आपण वामांगी सरके ॥ २५ ॥

दशरथु जाता बोळवून । श्रीराम-शकुनाचें सुचिन्ह । [तु. नि. घा. 'ब्रह्मरूपी वसिष्ठ'; तं. सु. कै. 'ऋषी वसिष्ठजी'.] ऋषी वसिष्ठ आपण । मार्गीं व्याख्यान करूनी सांगे ॥ २६ ॥

प्रथम भेटल्या ब्राह्मण । ब्रह्म सृष्टीमाजीं जाण । तो विजयी होय संपूर्ण । सुरासुर गण वंदिती ॥ २७ ॥

पूर्ण कलश जैं भेटतीं । तै सदा पूर्णत्व मनोरथीं । दधिक्षीर भेंटलिया नवनीतीं । तैं पूर्ण प्राप्ती ऐश्वर्याची ॥ २८ ॥

सव्यें गेलिया वायस । तो सर्वत्र पावे यश । अपसव्य गेलीया [पै. 'चास'.] तास । शत्रु निःशेष नासती ॥ २९ ॥

मुक्तघोसेंसी सन्मुख । हंस भेटलिया देख । तो सर्वत्र पावे सुख । स्वप्नींही दुःख दिसेना ॥ ३० ॥

सव्यें गेलिया मृगगण । अलभ्य लाभ पावे पूर्ण । मृगींचे जैं [मु. प्रतीत हे पद नाही.] वामगमन । तैं [मु. 'ते'.] नववधु आपण माळ घाली ॥ ३१ ॥

नकुळ गेलिया वामभागी । तो विजयी होय रणरंगीं । शत्रु निर्दळी [मु. 'वेदी'; कं. 'सवेगीं'.] लागवेगी । यश त्रिजगीं न समाये ॥ ३२ ॥

डावा गेलिया भरद्वाज । तो जें [मु. प्रतीत हे पद नाही.] करी तें सिद्ध काज । वैरियासी लावुनि लाज । आनंदाचें [सु. 'भोज सवत्र नाचे'; नि. घा. तु. 'भोज नाचवीं'; पै. 'तक'; 'भोज सर्वदा नाचे'.] भोजे सदा नाचे ॥ ३३ ॥

ऐसी सांगतां शकुनगती । स्वयें संतोषला नृपती । विजयी होईल रघुपती । हा निश्चयो चित्तीं दृढ [मु. 'झाला'.] केला ॥ ३४ ॥

[कं. सु. नि. घा. 'दीडगाव'; भा. /१ 'दिढा गाव'; तु. 'दंडगाव'.] सार्ध योजन शरयूतीरीं । कामाश्रमाची अगाध थोरी । विश्वामित्रें तेथवरी । रथचमत्कारीं कुमरेंसी नेला ॥ ३५ ॥

कामाश्रमीं श्रीराम-वस्ती । तेणें सकळ काम सिद्धी जाती ।
हे विश्वामित्राची निजयुक्ती । कार्यसिद्धार्थी राहविला रामु ॥ ३६ ॥

श्रीराम आणि लक्ष्मण । निजतेजें विराजमान । करीं गोधांगुळी त्राण । धनुष्यबाण सन्नद्ध ॥ ३७ ॥

काकपक्ष शिखाधर । कवची खड्गी महावीर । बाळपणीं अति दुर्धर । जेंवी वैश्वानर तेजस्वी ॥ ३८ ॥

तयांचे देखोनि स्वरूप । विश्वामित्रा सुख अमूप । श्रीराम लावण्याचें दीप । चित्स्वरूप सुखकारी ॥ ३९ ॥

अनुक्रमणिका

ऋषि म्हणे रामाप्रती । येथ वसावें आजिची राती । राम म्हणे आज्ञा निश्चिती । सुखरूपें वस्ती करिते जाले ॥ ४० ॥

विश्वामित्राचें संगती । सुखशयनीं [त. 'कर्मिली'.] क्रमिली राती । उदया येता गभस्ती । ऋषि प्रबोधिती श्रीरामा ॥ ४१ ॥

वेगीं [क. तु. 'उठौनि'.] उठा दोघे जण । शीघ्र करा संध्यास्नान । शिरीं वंदुनि [सु. घा. 'गुरुचरण'.] गुरू-वचन । स्वानंदें नमन साष्टांगीं ॥ ४२ ॥ [नि. प्रतीत ही ओवी नाही.]

[मु. 'विधीयुक्त'.] विध्युक्त करूनि स्नान । संध्या गायत्री जपावर्तन । करूनि विश्वामित्रा नमन । स्वानंदें चरण वंदिले ॥ ४३ ॥

देखोनि श्रीरामविनीतता । उल्लास विश्वामित्राचिया चित्ता । आलिंगुनिया रघुनाथा । कृपेनें बोलता कृपाळु ॥ ४४ ॥

आइके बापा रघुनाथा । तुम्हासी सिद्धमंत्र देईन आतां । दोघीं चरणीं ठेविला माथा । सावधानता मंत्रार्थी ॥ ४५ ॥

दृढ बाणल्या मंत्रार्था । राक्षसभय नुपजे चित्ता । श्रमु बाधिना सर्वथा । [मु. 'तिन्ही'.] तिहीं अवस्था [पै. तं. तु. खेरीज इतरत्र 'सावधान'.] सावध ॥ ४६ ॥

या मंत्रार्थाचिये प्रौढी । रणांगणी राक्षस कोडी । मारितां न लागे अर्ध घडी । तो मंत्र निखडीं सांगेन ॥ ४७ ॥

क्षुधा तृषा निद्रा आलस्य । बाधूं न शके देहकारुष्य । ऐशिया मंत्राचें मंत्ररहस्य । तुज मी अवश्य सांगैन ॥ ४८ ॥

परम तपाचिये निखडीं । जे म्यां जोडिली सिध्दार्थजोडी । ते तुज देईन रोकडी । म्हणौनी आवडीं आळिंगी ॥ ४९ ॥

ऐसी कृपा देखोनि पूर्ण । दोघीं धरिले दृढचरण । सर्वभावें सावधान । सद्गुरूवचन ग्रहणार्थी ॥ ५० ॥

मंत्राक्षरें पडतां कानीं । सिद्ध परिपाकु अंतःकरणी । मंत्रशक्ति लागे चरणीं । [भा. /१ खेरीज इतरत्र 'मंत्र शिरोमणी'.] मंत्रां शिरोमणी श्रीराम ॥ ५१ ॥

श्रीराम मंत्रीं मंत्राक्षर । राम क्षराक्षरातीत पर । श्रीराम स्वयें ॐकार । मंत्रार्थ सार श्रीराम ॥ ५२ ॥ [सु. प्रतीत ही ओवी नाही.]
श्रीराम मंत्रांची निजशक्ती । श्रीराम मंत्रीं मंत्रमूर्ति । त्यासी मंत्रार्थ बाणला चित्तीं । हें नवल किती सांगावें ॥ ५३ ॥

अनुक्रमणिका

मंत्री मंत्रार्थ निजबीज । श्रीरामुचि स्वयें सहज । तो वंदुनि सद्‌गुरूचरणरज । शिष्यत्वाची वोज सेवकत्वें दावी ॥

सद्‌गुरूची [सु. नि. घा. 'निजसेवा'; तु. 'जे सेवा'.] नित्य सेवा । हेंचि [नि. घा. 'निजबिज'.] निजभाग्य सकळ [नि. घा. 'देवा'.] दैवा । तें कळलेंसें राघवा। [सु. घा. 'गुरू आज्ञा जीवा आइंकित केले'.] गुरूआज्ञा जीवा विक्रीत केलें ॥ ५५ ॥

दोघां मंत्रार्थ बाणला पूर्ण । विश्वामित्रा कळली खूण । दोघांची पाठी थापटून । सुखसंपन्न स्वयें जाला ॥ ५६ ॥

रघुनाथासी म्हणे आपण । येथुनी करावें प्रयाण । राम म्हणे आज्ञा प्रमाण । रथीं तिघेजण बैसले ॥ ५७ ॥

कथाकौतुकें मार्गानुक्रम । शरयूतीर मनोरम । पुढां भागीरथी संगम । उत्तमोत्तम देखिला ॥ ५८ ॥

मानस सरोवरीं जन्मली । यालागीं शरयूनाम पावलीं । अयोध्यानगरीं रूढ जाली । संगमा आली [सु. नि. घा. 'शरयु गंगेच्या'.] सुरगंगे ॥ ५९ ॥

देखोनि संगम दर्शन । साष्टांग केलें नमन । स्नान संध्या जप ध्यान । मंत्रावर्तन प्रयोगें ॥ ६० ॥

तये संगमसंगती । राम राहविला एकी रातीं । [सु. घा. 'प्रभात जालिया प्रस्तुती'.] प्रभातें परतीराप्रति । जाणें निश्चिती नेमिलें ॥ ६१ ॥

[सु. नि. घा. 'मग प्रातःकाळी उठोन'.] विमळ प्रातःकाळीं पूर्ण । नावेसीं रामलक्ष्मण । विश्वामित्रें बैसवुनि जाण । होऊनी आपण परतीरा गेला ॥ ६२ ॥

परतीरीचें विधान । केलें स्नानसंध्या जपध्यान । तीरीं वनाचें विपरीत भान । रघुनंदन स्वयें देखे ॥ ६३ ॥

उग्र पक्षांची चाऊटी । क्रूर श्वापदांची दाटी । दिवाभीतांची घुघुटी । शिवा भुंकत उठी [सु. घा. 'सूर्यासन्मुख'; नि. 'भयानक'.] सूर्योन्मुख ॥ ६४ ॥

भिंगी [क. पै. खेरीज इतरत्र 'भृंगी'.] झुंगीचे झुंकार । वनीं वाजती भयंकर । राम पुसे हे वन का घोर । ऋषि प्रत्युत्तर समूळ सांगे ॥ ६५ ॥

भयानक भासे वन । येथ आहे ताटिकाभवन । ते राक्षसी अतिदारूण । [सु. घा. 'प्राणीगणभयें सकंप'.] प्राणीगणभक्षक ॥ ६६ ॥

तिचेनि वन हें उद्वस । [सु. नि. ग. घा. खेरीज इतरत्र 'मालीव'.] मालव केशिक कारूष । हे [सु. नि. घा. 'क्षणार्धे'.] भक्ष्यार्थ देश केले ओस । अति दुर्धर्ष राक्षसी ॥ ६७ ॥

दशदिशा [सु. नि. घा. 'मार्ग रोधून'.] मार्गरोधन । ती भेणें वागों न शके जन । तेणें मार्गें आपण । सर्वथा गमन न करावें ॥ ६८ ॥

येथुनि अर्धयोजन । आहे ताटिकेचें भवन । ते मार्गीं करील प्राण-हरण । सर्वथा गमन न करावें ॥ ६९ ॥

श्रीराम म्हणे हे ऐसी कैची । कोठुनी आली कोणाची । एव्हढी शक्ती ते [नि. घा. 'तिला कैंची'; सु. 'कशाची'; तं. 'काईची'.] काशाची । ऋषी तिची कथा सांगे ॥ ७० ॥

सुकेतु यक्ष अति पावन । त्यासी नव्हतें संतान । तेणें करूनि अनुष्ठान । ब्रह्मा प्रसन्न स्वयें केला ॥ ७१ ॥

तो मागे पुत्रसंतान । ब्रह्मेनि दिधलें कन्यारत्न । अल्पवीर्य कन्या जाण । कार्य कोण प्रजेचें ॥ ७२ ॥ [नि. घा. या प्रतींत या ओवीचा उत्तरार्ध असा आहे :— 'अनल्पवीर्य कन्या जाण । कार्यकारण प्रवृत्तीचें ॥'; तु. 'आकळ वीर्य कन्यादानीं । कार्यकारण प्रवृत्तीचें ॥ १ ॥']

तुज नव्हे पुत्रसंतती । सहस्रनागबळशक्ति । कन्या होईल निश्चिती । ब्रह्मा वरदोक्ति वदोनि गेला ॥ ७३ ॥

ते हे ताटिका कन्यारत्न । सुंदोपसुंद बंधु दोघे जण । त्यांतु ज्येष्ठ सुंदेसी केलें लग्न । अति शोभन समारंभीं ॥ ७४ ॥

सुंदापासुनि गर्भसंभव । मरीचि आणि सुबाहु । ताटिकेचां पोटीं दोघे भाऊ । जन्मोद्भवु पावले ॥ ७५ ॥

या उभय बालकांची । जाळी लागली पितीयांचे मूळीं । पितियाचे बुद्धि तिये काळीं । [सु. नि. घा. 'मरणन्मेळी'.] मरणोन्मुळीं बळावली ॥ ७६ ॥

सुंदोपसुंद महावीर । परम योद्धे अति दुर्धर । तिहीं पराभवुनि सुरवर । त्यांचे अधिकार [नि. घा. 'स्वयें घेतलें'; सु. 'स्वयें नेलें'; भा/१. 'स्वये केलें'; तु. 'घेतले'.] स्ववश केले ॥ ७७ ॥

त्यांचा करावया वधु । विधाता रची विचित्र [सु. नि. घा. 'बोधु'.] बाधु । तिलोत्तमा सुंदर वधू । दोघे बंधु देखती ॥ ७८ ॥

ते देखतांचि सुंदर । दोघे उठिले सत्वर । तिचां वरणीं अतितत्पर । तत्कामीं दुर्धर सकाम ॥ ७९ ॥

कनिष्ठ म्हणे जेष्ठासी । भावजयी तूं मानीं इयेसी । येरू म्हणे [सु. नि. घा. 'जेष्ठ पत्नी ऐसीं'.] जेष्ठासी पत्नी इयेसी । निश्चयेसी तूं मानीं ॥ ८० ॥

[भा/१. 'कनिष्ट बंधुचें'; तु. 'ऐके कनिष्ठाचे'.] कनिष्ठाचें लळे । जेष्ठें पाळावे सोहळे । भावजयी मानी इये वेल्हाळे । कृपामेळें कृपाळुवा ॥ ८१ ॥

जेष्ठ आज्ञेची थोरी । कनिष्ठे मानावी शिरीं । हे जेष्ठाची पत्नी घरी । निजनिर्धारी मानावी ॥ ८२ ॥

अनुक्रमणिका

कनिष्ठें कामिली जे कांता । ते भावजयी [त. सु. घा. 'मानी'; भा. /१ 'मानावी'.] भावी दुहिता । जेष्ठपत्नी ते तुज माता । तुवां तत्वतां मानावी ॥ ८३ ॥ [तु. प्रतीत ही ओवी नाही.]

ऐसे करितां वेवादा । दोघै दुर्धर चढलें क्रोधा । परस्परें घेवुनि गदा । निर्वाणयुद्धा [भा. /१ सु. नि. घा. 'प्रवर्तले'.] पेटले ॥ ८४ ॥

दोघे जण महावीर । दोघे योद्धे अतिदुर्धर । दोघैं गदाविंदाणी चतुर । येरा येर नाटोपे ॥ ८५ ॥ [मुद्रित प्रतीत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :— 'दोघे युद्धी अति दुर्धर । दोघे गदाविंदाणी प्रति चतुर । अति मांडिला निकुर । येर येरा नाटोपती' ॥ १ ॥]

कनिष्ठ [तु. खेरीज इतरत्र 'कनिष्ठे कळा लाघवात'.] कळालाघवी बहुतु । [पै. तं. भा. /१ त. कं. 'उलटे'.] तेणें जेष्ठाचा केला [कं. पै. तं. 'अन्तु'.] घातु । पडतां [भा. /१ 'गदेचा हातु'; तु. सु. नि. घा. 'गदा क्षोभे हाणतु'.] गदाक्षेपा आंतु । कनिष्ठाचा घातु जेष्ठें केला ॥ ८६ ॥

बंधुबंधूचां घायीं । दोघे जण पडलें ठायीं । हे स्त्रीकामाची नवाई । दृष्टिक्षेपें पाही देहान्तु दोघां ॥ ८७ ॥

नाहीं [सु. नि. घा. 'स्त्रीशी कामें एकांतु'; तु. कं. 'स्त्रीकामना एकांतु'.] स्त्रीकामु एकांतु । नाहीं स्त्रियेसी केली मातु । नाही स्त्रियेसी लाविला हातु । [मुद्रित 'परी'.] तऱ्ही [सु. नि. घा. 'अपघातु'.] आत्मघातु [त. खेरीज इतरत्र 'स्त्री दृष्टी'.] स्त्रीलोभें ॥

एवं स्त्रियांसी न व्हावी भेटी । स्त्रियांसी न करावी गोष्टी । स्त्रियांसी पाहतां दृष्टी । उठाउठी [भा. /१ सु. नि. घा. 'आत्मघातु'.] अवघातु ॥ ८९ ॥

सखे [कं. भा. /१ पै. 'आत्मबंधु'.] आत्मबंधु दोन्ही । तिहीं स्त्री देखतां नयनी । निजघाते निमाले रणीं । स्त्रीदर्शनीं अपघातु ॥ ९० ॥ [तं. प्रतीत ही ओवी नाही.]

स्त्रीदर्शनीं देहघातु । स्त्रीदर्शनीं नरकावर्तु । एवं स्त्रियांचा [मु. 'संगत'.] सांगातु । अति अनर्थु पुरुषासी ॥ ९१ ॥

कथा कथनीं सुंदोपसुंदु । हा कथेसी लागला संबंधु । म्हणौनि केला अनुवादु । श्रोतीं [मु. 'जल्पानुवाद'.] जल्पवादु न म्हणावा ॥ ९२ ॥

स्त्रीसंगापासी अति अनर्थु । हा बोलिलों परमार्थु । पुढिले कथेचा कथार्थु । सादर वृत्तांतु परिसावा ॥ ९३ ॥

मरीची सुबाहु [सु. नि. घा. या प्रतींत हे पद नाही; भा. /१ पै. तु. त. कं. 'शत्रुसुत'.] शक्रारिसुतु । त्यासी इंद्र मारूं टपतु । [सु. नि. घा. 'तद्भये'; भा. /१ 'बळभये'.] बाळभयें भयचकितु । ताटका तदर्थ वना आली ॥ ९४ ॥

[मु. 'मग बोले रघुनंदन'.] राम म्हणे तये क्षणीं आपण । तीसी कां आलें राक्षसपण । तेही विषयीचें निरोपण । ऋषि संपूर्ण सांगतु ॥ ९५ ॥

अगस्तीच्या आश्रमापासीं । ताटका [मु. 'वसे'.] वनीं वनवासी । घेवूनिया दोघां पुत्रांसी । ते प्रदेशी विचरत ॥ ९६ ॥

अनुक्रमणिका

ते नानायुत-निजशक्ति । त्या बळाची अंगी मस्ती । तेणें बळें ते दुर्मति । अगस्तिप्रति छळूं गेली ॥ ९७ ॥

पुत्रासमवेत आपण । विक्राळ करूनिया वदन । अगस्तीसी छळिता जाण । तेणें दारूण शाप दिधला ॥ ९८ ॥

विक्राळ करूनि वदनासी । जे तुज मज छळूं येसी । ते तूं सपुत्र राक्षसी । [नि. घा. 'विक्राळ देहासी विकंट होसी'; तं. 'विक्राळ वेशी विटक'.] विक्राळ होसी विटंक ॥ ९९ ॥

ते हे अगस्तीशापदग्ध । राक्षसी अति विरुद्ध । [मु. 'प्राणी गणां'.] नाना प्राणियां करीत बाध । [मु. 'मार्ग निरोध'.] मार्गावरोध करीतुसे ॥ १०० ॥

जे मार्गीं असे ते राक्षसी । ते मार्गी [सु. नि. घा. खेरीज इतरत्र 'जावो नये'.] जातां नये आम्हासी ।
ऐसे आइकता ऋषिवाक्यासी । हांसें श्रीरामासी [मु. 'पैं'.] स्वयें आले ॥ १०१ ॥

स्त्रीव्यक्ति ताटकेभेण । जै करावें पलायन । तैं तुमच्या यागीं संरक्षण । केंवी आपण [मु. 'करावे'.] करवेल ॥ १०२ ॥

आज्ञा देईल स्वामीनाथा । राक्षसी मी वधीन आतां । ऐसें विश्वामित्रें आइकतां । उल्हासें तत्त्वतां [नि. 'आलिंगी'.] नाचतु ॥ १०३ ॥

तुझा पाहावया पुरुषार्थ । म्यां सूचिला मार्ग भयार्थ । तंव तूं निधडा रघुनाथ । निर्भयार्थ निजयोद्धा ॥ १०४ ॥

इसी मारावे रघुनाथा । स्त्री मारूं नये [मु. 'शास्त्रार्थ'.] शास्त्रता । दुष्टमर्दनीं हे वाक्य वृथा । इसी सर्वथा मारावे ॥ १०५ ॥

स्वामी करूं नये गुरुअवज्ञा । हे सकळ शास्त्र प्रतिज्ञा । वसिष्ठ दशरथांची [भा. /१ पै. तं. त. कं. 'संज्ञा'.] आज्ञा । तुझी अवज्ञा न करावी ॥ १०६ ॥

सकळ शास्त्रार्थ आपण । गुरुचरणा येती शरण । [तु. नि. 'गुरूचे अपार महिमान'.] गुरुआज्ञा परम प्रमाण । अन्यथा कोण करूं शके ॥ १०७ ॥

ऐसे बोलुनि रघुनंदन । नमुनि सद्‌गुरूचे चरण । चाप सज्जुनी संपूर्ण । साटोपें ठाण मांडिलें ॥ १०८ ॥

ते काळीं श्रीरामस्वरूप । पाहतां काळांसी सुटे कंप । वीर्यधैर्याचा साटोप । परम प्रताप युद्धाचा ॥ १०९ ॥

करितां धनुषी टणत्कार । दुमदुमिले मेरूमंदार । खळबळिले सप्तसागर । पाताळीं विखार [तु. नि. 'खळबळिले'; सु. घा. 'पळताती'; कं. 'वचकले'.] वोसपले ॥ ११० ॥

अनुक्रमणिका

[घा. 'धनुष्य नांदे कांपे सृष्टी'.] धनुष्यनादाचिया कोटी । न्याहो उठिला वैकुंठीं । ध्यानीं दचकला धुर्जटी । हडबड मोठी सुरनरां ॥ १११ ॥

नांदे कोंदलें अंबर । दिशा जालिया नादाकार । तेणें ताटिकेचें जिव्हार । कांपे थरथर सनादें ॥ ११२ ॥

तेणें ते गजबजिली उठी । दोघे कुमार देखे दिठीं । गिळावया आवाळी चाटी । सक्रोध उठीं साटोपें ॥ ११३ ॥

[कं. सु. नि. घा. त. 'विकट'.] विटंक देखोनिया हांक । विक्राळ पसरुनिया मुख । धांविन्नली श्रीरामा सन्मुख । येरू तो निशंक तद्वधार्थी ॥ ११४ ॥

श्रीराम म्हणे लक्ष्मणा । पाहें राक्षसी भ्यासूर पूर्णा । देखतां प्राणी सांडिती प्राणा । ईसमोर [सु. नि. घा. 'कोणा न रहावे'.] कोण थिरावे ॥ ११५ ॥

आतां [मु. प्रतीत 'माझें' हे पद अधिक आहे.] पाहे विंदाण । हस्तलाघव अनुसंधान । एकें घायें घेईन प्राण । म्हणौनि बाण सोडिला ॥ ११६ ॥

कानाडी ओढितां आपण । आकर्षिला ताटिकेचा प्राण । हृदयीं आदळला बाण । जिव्हारीं पूर्ण भेदला ॥ ११७ ॥

बाणाचा सबळ मेळीं । ताटिका देवुनि आरोळी । नेटें आदळली भूतळीं । न्याहो पाताळीं उठिला ॥ ११८ ॥

ताटकेचेनि शरीर भारे । दुमदुमिली गिरिकंदरें । डळमळिली मेरूशिखरें । भयें वनचरें । [सु. नि. घा. 'मुर्च्छागत'; भा. /१ 'मुर्च्छित'.] चकित मूर्च्छा ॥ ११९ ॥

तळीं पाषाण जाले रांगोळी । वृक्ष उपडिले समूळीं । पक्षी भ्रमले अंतराळीं । बैसली टाळी दिग्गजां ॥ १२० ॥

ताटकापातें भूकंप होत । समुद्रजळ उचंबळत । नरनारी हाहाभूत । असुर कांपत [मु. 'थराथरा'.] थरकांपीं ॥ १२१ ॥

तिचें छेदिलें त्रिविधताप । छेदिले संकल्प-विकल्प । छेदुनिया पुण्यपाप । निर्विकल्प मारिली ॥ १२२ ॥

छेदिला देहेंसी अभिमान । जीवपणेंसी जीवबंधन । समूळ छेदुनि मीपण । ताटका संपूर्ण मारिली ॥ १२३ ॥

ताटका पडतांचि सृष्टीं । देवाचिया कोट्यानुकोटी । विमानें दाटलीं दाटीं । पुष्पवृष्टी तिहीं केली ॥ १२४ ॥

निशाण त्राहाटिलें सुरवरीं । शंख दुंदुभि मृदांग भेरी । गगन गर्जे जयजयकारीं । कीर्ति सुरवरीं [तु. खेरीज इतरत्र, 'वानिजे'.] वर्णिजे ॥ १२५ ॥

अनुक्रमणिका

योगी छेदिती निजकल्पना । तेणें सुख होय जीवा मना । ताटका निर्दळितांची जाणा । सुख त्रिभुवना श्रीरामें ॥ १२६ ॥

भक्त निर्दळीं आशंका । तेणें तो पावे निजात्मसुखा । तेवीं वधितांचि ताटका । सकळ लोकां आल्हादु ॥ १२७ ॥

विश्वामित्राचे निजगुण । अमरेंद्र वानीं आपण । तुझेनि धर्में जाण । दुष्टनिर्दळण श्रीरामें ॥ १२८ ॥

ताटका वधिली तत्काळीं । कौशिकुनाचे आनंदमेळीं । श्रीरामातें जीवें ओवाळी । पिटिली टाळी ऋषिवृन्दें ॥ १२९ ॥

इंद्र सांगे विश्वामित्रासी । अस्त्रविद्या द्यावी श्रीरामासी । हा साह्य होईल [मु. प्रतीत हे पद नाही.] सुरकार्यासी । तुमच्या यागासी सिद्धयर्थ ॥

श्रीरामासारिखें पात्र । यासी सांगावें सच्छास्त्र । विद्या सांगावी [मु. 'सबिज मंत्र'.] समंत्र । तूं विश्वामित्रा गुरुवर्या ॥ १३१ ॥

आइकोनि [सु. नि. घा. तु. त. कं. 'देवाचे'.] देवेंद्र वचन । विश्वामित्रें संतोषोन । श्रीरामा दे आळिंगण । करी निंबलोण सर्वस्वें ॥ १३२ ॥

तो म्हणे ताटकावधें येथ । सुरवरां सुख अपरिमित । मार्गस्थां मार्ग निर्मुक्त । हा प्रताप समर्थ श्रीरामें ॥ १३३ ॥

हें रघुनाथाचें प्रथम चरित्र । लोकत्रयीं अति विख्यात । पुढारीं कथा परमाद्भुत । श्रोतां [नि. घा. 'सावचित्त'.] सुचित परिसावी ॥ १३४ ॥

जे कथेचेनि अवधानें । जन्ममरणाचें उठी धरणें । विषयांचें खत फाडणें । गुढी उभवणें वैकुंठीं ॥ १३५ ॥
वैकुंठीचे मुक्तवासी । तेहि येती रामकथेपासी । कथेची महिमा ऐसी । कथा सर्वांसी प्रियंकर ॥ १३६ ॥
एका जनार्दना शरण । जाले ताटकानिर्दाळण । पुढां धनुर्विद्याअस्त्रग्रहण । यज्ञरक्षण ऋषीचें ॥ १३७ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां ताटकानिदर्लनं नाम द्वादशप्रसंगः ॥

संपादित प्रत श्लोक नाही. ओव्या १३७. इतर प्रतींत ही संख्या अशी : कं. श्लोक १, ओव्या १३७; प. १३८; तु. भा. /१ घा. १३७; नि. इं. सु. त. तं. १३६.

अनुक्रमणिका

## प्रसंग तेरावा

## सुबाहु निर्दलन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

विश्वामित्र उवाच—

[वाल्मीकिरामायण, बालकांड, सर्ग २६, श्लोक ३३.] इहाद्य रजनीं राम वसामः शुभदर्शन । [हा श्लोकार्थ तं. पै. भा. /१ कं. याच प्रतींत आहे.] श्वः प्रभाते गमिष्यामस्तदाश्रमपदं मम ॥ १ ॥
अयं सिद्धाश्रमो नाम त्वत्प्रसादाद्भविष्यति ॥

**विश्वामित्र म्हणे श्रीरामासी । सिद्धाश्रम नाम यासी । येथ राहावें आजिची निशीं । सिद्धाश्रमासी निजसिद्धी ॥ १ ॥**

**आम्ही तुम्ही केलीया वस्ती । या सिद्धाश्रमीची सिद्ध ख्याती । विस्तारेल त्रिजगतीं । ममाश्रमाप्रति प्रभाते गमन ॥**

**तेथ** [पै. तं. त. 'सुख'.] **सुखें निशा क्रमून । प्रभाते स्नानसंध्या** [पै. कं. खेरीज इतरत्र 'करून'.] **सारून । विश्वामित्र म्हणे आपण । अस्त्रग्रहण करीं रामा ॥ ३ ॥**

**वसिष्ठे आज्ञेचा निर्धारू । धनुर्विद्येसी तूं सद्‌गुरू । तदर्थी आल्हाद थोरू । श्रद्धा सादरू रघुनाथ ॥ ४ ॥**

**वंदुनि सद्‌गुरूचरण । कृतांजली रामलक्ष्मण । तयासी विश्वामित्र आपण । अस्त्रप्रदान प्रारंभी ॥ ५ ॥**

**तो म्हणे हें अस्त्राभिग्रहण । त्रिशुद्धी होवावें सावधान । सबीज मंत्राचें मंत्रधारण । प्रेरणावरण अस्त्रांचें ॥ ६ ॥**

**अस्त्र सोडिलें तत्काळ जाये । कार्य साधुनि हातासी** [सु. नि. घा. 'येथ'.] **ये । ऐसी बीजे निःसंदेहें । ऋषी सांगता हे सवर्म ॥ ७ ॥**

[या पुढील आलेली अस्त्रांची नावे सर्वच प्रतीत सारख्या अनुक्रमाने न येता ती मागेपुढे आली आहेत. अस्त्रांच्या नावांत किरकोळ स्वरूपाचे पाठभेद आलेले असले तरी अर्थभेदाच्या दृष्टीने ते विशेष महत्त्वाचे नसल्यामुळे ओवी ८ पासून १८ व्या ओवीपर्यत पाठभेद नमूद केले नाहीत.] **पन्नगास्त्र गरूडास्त्र । अग्न्यस्त्र पर्जन्यास्त्र । वायव्यास्त्र पर्वतास्त्र । वज्रास्त्र दुर्धरत्वें ॥ ८ ॥**

**गंधर्वास्त्र आदित्यास्त्र । सोमास्त्र हिमास्त्र । क्रौंचास्त्र नंदिकास्त्र । हयशिरास्त्र दारुण ॥ ९ ॥**

**वीरघ्नास्त्र विरोधास्त्र । दुर्मनास्त्र दर्पघ्नास्त्र । घोरास्त्र अघोरास्त्र । घोरघोरास्त्र अति तापी ॥ १० ॥**

**संतापास्त्र अतितापास्त्र । शोषणास्त्र घोषणास्त्र । दानवास्त्र मानवास्त्र । विद्याधरास्त्र मारक ॥ ११ ॥**

अनुक्रमणिका

वृकास्त्र जंबुकास्त्र । जंभकास्त्र जृंभकास्त्र । पिशाचकास्त्र पिपीलिकास्त्र । त्वष्ट्रास्त्र तडित्प्राय ॥ १२ ॥

कंकाळास्त्र कालिकास्त्र । सूचिकास्त्र विषूचिकास्त्र । चंडास्त्र प्रचंडास्त्र । वितंडास्त्र दाहक ॥ १३ ॥

संवर्तकास्त्र मुशलास्त्र । खंडनास्त्र दंडनास्त्र । शीतास्त्र वातास्त्र । वशिकास्त्र विध्वंसा ॥ १४ ॥

मायास्त्र मोहनास्त्र । पातनास्त्र घातनास्त्र । मातंगीदाहनास्त्र । ब्रह्मकपाळास्त्र रुधिराशी ॥ १५ ॥

भीमास्त्र भयानकास्त्र । भूभंगास्त्र भृंगास्त्र । क्रूरास्ये करालास्त्र । भैरवास्त्र उग्रत्वें ॥ १६ ॥

वरुणास्त्र दारुणास्त्र । काळरुद्रास्त्र रुद्रास्त्र । कार्तिकास्त्र कपाळास्त्र । वीरभद्रास्त्र विघाती ॥ १७ ॥

शंखवरास्त्र शंकरास्त्र । नारायणास्त्र नृसिंहास्त्र । वामनास्त्र मदनास्त्र । प्रद्युम्नास्त्र परिपाती ॥ १८ ॥

ईषीकास्त्र तृणशलाका । दाटुनि जिणौनि अस्त्रां अनेकां । पाशुपताची महिमा देखा । तिहीं लोकां अनिवार ॥ १९ ॥

ब्रह्मशिरोस्त्राचा मंत्र । प्रेरिलिया छेदी चराचर । याचा ऐसा [सु. नि. घा. 'असे'.] आहे विचार । यालागीं हें अस्त्र राखिजे जतन ॥ २० ॥

मांडिलियाही निर्वाण । या अस्त्राचें प्रेरण । सर्वथा न करिती [तु. नि. घा. 'विचाक्षण'.] सज्ञान । परम दारुण अनिवार्य ॥ २१ ॥

हें अस्त्र जों पाळूं जाणे । सकळां अस्त्रां सामर्थ येणें । यालागीं हें अस्त्र शहाणें । अति यत्नें पाळिती ॥ २२ ॥

जाहाली अस्त्रांची अवधी । आतां सांघैन [नि. घा. तु. कं. 'शस्त्रविधी'.] शस्त्रसिद्धी । जें स्मरतांचि त्रिशुद्धी [सु. नि. घा. 'युद्धसमयी'; भा. /१. 'युद्धसिद्धी'.] युद्धसंधीं स्वयें येती ॥ २३ ॥

वायोचक्र विष्णुचक्र । कूर्मचक्र नक्रचक्र । काळचक्र अति दुर्धर । कंदन करी अभिमाना ॥ २४ ॥

कौमोदकी शिवोदकी । दोन्ही गदा अलौकिकी । मोहममतेचा छेदकी । तिहीं लोकीं अति धाकु ॥ २५ ॥

शूळ त्रिशूळ महाशूळ पाहें । घायें खोंचती चाऱ्ही देहे । तया समोर कोण राहे । धांके कांपताहे कळिकाळु ॥ २६ ॥

दोन्ही खर्गे अत्यंत चोख । एक जीवाचा छेदक । दुजा कल्पनेचा घातक । यासी लोकालोक कांपती ॥ २७ ॥

अनुक्रमणिका

शिवशक्ति विष्णुशक्ति । अनादि [कं व मु. प्रतींत हे पद नाही.] आद्या आदिशक्ति । सदेह लिंगदेह छेदिती । यांचिया दीप्तीं पळे काळु ॥ २८

टणत्कारें ओढितां कानाडी । नादें निमती राक्षस कोडी । माया सकुटुंब प्राण सांडी । हे [सु. नि. घा. 'धनुर्विद्यागाठी'; भा. /१ 'धनुवडी'.] धनु निरवडी दृढ धरीं ॥ २९ ॥

निजतेजें [पै. तं. खेरीज इतरत्र 'तिखट'.] तीख सदा । अशेष आशेच्या करी छेदा । ते दिव्यबाण हे प्रबुद्धा । तुणिरबद्ध [सु. नि. घा. 'निर्बधु'; भा. /१ तु. त. 'निबंधु'.] निबद्ध ॥ ३० ॥

जालिया शस्त्रास्त्रविधी । [सु. नि. घा. खेरीज इतरत्र 'मालविद्या'.] मल्लविद्या विंदानसिद्धी । गुरुकृपा [भा. /१ सु. नि. घा. 'उपले'; नु. कं. 'उपदेश'.] उपदेशी त्रिशुद्धी । कृपानिधी सच्छिष्या ॥ ३१ ॥

आदेशितां विश्वामित्रें । धनुर्विद्या शस्त्रास्त्रें । ते विद्या श्रीरामचंद्रें । [नि. 'निमिष्यमात्रे निजबोधिली'; घा. कं. 'निगदमात्रें निजबोधिली'.] निगदमात्रें निजबोधु ॥ ३२ ॥

मंत्राचिया मंत्रशक्ति तत्त्वतां । आणि मंत्रमूर्ति समस्तां । स्वयें वंदिती रघुनाथा । आमुची सार्थकता तुझेनि ॥ ३३ ॥

आमुचा स्वभाव छेदकभूतीं । ते छेदकता तुझ्या हातीं । मरत्या [सु. नि. घा. 'मरत्या मारित्या अमृतप्राप्ती'; तु. 'मरता ऐकता अमृतप्राप्ती'; भा. /१ 'मरत्या ऐकत्या अमृत होती'; त. 'मरत्या आइकत्या अमृतप्राप्ति'; तं. 'मरता आईत्या अमृतप्राप्ती'; कं. 'स्मरत्या आइकत्या अमृतपानप्राप्ती'.] आइति अमृतप्राप्ती । ऋषि वंदिती पावनत्वें ॥ ३४ ॥

तूं अधर्मत्वां निर्दळीसी । स्वधर्मातें प्रतिपाळीसी । तेचि कीर्ति आम्हासी । तुझेनि हस्तेसी पावन ॥ ३५ ॥

तुवां आम्हासी धरितां हातीं । आम्ही पावन तुझिया ख्यातीं । तुझिया [कं. पै. त. खेरीज इतरत्र 'युद्धाची'.] आयुधांची कीर्ति । कवि वानिती पुराणीं ॥

आमुचें कर्म भूतघातीं । घातामाजीं तूं देसी मुक्ति । तेणें आमुची पावन कीर्ति । स्वयें वंदिती द्विजदेव ॥ ३७ ॥

ऐसे करूनि [भा. /१ 'स्तुतीस्तवना'; तं. 'स्तुतीवदना'.] स्तुतिवादना । लागलीं श्रीरामचरणा । करूनिया प्रदक्षिणा । रामहृदयीं जाणा प्रवेशलीं ॥ ३८ ॥

शस्त्रदेवता अहर्निशीं । जडोनि ठेल्या [मु. 'जोडोनि हात'; तु. 'कर जोडोनि'.] श्रीरामासी । घोकणी चिंतनीं न लगे त्यासी । [मु. प्रतीत 'प्राप्त' हे अधिक पद.] अनायासी सर्वज्ञा ॥ ३९ ॥

यालागी संग्रामासीं । जें जें [तं. खेरीज इतरत्र 'शस्त्र'.] अस्त्र पाहिजे ज्यासी । तें तें ये निजहातापासी । शत्रुघातासी स्वभावें ॥ ४० ॥

अनुक्रमणिका

शस्त्रां अस्त्रां श्रीरामशक्ति । रामहृदयीं शस्त्रांची वस्ती । ऐसिया [तु. 'अगम्य अभिन्न स्थिती'; भा. /१ 'अनन्य गति'; सु. नि. घा. 'अभिनवाजति'; पै. तं. त. कं. संपादित पाठ.] अनन्या अभिन्नागती । संग्रामस्थिति श्रीरामीं ॥

एवं श्रीराम सौमित्रा । उपदेशितां विश्वामित्रां । उल्हासु जाहला शस्त्रां अस्त्रां । निशाचरां वधावया ॥ ४२ ॥

ऋषीनें हातु ठेवितां माथां । विद्या बाणली रघुनाथा । तेणें उल्हासें तत्त्वतां । ऋषि स्वानंदा स्वयें नाचे ॥ ४३ ॥

विद्या बाणतां शिष्याचां पोटीं । गुरूसी आनंदाचिया कोटी ।
हे [तु. सु. नि. घा. 'शाब्दिक'.] शाब्दिका न कळे गोठी । बोधकसवटी [सु. नि. घा. 'अनुपम्य'; भा. /१ तु. 'अनुभव'; कं. 'अनुभवाचिया'.] अनुभवियासी ॥ ४४ ॥

शाब्दिकांचें शब्दज्ञान । तेंचि सोलीव अज्ञान । तेंचि साधकां निजबंधन । रघुनंदन तैसा नव्हे ॥ ४५

रघुनाथ [कं. भा. /१ मु. प्रतींत हे पद नाही.] सकळ विद्या [तु. 'अनुष्ठान'.] अधिष्ठान । हें विश्वामित्रा कळली खूण । तेणें आनंदें बोले आपण । येथुनी प्रयाण करावें ॥ [तं. प्रतीत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :— 'हे विश्वामित्रा कळली खूण । जे विद्या झाली संपूर्ण । तेणें आनंदें बोले आपण । येथोन प्रयाण करावें ॥']

आइकोनि श्रीगुरूचें वचन । रथारूढ रामलक्ष्मण । उल्हासें करितां गमन । पुढें शोभायमान वन देखे ॥ ४७ ॥

राम म्हणे ऋषिनिर्मळा । हे कोणाची शोभनशाळा । येरू म्हणे घननीळा । आश्रम सोज्वळा पैं माझा ॥ ४८ ॥

आश्रमा आले रघुपती । आनंदल्या ऋषिपंक्ति । विश्वामित्रें धर्मस्थिती । रामु अती प्रीतीं पूजिला ॥ ४९ ॥

आणुनि श्रीरामा सुभटा । पाचारूनि मुनिश्रेष्ठा । [सु. 'आदरें यज्ञप्रतिष्ठा'; नि. घा. 'आदरें अग्निप्रतिष्ठा'; तु. 'आदरिली'.] आदरिली यज्ञप्रतिष्ठा । धर्मनिष्ठा [मु. 'केली स्वधर्म'.] स्वधर्में ॥ ५० ॥

गर्ता वेदी कुंड मंडप । विध्युक्त तोरणें पताकारोप । [मु. 'यालागीं'.] यागीं मुख्य रघुनाथ यूप । जो निजस्वरूप यज्ञाचें ॥ ५१ ॥

अग्निप्रतिष्ठा पूजन । [पै. तं. त. कं. खेरीज इतरत्र 'परिसमोहन'.] परिसमूह्य परिस्तरण । प्रणितापात्रें करूनि पूर्ण । इध्या विसर्जन होमार्थ ॥ ५२ ॥

बर्हीचें आस्तरण । आज्यस्थाली संस्थापन । ज्वलनाज्यें आधारून । होम प्रधान मंत्रोक्त ॥ ५३ ॥

ॐकारवषट्कारीं करिती यज्ञ । ऋषीसीं पुसे रघुनंदन । राक्षसीं यज्ञ विध्वंसन । कोठून येऊन ते करिती ॥ ५४ ॥

अनुक्रमणिका

ऐसें पुसतां रघुनाथां । उल्हासु मुनिवरां समस्तां । कौशिकें [सु. नि. घा. 'आश्वासुनी'; भा. /१ 'तुकुनिया'; त. 'वाऊनिया'; तु. 'अग्नोनि'.] आघ्राणुनी माथा । राक्षसकथा स्वयें सांगे ॥ ५५ ॥

आरंभापासौनि [पै. तु. व कं. खेरीज इतरत्र 'साहावें'.] सा रातीं । अलक्ष लक्षें राक्षस येती । रिघोनियां यागाप्रति । विध्वांसिती [तु. सु. नि. घा. 'दुर्धर'; भा. /१ 'यरातें'.] दुर्धरत्वें ॥ ५६ ॥

जो निर्विकार निजनेटेसी । सा दिवस अहर्निशीं । सावध राहे [नि. 'निद्रेसी'; सु. घा. 'अग्निदेशी'.] अनिद्रेसी । राक्षस त्यासी वध्य होती ॥ ५७ ॥

ऐसें आइकितां गुरुवचन । श्रीराम नित्य सावधान । वेगें घेऊनि धनुष्यबाण । राहिला आपण यज्ञद्वारीं ॥ ५८ ॥

कर्मयागीं करितां विश्वामित्र । क्षात्रधर्म-यागीं श्रीरामचंद्र । दोहीं यागांचा विचार । श्रोतीं साचार परिसावा ॥ ५९ ॥

कर्मयागी कुंड साधन । क्षात्रयागीं रणांगण । कर्मयागीं वेदविधान । अपलायन क्षात्रयागीं ॥ ६० ॥

ऋषियागीं [पै. तं. तु. न. 'ब्रह्म'.] ब्रह्मा श्रेष्ठ । रणयागीं सत्त्व वरिष्ठ । [भा. /१ 'ऋषियागीं'; तं. सु. नि. घा. 'यज्ञयागीं'.] ये यागीं कर्म खटपट । तेथ खणखणाट शस्त्रांचा ॥ ६१ ॥

येथ स्रुक् स्रुवा परिमार्जन । तेथ [तु. नि. घा. 'धनुष्या'.] साहाणे लाविले बाण । बाणांचें परिस्तरण । परिसमहन धैर्याचें ॥ ६२ ॥

कर्मयागीं अग्निस्थापन । येथ काळानळ हुताशन । तेथ स्रुवेंनि होमिती अन्न । येथ मांसावदान बाणाग्रें ॥ ६३ ॥

ऋषियागीं [तं. 'वसोद्धार'; सु. नि. घा. 'वसोर्धारा'; कं. 'वर्धार'.] वसुधार । येथ [मु. 'प्रवाहो रूधिरा'.] प्रवाहें रुधिर । तेथ ॐकार वषट्कार । येथ हाहाकार वीरांचे ॥ ६४ ॥

कर्मयागीं ज्वाळा उद्भट । येथ शस्त्रांचा [कं. भा. /१ तु. सु. नि. घा. 'खणखणाट'.] लखलखाट । यागीं धूर निघे अचाट । तेथ स्वेदश्रमकष्ट वीरांचे ॥ ६५ ॥

यागीं वाढिल्या हुताशन । पृषदाज्यें अभिषेचन । राक्षस वाढिल्या दारुण । अस्त्रसिंचन तयांसी ॥ ६६ ॥

यागीं सदीप बलिदान । येथ जीवबळी [भा. /१ त. 'सहितज्ञान'; तं. 'सहित अज्ञान'; तु. 'सदिप्त ज्ञान'.] संदीप्त ज्ञान । बळी नेती सलोभहीन । येथही जीवपण देहलोभ्या ॥ ६७ ॥

श्रीरामेसी विमुख होऊन । जें युद्धीं करिती पलायन । तयांचें न तुटे देहबंधन । जीव बळी भक्षण अधःपातें ॥ ६८ ॥

अनुक्रमणिका

यागीं पूर्णाहूति नारीकेळें । येथ पूर्णाहुति सिसाळें । तेथ प्रदक्षिणा मंत्रमेळें । येथ रणकल्लोळें प्रदक्षिणा ॥ ६९ ॥

कर्मयागीं दक्षिणाधन । येथ दक्षिणा निजपद पूर्ण । तेथ अभिषेचति ब्राह्मण । येथ देवगण पुष्पवृष्टीं ॥ ७० ॥

यागीं श्रेय संपाद्य विश्वामित्रा । संग्राम श्रेय श्रीरामचंद्रा । श्रेयें उल्हासु स्वगोत्रा । येथ चराचर [तु. सु. नि. घा. 'उल्हासु'.] आल्हादु ॥ ७१ ॥

कर्मयागीं [मु. 'ब्राह्मणभोजन'.] ब्रह्मभोजन । रणयागीं भूतसंतर्पण । दोन्ही याग समसमान । सिद्धी संपूर्ण श्रीरामें ॥ ७२ ॥

यज्ञान्तीं अग्निविसर्जन । तैसें न करी रघुनंदन । पूर्ण द्यावया भोजन । [सु. घा. 'तृप्ती संपूर्ण'; भा. /१ हे पद नाही; पै. तं. त. सु. ग. कं. संपादित पाठ.] नवें निमंत्रण काळानळा ॥ ७३ ॥

ताटकावधें पात्रप्रोक्षण । चित्राहुति सुबाहु पूर्ण । त्रिशिरा आणि खरदूषण । प्रथम जाण प्राणाहुति ॥ ७४ ॥

कढीभात तो कुंभकर्ण । इंद्रजित पक्वान्नें पूर्ण । रावण तो दध्योदन । उत्तरापोषण रणत्याग ॥ ७५ ॥

प्रधान आणि राक्षसगण । हे भोजनीं शाक आणि [तं. 'वरलोण'; भा. /१ सु. नि. घा. तु. तं. 'शाखा आणि लवण'.] वरलवण । अखयादि पुत्र पूर्ण । ते लोणची जाण [सु. 'स्वानंदाची'; नि. घा. तु. 'सर्वस्वें'; पै. भा. /१ तं. त. कं. संपादित पाठ.] स्वादाची ॥ ७६ ॥

इतुकें जालिया संपूर्ण । काळानळा तृप्तभोजन । हें द्यावया रघुनंदन । सावधान युद्धार्थी ॥ ७७ ॥

विश्वामित्र यज्ञरक्षण । कथा सांडुनि रामायण । मध्येंचि केलें व्यर्थकथन । तें श्रोतां संपूर्ण क्षमा कीजे ॥ ७८ ॥

मी तंव संताचे लाळेवाड । माझ्या बोलांचे त्यासी कोड । यालागीं माझी बडबड । लागे गोड साधूंसीं ॥ ७९ ॥

साधूंचें मी तान्हें बाळक । अगुणपणें समूळ मूर्ख । रामकथा [सु. नि. घा. 'वदे ज्याचे'; भा. /१ तु. त. 'कैवदे त्याचे'; पै. तं. संपादित पाठ.] वदें मुख । हें कृपापीयूष साधूंचें ॥ ८० ॥

तंव संत म्हणती नवलावो । उभय याग अभिप्रावो । शुद्ध साधिला [नि. घा. 'आत्मानुभव'.] अन्वयो । अविरूद्ध भावो वेदोक्त ॥ ८१ ॥

श्रीरामीं प्रेम गहन । तें निरोपणीं कळलें चिन्ह । आतां चालवी रामायण । मूळ निरोपण ग्रंथार्थे ॥ ८२ ॥

अनुक्रमणिका

आइकोनी साधूंचा बोध । [नि. घा. ‘कवित्वा जाला परम आल्हाद’; तु. ‘कवित्वा जाला परमानंदु’.] परम जाला आल्हाद । एका जनार्दनीं बोध । कथा संबंध अवधारा ॥ ८३ ॥

विश्वामित्रयज्ञरक्षण । [नि. घा. तु. ‘करावया श्रीराम सावधानु’.] करिता श्रीराम संपूर्ण । रिघों न शके रक्षोगण । सुबाहु आपण स्वयें आला ॥ ८४ ॥

यज्ञद्वारीं रघुपती । राक्षसांची न चले गती । अंधारीं छळावया येती । तंव श्रीराममूर्ती सावध ॥ ८५ ॥

दिवसा [भा. /१ सु. नि. घा. ‘करावया’.] करावें छळण । तेथ श्रीराम सावधान । स्वयें सुबाहु भवें आपण । तऱ्ही रघुनंदन [कं. पै. तं. त. खेरीज इतरत्र ‘छळेना’.] छळवेना ॥ ८६ ॥

अंधाराचें निजतेज । स्वयें श्रीरामुची सहज । दिवसांचे निजबीज । दशरथात्मज निजांगें ॥ ८७ ॥

[सु. नि. घा. खेरीज इतरत्र ‘यज्ञरक्षण’.] यज्ञरक्षक रघुनाथु । न चले छळाचे छळमतु । हा बाळपणीं प्रतापवंतु । ठेला तटस्थ सुबाहु ॥ ८८ ॥

दावूं दुर्धरत्वें दरारा । तवं श्रीराम नेघे भेदरा । [नि. घा. ‘झापडे’.] संदिग्ध पडिलें निशाचरां । सर्वथा अध्वरां शिवो नेदी ॥ ८९ ॥

श्रीराम नित्य सावधान । सर्वांगें देखणा पूर्ण । सुबाहूचें तळमळी मन । ऋषीनें संपूर्ण गांजिलों ॥ ९० ॥

आतां संग्राम करूं दृढ । घेवों ताटिकेचा सूड । म्हणऊनी असुरीं पडिपाड । गगनीं गडाडु गर्जती ॥ ९१ ॥

वरूषती रुधिराचिया धारा । भयें भेडसाविती द्विजवरां । सांभाळीं म्हणे रघुवीरा । आला सामोरा सुबाहु ॥ ९२ ॥

हांसें आलें रघुवीरा । [भा. /१ सु. नि. घा. ‘सुबाहु’.] बाणीं त्रासिला तो पुरा । मरीची धांविन्नला कैवारा । तेणें रामचंद्रा हाकिले ॥ ९३ ॥

बाबरझोंटिया मस्तकु । घोर सनादें दिधली हाकू । विक्राळ पसरूनिया मुखु । श्रीरामासन्मुखु धावले ॥ ९४ ॥

आइकतां राक्षस आरोळी । भयें द्विज पडिले भूतळीं । एकांच्या बैसल्या दांतखिळी । एक ते चळी कांपती ॥ ९५ ॥

एकांचीं धोत्रें तळीं [मु. प्रतीत हे पद नाही.] गळती । एक ते धोत्रांत मुतती । एकां अधोवात सरती । एक करिती महाशब्द ॥ ९६ ॥

अनुक्रमणिका

एके आरडती ओरडती । एक दीर्घस्वरें रडती । एक चडफडिती [मु. प्रतीत हे पद नाही.] फडफडीती । एक [सु. नि. घा. तु. 'उघडे'.] डबडे पडिती धाकें ॥ ९७ ॥

[सु. नि. घा. या प्रतींत पहिले चरण 'एकांचे खुटखुटती दांत' असे आहे.] एकाचे [तु. 'घुरघुरिती'.] घुटघुटती कंठ । एकांचे फुटले ओंठ । एकांचें भयें फुगलें पोट । अति संकट ब्राह्मणा ॥ ९८ ॥

राम म्हणे लक्ष्मणासी । वेगीं नाभिकारू दे द्विजासीं । थोर होताती कासाविसी । मी राक्षसांसी निवटीन ॥ ९९ ॥

तंव समुदायें निशाचर । करित आले हाहाकार । दुर्मदें अति दुर्धर [मु. प्रतीत तृतीय चरण पुढीलप्रमाणे, 'त्रिकाळ दुर्मद अति दुर्धर'.] । भयंकर संग्रामीं ॥ १०० ॥

कात्या त्रिशुळें तोमर । गदा मुद्‍गर [सु. नि. घा. खेरीज इतरत्र 'चेंडुचक्र'.] चंडचक्र । बाण खड्‍गे लहुडी थोर । शस्त्रसंभार सुटलें ॥ १०१ ॥

शस्त्रांचा लखलखाट । खड्‍गांचा खणखणाट । बाण सुटती सणसणाट । घायें उद्भट हाणती ॥ १०२ ॥ [तं. प्रतीत ही ओवी नाही.]

राहें साहें वीर शूर । घायें निर्बळ [नि. घा. 'केले असुर'; तु. 'केले सुर'; तं. 'परतें न सरा'.] परते सर । पळो नको धरी धीर । क्रोधें वीर गर्जती ॥ १०३ ॥

श्रीरामें सोडिला बाण । सकळ शस्त्रें केली चूर्ण । वीर खोचले दारुण । बळ संपूर्ण रघुवीरा ॥ १०४ ॥

निवारावया रामबाण । शस्त्र सोडी तें होय चूर्ण । तिळप्राय केलें वोडण । सुबाहु पूर्ण क्षोभला ॥ १०५ ॥ [नि. घा. प्रतीतं पुढील ओवी यानंतर आली आहे :——'मग हातीं वसवोनी गदा । सुबाहू धांविन्नला मल्लयुद्धा । तंव श्रीराम नित्य सावधु । राक्षस द्वंद्वा तें कळलें ॥']

सुबाहूची गदा केली पीठ । मारिचीमुद्‍गल केला कूट । त्रिशूळ अति तिखट । ते करी सपाट श्रीराम ॥ १०६ ॥

बाणीं [पै. 'जोडिले'.] योजिलें अग्न्यस्त्रां । घायें सुबाहु केला पुरा । मरिची [तु. नि. घा. 'पळविला'.] पळतां माघारा । त्यासी पिसारा लागला ॥ १०७ ॥

पिसारा लागला ब्रह्मांडीं । तेणें त्यासी आली भवंडी । हातपाय वळले मुरकुंडी । सुटल्या तोंडी रुधिरधारा ॥ १०८ ॥

बाणपिसारियाचा पवन । तो मरिचीसी उडवी जेवी तृण । वाहाटुळीमाजीं भंवे पान । तेवी परिभ्रमण आकाशीं ॥

अनुक्रमणिका

बाणपिसारियाचा वारा । मरिची उडविला अंबरा । शतयोजन समुद्रतीरा । तेथें निशाचरा [सु. नि. घा. 'टाकिलें'.] पाडियलें ॥ ११० ॥

राम लक्ष्मणासी म्हणे आपण । मरिचीसी नाहीं लागला बाण ।
यालागीं त्याचा न वचे प्राण । पिसारेनि पूर्ण उडविला ॥ १११ ॥

मरिचीसी मूर्च्छा उद्भट । वाटारिले नेत्र वाट । घुरघुरींत वाजे कंठ । प्राणसंकट मांडलें ॥ ११२ ॥

मरिची दैवें जाला सावध । परी धाकु घेतला सुबद्ध । पिसाऱ्याचा येवढा बाध । मा सन्मुख [सु. नि. घा. 'युद्ध'; तं. 'वध'.] वेध कोण साहे ॥ ११३ ॥

राम देखतांचि जीवु जायें । याच्या निर्वाणिच्या घायें । देहवंत कोण साहे । महाभया भय श्रीरामु ॥ ११४ ॥

देखोनि श्रीरामाचे चरण । युद्धाभिमान गेला पळोन । संग्राम न करी आपण । वाउनि आण निजाश्रमीं अतिशांत

श्रीरामाचा निजबाण । सुबाहूचे निवटी मन । चित्त बुद्धि अभिमान । छेदूनि संपूर्ण मारिला ॥ ११६ ॥

येणें नेटें मारिला देख । जें मरणाचें नाठवे दुःख । पुढें [सु. नि. घा. 'जन्मांचें'.] मरणाचें नेदखे सुख । ऐसा निःशेष मारिला ॥ ११७ ॥

मरिची सुबाहूचे सेवक । राक्षस आले जे अनेक । रामें मारिलें एकएक । राक्षसान्तक श्रीराम ॥ ११८ ॥

रामु मरणाचा मारक । राम जन्माचा घातक । राम दुष्टाचा छेदक । अन्तका अन्तक श्रीरामु [तु. सु. नि. घा. या प्रतींत ही ओवी नाही.] ॥ ११९ ॥

राक्षसांचीं धेंडीं । आश्रमीं पडिलीं मढीं । शिष्य धाकिती बापुडीं । ये कोण काढी अतिदीर्घ ॥ १२० ॥

ते शिष्यांची सांकडी । न लगतां अर्धघडी । श्रीरामें फेडिली रोकडी । घेऊनि भूतकोडी । जगदंबा आली ॥ १२१ ॥

अवूट कोडी भूतावळी । सहित आली भद्रकाळी । आरती घेऊनी सोज्वळी । स्वयें ओवाळी श्रीरामा ॥ १२२ ॥

येतां भूतांचा मेळा । प्रेतें नेलीं देखतां डोळां । आश्रमीं [सु. नि. घा. 'आश्रम जाला अति सोज्वळा'; त. भा. /१ 'आश्रमी अति सोज्ञवळा'; तु. 'आश्रमी अतिरम्य सोहळा'.] अतिसोहळा । सडे रंगमाळा घातल्या [तु. 'भूत घालिती'; त. सु. नि. घा. 'भूतीं'.] भूमीं ॥ १२३ ॥

अनुक्रमणिका

ऋषी आले करूनि स्नान । आश्रमु दिसे शोभायमान । बाप प्रतापी रघुनंदन । स्वानंदें स्तवन ऋषी करिती ॥ १२४ ॥ [या ओवीपूर्वी तु. नि. घा. या प्रतींत पुढील ओवी आलेली आहे :–– 'ऋषी राक्षसमध्यें भयभीत । पडलें होते पै मूर्च्छित । ते लक्ष्मणें करूनीं सावचित्त । शीघ्र स्नानार्थ पाठविलें ॥'.]

विजयी जाला रघुवीर । सुखी जाले ऋषेश्वर । विष्णु पूजिती सुरवर । तैसा रामचंद्र पूजिला ॥ १२५ ॥

रामप्रताप देखोनि दिठीं । विश्वामित्रा आनंद कोटी । श्रीरामाची पाठी थापटी । [पै. भा. कं. खेरीज इतरत्र 'उल्लास'.] उल्हासें सृष्टीं न समाये ॥ १२६ ॥

गुरू आज्ञा तुवां पाळिली । गुरुसेवा तुजचि फळली । गुरुचिंता तुवांचि हरिली । गुरुपूजा केली यथार्थें ॥ १२७ ॥

तूं गुरुत्व सद्‍गुरूचें । तूं गुरूज्ञान निश्चयाचें । तूं निजबीज गुरुवाक्याचें । गुरुत्व साचें तुझेनि ॥ १२८ ॥

श्रीराम गुरुत्वाची गरिमा । श्रीराम गुरुत्वाची महिमा । श्रीराम [तु. नि. घा. 'गुरुत्वाची सीमा'.] गुरुत्वाचा निजात्मा । ब्रह्मत्व ब्रह्मा श्रीरामें ॥

श्रीराम गुरूचें निजवीर्य । श्रीराम गुरूचें निजधैर्य । श्रीराम गुरुत्वा गुरुवर्य । गुरुगांभीर्य श्रीरामु ॥ १३०

श्रीराम गुरुत्वाचें निजतेज । श्रीराम गुरुत्वाचें निजबीज । श्रीराम गुरूचें गुह्यगुज । स्वानंदभोज श्रीरामु ॥ १३१ ॥

श्रीराम गुरूची नित्य वित्पत्ति । श्रीराम गुरूची [सु. नि. घा. 'निजशांति'; तु. 'शक्ति'; भा. /१ तं. त. कं. 'निजशक्ति'.] नित्य शक्ति ।
श्रीराम गुरूची निजमूर्ति । श्रीराम निश्चिती गुरुगम्य ॥ १३२ ॥

श्रीराम गुरुत्वा निजप्रताप । श्रीराम गुरूचें सद्रूप । श्रीराम स्वयें ब्रह्मरूप । चित्स्वरूप श्रीरामु ॥ १३३ ॥

ऐसें श्रीरामाचें निजस्तवन । कौशिकें करूनि आपण । आनंदें दिधलें आलिंगण । समाधान गुरुशिष्यां ॥ १३४ ॥

विश्वामित्रा आनंद निर्भर । द्विजांदे [तं. 'गोसहस्र'; तु. 'गाईसहस्र'; त. 'गोसहस्री सहस्र'; सु. नि. घा. 'गोसहस्रासहस्र'; कं. 'गोसहस्रे सहस्र'.] गौसहस्त्र सहस्त्र । सुवर्णशृंगी रौप्यखूर । पृष्ठासी ताम्र कांस्य दोहीं ॥ १३५ ॥

गोपुच्छींचीं [भा. /१ 'गोपुच्छी प्रवाळें'; सु. नि. घा. 'गोपुच्छीचीं प्रवाळें'; तु. 'गोपृष्टीसी प्रवाळें'.] बाळबाळें । गोविलीं रत्नमुक्ताफळें । ऐसीं विश्वामित्रें गोकुळें । देवोनि द्विजकुळे सुखी केलीं ॥ १३६ ॥

सुवर्णाचे संभार । दक्षिणांचे सहस्त्र सहस्त्र । याचक केले निर्भर । मागतें अभर कौशिकयागीं ॥ १३७ ॥

अनुक्रमणिका

रामें [भा. /१ 'निरसिलें'; तु. 'निवारिलें'.] निवटिलें [तु. सु. नि. घा. 'राक्षसगण'; भा. /१ तु. 'यज्ञविघ्न'.] यज्ञघ्न । ऋषींचा सिद्धी पावला यज्ञ । जाहलें ब्राह्मणभोजन । रघुनंदन निजविजयी ॥ १३८ ॥

विजयी जाला रघुनाथ । पवाडा [तु. सु. नि. घा. 'केला'; पै. भा. /१ तं. त. कं. संपादित पाठ.] गेला त्रैलोक्यांत । आइकोनि रावण विस्मित । आनंद अद्भुत सुरवरांसी ॥ १३९ ॥

एका जनार्दना शरण । जाहलें सुबाहुनिर्दळण । सिद्धी पावला गुरूचा यज्ञ । अहिल्याउद्धरण अवधारा ॥ १४० ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां विश्वामित्रयागसमाप्तिर्नाम त्रयोदशप्रसंगः ॥

संपादित प्रत : श्लोक १, ओव्या १४०. इतर प्रतींत : त. १,१३८; तं. १,१३९; घा. १,१४१; नि. १,१४०.

अनुक्रमणिका

## प्रसंग चौदावा

## अहिल्योद्धारण

### ॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

[सर्वच हस्तलिखितांत प्रारंभीच्या तीन श्लोकांतील पहिल्या श्लोकाचा दुसरा, दुसऱ्या श्लोकाचे दोन चरण व तिसऱ्या श्लोकाचा प्रथम चरण मिळून चार चरणांचे दोन श्लोक देण्यात आले आहेत. वाल्मीकिरामायण बालकांड, सर्ग ३१, श्लोक ५, ६ व ७.] एवमुक्ते तयोर्वाक्ये सर्व एव महर्षयः । विश्वामित्रं पुरस्कृत्य राघवं वाक्यमब्रुवन् ॥ १ ॥
मैथिलस्य नरश्रेष्ठ जनकस्य भविष्यति ॥ यज्ञः परमधर्मिष्ठस्तत्र यास्यामहे वयम् ॥ २ ॥
त्वं चापि नरशार्दूल सहास्माभिर्गमिष्यसि ॥ अद्‌भुतं धनूरत्नं च तत्र त्वं द्रष्टुमर्हसि ॥ ३ ॥

**ऋषि** [मु. 'ऋषिसभें'.] **सभां प्रसन्नोन्मुख । बैसले वर्णिती रघुटिळक । तंव जनकाचे दोघे सेवक । पत्र** [सु. नि. घा. 'कुंकुमाकित'.] **कुंकुमांक घेऊनि आले ॥ १ ॥**

**विश्वामित्रें निजयागार्थ । ऋषि मेळविले समस्त । स्वामीनें तया समवेत । यावें यज्ञार्थ स्वयंवरा ॥ २ ॥**

**तंव** [पै. तं. त. तु. कं. खेरीज इतरत्र 'रामलक्ष्मणा लागोनी'.] **रामलक्ष्मण दोन्ही । कौशिक बोलावी** [पै. तं. त. तु. कं. खेरीज इतरत्र 'सन्मानोनि'.] **सन्मानीं । दोघीं साष्टांग नमूनी । कर जोडुनि बोलती ॥ ३ ॥**

**आम्ही तुझे नित्यांकित । निजसेवक निश्चित । सिद्धी पावला यज्ञार्थ । पुढील कार्यार्थ सांगावा ॥ ४ ॥**

**स्वामी जें तूं** [भा. /१ खेरीज इतरत्र 'आज्ञा देसी'.] **आज्ञापिसी । तें कार्य** [पै. भा. /१ तु. त. कं. खेरीज इतरत्र 'करूं'; तं. 'करूनि'.] **करीन क्षणार्धेसी । गुरुकृपेची महिमा ऐसी । सर्व कार्यासी निजसिद्धी ॥ ५ ॥**

**बाळपणीं धीर शूर । मारिले उद्भट निशाचर । परी गर्व न धरीच रघुवीर । तेणें विश्वामित्र सुखी जाला ॥ ६ ॥**

**वीर्य-धैर्येंसी ज्ञान प्रांजळें । ऐसाहि निगवा शिष्य मिळे । तेणें गुरुसी सुखसोहळे । त्या सुखा कांटाळे असेना ॥ ७ ॥**

[भा. /१ प्रतीत ८ व्या ओवीपासून ते १७ व्या ओवीपर्यतच्या ओव्या नाहीत. सातव्या ओवीनंतर :— ऋषि चालिले आश्रमीहूनीं । सवें रामलक्ष्मण दोन्ही ॥ आणि ऋषिसमुदाय मिळोनि । यागा लागोनी विदेहाच्या ॥ १ ॥ ऋषि आनंदें चालत । श्रीराम संगें नित्यतृप्त ॥ तंव पुढां आले पै जेथ । आश्रम उपहत गौतमाचा ॥ २ ॥ या दोन ओव्या देऊन १७ व्या ओवीपासून पुढचा कथाभाग आला आहे.] **ऐसा सुखावोनि विश्वामित्र । आळंगिले रामसौमित्र । सांगे आलें जनकाचें मूळपत्र । जाणें सत्वर मिथिलेसी ॥ ८ ॥**

**जनकु मिथिलेचा नृपवर । धनुर्याग सीतास्वयंवर । तेथ मिनले** [पै. तं. तु. त. कं. खेरीज इतरत्र 'सुरनर'.] **सुरासुर । तेणें ऋषेश्वर बोलाविले ॥ ९ ॥**

अनुक्रमणिका

देशोदेशींचे भूपाळ । मूळें पाठविलीं सकळ । दशरथासी धाडिलें मूळ । तो न येचि विव्हळ श्रीरामविरहें ॥ १० ॥

आम्ही ऋषिवर्य समस्त । अवश्य जाऊं गा तेथ । तुम्हीं यावें समवेत । आज्ञा समर्थ म्हणे रामु ॥ ११ ॥

गुरू आज्ञा परिपाळण । हें सकळभाग्या निजभूषण । सकळ कल्याणा कल्याण । गुरुवचन शिष्यांसीं ॥ १२ ॥

तुझेनि शिष्यत्वें माझी थोरी । [तं. कं. खेरीज इतरत्र 'तुवां'.] तां अवश्य यावें तेथवरीं सकळ राजसभे माझारीं । तूं मुख्य [सु. नि. घा. 'मुखरण'.] मुखरी होशील ॥ १३ ॥

ऐसें आइकोनि [मु. 'गुरुवचन'.] ऋषिवचन । सद्‌गुरुसमवेत आपण । रथारूढ रामलक्ष्मण । मिथिलाप्रयाण [पै. कं. 'महोत्सव'.] महोत्साहें ॥ १४ ॥

रथारूढ रामचंद्र । अवघे करिती जयजयकार । ऋषिसमवेत रघुवीर । अति सत्वर निघाला ॥ १५ ॥ [कं. प्रतीत ही ओवी नाही.]

मिथिले आरुते पंचयोजिनीं । मुनि राहिले कुशोपवनीं । बैसली ऋषींची [मु. 'श्रेणी'.] आस्थानीं । राम सुखासनीं उपविष्ट ॥ [या ओवीपूर्वी त. व भा. /१ या प्रतींत अधिक दोन ओव्या पुढीलप्रमाणे :— ऋषि चालिले आश्रमीहुनी । सवें रामलक्ष्मण दोन्ही ॥ आणि ऋषिसमुदाय मिळोनी । यागा लागूनी विदेहाच्या ॥ १ ॥
ऋषि आनंदें चालत । श्रीरामसंगें नित्यतृप्त ॥ तंव पुढां आले पै जेथ । आश्रम उपहत् गौतमाचा ॥ २ ॥]

ते उपवनीं एके कोनीं । श्रीराम आश्रम देखे नयनीं । वृक्ष खांकरले फळीं पानीं । आश्रमीं कोण्ही असेना ॥ १७ ॥ [मुद्रित प्रतीत या ओवीनंतर पुढील ओवी आलेली आहे :—– ऐसे देखोनी रघुनाथ । पुसे ऋषीस वृत्तान्त । म्हणे हे कां दिसे वन उपहत् । हा वृत्तान्त सांगा मज ॥]

तेथ वस्ती नाहीं मनुष्यांसी । पक्षी वाळिले वृक्षांसी । आश्रमीं नाहीं मुंगी मासी । उपहती ऐसी कां दिसे ॥ १८ ॥

ऐसें पुसतां श्रीरामासी । पूर्वकथा सांगे ऋषि । ये आश्रमीं अहिल्येंसी । आश्रमवासी गौतमु ॥ १९ ॥

इंद्रें छळिलें अहिल्येसी । गौतमें शापिलें दोहींसी । तैं पासुनिया आश्रमासीं । वस्ती कोण्हासी असेना ॥ २० ॥

राम पुसे अहिल्या ते कोण । इंद्रें छळावया काय कारण । हें समूळ मूळीचें कथन । कृपा करूनि पूर्ण सांगावें ॥ २१ ॥

आइकोनि श्रीरामाचें वचन । विश्वामित्र म्हणे आपण । अहिल्येचें उद्धरण । प्रसंगें पूर्ण [कं. व मु. पाठ 'ओढवलें'.] वोडवलें ॥ २२ ॥

त्रैलोकीचें बरवेपण । ब्रह्मेनि [पै. तं. त. खेरीज इतरत्र ‘एकवटुनी’.] एकवाटुनि आपण । [मु. ‘स्वयेंकन्या’.] स्वकन्या केली निर्माण । अहिल्या जाण तियेचें नांव ॥ २३ ॥

शरीर अत्यंत सुकुमार । खुपों शके चंद्रकर । पन्नग पद्‌मिणी ती पुढें निबर । निजांगें अरुवार नभापरिस ॥ २४ ॥

तिचें होतांचि स्पर्शन । [मु. ‘मन आदि इंद्रिया’.] मना इंद्रिया [तं. ‘गुंतल्या’; कं. व मु. पाठ ‘गुदगुल्या’.] गुतकुल्या पूर्ण । फिकें अमृताचें गोडपण । तिचें बरवेपण देखोनि ॥ २५ ॥

देखोनिया तिचिया मुखासी । अत्यंत सुख डोळियासी । ते मुखीं जाले क्षेत्रसंन्यासी । आन पहावयासी नावडे ॥ २६ ॥

अत्यंत सौंदर्याची शोभा । चंद्र लोपे अंगप्रभा । [तं. ‘देखतां चढे कामशोभा’; मु. पाठ ‘देखोनी लावण्याचा गाभा’; पै. , भा. /१, तं. तु. कं. संपादित पाठ.] देखे तो चढे कामक्षोभा । विवेकाचा उभा प्राण जाये ॥ २७ ॥

तिसी होतां डोळे भेटी । धैर्याची विरे गांठी । बरवेपणें अत्यंत लाठी । देखिल्या दृष्टी उपडेना ॥ २८ ॥

ऐसी अत्यंत सुंदर । [पै. संपादित पाठ; इतरत्र ‘दिवसें दिवस’.] दिवस दिवसें जाली थोर । कन्या देखोनि उपवर । वरविचार ब्रह्मयासी ॥ २९ ॥

इंद्र साक्षेपी करावया राणी । चंद्र साक्षेपी करावया पत्नी । सूर्य तिचां वरणीं । अनुदिनी उपार्जी ॥ ३० ॥

वरुण वायो यम कुबेरु । स्कंदादि सकळ सुखरू । अहिल्यावरणीं सर्व सादरू । [तु. ‘विनित तया ब्रह्मयासीं’; मु. ‘पडला विचार ब्रह्मयासीं’.] नित्य तत्परू ब्रह्मयासी ॥ ३१ ॥

विधाता करी विचार । अहिल्यावरणीं सर्व सादर । मी कोणाचा करू निर्धार । प्रकारान्तर उपवादित ॥ ३२ ॥

ब्रह्मेनि योजिलें विंदान । दों [कं. व मु. ‘दो प्रहरीं’.] पाहारां पृथ्वीप्रदक्षण । जो करुन येईल आपण । त्यासी कन्यादान अहिल्या ॥ ३३ ॥

आइकोनि ब्रह्मयाचें वचन । इंद्र ऐरावतें करी गमन । चंद्र मृगेंसीं निघे आपण । मेषारोहण निघे अग्नि ॥ ३४ ॥

यमु नियंता सकळ जगा । तोहि कामाच्या लगबगां । पालाणुनिया टोणगा । लागवेगा निघाला ॥ ३५ ॥

स्कंदें पालाणिला मयूर । कामें पालाणुनि मकर । एवं अवघेचि सुखर । निघाले तत्पर प्रदक्षणे ॥ ३६ ॥

अनुक्रमणिका

ऋषेश्वर [मु. 'धाकटे मोठे'.] धाटे मोटे । धांवती मेरूतळवटें । आम्ही आपुलिया तपोनिष्ठें । करु निजनेटें प्रदक्षणां ॥ ३७ ॥

गौतम करितां अनुष्ठान । गोप्रसूतकाळीं जाण । उभयतो मुखी देखोनि पूर्ण । त्रिवार प्रदक्षण तेणें केले ॥ ३८ ॥

उभयतोमुखीचें प्रदक्षण । पृथ्वीप्रदक्षणे समान । हें ब्रह्मेनि जाणोनि ज्ञान । करी कन्यादान गौतमा ॥ ३९ ॥

इंद्र आला प्रथम पहारा । अहिल्येसी गौतमु नोवरा । बोहलां देखोनि वधूवरां । अभ्यंतरां संतप्त ॥ ४० ॥

जे जे प्रदक्षणा करुनि येती । [सु. नि. घा. 'तें तेही श्वास टाकिती'; भा. /१ 'तें तें हिंसले हाती'; तु. 'ते ते हिंवसले राहती'; तं. 'ते ते हिंवासले गती'.] ते ते हिंवासले ठाती । गौतमासी अहिल्याप्राप्ती । कैशां रीतीं जाली पां ॥ ४१ ॥

इंद्र पुसे ब्रह्मयासी । अहिल्या देणें होतें गौतमासी । तरी कां छळिलें आम्हांसी । प्रदक्षणेसी धाडुनि ॥ ४२ ॥

ब्रह्मा बोलिला आपण । त्रिवार पृथ्वीप्रदक्षण । गौतमासी घडली पूर्ण । मग कन्यादान म्यां केलें ॥ ४३ ॥

[मु. प्रतीत 'इंद्र म्हणे' ही पदे अधिक आहेत.] आम्हा होऊनि गौतमासी । अधिक शक्ति चालावयासी । त्रिवार प्रदक्षणा घडली यासी । [मु. 'घडली कैसी नेणवे'; तं. 'कन्यादानासी दिधली'.] म्हणोनि त्यासी कन्या दिधली ॥ ४४ ॥ [या ओवीनंतर तु. प्रतीत पुढील ओवी आली आहे :––ऐसें अमरेंद्र बोलिले । चंद्रादिक प्रदक्षणा करो निघाले । गौतम अहिल्या देखती बोहले । तेणें क्षोभलीं सकळिक ॥]

ब्रह्मा म्हणे न करीं छळण । उभयतोमुखीचें प्रदक्षण । पृथ्वीप्रदक्षणेसमान । हें जाणोनि कन्यादान म्यां केलें ॥ ४५ ॥

वचन [सु. नि. घा. 'पाहिलें'.] पावलें वेदोक्तिं । परी अति संताप वाढला चित्तीं । म्हणे मी नाना छळणोक्ति । अहिल्या आपैती स्वयें करीन ॥

चंद्रें भोगिलें गुरुपत्नीसी । तेवीं मी भोगीन अहिल्येसी । यापरी इंद्रें निजमानसीं । निश्चयेंसी दृढ धरिलें ॥ ४७ ॥

ब्रह्मा सांगे गौतमासी । इंद्र अभिळाशी अहिल्येसी । तुम्ही तिसी अहर्निशी । अति यत्नेंसी राखावी ॥ ४८ ॥

गौतम तपें तेजोराशी । अहिल्या आणिली आश्रमासी । इंद्र कष्टता वर्षानुवर्षी । [मु. 'अहिल्या त्यासी'.] अहिल्येसी अप्राप्त ॥ ४९ ॥

पूर्ण खग्रासें सूर्यग्रहण । अहिल्येसहित गंगास्नान । करावया ये गौतम आपण । अति सावधान इंद्रार्थी ॥ ५० ॥

अनुक्रमणिका

जालें ग्रहणविधि विधान । अहिल्या करुनी [सु. नि. घा. 'मुक्तिस्नान'.] मुक्त स्नान । आश्रमासी आली आपण । द्विजभोजन पाकार्थ ॥ ५१ ॥

गौतम धर्मसंपन्न । करावया राहिला दानतर्पण । ते संधी साधूनी पूर्ण । इंद्र आपण संचरला ॥ ५२ ॥

गौतमाचिया स्वरूपस्थितीं । इंद्र आला अहिल्येप्रति । तिसी नेऊनि एकांतीं । सवेग रति स्वयें मागे ॥ ५३ ॥

ते म्हणे नवलगती । दिवसा केवीं मागां रती । आजी पर्वकाळ पितृतिथी । कामसर्वार्थी निषिद्ध ॥ ५४ ॥

भलतैसें पतिवचन । पाळी ते पतिव्रता संपूर्ण । [सु. नि. घा. 'पतिवचनालागीं'.] पतिवचना लावी दूषण । अधःपतन ते स्त्रियेसी ॥ ५५ ॥

पतीचिया वचनार्था । अनुसरावें सर्वात्मकता । हे मर्यादा वेदशास्त्रार्था । दोष सर्वथा देखों नये ॥ ५६ ॥

पतिवाक्या दोषदर्शन । देखे तिसी [नि. 'आकल्प अधःपतन'; भा. /१ 'अवश्य पतन'; तं. 'आलोट पतन'; तु. 'अकल्पपतन'; पै. तं. कं. 'आरूढ'.] अधःपतन । आतां तूं जालीसी सज्ञान । पतिवचन न [मु. 'न मानिसी'.] मनावयां ॥ ५७ ॥

माझें जें विरुद्धाचरण । तें आपुलेनि तपें मी आपण । तत्काळ करीन निर्दळण । येथ तुज कोण संदेह ॥ ५८ ॥

संकोचली स्वधर्मता । कांहीं न बोलवे सर्वथा । मग जाऊनि एकांता । रत्यर्था अनुसरली ॥ ५९ ॥

इंद्र अहिल्या सेजेवरी । तंव गौतम आला बाहेरीं । परपुरुषा [कं. व मु. पाठ 'रतली'.] रातली नारी । जाणोनियां द्वारीं गुप्तत्वें राहे ॥ ६० ॥

[सु. नि. घा. या प्रतींत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :——'अहल्या म्हणे एकांतवासी । घेवोनि भ्रताररूपासी । तूं कोण येथें आलासी । कपटें भोगिसी परदारा ॥'] अहिल्या म्हणे एकांतवासी । ना न [तं. 'म्हणावे'; तु. 'म्हणे'.] म्हणवे स्त्रियेसी ।
तूं महापापी कोण आहेसी । कपटें भोगिसी परदारा ॥ ६१ ॥

अहिल्यें इंद्र धरिला हातीं । घेउनि भ्रताररूपाची बुंथी । तूं कोण [मु. प्रतीत हे पद नाही.] पां पापमूर्ति । छळुनि रति मागीतली ॥ ६२ ॥

तो म्हणे मी अमरपती । येरी म्हणे पूर्ण जाली रति । आतां तूं जाय शीघ्रगतीं । दोहींची उपहती ऋषि करील ॥ ६३ ॥

मर मर पापिष्ठा चांडाळा । विटाळविलें दोहीं कुळा । पापमूर्ति अमंगळा । दुष्ट दुःशीळा नीघ वेगीं ॥ ६४ ॥
[कं. व मु. प्रतींत ओवी पुढीलप्रमाणे आहे :—— 'मर मर पापिष्ठा चांडाळा । नाहीं पापाचा कंटाळा । विटाळविलें दोहीं कुळा । दुष्टा दुःशीळा नीघ वेगीं ॥ १ ॥']

जळो तुझें महिमान । निंद्य कर्म काळें वदन । येथुनी शीघ्र करीं गमन । देखिल्या दहन ऋषि करील ॥ ६५ ॥

अनुक्रमणिका

**जो तूं देवांचा देवाधिपति । तो परदारा कामासक्तिं । अचूक गेलासी** [मु. 'अधोगति'.] **अधःपातीं । नीघ मागुती मुख न** [कं. व मु. 'दाखवी'.] **दावीं ॥ ६६ ॥**

**लाजा इंद्र निघे बाहेरीं । तंव गौतम** [मु. 'देखिला'.] **देखें द्वारीं । भयें कांपोनि जिव्हारी ।** [पै. 'इंद्रगुप्ताकारी'; त. 'इंद्रगोप्येंकरी'; कं. 'इंद्र गोपावरी'.] **इंद्रगोपाकारीं पळों** [तु. सु. नि. घा. 'पळोनि गेला'.] **गेला ॥ ६७ ॥**

**तंव गौतमें** [सु. नि. गं. घा. खेरीज इतरत्र 'खुंटली'.] **खुंटविली गती । जाऊं न शके निजशक्ति । अद्यापि इंद्रगोपाप्रति । शीघ्रगति असेना ॥ ६८ ॥**

**जेणें करिसी परदारारमण । ते झडती तुझे** [मु प्रतीत हे पद नाही.] **दोन्ही वृषण । परभगीं आसक्त मन । भगें संपूर्ण सर्वांगीं होती ॥ ६९ ॥**

**इंद्र शापिला यापरी । गौतमु पाहे भीतरीं । तंव अहिल्या वस्त्रें सांवरी । म्हणे दुराचारी रमलीस केवी ॥ ७० ॥**

> [मु. 'क्षणो'; इतरत्र संपादित पाठ.] अहो नास्ति रहो नास्ति नास्ति प्रार्थयिता नरः । तेन नारद नारीणां पातिव्रत्यं हि जायते ॥ ४ ॥

**स्मृति वेदान्त वेदोक्ति । परपुरुषें प्रार्थिल्या एकांतीं । धीर धरूं न शके सती । पतिरूपोक्तीं छळिलें मज ॥ ७१ ॥**

**तुमचिया स्वरूपस्थितीं । तेणें मज मागितली रति । मी रमलें तुम्हांप्रति । कपट निश्चितीं मी नेणें ॥ ७२ ॥**

**तुमचिया वचनार्था ॥ ना न म्हणवे तत्त्वतां । त्याचिया कपटाची वार्ता । मी सर्वथा जाणेंना ॥ ७३ ॥**

**स्वामीचिया वचना उल्लंघन । तेंचि मज अधःपतन । येणें भयें मी आपण । स्वधर्माचरण विचरलें ॥ ७४ ॥**

**इंद्र-अहिल्या एकांतवार्ता । गौतमें आइकिली गुप्तता । तेंचि सांगतुसें तत्त्वतां । तूं निजकामार्था रमलीसी ॥ ७५ ॥**

**संभोगी परपुरुषा जाणतां । जरी** [तं. खेरीज इतरत्र 'तूं उठतीस'.] **तुडवतीस हाणोनि लाथा ।**
**तरी मी मानितों पतिव्रता । तूं पूर्णकामतां कां रमलीसी ॥ ७६ ॥**

**ओळखोनि परपुरुषता । तूं बोललिसी भोग भोगितां । तुझी जाली पूर्णकामता । ऋषि न येतां तूं जायें ॥ ७७ ॥**

**जाणोनि परपुरुषाचें ज्ञान ।** [पै. 'भोगी'.] **भोगितां** [मु. 'कंटाळेना'.] **कांटाळेना तुझें मन । ते तूं होसी महापाषाण । शिळा जाण जडत्वें ॥ ७८ ॥**

अनुक्रमणिका

परपुरुषकामाचा सोहळा । ते तूं होसी महाशिळा । तुज कोण्ही नेदखे डोळा । भूतें विटाळा मानिती तुझा ॥ ७९ ॥

वृक्ष फुलां फळां न येती । छायेसी येथ नाहीं विश्रांति । आश्रमीं प्राणी न वसती । पापोपहती भोगिसी ॥ ८० ॥

[कं. व तं. या प्रतींखेरीज इतरत्र हे पद नाही.] तंव येरी बोलली आपण । पतिभ्रमें लागलें दूषण । स्वामीनें कृपा करावी पूर्ण । शापमोचन वदावें ॥ ८१ ॥

आइकोन तिचें दीनवचन । कृपेनें कळवळिला पूर्ण । म्हणे लागल्या श्रीरामचरण । तैं तूं जाण उद्धरसी ॥ ८२ ॥

[मु. 'तुज जम'; भा. /१ कं. तं. पै. 'जव'.] जंववरी भेटती रामचरण । तंववरी करावें रामस्मरण । रामनामापरते जाण । प्रायश्चित आन असेना ॥ ८३ ॥

रामनामाचिया आवृत्ती । जळती पातकांचिया पंक्ति । शिळारूपें तुझी लोपेल मति । तऱ्ही श्रीराम चित्तीं न विसंबे ॥

ऋषि पाठिमोरा जाला । तंव अहिल्या [तु. सु. नि. घा. 'जाली'.] आतळी शिळा । आश्रम पावला अवकळा । प्राणी तात्काळ पळाले ॥ ८५ ॥

कैसें शापाचें अतिबळ । मुंगी माशी सांडी स्थळ । पक्षी पळाले सकळ । श्वापदांचे मेळ सवेग गेले ॥ ८६ ॥

श्राप देवुनि [मु. 'कोप दृष्टीं'; कं. पै. 'सक्रोध दृष्टीं'.] क्रोधदृष्टीं । गौतमें सांडिली पर्णकुटी । सवेंचि अनुताप जाला पोटीं । म्हणे क्रोधें उठाउठी जिंकिलें मज ॥

अहिल्या इंद्र अति प्रीति । सुखभोग भोगितां एकांतीं ।
तेव्हां मज कां नुपजेचि शांती । [नि. 'स्त्रीकामासक्ति'.] स्त्रीकामानुवृत्ति नाडिलें क्रोधें ॥ ८८ ॥

रतिसंभोग एकांतवासी । इंद्र असतां अहिल्येसी । अनुद्वेगें त्यागुनी त्यासी । मी कां तपासी न वचेंचि ॥ ८९ ॥

सर्वांतरात्मा भोक्ता एक । ऐसा जाणता जो मी देख । त्या मज इंद्रसंभोगाचें दुःख । ज्ञानेंसी विवेक गिळिला क्रोधें ॥

माझी स्त्री माझें घर । हें कामक्रोधाचें मंदिर । येथें ठकले थोरथोर । मजहि साचार नाडिलें क्रोधें ॥ ९१ ॥

माझी स्त्री हा जो अभिमान । हें सकळ दुःखाचें भाजन । हेंचि क्रोधाचें जन्मस्थान । तेणें मी संपूर्ण नाडिलों ॥ ९२ ॥

अनुक्रमणिका

मज गौतमाचिया तपाची ख्याती । ऋषेश्वर श्रेष्ठ मानिती । तों मी स्त्रीलोभानुवृत्ति । क्रोधें निश्चिती नाडिलों ॥ [भा. /१ प्रतींत ही ओवी नाही.]

गौतम पावन त्रिजगतीं । ऐसी पुराणप्रसिद्ध वदती । तो मी स्त्रीलोभानुवृत्ति । विवेक संपत्ती नाडिलों क्रोधें ॥ ९४ ॥

म्यां गौतमें मध्यान्हकाळीं । नित्य पिकवुनिया साळी । ऋषि वांचविलें दुःकाळीं । तो मी तात्काळीं नाडिलों क्रोधें ॥

मुख्यत्वें स्त्रीकामापाशीं । क्रोध सदा मुसमुसीं । तेणें नाडिलें मज गौतमासी । म्यां कोणापासी सांगावें ॥ ९६ ॥

मातेवरील गालिप्रदान । भलता साहे करुनि हेळण । स्त्रीवरी शिवी देतां जाण । तात्काळ मरण श्रापें कां शस्त्रें ॥

बाप क्रोधाची निजख्याती । त्या दोघांची केली उपहती ।
मजहि नाडिलें ज्ञानविरक्तीं । क्रोध परमार्थी घातकु ॥ ९८ ॥

क्रोध केवळ महामांग । जिवें मारिलें वैराग्य । सकळ [भा. /१ 'योगां योगभंग'; तं. तु. त. पै. 'योगायोगभंग'; कं. 'योग्यायोग्यभंग'.] योगा होय भंग । क्रोध सर्वांग अपवित्र ॥ ९९ ॥

[पै. व मु. 'मातंग विटाळा'.] मातांग विटाळ जळें निवृत्ती । क्रोधाची चित्तामाजीं वस्ती ।
त्याचे क्षाळणीं न चले युक्ती । क्रोध सर्वार्थी घातकु ॥ १०० ॥

'का ते कांता कस्ते पुत्रः'। ऐसे म्यां वाचिलें वेदशास्त्र । ते वृथा गेलें पुराणपत्र । क्रोधें अपवित्र मज केलें ॥ १०१ ॥

कामासी जे वश होती । ते कांही तरी भोग भोगती । जे आतुडले क्रोधाहातीं । ते वृथा नागवती भोगमोक्षां ॥ १०२ ॥

क्रोधा ऐसा वैरी । बैसला असतां जिव्हारीं । जो तपाची मानी थोरी । तो चराचरीं अतिमूर्ख ॥ १०३ ॥

अपकारिणि कोपश्चेत्कोपे कोपः कथं न ते ॥ धर्मार्थकाममोक्षाणां प्रसह्य परिपंथिनि ॥ ५ ॥

अपकारियावरी कोप करिती । [मु. पाठ 'परी'.] ते कोपावरी कोप न करिती । क्रोध वाटपाडा निश्चितीं । चहूं पुरुषार्थां नागवी ॥

त्या क्रोधाचीं होये शांती । तैसी आचरेन तपस्थिती । ऐसा निश्चयो करूनि चित्तीं । ऋषि तपार्थी निघाला ॥ १०५ ॥

अनुक्रमणिका

एवमुक्त्वा महातेजा गौतमो दुष्टचारिणम् । इदमाश्रममुत्सृज्य सिद्धचारणसेविते ।
हिमवच्छिखरे रम्ये तपस्तेपे महातपाः[मु. प्रतीत हा श्लोकार्थ नाही.] ॥ ६ ॥ [वाल्मीकिरामायण, बालकांड, सर्ग ४, श्लोक ३४.]

**सिद्धचारण लोकांवरी । मेरु गिरीच्या पाठारीं । हिमाच्छळाच्या शिखरीं । तपांतें आचरी गौतमु ॥ १०६ ॥**

**गौतम बैसोनि निर्विकारी । अगाध निष्ठेनें आदरीं । कामक्रोधांची नुरे उरी । त्या तपाची थोरी थोरावी ॥ १०७ ॥**

**ब्रह्मशाप अतिदारुण । इंद्राचे झडले वृषण । भगें बिंबलीं संपूर्ण । तेंही लक्षण अवधारा ॥ १०८ ॥**

**परदारानिरीक्षण । भगांकित जाले नयन । परदारा मुखचुंबन । भगांकित वदन तेणें जालें ॥ १०९ ॥**

**परदारा आळिंगण । हृदयीं भगें बिंबलीं पूर्ण । बाहु भगांकित जाले जाण । अंगुलिया पूर्ण भगांकित ॥ ११० ॥**

**परदारा अधरपान । जिव्हा भगांकित जाली जाण । भृकुटिया खुणाविली खूण । त्या भृकुटिया संपूर्ण भगांकित ॥**

**परदारेप्रति गमन । भगांकित जाले चरण । तळवाहि आपण । भगें संपूर्ण बिंबलीं ॥ ११२ ॥**

**परदारेसी** [मु. 'कामगोष्टी'.] **गुह्यगोष्टी । भगांकित जाला दोहीं ओठीं ।** [कं. तं. 'भग पिटीलें'.] **भगें पडिलीं लल्हाटीं । भगें पाठी पुरविलीं ॥ ११३ ॥**

**इंद्र पावला उपहती । भगें सर्वांगीं स्त्रवती । निजकर्माची मानुनी खंती । अधोगती विलपतु ॥ ११४ ॥**

**परदाराकामसुख । पुरुषत्व गेलें निषेख । तुटलें इंद्रत्वाचें तुक । अधोमुखें विलपतु ॥ ११५ ॥**

**इंद्र सर्वांगीं भगांकित । तो पक्षियांमाजी राहिला गुप्त । पाहतां देवऋषि समस्त । तो अभिव्यक्त लक्षेना ॥ ११६ ॥**

**इंद्रे सांडिलें अमरमंडळ । मेघ जाले उच्छृंखल । पृथ्वी जाली मंदफळ । धर्म सकळ खुंटले ॥ ११७ ॥**

**यालागी साक्षेपें इंद्रासी । शोधिते जाले देवऋषि । बृहस्पति सांगे तयासी । गौतमापासी उःशाप मागा ॥ ११८ ॥**

**मग मिळोनि देवऋषि । अवघे आले गौतमापासीं । उद्धार करावा इंद्रासीं । समस्तीं त्यासी प्रार्थिलें ॥ ११९ ॥**

अनुक्रमणिका

गौतमें अनुतापें आपण । केलें क्रोधाचें निर्दाळण । [मु. 'देव'.] देवीं प्रार्थितां जाण । कृपेनें संपूर्ण कळवळिला ॥ १२० ॥

इंद्र पावला उपहती । त्याची पूर्विच्या [तं. 'सरिसी'.] परिस महंती । अतिशयें करीन वाढती । स्वयें वरदोक्ति वदता जाला ॥ १२१ ॥

इंद्र भगांकित जाला पूर्ण । तीं भगें होतील लोचन । तैं पासुनि सहस्त्रनयन । इंद्र अभिधान पावला ॥ १२२ ॥

इंद्र लपाला होता मयुरवेषें । उःशाप आइकतांचि डोळसें । सर्वांगीं उभारुनी पिसें । अति उल्लासें नाचतु ॥ १२३ ॥ [या ओवीनंतर 'नि. तु. घा.' या प्रतींत पुढील तीन ओव्या आल्या आहेत :——इंद्र म्हणे जयजयजी गौतमा । पुरुषांमाजी उत्तमोत्तमा । न कळे तुझा महिमा । अगाध महिमा पैं तुझा ॥ १ ॥
त्वां शाप नाहीं दिधला । माझा कर्मभोग म्यां भोगिला । जो दुराचारी तो सरता केला । हे महद्‌लीला पैं तुझी ॥ २ ॥
ऐसी इंद्रें केली स्तुती । तेथें देवही गौतमातें स्तविती । अलोकिक तुझी ख्याती । अपराधी निश्चिति त्वां उद्धरिला ॥ ३ ॥]

ते इंद्रपणाची खूण । मयूरीं आभासें संपूर्ण । तयासी नव्हते वृषण । मयुरीं स्त्रीरमण असेना ॥ १२४ ॥

मयोर आनंदें नृत्य करीं । वीर्य स्त्रवे नेत्राश्रुद्वारीं । ते [भा. /१ 'जेलुनि नेती'; तु. तं. 'जेलुनि घे'; सु. नि. घा. कं. पै. 'झेलोनि ने'.] झेलिते मयोरीं । तेणेंचि उदरीं गर्भ तिसी ॥ १२५ ॥

पूर्ण महत्त्व आलें इंद्रासी । परी ठाव नाहीं पुरुषत्वासीं । तेव्हां गजाचे वृषण देवुनि त्यासी । पुरुषार्थासीं पूर्ण केला ॥

गजदेहीं नाहीं वृषण । तेणें तो जाला वीर्यक्षीण । त्यासी दिधले [सु. नि. घा. 'इंद्रें ऋषण'.] इंद्रवृषण । तेणें मस्तकीं पूर्ण [तु. खेरीज इतरत्र 'वंदिलें'.] धारियेले ॥ १२७ ॥

यालागीं गजाच्या देहीं । अद्यापी लिंगीं वृषण नाहीं । ते [पै. भा. /१ तं. तु. सु. नि. घा. कं. 'भासती'.] शोभती मस्तकांच्या ठायीं । कुंभेभ पाही या लागीं म्हणती ॥

[कं. तं. भा. /१, तु. तं. पै. 'ऋतुकाळीं'.] रतिकाळीं आपण । लिंगापासीं येती वृषण । येऱ्हवी तें मस्तकीं जाण । कुंभेभ पूर्ण यापरी भासे ॥ १२९ ॥

गजाचिया वृषणस्थितीं । इंद्रासी जाली ऐश्वर्य प्राप्ती । यालागीं त्यासी ऐरावती । देवीं समस्तीं ठेविलें नाम ॥ १३० ॥

इंद्रापासी गजाचे वृषण । तेणें त्यासी बळ संपूर्ण । गजापासी इंद्रवृषण । शक्रसमान बळ त्यासी ॥ १३१ ॥

गजासी बळ शक्रसमान । शक्रें वाढविलें गजमहिमान । गजदळें दलशोभायमान । येऱ्हवीं तें जाण [भा. /१, 'रुढ मुंढें'; तं. 'रुढें मुंढें'; तु. 'रुंडमुंडे'; सु. नि. घा. 'रुढमुंढ'.] रुंडे मुंडे ॥ १३२ ॥

अनुक्रमणिका

[तु. सु. नि. घा. 'गजेंद्रासी'.] गजें इंद्रासी राज्यप्राप्ती । यालागीं गजान्तलक्ष्मी म्हणती । जो जाला गजपती । ते पूर्ण स्थिती लक्ष्मीची ॥ १३३ ॥

एवं ऋषिवाक्य कृपास्थिती । इंद्र पावला [सु. नि. घा. 'उपहती'.] उद्धरागती ।
त्यासी वाहुनी ऐरावतीं । नेला स्वर्गाप्रती जयजयकारें ॥ १३४ ॥

इंद्र अहिल्या [तं. त. 'व्याख्यान'.] आख्यान । ऋषीने सांगितलें संपूर्ण । [तं. प्रतीतच हे पद आहे.] आतां अहिल्येंचें पाषाणपण । करी उद्धरण श्रीरामा ॥ १३५ ॥

आयकोन सद्‌गुरुचें वचन । वेगें उठिले रघुनंदन । करावया अहिल्या उद्धरण । आश्रमीं आपण प्रवेशला ॥ १३६ ॥

हातीं धरुनि ऋषिवर्यासीं । आश्रमीं पाहे अहिल्येसी । ते लक्षेना सकळां ऋषि । पाहतां चौपासीं दिसेना ॥ १३७ ॥

आश्रमीं करितां परिभ्रमण । अवचटें लागला रामचरण । जालें अहिल्येचें उद्धरण । साष्टांगीं नमन त्या केलें ॥ १३८ ॥

मस्तकीं [तं. खेरीज इतरत्र 'मस्तकीं धरीले श्रीरामचरण'.] दृढ धरिले चरण । आनंदाश्रु चालिले पूर्ण । जालें श्रीरामचरणक्षाळण । प्रेम संपूर्ण अहिल्येसी ॥ १३९ ॥

म्हणे जयजयाजी श्रीरामचंद्रा । शीळा तारिली पादमुद्रा । तुझे चरण जगदुद्धारा । भवसागरा [नि. 'लागता'; सु. घा. 'सुख हेतु'; तु. 'तारकु'; तं. 'सुखें सेतु'.] सुखसेतु ॥ १४० ॥

तुझा लागतांचि चरण । शिळा उद्धरे हें नवल कोण । कर्माकर्माची बोळवण । प्रपंच तो पूर्ण परमार्थ होथे ॥ १४१ ॥

[मु. 'न होता'.] नव्हतां तुझी चरणभेटी । प्रपंचाची सबळ गोठी । तुझे चरण देखतां दृष्टीं । प्रपंच उठी परब्रह्मत्वें ॥ १४२ ॥

तुझा लागतां श्रीचरण । स्थूळ लिंग आणि कारण । महाकारणेंसीं जाण । होय परिपूर्ण परब्रह्म ॥ १४३ ॥

तुझें लागतांचि पाये । देह तें होय विदेह । संदेह होती निःसंदेह । जीव तो होय शिव साक्षी ॥ १४४ ॥

अगाध चरणाची ख्याती । वानितां मौनावल्या श्रुती । चरणां शरण चाऱ्ही मुक्ति । कथानुवृत्ति अनुवादें ॥ १४५ ॥

अनुवादतां रामकथा । कळिकाळ वोढवी माथा । तीर्थें [सु. नि. घा. 'वंदिती'.] मागती चरणतीर्था । कथा ऐकतां [भा. /१ सु. नि. घा. 'देव'; तु. 'देह'.] वेद निवती ॥ १४६ ॥

अनुक्रमणिका

आवडीं गातां रामायण । श्रीराम सुखावे आपण । वक्त्याचें [सु. नि. घा. 'निरसे'.] निवारी जन्ममरण । श्रोते संपूर्ण ब्रह्म होती ॥ १४७ ॥

ऐसी हे तुझी निजकथा । पावन करी लोकां समस्तां । असो कथा अनुवादवार्ता । नाम स्मरतां नित्य [मु. पाठ 'निजमुक्ति'.] मुक्ति ॥ १४८ ॥

नित्य स्मरतां रामनाम । सकळ पातकां करी भस्म । चहूं पुरुषार्थांचें काम । होय सुगम हरिनामें ॥ १४९ ॥

करितां रामनामस्मरण । जन्ममरणासी ये मरण । समूळ विरे मी तूं पण । भवबंधन बाधिना ॥ १५० ॥

बाधिना मायामोहन । बाधिना कर्मबंधन । बाधिना त्रिविध विंदान । [मु. 'रामस्मरण'.] नामस्मरण करितांचि ॥ १५१ ॥

दृश्य द्रष्टा दर्शन । ध्येय ध्याता ज्ञेय ज्ञान । करितां रामनामस्मरण । त्रिकुटीचें भान असेना ॥ १५२ ॥

असेना देहीं अहंभावो । असेना जीवीं जीवभावो । मीतूंपणा नाहीं ठावो । नाम निर्वाहो श्रीरामें ॥ १५३ ॥

रामनामाचे गदारोळें । स्मरत्या शरण रिघिजे काळें । भवभय समूळ पळे । सुख-सोहळे श्रीरामें ॥ १५४ ॥

श्रीरामनाम-गजरें । ब्रह्म स्वानंदें हुंबरे । जेवी धेनु [तु. 'वच्छस्मरें'; सु. नि. घा. 'वत्सानुसरें'; संपादित पाठ.] वच्छानुस्वरें । तेवी नामोच्चारें श्रीरामु ॥ १५५ ॥

श्रीराम हें नामाक्षर । क्षराक्षरातीत पर । नाम ब्रह्म परात्पर । राममंत्र शिवसेव्य ॥ १५६ ॥

नामापाशीं सद्य मुक्ति । पंडित बोलती पुराणोक्तीं । [भा. 'मी बोले ते माझी प्रतीती'; सु. नि. घा. 'मी बोलिलों ते माझी प्रतीती'; तं. 'मी बोलतें आत्मप्रतीती'.] मी बोलत्यें माझ्या प्रतीती । नाम निश्चिती तारक ॥ १५७ ॥

नामें भुक्ति नामें मुक्ति । नामापासीं ब्रह्मप्राप्ती । रामनाम जे जपती । वंद्य त्रिजगतीं ते धन्य ॥ १५८ ॥

रामनाम परम जप । रामनाम परम तप । नाम [कं. पै. तु. खेरीज इतरत्र 'निरसी'.] निवारी पुण्यपाप । नाम निर्विकल्प समाधि ॥ १५९ ॥

नामीं नाहीं अनध्यायो । नामीं सर्वदा स्वाध्यावो । नाम प्रत्यक्ष ब्रह्म पहा हो । अभाग्यां भावो उपजेना ॥ १६० ॥

नामीं नाहीं अध्ययन । नामीं नाहीं विधिविधान । नामीं नाहीं कर्मबंधन । नामें पावन महापापी ॥ १६१ ॥

> अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् । साधुरेवः स मन्तव्यः सम्यग्व्यवसितो हि सः[मु. प्रतीत हा श्लोक नाही.] ॥ ७ ॥ [श्रीमद्भगवद्गीता, अध्याय ९, श्लोक ३०.]

अनुक्रमणिका

जऱ्ही जाला दुराचारी । तो जैं भरे अनुतापभरी । [मु. पाठ 'रामनामें जपे जिव्हारीं'; तं. 'नाम स्मरे निजनिर्धारी'; तं. भा. /१ 'राम जपे निजनिर्धारीं'.] रामजपें निज जिव्हारीं । तो साधु संसारीं भगवद्वाक्यें ॥ १६२ ॥

श्रीरामकृपा निजदीप । अहिल्येचें गेलें अकल्पपाप । [तं. खेरीज इतरत्र 'तिचिया तपाचा प्रताप'.] हाचि श्रीरामप्रताप । पाप तें निष्पाप करुनी दावी ॥ १६३ ॥

इंद्र न करितां व्यभिचार । शाप नेदी ऋषेश्वर । तैं मी कैंचा पावतें रामचंद्र । माझें भाग्य थोर ऋषिश्रापें ॥ १६४ ॥

गौतमाचा निजशाप । तो मज जाला अमृतरूप । माझें जाऊनि पुण्यपाप । [तं. 'शमस्वरूप'; सु. नि. घा. 'शुद्ध स्वरूप'; तं. 'राम सद्रुप'.] रामस्वरूप पावलें ॥ १६५ ॥

इंद्रे नाहीं केला व्यभिचारु । केला माझा जन्मोद्धारु । गौतमशाप नव्हे तो वरु । तेणें रघुवीरु भेटविला ॥ १६६ ॥

गौतम माझा निजभ्रतारु । गौतम माझा निजसद्‌गुरु । गौतम माझा निजनिर्धारु । जेणें रघुवीरु भेटविला ॥ १६७ ॥

जगीं उदंड आहेती वीरु । छेदूं न शकती अहंकारु । परम योद्धा श्रीरामचंद्रु । मारिला सपरिवारु अहंभाव माझा ॥

ऐसी अहिल्या करितां स्तुती । गौतमा कळलें ज्ञानशक्तिं । तेणें येऊनि शीघ्रगतीं । स्वयें रघुपति पूजिला ॥ १६९ ॥

कामक्रोध निर्दळी गौतम । अहिल्या श्रीरामें नित्य निष्काम । दोहींची वृत्ती सहजें सम । [मु. 'रामें'.] राम परब्रह्म पावलीं ॥ १७० ॥

श्रीरामें देऊनि भेटीं । दोहींची सोडिली लिंगगांठी । सच्चिदानंदें आली पुष्टी । दोघां सम दृष्टी समत्वें ॥ १७१ ॥

दोहींचें एक देखणेपण । दोहींचें एक सावध श्रवण । दोहींचें एक [तु. सु. नि. घा. भा. 'मग उन्मन'; तं. 'उन्मनीं मन'.] उन्मने मन । दोहींचें चैतन्यघन श्रीरामें ॥ १७२ ॥

दोहींची [मु. 'एक आत्मा'.] एकात्मता एक प्राण । दोहींचें एक अन्तःकरण । दोघांचें एक निजज्ञान । दोघे सुखसंपन्न एकात्मता

दोहींची एक शब्दसिद्धी । दोहीं एकी इंद्रियविधी । प्रपंच परमार्थी समानबुद्धि । दोघां समाधि एकीचि ॥ १७४ ॥

अनुक्रमणिका

ऐशा [मु. 'एकात्मतानिष्ठ'; भा. /१ 'एकात्मता तन्निष्ठ'.] एकात्मता सन्निष्ठ । दोघां भरिला सेसपाट । गौतम ऋषिवर्या वरिष्ठ । अहिल्या श्रेष्ठ पतिव्रता ॥ १७५ ॥

ऐसिया एकात्मता पूर्ण । स्वयें श्रीरामें आपण । केलें अहिल्या उद्धरण । गौतम संपूर्ण सुखी जाला ॥ १७६ ॥

सुखसंपन्न ऋषेश्वर । हरुषें निर्भर सुरवर । वर्षती सुमनसंभार । जयजयकार प्रवर्तला ॥ १७७ ॥

एकात्मता तरलों म्हणती । शेखी भेद दृष्टीं विषयासक्ति । ऐसी आइकोनिया मुक्ति । श्रोते हसती सज्ञान ॥ १७८ ॥

कवित्व करिती धीटपाठ । मेळविती [मु. 'कर्मकचाट'; पै. भा. /१ तु. त. कं. 'कसकटसट'.] वित्पत्तिकसवट । ते कवित्वाची कटकट । श्रोते [कं. पै. 'विकट'.] वीट मानिती ॥ १७९ ॥

जे [तु. सु. नि. घा. 'कवित्वीं'.] कथेसी शब्दचातुर्य शोभा । ते शाब्दिकांसीं अतिवल्लभा ।
जे कथा [मु. पाठ 'परमार्थ ज्ञानगाभा'.] परमार्थ-ज्ञान-गर्भा । ते कथा जगदंबा जग निववी ॥ १८० ॥

ज्ञानीयें निवती परमार्थ बोधें । पंडित निवती पदबंधें । लोक निवती कथा विनोदें । ग्रंथसंबंधें जग निवे ॥ १८१ ॥

मुख्यत्वें ग्रंथींचें राखावें प्रेम । [मु. 'प्रतिपदीं'] पदीं प्रतिपादावें परब्रह्म ।
हाचि कवित्वाचा कवित्वधर्म । श्रोते सप्रेम सुखी होती ॥ १८२ ॥

कथा [भा. /१ 'रहस्य'.] रम्य रामायण । एका [तं. व कं. प्रतींत 'रम्यत्वें' हे अधिक पद.] जनार्दना शरण । जाले अहिल्या उद्धरण । जानकीवरण तें आइका ॥ १८३ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां अहिल्योद्धरणं नाम चतुर्दशप्रसंगः ॥

संपादित प्रत, श्लोक ६, ओव्या १८३, इतर प्रतींत पुढीलप्रमाणे :—
कं. ७, १८२; तं. ५, १८२; तु. ६, १८७; तं. ६, १८२; घा. ६, १९१; भा. /१ ५, १७५; इं. ५, १८१; सु. ६,१८१.

अनुक्रमणिका

## प्रसंग पंधरावा

## जानकी जन्मकथा

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

पदकमलरजोभिर्मुक्तपाषाणदेहा । त्वियमभवदहल्या गौतमी धर्मपत्नी ।
त्वयि चरति विशीर्णग्रावविंध्याद्रिपादे कति कति भवितारस्तापसा दारवन्तः ॥ १ ॥

**लागतां श्रीराम-**[सु. नि. गे. घा. 'पादरजः कण'; त. तु. 'पादकण'.] **पदकण । जावुनियां पाषाणपण । जाहलें अहिल्या उद्धरण । तें दाराग्रहण गौतमें केलें ॥ १ ॥**

**चरणरजांचा प्रताप । अहिल्या जाली निःपाप । हारुनि गौतमाचा विकल्प । स्त्री अनुरूप पतिव्रता ॥ २ ॥**

**अगाध पदमहिमा देखोन ।** [नि. घा. 'विस्मित जाले'.] **देखतां विस्मित ऋषिजन । स्वर्गी सुरवर करिती स्तवन ।** [नि. तु. 'नाम'.] **कीर्ति पावन तिहीं लोकीं**

**पुढें विंध्याद्रीच्या ठायीं । जे पाषाण लागती रामपायीं । ते निःशेष विरोनी पाहीं ।** [मु. 'उठतील स्त्रीदेहीं सुंदरत्वें'; तु. 'उठती देहीं अतिसुंदरे'; भा. /१ 'उठती स्त्रीदेही सुरत्वें'.] **उठती स्त्री-देहीं अतिसुंदरत्वें ॥ ४ ॥**

**तयां स्त्रियांतें देखोन । बहुसाल तपस्वीजन । ब्रह्मचर्य विसर्जून । दाराग्रहण करितील ॥ ५ ॥**

**एवं** [पै. तं. खेरीज इतरत्र, 'ऋषिवर्य मंडळी'.] **ऋषिमंडळी ।** [सु. नि. गे. घा. 'राम कीर्तनाचे समेळीं'; कं. 'राम कीर्तवासमेळी'.] **रामकीर्तीचा समेळीं । चालती आनंदकल्लोळीं । पुढां मिथिला देखिली ॥ ६ ॥**

**ते विदेहाची विदेहपुरी । पताका झळकती चिदंबरीं । रविचंद्रांची लोपुनि थोरी । रत्नकळसांच्या हारी शोभती ॥ ७ ॥**

[तं. 'नवश्रिगेची'.] **वनश्रियेची शोभा । पूर्णत्वें पूर्ण करी नभा ।** [तु. नि. 'प्राणस्तब्द'; तं. 'प्राणसदा'.] **प्राणस्पंद राहे उभा ।** [मु. पाठ 'होय'; तं. 'प्रतीत हे पद नाही.] **हा प्रवेशारंभा आल्हादु ॥ ८ ॥**

**वृक्ष समूळीं सपत्रीं गोड । बीजेंवीण फळांचे घड । देखतां पथिकांचें पुरे कोड । छाया सेवितां चाड निचाड होये ॥ ९ ॥** [या ओवीनंतर तु.' प्रतीत पुढील ओवी आलेली आहे :–– 'नवल वनाचियापरी । वृक्ष दिसती दोही हारी । कल्पतरूची कल्पना वारी । देहीची निवारी जडत्व काळिमा ॥']

**नवल ते छायेची विश्रांति । काम-क्रोधां होय शांती ।**
**त्रिविध ताप स्वयें शमती ।** [भा. /१ 'निरसुनीं भ्रमविस्मृति स्वानंद होये'; तु. नि. 'भांति ते चिच्छक्ति स्वयें होये'; तं. 'भ्रांति तेची शक्ति स्वानंदें होय'; सु. गे. घा. तं. 'भ्रांति ते चिच्छक्ति स्वानंदें'.] **भ्रांति ते चिच्छक्ति स्वानंदें होये ॥ १० ॥**

अनुक्रमणिका

सेवितां त्या फळांचा स्वादु । क्षुधे तृषेचा निमे बाधु । सबाह्य कोंदे परमानंदु । अति [तं. 'अतिस्वानंदें'.] सुस्वादु विटेना ॥ ११ ॥

जाणोनि त्या फळांची गोडी । शुकांची सवेग पडे उडी । तृप्ती लाहोनियां गाढी । उडण्याची वोढी [भा. /१ 'विसरला'; सु. नि. गे. घा. तु. कं. 'विसरोनीं गेली'; तं. 'विसरोनीं गेला'.] विरोनि गेली ॥ १२ ॥

विदेहवनींच्या हंसांसी । नवल-लीळा दिसे त्यांसी । सांडुनि उभय पक्ष्यांसी । चिदाकाशीं उड्डाण ॥ १३ ॥

देखोनि ते वनस्थळी । मुमुक्षुमयोर स्वानंदमेळीं । पिछें पसरूनि रोमावळी । सुख सुकाळीं नाचती ॥ १४ ॥

विदेहवनींचा सुगंधु । पावतां प्रकटे परमानंदु । [नि. तु. 'देही पावे आनंद । होय निजबोध स्वानंदें'.] मंदुही पावे निजबोधु । हा अतिविनोदु आरामी ॥ १५ ॥

स्वानंदें मयूर गर्जती । तेणें वेदार्थ [कं. सु. नि. गे. घा. 'चवकती'.] दचकती । सांडुनि कर्मवादवृत्ति । निश्चळ राहती निःशब्दें ॥ १६ ॥

वनीं पारिवे घुमती । तेणें गंधर्व [तं. 'गंधर्व गायने लाजती'; सु. नि. गे. घा. 'गंधर्व गाणी वेडावती'.] गाणिवे लाजती । सामवेदाची उपरमे वृत्ति । पक्षी बोलती अनुपम्य ॥ १७ ॥

प्रवेशतां रामचरण । ऐसी स्थिती पावे उपवन । हें विदेहाचें विदेहवन । अगाध महिमान कोण वर्णी ॥ १८ ॥

स्वभावें करितां वस्ती नगरीं । पिंगळा वेश्या समाधि वरी । ते विदेहाची विदेहपुरी । कोणें थोरी वर्णावी ॥ १९ ॥

ज्याच्या द्वारपाळांचें वचन । श्रीशुकासी दे समाधान । हें जनकाचें अति महिमान । अगाध लक्षण परमार्थी ॥ २० ॥

तेचि नगरी बाह्यप्रदेशीं । रामु देखे जनकयागासी । जो सीतास्वयंवर उद्देशीं । [नि. 'बहु क्लेशेसी'.] बहु काळेसीं योजिला ॥ २१ ॥

धैर्याचा स्तंभ निर्धारीं । धर्माचे आडवळे तयावरी । [सु. नि. गे. घा. 'शांतीनें सेविला'; तु. 'शांति नेसविलें'; पै. 'शांतीने शिविला'; भा. /१ 'शांतिसन शिविला'.] शांती नेसियिला कुसरीं । त्या मंडपा-माझारीं यज्ञवाट ॥ २२ ॥

निर्धूम अग्नि अति उद्भट । इंधनेंवीण लखलखाट । ज्वाळा अतिशयें चोखट । सुख स्वादिष्ट प्रकाशु ॥ २३ ॥

ॐकार अर्धमात्रा निजार्थे । जे जाणती परमार्थे । [तं. 'तेची हो तेणें ते उद्‌गातें'; भा. /१ 'ते चित्तें होते उद्‌गाते'; सु. गे. 'तेची होते'; पै. 'तेथें उद्‌गाथें'; होते-पोते—द्वंद्व समास; उत्तर पद केवळ यमकासाठी, पण निरर्थक होतृवर्ग आदि हा भाव.] तेचि होते-पोते उद्‌गाते । अक्षरार्थे द्वारपाळ ॥ २४ ॥

अनुक्रमणिका

निर्गुणेसी वळिलें त्रिगुण । तेंचि तेथिंचें त्रिसंधान । विवेकाचें परिस्तरण । परिसमूहन [भा. /१ 'वैराग्य'.] नैराश्यें ॥ २५ ॥

निःकंटक इध्मा पूर्ण । [मु. 'भूतां ऐक्यें'; तं. 'भूतें ऐक्य'.] भूतऐक्यें बहिर्बंधन । श्रद्धा आज्यस्थाली [मु. 'आज्यस्थाली स्थापून'.] स्थापन । स्रुक्स्रुवामार्जन प्रत्यगावृत्ति ॥ २६ ॥

वक्र बुद्धीच्या वक्रोक्ति । तेचि आधार आज्य आहुती । पाठीं [तु. नि. घा. 'प्रधान होम'.] प्रधान होमिती । सहित प्रकृति महत्तत्वेसीं ॥ २७ ॥

युक्ति प्रयुक्ति ज्ञानाभिमान । द्रव्य दारा ममता मान । गुरुमंत्रें त्यांचें केलें हवन । विनियोग विधान 'न ममेति' ॥

सावधानता सादृश्य । कर्मी ब्रह्मता रहस्य । अवभृतस्नान सामरस्य । [मु. 'निमज्ञनीं'.] निमग्नीं उल्हास परमानंदें ॥ २९ ॥

क्षेत्रा प्रतिपाळी संपूर्ण । क्षेत्रपाळ जो चिद्घन । त्यासी देती विषयांचें बलिदान । वासनास्मरण समवेत ॥ ३० ॥

त्यागिलीया बलिदानासीं । [तं. 'परंतु न'.] परतोनि पाहों नये त्यासीं । स्मरण उरों नये मानसीं । [मु. 'एवं'.] ए ये [भा. /१ 'शुद्धविद्येसी'.] शुद्धविधीसीं बलिदान

अखंडत्वें नित्यस्थिती । तेंचि वसुर्धारा अहोरात्रीं । अहंकाराची पूर्ण आहुती । फळसंयुक्तीं होमिली ॥ ३२ ॥

स्वयें सांडणें मीतूंपण । हेंचि श्रेयसंपादन । आत्मत्व देणें हें अगाध दान । समाधान स्वानंदें ॥ ३३ ॥

परमानंदें अभिषेचन । सवेंचि भवभया विसर्जन । ऐसा विदेहाचा यज्ञ । श्रीरामें आपण देखिला ॥ ३४ ॥

नाना देशींचे ब्राह्मण । नाना भाषाप्रवीण । वेदशास्त्रीं अतिसंपन्न । दैदीप्यमान [कं. पै. खेरीज इतरत्र 'तेजस्वी'.] तपस्वी ॥ ३५ ॥

आइसिया ब्राह्मणाचिया थाटी । विदेहाचां यज्ञवाटीं । श्रीरामें देखोनियां दिठीं । अत्यंत पोटीं सुखावला ॥ ३६ ॥

श्रीराम म्हणे विश्वामित्रासी । स्वामीनें रहावें यज्ञवाटापासीं ।
वचन मानले कौशिकासी । तेचि प्रदेशीं निवासु केला ॥ ३७ ॥

[मु. 'महिवतीचें'.] महीमतीचें स्वच्छ जीवन । तीरीं अगाध उपवन । [नि. घा. 'सदाफळीं'.] सदाफळित शोभायमान । तें निवासस्थान श्रीरामा ॥ ३८ ॥

अनुक्रमणिका

घेवोनि ऋषिवरांचा भार । आला आइकोनि विश्वामित्र । जनकु धांविन्नला सत्वर । केला नमस्कार सद्भावें ॥ ३९ ॥

हरुषें दिधलें [मु. पाठ 'शतगोदान'.] गोदान । केलें मधुपर्क पूजन । तैसेचि पूजिले ऋषिजन । साधुसज्ञन आल्हादें ॥ ४० ॥

राजा बोले [सु. नि. गे. घा. तु. 'हरिखे जाण'.] हरिखेंजोन । आजि माझा सफळ यज्ञ । आजि माझे सफळ नयन । साधुदर्शन देखोनि ॥ ४१ ॥

साधूंसी क्षेमाळिंगण । तेणें शरीर होय पावन । साधूंसी मृदु संभाषण । वाचा पावन तद्योगें ॥ ४२ ॥

साधूंचे चरण-तीर्थ । सेवितां अंतर पुनीत । साधुसंगें सुनिश्चित । ब्रह्म प्राप्त भाविका ॥ ४३ ॥

बहुकाळ याग [तं. 'योजिता'.] यजितां विधीं । माझी नव्हेचि यज्ञसिद्धी । तूं आलासी कृपानिधी । यज्ञाची त्रिशुद्धी सिद्धी जाली ॥

कौशिक रायातें पुसतु । स्वस्थ राज्य स्वस्थ चित्तु । येरू म्हणे हे कृपा समर्थु । स्वस्थ सुनिश्चित सवार्थ भावें ॥ ४५ ॥

राजा पुसे हे दोघेहि जण । अग्नितेजें विराजमान । हेंही उपमा यांसी गौण । तेंही लक्षण अवधारीं ॥ ४६ ॥

अग्नि सन्निध सर्वांतें तावी । यांची सन्निधि [मु. 'सर्वांतें'.] हृदय निववी । यांची पाहतां पदवी । जीवांचां जीवीं आल्हादु ॥ ४७ ॥

यांचें देखलिया दरुषण । डोळियांसी नावडे आन । यांचां स्वरूपीं जडलें मन । [तु. 'चित्त चिंतन विसरलें'; सु. नि. गे. घा. भा. /१ 'चित्त चिंतन विसरुनिं'] चिंता चिंतन विसरोनि ॥ ४८ ॥

सुंदर आणि सकुमार । रूपरेखा मनोहर । ठाणमान अति गंभीर । हें कोणाचे कुमर नृप पुसे ॥ ४९ ॥

दुर्गम मार्ग अति दारुण । यांचें कैसेनि पां आगमन । तुजसी यांसी कां सन्निधान । हें मूळ कारण मज सांगा ॥ ५० ॥

ऋषि म्हणे हे दशरथाचे कुमर । राम लक्ष्मण महावीर । आइक यांचें चरित्र । अति [कं. पै. तं. भा. /१ खेरीज इतरत्र 'अति पवित्र'.] विचित्र सांगैन ॥ ५१ ॥

माझा याग न पवे सिद्धी । मरीची सुबाहु सदा बाधी । ताटका सर्व मार्ग [मु. 'विरोधी'.] रोधी । आश्रम त्रिशुद्धी उपहत करिती ॥

अनुक्रमणिका

यालागीं म्यां अनुष्ठान । करूनि हरू केला प्रसन्न । तेणें मज करूनि सावधान । हें गुह्यज्ञान सांगितलें ॥ ५३ ॥

साक्षात् पूर्ण परब्रह्म । अवतरेल दाशरथी राम । त्याचेनि सिद्धी पावेल होम । राक्षसां भस्म तो करील ॥ ५४ ॥

शिववचन विश्वासीं । म्यां जावुनि दशरथापासीं । मागोनि आणिलें श्रीरामासी । निजयागासी सिद्ध्यर्थ ॥ ५५ ॥

मार्गीं ताटिका छेदिली । मार्गस्थां मार्गनिर्मुक्ति केली । सिद्धाश्रमीं वस्ती जाली । ख्याती [खेरीज इतरत्र 'लाविली'.] केली राक्षसां ॥ ५६ ॥

सुबाहु निवटिला बाणधारा । मरीचीसी लागला पिसारा । तो उडविला समुद्र तीरा । येरां निशाचरां निर्दळिलें ॥

अवचटे लागतां चरणीं । अहिल्या उद्धरिली तत्क्षणीं । अगाध श्रीरामकरणी । वेदीं पुराणीं जगद्वंद्य ॥ ५८ ॥

तो हा हरचाप दर्शनेच्छा । आला असे आम्हांसरिसा । देखोनिया श्रीरामाचा ठसा । जनकमानसा उल्हासु ॥ ५९ ॥

सीतेसी अनुरूप नोवरा । श्रीरामुचि निजनिर्धारा । परी धनुर्धारणीं महावीरां । अति दरारा बळिष्टा ॥ ६० ॥

जनकु म्हणे ऋषिराजा । सीता माझी निजात्मजा । परी ते मुख्य अयोनिजा । आइके महाद्विजा तो भावो ॥ ६१ ॥

> अथ मे कृषतः क्षेत्रं लांगलादुत्थिता ततः । क्षेत्रं शोधयता लब्धा नाम्ना सीतेति विश्रुता ॥ २ ॥ [वाल्मीकि रामायण, बालकांड, सर्ग ६७, श्लोक १३.]

नांगर वाहतां शेतीं । पेटी लागली हळाच्या दांतीं । [तं. 'ते उघडतां निश्चिती । देखिली रूपवंती महात्मजा'; मु. 'ती उघडतां त्यामाजीं हें आंत होती । रूपवंती महात्मजा ।'.] त्यामाजीं हे सीता होती । रूपवंती ममात्मजा ॥ ६२ ॥

आइकोनि रायाचा शब्दु । अहिल्या कुमरू शतानंदु । जनक पुरोहितु प्रसिद्धु । तेणें पूर्वानुवादु आरंभिला ॥ ६३ ॥

ब्रह्म शापाचें क्रूर अज्ञान । त्यामाजीं माझी माता निमग्न । तिसी लागतां रामचरण । जाले उद्धरण जगद्वंद्य ॥ ६४ ॥

लागतां श्रीरामाचे चरण । स्वयें उद्धरती पाषाण । हेंही नवल नव्हे जाण । जगदोद्धारण श्रीरामें ॥ ६५ ॥

अनुक्रमणिका

अगाध श्रीरामाचें नाम । नाम निर्दळी क्रोधकाम । नाम निवारी मरणजन्म । नाम तें ब्रह्म [पै. भा. /१ तं. कं. खेरीज इतरत्र 'निर्द्वंद्व'.] निर्दुष्ट ॥ ६६ ॥

अबद्ध पढतां वेद । तात्काळ बाधी निषेध । अबद्ध नामें प्रसिद्ध । होती शुद्ध महापापी ॥ ६७ ॥

अबद्ध मंत्राच्या आवर्तीं । जापक चळले नेणों किती । अबद्ध नामाच्या नामोक्ति । अगाध कीर्ति वाल्मिकाची ॥ ६८ ॥

अबद्ध नाम नारदोक्ति । मरा मरा या वचनोक्ति । रामनामीं लागली वृत्ती । पापनिष्कृति [मु. 'वाल्मीकाची'.] वाल्मीकस्त्येया ॥ ६९ ॥

करितां अबद्ध नामपठण । वाल्मीक उद्धरला आपण । वदला शतकोटी रामायण । कथा पावन शिववंद्य ॥ ७० ॥

ते देखतां श्रीराममूर्ति । हरिखे विरे चित्तवृत्ति । आनंदें ओसंडे त्रिजगतीं । हे स्वरूपस्थिती रामाची ॥ ७१ ॥

['भा. /१ सु. गे. 'नामे रूपें'.] राम-नामीं अभेदस्थिती । यालागीं [कं. नि. घा. या प्रतींत हे पद नाही.] नामें [सु. गे. 'जग'.] जड उद्धरती । राम केवळ ब्रह्ममूर्ति । [भा. /१ 'सबाह्यशक्ति'; तु. सु. नि. गे. घा. 'आद्यशक्ति'; तं. 'सच्छित्तशक्ति'.] सद्विद्याशक्ति ते सीता ॥ ७२ ॥

ते सीतेची शेतीं उत्पत्ति । ते मी सांगेन पूर्ववृत्ति । जे म्यां आइकिली नारदोक्तिं । तेचि तुम्हांप्रति सांगेन ॥ ७३ ॥

पूर्वी पद्माक्षराजा अतिपावन । तेणें करूनि अनुष्ठान । रमा केली प्रसन्न । मातें कन्यारत्न तूं होई ॥ ७४ ॥

येरी म्हणे गा नृपनाथा । भगवंतअन्वयो न हुतां । मज न घडे जन्मकथा । जाण तत्त्वतां नृपवर्या ॥ ७५ ॥

ऐसें आइकोनि वचन । रायें धरूनि दृढ ध्यान । भगवंत केला प्रसन्न । मागे वरदान कन्यार्थी रमा ॥ ७६ ॥

विषयांचिये विषयपुष्टीं । रमा गोड प्रथमदृष्टीं । लक्ष्मी विमुख जाल्यापाठीं । दुःख कोटी श्रीमंता ॥ ७७ ॥

लक्ष्मी आलिया जें सुख । सुख नव्हे तें केवळ दुःख । सुख मानिती ते महामूर्ख । जाण निष्टंक नृपनाथा ॥ ७८ ॥

राजा म्हणे गा श्रीहरी । रमा [भा. /१ 'क्रिडे'; तु 'रंगें'; सु. नि. गे. घा. 'खेळे'.] रमे मांडीवरी । ऐसिचि मज कृपा करीं । म्हणौनि निर्धारीं धरिले पाये ॥ ७९ ॥

ऐसें रायाचें [भा. /१ 'अभिष्टलिंग'; सु. नि. गे. घा. 'मनोगत जाण'.] मनोलिंग । जाणोनियां [सु. नि. गे. घा. 'विष्णु आपण'.] श्रीरंग । देता जाला [मु. 'मातृलिंगपूर्ण'.] मातुलिंग । येणें कन्या [मु. 'जाग'; तं. 'अभंग'.] अव्यंग पावसी रमा ॥ ८० ॥

अनुक्रमणिका

तें मातुलिंग द्विधा करितां । कन्या देखिली अतिरूपता । रायासी उपजली अतिममता । माझी दुहिता म्हणौनि ॥ ८१ ॥

पद्‌माक्षाचे घरीं जन्म । यालागीं पद्‌मा हे पावली नाम । तिचें रूप देखोनि उत्तम । उल्हास परम रायासी ॥ ८२ ॥

जन्मली मातुलिंगा प्रति । तें दोन्हीं शकलें एक होती । तेंचि मातुलिंग शक्ति तिच्या हातीं । स्वयें सप्रशती बोलत ॥

कन्या सर्वांग मनोहर । रूपें अत्यंत सुंदर । सवेंचि जाली उपवर । तिसी [मु. 'नृपवर'.] प्राणिमात्र भाळले ॥ ८४ ॥

[तु. नि. घा. 'कन्या स्वयंवरा योग्य । राहे विवाह आरंभिला सांग ।'.] कन्या स्वयंवराचा याग । रायें आरंभिला सांग । भाळोनि आले ऋषिवर्ग । योग्यता [तु. 'योग्य दाविती'; सु. नि. गे. घा. 'योग्य निर्विती'.] योग मिरवीत ॥ ८५ ॥

आले देव दानव मानव । नर किन्नर गंधर्व । राजे पावले जी सर्व । दैत्यसमुदाव बळेसीं ॥ ८६ ॥

कन्या देखोनि रूपस । [मु. प्रतीत दुसरे व तिसरे चरण पुढीलप्रमाणे :–– 'सवेग पावले राक्षस । स्वरूप देखोनि बहुवस ॥' इतरत्र संपादित पाठ.] यक्ष पावले बहुवस । सवेग पावले राक्षस । अति कर्कश संग्रामीं ॥ ८७ ॥

रायें पणु केला क्षोभदृष्टीं । आकाशाची सुनीळ उटी । ज्याच्या अंगीं शोभेल गोमटी । त्यासी हे गोरटी वरील ॥ ८८ ॥

पणु आइकोनि दुर्धर । क्षोभले अवघे सुरासुर । कन्याहरणार्थ तत्पर । जाले नरवीर सन्नद्ध ॥ ८९ ॥

धरूं धांवले यक्षरक्ष । देखोनि कोपला पद्‌माक्ष । बाणीं साधुनियां लक्ष्य । विपक्षी-पक्ष त्रासिले ॥ ९० ॥

त्रासिले निशाचर । [मु. 'रायें'.] राजे पळविले संभार । आकाश लंघिती सुरवर । दैत्यीं दुर्धर युद्ध केलें ॥ ९१ ॥

[नि. घा. या प्रतींत 'तेणें' हे अधिक पद.] पळविले दैत्यगण । रायासी खडतरले बाण । तेणें रणांगणीं प्राण । सांडिला आपण क्षात्रवृत्तीं ॥ ९२ ॥

जाहली रणाची निरवडी । कन्या धरितां तांतडी । तिणें उठोनि लवडसवडी । [मु. 'अग्निमाझी'.] अग्निकुंडीं उडी घातली ॥ ९३ ॥

नोवरी नव्हेचि प्राप्त । [तु. नि. 'राक्षस क्षोभले अत्यद्‌भुत'.] धुराचि कोपल्या अद्भुत । घरें पाडुनियां समस्त । नगर उपहत तिहीं केलें ॥ ९४ ॥

अनुक्रमणिका

सुरनर असुरा कंदन । करुनि [मु. प्रतीत हे पद नाही.] रणीं रायें दिधला प्राण । राण्यां केलें सहगमन । लक्ष्मी तें विघ्न श्रीमंतांसी ॥ ९५ ॥

प्रतिपाळिते [तं. 'प्रतिपाळितां प्राण गेले'; सु. नि. गे. घा. 'प्रतिपाळिते प्राणा मुकलें'.] प्राणें गेले । अभिळाषिते रणीं पडिले । उरले ते रडत गेले । लक्ष्मीचें केलें ऐसें आहे ॥ ९६ ॥

ते आद्या शक्ति नोवरी । निघाली अग्निकुंडा बाहेरी ।
तंव बाहेरी भंवली बोहरी । [कं. व मु. 'तीरीं'.] कुंडाचां अंतरीं एकाएकी बैसली ॥ ९७ ॥

विमानीं विचरतां रावण । त्यासी प्रधान सांगे सारण । जी लागीं जाहलें रणकंदन । ते हे जाण नोवरी ॥ ९८ ॥

इसी धरूं जातां सुरासुरीं । उडी घातली अग्निमाझारीं । ते हे निघोनिया बाहेरी । कुंडाच्या तीरीं बैसली असे ॥ ९९ ॥

तिचें देखोनि बरवेपण । रावण अभिलाषी [कं. व मु. 'संपूर्ण'.] आपण । तिसी धरितां जाण । अग्निप्रवेश नोवऱ्या केला ॥ १०० ॥

तंव रावण बोले हांसोनि । अग्निमाजीं तुझी लपणी । ते सुरवर नेणती कोण्ही । ते मी शोधुनि धरीन आतां ॥ १०१ ॥

तेथ अतिक्षोभें रावण । कुंड विझवी आपण । शोधितां नवरी न लभे जाण । तेथ पंचरत्नें [मु. प्रतीत 'जाण सांपडली'.] सांपडलीं ॥ १०२ ॥

त्या रत्नांची पाहतां शोभा । [मु. 'लपोनि'.] लाजोनि जाय सूर्यप्रभा ।
महातेजाचा [मु. 'निजभागा'; कं. खेरीज इतरत्र 'दिव्यभागा'.] दिव्य गाभा । रावण [पै. खेरीज इतरत्र 'उभा'.] उभउभ्यां विस्मित जाला ॥ १०३ ॥

सावध करूनिया निजमना । मग तयां दिव्यरत्नां । करूनिया अतियत्ना । चढोनि विमाना लंकेसी आला ॥ १०४ ॥

तीं रत्नें अति गोमटीं । मंदोदरीसी [मु. 'द्यावया भेटी'.] द्यावी हे पोटीं । देव्हारां ठेऊनि पेटी । आपण उठाउठीं सेजारां आला ॥ १०५ ॥

प्रियेसी सांगे गुह्य गोठी । रत्नें [तं. 'आणिली अत्यंत'.] अत्यंत गोमटीं । तुज शोभती कंठीं मुगुटीं । ते देव्हारां पेटी ठेविली आहे ॥ १०६ ॥

अनुक्रमणिका

ते पेटी तिसी उचलितां । नुचलेचि [पै. 'पेटी'; तं. 'कांहीं केल्या नुचलेचि सर्वथा'.] पैं सर्वथा । रावणें उपहासुनि कांता । आपण तत्त्वतां उचलूं आला ॥ १०७ ॥

त्यासी उचलितां विसे हातीं । नुचलेच पैं सर्वशक्तिं । बळाची मावळली गती । रावण चित्तीं चळकांपे ॥ १०८ ॥

तेथ मिनले प्रधान । वेगें आले सुहृज्ज्ञन । पेटीमाजीं कोण निधान । काढुनि आपण पाहों गेले ॥ १०९ ॥

ते उघडितांचि पेटी । तेजें झांकोळल्या दृष्टीं । अनर्घ-रत्न कन्या गोमटी । [नि. 'देखोनि गोरटी'.] देखिली गोरटी षण्मासिक ॥ ११० ॥

सावध होऊनि लंकानाथ । कन्येचा सांगे पूर्ववृत्तांत ।
मंदोदरी म्हणे हें कृत्य निश्चित । करावया कुळघात कां आणिली ॥ १११ ॥

पाळितीं निर्दळिलीं पिताजननी । सुरासुर निमाले भुलोनी रणीं ।
दानव-मानवांच्या श्रेणी । पडिल्या रणांगणीं इचेनि ॥ ११२ ॥

भविष्य बोले मंदोदरी । हे प्रतिपाळित्यातें संहारी ।
[पै. तं. 'उद्यापनीं भोवंडी बोहरी'; सु. गे. घा. कं. 'उद्यांपणी भोवंडील बोहरी'; तं. 'इच्छी त्याने भोवंडिल'; भा. /१ 'येथे हेहि भोवंडील बोहरी'.] उद्यां आपणा भोवंडी बोहरी । हे राष्ट्राबाहेरीं सांडावी ॥ ११३ ॥

इचा करितां बाळघात । आतांचि उपजेल अनर्थ । हे नेठवावी राज्यां आंत । त्यागावी निश्चित राष्ट्रांतरीं ॥ ११४ ॥

आतांचि हे हिची पेटी । रावणा नुचलेचि संकटीं । इसी मारितां कडकडाटीं । अनर्थ कोटी [भा. /१ 'आडळती'; मु. 'होईल'.] आदळती ॥ ११५ ॥

[तं. 'अचेत खांबा हाणों जाता'; तु. सु. नि. गे. घा. 'अचेतन खांब हाणिता लाथा'.] अचेतन खांबु हाणो जातां । हिरण्यकश्यप पावला घाता । येथही होईल तेचि कथा । इसी तत्त्वतां त्यागावें ॥ ११६ ॥

वचन मानलें लंकानाथा । युक्ति मानली समस्ता । पेटी त्यागावया [सु. नि. घा. 'सर्वथा'.] तत्त्वतां । सवेग दूतां बोलावी ॥ ११७ ॥

कन्या त्यागावया शीघ्रवंत । विमान आणविलें त्वरित । मंदोदरी दूतांसी सांगत । पेटी भूमिगत करावी ॥ ११८ ॥

अनुक्रमणिका

प्रकट पेटी ठेवितां जेथ । तत्काळ अनर्थ उपजेल तेथ । यालागीं करावी भूमिगत । [तु. 'अति गुप्त निक्षेपावी'; कं. भा. /१ तं. सु. नि. गे. घा. 'अति गुप्त निक्षेप'.] त्वरित निक्षेपु करावा ॥ ११९ ॥

जो गृहाश्रमी ब्रह्मचारी । हे वाढेल त्याच्या घरीं । जो आत्मत्वें वर्ते चराचरीं । त्याचां घरीं नांदेल ॥ १२० ॥

पेटी घालितांचि विमानीं । पेटीमाजीं उठिला ध्वनी । मी मागुतीं येईन लंकाभुवनीं । राक्षससदनीं दहनार्थ ॥ १२१ ॥

माझें करितां अभिळाषण । रावणासी येईल मरण । माझेनि निमित्यें संपूर्ण । निर्दळण राक्षसां ॥ १२२ ॥

ऐसा आइकतांचि शब्द । रावण जाला अति स्तब्ध । राक्षस धाकती सुबद्ध । भविष्य विरुद्ध [तु. नि. घा. 'ऐकोनी'.] देखोनि ॥ १२३ ॥

दूतीं पेटीं घालोनि विमानीं । पाहत पाहत आले [तं. 'वनीं'; सु. नि. गे. घा. 'या वनीं'.] अवनीं । विदेहाची सीमा लक्षूनि । पेटी निक्षेपूनि ते गेले ॥ १२४ ॥

ते भूमि जनकें धर्मार्थी । द्विजासी दिधली क्षेत्रवृत्तीं । तेणें नांगर धरावया शेतीं । [तं. 'अब्दोदतिथी'; भा. /१ 'अव्दाअव्द तिथी'; तु. 'अष्टवा तिथी'; सु. नि. गे. घा. 'अति निगुती'.] अब्दाष्टतिथी मुहूर्त पाहे ॥ १२५ ॥

[तु. नि. घा. 'वेळ'.] एवं साधूनि सुमुहूर्ती । नांगरू धरितांचि शेतीं । प्रथम तासाचे [सु. नि. गे. घा. 'उपहती'.] उपरती । [तु. नि. घा. 'फाळाच्या'.] हळाच्या दांतीं लागली पेटी ॥ १२६ ॥

द्विजांसी सांगे क्षेत्रदूत । धन्य धन्य तुझे सुमुहूर्त । पीक पिकलें अद्भुत । [तु. नि. घा. 'निधी निश्चत पहा स्वामी'; भा. /१ सु. गे. 'निधी निश्चित फळला स्वामी'; तं. 'निधी निश्चित फळली स्वामी'.] विधी निश्चित फळला स्वामी ॥ १२७ ॥

द्विजें पेटी देखतांचि जाण । म्हणे गुप्त-ठेवा तें राज्यधन । मज दिधलें क्षेत्रधान्य । ठेवा आपण घेवों नये ॥ १२८ ॥

पेटी घेऊनि हातीं । द्विजु आला सभेप्रति । हा गुप्त-ठेवा [तु. नि. घा. 'होता तुमचे शेती'; सु. गे. 'होता शेतीं'.] होता क्षितीं । तो तां भूपति घेइजे स्वयें ॥ १२९ ॥

राजा बोले धर्मवचन । तुम्हांसी दिधलें भूमिदान । तेथील जें जें धनधान्य । तें ब्रह्मार्पण द्विजवर्या ॥ १३० ॥

द्विजधर्मार्थी अति प्रवीण । [तं. 'मज दिधले क्षेत्रधान्य'; सु. नि. गे. घा. 'मज समर्पिलें क्षेत्रदान'.] मज संकल्पिलें क्षेत्रधान्य । नाहीं दिधलें गुप्तधन । तें मी आपण स्पर्शेना ॥ १३१ ॥

धनलोभु नाहीं द्विजा । धनलोभु नाही भूभुजा । [तु. 'भ्रम संकटीं'; सु. नि. गे. घा. 'परम संकटीं'.] ब्रह्मसंकटीं पडिला राजा । हें साधुसमाजा कळों सरलें ॥ १३२ ॥

अनुक्रमणिका

तेथ साधु बोलिले वचन । यामाजीं कोण आहे धन । तें काढुनि पाहावें आपण । मग शास्त्रविधान विचारूं ॥ १३३ ॥

ते उघडितांचि पेटी । सौंदर्याचे [तं. 'सरूप दिठी'; तु. 'सुंदर शोभा दिव्य कोटी'; सु. नि. गे. घा. 'दीप्ती दृष्टीं'; कं. 'सौंदर्या चिद्रुपद्रुष्टीं'.]

दीप दिठीं । कन्या देखिली गोरटी । आश्चर्य पोटीं सर्वांचे ॥ १३४ ॥

कन्या देखतांचि देख । डोळ्या लागली टकमक । विस्मयें दाटले सकळिक । अलौकिक सौंदर्यें ॥ १३५ ॥

देखोनि लावण्यनिधान । जनकें उचलली आपण । म्हणे हें माझें कन्यारत्न । भेरी निशाण त्राहाटिलें ॥ १३६ ॥

गगन गाजे मंगळतुरीं । सभा गर्जे जयजयकारीं । शांतिपाठ पढिजे ऋषीश्वरीं । वेदोक्त मंत्रीं अभिषेकु ॥ १३७ ॥

जनकें पाळिली जनकात्मजा । धरेनें राखिली अति वोजा ।
यालागीं म्हणिजे धरणीजा । परी ते अयोनिजा जगदंबा ॥ १३८ ॥

नांगर वाहतां लागली दांतीं । सीता जन्म पावली शेतीं । ते सांगितली पूर्वस्थिती । नारदोक्ति यथार्थें ॥ १३९ ॥

सीतेचें जन्मलक्षण । यासी मूळ स्कंध पुराण । काळिकाखंडीं हे निरोपण । समूळ संपूर्ण लिहिलें असे ॥ १४० ॥

अहिल्येचा जेष्ठ सुतु । जनकाचा जो पुरोहितु । शतानंद ऋषि समर्थु । तेणें हा वृत्तान्तु सांगितला ॥ १४१ ॥

सांगितली सीतेची उत्पत्ति । आतां सीता स्वयंवरार्थी ।
जनकासी हरचापप्राप्ती । जाली कैशा रीती तें आइका ॥ १४२ ॥

एका जनार्दना शरण । जाहलें सीताजन्मकथन । पुढें हरचाप प्रकरण । सज्ञनीं सावधान परिसावें ॥ १४३ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां जानकीजन्मप्रभवकथनं नाम पंचदशप्रसंगः ॥

संपादित प्रत, श्लोक २, ओव्या १४३, इतर प्रतींत ही संख्या सारखीच आहे.

अनुक्रमणिका

## प्रसंग सोळावा

## परशुराम युद्धप्रभाव

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

सीता स्वयंवराची जाण । शिवचापासी [तं. 'वाहावा'; तं. 'वावे'; भा. 'वाहवा'; सु. नि. गे. घा. 'लावावा'.] वावा गुण । हा जनकें करावया पण । काय कारण तें आइका ॥ १ ॥

पूर्वी फरशराम कैलासीं । धनुर्विद्या शिवापाशीं । फरशविद्या [तु. 'गुणेसी'; भा. 'गणपतिसी'; तं. सु. नि. गे. घा. 'गणेशापासीं'.] गणेशी । लघुलाघवेंसीं शिकला ॥ २ ॥

फरशराम कैलासीं । राहिला असे शिवसेवेसी । [तं. 'तयाची परी'; कं. भा. 'तत्प्रवीण'; तं. 'तपवनें'; तु. 'तत्परसें'; सु. नि. गे. घा. 'तत्परता'.] तत्पर अहर्निशीं । श्रद्धा गणेशीं समसाम्य ॥ ३ ॥

[कं. व मु. प्रतींत 'तंव' हे अधिक पद आहे.] आक्रंदे आत्यंतिक । [मु. प्रतीत 'ऐकिली' हे अधिक पद आहे.] रेणुकीची महाहांक । फरशरामे एका एक । आईकोनि साशंक तो जाला ॥ ४ ॥

येऊनि सांगे शिवापासीं । रेणुका बोभाते आक्रंदेसीं । आज्ञा पुसतों स्वामीसी । मज मातेपासीं जावया ॥ ५ ॥
[या ओवीनंतर तु. नि. घा. प्रतींत पुढील ओवी अधिक आहे :—
'ऐका रेणुकापुराण । जे कां अति पावन । दोष नासती दारुण । कथा श्रवण करितांची ॥']

आईकतांची तें वचन । रुद्र झाला [पै. तं. कं. खेरीज इतरत्र 'कोपायमान'.] क्रोधायमान । जगीं [कं. भा. तु. नि. घा. 'वाढला'.] जाला अधर्म पूर्ण । दानवी ब्राह्मण वधिला दर्पे ॥ ६ ॥ [या ओवीनंतर तु. नि. घा. या प्रतींत पुढील ओवी आली आहे :—
'शिव म्हणे जामदग्न्या । मी तुज प्रसन्न सर्वज्ञा । वेगीं दुष्ट वधीं प्रतिज्ञा । विद्यासंपन्ना परशुरामा ॥']

व्यासी देऊनी निजत्र्यंबक । निर्दली म्हणे ब्रह्मघातक । क्षत्री श्रीमदें उन्मादक । तेही एकें एक निर्दाळी ॥ ७ ॥

या त्र्यंबकाचां बाणीं । निःक्षत्री करीं धरणीं । गणेशें फरश देवोनि । फरशवाणी पाठविला ॥ ८ ॥ [या ओवीनंतर तु. नि. घा. या प्रतींत पुढील अधिक ओवी आली आहे :— 'तैं पासुनी परशुरामाभिधान । वरद गणेशाचें पूर्ण । ज्या कार्या प्रवर्तसी जाण । तें निर्विघ्न करीन मी ॥']

वेगें येतां फरशरामासी । मार्गीं भेटले आश्रमवासी । तेंही सांगितलें त्यापासीं । अति कंदनेंसी पितृपातु ॥ ९ ॥

फरशरामें केला प्रश्न । पितृघाता काय कारण । या विग्रहाचें मूळ कथन । आश्रमींचे जन सांगती ॥ १० ॥

अनुक्रमणिका

सहस्रार्जुन वनक्रीडेसी । आला जमदग्नि आश्रमासीं । रेणुका प्रार्थुनिया पतीसीं । राजा कटकेंसीं निमंत्रिला ॥

ऋषि म्हणे [सु. नि. गे. घा. ‘राजासी’.] राजाची केवळ । आणुनी [सु. नि. गे. घा. ‘घालूं’.] घाली [मु. प्रतीत हे पद नाही.] न फळमूळ ।
स्त्री म्हणे आश्रमधर्म विफळ । अन्नें सकळ तृप्त की जो ॥ १२ ॥

आश्रमा आले ते ते अतीथ । तृप्त करावे समस्त । तुम्ही सामर्थ्यें अति समर्थ । विकल परमार्थ न करावा ॥ १३ ॥

[मु. ‘यावीमात्र’.] याममात्र कामधेनु । आणुनि [पै प्रतीत हे पद नाही.] द्यावें दिव्यान्नु । राजा विभूति श्रीभगवानु । यथोक्त पूजन करावें त्यांचें ॥ १४ ॥

पत्नीचें धर्मवचन । आईकोनि ऋषि सुखायमान । [तु. नि. ‘मग कामधेनु लागून’.] आणावया कामधेनु । विजनीं अनुष्ठान [कं. पै. खेरीज इतरत्र ‘आरंभिले’.] मांडिलें ॥ १५ ॥

रायें पाहों पाठविलें दूतांसी । अन्न-सिद्धी केली ऋषिं ।
तंव वैश्वानरू नाहीं चुलीशीं । पाकांची कायसीं कथा वार्ता ॥ १६ ॥

त्या ऋषिची ऋषिकांता । वदान्य अति उदारता । नवल तिची अगाधता । चित्तीं चिंता असेना ॥ १७ ॥

ते ऋषिपत्नी राजबाळा । विचित्रा घाली ते रंगमाळा । राजपूजेचा सोहळा । तिसी आगळा [मु. ‘उत्साह’.] उच्छावों ॥ १८ ॥

राजदूत गेला परतोनु । तंव ऋषिनें आणिली कामधेनु । [मु. ‘तेणे’.] ते रेणुकेचे हातीं देवुनु । म्हणे [कं. भा. तं. या प्रतींखेरीज इतरत्र हे पद नाही.] राजभोजन संपादी ॥ १९ ॥

मज न सोसे खटपट । राजोपचार अति चोखट । जे जे मागसी वरिष्ठ । ते ते यथेष्ट देईल धेनु ॥ २० ॥

धेनु प्रसवली [नि. घा. ‘कृपा संतुष्टी’.] कृपादृष्टीं । पहिलें एक ताट देखिलें दृष्टीं । त्यांचि ताटांच्या पोटीं । ताटें कोट्यानुकोटी प्रसवली ॥

ऋषीनें सांडिला निजकोप । त्यासी नाहीं संकल्प विकल्प । लौकिक क्रिया खटाटोप । नाहीं साटोप तयासीं ॥ २२ ॥

राजभोजनकर्तव्यता । घातलीं रेणुकेचे माथां । पुढें काय वर्तली कथा । सावधानता अवधारा ॥ २३ ॥

कोण कार्यार्था जमदग्नीनें । कोप सांडिला आपण । ऐसा श्रोतीं केला प्रश्न । तेंही कथन अवधारा ॥ २४ ॥

अनुक्रमणिका

ब्रह्मांड खंडपुराणीं । बदली मार्कंडेयाची वाणी । तेचि कथा निरोपणीं । साधुसज्ञनीं परिसावी ॥ २५ ॥

वधु करावया सहस्त्रार्जुनासी । इंद्र आला जमदग्नीपासीं । धरुनिया दीन वेषासी । अति तृषेसीं तृषितु ॥ २६ ॥

पाहोनियां विहित काळ । साधूनि अतिथीची वेळ । मागों आला जी तात्काळ । केवळ जळ ऋषिपासीं ॥ २७ ॥

तोंड कोरडें पैं जालें । दोन्ही वोंठ वाळोनि गेले । कांहीं न बोलावे बोलें । कराग्रें दाविलें उदकार्थी ॥ २८ ॥

ऋषि म्हणे रेणुकेसी । शीघ्र उदक दे अतिथीसी । येरी जाणोनि [मु. 'कपटवेषासी'.] कपटवेषी । निजमानसीं शंकली ॥ २९ ॥

मज यासी देतां उदक । हा करील कडु विख । ऋषि कोपेल आत्यंतिक । जीवीं धुकधुक लागली ॥ ३० ॥

अतिथी छळील उदक देतां । जमदग्नि कोपेल नेदितां । थोर ओढवली संकोचता । कांहीं कर्तव्यता स्मरेना ॥ ३१ ॥

जमदग्नि [मु. 'अति समर्थ सर्वज्ञ'.] अति सर्वज्ञ । जाणे आश्रमधर्म संरक्षण । हातीचें अग्रोदक जीवन । करवी प्राशन अतिथीसी ॥ ३२ ॥

जमदग्नीनें आपण । [मु. 'करविलें'.] केलें अतिथिसीं उदकपान । रेणुका म्हणे मीं छळिलें पूर्ण । विघ्न दारुण मज आलें ॥ ३३ ॥

कोपें ऋषि म्हणे रेणुकेसी । तूं केवळ कृत्या कर्कशी । उदक नेदुनि अतिथीसीं । पतिवचनासी पराङ्मुख ॥ ३४ ॥

चोर चांडाळ कपटवेषी । आश्रमा आला [कं. पै. खेरीज इतरत्र 'समयासी'.] समय विशेषीं । जें जें मागेल तें तें त्यासी । अवश्यतेसीं अर्पावें ॥ ३५ ॥

केवळ निमोलें उदक । नेदुनि जालासी विन्मुख । जळो तुझें काळें मुख । तुझें सुख मज नाहीं ॥ ३६ ॥

गृहिणीस्तव गृहस्थाश्रम । ते जैं पाळिना आश्रमधर्म । तिचा मज कोण संभ्रम । अति दुर्गम कोपला ॥ ३७ ॥

कोपु नावरे ऋषीसीं । पाचारुनिया पुत्रासीं । वेगीं तुम्ही वधा इसी । ममाज्ञेसीं अति शीघ्र ॥ ३८ ॥

पुत्र म्हणेति स्वामीनाथा । जैसाचि पिता तैसीच माता । आम्हासीं वध्य नव्हे सर्वथां । [मु. प्रतीत हे पद नाही.] तुम्हींच तत्त्वतां विचारिजे ॥ ३९ ॥

अनुक्रमणिका

[कं. पै. तं. खेरीज इतरत्र 'पुत्र न मानिती पित्याचें वचन'.] प्रेत न मनी पितियाचें वचन । तैसेंचि तुम्ही पांचही जण । आतांचि जावोनियां प्राण । प्रेतत्व पूर्ण पावाल ॥ ४० ॥

ऐसें आईकतां ऋषिभाषण । तत्काळ ते पांचहि [भा. घा. 'जाण'.] जण । प्रेतत्व पावले संपूर्ण । ऋषिभयें प्राण पळाले ॥ ४१ ॥

प्राणु म्हणे आयुष्य असतां । [तु. नि. घा. 'आम्हासीं'.] मज जावों नये म्हणौनि राहतां ।
[कं. पै. खेरीज इतरत्र हे पद नाही.] तैं ऋषिशापु बैसेल माझे माथां । तेणें धाकें तत्त्वतां पळाला प्राणु ॥ ४२ ॥

ऋषिभयें पळाला प्राण । प्रेतत्व पावले पांचहि जण । तऱ्ही ऋषीचा कोप दारुण । क्षोभलेपण सांडिना ॥ ४३ ॥

तेवि समयीं फरशधर । सुमनें घेऊनि आला [भा. तु. नि. घा. 'सत्वर'.] शीघ्र । ऋषीसी केला नमस्कार । त्यासीहि दुर्धर आज्ञापी ॥ ४४ ॥

करीं रेणुकेच्या घातां । येरें तत्काळ [त. भा. सु. नि. गं. घा. कं. 'छेदिला माथा'.] छेदिली माता । तेणें आल्हाद ऋषिचिया चित्ता । प्रसन्नता संतुष्ट ॥ ४५ ॥

ऋषि गर्जे प्रसन्नता । मागसी तें देईन आतां । रामें चरणीं ठेविला माथा । विनंती [मु. 'स्वामीनाथा'.] तत्त्वतां अवधारीं ॥ ४६ ॥

माझी उठवावी माता । बंधूंची [तु. सु. नि. गे. घा. 'दवडावी'.] जावी निजप्रेतता । हेंचि मागतों गुरुनाथा । दिधलें तत्त्वतां ऋषि म्हणे ॥ ४७ ॥

तुझा लागतांचि हात । बंधू प्रेतत्वां [भा. 'बंधुप्रेतत्व होय मुक्त'; 'बंधुप्रेतत्व होती निर्मुक्त'; तु. 'बंधुप्रेतापासूनि मुक्त'; सु. नि. गे. घा. 'बंधु प्रेतत्वा होती निर्मुक्त'.] होऊनि निर्मुक्त । चेतनासुखें सावचित्त । यथास्थित वर्तती ॥ ४८ ॥

रेणुकेचीं दुखंडें । तुझेनि हातें होती अखंडें । शांतिसुखाचेनि सुरवाडें । वाडें-कोडें उठतील ॥ ४९ ॥

म्यां छेदिली निज माता । हें नाठवो मातेचिया चित्ता । ऐसी मज द्यावी वरदता । चरणीं माथा ठेविला ॥ ५० ॥

तुझें नाठवे छेदिले-पण । अंगीं घायाचा न दिसे वण । निद्रेपासुनी उठी आपण । तैसें लक्षण पावेल ॥ ५१ ॥

आइकोनि [नि. घा. या प्रतींत 'पित्याचे' हे अधिक पद आहे.] वरद भाषण । पुढती पितीयाचे वंदुनि चरण । करावया मातेचें उद्धरण । हर्षें संपूर्ण उठिला ॥ ५२ ॥

अनुक्रमणिका

रेणुका छेदाचे अंतीं । तिसीं भेटों आली अद्या शक्ति । तूं जन्मलीसी ज्या कार्यार्थी । कां तदर्थीं उदास ॥ ५३ ॥

तां [पै. खेरीज इतरत्र 'वधावा'.] वधवावा सहस्त्रार्जुन । तें तूं गेलीसी विसरोन । त्याची द्यावया आठवण । इंद्रें आपण तुज छळिलें ॥ ५४ ॥

रेणुका म्हणे कार्यसिद्धी । साधावी लागे गुह्यबुद्धी । [तु. 'कळो नेदावें जनीं'; नि. घा. 'कळों नेदावें जनापवादीं'; गे. सु. 'कळों नेदतां जनापवादी'.] कळो नेदितां जनपदीं । विरोधसंधी लक्षेना ॥ ५५ ॥

कळो नेदावें पैं जनीं । कळों नेदावें जमदग्नी । ऐसें मज लक्षितां अनुदिनीं । विरोध करणीं लाभेना ॥ ५६ ॥

तंव बोलिली आद्या शक्ति । फरशरामाची वरदोक्ति । तूं पावसी देहप्राप्ती । येचि कार्यार्था साधावया ॥ ५७ ॥

रेणुका बोलिली वचनोक्ति । तूंचि कार्य तूंचि [तं. तु. 'कीर्ति'.] कर्ती । मज सांगसी जैशा [सु. नि. गे. घा. 'युक्ति'.] गती । त्या त्या [सु. नि. गे. घा. 'गती'.] रीती साधीन ॥ ५८ ॥

जगदंबा सांगे रेणुकेसी । सहस्त्रार्जुन पारधीसी । येईल तुझ्या आश्रमासी । या [तं. 'या कार्यासी पुजवावा'; तु. 'तो कार्य सिद्धार्थासी पूजावें'; सु. गे. 'तैं कार्यासी साधावें'; नि. घा. 'तैं कार्यसिद्धार्थी पुजवावा'.] कार्यार्थासी पुजवावा ॥ ५९ ॥

सकळ सैन्येसी नृपती । निमंत्रवी ऋषि हातीं । कामधेनु आणवी तदर्थी । ऋषि प्राप्ति सांगोनि ॥ ६० ॥

दुर्लभ उपचार त्रिजगतीं । तें तें मागोनि धेनुप्रति । साधावया निजकार्यार्थी । आदरें नृपती पूजावा ॥ ६१ ॥

करितां दोन्ही शक्ति भाषण । तंव फरशरामें आपण । लाहोनि पितियांचें वरदान । केलें सावधान मातेसी ॥ ६२ ॥

फरशरामें लावितां हात । बंधु जाले सावचित्त । ते नेणती मातेचा घात । तिची निजघात नाठवे ॥ ६३ ॥

पुत्र सोडविले शापापासून । रेणुकेसी आल्हाद पूर्ण । फरशरामातें आलिंगून । वदे वरदान रणविजयीं ॥ ६४ ॥

रामें आईकतां वरद गोठी । दृढ बांधली शकुन गांठी । पुढीले कथेची [तु. नि. घा. 'परिपाटी'.] कसवटी । सावधान दृष्टी अवधारा ॥ ६५ ॥

स्त्रीपुत्र जाळीं सावधान । जमदग्नि जाला अति उद्विग्न । केवढें क्रोधाचें विंदान । अधःपतनदायक ॥ ६६ ॥

स्त्रीपुत्रांचा करितां घातु । मज [सु. नि. गे. घा. 'होतें अधःपतन येथ'.] होता अधःपातु । धन्य धन्य परशरामसुतु । अति अनर्थु चुकविला ॥ ६७ ॥

माझें घेऊनियां वरदान । माझें चुकविलें अधःपतन । क्रोधें [त. 'डांखिले'; कं. भा. 'ठकविलों'; तु. त. 'ठकलों'; सु. नि. गे. घा. 'ठकविले'.] वंचिलों मी संपूर्ण । त्याचें निर्दळण मी करीन ॥ ६८ ॥

क्रोध म्हणिजे केवळ मांग । तो मजमाजीं वसे सांग । जळो माझा योग-याग । [त. 'क्रोधेंसी सर्वांग अपवित्र'; त. क्रोधें सर्वांग अपवित्र'; भा. 'क्रोधेसी माग अपवित्र'; नि. घा. 'क्रोध डाग अपवित्र'.] क्रोधें मी सांग अपवित्र ॥ ६९ ॥

क्रोधा एवढा महावैरी । बैसला असतां जिव्हारीं । जो ज्ञानाची मानी थोरी । तो संसारी महामूर्ख ॥ ७० ॥

अपकारिणि कोपश्चेत्कोपे कोपं कथं न ते । धर्मार्थकाममोक्षाणां प्रसह्य परिपंथिनि ॥ १ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

अल्प अन्यावो देखिल्यावरी । त्यावरी जो तो क्रोधकरी । क्रोधाएवढा अपकारी । क्रोधु क्रोधावरी न करिती ॥ ७१ ॥

क्रोध अपकाराची थोरी । अतर्क्य रिघोनि जिव्हारीं । चहूं पुरुषार्थां करुनि बोहरी । नानापरी विभांडी ॥ ७२ ॥

क्रोधू आलिया [नि. घा. 'कडकडाडी'.] कडकडाटी । कामु पळे उठाउठीं । धर्मु जाय बारा वाटीं । क्रोधें तुटी अर्थस्वार्था ॥ ७३ ॥

क्रोध रिघोनिं अंतरीं । मुख्य मोक्ष जीवें मारीं । ऐसा क्रोधु वैरी । तो मी संहारी [सु. नि. गे. घा. 'पै'.] तें सत्य ॥ ७४ ॥

ऐसें बोलुनि [पै. खेरीज इतरत्र 'ऋषि आपण'.] आपण । [तं. 'मग'.] दृढ घालुनि आसन । आवरुनि प्राणापान । क्रोधदहन करूं पाहे ॥ ७५ ॥

क्रोध म्हणे ऋषि विचारीं । मज निघाल्या देहा बाहेरी । वृथा जाईल तुझी थोरी । [पै. संपादित पाठ; त. 'तृणावरीं', इतरत्र 'तृणावारीं'.] तृणावऱ्हीं [सु. नि. गे. घा. 'न पुसती'; भा. 'मानिती'.] न मानिती ॥ ७६ ॥

आईक माझीये वस्तीची थोरी । म्यां प्रवेशोन नृसिंह शरीरीं । हिरण्यकश्यपा एवढा वैरी । नखाग्रीं निवटिला ॥ ७७ ॥

म्यां शिवस्वरूपीं घालुनि ठाणें । त्रिपुर निवटिले एक बाणें । माझेनि योगें त्रिनयनें । जिवें मारणें जाळंधरू ॥ ७८ ॥

म्यां रिघोनि विष्णुदेहीं । मधु कैंटभ मारिले ठायीं । म्यां संचरोनि कुमाराचां [कं. तं. तु. 'ठायीं'; भा. सु. नि. गे. घा. 'देहीं'.] पायीं । मर्दिला पाहीं लवणासुरू ॥

अनुक्रमणिका

ऐसें माझेनि योगें जाण । [भा. तु. 'देव करिती'; सु. नि. गे. घा. 'देवाही केलें'.] देवों करी दुष्टदळण । विचारी [मु. प्रतीत 'तूं' हे अधिक पद आहे.] ऋषिराया आपण । मजवीण तूं तृणप्राये ॥ ८० ॥

त्वां मज दवडिलिया ऋषि । तुझी दशा होईल कैसी । तें मी सांगेन तुजपासीं । सावधानेंसी अवधारीं ॥ ८१ ॥

मज निघाल्या [पै. 'देह्याबाहेरीं'.] देहाबाहेरीं । बाईला घेती टोलेवरी । तुज मारिल्या तोंडावरी । साटोपु शरीरीं तुज नाहीं ॥ ८२ ॥

ऐसी आईकोनि त्याची कथा । कोपावरी अति [पै. भा. कं खेरीज इतरत्र 'क्षोभता'.] क्षोभवता । पूर्ण बाणली ऋषिनाथा । तुज मी आतां मारीन ॥ ८३ ॥

> त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः । कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ २ ॥ [श्रीमद्भगवद्गीता, अध्याय १६, श्लोक २१.]

भगवंताची वाक्य थोरी । कामक्रोधलोभ ज्या शरीरीं । त्यांची वस्ती [पै. भा. सु. गे. त. कं. 'नरकांतरीं'; नि. घा. तु. 'नरकाभितरीं'.] नरकद्वारीं । त्यांचां घरीं नित्य नरकु ॥ ८४ ॥

नरका जाणें नलगे त्यासी । ते स्वयेंचि [सु. नि. गे. घा. 'नरकवासी'.] नरकवासी । क्रोधा तुझी गती ऐसी । व्यर्थ जल्पसी [तं. 'वाटिक'; पै. 'वांढीव'; सु. नि. गे. घा. 'वाढीवा'.] वाटीवा ॥ ८५ ॥

क्रोधा कामाचा कैवारी । क्रोध अभिमाना साहाकारी । क्रोध लोभा बाह्य अंतरीं । पापकारी निजक्रोधु ॥ ८६ ॥

क्रोध संचरल्या निजदेहीं । अणुमात्र हित नाहीं । पापाच्या कोटी पाहीं । क्रोधाच्या [तु. तं. त. 'ठायीं'; भा. 'पाही'.] पायीं तोडरु ॥ ८७ ॥

ऐसें बोलोनि जमदग्नी । चेतवूं पाहे [तं. 'जठरीं'.] जंव योगाग्नी । [मु. प्रतीत 'तंव' हे पद अधिक आहे.] क्रोध निघाला गजबुजुनि । देह त्यागुनी ऋषीचें ॥ ८८ ॥

क्रोध म्हणे जी ऋषिनाथा । तुझी आज्ञा वंदुनि माथां । मी निघालों जी तत्त्वतां । कोठें आतां म्यां राहावें ॥ ८९ ॥

ऋषि होय विचारितां । माझ्या क्रोधाची दुर्धरता । त्यासी वस्ती न दिसे सर्वथा । म्यां काय आता सांगावें ॥ ९० ॥

ऐसी जमदग्नीची चिंता । [तु. 'फरशराम कळवळे'.] फरशरामा कळतीं तत्त्वतां । चरणीं ठेऊनिया माथा । होय बोलता अति नम्र ॥ ९१ ॥

अनुक्रमणिका

[तु. नि. 'स्वामिचा'.] तुझा कोप अति दारुण । हा सर्वत्र करील कंदन । हा करावा मर्दपण । कृपा करून स्वामिया ॥ ९२ ॥

जमदग्नि विचारी आपण । माझ्या [तु. नि. गे. घा. 'क्रोधा अति साठवण'.] क्रोधासी साटवण । फरशधरु शुद्ध संपूर्ण । हा रामार्पण करावा ॥ ९३ ॥

ऋषि सांगे नित्य ब्रह्मचारी । धनलोभु नाहीं ज्या भीतरीं । जो द्विजांचा द्वेषु न करी । क्रोध त्या माझारीं शांतत्वें वसे ॥

या होऊनि अन्यथा पैं होतां । क्रोधु करील त्याच्या घाता । जरी तुज टाकेल तत्त्वतां । तरी मी आतां अर्पीन ॥ ९५ ॥

द्रव्यदारालोभु ज्या पासीं । [पै. प्रतीत हे पद नाही.] क्रोध तेथ सदा मुसमुसी । ज्ञानगर्व ज्याचां मानसीं । क्रोध त्या पासीं चाविरा ॥ ९६ ॥

ज्ञानगर्व द्रव्य दारा । येही द्वारीं क्रोधाचा मारा । ये जिंकलिया फरशधरा । क्रोधु कामारा तयांचा ॥ ९७ ॥

फरशराम म्हणे ताता । तुझें चरणतीर्थ घेतां । तेणें तीर्थें मज सामर्थ्यता । क्रोध राखतां भय नाहीं ॥ ९८ ॥

पित्यासी करुनी नमन । घेतलें चरणतीर्थ प्रार्थून । तेणें तीर्थेंसी आपण । केलें प्राशन क्रोधाचें ॥ ९९ ॥

क्रोधु बोलिला आपण । भार्गवा करीतां दुष्टनिर्दळण । संग्रामीं साहाकारी संपूर्ण । तुज मी होईन भृगुवीरा ॥ १०० ॥

फरशरामु जंव क्रोध घोटी । अंगीं बाणली पुष्टी तुष्टी । चौंगुणीं वाटवी पैं पोटीं । संग्रामीं लाठी वीरवृत्ति ॥ १०१ ॥

करितां क्रोधाचें प्राशन । फरशरामा समाधान । अंगीं बाणली अंगवण । दुष्टदळण करावया ॥ १०२ ॥

क्रोधु त्यागिला जमदग्नीनें । तें हें सांगितलें निरोपण । एका जनार्दना शरण । कथानुसंधान अवधारा ॥ १०३ ॥

कामधेनु आणुनी ऋषि । स्वयें दिधली रेणुकेपासीं । तिणें पुजुनी धेनुसी । राजोपचारासीं मागितले ॥ १०४ ॥

जें रायें देखिलें ना आईकिलें । जें रायें नाहीं चाखिलें । तें तें उपचार [तु. नि. घा. 'भले भले'; भा. 'हें' पद नाही.] द्यावे भले । धेनुनें दिधले तत्काळ ॥ १०५ ॥

अनुक्रमणिका

दिव्यान्न दिव्य लेणीं लुगडीं । एक ताट प्रसवली आवडीं । त्यामाझीं ताटें लक्षकोडीं । निघाल्या चवडी ताटांचां ॥

राजदूत सांगे राजापासीं । अन्नसामुग्री कैंची ऋषि । वैश्वानर नाहीं चुलसी । कथा कायसी पाकाची ॥ १०७ ॥

रायें पाठविला प्रधान । आश्रमी पाहे [(अन्नसाधन), तं. सु. नि. गे. घा. कं. 'अन्न सदन'.] अन्नसाधन । नसेल तरी द्यावें आपण । अन्नधन ऋषीसी ॥ १०८ ॥ [तु. नि. घा. या प्रतींत या ओवीनंतर पुढील ओव्या आल्या आहेत :—
'ऐसें ऐकोनि वचन । ऋषिआश्रमा प्रधान । स्वयें पातला आपण । तंव ऋषि बोलाविणें पाठवितु ॥
प्रधान म्हणे लागला उशीर । शिष्यवर्ग म्हणती धरा धीर । संपादिला अन्न प्रकार । आतां सत्वर चालावें ॥
प्रधानें आणविलें रायासी । ऋषीनें पाठविलें बोलवायासीं । रायें सिद्ध करोनि सर्वांसी । आला कटिकेसी भोजना ॥
आले देखोनि राजासी । ऋषि सामोरा येवोनि प्रीतीसीं । रायासीं पूजिलें उपचारेंसीं । मधुपर्कासीं सिद्ध केले ॥']

[तु. नि. 'पाहती राजा आणि प्रधान'.] येवुनि पाहे प्रधान । दिव्यमंदिरें शोभायमान । सुवर्णताटें दिव्यान्न । समसमान सर्वांसी ॥ १०९ ॥

ऋषीने बैसविली पंक्ति । राजा अति विस्मित चित्तीं । धन्य ऋषीची संपत्ति । अगाध स्थिती सामर्थ्य ॥ ११० ॥

[तु. नि. 'सकल बैसले भोजनपंक्ति'.] बैसलियें राजपंक्ति । मागणें नाहीं मागुती । वाढणें नलगे पुढती । अवघ्यां तृप्ती एकीची ॥ १११ ॥

दिव्यालंकार भूषणें । दिव्यांबरें परिधानें । सर्व गौरविले [भा. तं. सु. नि. गे. घा. 'सन्मानें'.] समसमानें । अवघेहि मनें विस्मित ॥ ११२ ॥

राजा म्हणे प्रधानाप्रति । आम्ही राजे चक्रवर्ती । आम्हांसी ऐसी नाहीं संपत्ति । ते ऋषि प्रति कैंसेनि ॥ ११३ ॥

पुरोहित सांगे ऋषिची थोरी । कामधेनु आहे त्याच्या घरीं । तिचेनि [तं. तु. सु. नि. गे. घा. 'प्रभावे करीं'.] प्रभवें करीं । दिव्योपचारीं [तु. नि. घा. 'वर्षत'.] नांदती ॥ ११४ ॥

ऋषिपासीं आहे कामधेनु । ऐसें आइकतां सहस्त्रार्जुन । ते आम्ही घेवों मागुन । ऐसा अभिमान दृढ धरिला ॥ ११५ ॥

राजा म्हणे जगदग्नीसी । थोर सुखी केलें आम्हासीं । कांहीं एक मागेन तुम्हासी । तें अवश्यतेसीं मज द्यावें ॥ ११६ ॥ [या ओवीनंतर 'कं. तं. तु. सु. नि. घा. गे.' या प्रतींत एक ओवी अधिक आली आहे. तं. नि. गे. घा. या प्रतींत आलेली ओवी पुढीलप्रमाणे आहे :——
'मी राजा आत्यंतिक । तुझा झालोंसे याचक । तुज मागेन कांहीं एक । तें आवश्यक मज द्यावें ॥'
तु. नि. या प्रतींत आलेली ओवी पुढीलप्रमाणे आहे :—
'राजा म्हणे जमदग्नीसी । थोर सुखी केलें आम्हांसीं । कांही एक मागेन तुजपासीं । ते अवश्यतेसीं मज द्यावें ॥']

अनुक्रमणिका

आश्रमीं आहे कामधेनु । ते मज द्यावी कृपाकरुनु । वचन आइकतां जमदग्नु । अति उद्विग्न पैं [कं. तु. 'तो'; तं. सु. नि. गे. घा. 'स्वयें'.] जाला ॥ ११७ ॥

कामधेनु स्वर्गभूषण । मृत्युलोकीं नाहीं जाण । [भा. /१ तं. 'जाया'; सु. गे. 'म्यां'; तु. नि. गे. घा. 'गाय'.] जायें आणिली इंद्रापासून । परवस्तुदान केवी द्यावीं ॥ ११८ ॥

राया तुझे पूजेच्या अंतीं । धेनु न्यावी इंद्राप्रती । ऐसीं करुनियां निगुतीं । आश्रमा प्रति आणिली ॥ ११९ ॥

राजा विचारी मानसीं । बळात्कारें नेवों धेनुसीं । इंद्र येईल धावण्यासी । [कं. सु. नि. गे. घा. 'शिक्षा'.] शीक मी त्यासी लावीन ॥ १२० ॥

सोडावया कामधेनु । रायें धाडिला प्रधानु । आडवा राहिला जमदग्नु । दैदिप्यमानु तेजस्वी ॥ १२१ ॥

जमदग्नीच्या तेजापुढें । प्रधान पळे मागिलें कडें । योद्धे पळाले निधडे । सैन्य बापुडें [तु. 'केवी राहे'; तं. 'निघे केवी'; सु. नि. गे. घा. 'ते किती'.] रिघे केवी ॥ १२२ ॥

ऐसें देखोनियां जाण । राजा [तु. सु. नि. गे. घा. 'धाविन्नला'; भा. /१ नि. 'धांविला'.] धावला आपण । [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] पुढां उभा जो जमदग्न । तो अणुप्रमाण ढळेना ॥ १२३ ॥

ऐसें देखोनियां त्यासी । राजा मोकळी शस्त्रासीं । ते लागों न शकलीं ऋषिसी । मग हातवसी [तु. 'निजखड्ग'; नि. घा. 'निर्वाण खडा'; भा. 'निर्वाण शस्त्र'.] निर्वाण ॥ १२४ ॥

जेथें विषयांचा अतिस्वार्थु । तेथे नाठवे कर्तव्यार्थु । [तु. नि. घा. 'राजा हस्तें' 'ऋषिघांत ऐसा अनर्थ ओढवला'; तं. 'राजा ऋषिते पावली घातु । तैसा अनर्थु ओढवला ॥'.] राजा ऋषि पावली घातु । तैसा अनर्थु वोडवला ॥ १२५ ॥

राजा अत्यंत क्रोधयुक्त । निर्वाण शस्त्र टाकित । तेणें ऋषिचा केला घात । पडिला अचेत जमदग्नी ॥ १२६ ॥

जमदग्नीनें सांडिला कोप । यालागीं त्यासी नेदवे शाप । तेणें रायाचा प्रताप । शस्त्रसाटोप चालिला ॥ १२७ ॥

जमदग्नीचा गेला प्राण । पळाले आश्रमीचे ब्राह्मण । राजा बोलिला आपण । आतां कामधेनु आणा रे ॥ १२८ ॥

धेनु सोडू आले सेवक । रेणुका क्षोभली अत्यंतिक । चक्र करोनिया ताटंक । युद्धां सन्मुख ते जाली ॥ १२९ ॥

ताटंक चक्राची तिखट धार । निधडे पडिले महाशूर । वाहती रुधिराचे महापूर । ती समोर कोण राहे ॥ १३० ॥

अनुक्रमणिका

ताटंक चक्राभेण । उठाउठी पळे प्रधान । [भा. /१ सु. नि. गे. घा. तु. 'सेवा निघे'; तं. 'सेना गेली'.] सेनानी गेला जीव घेवून । पळाले सैन्य बारावाटीं ॥ १३१ ॥

[तु. 'कामधेनुसी'; सु. नि. गे. घा. 'कामधेनुतें'.] कामधेनुचा लवलाहो । सोडूं धावो स्वयें राहो । रेणुकेने आसुडिला पाहो । पडे सहस्रबाहो मूर्च्छितु ॥ १३२ ॥

त्या सहस्रार्जुनाचे सुत । धांविन्नले क्रोधयुक्त । तेही युद्ध केलें अद्भुत । तंव सावचित नृप जाला ॥ १३३ ॥

निर्वाण शस्त्राचे घाये । रावों सोडी लवलाहे । [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] चक्र ते तिसी न लगतचि जावे । देखोनि रायें गजबजिला ॥ १३४ ॥

मज सहस्रार्जुनाचा यावा । न साहवे देवदानवां । [मु. 'मा मनुष्यांचा'; कं. 'मनुष्याचा'.] मनुष्यां कोण केवा । त्या मज लघुत्वा आणिले स्त्रियां ॥ १३५ ॥

चामुंडास्त्राचे प्रळयघात । बळें सहस्त्रार्जुन हाणत । साहोनिया एकवीस आघात । ते मूर्च्छित जगदंबा ॥ १३६ ॥

जमदग्नी आज्ञेचें बंधन । कामधेनुसी होतें पूर्ण । ऋषि निमंताचि जाण । धेनु निर्बंध स्वये जालीं ॥ १३७

रेणुका रणीं पडिल्यावरी । राजा धावोनि धेनु धरी । [पै. 'थडक हाणोनि उरावरी निघे बाहेरी'; तं. 'थडका हाणोनि उरावरी'; भा. सु. नि. गे. घा. 'थडका हाणोनि निघे बाहेरी'.] थडक हाणोनि रिघे बाहेरीं । सहस्त्रकरी नाटोपे ॥ १३८ ॥

राजा खुरावरी हाणे घात । तेणें खुरीं निघालें रक्त । खुरासनीं जाले [तं. 'तेथ'.] आरक्त । रणीं [कं. पै. तं. हे पद नाही; भा. /१ 'करिती'; तं. सु. नि. गे. घा. 'आले'.] युद्धार्थ रायासी ॥ १३९ ॥

खुरासनीं पळवूनि पाहों । राजा शिंगी हाणे घावों । जाला [पै. कं. तं. खेरीज इतरत्र 'सिंगाळाचा'.] शिंगळ्यांचा उद्भवो । तेहि सहस्त्रभावो आवरीला

आक्रंदें दे हंबरड्यासी । ते ठायीं [भा. तु. सु. गे. 'जाले काळेमसी'; नि. घा. 'झाले काळेमसी'.] काळेमसी । जन्म पावले हबसी । [तु. 'तिहीं सहस्त्रबाहो आवरिला'; सु. नि. गे. घा. 'तिंही सहस्त्रबाहु हांकिला'.] तिहीं रायासी युद्ध केलें ॥ १४१ ॥

इतकें करोनियां कंदनु । स्वर्गा गेली कामधेनु । राजा जाला अति उद्विग्नु । म्लानवदनु अनुतापीं ॥ १४२ ॥

म्हणे स्वार्थ ना परमार्थ । गाईसी केला शस्त्रपात । मज घडला ब्रह्मघात । सद्य अनर्थ सलोभें ॥ १४३ ॥

राजा अनुतापें मानसीं । कांहीं नोबले कोणासीं । घेवूनि सकळ सैन्यासी । निजनगरासी तो गेला ॥ १४४ ॥

रणीं रेणुका मूर्च्छापन्न । ते स्वयें होऊनि सावधान । ठायीं ठेऊनियां प्राण । चेतना संपूर्ण फावली ॥ १४५ ॥

अनुक्रमणिका

कदन देखोनि आत्यंतिक । आक्रंदें दिधली हांक । फरशरामा पाव आवश्यक । माझें निज दुःख [तु. 'साहावया'; भा. सु. नि. गे. घा. 'निवारावया'.] निरसावया ॥ १४६ ॥

तो मातेचा महाध्वनी । कैलासीं पडे तुझ्यां कानीं । तूं आलासी तत्क्षणीं । मातृवचनीं अति भक्ति ॥ १४७ ॥

हे पूर्वकथा [तु. नि. घा. 'इतिहासी'; कं. 'विगतहासीं'.] विग्रहासी । जाली होती जैसी तैसीं । ते सांगितली फरशरामासी । आश्रमवासी ब्राह्मणीं ॥ १४८ ॥

ऐसी आईकोनि वार्ता । सवेग पाहों आला मातां । तिसी धायवट देखतां । आक्रंदतां गहिंवरला ॥ १४९ ॥

रेणुका म्हणे पुत्रासी । तूं काय येथें रडों आलासी । पुरुषार्थ नाहीं तुजपासीं । कैवारी होसी तूं कायें ॥ १५० ॥

आईकोनि मातेच्या वचना । फरशरामु लागे चरणां । शीघ्र मज देई अनुज्ञा । सहस्त्रार्जुना छेदीन ॥ १५१ ॥

क्षोभें आज्ञा दिधली दुर्धर । सहस्त्रार्जुनाचे सहस्त्रकर । छेदुनि निवटीं [मु. 'त्याचें शरीर'.]शिर । दानव समग्र निर्दळीं ॥ १५२ ॥

युद्धामाजीं शस्त्रास्त्रीं । मज घायवट केलें क्षेत्रीं । [भा. कं. 'ते त्वां करावें निक्षेत्री'; तं. 'तुवां करावें निक्षेत्री'; तं. 'तुवां करावें बा निक्षेत्री'; त. 'ते तो करावें निक्षेत्री'; तु. 'तरी पृथ्वी करावी निक्षेत्री'.] ते तां करावा निक्षत्री । [भा. 'शोध शोधू मारी'; तं. 'शोधून मारी'; कं. तं. 'शोधूनियां मारी'; तु. 'धू धू मारीं करूनिया'; सु. नि. गे. घा. 'धुंड मारी करोनिया'.] छेदुनि मारी समग्र ॥ १५३ ॥

रायाचे [तु. 'सहस्त्रार्जुनासहितसूत'; तं. 'तयाचे निजसूत'; नि. घा. 'सहस्त्रार्जुनासहित राजसूत'.] राजसूत । शोधूनि मारावे समस्त । दैत्य मातले उन्मत्त । समुळीं घात करी त्याचा ॥ १५४ ॥

माझें शरीर तें धरित्री । एकवीस घाय केले क्षेत्रीं । एकवीस वेळां निःक्षंत्री । पृथ्वी करी ममाज्ञा ॥ १५५ ॥

वंदुनि मातेचें [तु. सु. नि. गे. घा. 'चरण'.] वचन । घेऊनिया धनुष्यबाण । फरश धरूनिया दारुण । कोपायमान चालिला ॥ १५६ ॥

मातेची आज्ञा निःसीम । मुळपीठ पवित्र परम । तेथ मी करीन [भा. 'संग्राम'; तु. सु. नि. गे. घा. कं. 'सहगम'.] सहगमन । मग उत्तरकर्म तू करीं ॥ १५७ ॥

ऐसें बोलतांचि पाहीं । रेणुका प्रवेशे जमदग्नी देहीं । तिचें प्रेत उरलें नाहीं । तें देहींच विदेही जगदंबा ॥ १५८ ॥

फरशराम ललाट पिटी । माते मज दे कां भेटी । येरीं वो दिधला मूळ पिठीं । सांगितली गोठी करावी ॥ १५९ ॥

अनुक्रमणिका

मग [तु. सु. नि. गे. घा. भा. 'सिंहाद्रिसी'; कं. तं. तं. 'सिह्याद्रिसी'.] सह्याद्रीसीं फरशराम । करुनि दोहांचें उत्तरकर्म । [तं. सु. गे. तं. 'आरंभिला'; नि. घा. 'पुढे आरंभिला'; तु. 'पुढे आरंभी'.] आरंभीं युद्धधर्म । परमसंग्राम रायासीं ॥ १६० ॥

जेथ वसे सहस्त्रार्जुन भूपती । [तु. 'त्यासी हाकु आला'; सु. नि. गे. घा. 'तेथें ठाकोनि आला'.] ते टाकुनि आला महिकावती । धनुष्यबाण घेऊनि हातीं । [तु. 'मग रायाप्रति पैं आला'; भा. सु. गे. तं. 'नगराप्रति राहिला'; नि. घा. 'नगराप्रति पै आला'.] नगर प्रांतीं राहिला ॥

[मु. 'जैं' हे अधिक पद.] विभांडून राजनगरी । तैं प्रजा पीडती समग्रीं । [मु. प्रतीत 'तैं' हे अधिक पद.] राजा प्रजा निघालिया बाहेरीं । सहपरिवारीं मारीन ॥ १६२ ॥

बाहेरी येवूनि करावें रण । सांगूनि धाडूं धर्मवचन । नगरी [भा. 'भांडितां'.] भिडतां आपण । होईल कदन प्रजासी ॥ १६३ ॥

ऐसें आइकोनिया जाण । राजा नयेल मज भेण । तैं नगरी प्रवेशों आपण । राजभवन लक्षून ॥ १६४ ॥

प्रजांसी देवों अभयदान । स्वतः राखोनि गोब्राह्मण । राजभवनीं प्रवेशोन । सहस्त्रार्जुन वधीन ॥ १६५ ॥

युद्धासी यावें मजप्रति । सांगोनि धाडूं कवणां हातीं । ऐसें विचारितां चित्तीं । पुष्पहस्ती भेटला ॥ १६६ ॥

रायाचा देवपूजेचा माळी । फुलें घेऊनिया करतळीं । ब्राह्मणाची अभिनव शैली । देखोनि [तु. 'प्रातःकाळीं'.] जवळी पाहों आला ॥

फरशुराम पुसे त्यासी । फुलें नेतोसी कवणासीं । तो म्हणे मी रायाचा विश्वासी । देव पूजेपासीं पुष्पधारी ॥ १६८ ॥

राम सांगे [नि. घा. 'पुष्पधाऱ्यासीं'. त. 'फुलाऱ्यासी'.] फुलधरासी । जाऊनि सांग रायापासीं । मजसी यावें युद्धासी । सकल सैन्येसी सन्नध ॥ १६९ ॥

आइकोनि रामवचनासी । माळी त्यातेंचि उपहासी । मरण धरणें कां बैससी । युद्ध रायासीं वांच्छित ॥ १७० ॥

अंगीं दिसे ब्राह्मणपण । तुज कां आले धनुष्यबाण । फरश धरावया काय कारण । तुवां वेदपठन करावें ॥ १७१ ॥

राजा सैन्येंसीं सन्नद्ध सबळ । तूं एकाकी ब्रह्मबाळ । तुज त्यासी युद्ध प्रबळ । रणकल्लोळ घडे केवीं ॥ १७२ ॥

जे जे [पै. 'मार्गीं'.] मार्गस्थ देखती । ते म्हणती द्विज अपघाती । [तं. 'त्यासी केवी युद्ध प्राप्ती'.] रायासी युद्धप्राप्ती । हा मरणार्थी आतुर ॥ १७३ ॥

अनुक्रमणिका

क्षत्रियासी युद्धाचें बळ । ब्राह्मण शापबळें सबळ । तो तूं वांछिसी युद्ध प्रबळ । पूर्ण केवळ अविवेकी ॥ १७४ ॥

फुलारी म्हणे मज सांगतां । राजा करील तुझ्या घाता । ब्रह्महत्या बैसेल माझे माथां । मी सर्वथा सांगेनां ॥ १७५ ॥

[सु. नि. गे. घा. 'मग परशुराम म्हणे मनीं'.] फरशराम विचारी मनीं । साधुत्व येथें कोण्ही न मनी । पुरुषार्थ देखिल्या जनीं । वचन मानीं भलेता ॥ १७६ ॥

ऐसें फरशराम [सु. नि. गे. घा. 'अवधारी'.] निर्धारी । मग धुमसिला फुलारीं । फुलें हिरोनिया घे करीं । जाय शंख करी सभेसी ॥ १७७ ॥

आघातें पिडला फुलारीं । शंख करीं राजद्वारीं । आईकोनि धाकती नरनारी । राजा भीतरीं जीतु कीं मेला ॥ १७८ ॥

सहस्त्रार्जुनाच्या राज्याभीतरीं । बोंब नायकों स्वप्नांतरीं ।
ते बोंब पडिली राजद्वारीं । राजा भीतरीं जीतु कीं मेला ॥ १७९ ॥ [भा. प्रतीत ही ओवी नाही.]

ऐसीं विश्वतों मुखीं वार्ता । भविष्य वदे वाग्देवता । ते बोंब रायें आईकतां । चळकापु चित्ता सुटला ॥ १८० ॥

म्यां गाईसी केला शस्त्रपात । [तु. 'आणि ब्राह्मणाचा केला घात'; नि. घा. 'आणि ब्राह्मणा केला घात'; तु. 'ब्राह्मणा केला शस्त्रघात'. त. ब्राह्मण केला ब्रह्मघात.] ब्राह्मणा केला ब्रह्मघात । पाप आचरलों अत्यद्भुत । जयों निश्चित मज नये ॥ १८१ ॥

फुलाधरा पुसे प्रधान । तुझ्या बोंबेसी काय कारण । तो म्हणे एकु आलासे ब्राह्मण । धनुष्यबाण फरशेसीं ॥ १८२ ॥

तो रायासी [तु. 'खंदळी'; भा. सु. नि. गे. कं. घा. 'समदळी'.] संवदली । युद्ध करू पाहे [त. 'महाबळी'.] बळी । तो म्हणे सांग राजा जवळी । त्याची वचनाळी [पै. त. सु. गे. खेरीज 'शस्त्र छेदिला'; सु. नि. गे. घा. 'धुमसिलें'.] छळिली म्यां ॥

रायासीं ब्राह्मणयुद्ध । बोलणें तुझें अति अबद्ध । तेणें ब्राह्मणासी आला क्रोध । तेणें सुबद्ध [तं 'कोपें करीत'; सु. नि. गे. घा. 'फें फें करितां'.] त्राहाटिलें ॥ १८४ ॥

फुलें हिरोनियां करीं । करें त्राहाटिलें मुखावरी । तेणें मज आलें जीवावरी । यालागीं करीं महाशब्द ॥ १८५ ॥

प्रधानें बोलाविला सेनानी । ब्राह्मण आणावा धरूनि । तेणें ठाणांतरीं पाचारुनी । ब्राह्मणा बांधोनि तुम्ही आणा

अनुक्रमणिका

बाहेरी निघाला ठाणांतरीं । पुढें पायकाचिया हारी । एक गर्जती हां हां कारीं । एक शस्त्रें करी झेलिती ॥ १८७ ॥

नगर नागरिक लोक । तेथें आले स्वाभाविक । हे बहुत तो एकला एक । युद्धकौतुक पाहों पां ॥ १८८ ॥

फरशराम म्हणे हे दीन । मारिल्या पुरुषार्थ कोण । यांचां रायासीं अपशकुन । होय तैसें चिन्ह करूं यासी ॥ १८९ ॥

ऐसें म्हणोनि सोडिला बाण । अवघ्यांचीं शस्त्रें छेदून । सवेंचि नाक कान सरकटून । बाण परतोनि भाता रिघे ॥

कोन्हाचा व्याही जांवई । कोणाचा भेटों आला भाई । कौतुक पाहातां तेही । नाकां कानां पाहीं मुकले ॥ १९१ ॥

कोन्हाचा पाहुणा मेहुणा । जांवई आणिला दिवाळसणा । ते ते मुकले नाकां कानां । दावितां वदना सलज्ज ॥ १९२ ॥

शंख करिती आक्रंदोनी । नाक कान गेले दोन्ही । फें फें [पै. त. सु. गे. खेरीज 'शस्त्र छेदिला'; सु. नि. गे. घा. 'धुमसिलें'.] करीत निघे ध्वनी । हे विटंबणी युद्धाची ॥ १९३ ॥

सन्मुख घाई गेल्या प्राण । तें वीरांसी उत्तम मरण । परि जितां गेल्या नाक कान । तैं चौगुणें मरण [त. 'जन निंद्यत्वें'; तु. 'जघन्य'; सु. नि. गे. घा 'निंद्यत्वें'.] जघन्यत्वें ॥

वीर विटंबिले अनेक । नगरामाजीं पडिली हांक । कोपले राजपुत्र विटंक । सन्नद्ध कटक तिहीं केलें ॥ १९५ ॥

साठी प्रयुतें कुंजर । कोट्यानुकोटी रहंवर । अमित चालिले असिवार । पायांचे मोगर गर्जती ॥ १९६ ॥

सेनामुखीं सेनानी । राजपुत्र मध्यमानीं । दक्षिणे राजे मुकुटमणी । चंड प्रचंड दोन्ही वामभागीं ॥ १९७ ॥

वेगें निघतां सहस्रार्जुन । कुमर आणि प्रधान । तिहीं राहविला प्रार्थुन । बांधोनि ब्राह्मण आणों आम्ही ॥ १९८ ॥

आम्ही असतां इतुके जण । एकला एक ब्राह्मण । त्यावरी निघावें आपण । हें [त. 'शूरपण भारी'; भा. 'समरांगण'; 'नि. घा. 'समरांगण'.] समरंगण नव्हे राया ॥ १९९ ॥

यापरी मंत्रीं आणि कुमरीं । राजा राहवोनियां नगरीं । आपण येऊनिया [नि. घा. 'दळभारी'; त. 'भीतरी'; सु. गे. 'येऊनिया बाहेरी'.] भारीं । [सु. गे. 'रणामाझारीं चालिलें'; नि. घा. तु. 'नगरा बाहेरी निघाले'.] भार बाहेरी काढिले ॥ २०० ॥

पुढां भेटले निर्नासिक । तो अपशकुन आत्यंतिक । मुख्य रायासीच घातक । हा आवश्यक शास्त्रार्थ ॥ २०१ ॥

जळो तुमचें निंद्य मुख । मुहूर्तीं आलेति कां सन्मुख । अवघे निर्भर्त्सिती लोक । तें अति दुःख घायाळां ॥ २०२ ॥

घायाळ बोलती आपण । ब्राह्मण कोण्हाचे नेघे प्राण । तुम्ही वाचवा नाक कान । तें दादुलपण [भा. सु. नि. गे. घा. 'जाणवेल'; तु. 'कळेल तुमचें'.] कळेल ॥ २०३ ॥

प्रधान बोलिला आपण । परतों नये अपशकुना भेण । परतणें थोर अपशकुन । अति [मु. 'निंद्य'.] जघन्य जगामाजीं ॥ २०४ ॥

युद्ध करितां परस्परीं । एका [मु. 'जय'. संपादित प्रत श्लोक २, ओव्या २०९. इतर प्रतींत ही संख्या अशी : 'नि. घा. १,२१७; इं. सु. १,२१०; गे. २१०; तु. २,२१७; पै. भा. २, २०९; तं त. कं. २, २१०'.] जैत एका हारी । हें न चुके भलत्यापरी । शकुनाची थोरी मूर्ख मानी ॥ २०५ ॥

अंगीं नाहीं आंगवण । त्यासी काई जयो देईल शकुन । हें मानिती तें मूर्खपण । शूरांचें लक्षण ऐसें नव्हे ॥ २०६ ॥

देव असे शकुनांच्या ठायीं । तो कायें अपशकुनीं नाहीं । शकुना अपशकुनांचें कांहीं । निधडें पाहीं न मानिती ॥ २०७ ॥

ऐसें बोलोनि प्रधान । भेरी त्राहाटिल्या निशाण । सैन्य चालविलें संपूर्ण । पुढां ब्राह्मण लक्षूनि ॥ २०८ ॥

एका जनार्दना शरण । दानवांचें युद्ध दारुण । राम करील निर्दळण । तें रणकंदन अवधारा ॥ २०९ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां सहस्रार्जुनफरशरामयुद्धप्रभवो नाम शोडषप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सतरावा

## चाप निरूपण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

फरशराम पाहे [मु. 'दुरुन'.] सैन्य । निर्नायकी [मु. 'दिसे सैन्य'.] सेना प्रधानाधीन । राजा आला नाहीं आपण । राजपुत्र [सु. गे. 'संधान'.] पूर्ण देखिले ॥ १ ॥

रायाचे राजसूत । शोधुनि मारावें समस्त । हे मातेची आज्ञा समर्थ । तो मी कार्यार्थ साधीन ॥ २ ॥

केला त्रिंबकाचा टणत्कार । नादें मूर्च्छित जाले सुर । [मु. 'दुमदुमले गिरीकंदर'; त. 'गजबजिले करिती किरकिर'; तु. 'गजबजोनी करिती कीर'; तं. कं. 'गजबजिले करिती कीर'.] गजबजिले कीर्तिकार । राजकुमर धाकिन्नलें ॥ ३ ॥

धाकें दचकला प्रधान । उभा ठेला धैर्य धरून । सैन्यें उभउभ्या [तं. 'सोडिला'; मु. 'सांडिती'; कं. 'सांडी'.] सांडिला प्राण । टणत्कारें पूर्ण नभ [भा. 'भरलें'; सु. नि. गे. घा. 'कोंदले'.] केलें ॥ ४ ॥

बाण सोडिला सिंहमुख । [मु. प्रतीत 'तेणे' हे अधिक पद आहे.] गज मारिले निःशेष । रथांचे छेदुनिया आंख । [नि. घा. 'वाजींची मस्तकें फोडिलीं'; तु. 'रायाचे मस्तक फोडिलें'; पै. तं. तु. कं. 'रायाचे मस्तक पाडिलें'.] वाजींचें मस्तक छेदिलें ॥ ५ ॥

बाण पिसारा सुटला वारा । [त. 'तेणे' हे अधिक पद.] कोटी कोटी रहंवरां । उडऊनि नेले अंबरा । [तु. त. 'वरिल'; भा. सु. नि. गे. घा. 'वरिल्या'.] वरिला वीरा आवर्तु ॥ ६ ॥

वरील वीर तळी पडत । [मु. 'तळी'.] तळीला धुरा चूर होत । रथ अंगभारें आदळत । तेणें पीठ होत शूराचें ॥ ७ ॥

बाण सोडिले संपूर्ण । आवर्तीं [कं. तं. पै. खेरीज इतरत्र 'पाडिलें'.] पाडिलें सैन्य । जो जिकडे सरे चुकऊन । तिकडेचि बाण [कं. पै. तं. त. खेरीज इतरत्र 'खडतरती'.] कडतरती ॥ ८ ॥

धाकें धाकें घायाभेण । आडवीं वोडविती वोडण । वोडण फोडुनियां बाण । सर्वांगीं संपूर्ण [मु. 'भेदिले'; कं. पै. संपादित पाठ; इतरत्र 'खोचिती'.] खोंचितु ॥ ९ ॥

रामें [त. 'माजविली'.] मांडिली [भा. /१ 'रणफळी'; तु. त. सु. नि. गे. घा. 'रणकळी'.] रणकेली । शिरांची [तु. नि. घा. 'केली'.] खेळे चेंडुफळी । राजे मारिले आतुर्बली । रुधिरांजळी प्राशिती भूतें ॥ १० ॥

सैन्या देखोनि महामार । [पै. 'कळवलें' तु. कं. 'कळवळिलें'; त. सु. नि. गे. घा. 'खळबळिले'.] खवळले राजकुमार । प्रधान धाविन्नला समोर । अति दुर्धर निजयोद्धा ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

बाणांचिया झडाडां । प्रधान उठविला रोकडा । नेऊनि [मु. 'टाकिला'.] पाडिला रायापुढां । मस्तकीं तडा पडोनि मेला ॥ १२ ॥

चंड आणि प्रचंड । त्याहीं युद्ध केलें वितंड । त्यांचे छेदुनिया बाहुदंड । दोहींचें मुंड पाडिलें ॥ १३ ॥

दोघै पाडिले अति दुर्धर । रणीं उठला हाहाकार । हांका दे त्यांचें छेदी वक्त्र । वीरें वीर आटिला ॥ १४ ॥

मग लक्षिलें राजकुमर । तेही चालिले अति दुर्धर । [नि. घा. 'चाले'.] युद्ध जाहले घोरांदर । शस्त्रास्त्र लाघवें ॥ १५ ॥

बाणें बाणांतें तोडित । शस्त्रें शस्त्रांतें झोडित । अस्त्रें अस्त्रांतें मोडित । मग वोढित [तु. नि. घा. 'निर्वाणशस्त्रें'.] निर्वाण ॥ १६ ॥

रामें छेदिलें त्यांचे रथ । सारथी मारिले [तु. नि. घा. 'शतानुशत'.] निमिषांत । [मु. 'वीर'.] वारु मारुनिया तेथ । अवघे विरथ रणीं केलें ॥ १७ ॥

अंतकांतक अर्धचंद्रें । निःशेष त्यांचीं छेदिलीं शस्त्रें । सवेंचि त्यांची निवटिलीं शिरें । अवनी रुधिरें प्रवाहे ॥ १८ ॥

राजपुत्र पड़िंतां क्षितीं । पडिल्या वीरांचिया [त. 'चळथी'; भा. कं. 'पाती'; तु. नि. गे. घा. त. 'पांथी'.] पंक्ति । रामें रणीं लाविली ख्याती । केली शांती सर्वांची ॥ १९ ॥

रणांगणा जे जे आले । ते ते निःशेष निर्दळिले । बोंब सांगावया नाहीं उरले । रामें केले निक्षत्री ॥ २० ॥

[भा. /१ 'अश्वगत पदाती'; तं. तु. 'अश्वगज रथ पदाती'; नि. घा. अश्वगज रथ पदपदाति'.] अश्वगज पदपदाती । अतिरथी महारथी । जे जे आले युद्धाप्रति । त्यांची समूळ शांती भार्गवें केली ॥ २१ ॥

प्रधान पाडिला [भा. /१ सु. गे. घा. 'पडिला रण मोदिनीं'.] राजभवनीं । पुत्र [मु. 'पडिले'.] पाडिले रणांगणीं । राजा क्षोभला आइकोनि । युद्धालागुनि उठावला ॥ २२ ॥

सैन्य निमालें समस्त । उरले [तु. 'पार्श्वं'; सु. नि. गे. घा 'पार्बद'.] पार्श्वद [तं. तु. त. सु. नि. गे. घा. 'पांच शत'.] पांचसात । राजा एकाकी युद्धार्थ । बैसला त्वरित रथावरी ॥ २३ ॥

राजा मनीं करी विचार । म्या गाईब्राह्मणा लाविलें शस्त्र । तेणें मी जालों अपेशपात्र । [मु. प्रतीत 'आता' अधिक पद.] करावें [सु. गे 'क्षेत्रे'; तु. नि. घा. 'क्षात्र'.] क्षत्र क्षात्रधर्मे ॥ २४ ॥

दावीन क्षात्रधर्म करणीं । फरशरामु त्रासीन वाणीं । कटाक्षें भिडेन रणांगणीं । निजनिर्वाणीं युद्धार्थी ॥ २५ ॥

तो सूड मागेल पित्याचा । मी सूड घेईन पुत्रांचा । पाहों पराक्रम दोहींचा । गर्जोनि वाचा उठावला ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

फरशराम सतेज बोले । जेवुनिया घर घेतलें । तें [नि. घा. ‘तुवांचि दुष्टा साच केलें’ तु. ‘त्वां दुष्टा साच केले’; सु. गे. ‘तुवांचि साच केले’.] तें तुवां साच केलें । निर्वैरा मारिले जमदग्नी ॥ २७ ॥

जमदग्नीनें सांडिला कोप । त्यावरी तां केला प्रताप । वृथा करिसी बळाचा जल्प । तूं अति अल्प लघुत्वें ॥ २८ ॥

स्त्रियांवरी तुझा पुरुषार्थ । माझी माता [पै. कं. खेरीज इतरत्र ‘पडली’.] पाडिली मूर्च्छित । तो तूं सांपडलासी येथ । तुझा निःपात मी करीन ॥ २९ ॥

ऐसें आइकता [सु. गे. घा. ‘वचनबीज’.] वचन पुंजु । कोपें चालिला सहस्त्रभुजु । त्यावरी लोटला द्विभुजु । धरावया गजु केसंरी जैसा ॥ ३० ॥

जमदग्नीचा अति क्रोध । होता फरशरामीं प्रसिद्ध । तो खवळला अति विरुद्ध । रायाचा [तं. ‘कंठ’; मु. ‘कंडू’.] कंद छेदावया ॥ ३१ ॥

कोपें धनुषा [नि. गे. घा. कं. ‘वाहिला’; सु. ‘पाहिला’.] वाईला गुण । काढिले अति तीक्ष्ण बाण । सरिसावला सहस्त्रार्जुन । युद्ध दारुण मांडलें ॥ ३२ ॥

दोहींचे बाण [मु. ‘तिखट’.] अति उद्भट । बळें [मु. ‘पिच्छांचा झुंझाट’; तु. ‘शरांचा सुसाट’; कं. ‘शरांसी झुंझाट’.] शरांसी सुसाट । गगनीं [भा. तु. सु. नि. गे. घा. कं. ‘बाणाचा’.] बाण [तु. ‘झणझणाट’.] खणखणाट । हव्यवाट उठिला ॥ ३३ ॥

बाण बाणांतें निवारी । शस्त्र शस्त्रातें संहारी । अस्त्र अस्त्रातें स्वयें वारी । शस्त्रास्त्रीं प्रवीण ॥ ३४ ॥

सहस्त्रभुजांचा [पै. भा. त. कं. संपादित पाठ. इतरत्र ‘धनुर्वाडा’.] धनुवाडा । द्विभुजें लाविला वेढा । बाणांचिया [तु. सु. नि. गे. घा. ‘झडाडा’.] झडपडा । कांहीं कैवाडा स्मरेना ॥ ३५ ॥

याचि लाघवामाजीं देख । रामें रथाचा छेदिला आंख । सारथी मारिला निःशेख । वारू अमोलिक पाडिले रणीं ॥

मागुनिया [तु. नि. घा. ‘रथांचि’.] विरथांची भरणी । ते वीर रामें छदिले बाणीं । साहाकारी नाही कोण्ही । एकला रणीं उरे रावो ॥ ३७ ॥

विरथी राजा उरे आपण । क्रोधें मांडिलें निर्वाण । अस्त्रें अनिवार योजून । ज्याचें निवारण नेणती कोण्ही ॥ ३८ ॥

दंडास्त्र आणि [मु. ‘चंडास्त्र’.] खंडास्त्र । सवेंचि सोडिलें प्रचंडास्त्र । वेगें मोकली वितंडास्त्र । घोरघोरास्त्र अनिवार्य ॥ ३९ ॥

अनुक्रमणिका

देखोनि [मु. ‘शस्त्रांचा’.] अस्त्रांचा संभार । राम नेटका धनुर्धर । [मु. ‘शस्त्रांचा’.] अस्त्रें अस्त्रांचा संहार । करी तो प्रकार अवधारा ॥ ४० ॥

दंडे दंडिलें दंडास्त्रा । अखंडें [मु. ‘खंडे’.] खंडिलें [क. पै. ‘खंडणास्त्रा’.] खंडास्त्रा । चंडें छेदिलें प्रचंडास्त्रा । छेदिलें [मु. ‘घोरास्त्र’.] घोरघोरास्त्रां अघोरास्त्रें ॥ ४१ ॥

निर्वाणास्त्रें समस्त । रामें केलीं वाताहत । मग अनिवार्य अति अत्यंत । ते [पै. तं. ‘ते चामुंडा अद्भुत घेतलें रायें’; सु. गे. ‘तो चामुंडा अद्‌भुत घेतली रायें’; भा. ‘चामुंडा अद्भुत घेतलें रायें’; तु. नि. घा. चामुंडास्त्रा घेतलें रायें’.] चामुंडास्त्र अद्भुत घेतलें रायें ॥ ४२ ॥

पूर्वी मर्दिलें चंडमुंडासी । ते [कं. पै. तं. खेरीज इतरत्र ‘चामुंडाशास्त्र’.] चामुंडा हातवसी । रामु आव्हानी महाकालीसी । चामुंडा दासी तियेची ॥ ४३ ॥

चामुंडेसी म्हणे कालिका । माझें स्वरूप ते रेणुका । तिच्या पतीच्या घातका । तो तूं आवश्यका निर्दळीं ॥ ४४ ॥

चामुंडा काळिकेची दासी । हें सत्य न [तु. ‘माने’; त. त. सु. नि. गे. घा. ‘मानेल’.] मनेल ज्यासी । तिहीं पाहावें सप्तशतीसी । चंडमुंडांसी जेथ वधिलें ॥ ४५ ॥

काळिकेसी करूनि नमन । लाहोनि तिचें आज्ञापण । चामुंडा परतली आपण । करावया दळण रायाचें ॥ ४६ ॥

चामुंडा वळिली उफराटी । सहस्त्रार्जुन देखे दृष्टीं । माझीं अस्त्रें मज लागलीं पाठीं । [मु. प्रतीत हे पद नाही.] तेणें धाकें पोटीं गजबजिला ॥ ४७ ॥

चामुंडेचें निवारण । माझे मी नेणें आपण । अवश्य मज आलें मरण । धाकें संपूर्ण [तु. सु. नि. गे. घा. ‘कांपत’.] गजबजिला ॥ ४८ ॥

रामें त्याचि क्षणामाझारीं । फरश घेऊनिया करीं । सहस्त्रभुजांचीं कांडोरीं । धरणीवरी पाडिलीं ॥ ४९ ॥

साधुनि निर्वाणींचा आवो । मग मस्तकीं घाली घावो । तेणें घायें महाबाहो । पडिला पाहों क्षितीतळीं ॥ ५० ॥

शिर उडालें अंतराळीं । जीवें फरशरामासी ओवाळी । मग उतरलें पायांजवळी । चरणीची धुळी वंदावया ॥ ५१ ॥

[मु. ‘सद्भावें’.] प्रेमें आदरिली स्तुती । मी [मु. ‘गोब्राह्मण परमघाती’; तु. कं. ‘गोब्राह्मण घाती’; भा. /१ ‘गोब्राह्मणाचा घाती’.] गोब्राह्मणब्रह्मघाती । त्या मज शस्त्रधारातीर्थी । पापनिष्कृती निजकरें केली ॥ ५२ ॥

अनुक्रमणिका

छेदिला सहस्त्रभुजाभार । [मु. प्रतीत ही पदे नाहीत.] नातो छेदिला अहंकार । छेदुनि वासनासंभार । जीवोद्धार त्वां केला ॥ ५३ ॥

छेदिले माझें कर्माकर्म । छेदिले माझे धर्माधर्म । छेदुनि माझा मोहभ्रम । ब्रह्म परम मज केलें ॥ ५४ ॥

छेदिलें माझें पुण्यपाप । छेदिलें माझें नामरूप । छेदुनि संकल्प विकल्प । ब्रह्म निर्विकल्प मज केलें ॥ ५५ ॥

छेदिलें [पै. भा/१, त. कं. खेरीज इतरत्र 'अहंसोहंपण'.] अहंसोहंकोहंपण । निःशेष छेदिलें [मु. 'मीपण'.] मीतूंपण । छेदुनि एकत्वाचें एकपण । ब्रह्म परिपूर्ण मज केलें ॥ ५६ ॥ [तु. प्रतीत ही ओवी नाही.]

ऐसें करितां स्तवन । प्रेमें पूर्ण झाले नयन । मस्तकीं वंदुनिया चरण । सांडिला प्राण सहस्त्रार्जुने ॥ ५७ ॥

मातेची आज्ञा अति सधर । पहिले छेदावे सहस्त्र कर । मग छेदावें त्याचें शिर । तोचि प्रकार रामें केला ॥ ५८ ॥

सहस्त्रार्जुन पाडिला क्षेत्रीं । सेवेचि तिन्ही सप्तकें धरित्री । फरशरामें केली निःक्षेत्री । आज्ञेवरी मातेचिया ॥ ५९ ॥ [या ओवीनंतर पै प्रतीत पुढीलपैकी प्रथम आलेल्या दोन ओव्या अधिक आहेत आणि तु. नि. घा. या प्रतींत पुढे दिलेल्या सर्वच ओव्या अधिक आलेल्या आहेत. तं. भा. सु. गे. प्रतींत हा विस्तार नाही.
'एका जनार्दना शरण । जालें रेणुकापुराण । आतां जानकीचें लग्न । सावधान अवधारा ॥ १ ॥
सांगतां धनुष्य प्रकरण । प्रसंगें आलें रेणुका आख्यान । कथेसी जालें विलक्षण । श्रोतीं संपूर्ण क्षमा कीजे ॥ २ ॥
रामें निक्षत्रीं पृथ्वी करितां । मिथुळेसी आला अवचितां । ऋषिवृंदासी होय पुसता । येथें राजकर्ता कोण होय ॥ ३ ॥
ऋषि सांगती परशुरामा । हा चक्रवर्ती धर्मात्मा । देही असोनि विदेही धर्मा । अगाध महिमा पै याचा ॥ ४ ॥
ऐसें ब्राह्मण बोलिलें उत्तर । तंव जनक सामोरा आला सत्वर । आलिंगुनीं परमादर । रामासहित ऋषीश्वर गृहा गेले ॥ ५ ॥']

जनकुराजा ब्रह्माधिकारी । फरशरामु त्यांते न मारी । एकात्मता प्रीती [मु. 'करी'.] पुरी । त्याच्या घरी राहिला ॥ ६० ॥

जनकें फरशरामासी । राहविलें भोजनासी । रामासवें अपार ऋषि । जनकें त्यासी निमंत्रिले ॥ ६१ ॥

रामें ठेऊनि धनुष्यबाण । स्वयें केलें संध्यास्नान । भीतरीं करावया भोजन । ऋषिपंक्ति पूर्ण बैसली ॥ ६२ ॥

ताटें वाढिलीं चोखडीं । अवघिया रसां एकी गोडी । जनकें अत्यंत आवडीं । केली परवडी भृगुवर्या ॥ ६३ ॥

तें देखतांचि परिपक्कान्न । देखणे देखती निजनयन । दृश्य द्रष्टा दर्शन । समरसें लोचन सुखी जाले ॥ ६४ ॥

स्वानंदें भोजनीं देता मिठी । शब्दी निःशब्दता श्रवणीं उठी । तेणें श्रवणाचां पोटीं । सुखसंतुष्टी स्वानंदें ॥ ६५ ॥

[तु. तं. सु. नि. गे. घा. 'या परी पक्वानाचा'; त. 'त्या परिपक्वानाचा'.] त्या परिपक्व पक्वान्नांचा वास । [तु. 'वाचा समरसीं'; सु. नि. गे. घा. 'सबाह्य समरसी'.] वासा समरसी परेश । तो येतांचि सुवास । सुख उल्हास घ्राणासी ॥ ६६ ॥

अनुक्रमणिका

तें [पै. तं. तु. कं. खेरीज इतरत्र 'सदन्न'.] सत्सदन्न स्पर्शतां । हातां आली [मु. 'अकर्मात्मकता'.] अकर्तात्मता । सुधा तृषा नित्यतृप्तता । क्रिया चित्सत्रा स्वयें जाली ॥ ६७ ॥

तो सेवितां रसास्वाद । रसनेमाजीं निजानंद । उदरीं कोंदला परमानंद । सबाह्य स्वानंद रसस्वादीं ॥ ६८ ॥

ऐसें करितां भोजन । मने मनचि उन्मन । समाधीसी समाधान । अन्नचि चैतन्य [भा/१ 'सुखी केलें'; तं. 'स्वसुख जाहलें'; सु. नि. घा. 'स्वयें जालें'; कं. 'स्ववस्तुसे जालें'.] स्वसुखें जालें ॥ ६९ ॥

[तु. 'सकल सावधानेसी वरी लवण'; भा. 'रसने साधनेंसी वरी लवण'; त. सरले 'साधनेंसी वरळपण'; सु. नि. गे. घा. 'सकल साधनेसी वरी लवण'.] सरलें साधनेसी वरलवण । तंव तृप्ती जाली संपूर्ण । श्रीरामाचिये पंक्तीं [भा. 'पूर्ण'; तु. नि. घा. 'जें भोजन'.] जाण । अपूर्णपण असेना ॥ ७० ॥

यापरी स्वयें तृप्त जाले । सर्वेचि संसारा आंचवले । तृप्तसुखें सुखी जाले । स्वस्थ राहिले स्वस्थानीं ॥ ७१ ॥

फळाशा फोडुनी फोडी । वासनाशिरा काढुनि बुडीं । शांति परिपक्वपानाची विडीं । स्वलीला तोंडीं घालिती ॥ ७२ ॥

जाळुनि अहंकठिणपणा । सोहं गाळींव शुद्ध चुना । लागोनि शांति पक्वपाना । तांबोल स्वादना सुस्वाद ॥ ७३

सर्व साराचें निजसार । तेंचि सेविती खदिरसार । [सु. गे. 'श्रीरंगे रंगाकार'; तु. नि. घा. 'श्रीरंग रंगाकार'.] श्रीरंग-रंगें रंगाकार । अति पवित्र तांबोल ॥ ७४ ॥

अर्पिलें सुमन चंदन । दिपावली निरांजन । यथोक्त करितां पूजन । सुखसंपन्न भार्गव ॥ ७५ ॥

फरशरामाचा मेढा । सीतेनें स्वयें करुनि घोडा । सीताचा करुनि वोढा । बाणाचा गाढा [मु. पाठ 'जाणा'; त. 'तांडव'; कं. 'ताजाणा'; 'ताज (१)' मूळ शब्द 'ताज' असावा. अर्थ अश्वमुखकवच (राजव्यवहार कोश) घोड्याच्या तोंडात घालावयाची म्होरकी.]ताजना केला ॥ ७६ ॥

त्या धनुष्यावरी बैसुनी । घोडा नाचवी राजांगणीं । स्वेच्छा क्रीडे राजभवनीं । राजबिदींतूनि धांवडी ॥ ७७ ॥

ठेविले ठायीं धनुष्यबाण । रामु नदेखे आपण । मग रायावरी कोपायमान । काय वचन बोलिला ॥ ७८ ॥

माझ्या धनुष्याचि चोरी करी । ऐसा बळिया कोण क्षत्रीं । तुवां लपविला आहे घरीं । तो झडकरी मज दावी ॥ ७९ ॥

पांचशती महावीरीं । धनुष्य नुचले तिळुभरी । त्याची जेणें केली चोरी । तो झडकरीं मज दावीं ॥ ८० ॥

अनुक्रमणिका

ऐकूनी क्रूर रामवचन । राजा जनकु कंपायमान । आजि मज आलें पूर्ण विघ्न । राम क्षत्रघ्न कोपला ॥ ८१ ॥

राजा त्या धनुष्याचा लाग । स्वयं गिवसूं लागला [मु. 'चांग'; कं. 'स्वांग'.] सांग । राजांगणीं देखोनि रेघ । तोचि मागु घेत आला ॥ ८२ ॥

तंव धनुष्याचा करुनी घोडा । सीता खेळत देखे पुढां । राजबिंदी घेत दवडा । बाळक्रीडा क्रीडत. ॥ ८३ ॥

राजा म्हणे अगे कुवारी । हा त्वां अन्याय केला भारी । तें धनुष्य सांडी क्षितीवरी । तें रायाच्या करीं उचलेना ॥ ८४ ॥

मग राजा अति प्रीति करीं । सीतेतें पोटेसीं धरी । म्हणे बैस घोडियावरी । हरिखें येरी बैसली ॥ ८५ ॥

[भा. प्रतीत ही ओवी नाही.] करुनि धनुष्याचा घोडा । नाचवित [मु. 'तडतडा'.] वाडाकोडा । आली फरशरामापुढां । देखोनि गाढा तो विस्मितु ॥ ८६ ॥

तो म्हणे हे आद्याशक्ति । आणि कां धनुष्य नुचले हातीं ।
ईसी आदिपुरुष होईल पती । आणिकासी प्राप्ती नव्हे इची ॥ ८७ ॥

राम रायासी पुसे विचार । इसी कोण नेमिला वर । तो म्हणे नाहीं केला निर्धार । इचें स्वयंवर [मु. 'करणे आहे'.] करावें ॥ ८८ ॥ [या ओवीनंतर तु. नि. घा. प्रतींत पुढील दोन ओव्या आलेल्या आहेत :—
परशुराम म्हणे रायासी । स्वयंवर करणे सीतेसीं । मी सांगेन त्या प्रकारासी । जो सर्वांसी दुर्घट ॥ १
हे आदिईश्वरीचा अवतार । आदिपुरुष ईसी वर । मी सांगेन जोपण प्रकार । तो सादर अवधारी ॥ २ ॥]

स्वयंवरीं हाचि पण । जो धनुष्यासी [तु. सु. नि. घा. गे. कं. 'वाहील'.] वाईल गुण । त्यासीच हे द्यावी आपण । आज्ञा संपूर्ण भार्गवाची ॥ ८९ ॥

तेणें सीतेच्या स्वयंवरासी । धनुष्य ठेविलें जनकापासीं । जेणें धनुष्य त्रिपुरासी । एकें बाणेंसीं छेदिलें ॥ ९० ॥

शिवें येणेंचि धनुष्येंसीं । विध्वंसिलें दक्षयागासी । पळवूनि सुरनरऋषि । [तु. नि. घा. 'यज्ञभंगासी, पै. केले'.] यज्ञभागासी घेतले ॥ ९१ ॥

हेंचि शिवचाप घेऊनि करी । एकवीस वेळां धरित्री । फरशरामें केली निःक्षेत्री । तें हें स्वयंवरीं ठेविले चाप ॥ ९२ ॥

हे धनुष्याची समूळवार्ता । अतिशयेंसीं रसाळ कथा । शतानंदु जाला सांगता । आइकोनि समस्तां आश्चर्य ॥ ९३ ॥

आतां जनकाच्या घरीं । स्वयंवर सभेची परी । जे महासभेमाझारीं । रामप्रतापथोरी । धनुर्भंगें ॥ ९४ ॥

अनुक्रमणिका

**त्या स्वयंवराचें निरोपण । रसाळ कथेचें गोडपण । एका जनार्दना शरण । श्रोते सर्वज्ञ अवधान देतु ॥ ९५ ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां चापप्रभवो नाम सप्तदशप्रसंगः**

संपादित प्रत श्लोक नाहीत. ओव्या ९५. इतर प्रतींत ही संख्या अशी––घा. नि. १०२; तु. १०१; इ. सु. गे. तं. ९५, ९४; कं. ९५; पै. ९७.

अनुक्रमणिका

## प्रसंग अठरावा

## चाप कथा निरूपण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

स्वयंवरसभेची स्थिति । [तं. 'गगनीं विमानीं देवपंक्ति'; सु. नि. गे. घा. 'स्वर्गी देव विमानीं पाहातीं'.] गगनीं देवविमान पंक्ति । शाहाणौ कुळियाचे भूपति । दाटले क्षितीं सन्मानें ॥ १ ॥

आले तपस्वी ऋषेश्वर । आले यक्ष गंधर्व किन्नर । स्वयंवरा आले निशाचर । दैत्य [भा. 'ते आले'; सु. नि. गे. घा. 'तेही आले'.] महावीर येते जाले ॥ २ ॥

धैर्य धैर्य महाशौर्य । रूप लावण्य गुण गांभीर्य । [मु. 'धर्माधर्म'.] धर्म धैर्य अति औदार्य । ऐसे नृपवर्य येते जाले ॥ ३ ॥ [भा. /१ प्रतीत ही ओवी नाही.]

जे गोब्राह्मणा [भा. /१ तु. नि. घा. 'साह्यार्थी'.] साह्य सर्वार्थी । ज्यांचे [मु. 'यशकर्ती'.] यश कीर्ति महाख्याती ।
ज्यांचे पवाडे स्वर्गी गाती । ते स्वयंवरार्थी [भा. /१ तु. सु. नि. गे. घा. 'येते झालें'.]
स्वयें आले ॥ ४ ॥

जे दानीं देती सर्वस्व । ज्यांची वैकुंठीं वर्णिति [मु. पाठ 'वाढिव'.] वाढिव । ज्यांचे त्रैलोकीं [तु. 'विस्फारिले'; त. कं. 'भारले'; सु. नि. गे. घा 'प्रसिद्ध'; तं. 'स्फुरले'.] स्फारले गौरव । तेहि राजे सर्व येते जाले ॥ ५ ॥

ज्यांच्या शस्त्रांचा महामार । साहों न शकती सुरासुर । जे दानीं सदा अति तत्पर । तेहि नृपवर येते जाले ॥ ६ ॥

[पै. खेरीज; इतरत्र 'दानें दळें बळें प्रबळ'.] दळें बळें अति प्रबळ । शाहाणौ कुळियाचे भूपाळ । येते जाले सकळ । सीतार्थी केवळ स्वयंवरासी ॥ ७ ॥

स्वयंवरीं [पै. प्रतीखेरीज हे पद नाही.] ज्या धनुष्याचा पण । [भा. /१ 'जनके केला असे आपण'.] तें जनकें [तं. त. सु. नि. गे. घा. कै. 'आणावे'.] आणवावें आपण । ज्यासी असेल आंगवण । तो त्यासी गुण [मु. 'लावीत'.] वाईल ॥ ८ ॥

ऐसें आइकोनि रायाचें वचन । जनकें बोलाविला प्रधान । धनुष्य आणावें आपण । आज्ञापन स्वयें केलें ॥ ९ ॥

तंव बोलिले महर्षि । आधीं आणावे नोवरीसी । मग आणावें धनुष्यासी । वचन सर्वांसी मानलें ॥ १० ॥

सीता [त. 'न कळे'; तं. भा. /१ तु. 'नातळे'.] नाकळे कर्मबंधासी । नाहीं जन्मली गर्भवासीं । स्त्रष्टा स्त्रजुं न शके तिसी । [तं. /१ 'रामप्रभावेसी सप्रभा'; सु. नि. गे. घा. 'रामप्रभावेंसीं समप्रभाव'; भा. /१ 'रामप्रभेसी प्रभव'; त. 'रामप्रभवेसी सुप्रभा'; तु रामप्रभवेसी सप्रभा]

अनुक्रमणिका

**रामप्रभेसी** [या ओवीनंतर पै. प्रतीत आलेली पुढील ओवी अप्रस्तुत वाटल्यावरून प्रक्षिप्त गणली आहे :— श्रीराम चैतन्यपुतळा। डोळस सुंदर सावळा। हातीं धनुष्यभाता सोनसळा। दुसरा जवळा लक्ष्मण ॥] **सप्रभ ॥ ११ ॥**

**श्रीराम चैतन्याचा कळा । चिच्छक्ति ते जनकबाळा । तिच्या** [त. 'रूपाचा'; तं. 'स्वयंरूपाचा'.] **स्वरूपाचा सोहळा । सभाग्य डोळां देखती ॥ १२ ॥**

**साळंकृत गजावरी । सीता बैसविली नोवरी । तिच्या सौंदर्याची थोरी । चराचरीं अनुपम्य ॥ १३ ॥**

**शून्यत्वें वाळिलें आकाश । तें शरण आलें सीतेस । राम वंदावया सावकाश । मस्तकीं केश ते जाले ॥ १४ ॥**

**शून्यत्व** [तं. 'झाडुनि सकळ'.] **सांडुनि तत्काळ । जाले मस्तकीं केश कुरळ । तेंचि आकाश सुनीळ । तेथ मुखमंडळ मुखचंद्रु ॥ १५ ॥**

**चंद्र पौर्णिमेसीच पूर्ण । मुखचंद्र सदा संपूर्ण । चंद्रीं** [तं. 'राहावे पर्वी'; तु. 'राहूचे पूर्वी'; कं. 'राहूचे पर्व'.] **राहूचे पर्वी ग्रहण । येथ नित्य ग्रहण श्रीरामीं ॥ १६ ॥**

**चंद्रबिंब सकळंक । मुखचंद्र नित्य निष्कळंक । देखतां सीतेचें श्रीमुख । होती** [मु. 'निर्दुःख'.] **निर्दोष भावार्थी ॥ १७ ॥**

**चंद्रीं नक्षत्रें पुढें मागें । तैसी तानवडें मोतिलगें । कुंकुम सुरंग रामरंगें । तोचि निजांगें मळिवटु ॥ १८ ॥**

**श्रीरामु देखलियावरी । घालुं विसरली ते भवरी । भवऱ्या निज मायेच्या करीं । राजे भ्रमचक्रीं पाडिले तिणें ॥ १९ ॥**

**सीता** [तं. 'सीता भ्रमरिया'.] **भ्रमाचिया भंवरीं । रावणु पडला भ्रमचक्रीं । जानकी भ्रमें स्वयंवरीं । आपदा थोरी भोगील ॥ २० ॥**

**भवरी-भ्रमाचा निजनाशु । करावया श्रीरामुचि** [तं. खेरीज इतरत्र 'कळस'.] **ईशु । त्याचेनि नामें** [तु. 'भ्रम हा निरासु। होय सावकाश श्रीरामें'; सु. 'भ्रमाचा नाश। होय हराश श्रीरामें'; नि. घा. 'भ्रमाचा नाश। होय सावकाश श्रीरामें'; गे. 'भ्रमाचा नाश। होय हताश श्री रामें'.] **भ्रम हरासु । भ्रमाचा नाशु श्रीरामें ॥ २१ ॥**

**रामनामें निरसे भ्रम । यालागीं भंवऱ्याचा संभ्रम । जानकीसी नाहीं परम । भंवऱ्याचें नाम ते नेघे ॥ २२ ॥**

**जानकीचें निज निडळ । रामचरणें सदा सफळ । तिचेंचि धन्य कपाळ । वानिती सकळ ऋषिवर्य ॥ २३ ॥**

**चंद्रबिंबीं काळिमेचा काट । तैसा कस्तुरीचा मळिवट । मुखचंद्रीं मिरवे चोखट । त्यावरी बोट कुंकुमाचें ॥ २४ ॥**

अनुक्रमणिका

[पै. मु. 'श्रीरामरंग'; तं. 'श्रीराम रंगें'.] श्रीरामरंगें अति सुरंग । तेणें रंगें रंगणें कुंकुम चांग । [तु. नि. घा. 'अति'.] आहेवपण तेणें अभंग । निडळाचे आंग शोभवी शोभा ॥ २५ ॥

चंद्र सदा क्षयरोगी । तेणें होवावया नित्य निरोगी । जडला जानकीच्या अंगीं । [क. तु. सु. गे. 'सवेगीं';. नि. घा. 'सवेग'.] जाला सर्वांगीं अर्धचंद्रु ॥ २६ ॥

सेवावयां श्रीराम अधरामृत । अर्धचंद्र होउनि तेथ । चंद्रमा राहिलासे टपत । पाहे एकांत प्रकृति पुरुषा ॥ २७ ॥

तया अर्धचंद्रावरती । [प. क, 'भाळीं'.] भांगीं सेंदुराची आरक्ती । भावें [क. तं. त. 'भुलवावया'; भा. /१ सु. नि. गे. घा. 'भाळावया'] भुलावया रघुपती । प्रेमाच्या प्रीतीं पूजिली माया ॥ २८ ॥

माया [त. सु. नि. गे. घा. 'विकल्पें'; तं. तु. कं.] विकल्पां दे अति अविद्या । भाविका दे शुद्ध सद्विद्या । जानकीची श्रीरामीं मेघा । त्याच्या निजपदा विनटेल ॥

भांगींची नव्हे सेंदूर स्थिति । तेणें वोघें आली सरस्वती ।
भावें भेटावया रघुपती । विरक्तीच्या प्रीतीं अनुरक्त ॥ ३० ॥

तिचा दोहीं तटीं हासळिया । श्रीराम ध्यानें बैसलिया ।
म्हणउनि मुक्ताफळीं शोभलियां । [तु. नि. घा. 'बाह्या'.] सहाय जालिया सीतेसी ॥ ३१ ॥

जेवीं नक्षत्रें नभोमंडळीं । तेवि मस्तकीं मोतियांची जाळी । श्रीराम-अनुसंधानें वोविली । मस्तका आली मुक्तत्वें ॥ ३२ ॥

त्यावरीं भक्तिफरा झळकत । [मु. 'नवविधरत्न विराजित'.] नवविध रत्नीं लखलखीत ।
स्वर्गस्थां वांकुल्या दावित । भजा रघुनाथ अक्षयार्था ॥ ३३ ॥

श्रीरामु लक्षितां दृष्टीं । सुटली भवयांची गांठी । सहजें सांडुनि व्यंकटी । अवलोकुनि उठी [मु. 'स्वरूपता'.] सुखरूपता ॥ ३४ ॥

जगाची जे डोळसता । सदा शिणली [तं. 'देश'.] दृश्य देखतां । सीतेच्या डोळ्यां शरणांगता । [तं. भा. /१ स. गे. घा. 'पाहावया रघुनाथा परिपूर्ण'; तु. नि. 'आली रघुनाथा पाहावया'.] पहावया रघुनाथा परिपूर्णत्वें

श्रीरामाचें पूर्णपण । देखतां डोळे सुखसंपन्न । यालागीं जगाचें देखणेंपण । सीतेसी शरण स्वयें आलें ॥ ३६ ॥

जगाची [तु. 'देखोनी'.] देखणी अवस्था । तिहीं डोळां [भा. /१ सु. नि. गे. घा. 'डोळसता'.] डोळस सीता । श्रीरामाची सुखरूपता । पहावया तत्त्वतां अति सादर ॥

अनुक्रमणिका

यापरी सीतेचे नयन । देखणेंपणें सुलोचन । त्यावरी सूदलें अंजन । राम निधान साधावया ॥ ३८ ॥

[सु. गे. 'साधुचें अवयव आस्तिक्य'; भा. /१ 'साधुचीं अवक्र आस्तिक्य'; पै. तं. त. कं. 'साधूची अवक्र आस्तिक'.] साधूंचें अवक्र आस्तिक्य । तैसें सरळ शोभे नासिक । [तु. 'नास्तिके निवटोनियां नास्तिक्य'; सु. गे. 'निरसोनी, नास्तिक'; नि. घा. 'निवटोनी नास्तिक्य'.] नाकें निगटूनि नास्तिक । प्राणासी सुख श्रीरामें ॥ ३९ ॥

सदा सैराट विचरे प्राण । तेणें वसविलें जानकी घ्राण । होतां श्रीराम सन्निधान । समाधान प्राणासी ॥ ४० ॥

सेवावया श्रीराम अधरामृत । सीतीचे अधर अति [भा. /१ तु. नि. सु. गे. घा. 'आरक्त'.] आसक्त । त्याचिया आर्ती अति [भा. /१ सु. नि. गे. घा. 'आसक्त'.] आरक्त । लाजवीत प्रवाळा ॥

उपमें प्रवाळें अति कठिण । अधर मृदु गगना होऊन । तें सीतेचें अधरपान । रघुनंदन स्वयें जाणे ॥ ४२ ॥

सकळांचे मुखीचे दांत । रसविषयें अति [तं. 'आसक्त'.] अदांत । जानकीमुखीचे [तं. 'अनासक्त'; भा. /१ त. तु. सु. नि. गे. घा. कं. या प्रतींत हें पद नाही.] दांत ते दांत । यालागीं रघुनाथ भाळला मुखा ॥

अधरातळीची चुबुका । रामरंगें गोंदिली देखा । शामतेचा वर्ण नेटका । रघुटिळका भाळवी ॥ ४४ ॥

[कं. भा. /१ प्रतीत ही ओवी नाही.] मुक्त रिघोनि सुवर्णापाशीं । वनिता-अधरीं आलें [मु. 'नाकासी'.] नाशासी । [तु. 'जानकीचें मुखी मुक्ती सुवासी'; नि. घा. 'जानकी नाके मुक्ति सुखासी'; त. सु. गे. 'जानकी नासिके मुक्त मुक्तांसी'.]
जानकी नासिकें मुक्तिमुक्तांसी । श्रीरामासी देखलिया ॥ ४५ ॥

लाजवुनि बारा सोळा । तेज मिरवे गंडस्थळा । देखतां [त. 'ठक पडला'; कं. 'ठक पडिलें'.] ठक पडे डोळां । लागलीं सकळां टकमक ॥ ४६ ॥

देखोनि जानकी मुखचंद्र । लाजिनला रजनीकर । लाजां लोपलें अर्ध शरीर । जाला अर्धचंद्र जानकीभाळीं ॥ ४७ ॥

चंद्रासी गती नित्य नक्षत्रें । मुखचंद्रा गति रामचंद्रें । चंद्र प्रतिपाळी चकोरें । येणें मुखचंद्रें [तं. 'जिवाशिव पावला'; सु. गे 'जीव शिवा पाळी'; तु. नि. घा. 'जीव शीव'.] जीवशिव पाळी ॥ ४८ ॥

चंद्रीं उदोअस्तु अहर्निशीं । मुखचंद्र उदो-अस्तुतें ग्रासी । उद्योत प्रभा मुखचंद्रासी । जीवशिवासी [मु. 'प्रकाश'.] प्रकाशकु ॥ ४९ ॥

शुद्धशामता श्रीरामा । तेचि सुनीळ नभोपमा । तेथ मिरवे मुखचंद्रमा । श्रीराम व्योमा माझारीं ॥ ५० ॥

स्मरणाची गळसरी गोमटी । ऐक्यभावें पडली गांठी । न तुटतां धरिली कंठीं । लोकदृष्टीं अलक्ष ॥ ५१ ॥

अनुक्रमणिका

जे कंठीं रामनाम ठसा । तेथ [त. तु. सु. नि. गे. घा. या 'प्रतींत हे पद नाही'.] चिंता-चितांकु रिघे कैसा । चितांकु तेणें दुर्दशा । सीतेच्या मानसा शृंगार रामु ॥ ५२ ॥

जीव शिवपद सांडुनि देख । श्रीरामपदींचा पदांक । तेंचि हृदयींचें पदक । [भा. /१ 'हृदयीं देख जानकीया'; त. 'ले आवश्यक जानकीया'; सु. गे. घा. 'शोभे आवश्यक जानकीया'.] केलें आवश्यक जानकीया ॥ ५३ ॥

हृदयपदकाचें महिमान । चिद्रत्न रत्नीं जडित पूर्ण । मुक्त मोतियें ओऊन । गुणेंवीण ल्यालीसे ॥ ५४ ॥

त्रिगुण [नि. 'आणिले'.] आटिलें निर्गुणेंसी । तेचि बाहुवटे सीतेसी । रामकीर्ति मुखें जडुनि त्यांसी । उभय बाहूसी भूषण ॥ ५५ ॥

ॐकारा माजिला श्रुती । कर्मकांडाच्या [मु. 'उपपत्ती'.] उपरती । वेदार्थ कंकणें सीतेच्या हातीं । रुणझुणिति स्वानंदें ॥ ५६ ॥

दशांगुळीं दशमुद्रिका । चढत्या वाढत्या जडिल्या टीका । दशावतारांचिया माणिकां । जिवाच्या जीविका जडित केलें ।

पंचभूतें पंचांगुळिका । सीतेचे मुष्टी होती एका । श्रीराम सीतेची धनरेखा । तिहीं लोकां जगद्वंद्य ॥ ५८ ॥

गुणीं गोविलें मुक्तां फळां । न पवती मुक्तीचा जिव्हाळा ।
येऊनि पडिली जानकीगळां । श्रीरामु स्वलीळा सेवावया ॥ ५९ ॥

सुमनें विमनें जालीं फळां । रामु जिवांचा जिव्हाळा । सेवावया सूत्रीं बांधोनि गळां । सीताकंठीं माळा सुमनें जालीं

सीता होती धरणीतळीं । त्या [तं. 'धराधात्र्या'; त, 'धराधरत्र्या'; तु. 'धरत्र्या'; भा. /१, 'धरेत्र्या'; नि. घा. 'धरित्रीच्या'; सु. ग. 'धराधरित्र्या'.] धराधात्रीं स्नेहमेळीं । निजांगें सुनीळ कांचोळीं । जनकबाळीं लेवविली ॥ ६१ ॥

भक्ति सकामत्वें अति [कं. तु. 'गोंदली'; सु. नि. गे. घा. 'गांजली'.] गादली । निष्काम राम सेवावया वहिली । सीतेचे अंगीं रिघाली । कांचोळी जाली नवखंड ॥

भक्ति सर्वदा नवखंड । नवखंडें ते अति अखंड । सीता सांडउनीं नवविध बंड । केली अखंड श्रीरामभजनें ॥ ६३ ॥

पृथ्वी नवखंडें [तु. 'नटली'.] नांदली । तेही जडजाड्यता उबगली । भक्ति नवखंडें अखंडली । सीतेची जाली कांचोळी ॥ ६४ ॥

येणेंचि स्वार्थें धरत्रीं । सीता धरिली होती उदरीं । हे निघालियां बाहेरीं । धरा उद्धरी श्रीरामसंगें ॥ ६५ ॥

अनुक्रमणिका

भक्तिभावाचें बिरडें । कांचोळिये घातले फुडें । श्रीराम फेडील सांकडें । आणिका नवखंडे नुगवे हें ॥ ६६ ॥

अंगींच्या अंगीं भिन्नाभिन्नीं । जीव शिव वाढले हृदयस्थानीं । तेणेंचि कुचभारें कामिनी । व्यजनस्तनीं शोभत ॥ ६७ ॥

विद्या अविद्या पांखे दोन्ही पाहीं । दोन्ही आच्छादी दोन्ही ठाईं ।
एकु देहीं एक विदेही । गुणगुणान्वयीं बांधले कसण्या ॥ ६८ ॥

त्रिगुणांचे गोंडे [तं. 'गोड नानारंगे'; भा. /१ 'गोंडे नागर स्वयंभ'; सु. नि. गे. घा. 'गोंडे नागर'; कं. 'गोड नानारंभा'.] नाना रंग । तेचि गुणाची शोभन शोभ । विमुखां भुलती गुणक्षोभ । समुखां गुणभांब असेना ॥ ६९ ॥ [मु. प्रतीत या ओवीचे उर्वरित तीन चरण पुढीलप्रमाणे :— पाठीवरी रुळती सुंदर । श्रीराम व्हावया तत्पर । शोभती मनोहर जानकीसीं ॥]

त्रिगुणांची ग्रंथी दारुण । छेदील श्रीराम आपण । आणिकांचें न चले जाणपण । ते गिळिती गुण [कं. तु. सु. नि. गे. घा. 'गर्वाभिमाने'.] गर्वातिमानें ॥ ७० ॥

[भा. /१, 'भक्ति वैराग्यें नित्यदीप्त'; त. 'यदर्थी नित्य दीप्त'; तं. 'सत्यश्री नित्यदीप्त'; तु. 'पति वैराग्य नित्य दीप्त'; सु. गे. 'भक्ति वैराग्य नित्य दीप्तीं'; नि. घा. 'भक्ति वैराग्य नित्यदीप्त'; 'सत्यर्थी अति दीप्त'.] पत्यर्थी नित्य दीप्त । [नि. घा. 'राम अनुरागें'.] रामानुतापें अनुरक्त । तेचि सेंदुरीं साडी अति आरक्त । हर्षयुक्त नेसली ॥ ७१ ॥

शोधित सत्त्वाचा सात्त्विक । क्षीरसागरींचा क्षीरोदक । वैरणा शोभे अति चोख । [भा. /१, 'तेणे आलोक'; त. 'तेजे अर्क'; तु. 'तेजे अलोलिक'; सु. गे. 'तेजे अलोलिक'.] तेजे आलोकु लोपतु ॥ ७२ ॥

परिधानेसीं समसूत्र. । तेंचि जानकीचें कटिसूत्र । तेणेंचि महतत्त्व अपार । शोभें सुंदर कटिसूत्रें ॥ ७३ ॥

किंकिणीजाळमाळा । कटिसूत्रीं सिद्धी सकळा । क्षुद्रघंटिकीं ऋद्धि प्रबळा । कटीं मेखला शोभत ॥ ७४ ॥

पृष्ठिभागीं रुळे वेणी । माजीं अनर्घ्य शाम मणी । मूद मिरवताहे चिद्रत्नीं । शोभे कामिनी सौभाग्यें ॥ ७५ ॥

तिच्या [पै. खेरीज इतरत्र 'वैराग्यपल्लवासी'.] सौभाग्य पल्लवा वासीं । मुक्तमोतियें झळकती कैसी । देखोनि भाळले संन्यासी । अहर्निशीं अनुलक्ष ॥ ७६ ॥

यालागीं सीतास्वयंवरीं । अपार मिनले मस्करी । भुलले तिच्या पालवावरीं । अहोरात्रीं अनुलक्ष ॥ ७७ ॥

सामवेदींचा नाद [कं. तु. तं. 'गहिवर'; भा/१. सु. नि. गे. घा. 'गंभीर'.] गहिर । तेवि [मु. प्रतीत 'वाकी' हे पद नाही.] वांकी आंदुवांचा गजर । नादें भुलले राजकुमर । वरणीं तत्पर भूपाळ ॥ ७८ ॥

देव म्हणती हे सीता । होआवि आमुची देवकांता । दैत्यां दानवांच्या [तु. नि. 'चित्ता'.] मत्ता । आमच्या हाता हे यावी ॥ ७९ ॥

यक्षरक्ष गंधर्वगण । नर किन्नर सिद्ध चारण । सीतास्वयंवरीं पण कोण । अवघे जन पुसती ॥ ८० ॥

अनुक्रमणिका

विश्वामित्र म्हणे रायासी । आतां आणावें धनुष्यासी । रायें प्रेरिलें प्रधानासी । तो परिवारेसीं निघाला ॥ ८१ ॥

धनुषीं मांदूस अष्टचक्र । पांचशतें महावीर । वोढितां नोढे अणुमात्र । मागां गजभार लोटिती ॥ ८२ ॥

जे जे मार्गीं भेटती त्यांसी । ते ते लाविती वोढावयासी । एवं अत्यंत प्रयासीं । धनुष्य सभेसी आणिलें ॥ ८३ ॥

बाहेरी काढितांचि चाप । दैत्य दानव सकंप । राजीं सांडिला प्रताप । [मु. 'वाढिवेचा'.] वांढिवेचा दर्प गळाला ॥ ८४ ॥

जनकु सांगे सकळांसी । हरें येणेंचि त्रिंबकेंसी । बाणें भेदिलें त्रिपुरासी । दक्षयागासी विध्वंसिलें ॥ ८५ ॥

येणेंचि धनुषेंकरीं । येकवीस वेळां धरत्री । फरशरामें केली निक्षेत्री । तें हें स्वयंवरीं आणिलें [भा. /१, हे पद नाही; मु. 'पणा'.] वरणा ॥ ८६ ॥

या धनुष्यातें [मु. 'उचलोन'.] मर्दुन । जो पुरुषार्थी [कं. तं. तु. सु. नि. गे. घा. 'वाहील'.] वाईल गुण । त्यासीच सीतेचें पाणिग्रहण । [तु. 'घडेल संपूर्ण त्रिशुद्धी'; सु. नि. गे. घा. 'घडेल जाण त्रिशुद्धि'; तं. त. भा. /१, 'दिधली आपण त्रिशुद्धी'.] दिधलें आपण त्रिशुद्धि ॥ ८७ ॥

आइकोनि रायाचें वचन । तटस्थ ठेले सकळै जन । त्यांमाजीं पुरुष पंचानन । [तु. सु. नि. गे. घा. 'वहावया गुण उठिलें'.] वाविया गुण उठावले ॥ ८८ ॥

ज्यांची [मु. 'वाढीव'.] वांढीव अति प्रबळ । जे रणांगणीं रणकल्लोळ । राजे उठिले सबळ । नांवें सकळ अवधारा ॥ ८९ ॥

शिखीध्वज कुशध्वज । ताम्रध्वज मयूरध्वज । रामु आलासे गरुडध्वज । भूभुजां लाज लावया ॥ ९० ॥

सुरथ भरत विदूरथ । चित्ररथ चैत्ररथ । गुप्त आलासे रघुनाथ । सीताकांत होआवया ॥ ९१ ॥

वीरसेन वीरघ्न । भारसेन भद्रघ्न । येथें आलासे रघुनंदन । [तु. नि. 'सीतावरण करावया'; सु. गे. घा. 'सीतारमण प्रतापी'.] सीतावरण प्रतापी ॥ ९२ ॥

जयपाळ विजयपाळ । वीरपाळ भूपाळ । राम आलासे प्रणतपाळ । धनुर्बळ भंगावया ॥ ९३ ॥

चित्रकेतु विचित्रकेतु । श्वेतकेतु [सु. गे. धा. 'मधुकेतु'.] धूम्रकेतु । रामु आलासे भक्तकेतु । गर्वघातु रावणा ॥ ९४ ॥

केशिक कारुष कळिंग । मद्र माथुर अंग वंग । राम आलासे श्रीरंग । धनुर्भंग करावया ॥ ९५ ॥

अनुक्रमणिका

राजे धरूनियां आंगवण । धनुष्यासी वावो पाहती गुण । तंव तेथ आलासे रावण । मूळेंवीण अतिगर्वी ॥ ९६ ॥

देखोनि रावणाचा यावा । कांपु सुटला रायां सर्वां । धाकु देवां आणि दानवां । हा लग्नीं मानवां अरिष्ट ॥ ९७ ॥

लोक जाले हा हा भूत । जनकु जाला साशंकित । राम बैसला सावचित्त । रावणान्त कृतकारी ॥ ९८ ॥

गर्वे बोले रावण । मज करितां सीताहरण । येथ निवारूं शके कोण । [मु. 'परी'.] तऱ्हीं पुसों पण स्वयंवरींचा ॥ ९९ ॥

रावणु पुसे जनकासी । कोण पणु या स्वयंवरासी । जो गुण वाईल धनुष्यासी । सीता त्यासी वरील ॥ १०० ॥ [या ओवीनंतर पै. प्रतीत पुढील श्लोक आहेत :—जनक उवाच : माहेश्वरं धनुः कुर्यादधिज्यं चेद्‌दामि ताम् । गुरोः शंभोर्धनुर्वोचैश्चूर्णता नयति क्षणात् ॥ १० ॥
रावण उवाच : सार्धं हरेण हरवल्लभयाच । देव्या हेरंभषण्मुखवृषप्रमथादिभिश्च ॥
कैलासमुद्धृवतो दशकंधरस्य । केयं च ते धुनुषिदुर्मददोः परीक्षा ॥']

रावण म्हणे जनकासी । शिवषण्मुख पार्वतीसीं । गणेश नंदिकेश्वरेसीं । म्यां भुजेसीं कैलास आंदोळिला ॥ १०१ ॥ [ओवी १०१ ते १०४ या फक्त पै. प्रतीत आहेत.]

मी पाहें दिशांकडे । तैं दिग्गजांसी पडें सांकडे । पळत वायु आसुडे । सूर्य पडे अडखळोनी ॥ १०२ ॥

मी स्वभावें निमेष उघडीं । तैं बृहस्पतीसी पडे बोबडी । ब्रह्मयाची वळे मुरकुंडी । पडतां बुढीं नक्षत्रें ॥ १०३ ॥

ऐसिया मज रावणाची । परीक्षा करावया तूचि एकु पारखी । थोर गर्वास चढलास कीं । शिक्षा निकी नाहीं केली

[¹कं. पै. 'बाणे'; भा/१. तं. तु. सु. नि. घा. 'वाहणे'.] धनुष्यबाणें गोष्टी थोडी । [पै. खेरीज इतरत्र 'महारण'.] मांहरण करूं कां तांतडी । आंगां न येतां अपखडी । जानकी रोकडी परणीन ॥ १०५ ॥

ऐसी बोलोनि वचन प्रौढी । मग रावणें लवडसवडी । सभारंगणीं घातली उडी । धनुष्य तांतडी धरूं गेला ॥ १०६ ॥

तंव तळीं राहिला माथा । तळवटु वरी आला हातां । गर्वे न कळे लंकानाथा । पाहे सभोवंती सभेसी ॥ १०७ ॥

म्हणे म्यां [पै. त. 'या प्रतींखेरीज इतरत्र हे पद नाहीं'.] धनुषीं वाईला गुण । सीता आणा हातीं धरून । सभेसी रावणें जिंतिला पण । [तं. 'वगळोनी'; त. 'बोले'; तु. 'वल्गना'; सु. नि. गे. घा. 'वगळोनी'.] वल्गोनि आपण गर्जतु ॥

अनुक्रमणिका

तें देखोनियां सीता । थोरें गजबजिली चित्ता । म्हणे आगाये उमाकांता । तुझे चाप सर्वथा नुचलो यासी ॥ १०९ ॥

माते धरित्री इये वेळीं । रावणा नेटु नेंदी पातायळीं । त्यासी [त. सु. नि. गे. घा. 'तों'; भा/१. तं. कं. 'त्वा'.] त्वां न्यावें रसातळीं । धनुष्याचां मुळीं घालुनि भारु ॥

आपुला धराभार समस्त । घालावा धनुष्या आंत । रावणाचा [मु. 'चके'.] लचके हात । तैसा कार्यार्थ साधावा ॥ १११ ॥

रावणातें पूर्ण [भा/१. सु. नि. गे. घा. 'छळी'.] सळी । ते वेळीं पावो कंकाळी । आमची कुळदेवता भद्रकाळी । धनुष्य मुळीं धरुनि राहो ॥ ११२ ॥

इंद्रिय अधिष्ठात्री देवता । [पै. खेरीज इतरत्र 'मज साह्य होवोत समस्ता'.] यासी विमुख होतु समस्ता । धनुष्य नुचले लंकानाथा । ऐसी अशक्तता यासी द्यावी ॥

रावणाच्या शरीरींचा प्राण । [पै. खेरीज इतरत्र 'मज साह्य व्हावे संपूर्ण'.] तो विमुख लोकां संपूर्ण । यासी न चढवे चापगुण । तैसा क्षीण करावा ॥ ११४ ॥

आपलें चाप विसरोन । [तु. 'कां राहिला त्रिनयन'; सु. नि. गे. घा. 'फेडता गेला त्रिनयन'.] केवीं गुंतला त्रिनयन । रावणाचें काळें वदन । करावें संपूर्ण श्रीशंकरें ॥ ११५ ॥

सीता आदिशक्ति निजमाता । तिचा स्तुतिवादु ऐकतां ।
साह्य जाल्या इंद्रिय देवता । रावणा क्षीणता [पै. खेरीज इतरत्र 'आणिली'.] आली प्राणें ॥ ११६ ॥

[मु. 'ऐशा औटकोटी'.] औटकोटी भूतावळी । घेऊनि आली भद्रकाळी । महादेव जटा मोकळी । धनुष्याजवळी तो आला ॥ ११७ ॥

म्हणे माझिया [पै. 'श्रीरामाची'.] स्वामीची कांता । केवीं जाय [मु. 'रावणाच्या'.] आणिकाचिया हातां ।
क्रूर काळाग्नी रुद्राचिया सत्ता । धनुष्या आंतौता प्रवेशला ॥ ११८ ॥

रावणाचेनि अदृष्टें । धनुष्य जालें उफराटें । माथा बैसला तळवटें । तळु गर्विष्ठें धरिला हातीं ॥ ११९ ॥

जेथ गर्व आणि अभिमान । तेथ अवश्य ये अपमान । नेणें गर्वेंचि रावण । धनुष्या गुण वाहो गेला ॥ १२० ॥

तंव तें पूर्वींच पालथें । बळें करूं जातां उलथें । भवंडितां न भवें विसे हातें । रावणाभंवतें भविनलें तें ॥ १२१ ॥

धरितां न धरे महाभारी । लोटितां न लोटे विसांकरीं । [नि. घा. तु. या प्रतीत 'येउनी' हे अधिक पद.] आदळलें उरावरी । पालथा शिरीं [तु. सु. नि. गे. घा. 'पडियेला'; कं. 'पडिला'.] पाडिला ॥ १२२ ॥

रावणाच्या आदळीं । [तु. सु. नि. गे. घा. 'न्याहा'.] निधा उठिला पाताळी । दाही मुखीं पडली धुळी । [मु. 'रावण तळमळत पडियेला'.] रावणा धुळीं मेळविला ॥ १२३ ॥

रावण पडतां अधोगति । धुळी उधळली सभेप्रति । रायांच्या तोंडीं पडिली माती । जानकीचां चित्तीं आल्हादु ॥ १२४ ॥

सभारंगण तोचि पाटा । धनुष्य तोचि वरवंटा । रावणा ऐसा लाठा । सभेचे चोहटां लाटियेला ॥ १२५ ॥

दाहाही घर्घरिती गळे । वीसहि [तु. सु. नि. गे. घा. 'वटारिलें'.] ताणताती डोळे । मुखीं होऊनि लाळ गळे । गात्रें विकळें पाडिलीं पैं ॥ १२६ ॥

[पै. खेरीज इतरत्र 'प्रधान धाविन्नला कैवाडें'.] रावण-प्रधान कैवाडे । धनुष्य काढुं आले कडे । रावणाचीं रगडिलीं हाडें । अति चरफडे आक्रंदे ॥ १२७ ॥

तुम्ही साह्य नव्हां रे सांघाती । प्रधान नव्हां माझे घाती । रागें क्षोभला प्रधानाप्रति । क्षीण शक्ति जल्पतु ॥ १२८ ॥

जनकासी म्हणे रावण । धनुष्यें माझा गेलियां प्राण । इंद्रजीत आणि कुंभकर्ण । कुळनिर्दळण करिती तुझें ॥ १२९ ॥

मी रावण अति कृतांत । धनुष्यें केलों गर्वहत । जनका आतां तुझें जें उचित । तें तां निश्चित करावें ॥ १३० ॥

जनकासी भूतदया भारी । घायीं सांपडियां वैरी । त्यासीहि होआवें उपकारी । तोचि [सु. नि. गे. 'रावणातें करी सावध'.] संसारी परमार्थी ॥ १३१ ॥

महावीर सपरिवारीं । जनकु धाविन्नला त्वरें करीं । चाप काढिलें वरीच्या वरी । रावणातें करी सावध ॥ १३२ ॥ [सु. गे. 'प्रतींत ही ओवी नाहीं'.]

उदकें शिंपिलें मुखकमळा । तेव्हां तो उठुनि बैसला । मग आणुनिया [तु. सु. नि. गे. घा. 'शुद्धजळा'.] सागळा । केला [पै. 'गळाला'; नि. घा. 'गुळणा'.] गुरळा रावणें ॥ १३३ ॥

करूनिया शुद्धाचमन । केलें उदक प्राशन । होऊनियां सावधान । बैसला आपण निजासनीं ॥ १३४ ॥

मजतरी जाहला अपमान । आतां धनुष्य वाईल कोण । तें पाहावया विंदान । क्रोधें रावण बैसला ॥ १३५ ॥

अनुक्रमणिका

धनुष्या गुण न [मु. ‘चढविता’.] वाता । जनकु कोणासी देईल सीता । तरी मी त्याच्या करीन घाता । क्रोधें क्षुद्रंता पाहों ठेला ॥ १३६ ॥

देखोनियां रावणाची दुर्दशा । राजीं [मु. ‘सकळी’.] दुर्धरीं सांडिला धिंवसा ।
सांडिली जनकाची आशा । [तं. ‘चंचळावस्ता’.] चापवळासा अनिवार ॥ १३७ ॥

सर्वथा चापीं न चढे गुण । चढऊं जातां जाईल प्राण । मग जानकी भोगील कोण । जाहलियां अपमान सभेसी ॥ १३८ ॥

एवं नरवीर राजे समस्त । धनुष्यार्थी जाहले विरक्त । आतां उठोनि रघुनाथ । चापाचा अंत [मु. ‘पुरवील’.] दावील ॥ १३९ ॥

येका जनार्दना शरण । चापें अपमानिला रावण । त्यासी राम वाईल गुण । सेखीं घेईल प्राण चापाचा ॥ १४० ॥

रामकथा अति रसाळ । श्रवणाचिये [तं. ‘सुखा’.] मुखा येत लाळ ।
[कं. तं. भा. /१ त. तु. ‘मनाची’; सु. नि. गे. घा. ‘सुखाची’.] मनाची जिव्हा करी ळळळळ । जिवें मुखकमळ पसरिलें अर्था ॥ १४१ ॥

रामकथा-अक्षर [मु. ‘पावावया’.] पाहावया । नेत्रीं सांडिल्या वेंकट भंवया ।
ते कथा अक्षर आळिंगावया । स्फुरती बाह्या अष्टांगें ॥ १४२ ॥

रसना चाखतां कथारस । सकळ रसें होती विरस । ऐसी रामकथा सुरस । श्रोतां अवकाश मज द्यावा ॥ १४३ ॥

रामकथेचा प्रताप । वर्णावया मी अती अल्प । श्री जनार्दना-कृपादीप । कथा सुखरूप स्वयें [तं. ‘वदती’; नि. घा. ‘दावी’.] वदवी ॥ १४४ ॥

एका जनार्दना शरण । [तं. ‘रमोरमणीय’; त. ‘रामे रमणीय’; भा. /१ ‘रम्यकथा’; तु. नि. घा. ‘अति रमणीय’; कं. ‘रम्य रमणीय रामायण’.] रमा रमणीय रामायण । सज्ञनीं द्यावें अवधान । चाप-भंजन श्रीरामें ॥ १४५ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां चापकथानिरूपणं नाम अष्टादशप्रसंगः ॥

संपादित प्रतीत श्लोक नाहीत, ओव्या १४५. इतर प्रतींत ही संख्या अशी पै. २, १४५. इतर सर्व प्रतींत श्लोक नाहीत.
ओवी संख्या अशी नि. घा. त. १४१; इं. सु. गे. भा. /१ कं. १४०; तु. १३९.

अनुक्रमणिका

## प्रसंग एकोणिसावा

## श्रीराम स्वरूप वर्णन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

**सीतेसी सांगती सखीजन । टळलें** [पै. खेरीज इतरत्र 'रावणाचें'.] **रावणा येवढें विघ्न । तूं भाग्याची सभाग्य पूर्ण । आवडे तो आपण नृप लक्षी ॥ १ ॥**

**दळें बळें अति संपत्ति । धैर्य वीर्य यश कीर्ति । सखिया दाविती भूपति । सीता ते नृपती मानीना ॥ २ ॥**

**शामसुंदर निजमूर्ति ।** [भा. 'पति'; तु. सु. नि. घा. गे. 'पति तो'.] **पतित्वें एक रघुपती । सीतेनें निश्चयो केला चित्तीं ।** [तु. नि. घा. 'वरकड निश्चिती मानीना'.] **वरण स्थिती दारुण ॥ ३ ॥**

**सभेसी** [पै. खेरीज इतरत्र हे पद नाही.] **अपमानें बैसला रावण । श्रीराम तरी दीन चढविता गुण । माझें करूं न शके वरण । जनकें कठिण पणु केला** [सु. नि. गे. घा. या प्रतींत दुसरा व तिसरा चरण पुढीलप्रमाणे आहे :— 'धनुष्या न चढवेचि गुण । राम करूं न शके वरण ॥'; तु. 'धनुष्यासी न चढविता जाण । राम करूं न शके वारण ॥'; भा. कं. 'धनुषीं न चढवितां गुण । राम करूं न शके वरण ॥'; त. 'धनुषीं चढवितां गुण । राम करूं न शके पण ॥'; त. 'धनुषा न चढवितां गुण । राम करूं न शके वरण ॥'; पै. संपादित पाठ.] **॥**

> कमठपृष्ठकठोरमिदं धनुर्मदनमूर्तिरसौ रघुनंदनः । कथमधिज्यमनेन विधीयतामहह तात पणस्तव दारुणः ॥ १ ॥

**जो धनुषीं वाईल गुण । त्याचें म्यां करावें पाणिग्रहण । हा** [सु. गे. प्रतींत हे पद नाही.] **जो जनकें केला पण । अति दारुण निष्ठूर ॥ ५ ॥**

**धनुष्य** [सु. नि. गे. घा. 'कमटपृष्टासम'; कं. तं. भा. त. तु. 'कमटपृष्टीं'.] **कमठपृष्ठीहुनि कठोर । राम अत्यंत सुकुमार । त्यासी केंवी होय स्वयंवर । चिंता थोर सीतेसी ॥ ६ ॥**

**रावण अपमानल्यापाठीं । नृपनरवीरां धाकु पोटीं । धनुष्य वावया कोण्ही नुठी । सभेची दृष्टी टकमक ॥ ७ ॥**

**तटस्थ देखोनि सभामंडळ । जनकु बोलिला भूपाळ । शिवचापधारी नाहीं प्रबळ । क्षितीमंडळ निर्वीर ॥ ८ ॥**
[यानंतर श्लोक २ व ३ फक्त पै. प्रतीत आहेत. परंतु श्लोकांचा भाग झडल्यामुळे ते येथे देता आले नाहीत.]

**आइकोनि रायाचें वचन । उठावला रघुनंदन ।** [तं. भा. /२ त. सु. गे. 'धनुर्भग्न'; तु. 'धनुष्यभंजन'; नि. घा. 'धनुर्भजन'; कं. 'करावया धनुष्यभग्न'.] **वाविया धनुषीं गुण । पुसे आज्ञापन गुरुसी ॥ ९ ॥**

[तं. 'निर्वीर भुवीतळ'; तु. 'निर्वीर क्षितीतळ'; सु. नि. गे. घा. 'निर्वीर पृथ्वीतळ'; कं. 'निर्वीर पृथ्वीमंडळ'.] **निर्वीरमुर्वीतळ । हें वाक्य न साहे** [तं. 'चळवळ'; भा. /१ 'आळुमाळ'; सु. गे. 'गढूळ'; तु. नि. घा. 'रामभूपाळ'.] **चळाचळ । गुरु आज्ञा जाल्या सफळ । धनुष्य तात्काळ सज्जीन ॥ १० ॥**

अनुक्रमणिका

**आइकतां आल्हाद विश्वामित्रा । वेगीं चाप चढवी रामचंद्रा ।** [सु. नि. गे. घा. 'निचावी'; तु. 'उचली'; तं. 'उचलावी'; कं. 'कुढावी'.] **उंचावी शूरा वीरां नृपवरां । धनुर्धरा** [सु. नि. गे. घा. 'सकळासी'.] **कुढावीं ॥**

**गुरु आज्ञा होतांचि रोकडी । रामचंद्रें घातली उडी । लक्ष्मणें अति तांतडी । कांस गाढी** [तं. तु. सु. नि. गे. घा. कं. 'घातली'.] **घेतली ॥ १२ ॥**

> देव श्रीरघुनाथ किं बहुगिरा दासोऽस्मि ते लक्ष्मणो । मेर्वादीनपि भूधरान्न गणये जीर्णः पिनाकः कियान् ।
> त्वं मामादिश पश्य मामकबलं भृत्यस्य यत्कौतुकम । प्रोद्धर्तुं प्रतिनामितुं प्रचलितुं भङ्क्तुं सदैव क्षमः ॥ २ ॥ [श्लोक २ व ओव्या १३ ते १६ फक्त पै. प्रतीत आहेत.]

**लक्ष्मण म्हणे जी रघुनाथा । धनुष्यबाणें अल्पकथा । तुझी आज्ञा जालिया समर्था । धनुष्य आतां सज्ञीन ॥ १३ ॥**

**तुझी कृपा होय जयाकडे । ते मश्यकही परी मेरू घे कडे । गोष्पदीं करुनि सागर उडे । हेंहि घडे तुझिया कृपा ॥ १४ ॥**

**तुझी आज्ञा होतांचि रोकडी । समपाताळाची करीन चवडी ।**
**पाडीन एकवीस स्वर्गांची उतरंडी । धनुष्य कडाडी मोडीन ॥ १५ ॥**

**आइकोनि लक्ष्मणाची गोष्टी । रामें हातीं धरूनि हनुवटी । कुरवाळुनि पाठी थापटी । सांगेन गोष्टी ते ऐक ॥ १६ ॥**

**चाप** [तं. 'धरू'.] **एक आम्ही दोघेजण । राजे हांसतील** [पै. खेरीज इतरत्र 'संपूर्ण'.] **विचक्षण । सीताहि हांसेल आपण । वीर लक्षण हें नव्हे ॥ १७ ॥**

[मु. प्रतीत 'राम म्हणे' ही पदे अधिक आहेत.] **सौमित्रा राहे सावधान । जेणें चापें गांजिला रावण । त्या चापासीं निमिषार्धे वाईन गुण ।** [भा. /१ 'राजे रावण देखती'; त. 'राजा रावण देखतु'; सु. नि. गे. घा. 'राजां रावणा देखतु'; कं. 'राजे रावण देखतां'.] **राजे रावण देखतु ॥**

**आइकोनि श्रीरामाचें वाक्य । चवकले रावणादिक । पाहातां दिसे बाळक । अलौकिक निजधैर्य ॥ १९ ॥**

**हरचाप देखतां दिठीं । सर्वांगीं** [मु. 'कांटा उठी'.] **कांटाळा उठी । तें सज्ञावया जगजेठी । धैर्याचा पोटीं निर्धारू ॥ २० ॥**

**एक म्हणती ऋषेश्वर वेडे । आपुले प्रतिष्ठेचें चाडें । लोकांचीं बाळकें लळेवाडें । चापापुढें घालिती ॥ २१ ॥**

**एक म्हणती शामसुंदर । शोभा अत्यंत मनोहर । सांडूनि** [मु. 'चापारोपण प्रकार'.] **चाप-प्रकार । सीता सुंदर यासी द्यावी ॥ २२ ॥**

अनुक्रमणिका

बोलती नरनारी समस्ता । यासी अवश्य द्यावी सीता । धनुष्य वावियाची कथा । कोण्ही सर्वथा न करावी ॥ २३ ॥

श्रीराम-सीतेचा हा जोडा । देवें मेळविला चोखडा । जनकु केवळ आहे वेडा । धनुष्याचा [भा. /१ 'पुढां'; त. कं. 'चाडा'; सु. नि. गे. घा. 'तडा'.] चढा गोवितो ॥ २४ ॥

सीता कृतनिश्चयेंसीं । स्वयें रातली श्रीरामासीं । [भा. /१ सु. नि. गे. घा. 'जनकमन'; तं. 'जानकी गुंतली'; कं. 'जनमन'.] तनु मनु विगुंतले रामापासीं । राम जनकासी आवडला ॥ २५ ॥

बापा लेकींचें मनोगत । श्रीरामापासीं एक होत । त्याच्या स्वरूपाचा इत्यर्थ । दोघे लक्षित एकाचें ॥ २६ ॥

त्या श्रीरामाची निजस्थिती । चिन्मात्रैक चैतन्यमूर्ति । अव्यक्त आलासे व्यक्ति । भक्त भावार्थी साकार ॥ २७ ॥

जेवीं कपिलेचें [भा. /१ 'धाराक्षीर'; तु. 'धारोक्षीर'; सु. नि. गे. घा. 'शुद्ध क्षीर'.] धारोष्णक्षीर । आळुनि करिती दध्याकार । तेंचि मथुनियां साचार । काढिती सार नवनीत ॥ २८ ॥

तें ठेवितां नवनीत । हों पाहे विकारवंत । [मु. 'अग्निनें'.] वैराग्याग्निं करूनि तस । साधिती घृत [तं. 'रुचिकारें'; सु. नि. गे. घा. 'परिकर'.] अविकार ॥ २९ ॥

तें थिजोनि अविकारता । स्वयें भासें साकारता । कणिकारूपें अनेकता । दिसे स्वभावता घृतीं घृत ॥ ३० ॥

तेवीं विवेक वैराग्य चतुर । नित्यानित्य निजविचार । करूनियां साधिती शुद्ध सार । चिदचिन्मात्रस्वरूप ॥ ३१ ॥

तेंचि स्वरूप स्वभावेसीं । आलें साकार दशेसी । सगुण मूर्ति भासे कैसी । चिद्विलासी श्रीरामु ॥ ३२ ॥

श्रीराम कौसल्येच्या उदरीं । कीं तो [तं. नि. घा. हे पद नाही.] तिसी सबाह्य [मु. 'अंतरीं'; भा. /१ 'भीतरीं'.] अभ्यंतरीं । राम परमात्मा चराचरीं । तो दशरथाघरीं अवतारू ॥ ३३ ॥

रामु अवतारांचा अवतारी । तो स्वयें आलासे स्वयंवरीं । सीता निजशक्ति नोवरी । परिणावया [नि. घा. 'करील'; ग. 'कीं'.] करी उल्हासु ॥

नोवरीची [मु. प्रतीत 'इच्छा' हे अधिक पद आहे.] स्वभावता । [तु. 'सुंदर स्वरूप पाहातां'.] सुंदर वरू यावा हाता । ते श्रीरामाची सगुणता । निर्धारी सीता सांगोपांग ॥ ३५ ॥

श्रीरामाचें पूर्णपण । सीताचि जाणे संपूर्ण । यालागीं त्याचें सगुणपण । पाहे आपण सर्वावयवीं ॥ ३६ ॥

श्रीरामाची श्रीमूर्ति । वर्णितां मौनावल्या श्रुति । [तु. नि. घा. 'वेद'.] शास्त्रें म्हणती नेति नेति । राम शब्दार्थी

अनुक्रमणिका

अर्थवेना ॥ ३७ ॥

चाटू मधुर रस [सु. घा. ‘रसवाटी’; गे. ‘रसवाडी’; तं. ‘रसा वाहाडी’.] वाढी । [पै. खेरीज इतरत्र ‘तो’.] ते चाटू खातां नलभे गोडी ।
तेंवि सांडुनि शब्दाची वोढी । पाहावी रोकडी श्रीरामशोभा ॥ ३८ ॥

शब्दीं बोलतां रामपरेश । [भा. /१ तु. सु. नि. गे. घा. ‘बोलत्याचे’; कं. ‘बोलित्याचे’.] बोलक्याचे बोल पडती ओस । मोटें बांधतां आकाश । ये हातास चौपालवी ॥ ३९ ॥

आकाशाची बांधतां मोट । कर्त्याचे वृथा जाती कष्ट । करितां शब्दांची खटपट । श्रीराम स्पष्ट न बोलवे ॥ ४० ॥

राम सगुण तोचि निर्गुण । राम परमात्मा परिपूर्ण । राम [सु. गे. ‘चिन्मात्र चैतन्यघन’; इतरत्र संपादित पाठ.] चिन्मात्रैक चैतन्यघन । जगजीवन श्रीरामु ॥ ४१ ॥

त्या श्रीरामाचें सगुणपण । बोलावया मी अतिदीन । वाचा वाचकु श्रीजनार्दन । आपुलें आपण स्वरूप वदवी ॥

राम सर्वांगें निजनिर्मळ । ते निर्मळी बिंबे नभ सुनीळ । यालागीं शामता सोज्वळ । भासे निर्मळ निजभक्तां ॥ ४३ ॥

राम शामता मेघश्याम । [तं. ‘त्या सीता गर्जवी आब्रह्म’; तु. ‘ते शामता गर्जवी अहं ब्रह्म’; सु. नि. गे. घा. ‘त्या शामता गर्जे अहं ब्रह्म’.] त्या शामता गर्जवी आब्रह्म । यालागीं रामु मेघश्याम । बोलती [तु. नि. घा. ‘निगम’; सु. गे. ‘नियम’.] परम श्रुतिशास्त्रें ॥ ४४ ॥

राम [सु. गे. ‘निर्मळ परात्पर परम’; तु. नि. घा. ‘निर्मळत्वें परम’; तं. ‘निर्मळत्वें परात्पर’.] निर्मळत्वें परापरम । हें सुरनरां न कळे वर्म । आंगीं बिंबलें देखोनि व्योम । राम [मु. ‘मेघश्यामें’.] श्याम म्हणताती ॥ ४५ ॥

यापरी स्वयें श्रीराम । शोभा शोभे मेघशाम । त्याचे पदींचा [भा. /१ त. सु. नि. गे. घा. ‘पराक्रम’; तु. ‘पदक्रम’.] पदाक्रम । त्रिविक्रम आक्रमें ॥ ४६ ॥

शेषासी तोंडें उदंड । चरण वर्णावया धरिलें बंड । त्याची जिव्हा जाली दुखंड । शेषाचे तोंडें [मु. ‘न वर्णवे’.] सरेना ॥ ४७ ॥

तेथ माझी [मु. प्रतीत ‘केउती’ हे अधिक पद; कं. ‘शक्ति’.] युक्ति । सरों शके कैशा रीती । [त. ‘बाळाच्या बोबड्या युक्ति’; सु. नि. गे. घा. ‘बाळभाषें बोबडी स्थिती’.] बाळाचिया बोबड्या स्तुती । संतोषती सखे [नि. घा. तु. ‘सुखें साधू’; सु. गे. ‘संतसाधू’; कं. ‘स्वभावें’.] साधु ॥ ४८ ॥

ध्वज-वज्र अंकुश रेखा । दोहीं पायीं पद्में देखा । पाहातां पाईच्या सामुद्रिका । महापातक्या उद्धारू ॥ ४९

अनुक्रमणिका

॥

चहू मुक्तीं लाऊनि लाज । चरणीं शोभे भक्तीचा ध्वज । वज्रें निर्दळी कर्मबीज । स्मरणाचा सहज नित्यांकुश ॥ ५० ॥

शोधित सत्वाचेंनि आक्रमें । दोहीं पाई तळपती पद्में । तळवे आरक्त [तु. 'अरूजणम'; सु. नि. गे. घा. 'संध्याराग'.] अनुराग प्रेमें । त्या शोभा कुंकुमें लाजिजे ॥

जडजाड्या निस्तरावया [तं. 'गुण'.] त्रिगुण । वेगीं [तं. भा. /१ तु. त. कं. 'वेगीं टाकिलें'; पै. 'योमें टाकिलें'.] ठाकले रामचरण । घोटीं जाली जीं त्रिकोण । चरणीं संपूर्ण जडोनि ॥ ५२ ॥

कळावया कळासल्या चित्कळा । सरळा शोभती सोज्वळा । भक्तांची तें जीवनकळा । निज जिव्हाळा साधकां ॥ ५३ ॥

तोडरू [नि. नां. तु. 'नादें'; सु. गे. घा. 'नांदें'; त. 'नामें'.] नांवें प्रळय घंघाळ । गजरें कांपे कळिकाळ । वांकी आंदुवां खळाळ । सुखकल्लोळ अहंसोहं ॥ ५४ ॥

कदनें कदर्थलें काळचक्र । जालें रामाचें जानुचक्र । चरणीं पावोनि सुखसार । [मु. 'सुरासुर'.] नर वानर स्वयें वंदिती ॥ ५५ ॥

रामाचीं जानुचक्रें देखतां । काळचक्र वंदी भक्तां । चरण-सामर्थ्य रघुनाथा । वेदशास्त्रार्थां अलक्ष ॥ ५६ ॥

लागतां रामचरण कमळा । सवेग [पै. तं. त. कं. 'उद्धरती'; मु. 'उद्धरली अहिल्या शिळा'.] उद्धरली शिळा । [तु. नि. घा. 'चरणप्रसाद जिहीं घेतला'; त. 'चरण प्रसन्न सद्भाव शिळा'.] चरण प्रसन्न स्वभाव शीळां । ते कळिकाळां नागवती ॥ ५७ ॥

ऊरू मृदुत्वें सरळ शोभ । तेणें लाजिले कर्दळीस्तंभ । केळीच्या पोटीं वक्र गर्भ । अवक्र शोभ रामांकीं ॥ ५८ ॥

श्रीरामाचें गुह्यस्थान । पावावया सीताचि संपन्न । वेद तेथ लज्जायमान । शास्त्रें संपूर्ण कचकचिती ॥ ५९ ॥

त्यजूनि वासना वासांसी । जे निर्लज्ज लोकलाजेसी । ते पावती रामगुह्यासी । अहर्निशीं सुखरूप ॥ ६० ॥

श्रीरामासी एकपत्नीव्रत । भक्त पतिपत्नी स्वयें होत । त्यासीच गुह्याचें गुह्य प्राप्त । भक्त भावार्थ अलौकिक ॥

क्षणक्षणा उदो अस्तु विजूसी । ते लागली रामकांसेसी । गिळुनियां [मु. 'निजवस्तूंसी'.] निज अस्तुसी । अहर्निशीं तेजस्वी ॥ ६२ ॥

यालागीं [नि. 'तडतडीत'; सु. गे. घा. 'तगटी'.] तडित्पीतांबर । कांसे [तु. नि. घा. 'रविशश्मिचंद्र'.] मिरवी रामचंद्र । राम

सौंदर्या निजसुंदर । मनोहर [तु. नि. घा. 'सर्वांगीं'.] सर्वांसी ॥ ६३ ॥

ज्यामाजीं राम सांपडे सगळा । ते लेइला भक्तभाव मेखळा । त्यासी किंकिणी जाळमाळा । शोभती सकळा सद्विद्या ॥

पावोनि श्रीरामाचें [मु. 'मुख'.] सुख । क्षुद्र घंटिका अधोमुख । मुक्तलग अलौकिक । शोभे निर्दोष कटि मेखळा ॥ ६५ ॥

अतिसूक्ष्म मध्यमान । पंचानना पूर्ण अभिमान । तेहीं राम-मध्य देखोन । गेला [तं. 'लाजूनी वनवासी'; भा. /१ त. सु. नि. कं. गे. घा. 'पळोन गनवासा'.] पळोन लाजोन वनवासा ॥ ६६ ॥

पाहावया श्रीराम-मध्यमासी । शाहाडे जडले मेखळेसी । शेखीं भुलले श्रीरामासी । गमनागमनासी विसरले ॥ ६७ ॥

[तु. नि. घा. 'नाभी'.] नभ निमग्न निज नाभीं । पूर्वी ब्रह्मा शिणला पद्‌मगर्भी । तो देउनि स्थापिला 'नाभीं' [कं. भा. /१. त. तु. नि. घा. या प्रतींत हे पद नाही.] नाभीं । उदरारंभीं वर्तुळ ॥

ज्ञेय ज्ञाता ज्ञान नवाळी । हेचि [मु. 'उदरोदरीं'; तं. 'उदरादळीं'; तु. 'उदरावरी'; तं. भा. /१ कं. 'उरों' हे पद नाही.] उरों उदरीं त्रिवळीं । सत्कर्मे रेखिल्या रोमावळीं । हृदयें कमळीं शोभती ॥ ६९ ॥

श्रीराम हृदयींचा अवकाश । घनानंदें निरावकाश । संत जडले सावकाश । त्यासी नाहीं नाश कल्पांतीं ॥ ७० ॥

समाधीचें सोलीव सुख । तेंचि राम हृदयींचें पदक । संतमाणकुलीं अनेक । जडलें देख सत्कोंदणें ॥ ७१ ॥

अनन्यभावाच्या सत्प्रीती । हेचि [तु. नि. घा. हे पद नाही; पै. 'तेवि'; कं. 'तेचि'.] रुळे वैजयंती । सुमन मनाच्या रघुपती । माळा शोभती [तु. भा. /१ 'चिन्नमात्र'; तं. 'सन्मीन'; सु. नि. घा. 'सहित'.] सन्मिश्र तुळसी ॥ ७२ ॥

मुक्त सद्भावो मुक्ताफळीं । पूर्णानुसंधानें वोविलीं । श्रीरामकंठीं शोभली । एकावळी मुक्तांची ॥ ७३ ॥

श्रीरामाचा कंबुकंठ । तें वेदांचें मूळपीठ । स्वरवर्णाची वाहती वाट । तेथुन प्रगट परमार्थ ॥ ७४ ॥

मुख्य मुळीं तो अबाहु । त्यासी शोभती आजानुबाहु । बाहूंचा पराक्रम बहु । [मु. 'दैत्याचा'.] द्वैताचा ठावु निर्दळी ॥ ७५ ॥

वामहस्तीचें निजचाप. । निःशेष निर्दळीं पुण्यपाप । निवटी संकल्प विकल्प । कंदर्पाचा दर्प समूळ छेदी ॥ ७६ ॥

बाण लखलखी दक्षिण करीं । घायें समान भक्त वैरी । अहं [तं. हे पद नाही; पै. खेरीज इतरत्र 'ममता'.] मम जीवें मारी

अनुक्रमणिका

। द्वैताची उरी उरों नेदी ॥ ७७ ॥

चैतन्य तेजें अति तेजिष्ठें । अहं सोहं निःशेष आटे । तेचि श्रीरामाचे बाहिवटे । कीर्तिमुखें चोखटें उपनिषदें ॥ ७८ ॥

वीर्य [तु. नि. घा. 'धैर्य जाण'.] धैर्याधैर्य जेणें । तेंचि श्रीरामाचीं वीरकंकणें । करीं बाणलीं पूर्णपणें । लेणियां लेणें श्रीरामु ॥ ७९ ॥

राममुद्रा बाणल्या हातीं । तो वंद्य होय त्रिजगतीं । कळिकाळ पायां लागती । चांऱ्ही मुक्ति आंदण्यां ॥ ८० ॥

ऐसिया दशांगुळीं [भा. /१ सु. गे. घा. 'मुद्रिका'.] दशमुद्रा । करीं प्रतिपाळीं दशावतारा । करीं धरील सीता सुंदरा । [भा. /१ सु. नि. गे. घा. 'लंकानाथा'.] दशकंधरा [तु. 'लोटुनीं'.] नोकुनि ॥ ८१ ॥

आजानुबाहु पंचानन । राम त्रिंबक भंजन । सभेसी रावण गांजून । पाणिग्रहण सीतेचें ॥ ८२ ॥

श्रवणीं कुंडलें मकराकार । हा लौकिक बाह्यविचार । ते आकारींच निराकार । श्रवणीं विकार निर्दळी ॥ ८३ ॥

नवल शोभा त्या श्रवणासी । नित्य मिळणी [तु. नि. घा. 'निजात्मयासी'.] निजात्मअंशीं । श्रवणें देखणें निर्दोषीं । अंशाअंशीं समरस ॥ ८४ ॥

गाळीव आनंदाची मूस देख । कीं सोलींव सुखाचेंही सुख । तेंचि श्रीरामाचें श्रीमुख । करी निर्दोष देखत्यांसी ॥ ८५ ॥

श्रीरामाचा मुख-[मु. 'मृगांक'.] मयंक । पूर्णत्वें नित्य निष्कळंक । तें देखोनियां शशांक । लाजा अधोमुख स्वयें जाला ॥ ८६ ॥

पक्षा वाढे पक्षा मोडे । हें चंद्रासी दुःख गाढें । येऊनि चरणांगुष्टीं जडे । जग पायां पडे नखचंद्रीं ॥ ८७ ॥

जडतां श्रीराम-अंगुष्टीं । चंद्रासी जाली पुष्टी तुष्टी । रामचरणीं सुखाच्या कोटी । देखतां [कं. पै. खेरीज इतरत्र 'दृष्टी'.] सृष्टीं आल्हादु ॥ ८८ ॥

देखतां श्रीरामाचें श्रीमुख । समूळ निर्दळी [मु. 'जन्मुख'.] द्वंद्व-दुःख । परमानंदें कोंदे सुख । हरिखीं हरिख कोंदाटे ॥ ८९ ॥

अकार उकार मकार स्थिती । ॐकारीं कर्म निष्कर्म [पै. खेरीज इतरत्र हे पद नाही.] स्थिती [तं. 'गति'.] श्रुती ।
तैस्या मुखीं दुभागीं [पै. पंक्ति.] दंतपंक्ति । चतुर्वेदोक्ति चौकीचे चाऱ्हीं ॥ ९० ॥

अनुक्रमणिका

जगाचे अधर ते अधर । राममुखींचे अधर सधर । परमामृतासी निज माहेर । निज जिव्हार सीतेचें ॥ ९१ ॥

श्रीरामाची हनुवटी । देखतां सुख वोसंडे सृष्टी । धन्य देखत्यांची दृष्टी । ते जाणे हनुवटी हनुमंतु ॥ ९२ ॥

जगीं सौंदर्या शोभनिक । तेचि श्रीरामाचें निज नासिक । तो नासिकीं निर्नाशक । करील आवश्यक शूर्पनखा ॥ ९३ ॥

श्रीरामाचेनि प्राणें जाण । जगाचा परिचरे प्राण । तेथ वसतां समाधान । निज जीवन वायूसी ॥ ९४ ॥

चैतन्याचें विश्रांतिस्थान । ते श्रीरामाचे निजनयन । सबाह्य डोळस संपूर्ण । आपणया आपण देखणें ॥ ९५ ॥

देखतां श्रीरामाची दृष्टी । [मु. 'ब्रह्मानंदें'.] कोट्यानंदें जीऊ उठी । दृश्य द्रष्टा न दिसे त्रिपुटी । हेलावे सृष्टी स्वानंदे ॥ ९६ ॥

श्रीरामाची भ्रुकुटी । रची ब्रह्मांडाच्या कोटी । भ्रूविक्षेपें कळिकाळ घोटी । छेदी गांठी चहूं देहा ॥ ९७ ॥

[भा. /१ सु. नि. गे. घा. 'श्रवणांतें'.] श्रवणान्त देखणें नयन । याचि नांवें डोळसपण । पदार्थी परमार्थ-दर्शन । तें समाधान नयनांसी ॥ ९८ ॥

श्रेष्ठ श्रीरामाचें निडळ । तेणेंचि अधिष्ठान सकळ । सच्चिदानंद रेखा सरळ । शोभे कपाळ त्रिवळिया ॥ ९९ ॥

[मु. 'गाळुनीं'.] उगाळुनि अहं [भा. /१ तु. सु. नि. गे. घा. 'कठिणपण'.] कठिण । सोहं काढिलें शुद्ध चंदन । तेंहि केलें रामार्पण । गंधार्चन श्रीरामा ॥ १०० ॥

श्रद्धाकेशराचा मेळा । टिळकु रेखिला पिवळा । सप्रेम रंगें सुरंग कळा । अक्षता निडळां शोभती ॥ १०१ ॥

श्रीरामु सकळां मुगुटमणी । राम शिरोरत्न राजस्थानीं । त्याचे माथाचा मुगुट [तु. सु. नि. गे. घा. 'मुकुटमणी'.] वर्णी । ऐसा कोण्ही दिसेना ॥ १०२ ॥

राम-मुकुटां मुकुटीं निज शोभा । राम शिरोरत्न निजभागा । त्या श्रीरामाची मुकुटप्रभा । वचनारंभा दुर्लभ ॥ १०३ ॥

श्रीरामाच्या शिरावरतें । कांहीं उरलें असे तें रितें । तरी मुकुट वाणावया तेथें । अवकाश वाचेतें सुखें होता ॥ १०४ ॥

श्रीरामावरतें कांहीं । सर्वथा रितें उरलें नाहीं । मां मुकुट वाणावा कोणे ठाई । वाचेनें काई बोलावें ॥ १०५ ॥

श्रीरामाचा निजप्रताप । नित्यत्वें निर्विकल्प । तोचि शिरीं मुकुट सद्रूप । चित्स्वरूप शोभतु ॥ १०६ ॥

अनुक्रमणिका

यालागीं श्रीरामाचे माथां । शिरीं मुकुटत्व श्रीरघुनाथा । तो लेणया लेणें तत्त्वतां । अंगें निजांगता शोभवी ॥ १०७ ॥

जेवीं सोनयां सोनेंचि कोंदणें । तेवीं श्रीरामा रामचि लेणें ।
हे सीताचि स्वयें [पै. भा. /१ तु. खेरीज इतरत्र 'लक्षूं जाणें'.] लक्षणें जाणे । इतरांचें जाणणें दिवा-खद्योत ॥ १०८

[मु. प्रतींत हे पद नाही.] सती सीतेचें सद्रूपपण । स्वयें श्रीरामुचि जाणे आपण । श्रीरामाचें पूर्णपण । जाणे संपूर्ण स्वयें सीता ॥ १०९ ॥

येर येरांची ऊण खूण । दोघे जाणती संपूर्ण । एका जनार्दना शरण । चापनिर्दळण अवधारा ॥ ११० ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां श्रीरामस्वरूपवर्णनं नाम एकोनविंशतितमप्रसंगः ॥

संपादित प्रत, श्लोक ४, ओव्या ११०.
इतर प्रतींत कं. नि. इं. सु. घा. गे. १,१०६; अन्यत्र श्लोक नाहीत, ओव्या १०६.

अनुक्रमणिका

## प्रसंग विसावा

## धनुर्भंग सीतावरण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीरामाचें पूर्णपण । रूपरेखा गुण लावण्य । देखोनि सीतेचें वेधलें मन । सर्वथा आन नावडे ॥ १ ॥

सांडोनियां चंद्रामृत । चकोरें आन न सेवित । तेवीं सांडुनि रघुनाथ । सीतेचें चित्त आन न [भा. /१, सु. नि. गे. घा. 'मानी'.] मनीं ॥ २ ॥

जनकें देखोनि रघुनाथ । चित्तीं आल्हाद अत्यंत । जानकी द्यावी निश्चितार्थ । साशंकित धनुष्यार्थी ॥ ३ ॥

सभास्थितांचे नयन । रामरूपीं अति निमग्न । रावणासी पडिलें मोहन । तटस्थ जन श्रीरामें ॥ ४ ॥

राम देखोनि ऋषिपंक्ति । अवघे आश्चर्य मानिती । सीता द्यावी [मु. 'रघुपतिप्रति'.] रघुपती । मानलें चित्तीं सर्वांसी ॥ ५ ॥

पुढील कार्य अति कठिण । केवीं धनुषासीं वाईल गुण । कळवळीत सकळै जन । चाप बंधन लग्नासी ॥ ६ ॥

सत्य सीतेचा भावार्थ । राम अंतर्यामीं समर्थ । करावया सकळांचें मनोगत । चाप-भंगार्थ चालिला ॥ ७ ॥

मागां ठेउनी लक्ष्मण । रामु चालिला सत्राण । देखोनि दचकला रावण । हा धनुष्या गुण वाईल ॥ ८ ॥

हा तंव दिसताहे बाळक । याचा पराक्रम अलौकिक ।
घायें मरीचीसी लावी शीक । मारिला निःशेष सुबाहु ॥ ९ ॥

म्लान देखोनि दशवक्त्रा । उल्हास थोर विश्वामित्रा । वेगु करी रामचंद्रा । धनुर्धरां [मु. 'लाजवी'.] कुढावी ॥ १० ॥

तेणें हरिखेला रघुनंदन । विश्वामित्रासी केलें नमन । द्विजांचें घेउनि आशीर्वचन । दिधला सन्मान सभेसी ॥ ११ ॥

जनकु अतिशयें सज्ञन । त्यासी [मु. 'रामें'.] नेत्रें केलें नमन । बाहूंसी आलें जी स्फुरण । चापग्रहण कराविया ॥ १२ ॥

हेळसूनियां सभा समस्त । मी एकु सामर्थ्यें समर्थ । रावणा ऐसा अति [पै. खेरीज इतरत्र 'गर्वार्थ'.] गर्वित । [तं. भा. /१ सु. गे. घा. त. क. 'धरुनीं रघुनाथ न धरी चाप'; तु. 'श्रीरघुनाथ न करी तैसें'; नि. 'श्रीरघुनाथ न करीतसे'.] नव्हे निश्चित रघुनाथ पैं ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

देऊनि सकळिकांसी सन्मान । वृद्ध वृद्धां करुनि नमन । अति [मु. 'अति विनीत'.] विनीतता रघुनंदन । चापग्रहण करूं आला ॥ १४ ॥

धनुषीं अत्यंत जडपण । तेंही सांगेन निरोपण । श्रोतां द्यावें अवधान । पूर्वलक्षण पर्यावो ॥ १५ ॥

चाप सदाशिवाचे हातीं । त्यासी [तु. नि. घा. 'जडत्वा'.] जडत्व शिवशक्ति । [तु. 'चापें चाप जडपणें प्रासी'; सु. नि. गे. घा. 'चापें चाप जडत्व प्राप्ती'; कं. 'पापें चापा जड प्राप्ती'.] पापें चापा जडत्वप्राप्ति । जे बोलती ते महापापी ॥ १६ ॥

चाप अतिदुष्ट निर्दळी । तें पाप न ये चापाजवळी । शिवु रामनामें पाप जाळी । मग निर्दळी दुष्टांते ॥ १७ ॥

चापें बहु केलें तपव्रत । म्हणोनि पावलें शिवाचा हात । शिवहस्तें अति पुनीत । यालागीं रघुनाथ हातीं धरी ॥ १८ ॥

शिवाचें शिवचाप अपूर्व । तेथ अधिष्ठानें वसे शिव । तें केवीं उचलूं शकती जीव । चापीं जडभाव शिवशक्ति ॥ १९ ॥

धनुष्य उचलितां रावण । चापीं प्रवेशे त्रिनयन । तेणें तो अपमानला पूर्ण । चापीं जडपण शिवशक्ति ॥ २० ॥ [तं. प्रतीत ही ओवी नाही.]

शास्त्रमर्यादा ते ऐसी । जो जड तो पापराशी । तें जडत्व नाहीं चापासीं । घनत्व त्यासी शिवशक्ति ॥ २१ ॥

कोदंडाचा निज भावार्थ । शिवहस्तें मी अति पुनीत । श्रीरामहस्तें परममुक्त । होईन निश्चिती स्वयंवरीं ॥ २२ ॥

[कं. नि. घा. 'राम सदा शिवातें ध्याय'.] राम सदाशिवाचें ध्येय । [त. 'शिव सेवी श्रीरामपायें'; तं. 'शिव वंदी श्रीराम स्वये'; भा. /१ तु. नि. गे. घा. 'शिव वंदी श्रीरामपाय'; कं. 'शिव वंदी सदाशिवाचे पायें'.] शिव श्रीरामाचें हृदय । तेणें चापाचें जडत्व जाये । पुष्पप्राय तें जालें ॥ २३ ॥

असो ही धनुष्याची कथा । स्वयंवरीं वरावी सीता । हेंचि कार्य रघुनाथा । तत्कार्यार्थी चाप पाहे ॥ २४ ॥

रामें अवलोकितां चाप । चाप जालें [पै. प्रतीत 'जैसें' अधिक पद आहे.] निष्पाप । हरला जडजाड्य संताप । स्वयें सुखरूप उचललें ॥ २५ ॥

रामु पाहे जयाकडे । त्याचें आकल्प जडत्व उडे । तेथें धनुष्य काय बापुडें । जडत्व पुढें [तं. 'उडे उठाउठी'; त. 'पुढे रहावया'.] उरावया ॥ २६ ॥ [या ओवीनंतर कं. प्रतीत पुढील ओवी आहे :–– 'धनुष्याचेंहि मनोगत । लागला श्रीरामाचा हात । मी होईन कृतकायार्थ । रामराम म्हणत वाचेसी ॥'.]

राम राम म्हणतां वाचें । जड संसार तरती साचे । दर्शन जालिया त्या रामाचें । जडत्व कैंचें धनुष्यासी ॥ २७ ॥
देखिलिया रामचरण । भवाब्धि तरती जड पाषाण । त्याचें जालियां दर्शन । कैचें जडपण धनुष्यासी ॥ २८

अनुक्रमणिका

॥ [नि. घा. प्रतींत ही ओवी नाही.]

**धनुष्याचेंहि मनोगत । लागल्या श्रीरामाचा हात । मी होईन** [तं. 'कृतार्थ'; सु. नि. गे. घा. भा. /१ त. तु. 'कृतकृतार्थ'; कं. 'कृतकृत्य'.] **कृतकार्यार्थ । कर्मनिर्मुक्त श्रीरामें ॥ २९ ॥**

**चापासी उपजे अनुताप । ऐसा श्रीराम प्रताप । अनुतापें जडत्व गेले पाप । रामें सकृप पाहिलें ॥ ३० ॥**

**या** [त. 'यापरी पाही'; सु. नि. गें. घा. 'या परी'.] **परिपाठीं रघुनाथें । अवलोकुनिया धनुष्यातें । आकळिलें वामहस्तें । सज्ञ** [तु. नि. घा. 'त्वरितें'.] **सर्वार्थें करावया ॥ ३१ ॥**

**धनुष्य श्रीरामें धरितां हातीं । थोर आशंका जनकाचां चित्तीं । तो येउनि मुनीप्रती । अति काकुळती बोलतु ॥ ३२ ॥**

**राजा म्हणे महर्षि । राम सुकुमाराची महाराशी । जेणें घोळसिलें रावणासी । तें चाप यासी केवीं सज्ञें ॥ ३३ ॥**

> विश्वामित्रः सरामस्तु श्रुत्वा जनकभाषितम् । वत्स राम धनुः पश्य इति राघवमब्रवीत् ॥ १ ॥ [वाल्मीकिरामायण, बालकांड, सर्ग ६७; श्लोक १२.]
> गृहाणेदं महाबाहो दिव्यं धनुरनुत्तमम् । धारणे कर्षणे चास्य यत्नमातिष्ठ राघव ॥ २ ॥ [हा श्लोक पै. तु. भा. /१ कं. ह्याच प्रतींत आहे.]

**आइकतां साशंक रायाचें वचन । विश्वामित्र निःशंक पूर्ण । काय बोलिला गर्जोन । सभेचे जन आइकतां ॥ ३४ ॥**

**आइके बापा रघुनंदना । पुरुषांमाजीं पंचानना । धनुष्य चढवावें आंगवणा । सावधान निजवृत्ति ॥ ३५ ॥**

**तूं तंव पुरुषार्थी रघुनाथ । धनुष्य वावें निमिषार्धांत । जनकाजानकीचा मनोरथ । कृतकृत्यार्थ करावा ॥ ३६ ॥**

**आइकोनि सद्‌गुरुचें वचन । धनुष्य पाहे रघुनंदन । वामहस्तें आकळून । चढवावया गुण सज्ञ जाला ॥ ३७ ॥**

श्रीराम उवाच—

> इदं धनुर्वरं दिव्यं संस्पृशामि हि पाणिना । यत्नवास्तु गमिष्यामि तोलने पूरणे तथा ॥ ३ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही; वाल्मीकिरामायण बालकांड, सर्ग ६७, श्लोक १४.]

**राम म्हणे गुरुप्रति । तुझ्या वचनें कृपा प्राप्ती । धनुष्य वाहणें कार्य किती । वृथा** [पै. खेरीज इतरत्र, 'कुंथती'.] **शंकती** [तु. 'नृपवर'; सु. नि. गे. घा. 'नरवर्य'.] **नरवीर ॥ ३८ ॥**

**हें शंकराचें दिव्य चाप । गुण वाणे कार्य अल्प । पाहा माझा प्रताप । करीन** [भा. /१ 'आरोप संकर्षणेसी'; सु. नि. गे. घा.

अनुक्रमणिका

'शराकर्षणेंसी'; कं. 'कर्षण आरोप करीन'.] **आरोप कर्षणेसी ॥ ३९ ॥**

बाढमित्यब्रवीद्राजा मुनिश्च समभाषत । लीलया स धनुर्मध्ये जग्राह वचनान्मुनेः ॥ ४ ॥
पश्यतां नृपसहस्राणां बहूनां रघुनंदनः । आरोपयत्स धर्मात्मा सलीलमिव तद्धनुः ॥ ५ ॥
[वाल्मीकिरामायण, बालकांड, सर्ग ६७, श्लोक १५, १६.]

**ऐसें बोलतां रामचंद्र । हरुषें** [भा. /१ 'उचंबळला'; तं. 'उल्हासला'; तु. सु. नि. गे. घा. 'उल्हासें'.] **उथळला विश्वामित्र । म्हणे धन्य धन्य तुझें वक्र । तूं प्रताप समुद्र रविवंशी ॥ ४० ॥**

**तुझिया या** [मु. 'साठीं'.] **वचनासाठीं । मज दिधल्या अयुत कोटी । म्हणोनिया पाठी थापटी । धनुष्य मुष्टी आकर्षी ॥ ४१ ॥**

**जनकु म्हणे रघुनाथा । मजही ऐसा भ्रमु होता । हरधनुष्य** [तं. कं. 'आकळी आतां'.] **आकळिता । वीर सर्वथा असेना ॥ ४२ ॥** [तु. प्रतीत ही ओवी नाही.]

**ते त्वां** [मु. 'वाढिवेचा'.] **वांठीवेचा माथा । उजळ केला सभे देखतां । किती वानु पैं पुरुषार्था । धन्य रघुनाथा वांठीव ॥ ४३ ॥**

**बोलिलासी प्रताप गरिमा । ते सत्य करावी श्रीरामा ।** [नि. घा. 'संपादीं शीघ्र'.] **संपादी चापकर्मा । पुरुषोत्तमा रघुवीरा ॥ ४४ ॥**

**गुरु श्वशुर उभय वचन । आइकोनि रघुनंदन । धनुष्या वाविया पैं** [भा. /१ 'पूर्ण'.] **गुण । चाप संपूर्ण आकळिलें ॥ ४५ ॥**

पृथ्वि स्थिराभव भुजंगम धारयैनाम् । त्वं कूर्मराज तदिदं द्वितयं दधीथाः ॥
दिक्कुंजराः कुरुत तत्रितये दिधीर्षो । रामः करोति हरकार्मुकमाततज्यम् ॥ ६ ॥ [हा श्लोक व त्या पुढील ४६ व ४७ या दोन ओव्या फक्त पै. प्रतीतच आहेत.]

**पृथ्वी तुवां असावें सावधान । शेषा करावें इचें धारण । कुर्मा करावें दोहीचें उद्धरण । दिक्कुंजरीं धैर्य धरावें ॥ ४६ ॥**

**श्रीराम भंगील धनुष्यासी । पृथ्वी जावों पाहे रसातळासी । यालागीं तुम्ही राखावें इयेसीं । सावधानतेसी सर्वत्र ॥**

**अति आतुर्बळी रघुनाथ । न लवितां दुसरा हात । एकेचि हातें वाइलें शीत । जाले विस्मित सुरासुर ॥ ४८ ॥**

[तु. नि. घा. या प्रतींत 'चाप' हे अधिक पद आहे.] **टणत्कारितां करतळीं । नादें रावणा दांतखिळी । राजे मूर्च्छित भूतळीं । बैसली टाळी** [मु. 'दिग्गजांची'.] **सकळिकां ॥ ४९ ॥**

आरोपयित्वा मौर्वींच पूरयामास तद्धनुः । तद्बभञ्ज धनुर्मध्ये नरश्रेष्ठो महायशाः ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

तस्य शब्दो महानासीन्निर्घातसमनिस्वनः । भूमिकम्पश्च सुमहान् पर्वतस्येवदीर्यतः ॥ ८ ॥
निपेतुश्च नराः सर्वे तेन शब्देन मोहिताः । वज्रयित्वा मुनिवरं राजानं तौ च राघवौ ॥ ९ ॥ [हे तीन श्लोक मु. प्रतीत नाहीत. वाल्मीकिरामायण, बालकांड, सर्ग ६७, श्लोक १७ ते १९.]

**धनुष वोढितां नुपुरें वोढी । मुष्टी माझारीं तडाडी । वोढितां पूर्ण कानाडी । अति कडाडी भंगलें ॥ ५० ॥**

**नादाचेनि** [सु. गे. 'घर्घरारीं'; नि. घा. 'घन घर्घरारीं'.] **घर्घर घोरें । बैसलीं** [मु. 'वीरांची दांतेरीं'.] **नेत्र आणि दांतौरें । किरिकिरूनि** [पै. खेरीज इतरत्र. 'वाजिकुंजरें'.] **गजवाजी उष्ट्रें । उभीं शरिरें उलंडिलीं ॥ ५१ ॥**

**धनुर्भंगाचा कडकडाटी । नादें दुमदुमिली सृष्टी । तडा पडो पाहे मेरुपृष्टीं । निमटे दृष्टी काळाची ॥ ५२ ॥**

**कोटी विजू तुटोनि पडे । चाप कडाडी तेणें पाडे । सुरनर किन्नर जाले वेडे । वायु उडे तेणें नादें ॥ ५३ ॥**

**नादाचिया अत्यंत प्रौढी । पृथ्वी गेली चिरडो बिऱ्हढी । नभीं नक्षत्रां पानझडी । पडिली** [तु. 'बुढीं तळमळींत'; सु. नि. गे. घा. 'बुडीं डळमळिती'.] **बुडी टळटळीतें ॥ ५४ ॥**

**उद्भट नादाची गती कैसीं । पक्षी विसरले पळावयासी । भ्रमें भ्रमती ते आकाशीं । गति** [मु. 'सर्वांची'.] **सर्वांशीं खुंटली ॥ ५५ ॥**

**काळें** [पै. त. कं. 'भयें'; तं. हे पद नाही.] **प्राण्याचा घ्यावा प्राण । काळु पळाला भया भेणें । आतां तेथें मारितें कोण ।** [मु. 'काळा आकर्षण'; कं. तं. 'काळा काळपण'; तु. 'काळा कळणें'; भा. 'काळा आकळण'; त. 'काळ आंकण'.] **काळाकळण श्रीरामें ॥ ५६ ॥**

**चापखंडें पडतां बुढीं । शेष अत्यंत** [मु. 'तडफडी'.] **फडफडी । वराहाची** [मु. 'दाढी'.] **दाढ तडाडी । कूर्में गाढीं पुष्टीं केली ॥ ५७ ॥**

[त. 'येरव्ही चौघडी होती'; भा. /१ 'उलथो पाहती'; नि. तु. 'ऐसी दडपलीं'; सु. गे घा. 'दडपलीं सप्तपाताळें'.] **येऱ्हवी चवडी होती पाताळें । उचंबळलीं समुद्रजळें । शेषशयन पैं आंदोळे । मेरु कुळाचळें** [भा. /१ सु. गे. घा. 'डळमळली'; कं. 'लोपती'.] **कांपती ॥ ५८ ॥**

**दिवीं कंप भूकंप । सत्यलोकीं चळकांप । श्रीरामें भंगिलें शिवचाप । अति प्रताप तिहीं लोकीं ॥ ५९ ॥**

**जनक आणि विश्वामित्र । राम आणि सौमित्र । यांचेचि सावध नेत्र । येर सर्वत्र मूर्छित ॥ ६० ॥**

**या चौघाही वेगळी । सावध पाहे जनकबाळी । देखोनि रामप्रताप** [पै. 'वळी'.] **बळी । उतावळी वरावया ॥ ६१ ॥**
[पै. 'शिवचापें'.] **शिवचापाचें मनोगत । रामहस्तें मी परममुक्त । कडकडाट नव्हे** [तु. नि. 'व्यर्थ'; कं. 'सत्य'.] **तेथ । चाप गर्जत स्वानंदें ॥ ६२ ॥**

अनुक्रमणिका

**आनंदनाद अति उद्भट । नादें दुमदुमिलें वैकुंठ । तेणें कोंदलें कैलासपीठ । नादें नीळकंठ डुल्लतु ॥ ६३ ॥**

[तु. सु. नि. गे. घा. 'चाप निर्मुक्त'.] **चाप निर्मुक्ति आनंद** [तं. /१ सु. नि. गे. घा. 'गहींवर'.] **गहीर । तेणें उथळला क्षीरसागर । शेषशयना आनंद फार ।** [मु. 'स्वर्गी जयजयकार देवांचा'; भा. 'जयजयकार वेदांचा'; तु. 'जयजयकार वदे वाच्या'.] **जयजयकार देवांचा ॥ ६४ ॥**

**रामप्रताप आनंदद्वारां । अकार उकार मकारा ।** [मु. 'आनंद कोंदला'.] **आनंदें कोंदली अर्धमात्रा । राया रघुवीरा प्रतापें ॥ ६५ ॥**

**लागतां श्रीरामाचे हात । शिवचाप जालें परममुक्त ।** [तु. नि. घा. 'तोही मुक्तिचा अर्थ'; कं. 'तोचि मुक्तिचा इत्यर्थ'.] **तोही मुक्तीचा इत्यर्थ । श्रीरघुनाथ प्रताप ॥ ६६ ॥** [सु. गे. प्रतींत ही ओवी नाही.]

**लागतां श्रीरामाचे चरण । सद्यमुक्त होती पाषाण । त्याचेनि हस्तें चापग्रहण । मुक्त संपूर्ण श्रीरामें ॥ ६७ ॥**
[कं. प्रतीत पुढील ओवी आलेली आहे :–– करितां श्रीराम स्मरण । जडासीं मुक्ति वरी आपण । त्याचेनि हस्तें चापग्रहण । मुक्ति संपूर्ण श्रीराम ॥']

**शिवचापा परम मुक्ति । जनकसंशया** [कं. भा. /१ सु. गे. 'निर्मुक्ति'; तु. नि. घा. 'विनिर्मुक्ति'.] **नित्य निर्मुक्ति । जानकीलोचना नित्य तृप्ती । ते श्रीराममूर्ति स्वयंवरीं ॥**

**रावणगर्वा विनिर्मुक्ति । राजाभिमाना नित्य निर्मुक्ति ।**
[तु. 'आशापाश निःशेष जाती'; सु. नि. गे. घा. 'आशापाश निःशेष' निवृत्ती; पै. 'आशापाशीं निःशेष मुक्ति'; कं. 'आशा निशेष मुक्ति'.] **आशापाशीं निःशेष मुक्ति । ते श्रीराममूर्ति स्वयंवरीं ॥ ६९ ॥** [तं. प्रतीत ही ओवी नाही.]

**वेदानुवादां** [भा. /१ तं. तु. सु. नि. गे. घा. कं. 'वचनानुमुक्ति'; तं. 'वचनानुक्ती'.] **उपरति ।** ['शास्त्रवेवादा मुक्ति प्रत्योक्ति'; तु. नि. 'शास्त्रानुवादां युक्ति प्रयुक्ति'; त. कं. 'शास्त्रेवेवादा मुक्ति प्रत्युक्ति'; तं. 'शास्त्रवेवादां मुक्त प्रत्युक्ति'; सु. गे. घा. 'वेदशास्त्रा प्रत्युक्ति'.] **शास्त्रवेवादां समाप्ति ।** [तं. भा. /१ तं. तु. कं. 'जानकीलोचना दृश्य निर्मुक्ति'; सु. नि. गे. घा. 'जानकीलोचना दृश्य निर्मुक्ति".] **जानकीहृदयींची चित्स्फूर्ति । ते श्रीराममूर्ति स्वयंवरीं ॥ ७० ॥**

**जनसमुदाया संदेहमुक्ति । सुरसमुदाया बंधनिर्मुक्ति ।**
[तु. नि. 'भक्तसंताप'; तं. भा. /१ त. सु. गे. घा. कं. 'भक्तसंता'.] **भक्तसमुदाया निजात्ममुक्ति । ते श्रीराममूर्ति स्वयंवरीं ॥ ७१ ॥**

**श्रीरामप्रतापाचा सोहळा । देखावया भाग्य कैचें सकळां । आंध्य पडिलें त्यांच्या डोळां । जनकबाळा सुख भोगी ॥**

**श्रीरामसुखाचा सोहळा । देखोनि जानकी निवाली डोळा । त्याचे कंठीं घालावया माळा ।** [त. 'उतावेळा भावार्थे'; तु. भा. /१ 'उताविळा भावार्थु'; तं. 'उतावेळा भावार्थु'; सु. नि. गे. घा. 'उतावळी भावार्थे'.] **उतावळा भावार्थु ॥ ७३ ॥**

[मु. प्रतीत श्लोक नाहीत. वाल्मीकि रामायण, बालकांड, सर्ग ६७, श्लोक २० ते २३.] प्रत्याश्वस्ते जने तस्मिन् राजा विगतसाध्वसः । उवाच प्रांजलिर्वाक्यं वाग्यज्ञं मुनिपुंगवम् ॥ १० ॥
भगवन् श्रुतपूर्वं मे रामं दशरथात्मजम् । अत्यद्भुतमचिन्त्यं चातर्कितमिदं मया ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

जनकानां कुले कीर्तिमाहरिष्यति मे सुता । सीता भर्तारमासाद्य रामं दशरथात्मजम् ॥ १२ ॥
मम सत्या प्रतिज्ञा च वीर्यशुल्केति कौशिक । सीता प्राणैर्बहुमता देया रामाय मे सुता ॥ १३ ॥

**चापभंगाची नाद कोटी । शनैःशमती नभाच्या पोटीं । चेतनोपलब्धी जाली सृष्टी । उघडल्या दृष्टी जनांच्या ॥ ७४ ॥**

**जन झाले सावधान । सभा बैसली स्वस्थान । देखोनिया धनुर्भग्न । विस्मित मन सर्वांचें ॥ ७५ ॥**

**गेला जनकाचा संदेहो । जाला सर्वार्थी निःसंदेहो । राम आतुर्बळी महाभावो । जाणोनि रावो बोलतु ॥ ७६ ॥**

**जनकु अत्यंत उल्हासेंसी । हरिखें बोले विश्वामित्रासी । राम दाशरथी सूर्यवंशी । पूर्वी बहु ऋषि सांगिजे मज ॥ ७७ ॥**

**निजतेजें अत्यद्भुत । अचिंत्यानंत अति सामर्थ्य । दृष्टीं देखिलें इत्थंभूत । प्रतापवंत श्रीराम ॥ ७८ ॥**

**जेणें शिवाचें कोदंड । अवलीला केलें दुखंड । श्रीरामप्रताप प्रचंड । काळें तोंड रावणाचें ॥ ७९ ॥**

**पूर्ण न भरतां कानाडी । हरचाप भंगलें कडाडीं । त्याचे प्रतापाचे प्रौढी । कोणें केव्हडी वाणावी ॥ ८० ॥**

**जनककुळीचीं कुळात्मजा । होईल श्रीरामाची भाजा । तेणें वंश सार्थक माझा । हा धर्म तुझा ऋषिवर्या ॥ ८१ ॥**

**विश्वामित्रा तूं धर्मात्मा । तुझेनि धर्में भेटी श्रीरामा । तुझेनि** [भा. /१ 'कृतार्थ कर्माकर्मा'; तं. 'निवृत्ती कर्माकर्मा'; सु. नि. गे. घा. 'निष्कृति सर्वा कर्मा'.] **निष्कृती कर्माकर्मा । राम परमात्मा मज सुहृद ॥ ८२ ॥**

**तुझें रूढ नाम विश्वामित्र । परी तूं माझा परममित्र । राम परमात्मा परम पवित्र । सुहृदे स्वतंत्र तुझेनि ॥ ८३ ॥**

**माझा पूर्वकृत संकल्प ।** [भा. /१ 'शिवाचें अमोल्य'; नि. 'सीता अमूल्य'.] **सीता मौल्य प्रताप चाप । तो त्वां केला** [पै. खेरीज इतरत्र 'निर्विकल्प'.] **सुखरूप । सत्य संकल्प श्रीरामें ॥ ८४ ॥**

**स्वयंवरीं** [भा. /१ 'कठीणपण'; सु. नि. गे. घा. 'स्वयंवरीचा पण'; कं. 'स्वयंवरी चाप कठिण'.] **चाप पण कठिण । राजे भंगले सहरावण । त्यासी श्रीरामें वाईला गुण । सीतावरण प्रतापी ॥ ८५ ॥**

**सीतेसी श्रीराम भर्तार । कार्यकर्ता विश्वामित्र । भलें जाणसी ब्रह्मसुत्र । अति पवित्र ऋषिवर्या ॥ ८६ ॥**

**विश्वामित्राचे चरणीं माथा । ठेऊनि जनकु होय बोलता । प्राणापरीस पढिये सीता । ते म्यां रघुनाथा अर्पिली ॥ ८७ ॥**

अनुक्रमणिका

आजी माझे याग सफळ । आजी माझें पावन कुळ । आजी सीतेचें भाग्य सानुकूळ । सुखकल्लोळ श्रीरामें ॥ ८८ ॥

माझी कन्या अगुणे सगुण । सीता केली रामार्पण । विश्वामित्रा तूं सज्ञान । वेगीं लग्न लावावें ॥ ८९ ॥ [या ओवीनंतर तु. नि. घा. या प्रतींत पुढील ओवी आलेली आहे :—‘ऐसी जनकाची विनवणी । विश्वामित्रें ऐकोनि । बरवें म्हणौनि प्रतिवचनीं । उल्हासोनि बोलिला ॥’]

आइकोनि ऋषि रायाची गोष्टी । [कं. पै. तं. /१, त. तु. खेरीज इतरत्र, ‘सीता गजु’.] गजु पेलिला घडघडाटी । माळा घालावया श्रीरामकंठीं । आली गोरटी उल्हासें ॥

जें सीतेचे मनीं होतें । तेंचि केलें रघुनाथें । वेगीं वरावया त्यातें । आली [नि. ‘आनंदें अद्‌भुते पैं आली’; तु. ‘आनंद अद्‌भुते पैं आली’.] अद्भुतें उल्हासें ॥ ९१ ॥

घेऊनि चिद्रत्नाची माळा । आनंदें आली जनकबाळा । देखतां सकळिकां भूपाळां । घातली गळां श्रीरामा ॥ ९२ ॥

होतां डोळयां डोळे भेटी । [मु. ‘लाज’; कं. ‘लज्जा’.] लाजा विराली उफराटी । आनंदें वोसंडली सृष्टी । सुटल्या गांठी चहूं देहा ॥ ९३ ॥

सवेंचि पाहे सावधान । डोळया डोळां जालें वरण । प्राणें प्राणा परिणयन । लागलें लग्न जीवीं [नि. ‘जीवीं शिवा’; तु. कं. ‘जिव शिवा’.] जीवा ॥ ९४ ॥

चापें वीराभिमान अस्तु । मध्यान्हीं तपें आदित्यु । सीता वरावया रघुनाथु । आला अभिजितु सुमुहूर्ता ॥ ९५ ॥

लग्नघटिका पाहे भास्वत । वाचा राहिल्या निज मौनांत । स्वबोध [पै. खेरीज इतरत्र ‘सावधान’.] एकचित्त सांगत । काळ [पै. खेरीज इतरत्र ‘काळं सावचित्त दोहीं भागीं’.] म्हणत सावधान ॥

धनुर्भंगाच्या गजरा आंत । अंतर्पट विनिर्मुक्त । वरावया श्रीरघुनाथ । भावार्थ म्हणत ॐ पुण्या ॥ ९७ ॥

ऐसा समय साधूनि उचित । सांडूनि [तु. नि. ‘उभयपक्षार्थ’.] उभयपक्ष स्वार्थ । करूनि अभिमानाचा अंत । सीता रघुनाथ वरिएला ॥ ९८ ॥

येरयेरां पाहातां अति प्रीति । सुटल्या [पै. संपादित पाठ; इतरत्र ‘चिदचिन्महाग्रंथी’; कं. ‘चित्तचीर महाग्रंथीं’.] चिदचिद्ग्रंथी । निज ऐक्याचा बोवल्याप्रति । दोघी बैसती एकात्मता ॥ ९९ ॥

वोहरें पाहातां परस्परां । नोवरीमाजीं दिसे नोवरा । नोवऱ्या आंगीं शोभे [मु. ‘दिसैं’.] सुंदरा । वरिलें वरा या स्थिती ॥ १०० ॥

सीता श्रीरामी घालितां माळा । तेचि क्षणीं त्याचि काळां । रावणा वरिलें अवकळा । निडळीं टिळा

अनुक्रमणिका

काळिमेचा ॥

अवकळां बैसतां पाठीं । रावणु अपमानला सृष्टीं । रामप्रताप देखतां दिठीं । रावणापोटीं धुक धुक ॥ १०२ ॥

विजयी जाला रामचंद्र । हरिखें नाचे विश्वामित्र । घेऊनि [भा/१. सु. नि. गे. घा. 'ऋषींचा'.] शिष्यांचा संभार । नृत्यतत्पर स्वानंदें ॥ १०३ ॥

एक रोडिके एक बोडिके । एक ते केवळ सुडिके । अवघे नाचती हरिखें । सीता रधुटिळकें परिणिली ॥ १०४ ॥

आनंदें नाचती आघवे । झेलती गोपीचंदन रवे । धोत्रें झेलिती घडियापालवें । सीता राघवें परिणिली ॥ १०५ ॥

एक ओवाळिती अंगवस्त्रें । एक ओवाळिती जुनीं धोत्रें । एक ओवाळिती दर्भ पवित्रें । सीता रामचंद्रें जिंतिली ॥

एक ओवाळिती कौपीन । एक ओवाळिती कुशासन । एक ओवाळिती कृष्णाजिन । रघुनंदन निज विजयी ॥ १०७ ॥

मंत्रीं गर्जती ऋषेश्वर । स्वर्गीं सुरवरां जयजयकार । वरुषति सुमनांचे संभार । रामचंद्र निज विजयी ॥ १०८ ॥

सुखाचिया अतितांतडीं । देव उदुनियां लवडसवडी । उभिली हरिखाची पैं गुढीं । बांदवडी [कं. पै. तं. या प्रतींत हे पद नाही.] राम सोडवील ॥

जनकाच्या महाद्वारीं । त्राहाटिलीया निशाण भेरी । गगन गर्जे मंगळ तुरीं । जयजयकारीं निज गजरू ॥ ११० ॥

विश्वामित्रें उल्हासतां । रथीं वाऊनि रामसीता । भेटावया दशरथा । होय निघता सवेगें ॥ १११ ॥

सीता जिंतली आपण । उल्हासें [मु. 'नाचे'.] चालिला लक्ष्मण । [मु. 'वाग्दोर'; त. 'वागारे'.] अश्ववागोरे धरुनी पूर्ण । रथारोहण तेणें केलें ॥ ११२ ॥

[नि. घा. 'विश्वामित्राचे अधीन'.] विश्वामित्रा आज्ञेधीन । श्रीरामसीतेचें गमन । देखोनि [तु. 'जनक दीनवदन'; तं. त. भा/१. तु. कं. 'जनक जाला दीन'; नि. घा. सु. गे. 'जनक जाला लीन'.] जनकोत्तम । घाली लोटांगण ऋषि [नि. घा. 'राया'.] रामा ॥ ११३ ॥

[तु. नि. घा. 'विश्वामित्रा तूं गुरुत्वें पूर्ण'; कं. 'विश्वामित्रा गुरुचें पूर्ण'.] विश्वामित्र गुरुत्वें पूर्ण । स्वयंवरीं केलें सीतावरण । आतां करावे पाणिग्रहण । [कं. पै. तं. भा/१. खेरीज इतरत्र 'विधियुक्त'.] विध्युक्त लग्न ऋषिवर्या ॥ ११४ ॥

अनुक्रमणिका

जनकु म्हणे विश्वामित्रा । उभयपक्षीं तूं सोयरा । जाणोनि [त. 'शास्त्रोक्त विचारा'; तु. सु. नि. गे. घा. 'शास्त्रविचारा'.] शास्त्रार्थ विचारा । येथें वधुवरां राहावावें ॥ ११५ ॥

जनकाची निजकांता । सुमेधा सति पतिव्रता । तेही पाहो पाहे रघुनाथा । वामांगीं सीता बैसउनि ॥ ११६ ॥

आणावें दशरथा भूपाळा । करावा संभ्रम सोहळा । सुख द्यावें दोहीं कुळां । ऋषि निर्मळा कृपाळु वा ॥ ११७ ॥

आइकोनि जनकाची विनंती । कौशिकु सुखावला चित्तीं । राहावी सीतापती । ऋषिपंक्तिसमवेत ॥ ११८ ॥

धनुर्भंगें सीतावरण । समूळ जाहालें निरोपण । आतां रामसीता-पाणिग्रहण । लग्नविधान अवधारा ॥ ११९ ॥

एका जनार्दना शरण । प्रकृति पुरुषा पाणिग्रहण । पुढां रसाळ निरोपण । श्रोते सज्ञान परिसतु ॥ १२० ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां धनुर्भंगसीतावरणं नाम विंशतिप्रसंगः ॥

संपादित श्लोक १३, ओव्या १२०. इतरत्र : नि. घा. ३,११९; इं. सु. गे. ३,११७; भा/१. १२,१२०; तं. १३,१२०; तु. १२,११९; त. ११,११९; कं. पै. १३,१२०.

अनुक्रमणिका

## प्रसंग एकविसावा

## दशरथागमन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

[मु. 'सीतेचें रामासी लग्न'.] **सीता श्रीरामासी लग्न । वचन आइकोनि रावण । न दाखवीच काळें वदन । गेला निघोन अधोमुखें ॥ १ ॥**

**देखोनि श्रीरामप्रताप । राजे जाहाले** [मु. 'सकंप'; तं. 'हा हा कंप'; तु. 'अहकंप'.] **अहाकंप । तेहीं सांडुनि** [भा. /१ सु. नि. गे. घा. 'दर्प'; तं. त. कं. तु. 'कंदर्प'.] **कंदर्पदर्प । गेले नृप निजनगरा ॥ २ ॥**

**यापरी राजे राक्षस अनेक । रामप्रतापें केले विमुख । तेणें जनकासी अत्यंत सुख । परम हरिख लग्नाचा ॥ ३ ॥**

**राजा म्हणे विश्वामित्रासी । शीघ्र आणावया दशरथासी । मी धाडितों प्रधानांसी । परी तो यासी मानीना ॥ ४ ॥**

> भवतोऽनुमतेर्ब्रह्मन् शीघ्रं गच्छंतु मंत्रिणः । मम कौशिक भद्रं ते त्वयोध्यां त्वरिता रथैः ॥ १ ॥
> [श्लोक क्रमांक २, ३ व ४ मु. प्रतींत नाहीत.] राजानं प्रश्रितैर्वाक्यैरानयन्तु पुरं मम । प्रदानं वीर्यशूक्लायाः कथयन्तु च सर्वशः ॥ २ ॥
> मुनिगुत्पौ च काकुत्स्थौ कथयन्तु नृपाय च । प्रीतियुक्तं तु राजानमानयस्तु सुशीघ्रगाः ॥ ३ ॥
> कौशिकस्तु तथेत्याह राजा चाभाष्य मंत्रिणः । अयोध्यां प्रेषयामास धर्मात्मा कृतशासनान् ॥ ४ ॥ [वाल्मीकिरामायण, बालकांड, सर्ग ६७, श्लोक २४ ते २७.]
> जनकेन समादिष्टा दूतास्ते क्लान्तवाहनाः । त्रिरात्रमुषिता मार्गे तेऽयोध्यां प्राविशन्पुरीम् ॥ ५ ॥ [वाल्मीकिरामायण, बालकांड, सर्ग ६८; श्लोक १.]

**आइके ऋषिवर्या कौशिका । तुझी नसतां पत्रिका । दशरथ न मनीं ब्रह्मादिकां । तेथ या मशकां कोण पुसे ॥ ५ ॥**

**तुझी न लभतां संज्ञा । वसिष्ठ कदा न ये लग्ना । ऐसें जाणोनि सर्वज्ञा । द्यावी अनुज्ञा** [नि. तु. 'पत्रेंसीं'; त. 'शिष्यासीं'.] **सचिवासी ॥ ६ ॥**

**आमच्या तुमच्या एकात्मता । पत्र लिहावें विनीतता । सीता देवों केली रघुनाथा । अति पुरुषार्था देखोनि ॥ ७ ॥**

**रामप्रतापें अति श्रेष्ठ । पत्र लेहावें अति** [सु. 'निस्पष्ठ'; गे. 'विस्पष्ट'; तु. 'अति वरिष्ठ'; त. भा. पै. /१ त. कं. 'निर्द्रुष्ट'.] **स्पष्ठ । जेणें सुखावे श्रीवसिष्ठ ।** [नि. घा. 'नृपसंतुष्ट अजात्मजसुखें'; तु. 'नृप संतुष्ट आत्मजसुखें'.] **नृपवरिष्ठ अजात्मज ॥ ८ ॥**

**आइकोनि जनकाचें वचन । विश्वामित्र सुखसंपन्न । पाचारुनिया प्रधान ।** [तु. 'आज्ञासंपन्न पत्रिका'; तं. सु. नि. गे. घा.

अनुक्रमणिका

कं. 'अनुज्ञापन पत्रिका'.] आज्ञापन पत्रिका ॥ ९ ॥

आणिकाचें निर्जीव पत्र । येथ सचीव तोचि सजीव पत्र । लिहिता [तं. हे पद नाही. इतरत्र 'विश्री'.] वरिष्ठ विश्वामित्र । पत्र पवित्र त्याचेनि ॥ १० ॥

क्षराक्षरा होउनि परती । श्रीरामाची [भा. /१ 'जे कीर्ति'; तु. नि. घा. 'निजमूर्ति'.] निजकीर्ति । करूनि पत्रिकासमाप्ति । प्रधानाहातीं दिधली ॥ ११ ॥

पत्रिकेचा अर्थ श्रेष्ठ । वाचूं जाणे एक वसिष्ठ । आणिकां आकळितां अति कष्ट । होईल स्पष्ट अयोध्येसी ॥ १२ ॥

प्रेमकुंकुमें परम प्रीति । पत्रिका शोभे शोभन स्थितीं । ज्याचें प्राधान्य त्रिजगतीं । त्या प्रधानाहातीं दिधली ॥ १३ ॥

बैसला मनोरथ रथीं । चाऱ्हीवारू चहूं पुरुषार्थीं । मनासी ज्याचेनि निजगति । तोचि सारथी धुरेसी ॥ १४ ॥

ऐसिया सन्नद्ध निजस्थिती । पाठविला शीघ्रगती । तो पावला तिसरे वस्ती । वस्तीची स्थिती अवधारा ॥ १५ ॥

[तु. सु. नि. गे. घा. 'प्रथमवस्ती'.] प्रथम श्रवण-मननपुरीं । दुजी निदिध्यास नगरीं । तिसरी वस्ती साक्षात्कारीं । अयोध्यानगरीं पावला ॥ १६ ॥

अयोध्या प्रथम मोक्षपुरी । अजाचा पुत्र राज्य करी । ते श्रीरामाची निजनगरी । प्रधान तेथवरी पावला ॥ १७ ॥

दशरथसभा वसिष्ठें गाढी । तीपुढें इंद्रसभा बापुडी । प्रधानें देखोनि आवडी । उभिली गुढी विजयाची ॥ १८ ॥

सीता अत्यंत सुंदरी । [मु. 'हरचापभंगें'.] चापभंगें श्रीराम वरी । प्रधान [तं. 'धावा पोखारी'; तु. 'धावा फोकरी'; त. भा. /१ कं. 'वाधावा पोकारी'; गे. सु. 'वर्धावा फोकारी'.] वाधावा फोकारी । घरोघरीं आल्हाद ॥ १९ ॥

हरधनुष्य नुपरेंचि वोढी । ओढितां भंगलें कडाडीं । धाकें रावण पडिला बुढीं । सभा बापुडी मूर्च्छित ॥ २० ॥

धनुष्याच्या कडकडाटीं । मूर्च्छित रायांच्या कोटी । [मु. 'वळली मुरकुंडी'.] कृतांताची झांकिली दृष्टि । धाकें पोटीं कळिकाळ ॥ २१ ॥

सद्गुरु कौशिकें अभ्यासिलें । रामलक्ष्मण सुविद्य भले । दादुल्यांचे ते दादुले । यश [तु. 'यशस्फारलें'; तं. 'यश स्फुरालें'; भा. /१ 'यश विस्फारिलें'; त. सु. नि. घा. 'यश पावलें'; कं. 'ऐसे विस्तारिलें'.] स्फारलें तिहीं लोकीं ॥ २२ ॥

जनकनेम अति प्रबळ । [भा. /१ त. 'शिवचाप प्रचंड प्रबळ'; तु. 'सीतेचें शिवचाप बळ'; सु. नि. गे. घा. 'सीतेचें लग्न शिवचाप बळ']

अनुक्रमणिका

सीतेचें शुल्क चापबळ । जो कोण्ही [तु. 'चढवील'; तं. 'सजील'.] सज्जील सबळ । [पै. प्रतीत हे पद नाही.] त्यासी जानकी माळ घालील ॥ २३ ॥

त्याहि जनकाच्या नेमातें । सिद्धी पावविलें [तु. नि. घा. 'समर्थें'.] चापातें । सभेसी [पै. 'गांजिली'.] गांजूनि समस्तें । ते [पै. त. या प्रतींखेरीज इतरत्र हे पद नाही.] सीता रघुनाथें जिंतिली ॥ २४ ॥

प्रधानाचां सुखोत्तरीं । सभा गर्जे जयजयकारीं । त्राहाटिलिया निशाण भेरी । मंगळतुरीं आल्हाद ॥ २५ ॥

गुढ्या उभविती घरोघरीं । परमानंदें बोलती [भा. /१ सु. नि. गे. घा. या प्रतींत 'नरनारी' असा पाठ आहे.] नारी । सभें जनकाच्या स्वयंवरीं । सीता सुंदरी परिणिली ॥ २६ ॥

सांगोनि श्रीरामाची ख्याती । वर्णुनि श्रीरामाची कीर्ति । प्रधानें ते सभेप्रति । घातलें क्षितीं लोटांगण ॥ २७ ॥

अति आल्हाद दशरथासी । सन्मानिलें प्रधानासी । मुगुट कुंडलें देउनि त्यासी । वसिष्ठापासीं बैसविला ॥ २८ ॥

रायें फोडुनि भांडारें । दानें देतो उदार करें । दिधली गाईंचीं खिल्लारें । कण कोठारें द्विजांसीं ॥ २९ ॥

राजा निमग्न परमानंदीं । वसिष्ठ सुखावला त्रिशुद्धीं । प्रधान अत्यंत सुबुद्धि । पत्र ते संधि ओपिलें ॥ ३० ॥

विश्वामित्राची निजयुक्ति । [पै. 'सर्व संधीचा'.] सर्व सिद्धींचा सिद्धयर्थी । आधी सद्‌गुरुसी विनंती । मग भूपति कार्यार्थी ॥ ३१ ॥

वसिष्ठें वाचितांचि पत्र । रामप्रताप अति विचित्र । तेणें सजळ झाले नेत्र । धन्य विश्वामित्र तो म्हणे ॥ ३२ ॥

पूर्णावतार बाळलीला । बाळपणीं प्रताप आगळा । [तु. 'धन्य धन्य हे जनकाची बाळा'; भा. /१ 'धन्य जनकाची बाळा', गे. नि. घा. 'धन्य जानकी जनकबाळा'.] धन्य जनकाची जनकबाळा । ब्रह्मपुतळा निजकांत ॥ ३३ ॥

धन्य दशरथाचें भाग्य । आम्हीहि भाग्याचे सभाग्य । धन्य धन्य जानकीचें अष्टांग । राम अर्धांग पावली ॥ ३४ ॥

ऐसी पत्रिकेची स्तुती । वसिष्ठें केली अति प्रीती । काय लिहिलेसें पत्रार्थीं । सावध श्रोतीं परिसावें ॥ ३५ ॥

ॐनमः स्वामी श्रीवसिष्ठा । निजज्ञानें ज्ञानज्येष्ठा । परमानंदें अति प्रतिष्ठा । विनंति वरिष्ठा अवधारीं ॥ ३६ ॥

तुझी आल्हादें होआवी भेटी । जनका उत्कंठा पैं मोटी । बोहरें पाहावी कृपादृष्टीं । लग्नसंतुष्टी तुझेनि ॥ ३७ ॥

सीता श्रीरामें धनुर्वेधी । स्वयंवरीं जिंतिली त्रिशुद्धीं । तुवां आलियां कृपानिधी । लग्नसिद्धी होईल ॥ ३८ ॥

अनुक्रमणिका

**प्रकृति-पुरुषां पाणिग्रहण । तुझेनि होतसें संपूर्ण । तूं कारण निजकारण । लग्न सुलग्न तुझेनि ॥ ३९ ॥**

**दशेंद्रियें दशरथा । तूंचि कर्ता तूंचि नियंता । पाणिग्रहणीं श्रीरामसीता । तूं निजकर्ता कुळगुरु ॥ ४० ॥**

**तुझी आज्ञा अति समर्थ ।** [सु. गे. 'गगनीं काठी वंदी'; तु. 'मंडळीं छाटी मानी'; नि. घा. 'गगनीं छाटी वंदी'; त. 'मंडळीं काठी तपें'.] **मंडळीं काठी वंदी आदित्य । तुझेनि रघुवंश सनाथ । लग्न समाप्त तुझेनि ॥ ४१ ॥**

**यापरी वसिष्ठासी विनंति । विश्वामित्रें लिहिली स्थितीं ।** [मु. 'जनक'.] **जनकें दशरथ भूपति ।** [भा. /१ 'पत्रें प्रीति प्रार्थिलें'; त. 'अति प्रीति प्रार्थिला'; तु. नि. घा. 'पत्रयुक्तीं प्रार्थित'.] **पत्र प्रीतीं प्रार्थितु ॥ ४२ ॥**

**स्वस्ति श्री अजात्मजा । सूर्यवंश वंशाध्वजा ।** [पै. खेरीज इतरत्र 'दशरथा महाराजा'.] **प्रतापप्रौढा दशरथराजा । श्रीराम तुझा निजविजयीं ॥ ४३ ॥**

**श्रीराम प्रतापें आगळा । स्वयंवरीं वरिली जनकबाळा । त्याच्या लग्नाचा सोहळा । यावें भूपाळा** [नि. तु. 'पाहावया'.] **आल्हादें ॥ ४४ ॥**

**श्रीरामाच्या निजजननी । आणाव्या सुखासनीं । भरत शतुघ्न पैं दोन्ही । गजारोहणीं आणावे ॥ ४५ ॥**

**सेवक सुहृद लहानथोर । सेनापति सपरिवार । सोईरे आणावे समग्र ।** [सु. नि. गे. घा. 'सोहळा स्वयंवर पहावया'; पै. भा. /१ तं. त. कं. 'सोहळे समुद्र श्रीराम'.] **सोहळे समग्र श्रीराम ॥ ४६ ॥**

**देखोनि जनकाचें मूळपत्र । दशरथासी आल्हाद थोर । प्रधान प्रेरिले सत्वर । रथकुंजर श्रृंगारा ॥ ४७ ॥**

**धन्य सद्‌गुरु विश्वामित्र । धनुर्विद्या अति विचित्र । त्याचेनि** [भा. /१ त. सु. नि. गे. घा. कं. 'प्रतापें'.] **प्रतापी रघुवीर । कृतोपकार आम्हीं केलों ॥ ४८ ॥**

**ताटिका वधिली अति दुस्तर । यागीं मारिले राक्षस घोर । चापभंगें सीता सुंदर । वरी रामचंद्र गुरुविद्या ॥ ४९ ॥**

**यापरी प्रतापें रघुनाथा । विश्वामित्रें सुविद्यता । ऋषीची आज्ञा यावें लग्नार्था । आम्ही सर्वथा तेथ जाणें ॥ ५० ॥**

> 'अथ रात्र्यां व्यतीतायां सोपाध्यायः सबांधवः । राजा दशरथो हृष्टः सुमंत्रमिदमब्रवीत् ॥ ६ ॥
> अद्य सर्वे धनाध्यक्षा धनमादाय पुष्कलम् । व्रजंत्वग्रे सुविहिता नानारत्नसमन्विताः ॥ ७ ॥
> चतुरंगबलं चापि शीघ्रं निर्यातु सर्वशः । ममाज्ञासमकालं च यानं युग्ममनुत्तमम् ॥ ८ ॥ [श्लोक ८, ९, १०, ११ व १२ मु. प्रतींत नाहीत.]
> वसिष्ठो वामदेवश्च जाबालिरथ काश्यपः । मार्कण्डेयश्च दीर्घायुर्मुनिः कात्यायनस्तथा ॥ ९ ॥'
> एते द्विजाः प्रयान्त्वग्रे स्यन्दनं योजयस्व मे । यथा कालात्ययो न स्याद्दूता हि त्वरयन्ति माम् ॥ १० ॥
> वचनात्तु नरेंद्रस्य निर्ययौ चतुरंगिणी । राजानमृषिभिः सार्धं व्रजन्तं पृष्ठतोऽन्वयात् ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

चतुर्भिस्तानहोरात्रैर्वैदेहानभ्युपेयिवान् । ददर्श मिथिलां रम्यां जनकेनोपशोभिताम् ॥ १२ ॥ [वाल्मीकि रामायण, बालकांड, सर्ग ६९, श्लोक १ ते ७.]

**रायें नगरीं क्रमुनि निशी । सांगे सुमंता प्रधानासी । श्रीराम सीतेच्या लग्नासी । जाणें मिथळेसी अति शीघ्र ॥ ५१ ॥**

**भांडारे उघडी उठाउठी । काढी द्रव्य कोट्यानुकोटी । भरावें गजावाजींचां पुष्टीं । उरलें शकटीं द्रव्य भरी ॥ ५२ ॥**

**मुकुट कुंडलें अळंकार । रत्नें मुक्ताफळें संभार । सूत्र पटसूत्र रोमसूत्र । वस्त्रें विचित्र सवें घ्यावीं ॥ ५३ ॥**

**राजपत्न्या अति सुकुमार । सुखासनीं साळंकार ।** [त. 'छत्रें विचित्रें निजगजरें'; भा. /१ 'छत्रें पालछत्रें निजगजरें'; मु. 'वस्त्रें पालवछत्रें गजर'.] **छत्रें पालव छत्रें गजर । अति शीघ्र चालों दे ॥ ५४ ॥**

**रायासी आल्हाद अनिवार । भरत शत्रुघ्न निजकुमर । साळंकृत मनोहर । रथीं सत्वर बैसविले ॥ ५५ ॥**

**सेनापती वीरें वीर । शृंगारिले सैन्य-संभार । टके पताका निजगजर । रथकुंजर घडघडिलें ॥ ५६ ॥**

**सेना चालिली एकसरें । वाजती नानापरीचीं तुरें । गज गर्जती अति गहिरे । भाट गजरें गर्जती ॥ ५७ ॥**

**वीरीं** [त. 'गर्जती'.] **दिधली आरोळी । सिंहनादें** [मु. 'पिटिली'.] **पडिली टाळी । परिणावया जनकबाळी । राजकुळीं चालिली ॥ ५८ ॥** [भा. /१ प्रतीत ही ओवी नाही.]

**आणुनि उत्तमा रथांसी । रायें बैसविले महाऋषि । वसिष्ठ वामदेव कश्यपासीं । मार्कण्डेय ऋषि जाबाली ॥ ५९ ॥**

**कात्यायनादि ऋषेश्वर । रायापासीं जे निरंतर । रथीं बैसले आपार । ज्ञानगंभीर निजनिष्ठ ॥ ६० ॥**

**ज्याच्या वचनावाचेनि पडिपाडें । कळिकाळु पायां पडे । ऐसे ऋषिवर्य** [त. 'धडफुडे'.] **निधडे । राम वऱ्हाडे तेहि आले ॥ ६१ ॥**

**ऐसें दोहीं भागीं ऋषेश्वर । मध्यें राजासहित कुमर । पुष्टीं भागीं सैन्यसंभार । आले सत्वर मिथिळेसी ॥ ६२ ॥**

**नाम कीर्ति विरक्ति भक्ति । इहीं तिहीं पेणांतीं वस्ती । चौथे पेणां रघुपति । निजात्मप्रीति भेटले ॥ ६३ ॥**

**'अहं कोहं सोहं' गति । याचि तिहीं पेणां तिनीं वस्ती ।** [तु. सु. नि. गे. घा. 'तेथवरी ज्याची स्थिती'.] **तिन्ही क्रमुनि चौथी । राम निश्चितीं भेटला ॥ ६४ ॥**

अनुक्रमणिका

दृश्य द्रष्टा दर्शन स्थितीं । याची तिहीं पेणां तिनीं वस्ती । तिन्ही क्रमूनी चौथी । रामु निश्चितीं भेटेल ॥ ६५ ॥

विदेहनगरी विदेहगति । राम राहिलासे निजस्थितीं । तेथवरी ज्याची वस्ती । राम निश्चितीं भेटेल ॥ ६६ ॥

[मु. 'विदेह श्रीराम'.] राम भेटेल सत्वर । साधनचतुष्टय शृंगार । च्यान्ही पुरुषार्थ अळंकार । निधडे [मु. 'वीर'.] नर लेइले ॥ ६७ ॥

यापरी पेणोपेणां सत्वर । टाकिलें विदेहाचें नगर । पुढें विदेहाचें पुर । मनोहर शोभत ॥ ६८ ॥

मुळींचे पदीं वस्ती चारी । करुनि पावले विदेहपुरीं । तेंचि म्या वर्णिलें [भा. /१ 'ग्रंथाकारी'; तं. तु. त. मु. नि. ने. घा. कं. 'ग्रंथाधारी'.] ग्रंथांतरीं । श्रोतां कुसरी न करावी ॥ ६९ ॥

[मु. 'दशरथा'.] श्रीरामजनका जनकें भेटी । जानकी कन्या ज्याची गोमटी । [पै. प्रतीत हे पद नाही.] दोघांचे भेटीची गोड गोष्टी । सुखसंतुष्टीं आल्हाद ॥

ज्याचेनि पावन पृथ्वी नवखंड । ज्याचेनी पावन पिंडब्रह्मांड ।
त्याचिया लग्नाचें पैं कोड । कथा अति गोड निरूपणीं ॥ ७१ ॥

रामायणाचें निजसार । तें हें सीतास्वयंवर । प्रकृति-पुरुषें एकाकार । होती साचार सुलग्नीं ॥ ७२ ॥

एका जनार्दना शरण । प्रकृति-पुरुषां पाणिग्रहण । श्रीरामसीतेचें सुलग्न । समाधान जीवशिवा ॥ ७३ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां दशरथलग्नागमनन्नाम एकविंशतिप्रसंगः ॥

संपादित प्रत : श्लोक १२, ओव्या ७३. इतर प्रतींत : नि. इं. सु. घा. गे. ४, ७३; भा. /१ १२,७२; तं. त. कं. पै. १२, ७३; तु. १२, ६९.

अनुक्रमणिका

## प्रसंग बाविसावा

## सूर्यवंश निरूपण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

जीवशिवांचें समाधान । तें हें कथा रामायण । पवित्र परिकर पावन । जगदोद्धारण जडजीवां ॥ १ ॥

श्रीरामीं संलग्नता । सर्वांगे समरसे सीता । याचि नामें सुलग्नता । ते लग्नकथा अवधारा ॥ २ ॥

मार्गीं वसोनि चारी वस्ती । राजा दशरथ शीघ्रगतीं । आला विदेहपुरा प्रति । जेथें रघुपति निज विजयी ॥ ३ ॥ [या ओवीनंतर पुढील ओव्या पै. प्रतीखेरीज इतर सर्व प्रतींत आढळतात :––‘विदेह पुरा वस्ती आले । ते त्रिभुवनी विजयीं झाले । विश्वामित्रें मित्रत्व केलें । गुरुत्व दिधलें वसिष्ठें ॥ १ ॥ श्रीवसिष्ठें विश्वामित्रु । केला श्रीरामीं धनुर्विद्या गुरु । आपण ब्रह्मविद्या सद्‌गुरु । विजयी रामचंद्र यांचेनि ॥ २ ॥’]

वसिष्ठनिष्ठा निजनिर्धारीं । दशरथ पावला विदेहपुरीं । रत्न कळसांचियाहारी । तेजें अंबरीं रवि लोपे ॥ ४ ॥

दशरथ आला निजनगरीं । [नि. गे. घा. ‘छत्रें पल्लव छत्रेंवरी’.] छत्रेंपालव छत्रेंवरी । निशाण त्राहाटिलियां भेरी । मंगळतुरीं गर्जतु ॥ ५ ॥

आला आइकोनि दशरथ । जनक सामोरा धावत । सत्यानंद पुरोहित । सवें समस्त प्रधान ॥ ६ ॥

पुढें वसिष्ठ देखिला दृष्टीं । धावोनि चरणा घातली मिठी । जगदोद्धार चरणांगुष्ठी । सभाग्य सृष्टीं मी एक ॥ ७ ॥

> अद्य नः पितरस्तृप्ता अद्य नः पावितं कुलम् । अद्य नो वंशजाः सर्वे यद्भवान्गृहमागतः ॥ १ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही.]

वसिष्ठचरण जाले प्राप्त । आजी माझें कुल पुनीत । आजी माझे पितर तृप्त । वंश सनाथ आजी माझा ॥ ८ ॥

वसिष्ठ भेटल्या अभीष्ट । वसिष्ठ भेटल्या अनिष्ट इष्ट । वसिष्ठ भेटल्या भाग्य वरिष्ठ । वसिष्ठें श्रेष्ठ निजदास ॥ ९ ॥

वसिष्ठ अत्यंत सज्ञान । जनक सद्भाव संपूर्ण । देखोनि दिधलें आलिंगन । समाधान दोहींसी ॥ १० ॥

दोन्ही दीप एक होती । द्वैत लोपे एकीच दीप्ती । तैसें आलिंगन देती । अभेदवृत्ती आल्हादें ॥ ११ ॥

वसिष्ठ देहींच विदेही । जनक सहजच विदेही । दोघे निःसंदेह [सु. गे. ‘विदेह देही’; तं. ‘निःसंदेही’; भा. ‘दोघे भेटले विदेही’; त. ‘दोघा निःसंदेह देही’; तु. नि. घा. ‘दोघे निःसंदेह विदेही’.] देहीं । दिधलें पाही आळिंगण ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

जनका वसिष्ठाची भेटी । आल्हाद न समाये सृष्टीं । पुढां दशरथ देखिला दृष्टीं । उठाउठी आळंगी ॥ १३ ॥

जानकी जनका श्रीराम जनका । आळिंगण पडिलें देखा । तेणें संतोष सकळिकां । तिहीं लोकां आल्हाद ॥ १४ ॥

एक जनकु एक दशरथ । समर्था आळंगी समर्थ । तेणें सुखावे रघुनाथ । [त. 'आनंदें' हे अधिक पद; सु. नि. गे. घा. 'पुरला' हे अधिक पद.] मनोरथ सीतेचा ॥ १५ ॥

दोघां अतिप्रीतीं आळिंगण । दोघे राजे सुखसंपन्न । सीतेरघुनाथाचें लग्न । वेगीं सुलग्न करावें ॥ १६ ॥

देखोनि भरत आणि शत्रुघ्न । राजा प्रधान विस्मयापन्न । विस्मित मिथिलेचे जन । राम लक्ष्मण केवीं आले ॥ १७ ॥

पुसोनि येतां कौशिकासी । दोघे होते गुरुसेवेसीं । तेचि दोघे दशरथापासीं । शीघ्र वेगेसीं कां आले ॥ १८ ॥

कांहीं जाला अपमान । किंवा [मु. पाठ 'चुकलें'.] चुकलों विधिविधान । दोघे आले हे रुसोन । अति उद्विग्न विदेही ॥ १९ ॥

जनक वसिष्ठासी पुसे आपण । राम लक्ष्मण दोघेहि जण । येथें कां आले हे रुसोन । कोण विधान मी चुकलों ॥ २० ॥

विदेहासी सांगे वसिष्ठ । रामलक्ष्मण ते [पै. 'श्रेष्ठ'.] ज्येष्ठ । भरत शत्रुघ्न हे कनिष्ठ । सांगतां स्पष्ट कळेना ॥ २१ ॥

रूपरेखा समसमान । [भा. सु. नि. गे. घा. 'ठाण माण'.] ठाणठकार गुण लावण्य । हेचि दोघे राम लक्ष्मण । भरत शत्रुघ्न ते कोण ॥ २२ ॥

ऐसें बोलतां विदेहासी । हासें आलें वसिष्ठासी । मग बैसोनि सावकाशीं । पूर्व वृत्तासीं सांगतु ॥ २३ ॥

भरत रामपिंडाचा अर्धभाग । तो रामरूप दिसे सांग । शत्रुघ्न सौमित्रेचा भाग । त्याचें सर्वांग तद्रूप ॥ २४ ॥

हे [भा. नि. घा. कं. 'चतुर्विध चारी मूर्ति'; तु. 'चतुर्विद्या चारी मूर्ति'.] चतुर्व्यूह चाऱ्ही मूर्ति । एकरूपें चतुर्धा भासती । ऐसें आइकोनियां भूपति । विस्मयें चित्तीं तटस्थ ॥ २५ ॥

तेचि समयीं विश्वामित्र । घेऊनि आला राम सौमित्र । दशरथाचे चाऱ्ही पुत्र । शोभा विचित्र एकत्वें ॥ २६ ॥

देखतां चतुर्मूर्ति [कं. तं. 'चतुरांक'; सु. 'चतुरार्क'; पै. भा. त. तु. 'चतुरांक'.] चतुरार्क । पाहणें पाहतां अवघे एक । आइकोनि देखोनि जनका सुख । परम पुरुष हे चाऱ्ही ॥ २७ ॥
कुशध्वज माझा कनिष्ठ बंधु । त्याच्या कन्या [तु. नि. घा. खेरीज इतरत्र 'स्वरूप साधु'.] स्वरूपसिंधू । भरत शत्रुघ्ना

अनुक्रमणिका

करूं वधू । उन्मिळा समंधु लक्ष्मणेसीं ॥

ऐसा जनकाचा मनोरथु । चौघा बंधूंहि सहितु । जामात जोडला रघुनाथु । उल्हासतु स्वानंदें ॥ २९ ॥

घेऊनि श्रीराम लक्ष्मण । विश्वामित्र आला आपण । दशरथ घाली लोटांगण । हरुषें चरण वंदिले ॥ ३० ॥

हर्षें दशरथ बोलत । तुझी धनुर्विद्या समर्थ । तुझेनि विजयी रघुनाथ । कीर्ति विख्यात तुझेनि ॥ ३१ ॥

तुझेनि ताटकेसी अंत । तुझेनि सुबाहूसी घात । तुझ्या कृपा जानकी प्राप्त । तूं अतिसमर्थ ऋषिवर्या ॥ ३२ ॥

माझे अत्यंत कृपणपण । नेदी म्हणे रामलक्ष्मण । ते त्वां आणुनि आपण । यशभूषण मज दिधलें ॥ ३३ ॥

तुझेनि निज शिष्यपणें । तिहीं लोकीं मिरवे लेणें । ऐसीं लेवविलीं भूषणें । कंठाभरणें [पै. खेरीज इतरत्र 'शिवासी'.] शिष्यासी ॥ ३४ ॥

ऐसें आइकतां स्तुतिस्त्रोत्र । हांसोनि बोले विश्वामित्र । रामचंद्रें मी पवित्र । ब्रह्मीं ब्रह्मसूत्र श्रीराम ॥ ३५ ॥

श्रीरामाचेंनि शिष्यपणें । [सु. नि. घा. गे. 'तिहीं लोकीं माझें गुरुत्व वंदणें'; त. तु. 'माझें गुरुत्व जगीं वंदणें'.] माझें गुरुत्व जगें वंदणें । श्रीराम माझें सनाथ जिणें । जिणें मरणें मज नाहीं ॥ ३६ ॥

पूर्वीं यागीं मी अनाथ । तो श्रीरामें केलों सनाथ । कर्माकर्मा करूनि घात । श्रीरघुनाथ तुष्टला ॥ ३७ ॥

श्रीराम शिष्यत्वा नवायी । मज देहवंता वंदी विदेही । श्रीरामकीर्ति सांगो कायी । पाषाण पायीं पुनीत ॥ ३८ ॥

ज्याचेनि पायें तरती पाषाण । त्याचेनि [भा. सु. नि. गे. घा. 'गुरुत्वें मी धन्य'; तं. 'गुरुत्वे महिमान'.] गुरुत्वें मीहि पावन । माझिया यज्ञाचें फळ जाण । ब्रह्म परिपूर्ण श्रीराम ॥

ऐसें बोलतां विश्वामित्र । सुरसिद्ध करिती जयजयकार । वर्षति सुमन-संभार । [सु. गे. भा. प्रतींत हे पद नाही; तु. नि. घा. 'प्रेमें'.] सुखें विश्वामित्र मूर्च्छित ॥ ४० ॥

वसिष्ठ येऊनिया तेथ । विश्वामित्र करी सावचित । जें बोलसी तें इत्थंभूत । श्रीरघुनाथ परब्रह्म ॥ ४१ ॥

आल्हादें दशरथ उठून । आळंगी श्रीराम लक्ष्मण । रत्नें धन धान्य वोवाळून । चौघेजण बैसविले ॥ ४२ ॥

वसिष्ठ विश्वामित्र वचन । श्रीराम परमब्रह्म परिपूर्ण । तेणें जनकासी [तु. 'समाधान'; सु. नि. गे. घा. 'आल्हाद'.] उल्हासपूर्ण । करावया लग्न [कं. व मु. पाठ 'उद्यत'.] उदित ॥ ४३ ॥

शतानंद पुरोहितासी । जनकु धाडी कुशध्वजापासी । तो धाकुटा बंधु आम्हासीं । [तं. तु. नि. घा. 'शीघ्र त्यासी'.]

अनुक्रमणिका

शीघ्रतेसी आणावा ॥ ४४ ॥

संकाशा नाम नगरीसी । म्यां राज्यीं स्थापिला प्रतिष्ठेसी । दोघी कन्या आहाती त्यासी । लावण्यराशी [पै. त. खेरीज इतरत्र 'सुंदरा'.] उदारा ॥ ४५ ॥

श्लाघ्य समंधु रघुनंदना । दोघी द्याव्या भरत शत्रुघ्ना । यालागीं त्यांसी शीघ्र आणा । लग्नीं सुलग्ना साधावया ॥

आइकोनि जनकाचें आकारण । शीघ्र कुशध्वज आला आपण । रायासी करूनिया नमन । आलिंगण दिधलें ॥ ४७ ॥

जनकसभा सावकाशीं । मूळ धाडिलें दशरथासी । वेगीं बोलावावें त्यासी । लग्नदिनासी नेमावया ॥ ४८ ॥

समासाद्य च राजानं सोपाध्यायगणैर्वृतम् । तं वाक्यं वाक्यकुशलो वैदेहमिदमब्रवीत् ॥ २ ॥ [मु. प्रतीत हे श्लोक नाहीत.]
विदितोऽयं यथा राजन्निक्ष्वाकुकुलदैवतम् । वक्ता सर्वेषु कालेषु वसिष्ठो भगवानृषिः ॥ ३ ॥
विश्वामित्राभ्यनुज्ञातः सहसर्वैश्च महर्षिभिः । एष वक्ष्यति धर्मात्मा वसिष्ठो मे यथाक्रमम् ॥ ४ ॥
तूष्णीं भूते दशरथे वसिष्ठो वाग्विदां वरः । उवाच वाक्यं वाक्यज्ञो वैदेहं सपुरोधसम् ॥ ५ ॥

दशरथ आला ऋषिसंमेळीं । वसिष्ठ वामदेव रायाजवळी । कश्यप कात्यायन जाबाळी । तपोबळी मार्कंडेय ॥ ४९ ॥

आले [तु. 'राजे सुहृद सज्जन'; सु. नि. गे. घा. 'आले सखे सुहृज्जन'; तं. 'आला सुहृद्सज्जन'.] सुहृत सज्जन । जनकें दिधला सन्मान । अवघे [तु. नि. घा. 'बैसविले'.] बैसले सावधान । लग्नदिन नेमावया ॥ ५० ॥

विवाह करावा सत्कुळीं । दोहीं वंशांची वंशावळी । शोधुनि पाहावी समुळीं । ऋषी सकळीं नेमिलें ॥ ५१ ॥

वराचें कुळ समस्त । सांगावया वसिष्ठ कुळदैवत । तेणें सांगावा आद्यंत । इत्थंभूत रविवंश ॥ ५२ ॥

आइकोनि ऋषींचें उत्तर । वसिष्ठें केला नमस्कार । आइका सूर्यवंश विस्तार । अति पवित्र भूपति ॥ ५३ ॥

सूर्यवंशाचिया ख्याती । महापातकी मुक्त होती । एक एक चक्रवर्ती । त्रिजगतीं भूषण ॥ ५४ ॥

सूर्याचा मुख्य मनुपुत्र । मनूचा इक्ष्वाकु पवित्र । तेणे अयोध्या मुक्त क्षेत्र । केलें नगर निजवासा ॥ ५५ ॥

यालागीं सूर्यवंशीं जाण । म्हणती इक्ष्वाकु नंदन । म्हणावया हेंचि कारण । पदव्याख्यान या स्थिति ॥ ५६ ॥

येच वंशीं पृथु चक्रवर्ती । रसातळीं जातां क्षिती । पृथूनें धरिली निजात्मशक्ति । पृथ्वी म्हणती त्याचेनिं ॥

५७ ॥

तेणें पृथ्वीचें केलें दोहन । सुखी केले सकळहि जन । पूजाभक्ति तेणें [तु. नि. घा. 'पावन पूर्ण'.] पावन । अनर्घ्य रत्न सूर्यवंशी ॥ ५८ ॥ [कं. प्रतीत पुढील ओवी आलेली नाही.]

येच वंशीं उत्तानचरण । त्याचा पुत्र तो ध्रुव जाण । बाळपणीं देव प्रसन्न. । करूनि आपण अढळ जाला ॥ ५९ ॥

सुरां असुरां नागवे वैरी । धूमांकित पाताळविवरीं । त्यातें साधुनिया मारी । तो धुंधुमारी सूर्यवंशीं ॥ ६० ॥

योनीद्वारें न जन्मता । पित्याचे कुक्षीं जन्म पावता । परी मरों नेदीच निजधाता । तो मांधाता सूर्यवंशी ॥ ६१ ॥

शिबी चक्रवर्ती येचि वंशीं । पक्षियासाठीं तुकी मांसासी । नगरी नेली वैकुंठासी । सत्वराशी शिबी देखा ॥ ६२ ॥

सूर्यवंशीं अतिपवित्र । जन्म पावला हरिश्चंद्र । स्वप्नदानविधि उपचार । केले साचार जागृतीं ॥ ६३ ॥

दक्षणा द्यावया [भा. सु. नि. गे. घा. 'समग्र'.] स्वतंत्र । डोंबाघरीं होय परतंत्र । विकुनिया स्त्रीपुत्र । विश्वामित्र सुखी केला ॥ ६४ ॥

रुक्मांगद येच वंशीं । व्रत पाळुनी एकादशी । नगरी नेली वैकुंठासी । व्रतें जगासी उद्धारू ॥ ६५ ॥

त्याचा पुत्र धर्मांगदु । एकादशीव्रती आल्हादु । शिर देतां नयनी खेदु । परमानंदु पावला ॥ ६६ ॥

सूर्यवंशीचे भूपति । एकाचढी एकाची ख्याती । श्रवणें जन पावन होती । वंशोत्पत्ति अवधारा ॥ ६७ ॥

येचि वंशीं अंबरुषि । व्रत साधुनि द्वादशी । देव आणिला गर्भवासी । दुर्वासासी वांचविलें ॥ ६८ ॥

येचि वंशीं राजे सगर । ज्याचेनि नामें झाले सागर । कपिल-शापें जळतां शूर । करी उद्धार भगिरथु ॥ ६९ ॥

भगीरथें निजात्मशक्ति । आणुनिया भागीरथी । पूर्वज तारिले [तु. नि. घा. 'नेणों'.] सांगो किती । त्रिजगतीं उद्धारु ॥ ७० ॥

भगीरथसुत प्रवीण युद्धीं । देवां दैत्यां युद्धसंधि । इंद्रें बैसउनियां खांदी । नेला त्रिशुद्धी युद्धासी ॥ ७१ ॥
बैसला इंद्राचे [सु. गे. 'काकुती'; नि. घा. 'ककुदी'.] ककुस्थी । यालागीं त्यासी काकुस्थ म्हणतो ।
त्याच्या नामाच्या निजख्याती । काकुस्थ म्हणती श्रीरामा ॥ ७२ ॥

अनुक्रमणिका

रविवंशीं अति निष्पाप । राजा जन्मला दिलीप । कामधेनु उपासी नृप । अति साक्षेप पुत्रार्थी ॥ ७३ ॥

कामधेनु प्रसन्न पूर्ण । रघुपुत्र पावला सुलक्षण । त्याचेनि नामें रघुनंदन । वंशीच्या जाण म्हणताती ॥ ७४ ॥

रघूचा अज अतुर्बळी । अतिप्रतापी भूमंडळीं । वैरी अजाप्राय [भा. 'अंजुळी'; सु. नि. गे. घा. 'बळी'; तु. 'भूमंडळी'.] वळी । [भा. सु. नि. गे. घा. 'पायातळीं'.] आज्ञेतळी में माती ॥ ७५ ॥

त्या अजाचा श्रीदशरथु । शुक्र जिंतिला युद्धाआंतु । स्वर्गीं जाहाला यशवंतु । सन्मानितु अमरेंद्र ॥ ७६ ॥

पराभविलें दैत्य गुरूसी । अति आल्हाद बृहस्पतीसी । आलिंगुनि हृदयेसीं । निजनगरासी धाडिला ॥ ७७ ॥

त्याचे पुत्र चौघेजण । श्रीराम आणि लक्ष्मण । धाकुटे भरत शत्रुघ्न । आदिकारण हे चार्‍ही ॥ ७८ ॥

केला ताटिकेचा निर्वाळा । सुबाहु मारिला राक्षसमेळा । रावणु अपमानिला बळा । चरणीं शिळा उद्धरिल्या ॥ ७९ ॥

सूर्यवंशाचें वर्णन । वसिष्ठ गर्जे आल्हादोन । सुमनें वर्षती सुरगण । हर्षित मन जनकाचें ॥ ८० ॥

आइकोनि सूर्यवंशावळी । महासिद्धि पिटिली टाळी । धन्य धन्य जनकबाळी । भाग्यें सत्कुळीं सुलग्न ॥ ८१ ॥

परिसोनि निजवंशवर्णन । दशरथासी आल्हाद पूर्ण । वसिष्ठासी ओवाळून । देतु [भा. 'धनधान्य गोकोटी'; सु. नि. गे. घा. 'गोदान लक्षकोटी'.] धनधान्य गोलक्ष ॥ ८२ ॥

मग उठउनि महाऋषि । बैसविले वसिष्ठासी । सूर्यवंशी सद्‌गुरू होसी । रविवंशासी भूषण ॥ ८३ ॥

सूर्यवंशी जे जे भूप । सांगितले अतिप्रताप । [त. 'तो तो तुझा कृपानुरूप'; भा. 'तो तो तुझा कृपारूप'; सु. नि. गे. घा. 'ते ते तुझेनि निष्पाप'; कं. प्रतीत या ओवीच्या ऐवजी पुढील ओवी आली आहे :——'सूर्यवंशीं जे जे भूपति । सांगितले अति पुरुषार्थी । ते वंशीं हा रघुपती । वसिष्ठ आज्ञास्थिती चालतु ॥']
तो तो तुझा कृपानुकंप । तूं सद्रूप सद्‌गुरू ॥ ८४ ॥

जेवीं सूर्य निजतेजेसीं । सूर्यकांती तेज प्रकाशी । तेवी तुझेनि अनुग्रहेसी । सूर्यवंशीं प्रताप ॥ ८५ ॥

अचेतन [तु. नि. घा. 'अचेतन तुझिया कृपादृष्टि'.] कृपादृष्टी । सूर्यमंडळीं तपे [तु. नि. घा. खेरीज इतरत्र 'काठी'.] छाटी । तुझा अनुग्रहो जाल्या पाठी । शिष्य सृष्टीं निजविजयी ॥ ८६ ॥

वसिष्ठ वक्ता सुखस्वानंद । सभेसी जाला परमानंद । जनक भाग्याचा अगाध । लग्नसंमंध श्रीरामीं ॥ ८७ ॥
एका जनार्दना शरण । जालें सूर्यवंश व्याख्यान । जनकवंशाचें निरूपण । सावधान अवधारा ॥ ८८ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां सूर्यवंशनिरूपणं नाम द्वाविंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

संपादित प्रत श्लोक ५, ओव्या ८८. इतर प्रतींत पुढीलप्रमाणे :——
नि. इं. सु. घा. गे. श्लोक नाहीत, ओव्या ९०; त. श्लोक नाहीत, ओव्या ८७; भा. तं. ५, ९०; तु. ५, ८९; पै. कं. ५, ८९.

अनुक्रमणिका

## प्रसंग तेविसावा

## सीमांतपूजन रुखवत भोजन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**सूर्यवंशींचे भूपति । असंख्य आणि अगाध कीर्ति । ते म्यां सांगितलें संकळितीं । क्षमा श्रोतीं करावी ॥ १ ॥**

> एवं ब्रुवाणं जनकः प्रत्युवाच कृतांजलिः । श्रोतुमर्हसि भद्रं ते कुलं नः परिकीर्तितम् ॥ १ ॥
> प्रदाने हि मुनिश्रेष्ठा कुलं निरवशेषतः । वक्तव्यं कुलजातेन तन्निबोध नरेश्वर ॥ २ ॥
> [मु. प्रतीत हा श्लोक नाही.] राजाऽभवत्रिलोकेषु विश्रुतः स्वेन कमणा । निमिः परमधर्मात्मा सर्वसत्ववतां वरः ॥ ३ ॥ [वाल्मीकिरामायण, बालकांड, सर्ग ७१, श्लोक १ ते ३.]

**वसिष्ठें सूर्यवंशावळी । वर्णिली अति प्रांजळी । जनक उठोनि तिये वेळीं । कृतांजळी विनवीत ॥ २ ॥**

**माझे कुळीचे भूपाळ । ख्यातिवंत अतिप्रबळ । राउळें परिसावें सकळ । कुळसकळ पर्यावो ॥ ३ ॥**

**कन्यादानीं सकळ कुळ । स्वयें सांगावें लागे समूळ । पहिले कुळीं निमी भूपाळ । ज्याची कीर्ति प्रबळ तिहीं लोकीं ॥ ४ ॥**

**वसिष्ठाचे शापस्थितीं । जगाचें देखणा ज्याची वस्ती । ज्याचेनि डोळे देखणे होती । यालागीं म्हणती निमी त्यातें ॥**

[तं. त. 'निमिषोनिमिषाची'; तु. सु. नि. गे. घा. 'निमिषानिमिषाची'.] **निमिषोन्निमिषाची गती । ज्याचेनि चाले अहोराती । या लागीं त्यातें निमी म्हणती । जाणे निश्चिती नरनाथा ॥ ६ ॥** [कं भा. प्रतीत ही ओवी नाही.]

**निमीचा** [पै. त. प्रतींत हे पद नाही.] **सुतु मिथी सोज्वळा । नगरी वसविली स्वलीळा । यालागीं इतें म्हणती मिथिळा । स्वनाम सोहळा निजनगरीं ॥**

**मिथीपुत्र प्रथम जनक । जो कां अत्यंत सात्विक । पुत्रप्राय पाळी लोक । यालागीं जनकनाम त्यासीं ॥ ८ ॥**

**त्याचा पुत्र धृष्टकेतु । जनकवंशीं अति विख्यातु । दळें बळें प्रतापवंतु । धर्मसेतु द्विजधर्मा ॥ ९ ॥**

**त्यापासुनियां अनेक । जनक नामाचे नृप देख । तेही सांगतां** [त. कं. 'असंख्य'; सु. नि. गे. घा. 'असती असंख्य'.] **अझेख । कथा अत्यंतिक वाढेल ॥ १० ॥**

**बहुलाश्वं स्वकीर्तिजनक । स्वदेह विदेह जनक । त्यामाजील मीहीं एक । निज सेवक तुमचा ॥ ११ ॥**

**वंशावळी वाढवितां । अपार** [भा. /१ 'वाढो लागे'; तु. नि. घा. 'वाढेल'.] **वाढो पाहे कथा । लग्नीं साधावें रघुनाथा । हे**

अनुक्रमणिका

परमावस्था जनकासी ‖ १२ ‖

घ्यावया आमच्या परमराज्यासी । हिरोनि न्यावया सीतेसी । सुधन्वा आला अति क्रोधेसीं । तेणें मिथिलेसी वेढिलें ‖

मग म्यां युद्ध केलें त्यासी । रणीं वधिलें सुधन्व्यासी । [भा. /१ प्रतीत हा चरण नाही; सु. नि. गे. घा. 'मग त्याचिया राज्यासी । कुशध्वजासी म्यां स्थापिलें'.] त्याचें राज्य आलें आम्हासी । तें कुशध्वजासी म्यां दिधलें ‖

कुशध्वजु माझा धाकुटा बंधु । राजप्रतापें [पै. खेरीज इतरत्र 'प्रतापसिंधू'.] प्रतापसिद्धु । त्याच्या कन्या दोघी वधू । वरसंबंधू करूं इच्छी ‖ १५ ‖

सीता दिधली श्रीरामासी । उर्मिळा दिधली लक्ष्मणासी । मांडवी दिधली भरतासी । शत्रुघ्नासी श्रुतिकीर्ति ‖ १६ ‖

चौघे बंधु चार्‍ही वधू । ऋषि म्हणती श्लाघ्य संबंधु । अवघां केला निश्चय शब्दु । [त. 'लग्नबंध'; भा. /१ 'लग्नसंबंधु'; सु. नि. गे. घा. 'लग्नविधी'.] लग्नानुबंधु अवधारा ‖ १७ ‖

वसिष्ठ विश्वामित्र वामदेव । अवघे म्हणती अति अपूर्व । श्लाघ्य संबंध गौरव । भाववैभव समसाम्य ‖ १८ ‖

आजपासुनी तिसरे दिवशीं । उत्तरा फाल्गुनीं सुदिनेसीं । अभिजित साधुनि मध्यान्हेंसीं । लग्न चौघांसी लावावें ‖

वसिष्ठ विश्वामित्राचें वचन । दशरथ मस्तकीं वंदून । तुमचें वाक्य परम प्रमाण । करणें लग्न चौघांचें ‖ २० ‖

जनक कुशध्वज भूपति । दोघे व्याही परमार्थी । विजयी जाला रघुपति । हे अति कीर्ति तुमचेनि ‖ २१ ‖

लग्न करणें हें प्रमाण । भेरी त्राहाटिलें निशाण । दोघीं राया हर्षपूर्ण । सुहृज्ञन आल्हादीं ‖ २२ ‖

दशरथें पुसोनि जनकासी । सवें घेऊनि महाऋषि । वेगें आला जानवशासी । [भा. /१ 'देवदेवकासी आरंभु'; सु. नि. गे. घा. 'देवकासी आरंभ'.] देवकार्यासी प्रारंभु ‖ २३ ‖

जनक बोळवीत ये सर्वांसी । हात जोडी ऋषि-रायासी । शिष्य सेवक [पै. प्रतीत हे पद नाही.] मी तुम्हांपासीं । सबांधवेसी ससैन्य ‖ २४ ‖

श्रीरामलग्नाचा महोत्सव । दोहीं मांडवीं उत्सव । मिनला महाऋषि समुदाव । नवल नवलाव [तु. नि. घा. 'लग्नाचा'; भा. /१ 'मंडपी'; सु. गे. 'मंडपाचा'.] मंडपां ‖ २५ ‖

रामविवाह मंडपस्तंभ । चार्‍ही वेद झाले स्वयंभ । आडवलें धैर्याचें सलंब । वांसे कोंभ विवेकाचे ‖ २६ ‖

अनुक्रमणिका

**वन्हिया शाकार स्मृतिपुराणें । चाऱ्ही पुरुषार्थ तोरणें । धर्मद्वारें शोभती तेणें । सलंबपणें मुक्तघोंसीं ॥ २७ ॥**

**धर्मद्वारें नित्यमुक्त ।** [भा. /१ 'द्वारीं निरोध'; नि. 'द्वार निरोध'.] **द्वारीं निषेध नाहीं तेथ । दीनें वरापासी पावत । सुखी होत तत्काळें ॥ २८ ॥**

**वसिष्ठ पुरोहित सुबुद्धि । मंडप कापडिला उपनिषदीं । शोभा शोभे त्रिशुद्ध बुद्धि । चिदानंदीं मंडप ॥ २९ ॥**

**मंडपशोभा शोभे कैसी । पताका** [भा. /१ सु. नि. गे. घा. 'शोभती'.] **झळकती चिदाकाशीं । देखतां सुख होय दृष्टीसी । मंडपवासीं आल्हाद ॥ ३० ॥**

**कन्यामंडपीं स्तंभ भावाचे । आडवळे शुद्ध सत्वाचे । वऱ्हीया शाकार विधीचे । सुबुद्धीचे दारवंठे ॥ ३१ ॥**

**कन्यामंडपीं चांदोवे धर्म । वरमंडपीं वितान ब्रह्म । कन्यागृहीं दाटुगें कर्म । कर्म निष्कर्म वरगृहीं ॥ ३२ ॥**

**कन्यागृहीं साधन पंक्ति । वरगृहीं साधन शांती । कन्यागृहीं रत्नज्योती ।** [भा. /१ 'निजात्मदीप्ती'; तु. सु. नि. गे. घा. 'निजदीप्ती'.] **निजनित्यदीप्ती वरगृहीं ॥ ३३ ॥**

**कन्यामंडपीं नवरसप्रीती । वरमंडपीं नवविध भक्ति । कन्यागृहीं विधी सर्वार्थीं ।** [तु. नि. घा. 'विधिनिर्मुक्ती'; तं. 'विधिनिर्मोक्ति';] **विधी नामोक्ति वरगृहीं ॥ ३४ ॥**

**कन्यागृहीं नित्य चाचरीं । वरगृहीं कीर्तन गजरीं । कन्यागृहीं भाट कैवारी । वेदनागारी वरगृहीं ॥ ३५ ॥** [कं. प्रतीत ही ओवी नाही.]

**कन्या मंडपीं नोवऱ्या चारी । वरमंडपीं मिथ्या नरनारी । दोहीं मंडपामाझारीं । अगाध थोरी सामर्थ्य ॥ ३६ ॥**

**वसिष्ठें दशरथ बैसऊन । देवकविधी पुण्याहवाचन । नांदी श्राद्ध करऊन । बहु हिरण्य वांटिलें ॥ ३७ ॥**

> [वाल्मीकिरामायण, बालकांड, सर्ग ७२, श्लोक २१ ते २५.] स गत्वा निलयं राजा श्राद्धं कृत्वा विधानतः । प्रभाते कल्पमुत्थाय चक्रे गोदानमनुत्तमम् ॥ ४ ॥
> गवां शतसहस्त्रं च ब्राह्मणेभ्यो नराधिप : । एकैकशो ददौ राजा पुत्रानुद्दिश्य धर्मतः ॥ ५ ॥
> सुवर्णशृंगीः संपन्नाः सवत्साः कांस्यदोहनाः । वित्तमन्यद्बहुवसु द्विजेभ्यो रघुनंदनः ॥ ६ ॥ [कं. प्रतीत श्लोक ६ व ७ नाहीत; मु. प्रतीत श्लोक ७ नाही.]
> ददौ गोदानमुद्दिश्य पुत्राणां पुत्रवत्सलः । स सुतैः कृतगोदानैर्वृतः स नृपतिस्तदा ॥ ७ ॥

**श्रीवसिष्ठें आव्हानितां । नळिनी नंदिनी उमादि समस्ता ।** [नि. घा. तु. 'समस्त मंडपदेवता'.] **मंडपीं मंडपदेवता । मूर्तिमंता पैं आल्या ॥ ३८ ॥**

**नवग्रहादि ग्रह समस्त ।** [तु. नि. 'मंडळे सोडुनियां त्वरित'.] **आवाहनें जोडुनि हात । अवघे आले मंडपा आंत । श्रीरघुनाथ लग्नार्थीं ॥ ३९ ॥**

अनुक्रमणिका

मंडपदेवता ग्रहपरवडी । श्रीराम वंदिती आवडी । आमची तोडील हा बेडी । सोडील बांदवडी लंकेची ॥ ४० ॥

क्षेत्रपाळ अहोराती । मंडपद्वारीं नित्य जागृती । रावणें हरिल्या क्षेत्रवृत्ती । ते रघुपती सोडवील ॥ ४१ ॥

[तं. भा. /१ तु. नि. गे. घा. 'देवक प्रतिष्ठा'.] देवप्रतिष्ठा ऐसिया रीतीं । श्रीवसिष्ठ विधानोक्ति । करविली रायाहातीं । आल्हाद चित्तीं दशरथा ॥ ४२ ॥

पाचारूनियां ब्राह्मण । शतानुशतें करी गोदान । श्रीराम लक्षुनियां दान । दान विधान अवधारा ॥ ४३ ॥

नेदीच लातिऱ्या डिविऱ्या । नेदीच अत्यंत बुजिऱ्या । चोरपान्हा अति [मु. 'खावरिया'.] खाइऱ्या । मरळा कुचरा नेदीच ॥ ४४ ॥

ऐसिया गाई दाना देतां । अवचटें घडेल [मु. 'ब्रह्महत्या'.] ब्रह्मघाता । दानीं दुभाळु अति शांता । होय देता नृपनाथ ॥ ४५ ॥

नेदीच [तं. त. कं 'पढवंटा'; तु 'पढवाठा; भा. /१ 'पेढवंटा'; तु. 'पढवाठा'; भा. /१ 'पेढवंटा'; सु. नि. गे. घा. 'फळवटा'; 'पढवांटा=गौण प्रतीच्या.] पढवांठा [नि. 'प्रथम विताच्या'; सु. गे. घा. 'प्रथमवेताच्या'; तं. 'प्रथमीच्या'.] प्रथमाच्या । नेदीच वृद्धा बहुवेतांच्या । तरुणा सुदोही सुस्तनाच्या । बहुमोलाच्या उत्तमा ॥ ४६ ॥

सुवर्णशृंगी रौप्यखुरी । कांस्यदोही क्षौमांबरी । रत्नपुच्छा सुकुमारी । साळंकरीं शोभिता ॥ ४७ ॥

जैशा गाई जैसे आभरण । तैसीच दक्षणा संपूर्ण । पुतोद्वाहे देतुसे दान । सुखी ब्राह्मण तेणें केले ॥ ४८ ॥

तिळपात्रें घृतपात्रें । [तु. सु. नि. गे. घा. 'क्षीरसहित'.] क्षिप्रासहित भोजनपात्रें । द्विजां दिधलीं नृपवरें । श्रीरामचंद्रें उत्साव ॥ ४९ ॥

श्रीराम भावना भावून । सकळहि लोक करिती दान । प्रत्यक्ष श्रीरामें निजदान । भाग्यें संपन्न दशरथ ॥ ५० ॥

> [मु. प्रतीत हे श्लोक नाहीत. वाल्मीकिरामायण, बालकांड, सर्ग ७३, श्लोक १ व २.] यस्मिंस्तु दिवसे राजा चक्रे गोदानमुत्तमम् । तस्मिंस्तु दिवसे वीरो युधाजित्समुपेयिवान् ॥ ८ ॥
> पुत्रः कैकयराजस्य साक्षाद्भरतमातुलः ॥ ९ ॥

देवक प्रतिष्ठा अति गजर । हर्षें दान दे नृपवर । तेच समयीं युधाजित शूर । आला [भा. /१ 'ज्येष्ठ कुमर कैकयाचा'; तु. सु. नि. गे. घा. 'ज्येष्ठ सहोदर कैकयीचा'.] ज्येष्ठपुत्र कैकयाचा ॥ ५१ ॥
तो भरताचा निजमातुळ । सुहृद संबंधी अति कुशळ । स्वसापुत्रासी स्नेहाळ । रायें तत्काळ आळंगिला ॥ ५२ ॥

अनुक्रमणिका

शाळक बोले दशरथेसी । भेटावया दोहीं पुत्रांसी । प्रीति कैकय रायासी । मज तुम्हांपासीं पाठविलें ॥ ५३ ॥

मीं जंव आलों अयोध्येसी । तंव तुम्ही आलेती लग्नासी । आइकोनि उत्साहासी । अति त्वरेंसी मी आलों ॥ ५४ ॥

अवघीं केलें अभ्युत्थान । रायें दिधला अति सन्मान । दिधलें सुमनचंदन । वरासन बैसावया ॥ ५५ ॥

अभ्यंग करितां वरासी । मंगळ तुरें ध्वनी आकाशीं । अळंकृत दासदासीं । महाऋषि पूजिले ॥ ५६ ॥

वस्त्रें भूषणें विचित्र लीळा । गंधाक्षता सुमनमाळा । देती परमळ तांबूळा । जनक लीळा शोभत ॥ ५७ ॥

केळवला रघुनंदन । कोणी नाहीं हीन दीन । अवघे दिसती प्रसन्नवदन । सुप्रसन्न दशरथ ॥ ५८ ॥

[भा. /१ सु. नि. गे. घा. 'वस्त्रें अलंकार अति चोखट । सभा बैसली घनदाट ।'.] वस्त्रें अळंकार तेजिष्ठ । राणीवसा लखलखाट । [भा. /१ सु. नि. गे. घा. 'रायें'.] रामें रचिलें भूवैकुंठ । अति उद्भट निजशोभा ॥ ५९ ॥

श्रीरामाचां निज तेजेंसी । शोभा आली मंडपासी । रमे होऊनि वरिष्ठ दासी । श्रीरामापासीं खेळती ॥ ६० ॥

हातीं धरूनि वसिष्ठा । रायें केली यागप्रतिष्ठा । होम दिधला हव्यवाटा । ज्येष्ठां श्रेष्ठां पूजिलें ॥ ६१ ॥

जनकें अत्यंत गजरेसीं । आणिलें सीमंत पूजेसी । सभा शोभताहे कैसी । वैकुंठवासी नरनृप ॥ ६२ ॥

वैकुंठीचें निजसामर्थ्य । येणें आणिलें समस्त । जनकु निजभाग्यें समर्थ । श्रीरघुनाथ जांवाई ॥ ६३ ॥

च्यान्ही मुक्ति ते चवाई । त्यावरी बैसविला [पै. त. या प्रतींखेरीज इतरत्र हे पद नाहीं.] श्रीराम जांवाई । तेणेंचि सन्मानें तिघेही । ठाईंच्या ठाइं बैसविलें ॥ ६४ ॥

सच्चिदानंद तिन्हीं जाण । गुणातीत ते शोभायमान । तैसेचि हे तिघै जण । श्रीरामें पूर्ण शोभती ॥ ६५ ॥

मुकुट कुंडलें रत्नमेखळा । करमुद्रिका [तं. सु. नि. गे. घा. 'रत्नमाळा'.] मुक्तमाळा । निजभावाचें पदक गळां । हृदय कमळावरी शोभे ॥ ६६ ॥

जानकी जनकें विदेहवीरें । आणिलीं शुद्ध चिदंबरें । तें वेढिलीं रामचंद्रें । अत्यादरें [तु. नि. घा. 'करूनिया'.] मानुनि ॥ ६७ ॥

येरही वर याचि रीती । गौरविले अति प्रीती । देखोनि विदेहाची भक्ति । रघुपति उल्हासें ॥ ६८ ॥
वसिष्ठ म्हणे गा विदेहेंद्रा । आधीं पुजावें विश्वामित्रा । वचन मानलें राजेंद्रा । पूजी ऋषिवरा अग्रपूजा ॥ ६९ ॥

अनुक्रमणिका

पुजिलें वसिष्ठ वामदेव । कश्यपादि ऋषि समुदाव । पुजिला मातुळ महाबाहो । पुजिला रावो दशरथ ॥ ७० ॥

अत्यंत श्रद्धा जानकीजनकु । तेणें पूजिला श्रीरामजनकु । सोइरा सहृद एके एकु । सेवकें सेवकु [भा. /१ सु. नि. गे. घा 'बुझाविलें'.] गौरविलें ॥ ७१ ॥

ऋषीशृंगाची निजकांता । मुख्य करवली ते शांता । जनकु पूजी दिव्यांबरता । रत्नभूषणता अळंकारीं ॥ ७२ ॥

सुविद्या अविद्या श्रद्धा पत्नी । तैश्या वरमाय तिघी जणीं । सुमेधा लागली चरणीं । रत्नभूषणीं पूजिल्या ॥ ७३ ॥

जनकाची पतिव्रता । सुमेधा सीतेची निजमाता । भावें वंदिलें रघुनाथा । चरणीं माथा ठेऊनि ॥ ७४ ॥

वृद्धपरंपरा पूर्ण । वोहमाये उटी वरचरण । शुद्धमेधेनें आपण । श्रीरामचरण पूजिले ॥ ७५ ॥

लाज सांडुनि रोकडी । सुमेधा विनवी अति आवडी । माझी रुखवत परवडी । स्वामीनें गोडी चाखावी ॥ ७६ ॥

तुझेनि उद्देशें संतत । परिपाक केले बहुत । भावाचा भोक्ता तूं रघुनाथ । मनोरथ पुरवावे ॥ ७७ ॥

तिचा [भा. /१ सु. नि. गे. घा. 'जाणोनी'.] देखोनी भावार्थ । भावें तुष्टला रघुनाथ । जनकें प्रार्थिला दशरथ । भोजनार्थ रुखवतीं ॥ ७८ ॥

मध्यें श्रीराम केवळ । आवरण पंक्ति राजे सकळ । प्रकाशें दीप प्रबळ । भाग्य पुष्कळ सुमेधे ॥ ७९ ॥

चैतन्यतेजें अति चोखटें । समभावें सुवर्णताटें । पूर्णरसें भरिले वाटे । अपूर्ण कोठें असेना ॥ ८० ॥

एकी शाका त्या खणिवा । एकी केवळ खुडिवां । एकी सदेठीं तोडीवां । एकी सोलीवां सुवासा ॥ ८१ ॥

एकें कडुवटें खणुवाळीं । एके तिखटें तोंडाळी । एकें सलंब [भा. /१ सु. नि. गे. घा. 'रसाळीं'.] सरळी । एके वाटोळीं गडबडिते ॥ ८२ ॥

एकें हिरवीं करकरिते । एकें जारसे कचिकचिते । एकें बहुबिजे बुचबुचिते । एकें हंसहंसिते कोरडी ॥ ८३ ॥

एकें अत्यंत अबंटें । एकें सबाह्य तिखटें । एकें सर्वांगें कटुवटें । एकें तुरटें समसमितें ॥ ८४ ॥
एकें [नि. घा. 'वाटोळी जारठली'; कं. 'वाळूनी जारठली'.] वाढोनि जारटेलीं । एकें सुपुष्टें सारटेलीं । एकें मुरडी मुरकुटलीं । एकें तुटलीं अनुवायें ॥ ८५ ॥

अनुक्रमणिका

ऐशा [भा. /१ नि. घा. कं. 'फळावळी'.] फळोवळीं फळभारें । केलें समरस सांबारें । अवघ्या वाघारु वाघारें । निजथावरें श्रीरामें ॥ ८६ ॥

ऐशा नानापरीच्या शाका । परवडी केली रघुटिळका । एकेची स्वादें जेवील देखा । अति नेटका जेवणार ॥ ८७ ॥

एके परिपाकें उतटलीं । स्नेहदेठींहूनि सुटलीं । वनिता हातीं होऊनि निष्टली । स्वादा आली शिखरणीं ॥ ८८ ॥

झाडीं पिकलें देठकेणें । तऱ्ही ते आंबे [तं. भा. /१ 'आम्लवाणें'; सु. गे. 'आम्ल लवणें'; नि. घा. तु. 'आंबटपणें'; पै. 'आम्लकेणें'.] आम्लपणें । सेजा मुरालियां एकांतपणें । न चखतां घ्राणें चवी फाडे ॥ ८९ ॥

रूपें दृष्टीतें बुझावी । वासे घ्राणातें समझावी । वाचा श्रवणातें बरा म्हणवी । स्पर्शें निववी त्वचेतें ॥ ९० ॥

रसना सेवितां रसमात्र । गोडिया सुखावी अंतर । सेवितां श्रीरामचरित्र । बाह्याभ्यंतर सुखरूप ॥ ९१ ॥

एकलें एक च्यूत फळ । निववी इंद्रियें सकळ । श्रीरामपंक्तीं अच्युतफळ । जग सकळ सुखरूप ॥ ९२ ॥

वैराग्यतापें तापलिया । त्याची संतप्त काचरिया । अनुतापतेलें तळिलिया । चवी आलिया श्रीरामा ॥ ९३ ॥

एकें भोजनीं अविचारितें । सेविती निंदेचें राईतें । चवी चाखतां कुसमुसितें । कपाळ हातें पिटिती ॥ ९४ ॥

नाकीं तोंडीं धूर उठीं । तळमळुनि कपाळ पिटी । श्रीराम त्यातें नातळे दृष्टी । [तु. नि. घा. 'परिपाटीं'.] परवडी खोटी भोजनीं ॥ ९५ ॥

लोणीचीं वाढिलीं अनेगें । रंगिली भक्तिप्रेमरंगें । एकें सलवणें सर्वांगें । स्वाद श्रीरंगें सेवावा ॥ ९६ ॥

अहं कडुवट कुहिरी । सोहं लोणचीं रंगलीं [भा. /१ तु. नि. गे. घा. 'खारी'.] खरी । वैराग्यभोंकरें खारलीं [मु. 'सारीं'; तं. हा चरण नाही.] खारीं । त्याहि माझारीं [सु. गे. 'मुरू माखें'; तु. नि. घा. 'मुख्य मिरवे'; कं. तं. भा. /१ 'मुक्त मोखे'; त. 'मुक्ति मेखें'.] मुक्ति मोखे ॥ ९७ ॥

[तं. 'स्वबोध-बळेसी आवळिला'; भा. /१ 'स्वबोध बोले बेल आवळा'; त. 'स्वबोधबळेंसी आंवळा'; तु. 'स्वबोधें बोधेसी आंवळा'; सु. नि. गे. घा. 'स्वबोध आलेसी आंवळा'.] स्वबोध बेलेसी आंवळा । [त. 'जेवणी चवी अति आगळा'; सु. नि. गे. घा. 'भोजनें चवी अति आगळा'.] जीवतें चवी अति आगळा । मुळींच्या मुळेंसी रंगला । स्वयें सेविला रघुनाथें ॥ ९८ ॥

[कं. भा. /१ सु. नि. गे. घा. खेरीज इतरत्र, 'त्रिगुणीं गुणाचें निजत्रिकुट'.] त्रिगुणाचें निज त्रिकुट । निर्गुणें भरिलें त्याचें पोट । [नि. घा. 'घमघमीत'; भा. /१ त. सु. गे. 'मघमघींत'; पै. कं. 'घटघटित'.] मगमगीत उद्भट । अतिस्वादिष्ट [तु. सु. नि. गे. घा. 'श्रीरामें'.] श्रीरामा ॥ ९९ ॥

अनुक्रमणिका

ऐसीं लोणिचीं नेणें किती । मुख्य [भा. /१ तु. नि. घा. कं. 'स्मरण'.] सुरण आलें नेपती । तो स्वाद जाणें रघुपती । बैसले पांतीं ते धन्य ॥ १०० ॥

सूक्ष्म सेवेच्या सेवया । [मु. 'मोडोनि देतां'.] मोडो नेदीत सगळिया । [पै. तं. तु. 'क्षीरसागरेसी'; भा. /१ 'परमभक्ती-प्रीति वेळलिया'.] क्षीरसाखरेंसी आळिलिया । स्वयें सेविलिया श्रीरामें ॥ १०१ ॥

पोकळे वळवटें सरवळीं । एकें वाटोळी लांबोळीं । सेवेमाजीं अवघीं आलीं । ठाइं पावलीं रघुनाथा ॥ १०२ ॥

परमु स्वादाचीं साखर । पंचरस पंचधार । घृत वाढिलें सर्वसार । स्वादें रामचंद्र डुल्लतु ॥ १०३ ॥

अनुतापें सद्यस्तप्त । निजसारांचें [त. सु. नि. गे. घा. 'सार'.] सारांश घृत । अखंड धारा स्वयें वाढित । श्रीरघुनाथ निजभोक्ता ॥ १०४ ॥

शास्त्र पडिपाडें पापड । नानायुक्ति अति [कं. पै. तं. खेरीज इतरत्र 'तडफड'.] तडपड । जळजळेंचे आले फोड । तेणें कडकडां मोडत ॥ १०५ ॥

यालागीं घातले होते मागें । ते वाटुनि भजन मार्गें । विरउनियां सर्वांगे । श्रीरामभोगें स्वादिष्ट ॥ १०६ ॥

श्रीराम सीते प्रीति सदा । त्यामाजीं सांड्या अबद्धा । यालागीं न करीच सुमेधा । वृद्धानुवादा जाणोनि ॥ १०७ ॥

समूळ गुंतली कुरवंडी । स्वयें नुगवेचि बापुडी । शांतिदांतीं केली कुडकुडी । आली रोकडी राममुखा ॥ १०८ ॥

विषय लालसाचे लाडू । विवेकें वाढिलें फोडफोडूं । तेणें पडिपाडें तिळण्या जोडू । स्वादु गोडु श्रीरामें ॥ १०९ ॥

वैराग्य कढें कढिली कढी । तीमाजीं माया मुगवडी । विरोनि स्वादा आली गाढी । तिची गोडी हरी जाणे ॥ ११० ॥

त्यामाजीं मिऱ्यें जिऱ्यें कापुरा । ते [पै. त. खेरीज इतरत्र 'तेणें'.] सुवास चढे अंबरा । रसज्ञ सेविती फरफरा । श्रीरामचंद्राचेनि धर्में ॥ १११ ॥

भजन भावाचिया [तं. 'इडुरिया'; भा. /१ 'इडरिया'; तु. नि. घा. 'मांडेपुरिया'; सु गे. त. 'इंडोरिया'.] इंडरिया । क्षीरसागरींच्या क्षीरघारिया । सबाह्य गोडा गुळवरिया । पूर्ण पुरिया परिपूर्ण ॥
भजनभेदें [मु. 'सफेद'.] सभेद फेणी । प्रेमशर्करा भरिली भरणीं । अमृतफळातें लाजउनि । वाढिले आईणी आंबवडे ॥ ११३ ॥

नुसधे गोडियेची घडिली । तैसी खांडवी वाढिली । चंद्रबिंबींची काढिली । घडी [पै. खेरीज इतरत्र 'मांडिली'.]

मोडली मांडिया ॥ ११४ ॥

मांड्याची [तु. नि. घा. या प्रतींत 'ऐका' हे अधिक पद.] नवलपरी । चतुर्वेद घडिया चाऱ्ही । कर्मकानवटी [नि. घा. 'कानवले उत्तरी'; सु. गे. 'कानवडी उत्तरी'; तु 'कानवडी उतरी'; भा. /१ 'कानवेटी उतरी'; तं. 'कानवटी उतर'.] उतरी । श्रीरामचंद्रीं निजस्वादा ॥ ११५ ॥

[पै. 'विवेक पडणी'.] विवेक सडणीं सोज्वळें । उभयभागीं निजतेजाळें । तांदूळ वेळिले आणियाळे । भावबळें अरुवार ॥ ११६ ॥ [तु. प्रतीत ही ओवी नाही.]

सोहं वोगराळें सनाथ । अलिप्तपणें भरिला भात । ठाई वाढिला न फुटत । श्रीरघुनाथ निजभोक्ता ॥ ११७ ॥

अन्नीं वरान्न श्रेष्ठता । सबाह्य कोंडा सांडिला परता । चढलें मध्य नायका माथां । प्रिय रघुनाथा यालागीं ॥ ११८ ॥

सर्व स्वादाचें कारण । स्वयें श्रीराम आपण । यालागीं वाढिलें वरलवण । अपूर्ण पूर्ण तो करील ॥ ११९ ॥

श्रीराम पंक्ती रस पीयूख । ज्यांसी श्रद्धेची अति भूख । ग्रासोंग्रासीं चढतें सुख । हे परवडी देख त्यालागी ॥ १२० ॥

न्यून नाहीं श्रीराम पंक्ती । जेवितां जेविते [तु प्रतीत हे पद नाही.] चवी [त 'चाखती'.] जाणती । रुचलेंपण जाणें वाढिती । जनक नृपति सावध ॥ १२१ ॥

सुमेधा सदा सावधान । जाणे तृषितांचें लक्षण । सबाह्य निववी ते संपूर्ण । जीवा जीवन देतिसे ॥ १२२ ॥

सुमेधा स्वयें खुणविती । चाऱ्ही मुक्ति [त. सु. नि. गे. घा. या प्रतींत 'तेथ' हे अधिक पद.] तेथ राबती । जें जें ज्याची मनोगती । तें तें देती ते ठाईं ॥ १२३ ॥

पहिलें नवजणी वाढित्या । चौघी जणी पूर्ण करित्या । जे पंक्तीसी रामभोक्ता । [भा. /१ सु. नि. गे. घा. या प्रतींत 'तेथ' हे अधिक पद.] अतृप्तता असेना ॥ १२४ ॥

एवं तृप्त [पै. तं. तु. त. कं. 'अभयंकर'.] अभ्यंतर । देती स्वानंद उद्‌गार । [कं. व मु. 'स्वानंदे'.] स्वादें कोंदले जेवणार । श्रीरामचंद्र [मु. 'निजभोक्ता'; कं. 'निजभक्ति'.] निजपंक्तीं ॥ १२५ ॥

सुमेधा सावधान वाढी । राजा धाले निज परवडी । ब्राह्मणतृप्ती जाली गाढी । धोत्रें बुढीं ढिलाविती ॥ १२६ ॥

तृप्ती जाली सकळिकां । उष्टावणी रघुटिळका । रामनाम निजमुद्रिका । ठाईं देखा ठेविली ॥ १२७ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम निजमुद्रा देखतां । उल्हास सुमेधेच्या चित्ता । चरणीं लागली रघुनाथा । लाज सर्वथाचि सरली ॥ १२८ ॥

संतोषोनियां रघुपती । सुमनमाळा तिसी देती । हर्षें नमाय त्रिजगतीं । सीता सती सभाग्य ॥ १२९ ॥

जे जे जेविले श्रीरामपंक्तीं । ते ते संसारा आंचविती । श्रीरामनामें [तु. नि. घा. 'सुखी रंगती'; सु. गे. 'सुखसंपत्ति'; त. ' 'सुखपंक्ति'.] मुखपंक्ति । विडे शोभती सुरंग ॥ १३० ॥ [कं. प्रतीत पुढील तीन ओव्या नाहीत.]

[मु. 'फोडफोडुनि'.] फोडी फोडुनि फळाशा । शांति पक्कपान दशा । वासना शिरा काढुनि निःशेषा । तांबोल परेशा श्रीरामा ॥ १३१ ॥

अहं जाळूनी कठिणपणा । सोहं गाळुनि शुद्ध चुना । लागोनि शांति पक्कपाना । श्रीराम-वदना सुस्वाद ॥ १३२ ॥

सर्व सारांचें निजसार । तेंचि सेविती खदिरसार । श्रीराममुखीं रंगाकार । अधरीं [पै. सु. गे. खेरीज इतरत्र 'सधर'.] अधर शोभत ॥ १३३ ॥

श्रीरामप्रसाद येतां हाता । सुमेधा [मु. 'लाहे'.] चाले उल्हासता । स्वयें सीतेचे हातीं देतां । तिणेंहि माथां वंदिला ॥ १३४ ॥

वंदुनिया श्रीरामचंद्रा । हृदयीं धरिली नाममुद्रा । प्रसाद सेवितां ते भद्रा । [त. 'वीरा सुरेंद्रा न भीये'; तं. भा. /१ कं. 'नरां सुरेंद्रा विपुलाये'; तु. 'वरा सुरेंद्रा विपुलाये'; सु. नि. गे. घा. 'नरां सुरेंद्रा विपुलांगे'.] वीरां सुरेंद्रा विपुळाये ॥ १३५ ॥

श्रीरामाच्या निज दीप्ती । उदो अस्तु नाठवती । उपाध्ये रायातें सांगती । उदया गभस्ति येवो पाहे ॥ १३६ ॥

मांडवा चाला लवडसवडी । आधीं प्रतिष्ठावी घडी । दशरथें निज निरवडी । फळ तांतडी आणावें ॥ १३७ ॥

एका जनार्दना शरण । जाहालें रुखवत संपूर्ण । पुढारें सीता पाणिग्रहण । सावधान अवधारा ॥ १३८ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां सीमंतपूजनशोभा नाम त्रिविंशतितमप्रसंगः ॥

संपादित प्रत, श्लोक ९, ओव्या १३८. इतर प्रतींत : नि. इं. सु. गे. घा. ५, १३८; भा. /१ ८, १३७; तं ९, १३८; तु. ८, १३६; त. पै. ९,१३८; कं. ८, १३३.

अनुक्रमणिका

## प्रसंग चोविसावा

## श्रीराम मंडपागमन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीरामप्रसाद सेवितां । समाधिसुख फिके आतां । ऐसी उल्हासली सीता । रघुनाथाचेनि शेषें ॥ १ ॥

सद्‌गुरु [पै. 'परापर'.] परात्पर उपरी । सर्वां सावधान करी । घटिका प्रतिष्ठिली अंतरीं । जीवनावरी संख्येची ॥ २ ॥

अक्षरें अक्षर पळेंपळ । घडी भरतां न लगे वेळ । लोक व्यापारें [भा. /१ सु. नि. गे. घा. 'विकळ'.] विव्हळ । गेला काळ नेणती ॥ ३ ॥

घडी [मु. पाठ 'झेंगटातें'.] झेंगटातें हाणत । काळ जावों नेदावा व्यर्थ । तेणें काळें [तु. 'काळ काळांत आणित'; नि. 'काळ अंत जाणित'.] कळांतर गणित । मुदल तेथ बुडालें ॥ ४ ॥

नवल लोकांची नवाई । काळें गिळिलें न पडे ठाईं । दुमाही चौमाही गणिता वही । तेणें पाही नागवले ॥ ५ ॥

सद्‌गुरु सांगे भरली घडी । उगेचि पाहाती वऱ्हाडी । ज्यांसी निजकार्यी तांतडी । घडिया घडी ते साधिती ॥ ६ ॥

रामसेवक [पै. खेरीज इतरत्र 'सावचित्त'.] सावधचित्त । क्षणेक्षणु जावों नेदीत व्यर्थ । फळ विस्तारी रघुनाथ । तेणें सर्वार्थ सफळित ॥ ७ ॥

सीतेसी नेसावया चिदंबर । चिद्रत्नांचे अळंकार । हृदयपदकीं नीळा मनोहर । विचित्र हार मुक्तलग ॥ ८ ॥

अहंकाराचें बीज भरडी । मोहममतेचा कोंडा दवडी । सोलीवां डाळीची परवडी । भरली दुरडी भावाची ॥ ९ ॥

घेऊनि विवेकचाळणी । कणीक चाळिली सुगरणी । फळकट सांडिलें त्यागुनी । गूळ गोडपणीं त्यामाजीं ॥ १० ॥

समूळ देठींहूनी सुटलीं । निजपरिपाकें उतरलीं । प्रमदास्पर्शें नाहीं स्पर्शिलीं । फळे आणिलीं फळार्था ॥ ११ ॥

रंभाफळें ते पवित्रें । वक्रफळें [तु. नि. घा. 'वक्राकृति अपवित्रें'; सु. गे. त. 'वक्रफळें ती वक्रोक्ति अपवित्रें'; भा. /१ 'वक्रपणें वक्रोक्ति अपवित्रें'; तं. 'रक्तफळें वक्रोक्ति अपवित्रें'; कं. 'चक्रोक्ति अपवित्रें'.] वक्रोक्ति अपवित्रें । सोलुनि सांडिलीं रामचंद्रें । केलें अवक्रें श्रीरामें ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

लोकांचे फळीं च्यूत फळ । तेंहि माझारीं गांठियाळ । राम विस्तारी अच्युतफळ । फळें सफळ विदेही ॥ १३ ॥

सौभाग्यद्रव्यें ठेविलीं आधीं । [तु. नि. घा. 'धणे आणि हळदी'; कं. 'धणें धरणे हाळदी'.] धणीपणें धणे हळदी । जिरें मेळविलीं त्यामधीं । जेवीं सुबुद्धीं विवेक ॥ १४ ॥

श्रीराम [सु. गे. घा. 'श्रीराम मुद्रा'.] मुख्य आहेवतंतु । शाममणी स्वयें ओवितु । त्यामाजी रामनाम संकेतु । कंठीं एकांतु गळसरी ॥ १५ ॥

तोडुनि सांडिली गांठ्याळ गांठी । स्मरणमणी सीतेच्या कंठीं ।
बांधावया गळसरी गोमटी । राम जगजेठी स्वयें वोवी ॥ १६ ॥

विमने त्यजुनि सर्वत्र । शुद्ध सुमनांचे हार । गुणेंवीण गुंफी रामचंद्र । सीता मनोहर तेणें शोभे ॥ १७ ॥

नाहीं [तु. 'मध्यमा मध्य'; तं. भा. /१ 'मध्यमध्यें'; त. सु. नि. गे. घा. कं. 'मध्यमध्य'.] मध्यें मध्यें गोठ्याळ । सबाह्य रसें अति रसाळ । इक्षुदंड अति सोज्वळ । आणिलें सफळ फळासी ॥ १८ ॥

काठे पुंडें [तं. 'काळे कुंडे नाकळे नवाळे'; त. 'कांठे कुंडे नाकाळे नेवाळे'; तु. 'कोन्हे पुंडे नेवाळे'; भा. /१ 'कांठे पुंडे काळे वाळे'; सु. नि. गे. घा. 'कांटे पुढे काळे नेवाळे'.] नाकाळे । चहूं वर्णाहि वेगळें । ऊस आणिले प्रेम समेळें । सफळ फळें सीतेसी ॥ १९ ॥

एकें बीजेवीण फळें । एकें त्वचेवीण रसाळें । एकें सबाह्य निर्मळें । सफळ फळें सीतेसी ॥ २० ॥

चहूं मुक्तीच्या सेवया कुसरी । श्रद्धेच्या परड्या-दुरड्या भरी । देउनि नवविधांचां करीं । फळ बाहेरीं काढिले ॥

[मु. 'ऋष्यशृंगाची कांता अलंकारें'; तं. 'ऋषिशृंगाचेनि निज अलंकारें'.] ऋषिशृंगाचेनि अळंकारें । शांता करउली सौभाग्य भरें । मिरवताहे अति गजरें । मंगळ तुरें गर्जती ॥ २२ ॥

सूर्यवंशींच्या राजवल्लभा । जैसी सूर्याची निजप्रभा । तैशा शोभीत निजांग शोभा । वेदगर्भा श्रुतिव्यती ॥ २३ ॥ [तं. प्रतीत या ओवीचे पहिले तीन चरण असे आहेत :— 'जैसी स्वरूपीची आभा । कीं सूर्याची सूर्यप्रभा । तैसी शोभती निजांगशोभा ।']

लग्नीं पाहावया रघुपति । [तु. नि. 'वऱ्हाडिणी आल्या श्रुतिस्मृती'; सु. गे. घा. 'वऱ्हाड आले वेदश्रुती'.] वऱ्हाडे आल्या वेद श्रुति । कर्मकांडींच्या घेउनि बुंथी । मिरवती निजगजरें ॥ २४ ॥

घेऊनि ऋषिवर्गाचा मेळ । निघाला दशरथ भूपाळ । राजे चालिले सुहृत्सकळ । तूर बंबाळ लागला ॥ २५ ॥

जनक आला जी सामोरा । नमस्कारिले ऋषेश्वरां । मंडपीं बैसविले नृपवरां । ऋषेश्वरांसमवेत ॥ २६ ॥
कन्या बैसावया मूळपीठ । निज प्रकृतीचें धुवट । वऱ्हीया आंथुरिलें चोखट । पुरोहित श्रेष्ठ [पै. भा/१ त. 'सत्यानंद'.] शतानंद ॥ २७ ॥

अनुक्रमणिका

कन्या आणूनि बाहेरी । वस्त्रें अर्पुनि त्यांचां करीं । सर्वेचि नेल्या जी भीतरीं । ते चमत्कारीं नेसल्या ॥ २८ ॥

फेडुनि माया मळिनांबरें । [मु. 'नामनामें चूण मनोहरें'.] राममेचूचीं मनोहरें । चौघी नेसल्या चिदंबरें । जयजयकारें आणिल्या ॥ २९ ॥

वरावया निजात्म पति । चाऱ्ही मुक्ती शृंगारती । तैशा चौघीजणी येती । सीता सती मुख्यत्वें ॥ ३० ॥

सीतेचा पल्लव झळकतु । उजेड पडला मंडपांतु । सून देखोनि दशरथु । अति विस्मितु तो [पै. त. खेरीज, इतरत्र 'पैं.'] जाला ॥ ३१ ॥

ते तंव लेणयांचें लेणें । तिचेनि शोभती भूषणें । सीतेचेनि निजगुणें । अवघी सगुणें भासतीं ॥ ३२ ॥

सीता-आंगप्रभा-किरणें । लाजिलें अंधाराचें जिणें । लोपलें उष्ण आणि चांदणें । प्राणी प्राणें तटस्थ ॥ ३३ ॥

न कळे दिवसु ना राती । लवों विसरलीं नेत्रपातीं । समूळ शब्दा जाली शांती । अवघीं पाहाती टकमका ॥ ३४ ॥

वसिष्ठ म्हणे सावधान । [तं. 'दशरथा करी शुद्धाच्मन'; त. सु. नि. गे. घा. 'दशरथें देखिली सून'.] दशरथा देखिली सून । वेगीं करी फळार्पण । श्रीराम लग्न साधावया ॥ ३५ ॥

लावावया श्रीरामलग्न । नाहीं उरलें व्यवधान । सीता साधावया निधान । फळार्पण करी वेगीं ॥ ३६ ॥

[मु. 'पहिलेनि अर्पिता'.] पहिले नार्पिता फळ । कार्य न सधे तत्काळ । निःशेष [तु. 'अर्पिल्या सफळ'; नि. घा. 'अर्पिल्या फळ सकळ'.] अर्पी फळ सकळ । खूण भूपाळ पावला ॥ ३७ ॥

वसिष्ठाच्या निजवचना । सन्मुख बैसउनि चाऱ्ही सुना । निःशेष फळ अर्पिलें जाणा । वस्त्रां भूषणां समवेत ॥ ३८ ॥

पुरोहित जनकवंशीं । सत्यानंद धन उदासी । दशरथें आणुनि त्यासी । घातली कळशीं कोटि द्रव्यें ॥ ३९ ॥

तो म्हणे राया दशरथा । [पै. 'देखिया'.] देखिलिया रघुनाथा । द्रव्यलोभ नाहीं आतां । रायें चरणीं माथा ठेविला ॥ ४० ॥

द्विजां अग्रपूजा सन्मान । दिधलें सुमन चंदन । सकळां तांबूल संपूर्ण । फळार्पण पैं जालें ॥ ४१ ॥

वसिष्ठ सांगे जनकासी । शीघ्र मूळ यावें वरासी । दशरथ सहित ऋषि । जानवशासी स्वयें आले ॥ ४२ ॥

बोलती वऱ्हाडणी वेल्हाळा । कन्या देखतांचि डोळां । ताहन-भूक नाठवे सकळां । अपूर्वकळा सौभाग्यें ॥

अनुक्रमणिका

४३ ॥

अत्यंत सुरूपा चौघीजणी । समूळ सौंदर्याच्या खाणी । लावण्य पीठींच्या दिव्य योगिनी । सगुण गुणीं गुणांच्या ॥ ४४ ॥

साधावया [नि. घा. 'नवविधान'.] नवनिधान । स्वयें श्रीराम सज्ञान । त्रिंबक भंजुनिया जाण । दिव्य रत्न परिणिलें ॥ ४५ ॥

येऊनि आद्याशक्ति जाण । स्वयें श्रीरामासी आपण । अदृश्यीं बांधे दृश्य कांकण । जिवें निंबलोण करूं गेली ॥ ४६ ॥

जनक अति संभ्रमेसीं । मूळ निघाला वरासी । सुमेधा अत्यंत उल्हासी । तेलवणासी विस्तारी ॥ ४७ ॥

सूक्ष्म सेवेचा पैं लाडु । श्रीरामासी अत्यंत [मु. पाठ 'कोडू'.] गोडु । वैराग्य सोलीव [तु. 'वैराग्य सोलीव उदंडु'; सु. नि. गे. घा. 'वैराग्य शर्करा अति गोडू;' त. या प्रतीत शेवटचे दोन चरण पुढीलप्रमाणे :— 'तिळव्या जोड अति गोड । अति सुख सुस्वादा ॥' कं. 'वैराग्य सोलीव सजोड'.] सगोडु । तिळव्या जोडी सुस्वादु ॥ ४८ ॥

शाब्दिक शब्दांची खसखस । धुऊनि सांडिली कसकस । लाडु वळिले सुरस । शुद्ध चिदंश गुळगोड्या ॥ ४९ ॥

चार्वाकचारें फोडुफोडू । चैतन्य चारोळ्या पडिपाडू । चित्साखरां वळिले लाडू । सुख सुरवाडू श्रीरामा ॥ ५० ॥

अष्टांग योगीचें अष्टदळबीज । त्याचेंही [त. 'फोडूनि' पै. 'सोडूनीं'.] सोलुनि काढिलें निज । [सु. गे. घा. 'सुगंधे'.] सुमेधां लाडू वळिले सहज । दाखवी वोज तेलवणा ॥ ५१ ॥

सप्रेम प्रेमें सर्वांगीं कांटे । फणसा अंतरीं गोड गोमटें । त्याचीहि बीजें फोडुनि नेटे । लाडू गोमटे वळियेले ॥ ५२ ॥

अति सज्ञान विदेह भाज । गंगाफळाचें निजबीज । सोलूनी लाडू वळिले सहज । निज वोज तेलवणा ॥ ५३ ॥

कंटकामाजीं दांभिकें बोरे । आंत अंबट वरी साजिरें । त्याचेहि बीज फोडुनि निर्धारें । काढी बाहेरें निजबीज ॥ ५४ ॥

सद्भावाचा गूळ गोडू । घालुनि वळियेले लाडू । श्रीराम जाणे चवी निवाडू । पडिपाडू तेलवणा ॥ ५५ ॥

वैराग्यें कडकडीत कडकणें । सुमेधा आणिलें तेलवणें । श्रीराम उद्देशाचेनि गुणें । फुटणें तुटणें त्या नाहीं ॥

अनुक्रमणिका

५६ ॥

निजप्रपंचा उबगले । तेचि वांकडे कानवले । मुरडी सद्भावें मुरडलें । ते आवडले श्रीरामा ॥ ५७ ॥

संदेहाचें तेलवण । बोलावया बहुतां आंगवण । [तु. नि. 'परी ते विदेहाचें'; भा. /१ 'हें विदेहाचें' त. 'परि विदेहाचें'; सु. घा. 'वरी हें देहाचें'.] परी हें विदेहाचें तेलवण । अति कठिण अर्थितां ॥ ५८ ॥

वरासी मूळ गजर गहिरे । जनकु आला अत्यादरें । सुमेधा सुवासिनी संभारें । निजगजरें पैं आली ॥ ५९ ॥

देऊननीं दशरथें सन्मान । दोही पक्षीचे सुहृद्‍जन । [तु. नि. घा. 'सभे बैसविलें'.] सभा बैसली प्रसन्नवदन । समाधान मंडपीं ॥ ६० ॥

वरू उपविष्ट सर्वांतरी । भावें आणावा सभेभीतरीं । वसिष्ठ सद्‍गुरु हातीं धरी । राम बाहेरी तैं प्रकटे ॥ ६१ ॥

श्रीराम लावण्याची राशी । [तं. प्रतीत दुसरा चरण पुढीलप्रमाणे आहे : 'अलंकार शोभती त्यासी'.] फेडी [भा. /१ सु. नि. घा. 'वेडी'.] वेढी नाहीं त्यासी । त्याचेनि सुंदरत्व जगासी । सीमा रूपासी न करवे ॥ ६२ ॥

वसिष्ठाचें गुरुवचनीं । श्रीराम आला सभास्थानीं । तेजें कोंदली [तं. सु. नि. गे. घा. 'नभमेदिनीं'.] नभअवनी । वरासनीं बैसविला ॥ ६३ ॥

देखतां श्रीराम श्रीमुख । तटस्थ जाले सकळ लोक । डोळ्यां लागली टकमक । अंतरीं सुख कोंदलें ॥ ६४ ॥

श्रीरामाचेनि दर्शनें । होत डोळ्यां पारणें । इंद्रियें सुखावलीं संपूर्णें । बोलणें चालणें तटस्थ ॥ ६५ ॥

वसिष्ठ म्हणे सावधान । वेगीं समर्पा तेलवण । सुमेधा येऊनि आपण । पाहे वदन रामाचें ॥ ६६ ॥

देखोनि श्रीरामाचें वक्तृ । परमानंदें धाले नेत्र । देताती तृप्तीचे ढेकर । तऱ्ही अपार भुकेले ॥ ६७ ॥

वारंवार मुख न्याहारी । हरिखें निंबलोण उतरी । राम देखोनि सर्वांतरीं । जीवें करी कुरवंडी ॥ ६८ ॥

सर्वांतरीं राम परिपूर्ण । कवणा [तं. कं. संपादित पाठ; मु- 'वाहूं'; पै. 'वावों'.] वाहों तेलवण । वसिष्ठें येउनी आपण । [त. 'गुरु. खुणेनें प्रबोधी'; तं. 'श्रीरामपण बोधवी'; तु. 'श्रीरामायणें प्रबोधी'; पै. भा. /१ 'श्रीरामपण प्रबोधी'.] श्रीराम खुणेनें प्रबोधी ॥ ६९ ॥

ज्याचेनि देखतां दर्शन । सर्वांतरीं दिसे राम पूर्ण । तो श्रीराम मुख्य जाण । त्यासी तेलवण अर्पावें ॥ ७० ॥
आइकतां वसिष्ठाचें वचन । सुमेधा जाली सावधान । श्रीरामासी तेलवण । वस्त्रें भूषणें समर्पिलीं ॥ ७१ ॥

वऱ्हाडी बोलती [तु. नि. घा. खेरीज इतर 'लवलाही'.] नवाई । मुख्य वोहमाय नोळखे जांवाई । आतां आम्ही करावें

कायी । वरु लवलाही चालों द्या ॥

जैसें श्रीरामासी तेलवण । तैसेंचि भरत शत्रुघ्न लक्ष्मण । देऊनि दिव्यांबरें भूषण । समसमाधान पूजिले ॥ ७३ ॥

शुद्धसत्वाचा श्वेत वारू । त्यावरी चढला रघुवीरू । सत्वाथिला अत्यंत धीरू । भीरामभारू तो साहे ॥ ७४ ॥

चौघांसीहि समसमान । बैसावया श्वेत वाहन । चौघे वर शोभायमान । जननयन आल्हादी ॥ ७५ ॥

लक्षूनि पूर्ण परमानंदु । प्रगटे सच्चिदानंदु । तैसे रामासवें [त. 'तिघे' हे पद नाही; पै. सु. 'चौघे'.] तिघे बंधु । [मु. 'निजात्मबोधु'; कं. 'निजबंधू एकात्मता'.] निजबोधु एकात्मता ॥ ७६ ॥

जेवी कां ॐकारु मुख्यवेदु । तोचि भासे चतुर्विधु । तैसेचि हे चौघे बंधू । निजबोधु एकात्मता ॥ ७७ ॥

एकाचि साधूचे शरीरीं । भासती पुरुषार्थ चाऱ्ही । तैसीच या चौघांची परी । एकाकारी निजबोधें ॥ ७८ ॥

जेवीं एके श्लोकीं चरण चारी । [भा. /१ सु. नि. घा. 'तैसीच या चौघांची परी'.] तैसे चौघे बंधु एकाकारी ।
श्रीराम अर्थु श्लोकाक्षरीं । तेवी चौघा भीतरीं एकत्व ॥ ७९ ॥

वर मिरवती एकत्रें । धरिलीं तन्मयाचीं छत्रें । निजबोधाची ढळती [मु. 'चामरें'.] चवरें । दशविध तुरें लागलीं ॥ ८० ॥

घंटा किंकिणीचे शब्द । मधूर [भा. /१ सु. नि. घा. 'शब्दांचे'.] शंखाचा अनुवाद । वीणा वेणु मृदंगनाद । ['सुख शब्द चिन्ह काहाळा'; तु. 'सुर शब्दचि न काहाळा'; तं. 'सुख शब्दांची न काहाळा'; सु. नि. घा. 'शुद्ध शब्दाचे काहळा'.] सुख शब्दचि न काहळा ॥ ८१ ॥

[मु. 'तुरें'.] बुरंगे काहाळा गर्जती भारीं । निशाण त्राहाटिलें गजरीं । दुमदुमीलिया [त. 'नादगजरीं'; तु. नि. 'मंगळमोहरी'.] भेरी । नादांतरीं मन नीवे ॥ ८२ ॥

जैसा अनुहाताचा गजर । तैसीं तुरे जी अपार । नादे कोंदलें अंबर । शब्दाकार नभ जालें ॥ ८३ ॥

[तं. 'श्री वर्णुनि'; भा. /१ तु. नि. सु. घा. 'श्रीराम वर्णनीं'.] श्रीराम वर्णुनि चतुर । चौघे भाट अति गंभीर । अठरा मागध विचित्र । वंशींचे वीर वर्णिती ॥ ८४ ॥

शब्दानुवादें अति प्रबळ । साहीं जणा वेवादु सबळ । [भा. /१ 'शब्दीं शब्दा करिती सळ'; त. कं. 'शब्दीं शब्दा करिती छळ'; सु- 'शब्दाशब्दीं करिती सळ'; नि. घा. 'शब्द करिती सळ'.] शब्दें शब्दा करिती छळ । अभिमान प्रबळ ज्ञानाचा ॥ ८५ ॥
आठै भाव अत्यंत प्रीति । सत्वाचा वारू धरूनि हातीं । श्रीरामासवें नित्य चालती । अन्यथागति त्या नाहीं ॥ ८६ ॥

सुख छायेचीं आतपत्रें । चिदंबरीचीं पालवछत्रें । झळकताती तेजाकारें । श्रीरामचंद्रें उल्हास ॥ ८७ ॥

अनुक्रमणिका

अनुभव स्वानंदें दुर्धर । [मु. 'भाट'.] मद गर्जती अति गंभीर । दोहीं बाहीं कुंजरभार । चालती स्थिर श्रीरामें ॥ ८८ ॥

श्रीरामें त्यजिल्या त्याग देऊनि । अष्टौ महासिद्धी नाचणी । नाचताती चपळपणीं । जनालागुनि भुलवावया ॥ ८९ ॥

सिद्धी जेथें नाचतां देखती । योगी साधक तेथ [सु. 'ढसती'; भा. /१ तु. नि. घा. कं. 'ढेंसती'; तं. त. 'सती'.] ढेंपती । सेखीं संन्यासी भुलती । पाहाणें रघुपति विसरोनी ॥ ९० ॥

चैतन्य बुका घाली रघुनाथ । ज्यासी लागे तो धन्य जगा आंत । याचकांचें निवें चित्त । तैसें देत संज्ञेनें ॥ ९१ ॥

सत्यानंद जगजेठी । घेउनि विवेक वेताटी । दृश्याची मांदी मागे लोटी । श्रीराम दृष्टी पाहावया ॥ ९२ ॥

श्रीराम-रूपीं अति प्रीती । ते वैष्णव पुढें नाचती । अहं सोहं सांडुनि वृत्ती । [मु. 'नित्य'.] नृत्य करिती स्वानंदें ॥ ९३ ॥

श्रीरामासवें सुवासिनी । [तं. 'ब्रह्मवेश्याच्या ब्राह्मणी'; त. 'ब्रह्मवेत्याच्या ब्राह्मणी'; मु. 'ब्रह्मविद्येच्या ब्राह्मणी'.] ब्रह्मवेत्तेच्या ब्राह्मणी । बोध पुत्रांच्या जननी । सुखासनीं मिरवती ॥ ९४ ॥

ऐसिया सुवासिनी समस्ता । निजबोधाच्या अक्षता । घालिती रघुनाथाचे माथां । लक्ष सर्वथा न चुकती ॥ ९५ ॥

श्रीरामाचे सोइरे आप्त । योगी अनुभवी ज्ञानी [नि. 'मुक्त'.] भक्त । त्यासी [भा. /१ तु. सु. नि. घा. 'वहने'.] वाहनें रघुनाथ । जें जें देत तें आइका ॥ ९६ ॥

एका सलोकता घोडे । एका सामीप्य रथ चोखटे । एका [तं. 'सारूपता'; पै. खेरीज इतरत्र 'स्वरूपता'; कं. 'स्वरूपतां'.] स्वरूपवंता गजगाढे । [तु. 'रणरगडे भवगंगा'; मु. 'भवभंगडें रणरंगीं'.] रणरगडे भवगजा ॥ ९७ ॥

सायुज्य चवर डोलावरी । बैसविले निजाधिकारी । त्यासी जवळूनिया दुरी । क्षणभरी जावो नेदी ॥ ९८ ॥

भरूनि रज-तम औषध । अग्नियंत्रें करूनि सिद्ध । श्रीरामासी अति विनोद । एक प्रबुद्ध दाविती ॥ ९९ ॥

चैतन्याग्नि देऊन देहीं । ममता जाळिली हवाई । गगना उसळोनियां पाही । ठाईंचां ठाईं निमाली ॥ १०० ॥

सलोभ लोभाच्या चुचुंदरी । विवेकीं जाळुनी टाकिल्या दुरी । त्या पडती जनांवरी । उरी शिरीं जाळीत ॥ १०१ ॥

देऊनि उपशम अनळा । जाळिला क्रोधाचा भुइनळा । भडभडा निघोनि ज्वाळा । तोहि तत्काळा निमाला ॥ १०२ ॥

अनुक्रमणिका

श्रीरामयुक्तीच्या स्वलीळा । जाळीत कामाचा हातनळा । जाळू नेणत्या अबळा । जीवीं जिव्हाळा पोळितु ॥ १०३ ॥

पाहातां अत्यंत कठिण । चिन्मात्र अग्नि लाउनि [घा. प्रतींत हे पद नाही.] पूर्ण । जाळिला अहंकाराचा बाण । पळे [त. पै. 'जीवन'.] जीवपण दचकोनी ॥

अहं ममता कामक्रोध शांती । करीत येतसे रघुपती । वृथा वाढविली युक्ति । ऐसें संतीं न म्हणावें ॥ १०५ ॥

जाहाल्या अहं ममादि शांती । उजळे निजात्म चंद्र ज्योती । प्रकटली परमदीप्ती । तेहि स्थिती अवधारा ॥ १०६ ॥

समूळ आंधारे नुरेचि तेथ । उष्ण चांदिणें घोटी समस्त । तेज प्रगटलें अत्यद्भुत । सुखें डुलत श्रीराम ॥ १०७ ॥

एवं नानापरीचे त्याग । पदोपदीं जी अनेग । वोवाळीत जीवभाग । स्वयें श्रीरंग पैं आला ॥ १०८ ॥

कन्येचिया द्वारापासीं । एक भागीं सिद्धीदासी । शकुनालागीं श्रीरामासी । पूर्ण कळशेसी तिष्ठती ॥ १०९ ॥

दुसरे भागीं द्वाराप्रती । श्रद्धा कीर्ति धृती विरक्ति । जीवें ओवाळावया रघुपति । स्वयें तिष्ठती सर्वदा ॥ ११० ॥

एकीं त्याग दिधला निःशेष । एकी दिधला परम हर्ष । एकीं दिधलें अनंत [पै. संपादित पाठ; त 'सुखवास'; इतरत्र 'सुख'.] सुखास । एका अवश्यक निजवास ॥ १११ ॥

जीवभावाचिया [पै. सु. 'मुद्रा'.] मुदा । वोवाळुनि सांडी सुमेधा । सोहळा देखोनि सर्वदा । परमानंदा ते पावे ॥ ११२ ॥

द्वारीं प्रवेशला रघुनाथ । चौघां बंधूहि समवेत । अवघे जयजयकार करित । मंडपा आंत आणिलें ॥ ११३ ॥

छेदावया हृदयबंधु । गुरुवाक्येंसी रिघे बोधु । तैसें घेऊनि तिघे [सु. नि. गे. घा. खेरीज इतरत्र 'च्यार्‍ही'.] बंधु । राम प्रसिद्धु स्वयें आला ॥ ११४ ॥

दशेंद्रियें अति समर्थ । दशेंद्रियांसी अलिप्त । तोचि महाराज दशरथ । सोहळा समस्त त्याचेनि ॥ ११५ ॥

एका जनार्दना शरण । मंडपा श्रीराम आगमन । पुढां मधुपर्क विधान । श्रोतां सावधान परिसावें ॥ ११६ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां श्रीराममंडपाभिगमनं नाम चतुर्विंशतितमप्रसंगः ॥

संपादित प्रत श्लोक नाहीत; ओव्या ११६; इतर प्रतींत तं. त. खेरीज सर्वत्र ११६ ओव्या; तं. त. ११५.

अनुक्रमणिका

## प्रसंग पंचविसावा

## जानकी पाणिग्रहण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीराम मंडपा आंत । आला चहूं वरांसमवेत । जनकासी आल्हाद अद्भुत । आला दशरथ [मु. पाठ 'ऋषियुक्त'.] ऋषियोगें ॥ १ ॥

जनकें दिधला सन्मान । गाद्या पडगाद्या वरासन । मृदोलिया वोटंगण । ऋषि संपन्न सभेसी ॥ २ ॥

मधुपर्काचें विधिविधान । चाऱ्ही पुरुषार्थ चवाई जाण । त्यावरीं समाधी सुखासन । वरासन चौघांसीं ॥ ३ ॥

सदोदिता आवाहन । अधिष्ठानासी आसन । कर्मरहितासी आचमन । चरणक्षाळण आचरण्या ॥ ४ ॥

श्रीराम भूषणां भूषण । त्यासी अलंकार आभरण । निरावरणासी प्रावरण । सर्वगता आगमन वाहनादिकीं ॥ ५ ॥

सहजासी पाठी पोट । [गे. प्रतीत हा चरण नाही.] अखंडासी वस्ती [तं. 'पाट'.] पीठ । निःशब्दा [मु. 'शब्द स्पष्ट'.] शब्दपाठ । निरंतरा [नि. घा. 'अन्तःपट'; सु. 'अंतरपट'; तं. कं. 'अंतरपाट'; भा. /१ त. 'अंत्रपाट'.] अंत्रपट लग्नार्थ धरिती ॥ ६ ॥

श्रीराम परब्रह्म स्वतंत्र । तोहि धरी ब्रह्मसूत्र । वेदविधान आचार । श्रीरामचंद्र प्रतिपाळी ॥ ७ ॥

असो हा अगाध परमार्थ । जनकु आला मधुपर्कार्थ । त्याचा जाणोनि भावार्थ । श्रीरघुनाथ अंगीकारी ॥ ८ ॥

सर्व समता समसमान । तेचि श्रीरामासी आसन । आशा नैराश्यें अर्घ्यदान । तेणें श्रीचरण समर्थ जाले ॥ ९ ॥

पाद्यार्घ्यालागीं तीर्थ । त्रिगुण त्रिवेणी गुणातीत । चैतन्य-प्रवाहें पुनीत । यथोचित चिद्गंगा ॥ १० ॥

स्वयें सुमेधा घाली उदक । चरण प्रक्षाळी विदेह जनक । तळीं तीर्थें सकळिक । आली आवश्यक चरणतीर्था ॥ ११ ॥

श्रीरामाचें चरण-तीर्थ । सेवितां तीर्थें होती पुनीत । सुरनर सिद्ध आले तेथ । लग्नीं रघुनाथ पाहावया ॥ १२ ॥

सुमेधा शुद्ध निजजीवन । घातलें श्रीरामासी आचमन । चोविसां नाम न्यासीं रामपूर्ण । सर्वापोशन कर्माचें ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

परब्रह्मीचा अधिष्ठात्रा । त्यासीहि देती ब्रह्मसूत्रा । मान देतो वृद्धाचारा । श्रुतिव्यवहारा संरक्षी ॥ १४ ॥

टिळे माळा शुद्ध सुमन । चिद्रत्नादि दिव्य भूषण । भावें पूजिले [तु. सु. नि. घा. 'चौघांकारणें'.] चौघेजण । परिधान पितांबर ॥ १५ ॥

उदक घालितां मूळांत । शाखा पल्लव टवटवीत । तेवीं पूजिल्यां रघुनाथ । साळंकृत बंधू चाऱ्ही ॥ १६ ॥

रसस्वाद रसना घोटीं । तेणें इंद्रियां तुष्टी पुष्टी । श्रीराम पूजिलीया जगजेठी । बंधू त्रिपुटी सुपूज्य ॥ १७ ॥

मुख्यस्थानीं अग्नौकरण । तेणें सुखी [तं. 'पोये'; तु. 'थोर'; सु. नि. गे. घा. 'देव'.] येर ब्राह्मण । तेवीं पूजिल्या रघुनंदन । चौघेजण [या ओवीनंतर नि. घा. तु. या प्रतींत पुढील ओवी आली आहे :–– 'एका मनासी संबोधन । तेणें इंद्रियां समाधान । तैसें अधिष्ठान रघुनंदन । तेणें बंधु आपण संतुष्ट ॥'] सुपूज्य ॥ १८ ॥

दधी मधु एकत्रता । घातलें चौघांचियाहि हातां । विदेहाच्या निजभावार्था । रघुनाथा अतिप्रीति ॥ १९ ॥

विपरीत वेद विधान । निष्कर्मासी कर्मबंधन । दधी मधु प्राशी रघुनंदन । विस्मित जन सुर सिद्ध ॥ २० ॥

जनकु म्हणे 'प्रतिगृह्यतां' । प्रतिगृहणामि [त. 'रघुनाथ म्हणतां'; नि. घा. तु. 'म्हणविती रघुनाथा'; सु. तं. कं. भा. /१ 'म्हणे रघुनाथा'.] म्हणा रघुनाथा । विदेहें सांडिलियां अहंता । प्रतिगृह्यता सर्वांची ॥

संकल्प सांडिता नरेंद्र । दधी मधु सेवी श्रीरामचंद्र । सुमेधा घातले पैं नीर । प्रक्षाळी कर श्रीराम ॥ २२ ॥

सवेंची केलें शुद्धाचमन । सद्‌गुरु म्हणती सावधान । नाहीं विलंबु व्यवधान । वेगीं सुलग्न साधावें ॥ २३ ॥

श्रीरामपद रितें न पडे । पूर्णता [तु. 'पदरीं पाय मांडें'; तं. 'पायीं पाया पडे'; पै. भा. /१ सु. कं. 'पायीं पाय मांडे'.] पायीं पायीं मांडे । दोन्ही सद्‌गुरु दोन्हींकडे । वरू वाडेकोडें चालिला ॥ २४ ॥

गौरीहरी सीता सती । गौरीहरातें सिंपिती । शिवासी श्रीरामाची प्रीती । आला लग्नार्थी [मु. 'भवानेसी'.] शक्तीसीं ॥ २५ ॥

मुख्य माया अंत्रपटु । तिसी श्रीरामें सेवटु । जनक निजभाग्यें वरिष्ठु । सोयरा श्रेष्ठु श्रीराम ॥ २६ ॥

श्रीरामनामाचें [नि. घा. प्रतींत 'नित्य' हे अधिक पद आहे.] स्मरण । अंत्रपटा निवारण । त्यासीहि अंत्रपटु जाण । धरिती ब्राह्मण वेदार्थें ॥ २७ ॥

सुटावया देवांचें बंधन । मुख्य सीताच कारण । तिचें साधावया सुलग्न । रवि सावधान घडी राखे ॥ २८ ॥

घडी भरतां न लगे क्षण । म्हणती नित्य सावधान । सत्य सवेगें [तु. 'घडे'; सु. नि. गे. घा. 'चढें'.] झडे जीवन । नाहीं व्यवधान शब्दाचें ॥ २९ ॥

अनुक्रमणिका

सांडा चौघीची चावटी । महामौनीं पाडा मिठी । घटिका भरता हे उठाउठी । राहा निजदृष्टीं सावधान ॥ ३० ॥

अंत्रपटु आहे ज्यासी । आधीं सावध करा त्यासी । अक्षर निमिष श्वासोश्वासीं । घडी वेगेंसी भरता हे ॥ ३१ ॥

यालागीं नित्य सावधान । सद्‌गुरु म्हणताहे आपण । वचनीं नेदावें प्रतिवचन । सावधान निजरूपीं ॥ ३२ ॥

शब्दार्थे महामौन । धरी तो नित्य सावधान । ज्यांसी शब्दार्थि अभिमान । असावधान ते सदा ॥ ३३ ॥

आंगीं जाणिवेचें जाणपण । [तं. 'वचनीं नेदावें प्रतिवचन'; सु. नि. घा. 'वचना नवेदी प्रतिवचन'; कं. 'वचनीं नेदती प्रतिवचन'.] वचनीं देती प्रतिवचन । तेणेंचि वचनें त्या दूषण । सावधपण त्या नाहीं ॥ ३४ ॥

अति समयो संधि लग्न । उभयभागीं सावधान । अच्युत [त. तं. 'अच्युत चिंतनीं'; भा/१. कं. 'अच्युत चिंतें'; तु. सु. नि. घा. 'अच्युत चिंतनें'.] चित्तें राखा मन । अति सुलग्न स्वानंदें ॥ ३५ ॥

ॐ [कं. व मु. 'ॐ पुण्याहं'.] पुण्याहं हें वचन । पूर्णतेचें परिपूर्ण । त्या पूर्णता रघुनंदन । निजात्म लग्न स्वयें साधी ॥ ३६ ॥

ॐ पुण्याहं हे मुळींची गोठी । तेणें शब्द विरे प्रणवाच्या पोटीं । अंत्रपटु [तु. नि. घा. 'फिटला'.] सुटला उठाउठी । सीता गोरटी वरी राम ॥

नयनीं नयन जी संलग्न । एक जालें देखणेंपण । प्राणपति वरितां पूर्ण । प्राणें प्राण एक जाले ॥ ३८ ॥

वसिष्ठाच्या लग्नाक्षता । एकात्मता पंचभूतां । श्रीरामें वरिली सीता । एकात्मता निजलग्नीं ॥ ३९ ॥

एक आवेवीं [मु. प्रतीत 'एक' हे अधिक पद.] आवेव । एक जाले जीवभाव । एक जाले सीता राघव । लग्न अपूर्व [सु. घा. 'वरिष्ट'.] वसिष्ठें ॥ ४० ॥

सीतेचिये निजमाथां । श्रीराम घाली लग्नाक्षता । [भा/१. या प्रतीत शेवटचे दोन चरण पुढीलप्रमाणे आहेत :— 'तोचि हस्तक मस्तक तत्त्वता । पावे सीता स्वानंदें ॥'] तोचि [मु. 'तोचि हस्त पावे सीता'.] हस्तक मस्तक पावे सीता । सुखरूपता स्वानंदें ॥ ४१ ॥ [तं. प्रतीत ४१ व ४२ या दोन ओव्यांतील चरण मिळून पुढीलप्रमाणे एकच ओवी आली आहे :— 'सीतेचिया निजनाथा । श्रीराम घाली लग्नाक्षता । तोचि हस्तक पावे सीता । कर्तव्यता सलज्ज ॥']

श्रीरामाचे निजमाथां । अक्षता घालूं जातां सीता । सर्वभूतीं देखे रघुनाथा । कर्तव्यता सलज्ज ॥ ४२ ॥

पाणिग्रहणीं रघुनाथा । पावोनिया जी सर्वथा । क्रिया पारुषल्या समस्ता । निष्कर्मता श्रीरामें ॥ ४३ ॥

अर्धनारी नटेश्वरीं । जो पुरुष तोचि नारी । श्रीरामहि तैशाचि परी । सीता वरी निजात्मता ॥ ४४ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम स्वयें चैतन्यमूर्ति । सीता ते तंव चिच्छक्ति । लग्न लागलें एकात्मप्रीती । चतुरोक्ति चहूं ठाई ॥ ४५ ॥

सीता वरिला श्रीरामचंद्र । उर्मिला वरिला सौमित्र । मांडव्या वरिला भरत वीर । शत्रुघ्न शूर श्रुतिकीर्ति ॥ ४६ ॥

चौघी कन्या चौघे वर । लग्न लागलें सविस्तर । वोहरे शोभती मनोहर । जयजयकार प्रवर्तला ॥ ४७ ॥

ऋषि करिती जयजयकार । सुमनें वरुषति सुरवर । मंगळ तुरांचा गजर । नादें अंबर कोंदलें ॥ ४८ ॥

सुर दुंदुभी त्राहाटी । भेदी मृदंग किंकटी । नाद न समाय नभा पोटीं । निधा वैकुंठीं उठिला ॥ ४९ ॥

रंभा उर्वशी नाचणी । नाचती जनकाच्या रंगणीं । गंधर्व मधुर गाती गाणीं । वोवाळणीं दोहीं भागीं ॥ ५० ॥

असो हें जालें पाणिग्रहण । वोहरां बांधावया कांकण । वसिष्ठें येऊनि आपण । सूत्र प्रधान सूतवी ॥ ५१ ॥

गगन गर्भीचा सूक्ष्मतंतु । तोचि अष्टधा [तं 'वाढवितु'; मु 'वेढितु'.] वाढतु । स्थूळाभिमानें दृश्य होतु । मग तो तोडितु दो ठाई ॥ ५२ ॥

अखंड [तु. 'अखंडा अखंड'; तं. 'अखंडा दुखंड'; भा/१. नि. घा. 'अखंड खंड'.] दुखंड केलें जाण । घालुनि त्रिगुणाचें वळण । अर्ध स्त्रीनामें कांकण । अर्धे परिपूर्ण पुरुषत्वें ॥ ५३ ॥

फेडिली मायेचीं वधूवस्त्रें । श्रीराम मेचुनि अछिद्रें । अष्टपुत्र्या पीतांबरें । नेसलीं वोहरें स्वानंदें ॥ ५४ ॥

मायामळीन वधूवस्त्रासी । नेघे सत्यानंद उदासी । वसिष्ठ नेघे वरवस्त्रांसी । दोघे उदासी पुरोहित ॥ ५५ ॥

घ्यावया मायामळीन वासासी । कलह सलोभ गोत्रजांसी । विसरोनियां निजात्मतेसी । देह लोभेसीं भांडती ॥ ५६ ॥

कोट्यानुकोटी निजधना । जनकें दिधली वरदक्षणा । सौभाग्यद्रव्यें देतां वाणा । निंबलोणा उतरिती ॥ ५७ ॥

जीवीं जीवा पडिली मिठी । बाह्य पालवा दिधल्या गांठी । श्रीराम देखोनियां दृष्टी । उल्हास पोटीं जानकीचां ॥ ५८ ॥

विवाह-होम निज निर्धारीं । वोहरें आणा [मु. 'बोहल्यावरी'; कं. 'देव्हारी'.] वेदिकेवरीं । राम वेढिला नरनारीं । कडें नोवरी तुम्ही घ्यावी ॥ ५९ ॥

हासें आलें रघुनाथासी । विपरीत विधी लौकिकासी । वसिष्ठ म्हणे श्रीरामासी । वृद्धाचारासी प्रतिपाळीं ॥

६० ॥

स्वयें श्रीराम विचारी । माझी प्रकृति मज माझारीं । नेघतां बैसली कडियेवरी । मजहूनि दुरी हो नेणें ॥ ६१ ॥

न बैसतां बैसली कडिये । जीवभावें मज हे पढिये । नांवारूपाचें [तु. 'मज पढिये'; मु. 'मज मढिये'.] मढमढिये । उभऊनि गुढीये हे नांदे ॥ ६२ ॥

माझेनि शोभे हे रूपवंती । माझेनि इसी नित्यस्थिती । माझेनि इसी गमनगति । लाजो किती लौकिका ॥ ६३ ॥

तिसी न लावितां हात । नोवरी उचली रघुनाथ । अलिप्तपणें घेऊनि येत । तेणें विस्मित ऋषिसमूह ॥ ६४ ॥

चहूं [त. तु. सु. नि. घा. 'पुरुषार्थ'.] पुरुषां चाऱ्ही मुक्ति । तैसीच चाऱ्ही वोहरें शोभती । कडे घेतल्या कवणे रीतीं । तेहि स्थिती अवधारा ॥

सायुज्यता सीता सती । तिसी उचली रघुपती । उन्मिळा स्वरूपता शोभती । उचलली प्रीती सौमित्रें ॥ ६६ ॥

मांडवी स्वयें समीपता । भरतें उचलिली तत्त्वतां । श्रुतिकीर्ति सलोकता । होय उचलिता शत्रुघ्न ॥ ६७ ॥

एवं वोहरें आली वेदिके प्रति । सत्यानंदें विधिवेदोक्ति । केली विवाहहोम समाप्ती । द्विजा देती धनधान्यें ॥ ६८ ॥

जनकें केला अनुक्रम । येथें करावा चतुर्थ होम । चाऱ्ही दिवस संभ्रम । सोहळा परम करावा ॥ ६९ ॥

धेंडा नाचवावा येथ । ते पाहावया [मु. 'जन'.] बहुतें आर्तभूत । वचन नमनी रघुनाथ । भविष्यार्थ जाणोनि ॥ ७० ॥

धनुर्भंगाचा [त. तु. सु. नि. घा. 'अनुक्रम'.] आक्रम । क्रोधें पावेल फरशराम । दारुण होईल संग्राम । अति दुर्गम दुर्धर ॥ ७१ ॥

जमदग्नीचा क्रोधानळ । फरशरामाचा क्रोध [नि. तु. 'तुंबळ'.] प्रबळ । उभय क्रोधें [तु. नि. 'गर्व प्रबळ'.] भार्गव सबळ । नगरी तत्काळ जाळील ॥ ७२ ॥

प्रजा पीडती समस्त । हें श्रीरामाचें मनोगत । वसिष्ठ जाणे इत्थंभूत । आणिकहि हृद्गत रामाचें ॥ ७३ ॥

वऱ्हाडा होउनिया अधिक । पुढें [कं. घा. 'काय आहे अधिक'; कं. 'कार्य आहे अधिक'.] कार्य आहे आणिक । [मु. प्रतीत 'आणि' हे अधिक पद.] अयोध्ये जातांचि आवश्यक । जाणे एकाएक वनवासा ॥

अनुक्रमणिका

येथ जाहालें पाणिग्रहण । लंकेसी मारिल्या रावण । सीतेचें माझें होईल सुलग्न । सोहळा संपूर्ण युद्धाचा ॥ ७५ ॥

तेथ नाचेल रणधेंडा । वोवाळणी राक्षसमुंडा । पडतील अति उदंडा । बाण प्रचंडा समवेत ॥ ७६ ॥

[सु. नि. गे. घा. खेरीज इतरत्र 'जनक विवाह'.] जानकीविवाह अल्पसोहळा । सोडणें देवांची बंदीशाळा । तोडणें ग्रहांची शृंखळा । तो आगळा उत्साह ॥ ७७ ॥

श्रीरामाच्या निजभावासी । [तु. नि. 'वसिष्ठें जाणोनि सावकाशीं'; कं. पै. तं. भा/१. सु. 'वसिष्ठें जाणोनि सर्वांसी'.] वसिष्ठ जाणे सर्वस्वेसीं । तेणें सांगितलें जनकासी । वेगीं वोहरांसीं बोळवी ॥ ७८ ॥

श्रीराम नव्हे गा प्राकृत । याचें वचन ब्रह्मलिखित । जनकें मानुनि निश्चित । हर्षयुक्त बोळवी ॥ ७९ ॥

वधूवरांसी आंदणें । दिव्यालंकार भूषणें । नानापरीचीं आभरणें । बहु सुवर्णें गजपुष्टीं ॥ ८० ॥

अति सूक्ष्में [तु. 'दिव्यांबरें'; भा/१. क्षौमांबरें'; तं. सु. नि. घा. 'रोमाबरें'.] रामांबरें । पट्टकुलें पीतांबरें । अति मोलाचीं नानाकारें । वस्त्रें विचित्रें दिधलीं ॥ ८१ ॥

मुक्ताफळाच्या झल्लरी । दिधल्या रथांचिया हारी । गज गर्जती [मु. 'दळभारी'; पै. 'कळीवरें',] गजभारीं । साळंकारीं डुल्लत ॥ ८२ ॥

रत्नाळंकारीं मनोहर । अमित दिधलें असिवार । पदक कंठ्या दासी अपार । नवसरहार [त. 'अर्पिले'; भा/१. कं. 'कळीखे'; पै. 'कळीवरें'; तु. नि. घा. 'शोभती'.] मंडित ॥ ८३ ॥

जनकासी अति उल्हास । सेवा करावया श्रीरामास । मुगुट कुंडलांचे [तु. नि. 'घोंस'.] दास । दिधले बहुवस विश्वासी ॥ ८४ ॥

सुमेधा बोले भाववचन । अनन्यभावीं आम्ही [तु. सु. नि. घा. 'शरण'.] आपण । जीव श्रीरामा दिधला आंदण । बाह्याभरण कोण पाड ॥

जनक बोले हर्षयुक्त । देह गेह वित्त जीवित । केलें रामार्पण समस्त । जाण निश्चित सुमेधे ॥ ८६ ॥

ऐसें दोघे अति उल्हासीं । आंदण देऊनि वोहरांसी । जनक बोळवित रामासी । बहु मार्गासी स्वयें आला ॥ ८७ ॥

विश्वामित्रें स्वत्रें आपण । करुनि वसिष्ठासी नमन । दोघीं रायांसीं पुसोनि पूर्ण । करी गमन स्वाश्रमा ॥ ८८ ॥

राम लक्ष्मणादि चौघेजण । केलें साष्टांग नमन । ऋषीनें देऊन आशीर्वचन । करी गमन स्वाश्रमा ॥ ८९ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम म्हणे मिथिळीनाथा । येथुनि आपण राहावें आतां ।
वसिष्ठाचरणीं ठेविला माथा । होय पुसता विवाह्यासी ॥ ९० ॥

दशरथें अत्यंत सन्मान । करूनि दिधलें आज्ञापण । जनकें श्रीरामा आपण । घाली लोटांगण सद्भावें ॥ ९१ ॥

कुशध्वजा समवेत । आलिंगुनि चार्‍ही जामात । जनक अत्यंत हर्षित । निघे त्वरित निजनगरा ॥ ९२ ॥

करितां अयोध्यागमन । फरशरामाचें आगमन । ज्याचेनि विश्व कंपायमान । अति दारुण भयानक ॥ ९३ ॥

रामें श्रीरामा पडिपाड । रामें श्रीरामा युद्ध दृढ । रामें श्रीरामा प्रेम गोड । कथा कैवाड अवधारा ॥ ९४ ॥

एका जनार्दना शरण । जाहालें जानकीपाणिग्रहण । श्रीरामें राम समाधान । कथा गहन अवधारा ॥ ९५ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां जानकीपाणिग्रहणं नाम पंचविंशतितमप्रसंगः ॥

संपादित प्रत : श्लोक नाहीत, ओव्या ९५; इतर सर्व प्रतींत श्लोक नाहीत. ओवी संख्या अशी : नि. इं. सु. गे. ९५; घा. ९६; पै. कं. ९५; भा/१. तं. तु. त. ९४.

अनुक्रमणिका

## प्रसंग सव्विसावा

## श्रीपरशुराम एकात्म बोध

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

चौघी बहिणी सहित जाण । जाहालें जानकी पाणिग्रहण । जनकें केली बोळवण । सुख संपूर्ण दशरथासी ॥ १ ॥

चौघे पुत्र चौघी सुना । कीर्ति न समाय त्रिभुवना । एव्हडेनि आल्हादें जाणा । अयोध्या भुवना निघाला ॥ २ ॥

सन्नद्ध केला जी दळभार । महामदें गर्जती कुंजर । [मु. 'घंटा किंकिणी'.] घंटा घंटकी साळंकार । पताकी अंबर शोभत ॥ ३ ॥

घोडे नाचविती वीर । [पै. खेरीज इतरत्र 'जी जी मामा'; कं. 'ज्या ज्या मामा थीर थीर'.] जज्ञा ममा थीर थीर । तीचि पायीं असिवार । अति अरुवार नाचती ॥ ४ ॥

[तु. 'आढाऊ झेलिती सबळ धीर'; मु. 'अढाऊ झेली साबळ धर'.] अढाउ सेली साबळधर । [मु. 'कोयतेकार'.] कोंतेकार धनुर्धर । चालती पायांचे मोगर । [मु. 'अलगाइत पाणाइत'.] हर्षनिर्भर स्वानंदें ॥ ५ ॥

अलंगाईत बाणाईत । वोडणीं थैथकार देत । जेठी तळपत चंवकत । भाट गर्जत कैवारें ॥ ६ ॥ [मु. प्रतीत ही ओवी पुढीलप्रमाणे आली आहे :— 'वोढणिये थैकार देत । जेठिये तळपत चमकत । ऐसें सैन्य पुढें चालत । भाट गर्जत कैवारें ॥']

राजे मुगुटांचे वरिष्ठ । पाठीसी चालती घण दाट । [मु. 'अतिरथी'.] अतिरथांचा घडघडाट । सुख उद्भट दशरथा ॥ ७ ॥

राजा वसिष्ठ [नि. घा. 'सकळ जन'.] समसमान । समान रथीं [सु. 'समान मान'; तं. 'समान गमन'; नि. घा. तु. 'समसमान'; भा/१. प्रतीत आठवी ओवी पुढीलप्रमाणे आहे :— 'राजा वसिष्ठ समसमान । चालताती सुखसंपन्न । चतुरंग सैन्य वेष्टुन । पुढा अपशकुन देखती ॥'
तं.'प्रतीत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :— 'राजा वसिष्ठा समसमान । रथीं चालती सावधान । अवघे जण सुखसंपन्न । पुढें अपशकुन देखती ॥'
कं. 'सममान'.] समासन । चालताती सुखसंपन्न । पुढां अपशकुन देखती ॥ ८ ॥

सव्यें जाताती पैं चास । अपसव्यें जाती वायस । [पै. तं. त. कं. खेरीज इतरत्र 'मयुरें'.] मयूरपिलीं गाळीत पीस । सर्पमुंगस भांडती ॥ ९ ॥

भालु भुंकती सन्मुख । पक्षी करकरिती अग्निमुख । युद्ध होईल अचूक । थोर धुक धुक रायासी ॥ १० ॥

श्रीरामा शकुनापशकुन । दोन्हीं देखे समसमान । नाही भय कंपायमान । नित्य सावधान निर्भयत्वें ॥ ११ ॥

राजा सांगे वसिष्ठासी । अपशकुन कां होताती आम्हांसी । दिशा धुमधुमिती चौपासीं । शशी सूर्यासी प्रभा

अनुक्रमणिका

मंद ॥ १२ ॥

दिवसा [तं. 'रजनी'; त. 'रजनीचर'; तु. नि. 'ग्रहगण'.] गगनीं गगनस्थ । एक पूर्वे एक पश्चिमे [भा/१. 'अस्त'; तु. सु. नि. घा. 'जात'.] आंत । रविचंद्र परिधी करीत । अति उत्पातदायक ॥ १३ ॥

सन्मुख गगनाचां पोटीं । [तु 'दिशा अंधकारलिया सृष्टीं'; नि. 'अंधकारलिया दिठीं'.] दिग्दाहो दिसताहे दृष्टीं । वसिष्ठा तूं सर्वज्ञ सृष्टी । हे यथार्थ गोष्टी मज सांग ॥ १४ ॥ [भा. /१ प्रतीत ही ओवी नाही.]

राया जें जें चिन्हें दिसताती । [त. पै. खेरीज इतरत्र 'तेणें'.] तें दुस्तर विघ्नप्राप्ती । [नि. घा. 'परी' हे अधिक पद आहे.] आम्हां सवें [त. 'आहे रघुपति'.] चालती शांती । विघ्नें आम्हा प्रति प्राङ्मुख जाणा ॥ १५ ॥

अपशकुन पूर्वे जात्यासी । तेचि शकुन पश्चिमे जात्यासी । [पै. त. खेरीज इतरत्र 'तेवीं'.] तेजि भूतीं भगवद्भाव ज्यासी । विघ्नें त्यासी निजविजयो ॥

येऱ्हवी विघ्नाचें सूचक । युद्ध होईल ठाकठाक । विजयी होईल रघुटिळक । हें अवश्यक निजभावी ॥ १७ ॥

रामनामाच्या नामोक्ति । विघ्नें चरणा शरण [कं. पै. तं. त. खेरीज इतरत्र 'येती'.] होती । तो श्रीराम असतां सांघांती । विघ्नांचे प्राप्ती निजविजयो ॥

ऐसी दोघे बोलत बोली । तंव उठिली वाहूटळी । नभ व्यापिलें धुळी । [तं. 'संज्ञा मांडिली सैन्याची'; त. 'संज्ञा मोडिली सैन्याची'; भा/१. सु. घा. 'समूळ ढवळी सैन्याची'.] संज्ञा मोडली सैन्याची ॥ १९ ॥

लागतां त्या वायूची झडप । सप्तसागर सप्त द्वीप । तेणेंसी पृथ्वी अति सकंप । सुटे चळकंप मेरूसी ॥ २० ॥

त्यामाजी उठिली [तं. 'विटक'; त. तु. नि. घा. 'विकट'.] विटंक हाक । सैन्य मूर्च्छित पडे निःशेष । दशरथें घेतला धाक । राम निःशंक निजनिधडा ॥ २१ ॥

विद्युत्प्राय जटा शिरीं । सतेज फरश खांद्यावरी । धनुष्यबाण घेऊनि करीं । श्रीरामावरी चालिला ॥ २२ ॥

फरशरामातें देखोन । वसिष्ठें केलें पूजन । ते पूजा भार्गवें अंगीकारून । चालिला आपण रामावरी ॥ २३ ॥

अत्यंत पराक्रम देखोन । दशरथ जाला कंपायमान । घालुनिया लोटांगण । दीन वदन बोलतु ॥ २४ ॥

फरशरामा तुझी थोरी । तिनी सप्तकें पृथ्वी निःक्षत्री । करुनि दिधली [मु. 'द्विजकरीं'.] द्विजवरीं । शस्त्रतां करीं संन्यासिलें ॥ २५ ॥

तूं क्षत्रिया कंद [भा. /१ 'कंदकुदाळ'; तु 'कुंदकुदाळ'; त. 'कंदनकुदाळ'; तं. कं. 'कंदकुदाळ'; सु. घा. 'कंदनकाळ'; नि. 'कदनकाळ'.]

अनुक्रमणिका

कुंद्दळ । हें तुझिया ब्रिदांचें शील । श्री माझें केवळ बाळ । त्यावरी प्रबळ क्रोध न करी ॥ २६ ॥

तूं श्रीरामातें मारिसी । तेंचि मरण आम्हां सर्वांसी । एवढें करावया कदनासी । उचित तुम्हासी नव्हे स्वामी ॥ २७ ॥

मी पुत्रार्थी अति दीन । पुत्रभयें अति कृपण । मज द्यावें पुत्रदान । घाली लोटांगण नृपनाथ ॥ २८ ॥

ऐसें दशरथ भाषित । उपेक्षुनियां समस्त । जेथें होता रघुनाथ । भार्गव तेथ स्वयें आला ॥ २९ ॥

रामा श्रीराम जुंझारी । श्रीराम रामातें निवारी । रामा श्रीरामा प्रीती पुरी । ऐक्य करी नजबोध ॥ ३० ॥ [सु. प्रतीत ही ओवी नाही.]

त्या दोघांचा निजसंग्राम । सुरनर वीरां अति दुर्गम । युद्धीं पावोनि निजवर्म । उपरम नजबोधें ॥ ३१ ॥

देखोनियां रघुनंदन । भार्गव सोडी दारुण बाण । श्रीरामें सांडिले तोडून । क्रोधें परिपूर्ण जामदग्न ॥ ३२ ॥

फरशराम सोडी दिव्यास्त्रें । श्रीराम निवारी क्षणमात्रें । कोपें सोडिलीं निर्वाण शस्त्रें । तेहि रघुवीरें निवारिलीं ॥ ३३ ॥

रेणुकां दिधल्या भार्गवा हाती । दोन्हीं [सु. घा. 'अमोल्या आत्मशक्ति'.] आपल्या निजात्मशक्ति ।
सकळ शस्त्रांअस्त्राचां अंतीं । या निर्वाणार्थी सोडावया ॥ ३४ ॥

त्या काळी कराळी उभयशक्ति । [तु. नि. 'जाणोनीं राहिल्या रामा प्रति'.] सोडिल्या श्रीराम जयार्थी ।
तेहि वोवाळुनियां रघुपती । श्रीरामभात्याप्रती प्रवेशल्या ॥ ३५ ॥ [तं. प्रतीत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :— 'त्या काळी कराळी उभयता शक्ति । त्रैलोक्यातें ग्रासों शकती । त्या भार्गवें सोडिल्या क्रोधयुक्ति । त्या श्रीरामभात्या प्रति प्रवेशल्या ॥']

भार्गव म्हणे [भा. /१ सु. नि. 'नचले'.] नवल आतां । माझ्या शक्ति याव्या माझ्या हातां ।
त्या प्रवेशल्या श्रीरामभातां । साह्य रघुनाथा त्या जाल्या ॥ ३६ ॥

माझ्या निर्वाण निजशक्ति । जाऊनि राहिल्या श्रीरामाप्रति । हें आश्चर्य [कं. भा. /१ 'हें आश्चर्य मानोनी चित्तीं'.] चित्तीं । छळणें वचनोक्ति बोलत ॥ ३७ ॥

जें जें शस्त्रें म्यां प्रेरिलीं । तें तें त्वां स्वयें निवारिलीं । परी आपली नाहीं [मु. 'सोडिली'] मोकलीलीं । हे उणीव आली श्रीरामा ॥

जाणसी शस्त्रांचे निवारण । परी नेणसी शस्त्रांचें प्रेरण । हें तुझें उणेपण । शौर्य संपूर्ण तुज नाहीं ॥ ३९ ॥

ऐकोनि फरशरामवचन । श्रीरामें केलें नमन । [मु. 'ब्राह्मणापुढें उणेपण सर्वथा'; भा. /१ तु. 'ब्राह्मणा प्रति उणेपण सर्वथा'.] ब्राह्मणांप्रति उणेपण । सर्वदा जाण आम्हांसी ॥ ४० ॥

अनुक्रमणिका

लक्ष्मणोक्ति :

भो ब्रह्मन् भवता समं न घटते संग्रामवार्ताऽपि नः । सर्वे हीनबला वयं बलवतां यूयं स्थिता मूर्धनि ॥ १ ॥ [श्लोक १ व २ व ओव्या ४१ व ४२ पै. भा/१. तु. त. प्रतींतच आढळतात.]

यस्मादेकगुणं शरासनवरं सुव्यक्तमूर्तिर्भृतामस्माकं भवतां पुनर्नवगुणं यज्ञोपवीतं वलम् ॥ २ ॥ [सुभाषित.]

**भार्गवासी म्हणे लक्ष्मण । आम्हासी चापबळ एक गुण । तुम्हासी यज्ञोपवीत नवगुण । त्यापुढें दीन सर्वदा आम्ही ॥**

**यज्ञोपवीत नवगुणीं । ब्राह्मण तुम्ही मूर्द्धास्थानीं । तुम्हासी युद्ध न घटे स्वप्नीं । शस्त्र ब्राह्मणीं नपलवें ॥ ४२ ॥**

रामोक्ति :

अयं कण्ठः कुठारस्ते कुरु राम यथोचितम् । निहंतुं हंत गोविप्रान्न शूरा राघवा वयम् ॥ ३ ॥ [सुभाषित.]

**भार्गवा परशु तुझ्या हातीं । म्या कंठ वोपिला तुजप्रती । जें करणें असेल तुझां चित्तीं । तें त्वां निश्चितीं करावें ॥ ४३ ॥**

**गाई-ब्राह्मणा करावया घात । स्वप्नींहि नुपजे मनोरथ ।**
**त्यावरी सशस्त्र उचली हात । ऐसा सूर्यवंशा आंत** [त. 'वीर'.] **शूर नाहीं ॥ ४४ ॥**

**गाई आणि ब्राह्मणांपुढें । आमचें शौर्य नित्य बापुडें । तुझे निवारावया कुऱ्हाडे ।** [तं. भा. /१ सु. 'धनुष्य पुढें'; तु. नि. घा. 'धनुष्यबाण पुढे'; कं. 'धनुष्य पुढारे'.] **धनुष्य मुढें म्यां धरिलें ॥ ४५ ॥**

**आइकोनिया श्रीरामवचन । फरशराम हास्यवदन । परिसोनि हरचापभंजन ।** [मु. 'तुज ठाकुनी जाण मी आलों'.] **तुज ठाकून मी आलों ॥ ४६ ॥**

**असो युद्धाची आटाटी । सांडिली शस्त्र धरावयाची गोष्टी । विष्णुचाप आहे माझे मुष्टीं । तें तूं जगजेठी सज्जी पां ॥**

**जरी तूं हें सज्जिसी संपूर्ण । तरी त्वां मज जिंतिलें जाण । श्रीराम म्हणे हें भाषण ।** [सु. घा. 'सर्वथा जाण न करवे'; पै. 'समदूषण'.] **मज दूषण द्विजविजयी ॥ ४८ ॥**

**तूं अगाध ब्राह्मण ब्रह्मचारी । पितृसेवेची परम थोरी ।**
**तुझी आज्ञा वंद्य शिरीं । विष्णुचाप करीं धरिता जाला ॥ ४९ ॥**

**श्रीराम म्हणे भार्गवरामा । तुझेनी तीर्थें प्रताप आम्हा । तेणें प्रतापें द्विजोत्तमा । धनुर्धर्मा सज्ञीन ॥ ५० ॥**
**शिवचापापरीस भारी । वैष्णव चापाची पैं थोरी । श्रीरामें धरूनि करीं । क्षणामाझारीं सज्रिलें ॥ ५१ ॥**

अनुक्रमणिका

भार्गवाचे दृष्टी पुढां । श्रीरामें सज्जिला वैष्णव मेढा । ठाण मांडुनि निधडा । बाण [तं. 'वेगाढा जोडिला'; पै. त. तु. कं. खेरीज इतरत्र 'गाढा जोडिला'.] वेगाढा जोडिला ॥ ५२ ॥

जैसा अंतका अंतकु । समूळ कळिकाळा घातकु । देखोनि भार्गवें घेतला धाकु । अलौकिक श्रीरामु ॥ ५३ ॥

श्रीरामाच्या प्रताप प्रौढी । तेजें भार्गवा पडे झांपडी । धनुष्य वोढितां कानाडी । चाप कडाडी वैष्णव ॥ ५४ ॥

फरशरामा अति तांतडी । लाग वेगें घालुनि उडी । श्रीराम धरिला लवडसवडी । चाप न मोडी वैष्णव ॥ ५५ ॥

शिवचाप मोडिलें क्षणामाझारीं । तैसे वैष्णवचाप न करी । तुझ्या पराक्रमाची थोरी । चराचरीं अतुळित ॥ ५६ ॥

तुझें बळ अति अद्भुत । कळिकाळ तुझे नित्यांकित । तूं अवतार श्रीरघुनाथ । मज निश्चित मानलें ॥ ५७ ॥

मी तुज करूं आलों छळ । तुझें पाहतां स्वभावशीळ । [मु. 'माझी निमली खळबळ'.] माझें निमालें छळबळ । तूं केवळ परमात्मा ॥ ५८ ॥

ऐसें बोलोनि आपण । प्रेमें दिधलें आलिंगण । दोघां जालें समाधान । मुळीची खूण [पै. खेरीज इतरत्र 'पावोनी'.] जाणोनि ॥ ५९ ॥

श्रीरामें रामा समाधान । श्रीरामें राम सुखसंपन्न । श्रीरामें रामा आनंद पूर्ण । चैतन्यघन रामें राम ॥ ६० ॥

रामें रामा अति आल्हाद । रामें रामा परमानंद । रामें रामा निजात्मबोध । जाला अभेद रामें राम ॥ ६१ ॥

मी एक राम दाशरथी । हें नाठवे श्रीरामाप्रति । मी एक भार्गव भृगुपति । नाठवे चित्तीं फरशुरामा ॥ ६२ ॥

ऐसें पडिलें आलिंगण । निघोट कोंदलें चैतन्य घन । खुंटला बोल तुटलें मौन । जालें परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ६३ ॥

अवतार कृतकार्यार्थ । साधावया श्रीराम सावचित्त । भार्गवातें श्रीरघुनाथ । उद्बोधित निजबोधें ॥ ६४ ॥

तो जंव होय सावधान । सावध करितां रघुनंदन । देखोनि विस्मय संपूर्ण । शिरोरत्न श्रीराम ॥ ६५ ॥

कर्मीं ब्रह्मस्थिती समान । श्रीरामावतार शिरोरत्न । भार्गवें जाणोनि संपूर्ण । सुखसंपन्न श्रीरामें ॥ ६६ ॥

श्रीराम म्हणे अमोघ बाण । धनुषीं करविला आरोपण । मार्गे काढिता नये जाण । कोठें प्रेरण करूं स्वामी ॥ ६७ ॥

अनुक्रमणिका

ऐसें पुसतां रघुनाथ । फरशुराम अति विस्मित । बाणाचें लक्ष्य सावचित्त । विचारित अनुलक्षी ॥ ६८ ॥

श्रीरामाचा निज शर । अतिशयें अति दुर्धर । तेणें निपटी माझें गत्यंतर । ऐसें फरशधर सांगत ॥ ६९ ॥

श्रीरामाचा निजबाण । जेथ पडेल तेथ करील कदन । येणें निवटावा माझा अभिमान । गमनागमन मग कैचें ॥ ७० ॥

मीं तपस्वी अति श्रेष्ठ । तपें जिंतिले लोक वरिष्ठ । ते [कं. व मु. 'लोकांतराची'.] लोकलोकांतराची वाट । करी सपाट येणें बाणें ॥ ७१ ॥

मी वीर धीर महाशूर । रणांगणीं अति दुर्धर । शत्रुनिर्दळणीं एकांगवीर । हाही अहंकार निर्दाळी ॥ ७२ ॥

माझा निर्दाळिया अहंकार । कैंचे लोक लोकांतर । सहजे खुंटलें गत्यंतर । हें करी साचार श्रीरामा ॥ ७३ ॥

जुंझार बाह्य शत्रू संहारी । श्रीराम निवटी अंतर्वैरी । अहं ममता जीवेसीं मारी । धनुर्धारी श्रीराम ॥ ७४ ॥

श्रीरामाचें अनुसंधान । वीरां शूरां न कळे जाण । शिवचापधारी आपण । त्यासीही संपूर्ण लक्षेना ॥ ७५ ॥

अहंकारातें छेदितां । आणिक नाहीं रघुनाथा । येणें बाणें तुवां आतां । अहंममता छेदावी ॥ ७६ ॥

म्यां कश्यपासी पृथ्वी दिधली दान । तेथें मी वसेन निराभिमान ।
लोक लोकांतरानें अभिमान । त्याचें छेदन करी रामा ॥ ७७ ॥

निराभिमानें वसतां क्षितीं । दोष नाहीं गा रघुपती । लोकलोकांतरा गती । माझी निश्चिती निर्दळी ॥ ७८ ॥

ऐसें बोलिला फरशराम । तेंचि करूं पाहे राम । कैसें आश्चर्य केलें परम । गत्यंतराचें वर्म श्रीराम छेदी ॥ ७९ ॥

अलक्ष लक्षूनि श्रीरामचंद्रें । बाण वोढुनी निज निर्धारें । अर्ध मात्रा अर्धचंद्रशरें । अहं रघुवीरें निवटिलें ॥ ८० ॥

जेव्हां गुण वाईला विष्णुचापासी । तेव्हांचि बोळवण अहंकारासी ।
मागुता येईल भार्गवापासी । तो अर्द्धमात्रेसी निर्दळिला ॥ ८१ ॥

निवटितां अहंकार । कैचें लोकलोकांतर । कैचें गती-गत्यंतर । केला स्वस्थी फरशराम ॥ ८२ ॥

यापरी श्रीरामचंद्र । सोडुनियां निज शर । सुखी केला फरशधर । स्वर्गादि गत्यंतर खुंटुनि ॥ ८३ ॥
[पै. खेरीज इतरत्र 'कथांतरीं'.] ग्रंथांतरीं निरूपण । भार्गवाचें स्वर्गगमन । श्रीरामें खुंटिलें आपण । विंधोनि बाण क्षणमात्रें ॥ ८४ ॥

अनुक्रमणिका

श्रीरामें स्वर्गवाटेसीं । काय कूड घातला बाणेसीं । कीं भिंती घालुनि चौपासीं । मार्ग गतीसी खुंटिले ॥ ८५ ॥

ऐसी पाहातां सूक्ष्म गती । ग्रंथींची न कळे अंतरवृत्ती । बाह्य लौकिक पंडित युक्ति । रामें स्वर्गगती खुंटिली ॥ ८६ ॥

बाणें खुंटे स्वर्गगति । हे लौकिक कथावदंती । अहं निवटुनी रघुपती । लोकांतरगती खुंटिली ॥ ८७ ॥

ज्यासी अनुलक्षी रामचंद्र । त्याचा गळे अहंकार । सहजे खुंटे गत्यंतर । यापरी रघुवीर स्वर्गगती खुंटी ॥ ८८ ॥

श्रीरामें ऐसिया गती । फरशरामाची स्वर्गगति । खुंटली यथार्थ स्थिती । हें ग्रंथार्थी निजगुह्य ॥ ८९ ॥

श्रीरामें जिंतिला फरशधर । गगनीं सुरवरांचा गजर । भूतळीं गर्जती ऋषेश्वर । विजयी रघुवीर निजात्मवीर्यें ॥ ९० ॥

शिवचाप विष्णुचाप । दोहीं चापांचा दुर्धर दर्प । राघवें केला निर्वीर्यरूप । श्रीराम-प्रताप निजविजयी ॥ ९१ ॥

श्रीराम परशरामाचें विक्रीडित । ब्रह्मादि देव विमानस्थ । कौतुक पाहों आले समस्त । दोघे अत्यद्भुत महावीर ॥

ते देव गर्जती अंबरीं । श्रीराम विजयी निज निर्धारी । वर्षती सुमनांचा [कं. त. तु. सु. नि. घा. खेरीज इतरत्र 'शरधारी'.] संभारी । ऋषि जयजयकारीं गर्जती ॥ ९३ ॥

राम म्हणे श्रीरघुनाथा । त्वां मज जिंतिलें तत्त्वतां । मज लाज नाहीं सर्वथा । अधिक श्लाघ्यता मज तुझेनी ॥ ९४ ॥

जेवी गुळ गोडी द्विविधा नाम । परी स्वरूपीं नाहीं द्विधा धर्म । तेवीं मी राम तूं आत्माराम । लज्ञा परम कोणाची ॥

देह लाजेना अवयवा । रूप लाजेना देहभावा । तेवीं मज तुज राघवा । लाजेचा हेवा असेना ॥ ९६ ॥

ऐसें बोलोनि तत्त्वतां । मग म्हणे गा रघुनाथा । धर्मरक्षण तुझे माथां । लोकपाळणतां त्वां कीजे ॥ ९७ ॥

होता जमदग्नीचा कोप । आणि आपला निजसाटोप । तो श्रीरामीं केला निक्षेप । जाला सुखरूप फरशराम ॥ ९८ ॥

श्रीराम लागला रामचरणा । रामें श्रीरामा केली प्रदक्षणा ।
रामनामें गर्जोनि जाणा । गेला स्वस्थाना फरशराम ॥ ९९ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम विजयी अलौकिक । वसिष्ठासी आल्हाद अधिक ।
तेणें आळंगिला रघुटिळक । गेली धुकधुक दशरथाची ॥ १०० ॥

श्रीरामें वसिष्ठासी लोटांगण । दशरथासी साष्टांग नमन । येरें दिधलें आळिंगण । निवालें मन रायाचें ॥ १०१ ॥

विजयी जाला श्रीरामचंद्र । ऋषि रायासी आल्हाद थोर । अवघे करिती जयजयकार । चालिले भार स्वानंदें ॥

एका जनार्दना शरण । जाली परशराम बोळवण । आतां अयोध्या-प्रवेशन । स्वानंद नमन श्रीरामा ॥ १०३ ॥

इति श्रीभावार्थरामायणे बालकांडे एकाकारटीकायां श्रीरामफरशुरामनिजविजयो नाम षड्विंशतिप्रसंगः ॥

संपादित प्रत : श्लोक ३, ओव्या १०३. इतर प्रतींत : नि. घा. १,१०१; सु. १,१००; भा. /१, १,१००; कं. १,१०१; त. ३,१०७; तु. ३,१०२; त. ३,१०३; पै. ३,१०३.

अनुक्रमणिका

## प्रसंग सत्ताविसावा

## श्रीरामजानकी अयोध्या प्रवेश

### ॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

गते रामे प्रशांतात्मा रामो दाशरथिर्धनुः । वरूणायाप्रमेयाय ददौ हस्ते महायशाः ॥ १ ॥ [मु. प्रतीत हा श्लोक नाही. वाल्मीकिरामायण, बालकांड सर्ग ७७, श्लोक २.]

**फरशराम गेला स्वस्थाना । स्वस्थ दशरथाच्या मना । आनंद वाढला चौगुणा ।** [मु. 'रघुनाथ जाणा';] **रघुनंदना निज विजयी ॥ १ ॥**

**सांडुनि वैष्णव चापासी । भार्गव गेला आश्रमासी । धनुष्य राहिलें रामापासी । तेणें वरुणासी तें दिधलें ॥ २ ॥**

**मी आपल्या निजात्मशक्ति ।** [तं. भा. 'रणीं जिणे' न. तु. 'रणीं जिणोनी'; सु. नि. गे. घा. 'रणीं जिंकोनी'; कं. 'रणीं जिंकिन'.] **रणीं न जिणें राक्षसपंक्ति । वैष्णवचाप असतां हातीं । लोक म्हणती धनुर्बळें ॥ ३ ॥**

**माझ्या यशाची निज पुष्टी । अवघी जाईल धनुष्यासाठीं । यालागी ते उठाउठीं । राम जगजेठी स्वयें त्यागी ॥ ४ ॥**

[नि. 'स्वसामर्थ्य नाहीं ज्यासी'.] **स्वयें सामर्थ्य नाहीं शूरासी । धनुष्यें यश केवी होय त्यासी ।**
**यालागी श्रीराम नव्हे अभिलाषी । वरुणापासीं दिधलें ॥ ५ ॥**

**अयोध्या प्रवेशा सत्वर । उल्लास करी नृपवर । आनंद गर्जती गजभार । सैन्यसंभार आल्हादी ॥ ६ ॥**

**निशाण भेरी मृदंग शंख । ढोल** [कं. तु. नि 'डौल चौडकी'; मु. घा. 'ढोल ढौर'; भा. 'ढोल ढोडकी'.] **शेंडकी काहाळानेक । जयजयकारीं सकळिक । नगरोन्मुख निघाले ॥ ७ ॥**

**ऋषि पढती शांती पाठ । बरदें गर्जताती भाट । सिंहनाद करिती** [त. 'करिती वाट'; तु. 'सिंहनादें गर्जती वाट'; मु. 'करिती वीर घाट'.] **बांट । घडघडाट रथांचा ॥ ८ ॥**

**वसिष्ठें दूत धाडिले पुढें । नगर** [तु. सु. नि. घा. 'वाडे कोडे'.] **शृंगारावें कोडें । रंगमाळा कुंकुम सडे । मखरें** [मुद्रित, 'तोरणें'.] **जोडे ठाईं ठाईं ॥ ९ ॥**

**गुढिया उभविलिया घरोघरीं । पताका झळकती अंबरीं । दिव्यभूषणीं दिव्यांबरीं । नरनारी शोभती ॥ १० ॥**

**कुंकुम केशर सुमनमाळा । कंठीं पदकें रत्नमेखळा ।** [तं 'नवरस हारगळा'; भा. कं. 'नवरत्नहारगळा'; तु. नि. घा. 'नवरत्नहार रुळे गळा'.] **नवसर हार गळां । जनलीला शोभत ॥ ११ ॥**

पूर्ण कलश दारोदारीं । दधी दूर्वा सुमनें [भा. तु. त. कं. 'त्यावरी'; तं. 'त्या पात्रावरी'; सु. नि. घा. 'त्या भीतरीं'.] त्यावरी पात्रीं । [तु. नि. 'प्रदीप्त ठेविलें हारीं'.] उभय दीप द्वारांतरीं । घरोघरीं आल्हाद ॥ १२ ॥

राजगृहीं अति उत्सव । [भा. सु. नि. गे. घा. 'गुढिया तोरणें उभविती पाहों'; तु. 'नगरी न समाये उच्छावो'.] नगरीं न समाय महोत्सव । विजयी जाला श्रीरामराव । आजानुबाहो प्रतापी ॥ १३ ॥

श्रीरामें शिवचाप भंगूनि । फरशरामातें [पै. त. 'गांजूनि'; तु. 'जिंतोनि'; भा. कं. 'गांजूनी'; नि. घा. 'जिंकोनी'; सु. 'गांजोनि'.] जिणुनि । सीता आणिली परणुनि । जनवदनीं हेचि वार्ता ॥ १४ ॥

एक म्हणती गुरुचां यागीं । राक्षस मारिले रणभंगीं । सुबाहु छेदिला अष्टांगीं । मरीची लागीं [भा. सु. नि. घा. 'केलें'; तु. 'घायवार'.] घायवारें ॥ १५ ॥

आणिक म्हणती दुष्ट ताटका । नित्य [त. 'पीडी सर्व लोकां'; सु. नि. घा. 'पिडीतसे लोकां अनेकां'; तु. 'पिडी लोकां अनेकां'; तं. भा. कं. 'पिडी लोका लोकां'.] पीडी लोकां लोकां । श्रीराम देखतांचि देखा । बाणें एका निवटिली ॥ १६ ॥

एक म्हणती श्रीरामलीळा । चरणोद्धारी अहिल्याशिळा । श्रीराम परब्रह्मपुतळा । [कं. तु. नि. घा. 'सच्चित्कळा साचार'; भा. सु. 'सच्चितकळा साकार'.] सच्चिदानंद कळा साकार ॥ १७ ॥

साकार आणि निराकार । स्वयें श्रीराम चिन्मात्र । धन्य धन्य त्याचे नेत्र । श्रीरामवक्तृ देखती ॥ १८ ॥

देखतां श्रीराममुख । निःशेष जाय तहानभूक । परमानंदें कोंधाटे सुख । हरिखे हरीख वोसंडे ॥ १९ ॥

ऐसी श्रीरामाची कीर्ति । घरोघरीं अनुवादती । आला आईकोनि रघुपती । सामोरे येती नगरस्थ ॥ २० ॥

छत्रचामरें गजभारें । वाजती नानाविध तुरे । शोभायमान चाऱ्ही वोहरे । आला गजरें रघुनाथ ॥ २१ ॥

चाऱ्ही पुत्रांच्या चाऱ्ही सुना । देखतां धणी नुपरे मना । पाहतां पारणें होय नयना । भाग्य भावना दशरथा ॥ २२ ॥

[तं. 'श्रावणपितरांचा शाप'; तु. नि. घा. 'श्रावणपितयाचा शाप'; पै. भा. त. सु. 'श्रावण ब्राह्मणाचा'.] श्रावणपितरांचा शाप । दशरथासी सुखरूप । पुत्र पावला सद्रूप । चित्स्वरूप श्रीरामु ॥ २३ ॥

जैसा मातेचा निजकोप । वरी वरी कठीण आंत सुखरूप । तैसाचि ब्राह्मणाचा शाप । शापें निष्पाप [नि. घा. 'सुख देत'.] सुख दाते ॥ २४ ॥

श्रावणपितरांच्या शापासाठीं । दशरथा श्रीरामीं भेटी । भोगीत आनंदाच्या कोटी । सभाग्य सृष्टीं दशरथ ॥ २५ ॥

नगर प्रवेश रघुपती । चाऱ्ही मुक्ति पुढें नाचती । पायघडियाचिये गती । पायीं लोळती पुरुषार्थ ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

अनुहाताच्या [कं. भा. 'समती'; नि. घा. 'संगती'.] संमती । नानाविध तुरे वाजती । नादें कोंधाटे चिच्छक्ति । नभ स्थिति चिन्मात्रें ॥ २७ ॥

श्रीराम पाहावया [पै. संपादित पाठ इतरत्र 'प्रेम पडी भरी'.] पडिभरी । एकें चढलीं गो गोपुरीं । एके चढलीं परेची उपरी । एके जनाभीतरीं राम पाहाती ॥

एकें सलज्जे एकांतीं । गवाक्षद्वारें राम पाहती । एके एकांतीं धरूनि हातीं । राम दाविती अनुलक्षें ॥ २९ ॥

हा नव्हे तो नव्हे पैल तो तो । ऐसें देखणें दाखवितो । तोचि अनुभवो एका होतो । पाहाणें पाहावितो श्रीराम ॥ ३० ॥

एक चढोनि जीवाचे माथां । सादरें पाहती रघुनाथा । एक सांडुनि जीविता । श्रीरघुनाथा भेटती ॥ ३१ ॥

नावडे जीव शिवा सांघात । एकाकी एकपणा आंत । परिपूर्ण पाहाती रघुनाथ । आल्हादयुक्त स्वानंदें ॥ ३२ ॥

एक प्रेमाचेनि पडिपाडें । आनंदें नाचती श्रीरामापुढें । एक ते अत्यंत निधडे । पाहाती चहूंकडे श्रीराम ॥ ३३ ॥ [सु. घा. प्रतींत ही ओवी पुढीलप्रमाणे आली आहे :—'एक प्रेमाचेनी पडीभरें । श्रीराम पाहती आदरें । आनंदें नाचती गजरें । जयजयकारें गर्जती ॥']

एकातें श्रीराम सांघाती । एकासी श्रीरामें नित्यगती । एक श्रीरामाच्या स्थिती । स्वयें वर्तती सर्वदा ॥ ३४ ॥

एक [मु. 'निःसंग'.] निशंक निश्चिंती । लोकांची ये लोकस्थिती । स्वयें श्रीराम पाहाती । आशंका वृत्ति त्या नाहीं ॥ ३५ ॥

एकाची नवल नवाई । गजबजेसी बिहिणें नाहीं । श्रीराम पाहाती ठाईंच्या ठाईं । आडवे कांहीं येवो न शके ॥ ३६ ॥

ऐसीया लोकांचिया पंक्ति । श्रीरामासी पाहों येती । मुडुप घसणी जनासी होती । श्रीराममूर्ति पाहावया ॥ ३७ ॥

पायघडिया [मु. 'पद वाहाणें'; कं. पै. तं. 'पदसोवाणें'.] पदरावणें । दीपावळी निरांजनें । वोवाळिती धनधान्यें । [मु. 'राम पहावया उल्हास जनासीं'.] रघुनंदनें उल्हासु ॥ ३८ ॥

श्रीराम जातां निजगजरीं । पाहों न येती अग्निहोत्री । पाहतां विटाळू होईल भारी । तंव श्रीराम दूरी अंतरला ॥ ३९ ॥

श्रौती स्वयंपाकी प्रबळ । श्रीराम पाहतां होईल विटाळ । आधणी घाटाव्या तांदूळ । चाटू तत्काळ विसरले ॥ ४० ॥

अनुक्रमणिका

ऐसिया विटाळाचां परी । श्रीराम [तु. नि. घा. 'दुरीच्या दुरीं'.] अंतरला दूरी । धुपधुपित पाकावरी । कर्माहंकारीं विगुंतलें ॥ ४१ ॥

आम्ही उत्तम आश्रमासी । श्रीराम जातो जनपदेसी ।
पाहतां स्पर्श होईल आम्हासी । दुरूनि संन्यासी पाहों म्हणती ॥ ४२ ॥

विटाळाभेणें दुरी [सु. नि. घा. 'दुरुनी पाहतां'; कं. पै. तं. त. भा. संपादित पाठ.] राहातां । श्रीराम न दिसे सर्वथा । आश्रमाभिमानें पाहों जातां । श्रीराम तत्त्वतां लक्षेना ॥ ४३ ॥

अनुलक्षुनिया श्रीरामासी । पिंगळा वेश्या धावे उल्हासीं । मार्गीं झगट जाला संन्याश्यासी । हे लक्ष तिसी असेना ॥

मज कां हे आतळली रांड । रागें संन्यासी ठोकी दंड । येरी पाहतां श्रीरामाचें तोंड । दंडें उदंड सुखी जाली ॥ ४५

स्वामी तुमचां दंडाचा घावो । तेणें दंडिला माझा अहंभावो ।
तो [नि. घा. प्रतींत हे पद नाही.] दंड दंडिना तुम्हासी पाहो । पाहतां श्रीरामरावो विटाळ देखा ॥ ४६ ॥

श्रीराम पाहतां विटाळ उडे । तो विटाळ संन्याशामाजीं दडे ।
म्हणोनि विटाळाचें सांकडें । संन्याशाकडे सर्वदा ॥ ४७ ॥ [तु. घा. प्रतींत या ओवीनंतर पुढील ओवी आली आहे :—'श्रीराम पाहतां विकल्प विटाळ । भक्तभावीं न राहे तीळ । तो सद्‌गंध संन्याशामाजीं सळ । आश्रमीं केवळ राहिला ॥']

मी आत्मा सर्वभूतीं संपूर्ण । ऐसें भूतां देऊनि अभयदान । स्वयें केलें संन्यासग्रहण । तोचि आपण विटाळ देखे ॥ ४८ ॥

श्रोती स्वयंपाकी संन्यासी । हे निज माहेर विटाळासी । त्यामाजीं तो सदा मुसमुसी । देखे जगासी अपवित्र ॥ ४९ ॥

ऐसी वेवादतां वेश्या संन्यासी । श्रीराम गेला स्वाश्रमासी ।
संन्यासी करितां मृत्तिकास्नानासी । आली हातासी मृत्तिका ॥ ५० ॥

मी पवित्र जग अपवित्र । हें स्वयंपाकाचें मुख्यसूत्र । तेणें विटाळे [कं. तं. व मु. प्रतींत हे पद नाही.] मुख्य रामचंद्र । दूरी दुरंतर अंतरला ॥ ५१ ॥

वर्णाभिमान आश्रमाभिमान । कर्माभिमान धर्माभिमान । न [तं व मु. 'न वंचितां'.] वचता सर्वाभिमान । रघुनंदन न भेटे ॥ ५२ ॥

ऐशा बोलतां सद्‌युक्तीसी । पिंगळा वेश्या कोण म्हणसी । जे अवधूतें चोविसावां गुरुसीं । यदूपासी

अनुक्रमणिका

सांगितली ॥

श्रीराम पावला राजभुवन । शांती येऊनि आपण । जीवभावाचें निंबलोण । सांडी वोवाळून वोहरासी ॥ ५४ ॥

चाऱ्ही पुत्र सुना चाऱ्ही । वसिष्ठें धरुनियां करीं । प्रवेशल्या राजमंदिरीं । उल्हास भारी राणिवसां ॥ ५५ ॥

वाजती मधुरें मंगळ तुरें । द्विज गर्जती जयजयकारें । वोहरे देखोनि मनोहरें । राण्या आदरें पाहों आल्या ॥ ५६ ॥

पहिलें कौसल्येसी नमन । चाऱ्ही सुना अंकीं [मु. 'वाहन'.] वाउन । [मु. 'फरां कंकण पदक भूषण'.] फरा पदकहारभूषण । दे आपण स्वानंदें ॥ ५७ ॥

लागतां सुमित्रेच्या चरणा । हरिखे आळंगी चाऱ्ही सुना । कटी मेखळा कर कंकणा । दे आपण स्वानंदें ॥ ५८ ॥

कैकयीसी करितां नमन । चहूं सुनांसी दे चुंबन ।
त्यांतुन आपुल्या सुना दोघी जाण । त्यांसी दे आपण सुमनमाळा ॥ ५९ ॥

आणिकें राणिवसांच्या नारी । वोहरे आळंगिती प्रीतीवरी । वोवाळिती नानापरी । आल्हाद भारी राणिवसां ॥

करावया गृहप्रवेशासी । कृत्रिम लक्ष्मी भाणवसी । देखोनि श्रीरामसामर्थ्यासी । लक्ष्मी पूर्णांशेसी प्रगटली तेथ ॥

कृत्रिम लक्ष्मीचें अंतर । तेथ प्रवेशली लक्ष्मी साचार । तेणें तिचें रूप मनोहर । अति सुंदर आभासे ॥ ६२ ॥

सीता आणिली धनुर्भंगेसी । दुसरी सीता कैसी भाणवसीं ।
हें आश्चर्य वाटे ज्या त्यांसी । [मु. प्रतीत 'ही' हे अधिक पद.] ऋषि मानसीं विस्मित ॥ ६३ ॥

ते देखतां लक्ष्मीसी । सीता साशंकित मानसीं । हे स्त्री असतां गृहवासी । [तं. 'म्यां रघुनाथासीं स्वयें वरीलें'; मु. 'रामें का मज सीतेसी पर्णिलें'.] म्या रामासी स्वयंवरिलें ॥ ६४ ॥

आम्ही दोघी स्त्रिया [मु. प्रतीत हे पद नाही.] घरीं असतां । कैचि एकपत्नित्व रघुनाथा ।
असो [मु. पाठ 'ते'.] त्याची एकपत्नित्वकथा । सवती तत्त्वतां मज जाली ॥ ६५ ॥

सवती वोडवली कपाळासी । म्हणोनि क्षोभें पाहातां तिसीं । लक्ष्मी लागली पायांसीं । मी तुझी दासी

**जानकी ये ॥**

**प्रेमें देतां आळिंगण । दोहींचें मोडलें दोनी पण । दोही ठायीं एकत्व पूर्ण । आपण्यां आपण देखती ॥ ६७ ॥**

**लक्ष्मी तेचि सीता आपण । सीता तेचि लक्ष्मी जाण । श्रीरामाचें एकपत्निपण । सीतेसी संपूर्ण कळों सरलें ॥ ६८ ॥**

**सीता-लक्ष्मीचें एकपण । त्या दोघी जाणती आपण । हें ब्रह्मादिका न कळे विंदान । जाणे संपूर्ण वसिष्ठ ॥ ६९ ॥**

**तेणें वसिष्ठें आपण । केलें लक्ष्मीचें पूजन । गृहप्रवेशांचे विधान । केलें संपूर्ण यथोक्त ॥ ७० ॥**

**शुद्ध विद्या जोडली** [पै. कं. खेरीज इतरत्र 'शस्त्रास्त्रीं'.] **शास्त्रशस्त्रास्त्रीं । स्त्रिया परिणिलीया अति गजरी । कीर्ति** [मु. 'फार झाली'; कं. 'विस्तारली'.] **स्फारली लोकांतरीं । येवढी सामग्री श्रीरामा ॥ ७१ ॥**

**तेही चौघे बंधु चौघी स्त्रियांसी । दशरथाचे सेवेसी । सावधान अहर्निशीं । वसिष्ठापासीं किंकरत्वें ॥ ७२ ॥**

**त्याही माजीं श्रीराम जाण । वसिष्ठासी पढिये संपूर्ण । तो दशरथाचा जीव प्राण ।** [मु. प्रतीत हे पद नाही.] **राम आवडे संपूर्ण सर्वांसी ॥ ७३ ॥**

**राम आवडे सर्व भूतां । रामें सर्वांसी सुखरूपता । तोही वसिष्ठाचां वचनार्था । होय वंदिता किंकरत्वें ॥ ७४ ॥**

> [मु. प्रतीत हे श्लोक नाहीत.] रामस्तु सीतया सार्धं विजहार बहूनृतून् । मनश्च तद्गतं चाम्य नित्यं हृदि समर्पितम् ॥ २ ॥
> प्रिया तु सीता रामस्य दाराः प्रियकृता इति । गुणाद्रूपगुणाच्चापि प्रीतिर्भूयोऽभिवर्धते ॥ ३ ॥ [वाल्मीकिरामायण, बालकांड, सर्ग ७७, श्लोक २७ ते २९.]
> तस्याश्च भर्ता द्विगुणं हृदये परिवर्तते । अंतर्गतमपि व्यक्तमाख्याति हृदयं हृदा ॥ ४ ॥
> तस्य भूयो विशेषेण मैथिली जनकात्मजा । देवताभिः समारूपे सीता श्रीरिव रूपिणी ॥ ५ ॥

**श्रीरामाच्या मनोगता । अनुकूल वर्ते सीता । सीतेचिया मनोरथा । परिपूर्णता श्रीरामें ॥ ७५ ॥** [या ओवीपूर्वी नि. घा. प्रतींत पुढील ओवी आली आहे :––'गुरुमहिमा अति थोर । तो संरक्षी रामचंद्र । लोकसंग्रहणार्थ साचार । दावी विचार भजनाचा ॥']

**सीतेचा भाव श्रीरामीं पूर्ण ।** [मु. प्रतीत हे पद नाही.] **तव सीता श्रीरामें संपूर्ण । सीता श्रीरामें सुख संपन्न । सुखी रघुनंदन तिचेनि ॥ ७६ ॥**

**श्रीरामरसें रसज्ञ सीता । सीतेच्या रसना श्रीराम भोक्ता ।** [मु- 'श्रीराम देखणें सीता डोळसता'.] **श्रीराम देखणें डोळस सीता । तिचेनि** [मु. प्रतीत हे पद नाही.] **डोळा देखता श्रीराम ॥ ७७ ॥**

अनुक्रमणिका

श्रीरामें सीता सुंदर पूर्ण । सीतेनें श्रीराम शोभे सगुण । श्रीरामें सीता सुलक्षण । तिचेनि लक्षलक्षण श्रीरामा ॥ ७८ ॥

श्रीराम सीतेचा निजभोग । सीतेनें श्रीरामा रसुरंग । श्रीरामें सीता शोभे सांग । सीता सर्वांग श्रीराम ॥ ७९ ॥

सीता रस श्रीराम स्वाद । सीता सुमन श्रीराम गंध । सीता बुद्धि श्रीराम बोध । अनन्य सिद्ध [मु. 'येरयेरा'.] निजभोग ॥ ८० ॥

सीतावचन रामवचनार्थ । सीता पदें राम पदार्थ । सीता मुक्ति राम मुक्त्यर्थ । परम [तं. 'स्वादु'; पै. खेरीज इतरत्र 'परमस्वार्थू'.] स्वादार्थ येरयेरां ॥ ८१ ॥

सीता जीव श्रीराम जीवन । सीता मन श्रीराम [मु. 'उन्मन'.] मनोज्ञ । सीता चित्त श्रीराम चैतन्य । आनंद घन येरयेरां ॥ ८२ ॥

सीता धारा श्रीराम धारक । सीता चळण श्रीराम चाळक ।
सीता [मु. 'व्याप्य'; कं. 'अवयव'.] व्यवसाय श्रीराम व्यापक । सुख संतोष येरयेरां ॥ ८३ ॥ [भा. प्रतीत ही ओवी नाही.]

सीता क्रिया श्रीराम कर्ता । सीता भोग्य श्रीराम भोक्ता । सीता ज्ञान श्रीराम ज्ञाता । एकात्मता अतिप्रीती ॥ ८४ ॥

सीता शर्करा श्रीराम गोडी । सीता व्यवसावो श्रीराम जोडी ।
एकात्मता अति आवडी । नकळे फुडी [पै. 'स्मृतिशास्त्रां'.] श्रुतिशास्त्रां ॥ ८५ ॥

येरयेरांविण जाण । न करिती उदकपान । येरयेरेविण [भा. 'अन्नपान'; त. सु. नि. घा. गे. कं. 'न खाती पान'.] न खाती अन्न । प्रीति अनन्य येरयेरां ॥ ८६ ॥

येरयेरां वेगळेपण । हो न शकती अर्ध क्षण । अणु मानीं दोघेजण । नांदती पूर्ण पूर्णत्वें ॥ ८७ ॥

ऐसी ऐसिया अनन्य गति । श्रीराम भोगी सीतासती । सीतेचिया निजात्मप्रीती । श्रीराममूर्ति उल्हासें ॥ ८८ ॥

सीतेचा भावार्थ संपूर्ण । देखोनि उल्हासे रघुनंदन । सीता भाव धरी द्विगुण । प्रीति चतुर्गुण श्रीरामीं ॥ ८९ ॥

सीता भाव धरी अधिका अधिक । तंव तंव श्रीरामीं वोसंडे सुख । कैसी प्रीति अलौकिक । एकी एक अनन्य ॥ ९० ॥

ये यथा मां प्रपद्यन्ते तांस्तथैवभजाम्यहम् ॥ ६ ॥ [मु. प्रतीत श्लोकार्ध नाही. श्रीमद्भगवत् गीता, अध्याय ४, श्लोक ११.]

अनुक्रमणिका

जैसी जयांसी श्रीरामीं भक्ति । तैसीच ही त्यावरी श्रीरामप्रीती ।
हें बोलिलेंसे बहुतां ग्रंथीं । मीचि किती अनुवादों ॥ ९१ ॥

जैसा भाव तैसी प्रीती । जैसी प्रीती तैसी प्राप्ती । जैसी प्राप्ती तैसी स्थिती । हाचि परमार्थी मुख्यार्थ ॥ ९२ ॥

ग्रंथीं राखोनी [मु. 'गुह्यार्थ'; कं. 'ग्रंथार्थु'.] ग्रंथार्थु । मुख्यत्वें दावावा परमार्थु । हाचि कवित्वाचा निजस्वार्थु । येणें रघुनाथ संतुष्ट ॥ ९३ ॥

संतुष्ट होती श्रोते । संतुष्ट होती वक्ते । संतुष्ट होती कथा ऐकते । श्रीराम चरितें रामायणे ॥ ९४ ॥

कथा परिसतां रामायण । पूर्वज उद्धरती जाण । पूर्वजांचा नवलाव कोण । उद्धरे संपूर्ण त्रिजगती ॥ ९५ ॥

श्रीरामकथेची नवाळी । हे सदाशिवा जपमाळी । मनकर्णिका अंतकाळीं । जपे कर्णमूळीं तें हें ब्रह्म ॥ ९६ ॥

[मु. 'सावधान'.] सावध करणें निजमन । तेंचि मणिकर्णिका सत्य जाण । आदरें परिसतां रामायण । तें तारकपूर्ण परब्रह्म ॥ ९७ ॥ [नि. घा. प्रतींत या ओवीनंतर पुढील ओवी आलेली आहे :–– 'आदरें रामकथा श्रवण । ते तारक ब्रह्म रामायण । काशी मणिकर्णिका आपण । हात जोडून उभ्या तेथें ॥']

यालागीं रामकथेपासी । तीर्थें तिष्ठती अहर्निशीं । चाऱ्ही मुक्ति होती दासी । कथा उल्हासी परमानंदु ॥ ९८ ॥

कथा रामायणी अगाध । पदोपदीं परमानंद । श्रवणें वोसंडे आनंद । निजात्मबोध श्रीरामें ॥ ९९ ॥

रामायणाच्या निजकीर्ति । सुखें शिवादिक डुल्लती । तेणें पावन त्रिजगती । कथाश्रवणार्थी श्रीराम तोषें ॥ १०० ॥

यापरी अयोध्येप्रती । सीतेचिया अनन्य प्रीती । वसता जाला रघुपती । जाली समाप्ती बालकांडा ॥ १०१ ॥

वश्य करूनि वैराग्य वितंड । साधिलें ब्रह्मज्ञान अखंड । ऐक्या आणुनि पिंड-ब्रह्मांड । बाळकांड संपविलें ॥ १०२ ॥

साधिली शस्त्रास्त्रविद्या उदंड । गुरुयाग सिद्धी नेला प्रचंड । [मु. 'झाडोनी'.] सांडुनि अहिल्या पापबंड । बाळकांड संपविलें ॥ १०३ ॥ [मु. प्रतीत ओवी १०३ व १०४ यांतील चरण मागेपुढे झाले आहेत.]

ताटका सुबाहु केली दुखंड । मरीचीचें ठेचुनि तोंड । भंगुनि शिवाचें कोदंड । बाळकांड संपलें ॥ १०४ ॥

राजे लाजउनि उदंड । सीता-संशया देऊनि दंड । रावणाचें काळें तोंड । करूनि बाळकांड संपलें ॥ १०५ ॥

अनुक्रमणिका

**फरशराम प्रताप प्रचंड । तो करूनि खंड विखंड । विष्णुचापाचें दमुनि बंड । बाळकांड संपलें ॥ १०६ ॥** [त. प्रतीत ही ओवी नाही.]

**यापरी संपलें बाळकांड । पुढां राम प्रताप प्रचंड । राक्षस वधिजेतील वितंड । ते कांडे कांड अवधारा ॥ १०७ ॥**

**बाळकांड संपते क्षणीं । श्रीरामाच्या निजबाणीं । राक्षसवधाची बोहणी । ते कथा कडसणी अवधारा ॥ १०८ ॥** [मु. प्रतीत ही ओवी नाही.]

**एका जनार्दना शरण । कथा रम्य रामायण । जालें बालकांड संपूर्ण । हे कृपा पूर्ण संतांची ॥ १०९ ॥**

**संतकृपा परिपूर्ण । अगाध कथा रामायण । ते वदावया मी अतिदीन । श्रीजनार्दन स्वयें वदवी ॥ ११० ॥**


**ग्रंथ कथा ग्रंथ कविता । श्रीराम ग्रंथ लिहविता । वदनीं वदविता स्वयें श्रोता । परिसविता श्रीरामु ॥ १११ ॥**
[मु. प्रतीत ही ओवी वेगळ्या स्वरूपात आली आहे :— ‘स्वयें श्रीरामचि ग्रंथकथिता । श्रीरामचि ग्रंथकर्ता । श्रीराम ग्रंथ लिहविता । वदनीं वदविता श्रीराम ॥’]

**एका जनार्दना शरण । यापरी श्रीराम आपण । कथा करवी रामायण । केलें संपूर्ण बाळकांड ॥ ११२ ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे बाळकांडे एकाकारटीकायां बाळकांड समाप्तिः । श्रीरामायोध्याभिगमनं नाम सप्तविंशतितमप्रसंगः ॥** [तं. प्रतीत समाप्ति लेख पुढीलप्रमाणे आहे :— ‘शके पंधराशे एक्यांसी आणि सतरा । पिंगळानाम संवत्सरीं अवधारा । फाल्गुनमास तृतीयप्रहरा । ग्रंथलेखना समाप्ती ॥’
पै. प्रतीत पुढीलप्रमाणे लेखन शक देण्यात आला आहे. शके १६७२, प्रमोदिनाम संवत्सरे, माघ मासे, कृष्ण पक्षे, प्रतिपदा, गुरुवासर तद्दिने प्रतिष्ठान गोदावरीतीर नागतीर्थ सन्निधौ बाळकांड लेखनम् समाप्तिभगत् । रामचंद्रार्पणमस्तु । पत्रे सुमार १५४ ।; कं. प्रतीत पुढीलप्रमाणे समाप्ति लेख आला आहे :— ‘सर्वधारीनाम संवत्सरे, आषाढ मासे, वद्य पक्षे, तृतिया भुगृवासरे, धनिष्ठा नक्षत्रे दिवा अभिजित सुमुहूर्ते शुभ वेळायां बालकांड रामायणग्रंथलेखन समाप्तम् । हस्ताक्षर राघो अनंत परंडेकर तत्सूनुन्मे भगवंतेन लिखितम् । प्रस्तुत वास्तव्ये पेट भास्करनगर कसबे चिटगोपे ग्रामे लेखनं समाप्तम् । शके १६९०.’
संपादित प्रत : श्लोक ५, ओव्या ११२.
इतर प्रतींत ही संख्या अशी : नि. इं. सु. गे. घा. श्लोक नाहीत, ओव्या ११४; भा. ५, १११; तं. ५, ११३; तु. ५,११५; त. ५,११०; पै. ५, ११३.]

श्रोते हो ऐकाजी विनंती । ग्रंथु लिहिला यथाप्रती । न्यून पूर्ण महंती । लिखितां दोष न ठेविजे ॥ २ ॥
तैलाद्रक्षेत् जलद्रक्षेत् रक्षेत् शिथिलबंधनात् । मूर्खहस्ते न दातव्यंमेवं वदति पुस्तकम् ॥ ३ ॥

अनुक्रमणिका




अनुक्रमणिका

# अयोध्याकांड

## प्रसंग पहिला

## श्रीराम शस्त्रविद्या प्रदर्शन—भरत मातुलग्राम गमन

### ॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम् । एकैकमक्षरं पुसां महापातकनाशनम् ॥ १ ॥ [रामरक्षास्तोत्र, श्लोक २, गे. प्रतीखेरीज सर्व मुद्रित प्रतींत प्रथम पुढील श्लोक आला आहे. गे. प्रतीत पुढील श्लोक पहिल्या अकरा ओव्यांनंतर आला आहे :— 'गजाननाय महते प्रत्यूहतिमिरच्छिदे । अपारकरुणामूर्त्यै सर्वज्ञानदृशे नमः ॥ १ ॥']

[सर्व मुद्रित प्रतींत पुढील ३२ ओव्या प्रारंभी आलेल्या आहेत :—
'श्रीराम कथेची नव्हाळी । शेष वंदी पाताळीं । शिव वंदी प्रेमसमेळी । कथा भूतळीं जगद्वंद्य ॥ १ ॥
तरी तें शतकोटी रामायण । आळवूं शकेल कोण । तेथें मी अपुरतें दीन । परी तो जनार्दन स्वयें वदवी ॥ २ ॥
तरी श्रीराम स्वरूप चिद्रूपता । चैतन्य-शोभांकित सीता । तरी देवभक्तांच्या कृत कार्यार्था । मानुष्यजाड्यता अवतारू ॥ ३ ॥
अर्धनारी नटेश्वरी । जो पुरुष तेचि नारी । तेवीं ते सीता निर्धारीं । एकात्मतेवरी स्त्री पुरुष ॥ ४ ॥
जैसीं बहुरूपी रावराणी । परी स्त्री पुरुष भाव नाहीं मनीं । तरी तेची संपादणी । लोकसंरक्षणीं सत्यत्वें दावी ॥ ५ ॥
"एकाकी न रमते" या श्रुती । सवती मत्सरू स्वयें म्हणती । तरी हे बृहदारण्य वेदोक्ती । द्वैतीं कल्पिती अद्वैत भावो ॥ ६ ॥
परब्रह्म जें अतिरिक्त । "सहैतावानास" द्विधांग पावत । तरी हा वेदांतीचा इत्यर्थ । द्वैत कल्पित अद्वैतत्वें ॥ ७ ॥
यापरी सुखें श्रीराम सीता । दोनी नांदिती एकात्मता । ऐसिया स्थितीची व्यवस्था । जे अवतरता नटनाट्यें ॥ ८ ॥
तरी व्यवस्था पावे अधिकार विधी । आणि भक्ता नांदवावे निजपदीं । म्हणौनी याची लागीं त्रिशुद्धी । अवतार सिद्धी श्रीराम ॥ ९ ॥
ऊंस गाळून काढिजे रसु । मग तोही जाळून असोसु । शर्करा कीजे अति सुरसु । तिचाहीं निर्मळांशु नाबद कीजे ॥ १० ॥
मग नाबदेंचीं अति निगुतीं । फळें नारळें चतुर करिती । आणि तेथेंही कवठें काढिती । ते करंटे निश्चितीं निजस्वादा ॥ ११ ॥
तेवीं परब्रह्मतेची रसें । देहाकृतीचियें मुसें । ओतींव रामरूपाचे ठसे । आले आपैसे चित्स्वरूपा ॥ १२ ॥
ऐसी श्रीरामाचीं शुद्धमूर्ती । शोभा शोभवी त्रिजगतीं । तरी तेथें स्थूलत्व भाविती । ते करंटे निश्चितीं अभागी ॥ १३ ॥
जे मनुष्य मानिती श्रीरामा । ज्याचेनीं नामें नाश भवभ्रमा । त्यासी मानवी महिमा । बोलोंची नये ॥ १४ ॥
श्रीरामाची निजस्थिती । शिवभवानी नाम जपती । आणि त्यासी लक्ष्मण अनुवर्ती । सखा सांगाती सर्वस्वें ॥ १५ ॥
तरी लक्ष्मण एकात्मता रामांकित । केवळ भावार्थ तो भरत । शत्रुघ्न तो धैर्यवंत । हा व्यूहवृत्तांत चतुष्टयाचा ॥ १६ ॥
मुख्य मुळीं एक मूर्ती । तेची चतुर्धा अभिव्यक्ति । या नांव व्यूहचतुष्टय म्हणती । एक निश्चितीं विभाग ॥ १७ ॥
आत्मप्रबोध तो लक्ष्मण । भावार्थ ते भरत जाण । निजनिर्धारीं तो शत्रुघ्न । आनंद-विग्रही पूर्ण श्रीराम ॥ १८ ॥
अहमात्मा तोचि दशरथ । उत्पत्तीसी मुख्य हेत । दूर गेलिया श्रीरघुनाथ । निवर्तत अहमात्मा ॥ १९ ॥
आता विवेक आणि निजविचारू । तैंसे वसिष्ठ-विश्वामित्र गुरु । ज्यापासोनि अति साचारु । शस्त्रास्त्रविद्या दृढ केली ॥ २० ॥
कौसल्या ते सुविद्या । सुमित्रा ते शुद्ध मेधा । कैकयी ते अति अविद्या । मंथरा कुविद्या तीपासी ॥ २१ ॥
कुविद्या क्षोभवोनी अविद्येसी । श्रीराम केला वनवासी । तंव सीता अनन्य भावेंसी । श्रीरामासरसी निघाली ॥ २२ ॥
सूर्यासवें जैसी प्रभा । वसंतासवें शोभे वनशोभा । तेवीं जानकी जगदंबा । प्राणवल्लभा स्वयें निघे ॥ २३ ॥
जेंवी साकरेतें न सांडी गोडी । तेवीं सीता राम न सोडी । केवळ सेवेची आवडी । वनीं रोकडी दास्यत्वाची ॥ २४ ॥
राज्यीं असतां रघुनंदनासी । सेवा वाटिली सेवकांसी । तरी ते मी एकली वनावासी । सर्व सेवेसी पात्र होईन ॥ २५ ॥
श्रीरामसेवा जरी ये हाता । ऐसें भाग्य दुर्लभ सर्वथा । ते सेवावया तत्त्वता । चरणाखालीं सीता वना आली ॥ २६ ॥
ऐसी हे सीतेची गती । तैसीच लक्ष्मणाची स्थिती । श्रीरामसेवे वनाप्रति । आला निश्चिती सर्वभावें ॥ २७ ॥
जैसा आत्म्यापासी निजबोधु । तैसा श्रीरामासवें निजबंधु । दोघांचा एक संवादु । परम आल्हादु वनवासी ॥ २८ ॥
जैसे बोध विरक्ति परमार्थासी । तैंसे सीता लक्ष्मण श्रीरामासरसी । ऐसे तिघे निघाले वनवासी । कृतकार्यासी लक्षोनी ॥ २९ ॥
लक्षोनी पुढील कार्यार्थु । वना निघाला श्रीरघुनाथु । येथोनी चालिला ग्रंथार्थु । तो श्रोतीं भावार्थु अवधारिजें ॥ ३० ॥
रामायणीचा ग्रंथार्थु । त्यामाजी जो निजभावार्थु । श्रोतीं पाहावा साधनार्थु । अर्थे परमार्थु सहज जोडे ॥ ३१ ॥
एका जनार्दना शरण । हें भावार्थ रामायण । श्रीरामाचें निरूपण । दावी लक्ष्मण व्यूहचतुष्टयाचें ॥ ३२ ॥'
कं. प्रतीत प्रारंभी संपादित प्रतीत नसलेल्या एकूण २९ ओव्या आहेत. वरील ३२ ओव्यांपैकी ७, ३१ व ३२ या तीन ओव्या कं. प्रतीत नाहीत.]

**रामकथेचें** [मु. 'आर्त'.] **अक्षर । ते क्षराक्षरातीत पर । सभाग भाग्याचे जे नर । ते कथा सादर परिसती ॥ १ ॥**

**कथाश्रवणें उपजे विरक्ति । कथाश्रवणें वाढे शांति । श्रवणें परमानंद प्राप्ती । महापापी उद्धरती कथाश्रवणें**

अनुक्रमणिका

॥ २ ॥

चोरटा वाल्मीक महापापी । रामायणें जाला निःपापी । त्याची कथा नित्य जपी । वाग्जल्पीं शिवाच्या ॥ ३ ॥

तें हें शिव सेव्य रामायण । श्रवणें मरणासी ये मरण । सवेंची जन्माची बोळवण । श्रवणें परिपूर्ण ब्रह्मप्राप्ती ॥ ४ ॥

नित्य जपतां [सु. नि. गे. घा. तं. त. 'रामनाम'.] राम राम । भक्ता होय पूर्ण ब्रह्म । त्याचे कथेचा अनुक्रम । कर्माकर्म छेदक ॥ ५ ॥

कथा निर्दळी कर्माकर्म । श्रोते स्वयें होती परब्रह्म । वाल्मीक उपकार हा परम । केला सुगम परमार्थ ॥ ६ ॥

[कं. सु. गे. घा. 'अमृत लहरी'.] सुगम परमार्थ कथा । बाळकांड स्वयें संपता । विजय गजरें रघुनाथा । अयोध्ये आंतौता आणिला रायें ॥ ७ ॥

ते अयोध्ये आंत दशरथ । सुख स्वानंदें असे नांदत । नित्य सेवा करी रघुनाथ । हर्षयुक्त बंधूसीं ॥ ८ ॥

[नि. गे. 'मातुळकुळी'; घा. 'मातुळगृहा'.] मातुला न्याविया भरत । मातुळ जो का युधाजित । तो रायासि साक्षेप युक्त । असे पुसत एकांतीं ॥ ९ ॥

भरताचें मनोगत । मातुळा जावया अति उद्यत । ते जाणोनियां दशरथ । स्वयें धाडित उल्हासें ॥ १० ॥

अश्व गज रथ पदाती । चातुरंग [मु. 'सेना सहसंपत्ती'.] सैन्य संपत्ती । भरत शत्रुघ्न मातुळा प्रति । धाडी नृपती निजगजरें ॥ ११ ॥

दोघेहि जाऊनि उल्हासीं । भेटले [मु. 'कैकयीसुत'.] कैकेय मातामहासी । नमुनिया मातामहीसी । मातुळवासी स्वानंदें ॥ १२ ॥

[तु. सु. नि. गे. घा. तं. 'नित्य'.] नीच नवे नानाभोग । कौतुहळ [कं. सु. गे. 'कौतुहल उपभोग'; नि. घा. 'कौतुक सोहळे उपभोग'; तं. 'कौतुकहल उपभोग'.] उपसंभोग । दोघै वसति अनुद्वेग । वैभवभाग्य उल्हासें ॥ १३ ॥

येरीकडे अयोध्येसी । वसिष्ठाचे निज सेवेसी । रामसौमित्र अति उल्हासी । सर्वस्वेंसी सादर ॥ १४ ॥

तैसेचि दशरथ सेवेसी । निकटवर्ती अहर्निशीं । जें जें मनोगत रायासी । त्या त्या कार्यासी प्रवीण ॥ १५ ॥

न संगतां मनोगत । हृदयीचें निजकार्यार्थ । तें तें संपादी रघुनाथ । अति समर्थ मनोज्ञें ॥ १६ ॥

रायाचा अति पढियंता । वसिष्ठाचा आवडता । राम आवडे समस्तां । भूतां महाभूतां वल्लभ ॥ १७ ॥

अनुक्रमणिका

जैसें [नि. घा. 'जीवन कां'.] जीवन जिवासीं । तैसाचि रामु सर्वांसी । आवडता अहर्निशी । जीवोल्हासी श्रीरामु ॥ १८ ॥

जैसा चंद्रकर चकोरां । तैसा रामु चराचरां । [मु. 'आवडे सर्व'.] आवडता नारी नरां । जीवां समग्रां अति प्रिय ॥ १९ ॥

वसिष्ठ सांगे रायापासीं । रामशस्त्रास्त्रीं विद्याराशी । तेचि पाहावया रायासीं । निजमानसीं उल्हासु ॥ २० ॥

जाणोनि [मु. 'रायाचें मनोगत'.] राज मनोगत । वसिष्ठ आज्ञापी रघुनाथ । विद्या पाहो इच्छी दशरथ । आज्ञा समर्थ म्हणे राम ॥ २१ ॥

गुरुवचन पितृवचन । साधुसज्ञन आज्ञापन । उलंघी तो अभाग्यपूर्ण । तो पाषाण नरदेही ॥ २२ ॥

गुरु आज्ञेचें उत्तर । आइकतां करावें [मु. प्रतीत हे पद नाही.] अति सत्वर । मुहूर्त पाहे तो पामर । करी विचार तो मूर्ख ॥ २३ ॥

मी तंव केवळ आज्ञाधार । ऐसें बोलोनि रघुवीर । कास [सु. गे. प्रतींत ही ओवी नाही.] घेतली सत्वर । जाला सौमित्र सन्नद्ध ॥ २४ ॥ [कं. 'घाली'; नि. घा. 'घातली'.]

गुरु आज्ञेचें विंदान । दोहीं बाह्यां आले स्फुरण । आंगीं न समाय सत्राण । प्रताप पूर्ण गुरुवाक्यें ॥ २५ ॥

गुरुवाक्याचा उल्हासु । [मु. प्रतीत 'ज्या' हे अधिक पद.] नाहीं तो जाण केवळ पशु । शिष्यामाजीं तो रासभवेषु । ज्यासी आळसु गुरुवाक्या ॥ २६ ॥

देखोनि साटोपी रघुवीर । वसिष्ठासी उल्हास थोर । जेवीं देखोनि पूर्ण चंद्र । क्षीर समुद्र हेलावे ॥ २७ ॥

तैसें जालें वसिष्ठासी । थोर आल्हाद दशरथासी । देखोनि साटोप पुत्रासी । रंगभूमीसी शृंगारी ॥ २८ ॥

रायें रंग शृंगारिला । देखोनि विश्वकर्मा शंकला । स्वर्ग तेणें फिका केला । [नि. घा. 'लाजविला'.] लाजीनला कैलास ॥ २९ ॥

अळंकावतीची सौभाग्य थोरी । रंगी न सरे [सु. गे. 'लोभावरी'; तं. 'लोणारी'.] लोणावाऱ्ही । तैसियाजी रंगामाझारीं । रंगधारी श्रीराम ॥ ३० ॥

धनुर्विद्या अलक्षविद्या । छत्तीस दंडायुधी विद्या ।
[नि. घा. 'संमुखी विमुखी करण विद्या'; सु. गे. 'सुमुखी विमुखी किराण विद्या'; त. 'समुख विमुख रणविद्या'; तं. 'समुखा मुखा कारण विद्या'; पै. भा/२. तु. 'समुखा विमुखी किराण विद्या'; कं. 'समुद्रवासी किराण विद्या'.] समुखी विमुखी किराण विद्या । [तं. सु. गे. 'मल्लाविद्या लघुविद्या'; भा/२. तु. त. कं. 'मालविद्या लघुविद्या'; पै. 'मालविद्या लघु वेगें'.] मल्ला विद्या लघुविद्या लाघवी ॥ ३१ ॥

अनुक्रमणिका

गजबाजी रथारोहणे । निराधारीं युद्ध करणें । आकाश खोचुनी परतें [नि. घा. 'जाण'.] जाणे । मेरू उडवणें तृणप्रायें ॥ ३२ ॥

ऐसिया विद्या अलौकिक । गुरु आज्ञा दावी आवश्यक । पाहों आले नागरिक । साधु लोक ठेसले ॥ ३३ ॥

रंगीं उभा रघुवीर । विद्या दावील समग्र । पाहों आले सुरवर । विमानीं अंबर दाटलें ॥ ३४ ॥

तें काळीं रामलक्ष्मण । [नि. 'वीरश्रियेसी आंगवण'; त. 'करिते जाले आपण'; तं. प्रतीत शेवटचे दोन चरण पुढीलप्रमाणे आहेत :— 'सुरासुर कंपायमान । दैदिप्यमान तेजस्वी ॥'] मांडुनी माहेश्वरी ठाण । धनुर्विद्येचें लक्षण । स्वयें संपूर्ण दाविती ॥ ३५ ॥

देखोनि श्रीरामाचें ठाण । सुरासुर कंपायमान । नरांचे झांकोळले नयन । दैदीप्यभान तेजस्वी ॥ ३६ ॥ [तं. प्रतीत ही ओवी नाही.]

बाण तेजें छेदी गगन । गगनोदरीची अलक्ष खूण । स्वयें लक्षूं जाणे आपण । अचूक संधान श्रीराम ॥ ३७ ॥

बाण पिसारांचा वारा । शत्रुसहित उडवी रहंवरा । गगनीं भवंडी गरगरां । जेवीं तृणांकुरां वाहाटुळी ॥ ३८ ॥

श्रीराम बाणाचा प्रताप । मेरूमांदारा चळकांप । भेणें सहस्त्रमुखा लागे धाप । कूर्म साटोप तडफडो लागे ॥ ३९ ॥

[नि. घा. प्रतींत 'त्या' हे अधिक पद आहे.] सिंहनादाचा अतिगजर । भेणें शत्रूचें भेदे जिव्हार । परदळी हाहाकार । वीर धीर मूर्च्छित ॥ ४० ॥

फरश पट्टीस तोमर । गदा मुद्‌गल लहुटी चक्र । या या शस्त्रांचा महामार । दावी अनुकार शत्रुदमनीं ॥ ४१ ॥

[तं. 'पशुपाश शूळ शक्तिधर'; पै. खेरीज इतरत्र 'असिपाश शूळ शक्तिधर'.] असी पाशशक्ति शूलधर । छत्तीस दंडायुद्धी चमत्कार । दावितु शस्त्रांचे महामार । शत्रुसंभार निर्दळणीं ॥ ४२ ॥

वोडण खड्गाचा धारकु । दावितु थरक सरक चंबकु । वोडण धडकें लाऊनी धाकु । पाडी एके एकु मूर्च्छित ॥ ४३ ॥

पुढिला वेगाचेनि उड्डाणें । शत्रु समुदावो मर्दणें । तेणेंचि पाठीमोऱ्या किराणे । निर्दळणें अरिवीरा ॥ ४४ ॥

पुढिले घाई मागिले पाडी । मागिले घाई पुढिले तोडी । ऐसिया माराच्या परवडी । [तं. 'रडवडी'; सु. नि. गे. घा. 'रणी निर्वडीं'.] रण निर्बडी दावितु ॥ ४५ ॥

निर्वाण युद्धाचा निर्वाहो । मागिला पुढिला एकुची घावो ।

अनुक्रमणिका

तो तो यावा दावितु पाहो । ऋषि आणि रावो विस्मित ॥ ४६ ॥

जाणे माल विद्या कुसरी । उरीं शिरीं हाणे कोंपरी । तळिले आणुनिया वरी । चक्राकारीं उपटितु ॥ ४७ ॥

अष्टांगीच्या कळा जाणे । कळ लाऊनी प्राण घेणें । एकांगुष्टाचेनि चेपणें । जीवें मारणें महावीर ॥ ४८ ॥

तडवा हाणोनि तांतडी । गजे सहित वीर पाडी । रथ मोडुनि कडाडी । रण रगडी पायवाटा ॥ ४९ ॥

जाणे रथी आरोहण । रणमाराचें प्रेरण । गती विगुती परिभ्रमण । चक्रावर्तन रथाचें ॥ ५० ॥

रथाचिया सवेगता । शत्रुरथ अपसव्यता । घालुनी चालवी निजरथां । रथ योग्यता दावितु ॥ ५१ ॥

निरालंबींच्या [कं. सु. गे. 'गगना'.] गमना । रथ चालऊ शके [मु. 'जाणा'; कं. 'अंगवणा'.] गगना । दावितां रथ गती लक्षणा । विस्मयो मना सुर सिद्धां ॥ ५२ ॥

गज गर्जोनि आल्यावरी । उडोनी बैसे कुंभांतरीं । मग वागवी युद्धाचारी । महामारी गजयोद्धा ॥ ५३ ॥

गजें पर सैन्य आकळी । रथ रगडी गजातळीं । गजें गजदळ निर्दळी । रण रांगोळी गजयोद्धा ॥ ५४ ॥

बैसों जाणे अश्वावरी । वागवी युद्धाचे महामारी । [तं. 'नाचवीत वरिच्या वरी'; मु. 'नाचविती चौं पायावरीं'.] नाचवितीचि पायावरी । रणांतरीं विचरतु ॥ ५५ ॥

अश्वखुराचेंनि महारजें । वैरी पावले निर्बुजे । शस्त्रें विसरले गजवजे । वारू रघुराजें प्रेरितां ॥ ५६ ॥

[तं. 'होईजे विधड'; नि. गे. घा. 'दुखंड'.] लागतां अश्वाची महाझड । सैन्य होय जी दुधड । तोडितु वीरांचे रुंडमुंड । वैरी दुखंड रणरंगी ॥ ५७ ॥ [त. प्रतीत ही ओवी नाही.]

ऐसे नाना अनुकार । अश्वगज रथाचे संचार । शस्त्रां अस्त्रांचे महामार । दावी चमत्कार रघुनाथ ॥ ५८ ॥

युद्धा दियावा अनुकारण । श्रीरामाचा अति दारुण । देखोनि एकें मूर्च्छापन्न । एकें ते प्राण सांडु पाहाती ॥ ५९ ॥

एकीं घेतलें परम धाका । एकासी लागल्या धुकधुका । एके करिती लघुशंका । एकें ते देखा [त. 'उभडीं'; नि. घा. 'नागवे पडती'.] उबडी पडती ॥ ६० ॥

देखोनि श्रीराम प्रताप । सुर सिद्धां सुटे कांप । दैत्य दानवा आहाकंप । दुर्धररूप श्रीराम ॥ ६१ ॥

भूत भविष्य वर्तमान । जाणते जे सज्ञान । तेही धाकें कंपायमान । यावा दारुण देखोनि ॥ ६२ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम यावा अति दुर्धर । देखोनि राजा सुखनिर्भर । विद्यानिपुण जाले कुमर । हा दृढ निर्धार रायासी ॥ ६३ ॥

राजा अत्यंत हर्षनिर्भर । ओवाळी वस्तुजात अपार । सुरवर करिती जयजयकार । सुमन संभार वर्षति ॥ ६४ ॥

देखोनियां दुर्धर यावा । हरुष वसिष्ठाचिया जीवा । आनंदें आळंगी राघवा । प्रेमसद्भावा आल्हादें ॥ ६५ ॥

शस्त्रास्त्रविद्येचा साटोप । तुवां मज दाविला सद्रूप । धन्य धन्य विजयाचा प्रताप । कृपा सकृप तुष्टला ॥ ६६ ॥

माझ्या वरदाचे द्विपंच बाण । यत्नें राखा दोघेजण । युद्ध मांडल्या निर्वाण । जयो संपूर्ण एही बाणी ॥ ६७ ॥

यांचिया बाणाचां पैं पोटीं । शस्त्रास्त्रें कोट्यानुकोटी । सुटोनी [कं. सु. गे. 'शत्रुसमुदाव'; पै. त. भा/२. तु. त. 'शत्रुसमोह'.] शत्रुसमुद्र आटी । [कं. व मु. प्रतीत 'हे' हे अधिक पद आहे.] गुह्य गोठी सांगितली ॥ ६८ ॥

यापरी [भा/२. 'देऊनी'; सु. नि. गे. घा. 'अपत्यत्वें'; तु. 'आत्मत्वें'.] आप्तत्वें सन्मान । दोघां देऊनी आश्वासन । निजगजरें अवघे जन । राजभुवन प्रवेशले ॥ ६९ ॥

श्रीराम सर्वगुणें संपूर्ण । [कं. व मु. प्रतींत 'हें' हे अधिक पद.] रायासी कळलें लक्षण । तेंची वसिष्ठासी आपण । गुह्य संपूर्ण पूसतु ॥ ७० ॥

राज्यीं [मु. प्रती 'अभिषेकावा'.] अभिषेचावा रघुनाथ । हा दृढ माझा मनोरथ । स्वामीनें सांगावा इत्यर्थ । तोचि कार्यार्थ मी करीन ॥ ७१ ॥

वसिष्ठ सांगेल आपण । श्रीरामासी अभिषेचन । एका जनार्दना शरण । कथा मनोज्ञ अवधारा ॥ ७२ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीरामशस्त्रविद्याप्रदर्शनं भरतमातुलग्रामगमनं नाम प्रथमप्रसंगः ॥ [तं. प्रतीत पहिल्या प्रसंगाच्या समाप्तीनंतर पुढील ओव्या आल्या आहेत :— 'अयोध्याकांड कथा । आदरें ऐकतां श्रोतां । श्रीराम कृपा करील सत्यता । भवभय चिंता निरसेल ॥ १ ॥
श्रीराम भवसिंधुतारक । सदाशिव ध्यातो ज्यास देख । कळीकाळ ज्याचे पाईक । सार्वकाळ वोळवती ॥ २ ॥
ऐसें जाणोनी प्राणी । भाव धरूनीं अन्तःकरणीं । जे चिन्तीती श्रीराम ध्यानीं । तेच या जन्मी मुक्ति दाते ॥ ३ ॥']

अनुक्रमणिका

## प्रसंग दुसरा

## श्रीरामाभिषेक प्रारंभ

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**राज्याभिषेक श्रीरामासी । कराव्या उल्हास दशरथासी ।** [तं. 'पृथ्वीपाळ नृपवरासीं'; त. 'बोलाऊनियां ज्येष्ठासीं'; कं. भा/२. तु. सु. गे. 'बोलाऊनिं ज्येष्ठ श्रेष्ठासीं'; नि. घा. 'बोलाऊनियां ज्येष्ठां श्रेष्टासीं'; पै. संपादित पाठ.] **बोलाउनि ज्येष्ठ जेष्ठांसी । गुह्य त्यांपासीं सांगतु ॥ १ ॥**

[नि. घा. 'उदार' हे पद अधिक.] **वसिष्ठादि महाऋषि । पृथ्वीपाळ नृपवरांसी । सेनापति समग्रांसी । गुह्य त्यांपासीं सांगतु ॥ २ ॥**

**अष्टादश निज प्रजांसी । बोलाउनि अति** [कं. सु. गे. 'आप्तवर्गासीं'; नि. घा. 'अति प्रीतीसीं'; पै. तं. त. भा/ २. तु. संपादित पाठ.] **आप्तासी । बैसऊनि सन्मानेसीं ।** [कं. सु. गे. 'कथा त्यापासीं सांगतु'; नि. घा. 'काय त्यापासीं मग बोलें'; पै. तं. भा/ २. तु. संपादित पाठ.] **काय त्यांपासीं नृप बोले ॥ ३ ॥**

दशरथ उवाच——

परिश्रान्तोऽस्मि लोकस्य गुर्वीं धर्मधुरं वहन् । सोऽहं विश्राममिच्छामि पुत्रं कृत्वा प्रजाहिते ॥ १ ॥
भवद्भिरपि तत्सर्वमनुवर्तध्वमद्य वै । अनुजातो हि मां सर्वैर्गुणैः श्रेष्ठो ममात्मजः ॥ २ ॥
पुरंदरसमो वीर्ये रामः परपुरंजयः । तं चंद्रमिव पुष्येण युक्तं धर्मभृतां वरम् ॥ ३ ॥ [श्लोक ३ ते ७ तं. प्रतीत नाहीत; सु. ग. या प्रतींत श्लोक १ ते ७ पैकी एकही श्लोक नाहीं.]
यौवराज्ये नियोक्तास्मि प्रातः पुरुषपुंगवम् । अनुरूपः स वो नाथो लक्ष्मीवांल्लक्ष्मणाग्रजः ॥ ४ ॥
त्रैलोक्यमपि नाथेन येन स्यान्नाथवत्तरम् । अनेन श्रेयसा सद्यःसंयोक्ष्येऽहमिमां महीम् ॥ ५ ॥
गतक्लेशो भविष्यामि सुते तस्मिन्निवेश्य वै । इति ब्रुवंतं मुदिताः प्रत्यनन्दन्नृपा नृपम् ॥ ६ ॥
वृष्टिमन्तं महामेघं नर्दन्त इव बर्हिणः । तस्य तद्वचनं श्रुत्वा सर्वकल्पस्य धीमतः ॥ ७ ॥ [वा. रा. 'अयोध्याकांड' सर्ग २, श्लोक ९ ते १७.]

**समस्तांसी सांगे दशरथ । राज्यी** [कं. व मु. 'अभिषेकावा'.] **अभिषेचावा रघुनाथ । हा माझा दृढ मनोरथ ।** [सु. गे. 'तुम्हासीं अर्थ कैसा मानला'; नि. घा. 'तुम्हासीं अर्थ मानला कीं'; कं. 'तुम्हासीं इत्यर्थ कैसा मानला'.] **तुम्हासी हा अर्थ मानला ॥ ४ ॥**

**समस्तांसी संमत । जो कीजे तो दृढ कार्यार्थ । तुम्ही माझे परम आप्त । निश्चितार्थ मज सांगा ॥ ५ ॥**

**ऐके वसिष्ठा विशेषज्ञा । अंगीं बाणली वार्धिक्य संज्ञा । आझुणीं राज्यभोगाची प्रज्ञा ।** [सु. 'काय मी'.] **कायिसी सर्वज्ञा मज आतां ॥**

**दुष्टदळणीं अति पुरुषार्थ । गोब्राह्मणादि प्रजा समस्त । नित्य राखतां** [त. नि. घा. 'सुखस्वार्थ'; सु. गे. 'सुखें स्वस्थ'; भा. 'सुखस्थ'; तं. 'सुखावस्थ'; पै. तु. कं. संपादित पाठ.] **सुखस्वस्थ । राज्यभारें श्रांत मी जालों ॥ ७ ॥**

अनुक्रमणिका

**ते श्रांतीसी विश्रांतता । राज्याभिषेकु रघुनाथा । त्या श्रीरामाची योग्यता । तुम्हां समस्तां** [भा/ २. ‘मानली कीं’; मु. ‘विदित असे’; पै. तं. तु. त. संपादित पाठ; कं. ‘विदित समस्ता तुम्हासीं’.] **विदितार्थु ॥ ८ ॥**

**श्रीराम सर्वगुणीं संपूर्ण । राज्यलक्षणीं सुलक्षण । साधुसेवेसी आल्हाद पूर्ण । गुरुवचन ब्रह्म-तुल्य ॥ ९ ॥**

**श्रीराम माझा ज्येष्ठीं जेष्ठ । श्रीराम बळियां बळिष्ठ । श्रीराम वरिष्ठां वरिष्ठ । श्रीराम** [तु. सु. गे. ‘श्रेष्ठ वंदनीं’; त. ‘श्रेष्ठ अतिवंद्य’; नि. घा. ‘वरिष्ठ वंदनीय’; कं. पं. भा/ २. तं. संपादित पाठ.] **श्रेष्ठ वंदनीय ॥ १० ॥**

**श्रीराम प्रौढाचेनि पडिपाडे । यम इंद्रवरुण** [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] **ते बापुडे । श्रीरामप्रताप तेजापुढें ।** [कं. नि. घा. त. तु. ‘खद्योतपाडें शशिसूर्य’; तं. ‘खद्योत पाडे पै सूर्य’; भा/ २. ‘खद्योत पाडे शशिसूर्य’; सु. गे. ‘खद्योता पडीपाडी शशीसूर्य’; पै. संपादित पाठ.] **खद्योत बापुडें शशीसूर्य ॥ ११ ॥**

**श्रीरामाच्या सुंदर शोभा । लाजा मदन विरे उभा । श्रीराम** [तं. ‘वल्लभी वल्लभा’; कं. त. ‘वल्लभीया वल्लभा’; मु. पाठ ‘वल्लभिया वल्लभा’; पै. भा/ २. तु. संपादित पाठ.] **वाल्लंभिया वालभा । लावण्यगाभा श्रीराम ॥ १२ ॥**

**श्रीराम निधडा रणगंधीर । सुबाहु मारिला दुर्धर । त्रिंबकभंगाचा बडिवार । शूर वीर श्रीराम ॥ १३ ॥**
**श्रीराम भुजांचा प्रतापपुंज । जिंकिला प्रतापी भार्गवद्विज ।** [तं. ‘श्रीराम भयाची निर्भय मज’; तु. ‘श्रीराम भयची निर्भय मज’; सु. ‘श्रीरामाचे भय मज’; गे. ‘श्रीरामाचेनि निर्भय मज’; कं. त. ‘श्रीरामें भयें निर्भय मज’; नि. घा. ‘श्रीराम भयेचि निर्भय’; पै. भा. संपादित पाठ.]

**श्रीरामें भयची निर्भय मज । होईन पूज्य त्रिलोकीं ॥ चैत्रमासीं पुष्य नक्षत्रें । राज्याभिषेकु श्रीरामचंद्रें । त्रैलोक्य भोगिजे तेणें नरेंद्र । हें भाष्य निर्धारिं गुरुवाक्य ॥ १५ ॥**

**माझा गुरु श्रीवसिष्ठ । तो त्रैलोकीं परम श्रेष्ठ । त्याचें वचन मज वरिष्ठ ।** [सु. गे. त. ‘रामराज्यपट्ट प्रतापें’; भा/ २. ‘रामराज्यें पट प्रभातें’; नि. घा. ‘रामा राज्यपट्ट प्रभाते’; तु. पै. संपादित पाठ; कं. ‘रामराज्यपट प्रभातें’.] **रामराज्यपाट प्रभाते ॥ १६ ॥**

**प्रातःकाळी रघुनाथ । अभिषेचणें निश्चितार्थ । गर्जोनि बोलिला दशरथ । तेणें समस्त** [कं. व मु. ‘आल्हादलें’.] **आल्हादी ॥ १७ ॥**

**राजे प्रजा सेना प्रधान । नगर नागरिक जन । आइकोनिं रायाचें वचन । उल्हास पूर्ण रामराज्यें ॥ १८ ॥**

**आइकोनियां घनगर्जित । मयूर केकारवें नाचत । ते रामराज्यें समस्त । उल्हासित** [त ‘जनलोक’; कं. व मु. पाठ ‘जन अवघे’; तं. ‘आवघे’; पै. भा/२. तु. संपादित पाठ.] **जनौघ ॥ १९ ॥**

जना ऊचु——
रामस्य पुरुषो लोके सत्यधर्मवतो गुणैः । समो न विद्यते कश्चिद्विशिष्टः कुत एव तु ॥ ८ ॥ [गे. प्रतीत हे दोन श्लोक २८ व्या ओवीनंतर दिले आहेत.]
बहुश्रुतानां वृद्धानां ब्राह्मणानामुपासिता । तेनास्येहातुलाकीर्तिर्यशस्तेजश्च वर्धते ॥ ९ ॥ [वा. रा. २–२–३३.]

**सुखावोनिया संपूर्ण । अवघे बोलती आपण । श्रीरामरायां शिरोरत्न । गुणनिधान श्रीराम ॥ २० ॥**

अनुक्रमणिका

**राम सत्यवादी पवित्र परम । असत्यवादी जपतां रामराम ।**
**तेही पावन होती निःसीम । सत्यासी विश्राम श्रीरामें ॥ २१ ॥** [पै. प्रतीत या ओवींचा आंकडा चुकीचा पडला आहे.]

**राम धर्मात्मा** [मु. पाठ 'धीर'.] **धैर्य परम । राम धर्माचें विश्रामधाम । धार्मिकी धर्मात्मा श्रीराम । धर्माश्रम श्रीराम ॥ २२ ॥**

**गुणीं गुणातीत श्रीराम । श्रीराम गुणांचें निजधाम ।** [मु. 'अप्रमेय आत्माराम'; कं. तु. 'पराप्रमेय अप्रेम'; पै. भा/२. तं. 'पराप्रमेया अप्रेम'; त. संपादित पाठ.] **पराप्रमेय परमप्रेम । पुरुषोत्तम श्रीराम ॥ २३ ॥**

**श्रीरामाची नवलस्थिती । निच नवी ब्राह्मण भक्ति । तेणें षड्गुण शरण येती । यश कीर्ति अतुळित ॥ २४ ॥**

**श्रीरामासीं समसमान । तिहीं लोकीं न दिसे आन ।** [मु. 'मग'; कं. 'परी'.] **मा त्याहूनि अधिक कोण । प्रमाणी प्रमाण नव्हे राम ॥ २५ ॥**

**ऐसें जाणोनि श्रीरामातें । श्रीराम राजाजी आमुतें । आम्हीं अभिषेचिला चित्तें । जाण निश्चितें पूर्वीचि ॥ २६ ॥**

**त्या अभिषेकाचि सत्यता । घरोघरीं हेचि कथा । श्रीराम राजाजी तत्त्वतां । जनीं वार्ता रामराज्य ॥ २७ ॥**

**प्रातः अभिषेकी रघुनाथ । सुमुहूर्त सोहळा वेदोक्त । तोहि पाहावया उल्हासयुक्त । रामानुगत सर्वस्वें ॥ २८ ॥**

**ऐसें बोलतां सकळां । त्यांच्या वाक्यसुमनमाळा । रायें आवडीं घातल्या गळां । पुत्रसोहळा** [तु. संपादित पाठ; कं. व मु. 'उत्साहे'; इतरत्र 'उच्छाव'.] **उच्छाव ॥ २९ ॥**

[तं. प्रतींत पुढीलपैकी एकही श्लोक नाही; तं. प्रतीत 'श्लोक' असे लिहून लगेच तिसावी ओवी दिली आहे; सु. गे.' प्रतींत इतर मुद्रित प्रतींत असलेले पहिले तीनच श्लोक आले आहेत; नि. घा. या प्रतींत संपादित प्रतींतील श्लोकांची व श्लोकचरणांची सरमिसळ झाली असून एकूण ६ श्लोक आले आहेत ते असे :——'इति प्रत्यर्चितान् राजा ब्राह्मणानिदमब्रवीत् । वसिष्ठवामदेवं च तेषामेवोपश्रृण्वताम् ॥ १ ॥
चैत्रः श्रीमानयं मासः पुण्यः पुष्पितकाननः । यौवराज्याय रामस्य सर्वमेवोपकल्प्यताम् ॥ २ ॥
राज्ञस्तूपरते वाक्ये जनघोषे महानभूत् । शनैस्तस्मिन्प्रशांते च जनघोषे जनाधिपः ॥ ३ ॥
वसिष्ठं मुनिशार्दूलं राजा वचनमब्रवीत् । अभिषेकाय रामस्य यत्कर्म सपरिच्छदम् ॥ ४ ॥
तदद्य भगवन्सर्वमाज्ञापयितुमर्हसि । तच्छ्रुत्वा भूमिपालस्य वसिष्ठो मुनिसत्तमः ॥ ५ ॥
आदिदेशाऽग्रतो राज्ञः स्थितान्युक्तान्कृतांजँलीन् । सुवर्णादीनि रत्नानि बलीन्सवौषधीरपि ॥ ६ ॥'
पै. भा. त. तु. संपादित पाठ.] दशरथ उवाच—

वसिष्ठं वामदेवं च तेषामेवोपश्रृण्वताम् । चैत्रः श्रीमानयं मासः पुण्यः पुष्पितकाननः ॥ १० ॥
यौवराज्याय रामस्य सर्वमेवोपकल्प्यताम् । श्वो भूते पुण्ययोगेन ब्रूत वो यदि रोचते ॥ ११ ॥ [वा. रा. अ. का. सर्ग ३, श्लोक ३ ते ४.]
अथाब्रुवन्नराः सर्वे पूर्वमेव नराधिप । रामो वाग्भिर्मनोभिश्चाभिषिक्तो हि नागरैः ॥ १२ ॥
तेषां तद्वचनं श्रुत्वा पौराणां तत्र हर्षजः । संघशोऽभून्महान् शब्दः साधु साध्विति जल्पताम् ॥ १३ ॥
शनैस्तस्मिन् प्रशान्ते तु जनघोषे नराधिपः । प्रणम्य गुरुमासीनमित्युवाच पुरोहितम् ॥ १४ ॥
अभिषेकाय रामस्य यत्कर्म सपरिच्छदम् । तदस्य भगवान्सर्वमाज्ञापयितुमर्हसि ॥ १५ ॥ [वा. रा. अ. कां. सर्ग ३, श्लोक ६ व ७.]

अनुक्रमणिका

तच्छ्रुत्वा भूमिपालस्य वसिष्ठो द्विजसत्तमः । आदिदेशाग्रतो राज्ञा गुणयुक्तं कृतांजलिः ॥ १६ ॥

**दशरथ बोले हर्षनिर्भर । वसिष्ठ वामदेवादि ऋषिवर । तुम्ही अवधारा समग्र । निज निर्धार अभिषेका ॥ ३० ॥**

**चैत्रमास अति पवित्र । वसंत वनशोभा विचित्र । गुरुपुष्य** [पै. खेरीज इतरत्र 'शुभ'.] **सुभग नक्षत्र । श्रीरामचंद्र अभिषेका ॥ ३१ ॥**

**ऐसा माझा निज निर्धार । तुम्हासी मानेल साचार । तरी प्रातःकाळीं रामचंद्र । तुम्ही समग्र अभिषेका ॥ ३२ ॥**

**आइकोनि रायाचें उत्तर । राजे** [मु. 'राजे प्रजा आणि नगरनर'; कं. तं. 'राजे प्रजाजन नगर'.] **प्रजाजन नागर । मने वचनें राजा रघुवीर । आम्ही साचार अभिषेचिला ॥ ३३ ॥**

**ऐसें बोलोनि समग्र । उल्हासें करिती जयजयकार । नादे कोंदलें अंबर । शब्दें सर्वत्र सुख गर्जे ॥ ३४ ॥**

**नाद सुखेसीं सुलीन होत । अवघे बैसले हर्षयुक्त । ते वेळीं उठूनी दशरथ । अभिवंदित सद्‌गुरु ॥ ३५ ॥**

**वंदुनी वसिष्ठाचे पाये । रामाभिषेका पाहिजे काये । तें सांगावया पाहे । सामर्थ्य आहे तुज** [कं. नि. घा. 'तुजपासी'.] **स्वामी ॥ ३६ ॥**

**राजे प्रजा प्रधान युक्त । मज सगट समस्त । आम्ही तुझे** [मु. 'आहों' हे पद अधिक.] **आज्ञांकित । तुम्ही रघुनाथ अभिषेचा ॥ ३७ ॥**

**आइकोनि रायाचें वचन । वसिष्ठ उठला संतोषोन ।** [नि. घा. 'अवलोकिती'.] **अवलोकितां सभेचे जन । ठेले उठून कृतांजली ॥ ३८ ॥**

**देशोदेशीचे भूपति । मुकुट कुंडलें छत्रपति । रायें आणिले अभिषेकार्थी । ते ते नृपति अवधारा ॥ ३९ ॥**

**पूर्वपश्चिम नृपति । उत्तर राजे चक्रवर्ती ।** [तं. नि. घा. 'दक्षिण दिशेचें'; सु. गे. 'दक्षिणेचे'; भा/२. 'दक्ष देशिचें'.] **दक्षिण देशीचे भूपति ।**[नि. घा. 'आले रघुपति अभिषेका'; कं. प्रतींत ४० व ४१ या दोन ओव्यांच्या चरणांची अदलाबदल झाली आहे.] **आले गढपति गढपाळ ॥ ४० ॥**

**पर्वतवासीचे पर्वती । म्लेंच्छ राजे नेणो किती । द्वीपोद्वीपीचे भूपति ।** [नि. घा. 'आले गढपति गढपाळ'.] **आले रघुपति अभिषेका ॥ ४१ ॥**

**देखोनि श्रीराम साटोप । भार्गव जयाचा प्रताप । तेणें धाकें** [तं. 'ते धाकें सकळ नृप'; त. तु. 'तेणें धाकें सकळ नृप'; कं. सु. नि. गे. घा. 'तेणें धाकें सकळहि नृप ॥'] **सकलै नुप । आपेंआप पै आले ॥ ४२ ॥**

अनुक्रमणिका

तेही राजे अवघे जण । करावया वसिष्ठ वचन । ठेले अंजुळी पुट जोडून । सावधान वचनार्थी ॥ ४३ ॥

वसिष्ठ मुखीचें वचन । काय देईल आज्ञापन । तें तें करावया सावधान । नृप संपूर्ण वचनार्थी ॥ ४४ ॥

आणिकहि देशदेशिक । प्रजाप्रधान [त. 'सकळहि लोक'; सु. तु. गे. कं 'सकळ लोक'; 'नि. घा. 'सकळिक'; पै. 'सकळै लोक'.] सकळैक । वसिष्ठ वचनाचे चातक । रघुकुळटिळक अभिषेका ॥ ४५ ॥

समस्त देखोनि सावधान । वसिष्ठ बोले अति गर्जोन । अवघे आणा उपायन । पट्टपूजन रघुनाथा ॥ ४६ ॥

शतानुशते कुंभ [कं. त. 'संपूर्ण'] सुवर्ण । नानारत्नीं परिपूर्ण । [मु. 'रायाहीं'.] राजीं आणावे आपण । पटपूजन रघुनाथा ॥ ४७ ॥

श्वेतवारू श्वेतहस्ती । श्वेत चामरे घेउनि हातीं । दशरथादि सकळ भूपति । पूजेप्रति उभे असा ॥ ४८ ॥

प्रजाप्रधान देशदेशिक । तेही यथानुशक्ति देख । आणावें जी निजकनक । रघुटिळक पट्टपूजे ॥ ४९ ॥

सपुच्छ सनख व्याघ्रचर्म । सुवर्णशृंगी वृषभोत्तम । छत्र पांडूर मनोरम । अति उत्तम आणावें ॥ ५० ॥

प्रातःकाळीं सुमुहूर्त । जे जे उपचार वेदोक्त । ते ते आणावे समस्त । अभिषेकार्थ श्रीरामा ॥ ५१ ॥

ब्राह्मणां द्यावें निमंत्रण । उत्तम निफजवा मिष्टान्न । सर्वकर्मीं ब्राह्मण भोजन । नित्य निर्विघ्न कार्यार्था ॥ ५२ ॥

रथ गज वाजी साळंकार । सेना शृंगारावी विचित्र । देवालयें [पै. तु. 'सकळ नर'; मु. 'अति पवित्र'; कं. 'देवालयें मनोहर'.] सकळनगर । [मु. 'राममंदिर'.] राजमंदिर शृंगारा ॥ ५३ ॥

स्वयें वसिष्ठें ऐसी ऐसी । आज्ञा दिधली समस्तासी । तें तें कार्य शीघ्रतेसी । अति उल्हासी पैं केलें ॥ ५४ ॥

वैकुंठीची पूर्ण ['प्रतिभा=प्रतिबिंब'] प्रतिभा । राजमंदिरीं [मु. 'आणिली'.] आली शोभा । चैतन्य तेजें मिरवे सभा । [भा. 'लाजे उभउभा कैलासु'; तं. त. सु. नि. गे. घा. कं. 'लाजे उभा कैलास'; पै. 'लाजे उभउभ्या कैलास.'] लाजे विरे उभा कैलासु ॥ ५५ ॥

देवालयीं मूळारंभा । स्वप्रकाशें प्रकाशगर्भा । चिदानंदें शोभे शोभा । गर्भी पद्मनाभा महापूजा ॥ ५६ ॥

राजमंदिरीं अगाध थोरी । ध्वजापताका [मुं. 'प्रासाद शिखरी'.] देवशिखरीं । [तं. 'विद्युतप्राय से अंबरी'; त. 'विजुःप्राय शोभा अंबरी'; मु. 'महोत्साह घरोघरीं'; कं. 'विद्युत्प्राय शोभती अंबरीं'.] विद्युत्प्राय शोभा अंबरीं । दारोदारीं रत्नदीप ॥ ५७ ॥

राजांगणीं वाडेकोडे । कुंकुम चंदनाचे सडे । नाना [सु. नि. गे. घा. खेरीज इतरत्र 'नाना चौक'.] रंगमाळा चहूकडे । लाजे त्यापुढें वसंतु ॥ ५८ ॥

अनुक्रमणिका

राजसभा शोभायमान । शोभेसी नंदनवन शरण । [त. सु. नि. गे. घा. तु. प्रतींत 'ये' हे अधिक पद.] लोटांगणी [कं. तं. त. सु. नि. गे. घा. 'चित्ररथवन'.] चैत्रवन । विराजमान श्रीरामें ॥ ५९ ॥

वैकुंठीचा श्रीराम रावो । त्याचे अभिषेकी उत्सावो । वैकुंठीचा सर्व समुदावो । आला पाहा हो अयोध्येसी ॥ ६० ॥

दासदासी नगरजन । राजे प्रजा सेना प्रधान । वस्त्रीं भूषणीं शोभायमान । वैकुंठभुवन सम शोभा ॥ ६१ ॥

राजबिदीं दोहीं हारी । शोभा शोभे नाना कुसरी । ध्वजापताका [तं. 'गिरिशिरीं'; कं. सु. त. गे. 'शिरीं गिरीं'; पै. भा/२. तु. 'शिरगिरी'.] शृंगारी । [त. 'सूर्यावरी दीपमाळा'; तं. भा/२. तु. कं. सु. गे. 'चर्यावरी दीपमाळा'; नि. घा. 'रचिल्या वळी दीपमाळा'.] बऱ्या वरी दीपमाळा ॥ ६२ ॥

[सु. गे. 'कस्तुरीचंदनकर्दमाक्त'; पै. भा. तं. कं. तु. त. 'कस्तुरीचंदनकर्दमोक्त'] कस्तुरी चंदन कर्दमयुक्त । मार्ग शिंपले सुवासित । वासें वसंत होय मूर्च्छित । श्रीरघुनाथ निजशोभा ॥ ६३ ॥

हाटवटी दोहीं बाहीं । चिद्रत्नें जडित शोभा पाही । हरिकीर्तनें ठाईं ठाईं । गर्जति देही हरिनामें ॥ ६४ ॥

मखरें शोभती कुसरी । मुक्ताफळांचिया हारी । सुमनमाळा च्युतांकुरीं । दारोदारीं तोरणें ॥ ६५ ॥

पूर्णकळश दारोदारीं । सदीप [मु. 'सदीप शोभा तयावरीं'; कं. 'सदीप मिरवती तयावरी'.] दीप तयावरी । गुढिया उभिल्या घरोघरीं । नरनारी उत्सावो ॥ ६६ ॥

कोठें अभिषेकाच्या वार्ता । कोठें करिती रामकथा । येकें अत्यंत एकाग्रता । श्रीरघुनाथा पाहावया ॥ ६७ ॥

निजनगरी शोभायुक्त । सकळजन उल्हासित । ते देखोनि दशरथ । जाला [तं. त. 'सुचित'; भा/२. 'संकोचित'; नि. घा. 'शंकित'.] सचिंत निजमानसीं ॥ ६८ ॥

श्रीराम अभिषेकाचा सोहळा । मी काय देखेन आपुलें डोळा । हें भाग्य दुर्लभ कपाळ । म्हणोनि डोळा अश्रु आले ॥

पाचारूनी श्रीरामासी । गुह्य सांगे तयापासी । [मु. 'म्हणे' हे अधिक पद.] प्रातःकाळीं गुरुपुष्यासी । यौवराज्यासी अंगिकारी ॥ ७० ॥

येरे चरणीं ठेविला माथा । [मुं. प्रतीत 'तंव' हे अधिक पद.] गहिंवरू आला दशरथा । आइकें बापा रघुनाथा । गुह्य तत्त्वतां सांगेन ॥ ७१ ॥

तुझ्या अभिषेकाचा निर्धार । जैंपासुनी केला साचार । तैंपासुनी ग्रह क्रूर । गगनीं अत्युग्र भासती ॥ ७२ ॥

[तं. प्रतीत १७ ते २० श्लोक नाहीत; नि. घा. या प्रतींत १९ वा श्लोक नाहीं. उरलेल्या तीन श्लोकांत पाठभेद बरेच असून ते तीन श्लोक खालीलप्रमाणे आले आहेत :—

अनुक्रमणिका

'अवष्टब्धं च मे राम नक्षत्रं दारुणग्रहैः। आवेदयंति देवज्ञा जन्मस्थो मां शनैश्चरः ॥ १ ॥
अपि चाद्याशुभान्नाम स्वप्नान्पश्यामि राघव। सनिर्घाता दिवोल्काश्च पतंति हि महास्वनाः ॥ २ ॥
प्रायेण च निमित्तानामीदृशानां समुद्भवे। राजा हि मृत्युमाप्नोति घोरां चापदमृच्छति ॥ ३ ॥'
सु. ग. प्रतींत नि. घा. प्रतींतील उपरोक्त श्लोकांपैकी पहिला व दुसऱ्याचे दोन चरण एवढेच आलेले आहेत.]
उपश्रुतं च मे राम नक्षत्रं पीडितं ग्रहैः। आवेदयन्ति दैवज्ञा जन्मस्थो मे शनैश्चरः ॥ १७ ॥
अपि चानभिप्रेतान्स्वप्नान्पश्यामि दारुणान्। सनिर्घाता महोत्काश्च पतन्ति स्वरनिस्वनाः ॥ १८ ॥
उपविष्टो विशाखासु रोहिणी ग्रसते ग्रहः। प्रवांति वाताः परुषा सशैला भूश्च कंपते ॥ १९ ॥
प्रायेण हि निमित्तानामीदृशानां समुद्भवे। राज्याद्वा भ्रश्यते राजा मृत्युं वाप्यधिगच्छति ॥ २० ॥ [वा. रा. अयो. कां. सर्ग १८, श्लोक ४, १७, १८, १९.]

**माझे राशीस शनीश्वर । सांगती ज्योतिर्विद नर । तोही लागत आतिक्रूर । पीडा दुर्धर तयाची ॥ ७३ ॥**

**माझें जे कां जन्मनक्षत्र । तेथें वक्री भौमशनीश्वर । तयासी मिनला अतिचार । अति सत्वर गुरु देखा ॥ ७४ ॥**

**मृग नक्षत्रें माझी उत्पत्ति । पुनर्वसु तुझी जन्म प्राप्ती । दोघांसी दिसताहे ग्रहगति । जाण निश्चिती रघुनाथा ॥ ७५ ॥**

**सूर्ययुक्त राहू रोहिणिसी । केतु बैसिलासे विशाखासी । ते दोघे वैरी सूर्यासी । रवि रोहिणीसी ग्रासूं पाहाती ॥ ७६ ॥**

**मृगीमिथुन माझी राशी । बारावे रवि राहु वृषभेसी । क्रूरग्रहगति दिसे ऐसी । विनाशासी निज मूळ ॥ ७७ ॥**

**शनि भौम दोघे वक्री । तेथेची गुरु आला अतिचारी । हे क्रूर माझे राशीवरी । तेची रामचंद्रीं बारावे ॥ ७८ ॥**

**अभ्रेंवीण अति** [पै. 'बोसाटे' (लेखन प्रमाद असावा).] **बोभाटे । वीजु पडती महानेटें । जीऊ जावो पाहे कडकडाटें । येणें उद्भटे** [त. 'सन्निपातु'; तं. 'अग्निपात'; सु. गे. आश्विनींपातु'; नि. घा. 'अति निःपातु'.] **अशनिपातु ॥ ७९ ॥**

**आणिकही एक दुःश्चिन्ह । म्यां देखिले दुष्ट स्वप्न । पुढील वाढिलें भाणें संपूर्ण । नेलें झडपून महाघारीं ॥ ८० ॥**

**सहित मेरू कुळाचळ । भूकंपु जाला प्रबळ । श्रीरामा या चिन्हाचें फळ । जाण केवळ अनिष्ट ॥ ८१ ॥**

**या चिन्हांचा निजविलासु । राज्यभ्रंश वनवासु । अवश्य होय जीवनाशु । परम त्रासु सुहृदासी ॥ ८२ ॥**

**यालागीं गा रघुनाथा । यौवराज्य अभिषेकता । अंगीकारी अतिशीघ्रता । प्रातःपुण्यता साधुनी ॥ ८३ ॥**

**राम म्हणे आज्ञा प्रमाण । म्हणोनियां वंदी चरण । रायें संतोषोनि जाण । पाठवी आपण निजधामा ॥ ८४ ॥**

**रामें पुसोनी नृपवरा । आला कौसल्ये मंदिरा । येरी देखोनि श्रीरामचंद्रा । नयनद्वारा निवाली ॥ ८५ ॥**

अनुक्रमणिका

राम सांगे कौसल्येपासीं । प्रातःकाळी यौवराज्यासी । रायें नेमिलें अभिषेकासी । तेणे उल्हासी कौसल्या ॥ ८६ ॥

श्रीरामराज्याभिषेक । तेणें कौसल्येसी हरीख । गौभूक्षौमांबरें कनक । विप्रां अनेक देती झाली ॥ ८७ ॥

हरिखें आला लक्ष्मण । त्यासी राम बोलिला आपण । माझें राज्य तें तुझें जाण । मीतूंपण आम्हां नाहीं ॥ ८८ ॥

गोडीगुळाचा विवेक । नांवे दोनी स्वरूप एक । तैसी आम्हां तुम्हां देख । [कं. सु. गे. घा. 'सर्वदा एकत्व सर्वकर्मीं'.] वेगळीक असेना ॥ ८९ ॥

अलंकार आणि कनक । आकार विकारी दोहीं एक । तैसे आम्ही तुम्हीं देख । सर्वदा [नि. घा. 'ऐक्य'; कं. 'वेगळिक असेना'.] एक सर्वकर्मीं ॥ ९० ॥

जैसा जीवु आणि प्राण । तैसे रामलक्ष्मण । आइकोनि श्रीरामवचन । केलें निंबलोण कौसल्या ॥ ९१ ॥

सौमित्रेसी आल्हाद पूर्ण । तिणे [मु. प्रतीत 'देखोनी' हे अधिक पद.] रामलक्ष्मण । ओवाळुनी दोघेजण । हरिखें आपण धनवांटी ॥ ९२ ॥

श्रीरामासी लोटांगण । घालुनिया लक्ष्मण । तुझे सेवेचे सुख संपूर्ण । यासी प्रमाण चरण तुझे ॥ ९३ ॥

श्रीरामा तुझे सेवेवीण । त्रैलोकीचें राज्य संपूर्ण । तें मज ब्रह्मस्वासमान । तुझी आण वातसे ॥ ९४ ॥

आइकोनि लक्ष्मणाचें वचन । श्रीरामें दिधलें आलिंगण । म्हणे तूं जीवलग संपूर्ण । सखा सज्ञन सर्वस्वें ॥ ९५ ॥

यावरी रघुनंदन । कौसल्ये सुमित्रेसी नमन । करूनि लक्ष्मणासी बोळवण । स्वधामा आपण स्वयें आला ॥ ९६ ॥

प्रातःकाळी अभिषेचन । रामसीतेसी उपोषण । सांगावया वसिष्ठ श्रेष्ठ पूर्ण । रायें आपण पाठविला ॥ ९७ ॥

सद्‌गुरु आला निजभवनासी । राम अत्यंत उल्हासी । लोटांगण घालुनी त्यासी । मग पायासी लागला ॥ ९८ ॥

पूजा मधुपर्क विधान । साळंकृत शतगोदान । देऊनि केलें चरणक्षाळण । तीर्थप्राशन केलें रामें ॥ ९९ ॥

ते वेळीं वसिष्ठें आपण । करविलें पुण्याहवाचन । रामसीतेसी उपोषण । केला संपूर्ण संकल्प ॥ १०० ॥

अभिषेकार्थ होमविधान । होमशेष घृतप्राशन । कुशास्तरणीं भूमिशयन । दोघांजणा करविलें ॥ १०१ ॥

अनुक्रमणिका

वसिष्ठ सांगे रायापासीं । प्रातःकाळीं अभिषेकासी । उपवास श्रीरामसीतेसी । कुशास्तरणेसी [मु. 'भूमिशयन'; तु. 'भूशयन'; त. 'ब्रह्मशयन'.] व्रतशयन ॥ १०२ ॥

राजा वसिष्ठासी करी नमन । केल्या श्रीरामा अभिषेचन । ऋणत्रयासी मी उत्तीर्ण । सत्य जाण गुरुवर्या ॥ १०३ ॥

वसिष्ठ बोले आल्हादेंसी । श्रीरामराज्याभिषेकासी । स्वर्गसुखेसी राया देखसी । [चु. प्रतीत 'या' हे अधिक पद आहे.] वाक्यें उल्हासी दशरथ ॥ १०४ ॥

राज्याभिषेक रघुनाथा । तेणें इंद्रादि देवां समस्तां । मांडली कल्पांत चिंता । तेहीं विधाता प्रार्थिला ॥ १०५ ॥

श्रीराम अभिषेकासी विघ्न । घरीच्या घरीं उपजे पूर्ण । ते युक्ती सांगेल चतुरानन । दशवदन वधार्था ॥ १०६ ॥

एका जनार्दना शरण । ब्रह्मरसें नवरस पूर्ण । विघ्नें सुखावें रघुनंदन । तें निरोपण अवधारा ॥ १०७ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीरामाभिषेकप्रारंभो नाम द्वितीयप्रसंगः ।

अनुक्रमणिका

## प्रसंग तिसरा

## कैकयी प्रायोपवेशन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीरामराज्याभिषेचन । तेणें इंद्रादिकां चिंता गहन । समस्त [नि. घा. 'देवीं'.] देव मिळोन । चतुरानन विनविला ॥ १ ॥

देव म्हणती ब्रह्मयासी । तुझें आश्वासन आम्हांसी । राम [तं. 'अवतरेल'; त. 'अवतार'; सु. नि. गे. घा. 'अवतरला'.] अवतरल्यां सूर्यवंशीं । तो रावणासी वधील ॥ २ ॥

सपुत्र सबंधु सप्रधान । राम करील राक्षसकंदन । तेणे देवांसी [तं. नि. घा. कं. 'बंधमोचन'.] बंदीमोचन । मिथ्या वचन [पै. भा/२. तु. खेरीज इतरत्र 'होऊ पाहे'.] हों पाहे ॥ ३ ॥

सत्य करी आपुलें वचन । आमचें करी [तं. नि. घा. कं. 'बंधमोचन'.] बंदीमोचन । आमच्या आपत्तीचें [मु. 'विंदान'.] विधान । सावधान अवधारी ॥ ४ ॥

इंद्रबारी चंद्र [कं. व मु. 'छत्रधारी'.] कऱ्हेरी । यम पाणी वाहे [कं. व मु. 'घरी'.] घरोघरीं । वायु सर्वदा [मुं. 'पुजे'.] पुंजे वोसरी । विधि तेथ करी दळाकांडां ॥ ५ ॥

[मु 'आश्विनीसूनू'.] अश्विनौ देव दोन्ही । [मु. 'तिहीं' हे अधिक आहे.] परिमळ द्यावे स्त्रियां लागुनी । विलंब होता अर्धक्षणीं । दासी धावोनि धुमसिती ॥ ६ ॥

[तं. 'रेणुका केलीसे'; सु. नि. गे. घा. 'मार्की असे'.] मारको केलीसे तराळी । [तु. तं. 'सखी बाळांची बाळांती पाखाळी'; सु. नि गे. घा. कं. 'सखी बाळंती प्रक्षाळी';] सटी बाळांची बाळांती प्रक्षाळी । रात्री [तं. सु. नि. गे. घा. 'जागर घाली'; कं. त. जागेली घाली; भा/२. तु. 'जागें घाली'.] जागे घाला कराळी । मेसको वळी शौभनिका ॥ ७ ॥

मैराळ देवो कानडे । करी राक्षसांची दाढ्याखांडे । आरसा न दखवितां ज्यापुढें । तोचि रोकडें बुकाली ॥ ८ ॥

नवग्रहांची पीडा गाढी । ते रावणे घातले बांदवडी । पाई घालुनियां बेडी । [कं. तं. 'पाईच्या बुडी आडकविले'; त. 'पायीं त्या बुंडीं आडकविलें'; भा/२. 'पाइच्यां बुडी अडविलें'; सु. नि. गे. घा. 'पायरीबुडी अडकविले'.] मंचका बुद्धीं आडविलें ॥ ९ ॥ [तु. प्रतीत ही ओवी नाहीं.]

राहु केतु शनी अंगारी । यांची पीडा सुरासुरीं । रावणें करुनी ते पायरी । मंचकावरी [तं. 'वळपतों'; त. 'वोळगतु'; कं. सु. नि. गे. घा. 'वेंघतु'; पै. भा/२. संपादित.] वळघतु ॥ १० ॥ [तु. प्रतींत ही ओवी नाही.]

अनुक्रमणिका

विघ्न राहो न शके ज्यापुढें । तो गणेश होऊनी बापुडे । गाढवांचे कळप गाढे । चहूंकडे वळीतसे ॥ ११ ॥

अग्नीसी आपदा बहुवस । रावणाचे मैळे असोस । नानापरीचें स्पर्श दोष । धुयी अहर्निश धुपधुपीत ॥ १२ ॥

उदक क्रिया वरुणा हातीं । व्यजन सेवा नित्य वसंती ।
[त. 'निरोपु पुसावया'; भा/२. तुं. कं. 'निरोपु सांगाव्या'; सु. नि. गे. घा. 'निरोप सांगावया.'] निरोपण सांगावया बृहस्पति । प्रजापति [सु. नि. घा. 'शांतिपाठक'; त. तं. गे. 'शांतिपाठ'.] शांतिपाठा ॥ १३ ॥ [या ओवीनंतर 'त.' प्रतीत पुढील ओवी आली आहे :— 'सूर्यः दीपधर । पर्जन्य सडा घालीं समग्र । ऐसा नानापरी अंगीकार । उभे जोडोनी कर आसवे ॥']

ऐसे आम्ही देव समस्त । रावणाचे नित्यांकित । लंके आलिया रघुनाथ । [नि. घा. 'बंधनिर्मुक्त करील'; तं. तु. सु. गे. 'बंदी निर्मुक्त आम्ही होऊ'; कं. 'बंद निर्मुक्त होऊन'.] बंदी निर्मुक्त आम्ही होऊं ॥ १४ ॥

राघवा राज्याभिषेचन । तैं त्यासी न घडे लंका गमन । आमचे नव्हे बंदी मोचन । अति दीन [मु. 'वदताती'.] विनविती ॥ १५ ॥

आइकोनि देवांची विनंति । ब्रह्मा विचारी निज चित्तीं । राज्याभिषेका विघ्नप्राप्ती । ते दृढ युक्ति योजिली ॥ १६ ॥

अविद्येचा अति लाडिका । कार्यनाशासी [कं. व मु. 'अति नेटका'.] निज नेटका । विघ्न करावया रामाभिषेका । विकल्प देखा धाडिला ॥

विकल्प म्हणे ब्रह्मदेवा । पट्टाभिषेक श्रीराघवा । तेथें माझा कोण केवा । सर्वथा रिघावा नव्हे माझा ॥ १८ ॥

जेथ श्रीरामाचें नाम । तें स्थान मज अति दुर्गम । रामराज्यासी विघ्न परम । तें मज कर्म ठाकेना ॥ १९ ॥

श्रीरामाचें राज्य जेथ । विकल्प केवी रिघे तेथ । [तं. 'श्रेष्ठ सर्व तूं सामर्थ्य'; कं. सु. गे. 'अभिष्ट सर्वज्ञ समर्थ'; भा/२. त. नि. घा. 'श्रेष्ठा सर्वज्ञा'.] स्त्रष्टा सर्वज्ञ तूं समर्थ । श्रीरामीं पुरुषार्थ नचले माझा ॥ २० ॥

ब्रह्मा सांगे गुह्य गोठी । न पडोनि श्रीरामाचे दृष्टी । रिघावें मंथरेच्या पोटीं । विकल्पा पुष्टी तीमाजी ॥ २१ ॥

मंथरा कैकयीची आंदणी दासी । [त. 'ते दासीकन्या परियसी'; सु. गे. 'ते 'दासीकन्या प्रीय तियेसी'; नि. घा. 'ते दासी भरथ राज्या अभिलाषी'.] ते दासी कन्या परंपरेसी ।
ते सदा श्रीरामाचे द्वेषी । सापत्न भावेसी अति दुष्ट ॥ २२ ॥

जेथ श्रीरामाचा द्वेष । तेथ विकल्पा वस्ती सावकाश । तीमाजी करुनिया प्रवेश । करी विध्वंस अभिषेका ॥ २३ ॥

विध्वंसूनी अभिषेकासी । श्रीराम करावा वनवासी । राज्याभिषेक भरतासी । या [त. 'या कार्यासी विघ्नकारी'; नि.

अनुक्रमणिका

घा. 'या कार्यार्थासी शीघ्र करी'.] कार्यासी शीघ्र करी ॥ २४ ॥

विकल्प म्हणे वचन सत्य । मंथरा वसे अयोध्ये आंत । माझा प्रवेश नव्हे तेथ । केवी कार्यार्थ साधेल ॥ २५ ॥

ब्रह्मा सांगे विकल्पासी । नगरा बाहेरी वनक्रीडेसी । मंथरा येईल आरामासी । [त. तु. 'प्रवेश ये संधी'; भा/२. कं. 'तुज प्रवेश ते संधी' सु. गे. 'तुझा प्रवेश ते संधी'; नि. घा. 'तुझ्या प्रवेशासी तेथे संधी'.] तुज प्रवेशी ते संधी ॥ २६ ॥

विकल्प लागे ब्रह्मा पायी । प्रवेशेन मंथरादेहीं । वश्य करीन कैकेयी । तऱ्ही राज्य नाहीं भरतासी ॥ २७ ॥

श्रीराम ज्येष्ठ भरत कनिष्ठ । कैसेनि [मु. 'घडेल'.] घडे राज्यपाट । वचन न मानिती वरिष्ठ । ज्येष्ठ श्रेष्ठ निजज्ञाते ॥

ब्रह्मा म्हणे विकल्पासी । तूं सर्वज्ञ ज्ञाता होसी । भरत पावे रघुराज्यासी । त्या [नि. घा. 'मी' हे पद अधिक.] वर्मासी सांगेन ॥ २९ ॥

दशरथें निज भाकेसी । दोनी वर दिधले कैकयीसी । एकें वरें राम वनासी । एके भरतासी राज्यपाट ॥ ३० ॥

आइकोनि ब्रह्ययाची गोठी । विकल्प बांधे शकुन गांठी ।
संचरावया मंथरेच्या पोटीं । अति संकटी चालिला ॥ ३१ ॥

अयोध्या देखोनि रामप्रतापें । विकल्प धाके चळीं कांपें । जेथीचा तेथ स्वयें लपे । श्रीरामदर्पें साशंक ॥ ३२ ॥

गुप्त राहे [नि. 'रहावया बुडीं'.] व्याहडिया बुढीं । लपे हिवराच्या खोडीं । निळीचा सुनीळ झाडी । देऊनी दडी स्वयें राहे ॥ ३३ ॥

म्हणउनि [मु. 'ती'.] ये झाडें जाण । अपवित्र म्हणति सज्ञन । तें तें विकल्पाचें स्थान । विध्वंसन शुभकार्या ॥ ३४ ॥

या झाडां वेगळां [तं. व मु. 'कांही'; तु. 'केही'.] कांहीं । विकल्प स्पर्शावया ठावो नाहीं । यालागीं तें निंद्य पाही । सर्व कार्या अपवित्रें ॥ ३५ ॥

कळींग फळीं [त. 'जेथ विकल्पाची वस्ती'; नि. 'कलिंगफळीं अपवित्र वस्ती'.] विकल्पवस्ती । जे सेवी त्या विकल्प प्राप्ती ।
मंथरेसी त्या फळांची प्रीति । देखे अवचिती आरामीं ॥ ३६ ॥

मंथरा आली आरामासी । देखोनि कळींग फळासी । ते जाती अति उल्हासी । सेवावयासी सादर ॥ ३७ ॥

कळींग [कं. सु. गे. 'कलिंग फळा आवडी भारीं'; नि. घा. 'कळिंग फळ आवडें भारी'; तं. 'कळींग फळाची आवडीं भारी'.] फळीं आवडी

**भारी । सेवितां अति प्रीतिकरी । विकल्प संचारला भीतरीं । क्षणामाझारीं व्यापिली ॥**

**मग विचारी हृदया आंत । पढियंतीचा सुत भरत । तो सांडूनिया रघुनाथ । राज्य पावत हें कुडें ॥ ३९ ॥**

**मातुळा दवडूनिया भरत । मागें अभिषेकी रघुनाथ । केवळ कुडा हा दशरथ । अति अनर्थ हा आम्हां ॥ ४० ॥**

**राज्य** [नि. घा. 'राज्य आल्या'; सु. गे. कं. 'राज्य जाल्या'.] **जाहाल्या श्रीरामासी । भरत होईल परदेशी । कैकेयी होईल कौसल्यादासी । मग आम्हांसी सुख कैचें ॥**

**ऐसी भावना भावुनिं । रामराज्याचा द्वेष मनीं । मंथरा क्रोधाग्नी होऊनी । कैकेयीभुवनीं प्रवेशली ॥ ४२ ॥**

**मंथरा सहजें श्रीरामातें द्वेषी । आंगण झाडी द्वेष भावेंसी ।**
**पुढें असतां श्रीरामासी । रज त्यापासी लोटिलें ॥ ४३ ॥**

**राम म्हणे मंथरेसी । द्वेषें** [कं. व मु. प्रतींत 'कां' हे अधिक पद.] **वरतें न पहासी । ते तूं अधोमुख कुब्जा होसी । श्रीरामें तिसी शापिलें ॥ ४४ ॥**

[नि. घा. 'त्या'.] **त्याचि शापाचे प्राप्तीसी ।** [नि. घा. 'पावली सत्वर आघातेसी'; त. तु. सु. गे. 'पावली भरथ आघातासी'; कं. प्रतीत ही ओळ नाही.] **पावेल भरत आघातासी । यालागी कुब्जा हें तिसीं । स्वभावेंसी निजनाम ॥ ४५ ॥**

**रामराज्याचा सोहळा । जंव जंव मंथरा देखे डोळां । तंव तंव क्रोध चढे बळा । द्वेष आगळा आक्रोश ॥ ४६ ॥**

**कैकेयीचां राजभवनीं । रामराज्याचा उल्हास मनीं । गुढिया तोरणें ध्वजा सुमनीं । मंथरा देखोनि अति तप्त ॥ ४७ ॥**

**श्रीराम राज्यें उल्हासोनीं । कैकेयी अलंकार भूषणीं । पर्यंकी विश्रांत वोटंगोनी । दोघीजणी विड्यां देती ॥ ४८ ॥**

**एकी घालिती विजणवारा । तंव तेथ आली** [कं. तु. नि. घा. त. 'जी' हे पद नाही.] **जी मंथरा । कोध्रें नेत्र भवंडी गरगरां । द्वेषें थरथरां कांपती ॥ ४९ ॥**

मंथरा उवाच——

उत्तिष्ठ मूढे किंशेषे सौभाग्यवलगर्विते । उपलुप्तमघौघेन नात्मानमवबुध्यसे ॥ १ ॥
अनिष्टे सुभगाकारे सौभाग्येन विकत्थसे । चलितं तव सौभाग्यं नद्याः स्रोत इवोष्णगे ॥ २ ॥
[मु. प्रतीत हा श्लोक नाहीं; त. प्रतीत श्लोक १ ते ३ नाहीत. (या अध्यायात असलेल्या संस्कृत श्लोकांपैकी एकही श्लोक तं. प्रतीत नाही).] एत्तच्छ्रुत्वा तु कैकेयी सरभं परुषं वचः । कुब्जायाः पाददर्शिन्या प्रष्टुं समुपचक्रमे ॥ ३ ॥ [वा. रा. अ. कां. सर्ग ७, श्लोक १४, १५, १२.]

**मंथरा अति क्रोधेसीं । काय बोले कैकेयीसीं । उठी मूढे काय निजसी । सुख मानिसी तें दुःख ॥ ५० ॥**

अनुक्रमणिका

**रामराज्याचें मानिसी सुख । गुढिया तोरणें अति हरिख । तें तुज आलें महादुःख । परी तूं मूर्ख नेणसी ॥ ५१ ॥**

**मी रायाची पढियंती ।** [तं. भा/२. तु. कं. 'येणें गर्वें'; सु. गे. 'या गर्वें'; नि. घा. 'तेणें गर्वें'.] **येणें भ्रमें तुज पडिली भ्रांति । सौभाग्य गेलें कौसल्येप्रती । तें तूं निश्चिती नेणसी ॥ ५२ ॥**

**जळें केळी पोफळी वाढती । तो जळ स्रोत आल्या मूळाप्रति ।**
**तेणेची ते वृक्ष उलथती । ते नाशस्थिती तुज आली ॥ ५३ ॥**

**आइकोनी मंथरा उग्रवाणी । कैकयी सौभाग्य शिरोमणी । तिसी पुसे आश्वासोनि । क्रोध कैसेनि तुज आला ॥** [सु. गे. घा. या प्रतींत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :–– 'ऐकोनी मंथरेची उग्रवाणी । तिसी पुसें आश्वासोनी । तूं कां ऐसी वदसी वाणी । क्रोध कैसेनि तुज आला ॥']

कैकयी उवाच––

कैकेयीत्वब्रवीत्कुब्जां कच्चित्क्षेमं न मंथरे । विषण्णवदनां हि त्वां लक्षये भृशदुःखिताम् ॥ ४ ॥ [वा. रा. अ. कां. सर्ग ७, श्लोक १७.]

**तुज कोणें काय अपमानिलें । तुज कोणें काय गांजिले । तुज कोणें काय बोलिलें । तें मज वहिले सांग पां ॥ ५५ ॥**

**तूं माझी जीवलग होसी । कधीं क्रोध नेदखे तुजपासी ।**
**क्रोध सांडावा मज सांगसी । ते तूं दुःखी होसी अति क्रोधें ॥ ५६ ॥**

**तुझा ठाईं चिंता दारुण । चिंतेनें मुख दिसे** [नि. घा. 'माळिण'; भा/२. 'विद्वज्ञ'; कं. 'हीनदीन'.] **विवर्ण । ऐसें तुज दुःख कोण । तें मज संपूर्ण सांग पां ॥ ५७ ॥**

**तुज कोण बोलिलें दुष्ट मातु । कोणे तुजकडे उचलिला हातु ।**
**त्याचा मी** [पै. भा/२. खेरीज इतरत्र 'करीन'.] **करवीन घातु । समूळ वृत्तांतु मज सांग ॥ ५८ ॥**

मंथरोवाच––

[तं. प्रतीत या ठिकाणी एकही संस्कृत श्लोक नाही; त. प्रतीत ५, ६ व ७ हे तीनच श्लोक आहेत; सु. नि. घा. या प्रतींत श्लोक ५ ते ९ या श्लोकांतून काही चरणार्थ घेऊन पुढीलप्रमाणे दोन श्लोक दिले आहेत :–– मंथरा तु वचः श्रुत्वा कैकेय्या मधुराक्षरम् । उवाच क्रोधसंयुक्ता वाक्यं वाक्यविशारदा ॥ १ ॥
सास्म्यगाधे भये मग्ना दुःखशोकसमन्विता । दह्यमानानलेनैव त्वद्धितार्थमिहागता ॥ २ ॥']

श्रुत्वा कैकेया मधुरं वाक्यं वाक्यविशारदा । अक्षेमं सुमहद्देवि प्रवृत्तं त्वद्विनाशनम् ॥ ५ ॥
रामं दशरथो राजा यौवराज्येऽभिषिंचति । सास्म्यगाधे भये मग्ना दुःखशोकपरिप्लुता ॥ ६ ॥
दह्यमानालेनैव त्वाद्धितार्थमुपागता । तव दुःखेन कैकेयि मम दुःखं महद्भवेत् ॥ ७ ॥
त्वद्वृद्धया मम वृद्धिश्च भवेदिति न संशयः । उग्रत्वं राजधर्माणां कथं देवि न बुद्धयसे ॥ ८ ॥
धर्मवादी शठो भर्ता लक्ष्मवादी च दारुणः । शुद्धभावेन जानीषे तेनैवमतिसंधिता ॥ ९ ॥ [वा. रा. अ. कां. सर्ग ७, श्लोक १८, २०, २१, २२, २३ व २४.]

अनुक्रमणिका

आईकोनि कैकेयीचें वचन । मंथरा जाली क्रोधायमान । तुज आलें वो दारुण विघ्न । तें तूं आपण नेणसी ॥ ५९ ॥

राजा दशरथ आपण । तुज छळितो संपूर्ण । त्याचें तूं नेणसी लक्षण । [नि. घा. 'पढियंतीपणें अतिगर्वी'; सु. गे. 'पढियंती पूर्ण अतिगर्वी'.] पढियंतेपण अति गर्वी ॥ ६० ॥

तूं [मु. प्रतीत 'जे' हे अधिक पद.] गर्वित राजवैभवेसीं । तें राज्य राजा देतो श्रीरामासी । वैभव गेलें कौसल्येसी । तूं नेणसी मूर्खत्वें ॥ ६१ ॥

तुज आलें दुःख [नि. घा. या प्रतीत हे पद नाही.] शोक गहन । त्यामाजीं मी अति निमग्न । तुझेनि दुःखें दह्यमान । तुझें मूर्खपण देखोनि ॥ ६२ ॥

तुझ्या वृद्धीं मी वर्धमान । तुझेनी सुखें सुख संपन्न । तुझेनि दुःखें दह्यमान । तुझेनी जाण अति [मु. 'संतप्त'.] तप्त ॥ ६३ ॥

[कं. 'राज्य वैभव वल्लभेसी । तेणेची रायें तूं ठकविलिसी'; तं. 'राज्यवैभवे लाडे जसी । तेणेंची राया ते तुटसी'; तं. 'राज्य वैभवे वळगजसी'; तु. 'राज्यवैभव वलोजसी । तेणे राये तूं ठकीजेसी ।' सु. गे. घा. 'राज्य वैभव वल्लभासी । तेणेंची राज्ये तू ठकलिसी ।'; नि. 'राजा वैभव लोभें तुजसी'.] राज्यवैभवें वल्गेजसी । तेणेची रायें ठकीजसी । भरत दवडूनी मातुळासी । मागें रामासी राज्य पाटु ॥ ६४ ॥

राज्य दिधल्या श्रीरामासी । [भा/२. 'दासभोग'; सु. गे. 'दासभाव'; नि. घा. 'दास्य भोग'.] दासभागु तो भरतासी । सत्ता सामर्थ्य कौसल्येसी । तूं श्लाघसी मूर्खत्वें ॥ ६५ ॥

[मु. प्रतीत 'तूं' हे अधिक पद.] माझें वाक्य विवेकें विवरी । होई भरतासी साहाकारी । आपलें हित आपण करी । [पै. भा/२. खेरीज इतरत्र 'गर्वावारी'.] गर्वावाऱ्ही ठकों नको ॥

आइकोनि मंथरेचें वचन । [कं. व मु. प्रतींत 'झाली' हे अधिक पद.] कैकयी सुख संपन्न । रत्नखचित कंठाभरण । दिधलें [सु. गे. 'आंदण'; नि. घा. 'दान'.] आपण मंथरेसी ॥ ६७ ॥

कंठीचें पदक अमोलिक । मंथरेसी देऊनि देख । रामराज्याचें सर्वांसी सुख । तुचि कां दुःख मानिसी ॥ ६८ ॥

कैकयोक्ति——

राम वा भरते वाहं विशेषं नोपलक्षये । तस्मात्तुष्टास्मि यद्राजा रामं राज्येऽभिषेक्ष्यति ॥ १० ॥ [कं. व मु. प्रतींत 'झाली' हे अधिक पद.]

भरता होउनियां अधिक । राम प्रिय मज आत्यंतिक । तूं मूर्खत्वें मानिसी दुःख । मज महासुख रामराज्यें ॥ ६९ ॥

भरत इष्ट राम अनिष्ट । ऐसें मानी तो महापापिष्ट । राम ज्येष्ठा अति ज्येष्ठ । राज्याभीष्ट श्रीराम ॥ ७० ॥

जैसाचि भरत तैसाचि श्रीराम । मज तंव दोन्ही सम समान ।

अनुक्रमणिका

कुब्जे तूं कां मानिसी विषम । मूर्ख परम तूं येकी ॥ ७१ ॥

आइकोनि कैकेयीचें वचन । कुब्जा क्रोधें मूर्च्छापन्न । कंठीचे काढूनी आभरण । दिधलें टाकूनी अतिरागें ॥ ७२ ॥

राज्य गेलें श्रीरामासी । वैभव गेलें कौसल्येसी । ठकिलें दशरथें तुम्हासी । सुख मानिसी मूर्खत्वें ॥ ७३ ॥

कुब्जा अतिक्रोधें बोलत । कैकेयी तीतें संबोखित । राम रायाचा ज्येष्ठ सुत । अधिकार प्राप्त राज्याचा ॥ ७४ ॥

राम [तं. 'राम गुणा गुण गंभिर'; भा/२ सु. नि. गे. घा. 'राम गुणी गुणगंभिर'.] गुणागुणी गुणगंभीर । त्रैलोक्यामाजीं महाशूर । त्यासीच राज्याचा अधिकार । तूं पामर रामद्वेषें ॥ ७५ ॥

राम भरताचें करी वोखटें । हे तंव काळत्रयीं न घटे । कुब्जे बोलसी तितुकें [पै. भा/२. खेरीज इतरत्र 'खोटे'.] वोखटे । राम तूं हट्टे द्वेषिसी ॥ ७६ ॥

आइकोनि कैकेयी [कं. व मु. 'कैकयीची गोष्टी'.] गोठी । कुब्जा रागें कपाळ पिटी । तूं येकी [तं. भा/२. तु. त. 'तूं एकी महामूढ सृष्टीं'; मु. 'तूं एकी मूढ या सृष्टी'.] महामूर्ख सृष्टी । राम राज्यपट्टीं बैसविसी ॥ ७७ ॥

कैकेयी नायिके आपल्या बोला । ऐसा मंथरा निश्चयो केला ।
तुज दुःख नेदखवें मजला । प्राण आपला मी [तं. 'देईन'; त. सु. नि. गे. घा. 'त्यागीन'.] त्याजीन ॥ ७८ ॥

म्हणोनि [पै. भा/२. खेरीज इतरत्र 'गडबडा'.] गडबडीया लोळे । केस सुटले मोकळे । कैकेयी [मु. 'उठवोनि तये वेळें'.] उठुनियां कळवळे । भावबळें आळंगी ॥ ७९ ॥

क्षेम देतां नवलपरी । विकल्प होतां मंथरे उदरीं । रिघाला कैकेयी माझारीं । [मु. 'क्षणाभीतरीं अति वेगें'.] खेवांभीतरी क्षणमात्रें ॥ ८० ॥

हृदया हृदय लागतांदेख । दोहीं ठाई विकल्प एक । वाढीनला आत्यंतिक । रामाभिषेक दृढद्वेषी ॥ ८१ ॥

मंथरा बोले कैकेयी प्रती । रामराज्य तुज अपघाती । ते तूं नमनिसी चित्तीं । म्यां तुज किती शिकवावें ॥ ८२ ॥

दास दासी तुज अनेक । परी ते दशरथी सेवक । तुज आप्तत्वें मीचि एक । मजहि मूर्ख तूं म्हणसी ॥ ८३ ॥

सपत्न ते केवळ शत्रु । तूं हा नमनिसी माझा मंत्रु । येच विषीं शास्त्र विचारु । [मु. 'पूर्वपारु'.] पूर्वापरु सांगेन ॥ ८४ ॥

अनुक्रमणिका

**कश्यपापासूनि संभूत । सपत्न बंधू देवदैत्य ।** [कं. व मु. प्रतींत 'ते' हे अधिक पद.] **येरयेरांचा करिती घात । पुराणार्थ गर्जति ॥ ८५ ॥**

**येचि अर्थी** [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] **वो वेदोक्ति । याज्ञवल्क्य महामूर्ति । बोलिला उपनिषदे प्रति । तेही** [नि. घा. 'प्रचिती'; पै. भा/२. तं. तु. सु. गे. कं. 'वेदश्रुति'.] **वेदोक्ति अवधारीं ॥ ८६ ॥**

श्रुतिवेदोक्त——

द्वया ह प्रजापत्या देवाश्चासुराश्च ततः । कानीयसां एवं देवज्यायसा असुरास्ते एषु लोकेषु स्पर्द्धतम् ॥ ११ ॥ [तं. व मु. प्रतींत हा श्लोक नाही.]

**एवं वेदशास्त्रीं विचारी । सपत्न ते मुख्य वैरी । त्वाहीं पुराण परिसिलें घरीं । तुज गर्वेंकरी नाठवें ॥ ८७ ॥**

देवासुरविमर्दाश्च श्रुता बहुविधा त्वया । स्वार्थास्वार्थ स्वमुद्दिश्य भ्रात्रा भ्राता वहिष्कृतः ॥ १२ ॥
भातृणामेकजाताना मेकद्रव्याभिलाषाम् । जिजीषूणां न पश्यामि सौभात्रं क्वचिदप्यहम् ॥ १३ ॥

**देव आपुलें स्वार्थसिद्धि । दैत्य मारिती महायुद्धीं । दैत्य आपुल्या हितावबोधी । देवांते** [मु. प्रतीत हे पद नाही; कं. 'युद्धीं'.] **त्रिशुद्धी ग्रासु पाहाती ॥ ८८ ॥**

**पाहें पां श्वानाचिया परी ।** [तं. 'भांडण लागे एकाद्वारीं'; मु. 'भांडु लागती एका हारीं'; कं. 'भांडण लागे एकोदरी'.] **भांडण लागे एका हारी । तैसाचि कळहो राजपुत्रीं । कैंची मैत्री सापत्नां ॥ ८९ ॥**

**दिती देवांची सापत्न माता । तिसी गरोदर असतां । तिच्या गर्भाच्या करावया घातां । इंद्र विनतता सेवा करी ॥**

**पाहोनियां विषम संधी । इंद्र तिचा गर्भ** [तं. मु. 'वधीं'; भा/२. त. 'बांधीं'; कं. 'भेदी'.] **बाधी । वज्रें** [तं. 'सप्तताळें'; कं. 'सप्रधा'.] **सप्तसप्तधा छेदी । केलें** [मु. 'विशुद्ध'; कं. 'विधीं'.] **त्रिशुद्धीं मरुद्‍गण ॥ ९१ ॥**

**यालागीं सपत्नासी थोर । स्वभावें सदा नित्य वैर । हा तूं नेणसी विचार । मजचि पामर स्वयें म्हणसी ॥ ९२ ॥**

**आइकोनि मंथरेच्या बोला । कैकेयीसी उल्हास झाला । राज्याभिषेक नव्हे भला । श्रीरामीं धरीला दृढ द्वेष ॥ ९३ ॥**

**राम ज्येष्ठ भरत कनिष्ट । कनिष्टासी राज्यपाट । वचन नमनीं** [कं. व मु. प्रतींत 'स्वयें' हे अधिक पद'.] **हें वसिष्ठ । तो अतिश्रेष्ठ निजज्ञानें ॥ ९४ ॥**

**जऱ्ही म्यां राजा वश केला ।** [तं. 'तरी वसिष्ठ नायके या बोला'; सु. गे. कं. 'तरी वसिष्ठ नव्हे माझ्या बोला'; नि. घा. 'तरी वसिष्ठ नायके माझ्या बोला'.] **वसिष्ठ नायिके ऐसिया बोला ।**

अनुक्रमणिका

[सु. गे. 'कनिष्ट राज्यपूत्र'; तं. त. नि. घा. 'कनिष्टा राज्यपट'.] कनिष्ठा राज्यपाट [पै. भा/२. तु. 'विहीला'.] वहिलां । नाहीं बोलिला शास्त्रार्थ ॥ ९५ ॥

वसिष्ठ सांगेल शास्त्रार्थ । तेथ काय करील दशरथ । अटक पडिलिया वेदोक्त । राज्य भरत केवीं पावे ॥ ९६ ॥

मंथरा सांगे कैकयीसी । जरी तूं माझा बोल करिसी । राज्य साधीन भरतासी । क्षणार्धेसी मी [तं. 'होईल देख'; नि. घा. 'मी एक'.] देख ॥ ९७ ॥

कैकयी बोले पुडती । कोण्या युक्तीं राज्यभरती । साधिसी ते उपपत्ति । यथा निगुती मज सांग ॥ ९८ ॥

वसिष्ठ वामदेवादि ऋषि । राज्य मानिती भरतासी । ते तुज युक्ति आहे कैसी । यथार्थेसी मज सांग ॥ ९९ ॥

मंथरा बोले आपण । तुझी तुज नाहीं आठवण । रायें करूनिया भाषण । दोनी वर पूर्ण [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] तुज दिधले ॥ १०० ॥

ते दोन्ही वर रायापासी । मागावे ये संधीसी । एकें [मु. 'एकें राम वनवासीं । एकें भरथासी राज्यपद'.] राज्यभाट भरतासी । एकें वनवासी श्रीराम ॥ १०१ ॥

पूर्वदत्त वर मागतां आपणासी । काहीं नोबलवें वसिष्ठासी ।
नेदी न म्हणवे [नि. घा. 'दशरथासी'.] रायासी । निजभाकेसी गुंतला ॥ १०२ ॥

आइकोनि मंथरेचें वचन । कैकेयीसी विस्मयो [नि. घा. 'पूर्ण'.] गहन ।
कुब्जे तूं तंव [कं. व मु. प्रतींत 'अति' हे अधिक पद.] सज्ञान । वरद स्फुरण तुज [मु. 'आलें'.] जालें ॥ १०३ ॥

मज रायाचें वरदान । [नि. घा. 'परी' हे अधिक पद.] माझी मज नाहीं आठवण । त्याचें समयीं स्फुरलें ज्ञान । अति सज्ञान तूं कुब्जे ॥ १०४ ॥

मंथरा [नि. घा. 'म्हणे'.] पुसे कैकेयीसी । तुझेनि विजयो दशरथासी । [तं. 'बाहो सज्जुनीं रथांकासी'; नि. तु. 'हात घातला रथासी'; सु. गे. घा. 'बाहू सूदला रथांकासी'; कं. 'बाहू सूदला रथचक्रांसी'.] बाहू सूदला रथासी । केवी दुःखासी साहावलें ॥ १०५ ॥

संग्रामीं रथचक्राचा लोट । तुझा बाहु होआवा पीठ । कैसेनि धरवला नेट । ते मज स्पष्ट सांग पां ॥ १०६ ॥

आइकता मंथरेचा प्रश्न । कैकयीसी उल्हास पूर्ण । सांगे ऋषीचे शापवचन । आणि वरदान [नि. घा. 'तयाचें'.] ऋषीचें ॥ १०७ ॥

पितृगृहीं मज बाळपण । तेथें आला ऋषी सज्ञान । कुशासन कुशावरण । [मु. प्रतीत 'आणि' हे अधिक पद.] आभरण

कुशाचें ॥ १०८ ॥

वृद्ध वडील रोमांचित । म्यां तेथ केलें वो अनुचित ।
वाकुल्या दाविल्या अति निंदित । तऱ्ही क्षमायुक्त महाऋषी ॥ १०९ ॥

उगे देखोनियां ऋषि । म्यां त्यासी नाकीं लाविली मशी । क्षोभ पावला तापसी । अति आवेशीं शापिलें ॥ ११० ॥

नानापरी मज निंदिसी । तें तूं जगीं निंद्य होसी । उःशाप मागावा त्यापासी । बाळ भावेसी नेणें ॥ १११ ॥

मशी लाविली माझ्या तोंडी । [तं. प्रतीत ही ओवी नाही.] तूं जगी होसी काळतोंडी ।
अपेशाची उभडुनी गुढी । निंद्यत्वें रोकडी नांदसिल ॥ ११२ ॥ [तं. प्रतीत ह्या ओव्या नाहीत.]

देवपूजा विसरला क्षोभोक्ति । तें म्यां दिधली त्याच्या हातीं ।
तेणें वदला तो वरदोक्ति । ऐक तुजप्रति सांगेन ॥ ११३ ॥

येणेची हातें भर्तारासी । संग्रामीं तूं साह्य होसी । वरदद्वय पतीपासी । तूं पावसी राजबाळे ॥ ११४ ॥

रथचक्रीं तुझा हात । [तं. प्रतीत द्वितीय चरण नसून 'रथचक्रीं तुझा हात । विजयी होईल तुझा कांत । ऐसा वर वदला समर्थ । वरदार्थ ऋषिमुनीं ॥'.] संग्रामीं [मु. 'न होईल'.] नव्हें व्यथा भूत । विजयी होईल तुझा कांत । ऐसा वरदार्थ वदला ऋषि ॥ ११५ ॥

या उपरी मज आतां । पुढें काय कर्तव्यता । मंथरे सांगसी ज्या ज्या अर्थी । [नि. घा. 'तो तो नाही'.] तें तें तत्त्वतां मी करीन ॥ ११६ ॥

आइकोनि कैकेयीचा बोल । कुब्जा विचार सांगे सखोल ।
तुवां कोप करावा प्रबळ । मुख्यत्वें केवळ रायांवरी ॥ ११७ ॥

सांडूनि [भा/२. त. तु. 'सर्वांबर आभरणासी'; सु. गे. 'सर्वभूषणासीं'; नि. घा. 'दिव्याभरणांसी'.] सर्वां आभरणासी । मुक्त केश मळीनवासी । तुवां रिघावें प्रयोपवेशी । वरदद्वयासी मागावया ॥ ११८ ॥

राजा येईल तुजपासी । मुख न दाखवावा त्यापासीं । कांहीं नोबलावें त्यासी । [तं. त. सु. गे. 'अति निश्चयेसी क्षोभावें'; नि. घा. 'अति निश्चयेसीं क्षोभवावें'; कं. 'निश्चयेसी क्षोभावें'.] अति निश्वासी क्षोभोनी ॥ ११९ ॥

राजा देईल सुवर्णमेरु । अथवा रत्नांचा सागरु । तो तो न करी अंगीकारु । वरद विचारु सांडूनी ॥ १२० ॥

राज्यपाट द्यावा भरता । वनवास रघुनाथा । त्याही वनवासाची कथा । ऐक आतां सांगेन ॥ १२१ ॥

अनुक्रमणिका

अयोध्ये निकट वनांत । वनवासी जाल्या रघुनाथ । प्रजा समस्त जाती तेथ । उद्वंसी भरत केवी राजा ॥ १२२ ॥

रामीं अति प्रीती प्रजांसी । राम आवडे प्रधानासी । अवघे जाती त्यापासी । मागें भरतासी राज्य कैंचे ॥ १२३ ॥

दंडकारण्य दूरदेशीं । गंगातीरीं राम वनवासी । श्रीराम वार्ता अयोध्येसीं । कदा काळेंसी न यावी ॥ १२४ ॥

अयोध्येची कथा वार्ता । रामें नायिकावी सर्वथा । ऐसें जालियां तत्त्वतां । राज्य भरता भोगेल ॥ १२५ ॥ [तं. प्रतीत ह्या ओव्या नाहीत.]

आइकोनि मंथरेची युक्ती । उल्हास कैकेयीच्या चितीं । आळंगिली दोहीं हातीं । अति प्रीति सद्भावें ॥ १२६ ॥

रागें सांडिलें होतें पदक । स्वयें लेवविलें देख । कानीचीं कुंडलें अलौकिक । दिधली आवश्यक अतिप्रीति ॥ १२७ ॥

भरत अभिषेकिल्या पाठीं । सुर्वर्णें मढीन तुझी पाठी । रत्नखचित टिळा लल्हाटीं । घालीन कंठीं मुक्तमाळा ॥

अनुमोदिनी मंथरेसी । कैकेयी निघाली प्रायोपवासी ।
सांडुनी अलंकार वस्त्रासी । मळीनवासी भूमि शय्या ॥ १२९ ॥

आंत येऊनी दशरथ । पुसतां कैकेयीचा स्वार्थ । वनासी निघेल रघुनाथ । तोही कथार्थ अवधारा ॥ १३० ॥

एका जनार्दनीं शरण । देवकार्यार्थ संपूर्ण । वना निघेल रघुनंदन । दशवदनवधार्थ ॥ १३१ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां कैकेयीप्रायोपवेशनं नाम तृतीयप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग चौथा

## दशरथ विलाप

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

[तं. सु. गे. या प्रतींत एकही श्लोक नाही; पै. तं. त. तु. संपादित पाठ; नि. घा. या प्रतींत एकूण पांच श्लोक पुढीलप्रमाणे :——
'आज्ञाप्य तु महाराजो राघवस्याभिषेचनम् । उपस्थानमनुसंज्ञाप्य प्रविवेश निवेशनम् ॥ १ ॥
प्रियार्हां प्रियमाख्यातुं विवेशांतः पुरं वशी । स कैकय्या गृहं श्रेष्ठं प्रविवेश महायशाः ॥ २ ॥
न ददर्श स्त्रियं राजा कैकयीं शयनोत्तमे । स कामबलसंयुक्तो रत्यर्थी मनुजाधिपः ॥ ३ ॥
अपश्यन्दयितां भार्यां पप्रच्छ विषसाद च । नहि तस्य पुरा देवी त्वं वेलामत्यवर्तथाः ॥ ४ ॥
प्रतिहारी त्वथोवाच संत्रस्तं तु कृतांजलिः । देव देवी भृशं क्रुद्धा क्रोधागारमभिद्रुता ॥ ५ ॥']
आज्ञाप्य तु महाराजो राघवस्याभिषेचनम् । तत्प्रविश्य महातेजाः कैकेय्या भवनोत्तमम् ॥ १ ॥
स कामबलसंतप्तो रत्यार्थी मनुजाधिपः । अपश्यन् दयितां भार्यां पप्रच्छ विषसाद च ॥ २ ॥
प्रतिहारी त्वथोवाच संत्रस्तं तु कृतांजलिः । छत्रधारी ततो वाक्यमब्रवीत्तत्र भीतवत् ॥ ३ ॥ [वा. रा. अ. कां. सर्ग १०, श्लोक ८ (पूर्वार्ध) व १६ (पूर्वार्ध), १७ व २०.]

**श्रीरामासी अभिषेकार्थ । प्रातः पुष्यें सुमुहूर्त । सिद्ध सामग्री करा समस्त । आज्ञा नेमस्त रायें केली ॥ १ ॥**

**मग रतिकामसंभोगासी । आला कैकयी भवनासी । गृहीं नेदखोनि तिसीं ।** [तं. 'समस्तासी पुसे रावो'; म. सु. नि. गे. घा. कं. 'पुसें समस्तासीं प्रिया कोठें'.] **पुसे समस्तासी प्रिया कें ॥ २ ॥**

**तेथ दासदासी सेवक । कोण्ही न बोले राया सन्मुख । अवघीं राहिलीं अधोमुख । तेणें साशंक नृप जाला ॥ ३ ॥**

**कुब्जा राहोनिया दुरी । खुणावली छत्रधारी । ते रायातें नमस्कारी । भयभीत भारी बोलावया ॥ ४ ॥**

**तिसी नाभिकार युक्त । राजा पुसतुसे वृत्तांत । ते म्हणे कैकयी क्रोधमूर्च्छित । अति संतप्त भोग त्यागें ॥ ५ ॥**

**सांडुनि वस्त्रां आभरणासीं ।** [तं. भा/२. त. 'भूमिशियन'; 'मळिणवासीं'; तु. 'भूमिशय्या मळिणवासी'; मु. 'भूमिशय्या मळिणवासासीं'; कं. 'भूमिशय्या जीर्णवासी'.] **भूमीशायी मळिनवासी । कैकयी होती तमः प्रदेशीं । तेथें रायासी** [कं. व मु. 'तिणें'.] **त्या नेलें ॥ ६ ॥**

**देखोनि** [त. 'कैकयी अवस्था'; तं. भा/२. तु. नि. घा. 'कैकयीची अवस्था'; सु. गे. 'तिची विकलता'; कं. 'कैकयी दरिद्रता'.] **कैकयी ते अवस्थां । परम दुःख जालें दशरथा । तुज काय कोणें केलें आतां । तें तत्त्वतां मज सांग ॥ ७ ॥**

**तुज कोणें दाविला हात । त्याचा समूळ करीन घात । तुज बोलती जे विरुद्धार्थ । जिव्हा सदांत** [कं. व मु. प्रतींत 'त्याची' हे अधिक पद.] **छेदीन ॥ ८ ॥**

**ज्यासी म्हणसी करा समर्थ । गजांत लक्ष्मी देईन तेथ ।**

करावें म्हणसी ज्यासी बंदीमुक्त । ते निर्मुक्त मीं करीन ॥ ९ ॥

[मु. ‘मी’.] मज असतां शिरावरीं । त्वां कां तोडिली गळसरी । भूमिशयन प्रेताच्या परी । अशुभकारी हें चिन्ह ॥ १० ॥

तिसी लाऊं जातां हाता । झिंजाडिलें त्या नृपनाथा । तिचें मुख पाहों जातां । मुख सर्वथा ते न दावी ॥ ११ ॥

प्रिया पाहों नेदी वदन । रायासी आलें जी रुदन । धावोनि तिचे धरिले चरण । [कं व मु. प्रतींत ‘प्रिये’ हे अधिक पद.] तुजवीण मी परदेशी ॥ १२ ॥

येरी आसुडिले पाये । उठी येथुनि परते जाये । मुख दाखवीसी काये । निर्लज्ज पाहे तूं येकु ॥ १३ ॥

शुना येतांचि शुनी वसवसी । कैकयी दशरथासी तैसी । स्त्रीलोभाची दशा ऐसी । [सु. गे. घा. ‘आपत्तीसी स्त्रीलोभ’; कं. ‘ज्ञानभ्रंशी स्त्रीलोभ’.] अपभ्रंशी स्त्रीलोभु ॥ १४ ॥

राजा दशरथ सूर्यवंशी । [त. ‘भूलला स्त्री लोभापासीं’; नि. त्याचीं स्त्री लोभे पदवी ऐसी’; कं. सु. गे. घा. ‘त्याची स्त्री लोभें दशा ऐसी’.] स्त्रीलोभें त्याची पदवी ऐसी ।
इतर पुरुष स्त्रियांच्या दासी । स्त्रीलोभापासी हा बडीवारू ॥ १५ ॥

मज कायसी गळसरी । तूं मज कैंचा शिरावरी । प्राण सांडीन उपरा उपरी । तुझी मजवरी [तं. तु. ‘अप्रीति’; पै. खेरीज इतरत्र ‘अति प्रीति’.] अवकृपा ॥ १६ ॥

राजा बोले प्रीतियुक्त । सांग तुझें मनोगत । तें मी करीन समस्त । तुज कां अत्यंत क्रोध आला ॥ १७ ॥

दोघी स्त्रियांचा जो पती । त्यासी सत्यत्व नाहीं शास्त्रार्थी ।
त्याची साक्षी साधु न मनिती । तुज [तं. सु. नि. गे. घा. ‘प्रीति’.] मजप्रति सत्य कैचें ॥ १८ ॥

दोघी स्त्रियांचा जो पति तो शठ । तूं तिघींचा अति पापिष्ट । माझा अपमान करूनी स्पष्ट । राजपाट कौसल्ये ॥

मज तुझीया अति प्रीती । स्वर्गी इंद्रादिक पूजिती । माझी करूनिया अप्रीति । कौशल्ये प्रति राजपाटु ॥ २० ॥

तुवा मांडिलें मजसी वैर । मातुळा धाडुनी माझे कुमर । श्रीराम करिसी राज्यधर । कपटी साचार तूं येकु ॥ २१ ॥

राजा म्हणे कैकयीसी । तुवांचि करूनी आग्रहासी । पुत्र धाडिले मातुळासी । सेखी [मुद्रित प्रतीत हे पद नाही.] तूं म्हणसी मज कपटी ॥ २२ ॥

अनुक्रमणिका

राज्याधिकार ज्येष्ठ पुत्रासी । तो केवीं लाभे कनिष्ठासी ।
विवेक नाहीं तुजपासी । व्यर्थ कां करिसी अतिक्रोध ॥ २३ ॥

अनधिकारी राज्याधिकारू । ब्रह्मा आला न शके करूं ।
तुज काय जाला भूत संचारू । अति अविचारू क्रोध तुझा ॥ २४ ॥

क्रोध पित्यापुत्रातें बाधी । क्रोध स्त्रीपुरुषातें विरोधी । क्रोध [सु. गे. घा. 'प्रियाप्रिय उच्छेदी'; नि. 'पित्याची प्रीति छेदी'; कं. भा/२ पै. तं. तु. त. संपादित पाठ.] प्रियांची प्रीति छेदी । क्रोध त्रिशुद्धी अनर्थ ॥ २५ ॥

क्रोध निजज्ञान निर्दळी । क्रोध [नि. घा. 'तापातें'.] तापसातें छळी । क्रोध स्वार्थाची करी होळी । क्रोध महाबळी अनर्थ ॥ २६ ॥

क्रोध साहाकारी कामासी । सेखीं क्रोध आलिया कामनाशी । क्रोध विवेकातें ग्रासी । तो तुजपासी अति क्रोध ॥ २७ ॥

तुज श्रीरामीं प्रीती त्रिशुद्धी । ते तुझी कोणें [कं. पै. खेरीज इतरत्र 'छळिली'.] छेदिली बुद्धी । दारुण उपजली दुर्बुद्धी । अतिविरोधी श्रीरामीं ॥ २८ ॥

विरोधु करितां श्रीरामासीं । ऐहिक परत्रा मुकसी । जगीं अत्यंत निंद्य होसी । हितोपदेशी तुज सांगे ॥ २९ ॥

माझी तुज समेक्षा भारी । वचन नुलंघीसी तिळभरी । ते तूं आजी मजचिवरी । अति धिःकारी जल्पसी ॥ ३० ॥

तुझा जाला बुद्धिपालटु । येथुनि मज तुज सेवटु । अति दुःखाचा राजपाटु । पावसी स्पष्टुअति क्रोधें ॥ ३१ ॥

उदकस्य रसः शैत्यमन्नस्य स्वादुता रसः । आनुकूल्यं रसः स्त्रीणां मित्रस्यावंचनं रसः ॥ ४ ॥ [तं. प्रतीत हा श्लोक नाही.]

शीतळता [मु. प्रतीत 'ते' हे अधिक पद.] उदकी गोडी । मिष्टान्ना आदरें चवी गाढी । अनादरीं कोटी परवडी । लागती पाडी विखाचा ॥ ३२ ॥

अवंचकता परिपूर्ण । तेंचि मित्रत्वा गोडपण । वंचकता जाल्या जाण । मित्रीं मित्रपण [भा/२. 'विटेल'; मु. 'विटंबिलें'; कं. 'विटले'.] विट विटें ॥ ३३ ॥

अनुकूळता स्त्रियेसी गाढी । तंव तंव स्त्री पुरुषांसी [मु. प्रतीत 'अति' हे अधिक पद.] गोडी ।
जाल्या विकल्पासी सवडी । तुटी रोकडी स्त्रीपुरुषां ॥ ३४ ॥

कैकये विकल्प धरिला पोटीं । स्त्री पुरुषां पडे तुटी । तुझ्ये कळवळां सांगतों गोठी । विवेक दृष्टी विचारीं ॥ ३५ ॥

अनुक्रमणिका

तुझी नव्हे [कं. व मु. प्रतींत 'ही' हे अधिक पद.] स्वबुद्धि । नेणों कोणें दिधली दुर्बुद्धि । क्रोध सांडुनि त्रिशुद्धी । भोग समृद्धी सुखें भोगी ॥ ३६ ॥

राम सर्वांचा आवडता । तुज रामेसीं येकात्मता । कोणें विकल्प घातला चित्ता । [मु. प्रतीत 'तो' हे अधिक पद.] सांडी सर्वथा कैकयी ॥ ३७ ॥

तुझी मज प्रीती पूर्ण । [मु. प्रतीत 'जे' हे अधिक पद.] मागसी तें देईन जाण । [पै. तु. 'वातों'.] वाहतों श्रीरामाची आण । परमप्रमाण हें माझें ॥ ३८ ॥

आइकोनि [मु. प्रतीत 'हे' अधिक पद.] रायाची गोष्टी । कैकया विकल्प सांडिला पोटीं ।
भरत अयोग्य राज्यपाटीं । मागतां सृष्टीं मी निंद्य ॥ ३९ ॥

अयोग्यीं मागतां राज्यभार । मज निंदिती ऋषीश्वर । मरमर करिती लाहनथोर । हा विचार अति निंद्य ॥ ४० ॥

[मु. कं. प्रतींत या ओवीपूर्वी पुढील ५ ओव्या आल्या आहेत :–– 'तें चिन्ह कळलें मंथरेसी । म्हणे काय जालें इयेसी । घालोनिया विवेकासी । केली पिशाची नृपनाथें ॥ ४१ ॥ म्यां तंव शिकविला हितार्थ । परी ईस न कळे निजस्वार्थ । माझें शिकवलें गेलें व्यर्थ । अति चरफडित मंथरा ॥ ४२ ॥ दुष्टांसी ऐकतां धर्मवार्ता । अति क्रोध उपजे चित्ता । कैकयी मन द्रवलें देखतां । मंथरा तत्वतां कुसमुसी ॥ ४३ ॥ आंतचे आंत हात चुरी । म्हणे आता काय करी । राज्य दिधलें रामाकरीं । आम्हां रोकडी देशवटा ॥ ४४ ॥ रामासी नाही माया जाण । आम्हांवरी निष्ठूर पूर्ण । त्यासी जालिया राज्याभिषेचन । पुनरागमन नांहीं आम्हां ॥ ४५ ॥'] ते संधी खुणावी मंथरा । सांडू नको पूर्व निर्धारा । अन्यथा न करी वो विचारा । दोहीं वरां माग वेगी ॥ ४१ ॥

मंथरा देखतांचि दृष्टी । विकल्प बळकावला पोटीं । मग रायासी मांडिली गोठी । क्रोध दृष्टी पाहोनि ॥ ४२ ॥

वाइली रामाची आण । तें मज मानलें प्रमाण । मागेन तें द्यावें आपण । अन्यथा वचन न करावें ॥ ४३ ॥

तुम्हीचि पूर्वीं मज दिधलें । तेचि मी मागेन आपुलें । राजा सुखावला येणें बोलें । माग वहिलें म्हणे तिसी ॥ ४४ ॥

तुम्हीच युद्धी सुखावोन । दिधलें दो वरीं वरदान । तें [मुद्रित प्रतीत 'माझें' हे पद नाही.] माझें मी मागेन आपण । कृपण पण न करावें ॥ ४५ ॥

राजा म्हणे अवश्यक । जें जें मागसी अलौकिक । तें तें मी तुज देईन देख । [कं. व मु. 'पूर्णभाक'.] पूर्व भाक पैं माझी ॥ ४६ ॥

सत्य न करितां [मु. 'पूर्वभाग'.] निजभाक । हांसती हरिश्चंदादिक । पूर्वज शापिती आवश्यक । मजहिं नरक [मु. 'होईल'.] होतील ॥ ४७ ॥

कल्पतरु कामधेनु । पाताळीचें अमृतपान । जे जें मागसी तें देईन । साह्य संपूर्ण [मु. 'करीन मी'; कं. 'करी रामु'.]

अनुक्रमणिका

श्रीराम ॥ ४८ ॥

असतां साह्य [सु. नि. गे. घा. संपादित पाठ; इतरत्र ‘श्रीरामासीं’.] श्रीरामा मजसी । काय दुर्लभ मज द्यावयासी । [मु. प्रतीत ‘मग’ हे अधिक पद.] दशरथ अति उल्हासीं । कैकयीसी तुष्टला ॥ ४९ ॥

भोळेपणाचेनि लवलाहें । राजा गर्जे उभूनि बाह्ये । स्त्रियांचें [मु. ‘कृत्रिम’.] कातर हृदय आहे । ते ठावो नोहे पुरुषांसी ॥ ५० ॥

संव चोराचा [पै. भा/२. तं. तु ‘सांघातु’.] सांगातु । तैसा स्त्रियांचा वृत्तांतु । सर्वस्वें ठकूनि करावा घातु । नरकपातु स्त्रीसंग ॥ ५१ ॥

आइकोनि रायाची वचनोक्ति । कैकयी बोले रायाप्रति ।
मागणें माझी जे वरदोक्ति । ऐका निश्चिती मागते ॥ ५२ ॥

एकें [कं. त. सु. नि. गे. घा. ‘वरदे’.] वरें भरतासी । स्वयें द्यावें निजराज्यासी । जैसा उल्हासु रामाभिषेकासी । तेणें उल्हासीं अभिषेकी ॥ ५३ ॥

दुसरेंनि [कं. त. सु. नि. गे. घा. ‘वरदे’.] वरें श्रीरामासी । धाडावें दंडकारण्यासीं । [मु. ‘गोदातीरीं’.] गंगातीरीं वनवासीं । चौदा वर्षें वनवासु ॥ ५४ ॥

मज नाहीं अति स्वार्थ । चौदा वर्षें [कं. व मु. प्रतींत हे पद नाहीं.] जी नेमस्त । राज्य [कं. व मु. प्रतींत ‘माझा’ हे अधिक पद.] करील भरत । पुढें रघुनाथ राज्य [कं. व मु. ‘करो’.] करू ॥ ५५ ॥

चौदा वरुषा माझारीं । चौदा भुवनें भरत आंवरी । राम आलियही वरी । मग कैश्यापरी राज्य पावे ॥ ५६ ॥

वनीं दंडकारण्या आंत । राक्षसांचा अति घात । ते गिळीती रघुनाथ । [मु. प्रतीत ‘मग’ हे अधिक पद.] राज्यीं भरत अक्षयी ॥ ५७ ॥

रामा सवें गेलिया लक्ष्मण । [सु. नि. गे. घा. खेरीज इतरत्र ‘त्याचें’.] त्यांचेहि राक्षस करितील भक्षण ।
तेव्हां निष्कंटक राज्य पूर्ण । भरत आपण भोगील ॥ ५८ ॥

दृढ विचार हा पोटांत । संभोखावया दशरथ । चौदा वर्षें जीं नेमस्त । स्वयें सांगत मर्यादा ॥ ५९ ॥

अयोध्या निकट प्रदेशीं । श्रीराम जालिया वनवासी । अयोध्या जाईल त्यापासी । [मु प्रतीत ‘मग’ हे अधिक पद.] भरता उद्वसीं राज्य कैंचें ॥ ६० ॥

राम आवडे प्रजांसी । राम आवडे प्रधानांसी । राम [क. व मु. प्रतींत ‘सर्व’ हे अधिक पद.] आवडे सैन्यासी । ते त्यापासी जातील ॥ ६१ ॥

अनुक्रमणिका

**रामापासीं जाती समग्र । [मु. 'मग'.] मागें अयोध्या वोस नगर । तेथें भरत राज्यधर । हा मिथ्या विचार समूळीं ॥ ६२ ॥**

**यालागीं दंडकारण्यासी । अवश्य धाडावें रामासी । [मु. 'गोदातिरीं'.] गंगातीरीं वनवासी । वल्कलांबरेंसी रहिवासु ॥ ६३ ॥**

**राज्यामधील अणुप्रमाण । [मु. 'श्रीरामासी न द्यावें'.] रामें न न्यावें आपण । जटाधारी वल्कल प्रावर्ण । करावें गमन [मु. 'गोदातिरीं'.] गंगातीरीं ॥ ६४ ॥**

[तं. प्रतीत हा श्लोक नादी.] श्लोक——
असंगसंगदोषेण साधवो यान्ति विक्रियाम् । एकरात्रप्रसंगेन काष्ठघंटा विटंबना ॥ ५ ॥

**वोढाळेचें [कं. व मु. प्रतींत 'धेनूच्या' हे अधिक पद.] संगतीं । धर्मधेनु चरतां शेतीं । वोढाळ पळें अतर्क्य गति । धर्म धेनु प्रति लोढणें ॥ ६५ ॥**

**तैसेंचि कैकयीसी जाण । मंथरेचें आप्तपण । भरत राज्याचे भूषण । लोढणें संपूर्ण वैधव्याचें ॥ ६६ ॥**

**अवगणुनि निजपति । द्वेष करितां रघुनाथीं । पावेल वैधव्याची प्राप्ती । दुष्ट संगतीचें [मु. प्रतीत 'ऐसें' हे अधिक पद.] फळ ॥ ६७ ॥**

**असो हा अति कथार्थ । ऐकतां कैकयी वचनार्थ । दशरथ [मु. 'धरणी पडें'.] पडिला मूर्च्छित । [मु. 'अवस्था प्राणांत ओढवली'.] अति प्राणांत वोढवला ॥ ६८ ॥**

**श्रीराम वियोगाचे बाण । हृदयीं कडतरलें दारुण । [मु. 'अर्धकंठीं धरिला प्राण'; भा/२. 'अर्धघटिका उरला प्राण'; त. 'अर्धदुःखा उरला प्राण'; तं. 'अर्धोदकीं उरला प्राण'; कं. 'अर्धकंठीं उरला प्राण'.] अर्धटुका उरला प्राण । श्रीराम दर्शन घ्यावया ॥ ६९ ॥**

**कैकयीचें वचन वज्र । राम वियोगें सतेज धार । मरणा होउनि घाव थोर । घायें नृपवर मूर्च्छापन्न ॥ ७० ॥**

[या ओवीपूर्वी मु. व कं. प्रतीत पुढील ओवी आलेली आहे :—— 'ऐसा अंतरीं विव्हळ । राम वियोगाची तळमळ । नेत्रांवाटे वाहे जळ । स्वेद प्रबळ चालिला ॥ १५ ॥'] **आंगीं घावो नेदखे वैद्य । या लागीं न चले औषध । अंतरीं** [तु. 'सुटला'; मु. 'खोंचला'; कं. 'खाचला'.] **तुटला सुबद्ध । पोटीं अशुद्ध दृढ पडिलें ॥ ७१ ॥**

**राजा होऊनि सावधान । म्हणे मी [मु. प्रतीत 'काय' हें अधिक पद.] देखतों दुष्ट स्वप्न ।**
**श्रीराम सर्वांचा [मु. 'जीवन'.] जीवप्राण । त्यासी वनप्रयाण कोण नेमी ॥ ७२ ॥**

**कैकयीची मज आवडी । तेचि मोहक मद्य [मु. 'उघडी'; कं. 'फुडी'.] उंडी । श्रीराम वनवासा दवडी । प्रिया प्रियधाडी मज आली ॥ ७३ ॥**

अनुक्रमणिका

[तु. 'स्त्री बाळभाव'; कं. भा/२. तं. त. सु. नि. गे. घा. 'स्त्रीवल्लभा'.] स्त्रीवालंभा आप्तपण । जो मानी तो मूर्ख पूर्ण । श्रीरामासी वनाभिगमन । आली नागवण स्त्रीलोभें ॥ ७४ ॥

[तं. 'पुरुष प्रलोभोनीं द्यावी भाक'; मु. 'पुरुषे प्रलोभे न द्यावी भाक'.] पुरुष प्रलोभूनि द्यावी भाक । [मु. 'स्वयें'.] सवेंची मागणें नाहीं ते देख । संधी [पै. खेरीज इतरत्र 'साधोनिया'.] रोधुनि अटक । नरकदायक मागणें ॥ ७५ ॥

दुष्ट दुर्धर स्त्रीचरित्र । [कं. व मु. 'सर्वदा बोलतें'.] सदा बोले वेदशास्त्र । ते मी न मनुनी पामर । जाहलों पात्र अति दुःखा ॥ ७६ ॥

जेंवी उच्छिष्टें [तं. 'पाहे'; त. सु. नि. गे. घा. 'पाळिजे'.] पाळिलें श्वान । तैसा [मु. प्रतीत 'मी' हे अधिक पद.] जालों [तं. भा/२. त. 'स्त्री अधिन'; मु. 'स्त्रियांचे अधीन'.] स्त्रियेधीन । तें फळ पावलों संपूर्ण । वनाभिगमन श्रीरामा ॥ ७७ ॥

पाहोनि कैकयीचें वदन । रायासी आला क्रोध दारुण । [मु. 'नष्टें दुष्टें दुर्भगें जाण; तं. 'अति दुष्ट'; तु. 'दुर्भगपूर्ण'.] दुष्ट नष्ट तूं दुर्भग पूर्ण । द्वेष संपूर्ण श्रीरामीं ॥ ७८ ॥

रामें काय केला अपराध । त्यावरी तुज कां दुर्धर क्रोध ।
दंडकारण्य अति विरोध । [सु. गे. 'भाग्यानुगंध वनवासा'; नि. घा. 'भाषानिर्बंध'; पै. तु. भा/२. 'भाषा निर्बद्ध वनवासु'; त. 'भास निर्बंध वनवासु'; कं. 'भाग्य निर्बद्ध वनवास'.] कां पां निर्बंध वनवासा ॥ ७९ ॥

भरतापरीस अतिप्रीति । श्रीरामावरी तुझी होती । कोणें विकल्प घातला चित्तीं । श्रीरामाप्रति अतिद्वेष ॥ ८० ॥

कौसल्ये परीस अधिक । श्रीराम तुझा निजसेवक । सेवा करूनि अवंचक । त्यासी तूं दुःख देवों पाहासी ॥ ८१ ॥

माझी घेउनियां भाक । मजचि देवों पाहासी दुःख । जळो तुझें काळें मुख । दुःख तें सुख मानिसी ॥ ८२ ॥

श्रीराम परमात्मा परेश । त्याचा तुज करितां द्वेष । होईल सर्वस्वाचा नाश । पावसी त्रास निंदेचा ॥ ८३ ॥

ना भरत ना श्रीराम । ऐसें होईल विरुद्ध काम । या लागी करीवो उपशम । द्वेष दुर्गम सांडूनि ॥ ८४ ॥

श्रीरामीं सांडी दुष्टपण । यालागीं धरितों तुझे चरण । वरदानाचें [कं. व मु. 'दृढपण'.] कठिणपण । क्षमा संपूर्ण मज कीजे ॥ ८५ ॥

आइकोनि रायाचें वचन । कैकयी म्हणे होसी सर्वज्ञ । सूर्यवंशी वरदान । मिथ्यावचन नाहीं केलें ॥ ८६ ॥

स्वप्नीचें वरदान नरेंद्रें । सत्य केलें हरिश्चंद्रें । आपणासकट स्त्रिया पुत्रें । विकुनि खरें वरद केलें ॥ ८७ ॥

नपुंसक तूं सूर्यवंशी । राम न धाडवे वनवासी । [नि. 'उणें आणिलें पूर्वजांसी । दिधले भाकेसी नेदूनी'.] सेखी स्त्रियेच्या पायां लागसी । निसुग होसी तूं एक ॥ ८८ ॥

कपोत्याच्या वरदानासी । शिबीनें तुकिलें निजमांसासी । सत्य करूनि वचनार्थासी । वैकुंठासी नेली नगरी ॥ ८९ ॥

राजा रुक्मांगद अयोध्यादेसी । धर्मांगद पुत्र त्यासी । तेणें जिंकोनिं सप्तद्वीपांसी । [नि. 'नाना अर्थ पितयासी सद्भावेसीं अर्पिलें'; तं. 'सद्भावेसीं पित्या अर्पी'; तु. 'नाना अर्थ पित्यासी सद्भाव अर्पी'; सु. गे. घा. कं. 'नाना अर्थ पितयासीं अर्पिलें'; पै. त. 'नानार्थ पित्यासी सद्भावें अर्पि ।] नाना अर्थ पित्यासी स्वभावें अर्पी ॥ ९० ॥

पृथ्वी समुद्र वळयांकित । [त. 'धर्मांगदांचे वचन ऐकत'; सु. गे. कं. 'तो पितयासी एकचि सुत'; नि. घा. 'धर्मांगद पितयासीं एकचि सुत'.] धर्मांगदाच्या वचनांकित । [कं. व मु. 'पितृसेवनार्थ अति उदित । आणि हरिभक्त सर्वस्वें ।';] तो पित्यासी येकुचि सुत । अति विरक्त हरीभक्त ॥ ९१ ॥

मोहनीच्या वरदासीं । पिता वधी धर्मांगदासी । नगरी नेली वैकुंठासी । व्रत एकादशी प्रतापें ॥ ९२ ॥

तेचि वंशीं तूं दशरथा । वना न धाडवे रघुनाथा । वरद नेदवें म्हणसी आतां । हें नपुंसकता तुज साजे ॥ ९३ ॥

स्त्रीवाक्य अति तीक्ष्ण । ऐकतां निवटे जीव प्राण । राजा पडिला मूर्च्छापन्न । संज्ञा संपूर्ण बुडाली ॥ ९४ ॥

स्त्री विषयो [मु. 'विषसंपूर्ण'; त. 'स्त्री विषयो जाण'.] विषपान । [कं. नि. घा. 'दुर्धरत्वें'; सु. गे. 'दुर्धर ते'.] मधुरत्वें अति दारुण । सेविल्या अवश्य आणी मरण । तें तें [मुं. प्रतीत हे पद नाही.] संपूर्ण कैकया केलें ॥ ९५ ॥

राजा अति दुःखें मूर्च्छापन्न । तो स्वयें [सु. गे. 'तो पावोनि'; नि. घा. 'तो स्वयें पावोनि'.] सज्ञांलाहोन । [मु. 'प्रती खेरीज इतरत्र 'तो' हे अधिक पद.] कैकयी प्रति आपण । [मु. 'विनीत'.] दीन कारुण्य बोलतु ॥ ९६ ॥

श्रीरामीं तुझी कृपा पूर्ण । तेथ अत्यंत कठिणपण । धरावया तुज काय कारण । अति दारुण निर्दयत्वें ॥ ९७ ॥

सुंदर सुकुमार सुखैक घन । [मु. प्रतीत 'हा' हे अधिक पद.] श्रीराम राजीव लोचन । त्यासी चरणचाली गमन । दुर्धर वन केवी कंठे ॥ ९८ ॥

[तं. 'अत्यंत सुखवासीं'; नि. घा. 'सुखवासी'; कं. 'सुवासवसनें'.] सुवास वासें रघुवीर । त्यासी परिधान वल्कलांबर । शीत उष्ण अति दुर्धर । श्रीरामचंद्र केंवी साहे ॥ ९९ ॥

मृदु अरुवार सुख सेजेसीं । सुमनें खुपती श्रीरामासी । तृणपर्णीं शयन त्यासी । कैसेनि सोसी श्रीराम ॥ १०० ॥

अनुक्रमणिका

पंचामृतें अति चोखटें । जेवितां श्रीराम [मु. 'मन'.] स्वयें विटे । त्यासी तिखटें तुरटें अंबटें । [मु. प्रतीत 'मुळें' हे अधिक पद.] फळें कडुवटें केवी खाये ॥ १०१ ॥

सेनाप्रधान सेवक आप्त । तेणेंसी विंचरे रघुनाथ । तो एकला वना आंत । संख्या [नि. घा. 'चौदा वर्षे केंवि राहे'; कं. सु. गे. 'दंडकारण्यांत केवी राहे'.] वरुषांत केवि राहे ॥ १०२ ॥

जळो माझें काळें वदन । प्रमादी प्रमादां गुप्त वरदान ।
श्रीरामा लागलें दृढबंधन । म्हणौनि रूदन करी रावो ॥ १०३ ॥

श्रीरामाचे वन प्रयाण । [मु. प्रतीत, 'त्या' हे अधिक पद.] सांगाते जाईल लक्ष्मण । त्यासंवे जाईल माझा प्राण । सत्य जाण कैकयी ॥ १०४ ॥

दुःखें कौसल्या त्यजील प्राण । सुमित्राही मरेल [मु. प्रतीत 'सत्य' हे अधिक पद.] जाण । येवढें जालियां कंदन । सुखसंपन्न तूं होसी ॥ १०५ ॥

दुर्धर करुनि आकांत । राज्यीं स्थापूं पाहासी भरत । येवढा न करी [मु. 'तु'.] वो अनर्थ । शरणागत मी तुझा ॥ १०६ ॥

म्हणौनि चरणीं ठेविला माथा । क्षमा करी मज दशरथा ।
न मागावी [कं. व मु. प्रतीत 'हें' हे अधिक पद.] वरद कथा । वना रघुनाथा न धाडावें ॥ १०७ ॥

राम असों दे मजपासी । राज्य मी देईन भरतासी । प्रतिभू देतो वसिष्ठासी । तो आम्हासी नियंता ॥ १०८ ॥

म्हणौनि घातलें लोटांगण । तिचे मस्तकीं धरिले चरण ।
तंव ते क्षोभली दारूण । [मु. प्रतीत 'म्हणें' हे अधिक पद.] शठ नष्टपण कां करिसी ॥ १०९ ॥ [या ओवीनंतर मु. व कं. प्रतींत पुढील ओवी आलेली आहे :— 'अति हीन दीन तूं होसी । लाज लाविली सूर्यवंशासी । बोलिला बोल पैं सांडिसी । कृपण होसी नृपनाथा ॥ १ ॥']

पायां पडिलियां साठी । मी न संडी वरद गोठी । देणें नाहीं तुझ्या पोटीं । महाहटी होसी राया ॥ ११० ॥

तूं तंव नेदिसी वरदान । मज म्हणसी महाविघ्न । तरी मी देईन आपला प्राण । सुख संपूर्ण हो तुम्हां ॥ १११ ॥

माझा हाचि परमार्थ । सुखी होआवा निजकांत । माझा करुनियां घात । सुखी दशरथ हो येथें ॥ ११२ ॥

[कं. व मु. 'वरदभाष्यकरिता मिथ्या'.] वरद नेदितां भाक मिथ्या । माझी तुजवरी पडेल हत्या ।
मग तूं अभिषेची रघुनाथा । सुख समस्तां होईल ॥ ११३ ॥

अनुक्रमणिका

अत्युग्र कैकयी वचन । तेणें रायासी [कं. व मु. 'आलें'.] दीर्घ रुदन । सवेंची पडे मूर्च्छापन्न । [भा/२. 'दुर्भग मग'; तं. 'दुःख निमग्न'; त. 'दुर्भर'; मु. 'भ्रमें मन'.] दुर्भ्रम मन रायाचें ॥ ११४ ॥

देशोदेशींचे भूपति । आणिले रामाभिषेकार्थी । ते मज दिगंतीं निंदिती । [मु. 'स्त्रीवश स्त्रीजित'.] स्त्रीवशवर्ती दशरथ ॥ ११५ ॥

प्रधानादि जन समस्त । घरोघरीं निंदिती बहुत । निंदापात्र मी निश्चित । वना रघुनाथ धाडितां ॥ ११६ ॥

कैकयीचें [नि. घा. 'परमसुख'; त. 'परमदुःख'.] प्रेमसुख । इहलोक ना परलोक । जगासी द्यावीया पैं [मु. 'परम'; कं. प्रतीत हे पद नाही.] दुःख । [नि. घा. 'सुंदरी परम'; सु. गे. 'सुंदरी'.] सुंदर विख कैकयी ॥ ११७ ॥

कैकयी केवळ काळराती । म्यां पाळिली अति प्रीती । [मु. प्रतीत 'ते' हे अधिक पद.] माझी भंवली मज भवंती । म्यां कोणाप्रति सांगावें ॥

राम [पै. 'धाकुटा'; सु. नि. गे. घा. तं. 'धाडांवया'.] धाडावा वनाप्रति । वचनें तळमळी भूपति । दुःख सोसितां सरली राती । उदय प्राप्ती हों आली ॥ ११९ ॥

प्रबोधितां श्रीदशरथ । कैकयी करील [कं. तु. सु. नि. गे. घा. खेरीज सर्वत्र 'विपरीतार्थ'.] विपरीत । वधावया राक्षस समस्त । वना रघुनाथ निघेल ॥ १२० ॥

एका जनर्दना शरण । कथारम्य रामायण । श्रोतां द्यावें अवधान । वनप्रयाण श्रीरामा ॥ १२१ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां दशरथविलापो नाम चतुर्थप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग पाचवा

## श्रीरामागमन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

> प्रभाते शर्वरीं दृष्ट्वा चंद्रनक्षत्रमंडिताम् । ततः सुतो यथाकालं पार्थिवस्य निवेशनम् ॥ १ ॥
> प्रविवेश प्रबोधार्थं सुमंतो मंत्रिसत्तमः ॥ २ ॥

**अभिषेकावया श्रीरघुनाथ । प्रातःकाळीं सुमुहूर्त । चंद्र देखोनि गुरुपुष्ययुक्त । वेगीं सुमंत उठिला ॥ १ ॥**

**सुमंत प्रधान बुद्धिवंत । प्रबोधावया श्रीदशरथ । आला राजभवना आंत । कैकयी युक्त नृप जेथें ॥ २ ॥**

**अभिषेकावया रघुनंदन । राया होई सावधान । आइकोनि प्रधान-वचन । मूर्च्छापन्न दशरथ ॥ ३ ॥**

**राम जाईल वनांत । कोणें तोंडें बोलों मात । हातींचा जाईल रघुनाथ । दुःखें मूर्च्छित दशरथ ॥ ४ ॥**

**वना धाडितो दशरथ । ऐसी आइकतांचि मात । वचन नुलंघी रघुनाथ । जाईल वनांत तात्काळ ॥ ५ ॥**

**रामासी नाहीं राज्यचाड । नाहीं विषयांचें कोड । माझें वाक्य अतिगोड । घेईल** [मु. 'ओढ'.] **होड वनवासा ॥ ६ ॥**

**वना धाडितों ऐसी गोठी । काना वचना होतां भेटी । वना निघेल उठाउठी । जगजेठी श्रीराम ॥ ७ ॥**

**वनवासाची हे कथा । कानीं आइकतां रघुनाथा । वना निघेल तत्त्वतां । यासी मी आतां काय करूं ॥ ८ ॥**

**विशेषेसीं माझी भाक । मिथ्या न करी रघुनायक । वना जाईल अवश्यक । दुःखशोक दशरथा ॥ ९ ॥**

**कैकयी तंव आहे खोटी । हट्टें विस्तारील हे गोठी । पाडिल श्रीरामेंसी तुटी । दुःखें सृष्टी मूर्च्छित ॥ १० ॥**

**कैकयी म्हणे सुमंताप्रति । रायासी लागलीसे सुषुप्ती । वेगीं आणावा रघुपती । आज्ञा मज प्रति रायाची ॥ ११ ॥**

**ऐसी कैसी पां सुषुप्ती । क्षितींतळीं लोळतो भूपति । मिथ्या मानूनियां चित्तीं । निघे मागुती सुमंतु ॥ १२ ॥**

**तंव अभिषेकसामग्री । सभामंडपाच्या द्वारीं । स्वयें वसिष्ठ विस्तारी । नानापरी उपचार ॥ १३ ॥**

**वसिष्ठ म्हणे सुमंतासी । सर्व सामुग्री सांग** [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] **पां रायासी । वेगीं बोलावी रायासी । अभिषेकासी सुमुहूर्त ॥ १४ ॥**

अनुक्रमणिका

[कं. व मु. 'सदाफळी औदुंबर'.] सदाफळित उदुंबर । त्याचें भद्रपीठ मनोहर । केलें असे अति सुंदर । श्रीरामचंद्र अभिषेका ॥ १५ ॥

भद्रीं व्याघ्रचर्म आहत । समग्रही नखपुच्छयुक्त । सिंहासनीं विराजत । वरासनार्थ श्रीरामा ॥ १६ ॥

सुवर्णकुंभ शतानुशत । दीर्घ [मु. 'वासंडे'; तं. 'वसव हे'; कं. 'वसवंडे'; 'वासवंडे=बैलाचे वशिंड'.] वासवंडें वृषभ श्वेत । [कं. व मु. 'सुवर्णशृंगी'.] सुवर्णशृंगार क्षीरयुक्त । वस्त्रें आहात अति शुद्धें ॥ १७ ॥

सिंधुसंगम सुधासंगम । गंगायमुना त्रिवेणीसंगम । जळे आणिलीं पवित्र परम । रघुत्तम अभिषेका ॥ १८ ॥

सप्तकुश सप्तमृतिका । सप्तऋषि आणिले देखा । चतुःसमुद्रींच्या उदका । अभिषेका आणिलेसे ॥ १९ ॥

श्वेत अश्वेसीं शार्दूळ रथ । चंद्रोपम छत्र श्वेत । श्वेत चामरें [मु. 'रत्नजडित'.] रत्नदंडयुक्त । [मु. 'सुशोभित व्यंजनें'; कं. 'सुभाषित सौम्य जन'.] सुवासित शुभ्र व्यजन ॥ २० ॥

गोरोचनहरिद्रागौरव । [मु. 'क्षीरचुतपल्लव'.] क्षीरपल्लव पद्मपल्लव । तोरणें [मु. 'बांधिली'.] बाणलीं अपूर्व । राजे सर्व तिष्ठती ॥ २१ ॥

दधिमधुघृताक्षतायुक्त । पूर्ण कळश साळंकृत । अष्टौ कन्या दानार्थ । उभ्या तिष्ठत अभिषेका ॥ २२ ॥

मुकुट कुंडलें रत्नमेखळा । बाहुअंगदें कंठमाळा । सिद्धसामग्री या सकळा । ब्राह्मणमेळा तिष्ठत ॥ २३ ॥

बाहेरी येऊनि आपण । अभिषेकी रघुनंदन । हे वसिष्ठाची आज्ञा पूर्ण । केलें नमन सुमंतें ॥ २४ ॥

आइकोनि वसिष्ठाचें वचन । राजा जाला अति उद्विग्न । केवी दाऊं काळें वदन । मूर्च्छापन्न अति दुःखी ॥ २५ ॥

देखोनि रायाची अवस्था । कंप सुटला सुमंता । कैकयी सांगे समूळ वार्ता । [मु. प्रतीत 'म्हणे' हे अधिक पद.] रावो कां वृथा दुःख मानी ॥ २६ ॥

पूर्वीं दिधलें मज भाकेसी । भरता राज्य राम वनवासी । तेंचि मागतां रायासी । अति दुःखासी कां मानी ॥ २७ ॥

निश्चयो जाण तूं सुमंता । राज्यपाटु माझिया भरता । दंडकारण्य रघुनाथा । भाक अन्यथा मी न करी ॥ २८ ॥

ऐकतां कैकयीची वाणी । सुमंतु मूर्च्छा पडे धरणी । कपाळ पिटी आक्रंदोनि । काय पापिणी वदलीसी ॥ २९ ॥

अनुक्रमणिका

राम परम प्रिय समस्तां । [तं. मु. 'जीवाहूनि'; त. 'जीवीजिवाहूनि'; तु. 'जीवाहोवोनी'.] जीवाहोउनि आवडता । त्या तुज द्वेषितां रघुनाथा । अभाग्यता [कं. व मु. पाठ 'पै'.] तुज आली ॥ ३० ॥

इचे [कं. पै. भा. तं. तु. खेरीज इतरत्र 'वचन'.] वचनीं अति अनर्थ । इसी रायें करावा घात । वना दवडितां रघुनाथ । अति आकांत होयील ॥ ३१ ॥

येरी म्हणे [सु. नि. घा. खेरीज इतरत्र 'पूर्वजांची'.] पूर्वीची भाक । नेदितां रायासी होतील नरक । सुमंता वोडवलें अति दुःख । अधोमुख विलपतु ॥ ३२ ॥

तयासी संभोखी दशरथ । [मु. प्रतीत 'म्हणें' हे अधिक पद.] बाहेरी कळों नेदुनि मात । वेगीं पाचारी रघुनाथ । मग वृत्तांत कळैल ॥ ३३ ॥

सुमंत वेगें राजाज्ञेसी । आला श्रीरामभवनासी । शोभा शोभे वैकुंठेसी । लाजे त्यासी कैलास ॥ ३४ ॥

भुवनीं मयूर नृत्य करिती । [मु. प्रतीत 'तेणें' हे अधिक पद.] तांडव विसरे उमापती । मधुर [पै. भा. 'पारापवें'.] पारवे घुमती । [मु. 'चमके'.] चवंके चित्तीं सामवेद ॥ ३५ ॥

[पै. भा. 'पारापतांच्या घुमणी'; मु. 'पारव्याच्या पीयुषवाणी'; कं. 'पारापतांच्या पीयुषवाणी'.] पारव्यांच्या घुमणीं । गंधर्व ठेले वेडावोनि । च्यार्‍ही वेद झाले मौनी । श्रीरामभुवनीं आल्हाद ॥ ३६ ॥

श्रीरामाच्या भुवनाप्रति । शुक सुभाषितें बोलती । वेदांतें वेडावलीं [त. 'चित्तीं'; तं. 'गती'; मु. 'किती'.] ठाती । रस सेविती उपनिषदें ॥ ३७ ॥

सारिका गोड बोल बोलती । तेणें लाजे सरस्वती । विस्मय मानी बृहस्पति । पक्षी पक्षार्थी परमार्थ ॥ ३८ ॥

रस स्त्रवती द्राक्षघड । तो रस [मु. 'सर्वाहूनि गोड'; तं. 'सर्वथा गोड्या गोड'; कं. प्रतीत 'सर्वा' हे पद नाही.] सर्वा गोडिया गोड । सचाड तेणें होय निचाड । पुरे कोड मुमुक्षां ॥ ३९ ॥

श्रीरामभुवनींचें सुमन । वासें होय [कं. सु. नि. गे. घा. खेरीज इतरत्र 'मन' हे पद नाही.] मन उन्मन । तेणें सुवासें पांगुळें पवन । राहे [मु. 'मिळोन'; कं. 'सुखावोन'.] मुसावोन चिद्रूपें ॥ ४० ॥

रामांगणीच्या कमळिणी । कमळा लाजे त्या देखोनि । माझा रहिवासु चरणी । [मु. प्रतीत हे पद नाही.] या हृदयाभरणी शोभती ॥ ४१ ॥

पताका श्रीराम मंदिरीं । झळकतां चिदंबरीं । जो कां लक्ष्यी त्यांची थोरी । चराचरीं तो धन्य ॥ ४२ ॥

च्यूतवृक्ष रामभवनांत । अवघे जावे जी अच्युत । सफळ [मु. 'झाले'.] फळे अति बिनीत । फळें त्यागीत परिपाकें ॥ ४३ ॥

अनुक्रमणिका

पारिजातें स्वर्गसुवासें । पायीं लोळती कोष्टी न पुसे । श्रीराम मंदिरींचीं माणुसें । अवघीं उदासें तयांसी ॥ ४४ ॥

सप्तावरण सप्तदारवंठें । द्वारपाळ सज्ञान मोठे । कळीकाळातें मारिती [मु. 'सोटे'.] साटें । ऐसे लाठे प्रतापी ॥ ४५ ॥

देखोनि द्वारपाळाचा वेत । कृतांत चळचळां कांपत । काळ कामारा पैं होत । श्रीरघुनाथ सेवावया ॥ ४६ ॥

श्रीराममंदिर देखतां देख । सुमंतासी परम हरिख । मागील विसरला दुःख । परम सुख [मु. 'पावला'.] कोंदलें ॥ ४७ ॥

[तं. प्रतीत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :— 'रथ सांडूनी पहिल्या द्वारीं । चरण चाली जातसे त्वरी । ऐसा जातां झडकरी । त्रिस्तरें द्वारीं पैं झालें ॥ १ ॥'] रथ सांडिती पहिले द्वारीं । छत्र चामर दुसरे द्वारीं । [सु. गे. घा. 'पादत्राण तिसरे द्वारीं । त्यजोनीं नरीं जाईजे ॥'.] पादत्राणादि सामग्री । तिसरे द्वारीं पै राहे ॥ ४८ ॥

चौथे द्वारीं सांडिती अर्थ । पांचवें द्वारीं निःशेष स्वार्थ । साहाविया द्वारा आंत । साधनें समस्त स्वयें राहाती ॥ ४९ ॥

सांडूनि मीतूंचा सांघात । रिघावें सातव्या द्वारांत । तैंच भेटे रघुनाथ । मुख्य परमार्थ या नांव ॥ ५० ॥

भावार्थ तें राजभवन । प्रथम दारवंठा ते श्रवण । दुजा [मु. 'दुसरे द्वारीं तें'.] दारवंठा साधन । नित्यानित्य ज्ञान तो तिजा ॥ ५१ ॥

चौथा दारवंठा [मु. प्रतीत 'तें' हे अधिक पद.] मनन । पांचवा निदिध्यासन । साहावा तो वैराग्य पूर्ण । सातवा तो जाण साक्षात्कार ॥ ५२ ॥

याचि मार्गाच्या परिपाठी । श्रीरामेसी होय भेटी । [त. 'भरलिया जीऊ आमा वाटीं । उडती पाठीं यमदंड ।'; तं. 'भरलिया येथें अव्हाटीं । वाजती०. . . . . . . . . . . . . . . . ।'; नि. 'भरलिया जिवा अव्हाटीं । वाजती ०. . . . . . ।'; सु. गे. घा. 'भलतिया जाती अव्हाटीं । वाजती ०. . . . . . . . ।'; कं. 'पडलिया आव्हाटी । उठती ० . . . . . . . . . ।'.] भरलीया जी आव्हाटीं । वाजती पाठीं यमदंड ॥ ५३ ॥

असो हा अतिशयें कवितार्थ । पुढील चालवावा ग्रंथ । पाचारावया रघुनाथ । आला सुमंत सवेगें ॥ ५४ ॥

अंतरशुद्ध तो सुमंत । [मु. प्रतीत 'आला' हे अधिक पद.] सातव्या द्वारा आंत । तेणें देखिला रघुनाथ । स्वरूपार्थ अनुपम्य ॥ ५५ ॥

राजीवलोचन घनसावळा । [पै. खेरीज इतरत्र 'आजानुबाहु अति विशाळा'.] टिळकु रेखिला पिवळा । मुगुटकुंडलें विचित्रमाळा । अनर्घ्य गळा निजपदक ॥ ५६ ॥

वीज लागोनि कांसेसी । जावों विसरली अस्तूसीं । तैसा पीतांबर तेजेसीं । कटीप्रदेसीं लखलखी ॥ ५७ ॥

अनुक्रमणिका

[कं. व मु. प्रतीत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :— 'सांवळे अंगी सुगंधी उटी । बाहु-भूषणें बाहुवटी । टिळक पिंवळा ललाटीं । देखतां दृष्टीं मन निवे ॥']
सावळे आंगी सुगंध उटी । चंदनाची अति गोमटी । बाहु-भूषणें बाहुटी । देखतां दिठीं मन निवे ॥ ५८ ॥

पीतांबरें परिधान । कटी मेखळा विराजमान । देखतां जाय भूकताहान । आनंदघन श्रीराम ॥ ५९ ॥

वांकीआंदुवांचा गजर । चरणीं गर्जतां तोडर । सुवर्णपर्यंकीं रघुवीर । आल्हाद थोर सुमंता ॥ ६० ॥

सौंदर्याची निःसीम सीमा । सीता सेवी श्रीरामा । [त. 'लक्ष्मीकांत'; मु. 'लक्ष्मीकांता'.] लक्ष्मीकांती जैसी रमा । तैसी प्रतिमा शोभत ॥ ६१ ॥

ऐसा देखोनि रघुवीर । सुमंतें केला नमस्कार । तुझे भेटीसी नृपवर । अति सादर एकांतीं ॥ ६२ ॥

आइकोनि सुमंताचें वचन । सीता बोले हास्यवदन । करावया राज्याभिषेचन । रायें प्रधान पाठविला ॥ ६३ ॥

आइकोनि पित्याचें [मु. 'आज्ञावचन'; तं. 'क्रियाचें कारुण्य वचन'; कं. पै. भा. तु. 'आकरण'.] वचन । शीघ्र उठिला रघुनंदन । सीतेनें करूनियां नमन । नीरांजन त्या केलें ॥ ६४ ॥

श्रीराम द्वारांतरा येतु । सुमंतें शीघ्र आणिला रथु । तेथ बैसला रघुनाथु । जैसा भास्वतु तेजस्वी ॥ ६५ ॥

लक्ष्मण जाहाला छत्रधारी । चामरें सुमंताच्या करीं । श्रीराम निघाला बाहेरी । जयजयकारी [त. हे पद नाही; मु. 'घन'.] जग गर्जे ॥ ६६ ॥

पुढां वीर वेत्रपाणी । लागला वाजांत्रांचा ध्वनी । राजे जे कां मुगुटमणी । लागती चरणीं श्रीरामा ॥ ६७ ॥

पाठीसीं रथांचे घडघडाट । [कं. सु. 'राजे आरूढले'; नि. घा. 'वरी युवराजे'; तं. 'रथारूढ राजे' त. 'वऱ्हाडीये राजे'.] वऱ्हीया राजे श्रेष्ठ श्रेष्ठ । दोहीं बाहीं कुंजर थाट । पुढां उद्भट महावीर ॥ ६८ ॥

असीवारांचे पैं थवे । वारु नाचती [मु. प्रतीत 'अति' हे अधिक पद.] लाघवें । महामंडिळीकांचें यावे । जयजयकारें गर्जती ॥ ६९ ॥

अश्वगजरथांचे भार । चालती पायांचे मोगर । हयकार थैकार जयकार । सेना संभार चातुरंग ॥ ७० ॥

ध्वजा पताका अपार । डोलती श्रीगिरीसंभार । सिंहनाद करिती वीर । भाट कैवार वाणिती ॥ ७१ ॥

नगर नागरीक लोक । हरिखें बोलती सकळिक । रायें राम पाचारिला देख । राज्याभिषेक करावया ॥ ७२ ॥

हेचि वार्ता घरोघरीं । स्वयें बोलती नरनारी । राम जातो निजगजरीं । राज्याधिकारी होवावया ॥ ७३ ॥

अनुक्रमणिका

मार्ग शिंपिले सुगंधें । तोरणें मखरें नानाविधें । नगर शृंगारलें विनोदें । परमानंदें आल्हादु ॥ ७४ ॥

मुडुपघसणी होत भारी । येकें चढलीं माडिया गोपुरीं । एक पाहाती गवाक्षद्वारीं । आवडी भारी श्रीरामीं ॥ ७५ ॥

आल्हादु नगरामाझारीं । गुढीया उभील्या घरोघरीं । सदीप बळीदानें करीं । नरनारी ओवाळिती ॥ ७६ ॥

पाहतां श्रीरामाचें मुख । परमानंदें होय सुख । डोळया लागली टकमक । नावडे आणिक दूष्टीसी ॥ ७७ ॥

लवों विसरली पातीं । प्राण पांगुळला निजगती । सर्वेंद्रिया [मु. 'एकवृत्ति'.] एकीच तृप्ती । श्रीराममूर्ति देखोनि ॥ ७८ ॥

सादरें पाहातां रघुपति । आनंदें कोंदली त्रिजगती । नाठवे देहगेहस्फूर्ति । श्रीराममूर्ति देखोनि ॥ ७९ ॥

देखतां श्रीरामश्रीमुख । निःशेष निमालें पै दुःख । तिहीं लोकीं न माय सुख । हरिखें हरिख कोंदाटें ॥ ८० ॥

देखोनि श्रीरामवदन । जीऊ विसरे भूक तहान । आनंदें [नि. घा. 'निवती'.] नाचती नयन । रघुनंदन देखोनि ॥ ८१ ॥

पाहातां श्रीरामस्वरूप । तत्काळ जाती त्रिविध ताप । नाम निरसी पुण्यपाप । सुखस्वरूप श्रीराम ॥ ८२ ॥

नाना ध्वनींच्या वाजांत्री । श्रीराम येतां निजगजरीं । आइकोनि राजा रुदन करी । [मु. प्रतीत 'म्हणें' हे अधिक पद.] कैश्या परी मुख दाऊं ॥ ८३ ॥

जगासी श्रीरामाचें सुख । तेणें दशरथा परमदुःख । त्याचें पाहों न सके मुख । पाडिली अटक कैकया ॥ ८४ ॥

श्रीराम निववी सर्वांसी । तेणें अति ताप दशरथासी । कैकया [नि. घा. 'पाडिलें अति भ्रांतीसी'.] पाडिला अपभ्रंशीं । निजभाकेसी गोउनि ॥ ८५ ॥

स्त्रीचरित्र अगम्य सृष्टी । निजवरदाचा नेटपाटीं । पित्यापुत्रां पाडी तुटीं । उठाउठी कैकया ॥ ८६ ॥

दारुण स्त्रियांचें विंदान । श्रीरामासी वनप्रयाण । तेंचि दशरथासी मरण । [त. 'रडे दारूण वैधव्य'; मु. 'नाडिली आपण वैधव्यें'; कं. 'राउळी आपण वैधव्यें'.] रडेल आपण वैधव्यें ॥ ८७ ॥

ऐसें जाणोनि दशरथ । अतिशयेंसी विलपत । तंव पातला रघुनाथ । समवेत सौमित्र ॥ ८८ ॥

नमस्कारूनि दशरथा । कैकयीचरणीं ठेविला माथा । विजयी होई बा रघुनाथा । वाग्देवता सत्य वदे ॥ ८९ ॥

अनुक्रमणिका

कैकयी आशीर्वाद गोठी । रामें बांधिली शकुनगांठीं । विजई जालों मी सृष्टी । बाहे थापटी स्वानंदें ॥ ९० ॥

उल्हास देखोनि रघुनाथा । [मु. व कं. प्रतींत हे पद नाही.] दारुण मूर्च्छा आली दशरथा । श्रीराम वियोगाची अवस्था । कांहीं सर्वथा नोबलवे ॥ ९१ ॥

[पै. व तु. या प्रतींखेरीज अन्य प्रतींत ९१ व्या ओवीनंतर पुढील ओवी आली आहे :— 'छेदावया दशकंठ । मुहूर्त सांगे वसिष्ठ । अयोध्याराज्य तें कनिष्ठ । रामराज्य श्रेष्ठ तिहीं लोकीं ॥ १ ॥'] श्रीरामासीं संभाषण । रायासी न करवे जाण । कैकया केलें [त. 'दुःखदारूण'; सु. घा. 'मुखमुरडण'; कं. 'मुखसंभोन' (मुखस्थंभन).] मुखमुद्रण । वनाभिगमन न संगवे ॥ ९२ ॥

नोबलवे येथें राहे । न बोलवे वनासी जाये । देखोनि श्रीरामाचे पाये । दुःखी होय आत दुःखें ॥ ९३ ॥

बाष्पें रुंधिला पैं कंठ । घोरे वाजे घटघट । टवंकारले नेत्रवाट । व्यथा उद्भट रायासी ॥ ९४ ॥

राजा देखोनि व्यथाभूत । कैकयीसी पुसे रघुनाथ । कैसेनि ताप जाला अद्भुत । किंवा भूतसंचार ॥ ९५ ॥

अथवा माझी अपराधता । घडलीं [कं. व मु. प्रतींत 'असे' हे अधिक पद.] मज न [सु. 'मज नेणता'.] कळतां । [कं. व मु. प्रतींत 'कीं' हे अधिक पद.] कांहीं भरतें धाडिली [मु. 'वार्ता'.] व्यवस्था । किं शत्रुघ्नें बोलतां अन्याय केला ॥ ९६ ॥

[सु. 'तऱ्ही नव्हे देहादिनिष्ठा'; नि. घा. कं. 'तरी नव्हे देहतापाची निष्ठा'.] नव्हे हे देहतापाची निष्ठा । नव्हे भूतसंचाराचा ताठा । नव्हे त्रिदोषांचा फांटा । नृपा वरिष्ठा कोण व्यथा ॥ ९७ ॥

दैविक दैहिक [मु. प्रतीत 'किंवा' हे अधिक पद.] मानसिक । अथवा कांहीं अलौकिक । रायासी कवणेपरीचें दुःख । तुवा सम्यक् पुसावें ॥ ९८ ॥

धाडूनि सुमंत प्रधान । रायें बोलाविलें जाण । त्या मज कोण आज्ञापण । तेंही आपण पुसावें ॥ ९९ ॥

कैकयी म्हणे रघुनाथा । तुझेनि रायासी पूर्ण व्यथा । तेहीं मीं तुज सांगेन [कं. व मु. 'आता'.] कथा । कोप सर्वथा न करावा ॥ १०० ॥

माझें ऐकतां वचन । तुज कोप येईल संपूर्ण । यालागीं माझें धाके मन । पूर्वकथन सांगावया ॥ १०१ ॥

आइकोनि कैकयीचें वचन । रामें धरिले तिचे चरण । ऐसा महापापी कोण । [मु. प्रतीत 'जो' हे अधिक पद.] मातृवचन विरोधी ॥ १०२ ॥

त्रिसत्य [मु. प्रतीत 'हें' अधिक पद.] सत्य जाण । तुझें वचन मज प्रमाण । वातो वसिष्ठाची आण । विकल्प पूर्ण सांडी माये ॥ १०३ ॥

आइकोनि श्रीराम निर्वाण । कैकयी उल्हासली आपण । रामें करावया वनप्रयाण । धर्मबंधन उद्बोधी ॥ १०४

अनुक्रमणिका

॥

कैकयीची युक्ती कैसी । राम करावया वनवासी । धर्मवचनाच्या पाशीं । श्रीरामासी दृढ बांधे ॥ १०५ ॥

दृढ वरदानाचें वरबंधन । जेणें दशरथा दुःख पूर्ण । तें निवारील रघुनंदन । प्रतिज्ञा प्रमाण वनवासा ॥ १०६ ॥

राज्य सांडुनि वना जातां । दुःख नाहीं रघुनाथा । वनाभिगमन उल्हासतां । लंकानाथावधार्थ ॥ १०७ ॥

येका जनार्दना शरण । जालें श्रीराम आगमन । पुढां वनाभिगमन । सावधान अवधारा ॥ १०८ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीरामागमनं नाम पंचमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सहावा

## कौसल्या सौमित्र समाधान

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

राजा न कुपितो राम व्यसनं नास्य किंचन । किंचिन्मनोगतं त्वस्य त्वद्भयान्नानुभाषते [तं. या प्रतीत या प्रसंगात एकही श्लोक नाही; गे. प्रतीत श्लोक दोन नाहीत.] ॥ १ ॥ [वा. रा. अयो. सर्ग १०, श्लोक २०.]
प्रियं त्वामप्रियं वक्तुं नास्य वाणी प्रवर्तते । तद्यावश्यं त्वया कार्यं यदनेन प्रतिश्रुतम् ॥ २ ॥ [वा. रा. अयो, सर्ग १८, श्लोक २१ व २२.]
एष मह्यं वरं दत्वा पुरा मामभिपूज्य च । पश्चात्संतप्यते राजा यथान्यः प्राकृतस्तथा ॥ ३ ॥

**पूर्व प्रसंगीं आपण । रामें वाईली वसिष्ठाची आण । तेणें कैकयीसी** [नि. गे. घा. 'केकयी सुखसंपन्न'.] **सुखसंपूर्ण । पूर्व कथन ते सांगे ॥ १ ॥**

**रायासी नाहीं** [तं. 'ज्वरावस्था'.] **ज्वरादि अवस्था । नाहीं भूतसंचारता । आणिक कांहीं नाहीं व्यथा । तुझी ममता बहु बाधी ॥ २ ॥**

**तें रायाचें मनोगत । सांगतां तुझे** [तु. पै. 'पळीपेत'.] **पोळैल चित्त । यालागीं पैं नृपनाथ । साशंकित सांगावया ॥ ३ ॥**

**तूं रायाचा प्रियपूर्ण । प्रियांपासीं अप्रिय वचन । सर्वथा नोबलवें जाण । यालागी मौन धरी रावो ॥ ४ ॥**

**रायाची** [नि. घा. प्रतींत हे पद नाही.] **आहे पूर्व भाक । ते त्वां करावी अवश्यक । पितृवचन परिपाळक । तिन्ही लोक वंदिती ॥ ५ ॥**

**रुक्मांगद सूर्यवंशी ।** [तं. 'व्रतभक्ता'; पै. 'व्रतभंग'; कं. 'व्रतभंग नाही'.] **व्रत भंगतां एकादशी । धर्मांगद शिर दे त्यासी । वैकुंठवासी जगद्वंद्य ॥ ६ ॥**

**तू तंव सत्यवादी रघुनाथ । जगीं थोर तुझा पुरुषार्थ । पित्याची भाक करी तूं सत्य । पितृवचनार्थ प्रतिपाळी ॥ ७ ॥**

**रायाचें मज वरदान । माझें मज नेदितांचि जाण । तुज देवों** [नि. घा. 'केवी'.] **केले आपण । तज्ञायमान तेणें रावो ॥ ८ ॥**

**देवो केलें तुजप्रति ।** [मु. प्रतीत 'त' हे अधिक पद.] **नेदी न म्हणवे भूपति । काय बोलावें तुज प्रति । सलज्ञचित्तीं नृपनाथु ॥ ९ ॥**

**आइकोनि कैकयीची वाणी । श्रीराम सत्त्वशिरोमणी । लागोनि मातेच्या चरणीं । काय गर्जोनि बोलतु ॥ १०**

अनुक्रमणिका

॥

अहं हि वचनाद्राज्ञ : पतेयमपि पावके । भक्षयेयं विषं वापि मज्ञयेयंजलेऽपि वा ॥ ४ ॥ [वा. रा. अयो. सर्ग १८, श्लोक २८ ते ३०.]
नियुक्तो गुरुणा पित्रा नृपेणाम्ब हि तेन च । तद्ब्रूहि वचनं देवि राज्ञो यदभिकांक्षितम् ॥ ५ ॥ [सु. प्रतीत श्लोक ५ वा नाही.]
प्रतिजाने करिष्ये च रामो द्विर्नाभिभाषते ॥ ६ ॥

**गुरुवचन पितृवचन । न करी तो पापी पूर्ण । मनुष्यवेषें तो** [मु. प्रतीत हे पद नाही; तु. त. 'किवणा'; तं. 'किवर्ण'; भा/२. 'तोकी विण'; प. 'किंवा'.] **केवळ श्वान । काळें वदन तयाचें ॥ ११ ॥**

**गुरुवाक्य विषम वितंड । न करी म्हणे ज्याचें तोंड । तें तोंड नव्हे रौरवकुंड । पापी प्रचंड तो येकु ॥ १२ ॥**

**गुरुवचनीं अविश्वासी । जितांचि तो नरकवासी । प्रेतें आतळों भीति त्यासी । महापापराशी तो येकु ॥ १३ ॥** [सु. प्रतीत ही ओवी नाही.]

**यालागीं पितृवचन अन्यथा । मी न करी वो** [पै. प्रतीत हे पद नाही; 'कं'. प्रतीत ही ओवी अशी आहे :— 'यालागी पितृवचन । अन्यथा मी न करी जाण । त्रिसत्य सत्य हे वचन । विकल्प चित्तीं धरूं नको ॥'] **सर्वथा । त्रिसत्य सत्य हें तत्त्वतां । विकल्प चित्ता धरूं नको ॥ १४ ॥**

**तुज कैसकैसें वरदान । रायें दिधलें आपण । त्याचें समूळ कथन । कृपा करुन मज सांग ॥ १५ ॥**

**आइकोनि श्रीरामाची सत्यवाणी । कैकेयी उल्हासलीं मनीं ।**
**वरद प्रतापाची कहाणी ।** [कं. पै. तु. भा/२. संपादित पाठ; तं. सु. नि. घा. 'हरिखे गर्जोनी सांगत'; त. 'हरिखेजोनी स्वयें सांगें'.] **हरिखेजोनि सांगत ॥ १६ ॥**

[तं. प्रतीत हे श्लोक नाहीत; सु. प्रतीत श्लोक ८ वा नाही.] पुरा देवासुरे युद्धे पित्रा ते मम राघव । रक्षितेन वैरो दत्तौ सशल्येन महारणे ॥ ७ ॥
तत्र मे याचितो राजा भरतस्याभिषेचनम् । गमनं दंडकारण्ये तव चाद्यैव राघव ॥ ८ ॥ [वा. रा. अयो. सर्ग १८,श्लोक ३२ व ३३.]

**पूर्वीं शुक्रासी युद्धार्थ । दशरथ गेला मजसमवेत । शुक्रासी साह्य दैत्य समस्त । देव साह्यार्थ दशरथ ॥ १७ ॥**

**देवदैत्यां युद्ध पूर्ण । थोर जालें रणकंदन । दशरथें दैत्य दारुण । बाणीं संपूर्ण निवटिले ॥ १८ ॥**

**वृषपर्वा दैत्यनाथ । रायें रणीं केला विरथ । पायीं पळती रणाआंत । बाणीं मूर्च्छित तो पडला ॥ १९ ॥**

[तं. नि. घा. भा/२. 'रायें मारिलें'; सु. गे. 'रावो मारीं'; कं. 'रायें मारितां.] **रावो मारील वृषपर्व्यासी ।** [नि. घा. 'म्हणोनि' हे अधिक पद.] **शुक्रें पाठीसी घातलें त्यासी ।**

अनुक्रमणिका

निर्वाणयुद्ध दशरथेंसी । [घा. 'क्षात्रिवृत्तीसी मांडले'; कं 'सतेज'.] अति क्रोधेसी मांडिलें ॥ २० ॥

शुक्रें बाण लाघवा आंत । आंखें छेदुनि राजा केला विरथ ।
युद्धीं [तं. 'चवकला'.] विचंबला विरथ दशरथ । [मु. प्रतीत 'म्हणोनि' हे अधिक पद.] बाहू चक्रांत म्यां सूदला ॥ २१ ॥

माझा बाहूचा निज नेट । रथ चालिला घडघडाट । शुक्राचा रथ करूनि पीठ । शिरीचा मुगुट पाडिला ॥ २२ ॥

युद्धीं निवटावें [पै. भा/२. खेरीज इतरत्र 'शुक्रासी'.] शिरासी । ब्राह्मण म्हणोनि राखिलें त्यासी ।
यश आलें दशरथासी । जयो रायासी माझेनि ॥ २३ ॥

ते वेळीं रायें अति संतोषीं । दोनी वर दिधले [कं. मु. प्रतीत हे पद नाही.] मज भाकेसी । एकें राजपाटु भरतासी । एकें वनवासी श्रीराम ॥ २४ ॥

राम रहिवास वनांतरीं । दंडकारण्या पैं [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] माझारी । वल्कलांबरें जटाधारी । [भा/२. 'गंगातीरी वनवासु'; सु. नि. घा 'गौतमतीरी रहिवासु'.] गौतमीतीरीं वनवास ॥ २५ ॥

ज्येष्ठ सांडूनियां दूरी । भरत [तं. सु. नि. घा. सर्वथा.] सर्वदा राज्य करी । तैसी नव्हे मी पापाचारी । ऐक निर्धारीं नेम माझा ॥ २६ ॥

मज नाहीं अत्यंत स्वार्थ । चौदा वरुषें नेमस्त । राज्य करील [कं. व मु. प्रतींत 'माझा' हे अधिक पद.] भरत । पुढें [कं. व मु. 'रघुनाथा निजराज्य'.] रघुनाथ निज राजा ॥ २७ ॥

राज्यांतील अणुप्रमाण । सवें न न्यावें आपण । पितृवचन जरी [तं. 'पाळण'.] प्रमाण । [तं. नि. कं. 'तरी वनप्रयाण आजीची'; सु. घा. 'तरी वनाभिगनम करावें'.] वन प्रयाण आजीचि ॥ २८ ॥

अजीन वल्कलें जटाधारी । वनां निघावें झडकरीं । कंदमूळ फळाहारी । गंगातीरीं वनवास ॥ २९ ॥

आइकोनि कैकयीचें उत्तर । श्रीराम [कं. व मु. प्रतींत 'जाला' हे अधिक पद.] हर्षनिर्भर । वना निघावया सत्वर । हृदयीं अपार आल्हाद ॥ ३० ॥

राज्य गेलियाचें नाहीं दुःख । वना जावयाचें परमसुख ।
बाहु स्फुरलें चालिला हरिख । प्रसन्नोन्मुख [नि. घा. 'प्रसन्नमुख वनाभिगमनी'; कं. 'प्रसन्नसुख वनवासी'.] वनगामी ॥ ३१ ॥

कैकयी हे एकी खोटी । हा विकल्प नाहीं रामाच्या पोटीं ।
तिच्या सत्य मानुनी गोठी । विश्वासें जगजेठी वना निघे ॥ ३२ ॥

अनुक्रमणिका

सर्वेचि पुसे मातेसी । रावो कां न बोले मजसी । येरी म्हणे अतिशयेसीं । लज्ज्ञा त्यासी जाली असे ॥ ३३ ॥

पहिलें तुज राज्य देवों केलें । आतां वना [कं. व मु. प्रतीत हे अधिक पद.] जाय केवी बोलें । या लाजा मौन पडिलें । मुख आपुलें दावीना ॥ ३४ ॥

मानावें पित्याच्या वचनार्था । तूं तंव माझी निजमाता । तुझें वचन न मनितां । वेदशास्त्रार्थी मी निंद्य ॥ ३५ ॥

पित्या परीस माता श्रेष्ठ । हे संन्यास पद्धति निर्दुष्ट । तुझें वचन मज वरिष्ठ । सुख उद्भट वनवासा ॥ ३६ ॥

संन्यास घेतलिया वरी । पिता पुत्रातें नमस्कारीं । संन्यासी माता वंदी शिरीं । आज्ञाधारी तियेचा ॥ ३७ ॥

[तं. 'जे तुज मानेसी वो सुख'; त. 'ते तुज मातेसी वो सुख'; कं. सु. नि. घा. 'जे तुज मातेसी होय सुख'.] ते तुज मातेसी-हो सुख । [मु. प्रतीत 'आणि' हे अधिक पद.] पित्याची प्रनिपाळे भाक । तें मज करणें आवश्यक । श्रीराम [मु. 'निःशंक'.] निशंक बोलिला ॥ ३८ ॥

पित्याची पढियंती तत्त्वता । तें तूं माझी सखी माता ।
विकल्प न धरी वो चित्ता । तुझ्या वचनार्था [कं. व मु. 'अनुकूल'.] अंकितु ॥ ३९ ॥

[नि. घा. 'ऐसे' हे अधिक पद'.] आइकता श्रीरामवचन । कैकयी जाली सुखसंपन्न । आनंदाश्रु लोटले नयन । दिधलें आळिंगण श्रीरामा ॥ ४० ॥

श्रीरामासी आळिंगिता । विकल्प निघाला [नि. घा. प्रतींत हे पद नाही.] मंथरे आंतौता ।
कैकयीची उपजे सद्भावता । त्याचि वचनार्था बोलत ॥ ४१ ॥

तें म्हणे निर्मळ तूं रघुनाथा । [तं. 'रायाचेन न बोलवे आतां'; भा/२. सु. नि. घा. 'येर तंव न बोलवे आतां'; कं. 'येर ते न बोले आतां'; तं. प्रतीत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :–– ते म्हणे निर्मळता रघुनाथा । तुज वनवासीं असतां । जयो पावसी तत्वतां । प्रतापता मद्वाक्यें ॥] येर तें नोबलवे आतां । [पैं. खेरीज इतरत्र 'तुज वनवासीं असतां'.] तुज वनासीं असतां । [तं. 'पूर्व विजयता सद्भाववाक्यं' इतरत्र 'पूर्ण विजयता मद्वाक्यें'.] पूर्ण विजयता मद्भाववाक्यें ॥ ४२ ॥

आतां राम न बैसे राज्यपाटीं । मां व्यर्थ करु कां गोठी । हा पित्याचें भाकेसाठीं । वना उठाउठी जाईल ॥ ४३ ॥

राम सत्यवादी निज निर्धारी । आजी मज कळली थोरी । हा पितृवाक्यावारीं । जाईल वनांतरीं दंडकारण्या ॥ ४४ ॥

श्रीरामाचें वनाभिगमन । आइकतां राजा पडे विसंज्ञ । [कं. व मु. प्रतींत 'त्याचें' हे अधिक पद.] श्रीरामें वंदुनि चरण । निघे आपण वनवासा ॥ ४५ ॥

अनुक्रमणिका

[पै. 'कैकयीचें चरण माथा'; भा/२ तु. 'कैकयीचे चरणी माथा'; तं. 'कैकयी चरणीं ठेविला माथा'; मु. 'कैकयीच्या चरणी ठेविला माथा'; कं. 'कैकयी चरणीं ठेवोनि माथा'.]**कैकयीचें चरणीं ठेवी माथा ।** [मु. प्रतीत 'म्हणे' हे अधिक पद.] **तुवां पूर्ण कृपा केली आतां ।
शांतवावी कौसल्या माता । चिंता दशरथा करूं नेदी ॥ ४६ ॥**

**दोघां करुनि** [पै. खेरीज इतरत्र 'प्रदक्षिणा'.] **नमन । राम करी वनाभिगमन । कैकयी गहिंवरली संपूर्ण । दीर्घ स्वरे रुदन राजा करीं ॥ ४७ ॥**

**आइकता रायाची ग्लानी । राम निघे धैर्य धरुनि । वनां जाविया उल्हास मनीं । सापत्न वचनीं विश्वासु ॥ ४८ ॥**

**क्रोध लक्ष्मणाच्या पोटीं । भवंया घालुनि गांठी । निघाला श्रीराम पाठीं । क्रोधदृष्टी संतप्त ॥ ४९ ॥**

गमने च मतिं चक्रे वनवासाय लक्ष्मणः । अनुचिंत्य विना रामं न हि जीवितुमुत्सहे ॥ ९ ॥

**लक्ष्मणाचें मनोगत । वना गेलिया रघुनाथ । मींही जाईन त्या समवेत । हा निश्चितार्थ सौमित्रीं ॥ ५० ॥**

**रामा वेगळें जीवें प्राणें । अर्धक्षण नाहीं राहाणें । ऐसा निश्चयो लक्ष्मणे । स्वांतःकरणें दृढ धरिला ॥ ५१ ॥**

**उलंघुनि राजभुवना । अभिषेकपात्रा प्रदक्षणा । करुनि राम निघाला वना । हाहाकार जना** [तं. त. 'होऊ सरला'; घा. 'ओसरला'.] **होंसरला ॥ ५२ ॥**

[वा. रा. अयो. सर्ग २०, श्लोक १.] तस्मिंस्तु पुरुषण्याघ्रे निष्क्रामतिकृतांजलौ । आर्तशब्दो महाञ्झ्ज्ञे स्त्रीणामन्तः पुरे तदा ॥ १० ॥

**कैकयीचा निजमदिरीं । अति आक्रंदे रडती नारी । राम दवडिला वनांतरीं । दुष्ट दुराचारी कैकयी ॥ ५३ ॥**

**येकी कान केश तोडिती । येके अति दुःखें आरडती । स्त्रीजित जाला भूपति । बाळें वनाप्रति धाडिलीं केवीं ॥ ५४ ॥**

**त्यांचें ऐकोनि रुदन । वेगीं निघे रघुनंदन ।** [मु. 'ठाकूनी'.] **टाकुनी आला मातृभवन । वनाभिगमन सांगावया ॥ ५५ ॥**

**नेघतां मातेचें आज्ञापन । कार्य साधेना निर्विघ्न । ऐसे जाणोनि रघुनंदन । आला आपण मातृभुवना ॥ ५६ ॥**

**जन बोलती** [मु. 'समस्त श्रेष्ठ'; कं. 'समस्त निकट'.] **समसकट । दशरथा नियामक वसिष्ठ ।
तेणे श्रीरामासी राज्यपाट । करावा वसिष्ठ गुरुप्रतापें ॥ ५७ ॥**

**वसिष्ठाचें आज्ञेपुढें । कैकयी कायसें बापुडें । राजा बोलो न शके** [पै. खेरीज इतरत्र 'तोंडें'.] **त्यापुढे । त्यासी हे निवाडे** [पै. खेरीज इतरत्र 'सांगाकोणी'.] **सांगावे ॥ ५८ ॥**

अनुक्रमणिका

वना गेलियां रघुपती । त्याची थोर वाढेल कीर्ती । वसिष्ठें जाणोनि निश्चिती । जातां वनाप्रति ना न म्हणे ॥ ५९ ॥

आपण शीघ्र वनाभिगमनी । हें मातेसी सांगावया लागुनि ।
राम प्रवेशला मातृभुवनीं । उल्हासु मनीं गमनाचा ॥ ६० ॥

रामें नमस्कारिली जननी । येरीं आळंगिला उल्हासोनी । गुरुपुष्याच्या अभिषेचनीं । राजा त्रिभुवनीं तूं होसी ॥ ६१ ॥

गुरुपुष्याचे समुहूर्त । सभाग्यासी होय प्राप्त । तेणे मुहर्तें अभिषेंची दशरथ । राजा रघुनाथ तिहीं लोकीं ॥ ६२ ॥

या मुहूर्ताचें ऐसे काज । जगीं होईल रामराज्य । सुरनर नाचती आनंद भोज । निश्चयें मज कळलेसें ॥ ६३ ॥

वसिष्ठ अभिषेकाचें जळ । त्याचें ऐसें आहे बळ । तिहीं लोकांचे राज्य अढळ । होईल सकळ श्रीरामा ॥ ६४ ॥

ऐसे बोलतां कौसल्येसी । श्रीराम सांगे तियेपासीं । जाला अभिप्रावो तूं नेणसी । सावकाशीं अवधारीं ॥ ६५ ॥

पूर्वी रायें निज भाकेसीं । दोनी वर दिधले कैकयीसी । एकें राज्यपाट भरतासी । एकें वनवासी श्रीराम ॥ ६६ ॥

भाकें गोउनिं दशरथ । कैकया साधिला निजस्वार्थ । राज्याभिषेकीं नेमिला भरत । मज वनांत धाडिलें ॥ ६७ ॥

मर्यादा नेमुनि चौदावर्षी । दंडकारण्य विजनदेशीं । गोदावरीतीरीं वनवासी । फळमूळांसी सेऊनी ॥ ६८ ॥

राज्यींचें नेवोनयें अणुमात्र । त्यजुनि वस्त्रें अळंकार । कृष्णाजिनें वल्कलांबर । जटाधर वनवासी ॥ ६९ ॥

रायें नेमिलें नेमस्त । वनप्रयाणा सुमुहूर्त । आजीची निघावें त्वरित । पुसावया येथ मी आलों ॥ ७० ॥

आइकोनि श्रीरामाची वाणी । जीवा मना अति आरणी ।
मूर्च्छापन्न पडली धरणी । खुंटली वाणी अतिदुःखें ॥ ७१ ॥

गरगरीत नेत्र वाट । बाष्पें रुंचला पैं कंठ । श्वासें फुटों पाहे पोट । प्राण संकट मांडिलें ॥ ७२ ॥

पत्रवियोगाचा घावो । दृढजिव्हारीं खोचला पाहों । पुत्रशोकें पूर्ण विरहो । पडिला देहो मूर्च्छित ॥ ७३ ॥

माता मूर्च्छित भूतळीं । रामें उचलूनि ते वेळीं । झाडूनियां धूसर धुळी । हृदयकमळीं आळंगी ॥ ७४ ॥

अनुक्रमणिका

तिसी रामें सावध करितां । म्हणें मज मरों दे रघुनाथा । पुत्रवियोगें जिणें जितां । परमव्यथा मातेसी ॥ ७५ ॥

येथुनि श्रीरामाचें मुख । मागुतेंनि [कं. व मु. 'मागुती कैं देखेन देख'.] मी नेदखे देख । तेणें आक्रंदें दिधली हांक । हृदयीं दुःख दाटलें ॥ ७६ ॥

कांटा रुपल्यां फणी कपाळीं । पुंस तुटल्या सांपसुरळी । [मु. प्रतीत 'जैसी' हे अधिक पद.] जळा वेगळी मासोळी । तैसी तळमळी कौसल्या ॥ ७७ ॥

कपटी म्हणों जातां रावो । माझें पातिव्रत्य होईल वावो ।
पति अवज्ञा थोर अन्यावो । विकिला देहो पतिवाक्या ॥ ७८ ॥

कैकयी भर्तार प्रियकर । तिसी मज करिता मत्सर । माझा अपराध मी देखें थोर । अतिदुस्तर मज रामा ॥ ७९ ॥

कैकयीचा आजीवरी । मज द्वेषु नाहीं तिळभरीं । भर्तारकृपा जियेवरी । ते निर्धारी मज पूज्य ॥ ८० ॥

घारी झडपूनि कैकयीसी । गर्भप्रसाद नेतां आकाशीं । अर्धपिंड [मु. प्रतीत हे पद नाहीं.] म्यां दिधला तिसीं । निज पतीसी संतोषा ॥ ८१ ॥

तैं पासूनि दशरथ । मजवरी कृपा करी अनंत । अन्यायी नव्हे नृपनाथ । अभाग्य येथें मी रामा ॥ ८२ ॥

कैकयीचा कोण अन्यावो । तिसी निजपुत्रांचा मोहो । वना जातो रामरावो । अभाग्य पाहों मी येकी ॥ ८३ ॥

रायांचे वचन वंदुनि माथां । वना निघतोसी रघुनाथा । माझें वचन पाळिसी आतां । अति गुह्यार्था सांगेन ॥ ८४ ॥

रायाचें वचन सिद्धी जाये । माझे वचन पाळिलें होये । ऐसें कांहीं एक वर्म आहे । [मु. प्रतीत 'तें' हे अधिक पद.] तुज मी पाहे सांगेन ॥ ८५ ॥

पित्याच्या प्रतिपाळीं वाक्यार्था । तेणेंची सुखावे निजमाता । तें मज करणें [मु. प्रतीत 'वो' हे अधिक पद; कं. प्रतीत 'वा' हे अधिक पद.] सर्वथा । चरणीं माथा ठेवी रामु ॥ ८६ ॥

राज्य देऊनि भरतासी । तुवां राहावें मजपासी । माझिये शृंगार वाडीसी । चौदा वरुषीं वनवासु ॥ ८७ ॥

दवडूनि सेवकां सर्वांसी । [मु. 'राज्य सांडुनि वैभवासी'.] सांडुनि राज्य वैभवासीं । माझिये श्रृंगार वाडीसी । चौदा वरुषीं वनवासु ॥ ८८ ॥

न भेटावें प्रधानासी । न भेटावें निज प्रजांसी । माझिये शृंगार वाडीसी । चौदा वरुषीं वनवासु ॥ ८९ ॥ [त. प्रतीत ही ओवी नाही.]

अनुक्रमणिका

**न भेटावें गृहस्त्रियांसीं । न भेटावें निजप्रियांसी । वसोनि शृंगार वाडीसी । चौदा वर्षीं वनवासु ॥ ९० ॥**

**नेभटावें दशरथासी । नेभटावें वसिष्ठासी । माझीये श्रृंगार वाडीसी । चौदा वर्षीं वनवासु ॥ ९१ ॥**

**रायाची आज्ञा अति सधर । त्यजूनि वस्त्रें अळंकार । वल्कलांबरी जटाधर । फळ आहार करू दोघें ॥ ९२ ॥**

**तुजसी असोनिया येक । तृण सेवितां परम सुख । तुज वेगळें पीयुष । केवळ विख मज होये ॥ ९३ ॥**

**आइकोनि मातेच्या वचनासी । श्रीराम लागला पायांसी । आश्वासुनि कौसल्येसी । निजधर्मासी सांगतु ॥ ९४ ॥**

**रायाची आज्ञा आहे ऐसी । जावे दंडकारण्यासी । राहातां शृंगार वाडीसी । पितृवाक्यासी विरोधु ॥ ९५ ॥**

**तूं बोलसी मोहसंभ्रम ।** [मु. प्रतीत 'मज' हे अधिक पद.] **पितृवाक्य पूज्य परम । सांडूनी मोह ममता भ्रम । आज्ञा परम मज देई ॥ ९६ ॥**

**तुझी आज्ञा वो** [मु. 'पै'; कं. 'हे'.] **नव्हता । मज यश न ये सर्वथा । म्हणूनि चरणीं ठेविला माथा । प्रसन्नता मज प्रेरी ॥ ९७ ॥**

**पित्याचें वचन अनुलंघेता । त्याहुनी जाण अधिक माता । सावधान परिसें रघुनाथा । वेदशास्त्रार्था अनुमत्त ॥ ९८ ॥**

> [१४ वा श्लोक मु. प्रतीत नाही.] दशविप्रानुपाध्यायो गौरवेणातिरिच्यते । उपाध्यायाद्दश पिता गौरवेणातिरिच्यते ॥ ११ ॥
> पितृन् दश च मातैका सर्वां वा पृथिवीमपि । गौरवेणाधिकालोकान्न मातृसदृशो गुरुः ॥ १२ ॥
> पतिता गुरवस्त्याजा न तु माता कथंचन । गर्भधारणपोषाभ्यां तेन माता गरीयसी ॥ १३ ॥
> साहं ते पितृतो राम धर्मतो गौरवाधिका । माननीया विशेषेण यथा धर्मविदो विदुः ॥ १४ ॥
> अतो मामपि ते कार्यं शासनं गुरुवत्सल ॥

**कौसल्या बोले आपण । ऐक श्रीरामा सावधान ।** [मु. प्रतीत 'सांगेन हे अधिक पद'.] **मातृत्वाचें महिमान । अति गहन वेदोक्त ॥ ९९ ॥**

**स्वधर्मकर्मीं निज निपुण । दाहा ब्राह्मण अति सज्ञान ।**
**एक आचार्या त्या** [मु. प्रतीत हे पद नाही.] **दहा समान । ऐसें महिमान आचार्यत्वा ॥ १०० ॥**

**दशाचार्या श्रेष्ठ कर्मप्रवृत्ती । त्यांहूनि** [मु. 'ज्याची'.] **पित्याची अधिक शक्ती ।**
**पुत्र विक्रयीं कांदूरी कार्यार्थी । नियामकत्वें निश्चितीं पिता अधिक ॥ १०१ ॥**

अनुक्रमणिका

दशाचार्या विशेषेसीं । गुरूत्वें गौरव पित्यासी । पित्या होऊनि दशांसी । गुरुत्व मातेसी पूज्यत्वें ॥ १०२ ॥

गर्भधारण पोषणेंसी । मातेसी गुरुत्व विशेषेसी । पृथ्वीपरीस मातेसी । पूज्यत्वासी गौरव ॥ १०३ ॥

पितां जालिया पतित । पुत्रें त्यागावा निश्चित । माता जालिया पतित । पूज्यत्वें शास्त्रार्थ प्रतिपादी ॥ १०४ ॥

पुत्र जाहालिया संन्यासी । अवश्य त्यागावें पितयासी ।
भिक्षा मागोनि मातेसी । पोसावें संन्यासी विधि शास्त्रार्थें ॥ १०५ ॥

यापरी गा रघुनाथा । पित्यापरिस पूज्यमाता । माझ्या भजावें वचनार्था । वना सर्वथा न जावें ॥ १०६ ॥

मातृवाक्य मानोनि गौण । करिसी पितृवाक्यपरिपाळण । हें [कं. व मु. प्रतीत ‘गा’ हे अधिक पद.] तुज परम दूषण । माझें वचन उलंघिता ॥ १०७ ॥

श्रीराम म्हणे कौसल्येसीं । तूं श्रेष्ठत्वें पूज्य होसी । येचिविषयी पूर्वधर्मासी । ऐक तुजपासी सांगेन ॥ १०८ ॥

पूर्वी पितृवाक्यें तत्त्वतां । फरशरामें छेदिली माता । नुलंघीच पितृवचनार्था । पूज्य [नि. ‘पिता’.] माता म्हणौनि ॥ १०९ ॥

पुत्रें वधिलें निजमातेसी । रेणुका क्षोभेचिना रामासी ।
प्रतिपाळिलें पतिवचनासी । तूंहि जाणसी हे कथा ॥ ११० ॥

मज पितृवाक्य पूज्य पूर्ण । तुजही पूज्य पतिवचन । त्याचें करितां उल्लंघन । अधःपतन दोहीसीं ॥ १११ ॥ [ओवी १११ ते ११६ या सहा ओव्या त. प्रतीत नाहीत.]

आइकोनि पुत्राच्या वचना । [मु. प्रतीत ‘म्हणे’ हे अधिक पद.] तुझा वियोगु रघुनंदना ।
मरणा होऊनि [मु. प्रतीत हे पद नाही; कं. ‘या’.] मज चौगुणा । [कं. व मु. प्रतींत ‘तऱ्ही’ हे अधिक पद.] सवें वना मज नेयी ॥ ११२ ॥ [ओवी १११ ते ११६ या सहा ओव्या त. प्रतीत नाहीत.]

या तऱ्ही पाळी माझ्या वचना । मज सवें न्यावें वना ।
म्हणौनि लागली श्रीरामचरणां । अति करुणां विलपत ॥ ११३ ॥ [ओवी १११ ते ११६ या सहा ओव्या त. प्रतीत नाहीत.]

काय करुं रे रघुनाथा । मज तंव मरण न ये आतां । न साहावे वियोगव्यथा । वना सर्वथा मज न्यावें ॥ ११४ ॥ [ओवी १११ ते ११६ या सहा ओव्या त. प्रतीत नाहीत.]

पुत्रासवें वनवासी । सर्वथा जावों नये मातेसी । ऐकतां क्षोभेल वसिष्ठ ऋषि । केवीं वनासी म्यां न्यावें ॥ ११५ ॥ [ओवी १११ ते ११६ या सहा ओव्या त. प्रतीत नाहीत.]

अनुक्रमणिका

ऐसिया परि निजधर्मता । रामें संभोखिली माता । तिचे चरणीं ठेविला माथा । क्षमा सर्वथा मज कीजे ॥ ११६ ॥ [ओवी १११ ते ११६ या सहा ओव्या त. प्रतीत नाहीत.]

आइकोनि [मु. ‘कौसल्या करुणावचन’.] कौशल्याकारुण्य । लक्ष्मण क्षोभला आपण । [मु. प्रतीत ‘म्हणें’ हे अधिक पद.] श्रीरामा ऐक माझें वचन । वनप्रयाण नको करूं ॥ ११७ ॥ [ओवी ११७ ते १२० या चार ओव्या त. प्रतीत नाहीत.]

परमसुख दशरथासी । कौसल्या पावे निजसुखासी । जाणें न लागे तुज वनासी । तें मजपासीं वर्म आहे ॥ ११८ ॥ [ओवी ११७ ते १२० या चार ओव्या त. प्रतीत नाहीत.]

आज्ञा देशील रघुनाथा । तरी मी साधीन कार्यार्था । ऐक त्याची ही व्यवस्था । तुज मी आतां सांगेन ॥ ११९ ॥ [ओवी ११७ ते १२० या चार ओव्या त. प्रतीत नाहीत.]

कैकयीच्या करीन घाता । [मु. प्रतीत ‘तैं’ हे अधिक पद; कं. ‘तैं’ हे अधिक पद.] परमसुख दशरथा । [मु. ‘सुखावेल’.] सुख पावेल कौसल्यामाता । राज्यीं रघुनाथा अभिषेकु ॥ १२० ॥ [ओवी ११७ ते १२० या चार ओव्या त. प्रतीत नाहीत.]

कैकयीचा निज कैवारा । आलिया निवटीन सुरनरा । रणीं निर्दळीन असुरां । भरीन सागरां अशुद्धे ॥ १२१ ॥

लोहें घोटोन पैं मांस । पृथ्वी करीन निर्मनुष्य । यमलोक पाडीन वोस । लावीन त्रास कळिकाळां ॥ १२२ ॥

पाठिसीं असिल्या रघुनाथ । कृतांताचे पाडीन दांत । मज भय नाहीं निश्चित । दुष्ट समस्त निर्दळितां ॥ १२३ ॥

तूं म्हणसी हें अप्रमाण । माझें वचन परम प्रमाण । दुष्टा करावया निर्दळण । अवतार पूर्ण श्रीराम ॥ १२४ ॥

दुष्टामाजीं दुष्ट संपूर्ण । मुख्यत्वें कैकयी अतिदारुण । सुहृद श्रिये विध्वंसन । प्रियाचे प्राणघातक ॥ १२५ ॥

सुमुहूर्त दुष्टदळणी । पहिलें कैकयीची बोहणी । मायापूतां विघडणीं । महापापिणी पतितापी ॥ १२६ ॥

दुःखें [मु. ‘रडेतों’; कं. ‘रडतों’.] रडतां दशरथ । त्याचा न मनीं हे वचनार्थ । पायां लागतां नृपनाथ । पतिवचनार्थ मानिना ॥ १२७ ॥

पित्यां पुत्रां करावया तुटी । दृढ दुष्टत्व कैकयी पोटीं । राम घालावया दिग्पटीं । परम खोटी हे एकी ॥ १२८ ॥

इचा [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] मज करितां [कं. व मु. प्रतींत ‘पैं’ हे अधिक पद.] घात । सुख होईल जगां आंत । कौशल्येसीं दशरथ प्राप्त । राज्यीं रघुनाथा अभिषेक ॥ १२९ ॥

भर्तार वचन नाणी दृष्टीं । श्रीराम द्वेषें [पै. खेरीज इतरत्र ‘महाहट्टी’.] महा खोटी ।

अनुक्रमणिका

इसी मारिल्या पुण्यकोटी । स्वानंद पुष्टी तिहीं लोकां ॥ १३० ॥

येच विषयीं रघुनाथा । मज आज्ञा देई आतां । म्हणौनि चरणीं ठेविला माथा । क्षोभकता अनिवार ॥ १३१ ॥

देखोनि सौमित्राचें चिन्ह । श्रीराम [कं. व मु. प्रतींत 'दे' हे अधिक पद.] त्यासी समाधान । तुझें आंगवण बळ संपूर्ण । मी आपण स्वयें जाणें ॥ १३२ ॥

वाटीव लांठीव वीरवृत्ती । चाऱ्ही पुरुषार्थ तुझा हातीं । येवढें असोन अपकिर्ती । आपणाप्रति येवों नेदीं ॥ १३३ ॥

आतुर्बळ पुरुषार्थेसीं । तेणें मारावें मातेसीं । दुःख द्यावें [मु. प्रतीत हे पद नाही.] निज पित्यासी । हेचि आम्हांसी अपकीर्ति ॥ १३४ ॥

पित्यासी पढियंती सर्वथा । ते तंव आमची सखी माता । तिच्या करितां निजघाता । अधर्मता शास्त्रार्थें ॥ १३५ ॥

पित्यानें हात घातला दासीसी । ते तंव माता होय आम्हासी ।
विरुद्ध करूं नये तिसी । मा कैकयीसी केंवी मारूं ॥ १३६ ॥

पितृवचना उलंघन । त्याहिवरी मातेचें हनन । तें तंव होईल जगीं जघन्य । निंद्य संपूर्ण तिहीं लोकीं ॥ १३७ ॥

येऊनि सूर्यवंशाप्रति । येवढी जोडावी अपकीर्ति । सौमित्रा हे [मु. पाठ 'हें न घडे ऐसी युक्ति'.] न घडे युक्ती । पूर्वज क्षोभती स्वर्गस्थ ॥ १३८ ॥

सामास सुरी परजिली । घरींची म्हातारी खोंचली । ते अपकीर्ति आम्हीं केली । जरी वधिली कैकयी ॥ १३९ ॥

आंगीं बळ आहे संपूर्ण । स्त्री मारणें पुरुषार्थ कोण । पित्यासी दुःख देतां दारुण । [मु. प्रतीत 'तैं' हे अधिक पद.] अधःपतन आम्हांसी ॥ १४० ॥

अंगी बळाची दृढ प्रौढी । वना जातां कोण सांकडी । मारूं राक्षसांच्या कोडी । सोडूं बांदवडी देवांची ॥ १४१ ॥

बांधोनि स्वधर्माचा सेतु । दुष्ट निर्दळु लंकानाथु । कीर्ति न समाये तिहीं लोकांतु । हा पुरुषार्थ साधावा ॥ १४२ ॥

आइकोनि श्रीरामवचन । सौमित्र करी साष्टांग नमन । रामें दिधलें आलिंगण । [मु. प्रतीत 'तेणें' हे अधिक पद.] समाधान दृढ झालें ॥ १४३ ॥

अनुक्रमणिका

पुढती घाली लोटांगण । पुडती वंदी श्रीरामचरण । [मु. 'तुझे सेवे मीं'.] तुज सवें वनीं येईन । दुष्ट दळण करावया ॥ १४४ ॥

पुडती नाचे पुडती गाये । पुढती वंदी श्रीरामपाये । तूंचि बाप तूंचि माये । गर्जतु आहे स्वानंदें ॥ १४५ ॥

श्रीरामा देई निजभाकेसी । [मु. हे पद नाही.] मज सवे न्यावें वनांसी । सेवा करावया वनवासीं । निजमानसीं उल्हासु ॥ १४६ ॥

आइकोनि श्रीरामाच्या युक्ती । कौसल्या सुखावली चित्तीं ।
वना न वचावा रघुपती । आग्रह स्थिती सांडिली ॥ १४७

श्रीरामाचें निजवचन । तेणें सुख समाधान । सुखी झाला लक्ष्मण । सुखसंपन्न कौसल्या ॥ १४८ ॥

माता आणि सौमित्र बंधु । दोघांजाला [मु. 'सुखसंवादु'.] सुखावबोधु । एका जनार्दनीं विनोदु । परमानंदे श्रीरामु ॥ १४९ ॥

एका जनार्दना शरण । शोकामाजीं सुख संपूर्ण । कौशल्या सुखावोन आपण । [मु. 'करवी' हे अधिक पद.] वनप्रयाण श्रीरामा ॥ १५० ॥

करुनिया पुण्याहवाचन । श्रीरामासीं वन प्रयाण । कौशल्या करवी आपण । स्वस्तिवाचन अवधारा ॥ १५१ ॥ [या ओवीनंतर त. प्रतीत पुढील २१ ओव्या अधिक आल्या आहेत :—
सुमित्र उताविळा चित्तीं । वैरी वधावयाचा आर्ती । चित्ती धरुनी पुरुषार्थी । बाहु स्फुरती स्फुराणें ॥ १ ॥
वना नेई रघुनाथा । कां सर्वथा करी घाता । राहें म्हणसी जरी आतां । माझी हत्या तुजवरी ॥ २ ॥
माझा निश्चयो तंव जाण । वसिष्ठ दशरथ आणि तुझे चरण । या तीर्थत्रयांचें प्रमाण । तुजवीण प्राण राखेना ॥ ३ ॥
श्रीरामें जाणोनि करुणा । म्हणे घेई वसिष्ठ वचना । येरे वंदुनी चरणा । म्हणे मज वना धाडावें ॥ ४ ॥
जानकी जननी श्रीराम जनक । मी तंव थानपितें बालक । तयावीण पळ एक । प्राणांतिक मजलागीं ॥ ५ ॥
दीर्घायुर्भवनी आशीर्वचनी । असेल तरी शीघ्र आज्ञा देऊनि । धाडी वनी रामा सवें ॥ ६ ॥
तत्काळ देहाचा व्हावा विनाशु । ऐसा हृदयीं असेल रोषु । तरी राहे ऐसा विश्वासु । शब्दपाश मज घाली ॥ ७ ॥
एकोनि सौमित्राचें वचन । वसिष्ठ झाला हर्षवदन । हातीं धरूनी लक्ष्मण । वोपी आपण रामहस्तीं ॥ ८ ॥
म्हणे रघुपति ममाज्ञा । अवश्य सुमित्र न्यावा वना । तुझियें सेवासंगति प्राज्ञा । जयो वोळगणा या होईल ॥ ९ ॥
सहस्रनयनिंच्या अश्रुधारा । प्रतापाचळें पुसुनी वीरा । विंशति नेत्राच्या जळधारा । अभिषेची धरा भूलिंगा ॥ १० ॥
अमरेंद्राचे हृदय शल्य । हाचि एकु करील निःशल्य । अतिकायातें दमील । करील सेवाळ रणतळां ॥ ११ ॥
त्रैलोक्याची आधी व्याधी । याचेनि होईल निर्व्याधी । तुज सर्वज्ञा विशालबुद्धी । नलगें बहुशब्दीं सांगणें ॥ १२ ॥
वचनें आनंदला सौमित्र । चुंबिले वसिष्ठाचे आंघ्र । पुढती वंदी श्रीरामचंद्र । हरुषे निर्भर नाचत ॥ १३ ॥
भविष्य श्रीरामाची करणी । वसिष्ठासी स्मरण होता ज्ञानी । अष्टै भावें वोसंडोनि । अश्रु नयनीं लोटले ॥ १४ ॥
तया आनंदाची लहरी । न सांठवेचि हृदयाचा पात्री । म्हणौनि सांडावया बाहेरी । धरिली करी कौशल्या ॥ १५ ॥
म्हणे ऐक वो माते वचन । न धरी शोक मोहो भय भान । हा दशरथासी रघुनंदन । आदिनारायण अवतरला ॥ १६ ॥
करूनी वनवासाच्या मिषा । राक्षसकुळ करावया नाशा । तिही लोक सुखसंतोषा । अतिविशेष वाढवावया ॥ १७ ॥
द्विजां द्यावें जनस्थान । सुग्रीवाचे क्लेश हरण । सागरीं तारुनिया पाषाण । वधावया रावण सपुत्र ॥ १८ ॥
तोडी नवग्रहांची बेडी । सोडवी देवांची बांदवडी । उभवुनी रामराज्याची गुढी । दावावी प्रौढी तिहीं लोकी ॥ १९ ॥
याचि कार्य कारणें । मांडले असे वनवासा जाणें । यालागी तुवां प्रसन्नमनें । आज्ञा देणें श्रीरामा ॥ २० ॥
एका विनवी जनार्दन । रम्यकथा रामायण । पुढें श्रीराम वनाभिगमन । सावधान अवधारा ॥ २१ ॥]

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां कौशल्यासौमित्रसमाधानं नाम षष्ठप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सातवा

## जानकी लक्ष्मण वनप्रयाण निश्चय

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

[मु. प्रतीत 'झाली' हे अधिक पद आहे.] **कौसल्या** [तं. प्रतीत 'होवोनी' हे अधिक पद.] **सुप्रसन्न । श्रीरामासी वनाभिगमन । करावया करी पुण्याहवाचन । स्वस्त्ययन अवधारा ॥ १ ॥**

> [मु. प्रतीत 'श्लोक १ ते ४ आहेत. हस्तलिखितात दीड श्लोक अधिक आहे, परंतु पै. प्रतीतील भाग झडल्याने श्लोक लागत नाही व इतर प्रतींत फारच अशुद्ध असल्याने श्लोक देता आले नाहीत.] निश्चितं तं तथा रामं विज्ञाय गमनोत्सुकम् । प्रास्थानिकं स्वस्त्ययनं कर्तुमेवोपचक्रमे ॥ १ ॥
> सानुगृह्यागतं बाष्पमुपस्पृश्य जलं शुचि । चकार माता रामस्य मंगलानि मनस्विनी ॥ २ ॥ [वा. रा. अयोध्याकांड, सर्ग २५, श्लोक १, १७ व १८.]
> गंधैश्चापि समालभ्य राममायतलोचना । औषधीं च सुसिद्धार्थां विशल्यकरणीं शुभाम् ॥ ३ ॥
> चकार रक्षां कौसल्या मंत्रैरभिजजाप च । देवानभ्यर्च्य विधिवत्प्रणम्य च शुभव्रता ॥ ४ ॥ [या पुढील दोन श्लोकांचा कागद झडल्यामुळे श्लोक घेता आले नाहीत.]
> × × × × × ॥ ५ ॥
> × × × × × ॥ ६ ॥

**वनीं होआवया** [पै. भा/२. 'वनवासासीं'.] **वनवासी । अति उल्हासु श्रीरामासी ।**
**कौसल्या जाणोनी निश्चयेंसी । धाडी वनासी स्वस्त्ययनें ॥ २ ॥**

**करूनी करचरण क्षाळण । कौसल्या करी शुद्धाचमन । करविलें देवतार्चन । रघुनंदन निज विजया ॥ ३ ॥**

**सुमनें चंदनें अति वोजा । पूजा केली अधोक्षजा । लोटांगण गरुडध्वजा । वनीं रामु माझा तूं रक्षी ॥ ४ ॥**

**नानाजळें सेवितां पाहे । रोग उपजोंचि न लाहे । त्या औषधी आणुनी** [कं. पै. तं. भा/२. 'लाहे'.] **लवलाहें । बांधल्या बाहे श्रीरामा ॥ ५ ॥**

**ज्या औषधी देखिल्या प्रति । राक्षस जीव घेउनी पळती । त्याही आणुनि निश्चिती । बांधल्या हातीं श्रीरामा ॥ ६ ॥**

[तं. प्रतीत ही ओवी नाही. कं. प्रतीतही ही ओवी नाही; परंतु ओवीचा क्रमांक मात्र दिला आहे.] **वनवासी नित्य निर्विघ्न । विजयी होआवया रघुनंदन । सर्वीं सर्वांचें प्रार्थन । करी आपण कौसल्या ॥ ७ ॥**

**जगद्‌गुरु जो कां ब्रह्मा । तेणें रक्षावें श्रीरामा । सदाशिव सहित उमा । माझ्या श्रीरामा संरक्षू ॥ ८ ॥**

**विष्णू जो कां त्रैलोक्यनाथ । तेणें रक्षावा** [मु. प्रतीत 'माझा' हे अधिक पद.] **रघुनाथ । विचरतां वना आंत । साह्य**

अनुक्रमणिका

संतत अहर्निशीं ॥ ९ ॥

साह्य होतु ऋषिगण । साह्य होतु सिद्धचारण । साह्य होतु मरुद्‍गण । रघुनंदन वनवासीं ॥ १० ॥

[तं. प्रतीत या ओवीचे पहिले तीन चरण पुढीलप्रमाणे आहेत :—‘आर्य मांधाता । चंद्रव्योम आदित्या । वरुण वस्तुमित्र विधाता ।’ त. प्रतीत या ओवीची जागा मोकळी सोडलेली आहे.] पूर्षा भग आर्यमा धाता । मित्र [पै. प्रतीखेरीज इतरत्र ‘चंद्रयम’.] चंद्रमा आदित्या । वरुण सुविधी विधाता । वनीं रघुनाथा रक्षावें ॥ ११ ॥

अकरा रुद्र चौदा इंद्र । पदोपदीं रक्षु उपेंद्र । साह्य होतु सप्त समुद्र । क्षीरसागर शेषशायी ॥ १२ ॥

चाऱ्ही वेद चौदा विद्या । श्रीरामा साह्य होतु सदा । मंत्रमूर्ति मंत्रानुवादा । राम सर्वदा रक्षावा ॥ १३ ॥

वेदामाजीं अथर्वण । त्याचे मंत्र अति दारुण । श्रीरामा साह्य होतु संपूर्ण । [पै. खेरीज इतरत्र ‘वनीं निर्विघ्न करावया’.] वन निर्विघ्न करावें ॥ १४ ॥

सप्त ऋषि आणि ब्रह्मऋषि । राम रक्षतु देवऋषि । नारदा लागते पायासी । माझ्या रामासी तूं रक्षी ॥ १५ ॥

शनी भौम महाक्रूर । राहु केतु गुरु शुक्र । श्रीरामासी न व्हावें वक्र । अहोरात्र रक्षावा ॥ १६ ॥

नक्षत्रें आणि नक्षत्रपति । ध्रुवें राखावा रघुपती । सप्तऋषीची अरुंधती । श्रीराममूर्ती ते रक्षु ॥ १७ ॥

विजूसी येते काकुलती । तुम्ही न पडावे श्रीरामा प्रति । नाना विधा दिव्यदीप्ति । तुम्ही रघुपती रक्षावा ॥ १८ ॥

वृक जंबुक सिंह व्याघ्र । आस्वलें तरस गौर तगर । सर्प शार्दूळ आणि वानर । तिहीं रामचंद्र रक्षावा ॥ १९ ॥

मातले म्हैसे उन्मत्त गज । मृग वराह आणि दिग्गज । वनदेवता नाचतु भोज । [मु. ‘तिही’.] माझा रघुराज रक्षावा ॥ २० ॥

महापक्षी अति दुर्धर । अग्निमुख नखक्रूर । श्येन गीध उलूक घार । तिहीं रामचंद्र रक्षावा ॥ २१ ॥

यक्ष रक्ष पिशाचक । जे का शिवाचे सेवक । तेहीं माझा रघुटिळक । आवश्यक रक्षावा ॥ २२ ॥

जळींचे क्रूर जळचर । मच्छ मगर महानक्र । माझा रक्षूत रामचंद्र । निरंतर वनासीं ॥ २३ ॥

मार्गीं चालतां रघूटिळक । कंटक होतु निःकंटक । दंश मशक गांधिलें वृश्चिक । ते विखें निर्विख होतु रामा ॥ २४ ॥

गमन शयन [मु. ‘अशना’.] आसना । पृथ्वी साह्य हो रघुनंदना । स्नान प्राशन मज्ञना । श्रीरामा जाण साह्य

आप ॥ २५ ॥

तम निराशी प्रकाशघन । जठराग्नी प्रदीपन । वनीं शीतनिवारण । अग्नि संपूर्ण साह्य रामा ॥ २६ ॥

करितां वनवास प्रयाण । श्रीरामा साह्य पंचप्राण । करितां संग्राम दारुण । ते [पै. खेरीज इतरत्र 'बळें'.] वेळें संपूर्ण साह्य वायु ॥ २७ ॥

श्रीरामाचिया वनवासा । साह्यत्व संपूर्ण आकाशा । हृदयीं चिंतेचा पैं वळसा । अल्पही ऐसा रिघो नेदी ॥ २८ ॥

दिशा आणि विदिशा । साह्य होतु श्रीरामा परेशा । हृदयीं दाऊनि चिद्विलासा । चिंतेचा घसा निवटावा ॥ २९ ॥

ऋतुमास संवत्सर । लवनिमिषादि तिथिवार । होरा मुहूर्त अहोरात्र । श्रीरामचंद्र रक्षावा ॥ ३० ॥

याहीं वेगळे अरण्यवासी । जे जे असती सामर्थ्येसीं । ते ते साह्य होतु श्रीरामासी । तुमची दासी मी [मु. 'झाले'.] होईन ॥ ३१ ॥

इंद्र निघतां वृत्रवधासी । गुरुंनीं मंगळें केलीं त्यासी । तें तें मंगळें तुजपासीं । अहर्निशीं [मु. तिष्ठोत.] तिष्ठतु ॥ ३२ ॥

गरुड जातां अमृतासी । विनतेनें मंगळ केलें त्यासी । तें तें मंगळें तुजपासी । अहर्निशीं तिष्ठतु ॥ ३३ ॥

हरें भेदावया त्रिपुरासी । उमेनें मंगळें केलीं त्यासी । तें तें मंगळें तुजपासीं । अहर्निशीं तिष्ठतु ॥ ३४ ॥

हरीनें मर्दितां मुरासी । रमेनें मंगळें केलीं त्यासी । तें तें मंगळें तुजपासी । वनवासीं तिष्ठतु ॥ ३५ ॥

जळचर भूचर खेचर । उग्र रौद्र महाक्रूर । तें तें साह्य करूं शंकर । दासी किंकर मी त्यांची ॥ ३६ ॥

वनीं रक्षु तुज वामन । जनीं रक्षू जनार्दन । निरंजनीं मधुसूदन । तुज संपूर्ण संरक्षु ॥ ३७ ॥

जळीं तुज रक्षु नारायण । स्थळीं तुज रक्षु संकर्षण । रणीं रक्षु सिंहवदन । विदारणा [मु. 'अभक्तासीं'; कं. 'जो विदारण दैत्यासी'.] भक्तारी ॥ ३८ ॥

शयनीं राखो शेषशायी । शिव [मु. प्रतींत हे पद नाही; कं. प्रतीत हा चरण असा आहे :—'पद्मनाभ आसनांचा ठायीं ।'] तुज राखो स्वप्नाच्या ठाईं । सुषुप्ती माझारीं विदेही । चित्सुखें पाहीं तुज राखो ॥ ३९ ॥

वनीं वसतां रघुनाथ । वीर्य धैर्या नव्हे च्युत । तो तुज राखो गा अच्युत । वना आंत विचरतां ॥ ४० ॥

अनुक्रमणिका

तुज रक्षू आगम निगम । तुज रक्षू स्थावर जंगम । तुझें संकट दुर्गम । पुरुषोत्तम संरक्षु ॥ ४१ ॥

जनवनां जो जीवन । निरंजना [मु. प्रतीत 'जो' हें अधिक पद.] निज जीवन । तो तुज रक्षु जनार्दन । लोटांगण त्यासी माझें ॥ ४२ ॥

म्यां प्रार्थिलें देवो देवता । म्या प्रार्थिलें भूतां समस्तां । म्या प्रार्थिलें आदि अच्युता । वनीं रघुनाथा रक्षावया ॥ ४३ ॥

राम जगाचा जिव्हाळा । त्याहींवरी मातेचा कळवळा । अश्रुपूर्ण [मु. 'भरलें'.] होऊनि डोळा । वेळोवेळां आळंगी ॥ ४४ ॥

धणी नुपरें आळंगितां । धणी नुपरे मुख पाहातां । धणी नुपरें गुज बोलतां । निजमाता कृपाळु ॥ ४५ ॥

धणी नुपरे मुख मर्दितां । धणी नुपरे मुख चुंबिता । धणी नुपरे ह्रदयीं धरितां । [मु. प्रतीत 'ऐसी' हे अधिक पद.] निजमाता कृपाळु ॥ ४६ ॥

धणी नुपरे वदनीं गातां । धणी नुपरे नयनीं पाहातां । धणी नुपरे ह्रदयीं ध्यातां । निजमाता कृपाळु ॥ ४७ ॥ [ही ओवी कं. प्रतीत नाही.]

श्रीरामें येऊनि आपण । त्रिवार करूनि प्रदक्षिण । वंदुनि मातेचे चरण । वनप्रयाण करूं [मु. 'करियेलें'.] जात्या ॥ ४८ ॥

देखोनि जननीचें वदन । पुढती नमन पुढती गमन । पुढती घाली लोटांगण । प्रेमपूर्ण मातेचें ॥ ४९ ॥

देखोनि मातेचा कळवळा । श्रीराम कृपेचा कोंवळा । आनंदाश्रु आले डोळा । बाष्पें गळा रुंधिला ॥ ५० ॥

तें देखोनि उठाउठीं । कौसल्या राम धरिला पोटीं । लल्हाट मर्दूनि लल्हाटीं । घातली मिठी दृढ चरणीं ॥ ५१ ॥

वनीं होऊनि रघुनाथा । अयोध्येसी [कं. व मु. प्रतीत 'येसीं' हे अधिक पद.] तूं [मु. 'विजयता'.] मागुता । कैं मी डोळां देखेन [कं. तु. तं. 'आता'; मु. 'मागुता'.] येतां । श्रीमुखता श्रीरामा ॥ ५२ ॥

मागुतेनि [मु. 'श्रीमुख देखेन'; कं. 'श्रीराममुख देखणें'.] श्रीराम देखणें । तैं होय डोळ्यां पारणें । म्हणउनि आळंगी जीवें प्राणें । वियोग मनें न साहवे ॥ ५३ ॥

माउलीचें प्रेमपूर्ण । [मु. प्रतीत 'तेणें' हे अधिक पद.] आश्रु लोटले संपूर्ण । जाहलें श्रीराम चरणक्षाळण । प्रक्षाळण निजदुःखा ॥ ५४ ॥

तंव गर्जली आकाशवाणी । श्रीराम निजविजयी वनीं । दुःख नको करूं जननी । राम त्रिभुवनीं महाराजा ॥

५५ ॥

श्रीराम वंद्य ब्रह्मादि देवां । श्रीराम वंद्य दैत्यां दानवां । श्रीराम [पै. 'वंदितां मानवा'; भा/२. 'वंदिती मानव'; तं. 'वंद्य तो मानवा'; मु. 'वंद्य सर्वमानवा'.] वंद्य मानवा । राम स्वयमेव परब्रह्म ॥ ५६ ॥

श्रीराम स्वयें परात्पर । श्रीराम [तं. त. सु. नि. गे. घा. या प्रतींत हे पद नाही.] वस्तु स्वयें स्वतंत्र । [त. 'श्रीराम तारु भव समुद्र'; मु. 'श्रीराम स्वयें चिन्मात्र'.] श्रीराम स्वयें चिदाचिन्मात्र । श्रीरामचंद्र परब्रह्म ॥ ५७ ॥

श्रीराम गुणीं गुणातीत । श्रीराम जीवशिवातीत । श्रीराम स्वयें सदोदित । राम निश्चित परब्रह्म ॥ ५८ ॥

श्रीरामा नाहीं सुख दुःख । [तु. 'मानी तो केवळ मूर्ख'; मु. व कं. 'जे मानिती ते केवळ मूर्ख'.] दुःख मानिती ते केवळ मूर्ख । आइकतां कौसल्ये जालें सुख । हृदयीं हरिख कोंदाटला ॥ ५९ ॥

ऐसी आकाशवाणी आइकता । परमसुख मायपुतां । मावळली द्वंद दुःखता । उल्हासता वना धाडीं ॥ ६० ॥

मावळले संकल्प विकल्प । मावळलें द्वंद दुःख । श्रीराम वना जातां देख । परम हरिख कौसल्यें ॥ ६१ ॥

एका जनार्दना शरण । कौसल्या करूनि नीरांजन । श्रीरामाचें वनप्रयाण । आल्हादें आपण करविलें ॥ ६२ ॥

जें स्वस्त्ययन रघुनंदना । तेंचि स्वस्त्ययन लक्ष्मणा । कौसल्या करूनिया जाणा । दोघेहि वना [सु. नि. गे. घा. खेरीज इतरत्र 'निघाले'.] धाडिले ॥ ६३ ॥

लागोनि मातेच्या चरणा । तिसी करूनी प्रदक्षणा । वेगें निघावया वना । निजभुवना राम आला ॥ ६४ ॥

राज्याभिषेकें श्रीराममूर्ति । गजरें येईल रघुपती । वोवाळावया सीता सती । घेऊनि आरती तिष्ठतु ॥ ६५ ॥

तंव देखिला रामचंद्र । नाहीं छत्र ना चामर । नाहीं द्विजांचा जयजयकार । नाइके गजर वाद्यांचा ॥ ६६ ॥

चरणा लागोनियां सीता । आदरें पुसे रघुनाथा । राज्याभिषेक न देखो माथां । विलंबता कां जाली ॥ ६७ ॥

अभिषेक नाहीं तत्त्वतां । राज्येंवीण उल्हासता । देखतसे [कं. व मु. प्रतींत 'मी' हे अधिक पद.] रघुनाथा । हे मज कथा सांगावी ॥ ६८ ॥

राहिलें राज्याभिषेचन । अति [मु. 'अति दूर'.] दुरास वनाभिगमन । तऱ्ही रघुनाथ नव्हे दुर्मन । उल्हास पूर्ण पितृवाक्यें ॥ ६९ ॥

येकाकी राम वना जातां । तेणें सुखावे कैकयी माता । भाकें [त. व मु. 'उत्तीर्णता'.] उत्तीर्ण दशरथा । तोचि रघुनाथा उल्हास ॥ ७० ॥

अनुक्रमणिका

श्रीराम म्हणे ऐके सीते । कैकयीसी श्रीदशरथें । दोनी वर दिधले होते । शुक्रविजयार्थें युद्धसंधीं ॥ ७१ ॥

शुक्रें रायाचा भंगिला रथ । कैकया चक्रीं सूदला हात ।
तेणें विजयी जाला दशरथ । तैं वरदार्थ रावो वदला ॥ ७२ ॥

तेंचि कैकया [मु. 'वरदोन'.] वरदान । आजी मागितलें आपण । एकें मज वनाभिगमन । शीघ्र प्रयाण आजीचि ॥ ७३ ॥

राज्यामधील अणुप्रमाण । कांहीं नेघावें आपण । हे रायाची [मु. 'प्रमाण'.] आज्ञा पूर्ण । शीघ्र प्रयाण आजीचि ॥ ७४ ॥

दुसरें वरदें रायापासी । राज्याभिषेक भरतासी । तेहि मर्यादा [कं. व मु. 'नवपंचवर्षीं'.] नवपंचकेसी । मग आम्हासी रामराज्य ॥ ७५ ॥

ऐसी जानकी जाहाली कथा । मज वना निघणें आतां । गुरुपुष्य सुमुहूर्तता । तुज तत्त्वतां पुसों आलों ॥ ७६ ॥

तुवां राहावें कौसल्येपासी । द्वेष न करावा कैकयीसी ।
हें गुह्य सांगतों तुजपासी । तिचेनि आम्हांसी अति कीर्ति ॥ ७७ ॥

कैकयीचें वरदान । तें मज जाहालें सुप्रसन्न । समुद्रीं तरतील पाषाण । हें [मु. प्रतीत हे पद नाही.] मज महिमान ईचेनि ॥ ७८ ॥

इनें वना नाहीं दवडिलें । प्रतापभांडार मज दिलें । त्रिभुवनीं रामराज्य जालें । इचेंनि बोलें वनवासी ॥ ७९ ॥

जाणोनिया ऐसिया स्वार्था । मजउल्हासु वना जातां । हें त्वां जाणोनि तत्त्वतां । कैकयी सर्वथा द्वेषूं नको ॥ ८० ॥

जैसी लक्ष्मी नारायण । तैसी सासु सासरा भावून । सेवा करावी आपण । सावधान सद्भावें ॥ ८१ ॥

सौमित्राची सखी जननी । कौसल्ये होऊनि अधिक मानी । सुखी करावी [तं. सु. नि. गे. घा. 'सेवा करुनीं'.] सेवनीं । अनुदिनीं निजभजनें ॥ ८२ ॥

माझी आज्ञा प्रमाण जैसी । भरताची आज्ञा मानी तैसी ।
विकल्प न धरावा मानसीं । वरा देवरासीं भेदू न मानी ॥ ८३ ॥

माझी आज्ञा आहे ऐसी । तुवां न वचावें माहेरासी ।
वेगळें न राहावें निजमंदिरेसीं । कौसल्येपासी नित्यवस्ती ॥ ८४ ॥
जंव होय माझें पुनरागमन । तंव करावें माझें ध्यान । मुखीं माझें नामस्मरण । विस्मरण येवों नेंदी ॥ ८५ ॥

अनुक्रमणिका

माझें ध्यान अहर्निशीं । उपमा नाहीं त्या सुखासी । माझेनि स्वरणें सुखी होसी । वियोगासी विसरोनि ॥ ८६ ॥

आइकोनि श्रीरामाचें वचन । हृदयीं लागला तो वाग्बाण । आसूंनीं पूर्ण जाले नयन । अधोवदन जानकी ॥ ८७ ॥

पतिवियोगाचें दुःख । तेणें कोरडें [मु. 'झालें'.] केलें मुख । हारपलें सकळही सुख । परमदुःख वोडवलें ॥ ८८ ॥

दुःखें जाहाली कासाविसी । मग लागली पतिपायांसी । काय बोलिली श्रीरामासी । [मु. 'तें सावकाशीं अवधारा'.] वनवासी मज न्यावें ॥ ८९ ॥

राज्यीं असतां श्रीरामासी । सेवा वांटली सेवकांसी । ते मी एकली वनवासीं । [मु. 'सर्वस्वेसीं'.] सर्व सेवेसी सेवीन ॥ ९० ॥

सर्व सेवेचा निजस्वार्थ । मज लाभे वनवासांत । तूं सर्वज्ञ श्रीरघुनाथ । माझा मनोरथ पुरवावा ॥ ९१ ॥

मग बोलिला रघुनंदन । नेणसी वनवासाचें चिन्ह । वनवासीं दुःख दारुण । सावधान अवधारी ॥ ९२ ॥

राज्यांतील अणुप्रमाण । घेवों नये वो आपण । त्यागुनिया वस्त्रभूषण । पादत्राण त्यागावे ॥ ९३ ॥

वल्कलांचें वस्त्र भरण । कृष्णाजिनें प्रावरण । तूं तंव सकुमार संपूर्ण । दुःख दारुण वनवासीं ॥ ९४ ॥

दंडकारण्य दुर्धर वन । तेथ वसावें आपण । पायीं चालतां कंटकपूर्ण । दुःख दारुण वनवासीं ॥ ९५ ॥

सिंह शार्दूल व्याघ्र वृक । तरस तगर मृग जंबुक । रीस वानर सर्प वृश्चिक । परमदुःख वनवासीं ॥ ९६ ॥

पतंग भृंग दंश क्रूर । नक्र सुसरी मच्छ मगर । कंक बक पक्षी घोर । दुःख दुर्धर वनवासीं ॥ ९७ ॥

वनीं वनफळांचा आहार । तृणपर्णाचा सेजार । शीत उष्ण निरंतर । दुःख दुर्धर वनवासीं ॥ ९८ ॥

तूं तंव रायाची राजबाळा । अतिशयेसीं वेल्हाळा । वनीं द्वंद दुःख उमाळा । तूं वेल्हाळा केवीं साहासी ॥ ९९ ॥

आइकोनि द्वंदबाधा वचन । सीता जाहाली [त. सु. नि. गे. घा. खेरीज इतरत्र 'सावधान'.] हास्यवदन । जवळीं असतां रघुनंदन । द्वंदबंधन मज न बाधी ॥ १०० ॥

करितां तुझे नामस्मरण । [मु. प्रतीत 'जाण' हे अधिक पद.] द्वंददुःखाचें निर्दळण । तो तूं जवळीं असतां जाण ।

द्वंदबंधन मज कैचें ॥ १०१ ॥

वृक व्याघ्र पंचानन । त्यांचा आत्मा रघुनंदन । तो तूं जवळी असतां जाण । द्वंदबंधन मज कैंचें ॥ १०२ ॥

जवळीं असतां रघुटिळक । कंटक होती निःकंटक । विख ते होयील पीयूष । परम सुख वनवासीं ॥ १०३ ॥

तुज सांघातें वनवास । तो मज वैकुंठ कैलास । तुज वेगळ्या संसार वोस । दुःख असोस मज तेव्हां ॥ १०४ ॥

माझा स्वामी तूं रघुनाथ । ऐक माझें मनोगत । तुज वेगळें जीवित । दुःखाभिभूत संसारु ॥ १०५ ॥ [कं. प्रतीत ही ओवी नाही.]

पति प्रियेचें निजजीवन । पति प्रियेचे निजनिधान । पति प्रियेचें निजभूषण । तेणेंवीण ते अति दीन ॥ १०६ ॥

पति प्रियेचें निजशोभन । पति प्रियेचें गति गमन । पति प्रियेचें प्रेमधन । तेणेंवीण ते अति दीन ॥ १०७ ॥

पति प्रियेचें निजवैभव । पति प्रियेचें निजगौरव । पति प्रियेचें सुख स्वमेव । तेणेंवीण पाहा हो अति दीन ॥ १०८ ॥

पति प्रियेची पूज्य मूर्ति । पति प्रियेची निजात्मगती । पति प्रियेची परममुक्ती । होय उपहती तेणें वीण ॥ १०९ ॥

तूं तंव माझा प्राणनाथ । तुज वेगळा मज प्राणांत । माझा परमात्मा रघुनाथ । हृदयस्थ अवधारी ॥ ११० ॥

जेव्हांचि तुझें वनप्रयाण । तुज सवें येती माझे प्राण । मागे [मु. प्रतीत 'मज' हे अधिक पद.] राहावितां जाण । अचुक मरण मज रामा ॥ १११ ॥

कृपाळू तूं हृषीकेशी । ऐशीं बिरुदे [मु. प्रतीत 'तूं' हे अधिक पद.] स्वयें वहासी । तरी मज न्यावें वनवासासी । निज सेवेसी दास्यत्वा ॥ ११२ ॥

म्हणोनि धरिले दोन्ही चरण । गहिवरें गळती तिचे नयन । जाहाले पतिपदक्षाळण । श्रीराम पूर्ण तुष्टला ॥ ११३ ॥

कोण्हांसीही न पुसतां । तुज म्यां सवें वनां नेतां । [नि. घा. 'म्हणतील स्त्रीजित कामलोलुपता'; सु. गे. 'म्हणतील स्त्रीजित कामलोलंगता'; भा/२. 'म्हणती स्त्रीकाम लौन्यता'; तं/१. तु. त. 'म्हणती स्त्रीकाम लोलुपतां'.] म्हणती स्त्रीकामें लोलिंगता । वना सीता राम नेतो ॥ ११४ ॥

जेणें चुके लोकनिंद्यता । [नि. घा. प्रतींत 'जेणें' हे अधिक पद.] स्वार्थ पावे परमार्था । ऐसिया सांगेन निजस्वार्था ।

अनुक्रमणिका

तुवां शीघ्रतां करावें ॥ ११५ ॥

लौकिकीं माने जें सर्वांसी । स्वार्थीं पाविजे परमार्थासीं । ऐसिया सांगेन गुह्यासी । त्या कार्यासी तूं साधी ॥ ११६ ॥

भूत भविष्य वर्तमान । वसिष्ठासी आहे [कं. व मु. प्रतींत 'हें' हे पद नाही.] हें ज्ञान । त्यासी रिघावें [कं. व मु. प्रतीत 'त्वां' हे अधिक पद.] शरण । वनाभिगमन करावया ॥ ११७ ॥

रिघाल्या सद्‍गुरुसी शरण । विघ्न तेंचि होय निर्विघ्न । गुरुवचना उल्लंघी [मु. प्रतीत 'ऐसा' हे अधिक पद.] कोण । हरिहर पूर्ण वंदिती ॥ ११८ ॥

आज्ञा पुसिल्या वसिष्ठासी । ना न म्हणवे दशरथासी । मजही नुलंघवे त्यासी । [मु. 'गुरुवाक्य जगद्वंद्य'.] गुरुवाक्यासी जग वंदी ॥ ११९ ॥

ज्याचिया [मु. 'जाण' हे अधिक पद; कं. प्रतीत 'प्रताप' हे अधिक पद.] वचनासाठी । सूर्यमंडळीं तपे कांठी । येवढा गुरु आमचे गांठीं । हे गुह्य गोठी त्यासी पुस ॥ १२० ॥

आइकोनि श्रीरामाचें वचन । सीता हरिखेली संपूर्ण । धरिले वसिष्ठाचे चरण । वनाभिगमन आज्ञार्थ ॥ १२१ ॥

मज न्याविया वनवासासी । आज्ञा द्यावी श्रीरामासी । तूं तंव हृदयस्थ जाणसी । सर्वज्ञ होसी गुरुवर्या ॥ १२२ ॥

वसिष्ठ म्हणे रघुनाथा । वना अवश्य न्यावी सीता । इचेनि पावसी पुरुषार्था । यश [मु. 'सर्वथा'; कं. 'वर्धता'.] तत्त्वतां ईचेनि ॥ १२३ ॥

सुरनर वानिती पवाडे । येवढी कीर्ति ईचेनि जोडे । इसी घालुनि पुढें । वना रोकडें निघावें ॥ १२४ ॥

कौसल्या म्हणे वनवासासी । श्रीरामें सीता न्यावी सरिसीं ।
येथें ठेवितां आम्हांपासी । देखतां तिसी नित्य दुःख ॥ १२५ ॥

स्त्रीपुरुषां वेगळेंपण । हें तंव मरणापरीस मरण । हेंचि स्त्रीयेसी दुःख दारुण । पृथक्‌शयन पुरुषेसीं ॥ १२६ ॥

अयोध्येच्या जनांची वार्ता । श्रीरामें वनासी न्यावी सीता ।
वचन मानलें रघुनाथा । वना निजकांता नेवों इच्छी ॥ १२७ ॥

बाप श्रीरामाची करणी । सद्‍गुरु आज्ञा लाहोनि । लौकिक स्वयें संपादुनि । वना निजपत्नी नेवों पाहे ॥ १२८ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम म्हणे सीतेसी । त्यजूनि वस्त्रा-भरणासी । वल्कलांबर परिधानेसी । वेगीं वनासी निघावें ॥ १२९ ॥

वस्त्राभरण त्यागितां । उल्हास सीतेचिया चित्ता । धन धान्यादि वस्तुजातां । आणुनि रघुनाथापुढें ठेवी ॥ १३० ॥

लक्ष्मण म्हणे रघुनाथा । तुम्हीं सवें घेतली सीता । मीहि वना येईन आतां । निजस्वार्था [नि. घा. 'सेवावया'.] सेवेच्या ॥ १३१ ॥

श्रीराम म्हणे सौमित्रा । तूं मज निजांचा सोयरा । मागें धरावया राज्यभारा । जवळी तिसरा दिसेना ॥ १३२ ॥

आइकोनि श्रीरामाचें वचन । लक्ष्मणें मांडिलें निर्वाण । तुज वेगळा सांडीन प्राण । तुझी आण श्रीरामा ॥ १३३ ॥

वाऊनिया निर्वाण आण । दुढ धरिले श्रीरामचरण । सोडविता नोसंडी जाण । कळवळोन बोलतु ॥ १३४ ॥

तुम्ही दोघें वनवासी । आश्रमीं सांडूनि सीतेसी । तूं जासील वनफळांसी । मागें इसी कोण राखे ॥ १३५ ॥

स्त्रियेसी मुळीं होऊनी रक्षण । माता संरक्षी बाळपण ।
कुमारीपणीं पिता रक्षण । लग्न लागलिया जाण [सु. गे. 'जाण तिसी रक्षण सासुसासरे'; नि. घा. 'रक्षण सासुसासरें'; तं. 'जाण सासुसासरा'; कं. 'लग्नातीं जाण सासुरीं'.] बहूरक्षण सासुरा ॥ १३६ ॥

सासुश्वसूर भावे देर । [मु. 'जावादिकादि अपार'; तं. 'ओहणिका आणिं वर'; कं. 'वोहनिका सर्व चर'.] नणंदा वोहनिका आणि घर । मुख्य रक्षण भर्तार । तेणें निरंतर रक्षावी ॥ १३७ ॥

अरक्षणता स्त्रियेसी । अनर्थ आला त्या घरासी । लांछन लावील [कं. व मु. 'त्या' हे अधिक पद.] कुळासी । प्रमदा तिसी निजनांव ॥ १३८ ॥

प्रमादीं पाडी पतिपुत्रासी । प्रमादीं पाडी कुळ गोत्रासी । यालागीं प्रमदा नांव तिसी । वेदशास्त्रेंसीं संमत ॥ १३९ ॥

तुम्ही दोघे वनवासीं । मी असलिया तुम्हांपासी । आणीन फळमूळ पुष्पासी । अहिर्निशीं रक्षण ॥ १४० ॥

तुझें वाहीन धनुष्यबाण । काष्ठें आणीन जीवन । तुम्हासी करावया शयन । सेज करी तृणपर्णीं ॥ १४१ ॥

तुझ्या रंकाचाही रंक । मोलेवीण मी सेवक । वनवासींचा पायिक । विश्वासिक [कं. 'सम गवळा'; त. तं. 'आगळा'; सु. गे. 'आंगलग'; तु. 'आंगवळा'; नि. घा. 'आंगवणा'.] आंगबळ ॥ १४२ ॥

अनुक्रमणिका

वनीं एकली सांडितां सीता । अनर्थ होईल रघुनाथा । विचार पुसावा समर्था । श्रीगुरुनाथा वसिष्ठा ॥ १४३ ॥

लक्ष्मणाची निज युक्ति । सत्य मानिली समस्तीं । येकली सीता वनाप्रति । ठेवितां निश्चिती अनर्थ ॥ १४४ ॥

आइकोनि लक्ष्मणाचें वचन । वसिष्ठ [सु. गे. 'आज्ञा दे सर्वज्ञ'; नि. घा. 'आज्ञा दे सर्वज्ञा सर्वज्ञ'.] सर्वज्ञा सर्वज्ञ । तेणें खुणाउनी रघुनंदन । वना लक्ष्मण [नि. घा. 'स्वयें न्यावा'; भा. 'सुखें नेई'.] सवें नेईं ॥ १४५ ॥

[सु. 'पाहुनी सद्गुरु सज्ञाना'; नि. घा. 'श्रीगुरु संज्ञा'; तं. 'लाहूनि सद्गुरु सर्वज्ञा'.] लाहोनि सद्गुरु संज्ञा । श्रीराम म्हणे लक्ष्मणा । जरी तुज येणें आहे वना । तरी धनधान्य वांटावें ॥ १४६ ॥

परिसतां श्रीरामवचन । हर्षें निर्भर लक्ष्मण । एका जनार्दना शरण । वनप्रयाण अवधारा ॥ १४७ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां जानकीलक्ष्मण वनप्रयाणनिश्चयो नाम सप्तमप्रसंगः ॥

## प्रसंग आठवा

## श्रीराम वनप्रयाण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीरामोक्ति––

[मुद्रित प्रतीत प्रारंभीचे श्लोक पुढीलप्रमाणे आहेत :
रामस्त्वनेन वाक्येन सुप्रीतः प्रत्युवाच तम् । व्रजापृच्छस्व सौमित्रे सर्वमेव सुहृज्जनन् ॥ १ ॥
ये च राज्ञे ददौ दिव्ये महात्मा वरुणः स्वयम् । जनकस्य महायज्ञे धनुषी रौद्रदर्शने ॥ २ ॥
अभेद्ये कवचे दिव्य तूणी चाक्षय्यसायकौ । सर्वमायुधमादाय क्षिप्रमाव्रज लक्ष्मण ॥ ३ ॥
स सुहृज्जनमामंत्र्य वनवासाय निश्चितः । इक्ष्वाकुगुरुमागम्य जग्राहायुधमुत्तमम् ॥ ४ ॥
तं दिव्यं राजशार्दूलः सत्कृतं माल्यभूषितम् । रामाय दर्शयामास सौमित्रिः सर्वमायुधम् ॥ ५ ॥
तं. प्रतीत एकही श्लोक नाही; कं. प्रतीत पहिले दोन श्लोक आहेत.] व्रज रे गच्छ सौमित्र त्वमापृच्छ सुहृज्जनम् । अपि राज्ञे ददौ दिव्ये महात्मा वरुणः स्वयम् ॥ १ ॥
धनुषी ते गृहाण त्वमक्षय्याविषुधी च तौ । अभेद्यं कवचं दिव्यं निशीताश्चाक्षयाः शराः ॥ २ ॥
खड्गाश्च विमलाकाराः वर्चसा कनकप्रभाः । यच्चार्यगृहे नित्यं धनुस्तिष्ठति मेऽर्चितम् ॥ ३ ॥ [वा. रा. अ. कां. सर्ग ३१, श्लोक २८, २९ व ३०.]
तदानय च गत्वा त्वं त्वरावानिह लक्ष्मण । इत्युक्तो लक्ष्मणः शीघ्रं स्वामापृच्छय सुहृज्जनम् ॥ ४ ॥
आचार्यगृहमागम्य ते जग्राह पृथूत्तमे । ते दिव्ये नरशार्दूसकृते देवभूषणे ॥ ५ ॥
दर्शयामास रामाय धनुषी लक्ष्मणस्तदा ॥ ६ ॥

**श्रीराम म्हणे सौमित्रासी । जरी तूं वनवासा येतोसी । तरी पुसोनि ये निजमातेसी ।** [कं. मु. 'आणि पत्नीसी'.] **निजपत्नीसी भेटोनी ॥ १ ॥**

**आणिकहि सुहृदसंबंधे । त्यांसी** [तं. 'त्यासीं पुसावें यथाविधें'; त. 'तेथेहि पुसावे निजबोधें'; मु. 'त्यासी पुसोनी यावे यथावबोधें'; कं. 'त्यासी पुसोनी यावें बोधें'.] **पुसावें यथावबोधें । माझी आणावीं दिव्यायुधें । जे अति शुद्धें युद्धार्थी ॥ २ ॥**

**मज दिधलें दशरथें । वरुणदत्त धनुष्यातें । तेणेंसी आणावें अक्षयी भाते । अभेद्य कवचातें आणावें ॥ ३ ॥**

**शत्रुघातें अति खडतर । अतिशयें सतेज धार । तें** [मु. 'तेही खर्ग आणावे अति शीघ्र'; त. 'ते खड्ग आणावे सत्वर'.] **खर्ग आणावें शीघ्र । आज्ञा गंभीर रामाची ॥ ४ ॥**

**सद्‌गुरु वसिष्ठांचा घरीं । माझ्या आयुधांची सामग्री । ते आणावी त्वरें करी । वनांतरीं जाविया ॥ ५ ॥**

**लक्ष्मण सांगे सुमित्रेसीं । राम सीता जाताती वनासी । मीहीं जातो त्यांचे सेवेसी । म्हणोनि मातेसी वंदिलें ॥ ६ ॥**

**सुमित्रा म्हणे श्रीरामसेवा । करिता सुख माझिया जीवा । वनीं सुखी केलिया राघवा । धन्य कुसवा तैं माझा ॥ ७ ॥**

अनुक्रमणिका

**ज्येष्ठ बंधु सद्गुरु परम । ज्येष्ठ बंधु पित्यासम । ज्येष्ठ बंधु आत्माराम । पुरुषोत्तम ज्येष्ठ बंधु ॥ ८ ॥**

**श्रीरामसेवा परमदान । श्रीराम सेवा परम ध्यान । श्रीरामसेवा** [मु. प्रतीत 'परम' हे अधिक पद.] **समाधान । ब्रह्मज्ञान रामसेवा ॥ ९ ॥**

**श्रीराम सेवेचा** [मु. प्रतींत 'करी' हे अधिक पद.] **आदर । तो सुखरूप नित्य नर । ऐसा मातेनें देऊनि वर । वना सौमित्र पाठविला ॥ १० ॥**

**यापरी वंदुनिया जननी । निजपत्नी आश्वासुनि । दिव्यायुधें स्वयें घेऊनि । आला धांवोनि सौमित्र ॥ ११ ॥**

**आले देखोनि सौमित्रासी । अति उल्हास स्वयें सीतेसी । परम सुख श्रीरामासी । धरी पोटेसीं आल्हादें ॥ १२ ॥**

[तं. प्रतीत ही ओवी पुढीलप्रमाणे आली आहे :–– 'जो त्यागी निजकांतेसी । तोचि पढिये श्रीरामासी । तोचि अति विश्वासी । अहर्निशी आवडता ॥']
**जो त्यागी निजकांतेसी । जो त्यागी** [नि. घा. 'वित्तविषयासीं'.] **वित्तजीवितेसी । तोचि पढियंता** [मु. प्रतीत 'जीवीं' हे अधिक पद.] **श्रीरामासी । अहिर्निशीं आवडत ॥ १३ ॥**

श्रीरामोक्ति–

तमुवाचात्मवान्रामः प्रीत्या लक्ष्मणमागतम् [वा. रा. अ. कां. सर्ग ३१, श्लोक २८, २९ व ३०.] । काले त्वमागतः सौम्य कांक्षिते मम लक्ष्मण ॥ ७ ॥ [वा. रा. अयो. कां. सर्ग ३१, श्लोक ३४, ३५, ३६ व ३७.]
अहं प्रदातुमिच्छामि यदिदं मामकं धनम् । ब्राह्मणेभ्यस्तपस्विभ्यस्त्वया सह परंतप ॥ ८ ॥
बहुबालानल्पध्वनान्तस्मादानय मे द्विजान् । तद्धनं कृपणानाथविकलेभ्यश्च राघवः ॥ ९ ॥ [मुद्रित प्रतीत श्लोक ९ ते ११ नाहीत. कं. प्रतीत हे श्लोक नाहीत.]
दरिद्रेभ्यश्च साधभ्यो ददौ सर्वमशेषतः । वसिष्ठपुत्रं च सुयज्ञमार्यं त्वमानयाशु प्रवरं द्विजानाम् ॥ १० ॥ [मुद्रित प्रतीत श्लोक ९ ते ११ नाहीत. कं. प्रतीत हे श्लोक नाहीत.]
तमर्चयन्रत्नैः प्रथमं महार्हैः सुतर्पयिष्यामि परान् द्विजातीन् ॥ ११ ॥ [मुद्रित प्रतीत श्लोक ९ ते ११ नाहीत. कं. प्रतीत हे श्लोक नाहीत.]

**श्रीराम म्हणे लक्ष्मणासी । यथाकाळें शीघ्र आलासी । मी निजधन देईन दीनांसी । तूं त्या कार्यासी संपादी ॥ १४ ॥**

**तूं सखा साह्य वनवासीं । तूं सखा साह्य निजधर्मासी । तूं सखा साह्य निजकर्मासी । सहकारी होसी सर्वार्थी ॥ १५ ॥**

**माझें निःशेष निजधन । मी धर्मार्थ करितों दान । तें वांटावयाचें विधान । सावधान अवधारी ॥ १६ ॥**

**सखा साह्य स्वामी सर्वार्थे । आधी पुजावें श्रीवसिष्ठातें । सर्वस्व अर्पावें सद्गुरुतें । हा मुख्य आमुतें स्वधर्म ॥ १७ ॥**

**धनधान्य** [सु. गे. घा. 'असंख्य उमोप'; तं. 'असंख्य'; त. 'असंख्यात'.] **असंख्यांक ।** [तु. 'धाडाव्या गाई वत्सयुक्त'; तं. 'धाडा गाई

अनुक्रमणिका

सकळैक'; तु 'धाडावे गाईचे कळप सकळिक'; मु. 'धाडावे गाईचें कळप अनैक'.] धाडावे गाईंचे कळप । वस्त्रें अर्पावीं [कं. सु. घा. 'अमोप'; त. 'समस्त'.] अमौलिक । रथ वारू [सु. घा. प्रतीत हे पद नाही.] अलौकिक गुरुसी अर्पी ॥

अनर्घ्य रत्नाचिया कोडी । भरूनि धाडाव्या कावडी । सद्‌गुरु पूजावा आवडी । निजपरवडी धर्माची ॥ १९ ॥

तुवां जाऊनि सांघातें । स्वयें अर्पावें सद्‌गुरुतें । सुयज्ञ ज्येष्ठपुत्र त्यातें । [नि. घा. प्रतीत हे पद नाही.]तो आणी येथें प्रार्थुनि ॥ २० ॥

वसिष्ठासी द्यावें धन । आइकोनि श्रीराम वचन । लक्ष्मणासी हर्ष पूर्ण । जाऊनि आपण गुरु पूजी ॥ २१ ॥

वसिष्ठ बोले उल्हासेंसी । त्रैलोक्यविजयो श्रीरामासी । म्हणोनि सुबुद्धी त्याची ऐसी । पूर्णभाग्यासी प्रकाशक ॥ २२ ॥

मग जाऊनि [तं. 'यज्ञमंडपासी'; सु. 'सुयज्ञाचें घरासी'; कं. नि. घा. 'सुयज्ञ घरासी'.] यज्ञवाटासी । सौमित्र वंदी सुयज्ञासी । श्रीराम जातो वनवासीं । तेणें भेटीसी [तं. सु. नि. घा. 'बोलाविले'.] प्रार्थिलें ॥ २३ ॥

आइकोनि श्रीरामाचें गमन । सुयज्ञ जाला उद्विग्न । लाऊनिया दोन्ही नयन । ठेला आपण तटस्थ ॥ २४ ॥

मग करूनिया संध्यावंदन । सुयज्ञ आला जी आपण । देखतांचि रघुनंदन । घाली लोटांगण गुरुपुत्रा ॥ २५ ॥

मधुपर्क विधिविधान । केलें यथोक्त पूजन । आपलीं भूषणें रघुनंदन । करी समर्पण गुरुपुत्रा ॥ २६ ॥

जडित कुंडलें रत्नमेखळा । बाहु भूषणें अनर्घ्य माळा । करकंकणें मुद्रिका सकळा । शृंगारिला गुरुपुत्र ॥ २७ ॥

श्रीराम सांगे स्वयें सीतेसी । [मु. 'म्हणें' हे अधिक पद.]तूंही पूजी सुयज्ञासी । तिणेंही अनर्घ्य अळंकारांसी । दिधलें त्यासी उल्हासें ॥ २८ ॥

वना जाते श्रीरामासरिसीं । परम आल्हाद सीतेसी । सर्वस्वें देतां सुयज्ञासी । निजमानसीं उल्हास ॥ २९ ॥

अमौल्य वस्त्रें सीतेपासीं । तेही दिधलीं सुयज्ञासी । जडितशय्या आस्तरणेंसी । सहित दासी अर्पिल्या ॥ ३० ॥

मातुळदत्त गज रामापासीं । [मु. प्रतीत 'तो' हे अधिक पद.] शृंगारूनी अळंकारेंसी । त्यावरी बैसवुनि सुयज्ञासी । [तं. 'अति गजरेसीं'; नि. घा. 'गजगजरेसी'.] दान गजरेसी बोळविला ॥ ३१ ॥

उल्हासें पूजूनि सद्‌गुरुसी । जो भजेना सत्पात्रासी । तेंचि दूषण दात्यासी । आम्ही महाऋषि पूजावे ॥ ३२

अनुक्रमणिका

॥

श्रीराम सांगे सौमित्रासी । अगस्त्य शांडिल्य गर्गऋषी । वामदेवादि कौशिकांसी । बहु धनराशी पाठवी ॥ ३३ ॥

वेदपाठक अग्निहोत्री । सदाचार नित्यश्रोत्री । आगमिक महामंत्री । द्रव्यसंभारीं पूजावें ॥ ३४ ॥

ऐसियांसी दिधल्या दान । तें तंव अतिशयें पावन । सत्पात्र तें आहे आन । सावधान अवधारी ॥ ३५ ॥

अयाचित भगवद्भावें । अवश्य दान त्यासी द्यावें । आपण जाऊनियां सवें । धन अर्पावें अयाचका ॥ ३६ ॥

कुटुंबवत्सल आणि निर्धन । बहु अपत्यें अति दीन । त्याचें सुखी होय मन । इतुकें धन अर्पावें ॥ ३७ ॥

शीळवृत्ती [मु. प्रतीत 'आणि' हे अधिक पद.]उंच्छवृत्ति । जाऊनिया त्याच्या घराप्रति । जितुकें द्रव्य ते मागुती । [मु. प्रतीत 'तितुके' हे अधिक पद.] चतुर्गुणीं तूं [मु. प्रतीत 'त्या' हे अधिक पद.] देई ॥ ३८ ॥ [कं. प्रतीत ही ओवी नाही.]

त्यांसी कैंचें साधन शाक । गोसहस्त्र सवत्सक । त्यांसी द्यावें आवश्यक । घृत दधी ताक भोजनार्थ ॥ ३९ ॥

धनधान्य कौसल्येघरीं । आधीं द्यावें धर्माचारीं । संन्यासी माधुकर करपात्री । ब्रह्मचारी भिक्षार्थ ॥ ४० ॥

कौसल्येचे निजसेवक । आणिक तिचे उपासक । तैसेचि सुमित्रेचे देख । धन अनेक त्या देई ॥ ४१ ॥

आमचे सुहृद आणिक सेवक । परिचारक आणि [तं. 'प्रेरक'; कं. 'पोषक'.] प्रेषक । कथाकथक आणि पुराणिक । द्रव्य अनेक त्यां द्यावें ॥

वार्तासूचक [मु. प्रतीत 'आणि' हे अधिक पद.] गंधलेपक । सभास्थानीं हास्यभाषक । ते पावती परम सुख । [मु. 'त्या'.] तैसें आवश्यक धन द्यावें ॥ ४३ ॥

छत्रकार चवरधारी । हडपी बारी आणि [मु. 'व्यवहारी'.] कर्‍हेरी । जळप्राशक धूपी फुलारी । सुखी करी द्रव्यदानें ॥ ४४ ॥

मल्लमर्दनीं नटनाटक । अश्ववाहक वस्त्रक्षाळक । रायविनोदी उपहासक । शिल्पीकारक सुखी करी ॥ ४५ ॥

माझा सारथी चित्ररथ । त्यासी अपार अर्पी अर्थ । दीन [मु. 'दरिद्री जे जे समस्त'; कं. 'दीन जे जे समस्त'.] जन जे समस्त । अर्थवंत तेही करी ॥ ४६ ॥

आमचे सखे सुहृद् भक्त । जे कां आमुचे नित्याश्रित । जे जे आम्हांसी आर्त्तभूत । [मु. प्रतीत 'ते' हे अधिक पद.] धनें समस्त सुखी करी ॥ ४७ ॥

अनुक्रमणिका

द्रव्य कांहीं ठेवणें नाहीं । निःशेष वेंची [तं. 'धर्मकर्मींहि'; मु. 'धर्मी सर्वही'.] धर्मकार्यीं । आणिक लागेल जें कांहीं । तें तें पाही मी देईन ॥ ४८ ॥

मग पाचारूनि भांडारी । [मु. 'म्हणे निःशेष द्रव्य काढी बाहेरी'.] निःशेष द्रव्य काढिलें बाहेरी । याच्या विनियोगाची परी । अवधारी सौमित्रा ॥ ४९ ॥

कृपणें अनाथे अति दीने । अंध पंगु [मु. 'वृत्तिहीन'.] वृत्तीक्षीणे । जें मागती तें द्यावी धनें । अति सन्मानें सुखी करूनि ॥ ५० ॥

सुख उपजे दिधल्या [नि. घा. 'दान'.] धन । त्या होऊनि सुख दे सन्मान ।
तेणें सुखें सुखावे श्रीभगवान । हा विधि दान अति श्रेष्ठ ॥ ५१ ॥

वृद्ध ब्राह्मणस्त्रिया तरुण । बहुबाळकेशीं निर्धन । त्यांसी सन्मानें द्यावें धन । सूक्ष्मदान या नांव ॥ ५२ ॥

ऐसिया ब्राह्मणा ठाई । सवच्छा आणिक सुदोही । सहस्त्र सहस्त्र अर्पीं गाई । खिल्लारीं कांहीं उरो नेदी ॥ ५३ ॥

माझें होय पुनरागमन । तंव खाविया पुरे धन । ऐसे दीनासी द्यावें दान । सनातन हा धर्म ॥ ५४ ॥

मज वनां गेलियापाठीं । कोण्ही न व्हावें कष्टी । कोण्ही न पडावें संकटीं । अगाध [मु. 'तुष्टी धन देई'; कं. 'अगाध मुष्टी धन देई'.] मुष्टी दाना देई ॥ ५५ ॥

श्रीरामें आज्ञा दिधली जैसी । लक्ष्मण दान दे त्याहूनी विशेषी । दान देतां लक्ष्मणासी । चौगुणा मानसीं उल्हास ॥

निःशेष वांटुनिया धन । सीता श्रीराम लक्ष्मण । करावया वनप्रयाण । निघालीं आपण रायासी पुसों ॥ ५७ ॥

राम सीता निघाल्या बाहेरी । पाहों धांवल्या नरनारी । एकें चढली उपरीवरी । माझ्या गोपुरीं पैं एके ॥ ५८ ॥

राम चालतां राजबिदीं । [तं. 'स्वयें'; मु. 'सवें'; कं. 'संधि'.] सैंघ दाटली जनाची मांदी । कैकयीची दुष्ट बुद्धि । राजा निर्बुद्धि कां ऐके ॥ ५९ ॥

रथ गज चातुरंग श्रेणी । राम गजरें जातु प्रतिदिनीं । तो श्रीराम आजी अन्हवाणी । जातो चरणीं वनवासा ॥ ६० ॥

राम देखतां निवती नयन । राम देखतां निवे मन । राम देखतां निवती जन । जगजीवन श्रीराम ॥ ६१ ॥

श्रीराम जगाचें जीवन । ते जीवनीं जन मीन । तो श्रीराम जातांची जाण । जनांचे प्राण [मु. प्रतीत 'की' हे अधिक

अनुक्रमणिका

पद.] जातील ॥ ६२ ॥

ऐसिया सुखरुप रामासी । दशरथ धाडितो वनासी । कैकयीग्रहें घेतलें त्यासी । लागलें रायासी स्त्रीपिसें ॥ ६३ ॥

सीता सकुमार महासती । इंद्रादि देव पाहों न सकती । तेही चरणीं चालतां क्षितीं । लोक देखती मार्गस्थ ॥ ६४ ॥

ऐसें बोलतां जनासी । तिघे अनुद्विग्न मानसीं । वेगें आलीं राजगृहासी । दशरथासी पुसावया ॥ ६५ ॥

सुमंतु प्रधान अति विश्वासी । तेणें सांगितलें रायासी । श्रीराम जातो वनवासासी । आज्ञा तुम्हांसी पुसों आला ॥

रामे वांटिलें निजधन । सेवक सुहृद आणि ब्राह्मण । सुखी केले दीनजन । वनप्रयाण सुमुहूर्ता ॥ ६७ ॥

आइकोनि सुमंताचें वचन । रायासी आलें पैं रुदन । जळो कैकयीचें [पै. खेरीज इतरत्र 'वदन'.] वचन । रामनिधान वनवासी ॥ ६८ ॥

श्रीराम देखतां दृष्टीं । राजा मूर्च्छित पडिला सृष्टी । रामें [पै. तं. भा. तु. खेरीज इतरत्र 'उठविला'.] उचलिला उठाउठीं । स्वयें थापटी पर्यंकीं ॥ ६९ ॥

राजा होऊनि सावधान । श्रीरामेंसी बोलें आपण । नको करूं वनप्रयाण । माझा प्राण जावों पाहे ॥ ७० ॥

कैकयी ते मश्यक कोण । तुज मी राज्य देतों संपूर्ण । आतांचि करीन अभिषेचन । ऋषिगण समयोगें ॥ ७१ ॥

श्रीराम लागला पायांसी । नको करूं अभिषेकासी । मिथ्या करितां भाकेसी । दोघें दोषी वेदोक्त ॥ ७२ ॥

आतां मज राज्य घेतां । जग निंदील सलोभता । तुझी भाक मिथ्या करितां । अधःपाता [मु. प्रतीत 'मी' हे अधिक पद.] जाईन ॥ ७३ ॥

वेदवचन गुरुवचन । त्याहूनि अधिक पितृवचन । यावज्जन्म करी जो पाळण । त्याचें वचन अनुलंघ्य ॥ ७४ ॥

तुझेनि वचनें त्यागीन सीता । तुझेनि वचनें त्यागीन जीविता । वनवासाच्या निश्चयार्था । मी सर्वदा त्यागीना ॥

माझा जऱ्ही जाईल प्राण । तऱ्ही त्यागीना वनप्रयाण । राया तुझी वातों आण । म्हणोनि चरण दृढ धरिले ॥ ७६ ॥

अनुक्रमणिका

देखोनि श्रीराम निर्वाण । राजा दीर्घ करी रुदन । कैकया नागविलों संपूर्ण । रामनिधान अंतरले ॥ ७७ ॥

न विचारितां निजकार्यासी । भाक देवों नये स्त्रियांसी । [कं. व मु. प्रतींत 'तेणें' हे अधिक पद.] भाकां गोऊनि आम्हांसी । केला वनवासी श्रीराम ॥ ७८ ॥

श्रीरामाचा दृढपण । वनाभिगमनीं अति निर्वाण । रायें [मु. प्रतीत 'वृत्त' हे अधिक पद.] जाणोनि आपण । निजप्रधान आज्ञापी ॥ ७९ ॥

सन्नद्ध चतुरंगसेना । रामासवें द्यावी वना । वनीं वेचावया रघुनंदना । अशेष धना सवें देई ॥ ८० ॥

उष्णें पीडेल श्रीरामचंद्र । सवें देई छत्रातपत्र । कापडगृहें अति विचित्र । देई खिल्लार धेनूंचें ॥ ८१ ॥

आइकोनि रायाचें वचन । कैकयी जाली कोपायमान । आरक्त करूनिया नयन । कोपें आपण बोलत ॥ ८२ ॥

घेऊनि उंसांच्या रसासी । बाकस दीजे जेवी दानासी । लक्ष्मी देऊनि रामासरिसीं । भरता देसी शून्य राज्य ॥ ८३ ॥

दाऊनि गज भद्रजाती । दानसंकल्प द्विजाहातीं । त्यासी देईजे चित्रींचा हस्ती । तैसी गती राज्य देण्या ॥ ८४ ॥

माझें म्हणा काळें मुख । तुम्ही दुष्ट नष्ट [मु. 'नष्टविवेक'; कं. 'नष्ट दुष्ट विशेष'.] अविवेक ।
मिथ्या करिता आपुली भाक । आवश्यक नरक भोगाल ॥ ८५ ॥

कैकयीचें कठिण वचन । आइकोनि राजा कोपायमान । नष्ट दुष्ट तूं अति कठिण । वर्मीं वाग्बाण विंधसी ॥ ८६ ॥

श्रीराम म्हणे स्वामी दशरथा । सेनासंपत्ती सवें घेतां । राज्यभारू आला माथां । ते सर्वथा मी नेघे ॥ ८७ ॥

गंगोदक अति शुद्ध । त्यामाजीं पडल्या मद्यबिंद । अवघेची होय अशुद्ध । अति विरुद्ध दुष्टसंग ॥ ८८ ॥

तुम्हीं राज्य दिधलें भरता । त्यांतील अणुमात्रही घेतां । माझ्या वनवासाच्या व्रता । दोष तत्त्वतां लागेल ॥ ८९ ॥

सांडुनि वस्त्रें अळंकार । परिधान [मु. प्रतीत 'करावे' हे अधिक पद; कं. 'करी' हे अधिक पद.] वल्कलांबर । माथा धरूनि जटाभार । होईन वनचर वनवासीं ॥ ९० ॥

ऐसें बोलतां श्रीरामासी । कैकयी वल्कलें दे त्यापासीं । वेगीं वेढुनिया यांसी । वनवासासी शीघ्र जावें ॥ ९१ ॥

अनुक्रमणिका

स्वमेव देखतां दशरथ । वल्कलें वेढी श्रीरघुनाथ । लक्ष्मण येऊनीया [कं. व मु. प्रतीत 'शीघ्र' हे अधिक पद.] तेथ । स्वयें वेढी वल्कलें ॥ ९२ ॥

वल्कलें दिधलीं सीतेसी । तें वेढितां नये तिसी । श्रीरामें येऊनि तीपासीं । अति युक्तीसी नेसविलीं ॥ ९३ ॥

रामसौमित्रसीतेच्या वस्त्रांसी । कैकया घेतली आपणापासीं ।
देखोनि क्षोभ जाला रायासी । अति निर्भर्च्छी कोपला ॥ ९४ ॥

कोप आला वसिष्ठासी । निर्भर्छिले कैकयीसी । नष्ट दुष्ट शठ तूं होसी । न लाजसी अति स्वार्था ॥ ९५ ॥

तुझिया वरदाच्या नेमासीं । एकला एक राम वनवासी । तूं कां वल्कलें देसी सीतेसी । दुष्ट होसी दुर्भग ॥ ९६ ॥

वस्त्रें अलंकार त्याचिया [नि. घा. 'आता'.] अर्था । तू कां घेसी सभेदेखतां । काळें वदन तुझें [मु. 'तत्त्वता'.] आतां । मुख दावितां न लज्यसी ॥

दुस्तर कोपे दशरथा । कैकयीसी हाणों धांवे लाता । तूं नव्हसी माझी कांता । तुझा भर्ता मी नव्हे ॥ ९८ ॥

माझ्या बाळांचीं घेसी लुगडीं । तूं तंव रामा हाटींची धगडी । घरीं घातलीसे धांगडी । जाय रोकडी बैस हाटीं ॥ ९९ ॥

ऐसें सक्रोध बोलतां । गंहिवरू आला दशरथा । पोटेसी धरोनिया सीता । होय अर्पिता आभरणें ॥ १०० ॥

चौदा वरुषें वनवासी । वस्त्राभरणें पुरे तिसी । तितुकीं द्यावीं सीतेसरिसीं । सुमंतासी आज्ञापी ॥ १०१ ॥

वस्त्राभरणें सीतेजवळीं । [कं. व मु. 'सुमंतें दिधली तें काळीं'.] सुमंतें नेसविलीं तत्काळीं । दशरथ वंदिला जनकबाळीं । वंदी वेल्हाळी वसिष्ठातें ॥

वसिष्ठें दिधलें आशीर्वचन । वनीं सतीत्व पावसी पूर्ण । विजयी होईल रघुनंदन । तुज त्रिभुवन वंदील ॥ १०३ ॥

राजा आज्ञापी सुमंतु । शीघ्र आणि माझा रथु । बैसावया रघुनाथु । सीता समवेतु सौमित्र ॥ १०४ ॥

रामलक्ष्मणें प्रदक्षणा । करूनि लागले पित्याच्या चरणा । सात शतें माता जाणा । अभिवंदना तिहीं केलें ॥ १०५ ॥

तंव तिहीं केला कोल्हाळ । अवघ्यां एकुचि हळकालोळ । राम निघाला तात्काळ । अति विव्हळ समस्त ॥ १०६ ॥

अनुक्रमणिका

जातां देखोनि रघुनंदन । राजा पडिला मूर्च्छापन्न । रुदन करिती सकळही जन । दीनवदन अयोध्या ॥ १०७ ॥

एकी माता कपाळें कुटिती । एकी वक्षस्थळें पिटिती । एकी दीर्घहांका देती । पडिल्या बहुती मूर्च्छित ॥ १०८ ॥

श्रीराम म्हणे येथें राहतां । अधिक वाढेल ममता । रथीं वाउनिया सीता । होय निघतां तत्काळ ॥ १०९ ॥

आक्रंदे आरडे निजमाता । [मु. प्रतीत 'म्हणे' हे अधिक पद.] मुख पाहों दे रघुनाथा । केंवी मी देखेन मागुता । [मु. 'वदन श्रीरामा दाखवीं'.] सुखें श्रीमंता श्रीरामा ॥ ११० ॥

येई रे येई रे माझिया रामा । मनमोहना मेघशामा । विव्हळ सांडुनियां आम्हा । वना दुर्गमा केंवी जासी ॥ १११ ॥

तुज निघतांचि [मु. प्रतीत 'बारे' हे अधिक पद.] वना । मज प्रेमाचा आला पान्हा । कोणासी पाजू रघुनंदना । निजवदना मज दावी ॥ ११२ ॥

वना जातां रघुनंदन । गाईंचे गळती लोचन । अश्व गज करिती रुदन । दुःखें पाषाण उलताती ॥ ११३ ॥

डोहीचें आटतां जीवन । जेवी तळमळिती मीन । तेवी अयोध्येचे जन । रामेंवीण [मु. 'तळमळिती'.] चडफडिती ॥ ११४ ॥

कैकयी अत्यंत कठीण । सीतेचें हरी वस्त्राभरण । तीखालें येथें राहे कोण । करूं प्रयाण वनवासा ॥ ११५ ॥

निघाले ज्योतिषी वेदपाठक । निघाले अग्निहोत्री साग्निक । त्यांचिया समागमें देख । एके एक निघाले ॥ ११६ ॥

निघाले दुशीभूशी साळी माळी । चाटे भाटे तेली तांबोळी । [नि. घा. 'कोष्टी'.] सोवनीं सोनार शिंपी गौळी । कोळी नाळी निघाले ॥ ११७ ॥ [कं. प्रतीत ही ओवी नाही.]

सुतार कुंभार नापिक । निघाले ते नटनाटक । रजक रंगारे चर्मक । अनामिक निघाले ॥ ११८ ॥

कैकयीची दुष्टबाधा । ते आम्हांसी पीडिल सदा । जिकडे राम तिकडे अयोध्या । सर्वांची श्रद्धा वनवासी ॥ ११९ ॥

श्रीराम जंव मागें पाहे । नगरजन धांवती लाहे । राम सुमंतासी म्हणे राहें । जन समुदायें केंवी येती ॥ १२० ॥

अनुक्रमणिका

श्रीराम स्वयें विनवी जन । दंडकारण्या मज गमन । दूरस्थ पंथ अति [पै. भा. तु. तं. कं. ‘आध्वान’; त. ‘उद्विग्न’.] कठिण । तुम्हां आगमन तेथें नव्हे ॥ १२१ ॥

कृपा करूनि मजवरी । तुम्ही राहावें निजनगरीं । राजा दशरथ आहे शिरीं । सुखोद्‌गारीं नांदावें ॥ १२२ ॥

माझी आज्ञा पाळील भरत । तुम्ही राहावें सुनिश्चित । ऐसें सांगोनि रघुनाथ । जन समस्त राहाविले ॥ १२३ ॥

माझें स्मरण ज्या अहर्निशीं । मी अखंड तयापासी । मज न विसरावें मानसीं । मी तुम्हापासीं सर्वदा ॥ १२४ ॥

यापरी राहावुनिया जन । श्रीराम करी वनाभिगमन । एका जनार्दना शरण । पुढां निरोपण रसाळ ॥ १२५ ॥

रसाळ कथा रामायणी । वदली वाल्मीकाची वाणी । एका शरण जनार्दनीं । कृपा सज्जनीं करावी ॥ १२६ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीरामवनप्रयाणं नाम अष्टमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग नववा

## श्रीराम चित्रकूट निवास

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

वना निघतां रघुनाथ । राजा महामोहें मूर्च्छित । तो होउनि सावचित । पुसे दशरथ श्रीराम [पै. तु. खेरीज इतरत्र ‘कोठें’.] कें ॥ १ ॥

त्यासी स्त्रिया सांगती मातु । तुम्हीं दिधला जो निजरथु । त्यावरी बैसोनि रघुनाथु । गेला निश्चितु वनवासा ॥ २ ॥

एक सांगती रायासी । राम आश्वासीत जनांसी । आहे नगरद्वारापासीं । [मु. ‘तंव’ हे अधिक पद’.] रावो वेगेसीं धाविन्नला ॥ ३ ॥

> अथ राजावृतः स्त्रीभिर्दीनात्मा दीनमानसः । निर्जगाम प्रियं पुत्रं द्रक्ष्यामीत्यब्रुवन् गृहात् ॥ १ ॥ [तं. प्रतीत केवळ श्लोक एवढीच नोंद परंतु श्लोक दिलेले नाहीत (वा. रा. अयो. सर्ग ४०, श्लोक २८).]

सात शतें राणियां समवेत । [मु. हे पद नाही.] पायीं धांवला दशरथ । कोठें कोठें माझा रघुनाथ । स्वयें पुसत सर्वांसीं ॥ ४ ॥

मग आक्रंदें दिधली हांक । श्रीरामा [मु. ‘दाखवी रे निजमुख’; तं. ‘दाखवी रे श्रीमुख’; त. कं. ‘दाखवी श्रीमुख’; तु. ‘दाखवी पां मुख’.] दाखवी मुख । तुज जालिया विमुख । परम दुःख सर्वांसी ॥ ५ ॥

कैकया घेऊनि भाक । मज दिधलें महादुःख । तुझें देखिलिया श्रीमुख । परम सुख मज होईल ॥ ६ ॥

श्रीराम स्मरतां हृदया आत । सकळ दुःखा होय अंत । भाग्यें अभाग्य मी दशरथ । वना रघुनाथ [कं. व मु. ‘धाडिला’; तं. ‘दवडिला’.] धाडिला ॥ ७ ॥

धांवे पावें गा राघवा । भेटी देई परम कणवा । सुख होईल माझ्या जिवा । म्हणौनि धांवा फोकारी ॥ ८ ॥

गेला गेला रे रघुनाथ । म्हणोनि आक्रंदें गर्जत । रडत पडत स्वयें धांवत । पडे मूर्च्छित अति दुःखें ॥ ९ ॥

राम म्हणे येथें राहतां । दृढ वाढेल [मु. ‘मोह ममता’.] अति ममता । रावो मजपासीं न येतां । वेगें सुमंता रथ [मु. ‘हां की’.] पेली ॥ १० ॥

श्रीराम न येचि परतोनि । दशरथ देखे नयनीं । दृष्टी मुरडेना तेथोनी । ठेली जडोनी रामरूपीं ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

यावत्तु गच्छतस्तत्र रामरूपं व्यलोकयत् । तावत्प्रवर्धिते चास्य चक्षुः पुत्रदिदृक्षया ॥ २ ॥ [तं. प्रतीत श्लोक हे पद लिहिले आहे परंतु श्लोक नाहीत. सु. ग. प्रतींत दोन्ही श्लोक नाहीत; नि. घा. प्रतीत तिसऱ्या श्लोकाचा पूर्वार्ध नाही (वा. रा. अयो. कां. सर्ग ४१, श्लोक व सर्ग ४२, श्लोक ३).]
नापश्यंस्तु रजोप्यस्य यदा रामस्य भूमिपः । तदार्तश्च विवर्णश्च पपात धरणीतले ॥ ३ ॥

**श्रीरामें देखतांचि दिठी । दृष्टी लागली रामापाठीं । राम** [कं. नि. घा. प्रतींत 'न' हे पद अधिक.] **देखतांचि दृष्टी । बैसली शेवटीं ध्वजास्तंभीं ॥ १२ ॥**

**दृष्टी अंतरल्या ध्वज । राजा पाहे रथाचे रज । नेदखतां श्रीरामरज । पडे भूभुज मूर्च्छित ॥ १३ ॥**

**आठवितां श्रीरामासी । राजा विसरे निज देहासी । तेणेंचि मुर्छा आली त्यासी । देहभावासी विसरोनी ॥ १४ ॥**

**स्त्रिया करिती दीर्घ रुदन । रुदन करिती सकळही जन । गाई न** [मु. 'सेविती तृण जीवन'; कं. 'न सेविती तृण'.] **खाती पैं तृण । वत्सें स्तनपान न करिती ॥ १५ ॥**

**अश्वें** [भा. तु. तं. 'नेघती घाण पाणी'; मु. 'न खाती चारापाणी'.] **नेघती दाणापाणी । गज निजकवळ न घालिती वदनीं । आहार** [मु. 'त्यजिला पौर जनीं'.] **त्यजिला पैं श्वानीं । अयोध्याभुवनीं आकांतु ॥ १६ ॥**

[कं. मु. 'दिवस'.] **सूर्य गेला अस्तमानीं । राजा सावध केला राणीं । प्रवेशतां अयोध्या भुवनीं । सुख स्वप्नीं दिसेना ॥ १७ ॥**

**दीप दीपिका नाहीं कोठें । वोस हाटवटिया चोहटे ।** [मु. 'जो तो रडतची वाटे'; 'कं. 'जे ते रडत पडत भेटे'.] **जे ते रडतचि भेटे । श्रीराम कोठें पुसत ॥ १८ ॥**

**श्रीराम प्रवेशल्या वनीं । घरोघरीं दीर्घ रडणीं ।** [मु. 'अरंदोळ पडला'.] **आरंधें पडलें अयोध्या भुवनीं । अन्न कोण्ही न खाये ॥ १९ ॥**

**न सहावें** [कं. व मु. 'श्रीराम वियोग दुःख'.] **श्रीराम-दुःख । राजा राण्या सकळै लोक । अवघे** [कं. व मु. 'म्हणती घेवों विख'.] **घेवों पाहती विख । वसिष्ठें देख** [मु. 'निवारिले'.] **वारिलें ॥ २० ॥**

**चौदा वर्षें वनवासीं । राम क्रमील निमिषार्धेसीं । लाहोनी त्रिभुवन यशासी । अयोध्येसी येईल ॥ २१ ॥**

**मारूनियां राक्षसांचिया कोडी । तोडूनि देवांच्या बांदवडी । उभउनि रामराज्याची गुढी । येईल तांतडी श्रीराम ॥ २२ ॥**

**माझें वचन माना प्रमाण । वातों श्रीरामाची आण । विख घेऊनि देतां प्राण । अधःपतन पावाल ॥ २३ ॥**

**आइकोनि वसिष्ठाची वाणी । राजा प्रवेशे राजभुवनीं । श्रीराम आठवतां मनीं । पडिला धरणीं मूर्च्छित ॥ २४**

अनुक्रमणिका

॥

**येरीकडे श्रीराम आपण । शीघ्र करितां वन प्रयाण । पाठी लागले ब्राह्मण । राहावितां जाण न राहती ॥ २५ ॥**

**रामें रथ प्रेरिला उठाउठी । द्विज धांवती पाठोवाठी । श्रीरामाची प्रीति मोठी । प्रेमा पोटीं अनिवार ॥ २६ ॥**

> [कं. सु. गे. तं. या प्रतींत हे श्लोक नाहीत (वा. रा. अयो. कांड, सर्ग ४५, श्लोक १२ ते १४, १६, १७).] चकर्षेव गुणैर्बद्धं जनं पुरनिवासिनम् । ते द्विजास्त्रिविधं वृद्धा ज्ञानेन वयसौजसा ॥ ४ ॥
> वयःप्रकंपशिरसो दूरादूचुरिदं वचः । वहतो जवना रामं भो भो जात्यास्तुरंगमः ॥ ५ ॥
> उपवाह्यस्तु वो भर्ता नापवाह्य पुराद्वनम् । एवमार्तप्रलापांस्तान्वृद्धान्प्रलपतो द्विजान् ॥ ६ ॥
> अवेक्ष्य सहसा रामो रथादवततार ह ॥ ७ ॥

**श्रीरामाचिये संगतीं । वनवासीं करावया वस्ती । दृष्टि ठेऊनियां रथीं । ब्राह्मण धांवती लवलाहें ॥ २७ ॥**

**वृद्ध वृद्ध वेदपाठक । तपस्वी** [त. 'यज्ञहोत्री याज्ञिक'; पै. तु. 'अग्निहोत्री साज्ञिक'.] **अग्निहोत्री याज्ञिक । आणिकही बहुसाल लोक । मोठेनी हांक तिंहीं दिधली ॥ २८ ॥**

**शीघ्र नेताती श्रीरामासी । शरण रथीच्या वारुवांसीं । राम आणावा** [पै. खेरीज इतरत्र 'आम्हांपासीं'.] **अयोध्येसीं । वेगें वनासीं न न्यावा ॥ २९ ॥**

**रथ चालवितो अलौकिक । त्या सारथ्यासी नमनें देख । रथ पेलावा नगरासन्मुख ।** [मु 'वना श्रीराम न न्यावा'] **वना निःशेष न न्यावा ॥ ३० ॥**

**श्रीराम जंव मागें पाहे ।** [मु. 'तंव जनसमुदाय धांवताहे'; कं. 'तंव जनसमुदाय येती लाहे'.] **जन धांवताती समुदायें । उडी टाकूनि लवलाहें । वंदुनि पाये बोलतु ॥ ३१ ॥**

**स्वामी कष्टलेति बहुत दूरी । म्हणौनि ब्राह्मणाचे चरण चुरी । वनवास दंडकारण्य वरी । तुम्ही कैशापरी तेथें याल ॥**

**श्रीरामा तुझीये संगतीं । आम्ही पावों कीं ब्रह्मप्राप्ति । वनवास तो बापुडा किती । भय निश्चितीं आम्हां नाहीं ॥**

**परतोनि जाणें मागुती ।** [कं. व मु. 'निश्चय आम्हां नाहीं रघुपति'.] **आम्हांसी नाहीं निश्चिती ।** [मु. 'स्वामीनें'; कं. 'स्वामी'.] **श्रीरामा न्यावें वनाप्रति । वनसांगाती वनवासी ॥ ३४ ॥**

**तूं जैं सांडूनि जासी दूरी । तैं आम्ही होऊं कीं रानभरी । आम्हावरी कृपा करी । दीनोद्धारीं चालावें ॥ ३५ ॥**

**आइकोनि द्विजांची वचनोक्ति । श्रीराम विचारी पैं चित्तीं । हे निज नगरा स्वयेंचि जाती ।** [मु. 'ऐसी युक्ति

अनुक्रमणिका

योजावी'; कं. 'ऐसी युक्ति योजिली'.] तैसी युक्ति योजिली ॥

[मु. 'श्रीराम' हे पद अधिक.] लक्ष्मणातें आज्ञा करी । [मु. 'म्हणे' हे पद अधिक.] द्विज चालतां शिणले भारी । आजीचि वस्ती तमसा तीरीं । सीता उतरी [पै. भा/२. तु. त. 'वृक्षस्थ'; मु. व कं. 'वृक्षातळीं'.] वृक्षस्थानीं ॥

श्रीराम नेघेचि पैं अन्न । अवघीं केलें अंबुप्राशन । सीतेसहित आपण । केलें शयन तृणसेजे ॥ ३८ ॥

श्रीराम सांगे लक्ष्मणाप्रति । ब्राह्मण राहावितां न राहाती । हे जंव निजेले आहाती । शीघ्रगती निघावे ॥ ३९ ॥

सुमंतु रथ सिद्ध करी । मागु घातला अयोध्ये मोहरी । रिघोनि तमसे माझारी । परतीरीं उतरले ॥ ४० ॥

ब्राह्मण प्रातःकाळीं पाहाती । मागु घातला अयोध्ये प्रति । उल्हासे अवघे नगरा येती । [मु. 'तंव' हे पद अधिक.] रघुपती पुढें गेला ॥ ४१ ॥

त्यांसी पुसती नगरस्थ । कोठे आहे रघुनाथ । ते म्हणती राम आला [मु. हे पद नाही.] कीं येथ । जन हांसत ब्राह्मणा ॥ ४२ ॥

बहुतां पाडुनिया भ्रांती । राम गेला हातोहातीं । श्रीरामाची अगम्य गती । न कळे वेदोक्ति ब्राह्मणां ॥ ४३ ॥ [कं. प्रतीत ही ओवी नाही.]

हृदयीं असतां आत्माराम । जनासीं पाडिला [मु. मोहभ्रम'.] परम भ्रम । अवघे जाले विषय काम । कल्पांतीं राम [मु. 'न भेटे'.] नाठवे ॥

फुकाचें जें रामनाम । नुच्चारिती जे अभाग्य परम । असो ते पावती अंधतम । जे आत्माराम नाठविती ॥ ४५ ॥

असो हे येरीकडे रघुपती । दुसरे दिवशीं दिनांतीं । इंगुदी वृक्षीं केली वस्ती । निकट भागीरथी प्रवाहो ॥ ४६ ॥

वना आली श्रीराम मूर्ति । ऐकतां गुहक निषादपति । भेटों आला अति प्रीतीं । घातलें क्षितीं लोटांगण ॥ ४७ ॥

देखतां श्रीरामाचें श्रीमुख । गुहका [मु. 'जाला परम हरिख'.] जालें परम सुख । रामें आळंगितां देख । द्वंद दुःख विसरला ॥ ४८ ॥

विसरला धर्माधर्म । विसरला अधमोत्तम । सद्भावे देखतां श्रीराम । मरण जन्म विसरला ॥ ४९ ॥

विसरला कर्मकर्तेपण । विसरला मीतूंपण । देखतां श्रीरामाचे चरण । समाधान गुहका ॥ ५० ॥

अनुक्रमणिका

करितां श्रीरामनामस्मरण । समूळ निर्दळे जन्ममरण । त्याचे देखतां श्रीचरण । बोळवण भवभावा ॥ ५१ ॥

गुहकें आणिला फळसंभार । राम न करीच फळाहार । करूनि जळाचा जळआहार । केलें सेजार वृक्षमूळीं ॥ ५२ ॥

केला [मु. 'सीतेसी'.] लक्ष्मणासी सेजार । निद्रा न करीच सौमित्र । सावधान अहोरात्र । सेवेसीं तत्पर श्रीरामीं ॥ ५३ ॥

श्रीराम गुहक एकांतीं । संवादु करिती अति प्रीतीं । निमिषार्धें गेली राती । जाहाली प्राप्ति अरुणोदया ॥ ५४ ॥

श्रीराम म्हणे गुहकासी । वेगीं आणवी नावेसी । जाणें आहे परतीरासी । आजी वस्तीसी प्रयाग ॥ ५५ ॥

सुमंतें सज्ज केला रथ । त्यासी सांगे रघुनाथ । आतां येथुनि [मु. हे पद नाही.] तूं परत । जावें त्वरित अयोध्यें ॥ ५६ ॥

तमसातीरीहूनि रथ । [तं. 'तूं परतावें निश्चित'; कं. तं. व मु. 'परतवावा हा निश्चितार्थ'.] परतवावा हें निश्चित । ब्राह्मण संगाच्या त्यागार्थ । [मु. व कं. 'तुज येथपर्यंत आणलें'.] तुज म्यां येथें आणिलें ॥ ५७ ॥

आइकोनि श्रीरामाचें वचन । सुमंतु पडिला मूर्च्छापन्न । दीर्घ आक्रंदे करी रुदन । राम चिद्घन अंतरला ॥ ५८ ॥

रिता देखोनियां रथ । होईल अयोध्येसी आकांत । प्राण सांडील दशरथ । नको तेथ मज धाडूं ॥ ५९ ॥

तुज सांडुनी रघुनाथा । अयोध्येमाजीं मज जातां । सुख न पवें गा सर्वथा । चरणीं माथा ठेविला ॥ ६० ॥

कृपा करी रघुपती । मी येईन वनाप्रती । सेवा करीन अहोरातीं । विघ्नें रथगति वारीन ॥ ६१ ॥

श्रीराम म्हणे गा सुमंता । गुज सांगेन [मु. 'मी तुज' हे शब्द अधिक; कं. प्रतीत 'मी' हे अधिक पद.] आतां । तुज अयोध्ये न वचतां । कैकयी दशरथा पीडील ॥ ६२ ॥

रायें देऊनियां रथ । कोठें धाडिला रघुनाथ । माझेनि रागें दशरथ । करवील घात भरताचा ॥ ६३ ॥

पायीं जावें वनवासासी । साक्षेपें रथ कां दिधला त्यासी । मारावया भरतासी । रायें रामासी पाठविलें ॥ ६४ ॥

[मु. 'भरता मारविलिया पाठीं'.] भरत मारलिया पाठीं । श्रीराम बैसवावा राज्यपाठीं । विकल्प कैकयेचा पोटीं । [मु. 'तो' हे अधिक पद.] तुज गेल्या पाठीं सांडील ॥ ६५ ॥

अनुक्रमणिका

रितें देखीलिया रथासी । रामु जाहाला वनवासी । सत्य मानेल कैकयीसी । या कार्यासी तूं जाई ॥ ६६ ॥
[नि. घा. प्रतींत ६६ व्या ओवीनंतर : 'माझी आज्ञा आहे ऐसी । तुवां जावे अयोध्येसी । दशरथ आणि कौसल्येसी । सुख उपदेशी ब्राह्मणा ॥']

वचन आइकोनि सांकडें । सुमंतु संकोचला रडें । कांहीं नोबलवे पुढें । रथेंसी मुरडे अति दुःखी ॥ ६७ ॥

श्रीराम बोलिला उत्तर । गुहका आणावी [तं. 'वटक्षीर'.] न्यग्रोधक्षीर । वेगीं बांधावा जटाभार । राम सौमित्र वनवासा ॥ ६८ ॥

गुहकें आणुनियां क्षीर । जटा मुकुट अति सुंदर । दोघां बांधलें मनोहर । राम सौमित्र शोभती ॥ ६९ ॥

आज्ञा देऊनि सुमंतासी । श्रीराम आला नावेपासी । वेगें बैसऊनि सुमित्रासी । सीता त्यापासीं बैसविली ॥ ७० ॥

श्रीराम नावेसीं बैसतां । आक्रंदे गर्जे निषादमाता । आम्हां समस्तांच्या घाता । रघुनाथा करूं नको ॥ ७१ ॥

[तं. 'आम्ही निषाद निलाग हीन'; पै. भा. तु. 'तुम्ही निषाद निलाग हीन'; कं. मु. 'तुझी लीळा अगाध गहन'.] तुम्ही निषाद कळाहीन । नेणा श्रीराममहिमान । चरणीं उद्धरिले पाषाण । जडतारण श्रीराम ॥ ७२ ॥

नावेवरी आमचें जिणें । ते उद्धरेल तुझेनि चरणें । मागां आम्हीं काय करणें । येणें जाणें खुंटले ॥ ७३ ॥

> क्षालयामि तव पादपंकजम् । नाथ दारुदृषदोः किमन्तरम् ॥
> मानुषीकरणचूर्णमस्ति ते । पादयोरिति कथा प्रथीयसी ॥ ८ ॥ [तं. प्रतीत हा श्लोक नाही (वा. रा. बाल. स. ६, श्लोक ३).]

[नि. घा. 'ऐसें'.] असो अगाध तुझे चरण । तुझे पदींचे रजःकण । लागतां जडाचें उद्धरण । त्यांचें क्षाळण मी करीन ॥ ७४ ॥

देखोनि निषादीचा भावो । संतोषला श्रीराम रावो । दीन उद्धरावया पाहो । वननिर्वाहो श्रीरामा ॥ ७५ ॥

करावया दीनोद्धरण । श्रीरामाचें वनप्रयाण । एका जनार्दना शरण । भवतारण श्रीराम ॥ ७६ ॥

यापरी श्रीरामचंद्र । उतरोनी गंगापरपार । राम सीता सौमित्र । तिघे एकत्र निघालीं ॥ ७७ ॥

पुढें पद्म पुष्करणी । तेथ ते [मु. 'त्रिरात्री'.] रात्री वसोनी । कमळ किंजल्कें सेउनि । प्रभातें त्रिवेणी पावतीं जालीं ॥ ७८ ॥

राम लक्ष्मण सीता तिन्ही । [मु. 'देखोनिया श्रीत्रिवेणी'.] वेणी नेदेखोनि हे त्रिवेणी । उल्हासु गंगेचे मनीं । श्रीरामचरणीं विनटावया ॥ ७९ ॥

गंगा म्हणे मी भाग्यें गहन । यमुना म्हणे मी अति पावन । सरस्वती म्हणे मी धन्य । श्रीराम चरण स्पर्शनें ॥

अनुक्रमणिका

८० ॥

**लागतां श्रीरामाचा चरणीं । आम्ही पावन तिघीजणी । म्हणौनि आनंदली** [तं. 'वेणी तीर्थ त्रिवेणी सनाथ'; मु. 'त्रिवेणी तिघी जणी सनाथ।'.] **वेणी । तिघी त्रिवेणी सनाथ ॥**

**प्रयाग करूनि पावन । सीता समवेत लक्ष्मण । श्रीराम करी संध्या स्नान । जपध्यान यथोक्त ॥ ८२ ॥**

**राम लक्ष्मण सीता सहित । भरद्वाजाच्या आश्रमा येत । ऋषीनें देखोनि रघुनाथ । आला धांवत सामोरा ॥ ८३ ॥**

**स्वयें श्रीरामें आपण । केलें साष्टांग नमन । सौमित्रें घातलें लोटांगण । वंदिले चरण जानकीया ॥ ८४ ॥**

**आला देखोनि रघुनाथ । आनंदु भरद्वाजा अद्‌भुत । आजी माझें कुळ पुनीत । पितर तृप्त आजि माझे ॥ ८५ ॥**

> [तं. प्रतीत हा श्लोक नाही.] अद्य नः पितरस्तृप्ता अद्य नः पावितं कुलम् । अद्य नो वंशजाः सर्वे यद्भवान्गृहमागतः ॥ ९ ॥

**आजी माझा वंश धन्य । आजी माझा आश्रम पावन । आजी माझे याग संपूर्ण । सफळ ध्यान आजि माझें ॥ ८६ ॥**

**आजी माझे धन्य नयन । आजी** [तं. 'विश्रांति आलें सावधान'; नि. 'आजी विश्रांतीस आलें समाधान'; घा. 'आजी विश्रांतिस आलें साधन'; कं. 'आजी विश्रांती पावलें साधन'.] **विश्रांती आलें साधन । जाली** [तु. नि. 'ध्येय ध्याता बोळवण'.] **ध्येयध्याना बोळवण । श्रीराम चरण देखिले ॥**

**स्वभावें देखोनि रघुपति । ज्ञानासी विज्ञानाची प्राप्ती । आजी जिवशिवां विश्रांती । श्रीराममूर्ति देखोनि ॥ ८८ ॥**

**हर्षें करितां स्तवन । अश्रुपूर्ण जाले नयन । हृदयीं धरितां रघुनंदन । समाधान ऋषिवर्या ॥ ८९ ॥**

**ऋषि पावोनी समाधान । केलें** [मु. 'अर्घ्यपाद्यादि'.] **अर्घ्यादि पूजन । फळें आणूनि संपूर्ण । दिधलें भोजन फळआहारें ॥ ९० ॥**

[कं. व मु. ही ओवी अशी आहे :——'ऋषि सद्भावें निर्मळ । श्रीरामीं अर्पितां फळ । देह गेह रामची केवळ । सुफळीं सकळ श्रीराम ॥'] **श्रीरामीं अर्पितां फळ । ऋषि सर्वांगें जाला सफळ । देह गेह रामुचि केवळ । सकळी सकळ श्रीराम ॥ ९१ ॥**

**ऐशी सर्व समाधी असतां । धणी नुपरे ऋषीच्या चित्ता । श्रीरामसेवासुख सेवितां । समाध्यवस्था ते तुच्छ ॥ ९२ ॥**

अनुक्रमणिका

ऋषि म्हणे श्रीरामासी । दूरी वनवासा तूं कां जासी । प्रयाग तीर्थरावो [कं. व मु. 'सर्व' हे पद अधिक.] तीर्थांसी । चौदा वर्षें येथें राहे ॥ ९३ ॥

श्रीराम म्हणे ऋषिनाथा । मज निश्चयें येथ राहातां । अयोध्येच्या प्रजा समस्ता । [तं. 'येती धांवत समीप हे'; मु. 'देखोनि समीपता धांवतील'; कं. 'देखोनी समीपता धांवोनी येती'.] येती धांवता समीपत्वें ॥ ९४ ॥

[कं. व मु. 'चुकवोनी'.] छळुनी आलों मी द्विजगण । अवश्य येती ते ब्राह्मण । स्त्रिया वृद्धें अति दीन । समस्त जन येतील ॥ ९५ ॥

येतील पुरोहित प्रधान । येतील नटनाटक गण । वारांगना येतील संपूर्ण । सेवकजन येतील ॥ ९६ ॥

श्रीरामभेटी प्रयागस्नान । पर्वकाळ अति पावन । जनक येईल धांवोन । सीताभिगमन माहेरा ॥ ९७ ॥

सीता [मु. 'कां नेता'; कं. 'नेणती'.] न न्यावी वनवासी । इसी धाडावें माहेरासी । म्यां काई बोलावें जनकासीं । वनवासीं मुख्य विघ्न ॥ ९८ ॥

[मु. प्रतीत 'वेगें' हे पद नाही.] वेगें दशरथ येईल येथ । तेव्हां भाक होईल व्यर्थ । यालागीं येथूनि [मु. प्रतीत 'अति' हे पद नाही.] अतिगुप्त । जावे दूरस्थ वनवासा ॥ ९९ ॥

ऋषि म्हणे सत्य वचनार्थ । येथुनि चित्रकूट पर्वत । पुष्पीं फळीं सफळित । त्या वनांत तुम्ही राहा ॥ १०० ॥

तो पर्वत पुण्यशीळ । [मु. 'जननीवासा परीस निर्मळ'.] जळ निष्पाप आणि निर्मळ । वृक्ष तेथें सदाफळ । सुख सकळ पावाल ॥ १०१ ॥

मार्गीं सिद्धवट विख्यात । त्यासी वंदावें भावयुक्त । त्याचेनि सफळित पुरुषार्थ । निर्विघ्नार्थ वंदावा ॥ १०२ ॥

[कं. व मु. 'मग' हे पद अधिक.] करूनि भरद्वाजा नमन । तिघीजणीं केलें गमन । ऋषि बोळवीत जाण । अर्धयोजन स्वयें आला ॥ १०३ ॥

रामें ऋषीसी राहवून । तिघे यमुना उतरोन । पाहात शोभा नव कानन । आलीं टाकून सिद्धवटा ॥ १०४ ॥

अनंत शाखा अति सरळी । तिघें आलीं तया तळीं । राम सौमित्रें वंदिला निडळीं । सीता वटमूळीं स्वयें बोले ॥ १०५ ॥

वना विजयी रघुनंदन । निर्विघ्न आमचें पुनरागमन । जालिया देईन लक्ष गोदान । द्विज भोजन लक्षान्त ॥ १०६ ॥

वटीं वसती वट सावित्री । [मु. 'तीसी' हे पद अधिक.] पूजीन अळंकार वस्त्रीं । ऐसें बोलोनी सुंदरी । नमस्कारी

वटातें ॥ १०७ ॥

तेथुनीया शीघ्रवत । पावलीं चित्रकूट पर्वत । शोभा देखोनि अद्भुत । श्रीरघुनाथ सुखावला ॥ १०८ ॥

पर्वत देखोनि शोभायमान । मार्गश्रमा जाली बोळवण । [मु. प्रतीत 'ती' हे पद अधिक.] तिघें जालीं सुखसंपन्न । येथें आपण राहावें ॥ १०९ ॥

श्रीराम म्हणे सौमित्रासी । वेगीं रचावें आश्रमासीं । आणुनि गजभग्ना वृक्षांसी । पर्णशाळेसी निर्मिलें ॥ ११० ॥

श्रीरामाचें निज सेजार । रचिलें अति मनोहर । दुसरी शाळा सविस्तर । ऋषेश्वर रहिवासा ॥ १११ ॥

आणुनियां जळफळासीं । सौमित्र अर्पी सीतेपासीं । जागृत राहे अहर्निशीं । राम सेवेसीं विनटला ॥ ११२ ॥

मुखीं नित्य श्रीरामनाम । सर्वेंद्रियीं श्रीराम कर्म । हृदयीं परमात्मा श्रीराम । भक्तोत्तम सौमित्र ॥ ११३ ॥

श्रीराम सेवा अति निर्वाण । लक्ष्मणासी फावली पूर्ण । एका जनार्दना शरण । भरतागमन अवधारा ॥ ११४ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीरामचित्रकूटनिवासो नाम नवमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग दहावा

## दशरथ निर्याण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

**येरीकडे सुमंत गुहक । श्रीराम गेलियावरी देख । राम विरहें पावले दुःख । तोचि श्लोक अवधारा ॥ १ ॥**

[तं. प्रतीत श्लोक नाहीत; सु. ग. प्रतीत फक्त पहिला श्लोक आहे; तु. प्रतीत पहिला श्लोक नाही; भा/२. प्रतीची १३ व्या ओवीनंतरची पाने गहाळ झाली आहेत.] कथयित्वा तु दुखार्तः सुमंत्रेण चिरं सह । रामे दक्षिणकूलस्थे जगाम स्वगृहं गुहः ॥ १ ॥
भरद्वाजाभिगमनं प्रयागे च सभाजनम् । चित्रकूटनिवासं च तत्रस्थैरेव तैः श्रुतम् ॥ २ ॥
अनुज्ञातः सुमंतोऽपि योजयित्वा हयोत्तमान् । अयोध्यामेव नगरीं प्रययौ गाढदुर्मताः ॥ ३ ॥ [वा. रा. अयो. कां. सर्ग ५७, श्लोक १ ते ३.]

**पुसोनि गुहका सुमंतासी । श्रीराम बैसोनि नावेसी । गेलिया गंगापरतीरासी । लागली दोघांसी टकमक ॥ २ ॥**

**न लागतां पातयां पातीं । दोघेहि श्रीरामातें पाहाती । दृष्टि अंतरल्या रघुपति । दोघैं पडती मूर्च्छित ॥ ३ ॥**

**जर्‍ही दोघैं जाले सावधान । तर्‍ही रामविरहें अति दुर्मन । [नि. घा. 'वाहती'.] अश्रुधारा गळती नयन । करिती स्मरण [त. 'रामाचे'; तं. 'श्रीरामा'; नि. घा. कं. 'रामनामे'; सु. गे. शेवटचा चरण 'रामराम स्मरताचि'.] श्रीरामराम ॥**

**वाचेसी श्रीरामनामस्मरण । रामरूपीं जडले नयन । हृदयीं [तं. 'निघाल्या'; मु. 'भरलिया'.] रिघाल्या रघुनंदन । दुर्मन ते सुमन [मु. 'होय' हे अधिक पद.] श्रीरामें ॥ ५ ॥**

**गुहक म्हणे सुमंतासी । राम भेटल्या एकीं निशीं । आम्हांसी अवस्था जाली ऐसी । [मु. 'मग'; पै. तु. हे पद नाही.] मां अयोध्येसी काय होये ॥ ६ ॥**

**गुहकें धाडिलें दूतासी । श्रीराम कोणे [सु. गे. नि. घा. 'वनवस्तीसी'; त. 'प्रदेशी'; कं. 'वनवासी'.] वनप्रदेशीं । स्थिरु होईल [कं. व मु. 'वनप्रदेशीं'.] वनवासी । ते वार्तेसी आणावया ॥ ७ ॥**

**गुहकें आपुल्या ग्रामासी । आदरें आणिलें सुमंतासी । दूत आणि वनवार्तेसी । तंववरी त्यासी राहाविलें ॥ ८ ॥**

**दूत सांगे गुहकापांसी । श्रीरामें जाऊनि प्रयागासी । भेटी देऊनि भरद्वाजासी । स्थिरनिवासी चित्रकुटीं ॥ ९ ॥**

**सुमंतें ऐकोनि [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] ते वार्ता । वेगें संजोगोनि रथा । गुहकांसी पुसोनि तत्त्वतां । होय**

**निघतां अयोध्येसी ॥ १० ॥**

[मु. प्रतीत ४ थ्या श्लोकाचा पूर्वार्ध नाही; तं. प्रतीत ‘कस्यादेष समायातो. . . . . . . . . . . . . . . रथमभ्यद्रवन्नराः ॥’ असे चरण आहेत. सु. गे. प्रतींत हे श्लोक नाहीत.] कस्यादेष समायातो रामं त्यक्त्वा च निर्जने । सुमन्त्रमभिधावन्तः शतशोऽथ सहस्रशः ॥ ४ ॥
क्व राम इति पृच्छन्तः सूतमभ्यद्रवन्नराः ॥ ५ ॥ [वा. रा. अ. कां. सर्ग ५७, श्लोक ९.]

**सुमंतु आला देखोन । धांवले नागरिक जन ।** [मु. प्रतीत ‘सांग’ हे अधिक पद.] **राम कोणें स्थळीं सांडून । तुझें आगमन सुमंता ॥ ११ ॥**

**सुमंत एकासी सांगे गोठी । तंव आले शतेसहस्र कोटी । रिता रथ देखोनि दृष्टीं । पडिलें सृष्टी मूर्च्छित ॥ १२ ॥**

**नरनारी आक्रंदत । सुमंत नव्हे** [पै. खेरीज इतरत्र ‘हा’.] **गा कुमंत । वनीं सांडुनि रघुनाथ । आला येंथ काळतोंडा ॥ १३ ॥**

**सुमंतु आलियावरी । आकांतु मांडला नगरीं । चडफडिती नरनारी । घरोघरीं आरडती ॥ १४ ॥**

**जळो याचें काळें मुख । आला नगरासी द्यावया दुःख ।** [पै. ‘समुख’.] **सन्मुख निंदिती सकळै लोक ।** [कं. मु. प्रतींत हे पद नाही.] **दुःखें अधोमुख सुमंतु ॥ १५ ॥**

**राजपत्न्या शतें सात । रिता देखोनिया रथ । त्याही सुमंतातें निंदित । सांडुनि रघुनाथ हा कां आला ॥ १६ ॥**

**रामापासूनि उफराटा । मी कां** [मु. ‘आलों’.] **परतलों करंटा । दुःखें पिटीतु लल्हाटा । धिगी धिगी अदृष्टा निर्लज्या ॥ १७ ॥**

**श्रीराम सांडिलिया पाठी । निंद्य होइजे सकळ सृष्टीं । रामरूपीं चळल्या दृष्टीं । पापें कोटी पदोपदीं ॥ १८ ॥**

**निजनिंद्यत्वें स्वयें निंदितु । तेणेंचि दुःखें अति दुःखितु । महाद्वारीं सांडुनि रथु । आला सुमंतु राजभुवना ॥ १९ ॥**

**पुत्रदुःखें दुःखी पूर्ण । गेली कळा हीनदीन । कृष्णमुख दिसे विवर्ण । अति उद्विग्न नृपनाथु ॥ २० ॥**

**एकला देखोनि सुमंतु । म्हणे नयेचि** [मु. प्रतीत ‘कां’ हे अधिक पद.] **रघुनाथु । ऐसें बोलोनि दशरथु । पडे मूर्च्छित धरणीये ॥ २१ ॥**

**मग सुमंतें आश्वासून । राजा केला सावधान । आला सुमंत देखोन । काय आपण** [मु. ‘बोलत’.] **पुसतु ॥ २२ ॥**

अनुक्रमणिका

दशरथोक्ति :––

[कं. सु. गे. प्रतींत हे श्लोक नाहीत. पै. भा/२. तु. त. या प्रतींखेरीज इतरत्र पुढील श्लोक आहेत :––
'राजा तु रजसा सूतं ध्वस्तांगं समुपस्थितम् । अश्रुपूर्णमुखं दीनमुवाच परमार्तवत् ॥ १ ॥
क्व नु वस्यति धर्मात्मा वृक्षमूलमुपाश्रितः । किमुवाच वचो रामः किमुवाच च लक्ष्मणः ॥ २ ॥
सुमंत्र वनवासाद्य किमुवाच च मैथिली । आसितं शयितं भुक्तं सूत रामस्य कीर्तय ॥ ३ ॥']

क्व सुमंत गतो रामः क्व वा वत्स्यति शंस मे । क्व स्थेन च वै तेन त्वं राघवेण विसर्जितः ॥ ५ ॥

**राजा म्हणे सुमंतासी । कोणे ठाईं कोणे वस्तीसीं । रामें काय बोलोनि तुजसी । तुज मजपासीं पाठविलें ॥ २३ ॥**

**काय बोलली सती सीता । श्रीरामाचा अति पढियंता । लक्ष्मण काय जाला बोलता । ते समूळ कथा मज सांग ॥**

**सांडुनि राजभोग निजकांता । सांडुनिया मातापिता । वना सेवूं गेला रघुनाथा । त्या लक्ष्मणापरता धन्य नाहीं ॥**

**धन्य धन्य ते सती सीता । धन्य धन्य तो लक्ष्मण भ्राता ।**
**धन्य धन्य जन्म श्रीरघुनाथा । पितृवचनार्था प्रतिपाळी ॥ २६ ॥**

**त्यांसी कोठें मिळालें अन्न । तिहीं कोठें केलें भोजन । अश्रुधारा गळती लोचन । मूर्च्छापन्न पुनः पुनः ॥ २७ ॥**

**तिहीं कोठें केलें शयन । काय आस्तरण प्रावरण । कोणें केलें चरणसंवाहन । प्रातःप्रबोधन कोणें केलें ॥ २८ ॥**

**त्यांची समूळ सांगतां वार्ता । मी काय करूं रे सुमंता । धीरू न धरे माझ्या चित्ता । श्रीरघुनाथा वांचुनि ॥ २९ ॥**

**श्रीराम सीता चालती चरणीं । हे म्यां विरुद्ध केली करणी ।**
**म्हणौनि गडबड्यां लोळे धरणीं । कैकया वैरिणी वैर केलें ॥ ३० ॥**

**जंव जंव आठवी रघुनाथा ।** [कं. व मु. प्रतींत 'तंव' हे अधिक पद.] **तंव उफडु न** [नि. घा. 'धरवे'.] **संडे चित्तां । धीरू न धरे सर्वथा । हृदयस्फोटता हो पाहे ॥ ३१ ॥**

**त्याची वनवास वार्ता । वेगीं सांग रे सुमंता । कांहीं सुख होईल चित्ता । श्रीरामकथा परिसोनि ॥ ३२ ॥**

उत्तीर्णायां तु गंगायामहमामंत्र्य राघवम् । अनुज्ञातो निवृत्तोऽस्मि धार्मिकेण महात्मना ॥ ६ ॥ [वा. रा. अयो. कां. सर्ग ५८, श्लोक ८.]

**सुमंत सांगे रायापासीं । श्रीराम उतरतां गंगेसी । रथ पाठविला तुम्हांपासीं । आपण वनासी पादाभिगमनें ॥ ३३ ॥**

अनुक्रमणिका

माझा पिता अति वृद्ध जाण । माझेनि वियोगें दुःख निमग्न ।
सुमंता त्यासी द्यावें आश्वासन । शीघ्र आगमन नियमांतीं ॥ ३४ ॥

चौदा वरुषें वनवासांतीं । मी येईन शीघ्रगति । ऐसे सांघविलें तुम्हाप्रति । मजहातीं श्रीरामें ॥ ३५ ॥

त्यांचे वनवासलक्षण । तृणपर्णांचे आस्तरण । वल्कलांचें प्रावरण । प्रातः प्रबोधन पक्ष्याचें ॥ ३६ ॥

तिहीं नाहीं केलें भोजन । नाहीं केलें फळभक्षण । [मु. 'त्रिरात्री तिघें जण'; कं. 'त्रिरात्री तिधीं आपण'.] त्रिरात्र तेहीं तिहीजण । केलें जळपान दिनांतीं ॥ ३७ ॥

ऐसें ऐकतांचि गोष्टी । रावो मूर्च्छित पडला सृष्टीं । [पै. 'दुःखें होत उकल पुटी'; भा/२. 'दुःखें होत उदर फुटी'; तं. 'दुःखें होतसे हृदयफुटी'; तं. सु. नि. घा. 'दुःखे होत हृदय स्फोटी'; कं. 'दुःखें होतसे हृदय स्फोटी'.] दुःखें हाणोनि हृदयफुटी । लल्हाट पीटी आक्रोशें ॥ ३८ ॥

गळीं अडकला [त. 'जैसा'; तं. सु. नि. गे. घा. 'जेवी'.] जो मासा । [मु. 'तो जीवें न मरी चरफडी जैसा ।'; तं. तु. 'जीवें मरेना चरफडी जैसा'; भा/२. 'जी मरेना चरफडी तैसा'; तं. 'जीव मरेना चरफडी जैसा'; कं. तो. 'जेवी मरेना चरफडे जैसा'.] जीना मरेना चरफडी जैसा । दशरथाची तैसी दशा । मोहपाशीं विलपतु ॥ ३९ ॥

सुमंता माझा पूर्वोपकार । तुज जाला असेल साचार । तरी रथीं घालुनि रघुवीर । आणि सत्वर मजपासीं ॥ ४० ॥

राम भाक न संडी सर्वथा । तो परतोनी न ये मागुता । मजचि वाऊनिया रथा । नेई तत्त्वतां वनवासा ॥ ४१ ॥

काय करूं [मु. 'मी'.] रे सुमंता । स्वयें श्रीराम नेदखतां । जीव जाईल तत्त्वतां । मज अत्यावस्था होतसे ॥ ४२ ॥

श्रीरामासवें गेली गती । श्रीरामासवें [मु. प्रतीत 'गेली' हे अधिक पद.] चित्तवृत्ती । श्रीरामासवें गेली मती । प्राण रामाप्रति जावों पाहे ॥ ४३ ॥

रामरूपीं जडलें नयन । रामासवें गेलें [मु. 'रामरुपी जडलें मन'.] मन । रामापासीं जातील प्राण । सत्य जाण सुमंता ॥ ४४ ॥

श्रीरामाचे रूपगुण । आठवितां मूर्च्छा आली पूर्ण । मूर्छे सवें गेले प्राण । राम स्मरण करितांचि ॥ ४५ ॥

राम राम करितां स्मरण । स्वयें दशरथें सांडिला प्राण । मन बुद्धि इंद्रियें जाण । रामार्पण तेणें केलीं ॥ ४६ ॥

आवडी श्रीराम धरूनि पोटीं । रामनाम जपे वाग्पुटी । देह त्यजूनि [मु. 'श्रीरामसृष्टीं'.] श्रीराम दृष्टी । रिघै वैकुंठीं

अनुक्रमणिका

दशरथ ॥ ४७ ॥

सप्रेम आवडीं धरिला राम । दृष्टी नोसंडी श्रीरामप्रेम । वाचेनि स्मरतां श्रीरामनाम । निधनधर्म दशरथा ॥ ४८ ॥

मनीं राम ध्यानीं राम । नयनीं राम वदनीं राम । ऐसा स्मरतां राम राम । प्राणोत्क्रम रायासी ॥ ४९ ॥

करितां श्रीरामाचें स्मरण । विस्मरणासी आलें [नि. घा. 'स्मरण'; कं. 'विस्मरण'.] मरण । तंव श्रीरामीं जडला प्राण । देहनिर्याण दशरथा ॥ ५० ॥

श्रीरामाच्या अति प्रीतीं । देहो त्यागिला भूपतीं । कौसल्या सुमित्रा जंव पाहाती । [कं. व मु. प्रतीत 'तंव' हे अधिक पद.] मरणप्राप्ती रायासी ॥ ५१ ॥

जेंवी आरिसा पालथा करितां । प्रतिरूप न दिसे पाहतां । तेवीं श्रीराम वनां जातां । [कं. मु. 'राया'.] तोचि दशरथा निजमृत्यु ॥

निःशेष पाझरल्या घटजळ । जेंवी घटचंद्र लोपे तत्काळ । नेदखता श्रीराममुखकमळ । मरे तत्काळ दशरथ ॥ ५३ ॥

[कं. सु. गे. प्रतीत ही ओवी नाही.] सूर्य पावतां अस्तमान । जेंवी अंधारें कोंदें गगन । तेवीं अंतरता रघुनंदन । पावला मरण दशरथ ॥ ५४ ॥

श्रीरामविरहें उठाउठी । दशरथें सांडिली सृष्टी । राणीवासीं बोंब उठी । कपाळ पिटी कौसल्या ॥ ५५ ॥

राम धाडिला वनसंकटीं । रावो निघाला वैकुंठीं । कैकयी पावली सुखसंतुष्टी । राज्यपाटीं ते बैसे ॥ ५६ ॥

वना दवडिला रघुनाथ । निःशेष निमाला दशरथ । कैकयीचा मनोरथ । सुखस्वार्थ पावला ॥ ५७ ॥

राज्यलोभ परमदुःख । त्याचा कैकयीसी हरिख । [मु. 'क्षुरें'.] सुरें अभिषेका समस्तक । राज्यसुख भोगावया ॥ ५८ ॥

पतिअंतःकाळीं काळें वक्त्र । त्यावरी मस्तकीं धरा छत्र । सीस बोडुनी साचार । युग्मचामर ढाळावें ॥ ५९ ॥

पतीसी आगीं घालुनी आधीं । कैकयीसी बैसवा गजस्कंधी । हांका बोंबांचा पैं नादीं । राज्यपदीं अभिषेका ॥ ६० ॥

पुत्र [कं. तु. त. 'दवडोनिया'; तं. नि. घा. 'भोवंडुनिया'.] बोडूनियां दोन्ही । कैकयी बैसवावी सिंहासनीं । रायासीं पिंडदान देऊनि । राजभोजनीं कैकयी ॥ ६१ ॥

अनुक्रमणिका

**रायासी करुनी घटस्फोट । कैकयीसी विस्तारा ताट । बत्तिसा वाटियांचें उद्भट । अति चोखट षड्रसीं ॥ ६२ ॥**

**रायासी देतां तिळोदक । गोत्रकुटुंबासी दुःख । तंव तंव कैकयीसी हरीख । राज्यसुख भोगावया ॥ ६३ ॥**

**असो हें कैकयीचें कथन । वना गेला रघुनंदन । राजा पावला निधन । सहगमन मी करीन ॥ ६४ ॥**

**कैकयी राहेल राज्यभोगासी । मी जाईन पतिसरिसीं । क्षणार्ध राहातां वैधव्यासीं । पापराशी पदोपदीं ॥ ६५ ॥**

**पति जळतां धडाधडां । आगीं** [त. 'न रिघती रांडवा मुंडा'; भा/२. 'न रिघती रांडवा पुढां'; सु. गे. घा. 'न रिघती त्यांच्या रांड मुंडा'; कं. 'न रिघती त्या रांडवा मुढा'.] **न निघती रांडवा मूढां ।**
**तोडावी गळसरी फोडावा चुडा । सुखभोग पुढां तो ऐका ॥ ६६ ॥**

**काजळ कुंकु नाहीं चंदन । दाऊं नये काळें वदन । मासमासावरी मुंडण । अति दंडन लाजेचें ॥ ६७ ॥**

**विधवा शोभनी अशोभन । जितप्रेत ते विधवा जाण । विधवा मुख्य अपशकुन । सुख कोण जिण्याचें ॥ ६८ ॥**
[कं. प्रतीत या ओवीनंतर पुढील ओवी आली आहे :––'त्यात बाळविधवा जाण । निंद्या होऊनी निद्य श्वान । स्वधर्म कर्मी अप्रमाण । ग्राह्य संपूर्ण असेना ॥ १ ॥']

**केवळ देहलोभासाठीं । जे ते बैसें रांड पाटीं । स्वप्नीं सुखेसी नव्हे भेटी । दुःखकोटी अनिवार ॥ ६९ ॥**

**वैधव्याचें महादुःख । सोसूं शके कैकयी एक । भोगावया राज्यसुख । अति कवतिक वैधव्या ॥ ७० ॥**

**वैधव्याचें दुःख दारुण । तें मी न साहे अर्धक्षण । करितां राजदेहदहन । सहगमन मी करीन ॥ ७१ ॥**

**देखोनि कौसल्येचें रुदन । राजपत्न्या घेती वदन । दुःखें तोडिती केश कान । मूर्च्छापन्न पैं एकी ॥ ७२ ॥**

**एकी त्या कपाळें स्वयें घेती । एकी वक्षस्थळीं पिटिती । एकी अति दुःखें पडती । एके रडती अतिदुःखें ॥ ७३ ॥**

**एक दुःखवियोग रघुनाथा । दुसरें मरण दशरथा । तिसरें वैधव्य आलें माथां । मूळ अनर्था कैकयी ॥ ७४ ॥**

**भोगावया राज्यपाटा । कैकयीच्या वरदनिष्ठा । तिघां केल्या तिनीं वाटा । या मुख्य चेष्टा मंथरेच्या ॥ ७५ ॥**

**श्रीरामासी वनप्रयाण । दशरथासी त्वरित मरण । यासी मंथरा मुख्य कारण । तिचें नाक कान छेदावे ॥ ७६ ॥**

**राजपत्न्या अति प्रबळ । दुःखें करिती हलकल्लोळ । आले नागरिक सकळ । कोलाहल नगरांत ॥ ७७ ॥**

अनुक्रमणिका

आक्रंदती नरनारी । [नि. घा. ‘शोक’.] शंख करिती घरोघरीं । बोंब पडिली राजद्वारीं । सेनानी मंत्री चडफडिती ॥ ७८ ॥

श्रीराम घालितां बाहेरीं । अवदसा आली नगरीं । राजा निमाला दुःखें करी । घरोंघरीं आकांतु ॥ ७९ ॥

कैकयीचें काळें तोंड । तिणें वाढविलें वरदबंड । तिसी मंथरा मिळोनि लंड । दुःख वितंड वाढविलें ॥ ८० ॥

जिचेनि निमाला निजकांत । ते कैकयीचा करावा घात ।
मंथरा घाला चुनखड्यांत । राज्यीं रघुनाथ अभिषेका ॥ ८१ ॥

वेगीं लक्ष्मणा आणा येथ । तो साधील सर्वकार्यार्थ । ऐसें बोलती जन समस्त । तळमळित अति दुःखें ॥ ८२ ॥

निलजे कैकयीचा वृत्तांत । ना राम ना दशरथ । सेखीं इसीं त्यागील भरत । वृथा आकांत तया केला ॥ ८३ ॥

भरत स्वधर्म सात्विक । सप्रेम श्रीराम सेवक । तो न पाहे इचें काळें मुख । त्यासीही दुःख या दिधलें ॥ ८४ ॥

कैकयां केलें जें चरित्र । भरत मानील अपवित्र । पति निमाला त्यजील पुत्र । सखे सावत्र दुःखी केले ॥ ८५ ॥

श्रीराम गेला वनांतरीं । [कं. मु. ‘हे वार्ता’.] ऐसे ऐकिलीयावरी । भरत न राहे तिळभरी । तोही रानभरीया केला ॥ ८६ ॥

जळो तिचें काळें मुख । निजपति मारिला निःशेष । पुत्र दुऱ्हाविले निर्दोष । जगासीं दुःख ईचेनि ॥ ८७ ॥

कैकयी पाहे ज्या समोर । [कं. व मु. प्रतींत ‘ते’ हे अधिक पद.] म्हणती झांकी मुख अपवित्र ।
सन्मुख थुंकिती सकळ लोक । करिती मरमर नरनारी ॥ ८८ ॥

अवो रांडे अवो मुंडे । अवो कैकयी काळतोंडे । [नि. घा. ‘म्हणोनि’ हे अधिक पद.] तिचेनि नांवें फोडिती धोंडें । अति उदंडे निंदिती ॥ ८९ ॥

कैकयी पावली परम दुःख । जगीं दाखऊं न सके मुख । दिवाभीताऐसी देख । लपे निःशेष अंधारीं ॥ ९० ॥

राजगृहीं कोलाहळ । नरनारी दुःख प्रबळ । तेथ पावले सुहृद सकळ । आले तत्काळ ऋषिवर्य ॥ ९१ ॥

मार्कण्डेयोऽथ मौद्गल्यो वामदेवश्च कश्यपः । कात्यायनस्तु जाबालिगौतमश्च महायशाः ॥ ७ ॥

दशरथें थोर थोर । नगरीं राहाविले ऋषेश्वर । राजनिधनें आले सत्वर । अति पवित्र ते ऐका ॥ ९२ ॥

अनुक्रमणिका

मार्कंडेय मौद्‌गल्य उत्तम । कात्यायन जाबाली गौतम । कश्यप वामदेव परम । पवित्र नाम जयांचें ॥ ९३ ॥

ते समस्तही महाऋषि । वेगें आले राजसभेसी । प्रधान आले तयांपासीं । राजदेहासी दहनार्थ ॥ ९४ ॥

एक म्हणती करावें दहन । एक म्हणती पुत्रेंवीण । कोण देईल दाहजीवन । अधिकार पूर्ण पुत्रासी ॥ ९५ ॥

रायाचे जे प्रधान । ते राजपुत्रासमान । निःसंतानयाचेंनि दहन । अयोग्य प्रधान सुपुत्रका ॥ ९६ ॥

सिद्ध असतां धर्मपत्नी । तिसी योग्यता पतिदहनीं । हा अधिकार वंध्येलागूनी । पुत्रजननी अयोग्य ॥ ९७ ॥

ऋषि बोलती सज्ञान । येथ वसिष्ठाचें प्राधान्य । तो [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] कां कांहीं नोबले वचन । राजदहनसंस्कारा ॥ ९८ ॥

बुद्धिवंत बोलती गाढे । कैं पुत्र येईल पुढें । तंव राजदेहा पडती किडे । दहन रोकडें करावें ॥ ९९ ॥

ऐसें ऋषींचे अनुवाद । करिती संवादविवाद । वसिष्ठमर्यादा अगाध । कार्यावबोध तो जाणें ॥ १०० ॥

[तं. प्रतीत ही ओवी १०२ क्रमांकात आली आहे.] जाणे कर्मधर्मज्ञान । जाणे वेदशास्त्रविज्ञान । जाणें ब्रह्मसमाधान । त्या समान आन नाहीं ॥ १०१ ॥

[तं. प्रतीत या ओवीपूर्वी पुढील ओवी आहे :——'ज्याचिया वचनासाठीं । वैकुंठ पति आणिला पोटीं । तयासी हे कार्य ते किती । समाधान स्थिती जनांचें ॥ १ ॥'] ज्याचिया वचनासाठी । सूर्यमंडळी तपे [तु. नि. घा. 'छाटी'.] कांठी । त्याच्या ज्ञानाची अगाध गोठी । दुजा सृष्टीं असेना ॥ १०२ ॥

तेणें वसिष्ठें येऊनि आपण । तेलद्रोणीं राजा [पै. सु. नि. गे. घा. खेरीज इतरत्र 'तळुनीं'.] घालून । [मु. 'जेणें देह निर्विकार जाण'; कं. 'तेणें देहनाश नव्हे जाण'.] तेणें देहविकार नव्हती जाण । संरक्षण अति यत्नें ॥

शीघ्र भरताचें आगमन । एतदर्थी सुमंतु अति सज्ञान । वसिष्ठें देऊनि सन्मान । त्वरां प्रयाण करवितु ॥ १०४ ॥

सुमंता [मु. 'तुवां येचि काळीं'.] आजीचिये काळीं । तूं एक आप्त रायाजवळी । भरत आणावा तत्काळीं । माया मातुळीं जो आहे ॥

शीघ्र बैसोनियां रथीं । जावें गिरिव्रज नगराप्रति । भेटोनि कैकया भूपति । भरत रातोरातीं आणावा ॥ १०६ ॥

करुनि वसिष्ठासीं नमन । सुमंतें शीघ्र केलें गमन । आठवितां श्रीरामाचें गुण । करी रुदन पुनः पुन्हां ॥ १०७ ॥

अनुक्रमणिका

श्रीरामाचें रूपगुण । आठवितां विरहो पूर्ण । एका जनार्दना शरण । पुढील निरोपण अवधारा ॥ १०८ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां दशरथनिर्याणं नाम दशमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग अकरावा

## भरतविलाप

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीरामाचें वन प्रयाण । ते काळींचें निर्लोभपण । सुमंत आठवी आपण । श्रीरामीं मन दृढ जडलें ॥ १ ॥

[मु. 'त्या' हे अधिक पद.] त्यागाची निजगती । दाऊनि गेला रघुपति । ते सुमंतु स्मरे अति प्रीतीं । त्यागस्थिती ते ऐसी ॥ २ ॥

असत्य त्यजिजे जेवीं पवित्रें । तेंवी [मु. 'त्यागी'.] त्यजूनि राज्यलंकार वस्त्रें ।
वना निघतां श्रीरामचंद्रें । [नि. घा. 'केलें' हे अधिक पद; सु. गे. 'करी' हे अधिक पद; भा/२. पै. त. 'त्यजूनी' हे अधिक पद.] वल्कलांबरें परिधान ॥ ३ ॥

जेवीं निंदा त्यजिजे साधुसंतीं । तेंवी राज्य वैभव संपत्ती । सर्वहि त्यजुनि रघुपति । निघे वनाप्रति वल्कलधारी ॥ ४ ॥

रजक स्पर्शाचें जीवन । जेंवी नातळती साधुसज्ञन । तेंवी सांडुनि राज्यादि धनमान । निघे रघुनंदन वनवासा ॥ ५ ॥

राज्यांतील अणुप्रमाण । श्रीराम कांहीं नेघेचि जाण । त्यजूनियां पादत्राण । निघाला आपण वनवासा ॥ ६ ॥

देखोनि [मु. 'निर्याण'.] श्रीरामनिर्वाण । त्यापूर्वींच सीतालक्ष्मण । करूनि वल्कलें परिधान । वनाभिगमन उल्हासें ॥ ७ ॥

जंव जंव सूर्य तपे तीव्रता । [कं. मु. प्रतींत 'तंव' हे अधिक पद.] तंव कमळीं शोभा अधिकता ।
तेवीं एकाकी राम वना जातां । लक्ष्मण सीता उल्हासी ॥ ८ ॥

देखोनि पूर्णिमा पूर्णचंद्र । चकोरां आल्हाद अपार । तेंवी वना निघतां रामचंद्र । सीता सौमित्र उल्हासी ॥ ९ ॥

एकाकी राम वना जातां । सफळ सेवा आमची आतां । येणें भावार्थे लक्ष्मण सीता । उल्हासता वना गेलीं ॥ १० ॥

जेंचि रघुनाथाचें गमन । तेंचि दशरथा प्राणोत्क्रमण । [तं. भा/२. नि. घा. कं. 'स्थळींचें'.] थिल्लरीचें आटतां जीवन । प्रतिबिंब पूर्ण हारपे ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

पुढुनि नेतांचि दर्पण । स्वयें हारपे प्रति वदन । तेवीं वना जातां रघुनंदन । दशरथें प्राण सांडिला ॥ १२ ॥

निःशेष आटतां जळ । मीन मरे न लगतां पळ । [कं. व मु. प्रतींत 'तैसा' हे अधिक पद.] राम वना जातां केवळ । दशरथें तत्काळ सांडिला प्राण ॥ १३ ॥

श्रीराम जगाचें जीवन । तोचि दशरथा मृत्युकारण । राम राम म्हणतां जाण । रायें निजप्राण सांडिला ॥ १४ ॥

राम प्रवेशतां वनस्थळीं । भरत शत्रुघ्न माया मातुळीं । तेही जरी असते जवळी । जाते तत्काळीं वनवासा ॥ १५ ॥

मीचि भाग्यें अभाग्य पूर्ण । श्रीराम निजसेवा सांडून । कां अयोध्यें आलों परतोन । म्हणौनि रुदन करी मार्गीं ॥ १६ ॥

श्रीराम सेवा [मु. कं. 'होय प्राप्त'.] चढे हात । त्याचें भाग्य अति समर्थ । मी अभाग्यें घेऊनि आलों रथ । म्हणौनि रडत मार्ग क्रमी ॥ १७ ॥

पुढील कथा अनुसंधान । मातुळीं भरत शत्रुघ्न । भरतासी जालें [मु. 'दुष्ट स्वप्न'.] दुश्चिन्ह । तेंही कथन अवधारा ॥ १८ ॥

भरतें मातुळीं देखिला स्वप्न । [मु. 'अशिरी'.] अशिरस्था तैलाभ्यंजन । भरत [नि. घा. 'स्वप्न लक्षणाचें'.] लक्षणाचें जाणें [नि. घा. 'चिन्ह'; भा/२. 'चिन्हज्ञान'.] ज्ञान । आक्रंदें रुदन मांडिलें ॥ १९ ॥

गजबजें आला मातुळ । पुसे व्यर्थ रुदन काय मूळ । येरु म्हणे अति प्रबळ । [सु. गे. 'दुःख सबळ आम्हा आलें'; नि. घा. 'दुःखमुळ आम्हा झालें'; कं. 'वाटे सबळ आम्हा जालें'.] दुःख समूळ आम्हां आलें ॥ २० ॥

जें म्यां आजी देखिलें स्वप्न । त्याचें ऐसें आहे लक्षण । आम्हां पांचामाजीं एक जण । निश्चयें मरण पावो ॥ २१ ॥

माझा स्वप्न नव्हे व्यर्थ । राजा अथवा रघुनाथ । लक्ष्मण शत्रुघ्न कां मी भरत । एकाचा जीवघात होईल ॥ २२ ॥

आणि मज सज्ञनाची भेटी । बहुकाळ होईल तुटी । बोलतां बाष्प दाटे कंठीं । पडिला सृष्टीं मूर्च्छित ॥ २३ ॥

आंक्रदें हांक दिधली मोठी । कैंवी दशरथेंसीं होईल भेटी । कैसेनि राम देखेन दिठीं । [नि. 'म्हणोनि पिटी ललाट आक्रंदोन'; सु. घा. 'म्हणोनि पिटी ललाट'.] लल्हाट पिटी आक्रोशें ॥ २४ ॥

मातुळ म्हणे सुमुहूर्त । पाहोनि तुज पाठऊं तेथ । येरु म्हणे मृत्यू आला निश्चित । मुहूर्त कुमुहर्त तें कवण ॥ २५ ॥

अनुक्रमणिका

तंव अयोध्येसीं श्रीवसिष्ठ । कुळगुरु अति वरिष्ठ । अर्थ परमार्थ जाणोनि श्रेष्ठ । विचार चोखट तेणें केला ॥ २६ ॥

भरतासी राज्याभिषेंचन । न करितां नव्हे राजदहन । यालागीं भरताचें आगमन । अति त्वरेन [मु. 'पाहातसें'.] करावें ॥ २७ ॥

न संगावें राजमरण । विशेषें श्रीरामाचें गमन । अवचटें ऐकतांचि जाण । तत्काळ प्राण सांडील ॥ २८ ॥

उत्तम वस्त्रें अळंकाररासी । देऊनि सुमंत प्रधानासीं । त्वरेंन भेटावें भरतासी । अति शीघ्रतेसीं आणावा ॥ २९ ॥

भरतासी [त. भा/२. तं. 'ऋषिवचनीं'; कं. व मु. 'रसिक वचनी'.] ऋषीमुनी । मातुळ करिती संभोखणी ।
[कं. व मु. 'तंव' हे अधिक पद.] सुमंतु पातला तेचि क्षणीं । अयोध्या पाटणीं कुशळ सकळां ॥ ३० ॥

भरतें पाहिलें सुमंताकडे । तुझी शोभा कां क्षीण पडे । हृदयीं दुःख दाटलें गाढें । तें मुखापुढें [मु. 'दिसतसें'; कं. 'भासत'.] आभासे ॥ ३१ ॥

अश्रुपूर्ण तुझे नयन । मार्गीं आलासी करीत रुदन । वार्ता सांगसी लज्ञायमान । हीन दीन मुख तुझें ॥ ३२ ॥

आंगुठा धरुनि मस्तकावरी । तुज सुख नाहीं तिळभरी ।
[नि. घा. 'बुडालासी'.] बुडाला दिससी दुःखसागरीं । चांचरे वैखरी दुःखाभिभूत ॥ ३३ ॥

असो तुझ्या [नि. घा. 'दुःखाची'.] लक्षणाची कथा । मजचि जाणें आहे आतां । विलंब करूं नये सर्वथा । शत्रुघ्नेंसीं रथारूढ जाला ॥ ३४ ॥

रथ पेलिला त्वरेंसीं । टाकुनि आला अयोध्येसी । अयोध्या पाहातां चौपासीं । दुःख भरतासी वोसंडलें ॥ ३५ ॥

जेथ श्रीसीं श्रीरामनिवास । जेथ [मु. प्रतीत 'वसे' हे अधिक पद; कं. 'दशरथ वस्तीस'.] श्रीदशरथ क्षितीश । ते अयोध्या दिसे उद्वस । जैसें कां वोस शकुंतनीड ॥ ३६ ॥

पाहातां अयोध्येची शोभा । आरक्त धुई वाटली नभा ।
रोहिणी मृग भेदूनि वृषभा । ग्रहचक्रीं उभा शनि भौम वक्री ॥ ३७ ॥

अयोध्या मंडळीं असाधारण । क्रूर भासती ग्रहगण । येणें अयोध्येचें लक्षण । अति विलक्षण दुर्भगत्वें ॥ ३८ ॥

तंव राजद्वारीं छत्रभंग । मृतप्राय लोकलिंग । राजभवनीं [तं. 'द्वारसंघ'; कं. व मु. 'अति उद्वेग'.] सैंघ । सौभाग्यभंग

अनुक्रमणिका

राजपत्न्यांचें ॥ ३९ ॥

पुढारा पाहे राजभवनीं । राजा देखिला तैलद्रोणीं । थोरें गजबजिला मनीं । अश्रु नयनीं लोटले ॥ ४० ॥

राजा गेला सांडुनि सृष्टी । आतां श्रीरामीं घालूं मिठी । म्हणोनि धांवला उठाउठी । तंव तोही दृष्टी दिसेना ॥ ४१ ॥

मंत्री गुह्य सांगे कानीं । कैकया राम दवडिला वनीं । हें मुख्यत्वें मंथरेची करणी । सीता चरणीं धाडिली वना ॥

मग आक्रंदें दिधली हांक । [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] म्हणे श्रीरामा [मु. 'दाखवीरे निजमुख'.] दाखवी मुख । माझ्या सुखाचे तूं निजमुख । मज वंचुनि देख [नि. घा. प्रतींत हे पद नाही.] कां गेलासी ॥ ४३ ॥

म्यां सांडुनि तुझी संगती । गेलों माया मातुळाप्रति । हें देखोनि माझी अभक्ति । [सु. गे. घा. 'कां रघुपति मज त्यागिलें'.] तां मज निश्चिती त्यागिलें ॥

सांडूनि तुझा निजसंग । माया मातुळीं भोगितां भोग । तेणें तुजसीं जाला वियोग । मी परम अभाग्य श्रीरामा ॥

जितुकी विषयांची आसक्ती । तितुकें विघ्न श्रीरामप्राप्ति । [कं. 'विषयतेचि भवबंध होती'; तं. 'विषये भवबंधन निश्चिति'; नि. घा. 'विषय तेचि भवबंधन प्राप्ती'; तं. प्रतीत शेवटचे दोन चरण असे आहेत :––'नागविलों हातोहातीं । राम चिन्मूर्ति अन्तरला ।'] विषय तेचि भवबंधाप्रति । नरकगती निजविषयो ॥ ४६ ॥

विष विषय समानस्थिती । [तं. सु. गे. 'एके विषया अधिक स्थिती'; नि. घा. 'परंतु विषया अधिक शक्ति'. ; कं. 'एक विषया अधिक शक्ति'.] यकारें विषयां अधिक शक्ति । विष भक्षिल्या एकदां मरती । जन्म मरण पंक्ति विषयार्थी ॥ ४७ ॥ [या ओवीनंतर १०५ ओवीपर्यंतच्या ओव्या त. प्रतीत नाहीत. त्यांऐवजी पुढील ओव्या त. प्रतीत आल्या आहेत :–– 'राम माझें निज निधान । राम माझें ध्येय ध्यान । राम माझें जीऊ जीवन । प्राणाचा प्राण राम माझा ॥ ४७ ॥
राम माझा निज जननी । राम जनक मज लागुनी । राम बंधु राम भगिनी । रामावांचुनी मी अन्यथा ॥ ४८ ॥
राम माझें अक्षयी राज्य । राम माझ्या सुखाचा भोज । राम माझें गुह्याचें गुज । माझें सर्वस्व काज राम माझा ॥ ४९ ॥
राम माझें निज ठेवणें । वना काढुनी नेलें कवणें । जळो अभाग्य माझें जिणें । रामेविण दरिद्री ॥ ५० ॥
राम माझे अमोघ रत्न । राम माझा जीवन घन । राम माझा अमृत पान । कोणें हिरोनी विष दिधलें ॥ ५१ ॥
राम माझा गुणगंभीरू । राम माझा कनक मेरू । राम माझा सुख समुद्रु । कल्पतरू राम माझा ॥ ५२ ॥
राम माझी कामधेनु । राम वत्सातें सांडुनी । कैकयी वाघिणी भेण । गेली पळोन दंडकारण्या ॥ ५३ ॥
राम सौमित्र दोघे जण । एक जीव एक प्राण । दोघे माझें निजनिधान । चित्र चैतन्य दोघे माझें ॥ ५४ ॥
दोघे माझे मांदारमेरू । दोघे माझें चंद्रभास्करू । दोघे माझे हरिशंकरू । परि पापरू मी अंतरलों ॥ ५५ ॥
दोघे अंधाचे आंख । दोघे मज पक्षियाचे पांख । ते उपडुनि सांडितां देख । अति दुःख मज आलें ॥ ५६ ॥

अनुक्रमणिका

आतां मज कैंची विश्रांति । आतां मज कैंची उपशांति । आतां कैंची कीर्ति । राम गुणमूर्ति अंतरला ॥ ५७ ॥
आतां कंचा सुखसंतोष । आतां कैंचा हरुष विलास । आतां कैंचे परम पीयुख । राम परेश अंतरला ॥ ५८ ॥
आतां कायसें राज्यभोग । आतां कायसा सज्जनसंग । आतां कायसा जीवितमार्ग । राम सौभाग्य हरविला ॥ ५९ ॥
हरविलें रामनिधान । हरविलें राम गुण रत्न । हरविलें राम जगज्जीवन । राम मत्प्राण हरविला ॥ ६० ॥
धांवे धांवे गा रे रघुनंदना । मज लागीं घाली कृपेचा पान्हा । जाणतां जाणतां माझी करुणा । कैसेनि वनां जाववलें ॥ ६१ ॥
राघवा वेगीं येई येई । मज लागीं स्नेहें कडिये घेई । तुज मी आळंगीन बाहीं । तरी प्राण देहीं वांचेल ॥ ६२ ॥
दुःखें पडे मुर्च्छापन्न । पुडती उठे आक्रंदोन । आठवितां रघुनंदन । प्राणोत्क्रमण क्षणक्षणां ॥ ६३ ॥
दुःखामाजी अत्यद्‌भुत । क्रोध आला जी न धरत । तंवकें खरगा घातला हात । करावया घात मंथरेचा ॥ ६४ ॥
धांवोनिया अति आवेशीं । धरूनीं आसुडिली केशीं । भूमीं पाडुनिया सीसीं । खर्ग धारेसी वेंचील ॥ ६५ ॥
हृदयीं हाणीतली लाथ । तेणें मुखासीं आलें रक्त । शिर छेदावया त्वरित । उर्ध्वहस्त उचलीला ॥ ६६ ॥
नव्हे राक्षस वेष । इने हरविलें जगाचें सुख । इनें त्रैलोक्या भरीलें दुःख । दिधलें विख नगरस्तां ॥ ६७ ॥
इनें गिळीला दशरथु । इनें वना धाडिला रघुनाथु । इचेनि अपकीर्तिवंतु । केलों मी भरतु बंधुद्वेषीं ॥ ६८ ॥
इनें वैखल्य दिधलें माता । सौभाग्य दवडिलें दिगंता । इच्या मी करीन घाता । प्राशीन रक्ता निजमुखें ॥ ६९ ॥
क्रोधें नयन रक्तांबर । अधरी रोविलें दशनाग्र । कंठीं घालावें वज्रास्त्र । तंव धरिला कर वसिष्ठें ॥ ७० ॥
रायाचें बाळ एकलें । कर्मठें खोडूनि सांडलें । पुढें कर्मठे मारिलें ते फोडिलें । काय श्लाघ्य जालो सांगावया ॥ ७१ ॥
तैसें होणार बळिवंत जाण । इसी मारलिया साध्य कोण । राजा कीं रघुनंदन । येईल परतोन गे काळीं ॥ ७२ ॥
स्त्री हत्येचा दोष कोटी । तंव पात्र नव्हे सृष्टी । भरता नव्हे क्रोध सुटी । शस्त्रपोटीं घालु पाहे ॥ ७३ ॥
वसिष्ठें खर्ग हिरोनी मुष्टीं । आळंगिला धरुनी पोटीं । म्हणे सर्वथा नव्हे कष्टी । ऐक गोष्टी नावेक ॥ ७४ ॥
दुराग्रह नेदी मन । स्वस्थ करी अन्तःकरण । तुझें देखोनियां रुदन । निमती जन अयोध्येचे ॥ ७५ ॥
आता रायासीं देऊनी दहन । तूंते करुनि अभिषेंचन । चौदा वरुषा रघुनंदन । येईल जाण नेमांतीं ॥ ७६ ॥
आइकोनि राज्याभिषेंचन वार्ता । भरता होय प्राणांत व्यथा । धैर्यें सावरूनि जीवित्वा । होय बोलतां वसिष्ठेंसीं ॥ ७७ ॥
राज्यधानी श्रीराम कांता । ते तंव स्वामी माझी माता । ते अभिषेचनीं भोगीन म्हणतां । नाहीं मज परता मात्रागमनी ॥ ७८ ॥
असंख्य गाई ब्राह्मणा हनन । मात्रागमन सुरापान । साधूनिंदा गुरहनन । याहूनिं आन जें पाप ॥ ७९ ॥
तितुकीं येतु मजलागुनी । जरी अभिषेच वार्ता स्पर्शे कानीं । येथें उपदेश देईल कोण्ही । X X दोषी तो माझा ॥ ८०
नग्न माता कां गुरुपत्नी । पुत्र पाहे अभिलाषेनी । तो दोष घडे मज लागुनी । जऱ्ही रामावाचुनी अयोध्या पाहे ॥ ८१ ॥
भोगक्षण मद्यपान । त्याहूनि तीव्र निंदाजन । ते दोष वसऊत माझें वदन । कां जऱ्ही काढी वचन अभिषेकांचे ॥ ८२ ॥
उत्तमावरील अभिषाप वार्ता । जो कानीं ऐके लाऊनी चित्ता । तो दोष देई मजचि आतां । जऱ्ही ऐके वार्ता अभिषेकाची ॥ ८३ ॥]

**विषयांचा जो विषय भोग । तोचि इंद्रादिका** [कं. 'भदयोग'.] **पदभंग । विषय तो** [सु. कं. गे. प्रतींत हे पद नाही.] **मुख्य क्षयरोग । नित्य** [नि. 'नित्य आघात'; सु. गे. घा. 'नित्यदाहक'; तं. 'नित्य डाघ'.] **दाघ तो विषयो ॥ ४८ ॥**

**असो इतरांची इतर गती । मीचि ठकिलों विषयासक्ती ।**
**राम अंतरला हातोंहातीं ।** [कं. 'मातुळप्रिती विषयत्वें'.] **मायामातुळस्थिती विषयत्वें ॥ ४९ ॥**

अनुक्रमणिका

माया मातुळ विषय स्थिती । रामें त्यजिलों निश्चितीं । जेथवरी [कं. 'विषयासक्ति'.] विषयप्रीति । त्या [कं. 'रामभक्ति'.] रामप्राप्ती कदा न घडे ॥ ५० ॥

जेथवरी मानाभिमान । ज्यासी ज्ञानगर्व गहन । त्यासी नेभटे रामचरण । प्रत्यक्ष प्रमाण मज घडलें ॥ ५१ ॥

मज घडलें अति दूषण । आंगीं आदळलें लांछन । जळो माझें बंधुपण । श्रीरामचरण अंतरले ॥ ५२ ॥

जो मी होतों निजात्मबंधु । तो मी जालों अति [भा/२. 'तो मी केलों अबंधु', तं. 'तो मी जालों अति बद्धु'; सु. गे. 'तो मी जालों अति आबद्धु'; नि. घा. 'अबंधु'.] बाधु । राम अंतरला कृपासिंधु । मी भाग्यमंदु अति दुःखी ॥

कैकयी अविद्येचा बाधु । बंधु तो केलों अबंधु । लाविला सापत्नसंबंधु । रामकृपासिंधु अंतरला ॥ ५४ ॥

अंतरला सुखावबोधु । अंतरला स्वानंदकंदु । अंतरला निजात्मबंधु । राम परमानंदु अंतरला ॥ ५५ ॥

दशरथें केलें [तं. प्रतीत 'परम' हे पद नाही; मु. 'परलोक प्रयाण'.] परमप्रयाण । श्रीरामासवें दिधला प्राण । मी वांचलोंसे पाषाण । [कं. 'अति कठिण लेखावा'; सु. गे. घा. 'अति कठीण जीवो उलेना.'; नि. 'अति कठिण उलंडेना'.] अति कठिण उलेना ॥ ५६ ॥

वना जातां श्रीरामरावो । राजा गेला सांडूनि देहो । मी महापापी उरलों पाहो । देह मोहो छेदवेना ॥ ५७ ॥

दूरी जातां श्रीरामासी । दशरथें सांडिलें देहासी । मी उरलों पापराशी । द्वंददुःखासी भोगावया ॥ ५८ ॥

दुरीं जातां श्रीरघुनाथ । तत्काळ देह त्यागी दशरथ । मी पापी उरलों भरत । अद्यापी मृत्यू मज न ये ॥ ५९ ॥

अद्यापि मज न ये मरण । तरी मृत्यू निमाला आपण । काळाचें काळें वदन । माझें देहबंधन [कं. व मुद्रित 'छेदवेना'.] छेदीना ॥ ६० ॥

श्रीराम वना जातां जाण । [कं. 'मृत्युनें सोडिला प्राण'; मु. 'मृत्यूनें सांडिला आपुला प्राण'.] दुःखें मृत्यूनें सांडिला प्राण । आतां मज मारील कोण । मी पापी पूर्ण उरलोंसें ॥ ६१ ॥

रामविरहें धडफुडा । मृत्यू निमाला बापुडा । मी [मु. 'राहिलों'.] उरलों काळाचा कांकडा । दुःखाचा हुडा अतिदुःखी ॥ ६२ ॥

जितां जिववेना रामेंवीण । काळु निमाला न ये मरण । माझें अतिदुःख दारुण । निवारी कोण रघुनाथा ॥ ६३ ॥

ऐसी बोलत बोलतां बोली । धरणीवरी अंग घाली । श्रीराम माझी निज माउली । [मु. प्रतीत 'ते' हे पद नाही.] ते केऊती गेली चुकवूनि ॥ ६४ ॥

अनुक्रमणिका

श्रीरामा मज देई भेटी । सांगेन जीवांच्या गुह्य गोठी । श्रीराम चरण नेदखे दिठीं । म्हणऊनि पिटी लल्हाट ॥ ६५ ॥

राम माझा निजात्मा । राम माझा परमात्मा । राम माझा जीवात्मा । तो कां पां आम्हां [कं. व मु. 'विसरला'.] रुसला ॥ ६६ ॥

केऊता गेलासी श्रीरामा । [तं. 'सादु जो कां मेघश्यामा'; भा/२. सु. नि. गे. घा. 'भेटी देईजे मेघश्याम'.] सादु दे का मेघशामा । धांव पाव पुरुषोत्तमा । माझ्या [पै. भा. /२. सु. गे. खेरीज इतरत्र 'भवभ्रमा'.] भवश्रमा निवारी ॥ ६७ ॥

रामा धांव [कं. व मु. 'पाव'.] धांव तांतडीं । वेगीं पाव लवडसवडी । मज लागीं घाली उडी । माझ्या दुःख कोडी [तं. व मु. 'विवाही'.] विनाशी ॥ ६८ ॥

राघवा वेगीं येरे येरे । मजलागीं तूं कडिये घेरे । मी तुझें लळेवाड कीं रे । अति दुःखभारें पीडलों ॥ ६९ ॥

राम माझे गतीची गती । राम माझे स्थितीची स्थिती । राम माझे मुक्तीची मुक्ति । तो हातोहातीं अंतरला ॥ ७० ॥

श्रीरामसंगें अति गोड । लक्ष्मण परिपाकें [कं. 'परिपाक तो सुरवाड ।' सु. नि. गे. घा. 'परिपाक अति सुरवाड'; तं. 'पाके सुख सुरवाड'; भा. /२. 'परिपाकें दुःख सुरवाड'.] सुख सुचाड । [तं. 'मी एक रामसंगें मूढ'; नि. 'रामसंगती वाचून मूढ'; सु. गे. घा. 'मी राम संघें न घे मूढ'.] मी रामसंगा धणी मूढ । उरलों कांकडमूग जैसा ॥ ७१ ॥

रघुनाथाचा निज सांघाती । धन्य लक्ष्मण त्रिजगतीं । मी माया मातुळ संगती । दुःखावर्ती अति दुःखी ॥ ७२ ॥

लक्ष्मण बंधुत्वें अति सभाग्य । मी बंधुत्वें अति अभाग्य ।
सकळ दुःखें व्यापिलें अंग । तऱ्ही अंग भंग नव्हे माझा ॥ ७३ ॥ [कै. प्रतीत या ओवीनंतर पुढील श्लोक आला आहे :——'एके तुंबा कटुकमधुरा तुंबिनी वंशजाता । शब्दायन्ते मधुरतनया शुद्धवंशावलग्ना ॥ एके साधु सपदि पतितं दुस्तरं तारयन्ति । तेषामन्ये ज्वलितहृदयं शोणितं ते पिबन्ति ॥']

तुंबिणीच्या फळस्थिती । [नि. घा. 'एका होती यंत्री पात हातीं'; सु. गे. 'एक हातां येता मात्र प्राप्ती'.] एका येती हातीं पात्र प्राप्ती । एक दुस्तरीं तारक होती । एक प्राशिती रुधिरातें ॥ ७४ ॥ [तं. प्रतींत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :—— 'एक शुद्ध वैष्णव संगती । मधुर वचनीं वदे श्रुति । तैसी जाली आमुचि गती । संग प्राप्ती परिपाकु ॥']

एक शुद्ध [नि. घा. प्रतींत 'वंश' हे पद नाही; सु गे 'शुद्ध वेश्या संगती'.] वंश संगती । मधुर वचनें दे [कं. 'वेवादती'.] विश्रांति । [नि. घा. 'तैसी अशुचिही गती'; कं. 'तैसेचि आमुची संगती'.] तैसीच आमचीही गती । [कं. 'सत्प्राप्ती'.] संगप्राप्ती परिपाक ॥ ७५ ॥

लक्ष्मण शुद्ध संगती । तारक विश्रांति त्रिजगतीं । मी मायामातुळस्थिती । दुःखप्राप्ती रुधिर प्राय ॥ ७६ ॥

अनुक्रमणिका

राम मज नित्य निववी । राम जीवेंविण जीववी । राम माझा स्वानंद पदवी । ते कैकया अवघी वंचिली भेदें ॥ ७७ ॥

राम मज निजी निजवी । राम जिवाशिवाचा गोसावी ।
राम [कं. व मु. पाठ 'सुखानंद'.] स्वानंदजान्हवी । ते कैकया अवघी कोरडी केली ॥ ७८ ॥

राम माझें मुख्य मुदल । राम माझें नित्य भांडवल । राम माझें [पै. 'निजशबळ' आहे.] निजबळ । तें कैकया केवळ वंचिलें भेदें ॥ ७९ ॥

राम माझें निज जीवन । राम माझें निज अंजन । राम माझें निजनिधान । तें कैकया चोरून नेलें भेदें ॥ ८० ॥

आम्ही सखे निजात्मबंधु । कैकया केला व्यर्थ भेदु । मुख्यत्वें सापत्नविरोधु । मंथरा सुबद्धु वाढविला ॥ ८१ ॥

भोळी कैकयी बापुडी । मंथरा बुद्धि दिधली कुडी । राम केला देशोधडी । अयोध्या रोकडी घातली दुःखीं ॥ ८२ ॥

तिच्या करीन मी घातासी । म्हणौनि धांवला वेगेसीं । मंथरा धरूनि आणी केशीं । क्रोधें हातवसीं स्वर्गातें ॥ ८३ ॥

ईचेनि वनवासीं रघुनाथ । ईचेनि निमाला दशरथ । ईचेनि अयोध्येसीं आकांत । जगीं दुःखावर्त इचेनि ॥ ८४ ॥

सवतीमत्सराचें बंड । इणें वाढविलें प्रचंड । ईचेनि कैकयीचें काळें तोंड । ते मी दुखंड करीन ॥ ८५ ॥

हे सूर्यवंश सुखाची आगी । हे सख्यासुहृदां योगभंगी । ईचेनि कैकयी निंद्य जगीं । ते मी वेगीं छेदीन ॥ ८६ ॥

इणें चरणचाली दवडिली सीता । ईचेनि अंतरला लक्ष्मण भ्राता ।
इणें गिळीला दशरथ पिता । ते मी आतां छेदीन ॥ ८७ ॥

इणें केलें थोरा अनर्था । इचेनि वैधव्य [कं. सु. नि. गे. घा. 'मायेच्या माथां'.] माझ्या माता । मजही घातलें दुःखावर्ता । ते मी आतां छेदीन ॥ ८८ ॥

ईचेनि [मु. 'आम्ही रामीं तुटीं'.] आत्मारामीं तुटीं । ईचेनि आम्ही [त. कं. प्रतींत 'झालों' हे अधिक पद; भा. /१ नि. घा. 'पोरें' हे अधिक पद.] पोरटी । ईचेनि आम्ही [मु. गे. कं. 'निंद्य'.] दीन सृष्टीं । ते मी उठाउठी वधीन ॥ ८९ ॥

तिचा करावया प्राणांत । भरत खर्गेसी उद्यत । वसिष्ठें धांवोनि धरिला [कं. 'त्वरित'.] हात । [पै. भा/२. त. या प्रतींत

हे पद नाही.] म्हणे स्त्रीघात करूं नये ॥ ९० ॥

करूं नये स्त्रियेच्या घाता । उपेक्षु नये निज माता । मूर्ख म्हणों नये पिता । जऱ्ही तत्त्वतां अपंडित ॥ ९१ ॥

मानु नये द्विजविटाळु । अतीथ दवडू नये भुकाळु । साधूसी करूं नये छळु । नये शस्त्र कल्लोळु स्त्रियेसी करूं ॥

गो ब्राह्मण स्त्री बंधू । वधायोग्य केल्या अपराधु । तऱ्ही करूं नये [मु 'यांचा' हे अधिक पद.] वधू । तूं भरत [पै. 'सिद्धु'.] प्रसिद्धु विवेकी ॥ ९३ ॥

गुरुवाक्य नुलंघवे सर्वथा । नावरेचि क्रोधावस्था । मंथरा हाणीतली लाता । अति निघाता निष्ठुरत्वें ॥ ९४ ॥

लातेसरिसी तळीं पडे । निघातें तिचा माज मोडे । शरीर तीं ठाईं वाकुडें । तिणें त्रिवक्रा पडे नांव तीसीं ॥ ९५ ॥

जिणोनियां राक्षसांसी । राम आलीया अयोध्येसीं । मंथरा लागली पायांसी । माझी दशा ऐसी श्रीरामा ॥ ९६ ॥

[पै. भा. /२. खेरीज इतरत्र 'राम म्हणेल आता उजूं करितां'.] आतांचि तुज उजू करितां । विषम वाटेल बंधु भरता । स्वभावें मज मथुरे जातां । [तं. कं. 'तुझ्या मनोगता पुरवीन'; भा. /२. 'तुझ्या मनोमता पूर्ण करीन'; मु 'तुझ्या मनोगता मी करीन'.] तुझ्या मनोरथा प्रिय करीन ॥ ९७ ॥

ते राम जपे अहर्निशीं । तेणें सुवासु आला चंदनासी । कृष्णें चर्चुनि निजांगासी । कुब्जा निजदासी उद्धरील ॥ ९८ ॥

[कं. 'हे बोलणें प्रसंगता'.] हें बोलिलों [पै. खेरीज इतरत्र हे पद नाही.] पां प्रसंगता । मंथरा ते कुब्जा तत्त्वतां । पुढें काय वर्तलें भरता । तेही कथा अवधारा ॥ ९९ ॥

वसिष्ठ बोलिला वचन । न करितां राज्याभिषेंचन । करूं नये राजदहन । राज्याभिषेंचन तुज करूं ॥ १०० ॥
[१०० ते १०५ या ओव्या तं. प्रतींत नाहीत.]

ऐसें ऐकतां वचन । भरतासी चालिलें रुदन । दुःखभरितें आलें दारुण । तत्काळ प्राण त्यजूं पाहे ॥ १०१ ॥

श्रीराम गेलियापाठीं । जरी मी बैसें राज्यपाटीं । [तं. 'आब्रह्मसांबहत्या सृष्टीं'. पै. भा. /२. खेरीज इतरत्र 'अवघ्या ब्रह्महत्या ज्या सृष्टि'.] आब्रह्म ब्रह्महत्त्या सृष्टीं । ते माझा लल्हाटीं निक्षेपु ॥ १०२ ॥

वनां गेलियां रघुनाथा । पट्टाभिषेकु होय भरता ।
महादोषांच्या ज्या ज्या वार्ता । त्या हत्त्या समस्तां म्यां केल्या ॥ १०३ ॥

अनुक्रमणिका

रामचंद्र गेलिया वना । जरी मी घे अभिषेंचना । [तं. 'विधवा अंगना भोगी द्विजासीं; सु. गे. 'तरी क्षुद्र भोगी विधवांगना'; कं. नि. घा. 'तरी क्षूद्र द्विजविधवांगना'.] विधवा शुद्र भोगी द्विजांगना । त्या गर्भस्थाना मी जाय ॥

सकल रजस्वलांचें रुधिर । तेणें अभिषिकों माझें शरीर । परि राज्याभिषेकाचें नीर । तें मी अणुमात्र स्पर्शेनां ॥ १०५ ॥

श्रीरामाची राजधानी । ते जाण पां माझी जननी । ते जैं भोगी अभिषेचनीं । तैं मात्रागमनी मी जालों ॥ १०६ ॥

वसिष्ठा शिवतों तुझें चरण । वातों रघुनाथाची आण । राज्याचें अभिषेंचन । प्राणांतें आपण करूं नेदी ॥ १०७ ॥

वसिष्ठ पाहे शत्रुघ्नाकडे । तंव तो बोले [सु. गे. 'बोलेना चालेना अति रडे'; नि. घा. 'बोलेना पैं रडें'; कं. 'बोले नां चाले रडें'; तं. 'बोलेना चालेना रडें';] चाले ना रडे । श्रीरामविरहें जालें वेडें । मागेंपुढें स्मरेना ॥ १०८ ॥

विसरला तो घरदार । विसरला इंद्रियव्यापार । विसरला निजशरीर । तदाकार होऊनि ठेला ॥ १०९ ॥

आठवितां रामचंद्रा । शत्रुघ्ना लागली [पै. 'योगनिद्रा'.] योगमुद्रा । विसरला निद्रातंद्रा । कृपा रामचंद्राची ऐसी ॥ ११० ॥

दृश्य द्रष्टा दर्शन । कर्मक्रिया कर्तेपण । शत्रुघ्नासी नाठवे जाण । आपणया आपण विसरला ॥ १११ ॥

करणें न करणें कांहीं । उठीना शत्रुघ्नाचा ठाईं । धैर्ये श्रीराम स्मरतां पाही । देहीं विदेही तो जाला ॥ ११२ ॥

बोलिला भरत तो भावार्थ । त्याचा भाव दाविला यथार्थ । शत्रुघ्न तो धैर्यमूर्त । तो धैर्यवृत्तांत निरोपिला ॥ ११३ ॥

शत्रुघ्नाची ऐसी स्थिती । भरताची तैसी [सु. नि. गे. घा. कं. 'गति'.] रीती । आतां राज्याची कवण गती । वसिष्ठ चित्तीं विचारी ॥ ११४ ॥

वसिष्ठ म्हणे भरतातें । व्यर्थ खेदु कां करिसी येथें । जें मी सांगेन यथार्थें । तें त्वां निश्चितें करावें ॥ ११५ ॥

अभिषेक रामपादुकांसीं । करुनि दहन द्यावें रायासी ।
मग आम्ही [नि. घा. प्रतींत हे पद नाही.] तुम्ही रामापासीं । जावों वनवासीं भेटावया ॥ ११६ ॥

आइकोनि वसिष्ठाचें वचन । भरता जालें अमृतपान । [मु. प्रतीत 'मग' हे अधिक पद.] साष्टांग करूनि नमन । मस्तकीं चरण वंदिलें ॥ ११७ ॥ [तं. प्रतीत ही ओवी नाही.]

अनुक्रमणिका

भरतें करितां राजदहन । कौसल्या करूं पाहे सहगमन । [मु. प्रतीत 'मग' हे अधिक पद.] वसिष्ठे येऊनि आपण । निवारण तिसीं केलें ॥ ११८ ॥

सहगमन पतिसंकटीं । त्याहोनि अधिक श्रीराम भेटी । येरी म्हणे चौदा वर्षांसाठीं । जिण्याची गोठी दुर्लभ ॥ ११९ ॥ [या ओवीनंतर तं. प्रतीत पुढील ओव्या आल्या आहेत :–– 'मग वसिष्ठ वामदेवादिक । कश्यप जाबाळी कौशिक । राज दहनार्थ सकळिक । आले सहलोक शरयूतीरा ॥ १ ॥
प्रक्षाळुनी राज शरीर । परीधानितां पीतांबर । विभूति रुद्राक्षी साळीकार । छत्र चामर दिव्य वस्त्रें ॥ २ ॥
आगर चंदन बेल तुळसी । वाळा केशर कर्पुर राशी । चिता रचुनि एकांत भूमीसी । राजयासी अर्पिलें ॥ ३ ॥]

नगरां न येतां रघुनाथु । मध्येंच मज आलिया मृत्यु । ना श्रीराम ना दशरथु। [मु. प्रतीत 'ऐसा' हे अधिक पद.] अपघातु मज होईल ॥ १२० ॥

आइकोनि कौसल्येची गोठी । वसिष्ठ कळवळला पोटीं । रायाच्या उत्तरकर्मापाठीं । करीन भेटी श्रीरामीं ॥ १२१ ॥

कौसल्या म्हणे जी गुरुनाथा । अवश्य भेटवणें रघुनाथा । ऐसी मज भाक देसी आतां । तरी जीविता राखेन ॥ १२२ ॥

श्रीराम देखतांचि दृष्टीं । मावळे द्वंददुःख कोटी । आनंदु न समाये सृष्टीं । सुखसंतुष्टी श्रीरामें ॥ १२३ ॥

श्रीरामेसीं होय भेटी । तें भाग्य दुर्लभ अति संकटीं । तें पाविजे सद्गुरुकृपादृष्टीं । तैं मीं सृष्टीं अति धन्य ॥ १२४ ॥
कौसल्येचें सत्त्व चोख । देखोनि वसिष्ठा परमसुख । उल्हासें देउनियां भाक । [कं. सु. नि. गे. घा. 'राहविली निष्टंक राजमाता'.] अवश्यक राहाविली ॥ १२५ ॥

भरतें उठूनि आपण । राम पादुका अभिषेचन । करुनि रायाचें दहन । और्ध्वदेहिक पूर्ण तेणें केलें ॥ १२६ ॥

भरताचें अयोध्ये आगमन । तंव श्रीरामाचें दूर गमन । एका जनार्दना शरण । रसाळ [मु. 'निरुपण'.] कथन अवधारा ॥ १२७ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां भरतविलापो नाम एकादशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग बारावा

## भरत गुहक संवाद—गंगातरण

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**जाहालिया जननिवृत्ति । [मु. 'पुन्हां'.] पूर्ण प्राप्त मध्यराती । कैकयी येऊनि भरताप्रति । बोले उपपत्ति ते एका ॥ १ ॥**

[वा. रा. अयोध्याकांड, सर्ग ७२, श्लोक २३, २४ व ५४.] कैकेय्युक्ति—

उत्थापयित्वा शोकार्तं वचनं चेदमब्रवीत् । उत्तिष्ठोत्तिष्ठ किं शेषे राजपुत्र महायशाः ॥ १ ॥

त्वद्विधा नहि शोचन्ति सन्तः सदसि संमताः । गृहाणेदं स्वकं राज्यं सफलं कुरु मे [मु. प्रतीत यानंतर पुढील चरण आला आहे 'त्वत्कृते हि मया सर्वमिदमेवंविधं कृतम्'; तं. प्रतीत श्लोक नाहीत.] श्रमम् ॥ २ ॥

मनो नंदय मित्राणां मम चामित्रकर्षण ॥ ❦ ॥

तत् पुत्र शीघ्रं विधिवत्स्वराज्यं विप्रैर्वसिष्ठप्रमुखैः समेत्य ।

सत्कृत्यराजानमनन्तरं त्वमात्मानमाश्वास्याभिशेचयस्व ॥ ३ ॥

**उठउनियां पुत्रासी । कैकयी बुद्धि सांगे त्यासी । राम गेला वनवासासी । तूं कां करिसी शोक त्याचा ॥ २ ॥**

**रांडवे बाइलेच्या परी । रडतां न लजेसी सभेमाझारीं । उठी वेगीं धीरु धरी । अयोध्येचें करी निजराज्य ॥ ३ ॥**

**मुख्य जेष्ठांचें निजराज्य । तें म्यां संकटीं साधिलें तुज । सेखीं [नि. घा. 'न मानिसी तूं मज'.] तुज माझी न मने वोज । नाचसी भोज वनां जावया ॥**

**आयुष्य सरल्या निमाला [नि. घा. 'पती'.] पिता । पितुराज्ञा वनवास रघुनाथा ।**
**तो दोष [मु. 'ठेविसी'.] घालिसी माझें माथा । निजस्वार्था नेणसी ॥ ५ ॥**

**मुळीं लागोनि संसारीं । सापत्न्य तें तंव मुख्य वैरी । तें तुज सांगेल निर्धारीं । वेदशास्त्रीं संमत ॥ ६ ॥**

**दिती आदिती दोघी सवती । एक्या पित्याची संतती । देवां दैत्यां वैर प्राप्ती । निजघातीं येरयेरां ॥ ७ ॥**

**येचि अर्थाची वेदोक्ति । बृहदारण्य प्रथम श्रुती । दैव दैत्य वैरी होती । श्रुति संमति अवधारी ॥ ८ ॥**

[मु. प्रतींत ही श्रुति नाही.] श्रुति बृहदारण्याची—

द्वया ह प्रजापत्या देवाश्चासुराश्च । ततः कनीयसाएकदेवा । ज्यायसा अनुरास्त एषु लोकेष्वस्पर्धन्ति ॥ ४ ॥ [बृहदारण्यक अध्याय १, ब्राह्मण ३, श्लोक १; पृष्ठ ८८, गोरखपूर प्रत.]

अनुक्रमणिका

सापत्नांमाजी अति प्रिति । कहींच नाहीं वेदशास्त्रीं । गरुड सर्पा वैरप्राप्ती । ते काय नव्हती निजबंधु ॥ ९ ॥

आयीक माझी निजयुक्ति । तुवां न वचावें वनाप्रति ।
आणुनि वसिष्ठादि ऋषिपंक्ति । घेई राज्यप्राप्ती अभिषेकु ॥ १० ॥

भरता तूं तंव सभाग्य पूर्ण । [तं. 'अभागी'; मु. 'अभाग्य'.] भाग्यें वनवासा गेला लक्ष्मण ।
तो जरी येथें असतां जाण । करितां कदन राज्यलोभें ॥ ११ ॥

मी सांगते हित देखोन । तूं होई [मु. प्रतींत हे पद नाही.] मुख्य राजा संपूर्ण । युवराजा करी शत्रुघ्न । माझेंचि वचन प्रतिपाळी ॥ १२ ॥

आइकोनि मातेचें वचन । भरता कोपु आला संपूर्ण । कोपामाजीं आलें रुदन । अति उद्विग्न अनुतापी ॥ १३ ॥

घायावरी हाणिजे लाता । तैसा पाडू जाला भरता । [मु. प्रतींत 'म्हणे' हे अधिक पद.] तूं तंव नव्हसी माझी माता । पापरूपता तूं पूर्ण ॥ १४ ॥

निजपति निमाल्याचें तुज । अणुमात्र दुःख ना लाज । [तु. 'राज्यलाभाचें'; तं. सु. नि. गे. घा. 'राज्यभोगाचें'.] राज्यलोभाचें सुखभोज । अति निर्लज्य नाचसी ॥ १५ ॥

तुझ्या आइकोनि वचनार्था । म्यां द्वेषावें रघुनाथा । स्वजनीं देऊनि [त. 'दुःखवर्ता, कं. पैं खेरीज इतरत्र 'दुःखवार्ता'.] दुःखावस्था । नरकपाता स्वयें जावें ॥ १६ ॥

निजमातेचें [मु. 'हितोपदेश वाक्य'.] हितोपवाक्य । रौरवा जावें आवश्यक । पूर्वज नरका आणावें देख । यावें दुःख जगासीं ॥ १७ ॥

निजपतीची घातकिणी । श्रीराम द्वेषाची [कं. 'संघटणी'; त. तं. सु. नि. गे. घा. 'संवदणी'.] सवंजणी । [कं. 'सुहृद सुखा दुःखकारिणी'; तं. 'सुहृदसुखाची दुःखखाणी'; त. 'सुहृदयें दुःखखाणी'; सु. गे. 'सुहृदा सुख दुःखकारिणी'; नि. घा. 'सुहृदासी दुःखकारिणी'.] सुहृदसुखा दुःखखाणी । [तं. 'निघे'; कं. 'नेघे'; नि. घा. 'जाय'.] निंद्य पापिणी अति निंद्य ॥ १८ ॥

जळों तुझें काळें मुख । [मु. 'श्रीरामासी दिधले'.] श्रीराम सुखा दिधलें दुःख । तुझें मज नाहीं सुख । जगांसी असुख तुझेनि ॥ १९ ॥

वधूं नये निजमाता । यालागीं [मु. 'चुकलो तुझ्याघाता'.] चुकलीसी घातां । तुझेनि मज दुःखावस्था । [मु. 'श्रीरामदशरथा'.] श्रीरघुनाथा विघडिलें ॥ २० ॥

तुजसी पाहातां सन्मुख । मज [नि. घा. 'वाटे'.] दाटले परम दुःख । नको दाऊं काळें मुख । निंद्य निःशेष [नि. घा. 'अतिनष्टे'.] अति दुष्टे ॥ २१ ॥

भरतें कोपोनिया भारी । निर्भर्च्छुनि नानापरी । कैकयी घालुनि बाहेरी । तिचेनिं करी अति दुःखी ॥ २२ ॥

अनुक्रमणिका

जिचेनि अंतरला राघव । [मु. 'ते' हे अधिक पद.] माता नव्हे महालांव । जगीं निंद्य इचें नांव । दुःख ओतीव कैकयी ॥ २३ ॥

श्रीराम भरताचा पिंड एक । एक पिंडाचे दोघे देख । येरयेरांचें न मानिती दुःख । परमसुख येरयेरां ॥ २४ ॥

येरयेरांचां जीवप्राण । येरयेरांचें निजजीवन । येरयेरां समाधान । सुखसंपन्न रामें भरत ॥ २५ ॥

भरतासी श्रीरामाचें सुख । श्रीरामा भरताचा हरिख । एकामेकां दोघेही एक । कैकयी मूर्ख हें नेणें ॥ २६ ॥

आठवितां श्रीरघुनाथ । परमसुखें सुखावें भरत । नाहीं राज्यलोभाचा स्वार्थ । परमामृत श्रीराम ॥ २७ ॥

श्रीरामाच्या पायांपरतें । परमसुख नाहीं भरतातें । या लागीं [कं. 'नेघे'; मु. 'त्यजोनी'.] नेघोनि निजराज्यातें । श्रीरामातें भेटों निघे ॥ २८ ॥

देवांदैत्यां वैर वितंड । त्यांचा नव्हे एक पिंड । राज्यलोभें दुःख [नि. 'उदंड'.] वितंड । वैर अखंड येरयेरां ॥ २९ ॥

भिन्न भिन्न पिंडें निजोत्पत्ति । गरुडसर्पां वैर प्राप्ती । तैसें नाहीं श्रीरामभरतीं । चौघेही होतीं एकपिंडें ॥ ३० ॥

सौमित्र भरत आणि शत्रुघ्न । चौथा जाण रघुनंदन । चार्‍ही मूर्ति श्रीराम पूर्ण । व्यूह संपूर्ण या नांव ॥ ३१ ॥

चौघे बंधू भिन्नभिन्न व्यक्ति । चार्‍ही मिळोनि श्रीराममूर्ति । व्यूह चतुष्टय यातें म्हणती । आगमार्थी वेदोक्त ॥ ३२ ॥

ऐसिया एकात्मता अति प्रीति । [पै. 'उठो'.] भेटों पाहे श्रीराममूर्ती । उदया येतांचि गभस्ती । निज गमनार्थी उद्यत ॥ ३३ ॥

पाचारुनियां प्रधाना । [मु. 'म्हणे सिद्ध वेगीं करा सेना'.] वेगीं सन्नद्ध करी सेना । भेटावया रघुनंदना । जाणें वना निश्चित ॥ ३४ ॥

वसिष्ठें येऊनि आपण । पाहावया भरताचें मन । [मु. प्रतीत 'म्हणे' हे अधिक पद.] पुत्रधर्माचें लक्षण । निजवचन बोलतु ॥ ३५ ॥

तुम्हीं [नि. घा. 'तरी' सु. गे. प्रतीत हे पद नाही.] तंव चौघेहि पितृभक्त । आज्ञा नेमुनि गेला दशरथ । राज्यीं अभिषेकावा भरत । श्रीरघुनाथ वनवासी ॥ ३६ ॥

तुझें मातेचें वरदान । तिचेंही मागणे हेंचि जाण । भरता राज्याभिषेंचन । रघुनंदन वनवासी ॥ ३७ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम पितृवचन विश्वासी । वेगें गेला वनवासासी । तूंही पाळी पितृवाक्यासी । अभिषेकासी अंगीकारी ॥ ३८ ॥

[कं. प्रतीत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :—‘पूर्वी केली होती सामुग्री । ते सिद्ध आहे माझां घरीं । श्रीरामा अभिषेकावरीं । तूं अंगिकारी अभिषेक ॥’]
श्रीराम [भा. /२. ‘अभिषेक व्यापारी’; सु. गे. ‘अभिषेकाच्या वरीं’; नि. घा. ‘अभिषेकावया निर्धारी’; तं. तु. त. ‘अभिषेकावया वरी’.] अभिषेकावया वार्‍हीं । पूर्वी केली होती सामग्री । ते सिद्ध आहे माझां घरीं । तूं अंगीकारी अभिषेकु ॥

पितृवचन उल्लंघितां । अवश्य पाविजे नरकपाता । आग्रहो न करावा भरता । तुज मीं आतां अभिषेकीन ॥ ४० ॥

आइकोनि वसिष्ठाचें वचन । भरत पडिला मूर्च्छापन्न । दीर्घ मांडिलें रुदन । आक्रंदें पूर्ण बोलतु ॥ ४१ ॥

कैकयी हरिखें जाली रांड । जळों तिचें काळें तोंड । वनवासाचें पाखांड । त्याचि वितंड वाढविलें ॥ ४२ ॥

कैकयी केवळ [कं. सु. नि. गे. घा. ‘परम’; तं. प्रतीत हे पद नाही.] पैं नष्ट । भाकां गोंविला पति वरिष्ठ । तिचें मागणें पाप स्पष्ट । तो राज्यपाट मीं नेघे ॥ ४३ ॥

वसिष्ठा तुज करितों नमन । किती पाहासी माझें मन । वांचुनियां रघुनंदन । अभिषेंचन मी नेघे ॥ ४४ ॥

श्रीराम सांडुनियां वनीं । जरी [नि. घा. प्रतींत ‘मी’ हे अधिक पद.] बैसलों अभिषेंचनीं । तरी मी जालों मद्यपानी । मात्रागमनीं अतिनष्ट ॥ ४५ ॥

तुझें शिवोनियां चरण । पूर्वी वाइली रामाची आण । तेंचि माझें अति प्रमाण । पुडती आपण न पुसावे ॥ ४६ ॥

म्हणौनि चरणीं ठेविला माथा । येथुनि मागुती गुरुनाथा । राज्याभिषेकाची कथा । [नि. घा. ‘मजहि आतां’.] मज सर्वथा न पुसावी ॥ ४७ ॥

आइकोनि भरताचें वचन । वसिष्ठ जाला सुखसंपन्न । हृदयीं धरिला आळिंगुन । [मु. प्रतीत ‘म्हणे’ हे अधिक पद.] अति सज्ञान तूं होसी ॥ ४८ ॥

तुझ्यासवें घेऊनि माता । भेटी येईन मी रघुनाथा । भरतें चरणीं ठेविला माथा । सभाग्यता आजी माझी ॥ ४९ ॥

सद्‌गुरु जाहला सुप्रसन्न । भरतें त्राहाटिलां निशाण । सेना सन्नद्ध करा संपूर्ण । शीघ्र गमन वनवासा ॥ ५० ॥

हरिखें नाचतु भरत । आजी [मु. प्रतीत हे पद नाही.] मी देखेन रघुनाथ । माझें पुरती मनोरथ । कृतकृत्यार्थ मी होईन ॥ ५१ ॥

**श्रीराम भेटावया तत्काळीं । भरत निघाला** [कं. 'सह्रदळी'; सु. नि. ग. घा. 'सदळी'.] **सवंदळीं । नगरीं हरिखें पिटिली टाळी । वना सकळीं निघावया ॥ ५२ ॥**

**होईल श्रीरामदर्शन । उद्दीम चालेल संपूर्ण । उभय लाभीं ठेऊनी मन । निघाले जन अयोध्येचें ॥ ५३ ॥**

पौराश्च निर्युयुः सर्वे समवायेन नैगमाः । रामदर्शनसंह्रष्टाः सर्वाः प्रकृतयस्तदा ॥ ५ ॥

**वाणी सिद्ध केलें पसारे । सोवनी सोनार जोशी वेव्हारें । दुसीं दिंडे घेतली थोरें । गौळी खिरारें थापटिलीं ॥ ५४ ॥**

**चालिल्या पक्वान्न परवडी । दही दुधाच्या कावडी । तेलीं घेतल्या तेलाचा जोडी । कापड घोडीं चाट्यांची ॥ ५५ ॥**

**तांबोळीं बांधिलीं आटुगीं । ब्राह्मणीं बांधिली** [तं. 'धोकटी'; मु. 'धोटकी'.] **वेंटुगीं । मायबापा न पुसत वेगीं । चोरूनि मार्गी लागलीं एकें ॥ ५६ ॥**

**पुत्रालागीं धांवें माता । स्त्रीपुत्रालागीं निघे पिता । पुतण्यालागीं धांवें चुलता । श्रीरघुनाथा पाहावया ॥ ५७ ॥**

**भाडाईत भारवाहक । वोड शिंपी नटनाटक ।** [भा. /२ 'मणियारक'; मु. 'मणिकर'.] **मणिक रजक नापिक । जळतारक निघाले ॥ ५८ ॥**

**सुतार शस्त्रकार रज्जुकार । मार्गीं विकरा होईल अपार । घेऊनि** [मु. प्रतीत 'चालिले' हे अधिक पद.] **पाइतणांचा भार । मोची चांभार निघाले ॥ ५९ ॥**

**सहकुटुंब निघाले समस्त । भाडें न मिळे देतां अर्थ । एक म्हणती निघा त्वरित । दूरी भरत अंतरला ॥ ६० ॥**

**घरीं राखण न राहे कोण्हीं ।** [पै. खेरीज इतरत्र 'निघती'.] **घेती येर येरांवरी रुसोनि । श्रीराम पाहावया नयनीं । उल्हास मनीं सर्वांच्या ॥ ६१ ॥**

**खरावरीं वळंघोनि । हरिखें निघाल्या कुलाळपत्नीं । श्रीराम देखावया नयनीं । आपमानु** [मु. 'जनी'.] **जनीं सुखें साहती ॥ ६२ ॥**

**अवघियाही पुढें । भाडेकरीं नेले गाडे । राजस टणकती बापुडें । त्यापासीं भाडें जोडावया ॥ ६३ ॥**

**निघाले द्विजांचे संभार । संन्यासी चालले अपार । नागिवे चालिले दिगंबर । श्रीरामचंद्र पाहावया ॥ ६४ ॥**

[वा. रा. अ. कां. सर्ग ८३, श्लोक १, ५ (पूर्वार्ध), ४ (पूर्वार्ध) २, २.] ततः श्वेतैर्हयैर्युक्तमास्थाय स्यंदनोत्तमम् । प्रययौ भरतः श्रीमान्रामदर्शनकांक्षया ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

शतं सहस्राण्यश्वानां समारूढानि राघवम् । षष्ठी रथसहस्राणि धन्विनो विविधायुधाः ॥ ७ ॥
अग्रतः प्रययुस्तस्य सर्वे मंत्रिपुरोहिताः । अधिरुह्य हयैर्युक्तान्रथान्सूर्यरथोपमान् ॥ ८ ॥
नवनागसहस्राणि कल्पितानि यथाविधि । अन्वयुर्भरतं यांतं राजपुत्रं यशस्विनम् ॥ ९ ॥

**श्वेत वारुयुक्त रथ । त्यावरी हरिखें बैसे भरत । शत्रुघ्नेंहीं पेलिला रथ । श्रीरघुनाथ देखावया ॥ ६५ ॥**

[मु. प्रतीत या ओवीचे पहिले दोन चरण असे आहेत :——'पालखीमाजी कौसल्यावाहूनी । आणि सुमित्रा दुसरी जननीं ॥'] **पालकीमाजीं वावुनि । कौसल्या सुमित्रा जननी । निघाल्या येरीही राजपत्नी । श्रीरामदर्शनीं उद्यत ॥ ६६ ॥**

[मु. 'माता' हे अधिक पद.] **कैकयी न येचि निःशेष । तिसी जालें परमदुःख ।** [मु. 'न रामराव ना भरत देख'.] **राम ना रावो भरतही देख । काळें मुख केवीं दाऊं ॥ ६७ ॥**

**वसिष्ठादि ऋषि** [मु. 'समस्त'.] **महंत ।** [मु. प्रतींत 'महंत' हे अधिक पद.] **प्रधान सुमंतादि समस्त । त्यासी देऊनि उत्तम रथ । त्यांसमवेत निघाले ॥ ६८ ॥**

**षाष्ट्यायन भद्रजाती । दहा सहस्र उन्मत्त हस्ती । घंटा घांगुरलीं पताका बहुती । दोहीं** [मु. 'भागी'.] **बाहीं शोभती भरताच्या ॥ ६९ ॥**

**अतिरथी महारथी । साठी सहस्र** [मु. 'भद्रजाती'; तं. 'नृपती'.] **भूपति । भरता पाठीसी** [सु. नि. गे. घा. कं. 'धांवती'.] **चालती । रथ घडघडिती सायुध ॥ ७० ॥**

**रथांचिया गति विगुती । एकापरीस एक दाविती । त्यांमाजीं धनुष्यांची वित्पति । सहस्र गती साटोप ॥ ७१ ॥**

**शतसहस्र सुजाती वारू । निघाला वीरांचा संभारू । नाना अलंकारीं मनोहरु । करिति दुर्धरु सिंहनादु ॥ ७२ ॥**

**वारुवां बाणीळी मोहाळी ।** [मु. 'अंगटोप'.] **कंगलटोप रागावळी । पाखरां झळकती तेजाळी । वीर महाबळी आरूढ ॥ ७३ ॥**

**वारु तिपाई नाचती । हो हो मा मा जी जी** [त. सु. नि. गे. घा. खेरीज इतरत्र 'म्हणति'.] **करिती । दाऊनि अंतराळगति । वारु थापटिती महावीर ॥ ७४ ॥**

**कात्या त्रिशूळ तोमर । भिंडीमाळा चेंडू चक्र । गदा मुद्गल लहुडी थोर । आलें मोगर पायांचें ॥ ७५ ॥**

[मु. 'खेटक'; कं. 'खंडे'.] **खेड भाले जी अपार । पिलंगती पायांचे** [नि. घा. 'मोगर'.] **धनुर्धर । गर्जत आले फरशधर । माल दुर्धर तळपती ॥ ७६ ॥**

**सेळी साबळी शक्तियुक्त । अलंगाईत बागाईत । कोंतेकार अति उद्भुत । कटारहस्त** [तं. 'लघुहस्त'; मु.

‘लघुवेगी’; कं. ‘लघुबाधी’.] **लघुवेधी ॥ ७७ ॥**

**अढाऊं वोढणें धडकित्त । तुळवे त्यामाजी तळपत । हैकार थैकार पैं देत । वीर गर्जत पायांचे ॥ ७८ ॥**

**चातुरंग सेनासंभार । राघवसैन्य अति दुर्धर । भरत चालिला सत्वर । जाला गजर वाद्यांचा ॥ ७९ ॥**

**कुऱ्हाडी कात्या कोइते हस्तीं । भारापुढें वन छेदिती । मातीकामें नेणों किती । भूमीं सज्ञिती चालावया ॥ ८० ॥**

**भार चालिला अति दुर्धर । ठाकिलें भागीरथी तीर । देखोनि भरताचा भार । गुहक थोर क्षोभला ॥ ८१ ॥**

**कैसा** [नि. घा. ‘अति’ हे अधिक पद.] **राज्यलोभ दुर्धर । सख्या बंधु पडिलें वैर । भरतें सज्ञूनियां भार । श्रीरामचंद्र मारूं जातो ॥ ८२ ॥**

**माझा स्वामी रघुनाथ ।** [नि. घा. ‘तयाचा हा’.] **याचा करूं पाहे घात ।** [कं. मु. ‘मी’ हे अधिक पद.] **रणीं विभांडीन भरत । सैन्य समस्त छेदीन ॥ ८३ ॥**

गुहकोक्ति :——

अनु दाशरथीं रामं पित्रा राज्याद्विवासितम् । सामात्यो राज्यलोभेन हंतुं भरत उद्यतः ॥ १० ॥ [वा. रा. अ. कां. सर्ग ८४, श्लोक ४ (उत्तरार्ध), ५ (उत्तरार्ध).]
अद्य मे शरसंघातो मत्कार्मुकविनिःसृतः । निष्पतिष्यति गात्रेषु नरेषु गजयोधिषु ॥ ११ ॥
निविष्टा यत्र सेना सा सवाजिरथकुंजरा । तां च भूमिं करिष्यामि शरैः शोणितकर्दमाम् ॥ १२ ॥
मम दाशरथी रामो भर्ता बंधुःसुहृद्गुरुः । अहं तस्य हितार्थाय करिष्यामि सुदुष्करम् ॥ १३ ॥

**श्रीराम माझी माता पिता । श्रीराम माझा सुहृद्भर्ता ।**
**श्रीराम सद्गुरु निजात्मता । श्रीराम तत्त्वतां आत्मा माझी ॥ ८४ ॥**

**त्याचा करावया घात । ससैन्य जातसे भरत । याचा करीन मी निःपात । रामभक्त तैं सत्य ॥ ८५ ॥**

**मी श्रीरामाचा मेटकरी । ठेविलों असें गंगातीरीं । भरत** [तं. सु. नि. घा. ‘घेऊनी’.] **येथुनि कैश्यापरी । परतीरीं उतरेल ॥ ८६ ॥**

**निषादांसी सांगे गुहक ।** [तु. ‘सिद्ध करुनिया कटक’; कं. सु. गे. ‘आले भरत सैन्य अनेक’; नि. घा. ‘जरी भरथ येईल सकटक’.] **आले भरतसैन्य असंख्याक । दृढ राखावे गंगातटाक । गंगोदक शिवों नेदा ॥ ८७ ॥**

**हे जरी आले युद्धासी । तरी मी ख्याती लावीन त्यासी । धडमुंडांकित पृथ्वीसी । क्षणार्धेसी** [मु. ‘मी’ हे अधिक पद.] **करीन ॥ ८८ ॥**

**मारीन रथवाजी कुंजर । रणीं** [मु. ‘मारीन’.] **पाडिन नरवीर । वाहाती अशुद्धाचे पूर । तैसें** [नि. घा. ‘क्षात्र’.] **क्षेत्र**

करीन ॥ ८९ ॥

श्रीरामाच्या निजकार्यार्था । निःशेष वेंचीन जीविता । येथुनियां पुढें भरता । [मु. 'त्या'.] सत्य सर्वथा जावो नेदी ॥ ९० ॥

निधडे निषाद निःशंक । मेळऊनि निजकटक । सन्नद्ध [मु. प्रतीत हे पद नाही.] बद्ध स्वयें गुहक । सैन्यासन्मुख पैं आला ॥ ९१ ॥

भरता सांगती सैन्यक । युद्धासी आलासे गुहक । धरूनि गंगेचे तटाक । गंगोदक शिवों नेदी ॥ ९२ ॥

[मु. 'एक म्हणति राजा निमाला निशंक'.] राजा निमाला निःशेष । [मु. 'म्हणोनि' हे अधिक पद.] आम्हांसी परिका जाला गुहक । ताहाना फुटताती लोक । गंगोदक शिवों नेदी ॥ ९३ ॥

गुहक बापुडें तें किती । त्यासी क्षणार्धे लाऊनि ख्याति । आज्ञा द्यावी आम्हां प्रति । कोपें दळपती पुसतु ॥ ९४ ॥

विचारें बोलिला भरत । गुहक रामाचा अति आप्त । त्याचा नेघतां वृत्तांत । युद्ध कंदनार्थ करूं नये ॥ ९५ ॥

भरत पुसे गुहकासी । तूं कां युद्ध करूं पाहासी । [सु. गे. कं. घा. 'ते सत्य सांगे आम्हांसी । काय युद्धासी कारण ।'; कं. 'हे कां वैर आम्हां तुम्हांसी । अति युद्धासीं किंनिमित्य'.] येरू म्हणे तूं अति बळेंसी । मारूं कां जासी श्रीरामा ॥ ९६ ॥

[कं. सु. गे. प्रतींत ही ओवी नाही.] माझा स्वामी वनवासी । सबळ बळें [नि. घा. हे पद नाही.] तूं मांरू पाहासी । हेंचि वैर आम्हां तुम्हांसी । अति युद्धासी कारण ॥ ९७ ॥

[मु. 'तो म्हणे' ही अधिक पदे.] सद्गुरुचा द्वेष करी । तोचि आमुचा मुख्य वैरी । त्यासी निवटिन शस्त्रधारीं । प्रतिज्ञा खरी हे माझी ॥ ९८ ॥

आइकोनि गुहकाचा वचनार्थ । रथावरूनि पडिला भरत । [सु. गे. 'दुःख शोके अति मूर्च्छित'.] दुःखें गडबड्यां लोळत । [मु. 'अवस्था प्राणांत ओढवली'.] वचनें प्राणांत वोडवला ॥ ९९ ॥

भरत म्हणे गुहकासी । वेगी वधी मज पापियासी । कैकया जोडिल्या पापराशी । केलों जगासी अति निंद्य ॥ १०० ॥

कैकयी राज्यलोभाची थोरी । तिणें मीं केलों रामाचा वैरी । तिचेनि [नि. घा. 'मी' हे अधिक पद.] निंद्य चराचरीं । दुःखसागरीं निमग्न ॥

जे श्रीरामासी स्वयें द्वेषी । त्यासी उतरती तिन्हीं मसी ।
ते कैकयी आर्जवाची मसी । माझ्या मुखासीं लागली ॥ १०२ ॥

अनुक्रमणिका

तिणें मी जालों काळमुखा । मुख दाऊं न शके लोकां ।
कैकया दिधलें परम दुःखा । [मु. 'तें' हे अधिक पद.] कोणासी गुहका मी सांगो ॥ १०३ ॥

गुहका धरितों तुझे चरण । वेगीं सोडुनि निर्वाण बाण । छेदी माझें देहबंधन । पापा पुरश्चरण होईल ॥ १०४ ॥

तूं श्रीरामाचा [मु. 'परम'.] अति आप्त । तरी माझाही सखा निश्चित ।
माझा करावया वचनार्थ । प्रायश्चित्तार्थ देह छेदी ॥ १०५ ॥

आइकोनि भरताचें वचन । गुहकें घातलें लोटांगण ।
मस्तकीं धरिले दृढ चरण । पडिलें आळिंगण अति आप्तता ॥ १०६ ॥

दोघांसी प्रेमपूर्ण । नयनीं स्वानंद जीवन । [नि. 'गुहकें घातलें लोटांगण'.] उल्हासोनि गुहक जाण । काय आपण बोलतु ॥ १०७ ॥

श्रीरामीं ज्याची पूर्ण भक्ति । तो मज आप्त त्रिजगतीं । तोचि माझा निज सांगाती । मी चरणार्थी तयाचा ॥ १०८ ॥

[मु. 'तंव' हे अधिक पद.] गुहकांसी सांगे सुमंत । राज्य देतां नेघेचि भरत ।
राज्यीं अभिषेकावया रघुनाथ । वना असे जातु आणावया ॥ १०९ ॥

आइकोनि सुमंताची गोठी । भरताचें प्रेम देखोनि दिठीं ।
गुहकें चरणीं घातली मिठी । [मु. 'म्हणे' हे अधिक पद.] धन्य सृष्टीं भरता तूं ॥ ११० ॥

गुहक सांगातें घेऊन । भरतें केलें संध्यास्नान । करूनिया पितृतर्पण । गुहकासी आपण पूसतु ॥ १११ ॥

गंगातीरीं एकी राती । श्रीरामें केली होती वस्ती । शयन केलें कोणे [कं. तु. सु. नि. गे. घा. 'स्थिती'.] क्षितीं । ते मज प्रति दाखवी ॥ ११२ ॥

गुहक जो निषादपति । तेणें भरत धरूनि हातीं । जेथें श्रीरामें केली वस्ती । त्या स्थळाप्रति आणिला ॥ ११३ ॥

[मु. प्रतीत हा श्लोक नाही; वा. रा. अ. कां. सर्ग ८७, श्लोक २२.] एतदिंगुदीमूलमेतदेव च तत्तृणम् । यस्मिन् रामश्च सीताच तां रात्रीं शयितावुभौ ॥ १४ ॥

गुहक सांगे भरताजवळी । याचि इंगुदी वृक्षाचां मुळीं । श्रीराम राहिला महाबळी । ये गंगाजळीं स्नान केलें ॥ ११४ ॥

अनुक्रमणिका

येचि तृणसेजें रघुनंदन । सीतेसहित केलें शयन । निद्रा न करीच लक्ष्मण । बहु प्रार्थन म्यां केलें ॥ ११५ ॥

तो म्हणे श्रीराम सेवा समाधान । न करी जडमूढ शयन । ऐकतां भरता आलें रुदन । मूर्च्छापन्न तो पडिला ॥ ११६ ॥

भरत पडिला मूर्च्छापन्न । [तं. 'शत्रुघ्न जाला निमग्न'; मु. 'शत्रुघ्न जाला अति उद्विग्न'.] शत्रुघ्न पडिला विसंज्ञ ।
कौशल्या सुमित्रा हडबडून । आल्या धांवोन राजपत्न्या ॥ ११७ ॥

[कं. सु. गे. 'काय वनवासी आली वार्ता'; नि. घा. 'वनवासींची ऐकिली वार्ता'.] वनवासींची आली वार्ता । तेणें अतिदुःख शत्रुघ्ना भरता ।
वनीं क्षेम रघुनाथा । लक्ष्मण सीता सुखी आहेती ॥ ११८ ॥

काय वनवासीची कथा । वेगीं सांगावी गा भरता । दुःखें रुदन करिती माता । श्रीरघुनाथाचेनि विरहें ॥ ११९ ॥

गुहक सांगतां करी रुदन । ये वृक्षीं राहिला रघुनंदन । श्रीरामसीता केलें शयन । तें हें पावन तृणसेजें ॥ १२० ॥

वृक्ष वंदितों मी वोजा । नित्य पूजितों तृणाची सेजा । [नि. घा. 'पंथीच्या'.] येथीच्या वंदिता पैं राजा । श्रीरघुराजा पदनिष्ठ ॥ १२१ ॥

आइकोनि गुहकाची वाणी । भरत लागे त्याच्या चरणीं ।
[मु. प्रतीत 'म्हणे' हे अधिक पद.] गुहका धन्य धन्य तूं त्रिभूवनीं । श्रीरामभजनीं शुद्ध प्रेम ॥ १२२ ॥

श्रीरामभावें गा संपूर्ण । तूं वंदिसी वृक्ष तृण । याही परतें [मु. 'लाभ'.] भाग्य कोण । सूक्ष्म भजन निजनिष्ठा ॥ १२३ ॥

धन्य धन्य गुहका तुझा भावों । तुज तुष्टला श्रीरामरावो । फिटला देहबुद्धिसंदेहो । निःसंदेहो रामभजनीं ॥ १२४ ॥

गुहक निषाद अति पवित्र । श्रीरामभजनें जाला पुनीत । दीनदयाळु श्रीरामचंद्र । नामें पवित्र महादोषी ॥ १२५ ॥

गुहकाची अनन्य भक्ति । देखोनि भरता अति प्रीति । विषाद सांडूनिया चित्तीं । जाले सांगाती जिवलग ॥ १२६ ॥

श्रीराम सीता तृणसेजार । कौसल्या देखोनि साचार । दुःख दाटलें दुस्तर । काय उत्तर बोलिली ॥ १२७ ॥

अनुक्रमणिका

सीता सती अति सकुमार । श्रीराम सुकुमुरां सुकुमार । सुमनसेज खुपे साचार । तृणसेजार त्यांसी देखा ॥

राजान्न सेविती पवित्र । त्या तिघां लंघन त्रिरात्र । कैकया केलें हें [त. सु. नि. गे. घा. ‘विचित्र’.] चरित्र । सखे सावत्र दुःखी केले ॥ १२९ ॥

ऐसी चालितां उपपत्ति । निमिषामाजीं गेली राती । उदया आला पैं गभस्ति । निषादाप्रति गुहक बोले ॥ १३० ॥

भरत उतरेल परपार । नावा आणा रे सत्वर । घंटा पताका साळंकार । मृद अरुवार बैसणियां ॥ १३१ ॥

रथवाजी हस्ती युक्त । स्तोमें स्तोम जें जेथिंचा तेथ । कटक उतरलें समस्त । अति विस्मित तेणें भरत ॥ १३२ ॥

गुहक जो कां निषादपति । नावा घेऊनियां हातीं । स्वयें आला भरताप्रति । करी विनंती आरुढा ॥ १३३ ॥

वसिष्ठाच्या चरणांवरी । गुहक लोटांगण करीं । तुम्ही तारक भवसागरीं । [मु. ‘स्वामीं’ हे अधिक पद.] नावेवरी बैसावें ॥ १३४ ॥

वसिष्ठें देखोनियां गुहकासीं । निजात्म प्रीतिं आळंगी त्यासी ।
आजीचा तारक तूं आम्हां होसी । परपारासीं न्यावया ॥ १३५ ॥

गुहक म्हणे गुरुनाथा । तारक तुझी कृपा तत्त्वतां । कृपेनें हातु ठेवी माथा । मी समस्तां तारीन ॥ १३६ ॥

ऐसी गुहकें बोलतां बोली । वसिष्ठा निजखूण पावली । हरिखे पिटुनियां टाळी । नावेजवळी तो आला ॥ १३७ ॥

वसिष्ठादि महंत थोर । त्यांसी नाव दिधली स्वतंत्र । ते नव्हती परतंत्र । भवसमुद्रतारक ॥ १३८ ॥

राजपत्न्या अति सकुमार । त्यांसी नाव दिधली थोर । मृदु आस्तरणें सपरिकर । तेथ समग्र बैसविल्या ॥ १३९ ॥

भरत शत्रुघ्न नावेवरी । निशाण त्राहाटिलिया भेरी । नाना वाजंत्रे जयजयकारीं । परपारीं उतरले ॥ १४० ॥

भरत पुसे गुहकातें । सैन्य लावावें कोणें पंथें । तो म्हणे मी येतों सांगातें । भूयाळांते घेऊनि ॥ १४१ ॥

[सु. नि. गे. घा. कं. प्रतींत पुढील दोन ओव्या अधिक आल्या आहेत :——‘गुहक अति हर्षयुक्तें । चालिला भरताचे सांगाते । दृष्टी पहावया श्रीरामाते । बाह्य स्वार्थातें सांडूनी ॥ १ ॥
मुमुक्षुवा साधनी अति प्रीती । तैसी गुहका श्रीरामभक्ती । भुयाळ घेऊनि सांगाती । मार्ग शोधिती अति निष्टा ॥ २ ॥’] भरत गुहकांचा वेवाद । दोघां अनुतापें संवाद । एका जनार्दनीं बोध । परमानंद रामकथा ॥ १४२ ॥

अनुक्रमणिका

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां भरतगुहकसंवादे गंगातरणं नाम द्वादशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग तेरावा

## भरद्वाजाश्रम आगमन—भरत पूजन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

[भा. /२. प्रतीत पहिल्या १७ ओव्या असलेली पाने नाहीत.] भरतें गंगा उतरोन । केलें स्नान संध्यातर्पण । आजीची वस्ती प्रयागस्थान । म्हणौनि निशाण त्राहाटिला ॥ १ ॥

रथ गज वाजी वीरश्रेणी । चालतां नुपरे मार्ग धरणी । पुढां देखिली त्रिवेणी । दूत गर्जोन सांगती ॥ २ ॥

[मु. प्रतीत पहिले दोन चरण असे आहेत :–– 'देखोनी त्रिवेणी भरत शत्रुघ्न । दोघीं घातलें लोटांगण ॥'] देखोन त्रिवेणी दर्शन । भरत आणि पैं शत्रुघ्न । दोघीं घातलें लोटांगण ।

[कं. प्रतीत शेवटचा चरण 'पादत्राण त्यागुनी' असा आहे.] त्यजुनियां पादत्राण [तं. 'चरणीं निघाले'.] चरणचाली निघाले ॥ ३ ॥

वसिष्ठादि ऋषेश्वर । चरणीं चालती सत्वर । देखोनी त्रिवेणीचें तीर । जयजयकार तिहीं केला ॥ ४ ॥

देऊनि लक्ष लक्ष गोदान । भरत शत्रुघ्नें केलें स्नान । तीर्थश्राद्ध पिंडदान । पितृतर्पण तिहीं केलें ॥ ५ ॥

तीर्थोपवास मुंडण । रायासी नाहीं हें बंधन । वसिष्ठ सद्‌गुरु सज्ञान । तीर्थ विधान तो करवी ॥ ६ ॥

[तं. 'मातेचें'.] मागत्याचें निवें मन । तैसें वांटविलें धन । सुखी केलें [मु. 'तीर्थवासी ब्राह्मण'.] तीर्थब्राह्मण । दीन जन सुखी केलें ॥ ७ ॥

द्रव्य वांटितां भरत । [तं. 'मागुती जाली कृतार्थ'; मु. 'मागते जाले कृतार्थ'.] मागतीं जालीं कृतकृत्यार्थ । सुखी केलें तीर्थ [मु. 'तीर्थस्थ'.] समस्त । श्रीरघुनाथ मज भेटों ॥ ८ ॥

द्विज बोलती द्विजापासीं । श्रीराम आला होता तीर्थासी । निःशेष द्रव्य नाहीं त्यासी । वल्कलवासी जटाधारी ॥ ९ ॥

त्याचें देखतां श्रीमुख । तीर्थी सकळां जालें सुख । त्यापुढें द्रव्य तुच्छ देख । अलौकिक सुख रामें ॥ १० ॥

भरद्वाज येऊनि साउमा । तेणें आश्रमा नेलें श्रीरामा । तोचि जाणे श्रीराममहिमा । मूर्खां आम्हां न कळेचि ॥ ११ ॥

तीर्थ ब्राह्मणा [मु. 'लोलुप'; तं. 'भूरीं'; त. 'लोलुप्त'.] लुलू बहुत । वल्कलधारी श्रीरघुनाथ । द्रव्य वांटील [पै. तं. खेरीज इतरत्र 'राजसूत'.] महाराजसुत । असेल गुप्तधन [पै. त. तु. 'यासी'.] यापासीं ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

**अति समर्थ रघुपती । वना न वचे रिता हातीं । धन वांटील हा तीर्थी । द्रव्यलाभार्थी ब्राह्मण ॥ १३ ॥**

**जेथवरी द्रव्यदाराअभिमान । जेथवरी ज्ञानगर्व गहन । त्यासीं श्रीरामाचें महिमान । स्वप्नींहीं जाण लक्षेना ॥ १४ ॥**

**लोभेंही श्रीरामाचें मुख । पाहातां आम्हां झालें सुख ।** [मु. ‘परी’ हे पद अधिक.] **महिमा नेणों आम्ही मूर्ख । सुखदायक श्रीराम ॥ १५ ॥**

**वाल्मीकापासीं संपूर्ण । ज्ञानकांडाचें श्रवण । भरद्वाजें केलें आपण । अति सावधान श्रद्धेनें ॥ १६ ॥**

**जालिया श्रवणनिष्पत्ती । श्रीराम देखें सर्वभूतीं । यालागीं त्याची श्रीरामीं भक्ति । भावें रघुपति स्वाश्रमा नेला ॥**

**ऐसिया ब्राह्मणाची कथा । आइकोनि भरतासी अवस्था । श्रीराम सर्वांसीं सुखदाता । मज अभाग्यता मायेची ॥ १८ ॥**

**करूनि वसिष्ठासीं नमन । भरत बोलिला** [मु. ‘आपण’.] **वचन । भरद्वाजें पूजिला रघुनंदन । त्याचें दर्शन आम्हीं घेवों ॥ १९ ॥**

**वसिष्ठ म्हणे धन्य वाणी । हेंचि होतें माझां मनीं । भरद्वाज ऋषिशिरोमणी । चाला तत्क्षणीं भेटीसी ॥ २० ॥**

**कटक ठेऊनि गंगातीरीं । भरत वसिष्ठादि ऋषेश्वरीं । भरद्वाजाश्रमाभीतरीं । आले झडकरी भेटीसी ॥ २१ ॥**

**भरद्वाजें उठूनि आपण । वसिष्ठासी घाली लोटांगण । वसिष्ठें दिधलें आलिंगन । समाधान दोघांसी ॥ २२ ॥**

**इतरहि ऋषिजन । भरद्वाज वंदी आपण । भरत आणि शत्रुघ्न । घालिती लोटांगण भरद्वाजा ॥ २३ ॥**

**भरद्वाजें त्या दोघांसी । आळंगिलें हृदयेसीं । स्वागत पुसोनि त्यासी । काय त्यापासीं बोलतु ॥ २४ ॥**

भरद्वाजोक्ति :

[तं. सु. गे. प्रतींत श्लोक १ ते ३ नाहीत.] कच्चिन्न तस्य रामस्य धार्मिकस्य क्षमावतः । त्यक्तस्नेहो राज्यलोभान्न निहंतुमिहागतः ॥ १ ॥
कच्चिन्न तस्या पापस्त्वं पापं कर्तुमिहेच्छसि । अकंटकं भोक्तुमना राज्यं राजीवलोचन ॥ २ ॥ [वा. रा. अयो. कांड, सर्ग ९०, श्लोक १३.]
न खल्वकार्यं कार्य ते पाप तस्मिन्महात्मनि । यदसौ त्वत्कृते पित्रा वनवासे विवासितः ॥ ३ ॥

**भरद्वाज म्हणे** [मु. हे पद नाही.] **गा भरता । सज्जूनि सैन्या समस्ता । वनीं वधूं जासी रघुनाथा । राज्यलोभार्था लक्षूनी ॥ २५ ॥**

अनुक्रमणिका

राज्य भोगावया निःकंटक । वधूं पाहासी रघुटिळक । पापकारी तूं अति मूर्ख । परम दुःख पावसी ॥ २६ ॥

मिळाल्या दैत्यदानव । यक्ष राक्षस आणि मानव । रणीं न जिंकवे राघव । तो तूं बाळभाव [भा. /२ मु. 'केवी'.] कें वधिसी ॥ २७ ॥

श्रीरामाची क्रोध भृकुटी । रणा [मु. 'रणीं आटील'.] आणील सकळ सृष्टी । तेथ तुझी कायिसी गोठी । रुद्र संकटीं [मु. 'राहूं'.] साहों न शके ॥ २८ ॥

सैन्य श्रीरामाचें संपूर्ण । तें तंव युद्ध न करी जाण । क्षोभलीया लक्ष्मण । घेईल प्राण दोघांचा ॥ २९ ॥

भरता मानीं माझें वचन । तूं अयोध्येसी जाय परतोन । चौदा वर्षें राज्य करुन । रिघावें शरण श्रीरामा ॥ ३० ॥

भरद्वाजाचें वचन । वज्रप्राय अति तीक्ष्ण । हृदयीं भेदिलें दारुण । भरत प्राण सांडु पाहे ॥ ३१ ॥

ऐकतां भरद्वाजवचन । भरत पडे मूर्च्छापन्न । म्हणे मज कां न ये मरण । करी रुदन अति दुःखें ॥ ३२ ॥

कैकयी राज्यलोभाची थोरी । जगीं मीं केलों रामाचा वैरी ।
भरत जाऊनिं वनांतरीं । श्रीरामातें मारी जग बोलें ॥ ३३ ॥

कैकयी मातेचा अति अनर्थु । वना जाउनियां भरतु । करील श्रीरामाचा घातु । जगाआंतु प्रवादु ॥ ३४ ॥

तुम्हांसारिखें साधुसंत । म्हणती वना जाऊनि भरत । करील श्रीरामाचा घात । तऱ्ही देहान्त नव्हे माझा ॥ ३५ ॥

मी काय वज्रांचा घडिलों । कीं अपेशाचा वोतिलों । दुःख दुर्धरीं जन्मलों । निंदेचा [मु. 'जालों'.] निर्मिलों मेरू जैसा ॥ ३६ ॥

मी तंव अपेशाचें आयतन । अपकीर्तीचें अधिष्ठान । जळो माझें काळें वदन । देहबंधन छेदवेना ॥ ३७ ॥

श्रीरामद्वेषी पापी परम । राज्यलोभें अति अधम । शाप देऊनियां दुर्गम । माझें भस्म करी वेगें ॥ ३८ ॥

ऐसें म्हणोनि भरतें आपण । भरद्वाजाचे धरिले चरण । माझिया पापा पुरश्चरण । शाप दारुण स्वामीचा ॥ ३९ ॥

ऐसें बोलतां आलें रुदन । भरत पडिला मूर्च्छापन्न । देखोनि भरताचें प्रेम पूर्ण । आलें स्फुंदन भरद्वाजा ॥ ४० ॥

सर्वांग जालें रोमांचित । प्रेमें चळचळां कांपत । म्हणे धन्य धन्य तूं भरत । प्रेमा अद्‌भुत श्रीरामीं ॥ ४१ ॥

अनुक्रमणिका

उचलूनि दोहीं हातीं । आळंगिला अतिप्रीतीं । रामभक्तांचे पायींची माती । अहोरातीं मी वंदी ॥ ४२ ॥

श्रीरामीं ज्याची अनन्य प्रीती । श्रीरामीं ज्याची अनन्य भक्ति ।
श्रीरामीं ज्याची अनन्य गती । निज सांगाती तो माझा ॥ ४३ ॥

श्रीरामीं ज्याचें अनन्य भजन । त्याचें आम्ही करूं [मु. 'ध्यान पूजन'.] ध्यान । त्याचेनिं आम्हां समाधान । सत्यवचन हें माझें ॥ ४४ ॥

भरता भरद्वाजाचा प्रेम पूर्ण । देखोनि हरिखेले ऋषिगण । जयजयकारें केलें गर्जन । सुख संपूर्ण वसिष्ठासी ॥ ४५ ॥

वसिष्ठ बोलिला आपण । भरता राज्य म्यां देतां जाण । तेणें शिवोनि माझे चरण । निर्वाण आण वाईली ॥ ४६ ॥

सांडूनिया रघुनाथा । राज्याभिषेकु होय भरता । तैं म्यां वधिलीं मातापिता । सद्‌गुरुघाता म्यां केलें ॥ ४७ ॥

श्रीरामाची राजधानी । ते तंव माझी सखी जननी । ते जैं भोगी [पै. खेरीज इतरत्र हे पद नाही.] मी अभिषेचनीं । तैं मात्रागमनीं मी जालों ॥ ४८ ॥

ऐसी वावोनियां आण । भरत राज्य नेघेचि जाण । शीघ्र करावया वनप्रयाण । तेंही कारण अवधारी ॥ ४९ ॥

भरतें जाऊनि रामाप्रती । राज्य द्याविया रघुपती । अयोध्ये आणावया मागुती । ऐसिया [पै. 'प्रति'.] प्रीती जातुसे ॥ ५० ॥

ऐकोनि भरताचें निर्वाण । भरद्वाज विस्मयपूर्ण । हरिखें नाचोनि आपण । दिधलें आळिंगण भरता ॥ ५१ ॥

पुडतीं नमन पुडतीं आळिंगण । पुडती त्याचें वंदी चरण । भरद्वाजाचें प्रेम पूर्ण । आपण्या आपण विसरला ॥ ५२ ॥

वाल्मीकी गुरुची आज्ञा पूर्ण । भगवद्भक्तां द्यावें आळिंगण । तेणें शरीर अति पावन । समाधान जिवशिवां ॥ ५३ ॥

ऐस ऐसिया अनन्य प्रीतीं । भरतपूजनीं वाढली भक्ति । वसिष्ठ पूजावया ब्रह्ममूर्ति । उल्हासु चित्तीं भरद्वाजा ॥

वसिष्ठ केवळ ब्रह्मपूर्ण । परमभाग्य त्याचें आगमन । भरत रामभक्त अनन्य । करूं पूजन यथोक्त ॥ ५५ ॥

केलें वसिष्ठासीं नमन । आजी घ्यावें माझें पूजन । माझे आश्रमीं निजभोजन । ऋषिजन समयोगें ॥ ५६ ॥

अनुक्रमणिका

**वसिष्ठासवें ऋषिगण । आले असती कोण कोण । ज्याचें करितां नामस्मरण । पुरश्चरण महादोषां ॥ ५७ ॥**

**कश्यप कात्यायन वामदेव । जाबाली मुग्दल मार्कंडेय । गौतम ऋषि महानुभाव । ऋषिसमुदावो निमंत्रिला ॥ ५८ ॥**

**मग बोलिला भरताप्रति । भोजना यावें तुम्हीं समस्तीं । आम्हीं दोघे येवों ऋषिपंक्ति । चाड बहुतीं तुज काये ॥**

**भरता तुझें जितकें कटक । अश्व गज अवघे रामसेवक ।** [सु. गे. 'ते मज पूज्य आवश्यक । त्या समस्ता देख आणावें ॥'; नि. घा. 'ते मज पूजापूज्य आवश्यक । त्या समस्ता देख आणावें ॥'.] **ते मज पूज्य आवश्यक । एकेएक आणावें ॥ ६० ॥**

**समग्र सैन्य उतरावयासी । माझे आश्रमीं अवकाशु त्यासीं । प्रेमें आज्ञापी भरतासी । अति उल्हासी भरद्वाज ॥**

**करावया** [मु. 'ऋषीचें पूजन'.] **ऋषिराजपूजनीं ।** [मु. 'जरी' हे पद अधिक.] **आणावी कामधेनु मागोनी ।** [मु. 'तरी' हे पद अधिक.] **होईल** [नि. घा. 'जमदग्नीचें चिन्ह'.] **जमदग्नीच्या वाणी । राजे देखोनि अभिळाषिती ॥ ६२ ॥**

भरद्वाज उवाच—

[तं. श्लोक ४ व ५ नाहीत; सु. गे. प्रतींत ४ था श्लोक आहे.] समाधिमवलम्ब्याथ भरतस्य तु पूजने । वसिष्ठप्रमुखा विप्राः संप्राप्ता मेऽद्य चाश्रमम् ॥ ४ ॥
परमं रत्नमासाद्य दिव्यज्ञानान्वितो मुनिः । आतिथ्यार्थे भरद्वाजः स्वर्गभोगान्समानयत् ॥ ५ ॥

**भरद्वाज महामुनी । बैसोनिया अनुष्ठानीं । स्वर्ग आणिला आकर्षुणी । पूजेलागुनी आश्रमा ॥ ६३ ॥**

**घरें चत्वरें पट्टिशाळा । अश्वशाळा गजशाळा । जन बैसावया विश्रामशाळा । अति विशाळा विचित्रा ॥ ६४ ॥**

[मु. 'चित्रवन'.] **चैत्रवन नंदनवन । तेथ आणिलें** [नि. घा. 'खांडववन'.] **आनंदवन । तेणें आश्रम शोभायमान । राजे ऋषिजन विस्मित ॥ ६५ ॥**

**घृतकुल्या मधुकुल्या । आम्ररसें वापी भरल्या । इक्षुरसें नदी वाहों लागल्या । सरिता भरल्या दहीदुधें ॥ ६६ ॥**

**नाना परींच्या शिखरिणीं । तेणें भरिल्या पोखरणीं । शर्कराचे पर्वत धरणीं । फळ श्रेणीं स्वादिष्ट ॥ ६७ ॥**

[मु. 'चंपक' इतरत्र 'संतान'.] **शतानुशत कल्पद्रुम मांदार । पारिजातादि विचित्र हार । पूजावया ऋषि राजकुमर । सुमनसंभार सुवास ॥ ६८ ॥**

**उगाळूनि शुद्ध चंदन । भरिलें कनकाचे रांजण । षड्रसेंसी दिव्यान्न । नाना पक्वान्न परवडी ॥ ६९ ॥**

अनुक्रमणिका

ऐसीं [मु. 'पूर्ण' हे अधिक पद.] दिव्यान्नें सुवर्णताटीं । नानारसीं भरली वाटी । परमानंदें पडे मिठी । शाखा गोमटीं लोणिचीं ॥ ७० ॥

ठाईं ठाईं अति निर्मळ । सुवासित शीतळ जळ । सेवितांचि पैं तात्काळ । सबाह्य सकळ निवताती ॥ ७१ ॥

दिव्यांगना अति सुंदरी । व्यजन घेऊनियां करीं । वीजिताती ढांळेकरी । त्यांसी जेव्हणारीं भाळिजे ॥ ७२ ॥

पाहातां त्यांच्या तोंडाकडे । जेवण अंतरलें पुढे । जेवण्हार झाले वेडे । अंगनाकडे पाहतांचि ॥ ७३ ॥

त्यांच्या मुखाची पाहातां वास । देखतां हावभाव विलास ।
हातीचें हातीं राहिले ग्रास । जाहला स्पर्श वायसांचा ॥ ७४ ॥

जेवण अंतरलें पुढे । सचैल स्नान करणें [तं. भा. सु. नि. गे. घा. 'घडे'.] पडे । सकाम ठकले रोकडे । अति तडफडे चडफडिती ॥ ७५ ॥

श्रीरामाचे निजभक्त । अंगनामुखें नव्हती आसक्त । ग्रासोग्रासीं राम स्मरत । जाले तृप्त स्वानंदें ॥ ७६ ॥

[तं. हा श्लोक नाही.] कवले कवले च गोविंदं स्मरन्भुंक्ते तु यो नरः । तत्र भोक्ता हरिः साक्षान्मुक्तः स्यान्नात्र संशयः ॥ ६ ॥

ग्रासोग्रासीं राम स्मरत । ते भोजनीं भोक्ता श्रीरघुनाथ । जेव्हणार तो नित्य मुक्त । श्रुतिसंमत शास्त्रार्थे ॥ ७७ ॥

ऐसी हे भोजनाची स्थिती । [नि. घा. 'सकाम हे निष्काम प्रयुक्ति'; सु. गे. 'सकामता काम प्रयुक्ति'; तं. 'सकाम निष्काम प्रकृति'; स. 'सकाम निष्काम प्रवृत्ति'.] सकाम निष्काम प्रयुक्ती । जे जे रसीं ज्या आसक्ती । ते ते सेविती तो रसु ॥ ७८ ॥

वसिष्ठ ताटीं परवडी चोख । तैसेंचि ताट सेविती रंक । उंच नीच नाहीं देख । जेविलें कटक समतृप्ती ॥ ७९ ॥

न लगे मागणें नाहीं वाढणें । ठाइंचीं सरों नेणती अन्नें । जे जे आवडी ज्या कारणें । तेणें सेवणें ते गोडी ॥ ८० ॥

क्षुधा हारपली तेथ । तृषा तृषेसी जाहाली तृप्त । तृप्त जाहालें सैन्य समस्त । कोण्हीही अतृप्त असेना ॥ ८१ ॥

अश्व गज न खाती तृण । त्यांसीहीं वोगरिलें मिष्टान्न । कोरडे न पाजिती जीवन । करिती क्षीरपान स्वादिष्ट ॥

चाटे [घा. प्र. हे पद नाही.] भाटे उदिमी लोक । वाणी वेव्हारे सकळिक । रजक आदिकरुनि चर्मक । एकेएक [मु.

अनुक्रमणिका

एकैक तृप्त जाले.] नित्यतृप्त ॥ ८३ ॥

वसिष्ठ भरत आणि शत्रुघ्न । ऋषिं केलें शुद्धाच्मन । सभा बैसली प्रसन्नवदन । सुख संपूर्ण सर्वांसी ॥ ८४ ॥

टिळे माळा गंधाक्षता । विडे दिधले समस्तां । पूजितां श्रीरामाच्या भक्तां । उल्हासतां भरद्वाजु ॥ ८५ ॥

वनश्री मघमघीत मनोहर । पराग उधळत सपूर । सामगान अति मधुर । तैसे भ्रमर रुणझुणिती ॥ ८६ ॥

कोकिळा वेदवादें कूजती । वेदांत पारापतें घुमती । तांडव नाचे उमापति । तैसे नाचती मयूर ॥ ८७ ॥

ब्रह्मज्ञानाच्या निजयुक्ती । फळाशा सांडुनी शुक बोलती । पिंगळा त्यासी संवादती । संतोषती सारिका ॥ ८८ ॥

विवेकद्राक्षीचे पैं घड । देखतां डोळ्यां पुरें कोड । सकळां गोडियां ते [मु. हे पद नाही.] गोडी गोड । [पै. खेरीज इतरत्र ‘सुख सुरवाड’.] सुख वाड सेविलियां ॥

हा हा हू हू गंधर्व दोन्ही । मधुर स्वरें गाती गाणीं । रंभा उर्वशी विलासिनी । रंगीं नाचणी नाचती ॥ ९० ॥

प्रकाश न लोपे सूर्यापुढे । ऐसे रत्नदीप चोखडे । उजळिले वाडेकोडे । चहूंकडे लखलखित ॥ ९१ ॥

ज्या दीपामाजीं जळमळ । पुढां काजळी माथां काजळ । ते मालउनि सकळ । [नि. घा. ‘चिद्रत्नाचे उजळिले दीप’; सु. गे. ‘चिद्रत्न दीप प्रबळ उजळिले’.] चिद्रत्नाचे प्रबळ उजळिले दीप ॥

प्रतिपुरुषीं भिन्न वोवरी । रत्नमंचक त्या माझारीं । पुरुषाप्रति पांच नारी । सेवेवरी तिष्ठती ॥ ९३ ॥

एकी करिती चरण क्षाळण । एकी ते चरणसंवाहन । एकी चंदन एकी व्यजन । विडिया जाण एकी देती ॥ ९४ ॥

अप्सरा पुरुषांसीं बोलती । आम्ही न यो अयोध्येप्रति ।
[त. ‘आजीचि करमुनिया रात्रीं’; नि. घा. ‘आजीचि कामिलिया रात्रीं’.] वना आम्हीं न यो निश्चितीं । जाऊनि मागुती स्वर्गासीं ॥ ९५ ॥

भरद्वाजाचें [पै. भा. तु. खेरीज इतरत्र ‘ध्यानज्ञानें’.] ध्यानाज्ञेन । आमुचें येथें आगमन । दिवस उगवतांचि जाण । स्वर्गां गमन आम्हांसी ॥ ९६ ॥

जवळी असतां अप्सरांसी । श्रीरामभक्त उदास त्यांसी । भूतीं देखतां भगवंतासी । स्त्री पुरुषासीं अभावो ॥ ९७ ॥

मुळीं आत्मा आत्मीं नाहीं । तेथें स्त्री पुरुष मिथ्या पाही ।

अनुक्रमणिका

स्त्री पुरुष भास भासे देहीं । ते देहबुद्धि नाहीं हरिभक्तां ॥ ९८ ॥

विषयी पुरुष सहित नारी । स्वर्ग भोगिती घरोघरीं । भरद्वाज ऐसिया परी । पूजा करी भरताची ॥ ९९ ॥

कोण्ही नाहीं मळीनवास । कोण्ही नाहीं मळीन केश । कोण्ही नाहीं मळीनाभास । स्वर्ग उल्हास सर्वांसी ॥ १०० ॥

अश्व गज [मु. हे पद नाही.] गो खर उष्ट्र । मिष्टान्न भक्षिती तृणचर । जळप्राशनीं प्राशिती क्षीर । केलें विचित्र भरद्वाजें ॥ १०१ ॥

वाल्मीकरामायणा आंत । स्वर्गभोग लिहिले बहुत । तितुका नाहीं वाढविला ग्रंथ । संकळितार्थ बोलिलों ॥ १०२ ॥

भरद्वाजाचें परमज्ञान । स्वगृहीं क्षणेक धरुनि ध्यान । स्वर्गभोग आकर्षून । केलें पूजन समस्तां ॥ १०३ ॥

राव रंक समसमान । भरद्वाजें केलें पूजन । आश्चर्य करिती सकळ जन । भरत शत्रुघ्न विस्मित ॥ १०४ ॥

स्वर्गीं केवळ अमृतपान । देवांसीं स्वर्गी न मिळे अन्न । अमृतेसहित मिष्टान्न । दिधलें भोजन भरद्वाजें ॥ १०५ ॥

नाहीं आणिली कामधेनु । नाहीं वेंचिलें संचित धनु । स्वर्ग आणिला आकर्षूनु । क्षणार्ध ध्यानु धरुनी ॥ १०६ ॥

ऐसें ऋषिवर्य बोलती । भरत शत्रुघ्न चकित चित्तीं । संवाद करितां सरली राती । उदयप्राप्ती हों आली ॥ १०७ ॥

भरत पुसे भरद्वाजासीं । स्वामीनें आज्ञा द्यावी आम्हांसी । जाईन श्रीरामभेटीसी । म्हणौनि पायांसी लागला ॥

भरद्वाजें आल्हादयुक्त । प्रीतिनें आलिंगला भरत । चित्रकूटीं श्रीरघुनाथ । तुज निश्चित भेटेल ॥ १०९ ॥

आइकोनि भरद्वाजाची गोष्टी । भरतें बाधिली शकुन गांठी । चरण वंदिले लल्हाटीं । पाठी थापटी भरद्वाज ॥

भरद्वाजें येवोनि आपण । वसिष्ठादि ऋषिगण । त्यासीं घातलें लोटांगण । वंदिले चरण वसिष्ठाचे ॥ १११ ॥

वसिष्ठाचे निजचरण । स्वर्गेसीं वोळगे पाकशासन । तुझेनि चरणप्रभवें जाण । केलें पूजन भरताचें ॥ ११२ ॥

अनुक्रमणिका

वसिष्ठ म्हणे भरद्वाजासी । सकळ सिद्धी निगर्वापासीं ।
तेणें निगर्वे तूं नांदसी । वंद्य सर्वांसी तिहीं लोकीं ॥ ११३ ॥

अनुमोदुनि भरद्वाजासी । ऋषि निघाले पुसोनि त्यासी ।
[कं. 'भरतें राहउनीं त्यासीं । मग सैन्यासीं सज्ञ केलें ॥'; तं. 'भरतें बैसउनीं त्यासी । निज सैन्यासी सिद्ध केलें ॥'; सु. गे. 'भरतें रथीं बैसऊनीं ऋषीसीं । मग सैन्यासीं सिद्ध केलें ॥'; नि. घा. 'भरतें रथीं बैसउनीं समस्तासीं । निज सैन्यासी सिद्ध केलें ॥.] भरतें रथीं बैसवुनि त्यासी । निज सैन्यासी सज्ञ केलें ॥ ११४ ॥

सिबिकें बैसविल्या जननी । रथीं बंधु बैसले दोन्ही । लागली वाजंत्राची ध्वनी । गडगर्जे निघाले ॥ ११५ ॥

उतरोनिया यमुनातीर । टाकिला चित्रकूट गिरिवर । अवघीं केला जयजयकार । हर्षनिर्भर श्रीरामें ॥ ११६ ॥

देखोनि चित्रकूट पर्वत । भरत आनंदें नाचत । [मु. हे पद नाही.] आम्हासि भेटेल रघुनाथ । उल्हासयुक्त शत्रुघ्न ॥ ११७ ॥

भरताश्रीरामा दर्शन । तें सुख बोलों शके कोण । एका जनार्दना शरण । जीव प्राण येरयेरां ॥ ११८ ॥

भरता श्रीरामेसीं भेटी । हरिखें वोसंडेल सृष्टी । तें सुख न बोलवे गोठी । पडे मिठी परब्रह्मीं ॥ ११९ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां भरद्वाजाश्रमे आगमनं भरतपूजनं नाम त्रयोदशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग चौदावा

## काकनिग्रह

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

येरीकडे श्रीरघुनाथ । चित्रकूट पर्वतांआंत । अग्निहोत्र सीतासमवेत । नित्य वेदोक्त प्रतिपाळी ॥ १ ॥

श्रीरामसेवेसीं सौमित्र । पर्णशाळा केल्या विचित्र । श्रीरामाचें अग्निहोत्र । अहोरात्र संरक्षी ॥ २ ॥

विचित्र आणि फळमूळ । नित्य निर्वाह पुरवी जळ । काष्ठें आणूनियां प्रबळ । अग्नि सोज्वळ [नि. घा. 'स्वयें रक्षी'; सु. गे. 'संरक्षी'.] स्वयें राखे ॥ ३ ॥

रामसीतेचें चरणक्षाळण । [मु. 'नित्य नेमें'.] नित्य नेमस्त करी लक्ष्मण । जैसी लक्ष्मीनारायण । या [कं. सु. गे. घा. 'या भावें'.] बुद्धिपूर्ण पूजितु ॥ ४ ॥

विधीविधान जाणें श्रीराम । [भा. तु. 'दर्शपूर्णमास्या'; सु. गे. घा. 'दर्शपूर्णमासिक'; तं. 'दर्शपौर्ण्यमास्या'; नि. 'दर्शपौर्णमासिक'.] दर्श पूर्णमास [त. प्रतीत या ओवीचे शेवटचा दुसरा व तिसरा चरण असे आहेत :–– 'दंसे पाहो माझा होम । मनीं असे होमसंभ्रम ।'] होम । मृगमांस होमसंभ्रम । चालवी नेम सौमित्र ॥ ५ ॥

श्रीरामाचे सेवेवरी । शरीर वंचीना तिळभरीं । धनुष्यबाण घेऊनि करी । मृग मारी होमार्थ ॥ ६ ॥

धन्य त्या मृगांचें जीवित । [घा. 'त्यांचा'; नि. 'त्यांचे'.] ज्यांचा [नि. प्रतीत 'मांसे' हे अधिक पद.] होम करी श्रीरघुनाथ । [तं. 'ज्या वृक्षांची'.] ज्यांची फळें स्वयें सेवित । [पै. खेरीज सर्वत्र 'तें' हे अधिक पद.] वृक्ष नित्यमुक्त श्रीरामें ॥

इध्माबर्हि कुशास्तरण । श्रीरामें उद्धरिलें तृण । पायातळीं येती पाषाण । तेही जाण नित्यमुक्त ॥ ८ ॥

स्नान करितां निर्मळ नीरें । तेथें उद्धरिली मच्छमगरें । वनवासीं श्रीरामचंद्रें । वनीं वनचरें उद्धरिलीं ॥ ९ ॥

करावया जगदोद्धरण । श्रीरामाचें वनप्रयाण । [कं. सु. गे. घा. 'ज्या ज्या घडे'; नि. खेरीज इतरत्र 'जे जे देखती रामदर्शन'.] ज्या ज्या घडलें रामदर्शन । ते ते जाण उद्धरिले ॥ १० ॥

श्रीराम देखावया दृष्टीं । पाहीजती भाग्याचिया कोटी । धन्य धन्य तेचि सृष्टीं । ज्यासी भेटी श्रीरामीं ॥ ११ ॥

श्रीरामकथा नित्यश्रवण । सावध परिसे तो धन्य धन्य । निर्लोभ रामकथापठन । त्याचेनीं पावन जडमूढ ॥ १२ ॥

ज्याचें मुखीं श्रीरामनाम । धन्य धन्य त्याचें जन्म । [मु. 'भक्तीनें'.] भक्तांचें नित्य स्मरती नाम । त्यांसी श्रीराम उद्धरी ॥ १३ ॥

**ऐसा श्रीराममहिमा गहन । बोलतां वेदां पडिलें मौन ।** [तं. भा. 'तेथें'.] **तें मी कैंवी** [कं. पै. खेरीज सर्वत्र 'बोलों'.] **बोले दीन । कथानुसंधान अवधारा ॥ १४ ॥**

**श्रीरामाचें अग्निहोत्र । चालवावया अति तत्पर । मृग मारूनी अति पवित्र । आणिले सत्वर** [नि. घा. 'लक्ष्मणें'.] **सौमित्रें ॥ १५ ॥**

[सु. गे. घा. 'पूर्णमासादि करी याग'; नि. 'पूर्णिमा अमावास्यादि याग'.] **पौर्णमास्यादि याग । श्रीरामें** [मु. 'श्रीराम ते वधी मृग'; तं. 'श्रीरामें ते धन्य मृग'; कं. भा. त. तु. 'श्रीरामें ते मेध्य मृग'.] **ते वधुनि मृग । यागार्थ केलें विभाग । मांसार्थी काक आले तेथें ॥ १६ ॥**

**लक्ष्मण आणावया गेला फळें । मांसार्थी टपती काऊळे । राम सीतेसी म्हणती अबळे ।** [मु 'हीं'; तु. तं. 'हे'; त. 'ये'.] **ये पक्षीकुळें निवारी ॥ १७ ॥**

> तद्रामवचनात्सीता काकेभ्यः पर्यरक्षत । इतश्चेतश्च तां काको वारयंतीं पुनः पुनः ॥ १ ॥ [तं. प्रतीत श्लोक १ ते ३ नाहीत.]
> यस्या हारांतरचरः कामचारी विहंगमः । काकेनारोध्यमानां तां सा मुमोह तदातुरम् ॥ २ ॥
> पक्षतुंडनखाग्रैश्च कोपयामास कोपनाम् । सीतामभिपपातैव ततश्चुक्रोध राघवः ॥ ३ ॥

[सु. गे. घा. या प्रतींत हे पद नाही.] **सीता श्रीराम आज्ञेवरी । सवेग येऊनी बाहेरी । स्वयें काकांतें निवारी । राजकुमरी सुकुमार ॥ १८ ॥**

**सुंदर देखोनिया तिसी ।** [मु. 'सुदसुव'; तं. 'सुदेश'; तु. 'सुंदसु'; भा. त. 'सुदसु'.] **सुदृंशु गंधर्व अभिलाषी । धरूनिया काकवेषासीं । सीतेपासीं तो आला ॥ १९ ॥**

**स्वयें हांकितां सीतासती । इतर काक तत्काळ पळती । तो पळेना कामासक्ति । पुडत पुडती झेंपावे ॥ २० ॥**

**काक हांकितां सरोखें । सुटलें कंचुकीचें पाखे । पालव** [त. 'सरला आंगसरके'; तु. 'उचळला आंग झोके'; सु. नि. गे. घा. 'चळला आंग झोके'; कं. 'उंचावला'.] **वुचलला आगझोकें ।** [मु. 'तंव' हे अधिक पद.] **हृदय देखे तो काकु ॥ २१ ॥**

[कं. तु. 'देखे'; तं. त. सु. नि. गे. घा. 'दिसे'.] **मुक्तकुचदेशे सुंदरी । हार रुळती कुचांवरी । देखोनि काक कामाचारी । हृदयावरी झेपावे ॥ २२ ॥**

**पांखें झडपूनियां तिसी । नखाग्रें ओरबडिलें कुचासी । चंचूनें चुंबुनी मुखासी । केली कासाविसी जानकी ॥ २३ ॥**

**काकपक्ष झडपेचिया ऊर्मी । सीता आक्रंदें पडिली भूमीं । काक कामाचारी अधर्मी । हृदयआरामीं विचरतु ॥ २४ ॥**

**काक बैसला हृदयावरी । सीता कराग्रें निवारी । चंचुक्षतें करितां करीं । हाक मारी आक्रोशें ॥ २५ ॥**

अनुक्रमणिका

**आइकोनि सीतेची दीर्घ हांक । वेगें आला रघुटिळक । दुष्ट देखोनियां काक । दर्भशिखा देख मोकलिली ॥ २६ ॥**

[तं. प्रतीत श्लोक ४ ते ६ नाहीत.] सोभिमंत्र्य शरैषीकामैषीकास्त्रेण वीर्यवान् । काकं तमभिसंधाय ससर्ज पुरुषर्षभः ॥ ४ ॥
[सु. गे. प्रतींत पाचवा श्लोक नाही.] स तेनाभिहतः काकस्त्रींल्लोकान्पर्यगात्ततः । यत्र यत्रागमत्काकस्तत्र तत्र ददर्श ह ॥ ५ ॥
इषीकां भूतसंकाशां स रामं पुनरागमत् । सीतायास्तत्र पश्यंत्या मानुषीमैरयद्गिरम् ॥ ६ ॥

**ते श्रीरामाची दर्भशिखा । ईषिकामंत्रें मंत्रूनी देखा । सोडितां पाठीं लागली काका । धगधगीत अर्कासमप्राय ॥ २७ ॥**

**सवेग पळतां काका । पाठी लागली ईषीका । परी भ्रमतां तिहीं लोका । पाठीलागु देखा सोडिना ॥ २८ ॥**

[सु. गे. प्रतींत ही ओवी नाही.] **श्रीराम इषीका देखोन । इंद्र** [कं. नि. घा. प्रतींत हे पद नाही.] **धाकें सांडी सिंहासन । तेथ काकासी राखे कोण । करी पलायन देवांपासीं ॥ २९ ॥**

**श्रीराम ईषिका देखोन । इंद्र** [नि. घा. प्रतींत हे पद नाही.] **चंद्र कुबेर वरुण । धाकें करिती पलायन । यमही** [सु. गे. घा. 'यमही कापीन धाकतसे'.] **आपण चळी कांपे ॥ ३० ॥**

**श्रीराम ईषिका देखोन । काळ चळचळा कांपे कंपायमान । ईषिका वंदी चतुरानन । घाली लोटांगण शिवभवानी ॥**

**काक जाय जे जे ठायीं । इषीका पावेल लवलाही ।** [नि. घा. प्रतींत 'काक' हे अधिक पद.] **हिंडतां लोकीं तिंहीं । ठावो नाहीं राहावयासी ॥ ३२ ॥**

**धाकें काक रिघें पातळीं । तेथ दैत्यदानव कांपती चळीं । श्रीराम ईषिका करील होळी । तेहीं तात्काळीं दवडिला ॥**

**काक हिंडतां दशदिशीं । अत्यंत जाला कासाविसी । कोठें न लभे आश्रयो त्यासी । तेणें नारदासीं देखिलें ॥ ३४ ॥**

**धरिलें नारदाच्या पायांसी ।** [मु. 'म्हणें' हे अधिक पद.] **ईषिका निवारी देवऋषि ।**
**तो म्हणे शरण रिघ श्रीरामासीं । तो** [मु. 'शरणांगतासीं न मारीं'; कं. 'शरणांगतासी मारीना'.] **शरणार्थासीं मारीना ॥ ३५ ॥**

**आइकोनि नारदाचें वचन । काकें केलें पुनरागमन । श्रीरामा तुझ्या चरणा शरण । माझे प्राण वांचवी ॥ ३६ ॥**

अनुक्रमणिका

घालुनी श्रीरामा लोटांगणीं । काक बोले [सु. गे. घा. 'मनुष्यवच'; कं. 'मधुरवाणी'.] मनुष्यवाणी । ईषिका धगधगीत देखोनी । आश्चर्य मानी जानकी ॥

काक म्हणे जी रघुनाथा । थोर अपराध माझे माथां । शरण आलों मी [मु. 'तुज सर्वथा'.] तत्त्वता । [मु. 'न मारावें आता राघवा'.] मज सर्वथा न मारावें ॥ ३८ ॥

नारदा सद्गुरुचें वचन । तेणें तुज मी आलों शरण । [मु. 'शरणांगताचें रक्षण'.] शराणांगता तूं शरण्य । माझें मरण निवारीं ॥ ३९ ॥

मरणाभेण जी पळतां । थोर शिणलों [मु. प्रतीत 'गा' हे अधिक पद.] रघुनाथा । सद्गुरुनें हात ठेविला माथां । [मु. 'म्हणौनी आतां शरण आलों'.] मग मी आतां शरण आलों ॥

नारदें सांगीतलें कानीं । जानकी माता जगज्ञननी । ते म्यां अभिळाषिली [कं. व मु. 'कामें करूनीं'; त. 'कामिनी'.] कामुनी । [सु. गे. घा. 'महापातका जनीं मीं होय'; नि. 'मातृगमनीं महादोषी'; तं. भा. 'मी मात्रागमनीं महादोषी'.] मात्रागमनी महादोषी ॥

[सु. गे. घा. प्रतींत पहिले दोन चरण पुढीलप्रमाणे आहेत :––'त्या दोषालागीं प्रायश्चित्त । श्रीराम नाम मनीं स्मरतां ॥'] महापातकें ज्याचे माथा । तेहीं श्रीरामनाम स्मरतां । पातकें जाऊनी तत्त्वतां । होय सरता वैकुंठीं ॥ ४२ ॥

श्रीराम दों अक्षरांसाठीं । पातकें जळतीं कोट्यानुकोटी । तो नर वंद्य होय वैकुंठीं । बैसे पाटीं ब्रह्माचा ॥ ४३ ॥

श्रीरामनामाचा प्रताप । पापें निर्दळती आकल्प । माझें पाप [मु. हे पद नाही.] तें तंव अल्प । मी [पै. 'निमिष्याप'.] निष्पाप श्रीरामें ॥ ४४ ॥

रामनाम स्मरतां [भा. पै. 'वाग्पटीं'.] वाक्पुटीं । कलीकल्मषां होय तुटी । तो श्रीराम देखतां दिठी । पापाची गोष्टी मज नाहीं ॥ ४५ ॥

श्रीराममूर्ति आलिया ध्यानीं । सकळ पापां होय धुणी ।
तो राम देखिला [मु. प्रतीत हे पद नाही; कं. 'या'.] म्यां नयनीं । पाप त्रिभुवनीं मज नाहीं ॥ ४६ ॥

ऐसें बोलोनी आपण । काकें वंदिलें श्रीरामचरण । सीतेसीं घातलें लोटांगण । कृपा पूर्ण मज करी ॥ ४७ ॥

बळें कुचाग्रीं लावावया हात । बाळकाची सत्ता [मु. 'बहुत'; कं. 'तेथ बहुत'.] तेथ । [कं. मु. 'तैसें'.] तें मी तुझे ज्येष्ठ अपत्य । जाण निश्चित जानकी ये ॥ ४८ ॥

एक कुच धरूनी हातीं । दुजा घाली मुखा प्रति । बाळकसत्तेची [मु. हे पद नाही.] हे ख्याति । ते तुजप्रति म्यां केली ॥ ४९ ॥

अनुक्रमणिका

पतीसी कुचसत्ता एकांतीं । बाळका कुचसत्ता लोकांतीं । तें म्यां केली तुजप्रति । जाण निश्चिती जानकी ये ॥ ५० ॥

पतीसी कुचसत्ता मध्यरातीं । बाळकाची सत्ता अहोरातीं ।
ते म्यां केली वो तुजप्रति । जाण निश्चिती जानकीये ॥ ५१ ॥ [कं. प्रतीत ही ओवी नाही.]

रजस्वळा जालिया कांता । पतीशीं शिवो नये सर्वथा । तेथेंही बाळक होय झोंबतां । तैसें तत्त्वतां म्यां केलें ॥ ५२ ॥

करकर करूनियां जाण । बाळक करी कुचप्राशन । म्यांही करकर करूनी पूर्ण । स्तनपान केलें [कं. मु. 'माते' हे अधिक पद.] तुझें ॥ ५३ ॥

गाईचा गोऱ्हा गाईवरी उडे । [मु. 'तरी'.] तेणें मातेसी क्षोभ न चढे । ते म्हणें तान्हें बाळक वेडें । तैसें मजकडें पाहे माते ॥

तूं तंव चराचर जननी । आम्हीं अपत्यें पशुसमानीं । क्षोभु न धरावा मनीं । सखी जननी तूं आम्हां ॥ ५५ ॥

आइकोनी काकाचें बोलणें । सीता कळवळली [मु. 'निजमनें'.] मनें । यासी राखावें जिवें प्राणें । कृपा करणें श्रीरामा ॥ ५६ ॥

तुझेंनी वो [मु. प्रतीत 'निज' हे पद नाही.] निजबोलें । यावरी म्यां निर्वाण केलें । तें न वचें निवारिलें । अटक पडिलें जानकीये ॥ ५७ ॥

ऐकें स्वामी श्रीरघुनाथा । मारूं नये शरणागता । कैसेनी याच्या करीसी घाता । यासी सर्वथा [कं. मु. 'रक्षावें'.] राखावें ॥ ५८ ॥

सर्वशक्ति सर्वसत्ता । स्वयें राखावें शरणांगता । ऐसीं बिरुदें तुज रघुनाथा । [मु. 'कैश्यापरी'; कं. 'कैसे यापरी आता हावधरी'.] कैसेनीं आतां हा वधिसी ॥ ५९ ॥

ईषिका अनिवार निश्चित । तऱ्ही राखावा शरणांगत । तैंची तुझें सत्यव्रत । [कं. मु. 'प्रताप यथार्थ'; पैं. 'तुझा'; तं. 'प्रताप सत्य'; पैं. 'तुझा'; पैं. 'प्रताप सत्य तो तुझा'.] प्रताप सत्य तैं तुझा ॥ ६० ॥

जिणें मारविले कागातें । तेची वांचवा म्हणे त्यातें । ऐसें लाघव केलें रघुनाथें । स्वयें कर्मातें अलिप्त ॥ ६१ ॥

कळला काकाचा वृत्तांत । जाणोनी सीतेचें मनोगत । काय बोलिला श्रीरघुनाथ । सावचित्त अवधारा ॥ ६२ ॥

अनुक्रमणिका

[सु. गे. तं. प्रतींत श्लोक ७ व ८ नाहीत.] अमोघं क्रियतामस्त्रमेकमंगं परित्यज । किमंगं शांतयतु ते शरैषीका ब्रवीहि मे ॥ ७ ॥
एतावद्धि मया शक्यं तव कर्तुं प्रियं खग । एकांगहीनं ह्यस्त्रेण जीवितं मरणाद्वरम् ॥ ८ ॥

**आइकोनी सीतेचा वचनार्थ । काकासी नाभी म्हणे रघुनाथ ।**
**तुझें वांचवावया जीवित । आइक हितार्थ सांगेन ॥ ६३ ॥**

**ईषिका अनिवार निश्चित । तिणें करावा तुझा प्राणांत ।**
[कं. व मु. 'परी' हे अधिक पद.] **तूं जालासी शरणांगत । यालागीं तिष्ठत राहिलीसे ॥ ६४ ॥**

**ईषिका अनिवार दारुण । तुवां वांचवावया प्राण । एक आंग देसी आपण ।** [मु 'तेणें'.] **तैं निवारण चालेल ॥ ६५ ॥**

**तुझिया हितालागीं जाण । तुज मी सांगतों आपण । एक अंग करूनी क्षीण । आपुला प्राण वांचवी ॥ ६६ ॥**

**काक म्हणे श्रीरघुनाथा । तुझें** [मु. 'तुझी आज्ञा मी वंदीन माथा'; कं. 'तुझी आज्ञा वंदिली माथा'.] **वचन वंदिलें माथा । एकांग** [मु. 'घे'.] **देईन सुखरूपता । ईषिकेच्या घाता चुकवावें ॥ ६७ ॥**

**श्रीराम म्हणे काकासी । कोण आंग तूं देतोसी । तें देऊनी ईषिकेसी । तुज निश्चयेसी राखेन ॥ ६८ ॥**

**काक म्हणे ऐक आतां । माझ्या इंद्रियांचीं व्यवस्था ।**
**अपराध असेल ज्याचें माथां । त्याच्या करी घाता ईषिकास्त्रें ॥ ६९ ॥**

**उजवे डोळा जानकी माता । डावेनीं अभिळाषिली** [मु. 'तत्वता'.] **सीता ।**
**ईषिका घालुनी त्याचे माथां । त्यासी रघुनाथ दंडावें ॥ ७० ॥**

**ऐसी ऐकतांचि वाणी । ईषिका प्रवेशे वामनयनीं । काक मूर्च्छित पडे धरणीं । रामें तत्क्षणीं सावध केला ॥ ७१ ॥**

**घेतला माझा वामनयन । हें काकांसी नाहीं ज्ञान । मी जालों अंगहीन । हें हें चिन्ह तो नेणें ॥ ७२ ॥**

**मागें पाहातांचि त्या काका । नेदखेची ते ईषिका । हरिखें वंदिलें रघुटिळका । माझ्या मरणदुःखा निवारिलें ॥**

**अद्यापि काकदेही नवलावो । जराजर्जरित न पवे** [कं. पैं. तु. त. 'खेवो'; भा. 'क्षेवो'.] **क्षयो ।**
**श्वापद धरी कां लागल्या घावो ।** [मु. 'तोचि'.] **तैंची पाहों मृत्यू काका ॥ ७४ ॥**

अनुक्रमणिका

यापरी रामरावो । काकाचा [पै. खेरीज इतरत्र 'वारिला मृत्यूभावो'.] निवारिला मृत्यूभेवो । समस्तां वाटला नवलावो । कृपाळू पाहो श्रीराम ॥ ७५ ॥

जो तो म्हणे काक काणा । [मु. प्रतीत 'हें' हे पद अधिक; कं. प्रतींत 'ते' हे अधिक पद.] दुःख काकाचीया मना । जग निंदितें मज जाणा । श्रीरामें वेंकणा [मु. 'मी केलों'; इतरत्र 'कागु'.] काक केला ॥ ७६ ॥

कृपेनें वांचविलों संपूर्ण । ते कृपेसी आलें वेंकणेपण । आइकोनी हांसीनला रघुनंदन । काय वचन बोलिला ॥ ७७ ॥

सामर्थ्य देतों उजव्या बुबुळा । एकेची बुबुळें दोहीं डोळां ।
तुझी वाढेल देखणीकळा । देखणा सकळांमाजीं होसी ॥ ७८ ॥

कृपेचें जें वेंकणेपण । [मु. 'ते' हे अधिक पद.] रामें [मु. 'निवारिले जाण'.] निरसिलें संपूर्ण । काकांचे [त. तु. 'जे देखणेंपण'; मु. 'काकांचें देखणेपण जाण'; कं. 'काकाचे देखणें पण'.] जें कां देखणेपण । जो तो जाण स्वयें वाणी ॥ ७९ ॥

दशाहाच्या पिंडापासीं । देखणेपण आहे काकासी । ज्यातें देखे पापराशी । त्या पिंडासीं नातळे ॥ ८० ॥

श्रीरामकृपेस्तव जाण । पापपुण्याचें देखणेपण । काकासी [तं. तु. सु. नि. गे. घा. 'पावलें'.] फावलें संपूर्ण । दशाहचिन्ह जग देखें ॥ ८१ ॥

चांचूनीं चुंबिलें सीतेसी । तेणें मुखें भक्षितो [मु. 'निरयासी'.] नरकासी । रामें देखणें दिधलें डोळ्यांसी । पुण्यपापासी [कं. मु. 'तेणें'.] तो देखे ॥

ऐसिया परी रघुनंदनें । कागाचें निवारिलें मरणें । वांचविला देखणेपणें । समाधानें सुखी केला ॥ ८३ ॥

शरण आणूनी कागासीं । श्रीरामें सुखी केलें सीतेसी । काक वांचऊनी कृपेसी । महादोषासीं सुखी केलें ॥ ८४ ॥

[मु. 'तंव' हे अधिक पद.] येरीकडे जी भरत । श्रीरामभेटीसी उद्यत । गजभारेसीं असे येत । तोही कथार्थ अवधारा ॥ ८५ ॥

श्रीरामभरता आळिंगण । तेणें जिवशिवां समाधान । एका जनार्दना शरण । आनंदघन रामकथा ॥ ८६ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां काकनिग्रहो नाम चतुर्दशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग पंधरावा

## भरत श्रीराम संयोग

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

देखोनी चित्रकूट पर्वत । अत्यंत हरिखेला भरत । देखावया श्रीरघुनाथ । उल्हास अद्भुत सर्वांसी ॥ १ ॥

सेना शृंगारिली मनोहर । वीरीं केलें नाना शृंगार । गर्जत घेऊनी गजभार । भरत सत्वर चालिला ॥ २ ॥

कोईते [कं. तं. 'कत्या'; मु. 'कातिया'.] कात्या कुऱ्हाडें । वन छेदिती सैन्यापुढें । वेगें भूमि सज्जिती [तं. त. 'मातियाडें'; मु. 'मातियेडें'.] मातेडे । गज रथ घोडे चालावया ॥ ३ ॥

अश्व गजांचा कडकडाट । रथ चालिले घडघडाट । सैन्य चालतां नुपरे वाट । रजें वैकुंठ व्यापिलें ॥ ४ ॥

चरणरज अति उद्भट । लोक लोकांतर त्यजूनी स्पष्ट । टाकुनी [कं. मु. 'जावें'.] जाय वैकुंठ । हा नेटपाट रजाचा ॥ ५ ॥

गज गर्जती गहिरे । वारु हिंसती एकसरें । तुरें वाजती अपारें । गिरा गंभिरें गर्जती वीर ॥ ६ ॥

निशाण भेरी वाजांतरें । ढोल टमक बुरुंगे घोरें । तडक फुटलें एकसरें । गिरिकंदरें दुमदुमिली ॥ ७ ॥

> [तं. व गे. प्रतींत श्लोक एकही नाही; सु. प्रतीत तिसरा श्लोक नाही.] अथ रामे तदासीने लक्ष्मणे चाभिवीक्ष्यति । तस्य सैन्यस्य महतो रौद्र आसीन्महास्वनः ॥ १ ॥
> तेन शब्देन महता वर्धता विप्रबोधिताः । गुहां संत्यज्य वै व्याघ्रा निलिल्युर्विलवाससि ॥ २ ॥
> ऋक्षाश्चोत्ससृजुर्वृक्षान्प्रपेतुर्हरयो गुहाम् । खमुत्पेतुः खगास्तत्र मृगाश्चापि विदुद्रुवुः ॥ ३ ॥

आईकतां श्रीराम सौमित्र । भरत सैन्याचा नाद घोर । दुमदुमिले गिरिकंदर । श्वापदें क्रूर गजबजिलीं ॥ ८ ॥

नाद न समाय गगनीं । नादें कंपायनमान अवनी । श्वापदें पळालीं जीव घेऊनी । पक्षी त्रासोनी कळकळिती ॥ ९ ॥

व्याघ्र पळाले सांडुनी जाळी । वराह दडाले महाबिळीं । सर्प [पै. तं. खेरीज इतरत्र 'रिघालें'.] निघाले वारूळीं । दडी पाताळीं तिहीं दीधली ॥

तरस तगर मृग [मु. 'मुंगसें'.] ससे । धाकें पळती [मु. 'आक्रोशें'; तं. 'आसासें', भा/२. तु. 'आकासें'.] आपैसें । जळीचे खळबळिले मासे । भूतें आकाशीं [मु. 'धुगधुगिती'.] धुकधुकिती ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

**ऐकतां** [मु. 'धाकाची'.] **नादाची दणदण । अस्वलें विसरलीं गुणगुण । तेही पळालीं जीव घेऊन ।** [भा/२. 'कंदराण टाकिलें'; तं. 'कंदफळें आणणें टाकिती'; पै. तु. त. कं. 'कंदरा आंत टाकिली'.] **कंदराण्य टाकिलें ॥ १२ ॥**

**धाकें पळती नरवानर । पळती वनगजांचे भार । सिंहासी धाक लागला थोर । मारूं कुंजर विसरले ॥ १३ ॥**

**धाकें पळती** [पै. 'नर म्हैसे'.] **रानम्हैसे । पळतां मागें पुढें न दिसे । रानगाई पळती आक्रोशें । हाणती वत्सें हंबरडा ॥ १४ ॥**

[तं. सु. गे. प्रतींत श्लोक ४ व ५ नाहीत.] विलीना विविशुर्भीताः स्ववस्तिषु द्विजातयः । विद्याधराः स्वमुत्पेतुः किन्नरा भेजिरे दिशः ॥ ४ ॥
तमभ्यासमनुप्राप्तः तस्य देशस्य लक्ष्मणः । सैन्यस्य चागतं शब्दमिति रामे न्यवेदयत् ॥ ५ ॥

**वनौके कांपती चळचळीं । वडवागुळा रिघतीं ढोलीं । वृक्ष उन्मळती समुळीं । देती आरोळी भयाची ॥ १५ ॥**

**द्विजवरांचे शिष्य बहुत । धाकें चळचळां कांपत । एक** [कं. पै. भा/२. 'धोत्रांवरी'; नि. घा. 'धोत्रामध्यें'.] **धोत्रांतरीं मुतत । एकां अधोवात होंसरलें ॥ १६ ॥**

[सु. गे. घा. या प्रतींत या ओवीचा दुसरा व तिसरा चरण अनुक्रमें पहिला व दुसरा आला असून तिसरा चरण, 'श्वास कोंडला न फुटे वाट' असा आला आहे.] **धाक घेतला उद्भट । दांत वाजती खटखट । एकाचें धाकें फुगलें पोट । एकाचें कंठ शोषलें ॥ १७ ॥**

**ब्राह्मण शांतिपाठ जपत । तऱ्ही धीरु न धरे चित्त । सांडुनियां श्रीरघुनाथ । पळाले समस्त गुहेमाजीं ॥ १८ ॥**

**विद्याधर आणि किन्नर । धाकें लंघिती दिशांचे पार । नादें त्रासले दुर्धर । वनीं वनचर पळाले ॥ १९ ॥**

**नाल भिल्ल पळती धाकेंसीं । ते सांगती श्रीरामासी । वेगीं** [सु. गे. 'लपवावें', नि. घा. 'पळवा'.] **लपवा सीतेसी । आलें वनवासीं परचक्र ॥ २० ॥**

**जानकी देखोनी सुंदरी । हिरोनी नेतील क्षणामाझारी । इसी तुम्ही धरूनी करीं । गिरी कंदरीं रिघावें ॥ २१ ॥**

**तुम्हीं** [मुद्रित 'तुम्ही येथें दोघे जाण'.] **अवघे दोघेजण ।** [तं. 'हातीं'; मु. 'जरी'.] **जऱ्ही आहेती धनुष्यबाण ।** [मु. 'तरी' हे अधिक पद.] **किती कराल आंगवण । सैन्य दारुण आलेसें ॥ २२ ॥**

[तं. सु. गे. या प्रतींत हा श्लोक नाही.] हन्त लक्ष्मण पश्येह सुमित्रानंदवर्धन । भीमस्तनितगंभीरं तुमुलः श्रूयते स्वनः ॥ ६ ॥ [वा. रा. अयो. कां. सर्ग ९६, श्लोक ७.]

**श्रीराम म्हणे** [मु. 'गा' हे अधिक पद आहे.] **लक्ष्मणा । कोणा रायाची हे सेना । करीत आली** [तु. कं. त. 'आली असे गडगर्जना'; भा/२. तं. 'आली असे गर्जना'.] **गडगर्जना । आणुनी मना मज सांग ॥ २३ ॥**

अनुक्रमणिका

[नि. घा. 'चतुरा सुमित्रानंदना'; तु. तं. 'सुमित्रा सुमित्रनंदना'; सु. गे. 'सौमित्रा ऐकें सुमित्रानंदना'.] सौमित्रा सुमित्रानंदना । तूं ओळखसी राजचिन्हां । कोण रावो आला वना । आणुनी मना मज सांग ॥ २४ ॥

ये वनीं वाल्मीक आश्रमवासी । [सु. गे. घा. या प्रतींत 'म्हणोनी' हे अधिक पद.] राजे भेटों येताती त्यासी । अथवा आलें पारधीसी । आणुनी मनासी मज सांग ॥

आइकोनी श्रीरामाच्या वचना । वंदुनियां त्याच्या चरणा । सवेग पाहों आला सेना । राजचिन्हां लक्षितु ॥ २६ ॥

देखे ध्वजांकीं श्रीदशरथ । हे तंव राघवीसेना समस्त । वनीं वधावया रघुनाथ । [तं. 'ससैन्येसी', त. कं. 'सैन्यें'; मु. 'सेनेसी'.] ससैन्य भरत आलासे ॥ २७ ॥

कैसा राज्यलोभाचा स्वार्थ । सखा बंधु जो आमचा आप्त । तो वैराकारा पेटला भरत । वनीं रघुनाथ [पै. 'मारू'.] वधूं आला ॥

पहिलें श्रीरामीं दावी प्रेम । डोळां आसुवें आंगीं रोम । [कं. तं. प्रतींत ही ओवी नाही.] तोचि मारावया श्रीराम । वना अधम [नि. 'स्वये'; सु. गे. घा. 'बंधू'; भा/२. तु. त. 'वधु'.] पैं आला ॥ २९ ॥

[कं. तं. तु. सु. नि. गे. घा. या प्रतींत हे पद नाही.] मी श्रीरामाचा [तं. 'धंन्य'] अनन्य भक्त । [नि. घा. 'मी' हे अधिक पद.] जीवें असतां पै जीत । कैसेनी मारील रघुनाथ । ससैन्य भरत निवटीन ॥ ३० ॥

आजी माझा तिखट बाणीं । धडमुंडांकित करीन धरणी । भरत शत्रुघ्न हे दोन्हीं । अर्धक्षणीं मारीन ॥ ३१ ॥

श्रीरामाचे निजघातकी । [मु. 'तो'.] ते बंधु मारितां नव्हे पातकी । येश मिरवेल तिहीं लोकीं । मनीं निष्टंकी नेम केला ॥

रागें धनुष्या [मु. 'वाहिला'.] वाईला गुण । आरोळी देऊनी लक्ष्मण । सैन्यासमुख [कं. मु. 'आला'.] जाला आपण । निर्वाण बाण सज्जूनी ॥ ३३ ॥

सौमित्राचेनी गिरागजरें । दुमदुमिलीं गिरिकंदरें । डळमळिलीं मेरू शिखरें । धरा भारें कांपत ॥ ३४ ॥

आधींच शेषाचा अवतार । [कं. मु. 'विरहें'.] श्रीराम विग्रहें कोपला थोर । नेत्रीं ज्वाळा निघती दुर्धर । [मु. 'तंव' अधिक पद.] सुरनर कांपती ॥ ३५ ॥

सन्मुख देखोनी सौमित्रासीं । सेना सैन्यक कासाविसी ।
[मु. 'परस्परें बोलती येरयेरांसी'; कं. 'बोलते जाले येरयेरांसीं'.] युद्ध करावें कोणासी । हाहि आम्हांसी स्वामी होय ॥ ३६ ॥

जैसेचि भरतशत्रुघ्न । तैसेचि श्रीरामलक्ष्मण । येथ कोण्हांसी [मु. 'झुंझेल'.] झुंजे कोण । विषम पूर्ण ओढवलें ॥

अनुक्रमणिका

३७ ॥

**पुढें झुंझतां स्वामी संपूर्ण । मागें पळतां उणेपण । सौमित्रें** [मु. 'सज्जिला धनुष्यबाण'.] **सज्ज केले बाण । काय आपण करावें ॥ ३८ ॥**

**राहिली रामाची भेटी । युद्ध मांडलें उठाउठी । सरल्या संग्रामाच्या गोठी । शस्त्रें पोटीं घालावीं ॥ ३९ ॥**

**सन्मुख झुंझतां स्वामीसी तुटी । संग्रामीं देवों नये पाठी । क्षात्रधर्मा अटक मोठी । शस्त्रें पोटीं घालावीं ॥ ४० ॥**

**आतां श्रीराम न दिसे दृष्टी । विचाराची खुंटली गोष्टी । क्षात्रधर्मा अटक मोठी । शस्त्रें पोटीं घालावीं ॥ ४१ ॥**

**आईकोनी सौमित्राचा सिंहनाद । श्रीराम जाला** [त. 'सावध'; मु. 'सन्नद्ध'.] **सन्नद्धबद्ध । दारुण मांडलेसें युद्ध । म्हणौनि सक्रोध चालिला ॥**

**राम योद्धे निरीक्षी नयना ।** [मु. प्रतीत 'तंव' हे अधिक पद.] **देखे-दाशरथी सेना ।** [मु. 'मग' हे अधिक पद.] **तो म्हणे गा लक्ष्मणा । आप आपण्या युद्ध केवी ॥ ४३ ॥**

**आमची सेना आमचे प्रधान । आमचे बंधु भरत शत्रुघ्न । तुज युद्धासी काय कारण । निर्वाण बाण कां घेसी ॥ ४४ ॥**

> [तं. सु. गे. या प्रतींत श्लोक ७ ते ९ नाहीत; नि. घा. प्रतींत ७ व्या श्लोकाचा पूर्वार्ध पुढीलप्रमाणे आहे : 'संपन्नं राज्यमिच्छँस्तुव्यक्तं राज्याभिषेचनम्'. वा. रा. अ. कां. सर्ग ९६, श्लोक १७.] अकंटकमिदं राज्यं प्राप्य लब्ध्वाभिषेचनम् । आवां हन्तुमिहाभ्येति कैकेय्याः भरतः सुतः ॥ ७ ॥
> अहमेकः करिष्यामि त्वत्प्रेष्यस्योचितं तथा । अद्य मत्कार्मुकोत्सृष्टाः शराः कनकभूषणाः ॥ ८ ॥ [श्लोक ८ व ९ नि. घा. प्रतींत नाहीत.]
> पास्यन्ति रुधिरं नृणां हृदयादचिरादिव । भिंच शत्रुशरीराणि करिष्ये शोणितोदकम् ॥ ९ ॥ [श्लोक ८ व ९ नि. घा. प्रतींत नाहीत.]

**सौमित्र म्हणे रघुनंदना । सन्नद्ध बद्ध करूनी सेना । भरत आला असे वना । आम्हां दोघांजणा मारावया ॥ ४५ ॥**

**माझ्या रुक्मपुंखा बाणीं । मारीन वीरांचिया श्रेणी । भरत शत्रुघ्न पाडुनी रणीं । रुधीरें धरणी न्हाणीन ॥ ४६ ॥**

**जो श्रीरामासी दे संताप । तो बंधु मारितां नाहीं पाप । श्रीरामकार्यार्थी साटोप । पाहे प्रताप रणारंगीं ॥ ४७ ॥**

**मीं तंव तुझा** [सु. गे. घा. 'दासभक्त'; कं. 'कनिष्ठ भृत्य'.] **अनन्यभृत्य । जवळीं असतां जीवें जीत । कैसेनीं तुज मारील भरत । करीन घात समस्तां ॥ ४८ ॥**

अनुक्रमणिका

**ऐसें बोलोनी लक्ष्मण । करुं निघाला युद्धकंदन ।** [मु. प्रतीत 'तंव' हे अधिक पद.] **श्रीरामें धरिला धांवोन ।** [मु. प्रतीत 'म्हणे' हे अधिक पद.] **ऐसें आपण करूं नये ॥ ४९ ॥**

> [तं. सु. गे. या प्रतींत श्लोक नाहीत. नि. घा. प्रतींत श्लोक १० ते १३ या खालीलप्रमाणे दिले आहेत :——
> 'सुसंरब्धं तु भरतं लक्ष्मणं क्रोधमूर्च्छितम् । रामस्तु परिसांन्त्व्याथ वचनं चेदमब्रवीत् ॥ १० ॥
> किमत्र धनुषा कार्यमसिना वा सचर्मणा । महाबले महोत्साहे भरते स्वयमागते ॥ ११ ॥
> विप्रियं कृतपूर्वं ते भरतेन कदा नु किम् । ईदृशं वा भयं तेऽद्य भरतं यद्विशंकसे ॥ १२ ॥
> न हि ते निष्ठुरं वाच्यो भरतो नाप्रियं वचः । अहं ह्यप्रियमुक्तःस्यां भरतस्याप्रिये कृते ॥ १३ ॥'] सौमित्रमभिजल्पन्तमक्रोधः क्रोधमूर्च्छितम् । रामः प्रतिवभाषैतद्वचनं धर्मसंमितम् ॥ १० ॥
> अप्रियं कृतपूर्वं ते भरतेन कदा नु किम् । कीदृशं वा भयं तुभ्यं भरताद्यच्च शंङकसे ॥ ११ ॥
> किमत्र धनुषा कार्यमसिना वाथ चर्मणा । महेष्वासे महाप्राज्ञे भरते स्वयमागते ॥ १२ ॥ [वा. रा. अ. का. सर्ग ९७, श्लोक १३, १४, २.]
> न च ते निष्ठुरं वाच्यो भरतो नाहितं वचः । अहं त्वप्रियमुक्तः स्यां भरतस्याप्रिये कृते ॥ १३ ॥

**त्याचे युद्धासी आलें कोण । नाहीं तेहीं सोडिलें बाण । तवंचिवरी गा आपण । युद्ध दारुण करूं नये ॥ ५० ॥**
[कं. प्रतीत ही ओवी नाही.]

**लक्ष्मणा तुज काय जालें । कैचें भय सांगसी बोलें । भरत आमुचें तानूलें । सैन्य आलें तें आमचेंचि ॥ ५१ ॥**

**येथ पारिके आहे कोण । कोणाचें घेवों पाहासी प्राण । युद्ध करीन म्हणसी दारुण । हें मूर्खपण क्रोधाचें ॥ ५२ ॥**

**भरत आम्हांसीं** [मु. पाठ 'पासूनीं'.] **पूर्वी लागूनीं । विरुद्ध वदला नाहीं स्वप्नीं ।**
**तो वधील वना येऊनी । हे मिथ्या वाणी जल्पसी ॥ ५३ ॥**

**येथ काय** [कं. नि. घा. 'धरिसी'; कं. तं. भा/२. त. तु. सु. गे 'करिसी'.] **करील धनुष्यबाण । कोणावरी घेतोसी खर्ग वोडण ।**

**भरत माझा जीव प्राण । त्यावरी निर्वाण करूं नको ॥ ५४ ॥**

**सैन्य आमचें अंकित । याचा** [नि. घा. 'तूं' हे अधिक पद; इतरत्र 'तुज' हे अधिक पद.] **करूं नये घात । क्रोध सांडुनी होय शांत । ऐक वचनार्थ पैं माझा ॥ ५५ ॥**

**भरत वधील आम्हां लागुनि । हा** [नि. घा. 'संकोच'.] **भयसंकेत तुझ्या मनीं । भरतापासुनी विरुद्ध करणी । जागृति स्वप्नीं घडेना ॥**

**लक्ष्मणा तुज नाहीं ज्ञान । म्हणऊनी होसी क्रोधायमान । तुज मी सांगेन मुळीची खूण ।** [मु. प्रतीत 'तें' अधिक पद.] **सावधान अवधारी ॥**

**एका पिंडाचे नित्योद्भूत । भरत आणि मी रघुनाथ । तुज भरताचा करितां घात । मजही अनर्थ हों पाहे ॥ ५८ ॥**

अनुक्रमणिका

आम्हां दोघांचा एक प्राण । यालागीं गा विरुद्ध वचन । भरतीं नोबलावें आपण । माझी शिकवण मानावी ॥

विरुद्ध बोलसी जें भरता । तें चढेल माझे माथां । ऐसें जाणोनी तत्त्वतां । विरुद्ध वार्ता न [पै. भा/२. खेरीज इतरत्र 'वदावी'.] बोलावी ॥ ६० ॥

याचिपरी गा सज्ञान । भूतीं देखतां भगवान । विरुद्ध नोबलती वचन । समाधान तेणें त्यासी ॥ ६१ ॥

आणिक एक आहे चिन्ह । आम्हां चौघांचा एक प्राण । तेंही सांगेन लक्षण । सावधान अवधारी ॥ ६२ ॥

पुत्रेष्टी याग करी दशरथ । ऋष्यशृंग कर्ता तेथ । एक ताट पायसयुक्त । दिधलें निश्चित [तं. सु. गे. नि. घा. 'अग्निपुरुषें'.] यज्ञपुरुषें ॥ ६३ ॥

त्याचें केलें चारी भाग । एका पिंडाचें आम्ही [कं. मु. 'दोघें'.] चौघे ।
[मु. 'सापत्न भागाचा'.] सापत्नभावाचा [कं. मु. 'विभाग'.] विलाग । [मु. 'विकल्प दोघा'.] विकल्पदाघ नाहीं आम्हां ॥ ६४ ॥

प्रथम पायसा तिनीं भाग । घारीनें नेला कैकयी भाग ।
[मु. 'दो भागांचे'; कं. दोहीं'.] दोघींच्या भागांचें केले चारी भाग । ते आम्ही चौघे एकपिंड ॥ ६५ ॥

पांचवा भाग घारी नेत । तेणें ते जाली शापमुक्त । तिसी अंजनीं जन्म प्राप्त । भाग उदरांत तियेच्या ॥ ६६ ॥

त्या भागाचा जाण निश्चित । जन्म पावला हनुमंत । यालागीं म्हणती अंजनीपुत्र । वायुसुत [भा/२. तं. तु. कं. 'तेही ऐका'; त. 'तेही एकें'; मु. 'तोही एकें'.] ते ऐक ॥ ६७ ॥

अंजनीं उदरीं भाग संपूर्ण । यज्ञपुरुष जाणें आपण । तिसीं विचरला त्याचा प्राण । वायुनंदन या हेतु ॥ ६८ ॥

अर्धभागें आम्हां जन्म प्राप्त । सगळ्या भागाचा हनुमंत ।
यालागीं तो बळें अद्भुत । तिहीं लोकांत आतुर्बळी ॥ ६९ ॥

[तं. 'हा कपि पांचवा कां'; त. 'हा एका पिंडाचा पाचवा'; सु. गे. नि. 'हा एक पिंडींचा पांचवा कां'.] हा एक पिंडी पांचवा कां । सौमित्रा [मु. प्रतीत 'तुज' अधिक पद.] असावा ठाऊका । पुढां भेटेल पांचवा सखा । हनुमंत देखा साहाकारी ॥ ७० ॥

पिंडभागाचें गुह्यज्ञान । हें मी जाणें रघुनंदन । वेदशास्त्रां अटक [मु. 'पूर्ण'.]जाण । ते म्यां कथन सांगितलें ॥ ७१ ॥

[तं. प्रतीत हे श्लोक नाहीत.] तथोक्तो धर्मशीलेन भ्रात्रा तस्य हिते रतः । लक्ष्मणः प्रविवेशैव स्वानि गात्राणि लज्जया ॥ १४ ॥ [वा. रा. अ. का. सर्ग ९७, श्लोक १९.]

अनुक्रमणिका

इति संभाष्यमाणस्तु रामः सौमित्रिणा सह । तां चमूं हर्षसंपूर्णां ददर्श सहसा तथा ॥ १५ ॥
अवतीर्य धनुर्बाणं लक्ष्मणो लज्जयान्वितः । रामस्य पार्श्वमभ्येत्य परितस्थावधोमुखः ॥ १६ ॥

**ऐकोनी श्रीरामाचें वचन । लक्ष्मण जाला विस्मयापन्न ।**
[मु. प्रतीत 'म्हणें' हे अधिक पद.] **आम्हां चौघांचा एक प्राण । भरत शत्रुघ्न भिन्न नव्हती ॥ ७२ ॥**

**ऐसें विचारितां आपण । लक्ष्मण जाला लज्जायमान । युद्धक्रोध अति दारुण । हें मूर्खपण पैं माझें ॥ ७३ ॥**

**एवं अति लज्जायमान । उतरोनियां धनुष्याचा गुण । वंदूनी श्रीरामाचे चरण । जाला लक्ष्मण अति शांत ॥ ७४ ॥**

**विचारु करी आपण्या आपण । केवढें माझें मूर्खपण । भरत शत्रुघ्न आमचा प्राण । त्यासीं मीं रण** [मु. पाठ 'त्यासी म्यां रण कां सांधावें'; कं. 'त्यासी समरंगण कां साक्षावें'.] **करूं धावें ॥ ७५ ॥**

**धन्य धन्य श्रीरामाचें ज्ञान । जाणें भूत भविष्य वर्तमान । माझें निरसूनी अज्ञान । समाधान मज दिधलें ॥ ७६ ॥**

[पै. कं. तं. भा/२. तं. मु. 'विरोधकर्माचें'.] **विरोधधर्माचें अतिदुःख । सांडूनीं** [मु. प्रतीत हे पद नाही.] **युद्ध क्रोध निःशेष । श्रीरामाचे पाठिसी देख । अधोमुख राहिला ॥ ७७ ॥**

**श्रीरामें वारिला सौमित्र ।** [तं. 'सेना'; मु. 'सेनेने'.] **सेनानी देखोनी साचार । अवघीं केला जयजयकार । हर्षनिर्भर संन्यासी ॥ ७८ ॥**

**आम्हीं न करितों रण । मागें न वचतों पळोन । साहोनी सौमित्राचे बाण । त्यजितो प्राण क्षात्रधर्में ॥ ७९ ॥**

**येवढा आमचा अनर्थ । चुकवावया श्रीराम समर्थ । स्वधर्म रक्षी श्रीरघुनाथ । कृपावंत दीनांचा ॥ ८० ॥**

[मु. पाठ 'युद्धें स्वामीद्रोही समस्त.'] **स्वामीसी युद्धद्रोही समस्त । मागें पळतां नरकपात । क्षात्रधर्माचा अनर्थ । श्रीरामें निश्चित चुकविला ॥ ८१ ॥**

**करितां रामनाम स्मरण । सद्य अनर्था निर्दळन । तो राम देखिल्या जाण । जन्म मरण आम्हां नाहीं ॥ ८२ ॥**

**ऐसें सैन्यक बोलती । करूनि श्रीरामाची स्तुती । अवघे आनंदें नाचती । रघूपति कृपाळु ॥ ८३ ॥**

**भरत भेटों आला वना । हर्ष सीतेचिया मना । देखोनियां निजसेना । तिसीं चौगुणा आल्हादु ॥ ८४ ॥**

**येथें भेटोनियां भरत । श्रीराम नेईल अयोध्येआंत । स्वराज्य पावेल रघुनाथ । ऐसा भावार्थ सीतेसी ॥ ८५ ॥**

अनुक्रमणिका

[तं. प्रतीत हा श्लोक नाही.] निविष्टायां तु सेनायां सोल्हासो भरतस्तदा । ददर्श भ्रातरं हृष्टं शत्रुघ्नसहितो विभुः ॥ १७ ॥ [वा. रा. अ. का. सर्ग ९९, श्लोक १.]

**आला ऐकोनी रघुनाथ । सैन्य राहाऊनी समस्त । रथ सांडुनिया भरत । पायी धांवत अन्हवाणी ॥ ८६ ॥**

**धना लागीं जेवीं कृपण ।** [मु. 'दुकाळियालागीं मिष्टान्न'.] **दुकळलियां जेवीं मिष्टान्न । देखावया रामदर्शन । तैसें मन भरताचें ॥ ८७ ॥**

**चकोरा जैसे चंद्रकिरण । जीवनालागीं जैसे मीन । देखावया रघुनंदन । तैसें मन भरताचें ॥ ८८ ॥**

**चुकलियां निजबाळ । मातेसी भेटीची कळवळ । श्रीराम भेटावया तत्काळ । तैसी तळमळ भरतासी ॥ ८९ ॥** [ही ओवी कं. प्रतीत नाही.]

**बहूकाळें आल्यां भर्ता । आल्हादें भेटे पतिव्रता । तैसें भेटावया रघुंनाथा । उल्हासु चित्ता भरताच्या ॥ ९० ॥**

**वानरा आवडती चणे । गट्ट करूनि गालीं भरणें । तैसेनी निजप्रेमें पूर्णे । भेटोंधावणें श्रीरामा ॥ ९१ ॥**

**देखोनिया सोलिवें केळें । वानर उडी घाली तत्काळें । तैसा आनंदकल्लोळें । प्रेमसंमेळें आला भरतु ॥ ९२ ॥**

**जीवासवें जैसा प्राण । भरतासवें तैसा शत्रुघ्न । भेटावया रघुनंदन । उद्यत मन दोहींचें ॥ ९३ ॥**

**साखरेसवें जेवीं गोडपण । सुमनासवें सुवास पूर्ण । भरतासवें तैसा शत्रुघ्न । रघुनंदन पाहावया ॥ ९४ ॥**

[सु. गे. प्रतींत ही ओवी नाही.] **उदकासवें** [नि. घा. प्रतींत 'जैसे' अधिक पद.] **शीतळपण । चंद्रासवें प्रभापूर्ण । तेवीं भरतासवें शत्रुघ्न । रघुनंदन पाहावया ॥ ९५ ॥**

[तं. प्रतीत हे श्लोक नाहीत.] अथोपविष्टमासीनं सीतया लक्ष्मणेन च । ददर्श भरतः श्रीमान्दुःखशोकभयप्लुतः ॥ १८ ॥
पादावप्राप्य रामस्य पपात भरतस्तदा । शत्रुघ्नश्चैव रामस्य ववंदे चरणौ तदा ॥ १९ ॥
तावुभौ च समालिंग्य रामोऽप्यश्रूण्यवर्तयत् ॥ २० ॥ [वा. रा. अ. कां. सर्ग ९९, श्लोक ३७ व ४०.]

**श्रीराम सौमित्र आणि सीता । भरत जालासे देखतां । उल्हास न संडे चित्ता । प्रेमावस्था नावरे ॥ ९६ ॥**

**धांवोनी धरिलें** [त. 'दोन्ही चरण'.] **दृढ चरण । सवेंची घातलें लोटांगण । अश्रुधारा स्त्रवती लोचन । प्रेमें शत्रुघ्न लागला पायीं ॥**

**त्या दोघांचें गळती नयन । श्रीरामाचें स्त्रवती लोचन । तिघां पडिलें आिळंगण । त्रिवेणी पूर्ण होऊं सरली ॥ ९८ ॥**

अनुक्रमणिका

[कं. तु. प्रतींत ही ओवी नाही.] **श्रीराम** [मु. प्रतीत ‘पूर्ण’ हे अधिक पद.] **स्वयें गंगाजीवन । भरत यमुना अति पावन । सरस्वती तो शत्रुघ्न । त्रिवेणी पूर्ण हों सरली ॥ ९९ ॥**

**संगमीं दिसे त्रिवेणीरूप । पुढें गंगोदक निष्पाप । भरतशत्रुघ्न निर्विकल्प । श्रीरामरूप** [कं. पै. त. खेरीज इतरत्र ‘तेवीं’.] **ते जाले ॥ १०० ॥**

**लवणजळा जाहाली भेटी । तैसी खेंवा पडिली मिठी । विरोनी** [मु. प्रतीत ‘ते’ हे पद अधिक.] **येरयेरांचा पोटीं । ऐक्य संतुष्टी सुखरूप ॥ १०१ ॥**

**अग्नि कापुरा आळिंगण ।** [मु. ‘परम’.] **प्रथम प्रेमें दैदीप्यमान । सवेंची दोहीं हारपोन । होती गगन निर्विकार ॥ १०२ ॥**

**तैसें भरत आणि शत्रुघ्न । श्रीरामीं देतां आळिंगण । दोघां नाठवे दोनीपण । जाले परिपूर्ण श्रीराम ॥ १०३ ॥**

**अग्नीसी काष्टें खेंव देती । तेही अग्निरूप स्वयें होती ।** [तं. ‘भरत शत्रुघ्न तेचिं रीती’. मु. ‘भरत शत्रुघ्नाची तैसी स्थिती’.] **भरतशत्रुघ्न त्या स्थितीं । स्वयें होती श्रीराम ॥ १०४ ॥**

[कं. तु. सु. गे. या प्रतींत ही ओवी नाही.] **त्यांचें देखोनी आळिंगण । सीता अणि लक्ष्मण । त्यांचेही गळती नयन । जेवीं घृतकण रवितेजे ॥ १०५ ॥**

[कं. तु. सु. गे. प्रतींत ही ओवी नाही.] **भरत आणि शत्रुघ्न । तिहीं वंदितां लक्ष्मण । ऐक्यें पडिलें आळिंगण । भिन्नपण दिसेना ॥ १०६ ॥**

**एकपिंडें जन्मले सृष्टीं । त्यासी खेवा** [त. ‘पडे’; भा. सु. नि. गे. घा. ‘पडली’.] **पडतां मिठी । विसरोनी दुःख कोटी । सुखसंतुष्टी श्रीरामें ॥ १०७ ॥**

**जवळीं असतां रघुटिळक । पूर्वी हेळणा स्वाभाविक । वियोगसंगमाचें सुख । द्वंद्वदुःख विसरले ॥ १०८ ॥**

[सु. गे. घा. ‘भय’.] **नित्य निकट असतां जाण । स्वभावें उपजे हेळन । हेळणासवें दोषगुण । सहजें संपूर्ण देखती ॥ १०९ ॥**

> [तं. प्रतीत हा श्लोक नाही.] अतिपरिचयादवज्ञा संततगमनादनादरो भवति । मलये भिल्लपुरंध्री चंदनतरुकाष्ठमिंधनं कुरुते ॥ २० ॥

**चंदना सभोंवते समस्त । आरी बोरी चंदन होत । त्यांसीं द्विज देव मांथा वंदित । घेती श्रीमंत बहुमोलें ॥ ११० ॥**

**येवढी चंदनीं** [मु. ‘अति प्रेमा’; तं. भा/२ तु. कं. त. ‘निववितीं प्रेमा’.] **निववितीं प्रमा । दीपोंदीपीं अगाध महिमा ।**

अनुक्रमणिका

त्यांसी भिल्लांगना अति अधमा । आणिती अधर्मा कोळसा करूनि ॥ १११ ॥

तें मुख्य चंदन मलयाद्री । तेथ भिल्लांचिया अधमा नारी ।
त्यासी जाळुनी आगी माझारीं । रांधिती त्यावरी कांजी भाजी ॥ ११२ ॥

निकट वासें उबगु आला । सुवास हेळसुनी सांडिला । विषय साधावया आपला । चंदनु जाळिला विषयार्थी ॥

चंदनाचा गुण कैसा । जाळितांहिं दे सुवासा । तो नयेची भिल्लाच्या मानसा । त्याची निजाशा [त. 'त्याच्या निजाशा कांजी शिजवती'; तं. 'त्याची निजाशा शिजवी कांजी'; मु. 'त्याचेनि काष्टीं शिजवी कांजी'; कं. 'त्याची निजाशा जाळावा कांजी'.] सिजावी कांजी ॥ ११४ ॥

तैसें साधुपासी एक आहाति । गुण देखिला तो हेळसिती । मग आपुलें विषयार्थी । [तं. 'जाली धांवती मर्कटवेशें'; मु. 'जाळू जैं धावती वर्म स्पर्शें'; कं. 'जाळू धांवती वर्मः स्पर्शः'.] जाळुं धांवती मर्मस्पर्शे ॥

अहोरात्री असोनी संगतीं । जे साधुचा दोष नेदखती । ते ते धन्य त्रिजगतीं । त्यांतें वंदिती शिवशक्र ॥ ११६ ॥

साधुसंगतीं अहर्निश । असोनी न देखे गुणदोष । त्यापासीं अवतारपुरुष । घ्यावया उपदेश स्वयें येती ॥ ११७ ॥

अवतारमूर्ति श्रीवामन । त्यासी कश्यप उपदेशी ज्ञान । अगाध [सु. गे. घा. 'सिद्धांचें'.] साधूचें महिमान । पूज्य सज्ञन तिहीं लोकीं ॥

याची रामायणा आंत । वसिष्ठापासीं श्रीरघुनाथ । विनीतता उपदेश घेत । साधुसंत अति पूज्य ॥ ११९ ॥

जावया गुणदोषहेळणासीं । वियोग जालिया साधूसीं । त्यांचा अनुतापदोष निरसी । पुढें भेटीपासीं स्वानंद ॥

राम त्यजूनी मातुळीं भरत । वियोग अनुतापें तो सुस्नात ।
पुढती [मु. 'भेटतांचि रघुनाथ'; तं. भा/२. तु. त. कं. 'भेटतां रघुनाथ'.] भेटतां तो रघुनाथ । सद्यः सुख प्राप्त भरतासी ॥ १२१ ॥

वियोगाचा जो [पै. प्रतीत 'कां' हें अधिक पद.] का संयोग । पापभंगें होय सुखभोग । भरत सुखी जाला सांग । निवालें सर्वांग शत्रुघ्नाचें ॥

श्रीराम भरत आणि शत्रुघ्न । ऐक्यें पडिलें आलिंगण । खेंवामाजीं सुखसंपन्न । स्वानंदघन श्रीराम ॥ १२३ ॥

दीपीं अनेक दीप लाविती । सकळ दीपा एकीची दीप्ति ।
भरत शत्रुघ्न तैसिया रीती । अभिन्नस्थिती भिन्न जाले ॥ १२४ ॥

जें सुख जालें श्रीरामभेटीं । तें सुख बोलतां न ये [कं. 'सृष्टी'; भा/२. तु. 'गोठी'; तं. त. सु. नि. घा. 'गोष्टी'.] वोठीं । एका जनार्दनी [कं. पै. भा/२. तु. खेरीज इतरत्र 'पडिली' हे अधिक पद.] मिठी । सुखसंतुष्टीं श्रीरामें ॥ १२५ ॥

भरता श्रीरामा अनुवाद । संवादें वोसंडें परमानंद । एका जनार्दनीं बोध । कथानुवाद सुख सेव्य ॥ १२६ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां भरतश्रीरामसंयोगो नाम पंचदशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सोळावा

## श्रीराम भरत चित्रकूट समागम—पितृपिंड पर्याय

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

[तं. सु. गे. या प्रतींत संस्कृत श्लोक १ ते ४ नाहीत.] आघ्राय समस्तं मूर्ध्नि परिष्वज्य च राघवम् । अंके भरतमारोप्य पर्यपृच्छत सादरम् ॥ १ ॥
क्व नु तेऽभूत्पिता तात यदरण्यं त्वमागतः । न हि त्वं जीवतस्तस्य वनमागंतुमर्हसि ॥ २ ॥
किंतु वीर महारण्ये तवागमनकारणम् । कश्चिद्दशरथो राजा कुशली सत्यसंगरः ॥ ३ ॥
तात कश्चिच्च कौसल्या सुमित्रा च प्रजावती । सुखिनी कच्चिदार्या च देवी नंदति कैकयी ॥ ४ ॥ [वा. रा. अयो. कांड सर्ग १००, श्लोक ३, ४, ८ व १०.]

**अति प्रीतीं श्रीरघुनंदन । भरत आणि** [कं. तं. सु. नि. गे. घा. या प्रतींत हे पद नाही.] **तो शत्रुघ्न । हृदयीं धरिलें आळंगून । सुखसंपन्न तेणें** [तं. सु. नि. गे. घा. 'दोघे'.] **दोन्ही ॥ १ ॥**

**राम हृदया** [त. सु. गे. घा. 'राम हृदय एक जालें'; नि. 'हृदया हृदय एक जालें'.] **हृदय येक जालें । तेणें सुखाचें भरितें आलें । दुःख निःशेष निमालें । सागर भरले स्वानंदें ॥ २ ॥**

**परमानंदें तृप्ति गाढी । द्वंद दुःखें** [तु. सु. नि. घा. गे. 'देशोधडी'.] **देशधडी । होत हरिखाचिया कोडी । जोडिला जोडी श्रीराम ॥ ३ ॥**

**मग भरतासी रघुनंदन । मस्तकीं** [पै. खेरीज इतरत्र 'करोनी'.] **करी अवघ्राण । अंकीं बैसऊनि जाण । काय आपण पुसतु ॥ ४ ॥**

**तुज राज्याचें अभिषेचन । न व्हावया काय कारण । तेथ कोण पडिलें विघ्न । तेंही संपूर्ण मज सांग ॥ ५ ॥**

**दशरथ आमचा पिता ।** [तं. 'सुखें आहे'; तं. 'सुखे आहे कीं स्वस्थचित्ता'.] **सुखें आहे स्वस्थचित्ता । मज वनवासा निघतां । बहु अवस्था तेणें केली ॥ ६ ॥**

**मज निघतां वनस्थळीं । तूं तेव्हां नव्हतासी जवळी । जळावेगळी मासोळी । तैसा तळमळी मजलागीं ॥ ७ ॥**

**देखोनिया रायाच्या दुःखकोटी । मी निघालों उठाउठी । नाहीं पुरती घेतली भेटी । नाहीं गोष्टी सांगितली ॥ ८ ॥**

**असा राजा दुःखाभिभूत ।** [मु. 'तूं सांडोनि वना आलासी येथ'.] **सांडुनी वना येणें येथ । हें तंव तुझें** [मु. प्रतीत 'गा' हे अधिक पद.] **अनुचित । बुद्धिवंत तूं नव्हसी ॥ ९ ॥**

**दुःखित राजा स्वयें सांडून । दूरी पंथ अति** [मु. 'अतिक्रमोन'; तं. 'अतिकर्मुन'; भा. /२. 'अतिधावोन'.] **अश्वान । तुम्ही कां**

आलैति दोघैजण । तें कारण मज सांगा ॥ १० ॥

[मु. 'एक एकल्यावेगळे नव्हतां जाण'; तं. कं. 'एक एका वेगळे नव्हेती जाण'; त. 'एक एका वेगळा न भवता जाणु'.] अभिषेक नव्हता जाण । तुम्हीं दोघीं कां घेतले रान । कां राहिलें [पै. तु. 'राज्यसेचन'.] राज्याभिषिंचन । तेंही कारण मज सांगा ॥

माझ्या तुझ्या [नि. घा. 'सखी'.] दोघी माता । आहेत कीं [पै. 'दोघी स्वस्था'; तं. कं. 'सुख स्वस्था'.] सुखरूपता । सुमित्रा जे पतिव्रता । ते सुखरूपकता आहे कीं ॥ १२ ॥

स्वामी वसिष्ठ असतां तेथ । तुम्ही [मु. 'कां'.] कैसेनि आलेति येथ । हा तुमचा निजवृत्तांत । इत्थंभूत मज सांगा ॥ १३ ॥

ऐसें पुसतां रघुनंदन । ऐकतां भरता आलें रुदन । कांहीं नेदवे प्रतिवचन । मूर्च्छापन्न तो पडिला ॥ १४ ॥

शत्रुघ्न सांगे दुःखावस्था । आम्ही अयोध्येसी न येतां । तुज वनवासा जातां । प्राणान्त व्यथा रायासी ॥ १५ ॥

सुमंतें आणिला रिता रथ । देखोनी अतिदुःखी दशरथ । श्रीराम वार्ता पुसत पुसत । पडे मूर्च्छित धरणीये ॥ १६ ॥

[सु. गे. घा. या प्रतींत या ओवीचे पहिले तीन चरण पुढीलप्रमाणे आहेत :–– 'श्रीराम न देखतां दृष्टीं । श्रीराम आठविता पोटीं । श्रीराम स्मरतां कंठीं ॥']श्रीरामी नव्हेची भेटी गोठी । श्रीराम नेदखेची दृष्टीं । श्रीराम आठवितां पोटीं । पडिला दृष्टीं मूर्च्छित ॥ १७ ॥

मूर्च्छेमाजी म्हणे आपण । श्रीरामा दाखवी [मु. प्रतीत 'आपुलें' हे अधिक पद.] वदन । श्रीराम स्मरतां संपूर्ण । स्मरणें प्राण सांडिला ॥ १८ ॥

"राम [पै. खेरीज इतरत्र 'मनी'.] श्रवणीं राम वदनीं । राम नयनीं राम ध्यानीं " । श्रीराम धरुनी अनुसंधानीं । देह त्यजूनी गेला रावो ॥

तुवां केलें वनप्रयाण । आम्ही जवळीं नसतां जाण । करितां [तु. 'कीर्तन स्मरण'; पै. खेरीज इतरत्र 'नाम' हे पद नाही.] श्रीरामनामस्मरण । रायें प्राण सांडिला ॥ २० ॥

ऐसें सांगता शत्रुघ्न । दुःखें मूर्च्छित पडिला पूर्ण । आइकोनी पित्याचें मरण । मूर्च्छापन्न श्रीराम ॥ २१ ॥

दुःखें सीता रुदनपर । दुःखें मूर्च्छित सौमित्र । [कं. सु. गे. 'चौघेही राजपुत्र'; घा. 'चौघेहि राज्याचे पुत्र'; नि. 'चौघेहि राजाचे राजपुत्र'.] चौघेही रायाचे राजपुत्र । जाले पात्र अतिदुःखा ॥ २२ ॥

पडतां श्रीराम अश्रुबिंदु । दशरथा सुख स्वानंदु । श्रीरामाचा दुःखावबोधु । परमानंदु दशरथा ॥ २३ ॥

श्रीराम सुखरूप स्वतंत्र । करुणारूपें उद्धरी पितर । दशरथ सुखी केला साचार । सुखसागर श्रीराम ॥ २४

अनुक्रमणिका

॥

श्रीराम जाहाला सावधान । त्यासी सांगती भरत शत्रुघ्न ।
"[कं. सु. घा. गे. 'मातुळीहूनी येवोनी आपण । क्रिया संपूर्ण आचरलों ॥'] आम्ही रायाचें केलें विधान । स्नान पिंडदान तूं करी" ॥ २५ ॥

[कं. व मु. प्रतींत ही ओवी पुढीलप्रमाणे आहे :––'तुवां करावें शीघ्र स्नान । पिंडदान तिळतर्पण । सपिंडी करोनिया जाण । कर्म पूर्ण करावें ॥'] द्वादशांत [तं. 'दशांत विधिविधान'.] विधिविधान । आम्हीं आचरलों संपूर्ण । शीघ्र स्नान पिंडदान । तिळतर्पण तूं करी ॥ २६ ॥

तुझी आवडी रघुनाथा । अत्यंत होती [मु. प्रतीत 'गा' हे अधिक पद.] दशरथा । तुझेनी हातें पिंड देतां । सुखरूपता पावेल ॥ २७ ॥

श्रीरामें करितां रुदन । समस्त पितर सनातन । अवघे जाले सुखसंपन्न । हें गुह्यज्ञान कळेना ॥ २८ ॥

श्रीरामाचें गुह्यज्ञान । नेणती कर्मवादी सज्ञान । त्यांसी सांगती कर्मविधान । स्नान पिंडदान करी रामा ॥ २९ ॥

अगाध ज्ञानें श्रीरघुपति । कर्मीं ब्रह्म निज प्रतीती । कर्मक्रिया जे वेदोक्ति । ब्रह्मस्थिती प्रतिपाळी ॥ ३० ॥

कर्मीं ब्रह्म ब्रह्मीं कर्म । ऐसें बोलती ते मूर्ख परम । कर्म तें [तं. सु. तु. नि. घा. 'निखिल'.] निखळ परब्रह्म । हें जाणे वर्म श्रीराम ॥ ३१ ॥

श्रीराम [मु. पाठ 'कर्मीं'.] कर्मा कर्मगति । श्रीरामें कर्मीं ब्रह्मस्थिती । श्रीरामें कर्मा नित्यमुक्ति । श्रीराम निश्चितीं परब्रह्म ॥ ३२ ॥

ऐसा श्रीराम स्वयें ब्रह्ममूर्ति । तो हा स्वधर्म पाळी वेदोक्ति ।
ऐकतां दशरथ [पै. तं. तु. त. कं. 'निदानोक्ति'.] निधनोक्ति । मंदाकिनीप्रति स्नानार्थ आला ॥ ३३ ॥

रामलक्ष्मण सीतेसहित । सवें शत्रुघ्न आणि भरत । दशरथ क्षयाविधानार्थ । आले समस्त स्तानासी ॥ ३४ ॥

वसिष्ठ अत्यंत निजज्ञाता । तेणें [नि. घा. या प्रतींत 'कौसल्यासुमित्रादि' ही अधिक पदे आहेत.] श्रीरामाचिया माता । तेथ आणिल्या समस्ता । [सु. गे. 'स्नानार्थ आल्या एकत्र'; नि. घा. 'दुःखस्नानार्था एकत्र'.] स्नानार्था एकत्र ॥ ३५ ॥

तिहीं देखतां रघुनाथा । दीर्घ रुदनें आक्रंदतां । श्रीराम भेटल्या समस्तां । दुःखाभिभूता अति दुःखी ॥ ३६ ॥

कौसल्येसी केलें नमन । तिणें दिधलें दीर्घ आलिंगण । अश्रुधारा गळती नयन । प्रेम संपूर्ण मातेसीं ॥ ३७ ॥

अनुक्रमणिका

सुमित्रेचे चरणीं माथा । तिणें आळंगिलें रघुनाथा । तैश्याची माता समस्ता । होय वंदिता श्रीराम ॥ ३८ ॥

कौसल्या नमिता लक्ष्मण । तिणें सप्रेम दिधलें आलिंगण । तुझे केशीं झाडीन चरण । तुं संरक्षण [मु. प्रतीत 'करी' हे अधिक पद.] श्रीरामा ॥ ३९ ॥

सांडूनी निज मातापिता । सांडूनी [पै. भा/२. तु. खेरिज इतरत्र 'स्वभोग'.] स्वभोग्य [भा/२. प्रतींत हे पद नाही.] सुंदर निजकांता । वनीं रक्षिसी रघुनाथा । दासी सर्वथा मी तुझी ॥

श्रीरामीं अर्पिसी स्वादिष्टें फळ । नित्य मस्तकीं वाहासी जळ । काष्टें पुरविसी [पै. खेरीज इतरत्र 'प्रबळ'.] सर्वकाळ । दासी केवळ मी तुझी ॥ ४१ ॥

लक्ष्मण म्हणे अवो माते । मी तंव तुझें पोसणें येथें । मज उद्धरिलें श्रीरघुनाथें । पुडती चरणांतें वंदिलें ॥ ४२ ॥

सौमित्रें वंदिली सुमित्रा । तिणें आळंगिलें निजपुत्रा । [मु. प्रतीत 'ते म्हणें' ही अधिक पदे आहेत.] तुवां उद्धरिले उभय [पै. खेरीज इतरत्र 'पितरा'.] गोत्रा । श्रीरामचंद्रा सेवुनी ॥ ४३ ॥

[सु. गे. घा. या प्रतींत ही ओवी पुढील प्रमाणे :——'सौमित्रें निजमाता । कौसल्यें आलिंगिली सीता । म्हणे धन्य धन्य तूं पतिव्रता । होसी सर्वथा तूं माये ॥ १ ॥'] सौमित्रें निजमाता । "स्वयें वंदिल्या समस्ता" । [तं. 'कौसल्याचरणीं लागली सीता । पतिव्रता तूं माये ।'] कौसल्या आळंगी सीता । "पतिव्रता [नि. प्रतीत 'होसी सर्वथा' ही अधिक पदे.] तूं माये" ॥ ४४ ॥

सीतेनें घातलें लोटांगण । वंदिले सुमित्रेचे चरण । तिहीं दिधलें आळिंगण । आक्रंदें रुदन त्या करिती ॥ ४५ ॥

आळंगिता श्रीरघुनाथा । दुःख विसरल्या निजमाता । देखोनि वल्कलें जटा माथां । अति विस्मिता तटस्थ ॥ ४६ ॥

देखतां श्रीरामश्रीमुख । विसरोनि सकळ दुःख । माता पावल्या [नि. घा. 'परमसुख'.] निजसुख । सुखदायक श्रीराम ॥ ४७ ॥

वसिष्ठ म्हणे रघुनंदन । शीघ्र करूनिया स्नान । द्यावें दशरथा पिंडदान । जेष्ठविधान पितृप्रिय ॥ ४८ ॥

चौघेहि बंधु समस्त माता । सवें घेऊनिया सीता । श्रीराम जाला स्नान करिता । श्रीदशरथा उद्धरावया ॥ ४९ ॥

श्रीरामा करावया पिंडदान । [तं. 'पूर्ण'; सु. नि. गे. घा. 'तूर्ण'.] तीळ तंदूळ यवचूर्ण । भरतें आणिलें आपण । [पै. प्रती खेरीज इतरत्र 'तें' हे अधिक पद.] रघुनंदन नेघेची ॥ ५० ॥

अनुक्रमणिका

मी नाहीं सेवित अन्न । करितों वनफळें भक्षण । त्या फळांचें पिंडदान । करी आपण पितरार्थ ॥ ५१ ॥

मज वनवासाचें दृढव्रत । अन्न हातें नाहीं स्पर्शित । इंगुदी [कं. भा/२. तं. तु. 'पिनाक'; तं. 'पीनाएक'; पै. 'पीण्यांक'.] पुन्नाग अति पुनीत । पिंड पितरार्थ ते देईन ॥ ५२ ॥

यदन्नाः पुरुषा लोके तदन्नास्तस्य देवताः ॥ ५ ॥

जे काळी पुरुषा जें [मु. प्रतीत हे पद नाही.] जें अन्न । तेणें करावें [कं. सु. गे. घा. 'देवतार्चन'.] देवतायजन । तेणेंची पितरां पिंडदान । स्मृतिवचन वेदोक्त ॥ ५३ ॥

सौमित्रें इंगुदि [मु. प्रतीत 'फळें' हे अधिक पद.] मर्दून । सीता पिंड दे वळून । श्रीराम करी पिंडदान । कुशास्तरण याम्याग्र ॥ ५४ ॥ [कं. प्रतीत ही ओवी नाही.]

आणूनियां अरण्यतिळीं । अवघीं दीधल्या तिळांजुळी । तर्पण करितां कृष्णतिळीं । जालें ते काळीं अपूर्व ॥ ५५ ॥

आब्रह्मादिभुवन सर्व । देवऋषि पितृ मानव । ऐसें उच्चारितां राघव । अति अपूर्व तेथें जालें ॥ ५६ ॥

पिंड देतां श्रीरघुनाथ । गया गदाधर वोडवी हात । आब्रह्मादि कुळ समस्त । जालें [मु. 'नित्यतृप्त'; कं. 'मुक्तता'.] नित्यमुक्त श्रीरामा ॥ ५७ ॥

तुवां देतां तिळोदक । आब्रह्मभुवनीचे लोक । तेही जाले [मु. 'नित्यमुक्त'; कं. 'नित्यतृप्त'.] नित्यनिर्दोष । परमसुख पावले ॥ ५८ ॥

ऐसें बोलोनी उत्तर । अदृश्य जाला गदाधर । वसिष्ठें केला जयजयकार । तारिले पितर श्रीरामें ॥ ५९ ॥
श्रीराम स्वयें आत्माराम । त्याचें कर्म तें परब्रह्म । तो उच्चारी ज्याचें नाम । विश्रामधाम तो पावे ॥ ६० ॥
जपतां श्रीराम नामोक्ति । चाऱ्ही पुरुषार्थ पायां लागती ।
चाऱ्ही मुक्ति [त. 'दासी होती'; मु. 'आंदण्या येती'.] आंदण्या होती । येवढी ख्याती नामाची ॥ ६१ ॥

श्रीरामाचें [पै. प्रतीत या शब्दांची जागा झडलेली आहे.] वनप्रयाण । करावया दीनोद्धरण । एका विनवी जनार्दन । पितृतर्पण सिद्ध जालें ॥ ६२ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां श्रीरामभरतचित्रकूटसमागमो पितृपिंडपर्यायो नाम षोडशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सतरावा

## भरत समाधान

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीरामें उद्धरिले पितर । गगनीं करिती जयजयकार । सुमनें वर्षती सुरवर । जगदोद्धार श्रीरामें ॥ १ ॥

मार्गीं चालतां देखती डोळां । मनोहरा पर्णशाळा । सौमित्रें रचिल्या विशाळा । जनकबाळा स्वयें सांगे ॥ २ ॥

[कं. मु. प्रतींत 'ते' हे अधिक पद.] देखोनी म्हणती माता । धन्य जीवित सुमित्रासुता । वनीं सुखरूप श्रीरामसीता । जाणा तत्त्वतां याचेनि ॥ ३ ॥

याची सेवा अति निर्वाण । श्रीरामचरणीं विकिला प्राण । मस्तकीं जळ वाहे आपण । काष्ठें संपूर्ण हा आणी ॥

श्रीरामसीतेचें चरणक्षाळण । नित्य नेमस्त करी [कं. व मु. पाठ 'आपण'.] लक्ष्मण । स्वादिष्ट फळें पुरवी संपूर्ण । [मु. प्रतीत 'आणि' हे अधिक पद.] जागरण अहर्निशी ॥ ५ ॥

वनीं वसतां श्रीरघुनाथा । येणें विसरविली मातापिता । विसरविली राज्यभोगता । सुख रघुनाथा याचेनि ॥ ६ ॥

आईकोनी लक्ष्मणाची स्थिती । आश्रम देखोनी समस्तीं । पर्णशाळा शोभा देती । विचित्रा युक्ति मनोहरा ॥ ७ ॥

सडे चौक रंगमाळा । वृंदावनें सुमनशाळा । आश्रम [मु. 'देखोनी'.] देखतांचि डोळां । सुख सकळां पैं जालें ॥ ८ ॥

वसिष्ठ सुखावोनी चित्तीं । आळंगिला परम प्रीती । धन्य लक्ष्मणा तुझी भक्ति । [मु. 'श्रीरामाप्रति'.] श्रीरघुनाथीं सद्भावो ॥ ९ ॥

लक्ष्मणें स्वयें आपण । वंदिले वसिष्ठाचे चरण । तुझेनी तीर्थ परम पावन । अनन्य भजन श्रीरामीं ॥ १० ॥

तुझी कृपा अति समर्थ । कृपेनें जोडला श्रीरघुनाथ । ऐसेनि स्वानंदें डुल्लत । आश्रमांत बैसले ॥ ११ ॥

आइकोनियां जयजयकार । प्रधान सेनानी [तं. 'सैन्यभार'; मु. व तु. प्रतींत 'सैन्य' हे पद नाही; कं. 'समग्र'.] सैन्यसंभार । भेटावया श्रीरामचंद्र । अवघे सत्वर चालिले ॥ १२ ॥

अश्वगजांचा खडखडाट । रथ चालिले घडघडाट । सैन्य चालिलें घनदाट । श्रीराम वरिष्ठ वंदावया ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

देखोनि श्रीरामाचें श्रीमुख । सुखी जाले एक एक । अयोध्येचे सकळ लोक । परम सुख पावले ॥ १४ ॥

श्रीराम देखतांची दिठीं । हरिख न समाये पोटीं । आनंदें वोसंडली सृष्टी । डोळेभेटी होतांची ॥ १५ ॥

उठूनिया रघुनंदन । प्रधानादि सकळ जन । त्यांसी दिधलें आलिंगण । आदि करून [मु. 'गोरक्षका'.] गोरक्षीं ॥ १६ ॥

श्रीरामालागीं आर्तभूत । वना आले उत्कंठित । त्यांसी न आळंगी रघुनाथ । ऐसा ग्रंथार्थ न [पै. कं. 'मनावा'; इतरत्र 'मानावा'.] म्हणावा ॥ १७ ॥

[तु. प्रतीत ही ओवी नाही.] राम सर्वांचा हृदयस्थ । राम [मु. 'श्रीराम सर्वा हृदयीं नित्य व्याप्त'.] सर्वेंद्रियीं नित्य व्याप्त । [कं. व मु. प्रतींत 'तो' हे अधिक पद.] दीनांसी नेभटे रघुनाथ । ऐसा ग्रंथार्थ न मनावा ॥ १८ ॥

आश्रम देखोनी समस्त । अतिशयें जाले विश्रांत । वंदूनिया श्रीरघुनाथ । सभा तटस्थ बैसली ॥ १९ ॥

बोलावया कृतकार्यार्थ । कोण्हाहि सामर्थ्य नव्हे [मु. व कं. प्रतींमध्ये हे पद नाही.] तेथ । [मु. 'तेथ'; तं. तु. त. 'ते वेळी'; कं. 'ते वेळें'.] तेव्हेळीं उठुनिया भरत । श्रीरघुनाथ वंदिला ॥ २० ॥

भरत म्हणे रघुनाथा । अयोध्येसी [मु. पाठ 'चालिजे'.] चाल आतां । राज्यभार घेऊनी माथां । आम्हां समस्तां प्रतिपाळी ॥ २१ ॥

त्वरेन मज याविया येथ । हेंचि माझें मनोगत । तूं सर्वज्ञ श्रीरघुनाथ । सत्यानृत जाणसी ॥ २२ ॥

ऐसें बोलतां भरत । हांसीन्नला श्रीरघुनाथ । [मु. प्रतीत 'म्हणें' हे अधिक पद.] भाग नेमुनी गेला दशरथ । [मु. 'तो'.] त्याचा वचनार्थ प्रतिपाळी ॥ २३ ॥

तुज अयोध्याराज्याभिषेचन । मज नेमिलें वनप्रयाण । पितृवाक्य [पै. खेरीज इतरत्र 'परम'.] अतिप्रमाण । अन्यथा [तं. 'जाण मी न करीं'; मु. 'कोण करू शके'.] कोण करील ॥ २४ ॥

पित्याचेनी वाक्यें जाण । म्यां केलें वनप्रयाण । तुवां करावें राज्यग्रहण । [मु. 'प्रतिपाळण पितृवाक्य'.] परिपाळण पितृवाक्या ॥ २५ ॥

जितां [तं. त. 'पावी'.] पाळिली [मु. 'पित्राज्ञा'.] राजाज्ञा । मेल्यां करूं नये अवज्ञा । विचारी भरता सर्वज्ञा । [कं. मु. पाठ 'तु' हे अधिक पद आहे.] पितुराज्ञा [पै. खेरीज इतरत्र 'प्रतिपाळी'.] परिपाळी ॥ २६ ॥

वेदवचन पितृवचन । जो पाळीना गुरुवचन । त्यासी होय अधःपतन । तैसें आपण न करावें ॥ २७ ॥

पितुराज्ञा मानुनी माथां । [पै. खेरीज इतरत्र 'राज्य अंगीकारीं गा भरता'.] राज्य करावें भरता । तुज मी अभिषेचीन आतां । आग्रहो सर्वथा न करावा ॥ २८ ॥

अनुक्रमणिका

माझेनी हाते अभिषेचना । [पै. भा. तु. 'करावें आवडे तुझिया मना'; कं. 'करावया आवडी तुझिया मना'; मु. 'करूं आवडे तुझिया मना'.] करावें आवडेल तुझिया मना । यालागीं तूं आलासी वना । सत्य सर्वज्ञा भरता तूं ॥

आइकोनी श्रीरामाचें वचन । भरत सांडूं पाहे प्राण । राज्य नव्हें हें महाविघ्न । मज संपूर्ण वोडवलें ॥ ३० ॥

मज [मु. 'वनालागीं'; तं. तु. 'वनवासा'; भा. /२ त. 'वनवासीं'; कं. 'वनवासीं'.] वनवासी येतां । जो तो म्हणे मारूं जातो रघुनाथा । सेखी श्रीरामुही आतां । मजचि भवंता लागला ॥ ३१ ॥

राज्य आलियाचें सुख । [मु. 'जो मानी तो अति मूर्ख'; तं. तु. 'सुख मानी तो परम मूर्ख'; पै. 'तंव परम मूर्ख'.] मानी तो परम मूर्ख । राज्यलोभाचें महाविख । कैकया देख मज दिधलें ॥ ३२ ॥

श्रीरामसेवा सुखसंतुष्टी । सांडुनी राज्यलोभी दृष्टि । ते ते अभाग्य जन्मले सृष्टीं । दुःखकोटी भोगावया ॥ ३३ ॥

भरत मारुं जातो रघुनाथा । जगीं पावलों हे अतिनिंद्यता ।
वनवासां आलों शरणार्था । अभिषेकार्था तूं म्हणसी ॥ ३४ ॥

तुझेनि हातें राज्याभिषेक । जो वांच्छी तो अनामिक । [मु. 'अंत्यजा माजीं अंत्यज एक'.] अंत्यजा अंत्यजु तो एक । आत्मघातक महापापी ॥ ३५ ॥

तुज वांचुनी श्रीरघुनाथा । राज्याभिषेकु ज्याचा माथां । तो [पै. भा. /२ तु. या प्रतींखेरीज इतरत्र हें पद नाही.] तो महापापी तत्त्वतां । सत्य सर्वथा श्रीरामा ॥ ३६ ॥

वृद्धपरंपरा राज्यपाटा । राज्याभिषेकु मुख्य [मु. 'वरिष्ठ'; पै. तु. भा. /२ खेरीज इतरत्र 'ज्येष्ठ'.] ज्येष्ठा ।
तो केवी लाभे [पै. भा. /२ तु. खेरीज इतरत्र हे पद नाही.] गा कनिष्ठा । विचार [कं. पै. भा. /२ तु. खेरीज इतरत्र 'श्रेष्ठ'.] श्रेष्ठां श्रीरामा ॥ ३७ ॥

[कं. तं. त. 'जे आभरण शोभे गजा'; तु. 'निजाभरणी शोभा गजा'; मु. 'जो भार शोभे गजा'.] जे आभरणीं शोभा गजा । [मु. 'तो भार घालितां मरे अजा'; त. तं. 'तो भार वाहतां मरे अजा'; पै. 'तो भारू बाणितां मिरवे अजा'.] तो भारू बाणितां मरे अजा ।
तेवीं तुझें राज्य रघुराजा । अभिषेकीं माझा प्राणान्त ॥ ३८ ॥

माझा करणें आहे घात । आतांची अभिषेकावा भरत । तुजदेखता जाल्या प्राणान्त । परम मुक्त मी होईन ॥ ३९ ॥

ऐसा जालिया [मु. 'अभिषेकार्थ'.] अभिषेकान्त । सहजें भेटेल दशरथ । त्यासी हा सांगेन वृत्तान्त । अभिषेकें मृत्यू मज [मु. 'आला'; भा. /२ तु. 'रामा'.] राया ॥ [कं. 'प्रतीत' ही ओवी नाही.]

असें तूं म्हणसी आपण । राज्याभिषेक पितृवचन । ते मी न मनी गा प्रमाण । तेहीं लक्षण अवधारी ॥ ४१ ॥

अनुक्रमणिका

तुज वनवासा मज राज्यता । वांटे करितां श्रीदशरथा । तेव्हां जवळीं मी नव्हता । श्रुत सर्वथा मज नाहीं ॥ ४२ ॥

जे म्यां देखिलें ना आइकिलें । तें मज राज्य न वचें केलें । तूं म्हणसी मायेनें दिधलें । तेंही नाथिलें अवधारी ॥

मज राज्य दिधलें म्हणसी माया । [मु. प्रतीत 'तें' हे अधिक पद.] माया मिथ्या गा रघुराया ।
साच शिवतों तुझिया पायां । मायाकृतकार्या मी न करी ॥ ४४ ॥

ऐक मायेचा [मु. 'कृतकार्यार्थ'.] कार्यार्थ । वनां दवडिला रघुनाथ । जिवें घेतला दशरथ । दुःखी भरत [कं. व मु. 'पैं'.] त्या केला ॥ ४५ ॥

मायेचें केलें ऐसेंचि घडे । एकपिंडाबंधु वैर पडे । सुनेसी पुत्र करुनी उघडे । वना रोकडे दवडिले ॥ ४६ ॥

मायेमाजी अति निष्ठुरता । दुःखी केलें श्रीरघुनाथा ।
चरणचाली दवडिली सीता । केलें समस्तां अति दुःखी ॥ ४७ ॥

अति विपरीत [भा. /२ तं. 'माया मार्गी'.] मायामांगी । आपलें सौभाग्य आपण भंगी । निंद्यत्व पावोनी जगीं । तऱ्ही ते उगी न ऱ्हाये ॥ ४८ ॥

[सु. गे. घा. 'अवघे'.] अवघड मायेचें लक्षण । आपणया आणिलें रांडपण । आपलें करुनी काळें वदन । सखे सज्ञन दुःखी केले ॥ ४९ ॥

ऐसी माया बाधक भारी । [सु. गे. घा. 'तिच्याचें'.] तिच्या निजराज्याची थोरी । मी [मु. 'तरी'.] तंव सर्वथा न करी । निजनिर्धारीं श्रीरामा ॥

ऐसें बोलोनि आपण । [मु- 'सवें'.] सवेग घातलें लोटांगण । मस्तकीं धरिले श्रीरामचरण । अश्रुपूर्ण पैं आले ॥ ५१ ॥

आइकोनी भरताचें वचन । माता बंधु प्रधान जन । ऋषिवर्य साधुसज्ञन । आलें रुदन अवघ्यांसी ॥ ५२ ॥ [मु. प्रतीत ही ओवी नाही.]

देखोनी भरताचें लक्षण । श्रीराम बोलिला आपण । दशरथाचें अंतीचें वचन । अन्यथा आपण [कं. 'कहीं न करी'; तं. 'न करीस'; त. 'कोण करी'; भा. /२ तु. 'कदा न करी'; नि. 'कदा न करावें'; सु. गे. घा. 'न करावें'.] मी न करी ॥ ५३ ॥ [तं. पै. या प्रतींखेरीज इतर प्रतींत या ओवीनंतर पुढील ओवी आलेली आहे :–– 'राम राम करिता स्मरण । रायें मजलागीं दिधला प्राण । तेणें करविलें वनप्रयाण । तें अन्यथा आपण कांहीं न करी ॥']

वनवासाचें दृढ व्रत । म्यां घेतलें दशरथादेखत । तें मी अन्यथा न करी येथ । जाण निश्चित भरता तूं ॥ ५४ ॥

अनुक्रमणिका

**आइकोनी श्रीरामाचें वचन । भरतें मांडिलें निर्वाण । देवों पाहे आपुला प्राण । प्रायोपवेशन करूनी ॥ ५५ ॥**

भरतोक्ति :

इह तु स्थंडिले शीघ्र कुशानास्तर सारथे । आर्यं प्रत्युपवेक्ष्यामि यावन्मे संप्रसीददति ॥ १ ॥ [तं. सु. गे. या प्रतींत श्लोक १ व ३ नाहीत.]

अनाहारो निरालंबो धनहीनो यथा द्विजः । पुनःशायितशय्यायां यावन्मां प्रतियास्यति ॥ २ ॥ [नि. घा. प्रतींत हा श्लोक पुढीलप्रमाणे आला आहे :——'निराहारो निरालोको धनहीनो यथा द्विजः । शये पुरस्ताच्छालायां यावन्मां प्रतियास्यति ॥ १ ॥']

स तु राममवेक्षन्तं सुमंत्रं प्रेक्ष्य दुर्मनाः । पुनः शायितशय्यायां यावन्मां प्रतियास्यति ॥ ३ ॥ [वा. रा. अयो. का. सर्ग १११, श्लोक १३ ते १५.]

**अयोध्ये न ये श्रीरघुनाथ । ऐसा जाला इत्यर्थ । तेणें दुःखी जाला भरत । प्राणत्यागार्थ सज्ज जाला ॥ ५६ ॥**

**सुमंतासी सांगे आपण । मंदाकिनी तीर पावन । येथें करीं कुशास्तरण । मज निजप्राण त्यागावा ॥ ५७ ॥**

**श्रीरामावेगळें राहाणें । तें सर्व निंद्य जिणें ।** [मु. 'देह त्यागून'.] **त्याहूनि रामादेखतां मरणें । ब्रह्म पावणें परिपूर्ण ॥ ५८ ॥**

**राम न्यावा अयोध्येसी । येथ मी आलों प्रतिज्ञेसीं । राम न पाळी माझ्या** [सु. गे. कं. घा. 'लाजेसी'.] **लाडासीं । मी प्राणांसी त्यागीन ॥ ५९ ॥**

**सुमंताचें मनोगत । प्राणत्यागा रिघतां भरत । अयोध्ये येईल रघुनाथ । तेणें लोभें पसरित कुशांतें ॥ ६० ॥**

**ते मी कुशास्तरणीं आपण । नेघें अन्न नेघें जीवन । एकाकी** [पै. भा. तं. तु. त. 'रोगी दीन ब्राह्मण'; मु. 'जैसा दीन ब्राह्मण'.] **योगी ब्राह्मण । तैसा मी जाण पडेन ॥ ६१ ॥**

[मु. 'जंववरी', 'तंववरी'.] **जंव कृपा करी श्रीरघुनाथ ।** [मु. 'जंववरी', 'तंववरी'.] **तंव मी पडिला असे येथ ।**
**कृपा न करितां निश्चित । तोचि प्राणान्त पैं माझा ॥ ६२ ॥**

**मी श्रीरामाचें लळेवाड । राम न पुरवी माझे कोड । तैं मज देहाची नाहीं चाड । त्यजूनिया धड निधडा होईन ॥**

[तं. 'श्रीराम प्रेमें जावे जेथें'; सु. गे. घा. 'श्रीरामीं जियावें यथार्थे'; नि. 'श्रीरामीं प्रेम ज्याचें येथ'.] **श्रीरामप्रेमें जियावें येथ । रामध्यानें निमाल्या नित्यमुक्त ।**
**कां परलोक पावल्या तेथ । कृपा दशरथ** [मु. 'मजकरी'.] **करील ॥ ६४ ॥**

**ऐसें श्रीरामें देखतां जाण । भरतें शुद्धाचमन करून । कुशास्तरणीं घालुनी आसन । नेत्र लाऊनी बैसला ॥ ६५ ॥**

**तें देखोनिया समस्त । अवघे जाले हाहाभूत । असत्यवादी नव्हे भरत । प्राण निश्चित त्यागील ॥ ६६ ॥**

अनुक्रमणिका

**श्रीरामाचिये कृपेविण । भरत न वांचे अर्धक्षण । श्रीरामध्यानीं होऊनी लीन । सांडील प्राण निमिषार्धें ॥ ६७ ॥**

**ऐसें देखोनी रघुनाथ । स्वयें भरतासी बोलत ।** [मु. प्रतीत 'म्हणें' हे पद अधिक आहे.] **तुज हें कर्म अनुचित । नव्हे निश्चित राजधर्म ॥ ६८ ॥**

**अंध पंगु कुष्ठीशुभ्र । रोगी दुःखी सकाम क्रूर । देह त्यागिती ऐसे नर । ज्ञानविचार हा नव्हे ॥ ६९ ॥**

**भरत म्हणे कृपा नव्हतां । कैंची आम्हां ज्ञानकथा । कोटी अधर्म बैसेतु माथां । परी सर्वथा वांचेना ॥ ७० ॥**

**देखोनि भरताचें निर्वाण । श्रीरामेंही वायिली आण । वसिष्ठ चरणाचें प्रमाण । दंडकारण्य** [मु. 'त्यजीना'.] **सेवीन ॥ ७१ ॥**

श्रीरामोक्ति :

[तं. सु. गे. या प्रतींत हा श्लोक नाही. नि. घा. प्रतींत हा श्लोक पुढीलप्रमाणे आला आहे :——'लक्ष्मीश्चंद्रादपेयाद्वा हिमवान्वा हिमं त्यजेत् । अतीयात्सागरो वेलां न प्रतिज्ञामहं पितुः ॥ १ ॥'] लक्ष्मीश्चंद्रादपेयाद्वा हिमवान् वा हिमं त्यजेत् । अतीयात्सागरो वेलां न प्रतिज्ञामहं त्यजे ॥ ४ ॥ [वा. रा. अयो. का. सर्ग ११२, श्लोक १८.]

**पूर्ण चंद्रीं जावो शोभा । मेरू पृथ्वीमाजीं विरो उभा । सुवर्ण पावो काळिमेची प्रभा । तऱ्ही व्रतारंभ त्यजिना मी ॥**

**पश्चिमे उगवो दिनकर । एक होतु सातसमुद्र । आतांचि प्रळयो करूं रुद्र । तऱ्हीं राजोत्तर नुलंघी** [कं. व मु. प्रतींत हे पद नाही.] **मी ॥ ७३ ॥**

**पतंग दीपाचा घोंट भरू । नभाची मोट बांधो लेकरूं ।** [तं. 'इंद्रासी गिळी जे उंदीरीं'; त. 'इंद्रासी सुखे भिडो मार्जरू'; नि. घा. 'रुद्रातें सुखें गिळो उंदिरू'.] **इंद्रातें सुखें गिळू उंदीरू । तऱ्ही** [मु. 'वनविचार'.] **वनविचारू त्यजीना ॥**

**सूर्य अडखळोनि** [तं. 'अब्धी'; त. 'आगडी'.] **आडीं पडों । मृगजळामाजीं मेरू बुडौ ।**
**मासीच्या पांखें आकाश उडो । तऱ्ही मागें मुरडों नेणें** [तं. 'न ये रामें'; त. 'न मी मागें'; तु. भा/२. 'न ये रामु'; सु. नि. गे. घा. 'मी न शकें'; कं. 'मागें मी नेणें'.] **राम ॥ ७५ ॥**

**रामें वाइली निर्वाण आण । भरता कुशास्तरणीं निर्वाण । हाहाकारें गर्जति जन । करिती रुदन अवघेही ॥ ७६ ॥**

**बोंब सुटली एकसरी । आकंदें रडती नरनारी । येथें सावाधावा कोण करी । वनांतरीं आकांतु ॥ ७७ ॥**

**अयोध्ये न्यावया रघुनाथ । वना उल्हासें आला भरत ।** [मु. 'प्रतिज्ञापणें'; कं. तं. 'प्रतिज्ञाप्रमाण'.] **प्रतिज्ञाप्रमाणें दोहींचा अंत ।** [मु. 'महा अनर्थ'.] **अपघात वोडवला ॥ ७८ ॥**

अनुक्रमणिका

बुडाली सूर्यवंशाची कीर्ति । थोर वोडवली अपकीर्ति । [मु. 'येवढी'.] हे कैकयीची ख्याति । केली शांती सर्वांची ॥ ७९ ॥

राजा निमाला रामस्मरणें । राम-भरत निमती [मु. 'प्रतिज्ञापणें'; कं. तं. 'प्रतिज्ञाप्रमाण'.] प्रतिज्ञाप्रमाणें ।
प्राण सांडिजै लक्ष्मणें । सीता शत्रुघ्न निमिजेल ॥ ८० ॥

मग येथुनी मागुती । कोण जाईल अयोध्येप्रति । जाली अवघयांची शांती । [मु. 'कैकयीयुक्ती'.] कैकयोक्ति निजराज्यें ॥ ८१ ॥

भविष्य जाणोनी संपूर्ण । वसिष्ठ नोबले वचन । जनासीं अति दुःख दारुण । कोणासी कोण संबोखी ॥ ८२ ॥

दोघै सत्यवादी संपूर्ण । दोघांचाहि दुस्तर पण । यां दोघा बुझावी कोण । दुःख दारुण सर्वांसी ॥ ८३ ॥

उपावो न चले [भा/२. 'निशंख' मु. 'निःशंक'.] निःशेष । अवघ्या थोर पडिली अटक । तेथ जालें अलौकिक । आला वाल्मीक द्विजवरेंसी ॥

अथ तत्र समागम्य वाल्मीकिसहिताद्विजाः । भ्रातरौ तौ महावीर्यौं काकुत्स्थौ प्रशशंसिरे ॥ ५ ॥ [तं. मु. या प्रतींत श्लोक ५ व ६ नाहीत; गे. प्रतीत श्लोक ५ व ६ व्या श्लोकाचा पूर्वार्ध आला आहे.]
धन्यौ युवां राजपुत्रौ धर्मज्ञौ सत्यविक्रमौ । श्रुत्वा वयं हि संभाषामुभयोः स्पृहयामहे ॥ ६ ॥

श्रीराम भरतापासीं । वाल्मीक येऊनी वेगेसीं । बोलतां जाला उल्हासेसी । तुम्ही [मु. 'पुण्यराशी पुण्यपुरुष'; तं. 'पुण्यराशी पुण्यरूप'.] पुण्यासीं पुण्यरूप ॥ ८५ ॥

धन्य धन्य दशरथ पिता । धन्य धन्य तुमच्या माता । धन्य धन्य तुमच्या कथा । लोकां समस्तां तारक ॥ ८६ ॥

तुमचेनि धैर्यासीं धैर्यता । तुमचेनि वीर्यासी वीर्यता । तुमचेनि शौर्यासी शौर्यता । सत्यासी सत्यता तुमचेनि ॥

[कं. व मु. 'धन्यधन्य सूर्यवंशीं'.] धन्य जन्म सूर्यवंशीं । कीर्ति जोडली [मु. 'वंशानुवंशीं'.] वंशासी । राज्यलोभ नाहीं दोघांसी । यालागीं भेटीसी मी आलों ॥ ८८ ॥

वाल्मीक आश्रम चित्रकूटीं । परी नेघेचि श्रीरामाची भेटी ।
देखोनि दोघेही बंधु संकटीं । आला उठाउठी समाधाना ॥ ८९ ॥

दोघां द्यावया समाधान । वाल्मीक आला [कं. व मु. हे पद नाही.] जी आपण । जाणोनी अनागत ज्ञान । काय वचन बोलिला ॥ ९० ॥

ऐके स्वामी श्रीरघुनाथा । अवधारी धर्मज्ञा तूं भरता ।
कांहीं एक सांगेन तुमच्या हिता । श्रीरामचरिता अति गुह्य ॥ ९१ ॥

अनुक्रमणिका

ततस्त्वर्षिगणाः क्षिप्रं दशग्रीववधैषिणः । भरतं राजशार्दुलमित्यूचुः संगता वचः ॥ ७ ॥ [तं. सु. गे. या प्रतींत श्लोक ७ ते ९ नाहीत; नि. घा. प्रतींत पुढीलप्रमाणे आहेत :—– 'भो भो त्वं व्रतसिद्धयर्थ निवर्तस्व इतो लघु । देवकार्यं हि कर्तव्यं राघवेंण महात्मना ॥ १ ॥
एतावदुक्त्वा वचनं गंधर्वाः समहर्षयः । राजर्षयश्चैव तथा सर्वे स्वां स्वां गतिं गताः ॥ २ ॥']
भो भो भरत सिद्धार्थ निवर्तस्व इतो लघु । देवकार्यं तु सर्वं हि कर्तव्यं राघवेण वै ॥ ८ ॥
रामो लक्ष्मणः सीता च वने वत्स्यंति ते त्रयः । राजर्षयश्च धर्मज्ञाः स्वं स्वं स्थानं ततो गताः ॥ ९ ॥

**मजसांघातें ऋषिगण । यावियां** [मु. 'जाण' हे अधिक पद.] **हेंचि कारण । श्रीरामचरित्र गुह्यज्ञान । तुज संपूर्ण सांगावया ॥ ९२ ॥**

**देवऋषि राजऋषि । ऋषि आले गा तपोराशी । श्रीरामगुह्यज्ञानासी । तुजपासीं सांगावया ॥ ९३ ॥**

**भूत भविष्य वर्तमान । जाणोनी अति सज्ञान । ते ते आले तपोधन । श्रीरामगुण सांगावया ॥ ९४ ॥**

**तुम्ही दोघे महाहटी । बैसलेती प्राणसंकटीं । हें देखोनी ऋषि कृपादृष्टीं । आले गुह्य गोष्टी सांगावया ॥ ९५ ॥**

**ऐकें भरता सावधान । सीता श्रीराम लक्ष्मण । वनीं वसावया हेंचि कारण । रामें रावण वधावा ॥ ९६ ॥**

**हेंचि देवांचें मनोगत । हेंचि ऋषिचें संमत । रामें वधावा लंकानाथ । हाचि** [कं. तं. मु. 'सिद्धान्त'.] **सिद्धार्थ सर्वांचा ॥ ९७ ॥**

**श्रीरामराज्यासी विघ्न । पडावया हेंचि कारण ।**
**तूं हें नेणोनी गुह्यज्ञान । प्राणान्त दारुण आग्रहो करिसी ॥ ९८ ॥**

**अनागत** [तं. 'अनागत भान'; त. 'अनागत भाग्यें'; भा/२. 'अनागत भाष्यें'; मु. 'भाष्य' हे पद नाही.] **भाष्य गुह्यज्ञान । सत्य मानी माझें वचन । आग्रहो सांडूनी आपण । करावें गमन अयोध्येसी ॥ ९९ ॥** [कं. प्रतीत ही ओवी नाही.]

**देवकार्यार्थालागीं जाण । श्रीराम सीता** [कं. मु. हे पद नाही.] **आणि लक्ष्मण । वनीं ठेऊनी आपण । करावें गमन अयोध्येसी ॥ १०० ॥**

**ऐसें म्हणसी तूं आपण । कोठें राम कोठें रावण । त्यासी वधावया काय कारण । तेंही कथन अवधारी ॥ १०१ ॥**

**तुवां केलिया अयोध्येगमन ।** [मु. 'मागें' हे अधिक पद.] **राम सेवील दंडकारण्य । गंगातीर अति पांवन । निवासस्थान नाशिकीं ॥ १०२ ॥**

**गंगातटीं पंचवटी । वनवासीं पर्णकुटी । श्रीराम** [मु. 'लक्ष्मण'.] **रहिवासी जगजेठी । सीता गोरटी समवेत ॥ १०३ ॥**

अनुक्रमणिका

तेरा वर्षें सा मासवरी । सुखें वनवास श्रीराम करी । अंतींच्या सामासांभीतरीं । करील बोहरी राक्षसां ॥ १०४ ॥

लक्ष्मण देखोनिया दिठीं । पुत्रविरोधें छळावयासाठीं । शुर्पनखा वधू गोमटी । कपटें पाटीं बैसों आली ॥ १०५ ॥

तिसी नाशिकी निर्नासिक । सौमित्र करील आवश्यक । तिचै कैवारी त्रिशिरादिक । रघुटिळक वधील ॥ १०६ ॥

राम लाउनी मृगापाठीं । रावण येउनी पंचवटीं । सीता चोरूनी गोरटी । लंकात्रिकुटीं ठेवील ॥ १०७ ॥

सीताशुद्धीच्या कार्यार्थ । [पै. 'पंथें'.] पंपें येईल रघुनाथ । तेथें भेटेल हनुमंत । परम आप्त निजसखा ॥ १०८ ॥

श्रीरामा सुग्रीवा सौजन्य । करील हनुमंत आपण । अमित घेउनी वानरसैन्य । लंकागमन श्रीरामा ॥ १०९ ॥

वानर मिळतील महाबळी । समुद्र बांधोनियां शिळीं । लंकेपुढें [तं. 'रणरांगोळी'.] रण रवंदळी । आतुर्बळी करितील ॥ ११० ॥

[मु. 'एकें निजकरें सौमित्र । अनेक वीर मारील चतुर ॥'.] एकें निजकरें एकें सौमित्रें । एक वीर मारिती वानरें । छेदूनी रावणाचीं शिरें । श्रीरामचंद्रें निजविजयो ॥ १११ ॥

सोडील देवांची बांदवडी । तोडील नवग्रहांची बेडी ।
उभऊनी रामराज्याची गुढी । येतील तांतडी अयोध्येसी ॥ ११२ ॥

वनीं वसतां श्रीरामासी । त्रैलोक्यपावनी कीर्ति त्यासी ।
यालागीं ठेऊनी वनवासीं । शीघ्र अयोध्येसी तूं जाये ॥ ११३ ॥

आइकोनी वाल्मीकाचें वचन । भरता हर्षाचें [कं. तं. तु. 'स्फुराण'; मु. 'स्फुरण'.] फुराण । सांडूनी कुशास्तरण । केलें नमन ऋषीसी ॥ ११४ ॥

भरत म्हणे वाल्मीक मुनी । सुखी जालों तुझ्या वचनीं । श्रीराम ठेऊनिया वनीं । शीघ्रगमनीं मी जातों ॥ ११५ ॥

श्रीरामोक्ति :

आल्हादितस्तदा तेन वाक्येन शुभदर्शनः । रामः संहृष्टवदनस्तानृषीनभ्यवादयत् ॥ १० ॥ [तं. सु. प्रतींत हा श्लोक नाही.]

उल्हास भरताचा देखोन । वाल्मीकें दिधलें आलिंगण । भरतें केलें साष्टांग नमन । सुखसंपन्न तेणें राम ॥ ११६ ॥

अनुक्रमणिका

वाल्मीकें येऊनी आपण । भरता दिधलें समाधान । वनीं वसावा रघुनंदन । भरतें वचन मानिलें ॥ ११७ ॥

तें आइकोनी रघुनंदन । अत्यंत जाला सुखसंपन्न । एकला आकळी त्रिभुवन । येव्हढें फुराण त्या आलें ॥ ११८ ॥

सुख [तं. त. ‘उलथलें’; कं. मु. ‘दाटलें’; ‘उथळलें’ = ‘उचंबळलें’.] उथळलें संपूर्ण । बाहु थरकती उल्हासोन । हरिखें नाचतु लक्ष्मण । वाल्मीकवचन ऐकोनी ॥ ११९ ॥

परमानंदें रघुनंदन । केलें वाल्मीका [कं. मु. हे पद नाही.] नमनपूजन । [कं. मु. ‘येरें’.] ऋषीनें देऊनिया आशीर्वचन । केलें गमन स्वाश्रमा ॥ १२० ॥

एका जनार्दना शरण । आइकोनी वाल्मीक वचन । भरत पावला समाधान । अयोध्यागमन अवधारा ॥ १२१ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां भरतसमाधानं नाम सप्तदशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग अठरावा

## भरत अयोध्या गमन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

भरत धावोनी आपण । दृढ धरिले श्रीरामचरण । अश्रु चालिले संपूर्ण । [मु. 'तेणें' हे अधिक पद.] चरणक्षाळण श्रीरामा ॥ १ ॥

[तं. प्रतीत हा श्लोक नाही.] स्वस्थगात्रस्तु भरतो वाचा संसज्ञमानया । कृतांजलिरिदं वाक्यं राघवं पुनरब्रवीत् ॥ १ ॥

स्वेद रोमांच रवरवीत । तेणें सर्वांग डवडवीत । हरिखें [पै. 'उत्थंक'; तं. 'उल्हास'; भा. कं. तु. त. 'उत्छक'.] उत्कंठित जालें चित्त । [सु. गे. घा. 'सद्गदित पैं कंठ झाला'; कं. 'सद्गत पैं वाचा'.] सद्गदित पैं वाचा ॥ २ ॥

विकळ वाचा [मु. 'होऊनी'.] ठेऊनी ठाई । विनटोनी श्रीरामाच्या पायीं ।
अंजुळीपुट जोडुनियां पाही । भरत लवलाही विनवीत ॥ ३ ॥

करुनिया कुशास्तरण । तुजवरीं देत होतों प्राण । हा मज अपराध दारुण । क्षमा संपूर्ण करी रामा ॥ ४ ॥

भूतीं पृथ्वी नांगरून । दाढें घालुनी करिती दहन । जीवनेंसहित लाताऊन । कर्दमकंदन जन करिती ॥ ५ ॥

तो अपराध धरा न मनून । [कं. तं. 'फाडित्या'; मु. 'पाळित्या'.] फाळित्या पोळित्या देऊनी दिव्यान्न ।
जन सुखी करी संपूर्ण । तैसें आपण क्षमा कीजे ॥ ६ ॥

श्रीराम आमची जननी । आम्ही तुझी [मु. 'लेकरें'.] कीं तान्हीं । माझा अपराध न मानी । [सु. गे. घा. 'म्हणोनि लोटांगणी वंदीले'; नि. 'म्हणोनि लोटांगणी तुज आलों'; भा/२. त. 'लोटांगणी घातलीं'.] लोटांगण घातलें ॥ ७ ॥

तुझें वंदूनि [कं. मु. 'चरण'.] वचन । मीं करितों अयोध्यागमन । ऐसें [त. 'बोलुनि आले रुदन'; मु. 'बोलुनि करी रुदन'.] बोलतां आलें रुदन । मूर्च्छापन्न [तु. पै 'पडतु'; मु. 'तो पडला'; भा/२. पै. 'पुडती'; कं. 'पडियेला'.] पैं पुढती ॥ ८ ॥

भरताचें प्रेम देखोन । कळवळला रघुनंदन । धांवोनी उचलिला आपण । समाधान स्वयें वदे ॥ ९ ॥

[पै. प्रतीखेरीज इतरत्र 'तुम्हीं' हे अधिक पद.] आम्ही चौघेही जण । एका पिंडाचें उत्पन्न । कोणाचा अपराध मानी कोण । वृथा उद्विग्न तूं [तं. सु. नि. गे. घा. या प्रतींत 'कां' हे अधिक पद आहे.] होसी ॥ १० ॥

जीभ रगडल्यां दांतांबुडीं । कोप आलिया कडाडी ।
जीभ तोडी कीं दांत पाडी । तैसी परवडी आम्हांतुम्हां ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

**टाळी** [मु. प्रतीत हे पद नाही; कं. ‘टाळीनें’.] **न पीटिती हातेहात ।** [सु. गे. घा. या प्रतींत ‘हातीं’ हे अधिक पद.] **दुःख वाटे कीं सुख होत ।**
**तैसे आम्हीतुम्ही** [सु. गे. घा. ‘एकात्मता’.] **येथ ।** [सु. गे. घा. हे पद नाही’; नि. ‘एकात्मता’; तं. ‘अवघ्यांत’.] **आघातें अद्‌भुत आल्हादु ॥ १२ ॥**

**ऐसें आश्वासूनी परिपूर्ण । श्रीरामें दिधलें आळिंगण ।** [मु. प्रतीत ‘म्हणे’ हे अधिक पद.] **भरता! अयोध्ये करी गमन । येरें वचन वंदिलें ॥ १३ ॥**

**श्रीराम आज्ञा अति तांतडी । भरत निघतां लवडसवडी ।** [कं. तं. तु. ‘पाया वळली वेंगडी’; मु. ‘पायीं वळलीसे वेंगडी’.] **पाय वळले वेंगडी । पडे मुरकुंडी मूर्च्छित ॥ १४ ॥**

**मन विगुंतलें रामापासीं । नयन विगुंतले रामरुपासीं । पाय वोढिती** [मु. ‘रामदर्शनासीं’.] **रामापासीं । गति भरतासी खुंटली ॥** [तु. प्रतीत ही ओवी नाही.]

**वाचा विगुंतली रामनामासी । श्रवण विगुंतले** [मु. ‘कीर्तनासीं’.] **रामकीर्तीसी ।**
**क्रिया विगुंतली रामभक्तिसीं । गती भरतासी खुंटली ॥ १६ ॥**

**प्राण पांगुळला रामापासीं । जीव विनटला श्रीरामेसीं । इंद्रियें पारखी जालीं त्यासी । गति भरतासी खुंटली ॥**

**श्रीरामाच्या अनन्यप्रीती । भरताची अगाध स्थिती । देखोनी राम सुखावें चित्तीं । काय त्याप्रति बोलतु ॥ १८ ॥**

**भरता! ऐक गुह्यगोठी । माझें प्रेम तुझ्या पोटीं । तेंचि पोटीं कैकयीखोटी ।** [मु. प्रतीत हे पद नाही.] **हें ह्रदयीं गांठी न धरावी ॥ १९ ॥**

**मज धाडिलें वनवासासी । सीता पायीं धाडिली वनासी । हें शल्य अहर्निशीं । तुझा मानसीं सलताहें ॥ २० ॥**

**जे ह्रदयीं माझें पूर्ण प्रेम । तेथ नसावा द्वेष विषम । ऐसें बोलतां श्रीराम । भरत** [मु. पाठ ‘निभ्रम’; त. ‘मूर्च्छाभ्रम’.] **निर्धर्म पडे पुडती ॥ २१ ॥**

वसिष्ठोक्ति :

[तं. प्रतीत २ ते ४ श्लोक नाहीत; सु. गे. या प्रतींत श्लोक ३ व ४ नाहीत. नि. घा. प्रतींत हे श्लोक पुढीलप्रमाणे :——
‘एवमुक्त्वा वसिष्ठेन राघवः प्राङ्मुखः स्थितः । पादुके हेमविकृते मम राज्याय ते ददौ ॥ ३ ॥
रामाज्ञां शिरसि स्थाप्य पादुके भरतस्तदा । अयोध्यामेव गच्छामि गृहीत्वा पादुके शुभे ॥ ४ ॥’]

एवं ब्रुवाणं रामं तु वसिष्ठो वाक्यमब्रवीत् । प्रयच्छ पादुके पुत्र भरताय महात्मने ॥ २ ॥
तथोक्तः स वसिष्ठेन राज्यस्थानाय पादुके । प्रायच्छत् प्रीतिमान् पात्रे भरताय महात्मने ॥ ३ ॥
रामस्य शिरसि स्थाप्य पादुके भरतस्तदा । आरुरोह रथं हृष्टः शत्रुघ्नेन समाहितः ॥ ४ ॥

**श्रीरामप्रेमें प्रेमळ । रामविरहें अति** [तु. ‘विकळ’; मु. ‘व्याकुळ’.] **विव्हळ । भरत देखोनियां विकळ ।** [मु. ‘तंव’ हे अधिक

अनुक्रमणिका

पद.] वसिष्ठ कृपाळु बोलत ॥ २२ ॥

सांडुनियां श्रीराममूर्ति । भरतासी गमनीं नाहीं शक्ति । देखोनि गुरु कृपामूर्ति । काय रामाप्रति बोलतु ॥ २३ ॥

अति आल्हादें अयोध्याप्रति । भरत जाय शीघ्र गती । ऐसी श्रीरामा आहे युक्ति । तें त्वां निश्चिती करावी ॥

तुझ्या पादुका रघुनाथा । ठेवी भरताचियें माथां । तेणें [मु. 'जाण' हे अधिक पद.] आल्हादें तत्त्वतां । अयोध्ये जातां उल्हासु ॥ २५ ॥

श्रीराम न घली पायतण । करावया दीनोद्धरण । तारावया वृक्षवल्ली पाषाण । वनविहरण अन्हवाणी ॥ २६ ॥

रामासी कांटे न रुपती [तं. सु. गे. घा. 'पायीं'.] पायीं । कंटक उद्धरती श्रीरामपायीं ।
आडळता ठाईच्या ठाई । पाषाण तेही उद्धरती ॥ २७ ॥

रामपादुका सूवर्णभूषण । आवडी वागवी लक्ष्मण । त्याही केल्या भरतार्पण । गुरुवचन वंदूनी ॥ २८ ॥

रामपादुका आलियां हातां । उल्हास भरताचिया चित्ता । पादुका प्रतिष्ठूनि माथां । आल्हादता काय बोले ॥ २९ ॥

श्रीरामपादुका ठेवितां माथां । जगीं हारपली द्वेष विषमता । ते मी कैंची आणु आतां । निजमाता द्वेषावया ॥ ३० ॥

कैकयीवरदे वनप्रयाण । दूषण नव्हे तें रामभूषण । वाल्मीकवचनें कळली खूण । आतां कोण द्वेषील ॥ ३१ ॥

भरत आणि स्वयें शत्रुघ्न । वंदुनी वसिष्ठाचे चरण । करूनी श्रीरामासी नमन । काय आपण बोलतु ॥ ३२ ॥

तुझ्या पादुका ठेविल्या माथां । तुज भेटल्याविण रघुनाथा । नाहीं उतरणें [सु. नि. गे. घा. त. 'सर्वथा'.] तत्त्वतां । तिहीं अवस्था त्रिकाळीं ॥

पादुका माझें निजजीवन । पादुका माझें देवतार्चन । पादुका माझें निजपूजन । नित्यध्यान चरणांचें ॥ ३४ ॥

तुझ्या पादुका श्रीरामा । त्या तंव माझा परमात्मा । वाणूनीं पादुकांचा महिमा । वंदूनी श्रीरामा निघाले ॥ ३५ ॥

जातां घालुनी लोटांगण । भरत काय बोले आपण । वसिष्ठादि रामलक्ष्मण । अवघे जन अवधारा ॥ ३६ ॥

भरतोक्ति :

अनुक्रमणिका

[पाचव्या श्लोकाचा व सहाव्या श्लोकाचा पूर्वार्ध नि. घा. प्रतींत पुढीलप्रमाणे आहे :—
‘नंदिग्रामं गमिष्यामि मातरं भ्रातरं विना। गतश्चाहो दिवं राजा वनस्थः स गूरुर्मम ॥ ५ ॥’
सु. गे. या प्रतींत श्लोक ६ नाही; तं. प्रतीत श्लोक ५ व ६ नाहीत.] नंदिग्रामं गमिष्यामि सर्वानामंत्रयामि च। तत्र दुःखमिदं सर्वं सहिष्ये राघवं विना ॥ ५ ॥ [वा. रा. अ. का. सर्ग ११५, श्लोक २.]
पिता प्रेतश्च मे राजा दिविवासो गुरुर्मम। रामागमनपर्यन्तं पालयिष्ये वसुंधराम् ॥ ६ ॥

**श्रीरामाचे अनुज्ञेन । मी करितों अयोध्येगमन । परी तेथ श्रीरामावांचून ।** [भा/२. तं. ‘मी अयोध्याभूवन सेविना’; मु. ‘मी अयोध्याभुवनीं वसेना’.]**मी अयोध्याभवन वसवीना ॥ ३७ ॥**

**निज राज्यातें त्यागूनी । पिता प्रवेशे वैकुंठ भुवनीं । श्रीराम सांडूनियां वनीं । मी राज्यभुवनीं राहेना ॥ ३८ ॥**

**विनंती करितों** [मु. ‘मी’ हे अधिक पद.] **समस्तां । मी नंदीग्रामे राहेन आतां । अयोध्या** [मु. ‘अयोध्याराज्यभार तत्त्वतां’; कं. ‘अयोध्याराजभरतां’.] **राजभारतां ।** [कं. व मु. ‘होय चालविता’.] **होईन चाळिता तेथुनी ॥ ३९ ॥**

**भद्रीं नेदखतां रघुनाथा । मज नावरे दुःखावस्था । यालागीं अयोध्ये न वचतां ।** [मु. ‘राज्यभार माथा शत्रुघ्ना’; भा/२. तं. त. सु. कं. ‘राज्य शास्ता शत्रुघ्न’.] **राज्यशासनता शत्रुघ्नें ॥ ४० ॥**

**रामेविण अयोध्या दिठीं । देखतां मज दुःख कोटी । यालागीं तिची नेघे भेटी । ते वस्तीची गोठी रुचेना ॥ ४१ ॥**

**नंदीग्रामीं करुनी वस्ती । अयोध्या निजराज्याची स्थिती । माझिया अनुमती । शत्रुघ्नाहातीं करवीन ॥ ४२ ॥**

**श्रीरामपादुकांपुढें जाण । भरत शत्रुघ्न दोघेही** [मु. ‘जाण’.] **तृण । अयोध्यानिजराज्यरक्षण । करिती संपूर्ण पादुका ॥ ४३ ॥**

**पादुकांचा प्रतापपूर्ण । अयोध्येकडे पाहे कोण । कळिकाळ** [नि. ‘नोळंगती’. भा/२. कं. तं. तु. त. ‘वोळगती’.] **वोळंगती** [तं. ‘आंगवण’. कं. ‘आपण’.] **आंगण । राज्यरक्षण पादुका ॥ ४४ ॥**

**रामपादुका ऐकतां कानीं । यम काळ येती लोटांगणीं । इंद्रादिक** [मु. ‘लगती चरणीं’.] **वाहाती पाणी ।** [मु. ‘राज्यलक्षणीं पादुका’.] **राजरक्षणी पादुका ॥ ४५ ॥**

**पादुकासामर्थ्यें सामर्था ।** [मु. ‘त्या’ हे अधिक पद.] **भाग्यें आलिया माझिया हाता । त्या म्यां दृढ वायिल्या माथां । कृपावंता श्रीरामा ॥**

**श्रीरामवियोगाचें दुःख । पादुका पावतां गेलें निःशेष । पादुका पाहातां स्वानंदसुख । आत्यंतिक श्रीरामा ॥ ४७ ॥**

**पुडती भेटें श्रीरघुनाथ । तंववरी माझे हेंचि व्रत । मस्तकीं पादुका संतत । स्वानंदयुक्त वाहेन ॥ ४८ ॥**

अनुक्रमणिका

राम राहिला वनवासीं । विसरविलें त्या दुःखासी । पादुकारूपें मजपासीं । अहर्निशी श्रीराम ॥ ४९ ॥

तुजसीं वियोग रघुनाथा । येथुनी मज नाहीं आता । उल्हासु भरताचिया चित्ता । स्वानंदता गर्जतु ॥ ५० ॥

आइकोनी भरताचें वचन । श्रीराम जाला सुखसंपन्न । दोघां दिधलें अलिंगण । भरतशत्रुघ्न सुखरूप ॥ ५१ ॥ [या ओवीनंतर मु. प्रतीत दोन ओव्या अधिक'चौदा वर्षीं चौदा दिवसीं । मी येईन नेमेसी । संदेह न धरावा मानसीं । मी तुजपाशीं निभ्रांत ॥ १ ॥ ऐसे बोले श्रीरघुनंदन । यथार्थ मानी भरत शत्रुघ्न । दोन्हीं कर संपुष्ट जोडुन । साष्टांगीं नमन त्यांहीं केलें ॥ २ ॥']

बंधुबंधू जाला ऐक्यभाव । बंधुबंधू प्रेम अपूर्व । या लागीं चित्रकूटासी बांधव । ठेविलें नांव श्रीरामें ॥ ५२ ॥

चौघा बंधू एकात्मता । चित्रकुटीं आली हातां । यालागी बांधव हे [मु. 'नामतत्वतां'.] नामता । स्वभावतां चित्रकूटीं ॥ ५३ ॥

लागोनी श्रीरामाच्या चरणा । वंदुनी जानकीलक्ष्मणा । तिघां करुनी प्रदक्षणा । भरतशत्रुघ्नां उल्हास ॥ ५४ ॥

रामपादुका ठेऊनी शिरीं । दोघें बैसले रथावरी । निशाण त्राहाटिलिया भेरी । निजगजरीं निघाले ॥ ५५ ॥

श्रीरामें नीजमाता । संभोखिल्या सुखरुपता । [मु. 'त्यांच्या' हे अधिक पद.] चरणी ठेऊनियां माथा । त्याही समस्ता बोळविल्या ॥ ५६ ॥

सैन्य सेनानी प्रधान । [मु. 'तिहीं' हे अधिक पद.] वंदुनिया रघुनंदन । होऊनिया सुखसंपन्न । अयोध्यागमन [मु. 'तिहीं केलें'.] उल्हासें ॥ ५७ ॥

निजगजरीं अतिउल्हासीं । भरत आला प्रयागासी । भेटोनिया भरद्वाजासी । वृत्तांत तयासी सांगितला ॥ ५८ ॥

श्रीरामाच्या निजपादुका । देखोनी भरताच्या मस्तका । भरद्वाज पावला हरिखा । धन्य तिहीं लोकां भरता तूं ॥

परमानंदें परिपूर्ण । भरतासी दिधलें आळिंगण । देऊनिया आशीर्वचन । अयोध्यागमन करविलें ॥ ६० ॥

गंगा उतरोनी झडकरी । गुहकाची निजनगरी । भरत आला शृंगवेरपुरीं । गजभारीं गर्जत ॥ ६१ ॥

रामपादुका देखोनी शिरीं । गुहक लोटांगण करी । भरताचे चरण वंदुनी शिरीं । हर्षनिर्भरीं नाचत ॥ ६२ ॥

रामपादुका आल्या हातां । त्या त्वां प्रेमें ठेविल्या माथां । [मु. 'थोर'.] धन्य भाग्य तुझें भरता । तूं पढियंता श्रीरामा ॥ ६३ ॥

अनुक्रमणिका

**भेटी देऊनी गुहकासी । परमसुख जालें त्यासीं । भरत निघाला अयोध्येसी । निजसैन्येसीं सत्वर ॥ ६४ ॥**

**अयोध्या देखोनी भरता । सुख नुपजेची त्याच्या चित्ता । तेथ माता ठेऊनी समस्ता । होय निघतां नंदिग्रामीं ॥ ६५ ॥**

> [तं. सु. गे. या प्रतींत हा श्लोक नाही.] रथस्थः स तु धर्मात्मा भरतो भ्रातृवत्सलः । पादुके शिरसि स्थाप्य नंदिग्राममुपाविशत् ॥ ७ ॥ [वा. रा. अ. का. सर्ग ११५, श्लोक १२.]

**भातृवत्सल भरतवीर । रथीं बैसोनियां शीघ्र । रामपादुकीं मंडित शिर । आला सत्वर नंदिग्रामा ॥ ६६ ॥**

**नंदिग्रामीं बाह्यप्रदेशीं । रामपादुका स्थापुनी शिशी । भरत राजा राजऋषि । जाला तापसी अनुतापें ॥ ६७ ॥**


**नगरी त्यजूनी समस्त माता । अनुकूल त्यजुनी कांता । राजभोगा नातळतां । श्रीरामव्रता अनुसरला ॥ ६८ ॥**

**वनवासीं श्रीरघुनाथ । जे जे व्रतें आचरत । ते ते अंगीकारी भरत । हाचि श्लोकार्थ अवधारा ॥ ६९ ॥**

> [तं. सु. प्रतींत श्लोक ८ ते १० नाहीत; गे. प्रतीत श्लोक ९ व १० नाहीत; नि. घा. प्रतींत श्लोक ९ नाही.] जटावल्कलधारी च मुनिवेषधरः प्रभुः । नंदिग्रामेऽवसेद्धीरः ससैन्यो भरतस्तदा ॥ ८ ॥
> [वा. रा. अ. का. सर्ग ११५, श्लोक २१.] रामागमनमाकांक्षन्भरतो गुरुवत्सलः । भ्रातुर्वचनकारी च तस्य पादुकयोस्तदा ॥ ९ ॥
> सवालव्यजनं छत्रं धारयामास स स्वयम् । रामभक्तः सदा नित्यं रंजयन्विविधाः प्रजाः ॥ १० ॥

अनुक्रमणिका

श्रीराम-भरत भेट



पादुकासामर्थ्यें समर्था । भाग्यें आलिया माझिया हातां । त्या म्यां दृढ वायिल्या माथां । कृपावंता श्रीरामा ॥

अनुक्रमणिका

**राज्यवैभव त्यजूनी दूरी । जटावल्कल चीरधारी । रामपादुका स्थापुनी शिरीं । जळफळहारीं निर्वाहो ॥ ७० ॥**

**जंव होय श्रीरामागमन । तंव करणें नाहीं भोजन । दृष्टीं पाहाणें नाहीं अन्न । देहवर्तन जळफळें ॥ ७१ ॥**

**श्रीराम पादुकांचें भजन । श्रीराम पादुकांचें पूजन । श्रीराम पादुकांचें ध्यान ।** [मु. 'स्मरण'.] **चरणीं चिंतन रामाचें ॥ ७२ ॥**

**रामपादुका छत्र धरी । आतपत्र मुक्तझल्लरी । कनकदंड घेउनी करीं । निरंतरीं ढाळित ॥ ७३ ॥**

**श्रीरामनाम स्मरतां । आराणूक नाहीं भरता । मेळउनी साधुसंतां । श्रीरामकथा अनुवाद ॥ ७४ ॥**

**श्रीरामआज्ञा** [मु. 'मानोनी'.] **वंदूनी माथां । भरत अयोध्ये आला मागुता ।**
**त्याच्या पादुका एकाग्रता । होय भजता अतिप्रीतीं ॥ ७५ ॥**

**श्रीरामाचें निजवचन । त्यासी सर्वस्वें विकिला** [कं. मु. 'प्राण'.] **आपण । अयोध्याराज्यसंरक्षण । करी शत्रुघ्न भरताज्ञा ॥ ७६ ॥**

**भरताज्ञें अतिसादर । शत्रुघ्न आठै पाहार । आज्ञाधारी निरंतर । अणुमात्र नुलंघी ॥ ७७ ॥**

**बहु तापस अनुष्ठानीं । त्यामाजी भरत महामुनी । विनटला रामभजनीं । अनुदिनीं तन्निष्ठ ॥ ७८ ॥**

> [तं. सु. गे. या प्रतीत हा श्लोक नाही.] विविधजनसमूहैः संवृतो ग्राम आसीत् । प्रतिदिनमपि पूजां पादुकानां च कुर्वन् ।
> विविधनृपतिकृत्यं रामापादानुरूपं । विधिवदतिवरेण्यो रामबंधुः कनीयान् ॥ ११ ॥

**नंदिग्राम बाह्यप्रदेशीं । भरत राहिला मुनीवेषेंसी । तेथ योगी दिगंबर संन्यासी । येती** [मु. 'त्यापासीं'.] **तापसी दूरस्थ ॥ ७९ ॥**

**आले तपोराशी ऋषिगण । आगमी निगमी अतिसज्ञान । जपी ध्यानी मुमुक्षजन । साधुसज्ञन तेथ आले ॥ ८० ॥**

**देशदेशिक प्रजाप्रधान । श्रवणश्रद्धाळु बहूजन । अंजुळीसंपुट जोडून । उभा शत्रुघ्न वचनार्थी ॥ ८१ ॥**

**भरतमुखें रामायण । श्रवणें होत समाधान । देखोनी पादुकांचें भजन । विस्मित जन अवघेही ॥ ८२ ॥**

**भरताचे नित्यसंगती । श्रवणस्मरणें आहोराती । देखोनी श्रीरामाची भक्ति । सुखी होती समस्त ॥ ८३ ॥**

अनुक्रमणिका

रामपादुका ठेउनी माथां । भरत अयोध्ये आला असतां । राज्यीं नाहीं अधर्मकथा । अकर्मवार्ता असेना ॥ ८४ ॥

कैशी राजाज्ञा समर्थ । प्रजा सत्यवादी समस्त । स्वधर्मकर्मीं नित्य निरत । श्रीरामभक्त श्रद्धाळु ॥ ८५ ॥

राज्यामाजील निजजनन । स्वभावें श्रीरामनाम स्मरण । करितां [सु. गे. घा. 'जीवी कीर्तन'; कं. 'करितां सप्रेमें कीर्तन'.] जीविकावर्तन । रामचिंतन अहर्निशीं ॥ ८६ ॥

आइकोनि भरताचें शीळ । देशोदेशींचें भूपाळ । उपायनें घेऊनी प्रबळ । येती सकळ भेटीसी ॥ ८७ ॥

रत्नें धन गज वाजींसीं । राजे आणिती भेटीसी । भरत नातळे [कं. व मु. 'पै' अधिक पद.] त्यांसी । निजमानसीं निरपेक्ष ॥ ८८ ॥

स्मरतां श्रीरामाचें नाम । मावळे क्रोध काम । [मु. 'निघोनी'.] निमोनी गेला लोभसंभ्रम । भरत निष्काम [सु. गे. घा. 'अवधारा'.] श्रीरामें ॥ ८९ ॥

भेटी परतऊनी समस्त । राजे सन्मानें [मु. 'स्वयें' हे अधिक पद.] गौरवीत । रामप्रतापें अति विख्यात । उदार भरत तिहीं लोकीं ॥ ९० ॥

रामस्मरणें प्रज्ञाप्रबुद्ध । श्रीरामाचा कनिष्ठ बंधु । भरता भजनें अगाधबोधु । वसे स्वानंदु नंदिग्रामीं ॥ ९१ ॥

ऐसे ऐसिया अगाधस्थिती । भरता नंदिग्रामीं वस्ती । वनवासीं रघुपती । करिल ख्याति ते ऐका ॥ ९२ ॥

निजराज्याची [मु. 'लोभप्राप्ती'.] लाभप्राप्ती । [मु. 'मी' हें अधिक पद.] निःशेष त्यजूनी रघुपति । अयोध्याकांडा केली समाप्ति । करुनी वस्ती वनवासी ॥

सापत्न मातेची वचनोक्ति । श्रीरामें पाळुनी अतिप्रीती । अयोध्याकांडें केली समाप्ति । करुनी वस्ती वनवासी ॥ ९४ ॥

[मु. 'देह त्यागितां'; कं. 'देह त्यागीत'.] देहत्यागान्त नृपति । भाक न संडूनी रघुपति । अयोध्याकांड नेलें समांप्ति । करुनी वस्ती वनवासी ॥ ९५ ॥

कौसल्या मातेची काकुलती । श्रीरामें [कं. 'मोह न धरूनीं निश्चिती'; 'मोहनः मौन'; मु. 'मौन धरूनी निश्चिती'.] मोह न धरुनी चित्तीं ।
अयोध्याकांड [मु. 'केली'.] नेलें समाप्ति । करुनी वस्ती वनवासी ॥ ९६ ॥

सीता चरणीं चाले [कं. तं. सु. गे. घा. नि. 'वनाप्रति'.] वनांती । दुःख न मनुनी सीतापती ।
अयोध्याकांड [त. 'केलें'; मु. 'केली'. कं. प्रतीत पुढील समाप्ती लेख आला आहे :— 'शके १७०२ शार्वरीनाम संवत्सरे दक्षिणयाणे शरदऋतो अश्विनमासे शुक्ल पक्षे त्रयोदश्यां सौम्यवासरे दिवा अक्षिसी तूं काले उत्तरभाद्रपदा नक्षत्रे तद्दिनी अयोध्याकांड लेखन पैं भास्कर नगर कसवेचिटगोपें सरकार कृवेली हस्ताक्षर अनंतसूतुना रघुनाथेन श्रद्धयालिखित पुस्तकं स्वार्थं वा संपादयित्वा'.]

अनुक्रमणिका

पै. प्रतीत समाप्ती लेख पुढीलप्रमाणे आलेला आहे :—
‘शके १६. . . . . . . . नाम संवत्सरे पौषमासे शुक्लपक्षे द्वितीया बुधवार तद्दिने अयोध्याकांड समाप्त ।’
तं. प्रतीचा समाप्ती लेख असा आहे :—
‘इदं पुस्तकं लिख्यते भास्करबनाची कुलकर्णि होनवाडकर ग्रंथ समाप्त भाद्रपदमासे कृष्ण पक्षे कीलकनाम संवत्सरे चतुर्थी सौम्यवासरे भरणीनक्षत्रे श्रीमयोरनाथ अभयांबिका सन्निधे कावेरी दक्षिणतीरी ग्रंथ समाप्त ।’] नेलें समाप्ति । करुनी वस्ती वनवासी ॥ ९७ ॥

लक्ष्मणाच्या क्षोभक युक्तिं । क्षोभ न मनूनी रघुपती । अयोध्याकांड नेलें समाप्ति । करुनी वस्ती वनवासी ॥

भरत नेवों आला अति प्रीति । त्यासी बोळऊनी सुखस्थिती ।
अयोध्याकांड नेलें समाप्ति । करुनी वस्ती वनवासी ॥ ९९ ॥

त्यजूनी निजराज्य प्रचंड । वैभवासी देऊनी दंड । नाना भोगांचे ठेचूनी तोंड । अयोध्याकांड संपविलें ॥ १०० ॥

दुःख वोडवलें वितंड । तें स्वयें केलें खंड विखंड । मोहाचें करुनी काळें तोंड । अयोध्याकांड संपविलें ॥ १०१ ॥

अभिमान अति अवघड । भरडिला जैसा मूग कांकड । परिपाकें करुनी गोड । अयोध्याकांड संपविलें ॥ १०२ ॥


दुस्तर वनभयें दुर्घड । त्या भयाचें ठेचुनीं तोंड । वनवास करुनी गोड । अयोध्याकांड संपविलें ॥ १०३ ॥

या उपरी रघुनंदन । सेऊनियां दंडकारण्य । वधील त्रिशिरा खर दूषण । राक्षसां दळन श्रीराम ॥ १०४ ॥

एका जनार्दना शरण । अगाध कथा रामायण । परमानंदें रसाळ पूर्ण । दंडकारण्य रहिवासु ॥ १०५ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अयोध्याकांडे एकाकारटीकायां भरतस्यायोध्यागमनं नाम अष्टादशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका




अनुक्रमणिका

# अरण्यकांड

## प्रसंग पहिला

## चित्रकूटतः दंडकारण्याभिगमन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

[मु. तु. संस्कृत श्लोक नाहीत; नि. घा. इं. ‘चरितं रघुनाथस्य . . .’ या श्लोकानंतर पहिला श्लोक आला आहे; कं. ‘चरितं रघुनाथस्य. . .’ या श्लोकानंतर दुसरा श्लोक दिला आहे.] कूजंतं रामरामेति मधुरं मधुराक्षरम् । आरुह्य कविताशाखां वन्दे वाल्मीकिकोकिलम् ॥ १ ॥
वाल्मीकेर्मुनिसिंहस्य कवितां वनचारिणाम् । श्रृण्वन्रामकथानादं के न यांति परां गतिम् ॥ २ ॥

**श्रीराम** [मु. दै. पै. तु. त. ‘अच्युत वृक्ष’.] **चूतवृक्ष प्रबळ । त्यावरी वाल्मीक कवि कोकिळ । नारदवसंतें फुटली कीळ । मधुराक्षरीं** [कं. त. खेरीज इतरत्र ‘सरळ’.] **रसाळ आलापु केला ॥ १ ॥**

**या मधुराक्षरामाजीं मधुर । श्रीरामनाम हें सुखसार । सुखी केलें चराचर । सुखें शंकर डुल्लतु ॥ २ ॥**

**उफराटां रामाक्षरीं । मरा मरा या उत्तरीं । नारद वाल्मीका उपदेशु करी । दो अक्षरीं उद्धरला ॥ ३ ॥**

**नाम शुद्ध हो अबद्ध । जो जपे तो पावनसिद्ध । रामनाम जगद्वंद्य । परमानंद हारिनाम ॥ ४ ॥**

**चोरटा वाल्मीक तरे संसारीं । हेहि नामाची** [त. ‘गुण’; कं. ‘परम’; मु. ‘कोण’.] **गौण थोरी । नाम पावन जगदोद्धारी । नाम उद्धरी महापापी ॥ ५ ॥**

**इतर कवि** [पै. मु. त. जो. तु. दै. मु. ‘गजगजरीं’.] **गजकेसरी । वाल्मीक कवि** [पै. मु. त. जो. तु. ‘वनगज केसरी’.] **भुवगज केसरी । श्रीरामनाम सिंहनादें करी । रानभरी** [त. ‘वनवासा’.] **नवरसां ॥ ६ ॥**

**नवरसांचा रसिकु ।** [कं. ‘नवरंग हा श्रीराम एकु’.] **नवरंगडा रघुकुळ टिळकु । रामनामाचा एक एक श्लोकु । सुखदायकु नवरसां ॥ ७ ॥** [त. प्रतीत ही ओवी नाही.]

**हास्यादिक नवरसवृत्ति । रामरसें त्यां सुखप्राप्ती । वाल्मीक नामाच्या रामोक्ति । पावन होतीं कविकुळें ॥ ८ ॥**

**श्रीरामनामेविण जें तोंड । तें केवळ** [मु. कं. त. तु. दै. ‘चर्मकुंड’.] **चर्मककुंड । भीतरीं जिव्हा चामखंड । असत्य कांटे काटली ॥ ९ ॥**

**ऐकतां कथा रामायणी । नवरस पापां होय धुणी । नामें उद्धरिली कुंटणी । पवित्र वाणी रामनामें ॥ १० ॥**

अनुक्रमणिका

[ओवी १० त. प्रतीत नाही.]

**श्रीरामकथेची नव्हाळी । शेष स्वयें वंदी पाताळीं । शिव वंदी** [त. खेरीज इतरत्र 'प्रेमसंमेळीं'.] **प्रेमरसमेळी । कथा भूतळीं जगद्वंद्य ॥ ११ ॥**

**ते शतकोटी रामायण । येथ आकळूं शके कोण । तेथ मी अपुरतें दीन । कथा जनार्दन स्वयें वदवी ॥ १२ ॥**

**करितां लिंगदेहाचें मर्दन । तेंचि जन मानिती अर्दन । या लागीं नामें श्रीजनार्दन । निज व्याख्यान शास्त्रार्थें ॥ १३ ॥**

**असो काय काज बहु शास्त्रार्थें । काय काज बहुतां ग्रंथें । मुख्य श्रीरामकथा येथें । शोधित चित्तें अवधारा ॥ १४ ॥** [मु. प्रतीत १४ वी ओवी, '. . . . . मुख्य श्रीरामकथा येथे । तेंचि श्रवण मनन करावें ग्रंथें । सावध चित्तें अवधारा ॥ १४ ॥'.]

**भरत आलिया अयोध्येसीं । मागें श्रीराम वनवासी । काय वर्तलें येरां दिवसीं । ते कथेसी अवधारा ॥ १५**

> प्रतिप्रयाते भरते वसन्रामस्तपोवने । लक्षयामास सोद्वेगांस्तत्रारण्यनिवासिनः ॥ ३ ॥
> राममासाद्य निरतास्तानलक्षयदुत्सुकान्! अन्योन्यमभिजल्पंतः शनैश्चक्रुः पृथक्कथाः ॥ ४ ॥
> तेषां त्वौत्सुक्यमालक्ष्य रामस्त्वात्मनि शङ्किंत. ॥ ५ ॥

**भरत अयोध्ये गेलियावरी । मागां** [मु. 'चित्रकूटवासी'; पै. मु. जो. तु. 'चित्रकूट'.] **चित्रकूटीं ऋषीश्वरी । अति उद्वेग चित्तीं धरी । परस्परीं बोलती ॥ १६ ॥**

**ते येऊनी रामाप्रती । खुणाऊनी गुजबुजती । ते देखोनि रघुपती । शंकित चित्तीं स्वयें झाला ॥ १७ ॥**

**भरत आला होता सैन्येसीं । कांहीं उपद्रव जाला ऋषींसी । किंवा कांहीं** [जो. 'सीतेपासी'.] **मजचिपासीं । अधर्मासी देखती ॥ १८ ॥**

**अथवा लक्ष्मणें यांसी । कांहीं दिधले अपमानासी । किंवा कांहीं सीतेपासीं । अधर्मासीं देखिले ॥ १९ ॥**

**ऐसी अति चिंता रामासी । कळों सरली जाबालि ऋषीसी । तो येऊनी श्रीरामापासी । सांत्वनेसी बोलतु ॥ २० ॥**

> कृताञ्जलिरुवाचेदमृषिर्जाबालिकस्तदा । अथर्षिर्जरया विप्रस्तपसा नियतेंद्रियः ॥ ६ ॥
> स वेपमान उत्थाप्य रामं भूतदयापरम् । न चंद्रमुखं पश्यामो वृत्ति दुश्चरितां त्वयि ॥ ७ ॥
> त्वन्निमित्तं वयं तात वसामः शुभदर्शन । रक्षोभ्यःस्तेन संवृत्ताः कथयन्ति मिथः कथाः ॥ ८ ॥
> ऋषीणां कंदनं कृत्वा जनस्थाननिवासिनाम् । रावणावरजः कश्चित्खरो नामेति विश्रुतः ॥ ९ ॥
> उत्साद्य तापसान्सर्वान् जनस्थानकृतालयान् ॥ १० ॥

**जाबालि ऋषि अतिवृद्ध । तापसामाजीं** [मु. 'अति'.] **तपें प्रसिद्ध । इंद्रियनेमी अति अगाध । प्रज्ञा** [त. 'प्रसिद्ध'.]

अनुक्रमणिका

प्रबुद्ध ऋषिवर्य ॥ २१ ॥

ऐसा जो कां ऋषि जाबालि । तेणें करुनी कृतांजली । मृदु मधुर वाक्यें मंजुळीं । श्रीरामाजवळीं बोलतु ॥ २२ ॥ [ओवी २२ दै. प्रतीत नाही.]

श्रीरामापासुनी दुश्चरित । न घडे जागृति स्वप्न सुषुप्तींत । तुझेनि नामें दुष्कृती तरत । तो तूं साशंकित कां होसी ॥

तुझेनि [मु. 'मुखचंद्रें'.] मुखें चंद्र निष्कळंक । त्या तुझे देखतां श्रीमुख । कोटी जन्माचें हरे दुःख । परम सुख कोंदाटे ॥ २४ ॥

लक्ष्मणापासुनी अनुचित । मूर्खहि सत्य न मानित । तुझ्या भक्तापासुनी अकृत्य । न घडे निश्चित श्रीरामा ॥ २५ ॥

निज भक्ताचें अनुचित । तूं करिसी अति पुनीत । प्रल्हादें करविला पितृघात । कीर्ति लोकाआंत अतिपावन ॥ २६ ॥

प्रल्हादाचा पितृघात । वंद्य केला त्रैलोक्यांत । जे निजमायेचा करिती अंत । ते तूं अतिआप्त मानिसी ॥ २७ ॥

मातृघात पितृघात । जे जे करिती तुझे भक्त । ते ते मानिसी परम आप्त । अति पुनीत तिहीं लोकी ॥ २८ ॥

मातृघातकी परशुराम । पितृघातकी प्रल्हाद परम । या दोहींचें स्मरतां नाम । भेटे [मु. 'श्रीराम'.] परब्रह्म स्वानंदें ॥ २९ ॥

प्रल्हाद भक्तां मुकुटमणी । पढविला प्रातःस्मरणीं । दुजा ब्रह्मचारियां शिरोमणी । वेदीं पुराणीं [जो. 'बोलिजे'.] वानिजे ॥ ३० ॥

त्याहुनि सौमित्रु परमभक्त । सखा आणि अति [मु. 'पुनीत'.] विनीत । यापासुनी अनुचित । न घडे निश्चित श्रीरामा ॥ ३१ ॥

सीता तुझी धर्मपत्नी । अयोनिजा जनकनंदिनी । अधर्म तीहि पासूनी । जागृतीं स्वप्नीं घडेना ॥ ३२ ॥

अधर्माची [तं. 'आसक्ता'.] आशंकता । तुम्हामाजीं नाहीं रघुनाथा । ऋषी बोलती जे जे वार्ता । ते ऐक आतां सांगेन ॥ ३३ ॥

जनस्थानीं वसते जे जन । त्या तापसांचें अतिकंदन । राक्षसीं केलें अन्योविन्य । तें भय संपूर्ण ऋषि सांगती ॥ ३४ ॥

त्या [मु. 'महाभयाची वार्ता'.] भयाची महा वार्ता । ऋषी शंकले तुज सांगतां । मजहातीं तुज रघुनाथा । तिहीं हे

अनुक्रमणिका

कथा सांगविली ॥ ३५ ॥

तापसां कोण करितो बाधु । ऐसा पुससी समंधु । रावणाचा धाकटा बंधु । खरनामें अगाधु राक्षसु ॥ ३६ ॥

त्रिशिरा आणि खर दूषण । हे तिघेहि सखे बंधु जाण । चौदा सहस्त्र राक्षस सैन्य । जनस्थान वसविती ॥ ३७ ॥ [ओवी ३७ मु. प्रतीत नाही.]

त्या राक्षसा भेणें भयभीत । तुझा आश्रय करुनि येथ । ऋषी राहिले समस्त । राक्षसासी अन्त श्रीराम ॥ ३८ ॥

आजि आली नवी वार्ता । तेणें भय भारी ऋषि समस्तां । तुजसी सांडूनी रघुनाथा । आणिका पर्वता जावों पाहती ॥

राक्षस खराप्रति सांगत । रामाश्रयें ऋषि समस्त । राहिले चित्रकूटा आंत । तो स्वयें येथ येवों इच्छीत ॥ ४० ॥

ससैन्य बंधु तिघेहि जण । रातोरातीं घाला घालून । मारुनि रामलक्ष्मण । सीता आपण नेवों पाहती ॥ ४१ ॥

सन्मुख यावे तुम्हांप्रती । तंव तुम्ही परम पुरुषार्थी । हा धाकु सदा ते वाहाती । तुमची ख्याति कळलीसे ॥ ४२ ॥

ताटका वधिली एके बाणें । सुबाहु घेतला प्राणें । मारीच उडविला सत्राणें । त्यासी जुंझणें प्राणान्त ॥ ४३ ॥

धनुष्यें रावणा लाविली ख्याती । तें मोडिलें घेऊनी हातीं । त्यासी युद्ध न घडे निश्चिती । निद्रित शतीं मारावें ॥

हा राक्षसीं केला इत्यर्थ । तेणें ब्राह्मण चळीं कांपत । तुज सांगावया साशंकित । तें म्यां समस्त श्रुत केलें ॥ ४५ ॥

ऐके श्रीरामा निश्चित । येथ वन आहे अति गुप्त । धाकें ऋषी जाताती समस्त । तुम्हीही तेथ शीघ्र यावे ॥ ४६ ॥

> बहुमूलफलैश्चित्रमतिदूरादितो वनम् । स बांधव इतो गच्छ यदि चित्तं प्रवर्तते ॥ ११ ॥
> असतां रक्षसामेषां समीपे क्रूरकर्मणां । गंतव्यं न तु विश्वासच्छलाच्छिद्रा हि राक्षसाः ॥ १२ ॥
> इत्युक्त्वा ते तु मुनयो रामं पद्मनिभेक्षणं । न शेकुरुत्तरैर्वाक्यैरवबोद्धुं समुत्सुकाः ॥ १३ ॥

निकट वन अति गहन । अतर्क्य तर्केना गुप्तस्थान । फळमूळ गंगाजीवन । विश्रामस्थान वस्तीसी ॥ ४७ ॥

तेथ यावे तुम्ही तिघेजणीं । ऐसें ऋषीश्वरांचे मनीं । ऐसें गुह्य बोलतां कानीं । [कं. खेरीज इतरत्र ‘जाली तुझ्या मनीं

अनुक्रमणिका

आशंका'.] श्रीराम हांसोनि बोलत ॥ ४८ ॥

हात जोडोनि समस्तांसीं । राम विनवीं ऋषीश्वरांसी । सुखें असावें आश्रमवासी । आलिया राक्षसांसी मी जाणें ॥

संरक्षावे गो ब्राह्मण । हेंचि व्रत स्वधर्माचरण । मी रामु असतां रक्षण । [कं. 'भय न मना आपणासी'.] भय कोण तुम्हांसी ॥ ५० ॥

आलिया त्रिशिरा खर दूषण । निर्दळिती माझे बाण । मी राम असतां रक्षण । भय कोण तुम्हांसी ॥ ५१ ॥ [कं. प्रतीत ५१ ओवी नाही.]

बाणें भेदीन मेरुगिरी । मारीन राक्षसांच्या हारी । मी [मु. 'मी रघुवीर सेवक'.] सेवक असतां घरीं । कैशापरी भय तुम्हां ॥ ५२ ॥

ऐसें [मु. 'बोलतां'.] गर्जतां श्रीरामासीं । विचार करिती अवघे ऋषी । तिन्ही धुरा दळेबळेंसी । केविं दोघांसी [मु. 'आकळती'.] आंवरती ॥ ५३ ॥

एक पळेल घेउनी सीता । एकला राम उरेल जुंझतां । समस्त राक्षसांच्या घाता । केवी साहाता तो होय ॥ ५४ ॥

सुबाहु मारिला तत्वतां । तैं जवळी नव्हती सीता । दोघेही बंधु एकात्मता । केलें घाता सुबाहूच्या ॥ ५५ ॥

बाइलेचे चिंतेकरितां । धैर्य नुरे गा पुरुषार्था । स्त्रीलोभ हृदयीं असतां । जयो सर्वथा न पविजे ॥ ५६ ॥

हृदयीं स्त्रीलोभ असतां । युद्धीं नुरे एकाग्रता । मंत्रबीजें गिळी चिंता । जयो सर्वथा न पविजे ॥ ५७ ॥

तिन्ही धुरा भद्रजाती । एकला राम जुंझेल किती । चाऱ्ही कांडे सरोनि जाती । मग पळती माघारे ॥ ५८ ॥

हे तिन्ही वनीं गुप्त होती । मग राक्षस आम्हां भक्षिती । यांची सांडूनी संगती । निघा निश्चितीं अवघेही ॥ ५९ ॥

[तं. 'येक युक्ति'.] युक्ति सांगती रामाप्रती । तुम्ही दोघेहि अति पुरुषार्थी । तरी न राहावें येथिले वस्ती । यावें निश्चितीं आम्हांसवें ॥

राक्षस धर्मयोद्धे नव्हती । छळणें पळणें त्यांची शक्ति । सिंतरुनी नानायुक्ति । मग मारिती [मु. सुरवरातें] शूरांते ॥ ६१ ॥

राक्षस निशाचर होती । येऊनियां रातोरातीं । निदसुऱ्या तुम्हां मारिती । तुमची शक्ति ते काये ॥ ६२ ॥
ऐसें बोलतां ऋषीश्वर । राम नेदीच प्रत्युत्तर । ब्राह्मणांमाजीं विकल्प फार । धैर्य निर्धार असेना ॥ ६३ ॥

अनुक्रमणिका

**विश्वास नाहीं ब्राह्मणांसीं । माझी संगती न घडे यांसी । त्यागुनियां श्रीरामासी । निघाले ऋषि तत्काळ ॥ ६४ ॥**

**राहावया** [कं. 'येरीती'.] **एकीं रातीं । धीरु न धरे ब्राह्मणांचे चित्तीं । त्यागूनियां रघुपती । अन्यत्र गति निघाले ॥ ६५ ॥**

**अधैर्यें कंपायमान । आज्ञा पुसती ब्राह्मण । श्रीरामें करुनी नमन । म्हणे आपण सुखें** [जो. 'शीघ्र'.] **जावे ॥ ६६ ॥**

[पै. तु. 'अविश्वास भयभरें'.] **अविश्वासी द्विजवरें । हातीं स्त्रिया कडिये लेकरें । माथां ठेऊनिया यज्ञपात्रें । आश्रमांतरें ऋषि गेले ॥ ६७ ॥**

> सचिंतेषु प्रयातेषु तपस्विषु विशेषतः । विवृद्धराक्षसान् दृष्ट्वा रामोऽपि गमनोस्तुकः ॥ १४ ॥
> लक्ष्मणोऽपि प्रयातेषु तपस्विषु विशेषतः । न चक्रेऽपि मतिं स्थातुं वैदेही च सुमध्यमा ॥ १५ ॥
> तस्मादद्यैव गच्छामि इति संचिंत्य राघवः । प्रातिष्ठत ततः शीघ्रं सीतया लक्ष्मणेन च ॥ १६ ॥

**श्रीराम विचारी निजमनीं । राक्षस वाढले जनस्थानीं । तयांच्या निज** [मु. 'बीज'.] **निर्दळनीं । आजीच येथुनी निघावें ॥ ६८ ॥**

**सीता म्हणे श्रीरघुनाथा । समस्त ऋषि गेले असतां । येथ राहणें रुचेना चित्तां । आजीचि तत्वतां निघावें ॥ ६९ ॥**

**मग बोलिला लक्ष्मण । ऋषीश्वर गेले** [मु. 'भयभीत मन'.] **भयाभेण । तें भय निर्दळावया** [दै. 'लागुन'.] **आपण । शीघ्र प्रयाण करावें ॥ ७० ॥**

**करावें राक्षस दळण । तेणें श्रीरामा उल्हास पूर्ण । सर्वांगां आलें** [तं. 'निजस्फुराण'.] **फुराण । दंडकारण्य शोधावया ॥ ७१ ॥**

**बाहू थरकती समूळीं । पिंजारल्या रोमावळी । करावया राक्षसांची होळी । आतुर्बळी श्रीराम ॥ ७२ ॥**

**उल्हास श्रीरामाच्या चित्तां । सौमित्रासि होय सांगतां । घेऊनी आयुधा समस्तां । सहित सीता निघे वेगीं ॥ ७३ ॥**

**एका जनार्दना शरण । चित्रकूट वस्ती त्यागून । केलें श्रीरामें प्रयाण । दण्डकारण्य** [दै. खेरीज इतरत्र 'प्रवेशा'.] **प्रदेशा ॥ ७४ ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां चित्रकूटतः दण्डकारण्याभिगमनं नाम प्रथमप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग दुसरा

## विराध वध

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**अत्रि ऋषि वसे जेथ । आतुर विश्रांति पर्वत । तेथ आला रघुनाथ । समवेत** [त. 'स्वबंधु'.] **स्त्री बंधु ॥ १ ॥**

**देखोनी अत्रीचे** [पै. त. तु. दै. जो. 'दर्शन'; कं. 'ऋषिगण'.] **चरण । श्रीरामें घातलें लोटांगण । ऋषीनें दिधलें आलिंगन । समाधान** [दै. 'दोघांसी'.] **ध्येय ध्याना ॥ २ ॥**

**सीता आणि लक्ष्मण । दोघीं घातलें लोटांगण । दृढ मस्तकीं धरिलें चरण । सुखसंपन्न ऋषि जाला ॥ ३ ॥**

**श्रीरामें अति उल्हासतां । अनसूया चरणीं ठेविला माथा । अत्रि म्हणे रघुनाथा । तुझी हे माता पुरातन ॥ ४ ॥**

**आइकोनि अत्रीचें वचन । सौमित्रें वंदिलें तियेचे चरण । सीतेनें घातलें लोटांगण । दिधलें आलिंगन अनसूया ॥ ५ ॥**

**सीतेसी देखतांचि दिठीं । अनसूयेसीं** [मु. 'सुखानंद पोटीं'; त. 'आनंदकोटी'.] **सुखानुकोटी । धन्य धन्य तूं गोरटी । पतिसंनिष्टी पतिव्रता ॥ ६ ॥**

**तुझें आंगीं बाळपण । पतीच्या** [कं. 'लक्षणा'.] **व्रता अनुलक्षून । चरण चाली वनाभिगमन । तूं संपूर्ण पतिव्रता ॥ ७ ॥**

**पतीचें वचन नुलंघिता । जे अनुसरे पतीच्या व्रता । तेचि सती पतिव्रता । तें तूं सीता सभाग्य ॥ ८ ॥**

**ऐंसी करूनिया स्तुती । उचलुनी दोहीं हातीं । आळंगिली अति प्रीतीं । सतियां सती स्वानंदें ॥ ९ ॥**

**जाणोनी सीतेचें** [पै. मु. तु. दै. जो. 'हृदयस्थ'; तं. 'हृद्गस्थ'.] **हृदगत । अनसूया कृपायुक्त । आपुल्या पातिव्रत्याचें व्रत । सीतेसी देत स्वानंदें ॥ १० ॥**

**देऊनिया पातिव्रत्याचें व्रत । अनसूया उल्हासयुक्त । दिव्यवस्त्रें अंगरागयुक्त । स्वानंदें देत ते ऐका ॥ ११ ॥**

> अब्रवीच्चापि सफलं हर्षं सीते करोम्यहम् । इदं द्रव्यं वरं माल्यं वस्त्राण्याभरणानि च ॥ १ ॥
> अंगरागं च वैदेहि महार्हं च विलेपनम् । मया दत्तमिदं सीते भूषणैरपि वर्जिता ॥ २ ॥
> तथा रूपमसंक्लिष्टं नित्यमेव भविष्यति । अंगरागेन दिव्येन लिप्तांगि जनकात्मजे ॥ ३ ॥
> शोभयिष्यसि भर्तारं श्रीर्विष्णुमिव रूपिणी । सावस्त्रमंगरागं च भूषणानि स्त्रजस्तथा ॥ ४ ॥
> मैथिली प्रतिजग्राह प्रीतिदायमनुत्तमम् ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

अनसूया कृपायुक्त । सीतेसी दिव्य वस्त्रें नेसवित । दिव्य चंदनाची उटी देत । माळा घालित दिव्य सुमनें ॥ १२ ॥

सीतेचें पुरवावया कोड । घातला [मु. मुं. जो. 'ताडाचा पैं जोड'.] तोडाचा पैं जोड । अहर्निशीं पडे उजेड । सरली चाड शशी सूर्या ॥ १३ ॥

तोडांचिया दिव्य दीप्ति । शशी सूर्य खद्योत होती । अनसूयेची हे ख्याति । पतिसामर्थ्यें पतिव्रता ॥ १४ ॥

जिचा लागतांचि हात । तिन्हीं देव जाले अपत्य । तिचें सामर्थ्य अद्भुत । स्वयें अर्पित सीतेसी ॥ १५ ॥

माझिया दिव्यवस्त्रांची थोरी । मळिन नव्हेती परिचारीं । जावों नेणती रजकद्वारीं । निजतेजाकारीं निर्मळ ॥ १६ ॥

उटी धुतां वोहळेना जाण । [मु. कं. 'देही'.] हें दिव्यचंदनाचें महिमान । करितां अभ्यंग मर्दन । सुगंधपण उडेना ॥ १७ ॥

दिव्य सुमनांची माळा । सुकों नेणें कदा काळा । नित्य [पै. 'टवटव आगळा'.] टवटवी गळां । सुपरिमळा मघमघीत ॥ १८ ॥

सीते सावध परियेसी । तूं माझा प्रसाद पावलीसी । तुज भय नाहीं राक्षसांपासीं । निःशंक होसी निर्भय ॥ १९ ॥

वियोग जालिया रघुनाथा । वियोग न बधी तुझीया चित्ता ।
म्हणोनि हात ठेविला माथां । अनसूयां सीता [कं. 'अनुसरली'.] अनुग्रहिली ॥ २० ॥

अनसूया महापतिव्रता । पुढिला जाणोनि कार्यार्था । वधावया लंकानाथा । कृपेनें सीता अनुग्रहिली ॥ २१ ॥

श्रीराम सौमित्र सीता । देखोनि उल्हास अत्रीच्या चित्ता । पूर्वापर पूर्वकथा । होय सांगता श्रीरामा ॥ २२ ॥

अनसूयां महाभागां तापसीं धर्मचारिणीम् । दशवर्षसहस्त्राणि यया तप्तं महत्तपः ॥ ६ ॥
दशवर्षाण्यनावृष्ट्या दग्धे लोके निरंतरम् । यया मूलं फलं सृष्टं जान्हवी च प्रवर्तिता ॥ ७ ॥
देवकार्यनिमित्तं च यया संचरमाणया । दशमासा कृता रात्रिः सेयं माता तवानघ ॥ ८ ॥

अनसूया महापतिव्रता । तपस्विनी [तं. 'अति उत्तमता'.] अतिवृद्धता । चंद्र किरणासम शोभे माथां । पतिधर्मार्था अनुकूल ॥ २३ ॥

न रिघतां गिरिकंदरीं । वसोनि घरीच्या घरीं । दहा सहस्त्र वर्षेवरी । इचिया तपाची थोरी अगाध ॥ २४ ॥

अनुक्रमणिका

घरीच्या घरीं कोण तप । ऐसा पुसावया करिसी संकल्प । ऐक त्या तपाचें स्वरूप । अति निष्पाप सांगेन ॥ २५ ॥

कोणाची न करी असूया । यालागीं नांवें अनसूया । काम क्रोध लोभ न बधी जया । तें रघुवर्या महातप ॥ २६ ॥

[मु. 'तपें करकरोनि'; तं. 'तप करें करोनी'; कं. 'तप करूनियां'.] तप कर करूं तापस । क्रोधें केलें अतिकर्कश । दंड मुंडण वृथावेश । पडिली वोस तपश्चर्या ॥ २७ ॥

काम क्रोध तिसरा लोभ । सांडणें हें तप दुर्लभ । तें घरीच्या घरीं जालें सुलभ । अति निर्लोभ अनसूया ॥ २८ ॥

जेथ लोभ तें असूया । निर्लोभ तें अनसूया । इचें नामचि तपश्चर्या । जाण रघुवर्या निश्चित ॥ २९ ॥

नुलंघणें पतिवचनासी । हें परम तप स्त्रियांसीं । तें दहा सहस्त्र वर्षेंसीं । अनसूयेसी [कं. 'पावलें'.] फावलें ॥ ३० ॥

उलंघिता पतीचें वचन । पातिव्रत्या पडिलें खान ।
नाहीं सामर्थ्य ना समाधान । स्त्रीपुरुषें श्वानप्राय वसवसती ॥ ३१ ॥

दहा सहस्त्र वर्षें पर्यंत । माझा नुलंघी वचनार्थ । तेणें तपें हे अतिसमर्थ । ऐक सामर्थ्य तियेचें ॥ ३२ ॥

दहा सहस्त्र वर्षें अनावृष्टी । दुर्भिक्ष पडलें सृष्टीं । तृण नाहीं पृथ्वीचे पोटीं । वृक्षांची गोष्टी ते कैंची ॥ ३३ ॥

ते काळीं फळमूळयुक्त । इणें वाचविलें जनसमस्त । पराङ्मुख नव्हे अहोरात । जन संतृप्त फळमूळीं ॥ ३४ ॥

गौतम पेरी प्रातःकाळीं । माध्यान्हीं आणोनि दे साळी । तेणें पाकें अहिल्याबाळी । ऋषि मंडळी वांचविली ॥ ३५ ॥

गौतमें वांचविले ब्राह्मण । इणें वांचविले वर्णावर्ण । पशुपक्षी शूकर श्वान । तृप्त भोजन अनुद्वेग ॥ ३६ ॥

जंव जंव मागते ये द्वारासी । तंव तंव उल्हास अनसूयेसी । तृप्ती देतां समस्तांसीं । अहर्निशीं आल्हाद ॥ ३७ ॥

वृक्ष नाहीं पृथ्वीसी । तऱ्ही पुरवी फळमूळासी । अगाध सामर्थ्य ईपासीं । द्विज देवांसी अतर्क्य ॥ ३८ ॥

जेवीं प्रवाह गंगाजळा । तैसें पुरवी फळमूळां । इच्या सामर्थ्याची कळा । [कं. 'न कळे लीळा'.] अतर्क्य सकळां द्विजदेवां ॥ ३९ ॥

अनुक्रमणिका

अवर्षणीं तृप्त भोजन । द्यावें हें इचें व्रत संपूर्ण । आइकोनि तिन्हीं देव आपण । इचें छळण करूं आले ॥ ४० ॥

[कं. 'बाह्यवेषाचें आंग धरून'.] ब्राह्मण वेषें याञ्चा करून । इचे घेऊनिया [कं. 'दर्शन'.] वचन । म्हणती नग्न होऊनी आपण । स्नान भोजन द्यावें आम्हां ॥

आइकोनि त्यांची वचनोक्ति । शंका नाहीं इचें चित्तीं । हो म्हणितलें स्वानंद स्थितीं । ऐक रघुपति विनोदु ॥ ४२ ॥

माझे चरणतीर्थ घेऊन । त्यांसीं केलें अभिषिंचन । तिन्हीं बाळकें [कं. 'केली पूर्ण'.] जालीं जाण । अति अज्ञान षण्मासिक ॥ ४३ ॥

मग होऊनिया नग्न । पायांवरी अभ्यंगून । तिघां देऊनी स्तनपान । पर्यंदन पालकीं ॥ ४४ ॥

लक्ष्मी सावित्री पार्वती । तिघी सामर्थ्यें वेवादती । त्यासीं दावावया इची स्थिती । तिन्ही मूर्ति [दै. 'मूळ'.] छळूं आल्या ॥ ४५ ॥

पुढिलांसी करूं जाता छळण । छळितांचि छळे आपण । तिहीं देवा आलें बाळपण । अति अज्ञान स्वयें जालें ॥ ४६ ॥

दशमासांची अहोराती । अनसूया केली [नि. घा. सु. कं. 'निश्चिती'.] एकराती । तत्काळ तिहींची प्रसूति । अपत्यप्राप्ति पावले ॥ ४७ ॥

अतिशयें भोगी आपत्ती । या नांव अपत्य म्हणती । स्वविष्ठा स्वयें चिवडिती । तें बाळत्वप्राप्ती तिहीं देवां ॥ ४८ ॥

लक्ष्मी सावित्री पार्वती । देखोनि तिघी कुसमुसिती । पति [कं. 'अनुसरले अनुसये प्रती'.] अडकले अनसूये हातीं । सामर्थ्य तीप्रति चालेना ॥ ४९ ॥

जैसा सूर्यापुढें खद्योत । तैशा तिघी जाल्या [सु. नि. घा. 'गर्वहत'.] हताहत । अनसूयेसी लोटांगण घालित । पति निर्मुक्त करी माये ॥ ५० ॥

ते म्हणे पुसा ऋषिप्रति । त्या मज येती काकुलती । ऋषिराया कृपामूर्ति । पतिनिर्मुक्ती सांगावी ॥ ५१ ॥

अनसूया पतिव्रता शिरोरत्न । माझें लाहोनि आज्ञापन । तिघांचें हरुनी अज्ञान । केलें समाधान स्वस्वरुपीं ॥ ५२ ॥ [जो. व मु. प्रतींत ही ओवी खालीलप्रमाणें आली आहे :–– 'ऋषि म्हणे प्रियेप्रती । रमा सावित्री पार्वती । या तिन्ही श्रेष्ठ अतिथि । पति निर्मुक्ति करी यासी ॥']

केलें अनसूयेचें [सु. नि. घा. 'स्तवन'.] स्तनपान । तिघे पुत्र जाले जाण । अत्रि गोत्र समुत्पन्न । ब्रह्मा आपण चंद्र

अनुक्रमणिका

जाला ॥ ५३ ॥

रुद्र दुर्वास जाला कोपाग्नि । विष्णु जाला दत्तात्रय मुनी । ते हे श्रीरामा तुझी जननी । जुनाट जुनी अनसूया ॥ ५४ ॥

ते हे तुझी अनादि माता । सत्य मानी रघुनाथा । इचे चरणीं ठेवी माथा । तुम्हां निर्भयता [कं. 'इचेनि'.] वनवासीं ॥ ५५ ॥

अनसूया परम पतिव्रता । इनें अनुग्रहिली सीता । तुम्हांसीं वनवासीं असतां । भय सर्वथा असेना ॥ ५६ ॥

ज्या ज्या पावाल भयासी । तें तें निर्भय तुम्हांसीं । ज्या ज्या पावाल अपेशासी । अपेश यशीं जगद्वंद्य ॥ ५७ ॥

तिघे राहुनी त्रिरात्र । फळमूळांचा [सु. नि. घा. 'अति आदर'.] अल्पोपचार । देखोनि सीतेचा निर्धार । सुख अपार अनसूयें ॥ ५८ ॥

अभिवंदुनी अत्रि ऋषि । नमस्कारुनी अनसूयेसीं । रामु निघाला दंडकारण्यासी । राक्षसांसी अंतक ॥ ५९ ॥

ऋषि आश्रम वनसमेळीं । अग्निहोत्रांची नवाळी । पाहात यागांची शुद्ध शैली । राम वनस्थळीं विचरत ॥ ६० ॥

कोठें त्रिरात्र कोठें पंचरात्र । कोठें वस्तीसीं सप्तरात्र । कोठें राहूनी येकरात्र । गमन तत्पर श्रीराम ॥ ६१ ॥

पुढें देखिलें दुर्गमवन । पळती गज सिंह व्याघ्र हरिण । ससे साइळा वृक जंबूकगण । घेऊनि प्राण पळताती ॥ ६२ ॥

सिंहें मारावें गजथाट । ते कां पळती येकवाट । व्याघ्रें फोडावा हरिण कंठ । ते कां [सु. नि. घा. 'समसगट'; त. 'समसकट'.] समगट पळताती ॥ ६३ ॥

राम म्हणे लक्ष्मणासीं । महद्भय दिसे श्वापदासीं । विसरोनी वैरभावासी । अति आक्रोशीं पळताती ॥ ६४ ॥

यासीं भयाचें काय कारण । सावध पाहावें आपण । तंव विराधें धांवोनि आपण । सीताहरण स्वयें केलें ॥ ६५ ॥

पुढां श्रीराम लक्ष्मण । सीता मागें होती आपण । तिचें देखोनि सुंदरपण । विराधें हरण तत्काळ केलें ॥ ६६ ॥

सीता धरूनी दोहीं हातीं । बैसविली अंकाप्रति । मी होईन वो तुझा पति । चिंता चित्तीं करूं नको ॥ ६७ ॥

तूं अप्सरा कीं खेचरी । वनदेवता सुरेश्वरी । भाग्यें सांपडलीस वो सुंदरी । सुखें माझ्या घरी नांदावें ॥ ६८ ॥

अनुक्रमणिका

**तुजसारिखी सुंदर । रिघालिसी माझें घर । गजमुक्ताफळांचे अळंकार । उत्तम** [सु. नि. घा. 'शृंगार'.] **भांगार तुज करीन ॥ ६९ ॥**

**मज जोडिली सुंदर कांता । उल्हास राक्षसाचिया चित्तां । त्यासीं शंकेना सती सीता । श्रीरघुनाथाचेनि बळें ॥ ७० ॥**

**श्रीरामाच्या** [तु. दै. 'बळापुढें'.] **बाणापुढें । विराध राक्षस केवळ** [पै. तु. 'वेडे'; सु. नि. घा. 'बापुडें'.] **किडें । मज नेईल कोणीकडे । मरण रोकडें पावेल ॥ ७१ ॥**

**वन अत्यंत गूढ गहन । पुढां गेले रामलक्ष्मण । त्यासी विराध न देखें आपण । सीता दोघेजण न देखती ॥ ७२ ॥**

**अनसूया अनुग्रहिली सीता । तिसीं भय नाही सर्वथा । तऱ्ही ते स्मरे रघुनाथा । कृपावंता श्रीरामा ॥ ७३ ॥**

**ऐकता श्रीराम स्मरण । राक्षस जाला कंपायमान । म्हणे हें नको करूं स्मरण । वचन तीक्ष्ण मज बाधी ॥ ७४ ॥**

**ऐकोनि सीतेचें वचन । परतले रामलक्ष्मण । गूढ गहन महावन । सीता दर्शन नव्हे त्यासीं ॥ ७५ ॥**

**लक्ष्मण कोपला उद्भट । बाण सोडुनी घनदाट । वन छेदुनि केलें सपाट । देखिला पापिष्ठ विराध ॥ ७६ ॥**

> ददर्श गिरिशृंगाभं पुरुषादमवस्थितम् । वक्रनासं विरूपाक्षं दीप्ताऽस्यं निम्नतोदरं ॥ ९ ॥
> दीप्तंजिव्हां महाकायं मृगन्यालनिवर्हणम् । अष्टौ सिंहानुपासृज्य शूलान्वो रुधिरोक्षितान् ॥ १० ॥
> सविषाणं वसादिग्धं गजस्य च शिरो महत् । वसानं चर्म वैव्या घ्रं वसारुधिरभूषितम् ॥ ११ ॥

**राक्षस देखिला अतिक्रूर । पर्वतोपम महाथोर । वक्र नासिक विक्राळ** [नि. घा. 'वक्र वक्त्र'.] **वक्त्र । कपाटोदर दुर्धर्ष ॥ ७७ ॥**

**अष्टौ महासिंहांचीं मढीं । शूळें खोंचुनी खांदी कावडी । मृग व्याळ चितळे बापुडीं । मारी कोडी श्वापदांच्या ॥ ७८ ॥**

**सदंत गजांचीं शिरें । गजचर्मे थिबती रुधिरें । मारुनी पंच पंच व्याघ्रें । खांदीं क्रूरें वाहिजती ॥ ७९ ॥**

**जिव्हा तांबडी लखलखित । नेत्र** [नि. घा. 'दिसती'.] **निमग्न अतिआरक्त । भूतां करावया अंत ।** [सु. नि. घा. 'सवें धांवत वनासि'.] **स्वयें धांवत विकृतास्यें ॥ ८० ॥**

> स रामलक्ष्मणौ दृष्ट्वा सीतां च शुभलक्षणाम् । अभ्यधावत्सुसंक्रुद्धो प्रजाः काल इवांतकः ॥ १२ ॥
> स कृत्वा भैरवं नादं चालयन्निव मेदिनीम् । अंकेनादाय वैदेहीं परिक्रम्य ततोऽब्रवीत् ॥ १३ ॥
> इयं नारी वरारोहा मम भार्या भविष्यति ॥ १४ ॥

अनुक्रमणिका

विराधें देखोनि रामलक्ष्मण । सीतेसि पुसे हे दोघेहि कोण ।
श्रीराम भर्तार देर लक्ष्मण । माझी सोडवण करुं आले ॥ ८१ ॥

तो म्हणे तूं माझी कांता । तुज तंव नोसंडी सर्वथा । यां दोघांसी मी भक्षीन आतां । तूं कांहीं चिंता करुं नको ॥ ८२ ॥

ऐसें बोलोनियां देख । विटंक देऊनी हांक । धांवोनि श्रीरामासन्मुख । काय तो मूर्ख जल्पतु ॥ ८३ ॥

तुम्हांसवें सुंदर सीता । ते तंव जाली माझी कांता । तुम्हांसीं मी न मारी आतां । पळा जीविता वांचवावया ॥ ८४ ॥

तुम्हीं म्हणाल युद्ध करीन । तरी मी तुम्हां क्षणार्धें मारीन । तुमचें रुधिर प्राशीन । मांस भक्षीन स्वानंदें ॥ ८५ ॥

अरे मी विराध महाबळी । वसताहे ये वनस्थळीं । तुम्ही दोघे मूर्ख समूळीं । भार्या संमेळी आलेती ॥ ८६ ॥

तुम्हां दोघां तापसपण । तरि कां वाहा धनुष्यबाण । तुम्ही कोठील कोणाचे कोण । मज संपूर्ण सांगा पां ॥ ८७ ॥

त्यासी श्रीराम सांगे आपण । धनुष्यें गांजिला रावण । तें भंगिलें वाऊनी गुण । तो मी जाण श्रीराम ॥ ८८ ॥

सुबाहूचा घेतला प्राण । मारीच उडविला संपूर्ण । ताटिका वधिली विंधोनि बाण । तो मी जाण श्रीराम ॥ ८९ ॥

एकवीस वेळां धरत्री । जेणें भार्गवें केली निःक्षेत्री । तोही लाजविला शौर्यें करी । तो मी [तं. 'असुरारी'.] निर्धारी श्रीराम ॥ ९० ॥

सूर्यवंशी विख्यात । राम दाशरथी काकुत्स्थ । करावया राक्षसांचा अंत । वना निश्चित मी आलों ॥ ९१ ॥

सीता माझी निजवधू । लक्ष्मण माझा धाकुटा बंधू । तूं कोण राक्षस समंधु । मूळानुवादु मज सांगे ॥ ९२ ॥

राक्षस म्हणे रघुनाथा । जगाद पिता शतहृदा माता । विराध नामें मी येथें वसतां । तुमच्या घाता करीन ॥ ९३ ॥

ऐसें ऐकतां वचन । लक्ष्मण क्षोभला दारुण । धनुष्या वाऊनियां गुण । तीक्ष्ण बाण सोडिले ॥ ९४ ॥

कंकपत्री [मु. 'बहुपत्री'; कं. 'बहिरपत्रीं'.] बर्हपत्री । सुवर्ण पुंखी चौधारी । भेदले राक्षसाच्या शरीरीं । तेणें तो भारी क्षोभला ॥ ९५ ॥

अनुक्रमणिका

घ्यावया लक्ष्मणाचा प्राण । शूळ सोडिला गर्जोन । रामें विंधोनिया बाण । मध्येंचि जाण तोडिला ॥ ९६ ॥

सवेंचि श्रीरामें पैं जाण । विराधासीं पाचारून । रूक्मपुंख सोडिला बाण । अति तीक्ष्ण धगधगीत ॥ ९७ ॥

विराधा झांपडी पडली तेणें । मागें पळणें कां पुढें होणें । नाठवे करणें न करणें । येणें जाणें खुंटलें ॥ ९८ ॥

श्रीराम बाणाची लखलख । विराधासी एकाएक । पडोनी ठेलें जी ठक । क्रिया निःशेष विसरला ॥ ९९ ॥

विसरला राक्षसधर्म । विसरला युद्धसंभ्रम । विसरला क्रियाकर्म । घायें निभ्रम तो केला ॥ १०० ॥

श्रीरामाचा निजबाण । घेउनी आला रामस्मरण । धाकें निमाला देहाभिमान । गर्व बंधन घेऊनी ॥ १०१ ॥

ऐसी हृदयशुद्धि देखोन । हृदयीं भेदला श्रीरामबाण । बोध पावोनि संपूर्ण । राक्षसें प्राण सांडिला ॥ १०२ ॥

धन्य श्रीरामाचा बाण । लागतां राक्षसे सांडिला प्राण । बोध पावला संपूर्ण । तेंचि निरोपण अवधारा ॥ १०३ ॥

> उवाच रामं संहृष्टः प्रांजलिश्चलितेंद्रियः । वैदेहीं च महाभागां लक्ष्मणं च महारथम् ॥ १५ ॥
> युवां कोपयता वीरौ मया सीता हृता प्रभो । अभिशापादहं घोरात्प्रविष्टो राक्षसीं तनुं ॥ १६ ॥

बाणें भेदिलें जिव्हार । वाहाती रूधिरांचे पूर । विकळ पडतां शरीर । हर्ष-निर्भर विराध ॥ १०४ ॥

भेदतां श्रीरामाचा बाण । विकळ इंद्रियें चळित प्राण । घायें सुख पावला संपूर्ण । दुःख निर्दळण रामबाणें ॥ १०५ ॥

घाव लागतां होआवें दुःख । दुःख जाऊनी पावला सुख ।
विराधा जाला परम हरिख । बाणें अलौकिक सुखी केला ॥ १०६ ॥

धन्य धन्य हे श्रीराममूर्ति । धन्य धन्य बाणाची सुखशक्ति । धन्य धन्य हे सीतासती । स्पर्शें निर्मुक्ति राक्षसत्वा ॥

लक्ष्मणें कोपोनी उद्भट । घोरारण्य केलें सपाट । माझ्या मोक्षाची ते वाट । केली निर्दुष्ट सौमित्रें ॥ १०८ ॥

जो कां करी शुद्धमित्र । त्यासी म्हणती सौमित्र । लक्ष्मण सुमैत्र साचार । निशाचर मी सुखी केलों ॥ १०९ ॥

मी राक्षस अतिअपवित्र । श्रीरामबाणें केलों पवित्र । मज वंदिती सुरनर । सुखी साचार केलों बाणें ॥ ११० ॥

बाणीं कैंचा [तं. खेरीज इतरत्र 'सुखसंभ्रम'.] दुःखभ्रम । बाणीं सुखरूप श्रीराम । बाणासबाह्य श्रीराम परम ।

अनुक्रमणिका

**सुखसंभ्रम तेणें मज ॥ १११ ॥**

**शापें राक्षसतनु अधम । त्या शापाचें करूनी भस्म । श्रीरामें सुखी केलों परम । निजात्मधाम ठाकावया ॥ ११२ ॥**

**जन्ममरणाचा महाधांक । घायें फेडिला निःशेख । जितां मरतां नाहीं दुःख । ऐसें निजसुख दिधलें रामें ॥ ११३ ॥**

**कैंचा शाप तूं येथ कोण । ऐसा श्रीरामा पुससी प्रश्न । तेंहि विषयीचें निरोपण । समूळ कथन अवधारी ॥ ११४ ॥**

> अभिशापादहं घोरां प्रविष्टो राक्षसीं तनूम् ।
> तुंबरूर्नामगंधर्वः शप्तो वैश्रवणेन वै । प्रसाद्यमानश्च मया सोऽब्रवीन्मां महायशाः ॥ १७ ॥
> एष ते च महालाभो भविष्यति महाबल । यदा दाशरथी रामस्त्वां वधिष्यति संयुगे ॥ १८ ॥
> ततः प्रकृतिमापन्नो भवनं स्वं गमिष्यसि । इति वैश्रवणो राजा रंभासक्तं शशाप ह ॥ १९ ॥

**धनद कुबेर तूं जाणसी । तेणें रंगीं पाचारिलों गावयासी । मी तुंबरू आसक्त रंभेसी । मद्यपानेंसी उन्मत्त ॥ ११५ ॥**

**बळें मज नेलें तेथ । देखोनियां मदगर्वित । तूं राक्षस होसी उन्मत्त । घोर वनांत अघोर ॥ ११६ ॥**

**शाप ऐकोनि अद्भुत । मी जालों भयाभीत । लोटांगण घालुनी तेथ । उःशापार्थ प्रार्थिला ॥ ११७ ॥**

**सीता श्रीराम लक्ष्मण । वनवासां जातां जाण । तूं करिसी सीता हरण । युद्ध दारुण होईल ॥ ११८ ॥**

**लागतां श्रीरामाचा बाण । तूं तत्काळ सांडिसी प्राण । तेव्हा जाऊनि शापबंधन । निजात्मभुवन पावसी ॥ ११९ ॥**

**ऐसी उःशापाची निजकथा । ते आजि जाली** [मु. तु. सु. 'अति अल्पता'; नि. घा. 'तत्वतां'.] **अति आप्तता ।**
**तुझा बाण लागतां श्रीरघुनाथा । अलौकिकता सुखप्राप्ती ॥ १२० ॥**

**तुझ्या बाणाची होतां भेटी । अहं कोहं सोहं त्रिपुटी । छेदुनियां उठाउठी । स्वानंद पुष्टी सुखी केलों ॥ १२१ ॥**

**लागतांचि तुझा बाण । माझें निवटलें जन्ममरण । शाप बापुडें तें कोण । सुख संपूर्ण पावलों ॥ १२२ ॥**

**जे जाहाली सुखप्राप्ति । त्यासी कधीं नव्हे विकृती । कल्पांती नव्हेचि च्युति । ऐसी सुखप्राप्ती श्रीराम बाणें ॥ १२३ ॥**

अनुक्रमणिका

**मज उःशापें गंधर्व प्राप्ती । गंधर्व देहीं करितां वस्ती ।**
**मज बाधीना** [सु. नि. घा. 'देहाहंकृति'.] **ममाहंकृती । ऐसी** [दै. कं. तु. 'सुखप्राप्ति'.] **नित्यमुक्ति श्रीराम बाणें ॥ १२४ ॥**

तव प्रसादान्मुक्तोऽहमभिशापात्सुदारुणात् । भवनं स्वं गमिष्यामि स्वस्ति तेऽस्तु महाभुज ॥ २० ॥
अत्रार्धयोजने तात महर्षिः सूर्यसन्निभः । इतो वसति धर्मात्मा शरभंगः प्रतापवान् ॥ २१ ॥
तं शीघ्रमभिगच्छ त्वं स ते श्रेयोऽभिधास्यति ॥ २२ ॥

**ऐसे बोलोनी आपण । श्रीरामासीं केलें नमन । तंव विराधासी विमान । दैदीप्यमान उतरलें ॥ १२५ ॥**

**राक्षस देह सांडूनी क्षितीं । विराध बैसतां विमानाप्रती ।** [तं. 'श्रीरामातें'.] **श्रीरामाचे वनस्थिती । गमनोक्ति सांगतु ॥ १२६ ॥**

**येथूनिया अर्द्ध योजन । शरभंग वसे तपोधन । तपस्तेजें दैदीप्यमान । तेथें आपण अवश्य जावें ॥ १२७ ॥**

**तो तुम्हां वनवासाची गति । सांगेल वनवासाची स्थिती । तुझेंनि त्यासीं** [सु. नि. घा. 'निजमुक्ति'.] **नित्यमुक्ति । जाण निश्चिती श्रीरामा ॥**

**इंद्र आलासें शरभंगापासीं । त्यासीं न्यावया सत्यलोकांसीं ।**
**तो राहिलासे तुझे भेटीसी । सत्य लोकांसीं न वचोनी ॥ १२९ ॥**

**राम दंडकारण्या आला । तेणें विराध मारिला । तुझा प्रताप जाणोनी भला । असे राहिला भेटीसी ॥ १३० ॥**

**श्रीरामाचे भेटीपुढें । सत्यलोक तें बापुडें । ऐसें ज्ञान त्यासीं धडफुडें । भेटीचे चाडें तिष्ठत ॥ १३१ ॥**

**मज सुखी केलें राक्षसासीं । तैसें सुखी कीजे शरभंगासी । विराधें सांगोनि श्रीरामासी । पुढती तिघासीं वंदिले ॥**

**मग बैसोनि विमानीं । प्रवेशला निजात्मभवनीं । श्रीरामचरित्र देखोनी । विस्मित मनीं सुरनर ॥ १३३ ॥**

**मग करिती जयजयकार । वर्षती सुमनांचे संभार । विराध वधूनी दुर्धर । श्रीरामचंद्र निज विजयी ॥ १३४ ॥**

**विराधाचें घोरवन । तेथें रिघों शके कोण । तोहि** [सु. 'मारिला'.] **तारिला विंधोनि बाण । कृपाळू पूर्ण श्रीराम ॥ १३५ ॥**

**एका जनार्दना शरण । जालें विराध उद्धरण । पुढां** [कं. 'कथन'.] **शरभंग-दर्शन । कथा पावन अवधारा ॥ १३६ ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां विराधवधो नाम द्वितीयप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग तिसरा

## शरभंग उद्धरण

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

हत्वा तुतंभीमभयं विराधं हि महाजवं । आश्रमं शरभंगस्य विराजंतौ प्रजग्मतुः ॥ १ ॥
तस्य देवप्रभावस्य धर्मे संभावितात्मनः । समीपे शरभंगस्य ददर्श महदद्भुतम् ॥ २ ॥

**महाभयानक विराधु । त्याचा क्षणार्धें केला वधु । प्रतापें शोभती दोघेहि बंधु । परम आल्हादु सीतेसी ॥ १ ॥**

**मग तिघे जणें वेगेंसी । निघाली शरभंग आश्रमासीं । मार्ग क्रमितां दो क्रोशीं । त्या आश्रमासि देखिलें ॥ २ ॥**

**शरभंगु तपोराशी । तो न्यावया** [सु. नि. घा. 'लोकासीं'.] **ब्रह्मभुवनासीं । ब्रह्मेंनि धाडिलें इंद्रासी । विमानेंसि हंसयुक्त ॥ ३ ॥**

**हंसयुक्त विमानासी । बैसावया सामर्थ्य नाहीं इंद्रासी । पुढें घालुनी त्या विमानासी । इंद्र रथेंसीं आश्रमा आला ॥**

**जें विमानीं बैसवेना इंद्रासी । तें विमान धाडिलें शरभंगासी । शरभंगाची निष्ठा कैसी । ब्रह्मादिकांसि** [कं. 'संपूज्य'.] **निजपूज्य ॥ ५ ॥**

**इंद्रादिक देव समस्त । येऊनिया त्या आश्रमा आंत । अवघे लोटांगण घालित । मग विनवित शरभंगा ॥ ६ ॥**

**इंद्र प्रार्थी** [त. 'निजवचनीं'.] **मृदु वचनीं । आम्ही आलों ब्रह्मचि आज्ञेंनि । बैसोनि हंसयुक्त विमानीं । ब्रह्मभुवनीं प्रवेशावें ॥ ७ ॥**

**त्यासी शरभंग सांगत । या वना आलासें रघुनाथ । विराध वधुनि निश्चित । आतांचि येथें येईल ॥ ८ ॥**

**नेघतां श्रीरामदर्शन । मज न लगे ब्रह्मसदन । तुम्हीं घेऊनि जावें विमान । मी येईन** [कं. 'नुसताची'.] **निजसत्ता ॥ ९ ॥**

**श्रीरामाचे भेटीपुढें । ब्रह्मभवन तें** [सु. नि. घा. 'कायसें'.] **बापुडें । मज तेथ येणें न घडे । ब्रह्मयापुढें सांगावें ॥ १० ॥**

**ऐसें शरभंग बोलत । कर जोडुनी इंद्र ऐकत । तंव पातला रघुनाथ । तोही देखत इंद्रातें ॥ ११ ॥**

विभ्राजमानं वपुषा सूर्यवैश्वानरप्रभम् । असंस्पृशंतं वसुधां ददर्श विबुधाधिपम् ॥ ३ ॥

अनुक्रमणिका

**सोलीव सूर्याची प्रभा । कीं तो अग्नीचा निजगाभा । तैसी इंद्राची आंगप्रभा । निजशोभा शोभत ॥ १२ ॥**

**धरा ना तळोनि अधर । रथ शोभा वारु विचित्र । मस्तकीं चंद्रप्रभा छत्र । युग्मचामर ढळताहे ॥ १३ ॥**

[कं. 'देवांगना'.] **देवगण मरुद्‌गण । इंद्रासवें सिद्ध चारण । सवें बृहस्पति गुरु सज्ञान । तिहीं रघुनंदन देखिला ॥ १४ ॥**

**सीता सौमित्र रघुनाथ । देखतां अवघे जाले खद्योत । श्रीरामप्रभा अत्यद्भुत । देखोनि विस्मित सुरसिद्ध ॥ १५ ॥**

**देखतांचि श्रीराघवा । सूर्य प्रकाशीं जैसा दिवा । तैसी दशा** [तु. त. कं. 'जाली'.] **आली देवां । देव स्वभावा लाजिले ॥ १६ ॥**

**तरी देखोनि श्रीरघुनाथ । सुख पावले अत्यद्भुत । नभीं जयजयकार करित । निघाले समस्त निजधामा ॥ १७ ॥**

**शरभंग सांगे देवाप्रती । ब्रह्मसदनीं पुनरावृत्ती । श्रीरामदर्शनें अक्षय प्राप्ती । ते ब्रह्मयाप्रती तुम्ही** [तु. दै. 'सांगा'.] **पुसा ॥ १८ ॥**

**श्रीराम देखतांचि दिठी । जन्म मरणां होय तुटी । खुंटली पुनरावृत्तीची गोठी । ऐसी सुखभेटी श्रीरामीं ॥ १९ ॥**

**इंद्रादि देवा उपेक्षून । वोसंडोनि ब्रह्मभुवन । घ्यावया श्रीरामदर्शन । अति सज्ञान शरभंग ॥ २० ॥**

**ऐकोनि ऋषीचें वचन । इंद्रादि देव गेले निघोन । आश्रमा आला रघुनंदन । केलें नमन शरभंगा ॥ २१ ॥**

तस्य पादौ सुसंगृह्य सानुजः सह सीतया । निषसाद महाप्राज्ञो मुनिना स समर्चितः ॥ ४ ॥

**श्रीरामें वंदिले ऋषीचे चरण । देखोनि सीता आणि लक्ष्मण । दोघीं घातलें लोटांगण । मस्तकीं चरण वंदिले ॥**

**ऋषीनें दिधलें आळिंगन । मधुपर्क विधि** [पै. तु. मु. 'पूजन'.] **विधान । पूजूनियां श्रीरघुनंदन । सावधान बैसले ॥ २३ ॥**

ततः शक्रोपयानं तु पर्यपृच्छत राघवः । शरभंगस्तु तत्सर्वं राघवाय शशंस ह ॥ ५ ॥
अहं तु त्वां नरश्रेष्ठ वर्तमानमदूरतः । ब्रह्मलोकं न गच्छामि ह्यनभ्यर्च प्रियातिथिम् ॥ ६ ॥
अक्षय्या नरशार्दूल जिता लोका मया शुभाः । ब्राह्याश्च नाकपृष्ठ्याश्च प्रतिगृण्हीष्व मामकान् ॥ ७ ॥

**राम पुसे ऋषिप्रति । इंद्रादिक देवपंक्ति । आले होते आश्रमाप्रति । कोणे अर्थी ऋषिवर्या ॥ २४ ॥**

अनुक्रमणिका

आइकोनि श्रीरामाचें वचन । शरभंग विस्मयापन्न । न करितां जप तप ध्यान । दिव्यदर्शन राम देखे ॥ २५ ॥

दिव्य चक्षु रामाच्या पोटीं । श्रीराम देखे अखिल सृष्टी । श्रीरामें दाटुगी ब्रह्मदृष्टी । [तं. 'ब्रह्मस्थिती'.] देखणिया पुष्टी श्रीराम ॥

वेदशास्त्रांचें निजवर्म । श्रीराम केवळ तारक ब्रह्म । दीन तारावया [त. 'मनोद्‌गम'.] वनोद्‌गम । विश्रामधाम श्रीराम ॥ २७ ॥

ऐसी श्रीरामाची कीर्ती । ते मज जाली प्रतीती । ऋषी आपुली [तं. 'ब्रह्मस्थिती'.] धर्म स्थिति । श्रीरामाप्रति सांगतु ॥ २८ ॥

म्यां साधिली जे जे प्राप्ती । अति दुस्तर ते जनाप्रति । त्या त्या धर्माची निजस्थिति । यथा निगुति सांगेन ॥ २९ ॥

सांग अविकळ कर्मे देख । म्यां साधिला पितृलोक । त्याचें न मनेचि सुख । तो म्यां निःशेख त्यागिला ॥ ३० ॥

करूनि [त. मु. 'शतसोमयाग'.] शत यागा समयाग । म्यां साधिला [तं. 'सर्वभोग'.] स्वर्गभोग । तंव तो [नि. घा. 'वाटे'.] केवळ क्षयरोग । तोही म्यां [तं. 'सवेग'.] सांग उपेक्षिला ॥

महर्लोक जनलोक । आदि करूनी तपोलोक । साधिल्या मज नव्हेंचि सुख । तें म्यां निःशेष त्यागिलें ॥ ३२ ॥

ब्राह्मणभक्ति सत्यव्रत । तेणें सत्यलोक प्राप्त । इंद्रादिक देव समस्त । मज न्यावया तेथ स्वयें आले ॥ ३३ ॥

हंसयुक्त निजविमान । स्वयें धाडी चतुरानन । [मु. प्रतीत 'परि' हे अधिक पद.] तुझें देखोनि आगमन । म्यां ब्रह्मसदन त्यागिलें ॥ ३४ ॥

लोक लोकांतर [तं. 'आटत'.] प्राप्त । ऐसें पुण्य [सु. नि. घा. 'केलें अद्भुत'.] अत्यद्भुत । तें तुज अर्पिलें समस्त । श्रीरघुनाथ [जो. कं. दै. 'रघुनाथाप्रति'.] प्रीति पावो ॥ ३५ ॥

कर्म न करितां ब्रह्मार्पण । तैं तें वाढवी जन्ममरण । तुझें देखतां निजचरण । रामार्पण [पै. 'निजकर्मे'.] सर्व कर्मे ॥ ३६ ॥

मज पूर्वी होती भ्रांति । [मु. प्रतीत 'जे' हें अधिक पद.] पुण्यें होईल ब्रह्मप्राप्ति । पुण्यपापें क्षयान्ती । श्रीराममूर्ति तैं भेटे ॥ ३७ ॥

लोक लोकांतर पुण्यें देख । न तुटे दुःख नव्हेचि सुख । तुझें देखतां श्रीमुख । अलौकिक सुखप्राप्ति ॥ ३८ ॥

अनुक्रमणिका

**सांच श्रीराम देखिल्या दृष्टीं । समूळ संसारेंसि त्रुटी । निष्काम पुण्याचिया कोटी । तैं तुझी भेटी श्रीरामा ॥ ३९ ॥**

**तुझे भेटी लागीं जाण । सांडिलें सत्यलोकगमन । जाहाल्या श्रीरामदर्शन । समाधान जीवशिवां ॥ ४० ॥**

**देखतां श्रीरामाची मूर्ती । सर्वेंद्रियां नित्य विश्रांती । हे तंव माझी निज प्रतीती । सत्य निश्चिती श्रीरामा ॥ ४१ ॥**

**ऐकोनि ऋषीची वचनोक्ति । संतोषला श्रीरघुपति । ऋषीची देखोनि अद्भुतशक्ति । स्वयें त्याप्रति पुसतु ॥ ४२ ॥**

**दंडकारण्य महावन । ये वनवासीं निवासस्थान । कोठें म्यां करावें आपण । आज्ञापन मज देई ॥ ४३ ॥**

सुतीक्ष्णमभिगच्छत्वं राम शीघ्रं तपस्विनम् । रमणीये वनोद्येशे स ते वासं विधास्यति ॥ ८ ॥

**शरभंग म्हणे श्रीरामासी । येचि वनीं वनवासी । सुतीक्ष्ण वसे महाऋषि । शीघ्र त्यापासीं तुम्ही जावें ॥ ४४ ॥**

**तो तुम्हांसी वनवस्ती । सांगेल पैं यथा स्थिती । जेणें निवासें श्रीरामकीर्ती । यश त्रिजगतीं** [मु. 'वाढेल'.] **स्फारेल ॥ ४५ ॥**

एषपंथा महाप्राज्ञ मूहूर्तं स्थीयतामिह । यावज्जहामि गात्राणि जीर्णां त्वचमिवोरगः ॥ ९ ॥

**येणेंचि पंथें महाप्राज्ञा । जावें सुतीक्ष्ण ऋषिदर्शना । कांहीं एक असे विज्ञापना । ऐके सर्वज्ञा श्रीरामा ॥ ४६ ॥**

[पै. खेरीज इतरत्र 'तुझे'.] **दिव्य देखतां श्रीचरण । दृश्य द्रष्टा नाहीं दर्शन । खुंटलें भवभयाचें भान । गमनागमन मज नाहीं ॥ ४७ ॥**

**तऱ्ही प्रारब्धबळी सृष्टी ।** [मु. 'अनिर्वाच्य'.] **अनिवार्य त्याची गोष्टी । तें मज येथें** [नि. घा. 'दाटोवाटी'; तु. 'पाठोपाठी'; दै. 'दाटुनी पिटी'; जो. क. 'दाटोपिटी'.] **दाटोदाटी । नेते उठाउठी सत्यलोकां ॥ ४८ ॥**

**माझें अदृष्ट देखोन । ब्रह्मेनि धाडिलें विमान । तें निवारिलें जाण । तुझें दर्शन घ्यावया ॥ ४९ ॥**

**तुजसी जंव होय भेटी । तंव प्रारब्ध या देहाचें गांठीं । तुज** [नि. घा. 'देखतांचि'.] **जातांचि जगजेठी । उठाउठी** [सु. नि. घा. 'देह'.] **हें पडेल ॥ ५० ॥**

**तुज देखतां सावधान । करूनि निजदेहाचें दहन । करीन सत्यलोक गमन । तंव आपण स्थिर** [सु. नि. घा. 'व्हावें'.] **राहावें ॥ ५१ ॥**

**क्षण एक राहावें रघुपती । सर्प सांडो जैसी कांती । तैसी स्थूळदेहाची निवृत्ती । करीन निश्चितीं श्रीरामा ॥**

अनुक्रमणिका

५२ ॥ [कं. प्रतीत ओवी ५२ पुढीलप्रमाणे आहे :— 'अंतीं करिता तुझे स्मरण । देह होय पुण्य पावन । साक्षात तुझें दरुशन । समयीं कोण भाग्य माझें ॥']

**स्थूळदेह होती जाती ।** [तं. 'पाप'.] **परी पालटेना आत्मस्थिती । योगांग्नीं दाहूनि** [जो. नि. घा. 'देहकृति'.] **देहस्थिती । जाईन निश्चिती सत्यलोकां ॥**

**तुझिया कृपां श्रीरघुनाथा । भय नाहीं जन्म धरितां । भय नाहीं कर्म करितां ।** [मु. 'काये विचारतां'.] **देह मरतां भय नाहीं ॥ ५४ ॥**

**दोरा आंगीं सर्प जन्मला । नांदोनिया स्वयें निमाला । त्यासीं दोरु नाहीं भ्याला । तैसा घाला देहसंगु ॥ ५५ ॥**

**जैसी देहासवें मिथ्या छाया । तैसी मुक्तासवें मिथ्या काया । राहिलीसे रघुराया । भोगावया अदृष्ट ॥ ५६ ॥**

**ऐसें बोलोनियां जाण । श्रीरामा देखतां आपण । शरभंगें घालुनी आसन । केलें** [सु. नि. घा. 'दहन'.] **देहदहन योगाग्नियोगें ॥ ५७ ॥**

> स तु पावकसंकाशः कुमारः समपद्यत । उत्थायाग्निचया त्तस्माच्छरभंगो व्यरोचत ॥ १० ॥
> स लोकानाहिताग्नीनामृषीणां स्वर्गवर्मणां । देवानां चाप्यतिक्रम्य ब्रह्मलोके व्यरोचत ॥ ११ ॥

**करितां योगाग्नि देहदहन । सत्य लोक भोगायतन । कुमार देहो पावला आपण । दैदीप्यमान तेजस्वी ॥ ५८ ॥**

**याज्ञिक साधिती स्वर्गभुवन । त्याहुनी याचें महत्व गहन । अश्वमेधु राजसूय यज्ञ । त्याहूनी गहन गति यांची ॥**

**क्रमूनियां पितृस्थान । क्रमूनियां स्वर्ग महर्जन । क्रमूनियां** [तं. 'वेदसदन'.] **देवसदन । विराजमान सत्यलोकीं ॥ ६० ॥**

**सत्यलोकीं शरभंगासी । श्रीरामकृपा फळली कैसी । तेथेंहि देहबुद्धि नाहीं त्यासी । पूज्य सर्वांसी जरी जाला ॥ ६१ ॥**

**ब्रह्मेनि सन्मानितां त्यासी । श्लाघोनि न धरी देहबुद्धीसी । श्रीराम कृपा फळली** [सु. तु. तं. 'कैसी'.] **ऐसी । भोगी प्रारब्धासीं विदेहत्वें ॥**

**करितां रामनामस्मरण । बाधूं न सके देहबंधन । तें देखिलिया श्रीरामचरण ।** [कं. 'पावलों संपूर्ण सर्वपद'.] **देहीं विदेहपण शरभंगा ॥ ६३ ॥**

**दीनें तारावया जाण । श्रीरामाचें वनप्रयाण । एका जनार्दना शरण । जगदोद्धारण श्रीराम ॥ ६४ ॥** [कं. प्रतीत पुढील चार ओव्या अधिक आहेत :——

अनुक्रमणिका

‘स्थूळ देहाचें करुनी दहन । कुमार देह प्राप्त स्वर्गभुवन । श्रीरामें केलें ऋषिउद्धरण । वनप्रयाण लीलेनें ॥ ६४ ॥
वनवासांत बहुतांसी । पुनीत केलें शरणागतांसी । पुरविलें मनोरथासीं । पदोपदीं सर्वांतें ॥ ६५ ॥
ऐसे अरण्यकांडाचें महिमान । जे करिती पठण लेखन । सर्वदा श्रवणार्थी श्रवण । मनोरथ पूर्ण तयांचे ॥ ६६ ॥
विनवी एका जनार्दन । श्रीराम जगदौद्धारण । ऋषीला पावविलें सत्यभुवन । कीर्ति संपूर्ण त्रिलोकीं ॥ ६७ ॥’]

**विदेह कैवल्याचें ताट । शरभंगासी केले चोखट । सेवितां देशभाषाउच्छिष्ट । जालों अवचट शेषभागीं ॥ ६५ ॥**

**परमामृत रामायण । भोक्ते वसिष्ठ वाल्मीक पूर्ण । त्यांचें उच्छिष्ट सेवितां जाण । एका जनार्दन विदेही ॥ ६६ ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां शरभंगोद्धरणं नाम तृतीयप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग चौथा

## महामती आश्रमाभिगमन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

शरभंगे दिवं प्राप्ते मुनिसंघाः समंततः । अभ्यगच्छंत काकुत्स्थं रामं ज्वलिततेजसम् ॥ १ ॥

**विराध वधिला अतिदारुण । केलें शरभंग उद्धरण । तें देखोनि मुनिगण । आले** [सु, घा. 'ठाकूनि'.] **टाकून श्रीरामा ॥ १ ॥**

[कं. 'वैश्वानर'.] **वैखानस वालखिल्य । अग्निहोत्री शुद्ध शील । राक्षसभयें अतिव्याकुळ । आले सकळ श्रीरामा ॥ २ ॥** [तु. प्रतीत ओवी २ नाही.]

**जळाहारी फळाहारी । जटाधारी ब्रह्मचारी । पत्राहारी वायुआहारी । निराहारी ऋषि आले ॥ ३ ॥**

**एक भगवे एक नागवे । वल्कलधारी मळीन लेवे । राक्षसभयें आले आघवे । आम्हां राघवें रक्षावें ॥ ४ ॥**

**एकांगुष्ठव्रत एकासी । एक ते वृक्षाग्रनिवासी । एक ते एकपाद तापसी ।** [कं. 'भावें'.] **भयें संन्यासी येवों सरले ॥ ५ ॥**

**जळवासी आकाशवासी । विवरवासी अहर्निशीं । एक ते** [सु. 'सदा' हे पद नाही.] **सदा स्मशानवासी । तेहि धांकेसीं येवों सरले ॥ ६ ॥**

**राक्षस धाकाची धुकधुक । सपत्नीक अपत्नीक । विधूर आले पैं अनेक । रघुटिळक संरक्षी ॥ ७ ॥**

**वृद्धे अवृद्धे श्रीरामाप्रति । अतिशयें येती काकुळती । राक्षस** [कं. 'राक्षस आम्हा मारिती'; तं. 'महामार करिती'; घा. 'महामार अंतीं'.] **महामाराहातीं । आम्हां रघुपति रक्षावें ॥ ८ ॥** [सु. प्रतीत ओवी ८ नाहीं.]

**एक बोचिरे उखळे हातीं । फळें ठेच ठेचूं खाती । तेही आले श्रीरामाप्रति ।** [मु. 'धाकेंची येती महाभयें'.] **राक्षासां भीती महाभयें ॥ ९ ॥**

**ज्ञानी ध्यानी समाधानी । राक्षसभयें अति भेऊनी । आले श्रीरामा टाकूनी । अवघे मुनि एकत्र ॥ १० ॥**

क्रियमाणं चतैर्घोरं राक्षसैः क्रूरकर्मभिः । ततस्तु शरणार्थं त्वां शरण्यं च समागताः ॥ २ ॥
परिपालय नो राम सर्वानेव धनुर्धर ॥ ३ ॥

**सांगती राक्षसीं कडोविकडी । मारिल्या तापसांचिया कोडी । मांस खाऊनि सांडिलीं मढीं । लोळतीं बापुडीं असंस्कारें ॥**

अनुक्रमणिका

**जे संस्कार करुं जाती । त्यांसीहि येउनी राक्षस खाती । ऐसीं मढीं नेणों किती । लोळती क्षितीं श्रीरामा ॥ १२ ॥**

**आम्हांसि रक्षिता नाहीं कोणी । दैवें आलासि तूं चापपाणी ।**
**आम्हीं घालितों लोटांगणी । आमुच्या रक्षणीं सज्ञ होई ॥ १३ ॥** [घा. प्रतीत ओवी १३ अशी आहे : आम्हीं आलों तुजपासीं । राक्षसीं बहुत केली कामाविसीं । शरण आलों तुझ्या चरणासीं । आतां संरक्षी श्रीरामा ॥; कं. व सु. प्रतीत ओव्यांचा क्रम बदललेला आहे.]

**आम्ही तुझे शरणागत । शरण आलों गा समस्त । तूं कृपाळू श्रीरघुनाथ । दीन अनाथ रक्षावें ॥ १४ ॥**

**आम्ही केवळ गोब्राह्मण । काया वाचा मनसा शरण । आमचें करावें संरक्षण । अवघेजण प्रार्थिती ॥ १५ ॥**

[सु. घा. 'ऐसें' हें अधिक पद.] **ब्राह्मणांचें दीन भाषण । ऐकोनिया रघुनंदन । कळवळोनी संपूर्ण । काय आपण बोलतु ॥ १६ ॥**

रामस्तेषां वचः श्रुत्वा तापसानां तपस्विनाम् । इदं प्रोवाच धर्मात्मा सर्वानेव कृतांजलिः ॥ ४ ॥
नैवमर्हथ मां वक्तुमहमेव सलक्ष्मणः । तपो वृद्धान्वयोवृद्धान्च्छरण्यान्शरणागतः ॥ ५ ॥
भवतां कर्मसिद्ध्यर्थमागतोऽहं सलक्ष्मणः । तस्य मेऽद्य वने वासो भविष्यति तपस्विनः ॥ ६ ॥
संरक्षतो मुनिगणान्निघ्नतो राक्षसान्युधि ॥ ७ ॥

**राम म्हणे मी किंकर कोण । नव्हे तुमच्या दासासमान ।**
**त्या मज म्हणां आलों शरण । हें नव्हे वचन तुम्हां योग्य ॥ १७ ॥**

**तुम्ही वयोवृद्ध तपोवृद्ध । सज्ञान ज्ञानें अति प्रबुद्ध । ज्येष्ठ श्रेष्ठ महासिद्ध ।** [तं. 'सन्मान वृद्ध वंदावें'; कं. 'सन्मान देऊनि वंदावें'.] **सन्मान वाद न वदावा ॥ १८ ॥**

**तुम्हांपासूनि घ्यावा मान । तेचि आम्हा विषप्राशन । तुम्ही माझें देवतार्चन । साधु सज्ञन मज पूज्य ॥ १९ ॥**

**आमुचा धर्म द्विज रक्षणें । वना आलों याचि कारणें । खर दूषण निर्दळणें । संरक्षणें साधूसी ॥ २० ॥**

**तुमच्या** [कं. 'आशीर्वादाची प्रौढी'.] **आशीर्वाद जोडी । रणांगणी निज परवडी । मारीन राक्षसांच्या कोडी । अर्ध घडी न लगतां ॥ २१ ॥**

**ऐकोनि श्रीरामाची वाणी । जयजयकार केला ब्राह्मणीं । हर्ष पावोनि मुनिगणी । आशीर्वचनीं अभिषेक ॥ २२ ॥**

स राघवः सह भ्राता वैदेह्या च परंतप । सुतीक्ष्णस्याश्रमपदं जगाम सहितो द्विजैः ॥ ८ ॥

**सीता लक्ष्मण रघुनाथ । सांगातें मुनिगण समस्त । शरभंगें धाडिलें जेथ । त्या आश्रमा जात सुतीक्ष्णाच्या ॥ २३ ॥**

अनुक्रमणिका

**सुतीक्ष्ण ऋषि अतिश्रेष्ठ । तपोतेजें अति तेजिष्ठ । त्याचा आश्रम सुखोद्दिष्ट । दुःख संकट असेना ॥ २४ ॥**

**नवल आश्रमाची लीळा । सुवास सुस्वाद फळमूळां । आचमन करितां तेथिच्या जळा ।** [नि. घा. 'भ्रमा'.] **श्रमां सकळां निवारी ॥ २५ ॥**

**आश्रम देखतांचि देख । अवघ्यां जालें परमसुख । सुखावोनि रघुटिळक । ऋषी सन्मुख तो** [सु. नि. घा. 'आला'.] **जाला ॥ २६ ॥**

**आला देखोनि रघुनंदन । ऋषीनें सांडिलें आसन । सांडूनिया जपध्यान । अति सावधान भेटीसीं ॥ २७ ॥**
[ओवी २७ ते ३० मध्ये शब्द आलटून पालटून आलेले आहेत.]

**ज्या लागिं कीजे जपध्यान । ज्या लागिं कीजे तपसाधन । ज्यालागिं कीजे अनुष्ठान । तें हें चिद्रत्न श्रीराम ॥ २८ ॥**

**ज्या लागिं कीजे वेदपठण । ज्या लागिं कीजे शास्त्रश्रवण । ज्या लागिं योगयाग साधन । तें हें चिद्रत्न श्रीराम ॥ २९ ॥** [ओवी २९ व ३० दै. प्रतींत नाहीत.]

**ज्या लागिं कीजे तीव्रतप । ज्या लागिं जपिजे रूद्रजप । ज्या लागिं धैर्य आकल्प । तें हें चिद्रूप श्रीराम ॥ ३० ॥**

**ज्या लागिं शिवभवानी । नित्य चिंतिती अनुदिनीं । तो हा श्रीराम देखिला नयनीं । जो त्रिभुवनीं परमात्मा ॥ ३१ ॥**

**ज्या लागिं आम्ही नित्य तापसी । ज्या लागिं आम्ही वनवासी ।**
**तो हा श्रीराम ज्ञानराशी । भाग्यें आश्रमासी स्वयें आला ॥ ३२ ॥**

**ऐसें ऋषींचें मनोगत । जाणोनिया सुनिश्चित । श्रीराम उल्हास युक्त । चरण वंदित ऋषीचे ॥ ३३ ॥**

**श्रीराम ऋषीचें मनोगत । हृदयीचें जाणतो हृदयस्थ । श्रीराम परब्रह्म निश्चित । ऋषी जाणत निजज्ञानें ॥ ३४ ॥**

**देखणेंदेखोनि अतितीक्ष्ण । या लागीं नांवें सुतीक्ष्ण । त्याचे श्रीराम वंदी चरण । दिधलें आलिंगन ऋषि रामां ॥ ३५ ॥**

स निरीक्ष्य ततो वीरं रामं दशरथात्मजम् । उपाजिघ्रत्ततो मूर्ध्नि वचनं चेदमब्रवीत् ॥ ९ ॥
मत्प्रसादात्सभार्यस्त्वं विहरस्व सलक्ष्मणः । समस्तु सह सौमित्रिः सुतीक्ष्णेनाभिपूजितः ॥ १० ॥

**स्वयें सुतीक्ष्णें आपण । आलिंगुनी रामलक्ष्मण । करुनि मस्तकीं आघ्राण । आल्हादें वचन बोलतु ॥ ३६ ॥**

**माझा आश्रम दण्डकारण्य । येथ नाहीं भवबंधन । श्रीराम सीता आणि लक्ष्मण । सुख संपन्न वसावें ॥ ३७ ॥**

**माझिया निज आश्रमा आंत । न चले राक्षसांचा घात । सुखें वसावा श्रीरघुनाथ । सीता समवेत स्वानंदें ॥ ३८ ॥**

**अति प्रेमें सुतीक्ष्ण । पूजूनि श्रीराम लक्ष्मण । देऊनि वनफळें भोजन । षण्मास पूर्ण राहविलें ॥ ३९ ॥**

> तमुग्रतपसं रामो महर्षिं सत्यवादिनम् । आवासं त्वहमिच्छामि प्रदिष्टमिह कानने ॥ ११ ॥
> एवमुक्तस्तु रामेण महर्षिर्लोकपूजितः । अब्रवीन्मधुरं वाक्यं हर्षेण महतावृतः ॥ १२ ॥
> संश्लिष्य गात्रैर्गात्राणि ततो संदिश्य राघवम् । पश्याश्रमपदं दिव्यं दण्डकारण्यवासिनाम् ॥ १३ ॥

**सुतीक्ष्ण तपें तेजोराशी । श्रीराम स्वयें पुसे त्यासीं । मज राहावया** [नि. घा. तं. 'आश्रमासी'.] **आश्रमवासी । स्थान नेमेसीं सांगावें ॥ ४० ॥**

**शरभंगाची आज्ञा ऐसी । सुतीक्ष्ण सत्यवादी तापसी । स्थान नेम पुसोनि त्यासी । त्या आश्रमासीं वसावें ॥ ४१ ॥**

**ऐकतां श्रीरामवचन । ऋषि जाला सुखसंपन्न । दिधलें श्रीरामां आलिंगन । सर्वांगीं पूर्ण निवाला ॥ ४२ ॥**

**हर्षें सांगे श्रीरामासी । दण्डकारण्यनिवासी ऋषि । पाहे त्यांच्या आश्रमासी । पाहातां तुम्हांसी आल्हाद ॥ ४३ ॥**

**जे जे आश्रमीं तुम्हांसी । विश्रांति वाटेल अतिशयेसीं । त्याचि निवासस्थानासी । नेमस्तेसी नेमीन ॥ ४४ ॥**

**करुनि ऋषि आश्रमदर्शन । शीघ्र येथें यावें आपण । मग मी निवासस्थान । नेमस्त जाण नेमीन ॥ ४५ ॥**

**ऐकोनि ऋषीचें वचन । श्रीराम सीता लक्ष्मण । तिघीं करुनी नमन । केलें गमन दण्डकारण्या ॥ ४६ ॥**

**तंव** [तं. 'बोलो सरला'.] **बोलिला लक्ष्मण ।** [दे. 'मार्गेसी चालता जाण'.] **मागें सीता चालतां जाण । विराधें केलें होतें हरण । तैसें आपण न करावें ॥ ४७ ॥**

**पुढें श्रीराम मागें सौमित्र । मध्यें घालूनि सीता सुंदर । वेगें निघाले सत्वर । धनुर्धर महाबळी ॥ ४८ ॥**

[तं. 'सीता पाहे'.] **सीतेपासीं ऋषिगण । तापस ब्रह्मचारी ब्राह्मण । श्रीरामासवें निघाले जाण । त्यासीहि रक्षण श्रीराम ॥ ४९ ॥**

**वनें उपवनें शुभ काननें । ऋषिआश्रम अगाधस्थानें । तापस करिती अनुष्ठान ।** [कं. 'यज्ञ याज्ञिक'; घा. 'वेदाध्ययनें'; तं. 'यज्ञविधान'.] **यज्ञाधानें अग्निहोत्रें ॥ ५० ॥**

अनुक्रमणिका

**पाहात ऋषीचें महिमान ।** [दै. 'आले धुंडीत'.] **आलोडित दण्डकारण्य । पुढें तडागीं शुभ गायन । राम लक्ष्मण ऐकती ॥ ५१ ॥**

**श्रेष्ठ तडाग आणि पुनीत । त्यामाजीं मनोहर गीतनृत्य । गातें नाचतें न दिसे तेथ । तेणें विस्मित श्रीराम ॥ ५२ ॥**

**सवें चालती ऋषिगण । त्यांसी श्रीराम पुसे आपण । येथ गीतनृत्य करितें कोण । तें** [तं. कं. 'पूर्ण'.] **पूर्वकथन सांगती ॥ ५३ ॥**

> इदं पंचाप्सरो नाम तडागं पूर्वकालिकम् । निर्मितं तपसा राम मुनिना मांडकर्णिना ॥ १४ ॥
> स हि तेपे तपस्तीव्रं मांडकर्णिर्महामुनिः । दशवर्षसहस्राणि वायुभक्षी शिलाशयः ॥ १५ ॥

**या तडागा नांव पंचाप्सर । पुरातन सरोवर । निर्मितां मांडकर्णि ऋषीश्वर । तेणें तप तीव्र येथ केलें ॥ ५४ ॥**

**दहा सहस्त्रवर्षीं । निराहार वायु भक्षी । त्याची** [मु. 'स्थिर'.] **शील बुद्धि कैसी । काम मानसीं स्पर्शेना ॥ ५५ ॥**

**कर्मठ म्हणती स्वर्ग चांग । ऋषी म्हणे तो क्षयरोग । सत्यलोकीचे** [नि. घा. 'जे जे श्रेष्ठ भोग'.] **श्रेष्ठभोग । तो** [त. 'परम'.] **मरणमार्ग** [नि. घा. 'तयाचा'.] **तपाचा ॥ ५६ ॥**

**जेथवरी विषयासक्ति । तेथवरी पुनरावृत्ति । ऐसें जाणोनी निश्चितीं । तीव्र तपस्थिती** [मंदकर्णा = मांडकर्णि या नावाचे केलेले रूपांतर.] **मंदकर्णा ॥ ५७ ॥**

**ऐसे देखोनि तीव्र तपासी । स्वर्गीं हाहाकार सुरवरांसी । इंद्रें विघ्न मांडिलें त्यासीं । पंच अप्सरासीं धाडिलें ॥ ५८ ॥**

**रूप यौवन सालंकार । गीत नृत्य** [सु. नि. घा. 'मनोहर'.] **कामानुकार । देखोनियां ऋषीश्वर । काम तत्पर स्वयें जाला ॥ ५९ ॥**

**त्याची देखोनि कामासक्ति । अप्सरा नागव्या नाचती । तोही लिंग धरुनियां हातीं । निज कामार्थी नाचतु ॥ ६० ॥**

**त्यांसी झोंबोनि मागतां रति । त्या निघाल्या ऊर्ध्वगती । त्यांसी ऋषि ये काकुळती । कृपेनें रति मज द्यावी ॥ ६१ ॥**

**मज रत्यर्थीं अतीतासी । विमुख होऊं नये तुम्हांसी । मी लागतों तुमच्या पायांसीं । कृपेनें रतीसी मज द्यावें ॥ ६२ ॥**

**मी तुमचा धर्म सांघाती । परमार्थें मज द्यावी रती । त्यांचे अंगुष्ठ धरितां दातीं । तंव त्या जाती उपेक्षूनी ॥ ६३ ॥**

अनुक्रमणिका

तंवचि वैराग्याच्या गोठी । जंव सुंदर वनिता न दिसे दिठी ।
एकांतीं तिसीं जाल्या भेटी । विरक्तहि उठी भोगार्थ ॥ ६४ ॥

हो कां [घा. 'कामिनी एकदां मनी'; सु. 'एका जनीं'.] कमनीय कामिनी । एकांतीं देखतांचि नयनीं । धांवोनी झोंबती जपी ध्यानी । तप निर्दळणी स्त्रीसंग ॥ ६५ ॥

जंव पुरुषासी अति विरक्ति । तंवचि सिद्धी वोळंगती । पुरुष जालिया कामासक्ति । सिद्धी जाती थुंकोनी ॥ ६६ ॥

स्त्री गीत पडतां श्रवणीं । वैराग्य गेलें हारपोनी । यालागीं नांवे मंदकर्णी । श्रुति पुराणीं अभिधान ॥ ६७ ॥

प्रमदा गाणें ऐकोनि कानीं । [दै. 'प्रेमानंद.'] प्रमादु पावला तत्क्षणी । वैराग्य विवेक गेलीं दोन्ही । मंदकर्णि तेणें नांव ॥ ६८ ॥

जातो मदनवश्यस्त्वं सुराणामर्थसिद्धये । प्रधानाप्सरसः पंच मुनिपत्नीत्वमागताः ॥ १६ ॥
तडागे निर्मितं तासामस्मिन्नंतर्हि ते गृहम् । तत्र चाप्सरसः पंच निवसंति यथा सुखम् ॥ १७ ॥
रमयंति तपोयोगान्मुनिं यौवनमागतम् । तासां प्रक्रीडमानानां भयं वादित्र निः स्वनः ॥ १८ ॥

तिहीं अप्सरा पांचजणी । सुरकार्यार्थ साधूनी । ऋषि मोहिला स्त्री मोहनी । कामबाणीं संतप्त ॥ ६९ ॥

इंद्रें करविलें विघ्नासीं । ऐसें जाणिल्या ऋषी । कोपोनि देईल शापासी । तेणें इंद्रासी महाभय ॥ ७० ॥

भूत भविष्य वर्तमान । ऋषीसी त्रिकालिक ज्ञान । अपूर्ण कामें क्रोधायमान । शाप दारुण देईल ॥ ७१ ॥

ऋषि तापस महाक्रूर । दहा सहस्त्र वर्षें तप अत्युग्र । शाप देईल दुर्धर । धांकें सुरेन्द्र कांपतु ॥ ७२ ॥

शापभयें अतिसत्वर । ऋषीपासीं आला इंद्र । मागसी तो देईन वर । आज्ञाधर मी स्वामी ॥ ७३ ॥

ऋषि म्हणे इन्द्रासी । पंचाप्सरा लावण्यराशी । त्या मज द्याव्या नित्य भोगासी । इंद्रें ऋषीसी त्या दीधल्या ॥ ७४ ॥

दहा सहस्त्र वर्षीं । तपें जरठ जर्जर ऋषी । तो नावडे अप्सरांसीं । म्हणोनि त्या त्यासी उपेक्षिती ॥ ७५ ॥

जाणोनि अप्सरांचें मन । ऋषि सामर्थ्यें अतिसंपन्न । जाहला रूपें मदनमोहन । विराजमान तारुण्यें ॥ ७६ ॥

देखोनि ऋषीच्या रूपासीं । अप्सरा भुलल्या सर्वस्वेसीं । आन पुरुष नावडे त्यांसी । जीवेंभावेंसीं विनटल्या ॥ ७७ ॥

ऋषि सामर्थ्य अत्यंत थोर । ते तडागजळीं जळांतर । उभारुनि निजमंदिर । क्रीडा तत्पर पंचाप्सरीं ॥ ७८

अनुक्रमणिका

॥

त्यांचा गीत नृत्य ध्वनी । श्रीरामा पडला तुझ्या कानीं । ऐसें सांगती सकळ मुनी । विस्मित मनीं श्रीराम ॥ ७९ ॥

तेथील करितांचि आचमन । श्रीराम देखे ऋषिभवन । मंदकर्णीसी आल्हाद पूर्ण । रघुनंदन देखोनि ॥ ८० ॥

अत्यादर करूनि ऋषि । श्रीराम नेला निज भुवनासी । सीता लक्ष्मण श्रीरामेसीं । वर्षानुवर्षीं राहाविलें ॥ ८१ ॥

मंदकर्णी ऋषीश्वर । श्रीरामसेवेसीं सादर । पंचाप्सरा [पै. तु. 'अतितत्पर'; नि. घा. 'अतिसादर'.] अतिसुंदर । श्रीरामचंद्र निज भजना ॥ ८२ ॥

पूर्वीं निष्काम तपोवृत्ति । त्या तपाची फळप्राप्ती । घरां आली श्रीराममूर्ति । ऋषि निश्चितीं सभाग्य ॥ ८३ ॥

त्याचें भाग्य वानूं किती । चढतीवाढती नित्यप्रीति । श्रीरामाची आवडे भक्ति । अहोरातीं उल्हासें ॥ ८४ ॥

जपतां रामनाम वाक्पुटीं । उद्धरिले कोट्यानुकोटी । तें श्रीरामप्रेम धरितां पोटीं । ब्रह्मसंतुष्टी ऋषिवर्या ॥ ८५ ॥

करितां श्रीरामाची भक्ति । मंदकर्णि पावला मुक्ति । पंचाप्सरा त्याचे संगतीं । त्याहि [तं. खेरीज इतरत्र 'निजात्ममुक्ति'.] निजमुक्ति पावल्या ॥ ८६ ॥

श्रीरामनामें जडतरती । तो राम देखतां अतिप्रीतीं । चारी मुक्ति दासी होती । श्रीरामभक्ति प्रतापें ॥ ८७ ॥

ऋषीस ब्रह्मसमाधान । अप्सरा जाल्या सुखसंपन्न । करूनियां दीनोद्धरण । रघुनंदन निघाला ॥ ८८ ॥

> तत्राश्रमपदे रामो विश्रम्य सुसमाहितः । जगाम आश्रमांस्तेषां पर्यायेण तपस्विनाम् ॥ १९ ॥
> क्वचित्पर्यवसन्मासं क्वचिदेकं च वत्सरम् । क्वचिच्च चतुरोमासान्पंच षड्वा परान्क्वचित् ॥ २० ॥
> नवसंवत्सराः सार्द्धा गता रामस्य धीमतः । तत्र रामः सुतीक्ष्णस्य पुनरेवाजगाम ह ॥ २१ ॥

मंदकर्णीचें देखोनि प्रेम । ते आश्रमीं सुखी जाला राम । ऋषीहि सुखी जाला परम । सुख संभ्रम अप्सरा ॥ ८९ ॥

सुखी जालीं लक्ष्मणसीता । ऋषीसि पुसोनि तत्वतां । पाहावया आश्रमां समस्तां । होय निघतां श्रीराम ॥ ९० ॥

ऋषि आश्रमीं सावकाश । कोठें मास कोठें द्विमास । कोठें नेमस्त पंचमास । कोठें षण्मास राम राहे ॥ ९१ ॥

अनुक्रमणिका

कोठें वर्षी कोठे दीडवर्षी । कोठें राहे चातुर्मासीं । ऐसा विचरत वनवासी । सुतीक्ष्णापासीं राम आला ॥ ९२ ॥

श्रीरामाचें पुनरागमन । तेणें हरिखेला सुतीक्ष्ण । आलिंगिलें रामलक्ष्मण । आल्हाद पूर्ण ऋषिवर्या ॥ ९३ ॥

नित्य श्रीरामपूजन । देऊनी वनफळें भोजन । राहाविला रघुनंदन । किंचिंन्यून अर्धाब्द ॥ ९४ ॥

श्रीराम बैसोनि सावकाशीं । सादरें पुसे सुतीक्ष्णासी । अगस्त्याश्रम [सु. नि. घा. 'जये'.] ये प्रदेशीं । तेथ आम्हांसीं धाडावें ॥ ९५ ॥

ऐकोनि श्रीरामवचन । सुतीक्ष्ण म्हणे धन्य धन्य । अगस्त्याश्रम अति पावन । अवश्य गमन तेथ कीजे ॥ ९६ ॥

वन लागलेसें घनदाट । सहसा मार्ग न कळे स्पष्ट । स्वामीनें दाखवावी वाट । अवस्था उत्कट गमनार्थी ॥ ९७ ॥

श्रीरामा! मी सांगों किती । तूं आमचे गतीची गती । मार्ग पुससी आम्हांप्रती । आश्चर्य किती सांगावें ॥ ९८ ॥

येथुनी [तं. मु. 'अर्धयोजन.'] अर्धार्ध योजन । अगस्तीचें आश्रमस्थान । येणें मार्गें करावें गमन । ऐसें सुतीक्ष्ण बोलिला ॥ ९९ ॥

सीता श्रीराम लक्ष्मण । ऋषीसि करूनी नमन । तिघींजणीं केलें गमन । अगस्ति स्थान लक्षूनि ॥ १०० ॥

अगस्तीचें निज महिमान । ऐके श्रीरामा सावधान । वातापी इल्वल ब्राह्मणघ्न । त्यांचें निर्दळण तेणें केलें ॥ १०१ ॥

> इह पूर्वं किल क्रूरौ वातापिरपि चेल्बलः । भ्रातरौ तौ सहैवास्तां ब्राह्मणघ्नौ सुदारुणौ ॥ २२ ॥
> वातापिर्ब्राह्मणं रूपमिल्वलः संस्कृतोदनः । आमंत्रयत विप्रान्स श्राद्धमुद्दिश्य लक्ष्मण ॥ २३ ॥

वातापि ब्राह्मण होय आपण । इल्वल [मु. 'कपटें'.] कपटी होय अन्न । ब्राह्मण निमंत्रूनि जाण । श्राद्ध भोजन संतृप्त देती ॥

वातापी बोभाय बंधूसीं । तो फोडोनि निघे द्विजकुशी । यापरी तिहीं ब्राह्मणांसी । छळूनि राक्षसीं मारिजे ॥ १०३ ॥

[सु. नि. घा. 'ऐसें.'] ते जाणोनि ब्राह्मण घाती । त्यापासीं स्वयें आला अगस्ति । इल्वल वोदनान्न प्रयुक्ति । दिधलें संतृप्ती भोजन ॥

अगस्तिप्रति ग्रासोग्रासीं । भस्म करी जठराग्नीसी । [जो. 'आठवो'.] ठावो नाहीं इल्वलासी । कोणे कुसीं फोडावी ॥ १०५ ॥

अनुक्रमणिका

**वातापि बोभाय इल्वलासी । अगस्ति म्हणे म्यां जिरविलें त्यासी ।**
**कोप आला वातापीसी । अगस्तीसी गिळूं धांवें ॥ १०६ ॥**

[तं. 'शीघ्र'.] **विटंक धरोनि राक्षस वेख । दारुण देऊनिया हांक । धांवला अगस्ति सन्मुख । विक्राळ मुख पसरोनी ॥ १०७ ॥**

**अगस्ति नेत्रीचां कोपाग्नी । वातापि** [कं. 'पडिला जळूनि'.] **सांडिला जाळूनि । भस्म केला अर्ध क्षणीं । जो कां ब्राह्मणीं छळघाती ॥**

**ऐसे पापी राक्षस दोन्हीं । अगस्तीनें सांडिले जाळुनी । ऐसा प्रतापी महामुनि । अवश्य दर्शनीं तुम्हीं जावें ॥ १०९ ॥**

अहमाख्यामि ते वत्स यत्रागस्त्यो महामुनिः । योजनार्द्धात्छ्रमं राम गच्छ त्वं मुनिभिः सह ॥ २४ ॥
दक्षिणेन सह श्रीमानास्ते भ्रातुराश्रमः । तत्रैकां रजनीमुष्य प्रभाते तत्र गम्यताम् ॥ २५ ॥

[तं. सवेंचि.] **स्वयें सांगे सुतीक्ष्ण । पुढां वन अतिगहन । सहसा** [सु. नि. घा. 'न टाकीं'.] **न टके अगस्तिस्थान । सांगेन खूण ते ऐका ॥ ११० ॥**

**ज्येष्ठ बंधु नाम अगस्ति । कनिष्ठा नांव महामति । येथुनी अर्धयोजनांतीं । आश्रम स्थिती तयाची ॥ १११ ॥**

**जाऊनि त्याच्या आश्रमाप्रति । आजीची तेथ क्रमूनि राती । प्रातःकाळीं रघुपति । तुम्हां अगस्ति भेटेल ॥ ११२ ॥**

**महामतीची वनस्थळी । न पेरितां शाळी केळीं । पिंपळी नागवल्ली पोफळी । आश्रमाजवळीं शोभतीं ॥ ११३ ॥**

**ऋषिसत्तम महामती । तुम्हांसी भेटावया अगस्ति । ज्या ज्या सांगेल गमन गति । त्याचि स्थिती तुम्ही जावें ॥**

**सुतीक्ष्णासी करुनि नमन । तिघीं जणीं केलें गमन । वनें उपवनें शोभायमान । वस्तिस्थान महामती ॥ ११५ ॥**

**आश्रमां आला रघुपति । परम आल्हाद महामती । राहाऊनि अति प्रीति । सीतापति पूजिला ॥ ११६ ॥**

**एका जनार्दना शरण । वधावया त्रिशिरा खर दूषण । अगस्ति श्रीरामदर्शन ।** [कं. 'आश्रम गहन ऋषि वदे'.] **अस्त्रग्रहण ऋषि वरदें ॥ ११७ ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां महामतिआश्रमाभिगमनं नाम चतुर्थप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग पाचवा

## अगस्तिमुनि संभाषण, शस्त्रग्रहण

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**श्रीराम म्हणे महामति । तुझा ज्येष्ठ बंधू अगस्ति । तयाचिये दर्शनार्थी । तुम्हां प्रति मी आलो ॥ १ ॥**

**करावया ज्येष्ठाचें दर्शन । अति उद्यत माझें मन । कोणें मार्गें करूं गमन । कृपा करून सांगावें ॥ २ ॥**

यदि बुद्धिः कृता राम द्रष्टुं तं मुनिपुंगवम् । अद्यैव गमने बुद्धिं क्रियतां हि महामते ॥ १ ॥

**जरी अगस्तीचें दर्शन । करावया वांछी तुझें मन । तरी आजिचि करावें गमन । विलंब व्यवधान न करावें ॥ ३ ॥**

**जे मार्गी करितां गमन । सर्वथा चुकिजेना आपण । तें तें सांगेन मार्गचिन्ह । सावधान अवधारा ॥ ४ ॥**

**जो चालतां निजपंथ । सीता श्रीराम सुखी होत । सौमित्राचें सुखावें चित्त । तो पंथसंकेत अवधारा ॥ ५ ॥**

**अगस्त्याश्रम अति पावन । शिवादि देवीं निर्मूनि भुवन । करिताति अनुष्ठान । नित्यश्रवण रामकथा ॥ ६ ॥**

**देवाचे भूमीं न लगती पाये । अगस्त्याश्रमीं तेंही पाहे । बैसोनिया देव समुदायें । श्रवण होताहे रामकथा ॥ ७ ॥**

**पावन श्रीरामायण कथा । श्रीअगस्ति रसाळ वक्ता । देव बैसोनि तत्वतां । श्रीरामकथा परिसती ॥ ८ ॥**

**अगस्ति-आश्रमीं देवस्थानें ।** [सु. नि. घा. दै. जो. 'उभविलीं'.] **उभिलीं आहेती कोणकोणें । तेंहि ऐका सावधानें । मार्गीचीं चिन्हें लक्षावया ॥ ९ ॥**

स तत्र ब्रह्मणःस्थानं शिवस्थानं तथैव च । अग्नेः स्थानं महेन्द्रस्य स्थानं चैव विवस्वतः ॥ २ ॥
सोमस्थानं भगस्थानं स्थानं कौबेरमेव च । स्थानं धातुर्विधातुश्च वायुस्थानं तथैव च ॥ ३ ॥
कार्तिकेयस्य च स्थानं धर्मस्थानं तथैव च ॥ ४ ॥

**मार्ग सुचिन्ह नित्य निर्विघ्न । ते मार्गीची ऐका खूण । सुब्रह्मण्य ब्रह्मस्थान ।** [मु. 'स्वयें संस्थान'.] **शिवस्थान** [नि. घा. 'शिवभक्ति'.] **शिवशक्ति ॥ १० ॥**

**इंद्र चंद्र कुबेरस्थान । अग्निस्थान** [तु. जो. कं. इं. 'भृगु'.] **भगस्थान ।** [मु. 'नैऋत्यस्थान वरुणस्थान'.] **यमस्थान धर्मस्थान ।** [कं. 'उत्तमस्थान'.] **नित्य सावधान श्रवणार्थी ॥ ११ ॥**

अनुक्रमणिका

**स्वामि कार्तिक शिवसुत । तोही तेथें नित्य वसत । ऋषीस परमार्थ पुसत । ते ऋषी सांगत स्वानंदें ॥ १२ ॥**
[घा. इं. सु. मु. जो. प्रतींत ओवी १२ वेगळी व अधिक आहे :— 'धाता विधाता आपण । रामायण सुख संपन्न । वायूनें सांडुनी चंचलपण । अति तल्लीन श्रवणार्थी ॥']

**काशीखंड केदारखंड । सांगितलें श्री शैलखंड । रामायण कथा गोड । सुख सुरवाड सर्वांसीं ॥ १३ ॥**

**अनागत भाष्य रामायण । ते कथेचें करावया श्रवण । आश्रमीं वसती देव ब्राह्मण । रम्य रामायण परिसावया ॥ १४ ॥**

**अगस्ति आश्रम महिमान । देव दानव द्विज पावन । श्रीरामा शीघ्र करी गमन । मार्ग सुचिन्ह लक्षूनि ॥ १५ ॥**

ततस्तद्वचनं श्रुत्वा सह भ्रात्राऽभिवाद्य च । प्रतस्थेऽगस्त्यमुद्दिश्य सानुजः सह सीतया ॥ ५ ॥

**ऐकोनि ऋषीचें वचन । श्रीराम जाला सुखसंपन्न । अगस्तिआश्रम अतिपावन । स्वानंदें गमन करूं रिघे ॥ १६ ॥**

**श्रीराम सीता लक्ष्मण । अगस्तानुज वंदूनि जाण । सन्मार्गें लक्षूनि चिन्ह । शीघ्र गमन तिहीं केलें ॥ १७ ॥**

**अगस्ति ज्ञानें अतिसमर्थ । स्वानंदें शिष्यांसि सांगत । आतां येईल रघुनाथ । सीता सहित सौमित्र ॥ १८ ॥**

**गुढिया मखरें आश्रमांत । ऋषि उभवी आल्हादयुक्त । परब्रह्म मूर्तिमंत । आतां येथें येईल ॥ १९ ॥**

**माझ्या भाग्याच्या फळल्या कोडी । श्रीराम देखेन आवडी ।** [तं. कं. 'उभवावया'; दै. 'उभारीन'.] **उभारावी रामराज्याची गुढी । वनां तांतडीं आला असे ॥**

**मारूनि राक्षसांच्या कोडी । तोडावया नवग्रहांची बेडी । फेडावया देवांची बांदवडी । वनां तांतडीं आलासे ॥ २१ ॥**

**निजधर्माचें संरक्षण । करावया दुष्टांचें निर्दळण । श्रीराम अवतार परिपूर्ण । कृपेनें आपण येथ आला ॥ २२ ॥**

**आजि सभाग्य मी त्रिजगतीं । जो वेदशास्त्रां** [सु. नि. घा. 'नव्हे'.] **नये व्यक्ति । तो आश्रमा आला रघुपति । कृपामूर्ति श्रीराम ॥ २३ ॥** [२३ व २४ व्या ओवीमधील चवथे चरण मुद्रितांत २४ व २३ व्या ओवीस दिले आहे.]

**माझें भाग्य बापुडें किती । श्रीराम केवळ कृपामूर्ति । कृपेनें आला आश्रमाप्रति । सीतापती कृपाळु ॥ २४ ॥**

ततः शिष्यैः परिवृतो निश्चक्राम महामुनिः । तं ददर्श गतो रामो भ्रातरं चेदमब्रवीत् ॥ ६ ॥
एष लक्ष्मण निष्क्रांतो महर्षिर्लोकपूजितः । औदार्येणाभिजानामि निधानं तपसामयम् ॥ ७ ॥
एवमुक्त्वा महाबाहुरगस्त्यं सूर्यसन्निभम् । अभिवाद्य यथान्यायं तस्थौ रामः कृतांजलिः ॥ ८ ॥

अनुक्रमणिका

ऐसी करूनि श्रीरामस्तुति । मेळवूनि ऋषि पंक्ति । शिष्य समुदायेसि अगस्ति । आला अति प्रीति सामोरा ॥ २५ ॥

येतां देखोनि ऋषी । श्रीराम म्हणें लक्ष्मणासी । अगस्ति तपें तेजोराशी । येतो आम्हांसि सामोरा ॥ २६ ॥

समुद्र शोषिला आचमनीं । तोहा जाण अगस्ति मुनि । कृपाळू कैसा आम्हां लागोनि । येतो [नि. घा. सु. 'आम्हांसी'.] धांवोनी सामोरा ॥ २७ ॥

ऐसें बोलोनि आपण । श्रीरामें घातलें लोटांगण । मस्तकीं धरिलें दृढचरण । दिधलें आलिंगन ऋषीनें रामा ॥ २८ ॥

वैदेहीसहित लक्ष्मण । नमस्कारिले मुनीचे चरण । तिघे जणें सावधान । कर जोडोनि राहिलीं ॥ २९ ॥

देखोनियां श्रीरामचंद्र । ऋषीसि आल्हाद अपार । आश्रमा आणितां [मु. प्रतीत हे पद नाही.] अति गजर । जयजयकार ऋषिमंत्रीं ॥ ३० ॥

अगस्तिऋषि स्वयें सज्ञान । ब्रह्ममूर्ति रघुनंदन । मधुपर्कें केलें पूजन । दिधलें गोदान शतसंख्या ॥ ३१ ॥

श्रीराम म्हणे मी नीच सेवक । तुझ्या शिष्याच्या रंकाचे रंक । येवढी पूजा अलौकिक । योग्य देख मज नव्हे ॥ ३२ ॥

राजा सर्वस्य लोकस्य धर्मचारी यतव्रतः । पूजनीयश्च मान्यश्च भवान्प्राप्तः प्रियातिथिः ॥ ९ ॥

ऐकोनि श्रीरामवचन । अगस्ति बोले उल्हासोन । राघवा तुझें निजमहिमान । अगम्य जाण वेदशास्त्रां ॥ ३३ ॥

वेदशास्त्रांच्या निजयुक्ति । त्या परतल्या नेंति नेति । श्रीराम केवळ ब्रह्ममूर्ति । त्रिजगतीं निजपूज्य ॥ ३४ ॥

जें कां परब्रह्म अक्षर । तें तूं श्रीराम साचार । भक्त कृपाळू होसी [तं. 'रघुवीर'.] साकार । भाग्य थोर आजि माझें ॥ ३५ ॥

वरकड राजे ते भूपति । श्रीरामराजा [मु. प्रतीत हे पद नाही.] तूं त्रिजगतीं । तुझें नि भूतें वाहे क्षिती । शशिसूर्यां गति तुझेनि ॥ ३६ ॥

तुझी आज्ञा अति दुर्धर । मर्यादा नुल्लंघी सागर । इंद्रादिक तुझे किंकर । तुझेनि भूभार शेष वाहे ॥ ३७ ॥

काळ आज्ञा वंदी शिसीं । प्रळयो करी मर्यादेसी । भूतें भूतात्म तूं होसी । पूज्य सर्वांसी श्रीरामा ॥ ३८ ॥

अवतार जाले उत्तमोत्तम । त्या माजीं तूंचि आत्माराम । तूं तंव [सु. 'कैवल्य'.] केवळ परब्रह्म । पूज्य परम

परमार्था ॥ ३९ ॥

ऐसी निजस्थिती तुजपासीं । तो तूं धर्मव्रत चाळिसी । पितृआज्ञा प्रतिपाळिसी । निर्दळिसी दुष्टांतें ॥ ४० ॥

माता पिता गुरु देवता । त्यांहूनि पूज्य तूं रघुनाथा । ब्रह्मादिदेवांही वरौता । परम पूज्यता तुज रामा ॥ ४१ ॥

चारी वेद तुज [सु. नि. घा. 'वर्णिती'.] वंदिती । शास्त्रें चरणां शरण येती । शिव विरिञ्ची पायां लागती । पूज्य परमार्थी श्रीरामा ॥

तुज द्यावा जो जो मान । तो तो होऊनि लागे न्यून । तुझें अगाध महिमान । मानापमान तुज नाहीं ॥ ४३ ॥

श्रीरामा तुझें महिमान । वानितां वेदां पडलें मौन्य । तो तूं येथें आलासि कृपेनं । आजि मी धन्य [कं. 'संभ्रमेसीं'.] स्वाश्रमेसीं ॥ ४४ ॥

कांहीं एक तुझी पूजा । मीं करीन रघुराजा । ते अंगिकारावी अधोक्षजा । राक्षस समाज वधार्थ ॥ ४५ ॥

तूं आत्माराम प्रिय अतिथी । आश्रमां आलासी कृपामूर्ति । तुझी पूजा जे न करिती । ते अधःपाती अभाग्य ॥ ४६ ॥

विमुख होतांचि अतिथि । गृहस्थां कोटि पाप प्राप्ति । अतिथि ते पुण्यसंपत्ति । उरे अधोगति यजमाना ॥ ४७ ॥

यालागीं गा रघुराजा । करावी अतिथीची पूजा । तूं तंव केवळ आत्मा माझा । माझी पूजा अंगिकारी ॥ ४८ ॥

अमृतोपम फळेंमुळें । पुष्पें आणूनि सुपरिमळें । मधुपर्क विधान बळें । राम [मु. 'सुखमेळें'.] सुखसंमेळें पूजिला ॥ ४९ ॥

जयजयकारांच्या गजरीं । वेदोक्त महामंत्री । राम पूजिला ऋषीश्वरीं । चराचरीं परमात्मा ॥ ५० ॥

अगस्ति म्हणे रघुराजा । पुढती करीन तुझी पूजा । दिव्यायुधीं अधोक्षजा । शत्रुसमाजा निवटावया ॥ ५१ ॥

> इदं दिव्यं महच्चापं तूणौ चाक्षय्यसायकौ । महाकोशनिवासी च महासिर्हैमविग्रहः ॥ १० ॥
> इदं च मे तनुत्राणमभेद्यं भगवान्ददौ । स्पर्शेचानुपमं वीर सूर्याग्निसदृशप्रभम् ॥ ११ ॥
> पदा च संशयं प्राप्तं निश्चेतयसि वाहनम् । हयैर्युक्तं रथं दिव्यं आनयिष्यति मातलिः ॥ १२ ॥
> एवमुक्त्वा महातेजाः समग्रं तं वरायुधम् । दत्वा रामाय भगवानगस्त्यः पुनरब्रवीत् ॥ १३ ॥
> राम प्रीतोऽस्मि ते पुत्र परितुष्टोऽस्मि लक्ष्मण । अभिवादयितुं यौ मां प्राप्तौ स्तः सह सीतया ॥ १४ ॥

दिव्य चाप अक्षयी भाते । अनिवार शर पूर्ण तेथें । सुवर्ण सन्नाह घे खड्गाते । रणीं शत्रूंतें निवटावया ॥ ५२

अनुक्रमणिका

॥

शस्त्रास्त्रीं अभेद्य पूर्ण । सूर्य तेजें विराजमान । तें घेई गा अंगत्राण । दैदीप्यमान तेजस्वी ॥ ५३ ॥

कवच लेत्यासीं दे विश्रांति । शत्रु संतापीं निजतेजदीप्ति । ऐसी हे कवचाची गति । रिपु दळणार्थीं अंगिकारी ॥

रणीं मर्दावया लंकानाथ । रथ अपेक्षा करील चित्त । तेचि काळी इंद्राचा रथ । मातली त्वरित आणील ॥ ५५ ॥

ऋषीचें ऐकोनि वचन । रामसौमित्रें केलें नमन । ऋषीनें दिधलें आलिंगन । सुप्रसन्न ऋषि जाला ॥ ५६ ॥

संतोषोनि श्रीरामासीं । रणीं निर्दळावया राक्षसांसी । उल्हासें अगस्ति ऋषि । दिव्यायुधांसीं अर्पिलें ॥ ५७ ॥

देवोनियां दिव्यायुधें । ऋषि [सु. नि. घा. 'अति आल्हादें'.] आल्हादें वरदे वदे । रणीं राक्षस कबंधें । शास्त्र समंधें नाचविसी ॥ ५८ ॥

ऐकोनि ऋषीच्या वरदासीं । श्रीराम संतोषला मानसीं । [मु. प्रतीत 'तव' हे पद अधिक.] लोपामुद्रेनें सीतेसीं । अति उल्हासीं पूजिले ॥ ५९ ॥

लक्षूनियां रघुनंदन । चरण चाली वनाभिगमन । तूं पतिव्रता धन्य धन्य । आम्हीं पवित्र तुझेनि ॥ ६० ॥

राम म्हणे अगस्तीसी । दंडकारण्य या वनासीं । कां म्हणताती महाऋषि । तें मजपासीं सांगावें ॥ ६१ ॥

[सु. नि. घा. 'मग' हे पद अधिक.] अगस्ति म्हणें श्रीरामासि । दंडक राजा ये प्रदेशीं । अति गर्वित अहर्निशीं । राजमदेंसी उन्मत्त ॥ ६२ ॥

पारधी करितां दंडकासीं । भृगुवंशीचा च्यवनऋषि । अपमानिला अतिशयेंसी । तेणें त्यांसी शापिलें ॥ ६३ ॥

> दंडेन तु परित्यक्तः स्वयं देशो महात्मना । भार्गवस्य तु शापेन निर्मनुष्योऽमृगोऽभवत् ॥ १५ ॥
> योजनानां सहस्त्रं तु विंध्यपादप्रदक्षिणम् । नाति वर्षति पर्जन्यो न च वाति सुखोऽनिलः ॥ १६ ॥

शाप दिधला कोपेंसि । भस्म होय स्वराज्येंसि । ऐसें बोलतांचि ऋषि । स्वदेशेंसी भस्म जाला ॥ ६४ ॥

विंध्याचे दक्षिण भागेंसी । जंव पाविजे सेतुबंधासी । तंव दंडकारण्य नांव यासी । ऋषि शापेंसी भस्म जालें ॥ ६५ ॥

राजा भस्म जाला ससैन्य । भस्म जाले मनुष्यगण । भस्म जाले वृक्ष तृण । पशुपक्षी पूर्ण भस्म जाले ॥ ६६ ॥

अनुक्रमणिका

भस्म जाले सरिता तडाग । भस्म जाले मृग पन्नग । भस्म जाले ते देशीं जग । दुर्धर राग ऋषीचा ॥ ६७ ॥

दंडकाचेनि शापें जाण । असंख्यअद्बें वोस वन । यालागिं म्हणती दंडकारण्य । नामाभिधान राजशापें ॥ ६८ ॥

भार्गवाच्या शापभयेंसि । पर्जन्य वर्षेना ते देशीं । प्रकाशेना सूर्य शशि । अहर्निशीं [नि. घा. 'अंधकार'.] जगदांध्य ॥ ६९ ॥

ऐसेनि जगदांध्येसीं । लोटलीं वर्षानुवर्षी । पुढती वस्ती जाली कैसी । राम ऋषीसी पूसत ॥ ७० ॥

अगस्ति सांगे श्रीरामासीं । [पै. सु. नि. घा. तं. 'वसावया'.] वसवावया दंडकारण्यासी । नारदें विंध्याद्रिपासीं । महामेरूसी [सु. नि. घा. 'विनविले'.] वानिलें ॥ ७१ ॥

चराचरासि आधारू । स्वयें जाला महामेरू । मेरूहूनि सधरू । पर्वत थोरू असेना ॥ ७२ ॥

ऐकोनियां नारदोक्ति । मेरूचिया स्पर्धास्थिति । [सु. नि. घा. 'खुंटली'.] खंडूनिया शशिसूर्यगति । विंध्याद्रि ऊर्ध्व पंथीं वाढला ॥ ७३ ॥

राहिले स्वाहा स्वधाकार । राहिले स्वधर्म कर्माचार । राहिले जपतप विचार । रविचंद्र नुगवती ॥ ७४ ॥

लोपले स्वाहा स्वधाकार । मरों टेंकले देवपितर । भुका तळमळती ऋषीश्वर । संध्येविण आहार सेवूं नये ॥ ७५ ॥

गोधनें राना न वचती । वत्सें हंबरडा हाणिती । आकांत मांडला त्रिजगतीं । विंध्याद्रि गभस्ति उगवो नेदी ॥ ७६ ॥

[सु. नि. घा. 'मग' हे पद अधिक.] ऋषीश्वर ब्रह्मयाप्रति । अवघें गार्‍हाणें सांगती । तेव्हां तिन्हीं देव विचारिती । दक्षिणे अगस्ति धाडावा ॥ ७७ ॥

देव सांगती अगस्तीसी । त्यजूनियां वाराणसी । नेमावया विंध्याद्रीसी । शीघ्र दक्षिणेसि तुवां जावें ॥ ७८ ॥

नेमूनियां विंध्याद्रि । तो निजवावा पृथ्वीवरी । अहोरात्र वाहाते करी । शशिसूर्यां करी मोकळा मार्ग ॥ ७९ ॥

थोर पुण्य होईल ऋषि । देव पितर पावती पृथ्वीसी । ब्राह्मण चालविती स्वधर्मासि । हें तुजपासीं सामर्थ्य ॥ ८० ॥

तुझें सामर्थ्य वानूं किती । आचमनीं प्राशिला अपांपति । विंध्याद्रि बापुडें तें किती । परोपकारार्थी तुवां जावें ॥

अनुक्रमणिका

**पुढती न करी उत्थान । तैसा विंध्याद्रि नेमून । संस्थापावया देवब्राह्मण । दक्षिणे गमन तुवां कीजे ॥ ८२ ॥**

**ऐकोनि देवांचें वचन । म्यां जाणोनि नारदाचें** [कं. 'विदान'.] **मन । वसवावया दंडकारण्य । माझें आगमन दक्षिणेसि ॥ ८३ ॥**

**ऐक बापा रघुपति । माझें आगमन या रीति । आलों कोण कोणा स्थिती । तेंहि तुजप्रति सांगेन ॥ ८४ ॥** [ही ओवी जो. प्रतीत नाही.]

> कस्यचित्त्वथ कालस्य दैवयोगादहं नृप । वाराणसीं परित्यज्य इह प्राप्तोऽस्मि मानद ॥ १७ ॥
> ततो मया समाहूतः पर्जन्यो जलदैः सह । हिमवत्पादजा वृक्षाश्चितिता मनसा मया ॥ १८ ॥
> सुप्रवृत्ताः पुनर्नद्यः फुल्लपंकजमंडिताः । अचिरादवद्रम्यमृषिसंघैश्च सेवितम् ॥ १९ ॥

**म्यां पर्जन्योदकेंसि मेघ ।** [सु. नि. घा. 'आलों'.] **सवें घेऊनि अमोघ । सुरकार्य साधावया चांग । आलों सवेग विंध्याद्रि** [कं. खेरीज इतरत्र 'पासी' हे पद नाही.] **पासी ॥ ८५ ॥**

**ऐके राजचूडामणि । मज येतां तेणें देखोनि । विंध्याद्रि घाली लोटांगणीं । यथोक्त पूजूनीं पुसता होय ॥ ८६ ॥**

**कोण वार्ता उत्तरेसी । मज सांगा महाॠषी । तूं येथूनि केउता जासी । तें हि मजपासीं सांगावें ॥ ८७ ॥**

**कोण्या धरूनि अपेक्षेसी । तूं आलासि मजपासीं । तें म्यां दिधलें निश्चयेंसि । भाक मजपासीं दीधली ॥ ८८ ॥**

**त्यासी उत्तरेची वार्ता । म्यां सांगितली रघुनाथा । तें हि तुज मीं सांगेन आतां । यथार्थता अनुवाद ॥ ८९ ॥**

**विंध्याद्रि तुझा प्रताप । देखोनि मेरूसी अति कंप । सुरांअसुरां अति संताप । तुझें स्वरूप अतिश्रेष्ठ ॥ ९० ॥**

**पाहतां पृथ्वी माझारीं । विंध्याद्रि तुझी थोरी । वानिजे गा सुरासुरीं । तुझीं सरी मेरू न पवे ॥ ९१ ॥**

**ऐसें ऐकोनि वचन । विंध्याद्रि उल्हासला आपण । पुढती घालूनि लोटांगण । मस्तकीं चरण दृढ** [सु. नि. घा. दै. 'वंदिले'.] **धरिले ॥ ९२ ॥**

**तूं आलासि भाग्येंकरी । तुझें गमन कोठवरी । तें मज सांगावें निर्धारीं । तेणें अत्यादरीं पूसिलें ॥ ९३ ॥**

**दक्षिणतीर्थ यात्रा विधान । करावया मीं करितों गमन । मज द्यावें मार्गदान । अधःशयन करूनियां ॥ ९४ ॥**

**तुझी निर्धारितां थोरी । वाढी चंद्रसूर्यां उपरी । मज वेंघवेना तेथवरी ।** [कं. तु. 'शयन करी गा सर्वथा'.] **शयन करी गमनार्थ ॥ ९५ ॥**

**माझें ऐकोनि वचन । विंध्याद्रीनें केलें शयन । म्यां केलिया दक्षिणेगमन । तुवां उत्थान न करावें ॥ ९६ ॥**

अनुक्रमणिका

तीर्थें करूनि मी ये मागुता । तंववरी त्वां नुठावे [कं. खेरीज इतरत्र 'पर्वता'.] सर्वथा । भाषाबंधें नियामकता । करूनि रघुनाथा मीं आलों ॥

रविचंद्राची [तु. तं. 'वाहिली'; नि. घा. 'मोकळी'.] पाहालीं वाट । द्विज देवांचे चुकले कष्ट । दिनमान वाहे स्पष्ट । दिधली वाट विंध्याद्रि ॥ ९८ ॥

माझें होतांचि आगमन । भृगुशाप गेला पळोन । देशीं वर्षला पर्जन्य । तृणधान्य वाढलें ॥ ९९ ॥

महामेरूच्या वृक्षासीं । म्यां चिंतितां निजमानसीं । ते हि वाढले ये देशीं । फळभारेंसि सफळित ॥ १०० ॥

वाहती सरितांचे वोघ । पद्मोत्पलीं पूर्ण तडाग । नाना पक्षीगण अनेग । गज सिंह मृग क्रीडती ॥ १०१ ॥

मजसवें येवोनि ऋषी । जाहाले दंडकारण्यवासी । कोणी राजा नाहीं या देशीं । म्हणोनि राक्षसीं व्यापिलें ॥

दंडकशापें दंडकारण्य । तें करावया अतिपावन । तूं आलासी रघुनंदन । राक्षसघ्न प्रतापी ॥ १०३ ॥

तुझें जालिया आगमन । राक्षस निर्दळिसी संपूर्ण । येथूनि आतां वसती जन । वन पावन श्रीरामें ॥ १०४ ॥

रामक्षेत्र दंडकारण्य । ऐसें गर्जेल पुराण । हाचि प्रयोग ब्राह्मण । अति सज्ञान पढतील ॥ १०५ ॥

राक्षस निर्दळणीं विचित्र । राम करील दुर्धर क्षेत्र । या लागिं म्हणती रामक्षेत्र । पुराणें पवित्र श्रीरामें ॥ १०६ ॥

ऐसी ऐकतांचि कथा । परमाश्चर्य रघुनाथा । ऋषीच्या चरणीं ठेविला माथा । होय पुसतां वनवस्ती ॥ १०७ ॥

दंडकारण्य वनवासता । सौमित्रें सहित सीता । म्यां वसावें कोठें आतां । ते हि तत्वतां मज सांग ॥ १०८ ॥

तुझें वचन ब्रह्मलिखित । तें म्यां करणें निश्चित । ऐसें पुसतां रघुनाथ । कृपायुक्त ऋषी बोले ॥ १०९ ॥

गंगातीराचे निकटीं । अति पावन पंचवटी । तेथ बांधोनि पर्णकुटी । सुख संतुष्टी वसावें ॥ ११० ॥

पंचवटी गंगातटीं । ऐकतां आल्हाद सीतेच्या पोटीं । श्रीरामासि सुख संतुष्टी । पंचवटी ऐकोनि ॥ १११ ॥

पंचवटीं करितां वस्ती । त्रैलोक्य पावन निजकीर्ति । तूं पावसी गा रघुपति । जाण निश्चितीं मद्वाक्यें ॥ ११२ ॥

ऐकोनि अगस्तीची गोठी । रामें बांधिली शकुन गांठी । लक्षूनियां पंचवटी । उठाउठी निघाला ॥ ११३ ॥

श्रीरामें केलें नमन । ऋषीनें दिधलें आलिंगन । सीता सहित लक्ष्मण । अगस्ती वंदोनि निघाले ॥ ११४ ॥

अनुक्रमणिका

आश्रम करावया पंचवटीं । उल्हास लक्ष्मणाच्या पोटीं । वेगें निघाला जगजेठी । [मु. 'उठा उठी सत्वर'.] श्रीराम दृष्टीं लक्षूनि ॥ ११५ ॥

एका जनार्दना शरण । [मु. 'निर्वैर दंडकारण्य'.] अगस्ति पासूनि शस्त्रग्रहण । श्रीरामें केलें आपण । [सु. नि. घा. 'वनीं निर्दळण'.] रण निर्दळण राक्षसां ॥ ११६ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां अगस्तिमुनिसंभाषणशस्त्रग्रहणं नाम पंचमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सहावा

## कश्यपवंशवर्णन गरुड अमृत हरणाभिगमन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

पंचवटीं तु गच्छंतावंतरा रघुनंदनः । आससाद महागृध्रो जटायुरिति विश्रुतः ॥ १ ॥
तं दृष्ट्वा तु महाभागौ वनस्थौ रामलक्ष्मणौ । मेनाते राक्षसं गृध्रं तदा चैवाभ्यधावताम् ॥ २ ॥
ब्रुवाणौ को भवानिति तिष्ठ तिष्ठ निशाचर । ततो मधुरया वाचा सौम्यया प्रीयमाणया ॥ ३ ॥
उवाच वत्स मां विद्धि वयस्यं पितुरात्मनः ॥ ४ ॥

**पंचवटी परम** [कं. खेरीज इतरत्र 'प्रयाण'.] **प्रमाण । श्रीराम सीतासह लक्ष्मण । अगस्तीसि करुनि नमन । शीघ्र गमन तिहीं केलें ॥ १ ॥**

**रम्य रमणीय गंगातटीं ।** [सु. 'वास्तव करावया पंचवटी'.] **पंचक्रोश पंचवटी ।** [सु. इं. 'श्रीराम लक्ष्मण सीता गोरटी'.] **उल्हास तिघांचांहि पोटीं । उठाउठी निघालीं ॥ २ ॥**

**अरुणा वरुणा संगमाप्रती । मीनली प्राची सरस्वती । तीर्थपावन त्रिजगतीं । आवडे वस्ती श्रीरामा ॥ ३ ॥**

**सुंदर आणि** [दै. 'कपिलेश्वर'.] **कपालेश्वर । दोहीं तीरीं मनोहर । तीर्थ पावन परिकर । श्रीरामचंद्र रहिवासां ॥ ४ ॥**

**पद्मपुरीं निशाचर । वसताति अति दुर्धर । तेणें भयें वोस नगर । तीर्थ परिचार खुंटला ॥ ५ ॥**

**त्रिशिरा आणि खर दूषण । वोस करुनि जनस्थान । राक्षस वसताती दुर्जन ।** [नि. घा. 'तीर्था कोण जाऊं न शके'.] **तीर्थां कोण जावों शके ॥ ६ ॥**

**तेथ करावया वस्ती । पंचवटिके सीतापति । स्वयें धाडिला अगस्ती । राक्षसघाती श्रीराम ॥ ७ ॥**

**राक्षसांचें कुळनिर्दळण । समूळ करील रघुनंदन । यालागीं पंचवटीस्थान । दिधलें नेमून अगस्तीं ॥ ८ ॥**

**पंचवटी वनांतर । राम चालतां सत्वर । पुढें जटायु पैं गृध्र । पर्वताकार देखिला ॥ ९ ॥**

**डोळे आरक्त धगधगीत । चांचुवट समसमित । हा तंव राक्षस अद्भुत । दोघीं निश्चित मानिला ॥ १० ॥**

**धनुष्य आसडूनि मुष्टीं । दोघे चालिले जगजेठी । मग** [कं. 'हांक दिधली शैल्य पृष्टी'.] **शंकिला शौर्यदृष्टी । बाण** [सु. नि. घा. 'मुष्टी'.] **बोटीं सज्रूनि ॥ ११ ॥**

**राहे साहे** [सु. नि. घा. 'धरीधर'.] **थीरथीर । गृध्ररुपिया निशाचर । मार्गरोधी अतिदुर्धर । बाणीं सत्वर छेदीन ॥**

अनुक्रमणिका

१२ ॥

माझें सुटलिया कुर्‍हाडें । तुझें पक्षबळ बापुडें । केउता पळसील [तु. नि. घा. तं. ‘मजपुढे’.] मागेंपुढें । रणीं रोकडें मारीन ॥ १३ ॥

गृध्ररुपी तूं येथें कोण । मार्ग रोधावया काय कारण । समूळ सांगावें निजकथन । न बोलतां प्राण घेईन ॥ १४ ॥

मी दाशरथी रघुनंदन । सीता कांता बंधु लक्ष्मण । पंचवटिके करितां गमन । मार्ग रोधन कां केलें ॥ १५ ॥

ऐकोनि श्रीरामवचन । जटायु घाली लोटांगण । तूं दाशरथी रघुनंदन । तुझें महिमान मी जाणें ॥ १६ ॥

पंचवटी वनसेवन । करुं येईल रघुनंदन । तुझें घ्यावया दर्शन । बहुकाळ जाण मी तिष्ठत ॥ १७ ॥

तुझा [नि. घा. ‘पिताजाण’.] पिता दशरथ । युद्धसखा माझा आप्त । स्वर्गा गेलों इंद्र साह्यार्थ । नमुचि घात जैं केला ॥ १८ ॥

मीं आकाशीं झडपोनी जाण । दैत्याचें उडवी शिरस्त्राण । दशरथें विंधोनि बाण । दैत्य दारुण निर्दळिले ॥ १९ ॥

त्याचा तंव तूं ज्येष्ठ सुत । पूर्ण ब्रह्म रघुनाथ । तुझी सेवा करावया येथ । आलों निश्चित श्रीरामा ॥ २० ॥

तूं स्वामी मी तुझा दास । दृढ मानावा विश्वास । मज न म्हणावें राक्षस । माझा वंश काश्यपी ॥ २१ ॥

काश्यप वंशीं माझी उत्पत्ती । त्या कश्यपाची वंशस्थिति । मी सांगेन रघुपति । विश्वासार्थी माझिया ॥ २२ ॥

तूं मज म्हणसी राक्षस । मीं राक्षस नव्हे कश्यपवंश । माझी वंशावळी बहुवस । सावकाश अवधारी ॥ २३ ॥

मनुपासाव उत्पत्ती जाण । क्षत्री वैश्य शूद्र ब्राह्मण । [नि. घा. ‘वरकड ही सृष्टी कश्यपी जाण’.] वरकड सृष्टी कश्यपी पूर्ण । हें हि लक्षण तूं ऐक ॥ २४ ॥

अदिति पासाव जाले देव । दितीचे दैत्य दनूचे दानव । मनूपासाव जाले मानव । मानवी वैभव मनूचे ॥ २५ ॥

[त. ‘शंकरापासाव’.] स्वसेपासाव रुद्रोत्पत्ति । जें कां [नि. घा. तु. तं. कं. ‘रुद्रगण’.] रुद्रानुगण रुद्रानुवृत्ती । भद्रेपासाव गंधर्व जन्मती । जें गायन गाती अति मधुर ॥

उभय संध्या मैथुन स्थिति । यक्ष राक्षसां जन्म प्राप्ती । यालागीं संध्येपासाव उत्पत्ती । ज्ञाते बोलती राक्षसांची ॥ २७ ॥

अनुक्रमणिका

जे वेदशास्त्रीं अति व्युत्पत्ति । वादीं ब्राह्मण निर्भत्सिती ।
ते ब्रह्मद्वेषें ब्रह्मराक्षस होती । जाण निश्चिती श्रीरामा ॥ २८ ॥

रावणा ब्रह्मराक्षसपण । यावया हेंचि कारण । तेणें [कं. 'चारी'.] सहस्रधा वेद विभागून । ऋषी सज्ञन निर्भत्सिले ॥ २९ ॥

ज्ञान गर्वाचें अंतीं हेंचि गती । ब्रह्मद्वेषाच्या [कं. तं. 'आयुक्ति'; नि. घा. 'अतियुक्ति'.] अत्युक्ति । ब्रह्मराक्षसत्वाची प्राप्ती । जाण निश्चितीं श्रीरामा ॥ ३० ॥

[कं. 'क्रौधवसें पापास्तव देख'.] क्रोधवशें पासाव देख । सिंह व्याघ्र वरहादिक । मृग ससे वृक जंबूक । गौरादि अनेक श्वापदें जालीं ॥ ३१ ॥

वारणी पासाव उत्पत्ति । जन्म पावला ऐरावती । गजदिग्गजांची प्रसूति । जाण निश्चिती तिचेनी ॥ ३२ ॥

सरमेचे ज्येष्ठसुत । श्याम शबल यमाचे दूत । श्वान मार्जारादि समस्त । तिचेनि होत रघुनाथा ॥ ३३ ॥

[नि. घा. 'वृत्तेपासाव'.] हत्ते पासाव बहुवस । विद्याधर किन्नर किंपुरुष । तपस्वी दुर्धर [घा. 'असोत'; तं. 'अशेष'; कं. 'अशोक'.] असोस । बळें गहिस बलिष्ठ ॥ ३४ ॥

जांगले पासाव जाण । वनें उपवने कंटकी विपिन । वीरूध वल्ली ओषधीतृण । दुर्धरवन ते व्याली ॥ ३५ ॥

उत्पत्ति सुरभीपासून । तेथ जन्मली कामधेन । गाई बैल आदिकरुन । उत्पत्तिस्थान पशूंचें ॥ ३६ ॥

वडवेपासाव अश्वसंभूति । उच्चैःश्रवा स्वर्गसंपत्ति । श्यामकर्णादि नाना जाति । अश्वोत्पत्ति तिचेनि ॥ ३७ ॥

तिचाच ठाईं दुर्धर । भारवाहक खरोष्ट्र । जन्म पावले अपार । जन्मले वेसर खराश्वयोगें ॥ ३८ ॥

गृध्री श्येनी धृतराष्ट्री । शुकी क्रौंची पंचनारी । जन्मले यांचां उदरीं । मत्स्यादि मगरी जळचरे ॥ ३९ ॥

गृध्री पासाव गीध घार । उलूक वाघुळ अपार । गंड भैरवादि दुर्धर । अतिक्रूर प्रसवली ॥ ४० ॥

श्येनी पासाव जन्मले देख । श्येन तित्तिर लावक । कपोता कोकिळ कुक्कुट काक । सरड बेडूक जन्मले ॥ ४१ ॥

जन्मल्या क्रौंचीच्या उदरीं । ढोंक्या टिवटिव्या कांकणधारी । भोरड्या जन्मल्या घुमरी । अहोरातीं [सु. नि. घा. 'किळकिळिती'.] कलकलिती ॥

शुकी पासाव शुकसारिका । तास भरद्वाज मयूरिका ।
चिडी काळचिडी अनेका । पिंगळा बोलका भविष्योत्तरी ॥ ४३ ॥

अनुक्रमणिका

धृतराष्ट्रीचे पुत्र चोख । हंस बक कारंडक । चकोर आणि चक्रवाक । मत्स्यादि अनेक जळचरें व्यालीं ॥ ४४ ॥

कद्रूपासाव अनेग । काळ कर्कोटक भुजंग । [कं. 'देखा'.] शेष वासुकी नानानाग । पाताळ पन्नग ते व्याली ॥ ४५ ॥

कश्यपापासाव सुरासर । कश्यपापासाव नरकिन्नर । कश्यपापासाव चराचर । सृष्टीसमग्र काश्यपी ॥ ४६ ॥

अंडज स्वदेज [नि. घा. त. 'जरायुज'.] जारज । जें कां जन्मे उद्भिज । तें कश्यपाचें निजबीज । दुर्धर तेज कश्यपी ॥ ४७ ॥

जळचर भूचर खेचर । जें जें भासें चराचर । तें तें काश्यपी चरित्र । परम पवित्र [घा. इं. 'श्रीरामा'.] कश्यप ॥ ४८ ॥

ज्याचें नाठवे कुळगोत । तें तें कश्यपांत लावित । तें तत्काळ होय पुनीत । जग विख्यात कश्यप ॥ ४९ ॥

ज्यासीं कश्यपु लागला । तो मुक्तिच्या घरां आला । भुक्तिमुक्तीचा दादुला । वाखाणिला कश्यपु ॥ ५० ॥

सृष्टीचा कर्ता सृष्टीचा हर्ता । एवढी कश्यपाची सत्ता । यालागीं भुक्तिमुक्तीचा दाता । जाण तत्वतां कश्यपु ॥ ५१ ॥

कश्यपी सृष्टी वर्णी । ऐसा वक्ता नाही कोणी । मीं बोलिलों संकलोनि । क्षमा सज्ञनीं करावी ॥ ५२ ॥

त्या कश्यपाचा मीं नातू । जटायु नामें विख्यातु । ऐक माझा वृत्तांतु । समूळ [दै. 'ग्रंथु'.] साद्यंतु सांगेन ॥ ५३ ॥

कश्यपासी बहुता पत्नी । मुख्य अदिती दिती दनी । चौथी माझ्या पित्याची जननी । विनता [दै. 'मानिनी'.] नाम्नी पतिव्रता ॥

विनतेचे दोघे कुमर । अरुण गरुड पैं सुपुत्र । भगवद्भजनें अति पवित्र । त्यांचें चरित्र अवधारी ॥ ५५ ॥

अरुण रविरथीं [त. 'रविरथीचा सारथी जाण'.] सावधान । गरुड विष्णूचें वाहन । गरुडाची ख्याति गहन । अमृत [दै. 'स्वर्गीहुनी'.] हिरोनि आणितां ॥ ५६ ॥

गरुडें जावोनि आपण । कां केलें अमृत हरण । ऐसें पुसतां रघुनंदन । समूळ कथन जटायु सांगे ॥ ५७ ॥

विनता कद्रू दोघी सवती । सवती मत्सराच्या छळणोक्तीं । कद्रू पुसे विनतेप्रति । सूर्याचे रथीं वार कैसे ॥ ५८ ॥

विनता म्हणे वारु धवळ । कद्रू म्हणे वारु सुनीळ । बोलत बोलतां वाढलें सळ । पैजेचा प्रबळ पणु केला ॥

अनुक्रमणिका

५९ ॥

कद्रू म्हणे श्वेतवारु जरी । तरी घट घेवोनियां शिरीं । दिव्य सहस्त्रवर्षें वरी । पाणी तुझे घरीं वाहावें ॥ ६० ॥

विनता बोले तयेकाळीं । जैं वारुवांची प्रभा निळी । तैं म्यां घेऊनि घागरी चुंभळी । दिव्याद्बमेळीं जळदासी तुझी ॥

दोहींचें परम प्रमाण । भाषा बंधें केला पण । कद्रूनें करावया छळण । कपट संपूर्ण करुं [नि. घा. इं. 'मांडिले'.] पाहे ॥ ६२ ॥

अरुणें सांगितले विनतेसी । श्वेतवारु सूर्यरथासी । त्याचा अति विश्वासु तिसीं । विकल्प मानसीं असेना ॥ ६३ ॥

कद्रू सर्पांतें पुसे । सूर्यरथीं वारु कैसे । ते सांगती शुभ्रवेषें । कद्रू मानसें अति दुःखीं ॥ ६४ ॥

पुत्रांसीं सांगें पणाची थोरी । दिव्यसहस्त्रवर्षें वरी । मी दासी जाले विनते घरीं । जळपरिचारी जळदासी ॥ ६५ ॥

न [नि. घा. 'कळता'.] करितां निज निर्धारु । [दै. 'तुवां का नेमिला विचारु'.] त्वां कां नेमिले निळेवारु । करितां सवती मत्सरु । मत्सरें दुस्तरु भोग आला ॥ ६६ ॥

विनता सती पतिव्रता । तूं कां मत्सर करिसी वृथा । मत्सरें दासीत्व बैसलें माथां । त्यासी काय आतां चालेल ॥

न करा मातेचा कैवारु । पुत्र जन्मलां तुम्ही पाथरु । अवघे झोंबोनि विखारु । निळे सत्वरू करा वारू ॥ ६८ ॥

सर्प म्हणती करितां कपट । होईल अवघ्यांचें तळपट । वंश होईल सपाट । करितां कपट भलें नव्हे ॥ ६९ ॥

ऐकोनि पुत्रांचें वचन । कद्रू जाली क्षोभायमान । शाप दीधला दारुण । अग्निदाहोनः तुम्ही भस्म होआल ॥ ७० ॥

[दै. कं. जो. 'सर्प झोंबोनि काळविख । वास केले सुनील हरिख । मातेस सांगती उतावेळ देख । दावी तात्काळ विनतेसी ॥'; सु. नि. घा. 'तंव' हे अधिक पद.] सर्प झोंबोनि सकळ । विखें वारु केले सुनील । मातेसि सांगती उताविळ । दावी तत्काळ विनतेसी ॥ ७१ ॥

विलंब करितां या कार्यासी । सूर्य शोषील विखासीं । मग दाविल्या विनतेसी । जयो आम्हांसि पैं नये ॥ ७२ ॥

अनुक्रमणिका

कपटाच्या कृतकार्यासी । तत्काळ साधावें वेगेसीं । विलंबु करितां कपटासी । जयो आम्हांसि पै नये ॥ ७३ ॥

पुत्रवचनें उताविळ । कद्रू विनता आणि तत्काळ । सूर्यरथीचे नारु सुनील । देखे [पै. कं. 'तत्काळ'.] समूळ नीळवर्ण ॥ ७४ ॥

कद्रू म्हणे विनतेसी । म्यां जिंतिले निज पैजेसी । तूं जालीसि माझी दासी । अति उल्हासीं आली घरा ॥ ७५ ॥

आल्हाद देखोनि मातेसी । सर्प मागती उःशापासी । कद्रू हरिखेली मानसीं । उःशापासी स्वयें वदे ॥ ७६ ॥

कन्या जरत्कारीचे उदरीं । जरत्कार वीर्येंकरी । आस्तिक जन्मेल ब्रह्मचारी । तो शाप जो हरीं रक्षील ॥ ७७ ॥

दुर्धर शापाग्नि आंत । सर्प जळतां समस्त । आस्तिक पावोनियां तेथ । [इं. घा. 'देहदहनांत'.] दाहदहनीं रक्षील ॥ ७८ ॥

मातृपक्षाचें सकळकुळ । शापाग्नीं जळतां मातुळ । आस्तिक रक्षील तत्काळ । [इं. घा. 'तपोबळ प्रतापें'; सु. 'ब्राह्मणबाळ प्रतापें'.] ब्राह्मण बळप्रतापें ॥ ७९ ॥

उःशापें तुष्टली माता । आल्हाद सर्पां समस्तां । कपट करील आमच्या घाता । हे दुस्तर चिंता शमेना ॥ ८० ॥

कपटें जिंतिली विनता । कपट करील पुत्रांच्या घाता । ते कद्रूसि तीव्र चिंता । [त. 'सेवट करितां अति दुःखी'.] सुख सर्वथा असेना ॥ ८१ ॥

कपटें जयो पावल्या कपटी । तरी धाकें धुकधुकी पोटीं । कपट घातकी शेवटीं । कपटें कपटी अति दुःखी ॥ ८२ ॥

निज कपटाचि अतिचिंता । बैसली कद्रूचे माथां । पुढां विनतेचि कथा । बंदि मोचनता अवधारा ॥ ८३ ॥

विनतां पुसे अरुणाप्रति । श्वेत वारु सूर्याचें रथीं । त्वां सांगितलें मज निश्चितीं । नीळ प्रतीति मजजाली ॥ ८४ ॥

[नि. घा. इं. 'निळिमा चढला अश्वासी.'] नीळ प्रतीति अश्वापासीं । तेणें मीं जालें कद्रूदासी । घडा घेवोनियां शिसीं । अहर्निशीं जळवाही ॥ ८५ ॥

[सु. नि. घा. आरंभी 'तंव' हे अधिक पद.] अरुण म्हणे सर्पीं देख । चढऊनियां निजविख । निळे वारु केले निःशेख । कपटें दुःख पावती ॥ ८६ ॥

निळे देखोनि वारुवांसी । कोपु आला [जो. खेरीज इतरत्र 'जों' नाही.] जों सूर्यासीं । उपडोनियां सर्पांच्या पांखासी । आणि पायांसि निवटिले ॥

पूर्वी पक्ष होते सर्पांसी । गोमीच्या ऐसें पाय त्यांसीं । सूर्ये कोपोनि मानसीं । पक्ष पायांसीं छेदिले ॥ ८८ ॥

पाय निवटिले मग । उरें चालो लागले नाग । या लागिं त्यांसी म्हणती उरग । [सु. नि. घा. 'हा दुःखभोग'.] दुःख भोग कपटाचा ॥ ८९ ॥

सूर्ये शापिलें सर्पांसी । ऊदरीं धरिलें कपटासी । तोचि उदरशूळ तुम्हांसी । अहर्निशीं भोगाल ॥ ९० ॥

मुकले पक्ष आणि पायांसीं । उदरशूळ अहर्निशीं । कपटाची दशा ऐसी । कपटापासीं अतिदुःख ॥ ९१ ॥

इतुकें जालें उठाउठी । तरी कपट न सोडी पाठी । आगीं घालील सेवटीं । कपटें कपटी अतिदुःखी ॥ ९२ ॥

सूर्ये अश्वविख आकर्षून । कर्णीं राखिले [नि. घा. 'निर्मिष करुन'; पै. मु. तु. कं. 'निर्वीय करुन'.] नीलवर्ण । तेणें ते जाले शोभायमान । श्यामकर्ण जगद्वंद्य ॥ ९३ ॥

तैं पासूनिया जाण । वारु जाले श्यामकर्ण । जगीं यागीं अतिपावन । शोभायमान तिहीं लोको ॥ ९४ ॥

अरुण सांगे मातेप्रति । मज आधिन सूर्याची गति । मी जाऊनि बैसेन रथीं । बंध निर्मुक्ति [सु. नि. घा. 'गरुडाधीन'; पै. मु. तु. 'गरुडा पै'; कं. 'गरुडासी पैं'.] गरुडाचेनि ॥ ९५ ॥

आकळावया त्रिजगतीं । गरुडापासीं सामर्थ्यशक्ति । त्याच्याचि अंगिं सहिष्णु शांति । बंध निर्मुक्त तो करील ॥ ९६ ॥

सूर्याचि आज्ञा मज तत्वतां । उदयीं वंदावी मातापिता । मीं आलों वो वंदनार्था । जाईन मागुतां रथगति ॥ ९७ ॥

बंदिमोचन गरुडाहातीं । बुद्धि सांगोनि मातेप्रति । अरुण बैसला सूर्यरथीं । मातृभक्ति गरुडगाढा ॥ ९८ ॥

विनता सांगे गरुडापासीं । कपटें जिंतोनि पैजेसी । कद्रूनें मज केलें दासी । सहस्त्रवर्षीं जळवाही ॥ ९९ ॥

अरुणें सांगितलें मजप्रति । बंदिमोचन गरुडा हातीं । करिसील कैसिया युक्ति । [पै. खेरीज इतरत्र 'यथार्थ गति'.] पर्याय गति मज सांग ॥ १०० ॥

गरुड क्षोभला उद्भट । तुज जिंतिलें करुनि कपट । कपटे कपट्याचें तळपट । करीन सपाट सर्पांचें ॥ १०१ ॥

मातेसि द्यावया समाधान । कोपां केलें उपशमन । वंदूनि मातेचे चरण । काय वचन बोलतु ॥ १०२ ॥

अनुक्रमणिका

तुझ्या बंध मोचनासी । पालट पूस कद्रूपासीं । [सु. नि. घा. 'जरी'.] जे मागेल उत्तम पदार्थासी । आणूनि तिसीं मी देईन ॥ १०३ ॥

मातृबंधमोचनार्थ । अति दुर्लभ मागेल अर्थ । तो तो देईन पदार्थ । मोचनार्थ पूस वेगीं ॥ १०४ ॥

[सु. नि. घा. 'मग विनता'.] विनता सांगे स्वयें कद्रूसीं । गरुडें पाठविलें तुजपासीं । पालट बंध मोचनासीं । जे मागसी तें देईन ॥ १०५ ॥

निजमातेच्या बंदि मोचनीं । कल्पतरु चिंतामणी । देईन कामधेनू आणूनी । आवडे मनीं ते माग ॥ १०६ ॥

कद्रू विचारी निजचित्तीं । परम सामर्थ्य गरुडाप्रति । अति उद्भट त्याची शक्ति । अमृत प्राप्ति त्यां मागों ॥ १०७ ॥

माझेनि माझ्या पुत्रां शापबंधन । तिहीं केलिया अमृतपान ।
मग न बधी जन्ममरण । निर्धारुनि तेचि मागेन ॥ १०८ ॥ [ही ओवी कं. प्रतीत नाही.]

कद्रू सांगे विनतेपासीं । निश्चयें पुसावें गरुडासीं । परमामृत देवविसी । तैं तूं होसी बंधमुक्त ॥ १०९ ॥

माझे पुत्र पाताळवासी । अखंड राखत अमृतासी । तरी प्राप्ति नाहीं त्यासीं । तें तूं देसी तैं मुक्त ॥ ११० ॥

स्वादामृत उन्मादामृत । सुप्तामृत तृप्तामृत । ये अमृतें प्रलोभार्थ । परमामृत पांचवें ॥ १११ ॥

स्वादामृत अप्सरांसी । तेणें त्या स्वादिष्ट सर्वांसी । तृप्तामृत तें देवांसीं । क्षुधा त्यांसी बाधीना ॥ ११२ ॥

उन्मादामृत तें दैत्यांसी । तेणें उन्मत्त ते अहर्निशीं । सुप्तामृत दिग्गजांसी । तेणें सुखेचि डुल्लत ॥ ११३ ॥

डुकल्या येती निद्रितासी । तेंवि डुल्लणें दिग्गजांसी । [त. 'येरे तंव अमृतें सेवावयासी'.] ये तंव अमृतें वायसीं । देवें सर्वांसी चालविलें ॥ ११४ ॥

समुद्र मंथिला समस्तीं । जाहाली अमृताची प्राप्ती । कलहो करितां देवीं दैत्यीं । मोहिनी हातीं दीधलें ॥ ११५ ॥

मोहिनी रुपें श्रीविष्णुजाण । तेणें अमृत विभागून ।
[सु. नि. घा. 'इतरां अमृत वाढोन'.] इतर अमृतें चाळऊनि जन । राखिलें आपण परमामृत ॥ ११६ ॥

जेणें चुके जन्म मरण । तें परमामृत विष्णु अधीन । तें जरी देशील आणून । बंधमोचन तैं तुज ॥ ११७ ॥

अनुक्रमणिका

ऐकोनि कद्रूची हे कथा । गरुडापासीं आली विनता । आणोनि द्यावे परमामृता । बंदिमोचनता तैं मज ॥ ११८ ॥

परिसोनि मातेचें वचन । तिचें करावया बंध मोचन । वंदूनि मातेचे चरण । अमृतार्थी आपण उडों पाहे ॥ ११९ ॥

कृपा उपजली मातेसी । हातीं धरुनियां गरुडासी । आणिला कश्यपापासीं । वृत्तांतु त्यासी सांगितला ॥ १२० ॥

मातृभक्ति गरुडापासीं । देखोनि सुख कश्यपासीं । कृपा अभिषेकूनि त्यासी । धरी पोटेसी स्वानंदें ॥ १२१ ॥

[सु. नि. घा. 'हरिखें वर देत त्यासीं'; त. 'हरुषें वचन दे त्यासी'.] हरिखें वरद वदे त्यासीं । प्रतापें परमामृत पावसी । युद्धीं विष्णुभक्त होसी । मुक्त करिसी निजमाता ॥ १२२ ॥

परमामृत विष्णुआधीन । त्याचें करावें नामस्मरण । नामापासीं विजयो पूर्ण । [सु. नि. घा. 'निश्चये जाण'.] हरिरक्षण हरिभक्तां ॥ १२३ ॥

अच्युतनामाच्या [सु. दे. खेरीज इतरत्र 'चालिलां'.] आवर्ति । [घा. इं. 'तया प्रलयीं'.] च्यवत्या प्रळयीं नव्हे च्युति । अच्युत पदाची निजप्राप्ति । युद्ध सामर्थ्यें पावसीं ॥

कश्यपें परमकृपा करूनि । अच्युत नाम उपदेशूनि ।
गरुड धाडिला अमृत हरणीं । नामस्मरणीं निजविजयो ॥ १२५ ॥

मातापित्यासी करूनि नमन । तीर्थ घेतलें प्रार्थून । हरिनामें नित्य सावधान । करावया गमन आल्हादु ॥ १२६ ॥

नकुळा दासी विनते घरीं । नकुळ जन्मला तिचें ऊदरीं । तो गरुडासी साहाकारी । होऊनि सर्पारी चालला ॥ १२७ ॥

आरंभूनि त्या दिवसासीं । वैर सर्पा मुंगसासी । भेटी होतां येरयेरासीं । निज प्राणासी [घा. इं. 'सर्पसांडी'; दे. 'निजमरणासी जीव सांडी'.] संवसाटी ॥ १२८ ॥

मुखीं नामाची आवृत्ती । गरुड निघाला अमृतार्थी । कश्यप उपदेशाची युक्ति । विष्णु प्राप्ति संग्रामीं ॥ १२९ ॥

एका जनार्दना शरण । करितां रामनामस्मरण । भगवत्प्राप्ति [सु. नि. घा. 'अलोट ज्ञान'; त. 'अल्हादु जाणं'.] अलोट जाण । हें महिमान नामाचें ॥ १३० ॥

अनुक्रमणिका

नामापासीं भुक्तिमुक्ति । नामापासीं यश कीर्ति । नामापासीं विजय प्राप्ति । कर्मनिर्मुक्ति हरिनामें ॥ १३१ ॥

नामापासी नित्य निवृत्ति । नामापासी नित्य शांती । नाम वंदिजे [कं. 'सर्वांस गती'.] सर्वांमति । ब्रह्मप्राप्ति हरिनामें ॥ १३२ ॥

एका जनार्दना शरण । नामें पापी परम पावन । नामें प्रपंच ब्रह्म पूर्ण । नाम तें जाण परब्रह्म ॥ १३३ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां कश्यपवंशवर्णन गरुडेन अमृतहरणाभिगमनं नाम षष्ठमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सातवा

## पंचवटी आगमन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

अच्युत नाम धरुनि मानसीं । गरुड निघाला अमृतासीं ।
भावें वंदितां कश्यपासी । साह्य सप्त ऋषि त्यासि जाले ॥ १ ॥

गरुडें [कं. 'करुनियां नमन'; पै. 'अति नमन'; तं. 'अति गमन'.] अतिक्रमूनि गगन । सूक्ष्मरुप धरुनि जाण । परमामृत लक्षितां पूर्ण । बहुरक्षण अमृतासीं ॥ २ ॥

प्रथम सर्पाचें संपूर्ण । दुसरें रक्षण वरुण । तिसरें जाण यक्षगण । मरुद्‍गण तें चौथें ॥ ३ ॥

पांचवें रक्षण यमदूत । सहावें रक्षण शिवदूत । सातवें रक्षण विष्णुदूत । सावचित्त सर्वदा ॥ ४ ॥

गरुडें साधूनि सवडी । कुंडीं घालूनियां उडी । अमृत शोषोनियां तांतडी । अति झडाडी निघाला ॥ ५ ॥

तंव जाला हाहाकार । पक्षी नव्हे अमृतचोर । क्रोधें उठिले विरवार । शस्त्रसंभार सूटले ॥ ६ ॥

गरुड पांखांची झडाडी । राखणें मूर्छित बापुडीं । सशस्त्रें पडिलीं उबडीं । सर्प कडाडी धांविन्नले ॥ ७ ॥

रागें [मु. 'क्षोभतां'.] झोंबतां विखारी । नखाग्रघायीं ते विदारी । नकुळ [पै. खेरीज इतरत्र 'पावला'.] पातला साहाकारी । सर्प माझारीं छेदिले ॥ ८ ॥

वरुणें घालूनि पाशासीं । गरुड आकळिला पांखेसीं । नकुळें करांडूनि त्यासीं । केलें गरुडासि निर्मुक्त ॥ ९ ॥

गरुडें झडपूनि वरुणासीं । उडविला तो आकाशीं । भवंडूनि दाही दिशीं । पडे पृथ्वीसि मूर्छित ॥ १० ॥

राखणाईत आपांपरी । सर्प विदारिले नखाग्रीं । नकुळ केवळ सर्पारि । नानापरी छेदिले ॥ ११ ॥

ऐसें करूनि रणकंदन । गरूड वळघला गगन । करुनियां अमृतपान । बळवाहन चालिला ॥ १२ ॥

हांक वाजिली वैकुंठीं । कोपें चालिला धूर्जटी । देवांच्या कोट्यानुकोटी । अमृतासाठीं धाविन्नल्या ॥ १३ ॥

वेगें बैसोनि सुरगजासी । इंद्र धांविन्नला [मु. 'वेगेसीं'.] रागेंसी । वज्रें हाणितलें गरुडासी । [घा. इं. 'येरें'.] तेणें वज्रासि गिळिलें ॥ १४ ॥

अनुक्रमणिका

गरुड पांखांचां झडाडी । वळली इंद्राची मुरकुंडी । [कं. ‘पडली ऐरावता बुडी’.] गजु पळतां कडाडी । देवांच्या कोडी पळाल्या ॥ १५ ॥

गरुड पांखांचा पवन । देवा [मु. ‘नाठवे’.] न टके निजस्थान । वाहटुळिमाजि रजःकण । तैसें सुरगण भ्रमचक्रीं ॥ १६ ॥

यमु धाविन्नला कोपेसि । दंडें हाणीतलें गरुडासि । तेणें गिळिले दंडासि । मग यमासि झडपिले ॥ १७ ॥

यमें जाचिलें [दै. ‘जगासी’.] बहुतांसी । गरुडें गांजिलें यमासी । करुनिया कासाविसी । यम धुळीसि मेळविला ॥ १८ ॥

यमु गांजिला नानापरी । कोणी धांवेना कैवारी । देखोनि कुबेर पळे दुरी । सौजन्य करी गरुडेसीं ॥ १९ ॥

बंधमोचन मातेसी । अमृत द्यावया कद्रूपासीं । धाडी मणिमय कलशासी । अमृतासी सांठवण ॥ २० ॥

गरुड पांखांचे झडाडीं । दिग्गजें पळालीं बापुडी । सुराअसुरांचिया कोडी । देशधडी केल्या गरुडें ॥ २१ ॥

दैत्य दानव महाबळी । तेहि मर्दिले रणकल्लोळीं । धांकें रिघाले पाताळीं । आतुर्बळी वैनतेयो ॥ २२ ॥

मंत्रपूत जळशक्ति । युद्धा आला प्रजापती । [सु. नि. घा. ‘तंव कमंडलु’.] कमंडलू हिरोनि हातीं । अच्युत शक्ति गिळिला ॥ २३ ॥

पित्यांच्या पित्याचा पिता । भीड राखिली या धर्मार्था । ये‍ऱ्हवीं गरुड घोळसितां । घडी न लगतां ब्रह्मयासी ॥ २४ ॥

महादेवें क्रोधानळीं । गरुड हाणितला त्रिशूळीं । गरुड त्रिशुळातें गिळी । शिव ते वेळीं विस्मितु ॥ २५ ॥

त्रिशूळ गिळावयाची शक्ति । हे कैंची पां [तं. ‘गरुडासी गती’.] गरुडाप्रति । सदाशिव पाहे निश्चितीं । हृदयस्थिति रामनाम ॥ २६ ॥

रामनाम निजस्थिति । गरुडें जिंतिलीं त्रिजगतीं । त्रिशूळ गिळावयाची शक्ति । जाली निश्चितीं रामनामें ॥ २७ ॥

हृदयीं अमृत [मु. ‘मुखीं’.] वरी रामनाम । त्यासी कोण करी संग्राम । खुंटला शिवाचा पराक्रम । श्रीरामनाम परिसोनी ॥ २८ ॥

ऐकतां श्रीरामाचें नाम । सदाशिवासि आलें प्रेम । मूर्च्छित पावला विश्राम । युद्ध [मु. ‘संग्राम’.] संभ्रम विसरला ॥ २९ ॥

अनुक्रमणिका

कश्यप गुरुचां उपदेशीं । तेणें जिंतिलें सदाशिवासीं । कळिकाळाची गीत कायसी । हरिभक्तांसि बाधावया ॥ ३० ॥

निज भक्तासि द्यावया भेटी । विष्णु पावला उठाउठी । चक्र हातवसूनि मुष्टीं । कृपा दृष्टी पैं आला ॥ ३१ ॥

लौकिकीं दावी युद्धाचा आक्रम । परी भक्ताचें आवडे प्रेम । गरुड स्मरे नित्य नाम । पुरुषोत्तम तुष्टला ॥ ३२ ॥

जो सप्रेम स्मरे नाम । त्या आधीन पुरुषोत्तम । नामें संतुष्ट आत्माराम । भक्तकाम कृपाळू ॥ ३३ ॥ [ओवी ३३ कं. प्रतीत नाही.]

श्रद्धया हेलया नाम रटंति मम जंतवः । तेषां नाम सदा पार्थ वर्तते हृदये मम ॥ १ ॥

श्रद्धया हेळया जो स्मरे राम । [दै. 'त्याचे हृदयीं मी स्फुरें राम'.] त्याचें मी हृदयीं वाहे नाम । नामनिष्ठाचें पुरवी काम । नामें सुगम भत्प्राप्ति ॥ ३४ ॥ [मु. प्रतीत ओवी ३४ नंतर पुन्हा ३१ पासून क्रमांक देण्यात आले आहेत.]

अमृत सोडवावया बळी । चक्र मोकली वनमाळी । गरुड चक्रातें पैं गिळी । विस्मयो सकळीं मानिजे ॥ ३५ ॥

दैत्य दानव मंडळी । विष्णुचक्र सगळें गिळी । ऐसा कोणी नाहीं बळी । आतुर्बळी हा गरुड ॥ ३६ ॥

विष्णुचक्राचा महामार । घायें निर्दळी सुरासुर । चक्र त्रैलोकी दुर्धर । गरुडें तें चक्र गट्ट केलें ॥ ३७ ॥

स्मरतां नाम हरिगोविंद । नामापासी परमानंद । त्यासी बाधूं न शके द्वंद्व । द्वंद्व निर्द्वंद्व हरिनामें ॥ ३८ ॥

नाम स्मरतां निरंतर । तयापासीं अहोरात्र । घरटी करी विष्णुचक्र । विघ्नें दुर्धर निवटावया ॥ ३९ ॥

[तं. 'निजनामाचा नित्य गजर'; दै. खेरीज इतरत्र 'निजगजर'.] नित्य नामाचा गजर । त्या आधीन चक्रधर । भक्तां बाधूं न शके चक्र । हरि साचार त्या पासीं ॥ ४० ॥

देवां भक्तां नाहीं अंतर । त्या पासीं तो निरंतर । यालागीं बाधूं न शके चक्र । चक्र दुर्धर अभक्तां ॥ ४१ ॥

माझें निजचक्र गिळून । गरुडा! विजयी तूं संपूर्ण । विष्णु म्हणे मी सुप्रसन्न । वरदान माग वेगेंसी ॥ ४२ ॥

ज्या ज्या वरदातें मागसी । तें तें देईन अति उल्हासीं । ऐकोनि हांसे आलें गरुडासी । काय विष्णूसी बोलतु ॥ ४३ ॥

त्वां तंव जिंतिलें नाहीं मातें । वरद वदसी कोणे अर्थें । मीच प्रसन्न जालों तूंतें । मागसी तें देईन ॥ ४४ ॥

कश्यप गुरुचा हात माथां । अच्युत नाम नित्य स्मरतां । मज काय द्यावया [तु. मु. कं. जो. मु. 'अपूर्णता'.] अपूर्वता

अनुक्रमणिका

। मागसी आतां तें देईन ॥ ४५ ॥ [ओवी ४५ दै. प्रतीत नाही.]

ऐकोनि गरुडाचें वचन । भाषाबंधें निर्बंधून । विष्णु मागे वरदान । सावधान अवधारा ॥ ४६ ॥

गरुडा होई माझें वाहन । नुल्लंघावें माझें वचन । नित्य होआवें मजआधीन । हें वरदान मज देई ॥ ४७ ॥

ऐकोनि विष्णूचें मागणें । गरुड विचारी निजमनें । भाक देवोनि नेदणें । निंद्य जिणें तिहीं लोकीं ॥ ४८ ॥

मिथ्या करितांचि भाक । देव पितर नित्य विमुख । ऐहिकीं परत्रीं काळें मुख । नरक दुःख मिथ्यत्वें ॥ ४९ ॥

मिथ्या बोलती वितंड । नरका जाती ते अखंड । त्यांचें मुखचि नरककुंड । [सु. घा. 'पाहो नये'.] पोहणी तोंड तयाचें ॥ ५० ॥

[पै. 'मिथ्यानुवाद निघोनी'; मु. तु. तं. 'निजघणी'.] मिथ्यानुवादाची घाणी । तिहीं लोकीं उठी पोहणी । पितर विमुख मुख देखौनी । मिथ्या वाणी तो नरक ॥ ५१ ॥

ऐसी ऐसिया उपपत्ति । गरुडें विचार करुनि चित्तीं । जीवित्व द्यावें विष्णुच्या हातीं । [मु. 'केवळ'.] केला निश्चितीं निर्धारु ॥

शरीर विष्णूचें वाहन । जीवें नुल्लंघी विष्णुवचन । काया वाचा मन विष्णुआधीन । तेणें पावन तिहीं लोकीं ॥ ५३ ॥

ऐसा करितांचि निर्धारु । हृदयीं प्रगटला सद्‌गुरु । विवेक प्रकाशिला सधरु । कृपाळू गुरु तें ऐका ॥ ५४ ॥

स्मरतां कश्यपाचें वचन । विष्णु परमात्मा ब्रह्मपूर्ण । हे गरुडासि बाणली खूण । समाधान गुरुवाक्यें ॥ ५५ ॥

गुरुवाक्यें बोधस्थिती । सकळ [कं. 'भावाचिया'.] भयांची [पै. 'निजवृत्ति'.] निवृत्ति । गुरुवाक्यें यश कीर्ति । विजय प्राप्ति गुरुवाक्यें ॥ ५६ ॥

तें गुरुवाक्य निर्धारितां । विष्णुचालक निज चित्तां । विष्णु इंद्रियातें नेमितां । सर्व सत्ता विष्णूची ॥ ५७ ॥

जगीं विष्णूचि एकात्मता । तेथ मी देता तो मागता । हें तंव न घडे गा तत्वतां । सर्व सत्ता विष्णूची ॥ ५८ ॥

ऐसें विचारुनि चित्ता । विष्णु चरणीं ठेविला माथा । मज अर्पिता नार्पिता । तुज आधीनता सर्वस्वें ॥ ५९ ॥

माझें सत्व तत्व तूं आपण । माझें जीवित्व तूंचि परिपूर्ण । माझें जें कां मीपण । तेहि तूं संपूर्ण श्रीविष्णु ॥ ६० ॥

अनुक्रमणिका

गोडी साखर दोनीं एक । तैसा तूं स्वामी मी सेवक । मज तुज नाहीं [मु. 'भिन्नत्व'; तं. 'भिन्न'.] वेगळिक । भिन्नत्वें देख वर्ततां ॥ ६१ ॥

श्रीविष्णूचा निज सेवक । म्हणतां गरुडासि हरिख । मज तुझे सेवेचें सुख । दृष्टी [जो. दैं 'राहावें'.] सन्मुख राखावें ॥ ६२ ॥

पाहतां तुझें श्रीमुख । फिकें होय समाधी सुख । चरणीं ठेविला मस्तक । दृष्टी सन्मुख मज ठेवी ॥ ६३ ॥

ऐकोनि गरुडाचें वचन । विष्णु जाला तुष्टमान । दृष्टीपुढे नित्यस्थान । दिधलें नेमून गरुडासी ॥ ६४ ॥

गरुडें पृष्ठी दिधली देवासीं । देवें दृष्टी दिधली गरुडासी । उल्हासु देवांभक्तांसि । गरुड [मु. 'हरिसेवेसीं'; तं. 'निज भावेंसीं'.] हरीसि विनटला ॥ ६५ ॥

गरुडें [कं. 'विनटोनि'.] विनटोनि श्रीहरि । काया वाचा [सु. इं. 'सेवा'.] मनें करीं । जाला विष्णूचा आज्ञाधारी । जोडल्या करीं तिष्ठतु ॥ ६६ ॥

देवांभक्तां जालें युद्ध । युद्ध नव्हे तो महाबोध । एका जनार्दनीं विनोद । परमानंद रणरंगीं ॥ ६७ ॥

विष्णु म्हणे खगेश्वर । जरि तूं माझा आज्ञाधर । तरी गिळिला जो शस्त्रसंभार । तो द्यावा सत्वर शिवादिकां ॥ ६८ ॥

जीं शस्त्रें त्रैलोक्यीं दुर्धर । साहो न शकती सुरासुर । काळ कांपे अहोरात्र । तीं त्वां समग्र गिळिलीं ॥ ६९ ॥

दंड त्रिशूळ वज्र चक्र । शस्त्रें गिळिलीं दुर्धर । जाले यशाचे डोंगर । [तु. 'संभार'.] कीर्तिसागर त्वां भरिले ॥ ७० ॥

शूर वीर तूं धैर्य [त. 'निष्ठा'.] लाठा । श्रेष्ठ यश तुझा वांटा । त्याहि यशाच्या बांधल्या मोटा । सुरवरिष्ठां देई शस्त्रें ॥ ७१ ॥

उभय पक्षांचा आक्रम । अदट दाटुगा [पै. खेरीज इतरत्र 'पराक्रम'.] परम । तुज शस्त्रांचें नाहीं काम । शस्त्रें सुरोत्तम गौरवी ॥ ७२ ॥

यश कीर्तीच्या उत्तरीं । गरुड गौरविला श्रीहरि । तेणें तो लोळे पायांवरी । आज्ञा शिरीं वंदिली ॥ ७३ ॥

यमासि दंड इंद्रासि वज्र । त्रिशूळें पूजिला शंकर । चक्रें पूजिला चक्रधर । गरुडें समग्र सुखी केले ॥ ७४ ॥

पाचारुनि प्राजपति । कमंडलु दिधला हातीं । अवघे जयजयकार करिती । आळंगिती गरुडातें ॥ ७५ ॥

पुढील अमृताची कथा । इंद्र सांगे विव्हळता । सर्पां अमृत पाजितां । होईल तत्वतां तें विख ॥ ७६ ॥

अनुक्रमणिका

सर्पां पाजिलें पीयूष । ते परतल्या होय विष । अमृता वांचुनिया देख । अमर निःशेष निमतील ॥ ७७ ॥

सुरवरांची हरावया भूक । देवें निर्माण केलें पीयूख । तें सर्पामुखीं होतां विख । अमर निःशेष निमतील ॥ ७८ ॥

अमृत दिधल्या सर्पांसी । स्वर्गस्थ मरती उपवासी । यालागीं युद्ध केलें गरुडासी । बळें अमृतासी हरावया ॥ ७९ ॥

तंव येणें उभयपक्ष चाली । मर्दूनि सुरांची [कं. खेरीज इतरत्र 'सुरासुर फळीं'.] सुरफळी । शस्त्रें गिळूनि सगळीं । निघे तत्काळीं अमृतेसी ॥ ८० ॥

विष्णू सुबुद्धि तत्वतां । युद्धीं गरुड न जिंतितां । त्यासी केली दृढ आप्तता । सुरकार्यार्था साधावया ॥ ८१ ॥

विष्णूनें थोर ख्याति केली । गरुड जो कां आतुर्बळी । तो आकळोनि निजबोलीं । शस्त्रें देवविलीं आम्हांसी ॥ ८२ ॥

यालागीं बोलावया निश्चितीं । आम्हांसि जाली उपपत्ती । तोचि श्रीविष्णु अमृतार्थी । सांगेल युक्ति गरुडासी ॥ ८३ ॥

अमृतावांचूनि निश्चिती । अमर मरणातें पावती । तेव्हा गरुडाची यशकीर्ति । तेचि अपकीर्ति होईल ॥ ८४ ॥

ऐकोनि इंद्राच्या वचनासी । विष्णु बुद्धि सांगे गरुडासी । जेणें साधे दोहीं कार्यासीं । तें तुजपासी सांगेन ॥ ८५ ॥

मातेचें होय बंधमोचन । सर्पां न घडे अमृतपान । तैसें सांगेन विंदान । सावधान अवधारी ॥ ८६ ॥

सर्वांसि कळो नेदित । कद्रूपासी द्यावें अमृत । आशुचि दोषें होइल गुप्त । होउनि सुस्नात अमृत घेई ॥ ८७ ॥

अमृत कलश गंगातीरीं । [पै. 'तें ठेवितां'.] म्यां ठेविलासें दूर्वांकुरीं । माताबंधमोचन करी । भावें नमस्कारी कद्रूतें ॥ ८८ ॥

तुवां करितांचि नमन । कद्रू स्वयें संतोषोन । करील माताबंध-मोचन । उत्तीर्ण म्हणोनि तूं जाई ॥ ८९ ॥

पुढें सर्पां अमृतपान । घडो नेंदिती सुरगण । काक स्वरुपें झडपून । नेती आपण अमृतकुंभ ॥ ९० ॥

ऐसी विष्णूची युक्ति । गरुडासि सांगे [त. कं. 'देवगती'.] दैवीगति । तेंचि गरुडें धरूनि चित्तीं । कद्रूप्रति तो आला ॥ ९१ ॥

कुबेरू दे रत्नकुंभासी । अमृत भरोनिया त्यासी । गरुड आला कद्रूपासीं । कद्रू गरुडासि तुष्टली ॥ ९२ ॥

अनुक्रमणिका

गरुडें पाचारुनि माता । कद्रूपासीं अमृत देतां । बंध निर्मुक्त विनता । उल्हासता करी कद्रू ॥ ९३ ॥

कद्रू म्हणे धन्य विनतेसी । गरुड जन्मला तुझे कुसीं । घेवोनि आला अमृतासी । मुक्त मातेसि येणें केलें ॥ ९४ ॥

ऐकोनि कद्रूचें वचन । गरुड साष्टांगीं करी नमन । कद्रूनें गरुड आलिंगून । आशीर्वचन निजविजयी ॥ ९५ ॥

अशुचि [घा. इं. 'स्पर्शता'.] घेता अमृत । जेथीचें तेथें होईल गुप्त । यालागी होउनी सुस्नात । सेवा समस्त अमृतातें ॥ ९६ ॥

अमृत कुंभ गंगातीरीं । मी ठेवितों दुर्वांकुरीं । स्नान करुनिया समग्रीं । अमृतआहारीं बैसावें ॥ ९७ ॥

अमृत कलश ठेऊन । गरुडें आक्रमिलें गगन । विनता निर्मुक्त होऊन । आली [तं. 'पावन'.] आपण निजधामा ॥ ९८ ॥

अमृत सेवावया प्रीतीं । सर्प आल्हादें स्नान करिती । तंव कावळे अमृता प्रति । नेणों किती मीनले ॥ ९९ ॥

इंद्र अमृताचे कळवळां । होऊनि आला डोंबकावळा । अमृतकलश झडपूनि नेला । सर्पीं केला हाहाकार ॥ १०० ॥

अमृत नेतां त्वरें करीं । तें सांडलें दूर्वांकुरीं । तेणें दूर्वा अमृत संचारी । अद्यापि वरी टवटविती ॥ १०१ ॥
[ओवी १०१ त. प्रतीत नाही.]

अमृत नेता पैं कावळां । सर्प टाकिती विषाच्या गरळा । नकुळ सुरसाह्या पावला । सर्पां केला महामारु ॥ १०२ ॥

गरुडगति ते आकाशीं । नकुळगति ते विवरेसीं । वेगें येऊनि सर्पापासीं । युद्धकदनासि मांडिलें ॥ १०३ ॥

सविष उभारुनि फडा । सर्प धांवती अमृतचाडां । गरुडें नकुळ धाडिला गाढा । सर्पां [तं. 'रगडा'.] झगडा तेणें केला ॥ १०४ ॥

दुखंड त्रिखंड पंचखंड । एक सर्प केले नवखंड । जे जे आतुर्बळी प्रचंड । ते ते शतखंड नकुळें केलें ॥ १०५ ॥

सर्पीं कवळूनि चौपासीं । मारुं जातां नकुळासी । गरुड पाठीराखा आकाशीं । [दै. 'ते सर्पासी ना कळेचि'.] तेणें तो सर्पासि नाटोपे ॥ १०६ ॥

घार गीध गरुडाची सेना । सर्प झडपूनि नेतां गगना । एवं पन्नग पावोनि कदना । अमृतपाना मुकले ॥ १०७

अनुक्रमणिका

॥

नकुळ मार करी भूतळीं । गरुड घार गीध अंतराळीं । रणीं सर्पां केली रवंदळी । [मु. 'तेणें'.] भेणें पाताळीं निघाले ॥ १०८ ॥

गरुडें कैसी केली युक्ति । साधूनि मातेची निर्मुक्ति । आम्हां मारविलें नकुळांहातीं । अमृतप्राप्ती कागासी ॥ १०९ ॥

काग नव्हती ते सुरवर । यालागीं गरुडें केला कैवार । नकुळें केला महामार । दुःख दुर्धर सर्पांसी ॥ ११० ॥

दर्भीं सांडलें अमृत उंदड । सर्प चाटिती लावोनि तोंड । दर्भें जिव्हा जाली दुखंड । दुःख प्रचंड तेणें त्यांसी ॥ १११ ॥

अमृतस्वादाच्या भुलीं । दर्भ चाटितां जिव्हा चिरली । शेखीं काकुळती उरली । शीक लाविली निजकपटें ॥ ११२ ॥

पितृभक्ति मातृभक्ति । तेणें गरुडासि [घा. इं. 'अमृतप्राप्ति'.] विष्णुप्राप्ति । कद्रू कपटाचिये गती । सर्प पावती आति दुःख ॥ ११३ ॥

सद्भावें भगवत्प्राप्ती । असद्भावें अधोगती । भगवद्भक्तां सुखप्राप्ति । [मु. 'दुःख प्राप्ति'; तं. 'दुःख पावती अभक्त'.] दुःखावर्ती अभक्तां ॥ ११४ ॥

सर्पांपासून परमामृत । गरुडाचेनि देवांसि प्राप्त । इंद्रादि देव समस्त । गरुडें सुनिश्चित सुखी केलें ॥ ११५ ॥

देवीं पावोनि [पै. मु. दै. तु. 'पंचामृत'.] परमामृत । कुंडें भरिलीं पाताळगत । राखणें ठेवोनि इत्थंभूत । सुरसमस्त सुखी [कं. 'केलें'.] जालें ॥ ११६ ॥

त्रैलोक्य विजयी महावीर । वीर शूर अति उदार । हा गरुडाचा बडिवार । सविस्तर सांगीतला ॥ ११७ ॥

गरुडें सुखी कश्यप पिता । सुखी केली विनता माता । सुखीं केलें सुरां समस्तां । विष्णुहि तत्वतां सुखी केला ॥ ११८ ॥

ऐसी हे गरुडाची ख्याति । तो पितृव्य आम्हां रघुपति । आम्ही अरुणाची संतती । जटायु संपाति सखे बंधु ॥ ११९ ॥

> द्वौ पुत्रौ विनतायास्तु कथितौ गरुडारुणौ । तस्माज्जातोऽहमरुणात्संपाती च ममाग्रजः ॥ २ ॥
> जटायुषं तु मां विद्धि श्येनीपुत्रमरिंदम । सोऽहं राम सहायस्ते भविष्यामि यदीच्छसि ॥ ३ ॥
> सीतां च तात रक्षिष्ये त्वयि याते सलक्ष्मणे ॥ ४ ॥

अनुक्रमणिका

विनतेचे गरुड अरुण । त्यांचें सांगितलें कथन । अरुणाचे आम्ही दोघेजण । जटायु आणि संपाति ॥ १२० ॥

अरुण पित्याची आज्ञा चोख । सूर्यवंशीं व्हावे सेवक । तेथें जन्मेल रघुकुळटिळक । विश्वतारक जग द्वंद्व ॥ १२१ ॥

याचि लागीं सूर्यवंशीं । सख्य केलें श्रीदाशरथेसी । तो तूं राम भेटलासी । आजि भाग्यासी [मु. 'सभाग्य मी'.] सभाग्यता ॥ १२२ ॥

ऐसे बोलोनियां जाण । जटायु घालीं लोटांगण । श्रीरामें दिधलें आलिंगन । समाधान तेणें त्यासीं ॥ १२३ ॥

तुज पंचवटीं वसतां । सेवा सांगावी रघुनाथा । म्हणोनि चरणी ठेविला माथा । निज सेवकता मज देई ॥ १२४ ॥

पंचवटीसी सीता सांडून । श्रीराम आणि लक्ष्मण । मृग मारु [दै. तं. 'जाती'.] गेलिया दोघेजण । सीता संरक्षण मी कर्ता ॥ १२५ ॥

श्रीराम असतां नसतां । मी रक्षीन नित्य सीता । [मु. 'तेथें राक्षस भयाची'.] भयाची कथा वार्ता । मज असतां ते कैंची ॥ १२६ ॥

माझिया पराक्रमापुढें । राक्षस बळ तें बापुडे । कोण पाहे आश्रमाकडे । चहूंकडे मी रक्षण ॥ १२७ ॥

मी तराळ आश्रमापासीं । घरटीं करीन अहर्निशीं । सुखें राहावें आश्रमवासीं । मी विघ्नांसि रिघो नेदी ॥ १२८ ॥

करितां रामनामस्मरण । विघ्नचि होय निर्विघ्न । तेथ मी कायि [मु. तु. जो. दै. 'रक्षीन'.] रक्षण दीन । सेवा करीन सद्भावें ॥ १२९ ॥

पंचवटी जाणे आवश्यक । मार्गद्रष्टा मी सेवक । सीता सौमित्र रघुटिळक । आल्हादें देख नेईन ॥ १३० ॥

ऐकोनि जटायूची गोठी । राम चालिला जगजेठी । तिघे जणें उठाउठी । पंचवटी पावलीं ॥ १३१ ॥

गंगाजळ [मु. 'तटनिकटीं'.] निकटानिकटी । देखोनिया पंचवटी । आल्हाद तिघांचांहि पोटीं । गंगातटीं वसावया ॥ १३२ ॥

रामें वसविली पंचवटी । श्रीरामाचे सन्मुख दृष्टी । जटायु राहे पर्वत [मु. 'पर्वत पृष्ठी'; तं. 'पुष्ठी'.] पोटीं । करितु घरटीं अहर्निशीं ॥ १३३ ॥

एका जनार्दना शरण । श्रीराम सीता लक्ष्मण । जालें पंचवटीं आगमन । राक्षस दळन येथूनि ॥ १३४ ॥

अनुक्रमणिका

राक्षस वधाची बोहणी । श्रीराम करील येथूनी । सुरस कथा रामायणीं । श्रोते सज्ञनी परिसावी ॥ १३५ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां पंचवट्याआगमनं नाम सप्तमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग आठवा

## शूर्पनखा विरुपकरण

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

स तां पंचवटीं गत्वा नानाशकुनिनादिताम् । उवाच भ्रातरं रामो लक्ष्मणं शुभलक्षणम् ॥ १ ॥
अयं देशः समः श्रीमान्पुष्पितैस्तरुभिर्वृतः । इहाश्रमपदं सौम्यं यथावत्कर्तुमर्हसि ॥ २ ॥

**पंचवटी गंगातटीं । राम सुखावे देखोनि दिठीं । सुखावली सीता गोरटी । आल्हादु पोटीं** [कं. 'सुरवरा'.] **सौमित्रा ॥ १ ॥**

**श्रीरामा देखोनि आल्हाद । कोकिळा कूजतीं पंचम शब्द । घुमरी घुमघुमती स्वानंद ।** [मु. 'सुखानुवाद'.] **शुक अनुवाद अतिमधुर ॥ २ ॥**

**रामा तूं तूं सीते तूं तूं । धन्य धन्य सौमित्रा तूं । ऐसे कपोत कूजतू । पुण्य पुरुषार्थु ये वनीं ॥ ३ ॥**

**स्वतः प्रमाण कीं परतः प्रमाण । प्रयोगोपाधीनें व्यावर्तित कोण ।**
**जहदजहल्लक्षणाचें काय प्रयोजन । शुक सारिका आपण विवादती ॥ ४ ॥**
[ओवी ४ ते ६पै. मु. प्रतींखेरीज इतरत्र नाहीत.]

**जेथें शुक बोले विचक्षण । आत्मा येथें स्वतः प्रमाण । तो जहदजहल्लक्षणेन । श्रीराम पूर्ण लक्षावा ॥ ५ ॥**

**ऐसे पक्षी विवादती । तेणें सुखावे श्रीराम मूर्ति । लक्ष्मण चमत्कारे चित्तीं । सीता** [मु. 'सती'.] **हांसती स्वानंदें ॥ ६ ॥**

**मयूर आनंदें नाचत । शुक पिंगळे अनुवादत । ये वनीं वसल्या रघुनाथ । पुण्य पुरुषार्थ पावेल ॥ ७ ॥**

**अति पावन पंचवटी । श्रीराम** [तं. 'बळिया'.] **वसल्या जगजेठी । मारील राक्षसांच्या कोटी । सुख संतुष्टी तिहीं लोकीं ॥ ८ ॥**

**ऐकोनि पक्ष्यांचें कूजित । संतोषला श्रीरघुनाथ । सौमित्रासि स्वयें सांगत । आश्रमु येथ निर्मावा ॥ ९ ॥**

**अरुणा वरुणा संगमसार । प्राची सरस्वती पवित्र । लक्षूनि सुंदर कपालेश्वर । करी सत्वर स्वाश्रमु ॥ १० ॥**

**गंगातीर सम** [मु. जो. दै. तु. 'सुशील'.] **सुशीतळ । वृक्ष पुष्पित सफळ । मळ्यानिळ सुपरिमळ । सुख प्रबळ येथ वनीं ॥ ११ ॥**

**तूं तंव निजसखा लक्ष्मण । सर्वांगें** [घा. इं. 'सुंदर'.] **सदा सुलक्षण । येथ वसतां सुखसंपूर्ण । करी निर्माण**

अनुक्रमणिका

**आश्रम ॥ १२ ॥**

एवमुक्तस्तु रामेण लक्ष्मणः परवीरहा । अचिरेणाश्रमं भ्रातुश्चकार सुमहाबलः ॥ ३ ॥
पर्णशालां सुविपुलां चकार सुमनोहराम् । उपास्यां राघवस्यार्थे प्रेक्षणीयामनुत्तमाम् ॥ ४ ॥

**लक्ष्मणाचें शुभलक्षण । ना म्हणों नेणें आपण । शिरीं वंदूनि** [मु. 'चरण'.] **श्रीरामवचन । करी निर्माण आश्रम ॥ १३ ॥** [ओवी १३ वी तं. प्रतीत नाही.]

**यज्ञशाळा द्विजशाळा ।** [त. खेरीज इतरत्र 'जीवन शाळा'.] **भोजनशाळा शयनशाळा । निर्मिलिया पर्णशाळा । अतिविशाळा ऋषिवासां ॥ १४ ॥**

**वृंदावनें सुमनवनें । शोभती वनें उपवनें । बिल्वाश्वत्थ मधुवनें । आम्रवनें मघमघित ॥ १५ ॥**

**पंच पंच वृक्षांची दाटी । गंगातीरीं निकटानिकटीं । त्यामाजीं शोभे पंचवटी । देखतां दृष्टी मन निवे ॥ १६ ॥**

**अरुणा वरुणा सरस्वती ।** [जो. खेरीज इतरत्र 'त्रिवेणी'.] **त्रिवळी वाहे आश्रमाप्रति । सुंदर कपालेश्वर स्थिती । सन्मुख भासती आश्रमीं ॥ १७ ॥**

**पंचवटी आश्रम सुहावा । हेचि श्रीरामाची निजसेवा । लक्ष्मणें केली सद्भावां । श्रीराघवा सुखार्थ ॥ १८ ॥**

**उत्तमोत्तम आश्रमस्थिती । देखोनि सुखावे रघुपति । लक्ष्मणासि अतिप्रीतीं । सुखानुभूतीं आलिंगी ॥ १९ ॥**

**स्वयें श्रीराम सुखसंमेळीं । नाना पुष्पीं नाना फळीं । आश्रमीं दिधला बळी । जनकबाळी समवेत ॥ २० ॥**

**श्रीराम सीता आश्रमस्थिती । तेणें लक्ष्मणा सुख** [तं. मु. 'संपत्ति'.] **संवित्ती । सेवा करावया अहोरातीं । उल्हास चित्तीं चौगुणा ॥ २१ ॥**

**कुशमूळें स्वादुफळें । शीतळ जळें तुपरिमळें । लक्ष्मण पुरवी सर्वकाळें । सेवाबळें उल्हासी ॥ २२ ॥**

**श्रीराम सेवेचें निजसुख । लक्ष्मणासी आत्यंतिक । विसरला द्वंद्व दुःख । परम हरिख सेवेचा ॥ २३ ॥**

**श्रीराम सीतेचें चरणतीर्थ । सौमित्र नित्य सेवित । सेवेसीं विकलें जीवित ।** [सु. इं. 'सेवा करीत'.] **सावचित्त सर्वार्थी ॥ २४ ॥** [ओवी २४ ते ३८ तु. तं. कं. दै. प्रतींत नाहीत.]

**सीतेपासी संरक्षण । श्रीरामें ठेऊनि लक्ष्मण । आपण करूं गेला स्नान । अतिविंदान तेथ जालें ॥ २५ ॥**

**रघुनाथासी देखतां । कदा निद्रा न करी सीता । श्रीराम स्नाना गेला असतां । विश्रामतां निजेली ॥ २६ ॥**

**लक्ष्मणाचे दृष्टी समोरी । सीता स्वभावें निद्रा करी । वस्त्र उडालें गुह्यावरी । कुचांतरीं निर्मुक्त ॥ २७ ॥**

अनुक्रमणिका

**सौमित्रासि श्रीरामध्यान । न देखे कुच न देखे जघन । सीता दिसताहे नग्न । हें हि ज्ञान तो नेणें ॥ २८ ॥**

**श्रीराम करूनि आला स्नान । सीता दिसताहे नग्न । लक्ष्मणेंसि स्वयें आपण । काय वचन बोलतु ॥ २९ ॥**

अग्निकुंडसमानारी घृतकुंभसमो नरः । दृष्ट्वा गुह्यं परस्त्रीणां कस्य नोच्चलितं मनः ॥ ५ ॥

**स्त्री तंव अग्निकुंड केवळ । नर घृतकुंभ तापें विव्हळ । देखोनि नारीगुह्यस्थळ । मन निश्चळ कोणाचें ॥ ३० ॥**

पिता यस्य शुचिर्भूतो माता यस्य पतिव्रता । श्रीरामसेवानिरतस्तस्य नोच्चलितं मनः ॥ ६ ॥

**पिता ज्याचा शुचिर्भूत । माता पतिव्रता निश्चित । श्रीरामसेवे नित्य रत । त्याचें चित्त चळेना ॥ ३१ ॥**

**श्रीराम भक्तांची निजस्थिति । गुह्यें गुह्यार्थ देखती । तेणें चळेना चित्तवृत्ति । जाण निश्चिती श्रीरामा ॥ ३२ ॥**

[मु. 'देहीचिया'.] **दोहीचिया विकारवृत्ति । स्त्रीपुरुषां अभिव्यक्ति । देहीं देहातीत देखती । त्यांची वृत्ति चळेना ॥ ३३ ॥**

**सीता जगदंबा स्वयें सृष्टी । पाहोनि लक्ष्मणाची कसवटी । ऐकोनि दोघांचिया गोष्टी । स्वयें उठी सलज्ज ॥ ३४ ॥**

**लक्ष्मणाची स्थिती देखतां । सीतेनें चरणीं ठेविला माथा । स्वयें श्रीरामु जाला वंदिता । परम पूज्यता सौमित्रीं ॥ ३५ ॥**

**लक्ष्मणें घालूनि लोटांगण । दोहींचे मस्तकीं धरिले चरण । सेवासुख मज द्यावें आपण । पूर्ण पूज्यपण श्रीरामा ॥ ३६ ॥**

**ऐकोनि सौमित्रवचन । श्रीरामें देतां आलिंगन । दोघां नाठवे दोनीपण । जालें परिपूर्ण परब्रह्म ॥ ३७ ॥**

**पावोनियां पूर्णबोधु । लक्ष्मणा सेवेचा आल्हादु । सेवेलागीं जाला सावधु । कथानुवादु अवधारा ॥ ३८ ॥**

**लक्ष्मण जाऊनि वनासीं । नित्य आणी वनफळासी । तेणें वनीं एके दिवसीं । आश्चर्यासी देखिलें ॥ ३९ ॥**

**शूर्पनखेचा लाडिका सुत । शांब राक्षस विख्यात । काळखर्गाचें प्राप्त्यर्थ । करी वनांत तपश्चर्या ॥ ४० ॥**

**तपोतेजें आतुर्बळी । ध्यानी मंत्रमूर्ति आकळी । त्यावरी वाढिन्नली वृक्षजाळी । जालें बहुकाळीं वारूळ ॥ ४१ ॥**

**शांब तपश्चर्या अद्भुत ।** [घा. 'स्वर्गार्थी'.] **खर्गार्थी एकाग्रचित्त । काळखर्ग होता प्राप्त । जालें विपरीत अदृष्टें ॥ ४२ ॥**

अनुक्रमणिका

खर्ग उतरतां सत्वर । शस्त्रदेवता करी विचार । शांब महापापी दुर्धर । खर्गें [तु. मु. 'अघोर'.] घोर करील ॥ ४३ ॥

निर्दळील गोब्राह्मणां । वधु करील दीनाजनां । याचा हात मी स्पर्शेना । [कं. 'लक्ष्मणा प्रसन्न मी होईन'.] शरण लक्ष्मणां होईन ॥ ४४ ॥

हा तंव धर्माचा साहाकारी । [तं. 'अंकितजनाचर'.] अकिंचनांचा कैवारी । दीन जनातें उद्धरी । याचा करीं मी [दै. कं. मु. पै. मुं. 'पावेन'.] पावन ॥ ४५ ॥

शांब जे जाळीसि तप करित । लक्ष्मण फळें तोडी तेथ । खर्ग येऊनियां त्वरित । होय हस्तगत सौमित्रा ॥ ४६ ॥

वनफळें आसुडितां । [पै. सु. प्रतींत 'अवचटें' पद नाही.] अवचटें खर्गु आलें हातां । लक्ष्मण पाहें सभोंवतां । खर्गदाता दिसेना ॥ ४७ ॥

खर्गें सुखावला करतळीं । हरिखें वेळोवेळां तुळी । वाहो पाहावया तोडी जाळी । शांब ते वेळीं निवटिला ॥ ४८ ॥

घाव अतिशयें दुर्धर । जाळी सहित तुटलें शिर । धडधडा वाहे रुधिर । चिंतातुर सौमित्र ॥ ४९ ॥

कोण तपस्वी होता येथ । मज घडला ब्रह्मघात । स्वर्गीं क्षोभेल दशरथ । [सु. घा. इं. 'सत्य'.] सद्य रघुनाथ कोपेल ॥ ५० ॥

कैंचे खर्ग आलें हातां । तेणें हत्या बैसली माथां । कैसेनि भेटों रघुनाथा । चित्तीं चिंता अनिवार ॥ ५१ ॥

ब्रह्महत्याराचें मुख । श्रीराम न पाहे निःशेख । जीवीं लागली धुकधुक । परम दुःख सौमित्रा ॥ ५२ ॥

माता पिता बंधु गोत । माझें श्रीराम [घा. इं. 'समर्थ'.] समस्त । त्यासी सांगेन वृत्तांत । प्रायश्चित्तार्थ पुसेन ॥ ५३ ॥

[तं. 'न करितां राम नामस्मरण । केवी दोषां होईल दहन ।'.] करितां रामनामस्मरण । कोटि दोषां होय दहन । त्यासी जालिया अनन्यशरण । हत्या हरण निमिषार्धें ॥ ५४ ॥

मुखीं रामनाम आवृत्ति । हृदयीं श्रीरामाची मूर्ति । [तं. 'पालटीन आत्मस्थिती'.] पाउलां पाउलां रामस्थिति । दोष निवृत्ति श्रीरामें ॥ ५५ ॥

श्रीरामस्थितीं पाउल पडे । तेणें समाधिसुख [मु. 'गाढें'; पै. तु. 'वाढे'.] जोडें । प्रायश्चित जालें बापुडें । श्रीरामाकडे पाहतांचि ॥ ५६ ॥

हत्याभयें श्रीरामस्थिति । दृढ धरूनियां चित्तीं । पुसावया प्रायश्चिर्थी । आला निश्चिती सौमित्र ॥ ५७ ॥

रामासि सीता सांगे आपण । स्त्रियेवांचून लक्ष्मण । दिसता हे अति उद्विग्न । दीन वदन आभासे ॥ ५८ ॥

श्रीराम म्हणे सीतेप्रति । सौमित्र नव्हे वो विषथार्थी । दिसे नूतन खर्ग हातीं । कांहीं वनांतीं वर्तलें ॥ ५९ ॥

लक्ष्मणें येऊनि आपण । [घा. इं. 'साष्टांग'.] चिरकाळ घातलें लोटांगण । दोष घडला जी संपूर्ण । कृपा आपण करावी ॥ ६० ॥

जयजयजी रघुनाथा । अनाथ बंधु दीनानाथा । कृपा करी गा भगवंता । मज रक्षितां आन नाहीं ॥ ६१ ॥
[ओवी ६१ ते ६४ कं. मु. दै. तं. तु. प्रतींत नाहींत.]

मी तंव नेणें मातापिता । बंधुभगिनी तूंचि तत्वतां । कौसल्येनें निरविलें तुजचि येतां । मज रक्षितां तूंचि तूं ॥ ६२ ॥

तळीं धरित्री पाहतां । वरी आकाश न्याहाळितां । दाही दिशा धांडोळितां । मज रघुनाथा आन नाहीं ॥ ६३ ॥

लक्ष्मणाचें दीनवचन । ऐकोनियां रघुनंदन । संकेतें पुसे आपण । येरू मस्तक खालऊन सांगता होये ॥ ६४ ॥

वनीं वनफळें [पै. खेरीज इतरत्र 'तोडितां'.] आसुडितां । अवचटें खर्ग आलें हातां । त्याचा वाहो पाहों जातां । जाळी त्या अर्था तोडिली ॥ ६५ ॥

जाळीतळीं तप करित । तपस्वी होता वारूळांत । त्याचा मज घडला ब्रह्मघात । प्रायश्चित्तार्थ मज सांगा ॥ ६६ ॥

ऐकोनि सौमित्राचें वचन । मग बोलिला रघुनंदन । वैश्य क्षत्री कीं शूद्र ब्राह्मण । वधिला कोण जाळीमाजीं ॥ ६७ ॥

न करिता हा [त. 'यथार्थ'.] इत्यर्थ । सांगतां न ये प्रायश्चित । लक्ष्मण धाडिला त्वरित । परिक्षार्थ प्रेताचे ॥ ६८ ॥

लक्ष्मण तें [घा. इं. 'शरीर'.] शिर पाहे डोळां । भ्यासुरमुख दाढा विक्राळा ।
खापरा ऐसा सबाह्य काळा । आला कांटाळा [कं. 'मनासी'; घा 'नेत्र अनला सारिखे'.] नेत्रांसी ॥ ६९ ॥

लक्ष्मण सांगे इत्यर्थु । मज घडला राक्षसघातु । ऐकोनि हांसे रघुनाथु । मुख्य धर्मार्थु हा आम्हां ॥ ७० ॥

तुज नाहीं निजज्ञान । शस्त्रदेवता अतिसज्ञान । तिणें जाणोनि आपण । दुष्ट निर्दळण स्वयें केलें ॥ ७१ ॥

अनुक्रमणिका

हा जरी सावधान असतां । तरी [मु. 'तुजसी युद्ध करितां'.] करितां तुझ्या घाता । तुज प्रसन्न शस्त्रदेवता । न जुंझतां निर्दळिला ॥ ७२ ॥

राक्षस आतुर्बळी होता । दुर्धरतप केलें शस्त्रप्राप्त्यर्था ।
दुष्टां क्षोभोनि शस्त्रदेवता । त्याच्याचि घाता तिणें केलें ॥ ७३ ॥

तपस्व्याच्या केलें घातां । दोष बैसला माझे माथा । ऐसें न म्हणावें तत्वतां । दोष सर्वथा न मनावा ॥ ७४ ॥

करावया राक्षसांचा घात । आम्हीं आलों असो वनांत । शस्त्रें धरूनि तुझा हात । केला प्राणांत दुष्टाचा ॥ ७५ ॥

तूं तंव नव्हसी कर्मकर्ता । तुझ्या धरूनियां हातां । दुष्ट दमिला शस्त्रदेवता । दोष सर्वथा तुज नाहीं ॥ ७६ ॥

दोष नाहीं तुझे माथां । पुसणें नलगे प्रायश्चित्ता । ऐसें श्रीराम बोलतां । उल्हासता सौमित्रा ॥ ७७ ॥

धन्य ज्ञान श्रीरघुनाथा । शोधूनि काढिलें इत्यर्था । मी तंव नव्हे कर्मकर्ता । दोष सर्वथा मज नाहीं ॥ ७८ ॥

धन्य धन्य श्रीराम सकृप । जो म्यां घेतला दोषसंकल्प । तोचि केला [मु. 'निर्विकल्प'.] निःसंकल्प । पुण्य पाप मज नाहीं ॥ ७९ ॥

ऐसें बोलोनि लक्ष्मण । मस्तकीं धरिले श्रीरामचरण । श्रीरामें दिधलें आलिंगन । समाधान सुबंधू ॥ ८० ॥

श्रीरामाचे निजभक्त । कर्मे करूनि अलिप्त । हरिभक्तांचे पढतां चरित्र । नित्य मुक्त महादोषी ॥ ८१ ॥

करावया राक्षसांच्या घाता । काळखर्ग आलें हातां । श्रीरामें पुजूनि [तं. 'स्वभावता'.] सद्भावता । काळु सर्वथा साह्य आम्हां ॥ ८२ ॥

काळ साह्य जाला स्वभावतां । काळखर्ग आलें न प्रार्थितां । राक्षस निर्दळणें आतां । जाण तत्वतां सौमित्रा ॥ ८३ ॥ [ओवी ८३ त. प्रतीत अशी आहे :––
'प्रार्थिता राक्षस निर्दळणार्था । काळ साह्य जाला स्वभावतां । तरी काळखर्ग आलें हाता । जाण तत्वतां सौमित्रा ॥']

राक्षस वधावया [तं. दै. 'यावनी'; मु. जो. तु. 'रावणी'.] रावणादि रणीं । आजिपासुनी जाली बोहणी । येथूनि विचरतां वनीं । सावधानीं वर्तावें ॥ ८४ ॥

याचा सूड घ्यावयासी । राक्षस येती कपटवेषीं । योगी संन्यासी तापसी । विश्वासु त्यांसी न [पै. दै. तु. कं. मु. जो. 'न मनावा'.] करावा ॥ ८५ ॥

अगत्य मानेल कर्तव्यता । ते मज पुसावी तत्वतां । मज पुसल्याविण सर्वथा । अल्पहि कार्यार्था न करावें ॥ ८६ ॥

अनुक्रमणिका

शिरीं वंदूनि श्रीरामवचन । सौमित्र नित्य सावधान । तेथ करावया पुत्रशोधन । जालें आगमन शूर्पनखेचें ॥ ८७ ॥

शूर्पनखा स्वयें लंकेसी । देखती जाली दुष्टस्वप्नासी । [मु. 'पट्टाभिषेक'; तं. 'प्रेताभिषेक'; कं. 'प्राप्त्यर्थ'.] प्राप्ताभिषेक होतां शांबासी । चरण घातेंसि लोटिला ॥

मस्तकीं सेंदुराचा [मु. 'टिळा'.] रोळा । गळां आरक्त करवीरांच्या माळा ।
मुख माखिलें काजळां । भंवता पाळा गोळांगुळांचा ॥ ८९ ॥ [ओवी ८९ व ९० तु. दै. कं. मु. तं. या प्रतींत नाहीत.]

सर्वांगीं तैलमज्ञन । नग्न गर्दभावरी आरोहण । दक्षिणादि दिशेसि करूनि गमन । गोमयह्रदीं प्रवेशला ॥ ९० ॥

शूर्पनखा सांगे रावणासी । दुष्ट स्वप्न देखिलें शांबासी । मी जाईन पद्मपुरासी । मग विमानेंसिं ते आली ॥ ९१ ॥

भेटूनि त्रिशिरा खर दूषणासी । पाहों आली ते शांबासी ।
देखोनि त्याच्या शिरच्छेदासी । आक्रंदेसिं आरंबळली ॥ ९२ ॥

काय विंदान जालें वो यासी । कोण उठिली वो विवसी ।
काळ कृतांत भीती ज्यासी । तेणें भूमीसि स्वीकारिलें ॥ ९३ ॥

[ओवी ९३ ते ९८ दै. मु. तु. कं. तं. प्रतींत नाहीत. ओवी ९४ सु. घा. इं. प्रतींत नाही.] हा स्वभावें निमेष उघडी । तैं बृहस्पतीसि पडे बोबडी । ब्रह्माची वळे मुरकुंडी । पडती बुडीं नक्षत्रें ॥ ९४ ॥

स्वभावें उघडी दृष्टी । तैं सुरासुर पळती दिक्पुटीं । कळिकाळाची निमटे दृष्टी । तो हा हटी पडिला भूमीं ॥ ९५ ॥

तुज म्यां नवस केले रे बहुवस । अश्वत्थ [मु. 'सेवा'.] सेचन आणि उपवास ।
थोर धरिली रे तुझी आस । तो तूं उदास जालासी ॥ ९६ ॥

तुझिया देखोनि रे मुखकमळा । मज तंव पान्हा सुटला बाळा ।
तो शांब परलोकासी गेला । मजसी अबोला धरूनियां ॥ ९७ ॥

ऐसे विलाप करी वो अनेक । मुखावरी ठेऊनियां मुख । हा हा कोणे वधिला बाळक । थोर दुःख मज दीधलें ॥

रडोनि काय करूं येथ । कोणें केला पुत्रघात । त्यासी पाहावया निश्चित । वन समस्त ते शोधी ॥ ९९ ॥

अनुक्रमणिका

तंव खर्गासहित धनुष्यबाण । वनीं देखिला लक्ष्मण । शांब जीवघाती हाचि पूर्ण । याचें भक्षण मी करीन ‖ १०० ‖

शांब वधिला करितां ध्यान । तो जरी असतां सावधान । याचें करितां [तु. तं. 'गटग्रासन'; मु. 'सगट प्राशन'.] गट्टग्रसन । बळ संपूर्ण शांबासी ‖ १०१ ‖

शांब माझा आतुर्बळी । येणें वधिला ध्यानसंमेळीं । यांस मी सगळेंचि गिळी । करीन रांगोळी हाडांची ‖ १०२ ‖

माझा शांब वधिला येणें । सांगों खरादिकां गाऱ्हाणें । ते तंव मज लाजिरवाणें । मारूनि नेणें त्यांपासीं ‖ १०३ ‖

याचा अंगीं बळसंपूर्ण । सबळ बळाचें लक्षण । डोळां दोनी सहस्रनयन । नागचिन्ह बाहूंसीं ‖ १०४ ‖

डोळियामाजीं कूर्मदृष्टी । कळिकाळा न चेपे दृष्टी । [मु. तु. 'शयन'; नि. 'आतुर्बळी धूर्जटी'.] शेषशायीं चिन्ह पृष्टीं । [मु. 'अदृष्ट'; जो. 'आदर'.] अदट सृष्टी आंगवण ‖ १०५ ‖

यासि बळें गिळूं जाता । हा करील माझ्या घातां । छळूनि मारावा सर्वथा । याची कांता होऊनी ‖ १०६ ‖

स्वरूप रूपें अति सुंदर । अळंकारिली मनोहर । वांकी आंदुवा गजर । उभी समोर सौमित्रा ‖ १०७ ‖

शिसफुल राखडी फरागोंडा । पोफळ चांपेकळी केतकी दांडा । दोहीं हातीं जडित चुडा । मुखीं विडा सुरंग पैं ‖ [ओवी १०८ ते ११० पै. जो. मु. प्रतींखेरीज इतरत्र नाहीत.]

आंगी मदुवीची कांचोळी । गळां हार येकावळी । पाठीवरी वेणी मोकळी । गोंडा दुफुली सहित ‖ १०९ ‖

डोळे मोडी लक्ष्मणाकडे । [मु. 'दुडीपिडी'; इडापिडा याचे एक रूप.] इडीपिडी घेऊनि पायां पडे । लाजोनि पाठिमोरी मुरडे । पाहे देहुडे लक्ष्मणां ‖ ११० ‖ [ओवी १०९नंतर सु. घा. जो. इं. प्रतींत पुढील ओवी अधिक आली आहे :—— 'नेसली क्षीरोदक पाटोळा । मध्यभागीं जडित कटि मेखळा । हळदी लटिली मुखकमळा । काजळ डोळां भळभळीत ‖']

म्हणे मी तंव कुबेराची भगिनी । तुमचिये प्राप्तीलागूनि । बैसले होते अनुष्ठानीं । धर्मपत्नी मी होईन ‖ १११ ‖

सुंदर आवडे डोळ्यांसी । रामाज्ञा आठवे मानसीं । राक्षस येती कपटवेषीं । विश्वासु त्यांसीं न मनावा ‖ ११२ ‖

तिणें घेऊनि कमलमाळा । घालूं आली लक्ष्मणाचे गळां । येरे मानूनियां विटाळा । परता सरला सक्रोध ‖ ११३ ‖

अनुक्रमणिका

मजसारिखी सुंदर कांता । वनीं मिनलिया एकांता । नपुंसकही न सरे मागुता । तुमची पुरुषता [मु. तु. कं. 'सभय कां'; तं. 'तुझ्या परुषार्था भय काय'.] सलज्ज कां ॥ ११४ ॥

मी तंव केवळ चरणदासी । सेवा करीन अहर्निशीं । शयन करूं पर्णसेजेसीं । शंका मानसीं न धरावी ॥ ११५ ॥

माझा भोगिलिया गुह्यार्थ । कळेल सर्वहि भावार्थ । माझेनि संगें पुरुषार्थ । जग विख्यात पावाल ॥ ११६ ॥

सौमित्र म्हणे ऐक आतां । श्रीराम माझा ज्येष्ठ भ्राता । त्याची आज्ञा मज न होतां । तुज सर्वथा नांगिकारी ॥ ११७ ॥

श्रीराम ज्येष्ठ बंधू तो कैसा । कोण पुरुषार्थ कैसी दशा । समूळ आणावया मानसां । मार्ग जिज्ञासा पुशिली ॥ ११८ ॥

येणेंचि मार्गें गंगातटीं । रामाश्रम पंचवटी । श्रीराम वसे जगजेठी । सीता गोरटी समवेत ॥ ११९ ॥

माझ्या पुत्राचे हे वैरी । रम्याश्रम गंगातीरीं । नांदताती बरव्यापरी । सीता सुंदरी समवेत ॥ १२० ॥

श्रीराम आणि लक्ष्मण । दोघेहि छळून मारीन । सीता सुंदरी नेऊन । स्वयें अर्पीन लंकानाथा ॥ १२१ ॥

मग पंचवटीस जाऊन । श्रीरामा घाली लोटांगण । भावोजी वंदिते श्रीचरण । बाईसी शरण सर्वभावें ॥ १२२ ॥

मी तंव तुमची धाकुटी जाऊ । मजवरी कृपा करावी बहु । भावोसाचे धाकटे भाऊ । लग्नगौरवु न मानिती ॥ १२३ ॥

भावोसाचे आज्ञेविण । माझे न करिती पाणिग्रहण । भावोजीस सांगोनि आपण । लावावें लग्न सौमित्रासी ॥ १२४ ॥

सीता म्हणे श्रीरामासी । सौमित्र कष्टताहे अहर्निशीं ।
सुंदर कांता जोडली त्यासी । मज वनवासीं सांगातिणी ॥ १२५ ॥

श्रीराम पाहे जंव सुंदरी । उलट्या बाहुल्या देखे नेत्रीं । हे तंव केवळ निशाचरी । छळणावारी आली असे ॥ १२६ ॥

तिचा जाणोनि भावार्थु । हांसोनि बोले श्रीरघुनाथु । माझा सौमित्रीं संकेतु । असे विपरीतु सुंदरी ॥ १२७ ॥

पाठीसि लिहिल्या अक्षरांसीं । आज्ञा माने सौमित्रासी । पत्र न मने वो तयासी । मुखवचनासी मानीना ॥ १२८ ॥

अनुक्रमणिका

आज्ञा मागतां एकाएक । मुहूर्ती श्रीरामीं विमुख । पतीसि पत्र दावितां देख । तेथेंहि विमुख म्यां होआवे ॥ १२९ ॥

विमुखपणाचा सोहळा । मुळींच आला माझिया कपाळा ।
लग्नपत्रिका न दिसे डोळां । श्रीराम भोळा म्हणों नये ॥ १३० ॥

दोघांहि छळावे माझें मत । राम छळणासी नव्हे प्राप्त । आपलें कळों नेदी वृत्त । पत्र गुप्त पृष्ठभागीं ॥ १३१ ॥

रामाज्ञेन जालिया लग्न । वनीं लक्ष्मणातें निर्दळीन । निर्दळावया रघुनंदन । खर दूषण आणीन ॥ १३२ ॥

पद्मपुरा निकटा निकटीं । राम मारिजेल राक्षसभटीं । सीता हिरोनि गोरटी । नेईन भेटी लंकानाथा ॥ १३३ ॥

श्रीराम दोभुजांचे माणूस । खर दूषण उग्रराक्षस । राम मारितां न लगे निमिष । सीता लंकेश भोगील ॥ १३४ ॥

पुत्रवैरी [मु. दै. तु. 'वधावे'; त. 'मारावें पुढें'.] निमावें फुडें । विचारू केला निज निवाडे । [पै. खेरीज इतरत्र 'सलज्ज'.] सहज बोलिले सीतेपुढें । मज सांकडें वोढवलें ॥ १३५ ॥

नेम केलासें भावेंसी । लग्नपत्रिका ते पाठीसी । पाठिमोरी बैसो मी कैंसी । भावोजीसी तुम्ही सांगा ॥ १३६ ॥

पाठिमोरी बैसतां जाण । लाजां जाईल माझा प्राण । बाईजी सांगोनि आपण । पत्र लिहून करीं द्यावें ॥ १३७ ॥

स्त्रियांचें जिणें लज्जायुक्त । बाईजी तुम्हीं जाणा समस्त । प्रार्थुनियां रघुनाथ । पत्र लिखित करीं द्यावें ॥ १३८ ॥

श्रीरामाचा निजभावार्थ । पत्र दिधलियां वाचील अर्थ । मग करू धांवेल अनर्थ । केलें विपरीत यालागीं ॥ १३९ ॥

सौमित्रातें वरू पाहसी । तरी पत्र लिहों दे पाठीसी । नाहीं तरी जाऊन वनासी । येईल मनासी [सु. 'ते करी'.] तो वरी ॥ १४० ॥

ऐकोनि श्रीरामवचन । उकसाबुकसीं करी रूदन । जळो तें आणिकांचें वदन । श्रीलक्ष्मण निजपति ॥ १४१ ॥

भावोजी [पै. खेरीज इतरत्र 'तुमचे शिवते चरण'.] वाते आण । मी तंव पतिव्रता संपूर्ण । प्राणपति श्रीलक्ष्मण । तुम्हीं कठीण न वदावें ॥ १४२ ॥

अनुक्रमणिका

श्रीरामापुढें पाठिमोरी । येऊनि बैसली झडकरी । पत्र लिहावें पृष्ठीवरी । आज्ञाधारी मी तुमची ॥ १४३ ॥
[ओवी १४२ नंतर घा. इं. प्रतींत पुढील ओवी आली आहे :——
'मग श्रीराम बोले धर्मवचन । ज्येष्ठ भावजयी माते समान । कनिष्ठ ते लेकरुं जाण । लाजेसी कारण असेना ॥']

शूर्पनखेची न पडे दृष्टी । पत्र लिहिलें कटिपृष्टीं । पत्रीं लिहिली विकट गोष्टी । सावध दृष्टीं अवधारा ॥ १४४ ॥

सहनासिक सकट वोष्ठ । वेगीं करावे सरडसपाट । हाचि इचा शेसपाट । आज्ञा वरिष्ठ हे माझी ॥ १४५ ॥

करूं नये स्त्रीहनन । यालागीं इचा राखावा प्राण । करावें नासिका छेदन । हेंचि सुलग्न पैं इचें ॥ १४६ ॥

काय लिहिलें पाठीसीं । हें न कळेचि शूर्पनखेसी । वंदूनि श्रीराम सीतेसी । लक्ष्मणापासी ते आली ॥ १४७ ॥

वेगीं घेऊनि माळेसी । वरूं आली लक्ष्मणासी । तो कोपला अतिशयेंसी । निलंड होसी तूं एकी ॥ १४८ ॥

रघुनाथाचे आज्ञेविण । सांगितलें न करी लग्न । जळो तुझे काळें वदन । आज्ञेविण वरूं येसी ॥ १४९ ॥

[कं. 'भावोजीची आज्ञा पूर्ण'.] भावोजी बाई कृपाळुपूर्ण । तिहीं मज दिधलें आज्ञापन । तुम्हापासी कठिणपण । सांगेन खूण ते ऐका ॥ १५० ॥

भावोजी श्यामसुंदर जगजेठी । बाईजी चापे गोरटी । मज भेटलीं पंचवटी । आज्ञा वाक्पुटीं [जो. कं. मु. तु. तं. 'तुम्ही' हे अधिक पद.] वरावे ॥ १५१ ॥

तोंडीचा तोंडी आज्ञापन । सौमित्र म्हणे मानी कोण । तोंडीचा तोंडी होईल वरण । सत्य जाण सुंदरी ॥ १५२ ॥

माझा विश्वासु नाहीं तुम्हांसी । जन्म कंठणें पायापासीं । लटिकें बोलिल्या [मु. 'चरणासी'; तं. 'कवणासी'.] वरणासी । मुख श्रीरामासि केवीं दावूं ॥ १५३ ॥

थोर श्रमलेति वनांतीं । चरण तळ हातीन हातीं । दोघे शयन करूं एकांतीं । तेणें विश्रांति पावाल ॥ १५४ ॥

लक्ष्मण म्हणे तंव तूं लंड । बोलाची बडबड उदंड । घायें हाणोन फोडीन तोंड । तूं वेश्या भांड व्यभिचारिणी ॥ १५५ ॥

श्रीरामाचें हस्तलिखित । देखिल्याविण न लावी हात । जवळीं आलिया करीन घात । खर्गा हात घातला ॥ १५६ ॥

म्हणे मी कपाळें करंटी । सत्य न मना माझी गोष्टी । श्रीराम लिखित पाहा पां दिठीं । म्हणोनि पाठी दाखविली ॥

अनुक्रमणिका

श्रीरामाचीं हस्तांक्षरे । सार्थक वाचिलीं सौमित्रें । वेणी दंड धरूनि करे । बलात्कारे पाडिली ॥ १५८ ॥

मी काय धाकुटी करण कुमारी । [कं. 'मला' हे पद अधिक.] झोंबोनि पाडा पृथ्वीवरी । मींच पडते [दै. 'ये अवसरी'; मु. 'सत्वरी'.] धरणीवरी । पुरुषार्थ करी प्राणनाथा ॥ १५९ ॥

पाय देऊनि उरावरी । सवोष्ठ नाकशस्त्रधारीं । [मु. 'सरसकटून'.] सरकटूनि क्षणामाझारीं । राहिला दूरी शस्त्रेंसि ॥ १६० ॥

घायें उडविलें कपटपण । क्रूर राक्षसी अतिदारुण । बारा बारा हात एक स्तन । नाकेविण विक्राळ ॥ १६१ ॥ [घा. इं. प्रतींत ही ओवी नाही.]

सुपाएवढीं नखें देखा । यालागीं म्हणती शूर्पनखा । सौमित्रें छेदूनि नासिका । [जो. कं. तु. दै. 'टाकिलें देखा उदकांत'.] विरूपमुखा ते केली ॥ १६२ ॥

[तु. दै. 'नकटी' हे पद अधिक; ओवी १६२ नंतर दै. तु. कं. प्रतींत पुढील ओवी आली आहे :– 'मच्छें भक्षिलें तें नाक । ते मच्छ जाले निर्नासिक । शूर्पनखा तीर्थ देख । अद्यापि लोक बोलती ॥'] शंख करी अतिसुबद्ध । फें फें करीत निघे शब्द । नाकेंवीण अति विरुद्ध । धरी क्रोध सौमित्रीं ॥ १६३ ॥

जैसें म्या केलें कपट । तैसेंचि जालें सरसपाट । याचा मी भरीन घोंट । मुख अचाट पसरिलें ॥ १६४ ॥

मुख पसरी गिळावयासी । लक्ष्मण शस्त्रांतें हातवसी । घावो घालावा जंव शिसीं । तंव राक्षसी पळाली ॥ १६५ ॥

लक्ष्मण आला पंचवटी । श्रीरामासि सांगितली गोष्टी । समूळ राक्षसी ते खोटी । टाळी पिटी परस्परें ॥ १६६ ॥

धन्य [घा. इं. 'धन्य श्रीराम सूर्यवंशी'.] ज्ञान श्रीरामासी । कपटी वोळखिली राक्षसी । पत्र लिहिलें पाठीसी । तेणें म्यां तिसीं दंडिलें ॥ १६७ ॥

पत्र पडतें तिच्या हातीं । तैं ते भोंवती आम्हांभोंवती । भली श्रीरामें केली युक्ति । पृष्ठपत्रार्थीं दंडविली ॥ १६८ ॥

शूर्पनखेचें छेदिलें नाक । ते तीर्थीं मासे निर्नासिक । अद्यापि देखताती लोक । ऐसी सुटंक दंडिली ॥ १६९ ॥

तुझी आज्ञा आत्यंतिक । आज्ञेनें तिसी लाविली शीक । सवोष्ठ छेदूनि नासिक । विरूपमुख ते केली ॥ १७० ॥

अनुक्रमणिका

तिचा ने घावा निजप्राण । ऐसी तुझी आज्ञा संपूर्ण । यालागीं ते राखिली जाण । गेली पळून पद्‌मपुरा ॥ १७१ ॥

सीतेसि म्हणे रघुनंदन । सौमित्र पत्नीचें लग्न । नाकीं लाऊनि सुलग्न । आला सावधान सौमित्र ॥ १७२ ॥

रण बोहलें सोहळिया कारणें । होईल बाणाचें उटणें । अशुद्धें आंबा शिंपणें । तळीं झाडणें शस्त्रांचें ॥ १७३ ॥

येथ नाचेल रणधेंडा । वोवाळणी राक्षसमुंडा । आईण पाईण दोहीं कडा । शस्त्रें भडभडां पडतील ॥ १७४ ॥

श्रीराम बोलिला आपण । जाहलें कलहासि कारण । त्रिशिरा आणि खरदूषण । निर्दळीन रणकंदनें ॥ १७५ ॥

ऐसें बोलतांचि जाण । बाह्यांसी आलें फुराण । करावया अरिमर्दन । धनुष्य बाण [मु. 'उचलिलें'.] वंदिलें ॥ १७६ ॥

एका जनार्दना शरण । आलें श्रीरामा फुराण । निर्दळील खर दूषण । श्रोतां अवधान मज द्यावें ॥ १७७ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां शूर्पनखाविरूपकरणं नाम अष्टमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग नववा

## राक्षसैः सह युद्ध प्रसंग

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

**घेऊनि लक्ष्मणाचा दरारा । शूर्पनखा आली पद्मपुरा । निर्नासिका विरुपाकारा । रुधिरधारा लागलिया ॥ १ ॥**

**राक्षस समाजमेळीं । शूर्पनखा आतुर्बळी । ते सरकटिली समूळीं । राक्षसकुळीं गांजिली ॥ २ ॥**

**शूर्पनखा अतिदुर्धर । ते विटंबिली तो महावीर । राक्षसांसी धांकु** [पै. खेरीज इतरत्र 'थोर'.] **घोर । निशाचर** [मु. 'चळी कांपती'; मु. 'संरक्षी'.] **कांपती ॥ ३ ॥**

**शूर्पनखेचें विरूपकरण । देखोनियां खरदूषण । कोपां चढले दारुण । क्रोधें गर्जोन पूसती ॥ ४ ॥**

तां तथा पतितां दृष्ट्वा विरूपां शोणितोक्षिताम् । भगिनीं क्रोधसंतप्तो खरः पप्रच्छ राक्षसः ॥ १ ॥
बलविक्रमसंपन्ना राक्षसी कामरूपिणी । इमामवस्थां निता त्वं केनांतकसमा युधि ॥ २ ॥

**शूर्पनखा शंख करून । दुःखें पडली मूर्च्छापन्न । तिचें देखोनि विरूपकरण । खर आपण विस्मितु ॥ ५ ॥**

**सवोष्ठ नाक छेदूनि मुळीं । उघडी पाडिली दांताळी । ऐसा कोण बळिया बळी । रक्तें न्हाणिली शूर्पनखा ॥ ६ ॥**

**बळियां बळी शूर्पनखा । इचा चळकांपु इंद्रादिकां । इचा धाकु** [मु. तं. 'अंतका'.] **अंतकांतका । हे तिहींलोकां दुर्धर ॥ ७ ॥**

**ऐसी हे अतिबळिष्ठ । कामरूपें कपटें वरिष्ठ । इचें केले सरडसपाट । ऐसा उद्‌गट वीर कोण ॥ ८ ॥**

इति भ्रातृवचः श्रुत्वा कुद्धस्य तु विशेषतः । ततः शूर्पनखा वाक्यं सबाष्पमिदमब्रवीत् ॥ ३ ॥
तरुणौ रूपसंपन्नौ सुकुमारौ महाबलौ । पुंडरीकविशालाक्षौ चीरकृष्णाजिनांबरौ ॥ ४ ॥
इमामवस्थां नीतास्मि यथानाथवती तथा । तयोस्तु तच्च रुधिरं यत्पिबेयमहमाहवे ॥ ५ ॥

**भगिनीचे कैवाडें । खरबंधु पुसे वाडेकोडें । तंव ते सक्रोध क्रोधें रडें । तापसी गाढें गांजिले ॥ ९ ॥** [ओवी ९ कं. प्रतीत अशी आहे :——
'शूर्पनखा अति दुर्घट । महाबळियां माजी वरिष्ठ । यिचें कोणासी न कळे कपट । महाबळिष्ट हे असे ॥']

**ते तापस नव्हती ब्राह्मण । क्षत्री नव्हती साधारण । वैश्य शूद्र नव्हती जाण । योद्धे दारूण महावीर ॥ १० ॥**

अनुक्रमणिका

दोघेहि [घा. 'दारूण'.] तरूण राजकुमर । गौर श्याम अतिसुंदर । चीर कृष्णाजिनांबर । राजीवनेत्र राजस ॥ ११ ॥

ज्येष्ठां नांव रघुनंदन । कनिष्ठां नाम लक्ष्मण । अतिसुंदर दोघेजण । त्यां ऐसें आन असेना ॥ १२ ॥

इंद्रादिदेव [घा. इं. 'मदनमूर्त'.] मदनमुक्त । श्रीरामापुढें ते खद्योत । दानव मानव मशक तेथ । शोभा अद्भुत श्रीरामीं ॥ १३ ॥

ज्येष्ठ श्रीरामाची नारी । लावण्यरासी सीतासुंदरी । रमा न पवे तिची सरी । ती ऐसी दूसरी असेना ॥ १४ ॥
[ओवी १४ कं. प्रतीत अशी आहे :––
'ज्येष्ठ श्रीरामाची राणी । ते सीता लावण्यखानी । दुजी नाहीं त्रिभुवनी । उपमा कोणी द्यावया ॥']

होतां सीतेचें दर्शन । निवाले माझे दोन्ही नयन । देखतांचि श्रीरघुनंदन । काया वाचा मन निवालें ॥ १५ ॥

देखतां श्रीलक्ष्मण । मीं पावलें समाधान । पुत्रद्वेषें त्यासी आपण । कपटें छळण करूं गेले ॥ १६ ॥

त्यासीं न चले कपटांचे छळ । त्यासीं न चले सक्रोधबळ । सिद्धि न पवेंचि माझे सळ । तिहीं तत्काळ विटंबिलें ॥ १७ ॥

लात देऊनि उरेसीं । लक्ष्मणें [दै. 'शस्त्र लाविलें'.] छेदिले नाक कानासी । जाय सांग म्हणें बळियासी । ते मी तुजपासीं सांगों आलें ॥ १८ ॥

यापरी गांजिले तापसी । करी माझ्या कुडाव्यासी । म्हणोनि लागे पायासीं । उकसा बुकसी फुंदत ॥ १९ ॥

त्यांसीं तूं पाडिसी रणीं । त्यांचे नळीसी मी बैसोनि । घटघटा रुधिर प्राशनीं । नवस मनीं दृढ वर्ते ॥ २० ॥

ऐकोनि भगिनीचें वचन । कोपा चढले खरदूषण । निधडे राक्षस चौदा जण । अति दारूण धाडिले ॥ २१ ॥

तुम्ही पंचवटीस जाऊन । राम लक्ष्मण मारून । [कं. 'त्यांचे नळिये बैसोन'.] सीता आणावी धरून । रुधिर प्राशन शूर्पनखें ॥ २२ ॥

शूर्पनखेचें मनोगत । त्या दोघांचें प्राशावें रक्त । तें इसी द्यावें [कं. 'तेणें व्हावया तृप्त'.] यावत्तृप्त । दूत त्वरित पाठविले ॥ २३ ॥

राक्षस सत्राणें गर्जत । दोघांवरी चौदादूत । बापुडें काईसें रघुनाथ । निमिषार्द्धांत माराया ॥ २४ ॥

रूधिर प्राशावया देखा । सवें दिधली शूर्पनखा । तिणें दाविली पंचवाटिका । रघुकुळटिळका समवेत ॥ २५ ॥

कात्या त्रिशूळ तोमर । झेलिती शस्त्रांचे संभार । चौदा राक्षस दुर्धर । श्रीरामासमोर लोटले ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

एकु म्हणे श्रीरामासी । मी मारीन मुग्दरेसी । एक म्हणे लक्ष्मणासी । पट्टिशेसी मारीन ॥ २७ ॥

एक म्हणे मी दोघांसी । शस्त्रेंसहित गिळीन त्यांसी । एक म्हणे तूंचि खासी । [दे. 'तीव्र शस्त्रेंसी मारूनी'.] वाटां आम्हांसी पाहिजे ॥ २८ ॥

एक म्हणे हे मारूनि वीर । शूर्पनखा प्राशील रुधिर । मांस [तं. 'भक्षूनी'.] विभागूनि समग्र । अति अरुवार आरोगूं ॥ २९ ॥

एक म्हणें दोघांसी । धरूनि नेईन खरापासीं । तो रक्त देईल भगिनीसी । मांस त्यासी भोजन ॥ ३० ॥

ते दोघे आम्ही बहुत । विचारु कायिसा पां येथ । म्हणोन राक्षस वल्गत । आश्रमाआंत रिघाले ॥ ३१ ॥

श्रीराम सीता लक्ष्मण । आश्रमीं नित्यसावधान । चौदा राक्षस देखोन । रघुनंदन हांसिला ॥ ३२ ॥

राम म्हणे लक्ष्मण । राक्षस आले चौदाजण । एकेचि घायें घेईन प्राण । धनुष्यबाण दे वेगीं ॥ ३३ ॥

माझ्या बाणाचा महामार । तुम्हीं दोघे पाहा सादर । म्हणौनि उठिला रघुवीर । धनुषीं शर सज्जिला ॥ ३४ ॥

श्रीराम म्हणें राक्षसांसी । आम्ही गंगातीर तापसी । तुम्ही कां आलेति [मु. जो. मु. त. 'मरायासी'.] मारावयासी । कोणें तुम्हांसी धाडिले ॥ ३५ ॥

अरे तुम्ही दोघींजणी । विटंबिली खराची बहिणी । तापस म्हणौनि [मु. 'करीतां'.] येतां ग्लानि । तुम्हांसी कोणी सोडीना ॥ ३६ ॥

तापस आणि धनुष्यबाण । परस्त्रिया विटंबण । धन्य धन्य तापसपण । आपणा आपण लाजांना ॥ ३७ ॥

ऐसें बोलूनि समस्तीं । शस्त्रें सोडिलीं नेणों किती । बाप धनुर्वाडा रघुपति । हातिच्या हातीं छेदिलीं ॥ ३८ ॥

श्रीराम बाणाच्या [मु. 'कडाडी'.] झडाडी । राक्षसां वळली मुरकुंडी । डोळां पडली झांपडी । केलीं बापुडीं क्षणार्द्धें ॥ ३९ ॥

हाटकपत्री घेऊनि बाण । चतुर्दश विधीचे विंदान । अभिमंत्रूनि सोडितां जाण । घेतला प्राण चौदांचा ॥ ४० ॥

आतुर्बळी सोडिला शर । भेदूनि चौदांचे शरीर । धरणीं पाडिले महावीर । श्रीरामचंद्र निजविजयी ॥ ४१ ॥

भेदूनि चौदांचे शरीर । गगनीं परिभ्रमें शर । केउते त्रिशिरा दूषणखर । तेही सत्वर वधावया ॥ ४२ ॥

खर दूषण नाढळे घातां । बाण रिघाला श्रीरामभातां । हस्त लाघव रघुनाथा । देखोनि सीता विस्मित ॥ ४३

अनुक्रमणिका

॥

विस्मयो करिती सुरवर । विस्मयो करिती खेचर । श्रीराम रणरंगधीर । एकांग वीर श्रीराम ॥ ४४ ॥

चौदाजणांचे पाठीसी । देखिले नकटे शूर्पनखेसी । लक्ष्मण धांवला मारावयासी । [मु. 'तंव अति'.] अति आक्रोशीं पळाली ॥ ४५ ॥

हा कां पडिला माझे हटीं । मारू धांवे देखतां दिठीं । धांके पळता उठाउठी । [घा. इं. 'धांक'.] धाप पोटीं न समाये ॥ ४६ ॥

नकटे मुख घेऊनि येथ । आमचें प्राशूं आली रक्त । बाणें करितां तिचा घात । धरिला हात श्रीरामें ॥ ४७ ॥
[ओवी ४७ कं. प्रतीत अशी आहे :——
'नकटें मुख देखोनि देख । लक्ष्मणासी चढला तंवक । तें देखोनि रघुकुळटिळक । म्हणे हे निःशेष न मरावी ॥']

करूं नये स्त्रियेचा घात । हा मुख्यत्वे शास्त्रार्थ । आणिक एक आहे वृत्तांत । सावचित्त अवधारी ॥ ४८ ॥

जैसा सांडस भात्याजवळी । तापली घाली घायातळीं । तैसी शूर्पनखा कंकाळी । राक्षसकुळी [मु. 'घातकी'.] वधवील ॥ ४९ ॥

इचेनीच योगें जाण । वधिजेती रावण कुंभकर्ण । इसी न मारावें आपण । राक्षसदळण इचेनि ॥ ५० ॥

जेंवी दळणारी जात्यासी । वैरणें घाली ग्रासोग्रासीं । तेंवी शूर्पनखा आम्हापासीं । राक्षसांसी वैरील ॥ ५१ ॥

पहिलें वैरणें खरदूषण । दुसरें लंकेश प्रधान । तिसरें वैरणें कुंभकर्ण । चौथें जाण इंद्रजित ॥ ५२ ॥

पांचव्या वैरण्या जाण । सपुत्र सैन्य रावण । यासी शूर्पनखा कारण । सत्य जाण सौमित्रा ॥ ५३ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । सौमित्रें ठेविलें धनुष्यबाण । मस्तकीं वंदिले रामचरण । ज्ञान विज्ञान श्रीराम ॥ ५४ ॥

चौदा विद्यांसी अविद्या छेद । करूनि चौदाही परमानंद । श्रीरामाचा [मु. 'बाणवोध'; जो. 'बाणभेद'.] बाणवेध । परमात्मबोध प्रबोधी ॥ ५५ ॥

श्रीरामाचा निजबाण । देह छेदी हें नवलकोण । छेदूनिया [मु. प्रतीत 'जरा' हा शब्द अधिक.] जन्ममरण । चौदाहीजण सुखी केले ॥ ५६ ॥

संकल्प विकल्पेंसी मन । छेदिलें चित्त चिंता चिंतन । छेदूनियां मानाभिमान । चौदाहीजण सुखी केलें ॥ ५७ ॥ [ओवी ५७ व ५८ मुं. प्रतीत नाहीत; तु. प्रतीत ५७ क्रमांक दोनदा दिला आहे.]

छेदूनियां कर्माकर्मबंधन । छेदूनि कार्याकारण । छेदूनियां मींतूं पण । चौदाहीजण सुखी केलें ॥ ५८ ॥

अनुक्रमणिका

छेदूनियां विषयज्ञान । छेदूनियां भवभान । छेदूनियां [तं. 'अहंतागुण'.] देहबंधन । चौदाजण सुखी केले ॥ ५९ ॥

शूर्पनखेचें अभाग्यपूर्ण । नव्हेंचि रामबाणें मरण । पळाली देह लोभाभेण । शंखस्फुरण करीतचि ॥ ६० ॥

श्रीराम मोक्षांचें भरित । वैरी मारूनि करी मुक्त । नामें जडजीव उद्धरत । स्मरणें निर्मुक्त [दै. तु. 'श्वापदादि'; मुद्रितांत 'योनी' हें पद नाहीं.] श्वपचादियोनी ॥ ६१ ॥

एका जनार्दना शरण । यापरी मारिले चौदाजण । शूर्पनखा पळाली आपण । खर दूषण [दै. 'आणावया'; मु. 'वधावया'.] वधवावया ॥ ६२ ॥

तां पुनः पतितां दृष्ट्वा क्रोधाच्छूर्पनखी खरः । उवाच रोषताम्राक्षो भगिनीं पुनरागताम् ॥ ६ ॥
यदा त्विदानीं शूरास्ते राक्षमा रूधिराशनाः । त्वत्प्रियार्थं मयोत्सृष्टाः किमिदं रुद्यते पुनः ॥ ७ ॥

शंखस्फुरणें मारीत हांका । पळोनि आली शूर्पनखा । आड पडिली खरादिकां । अधिकाधिकां गांजिले ॥ ६३ ॥

खरासि आला अतिआवेश । चौदा आतुर्बळी राक्षस । रणरगडे रणकर्कश । तुज साह्यास म्यां दीधले ॥ ६४ ॥

कोपलिया चौदाजणीं । सुरनर कांपती चौदाभुवनीं । ते न येतीच माझ्यावचनीं । त्या लागूनि तूं रडसी ॥ ६५ ॥

सांगावया चौदांचे गाऱ्हाणें । पुढती रडणें आडपडणें । तूं कां रडसी मजकारणें । येरी [मु. 'सांगे'.] सांगणें वृत्तांत ॥ ६६ ॥

तुझे चौदाही राक्षस । आतुर्बळी अतिदुर्धर्ष । कात्या त्रिशूळें झेलित फरश । घेऊनि पट्टिश चालिले ॥ ६७ ॥

एक म्हणती गिळूं रामासीं । एक म्हणती [तं. व मु. 'मारूं' हें पद अधिक.] लक्ष्मणासी । एक मांसासी एक रुधिरासी । एक दोघांसीं गिळूं म्हणती ॥

एक म्हणती शूर्पनखेसीं । पाजूं दोघांच्या रुधिरासी । मग भक्षावें मांसासी । ऐसा राक्षसीं विवादु ॥ ६९ ॥

राहे साहे [तं. खेरीज इतरत्र 'धीरवीर'.] स्थिरस्थीर । घावो साहे तो परमशूर । ऐसा करीत [तं. व मु. 'गिरा' हें पद अधिक.] गजर । निशाचर लोटले ॥ ७० ॥

राक्षस देखोनियां दृष्टीं । राम उठिला जगजेठी । धनुष्य वावोनियां मुष्टीं । [सु. घा. 'बाणागुणी'.] बाणांगुष्टीं सज्जिला ॥ ७१ ॥

निर्दळावया नक्षत्रांसीं । सूर्य उगवे आकाशीं । [घा. 'तैसा' हे पद अधिक.] राम चालिला सूर्यवंशी । राक्षसांसी

अनुक्रमणिका

निवटावया ॥ ७२ ॥

आम्ही बहुत श्रीराम एक । क्षणार्द्धे मारूनि रंक । ऐसें बोलोनि एकें एक । श्रीरामा सन्मुख लोटले ॥ ७३ ॥

श्रीराम [कं. 'देखोनियां खळ'.] देखोनि सबळ । शस्त्रें सोडिलीं प्रबळ । रामें छेदिलीं तत्काळ । केले सकळ निःशस्त्री ॥ ७४ ॥

विटंक देऊनि हांक । विक्राळ पसरूनि मुख । श्रीराम गिळावया देख । अवघे सन्मुख धांविन्नले ॥ ७५ ॥

श्रीराम धनुर्धरां शिरोमणी । एक बाण लाऊनि गुणीं । चौदाही वोवियले बाणी । [कं. 'मग तत्क्षणी निमाले'.] न मगतां पाणी निमाले ॥ ७६ ॥

लक्ष्मण पडिला माझे हटीं । द्वंद्व चाळूं आली नकटी । शस्त्र घेऊनि लागला पाठीं । आले संकटीं पळोनी ॥ ७७ ॥

[मु. दै. 'बाप'.] बाणलाघवी रघुनाथ । जिणों न सका तुम्हीं समस्त । तुमचा करुनियां घात । घेईल निश्चित जनस्थाना ॥ ७८ ॥

श्रीरामाचा [सु. घा. 'बापक्रम'; दै. 'बाणाचा पराक्रम'.] बाणाक्रम । करील राक्षसांचे भस्म । तुमचे वाठिवेचा भ्रम । करील निभ्रम श्रीराम ॥ ७९ ॥

ऐसें ऐकतां वचन । खर दुर्धर कोपायमान । पाचारुनिया दूषण । रण निशाण त्राहाटिलें ॥ ८० ॥

अतिउद्भट निशाचर । सेना संख्या चौदासहस्र । रथीं बैसला जी खर । अतिसत्वर युद्धार्थी ॥ ८१ ॥

दक्षिण बाहूसि दूषण । त्रिशिरा वामबाहूसि जाण । खरा पुढे [मु. 'चौघे'.] दोघे जण । रण प्रवीण महायोद्धे ॥ ८२ ॥

चौदासहस्र निशाचरां । माजीं निधडे वीर बारा । ज्यांचा सुरासुरां दरारा । इंद्र थरथरां ज्यासी कांपे ॥ ८३ ॥

जे भ्यासुरत्वें जग दाटित । क्रोध दृष्टीं वीर आटित । लोहें मांस जे घाटित । आवाळीं चाटित रक्तपानें ॥ ८४ ॥

[दे. 'धाके'.] हांका कांपती लोकालोक । विक्राळ दाढा विकट मुख । [कं. 'जें भयानक तिन्ही लोक । तंवकें गिळू पाहती ।'] जे भयानकां भयानक । तिन्हीं लोक गिळूं पाहती ॥ ८५ ॥

ऐसे दुर्धर शत्रू दारूण । रणवेताळ रणप्रवीण । अवघ्यांपुढें बारा जण । कोण कोण ते ऐका ॥ ८६ ॥

अनुक्रमणिका

दूरगामी पृथुलवो यज्ञभोक्ता महाविषः । दुर्जयः पुरवीरघ्नो पुरुषः कालकार्मुकः ॥ ८ ॥
मेघमाली महाबाहुर्महास्यो लोहितांबरः । द्वादशैते महावीर्यास्तस्थुः प्रमुखतः खरम् ॥ ९ ॥

**पहिला दूरगामी तत्वतां । पृथुलवा आणि यज्ञभोक्ता । महाविष नामी चौथा । दुर्जय तो पांचवा ॥ ८७ ॥**

**परवीरघ्न आणि परुष । मेघमाली काळ कार्मुक । महाबाहू दहावा देख । दोघे अलौकिक महायोद्धे ॥ ८८ ॥**

**महाआस्य आणि लोहितांबर । दुःसह दुर्धर जुंझार वीर । यांचेनि बळें खर दुर्धर । सुरासुर गणीना ॥ ८९ ॥**

**यांचा भरवंसा खरासीं । हे खराचे अतिविश्वासी । यांचेनि बळें रावणासीं । खर दृष्टींसि आणीना ॥ ९० ॥**

**रामे मारिले चौदाजणांसी । त्यांच्या घ्यावया सूडासी । बाराहीजण अतिआवेशीं । युद्ध रामेंसी करूं पाहती ॥ ९१ ॥**

**नराचें अंग खराचें मुख । यालागीं खर म्हणती देख । नाक पांढरे निःशेष । तेणें दूषणें अवश्यक दूषण म्हणती ॥ ९२ ॥**

**दूषणाचे दुष्ट सांगाती । चौघेही युद्धार्थी अनिवर्ति ।** [मु. 'दूर पाहती'; तं. 'दुशांति'.] **दूरपाती** [तं. मु. 'दूराकृति'.] **दुरिताकृती । विश्वासघाती ते ऐका ॥ ९३ ॥**

महाकपालः स्थूलाक्षो प्रमाथी त्रिदशार्दनः । चत्वार एते सेनाग्रे दूषणः पृष्टतोऽन्वयुः ॥ १० ॥

**महाकपाळ स्थूलनयन । प्रमाथी आणि त्रिदशार्दन । हे दूषणाचा जीव प्राण । चौघेजण विश्वासी ॥ ९४ ॥**

**यांचेनि बळें संपूर्ण । यमासी दृष्टीं नाणी दूषण । घातपाती रणप्रवीण । ते चौघेजण चालिले ॥ ९५ ॥**

**तिघे पुत्र एक** [तं. 'एक मायेसी'.] **समयेसी । जन्मावे आपले कुसीं । एक वाण दिधलें तिघांसी । त्रिशिरा तिसीं पुत्र जाला ॥ ९६ ॥**

**एवं त्रिशिरा खर दूषण । एकत्र मिळाले तिघेंजण । श्रीरामेंसि करावया रण । रथ संपूर्ण सज्झिले ॥ ९७ ॥**

**सेनासंख्या चौदासहस्त्र । त्यांत अनिवर्ती बारावीर । रणघाती अतिदुस्तर । भार दुर्धर चालिला ॥ ९८ ॥**

**निशाण त्राहाटिलिया भेरी ।** [तं. 'डौरकी'; मु. 'चौंडकी' कं. 'डौर'.] **डौंडकी काहाळा रणमोहरी । बुरुंगांचा नादुगहिरी । केला वीरीं सिंहनाद ॥ ९९ ॥**

**हैकार थैकार जयजयकार । भाट गर्जती कैवार । खरासी आल्हाद अपार । रथ सत्वर पेलिला ॥ १०० ॥**

**सुभूमीसी समस्थळीं । घोडे अडखळले महाबळी ।** [घा. 'नेटे'.] **मेटें वळलीं भूतळीं । सारथी तळी उलंडिला ॥**

अनुक्रमणिका

१०१ ॥

त्या गजबजा माझारीं । दिवाभीत ध्वजेवरी । बैसोनि घुघ्घु करी । हाकितां [मु. 'हाकितां वरी'.] वीरीं उडेना ॥ १०२ ॥

अपशकुन आत्यंतिक । खर जाला साशंक । वचकले त्यांचें कटक । अवघे लोक गजबजिले ॥ १०३ ॥

ध्वजीच्या उलूकें झडपून तेथ । खराचें कपाळीं केलें खत । भूकंप भूस्फोट उल्कापात । अशनिघात होंसरला ॥ १०४ ॥

ऐसा जाला चमत्कार । निशाचरी हाहाकार । एकें एक चिंतातुर । जाले समग्र [तं. 'चिंताभूत'; मु. 'एकभूत'.] वेथाभूत ॥ १०५ ॥

खर होऊनि सावचित्त । सांवरूनि निजरथ । आपला पुरुषार्थ बोलत । महोत्पात मज मिथ्या ॥ १०६ ॥

> ललाटे च रजोजड्ने न च मोहान्न्यवर्तत । महोत्पातानिमान्घोरानुत्थित्तान्घोर दर्शनान् ॥ ११ ॥
> न चिंतयाम्यहं वीर्यान्बिलवानिव दुर्बलान् ॥ १२ ॥

अपशकुन देखोनि दृष्टीं । मागें सरों दो मनुष्यासाठीं । हे सर्वथा बुद्धि खोटी । आम्ही जगजेठी दृढयोद्धे ॥ १०७ ॥

नाहीं परचक्र दारुण । राजकुमर दोघेजण । यासाठीं अपशकुन । मानी कोण आम्हांमाजीं ॥ १०८ ॥

ऐसें बोलोनियां खर । रथ पेलिला सत्वर । उल्हासिले निशाचर । भार दुर्धर चालिला ॥ १०९ ॥

शूर्पनखेसी म्हणे खर । रामलक्ष्मणाचें रुधिर । तुज मी पाजीन अपार । हरिखें निर्भर ते जाली ॥ ११० ॥

द्वंद्व साधावया कैवाडें । शूर्पनखा वधू लळेवाडे । अशुद्ध प्राशावयाचें चाडें । अवघ्यां पुढें निघाली ॥ १११ ॥

देखोनियां पंचवटी । राक्षसवीर जगजेठी । शस्त्रें सज्जूनियां मुष्टीं । सक्रोध दृष्टीं चालिले ॥ ११२ ॥

श्रीरामासवें ऋषिजन । वनवासी तपोधन । राक्षसाभेण गेले पळोन । जाले सुलीन गुहेमाजीं ॥ ११३ ॥

राम म्हणे लक्ष्मणासीं । सावध राहे सीतेपासीं । मीं वधीन राक्षसांसी । बाण सपिसीं भेदूनि ॥ ११४ ॥

माझे सुटलिया कुऱ्हाडें । राक्षस पळती कवणीकडे । घायें विभांडीन [मु. 'बापुडें'.] गाढे । [कं. 'मजपुढें केंवी राहाती ।'.] रणीं रोकडे पाडीन ॥ ११५ ॥

वायु अनुकूळ आम्हांसी । प्रतिकूळ राक्षसांसी । शिवा सन्मुख भुंकती त्यांसि । जयो आम्हांसी वदताती ॥

अनुक्रमणिका

**११६ ॥**

**ऐसे बोलोनियां जाण । वेगें धनुष्या** [मु. 'वाहिला'.] **वायिला गुण । सन्मुख होऊनि आपण । सीतीं बाणसज्रिला ॥ ११७ ॥**

**विदारावया गजगण । एकला उठी पंचानन । विध्वंसावया राक्षससैन्य । रघुनंदन चालिला ॥ ११८ ॥**

**निर्दळावया खद्योतांसी । सूर्य उगवे आकाशीं । तैसा राम सूर्यवंशीं । राक्षसांसी अंतक ॥ ११९ ॥**

[तं. खेरीज इतरत्र 'खद्योत'. मु. 'सूर्योदयीं खद्योत मावळती ।'.] **रात्र मावळतांचि क्षिती । सचंद्र नक्षत्रें अस्तां जाती । सैन्य निर्दाळिता रघुपति । रणीं** [कं. 'मावळती'; दै. 'विंधितु'.] **निमती खरादिक ॥ १२० ॥**

**सीता पाहों पाहे श्रीरामजुंझ । तिचें लक्ष्मणासी चोज । चढविली श्रीरामसेज । रणसमाज देखावया ॥ १२१ ॥**

**कवित्व मुद्रा अनारिसी । सीता सौमित्र धाडी गुंफेसी । राम न भिये राक्षसांसी । तो कां तिसीं लपवील ॥ १२२ ॥**

**श्रीराम बाण वोढितां वोढी । राक्षससेना ते हडबडी । एकामागें एकें दडी । देऊनि बापुडीं राहिली ॥ १२३ ॥**

**श्रीराम देखतांचि दृष्टीं । थरकांप सुटला पोटीं । मूत्रप्रवाहे तळवटीं । शस्त्रें मुष्टीं गळताती ॥ १२४ ॥**

**व्याघ्र देखोनियां डोळां । भेणें अजा होती** [त. 'विक्रळा'.] **गोळा । तैसें जालें सैन्यां सकळां ।** [कं. खेरीज इतरत्र, 'राम मरिगळा'.] **श्रीरामाला देखोनि ॥ १२५ ॥**

> सैन्यं तु स्थितमालोक्य निश्चलं पर्वतोपमम् । पार्श्वस्थं दूषणं क्रुद्धः खरो वचनमब्रवीत् ॥ १३ ॥
> नचात्रास्ति नदीतीरं स्थितमेकपदे बलम् । किमर्थं ज्ञायतां शीघ्रं बत दूषण गम्यताम् ॥ १४ ॥
> खरस्य वचनादेव सैन्यमध्याद्विनिसृतः । स ददर्श ततो राममग्रतो विततायुधम् ॥ १५ ॥

**राक्षस सेना दुर्धरबळ । राहिले देखोनि निश्चळ । खरासी कोप आला प्रबळ । बोले तत्काळ दूषणेसी ॥ १२६ ॥** [ओवी १२६ दै. प्रतीत अशी आहे :——
'राक्षस सेना दुर्धर बळ । खरासी कोप आला प्रबळ । नेत्रीं निघती अग्निज्वाळ । बोले तात्काळ दूषणासी ॥']

**आमचा सैन्य संभार । निश्चळ दिसे पर्वताकार । पुढां न दिसतां दुस्तर । सैन्य एकत्र कां जालें ॥ १२७ ॥**

**सावज देखोनियां** [मु. 'दृष्टीं'.] **दुष्ट । जेंवी अजा होती एकवाट । तेंवी थोकलें सैन्य पष्ट । पुढें कां वाट फुटेना ॥ १२८ ॥**

[मु. 'ऐसे खरवचन ऐकोनि स्पष्ट ।'.] **खरवचनें अति उद्धट । दूषण चालिला घडघडाट । त्याच्या रथासी न फुटे वाट । सैन्य सकट कोंडिलें ॥ १२९ ॥**

अनुक्रमणिका

रथें वीर [घा. तं. 'गर्जती'.] रगडती पूर्ण । पुढें न चलती गेलिया प्राण । सेनामुखीं येतां दूषण । रामदर्शन देखिले ॥ १३० ॥

मुकुट कुंडलें [मु. कं. 'रत्नमेखळा'.] मेखळा । टिळकु रेखिला पिंवळा । आजानुबाहु घनसांवळा । कमळमाळा शोभती ॥ १३१ ॥

तडित्प्राय कांस गोमटी । आंगीं चंदनाची उटी । धनुष्यबाणें सज्जूनि मुष्टी । उभा जगजेठी रणरंगीं ॥ १३२ ॥

पाउलें आरक्त सुकुमार । वांकी आंदुवांचा गजर । नादें कांपती सुरासुर । त्यासमोर कोण राहे ॥ १३३ ॥

देखतां चळी कांपे दूषण । सुटलियां श्रीरामाचा बाण । अवश्य घेईल माझा प्राण । आला पळोन खरापासीं ॥ १३४ ॥

सेनामुखीं रघुनाथ । जैसा कोपला कृतांत । सैन्य चळचळां कांपत । त्यासी पुरुषार्थ चालेना ॥ १३५ ॥

प्रळयाग्नीच्या जैशा शिखा । तैसें त्याचे बाण देखा । दृष्टीनें जाळू पाहे कटका । रामनेटका जुंझार ॥ १३६ ॥
[ओवी १३६ कं. प्रतीत अशी आहे :——
'प्रळयाग्नीच्या जैशा शिखा । तैसे बाण लखलखीत देखा । दृष्टीनें जाळूं धांवे अर्का । श्रीराम नेटका झुंजार ॥']

दृष्टींने देखतांचि जाण । जीवांसि जीवें मारी संपूर्ण । त्या समोर राहे कोण । अरिमर्दन श्रीराम ॥ १३७ ॥

श्रीराम देखतांचि जाण । आपभयें पळेप्राण । मग [कं. सु. तं. घा. इं. 'केउती'.] कें युद्धा आंगवण । रणगर्जन श्रीराम ॥ १३८ ॥

ऐकोनि दूषणाची मात । पाहावया रघुनाथ । खरें पेलिला रथ । अतिगर्वित युद्धार्थी ॥ १३९ ॥

एका जनार्दना शरण । रामराक्षसां घोर रण । राम करील राक्षसकदन । श्रोतां अवधान मज द्यावें ॥ १४० ॥

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां राक्षसैः सहयुद्धप्रसंगो नाम नवमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग दहावा

## दूषण वध

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

युद्धार्थी चालिला [तं. खेरीज इतरत्र ‘खर’.] रघुवीर । देखोनि राक्षसांचा संभार । [तं. खेरीज इतरत्र ‘अवघे खवळले’.] खर खवळला निशाचर । शस्त्रसंभार सूटले ॥ १ ॥

ततस्ते क्रूरकर्माणः क्रुद्धा सर्वे निशाचराः । रात्रं नानाविधैः शत्रैरभ्यवर्षन्त दुर्जयम् ॥ १ ॥

श्रीराम रणरंगधीर । क्रूरकर्में निशाचर । मिळोनिया [मु. ‘मिळोनि समग्र सैन्य संभार’.] सैन्यसमग्र । शस्त्रे अपार वर्षले ॥ २ ॥

गदा मुग्दर तोमर त्रिशूळ । फरश पट्टीश महाशूळ । कात्या करकांडीं परिघ मुसळ । लहुडीचे स्थूल महाघात ॥ ३ ॥

खर्गें हाणती खणखणा । बाण सुटती सणसणा । वोडणें वाजती दणदणा । लागली निशाणा एक घाई ॥ ४ ॥

राम एकाकी एकला । गेला तुटला निवटला । शस्त्र संपातीं आटला । म्हणती निमाला निःशेष ॥ ५ ॥

एक म्हणती खंडविखंड । एक म्हणती नवखंड । एक म्हणती शतखंड । शस्त्रीं उदंड दंडिला ॥ ६ ॥

महावीरांचा घडघडाट । [पै. खेरीज इतरत्र ‘आणि’.] अगणित शस्त्रांचा कडकडाट । नाहीं पळावया वाट । जाहला सपाट श्रीराम ॥ ७ ॥

रुधिर प्राशनाचे प्रीतीं । शूर्पनखा येथ आली होती । तिच्या तोंडीं पडली माती । अशुद्ध क्षितीं आटलें ॥ ८ ॥

राम निमाला निःशेष । वृथा घाय हाणिती राक्षस । रणकाविरें लागलें यास । ऐसें बहुवस जल्पती ॥ ९ ॥

जेवीं पर्जन्याच्या धारा । झांकोळिती गिरिवरा । तेवीं झांकोळिलें रामचंद्रा । शस्त्रसंभारीं राक्षसीं ॥ १० ॥

[कं. ‘श्रीरामाची गती अमोघ; सु. श्रीरामपर्वत.] राम चित्पर्वत अमोघ । राक्षस मंडळी महामेघ । शस्त्रधारां झांकोळिले आंग । लौकिकीं सांग दिसेना ॥ ११ ॥

राम चिदादित्य तेज गाढें । राक्षससेना महामेहुडे । झांकोळिला चहूंकडे । ते यश [सु. इं. ‘पुढे’.] मूढ मिरविती ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

जेवीं हृदयीं आत्म गुप्त । कां अभ्रामाजीं भास्वत । तेवीं शस्त्रामाजीं रघुनाथ । सावचित्त धनुष्येसीं ॥ १३ ॥

झांकोळलिया अभ्रें घनु । जेवीं तोडी प्रभंजनु । तेवीं राक्षसशस्त्रें छेदूनु । राम [मु. 'प्रगट कळा'; सु. तं. 'चिद्धन'.] चिद्भानु प्रगटला ॥ १४ ॥

देखोनि राक्षसांचें बळ । रामें सोडिलें शरजाळ । त्यांचीं शस्त्रें छेदूनि सकळ । वीर प्रबळ खोंचले ॥ १५ ॥

एक बाण वोढितां वोढी । बाण सुटती लक्षकोडी । शत्रुशस्त्रें छेदूनी गाढीं । वीर मुरकुंडी पाडिल्या ॥ १६ ॥

उरीं शिरीं दोन्हीं करीं । बाण भेदले भुजांवरी । सपिसीं बुडाले शरीरीं । वीर महामारी श्रीराम ॥ १७ ॥

[सु. घा. इं. तु. अं. 'वल्गती'.] बोलती गेला मेला निमाला । तो राम दादुल्यांचा दादुला । वीरां निवटितु उठला । अंतु पुरला राक्षसांसीं ॥ १८ ॥

करूं जातां [घा. इं. 'राक्षसघात'.] शस्त्रघातु । सशस्त्र छेदूनि सांडी हातु । वीरीं मिरविता पुरुषार्थु । करी निःपातु बाणाग्रें ॥ १९ ॥

मागें वीर सरों जातां । बाण वाजती त्यांचे माथां । सन्मुख होतां रघुनाथा । जीव घाता करितुसे ॥ २० ॥

राहे साहे वीर गर्जत । त्यांची जिव्हा छेदी सदांत । बाणीं मांडिला आकांत । वीर [मु. कं. 'विख्यात'; तु. तं. 'घात'.] विघात श्रीराम ॥ २१ ॥

कंकपत्र बहिर्पत्र । हंसपत्र सुवर्णपत्र । बाणीं छेदिले वीर विचित्र । रणमयूर नाचवी ॥ २२ ॥

[मु. कं. 'भोवता'.] भंवत बाणांचा पैं वळसा । सैन्य [मु. 'पाडिले'; कं. 'धारवसा'; तं. सैन्य तोडी ठसठसा.] पडिलें धारसां । महावीर पावले त्रासा । उरीं राक्षसां उरो नेदी ॥ २३ ॥

श्रीरामाचा निजबाण । राक्षस रुधिरीं करूनि स्नान । देतसे मोक्षाचें दान । पापी पावन त्याचेंनि ॥ २४ ॥

राम रणीं रणरंगधीर । राक्षस सैन्या केला मार । रणीं उठिला हाहाकार । देखोनि खर कोपला ॥ २५ ॥

> तं दृष्ट्वा सगुणं चापमुद्यम्य खरनिःस्वनम् । रामस्याभिमुखं सूतं चोद्यतामित्यचोदयत् ॥ २ ॥
> स खरस्याज्ञया सूतस्तुरगान्समचोदयत् । यत्र रामो महाबाहुरेको धुन्वन्धुनुः स्थितः ॥ ३ ॥

देखोनि श्रीराम पुरुषार्थ । खर सारथ्यातें म्हणत । वेगीं पेली पां माझा रथ । जेथ रघुनाथ रणरंगीं ॥ २६ ॥

कोपें [घा. इं. 'कोप चढला'; तं. 'कोपा चढला'; सु. 'कोपे चालिला चवताळून'.] चालिला चतुर्गुण । वेगीं धनुष्यां [मु. 'वाहिला'.] वायिला गुण । आजि रामेंसि करीन रण । आंगवण पाहा माझी ॥ २७ ॥

अनुक्रमणिका

देखोनि धुरेचा कडकडाट । सारथियें वारुवां दिधला साट । रथ चालिला घडघडाट । पुढें दुर्धर श्रीराम ॥ २८ ॥

आजानुबाहू धनुधारी । वीरां करित महामारी । खर देखोनि रहंवरीं । टणत्कारी धनुष्यातें ॥ २९ ॥

रामधनुष्याचा टणत्कार । दुमदुमिलें गिरिकंदर । नादें कोंदले अंबर । निशाचर भयभीत ॥ ३० ॥

एक ते नादें जालीं वेडीं । एक ते केवळ बापुडीं । एकांच्या वळल्या मुरकुंडी । नादें [पै. 'परपाडी पाडिल्या'; मु. 'पाडापाडी मांडिली'; 'तं झांपड पाडिली'.] पटपटी पाडिलीं ॥ ३१ ॥

ऐसा देखोनि रघुवीर । खरासि वोढवलें दुस्तर । त्याचे कैवारी अति दुर्धर । बाराही वीर धाविन्नले ॥ ३२ ॥

नावानिगे राक्षसां आंत । ज्यांसी नित्य कांपे कृतांत । तिहीं पडखळिला रघुनाथ । स्वामिकार्यार्थ दृढ योद्धे ॥ ३३ ॥

वोढण खांडे घेउनि जाण । उग्रनामा आला आपण । स्वामिकाजीं वेचावयां प्राण । रणप्रवीण बाराही ॥ ३४ ॥

पृथुलव यज्ञभोक्ता । महाविष दुर्जय चौथा । धनुष्यबाण सज्जूनि हातां । युद्धीं रघुनाथा सन्मुख ॥ ३५ ॥
परवीरघ्न [घा. 'पुरुष बळी'.] परूषबळी । कारकार्मुक मेघमाळी । चौघे वीर आतुर्बळी । शूळ त्रिशूळीं महायोद्धे ॥ ३६ ॥ [ही ओवी तं. प्रतीत नाही.]

महाबाहो लोहितांबर । महाआस्य अतिदुर्धर । गदामुग्दर घेऊनी तोमर । रणीं रघुवीर पडखळिला ॥ ३७ ॥

गदा मुग्दर फरश पट्टिश । बाण मोकलिले बहुवस । शस्त्रें सोडिलीं असमसास । राम राजस लक्षूनि ॥ ३८ ॥

बाराजण कपटराशी । म्हणोनि आवडती खरासी । कैसें कपट तयापासीं । सावकासीं अवधारा ॥ ३९ ॥

गुप्तघाती आकाशपाती । एक तो अतर्क्य निघाती । एक मारकु निमिषस्थिती । प्राणवृत्ती पांचवा ॥ ४० ॥

संचरोनि नेत्रांतरीं । शूळें जिव्हार विदारी । एक रिघोनि कर्ण कुहरीं । वर्मी मारी शस्त्रांतें ॥ ४१ ॥

एक तो खर्ग हातवसीं । अंतरीं संचरे मनोवेगेंसी । शस्त्रें हाणोनि हृदयदेशीं । मारी वीरांसि अतिदुष्ट ॥ ४२ ॥

चौघे उरले कपटराशी । वीर वेढूनियां चौपासीं । गुप्तशस्त्रीं कासाविसी । करूनि वीरांसि मारिती ॥ ४३ ॥

ऐसे वीर बारा जण । कपट युद्धें रणप्रवीण । राम मारावया जाण । अवघे जण चालिले ॥ ४४ ॥

अनुक्रमणिका

त्यांचा धरूनि आधार । चालिला राक्षसांचा भार । वीर मारीं गर्जती घोर । रामा समोर लोटले ॥ ४५ ॥

राम धनुर्वाडा विचक्षण । मारावया बारा जण । दमनीं [कं. 'महाशक्ति'; मु. 'निजशक्ति'.] चिच्छक्ति दारुण । अभिमंत्रून सोडिली ॥ ४६ ॥

कपटी निर्दळावया निश्चितीं । अनिवार शस्त्रदमनीं चिच्छक्ति । रामें सोडिता [मु. 'अलक्ष'.] अक्षर गति । शस्त्रें ख्याति लाविली ॥

दमनीं चिच्छक्ति देखोनि । [घा. 'कपटिया पडली'.] कपटी पळाली मोहिनी । जाहालीं बारां भंगाणी । प्रतापरणीं चालेना ॥ ४८ ॥

बाण भरले नाकीं वदनीं । बाण भरले कानीं नयनीं । बाण भरले हृदय भुवनीं । बाणीं खिळूनी सांडिले ॥ ४९ ॥

श्रीरामाच्या बाणापुढें । केउतें पळतील बापुडे । [घा. इं. 'वाट न दिसे'; दे. 'न सांवरे'; सु. 'वाव न दिसे'; तं. 'न सावरेचि'.] न सखे मागें पुढें । जीवीं कुऱ्हाडे भेदिले ॥ ५० ॥

वोडणें खिळलीं उरेसीं । [कं. खेरीज इतरत्र 'कटाऱ्यासी'.] कंठ छेदी कुठारेसीं । शिरें छेदिलीं मुकुटेसीं । हात शस्त्रेंसी छेदिले ॥ ५१ ॥

छेदिले स्थूळ लिंग कारण । रामें छेदिलें महाकारण । जीवें मारूनि संपूर्ण । बाराही जण निर्दळिले ॥ ५२ ॥ [ओवी ५२ तं. प्रतीत नाही.]

कपटें जिणतां रामासी । कपटी मारिले कपटेंसी । राम प्रतापाची राशी । राक्षसांसी नाटोपे ॥ ५३ ॥

करूनि बारांचा निःपात । मग मिसळला सैन्या आंत । भंवता बाणांचा आवर्त । आला अंत राक्षसां ॥ ५४ ॥

रणीं खवळला रघुनाथ । अनिवार बाण संपात । जेथींचा तेथ राक्षसघात । रण आवर्त वीरांसीं ॥ ५५ ॥

एके खोंचिली सन्मुखा घायीं । एके पाडिलें ठायींच्या ठायीं । एके छेदूनि सपायीं । पाडिल्या भूयीं वीरश्रेणी ॥ ५६ ॥

शिर चेंडूफळी करणें । खळतु रुधिराचें शिंपणें । रणवसंत माजवणें । [मु. अं. 'किंशुक फुलणें; दे. 'केले सुफळ'.] केश फुलण बाणांचें ॥ ५७ ॥

वीर कुंथती अपार । तेंचि कोकिळा पंचमस्वर । रामें केला महामार । लहानथोर हुंबती ॥ ५८ ॥

न साहवती रामबाण । राक्षससेना पलायमान । देखोनि धांवला दूषण । आश्वासून सैन्यातें ॥ ५९ ॥

अनुक्रमणिका

तान्सवन्धिनुरादाय समाश्वास्य च दूषणः । अभ्यधावत्सुसंक्रुद्धः क्रुद्धं क्रुद्ध इवांतकः ॥ ४ ॥
निवृत्तास्तु पुनः सर्वे दूषणाश्रयनिर्भयाः । राममेवाभ्यधांवतसालताल शिलायुधः ॥ ५ ॥

**दूषण म्हणे राक्षस दळा । रण देखोनि केवीं पळा । आश्वासूनिया सकळां । सन्नद्ध केला दळभारू ॥ ६० ॥** [ओवी क्रमांक ६० तं. प्रतीत नाही.]

**दूषण** [दै. त. 'आश्वासी'; मु. कं. 'अवलोकी'.] **आलोची राक्षसांसी । तुम्ही राहावें माझे पाठीसी । मी वधीन श्रीरामासी । अति आवेशीं धांविन्नला ॥ ६१ ॥**

**धरूनि दूषणाचें बळ । परतलें राक्षस दळ ।** [पै. 'म्यां'.] **श्रीरामें छेदिलीं शस्त्रें सकळ । शाळ ताळ शिळा योधी ॥ ६२ ॥**

**रामेंसि युद्ध करी दूषण । राक्षस वर्षती पाषाण । शाळ ताळ वृक्ष जाण । अति सत्राण हाणती ॥ ६३ ॥**

**रामरणरंग प्रवीण । लघुलाघवें वर्षोनि बाण । तोडूनि शाळ ताळ पाषाण । बाणीं दूषण कासाविस ॥ ६४ ॥**

**एक निवारी जंव बाण । तंव लक्षधा येती आन । धनुष्य सांडिलें तोडून । भाते फोडून सांडिले ॥ ६५ ॥**

**बाणामागें येतीं बाण । घेती राक्षसांचे प्राण । मुर्छित पाडिला दूषण । रणकंदन वीरांसी ॥ ६६ ॥**

**केव्हां भात्यांचा बाण काढी । केव्हां जोडी केव्हां सोडी । अलक्ष लक्षाची परवडी । रण करवडी पाडिल्या ॥ ६७ ॥**

**वीर खोंचले वितंड । मिथ्या दूषणाचें बळबंड । एकही साहों न सके कांड । काळें तोंड दुषणाचें ॥ ६८ ॥**

[दै. 'पाहोनि रामबाण निर्वाण'.] **ऐकोनि वीराचें वचन । दूषण जाला लज्ञायमान । सामर्थ्यें मूर्छा सावरून । रथारोहण तेणें केलें ॥ ६९ ॥**

राक्षसांस्तान्रणे भग्नान्दृष्ट्वा रामेण धीमता । रथस्थो दूषणो रामं शरवर्षैरवाकिरत् ॥ ६ ॥

**राक्षससेना देखोनि भग्न । दूषण जाला** [तं. 'कंपायमान'.] **कोपायमान । रागें रथावरी** [मु. प्रतीत 'जाणं' हे पद अधिक.] **बैसोन । वर्षे बाण अनिवार ॥ ७० ॥**

**शतसहस्त्र लक्ष कोडी । बाणामागें बाण सोडी । राम निमिषार्धें ते तोडी । धनुष्य** [मु. 'कोडी'.] **पाडी छेदूनि ॥ ७१ ॥**

**धनुष्य छेदिलें संपूर्ण । क्रोधें** [मु. 'शक्ति गदा पडताळोन'.] **रुद्र जाला दूषण । सवेंचि रामें दहा बाण । अति दारुण सोडिले ॥ ७२ ॥**

**चारी वारू चहूं बाणी । विंधोनि पाडिलें धरणी ।** [मु. 'तोडोनी'; तं. 'कवच कुंडलें किंकिणी । तीनीं तिन्हीं छेदिलें'.] **त्रिवेषु**

अनुक्रमणिका

सांटा चाकें दोनीं । तिनीं ती बाणीं छेदिलीं ॥ ७३ ॥

एके ध्वजु पाडी क्षितीं । एकें रथु एकें सारथी । रामें रणीं लाविली ख्याति । केला विरथी दूषण ॥ ७४ ॥

छेदूनियां रथसारथी । रणीं दूषण केला पदाती । कोपें गदा घेऊनि हातीं । श्रीरामाप्रति धांविन्नला ॥ ७५ ॥

[मु. 'जाणोनि राक्षसांच्या अतिमदा'.] जिणोनि राक्षसां अतिमंदा । मिरविसी यशाच्या आनंदा । माझी साहे पाहें गदा । तरी मी योद्धा तुजमानी ॥ ७६ ॥

दूषणेंसि करितां रण । रणीं रामाचा घेईन प्राण । [तु. घा. 'झाडीन'; सु. तं. इं. 'सांडवीन'.] झोडीन वाठिवेचा अभिमान । गदा घेऊनि चालला ॥ ७७ ॥

राम म्हणे नांव दूषण । सांगतां न लजसी आपण । दूषण खरासी भूषण । निंद्य वदन दोघांचें ॥ ७८ ॥

धर्में दूषण कर्में दूषण । नामें दूषण कामें दूषण । दूषणासी बळ दूषण । आंगवण तुज कैंची ॥ ७९ ॥

दूषण म्हणे जल्पसी किती । गदा घेऊनियां हातीं । पतंग धांवे दीपाप्रति । तैशा गती धांविन्नला ॥ ८० ॥

गदा हाणतांचि [मु, 'दारूण'.] जाण । विंधोनि सुवर्णपत्री बाण । रामें केली शतचूर्ण । रागें दूषण दांत खाये ॥ ८१ ॥

दांत खाऊनि करकरा । शूळ घेवोनि धांवे सामोरा । घायें मारीन रघुवीरा । क्रोधें थराथरां कांपतु ॥ ८२ ॥

बाण सोडूनि तिधारा । शूळ ऊडविला अंबरा । करुनियां शकलें बारा । राम निशाचरावरी पाडी ॥ ८३ ॥

रामें सर्वशस्त्रें [कं. 'छेदिली सवेग'.] केली मोघ । देखोनि दूषणा आला राग । वज्रप्राय घेतला परिघ । अतिदीर्घ रणमारी ॥ ८४ ॥

वीरभद्राचें वरद पूर्ण । परिघ सोडिल्या हरी प्राण । त्यासीं न चले निवारण । [कं. 'हे निर्वाण जाण शस्त्रांचें'.] तें निर्वाणशस्त्र पैं त्याचें ॥ ८५ ॥

अष्टौ घंटा घवघवीत । वीररक्तें अति आरक्त । दूषण धांवे परिघहस्त । श्रीरघुनाथ वधावया ॥ ८६ ॥

परिघ देखोनि अनिवार । गगनीं देवा हाहाकार । सुरनरां विचार थोर । केवीं रघुवीर वांचेल ॥ ८७ ॥

राम धनुर्वाडा निजगडी । दूषण परिघ [पै. अं. 'सोडी सोडी'.] जंव सोडी । तंव परिघेंसी बाहु खुडी । बाण निखडी विंधोनि ॥ ८८ ॥

सपरिघ बाहु खुडून । तोचि परतोनियां बाण । हृदयीं भेदूनि संपूर्ण । रणी दूषण पाडिला ॥ ८९ ॥

अनुक्रमणिका

दूषण पडतां भूमिगत । परिघें वरिला रघुनाथ । येऊनि रिघाला भात्यांत । रणीं प्रमाथ वधावया ॥ ९० ॥

वीरभद्र शस्त्रदेवता । तोही प्रसन्न रघुनाथा । अमोघ परिघ आला हातां । रणीं प्रमाथ वधावया ॥ ९१ ॥

दूषण पाडितांचि रणी । [तं. खेरीज इतरत्र ‘हाहाकार’.] जयजयकार गर्जे गगनीं । धांकें कांपती वीरश्रेणी । श्रीराम रणीं रणरुद्र ॥ ९२ ॥

रणीं पडतां दूषण । त्याचे कैवारी तिघेजण । श्रीरामेंसी करावया रण । अतिदारुण चालिले ॥ ९३ ॥

महाकपाळ आणि स्थूळाक्ष । तिसरा प्रमाथी राक्षस । युद्धीं हांकीत श्रीरघुनाथास । अतिकर्कश चालिले ॥ ९४ ॥ [ओवी ९४ व ९५ दै. प्रतीत नाहीत.]

राक्षसामाजीं अतिदुर्धर । शूळ पट्टिश फरश थोर । तिघा हांती हातियेर । रामासमोर लोटिले ॥ ९५ ॥ [ओवी ९४ व ९५ दै. प्रतीत नाहीत.]

आमचा स्वामी पाडिला ठायीं । तुजही पाडून शस्त्रघायीं । शस्त्रें सोडिलीं लवलाही । [मु. ‘त्रिपुटी’.] तिकुटी पाही तिघांची ॥ ९६ ॥

एकु तो चालिला सन्मुख । एकु तो पाठीसि हाणे विमुख । एकु आकाशीं पैं देख । शस्त्रें अनेक वर्षतु ॥ ९७ ॥

राम पाठिमोरा देखणा । हें विंदान न कळे कोण्हा । विंधोनिया [घा. इं. ‘बिकट’.] विटंक बाणा । आणिला रणा प्रमाथी ॥ ९८ ॥

हाती घेवुनिया शूळ । सन्मुख आला महाकपाळ । शूळ छेदोनियां तत्काळ । कंठनाळ निवटिले ॥ ९९ ॥

गगनीं गर्जता स्थूळाक्ष । त्याचे बाणीं भेदूनि अक्ष । तळीं पाडिला देख । घायें निःशेष मारिला ॥ १०० ॥

वक्री शनी भौमकेतु । सूर्य उदयीं होती अस्तु । तैसा राक्षसांसी अंतु । श्रीरघुनाथु रणरंगीं ॥ १०१ ॥

गृहस्थ अतिथीस दे सन्मान । तैसेंचि श्रीरामें आपण । तिघां देऊनि शरासन । तिघे जण सुखी केले ॥ १०२ ॥

सुवर्णपत्री सोडूनि शर । प्रमाथी मथन केलें थोर । बाणीं त्रासिलें महावीर । निशाचर पळताती ॥ १०३ ॥

एकें बाणें शतवीर । पांचीं बाणीं मारी सहस्र । दाहीं बाणीं दहासहस्र । घोरांदर राक्षसां ॥ १०४ ॥

सकुंडलीं छेदी शिर । सायुध [तं. ‘सगदा’.] सांगद तोडिले कर । कवचेसि भेदी शिर । पाडिले वीर [पै. ‘साटोपें’; घा. ‘ब्रीदाचें’.] मुगुटांचे ॥ १०५ ॥

अनुक्रमणिका

**बाबर झोटीचे अपार । बाणीं पाडिले महावीर । वाहती रुधिराचे पूर । श्रीरामचंद्र क्षोभला ॥ १०६ ॥**

**श्रीराम बाणांचां कडाडीं । राक्षसां** [सु. घा. 'पळती भयें बापुडी'; कं. 'भोय होय'.] **पळतां भोय थोडी । अति दीन** [मु. 'होवोनि वेडीं'; दै. 'बाण धाडी'.] **जाली बापुडीं । बांण झडाडी चरफडिती ॥**

चतुर्दशसहस्राणि रक्षसां भीमकर्मणाम् । हतान्येकेन रामेण मानुषेण पदातिना ॥ ७ ॥

**रथेवीण पायीं रघुवीर । चौदासहस्र निशाचर । रणीं मारिले अति दुर्धर । ज्यांसी सुरनर कांपती ॥ १०८ ॥**

**राक्षसांमाजीं बळी दूषण । नित्य ज्यासी भीतुसे रावण । परिघ अनिवार्य दारूण । रामें आपण निर्दाळिला ॥ १०९ ॥**

**रणीं निर्दळिले निशाचर । दूषण मारिला महावीर । राम धनुर्वाडा दुर्धर । कोण समोर राहेल ॥ ११० ॥**

**राक्षसां जाला थोर मार । कोपें चालिला पैं खर । त्रिशिरा कोपला दुर्धर । तेणें रघुवीर पडखळिला ॥ १११ ॥** [ही ओवी मु. प्रतीत नाही.]

**करूनि राक्षसांच्या घातां । केउता जासील आतां । राहे साहे रघुनाथा । शस्त्रसंपाता पेटला ॥ ११२ ॥**

**निर्दळूनि निशाचरा । रणीं पाडूनि मुख्यधुरा । गर्व धरिसी रघुवीरा । तो मी त्रिशिरा झाडीन ॥ ११३ ॥**

**राम त्रिशिऱ्या जाली भेटी । दोघे दाहक क्रोधदृष्टी । दोघीं धनुष्यें वायिलीं मुष्टीं । दोघे हटी महावीर ॥ ११४ ॥**

**एका जनार्दना शरण । त्रिशिऱ्याचें युद्ध दारूण । राम रणरंग अतिपावन ।** [सु. 'मोक्षपावन'.] **मोक्षसाधन साधकां ॥ ११५ ॥**

**राम कथेचें अक्षर । क्षराक्षरातीत पर । मुक्त करावया निशाचर । कृपेनें दुर्धर कोपला राम ॥ ११६ ॥**

**रामकथा परमतीर्थ । श्रोते वक्ते नित्यमुक्त । एकाजनार्दनीं निर्मुक्त । कथामृत श्रीराम ॥ ११७ ॥** [कं. प्रतीत शेवटी 'गजाननश्रीरामेण चरितं पठितं तदा । बाणाष्टाष्ट भूशाके फाल्गुने कृष्ण सप्तके । कंदकूर्तिपुरे गोदावंजरा संगमांतिके ॥' असा पठन काल निर्देशिला आहे. (पारायण काल शके १८८५).]

**इति श्रीभावार्थरामायणे एकाकारटीकायां दूषणवधो नाम दशमप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग अकरावा

## त्रिशिरा दूषण खर वध

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

रामें मारिलिया सैन्य धुरा । दुर्धर कोपु आला खरां । त्यासि पुसोनि त्रिशिरा । [तं. 'श्रीरामचंद्रा पाचारिले'.] श्रीरामावरी पैं आला ॥ १ ॥

खर म्हणे त्रिशिऱ्यासी । रणीं मर्दिले दूषणासी । म्हणौनि भेवों नको रामासी । तुझें पाठीसि मी आहें ॥ २ ॥

मनुष्य खाजें राक्षसांसी । त्यांचें भय काय आम्हांसी । कांटे देखोनि फणसासी । खाणारासी भय नाहीं ॥ ३ ॥

चिरूनि फणसाचे कांटे । काढूनि अमृताचें सांटे । मग सेविती [मु. 'घटघटे'.] गटगटें । युद्ध संकटें तेंवि रामा ॥ ४ ॥

श्रीरामबाण कटकेसी । अति दुर्धर राक्षसांसी । तो गोड भक्षितां आम्हांसी । रणीं रामासी निर्दळी ॥ ५ ॥

ऐकोनि खराचें वचन । दुसरा खरू भुंके जाण । तैसा त्रिशिरा आपण । करी गर्जना तिहीं मुखीं ॥ ६ ॥

वेगीं बैसोनिया रथा । राहे साहे म्हणे रघुनाथा । धनुष्य [तु. खेरीज इतरत्र 'मर्दूनिया'.] घेवोनिया हातां । होय वर्षता बाण बहू ॥ ७ ॥

तत : प्रहृष्टस्त्रिशिराः चापमुद्यम्य वीर्यवान् । गच्छ युद्धेयेत्यनुज्ञातो राघवाभिमुखो ययौ ॥ १ ॥

खरासि म्हणे पैं त्रिशिरा । कोण पाड रणीं रघुवीरा । बाणीं खिळूनि करीन पुरा । शस्त्र [घा. ई. 'संभारा'.] संहारा तूं पाहे ॥ ८ ॥

त्रिशिरा म्हणे रघुनाथा । वधूनि राक्षसां बहुतां । पळो न शकसी मागुता । तुज मी आतां वधीन ॥ ९ ॥

लहान मत्स्या मत्स्य आकळी । तेवीं राक्षसा केली त्वां होळी । त्या तुज मी आतां सगळें गिळी । [कं. 'होय बळी त्रिशिरा'; घा. इं. 'रामा तुज मी गिळू आलो'; तं. 'बाणजाळी वर्षूनी'.] रामा तिमिंगिल मी आलों ॥ १० ॥ [ओवी १० दे. प्रतीत नाही.]

श्रीराम म्हणे त्रिशिऱ्याप्रती । खराश्वयोगें जन्मप्राप्ती । तो तूं खराचा सांगाती । [कं. 'खेचर'.] वेसर उत्पत्ति भारवाही ॥ ११ ॥

तूं भारवाही वेसर खरा । वाहसी तिशिरांच्या भारा । तिहीं मुखीं जल्पसी सैरा । नाहीं विचारा एकमुख ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

त्रिजात त्रिशिरा तूं देख । त्रिमुखा युद्धीं नव्हे एकमुख । पळोनि जासी खराभिमुख । [तं. 'पळोनि'.] वल्गोनि भुंक भुंकसी ॥ १३ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । त्रिशिरा वर्षे अमितबाण । आच्छादूनि रघुनंदन । बाणीं गगन व्यापिलें ॥ १४ ॥

देखोनि रामबाणीं आच्छिन्न । राक्षसांचें शेष सैन्य । अवघें परतलें गर्जोन । रघुनंदन निर्दळिला ॥ १५ ॥

त्रिशिरा योद्धा भला भला । रणीं राम निवटिला । राक्षसीं [मु. 'गजबजु'.] गजबू पैं केला । तेणें क्षोभला श्रीराम ॥ १६ ॥

रामें विंधिताचि बाण । बाणा [तं. 'अडखळती'.] आदळती बाण । भालीं वाजती खणखण । [मु. 'ठिणग्या'.] तिडक्या गगनीं न समाती ॥ १७ ॥

राम बाणाचा कडकडाट । [तं. 'बाण जाले सपाट'.] राक्षसबाणाचा अति नेट । [जो. 'घोर'.] घायीं उठला हव्यवाट । दोघे सुभट महायोद्धे ॥ १८ ॥

गरुड नखें सर्प चिरी । तेवीं राम बाणें बाण विदारी । तोडूनियां भूमीवरी । भुजंगाकारीं पसरले ॥ १९ ॥

राक्षसांचें बाणजाळ । वायु तोडी जेंवि आभाळ । तेवीं रामें तोडिले सकळ । त्रिशिरा प्रबळ क्षोभला ॥ २० ॥

त्रिशिरा ती बाणीं रघुनाथा । लागवेगें विंधिलें माथा । तेणें श्रीरामा नव्हे व्यथा । [घा. इं. 'म्हणे' हे पद अधिक.] गंधाक्षता मज [दै. खेरीज इतरत्र 'केली'.] जाली ॥ २१ ॥

तीं बाणांची मऊ [मु. 'मवाळी'.] मोकळी । रणीं अर्पिली पुष्पांजुळी । तुज पूजीन बाणजाळीं । राम महाबळी क्षोभला ॥ २२ ॥

तुझे म्यां साहिले तिन्ही बाण । माझे तूं साहे शर दारुण । ऐसें बोलोनि रघुनंदन । चौदा बाण सोडिले ॥ २३ ॥

चौदा विद्यांची अति गती । तैशी बाणांची निजशक्ती । निवारणा न चले युक्ती । धनुष्य हातीं छेदिलें ॥ २४ ॥

चहूंबाणीं चारी वारू । [मु. 'पथें'.] आठें सारथ्यासी मारूं । एकें ध्वज छेदिला सत्वरू । एकें रहंवरू छेदिला ॥ २५ ॥

विरथी त्रिशिरा आणिला भुयीं । श्रीरामावरी धांवतां पायीं । त्यासी सामर्थ्य न चले कांहीं । निर्वाण पाही मांडिलें ॥

कुमारवरदाचें निजप्राप्ती । त्रिशिऱ्यापासीं निर्वाण शक्ती । ते तंव सज्जूनियांहातीं । श्रीरामाप्रति धांविन्नला ॥

अनुक्रमणिका

२७ ॥

कुमारशक्ति त्रिशिऱ्या हातीं । देखोनि सुरवर कांपती । भूतळीं ऋषीश्वर [मु. 'धांवती'; त. 'आक्रंदती'.] धांकती । केंवि रघुपति वांचेल ॥ २८ ॥

कुमारशक्ति माराभेण । इंद्र चळी कांपे आपण । धांकें कांपती रुद्रगण । यमवरुण कांपती ॥ २९ ॥

धाकें कांपती सुरासुर । धाकें कांपती यक्षकिन्नर । शक्ति अतिशयें दुर्धर । केवीं रघुवीर साहेल ॥ ३० ॥

शस्त्र दुर्धर त्रिजगतीं । त्रिशिरा क्षोभोनियां चित्तीं । श्रीरामाच्या निजघातीं । सक्रोध शक्ति मोकलिली ॥ ३१ ॥

सर्व शक्तिची श्रीराम शक्ती । त्यावरी न चले शक्तीची गती । शक्तीनें वंदूनी रघुपती । चरण-विश्रांति पावली ॥ ३२ ॥

शस्त्रदेवता म्हणे आपण । होतां श्रीरामदर्शन । माझें जालें बंदिमोचन । काळें वदन त्रिशिऱ्याचें ॥ ३३ ॥

करावया राक्षसघाता । शक्ति चढली श्रीराम हातां । देखोनी त्रिशिऱ्यासी चिंता । [घा. 'विपरीत अवस्था'; तं. 'विपरीतार्था'; कं. 'विपरीत वार्ता पैं जाली'.] विपरीतता वोढवली ॥ ३४ ॥

माझी [जे. 'कां'.] जाऊनि निजशक्ति । वश्य जाली रघुपती । आतां आमुची खुंटली [कं. 'मती'.] गती । राक्षसां शांति श्रीरामें ॥ ३५ ॥

रणीं मारणें कां मरणें । हा निश्चयो करूनि तेणें । खर्ग तुळोनि [दै. खेरीज इतरत्र 'तळपणें'.] चपळपणें । हांकी सत्राणें श्रीरामा ॥ ३६ ॥

रामें सोडिली तिधारा । [मु. 'तेणें'.] येरें तोडिला खर्गधारा । त्रिशिऱ्या लागला पिसारा । तेणें अंबरा उडविला ॥ ३७ ॥

पिसाऱ्याचें प्रबळ बळ । रविचंद्रादि [पैं. खेरीज इतरत्र 'ऋषिमंडळ'.] ग्रहमंडळ । दाखविलें ध्रुवस्थळ । रणकल्लोळ श्रीराम ॥ ३८ ॥

घायेंवीण आली भवंडी । तळीं पडली मुरकुंडी । रुधिर वाहे नाकीं तोंडीं । बाणार्द्धखंडीं दंडिला ॥ ३९ ॥

त्रिशिरा सावध होऊनि पाहे । अंग प्रत्यंगी नेदखे घाये । म्हणे मज जालें काये । मिथ्या भय रामाचें ॥ ४० ॥

जाला सर्वांगीं सावध । शस्त्रास्त्रीं सन्नद्ध बद्ध । करावया श्रीरामाचा वध । अति सक्रोध चालिला ॥ ४१ ॥

जेवीं पतंग दीपापासीं । मागें सरणें नाहीं त्यासीं । [तं. 'वेगीं'.] तेवीं गिळावया श्रीरामासी । अति आक्रोशीं

अनुक्रमणिका

धांविन्नला ॥ ४२ ॥

हांक देऊनि तंवकें । पसरुनि तिन्हीं मुखें । आला श्रीरामा सन्मुखें । जेवीं अंतकें प्रळयांतीं ॥ ४३ ॥

श्रीराम गिळावया एकसरें । कामक्रोध सलोभ दरें । मुखें पसरिलीं तदाकारें । अति दुर्धरें समसमितें ॥ ४४ ॥

नातरी गिळावया निर्गुण । जेवीं खवळती तिन्ही गुण । तैसीं तिन्हीं मुखें जाण । राम निधान गिळावया ॥ ४५ ॥

ऐसा देखोन त्रिशिरा । हांसें आलें रघुवीरा । धनुर्ष्यीं सज्जूनियां शरा । निज निर्धारा [मु. 'उद्यत'.] विंधिला ॥ ४६ ॥

तीन्हीं बाण घेऊनि हातां । त्रिशिरा विंधिला तिन्हीं माथां । तो म्हणे या पुष्पाक्षता । बाणीं रघुनाथा बळ नाहीं ॥

बाण रुतले फुलांच्या ऐसे । त्रिशिरा खदखदा हांसे । श्रीराम बाणां बळचि नसे । अति आवेशें नाचतु ॥ ४८ ॥

हांसोनि उपडितां बाण । तंव ते अतिशयें कठिण । सरली त्रिशिऱ्याची आंगवण । माथांचे बाण नुपडती ॥ ४९ ॥

जंव जंव बाण उपडूं जाये । तंव तंव घायी घुसताहे । [मु. 'तरी तें' ही पदे अधिक.] विपरीत जाले आहे । म्हणे म्यां काय करावें ॥ ५० ॥

पहिले बाण आहाच गती । उपडितां ते कडतरती । श्रीराम बाणाची हे ख्याती । जीवघाती श्रीराम ॥ ५१ ॥
[ओवी ५१ सु. घा. इं. प्रतींत पुढीलप्रमाणे आली आहे :——
'पहिले म्हणे फुलापैसे । त्रिशिरा खदखदा हांसे । श्रीराम बाणा बळचिनसे । अति आवेशें नाचत ॥']

बाण नुपडती दारुण । भेणें पळाली आंगवण । सपिसीं बुडाले संपूर्ण । भेदले पूर्ण ब्रह्मांडीं ॥ ५२ ॥

लागतां वज्राचा पैं घातु । [मु. 'उलथोनी पडे जेवीं पर्वत'.] सपक्ष पडे पर्वतु । तेवीं त्रिशिरा रणाआंतु । पाडी रघुनाथु निजबाणीं ॥ ५३ ॥

त्रिशिरा पडतां भूतळीं । निधा उठिला पाताळीं । बैसली दिग्गजांची टाळी । राक्षसदळीं थरकांपु ॥ ५४ ॥

राम आला जीवघातीं । एकापुढें एक पळती । बाणीं लावियेली ख्याती । प्रळय प्राप्ति राक्षसां ॥ ५५ ॥

चौदासहस्त्र राक्षस सैन्य । शतेक उरले किंचित न्यून । राम बाणांच्या माराभेण । पलायमान सकंप ॥ ५६ ॥

हतशेषास्तथा भग्ना राक्षसाः खरसंश्रयाः । तान्खरो द्रवतो दृष्ट्वा निवार्य च ततः स्वयम् ॥ २ ॥

अनुक्रमणिका

रामें राक्षसां केला नाश । सैन्य निर्दळिलें निःशेष । उरलें तेही घेऊनि त्रास । दशदिशां पळताती ॥ ५७ ॥

एक सांगती एकासी । कोण निवारी राम बाणासी । [मु. 'टाकूनि जावें'.] टाकूनि जावों खरापासी । तो आम्हांसी रक्षील ॥ ५८ ॥

धाकें [पै. खेरीज इतरत्र 'पळती'.] कांपती निशाचर । देखोनि परतला खर । सैन्या देऊनि नाभिकार । रामा समोर तो जाला ॥ ५९ ॥

श्रीराम देखतांचि दृष्टीं । खरासि कांपु सुटला पोटीं । दूषण मारिला जगजेठी । त्रिशिरा हटी निर्दळिला ॥ ६० ॥

एकला [पै. मु. 'पाय उतारा'; तं. 'केवढा रघुनाथ'.] पायीं रघुवीर । धुरा मारिल्या थोरथोर । सेना मारिली चौदासहस्त्र । राम दुर्धर धनुर्वाडा ॥ ६१ ॥

निधडा योद्धा रघुनाथ । युद्ध करीन अत्यद्भुत । म्हणोनि खरें पेलिला रथ । धनुष्यां हात घालूनी ॥ ६२ ॥

[मु. 'धीरावीरा'; तं. 'धरुनी वीर'.] धीरधरी राहे साहे । मजसीं तुझें बळ [दै. खेरीज इतरत्र 'तें' हे पद नाही.] तें काये । माझे लागलिया घाये । कोण माये राखैल ॥ ६३ ॥

अवचटें लागोनिया बाण । मारी त्रिशिरादि दूषण । माझे सन्मुख साहसी बाण । तैं आंगवण मीं मानी ॥ ६४ ॥

रणीं समोर जाहलियां खर । अंतकासीं न धरे धीर । म्यां मर्दिले सुरासुर । तूं रघुवीर तें किती ॥ ६५ ॥

माझें सुटलियां शरसंधान । कोदंड खंडीन सबाण । तुझा घेई मीं प्राण । [पै. खेरीज इतरत्र 'रणांगण'; कं. 'रण आंगवण'.] रणरंगण पाहे माझें ॥ ६६ ॥

[मु. 'तंव' हे पद अधिक.] हांसोनि म्हणे श्रीरामचंद्र । खरा तुझा पराक्रम थोर । मीं जाणतों गा समग्र । आयिकें साचार [मु. 'महावीरा'.] सांगेन ॥ ६७ ॥

संवदणीं [मु. 'तिमिलें'.] तिंबिलें रजकहस्तीं । जगाचे मैले खर वाहती ।
ना तरी कुल्लाळा घरीं माती । [कं. 'नीचयातीं खरा तुझी'.] हे मुख्य ख्याती खराची ॥ ६८ ॥

काळे कोळसे वाहती खाती । कुलाल पत्न्या लगड घालीती ।
जगाचे उकरडे [मु. 'घोळिती'; दै. 'भरूनी नेती'; पै. तु. तं. 'वाहती'.] फुंकिती । हे दुसरी ख्याति खराची ॥ ६९ ॥

खर पालाणिती वोड । त्यावरी वाहती स्वेच्छा दगड । पाठीं रक्तीं सोलिलें बूड । थोर सुखाड माशांचा ॥

अनुक्रमणिका

७० ॥

खरी देखोनिया दुरी । खर भुंके दीर्घस्वरीं । [पै. तु. 'वदळा'.] लाथा हाणे ते ऊरावरी । [मु. 'ते सुख भारी खरासी'.] हे तिसरी ख्याति खराची ॥ ७१ ॥

[कं. 'नित्य खरासी भूषण । दोर खुटापासी जाण ।'] मुख्य खराचें भूषण । सारकेरीं नित्य लुंठन । जगाची विष्ठा [कं. खेरीज इतरत्र 'प्रियभोजन जगाची विष्ठा ।'] प्रियभोजन । हें महिमान खरांचें ॥ ७२ ॥

ऐसीं खराचीं प्रतिष्ठा । जन्म गेले भोगितां कष्टा । मर मर दोषिया पापिष्ठा । ऋषि वरिष्ठा मारिले ॥ ७३ ॥

त्यांचा घेईन सूड कैवाडें । बाणीं फोडीन जाभाडें । तूं पळसील कोणीकडें । बाणा पुढें पैं माझ्या ॥ ७४ ॥

खरासीं लागतां गोमासी । तडफडीत पळे चौपासीं । माझें बाण लागतां सपिसीं । तूं पळसीं खरू जैसा ॥ ७५ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । खरू जाला कोपायमान । धनुष्या वाऊनिया गुण । अमित बाण वर्षला ॥ ७६ ॥

खर वर्षला बहू बाण । दिशा विदिशा शरसंपूर्ण । देखोनि क्षोभला रघुनंदन । चाप सज्जून चालिला ॥ ७७ ॥

जेवीं गजावरी केसरी । तेवीं राम राक्षसांवरी । प्रळयांबुद वर्षे धारीं । तेवीं [पै. खेरीज इतरत्र 'शरधारी'.] शरभारीं वर्षला ॥ ७८ ॥

बाण वर्षतां रघुवीरा । बाणपिसारां सुटला वारा । तेणें चळकांपु निशाचरा । बाणीं भेदरा लाविला ॥ ७९ ॥

बाणीं रणीं खिळिला वारा । बाणीं खिळियेली [मु. 'मुख्यधुरा'.] वसुंधरा । बाणीं उठिला लोहधुळोरा । बाणीं अंबरा व्यापिलें ॥ ८० ॥

खर राम बाणीं खणखणाट । घायीं उठिला हव्यवाट । तेणें बाणपिसारे पेटत । धूमांकित खरनेंत्र ॥ ८१ ॥

बाणीं कोंदलें आकाश । तिळभरी रिता नाहीं अवकाश । बाणीं राक्षसां लाविला त्रास । कासावीस खर तेणें ॥ ८२ ॥

बाणीं कोंदलें भूतळ । बाणीं कोंदलें [मु. 'नभोमंडळ'.] नभस्थळ । श्रीरामाचे बाणजाळ । रविमंडळ झांकोळिलें ॥ ८३ ॥

रणीं पडली आंधारी । श्रीरामचंद्र प्रभेकरी । युद्ध कीजे दोहीं वीरीं । महामारीं पेटले ॥ ८४ ॥

ततोऽस्य सशरं चापं मुष्टिदेशे महाबलः । खरश्चिच्छेद रामस्य दर्शयन् पाणि लाघवम् ॥ ३ ॥

अनुक्रमणिका

खर कोपोनि [मु. 'निर्वाण'.] दारुण । घेऊनि वरद [मु. 'सोडिताहे वरदबाण'.] निर्वाण बाण । श्रीरामा तुझा घेईन प्राण । हस्तविंदान पाहे माझें ॥ ८५ ॥

ऐसें बोलोनि महाहटी । वरद बाणांचिया निजनेटीं । श्रीराम धनुष्य छेदूनि मुष्टीं । पाडिलें सृष्टी लघुहस्तें ॥ ८६ ॥

निज निर्वाणाचें पूर्ण । सवेंचि घेऊनि सात बाण । श्रीराम ह्रदय लक्षून । वेगीं गर्जोन विंधिले ॥ ८७ ॥

श्रीराम कवच अभेद्य पूर्ण । अभेद्य कवचीं न रुपे बाण । वरदें केलें जें [मु. 'निज निर्वाण'.] विंदान । सावधान अवधारा ॥ ८८ ॥

कवच न भेदे [पै. खेरीज इतरत्र 'बाणासी'.] रामासी । वरद शक्तीची विद्या कैंसी । छेदूनी बंधन बिरड्यासी । कवच भूमिसी पाडिले ॥ ८९ ॥

चाप कवच छेदितां देख । कांपिन्नले तिन्ही लोक । गगनीं देवांसीं असुख । परम दुःख इंद्रासी ॥ ९० ॥

कवच [मु. 'पडतांचि'.] पाडितांचि धरणी । अभ्रामधूनि निघे तरणी । तैसा राम शोभे रणीं । गिरा गर्जोनि बोलतु ॥ ९१ ॥

वरद बाण तुझे समस्त । क्रोधें सांडूनि केलें व्यर्थ । तुझा संपला पुरुषार्थ । आतां मी घात करीन तुझा ॥ ९२ ॥

जें कां चाप अगस्तिदत्त । वेगीं सज्जूनि रघुनाथ । रणीं चालिला गर्जत । शर संपात सूटला ॥ ९३ ॥

[जो. 'जेजे'.] खराचे बाण प्रबळ । रामें निवटिले सकळ । जेवीं गूड पाडी कृषीवळ । तेवीं बाणजाळ छेदिले ॥ ९४ ॥

हेमपत्रीं बाण सबीज । सोडूनि खर केला निर्बुज । रथींचा छेदिला ध्वज । रणीं रघुराज क्षोभला ॥ ९५ ॥

जैसा स्वर्गभोगच्युत । पुण्यक्षयें होय पतित । तैसा ध्वज लखलखित । पताकायुक्त पाडिला ॥ ९६ ॥

बाण सोडूनियां वरिष्ठ । शिरीचा पाडिला मुगुट । धनुष्य छेदिलें उद्भट । रणसंकट खरासी ॥ ९७ ॥

तं चतुर्भिः खरः क्रुद्धो रामं गात्रेषु मार्गणैः । विव्याध हृदि मर्मज्ञो मातंगमिव तोयदैः ॥ ४ ॥

खरें देखोनि रणसंकट । राम वधीन मी वरिष्ठ । शक्तिवरदाचे बाण [कं. 'अचाट'; मु. 'श्रेष्ठ'.] उद्भट । विंधावया दुष्ट चालिला ॥ ९८ ॥

चाप सज्जूनिया [मु. 'आकर्ण'; त. 'जाण'.] आन । शक्तिवरदाचे निर्वाण बाण । घायें घेती परांचा प्राण । अति

अनुक्रमणिका

दारुण अनिवार्य ॥ ९९ ॥

तेचि बाण घेऊनि चारी । शक्ति आवाहूनि बीजाक्षरीं । खरें मोकलिले रामावरी । सतेज धारी धगधगित ॥ १०० ॥

भूतळीं गजबजले ऋषीश्वर । स्वर्गीं कांपती सुरवर । शक्तिवरद अति दुर्धर । श्रीरामचंद्र केंवि वांचे ॥ १०१ ॥

बाण सुटतां कडाडी । पडली सुरवरां झांपडी । दुर्धर तेजाची पैं [मु. 'प्रौढी'.] धाडी । ऋषी बापुडीं मूर्छितें ॥ १०२ ॥

बाण लागतां हृदयावरी । शस्त्रदेवता श्रीराम उदरीं । तिनें धरुनि बाण चारी । [कं. 'भातां विवरीं प्रवेशली'.] राम तूणीरीं घातले ॥ १०३ ॥

खर म्हणे जालें विपरीत । वरदशक्ति श्रीरामा भजत । तिणें मांडिला आमचा घात । श्रीरघुनाथ नाटोपे ॥ १०४ ॥

श्रीरामाची अगाध थोरी । बाण निवारिले चारी । जयजयकार ऋषीश्वरीं । केला सुरवरीं [मु. 'महानाद'; कं. खेरीज इतरत्र 'जयजयकार'.] आल्हादु ॥ १०५ ॥

बाण निवारुनि चारी । राम कोपला पैं भारी । [मु. 'तीन'.] तेरा बाण खरावरी । महामारी मोकलिले ॥ १०६ ॥

श्रीरामबाण देखोनि दिठीं । [मु. दै. 'निवारणाची राहिली गोठी'.] निवारण चिंतितां पोटीं । एकें धनुष्यें छेदूनि मुष्टी । पाडिले सृष्टी दुखंड ॥ १०७ ॥

[मु. ध्वज.] जूं छेदिला बाणें एकें । दोबाणीं फोडिलीं चाकें । आंखु छेदिला पैं तंवकें । त्रिवेणु आणिकें छेदिला ॥ १०८ ॥

चहूंबाणीं चारी वारू । तीं बाणीं छेदिला रहंवरू । एकेबाणें विंधिला खरू । रुधिरोद्गारु प्रवाहे ॥ १०९ ॥

हत वारु हत सारथी । खरु रणीं केला विरथी । गदा घेऊनियां हातीं । श्रीरामाप्रति धांविन्नला ॥ ११० ॥

गदा घेऊनियां हातीं । घायें मारीन रघुपती । सरक थरक अति [घा. इं. 'दावीदीसी'.] वित्पत्ती । गति विगति तळपत ॥ १११ ॥

हतरथ हत सारथी । नष्टलासी सैन्य संपत्ती । राम म्हणे तुम्ही न लजा चित्तीं । काय गदागति दाविसी ॥ ११२ ॥

तुज पासूनि गेली शक्ति । वृथा वल्गसी गदाहस्तीं । गदेसहित पाडीन क्षितीं । तूं पापमूर्ति पापात्मा ॥ ११३

॥

ऋषी मारिले श्रेष्ठ श्रेष्ठ । तापस भक्षिले वरिष्ठ । त्याचें फळ भोगिसी स्पष्ट । बाणीं यथेष्ट दंडीन ॥ ११४ ॥

ब्राह्मण भक्षिले बहुत । ब्रह्महत्या दोष अद्भुत । बाण धारा प्रायश्चित्त । तुज निश्चित मी देईन ॥ ११५ ॥ [ओवी ११५ कं. तु. प्रतींत नाही.]

दंडकारण्यीं तूं कंटक । बाणीं छेदीन आवश्यक । वन करीन मी निष्कंटक । ऋषि निःशंक विचरावया ॥ ११६ ॥

निर्नासिक देखिल्या दृष्टीं । तेथ यशाची कायसी गोष्टी । स सैन्य धूर [मु. 'मरे शेवटीं'; जो. 'सरे'.] मरे संकटीं । भेटल्या नकटी फळ ऐसें ॥ ११७ ॥

ते नकटी तुम्हा सांगातें । तुम्हांसी यश कैंचे येथें । नकटिये निर्दळिले निश्चितें । हें खरातें लक्षेना ॥ ११८ ॥

नांवें खर रुपें खर । शस्त्रभार वाही केवळ खर । [मु. 'न कळे बुद्धीचा विचार'.] नकटे बुद्धीचा निर्धार । खर साचार तूं होसी ॥ ११९ ॥

वर्मभेदी श्रीराम वचन । खर दुर्धर कोपायमान । भूयींसी [मु. 'हातपाय'.] हस्त पैं घासोन । गदा घेऊनि धांविन्नला ॥ १२० ॥

किती जल्पसी सैरावैरा । वल्गो नको रामचंद्रा । बहु बडबड [कं. 'नसावी'.] न साजे वीरा । रणनिर्धारा [मु. 'पाहे'; तं. 'पाहे माझा'.] राहे पां ॥ १२१ ॥

राहे साहे रघुवीरा । तुवां मारिल्या बहुती धुरा । तुझ्या घेऊन रुधिरा । मारिल्या [मु. 'धुरा'.] वीरां तर्पीन ॥ १२२ ॥

तुझ्या रुधिरांचें तर्पण । तृप्त होतील राक्षसगण । गदाघायें घेंईन प्राण । सत्य संपूर्ण पण माझा ॥ १२३ ॥

सावध पाहे श्रीरामचंद्रा । एकेंचि घायें करीन पुरा । दांत खातसे करकरा । गदा गरगरा भवंडितु ॥ १२४ ॥

धूम निघती नेत्रद्वारा । रागें कांपतु थरथरा । डसो धांवे श्रीरामचंद्रा । कंठीच्या रुधिरा प्राशावया ॥ १२५ ॥

[कं. 'करीन'.] तुझे नळीचें रक्तपान । तेव्हां मी तृप्त होईन । वटारिले दोन्ही नयन । श्रीराम वदन देखोनि ॥ १२६ ॥

निःशेष मारावया रघुवीरा । आव्हानिले मातंगास्त्रा । बीजें जपोनि घातकमंत्रा । शस्त्रीं अस्त्रां योजिले ॥ १२७ ॥

अनुक्रमणिका

**ऐसें साधूनि निर्वाण । गदा सोडिली** [मु. 'तेणें उन्मळत वृक्षतृण । पृथ्वी होत कंपायमान ।'.] **अति सत्राण । तेणें उन्मळत वृक्षतृण । मूर्छापन्न पशुपक्षी ॥ १२८ ॥**

संक्षिप्ता तेन वेगेन प्रदीप्ता महती गदा । भस्म वृक्षांश्च गुल्मांश्च प्रकंपुश्च सरीसृपाः ॥ ५ ॥

[मु. 'गदाखराची तेजें दारूण'; तु. 'गदांग वातां'; तं. 'गदा गहेवता'.] **गदा घाताचें तेज दारुण । भस्मीभूत केलें तृण । गुल्म पर्वत कंपायमान । वृक्ष उन्मळोन पडताती ॥ १२९ ॥**

**गदा उसळतां अंबरा । विमानीं पळणी सुरवरां । चळ कांपु रवि नक्षत्रा । अस्त्र मंत्राचेनि धाकें ॥ १३० ॥**

**शस्त्र दुर्धर देखोन । श्रीराम नित्य सावधान ।** [पै. खेरीज इतरत्र 'अघोर'.] **घोर रुद्रयंत्र जपोन । बाण दारुण सोडिला ॥ १३१ ॥**

**बाण देखोनि दारुण । अस्त्र मातंगी आली शरण । माझा वांचवावा प्राण । श्रीरामचरण तियां धरिले ॥ १३२ ॥**

**बाण लागतां उद्भट । गदा जाहली शतकूट । घायें दुमदुमिलें वैकुंठ । करूनि पीठ पाडिली ॥ १३३ ॥**

**खर जाला रणोन्मत्त । निर्वाण गदा गेली व्यर्थ । चित्ता विसरलें चित्त । श्रीरघुनाथ देखोनी ॥ १३४ ॥**

**बाणें गदेचा जाला निःपात । अशेष सैन्या केला घात । शस्त्र सामग्री करूनि व्यर्थ । राम भात्यांत बाण आला ॥ १३५ ॥**

**एकला खर उरला रणीं । रामें जर्जर केला बाणीं । खर बाणातें न गणी । राम लक्षूनि लोटला ॥ १३६ ॥**

**सगळा राम मी** [मु. 'खांब'.] **स्वयें घोटी । हेंचि धरूनियां पोटीं । धांविन्नला महाहटीं । निर्वाण दृष्टी लक्षूनी ॥ १३७ ॥**

रणे प्रहरणार्थाय सर्वतो ह्यवलोकयन् । स ददर्श महाशालमपि दूरे निशाचरः ॥ ६ ॥
स तमुत्पाटयामास सदंष्टौष्ठपुटे लघु । राममुद्दिश्य चिक्षेप हतस्त्वमिति चाब्रुवन् ॥ ७ ॥

**रामें छेदिली शस्त्र सामग्री । हातेर न दिसें चौफेरी ।** [कं. घा. 'विशाल'.] **शाळ वृक्ष उपडूनि करीं । रामावरी धांविन्नला ॥ १३८ ॥**

**येणें वृक्षाचेनि घातें ।** [मु. त. जो. कं. 'रामा मारिलें म्या तूं ते'.] **आतां मारीन रघुनाथातें । ऐसा गर्जोनियां अत्यद्भुतें । वेगें वृक्षातें सोडिलें ॥ १३९ ॥**

**वृक्ष देखोनि प्रचंड । रामें बाण सोडिले** [मु. 'वितंड'.] **उदंड । दुखंड त्रिखंड नवखंड । करूनि शतखंड पाडिला ॥ १४० ॥**

अनुक्रमणिका

वृक्ष निवटूनि दुर्धर । अंगप्रत्यंगीं [कं. त. 'खोचले शर'.] खोंचला खर । वाहती रुधिराचे पूर । रणीं रघुवीर क्षोभला ॥ १४१ ॥

रणीं निर्दळावया खर । बाणीं योजिलें अंतकास्त्र । प्रळय रुद्र महामंत्र । जपोनि शस्त्रां सोडिलें ॥ १४२ ॥

देहबुद्धि मुकला खर । जुंझण्या पळण्या पडे विसर । धरणें मारणें धैर्य निर्धार । हाही विचार विसरला ॥ १४३ ॥

जेवीं कां ज्ञाता निजात्मसिद्धि । [मु. 'निश्चयें'.] निश्चळ राहे [घा. इं. 'रामपदी'.] समपदी । तेवीं राम देखतां त्रिशुद्धी । रणसमाधि खरासी ॥ १४४ ॥

निरसूनि तत्त्वांचा विकार । समाधि पावे मुनीश्वर । तेवीं लक्षितां श्रीरामचंद्र । निर्विकार खर जाला ॥ १४५ ॥

येऊनि श्रीरामाचा बाण । माझा घेईल पैं प्राण । हेंही नाहीं आठवण । [तं. 'स्मरण सुखकारी'; तु. कं. 'चरण सुखभारी'.] श्रीरामरण सुखकारी ॥ १४६ ॥

श्रीराम बाण अति दुर्धर । खराचें उडवूनि शिर । रणीं पाडिला महावीर । धन्य रघुवीर खरु म्हणे ॥ १४७ ॥

[दै. 'देहबुद्धिपासूनि सुटला देख'.] देहापासूनि तुटलिया देख । स्तुती वदे खराचें मुख । रामें छेदूनि द्वंद दुःख । दिधलें निजसुख शरघातें ॥ १४८ ॥

छेदूनि जन्ममरण दुःख । छेदूनियां तहान भूक । छेदूनि जीवाची धुकधुक । दिधलें निजसुख शरघातें ॥ १४९ ॥

छेदूनिया माझें मन । छेदूनियां देहाभिमान । छेदूनिया ज्ञानाज्ञान । सुखसंपन्न शरघाते ॥ १५० ॥

श्रीराम बाणाचा प्रताप । छेदिलें माझें पुण्यपाप । छेदूनि संकल्प विकल्प । केलीं सुखरुप शरघातें ॥ १५१ ॥

श्रीरामाचा सतेज बाण । छेदिलें स्थूळ लिंग कारण । छेदूनिया मीतूंपण । सुखसंपन्न शरघातें ॥ १५२ ॥

छेदूनि माझी राक्षस विधि । छेदूनि माझी आधिव्याधी । छेदूनि माझी देहबुद्धि । रामें त्रिशुद्धि सुखी केलें ॥ १५३ ॥

श्रीराम [कं. 'निजयोद्धा निजकरेसी'.] रणयोद्धा निकुरेसी । परी तो सुखरुप घायेसी । ऐसें वदूनि स्तुतीसी । पायापासीं शिर आलें ॥ १५४ ॥

जे गती नव्हे तापसासी । जे गती नव्हे योग्यासंन्याशासी । ते गती दिधली खरासी । घायासरसी श्रीरामें ॥ १५५ ॥

अनुक्रमणिका

जे गती नव्हे योगयागीं । जे गती न लभे सर्व त्यागीं । ते गती दिधली खरालागी । [कं. 'बाणसंगीं'.] रणरंगीं श्रीरामें ॥ १५६ ॥ [ओवी १५६ त. प्रतीत नाही.]
जे गती न लभे वेदविधीं । जे गती न लभे शास्त्रसिद्धीं । ते गती दिधली बाणवधीं । घायें त्रिशुद्धी खरासी ॥ १५७ ॥

जे गती न लभे कर्मकरितां । जे गती न लभे ध्यान धरितां । ते गती आली खराच्या हातां । बाणाग्रता श्रीरामें ॥ १५८ ॥

[मु. 'जो जो' ही पदे अधिक.] श्रीराम दृष्टि रणीं पडे । तो तो सायुज्यासी चढे । राक्षसांचें भाग्य चोखडें । रणीं रोकडें सायुज्य ॥ १५९ ॥

सुरवरां खर दुर्धर । खरासि शंके दशशिर । तो रामें रणा आणिला खर । जयजयकार द्विजदेवां ॥ १६० ॥

युद्ध पाहावया सुरवरीं । गगनीं विमानांच्या हारी । वर्षती सुमनांच्या [मु. 'संभारी.'] शरधारीं । जयजयकारी गर्जती ॥ १६१ ॥

युद्ध पाहों आला ब्रह्मदेव । युद्ध पाहों आला सदाशिव । जयजयकार करिती सर्व । श्रीराघव निजविजयी ॥ १६२ ॥

गगनीं गाजे सिद्धांची टाळी । जयजयकार ऋषी भूतळीं । रामें [कं. 'मर्दिला आतुर्बळी'.] मर्दिले राक्षस बळी । भूमंडळी आल्हादु ॥ १६३ ॥

श्रीराम प्रतापाचें पूर्ण । गगनीं लागलें निशाण । हरिखें नाचती सुरगण । राम रावण निर्दळील ॥ १६४ ॥

श्रीरामाचें युद्ध देखोनी । श्रीराम सेज उतरोनी । सीता सौमित्र येऊनी । लोटांगण श्रीरामा ॥ १६५ ॥

हरिखाच्या उल्हासतां । सीता आलिंगी रघुनाथा । रामें आश्वासूनि सीता । होय आलिंगितां सौमित्र ॥ १६६ ॥

पाचारुनि ऋषिगण । श्रीराम घाली लोटांगण । राक्षसीं गांजिलें ब्राह्मण । तें उत्तीर्ण मी जालों ॥ १६७ ॥

राक्षस भयातें निवारी । ते म्यां आज्ञा वंदूनि शिरीं । तुमचिये कृपेकरी । केली बोहरी राक्षसां ॥ १६८ ॥

तुमचिया कृपायुक्ती । मज जाहाली यशप्राप्ती । [घा. 'राक्षस मारिले जाली किर्ती'.] राक्षस मारिले अनुवर्ती । सत्संगतीचेनि [मु. 'निजबळें'.] बळें ॥ १६९ ॥

ज्याचे पाठीसी द्विजवर । देवोनि असती नाभीकार । एकला जिंके तो चराचर । कृपा सधर द्विजांची ॥ १७० ॥
समस्तसंपत्समवाप्तिहेतवः । समुत्थितापत्कुलधूमकेतवः ॥ ८ ॥

## अनुक्रमणिका

अपारसंसारसमुद्रसेतवः । पुनंतु मां ब्राह्मणपादपांसवः ॥ ९ ॥

**षड्गुण संपत्तीचें कारण । ब्राह्मणांचें रजरेणु प्रमाण । आपत्ति कुळनिर्दळण । द्विजचरण** [मु. 'प्रसादे'.] **पदपांसु ॥ १७१ ॥**

**अपार भवसागरा आंतु । द्विज पदरज सन्नद्ध सेतू । पडणें बुडणें नाहीं आवर्तु । सुखस्वार्थु द्विजचरणीं ॥ १७२ ॥**

**ब्राह्मणाचे चरणतीर्थी । गंगादि तीर्थें पवित्र होतीं । दास्य करिती चारी मुक्ती । सभाग्य भजती द्विजचरणीं ॥ १७३ ॥**

**त्या तुमची नित्य संगती । भाग्यें मज जाली प्राप्ती । तेणें पावलों अगाध कीर्ती । वानूं किती द्विज महिमा ॥ १७४ ॥**

**तुम्हांसी कांहीं द्यावें दान । ब्रह्मार्पण जनस्थान । करुनि स्वधर्म अनुष्ठान । सुखसंपन्न** [मु. 'असावें'.] **वसावे ॥ १७५ ॥**

**अरुणा वरुणा सरस्वती । ब्रह्मगिरी अष्टतीर्थी । करिता शंको नका चित्तीं । आज्ञावर्ती मी तुमचा ॥ १७६ ॥**

**ऐसे बोलोनि रघुनंदन । पुढती घाली लोटांगण । सुखीं जालें ब्राह्मण । श्रीराम गुण वर्णिती ॥ १७७ ॥**

**वर्णिती श्रीरामाची कीर्ती । वंदिती श्रीरामाची मूर्ती । श्रीराम गुण गीतीं गाती । द्विज गर्जती रामनामें ॥ १७८ ॥**

**द्विजीं घेतलें जनस्थान । राक्षस संपल्या पलायमान । हिरोनी घेती धनधान्य । वस्त्रें भूषणें ते हरिती ॥ १७९ ॥**

**गंगातीराचे ब्राह्मण । अतिशयेसी कठीण । आम्हांसीं नागविती संपूर्ण । यांसी कोण निवारी ॥ १८० ॥**

**पुरुषांची जाति व्यक्ति । रामें रणीं** [मु. 'लाविली ख्याति'.] **पाडिले क्षितीं । आम्हा रांडा द्विज नागविती । धांकें मुतती शूर्पनखा ॥ १८१ ॥**

**राक्षसपत्न्या पैं विमानीं । त्या माजी नकटी मुखरणी । भेडसावितां ब्राह्मणीं । जीव घेऊनी पळाल्या ॥ १८२ ॥**

**ऋषी राहिले जनस्थानीं । श्रीराम राहिलां स्वस्थानीं । एका शरण जनार्दनीं । रामायणीं सुखस्वादु ॥ १८३ ॥**

**रामायणीं भुक्ति मुक्ति । रामायणीं अगाध कीर्ती । रामायणीं ब्रह्मप्राप्ती ।** [कं. 'मुक्ति तिष्ठती उभी श्रवणें'.] **असे तिष्ठत श्रवणार्थें ॥ १८४ ॥** [ओवी १८४ नंतर कं. प्रतीत पुढील ओव्या अधिक आहेत :––

अनुक्रमणिका

'ऐसे निर्दाळुनी दुष्टासी । जनस्थान दिधलें द्विजांसी । तैसे मर्दुनी माझ्या स्वभोगासी । निज दीनासी करी सुखी ॥
मी तुज अनन्य शरण । म्हणवी परम पतित जाण । दुष्टकर्म विध्वंसून । करी रक्षण श्रीरामा ॥
माझे दोष गुण पाहसी । तरी पतीत पावन बिरुदासी । अपकीर्ती येईल त्यासी । सत्य मानसीं जाणावें ॥
नामें उद्धरण पापी गहन । तेथें माझें दोष कोण । नित्य करितों पठण श्रवण । दोष संपूर्ण निर्दाळी ॥
हृदयीं उदरभराची चिंता । ते दूर करी गा श्रीरघुनाथा । सुखी ठेऊनी सर्वथा । अति सुपथा पाववी ॥
हेंचि मागे तुझा दास । त्यासी न व्हावें उदास । . . . . . . . . . . . मिथत्वा स्वयें येऊं ने दीजे ॥']

**एका जनार्दना शरण । [कं. 'माझा जीव रामायण'.] जीवां रमणीय रामायण । खरादि राक्षस मर्दून । रघुनंदन निजविजयी ॥ १८५ ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां त्रिशिरादूषणखरवधो नाम एकादशप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग बारावा

## रावण शूर्पनखा संवाद

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

खर त्रिशिरादि बळवृत्ती । राक्षसांची जातिव्यक्ती । रामें रणीं पाडिल्या क्षिती । शर [दै. 'वर्षोनि'.] संपाती निवटूनी ॥ १ ॥

> तानि शूर्पणखा दृष्ट्वा सहस्राणि चतुर्दश । हतानि रामेणैकेन मानुषेण पदातिना ॥ १ ॥
> दृष्ट्वा हतान्महानादं ननाद जलदोपमम् ॥ २ ॥

एकला राम धनुष्पाणी । युद्धीं विचरतां [तं. कं. 'रणीं'; दै. 'निरंजनी'.] चरणीं । चौदा सहस्र वीरश्रेणी । पाडिले रणीं शरघातें ॥ २ ॥

बोंब सांगावया पुरती । राक्षसांची पुरुषव्यक्ति । नाही उरली रणाप्रती । बाणावर्ती [कं. 'निघाले'; तं. दै. खेरीज इतरत्र 'निवर्तलें'.] निवटिले ॥ ३ ॥

बोंब सांगावया देख । उरली शूर्पनखा एक । घेऊनि लक्ष्मणाचा धांक । मारुनि हांक पळाली ॥ ४ ॥

रणविमर्दाची धुक धुक । अति आक्रोशें करीत शंख । जनस्थाना आली देख । नकटें मुख घेऊनी ॥ ५ ॥

खरादिकांचिया पत्नी । हांसती शूर्पनखें देखोनी । वोहिनिसें गौरविली [दै. 'तरुणी'.] रणीं । नाकीं सुपाणी लेवविले ॥ ६ ॥

दोघें माणसें ते किती । खरादि मारुनी येती । हा निश्चयों स्त्रियांचें चित्तीं । तेणें हांसती शूर्पनखे ॥ ७ ॥

फें फें करीत सांगे मातु । रणीं क्षोभोनि रघुनाथु । सोडूनि बाणाचा आवर्तु । केला निःपातु राक्षसां ॥ ८ ॥

त्रिशिरा आणि खर दूषण । चौदासहस्र रक्षोगण । रामें मारूनि आपण । दिधलें [तं. 'जनासी'.] जनस्थान द्विजांसी ॥ ९ ॥

हे ऐकोनि गोठी । जनस्थानीं बोंब उठी । वीर निर्दळूनि जगजेठी । निर्लज्ज नकटी कां आली ॥ १० ॥

करितां नकटीचा कैवार । त्रिशिरा दूषणादि खर । चौदा सहस्र निशाचर । सपरिवार मारविले ॥ ११ ॥

नकटी भेटलियाची ख्याती । [कं. 'अवघिया करुनि शांती'.] पुरुषांची जाती व्यक्ती । इयां गिळिलें अपशकुनार्थी । आम्हां भंवतीं [पै. 'राहो'; तं. 'पीडो'.] रडों आली ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

बोंब उठली घरोघरीं । दीर्घस्वरीं रडती नारी । कोण कोणातें निवारी । सरोभरीं समदुःख ॥ १३ ॥

आम्ही रांडवा घरोघरीं । राखता कोणी नाहीं कैवारी । द्विज रिघोनिया [मु. 'घरोघरीं'.] नगरीं । क्षणामाझारीं नागविती ॥ १४ ॥

राक्षसीं भक्षिले द्विजांसी । हाडद्वंद्व ब्राह्मणेसीं । ते येऊनि अति आवेशीं । सर्वस्वासीं नागविती ॥ १५ ॥ [ही ओवी कं. दै. प्रतींत नाही.]

ब्राह्मणाचें दादुलपण । [कं. 'आम्हा मढ्या भवंते'; जो. 'रांडा महावणिया'; तं. 'नागवण्या'.] माहेवणियां भंवतें पूर्ण । त्यांसीं दिधलें जनस्थान । नागवण रांडांसी ॥ १६ ॥

ब्राह्मणाचा ब्रह्मदंड । रंडा दंडणीं अतिप्रचंड । शूर्पनखेचें काळें तोंड । केली रांड अवघ्यांची ॥ १७ ॥

ऐश्यां रडती पडती । एक कान केस तोडिती । एकी अत्यंत हडबडती । एकी ओरडती आक्रोशें ॥ १८ ॥

शूर्पनखा बोले पुढतीं । तुम्हीं येथें रडाल किती । लागवेगें ब्राह्मण येती । नागविती समस्तां ॥ १९ ॥

पडलिया ब्राह्मण बंदीं । सुटका नाहीं कल्पांत संधी । मग कांही नचले बुद्धी । निघावें त्रिशुद्धी लंकेसीं ॥ २० ॥

येथे मारविले महाबळी । निघाली करावया लंकाहोळी । नकटी लागली राक्षसमुळीं । रावण सकुळीं निर्दळावया ॥

द्विजां दिधलें जनस्थान । सशिष्य धांवले ब्राह्मण । राक्षसी गजबजिल्या संपूर्ण । पलायमान समुदायें ॥ २२ ॥

द्विज धांवले पूर्व द्वंद्वार्थी । विमान हिरों सहित संपत्ती । तेणें राक्षसी भारी भीती । येती काकुलती शूर्पनखे ॥ २३ ॥

ब्राह्मण येतां [त. दै. मु. 'दाटोदाटी'; पै. तु. 'दाटोपिटी'.] दाटोवाटीं । विक्राळ [मु. 'रुपे'.] मुखें धांवे नकटी । तुम्हां अवघ्यातें मी घोंटी । म्हणोनि पाठीं लागली ॥ २४ ॥

ब्राह्मण पळती उपराउपरी । शंख करिती दोहीं करीं । एक मुतती धोत्रांतरीं । एकां बाहेरी होसरलें ॥ २५ ॥

एका पुढें एक पळावयां बळी । पळतां बैसल्या दांतखिळी । नागवे आले रामाजवळीं । धोत्रे फिटलीं शुद्धि नाहीं ॥

मागें राहिलिया पाठीं । शूर्पनखा [मु. 'गिळील नकटी'.] सगळे घोटी । शंख करितां [मु. 'तये'.] अति संकटीं । रुधिर वोठीं प्रवाहे ॥ २७ ॥

अनुक्रमणिका

धांप [कं. 'धांक'.] न माय पोटी । [मु. 'मार्गलक्षेना'; तं. 'मार्ग न टाकिता'.] मृग लक्षणां [मु. 'भये दृष्टी'; दै. 'चुकता दृष्टी'.] चकिता दृष्टी । ब्राह्मणीं अतिसंकटीं । पंचवटी [मु. 'पावलें'.] टाकिली ॥ २८ ॥

श्रीरामा धांव झडकरी । शूर्पनखां गांजिलों भारी । गिळिलों गिळिलों निशाचरीं । [मु. 'निर्भय दे गा ब्राह्मणा'.] भय निवारी श्रीरामा ॥ २९ ॥

निर्भय ब्राह्मणा करुन । द्विजां दिधलें जनस्थान । रामराज्या आलें विघ्न । गोब्राह्मण गांजिलों ॥ ३० ॥

श्रीराम म्हणे लक्ष्मणासी । म्यां निर्दळिलें राक्षसांसी । कोण [कं. 'गांजी'; मु. दै. 'भेडसाविले'.] भेडसावी ब्राह्मणांसी । या भयासी निवारी ॥ ३१ ॥

पहिले [त. 'ब्राह्मणें पळोनीं गेलीं'.] ब्राह्मण पळवूं गेली । लोभें शूर्पनखेसी अवो [दै. 'अति भुली'; मु. 'आली भुली'; त. 'भूतळी'.] भुली । ब्राह्मणमांस खावो धांविन्नली । ते देखिली लक्ष्मणें ॥

निजनासिका विटंबिली । [मु. 'राक्षसाची समाप्ती'.] त्या क्षताची समाप्ति जाली । शूर्पनखा ते विसरली । भक्षूं धांवली द्विजमांस ॥ ३३ ॥

जेवीं कां मच्छ आविस गिळी । गळ वोढिल्या वरी तळमळी । त्याहूनि शूर्पनखेसी भुली । भक्षूं आली द्विजमांस ॥ ३४ ॥

बाप विषयांची [मु. 'आवडी'; सु. 'विषाची कांडी'.] विकडी । नाठवती दुःखकोडी । विसरवूनि [सु. 'चरणी'.] मरण वोढी । विषय गोडी वाढवी ॥ ३५ ॥

तैसीच शूर्पनखा जाण । भक्षूं धांवे ब्राह्मण । लक्ष्मणें सोडूनि बाण । दोन्ही कान छेदिले ॥ ३६ ॥

करुं नये स्त्रीहनन । तें पाळिलें श्रीरामवचन । तिचें छेदितां दोन्ही कान । पलायमान शूर्पनखा ॥ ३७ ॥

राक्षसपत्न्यां सवें घेऊनी । शूर्पनखा बैसे विमानीं । लंका अनुलक्षी लक्षूनि । जीव घेऊनि पळाली ॥ ३८ ॥

शूर्पनखा मुख्य विमानीं । माशा गोंगाती नाकीं कानीं । [सु. इं. 'स्वकिय स्त्रिया चिरडोनी'; घा. 'संगेस्त्रियांची शंखध्वनी'; कं. 'भोवती'.] सैंध स्त्रियांची रडणीं । आक्रंदोनि जल्पती ॥ ३९ ॥

येथ मारविल्या राक्षस थाटी । पुढें मारवील [मु. 'राक्षसाकोटी । लंके चालिली उठाउठी । स्वयें नकटीशूर्पनखां ॥'.] कोट्यानुकोटी । नकटी परतली उफराटी । रावणा संकटी घालावया ॥

पहिली ख्याति नकटीची । नळी निमटिली खरादिकांची । आतां नकटी जाली बुची । उरी रावणाची केंवी उरे ॥ ४१ ॥

इणेंचि वाढवूनियां कळी । चौदासहस्त्रां केली होळी । नकटी लागली [तं. 'राक्षस कुळी'; मु. 'राक्षसांमुळी'.]

**राक्षसांमुळीं । रावणु सकुळी निर्दळावया ॥**

**दुःख न समाय पोटीं । रागें बोलती विरुद्धागोठी । रडतां जाल्या हिंपुटी । तंव लंका दृष्टी देखिली ॥ ४३ ॥**

> आजग्मुस्ताः समुद्विग्ना लंकां रावणपालिताम् । सा ददर्श विमानाग्रे रावाणं दीप्ततेजसम् ॥ ३ ॥
> सहोपविष्टं सचिवैर्मरुद्भिरिव वासवम् ॥ ४ ॥

**लक्षूनियां लंकाभुवन । शीघ्रगती आलें विमान । शूर्पनखा अतिउद्विग्न । विरुद्धवचन स्त्री वाक्यें ॥ ४४ ॥**

**रावणु देखिला लंकाभुवनीं । जैसा इंद्र मरुद्‍गणीं । तैसा परिवारितु प्रधानीं । सिंहासनीं शोभतु ॥ ४५ ॥**

**ऐसा रावणु देखतां दिठीं । विमानीं एकी बोंब उठी । रावणें विमान देखतां दृष्टीं । देखिली नकटी शूर्पनखा ॥ ४६ ॥**

**शूर्पनखा स्वयें आपण । दीर्घस्वरें करुनि रुदन । रावणाचे धरुनि चरण । मूर्छापन्न अतिदुःखें ॥ ४७ ॥**

**ऐसा कोण महाबळी । नाक छेदूनि समूळी । उघडी पाडिलीं दांताळी । केली कर्णाळी बुचाट ॥ ४८ ॥**

**शूर्पनखेचें विटंबण । देखोनि गजबजिला रावण । प्रधानसेना कंपायमान । चकित जन लंकेचे ॥ ४९ ॥**

**रावणाचे निजदळीं । शूर्पनखा महाबळी । तेही विटंबिली समूळी । आतुर्बळी तो कोणु ॥ ५० ॥**

**तूं ज्येष्ठ असतां रावण । मज** [कं. खेरीज इतरत्र 'शूर्पनखे'.] **कनिष्ठेसी विटंबण । त्रिशिरा मारिले खरदूषण ।** [मु. 'रणकंदनें'; कं. 'केले' हे अधिक पद.] **रणकंदन श्रीरामें ॥ ५१ ॥**

**चौदासहस्त्र वीर अनिवर्ती । रामें मारिले बाणावर्ती । राक्षसांची जाति व्यक्ती । रण समाप्ति श्रीरामें ॥ ५२ ॥**
[ओवी ५२ तं. प्रतीत अशी आहे :–– 'चौदासहस्त्रवीर आतुर्बळी । श्रीरामें मारिलें बाणजाळीं । राक्षसांची जाली होळी । रणसमूळीं श्रीरामें ॥']

**रणीं राक्षसां रण समाप्ती । वार्ता सांगावया पुरती । मी एकी उरले प्रमदाजाती । रामें शास्त्रोक्तीं सोडिले ॥ ५३ ॥**

**श्रीराम शास्त्रार्थी सर्वज्ञ । करुं नये स्त्रीहनन । म्यां छळितां रामलक्ष्मण । तेहिं नाककान छेदिले ॥ ५४ ॥**

**करितां पुढिलासी छळण । छळिते छळे स्वयें आपण । तें मज जाहालें प्रमाण । विटंबण** [कं. 'मज'.] **मुख्य मुखा ॥ ५५ ॥**

**छळें छळिली मी कैसी । मुख दाखवूं नये कोणासी । श्रीरामाची ख्याती ऐसी । राक्षसांसी अंतकु ॥ ५६ ॥**

**माझे घेऊनि नाककान । द्विजा दिधलें जनस्थान । ब्राह्मणीं हिरोनि घेतां विमान । मीं पळोन येथें आले ॥ ५७ ॥**

अनुक्रमणिका

**श्रीराम निर्लोभ संपूर्ण । घेऊनियां जनस्थान ।** [मु. 'स्वयें'.] **सवेंचि द्विजां दिधलें दान । धन धान्य समवेत ॥ ५८ ॥**

**जनस्थानीं राहिले जाण । कोट्यानुकोटी** [कं. 'राक्षसगण'.] **राक्षसधन । तेंही द्विजां दिधलें दान । राम महिमान अगाध ॥ ५९ ॥**

**प्रताप तेजें रघुनंदन । तुझें** [कं. 'देखोनि'.] **घेऊनि लंकाभवन । तेंही सवेंचि देईल दान । ऐसें** [कं. 'सुचिन्ह'; मु. 'चिन्ह'.] **अशुभचिन्ह दिसताहे ॥ ६० ॥**

**तुझ्या राज्या आलें विघ्न । गर्वे नेणसी तूं अज्ञान । माझे आयिकोनि वचन । सावधान होईं वेगीं ॥ ६१ ॥**

> ततः शूर्पणखां दीनां वदंती परुषं वचः । अमात्यमध्ये संक्रुद्धः परिपप्रच्छ रावणः ॥ ५ ॥
> कस्य रामः कुतो रामः किं वीर्यं कः पराक्रमः । कथं च दंडकारण्ये प्रविष्टो दुश्चरं वनम् ॥ ६ ॥

**ऐकतां शूर्पनखेची गोठी । स्वयंवरीं रामु देखिला दिठीं । तो रामु आठवतां पोटीं । थरकांपु उठी रावणा ॥ ६२ ॥**

**धनुष्यें घोळसिलें मातें । तें भंगिलें रघुनाथें । तै त्यासी बाळपण होतें । आतां पुरतें तारुण्य ॥ ६३ ॥**

**त्याचा तारुण्य** [पै. खेरीज इतरत्र 'बाणप्रताप'.] **बळप्रताप । साहावया चौदासहस्त्र अल्प । त्रिशिरा खर दूषण स्वल्प । हा हा कंप रावणा ॥ ६४ ॥**

**वार्ता वदतां नकटी । रावणें धांकु घेतला पोटीं । बाह्य लौकिक** [मु. 'लौकिकाचार दृष्टी'.] **सभादृष्टी । गर्जत उठी अतिक्रोधें ॥ ६५ ॥**

**माझी भगिनी प्रियपूर्ण । दंडूनि केलें विटंबन । राम कोणाचा कैचा कोण । मुख्य लक्षण सांगे त्याचें ॥ ६६ ॥**

**कोण वीर्य कैसी शक्ती । किती सैन्य कोण सारथी । दंडकारण्यीं कां केली वस्ती । आयुधें किती श्रीरामा ॥ ६७ ॥**

**त्रिशिरा आणि खरदूषण । मारावया काय कारण । तुज कां केले विटंबण । समूळ कथन मज सांग ॥ ६८ ॥**

> इत्युक्ता राक्षसेंद्रेण राक्षसी क्रोधमूर्छिता । रामं तस्मै यथा तत्त्वमाख्यातुमुपचक्रमे ॥ ७ ॥
> दीर्घबाहुर्विशालाक्षश्चीरकृष्णाजिनांबरः । कंदर्पसमरुपश्च रामो दशरथात्मजः ॥ ८ ॥
> शक्रचापनिभं चापमुत्क्षिप्य कनकांगदम् । दीप्तान्क्षिपति नाराचान्सर्पानिव महाविषान् ॥ ९ ॥
> रक्षसां कामवीर्याणां सहस्राणि चतुर्दश । निहतानि शरैस्तीक्ष्णैस्तैनैकेन पदातिना ॥ १० ॥

**रावण जो कां** [घा. इं. कं. तु. 'लंकानाथ'.] **प्रमथनाथ । तेणें पुसिला श्रीरघुनाथ । त्याचें स्वरुप इत्थंभूत । असें सांगत शूर्पनखा ॥ ६९ ॥**

अनुक्रमणिका

शूर्पनखा व्यथाभूत । विटंबित ते क्रोधयुक्त । श्रीरामाचें निजवृत्त । असे सांगत यथार्थे ॥ ७० ॥

रामश्याम अतिसुंदर । [दै. तं. कं. 'रामरमणीय'.] रमा रमणीय मनोहर । सुखस्वरुप [मु. 'सुखाकार'; दै. 'सुखैकसागर'.] सुखैकसार । ब्रह्मसाकार श्रीराम ॥ ७१ ॥

कमळनयन कमळपत्र । सुखैकघन श्रीराम वक्त्र । मुख देखिल्या निवती नेत्र । सुखशृंगार श्रीराम ॥ ७२ ॥

[मु. 'कपूरयुक्त'.] आकर्णपूर्ण पिंवळा टिळा । कानीं कुंडलें कमळमाळा । कासें मिरवें सोनसळा । वीरु [मु. 'मंगळ'.] मरिगळा श्रीराम ॥ ७३ ॥ [पै. खेरीज इतरत्र ओवी ७२ नंतर पुढील ओवी आली आहे :–– 'जटामुकुट मनोहर । चीरकृष्णाजिनांबर । आजानुबाहू धनुर्धर । बाण तूणीर अक्षय ॥']

ध्वज वज्र अंकुश रेखा । दोहीं पायीं पद्में देखा । पाउले सकुमार रघुटिळका । अति नेटका [कं. 'पादांबुजी'; 'मु. 'पदांबुजें'.] पदबंध ॥ ७४ ॥

सांवळे आंगी शुभ्र उटी । तें देखतां [पै. 'नुपडे'; कं. दै. तं. 'न. पडे'; मु. 'नपुरे'.] रुपडें दृष्टी । मना नयना आनंद कोटी । वीर जगजेठी श्रीराम ॥ ७५ ॥

आंगीं खुपती चंद्रकर । ऐसा श्रीराम अतिसुकुमार । रणरंगीं रणधीर । परमशूर श्रीराम ॥ ७६ ॥

शक्रचाप समचाप । सवर्णभूषणें शोभे सद्रूप । श्रीरामाचा निजप्रताप । सत्यंसंकल्प संग्रामीं ॥ ७७ ॥

पाहतां श्रीरामाचें रुप । कोटिकंदर्पा हरे दर्प । लावण्याचें परमदीप । सुखस्वरूप श्रीराम ॥ ७८ ॥

केव्हां वोढी केव्हां जोडी । [दै. 'हे कोणा न कळे परवडी'.]केव्हां बाण सवेग सोडी । मारिल्या राक्षसांच्या कोडी । रण निखडी श्रीराम ॥ ७९ ॥

रामासी नाहीं रथसारथी । नाहीं सैन्य साह्यसंपत्ति । श्रीराम एकला एक पदातीं । राक्षस घातीं अंतकु ॥ ८० ॥

त्रिशिरा खरदूषण शूर । अनुवर्ती चौदासहस्त्र । रामें नेघतां दुसरें शस्त्र । केला संहार बाणाग्रें ॥ ८१ ॥

पुरुषांची जातिव्यक्ती । रणीं रामें केली समाप्ती । बोंब सांगावया पुरती । तुम्हा [मु. 'प्रति'.] भंवती मी आले ॥ ८२ ॥

जैसा सांगितला श्रीरामचंद्र । तैसाचि [मु. 'सखा'.] बंधु सौमित्र । तोही रणरंगधीर । परमशूर अतियोद्धा ॥ ८३ ॥

समानबळ समानशीळ । दोघे समरुपें निर्मळ । दोघे सर्वार्थी कुशळ । दोघे प्रबळ रणमारा ॥ ८४ ॥

अनुक्रमणिका

**प्रतिपाळावया पितृवचन । दोघीं सेविलें दंडकारण्य । सवें सीतासती जाण । बळवाहन ते दोघे ॥ ८५ ॥**

**लक्ष्मण श्रीरामाचा भक्त । अनन्यभावें अनुरक्त । सेवे लागीं नित्यरत । सावचित्त सर्वस्वें ॥ ८६ ॥**

**विटंबूनि मजकारणें । तुमचें उठविलें ठाणें । तुम्ही काय जितां जिणें । करा धांवणें ससैन्यें ॥ ८७ ॥**

**धांवणे करुं जातां खर । मारिले चौदासहस्त्र वीर । तैसा मी येथ नव्हे पामर । श्रीरामचंद्र नाटोपे ॥ ८८ ॥**

**ऐसें विचारुनि रावणें । नाहीं** [मु. 'केले'.] **करणें धांवणें । शूर्पनखीचें गार्‍हाणें । जिवें प्राणें उपेक्षिलें ॥ ८९ ॥**

**देखोनि रावणाचें चिन्ह । शूर्पनखा अतिउद्विग्न । प्रलोभावया त्याचें मन । काममोहन प्रतिपादी ॥ ९० ॥**

> रामस्य तु विशालाक्षी धर्मपत्नी यशस्विनी । सीतानाम वरारोहा वेदीप्रतिममध्यमा ॥ ११ ॥
> नैव देवी न गंधर्वी नासुरी न च राक्षसी । तथारूपा मया नारी दृष्टपूर्वा महीतले ॥ १२ ॥
> तवानुरूपभार्या सा त्वं च तस्यास्तथा पतिः । दृश्यमाना प्रयत्नेन ममाप्याक्षिपते मनः ॥ १३ ॥

**श्रीरामापासी सीतासुंदरी । तैसी नाहीं दुसरीनारी । मज पाहतां चराचरीं । तिची सरी न** [पै. 'वर्णवे'.] **पवती ॥ ९१ ॥**

**रमा उमा न पवती सरी । तेथ कोण पुसे सावित्री । देवीं गंधर्वी ना असुरी । तिचां** [तं. 'स्वरुपी'; कं. 'चरणांतरीं'; दै. 'घरीं परिचारी'.] **घवकारीं खद्योत ॥ ९२ ॥**

**पद्‌मिणी स्त्रियां मृदुशरीर । त्याहोनि तिची नखें अरुवार । ऐसी सुंदर सुकुमार । मनोहर जानकी ॥ ९३ ॥**

**ठाण माण गुणलक्षण । घवघवीत निजलावण्य । तिचें देखतांचि वदन । मूर्छापन्न कंदर्प ॥ ९४ ॥**

**वर्तुळ वदन विशाळनयन । देखतां जाय भूक तहान । तिचें देखतां बरवेंपण । मनमोहन विरक्तां ॥ ९५ ॥**

**सीता देखतां सौभाग्ययुक्त । फिकें होय पंचामृत । तीपासूनि** [मु. 'न ऊठे'.] **नुपडे चित्त । लोलंगत** [मु. 'तत्कामे'; कं. 'सर्वकाम'.] **तत्काळीं ॥ ९६ ॥** [ही ओवी तं. प्रतीत नाही.]

**तिचें देखतां श्रीमुख । दशेंद्रियां होय हरिख । मनाची खुंटे चकपक ।** [मु. 'लागे टकमक डोळियासी'.] **पडे ठक डोळियां ॥ ९७ ॥**

**राम वनवासी विरागयोगी । सीता न शोभे त्याच्या अंगी । ते तंव भार्या तुजजोगी ।** [कं. 'ये जगीं लंकेशा'.] **तिसी तूं भोगी लंकानाथा ॥**

**ते त्वां देखिलियां पाठीं । सत्य मानिसी माझिया गोठी । ते पडावीं तुझें दृष्टी । हें माझे पोटीं वर्तत ॥ ९९ ॥**

अनुक्रमणिका

**बुद्धीपूर्वक आपण । सीता पाहावी अनर्घ्यरत्न । तेव्हां मानूनि माझें वचन । साक्षेपें प्रयत्न करसील ॥ १०० ॥**

**सीता सांगतां शूर्पनखेसी । स्वयंवरीं देखिली होती जैसी । चांपेगोरटी लावण्यराशी । तैसी मानसीं ठसावली ॥ १०१ ॥**

> ततः शूर्पणखावाक्यं श्रुत्वा तद्रूपवर्णनम् । सचिवानभ्यनुज्ञाप्य जगाम स्वनिवेशनम् ॥ १४ ॥
> तत्कार्यार्थं विदित्वा च यथावदुपलभ्य च । दोषाणां च गुणानां च संप्रधार्य बलाबलम् ॥ १५ ॥
> इति कर्म विचार्येव कृत्वा निश्चयमात्मनः ॥ १६ ॥

**ऐकतां शूर्पनखेंचें वचन ।** [मु. 'आणि होता'.] **जाहली सीतेची आठवण ।** [मु. 'शरीरीं'.] **हर्षे रोमांचित रावण । लागलें ध्यान सीतेचें ॥ १०२ ॥**

**होतां गमनागमन । सीतामय त्याचें मन । करितां आसन भोजन । अखंड ध्यान सीतेचे ॥ १०३ ॥**

**रावण निजेलिया** [पै. तु. खेरीज इतरत्र 'सेजेवरीं'.] **शेजारीं । स्वप्नीं देखे सीता सुंदरी । तिची अनस्था लागली भारी । कैशापरी आंतुडे ॥ १०४ ॥**

**श्रीराम प्रतापी परिपूर्ण । त्यासी न करवे रण । त्याचें करुनियां छळण । सीता आपण आणावी ॥ १०५ ॥**
[ओवी १०५ तं. प्रतीत नाही.]

**छळूनियां रघुनंदना । त्याची आणावी अंगना । कळों देवों नये जनां । गोष्टी प्रधाना सांगो नये ॥ १०६ ॥**

[कं. 'आज्ञा देवोनी'.] **विसर्जूनिया प्रधाना । रावण आला निजभवना । सीता प्राप्तीची विवंचना । निजमना विवंची ॥ १०७ ॥**

**निद्रा न लभे सेजे आंत । सारथी पाचारुनि त्वरित । पिशाचरवरीं योजूनि रथ । निघे लंकनाथ मरीचि गुहा ॥ १०८ ॥**

**मरीचि रावणा भेटी गोठीं । मायामृगाची कामिक दृष्टी । दोघे येती पंचवटीं । सीतागोरटी हरणार्थ ॥ १०९ ॥**

**लागतां श्रीरामाचा बाण । मरीचि पावेल मरण । मरतां मरतां करील छळण । धांवेल लक्ष्मण गर्जोनी ॥ ११० ॥**

**मोडूनि धनुष्येसी रथा । जटायू जिणोनि लंकानाथा । त्या पासूनि सोडवी सीता । अपूर्व कथा अवधारा ॥ १११ ॥**

**एका जनार्दना शरण । पुढां** [मु. 'अपूर्व'.] **रसाळ निरोपण । कथा** [मु. 'कल्पष'.] **कळिमळ विध्वंसन । सावधान अवधारा ॥ ११२ ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां रावणशूर्पनखासंवादो नाम द्वादशप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग तेरावा

## मारीच रावण पंचवटी गमन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**सीता प्राप्त्यर्थ उद्विग्न । रथारूढ रावण । मरीचि आश्रमा** [मु. 'ठाकून'.] **टाकून । आला आपण सवेग ॥ १ ॥**

> स तं कृष्णाजिनधरं जटामंडलधारिणम् । ददर्श नियताऽहारं मारीचं नाम राक्षसम् ॥ १ ॥
> तं रावणः समागम्य विधिवत्स्वेन तेजसा । कुशलं परिपप्रच्छ यथावत्तेन पूजितः ॥ २ ॥

**मरीचि देखे रावण । जटाधारी कृष्णाजिन ।** [मु. 'आणि नेमस्त'; दै. तं. 'फळमूळ भोजन'.] **नेमस्त फळीं फळभोजन । एकांत वन** [मु. 'स्थान'; जो. 'वसन'; दै. 'वासिया तो'.] **वनवासी ॥ २ ॥** [ओवी २ तं. प्रतींत नाहीं.]

**मरीचि रावणातें देखोन ।** [कं. 'आदरें'.] **दोघीं दिधलें आलिंगन । त्यासीं कुशल पुसोन । केलें पूजन यथान्यायें ॥ ३ ॥**

**मग बैसोनि एकांतीं । रावण सांगे मरीचिप्रती । रामें गांजिलों बहुतारीतीं । सांगों किती तुजपासीं ॥ ४ ॥**

**पद्मपुरीं माझें** [कं. 'ठाणें निरंतर'; तं. 'राखणाइत वीर'.]**ठाणांतर । दूषण त्रिशिरा आणि खर । चौदा सहस्र निशाचर । अति दुर्धर तिहीं लोकीं ॥ ५ ॥** [ओवी ५ व ६ तील दोन चरणांतून तं. प्रतीत एक ओवी बनविली आहे.]

**रामें वर्षोनिया शरां । मारिला खर दूषण त्रिशिरा । चौदा सहस्र निशाचरां । बाणधारां निवटिले ॥ ६ ॥**

**शूर्पनखा भगिनी धाकुटी ।** [दै. तं. 'विटंबिली उठाउठी'.] **सकर्ण नासिकें केली नकटी । लाजविल्या राक्षस कोटी । लाज मोठी हे आम्हां ॥ ७ ॥**

> कर्णनासापहारेण भगिनी मे विरूपिता । तस्य भार्या जनस्थाने नाम्ना सीतेति विश्रुता ॥ ३ ॥
> रूपयौवनसंपन्ना श्रीःपद्मेनेव भूषिता । भार्या तस्य जनस्थाने तामहं लोकसुंदरीम् ॥ ४ ॥
> आनयिष्यामि विक्रम्य सहायस्त्वन्तु मे भव । एतदर्थमहं प्राप्तस्त्वत्समीपे निशाचर ॥ ५ ॥
> श्रुणु कर्म च साहायं यत्कार्य भवता मम। सौवर्णस्त्वं मृगो भूत्वा चित्रो रजतबिंदुभिः ॥ ६ ॥
> आश्रमे तस्य रामस्य सीतायाः प्रमुखे चर ॥ ७ ॥

**शूर्पनखेचें नासिक कर्ण । छेदूनि केलें विरुपपण । ते मी होआवया उत्तीर्ण । करीन हरण रामकांते ॥ ८ ॥**

**सीता सौंदर्याची थोरी । मज पाहातां चराचरीं । तीसमान नाहीं दुसरी ।** [दे. 'परम साजिरी'.] **परम सुंदरी** [पै. तं. खेरीज इतरत्र 'रामप्रिया'.] **रामकांता ॥ ९ ॥**

**सीता लावण्यें** [मु. 'मंजिरी'; कं. तं. 'सुंदरी'.] **साजिरी । उमा रमा न पवे तिची सरी । माझे** [कं. 'अंतुरिया'; घा. सु.

‘अंतरंगीची’; तं. ‘अंतरीच्या’.] अंतःपुरीच्या नारी । तिचें नखाग्रीं खद्योत ॥ १० ॥

मुख्य मंदोदरी जाण । नव्हे तिच्या अंगुष्ठा समान । तिचें मी करूं पाहे हरण । साह्य आपण मज व्हावें ॥ ११ ॥

तुजपासीं विचित्र गती । धरू जाणसी नाना [कं. ‘वेषयुक्ति’; दै. ‘युक्ति’.] व्यक्ति । सुवर्णमृगाच्या आकृती । सीतेप्रति तुवां जावें ॥ १२ ॥

सीता सांडूनि पंचवटी । सुवर्णमृग वधार्थ दृष्टी । श्रीराम धांवे [मु. ‘पाठोपाठी’; दै. ‘धांवेल पाठोपाठी’.] पाठोवाठी । ऐसी गोष्टी साधावी ॥ १३ ॥

दूरी नेऊनि राघव । हांक मारावी अपूर्व । लक्ष्मणा [मु. ‘वेगीं’ हें पद अधिक.] धाव पांव । हें ही लाघव साधावें ॥ १४ ॥

मारीच श्रूयातां तावद्वचनं मम भाषतः । आर्तोऽस्मि मम चार्तस्य त्वत्तो नान्या परागतिः ॥ ८ ॥

मरीचि तूं माझा निजमंत्री । तुझी मी जाणें अगाध थोरी । तूं मज जालिया सहकारी । मीं चराचरीं निजविजयी ॥

सीता हरणीं मी अति आर्त । आर्त पुरवावया तूं समर्थ । माझे पुरवावे मनोरथ । कृतकार्यार्थ साधावा ॥ १६ ॥

तूं साह्य जालिया संपूर्ण । देव दानव दैत्यगण । जिणों शके मी रावण । [मु. ‘तेथें’ हें पद अधिक.] श्रीराम कोण बापुडें ॥ १७ ॥

[मु. ‘तरी’ हें पद अधिक.] पर्णकुटी सांडवून । तुवां नेलिया रामलक्ष्मण । मागें मी करीन सीता हरण । [मु. ‘मग’ हें पद अधिक.] नको कोण मज म्हणे ॥ १८ ॥

राहू ग्रासी चंद्रकला । तैसी हरीन जनकबाळा । [पै. खेरीज इतरत्र ‘मरीचि’.] मिरवी साह्याचा सोहळा । मी कळिकाळा [तं. ‘न गवसे’; कं. मु. ‘नाटोपे’.] नांगवे ॥ १९ ॥

ऐकतां श्रीरामाचें नांव । मरीचीचा दचकला जीव । विसरला वाग्वैभव । भयोद्भवं अनिवार्य ॥ २० ॥

तस्य रामकथां श्रूत्वा मारीचस्यागमद्भयम् । शुष्कमासीच्च वदनं परित्रस्तो बभूव ह ॥ ९ ॥

वना आला रघुनंदन । ऐकतांचि भ्रांत [सु. इं. ‘मन’; घा. ‘वन’; तं. ‘कंपायमान’.] नयन । तोंडीचें पाणी गेलें पळोन । मूर्छापन्न तो पडिला ॥ २१ ॥

नांव ऐकतां रघुनाथा । मरीचीसी [कं. ‘प्राणव्यथा’.] प्राणांत अवस्था । बोलणें चालणें खुंटली वार्ता । तेणें लंकानाथा आश्चर्य ॥ २२ ॥

अनुक्रमणिका

मरीचि महावीर शूर । [मु. ‘रणामाजी रणरंग धीर’; तु. तं. ‘रणीं रणरंगधीर’.] रणरंगी रणधीर । योद्धयां माजीं मुख्य जुंझार । विचार समुद्र पैं मरीची ॥ २३ ॥

भय वोढवलिया पैं थोर । मज मरीचीचा आधार । याचेनि बळें म्यां सुरासुर । सचराचर जिंकिले ॥ २४ ॥

कार्य मांडिलिया अति अवघड । समूळ साधी अर्थ गूढ । तैसाच निधडा योद्धा [कं. ‘थोर’; दै. ‘विरुढ’.] दृढ । विचार प्रौढ विवेकी ॥ २५ ॥

घावो [मु. ‘फार न लागता’.] पाथर न लगतां । केवळ रामनाम ऐकतां । मरीचीसी मरणावस्था । भय कांपता कां जाली ॥ २६ ॥

श्रवणीं ऐकतां रघुनंदन । धांकें चेतना गेली पळोन । मरीचि [मु. ‘निर्जीव भासे प्रेतवदन’.] केवळ अचेतन । [मु. ‘स्फुरण’; कं. ‘प्राणोदान’.] प्राणस्पंदन पळालें ॥ २७ ॥

जैसा जडमूढ पाषाण । तैसा मरीचि मूर्छापन्न । त्यासी वेगें दशानन । सावधान स्वयें करी ॥ २८ ॥

मरीचीसी पुसे लंकानाथ । न लगतां घाव [मु. ‘घावो ना आघात’; कं. ‘घातपात’, तु. ‘घावो आंगा आंत’.] आघात । नांव ऐकता रघुनाथ । मूर्छा मरणान्त कां आली ॥ २९ ॥

[मु ‘मग’ हें पद अधिक.] मरीचि होऊनि सावधान । रावणासी घाली लोटांगण । श्रीरामासी विरुद्धपण । सर्वथा आपण न करावें ॥ ३० ॥

क्षोभलिया श्रीरामचंद्र । ससैन्य सबंधू [तं. ‘सगोत्र’.] सपुत्र । सप्रधान निशाचर । तुजसी समग्र निर्दळील ॥ ३१ ॥

सहित सेना चौदासहस्त्र । जैसे वधिले त्रिशिरा खर । तैसे [मु. ‘तुम्हीहि’.] तुम्हांसी समग्र । बाणीं दुर्धर वधील राम ॥ ३२ ॥

सुटलिया श्रीरामाचा बाण । तुम्हा मध्यें निवारी कोण । राक्षसकुळाचें निर्दळण । न लगतां क्षण करील ॥ ३३ ॥

[मु. ‘तरीं’ हे पद अधिक.] तुझें सद्बुद्धीचें हरण । कोणें क्रूरें केलें संपूर्ण । श्रीरामाचें [मु. जो. तु. ‘दारागृहण’.] दाराहरण । केवीं [तं. ‘आपण करावें’; दे. ‘आपण करिजेल’.] आपणां करवेल ॥ ३४ ॥

शेष माथाचा मणी । आणूं सकेल सांग कोणी । तेवीं सीता [मु. दै. जो. ‘श्रीरामा पासुनी’.] श्रीराम पत्नी । केवीं आमुचेनि आणवेल ॥ ३५ ॥

[पै. ‘श्रीराम सूर्याची’.] श्रीसूर्याची प्रभावळी । हरूं न शके महाबळी । तेवीं श्रीरामा वेगळी । जनकबाळी न करवे ॥ ३६ ॥

अनुक्रमणिका

**जेवीं सर्वांगीं जडली व्योमा । वेगळी न करवे नीळिमा । तेवीं सीता वेगळी श्रीरामा । सर्वथा आम्हां न करवे ॥ ३७ ॥**

**ऐसेनि करितां सीताहरण । आम्हां तुम्हां आलें मरण । सकळ कुळाचें निर्दळण । होईल जाण लंकेशा ॥ ३८ ॥**

**नकटी होऊनिया आधीं । ससैन्य खरू** [मु. तं. तु. कं. 'वधिला'.] **वधविला युद्धीं ।** [तं 'तेचि परी येणे बुद्धि'; मु. 'तरी शूर्पनखेची मूढ बुद्धि'.] **ते शिमुरीची शिमुर बुद्धी । ऐकतां त्रिशुद्धी निमसील ॥**

**सहस्त्र बाहू गर्वें करी । ऋषीची धेनू बळेंचि हरी । त्यातें ब्रह्मचारी मारी । क्षणामाझारीं ससैन्य ॥ ४० ॥**

**करिता परदारा हरण । अवश्य आम्हां आलें मरण । म्हणोनि मरीचि धरी चरण । तंव रावण क्षोभला ॥ ४१ ॥**

**दोघे माणसे वनवासीं । नाहीं सैन्य सामग्री त्यांसी । त्याचें भय** [दे. 'मानसीं'.] **मज दाविसी । तूं** [तं. 'न लाजसी नपुंसका'.] **जालासी नपुंसक ॥ ४२ ॥**

**तूं तंव बळिष्ठ संपूर्ण । काय जाळी आंगवण ।** [कं. 'नव्हतां श्रीरामाचें दर्शना' स्मरणें कंपायमान कां होसी ॥'.] **होतां रामनामस्मरण । कंपायमान कां होसी ॥ ४३ ॥**

**मी तंव रावण** [तं. 'आतुर्बळी वीर'.] **दुर्धर । बंदीं घातले ग्रह सुरवर । श्रीराम बापुडें** [दे. 'किंकर'.] **किंमात्र ।** [तं. 'त्याची थोरीव'.] **त्याचें भय थोर सांगसी ॥ ४४ ॥**

**म्यां जिंतिल्या थोर धुरा ।** [मु. 'तेथे' हें पद अधिक.] **कोण पाड श्रीरामचंद्रा । धाकड होई निशाचरा । धरी धीरु पुरा मरीचि** [तं. कं. प्रतींत 'तूं' हें पद नाही.] **तूं ॥ ४५ ॥**

**ऐकोनि रावणाचें वचन । मरीचि जाला हास्यवदन । रावणा न धरी गर्वाभिमान ।** [मु. 'पूर्ण'.] **पूर्वकथन अवधारी ॥ ४६ ॥**

> पुरा वै वीर्यमत्तोऽहं पर्यटन्पृथिवीमिमां । बलं नागसहस्त्रस्य धारयन् बलदर्पितः ॥ १० ॥
> अवज्ञाय त्वहं मोहाद्बालोयमिति राघवम् । विश्वामित्रपरामृष्टं प्रवृत्तोऽस्मि यथासुखम् ॥ ११ ॥

**तुझ्याचि ऐसा लंकानाथा । मज पूर्वी बळ दर्प होता । बाळ मानूनि रघुनाथा । त्याच्या निजघाता करू** [पै. कं. 'आलों'.] **गेलो ॥ ४७ ॥**

**आंगीं नागायुत बळ । राम सगळें गिळीन बाळ । विश्वामित्रादि ऋषी सकळ । मारूनि तत्काळ भक्षीन ॥ ४८ ॥**

**ऐसी धरुनिया हांव । आश्रमीं घेऊनि धांव ।** [मु. 'तंव' हे पद अधिक.] **निःशंक धनुर्वाडा राघव । बाण लाघव** [मु. तं.

अनुक्रमणिका

'अनिवार'; दै. 'अनावर'.] अनिवार्य ॥ ४९ ॥

मरीचि सुबाहु महावीर । सवें निधडे निशाचर । मारूं जातां रघुवीर । बाण दुर्धर सुटले ॥ ५० ॥

राक्षस देखोनियां क्रूर । डंडळीना श्रीरामचंद्र । सुटला बाणांचा महापूर । वीरें वीर खोंचले ॥ ५१ ॥

माझा मुद्‌गर केला कूट । सुबाहू वोडण केलें पीठ । वीर पाडिले उद्भट । [मु. 'ऐसा' हे पद अधिक.] रण सुभट श्रीरामें ॥ ५२ ॥

रामें बाण सोडिला तिधारा । तो म्यां तोडिला खर्गधारा । [मु. 'भल्लानें'.] भालानें सुबाहु केला पुरा । मज पिसारा लागला ॥ ५३ ॥

पिसारा लागला ब्रह्मांडीं । डोळा झांपडी आंगीं भवंडी । अशुद्ध वाहे नाकीं तोंडी । वळी मुरकुंडी हातपायां ॥ ५४ ॥

बाण पिसारा [मु. तं. कं. दै. 'दुर्धरवारा'.] दूर्धरवीरा । घायें उडविलों अंबरा । शत योजनें समुद्रतीरा । मूर्छित पुरा पाडिलों ॥ ५५ ॥

वाटारिले नेत्रवाट । [दै. 'घटघटा'; मु. 'घरघरित'.] घुटघुटित वाजे कंठ । धाकें [पै. तु. तं. खेरीज इतरत्र 'धुकधुकीतसे'.] धुकधुका पोट । प्राण संकट मज [मु. 'आलें'; दै. 'वोडवलें'.] जालें ॥ ५६ ॥

अर्धोन्मीलित झालें नयन । प्राण जाला अति सुलीन । शरीर जालें अचेतन । बाणार्द्धें मरण मज आलें ॥ ५७ ॥

उरला होतां आयुष्य कण । तेणें मी जालों सावधान । घायें गेली आंगवण । धैर्य संपूर्ण पळालें ॥ ५८ ॥

रामबाणाचा भेदरा । थोर लागला [पै. 'शरीरा'.] दशशिरा । सर्वत्र देखे रामचंद्रा । चरा अचरा माझारीं ॥ ५९ ॥

> वृक्षं वृक्षं हि पश्यामि चीरकृष्णाजिनांबरम् । शरचापधरं रामं क्रुद्धं क्रुद्धमिवांतकम् ॥ १२ ॥
> अभिरामसहस्राणि भीतः पश्यामि रावण । रामभूतमिदं सर्वमरण्यं प्रतिभाति मे ॥ १३ ॥

चीर कृष्णाजिनांबर । जटा मुकुट धनुर्धर । देखे वृक्षोवृक्षीं रामचंद्र । [दै. 'प्रबळ रुद्र'.] प्रळयरुद्र मारकु ॥ ६० ॥

भय भीत चकित दृष्टी । राम देखे कोट्यानुकोटी । राममय देखे सृष्टी । धांक पोटीं बाणाचा ॥ ६१ ॥

पक्षी सावज वनीं फडके । राम म्हणोनि मी [मु. 'वचके'.] चंवके । लहान थोर जें जें देखे । [मु. 'ते तें श्रीराम देखे धगधगीत'.] श्रीरामधाकें धुकधुकित ॥ ६२ ॥

अनुक्रमणिका

देखे [पै. दे. खेरीज इतरत्र 'दृश्यांची'.] वृक्षांचिया दाटी । श्रीरामचि दिसे दृष्टी । मज रामाचा धांक पोटीं । [मु. 'ऐसी' हे पद अधिक.] रामें पाठी पुरविली ॥ ६३ ॥

स्वप्नाचिये [घा. इं. 'परिपाटीं'; सु. कं. तं. 'स्वप्नपाठीं'.] स्वप्नपटीं । श्रीरामचि देखे [पै. खेरीज इतरत्र 'दृष्टी'.] सृष्टी । धांके गजबजिला उठी । रामें पाठी पुरविली ॥ ६४ ॥

श्रीरामबाणाचा पिसारा । तेणें ऐसा लाविला भेदरा । विरोधितां श्रीरामचंद्रा । उरी निशाचरा उरेना ॥ ६५ ॥

रामाचा धांक निजमानसीं । त्या मज धाडितां रामापासीं । जीव जाईल देखतां त्यासी । निश्चयेसी रावणा ॥ ६६ ॥

रकारादि वर्ण जल्प । ऐकतां मज थरकांप । श्रीराम नामाचा आलाप । [तु. मु. 'तेणें'.] भेणें सकंप सर्वदा ॥ ६७ ॥

शरणे मुक्तो रामस्य कथं चित्प्राणजीवितं । समीपेपि न गच्छेयं तदंतं जीवितं च मे ॥ १४ ॥

रामाच्या पूर्वार्द्धबाणे । जिवें [पै. खेरीज इतरत्र 'वांचलों'.] वांचविलों दैवगुणे । आतां त्यापासीं जैं जाणें । तो मज प्राणें सोडीना ॥ ६८ ॥

जैं मज मागें विंधिला बाण । तैं श्रीरामा [मु. 'होतें' हे पद अधिक.] बाळपण । आतां तारुण्य संपूर्ण । घायें प्राण घेईल ॥ ६९ ॥

देखतांचि रघुनाथ । माझ्या जीविताचा अंत । मी सर्वथा न वचे तेथ । त्रिसत्य सत्य मद्वाणी ॥ ७० ॥

ऐसे सांगोनि रावणासी । मरीचि रडे उकसा बुकसी । रावणें धरूनि पोटेसी । काय त्यासी बोलतु ॥ ७१ ॥

मनुष्य खाजुकें आम्हांसी । त्या रामातें तूं कां भेसी । सीता साधलिया आम्हांसी । अर्ध राज्यासी मी देईन ॥ ७२ ॥

जैसा माझा ज्येष्ठ कुमरु । त्याहूनि करीन राज्य धरू । तुज मीं देईन छत्रचामरू । सैन्य संभारू गजवाजी ॥ ७३ ॥

सांडी राम भयाची धुक धुक । निधडा होई तूं निःशंक । अर्ध राज्य देईन देख । माझी भाक तूं घेई ॥ ७४ ॥

[मु. 'तरि' हे पद अधिक.] मेल्या मागें पिंडदान । ते भक्षिती काक श्वान । श्रीरामें घेतलिया माझा प्राण । राज्य कोण भोगील ॥ ७५ ॥

तुझी बुद्धि ऐकतां जाण । ना मरीचि ना रावण । ऐसें करील श्रीराम बाण । [दे. 'मग राज्य कोण कोणा देईल'.] कुळ निर्दळण राक्षसां ॥ ७६ ॥

अनुक्रमणिका

**नकटी केवळ दुर्बुद्धी । तिणें** [मु. 'भेदिली'.] **छळिली तुझी बुद्धी । परदारा हरण विधी । तूं त्रिशुद्धी महामूर्ख ॥ ७७ ॥**

**देखतां नकटीचा मुखवटु । तत्काळ बुद्धीसी पालटु । जालासी परदारालंपटु । शठनष्टु महापापी ॥ ७८ ॥**

**होतां नकटींचे दर्शन । निमाले त्रिशिरा खर दूषण । आतां निर्दळावया रावण । नकटें वदन आणिलें ॥ ७९ ॥**

['तं. सत्यत्वें हिरोनिया सीतेतें'.] **स्वयंवरीं वरावया सीतेतें । धनुष्य** [पै. कं. खेरीज इतरत्र 'वाहतां'.] **वातां अतिस्वार्थे । धनुष्यें** [मु. 'न उचलितां'.] **घोळसिलें तूं तें । तें रघुनाथें भंगिलें ॥ ८० ॥**

**तें काय** [मुं. 'जाली होती'] **जाली आंगवण । कां न** [मु. 'न केलें'; तं. 'न करवेंचि'.] **करिसीच सीता हरण ।**
**सभेसी जालें काळें वदन । घेऊनि प्राण पळालासी ॥ ८१ ॥**

**तूं** [पै. तु. तं. खेरीज इतरत्र 'पळसी'.] **लपसी विराधा भेण । रामें मारिला न लगतां क्षण । तेथें तूं बापुडे रावण । मशक कोण संग्रामीं ॥ ८२ ॥**

**शूर्पनखेच्या दुष्टबुद्धी । श्रीरामदाराहरण विधी । बाणें दाहीं मस्तक छेदी । तूं त्रिशुद्धी निमसील ॥ ८३ ॥**

**स्वामीची वासना** [मु. 'वासना पुरवीत'.] **पोखीत । संवादी मिळती बहुत ।** [मु. दै. प्रतींत 'परी' हे पद अधिक.] **यथार्थे धर्म परमार्थ । सांगता आप्त दुर्लभ ॥ ८४ ॥** [ओवी ८४ कं. प्रतीत नाही.]

**ऐकें बापा लंकानाथा । म्यां सांगितलें यथार्थता । तें जैं नमने तुक्या चित्तां । तैं माझी कथा अवधारी ॥ ८५ ॥**

**होतां श्रीराम दर्शन । तत्काळ माझा जाईल प्राण । तेथें मी** [कं. 'नवांचें'.] **नवचे वाहिली आण । तेणें रावण क्षोभला ॥ ८६ ॥**

**श्रीराम** [पै. 'माझा'.] **तुझा घेईल प्राण । तुज** [पै. कं. तु. तं. 'मज मारितां'; मु. 'तरी मी मारितां'.] **मी मारितां राखेल कोण । वर्मे खोचला रावण । तुज निर्दळण माझे नि ॥ ८७ ॥**

आज्ञा भंगो नरेंद्राणां विप्राणां मानखंडनम् । पृथक् शय्या च नारीणामशस्त्रबध उच्यते ॥ १५ ॥

**राजाज्ञेचें उल्लंघन । करी त्या रायें करावें हनन । ये अर्थी शास्त्र विधि विधान । तुज मुख्य मरण माझेनि ॥ ८८ ॥** [मुद्रितात ८८ ओवी अशी आहे :–– 'सेवक मोडी स्वामींचें वचन । यदर्थ शास्त्र विधि विधान । सेवकासि करावें हनन । हें तुझ मुख्य मरण माझे नि ॥']

**राम मानवी रंक तापसी । त्याचें भय मज दाविसी । तो मीं गिळीन एके घासीं । लक्ष्मणेंसी समवेत ॥ ८९ ॥**

**मी तंव क्षोभलियां रावण । धाकें निमती रामलक्ष्मण । मग सीतेचें पाणिग्रहण । मी करीन प्रतापें ॥ ९० ॥**

अनुक्रमणिका

**मरीचीचा करावया घातु । कोपें खवळला लंकानाथु । मरीचि पडला विचारांतु । उभयतां मृत्यु मज आला ॥**

रामादपि च मर्तव्यं मर्तव्यं रावणादपि । उभाभ्यामपि मर्तव्यं वरं रामो न रावणः ॥ १६ ॥

**जातां पंचवटी आंत । अवश्य वधील रघुनाथ । तेथें न वचतां अनर्थ । लंकानाथ** [कं. 'करील'.] **वधील ॥ ९२ ॥**

**रावणाचें नि हातें मरण । तें मज** [मु. 'जालें'.] **आलें अधःपतन । लागतां श्रीरामाचा बाण । कृत कल्याण मज** [कं. 'जालें'.] **तेणें ॥ ९३ ॥**

**अति दुर्धर श्रीरामबाण । घायें** [मु. 'वारील'.] **मारील जन्म मरण ।**
**ज्यासी लागे तो सुख संपन्न । कृत कल्याण राम बाणें ॥ ९४ ॥**

**ऐसें विचारूनिं चित्तां । मरीचि म्हणे लंकानाथ । बोलिलों** [कं. 'चिंता'.] **रामभयाची वार्ता । तुझ्या पुरुषार्था पाहावया ॥ ९५ ॥**

**करावया श्रीरामासी रण । तुझे** [मु. कं. 'कैसी आंगवण'.] **आंगी आंगवण ।** [मु. 'तूं तव' ही दोन पदें अधिक.] **अति पुरुषार्थी तूं रावण । साह्य संपूर्ण मी तुज ॥ ९६ ॥**

**हरावया श्रीराम कांता । सर्वस्वें वेचीन जीविता । निमिषें प्रलोभीन सीता । मृगवेषता वैभवें ॥ ९७ ॥**

**ऐकोनि मरीचीचें वचन । सुखावला दशानन ।** [मु. 'तरीं' हे पद अधिक.] **धावोनि दिधलें आलिंगन ।** [मु. 'मग' हे पद अधिक.] **कंठाभरण अर्पिले ॥ ९८ ॥**

[मु. 'आणि' हें पद अधिक.] **दोघीं करूनि सुख गोष्टी । बैसोनिया** [मु. 'ऐंशा' हे पद अधिक.] **रथपृष्टीं ।** [मु. 'ठाकूनि'.] **टाकूनि आले पंचवटी । राम जगजेठी जे ठायीं ॥ ९९ ॥**

**मागां ठेऊनि सारथी रथु । दोघे आले वना आंतु ।** [मु. 'मग' हे पद अधिक.] **मरीचीसि म्हणे लंकानाथु ।** [दै. 'स्वकार्यार्थ'.] **कृतकार्यार्थु साधावा ॥ १०० ॥**

[मु. 'कामी कमनीय'.] **कामकमनीय मृगरुपता । सवेग प्रलोभोनि सीता ।** [मु. 'दूरी'.] **दूरस्थ न्यावें रघुनाथा । सौमित्र भ्राता समवेत ॥ १०१ ॥**

**येतां देखोनि रामबाणासी । अदृश्य होआवे** [दै. 'लाग वेगेसीं'.] **लाघवेंसी । तवें मी हरीन जानकीसी । मग लंकेसी जावों दोघे ॥** [कं. प्रतीत १०२ व १०३ या ओव्या नाहीत. प्रसंग समाप्तीची ओवीही अशी आहे :–– 'मरीचि होऊनिया सावधान । आपण होईल मृग वेष धरुन । तत्काळ पंचवटी टाकून । धरी आपण मृग वेषातें ॥']

**ऐसी आप्तत्वें सांगोनि गोठी । हरिखें त्याची पाठी थापटी । परम प्रीति धरुनि पोटीं । पंचवटीं** [मुं. तु. जो. 'प्रवेशवी'.] **प्रवेशती ॥ १०३ ॥** [कं. प्रतीत १०२ व १०३ या ओव्या नाहीत. प्रसंग समाप्तीची ओवीही अशी आहे :–– 'मरीचि होऊनिया सावधान । आपण होईल मृग वेष धरुन । तत्काळ पंचवटी टाकून । धरी आपण मृग वेषातें ॥']

अनुक्रमणिका

करितां जानकी हरण । धांकती मरीचि आणि रावण । एका जनार्दना शरण । [तं. 'विधान'.] कथाविंदान अवधारा ॥ १०४ ॥

पुढील श्रीरामचरित्र । अति गुह्य अति विचित्र । श्रवणें [मु. 'होती' हे पद अधिक.] पातकी पवित्र । चिद्चिन्मात्र श्रीराम ॥ १०५ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां मारीचिरावणपंचवाटिकागमन नाम त्रयोदशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग चौदावा

## मारीच वध

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

रामाश्रम पंचवटीं । रावणें देखोनियां दिठी । मारिल्या देखोनि राक्षस [मु. कं. 'कोटी'.] थाटी । तेणें पोटीं [मु. 'दचकला'; कं. 'भयकंपु'.] थरकांपु ॥ १ ॥

राक्षसांची दीर्घ मडीं । पाडिल्या देखोनि करवडी । मरीचि अत्यंत हडबडी । खाजवी शेंडी भयभीत ॥ २ ॥

आधींच रामभयें भयभीत । त्यावरी देखोनि राक्षसघात । मरीचि चळचळां कांपत । राक्षसां अंत श्रीरामें ॥ ३ ॥ [ओवी ३ कं. प्रतीत अशी आहे :—– 'बहुत देखोनि राक्षस घात । मरीचि चळचळा कांपत । भय धरूनि म्हणे हृदयांत । राक्षसा अंत श्रीराम ॥']

देखोनि राक्षस कंदन । मरीचीसि स्वयें रावण । अत्यंत देऊनि सन्मान । त्याचे चरण दृढ धरिले ॥ ४ ॥

सीताहरण अतिनिर्वाण । खुंटलें स्वामीसेवकपण । कृपा करूनि आपण । जानकी हरण साधावें ॥ ५ ॥

ज्यालागीं आमचें आगमन । तें कार्य साधावें आपण । दाऊनिं [तं. कं. 'मृगमोहन'.] मायामृग मोहन । सीताहरण मज साधी ॥ ६ ॥

> स रावणवचः श्रुत्वा मारीचो राक्षसाधिपः । मृगो भूत्वाऽऽश्रमपदे रामस्य विचचारं ह ॥ १ ॥
> दर्शनाल्लोभनीयश्च कांचनस्य समप्रभः । रुक्मविंदुशतैश्चित्रप्रवालमणिभूषितः ॥ २ ॥
> मुक्ताजालपरिच्छिन्नः स बभूव मनोहरः ॥ ३ ॥

ऐकोनि रावणाचें वचन । मरीचि म्हणे आलें मरण । श्रीराम बाणें [कं. खेरीज इतरत्र 'देतां'.] सांडितां प्राण । तैं आपण अति धन्य ॥ ७ ॥

अंती करी जो रामस्मरण । तो होय स्वयें [तं. 'ब्रह्म आपण'.] ब्रह्मपूर्ण । त्याचा लागलिया निजबाण । कृतकल्याण मी होईन ॥ ८ ॥

श्रीरामाच्या बाणघातीं । दासी होती चाऱ्ही मुक्ती । अनायासें ब्रह्मप्राप्ती । श्रीराम मूर्ति देखिलिया ॥ ९ ॥

ऐसें विचारूनि चित्तीं । रावणा सुख द्यावया अंतीं । जाला विचित्र मृगाकृती । लंकापति विस्मित ॥ १० ॥

नाहीं साडीमांडी केली । नाहीं फेडीवेढी देखिली । [कं. 'तत्काळ'.] घंवकरी मृगशोभा शोभली । पडली भूली लंकानाथा ॥ ११ ॥

तनु मनोहर सोनसळी । रत्नबिंदु [मु. कं. 'रोमावळी'.] रोममूळी । [कं. 'पृथ्वी'; तं. 'पुरवीं'.] पृष्ठीं शोभे मुक्ताफळी ।

अनुक्रमणिका

नभोमंडळी जेवीं तारा ॥ १२ ॥

खुर आरक्त [तं. 'प्रवाळपाणी'; दै. घा. 'प्रवाळवर्णी'.] प्रवाळमणी । कळावया शोभा [दै. 'मस्तकमणी'.] मरकतमणि । [घा. इं. 'पांचु बिंदु उमटले श्रवणीं'.] पांचूचे बिंदुकर्ण श्रेणी । कर्णाभरणीं [घा. सु. 'अतिशोभा'; इं. 'निःशंक अतिशोभा'.] शंकुशोभा ॥ १३ ॥

इंद्रनीळशृंगे रत्न मुरडी । आरक्तनयन जिव्हा तांबडी । [घा. इं. 'ठकार'; कं. सु. 'ठाणठणत्कार'.] ठाणठमकार परवडी । मृगशोभा [दै. 'निरवडी'.] गाढी शोभत ॥ १४ ॥

शृंगाग्रीं मणि लखलखिती । पुच्छ तळपे सेंदुराकृती । शुभ्र उदर हंस स्थिती । विचित्राकृति मृगशोभा ॥ १५ ॥

आंगीच्या तेजाचिया प्रगल्भा । लोपती रविचंद्राचिया प्रभा । सोलीव लावण्याचा गाभा । मृगशोभा शोभत ॥ १६ ॥

ऐसा चंवकत [दै. 'सरकत'; मु. 'बिचकत'.] बिंबत । चकिता दृष्टीं चपळ पाहात । कांहीं चरत कांहीं फडकत । आश्रमांत स्वयें आला ॥ १७ ॥

रिघोनिया पंचवटीं । सन्मुख सीतेचिये दृष्टी । श्रीराम देखे जगजेठी । तैसिये निकटी चरतुसे ॥ १८ ॥

श्रीरामापासूनि फडके दुरी । निकट विचरें सीतेसुंदरी । सर्वांगें दाऊनि साजिरीं । क्षणामाझारीं मोहिली ॥ १९ ॥

मृगेंसि होतां दृष्टीभेटी । हर्ष जानकीच्या पोटीं । त्याचें लावण्य देखतां दिठी । आल्हाद [तं. मु. 'पोटीं'.] कोटी सीतेसी ॥ २० ॥

देखोनि मृगाचे अवयव । सीतेसी सुख [तं. 'अनुभव'.] अभिनव । परमसुखें सुखावें जीव । जडला भाव मृगरूपीं ॥ २१ ॥

त्याचें पाहावया सर्वस्वरूप । सीतेसी अतिशयें साक्षेप । [कं. 'तंव तोहि आला ती समीप'.] तंव तो आला अतिसमीप । स्वस्वरूप दावावया ॥ २२ ॥

सीता अंगप्रत्यंगीं न्याहाळी । जवळी येऊनि कुरवाळी । [तं. तु. 'मृगरोमा'; दै. 'मृदुलोभ'; तं. 'मृगतनु रोम सांवळी'.] मृदुरोमा तनु कोंवळी । दोहीं करतळीं निवाली ॥ २३ ॥

देखोनि मृगशोभा अत्यंत । स्वर्गीं सुरवर जाले भ्रांत । कोण कोणाचा कैंचा येथ । [तं. 'मोह अत्यंत मृगासी'.] अत्यद्भुत महामृग ॥ २४ ॥

देखोनिया मृगाकृती । ऋषीश्वर पडले भ्रांतीं । तटस्थ [तं. 'ठेले दत्तचित्ती'.] ठेली चित्तवृत्ती । अवघे पाहाती

अनुक्रमणिका

टकमकां ॥ २५ ॥

होतां मृगाचें दर्शन । मृग आकर्षी सीतानयन । मृग सौंदर्या वेधलें मन । लागलें ध्यान मृगाचें ॥ २६ ॥

हरिखें सांगे श्रीरामासी । उल्हासें बोले लक्ष्मणेसी । मृगसौंदर्या शोभा कैंसी । [कं. 'हेमरंगेसी रत्नमंडित'.] हेमांगेसीं रत्नाळी ॥ २७ ॥

वनें हिंडतां कोट्यानुकोटी । येणें मृगेसी नाहीं भेटी । मज पाहातां निजदृष्टी । ऐसा मृग सृष्टीं नसेल ॥ २८ ॥

हा नाहीं सृष्टेन सृजिला । नाहीं [मु. 'कर्मजन्य'.] कर्मजन्में जन्मला । निखळ लावण्याचा वोतला । दैवें धाडिला मजलागीं ॥ २९ ॥

ऐसें सीता बोलोनि आपण । श्रीरामा घाली लोटांगण । [मु. 'जें मज अपूर्व'.] जन्मा अपूर्व मागते दान । तें आपण मज द्यावें ॥ ३० ॥

तूं तंव उदार चक्रवर्ती । मीं मागते अतिप्रीतीं । कृपा करावी रघुपती । कृपामूर्ति [कं. 'तूं कृपाळू'; मु. तु. तं. 'कृपाळूवा'.] कृपावंता ॥ ३१ ॥

म्हणोनि चरण धरी लल्लाटीं । अश्रु [मु. 'भरले'.] लोटलें नेत्रवाटीं । सलज्ञ याच्ञा [मु. 'पाहे'; कं. 'करी गोष्टी'.] करी गोरटी । श्रीराम दृष्टीं लक्षूनि ॥ ३२ ॥

मृगत्वचा अतिकोंवळी । हेमरत्न शोभा [मु. 'मुक्तावळी'; तं. 'शोभे मुळी'.] मुक्ताफळीं । अयोध्या प्रवेशन काळीं । याची कांचोळी मी करीन ॥ ३३ ॥

येथूनि अयोध्या प्रवेशास । उरले [मु. 'अवधि'.] आहेती षण्मास । ते कंचुकीची मज बहुत आस । तुम्ही उदास [पै. खेरीज इतरत्र 'न व्हावे'.] न करावें ॥ ३४ ॥

दिव्य अळंकार भूषण । त्याहूनि त्वचा शोभायमान । त्वचेंपुढें नवरत्न । खद्योत जाण श्रीरामा ॥ ३५ ॥

> तच्छ्रुत्वा वचनं तस्याः सीतायाः पुरुषर्षभ । उवाच संहृष्टमनाः सौमित्रिमथ राघवः ॥ ४ ॥
> पश्य लक्ष्मण वैदेहीं मृगत्वचि गतस्पृहां । न वने नंदने दृष्टो नापि चैत्ररथे वने ॥ ५ ॥
> कुतः पृथिव्यां सौमित्रे योऽस्य कश्चित्समो भवेत् ॥ ६ ॥

मृगाचें हृदयीचें हृद्गत । जाणोनि सीतेचें मनोगत । संतुष्ट जाला श्रीरघुनाथ । कर्तव्यार्थ लक्षूनि ॥ ३६ ॥

श्रीराम म्हणे सौमित्रा । पाहे पां कैसा मृगसुंदरा । ठाणमाण [पै. खेरीज इतरत्र 'अति'.] गति गंभीरा । हेम शरीरा रत्नांक ॥ ३७ ॥

ऐसा मृग नंदनवनीं । पूर्वीं नाहीं देखिला [तं. 'कवणी'.] नयनीं । नाहीं [तं. 'चित्र विचित्र वनीं'.] चैत्ररथ वनीं । ऐसा

अनुक्रमणिका

**त्रिभुवनीं असेना ॥ ३८ ॥**

**वनें हिंडता आम्ही** [कं. 'आम्ही नदी तटी'.] **दिक्पटीं । ऐशा मृगेसी नाहीं भेटी । लावण्य मृगाची** [मु. 'कसवटी'; तं. 'कांति गोमटी'.] **कामाठी । नाहीं दृष्टीं देखिली ॥ ३९ ॥**

**ये मृगत्वचेची कांचोळी । प्रेमें मागे जनकबाळी । अयोध्या प्रवेशाचे काळीं । स्वयें वेल्हाळी लेवों पाहे ॥ ४० ॥**

[मु. 'जे अपूर्व'.] **जन्मा अपूर्व मजकारणें । प्रथम सीतेचें मागणें । नेदी म्हणतां लाजिरवाणें । मृग मारणें** [मुं. 'तत्वार्थ'.] **त्वचार्थ ॥ ४१ ॥**

**सीतेचिया मागण्यासाठीं । मृगवधार्थ श्रीराम उठी । हेमाभरणी धनुष्य मुष्टीं । बाण पृष्ठीं तुणीर ॥ ४२ ॥**

**श्रीराम** [सु. इं. 'सोडोनियां'.] **मांडूनिया ठाण । धनुष्या** [मु. 'वाहिलासें'.] **वावोनियां गुण । सितीं लाऊनियां बाण । मृग लक्षून निघाला ॥ ४३ ॥**

> यावत्पृषतमेकेन सायकेन निहन्म्यहम् । हत्वेमं चर्मसहितः शीघ्रमेष्यामि लक्ष्मण ॥ ७ ॥
> अद्य भ्राजिष्यति शुभा मैथिली मृगचर्मणा । अजिनं प्राच्छदापूर्वं अयोध्यायां प्रवेशने ॥ ८ ॥

**लक्ष्मणा ऐके सावधान । बाणें एकें मृग मारीन । मृगचर्म शोभायमान । सीतेसि देईन सुखार्थ ॥ ४४ ॥**

**मृगचर्म आलिया हातां । परम सुखें सुखावे सीता । आईक तिचिया मनोगता । उभय भागतां विभागू ॥ ४५ ॥**

**अर्ध चर्माची कंचुकी पूर्ण । अर्द्ध चर्माचें मज आसन । करिता अयोध्या प्रवेशन । शोभायमान** [मु. 'आम्हां दोघां'.] **आम्ही दोघें ॥ ४६ ॥** [तु. प्रतीत ओवी ४६ व ४७ चे चरण घेऊन एकच ओवी केली आहे.]

**मृगचर्माचें भूषण । एका कंचुकी एका आसन । ऐसें सीतेचें भावी मन । पतिवंचन करूं नये ॥ ४७ ॥**

**उत्तम अन्न आणि पक्वान्न । वस्त्रें अलंकार भूषण ।** [मु. 'पतिवीण'; कं. 'पतितोषेवीन'.] **पति शेषेवीण भोगी आपण । ते स्त्री जाण समवेश्या ॥ ४८ ॥**

**असो हे ऐसी सीतेची कथा । लक्ष्मणा सावध ऐक आतां । मृग मारूनि मज न येतां । तिळभरी परता हों** [तं. 'येऊ नको'; कं. 'न व्हावे'; दै. 'जाऊं नको'.] **नको ॥**

> अहमेनं हनिष्यामि मृगरत्नं न संशयः । इह त्वं भव सन्नद्धः शस्त्रवान्रक्ष मैथिलीम् ॥ ९ ॥
> यावद्गच्छामि सौमित्रे मृगमानयितुं वनात् । न गंतव्यमितोऽन्यत्र यावन्नाहमिहागतः ॥ १० ॥
> राक्षसा दुष्टभावत्वाद्वितर्काः संभवंति हि । तथा तु तं समादिश्य भ्रातरं तु पुनः पुनः ॥ ११ ॥

**मृग मारीन मी निश्चित । मिळालिया त्रैलोकीचे दैत्य । मागें न सरे मीं रघुनाथ । संशयो येथ न मनावा ॥ ५० ॥**

अनुक्रमणिका

राक्षसां पडिलें हाडद्वंद्व । तुवां नसावें असावध । शस्त्रा अस्त्रीं सन्नद्धबद्ध । सीता सावध रक्षावी ॥ ५१ ॥

गुज सांगे सौमित्रा कानीं । राक्षस [दै. कं. 'मायीक या वनीं'.] मायावी यौवनीं । सीता नेतील छळूनि । सावधानी राखावी ॥ ५२ ॥

मृग मारूनि ये जंववरी । तुवां न व्हावें तिळभरी दुरी । संकट आलिया ही जिवावरी । धीरें निर्धारी [तं. सु. इं. 'राहावें'; दै. कं. 'असावें'.] साहावें ॥ ५३ ॥

माझे विषयीं कांहीं चिंता । तुवां न करावी सर्वथा । सावधानें राखावी सीता । मागुतमागुता सांगतु ॥ ५४ ॥

अतिसंकट देखिलिया दृष्टी । तरी न संडावी पंचवटी । गुह्य गुज सांगे गोष्टी । सीता गोरटी रक्षावी ॥ ५५ ॥

सन्मुख आलिया राक्षस कोडी । आंगीचिया निज प्रौढीं । युद्धां न [तं. 'निघसी'; मु. 'निघावें'.] रिघावें तांतडी । सीता रोकडी तें नेती ॥ ५६ ॥

तुज गोवूनि संग्रामासी । राक्षस नेतील सीतेसी । झणें सीता विसंबिसी । निश्चयेंसी तुज सांगे ॥ ५७ ॥ [ओवी ५७ तं. प्रतीत नाही.]

तुज चढलिया संग्राम [मु. दै. 'पृष्ठी'.] पुष्टी । मुख्य जानकी नाठवे पोटीं । [दै. 'सती'.] एकली देखोनि पर्णकुटीं । राक्षस कपटी हरतील ॥ ५८ ॥

म्यां सांगितल्या ज्या ज्या युक्ती । त्या दृढ राखोनियां चित्तीं । नाना परीच्या उपपत्तीं । सीता सती रक्षावी ॥ ५९ ॥

ऐसें सौमित्रा सांगोन । वेगीं निघे मृग लक्षून । सवेंचि परतोन येऊन । सांगे पुनः पुनः सीता रक्षी ॥ ६० ॥

वारंवार करूनि नेम । मृगवधार्थ निघे राम । धनुष्य बाणाचा आक्रम । अतिसंभ्रम [कं. 'तद्विसीं'.] तद्वधीं ॥ ६१ ॥

राम देखोनि धनुषमुष्टी । मृग फडके चकित दृष्टी । सांडूनिया [दै. खेरीज इतरत्र 'पंचवटी'.] पर्णकुटी । उठाउठी पळतुसे ॥ ६२ ॥

शूर्पनखेचें नासिका छेदन । तेथें मृगाचें आगमन । येतां देखोनि रघुनंदन । सवेग गमन तेणें केलें ॥ ६३ ॥

राम देखोनिया दुरी । मृग चाटी पाठीवरी । तया स्थळा नांव [दै. 'वाठौरी'.] चाटौरी । गंगातीरीं [तं. 'मृगहनन'.] मृगगमन ॥ ६४ ॥

श्रीराम मुखचंद्र न्याहारी । तया स्थळा नांव चांदोरी । श्रीराम न्यावया बहु दुरी । [सु. इं. 'रिघावा'; घा. 'निघे झडकरी'.] निघावा करी मृग वेगें ॥ ६५ ॥

अनुक्रमणिका

काढूनि न्यावें रघुवीरा । मृग फडकला मध्यमेश्वरा । दावली दाऊनि श्रीरामचंद्रा । मृग पुढारा [मु. 'चालिला'.] चंवकला ॥ ६६ ॥

दुरी अंतरावया पंचवटी । मृग पळे गंगातटीं । राम धांवे पाठोवाठीं । धनुष्य मुष्टीं सज्ञून ॥ ६७ ॥

कोठें देत दृष्टीभेटी । कोठें पाहाता न दिसे [मु. 'सृष्टी'.] दृष्टी । राम मृगाची न संडी पाठी । दृढ [कं. 'बाण बोटीं'; दै. 'बाणमुष्टी'.] बाणाटी सज्ञूनि ॥ ६८ ॥

कोठें दिसे कोठें न दिसे । कोठें उडे मृग विन्यासें । श्रीराम धांवे अति आवेशें । बाण [जो. 'समीपें'; दै. 'बाणा सरिसें'.] सपिसें विंधावया ॥ ६९ ॥

देखोनि श्रीरामाचा बाण । मृग वेगें [मु. 'सोडी'; दै. 'झाडी कान'.] फोडी ठिकाण । त्या त्या ठायां नांव ठाण । सावधान अवधारा ॥ ७० ॥

कुंकुमठाण मातुळठाण । नागमठाण [मु. 'बादमठाण'.] बादाठाण । पांचवें तें भामाठाण । पळे ठिकाणें [मु. 'सोडितु'.] फोडितु ॥ ७१ ॥

[पै. तु. घा. 'मृगपाप'.] मृगपाद छेदी रामरावो । तो [पै. तु. घा. 'छिन्नपाप'; दै. 'तो परिछिन्न पापदंडी गावो'.] छिन्नपाद देइगांवो । नेऊर विंधोनि पाडिलें पाहो । नेऊर गांवो तिये ठायीं ॥ ७२ ॥

भालीं भेदली जिव्हारीं । तो भालगांव गंगातीरीं । लक्ष्मणा धांव धांव लौकरी । गिरा गजरीं मृग पडिला ॥ ७३ ॥

> अंतकालेऽपि संप्राप्ते तस्य बुद्धिरभूदियं । सदृशं स्वरमालंब्य रामस्य विदितात्मनः ॥ १२ ॥
> हा लक्ष्मणेति चुक्रोश त्राहीति महता वने । स्वरमेतं तु संश्रुत्य लक्ष्मणं प्रेषयिष्यति ॥ १३ ॥
> लक्ष्मणेन विहीनां तां मैथिलीं रावणो हरेत् ॥ १४ ॥

लागतां श्रीरामाचा बाण । करुनि सप्त ताळ उड्डाण । मरीचि सांडी निजप्राण । पांव लक्ष्मणा म्हणौनी ॥ ७४ ॥

मरीचि महा मावकर । श्रीरामस्वरा सारिखा स्वर । करूनि आक्रंदे दुस्तर । दीन उत्तर तें ऐका ॥ ७५ ॥

लक्ष्मणा वेगीं धांव पावो । मिळोनि राक्षस समुदावो । रणीं निरोधें रोधिलों पाहो । महाबाहो [मु. 'धांव'.] पाव वेगीं ॥ ७६ ॥

तूं तव माझा निजसखा । रणभूमीचा पाठीराखा । राक्षसीं मारिलों मारिलों देखा । रणमोचका पाव वेगीं ॥ ७७ ॥

ऐसिया युक्ती आक्रंदोन । मृग रूपातें त्यागोन । मरीचि राक्षस होतां जाण । घेतला प्राण रामबाणें ॥ ७८ ॥

मृग देहो राक्षस देहो । स्थुळलिंग कारणदेहो । रामबाणें छेदूनि पाहो । निःसंदेहो मारिला ॥ ७९ ॥

मरण मारिलें जन्मेंसहित । देहविदेहा केला घात । [दै. 'माया मोह सारूनि'; तं. 'माया मृग मारूनी'.] माया मारूनि समस्त । बाणें अत्यंत सुखी केला ॥ ८० ॥

श्रीरामाचा निजबाण । ज्यासी लागे तो सभाग्यपूर्ण । बाण नव्हे तो आनंदघन । सुख संपन्न श्रीरामें ॥ ८१ ॥

स्थूळ देहातें छेदित । योद्धे देखिले बहुत । [दै. 'जीव शिवपणा'.] जीवी जीवपणा करी घात । श्रीरघुनाथ निजयोद्धा ॥ ८२ ॥

छेदूनिया [मु. 'भयाभय शोक'; दै. 'भवभय शोक'; कं. 'भवशेष'; तं. 'भेदशंका'.] भयशोक । छेदूनियां द्वंद्व दुःख । रामें दिधलें परमसुख । सुखाचें सुख श्रीराम ॥ ८३ ॥

मरीचीनें नेम केला देख । श्रीरामबाणें पावेन सुख । रामें दीधलें अवश्यक । शत्रुसेवक [दै. 'निजपदीं'; कं. 'समंधीं'.] समपदीं ॥ ८४ ॥

जें सुख भोगिती सनकादिक । तें सुख मरीचीसी अवश्यक । बाप कृपाळू रघुटिळक । सुखदायक संग्रामीं ॥ ८५ ॥

या परी श्रीरामें आपण । मरीचि मारिला विंधोनि बाण । धांव पाव कां म्हणे लक्ष्मण । रघुनंदन साशंकित ॥ ८६ ॥

मरीचि आक्रंदाची हांक । दुमदुमिले तिन्हीं लोक । सौमित्रें ऐकोनि देख । येईल अवश्यक [मु. 'धांवोनी'.] धांवणिया ॥ ८७ ॥

धांवण्या आलिया लक्ष्मण । अनर्थ होईल दारूण । [कं. 'कपटें'.] मागें येऊनि रावण । सीताहरण तो करील ॥ ८८ ॥

लक्ष्मण [तं. 'नयेतां'.] नयेल तत्वतां । त्यासी राहों नेदील सीता । [मु. 'बोल बोलेल उत्पातता'.] बोली बोलोनि उत्पाता । अति त्रासतां धाडील ॥ ८९ ॥

हा तंव मायावी मृगपूर्ण । अलक्ष योजिलें विंदान । धांवण्या आणूनि लक्ष्मण । सीताहरण साधावें ॥ ९० ॥

ऐसें राक्षस मायामत्त । आपण जाणोनि समस्त । विलंब करूं नये येथ । त्वरां रघुनाथ निघों पाहे ॥ ९१ ॥

जंव आला नाहीं लक्ष्मण । तंव तेथें जावें आपण । विलंब करितांचि जाण । [कं. 'सीताहरण होईल'.] सीता रावण हरील ॥ ९२ ॥ [ओवी ९२ दै. प्रतीत दोन वेळा लिहिलेली आहे.]

लक्ष्मण धांवणिया [मु. 'नये उठाउठी'.] उठाउठी । तंव टाकावी पंचवटी । ऐसें विचारूनि पोटीं । [मु. 'मग'.] राम

**जगजेठी निघों पाहे ॥ ९३ ॥**

**एका जनार्दना शरण । श्रीरामें मरीचि** [दै. ‘मारिची उद्धरण’.] **मारिला पूर्ण । धांवण्या धांवेल लक्ष्मण । कथाविंदान अवधारा ॥ ९४ ॥** [कं. प्रतीत शेवटी अधिक ओवी अशी आहे :—— ‘श्रीरामें मरीचि उद्धरिला । प्रसंग श्रवणें लाभ घडला । तैसाच दीनाचा उद्धार वहिला । श्रवणें सकळां होईल ॥’]

**इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां मारिचवधो नाम चतुर्दशप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग पंधरावा

## लक्ष्मण सीतानुवाद

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

**श्रीरामस्वरें समान । मरीचीनें केलें आक्रंदन । ऐकोनि सीता करी रुदन । रघुनंदन** [तं. मु. 'सापडला'.] **सांकडला ॥ १ ॥**

**राम रणरंगधीर पूर्ण ।** [घा. 'विकट योद्धा अति'; तं. 'विकट युद्धे करी रावण'.] **विकट युद्ध दिसे दारुण । तो आक्रंदे दीनवदन । पांव लक्ष्मणा म्हणोनि ॥ २ ॥**

**श्रीरामाचें आक्रंदन । ऐकोनि दीनवचन । उगाच राहिला लक्ष्मण । कां पां मन द्रवेना ॥ ३ ॥**

> आर्तस्वरं तु तं भर्तुर्विज्ञाय सदृशं वने । उवाच लक्ष्मणं सीता गच्छ जानीहि राघवम् ॥ १ ॥
> सखायं भ्रातरं ज्येष्ठं रामं पंथानमागतम् । आक्रंदमानं तु वने भ्रातरं त्रातुसर्हसि ॥ २ ॥
> तं क्षिप्रमभिधाव त्वं भ्रातरं शरणैषिणम् । रक्षसां वशमापन्नं सिंहानामिव गोवृषम् ॥ ३ ॥

**सीता म्हणे लक्ष्मणासी । आजि कां निष्ठुर जालासी । राक्षसीं रोधिले रामासी । तूं कां न धांवसी धांवण्या ॥ ४ ॥**

**तूं जिवलग बंधू सखा । रणांगणीचा पाठीराखा । ऐकोनि श्रीरामाच्या हांका । धांवणे तूं कां न धांवसी ॥ ५ ॥**

**जैसा व्याधिग्रस्त केसरी । वनीं वेढिजे जेंवीं** [कं. 'वनचरीं'.] **वानरीं । श्रीराम तैसा वनांतरीं । निशाचरीं** [मु. 'वेढिला'.] **रोधिला ॥ ६ ॥**

**श्रीराम रणरंगधीर परिपूर्ण । तोही आक्रंदें आला शरण । शरणागतां संरक्षण । केवीं आपण न करिसी ॥ ७ ॥**

**ऐसें बोलोनिया सीता । लक्ष्मणाचरणीं ठेविला माथा । राम** [मु. दै. 'पावला'.] **गुंतला अतिआकांता । धावणें तत्वतां करी वेगीं ॥ ८ ॥**

**ऐकोनि सीतेचें वचन । सौमित्र घाली लोटांगण । ऐक वो माते सावधान । रघुनंदननिजमहिमा ॥ ९ ॥**

> देवि देवमनुष्येषु गंधर्वेषु पतत्रिषु । राक्षसेषु पिशाचेषु किन्नरेषु मृगेषु च ॥ ४ ॥
> अशक्यस्तव वैदेहि भर्ता जेतुं न संशयः ॥ ५ ॥

**सुरासुर नर किन्नर । दानव मानव निशाचर । यक्ष राक्षस विद्याधर । पळती सत्वर रामबाणें ॥ १० ॥**

अनुक्रमणिका

पिशाच गुह्यक गंधर्ववीर । त्रिलोकीचे निधडे शूर । पक्षी पन्नग विखार । पळती सत्वर रामबाणें ॥ ११ ॥

विरिंच्यादि सुरेश्वर । कांपती देखोनि श्रीरामशर । पिनाकपाणी श्रीशंकर । रामासमोर हो न सके ॥ १२ ॥

देखोनि श्रीरामाचा बाण । शंकर घाली लोटांगण । त्या श्रीरामा मारी कोण । व्यर्थ रुदन तूं कां करिसी ॥ १३ ॥

तुज देखतां त्रिशिरा खर । मारिलें चौदा सहस्त्र वीर । त्या रामासीं मृगकिंकर । केवीं साचार मारवे ॥ १४ ॥

श्रीरामबाणाचें निजनेटें । मेरु मांदार पर्वत फुटे । कळिकाळाचें काळिज [पै. कं. 'तुटे'.] फाटे । घायें उतटे ब्रह्मांड ॥ १५ ॥

ऐसिया श्रीरामासी देख । मृग बापुडें एकलें एक । केवीं मारूं शके रंक । वृथा दुःख तूं करिसी ॥ १६ ॥

राम वध्य नव्हे कोणासी । राम वधील सर्वांसी । तूं कां रडसी आक्रंदसी । मृत्यू रामासी असेना ॥ १७ ॥

वसिष्ठें सांगितलें निजवर्म । अजरामर श्रीराम ब्रह्म । हें नाठविसी मूर्ख परम । रुदनधर्म तोही मिथ्या ॥ १८ ॥

लक्ष्मणा धांव धांव सत्वर । हा तंव नव्हे श्रीरामस्वर । राक्षस वदती [दै. 'मानवाकार'.] मावकर । तें तूं साचार मानिसी ॥ १९ ॥

ऐक माझें सत्यउत्तर । मृग मारूनि सत्वर । आतां येईल तुझा भर्तार । धरी निर्धार जानकिये ॥ २० ॥

राक्षसांचे छळणवचनीं । तुज एकलें सांडूनि वनीं । न वचे श्रीराम धांवणीं । सत्यवाणी हे माझी ॥ २१ ॥

श्रीराम सांगे वारंवार । जीवावरी आलिया [मु. 'दुर्धर'.] दुस्तर । तरी न सांडावी सीता सुंदर । तुज समोर नेमिलें ॥ २२ ॥

माझे विषयीची कांही चिंता । लक्ष्मणा न करावी सर्वथा । राम बोलिलां तुज देखतां । सावध सीता रक्षावी ॥ २३ ॥

पुनः पुनः सांगे कानीं । राक्षस मायावी ये वनीं । सीता नेतील छळूनी । सावधानी राखावी ॥ २४ ॥

श्रीरामाची सिकवण ऐसी । केवी मी करूं तुझ्या बोलासी । तुज सांडून वनवासीं । रामापासीं मी न वचे ॥ २५ ॥ [ओवी २५ कं. प्रतीत अशी आहे :—— 'छळावया वनांतरीं । शूर्पनखी जाहली सुंदरी । राक्षस येती तशा परी । सीता क्षणभरी न विसंबे ॥' ही ओवी पै. प्रतीत नाही. तु. घा. सु. दै. तं. प्रतींत ही ओवी २५ वी आहे. संपादित ओवी २५ कं. प्रतीत २६ कमांकावर आहे.]

उल्लंघूनि श्रीरामवचन । तुझेनि बोले जातां [पै. 'जाण'.] आपण । राक्षसीं केल्या तुझें हरण । रोकडें मरण मज

**आलें ॥ २६ ॥**

आत्मबुद्धिर्हितार्थाय गुरुबुद्धिविशेषतः । परबुद्धिर्विनाशाय स्त्रीबुद्धिः प्रलयं गता ॥ ६ ॥

**निजात्म बुद्धि स्वहितासी । सद्‌गुरु बुद्धि सुखैकराशी । परबुद्धि ते विनाशासी । मूळ प्रळयासी स्त्रीबुद्धि ॥ २७ ॥**

**ऐकतां स्त्रियेच्या वचनीं । जमदग्नि निमाला** [कं. 'संपूर्ण'.] **तत्क्षणीं । रेणुका घायवट पडे धरणीं । क्षत्रीं रणीं निर्दळिलें ॥ २८ ॥**

**तीन सप्तकें वधिले क्षत्री ।** [तं. 'रुधिरप्रवाहें'.] **रुधिरें पूर वाहे धरित्री । स्त्री वाक्याची हे थोरी । चराचरीं आकांतु ॥ २९ ॥**

**ऐसी स्त्रीवाक्याची परी । हितोपदेशें अनर्थकारी । तुज मी सांडूनि गुंफेभीतरीं । तिळभरी मी न वचे ॥ ३० ॥**

**अति कठिण माझा भावो । मज नाहीं श्रीरामस्नेहो । तुज एकली सांडूनि पाहो । शोधूं रामरावो मी न वचे ॥ ३१ ॥**

**मज काढावया गुंफेबाहेरी । धांव धांव म्हणिजे निशाचरी । ऐसिया मायिका हांका** [कं. 'परी'; दै. मु. 'मारी'.] **वरी । तुजहूनि दुरी मी न वचे ॥**

**ऐसें बोलतां लक्ष्मणा । सीतेसि कोप आला चौगुणा । सांडूनि मर्यादेची गणना । कठिण वचना अनुवादे ॥ ३३ ॥**

**वचनें पाषाण पैं फुटे । मेरु मांदार उतटे । ऐशीं वचनें** [कं. 'तिखटे'.] **दासटे । कोपाविष्टें अनुवादे ॥ ३४ ॥** [ओवी ३४ पै. कं. प्रतींतच आहे.]

नैव चित्रं सपत्नेषु पापं लक्ष्मण यद्भवेत् । त्वद्विधेषु नृशंसेषु नित्यं प्रच्छन्नचारिषु ॥ ७ ॥

**प्रत्यक्ष श्रीरामाची हांक । ते तूं म्हणसी मायिक । तुझ्या ठायीं माझा अभिलाष । पापी निष्टंक तूं एक ॥ ३५ ॥**

**माझा अभिलाष धरूनि मनीं । वनां आलासी सेवक होऊनी ।**
**राम राक्षसीं वधिल्या वनीं । मज निजपत्नी करूं पाहासी ॥ ३६ ॥**

**सापत्नांची हेचि** [मु. 'बुद्धि'.] **विधी । बंधू बंधतें छळूनि वधी । त्याची भोगावी** [प. 'भाग्य'; तं. 'भोगसंधि'.] **भाग समृद्धी । हे दुष्टबुद्धि तुजपासीं ॥ ३७ ॥**

**संवचोराचें साजणें । तैसी सेवा केली लक्ष्मणें । नानायुक्तीं राम मारणें । मज आपण भोगावया ॥ ३८ ॥**

अनुक्रमणिका

**श्रीरामसेवा केली प्रबळ । ते सेवेचे हें फळ । पत्नी करावी जनकबाळ । सेवा सफळ येणें तुझी ॥ ३९ ॥**

**परदारा कामुक दुष्ट । सेवा करूनि** [दै. तं. खेरीज इतरत्र 'अतिशठ'.] **अतिश्रेष्ठ । आजि कळला भाव स्पष्ट । महानष्ट तूं पापी ॥ ४० ॥**

**श्रीराम सन्निध देखोनि । म्हणसी जानकी जननी । राम राक्षसीं वधिल्या वनीं । सीता स्वपत्नी करूं पाहसी ॥ ४१ ॥**

**मी तंव श्रीरामाचें रंक । परपुरुषाचा न शिवे अंक । जळो तुझें काळे मुख । माझा अभिलाष करितोसी ॥ ४२ ॥**

**तूं तंव माझा अभिलाषी । मजपासूनि दुरी न वचसी । मींच जाईन रामापासीं । काय पां त्यासी वर्तलें ॥ ४३ ॥**

अश्रुपूर्णमुखी सीता तथोक्त्वा पुनरब्रवीत् । गोदावरीं प्रवेक्ष्यामि हीना रामेण लक्ष्मण ॥ ८ ॥
पिबामि वा विषं तीक्ष्णं प्रवेक्ष्यामि हुताशनम् । नत्वहं राघवादन्यं कदापि पुरुषं स्पृशे ॥ ९ ॥

**लक्ष्मणा ऐक सावधान । रामावेगळी मी आपण । होईन गंगा निमग्न । कां हुताशन प्रवेशु ॥ ४४ ॥**

**कां करीन विषभक्षण । अथवा पर्वतपतन । वृक्षाग्रीं** [मु. 'वेंघोन'.] **वळघोन । देईन प्राण अधःपातें ॥ ४५ ॥**

**परी तुजसी अंगसंग । नाहीं करणें विषयभोग । बोलणें माझें हें निर्व्यंग । तूं निःसंग विषयार्थी ॥ ४६ ॥**

**रामावेगळें आणिकातें । नाहीं स्पर्शणे जीवें** [घा. 'जीतें'; इं. सु. 'स्पर्श या नेमातें']. **चित्तें । ऐसे जाणोनि निश्चितें । नीघ** [धाय 'भजे भावार्थें'; तं. 'सुबुद्धितें'.] **शुद्धयर्थें श्रीरामा ॥ ४७ ॥**

**ऐकोनि सीतेची दुष्टवाणी । सौमित्र बोटें घाली कानीं । श्रीरामनाम स्मरोनि । अति उद्विग्न संतप्त ॥ ४८ ॥**

**जानकी** [तं. 'कर्मस्थ'.] **वर्मस्थ वाग्बाण । साहो न सकेचि लक्ष्मण । दृढ खोचलें अंतःकरण । वचनें प्राण देवो पाहे ॥ ४९ ॥**

**ऐसें बालोनि अति कठिण । सीता आक्रोशें करी रुदन । तें देखोनि लक्ष्मण । बोले दारुण क्षोभोनी ॥ ५० ॥**

स्वभावोऽयं हि नारीणां त्रिषु लोकेषु कथ्यते । विमुक्तधर्माश्चपलास्तीक्ष्णा भेदकराः स्त्रियः ॥ १० ॥
उपशृण्वंतु मे सर्वे साक्षिभूता वनेचराः । न्यायवादी यथावाक्यमुक्तोऽहं पुरुषं त्वया ॥ ११ ॥
स्त्रीस्वभावेन दुष्टेन दुरुक्तेन व्यवस्थितुम् । यास्यामि यत्र काकुत्स्थः स्वस्ति तेऽस्तु वरानने ॥ १२ ॥

**स्त्री स्वभाव दुष्ट अद्भुत । जे नवमास वाहे उदरांत । जे सदा सोसी नरक मूत । ते मातेसी सुत पारखा करी ॥ ५१ ॥**

अनुक्रमणिका

बंधु बंधूसी वैराकार । वाढवावया [पै. तु. दै. कं. खेरीज इतरत्र 'मुख्य साचार'.] मुक्त स्त्रीसंचार । स्त्री संगाचा बडिवार । वेगळाचार सुहृदांसीं ॥ ५२ ॥

मी बोलिलों नित्य निष्पाप । तो त्वां छळूनि रामप्रताप । मजवरी घालिसी अभिशाप । हें महापाप जानकीये ॥

सांडूनि मर्यादा धर्मार्गळा । स्त्रिया होती उच्छृंखळा । तें म्यां आजि देखिलें डोळां । जनकबाळा अभिशापी ॥ ५४ ॥

तुज मज साक्षी येथें । ऐकताती सकळभूतें । उल्लंघावया रामाज्ञेतें । अभिशापानें मज छळिलें ॥ ५५ ॥

तुज सांडूनि वनांतरीं । तिळभरी न व्हावें दुरी । हे रामाज्ञा वंदितां शिरीं । नानापरी त्वां छळिलें ॥ ५६ ॥

त्वां मज घातला अभिशाप । तें तुझें तुज फळेल पाप । श्रीराम न भेटे सद्रुप । भोगिसी संताप षण्मास ॥ ५७ ॥

तूं जननी मी अपत्य । हा तंव माझा दृढ भावार्थ । तुझा तुज फळेल [पै. तु. कं. खेरीज इतरत्र 'वचनार्थ'.] भावार्थ । अति अनर्थ पावसी ॥ ५८ ॥

मी अपत्य सीता जननी । हा सद्भावो माझ्या मनीं । तैं राम भेटो मृग वधुनी । द्वंद्वबंधनीं निर्मुक्त ॥ ५९ ॥

श्रीराम आज्ञेचें रक्षण । तुजपासीं मी होतों जाण । म्यां केलिया वनाभिगमन । राक्षस हरण तुज करिती ॥ ६० ॥

पुढें [पै. 'श्रीराम मी दृढदृष्टी'.] श्रीरामीं दृष्टादृष्टी । सहसा तुजसी नव्हे भेटी । [पै. 'शोधिता'.] सोशिल्या विघ्नांचिया कोटी । श्रीराम दृष्टीं देखसी ॥ ६१ ॥

तुज सांडूनि निर्बंधन । माझेनि न करवे गमन । माझें निजसत्व संपूर्ण । संरक्षण तुजपासीं ॥ ६२ ॥

तूं न मानिसी माझा भावो । मज पुसेल रामरावो । यालागीं रक्षण निर्वाहो । करूनि पाहो मी जातों ॥ ६३ ॥

मी रामाचा निजसखा । निर्विकल्पें शुद्ध नेटका । तरी हे माझी मर्यादा रेखा । ब्रह्मादिकां नुलंघवे ॥ ६४ ॥

माझे मर्यादेची रेखा । [सु. इं. 'ब्रह्मादिकां अनुल्लंघ्य देखा'.] कळिकाळेसी अटक देखा । तेथ राक्षसा पै रंका । केवीं आवांका करवेल ॥ ६५ ॥

राक्षसा न करवे हरण । तैसें ठेविलें निज संरक्षण । तुवां पाळावें [मु. 'येवढे वचन'; कं. 'हेंचि'; दै. 'माझें'.] वचन । रेखा उल्लंघन न करावे ॥ ६६ ॥

अनुक्रमणिका

योगी संन्यासी तापस वेषी । भिक्षेसि येती आश्रमासी । तूं विश्वासो त्यांसी । मर्यादेसी नुलंघी ॥ ६७ ॥

उल्लंघूनि रेखेसी । जरी तूं भिक्षा देवो जासी । तरी तूं राक्षसीं हरिजेसी । दुःखी होसी जानकीये ॥ ६८ ॥

ऐसें सांगोनी लक्ष्मण । करावया श्रीराम गवेषण । सवेग निघाला आपण । धनुष्य बाण सज्जूनी ॥ ६९ ॥

> त्यक्त्वा सुदुस्त्यजसुरेप्सितराजलक्ष्मीं । धर्मिष्ठश्चार्यवचसा यदगादरण्यम् ।
> मायामृगं दयितयेप्सितमन्वधावन्वंदे महापुरुष ते चरणारविंदम् ॥ १३ ॥

देव वांछित राज्यवैभव । पितृवाक्यें त्यजूनि सर्व । चरण चाली राघव । आला स्वयमेव वनवासा ॥ ७० ॥

सीता प्रियेचें प्रियवचन । ऐकोनियां रघुनंदन । मायामृगीं करी धांवन । ते श्रीचरण सौमित्र वंदी ॥ ७१ ॥

ध्वज वज्र अंकुश रेखा । श्रीरामपदें पाहात देखा । चालिला लक्ष्मण निजसखा । स्वानंदें देखा डुल्लतु ॥ ७२ ॥

श्रीरामपदीं प्रेमा पूर्ण । पदोपदीं लोटांगण । मस्तकीं वंदीं रजःकण । धन्य श्रीचरण रामाचें ॥ ७३ ॥

श्रीरामचरणी लागल्या [तं. 'पूर्ण'.] जाण । तृण पर्ण मृत्तिका पाषाण । त्यासि ही घाली लोटांगण । धन्य श्रीचरण रामाचें ॥ ७४ ॥

श्रीरामपदें देखतां दिठीं । सौमित्रासि आनंद कोटी । गात नाचत चालतां सृष्टी । श्रीराम दृष्टीं देखिला ॥ ७५ ॥

मृग मारूनि गंगातटीं । अश्वत्थतरूचां तळवटीं । स्वस्थ बैसला राम जगजेठी । देखिला दृष्टीं सौमित्रें ॥ ७६ ॥

कुमित्र गेलिया कल्पकोटी । श्रीरामेसि नव्हे भेटी । तो सौमित्रें देखिला दृष्टीं । स्वानंद पुष्टी सदोदित ॥ ७७ ॥

नाहीं श्रीरामी युद्धकदन । नाहीं [मु. 'राक्षस ना बंधन'.] राक्षस बंधन । नित्यमुक्त रघुनंदन । सुखसंपन्न देखिला ॥ ७८ ॥

लक्ष्मणा धांव धांव सत्वर । हें तंव मायिक उत्तर । सौमित्रें जाणोनि [मु. 'सत्वर'.] साचार । श्रीरघुवीर वंदिला ॥ ७९ ॥

दोघां जाली दृष्टादृष्टी । आनंदें वोसंडली सृष्टी । चरण वंदूनि लल्लाटीं । पडिली मिठी आलिंगणीं ॥ ८० ॥

दोन्ही दीप एक होती । दोन्हीं मिळोनि एकी दीप्तीं । रामसौमित्र तैशा रीतीं । [मु. 'क्षेम'.] खेव देती एकत्वें ॥

अनुक्रमणिका

८१ ॥

समुद्रीं रिघतांचि लवण । स्वयें समुद्र होय आपण । तेवीं श्रीरामीं लक्ष्मण । जाला परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ८२ ॥

श्रीरामा नाठवे रामपण । येरा नाठवे भक्तपण । खुंटला बोल तुटले मौन । आनंदमग्न सदोदित ॥ ८३ ॥

सीता सळिलों अभिशापवृष्टी । ते लक्ष्मणा नाठवे गोष्टी । ठाकूनि जावें पंचवटी । श्रीरामापोटीं नाठवे ॥ ८४ ॥

ऐसें स्वानंदाच्या पोटीं । दोघा पडिली एकी [तं. मु. 'मिठी'.] गांठी । पुढें संरक्षावया सृष्टी । सुटली मिठी [मु. 'प्रेमाची'.] खेंवाची ॥ ८५ ॥

श्रीराम म्हणे लक्ष्मणासी । एकलें सांडूनि सीतेसी । तूं कां येथें धांवलासी । तें मजपासीं सांग वेगीं ॥ ८६ ॥

ततो लक्ष्मणमायांतं ददर्श विगतप्रभम् । विषण्णः स विषण्णेन दुःखितो दुःखभागिना ॥ १४ ॥

पुसतां सीतासंरक्षण । [तं. 'निवर्ण'; दै. मु. 'निवांत'.] विवर्ण जात्या लक्ष्मण । दुःखें दुःखीं अतिदारुण । अश्रुपूर्ण मुख दिसें ॥ ८७ ॥

पुसों जातां सीतेची गोठी । लक्ष्मणासी दुःखकोटी । देखोनियां मुखचिन्हदृष्टी । श्रीराम पोटीं धांकिन्नला ॥ ८८ ॥

स्वयें सीतेनें सौमित्रासी । दुष्ट दुरुक्ती अति संत्रासी । धांवण्या धाडिला मजपासीं । अति दुःखेसी दुःखित ॥ ८९ ॥

सौमित्र नुलंघी माझी आज्ञा । मर्म स्पर्शाचिया संज्ञा । सीतेनें करविली [मु. 'आज्ञा'.] अवज्ञा । रामा सर्वज्ञा कळों सरलें ॥ ९० ॥

स्त्रीवाक्याचे दारुण बाण । हृदयीं खोंचले संपूर्ण । तेणें अति दुःखी लक्ष्मण । आला धांवोन मजपासीं ॥ ९१ ॥

सीता सांडूनि कां आलासी । ऐसें पुसतां श्रीरामासी । लक्ष्मण लागला पायासीं । उकसाबुकसी स्फुंदत ॥ ९२ ॥

आलिया विघ्नाचिया कोटी । मी न सांडता पंचवटी । सीता अभिशापगोठीसाठीं । मी उठाउठी पळालों ॥ ९३ ॥

ऐसें बोलिली दारुण । जेणें तत्काळ ये [इं. 'लक्ष्मण'.] मरण । तुझें करितां नामस्मरण । माझे प्राण वांचलें ॥ ९४ ॥

अनुक्रमणिका

न करितां तुझें [मु. पै. 'नामस्मरण'.] स्मरण । तत्काळ मज येतें मरण । देखोनियां तुझे चरण । समाधान पावलों ॥ ९५ ॥

जानकी अनुवादकथन । ऐक आतां सावधान । जे जे विंधिले वाग्बाण । ते ते प्रकरण अवधारी ॥ ९६ ॥

लक्ष्मणा धांव धांव गर्जोन । माया मरीचि आक्रंदन । ऐकोनि सीता करी रुदन । [दे. 'म्हणे युद्धबंधन'.] युद्धबंधन श्रीरामा ॥ ९७ ॥

जानकी म्हणे धांव सत्वर । राक्षेसीं वेढिला रघुवीर । त्याचा करी रणोद्धार । तूं सहोदर पाठीराखा ॥ ९८ ॥

म्यां दिधलें प्रतिवचन । राक्षसें बापुडी मशक कोण । त्यांसी नाटोपे रघुनंदन । ऐके महिमान रामाचें ॥ ९९ ॥

मीनल्या दैत्यदानव कोटी । आल्या राक्षस कोट्यानुकोटी । राम नाटोपे जगजेठी । नळी निमटी बाणें एकें ॥ १०० ॥

सीता नमनी तुझा प्रताप । अति आक्रंदें करी संताप । धांवण्या धांव धांव सकृप । राम सद्रूप [मु. 'पाहत दृष्टी'.] हतदृष्टी ॥ १०१ ॥

श्रीराम आज्ञा माझे शिरीं । तुजपासूनि तिळभरी । परता नव्हे [मु. 'बाहेरी'.] धांवण्यावरी । निज निर्धारीं बोलिलों ॥ १०२ ॥

तुज सांडूनि एकली नारी । मज धांवतां [मु. 'बाहेरी'.] धांवण्यावरी । तुज हरिल्या निशाचरीं । तिघांचां शिरीं दुर्नाम ॥ १०३ ॥

श्रीराम सांगे [मु. 'आळवूनि'; दे. 'आलों वनीं'; कं. 'क्षणक्षणीं'.] आलोचूनी । सीता राखावी सावधानी । तो मी धांवण्या न वचे वनी । तुजपासूनि दूरी न वचे ॥

ऐसी ऐकोनि माझी वाणी । सीता क्षोभली शतगुणी । पूर्व मर्यादा सांडूनि । वर्मी खोचूनि अनुवादे ॥ १०५ ॥

श्रीराम धांवण्या न धांवोनी । दूरी न वचसी मजपासूनी ।
राम राक्षेसीं वधिल्या वनीं । मज निजपत्नी करूं पाहसी ॥ १०६ ॥

माझा अभिलाष धरूनी । सेवा करिसी संवचोरपणीं । राम राक्षसीं वधिल्या वनीं । मज निजपत्नी करूं पाहसी ॥

परदारिया अतिलंपटा । सेवकवर्गिया महाशठा । मुख न दाखवी पापिष्ठा । दुष्टा नष्टा चांडाळा ॥ १०८ ॥

होऊनि श्रीरामाचा सवता । वना आलासी मजभंवता । येणें वाक्यें सांडूनि सीता । आलों रघुनाथा तुजपासीं ॥ १०९ ॥

अनुक्रमणिका

महामारक जें जें विष । तें मज घेतां पीयूष । सीता वाक्याचें असुख । परम दुःख श्रीरामा ॥ ११० ॥

पितेन गांजिल्या शांतवी माता । मातेन गांजिल्या शांतवी पिता ।
येणेचि भावें श्रीरघुनाथा । आलों तत्वतां तुजपासीं ॥ १११ ॥

ऐकोनि सौमित्राचें वचन । श्रीरामें दिधलें आळिंगन । तेणें जालें समाधान । सुखसंपन्न ते दोघे ॥ ११२ ॥

साखर विरोनि होय जीवन । जीवना आलें गोडपण । तेंवी श्रीरामलक्ष्मण । सुखसंपन्न येरयेरां ॥ ११३ ॥

लोहा परिसा पडतां मिठी । तत्काळ काळिमेसि तुटी । तेंवी सौमित्रा श्रीरामेसि भेटी । दुःखकोटी निमाल्या ॥ ११४ ॥

ऐकोनि सीतेचें कथन । विस्मित श्रीरामाचें मन । मायामृगाचें विंदान । जाणें संपूर्ण श्रीराम ॥ ११५ ॥

मायामृगें आक्रंदोन । धांवण्या आणिला लक्ष्मण । मागें येऊनि रावण । सीताहरण तो करील ॥ ११६ ॥

ऐसा जाला कृतकार्यार्थ । जाणोनिया श्रीरघुनाथ । सुख मानिलें पोटांत । राक्षसान्त करावया ॥ ११७ ॥

जाणोनिया मृगगोष्टी । बाईलेच्या बोलासाठी । राम कां धांवला मृगापाठीं । श्रोतां पोटीं न मनावें ॥ ११८ ॥

स्त्री कामाच्या अति प्रीती । मायामृगी रघुपती । नाहीं धांवला कामासक्ती । गूढ ग्रंथोक्ति अवधारा ॥ ११९ ॥

सीता केवळ नव्हे पत्नी । परमभक्त शिरोमणी । चरणचालीं आली वनीं । सेवेलागूनि श्रीरामा ॥ १२० ॥

राज्यीं असतां श्रीरामासी । सेवा वाटली सेवकासी । स्वयें करावया [दै. तं. 'सर्वस्वेंसी'.] सर्व सेवेसीं । आली उल्हासीं वनवासा ॥ १२१ ॥

सीता [मु. 'निर्विकार'.] निर्विकल्प भक्त । श्रीराम जाणें मनोगत । तिचा पोषावया भावार्थ । स्वयें धांवत मृगमार्गीं ॥ १२२ ॥

भक्तांचिया वचनासाठीं । प्रगटला कोरड्या काष्टीं । तो राम धांवे मृगापाठीं । सुखसंतुष्टी सीतेचां ॥ १२३ ॥

भक्तांचे भाव वचन । कदा नुलंघी रघुनंदन । सीता सद्भावे आपण । करी धावन मृगमार्गीं ॥ १२४ ॥

जैसा भावो तैसा देवो । ये अर्थी तंव नाहीं संदेहो । देखोनि सीतेचा सद्भावो । धांवे रामरावो मृगमार्गीं ॥ १२५ ॥

मायामृगी करी धांवन । समूळ सांगितलें कथन । सीता निस्तेजी लक्ष्मण । तें ही निरोपण अवधारा ॥ १२६ ॥

अनुक्रमणिका

लोकपावन श्रीरामख्याती । वाढवावया अगाध कीर्ती । लक्ष्मणा दवडी सीतासती । नाना वक्रोक्ती छळूनि ॥ १२७ ॥

मुख्य सीतेचें मनोगत । श्रीरामें वधावा लंकानाथ । तोचि साधावया कार्यार्थ । केला छळणार्थ सौमित्रा ॥ १२८ ॥

श्रीराम सीता सौमित्र । तिन्ही मूर्ति अति पवित्र । प्रकटावया रामचरित्र । कथा विचित्र अनुवादु ॥ १२९ ॥

अवताराचें नटनाट्य । प्रकटावया स्पष्ट । कथानुवाद दिसे विकट । तोचि [मु. 'निर्दिष्ट'.] निर्दुष्ट परमार्थु ॥ १३० ॥

सीता सतीं स्वयें सद्रूप । ते लक्ष्मणा लावी अभिशाप । हें मूर्खाचें मूर्खजल्प । कथानुरूप अतिगूढ ॥ १३१ ॥

येर येराचें मनोगत । जाणोनिया स्वयें वर्तत । अगाध कीर्ति श्रीरघुनाथ । जग पुनीत रामनामें ॥ १३२ ॥

श्रीरामकथेचें अक्षर । क्षराक्षरातीत पर । श्रोते वक्ते अतिपवित्र । रामचरित्र अनुवादें ॥ १३३ ॥

केवळ जपतां रामनाम । वक्ता होय परब्रह्म । त्याचा चरित्र संभ्रम । आनंद परम परमार्थें ॥ १३४ ॥

एका जनार्दना शरण । भेटले राम लक्ष्मण । येरींकडे स्वयें रावण । जानकी हरण करूं पाहे ॥ १३५ ॥

सीता साधावया पंचवटी । रावण येऊनि कपटी । त्या दोघांच्या धर्म गोष्टी । कथा कसवटी अनुपम्य ॥ १३६ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां लक्ष्मणसीतानुवादः नाम पंचदशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सोळावा

## रावणेन जानकीहरण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

लक्ष्मण गेला रामापासीं । सीता एकली [मु. 'मंदिरीं'.] गुंफेसी । रावण आला ते संधीसीं । सीतेपासी भिक्षु वेषें ॥ १ ॥

एतदंतरमासाद्य दशग्रीवः प्रतापवान् । परिव्राजकरुषेण वैदेहीमन्ववर्तत ॥ १ ॥

गुंफे नसतां रामलक्ष्मण । शून्य [मु. 'मंदिरीं'.] गृहीं रिघे श्वान । तेवीं आला दशानन । सीताहरण कार्यार्थ ॥ २ ॥

गर्भजन्में जन्मली नाहीं । सीता देहींच विदेही । तिचें हरण करावया पाही । आला लवलाही रावण ॥ ३ ॥

सीता हरण करूं म्हणतां । [मु. 'मुळीच भीक'.] भीक लागली लंकानाथा । चौपालवी आली हातां । आंगीं अशुभता बाणली ॥ ४ ॥

चौदा चौकड्या राज्य लक्षण । तें गेलें न लगतां क्षण । भिकारी जाला आपण । सीता-हरण करूं म्हणतां ॥ ५ ॥

सीतेचा आश्रम देखतां । भेणें पळाली राज वैभवता । भिक्षेनें वरिले लंकानाथा । सामर्थ्यें सीता दुर्धर ॥ ६ ॥

अभिलाषितां लाविली भीक । लंकेसी नेलिया हें देख । राक्षस मारील एकेएक । लंका निःशेष जाळील ॥ ७ ॥

वळहई माजीं दीपकळी । ठेवितां तत्काळ ते जाळी । तेवी सीता राक्षस कुळीं । करील होळी क्षणार्द्धें ॥ ८ ॥

अभिलाषितां कामधेनु । निर्दळिला सहस्त्रार्जुंनू । सीताहरणें रावणु । कुळनिर्दळणु राक्षसां ॥ ९ ॥

सीता पाहों जातां जाण । पळाली त्याची आंगवण । भिक्षुक वेषें अत्यंत हीन । दीन वदन भिक्षार्थी ॥ १० ॥

स्वयंवरी सीता देखतां जाण । रावणा जाला अपमान । येथेंही सीता पाहातां पूर्ण । निजापमान भिक्षुत्वें ॥ ११ ॥

बाप सीतेचें विंदान । दृष्टीनें गांजिला रावण । आपणा आपण दे अपमान । दीन वदन भिक्षार्थी ॥ १२ ॥

रावणा सन्निपात पूर्ण । न कळे शुभाशुभ चिन्ह । भिक्षुक वेषें अत्यंत हीन । दीनवदन भिक्षार्थी ॥ १३ ॥ [ओवी

अनुक्रमणिका

१३ सु. प्रतीत नाही.]

षण्मासिक सन्निपात । रावणासी जाला येथ । सीता अभिळाषीं निश्चित । निजात्मघात सकुळेसीं ॥ १४ ॥

[मु. 'ऐसिया युक्ती'.] ऐसिया अयुक्तयुक्ती रावण । धरुनि भिक्षत्व संपूर्ण । करुनि नारायणा स्मरण । आला आपण आश्रमां ॥ १५ ॥

सीता देखतां गोरटी । रावणाची खुंटली दृष्टी । पूर्व आभिलाष [मु. 'जाला'.] तयाचे पोटीं । अति गोमटी रामकांता ॥ १६ ॥

स्वरुपरुपें अति सगुण । रूप रेखा गुण लावण्य । सर्वावयवीं सुखैकघन । सुखनिधान जानकी ॥ १७ ॥

केवळ लावण्य पुतळी । निखळ सौंदर्यें वोतिली । [मु. 'बरवेपणासी चढली'.] बरवेपणा सीग चढली । सीता शोभली [कं. खेरीज इतरत्र 'सुखरुप'.] अतिशोभा ॥ १८ ॥

सीता सौंदर्यें निवालें नयन । विसरला भूक तहान । देखोनि सुखावलें मन । नव निधान जानकी ॥ १९ ॥

सीतेसि होतां दृष्टिभेटी । भेटीसवें आनंद कोटी । ईचेनि योगें सुख संतुष्टीं । आनंद सृष्टीं [तु. 'आन असेना'; तं. 'असंतुष्टी'; मु. 'असेना'.] न समाये ॥ २० ॥

ऐसिया सौंदर्याची बोली । कदाकाळीं नाहीं ऐकिली । सीता घवघवीत देखिली । भुली पडली [कं. 'इंद्रादिकांसी'.] इंद्रियां ॥ २१ ॥

नैव देवी न गंधर्वी नासुरी न च किन्नरी । एवं रूपा मया नारी दृष्टपूर्वा महीतले ॥ २ ॥

देवीं गंधर्वी सुरेश्वरीं । त्यांही न पवती इची सरी । रंभा उर्वशी किन्नरी । इच्या नखाग्रीं न [कं. 'समाप्ती'; पै. खेरीज इतरत्र 'सरती'.] सजती ॥ २२ ॥

दैत्यदारा आणि दानवी । सरी न पवती मानवी । सावित्री न पवे इची पदवी । सर्वावयवीं सुखरूप ॥ २३ ॥

पद्मिनी नारी अति विख्याता । सरी न पवे वनदेवता । उमा रमा [तं. सु. खेरीज इतरत्र 'हरिहर कांता'.] देवकांता । इची स्वरुपता त्या नाहीं ॥ २४ ॥

मंदोदरी येथ काइसी । जेवीं खद्योत सूर्यापासीं । सीता लावण्याची राशी । [तं. 'साम्य'.] सीमा रूपासी न करवे ॥ २५ ॥

अमृत प्राय इची बोली । ऐकतां [मु. 'पीयूषां पडली'.] उपनिषदां भुली । हंस परमहंसा न ये चाली । वेडावली मनबुद्धी ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

आंगीं खुपती चंद्रकर । सुखैकघन सुकुमार । आकार विकारीं निर्विकार । मनोहर जानकी ॥ २७ ॥

आणिका स्त्रिया मनोहर । कवि वर्णिती ते स्तुतिमात्र । सीता मनोहर साचार । मज किंकर इया केलें ॥ २८ ॥

मज हिंडतां सकळ सृष्टीं । ऐसी नाहीं देखिली दृष्टीं । इसी जाल्या भोगभेटी । सुख संतुष्टी स्वानंदें ॥ २९ ॥

सीता सुखभोग संतुष्टी । त्यासीं [मु. 'कांटाळे ना' (तुलना, मोजमाप).] कांटाळें नाहीं सृष्टी । भाग्य असलिया लल्लाटीं । सीता गोरटी तैं लाभे ॥ ३० ॥

स्वयंवरीं धनुष्य उचलतें । तैंच सीता वरिती मातें । धनुष्य भंवलें मजचि भंवतें । सामर्थ्य तेथ न चलेची ॥ ३१ ॥

आतां ही आहे अति सांकडीं । सीता एकली वन निर्वडी । श्रीरामाची पडल्या उडी । माझी नरडी मुरडील ॥ ३२ ॥

सांडूनि न वचवे सीतेसी । श्रीरामधाकें धांके मानसीं । छळूनि हरावया सीतेसी । भिक्षु भावेंसी बोलत ॥ ३३ ॥

> कासि कस्य कुतश्च त्वं किं निमित्तं च दण्डकम् । एका चरसि कल्याणि घोरराक्षससेवितम् ॥ ३ ॥
> इह वासश्च कांतारे किमर्थं ते वरानने ॥ ४ ॥

रावण केवळ कपटवेषी । स्वयें होऊनि संन्यासी । येऊनिया सीतेपासीं । सद्भावेंसी पूसतु ॥ ३४ ॥

तूं तव लावण्याची राशी । वनीं एकली कां वससी । कोणी न देखों संगतीसी । निजवृत्तांतासी मज सांग ॥ ३५ ॥

तूं कोण कोणाची पैं कैंची । एकाकी वस्ती कां वनीची । हे वृत्ति नव्हे साधुत्वाची । वस्ति वनीची अति कठिण ॥ ३६ ॥

दुस्तर वस्ती दण्डकारण्यीं । राक्षस मायावी ये वनीं । स्त्रिया नेती सिंतरुनी । ब्राह्मण मारुनी भक्षिती ॥ ३७ ॥

ऐसी हे कठिण वनस्थळी । तूं तंव दिससी राजबाळी । वनीं वससी कां [कं. 'एकली'.] वेल्हाळी । हें समूळीं मज सांग ॥ ३८ ॥

ऐकोनि अतिथीचें वचन । सीता सांगे निज कथन । मी तंव दशरथाची सून । कन्यारत्न जनकाचें ॥ ३९ ॥

स्वयंवरीं रावण अपमानून । रामें हरचाप भंगून । परशुरामातें जिंकून । परिणयन केलें माझें ॥ ४० ॥

अनुक्रमणिका

श्रीराम आणि लक्ष्मण । भरत आणि शत्रुघ्न । हे चौघे ही बंधु जाण । जीव प्राण येरयेरां ॥ ४१ ॥

राया दशरथासी जाण । कैकेयी [सु. इं. 'भार्या भाष्य'.] भाषा निर्बंधन । वना धाडिलें रामलक्ष्मण । दण्डकारण्य वनवासी ॥ ४२ ॥

नेम मर्यादा चौदा वर्षीं । रामें वसावें वनवासीं । मजही धाडिले वनासी । निज सेवेसीं श्रीरामां ॥ ४३ ॥

श्रीराम सेवेसीं सावधान । माझें करावया संरक्षण । सवें दिधला लक्ष्मण । वीर दारुण प्रतापी ॥ ४४ ॥

रामें मारिलें ताटकेसीं । सुबाहु मारिला रणकर्कशी । मरीचि उडविला आकाशीं । बाणार्द्धेंसी झडपूनी ॥ ४५ ॥

विराधें मज धरितां जाण । श्रीरामें विंधोनियां बाण । एकेंचि घायें घेतला प्राण । दुष्ट निर्दळण श्रीराम ॥ ४६ ॥

विराध ऐसा महाबळी । घायें मेळविला धुळीं । तेणें राक्षस कांपती [दे. 'सकळीं'; मु. 'चळचळीं'.] चळीं । आतुर्बळी श्रीराम ॥ ४७ ॥

तेणें येऊनि गंगातटीं । आश्रम करूनी पंचवटीं । वनवासाते तो कंठी । सुख संतुष्टी स्वानंदें ॥ ४८ ॥

सार्द्ध वर्षें त्रयोदश । रामें क्रमिला वनवास । आतां उरले षण्मास । मग प्रवेश अयोध्येसी ॥ ४९ ॥

सुवर्णमृग वधावयासी । श्रीराम धांवला वनासीं । लक्ष्मण गेला तयापासीं । [मु. 'तेणें'.] मज देखसी एकले ॥ ५० ॥

मी एकली नव्हे जाण । मज रक्षावया दोघेजण । दुर्धर वीर रामलक्ष्मण । न लगतां क्षण येतील ॥ ५१ ॥

मृग मारुनियां जाण । आतां येतील रामलक्ष्मण । तंववरी राहावें आपण । भिक्षा [तं. 'पूर्ण देईन'.] संपूर्ण देईल राम ॥ ५२ ॥

श्रीराम अतिथीचा सेवक । तुम्हांसि देखिल्या होईल सुख । भिक्षा देईल आवश्यक । तुम्ही नावेक राहवें ॥ ५३ ॥

ऐकतां सीतेचिया गोष्टी । रावणा थरकांप पोटीं । मागें पाहे चकिता दृष्टीं । उठाउठी पळों पाहे ॥ ५४ ॥

करावया सीतेचें हरण । अत्यंत साक्षेपी रावण । गोड बोलांचा करी प्रश्न । विश्वास पूर्ण उपजावया ॥ ५५ ॥

इह व्यालमृगाः सिंहा वृकव्याघ्रा च राक्षसाः । कथमस्मिन्महारण्ये न बिभेषि वरानने ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

ये वनीं श्वापदें दुस्तर । व्याघ्र सर्प सिंह शूकर । [पै. 'मृग'.] वृक जंबूक [तं. 'मोर'; मु. 'तरस'.] गौर तगर । निशाचर नरभक्षी ॥ ५६ ॥

स्त्रिया भयभीता त्रिभुवनीं । तुज भय नुपजे दुर्धर [घा. 'मनीं'.] वनीं । हेंचि सांग मजलागूनि । तूं कैसेनि निःशंक ॥ ५७ ॥

अतिथि ऐक सावधान । वनीं असतां रघुनंदन । प्रताप तेजें अति दारूण । संरक्षण निजभक्तां ॥ ५८ ॥

हृदयीं हाणोनिया नखे । मज अभिळाषिले काकें । श्रीरामें सोडिले [कं. दे. सु. इं. 'दर्भ शिखे'; घा. 'दर्भईषिके'.] शलाके । वचनें एके माझेनि ॥ ५९ ॥

श्रीरामाची हस्तशलाका । निवारेना ब्रह्मादिकां । काक हिंडतां तिहीं लोकां । शिवादिकां दुर्धर ॥ ६० ॥

श्रीराम शलाका देखोन । चळी कांपती [पै. 'चंद्र'.] इंद्र वरुण । कळिकाळ घाली लोटांगण । यम आपण शिरीं वंदी ॥ ६१ ॥

ईषिके नाहीं निवारण । काक श्रीरामा आला शरण । ईषिका वामनेत्र फोडुन । कृपेनें प्राण वांचविला ॥ ६२ ॥

तैं पासूनि श्वापद गाढें । कोणी न पाहे मजकडे । राक्षस कायिसें बापुडें । मजपुढें यावया ॥ ६३ ॥

श्रीरामाची प्रतिज्ञा पूर्ण । जो जो करील सीताहरण । त्याचा घेईन मीं प्राण । दुर्धर बाण वर्षोनी ॥ ६४ ॥

पक्ष्यावरी [कं. 'अरि पुरुषार्थ'.] अति पुरुषार्थ । करुनि प्रतापी रघुनाथ । एसा न मनावा अर्थ । रणकंदनार्थ अवधारी ॥ ६५ ॥

श्रीरामा नावडे कपट दृष्टी । शूर्पनखा अति खोटी । छळूं आली पंचवटीं । केली नकटी सौमित्रें ॥ ६६ ॥

शूर्पनखीच्या कैवारें जाण । मारिले त्रिशिरा खर दूषण । चौदा सहस्त्र रक्षोगण । रामें संपूर्ण निर्दाळिले ॥ ६७ ॥

लक्ष्मणें युद्धाआंत । अद्यापि लाविला नाहीं हात । त्याचा [कं. 'अनुष्ठानाचा'.] अनुच्छिष्ट पुरुषार्थ । इंद्रजित वधार्थ ठेविला असे ॥ ६८ ॥

मारिले त्रिशिरा खर दूषण । तैंचि रामें केला पण । मारुनि कुंभकर्ण रावण । अयोध्या गमन मग करणें ॥ ६९ ॥

ऐसा प्रतापी रघुटिळक । पशुपक्षियां त्याचा धांक । त्याचेनि बळें यथासुख । वनीं निःशंक मी विचरे ॥ ७० ॥

अनुक्रमणिका

ऐसे सीता स्वयें बोलोन । अतिथीस घाली आसन । तिसी करावया सन्निधान । चाले रावण हरणार्थी ॥ ७१ ॥

[मु. 'तंव' अधिक.] लक्ष्मणाची मर्यादरेखा । नुलंघवे दशमुखा । करितां बळाचा आंवाका । मर्यादरेखा नुलंघवे ॥ ७२ ॥

रेखा रावण पाहे तळीं । खोलीची खोल सप्तपाताळीं । वरती पाहातां निराळी । नभो मंडळी जडलीसे ॥ ७३ ॥

तळीहुनि जावया नाही गती । उल्लंघावया न चले शक्ति । रेखां रोधिला लंकापती । सीतेप्रति न वचवे ॥ ७४ ॥

सीतेपासीं न वचवे जाण । मग कैसेनि करवें हरण । [सु. इं. 'सत्वें'.] सत्य सत्वाथिला लक्ष्मण । रेखा रक्षण जानकीये ॥ ७५ ॥

सीता सांडूनि गेला लक्ष्मण । रेखा ठेविली दृढ रक्षण । अत्यंत कष्टतां रावण । सीताहरण न करवे ॥ ७६ ॥

मरीचि निमाला पैं देखा । [मु. 'आणि' हे पद अधिक.] माझेनि नुलंघवे रेखा । वेगीं आलिया रघुटिळका । दाहीं मस्तकां छेदील ॥ ७७ ॥

ऐशा विचारांच्या कोटी । उठती रावणाचे पोटीं । सीता देखोनि गोरटी । उपरम दृष्टी उपजेना ॥ ७८ ॥

मग मांडिलें पूर्ण कपट । संन्यासी आलिया स्त्रिये निकट । तो जाणावा महा पापिष्ट । अति [मु. 'निर्दुष्ट'; दै. 'अनिष्ट'.] नष्ट यतिधर्मी ॥ ७९ ॥

संन्यास धर्माचें रक्षण । निंद्य स्त्रियेचें दर्शन । निंद्य स्त्रियेशीं भाषण । संनिधान अति निंद्य ॥ ८० ॥

राम परमार्थी अति नेटका । तरी कां धर्मा [मु. 'ठेविली'.] आड रेखा । येच विषयीं मज आशंका । परतोनि देखा जावया ॥ ८१ ॥

ये वनीचे राक्षसवासी । भीत भीत आलों या वनासी । तुम्हांसि देखोनि मनुष्यवेषी । येथभिक्षेसी मी आलों ॥ ८२ ॥

तूं [मु. 'राक्षस सुंदरी मनुष्यवेषीं'.] सुंदरा राक्षस वेषीं । भीतरीं नेतीस मारावयासी । अत्यादरें बोलाविसी । सन्मान देसी [सु. इं. 'मारावया'.] भक्षावया ॥ ८३ ॥

ऐकोनि अतिथीचें उत्तर । सीता म्हणे हरहर । आम्ही नव्हे गा निशाचर । नित्य किंकर अतिथींचे ॥ ८४ ॥

सीता आणावया रेखे बाहेरी । रावणें बुद्धि [मु. 'योजिली'.] मांडिली पुरी । क्षुधा पीडिलों भारी । पडे [तं. सु. इं.

अनुक्रमणिका

'गिरिगिरी'.] भूमिवरी मूर्छित ॥ ८५ ॥

जरी कृपा आहे अतिथीसी । बाहेरी आणून भिक्षा देसी । गंगातीरीं सावकाशीं । निज आहारासी [पै. तं. कं. 'कल्पीन'; मु. 'करीन'.] सेवीन ॥ ८६ ॥

गोड बोलसी जैसें पीयुष । परी व घालिसी [मु. 'ये वेळे'; कं. 'उलंघोनी'.] इवली भीक । माझेनि न साहवे भूक । आतां विमुख मीं जातों ॥ ८७ ॥

सीता म्हणे स्वामिनाथा । विमुख न वचावें सर्वथा । रेखा उल्लंघूनि तत्वतां । भिक्षा निजस्वार्था मीं देईन ॥ ८८ ॥

विमुख जालिया अतीत । राम सौमित्र युद्धा आंत । [घा. 'जयो कदान पावत'.] दुःख पावती उत्पात । अति विघात होईल ॥ ८९ ॥

सुखी केलिया अतीत । सुखी होईल भगवंत । राम लक्ष्मण युद्धाआंत । यशवंत होतील ॥ ९० ॥

लक्ष्मण मर्यादा राखतां [पै. 'रेख'.] देख । अतिथी होऊं पाहे विमुख ।
येणें पापें [पै. 'अति'.] पति पावेल दुःख । भिक्षा अवश्य घालीन ॥ ९१ ॥

ऐसा विचार मानसीं । सीतेनें करुनि निश्चयेसीं । भिक्षा आणावया अतिथीसीं । स्वयें गुंफेसी रिघाली ॥ ९२ ॥

तंव हडबड देवांसी । स्वर्गीं होती कासाविसी । सकळ देव सकळ ऋषि । ब्रह्मयापासीं ते आले ॥ ९३ ॥

सुटावया देवाची बांदवडी । आजिची आहे लग्नघडी । बुद्धि विचारावी गाढी । सुरसांकडी फेडावया ॥ ९४ ॥

भिक्षां देतां रावणाप्रती । रावण सीता धरील हातीं । क्षणार्द्धें भस्म करील सती । आदि शक्ति जगदंबा ॥ ९५ ॥

पतंगा दीपीं अति प्रीती । आळंगितां मरोनि जाती । तेवीं सीता धरितां हातीं । भस्मोद्‌गति रावणा ॥ ९६ ॥

रावण जालिया भस्मीभूत । लंकेसी न ये श्रीरघुनाथ । देव बांदवडी समस्त । इंद्रजित सोडीना ॥ ९७ ॥

ऐसें विचारुनि जाण । गुंफेसी येऊनि सुरगण । धरिले सीतेचे चरण । भिक्षा आपण न घालावी ॥ ९८ ॥

अतिथि जातांचि विमुख । राम सौमित्र पावती दुःख । तुम्ही सज्ञान [कं. 'धार्मिक'; घा. 'सर्वज्ञ देवलोक'; दै. पै. 'देख'.] पुण्यश्लोक । हा [पै. 'अतिविवेक'.] अविवेक केवीं सांगा ॥ ९९ ॥

अनुक्रमणिका

देव सांगती आपण । अतिथीरूपें हा रावण । तुझें करूं आला हरण । भिक्षा आपण न घालावी ॥ १०० ॥

मग बोलिली सीता सती । रावणें मज धरितां हातीं । त्यासी लावीन कल्पांतख्याति । भय किती मज त्याचें ॥ १०१ ॥

रावण कायिसें बापुडें । दहा तोंडाचें किडे । त्याचें भय मजपुढें । वाडेफोडें मज [पै. खेरीज इतरत्र 'काय'.] सांगा ॥ १०२ ॥ [ओवी १०२ तं. प्रतीत नाही.]

देव म्हणती ऐक माते । रावण बंदी आम्ही समस्ते । तुवां निर्दाळिल्या रावणातें । इंद्रजित आमुतें सोडीना ॥ १०३ ॥

करावया आमुचें बंदिमोचन । तुम्हां दोघांचें अवतरण । तूंच पाहे विचारून । पूर्व विधान [मु. 'निजयोग'; दै. 'विवेक'.] विनियोग ॥ १०४ ॥

ऐकोनि देवांचें वचन । सीता जाली हास्यवदन । पावोनि मुळीची निजखूण । काय आपण बोलत ॥ १०५ ॥

म्यां राहिल्या गुप्तस्थिति । रावण आलासे भिक्षार्थी । त्यास काय कराल युक्ति । ते मजप्रति सांगावी ॥ १०६ ॥

देव बोलती निजयोग्यता । रावणाचिया भिक्षार्था । आम्ही करूनि मायिक सीता । जनक दुहिता तेणें हांसे ॥ १०७ ॥

साकार आणि [हे पद हस्तलिखितांत नाहीं.] सचेतनता । मायिकरूपें श्रीरामसीता । करूं न शके विधाता । तुम्ही तत्वतां महामूर्ख ॥ १०८ ॥

पर्जन्याची [तं. खेरीज इतरत्र 'जळगार'.] जळधारा । संख्या करूं न शकती अतिचतुरा ।
तेंवी ब्रह्मादि सुरवरां । कृत्रिम अवतार न शकती करूं ॥ १०९ ॥

जैसी माझी सगुण काया । तद्रूपरुपें माझी छाया । मी धाडिते भिक्षा द्यावया । सुरकार्या [कं. 'साह्यार्थ'.] सिद्धयर्थ ॥ ११० ॥

ऐकोनि सीतेचें वचन । समस्तीं घातलें लोटांगण । तिचे वंदूनि [मु. 'श्रीचरण'.] चरण । राहिले लपोन विमानीं ॥ १११ ॥

भिक्षा द्यावया लंकानाथा । सवेग छाया बाहेरी येतां । हेचि मुख्यत्वें सती सीता । सत्य समस्तां मानली ॥ ११२ ॥

ठाण मान गुणलक्षण । रूपरेखा समसमान । सुर सिद्ध साध्य चारण । अवघ्यांचे ज्ञान सत्य सीता ॥ ११३ ॥

अनुक्रमणिका

यक्ष राक्षस दैत्य दानव । सत्य सीता मानिती मानव । बाप जानकीचें लाघव । छाया सजीव स्वयें केली ॥ ११४ ॥

सद्भाव सामर्थ्यें जानकी । स्वयें राहोनि अग्निमुखीं । छाया धाडिली भिक्षे विखीं । येतां सकळिकीं देखिली ॥ ११५ ॥

भिक्षा घेऊनि वेगेंसी । उल्लंघोनि मर्यादेसी । सीता आली रावणापासीं । येरू अभिलाषी हरणार्थ ॥ ११६ ॥
[ओवी ११६ चे पै. प्रतीत चरण बदललेले आहेत.]

हस्ते हस्तं विनिक्षिप्य चकार सुमहद्वपुः । तच्च सौम्यं परित्यज्य भिक्षुरुपं स रावणः ॥ ६ ॥

भिक्षा घालतां अतिथीप्रती । अतिथी सीता धरी हातीं । येरी आसडूनि हस्तगती । पाडिला क्षितीं रावणु ॥ ११७ ॥

जंव रिघे मर्यादरेखे आंत । तंव आकर्षी लंकानाथ । सांडूनि भिक्षुवेषसमस्त । जाला अद्भुत राक्षसु ॥ ११८ ॥

दहा शिरें वीस भुजा । मी तंव लंकेचा राजा । तुज मी करीन निजभाजा । भोगी माझा सुखभोगू ॥ ११९ ॥

राम तापसी दीन वदनी । कष्टलीस वसतां [पै. 'तुज मी करीन पट्टराणी । अवघ्या लावीन सेवे लागूनी ॥'; घा. तु. इं. कं. दै. तं. प्रतींत पुढील ओवी अधिक आहे :—— 'जेवी छाया न राहे रुपापासी । तेवी उल्लंघोनिया मर्यादा रेखेसी । भिक्षा देतां रावणासी । तो आकर्षी सीतेतें ॥'] वनीं । तुज मी करीन पट्टराणी । विलासिनी मंदोदरी ॥ १२० ॥

तुज बैसल्या माझे अंकीं । मंदोदरी मुख्य सेवकी । ऐंशी सहस्त्र राण्या आणीकी । तुझ्या बटकी मी करीन ॥ १२१ ॥

मी ब्रह्मयाचा नातु प्रसिद्धु । कुबेराचा धाकटा बंधु । माझा वंश अति [पै. खेरीज इतरत्र 'शुद्धु'.] प्रसिद्धु । सांडी तूं [तु. 'समंधु'.] छंदू रामाचा ॥ १२२ ॥

वसंतु वोळगे शेजारे । सेज रचिजे [सु. 'सुकुमारें'.] कुसुमाकरें । चंद्र निववी शीतळ करें । करीन किंकरें सुरसिद्ध ॥ १२३ ॥

सुरश्रेष्ठ इंद्रादिक । तुझे वोळगेचे पाईक । मुख्य मी आज्ञेचा सेवक । अलौकिक भोग भोगी ॥ १२४ ॥

माझें देखिल्या अशोकवन । तुझें निवेल तनुमन । धन्य म्हणसी दशवदन । लंकाभुवन देखिलिया ॥ १२५ ॥

सीता आक्रंदे रामराम । रावण अत्यंत सकाम । तिचे प्राप्तीचा संभ्रम । आवडीं खेंव देवों पाहे ॥ १२६ ॥

सीता म्हणे रावणासी । वोळंबा चाखो पाहे अग्नीसी । तेवीं तूं मज भोगूं पाहासी । जळोनि मरसी [कं. 'तत्काळ'.] मत्कामें ॥ १२७ ॥

अनुक्रमणिका

पतंग आळंगी दीपकळी । तो तत्काळ होय होळी । भोगूं जातां जनकबाळी । तूं सकुळीं निमसील ॥ १२८ ॥

अहिल्या अभिलाष सुरेन्द्रा । सर्वांगीं भगें जालीं इंद्रा । अभिलाषितां श्रीरामदारा । बाणधारा निमसील ॥ १२९ ॥

श्रीराम सूर्य रावण खद्योत । रावण कांजी श्रीराम अमृत । तुझ्या ठायीं जे भोगासक्त । ते निश्चित दंश मशक ॥

श्रीराम केवळ क्षीरसमुद्र । रावण मुताचें थिल्लर । तये ठायीं भोग तत्पर । ते शूकर नर देहीं ॥ १३१ ॥

श्रीराम जगाचें जीवन । रावण [कं. 'डोमकावळा'; दै. 'वढाळश्वान'.] डोबाड परिछिन्न । तेथ रमती [तं. 'डोंब'; कं. मु. 'ढोंक'.] डोंख हीन । साधू निमग्न श्रीरामीं ॥ १३२ ॥

अतिथी वेषें अति कपटी । संन्यासी रूपें स्त्री लंपटी । विषय गोडीच्या गोड गोठी । आमिषासाठीं मरे मासा ॥ १३३ ॥

मम भर्ता तदा ब्रह्मन्वयसा सप्तविंशकः । अष्टादश तु वर्षाणि ममायुष्यञ्चगण्यते ॥ ७ ॥

वना निघतिया अवसरा । सत्तावीस वर्षें रामचंद्रा । माझें वय वर्षें अठरा । वसिष्ठ द्वारां ऐकिलें ॥ १३४ ॥

तूं तंव बहु काळाचा म्हातारा । विषय भोगितां आली जरा ।
तुज माझियां अभिलाषद्वारां । निशाचरा कां मरसी ॥ १३५ ॥

तुज मज न्यावया कैंची शक्ति । वृथावल्गतोसी चित्तीं । धांवण्या येवोनी रघुपति । करील [कं. 'ख्याति'.] शांति बाणें एकें ॥ १३६ ॥

सुटल्या श्रीराम कुऱ्हाडें । केउतें पळसी तूं बापुडें । बाण सोडूनिया गाढें । धडे दुधडें पाडील ॥ १३७ ॥

राम येईल त्रिशुद्धि । रावण जाणोनि दुर्बुद्धि । सीता घेऊनिया खांदीं । चपळपदीं निघाला ॥ १३८ ॥

पिशाच वदन खरसंयुक्ता । सारथिये सन्मुत्र आणिले रथा ।
रावणें रथीं वाऊनि सीता । होय निघतां लंकेसी ॥ १३९ ॥

एका जनार्दना शरण । रावणें केलें जानकी हरण । ऐकोनि सीता आक्रंदन । जटायु दारुण युद्ध करील ॥ १४० ॥

जटायू रावणातें दंडून । सीता सांडवील आपण । रावण करील जटायू छळण । तेंही निरोपण अवधारा ॥ १४१ ॥

अनुक्रमणिका

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां रावणेनजानकीहरणं नाम षोडशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सतरावा

## जटायु वध

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**रावणें करूनि सीताहरण । सवेग निघाला आपण । ते काळीचें गमनलक्षण । सावधान अवधारा ॥ १ ॥**

वामेन सीतां पद्‍माक्षीं मूर्धजेषु करेण सः । ऊर्व्यान्तु दक्षिणेनैव परिजग्राह पाणिना ॥ १ ॥

**सीता बैसवितां रथासीं । आंग टाकिलें भूमीसी । रावणें धरूनि केशीं । वाऊनि अंकासि बैसवी रथीं ॥ २ ॥**

**अंकीं बैसवितां पद्‍माक्षी । तेणें रावण जाला सुखी । सीता जाली परम दुःखी । धांवा फोडी आक्रोशें ॥ ३ ॥**

**धांव पाव रघुवीरा । सवेग धांवे सौमित्रा । रावणें हरूनि भिक्षाद्वारा । लंकापुरा मज नेतो ॥ ४ ॥**

**केउता राम केउता रावण ।** [कं. ‘लंकेश करितों दाराहरण’.] **कैसें केलें माझे हरण । अभिशापिला लक्ष्मण । तें पाप पूर्ण मज फळलें ॥ ५ ॥**

**सौमित्र निष्पाप हरिदास । तो म्यां छळिला अति संत्रास । आतां काइसी श्रीराम आस । माझी निरास म्यां केली ॥ ६ ॥**

**सौमित्रा श्रीरामीं अनन्य भक्ती । तो म्यां छळिला अति वक्रोक्तीं ।**
**त्या पापाची** [मु. ‘सद्यःप्रचीती’.] **सद्यःप्राप्ती । रावणा हातीं आतुडले ॥ ७ ॥**

**श्रीराम आज्ञा संरक्षण । सौमित्र दवडितां छळून । तेणें पापें मज रावण । झोटी धरून नेतसे ॥ ८ ॥**

**लक्ष्मण मानी मज जननी । त्यासी मी म्हणे करिसी पत्नी । येणें पापें फुटे अवनी । महापापिणी मी एकी ॥ ९ ॥**

**लक्ष्मणीं मिथ्या अभिशाप । तें मज माझें फळलें पाप । मज म्यां दिधला संताप । दुःख अमूप मज माझें ॥ १० ॥**

**जे पुढिलांसीं करी छळण । तेणेंचि छळें छळे आपण । तें मज फळलेसें संपूर्ण । केशाकर्षण रावणें ॥ ११ ॥**

**छळणाची शीघ्र गती । सौमित्र पावला रघुपती । मी तंव रावणाचे हातीं । बंध प्राप्ति पावले ॥ १२ ॥**

[कं. ‘छळवादी क्रूरदृष्टी’. तं. ‘छळशब्दें’.] **छळछद्‍म वक्रदृष्टी । महापापिणी मी ये सृष्टीं । आतां कैंची श्रीराम भेटी । दुःख कोटी मज माझ्या ॥ १३ ॥**

आता श्रीरामीं नव्हे भेटी । आतां श्रीराम न देखे दृष्टी । सौमित्र छळणा पै साठीं । दुःख कोटी मज माझ्या ॥ १४ ॥

छळणवाद्याचें निजमुख । श्रीराम न पाहे निःशेख । मज म्यां दीधलें अति दुःख । अधोमुख विलपत ॥ १५ ॥

महा पापिया परमगती । राम राम [मु. ‘जपतां’.] स्मरतां अंतीं । त्यांसी करिसी तू निर्मुक्ती । तैसी [घा. इं. ‘गती’.] रीतीं मज पांव ॥ १६ ॥

लक्ष्मणाच्या छळवादी । होणारा सारखी घडली बुद्धी । तेणें लागलीसे आधी । कृपानिधी कृपा करी ॥ १७ ॥

मी तंव श्रीरामाची दासी । मजही गांजितां राक्षसीं । आपली बिरुदें सत्य करावयासी । धांव धांवण्यासी श्रीरामा ॥

लक्ष्मणा तुझे चरणीं माथा । जरी तू मज मानिसी माता । माझ्या छळणोक्ती समस्तां । क्षमा सर्वथा कराव्या ॥ १९ ॥

श्रीराम भक्त तू निष्पाप । तुजमाजीं नाहीं कोप । माझ्या छळणाचा संताप । कृपानुरूप सांडावा ॥ २० ॥

> हा लक्ष्मण महाबाहो गुरुचित्तप्रसादक । ह्रियमाणां न जानासि रक्षसा पापकर्मणा ॥ २ ॥
> जीवितं सुखमर्थं च धर्महेतोः परित्यजन् । ह्रियमाणामधर्मेण मां राघव न पश्यमि ॥ ३ ॥

लक्ष्मणा वेगीं धांव पांव । सवें घेऊनि राघव । रावणाचा हरण गर्व । छेदी सर्व प्रतापें ॥ २१ ॥

तूं कां मज रुसलासी । तुझे चरण झाडीन केशीं । थोर गांजिलें राक्षसीं । कोणापासीं मी सांगों ॥ २२ ॥

नेणे परपुरुषाची मातु । त्या मज रावणें लाविला हातु । दुःखें आरंबळिली आकांतु । कां रघुनाथु विसरला ॥ २३ ॥

छळूनि दवडिलासी दुरी । तो कोप सांडूनियां जिव्हारीं । ऐसिये आकांत अवसरीं । पावे झडकरी सौमित्रा ॥ २४ ॥

तू जनकु तू जननी । सखा सांगाती [सु. दै. तं. ‘जिवालागोनी’.] जिवलगु वनीं । वेगें यावें कळवळोनी । मज लागूनि सोडवावया ॥ २५ ॥

विराधु वधिला जिहीं बाणीं । तेचि बाण लाऊनि गुणीं । प्रताप तेजें यावें गर्जोनी । मज लागूनि सोडवावया ॥ २६ ॥

पाप आहे माझे माथां । म्हणोनि नुपेक्षी रघुनाथा । तुझें रामनाम स्मरता । पाप सर्वथा मज नाहीं ॥ २७ ॥

अनुक्रमणिका

**महापापांच्या पर्वत कोडी । नाम क्षणमात्रें विभांडी । येऊनि निजकृपां तांतडी । माझी बांदवडी सोडावी ॥ २८ ॥**

**सोडावया देवांची बांदवडी । वना आलासी निजप्रौढी । माझी फेडावया सांकडी । घालावी उडी श्रीरामा ॥ २९ ॥**

**म्यां पाठविलें मृगापाठीं । हेचि माझी बुद्धि खोटी । श्रीरामेंसि पडली तुटी । दुःख कोटी मज माझ्या ॥ ३० ॥**

**मागतां मृगाची कांचोळी । सर्व सुखाची जाली होळी । राम अंतरला आतुर्बळी । मागण्यार्थ छळी सौमित्रा ॥ ३१ ॥**

**भर्तारापासीं जै मागणें । तें स्त्रियेचे निंद्य जिणें । मागण्या निमित्त मज** [पै. ‘कारणें’.] **रावणें । आकर्षण निजबंदीं ॥ ३२ ॥**

**भर्तार दे संतोषोन । तें स्त्रियांसी अतिपावन । स्वमुखें मागतां आपण ।** [पै. ‘दूषण’.] **दुःख दारुण पावलें ॥ ३३ ॥**

**माझ्या मागण्याची कथा । माझी मजचि आली घाता । बंदीं पडले लंकानाथा । श्रीरघुनाथा अंतरले ॥ ३४ ॥**

**अति अनुतापें संतप्ता । आपली आपण अपराधता । स्वयें अनुवादोनि सीता । दुःखार्ता अति दुःखी ॥ ३५ ॥**

**दूरी अंतरला रघुनंदन । त्यापासीं गेला लक्ष्मण । माझें अत्यंत आक्रंदन । दोघेजण नाइकती ॥ ३६ ॥**

**माझें उत्तर पडता कानीं । दोघे येते गर्जोनि । रावण बाणीं निर्दळूनी । अर्द्धक्षणीं सोडविते ॥ ३७ ॥**

**निरोप धाडावया रामासी । सीता पाहे द्विजशिष्यासी । ब्राह्मण पळाले धांकेंसी । निज पत्न्यांसी घेऊनी ॥ ३८ ॥**

**ते वेळीं सीता पै आपण । वृक्ष वल्लीसि रिघे शरण । श्रीरामा सांगावे आपण ।** [मु. ‘मज रावण नेतुसे’.] **सीताहरण रावणें केलें ॥ ३९ ॥**

> आमंत्रये जनस्थानं कर्णिकारांश्च पुष्पितान् । नमस्करोऽम्यहं तेभ्यो भर्तुःशंसत मां हताम् ॥ ४ ॥
> यानि कानिचिदप्यत्र सत्त्वानि विविधानि च । सर्वाणि शरणं यामि मृगपक्षिगणानपि ॥ ५ ॥
> दैवतानि च यान्यस्मिन् वने विविधपादपे। क्षिप्रं रामाय शंसध्वं सीतां हरति रावणः ॥ ६ ॥
> विदित्वा तु महाबाहुरमुत्रापि महाबलः । आनेष्यति पराक्रम्य वैवस्वतहृतामपि ॥ ७ ॥

**जनस्थानीचे जनवन । त्यांसीं घालितें लोटांगण । श्रीरामा सांगावे आपण । केलें सीताहरण रावणें ॥ ४० ॥**

**कर्णिकारादि बिल्व आम्र । समस्ता वृक्षां नमस्कार । श्रीरामासी सांगावे शीघ्र । सीता दशवक्त्र नेतुसे ॥ ४१**

अनुक्रमणिका

॥

गुल्मलता तृण पाषाण । दैवतें [कं. 'देवाभूत'.] श्वापदें पक्षिगण । त्यांसीं माझें लोटांगण । सांगावें आपण श्रीरामा ॥ ४२ ॥

काक बक कारंडक । हंस मयूर चातक शुक । श्रीरामा सांगावें अवश्यक । सीता दशमुख नेतुसे ॥ ४३ ॥

सिंह व्याघ्रादि सावजें क्रूर । त्यांसीं माझा नमस्कार । धांवण्या धाडावा श्रीरामचंद्र । राक्षसेंद्र वधावया ॥ ४४ ॥

वनदेवता जळदेवता । आकाशींच्या गुप्त देवता । तुम्हीं सांगावे रघुनाथा । रावण सीता नेतुसे ॥ ४५ ॥

श्रीरामा सांगावया जाण । वाचा पावोतु तृणपाषाण । तिहीं सांगावें संपूर्ण । सीता रावण नेतुसे ॥ ४६ ॥

विनविते पंचभूतां । तुम्हीं सांगावें रघुनाथा । धांवण्या धाडावा शीघ्रता । लंकानाथा वधावया ॥ ४७ ॥

न भेटतां जनकबाळी । स्वर्ग मुत्यु आणि पाताळीं । राम घेवोनि घरधांडोळी । मज तत्काळीं आणील ॥ ४८ ॥

माझे ऐकतां हरण । सवेग येऊनि लक्ष्मण । रागें निर्दळील रावण । अर्धक्षण न लगतां ॥ ४९ ॥

रामें ऐकतां माझें हरण । जेथिचा तेथें सोडूनि बाण । घायें रावणाचा घेईल प्राण । सोडवण तेणें माझी ॥ ५० ॥

लोकालोक कुळाचळीं । लपविल्याही जनक बाळी । राम राक्षसां करूनि होळी । मज तत्काळीं सोडवील ॥ ५१ ॥

रावणें माझा केल्या घात । ऐसा प्रतापी रघुनाथ । पाडूनिया यमाचे दांत । मज निश्चित आणील ॥ ५२ ॥

माझिया प्रेमाचे आवडीं । राम काळाची मुरडील नरडी । तेथ राक्षस कोण बापुडीं । बाणीं रोकडीं निर्दळील ॥ ५३ ॥

ऐसा प्रताप रघुनाथा । माझिया दुस्तर आकांता । कां पां न पवेचि तत्वतां । म्हणोनि सीता विलपत ॥ ५४ ॥

सीता स्वयें येचि अर्थी । ज्या त्या येतसे काकुळती । शुद्धी सांगावी रघुपती । रावण वधार्थी शीघ्र यावे ॥ ५५ ॥

धांव पांव श्रीरामचंद्रा । वेगीं यावें गा सौमित्रा । मज गांजितां राक्षसेंद्रा । कृपासमुद्रा कां न येसी ॥ ५६ ॥

अनुक्रमणिका

**मरमर पापिया अदृष्टा । दुःखें फळलासी दुर्घटा । वंचूनिया श्रीरामा वरिष्ठा । वश्य दुष्टा मज केलें ॥ ५७ ॥**

**मी जनकबाळा जानकी । श्रीरामाची निजसेवकी । रावणें दुष्टें केलें दुःखी । दशमुखीं निर्बंधु ॥ ५८ ॥**

**श्रीरामा तुझी अगाध थोरी । तुझें द्याहा घर फोडिलें चोरी । चोरुनि नेली अंतौरी । हे चराचरीं तुज लाज ॥ ५९ ॥**

**आपले लाजे कारणें । माझें करावें धांवणें । ऐसें सीतेचें आक्रंदनें । दीर्घस्वरें विलपत ॥ ६० ॥**

**ऐकतां सीता विलापन । व्याघ्र सिंहादि करिती रुदन । वृक्ष स्त्रवती संपूर्ण । गळती लोचन पक्ष्यांचे ॥ ६१ ॥**

**दुःखें फुटो पाहे अवनी । दुःखें द्रवो आला पाषाणी । दुःख न समाय गगनीं । ऋषिजनीं आकांतु ॥ ६२ ॥**

**ऐकोनि सीतेचें रुदन । रावण जाला** [तं. 'कोपायमान'.] **कंपायमान । वेगें आलिया रघुनंदन । माझा प्राण घेईल ॥ ६३ ॥**

**जेणें मारिले खर दूषण । मरीचि मारिला विंधोनि बाण । त्यासी माझा घेतां प्राण । अर्द्धक्षण लगेना ॥ ६४ ॥**

**ताटका सुबाहु मारिलीं जाण । विराध मारिला संपूर्ण । श्रीराम माझा घेईल प्राण । धाकें रावण धुकधुकी ॥ ६५ ॥**

**सीता करी दीर्घरुदन । तिसीं देऊनि** [तं. खेरीज इतरत्र 'आलिंगन'.] **आश्वासन । रथीं बैसोनि रावण । लंघी गगन अतिधाकें ॥ ६६ ॥**

**रावणाची शक्ति कैसी । सीता धरूनि पोटेसी । रथ चालविला आकाशीं । येरी आक्रोशीं आक्रंदे ॥ ६७ ॥**

**ऐकोनि आक्रंदता सीता । जटायु आला सकोपता । माझिया स्वामीची कांता । येथें गांजितां** [पै. तु. दै. तं. 'तो'.] **तूं कोण ॥ ६८ ॥**

> ततः पर्वतकूटाभस्तीक्ष्णतुंडः खगोत्तमः । वनस्पतिगतः श्रीमान् व्याजहार शुभां गिरम् ॥ ८ ॥
> दशग्रीवः स्थितो धर्मे पुराणे सत्यसंश्रयः । भ्रातस्त्वं निंदितं कर्म कर्तुं नार्हसि सांप्रतम् ॥ ९ ॥
> राजा सर्वस्य लोकस्य रामो दशरथात्मजः । तस्यैषा लोकनाथस्य धर्मपत्नी यशस्विनी ॥ १० ॥
> सीता नाम वगरोहा यां त्वं हर्तुमिहेच्छसि । कथं राजा स्थितो धर्मे परदारान् परामृशेत् ॥ ११ ॥

**रावणें सीता हरितां । जटायु वनक्रीडे गेला होता । ऐकोनि जानकी आक्रंदतां । सवेगता तो आला ॥ ६९ ॥**

**त्रैलोक्य राजा श्रीरघुनाथ । मी जटायु त्याचा भक्त । तूं रावण अति उन्मत्त । सीतेसीं हात** [मु. 'लाविला'; कं. 'कां'.] **घातला ॥ ७० ॥**

अनुक्रमणिका

पर्वतप्राय महाबळी । मी असतां ये वनस्थळीं । केवीं नेसी तू जनकबाळी । रण रांगोळी मी करीन ॥ ७१ ॥

पंचवटी आश्रमा निकट । माझे बैसले असे मेट । तुज कैसेनि फुटेल वाट । महानष्ट तूं परदारी ॥ ७२ ॥

रामरायाची अंतौरी । नेवों पाहासी करूनि चोरी । चोरासि मीं जीवें मारी । तुझी उरी उरों नेदी ॥ ७३ ॥

चोरापासील वस्तुजात । सांडऊनि करिती घात । तेवीं सीता सांडऊनि येथ । तुझा निःपात करीन ॥ ७४ ॥

चौदा चौकड्या राज्य शिरीं । शेखीं करू धांवसी चोरी । जळो ते रावणा तुझी थोरी । परदारी पापिष्ठा ॥ ७५ ॥

त्रैलोक्य स्वामित्व रघुनाथा । त्याची चोरूनि नेतोसि कांता । तुझ्या करीन मी [मु. 'निःपाता'.] शिरःपाता । जेवीं सदेंठ वृंताक ॥

जैसी कां परिपक्व फळें । सदेंठ झडती वायुबळें । तैसी तुझी कंठनाळे । दाहाही शिरकमळें छेदीन ॥ ७७ ॥

जटायु पक्षवात दुर्धर । न चले रावणाचा रहंवर । मागे वोसरले रथीचे खर । दशशिर क्षोभला ॥ ७८ ॥

धनुषा वाऊनिया गुण । जटायु लक्षूनिया पूर्ण । नाळीक नाराच वर्षे बाण । युद्ध दारूण मांडलें ॥ ७९ ॥

तुझ्या शस्त्रांचा कडकडाट । नखीं पांखीं करीन पीठ । माझी चांचू अतितिखट । दाहाही कंठ छेदीन ॥ ८० ॥

अरे मी जटायु न भेटतां । रावणा तुझी प्रतापता । हिरोनिया रामकांता । तुज मी आतां मारीन ॥ ८१ ॥

रावण काइसें बापुडें । दाहा तोंडांकें जडकिडें । हाणोनिया चांचुवाडे । सवक्त्र हाडें फोडीन ॥ ८२ ॥

चोरितां श्रीरामाची कांता । कीर्ति पळाली अपकीर्तिता । पापें शक्ति गेली लंकानाथा । तुज मारितां क्षण न लगे ॥

पापें जालासी निर्वीर्य । तुज युद्धीं कैचे धैर्य । मारूनिया [तं. घा. इं. 'राक्षस सर्व'.] राक्षसवर्य । राम कार्य साधीन ॥ ८४ ॥

रावण वर्षे दुर्धर बाण । जटायु पांखें उडवी पूर्ण । बाण प्रताप जाला क्षीण । रागें रावण क्षोभला ॥ ८५ ॥

जटायु पांखाच्या झडाडीं । विसा हातां वेळ वेंगडी । दहा शिरें कांपती गाढीं । धनुष्य वोढी न करवे ॥ ८६ ॥

जटायु पक्षाच्या आवर्ता । आवर्ती पाडिलें लंकानाथा । पुढें ढळो नदी रथा । अति निघाता पेटला ॥ ८७ ॥

अनुक्रमणिका

**रावण पावला आकांता । जटायु ढळो नेदी रथा । मागून आलिया रघुनाथा । माझ्या घातां तो करील ॥ ८८ ॥**

**मरीचि बोलिला सत्यवचन । करूं जातां सीताहरण । आम्ही दोघे पावों मरण । तें प्रमाण दिसताहे ॥ ८९ ॥**

**नाहीं इंद्रजित कुंभकर्ण । नाहीं साह्य सेना प्रधान । मज मारितां राखेल कोण । अति उद्विग्न लंकानाथ ॥ ९० ॥**

**अति प्रयासें चढली हात । ते पावल्या लंके आंत । तेथें येवों न शके रघुनाथ । दुर्घट पंथ कंठेना ॥ ९१ ॥**

**लंका दुर्ग अति गूढ । भंवता समुद्राचा अगड । राम मानवी अतिजड । मार्ग अवघड** [दै. 'लंकेचा'.] **कंठेना ॥ ९२ ॥**

**प्रस्तुत जटायु दारुण । दृढ वोढवलें विघ्न । हें शंकरें निवारून । लंकाभवन** [मु 'पावावें'.] **ठाकावें ॥ ९३ ॥**

**पुढें जटायु मार्ग रोधोन । मागून आलियां रघुनंदन । माझा घेईल तो प्राण । धांके रावण धुक धुकी ॥ ९४ ॥**

**एकेचि वेळें शतबाण । जटायूसि विंधी रावण । येरें चुकविले** [पै. खेरीज इतरत्र 'तळपोन'.] **लपोन । आला कोपोन झडपित ॥ ९५ ॥**

> ततोऽस्य सशरं चापं मुक्तामणिविभूषितम् । पक्षाभ्यां स महातेजा बभंज पतगेश्वरः ॥ १२ ॥
> सारथिं च रथोपस्थं स जघान नखांकुरैः । कांचनोरच्छदान्दिव्यान्पिशाचवदनान्खरान् ॥ १३ ॥
> पूर्णचंद्रप्रतीकाशं छत्रं च व्यजनैः सह । घातयामास वेगेन ग्राहिभी राक्षसैः सह ॥ १४ ॥

**रावणाच्या धनुष्यावरी । मुक्ताफळांच्या झालरी । सुवर्णबद्ध मणि मंजरी । घेऊनि करीं विंधतु ॥ ९६ ॥**

**जटायूने सवेग पांखी । रावण झडपिला दाहीमुखीं । चाप छेदूनि सांडिले नखीं । मुगुट मस्तकींचा पाडिला ॥ ९७ ॥**

**सवेंचि ध्वजु छेदिला** [पैं. इं. सु. खेरीज इतरत्र 'चांग'.] **सांग । शशांक छत्रा केला भंग । रावणाचें अंग प्रत्यंग । नखीं सवेग विदारी ॥ ९८ ॥**

**जटायु पक्ष वातावर्त । रावण चळचळा कांपत । चंचूं धरूनिया रथ । गगना आंत उचलिला ॥ ९९ ॥**

**सीता धरूनि पोटेंसी । रावण उडी टाकी वेगेंसी । पिशाचवदनखर रथासी । नखाग्रेसीं मारिले ॥ १०० ॥**

**तेथूनि टाकितां रहंवर । सारथी वारुवेंसि शतचूर ।** [कं. 'रणीं'.] **दणकां दुमदुमिलें अंबर । दशाशिर चळीं कांपे ॥ १०१ ॥**

अनुक्रमणिका

**मुहूर्ती केला छत्रपात । भंगिले चाप भंगिला रथ । रावण केला हताहत । धन्य पुरुषार्थ जटायू ॥ १०२ ॥**

**देखोनि जटायु साटोप । स्वर्गीं देव वानिति** [घा. इं. 'प्रताप'.] **अमूप । धन्य धन्य जटायूचें तप । केला प्रताप रामकाजीं ॥ १०३ ॥**

**रावण विचारी निजचित्तां । जटायू आलिया न जिरे सीता ।** [दै. 'युद्धीं'.] **इसी सांडूनिया जातां । अति लघुता तिहीं लोकीं ॥ १०४ ॥**

**सहित पार्वती महेश । म्यां आंदोळिला** [मु. 'गिरी कैलास'.] **कैलास । जिणोनिया कुबेरास । विमानास हिरतलें ॥ १०५ ॥**

**देवांचिया अमित कोडी । अद्यापि माझें बांदवडीं । त्याहीं माझी गर्वझाडी । केली रोकडी येणें पक्षें ॥ १०६ ॥**

**जटायु चंचू अति तिखट । शस्त्रसमुदावो केला** [पै. खेरीज इतरत्र 'सपाट'.] **पीठ । या पासून न फुटे वाट । परम कष्ट रावणा ॥ १०७ ॥**

> स भग्नधन्वा विरथो हताश्वो हतसारथिः । अंकेनादाय वैदेहीं पपात भुवि रावणः ॥ १५ ॥

**भंगलें धनुष्य मोडला रथ । सारथी वारुवां केला घात । विरथी** [तं. 'केला'.] **पदाति लंकानाथ । मग कपटार्थ मांडिला ॥ १०८ ॥**

**राक्षसांची गुप्तस्थिती । कडिये घेऊनि सीतासती । रावण निघे खेचरगती । गगनपंथी अति गुप्त ॥ १०९ ॥**

**जटायूसि अरुण भेटी । सहजें त्याची दिव्य दृष्टी । सीता नेता देखोनि दृष्टीं । रावणापाठीं लागला ॥ ११० ॥**

> स विदार्य नखैस्तीक्ष्णैस्तस्य पृष्ठं समंततः । केशांश्चोत्पाटयामास नखपक्षमुखायुधः ॥ १६ ॥
> स तदा गृध्रराजेन क्लिश्यमानो मुहूर्मुहुः । ततः क्रोधाद्दशग्रीवः सीतामुत्सृज्य वीर्यवान् ॥ १७ ॥

**जटायु धांवला सरोखी । सबळबळें निज पांखीं । रावण झडपिला दाहीमुखीं । विदारी नखी सर्वांग ॥ १११ ॥**

**तिखट नखें** [घा. इं. 'दशशिरा'.] **खगेश्वरा । सर्वांगीं लागल्या रुधिरधारा । देहान्त मांडिला दशशिरा । साह्य दुसरा नाहीं कोणी ॥**

**नखीं पांखीं चंचूतीक्ष्ण । घायीं घायवट केला रावण । आतां माझें न वांचती प्राण । योद्धा दारुण जटायू ॥ ११३ ॥**

**जटायु तळपोनि आकाशीं । केश उत्पाटी दाढ्या मिशी । भेणें रावण कासाविसीं । जीविताशेसीं सांडिलें ॥ ११४ ॥**

अनुक्रमणिका

मरीचि वाक्य सत्य भाषण । करितां जानकीहरण । आवश्य पावशील मरण । तें प्रमाण [मु. 'दिसताहे'.] हों आलें ॥ ११५ ॥

रावण म्हणें जानकी नेतां । जटायु करील माझ्या घाता । भेणें सांडुनिया सीता । होय पळतां लंकानाथ ॥ ११६ ॥

जटायूनें गांजिलों वनीं । वेगीं धांवा पांवा कोणी । ऐसा रावण आक्रंदोनी । सीता सांडूनि पळाला ॥ ११७ ॥

जटायु बोलिंला हांसोन । सीता सांडलिया आपण । सर्वथा तुज न मारी जाण । जीवदान तुज दीधलें ॥ ११८ ॥

रावणापासून जानकी । सुटोनि जाली अति सुखी । जटायु दाटुगा तिहीं लोकीं । केवळ पक्षी म्हणों नये ॥ ११९ ॥

सीता हरण महापापासी । उपडुनि दाढ्यामिशासी । प्रायश्चित दीधलें रावणासी । जटायु [कं. 'होसी'; घा. दै. 'ऋषि'.] परम धर्मात्मा ॥ १२० ॥

जटायु सोडवितां सीतेसी । स्वर्गीं हडबड देवांसी । बंध निमुक्ति नव्हें आम्हांसी । सीता लंकेसी न पवतां ॥ १२१ ॥

ऐसें देवांचें मनोगत । [कं. 'भविष्यें'.] तंव रावण जाला सावचित्त । होऊनिया [दै. 'पुढें'.] जी युद्धार्थ । पाचारित जटायूसी ॥ १२२ ॥

सीता होती मजपासीं । तेणें त्वां केलें कासाविसी । आतां युद्ध सावकाशीं । पुरुषार्थेंसी करूं दोघे ॥ १२३ ॥

गुंफेसि नसतां रामलक्ष्मण । शून्य [मु. 'मंदिरीं'.] घरीं रिघे श्वान । तेवीं त्वां सीतेतें चोरून । पलायमान भयभीत ॥ १२४ ॥

तुज कैचे दादुलपण । वेगें पळसी रामाभेण । मजसी करूं पाहासी रण । आंगवण [दै. पै. 'पाहे माझी'.] पाहों तुझी ॥ १२५ ॥

दाहा शिरें वीस भुजा । राक्षसांचा मुख्य राजा । [पै. प्रतीत 'पक्षी' हे पद नाही.] पक्षी पावला युद्धार्थ पैजा । बळसमाजा वरिष्ठ ॥ १२६ ॥

रावणाचीं शस्त्रें आणि शर । पूर्वीं जटायुनें केलीं चूर । आतां निजांगें दशशिर । मुष्टिप्रहार हाणों धांवे ॥ १२७ ॥

अति क्रोधें दशशिर । बळें हाणतां कर प्रहार । नखीं विदारिले कर । वेगें दुर्धर जटायू ॥ १२८ ॥

अनुक्रमणिका

रागें हाणतां दृढलात । चंचु घायें करूनि घात । रावणु केला अस्ताव्यस्त । लंकानाथ गजबजिला ॥ १२९ ॥

तळपोनियां गगनीं भरे । झडपांझडपी दाही शिरें । मस्तक भेदी चंचु चक्रें । मुखें नखाग्रें विदारी ॥ १३० ॥

नखीं पांखीं चंचुधारें । रावणा लागलें घायवारें । धाकें धाकें जिकडे सरे । तिकडे [घा. 'नखाग्रें'.] मारे मारिजे ॥ १३१ ॥

जटायु पक्षांचा आघात । रावण उडविला नभांत । गगनीं भवंडूनि आवर्त । पाडिला मूर्छित अधोमुख ॥ १३२ ॥

येथूनि पुरे पुरे रण । रावण दांती धरी तृण । अकाळ वोढवलें मरण । जटायु प्राण घातकु ॥ १३३ ॥

मीं म्हणें हें पांखरू । [मु. 'परी'.] तंव हा धीरू वीरू महाशुरू । विसा भुजांसी केला चूरू । अति दुर्धरू जटायु ॥ १३४ ॥

जटायुनें लाविली शीक । दाही मुखेंसी विमुख । रावण पाडिला अधोमुख । जीवा [कं. 'प्राण संकट'; घा. तं. 'संकट'.] असुख मांडलें ॥ १३५ ॥

न चलें बळाची आंगवण । परमदुःखी जाला रावण । करावया जटायुचें छळण । कपट पूर्ण मांडिलें ॥ १३६ ॥

रावणु म्हणे लवलाहीं । दोघेही झुंजों उसिणा घायीं । जटायु म्हणे तुज शक्ति नाहीं । उसणें कैं फेडिसील ॥ १३७ ॥

घावो हाणितां स वर्म । न पळे न ढळे योद्धा परम । तूं नेणसी युद्धधर्म । व्यर्थ आक्रम [मु. 'बळाचा'.] युद्धाचा ॥ १३८ ॥ [१३८ वी ओवी दे. प्रतीत नाही.]

घालूनि श्रीरामाची आण । जटायूसि पुसे रावण । तुझें कोणे वर्मी मरण । सत्य संपूर्ण मज सांग ॥ १३९ ॥

आवर्तलिया अति आकांतीं । वोढवल्या अंतगती । हरिभक्त असत्य न बोलती । जाण निश्चितीं [घा. दे. सु. इं. 'पक्षिनाथा'.] लंकेशा ॥ १४० ॥

भावार्थ दाऊनि उदंड । मधुर शब्दीं असत्य लंड । त्याचें मुख नरक कुंड । काळें तोंड तयाचें ॥ १४१ ॥

जटायु म्हणे रावणासी । जरी तूं निजमृत्यु सांगसी । मीं ही सांगेन तुजपासी । येर येरासी नेम [तु. 'केला'.] जाला ॥ १४२ ॥

घातली श्रीरामाची आण । असत्य न बोले गेलिया प्राण । दोहीं पांखीं माझें मरण । सत्य संपूर्ण वदे पक्षी ॥ १४३ ॥

अनुक्रमणिका

रावण छळवादी पातकी । मृत्यु सांगे वामांगुष्ट नखीं । जटायु सांगे दोहीं पांखीं । युद्ध सात्विकी सत्यवादी ॥ १४४ ॥

जटायु तळपोनि देख । छेदिलें वामांगुष्टनख । हातातळीं आले पांख । येरें निःशेष उपडिले ॥ १४५ ॥

रावणाचा छेदिला अंगुष्टा । तो [घा. 'जाला आवंढा पट्टा'.] आवंढा पक्षी पट्टा । त्रिंबकीच्या निकट घाटा । आवंढा पट्टा प्रसिद्ध ॥ १४६ ॥

जटायूसी येतां मरण । पडिल्या करी श्रीराम स्मरण । नष्टा रावणा केलें छळण । कुळनिर्दळण देखसी ॥ १४७ ॥

छळवादी अति दुष्ट । परमपापी क्रियानष्ट । परद्वारा अति पापिष्ठ । भोगिसी कष्ट छळणाचे ॥ १४८ ॥

छळणाच्या कपट निष्ठीं । जटायु मूर्छित पडिला सृष्टीं । श्रीरामाचिये निज भेटी । प्राण कंठीं धरिलासे ॥ १४९ ॥

मुखी श्रीरामनामस्मरण । चित्तीं श्रीराम चिंतन । नयनीं श्रीराम अवलोकन । हृदयीं ध्यान रामाचें ॥ १५० ॥

श्रीरामरूप देखे पाषाण । श्रीरामरूप देखे तृण । वृक्ष वल्ली वनें उपवन । देखें संपूर्ण श्रीराम ॥ १५१ ॥

श्रीराम काजीं वेचितां प्राण । श्रीराम कृपाळू आपण । सर्वरूपें स्वयें संपूर्ण । आला वोरसोन भेटीसी ॥ १५२ ॥

जटायूचां निज पोटीं । अंती श्रीराम देखावा दृष्टीं । त्यालागीं होऊनि स्वयें सृष्टी । आला भेटी निज भक्ता ॥ १५३ ॥

रावण नव्हे माझा वैरी । तो तंव परमार्थी साहाकारीं । राम भेटविला चराचरीं । सुख सागरीं सुखीं केलें ॥ १५४ ॥

निज भक्ताचें मनोगत । पुरवू जाणे श्रीरघुनाथ । जटायु जन्ममरणातीत । आनंदभरित सुखी केला ॥ १५५ ॥

एका जनार्दना शरण । जटायु छळणें वधी रावण । पुनः सीता हरण । करी रावण तें ऐका ॥ १५६ ॥ [ओव्या १५६ व १५७ कं. प्रतीत अशा आहेत :–– 'रावणें वधिलें नाहीं त्यासी । लाविलें निजमुक्ति मार्गासी । त्याची वासना होती जैसी । पुरविली तैसी श्रीरामें ॥
अरण्यकांडीचें महिमान । उद्धरिले दीन जन । या श्लोकार्थी घालील जो मन । तो मनोरथ संपूर्ण पावेल ॥']

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां जटायुवधो नाम सप्तदशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग अठरावा

## सीताया अशोकवन प्रवेश

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

जटायूसि स्वयें रावण । वधितां झाला करूनि छळण । तें देखोनि सीता जाण । जाली आपण अतिदुःखी ॥ १ ॥

तं स्वल्पजीवितं भूमौ क्षतजार्द्रं जटायुषम् । निरीक्ष्य पतितं सीता विललाप सुदुःखिता ॥ १ ॥

जटायूचे उपडिता पक्ष । भूमीं मूर्छित [पै. खेरीज इतरत्र 'निःशेष'.] जीवशेष । त्याचें देखोनि दुःखअशेष । परम दुःख सीतेसी ॥ २ ॥

न पवतीच रामलक्ष्मण । जटायु [मु. 'करिता'.] करी सोडवण । तंव त्यासीच आलें मरण । कपटी रावण दुष्टात्मा ॥ ३ ॥

जटायूसि म्हणे आपण । तुझें मज नयेचि कां मरण । तूं बळिया बळी संपूर्ण । मजलागीं प्राण वेंचिला ॥ ४ ॥

युद्धीं गांजूनि रावण । माझी केली सोडवण । तुझें करूनियां छळण । मारी रावण महापापी ॥ ५ ॥

ऐसें बोलूनि सुंदरी । लल्लाट पिटी निजकरीं । जो होय माझा साहाकारी । तो निशाचरीं मारिजे ॥ ६ ॥

वेगीं पावतां रघुनंदन । तुझा वाचवितां प्राण । माझी करितां सोडवण । रणीं रावण मर्दूनी ॥ ७ ॥

जटायु सबळ [कं. 'संबळ जुंझारी'.] धांवणेंकरी । जटायु माझा साहाकारी । जटायु माझा निजकैवारी । तोही निशाचरीं मारिला ॥ ८ ॥

रावण विचारी मानसीं । चराचर साह्य श्रीरामासी । भलता सोडवील सीतेसी । शीघ्र लंकेसी हे न्यावी ॥ ९ ॥

शंकरें टाळिलें जटायु विघ्न । आणिक उठलिया आन । मग न [मु. 'ठाके'.] भेटे लंकाभुवन । शीघ्र गमन करावें ॥ १० ॥

तां क्लिष्टमाल्याभरणां विलपंतीमनाथवत् । अभ्यधावत वैदेहीं रावणो राक्षसाधिपः ॥ २ ॥
क्रोशंतीं रामरामेति रामेण रहितां वने । जीवितांताय केशेषु जग्राहान्तकसंनिभः ॥ ३ ॥

केलिया जटायूच्या घातां । व्यस्ता भरणीं आक्रंदे सीता । तिसीं धरावया मागुतां । होय धांवतां लंकानाथु ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

रावणासी म्हणे सीता । [मु. 'तूं मजला'.] उजू मज लंकेसी नेतां । करिसी राक्षसाच्या अंता । तूं निजघातां पावसी ॥ १२ ॥

जटायूसि करिता रण । तुवां दांतीं धरिलें तृण । तेथ आलिया श्रीरामबाण । कुळनिर्दळण तुजसगट ॥ १३ ॥

कायिसा समुद्र अचाट । काइसें लंकेचे त्रिकूट । बाणें एकें करील पीठ । तुजसगट राक्षसां ॥ १४ ॥

ऐसें बोलतां सीतेसी । कोपुं आला रावणासी । धांवोनि धरिली ते केशीं । जेवीं जीवांसी अंतकु ॥ १५ ॥

रावणें धरितांचि सीता । रागें लोटिलें लंकानाथा । चांचरोनि पडे पालथा । धांवे मागुता धरावया ॥ १६ ॥

भेकापासीं आलिया सर्प । तें सर्वांगीं होय सकंप । देखोनि सीतेचा प्रताप । आहा कंप रावणा ॥ १७ ॥

युद्धा प्रवर्तलिया सीता । मज नाटोपे सर्वथा । ऐसें कळलें लंकानाथा । श्रीरामकांता दुर्धर ॥ १८ ॥

ऐसें मनीं विचारूनी । विसा भुजीं आकळूनी । सीता धरिली आंवळूनी । जेवीं कां स्वप्नीं निधान ॥ १९ ॥

मज सीता जाहाली प्राप्त । रावणाचा मनोरथ । स्वप्नप्राय अवघा व्यर्थ । तोही [पै. 'कार्यार्थ'.] कथार्थ अवधारा ॥ २० ॥

जरी निर्बळ असती सीता । रावण बळात्कारें भोगिता । तिची जाणोनि सबळता । होय प्रार्थिता [कं. 'भोगार्थी'; मु 'शरणार्थी.'] वरणार्थी ॥ २१ ॥

रावणापासूनिया सीता । क्षण न लगे स्वयें सुटतां । निर्दळावया दुष्टां समस्तां । निज हरणता अक्रंदे ॥ २२ ॥

पुढील रामायणी कथा । दुसरेनि रावणु हरी सीता । उल्हासु राक्षसाच्या चित्ता । लंकेसि नेतां तो होय ॥ २३ ॥

रथ भंगिला जटायूनं । नाहीं आणिलें विमान । गगनगती दशानन । सीता घेऊनि निघाला ॥ २४ ॥

सीता सोडविली जटायूनं । तेणें सुखी जाले ऋषिगण । सर्वेचि तिचें करितां हरण । तपोधन तळमळती ॥ २५ ॥

जळचर भूचर खेचर । जंगम आणि स्थावर । तळमळती जीवमात्र । सीता दशवक्त्र नेंतांची ॥ २६ ॥

सीता निज खांदी घेऊन । खेचर गती दशानन । ठाकावया लंकाभुवन । सवेग आपण निघाला ॥ २७ ॥

मागु कळावया श्रीरामासी । सीता न्यासी निजचिन्हांसी । मार्गो मार्गीं निजमाळांसी । सांडी सुमनांसी

अनुक्रमणिका

**मार्गार्थ ॥ २८ ॥**

**श्रीराम येईल धांवण्यासी । आशा सीतेच्या मानसीं । यालागीं मार्गामार्गांसी । प्रदेशोप्रदेशीं चिन्हें सांडी ॥ २९ ॥**

**उल्लंघून महापर्वत । पंथ क्रमिला बहुदूरस्थ । शुद्धि पावावया रघुनाथ । वस्त्रें शुद्ध्यार्थ सीता सांडी ॥ ३० ॥**

> ह्रियमाणा तु वैदेही कंचिन्नाथमपश्यती । ददर्श गिरिशृंगस्थान्पंचवानरपुंगवान् ॥ ४ ॥
> तेषां मध्ये विशालाक्षी कौशेयं कनकप्रभम् । उत्तरीयं वरारोहा शुभान्याभरणानि च ॥ ५ ॥
> मुमोच यदि रामाय शंसेयुरिति भामिनी ॥ ६ ॥

**लंघूनि पर्वता थोर थोरा । कृष्णा वेण्या तुंगभद्रा । नद्या लंघूनि दुस्तरा । लंकापुरा मज नेतो ॥ ३१ ॥**

**धांवण्या** [इं. दै. 'न पवे'; कं. 'न येसी'.] **न येववे रघुनाथा । कोणी न देखे सोडविता । ऐसें जाणोनिया सीता । परमचिंता पावली ॥ ३२ ॥**

**शुद्धी सांगावया श्रीरामचंद्रा । भंवते पाहे रामभद्रा । पर्वतमाथा पंच वानरां । देखे सुंदरा दुरूनी ॥ ३३ ॥**

**श्रीरामाचा जीवप्राण । वानर होती पांचहीजण । सीता जाणोनि संपूर्ण । वस्त्राभरण तेथें त्यागी ॥ ३४ ॥**

**वस्त्राभरणें वाऱ्यावरी । सीता सांडी हे नव्हे चातुरी । जाणोनि अवताराची थोरी । त्यागी सुंदरी शुद्ध्यर्थ ॥ ३५ ॥**

**पीतांबर कनकप्रभा । दिव्यालंकारांची शोभा । शुद्धि सांगावया निजवल्लभा । पद्मगर्भा स्वयें सांडी ॥ ३६ ॥**

**नीळ पीत आरक्त देखा । पाहातसे मज सन्मुखा । वानरांमाजी तो माझा सखा । रघुटिळका शुद्धि सांगे ॥ ३७ ॥**

**रामनामांकित खेवणें । करमुद्रिका कर कंकणे । पीतांबरीं बांधोनि तिणें । शुद्धिकारणें सांडिलीं ॥ ३८ ॥**

**सीतेनें वरूनि सोडितां ।** [मु. 'ती' आहे.] **तीं आलीं हनुमंताचे हातां । तेणें वंदूनिया माथां । होय सांगतां सुग्रीवा ॥ ३९ ॥**

**सुग्रीव म्हणे हनुमंतासी । हें तूं ठेवी आपणापासीं । कैंचें आलें पां आकाशीं । विस्मयो त्यासी वाटतु ॥ ४० ॥**

**सभाग्य भाग्य ज्याचे माथां । श्रीराममुद्रा ये त्याचे हातां । उल्हास हनुमंताच्या चित्ता । रामकार्यार्था उद्यत ॥ ४१ ॥**

**श्रीरामा वेगें धांव पाव । वानर ऐकती सीतारव । अवघे मानिती अपूर्व । नभीं अभिनव अनुवादु ॥ ४२ ॥**

अनुक्रमणिका

रामनामामृत गोठी । उठती नभाच्या पोटीं । अवघे पाहाती [पै. तु. कं. खेरीज इतरत्र ‘दृष्टीं’.] ऊर्ध्वकंठी । वदता दृष्टीं दिसेना ॥ ४३ ॥

व्यक्त अक्षरें ऐको कानीं । परी वदतां न देखो नयनीं । जरी हे मानूं आकाशवाणी । आक्रंदोनि अनुवादे ॥ ४४ ॥

ऐकोनि सीता आक्रंदन । आलें हनुमंता स्फुरण । [मु. ‘मग’ हें पद अधिक.] तिची करावया सोडवण । नभीं उड्डाण करूं पाहे ॥ ४५ ॥

दोन्ही वळूनि वज्रमुष्टी । पाहे वटारिलिया दृष्टीं । रागें थरकत पुसांटी । भूमी आपटी सक्रोधें ॥ ४६ ॥

निर्दळावया दशवदन । काळाग्निरुद्र देदीप्यमान । सगळें गिळूं पाहे गगन । भ्यासुर वदन भासतु ॥ ४७ ॥

निवटावया दशाशिरा । दांत खातुसे करकरां । रोम थरकती थरथरां । कोप वानरा अनिवार ॥ ४८ ॥

करितां हनुमंतां उड्डाण । गेला ध्रुवलोकासमान । तळीं पळाला रावण । सीता घेऊनि लंकेसी ॥ ४९ ॥

ऐसा हनुमंत देखोनि दिठीं । रावणें भय घेऊनि पोटीं । समुद्राच्या परतटीं । उठाउठीं पळाला ॥ ५० ॥

जटायु परिस दारुण । येथही उठूं पाहे विघ्न । तेणें धाकें पलायमान । लंकाभुवन ठाकिलें ॥ ५१ ॥

लंके गेला लंकानाथ । हनुमंतें क्रोध केला शांत । लंका जाळीन मी निमिषार्धांत । हें पोटांत दृढ धरिलें ॥ ५२ ॥

राक्षस धुरांचिया कोडी । मारीन न लगतां अर्धघडी । ऐसिया कोपाची चौघडी । शांति बुडीं सांठविली ॥ ५३ ॥

[मु. ‘तंव’ हे पद अधिक.] येरीकडे लंकानाथ । सीता मज जाली प्राप्त । येणें उल्हासें नाचत । येथ रघुनाथ केवीं पावे ॥ ५४ ॥

अति दुर्घट लंकागड । भंवता समुद्राचा अगड । न चले रामाची चरफड । मार्ग अवघड येथ यावया ॥ ५५ ॥

रावण सांगे सीते प्रती । तुज म्यां आणिलें [तं. ‘मनोगती’.] नभोगती । रामलक्ष्मण पदाभिगती । कैसेनि येती या ठायां ॥ ५६ ॥

क्रूर श्वापदे वनीं वसतीं । मार्गीं दुर्घट पर्वतीं । दुस्तर सरितांचे स्त्रोतीं । केवीं रघुनाथ [मु. ‘येऊं’.] येथ पावे ॥ ५७ ॥

ऐसेनि आलिया कष्ट कोडी । दोघे मानवें बापुडीं । मज मारिता न लगे घडी । त्यांची गोडी तूं सांडी ॥ ५८ ॥

अनुक्रमणिका

त्या दोघांसी चारी भुजा । मज एकल्या वीसभुजा । मी मारीन रामराजा । निज पैजा जानकिये ॥ ५९ ॥

या परी वो विचारितां । येथ न येववे रघुनाथा । तुवां मज वरूनिया आतां । राज्यभोगतां सुख भोगी ॥ ६० ॥

अनर्घ्य रत्नाचे अलंकार । वस्त्रें [मु. 'दिव्यें'.] देवांगें मनोहर । पदक मेखळा गंभीर । विचित्रहार मणियुक्त ॥ ६१ ॥

[तं. 'जवादि'.] बावन चंदन आगर । कस्तुरी कुंकुम केशर । विलेपनें सुखसार । सुखसेजार सुमनांचा ॥ ६२ ॥

दोघे बैसोनि विमानीं । क्रीडा करूं नंदनवनीं । अथवा लंकेचां भुवनी । अशोकवनीं सुखभोगूं ॥ ६३ ॥

इंद्रादिक सुरवर । तुझे आज्ञेचे करील किंकर । मंदोदऱ्यादि अंतःपुर । त्या निरंतर तुज दासी ॥ ६४ ॥

काइसी मृगाची कांचोळी । कंचुकी लेई मुक्ताफळीं । अर्द्धचंद्रबाणी तो भाळीं । मस्तकीं जाळी गजमुक्त ॥ ६५ ॥

रामप्रिया भोगी दशशिर । हा तुज ब्रीदाचा तोडर । रावणें हरिली सीता सुंदर । चरणीं गजर अंदुवाचा ॥ ६६ ॥

सीता रावणाची पट्टराणी । ऐशा वांकी गर्जतु चरणीं । ऐकोनि रावणाची वाणी । सीता संतापोनि बोलत ॥ ६७ ॥

मर मर निर्लज्ञा दशशिरा । काय बोलतोसि [तं. किंकरा; कं. 'सामोरा'.] शिमुरा । तुज सारिखा निलाजिरा । जगीं दुसरा नसेल ॥ ६८ ॥

स्वयंवरीं दाविता बळबंड । धनुष्यें दंडिलें [घा. 'करंड'.] वितंड । सभेंसी जालें काळें तोंड । रामें कोदंड भंगितां ॥ ६९ ॥

तैं न करिसीच माझें हरण । काळेंनि वदनें पलायमान । तूं तंव शूर्पनखेसमान । नाकेवीण जल्पसी ॥ ७० ॥

सदाचें तुझे काळें मुख । न येववेचि रामासन्मुख । माझा धरूनि अभिलाष । मागों भीक आलासी ॥ ७१ ॥

भीक मागतां म्हणसी जननीं । आतां म्हणसी करीन पत्नी ।
तुजसारिखा मात्रागमनी । आन त्रिभुवनीं असेना ॥ ७२ ॥

संन्यासी आणि चोरी करी । यति धर्मी आणि परद्वारी । हे तुजचि साजे थोरी । नानापरी मातृगामी ॥ ७३ ॥

करितां जटायूसि रण । तुवां दांतीं धरिलें तृण । मज सांडूनि पलायमान । तेव्हां आंगवण काय जाली ॥ ७४ ॥

अनुक्रमणिका

घालितां श्रीरामाची आण । जटायु बोलिला सत्य [घा. इं. 'वचन'.] संपूर्ण । तुवां कपटें करूनि छळण । घेतला प्राण जटायूचा ॥ ७५ ॥

माझा भोग भोगूं पाहे रावण । तेंही [मु. 'अधर्म्या'.] अर्थीं अतिदूषण । वायसां विष्ठाचि भक्षण । अमृतपान चकोरा ॥ ७६ ॥

तैसी सीता श्रीरामासी । रावणा उपभोग्य राक्षसी । अभिलाषितां [तं. 'परनारीसी'.] जानकीसी । अनायासीं मरसील ॥ ७७ ॥

गजांचें जें गजाभरण । रासभा बाणितां भारें मरण । सीता अभिलाषी रावण । कुळनिर्दळण पावेल ॥ ७८ ॥

सकळरस सेवी मासी । दीप चाखतां मरण तिसी ।
तेवीं राज्य भोगितां रावणासी । सीता अभिलाषीं प्राणांतु ॥ ७९ ॥

स्तनपानीच्या अपत्या । उत्तम पक्कान्न खावों देतां । तें त्यासी न जिरती तत्वतां । तेवीं लंकानाथा जानकी ॥ ८० ॥

जरी जालें अनर्घ्यरत्न । तें नव्हे शालिग्रामासमान । सीता श्रीराम भोगायतन । दशानन केविं पावे ॥ ८१ ॥

ऐरावतीं बसे इंद्र । तेथ बैसों जाता मरे खर । सीता अभिलाषी दशवक्त्र । सकुळ स्वगोत्र निमेल ॥ ८२ ॥

सुंदर आरिसा सुखरूप । सिमुरा दाविता अतिसंताप । रावणा आंगासि मुरे पाप । सीता सुखरूप त्या नव्हे ॥ ८३ ॥

ऐशा नाना सुवर्मयुक्तीं । रावण निर्भर्त्सी सीतासती । तेणें कोपला लंकापती । दूताप्रति बोलतु ॥ ८४ ॥

> संदिश्य राक्षसान्घोरान्रावणोऽष्टौ महाबलान् । आत्मानं बुद्धिवैक्लव्यात्कृतकृत्यममन्यत ॥ ७ ॥
> अप्रमादाच्च गन्तव्यं सर्वैरेव निशाचरैः । कर्तव्यश्च सदा यत्नो राघवस्य वधंप्रति ॥ ८ ॥

राक्षसांमाजी बळी संपूर्ण । कपटकार्यीं अतिप्रवीण । ऐसे बोलाऊनि आठजण । स्वयें रावण सांगतु ॥ ८५ ॥

तुम्ही दुर्धर निशाचर । होऊनि जनस्थानीं एकत्र । रामवधार्थ निरंतर । अतिसादर राहावें ॥ ८६ ॥

मारिले त्रिशिरा दूषण खर । ते रामा आम्हां बद्धवैर । तदर्थी तुम्ही आठही वीर । साधावें छिद्र अतियत्नें ॥ ८७ ॥

सन्मुख युद्ध करितां त्यासी । जिवें मारील समस्तांसी । यालागीं अति गुप्ततेसी । त्याच्या वधासि साधावें ॥ ८८ ॥

अनुक्रमणिका

मारू जातां रघुनंदन । तुम्हांसि निर्दळील लक्ष्मण । एकेंच वेळे दोघे जण । साधून आपण वधावें ॥ ८९ ॥

निजेले असतां वनीं । निदसुरें मारावे दोन्हीं । आसनी भोजनीं शयनीं । उदक पानीं साधावें ॥ ९० ॥

पडल्या श्रीरामाचे दृष्टीं । मग जिण्याची कायसी गोठी । आठांची शिरें निवटी । शरवृष्टि प्रतापें ॥ ९१ ॥

यालागीं आप आपण्या लपऊनी । जनीं विजनीं गमनागमनीं । सीताशुद्धि भ्रमतां वनीं । सिंतरूनि मारावे ॥ ९२ ॥

छळें बळें कपटमेळें । दोघेही मारावे एके वेळे । एतदर्थी तुम्ही प्रबळबळें । कार्यसमूळें साधावें ॥ ९३ ॥

मारिल्या रामलक्ष्मण । तुम्हांसी दिधलें जनस्थान । [दे. 'सुखें'.] तेथ नांदावें आपण । ढोल निशाण लाऊनी ॥ ९४ ॥

ऐसें सांगोनिया त्यांसी । रावणु आला सीतेपासीं । तिसीं न्यावया निजभुवनासी । गृहें चौपासी शृंगारी ॥ ९५ ॥

गुढिया तोरणें विचित्रमखरें । शोभा शोभती मनोहरें । सीता देखोनि मंदिरें । मज अनुसरे तैसें करा ॥ ९६ ॥

रावणें हाती धरूनि सीता । मंदिरें दावी अपूर्वता । दावूनि आपुली समर्थता । अति एकांता आणिली ॥ ९७ ॥

पाहातां कोणी न देखे दिठीं । दुजयाची न पडे दृष्टी । ऐसिया एकांता गोरटी । उठाउठी आणिली ॥ ९८ ॥

रावणासवें अति एकांता । निःशंक आली असे सीता । हा माज जालिया झोंबतां । लंकानाथा [दे. 'निवटीन'.] उपटीन ॥ ९९ ॥

शुंभ निशुंभ चंडमुंड । जेवीं जगदंबा करी दुखंड । तेवीं रावणाचें बळबंड । खंडविखंड मी करीन ॥ १०० ॥

श्रीरामसेवेचें धडफुडें । माझे आंगीं बळगाढें । रावण दहामुखांचें किडें । मजपुढें केवी झोंबे ॥ १०१ ॥

वीसभुजा वामकरें । दडपूनिया निजभारें । सकुंडल दाहीं शिरें । चमत्कारें खुडीन ॥ १०२ ॥

याचीं छेदावया कंठनाळें । कां लागलीं शस्त्रबळें । नखें खुडीन शिरकमळें । रावण कोवळें तृणप्राय ॥ १०३ ॥

आलिया इंद्रजित कुंभकर्ण । मारीन चडकणा हाणोन । कुमरसेना सप्रधान । निर्दळीन क्षणमात्रें ॥ १०४ ॥

माझें लंकेसि आगमन । रावण निर्दळावया ससैन्य । तो एकांतीं फावल्या पूर्ण । भीड कोण राखेल ॥ १०५ ॥

अनुक्रमणिका

**श्रीराम सेवा फळसंपूर्ण । निर्दळावें द्वंद्वदारुण । ते ज्याचेंनि नव्हें जाण । भक्तपण त्या नाहीं ॥ १०६ ॥**

**सीता श्रीरामनिजशक्ती । ते केवीं आकळे रावणाहातीं । येणें बळें सीतासती । आली एकांतीं निःशंक ॥ १०७ ॥**

**सीता नाकळे निजबळें । हे रावणास समूळ कळे । मग विषयांचे प्रीतिमेळें । चरण कमळें वंदितु ॥ १०८ ॥**

> एतौ पादौ मया स्निग्धौ शिरोभिः परिपीडितौ । प्रसादं कुरु मे क्षिप्रं वश्यो दासोऽहमस्मि ते ॥ ९ ॥
> इमाः शून्या मया वाचः शृष्यमाणेन भाषिताः । न चापि रावणः कांचिन्मूर्ध्ना स्त्रीं प्रणमेत हि ॥ १० ॥

**सीता आणून एकांता । रावणें चरणीं ठेविला माथा । मज विषय शरणागता । कृपा तत्वतां करी सीते ॥ १०९ ॥**

**त्यजूनियां श्रीरघुनाथा । मज वरावे वो तत्वतां । माझी** [मु. 'वाचा'.] **याञ्चा न करी वृथा । शरणागता नुपेक्षी ॥ ११० ॥**

**तुझीं वंदिता चरणकमळें । मस्तकीं लागती कोमळें । कर स्पर्शनीं अतिमवाळें । मन कळवळे भोगार्थ ॥ १११ ॥**

**जिचे चरण सुखरूप । तिचें भोगितां स्वरूप । मज आहे** [कं. 'दुःख'.] **सुख अमूप । कृपानुरूप वरी मातें ॥ ११२ ॥**

**मी तवं अतिगर्वी रावण । ब्रह्मादि देवा नव्हे शरण । दानवा मानवा पाड कोण । तो मी तुझे चरण वंदितों ॥ ११३ ॥**

**चरण वंदूनियां देख । होईन वशवर्ती सेवक । अनुदिनीं आज्ञाधारक । कृपा याचक भोगार्थी ॥ ११४ ॥**

**तिचे चरण धरूनि हातीं । रावण येतुसे काकुलती । मज अंगिकारी वो भोगार्थी । तंव सीतासती हांसली ॥ ११५ ॥**

**सुरवरां वंद्य श्रीरामचंद्र । त्यापुढें तुच्छ राक्षसेंद्र । सांडूनिया गजेंद्र । आरोहणी खर तैसा तूं ॥ ११६ ॥**

**सांडूनिया अमृतपान । करावे** [पै. खेरीज इतरत्र 'कागविष्ठा'.] **कां विष्ठाभोजन । तेवीं त्यजूनि रघुनंदन । तुच्छ रावण भोगावा ॥ ११७ ॥**

**सांडूनिया सज्ञनसंगती । बैसावें शूकराचे पातीं । तेवीं त्यजूनि रघुपती । रावण दुर्मति भोगावा ॥ ११८ ॥**

**कागाघरीं श्राद्ध विधान । क्षणिल्या न वचती ब्राह्मण । तेवीं रावण सुसंपन्न । स्वप्नींहि आपण स्पर्शेना ॥ ११९ ॥** [घा. इं. दै. शेवटचे तीन चरण असे आहेत :—– '. . . . । तेथें विष्ठेनें पितृतर्पण । तें न स्वीकारिती ऋषिजन । तें सेवन कागांचें ॥']

अनुक्रमणिका

**ऐकोनि सीतेचें वचन । रावण कोपला दारुण । तुज श्रीरामदर्शन । कल्पांतीं जाण हो नेदी ॥ १२० ॥**

**तुज श्रीरामीं हों नेदी भेटी । तुज त्यासी करूं नेदी गोठी । तुज राम देखो नेदी दिठीं । मीं महाहटी रावण ॥ १२१ ॥**

**सीते ऐक सावधान । तुज मी वधीना आपण । तुज** [घा. इं. 'कुजवीन'.] **कुहिजवीन संपूर्ण । जंव तूं शरण मज येसी ॥ १२२ ॥**

**तुज नेदीं अन्नपान । नेदी अभ्यंगादिमर्दन । तुज नेदी शय्या शयन । जंव तूं शरण मज येसी ॥ १२३ ॥**

**मस्तकीं जीव पडती भारी । वस्त्रें** [मु. 'लागती वज्रापरीं'.] **होती जर्जरी । तुज पीडीन मी तंववरी । जंव तूं अंतुरी होती माझी ॥ १२४ ॥**

**पैल पाहे इंद्रजित कुंभकर्ण । कोट्यानुकोटी रक्षोगण । कुमर प्रधान अति दारुण । मशक कोण श्रीराम ॥ १२५ ॥**

**श्रीराम आणि लक्ष्मण । ते तंव राक्षसांचे भक्षण । तुझी कोण करी सोडवण । आग्रही पूर्ण तूं मूर्ख ॥ १२६ ॥**

**माझे राक्षसीं घालूनि घाला । रामलक्ष्मण गेला मेला । सीते अंगिकारी मजला । सांडी आपुला दुराग्रहो ॥ १२७ ॥**

**पाप भोगाचिया राशी । वनीं कष्टलीसी रामापासीं । परमपुण्यें लंकेशासी । भोगी सुखासी जानकिये ॥ १२८ ॥**

**पाप असेल तुझे माथा । तरी सांडूनि लंकानाथा । भोगूं म्हणसी रघुनाथा । तो सर्वथा निमाला ॥ १२९ ॥**

**ऐकोनि रावणाचें बोलणें । सीता** [दै. 'हरिखली'.] **हांसिली सत्राणें । तूं मज भोगावया कारणें । मरणा धरणें बैसलासी ॥ १३० ॥**

**पतंगें आंलिगितां दीपासी । जळोनि मरे स्नेहसंगेसीं । ते तुज दशा रावणासी । मद्भोगेसी मरणार्थ ॥ १३१ ॥**

> गतासुस्त्वं गतश्रीको गतसत्त्वो गतेंद्रियः । लंका वैधव्यसंयुक्ता त्वत्कृगेन भविष्यति ॥ ११ ॥
> स हि देवरसंयक्तो मम भर्ता महाद्युतिः । निर्भयो वीर्यमाश्रित्य वने वसति दंडके ॥ १२ ॥
> स ते वीर्य बलं दर्पमुत्सेकं च यथाविधम् । व्यपनेष्यति गात्रेभ्यः शरवर्षेण संयुगे ॥ १३ ॥

**करितां परदारेची चोरी । गेलें आयुष्य यशकीर्तिश्री । लंका वैधव्याची** [कं. 'पारी'; इं. सु. 'परोपरी'.] **परी । बैसेल खरी तुझेनी ॥ १३२ ॥**

**मारिले म्हणसी रघुनाथा । हे तंव तुझी** [दै. 'मुर्खता'.] **मिथ्यावार्ता । श्रीराम काळाचा नियंता । ऐक आतां**

अनुक्रमणिका

सांगेन ॥ १३३ ॥

नेणसी श्रीरामाची थोरी । मृत्यु श्रीराम आज्ञेवरी । [मु. कं. 'सकुळ'.] समूळ मरण दशाशिरी । मग बोहरी राक्षसां ॥ १३४ ॥

श्रीराम बाण अति तिखट । धाकें समुद्र देईल वाट । भेदूनि गिरिदुर्ग त्रिकुट । दाही कंठ छेदील ॥ १३५ ॥

इंद्रजित सबळबळें प्रवीण । क्षणार्द्धें मारील लक्ष्मण । कुमरवीर सेना प्रधान । घायें प्राण त्यजितील ॥ १३६ ॥

निदसुरा [दे. 'उन्मत्त कुंभकर्ण'.] कुंभकर्ण । रणीं हारवील नाक कान । लागतां श्रीरामाचा बाण । उभ्याच प्राण सांडील ॥ १३७ ॥

ऐसें बोलोनियां सीता । क्षोभें पाहे लंकानाथा । त्यासी चळकांपु सुटला चित्तां । दुर्धर दूता पाचारी ॥ १३८ ॥

[मु. 'म्हणे' हे पद अधिक.] इसी भला नव्हे एकांत । क्षोभे करील माझा घात । विचारी पडला लंकानाथ । कृतकार्यार्थ साधेना ॥ १३९ ॥

भोगिली न वचे बळात्कारीं । पाया पडल्या नांगिकारी । सीता पतिव्रता खरी । राज्य भोगावरी भाळेना ॥ १४० ॥

सीतसती पतिव्रता । दृढ मानलें लंकानाथा । आपुलिया निजस्वार्था । होय राखता जानकी ॥ १४१ ॥

त्रिजटा रावणाची भगिनी । गुज सांगे तिचां कानीं । सीता घेऊनि अशोकवनीं । सावधानीं रक्षावी ॥ १४२ ॥

अशोकवन ऐकता गोठीं । सीता बांधी शकुनगांठी । शोक पळाला उठाउठीं । होईल भेटी श्रीरामीं ॥ १४३ ॥

अशोकवन ऐकोनि कानीं । अशोकवन देखे नयनीं । अशोकराम हृदयभुवनीं । सीता ते स्थानीं राखिली ॥ १४४ ॥

सीता राखिली अशोकांत । अशोकामाजीं श्रीरघुनाथ । तीपासीं असे संतत । [मु. 'सावधानार्थ'.] बंधनार्थ सुखरूप ॥ १४५ ॥

एका जनार्दन शरण । सीता प्रवेशे अशोकवन । अशोकीं नाहीं शोकबंधन । सीता तें स्थान पावली ॥ १४६ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां सीताअशोकवनप्रवेशो नाम अष्टादशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग एकोणिसावा

## सीताशुद्धि श्रीराम विलाप

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

अशोकवनीं सीतेपासीं । दुष्ट दुर्धर राक्षसी । रावण ठेवी भेडसावयासी । [पै. प्रतीत 'भयें' हे पद नाही.] भयें आपणासी वश्य होय ॥ १ ॥

अशोकवनिकामध्ये मैथिलीं नीयतामिति । तत्रेयं रक्षतां गूढं युष्माभिः परिवारिता ॥ १ ॥

सीता संरक्षण नित्य करावयासी । विकटास्या करालास्या भयवेषी ।
[मु. 'विरुपा विक्राळा'.] ऐशा अनेका राक्षसी । अशोक वनासि पैं आलया ॥ २ ॥

नानारूपा नानाकारा । कराळ विक्राळ अत्युग्रा । भिंगुळवाण्या भयासुरा । आल्या समग्रा सीतेपासीं ॥ ३ ॥

एकीचें विक्राळ वदन । सर्वांगासी एकचि कान । तिसीं कानचि आच्छादन । येऱ्हवीं नग्न कराळी ॥ ४ ॥

लागतां कानाचा फडकारा । नक्षत्रें पडती जैशा गारा । तिचें भय सुरासुरां । सीतेसि भेदरा देवों आली ॥ ५ ॥

एकीच्या उत्कट टेक कपाळा । थडका हाणे लोकपाळां । कपाळावरी [कं. दे. 'विकट'.] विटंक डोळा । जनकबाळा सळो आली ॥ ६ ॥

एकीस एक कान आंथरूण । दुसरा कान तो प्रावरण । कानें कांपे त्रिभुवन । सीतेसि छळण करूं आली ॥ ७ ॥

एकी स्तनयुद्धा दुर्धरा । एक एक थान [मु. कं. 'गांवे'.] वावे बारा । स्तन घातें मारी [पै. खेरीज इतरत्र 'असुरां'.] सुरां । सीतेसि भेंदरा देवों आली ॥ ८ ॥

भ्यासुरमुख दीर्घ दांताळी । दांते दिग्गजां करी रांगोळी । वीर निर्दळी दांतांतळीं । सीतेजवळी भय दावी ॥ ९ ॥

एकीचे केश सलंब पूर्ण । तेंचि नेसणें तेंचि पांघरूण । केश तिखट जैसे बाण । केसा भेणें जग पळे ॥ १० ॥

अजा मुखी गजमुखी । सिंहश्वानशूकरमुखी । व्याघ्रवानरतरसमुखी । घोडमुखी विक्राळ ॥ ११ ॥

खरोष्ट्र वक्त्र सलंब वोंठ । वोंठें प्राण्याचा भरी घोंट । अवघ्यां आल्या सीतेनिकट । भय उद्भट दावावयां ॥ १२ ॥

विक्राळमुख दीर्घचाभाडीं । कंटकजिव्हा दांतींतांबडीं । देखता प्राणी प्राण सांडी । भक्षी मढीं राक्षसांचीं ॥ १३ ॥

राक्षस भक्षिती मनुष्यांसी । विक्राळा भक्षी राक्षसांसीं । रावण धाडी सीतेपासीं । भयें आपणासी वरावया ॥ १४ ॥

वांकडें मुख [मु. 'दीर्घ'.] विघडें नाक । तेंही लांब वावें विशेख । श्वासावर्तीं [मु. दै. पै. 'जग'.] गज देख । [मु. दै. 'शतानुशतक'.] शतानुएक तळमळिती ॥ १५ ॥

नाकांचिया केसाआंत । म्हैसे गुंतले आरडत । सिंह गुंतले चडफडीत । [तु. पै. 'जगावर्त'.] गजावर्त विकटास्या ॥ १६ ॥

नखायुधा क्रूर मुख । सलंब नखें अत्यंत तिख । तिहीं लांब क्रोश एक । इंद्रादिक कांपती ॥ १७ ॥

नखघात अतिउद्भट । घायें शस्त्र करी पीठ । नखें पर्वत करी सपाट । दुर्धर दुष्ट नखायुधा ॥ १८ ॥ [कं. प्रतीत ही ओवी नाही.]

एक पादा आणि त्रिपादा । पंचपादादि सप्तपादा । शस्त्रा अस्त्रीं सन्नद्ध बद्धा । आल्या [पै. तु. दै. खेरीज इतरत्र 'उन्मादा'.] उन्नद्धा राक्षसी ॥ १९ ॥

वाल्मीकरामायणा प्रती । राक्षसी बोलिल्या बहुती । तो विस्तार न धरीच हातीं । कथाग्रंथी वाढेल ॥ २० ॥

पुढील कथेची संगती । कृपा करावी साधुसंतीं । स्वंये रावण राक्षसीप्रती । काय उपपत्ती बोलला ॥ २१ ॥

तथा च तर्जनैर्घोरैः पुनः सांत्वैश्च मैथिलीम् । आनयध्वं मम वशे वन्यां गजवधूमिव ॥ २ ॥

रावण सांगे राक्षसीसी । दुर्धर भेडसावा सीतेशी । गर्जन तर्जन अति आवेशीं । अट्टहासीं गर्जोनी ॥ २२ ॥

ऐसें करावें गर्जन । तेंचि चळीं कापें मन । अत्यंत होऊनिया उद्विग्न । मूर्छापन्न भयभीत ॥ २३ ॥

सुखें वरीन मीं रावण । ऐसें बोले जंव आपण । [मु. 'वरी' हे पद अधिक.] तंव भय दावावें संपूर्ण । जंव शरण मज होय ॥ २४ ॥

मज जालिया अनन्यशरण । तिसीं करावें सुख सांत्वन । सीते तुझें भाग्य धन्य । दशानन तुज कांतु ॥ २५ ॥

ऐसें सांगोनि तयांसी । धाडिल्या अशोक वनासी । वश जालिया सीतेसी । आणा मजपासीं [मु. गजरेसी.] गजगती ॥ २६ ॥

राक्षसी मिळोनि समस्तीं । कात्या त्रिशूळ मुग्दर हांतीं । आल्या अशोक वनाप्रती । हांका देती दुस्तरा ॥ २७

अनुक्रमणिका

॥

हांकी गर्जत अंबर । स्वर्गी कांपती सुरवर । भूतळीं मूर्च्छित नरकिन्नर । ऋषीश्वर भयभीत ॥ २८ ॥

राक्षसीं करिती दुर्धर रवो । सीता मारूनि मांस खावों । तुझें कंठीचे रुधीर पीवों । हार लेवों हाडांचे ॥ २९ ॥

तुझें सर्वांगाच्या शिरी । करूं सेवयांची खिरी । काळीज कादूनि बाहेरी । कोशिंबीरी करूं आम्ही ॥ ३० ॥

ऐशा गर्जत राक्षसी । अवघ्या आल्या सीतेपासी । तें भय भासेना सीतेसी । राम स्मरणेंसीं निःशंक ॥ ३१ ॥

देखतां सीतेचें दर्शन । राक्षसी जाल्या कंपायमान । इणें पाहिल्या क्षोभोन । आमचा प्राण घेईल ॥ ३२ ॥

सीता देखतांचि दिठी । भयें पळाल्या उठाउठी । राक्षसीं भयभीत पोटीं । गोष्टी उफराटी येथ जाली ॥ ३३ ॥

भेडसाऊं गेल्या सीतेसी । त्या भयभीत जाल्या राक्षसी । रामस्मरणाची महिमा ऐसी । द्वंद्वें भक्तांसी [मु. 'बाधीना'.] निर्द्वंद्व ॥ ३४ ॥

रावणा सांगती निशाचरी । सीता आमचें भय न धरी । आम्हां सीतेचें भय भारी । सर्वांपरी निःशंक ॥ ३५ ॥

रावण म्हणे सती सीता । निःशंक निधडी पतिव्रता । हे मज भोगेना सर्वथा । कष्ट वृथा गेले माझें ॥ ३६ ॥

येरी कडे रामसौमित्र । दोघे जाले एकत्र । आश्रमीं एकली सीता सुंदर । दोघे सत्वर निघाले ॥ ३७ ॥

व्रततस्तत्र तस्याथ वामलोचनमस्फुरत् । प्रास्फूरच्चास्खलद्रामो वेपथुश्चास्य जायते ॥ ३ ॥
उपलभ्य निमित्तानि सोऽशुभानि मुहुर्मुहुः । अपि सीताश्रमे सा स्याद्वयाजहार पुनः पुनः ॥ ४ ॥

सीतेचे भेटीसी जातां जाण । अशुभ लवे वामलोचन । पदोपदीं रघुनंदन । अडखळे आपण क्षणक्षणां ॥ ३८ ॥

सौमित्रा ऐक सावधान । अशुभ होताती अपशकुन । आजि सीतेचें दर्शन । केवीं देखेन हें न कळे ॥ ३९ ॥

लक्ष्मणा एकली सीता । आश्रमीं काय असेल आतां । वारंवार [मु. 'होय'.] राम पुसतां । प्रबळ चिंता सीतेची ॥ ४० ॥

आश्रमी एकले सीतेसी । सांडूनि तूं कां आलासी । हरूनि नेतां राक्षसीं । कोण तिसीं सोडवील ॥ ४१ ॥

स्त्रियेच्या क्षुद्र बोलासाठीं । [मु. 'त्वाकां' हे पद अधिक.] रागें सांडिली पंचवटी । सीता हरील रावण [कं. खेरीज इतरत्र 'हट्टी'.] कपटी । बुद्धी खोटी त्वां केली ॥ ४२ ॥

अनुक्रमणिका

**अशुभ होताती अपशकुन । तेणें मी अत्यंत उद्विग्न । सीता मागुती देखेन । सहसा मन मानीना ॥ ४३ ॥**

ददर्श पर्णशालां च सीतया रहितां तदा । श्रिया विरहितां ध्वस्तां हेमंतें पद्मिनीमिव ॥ ५ ॥
रुदितमिव वृक्षैश्च म्लानपुष्पमृगद्विजम् । श्रिया विहीनं विध्वस्तं संत्यक्तं वनदैवतैः ॥ ६ ॥

**ऐशा मार्गीं करीत गोठी । दोघे आले पंचवटी । रिती देखोनि पर्णकुटी । सीता गोरटी दिसेना ॥ ४४ ॥**

**शोधूनि पाहिली पंचवटी । शोधिली उभय गंगातटीं । सुंदर कपाळेशा निकटीं । सीता गोरटि दिसेना ॥ ४५ ॥**

**शुद्धि पुसावी** [पै. खेरीज इतरत्र 'कृषि'.] **येथ जनीं । ते पळाले जीव घेऊनी । मनुष्य मात्र न दिसे वनीं । लक्ष्मण मनीं धांकतु ॥ ४६ ॥**

**राम धांकतु होता पोटीं । तेचि येथें घडली गोठी । अपेश पात्र जालों सृष्टीं । लक्ष्मणा पोटीं अतिचिंता ॥ ४७ ॥**

**लक्ष्मणें हारविली सीता । हें अपेश आलें माझ्या माथा । काय मी सांगो रघुनाथा । शोधितां सीता दिसेना ॥ ४८ ॥**

**शुद्धि पुसो जातां वनीं । वृक्ष खांकरले फळीपानीं । जेवीं अंतरलियां जननी । दीनवदनीं अपत्यें ॥ ४९ ॥**

**वृक्ष स्रवती संपूर्ण । पशुपक्षी करिती रुदन । वनश्री गेली पळोन । अवदशा पूर्ण** [मु. 'वना आली'.] **आश्रमीं ॥ ५० ॥**

**पक्षिणी पडल्या पारध्या हातीं । पिलीं चरफडिती फडफडिती । तेवीं नेलिया सीतासती । जाली उपहती आश्रमीं ॥ ५१ ॥**

**सीतेचेंनि दुःखें जाण । सर्वांगें द्रवले पाषाण । थेंबटें गाळों लागले तृण । दुःख दारुण सर्वांसी ॥ ५२ ॥**

**ऐसी देखोनि उपहती । श्रीराम सुखावला चित्तीं । करावया अवताराची ख्याती । निजपुरुषार्थी उद्यत ॥ ५३ ॥**

**सज्ञान माझी सीतासती । रावण ससैन्य वधार्थी । स्वयें गेली लंकेप्रती । राक्षसा ख्याती लावावया ॥ ५४ ॥**

**समुद्रीं तारुनि पाषाण । मारीन रावण कुंभकर्ण । श्रीरामा आलें जी स्फुरण । कुळनिर्दळण राक्षसां ॥ ५५ ॥**

**मारूनि राक्षसांच्या कोडी । सोडीन देवांची बांदवडी । रामराज्याची निजगुढी । जगीं रोकडी** [कं. 'मिरवीन'.] **उभवीन ॥ ५६ ॥**

अनुक्रमणिका

**ऐसा श्रीराम सर्वज्ञ । जाणोनि भविष्याचें ज्ञान । सीताशुद्धयर्थ आपण । भ्रमलेपण स्वयें दावी ॥ ५७ ॥**

**जैसी अवताराची गती । जैसी अवताराची स्थिती । राम निघाला तैशा रीती । सीता शुद्धयर्थीं विलपतु ॥ ५८ ॥**

**श्रीराम अवतार सुनिश्चित । त्यास ही लोकसंग्रहार्थ । वसिष्ठें नेमिला परमार्थ । तेचि रघुनाथ संपादी ॥ ५९ ॥**

> अंतरेको बहिर्नाना अंतर्बोधो बहिर्जडः । अंतस्त्यागी बहिःसंगी लोके विहर राघव ॥ ७ ॥
> बहिःकृत्रिमसंरंभो हृदि संरंभवर्जितः । अकर्ता च बहिः कर्ता लोके विहर राघव ॥ ८ ॥
> अंतर्नैराश्यमादाय बहिराशोन्मुखो हि वा । बहिस्तप्तोंऽतराशीतो लोके विहर राघव ॥ ९ ॥

**अंतरी जाणें परब्रह्म । बाह्य सीतार्थी विरहभ्रम । अंतरी स्वतःसिद्ध निष्कर्म । बाह्य दुःखधर्म सीताशुद्धी ॥ ६० ॥**

**अंतरीं अद्वैत प्रतीती । बाह्य सीता पुसे जीवांप्रती । वृक्षवल्लीस ये काकुळती । सीता निश्चितीं मज सांगा ॥ ६१ ॥**

**अंतरीं निजबोधें अतिगोड । बाह्य सीतादुःखें जड । अंतरीं निर्विषय सुरवाड । बाह्य धुमाड विषयांचा ॥ ६२ ॥**

**अंतरीं अद्वयत्वे सर्वत्याग । बाह्य सीतेसी विषयसंग । अंतरीं** [मु. 'सुनिश्चित'.] **सुनिश्चळ सांग । बाह्य लगबग धांवणें धांवे ॥ ६३ ॥**

**अंतरीं अणुमात्र नाहीं चाड । बाह्य सीतार्थी अति चडफड । अंतरीं निजसुख सुरवाड । बाह्य दुर्वाड अति दुःखी ॥ ६४ ॥**

**अंतरीं नित्य नैराश्य । बाह्य सीतेचा आशापाश । तिचेनि दुःखें अतिसंत्रास । पिशाच भाव** [मु. दे. 'जगीं दावी'.] **जग देखे ॥ ६५ ॥**

**अंतरीं संताप निवृत्त । बाह्य सीतातापें अतिसंतप्त । अंतरीं सर्वार्थी निर्मूक्त । बाह्य विषयासक्त सीतार्थी ॥ ६६ ॥**

**अंतरीं भूतकृपा चोखडी । बाह्य युद्ध पुरुषार्थ** [मु. 'परवडी'.] **प्रौढी । मारूनिया राक्षस कोडी । गज करवडी पाडितु ॥ ६७ ॥**

**अंतरीं बोध अकर्तात्मता । बाह्य दिसे युद्धकर्ता । मारूनि राक्षसां समस्तां । लंकानाथा निर्दळी ॥ ६८ ॥**

**सद्‌गुरू वसिष्ठाचिये युक्ती । राम वर्ते निजात्मस्थिती । तें न कळे लोकांप्रती । श्रीराममूर्ति परब्रह्म ॥ ६९ ॥**

अनुक्रमणिका

वाल्मीक मुनीचे भाषित । सत्य करावया रघुनाथ । सीता शुद्धयर्थ विलपत । स्वयें बोलत तें ऐका ॥ ७० ॥

राम म्हणे लक्ष्मणासी । वेगीं बोलावी सीतेसी । माझी आज्ञा कां न करिसी । तुज काय तिसीं अबोला ॥ ७१ ॥

तूं तंव सीतेसी क्षोभलासी । रागें तिसीं न बोलसी । मींच पाचारितों तिसीं । अतिभ्रमेंसि अनुवादे ॥ ७२ ॥

किं धावसि प्रिये दूरं दृष्टासि कमलेक्षणे । वृक्षेणावृत्य चात्मानं कस्मान्न प्रतिभाषसे ॥ १० ॥
तिष्ठ तिष्ठ वरारोहे न तेऽस्ति करुणा मयि । नात्यर्थं हास्यशीलासि किमर्थं मामुपेक्षसे ॥ ११ ॥

मी तुज देखतों वो सुंदरी । तूं कां पळतेसि दुरी । रिघोनि वृक्ष गुल्मांमाझारीं । नेत्रांतरीं कां लपसी ॥ ७३ ॥

उभी उभी वो राहे येथें । तू जासील जेथजेथें । मी येईन तुज सांगातें । सांडूनि मातें जावों नको ॥ ७४ ॥

मृग कंचुकीसाठीं । मजसी रुसलीसि गोरटी । मज नेदसी दृष्टिभेटी । माझी गोष्टीं नाइके ॥ ७५ ॥

माझे सेवेची तुज आवडी । मज न विसंबसी अर्धघडी । ते तू आजि कडोविकडी । वृक्षाबुडीं कां लपसी ॥ ७६ ॥

मृग मारून मज येतां । विलंब लागला तत्वतां । तेणें क्षोभ जाला चित्तां । क्षमा सर्वथा मज कीजे ॥ ७७ ॥

लक्ष्मण न करीच तुझें वचन । तेणें जालीस क्षोभायमान । तदर्थी माझें लोटांगण । क्षमा संपूर्ण मज कीजे ॥ ७८ ॥

कृपेनें मज द्यावी भेटी । सांग जीवीच्या गुह्य गोष्टी । तूं एकाकी गोरटी । वन दिक्पटीं कां जासी ॥ ७९ ॥

तुज लागीं मी आर्तभूत । तुझें का निष्ठुर चित्त । कृपेनें येऊनियां येथ । माझें आर्त पुरवावें ॥ ८० ॥

ऐसेनि न भेटे निजकांता । वृक्षवल्लीस होय पुसतां । पशु पक्षांदि समस्तां । पुसे सीता श्रीराम ॥ ८१ ॥

तुम्ही न बोलां सकोपता । तुमचे चरणीं माझा माथा । केउती आहे माझी सीता । मज तत्वतां सांगावें ॥ ८२ ॥

देखोनि पर्वत पाषाण । श्रीराम घाली लोटांगण । तुम्ही तरी कृपाकरून । सांगावी आपण सीताशुद्धी ॥ ८३ ॥

ऐसेनी न देखतां सीता । श्रीरामासी परमचिंता । लक्ष्मणासी होय सांगतां । गता मृता जानकी ॥ ८४ ॥

अब्रवील्लक्ष्मणं दीनो मुखेन परिशुष्यता । हता मृता गता सीता भक्षिता वा तपस्विनी ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

**आश्रमीं सीता एकली । राक्षसभयें पळोनि गेली । किंवा आपभयें निमाली । अथवा मारिली राक्षसीं ॥ ८५ ॥**

**राक्षसीं सीता मारुन । स्वेच्छा केलें भक्षण । ऐसें बोलोनि रघुनंदन । मूर्च्छापन्न अतिदुःखी ॥ ८६ ॥**

**मूर्च्छापन्न मूर्च्छेआंत । हा सीता हा सीता स्वयें म्हणत । सीताविरहे श्रीरघुनाथ । दुःखभिभूत अतिदुःखी ॥ ८७ ॥**

**सीता सीता म्हणतां वेळोवेळां । वाळलें वोंठ शोखला गळा । अश्रू पूर्ण आले डोळां । जनकबाळा कें आहे ॥ ८८ ॥**

**पडे अडखळे उठे बैसे । सीता सीता म्हणे आवेशें । सीता विरहे लागलें पिसे । क्षणक्षणा पुसे जानकी ॥ ८९ ॥**

> क्व गता मां परित्यक्त्वा हा सीतेति पुनःपुनः । इत्येवं बिलपन्रामः पर्यधावद्वनाद्वनम् ॥ १३ ॥
> क्वचिदुद्भ्रमते योगात्वव चिद्वि भ्रमते बलात् । क्वचिन्मत इवाभाति कान्तान्वेषणतत्परः ॥ १४ ॥
> क्वचित्स्खलन्क्वचिद्विक्षन् क्वचिद्धावन्क्वचित्पतन् । उच्चैर्नीचैश्च विक्रोशन्सीता सीतेति वा वदन् ॥ १५ ॥

**आतां काईसी सीतेची आशा । म्हणोनि धांवे दाही दिशा । सीतेलागीं जाला पिसा । अति आक्रोशें विलपतु ॥ ९० ॥**

**हा सीते हा सीते हा सीते । म्हणोनि पाहे सभोंवतें । न देखोनिया तीतें । वने वनांतें परिभ्रमें ॥ ९१ ॥**

**कोठे अडखळे कोठें पडे । कोठें रडे कोठें उडे । सीताविरहें जालें वेडें । पाहें चहूंकडे जानकी ॥ ९२ ॥**

**सीता सीता म्हणोनि देखा । अति आक्रोशें फोडी हांका । लक्ष्मणा तूं माझा सखा । उगाचि कां पाहातोसी ॥ ९३ ॥**

**सीते देगीं धांव पांव । अतिसंभ्रमें देई खेंव । मी गर्जतों घेवुनि नांव । माझी कणव कां नुपजे ॥ ९४ ॥**

**कां रुसलीसि सांगातिणी । म्हणोनि आंग टाकी धरणीं । सवेंचि धांवे उन्मत्तपणी । वनीं काननीं गिंवसितु ॥ ९५ ॥**

> तस्य शैलस्य सानूनि गुहाश्च शिखराणि च । प्रयत्नेन विचिन्वन्तौ नैव तापाधिजग्मतुः ॥ १६ ॥
> विचिंत्य सर्वतः शैलं रामो लक्ष्मणमब्रवीत् । न तां पश्यामि सौमित्रे वैदहीं पर्वते शुभाम् ॥ १७ ॥

**दऱ्या दरफुट्या पर्वत शिखरें । गिरी गव्हरे गिरिकंदरें । शोधितां राम सौमित्रें । सीता सर्वत्रें दिसेना ॥ ९६ ॥**

**राम म्हणे सौमित्रासी । शोधितां पर्वत देशोदेशीं । सीता न भेटे आम्हांसी । शुद्धी कोणासी पुसावी ॥ ९७ ॥**

**शुद्धि पुसावया जाण । हें केवळ वन विजन । शोधितां येथें न भेटे जन । काय आपण करावें ॥ ९८ ॥**

**ऐसें बोलतां रघुनाथा । सीता विरहें संभ्रांतता । पुसों धांवे तो पर्वता । पर्वतमाथां वृक्षांसी ॥ ९९ ॥**

> रे वृक्षाः पर्वतस्था गिरिगहनलतावायुना वीज्यमाना । रामोऽहं व्याकुलात्मा दशरथतनयः शोकवृत्तश्च दग्धः ।
> बिंबोष्ठि चारुनेत्रा सुविपुलजघना बद्धरत्नाढ्यकांची ।
> हा सीता केन नीता मम हृदयगता को भवान्केन दृष्टा ॥ १८ ॥

**पर्वताग्रीचे वृक्ष हो । तुम्ही दुरी देखतां पाहा हो । तरी माझे हृदयीचा संदेहो । निःसंदेहो तुम्ही करा ॥ १०० ॥**

**म्हणाल तूं कोण कोणाचा । तरी मी राम दशरथाचा । सीता वियोग विरहाचा । अति दुःखाचा पर्वत ॥ १०१ ॥**

**सीता म्हणेल आहे कैसी । तिचिया निज स्वरूपासी । मी सांगेन तुम्हांपासी । यथार्थेसी सुचिन्हें ॥ १०२ ॥**

**आरक्त नेत्र आरक्त अधर । सुंदर सुनासिक सुकुमार । कटी रत्नाढ्य कटिसूत्र । पीतांबरधर जानकी ॥ १०३ ॥**

**ऐसिया लावण्याची खाणी । तुम्हांमाजीं देखिली कोणी । तें सांगा मज लागोनि । तिची धांवणी मी करीन ॥ १०४ ॥**

**वायूने** [तं. 'फळें गळती'.] **वृक्षपल्लव डोलती । राम म्हणे सीता शुद्धयर्थी । वृक्ष मज पाचारिती । धांवोनि** [मु. 'वेगवृत्ती'.] **त्यांप्रति स्वयें जाये ॥ १०५ ॥**

**तेथें न भेटतां सीता । परम दुःख रघुनाथा । मूर्च्छित पडे मागुतां । हा हा सीता जल्पतु ॥ १०६ ॥**

**सीता न सांगती पर्वत । तेणें क्षोभला रघुनाथ । भस्म करावया गिरिसमस्त । धनुष्या हात घातला ॥ १०७ ॥**

**धनुष्या वाऊनियां गुण । गुणीं लाविला वज्रबाण । तंव लक्ष्मणें धरिले चरण । विरुद्ध आपण न करावें ॥ १०८ ॥**

**निरपराध पर्वत । त्यांचा करू नये घात ।** [दै. 'ऐसा विनवूनी'.] **शांत करूनि रघुनाथ । पुढें वनांत चालिले ॥ १०९ ॥**

> इमे लक्ष्मण वैदेह्यास्तपनीये विभूषणे । जपापुष्पनिकाशैश्च चित्रक्षतजबिंदुभिः ॥ १९ ॥
> मन्ये लक्ष्मण वैदेही राक्षसैः कामरूपिभिः । नीत्वा छित्वा विभक्ता वा भक्षिता वा तपस्विनी ॥ २० ॥

अनुक्रमणिका

**मार्गी जातां रघुनंदने । देखिलीं सीतेचीं सुवर्णभूषणें । लक्ष्मणा धांव धांव म्हणे । सीता मार्गे येणे नेलीसे ॥ ११० ॥**

**आतां मागु लागला खरा । धांवणें करूं सौमित्रा । तंव रक्तांकित देखोनि धरा । श्रीरामचंद्रा अति चिंता ॥ १११ ॥**

**कपटरूपी पै राक्षसी । येथवरी आणुनि सीतेसी । छेदूनि भेदूनि मारूनि तिसी । विभागेसीं भक्षिली ॥ ११२ ॥**

**गेलें सींते ऐसें रत्न । अति दुःखी रघुनंदन । पुढां देखे जी आपण । महारण वीरांचें ॥ ११३ ॥**

रणोपकरणं सर्वं विध्वस्तं धरणीतले । मुक्तामणिनिभं दिव्यं तपनीयविभूषितम् ॥ २१ ॥
पतितं भुवि पश्य त्वं भ्रातः सौम्य महाद्भुतम् । विशालं पतितं भूमौ कवचं यस्य कांचनम् ॥ २२ ॥

**ते रणभूमि** [मु. ‘अवलोकितां नयनी’.] **रणांगणीं । धनुष्य भंगिलें हेमाभरणीं । कवच पाडिलें दिसे धरणीं । मुक्तामणी लखलखित ॥ ११४ ॥**

**रथ भंगिला सचक्र । मारिले पिशाच वदन खर । दंडभंगे पाडिले छत्र । युद्ध विचित्र वीरांचे ॥ ११५ ॥**

**सतूणीर विखुरले बाण । मुगुट पडिला देदीप्यमान । थोर जालेंसें रणकंदन । सीता संपूर्ण मारिली ॥ ११६ ॥**

**सीता अतिशयें सुंदर । तिज निमित्त निशाचर । भिडिन्नले येर येर । युद्ध दुर्धर तयांचें ॥ ११७ ॥**

**ऐसिये युद्ध संकटीं । सीता मारिली गोरटी । राक्षस** [पै. ‘भाव’.] **तव महाकपटी । मांसासाठी मारिली ॥ ११८ ॥**

**सीता मारिली राक्षसीं । काय मुख दावूं अयोध्येसी । काय सांगों जनकासी । क्षात्रधर्मासि हे लज्ञा ॥ ११९ ॥**

किं नु लक्ष्मण वक्ष्यामि समेत्य जनकं वचः । मातरं चैव वैदेह्या विनतामहमप्रियम् ॥ २३ ॥

**काय सांगों सीतेचे मातेसी । काय सांगो निज** [तं. ‘निज जनांसी’.] **जनन्यांसी ।**
**सीता हारविली वनवासीं । काय सुहृदांसी मी सांगों ॥ १२० ॥**

**लाज लागली यश कीर्तीसी । लाज लागली क्षात्रवृत्तीसी ।**
**लाज लागली** [सु. दै. ‘मानसीं’.] **मज रामासीं । सीता वनवासीं हारविली ॥ १२१ ॥**

**लाज लागली ककुत्स्थासी । लाज लागली हरिश्चंद्रासी । लाज लागली सूर्यवंशासी । सीता वनवासी**

हारविली ॥

**लाजविला निजपुरुषार्थ । स्वर्गीं लाजेल दशरथ । लाज जाली तिहीं लोकांत । तेणें रघुनाथ क्षोभला ॥ १२३ ॥**

**सौमित्रा पाहे आंगवण । म्हणोनि घेतलें धनुष्यबाण । सीता निमित्यें पै जाण । बाणीं निर्दळीन तिन्ही लोक ॥ १२४ ॥**

तमुवाच ततो रामश्चित्रं विस्फार्य कार्मुकम् । अराक्षसीमिमां लंकां जगत्पश्याद्य लक्ष्मण ॥ २४ ॥

**राक्षसीं नेली सीता सुंदरा । सकुळ सपुत्र सपरिवारा । अराक्षसी करीन धरा । शरधारा** [कं. 'वर्षोनिया'.] **निवटूनी ॥ १२५ ॥**

**सीता पाताळां नेलियां जाण । पन्नगांतें निर्दळीन । दानवा मानवा वधीन । घोळसीन त्रिदशां ॥ १२६ ॥**

**राक्षसीं मारिलीया सीता । जरी तिसीं यमु होय नेतां । त्याच्या करीन मी घाता । यमदूता समवेत ॥ १२७ ॥**

**यम दंडितो जगासी । बाणीं दंडीन मी त्यासीं । आणून नेदी जंव सीतेसी । तंववरी त्यासीं दंडीन ॥ १२८ ॥**

**यमाची मी** [दे. 'पिळीन घाटी'.] **नळी निमटी । कळिकाळाची फोडीन कवटी । मर्दूनिया सकळसृष्टी । सीता गोरटी आणीन ॥ १२९ ॥**

**मी तंव काळाचा आकळितां । अंतकातें निर्दळितां । मर्दूनि लोकालोक समस्तां । आणीन सीतां निभिषार्द्धे ॥ १३० ॥**

**नयन अग्नीचे कल्लोळ । नेत्रींहूनि निघती ज्वाळ । धनुष्य वोढिलें विक्राळ । स्वर्गीं खळबळ देवांसी ॥ १३१ ॥**

**दानव मानव ऋषीश्वर । भेणें कांपती थरथर ।** [तं. 'आक्रंदळे'.] **आंदोळलें चराचरा । राम दुर्धर क्षोभला ॥ १३२ ॥**

**सीतेचिये शुद्धीसाठीं । क्रोधें जाळूं पाहे सृष्टी । भयें उमा झोंबे कंठीं । धाकें पोटीं सदाशिव ॥ १३३ ॥**

अदृष्टपूर्वं संक्रद्धं दृष्ट्वा रामं स लक्ष्मणः । अब्रवीत्प्रांजलिर्वाक्यं मुखेन परिशुष्यता ॥ २५ ॥
पुरा भूत्वा मृदुर्दान्तः सर्वभूतहिते रतः । न क्रोधवशमापन्नः प्रकृतिं हातुमर्हसि ॥ २६ ॥
चंद्रे लक्ष्मीः प्रभासूर्ये गतिर्वायौ भुवि क्षमा । एतच्च नियतं नित्यं त्वयिचानुत्तमं यशः ॥ २७ ॥

**राम काळाग्निरूपें क्षोभायमान । तें देखोनि धाके लक्ष्मण । तोंडीचें पाणी गेले पळोन । कंपायमान भयभीत ॥ १३४ ॥**

अनुक्रमणिका

मारिली ताटिका आणि सुबाहू । तैं हा दुर्धर क्षोभ नव्हता बहु ।
विराध सीताग्रहणराहू । क्रोधोद्भवु तैं नव्हता ॥ १३५ ॥

हिरोनि राज्य वस्त्राभरणा । पायीं कैकयां धाडिलें वना । तै हा ऐसा क्षोभ जाणा । रघुनंदना नाही आला ॥ १३६ ॥

एके श्रीरामें आपण । वधिलें त्रिशिरा खर दूषण । तेव्हां ऐसा क्रोध दारुण । नाहीं आपण देखिला ॥ १३७ ॥

सीतेचिये शुद्धीसाठीं । राम कोपला [तु. कं. 'प्रळय'.] प्रबळ दृष्टी । स्वर्गी देवा हडबड मोठी । धांके पोटीं कळिकाळ ॥ १३८ ॥

दानव मानव ऋषीश्वरा । धांकें चळकांपु थरथरा । क्षोभले देखोनि श्रीरामचंद्रा । वसुंधरा चळीं कांपे ॥ १३९ ॥

श्रीरामक्षोभ अतिनिर्वाण । देखोनि सौमित्र आपण । धावोंनि धरिलें [पैं. खेरीज इतरत्र 'दोन्ही चरण'.] चरण । क्षमा संपूर्ण करी रामा ॥ १४० ॥

सावध ऐके कृपामूर्ती । भूत कृपाळू तूं रघुपती । तुवां [मु. द. 'निर्मिली'.] नेमिली सृष्टीची स्थिती । तेहि वेदोक्ति अवधारी ॥ १४१ ॥

प्राण राखोनियां भूतीं । तुझेनि वायूची नित्य गती । चंद्री तुझेनि रघुपती । शोभा शोभती सर्वदा ॥ १४२ ॥

तुझिया निजतेजस्थिती । सूर्यासी प्रभा अतिदीप्ती । तुझे क्षमेनें क्षमा क्षिती । भूतें वाहती सर्वदा ॥ १४३ ॥
[ओवी १४३ तु. प्रतींत नाहीं.]

समुद्र वेळा राखे [कं. 'मर्यादा'.] सर्वदा । काळ तुज अधीन सदा । अकाळीं प्रलयो न करी कदा । निज मर्यादा हे तुझी ॥ १४४ ॥

तो तूं आज स्थिती काळासी । अकाळ प्रळयो कां करुं पाहासी ।
विचारूनि निजमानसीं । क्षमा क्षोभासी करावी ॥ १४५ ॥

तूं सृष्टीचा आदिकर्ता । तुझें [सु. ई. 'तुझेनि बळें'.] बाळक विधाता । आपुलिया [कं. 'अपकीर्ती सर्वथा'.] परिपूर्ण पूर्णता । श्रीरघुनाथा आठवी ॥ १४६ ॥

ऐकोनि सौमित्रवचन । निज क्षोभ स्वयें प्राशून । संतोषोनि रघुनंदन । दिधलें आलिंगन सौमित्रा ॥ १४७ ॥

ऐकोनि बंधूची विनंती । संतोषली श्रीराममूर्ती । प्राशूनिया क्रोधवृत्ति । सुखशांती संतुष्ट ॥ १४८ ॥

संतोषोनि श्रीरघुपती । दोघे बैसले सहजस्थिती । जाहाली पूर्णिमा पूर्णराती । उदय प्राप्ति चंद्राची ॥ १४९ ॥

अनुक्रमणिका

एका जनार्दना शरण । आठवितां पूर्णपण । श्रीराम सुखें सुखावोन । केलें शयन तृणसेजें ॥ १५० ॥

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां सीताशुद्धिश्रीरामविलापो नाम एकोनविंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग विसावा

## श्रीराम पार्वती संवाद

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**पूर्णिमा रात्री शोभायमान । तृण सेजे रघुनंदन । करितां जाला सुखशयन । पदसंवाहन सौमित्रें ॥ १ ॥**

**चंद्रोदय मनोहर । चंद्रकिरण अति सुकुमार । आंगीं लागतां श्रीरामचंद्र । उठी सत्वर गजबजिला ॥ २ ॥**

> सौमित्रे ननु सेव्यतां तरुतलं चंडाशुरुज्जृंभते । चंडांशोर्निशिका कथा रघुपते चंद्रोऽयमुन्मीलति ॥
> वत्सैतद्भवता कथं नु विदितं धते कुरंगं यतः । क्वासि प्रेयसि हा कुरंगनयने चंद्रानने जानकि ॥ १ ॥

**श्रीराम म्हणे लक्ष्मण । खडतर ताविती सूर्यकिरण । मज बाधिताती दारुण । बैसों दोघे जण तरुतळीं ॥ ३ ॥**

**सौमित्र म्हणे रघुनाथा । रात्रीं कायिसी सूर्याची कथा । हा अमृतांशु चंद्र तत्वतां । निववी समस्तां निजकिरणीं ॥**

[मु. 'जरी हें चंद्रबिंब सांगसी पूर्ण'.] **हें चंद्रबिंब संपूर्ण । सौमित्रा तुज कैसेनि ज्ञान । बिंबीं देखोनि मृगचिन्ह । चंद्रलक्ष्मण मी जाणें ॥ ५ ॥**

**चंद्रबिंब मृगचिन्हीं । एकत्र देखतोसि नयनीं । मृगनयना चंद्रवदनी । जनकनंदिनी ते कोठें ॥ ६ ॥**

**मृगचिन्हें चंद्र देखसी । परी मृगनयना चंद्रवदनेसी । सीता दाखवी मजपासीं । उकसाबुकसी स्फुंदत ॥ ७ ॥**

**हा सीता प्रियकांता । सुखस्वरूप जनक दुहिता । लक्ष्मणा कोठें सीता । दुःखावस्था अनुवादे ॥ ८ ॥**

**पाठीसि उभी माझी सीता ।** [मु. 'पुढे पळे'.] **पैल पुढें जनकदुहिता । लक्ष्मणा धांव धांव तत्वतां । रुसली कांता बुझावी ॥ ९ ॥**

**सवेंचि बोले आन आन । चंद्रे द्वंद्व मांडिलें जाण । खडतर ताविताती किरण । तापलों पूर्ण सौमित्रा ॥ १० ॥**

> चंद्रश्चंडकरायते मृदुगतिर्वातोऽपि वज्रायते । माल्यं सूचिकुलायते मलयजो लेपः स्फुलिंगायते ।
> रात्रीः कल्पशतायते विधिवशात्प्राणोऽपि भारायते । हा हंत प्रमदा वियोगसमयः संहारकालायते ॥ २ ॥

**लक्ष्मणा सावध ऐक आतां । चंद्रमा दवडी रे परता । न वचे तरी करीन याच्या घाता ।** [तं. 'निशापती मज

अनुक्रमणिका

ताविसी'.] संतापतां मज तावी ॥ ११ ॥

लक्ष्मण घाली शीतळवारा । [पै. खेरीज इतरत्र 'म्हणे' हे पद अधिक.] द्वंद्वा पेटलासि सौमित्रा । मज हाणसी वज्रधारा । दशाशिरा मीनलासी ॥ १२ ॥

येथूनि उठी जाय परता । करूं आलासी माझिया घाता । विरहज्वरें रघुनाथा । संतापतां अतितापी ॥ १३ ॥

श्वेतोत्पलीं सुमन सेजार । तेथें निजविला श्रीरामचंद्र । सुयीं खिळिलें सर्तशरीर । आप्त सौमित्र मज [दै. 'वैरी'; कं. 'मंदधी'.] द्वंद्वी ॥ १४ ॥

जो तूं होसी सुमैत्र । तो कां जालासि कुमैत्र । सुयीं खिळिलें गात्रेंगात्र । वृथा वैर कां करिसी ॥ १५ ॥

सवेग [तं. खेरीज इतरत्र 'निघावया'.] निववाया धगी । बावन चंदन लावितां आंगी । क्रोधें राम बोले सवेंगीं । आगी सर्वांगीं लाविली ॥ १६ ॥

सीता विरहें अति विव्हळ । त्यावरी लाविलें त्वां इंगळ । न भेटतां जनकबाळ । प्रळयकाळ मज आला ॥ १७ ॥

सीतेचेनि वियोग विरहें । सूर्य निमाला [मु. 'नेणो' हे पद अधिक.] रे काये । रात्री जाली कल्पप्राये । करूं मीं काय सौमित्रा ॥ १८ ॥

मजसी वर [मु. 'चालवी'.] चाली चंद्र । वैरा पेटला सौमित्र । वायु चाली वैराकार । वज्रधार मज लागे ॥ १९ ॥

सीता वियोग विरहें जाण । माझा निघों पाहे प्राण । सौमित्रा वेगीं रची सरण । [तं. खेरीज इतरत्र 'अलोट'.] अकाल मरण मज आलें ॥ २० ॥

ऐसें बोलतां बोलतां । सवेंचि धांवे [मु. 'म्हणे'.]सीता सीता । वृक्षासि म्हणे माझी कांता । गुल्मलता आलिंगी ॥ २१ ॥

सीता म्हणोनियां जाण । श्रीराम स्वयें चुंबी पाषाण । धांवोनि ह्रदयीं धरी तृण । सीता संपूर्ण हे माझी ॥ २२ ॥

लक्ष्मणासि म्हणे तूं सीता । तूंचि माझी निजकांता । ऐसी सीतेचि अवस्था । श्रीरघुनाथा अति भ्रांती ॥ २३ ॥

मी येथ सौमित्रा सांगे कोण । तूं श्रेष्ठसखा स्वामी संपूर्ण । स्वामित्व मज कैंचें जाण । अयोध्यापति पूर्ण श्रीरामचंद्र ॥

तूं मजपासीं कैचा कोण । हरहर मीं काय सांगों आपण । नित्यानुवर्ती लक्ष्मण । सेवक संपूर्ण आज्ञाधारी ॥ २५ ॥

अनुक्रमणिका

वनीं कां हिंडतों [मु. ‘एकाकी’.] एकाएकी । प्रियाप्राप्तीचें अनुलक्षी । प्रिया कोण कैंचीं कीं । तुझी भार्या जानकी ॥ २६ ॥

ऐसी आठवण देतां । जानकी आठवली चित्ता । हा हा केउती गेली सीता । भेटवी आतां सौमित्रा ॥ २७ ॥

ऐसें देखोनि श्रीरामासी । उमा विनवी महेशासी । कांहीं एक पुसेन तुम्हांसी । निश्चयेंसी मज सांगा ॥ २८ ॥

तुम्हींच सांगितलें आपण । श्रीराम परब्रह्म परिपूर्ण । त्याचे स्वरूप तें कोण । कृपा करून मज सांगा ॥ २९ ॥

म्हणोनि घातलें लोटांगण । मस्तकीं धरिले दोन्ही चरण । तिसी उठऊनियां जाण । शिव आपण स्वयें सांगे ॥ ३० ॥

वना माजीं विचरत । सीतेलागीं आर्तभूत । पूर्णब्रह्म रघुनाथ । जाण निश्चित पार्वतिये ॥ ३१ ॥

उमा म्हणे विषयासक्त । स्त्री कामार्भी अतिलोलुप्त । शिवु म्हणें तेंचि सदोदित । ब्रह्म रघुनाथ पार्वतिये ॥ ३२ ॥

उमा म्हणे रडत पडत । अहर्निशीं तडफडत । सीते लागीं चरफडत । ब्रह्म रघुनाथ शिवु म्हणे ॥ ३३ ॥

तुम्हांसि काय हेंचि ध्यान । तुम्हांसि काय हेंचि चिंतन । शिवु म्हणे ज्ञान विज्ञान । आम्हां ब्रह्मपूर्ण श्रीराम ॥ ३४ ॥

विषय कामीं कामासक्त । धन्य धन्य दोघेही देवभक्त । उमा उपहासें हांसत । ब्रह्म रघुनाथ शिवु म्हणे ॥ ३५ ॥

रडत पडत चरफडत । विषय कामी कामासक्त । तरी परब्रह्म श्रीरघुनाथ । जाण निश्चित पार्वतिये ॥ ३६ ॥

उमा म्हणे महेशासी । जरी म्यां ठकिलें श्रीरामासी । शिवु म्हणे पार्वतीसी । ब्रह्मत्व त्यासी तें नाहीं ॥ ३७ ॥

तुमचें जालिया आज्ञापन । क्षणार्द्धे छळीन रघुनंदन । [मु. ‘तरी’ हे पद अधिक.] शिवु म्हणे तो सावधान । सुखें तूं छळण करी त्यासीं ॥ ३८ ॥

ऐसें शिवासी बोलतां । छळावया रघुनाथा । उमा स्वयें जाली सीता । अति लाघवता छळाणार्थी ॥ ३९ ॥

हा सीता हा सीता म्हणत । वनीं विचरे रघुनाथ । त्यास सन्मुख वो म्हणत । उमा वनांत स्वयें आली ॥ ४० ॥

वो म्हणोनि ये रामापुढें । राम सीता म्हणे आणिकीकडे । ते जंव येती कडिले कडे । राम आणिकीकडे म्हणे सीता ॥

अनुक्रमणिका

[हस्तलिखितांत 'जंव जंव' आणि 'तंव तंव' हे शब्द नाहीत.] जंव जंव ते ये श्रीरामासन्मुख । तंव तंव तियेसी होय विमुख । हा सीता हा सीता फोडूनि हांक । अधोमुख विलपतु ॥ ४२ ॥

लक्ष्मण विचारी निजचित्ता । वृक्ष पाषाणा म्हणे सीता । ते जानकी सन्मुख उभी असतां । दुःखावस्था कां रामा ॥

लक्ष्मण म्हणे श्रीरघुनाथा । दुःख कां करिसी भेटली सीता । त्यासी हाणों धांवे लाता । बोल बोलतां मारूं पाहे ॥ ४४ ॥

सौमित्र म्हणे कोपसी वृथा । पैल सन्मुख उभी सीता । ऐसें बोलणें ऐकतां । शस्त्रें घाता करूं धांवें ॥ ४५ ॥

सौमित्रा आम्ही तुम्ही सहोदर । तो तूं मजसी करिसी वैर । येथ कैंची सीता सुंदर । दुःख दुर्धर मज आलें ॥ ४६ ॥

अति भ्रांति रघुनाथा । मारूं धांवे सीता सांगता । लक्ष्मण म्हणे न बोले आता । बोलों जातां मारील ॥ ४७ ॥

सन्मुख भेटलीसे सीता । ते प्रबोधील रघुनाथा । आतां मी न बोले सर्वथा । [मु. 'म्हणोनि' हे पद अधिक.] मौनावस्था लक्ष्मणीं ॥ ४८ ॥

स्वर्गीं सुरवरां समस्ता । वोढवली परमावस्था । बंदी सुटोनि लंकानाथा । वना सीता केवीं आली ॥ ४९ ॥

विस्मय करिती ऋषीश्वर । ठकूनिया दशशिर । [मु. 'स्वयें' हे पद अधिक.] उल्लंघूनि सागर । सीता सुंदर वना आली ॥ ५० ॥

ब्रह्मा मानी अपूर्वता । भस्म करूनि लंकानाथा । वना आली सती सीता । तेणें विधाता विस्मित ॥ ५१ ॥

पार्वती स्वयें जाली सीता । न कळे ब्रह्मादिकां समस्तां । तें कळलेसें रघुनाथा । सर्वांगें ज्ञाता श्रीराम ॥ ५२ ॥

श्रीराम [तं. खेरीज इतरत्र 'अलिप्त'.] अलुप्त ज्ञानें ज्ञाता । त्यासि मानिती अति भ्रांतता । पुढें काय वर्तली कथा । सावधानता अवधारा ॥ ५३ ॥

लक्ष्मण राहिला धरूनि मौन । सीता सीता जल्पे रघुनंदन । कृत्रिम सीता धरी धांवोन । सावधान तुम्ही होआवें ॥

मी जवळी उभी असतां । व्यर्थ कां धांवा म्हणतां सीता । स्त्रीविरहें रडता पडतां । लाज सर्वथा नये तुम्हां ॥ ५५ ॥

पूर्वीं बोला निजमहिमान । मीं श्रीराम नित्यसावधान । तें स्त्रीविरहें बुडालें ज्ञान । अति अज्ञान जालेती ॥ ५६

अनुक्रमणिका

॥

अज्ञानाची अगाध मातु । बुडविला प्रपंच स्वार्थु । सखा बंधु भक्त विनीतु । त्याचाचि घात करूं धांवा ॥ ५७ ॥

सखा बंधु आणि भक्तु अनन्य । त्याचेचि करूं धावा हनन । बुडालें प्रवृत्तीचें ज्ञान । ब्रह्मज्ञान तुम्हां कैंचें ॥ ५८ ॥

मज क्षण एक न भेटतां । जडमूढ जालेती अति भ्रांतता । प्रवृत्तिज्ञान नाठवे चित्ता । परमार्थता तेथ कैंची ॥ ५९ ॥

वनीं म्यां राहोनि गुप्त । तुमचें पाहिले आचरित । तुम्हीं जालेति अतिभ्रांत । मग धांवत मीं आले ॥ ६० ॥

स पंडितो नरश्रेष्ठः प्राज्ञः कर्मविदां वरः । अप्राज्ञ इव किं राम भार्याहेतोर्विमुह्यसे ॥ ३ ॥

पूर्वी म्हणसी आत्मा मी तत्वतां । कर्म करूनि अकर्तात्मता । स्त्री विरहें तोचि तूं आतां । जडमूढता अतिभ्रांत ॥ ६१ ॥

[मु. 'जरी'.] मज वियोगें भ्रांति मोठी । आम्हां तुम्हां दोघां जाली भेटी । भ्रांति सांडूनिया पोटीं । पंचवटीसी जावों दोघे ॥ ६२ ॥

मर्यादा वर्षे चतुर्दश । आम्ही करावा वनवास । आतां उरले षण्मास । अयोध्येस मग जावों ॥ ६३ ॥

राम म्हणे तुं तुं काई । तेंचि नाम लोकांच्या ठायीं । अद्यापि राहिलेंसे पाही । म्हणती तुकाई जगदंबा ॥ ६४ ॥

तुकायी नामीं नामाभिधान । तें जगदंबेचें निजस्थान । अद्यापि पूजिताती जन । अतिपावन दंडकीं ॥ ६५ ॥

रामवरदायिनी माता । तुकाई म्हणती रामवाक्यार्था । पुढें काय वर्तली कथा । सावधान श्रोतां परिसावी ॥ ६६ ॥

हांसोनि बोले रघुनंदन । माते तुज लोटांगण । माझें न करावें छळण । अनन्य दीन मी शिवाचें ॥ ६७ ॥

श्रीराम सीतेसि म्हणे माता । विस्मयो लक्ष्मणाच्या चित्तां । आश्चर्य सुरवरां समस्तां । नोळखे कांता ऋषी म्हणती ॥

श्रीराम पुढती बोले तिसीं । एकलें सांडूनि शिवासी । सीतारुपें छळावयासी । तूं कां आलीसि जननिये ॥ ६९ ॥

ऐकोनि श्रीरामवचन । सीतेची स्वरुपता त्यागून । उमा घाली लोटांगण । राम सर्वज्ञ छळवेना ॥ ७० ॥

अनुक्रमणिका

शिव बोलिला सत्यवचन । श्रीराम नित्य सावधान । त्यासी तुझें न चले छळण । तें प्रमाण मज आलें ॥ ७१ ॥

मीं शिवाची निजशक्ती । सीता जाले अतर्क्य युक्ती । ब्रह्मादिक मज नेणती । तुवां रघुपती वोळखिले ॥ ७२ ॥

श्रीरामाचें अगाधज्ञान । न चले छळछद्‌मकामन । उमेसि बाणली निजखूण । धरूनि चरण पूसत ॥ ७३ ॥

तू तंव सर्वार्थी सर्वज्ञ [मु. 'संपूर्ण' हे पद अधिक.] । अवलंबूनि सभ्रांतपण । आलिंगावया तृण पाषाण । काय कारण मज सांगा ॥ ७४ ॥

सीताविरहें काम कां मन । तुज नाहीं अणु प्रमाण । तें खूण बाणली संपूर्ण । ब्रह्मपरिपूर्ण श्रीराम ॥ ७५ ॥

दुर्धर धरूनि पिशाचता । विरहेंविण सीता सीता । म्हणोनि वनोवनीं धांवता । रडत पडतां कां होसी ॥ ७६ ॥

ऐसें बोलोनि आपण । उमा धरी श्रीरामचरण । तुझी स्थिती हें संपूर्ण । कृपा करून मज सांग ॥ ७७ ॥

राम म्हणे माझी स्थितिगती । सदाशिव जाणे निश्चितीं । तो सांगेल तुजप्रती । स्वमुखें कीर्ति नये सांगो ॥ ७८ ॥

जरी सांगावे कृपा विधी । तरी पाहावी पात्रशुद्धी । [मु. 'नसावा'.] न व्हावा छळवादी स्थळवादी । वादी विवादी [मु. 'नसावा'.] न व्हावा ॥ ७९ ॥

[मु. 'नसावा'.] न व्हावा धूर्तज्ञान ठक । [मु. 'नसावा'.] न व्हावा शठ नष्ट दांभिक । नास्तिक दुजा शब्दवाचक । आळसी वंचक [मु. 'नसावा'.] न व्हावा ॥ ८० ॥

द्रव्यदारा त्यागोन्मुख । शोधित सत्वाचा सात्विक । पूर्ण परमार्थी विवेक । [पै. खेरीज इतरत्र 'त्यासी परिपाक सांगावा'.] आळसी वंचक न व्हावा ॥ ८१ ॥

तुझें आंगीं ज्ञानाभिमान । न मनूनि शिवाचें वचन । माझें करूं आलीस छळण । तुज आपण केवीं सांगों ॥ ८२ ॥

नाहीं पतिवचनीं कर्तव्यार्थ । नाहीं गुरुवचनीं भावार्थ । तुज सांगों नये गुह्यार्थ । ऐसें रघुनाथ बोलिला ॥ ८३ ॥

[मु. प्रतीत 'ऐसें' हे पद अधिक.] ऐकोनि श्रीरामवचन । उमा खोंचली [घा. इं. 'मनीं' हे पद अधिक.] संपूर्ण । पतिवचन गुरुवचन । उल्लंघन म्यां केलें ॥ ८४ ॥

अनुक्रमणिका

न मनूनि शिवाचें वचन । छळूं आले रघुनंदन । जळो माझा ज्ञानाभिमान । करी रुदन अनुतापें ॥ ८५ ॥

ज्ञानाभिमानाचें लक्षण । भेटलिया साधू सज्ञन । शोधूनि पाहे दोषगुण । त्याचेचि छळण करावया ॥ ८६ ॥

छळणीं छळवेना रघुनाथा । सेखीं मज कोपसीना सर्वथा । तेणें मज पालटु जाला चित्तां । ऐक आतां सांगेन ॥ ८७ ॥

तुझें होतांचि दर्शन । ज्ञानाभिमाना जालें दहन । छळ छद्‌म गेलें जळोन । तुझी आण श्रीरामा ॥ ८८ ॥

उमे एक सावधान । पूर्वी हे वो ऋषिसज्ञन । माझे प्राप्तिलागीं जाण । केलें अनुष्ठान निष्काम ॥ ८९ ॥ [तु. घा. सु. तं. प्रतींत ही ओवी अशी आहे :–– 'ऐकोनि तिचें सत्यवचन । कृपें द्रवला श्रीरघुनंदन । आपुलें अतर्क्य गह्यज्ञान । सांगें आपण सद्भावें ॥']

उमे माझे ठाकावया चरण । त्यांचा सद्भाव पूर्ण । सांडूनि सर्वही अभिमान । तृण पाषाण होऊनि ठेलें ॥ ९० ॥

एक ते वृक्ष होऊनि तिष्ठत । एक ते जाले वो पर्वत । एक ते तृण पाषाण होत । मीं तेथ तेथ स्वयें धांवे ॥ ९१ ॥

त्यांचा भावार्थ देखोन । परम प्रीतीं दे आलिंगन । त्यांसी तू म्हणसी तृण पाषाण । पिसें पूर्ण मज म्हणसी ॥ ९२ ॥ [ओवी ९२ ते ९५ दै. प्रतीत नाही.]

तें तंव निरभिमान भक्त । भक्त भावार्थी मी रघुनाथ । [मु. 'प्रीतीनें भक्त गिंवसित'.] त्यांचें पुरवावया मनोरथ । स्वयें धांवत वनोवनीं ॥ ९३ ॥

भक्त उद्धरावया कारणें । रडणें पडणें अडखळणें । पर्वतोपर्वतीं धांवणें । आलिंगनें वृक्षांसी ॥ ९४ ॥

उमे जाण तूं निश्चित । माझें पाऊल न पडे व्यर्थ । जाणें सदाशिव समर्थ । तुज भावार्थ तो नाहीं ॥ ९५ ॥

गाळीव भावाचा भावार्थ । सर्वभूतीं भगवंत । हाचि मुख्यत्वें परमार्थ । निजस्वार्थ परब्रह्म ॥ ९६ ॥

गुळाचें कारलें केलें । तें सकंटक कडू नाहीं जालें । तेवीं ब्रह्मवेत्ती कर्म केलें । ते ते मुकले [मु. घा. 'बंधुत्वा'.] बाधकत्वा ॥ ९७ ॥

साखरेचें इंद्रावण केलें । कडू म्हणे ते स्वयें ठकले । तेवीं साधूचें कर्म निंदूनि बोले । ते ते गेले अधःपाता ॥ ९८ ॥ [ओवी ९८ व १०० दै. प्रतीत नाहीत.]

साधूंची अद्भुत गरिमा । अतर्क्य त्यांची कर्मप्रमा । ते ना कळती [पै. खेरीज इतरत्र 'मोहभ्रमा'.] मनोभ्रमा । अगाध महिमा साधूंचा ॥ ९९ ॥

अनुक्रमणिका

जें तूं म्हणसी तृण पाषाण । तें साधूसी ब्रह्मपूर्ण । [मु. प्रतीत 'ऐसें' हे पद अधिक.] ऐकोनि श्रीरामवचन । मूर्छापन्न पार्वती ॥ १०० ॥

मी एकी शक्ति तो एकशिव । हें नाठवे पूर्वापूर्व । श्रीरामेंसी रूप नांव । भावाभाव विसरली ॥ १०१ ॥

अहं कोहं सोहंपण । कोंदाटले ब्रह्मपूर्ण । येणेंसि गेले मीतूंपण । समाधान शिवप्रिये ॥ १०२ ॥

करितां श्रीराम छळणोक्ती । समाधि पावली पार्वती । ऐसी संतांची संगती । उपकारार्थी अपकाऱ्यां ॥ १०३ ॥

पावोनिया पूर्ण समाधान । उमा जाली सावधान । त्रैलोक्य देखे चैतन्यघन । श्रीराम संपूर्ण तुष्टला ॥ १०४ ॥

उमा धांवोनि [मु. 'उल्लासतां'; कं. 'तत्वता'.] उत्फुल्लता । श्रीरामचरणीं ठेविला माथा । तुझेंनि जाली सुखरूपता । काय मीं आतां अनुवादों ॥

श्रीराम म्हणे अवो माते । कांहीं एक मागेन तूंतें । उमा म्हणे सर्वस्वार्थें । तुझेनि आज्ञेतें नुलंघी ॥ १०६ ॥

मिथ्या न म्हणावे शिववचन । कोणाचें न करावें छळण । हेंचि मी मागतो आपण । कृपापूर्ण करी माते ॥ १०७ ॥

श्रीरामा तुझे देखतां चरण । छळणादि वृत्तीसी जालें दहन । न करी शिवाज्ञे हेळण । तुझी आण श्रीरामा ॥ १०८ ॥

तुझें ऐकतां वचन । जालें अविद्येचें दहन । निमालें छळण हेळण । तूं [मु. 'तुझी आण श्रीरामा'.] ब्रह्म परिपूर्ण परिपाक ॥ १०९ ॥

तुझेनि वचनें रघुनाथा । पावलें सुख सायुज्यता । [मु. प्रतीत 'मग' हे पद अधिक.] चरणीं ठेविला माथा । गेली उल्हासता कैलासा ॥ ११० ॥

उमेनें केलिया [घा. 'नमन'.] गमन । सौमित्रें स्वयें धांवोन । मस्तकीं धरूनि श्रीरामचरण । काय आपण बोलतु ॥ १११ ॥

मीं म्हणे हेचि आमची सीता । तंव ते शिवाची शिवकांता । भली वोळखिली रघुनाथा । सर्वज्ञ ज्ञाता श्रीराम ॥ ११२ ॥

देखोनि उमेची स्थितिगती । ब्रह्मादिक विस्मित चित्तीं ।
आम्ही म्हणो हे सीता सती । रामें पार्वती वोळखिली ॥ ११३ ॥

आम्हीं म्हणो सीता विरहें भ्रांत । अचूक ज्ञाता भ्रमा आंत । याचा न कळे निजवृत्तांत । ब्रह्म सदोदित श्रीराम

अनुक्रमणिका

॥ ११४ ॥

रडणें पडणें सैंघ धांवणे । देखोनि जग पिसें म्हणे । श्रीराम विचरे ब्रह्मपणें । जग उद्धरणें श्रीरामें ॥ ११५ ॥

देखोनि श्रीरामाची स्थिती । ब्रह्मादिदेव विस्मित चित्तीं ।
तिहीं वंदूनि श्रीराममूर्ती । गेले निश्चितीं निजधामा ॥ ११६ ॥

फिटली देवांची निजभ्रांती । लक्ष्मण पावला विश्रांती । अगाध श्रीरामाची [दे. प्रतीत 'कीर्ति' हे पद अधिक.] स्थिती । नामें उद्धरती जडजीव ॥ ११७ ॥

एका जनार्दना शरण । पुढारे सीता अन्वेषण । करूं निघाले रामलक्ष्मण । तेही निरोपण अवधारा ॥ ११८ ॥

श्रीराम उमा [मु. 'संभाषण'.] संदर्शन । यासी मूळ शिवरामायण । हें ते ग्रंथीचें निरोपण । श्रोते सज्ञान जाणती ॥ ११९ ॥

संख्या शत कोटी समस्त । रामायण मूळग्रंथ । सुरनर पन्नग कथार्थ । कलह करित पैं आले ॥ १२० ॥

श्रीराम राजा सुरवरांचा । त्याची कथा वांटा देवांचा । पन्नग म्हणती शेषशयनीचा । राम आमचा तुम्ही कैंचे ॥ १२१ ॥

मनुष्य म्हणती मनुष्याकृती । रामें केली अगाधख्याती । आमचा वांटा श्रीरामकीर्ती । तुम्ही तदर्थी कां भांडा ॥ १२२ ॥

श्रीराम [मु. 'तुमचा'.] आमुचा वैकुंठपती । वैकुंठी नाहीं केली ख्याती ।
श्रीराम शेषशायी निश्चितीं । निजेल्या कीर्ती नाहीं केली ॥ १२३ ॥

येऊनि मनुष्य लोकाप्रती । रामें केली विचित्र ख्याती । मृत्युलोकीची हे कीर्ती । तुम्ही तदर्थी कां भांडा ॥ १२४ ॥

एक खालते एक वरते । वांटा मागों आलेति येथें । निर्लज्ज लाजाना पैं चित्तें । संबंध तुमते आथीचिना ॥ १२५ ॥

दोघेही केले निरुत्तर । तरी कथेची आवडी फार । न सोडिती येरांयेर । कथामृतसार सेवावया ॥ १२६ ॥

ब्रह्मेंनि बुद्धि केली जाण । वांटेकरी तिघेजण । त्यांची करावया बुझावण । धाडी आपण शिवापासीं ॥ १२७ ॥

शिवें बुद्धि केली कैसी । तिघे येतां आपणापासीं । स्वयें राखोनि निजसारासी । विभागेंसी बुझावी ॥ १२८ ॥

अनुक्रमणिका

शिवु म्हणे तयापासीं । विमुख न धाडी मी कोणासी । वांटा देईन समभागेंसी । वचन तिघांसी मानलें ॥ १२९ ॥

शतकोटी संख्या येथ । रामायणीं मूळ ग्रंथ । शिव वांटी त्रैलोक्यांत । विभागार्थ तें ऐका ॥ १३० ॥

तेहतीस तेहतीस कोटी प्रथमांक । तेहतीस तेहतीस लक्ष आणिक ।
तेहतीस सहस्त्र तीनशे श्लोक । तेहतीस श्लोकां एक ऊर्वरित ॥ १३१ ॥

दहा दहा अक्षरें वांट्या आलीं । दोन्हीं अक्षरें उरी उरलीं । तदर्थीं शिवें बुद्धी केली । युक्त बोली बोलोनी ॥ १३२ ॥

अक्षरें दोनी लोक तिन्हीं । वांटा करिता न ये वांटणी । [मु. प्रतीत 'तरी' हे पद अधिक.] हीं मज द्यावी मापाऱ्यालागुनी । खळें दानीं दानार्थ ॥ १३३ ॥

तिघेजणीं अतिउल्हासी । [मु. प्रतीत 'दोनीं' हे पद अधिक; दै. प्रतीत पुढील ओव्या १२२ व्या ओवीनंतर आल्या आहेत :–– 'तदर्थीं शिवें बुद्धि केली । ते बुद्धि कोणा नाहीं स्मरली । आपआपणा विवंचिली । वेडावली सकळही ॥
शिवें प्रार्थिले लोक तीन्हीं । वाटितां अक्षरें उरलीं दोन्हीं । यांची करितां नये वांटणी । माझी विनवणी परिसावी ॥
वाटितां अक्षरें उरले दौन । हे मी घेतो स्मरणालागोन । धर्मार्थ स्वयें दान । कृपा करून मज द्यावे ॥'] अक्षरें दीधलीं सदाशिवासी । तेणें धरिली हृदयेंसी । अहर्निशीं श्रीराम ॥ १३४ ॥

रामायणीचें सार संपूर्ण । शिवाचें वसवी हृदयभुवन । राम अक्षरें ही जाण । ब्रह्मपूर्ण परिपूर्णत्वें ॥ १३५ ॥

लोक विभाग तेहतीस कोटी तेहतीस लक्ष । तेहतीस सहस्त्र तीनशे श्लोक ।
दहा अक्षरें अधिक । हा भाग एक मृत्युलोकीं ॥ १३६ ॥

याही विभागांचे विवरण । बहुविध कवित्व रामायण । तेही अर्थीचें निरोपण । सावधान अवधारा ॥ १३७ ॥

शिवरामायण शैवरामायण । आगम पंचरात्र रामायण । गुह्यागुह्यक रामायण । हनुमद्रामायण नाटक ॥ १३८ ॥

मत्स्यकूर्म वराह रामायण । काळिका खंडीचे रामायण । महाकाली रामायण । स्कंद रामायण प्रसिद्ध ॥ १३९ ॥

अगस्ति रामायण पुलस्ती रामायण । पद्मपुरीचें रामायण । रवि [मु. 'अग्नि' हे पद अधिक.] वरुण रामायण । ऐकोनि आपण जटायुवक्ता ॥ १४० ॥

नंदिग्रामीं भरत आपण । वदे तें भरतरामायण । महाभारतीचें भारत रामायण । वक्ता आपण श्रीव्यास ॥ १४१ ॥

क्रौंच द्वीपीं अद्यापि जाण । क्रौंच ऋषि सांगे पुराण । कथा पवित्र रामायण । अति पावन अनुपम्य ॥ १४२ ॥

अनुक्रमणिका

बिभीषणापासीं जाण । नित्यकथा निरुपण । धर्मऋषि सांगे आपण । धर्म रामायण धार्मिकां ॥ १४३ ॥

श्वेत द्वीपीचे निरूपण । श्वेतकेतु रामायण । कथा विचित्र विंदान । अतिपावन तिंही लोकीं ॥ १४४ ॥

शंकर वक्ता स्वयें आपण । श्रोता भवानी सावधान । तें शिवभवानी रामायण । कथा विंदान विचित्र ॥ १४५ ॥

सदाशिव स्वयें वक्ता । [दै. प्रतीखेरीज इतरत्र 'स्वयें श्रीराम निजश्रोता'.] मुख्य पार्वती स्वयें श्रोता । ते शिवरामायणी कथा । श्रवणीं ऐकतां स्वानंद ॥ १४६ ॥

स्वयें श्रीराम स्वानंदे पूर्ण । आपणाप्रति वदे आपण । ते कथा आत्मरामायण । गोड निरूपण सर्वार्थी ॥ १४७ ॥

जैमिनीकृत रामायण । अपूर्व कथांचें विंदान । अलौकिक निरोपण । आश्चर्यमान चरित्रें ॥ १४८ ॥

जें कां अध्यात्मरामायण । रामायणीचे वेंचे काढून । केलें आधुनिक निरूपण । [मु. 'ऋषिकृत'.] ऋषिप्रोक्त जाण तें नव्हे ॥ १४९ ॥

मृत्युलोक भागाविखीं । रामायणें असंख्यात कीं । कैसेंनि आकळती तितुकीं । अल्प अल्प कीं बोलिलों ॥ १५० ॥

उमा श्रीराम संदर्शन । समूळ मूळीचें निरूपण । एका जनार्दना शरण । श्रोतां संपूर्ण क्षमा कीजे ॥ १५१ ॥

परम विश्रांति जीवशिवां । [मु. 'परम' हे पद अधिक.] विश्रांति देहविदेह भावा । तो हा प्रसंग विसावा । उमा श्रीराघवा संवादु ॥ १५२ ॥

विश्रांति त्रिविधतापोद्भवा । अति विश्रांति [मु. 'देहभाव'.] भवभावा । तो हा प्रसंग विसावा । उमा श्रीराघवा संवादु ॥ १५३ ॥

अति विश्रांति दुःखोद्भवा । विश्रांति विजय सुखसंभवा । तो हा प्रसंग विसावा । उमा श्रीराघवा संवादु ॥ १५४ ॥

विश्रांति [मु. 'निवृत्ती'.] प्रवृत्ति अहंभावा । विश्रांति निवृत्ति सोहंभावा । तो हा प्रसंग विसावा । उमा श्रीराघवा संवादु ॥ १५५ ॥

विश्रांति अहमात्मा वैभवा । विश्रांति ब्रह्मीं ब्रह्मभावा । तो हा प्रसंग विसावा । उमा श्रीराघवा संवादु ॥ १५६ ॥

भ्रमामाजीं [मु. 'विभ्रम'.] निभ्रम ठेवा । निभ्रमें चालवी भवभावा । तो हा प्रसंग विसावा । उमा श्रीराघवा संवादु ॥ १५७ ॥

अनुक्रमणिका

एका जनाईना शरण । अगाध [मु. 'रामाचे'.] रामें रामायण । विचित्र कथा निरोपण । ग्रंथीं भूषण श्रीरामु ॥ १५८ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां श्रीरामपार्वतीसंवादो नाम विंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग एकविसावा

## जटायु उद्धरण

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**उमा गेली महेशापासीं । रामलक्ष्मण वनवासी । निघाले सीता गवेषणासी । मार्गी** [मु. 'मार्गचिन्हांसीं'.] **मागासी पाहातची ॥ १ ॥**

ददर्श भूमौ निष्क्रांतं राक्षसस्य पदं महत् । स समीक्ष्य परिक्रांतं सीताया राक्षसस्य च ॥ १ ॥
संभ्रांतहृदयो रामः शशंस भ्रातरं प्रियम् । इह लक्ष्मण पश्य त्वं राक्षसस्य महत्पदम् ॥ २ ॥
मिथ्या मे तर्जितः शैलो न सीता गिरिगव्हरे । तदृष्ट्वा लक्ष्मणो भीतः पदं विकृतमद्भुतम् ॥ ३ ॥

**मार्गी माग पाहात जात । तंव राक्षसपद अत्यद्भुत । देखिलें लांब बारा हात । चतुर्हस्त रुंदाळ ॥ २ ॥**

**त्याचिपासीं सीतेचें पद । कुंकुमांकित पद्मबद्ध । देखोनि श्रीरामा आनंद । मार्गी माग शुद्ध लागला ॥ ३ ॥**

**लक्ष्मणा धांव धांव आतां । राक्षस घेऊनि जातो सीता । मार्ग वोळख तूं तत्वतां । झणें** [पैं. तु. खेरीज इतरत्र 'दुश्चित'.] **दुचिता होशील ॥ ४ ॥**

**राक्षसपद अतिविक्रांत । देखोनि लक्ष्मण विस्मित । सवेंचि जाला भयभीत । सीता भक्षार्थ न वधावी ॥ ५ ॥**

**मार्गी देखिला जो माग । त्याचा दोघीं धरूनि लाग । धांवणे धांवता सवेग । जटायु भग्नांग देखिला ॥ ६ ॥**

अथ पर्वतसंकाशं छिन्नपक्षं द्विजोत्तमम् । ददर्श पतितं भूमौ क्षतजार्द्रं जटायुषम् ॥ ४ ॥
तं दृष्ट्वा गिरीशृंगाभं रामो लक्ष्मणमब्रवीत् । अनेन सीता वैदेही भक्षिता नात्र संशयः ॥ ५ ॥

**जैसा कां महापर्वत । सेंदुरें न्हाणिला धगधगित । तैसा जटायु भासत । रक्तें आरक्त सर्वांग ॥ ७ ॥**

**त्यासी देखोनि रघुनाथ । सौमित्रासी स्वयें सांगत । सीता भक्षूनि प्राशिलें रक्त । दिसे आरक्त राक्षस ॥ ८ ॥**

**याचा करीन मी घात । बाण सज्जूनि रघुनाथ । कोपें चालिला कृतांत । सीता साह्यार्थ प्रतापी ॥ ९ ॥**

**माझी भक्षूनिया कांता । तूं कोण रे वनीं वसता । तुझ्या करीन मी घातां । होय गर्जता श्रीराम ॥ १० ॥**

**ऐकोनि श्रीरामाची वाणी । जटायु घायवट धरणीं । काय बोले दीनवचनीं । सावधानीं अवधारा ॥ ११ ॥**

स दीनो दीनया वाचा सफेनं रुधिरं वमन् । अभ्यभाषत पक्षीशो राम रामेति राघव ॥ ६ ॥
यामोषधीमिवायुष्मन्नन्वेषसि महावने । सा देवी मम च प्राणा रावणेनोभयं हृतम् ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

**ऐकोनि श्रीरामगर्जन । जटायु म्हणे मीं धन्य धन्य । करावया माझें दीनोद्धरण । वनाभिगमन श्रीरामा ॥ १२ ॥**

**सफेन रुधिर वमून । जटायु सांडीत होता प्राण । ऐकोनि श्रीरामवचन । जाला सावधान भावार्थी ॥ १३ ॥**

**श्रीराम जयराम जयजयराम । आवडी स्मरे श्रीरामनाम । माझा छेदावा देहभ्रम । अंतीं श्रीराम पावला ॥ १४ ॥**

**धन्य वृक्षवल्ली औषधी । राम विचरे ज्या सन्निधीं । ते पावन गा त्रिशुद्धी । कृपानिधी श्रीराम ॥ १५ ॥**

**ऐक श्रीरामा रघुपती । वनीं विचरा जीचे अर्थी । ते म्यां देखिली सीतासती । नेंली निश्चितीं रावणें ॥ १६ ॥**

**सीता मज पूज्य गुरुपत्नी । गुरुत्वें पढियंती प्राणाहूनी । तुम्हीं आश्रमीं नसतां कोणी । नेली चोरूनि रावणें ॥ १७ ॥**

त्वया विरहिता देवी लक्ष्मणेन च राघव । ह्रियमाणा मया दृष्टा रावणेच बलीयसा ॥ ८ ॥

**तुज गेलियां मृगापाठीं । लक्ष्मणे सांडिली पर्णकुटी । वेगें येऊनि रावण कपटी । सीता गोरटो तेणें हरिली ॥ १८ ॥**

**सीता बळेंचि हरिली रावणें । तुमचें न पवेचि धांवणे । आक्रंदत नेली तेणें । हें म्यां देखणें देखिलें ॥ १९ ॥**

**ऐसें** [पै. खेरीज इतरत्र ‘ऐकोनि’.] **देखोनि रघुनाथा । मज मानिसी नपुंसकता । सीते निमित्तें लंकानाथा । केलें तें आतां ऐक स्वामी ॥ २० ॥**

सीतामभ्यवपन्नोऽहं रावणश्च रणे प्रभो । विध्वंसितरथच्छत्रः पतितो धरणीतले ॥ ९ ॥
एतदस्य धनुर्भग्नमेते चास्य शरास्तथा । अयमस्य रणे राम भग्नः सांग्रामिको रथः ॥ १० ॥
अत्र युद्धं मया दत्तं रावणस्य पुनः पुनः । पक्षपातैर्नखैर्घोरैर्गात्राण्यारुह्य वैरिणः ॥ ११ ॥

**रावणें हरितां सीतेसी । मीं गेलों होतों वनक्रीडेसीं । सीता आक्रंदतां आक्रोशी । मी वेगेंसीं पावलों ॥ २१ ॥**

**घोर युद्ध केलें** [घा. इं. ‘रणीं’.] **रावणीं । पैल पाहे पां** [घा. ‘रक्तांकिंत’.] **युद्धधरणीं । रावणातें म्यां गांजूनी । छत्रभंगूनि पाडिलें ॥ २२ ॥**

**त्याचें जे कां धनुष्यबाण । नखांग्रें** [मु. दै. तं. मध्ये ‘म्या’ हे पद अधिक.] **केलें चूर्ण । रथीचे खर पिशाचवदन । तेही सप्राण निर्दळिले ॥ २३ ॥**

**युद्ध जालें कडकडाट । ध्वजु भंगिला अत्युद्भट । रथ सारथी करूनि पीठ । शिरीचा मुगुट पाडिला ॥ २४ ॥**

अनुक्रमणिका

युद्धीं भंगिला रावण । मजसीं न चले आंगवण । मजही ठकूनी जाण । सीता घेऊनि निघाला ॥ २५ ॥

राक्षस [दै. 'माया'.] मावां गुप्ततेसी । सीता घेऊनि कांखेसी । कळों नेदितां पशुपक्ष्यांसी । निघे आकाशीं अतिगुप्त ॥ २६ ॥

मजही हडबड जाली मोठी । हातीची नेली सीतागोरटी । काय श्रीरामा सांगों गोठी । लाजा पोटीं सलज्ज ॥ २७ ॥

मग पाहतां [कं. 'ऊर्ध्व'; तं. 'आतल्या'; मु. 'खुंटल्यां'.] खुतल्या दृष्टी । रावण सीता नभाचे पोटीं । देखोनि धांवलों उठाउठी । झडपे साठी सांडविली ॥ २८ ॥

वेगीं म्यां धांवोनि सत्वर । घायीं घायवट केला दशशिर । नखीं विदारितां शरीर । वाहे पूर रुधिराचा ॥ २९ ॥

मुखीं नखीं पांखीं झडपित । रावण केला [मु. 'अस्ताव्यस्त'.] खस्तावस्त । सीता सांडूनि त्वरित । पळे लंकानाथ अति धांके ॥ ३० ॥

पक्ष्यें सांडविली सीता । हे मज लाज लंकानाथा । युद्धा परतला मागुतां । सलज्ञता अभिमानें ॥ ३१ ॥

तो मज हाणे लाता । म्यां ते चुकविली [पै. खेरीज इतरत्र 'तळपतां'.] तळहातां । तेणें मज हाणिता मुष्टीघाता । अति झडपिता झडपिला ॥ ३२ ॥

उभय पांखाच्या अतिवातां । गगना उडविलें लंकानाथा । तेथूनि तळीं पडत पडतां । ने [मु. 'उडोनी मागुता झडपिला'.] मागुता झडपोनी ॥ ३३ ॥

ऐसा पक्षवातावर्त । त्यामाजीं नख मुखाचें आघात । रावण करूनि खस्तावस्त । रणीं मूर्च्छीत पाडिला ॥ ३४ ॥

देखोनि माझी आंगवण । रावण दांतीं धरी तृण येथूनि पुरें पुरें रण । दीन वदन अतिदुःखी ॥ ३५ ॥

पक्षी नांगवे रणांगणी । रावणा जाली मानहानी । मुख दावितां लाज जनीं । आला परतोनि युद्धासी ॥ ३६ ॥

मज छळावया पाही । रावण आली लवलाही । दोघे जुंझो उसिणा घाई । ते ही म्यां पाही मानिलें ॥ ३७ ॥

मज तुझी घालूनि आण । रावण पुसे माझें मरण । असत्य न वदे गेल्या प्राण । तुझी आण नुलंघी ॥ ३८ ॥

रावणाचें निजमरण ॥ म्यां ही पुसिलें आपण । मिथ्यावादी पापी पूर्ण । प्रतारोन बोलिला ॥ ३९ ॥

अनुक्रमणिका

तुझेनि भजनें सत्य सात्विकी । मृत्यु सांगितला दोही पांखीं ।
तो सांगे वामांगुष्ठनखीं । महापातकी अनृतवादी ॥ ४० ॥

खग खेचर अतिआवेशीं । दोघे मीनलों संग्रामासी ॥ लक्ष ठेऊनि वर्मापासीं । युद्ध आकांशी [कं. 'निर्धार'.] निराधार ॥ ४१ ॥

पांखी झडपूनि दशानन । वामांगुष्ठा केलें छेदन । तेणें न मरेचि रावण । कपटी पूर्ण अनृतवादी ॥ ४२ ॥

रावण बोलिला भावार्थ । ऐसा माझा मनोरथ । यालागीं करूनि पुरुषार्थ । अंगुष्ठ त्वरित छेदिला ॥ ४३ ॥

छेदितां वामांगुष्ठनख । हाततळीं आलें पांख । रावणें उपडिले देख । परम दुःख मज जालें ॥ ४४ ॥

उपडिले [मु. 'तेंणें' हें पद अधिक.] निजपांख । त्याचें मज नाहीं असुख । सीता नेतां मज प्रत्यक्ष । परम दुःख मज रामा ॥ ४५ ॥

इतुकी रावणा लावितां ख्याती । तूं न पवसीच रघुपती । यश नयेचि माझा हातीं । सीता सती तेणें नेली ॥ ४६ ॥

पांख छेदिल्याचे दुःख कोण । वेगीं न येसी तूं आपण । सीता घेऊनि गेला रावण । हें दुःख [मु. 'जाहले'.] दारुण मज रामा ॥ ४७ ॥

मजचि देखत देखतां । रडत रावणें नेली सीता । थोर दुःख हें रघुनाथा । किती आतां मी सांगो ॥ ४८ ॥

रामस्तस्य तु विज्ञाय सीतासक्तां प्रियां कथां । गृध्ररांज परिष्वज्य रुरोद सहलक्ष्मणः ॥ १२ ॥

ऐकोनि जटायूचें वचन । अत्यंत कृपां रघुनंदन । त्यासीं देतां आलिंगन । आलें रुदन श्रीरामा ॥ ४९ ॥

सखा बंधु पुत्र आप्त । घायीं पडल्या रणाआंत । तैसिया [मु. 'परी'.] प्रीतीं श्रीरघुनाथ । असे स्फुंदत कृपाळू ॥ ५० ॥

युद्धी गांजूनि रावण । सीता सांडविली जाण । जटायू मारिला छळून । दुःखे लक्ष्मण विलपतु ॥ ५ १ ॥

जरी [मु. 'हा'.] मी युद्धासमयीं येतां । रावण कैसेनि नेता सीता । माझा जटायू वांचता । अतिदुःखिता सौमित्रा ॥ ५ २ ॥

कोणी न सांगेचि धडफुडें । या लागीं हिंडो मागें पुढें । माग लागतां जरी निवाडें । येतो कैवाडैं धांवोनी ॥ ५३ ॥

देखोनि जटायूच्या घाता । लक्ष्मणासी परमव्यथा । सखा निमाला सर्वथा । दुःखावस्था विलपतु ॥ ५४ ॥

अनुक्रमणिका

जटायो यदि शक्नोषि वाक्यं व्याहरितुं पुनः । सीतामाख्याहि भद्रं ते वधमाख्याहि चात्मनः ॥ १३ ॥

**श्रीराम पुसे जटायूसी । जरी शक्ति असेल बोलावयासी । तरी सीताशुद्धी** [मु. 'ये वेळेसी'; तं. 'यथास्थिती'.] **इवलीसी । पुसेन तैसी मज सांग ॥ ५५ ॥**

**सीता हरूनिया रावण । कोणे दिशेसि केलें गमन । कोण त्याचें स्थान भुवन । हें संपूर्ण मज सांगा ॥ ५६ ॥** [ओवी ५६ सु. तं. प्रतींत नाही.]

**ऐसी रामें पुसतां गोठी । जटायूसि आनंद कोटी । धन्य धन्य आजि मीं सृष्टीं । श्रीराम दृष्टीं देखिला ॥ ५७ ॥**

**रावणें नेली सीता गोरटी । हे समूळ सांगावया गोठी । आत्मा धरिलासें कंठीं । तुझे चरण दृष्टीं देखावया ॥ ५८ ॥**

**मी पडिलों मूर्छापन्न । केउतें रावणें केलें गमन । नेणें त्याचें स्थान मान । सांगतां नयन लाविले ॥ ५९ ॥**

**सत्य जाण रघुनाथा । येथूनि न बोलवे आतां । तुझे चरणीं ठेऊनियां माथा । निज जीविता त्यागितों ॥ ६० ॥**

**सीता हरणाचें असुख । तसें मज नाहीं आत्यंतिक । जटायू मरणाचें दुःख । परमशोक सौमित्रा ॥ ६१ ॥**

**मदर्थी येणें वेचिंला प्राण । याचें होआवया उत्तीर्ण । जटायूसी आश्वासन । रघुनंदन अनुवादे ॥ ६२ ॥**

**कृपा उपजली रघुनाथा । नाभी म्हणोनि होय बोलता । तुज मी वांचवीन आतां । झणें जिविता** [तं. खेरीज इतरत्र 'कां' हें पद नाही.] **कां सांडिसी ॥ ६३ ॥**

**तुझे निवारूनि दुःख । तुज मी देईन दोन्ही पांख । वांचवीन वर्षे असंख्य । मरणोन्मुख कां होसी ॥ ६४ ॥**

**आम्ही तुम्ही तिघेजण । शोधूनि मारूं वैरी रावण । तूं युद्धां साहाकारी संपूर्ण । झणें प्राण** [तं. खेरीज इतरत्र 'कां' हें पद नाही.] **कां सांडिसी ॥ ६५ ॥**

**स्वर्गीं नमूचीच्या युद्धार्था साह्य जालासी दशरथा । आतां साह्य होई रघुनाथा । लंकानाथा वधावया ॥ ६६ ॥**

**ऐकोनि श्रीराम वचन । जटायु झाला हास्यवदन । वांचविसी हें नवल कोण । तूं सृष्टा संपूर्ण सृष्टीचा ॥ ६७ ॥**

**तुझिया संकल्पाआंत । जगासि उत्पत्ति स्थिती अंत ।**
**ब्रह्मा विष्णु शिव आज्ञा वंदित । ऐसा तूं समर्थ श्रीरामा ॥ ६८ ॥**

**तुज मारितां रावण । निमिषार्द्ध न लगे जाण । तेथ मी मशक साह्य कोण । विज्ञापन अवधारी ॥ ६९ ॥**

अनुक्रमणिका

मज आयुष्य आकल्प पूर्ण । परी हेंचि नित्य चिंतन । ठाकूनिया श्रीरामचरण । जन्ममरण छेंदावें ॥ ७० ॥

श्रीराम भेटावा [दै. 'आर्तगती'.] अंतगती । योगी संन्यासी चिंतीती । तो तूं भेटलासि कृपामूर्ती । देहलोभ चित्तीं मज नाहीं ॥ ७१ ॥

ऐकें श्रीरामा सावधान । आतांच्या ऐसें मज मरण । पुढें सर्वथा न लभे जाण । तेंहि लक्षण अवधारी ॥ ७२ ॥

वाचेसी श्रीरामनामस्मरण । दृष्टीस श्रीरामदर्शन । हृदयीं श्रीरामध्यान । ऐसें मरण मग कैंचें ॥ ७३ ॥

अंतीं तुझें नामस्मरतां । चारी मुक्ती देसी भक्तां । तूं पूर्णब्रह्म भेटला असतां । देहलोभता मज [मु. 'नाही'.] नेदी ॥ ७४ ॥

माझ्या पूर्वभाग्यकोटी । राम परब्रह्म [मु. 'देखिला दृष्टी'.] भेटलें भेटी । माझा देह लोभ निवटी । [मु. 'कृपादृष्टी'.] ब्रह्मात्मदृष्टीं मज पाहे ॥ ७५ ॥

रावणें केलें पक्ष छेदन । छेदिला उभय पक्षाभिमान । तेणें तुष्टला रघुनंदन । वांचलेंपण पुरे रामा ॥ ७६ ॥

माझ्या भाग्याचेनि [कं. 'गती'.] जगतीं । श्रीराम पावला कृपामूर्ती । आतां नको देहसंगती । रघुपती कृपाळुवा ॥ ७७ ॥

म्हणोनि धरिले दोन्ही चरण । माझे निवारी जन्ममरण । ऐकोनि जटायूवचन । रघुनंदन तुष्टला ॥ ७८ ॥

या च भूमिप्रदातृणामाहिताग्नेश्च या गतिः । गोहिरण्यप्रदातृणां या गति। शरणार्थिनाम् ॥ १४ ॥

श्रीरामकाज लक्षून । सीतार्थी वेंचिला प्राण । त्यासी श्रीराम संतोषोन । गती संपूर्ण स्वयें देतु ॥ ७९ ॥

सोमयाग [मु. 'श्येनयाग'.] चयनयाग । अश्वमेधादि नानायाग । अग्निहोत्र्यांची गती सांग । जटायु योग्य न मनी राम ॥ ८० ॥

गोदान भूदान तिळदान । हिरण्यादि नानादान । जटायू अर्थी ते [मु. 'न्यून'.] गतिगौण । रघुनंदन स्वयें मानी ॥ ८१ ॥

शरण्यार्थ्यांची शरण्यगती । धर्मशीलांची धर्मगती । अपुनरावृत्तियांची गती । तेही रघुपती गौण मानी ॥ ८२ ॥

संन्याशा ब्रह्मसदनप्राप्ती । योग्यांची योगयुक्त गती । जटायू निजप्राप्त्यर्थी । गौण रघुपती स्वयें मानी ॥ ८३ ॥

या अवधिया गतीवरती । उत्तमोत्तम उत्तमस्थिती । परात्पर परमगती । ममाज्ञा शक्तीं जाय वेंगी ॥ ८४ ॥

अनुक्रमणिका

तुझे आज्ञेची निजशक्ती । तुझी आहे तुजप्रती । म्यां तेथ जावे कैशा रीतीं । विकल्प चित्तीं धरूं नको ॥ ८५ ॥

योगयाग धर्मस्थिती । धार्मिक जे जे गति पावती । ते भोग क्षयें क्षया जाती । पुनरावृत्ति सर्वांसी ॥ ८६ ॥

माझ्या दर्शनाचें पुण्य । कल्पगेलिया नव्हें क्षीण । तूं पावसी शाश्वत स्थान । सत्यवचन हें माझें ॥ ८७ ॥

जटायु ऐक सावधान । जैसे बोलती साधारण । तैसें नव्हे माझें वचन । त्वरित गमन तूं करी ॥ ८८ ॥

ऐसें बोलतां श्रीरामचंद्र । वैकुंठवासी चतुर्भुज नर । पीतांबरधारी शंखचक्र । आलें सत्वर विमान ॥ ८९ ॥

विमानस्थ चतुर्भुज नर । ठेऊनिया शंखचक्र । साष्टांगी वंदिला श्रीरामचंद्र । जोडूनि कर उभे ठेले ॥ ९० ॥

श्रीराम म्हणे त्या पुरुषांसी । जटायु माझा [पै. खेरीज इतरत्र 'पुण्यराशी'.] तपोराशी । यांसी न्यावे वैकुंठासी । अक्षयवासी स्थापावा ॥ ९१ ॥

विमान देखतांचि पाहीं । जटायू जाला दिव्यदेही । लागला श्रीरामाच्या पायीं । म्हणे मी कायी वदों आतां ॥ ९२ ॥

तुझें करितां स्तवन । वेदशास्त्रां पडिलें मौन । तेथ मीं पक्षी अतिदीन । गुणवर्णन कायी वदों ॥ ९३ ॥

कांहीं न बोलणे हेंचि स्तवन । कांहीं न करणें हेंचि भजन । कांहीं न होणें प्राप्ती पूर्ण । पूर्णें परिपूर्ण श्रीराम ॥ ९४ ॥

त्रिवार करूनि प्रदक्षिणा । लागोनि श्रीरामाच्या चरणां । जटायु आरुढे विमाना । वैकुंठभुवना जावया ॥ ९५ ॥

वैकुंठ निवासिया पुरुषांसी । स्वामित्व आहे श्रीरामासी । जटायु विस्मित मानसीं । निघे उल्हासेंसि वैकुंठा ॥ ९६ ॥

पुढत पुढती प्रदक्षिणा । पुढत पुढती लागे चरणा । आरुढोनिया विमाना । वैकुंठभुवना निघाला ॥ ९७ ॥

> तात त्वं निजतेजसैव गमितः स्वर्गं व्रज स्वस्ति ते । ब्रूमस्त्वेकमिमां वधूहृतकथां तातांतिके मा कृथाः ॥ १५ ॥
> रामोऽहं यदि तद्दिनैः कतिपयैर्बीजानि सत्कंधरा । सार्धं बंधुजनेन सेंद्रविजयी वक्ता स्वयं रावणः ॥ १६ ॥

निज तेजें विराजमान । तेजें देदीप्य विमान । [मु. 'क्षणें'.] क्षेमें पावसी वैकुंठभुवन । कृतकल्याण जटायु ॥ ९८ ॥

अनुक्रमणिका

श्रीरामें जटायु पुनीत । वैकुंठा धाडी श्रीरघुनाथ । अगाध कथा वैकुंठांत । होईल विख्यात तिहीं लोकीं ॥ ९९ ॥

तुज भेटेल माझा पिता । माझी पुसेल [सु. इं. ‘भुवनवार्ता’.] वनवार्ता । रावणें हरून नेली सीता । हें सर्वथा सांगो नको ॥ १०० ॥

रामें उद्धरिले जटायूसी । परम आल्हाद दशरथासी । सीता हारविली वनवासीं । ऐकतां त्यासी अतिदुःख ॥ १०१ ॥

जन्मोनिया सूर्यवंशी । सीता हारविली वनवासी । लाज लाविली पूर्वजांशी । अति आवेशीं क्षोभेल ॥ १०२ ॥

वधावया लंकानाथ । येथ येईल दशरथ । येवढा होईल अनर्थ । सीताहरणार्थ नको सांगों ॥ १०३ ॥

जटायु म्हणे रघुनाथा । भली हें सांगीतली व्यवस्था । येऱ्हवीं मी सांगतों दशरथा । या गुह्यार्था न कळोनी ॥ १०४ ॥

एवढें चरित्रकथन । कैसेनि पित्यासी होईल ज्ञान । मागुनी येऊनि रांवण । स्वमुखें आपण सांगेल ॥ १०५ ॥

त्याचें ही मी करीन उद्धरण । तोचि येऊनि आपण । सांगेल सीतेचें हरण । कुळनिर्दळण प्रसंगे ॥ १०६ ॥

सपुत्र सबंधु सप्रधान । ससैन्येसीं दशानन । रामें वधिला विंधोनि बाण । सीताहरण करितांची ॥ १०७ ॥

ऐसी ऐकतांचि वार्ता । सुख होईल दशरथा । आनंद पूर्वजां समस्तां । माझ्या पुरुषार्था देखोनी ॥ १०८ ॥

श्रीरामज्ञान विज्ञानघन । ब्रह्मलिखित तुझें वचन । जटायु घालूनि लोटांगण । केलें गमन वैकुंठा ॥ १०९ ॥

एका जनार्दना शरण । जाहलें जटायु उद्धरण । पुढें निर्दळावया रावण । रघुनंदन चालिला ॥ ११० ॥ [ही ओवी पै. तु. कं. दै. तं. प्रतींत नाही. ओवी ११० मु. प्रतीत अशी आहे :— ‘श्रीरामस्वये ब्रह्मपूर्ण । जटायू भक्त संपूर्ण । करोनी पितर सनातन । जटायू सुखसंपन्न पै केला ॥’]

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां जटायूउद्धरणं नाम एकविंशतितम्प्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग बाविसावा

## कबंध उद्धरण

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**करुनि जटायू उद्धरण । श्रीराम आणि लक्ष्मण । करावया सीतेचें अन्वेषण । वनोपवन शोधित ॥ १ ॥**

**वनें शोधिंता लक्ष्मण । देखता होय अपशकुन । तेणें भयें कंपायमान । सांगे आपण श्रीरामा ॥ २ ॥**

> लक्ष्मणस्तं महातेजाः सत्यवांश्छीलवाञ्छुचिः । अब्रवीत्प्रांजलिर्वाक्यं भ्रातरं दीनचेतसम् ॥ १ ॥
> स्पंदते मे हृंद वाहुरुद्विग्नमिव मे मनः । प्रायशश्चाप्यनिष्टानि निमित्तान्युपलक्षये ॥ २ ॥
> तस्मात्सज्ञो भवार्य त्वं कुरुष्व वचनं मम । ममैव हि निमित्तानि सद्यःशंसन्ति संभ्रमम् ॥ ३ ॥

**सौमित्र तेजस्वी महावीर । परनारी सहोदर । सत्यवादि अति पवित्र । नित्य एकाग्र रामभजनीं ॥ ३ ॥**

**त्यागूनियां धनसन्मान । रामा त्यजूनि श्रीरामभजन । ऐसा सौमित्र पावन । अशुभ चिन्ह अनुवादे ॥ ४ ॥**

**सव्यें जाताति पै** [तं. दै कं. 'तास'; मु. 'चाप'.] **चास । कुशब्द वदती वायस ।** [कं. 'दिग्गजें'.] **दिग्दाहें कोंदले आकाश । दिसे संत्रास पशुपक्ष्यां ॥ ५ ॥**

**ऐसें देखोनिया चिन्ह । दोघे जाले सावधान । पुढें करितां गमन । दुर्धर विघ्न वोढवलें ॥ ६ ॥**

> वनस्य तस्य शब्दोऽभूद्वनमापूरयन्निव । तं शब्दं कांक्षमाणस्तु रामः खड्गी सहानुजः ॥ ४ ॥

**श्रीराम लक्ष्मणा सन्मुख । वनीं वाजली महा हांक । दुमदुमिले लोकालोक । वनीं वनौक गजबजिले ॥ ७ ॥**

**श्वापदें आरडती वोरडती । एकें** [मु. 'दीर्घ स्वरें'.] **ऊर्ध्वमुखें रडती । एकें मूर्छितें पडतीं । वृक्ष उपडती समूळीं ॥ ८ ॥**

**ऐसें देखोनि दोघेजण । धनुषीं सज्जूनियां बाण । वनींचे निर्दळावया विघ्न । सावधान चालिले ॥ ९ ॥**

**शुद्ध करावया दण्डकारण्य । माझी प्रतिज्ञा संपूर्ण । आधीं निरसूनि येथीचें विघ्न । मग गमन पुढें करूं ॥ १० ॥**

**ऐसें बोलोनि रघुनाथ । विघ्न निरसावया चालिला तेथ । तंव राक्षस अत्यद्भुत । त्या वनांत देखिला ॥ ११ ॥**

> ददर्श सुमहाकायं राक्षसं घोरदर्शनम् । विवृद्धमशिरोग्रीवं कबंधमुदरे मुखम् ॥ ५ ॥
> घोरौ भुजौ विकुर्वाणमुभौ योजनमायतौ । आकर्षतं विकर्षंतमनेकान्मृगयूथपान् ॥ ६ ॥

अनुक्रमणिका

भक्षयंतं महाघोरानृक्षसिंहमृगद्विजान्।

**सकंठ मस्तकी नाहीं शिर । आकाश प्राय दीर्घ शरीर । उदरोदरीं मुख क्रूर । दाढा अत्युग्र कराळा ॥ १२ ॥**

**धगधगीत दोन्ही नयन । अति** [मु. 'क्रोधी'.] **आरक्त अति निमग्न । तळवटीं भग्न चरण । बैसले स्थानासी सांडीना ॥ १३ ॥**

**अति सलंब दोन्ही दात । एक एक बाहू योजनायत । हात दशदिशा भंवत । कवळूनि खात पशुपक्ष्यां ॥ १४ ॥**

**मत्त मातंगाचे कळप । मुखामाजीं** [मु. 'होती गडप'.] **गरडगप । सिंह व्याघ्र अस्वलें अमूप । मुखीं निक्षेप दोहीं हातीं ॥ १५ ॥**

**पक्षी उडतां योजनायत । धरुनि घाली मुखाआंत । पशू गांव गांव भंवत । कवळूनि समस्त मुखीं घाली ॥ १६ ॥**

**गांव गांव उंच हात । अखंड गगनाआंत भंवत । प्राणी त्यातें न देखत । धरुनि मुखाआंत स्वयें घाली ॥ १७ ॥** [ओवी १७ तु. प्रतीत नाही.]

**कबंधें दिसे जैसा पर्वत । गुप्तकर भंवती गगना आंत । प्राण्यांचे लक्ष नाहीं तेथ । धरुनि समस्त मुखीं घाली ॥ १८ ॥** [ओवी १८ तं. प्रतीत नाही.]

**मारावया श्रीराम लक्ष्मण । रावणें धाडिले आठजण । राक्षस महाबळी दारुण ।** [मु. 'दोघांसी धरुनी'.] **दोघे सिंतरून मारावया ॥ १९ ॥**

**पुढिलें अतिगूढ विपिनीं । वाट धरुनि मारावया दोन्ही । आठही रिघतां** [तं. 'कबंध वदनी'.] **कबंधवनीं । तेणें धरुनि भक्षिले ॥ २० ॥**

**कबंधे धरुनि आठही जण । स्वेच्छा केलें त्यांचे भक्षण । पुढें धरावया रामलक्ष्मण । लक्ष लाऊन राहिलासे ॥ २१ ॥**

**शिरचरणरहित मध्य । यालागीं नांवें तो कबंध । देखोनि रामलक्ष्मणा सन्नद्ध । धरावया सिद्ध जो जाला ॥ २२ ॥**

कबंधेनातिकायेन समूढौ दीर्घबाहुना । भ्रातरौ वैरिणा प्राप्तौ कृशप्राणौ महाबलौ ॥ ७ ॥
वदतं कार्यमिह वां किमर्थं चागतौ युवाम् । इमं देशमनुप्राप्तौ क्षुधार्तस्येह तिष्ठतः ॥ ८ ॥

**श्रीराम लक्ष्मण लक्षूनी । कबंधें दीर्घबाहु पसरोनी । दोहीं हातीं धरिले दोन्ही । आंवरुनि निजबळें ॥ २३ ॥**

अनुक्रमणिका

त्यांचे करावया भक्षण । कबंध ओढी दोघेजण । राम ओढेना अणुप्रमाण । देखोनि आपण शंकला ॥ २४ ॥

मज कबंधाचेनि निजशक्ति । दोघे मनुष्यें न ओढती । यांचा ठाई [कं. मु. 'शक्ति'.] दुर्धरगती । यांची कुळवृत्ति पुसो पां ॥ २५ ॥

तुम्ही कोणाचे पैं कोण । येथ यावया काय कारण । या ठायां जे आले जाण । मुख्य भक्षण ते माझे ॥ २६ ॥

श्रीरामासी म्हणे लक्ष्मण । राक्षसें लाविलें दृढ बंधन । बळें सुटका नव्हे जाण । काय आपण करावें ॥ २७ ॥

राम म्हणे लागल्या दृढबंधन । आपल्या सोडवावें आपण । दुजयाची आस करी जो कोण । हीन दीन नपुंसक ॥ २८ ॥

सौमित्रा ऐक सावचित्त । याचा पुसो दे वृत्तांत । मग याचा करितां घाल । न लगे तेथ क्षण मात्र ॥ २९ ॥

कबंध म्हणे न सांगा वृत्त । तरी मी तुमचा करीन घात । हांसोनिया श्रीरघुनाथ । निजवृत्तांत सांगतु ॥ ३० ॥

मी दशरथी श्रीराम जाण । रावणें केलें सीताहरण । तिचें करावया गवेषण । दोघे जण येथ आलों ॥ ३१ ॥

दीर्घ बाहू [दे. खेरीज इतरत्र 'निमग्न'.] निम्नवदन । विक्राळरूप कैंचा कोण । मार्ग रोधावया काय कारण । निज लक्षण मज सांग ॥ ३२ ॥

हेंचि माझें निजवृत्त । [मु. 'तूं म्हणसील'.] तुम्हांसि भक्षावें म्यां येथ । बाहुबळें आकर्षित । दोघे मुखांत घालावया ॥ ३३ ॥

कबंध अति क्रोधानळीं । दोघांतें ओढी सबळबळीं । बाहू उखळों पाहाती मुळीं । बंधूंची जाळी ओढेना ॥ ३४ ॥

लक्ष्मण म्हणे श्रीरघुनाथा । हा तंव पेटला निघांता । यासीं वधावें शीघ्रता । विलंब आतां करूं नये ॥ ३५ ॥

श्रीराम सांगे जी आपण । यासी तंव नाहीं चरण । बाहुबळें सबळ पूर्ण । त्या आपण छेदाव्या ॥ ३६ ॥

आम्हा दोघां धरूनि येथ । याचे यानें गोविले दोन्ही हात । याच्या भुजा छेदूं येथ । सावचित्त निजखर्गें ॥ ३७ ॥

> दक्षिणों दक्षिण बाहुमासक्तमसिना ततः । चिच्छेद रामो वेगेन सव्यं वीरस्तु लक्ष्मणः ॥ ९ ॥
> स पपात महाबाहुश्छिन्नबाहुर्महास्वनः । खं च गां च दिशश्चैव नादयन् जलदो यथा ॥ १० ॥
> स निकृतौ भुजौ दृष्ट्वा शोणितोघपरिप्लुतः । दीनः पप्रच्छ तौ वीरौ कौ युवामिती दानवः ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

**खड्ग काढूनि सावचित । रामें छेदिला दक्षिण हस्त । लक्ष्मणें त्याचि क्षणाआंत । वाम हस्त छेदिला ॥ ३८ ॥**

**भुजा छेदिल्या महाथोर । वाहती रुधिराचे पूर । राक्षस आक्रदें अतिघोर । चराचर दुमदुमिलें ॥ ३९ ॥**

**नाद कोंदला अंतराळीं । नाद कोंदला सप्त पाताळीं । नादें** [मु. 'पक्षीश्वापदे आंदोळी'.] **पशुपक्ष्यां रवंदळी । बैसली टाळी दिग्गजां ॥ ४० ॥**

**घायें राक्षस कंपायमान । तुम्ही काय दोघेहि रामलक्ष्मण । केलें माझ्या भुजांचे छेदन । आनासी जाण न तूटती ॥**

**अतर्क्य माझ्या भुजा जाण । लक्षू जाणे रामलक्ष्मण । आणिकां न करवे छेदन । मूर्छापन्न देखोनी ॥ ४२ ॥**

**आणिकां माझी न कळे गोठी । आणिकीं मज देखतां दृष्टीं । मूर्छापन्न पडती सृष्टीं । ते उठाउठी मी भक्षी ॥ ४३ ॥**

**माझ्या भुजांचें बळ संपूर्ण । ओढितां न ओढा दोघेंजण । बळें बाहूंचे केले छेदन । रामलक्ष्मण तुम्ही दोघे ॥ ४४ ॥**

**तुमचा घावो लागतां देख । दुःख नाशोनि वाटलें सुख । राम सौमित्र तुम्ही आवश्यक । अलौकिक निजशक्ती ॥**

**ऐकोनि राक्षस वचन । सौमित्र सांगे जी आपण । आम्ही दोघे रामलक्ष्मण । सीता गवेषणा करूं आलों ॥ ४६ ॥**

त्वं तु को वा किमर्थं वा कबंधसदृशो वने । आस्येनोरसि दीप्तेन भग्नजंघो विचेष्टसे ॥ १२ ॥

**लक्ष्मण पुसे राक्षसासी । तूं कोण येथें वनवासी । शिरचरणेंविण कबंधतेसी । येथ वसावयासी काय काज ॥ ४७ ॥**

**कोथळ** [मु. 'प्रचंड'.] **प्राय चरणेंविण । येथ कैसैनि आगमन । उदरीं दिसे क्रूर वदन । दीर्घदशन विक्राळ ॥ ४८ ॥**

**येथ तुझ्या मुखा हातीं । पशु पक्षियां जाली शांती । कवळूनि खसी दोहीं हातीं । अति** [दे. 'भक्षार्थी'] **क्षुधार्थी तूं कोण ॥ ४९ ॥**

एवमुक्तः कबंधस्तु लक्ष्मणेनोत्तरं वचः । उवाच वचनं प्रीतस्तदिदं वचनं स्मरन् ॥ १३ ॥
श्रिया विराजितं पुत्रं दनोस्त्वं विद्धि लक्ष्मण । रूपमासीन्ममाचिन्त्यं त्रिषु लोकेषु विश्रुतम् ।
सोऽहं रूपमिदं कृत्वा लोकवित्रासनं महत् ॥ १४ ॥

अनुक्रमणिका

**ऐकोनि लक्ष्मणाचें वचन । राक्षस स्वयें संतोषोन । आपलें पूर्व विधान । स्वयें सावधान सांगतु ॥ ५० ॥**

**कश्यपाची प्रिय पत्नी । दिती अदिती आणि दनी । जे कां रूपें श्रियेसमानी । ते माझी जननी श्रीरामा ॥ ५१ ॥**

**दनीचा पुत्र मी प्रिय पूर्ण । यालागीं मातें म्हणती दन । रूपें मदनमोहन । बळें संपूर्ण बळवंत ॥ ५२ ॥**

**रूप यौवन संपत्ती । आंगीच्या बळाचे उद्धती । नाना वदन** [मु. 'विकट'.] **विकारवृत्ती । ऋषींसि वनांतीं भेडसावी ॥ ५३ ॥**

ततः स्थूलशिरानाम महर्षिः कोपितो मया । स चिन्वन्विविधं वन्यं रुपेणानेन धर्षितः ॥ १५ ॥
तेनाहमुक्तः प्रेक्ष्यैवं घोरशापाभिधायिना । एतदेवं नृशसं ते रूपमस्तु विगर्हितम् ॥ १६ ॥
स मया याचितः क्रुद्धः शापस्यांतो भवेदिति । यदा छित्वा भुजौ रामस्त्वां दहेद्विजने वने ॥ १७ ॥
तदा त्वं प्राप्स्यसे रूपं स्वमेव विपुलं शुभम् ॥ १८ ॥

**स्थूळ शिरा महाऋषी । वनीं वेचितां वनफळांसी । अधोमुखें भेडसावितां त्यासी । तेणें क्रोधावेशीं शापिलें ॥ ५४ ॥**

**विक्राळ मुख योजन कर । चरण रहित स्थूळ शरीर । शरीरा माजीं निमग्न शिर । होसी अघोर राक्षस ॥ ५५ ॥**

**त्याचे धरूनियां चरण । उःशाप मागितला आपण । करीत सीता गवेषण । राम लक्ष्मण वना येती ॥ ५६ ॥**

**त्यासी तूं धरिसी भक्षावयार्थी । ते दोघे दोन्ही बाहू छेदिती ।**
**तेंव्हा तूं पावसी उद्धारगती । ऐसी वरदोक्ति ऋषि वदला ॥ ५७ ॥**

**आणीक एकी माझी उद्धती । तें मी सांगेन तुम्हांप्रती । मज तुष्टला प्रजापती । तपानुवृत्तीं तोषोनी ॥ ५८ ॥**

अहं हि तपसोग्रेण पितामहतोषयम् । दीर्घमायुः स मे प्रादात्ततो मां विभ्रमोऽस्पृशत् ॥ १९ ॥
दीर्घमायुर्मया प्राप्तं किं मां शक्रः करिष्यति । इत्येवं बुद्धिमादाय रणे शक्रमधर्षयम् ॥ २० ॥
तस्य वाहु प्रमुक्तेन वज्रेण शतपर्वणा । सक्थनी च शिरश्चैव शरीरे संप्रवेशितम् ॥ २१ ॥

**तपें प्रसन्न केला विधाता । ब्रह्मशाप निवारी म्हणतां । द्विजशापीं नचले समर्थता । म्हणे नान्यथा ऋषिभाषित ॥ ५९ ॥**

**निवारवेना ब्रह्मशापासी । म्यां मागितलें दीर्घ आयुष्यासी ।**
**ब्रह्ययानें देऊनिया त्या वरासीं । अदृष्टतेसी तो गेला ॥ ६० ॥**

अनुक्रमणिका

**होआवेया ब्रह्मशाप प्राप्ती । गर्व वाढला माझां चित्तीं । मी तंव चिरंजीव त्रिजगतीं । इंद्र किती मज पुढें ॥ ६१ ॥**

**ऐसिया गर्वाचें उद्धती । घ्यावया त्याची** [कं. सु. इं. 'सर्व'.] **स्वर्ग संपत्ती । जाली** [मु. 'इंद्रपदाची प्राप्ती'.] **इंद्रेसी युद्धप्राप्ती । शचीपती कोपला ॥ ६२ ॥**

**मज आयुष्य आहे संपूर्ण । इंद्र मारावया मशक कोण । येणेंचि अतिगर्वे जाण । युद्ध दारुण म्यां केलें ॥ ६३ ॥**

**तीक्ष्ण वज्र** [मु. 'शतधारा'] **शरधारा । घायें हाणीतलों पुरा । शरीरीं निमग्न केलें शिरा । चरण धारा गिळियेलें ॥ ६४ ॥**

**घायें दुःखी जालों अत्यंत । इंद्रासि म्हणे मी करीन घात । तो म्हणे तूं चिरंजीवित । जीविता** [पै. तं. खेरीज इतरत्र 'अंत'.] **घात घडेना ॥ ६५ ॥**

**ऐसें बोलतां सुरपती । मज आली ब्रह्मशाप प्राप्ती । क्षणामाजीं पडली भ्रांती । अति उन्मत राक्षसु ॥ ६६ ॥**

**उदरोदरीं दिधलें मुख । अति त्रिक्राळ आणि** [मु. 'विकट'.] **विटंक । दोन्ही हात योजन एक एक । अगाध भूक अनिवार ॥ ६७ ॥**

**जें जें सांपडे हातांआंत । पशुपक्षी प्राणी नित्य भक्षित । तरी क्षुधेसी नव्हे अंत । समसमित अति दुःखी ॥ ६८ ॥**

**नवल कैसें रघुनाथा । काय खावों हेचि चिंता । आणीक नाठवे सर्वथा । उदरावस्था अति दुःखी ॥ ६९ ॥**

**पोटाचिये चिंते हातीं । जगासी पडली अति भ्रांती । हृदयीचा नाठवे रघुपती । दुःखावर्ती उदरार्थ ॥ ७० ॥**

**वेदशास्त्रें अति संपन्न । स्वयें म्हणवी अति सज्ञान ।** [मु. 'तरी'.] **तेही शिश्नोदर परायण । इतर जन ते मशक ॥ ७१ ॥**

**असो इतरांची** [मु. 'काय' हे पद अधिक.] **कथा । माझी जे कां दुःखावस्था । सावध ऐके रघुनाथा । मोक्षदाता तूं माझा ॥ ७२ ॥**

> ममाप्यनेन रूपेण निर्वेदः सुमहान्प्रभो । मृत्पिंडभूत एकस्थो जीवलोकविगर्हितः ॥ २२ ॥
> दीर्घौ चेमौ निकृत्तौ मे युवाभ्यामयतौ भुजौ । राघवौ यन्मया दृष्टौ नास्ति धन्यतरो मया ॥ २३ ॥
> सत्यसंधौ तथा वीरौ धार्मिकौ सत्यविक्रमौ । सहितौ भ्रातरौ दृष्ट्वा मुक्तोऽहं पापजीवितात् ॥ २४ ॥

**या देहाचिये संगतीं । अति दुःखी गा रघुपती । मृत्पिंड प्राय नाहीं गती ।** [सु. 'नित्य'.] **निंद्य सर्वार्थी सर्वस्वें ॥ ७३ ॥**

अनुक्रमणिका

**नाहीं यासी गमन गती । नाहीं अंतरी शुद्धमती । बाह्य क्रिया जीवघाती । निंद्य सर्वार्थी सर्वस्वें ॥ ७४ ॥**

**मारुनि खावें जीवमात्र । न म्हणे ब्राह्मण क्षत्री** [पै. दै. खेरीज इतरत्र 'वैश्य' पद नाही.] **वैश्य शूद्र । ऐसा राक्षस मी अपवित्र । दुःखें दुर्धर अति दुःखी ॥ ७५ ॥**

**शाप भाग्यास्तव जाण । तुम्ही आलेति दोघेजण । नव्हे हें सीता गवेषण । माझें उद्धरण करूं आलेती ॥ ७६ ॥**

**करिता मद्बाहू छेदन ॥ छेदिला माझा देहाभिमान । घायें केलें सावधान । सुख संपन्न श्रीराम ॥ ७७ ॥**

**सत्व तुमचेनि सात्विक । धर्म तुमचेनि धार्मिक । विवेक तुमचेनि सविवेक । धृति धारक तुमचेनी ॥ ७८ ॥**

**ऐसे तुम्ही धीर वीर । सत्व स्वरुप महाशूर । निज धर्माचें माहियेर । चिदचिन्मात्र तुम्ही दोघे ॥ ७९ ॥** [ओवी ७९ पै. तु. दै. तं. प्रतींत आहे; कं. प्रतीत नाही. या जागी घा. सु. इं. प्रतींत पुढील ओवी आहे :— 'तुम्ही दोघे पूर्ण पुरुष । सत्व निष्ठ सद्विवेक । तुमचे चरण सुखदायक । सदा सात्विक तुमचेनी ॥']

**तुम्हांसि देखतांचि दृष्टीं । निमाल्या अविद्या पापकोटी । सुख स्वरूपीं जाहाली भेटी । कृपाळू सृष्टी श्रीराम ॥ ८० ॥**

**तुम्ही दोघे अलौकिक ।** [मु. 'तुमच्या चरणा वोळंगता देख'.] **तुमचा घावो लागतांचि देख । दुःख छेदूनि दिधलें सुख । परम पुरुष तुम्ही दोघे ॥ ८१ ॥**

**पापकारी अति निंदित । राक्षस योनी अधःपात । त्या मज केलें नित्यमुक्त ।** [कं. 'ब्रह्मशुद्ध'.] **ब्रह्मभूत तुम्ही दोघे ॥ ८२ ॥**

**ऐसें बोलोनि आपण । कबंध घाली लोटांगण । माझें केलिया देहदहन । सांगेन संपूर्ण सीता शुद्धी ॥ ८३ ॥**
[तु. तं. दै. कं. घा. सु. इं. प्रतींत ओवी ८३ वर पुढील ओवी आहे :— 'सीता शुद्धि मी सांगेन । हें रामें ऐकोनि वचन । त्यासी स्वयें पुसे आपण । अति सावधान शुद्धयर्थी ॥']

स त्वं सीतां समाचक्ष्व येन वा यत्र वा हृता । कुरु कल्याणमत्यर्थं यदि जानासि तत्त्वतः ॥ २५ ॥

**श्रीराम पुसे कबंधासी । सीताशुद्धि सांगेन म्हणसी । कोणें नेलें कोणा स्थानासी । कोणे देशी तें सांग ॥ ८४ ॥**

**बुद्धि करूनि सावधान । स्वस्थ करूनि निजमन । सीतेचें केउतें गमन । स्थान मान मज सांग ॥ ८५ ॥**

एवमुक्तस्तु रामेण वाक्यं दनुरनुत्तमम् । इदं जगाद वचनं लक्ष्मणस्य च पश्यतः ॥ २६ ॥
रावणेन हृता सीता रामपत्नी यशस्विनी । नाममात्रं तु जानामि न रूपं तस्य रक्षसः ॥ २७ ॥
निवासं वा प्रभावं वा वयं तस्य न विद्महे । दिव्यमस्ति न मे ज्ञानं नाभिजानामि मैथिलीम् ॥ २८ ॥

**ऐकोनि श्रीराम वचन । कबंध सांगे जी आपण । जैसें मज आहे ज्ञान । तें सावधान अवधारी ॥ ८६ ॥**

अनुक्रमणिका

**लक्ष्मणासी उभे करून । कबंध सांगे गर्जोन । श्रीरामाची धर्मपत्नी जाण । गेला घेऊन रावण ॥ ८७ ॥**

**त्याचें नांव म्यां ऐकिलें कानीं । परी तो देखिला नाहीं नयनीं । तो केउता गेला गगनीं । कोणे स्थानीं मी नेणें ॥ ८८ ॥**

**त्याचा आवासनिवास । कोणें ठायीं रहिवास । जनवास कीं वनवास । तें मी निःशेष जाणेना ॥ ८९ ॥**

> विज्ञानं तु परिभ्रष्टं शापदोषेण राघव । स्वकृतेन मया प्राप्तं रूपं लोकविगर्हितम् ॥ २९ ॥
> किं तु यावन्न यात्यस्तं सविता श्रांतवाहनः । तावन्मानवटे कृत्वा दह राम यथाविधी ॥ ३० ॥

**श्रीरामा माझें शुद्धज्ञान । ब्रह्मशापें जालें** [मु. 'विच्छिन्न'; कं. 'क्षीण'.] **आच्छिन्न । न करितां राक्षस देहदहन । माझें मज ज्ञान प्रगटेना ॥ ९० ॥**

**आच्छादावया निज ज्ञान । श्रीरामा मुख्य देहबंधन । देहाभिमाना केलिया दहन । ज्ञान विज्ञान प्रांजल ॥ ९१ ॥**

**यालागीं राक्षसी देहदहन । दीर्घ गर्त खाणऊन । त्यामाजीं शुष्क काष्ठें घालून । करावें दहन सौमित्रें ॥ ९२ ॥**

**अंतकाळीं करी जो मित्र । तयाचि नांव गा सौमित्र । मी तंव अंतीचें कृपापात्र । श्रीरामचंद्र कृपाळू ॥ ९३ ॥**

**लक्ष्मणा ऐक सावधान । या देहा नाहीं प्रेतपण । श्रीराम हस्तें अति पावन । कृपेनें दहन करी स्वामी ॥ ९४ ॥**

**केलिया राक्षस देहदहन । सीता प्राप्तीचें विधान । मी ही यथार्थे सांगेन । सत्यवचन श्रीरामा ॥ ९५ ॥**

**ऐकोनि कबंध दीनवचन । संतोषला रघुनंदन । पाचारूनियां लक्ष्मण । देहदहन करविलें ॥ ९६ ॥** [ओवी ९६ कं. प्रतीत नाही.]

> चितामादीपयामास सा प्रजज्वाल सर्वतः । तच्छरीरं कबंधस्य घृतपिंडोपमं महत् ॥ ३१ ॥
> स विधूय चितामाशु विधूमोऽग्निरिवोत्थितः । अरजे वाससी विभ्रन्माल्यं दिव्यं महाबलः ॥ ३२ ॥
> उत्पपाताशु संहृष्टः सर्वप्रत्यंगभूषणः । विमाने भास्वरे तिष्ठन्हंसयुक्ते यशस्करे ॥ ३३ ॥

**कबंधाचें देहदहन । चितेमाजीं करितां जाण । तें निंद्य देह त्यागून । जाला आपण दिव्य देही ॥ ९७ ॥**

**दिव्यांबरें परिधान । अनर्घ्य भूषणें दिव्यचंदन । मंदार पारिजात** [मु. 'सनातन'.] **संतान । माळा परिधान मघमघित ॥ ९८ ॥** [ओवी ९८ तं. प्रतीत नाही.]

**त्यजितां राक्षस देहासी । दनु दानव अति उल्हासी । श्रीरामा तुझी कृपा ऐसी । निमिषार्द्धेसीं सुखी जालों ॥ ९९ ॥**

अनुक्रमणिका

**तुझें करितां नामस्मरण । सुरासुर येती शरण । तुझें देखिलिया चरण । चरणाशरण सायुज्यता ॥ १०० ॥**

**त्या तुझें सांग दर्शन । मज घडलें संपूर्ण । म्हणोनि घालितां लोटांगण । आलें विमान हंसयुक्त ॥ १०१ ॥**
[ओवी १०१ कं. प्रतीत नाही.]

**धन्य द्विजांचा निजशाप । शापें केलों निष्पाप । राम भेटला चित्स्वरूप । सुख स्वरूप मीं जालों ॥ १०२ ॥**

**सुख स्वरूप चराचर । सुखें भरले सागर । कबंधासी उल्हास थोर । श्रीरामचंद्र तुष्टला ॥ १०३ ॥**

**कबंध अति उल्हासोनी । बैसला हंसयुक्त विभानीं । सीता प्राप्तीचें विधानीं । स्वयें गर्जोनि सांगतु ॥ १०४ ॥**

> सोन्तरिक्षगतो वाक्यं कबंधो वाक्यमब्रवीत् । श्रृणु राघव तत्त्वेन यथा सीतामवाप्स्यसि ॥ ३४ ॥
> श्रूयतां राम वक्ष्यामि सुग्रीवो नाम वानर : । भ्राता निरस्तः क्रुद्धेन वांलिता शक्रसूनुना ॥ ३५ ॥

**कबंध बैसोनि विमानीं । श्रीरामा सांगे कळवळोनी । सीता शुद्धीचें विधानीं । सावधानी अवधारी ॥ १०५ ॥**

**ऐके श्रीरामा सत्य उत्तर । सीता भेटावी अति सत्वर । तरी सुग्रीवेंसी करी मित्र । वानर वीर महाबळी ॥ १०६ ॥**

**पालेखाईर वानर । केवळ नव्हती ते वनचर । किष्किंधेचे राज्यधर । सैन्य अपार** [मु. 'जयाचें'.] **असंख्य ॥ १०७ ॥**

**सुग्रीवासीं चौघे प्रधान । राजनीती अति संपन्न चहूं पुरुषार्थी अति सज्ञान । बळवाहन बळिष्ठ ॥ १०८ ॥**

**समान शीळा** [मु. 'योग्य'.] **निजमैत्री । येरयेरा नित्य साहाकारी । तुम्हां दोघां समान** [मु. 'सरी'.] **परी । तेही अवधारी श्रीरामा ॥ १०९ ॥**

**तुझी भार्या रावणें हरण । सुग्रीव भार्या वाळिग्रहण । दोघांची अवस्था समान । दोघे दीन स्त्रीविरहें ॥ ११० ॥**
[ओवी ११० तं. प्रतीत नाही.]

**तुज राज्यत्यागें प्राप्तवन । त्यासी राज्य त्यागें ऋष्यमूक स्थान । दोघांचेंही दुःख समान ।** [मु. 'अति दीन'.] **समसमान स्थितिगती ॥**

**तुम्ही नरपती वीरधीर । वानरपति सुग्रीव वीर । त्यासीं अवश्य करावें मित्र । सीता सुंदर प्राप्त्यर्थ ॥ ११२ ॥**

**श्रीरामां मानलें वचन । केउतें सुग्रीवाचें स्थान । कोणें मार्गे करावें गमन । रघुनंदन पूसतू ॥ ११३ ॥**

> स वानरवरः पंपामटतीव सुशंकितः । अभिषिक्तो कर्तुं कार्यं ते हरिपुंगवः ॥ ३६ ॥
> वानरेंद्रो महावीर्यस्तेजोवानमितप्रभः । दिशो विचेतुं तां सीतां त्वद्वियोगेन शोचतीम् ॥ ३७ ॥
> भास्करस्यौरसः पुत्रो वालिना कृतकिल्बिष : संनिधायायुधं क्षिप्रमृष्यमूकालयं कपिम् ॥ ३८ ॥

अनुक्रमणिका

कबंध सांगे श्रीरामाप्रती । येणेंचि मार्गे रघुपति । पंपा सरोवराची ख्याती । अति विश्रांती तापसा ॥ ११४ ॥

देखिलिया पंपेचें दर्शन । दुःखी होती सुखसंपन्न । ते त्या वानराचें स्थान । स्वानंदे पूर्ण क्रीडती ॥ ११५ ॥

तुज सुग्रीवेंसि जालिया भेटी । दोंहींच्या दुःखा होईल तुटी । मेळऊनि वानर कोटी । सीता गोरटी शोधील ॥ ११६ ॥

वानर धाडूनि महाबळी । त्रिलोकीं घेईल घरधांडोळी । ठाई घालूनि जनक बाळी । वानर तत्काळीं येतील ॥ ११७ ॥

सीता विरहें तूं आपण । गिरिकंदरीं शोधिसी वन । तिची शुद्धि वानर जाण । न लागतां क्षण आणिती ॥ ११८ ॥

स्त्री विषयाचे सुबद्ध । वाली सुग्रीवा महाद्वंद्व । सहा मासा करिती युद्ध । [मु. 'वीरां उन्माद वाटिव'.] वीर उन्नद्ध वांटिवा ॥ ११९ ॥

तुझेनि हातें वालीसि मरण । हें मज आहे पूर्ण ज्ञान । शीघ्र जाऊनि आपण । वाली निग्रहण करावें ॥ १२० ॥

त्या दोघांचे युद्ध संधीची । ठाकूनि जावें अतित्वरेसी । रणीं निर्दाळिल्या वालीसी । सुख सुग्रीवा स्वानंदु ॥ १२१ ॥

जें वालीचें निर्दळण । तेंचि सुग्रीवासी मैत्री पूर्ण । तेणें तूं पावसी कल्याण । सत्यवचन श्रीरामा ॥ १२२ ॥

बंधू बंधू माजीं वैर । पडावया मुख्य स्त्री [मु. 'साचार'.] संचार । स्त्रीसंगे [मु. 'मुख्य'.] दुःख दुर्धर । दुःखी नर स्त्री संगें ॥ १२३ ॥

सुग्रीव मैत्रीचें महिमान । पावसी सीता स्त्रीरत्न । कीर्ति प्रगटेल अतिपावन । सत्यवचन श्रीरामा ॥ १२४ ॥

ऐसें कबंधें सांगोन । स्वयें श्रीरामाची वंदुन । आल्हादें विमानीं बैसोन । ऊर्ध्व गमनीं तो गेला ॥ १२५ ॥

एका जनार्दना शरण । जाहलें कबंध उद्धरण । पुढें श्रीराम लक्ष्मण । पंपा प्रयाण स्वयें करिती ॥ १२६ ॥

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां कबंधोद्धरणं नाम द्वाविंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग तेविसावा

## श्रीराम ऋष्यमूकाभिगमन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**कबंधरूपें दानव दनु । पावला होतां राक्षस तनू ॥ तो श्रीरामें उद्धरुनु । केवळ पावनू तिहीं लोकीं ॥ १ ॥**

**दनूनें केलें ऊर्ध्वगमन । पुढें श्रीरामलक्ष्मण । पंपेसी निघाले आपण । धनुष्य बाण सज्जूनी ॥ २ ॥**

> पंपायाः पश्चिमे तीरे उपविष्टौ च राघवौ । ददर्शतुस्ततस्तत्र शबर्या रम्यमाश्रमम् ॥ १ ॥
> तौ तमाश्रममासाद्य द्रुमैर्बहुभिरावृतम् । सुरम्यमभिवीक्षंतौ शबरीमभ्युपेयतुः ॥ २ ॥
> तौ दृष्ट्वा तु तदा सिद्धा समुत्थाय कृतांजलिः । पादौ ज़ग्राह रामस्य लक्ष्मणस्य च धीमतः ॥ ३ ॥

**रामलक्ष्मण अति सत्वर । पावोनि पंपा पश्चिमतीर । सेऊनि पंपा पवित्र** [पै. 'तीर'.] **नीर । विश्रांत वीर बैसले ॥ ३ ॥**

**तेथ शबरीचा आश्रम । देखोनि अति मनोरथ । स्वयें आले सौमित्रराम । आल्हाद परम शबरीसी ॥ ४ ॥**

**श्रीरामचरणां लोटांगण । भावें वंदिला श्रीलक्ष्मण । शबरीसी आल्हादपूर्ण । श्रीरामदर्शन पावोनी ॥ ५ ॥**

**मातंग ऋषीच्या सेवावृत्तीं । शबरीची शुद्धमती । भगवद्भाव सर्वांभूतीं । श्रीरामीं भक्ति अनन्य ॥ ६ ॥**

**मातंग ऋषीचे शिष्य निर्मळ । पडिला असतां अति दुष्काळ । गुरुसि आणितां फळमूळ । स्त्रवले केवळ श्रमबिंदू ॥ ७ ॥**

**श्रमबिंदू पडतां जाण । जाहाली सरोवरें पावन । आटो नेणें ते जीवन । नित्य परिपूर्ण शुद्धजेळें ॥ ८ ॥**

**श्रद्धेंने सेवितां तेथीचें आप । तत्काळ शमती त्रिविध ताप । सांसारिक शर्मे संताप । सुखस्वरूप सुसेव्य ॥ ९ ॥**

**एकाचे बिंदू पडतां क्षितीं । सुमनें जाली नानाजाती । सुकों नेणती कल्पांतीं । नित्य टवटविती मघमघित ॥ १० ॥**

**त्या सुमनांचा घेतां वास । मनाचा निरसे त्रिगुणत्रास । भोगीं प्रकटे परेश । अति उल्हास जीवशिवां ॥ ११ ॥**

**तिहीं पुष्पीं सुपुष्पित । वनश्री शोभे सौभाग्ययुक्त । देखोनि श्रीराम संतोषत । अतिभावार्थ शबरीचा ॥ १२ ॥**

अनुक्रमणिका

**देखोनि शबरीचा भावार्थ । संतोषला श्रीरघुनाथ । तिचा वृत्तांत पूसत ।** [तं. 'सामर्थता', घा. इं. 'समाधानार्थ'.] **समाध्यर्थ द्यावया ॥ १३ ॥**

कच्चित्ते निर्जिता विघ्नाः कच्चित्ते वर्धते तपः । कच्चित्ते नियतः कोप आहारश्च तपोधने ॥ ४ ॥
कच्चित्ते नियमाः प्राप्ताः कच्चिते मनसः सुखम् । कच्चिते गुरुशुश्रूषा सफला चारुभाषिणी ॥ ५ ॥

**श्रीराम पुसे आपण । शबरी ऐक सावधान । मी एक ज्ञाता जग अज्ञान । हें महाविघ्न जिंकले कीं नाहीं ॥ १४ ॥**

**ज्ञानाचा ज्ञानाभिमान । हेंचि तापसां महाविघ्न । जेणें जिंतिला ज्ञानाभिमान । तपवर्धमान तयाचें ॥ १५ ॥**

**तयाच्या तपाची थोरी । स्वयें भगवंत आज्ञाधारी । तोचि तपस्वी संसारीं । सुरासुरीं** [सु. कं. 'वानिजे'.]**वंदिजे ॥ १६ ॥**

**अद्वैत देखिजे स्वस्वरूप । तैंचि जिंतिला जाय कोप । असतां द्वैत खटाटोप । सर्वथा कोप जिणवेना ॥ १७ ॥**

**जो पुढिलाचे ढकेनि पडे । त्यावरी तो कोपें वावडे । स्वयें निसरोनि गडबडे । झाडींत मागें पुढें उगाचि** [तु. 'चाले'; पै. खेरीज इतरत्र 'निघे'.] **राहे ॥ १८ ॥**

**स्वजिव्हा रगडल्या दांताबुडीं । तया कोपाचां कडाडीं ।**
**दांत फोडी कीं जिव्हा तोडी । अद्वैतीं सवडी कोपासि नाहीं ॥ १९ ॥**

**जंव द्वैताची सुदृढता । तंव जिंकवेना मोहममता । अद्वैत भावना भाविता । मोहममता निमाली ॥ २० ॥**

**वृत्ति पावलिया चित्स्वरूप । तैं मन होआवें सुखरूप । मनीं असतां दुःखसंताप । केलें ही तप अति मिथ्या ॥ २१ ॥** [ओवी २१ सु. प्रतीत नाही.]

**जरी सद्गुरु सेवा** [तं. सबळ.] **सफळ । संसार तैं होय मृगजळ । ऐसें न पवती जे बरळ । ते गुरू केवळ अनोळख ॥ २२ ॥**

**जे गुरूसी मनुष्य मानिती । त्यांची मिथ्या गुरुभक्ती ।**
**त्यांसी कल्पांतीं नव्हे विश्रांती ।** [मु. 'उपदेशें भ्रांती मनुष्यत्वें'.] **उपदेशीं भ्रांति गुरु शिष्यत्वां ॥ २३ ॥**

**मंत्र तंत्र जे सांगती । ते तोंडींच्या तोंडी उपदेशिती । नाहीं अंतरीं** [मु. 'निजप्रतीती'.] **निजप्राप्ती । उपदेशु भ्रांति** [कं. खेरीज इतरत्र 'मुख्यत्वें'.] **मनुष्यत्वें ॥ २४ ॥**

अनुक्रमणिका

**सुवर्णाचा म्हणती नाग । नाग नव्हे तो सोनेचि चांग । तेवीं दृश्यीं दृष्ट दिसे सांग । उपदेश अव्यंग या नांव ॥ २५ ॥**

**ऐसिया निजात्मप्रतीती । आहे सफळ गुरुभक्ती । सांडूनि ज्ञानगर्व उद्धती ।** [मु. 'विनीत सर्वाभूतीं अहेतुक'.] **विनयो सर्वाभूतीं आहे तुज ॥ २६ ॥**

**इंद्रिय कर्माचे प्रवृत्तीं । तुज आहे अकर्तात्म प्रतीती । तैं सकळ वासना होय शांती । सुखस्थिती स्वानंदु ॥ २७ ॥**

**ऐसी नित्यानंद निजप्रतीची । या नांव सार्थक तपस्थिती । निज देह मिथ्यात्वें देखती । मुख्य परमार्थी तो एक ॥ २८ ॥**

**ऐसें श्रीरामें पूसतां । शबरीसि जाली पूर्णावस्था । श्रीरामचरणीं ठेऊनि माथा । समूळ वृत्तांता ते सांगे ॥ २९ ॥**

> अद्य प्राप्ता तपः सिद्धीस्तव संदर्शनात्मया । अद्य मे सफलं जन्म गुरवश्च सुपूजिताः ॥ ६ ॥
> चित्रकूटं त्वयि प्राप्ते विमानैरतुलप्रभैः । मुनयो दिवमारूढा ये मयाभ्यर्चिताः पुरा ॥ ७ ॥
> तैश्चाहमुक्ता धर्मज्ञैर्महाभागैर्महात्मभिः । आगमिष्यति काकुत्स्थः सपुष्पमिदमाश्रमम् ॥ ८ ॥
> मया तु संचितं वन्यं विविधं पुरुषर्षभ । तवार्थे पुरुषव्याघ्र पंपायास्तीरशंभवात् ।
> तत्त्वे परिगृहीतव्यं राम सौमित्रिणा सह ॥ ९ ॥

**तुझे देखतांचि दर्शन । सफळ तप सफळ ज्ञान । सफळ ध्येय ध्याता ध्यान । सफळ अनुष्ठान आजि माझें ॥ ३० ॥**

**आजि माझी सफळवृत्ती । आजि माझी सफळस्थिती । आजि माझी सफळभक्ती ।** [मु. 'जे' हे पद अधिक.] **कृपां रघुपती आलासी ॥ ३१ ॥**

**तुझें करितां नामस्मरण । सहित पूर्वज उद्धरण । त्या तुझें जालिया दर्शन । सफळ संपूर्ण जन्म माझें ॥ ३२ ॥**

**तुझे देखिलिया चरण । जन्ममरणां बोळवण । बोळविलें मीतूंपण । सुखसंपन्न श्रीरामें ॥ ३३ ॥**

**तुज येतां चित्रकूटीहुनी । मार्गी उद्धरिलें** [कं. 'समस्त' हे पद अधिक.] **मुनी । शरभंग जाता विमानी । म्यां प्रार्थूनि** [पूसिले.] **पूजिला ॥ ३४ ॥**

**तेणें सांगीतलें मजप्रती । तुझ्या आश्रमा येईल रघुपती । तैं पासूनि अहोरातीं । चरण चित्तीं दृढ धरीले ॥ ३५ ॥**

अनुक्रमणिका

**माझा जाणोनि भावार्थ । कृपेनें आलासि कृपावंत । तरी आजि राहोनि येथ । पूजा यथोक्त अंगिकारी ॥ ३६ ॥**

**सूक्ष्म सामग्री अति पुनीत । म्यां संचित केली असे येथ । ते अंगीकारूनि रघुनाथ । सखा समवेत सौमित्र ॥ ३७ ॥**

**ऐकोनि शबरीचें वचन । संतोषला रघुनंदन । विध्युक्त पूजा अंगिकारून । वन्य भोजन स्वयें केलें ॥ ३८ ॥**

**संतोषला बोले रघुनाथ । दनुमुखें तुझें सामर्थ्य । ऐकोनि आम्ही आलों येथ । तुझें आचरित पहावया ॥ ३९ ॥**

**दनुदानवें जें सांगीतले । त्याहूनि अधिक आम्ही देखिलें । ऐसें श्रीराम बोलिले । मन आनंदले शबरीचें ॥ ४० ॥**

> वचनात्तस्य सा रामं शबरी वाक्यमब्रवीत् । कृत्स्नं वनमिदं श्रोतव्यं च श्रुतं त्वया ॥ १० ॥
> तदिच्छाम्यभ्यनुज्ञाता त्यक्ष्याम्येतत्कलेवरम् । तेषामिच्छाम्यहं गन्तुं समीपं भावितात्मनाम् ॥ ११ ॥

**सद्‌गुरु** [घा. 'मंत्र'.] **मातंग सामर्थ्यपूर्ण । कदा कोमाइजेना हें वन । सुमन न ये सुकलेंपण । न आटे जीवन बहु काळें ॥ ४१ ॥**

**सद्‌गुरूचें सामर्थ्य भलें । जैसें ऐकिलें तैसे देखिलें । त्याचें वचन म्यां पाळिलें । तेणें** [कं. 'पावले'.] **फळलें हे पाय ॥ ४२ ॥**

**ऐसें बोलोनि उल्हासतां । श्रीरामचरणीं ठेविला माथा । कांहीं एक** [सु. 'न मागें'.] **मागेन आतां । कृपावंता तें देई ॥ ४३ ॥** [ओवी ४३ तु. प्रतीत नाही.]

**तुझे घ्यावया दर्शन । धरिलें देहाचें आवरण । तुझें देखिलिया चरण । कार्य कोण देहाचें ॥ ४४ ॥**

**तुज देखतांचि रघुनाथा । गेली देहाची मोहममता । तें मी त्यागीन जी आतां । कृपावंता आज्ञापी ॥ ४५ ॥**

**देहसंगतीं अमित दोष । देहसंगतीं तो श्वानओक । देह तोचि केवळ नरक । परम दुःख देहसंग ॥ ४६ ॥**

**देहाचिये निजसंगती । ऐसी दुःखें नेणों किती । त्या देहसंगा करीन मी निवृत्ती । कृपां रघुपती आज्ञासी ॥ ४७ ॥**

**ऐसें शबरीयें स्वयें प्रार्थून । घातलें निवृत्त लोटांगण । देखोनि तुष्टला रघुनंदन । आज्ञा संपूर्ण स्वयें देतु ॥ ४८ ॥**

> धर्मिष्ठं तु वचः श्रुत्वा राघवः सहलक्ष्मणः । अनुजानामि गच्छेति प्रहृष्टवदनोऽब्रतीत् ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

अनुज्ञाता तु रामेण हुत्वात्मानं हुताशने । ज्वलत्पावकसंकाशा स्वर्गमेव जगाम ह ॥ १३ ॥
यत्र ते सुकृतोत्मानो विहरंति महर्षयः । तत्पुण्यं शबरीस्थानं जगामात्मसमाधिना ॥ १४ ॥

**ऐकोनि शबरी भाववचनासी । श्रीराम बोले अति उल्हासीं । सांडूनिया देहलोभासी । परलोकासीं सुखें जाये ॥ ४९ ॥**

**ऐकोनि श्रीरामवचन । शबर्या घालूनि आसन । निज तेजाग्नी चेतऊन । केलें दहन देहाचें ॥ ५० ॥**

**श्रीराम पुण्याचे निजशक्तीं । जाळूनिया देहस्थिती । शबरीसी कोण लोकप्राप्ती । ते ही गति अवधारा ॥ ५१ ॥**

**जैसें जैसें पुण्याचें सामर्थ्य । ऋषी ते ते लोक पावत । शबरी पाप पुण्यातीत । अति समर्थ श्रीरामें ॥ ५२ ॥**

**श्रीराम दर्शनाचें पुण्य । दिविभोगें नव्हें क्षीण । शबरी पावली अक्षयस्थान । गमनागमन जेथ नाहीं ॥ ५३ ॥**

**ऋषीश्वरांच्या पुण्यसंपत्ती । भोगक्षयें क्षया जाती । ते पावती पुनरावृत्ती । शबरीप्रती ते नाहीं ॥ ५४ ॥**

**जेथ नित्य वस्ती श्रीशुका । जेथ वस्ती सनकादिकां । शबरी पावली तया लोकां । शिवादिकां निज पूज्य ॥ ५५ ॥** [ओवी ५५ तं. प्रतीत नाही.]

**श्रीराम दृष्टी पुण्य परिपूर्ण । देहदहनें देदीप्यमान । तिसी न लगेचि विमान । केलें गमन निजगती ॥ ५६ ॥**

**जे जाती विमानगती । ते पावती पुनरावृत्ती । ते नाहीं शबरीप्रती । अगम्यगतीं ते गेली ॥ ५७ ॥**

**श्रीरामदर्शनें पुण्यसंपत्ती । क्षया न वचे कदा कल्पांतीं । अक्षय सुखाची सुखवस्ती । निजप्राप्ती शबरीसी ॥ ५८ ॥**

**श्रीराम देखतांचि दृष्टीं । पापपुण्यां पडली तुटी । खुंटली जन्ममरण गोठी । अक्षय संतुष्टी शबरीसी ॥ ५९ ॥**
[ओवी ५९ सु. कं. तं. प्रतींत नाही.]

**स्वयें श्रीराम कृपामूर्ती । शबरी तारिली सुखानुभूतीं । स्वर्गीं जयजयकार करिती । सुमनें वर्षती सुरसिद्ध ॥ ६० ॥**

**यापरी शबरी उद्धरण । श्रीरामें केलें आपण । एका जनार्दना शरण । जगदोद्धारण श्रीराम ॥ ६१ ॥**

**शबरी आश्रम अति विश्रांत । रामलक्ष्मण बैसोनि तेथ । वनशोभा स्वयें पाहात । अपूर्व तेथ वर्तलें ॥ ६२ ॥**

**देखोनि मृगशावाक्षि वदना । सीता आठवली मृगनयना । मदन क्षोभला रघुनंदना । मदनमोहन श्रीरामा ॥ ६३ ॥**

अनुक्रमणिका

**श्रीराम नित्य निष्काम । त्यासी क्षोभला अतिकाम । कामी निष्काम आक्रम । काम संभ्रम अवधारा ॥ ६४ ॥**

मां हि शोकसमाक्रांतं संतापयति मन्मथः । हृष्टः प्रवदमानश्च मामाव्हयति कोकिलः ॥ १५ ॥

**वसंतें वन शोभायमान । कोकिळांचें पंचमालापन । ऐकोनियां रघुनंदन । सकाम संपूर्ण सीतार्थी ॥ ६५ ॥**

**नव्हें हें कोकिळकूजन । मदनाचे दुर्धर बाण । हृदयीं विंधितो दारुण । द्वंद्व संपूर्ण हा करितो ॥ ६६ ॥**

**लक्ष्मणा करी निवारण । कोकिळु न संडी कूजन । माझे नायिके हा वचन । रघुनंदन कोपला ॥ ६७ ॥**

**याचें खुंटो वदते वचन । यासीं पडो दृढ मौन । रागें क्षोभे रघुनंदन । शाप दारुण स्वयें वदला ॥ ६८ ॥**

**कोकिळ विनवी अतिदीन । सवेंचि तुष्टला संतोषोन । वसंतीं तुज मधुरवचन । येऱ्हवीं मौन सर्वदा ॥ ६९ ॥**

मां दृष्ट्वैव मृगो याति तं मृगी परिधावति । वक्षतीव नभीः रामं मूढं सीता विनाशकम् ॥ १६ ॥

**लक्ष्मणा माझे सन्मुख दृष्टी । मृग रमतो मृगीपाठीं । मज काम क्षोभवी हठी । द्वंद्वी सृष्टीं हा माझा ॥ ७० ॥**

**माझ्या मूर्खत्वाच्या गोठी । सांगतो मृगीच्या कर्णपुटीं । सीता हारविली गोरटी । मूर्ख सृष्टीं श्रीराम ॥ ७१ ॥**

**पशु पक्षी काक कपोता । स्त्रीपासूनि न वचे परता । वनीं सांडूनि गेला सीता । मुख्य मूर्खता श्रीरामा ॥ ७२ ॥**

**हातीची हारवुनि सीता । वनीं रडत भोंवतसे आतां । श्रीरामा ऐसी मूर्खता । मज सर्वथा असेना ॥ ७३ ॥**

**मी सांडूनि निजकांता । श्रीरामा ऐसा न वचे परता । ऐशा माझ्या निंद्य कथा । मृग सांगता मृगीपासीं ॥ ७४ ॥**

**देखोनि मृगाचें मैथुन । रामें शापिला अति क्षोभोन । तुज करितां दाराग्मण । घायें प्राण जातील ॥ ७५ ॥**

**ऐकोनि दुर्धरशापोक्ती । मृग श्रीरामा ये काकुलती । सवेंचि तुष्टला कृपामूर्ती । शाप निर्मुक्ती स्वयें वदला ॥ ७६ ॥**

[मु. कं. 'घंटा पारधी'.] **घांट पारधीचे रातीं । घायें तुमचे प्राण जाती । येऱ्हवी विचरा स्त्रियेप्रती । सुख संभूति स्वानंदें ॥ ७७ ॥**

**उन्मत्त कामें कामगज । गजीसीं क्रीडे देखोनि मज । मज सीतेची लाऊनि लाज । नाचे भोज स्त्रीसंगें ॥ ७८ ॥**

अनुक्रमणिका

जेवीं मी प्रेमें आश्वासी सीता । तेंवीं सोंड ठेवी गजीचें माथां । मज उपहासितो रघुनाथा । स्त्री कामता उन्मत्त ॥

सीता पुसतां गजासीं । कांहीं न बोलोनी रामेंसी । गज क्रीडतां निजगजीसीं । तेणे रामासी कोप आला ॥ ८० ॥

रामें क्षोभोनि आपण । शाप दीधला दारूण । गजीसी करितां रमण । स्त्रीसंगे प्राण जाईल ॥ ८१ ॥

गजी गज दीनवदन । दोघे प्रार्थिती रघुनंदन । त्याचेंनि वचनें संतोषोन । उःशाप वचन स्वयें वदतु ॥ ८२ ॥

गजीसी करितां मैथुन । तूं पडसी अचेतन । गजीनें माथां घालितां जीवन । तुझा प्राण वांचेल ॥ ८३ ॥

गजी तुज पुरवील तृण । त्यांचे केलिया त्वां भक्षण । साता दिवसा सावधान । वन विहरण तूं करिसी ॥ ८४ ॥

तया नांव गजोपसेज । ऐसें मिरवीसी भोज । ऐकतां सुखी जाला गज । श्रीरघुराज तुष्टला ॥ ८५ ॥

अद्यापि गजीगज मैथुन । तेथ हें चालतें [मु. 'विंदान'.] विधान । बाप विनोदी रघुनंदन । करी विंदान विचित्र ॥ ८६ ॥

> शिखिनीभिः परिवृतास्त एते मदमूर्च्छिताः । मन्मथाभिपरीतस्य मम मन्मथवर्धनाः ॥ १७ ॥
> पश्य लक्ष्मण नृत्यंतं मयूरमुपनृत्यति । शिखिनी मन्मथार्तैषा भर्तारं गिरिसानुषु ॥ १८ ॥

पाहे पां लक्ष्मणा येथ । मयूर मयूरी संयुक्त । नृत्य करिती मन्मथोन्मत्त । मजही कामार्त करूनी ॥ ८७ ॥

मयूराची निजपत्नी । नाहीं राक्षसीं नेली हरूनी । म्हणोनि नाचे गिरिकाननीं । वांकुल्या [मु. 'दुरोनि मज दावी'.] दाऊनि मजलागीं ॥

म्यां सीता हारविली वनीं । मज दुःखितातें देखोनी । हा नाचतो घेऊनि पत्नी । रामें कोपोनि शापिला ॥ ८९ ॥

मज दुःखितां देखतां । दोघें नाचा उन्मत्तता । तुज येईल नपूंसकता । अंगसंगता तुम्हां न घडे ॥ ९० ॥

ऐकोनियां शापवचन । मयूर विनवी अतिदीन । मयूरीनें धरिले चरण । शापमोचन वदे रामा ॥ ९१ ॥

सीतेचेनि वियोगें जाण । दुःखी होसी तूं रघुनंदन । आम्हां पक्ष्यांचा पाडकोण । दुःख दारुण साहावयासी ॥ ९२ ॥

अनुक्रमणिका

ऐकोनि मयूरांचे वचन । श्रीराम जाला सुप्रसन्न । दोघे नृत्यमानें सुखसंपन्न । चक्षुवीर्यें पूर्ण सुख तुम्हां ॥ ९३ ॥

पाहे पां लक्ष्मणा विपरीत । काळा कावळा पत्नीसहित ।
मज दुःखितां वांकुल्या दावित । स्वयें क्रीडत पत्नीसी ॥ ९४ ॥

राम सीता पुसे कागासी । दोघे न बोलती श्रीरामासी । रामें क्षोभोनि आवेशीं । त्या दोघांसी शापिलें ॥ ९५ ॥

जन्मामध्यें एकदां जाण । तुम्हां दोघां होईल मैथुन । पुढती न घडे स्त्रीगमन । होसी संपूर्ण काकवंध्या ॥ ९६ ॥

अद्यापि कागाच्या कागदेहीं । दुसरा गर्भसंभव नाहीं । काकवंध्या म्हणती पाही । लोकीं तिहीं कागासी ॥ ९७ ॥

रामें चक्रवाकें देखतां नयनीं । एकत्र विचरती दोन्ही । परतीं नव्हती अर्धक्षणीं । गमनागमनीं एकत्र ॥ ९८ ॥

एक एव सुखी लोके चक्रबाको विहंगमः । पश्य दृष्ट्या मनोरम्या छाययानुगता प्रिया ॥ १९ ॥

ये लोकीं सुखें सुखिया । पाहातां दिसे चक्रवाकिया । रूपासवें जैसी छाया । तैसी भार्या अनुगत ॥ ९९ ॥

चक्रवाकीसी सांगे कथा । रामें हारविली सीता । मी पत्नीसी नव्हे परता । राममूर्खता मज नाहीं ॥ १०० ॥

वनीं एकली सांडी कांता । मुख्य मूर्खत्व त्याचे माथां । हें ज्ञान नाहीं रघुनाथा । [तं. 'मग मूर्खता'.] निज मूर्खता विलपतु ॥ १०१ ॥

श्रीराम मूर्ख शिरोमणी । कां गेला निजपत्नी सांडूनी । तीलागीं अतिदुःखी होऊनी । वनीं उपवनीं हिंडतू ॥ १०२ ॥

निजपत्नीसी क्रीडतां । देखोनि पुढिलांचिया कांता । क्षोभ उपजे रघुनाथा । [तु. 'निजशांतता'.] उपशांतता धरीना ॥ १०३ ॥

श्रीराम सीता पुसे त्यांसीं । ते न बोलती श्रीरामेंसी । वियोग पावाल अहर्निशीं । चक्रवाकांसी शापिले ॥ १०४ ॥

चक्रवाकें तळमळती । दीनें येती काकुलती । आमची अवधारी विनंती । कृपामूर्ति श्रीरामा ॥ १०५ ॥

सीतेचिये वियोगगती । तुज न साहवे रघुपती । तो वियोग आम्हांप्रती । कैशारीतीं कंठेल ॥ १०६ ॥

अनुक्रमणिका

याहीहूनि रघुनाथा । अवश्य करी आमच्या घाता । तुझेंनि निजहस्ते मरतां । सुखस्वरूपता आम्हांसी ॥ १०७ ॥

सुखें सोसेल अंगभंग । परी न साहे स्त्रीवियोग । ऐकतांचि [इं. सु. 'चांग'.] सांग । राम अव्यंग तुष्टला ॥ १०८ ॥

दिवसां दोघां सुखसंगती । [मु. 'परी' हे पद अधिक.] वियोग पावाल पैं रातीं । वियोगीं योगशब्द संगती । शाप निर्मुक्ती श्रीरामें ॥ १०९ ॥

श्रीरामें पंपातीरीं । सीता विरहाच्या आतुरी । वदला विचित्र कुसरी । लीलाधारी श्रीराम ॥ ११० ॥

मिथ्या सीतावियोग प्राप्ती । मिथ्या तिची विरहशक्ती । सत्यत्वें दावी श्रीरघुपती । शापोपहती अनुवादे ॥ १११ ॥

सर्वभूतीं आत्माराम सद्रूप । मिथ्या विषयो मिथ्याशाप । मिथ्या [पै. 'विहाराचा'.] विरहाचा प्रलाप । चित्स्वरूप श्रीराम ॥ ११२ ॥

राम ज्ञानविज्ञान अभिव्यक्ती । राम निर्विकल्प ब्रह्ममूर्ती । राम चिन्मात्र दाशरथी । राम सीतापति परब्रह्म ॥ ११३ ॥

सीता ध्येय राम ध्यान । सीता ज्ञेय राम ज्ञान । सीता चेतना राम चैतन्य । दोन्हीं अभिन्न एकत्वें ॥ ११४ ॥

श्रीराम चित्स्वरूप स्थिती । वर्णितां शास्त्रें मौनावती । श्रुती परतल्या नेंती नेंती । माझी वचनोक्ती ते काय ॥ ११५ ॥

पुढील कथा अनुसंधान । येथूनि ऋष्यमूकातें गमन । करावया सुग्रीवेंसी सौजन्य । रघुनंदन उद्यत ॥ ११६ ॥

ऋष्यमूको गिरिर्यत्र नातिदूरे प्रकाशते । यस्मिन्वसति धर्मात्मा सुग्रीवोंऽशुमतः सुतः ॥ २० ॥

लक्ष्मणा पाहे सावचित्त । ऋष्यमूक महापर्वत । येथूनि समीप दिसत । सुशोभित फळीं पुष्पीं ॥ ११७ ॥

ऋषीं [इं. 'मख'.] यज्ञमुख केलें येथ । यालागीं ऋषिमुख म्हणत । सुग्रीव वसताहे तेथ । प्रधानयुक्त भयभीत ॥ ११८ ॥

वालीभयें भयभीत । सुग्रीव वसे ऋष्यमुखांत । वालीसि ऋषिशापें तेथ । नव्हे सामर्थ्य यावया ॥ ११९ ॥

त्या सुग्रीवाची घ्यावया भेटी । येथूनि निघों उठाउठी । वालीभयाची निवटूनि गोठी । देवो संतुष्टी सुग्रीवा ॥ १२० ॥

अनुक्रमणिका

भार्या हिरोनि सुंदरी । वालीनें सुग्रीव गांजिला भारी । श्रीराम गांजिल्यांचा कैवारी । धनुर्धारी कृपाळू ॥ १२१ ॥

संपले अरण्यकांड कोड । किष्किंधाकांड अतिगोड । ते कथेचा सुखसुरवाड । श्रोते [मु. 'वारंवार'.] वाडवाड परिसतु ॥ १२२ ॥

पुरऊनि भरताचें कोड । पादुका देऊनि सुख [पै. खेरीज इतरत्र 'सुख' हे पद नाही.] सुरवाड । त्यांचे प्रेम वाढऊनि गोड । अरण्यकांड संपविलें ॥ १२३ ॥ [ओवी १२३ तु. दै. प्रतीत नाही.]

विराध राक्षस प्रचंड । ज्याचें रावणभय उदंड । श्रीरामें करूनि तो दुखंड । अरण्यकांड संपविलें ॥ १२४ ॥

शरभंग महामुनी वाड । भेटी देऊनि केला निवाड । देऊनि निजसुख सुरवाड । अरण्यकांड संपविलें ॥ १२५ ॥ [ओवी १२५ दै. प्रतीत नाही.]

शांब करूनि दुखंड । शूर्पनखा नासिक खंडविखंड । सकर्ण विटंबूनि तोंड । अरण्यकांड संपविलें ॥ १२६ ॥

पंचवटीं रण वितंड । खर दूषणादि छेदूनि मुंडमुंड । त्रिशिऱ्याचे ठेंचूनि तोंड । अरण्यकांड संपविलें ॥ १२७ ॥

मायामृगें छळितां दृढ । कपटी मरीचि मारिला [मु. 'सुदृढ'.] अतिगूढ । जाणोनि भविष्याचें बंड । अरण्यकांड संपविले ॥ १२८ ॥

रावणें जटायु केला खंडविखंड । दुःखें पडिला पसरूनि तोंड ।
रामें सुखी करूनि अखंड । अरण्यकांड संपविलें ॥ १२९ ॥

सीताशुद्धीचा अत्यंत कैवाड । [दै. 'विकल्प रूपें'.] विलापरूपें श्रीरामगोड । पुरऊनि पार्वतीचें कोड । अरण्यकांड संपविलें ॥ १३० ॥

एका जनार्दना शरण । श्रीरामें शबरी उद्धरण । केलें अरण्यकांड संपूर्ण । पूर्ण परिपूर्ण श्रीराम ॥ १३१ ॥


कबंधाचें छेदूनि बंध । तोही मुक्त केला अतिशुद्ध । एकाजनार्दनी परमानंद । स्वानंदकंद श्रीराम ॥ १३२ ॥

संपलें अरण्यकांड कोड । पुढें किष्किंधाकांड [घा. 'अति प्रचंड'.] अतिगोड । श्रोते परिसतु निवाड । सुख सुरवाड [पै. तु. 'रामायणीं'.] श्रीराम ॥ १३३ ॥ [कं. प्रतीत पुढील ओव्या अधिका आहेत :— 'देवांभक्तां सुखगोष्टी होती । ते किष्किंधाकांड युक्ती । हनुमंताची अगाध कीर्ती । सावध श्रोतीं परिसावी ॥
अगाध हनुमंताची ख्याती । तो श्रीराममूर्ति अभेदभक्ती । करील लंकेसी ख्याती । तेही उपपत्ती दाविजेल ॥
एका पिंडाची उत्पत्ती । श्रीराम लक्ष्मण हेचि स्थिती । हनुमंती अभिव्यक्ती । पिंडप्राप्ती एकीची ॥
वे कथेची अगाध थोरी । जो परिसेल भावें संसारीं । तोचि सभाग्य शरीरीं । जेणें प्रियकारी परिसिला ॥
ऋषिमूख पर्वताआंत । श्रीरामासी भेटेल हनुमंत । ऐकतां पातकां पुरेल अंत । जे सादर परिसिती ॥']

अनुक्रमणिका

इति श्रीभावार्थरामायणे अरण्यकांडे एकाकारटीकायां श्रीरामऋष्यमूकाभिगमनं नाम त्रयोविंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका




अनुक्रमणिका

# किष्किंधाकांड

## प्रसंग पहिला

## श्रीराम हनुमत्परिचय

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

सच्चिदानंदरूपाय जनार्दन स्वरूपिणे । स्वप्रकाशाय शुद्धाय आचार्याय नमोऽस्तुते ॥ १ ॥
मायातीताय नित्याय मायागुणप्रकाशिने । व्यक्ताव्यक्तस्वरूपाय आचार्याय नमोऽस्तुते ॥ २ ॥

**अरण्यकांड निरोपण । श्रीरामें केलें संपूर्ण । आतां किष्किंधाकांड** [मुं. 'आख्यान'; कं. 'कथन'.] **व्याख्यान । श्रीरघुनंदन स्वयें वदवी ॥ १ ॥**

**माझें आंगीं मूर्खपण । त्या मजकरवीं रामायण । श्रीराम करवितों आपण । निग्रहूनी निजबळें ॥ २ ॥**

**सांडोनी श्रीराम कथा लेखन । मज करितां गमनागमन । मार्गी श्रीराम रामायण । स्वयें संपूर्ण प्रकाशीं ॥ ३ ॥**

**करूं बैसतां भोजन । ग्रासोग्रासीं स्मरे** [तु. दै. 'रघुनंदन'.] **रामकथन ।** [मुं. 'मज'.] **मागां घालूनिया जेवण । रामायण स्वयें वदवी ॥ ४ ॥** [या ओव्या तं. प्रतीत नाही]

**पाहों जातां जी स्वभावीं । श्रीराम रामायण** [पै. दै. 'दावी'.] **वदवी । ओवी चढी दावोनि ओवी । कथा वदवी श्रीराम ॥ ५ ॥** [या ओव्या तं. प्रतीत नाही]

**बोलों जातां फुका कहाणी । तेचि राम कथेची होये वाणी ।**
**वाचा खिळिली रामायणीं । वचना वचनीं श्रीरामु ॥ ६ ॥** [या ओव्या तं. प्रतीत नाही]

**निजेलें असतां स्वप्नीं पूर्ण । श्रीराम** [तु. 'वदवी'] **दावी रामायण । आपुले गुह्य निरोपण । सांगे आपण न बोलोनी ॥ ७ ॥**

**केलें असतां सुषुप्ति शयन । श्रीराम थापटी आपण ।** [पै. खेरीज इतरत्र 'ऊठ'.] **उठवूनी लिहवी रामायण । वृथा निजोनी लाभु काये ॥ ८ ॥**

**रामायण लिहावयासाठीं । रामें पुरविली** [मुं. खेरीज इतरत्र 'माझी' हा शब्द नाही.] **माझी पाठी । श्रीराम संचरोनी पोटीं । दाटोदाटी लिहवितु ॥ ९ ॥**

अनुक्रमणिका

**मी तंव निज निद्रा डुल्लतु । ग्रंथ लिहिता श्रीरघुनाथु । माझिया कवित्वाचा इत्यर्थु । कर्ता समर्थु श्रीराम ॥ १० ॥**

**काय नेणों श्रीरघुनाथा । माझी आवडे मऱ्हाटी कथा । बलात्कारें होय वदविता । न लिहिता उगा राहो नेदी ॥ ११ ॥**

**तें पूर्वकथा अनुसंधान । करूनि शबरी उद्धरण । किष्किंधे राम लक्ष्मण । दोघेजण निघाले ॥ १२ ॥**

> तौ तु दृष्ट्वा महात्मानौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ । वरायुधधरौ वीरौ सुग्रीवः प्लवगाधिपः ॥ ३ ॥
> नैव चक्रे मनः स्थातुं वीक्ष्यमाणौ महाबलौ । कपेः परमभीतस्य चित्तं व्यवससाद ह ॥ ४ ॥

**क्रमूनिया दुर्धर वन । वीर धीर दोघे जण । घेऊनिया धनुष्य बाण । रामलक्ष्मण** [मुं. 'पातले'.] **देखिले ॥ १३ ॥**

**इंद्रादिदेवा दुर्गम वन । तेथें पायीं आले दोघे जण । सुग्रीव म्हणे आपण । योद्धे दारुण हे दोघे ॥ १४ ॥**

**आम्हां कपीते देखती । मनुष्य चळचळां कांपती । हे निःशंक आम्हा सन्मुख येती । दुर्धर शक्ति या दोघां ॥ १५ ॥**

**मज मारावया जाण । वालीने आणिले दोघेजण । तापस आणि धनुष्यबाण । मारेकरी पूर्ण हे माझे ॥ १६ ॥**

**ऐसें बोलोनी प्रधानाप्रती । सुग्रीव भ्याला जीव घातीं । येथील सांडूनिया वसती । शीघ्रगती पळावें ॥ १७ ॥**

> ततः सुग्रीवसचिवा दृष्ट्वा तौ वरवर्णिनौ । वीर्यवंतौ गिरीनन्यान्निर्जग्मुर्वनौकसः ॥ ५ ॥
> एवमेकायनगताः प्लवमाना गिरेर्गिरिम् । वेगेनाकंपयन्वृक्षान्वानराः शिखराणि च ॥ ६ ॥

**ऐंसे सुग्रीवें बोलोन । देखतां रामलक्ष्मण । वेगे करूनी उड्डाण । पळे आपण गिरिशिखरीं ॥ १८ ॥**

**सुग्रीवा सवें चौघे प्रधान । आणि वानर लहान सहान । अवघे सवेग पलायमान । वनें उपवनें लंघित ॥ १९ ॥**

**एक रिघाले गिरिकंदरीं । एक पळाले पर्वत शिखरीं । राम देखोनी धर्नुर्धारी ।** [मु. 'आनाना (वेगवेगळ्या रीती)'] **आपापरी वानरां ॥ २० ॥**

**सबळ वानरांची उडाणी । वृक्ष उलंडती उन्मळोनी । पर्वतकडे पडती धरणी । महा पळणी वानरां ॥ २१ ॥**

**सुग्रीव राजा आपण । गुहेंसी राम भयें बैसोन । तेथें आले चौघे प्रधान । कोण कोण ते आइका ॥ २२ ॥**

**नळनीळ जांबुवंत । चौथा प्रधान हनुमंत । जो कां सबळ बळें विख्यात ।** [तु. 'तया प्रती वचन बोलतु'.] **तो स्वयें पुसत सुग्रीवा ॥ २३ ॥**

तू राजा सबळ सृष्टीं । दोघे माणसें देखिलयासाठी । कां पळसी उठाउठी । त्या भयाची गोठी मज सांग ॥ २४ ॥

सुग्रीव म्हणे हें वन दुर्धर । रिघों न सकती सुरासुर । पायीं आले दोघे [तु. 'महावीर'.] वीर । धनुर्धर महाबळी ॥ २५ ॥

चीर कृष्णाजिनांबर । तापसवेषी अति सुंदर । त्या पासीं कां चापशर । मारेकार वालीचे ॥ २६ ॥

मज मारावयासाठीं । वालीनें आणिले हे कपटी । तें भय घेऊनिया पोटीं । उठाउठी मज पळणें ॥ २७ ॥

दोघे वीर देखतां दृष्टीं । धैर्य न धरवे [मु. 'माझ्या पोटीं'.] पोटीं । बळें सांडवली सृष्टी । [तु. अं. 'या तव गोष्टी विपरीत'.] उठाउठी पळालों ॥ २८ ॥

त्यांची होतां आठवण । माझा जावो पाहे प्राण । तेणें भयें पलायमान । सत्य वचन हनुमंता ॥ २९ ॥

आइकोनी सुग्रीव वचन । हनुमंत हासिन्नला आपण । मी असतां बळवाहन । भय कोण तुज राया ॥ ३० ॥

जरी तूं मज आज्ञा देसी । मी जाईन त्या दोघांपासी ।
समूळ [मु. 'आणीन'.] शोधीन वृत्तांतासी । कोणा कार्यासी येथ आले ॥ ३१ ॥

ऐसें बोलतां हनुमंतु । संतोषला वानरनाथु । त्या दोघांचा वृत्तांतु । मज साद्यंतु सांगावा ॥ ३२ ॥

दोघे धनुर्वाडे संपूर्ण । तुज मारिती विंधोनि बाण । आपला वांचऊनि प्राण । वृत्त संपूर्ण आणावें ॥ ३३ ॥

ते [अं. 'ते तुम्हासी'.] तूं म्हणसी साधारण । महा योद्धे अति निपुण । त्यांची म्यां आइकिली आंगवण । सावधान अवधारी ॥ ३४ ॥

ताटिका सुबाहू मारिले पूर्ण । मारीच मारिला विंधोनि बाण ।
त्रिशिरा मारिले खर दूषण । घेतला प्राण विराधाचा ॥ ३५ ॥

तेहिं मिळोनी दोघेजणीं । कबंध मारिला अर्धक्षणीं । मी पळालों त्यासी देखोनि । दुर्धर दोन्हीं महावीर ॥ ३६ ॥

या लागीं तयापासीं जातां । सावधान जावें हनुमंता । वांचऊनि निज जीविता । त्यांच्या वित्तांता आणावें ॥ ३७ ॥

आज्ञा देतां सुग्रीव वीर । हनुमंत निघाला सत्वर । पुढां देखतां श्रीरामचंद्र । जालें विचित्र तें आईका ॥ ३८ ॥

अनुक्रमणिका

जन्मतां अंजनीचां पोटीं । हनुमंताची सबळ पुष्टी । नव्हता श्रीरामेसी भेटी । करील सृष्टी [मु. ‘अन्योन्य’.] अन्योविन्य ॥ ३९ ॥

हनुमंताची सबळता । देखोनी ब्रह्मयासी अति चिंता । तेणें [दै. तु. ‘मग युक्ति करी वधाता’.] गुप्त केली सबळावस्था । तेहि व्यवस्था अवधारा ॥ ४० ॥

वानर भ्रमाचिये भ्रांति । ब्रह्मा लोपी हनुमंत शक्ति । भेटतांचि श्रीराममूर्ती । निजबळ प्राप्ती पावेल ॥ ४१ ॥

ऐसें ब्रह्मयाचें वचन । मिथ्या नव्हे अणु प्रमाण । देखतांची रघुनंदन । बळवाहन हनुमंत ॥ ४२ ॥

देखतां श्रीरामाची मूर्ती । हनुमान पावला बळप्राप्ती । एकला नाटोपे त्रिजगतीं । हे हि प्रतीती पावला ॥ ४३ ॥

करितां सुग्रिवाचिया कार्यार्था । दृष्टी देखतां श्रीरघुनाथा । हनुमान पावला पुरुषार्था । सामर्थ्यता निजशक्ती ॥ ४४ ॥

स्वामी मानूं सुग्रीव वीर । तंव तो भेड पालेखाईर । माझा स्वामी कोण साचार । [तु. दै. ‘पुसों विचार’.] पुसे निर्धार अंजनीसी ॥ ४५ ॥

तुझें गर्भीची निजलंगोटी । नैष्ठिक ब्रह्मचर्याची कासोटी ।
आतां जो कां देखेल दृष्टी । तो तुज सृष्टीं निजस्वामी ॥ ४६ ॥

मातुर्वचनमादाय हनूमान्मारुतात्मजः । पर्वताग्रादुपप्लुत्योपविष्टौ यत्र राघवौ ॥ ७ ॥

ऐकोनि मातेचें वचन । हनुमंतें केलें उड्डाण । शीघ्र आला जी आपण । राम लक्ष्मण जे ठाईं ॥ ४७ ॥ [ओवी ४७ ते ५९ चे पृष्ठ पै. प्रतीत गहाळ.]

दोघे बंधु धनुर्धारी । शीतळ छाया तरुवरी । रामलक्ष्मणाचे मांडीवरी । निद्रा करी स्वभावें ॥ ४८ ॥

त्याचि वृक्षावरी हनुमंत । येऊनि राहिला असे गुप्त । दोघांचा घ्यावया वृत्तांत । असे तिष्ठत अतर्क्य ॥ ४९ ॥

श्रीराम आश्चर्य सांगे गोष्टी । लक्ष्मणा पाहे ऊर्ध्व दृष्टी । वानरा ब्रह्मचर्याची कासोटी । सगर्भ पोटीं आभासे ॥ ५० ॥

ऐकोनी श्रीराम वचन । हनुमंत जाला हास्यवदन । दोघे मानव दुःखी दीन । स्वामी संपूर्ण केवी मानूं ॥ ५१ ॥

सेवक सबळ स्वामी निर्बळ । तें स्वामित्व समूळ विकळ ।
तरी यांचें आंगीं किती बळ । पाहों अळुमाळ पारखुनी ॥ ५२ ॥

अनुक्रमणिका

माझिया स्वामित्वाचिया अर्थां । पाहों यांचिया पुरुषार्था । [मु. 'सबळ'.] शाल वृक्ष घेऊनि हाता । आला रघुनाथा सन्मुख ॥ ५३ ॥

देखता श्रीराम चरण । अजरामर मी आपण । आठवले पूर्व स्मरण । जन्म मरण मज नाही ॥ ५४ ॥

श्रीराम देखतां दृष्टीं । हनुमंतासी आनंद कोटी । पुसावया त्यांच्या गुह्य गोष्टी । हर्षपोटीं [मु. 'न समाये'.] हनुमंता ॥ ५५ ॥

तुम्ही दोघे कैंचे कोण । येथें यावया काय कारण । समूळ न सांगता जाण । घायें प्राण घेईन ॥ ५६ ॥

हनुमंत प्रश्नाचा आक्रम । वरिवरी कोप पोटांत प्रेम । हे जाणोनि रघूत्तम । निजानुक्रम सांगतु ॥ ५७ ॥

मी दाशरथी रघुनंदन । धाकुटा बंधु हा लक्ष्मण । सीता माझी भार्या जाण । वनाभिगमन [मु. 'पितृवाक्यें'.] पितृआज्ञा ॥ ५८ ॥

[मुं. अं. 'शून्याश्रमीं'.] पुण्याश्रम पंचवटी । रावणे हरिली सीता गोरटी । ते सीतेचे शुद्धीसाठीं । उठाउठी येथ आलों ॥ ५९ ॥

ऐसें बोलतां रघुनाथ । सर्वांगे उल्हासला हनुमंत । दोहींचा कळला वृत्तांत । यांचा पुरुषार्थ पाहों पां ॥ ६० ॥

वीर्य धैर्य विशाळ । वाटीव शौर्य कैसें बळ । हेहि शोधावया सकळ । कळहो प्रबळ मांडिला ॥ ६१ ॥

लक्षूनिया रघुटिळक । वानरें देऊनियां विटंक हांक । शाल वृक्ष सोडिला देख । अति सरोष [मु. 'सन्मुख'.] सक्रोधें ॥ ६२ ॥

लक्ष्मण म्हणे सवेगें उठी । धनुष्यबाण सज्जुनी मुष्टी । वानर दिसतो सबळ सृष्टी । कडकडाटीं लोटला ॥ ६३ ॥

शयनीचा नुठी रघुनंदन । उठों नेदितां लक्ष्मण । निजेल्यां विंधोनिया बाण । केला शतचूर्ण शाळवृक्ष ॥ ६४ ॥

हनुमंत कोपें करीं । हाणे शतानुशत तरुवरीं । निजेल्या विंधोनि शरधारी । क्षणा माझारीं छेदिले ॥ ६५ ॥

क्रोधें चालिला पंच पर्वती । एक पुच्छीं दोनी दोहीं हातीं । दोनी धरी कांखा प्रती । बळें मारुती हाणितु ॥ ६६ ॥

बाप धनुर्वाडा रघुनंदन । नीज न संडूनि विंधिला बाण । पांच पर्वत केलें चूर्ण । बळी संपूर्ण श्रीराम ॥ ६७ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम मारील बाणेसी । हा धांकु नाहीं हनुमंतासी । हनुमंतु मारील आम्हासी । हें रामासीं भय नाहीं ॥ ६८ ॥

तोडुनी पांचाहि गिरिवरा । बाण पिसारां सुटला वारा । हनुमान उडविला अंबरा । गरगरां परिभ्रमे ॥ ६९ ॥

वाहांटुळी माजीं भंवें तृण । तैसा परिभ्रमे [मु. 'हनुमान जाण'.] आपण । कांही न चले आंगवण । जाहला क्षीण सर्व शक्ति ॥ ७० ॥

वेगंडी वळिले पाय हात । पूंस घातलें पायां आंत । वानरें विचकिले दांत । पिता वायू तेथ धावींनला ॥ ७१ ॥

सावध परियेसी हनुमंता । तुझिया संग्राम आघाता । निद्रा न [मु. 'मोडोनी'.] संडिता रघुनाथा । वृक्ष पर्वता छेदिले ॥ ७२ ॥

त्रैलोक्य राजा श्रीरघुनाथ । याचा पाहों नको पुरुषार्थ । जगाचा करूं शके घात । निमिषार्धांत क्षोभोनी ॥ ७३ ॥

त्यासीं त्वां सर्वस्वें आपण । अनन्य भावें रिघावें शरण । श्रीरामसेवें विकावा प्राण । स्वामी संपूर्ण श्रीराम ॥

आइकोनी [मु. 'पित्या वायूचें'.] पित्याचें वचन । हनुमंत घाली लोटंगण । श्रीरामा तुज अनन्य शरण । दास संपूर्ण मी तुझा ॥ ७५ ॥

अंतर्यामीं तूं रघुनाथा । जाणसी माझिया मनोगता । तुझें स्वामित्व पाहावया तत्वतां । केलें उद्धता संग्रामा ॥

ऐसिया माझिया अपराधता । क्षमा करावी श्रीरघुनाथा । म्हणौनि चरणीं ठेविला माथा । शरणागता नुपेक्षी ॥ ७७ ॥

सौमित्र म्हणे रघुनाथा । वीरधीर [मु. 'झुंझार पुरता'.] तूंचि सर्वथा । सवेंचि चरणीं ठेविला माथा । नये सर्वथा विश्वासों ॥ ७८ ॥

निधडा प्रताप तुज रघुवीरा । छेदिलें पर्वत तरुवरां । येऱ्हवी करितां आमुचा चुरा । नये वानरां विश्वासों ॥ ७९ ॥ [ओवी ७९ व ८० तु. कं. प्रतींत नाहीत.]

रावणें देऊनि विश्वासासी । जैसें छळिलें जटायूसी । तैसेंचि करील हा आम्हांसी । नये [मु. 'वानरा'.] यासी विश्वासों ॥ ८० ॥ [ओवी ७९ व ८० तु. कं. प्रतींत नाहीत.]

श्रीराम म्हणे सौमित्रासी । तूं तंव यासी नोळखसी । एक पिंडत्व यासी आम्हासी । अति विश्वासी निजसखा ॥

अनुक्रमणिका

एक पिंडत्व हनुमंता । ये [तं. 'याची कैसी'.] विषयीची पूर्व कथा । तुज मी सांगेन आतां । सावधानता अवधारी ॥ ८२ ॥

मज चित्रकूटीं असतां । तुज भरतेसी युद्ध करितां । म्यां सांगितली होती जे कथा । आईक मागुता सांगैन ॥ ८३ ॥

पुत्रेष्टि याग यज्ञ पुरुषीं । प्रसाद ताट [मु. 'दिधले'.] आलें रायासी । त्रिधा विभागूनी त्यासी । तिघी राण्यांसी दीधले ॥ ८४ ॥

पूर्वोपशापाच्या उद्धारीं । कैकयी भागु नेला घारी । तेणें तळमळी ते [मुं. तं. 'सुंदरी'.] भारी । उरले उरी दोनी भाग ॥ ८५ ॥

कौसल्या येऊनि कैकयी पासीं । अर्ध भाग दिधला तीसीं । सुमित्रेनें निज कृपेसी । अर्ध भागासी दीधलें ॥ ८६ ॥

ते हे आम्हीं चौघेजण । एक पिंडी पैं संपूर्ण । श्रीराम भरत लक्ष्मण । शत्रुघ्न समवेत ॥ ८७ ॥

कैकयी भाग घारी [मु. 'प्राशित'.] ग्रासित । तिसी अंजनी जन्म प्राप्त ।
यज्ञ भाग तिच्या उदरांत । जाणोनि निश्चित यज्ञ पुंरुषु ॥ ८८ ॥

यज्ञ पुरुषाचा निज प्राण । तिसीं विचरला संपूर्ण । तैंच तिसी गर्भाधान । वायूनंदन हनुमंत ॥ ८९ ॥

विचारितां पैं [मु. 'अंतरी'.] वानरीं । अंजनी भर्तार केसरी । यज्ञ पुरुषु प्रवेश न करी । जन्म धारी हनुमंत ॥ ९० ॥ [कं. प्रतीत ओवी ९० नाही.]

राम लक्ष्मण शत्रुघ्न भरत । अर्द्ध पिंडीं आम्ही समस्त । सगळ्या पिंडाचा हनुमंत । बळें समर्थ आतुर्बळी ॥ ९१ ॥

आम्हासी आणि हनुमंता । समूळ मूळीं एकात्मता । नाहीं भिन्नत्वाची कथा । जाण तत्वतां सौमित्रा ॥ ९२ ॥

ऐकतां श्रीराम वचन । हनुमंता आल्हाद संपूर्ण । स्वेद रोमांच आलें रुदन । श्रीराम चरण वंदिले ॥ ९३ ॥

तुटली भिन्न भेदाची गोष्टी । सुख उसळ कोट्यानुकोटी । तिघा जणा उठाउठी । पडली मिठी क्षेमाची ॥ ९४ ॥

गंगा यमुना सरस्वती । तिन्हीं मिळोनि एकी भागीरथी । रामलक्ष्मण मारुती । ऐक्यानुवृत्ती चिन्मात्रें ॥ ९५ ॥

नाना सरितेचे संभार । मिळणी मिळता होती सागर ।
तेंवि मारुती आणि सौमित्र । जाले चिन्मात्र श्रीराम ॥ ९६ ॥

अनुक्रमणिका

एका विनवी जनार्दन । तिघां जालें समाधान । स्वामी समर्थ रघुनंदन । दोघे [तुं. जाण.] जण सेवक ॥ ९७ ॥

गूळ गोडी नांवांची भिन्नता । स्वरूप एक एकात्मता । तेंवि लक्ष्मण हनुमंता । सेवकता श्रीरामीं ॥ ९८ ॥

पिंड भाग व्यवस्था । हे शिवरायामणीं कथा । वृथानुवाद न म्हणावा श्रोतां । पहावें ग्रंथा [तं. दै. 'ग्रंथानुमतें'; इं. अं. 'सावधान'.] अनाक्रोशें ॥ ९९ ॥

ऐकोनि खुणाविलें श्रोतां । वदनीं श्रीराम वदवी कथा ।
झाडा [मु. तु. 'चुकूं'.] सुचू नको आतां । पुढिलिया ग्रंथा अनुवादे ॥ १०० ॥

आधीच रम्य राम [तं. 'रामायण गाथा'.] कथा । त्याहीवरी तूं रसाळ वक्ता ।
भाग्य आलें श्रवणाच्या [मु. 'पंथा'.] माथा । कथा ऐकतां स्वानंदु ॥ १०१ ॥

एका जनार्दना शरण । जालें हनुमंत दर्शन । विरोध बोधें समाधान । सुख संपूर्ण तिघांसी ॥ १०२ ॥ [मु. प्रतीत या ओवीआधी :— 'शतकोटी रामायण । त्या ग्रंथाचें जालें खंडन । त्याची जाली दहा रामायणें । युगभेद जाण ग्रंथांचे ॥' ही ओवी अधिक आहे.]

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां श्रीरामहनुमत्परिचयो नाम प्रथमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग दुसरा

## वाली सुग्रीव जन्मकथन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

**श्रीराम हनुमंतेसी भेटी । दोघां आनंद कोट्यानु कोटी । पुढें हनुमंतें केल्या गोष्टी । कथा कसवटी अवधारा ॥**

दूतोऽहं प्रेषितस्तेन सुग्रीवेण महात्मना । राज्ञा वानरमुख्येन विश्वासता च मे सदा ॥ १ ॥
युवाभ्यां स हि धर्मज्ञः सुग्रीवः संगमिच्छति । तस्य मां सचिवं विद्धि वानरं मारुतात्मजं ॥ २ ॥

**हनुमंत सांगे श्रीरामासी । मज सुग्रीवें तुम्हांपासीं । धाडिलें पहावया वृत्तांतासी । सख्य तुम्हांसी करावया ॥ २ ॥**

**देव दैत्य दानवासी । रिगमु नव्हे या वनासी । तेथें येतां तुम्हां** [अं. कं. मु. 'मानवासी'.] **दोघांसी । वानरांसी विस्मयो ॥ ३ ॥**

**वीर धीर गंभीरता । तुम्हां दोघांसी देखोनि येतां । भयाश्चर्य सुग्रीव चित्ता । निःशंकता देखोनी ॥ ४ ॥**

**हृतदारा हृत स्वार्थ । सुग्रीव वाली** [मु. प्रतीत 'भयें' हा शब्द नाही.] **भयें भयभीत । तुमचा वांछित साह्यार्थ । मज तदर्थ धाडिलेसें ॥ ५ ॥**

**तुम्ही निःशंक निधडे वीर । वाली** [कं. 'वधार्थी'.] **भयार्थी साहाकार ।**
**तुम्हासी करावया मित्राचार । पुसों साचार मीं आलों ॥ ६ ॥**

**सुग्रीव तूं कोण म्हणसी । वानर स्वामित्व सुग्रीवासी । माझा विश्वासू तयासी । माझें तयासी प्राधान्य ॥ ७ ॥**

**अत्यादरें अतिशयेसीं । माझा विश्वासू सुग्रीवासी । मैत्री वांछितो तुम्हांसी । अभय त्यासी देई स्वामी ॥ ८ ॥**

**मी तंव तुझें निजबाळक । वानर सैन्य सहित देख । सुग्रीव हों पाहतों तुझा सेवक । कृपा** [मुं. 'अशेष'.] **आवश्यक करी रामा ॥**

हनूमंतो वचः श्रुत्वा रामो लक्ष्मणमब्रवीत । प्रहृष्टवदनः श्रीमान्भ्रातरं पार्श्वतः स्थितम् ॥ ३ ॥
सचिवो वानरेंद्रस्य सुग्रीवस्य महात्मनः । सौहृदं कांक्षमाणस्य यत्समीपमुपागतः ॥ ४ ॥

**आइकोनि हनुमंत वचन । संतोषला रघुनंदन । कार्य सिद्धींचे लक्षण । सांगे आपण सौमित्रा ॥ १० ॥**

अनुक्रमणिका

**आम्ही ऐक्य वांछू सुग्रीवेसीं ।** [मु. 'तंव तेणेंच'.] **तेणें धाडिलें प्रधानासी । तोहि अति आप्त आम्हांसी । अतिशयेसीं जिवलग ॥ ११ ॥**

**येथें आलियां हनुमंता । आम्हांसी शिणने न लगे आतां । सुलभें प्राप्त होईल सीता । जाण तत्वतां सौमित्रा ॥**

**श्रीरामु म्हणे हनुमंतासी । जें जें कांहीं** [तु. दै. 'तुझ्या मानसी'.] **तूं सांगसी । तें तें करीन** [मु. 'निश्चयेसी'.] **अतिशयेंसी । तुझिया वचनासी नुलंघी ॥ १३ ॥**

**तुवां सांगितलें मजपासी । बाणें एकें वधीन वालीसी ।** [कं. 'सदा'.] **सदार राज्य सुग्रीवासी । निमिषार्धेसीं देईन ॥ १४ ॥**

**वाली सुग्रीव दोघे जण । कैंचे कोणाचे हे कोण । यांचें समूळ** [मु. 'कथन'.] **लक्षण । मज संपूर्ण सांगावें ॥ १५ ॥**

एष ऋक्षराजो नाम वालीसुग्रीवयोः पिता । जननी कास्य भवनं तत्त्वया परिकीर्तितम् ॥ ५ ॥

**श्रीराम म्हणे हनुमंता । वाली सुग्रीवाचा पिता । ऋक्षराज हे** [मु. 'ऐसी'.] **ऐकिली कथा । यांची माता ते कोण ॥ १६ ॥**

**यांचे कोण पूर्व भुवन । यांसी हे कैसेनि प्राप्त स्थान । किष्किंधेचें राज्याभिधान । देता कोण पैं यासी ॥ १७ ॥**

**वानरांचें सकळ सैन्य । कोणें केलें यां आधीन । या दोघांचें मूळ कथन । विवंचूनि मज सांग ॥ १८ ॥**

श्रुत्वा रामकथामेतां मया पृष्टस्तु कौतुकात् । कथयामास धर्मात्मा महर्षिः कुंभसंभवः ॥ ६ ॥
सुखमास्ते यदा देवः पद्मयोनिश्चतुर्मुखः योगमभ्यसतस्तस्य नेत्रेभ्योऽश्रुणोऽयतत् ॥ ७ ॥
तद्गृहीतं भगवता पाणिनाचातिदूरतः । निक्षिप्तमात्रं तद्भमौ ब्रह्मणा लोककर्तृणा ॥ ८ ॥
तस्मिन्नश्रुकणे राम वानरः संबभूवह । समाश्वास्य प्रियैर्वाक्यैरूक्तः किल महात्मना ॥ ९ ॥

**हनुमंत म्हणे रघुनाथा । वालीसुग्रीव जन्म वार्ता । अगस्ति मुखें आइकिली कथा । तुज मी आतां सांगेन ॥ १९ ॥**

**ब्रह्मयाच्या डोळ्यांमधुनी जाण । वानरांचें जन्मस्थान । तें हि समूळ कथन । सावधान अवधारी ॥ २० ॥**

**ब्रह्मा** [तु. 'नित्य'.] **निजात्म योगासनीं । बैसला असतां आत्मचिंतनीं । अश्रू स्त्रवतां नेत्रीहूनी । ते करीं धरूनी टाकिलें ॥**

**नेत्र जळ सांडितां धरणी । वानर जन्मला तत्क्षणी । ब्रह्मा मातापिता दोन्ही ।** [मु. तु. 'या लागुनी'.] **आश्वासूनी प्रतिपाळी ॥ २२ ॥**

**तो ब्रह्याचा पढियंता । लळेवाड आवडता । निज शेजारीं निजविता । प्रतिपाळितां फळमूळें ॥ २३ ॥**

अनुक्रमणिका

**ब्रह्मयाच्या आसनापासी । नृत्य करी विनोदेसी । नृत्यांगना गोउनी पूंसी । थाका** [मुं. 'आसडोनी'.] **पासीं त्या पाडी ॥ २४ ॥**

**उडोनि बैसे ऋषींच्या सिसीं । वाकुल्या दावी सुरवरांसी । तंव तंव आल्हादू ब्रह्मयासी । वानरेसीं अति प्रीति ॥**

**जैसें पोटिचें लळेवाड । तैसें त्याचें पुरवी कोड । त्याचा विनोद वाटे गोड । कवतिकें चाड तयाची ॥ २६ ॥**
[ओवी २६ कं. प्रतीत नाही]

**ऋक्षराज ठेउनी नांव । ब्रह्मा प्रतिपाळी वैभव । कांही एक वर्तलें लाघव । अति अपूर्व तें** [मु. 'ऐका स्वामी'.] **आईका ॥ २७ ॥**

**वनीं विचरोनि अहर्निशीं । वानरू नित्य ये ब्रह्मयापासीं ।** [तु. 'ओळकंबे'.] **उवा पाहे दाढ्या मिशांसी । चहुं मुखांशीं चुंबुनी ॥**

**तो वानर एके दिवशीं । दूरी गेला वनीं वनांतरासी । सांडुनी सत्य लोकासी । गिरी** [तु. 'वरासी'; मुं. 'बिळासी'.] **कैलासी परिभ्रमे ॥ २९ ॥**

**कैलास गिरी बाह्य प्रदेशीं । उमा शाप बद्ध सरोवरासी । स्नान घडलें वानरासी । स्त्रीत्व त्यासी पैं आले ॥ ३० ॥**

**निर्मळ जळ उमावनीं । शिव आणि स्वयें भवानी ।** [तु. 'जळक्रिडा'.] **नग्न क्रीडा करिती दोन्ही । उल्हासोनि स्वानंदें ॥ ३१ ॥**

**तीर्थी विध्युक्त स्नानासी । तेथें आले** [मु. 'सप्तऋषि'; मुं. 'आला मातंग ऋषि'.] **महाऋषि । देखोनी उमा लाजिली त्यासी । दोघे जळवासीं जाले गुप्त ॥**

**उमा क्षोभोनी वदली वचन । सदाशिव करूनी भिन्न । जो नर करील येथें स्नान । स्त्रीत्व पूर्ण तो पावे ॥ ३३ ॥**

**शाप आइकोनी दारूण । न करितां पैं आचमन । ऋषीश्वर पलायमान । शाप बंधन सरोवर ॥ ३४ ॥**

> कस्यचित्त्वथ कालस्य समातीतस्य वानरः । चलत्केसरमात्मानं कृत्वा तस्य तटे स्थितः ॥ १० ॥
> ददर्श तस्मिन्सरसि वक्त्रछाया यथात्मनः । को ह्यास्मिन् ममरिपुर्वसत्यंतरजले महान् ॥ ११ ॥
> तदस्य दुष्टभावस्य करिष्यामि विनिग्रहं । आप्लुत्य चापं तत्तस्मिन् हदे वानरसत्तमः ॥ १२ ॥
> उत्प्लुत्य तस्मात्सरसः दुःखितः प्लवगः पुनः । तस्मिन्नेव क्षणे राम स्त्रीत्वं प्राप्तः स वानरः ॥ १३ ॥

**तेणें वानरें आपणासी । शृंगारूनि नाना सुमनेसीं । येतां सरोवरा पासी । प्रति रूपासी देखिलें ॥ ३५ ॥**
**वाकुल्या दावितां त्यासी । तोहि वाकुली दावी यासी । मारूं धांवतां आवेशीं । तो मारावयासीं स्वयें धावे ॥**

अनुक्रमणिका

**म्हणे हा माझा मुख्य वैरी । राहिला असे जळांतरीं ।** [मु. 'हांक'; तं. दांत खातो.] **हाबुक फोडितो मजवरी । याची बोहरी मी करीन ॥ ३७ ॥**

**निज बळाची महाथोरी । साटोप धरूनी शरीरीं । उडोनिया गगनांतरीं । उडी सरोवरीं घातली ॥ ३८ ॥**

**क्रोधाचिया सक्रोध दृष्टी । पूंस वळूनिया** [तु. 'पोटी'.] **वेठी । आवळूनिया वज्रमुष्टी । उठा उठी उडी घाली ॥ ३९ ॥**

**सरोवरीं उडी घालितां । वैरी नाडळेचि हातां । सवेग रागें बाहेरीं येतां । निज** [तु. तं. मु. कं. 'पुरुषार्थी'.] **पुरुषत्वा मुकला ॥ ४० ॥**

**लोपला पुरुषत्वाचा भाव । कुचादि योनी स्त्री अवयव । स्त्री कटाक्ष हा भाव ।** [मु. 'जाला अपूर्व स्त्री देही'.] **गेलें पूर्व पुरुषत्व ॥ ४१ ॥**

[मु. 'रमणीय एकांता'.] **अति सौंदर्य कमनीय कांता । सकामें भुलला सविता । इंद्र भुलला** [मुं. 'तत्वतां'.] **देखतां । स्त्री कामता संभोगा ॥ ४२ ॥**

> युगपत्सा तदा दृष्टा देवाभ्यां सुरसुंदरी । कंदर्पवशगौ तौ तु दृष्ट्वा तां संवभूवतूः ॥ १४ ॥
> अमोघरेतः शक्रस्य वानरस्य महात्मनः । वालेषु पतितं तेन वाली नाम्ना वभूव सः ॥ १५ ॥
> भास्करेणापि तस्या वै कंदर्पवशवर्तिना । बीजं निषिक्तं ग्रीवायां विधानमनुवर्तिना ॥ १६ ॥
> ग्रीवायां पतिते बीजे सुग्रीवः समजायत । एवमुत्पाद्य तौ वीरौ वानरेंद्रौ महाबलौ ॥ १७ ॥

**वानर ऋक्ष राजासी जाण । आंगीं स्त्रीत्व बाणलें संपूर्ण । तऱ्ही स्त्रीत्वाची आठवण । सर्वथा जाण** [मु. अं. तु. दै. 'आपण'.] **स्मरेना ॥**

**त्यासी देखोनि अति सुंदरी । शक्र सूर्य दोहीं देवेंद्रीं । धाविंनलें कामचारी । पळें भयेकरीं ऋक्षराजु ॥ ४४ ॥**

**भयें सांगावया ब्रह्मया जवळीं । वानरी सवेग पळे भूतळी । शक्र सूर्य काम संमेळी । अंतराळीं धांवती ॥ ४५ ॥**

**नव्हता तिचिया संभोगासीं । स्त्री कामाच्या अति आवेशीं । वीर्य स्खलन जालें दोघांसीं । सम काळेसीं समवेत ॥**

**संस्कृत भाषेमाजी विख्यात । केशां नांव वाल म्हणत । इंद्रवीर्य पडलें तेथ । वालाग्रांत अमोघ ॥ ४७ ॥**

**वानर मस्तकीं महाबळी । जन्म पावला वाल संमेळीं । या कारणें नांव ठेविलें वाली । आतुर्बळी वानरू ॥ ४८ ॥**

**काय पडलें मस्तकावरी । वरतें पाहे जंव वानरी । सूर्य वीर्य कंठावरी । ग्रीवांतरीं पडों सरलें ॥ ४९ ॥**

अनुक्रमणिका

ग्रीवे माजीं जन्म संभव । या लागीं नांमें तो सुग्रीव । दोहीं बंधूचें जन्मलाघव । अति अपूर्व [मु. अं. 'परिसिलें'.] सांगीतलें ॥ ५० ॥

ऋक्षराजु स्त्री वेशेसीं । सपुत्र आला ब्रह्मयापासीं । देखोनियां स्त्री [मु. 'त्याचिया रूपासी'.] वेशासीं । ब्रह्मा मानसीं विस्मित ॥ ५१ ॥

ब्रह्मा म्हणे हे अति सुंदर । दुष्ट कामीं देव दुर्धर । न म्हणती पात्रापात्र । करितां व्यभिचार वेश्यांसी ॥ ५२ ॥

ईसी देखोनियां [मु. 'सुरवर'.] सुंदर । अमोघ वीर्याचा व्यभिचार । जो तो रमेल सुरवर । होईल जोजार पोरांचा ॥ ५३ ॥

मज पासूनि जन्म यासी । स्त्रीत्व पावला मूर्खत्वेसीं । शाप मुक्त करावया त्यासी । कैलासासी निघे ब्रह्मा ॥

ब्रह्मा विनवी पार्वतीसी । शाप मुक्त करी ऋक्षराजासी ।
येरी पुसोनि सदाशिवासी । केलें वान्नरासी निर्मुक्त ॥ ५५ ॥

सांडुनी भ्रम भुजंग भारू । जेवि दोर रूपे होय दोरू । तेवीं सांडूनि स्त्री आकारू । जाला वानरू ऋक्षराजु ॥

स्वप्नीं ब्राह्मण होय अंत्यजु । जागा होतां म्हणे मी द्विजु ।
तेविं सांडूनि स्त्रीत्व फुंजू । जाहला ऋक्षराजु वानरू ॥ ५७ ॥ [तं. प्रतीत ओवी ५७ नाही.]

अगाध संतांची संगती । [मु. 'सवेग'.] संगे वानरा शापोन्मुक्ति । सुखिया जाला प्रजापती । सुख संविति ऋक्षराजा ॥ ५८ ॥

आतुर्बळी वानर मूर्ति । देखोनियां पुत्र संतती । शक्र सूर्य सुखावती । संतुष्टती निजपुत्रां ॥ ५९ ॥

दत्वा तु कांचनीं मालां वानरेंद्राय वालिने । अक्षय्यां गुणसंपूर्णां शक्रस्तु त्रिदिवं ययुः ॥ १८ ॥
सूर्योऽपि स्वसुतायैव निधाय पवनात्मजम् । रामभक्तं महाबाहुं जगाम पुनरंणरम् ॥ १९ ॥

देखोनि वालीच्या निजबळा । इंद्रासी पुत्रसुखाचा सोहळा ।
कंठीची निज कांचनी माळा । घातली गळां वालीचिया ॥ ६० ॥

जे माळा कंठी असतां । कदा तुटेना युद्ध करितां । श्रमु नव्हे वर्षें शतें झुंजतां । निराहारता निरोदक ॥ ६१ ॥

दुंदुभी [मु. 'पाठीं लागतां बळी'.] पाठीसी महाबळी । निराहार निरोदक युद्धकाळीं ।
काहीं श्रमु नव्हेचि वाली । तैं हे त्याजवळी माळा होती ॥ ६२ ॥

अनुक्रमणिका

हे माळा असतां कंठेसीं । युद्ध करितां महाबळियांसी ।
कदां अपजयो न ये योद्धयासी । वरदमाळेसी सर्वदा जयो ॥ ६३ ॥

वाली सुग्रीवा समान बळी । माळा बळें अधिक वाली ।
युद्ध करितां रण कल्लोळीं । सुग्रीवातें तळीं सर्वदा आणि ॥ ६४ ॥

स्वयें युद्ध करितां देख । माळा शत्रूसी अति अतर्क्य । जो जो युद्धासी ये सन्मुख । तो होय विमुख माळावरदे ॥

कैंची माळा हे इंद्रासी । वधूं जातां वृत्तासुरासी । कश्यपें दिधली सामर्थ्येंसी । निज विजयेसी युद्धार्थी ॥ ६६ ॥

कश्यप सामर्थ्याची माळा । इंद्रे घातली वालीच्या गळां । तेणें त्यासी प्रतापु आगळा । कळि काळा नांगवे ॥

इंद्रें देऊनि माळेसी । सामर्थ्य दिधलें वालीसी । तैसें सूर्यें सुग्रीवासी । हनुमंतासी निरविले ॥ ६८ ॥

हनुमंताचिया सामर्थ्यासी । प्रतीति आहे सूर्यासी । बाळपणीं आला गिळावयासी । स्वयें राहूसी पळऊनी ॥ ६९ ॥

ऐसें जाणोनि हनुमंतासी । सूर्यें निरविलें सुग्रीवासी । तुझेनि कीर्ति होईल यासीं । श्रीरामापासीं सख्यत्वें ॥ ७० ॥

हनुमंत होईल श्रीराम भक्त । सुग्रीव त्याचेनि सनाथ । ऐसा जाणोनि भविष्यार्थ । सुग्रीव निरवीत हनुमंता ॥

निज माळा देऊनि वालीसी । इंद्र गेला निजधामासी । सुग्रीव निरऊनी हनुमंतासी । सूर्य गगनासी [मु. मुं. पै. 'गेला'.] स्वयें गेला ॥

शक्र सूर्य गेले दोन्हीं । ऋक्षराजा सपुत्र दोन्ही । स्वयें ब्रह्मेनि आश्वासूनि । राजधानी त्या देतु ॥ ७३ ॥

> दृष्ट्वार्क्षराजं सपुत्रं ब्रह्मा लोकपितामहः । सांत्वयित्वा ततः पश्चाद्देवदूतमथादिशत् ॥ २० ॥
> गच्छ मद्वचनाद्दूत किष्किंधां नाम वै शुभाम् । विश्वकर्मकृतां दिव्यामभियोगाच्च शोभनाम् ॥ २१ ॥
> अभिषेचय राजानमारोप्य महदासने । दृष्टमात्राश्च ते सर्वे वानराणां च भूपतिम् ॥ २२ ॥
> ऋक्षराजस्य साह्यार्थं भविष्यंति वशानुगाः ॥ २३ ॥

ऋक्षराजासी मातापिता । स्वयें [अं. इं. 'स्वयंभू'.] स्वयमेव विधाता । गेलें पुरुषत्व आणूनि हाता । आश्वासितां होय ब्रह्मा ॥

विश्वकर्मा पाचारूनी । किष्किंधा करवी राजधानी । नाना वृक्ष मूळ शोभनी । [इं. अं. 'अनेक प्रकारें गृह रचना'.] नाना रत्नी रत्नाढ्य ॥ ७५ ॥

अनुक्रमणिका

दुर्ग दुर्गम रचिले वेगीं । दैत्य दानवा न लभे लागी । अतर्क्य तेथीची रिगीनिगी । पुत्र प्रयोगीं करविलें ॥ ७६ ॥

मरीच्यादि [मु. ‘ब्रह्मदूत’.] ब्रह्मसुत । सवें देऊनि समस्त । ऋक्षराजाचिया अभिषेकार्थ । किष्किंधे आंत ते आले ॥ ७७ ॥

ब्रह्मयाची आज्ञा अति समर्थ । देशो देशीचे वानर तेथ । सेनापती आले समस्त । अभिषेकार्थ ऋक्षराजा ॥

मुकुट कुंडले [मु. ‘रत्न मेखळा’.] मेखळा । बाहु अंगदे रत्नमाळा । वानरा बाणली राजकळा । सपुत्र सोहळा राज्याचा ॥ ७९ ॥

किष्किंधा मुख्य राजधानी । तेथें श्रेष्ठ वरासनी । ऋक्षराज अभिषेचुनी । वानर सैन्यीं निजराजा ॥ ८० ॥

अभिषेचिती ऋषीश्वर । वानर करिती जयजयकार । सुमनें वर्षती सुरवर । ब्रह्मा साचार तुष्टला ॥ ८१ ॥

ऋक्षराज राजा बळी । युवराजीं सिंचिला वाली । सेनापती महाबळी । केला ते वेळीं सुग्रीव ॥ ८२ ॥

[मु. ‘ऐसा तो ऋक्षराज समर्थ’.] ऋक्षराज ब्रह्मसुत । दोहीं पुत्रां समवेत । किष्किंधा राज्य जाला प्राप्त । भाग्य समर्थ सृष्टेनी ॥ ८३ ॥

जे कां अकिंचन वानर । तेहि केले राज्यधर । त्यासी वंदिती सुरवर । पितृ भाग्यें थोर सभाग्य ॥ ८४ ॥

त्रैलोकीचे वानर । वाली सुग्रीवाचे आज्ञाधर । पिता ऋक्षराज राज्य सधर । सेना संभार असंख्य ॥ ८५ ॥

तो ऋक्षराज जाण । कालगतीने पावला मरण । दोघीं पुत्रीं करूनि दहन । उत्तर विधान तेंहि केलें ॥ ८६ ॥

मिळोनि समस्त प्रधान । वालीसी केलें राज्याभिषेचन । कनिष्ठा सुग्रीवासी जाण । दिधलें संपूर्ण यौव राज्य ॥

बळी नेमकु न्याय नीति । धर्म योद्धा [मु. ‘आणि व्रती’.] अनिवर्ती । तो नीळु केला सेनापती । गंभीर स्थिती दळभारी ॥ ८८ ॥

वाली सुग्रीवाचा पिता । ऋक्षराजु नव्हे रघुनाथा । तो ह्या दोहींचीही माता । दोहींचा पिता भिन्न भिन्न ॥ ८९ ॥

एक शक्र सुतु एक सूर्य सुतु । जगीं विख्यात हे मातु । त्या दोहींचा निज वृत्तांतु । समूळ साद्यंतु सांगीतला ॥

ऐसे सांगोनिया कथन । हनुमंत घाली लोटांगण । सुग्रीवेसीं सख्य संपूर्ण । कृपा करूनी करी रामा ॥ ९१ ॥

अनुक्रमणिका

केवळ वनीचे वनचर । हे तंव नव्हती पाले खाइर । ब्रह्म कुळीचे कुळेश्वर । वीर दुर्धर रण योद्धे ॥ ९२ ॥

समूळ मुळीची जुनाट कथा । ऐकोनि सुख जालें रघुनाथा । आलिंगिलें हनुमंता । उल्हासता स्वानंदे ॥ ९३ ॥

एका जनार्दना शरण । वाली सुग्रीव जन्म कथन । समूळ जालें निरोपण । रामायण अति गोड ॥ ९४ ॥

किष्किंधा कांड निरोपण । अमृता आणिलें फिकेंपण । ऐसे गोड रामायण । श्रोतां अवधान मज द्यावें ॥ ९५ ॥

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां वालीसुग्रीवजन्मकथनं नाम द्वितीयप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग तिसरा

## श्रीराम सुग्रीव सख्य निरूपण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

वाली सुग्रीव जन्म कथा । ऐकोनि [इं. अं. मध्ये 'जाले' हे पद अधिक.] सुख रघुनाथा । संतोषोनियां हनुमंता । होय बोलता श्रीराम ॥ १ ॥

सख्य करावें सुग्रीवेसी । हें मुख्य कर्तव्य आम्हांसी । तूं हि सख्यार्थ आलासी । अतिशयेसीं सुख जाले ॥ २ ॥

कंबधें सांगितलें मजपासीं । हृतदारा दुःख सुग्रीवासी । सुखी करावया त्यासी । ऋष्यमूकासी मी आलों ॥ ३ ॥

जो मज होय अनन्य शरण । त्याचें दुःख निर्दाळून । सुखी करावे संपूर्ण । बीद्र जाण हें माझें ॥ ४ ॥

दुःख निरसूनी सुख द्यावयासी । मी आलों असे वनवासासी । वेगीं बोलावी सुग्रीवासी । सुखी त्यासी मी करीन ॥

ऐकोनी श्रीराम वचन । हनुमान जाला सुख संपन्न । वंदूनि श्रीराम चरण । केलें उड्डाण उल्हासें ॥ ६ ॥

> ऋष्यमूकात्तु हनुमान् गत्वा मलयपर्वतम् । आचष्ट भ्रातरौ वीरौ सुग्रीवाय महात्मने ॥ १ ॥
> अयं रामो महाप्राज्ञः संप्राप्तो दृढविक्रमः । लक्ष्मणेन सह भ्राता सख्यार्थं त्वामुपागतः ॥ २ ॥

हनुमंतें करुनि उड्डाण । सग्रीवापासी आला आपण । म्हणे तूं भाग्यें सभाग्यपूर्ण । रघुनंदन तुष्टला ॥ ७ ॥

राम लक्ष्मण महावीर । निःशंक निधडे धनुर्धर । तुजसी करावया मित्राचार । आलें साचार ऋष्यमुका ॥ ८ ॥

कोठील कोणाचे हे कोण । येथें यावया [मु. तु. प्रतीत 'काय' हे पद अधिक.] कारण । समूळ शोधिले म्यां जाण । सावधान अवधारी ॥ ९ ॥

श्रीराम दाशरथी महावीर । बंधु लक्ष्मण धनुर्धर । श्रीरामकांता सीता सुंदर । धन विहार पितुराज्ञा ॥ १० ॥

पित्याचे [मु. 'मानोनी आज्ञेसी'.] आज्ञेचां निर्देशी । दंडकारण्य वनवासी । [मु. 'तेही'.] तिघीं रहावें चौदा वर्षीं । फळामूळासि सेवुनी ॥ ११ ॥

[कं. 'पुण्याश्रम'.] शून्याश्रम पंचवटी । रावणें हरिली सीता गोरटी । तिची शुद्धि करावयासाठीं । आले जगजेठी ऋष्यमूका ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

**श्रीरामें उद्धरिले कबंधासी । शापोन्मुक्ती जाली त्यासी । तेणे सांगीतले श्रीरामासी । सुग्रीवासीं** [अं. मुं. तु. 'सुखी'.] **सख्य करी ॥**

**सीता हरणें दुःख रामासी । दाराहरणे सुग्रीवांसी । समान दुःख तुम्हां दोघांसी । येरयेरांसि सुखी करा ॥ १४ ॥**

**निःशेष वधुनि वालीसी । दारा राज्य सुग्रीवांसी । देऊनी सुखी करावयासी । किष्किंधेसि आला रामु ॥ १५ ॥** [ओवी १५ कं. प्रतीत नाही.]

**सांडुनिया सीताशुद्धयर्था । साधावया तुझ्या** [मु. 'कार्यार्थ'.] **स्वार्था । कृपेनें येणें रघुनाथा । सभाग्यवंतां सुग्रीवा ॥ १६ ॥**

**श्रीराम सप्रेम वत्सलु । श्रीराम निरपेक्ष स्नेहाळु । श्रीराम भक्त काज कृपाळु । दीन दयाळु श्रीराम ॥ १७ ॥** [ओवी १७ दै. प्रतीत नाही.]

> श्रुत्वा हनूमतो वाक्यं सुग्रीवो हृष्टमानसः । भयं चातिसमुद्भूतं भुक्तमाल्यमिवात्त्यजत् ॥ ३ ॥

**ऐकोनि हनुमंताची गोष्टी । सुग्रीवासी आनंद कोटी । हनुमंताची पाठी थापटी । प्रेमें संतुष्टी आलिंगीं ॥ १८ ॥**

**मेघगर्जनें मयूर साचे । तैसा सुग्रीव हरिखे नाचे । सभाग्यपण हनुमंताचें । कोण वाचे मीं वानूं ॥ १९ ॥**

**माझा साधितां निजस्वार्थ । जाला** [तु. प्रतीत 'परम हे पद अधिक'] **श्रीरामाचा आप्त । श्रीरामभाग्यें हा समर्थ ।** [मु. तं. मुं. 'कृतकृतार्थ मी जालों'.] **कृतकार्यार्थ मी केलों ॥ २० ॥**

**सुमनमाळा सुकलियावरी । स्वयें सांडिजे जेविं दुरी ।** [मु. मध्ये 'हें' पद अधिक.] **श्रीराम भय होतें भारी । माळेचें परी त्यागिलें ॥ २१ ॥**

**घ्यावयां श्रीरामाची भेटी । सुग्रीव निर्भय जाला पोटीं । श्रीराम लक्षूनिया दृष्टीं । उठाउठी आले दोघे ॥ २२ ॥**

**धरूनि हनुमंताचा हातु । जेथें होता श्रीरघुनाथु ।** [मु. दै. तु. 'तेथें' हे पद अधिक.] **सुग्रीव आला त्वरितु । शरणांगतु मी तुझा ॥ २३ ॥**

**तूं सत्य प्रतिज्ञ रघुवीर । माझा करावा अंगिकार । मी तुझा निजकिंकर । शरण साचार मी रामा ॥ २४ ॥**

> एवं तु वचनं श्रुत्वा सुग्रीवस्य सुभाषितं । सप्रहृष्टमना हस्तं पीडयामास पाणिना ॥ ४ ॥
> ततो रामस्य सुग्रीवो पाणिं जग्राह पाणिना ॥ हृद्यं सौहृद्यमालंव्य पीडितं चापि सस्वजे ॥ ५ ॥

**ऐसे सुग्रीव संभाषित । ऐकोनियां श्रीरघुनाथ । होऊनिया आनंद भरित । जाला उद्यत खेवांसीं ॥ २५ ॥**

अनुक्रमणिका

सुग्रीवें करितां लोटांगण । रामें उचलिला हातीं धरून ।

[दै. तु. तं. 'वानरासी स्नेह करून'.] वानरे करुनि हस्तग्रहण । दिधलें आलिंगन हृदयेंसीं ॥ २६ ॥

श्रीरामहृदया हृदय मीनलें । तंव हृदयस्थ एक जालें । सहज सुहृदत्व घडले । आलिंगिलें येर येरां ॥ २७ ॥

रामहृदयस्थ चिद्घन । त्यासी देतां आलिंगन । सुग्रीव हृदया समाधान । वाली भयभान निमालें ॥ २८ ॥

नरवानरां पडिली मिठी । आधि [तु. 'समूळ तुटी'; दै. 'पडली तुटी'.] व्याधि शमली पोटीं । सांगणें पुसणें सरल्या गोष्टी । आनंद कोटी सुग्रीवा ॥ २९ ॥

सख्यत्व जालें आलोलिक । अग्नि सूर्य प्रमाण साक्ष । कांही करणें नलगे देख । दोहींचें येक हृदय जालें ॥ ३० ॥

दोहींचें हृदय जालें एक । तेंचि निज [मु. 'निज सख्याचें'.] सत्याचें सख्य । आण प्रमाण देणें भाक । तें लौकिक अति अल्प ॥ ३१ ॥

श्रीराम सख्यापुढें जाण । बर्हिभूत आण प्रमाण । भाक तेथ केवळ तृण । सख्य संपूर्ण श्रीरामीं ॥ ३२ ॥

श्रीराम सख्यत्वाची थोरी । अति अगाध चराचरीं । तें सख्य पावोनि [तु. 'नुर्धारी'.] वानरी । जयजयकारी गर्जत ॥ ३३ ॥

> सुग्रीवो राघवश्चैव वयस्यत्वमुपागतौ । प्रहृष्टमनसौ प्रीतौ तावुभौ हरिराघवौ ॥ ६ ॥
> अन्योन्यमभिवीक्षंतौ न तृप्तिमुजग्मतुः । त्वं वयस्योऽसि हृद्यो मे एकं दुःखं सुखं च नौ ॥ ७ ॥

श्रीराम स्वयें सुरनरपती । सुग्रीव स्वयें वानरपती । दोघांसी स्वयें सख्यत्वाची स्थिती । अनन्य प्रीति आल्हादु ॥

जैसी प्रीति सुवासु सुमना । जैसी प्रीति जीवा मना । तैसी सुग्रीवा रघुनंदना । [मु. 'अन्योन्य'.] अनन्य जाणा अति प्रीति ॥ ३५ ॥

जैसी प्रीती गुळ गोडीसी । जैसी दीपक प्रकाशीं । जैसि प्रीति [मु. 'नाना रसा आणि उदकासी'.] जिवा शिवासी । राम सुग्रीवासी [मु. 'अति'.] तैशी प्रीति ॥ [ओवी ३६ तं. तु. इं. प्रतीत नाही]

सुग्रीवें पाहतां श्रीरामचंद्रा । श्रीरामें पाहतां वानरेंद्रा । प्रीति पाहा येरयेरां । दोहींच्या नेत्रां नव्हे तृप्ति ॥ ३७ ॥

जैसी प्रीति चकोरी चंद्रा । तैसी सुग्रीवीं श्रीरामचंद्रा । जैसी पाहा जळचरां । तैसी वानरां श्रीरामीं ॥ ३८ ॥

अनुक्रमणिका

**ऐसी श्रीरामा वानरीं प्रीति । श्रीरामीं वानरां अनन्य भक्ति ।**
**ऐसी यासी** [मु. 'प्रेम'.] **परम प्रीति । पाहतां तृप्ति नव्हे नेत्रां ॥ ३९ ॥** [ओवी ३९ दै. प्रतीत नाही.]

**श्रीराम सुग्रीव मारुती । तिघां जाली अनन्य प्रीति । मग बैसोनी सुख संविती । अनुवादती निज गुज ॥ ४० ॥**

**सुग्रीव म्हणे रघुपती । तुम्ही आलेती जिचिया अर्थी । ते म्यां देखिली सीता सती । गगन गती पै नेतां ॥ ४१ ॥**

ऱ्हियमाणा मया दृष्टा रक्षसा क्रूरकर्मणा । क्रोशंती रामरामेति लक्ष्मणेति च विस्वरम् ॥ ८ ॥
आत्मना पंचमं मां हि दृष्ट्वा शैलतले स्थितम् । उत्तरीयं तदा त्यक्तं शुभान्याभरणानि च ॥ ९ ॥

**रावणाचे** [मु. 'खांदेवरी'.] **कडियेवरी । वेगे नेतां गगनांतरी । आम्ही देखीली वानरीं । श्रीराम गजरीं आक्रंदे ॥ ४२ ॥**

**श्रीराम राया धांव धांव । राघवा तूं सवेग पाव । घेऊनि लक्ष्मणाचें नांव । दीर्घ स्वरें आक्रंदे ॥ ४३ ॥**

**राम नामें सीता रव । वानरीं** [मु. प्रतीत 'पै' हे पद अधिक.] **ऐकिला सर्व । आणिक जालें लाघव । अति अपूर्व तें आइका ॥ ४४ ॥**

**येची पर्वत शिखरीं । आम्ही असतां पंच वानरी । उत्तरीयवस्त्र सीता सुंदरी । सालंकारी** [मु. 'त्यागिले'; कं. 'टाकिले'.] **न्यासिले ॥ ४५ ॥**

**लक्षूनिया हनुमंता । वस्त्रें अलंकार सांडी सीता । ते आलीं हनुमंताचियां हातां । सभाग्यता भाग्याची ॥ ४६ ॥**

**श्रीराम नामें उत्तरीय वस्त्र । रामनामांकित अलंकार । आम्हां दाखविलें समग्र । राखे निरंतर मारुती ॥ ४७ ॥**

**रामनामीं ज्या विश्वास । ऐसेनि भाग्यें सभाग्य ज्यांस । तेचि पावती श्रीरामवास । भाग्य बहुवस हनुमंता ॥ ४८ ॥**

**रामनामें दीर्घ स्वर । सीता आक्रंदे सुंदर । आम्हीं ऐंकतां समग्र । हनुमान वीर** [कं. मु. 'खवळला'.] **कळवळिला ॥ ४९ ॥**

**मारून राक्षस दुर्धर । करूं दीनाचा उद्धार । सोडवूं अनाथ सुंदर । हनुमान सत्वर उडाला ॥ ५० ॥**

**रागें आपटूनी पुंसाटी । वटारूनी आरक्त दृष्टी । वळूनिया वज्रमुष्टी । उठाउठी उडाला ॥ ५१ ॥**

हनुमंताचें निज उड्डाण । गेले ग्रह चक्रा टाकून । तळीं तेणें धांके रावण । गेला लंघून सागरा ॥ ५२ ॥

गेला लंघूनि लंकानाथ । हनुमान क्रोध करी शांत । ऐसा ऐकतां वृतांत । अतिविस्मित श्रीराम ॥ ५३ ॥

ऐकोनि वानरांच्या गोष्टी । विस्मयो राम सौमित्रा पोटीं ।
सीता अलंकार पाहावया दृष्टी । उठा उठी आणविले ॥ ५४ ॥

उत्तरीयं गृहीत्वा तु शुभान्याभरणानि च । इदं पश्येति रामाय दर्शयामास वानरः ॥ १० ॥
ततो गृहीत्वा वासश्च सीताया भूषणानि च । हा प्रियेति रुदन् धैर्यमुत्सृज्य न्यपतंत् भुवि ॥ ११ ॥

सीता अलंकार वस्त्रेसीं । हनुमंते दाविलीं रामापासीं । तेणें धरुनी ह्रदयेसीं । उकसा बुकसी फुंदतु ॥ ५५ ॥

सीते मजसी रुसलीसी । पूर्व प्रीति विसरलीसी । रागें मजसी ना बोलसी । [मु. 'कोठे'.] कैसी गेलीसि प्रियेकांते ॥ ५६ ॥

सीतेचें अलंकार देखोनी । श्रीराम अतिग्लानि करूनी । मूर्च्छापन्न पडिला धरणीं । विसंज्ञी विव्हळ ॥ ५७ ॥

देखोनि श्रीरामाची व्यथा । सुग्रीवासी परम अवस्था । सावधान करूनि रघुनाथा । होय बोलतां पुरुषार्थ ॥ ५८ ॥

तुजमज सख्य जाले असतां । तुझी निवारेना व्यथा । तरी लाज लागली मित्रार्था । आणीन सीता शोधूनी ॥ ५९ ॥

स्वर्ग मृत्यू आणि पाताळीं । नेली आसलिया जनक बाळी । घेऊनिया जग धांडोळी । सीता वेल्हाळी [मु. 'मेळवीन'.] आणीन ॥ ६० ॥

कळिकाळाची मर्दिती मान । तैसे माझे चौघेहि प्रधान । अमित वानरांचें सैन्य । सीता शोधूनि आणीन ॥ ६१ ॥

श्रीरामा वाहतों तुझी आण । सीता आणीन आपण । पुढती शिवतों तुझें चरण । परम प्रमाण हें माझें ॥ ६२ ॥

रुदन नको करूं श्रीरामा । आईक माझी प्रमाण प्रमा । तरी मी अधम प्लवंगमा । श्रीरामरमा जरी नाणी ॥ ६३ ॥

सीता शुद्धि सांडूनी श्रीरामा । जरी मीज गुंते आणिकी कामा ।
तैं मी वानरू अधम जन्मा । श्रीरामरमा जरी नाणी ॥ ६४ ॥ [ओवी ६४ कं. प्रतीत नाही.]

लाजविला पितामह ब्रह्मा । लाजवी पूर्वज महिमा । लाजविलें क्षत्रधर्मा । श्रीरामरमा जरी नाणी ॥ ६५ ॥

अनुक्रमणिका

**सांडुनी सीता शुद्धी आक्रमा । जैं मी लागे आणिक कामा । तैं निंद्य माझिया जन्मा । श्रीरामरमा जरी नाणी ॥** [ओवी ६६ तं. प्रतीत नाही.]

**सीता वियोग विभ्रमा । दुःख न करी रघुरामा । निमिषें आणीन** [दे. तु. 'तुझी रमा'.] **श्रीरामा । प्रताप गरिमा पाहें माझी ॥ ६७ ॥**

**ऐकोनि सुग्रीव वचन । हास्य करी रघुनंदन । तुज राज्य दिधलिया वीण । सीता स्मरण मी न करी ॥ ६८ ॥**

**मित्र कार्यापुढें जाण । सीता शुद्धी ते मज तृण । वाहतों दशरथाची आण । सत्य जाण सुग्रीवा ॥ ६९ ॥**

**जें तूं बोलिलासी निर्वाण । तें मज मानलें प्रमाण । तुझें कार्य नव्हतां पूर्ण । सीता आगमन मज निंद्य ॥ ७० ॥**

**वैश्वदेव बलि विधान । न करितां निंद्य निजान्न । तेवि तुझें कार्य नव्हता पूर्ण । सीता आगमन मज निंद्य ॥ ७१ ॥**

**न करितां औपासन । स्वदारा गमन वेश्ये समान । तेंवीं तुझें कार्य नव्हता पूर्ण । सीता आगमन मज निंद्य ॥ ७२ ॥**

**न करितां संध्या स्नान । यज्ञादि कर्में निंद्य जाण । मित्र कार्य नव्हता पूर्ण । सीता आगमन मज निंद्य ॥ ७३ ॥**

**अतिथी दवडूनि** [मु. 'निराशन'.] **निर्वाण । निंद्य होय निज भोजन ।**
**तेवीं तुझें कार्य नव्हता पूर्ण । सीता आगमन मज निंद्य ॥ ७४ ॥**

**जरी त्वां येथें आणिली सीता । तुझें कृतकार्य जों नव्हता । तिसीं मी न पाहे सर्वथा । श्रीदशरथाची मज आण ॥**

**सीतेचें आधी कोठें गमन । शुद्धी केलिया मग आगमन । वाली वधालागीं जाण । हें व्यवधान तंव नाहीं ॥ ७६ ॥**

**आधीं साधीन मित्र कार्यार्था । मग शोधूनि आणीन सीता । धनुष्य बाण घेऊनी हातां । वाली वधार्था निघाला ॥**

अद्यैव तं हनिष्यामि तव भार्यापहारिणम् । इमे हि मे महाभाग पत्रिणस्तिग्मतेजसाः ॥ १२ ॥
वालिसंज्ञममित्रं ते भ्रातरं कृताकिल्विषम् । शरैर्विनिहतं पश्य विकीर्णमिव पर्वतम् ॥ १३ ॥

**सुग्रीवा ऐके सावधान । जेणें केलें तुझें दाराहरण । त्या वालीचा घेईन प्राण । तीक्ष्ण बाण विंधोनी ॥ ७८ ॥**

अनुक्रमणिका

माझे बाण अति तिखट । समरंगणीं सदा सदट । तेणें वालीचा छेदूनि कंठ । करीन सपाट बाणें एकें ॥ ७९ ॥

वज्रें हाणीतला पर्वत । जैसा विखुरे पृथ्वी आंत । तैसा वाली वधिला येथ । रुधिरोक्षित देखसी ॥ ८० ॥

क्षोभले देखोनि रघुनाथा । सुग्रीवें चरणीं ठेविला माथा । वालीचिया अति पुरुषार्था । सावधानता अवधारी ॥ ८१ ॥

अनुदिवें सूर्यो जाण । अविश्रम श्रमेविण । सप्त समुद्रीं करीस्नान । अर्धक्षण न लगतां ॥ ८२ ॥

वाली सव्य हस्तें पर्वत । सवेग टाकी गगनांत । वाम हस्तें स्वयें झेलित । शतानुशत गिरिवरां ॥ ८३ ॥

महिषासुराचा जेष्ठ सुत । [मु. 'नाम महिष'.] दुंदुभि महिष अति विख्यात । युद्धा लागीं परम उद्यत । विचरत तिहींलोकी ॥ ८४ ॥

दुंदुभी जाऊनि पाताळासी । युद्ध मागे वरुणासी । तेणें धाडिला हेमाद्रिपासी । जाय त्यासी युद्ध [मुं. कं. तु. 'करी'.] माग ॥ ८५ ॥

दुंदुभी येऊनि युद्धार्थ । हेमाद्रीतें पाचारीत । तो म्हणे मी युद्धीं अशक्त । धाडी युद्धार्थ यमापासीं ॥ ८६ ॥

दुंदुभी पाचारी यमासी । यम विचारी मानसीं । वाली हस्तें मृत्यू यासी । [तु. 'म्हणोनी'.] तेणें त्यापासीं धाडिलें ॥ ८७ ॥

> दुंदुभे युद्धदानाय नाहं प्रतिबलस्तव । युद्धं समवलेनैव कर्तव्यं च जयैषिणा ॥ १४ ॥
> किष्किंधां गच्छ रे तत्र वालिनामा हरीश्वरः । स युद्धतृष्णामापूर्य मदं ते नाशयिष्याति ॥ १५ ॥

यम म्हणें दुंदुभीसी । मज युद्ध न करवे तुजसीं । तूं युद्ध करूं जाय वालीसी । समबळेली बलिष्ठ ॥ ८८ ॥

वाली वानर भूमंडळी । सबळ योद्धा आतुर्बळी । सांग म्हणे मज जवळी । रण रवंदळी मीं करीन ॥ ८९ ॥

वाली युद्ध तृष्णा तृषित । तूं हि युद्धासि अति उद्यत । वालीपासी जाऊनी त्वरीत । युद्ध पुरुषार्थ करी त्यासीं ॥ ९० ॥

तूं म्हणसी वाली कोण । किष्किंधेचा राजा जाण । त्यासी करावें युद्ध दारुण । आंगवण पाहों तुझी ॥ ९१ ॥

ऐसें ऐकतां वचन । दुंदुभी सवेग आपण । ठाकून आला किष्किंधा भुवन । करी गर्जन युद्धार्थी ॥ ९२ ॥

येथें कोण सबळ [तु. 'बळी'.] वाली । बाहेरी निघोनिया येच काळीं । युद्धा यावे मज जवळीं । रणरांगोळी मी करीन ॥ ९३ ॥

अनुक्रमणिका

ऐकोनि दुंदुभी युद्ध वादन । वालीनें करुनी उड्डाण । सन्मुख आला आपण । रागें गर्जन भुभुकारें ॥ ९४ ॥

ऐकोनि भुभुकार आरोळी । दुंदुभीची बैसली टाळी । म्हणे वानरू महाबळी । केवीं आकळे संग्रामीं ॥ ९५ ॥

वालीसी हाणतां मुष्टी घात । दुंदुभीचा ऊखळे हात । तेणें धांकें पळे वनांत । अति गुप्त निज मावा ॥ ९६ ॥

प्रवेशतां निजबिळीं । थापा हाणितला वाली । अशुद्ध वमुनी भूतळीं । प्राण तत्काळीं सांडिला ॥ ९७ ॥

> कायं कैलाससंकाशमेतदस्ति प्रकाशते । उद्धर्तुमेको वाली वा शक्तोऽहं रघुसत्तम ॥ १६ ॥
> सर्वप्राणभृतां लोके तृतीयं नोपलक्षये । ईदृशो विक्रमों यस्य जवे चानुत्तमा गतिः ॥ १७ ॥

त्या दुंदुभीचें कलेवर । कैलासप्राय महाथोर । श्रीरामा पाहे [दै. 'समोर'.] साचार । अति दुर्धर सुरनरां ॥ ९८ ॥

तें ऊचलावया कलेवर ॥ स्वयें शक्त वाली वीर । दुसरा सुग्रीव नर । तिसरा शूर असेना ॥ ९९ ॥

दुंदुभी देह उद्धारार्थी । धांडोळितां त्रिजगतीं । तिसरियाची न चलेशक्ति । हे ऊचलिती दोघे बंधू ॥ १०० ॥

तिजाजों उचली हे अंगभरें । त्याचेनि हातें वाली मरे । भाषिलें मातंग ऋषीवरें । निज निर्धारें श्रीरामा ॥ १०१ ॥

ऐसा वाली बळें विख्यात । आणिक त्याचा अति पुरुषार्थ । तुज मी सांगेन इत्थंभूत । आईक निश्चित श्रीरामा ॥

वाली करितां अनुष्ठान । त्यासी धरूं आला रावण । वीसही भूजा पसरुन । कव घालून धरूं गेला ॥ १०३ ॥

तंव येरें पसरुनि वामहस्त । विसाभूजां समवेत । आकळूनि लंकानाथ । कांखें आंत चेपिला ॥ १०४ ॥

विक्षेपु जाला अनुष्ठाना । वाली सवेग उठिला स्नाना । कांखे गिवसूनि दशानना । तत्क्षणा निघाला ॥ १०५ ॥

रावण सूनी कांखे तळीं । सप्त सागरीं करि आंघोळी । नाकीं तोंडीं क्षार जळीं । तेणें तळमळी रावण ॥ १०६ ॥

कांखेंहुनि निसटावयासी । सामर्थ्य नव्हे रावणासी । कळ लागली दाही शिसीं । कासाविस लंकेश ॥ १०७ ॥

कांखे सुदला रावण । हें वाली गेला विसरोन । घरा आला करुनि स्नान । अति विंदान तेथें जालें ॥ १०८ ॥

अनुक्रमणिका

आवडी अंगद उचलिला वाली । तव रावण पडिला तळीं । देखतां वानरीं सकळीं । भूतावळी मिळाली ॥ १०९ ॥

दहा मुखे मुगुट शिरीं । त्यासी धरुनी वानरीं । आंगदाचिया पाळण्यावरी । खेळण्या परी बांधिला ॥ ११० ॥

अंगदाचे धारोष्ण मूत । रिघे रावणाचे मुखाआंत । मुखावरी हाणे लात । नखें चिमटित सर्वांग ॥ १११ ॥

निर्गमु नाहीं रावणासी । पुलस्ती येऊन वालीपासी ।
मागोनि घेतलें लंकेशासी । वानरी त्यासीं विनोद केला ॥ ११२ ॥

एकी मशी लाविली मुखासी । एकी हिरतिले मुकुटासी । काळे तोंड मोकळा केशीं । रावण लंकेसी धाडिला ॥ [ओवी ११३ तु. प्रतीत नाही.]

ऐसिया वालिचिया पुरुषार्था । विचारुनिया रघुनाथा । आक्रमें करवेल घाता । तरी त्या कार्यार्था [मु. 'अंगिकारी'.] अनुष्ठी ॥ ११४ ॥

वाली सुग्रीव समबळी । काश्यपी माळा वाली जवळी । तेणें [मु. 'त्यासी'.] त्याची ख्याति आगळी । युद्ध काळीं मज जिंके ॥

कश्यप माळा वरद देख । युद्धी जो येईल सन्मुख । तो अवश्य होईल विमुख । काश्यपोक्त निजवरदा ॥ ११६ ॥

श्रीरामें स्वयें विचारी देख । वालीस होऊं नये सन्मुख । आपण राहोनि [मु. 'विमुख'.] अन्यमुख । वाली अवश्य वधावा ॥

कश्यपाचिया वरदार्था । अवतारा न करवें अन्यथा । वालीस वधावें अनोळखतां । मित्रकार्यार्था साधावया ॥ ११८ ॥

सुग्रीव बोले जी आपण । सप्त ताल विषम जाण । एकें बाणी करी छेदन । वाली निर्दळन त्याचेनी ॥ ११९ ॥

वाली सुग्रीव महावीरा । याहुन वेगळा तिसरा । उचली दुंदुभी कलेवरा । वाली वानरा तो वधी ॥ १२० ॥

ऐंसें बोलतां सुग्रीवासी । श्रीरामें आश्वासिलें त्यासीं । दाखवी दुंदुभी कलेवरासी । [तु. मु. प्रतींत 'आणि' हे पद अधिक.] सप्त तालासी छेदावया ॥

दुंदुभी कलेवर मज तृण । वामांगुष्ठे उचलीन जाण । सप्त तालांचें छेदन । करीन संपूर्ण बाणें एकें ॥ १२२ ॥

ऐसें बोलतांचि जाण । श्रीरामें धनुष्या वाऊनियां गुण । म्हणे मज दावी तालवन । सीतीं बाण सज्जुनी ॥ १२३ ॥

अनुक्रमणिका

करावया वालीचा घातु । श्रीरामें धनुष्या घातला हातु । सुग्रीव आनंदें नाचतु । कृपा रघुनाथु तुष्टला ॥ १२४ ॥

एका जनार्दना शरण ॥ सुग्रीव सख्य जालें संपूर्ण । पुढें वाली निर्दळन । रघुनंदन स्वयें करील ॥ १२५ ॥

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां श्रीरामसुग्रीवसख्यनिरुपण नाम तृतीयप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग चौथा

## वाली सुग्रीव विरोधधर्मकथन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

निर्दाळूनियां वालीसी । सदारा राज्य सुग्रीवासी । द्यावयां श्रीराम उल्हासीं । मित्र कार्यासी अवंचक ॥ १ ॥

स्वकार्य सांडूनियां मागें । मित्रकार्यार्थ लाग वेगें । श्रीराम धांवतुसे स्वांगें । साह्य सर्वांगें शरणार्थ्या ॥ २ ॥

श्रीराम विचार करी शुद्ध । हे तंव दोघे सखे बंधू । कां पडला [तं. 'द्वेष समंधु'.] दृढ विरोधु । द्वेष संबंधु पूसतु ॥ ३ ॥

किं निमित्तमिदं वैरं श्रोतुमिच्छामि तत्त्वतः । अनंतरं वधिष्यामि संप्रधार्य बलाबलम् ॥ १ ॥

तुम्ही दोघेहि बंधू सहोदर । तुम्हां दोघां कां पडिलें वैर । तेहि अतिशयें दुर्धर । येरां येर घातक ॥ ४ ॥

या वैराचें मूळ कारण । समूळ सांगावें संपूर्ण । ऐकोनि श्रीरामवचन । सांगे आपण सुग्रीव ॥ ५ ॥

पिता पुत्र सखा सहोदरां । वैरासि मूळ द्रव्य दारा । सुहृद् पेटती वैराकारां । द्रव्य दारा देह लोभें ॥ ६ ॥

द्रव्य दारा देह लोभापासीं । अहंकारू सदा मुसमुसी । तो वैर पाडी सुहृदांसीं । आम्हां दोघांसी वैर लोंभें ॥ ७ ॥

कैसा लोभ वैर कोण । त्याही वैराचें निज कारण । समूळ सांगेन लक्षण । सावधान अवधारीं ॥ ८ ॥

श्रुयतां राम तेनाहं राज्यात्स्वादवरोपितः । परुषाणि च संश्राव्य निर्धूतोऽस्मि बलीयसा ॥ २ ॥

आम्हा बंधूचि वैराची थोरी । श्रीरामा सावध अवधारी । स्त्रीराज्य लोभा वार्‍ही । वालीनें बाहेरीं घातलें मज ॥

पिता राज्यीं बैसतां जाण । वालीस युवराज्य संपूर्ण । मज दिधलें सेनानीपण । [मु. 'समसमान'.] समस्त मान येकात्मता ॥ १० ॥

पिता निवर्तलिया जाण । समस्त मिळोनि प्रधान । जेष्ठा वालीसी राज्यप्रदान । यौवराज्य पूर्ण मज दिधलें ॥

शांत दांत सुबुद्धी सबळ । सैन्य राखों जाणे अविकळ । तो सेनानि केवळ नीळ । सबळ दळ त्याचे नि ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

**दोघें बंधू एकात्मता । येर येरां अवंचकता । उदक नाहीं घेणें तत्त्वतां । मा भोग भिन्नता ते कैंची ॥ १३ ॥**

**एकत्र आसन एकत्र वसन । दोघां एकत्र भोग्य भोजन । येर येरां लागीं वेचूं प्राण । दोघां संपूर्ण एकात्मता ॥ १४ ॥**

**ऐसे दोघे एकात्मता ।** [तं. 'आम्ही दोघे'.] **अविकळ राज्य करितां । पुढें आली विक्षेपता । तेहि रघुनाथा अवधारी ॥ १५ ॥**

> मायावी नाम तेजस्वी पूर्वजो दुंदुभेः सुतः । तेन तस्य महद्वैरं वालिनः स्वीकृतं पुरा ॥ ३ ॥
> स तु सुप्ते जने रात्रौ किष्किंधाद्वारपागतः । नर्दति स्म सुसंरब्धो वालिनं चाव्हयद्युधि ॥ ४ ॥

**दुंदुभीचा जेष्ठ कुमर । मय नामें महाशूर । पितृ वैरें वैराकार । वाली वानर वधूं इच्छी ॥ १६ ॥**

**विभांडूनि किष्किंधा गड । वाली मारीन** [मु. 'हें मजसी होड'; मुं. 'बळदोर'.] **बळाधिरूढ । घेईन दुंदुभीचा सूड । गर्वारूढ होऊनि आला ॥ १७ ॥**

**किष्किंधेचा महाद्वारीं । मय आला मध्य रात्रीं । गर्जत घर्घर स्वरीं । गिरीदरीं दुमदुमिलीं ॥ १८ ॥**

**ऐकोनि त्याच्या गिरागजरा । सुटलें महाभय वानरां । अवघीं कांपती थरथरां । रहावया धीरा धरवेना ॥ १९ ॥**

**वानरांचा राजा वाली । येथें कोण आहे महाबळी । मजसी घ्यावयाहातफळी ।** [मु. 'वीरश्रीनें'.] **रण कल्लेळी येथें यावें ॥ २० ॥**

**दुंदुभी मारिला माझा पिता । त्याचा सूड घेईन मी आतां । ऐसें वालीने ऐकतां । सकोपता चालिला ॥ २१ ॥**

**असुर युद्धा निघतां वाली । बंधु स्नेहाचां कळवळी । मीहिं आलों तेंचि काळीं । बंधू जवळी साह्यार्थ ॥ २२ ॥**

**वाली देतां पै आरोळी । दुंदुभी पुत्रा बैसली टाळी । आम्हां दोघांसि देखोनि बळी । धांकें तत्काळीं पळाला ॥**

**मी एकला हे दोघे जण । हे माझा घेतील प्राण । येणें भयें** [मु. तो. तु. 'करुनि जाण'; तं. 'पळे'.] **पैं आपण । पलायमान भयभीतु ॥ २४ ॥**

**वाली म्हणें यासी न मारितां । नगरां न वचें** [मु. 'मी रिता'.] **आतां ।**
**त्याच्या करावया समूळ घाता । पाठीं लागतां सोडीना ॥ २५ ॥**

**किष्किंधा सांडूनि दूरी । मय पळें गिरि कंदरीं । येऊनिया निज विवरीं । बिळ द्वारीं प्रवशे ॥ २६ ॥**

> सतृणैरावृत्तं दुर्गं धरण्यां विवरं महत् । प्रविवेशासुरो वेगादावां द्वारि व्यवस्थितौ ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

मामुवाच ततो वाली देववत्पुरतः स्थितम् । इह त्वं तिष्ठ सुग्रीव द्वारस्थोऽत्र समाहितः ॥ ६ ॥
यावदेव प्रविश्याहं निहन्मि समरे रिपुम् । स्थापयित्वा तु मां तत्र प्रविवेश बिलं ततः ॥ ७ ॥

**अतर्क्य बिळ ते सर्वांसी । असुर ते बिळीं बिळवासी ।**
**आम्ही आंधारीं लक्षूनि त्यासी । बिळापासीं आलों दोघे ॥ २७ ॥**

**आंधाराचा निज नेटी । दैत्य रिघे बिळ संकटीं । आम्ही त्याची न संडु पाठी । बिळा निकटीं दोघे आलों ॥ २८ ॥**

**वाली मज आज्ञा करी । सावध राहे बिळद्वारीं । मी रिघोनियां भीतरीं । जंव ये वैरी मारूनी ॥ २९ ॥**

**मी म्हणें सवें येईन साह्यासीं । वाली म्हणे त्या मशकासी । मारावया साह्य कां येसी । बैस द्वारेसीं सावध ॥ ३० ॥**

**बिळीं प्रवेशंता वाली । दुंदुभी सुतें नेला पाताळीं । तेथें दानव कोटि बळी । युद्ध रवंदळी मांडिली ॥ ३१ ॥**

**युद्ध देखोनि दारुण । वाली जाला सावधान । वरद विजयी माळ पूर्ण । पाहे आपण ते काळी ॥ ३२ ॥**

अथ च वाली संक्रुद्धो मालामागृह्य कांचनीम् । पित्रा दत्तां महेंद्रेण युद्धाय समतिष्ठत ॥ ८ ॥

**कश्यपवरद विजयीमाळा । इंद्रे दीधली कृपानुमेळा । वालीनें सांभाळुनी गळां । मग परदळां मिसळला ॥ ३३ ॥**

**कंठी माळा असिलिया देख । अवश्य वैरी होती विमुख । युद्धां आलियां सन्मुख । रणीं निःशेष निमावें ॥ ३४ ॥**

**निराहारी निरोदक । युद्ध करितां वर्षें असंख्यांक । बाधूं न शके ताहन भूक । श्रमु बाधक नव्हे वरदे ॥ ३५ ॥**

**वरदमाळा असतां जवळीं । वाली वानरू आतुर्बळी । मर्दुनि दानवांची फळी । रण कल्लोळीं गर्जतु ॥ ३६ ॥**

**सप्रधान ससैन्य सकुमर । दानव मारिले अपार । मुख्य धुरा थोर थोर । वाहाती पूर रुधिराचे ॥ ३७ ॥**

**दानव मारिले अमित । उरले पळाले समस्त । दुंदुभीपुत्र येऊनि तेथ । युद्ध करीत वालीसी ॥ ३८ ॥**

**निरोदक निराहारेसीं । अविश्रम रण एकवीस मासीं । त्याचेनि हातें मृत्यु पावसी । मायावीसी शिववरद ॥ ३९ ॥**

**वाली मारावया निभ्रांत । वरद बळें युद्ध करित । वाली निज माळा समर्थ । श्रम रहित रण योद्धा ॥ ४० ॥**

अनुक्रमणिका

**पंधरा मास युद्ध दुर्धर । मायावीस सुटलें रुधिर । अशुद्धें पूर्ण जालें विवर । बाहेरी पूर प्रवाहे ॥ ४१ ॥**

> तस्य प्रविष्टस्य बिले संग्रामे वत्सरो गतः । स्थितस्य च मम द्वारि स कालोऽत्यवर्ततः ॥ ९ ॥
> नर्दतामसुराणां च ध्वनिर्मे श्रोत्रमागतः । निरस्तस्य च संग्रामें क्रोशतो निःस्वनो महान् ॥ १० ॥
> अथ दीर्घस्य कालस्य बिलद्वाराद्विनिःसृतम् । सफेनरुधिरं तीव्रं भृशं दृष्ट्वा च दुःखित ॥ ११ ॥

**मी बैसलों बिल द्वारीं । काय वर्तत भीतरीं । तें मी नेणें** [मु. ‘चि’.] **जी बाहेरीं । सवा वर्षवरी तिष्ठत ॥ ४२ ॥**

**तंव वीरांचा युद्ध क्रोध । रणाभिवेशें गर्जत शब्द । नोकल पाडाचे सुबद्ध । अति विरुद्ध ऐकिलें ॥ ४३ ॥**

**राहे साहे वीर शूर । पळों नको धरी धीर । घाय वाजती अति निष्ठुर । घायें वीर हुंबती ॥ ४४ ॥** [ओवी ४४–४५ मुं. तं. प्रतींत नाही.]

**एक रडत पडत । एक कण्हत कुंथत । ऐसें वीरांचे विकळित । म्यां हि समस्त आईकिलें ॥ ४५ ॥** [ओवी ४४–४५ मुं. तं. प्रतींत नाही.]

**ऐसें शब्द जंव ऐकत । तंव बिळा आंतुनी रक्त । निघालें अति प्रवाहत । सफेन युक्त बिळद्वारीं ॥ ४६ ॥**

**बिळद्वारीं देखोनि रक्त । वाली मारिला युद्धा आंत । तेणें मी जालों दुःखाभिभूत । पडिलों मूर्च्छित आक्रंदें ॥ ४७ ॥**

**वाली ऐसा बंधु निधान । रणीं पडिला आक्रंदोन । त्याचा सूड घ्यावया मी जाण । बिळीं आपण रिघों पाहे ॥ ४८ ॥**

**पाहोनि निज भुजांची वास । दृढ घालोनियां कास । बिळीं करितां प्रवेश । ऋषि लोमश मज वारी ॥ ४९ ॥**

**किष्किंधा राहिली बहुदूरी । दुंदुभी बिळ देशांतरी । आम्ही दोघें गुंतलो विवरीं । राजा नगरीं नाहीं कोणी ॥ ५० ॥**

**ऐसें देखोन किष्किंधापुर । राज्य घ्यावया सत्वर । वेगीं आले विद्याधर । तेहिं नगर वेढिलें ॥ ५१ ॥**

**हा हा भूत देखोनि नगरी । मज पासी** [मु. ‘आले’.] **प्रधान चारी । आले अतित्वरें करी । रिघतां विवरीं वारिलें ॥ ५२ ॥**

**विवरीं वालीचा जाला अंत । तुझाहि तेथें करिती घात । हातीचें राज्य जाईल येथं । ऐसा अनर्थ नको करूं ॥ ५३ ॥**

**वाली मारिला निश्चित । सफेन रुधिर वाहातें येथ ।** [मु. ‘तुवां’.] **तुज रिघों नये तेथ । ऋषि समस्त वारिती ॥ ५४ ॥**

अनुक्रमणिका

**वैरी निर्दळूनि समस्त । नगर राखोनियां स्वस्थ । मग वाली बंधूचे शुद्धयर्थ । रिघों विवरांत अवघेहि ॥ ५५ ॥**

अहं त्ववगतो बुद्धया चिन्हैस्तं भ्रातरं हतम् । दुःखार्तश्चोदकं दत्त्वा किष्किंधामागतस्ततः ॥ १२ ॥
गम्यमानं तु मां ज्ञात्वा तं वै भ्रातृविपर्ययम् । श्रुतं मन्त्रिभि : । सर्वैस्ततोऽहमभिषेचितः ॥ १३ ॥

**बीळद्वारीं वाहातां रक्त । असुरीं वाली मारिला तेथं । म्यांहि मानुनि निश्चित । अतिदुःखार्त ऊठिलों ॥ ५६ ॥**

**स्नान करुनियां** [इं. 'जवळी'.] **जळीं । बंधु उद्धरावया वाली । म्यां दिधली तिळांजुळी । मंत्र मेळीं ऋषि युक्त ॥ ५७ ॥**

**ऐकोनि** [तु. 'विद्याधरांचा'.] **निजपुराचा बाध । स्त्रियां बाळां अति निर्बंध । तेणें मजहि आला क्रोध । नगर रोध छेदावया ॥ ५८ ॥**

**पुढें युद्ध विद्याधरी । असुर आलिया विवरद्वारीं । युद्ध करितां दोहीं परी । संकट भारी मांडेल ॥ ५९ ॥**

**ऐसें सांगतां ऋषेश्वरीं । म्यां उचलूनि प्रचंड गिरी ।** [मु. तं. मुं. 'दृढ'.] **पुढें ठेविला विवर द्वारी । वैरी बाहेरी न रिघावया ॥**

**मग करूनि उड्डाण । किष्किंधेसी येऊनि जाण । केले विद्याधरा कंदन । चौघे प्रधान न येतांचि ॥ ६१ ॥**

**माझिया उड्डाणाचे नि वेगें । प्रधान राहिले पैं माघें । म्यां येऊनि लागवेगें । वैरी निजांगें निर्दळिले ॥ ६२ ॥**

**माझें ऐंकतां गर्जन । वैरीं उभ उभ्याच सोडीलें प्राण । धांके अवघे कंपायमान । जीव घेऊन पळाले ॥ ६३ ॥**

**स्त्रिया बाळकें केलीं निर्मुक्त । नगर सुखी केलें** [कं. 'समस्त'.] **स्वस्थ । माझा देखोनि पुरुषार्थ । संतोषत ऋषिवर्य ॥ ६४ ॥**

**येऊनि पाहाती** [तं. प्रतीत 'जंव' शब्द नाही.] **जंव प्रधान । तंव म्यां केलें अरिमर्दन । तेणे** [मु. 'हर्षे.'] **तेहि चौघेजण । संतोषोन सुखी जाले ॥ ६५ ॥**

**माझा पुरुषार्थ देखोन । चौघे प्रधान ऋषि सज्ञान । किष्किंधेचे राज्य संपूर्ण । अभिषेचन मज केलें ॥ ६६ ॥**

राज्यं प्रशासतस्तस्य न्यायतो मयि राघव । आजगाम रिपुं हत्वा वाली तमसुरोत्तमम् ॥ १४ ॥

**पूर्ण षण्मास पर्यंत । प्रजा सुखी करूनि समस्त । राज्य करितां धर्मयुक्त । आला अकस्मात बळी वाली ॥ ६७ ॥**

**मर्दुनी मायावी असुर । त्याचें घेऊनियां शिर । उघडूनियां विवरद्वार । केला भुःभुकार वालीने ॥ ६८ ॥**

अनुक्रमणिका

ऐकोनि वालीचें गर्जन । मज उल्हास जाला पूर्ण । जेविं प्रेताचा परते प्राण । तेविं आगमन वालीचें ॥ ६९ ॥

मृता होय अमृत पान । आवर्षणीं वर्षे घन । अंधा उघडती लोचन । तेविं आगमन वालीचें ॥ ७० ॥ [ओवी ७० त. मुं. प्रतींत नाही.]

पतिव्रते प्रिय दर्शन । साधकु पावे ब्रह्मज्ञान । तैसें वालीचें आगमन । सुख संपूर्ण मज जालें ॥ ७१ ॥

ऐकोनि वालीचें आगमन । सुखी ऋषि सुखी प्रधान । सुखी नगर नागरीक जन । सुख संपन्न स्त्रिया बाळें ॥

उभऊनिया गुढिया मखरें । ढोल निशाण वाद्य [मुं. 'वाद्ये गजरें'.] गजरें । अवघे आलों सामोरे । जयजयकारें गर्जत ॥ ७३ ॥

म्यां येऊनियां आपण । दीर्घ घालुनी लोटांगण । मस्तकीं वंदूनिया चरण । आलींगन देवों गेलों ॥ ७४ ॥

मज देखोनियां सन्मुख । वाली रागें जाला विमुख । माझें न पाहेचि मुख । परम दुःख मानसीं ॥ ७५ ॥

अभिषिक्तं तु मां दृष्ट्वा क्रोधसंरक्तलोचनः । मदीयान्मत्रिणो बद्ध्वा परुषं वाक्यमुक्तवान् ॥ १५ ॥

मज केलें राज्याभिषेचन । तेणें वाली क्रोधायमान । अभिषेक करविते प्रधान । त्यातेंही आपण निग्रहूं पाहे ॥ ७६ ॥

[मु. प्रतींत 'मग' हे पद अधिक.] हात जोडुनि म्यां पुढती । वाली प्रति केली विनती । माझा अपराधु कोणे अर्थी । तुवां कां चित्तीं कोप धरिला ॥ ७७ ॥

आम्ही तुजविण अनाथ । तूं तव आमुचा ज्येष्ठ भ्रात तुझेनि आम्ही सनाथ । आम्ही [मु. 'कृतार्थ'.] समर्थ तुझेनि ॥ ७८ ॥

भाग्यें जिणोनि शत्रूसी । सभाग्य भाग्यें येंथें आलासी । परम [मु. 'भाग्य'.] दैवें भेटलासी । ऐसें वालीसी विनविलें ॥ ७९ ॥

आईकोनि माझें वचन । वाली क्रोधें आरक्त नयन । कठिण बोलिला [तु. तं. 'आपण'.] दारुण । सुहृदपण सांडूनि ॥ ८० ॥

तूं बंधू नव्हेसि माझा वैरी । वैर केलें बहुतां परी । तुझ्या वैराची निज थोरी । परोपरी छळवादी ॥ ८१ ॥

मी रिघालों विवरांत । तुवां द्वारी राहावें सावचित्त । तेथें तुवां केलें विपरीत । द्वारीं पर्वत लाविला ॥ ८२ ॥

सुग्रीवा तुझें मनोगत । असुरीं करावा माझा घात । स्वयें भोगावें राज्य समस्त । बिळ तदर्थ बूजिलें ॥ ८३ ॥ [ओवी ८३ तं. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

बिळी रिघावें माझिया शुद्धयर्थ । तो तुवां सांडूनिया अर्थ । धरिला राज्य भोग स्वार्थ । सहोदरत्व तुज कैचें ॥ ८४ ॥

राज्य भोगावया समस्त । म्यां मरावें तुझ्या पोटांत । बिळ बुजिलें तदर्थ । कपटें व्यर्थ विनविसी ॥ ८५ ॥

म्या रिघोनि बिळा आंत । दानव निर्दळिले समस्त । सपुत्र सैन्या करितां घात । रक्त विवरांत प्रवाहे ॥ ८६ ॥

वीरां करितां महामारी । अशुद्ध वाहिले विवरीं । तें प्रवाहे बिळद्वारी । दानवां बोहरी रणीं करितां ॥ ८७ ॥

वरद मायावी असुरांसी । निराहारें विणउदकेंसी । युद्ध करितां येकविसां मासीं । [मु. 'म. 'मयावीरासी'.] मायावियासीं तैं अंतू ॥ ८८ ॥

> अर्दयित्वा तु तं शत्रुं मायाविनमहं तदा । निष्कामन्नैव पश्यामि बिलस्य पिहितं मुखम् ॥ १६ ॥
> मम विक्रोशतश्चैव सुग्रीवेति पुनः पुनः । यदा प्रतिवचो नास्ति तदाहं दुःखितोऽभवम् ॥ १७ ॥

मारूनिया मायावी असुरांसीं । मज बाहेरी यावयासीं । मार्ग न दिसे कासाविसीं । तुवां बिळासी बूजियेलें ॥ ८९ ॥

भवंता भोवें विवराआंत । मार्ग मज नव्हे प्राप्त । गुप्त दानव करिती घात । अंधारांत अति धाकें ॥ ९० ॥

मग विचारूं केला मानसीं । सुग्रीव आहे द्वारापासीं । आपण बोभातांचि त्यासीं । येऊनि वेगेंसी काढील ॥ ९१ ॥

सुग्रीवा स्वयें बोभातां । पुनः पुन्हा हांक देतां । प्रतिवचन नायिकता । दुःखावस्था मज जाली ॥ ९२ ॥

येकला द्वारीं बैसला होतां । दानवीं ठकुनी केलें घातां । तो कळिकाळा नाटोपता । छळूनी छद्मतां मारिला ॥ ९३ ॥

सुग्रीव निमाला सर्वथा । बंधु स्नेह परम व्यथा । रडत पडत चडफडितां । दुःखावस्था मूर्च्छितु ॥ ९४ ॥

आम्ही दोघे सखे बंधु । आणुमात्र नाहीं विरोधु । सुग्रीव अंतरला बंधु । [मु. 'दुःखसिंधु'.] दुःख बाधु मज जाला ॥ ९५ ॥

केउता गेलासि रे सुग्रीवा । तूं तव माझा निज विसांवा ।
दैत्य मारूनि आलों मी [मु. 'दे'.] खेंवा । बंधु गौरवा विसरलासी ॥ ९६ ॥

उलंघूनि मम आज्ञेसीं । सुग्रीव न वचे लघुशंकेसी । दानवीं निर्दाळिलें त्यासीं । उकसाबुकसी फुंदतु ॥ ९७ ॥

अनुक्रमणिका

**सुग्रीव वानर युवराजा । जीव प्राण आत्मा माझा । दैत्यीं मारिला रण समाजा । कोण्या काजा मीं** [मु. तु. 'उरलों'.] **आलों ॥ ९८ ॥**

**मज सवें आला असतां । माझा सुग्रीव तैं वाचतां । विवर द्वारीं म्यां ठेवितां । स्व बंधु घाता म्यां केलें ॥ ९९ ॥**

**तुझा बाहेरी केला घात । मज कोंडिलें विवरा आंत । माझा करावया साह्यार्थ । येई धांवत बंधुराया ॥ १०० ॥**

**आम्ही तुम्ही वेगळे नव्हों कधीं ।** [मु. 'मज कां आठवली कुबुद्धी'.] **माझी कां आजी ठकली बुद्धि ।**
**तुज ठेवोनि द्वारविंधी । मी कां युद्धीं रिघालों ॥ १०१ ॥**

**मज लागला बहुत काळ । मजवीण नेघसी जळ फळ ।**
**तेणें तुज भरोनियां तरळ । प्राण तात्काळ सांडिला ॥ १०२ ॥**

**ऐसा सुग्रीवार्थ विलपत । आंधारीं भवंतां विवरांत । घातला बिळद्वारीं पर्वत । देखिला तेथ रविरश्मी ॥ १०३ ॥**

उपलेनास्मि संरूद्धो राज्यमन्विच्छता पुरा । सुग्रीवेण नृशंसेन न स्मृतं भ्रातृगौरवम् ॥ १८ ॥
एवमुक्त्वा तु मां तत्र वाससैकेन वानरः । तदा निर्वासयामास हृत्तं दारं च मां ततः ॥ १९ ॥

**सुग्रीवा तुझें निज हृदयांत । मज कोंडूनि मारावें तेथ । बिळद्वारीं घातला पर्वत । राज्य समस्त भोगावया ॥ १०४ ॥**

**पर्वत असतां बिळ द्वारीं । रवि देखिला छिद्रांतरीं । घायें पर्वत करूनि** [तं. 'चूरी'.] **दूरि । बिळा बाहेरीं मीं आलों ॥ १०५ ॥**

**सुग्रीव बैसविला होता येथ । त्याचा काय जाला वृत्तांत । ऐसें मी जंव विचारीत । तंव विपरीत** [तं. 'वर्तलें'.] **देखिलें ॥ १०६ ॥**

**सुग्रीव किष्किंधेचा राजा । होऊनी भोगी माझिया भाजा । शत्रुत्व जोडोनि वोजा । वैरी माझा हा** [तं. 'होय तूं'.] **एकु ॥ १०७ ॥**

**सुग्रीवालागीं मी तळमळित । सुग्रीवा** [पै. 'चिंती'.] **चित्तीं माझा घात । ऐसें केलें पैं विपरीत । राज्यभोगार्थ सुग्रीवें ॥ १०८ ॥**

**विवरीं माझी सांडुनी शुद्धी । तोडूनियां सुहृद बुद्धि । सुग्रीव बैसला राज्य पदीं । दुष्ट बुद्धि दुरात्मा ॥ १०९ ॥**

**तारा सांगे वालीपासीं । बुडतां किष्किंधेच्या राज्यासी । सुग्रीवें राखिलें प्रतापेंसी । सत्य तुजपासी सांगते ॥**

अनुक्रमणिका

बिळीं गुंतले दोघे वीर । मागें शून्य पडिलें राज्य । ते राज्य घ्यावया सत्वर । वेढिलें पुर विद्याधरीं ॥ १११ ॥

निरोधूनि नगर नागरां । निरोधिलें स्त्रियां कुमरां । [तं. 'आम्हाते'.] आकांत देखोनि समग्रा । ऋषेश्वरा अतिचिंता ॥ ११२ ॥

सेनापती वानर सैन्य । त्यांसी सर्वथा नाही ज्ञान । पूर्वीचे चौघे प्रधान । आले धांवोन तुम्हांपासीं ॥ ११३ ॥

तुम्हां दोघां आणावया येथं । विवरां आले ऋषि समस्त । तंव विवरीं रुधिर वाहात । सुग्रीव रडत देखिला ॥

सुग्रीव ऋषीपासी सांगत । वाली मारिला वाहे रक्त ।
मी हि जातों त्याचें शुद्धयर्थ । मंत्रीं समस्त नगर राखा ॥ ११५ ॥ [ओवी ११५ ते ११८ मुं. प्रतीत नाहीत व ११५ ते ११७ तं. प्रतीत नाहीत.]

ऐसें सांगोनि ऋषि समस्तां । सुग्रीव बिळीं प्रवेशतां । ऋषीं धरिला तत्वतां । पूर्व वृत्तांता अवधारी ॥ ११६ ॥

तुम्हांसि शोधावया लागूनि । प्रधान गेले वनोवनीं । सुनी देखोनि राजधानी । आले धांवोनि गंधर्व ॥ ११७ ॥

तिहीं निरोधिलें नगर । निर्बंधिले स्त्रिया कुमर । राज्य गेलें गेलें समग्र । आम्ही सत्वर सांगों आलों ॥ ११८ ॥

वाली निमाला रुधिर वाहे । मेल्यां मागें मरों नये । ब्रह्मदत्त स्वराज्य आहे । तें [मु. 'आधीं'.] लवलाहें संरक्षी ॥ ११९ ॥

राज्य राखोनियां स्वस्थ । मग निघावें वाली शुद्धयर्थ । तंव बिळद्वारीं घाली पर्वत । ऋषि सांगत पूर्व सूचना ॥

युद्ध करितां विद्याधरीं । विवर द्वारें येतील वैरी । संकट पडेल दोहीं परीं । घाली बिळद्वारीं पर्वत ॥ १२१ ॥

ऋषींची आज्ञा अति समर्थ । सुग्रीवें मानूनि निश्चित । घालूनि बिळद्वारीं पर्वत । आला युद्धार्थ महाबळी ॥

सुग्रीव वीर धीर जुंझार । विभांडूनि विद्याधर । विजयी जाला एकांग वीर । जय जय कार ऋषि करिती ॥

शून्य असो नये राजधानी । विचारूनि ऋषि प्रधानीं । सुग्रीवातें निग्रहूनि । अभिषिंचूनि बैसविला ॥ १२४ ॥

स्वयें सुग्रीवें राज्य नेघतां । बलात्कारें बैसविलें माथां । यासी कोपो नको आतां । क्षमा सर्वथा त्वां कीजे ॥

ऐकोनि तारेचें वचन । वाली बोलें कोपायमान । याचें तुज न कळे विंदान । वैरी संपूर्ण हा माझा ॥ १२६ ॥

विभांडूनी वैरियासी । संस्थापूनि निजराज्यासी । माझा कां आठऊं नव्हेचि यासी । परम द्वेषी हा माझा ॥

अनुक्रमणिका

माझा सांडूनि परामर्ष । सुखें राज्य करितों षण्मास ।
माझां मरणीं यासी उल्हास । विवरीं मारावयास कोंडिलें ॥ १२८ ॥

राज्य राखोनि [तं. 'समस्तां'.] स्वस्थता । बिळ पर्वत जरी काढिता । तरी मीं मानितों अति सख्यता । वैरी [तं. 'तत्वतां'.] सर्वथा हा आम्हा ॥

ऐसें बोलोनि सक्रोधता । करितां सुग्रीवाचिया घाता । तारेनें धांवोनि धरिलें हातां । स्वबंधु-घातां करूं नये ॥

सुषेणाची निज दुहिता । तारा वालीची पतिव्रता । रूमा सुग्रीवाची कांता । हिरोनि घेतां होय [तं. 'ते काळीं'.] वाली ॥ १३१ ॥

तारेचेनि बोलें जाण । मग राखिला माझा प्राण । हिरोनि दारा वस्त्रें भूषण । नगर निर्याणवस्त्रेंविण केलें ॥

लाऊनिया मज लंगोटी । [मु. पै. 'सुर्गीव दवडिला'.] लाविलें क्रोधें दिक्पाटीं । सक्रोध प्रधाना पाहतां दृष्टी । तेहि उठाउठी पळाले ॥

प्रधानीं मज केलें अभिषेचन । कोपें दंडूं पाहे प्रधान । तेणें भयें पलायमान । आले पळोन मजपासीं ॥ १३४ ॥

सख्या बंधु दोघां आम्हां । विरोध पडावयाची [मु. 'सीमा'.] प्रमा । सांगीतली गा श्रीरामा । उभय धर्मा यथार्थ ॥ १३५ ॥

हृतयुवराज्य हृतदारा । तेणें अति दुःखी [मु. 'मी' हे अधिक पद.] रघुवीरा । अहोरात्र न लगे निद्रा । श्रीरामचंद्रा तुझी आण ॥ १३६ ॥

ऐसें सुग्रीवें सांगतां । कृपा उपजली श्रीरघुनाथा । वाली वधीन मी आतां । ठेविला माथा अभय हस्त ॥ १३७ ॥

वाली सुग्रीव विरोध । त्याचा जाला अनुवाद । एका जनार्दनीं प्रबोध । वाली वध निज मोक्ष ॥ १३८ ॥

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां वालीसुग्रीवविरोधधर्मकथंन नाम चतुर्थप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग पाचवा

## सुग्रीव भंग स्थापन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**पुढती वालीच्या** [तं. 'शत्रुपणासी'.] **संत्रासासी । सुग्रीव सांगे श्रीरामासी ।**
**हृतराज्य गुप्त** [इं. अं. 'वानरांसी'.] **वनवासी । तेथेंहि आम्हांसी मारूं धांवें ॥ १ ॥**

तद्भयाच्च महींसर्वा विचरामिं समंततः । ऋष्यमूके गिरिवरे भार्याहरणदुःखितः ॥ १ ॥
प्रविष्टोऽस्मि दुराधर्ष वालिनः कारणांतरे ॥

**आम्ही जावों जेथजेथें । वाली मारूं धावें तेथतेथें । आमुच्या करावया घातातें । वैर पोटांत दृढ धरिलें ॥ २ ॥**

**वालीभयें भयाभीत । अहोरात्रीं राहतां गुप्त । पाळती येऊनिया तेथ । शुद्धि सांगत वालीसी ॥ ३ ॥**

**भयें भोवतां दशदिशीं । नारदें सांगितलें आम्हासी । जाऊनि राहा ऋष्यमूकासी । तेथ वालीसी ऋषिश्रापु ॥ ४ ॥**

**ऐक श्रापाचें कारण । दुंदुभी बळें उन्मत्तपूर्ण । वालीपासी येऊन** [तं. 'जाण'.] **आपण । युद्ध दारूण मांडलें ॥ ५ ॥**

स गृहीत्वा विषाणाभ्यां दुंदर्भिं गिरिसंन्निभम्। वाली विमोचयामास क्षितौ पंचत्वमागतम् ॥ २ ॥
चिक्षेप बलवान्वाली पादेनैकेन योजनम् । प्रपेदे रुधिरं क्षिप्त्वा मतंगस्याश्रमे शुभे ॥ ३ ॥
उत्ससर्ज तदा शापं क्षप्तारं प्रतिवालिनम् । इदं तेनाप्रवेष्टव्यं प्रविष्टस्य वधो भवेत् ॥ ४ ॥

[मु. 'वेगीं'.] **शिंगीं धरूनि दुंदुभीसी । वालीनें आपटितां भूमीसी । घायें सांडूनि प्राणासी । पंचत्वासी पावला ॥ ६ ॥**

**वाली वेगें वामपादेसी । दुंदुभी उडविला** [पै. 'वेगेसी'.] **आकाशीं । मतंगऋषि आश्रमवासी । रुधिर त्यापासीं स्रवलें ॥ ७ ॥**

**स्रवतां देखोनि रुधिरासी । कोप आला मतंगऋषीसी । तेणें शापिलें वालीसी । अति आक्रोशीं सक्रोध ॥ ८ ॥**

**ज्याचिया आघात निजशक्ती । अशुद्ध स्रवे आश्रमाप्रती । त्यासी रिघतां ये पर्वतीं । मृत्यु निश्चिती पावेल ॥ ९ ॥**

अनुक्रमणिका

पावो लावितां ऋष्यमुकासी । शापें मरण आहे वालीसी ।
नारदें सांगोनि आम्हांसी । धाडी वस्तीसी ऋष्यमूका ॥ १० ॥

ऋष्यमुकीं करितां वस्ती । होईल वालीभया निवृत्ति । थोर पावाल यश कीर्ति । श्रीरघुपती प्रसादें ॥ ११ ॥

नारद वचनें ऋष्यमूकीं । निर्भय राहिलों निजसुखी । वाली भयाची धुकधुकी । येथे नि :शेषीं असेना ॥ १२ ॥

श्रापभय घेऊनि पोटीं । वाली ऋष्यमूक न पाहे दृष्टीं ।
येथ यावयाची न करी गोष्टी । सुख संतुष्टी [मु. 'असो आम्ही'.] आम्ही वसों ॥ १३ ॥

नारदाची वचनोक्ति । आजि मज जाली प्रतीति । तूं भेटलासी [मु. सु. 'कृपामूर्ती'.] श्रीराममूर्ति । आम्ही त्रिजगतीं निज विजयी ॥ १४ ॥

एतत्ते सर्वमाख्यातं वैरादेः कारणं महत् । अनागसा मया प्राप्तं व्यसनं पश्य राघव ॥ ५ ॥

सर्व वैराचें कारण । मुख्य माझी भार्या हरण । तें म्यां सांगितलें संपूर्ण । निर्भय स्थान ऋष्यमुकीं ॥ १५ ॥

माझी भार्या जे कां रुमा । ते मज पढियंती जैसा आत्मा । ते सोडविलिया श्रीरामा । सुख संभ्रमा पावेन ॥ १६ ॥

तारा निजपत्नी वालीसी । तेणें सुखें भोगावें तिसीं । रुमा माझी द्यावी [मु. 'गौरवैसी'.] मजपासी । वैर दोघांसी असेना ॥ १७ ॥

आम्हां दोघां व्यर्थ विरोध । स्त्रीहरणें वैर संबंध । सा सा मासां करितां युद्ध । पडिलें द्वंद्व स्त्री लोभें ॥ १८ ॥

बहुत युद्ध त्यासी आम्हांसी । नेमस्त करितां सा सा मासीं । सुटका नव्हे निज पत्नीसी । उकसाबुकसी फुंदत ॥ १९ ॥

देखोनि सुग्रीवाचें रुदन । श्रीराम काढी निर्वाण बाण । घायें घेईन वालीचा प्राण । सत्य जाण सुग्रीवा ॥ २० ॥

वाली सबळ बळवान । आतुर्बळी रघुनंदन । दोघेजण समसमान । न्यून पूर्ण दिसेना ॥ २१ ॥

पैल दुंदुभी कलेवर जाण । आंगें जो उचली आपण । त्याचेनि हस्तें वालीसी मरण । ऋषि भाषण मातंगीं ॥ २२ ॥

सप्तताळ विषम [तु. 'जाण'; तं. 'पूर्ण'.] वन । येकें बाणें करी [मु. 'जो' हे अधिक पद.] छेदन । त्याचेनि हातें वालीसी मरण । ऋषि भाषण मातंगी ॥ २३ ॥

अनुक्रमणिका

तत्रैवं ब्रुवतस्तस्य सुग्रीवस्य महात्मनः । राघवो दुंदुभेः कायं वामांगुष्ठेन तोलयन् ॥ ६ ॥
सलीलया महावीर्यश्चिक्षेप दशयोजनम् ॥ ७ ॥

**ऐकोनि सुग्रीवाचें वचन । स्वयें श्रीराम हास्यवदन । दुंदुभी काया गिरीसमान । देखिली आपण श्रीरामें ॥ २४ ॥**

**वामांगुष्ठें उचलून । केले त्रिवार तोलण । दुंदुभी सांडिला हेळसून । दशयोजन उडविला ॥ २५ ॥**

**दुंदुभी काया अतिसमर्थ । रामें उडविला** [मु. 'अंगुष्ठवत'.] **अंगुष्ठें त्वरित । तऱ्ही सुग्रीव साशंकित । बोले भयभीत तें आईका ॥ २६ ॥**

आर्द्रमांसो हि प्रत्यग्रः क्षिप्तकायश्च वालिना । सांप्रतं लघुनिर्मांसः क्षिप्तः कायस्त्ववाद्य वै ॥ ८ ॥
नाद्य शक्यं बलं ज्ञातुं तव वातस्य वाधकम् । तालानेतांस्तु निर्भिद्य भवेद्व्यक्तिर्बलाबले ॥ ९ ॥

**वालींने मारूनी दुंदुभीसी । समांस रक्त सार्द्रतेसी । पायें उडविलें आकाशीं । आम्हा सर्वांसीं देखतां ॥ २७ ॥**

**आतां तुवां ही रघुनाथा । दुंदुभी काया अतिशुष्कता । वाळोन जाली अति लघुता । ती पदघातां उडविली ॥ २८ ॥**

**ऐसेही आम्ही देखतां । लक्षेना बळाबळता । विषम ताळ छेदी बाणें एके आतां । तैं वाली निहंता तूं होसी ॥ २९ ॥**

**संदिग्ध वानर वचन । ऐकता रामें चढवोनि गुण । गुणीं लाविला** [मु. तु. 'फणिबाण'.] **लाघवी बाण । ताळ छेदन करावया ॥ ३० ॥**

**विषम ताळाची ताळस्थिती । शेष पृष्ठीवरी उत्पत्ति । त्यासी छेदावया रघुपति । केली युक्ति तें ऐका ॥ ३१ ॥**

**धनुष्य वोढिलें रामें आपण । चेपितां लक्ष्मणाचा चरण ।**
**तेणें चुकवितां आंग संपूर्ण । विषम समान ताळ जाले ॥ ३२ ॥**

**शेषावतार श्रीलक्ष्मण । तेणें आंग चुकवितां आपण । विषम ताळ जाले समसमान । रघुनंदन** [मु. 'रघुनंदनें छेदितां'.] **निजसत्ता ॥ ३३ ॥**

सगृहीत्वा धनुर्वीरो शरमेकं स राघवः । भित्वा तालान्गिरींश्चैव प्रविवेश रसातलम् ॥ १० ॥

**धनुष्य वावोनि दुर्धर । गुणीं लाऊनी अमोघ शर । बाण सोडितां श्रीरामचंद्र । जालें विचित्र तें ऐका ॥ ३४ ॥**

अनुक्रमणिका

**सप्त तालातें छेदून । गिरिवरातें विदारून । सप्त पाताळें भेदून । गेला निघोन शर** [मु. तु. तं. ‘शेषांगी’.] **वेगा ॥ ३५ ॥**

**शेषाचें आंगी ताळमूलता । त्यातें जाला समूळ छेदितां ।**
**परतोनि येऊनि श्रीरामाहातां । रिघों भातां होय स्वस्थ ॥ ३६ ॥**

**श्रीरामें छेदिलें विषम ताळ । तेणें सुग्रीवा सुख कल्लोळ । जयजयकारें गर्जती सकळ । आम्ही सबळ श्रीरामें ॥ ३७ ॥**

[मु. ‘ताड विषमता’.] **भवभय विषमता । श्रीराम दृष्टि होय समता । विषम ताळां श्रीराम छेदितां । सुख समस्तां कपिकुळा ॥ ३८ ॥**

**श्रीराम आम्हां सुख संपत्ति । श्रीराम आम्हां निज विश्रांति ।**
**श्रीराम** [पै. ‘वानरां’.] **आम्हां साह्यार्थी । निज सांगाती श्रीराम ॥ ३९ ॥**

**श्रीराम जिवलग सोयरा । श्रीराम निजात्मा वानरां । श्रीराम स्वामी चराचरां । वंद्य सुरवरां श्रीराम ॥ ४० ॥**

**ऐसें बोलोनि आपण । सुग्रीवें घातलें लोटांगण । श्रीरामें दिधलें आलिंगन । समाधान** [पै. ‘जिवीं जीवां’.] **जीव शिवां ॥ ४१ ॥**

**श्रीराम म्हणे सुग्रीवांसी । पुढें जाऊनि किष्किंधेसी । वाली पाचारी युद्धासी । तुझिया पाठिसी मी आहें ॥ ४२ ॥**

**वाली आलिया संग्रामासी । बाणें निवटीन निमिषार्धेंसी । तूं तव भेवों नको** [त. ‘निजमानसी’.] **त्यासी ।** [तं. ‘निःशंक त्यासी’.] **निःशंकतेसीं युद्धकरी ॥ ४३ ॥**

**सुग्रीवा वालीसी युद्ध करितां । विसरो नको मज रघुनाथा । जयो पावसी सर्वथा । वचन माथां वंदिलें ॥ ४४ ॥**

**ऐसे सांगता श्रीरघुवीर । सुग्रीवें केला भुःभुक्कार । कवतीक पाहे श्रीरामचंद्र । वाली वानर मी मारीन ॥ ४५ ॥**

**वाली बळिया अतिबळी । मीहि श्रीराम आतुर्बळी । आजी वालीची करीन होळी । रणरंवदळी पाहे माझी ॥ ४६ ॥**

एवमुक्त्वा तु सुग्रीवं शूरौ तौ नरवानरौ । जगमतुः सहिताः सर्वे किष्किंधां वालिपालिताम् ॥ ११ ॥
ते सर्वे सहसागत्य रामसुग्रीवलक्ष्मणाः । वृक्षैरात्मानमावृत्य वितस्थुर्गहने वने ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

ऐसें बोलतां सुग्रीवापासीं । अति आल्हाद श्रीरामासी । सवेग उठिला सौमित्रेसी । वाली वधासी उद्यतु ॥ ४७ ॥

एक सखा जिवलग सौमित्र । दुजा सुग्रीव सन्मित्र । दोघे घेवोनि [मु. 'वेगवत्तर'.] सत्वर । श्रीरामचंद्र निघाला ॥ ४८ ॥

एक जालें नरवानर । वानर वीरांचा संभार । अवघे करिती जयजयकार । किष्किंधा द्वार ठाकिलें ॥ ४९ ॥

श्रीराम सुग्रीव आणि सौमित्र । तिघें [तं. 'बोलती'.] चालती एकत्र । आनंदें गर्जत वानर । किष्किंधा द्वार पावलें ॥ ५० ॥

जेवीं आत्मा देहा आंत । असोनि न देखती समस्त । तेविं श्रीराम त्या [पै. 'वनात'.] वानरांत । ठेला अति गुप्त जन दृष्टी ॥

वाली सुग्रीव युद्ध दुर्धर । पाहावया श्रीरामचंद्र । वनीं असोनि अगोचर । नर वानर न देखती ॥ ५२ ॥

निकट न देखती नरवीर । देखों न शकति ऋषीश्वर । त्यासि केविं देखे वाली वानर । अगोचर श्रीरामु ॥ ५३ ॥

गोचरां न दिसे अगोचर । हें तंव मुळीचें ब्रह्मसूत्र । जवळी असतां श्रीरामचंद्र । नर वानर न देखती ॥ ५४ ॥

असो हे कथा अति विस्तार । श्रीराम नव्हे गा गोचर । साधु जाणती हा विचार । श्रीरामचंद्र गुह्य गुप्त ॥ ५५ ॥

सुग्रीवें घालूनियां कांस । पाहोनि श्रीरामाची वास । भुःभुक्कारी अति उल्हास । नादें आकाश दुमदुमिलें ॥ ५६ ॥

सुग्रीवाचेनि गिरागजरें । दिवसा पडलीं नक्षत्रें । डळमळिलीं मेरूशिखरें । गिरिगव्हरें दुमदुमिलीं ॥ ५७ ॥

दिग्गजांची बैसली टाळी । नादें गजबजिला वाली । ऐसा कोण आला बळी । प्रलय आरोळी देऊनि ॥ ५८ ॥ [मु. प्रतीत ओवी ५८ नाही.]

दूत सांगती वालीसी । सुग्रीव आलासे युद्धासी । हें सामर्थ्य नाहीं त्यासी । अनारिसी शक्ति दिसे ॥ ५९ ॥

त्यासी कोण्ही भेटला बळी । त्याचेनि देतो आरोळी । ऐसें विचारूनियां वाली । कास तत्काळीं घातली ॥ ६० ॥

आजिचें युद्ध अति संकटीं । विजयमाळा घातली कंठीं । तऱ्ही धाकतुसे पोटीं । आरोळी मोठी ऐकोनी ॥ ६१ ॥

अनुक्रमणिका

**आजि मरणें किंवा मारणें । दोहीचें वैर आजि छेदणें । ऐसा निश्चयो करूनि तेणें । युद्धा येणें सक्रोध ॥ ६२ ॥**

> श्रुत्वा तु निनदं भ्रातुर्वाली क्रोधादमर्षितः । निपपात सुसंरब्धो राहुः सूर्यगणानिव ॥ १३ ॥
> तयोस्तु तुमुलं युद्धं वालिसुग्रीवयोरभूत् । तालैरशनिकल्पैश्च बहुवेगैः समुष्टिभिः ॥ १४ ॥
> जघ्नतुः समरेऽन्योन्यं भ्रातरौ क्रोधमूर्छितौ ॥

**ऐकोनि सुग्रीवाची आरोळी । युद्धा क्रोधें आला वाली । दोघे भिडती** [पै. 'क्रोधानुमेळी'.] **क्रोधानळीं । महाबळीं वानर ॥ ६३ ॥**

**वाली सुग्रीव युद्ध करिती । ब्रह्मादि देव पाहों येती । नभ दाटलें विमान पंक्ति । दोहींचि शक्ति लक्षावया ॥ ६४ ॥**

**समान बळ दोहीं वीरीं । युद्ध व्युत्पत्ति दोघां पुरी । कवणा जय कवणा हारी । पाहों सुरवरीं येइजे ॥ ६५ ॥**

**दोघां होतां दृष्टादृष्टी । कोणें भडका खवळें पोटीं । सद्बंधुत्वा पडली तुटी । स्त्री लोभासाठीं अपघातु ॥ ६६ ॥**

**जेवि राहु पर्वणीसी । ग्रासूं धांवे शशिसूर्यासी । तेंवि वाली सुग्रीवासी । निर्दळावयासि धांवतु ॥ ६७ ॥** [ओवी ६७ तु. तं. प्रतींत नाही.]

**वाली पर्वतु हाणे दारुण । सुग्रीव मुष्टिघातें करीचूर्ण । शाल तमाल मानी कोण । रणमदें पूर्ण उन्मत्त ॥ ६८ ॥**

**दोहींची अदट आंगवण । आंग** [पै. 'आंगा घडलें'; मुं 'घटलें'.] **छेदिलें करितां रण । घाय हाणती दारूण । भेडाचें प्राण निघों पाहाती ॥ ६९ ॥**

**वज्रप्राय कराभिघाता । निष्ठुर मुष्टि हाणिति माथां । परस्परें तडवे देतां । अति निघाता पेटले ॥ ७० ॥**

**दंडीं मुडपीं उरीं शिरीं । पाय हाणिती वर्मशरीरीं । जानु हाणती उरावरी । हाणती** [तं. 'उरावरी'.] **कोपरीं येर येरां ॥ ७१ ॥**

**दोघां जैतांचा आवांका । लाविती पुसांचिया चडका । परस्परें हाणती थडका । उठी धडका निराळी ॥ ७२ ॥**

**येर येरां तळीं वरी । दोघे तळपती चक्राकारीं । दोघे उसळती गगनोदरीं । निराधारी भिडती ॥ ७३ ॥**

**घाय हाणतां महाबळी । न्याहो उठीत पाताळी । कृतांताचि बैसे** [तं. 'कानटाळी'.] **दांतखिळी । देतां आरोळी गर्जोनी ॥ ७४ ॥**

**क्षणेक युद्ध पृथ्वीवरी । क्षणेक युद्ध गगनोदरीं । युद्ध लाघवता वानरी । सुरासुरीं विस्मित ॥ ७५ ॥**

अनुक्रमणिका

**बाप बळी दोघे वानर । वीर धीर महाशूर । दोघे युद्धीं दुर्धर । येर येरां नाटोपती ॥ ७६ ॥** [ओवी ७६ तं. प्रतीत नाही.]

धनुरादाय काकुत्स्थो तावुभौ समुदैक्षत । अन्योन्यसदृशौ वीरौ उभौ देवाविवाश्विनौ ॥ १५ ॥
तान्नावगच्छत्सुग्रीवं वालिनं चापिराघवः । ततो न कृत्वान्बुद्धि भोक्तुमंतकरं शरम् ॥ १६ ॥

**दोघे वीर रण प्रवीण । देखोनि वानराचें रण । संतोषला श्रीरघुनंदन । बल समान दोहींचे ॥ ७७ ॥**

**दोघे वानर** [मु. 'अनन्य'.] **अन्यून । सबळ बळें समसमान । देखोनि रामें योजिला बाण । वाली विंधोनि मारावया ॥ ७८ ॥**

**तंव वाली सुग्रीव दोघे जण । ठाण मान वर्ण लक्षण । रुप रेखा समसमान । कोणास बाण विंधावा ॥ ७९ ॥**

**जैसे कां दोघे अश्विनौ देव । समरूप सम स्वभाव । तैसेचि वाली सुग्रीव । सम अवेव सारिखेची ॥ ८० ॥**

**श्रीराम सज्जूनियां बाण । स्वयें जाला विस्मयापन्न । दोघांमाजि वाली कोण । कोणासी आपण विंधावे ॥ ८१ ॥**

**न कळोनि विंधो जातां । अवचटें जालिया सुग्रीवघातां ।**
**तेंव्हा म्यां केले विश्वासघातां । भाक ही वृथा होय माझी ॥ ८२ ॥**

**बाण लागलिया अवचितां । रामें मारिलें शरणागता । ऐसें निंद्यत्व बैसेल माथा । क्षोभ समस्तां पूर्वजां ॥ ८३ ॥**

**मुख्य क्षोभेल हरिश्चंद्र । शिबि भगीरथ पृथु नरेंद्र । ककुत्स्थ दिलीपादि नृपवर । वंशीचे समग्र क्षोभती ॥ ८४ ॥**

**रूक्मांगद धर्मांगद । सूर्य वंशीचे अगाध । अवघे क्षोभती प्रबुद्ध । केले विरुद्ध श्रीरामें ॥ ८५ ॥**

**शरणागता वज्रपंजर । मिथ्या मिरवी श्रीरामचंद्र । ऐसे निंदितील सर्वत्र । लागलियां शर सुग्रीवा ॥ ८६ ॥**

**ऐसे विचारूनिया जाण । श्रीराम न विंधेचि बाण । तंव वालीने केले आन । जयो आपण पावावया ॥ ८७ ॥**

**वीर्य धैर्य आंगवण ।** [मु. 'सबळबळें'.] **सळेंबळें दोघे समान । वालीनें जाणोनि आपण । केले विंदान निज विजया ॥ ८८ ॥**

**सुग्रीव नाटोपें निजबळें । वालीस कळलें युद्ध संमेळें । मग दाविलें वरदमाळे । जय काळे विजयार्थी ॥ ८९ ॥**

एतस्मिन्नंतरे भग्नो सुग्रीवस्तेन वालिना । अपश्यद्राघवं नाथमृष्यमूकं ययौ जवात् ॥ १७ ॥

अनुक्रमणिका

होतां वरद माला दर्शन । सुग्रीव शक्ति जाली क्षीण । भवंडी येवोनि पडे आपण । मूर्च्छापन्न ऋष्यमुकीं ॥ ९० ॥

रणीं मूर्च्छित पडतां [मु. 'पहा हो'.] पाहो । सुग्रीवें सांभाळिला आवो ।
उडोनि ऋष्यमूकीं पहा हो । पडे महा बाहो मूर्च्छित ॥ ९१ ॥

करावया सुग्रीवाचा अंतु । रिघो न शके ऋष्यमूका आंतु ।
वाली निज विजयें गर्जतु । व्यर्थ रघुनाथु साह्य केला ॥ ९२ ॥

धरूनी श्रीरामाचें बळ । मजसी करूं आलासी सळ । युद्धीं गेलासी विकळ । [तं. 'आतां' हे पद अधिक.] व्यर्थ तळमळ कां करिसी ॥ ९३ ॥

मजसी करावया संग्राम । सन्मुख राहों न सके राम । सांडी स्त्री राज्याचा भ्रम । वृथा श्रम करूं नको ॥ ९४ ॥

सुग्रीवा! दिधले जीवदान । न मारीच ऋक्ष राजाची आण । ऐसें वालीने गर्जोन । गेला निघोन किष्किंधे ॥ ९५ ॥

विजयाचे जयजयकारी । वाली प्रवेशला नगरीं । सुग्रीव ऋष्यमुका माझारीं । दुःखें करी विलपतु ॥ ९६ ॥

> अपश्यत् राघवं नाथं ऋष्यमूकं ययौ जवात् । क्लांतो रुधिरसिक्तांगो प्रहारैर्जर्जरीकृतः ॥ १८ ॥
> राघवोऽपि सहभ्रात्रा सहैव च हनूमता । तदेव वनमागछत्सुग्रीवो यत्र वानरः ॥ १९ ॥

सुग्रीव पडतांचि मूर्च्छित । वानर झाले [मु. 'हा हा भूत'.] वाताहत । वालीभयें भयाभीत । अवघे पळत ऋष्यमुका ॥ ९७ ॥

वालीच्या घायीं जर्जरीभूत । रक्ते न्हाणिला धगधगीत । सुग्रीव अति दुःखें विलपत । साह्य रघुनाथ नव्हेचि ॥

वाली वधावयाचा आक्रमु । श्रीरामें दाऊनी पराक्रमु । करविला युद्ध धर्मु । [तं. 'मज अनुक्रम'.] अति दुर्गमु वालीसी ॥ ९९ ॥

वाली वधावया तत्काळ । धरूनि श्रीरामाचें बळ । निःशंक युद्ध केले तुंबळ । अति प्रबळ वालीसी ॥ १०० ॥

श्रीराम बळाचा निजनेट । युद्ध केलें कडकडाट । रामें पाहिला माझा सेवट । घायवट जंव पडे ॥ १०१ ॥

वालीने केले जर्जरीभूत । तऱ्ही साह्य नव्हेचि श्रीरघुनाथ । दैवें आलों ऋष्यमुकांत । येऱ्हवी प्राणांत पावतों ॥

अनुक्रमणिका

**पडतों ऋष्यमुका बाहेरी ।** [मुं. 'तरी' हे पद अधिक आहे.] **वाली मारिता क्षणा माझारी ।**
**श्रीराम होऊनि साहाकारी । रण द्वारीं** [तं. 'गर्जविले'.] **गांजिलों ॥ १०३ ॥**

**श्रीरामाचें साह्य बोल । रणरंगीं जाले फोल । सुकली कृपेची पैं वोल । घायीं सखोल गांजिलों ॥ १०४ ॥** [तु. प्रतीत ओवी १०४ नाही.]

**रामें हारविली निजकांता । तो काय करील माझी साह्यता । व्यर्थ बोलणें रघुनाथा । मज तत्वतां मानलें ॥**

**श्रीराम रावो सत्यवचनी । राज्य त्यागूनि** [मु. तुं. 'आला'.] **निघाला वनीं ।**
**तोहि माझिया संरक्षणीं । मिथ्या प्रतिज्ञ होऊनि ठेला ॥ १०६ ॥**

**ऐसा सुग्रीव विलपत ।** [मुं. 'तंव' हे पद अधिक आहे.] **लक्ष्मण हनुमंत समवेत । तेथें आला श्रीरघुनाथ । कृपावंत कृपाळू ॥ १०७ ॥**

आव्हयस्वैति मामुक्त्वा दर्शयित्वा च विक्रमम् । वैरिणा घातयित्वा मां किमिदानीं करिष्यसि ॥ २० ॥

**स्वमुखें सांगें श्रीरघुनाथां । वाली पाचारी युद्धार्था । दृष्टी पडतांचि करीन घातां । तुझिया कार्यार्था साधीन ॥**

**ऐसें बोलोनि आपण । वालीसी मज लाविलें रण । घायीं जातां माझा प्राण । साह्य संपूर्ण नव्हसीच ॥ १०९ ॥**

**आतां येवोनिया येथ । काय साधिसी कार्यार्थ । वाली गेला नगरांत । निज विजयार्थ साधोनी ॥ ११० ॥**

**वालीनें करितां** [तु. 'निज'.] **अति निर्वाण । नाहीं ढळलों अणुप्रमाण । वरदमाळा दावितां जाण । मूर्च्छापन्न मी जालों ॥**

**दैवें** [मु. 'पाडिलों'.] **पडिलों ऋष्यमुकांत । येऱ्हवी वाली करितां घात ।**
**साह्य नव्हसी मूर्च्छे आंत । दुःखाभिभूत मज केलें ॥ ११२ ॥**

**मी मूर्च्छित होतां विमुख । पाठिसी घालुनि निःशंक । वालीसी नव्हसीचि सन्मुख । परम दुःख मज दीधलें ॥**

**साह्य होउनि करावें सुखी । त्वा मज केलें परम दुःखी ।**
**श्रीराम सत्यवादि तिहीं लोकीं । तेहि लटिकी कीर्ति केली ॥ ११४ ॥**

**सुग्रीव देखोनि दुःखाभिभूत ।** [तं. 'कृपेने'.] **कळवळिला श्रीरघुनाथ । तयाचें ऐकोनि रूदित । स्वयें बोलत कृपाळू ॥ ११५ ॥**

सुग्रीव श्रूयतां तावत्क्रोधश्च व्यपनीयताम् । कारणं येन बाणोऽयं न मया विनियोजितः ॥ २१ ॥
अलंकारेण वेशेण प्रमाणेन गतेन च । त्वं च सुग्रीव वालीच सदृशौ तु परस्परम् ॥ २२ ॥

अनुक्रमणिका

क्रोध सांडूनि सावधान । सुग्रीवा आयीक माझें वचन । साह्य न व्हावयाचें कारण । झालें विंदान तें ऐक ॥ ११६ ॥

गुणीं लावुनिया बाण । वालीचा म्यां घ्यावा प्राण । तंव तुम्ही दोघे जण । [मु. 'भासले ती'.] समसमान स्वरूपें ॥ ११७ ॥

वस्त्र अलंकार आभरण । रूपरेखा समसमान । नकळे वालीचें भिन्न चिन्ह । यालागीं बाण न विंधेचि ॥ ११८ ॥

नकळोनि बाण विंधितां । जरी तुज लागता अवचिता । [मु. प्रतीत 'तरी' हे पद अधिक.] श्रीरामें मारिलें शरणागता । जघन्यता तिहीं लोकीं ॥

अवचटें तुज लागलिया बाण । मग म्यां त्यजावा कीं प्राण । ऐसें जाणुनि आपण । शर संधान न करीच ॥ १२० ॥

तुझेनि कैवारें एका एक । वालीसी युद्ध करितां देख । तेथेंहि थोर आहे अटक । करी विमुख वरदमाळा ॥ १२१ ॥

जो जो युद्धीं ये सन्मुख । वरदमाळा करी विमुख । मज होणे नाहीं पराङ्मुख । ते मज अटक युद्धार्थी ॥ १२२ ॥

युद्ध न करावया हेचि कारण । साह्य होआवें तंव दोघेहि समान ।
या लागीं न विंधेचि बाण । सत्य जाण सुग्रीवा ॥ १२३ ॥

घायें घ्यावया वालीचा प्राण । आतां मी घेतों धनुष्यबाण ।
मज मारितां न लगे क्षण । युद्ध कारण करी वालीसी ॥ १२४ ॥

सुग्रीव म्हणे नाहीं शक्ति । केवि पाचारूं युद्धार्थी । कृपेनें आलिंगी रघुपति । अमृत हस्तीं [मु. तं. 'कुरवाळिला'.] स्पर्शिला ॥ १२५ ॥

आलिंगन मिसें जाण । दिधली निज शक्ति संपूर्ण । पहिल्यापेक्षा शतगुण । [पै. 'आली शक्ति'.] आंगवण सुग्रीवा ॥ १२६ ॥

सुग्रीव पाहे सावधान । आंगी न देखे घावो ना व्रण । पुरती बाणली आंगवण । वाली निर्दळण करावया ॥ १२७ ॥

सुग्रीव उठोनि ते काळीं । प्रताप बोले श्रीरामा जवळीं । आजी लोळवीन वाली । रण कल्लोळीं विचरोनी ॥

ऐसें बोलोनि श्रीरामेसीं । वेगीं उठिला उल्हासेसी । युद्ध करावया वालीसी । उडें आकाशीं सुग्रीव ॥ १२९ ॥

अनुक्रमणिका

**श्रीरामें पाचारूनी त्यासी । समरूपता तुम्हा दोघांसी । युद्धीं वोळखावया सुग्रीवासी । घालवी त्यासी गजमाळा ॥**

गजपुष्पमयीं मालामुत्पाद्य शुभलक्षणाम् । कंठे बबंध सौमित्री सुग्रीवस्य महात्मनः ॥ २३ ॥

**गजकमळ माळा सुलक्षण । लक्ष्मणे निर्मूनि आपण । सुग्रीव कंठीं घाली संपूर्ण । वोळखण रणरंगीं ॥ १३१ ॥**

**गजांत लक्ष्मी** [तं. 'पावावयासी'; मु. 'यावयासी'.] **यावी यासी । गजकमळमाळा घाली त्यासी ।**
**तेंचि वोळखण रणभूमीसी । वाली वधासी मुख्य मूळ ॥ १३२ ॥**

**श्रीराम आज्ञा अति समर्थ । माळा न तुटें युद्धा आंत । लागतां वीरांचे आघात । अभंगित राममाळा ॥ १३३ ॥**

**लक्ष्मण विंदानी महाबळी । कमळांच्या अष्टदळीं । सबाह्य लिहिल्या** [मु. 'नामावळी'.] **रामवोळी । आतुर्बळी तेणें** [मु. 'जाला'.] **माळा ॥ १३४ ॥**

**गुणेविण गजकमळा । निर्गुण गुणें गुंफिली माळा । घालितां सुग्रीवाच्या गळां ।** [तं. 'श्रीराम आज्ञे करूनी'.] **कळिकाळा नांगवे ॥ १३५ ॥**

**सुग्रीव कंठीं घालितां माळ । वानर हरिखलें सकळ । नळ नीळ तार तरळ । सैन्य समेळ समुदावो ॥ १३६ ॥**

**श्रीराम लक्ष्मण हनूमंत । सुग्रीव वानरा समवेत । आले किष्किंधे पर्यंत । हर्षयुक्त उल्हासें ॥ १३७ ॥**

**अति आक्रोशें महाथोर । सुग्रीवें** [तं. 'करितों'.] **करिता भुभुःकार । ऐकोनि कोपला वाली वानर । युद्ध दुर्धर करूं पाहे ॥ १३८ ॥**

**दोघेहि बंधु क्रोध युक्त । युद्ध करिताती अद्भुत । वाली वधील श्रीरघुनाथ । तोहि गुह्यार्थ अवधारा ॥ १३९ ॥**

**एका जनार्दना शरण । पुढां गोड निरूपण । श्रीरामें वाली उद्धरण । संसार तारण श्रीरामु ॥ १४० ॥**

**श्रीराम द्वय अक्षर । क्षराक्षरातीत पर । राम नाम स्मरे निरंतर । पावन नर तिहीं लोकीं ॥ १४१ ॥**

**राम नाम पढतां एकाएक । तो तिहीं लोकीं अलौकिक ।**
**एकाजनार्दनीं होती एक । नित्य निष्टंक राम नाम ॥ १४२ ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां सुग्रीवभंगस्थापनं नाम पंचमप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग सहावा

## वाली वध

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीराम हनुमंत सौमित्र । सुग्रीव समवेत [तं. 'सकळ'.] वानर । पावोनि किष्किंधेचें द्वार । केला भुभुःकार सुग्रीवें ॥ १ ॥

अथ तस्य निनादं तु सुग्रीवस्य महात्मनः । शुश्रावांतः पुरगतो वाली संतप्तमानसः ॥ १ ॥

सुग्रीवाचा गिरा गजर । नादें दुमदुमिलें [मु. 'अंबर'.] नगर । दुमदुमिलें गिरिकंदर । वालीचें मंदिर दुमदुमिलें ॥ २ ॥

ऐकतां सुग्रीवाची आरोळी । कोपें खवळला [दै. 'वीर'.] वाली । आरक्त जाला क्रोधानलीं । जेवीं कुलाचलीं बालसूर्य ॥ ३ ॥

वाली विचारी हृदयांत । आतांच युद्धीं जर्जरीभूत । म्यां पाडिला होता मूर्च्छित । सवेंचि गर्जत केविं आला ॥ ४ ॥

माझिया घायीं मासानुमास । कुंथत पडे वर्षानुवर्ष । सवेंचि आला असे युद्धास । अति उल्हासें [इं. 'मानसी'.] गर्जोनि ॥ ५ ॥

आतां असो हा विचार । बंधु वैरी सत्य साचार । रणीं पाचारितां महाशूर । निघावें सत्वर युद्धासी ॥ ६ ॥

युद्धा निघतां वालीसी । तारा लागली पायांसी । हित सांगते तुम्हांसी । विवेकेसी अवधारा ॥ ७ ॥

तुझा लागलिया घाये । सुग्रीव कुंथत पडिला राहे । तो सवेंचि येवोनिया [मु. 'बाहे'.] पाहे । गर्जताहे युद्धार्थी ॥ ८ ॥

हे तंव नव्हे सुग्रीवशक्ति । तेणें साह्य केलासे रघुपति । त्याचेनि बळें युद्धाप्रति । आला मागुती गर्जतु ॥ ९ ॥

तुझा करावया घात । सुग्रीवा साह्य श्रीरघुनाथ । हा तुज न कळे वृत्तांत । बळें उन्मत्त धांवसी ॥ १० ॥

तुवां जिंतिलें [मु. पै. 'सुरनरांसी'.] सुरवरांसीं । मर्दिले दैत्य दानवांसी । कांखे सूदले रावणासी । श्रीरामापासीं तें न चले ॥ ११ ॥

श्रीराम प्रतापी तेजोराशी । पूर्णावतार सूर्यवंशीं । ऐक त्याचिया पुरुषार्थासी । मीं तुजपाशी सांगेन ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

जें कां अटक तिहीं लोकां । रामें मारिली ते ताटका । छेदूनि सुबाहूच्या मुखा । मारीच देखा मारिला ॥ १३ ॥

चौदा सहस्त्र निशाचरां । सहित त्रिशिरा दूषण खरा । श्रीरामें मारिलें समग्रा । बाणीं दुर्धरा विंधोनी ॥ १४ ॥

विंधूनिया येकूचि बाण । विराधाचा घेतला प्राण । [घा. खेरीज इतरत्र ‘काळी’.] काळ कबंध मारिला जाण । प्रतापें पूर्ण श्रीराम ॥ १५ ॥

ज्या धनुष्यें गांजिला रावण । तें चाप श्रीरामें भंगून । केलें जानकीहरण । जामदग्न्य जिणोनि ॥ १६ ॥

श्रीरामाच्या बाणाभेणं । भिकारी जाला रावण । चोरोनि केलें जानकीहरण । देवोनि बलिदान मारीचाचें ॥

धांवण्या आलिया रघुनंदन । एकेचि बाणें घेईल प्राण । येणें भयें गा रावण । गेला पळोनि लंकेसी ॥ १८ ॥

ऐसा श्रीराम दुर्धर । तयापुढें तूं वानर । बळें उन्मत्त पालेखाईर । युद्धां सत्वर धांवसी ॥ १९ ॥

विंधोनि येकचि बाण । श्रीराम तुझा घेईल प्राण । हें तंव माझें सत्य भाषण । युद्धां आपण न वचावें ॥ २० ॥

श्रीरामीं न करावा विरोधु । त्यासी करावा सख्य संबंधु । माझा ऐकोनि अनुवादु । युद्धक्रोधु सांडावा ॥ २१ ॥

ऐकोनि तारेचें वचनोत्तर । वाली म्हणे सत्य साचार । मज श्रीरामेंसी नाहीं वैर । अणु प्रमाण मानसीं ॥ २२ ॥

जे जे रामीं करिती विरोधु । त्यां त्यांसी श्रीराम करी वधु । हा मज कळला [तु. ‘असे भेदु’.] शुद्ध बोधु । वधानुवादु अवधारी ॥ २३ ॥

ताटका सकळ लोकां बाधी । या लागीं श्रीराम तीसीं वधी । सुबाहू यज्ञातें अवरोधी । रामें [तु. ‘दुर्बुद्धि’.] त्रिशुद्धि मारिला ॥

विराधें केलें सीताहरण । रामें वधिला विंधोनि बाण । कबंधें धरिले दोघेजण । बाहू छेदूनि मारिला ॥ २५ ॥

करोनि शूर्पनखेचा कैवार । हिरोनि न्यावी सीता सुंदर । रामें वधिले त्रिशिरा खर । तैसें वैर मज नाहीं ॥ २६ ॥

मारीच मारिला कपटी पूर्ण । सीता हरिली वैरी रावण । तैसें तों विरोध लक्षण । मजसी जाण असेना ॥ २७ ॥

मी तंव केवळ निरपराध । कैसा श्रीराम करील वध । [तं. ‘श्रीराम तो सर्वसिद्ध’.] करितां सुग्रीवेसीं विरोध । वैर संबंध कां श्रीरामा ॥ २८ ॥

अनुक्रमणिका

**तारा स्वयें सांगें संपूर्ण । सुग्रीव श्रीरामा जाला शरण । श्रीराम शरणागतासी जाण । संरक्षण सर्वार्थी ॥ २९ ॥**

**शरणागता जो विरोधी । तो श्रीरामाचा मुख्य द्वंद्वी । त्यातें श्रीराम स्वयें** [तु. 'विंधी'.] **वधी । जाण त्रिशुद्धी कपिराजा ॥**

**शरणागताचिया घाता । श्रीराम** [तु. दै. 'करूं'.] **होऊं नेदी सर्वथा । हेंचि श्रीरामेसी वैरता । आत्मघाता निजमूळ ॥ ३१ ॥**

**तुटे सुग्रीवेसी विरोधु । श्रीरामी होय सुहृदसंबंधु । तैसा साधूनि निजबोधु । माझा शब्द जरी करिसी ॥ ३२ ॥**

> श्रूयतां क्रियतां तच्च तव वक्ष्यामि ते हितम् । यौवराज्येन सुग्रीवं तूर्णस्त्वमभिषेचय ॥ २ ॥
> विग्रहं मा कृथा मौर्ख्याद् भ्रात्रा रामेण च स्वयम् । अहं हि ते क्षमं मन्ये रामेण सह सौहृदम् ॥ ३ ॥

**वाली ऐक रे सावधान । तुझें निजहित सांगेन । सखा केलिया रघुनंदन । होसी पावन तिहीं लोकीं ॥ ३३ ॥**

**श्रीरामीं सख्य घडे कैसेन । ऐसा विकल्प मानी मन । तें मी निमिषामध्ये सांगेन । माझें वचन जरी करिसी ॥ ३४ ॥** [ओवी ३४ तु. प्रतीत नाही.]

**जेणें आप्त होय श्रीरघुनाथ । तारे! ते सांगे मनोगत । येरी सांगे उल्हासत । पूर्ण हितार्थ लक्षूनी ॥ ३५ ॥**

**विरोध तुटे बंधुबंधुसी । पूर्ण सख्यत्व श्रीरामेंसीं । युवराज्य द्यावें सुग्रीवासी । निजहितासीं लक्षूनी ॥ ३६ ॥**

**सुग्रीवां युवराज्य देतां । परमसुख श्रीरघुनाथा । तिघां होईल निजऐक्यता । एकात्मता अतिप्रीति ॥ ३७ ॥**

**जैसा तुज प्रिय अंगदु । तैसाचि प्रिय सुग्रीव बंधु । त्यासी सांडितां विरोधु । सख्य संबंधु श्रीरामीं ॥ ३८ ॥**

**ऐसें बोलोनियां पाहे । तारेनें धरिले दोन्ही पाये । श्रीराम सख्यत्वीं सुखी राहे । करी लवलाहे कपिराजा ॥ ३९ ॥**

**रत्नाभरणें धन वस्त्रेंसीं । अंगदु धाडी रामापासीं । शरण रिघोनियां त्यासीं । आपणासी वांचवी ॥ ४० ॥**

**श्रीरामीं रिघालियां शरण । तुझें चुकेल जन्ममरण । दोघां बंधु** [मु. 'पावोन'.] **बुझावण । कृतकल्याण** [मु. 'पावसी'.] **श्रीरामें ॥ ४१ ॥**

**जरी धरूनी गर्वबळ । श्रीरामेंसीं करिसी सळ । तरी किष्किंधा सांडूनिया पळ । श्रीराम प्रबळ वधार्थी ॥ ४२ ॥**

**होआवया श्रीरामासमोर । धीर न धरिती सुरवर । तेथें तूं केवळ वानर । पालेखाईर केवि रहासी ॥ ४३ ॥**

अनुक्रमणिका

**श्रीरामीं सख्य करीं प्रांजळ । अथवा उठूनि जाय पळ । त्यासीं युद्ध करितां प्रबळ । तूं तात्काळ मरसील ॥ ४४ ॥**

**लागतां श्रीरामाचा बाण । मेरू मंदार होय विदारण । तेथें तूं साहावयासी कोण । बळें प्राण देवों नको ॥ ४५ ॥**

**माझें नाइकतां बोलणें । तूं बैसलासी मरणा धरणें । श्रीराम विरोधिला जेणें । अर्थे** [मु. तु. 'जीवें प्राणें'.] **प्राणें तो मरे ॥ ४६ ॥**

**आइकोनि तारेचें वचन । वाली जाला कोपायमान । भ्याड प्रकृति तुम्ही स्त्रीजन । कंपायमान परदर्पें ॥ ४७ ॥**

**सुग्रीवासीं युवराज्यता । त्यासीं मी नेदी सर्वथा । साह्य जालियां श्रीरघुनाथा । राज्य सर्वथा नाहीं देणें ॥ ४८ ॥**

**देखोनि श्रीरामाचें बळ । म्हणसी वानर तूं निर्बळ । किष्किंधा सांडूनि पळ । भय प्रबळ दाविसी ॥ ४९ ॥**

**तारे! ऐक माझी शक्ति । अल्प सांगेन तुजप्रति । युद्धा आलिया रघुपति । शंका चित्तीं मज नाहीं ॥ ५० ॥**

> उत्पाटयतु रामो वा बाहुभ्यां विंध्यपर्वतम् । इमां सर्वां समुद्रांतां संवर्त्तयतु वा महीम् ॥ ४ ॥
> सचंद्रतारागहनं खं चेदं च ससागरम् । न विव्यथेऽहं तस्माद्धि सुग्रीवसहितान् हि तान् ॥ ५ ॥

**बाहुबळें श्रीरघुनाथ । उत्पाटूं विंध्य पर्वत । पृथ्वी समुद्र वलयांकित । करूं भस्मित बाणें येकें ॥ ५१ ॥**

**सचंद्रतारा गगन गंभीर । सहित सप्तहि सागर । बाणें शोषूं श्रीरामचंद्र । तऱ्हीं मी वानर शंकेना ॥ ५२ ॥**

**ऐसा प्रताप श्रीरघुनाथा । प्रत्यक्ष डोळांहीं देखतां । मज बाधीना भय व्यथा । उल्हासता संग्रामीं ॥ ५३ ॥**

**रणीं मरण भयभीत । त्यासी यश ना पुरुषार्थ । तैसा वाली नव्हे मी येथ । रणीं रघुनाथ** [तं. 'तुकीन'.] **सुखी करीन ॥ ५४ ॥**

**सुग्रीव बापुडें किंकर । श्रीराम योद्धा** [मु. 'रणवीर'.] **नरवीर । त्यासी भिडेन मी वानर । युद्ध दुर्धर पाहे माझें ॥ ५५ ॥**

**माझी पुरेल आंगवण । ऐसा योद्धा** [मु. 'आहे कोण'.] **नाहीं आन । करावया श्रीरामेसीं रण । आलें स्फुरण बाहूंसीं ॥ ५६ ॥**

**श्रीराम आलिया सन्मुख । युद्धीं करीन पराङ्मुख । प्रतिज्ञेची देवोनि** [दै. 'भाक'.] **हांक । युद्धा सन्मुख वाली आला ॥ ५७ ॥** [ओवी ५७ तु. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

स वाली बलसंदृप्तो मुष्टिमुद्यम्य वीर्यवान् । सुग्रीवमेवाभिमुखो ययौ योद्धा कृतक्षणः ॥ ६ ॥
सुग्रीवोऽपि समुद्दिश्य वालिनं हेममालिनम् । श्लिष्टं मुष्टिं समुद्यम्य संक्रुद्धस्तरसापतत् ॥ ७ ॥
स हतो मुष्टिना वाली सपक्ष इव पर्वतः । सुग्रीवेण तु निःसंगं शालमुद्यम्य तेजसा ॥ ८ ॥
स तेनाभिहतो वाली न्यपतत्स महीतले ॥ ९ ॥

**वाली सुग्रीवा दृष्टा दृष्टी । होतां** [पै. खेरीज इतरत्र 'वळोनी'.] **बांधल्या वज्रमुष्टी । युद्ध क्रोधें महाहठी । उठाउठी मिसळले ॥ ५८ ॥**

**उरीं शिरीं गुडघे मुष्टी । धांवोनी हाणिती पुसाटी ।** [मु. तु. तं. 'तडवा'.] **तळवा हाणोनि पाडिती सृष्टी । दोघे हट्टी महावीर ॥**

**हेममुगुट हेममाळा । शोभती वालीचिया गळा । सुग्रीवा शोभे कमळमाळा । रणसोहळा वीरांचा ॥ ६० ॥**

**मुष्टिघात चपेटघात । निष्ठुर हाणतां आघात । दोघांस रुधिर प्रवाहत । जेविं पर्वत गैरिक ॥ ६१ ॥**

**पालाश फुलले वसंतांत । तैसे वीर अति आरक्त । रणामाजीं विचरत । बळोन्मत्त युद्धक्रोधें ॥ ६२ ॥**

**सुग्रीव लक्षूनियां दृष्टी । वाली हाणे वज्रमुष्टी । मूर्च्छापन्न पडतां सृष्टी । धैर्ये जगजेठी ऊठिला ॥ ६३ ॥**

**सुग्रीवें क्षोभोनि ते वेळीं । शाल वृक्षें ठोकिला वाली । घायें मूर्च्छित महीतळी । महाबळी लोळविला ॥ ६४ ॥**

**वाली पडिला महावीर । वानर करिती हाहाकार । आइकोनि वीरांचा गजर । वाली सत्वर उसळला ॥ ६५ ॥**

**बाहे आफळूनि वाली । रणीं गर्जतु क्रोधानुमेळीं । कोपें सुग्रीव चालिला बळी । रणरवंदळी करावया ॥ ६६ ॥**

**सम तळपणे सम किराण । गती विगती सम उड्डाण । क्षणां भूतळीं क्षणां गगन । युद्ध विंदान दोहींचें ॥ ६७ ॥**

**दोघे बळी अति समर्थ । येरयेरां नाटोपत । दोघे भिडतां अति अद्भुत । दोघां विजयार्थ लाभेना ॥ ६८ ॥**

**वाली बळी वरदमाळा ।** [तु. दै. 'कमळमाळा'.] **श्रीराम माळा सुग्रीवां गळां । पाहतां त्यांचा रण सोहळा । सम बळा समसमान ॥**

**युद्ध कंदनें खेद क्षीण । श्रम स्वेदें दोघे क्लिन्न । देखोनिया रघुनंदन । धनुषीं बाण सज्जिला ॥ ७० ॥**

**सुग्रीव आलिया तळांसीं । गोष्टी होईल पहिल्या ऐसी । यालागीं श्रीरामें अति वेगेसी । बाण धनुषीं सज्जिला ॥**

अनुक्रमणिका

ततः संधाय रामेण शरमाशीविषोपमम् । वेगेनाभिहतो वाली निपपात महीतले ॥ १० ॥

**आक्रमें मारावया सुग्रीवासीं । वाली उडतां आकाशीं । श्रीरामें विंधितां वेगेसीं । शर सपिच्छिं खडतरला ॥**

**जेविं सर्पु रिघे वारूळीं । तैसा बाण हृदयकमळीं ।** [तं. 'भेदक होतांचि समूळीं'.] **प्रवेशोनि अंतकाळीं । पडिला वाली मूर्च्छित ॥ ७३ ॥**

**जैसा ईश्वर राहोनि गुप्त । निमिषमात्रें करी निःपात । तैसा अतर्क्य श्रीरघुनाथ । बाणाग्रें घात वालीचा ॥**

**अतर्क्य सद्‌गुरु वचन । श्रवणें शिष्या समाधान । तैसा श्रीरामाचा बाण । सुख संपन्न वालीसी ॥ ७५ ॥**

**जैसा धडधडीत वन्ही । सुखरूप सती लागूनि । तेविं रामबाण हृदयभुवनीं । वाली लागुनी सुखरूप ॥ ७६ ॥**

**जेविं कां सुख शुद्ध सात्विकीं । अग्रीं कठिण गोड परिपाकीं । श्रीरामबाण तदनुलक्षी । उभयपक्षी सुखरूप ॥** [ओवी ७७ तु. प्रतीत नाही.]

**सुग्रीवा सुखसेवा लौकिक । वालीसी सुख अलौकिक । विंधोनियां बाण एक । दिधलें सुख दोघांसी ॥ ७८ ॥**

**श्रीराम बाणाचा प्रताप । सुग्रीव भ्राता भयकंप । परिपाकीं सुखरूप । राम चिद्रूप कृपाळू ॥ ७९ ॥**

**राम बाणाग्रीं भासे दुःख । तेंचि परिपाकीं परमसुख । वदेल** [तं. 'वाल्मीक स्वयें'.] **वालींचे निजमुख । श्रोतें सकळिक परिसतु ॥**

**श्रीरामाच्या निजबाणीं । वाली मूर्च्छित पडला धरणीं । बोले श्रीराम अनुलक्षूनी । अधर्म करणी तुवां केली ॥**

पराङमुखवधं कृत्वा को नु प्राप्तस्त्वया गुणः । परोऽहं युद्धसंसक्तंस्त्वत्कृते निधनं गतः ॥ ११ ॥
शोचामि नात्मानमहं न तारा नापि बांधवान् । त्वत्कृतेन ह्यधर्मेण यथा शोचामि राघव ॥ १२ ॥

**मी आणिकांसी युद्धासक्त । श्रीरामा! येऊनि अति गुप्त ।**
**माझा पराङमुखें केला घात । कोण पुरुषार्थ रघुनाथा ॥ ८२ ॥**

**न पाचारितां एकाएक । अतर्क्य रूप नित्य घातक । तुझा हा अधर्म देखोनि देख । परम दुःख** [मु. 'माझें मनीं'.] **मज रामा ॥**

**नाहीं राज्यहरणाची व्यथा । ताराावियोग न बाधी सर्वथा । तुझी देखोनि अधर्मता । दुःख रघुनाथा मज** [मु. तं. पै. 'भारी'.] **बाधी ॥**

**नव्हे सुहृद स्नेह बाधक । बाधीना अंगदाचा शोक । तुझा अधर्म देखतां देख । परम दुःख मज रामा ॥ ८५ ॥**

अनुक्रमणिका

वधू करूं नये निद्रिता । वधू करूं नये स्त्रीसी रमतां । वधू करूं नये न पाचारितां । पुरुष दुश्चिता वधूं नये ॥

तूं सर्वज्ञ श्रीरघुनाथा । ऐसिया जाणोनि शास्त्रार्था । अधर्मे करूनी माझिया घाता । अपेश माथां घेतलें ॥

चंद्राहूनि अति चोख । श्रीराम कीर्ति अति निर्दोष । अधर्म घाताचा कलंक । त्यावरी देख बैसविला ॥ ८८ ॥

सुग्रीव बापुडें तें किती । काय साह्य होईल सीता अर्थी । मज सांगतासी रघुपति । करितों ख्याति ते ऐसी ॥

> सुग्रीवप्रिय कामेन वृथाऽहं घातिस्त्वया । गले वध्वा प्रदद्यां ते तमहं रावणं रणे ॥ १३ ॥
> आस्तां सागरतोये वा पाताले वापि मैथिली । आनयेयमहं देशे गरुडेनामृतं यथा ॥ १४ ॥

रावण माझें कांखवळ । गळा बांधोनी तत्काळ । आणितों न लगतां पळ । तूं माझें बळ नेणसी ॥ ९० ॥

समुद्रजळीं सप्त पाताळीं । शोधूनि लोक लोकाचळीं । आणितों मीं जनकबाळी । तुजजवळीं निमिषार्धे ॥ ९१ ॥

चतुःसमुद्रीं प्रातःस्नान । करितों न लगतां क्षण । मजपुढें तुच्छ रावण । सीता आणून तुज देतों ॥ ९२ ॥

मज हा सांगतासी विचार । तरी ससीता रावण परिवार । लंका उपडूनि समग्र । येथें सत्वर आणितों ॥ ९३ ॥

सुग्रीवाच्या पक्षपाता । अधर्मे [मु. 'करितां'.] केले माझ्या घातां । अपेश आलें श्रीरघुनाथा । कीर्तिचें माथां अपकीर्ति ॥ ९४ ॥

पुढें साचार रघुपती । जऱ्ही करिसी कोटी कीर्ति । अधर्म घाताची अपकीर्ति । तिळभरीं परती ढळेना ॥ ९५ ॥

सुग्रीवें काय केला उपकार । म्यां तुज काय केला अपकार ।
ऐसा न करितां विचार । मज सत्वर कां वधिलें ॥ ९६ ॥

नाहीं रडत राज्यहरणासी । नाही रडत निजमरणासी । अधर्म जडला श्रीरामासी । तेणें मानसीं अतिदुःख ॥

सेवकें कीर्ति करावी ऐसी । जगत्रय वंदी स्वामी सेवकांसी ।
सुग्रीवें गौरविलें रामासी । कीर्तिवंतासी अपकीर्ति ॥ ९८ ॥

अनुक्रमणिका

संग्रामीं वधितासी सन्मुख । त्या मरणाचा मज हरिख । कीर्ति वदिते तिन्हीं लोक । तें आवश्यक चुकलासी ॥

अधर्में वधितां वालीस । श्रीराम हस्तें उद्धारू त्यास । मज यश तुज अपेश । कीर्ति विशेष तुवां केली ॥ १०० ॥

श्रीराम हस्तें मरण । तेणें मी त्रैलोक्य पावन । तुज त्वां लाविलें दूषण । अधर्में बाण विंधोनी ॥ १०१ ॥

ऐकोनि वाली निंदा वचन । दुःख न मनीच रघुनंदन । काय बोलिला धर्मवचन । गुह्यज्ञान हितकारी ॥ १०२ ॥

पुढिल्यां स्वधर्म शिकविती । स्वयें अधर्म आचरती । तया मूर्खाची वदंती । सत्य मानिती महामूर्ख ॥ १०३ ॥

अद्य धर्ममधर्मं च जानासि त्वं कपीश्वर । कृत्वाधर्मं तदा त्वं हि भ्रातृभार्यां वशेकृथाः ॥ १५ ॥

माझा बाण भेदल्यांपाठीं । सांगसी स्वधर्माच्या गोष्टी । आपल्या अधर्माची राहाटी । नीतिदृष्टी न देखसी ॥

कन्या भगिनी भ्रातृपत्नी । तिघीं जणी समान जनीं । ते बंधुभार्या तुवां हिरोनी । अनुदिनी भोगिसी ॥ १०५ ॥

तारे सारिखी पतिव्रता । तुज असतां सुंदर कांता । बंधुभार्या अधर्मता । तूं कां भोगितां जालासी ॥ १०६ ॥

आपुली नाठवे अधर्मता । अधर्म ठेविसी माझे माथां । अधर्माचिया संसर्गता । भासे अशुभता शुद्धत्वीं ॥ १०७ ॥

जेविं कां [तं. 'स्फुलिंग'.] स्फटिक नित्य निर्मळ । त्यासी भेटतांचि काजळ । शुद्धता लोपोनि तत्काळ । भासे सकळ काळिमा ॥

स्फटिकु काजळें दिसे काळा । परि तो काळिमेसी वेगळा । तेवि पापपुण्या निराळा । राम चित्कळा चिन्मूर्ति ॥

नभीं नीलिमा नाहीं अळुमाळ । निळें डोळ्याचें निज बुबुळ ।
तेणें नभ देखती सुनील । डोळ्याचे मल नभीं दिसती ॥ ११० ॥

तेवीं मी राम नित्य शुद्धात्मा । तूं मज म्हणसी अधर्मकर्मा ।
तुझ्या छेदावया पाप भ्रमा । अगाध महिमा बाणाचा ॥ १११ ॥

तुझ्या आंगीं पाप दोष । तुज मी केंवि भेटेन सन्मुख । तुझे छेदावया महादोष । बाण अतर्क्य विंधिला ॥ ११२ ॥

अनुक्रमणिका

मी विश्वात्मा विश्वतोमुख । साधुसंतां नित्य सन्मुख । तूं पापात्मा नित्य विमुख । बाणें निर्दोष तुज केलें ॥

बाण विंधोनि अतर्क्यता । तुझी छेदूनि पापात्मता । कृपेनें भेटलों मी आतां । तुज तत्वतां तारावया ॥ ११४ ॥

तुज तारावया हेंचि कारण । माझ्या सुग्रीवाचा बंधु तूं पूर्ण ।
तुझा चुकवावया नरक दारूण । पाप निर्दळण बाणें केलें ॥ ११५ ॥

शरणागताचा निजबंधू । त्यासी जाला नरक बाधू । हा मज न साहेचि शब्दु । बाणें अति शुद्ध केलासी ॥ ११६ ॥

सांडूनियां विकल्प वृत्ति । जे जे लागले भक्तसंगती । ते ते उद्धरी मी रघुपती । वाली! निश्चिती तूं जाण ॥

तुझ्या आंगी पाप दारूण । यमु दंडितां अति कठीण । तें चुकवावया विंधिलां बाण । पुरश्चरण [मु. 'महापापा'.] मद्बाणें ॥ ११८ ॥

श्रीरामकृपेचा प्रताप । वालीसी स्मरे निजपाप । तेणें पावोनी अनुताप । निर्विकल्प विनवितु ॥ ११९ ॥

एवमुक्तस्तु रामेण वाली प्रव्यथितो भृशम् । प्रत्युवाच ततो रामं प्रांजलिर्वानरेश्वरः ॥ १६ ॥

राजमदें [कं. मु. 'अतिघूर्ण'.] उन्मत्त पूर्ण । पाप आचरलों संपूर्ण। तुवां कृपेनें सोडुनी बाण । आकल्प पापा निवटिले ॥ १२० ॥

तुवां कृपेनें विंधोनि बाण। छेदिला त्रिविध अभिमान । देहाभिमान बळाभिमान । कर्माभिमान शौर्याचा ॥ १२१ ॥

श्रीराम बाणाचा प्रताप । छेदिले संकल्पविकल्प । छेदूनिया पुण्यपाप । नित्य निःपाप मज केलें ॥ १२२ ॥

वाठिवेचा गर्व परम । सन्मुख न करीच संग्राम । दुचित्या मारणें अधर्म । मानी परम श्रीरामीं ॥ १२३ ॥

पूर्ण पापी मी परम । श्रीरामीं मानी अधर्म । राम परमात्मा परब्रह्म । हें मीं वर्म नेणेची ॥ १२४ ॥

प्रवृत्ति ज्ञानें ज्ञानोन्मत्त । श्रीराम मानी अधर्मरत । श्रीराम स्वधर्म कर्म रहित । हा मुख्यार्थ श्रीरामा ॥ १२५ ॥

तुझेनि बाणें हृदयांत । केली हृदयशुद्धि समस्त । आतां अनुभवासी येत । श्रीरघुनाथ परब्रह्म ॥ १२६ ॥

लटकें सीतेचें धांवणें । लटिका तुवां शोक करणें । दीन उद्धरावया कारणें । विचरणें वनवासु ॥ १२७ ॥

वना येऊनि रघुनंदन । उद्धरिले तृण पाषाण । उद्धरिले दीन जन । जगदोद्धारण श्रीराम ॥ १२८ ॥

अनुक्रमणिका

राम राम महाभाग जाने त्वां परमेश्वरम् । अजानता मया किंचिदुक्तं तत्क्षंतुमर्हसि ॥ १७ ॥
अनुजानीहि मां राम ज्ञातं त्वत्पदमुत्तमम् । मम तुल्यबलेऽह्यस्मिन्नंगदे च दयां कुरू ॥ १८ ॥

माया नियंता ईश्वर । त्याहूनि पर तूं परमेश्वर । तुझिया स्वरूपाचा पार । अगोचर श्रुतिशास्त्रां ॥ १२९ ॥

ऐसिया तूं रघुनाथा । कर्मज्ञानाचिया योग्यता । निरसिली जी अधर्मता । ते मज आतां क्षमा करी ॥ १३० ॥

जळा पासाव लवण होये । जळीचें जळीं विरोनि जाये । मोती जालें ते तंव पाहे । जळीं न जाय विरोनी ॥ १३१ ॥

मुक्तपणें मोलां चढलें । तें वनिता अधरी फासां पडिले । मुक्तचि परी नाशलें । कठिण केलें अभिमानें ॥ १३२ ॥

जळो हा कर्मधर्म अभिमान । सज्ञाना ज्ञानाभिमान बंधन । तेणें अभिमानें जाण । तुज संपूर्ण म्यां छळिलें ॥

कर्मज्ञानाच्या व्युत्पत्ति । निर्भत्सिलासी म्यां दुष्ट दुरुक्ति ।
ते मज क्षमा करी श्रीरघुपती । कृपामूर्ति कृपाळु वा ॥ १३४ ॥

ऐसें बोलोनिया आपण । वाली घाली लोटांगण । मस्तकीं वंदूनि श्रीरामचरण । म्हणे आपण क्षमा कीजे ॥

आणीक एक ममता चित्तीं । वर्तताहे जी रघुपती । ते मी सांगेन तुजप्रती । अंगदार्थी अवधारी ॥ १३६ ॥

मज समान बळिया दृढ । अंगदु माझा लळेवाड । [तं. तु. 'यासी'; मु. त्यासी.] या परी करावा रण सुरवाड । पुरवी कोड युद्धाचें ॥ १३७ ॥

अंगदु माझा कनकांगदी । [पै. 'सहज'.] सबळ साह्य होईल युद्धी । म्हणऊनी लाविला श्रीरामपदीं । कृपानिधी कृपा करी ॥

अंगद निरऊनिया जाण । वाली जाला सावधान । पाहोनी श्रीरामवदन । उल्हासोनि बोलतु ॥ १३९ ॥

तुझे निजपद सनातन । जे कां सच्चिदानंद घन । ते पावावया त्यजितों प्राण । लाविले नयन वालीनें ॥ १४० ॥

देखोनि वालीचे पूर्ण प्रेम । कृपा कळवळिला रघूत्तम । स्वयें बोलिला मेघश्याम । सावधान अवधारा ॥ १४१ ॥

वाली नको त्यजूं प्राण । तुझा उपडूनिया बाण । सामर्थ्ये वांचवीन प्राण । सुख संपूर्ण भोगावया ॥ १४२ ॥
[ओवी १४२ कं. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

सीता शुद्धी साह्य देख । तूं मज होसी आवश्यक । भोगी तारा अगंद सुख । मरणोन्मुख होऊं नको ॥ १४३ ॥

गळां बांधोनिया रावण । सीता आणीन आपण । तें तूं सत्य करी वचन । साह्य संपूर्ण मज होई ॥ १४४ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । वाली जाला हास्यवदन । पूर्वील माझा बळाभिमान । गेला [कं. इं. 'लाजोन'.] जळोन तुजपुढें ॥ १४५ ॥

सूर्यापुढें जेविं खद्योत । तेंवि देखे मी श्रीरघुनाथ । सबळ विरालें सामर्थ्य । तेजें अद्भुत श्रीरामा ॥ १४६ ॥

तुझ्या निज प्रतापापुढें । रावण दहा तोंडाचें किडें । मी मशक साह्य कोणीकडे । सामर्थ्य गाढें श्रीरामीं ॥ १४७ ॥

तुझा सुटलिया बाण । बापुडें रावण तें कोण । होय त्रैलोक्या निर्दलन । बळें संपूर्ण श्रीराम ॥ १४८ ॥

तुझी विक्षेप भ्रुकुटी । रणा आणील सकळ सृष्टी । कायशा वानर [पै. तु. 'गोष्टी'.] साह्य कोटी । [तं. 'दिग्पटीं'.] रावण कपटी उरे केविं ॥

भोगावया स्त्रीपुत्राचे सुख । आजि वांचावें आवश्यक । स्त्रीपुत्रभोग परम दुःख । म्यां निष्टंक अनुभविलें ॥

स्त्री सुख भोगाचा अनुवाद । सख्या बंधूसी पडिलें द्वंद्व । स्वजन घात दुर्धर क्रोध । नित्य विरोध तो विषय ॥ [ओवी १५१ व १५२ तं. प्रतीत नाहीत.]

श्रीरामा तूं तंव [मु. दै. कं. 'निज'.] नित्य विवेकी । विषय भोगितां इयें लोकीं । कोण्ही तरी जाला सुखी । नित्य दुःखी तो विषयी ॥ [ओवी १५१ व १५२ तं. प्रतीत नाहीत.]

आजीच्या ऐसें रघुनाथा । पुढें मरण न ये हातां । तेंहि ऐके सावधानता । माझ्या निजहिता लक्षूनी ॥ १५३ ॥

> त्यजाम्यसून्महायोगिन्दुर्लभं तव दर्शनम् । यन्नाम विवशो गृह्णन्म्रियमाणः परंपदम् ॥ १९ ॥
> याति साक्षात्स एव त्वं मुमुक्षुर्मे पुरा स्थितः ॥ २० ॥

न करितां योग याग साधन । तुझे दृष्टीपुढें देहत्यागून । मी होईन कृतकल्याण । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ १५४ ॥ [ओवी १५४ ते १५८ इं. प्रतीत नाहीत.]

अंतकाळीं अवचटे जाण । केलिया रामनाम स्मरण । परमपद प्राप्ति पूर्ण । जन्म मरण मग कैंचें ॥ १५५ ॥

रामनामाच्या कडकडाटी । दोष जळती [मु. पै. 'सृष्टी'.] आकल्प कोटी । परमपद पावे शेवटी । नित्य नेहटी रामनामें ॥ १५६ ॥

एवढी ज्याची नामख्याति । तो तूं स्वयें रघुपती । कृपेनें भेटलासी अंतीं । जिणें पुढती मज नको ॥ १५७ ॥

अनुक्रमणिका

**आतां नको विषयाचरण । आतां नको जन्ममरण । भावें धरूनी श्रीरामचरण । वाली आपण विनवितु ॥ १५८ ॥**

विशल्यं कुरु मे राम हृदये पाणिना स्पृशन् । त्वमेव बाणमुद्धृत्य राम संस्पर्श पाणिना ॥ २१ ॥
त्यक्त्वाहं वानरं देहं संयामि परमां गतिम् ॥ २२ ॥

**तुझे हातीचा लागतां बाण । मी जालों अति पावन । तुझा पद्‌महस्त स्पर्शन । वांछी मन सुखार्थ ॥ १५९ ॥**

**तुझा लागतां पद्‌महस्त । मी होईन नित्य मुक्त । सच्चिदानंद पद प्राप्त । मज निश्चित तुझेनि ॥ १६० ॥**

**ऐकोनि वालीचें वचन । हृदयीं भेदला जो बाण । श्रीरामें उपडूनी आपण । केलें स्पर्शन् अमृतहस्तें ॥ १६१ ॥**

**लागतां श्रीरामाचा हात । वाली देहीं देहातीत । बंधमोक्षाहि अतीत । केला निश्चित श्रीरामें ॥ १६२ ॥** [ओवी १६२ व १६४ इं. प्रतीत व ओवी १६४ कं. प्रतीत नाही.]

**श्रीराम हस्त मस्तकासाठीं । वालीसी सुखरूप सृष्टीं । परमानंदी पडली मिठी । कृपादृष्टी श्रीरामें ॥ १६३ ॥**

**म्यां सुग्रीवेसीं केला विरोधु । परी सुग्रीव परम सखा बंधु । त्याचेनि पावलों परमानंदु । सुखावबोधु श्रीराम ॥** [ओवी १६२ व १६४ इं. प्रतीत व ओवी १६४ कं. प्रतीत नाही.]

**यापरी वाली आपण । वानर देहातें त्यागून । श्रीराम कृपेस्तव** [मु. 'संपूर्ण'.] **जाण । निजपदीं पूर्ण विनटला ॥ १६५ ॥**

**विरोध रूपें श्रीरामें आपण । केलें वालीचें उद्धरण । एका विनवी जनार्दन । कृपाळू पूर्ण श्रीराम ॥ १६६ ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां वालीवधो नाम षष्ठप्रसंगः ।**

अनुक्रमणिका

## प्रसंग सातवा

## वाली उद्धरण, सुग्रीव राज्य स्थापन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**श्रीरामाच्या** [कं. तं. 'निज'.] **दृढ बाणीं । घायें वाली पाडिला रणीं । लोळतां देखोनियां धरणीं । वानरां पळणी मांडली ॥ १ ॥**

> निहते वालिनि रणे रामेण परमात्मना । दुद्रुवुर्वानराः सर्वे किष्किंधा भयविव्हलाः ॥ १ ॥
> तारामूचुर्महाभागे हतो वाली रणाजिरे । अंगदं परिरक्षार्थ मंत्रिणं परिचोदय ॥ २ ॥
> चतुर्द्वारकपाटादीन्बध्वा रक्षामहे पुरीं । वानराणां तु राजानमंगदं कुरु भामिनी ॥ ३ ॥

**श्रीरामाच्या बाण नेटीं । वाली पडिला देखोनि दृष्टी । वानर सेना भय संकटीं । उठा उठी पळालें ॥ २ ॥**

**वाली विंधोनि मारिला पूर्ण । सैन्यावरी सोडोनि बाण । अवघियांचा घेईल प्राण । पलायमान तेणें धाकें ॥**

**श्रीरामबाण अति दुर्धर । घायें निवटिलें त्रिशिरा खर । चौदा सहस्त्र निशाचर । बाणीं** [तु. दै. 'साचार'.] **सत्वर निवटिले ॥ ४ ॥**

**श्रीराम जीवें उरो नेदी । जो देखे तो समूळ छेदी । येणें भयें वानर मांदी । किष्किंधे मधीं पळाली ॥ ५ ॥**

**वानर चळचळां कांपत । अवघे आले किष्किंधे आंत । सांगती रामे केला घात । तेणें आकांत नगरा माजीं ॥**

**तारेसी सांगती सुभट । दुर्धर दुर्गा करीं बळकट । चहुद्वारीं देऊनी कपाट । करी राज्यपट्ट अंगदासी ॥ ७ ॥**

**ऐकोनि वालीचें मरण । अंगदातें हातीं धरुन । तारा निघाली आपण । आक्रंदन करीतचि ॥ ८ ॥**

**वाली निमालिया पाठीं । कायसी अंगदाची गोष्टी । कैंचे राज्य कैंची सृष्टी । देह उठाउठीं त्यागीन ॥ ९ ॥**

**कैचें घर कैंचें दार । कैंचें दुर्ग कैंचें नगर । कैचें प्रधान कैचा परिवार । मरणें सत्वर मज आजी ॥ १० ॥**

**हृदयीं भेदला रामबाण । वाली निमाला सप्राण । त्यातें तारेनें देखोन । मूर्च्छापन्न ते पडिली ॥ ११ ॥**

**सवेंचि आक्रंदोनि उठी । दुःखें मस्तक भूमीं आपटी । गडबडा लोळे सृष्टीं । हृदय पिटीं आक्रोशें ॥ १२ ॥**

**केश सुटले मोकळे । अश्रुधारा स्त्रवतीं डोळें । दुःखें पुनः पुन्हा लोळे । आरंबळें अति दुःखें ॥ १३ ॥**

अनुक्रमणिका

**गेलें माझें वैभव पूर्ण । गेलें माझे भोग** [तु. प्रती खेरीज इतरत्र 'भुवन'.] **भूषण । सुख सौभाग्या पडिलें खान । निज निधान अंतरलें ॥ १४ ॥**

**अंतरलियां निज पती । प्रिया पावें उपहती । उपेगा नये ते धर्मार्थी । शुभ कार्यार्थी** [पै. 'अशुभ तें'.] **अशुभ ॥ १५ ॥**

**त्यजिलीं अलंकार आभरणें । त्यजिलीं सर्वांग भूषणें । गळसरी राखिली तिणें । पतीसीं करणें सहगमन ॥ १६ ॥**

**तारेसीं सांगती वृद्ध वनिता । अंगदा सारिखा पुत्र असतां । सकळ राज्य हातां येतां । देह कां वृथा त्यागिसी ॥**

**भर्तार सुखा समान । पिता भ्राता** [तं. 'सखे सज्ञन'.] **सुत स्वजन । सर्वथा नव्हेति वो जाण । तेहि लक्षण अवधारी ॥ १८ ॥**

मितं ददाति हि पिता मितं भ्राता मितं सुतः । अमितस्य प्रदातारं भर्तारं का न पूजयेत ॥ ४ ॥
शरेणोरसि लग्नेन जीवितप्राणहारिणा । परिष्वक्तुं न शक्नोमि भुज्याभ्यां त्वां हरीश्वर ॥ ५ ॥

**पिता जालियां समर्थ । कन्येसी देणें परिमित । बंधूसीं जालियां राज्य प्राप्त । नियतार्थ भगिनीसीं ॥ १९ ॥**

**पुत्र जालियां राज्यधर । मातेसीं परिमित उपचार । सर्व सत्ता दे भर्तार । त्यासी केवी शरीर वंचू ॥ २० ॥**

**गजांत लक्ष्मी पती लागूनि । त्याची स्त्री म्हणती स्वामिनी ।**
**हें नये पित्या पुत्रां पासुनी । भर्तारा वाचुनि निंद्य जिणें ॥ २१ ॥**

**पतीसवें सहगमन । न करितां मागें येईल मरण । ते मरणचि नींद्य जाण । अधःपतन** [तु. प्रती खेरीज इतरत्र 'रांडवा'.] **रौरवासी ॥ २२ ॥**

[तं. 'सत्व'.] **धर्मकर्मअर्थविहीन । विधवा नारी प्रेतासमान । हें तंव श्रुतिशास्त्र वचन । सुख कोण वैधव्यें ॥ २३ ॥**

**पतीसवें होता सती । इहलोकीं पुण्य परत्रीं मुक्ति । येव्हडी सांडूनियां प्राप्ती । पुत्र राज्यार्थी** [पै. खेरीज इतरत्र 'सुखकाय'.] **वांचावें ॥ २४ ॥**

**पतीसी देतां आलिंगन । हृदयीं श्रीरामाचा बाण । भेदला देखोनि संपूर्ण । तारा उद्विग्न अति दुःखें ॥ २५ ॥**

**सेजेचा निर्दाळिला पती । खेंव ने दवे प्रेताप्रती । ऐसें वैर केलें रघुपती । तारा शापोक्ति क्षोभली ॥ २६ ॥**

न सीता मम शापेन चिरतः प्रतिवत्स्यति । आत्मनः शौचमास्थाय पतिव्रतागुणा सती ॥ ६ ॥
याच्यमाना त्वया सीता पुनर्यास्यति मेदिनीम् ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

पति दुःखाच्या दुःखावर्ती । तारा क्षोभोनियां चित्तीं । शाप वदे श्रीरामा प्रती । तेहि युक्ति अवधारा ॥ २७ ॥

विभांडूनि लंकापती । तूं पावसी सीतासती । परी ते नांदेना तुजप्रती । जाईल मागुती वनवासा ॥ २८ ॥

दोघें नांदतां अयोध्येसीं । श्रीरामा तूं बलात्कारेसी । वना दवडोनिया सीतेसी । मज ऐसा होसी अति दुःखी ॥

सीता वनवासी वनांत । लव कुश जन्मतां सुत । बारा वर्षें अयोध्ये आंत । सीता दुःखार्त श्रीरामु ॥ ३० ॥

लंकेसी दिव्य घेतलियां पाही । सीता सती लोकीं तिहीं ।
येथ दवडावया कारण कायी । जग अन्यायी म्हणेल तुज ॥ ३१ ॥

वाली मारियेला वृथा । हें अपेश बैसलें माथां । दुजें अपेश रघुनाथा । वना सीता दवडूनी ॥ ३२ ॥

कुशाचिया युद्ध ख्याती । अयोध्ये आणिसी सीता सती । तऱ्ही नांदेना तुजप्रती । जाईल मागुती धरेमाजीं ॥

श्रीरामासी शाप वचन । ऐकोनि तारेचें रुदन । वाली होऊनि सावधान । काय [दै. तु. कं. 'वचन'.] आपण बोलतु ॥ ३४ ॥

तारेसी म्हणे अगे मूढमती । पतिव्रते तूं महासती । शाप देऊं नको रघुपति । हा ब्रह्ममूर्ति परमात्मा ॥ ३५ ॥

आंगीं जंव [मु. दै. तु 'विषयासक्ती'.] विषयशक्ति । श्रीराम नोळखवे ब्रह्ममूर्ती ।
बाणें छेदिली विषयासक्ति । मग हे स्फूर्ति मज जाली ॥ ३६ ॥

हृदयीं भेदतां श्रीरामबाण । जगाचे न देखे दोष गुण । श्रीराम देखे ब्रह्म पूर्ण । जग संपूर्ण श्रीराम ॥ ३७ ॥

बाण नव्हे तो निजात्म बोधु । समूळ माझा छेदिला भेदु । तेणें पावलो परमानंदु । आनंद कंदु श्रीराम ॥ ३८ ॥ [ओवी ३८ तं. प्रतीत नाही.]

तुज जैं लागतां श्रीरामबाण । तैं तू पावतीस कल्याण । न देखतीस दोष गुण । राम परिपूर्ण परब्रह्म ॥ ३९ ॥

मजसवें होऊं नको सती । जीवित्व अर्पावें रघुपती । तें सतीत्व त्रिजगतीं । प्रेतप्रीति मरों नको ॥ ४० ॥

प्रेत पतिभावें आगी रिघती । त्या सति प्रेतभूतें होती । डांका भोगीं अवतरती । भोग मागती विषयांचे ॥ ४१ ॥

तेसें न करावें आपण । जीवित्व करावें रामार्पण । श्रीरामाचें निज वचन । अणु प्रमाण नुलंघी ॥ ४२ ॥

अंगद धरूनियां आपण । तोहि करावा रामार्पण । श्रीराम कृपेस्तव जाण । सुख संपूर्ण पावसी ॥ ४३ ॥

अनुक्रमणिका

**ऐसी तारेसी सांगोनि युक्ति । स्वानंदे बोले सुग्रीवा प्रती । तूं तंव जिवलग सांगाती । श्रीराम प्राप्ती तुझेनी ॥ ४४ ॥**

> सौंदर्य भ्रातृयुक्तं हि सख्यं चेष्टं कृतं त्वया । इदं हि त्वं प्रपद्यस्व राज्यमेषां वनौकसाम् ॥ ८ ॥
> सुषेणदुहिता चेयमर्थशिक्षाविनिश्चये । यदेषा साध्वी यद्ब्रूयात्तत्कार्यमुक्तसंशयम् ॥ ९ ॥
> एष तारात्मजः श्रीरामान्मया तुल्यपराक्रमः । यौवराज्येऽभिषेक्तव्यो युद्धार्थे यस्तवाग्रतः ॥ १० ॥

**सुग्रीवा! म्या केलें दृढ वैर । परी तूं सखा सहोदर । भेटऊनी श्रीरघुवीर । यम प्रहार चुकविला ॥ ४५ ॥**

**चुकविला माझा भय शोक । चुकविलें जन्म मरण दुःख ।**
**श्रीराम प्राप्ती परमसुख । अलौकिक मज दीधलें ॥ ४६ ॥**

**तुज मी काय होऊं उत्तीर्ण । अभेद सुख तुझेनि पूर्ण । काहीं एक देईन अणु प्रमाण । कृपा करून अंगिकारी ॥ ४७ ॥**

**मज होआवया उत्तीर्ण । किष्किंधेचें राज्य पूर्ण । अंगीकरावें आपण । सखा संपूर्ण तूं माझा ॥ ४८ ॥**

**सुषेणाची कन्या तारा । सारासार विवेकचतुरा । ईचिया मानूनि विचारा । राज्य भारा चालवावें ॥ ४९ ॥**

**अंगदा युवराज्य देऊनी । प्रति पाळावा लळें करूनी । तूंची पिता तूंचि जननी । श्रीराम भजनी लावी यासी ॥**

**प्रथम निर्दाळावया उद्भट । अंगद तुजपुढें सुभट । रणीं राक्षसां करूनी पीठ । घेईल त्रिकुट लंकेचें ॥ ५१ ॥**

**आम्हांसी श्रीरामाचें बळ । श्रीराम बळें आम्ही सबळ । श्रीराम भजा तुम्ही सकळ । राम केवळ परब्रह्म ॥**
[ओवी ५२ कं. प्रतीत नाही.]

**श्रीराम सद्गुरु निश्चित । श्रीराम आम्हा गणगोत । आमचें सर्वस्व रघुनाथ । कुळ दैवत श्रीराम ॥ ५३ ॥**
[ओवी ५३ नंतर —– 'संकल्प विकल्प भजन । तेथ विषयादि लीन । यालागीं कायावाचामन वेंचों प्राण श्रीरामी ॥
देह भावाच्या आदि अंती । कर्मांची जाली निवृत्ति । देखोनिया निजशांति । तुम्हा रघुपती न विसंबे ॥']
या ओव्या तं. प्रतीत अधिक आहेत.]

**तारा अंगद आणि सुग्रीव । भावें भजा श्रीराघव । हेचिं तिहीं लोकीं गौरव । अति अपूर्व आम्हांसी ॥ ५४ ॥**

**ऐकोनि वालीचें वचन । सुग्रीवें घातलें लोटांगण । मस्तकीं धरूनि वालीचरण । काय आपण बोलतु ॥ ५५ ॥**

**तुझिया वैरें वैराग्यप्राप्ति । स्वामी जोडला श्रीरघुपती । जाली** [कं. 'वैराग्य निजशक्ती.'] **वैराची निजशांती । वानूं किती उपकार ॥ ५६ ॥**

अनुक्रमणिका

मी तूं पणेसी तुटलें वैर । सुखेंचि तरलों भवसागर । जाला वंशाचा उद्धार । हा हि उपकार वाली तुझा ॥ ५७ ॥

आम्ही वानर वनचर । विषयोन्मत्त पाले खाईर ।
त्या आम्हा जोडला श्रीरघुवीर । हा हि उपकार वाली तुझा ॥ ५८ ॥ [ओवी ५८ तं. प्रतीत नाही.]

नुलंघी तारेच्या वचनासी । युवराज्य देईन अंगदासी । सर्वस्वें भजेन श्रीरामासी । भाक तुजपासी हे माझी ॥ ५९ ॥

ऐकोनि सुग्रीव वचन । वाली जाला सुख संपन्न । विजय माळा द्यावया आपण । उल्हास पूर्ण वालीसी ॥ ६० ॥

इमां मालां गृहाण त्वं दत्तां सुग्रीव कांचनीम् । उदारा श्रीः स्थिता यस्यां त्वामेष्यति यथामति ॥ ११ ॥
इत्येवमुक्ता सुग्रीवं रामं प्रांजलिरब्रवीत् । प्रणम्य शिरसा पादौ त्यक्त्वासुं परमांगतिम् ॥ १२ ॥

कश्यप दत्त वरद माळा । वृत्र वधाचिया काळा ।
घातली इंद्राचिया गळां । जे देखिलियां डोळां । वैरी विन्मुख होती ॥ ६१ ॥

माळा देखिल्या सन्मुख । धाकें वैरी होती विमुख । विजयश्रियेचे निज सुख । तिन्ही लोक [तु. 'मानिती'.] वानिती ॥ ६२ ॥

इंद्रें दिधली मज लागूनी । विजय माळा हे कांचनीं । सुग्रीवासी आलिंगूनी । वाली उल्हासोनी देता जाला ॥

सुग्रीवा हे विजय माळा । मीं घालितों तुझियां गळां ।
तूं न गवससी कळिकाळा । भोगी सोहळा कपि राज्याचा ॥ ६४ ॥

विजयमाळेचिया प्राप्ती । श्रीरामाच्या सेवावृत्ती । त्रैलोक्यीं विस्तारेल कीर्ति । नित्यानुवृत्ती श्रीरामाचा ॥ ६५ ॥

ऐसे सांगोनि सुग्रीवासी । नमस्कारूनि श्रीरामासी । रामस्मरणें त्यजोनि देहासी । परमगतीसी पावला ॥ ६६ ॥

वालीने सोडियेला प्राण । तारा दुःख शोकें निमग्न । श्रीरामापासीं येवोनि जाण । काय आपण बोलत ॥ ६७ ॥

वैधव्याचा दुःख शोक । न साहवें क्षण एक । मी मागेन काहीं एक । तें आवश्यक मज देई ॥ ६८ ॥

अनुक्रमणिका

**माझे निर्वाण मागणें । ना न म्हणावें** [मु. दै. 'कृपणपणें'.] **कृपाळूपणें । मजलागूनि उद्धरणें । कृपा करणें श्रीरामा ॥ ६९ ॥**

राम मां जहि वाणेन येन वाली हतस्त्वया । गच्छामि पतिसालोक्यं पतिर्मामभिकांक्षते ॥ १३ ॥
पत्नीवियोगजदुःखमनुभूतं त्वयानघ । वालिने मां प्रयच्छाशु पत्नीदानफलं लभेत ॥ १४ ॥

**वाली वधिला जेणें बाणें । मज वधावें जी तेणें । सवें जाऊं दोघे जणें । वियोग झणें होऊं नेदी ॥ ७० ॥**

**पत्नी वियोगाचें दुःख । तुवां भोगिलें अशेख । मज बाणें विंधोनियां देख । धाडी आवश्यक पतीपासी ॥ ७१ ॥**

**माझी वाट गा** [तं. पैं. 'तो'.] **पाहात । वाली राहिला असे तिष्ठत । मज पाठवावे** [मु. 'जी तेथं'.] **त्वरित । पुण्य अत्यंत होईल रामा ॥ ७२ ॥**

**मज धाडिलिया वालीपासीं । पत्नी दान फळ लाहासी । येणें सीता शीघ्र पावसी । पति पत्नीसी भेटविल्या ॥ ७३ ॥**

**ऐकोनि तारेचे बोल । प्रवृत्ति शास्त्रें अति सखोल । ते अवघे करावया फोल । राम निश्चल पूसतु ॥ ७४ ॥**

किं भीरु शोचसे व्यर्थं शोकस्याविषयं पतिम् । पतिस्तवायं देहो वा जीवो वा वद तत्त्वतः ॥ १५ ॥

**तारे! ऐके सावधानेसी । तूं काय देहासी पति मानिसी । कीं पती म्हणसी जीवासी । तें मजपासी सत्य सांगे ॥**

**देहासी सत्य पती मानिसी । तरी तो आहे तुजपासीं ।**
**सिद्ध असतां शोक कां करिसी । अति उल्हासीं भोगावा ॥ ७६ ॥**

**पति मानिसी जरी जीवासी । तरी त्वां नाहीं देखिलें त्यासी ।**
**गेला गेला केंवि म्हणसी । व्यर्थ** [मु. 'रांडवलीसी'.] **कां रडसी मूर्खत्वें ॥ ७७ ॥**

**जीवासी नाहीं जिणें मरणें । जीवासी नाहीं खाणें भोगणें । जीवासी नाहीं येणें जाणें । गेला म्हणणें हें मिथ्या ॥**

**जीव चिदात्मा चैतन्यघन । सर्वीं सर्वत्र परिपूर्ण । त्यासी नाहीं गमनागमन । वृथा रुदन कां करिसी ॥ ७९ ॥**

**घटा घडीमोडी बहुवस । घडमोडी नेणें घटाकाश । तेवि देहासीं होता नाश । जीव अविनाश** [तु. 'अलिप्त'.] **नित्यत्वें ॥ ८० ॥**

**घटीं भरिल्या घृत मद्यासीं । तो लेपु न लगे घटाकाशासीं ।**

अनुक्रमणिका

तेंवी देहीच्या पाप पुण्यासी । आत्म प्रकाशीं रिघु नाही ॥ ८१ ॥

आत्मा परिपूर्ण सदोदित । कर्मधर्मासी विरहित । सुखदुःखासी अलिप्त । तूं कां व्यर्थ विलपसी ॥ ८२ ॥

देहो हि काष्ठवद्राम जीवो नित्यश्चिदात्मकः । सुखदुःखादिसंबंधः कस्य स्याद्राम मे वद ॥ १६ ॥

देह तव काष्ट प्राय आहे । त्यासी दुःखसुख बाधूं न लाहे ।
आत्मा चैतन्यघन सबाह्यें । तेथें न समाये सुखदुःख ॥ ८३ ॥

सुखदुःखांचा हा मारा । कोणासी बाधी रामचंद्रा । याचा उकलूं सांगावा खरा । दुःख परपारा पावावया ॥ ८४ ॥

ऐकोनि तारेचा प्रश्न । स्वयें सांगे श्रीरघुनंदन । जंव देहीं देहाभिमान । दुःख बंधन [तं. खेरीज इतरत्र 'अविवेकिया'.] अवश्य कीं ॥ ८५ ॥ [ओवी ८५ व ८६ ची दै. प्रतीत एकच ओवी केली आहे.]

देही सबाह्य चैतन्यघन । तेथें मिथ्या भांसे देहाभिमान । जेंवी दोरा आंगीं सापपण । तेवी संपूर्ण देह मिथ्या ॥ ८६ ॥ [ओवी ८५ व ८६ ची दै. प्रतीत एकच ओवी केली आहे.]

जन्म मरण देह संभ्रम । क्षुधा तृषा प्राण धर्म । विषयांचा भोग परम । इंद्रियकर्म इंद्रियांचें ॥ ८७ ॥

सुख दुःख भय शोक । मनोधर्म आवश्यक । हरिहरब्रह्मा त्रिगुणात्मक । [तं. 'कल्पांतिक संहार'.] काल्पनिक संसारू ॥ ८८ ॥

आत्मा गुणी गुणातीत । देही [मु. तं. 'देहबाधा'.] देहबंधा अलिप्त । तेही विषयीचा दृष्टांत । सुनिश्चित अवधारी ॥ ८९ ॥

स्फटिक कृष्णवर्णी काळा । पीत वर्णी दिसे पिवळा । आरक्तीं भासे आरक्त कळा । तऱ्ही वेगळा तिहीं रंगा ॥

तेंवि आत्मा संसारातु । त्रिगुणां गुणी गुणातीतु । ऐसा जोडल्या परमार्थु । होय प्रांतु सुखदुःखा ॥ ९१ ॥

ऐसी व्हावया निज प्राप्ती । अवश्य पाहिजे सत्संगती । त्याचेनि संगें विषय विरक्ति । तैं परमार्थी अधिकारू ॥

शब्दें छेदी विकल्प समस्त । परमानंदी नित्य तृप्त । तैसिया गुरुपासी परमार्थ । सुनिश्चित [दै. तु. 'सावधान'.] साधावा ॥ ९३ ॥

वेदानुवादें सप्रमाण । ऐकोनि सद्गुरुचें वचन । देहीं मिथ्या देहपण । नित्य चैतन्य अनुलक्षी ॥ ९४ ॥

अनुक्रमणिका

**अनुलक्षितां चैतन्यघन । परमानंदे मूर्छापन्न । श्रीराम कृपा पावली पूर्ण । देहाभिमान विसरली ॥ ९५ ॥**

श्रीरामेणोदितं सर्वं श्रुत्वा तारातिविस्मिता । देहाभिमानजं शोकं त्यक्त्वा नत्वा रघूत्तमम् ॥ १७ ॥
सुग्रीवोऽपि च तच्छुत्वा रामवक्त्रात्समीरितम् । जग्राह ज्ञानमखिलं स्वस्थचित्तो भवत्तदा ॥ १८ ॥

**ऐकोनि श्रीराम वचन । तारा विसरली देहाभिमान । हरिखें घाली लोटांगण । श्रीराम चरण वंदिले ॥ ९६ ॥**

**वालीनें सांगितले आपण । ब्रह्मीं ब्रह्मभूत श्रीराम चरण । ते मज पावली निज खूण । ब्रह्म परिपूर्ण श्रीराम ॥**

**तारा प्रबोध श्रीरामवचन । सुग्रीवें ऐकतां आपण । विसरला देहाभिमान । सुख संपन्न श्रीरामें ॥ ९८ ॥** [ओवी ९८ कं. प्रतीत नाही.]

**ऐकतां श्रीराम वचनोक्ति । तारा सुग्रीवा सुख संपत्ति । दोघें जालीं अति प्रीती । विकल्प** [मु. तु दै. 'चित्तीं'.] **वृत्ति त्यां नाहीं ॥**

**दोघां जाले समाधान । तंव बोलिला रघुनंदन । वालीचें करूनियां दहन । द्यावें पिंडदान तिलोदक ॥ १०० ॥**

**अंगद सुग्रीव प्रधान । वालीस पुष्पकीं घालून । पंपा तीरीं केलें दहन । बिल्व चंदन काष्टादिकीं ॥ १०१ ॥**

**वालीचें उत्तरविधान । तिलोदक पिंडदान । करूनि सुग्रीवादि प्रधान । अंगदा घेऊनि येते जाले ॥ १०२ ॥**

**येऊनि अवघे जण । वंदूनि श्रीराम चरण । सुग्रीवें हात जोडून । अंगदा घेऊनि उभा ठेला ॥ १०३ ॥**

**श्रीराम म्हणे हनुमंता । सुग्रीवासी अति शीघ्रता । करावी राज्याभिषेकता । युवराज्यता अंगदासी ॥ १०४ ॥**

**ऐकोनि श्रीरामाची वचनोक्ती । हनुमंतें केली विनती ।**
**स्वामी येऊनि किष्किंधे प्रती । सुग्रीव राज्यार्थी अभिषेकी ॥ १०५ ॥**

**आपुलेनि हातें श्रीराघवा । सुग्रीव राज्यीं संस्थापावा । हें आवडे आमुच्या जीवा । कृपाळू वा श्रीरामा ॥ १०६ ॥**

**ऐकोनिया हनुमद्वचन । संतोषला रघुनंदन । आपुलिया नियमाचें लक्षण । स्वयें आपण सांगतु ॥ १०७ ॥**

चतुर्दश समाः सौम्य ग्रामं वा यदि वा पुरम् । न प्रवेक्ष्याम्यहं वीर पितुर्निर्देशकारकः ॥ १९ ॥

**श्रीदशरथ आज्ञा शिरीं । चौदा वर्षें वनांतरी । ग्रामीं पुरीं अग्रहारी । प्रवेश न करी नेमस्त ॥ १०८ ॥**

**ऐकोनि नेमांचे लक्षण । हनुमंत धरी श्रीरामचरण । सवें द्यावा लक्ष्मण । राज्याभिषेचन सुग्रीवा ॥ १०९ ॥**

अनुक्रमणिका

अभिषेकावया सुग्रीव वीर । किष्किंधें चालिला सौमित्र । वानर करिती जयजयकार । हर्षे अंबर कोंदलें ॥ ११० ॥

श्रीरामें तारा पाचारूनि । किष्किंधा राज्यीं तूं राजपत्नी । सुग्रीवातें अंगिकारूनी । माझें आज्ञेनें राज्य करी ॥ १११ ॥

सर्वभूतीं भगवद्भावो । त्या माजीं मानी सुग्रीव नाहो । माझे आज्ञेचा भोगी अनुभवो । देह संदेहो तेथ नाहीं ॥

देवरापासाव सुतोत्पत्ती । बोलिली आहे धर्म शास्त्रीं । माझे आज्ञेचे अनुभूति । सुग्रीवां प्रति भजावें ॥ ११३ ॥

स्त्री पुरुष उभय देहीं । आत्म्या वांचूनि आत्मी नाहीं । दृष्टी ठेवितां तिये ठाईं । देहीं विदेही [मु. 'सहजत्वें'.] अनुभवूं ॥ ११४ ॥

हें नसता निजात्म दृष्टी । स्वपत्नी भोगितां नरक कोटी । निजात्म दृष्टीच्या संतुष्टीं । [मु. 'सहजलोटीं'.] द्वंद्व घोटी ममाज्ञा ॥ ११५ ॥

श्रीरामाचें अनुवादन । ऐकतां शुद्ध विस्मयी मन । तारा सुग्रीवा समाधान । श्रीरामवचन अनुल्लंघ्य ॥ ११६ ॥

सुग्रीव किष्किंधेचा राजा । तारा त्याची निज भाजा । युवराज्य तारात्मजा । श्रीरघुराजाची आज्ञा ॥ ११७ ॥

ऐसें बोलतां श्रीरामचंद्र । अवघीं केला जयजयकार । संतोषले अवघे वानर । आणि सुरवर [दे. तु. मु. 'समस्त'.] स्वर्गस्थ ॥ ११८ ॥

महा महोत्सव किष्किंधे आंत । वानर मिळोनिया समस्त । ऋषि आणिले अति विख्यात । अभिषेकार्थ सुग्रीवां ॥

सनख व्याघ्रचर्म समग्र । वराह दंष्ट्रा कूर्मचक्र । सप्तसमुद्रींचें नीर । आणिलें क्षीर सुरभीचें ॥ १२० ॥

सप्त मृत्तिका तीर्थोदक । स्थळजें जळजें कमळें अनेक । सुमनें चंदने अतिचोख । क्षीरोदक मणिरत्नें ॥ १२१ ॥

च्यूतपल्लव पद्मपल्लव । अशोकपल्लव [तं. 'सर्वादि पल्लव'.] कल्पपल्लव । नगर शृंगारिलें सर्व । अति अपूर्व हनुमंतें ॥ १२२ ॥

मुकुट कुंडलें अलंकार । श्वेत छत्र [तु. 'श्वेत'.] युग्मचामर । सदाफलित औदुंबर । पीठ पवित्र अभिषेका ॥ १२३ ॥

शातकुंभ रजतकुंभ । सालंकार श्वेत वृषभ । रत्नीं पूर्ण रत्नकुंभ । हरित पल्लवीं अभिषेकु ॥ १२४ ॥ [ओवी १२४ कं. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

**होम करूनि प्रधान । सर्वेंचि केलें द्विज पूजन । तिलाज्य धेनु विविध दान । अभिषेचन सुग्रीवा ॥ १२५ ॥**

**जैसी उमा तैसी रूमा । तारा शोभे जैसी रमा । अंगदाची कांता क्षमा । महा महिमा अभिषेकीं ॥ १२६ ॥**

**सुवास शीतल** [तं. 'गंगोदक'.] **गंधोदक । सुमनोदक कुशोदक । श्रीरामाचें चरणोदक । ऋषि अभिषेक वेदघोषें ॥ १२७ ॥**

**वस्त्रें अलंकार धनधान्य । द्विजां दिधलें भोजन । अंगदा युवराज्य देऊन । सुख संपन्न सुग्रीव ॥ १२८ ॥**

**विधियुक्त वेद मंत्र । अभिषेकिती ऋषेश्वर । अभिषेकावया आले वानर । थोर थोर ते ऐका ॥ १२९ ॥**

गजो गवाक्षो गवयः शरभो गंधमादनः । मैंदो द्विदो नलो नीलो सुषेणो जांबवान्नलः ॥ २० ॥
अभ्यषिंक्तं तु सुग्रीवमंगदं च प्रपूजयन् ॥ २१ ॥

**गज गवाक्ष आणि गवय । शरभ गंधमादन उभय । मैंद द्विद नील** [तं. सोडून इतरत्र 'पाहे'.] **मय । आले लवलाहे अभिषेका ॥ १३० ॥**

**फनस केसरी दधिमुख सबळ । सुमुख दुर्मुख जांबुवंत नील ।**
**अभिषेकार्थ सुग्रीवासी सकळ । आले तत्काल वानर ॥ १३१ ॥** [ही नावें अनेक प्रतींतून अनेक प्रकाराने दिली आहेत.]

**अभिषेकिती सुग्रीवासी । युवराज्य अंगदासी । पूजा करोनि दोघांसी । अति उल्हासीं गर्जती ॥ १३२ ॥**

**अंगदा युवराज्य दीधलें । वानरी सुग्रीवा सन्मानिलें । अवघे म्हणती भले भले । संस्थापिलें श्रीरामें ॥ १३३ ॥**

एतस्मिन्नंतरे छत्रं गृहीत्वा पनसो हरिः । शूरौ पौनलतारौ च वालव्यजनधारिणौ ॥ २२ ॥

**पहिलें बैसऊनि सौमित्र । रथी बैसे सुग्रीव वीर । पुढें घेऊनि अंगद कुमर । निघे सत्वर राम नमना ॥ १३४ ॥**

**तेच समयीं** [मु. 'पन्नास'.] **पनस वीर । सुग्रीवावरी धरीं छत्र । कनकदंडी युग्म चामर । नळ तरळ वीजिताती ॥ १३५ ॥**

**या परी सुग्रीव राज्यधर । घेउनी वानरांचा भार । करीत आला जयजयकार । तेणें रघुवीर सुखी जाला ॥ १३६ ॥**

**हैकार जयकार थैकार । करीत आले वानर वीर । तें देखोनि श्रीरामचंद्र । सुख निर्भर स्वानंदे ॥ १३७ ॥**
**रथ सांडोनि सत्वर । अंगद सुग्रीव सौमित्र । लोटांगणीं श्रीरामचंद्र । नमस्कार घातला ॥ १३८ ॥**

अनुक्रमणिका

निवेद्य रामाय महात्मने तदा । राज्यभिषेकं कपिवाहिनीपतिः ॥
उवाच तां च प्रतिलभ्य ताराम् । शशंस राज्यं त्रिदशाधिपो यथा ॥ २३ ॥

**हनुमंत सांगे श्रीरामासी । राज्याभिषेक सुग्रीवासी । युवराज्य देउनी अंगदासी । पायापासीं आणिले ॥ १३९ ॥**

**येथोनि श्रीरघुनाथा । पुढील कार्य कर्तव्यता । विचारूनि सांगावी आतां । आम्हा समस्तां दासांसी ॥ १४० ॥**

**पर्जन्य काळ चातुर्मासीं । करितां नये सीता शुद्धीसीं । सुग्रीव धाडावा किष्किंधेसी । हनुमंतासी रामु सांगे ॥**

**प्रस्तवन गिरीं गुहेसी । मी राहेन सौमित्रेंसी । लोटलिया पर्जन काळासी । सीताशुद्धीसी शीघ्र यावें ॥ १४२ ॥**

**सुग्रीव म्हणे श्रीरामासी । लोटलिया** [दै. तु. 'पर्जन्य काळासी'.] **चातुर्मासांसी । आणूनि वानर सैन्यासी । सीता शुद्धीसी मी करीन ॥ १४३ ॥**

**ऐसें बोलोनि आपण । वंदूनिया श्रीरामचरण । उल्हासोनि अवघे जण । किष्किंधा भवन पावले ॥ १४४ ॥**

**रामें उद्धरिला वाली । राज्यीं स्थापिला सुग्रीव बळी । कीर्ति गेली भूमंडळीं । पिटिली टाळी तिहीं लोकीं ॥**

**एका जनार्दना शरण । जालें वालीउद्धरण । वानरा सखा रघुनंदन । पशु पावन श्रीराम ॥ १४६ ॥** [मु. प्रतींत १४६ ओवी अशी आहे :— 'आतां पुढे कथेसी । क्रमोनिया चातुर्मास्यासी । सुग्रीव घेवोनि येईल वानरांसी । सीता शुद्धीसी करावया ॥']

**इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां वाल्युउद्धरणसुग्रीवराज्य स्थापनं नाम सप्तमप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

### प्रसंग आठवा

### सुग्रीव सेना आगमन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीरामे उद्धरूनि वालीसी । राज्यीं अभिषेकिलें सुग्रीवासी । सुखी केलें रुमें तारेसी । देऊनी अंगदासी युवराज्य ॥

सुग्रीव राजा निज भर्तार । युवराज अंगद कुमर । तारा तेणें सुखें निर्भर । श्रीरामचंद्र [मु. 'प्रसादे'.] कृपाळू ॥ २ ॥

अभिषिक्ते तु सुग्रीवे प्रविष्टे वानरे गुहाम् । आजगाम सह भ्रात्रा रामः प्रस्रवणं वनम् ॥ १ ॥

प्रधान अंगदा समवेत । सुग्रीव गेला किष्किंधे आंत । श्रीरामें वसविला माल्य पर्वत । गुहा प्रशस्त देखोनी ॥

माल्यवंत गिरीवरीं । प्रस्त्रवण गुहा [मु. तं. 'भीतरी'.] गंभीरीं । श्रीराम राहिला मास चारी । सवें सहकारी सौमित्र ॥ ४ ॥

चारी मास पर्जन्य काळ । श्रीराम राहिला सुनिश्चळ । रामकार्या उतावेळ । शरत्काळ स्वयें आला ॥ ५ ॥

ग्रासूनियां वर्षाकाळ । शीघ्र पातला शरत्काळ । श्रीराम काळाचाही काळ । सुनिश्चळ स्वस्थानीं ॥ ६ ॥

जेंविं साधूचें मानस । नित्य निर्मळ निर्दोष । मेघीं सांडिलें आकाश । स्वप्रकाश [दे. तु. 'तेजोराशी'.] तेंवी भासे ॥ ७ ॥

शरदीं निर्मळता आकाशीं । प्रसन्न प्रभा शशि सूर्यासी । तो शुभ काळ साधकासी । पुरुषार्थासी साधावया ॥ ८ ॥

तीर्था निघाले तीर्थवासी । अभ्यासीं बैसले अभ्यासासी । राजे करिती प्रस्थानासी । अरि [दे. तु. 'परराज्यासी'.] वर्गासी जिणावया ॥ [ओवी ९ कं. प्रतीत नाहीं.]

काळ काळातें आकळित । काळा नकळे श्रीरघुनाथ । तो बैसलासे गिरि गुहांत । सीता शुद्धयर्थ नट नाट्यें ॥ [तं. प्रतींत पुढील ओव्या अधिक आहेत. 'आंगी सदा जेथें लीन । तें श्रीरामाचें निजमन । अंतर्बाह्य समाधान । देखिला पूर्ण श्रीराम ॥ ११ ॥ लीळारूप व्याप्त सृष्टि । लीळारूप व्याप्त दृष्टी । लीळारूप कर्म वृष्टी । स्वयें जगजेठी श्रीराम ॥ १२ ॥']

देखोनियां शरत्काळातें । श्रीराम म्हणे लक्ष्मणातें । सुग्रीव न येचि [मु. कं. तं. 'तो'.] पैं तेथें । निजनेमातें विसरला ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

जे रतले विषय स्वार्थी । ते नव्हती गा परमार्थी । त्यासी दंडूनिया संती । हित कार्यार्थी लावावें ॥ १२ ॥

जो अतिशयें विषयासक्त । तो कदा न देखे परमार्थ । तो [तु. मु. 'शुद्ध'.] सुग्रीव उपकारार्थ । येईल येथ कदा न घडे ॥ १३ ॥

चातुर्मास्यो गतः कालः सीतायाः परिमार्गणे । कृतार्थः समयं कृत्वा दुर्मतिर्नाभिमन्यते ॥ २ ॥

क्रमूनिया चातुर्मासीं । शीघ्र यावे सीताशुद्धीसी । हें ही नाठवे सुग्रीवासी । जो मजपासीं नेम केला ॥ १४ ॥

किष्किंधेसी जाऊनि आपण । सुग्रीवा द्यावी आठवण । जरी तो नायके आपण । विंधोनि बाणें वधावा ॥ १५ ॥

तारा रूमा घेऊनि पत्नी । [तु. दै. खेरीज इतरत्र 'जो उन्मत्त मद्यपानी'.] जरी असेल भोगशयनीं । माझें वचन अवगणी । तो तत्क्षणीं मारावा ॥ १६ ॥

ज्यासी नाहीं माझी आठवण । नाहीं [तु. इं. 'सत्कर्माचें'.] मत्कर्म स्मरण । त्यासी मारावें आपण । विंधोनी बाण सौमित्रा ॥ १७ ॥

जेणें केलें वालीनिर्दलन । तोंचि सोडूनि निज बाण । घ्यावा सुग्रीवाचा प्राण । अर्ध क्षण न लगतां ॥ १८ ॥

शठ नष्ट कृतघ्न तो वानर । नेणें उपकार प्रत्युपकार । मिथ्यावादी पालेखाइर । हा कुमित्र मित्रत्वा ॥ १९ ॥

तूं तंव माझा सखा सुमित्र । सुग्रीव केवळ कुमित्र । त्याचें विचारूनि अभ्यंतर । मग संहार करावा ॥ २० ॥

ऐकोनि श्रीरामवचन । करूनिया साष्टांग नमन । लक्ष्मण निघाला आपण । कोपायमान रामाज्ञा ॥ २१ ॥

शक्रचापनिभं घोरं धनुः कालांतकोपमम् । प्रगृह्य गिरिशृंगाभं प्रययौ लक्ष्मणस्तदा ॥ ३ ॥
शालतालाश्च कर्णाश्च तरसा पातयन्द्रुमान् । शिलाश्च शिकलीकुर्वन्नेभिर्वज्र इवाशुगैः ॥ ४ ॥

लक्ष्मणाचा अति साटोप । इंद्रधनुष्यासम चाप । हातीं घेऊनी सकोप । पादप्रक्षेप अवधारा ॥ २२ ॥

सक्रोध पाद सबळ शक्ति । शाल ताल उन्मळती । साय-सादडे नेणो किती । वृक्ष [तु. कं. पै. मु. 'उपडिती कर्णिकार'.] उन्मळती चरण घातें ॥ २३ ॥

अति सक्रोध क्रोधानळीं । वज्राभिघात पादें बळी । शिळा पाषाण [द. तु. 'रवंदळी'.] पायातळीं । होती रांगोळी पदीं पदीं ॥

पूर्व सूचना हनुमंत । सुग्रीवासी स्वयें सांगत । विसरलासी रामकार्यार्थ । अति उन्मत्त विषयांध ॥ २५ ॥

अनुक्रमणिका

**स्त्रीविषय मद्यपान । त्याहीवरी धन सन्मान । त्याहीमाजी शब्दज्ञान । हेचि नागवण** [दे. 'स्वहितासी'.] **पुरुषासी ॥ २६ ॥**

**द्रव्यदारा मद्यपान । तुझें बुडालें स्वहित ज्ञान । विसरलासी श्रीराम भजन । परम विघ्न तुज आलें ॥ २७ ॥**

**गेला काळ तूं नेणसी । आयुष्य वेचिलें विषयासी । लोटली चातुर्मासी । सीता शुद्धीसी** [मु. 'न निघसी'.] **नीघ वेगीं ॥ २८ ॥**

**सीता शुद्धि न करितां । कोप येईल रघुनाथा । तो करील तुझिया घाता । सत्य सर्वथा सुग्रीवा ॥ २९ ॥**

**ऐकोनि हनुमंताचें वचन । सुग्रीव नव्हेचि सावधान । वाक्य बोलिला उदासीन । अति गौण कार्यार्थी ॥ ३० ॥**

**सुग्रीव सांगे हनुमंतासी । शीघ्र मूळें धाडावीं वानरासीं । ऐसें सांगोनिया त्यासी । रावो राणिवसा निघाला ॥**

**हनुमंत येऊनी अतिशीघ्र । दहा सहस्त्र वानर वीर । आणावया सैन्य भार । स्वयें सत्वर धाडिले ॥ ३२ ॥**

**येरीकडे पैं सौमित्र । कोपें चालिला कालाग्निरुद्र । त्यातें देखोनि वानर वीर । थोर थोर गजबजिले ॥ ३३ ॥** [ओवी ३३ तु. कं. प्रतींत नाही.]

**किष्किंधेची धरूनी वाट । पायें पाषाण करीत पीठ । लक्ष्मण येता उद्भट । वानर श्रेष्ठ हडबडिले ॥ ३४ ॥**

> दशनागबलाः केचित्केचिद्दशगुणोत्तराः । केचिन्नागसहस्रस्य बभूवुस्तुल्यविक्रमाः ॥ ५ ॥
> संति कोटिबलाः केचित्केचिद्वायुबलोपमाः । अप्रमेयबलाश्चान्ये तत्रासन् हरियूथपाः ॥ ६ ॥
> तं ते भयपरीतांगाः क्रुद्धं दृष्ट्वा तु लक्ष्मणम् । कालमृत्युयुगांताभं शतशो दुद्रवुस्तदा ॥ ७ ॥

**एका दहा हस्तीचें बळवानर । एका त्याहूनि दशोत्तर । एका नागबळ सहस्त्र । त्यासम अपार असंख्य ॥ ३५ ॥**

**एकाचे आंगीं विद्युद्बळ । एक वायुबळें अति प्रबळ । एका आंगीं असंख्य बळ । तुळातुळ** [दे. खेरीज इतरत्र 'अप्रमेय'.] **प्रसिद्ध ॥ ३६ ॥**

**ऐसे वानराचे भार । किष्किंधेमाजीं अपार । नगर राखिती नरंतर । अति दुर्धर बलिष्ठ ॥ ३७ ॥**

**लक्ष्मण शरचापधर । काल कृतांत प्रलय रुद्र । त्यातें देखोनि वानर । लहानथोर भयभीत ॥ ३८ ॥**

**देखोनि लक्ष्मणाचा यावा । चळकांपु वानरांच्या जीवां । कोणे कोणा धीर द्यावा । भय सर्वां समानची ॥ ३९ ॥**

**लक्ष्मणें टणत्कारिलें सीत । वानर उडाले समस्त । एकएका पुढें पळत । अति आकांत नगरामाजीं ॥ ४० ॥**

अनुक्रमणिका

एका मनुष्याची आली धाडी । तेणें पळती वानर कोडी । राजगृहीं हडबडी गाढी । वानरें बापुडीं किलकिलती ॥

वानर बोलती कडोविकडी । वाली प्रताप ख्याती गाढी । तो मरतांचि आली धाडी । काढाकाढी कोण रिघे ॥ ४२ ॥

तारा सुग्रीवासी सांगत । नगरी होता अति आकांत । अजुनी कायिसा कामासक्त । होई सावचित्त उन्मत्ता ॥ ४३ ॥

प्रधान सांगती रायासी । सीता शुद्धि मर्यादेसी । तूं जावया चुकलासी । राम आवेशें क्षोभला ॥ ४४ ॥

तुझा करावया घात । रामें लक्ष्मण धाडिला त्वरित । वानर पळाले समस्त । अति आकांत नगरांत ॥ ४५ ॥

समयो चुकलों आपण । सत्य कोपला रघुनंदन । लक्ष्मणासी अनन्य शरण । रिघों आपण सपत्निक ॥ ४६ ॥

> तं दृष्ट्वा क्रोधरक्ताक्षं प्रगृहीतशरासनम् । सुग्रीवः सहसोत्तस्थौ कृतांजलिपुटस्तदा ॥ ८ ॥
> तस्य तारा रुमा चैव द्वे भार्ये पुरतः स्थिते । कृतांजलिपुटे ह्यास्तां लक्ष्मणाभिमुखे तदा ॥ ९ ॥

धनुष्या वाउनियां गुण । सीतीं सज्जूनियां बाण । लक्ष्मणाचा क्रोध दारूण । सुग्रीव देखोनि भयभीत ॥ ४७ ॥

तारा रूमा दोन्ही पत्नी । पुढां अंजुली पुट जोडूनी । सुग्रीवा सहित लोटांगणी । कर जोडोनी राहिल्या ॥ ४८ ॥

सुग्रीव म्हणे मी अपराधी । [दै. तु. खेरीज इतरत्र 'रामबाणें होय वधी'.] श्रीराम नेम टळली अवधी । लक्ष्मणा तूं कृपानिधी । मज त्रिशुद्धि वांचवी ॥ ४९ ॥

सुग्रीव येतां काकुळती । रूमा म्हणे वांचवी निजपती । तारा करीतसे विनंती । [मु. 'सत्य युक्ति दीन वचनें'.] सत्वमूर्ति शांत व्हावें ॥ ५० ॥

लटिका तरी शरणागत । याचा करूं नये घात । मारिल्या अपकीर्ति जगा आंत । श्रीरघुनाथ [मु. तं. कं. 'पावेल'.] कृपाळू ॥ ५१ ॥

सुग्रीव शरणागत जाला । श्रीरामें राज्यीं संस्थापिला । सवेंचि रघुवीरें मारिला । शेवटीं केला शिरच्छेदु ॥ ५२ ॥

शरणागता वज्रपंजर । हा सूर्यवंशीचा बडिवार । तेथें मारिलिया हा वानर । [दै. तु. खेरीज इतरत्र 'वंशी रघुवीर अपकीर्ति'.] तो बडिवार मिथ्या होय ॥ ५३ ॥

अनुक्रमणिका

**वाली वधिला अवचिता । हे अपकीर्ति श्रीरघुनाथा । सुग्रीव मारिलियां आतां । दुसरी माथा अपकीर्ति ॥ ५४ ॥** [ओवी ५४ कं. प्रतीत नाही.]

**बालक अंकावरीं मूतलें ।** [दै. खेरीज इतरत्र 'बापें धुतलें कीं मारिलें'.] **म्हणोनि पितयानें नाही मारिलें ।**
**तैसें शरणागत आपुलें । पाहिजे वांचविलें सौमित्रा ॥ ५५ ॥**

**तुझें नांव तंव सुमित्र । विंधता शरणागत वानर । सुमित्र होसी तूं कुमित्र । नाम अपवित्र होऊं नेदी ॥ ५६ ॥**

**वांचवी सुग्रीवाचा प्राण । वांचवी आमुचें आहेवपण । तारा रूमा दोघी धांवोन । धरिलें चरण मस्तकीं ॥ ५७ ॥**

**ऐकोनि तारेच्या सद्युक्ति । लक्ष्मण सुखावला चित्तीं । सुग्रीव महा पापमूर्ति । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ५८ ॥**

**असत्यवाद्यां अधोगती । तेंहि असत्य श्रीरामाप्रती । अनुवादला हे पापमूर्ति । ऐक शास्त्रार्थी निर्णयो ॥ ५९ ॥**

> पञ्चपशूननृतंच दशचैव गवानृते । शतमश्वानृते हंति सहस्त्रं पुरुषानृते ॥ १० ॥
> हंति जातानजातांश्च हिरण्यार्थेऽनृतं वदन । सर्वं भूम्यनृतं हंति मास्म भूम्यनृतं वद ॥ ११ ॥
> आत्मानं स्वजनं हंति पुरुषःपुरुषानृते । पूर्व कृतार्थो मित्राणां न तत्प्रतिकरोति यः ॥ १२ ॥
> कृतघ्नः सर्व भूतानां सवध्यः पुरुषाधमः ॥ १३ ॥

[मु. तं. तु. 'अपस्वार्थी'.] **पाश्वार्थी असत्य बोलती । पंच पूर्वज नरकीं पडती । असत्य वदलिया गौस्वार्थी । नरका जाती दशपुरुष ॥ ६० ॥** [ओवी ६० दै. प्रतींत नाही.]

**अश्वार्थी असत्य वदतीं । शतपूर्वज नरकाजाती । सहस्त्रवर्षे नरक भोगिती । जे मिथ्या बोलती पुरुषार्थ ॥ ६१ ॥**

**जे द्रव्यार्थी असत्य वदती । त्याचें जितां मेलिया अधोगती ।**
**सकळ कुळ नरका नेती । जे असत्य वदती भूम्यर्थ ॥ ६२ ॥**

**येऊनियां सत्पुरुषाप्रती । निश्चयें कर्तव्यार्थ नेमिती । तोचि नेमु जे न करिती । त्यांच्या दुर्गती अवधारा ॥ ६३ ॥**

**सकळ कुळ स्वजन युक्त । ते पावती निजात्मघात । मेलिया मागें नरकपात । त्यासी निश्चित शास्त्रार्थे ॥ ६४ ॥**

**मित्रापासुनी स्वकार्य घेती । मित्रकार्य स्वयें न करिती । ते वधावें** [तं. 'नेमशास्त्रार्थी'.] **सर्वभूतीं ।** [तं. 'ब्रह्महत्यार्थी ते पूर्ण'.] **नेम शास्त्रार्थी ब्रह्मयाचा ॥ ६५ ॥**

अनुक्रमणिका

**परोपकारी सर्वार्थी । ते वंदावे सर्व भूतीं । जे वंचकु मित्र कार्यार्थी । ते सर्वभूतीं नाशावें ॥ ६६ ॥** [मुद्रितांत येथे ही ओवी अधिक आहे : 'असतां घराश्रम पढीं । लटिका दोष लावुनी दुसरियातें पीडी । त्याच्या नरकाची परवडी । संस्था कोण करील ॥']

**त्यासी सर्प स्वयें डंखिती । व्याघ्र वृक स्वयें भक्षिती । धर्म नियामक त्यासी वधिती । वध्य होती सर्वांसी ॥ ६७ ॥**

**ऐकोनि लक्ष्मणाची** [मुं. 'युक्ति'.] **उक्ति । तारा विनवी पुढतीपुढती ।**
**सुग्रीव पापी होय निश्चिती । पाप निर्मुक्ति तुम्ही आम्हां ॥ ६८ ॥**

**करितां श्रीरामनामस्मरण । आकल्प पाप होय दहन । तो देखिलिया रघुनंदन । पाप निर्दळण सत्संगे ॥ ६९ ॥**

**आवडी करितां श्रीराम गोष्टी । पापें जळती कोट्यानुकोटी ।**
**तो राम देखिलिया दृष्टी । निष्पाप सृष्टी श्रीरामें ॥ ७० ॥**

**रामनामें प्रताप शक्ति । पाया लागती चाऱ्ही मुक्ति । नाम ब्रह्यादिक वंदिती । पाप निर्मुक्ति श्रीरामें ॥ ७१ ॥**

**तारावाक्यें राम महिमान । ऐकोनि** [मु. 'तेणें सौमित्रा प्रेमपूर्ण'.] **सौमित्र सुखसंपन्न ।**
**तारेंने धरिले दोन्ही चरण । म्हणे पतिदान मज द्यावें ॥ ७२ ॥**

**तारा सौमित्र संभाषण । ऐकोनि सुग्रीवा आलें रुदन । श्रीराम** [तु. 'कार्य'.] **सेवा चुकलों जाण ।** [दे. 'वृथा पाषाण'.] **वध्य संपूर्ण मी होये ॥ ७३ ॥**

**लागलिया श्रीरामाचा बाण । तात्काळ जाईल माझा प्राण । सौमित्रा तुज अनन्य शरण । जीवदान मज द्यावें ॥ ७४ ॥**

भ्रातुर्व्यसनसंतप्तं दृष्ट्वा दशरथात्मजम् । हित्वा मानससौख्यं तु नत्वा तच्चरणांबुजम् ॥ १३ ॥

**सांडूनि हेम सिंहासन । सांडूनि राजसन्मान । सर्व सांडूनी निरभिमान । वंदिले चरण लक्ष्मणाचे ॥ ७५ ॥**

**सीताशुद्धि कार्यकारण । श्रीराम आज्ञेस्तव जाण । कोपोनिया लक्ष्मण । काय आपण बोलतु ॥ ७६ ॥**

**कामाचारी स्त्रीलंपट । स्वकार्यवादी महाशठ । श्रीराम कार्या परिभ्रष्ट । अति पापिष्ट तूं** [मु. 'ऐक'.] **येकु ॥ ७७ ॥**

**चोरीमारी पाप थोडें । कृतघ्न मैत्री पाप गाढे । तें मी सांगेन तुजपुढें । निज निवाडें अवधारी ॥ ७८ ॥** [ओवी ७८ मु. प्रतीत नाही.]

ब्रह्मघ्ने च सुरापे च चौर्ये भग्नव्रते शठे । निष्कृतिर्विहिता लोके कृतघ्ने नास्ति निष्कृतिः ॥ १४ ॥

अनुक्रमणिका

सुरापानी ब्रह्मघाती । त्यासी प्रायश्चित्त शास्त्रार्थी ।
चोर शठ कां भग्नव्रती । त्यासीं हि निष्कृती शास्त्रीं असे ॥ ७९ ॥

मित्रोपकारा जो कृतघ्न । त्यासी निष्कृति नाहीं जाण । तुवां चाळविला रघुनंदन । पापी संपूर्ण तूं एक ॥ ८० ॥

सीताशुद्धीचा कार्यार्थु । सांडूनि ठकिला तुंवा रघुनाथु । श्रीराम तुझा करील घातु । महापापी तूं कृतघ्नु ॥ ८१ ॥

कठीण बोलतां लक्ष्मण । तारा सुग्रीव अति उद्विग्न । ऐसें संकट देखोन । वायूनंदन तेथे आला ॥ ८२ ॥

साधावया उभय कार्यार्थु । उचित बोले हनूमंतु । नको करूं सुग्रीवाचा घातु । राम कार्यार्थ साधावा ॥ ८३ ॥

सेवा [तु. 'न करूनी'.] चुकलियां रघुनाथा । कोटी अपराध ज्याचे माथां । क्षमा करूनी शरणागता । राम कार्यार्था साधावें ॥ ८४ ॥

आणावया वानर सैन्यासी । दूत धाडिले दशदिशीं । क्षमा करूनी सुग्रीवासी । राम कार्यासी साधावें ॥ ८५ ॥
[ओवी ८५ तु. प्रतीत नाहीं.]

ऐकोनि हनुमंताचें वचन । सौमित्र जाला सुप्रसन्न । तेव्हां सुग्रीव संतोषोन । करी नमन आल्हादें ॥ ८६ ॥

> प्रणम्य लक्ष्मणं राजा सुग्रीवमिदमब्रवीत् । समासतो वयं भृत्या रामस्य विदितात्मनः ॥ १५ ॥
> सर्वे तत्प्रयतिष्यामो यद्रामस्य चिकीर्षितम् ॥ १६ ॥

सीताशुद्धी रामकार्यार्था । अति आल्हाद वानरनाथा । सौमित्र-चरणीं ठेऊनी माथा । होय बोलता सुग्रीव ॥ ८७ ॥

सेनायूथप सैन्य प्रधान । अंगदसहित आपण । श्रीराम सेवे विकिला प्राण । सत्य जाण सौमित्रा ॥ ८८ ॥

श्रीरामाचें मनोगत । सिद्धी पाववीन समस्त । सैन्य आणावया [पै. 'त्वरित'.] येथ । दूत सत्वर धाडिले ॥ ८९ ॥

माझी सेना सैन्य संभार । रणकर्कश अति झुंजार । आतुर्बळी येती वानर । दूत सत्वर धाडिले ॥ ९० ॥

अर्घ्य पाद्यादि चंदन । धूप दीप माळा सुमन । करुनी लक्ष्मणाचें पूजन । केलें नमन सुग्रीवें ॥ ९१ ॥

सौमित्र म्हणे सुग्रीवासी । शीघ्र निघावें श्रीरामापासी । [तु. दै. 'श्रीराम राहिला प्रस्रवणासी'.] एकाकी सांडूनी त्यासी । येथें आम्हासी नये राहों ॥ ९२ ॥

ऐकोनि सौमित्राचें वचन । उभे करूनिया प्रधान । सुग्रीवें वाहिली आण । अति निर्वाण तें ऐका ॥ ९३ ॥

अनुक्रमणिका

जो परते किष्किंधाभुवनीं । तो दंडीन रासभारोहणी । तारा रूमा पाहे परतोनी । तो मात्रागमनी महापापी ॥

सीता [मु. 'शाद्धि'.] साध्य पैं न होतां । श्रीराम सुखी न करितां । जो परतेल मागुता । तो दंडीजे पालथा तप्ततैली ॥ ९५ ॥

ऐसें सुग्रीवें नेमुनी । निशाण त्राहाटिले गर्जोनी । रथ शिबिका सज्ञोनी । तत्क्षणीं निघाला ॥ ९६ ॥

अंगद सुग्रीव सौमित्र । रथीं चढले [मु. 'महाशूर'.] सत्वर । पताका विंजणे श्वेतपत्र । धरिले छत्र रायावरी ॥ ९७ ॥

जाला वाद्यांचा गजर । भाट गर्जती गंभीर । वानरवीरांचा संभार । अति सत्वर चालिला ॥ ९८ ॥

माल्यवंत पर्वतामाझारी । पस्त्रवण गिरी शिखरीं । श्रीराम [तं. 'रमणीय'.] मणिमय शिळेवरी । गुहाद्वारीं उपविष्ट ॥ ९९ ॥

श्रीराम देखोनी वानर । अवघीं केला जयजयकार । अंगद सुग्रीव सौमित्र । केला नमस्कार साष्टांग ॥ १०० ॥

आजानूबाहू पसरून । श्रीरामें दिधलें अलिंगन । सुग्रीव पावोनि समाधान । काय गर्जोन बोलतु ॥ १०१ ॥

दूत धाडिले सत्वर । [दै. खेरीज इतरत्र 'यूथप यूथप महावीर'.] अयुतायुत महाथोर । वानर सेनेचे संभार । येती सत्वर असंख्य ॥ १०२ ॥

> एतस्मिन्नंतरे घोरं वानराणां महद्बलम् । उत्पपात महावीर्यं चालयन्वसुधातलम् ॥ १७ ॥
> ततो नागेंद्रसंकाशैस्तीक्ष्णदंष्ट्रैर्महाबलैः । वभुवुर्वानरैर्घोरैर्दिशः सर्वाः समावृताः ॥ १८ ॥

ऐसें बोलतां सुग्रीव वीर । वानर सेनेचे संभार । येवों लागले अपार । धरा समग्र व्यापिली ॥ १०३ ॥

वानरसेना अतिप्रबळ । रिते न दिसे क्षितिमंडळ । व्यापूनियां कुलाचल । गोलांगूल पैं आले ॥ १०४ ॥

एक वानर पर्वताकार । एक वानरामाजीं गजेंद्र । तीक्ष्ण नखें दंष्ट्राक्रूर । अति दुर्धर युद्धार्थी ॥ १०५ ॥

मारितां पुंसाचा पैंसाट । शत सहस्त्रा भवे आट । नखें पर्वत करिती पीठ । दांती तिखट वीर मारा ॥ १०६ ॥

पूर्वे वानरांचे थाट । पश्चिमें कोंदलें घनवट । उत्तरे दक्षिणे वानरश्रेष्ठ । [दै. 'वीरें अंबर'.] वीर उद्भट कोंदलें ॥ १०७ ॥

आग्नेय वायव्य नैऋत्य । वानर कोंदले अमित । ईशान दिशेचा पैं प्रांत । किलकिलित वानरीं ॥ १०८ ॥

अनुक्रमणिका

वानरीं व्याप्त नभस्थळ । वानरी व्याप्त भूमंडळ । वानरीं व्यापिलें सकळ । कुलाचल पर्यंत ॥ १०९ ॥

एक ते अंजनाभ काळे । एक ते पीतवर्ण पिवळे । एक ते गौरवर्ण [मु. 'सोनसळे'.] सोज्वळे । एक ते निळे सुनीळ ॥ ११० ॥

सेंदुरारक्त वानरगण । [दै. 'पद्मराग माणिक वर्ण'.] एक ते विद्युत्प्रायपूर्ण । एक ते शुद्ध शुभ्रवर्ण । धूम्रवर्ण पैं एक ॥ १११ ॥

एक ते भुरकट वानर । एक ते दाळिंबी सुमनाकार । एक ते [मु. 'पेरिजाचें'.] पारिजाताचे डोंगर । अभ्रशरीर ते एक ॥ ११२ ॥

एक ते [दै. खेरीज इतरत्र 'चंद्रप्राय'.] चंपकप्राय चोखडे । एक ते कुंकुमांकित तांबडे ।
एक सलोम लोभीं रीस गाढे । सैन्यापुढें गुणगुणिती ॥ ११३ ॥

होतां श्रीरामदर्शन । [मु. तं. कं. 'रीसां'.] करिती रामनामें गुणगुण । वानर करिती रामस्मरण । नामें त्रिभुवन कोंदलें ॥ ११४ ॥

देखतां श्रीरामाची मूर्ति । पालटल्या चित्तवृत्ति । वानरां आवडे श्रीरामभक्ति । नामस्मरती अहर्निशीं ॥ ११५ ॥

बाप सत्संगाचा महिमा । पशू विनटले रामनामा ।
श्रीरामभक्ति प्लवंगमा । यासी हनूमान [मु. 'गुरु केला'.] कुलगुरू ॥ ११६ ॥

श्रीरामनामाचा गजर । वानरीं केला भुभुःकार । सुखावला श्रीरघुवीर । आणि सौमित्र आल्हादे ॥ ११७ ॥

स्वयें श्रीराम अति उल्हासी । सुग्रीव धरिला पोटेसी । सत्य सखा माझा तूं होसी । दृढविश्वासी कार्यकर्ता ॥ ११८ ॥

सौमित्र पुसे सुग्रीवासी । मर्यादा नाहीं वानरांसी । यांची संख्या आहे कैसी । तेंचि आम्हासी सांगावें ॥ ११९ ॥

> स्वैः स्वैः परिवृताः सैन्यैः सर्वे तिष्ठंति राघव । शतैः शतसहस्रैश्च वर्तन्ते कोटिभिस्तथा ॥ १९ ॥
> अयुतैरागमिष्यंति शंकुभिश्च परंतप । अर्बुदैरर्बुदैश्चैव मध्ये संख्यैश्च वानराः ॥ २० ॥

श्रीरामा तुझिया प्रतापप्रौढी । सैन्यें आली तें तंव थोडीं । पुढां येतील कल्प कोडी । संख्या परवडी असंख्य ॥ १२० ॥

अर्बुद निर्बुद हे अकल्पक । शंख महाशंखाहूनि अधिक । सैन्य मिळेल असंख्य । करितां संख्या पैं नव्हे ॥ १२१ ॥ [ओवी १२१ तु. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

समुद्राचे खडे थोडे । इतुके सैन्य मिळेल पुढें । रावण कायिसें बापुडें । आणीन रोकडें बांधोनी ॥ १२२ ॥

ऐसें बोलोंनी पाहे । सुग्रीवें आफळिली बाहे । शिवोनी श्रीरामाचे पाये । करीन काय तें ऐका [दै. तु. खेरीज इतरत्र 'स्वामी' हा शब्द नाही.] स्वामी ॥ १२३ ॥

रणीं राक्षस रवंदळी । करूनी लंकेची होळी । त्रिकुट उपटूनी समूळी । जनकबाळी आणीन ॥ १२४ ॥

वधूनियां लंकानाथा । स्वयें आणूनिया सीता । सुखी करीन श्रीरघुनाथा । [तु. 'चरण माथां वंदिले'.] होय गर्जता उल्हासें ॥ १२५ ॥

ऐकोनी सुग्रीवाची मातु । संतोषला श्रीरघुनाथु । सुग्रीवासी कडिये घेतु । स्वयें नाचतु स्वानंदें ॥ १२६ ॥

जसी आणूनि दिधली सीता । तैसें सुख जालें श्रीरघुनाथा । उचलूनियां निजभक्ता । होय नाचता श्रीराम ॥ १२७ ॥

वानरी केला भुभुःकार । ऋषि करिती जयजयकार । सुमनें वर्षती सुरवर । सुखें निर्भर श्रीराम ॥ १२८ ॥

सुग्रीवा श्रीरामें उचलितां । सुखें विसरला देवभक्ता । मीं तूं नाठवे रघुनाथा । भक्तप्रेमता निज ऐक्यें ॥ १२९ ॥

एका जनार्दना शरण । तेवभक्त ऐक्य पूर्ण । खुंटला बोल तुटलें मौन । सुखैक घन श्रीराम ॥ १३० ॥

सुख द्यावया सर्वांसी । श्रीरामु आलासे वनासी । तेणें सुखी केलें सुग्रीवासीं । [दै. तु. 'निज सख्यासी'.] निज समरसीं निजांगें ॥ १३१ ॥

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां सुग्रीवसेनागमनं नाम अष्टमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग नववा

## सुग्रीव सेना दर्शन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

सुग्रीवें विनविला रघुवीर । सैन्य सेनानी सेनाधर । येऊनि यूथपाल महावीर । नमस्कार करूं [कं. 'येती'.] पाहती ॥ १ ॥

स्वामी समवेत सौमित्र । पहावें वानरांचे भार । ऐकोनि सुग्रीवाचें उत्तर । जाला सादर श्रीराम ॥ २ ॥

दश सहस्त्रायुतैश्चैव वानरैः कोटिभिः शतैः । नादेयैः पार्वतीयैश्च सामुद्रैश्च महाबलैः ॥ १ ॥

माझे कटकीं दहा सहस्त्र । सेनानायक सेनाधर । एकएका तळीं [मु. 'कोटी कोटी'.] कोटि वीर । अति दुर्धर रण योद्धे ॥ ३ ॥

उदय अस्त गिरी पर्यंत । वानर आले जी समस्त । नंदनवनिचे वीर विख्यात । आले त्वरित रामकार्या ॥ ४ ॥

सप्तारण्यें सप्त समुद्र । नदी स्त्रोत वनें उखर । तेथोनि आले वानर वीर । अति सत्वर रामकार्या ॥ ५ ॥ [ओवी ५ तु. तं. प्रतींत नाही.]

मेरू मांदार आणि विंध्याद्रि । व्यंकटाद्रि आणि सह्याद्रि । तेथुनी यावा केला वानरीं । निज गजरीं रामकार्या ॥

हिमाचल अर्बुदाचल । गंध-मादन आणि श्रीशैल । नाना पर्वतीचे वानर सकळ । आले तत्काळ रामकार्या ॥ ७ ॥

घेवोनी आपुलाले भार । [मु. 'पृथक'; तु. कं. 'यूथप'.] स्वयें करूं येती नमस्कार । स्वामीनें पाहावें सादर । वानर वीर रण योद्धे ॥ ८ ॥

शतबळी नामें वानर । सेनादशकोटी सहस्त्र । घेऊनिया वानर भार । केला नमस्कार श्रीरामा ॥ ९ ॥

हनुमंताचा पिता सावत्र । केसरी नामा महावीर । सेवा कोट्यानुकोटी वानर । केला नमस्कार श्रीरामा ॥ १० ॥

वानरांच्या जाती अमिता । केसरी अंजनीचा भर्ता । तो हनुमंताचा क्षेत्र पिता । येणें ग्रंथार्था सत्यत्व ॥ ११ ॥

हनुमंत वायूचा वीर्यजातु । केसरी क्षेत्रत्वें पितु । दोही बापांचा हनुमंतु । सत्य ग्रंथार्थु वाल्मिकी ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

तो अकरावा रुद्र हनुमंतु । [तं. 'आला'.] बाल सूर्या समान आरक्तु । वानरसेना अयुतायुतु । वेगीं रघुनाथु वंदिला ‖ १३ ‖

गोलांगुल अति असंख्य । कोट्यानुकोटी लक्षानुलक्ष । घेउनी येऊनी गवाक्ष । राम सन्मुख वंदिला ‖ १४ ‖

अभ्रवर्ण अति दुर्धर । धूम्राक्ष नामा महावीर । दशकोटी सपरिवार । केला नमस्कार श्रीरामा ‖ १५ ‖

पनस वानर दुर्धर । पर्वतोपम महाथोर । दशकोटी सरिसे वानर । केला नमस्कार श्रीरामा ‖ १६ ‖ [ओवी १६ तु. प्रतीत नाही.]

मैंद द्विविद दोघे वीर । एका सप्तकोटी परिवार । एका अष्टकोटी वानर भार । केला नमस्कार श्रीरामा ‖

वीर वानर गंधमादन । साठी कोटी वानर सैन्य । घेउनी आला आपण । केलें नमन श्रीरामा ‖ १८ ‖

तारा तेजाचा घडिला । कीं चंद्र बिंबाचा वोतिला । तैसा तारू वानर आला । रामें देखिला [पै. तं. खेरीज इतरत्र 'तेजस्वी'.] जैसा रवी ‖ १९ ‖

ऐसा तो महावीर । सवें शतकोटी वानर भार । घेउनी आला सत्वर । केला नमस्कार श्रीरामा ‖ २० ‖ [ओवी २० तु. दै. प्रतींत 'शरभ महाबली वानर । सेना शतकोटी सहस्र ।' अशी प्रारंभ होते.]

गाळूनि व्योमाची नीलिमा । वोतिली नळाची प्रतिमा । सुनीळ शोभा प्लवंगमा । जो श्रीरामा पढियंता ‖ २१ ‖

सेतु बंधाचे अनुवृत्ती । याचेनि हातें शिळा तरती । हें जाणूनिया रघुपती । करी अति प्रीति नळासी ‖ २२ ‖

नामें नीळ वर्णे नीळ । कास घातली तेही सुनीळ । शत सहस्र कोटी दळ । घेउनी तत्काळ तो आला ‖ २३ ‖

सुग्रीव दळीचा दळपती । नीळ दुर्धर प्रताप शक्ति । तेणें येऊनी [तं. 'शीघ्र गती'.] विनीत वृत्ति । श्रीरघुपती वंदिला ‖ २४ ‖

दधिमुख दुराधर्ष दोन्ही । अकरा कोटी सेना घेउनी । श्रीरामातें अभिवंदूनी । कर जोडूनि राहिले ‖ २५ ‖

तरू [दै. 'कुमुद कुमुदाक्ष'.] तरळु कुमुदाक्ष । गज गवय शरभ गवाक्ष । महाहनु इत्यादि प्रमुख । यूथप असंख्य पाहे रामा ‖ २६ ‖

तारेचा पिता वालीचा श्वशुर । सुषेण वैद्यराज वानर । दहा आयुतें वानर भार । केला नमस्कार श्रीरामा ‖

जांबुवंताचा ज्येष्ठ बंधु । नामें धूम्र नामा अगाधु । रीस सैन्येसी सन्नद्धु । आला साधू रामकार्या ‖ २८ ‖

अनुक्रमणिका

जांबुवंत वीर प्रबळ । बाहात्तर कोटी रीसबळ । घेऊनिया निजदळ । आला तत्काळ गजरेसी ॥ २९ ॥

जांबुवंत वीर आपण । नित्य करी रामस्मरण । तेचि अस्वला गुणगुण । अनुदिन अहर्निशीं ॥ ३० ॥

रामनामाची गुणगुण । तेणें कोंदले त्रिभुवन । मही जीवन [मु. ‘पावन’.] पवन । नामें गगन कोंदलें ॥ ३१ ॥

देखोनि जांबुवंत वीर । राम सुग्रीवा आल्हाद थोर । त्यासी स्वयें श्रीरामचंद्र । पुसें विचार विजयाचा ॥ ३२ ॥

नामापासी नित्य कीर्ति । नामापासी नित्य शांति । नामापासी विजयवृत्ति । भव निर्मूक्ति रामनामें ॥ ३३ ॥

ऐसें जाणोनी श्रीरघुनाथु । आप्त मानी जांबुवंतु । त्यासी करी नित्य एकांतु । निज विजयार्थु साधावया ॥ ३४ ॥

ऐसे वानरांचे भार । रामें देखिले अपार । तंव जाला अति गजर । तुरें अपार लागली ॥ ३५ ॥

ततः पद्मसहस्रेण वृतः शंकुभिरेव च । युवराजोंऽगदः प्रातः पितृतुल्यपराक्रमः ॥ २ ॥

निशाणें त्राहाटिली लवलाही । ढोल [दै. ‘दमामे’.] टिमक्या बुरंगें पाही ।
गिडबिडिया लागल्या ठाईं ठाईं । विराणी पाही वाजती ॥ ३६ ॥

काहाळा आणि [तं. मु. ‘रण’.] चिन काहाळा । शंख त्राहाटिलें [मु. दै. तं. ‘भूगाळा’.] भोंगळा ।
महा भेरीचा गजर जाला । अंगदु आला युवराजा ॥ ३७ ॥

तडक फुटलें एक सरें । वोडणें भिंडिमाळाचे पागोरे । खाखायिलीं रणतुरें । भुभुःकारें [पै. ‘गिरी’; तं. ‘गगन’.] गिरा गर्जे ॥ ३८ ॥

पद्में महापद्में जाणा । शंकु शब्दें असंख्य गणना । अंगदाची वानर सेना । आंगवणा दादुगी ॥ ३९ ॥

वृक्ष उपडिले सहसुमना । श्वेत पीत धवल वानरसेना । शाल ताल वृक्ष कर्दळी पाना । ध्वजा सपर्णा शोभती ॥ [ओवी ४० तु. प्रतीत नाही.]

किंशुक फुलले आरक्त । अगस्ती वृक्ष फुलले श्वेत । कांचन फुलले श्वेत पीत । तेणें सैन्यांत अतिशोभा ॥ ४१ ॥

ऐसा निज सेनासंभार । त्यामाजीं अंगद राजकुमर । युवराजा मनोहर । श्वेत छत्र रत्नांक ॥ ४२ ॥

कनकदंड युग्मचामरीं । आरूढला रथावरी । ध्वजीं मुक्ताफळ [कं. दै. पै. ‘झल्लरी’.] झळकती हारी । जय जय कारीं चालिला ॥ ४३ ॥

अनुक्रमणिका

हैकार थैकार जैकार । थरक सरक चमत्कार । वृक्ष झेलिती ते अपार । देती वानर [तं. खेरीज इतरत्र 'किराणें'.]किंकाणें ॥ ४४ ॥

वानरवीर अति सावध । शाल-ताल शिलायुध । महावीर पैं उन्नद्ध । सन्नद्ध बद्ध दळभार ॥ ४५ ॥

रथ पेलिला घडघडाट । वानर सेनेचे पैं थाट । वीर चालिले उद्भट । कडकडाट सैन्याचा ॥ ४६ ॥

वाजंत्र्यांचा नादगंभीर । वानरीं केला भुभुःकार । दुर्धर सेनानी संभार । अंगदवीर पैं आला ॥ ४७ ॥

वालीबलासम बळें । अंगद आला सहदळें । वीर पुरुषार्थी प्रबळें । दुर्धर मेळ वीरांचा ॥ ४८ ॥

देखोनी अंगदाचा यावा । सुख जाले श्रीराघवा । सुख [मु. 'लक्ष्मणाचिया'.] सुग्रीवाचिया जीवा । सुख सर्वां सुरनरा ॥ ४९ ॥

अंगदें सांडूनियां रथा । श्रीराम चरणीं ठेविला माथा ।
रघुनाथ उल्हासोनी चित्ता । होय आलिंगितां अंगदासी ॥ ५० ॥

चुंबूनि अंगदाचें वदन । श्रीरामें दिधलें आलिंगन । तेणें त्यासी समाधान । सुख संपन्न श्रीराम ॥ ५१ ॥

केलें सुग्रीवासी नमन । सुग्रीवें दिधलें आलिंगन । अंगद सुग्रीवां समाधान । सुख संपन्न श्रीराम ॥ ५२ ॥
[ओवी ५२ तं. तु. प्रतीत नाही.]

सुग्रीवें करविलें वालीच्या घाता । हें नाठवे अंगदाच्या चित्ता ।
श्रीरामें उद्धरिला माझा पिता । यासी मुख्य कर्ता सुग्रीव ॥ ५३ ॥

वाली जन्मशताच्या कोडी । सुग्रीवें तोडविली ते बेडी । श्रीराम सुखाची निज गुढी । उभविली रोकडी वालीनें ॥

आम्ही पावों श्रीरघुनाथा । हा ही सुग्रीवाचा धर्म तत्वता ।
पित्याहूनी अधिक चुलता । आम्हां समस्तां उद्धरिलें ॥ ५५ ॥

ज्याचेनि पाविजे परमार्था । तो तंव माझा सखा [तु. 'चुलता'.] पिता । सुग्रीवाहूनि परता । सखा सर्वथा मज नाहीं ॥ ५६ ॥

सुग्रीवें वंश उद्धरण । सुग्रीवें वानरा संसारतरण ॥ पुडती सुग्रीवाचे चरण । अंगदे संपूर्ण वंदिले ॥ ५७ ॥

ऐकोनि अंगदाचें वचन । सुग्रीवासी आलें रूदन । अंगद वंशासी सुखनिधान । मी सुखसंपन्न अंगदें ॥ ५८ ॥

ऐसें सुग्रीवें बोलोन । अंगदा दिधलें आलिंगन । सभेद द्वेष गेला विरोन । सुख संपन्न श्रीरामें ॥ ५९ ॥

अनुक्रमणिका

देखोनी अंगदाचा दळभार । नळ नीळादि प्रधान वानर । अवघीं करुनी जयजयकार । श्रीरघुवीर वंदिला ॥

एक फळें ठेविती रामा पुढें । एक वानर तें घेऊनी उडे ।
सन्मुख बैसोनि लाडें कोडें । खाऊनी निवाडे विटावी ॥ ६१ ॥

वांकुल्या दावी रामापुढें । डोळे मिचकावी लक्ष्मणाकडे । सुग्रीवा घुलकावी रोकडे । नाचे उडे किलकिलित ॥

रामें हारऊनी सीता । ऐसा ऐसा रडत होता । उकसाबुकसीं होय फुंदतां । पडे मूर्च्छिता सीते म्हणोनी ॥ ६३ ॥

वानरचेष्टा श्रीरघुनाथ । देखोनी खदखदा हांसत । सौमित्र विस्मयो करित । चेष्टा युक्त वानर ॥ ६४ ॥

देखोनि वानरांचे भार । सुखी जाला श्रीरामचंद्र । तंव येऊनी पवनपुत्र । केला नमस्कार श्रीरामा ॥ ६५ ॥

सुग्रीव सांगे [दै. तु. 'वाडे कोडे'.] निज निवाडे । सकळ सैन्य एकीकडे । नतुकें हनुमंताचेनि पाडें । अति बळ गाढें हनुमंता ॥ ६६ ॥

हनुमंताच्या बळापुढें । सकळ सैन्य तें बापुडें । फोडिलें राहूचें जाभाडे । रवी यापुढें चळी कांपे ॥ ६७ ॥

ऐकोनि सुग्रीवाची मातु । श्रीराम जाला विस्मितु । अतुर्बळी हा हनुमंतु । श्रीरघुनाथु स्वयें जाणे ॥ ६८ ॥

असतां निज सखा हनुमंत । तुझा साधावया कार्यार्थ । वालीचा नाही केला घात । तो वृत्तांत मज सांगे ॥ ६९ ॥

पर्व विशेषें स्नानासी । पंपे आला अगस्ति ऋषि । देखोनिया श्रीरामासी । आला उल्हासी भेटावया ॥ ७० ॥

ऋषीसी देऊनी सन्मान । रामें केलें अभिवंदन । मग बैसोनि सावधान । केला प्रश्न श्रीरामें ॥ ७१ ॥

सुग्रीवा सखा हनुमंत । असतां आतुर्बळी समर्थ । वालीचा नाहीं केला घात । तो वृत्तांत मज सांगा ॥ ७२ ॥

हनुमंताचें जन्म कथन । नारदें सांगितले संपूर्ण । तें मी सांगेन आपण । सावधान अवधारी ॥ ७३ ॥

हनुमंताचा जन्मधर्म । [पै. 'बाळपणी'.] बळ संपूर्ण अतिआक्रम । कथा रम्य [तु. 'रामायण'.] मनोरम । श्रोता परम श्रीराम ॥ ७४ ॥

हनुमंताचें बाल-किराण । ग्रासूं गेला रविबिंब पूर्ण । [मु. 'ते कथा परम पावन । एका जनार्दन विनवीत ॥'] एका जनार्दना शरण । रम्य रामायण अवधारा ॥ ७५ ॥
रामायणीचा एक एक श्लोक । वेदशास्त्राहूनि अधिक ।

अनुक्रमणिका

एकलें रामनाम एक । होय छेदक जन्म मरणा ॥ ७६ ॥ [ओवी ७६ कं. प्रतीत नाही.]

ऐसी रामायणी कथा । अगस्ति वक्ता श्रीराम श्रोता । जन्म प्रयोग हनूमंता । होय सांगता ऋषिवर्य ॥ ७७ ॥

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां सुग्रीवसेनादर्शनं नाम नवमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग दहावा

## हनुमज्ञन्म कथन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

अगस्ती महामुनी प्रती । साक्षेपें पुसे रघुपती । सुग्रीवा निजसखा मारुती । अद्भुत शक्ति असतांही ॥ १ ॥

तेणें साधावया मित्रकार्यार्थ । कां न करीच वालीचा घात । हा हनुमंताचा भावार्थ । मज साद्यंत सांगावा ॥ २ ॥

राघवस्य वचः श्रुत्वा हेतुयुक्तमृषिस्तदा । हनूमतः समक्षं तदिदं वचनमब्रवीत ॥ १ ॥

ऐंसे पुसतां रघुनाथ । अगस्तिमुनी उल्हासयुक्त । हनुमंताचें निज सामर्थ्य । असें सांगत आनंदें ॥ ३ ॥

हनुमंतासी ऐकतां । हनुमंताची जन्मकथा । समूळ मुळारंभ वार्ता । होय सांगता अगस्ति ॥ ४ ॥

पुत्रेष्टि याग दशरथासी । ताटी प्रसाद यज्ञ पुरुषीं । वसिष्ठें करूनी तिही भागासी । तिघी राणियांसी दिधलें ॥

कैकयी भाग हरिला घारी । शापोद्धारें जाली [दै. तु. तं 'वानरी'.] नारी । तेथें वर्तली नवल परी । तेहि अवधारी श्रीरामा ॥ ६ ॥

यज्ञभाग तियेच्या उदरीं । होआवया श्रीरामा साहाकारी । ब्रह्मा तीतें करी वानरी । अंजनी नारी केसरीची ॥

उदरीं यज्ञभाग संपूर्ण । त्याचे होआवया प्ररोहण । यज्ञपुरुषाचा प्राण । तिसीं [पै. 'जाण'.] आपण विचरला ॥ ८ ॥

यज्ञभागें अति बळवंत । जन्म पावला हनुमंत । यालागीं म्हणती वायूसुत । अंजनी पुत्र वानरत्वें ॥ ९ ॥

दो भागाचे तुम्ही चौघं । सगळ्या भागाचा हनुमंत सांग । या लागीं बळाचा प्रयोग । अति अमोघ हनुमंता ॥

राम लक्ष्मण शत्रुघ्न भरता । यज्ञ भागीं हनुमंता । तुम्हा पांचाहि एकात्मता । भिन्न दिसतां अभिन्न ॥ ११ ॥

ऐकोनि अगस्तीची मातु । संतोषला श्रीरघुनाथु । संतोषला स्वयें हनुमंतु । आनंद भरितु सौमित्र ॥ १२ ॥

अगस्ती म्हणे श्रीरघुपती । बालपणीचि याची ख्याती । ते मी सांगेन तुजप्रती । अद्भुत शक्ति हनुमंता ॥

अनुक्रमणिका

**ब्रह्मचर्याची अति गोमटी । हनुमंतासी गर्भ कासोटी । अंजली माता** [कं. 'न देखे'.] **देखे दृष्टी । कां राम जगजेठी देखेल ॥**

**हनुमंताचे लिंग दर्शन । मुख्य माता न देखे आपण । मा इतर देखो सके कोण । ब्रह्मचारी पूर्ण कपिराजु ॥ १५ ॥**

**हनुमंत पुसे बाळभावें । माये! म्या भुकेसी काय खावें । आरक्त फळ जें देखावें । तें भक्षावें म्हणे माता ॥ १६ ॥**

> पावकार्कनिभं भासं श्रुत्वा क्षेत्रजमंजना । फलान्याहर्तुकामासौ निष्कांता च वनं तदा ॥ २ ॥
> एष मातुर्वियोगेन क्षुधया भृशमर्दितः । अथोद्यनां विवस्वंतं जपापुष्पाकरोपमम् ॥ ३ ॥
> ददर्श फललाभाय उत्पपात च तं प्रति ॥

**जन्मताच हनुमंत । अग्नि तेजें दीप्तिमंत । बालार्क प्रभेसम भासत । दीप्तीवंत मारूती ॥ १७ ॥**

**सूर्योदयो नव्हता तेथ । सेज निजऊनि हनुमंत । अंजनी गेली वनांत । फळे त्वरित आणावया ॥ १८ ॥**

**तंव जाग्रत जाला हनुमंत । रुदन करी अति क्षुधित । बालार्क देखोनी आरक्त । फलभक्षार्थ उडाला ॥ १९ ॥**

**क्षुधेने पीडिला प्रबळ । बालार्क फळ अति वर्तुळ । भक्षावया लागीं तत्काळ । उडे चपळ स्वभावें ॥ २० ॥**

**हनुमंताची उड्डाण शक्ति । ते गति न ये गरुडाप्रती ।** [मु. कं. वायुसुताची शीघ्रगती'.] **वायू सूर्याची क्षीण शक्ति । मनोवृत्ति ठणकल्या ॥ २१ ॥**

**भक्षावया बालार्कासी ।** [मु. 'उर्ध्व'.] **दुर्धर गती हनुमंतासी । देखोनि विस्मयो सुरवरांसी । देवऋषि विस्मित ॥ २२ ॥**

**धैर्य शौर्य महावीर्य । शीघ्र गती गमन गांभीर्य । हनुमंताचें परम औदार्य । सुरवर्य वानिती ॥ २३ ॥**

**हनुमंताच्या समान शक्ति । कोण्ही नाहीं त्रिजगतीं । बाळभावें शीघ्रगती । सूर्य भक्षार्थी धांवतु ॥ २४ ॥**

> सूर्यदाहं भयाद्रक्षन्वायुस्तु हिमशीतलः । यमेव दिवसं ह्येनं ग्रहीतुं भास्करं गतः ॥ ४ ॥
> तमेव दिवसं राहुर्जिधृक्षति दिवाकरम् ॥ ५ ॥

**मनोगती सांडूनि मागें । हनुमंत चालिला सवेगें । सूर्यकिरणाचे निदाघें । होईल सर्वांग भस्मित ॥ २५ ॥**

**ऐसे जाणोनि वायूपिता । निज पुत्रातें संजोगिता । हिमांबुकणीं निववित । होय चालता शिशु मागें ॥ २६ ॥**

अनुक्रमणिका

वायो धरु [तु. खेरीज इतरत्र ‘पाहे’.] धावें हनुमंतासी । तंव तो नाटोपे वायोसी । वेगें आला रविबिंबापासीं । फळ भावेंसी भक्षावया ॥

हनुमंतु आला बिंबापासी । रवि राहु ग्रहण तेंचि दिवशीं ।
राहु ग्रासितां सूर्यासी । हनुमंतासी कोप आला ॥ २८ ॥

माझ्या गोड घासा आड । येथें कोण आला मूढ । राहूचें फोडिलें जाभाड । पुंसें सदृढ हाणोनी ॥ २९ ॥

पुसें हाणितां वानरा । घायें राहु जाला घाबरा । नाभीं मुखीं रुधिरधारा । अति थरथरां कांपतु ॥ ३० ॥

धाकें थरथरां कांपतु । गगनीं गरगरां भवंतु । राहु पडतांचि मूर्छितु । धावोनी केतु धरी त्यासी ॥ ३१ ॥

राहु केतु अति आप्तता । दोघां देहीं एकात्मता । केतु येऊनी राहु साह्यार्था । कोपे हनुमंताकडे पाहे ॥ ३२ ॥

सकेतु राहु देखतां दृष्टी । रागें हनुमंत हाणी मुष्टी । दोघां पडतां पाय पोटीं । [मुं. ‘हाक’.] बोंब उठी ग्रहचक्रीं ॥ ३३ ॥

ग्रह सांगती सिंहिकासुता । पुच्छकेतु आला [तं. ‘सूर्या’.] तुम्हां भवतां ।
इंद्र अधिकार नियंता । त्यासी तत्वता तुम्ही सांगा ॥ ३४ ॥

> सचंद्रभुवनं गत्वा सरोषं सिंहिकासुतः । क्षुधापन्नश्च रक्ताङ्गो पप्रच्छ दिवि वासवम् ॥ ६ ॥
> किंमिदानीं त्वया दत्तो वरोऽन्यस्मै सुरेश्वर । अद्याहं पर्वकाले तु जिघृक्षुः सूर्यमागतः ॥ ७ ॥
> अथान्यो राहुरासाद्य जग्राह सहसा रविम् ॥ ८ ॥

राहु जो कां सिंहिकासुत । वानर घायें रुधिरोक्षित । इंद्रापासी आला त्वरित । [तं. ‘शोक’.] शंख करीत सांगावया ॥ ३५ ॥

माझी जीविका जीवन वृत्ती । चंद्र सूर्य ग्रहण तिथी । [तं. ‘आजीं’.] आली ग्रहणकालप्राप्ती । रवि ग्रहणार्थी मीं गेलों ॥

तंव मजहूनी बळिवंत । पुच्छ राहु येऊनि तेथ । घाये करूनी रुधिरांकित । धाडिलों येथ [तु. ‘महाशब्देसी’.] बोंबेसी ॥ ३७ ॥

तूं नियंता देवाधिदेवो । माझा न देखता अन्यावो । त्वा कां धाडिला पुच्छराहो । तेणे मज पाहों गांजिलें ॥

शेखीं मजहि न सांगता । त्वां करविलें गुप्त घाता । म्या काय करावें आतां । मज तत्वता तूं सांगे ॥ ३९ ॥

पुच्छराहु येऊनी त्वरित । सूर्य आकळिला समस्त । माझा करुं धांवें घात । आलों रडत सांगावया ॥ ४० ॥

अनुक्रमणिका

स राहोर्वचंन श्रुत्वा वासवः संभ्रमान्वितः । इंद्रः करीद्रमारुह्य राहुं कृत्वा पुरः सरम् ॥ ९ ॥
प्रायाद्यत्राभवत्सूर्यः सह तत्र हनुमंता । ततः सूर्यं समुत्सृज्य राहुस्थूलमवेक्ष्य सः ॥ १० ॥
उत्पपात पुनर्व्योम्नि ग्रहीतुं सिंहिकासुतम् ॥ ११ ॥

**ऐकोनि राहूचा वचनार्थ । इंद्रादिदेव अति विस्मित । ग्रह चक्रांते विपरीत । कर्ता येथ तो** [तं. 'नाहीं'.] **कोण ॥ ४१ ॥**

**कोणे केला नवा राहो । त्यासी निर्दळावया पाहो । घेवोनी सुरसेना समुदावो । इंद्र स्वयमेवो चालिला ॥ ४२ ॥**

**ऐरावत सालंकार । त्या गजावरी बैसोनि इंद्र । हातीं घेवोनियां वज्र । सपरिवार तेथ आला ॥ ४३ ॥** [ओवी ४३ तं. प्रतीत नाही.]

**इद्रें राहू पुढां** [कं. 'घालून'.] **सून । म्हणे नवा राहू दाखवी कोण । जेणें तुज गांजिलें संपूर्ण । त्याचें निर्दलन करीन मी ॥**

**दाखवितां हनुमंतासी । थरकांप सुटला राहुसी । दडोनी ऐरावतापासी । दावी इंद्रासी दुरोनि ॥ ४५ ॥**

**येरीकडे हनुमंत । धाविन्नला रवि ग्रासार्थ । भेणें सूर्य चळी कांपत । अति अनर्थ ओढवला ॥ ४६ ॥**

**दिनमान सांडूनी सविता । पळो न लाहे सर्वथा । निवारूं न शके हनुमंता । अति आकांता पावला ॥ ४७ ॥**

**तेचि संधी इंद्रापासीं । वानरें देखोनि राहूसी । रागें निर्दळावया त्यासी । अति आवेशें धाविन्नला ॥ ४८ ॥**

**मज क्षुधिताच्या आहारासी । राहू वोडवला विवसी । धरूनी इंद्राच्या बळासी । माझ्या ग्रासासी घेवों आला ॥**

**ऐसें बोलोनी हनुमंत । सूर्यग्रासाची सोडोनि मात । राहूचा करूं धावें घात । येरु बोभात इंद्रातें ॥ ५० ॥**

**राहू पळे इंद्राकडे । तंव हनुमंताची उडी पडे । येरू अति आक्रोशें रडे । इंद्रापुढें सांगतु ॥ ५१ ॥**

इंद्र इंद्रेति मां त्राहि मुहुर्मुहुरभाषत । श्रुत्वेंद्रोऽप्याह मा भैषीरहमेनं निषूदये ॥ १२ ॥
बलान्निहम्नि राजानमाभिदुद्राव मारुतिः । महूर्तमभवद्धोरं कालाग्निरिव मूर्छितः ॥ १३ ॥

**राहू हनुमंतें पीडितु । इंद्र इंद्र नामें आक्रंदतु । वानरें पुरविला अंतु । आरंबळतु आक्रोशे ॥ ५२ ॥**

**ऐकोनी राहूचा आकांतु । इंद्र नाभीकार देतु । भेवो नको धरी पुरुषार्थु । त्याचा घातु मी करीन ॥ ५३ ॥** [ओवी ५३ व ६६ कं. प्रतीत नाहीत.]

**ऐसें बोलोनी अमरपती । वेगें पेलिला ऐरावती । त्यावरी धांवला मारुती । हस्ते हस्ती उपटावया ॥ ५४ ॥**

अनुक्रमणिका

वानरा ऐरावतु आकळी । तेणें पुसें ठोकिला कुंभस्थळी । गजु आक्रंदे दे किंकाळी । [मु. 'भयें चळी'.] चळचळीं कांपतुं ॥ ५५ ॥

पुंस नव्हे तो वज्रघातु । घायें विमुख ऐरावतु । इंद्र बळें आवरितु । तरी युद्धांतु परतेना ॥ ५६ ॥

पुंस हाणितां वानरें । गजें घेतलें घायवारें । [तु. 'शस्त्र'.] शक्रशक्ति तो नावरें । केलें घाबरें इंद्रासी ॥ ५७ ॥

इंद्र देवामाजीं बळी । करितां हनुमंतासी कळी । वानरें मुकुट पाडिला तळीं । झोंटी मोकळी सूटली ॥ ५८ ॥

मुकुट घ्यावया आपणापासी । बाळ भावें न कळे त्यासी । इंद्र केला कासाविसी । मरुद्‍गणेसी [दै. तु. खेरीज इतरत्र 'मर्दूनी'.] समवेत ॥ ५९ ॥

इंद्र गाजितां कपींद्रें । यमु धाविन्नला कैवारें । दंडे हाणितां सत्वरें । केलें वानरें विपरीत ॥ ६० ॥

यम जंव हाणी दंडाशी । हनुमान आदळला आंगेसी । थाप हाणोनिया त्यासी । तोंडघसीं पाडिला ॥ ६१ ॥

घाय हाणोनी प्रचंड । सांडऊनी [मु. दै. 'बळबंड'.] दंडबंड । यमाचें ठेंचिलें तोंड । बळ वितंड वानरा ॥ ६२ ॥

यम गांजी जगासी । हनुमंते गांजिले त्यासी । [कं. 'थापें'.] घायें मिळविला धुळीसी । [मु. 'बळराशी वानर'.] उठावयासी बळ नाहीं ॥ ६३ ॥

यम गांजिला देखोन । भेणे पळाला वरुण । कुबेर घाली लोटांगण । चरणा शरण कपिराजा ॥ ६४ ॥

हनुमंते अर्ध क्षणीं । सुरसेना नेली भंगोनी । अवघिया केली दाणादाणी । महा पळणीं देवांसी ॥ ६५ ॥

हनुमंताच्या वेगा पुढें । आम्हीं पळावें कोणीकडे । येरयेरामागें दडे । जीव सांकडें देवांसी ॥ ६६ ॥ [ओवी ५३ व ६६ कं. प्रतीत नाहीत.]

सगज उपटावया इंद्रासी । ऐरावतु धरुनिया पुंसी । वानरें भवंडितां आकाशी । देव ऋषि गजबजिले ॥ ६७ ॥

हनुमंत बळ देखोनि दृष्टी । जेणे इंद्र उपटिला सृष्टीं । जगी एक बोंब [तु. 'हाक उठी'.] उठी । महाहट्टी वानरू ॥ ६८ ॥

लघु लाघवी सुरपती । वज्रें हाणितला मारुती । घाव लागता हनुमंता प्रती । पडिला क्षिती मूर्छित ॥ ६९ ॥

मेरु शिखर पाठारांत । हनुमान पडिला मूर्छित । वायूपिता धावोनि त्वरित । निज सूत उचलिला ॥ ७० ॥

क्षुधिता माझिया तान्हियासी । इंद्रे हाणोनी वज्रेसी । मूर्छित पाडिले भूमीसी । वायु मानसीं क्षोभला ॥ ७१ ॥

अनुक्रमणिका

**वायू क्षोभोनि संपूर्ण । आकर्षिला जगाचा प्राण । ब्रह्मादिकां** [पै. खेरीज इतरत्र 'संकट'.] **सगट पूर्ण । ऋषिभूतगण तळमळिती ॥ ७२ ॥**

> रुरोध सर्वभूतानि वायुः सर्वमिवांतरे । वायुप्रकोपाद्भूतानि निरुच्छ्वासानि सर्वशः ॥ १४ ॥
> ततोऽमराः सगंधर्वाः सयक्षा सुरमानवाः । प्रजापतिं समाधावन्त दुखार्ताश्च सुखैषिणः ॥ १५ ॥

**वायु क्षोभोनि सक्रोध । अंतरी केला प्राण निरोध । प्राणापान झाले स्तब्ध ।** [मु. 'अतिविरुद्ध'.] **अंतरी निरोध भूतांसी ॥ ७३ ॥**

**प्राण निरोधाचें स्थिती । ठेली भूतांची** [तं. 'वृत्ति'.] **नित्यगति । कोणासी नाहीं सुखप्राप्ती । तळमळिती अति दुःखें ॥ ७४ ॥**

**यक्ष राक्षस देव गंधर्व । सिद्ध चारणादि मानव । सत्यलोका येऊनी सर्व । पितामहो** [दै. 'विनविला'.] **वंदिला ॥ ७५ ॥**

**प्राण निरोधाचें कष्ट । ऋषि सांगती श्रेष्ठ श्रेष्ठ । तंव पितामहाचें फुगले पोट । थोर संकट सर्वांसी ॥ ७६ ॥**

**ब्रह्मा स्वयें सांगे समस्तां । इंद्रे हाणोनिया वज्र घाता । मुर्छित पाडिले हनुमंता । वायु पुत्रार्था क्षोभला ॥ ७७ ॥**

**वायु निज पुत्र दुःखार्ति । भूतांचिया अंतर्गती । निरोधिल्या प्राण वृत्ती । पुत्र कामार्थ क्षोभोनी ॥ ७८ ॥**

**राहु कैवारें अमरनाथू । वज्रे हाणितला हनुमंतु । पुत्र पडतांचि मूर्छितु । वायु प्राणांतु क्षोभला ॥ ७९ ॥**

**हनुमंत घेऊनिया पुढें । वायु फुंदफुदो रडे । तान्हे बाळ हे बापुडें । इंद्रें महामूढें मारिलें ॥ ८० ॥**

**माझा निमालिया हनुमंत । इंद्रादि देवां करीन घात । न लगतां एक निमिषा आंत । वायु प्राणांत क्षोभला ॥**

**प्राण वृत्ती चळतां वायू । तो तंव जगाचा जगदायु । पुत्रक्षोभें क्षोभोनी बहु । भूतां** [मु. 'प्रळयो'.] **अपावो मांडिला ॥ ८२ ॥**

**प्राण्या प्राणे नित्य सुख । प्राणें प्राण्या नित्य हरिख । प्राण जाताचि निःशेष । परम दुःख प्राण्यांसी ॥ ८३ ॥**

**प्राण गेलियां निघोनी । काष्ट प्राय प्राणी जनीं । दृष्टी पाहातां सचैल स्नानी । विटाळु मानी जग त्याचा ॥ ८४ ॥**

**यालागी प्राणें** [तु. 'पतिव्रता'.] **पवित्रता । प्राणें प्रीति प्रीतिवंता । प्राण गेलियां तत्वता । प्रिया प्रियकांता स्पर्शेना ॥ ८५ ॥**

अनुक्रमणिका

पतिप्रिया परमआप्त । नित्य एकांतीं भोगी जीवित । प्राण गेलिया [मु. 'प्राणी'.] मानी प्रेत । पतीसी भूत म्हणे पत्नी ॥

ऐसा प्राण प्रीय समस्तां । तो वायुक्षोभें जाईल आतां । यालागीं वांचवावें हनुमंता । वैकुंठनाथा सांगोनी ॥ ८७ ॥

प्राणे पीडिला शूलपाणी । वायूची करावया बुझावणी । तोही आला तत् क्षणी । वांचवा म्हणऊनी हनुमंता ॥

शिव शक्र चतुरानन । तिहीं प्रार्थिला जनार्दन । हनुमंता द्यावया जीवदान । अवघे जण निघाले ॥ ८९ ॥

> यास्यामस्तत्र यत्रास्ते मारुतो हि प्रजाहितः । मा विनाशं गमिष्यध्वं प्रसादात्तु तथास्य वै ॥ १६ ॥
> ब्रह्मा हरिहरं दृष्ट्वा वायुपुत्रवधार्दितः । शिशु मादाय नम्रश्च ह्युपस्थे वेगवत्तरः ॥ १७ ॥

ब्रह्मा हरिहर तिघे जण । सवे इंद्रादि देवगण । ऋषि श्रेष्ठ श्रेष्ठ प्रज्ञा पूर्ण । अवघे जण तेथें [कं. 'निघाले'.] आले ॥ ९० ॥

[तु. दै. 'तंव पुढें'.] जेथे घेऊनी हनुमंतु । वायु बैसलासे रडतु । प्राणरोधें क्रोध युक्तु । आले समस्तु त्या ठाया ॥ ९१ ॥

देखोनी ब्रह्मा हरिहर । वायू उठोनी सत्वर । कडिये घेऊनी कुमर । केला नमस्कार सद्भावे ॥ ९२ ॥

एका पुत्रघाता कारणें । अवघे जगचि निर्दळणें । ऐसे न करावें आपणें । क्षमा करणे प्राणनाथा ॥ ९३ ॥

वायू बोले क्षोभक्रांता । माझा हनुमंत न उठवितां । करीन इंद्रादिकांच्या प्राणघाता । जाण तत्वता प्रजापति ॥

ऐकोनि वायोचें वचन । हासिन्नला श्रीजनार्दन । हनुमंताचें भाग्य पूर्ण । जन्म मरण यासीं नाहीं ॥ ९५ ॥

श्रीराम भागाचा द्विगुणित । जन्म पावला हनुमंत । त्यासी स्वप्नींहि नाही मृत्य । चिंरजीवित हनुमंत ॥ ९६ ॥

वरद वदला श्रीजनार्दन । हे ऐकोनि त्रिनयन । वरद वदें संतोषोन । सावधान अवधारा ॥ ९७ ॥

माझिये तृतीय नेत्रीचा वन्ही । जाळूं न सके यया लागुनी । त्रिशूळ न शके अंग भेदनी । वरदवाणी शिवाची ॥

विष्णु वरद वदे तत्पर । गदादि बाण चक्र दुर्धर । तेणे न भेदे याचे शरीर । अजरामर हनुमंत ॥ ९९ ॥

ब्रह्मावदे निज वरदासी । ब्रह्मदंड ब्रह्मपाशाशी । बाधूं न शके हनुमंतासी । सकळ द्वंद्वासी निर्मुक्त ॥ १०० ॥

अनुक्रमणिका

**इंद्रवदे निज वरदासी । माझें वज्र लागलें हनूसी । तेणे हनुमंत नाम यासी । होईल सर्वांसीं विख्यात ॥ १०१ ॥**

**माझें वज्र न बाधी पाही । हा होईल वज्रदेही । सुरा असुरां नांगवे करीं । ख्याती लोकी तिहीं पैं याची ॥**

[मु. 'ऋषि कौशिकी'.] **कुश काश्यपी कमळ माळा । सुको नेणे कदा काळा । इंद्रे उल्हासोनि** [तं. खेरीज इतरत्र 'त्या वेळा'.] **घातली गळां । वायु बाळा हनुमंताच्या ॥ १०३ ॥**

**निज वरद वदे सविता । मजहुनी शत अधिकता । तेजो वृद्धि होय हनुमंता । राक्षसघातां करावया ॥ १०४ ॥**

**हा वांछिल** [दे. 'सज्ञान विज्ञानता'.] **सज्ञानता । तैं सकळ वेद शास्त्रार्था । मी देईन अति योग्यता । होईल** [तु. 'व्याख्याता'.] **विख्याता परमार्थी ॥ १०५ ॥**

**वरुण वदे वरदान । वर्ष शतें जळीं विमग्न । होतां हनुमंता भयमरण । पाश बंधनबाधीना ॥ १०६ ॥**

**यम वरद वदें वितंड । सुख पावसी तूं उदंड । तुज बाधीना कालदंड । आरोग्य अखंड अजरत्वें ॥ १०७ ॥**

**धनेशु वदे निजवरदासी । युद्ध करितां वर्षानुवर्षी । कदा काळीं श्रमु न पावसी । अस्त्रबंधेसी बांधवेना ॥ १०८ ॥**

**विश्वकर्मा वदे वरदान । म्या शस्त्रें केलीं निर्माण । तीं हनुमंतासी युद्धीं जाण । शस्त्रबंधन बाधीना ॥ १०९ ॥**

**माझे शिल्पी शास्त्र ज्ञान । तें तूं पावसी संपूर्ण । ऐसें बोलोनी आपण । दे आलिंगन हनुमंता ॥ ११० ॥**

> चतुर्मुखस्तुष्टमना वायुं प्राह जगद्‌गुरुः । एषोऽ मित्रभयंकारी मित्राणामभयप्रदः ॥ १८ ॥
> अजेयो भविता पुत्रस्तव मारुत मारुतिः । रावणोत्सादनार्थाय राघवप्रीणनाय च ॥ १९ ॥

**ब्रह्मा जगद्‌गुरु सर्वांसीं । संतोषोनि सांगेवायुसी । हनुमंत भाग्याची राशी । सकळ देव त्यासी तुष्टले ॥ १११ ॥**

**धीर वीर महा शूर । अदट दाटुगा वज्रशरीर । बाधूं न शके शस्त्र संभार । तुझा पुत्र सभाग्य ॥ ११२ ॥**

**सभाग्य भाग्य हनुमंता । गांजूनिया लंकानाथा । शुद्धि आणूनिया सीता । सुखी रघुनाथा हा करील ॥ ११३ ॥**

**तुझा पुत्र आतुर्बळी । घेईल इंद्रजीतासी फळी । करुनि राक्षस रवंदळी । लंका होळी हा करील ॥ ११४ ॥**
[ओवी ११४ कं. व तु. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

परमभाग्य हनुमंता । भेटोनि सुखी करील सीता । शुद्धि आणूनि तत्वतां । सुखी रघुनाथा हा करील ॥ ११५ ॥ [ओवी ११५ तु. प्रतीत नाही.]

श्रीरामाच्या कटकांत । अदट दादुगा हनुमंत । सेवा बळें परम आप्त । श्रीरघुनाथ मानील ॥ ११६ ॥

ऐसी हनुमंताची ख्याती । स्वयें सांगता प्रजापति । उल्हासु वायुचें चित्तीं । पुत्रकीर्ति ऐकोनी ॥ ११७ ॥

वरद लाहोनी हनुमंता । वायू अति उल्हासता । मुक्त केली प्राणरोधता । सुख समस्तां तेणें जालें ॥ ११८ ॥

सुखी जाले सुर नर । सुखी जाले ऋषेश्वर । सुखी जाले चराचर । जयजयकार तिहीं लोकीं ॥ ११९ ॥

वर देऊनी हनुमंतासी । सुरवर गेले निजधामासी । वायुनें आणूनि हनुमंतासी । अंजनीपासी दीधलें ॥ १२० ॥

हनुमंताची बाळकीर्ति । विस्तारली त्रीजगतीं । फळार्थ आकळितां गभस्ती । लावली ख्याती सुरवरां ॥ १२१ ॥

हनुमंताचें सामर्थ्य सिद्ध । तेचि देवीं दिधलें वरद । हनुमंत कीर्ति अगाध । तेणे आल्हाद श्रीरामा ॥ १२२ ॥

जें सामर्थ्य श्रीरामासीं । तेचि सामर्थ्य हनुमंतासी । एकात्मता अहर्निशी । लोक क्रियेसी देव भक्त ॥ १२३ ॥

लोक क्रिया संग्रहार्थ । श्रीराम देवो हनुमान भक्त । तोचि रामायणी ग्रंथार्थ । [मु. 'भक्त सामर्थ्य वायुपुत्री'; कं. 'साह्यार्थ हनुमंती'.] भक्त समर्थ हनुमंत ॥ १२४ ॥

डोंगरीं दावाग्नीची ख्याती । घरीच्या दीपा तेचि दिप्ती ।
दोहींची एक दाहक शक्ति । तेवीं देव भक्ती सामर्थ्य ॥ १२५ ॥

हनुमान असतां मातेप्रति । अंगी अद्भुत सामर्थ्य शक्ति । करिता बालत्वें उद्धति । [दै. तु. खेरीज इतरत्र 'हितोक्ती शापिला'.] ऋषि शापिती ते ऐका ॥

गंगातीरी ऋषींची वस्ती । अवघे आश्रम उचलूनि हातीं । हनुमंत ठेवी दूर पर्वती । जळ न पवती स्नानपाना ॥

ऋषि आपल्या तप सामर्थी । पुडती गंगातीरा येती । हनुमान [कं. इं. 'घाली उखरा प्रती'.] उचलूनी मागुती । [कं. 'ऋषि तळमळती जळफळा'.] घाली पर्वती अति दूर ॥

पुण्य पर्वती ऋषी वसत । सगळा उचलूनी पर्वत । हनुमान घाली उखरांत । ऋषि तळमळीत जळफळा ॥ १२९ ॥

अनुक्रमणिका

बाळभावाच्या परवडी । ऋषींची यज्ञ पात्रें फोडी । कुशासने अजिने फाडी । जानवीं तोडी बटूचीं ॥ १३० ॥

बटुब्रह्मचारी कवळूनि पुंसी । हनुमान उडे स्वयें आकाशीं ।
लेकुरें करीती कोल्हाळासी । ऋषी पत्न्यासी तळमळ ॥ १३१ ॥

मारुनिया गज करवडें । ऋषि आश्रमी ठेऊनी मढें । काढितां शिष्य समुदावो रडे । [दै. तु. 'श्रमती गाढी नित्य नित्य'.] उपावो पुढें चालेना ॥

ब्रह्मवराची वरदोक्ति । शापु न चलें हनुमंतीं । अवघे आलें ब्रह्मयाप्रती । बुद्धि पुसती वृद्ध [दै. तु. 'चतुर्मुखा'.] वृद्ध ॥ १३३ ॥

ब्रह्मा सांगे ऋषिप्रती । शाप द्यावा अति हितोक्ति । मारुती भेटे जंव रघुपती । तंव वरी शक्ति लीन राहो ॥

जेवी यौवन सौभाग्य थोरी । अती गुप्तराहे [तं. 'हे वानरी'.] कुमरीं । तेवी तुझी सामर्थ्य थोरी । तुज माझारीं लीन राहो ॥

जेवीं अंगीं आलिया तरुणता । यौवनें मुसमुसी वनिता । तेवीं भेटलियां रघुनाथा । निज सामर्थ्या पावसी ॥ १३६ ॥

ऐसे ऋषीश्वरे शापिती । जाली हनुमंताची लीनशक्ति । मग राहिला साधुवृत्ति । ऋषीप्रती अतिनम्र ॥ १३७ ॥

द्रव्यमद तारुण्यमद । आंगी बळाचा बळमद । तेणे पुरुष होय स्तब्ध । करी विरुद्ध अवमानें ॥ १३८ ॥

व्यापार जालिया व्यापारी । नाना अन्योविन्य करी । तोचि जालियां निराधारी । मग विचारी पापपुण्य ॥ १३९ ॥

कैसी संध्या कैसें स्नान । केंवि पाविजे निजज्ञान । अधिकारु झालियां क्षीण । विवेकपण प्राण्यासी ॥ १४० ॥

तैसें जालें हनुमंता । निजबळ लीन होता । म्या पावावें परमार्था । साधु संता भजावें ॥ १४१ ॥

पूर्वी सूर्याचें वरदान । जेव्हां हनुमंत वांछील ज्ञान । तेव्हांचि होईन प्रसन्न । ज्ञानसंपन्न मी [मु. 'कर्ता'; पै. 'ज्ञान संपन्नता मी देत'.] दाता ॥ १४२ ॥

ते ज्ञान मारुती वांछिता । अंतरी उगवोनी चित्सविता । ज्ञान विज्ञान तल्लीनता । देहीं विदेहता श्रीरामें ॥

ज्ञान विज्ञान संतृप्ती । देहीं असोनि विदेह स्थिती । श्रीरामाची अनन्य भक्ति । जाला मारुती जगद्वंद्य ॥ १४४ ॥

अनुक्रमणिका

वाली सुग्रीव कलहांत । शापें हनुमंतशक्ति गुप्त । या लागीं वालीचा न करी घात । जाण निश्चित श्रीरामा ॥

सुग्रीव हनुमंताचा आप्त । परी शापें शक्ति होती गुप्त ।
यालागीं वालीचा न करीच घात । जाण निश्चित श्रीरामा ॥ १४६ ॥ [ओवी १४६ इं. मध्ये नाही.]

ऐसी हनुमंताची ख्याती । ऐकोनि सुखावला रघुपति । श्रीरामासी पुसोनी अगस्ती । स्वाश्रमाप्रती स्वयें गेला ॥

एका जनार्दना शरण । हनुमंत जन्म निरोपण । ऐकोनि श्रीरघुनंदन । सुख संपन्न स्वयें जाला ॥ १४८ ॥

सुखावोनी श्रीरघुपति । प्रीति आलिंगिला मारुती । हा मजसाह्य सीताशुद्धयर्थी । रणकंदनार्थी अग्रगण्य ॥ १४९ ॥

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां हनुमज्जन्मकथननिरोपणं नाम दशमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग अकरावा

## सीता शुद्धयर्थ वानर प्रेरणा

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

दाविला कपिसेना संभार । अति दाटुगा हनुमंत वीर । तेणें सुखावला श्रीरामचंद्र । केला नमस्कार सुग्रीवें ॥ १ ॥

वानरसेना कडकडाटी । वेगीं रिघोनी वैकुंठीं । अथवा कैलासगिरींकुटीं । मेरूपृष्ठीं घालूं घाला ॥ २ ॥

रिघोनी पाताळाचे पोटीं । मारूं दानवांच्या कोटी । अथवा दैत्यांचिया थाटी । उठाउठी निर्दाळू ॥ ३ ॥

गण गंधर्व सुरवर । यक्ष राक्षस नर किन्नर । माझे निर्दळिती वानर । चराचर उलथोनी ॥ ४ ॥

लोका परलोकाहि परती । कव घालूं अवचिती । वानर कृतकार्य साधिती । आज्ञा रघुपती शीघ्र द्यावी ॥ ५ ॥

> इतिब्रुवंतं सुग्रीवं रामो दशरथात्मजः । बाहुभ्यां संपरिष्वज्य प्रीतो वचनमब्रवीत् ॥ १ ॥
> ज्ञायतां सौम्य वैदेहीं निलये रावणस्य च ॥ २ ॥

आइकोनि सुग्रीवाचें वचन । श्रीराम जाला [तु. पै. खेरीज इतरत्र 'सुप्रसन्न'.] सुखसंपन्न । आजानुबाहू पसरोन । दिधलें आलिंगन सुग्रीवा ॥ ६ ॥

श्रीराम म्हणे कपिनाथा सीताशुद्धि करावी आतां । कोणें ठाई रावणु वसता । तें हि तत्वतां शोधावें ॥ ७ ॥

ऐसें बोलतां श्रीरघुनाथा । सुग्रीवें चरणी ठेविला माथा । हरिखें वानरां होय सांगता । शोधावी सीता सत्वर ॥

विनत नामा महावीर । सवें वानर शत सहस्त्र । पूर्वे धाडिला सत्वर । सीता सुंदर शोधावया ॥ ९ ॥

रावणाचे वसतिस्थान । सीता शोधावी सावधान । नगरें पुरे वनें उपवन । गिरी गहन शोधावें ॥ १० ॥

तारेचा पिता सुषेण । त्याचे सुग्रीवें वंदुनी चरण । सीता शुद्धीसी जावें आपण । शोधावी संपूर्ण पश्चिम दिशा ॥ [ओवी ११ तं. प्रतीत नाहीं.]

पिता [पै. खेरीज इतरत्र 'तैसा'.] तो श्वशुर जाण । माझी कळवळ [पै. खेरीज इतरत्र 'तुज'.] बूझ संपूर्ण । सीता पाहावी सावधान । जन विजन शोधूनि ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

स्वयें शोधावें राष्ट्रें राष्ट्र । पुरें पाटणें नगरें नगर । ग्राम गुहा गिरि गव्हर । शिखरें शिखर शोधावीं ॥ १३ ॥

वानरामाजीं अति दुर्धर । शतवळी नामा महावीर । सेना शतकोटी संभार । शोधूं उत्तरे धाडिला ॥ १४ ॥

कोठें वसताहे रावण । हें मुख्य शोधावें आपण । करावें सीता गवेषण । रघुनंदन सुखार्थ ॥ १५ ॥

खेट [तु. 'खेवट'.] खर्वट पुरें नगरें । पर्वत सानुस्त्रोत शिखरें । गिरी गुहा कंदरें विवरें । मेरू पाठारें शोधावीं ॥ १६ ॥

अग्नि वायव्य ईशान्य । नैऋत्य दिशेचा नैऋत्य कोण । शोधूं धाडिले कोण कोण । सावधान अवधारा ॥ १७ ॥

[तु. दै. 'गवय आणि गवाक्ष'.] पद्मपाणी पद्माक्ष । कुमुद आणि कुमुदाक्ष । हे च्यार्‍ही वीर अति दक्ष । सुग्रीव प्रत्यक्ष सन्मानी ॥ १८ ॥

कोटिकोटी सेना देऊनी । चौघे धाडिले चहूं कोणी । रावण मारावा शोधूनी । श्रीरामपत्नी आणावी ॥ १९ ॥

रावण नागवें तत्वता । तरी शुद्धि आणावी शीघ्रता ।
मग मी त्याच्या करूनि घाता । श्रीरामकांता आणीन ॥ २० ॥

चवघे बोलती आंगवण । रावण बापुडे मशक कोण । दृष्टी पडलिया जाण । घायें निर्दलन करूं आम्ही ॥ २१ ॥

खांदी घेऊनिया सीता । नाचत येऊं तत्वतां । सत्य जाण कपिनाथा । सुखी रघुनाथा आम्ही करूं ॥ २२ ॥ [ओवी २२ व २४ तु. प्रतीत नाहीत.]

तारू आणि दुसरा तरळ । वानरांमाजीं वीर प्रबळ । शोधूं धाडिलें पाताळ । [तु. खेरीज इतरत्र 'कोटी दळ देऊनी'.] सप्ततळ पर्यंत ॥ २३ ॥ [ओवी २३ दै. प्रतीत नाही.]

अतळ वितळ सुतळ । रसातळ महातळ । तळातळ आणि पाताळ । सप्ततळें शोधावीं ॥ २४ ॥ [ओवी २२ व २४ तु. प्रतीत नाहीत.]

पाताळ शोधावयाची गती । मी सांगेन जैसिया [मु. कं. तं. 'रीती'.] स्थिती । तुम्ही शोधावें त्याचि रीती । सावध वृत्ति अवधारा ॥

पाताळ लोकांमाजीं जाण । कोठें नांदत आहे कोण । सुग्रीव सांगतों आपण । सीता सावधान शोधावी ॥ २६ ॥

अतळी वसें मयपुत्र बळु । [तु. 'बळें जैसा यम काळु'.] नामें बळु प्रतापें सबळु । त्याचा मंत्री हलकल्लोळु । दुर्धर मेळु दैत्यांचा ॥ २७ ॥

अनुक्रमणिका

येथें शोधावा रावण । आडवे आलियां दैत्य गण । रावणें सहीत ते दमून । सीता आपण आणावी ॥ २८ ॥

वितळीं वसे हाटकेश्वर । उमाकांत कर्पूरगौर । [तु. खेरीज इतर ‘जेथील’.] तेथील हाटक नदीचा पूर । सुवर्ण संभार प्रवाहे ॥ २९ ॥

रावण शिवाचा शिवगण । तेथें सांपडलिया जाण । त्याचा घेऊनियां प्राण । सीता आपण आणावी ॥ ३० ॥

सुतळीं महा वैष्णव बळी । ज्याचा द्वारपाल वनमाळी । प्रल्हादु वसे त्या जवळीं । वैष्णव कुळीं नांदत ॥ ३१ ॥

तेथ सीता आणि रावण । स्वयें शोधावीं सावधान । सांपडलियां घेवोनि प्राण । सीता आपण आणावी ॥ ३२ ॥

त्रिपुर भेदूनी शंकरु । रसातळीं मयासुरु । शिवें स्थापिला महावीरू । सपरिवारू वसताहे ॥ ३३ ॥

तो सोइरा रावणासी । तेथें तो असेल सीतेसी । जीवें मारुनियां त्यासी । जानकीसी आणावें ॥ ३४ ॥

महातळीं कद्रूसुत । जे विषधर क्रोध युक्त । [कं. ‘सर्प’; पै. मु. ‘सर्प वसताती’.] सहपरिवार वसती समस्त । रावण तेथें शोधावा ॥ ३५ ॥

जरी आंतुडला दृष्टी । तरी मारावा उठाउठी । सीता आणावी गोरटी । सुख संतुष्टी श्रीरामा ॥ ३६ ॥

तळातळीं तंव दानव । पणी मुख्य रायाचें नांव । निवातकवची वीर सर्व । वैरी स्वमेव इंद्राचे ॥ ३७ ॥

दनुज जन्मे दानव मांदी । टव टाळक नामावधी । संख्या नव्हे शंख शब्दीं । ते मुख्य द्वंद्वी इंद्राचे ॥ ३८ ॥

तेथें आंतुडलियां रावण । तो निर्दळावा आपण । आडवे दानव आलिया जाण । त्यासी कंदन करावें ॥ ३९ ॥

दानवांचे अति मर्दन । रणीं करूनि रण कंदन । जीवें मारूनी रावण । सीता आपण आणावी ॥ ४० ॥

[पै. ‘सावें’.] सातवें पाताळीं महानाग । शत सहस्त्र महा भुजंग । वासुकी प्रमुख अनेग । पद्मिनी भोग भोगिती ॥ ४१ ॥

स्वर्गीं उर्वशी रंभा सुंदरी । कीं पाताळी पद्मिनी नारी । यांच्या सौंदर्याची थोरी । चराचरीं वाखाणें ॥ ४२ ॥

तेथ अति सावधानता । स्वयें शोधावें लंकानाथा । सांपडलिया करुनी घाता । सवेग सीता आणावी ॥ ४३ ॥

अनुक्रमणिका

त्या तळीं [दै. तु. 'तीस'.] तीनशत योजनेंवरी । शेषु असे सहस्त्रशिरीं । ज्याच्या शरीर भागावरीं । निद्रा करी भगवंत ॥ ४४ ॥

तेथें जानकी आणि दशशिर । सावध शोधावे सत्वर । सांपडलिया करुनी मार । सीता सुंदर आणावी ॥ ४५ ॥

शुद्धी करावी तेथवरी । तेथूनि परतावें वानरीं । वाट न चले पुढारी । तुम्ही अघोरीं पडाल ॥ ४६ ॥

त्याही तळीं आत्यंतिक । अंध तमिस्त्र महानरक । त्याहूनि तळीं कूर्म [तं. 'उदक'.] देख । आवरणोदक त्या तळीं ॥ ४७ ॥

नरका जाती पापी नर । तुम्ही सांडोनि ते म्होर । रामनामाचा करूनी गजर । भजा सत्वर श्रीरामा ॥ ४८ ॥

स्वर्गभोगु नावडे ज्यासी । पुण्य करिती भोग इच्छेसी ।
ते जीव होती पाताळवासीं । निज पुण्यासी भोगावया ॥ ४९ ॥

पुण्य नाहीं तिळभरी । जे केवळ पापाचारी । ते पचती नरकांतरीं । पापकारी महापापी ॥ ५० ॥

वीरां सुग्रीव सांगे गर्जोन । तुम्हा न गवसे रावण ।
शुद्धीसी शीघ्र आणूनि आपण । त्याचें निर्दळण करीन मी ॥ ५१ ॥

वानर बोलतातीं [कं. 'निवाडे'.] कैवाडे । रावण दाहा तोंडाचें किडें । [तं. खेरीज इतरत्र 'सहसीता'.] सत्वरता बांधोनी आणू रोकडे । रामापुढें निश्चित ॥

पाताळ शोधावयाची गती । सुग्रीवें केली अति निगुती । तारू वानर स्वर्गाप्रति । धाडी तें स्थिती अवधारा ॥

तारू वानर तेजोराशी । सेना शतकोटी तया सरिसी । सुग्रीवें धाडिला स्वर्गासी । जानकीसी शोधावया ॥ ५४ ॥

सुग्रीव बोले तारूप्रती । मी सांगेन स्वर्गगती । सीता शोधावी [मु. 'ऐशा'.] तैशा रीती । सावधान वृत्ति निजबळें ॥ ५५ ॥

पृथ्वीहूनी वरती । सूर्य मंडळा खालती । यक्ष रक्ष गंधर्व वसती । तेथें सीता सती शोधावी ॥ ५६ ॥

स्वर्गलोक आहेती बहुत । मी सांगेन [तं. 'विख्यात'.] संकलित । सीता शोधावी तेथ । सावचित्त निजवृत्ती ॥ ५७ ॥

सूर्यलोक लक्षांतरीं । लक्ष योजने सोम त्यावरी । तारालोक त्याहि वरी । दो लक्षांतरीं वसतसे ॥ ५८ ॥

अनुक्रमणिका

तारा लोकाहुनी [पै. खेरीज इतरत्र 'वरी'.] दुरी । बुधलोक लक्षांतरीं । बुधलोकांहूनि वरी । दोलक्षांतरीं भृगुलोक ॥ ५९ ॥

दैत्यगुरु भृगुपति । रावणा शुक्रेसीं अति प्रीति । तेथें पहावा तो निश्चिती । सीतासती समवेत ॥ ६० ॥

तेथें देखिलिया सीता सुंदरी । बळें आणितां निज गजरीं ।
शुक्र [मु. 'येईल रावणा साह्यार्थी'.] आडवा आला जरी । बुद्धी अवधारी तेहि विषीं ॥ ६१ ॥

मारूं नये [मु. तु. कं. 'गा'.] गोब्राह्मणा । वामने केला आहे काणा । फोडूनि दुसरिया नयना । रामांगना आणावी ॥ ६२ ॥

तेथें नसलिया सीता सती । तरी निघावें शीघ्रगती । शुक्र लोकाहुनी वरती । दो लक्षा वसती भौमलोका ॥ ६३ ॥

भौमलोकाहूनि उपरी । दोनी लक्ष योजनावरी । देव गुरु वस्ती करी । जो सुरवरां अतिपूज्य ॥ ६४ ॥

त्याहुनी दोन्ही लक्ष योजनी । सूर्यसुतु वसे शनी । लक्ष योजने त्याहीहुनी । वसती मुनी सप्तऋषि ॥ ६५ ॥

तेथें आहे अरुंधती । तिसी पुसावी सीता सती । तें सांगेल यथा निगुती । श्रीरामप्रीति सत्यत्वें ॥ ६६ ॥

तेथुनी दशलक्षावरती । वसताहे अमरावती । इंद्र नांदताहे सुरपती । स्वर्ग संपत्ति समवेत ॥ ६७ ॥

तेथें [मु. 'पुसावें'.] गवसावें सीतारत्न । चैत्ररथ नंदनवन । कल्पतरू ऊद्यान । स्वयें शोधून पहावें ॥ ६८ ॥

येथुनी त्रैलोक्य सकळ । सरले स्वर्ग मृत्यु पाताळ । याहि परते आहे स्थळ । जनकबाळी शोधावया ॥ ६९ ॥

कैलासा [मु. 'गिरीचे'.] तळिलें पाठारीं । कुबेराची अलकानगरी ।
सुवर्ण कमळें सुगंधाकारी । साजिरे सरोवरीं विकासती ॥ ७० ॥

ज्या कमळांचा सुगंधु । घेतां ब्रह्मा होय स्तब्धु । तेथें शोधावी श्रीरामवधू । कुबेर जेष्ठबंधु रावणाचा ॥ ७१ ॥

तिहीं लोकींहूनि वरती । रावणा जावया कैची शक्ति । जवळीं आहे सीता सती । तीचेनि गती [पै. मु. कं. 'राक्षसां'.] रावणा ॥ ७२ ॥ [ओवी ७२ तं. प्रतीत नाही.]

सीतेचिया हरण संगती । राक्षसां होईल ऊर्ध्व गती । हें बोलिलें बहुतां ग्रंथी । संत जाणती सत्यत्वें ॥ ७३ ॥

तिहीं लोकाहूनि बाहेरी । भक्त कृपाळू श्रीहरी । अलक्ष लक्षांतरीं । कृपेने करी धृवलोकु ॥ ७४ ॥ ॥ [ओवी ७४ व ७८ कं. प्रतीत नाहीत.]

अनुक्रमणिका

त्रैलोकीं होतां प्रलयकाळ । धृवासी कदानव्हे चळ । तो सर्वदा अचंचळ । यालागीं अढळ धृवपद ॥ ७५ ॥

धृव वीर [इं. 'परम'.] शूर भगवद्भक्त । देखोनि सीता आक्रंदत । पाडुनी रावणाचे दांत । सीता निश्चित सोडवील ॥ ७६ ॥

धृव अढळपदीं सीता । प्रतिपाळील जैसी माता । तयासी पुसावें तत्वतां । श्रीरघुनाथ सुखार्थ ॥ ७७ ॥

तेथें न लभे जनकबाळ । आणिक स्थळें अति प्रबळ । ते मी सांगेन सकळ । सुनिश्चळ अवधारी ॥ ७८ ॥ [ओवी ७४ व ७८ कं. प्रतीत नाहीत.]

तेथें जावया एकची गती । विकल्प सांडावा गा चित्तीं । तैचि त्या स्थानाची प्राप्ती । जाण निश्चिती महावीरा ॥

पृथ्वी पासूनि कोटी योजन । महर्लोक वसे जाण । तेथें वसति कल्पायुजन । तें वसतिस्थान तयांचें ॥ ८० ॥

तेथें शोधावी [तु. 'जनक दुहिता'.] गा सीता । त्याहुनी कोटी योजने वरुता । जनोलोकु आहे वसता । तेथील [मु. 'अवस्था'.] संस्था अवधारी ॥ ८१ ॥

उर्ध्वरेते योगी देख । तेथें वसती सनकादिक । सीता पुसावी आवश्यक । ते निष्टंक सांगतील ॥ ८२ ॥

तेथुनि दोनि कोटी अधिक । वसताहे तपोलोक । वैराज देव निवासक । तपस्वी देख अतिशांत ॥ ८३ ॥

तपें तापस कर्कश होत । क्रोध युक्त सदा संतप्त । अल्पासाठीं श्राप देत । तेणें भस्म होत तपश्चर्या ॥ ८४ ॥

तैसें तापस नव्हतीं तेथ । वैराज देव अतिशांत । तप करिती परोपकारार्थ । दीन समस्त तरावया ॥ ८५ ॥

भावें करितां भगवद्भक्ति । ज्यांची कर्मे जे जे राहाटती । तें तें हे संपूर्ण करिती । उद्धरणार्थी दीनांच्या ॥ ८६ ॥

त्यासी करुनियां [तं. 'गमन'.] नमन । सीता पुसावी आपण । पुढें आहे ब्रह्मभुवन । सीता शोधन करावया ॥ ८७ ॥

तपोलोकाहुनी देख । चौकोटी उंच अधिक । वसताहे सत्यलोक । चतुर्मुख निजस्वामी ॥ ८८ ॥

सृष्टी सृजी स्वयें ब्रह्मा । त्याच्या लोकाचा निज महिमा ।
सावधान आईक प्लवंगमा । नाहीं उपमा त्या स्थाना ॥ ८९ ॥

तेथे मूर्तिमंत [तु. 'चाऱ्ही वेद'.] वेद । मूर्तिमंत धर्म प्रसिद्ध । मूर्तिमंत ब्रह्मचर्य शुद्ध । तपादि सिद्ध मूर्तिमंत ॥ ९० ॥

अनुक्रमणिका

गायत्री वेदबीज अतिगुप्त । मूर्तिमंत असे तेथ । वांचा मूर्तिमंत असे वर्तत । दया मूर्तिमंत उल्हासें ॥ ९१ ॥

तिन्ही याग मूर्तिमंत । तिन्ही एकत्वें नांदत । सत्य सत्यलोकीं मूर्तिमंत । असत्य तेथें असेचिना ॥ ९२ ॥ [ओवी ९२ व ९७ कं. तं. प्रतींत नाहीत.]

ते लोकीं वसते कोण लोक । जे गायत्री मंत्र जापक । जे ब्राह्मण तीर्थ प्रत्यक्ष । याग उपासक निष्काम ॥ ९३ ॥

ब्राह्मण कार्यीं जे निमाले । गौरक्षणीं जिवें गेले । परोपकारार्थ [मुं. 'प्राण वेचले'.] वेचले । ते पावले सत्य लोक ॥ ९४ ॥

जिहीं निष्कामें देव पूजिले । जींहीं निष्कामें द्विज भुंजिले । ब्राह्मण निष्कामें भजले । ते पावले सत्यलोक ॥ ९५ ॥

जे कृपाळु दीनार्थ देख । जे दयाळू बंदी मोचक । जे सत्यवादी नित्य सात्विक । ते सत्यलोक निवासी ॥ ९६ ॥ [ओवी ९६ व १०१ मु. प्रतीत नाहीत.]

जे परापवादी मूक । जे परदारा नपूंसक । परद्रव्या पराङ्मुख । ते सत्यलोक निवासी ॥ ९७ ॥ [ओवी ९२ व ९७ कं. तं. प्रतींत नाहीत.]

ऐसी सत्यलोकीची स्थिती । तेथिचा ब्रह्मा अधिपति । ब्रह्मसृष्टि याहि वरूती । नाही निश्चित महावीरा ॥ ९८ ॥

रावण पौलस्तीचा सुतु । तो होय ब्रह्मीयाचा पणतु । असेल सत्यलोकां आंतु । सीता समवेतु राहिला ॥ ९९ ॥

पाहावा इंदु बिंब सरोवरी । कां सोमसेवन वृक्षांतरीं । ऐक त्या ठायाची थोरी । चराचरीं अनुपम्य ॥ १०० ॥

इंद्रादि बिंबसरोवरीं करितां स्नान । सर्व रसांची गोडी जाण । सर्वांगें पाविजे आपण । अमृतपान फिके तेथें ॥ [ओवी ९६ व १०१ मु. प्रतीत नाहीत.]

तेथें घडल्या सभाग्य स्नान । अगाध गोडी पाविजे पूर्ण । सीता समवेत जाण । तेथें रावण गिवसावा ॥ १०२ ॥

सोम सेवन वृक्ष छायेंसी । बैसल्या विश्रांति होय कैसी । सुषुप्ति सुख तेथिची दासी । स्वर्गसुख त्यासी कुर्वंडी ॥

ते छायेच्या सुखासाठीं । पुण्यें वेचिती कोट्यानुकोटी ।
तऱ्ही त्या सुखाची नव्हे भेटी । अगम्य गोष्टी पावावया ॥ १०४ ॥

अनुक्रमणिका

पुण्यें करूनि कडोविकडी । सत्यलोका येती बापुडी । तरी त्या सुखाची नव्हे जोडी । अगाध गोडी दुर्लभ ॥ १०५ ॥

जावयासवें आलें घोडें । दाणापाणी देती कडबाडें । परी त्या पक्वान्न न जोडे । तेणें पाडें साधकां ॥ १०६ ॥

शोधीत सत्वाच्या परवडी । [तं. 'गोविली'.] गाळीव पुण्याचिया कोडी । तैं पाविजे तेथीची थडी। अगाध गोडी त्या ठाया ॥ १०७ ॥

त्या ठायाचें समाधान । समाधी सुखेसीं समान । न करितां भगवद्भजन । पुनरागमन [मु. तु. 'तेथे नाहीं'.] तेथेही ॥ १०८ ॥

यालागीं करिता भगवद्भक्ति । चाऱ्ही मुक्ति दासी होती । श्रीरामनामाहि परती । साधन शक्ति असेना ॥ १०९ ॥

पाहा पां कैसें अभाग्य जन । सांडूनि श्रीरामस्मरण । करितां अन्य साधन । जन्ममरण सोडीना ॥ ११० ॥

नामापासीं साधन शक्ति । नाम स्मरण मुख्य भक्ति । भक्तीपासीं चाऱ्ही मुक्ति । वेद शास्त्रार्थ निश्चित ॥ १११ ॥

श्रीरामस्मरण मुख्य भक्ति । साधु संत स्वयें जाणती । तेंचि अनुवादों किती । कथा संगती अवधारा ॥ ११२ ॥

साम सोमवन वृक्ष मेळीं । समवेत जनक बाळी । रावण गवसावा महाबळी । छायें तळीं उपविष्ट ॥ ११३ ॥

तेथेंहि नसिल्या रावणासी । तरी पाहावा कैलासीं । शिवभक्ति आहे त्यासी । शिव लोकासीं शोधावें ॥ ११४ ॥

जावया शिव लोका प्रति । म्हणाल आम्हां नाहीं शक्ति । रामनामाच्या [दे. मु. 'आवर्ती'.] आवृत्ति । सुलभ प्राप्ती शिवलोका ॥ ११५ ॥

शिवु श्रीरामभक्तपूर्ण । आइकोनी श्रीरामस्मरण । स्वयें सामोरा ये आपण । दे सन्मान नामासी ॥ ११६ ॥

शिवु सन्मानी नामासी । नाम स्मरण त्या अति [कं 'विश्वासी'.] विशेषीं । सुलभ प्राप्ती नामापासीं । शिव लोकासी जावया ॥

वैकुंठ कैलास वृत्तांतु । वेद शास्त्रां अगम्य मातु । तो मी सांगेन सिद्धांतु । सीता शुद्धयर्थु साधावया ॥ ११८ ॥

सप्तावरणाहूनि बाहेरी । मायावरणाभीतरीं । वैकुंठ कैलासाची थोरी । स्वलीळा करी भगवंतु ॥ ११९ ॥
प्रळयो होता ब्रह्मसृष्टीसी । वैकुंठ कैलास [पै. खेरीज इतरत्र 'शेषशायीसी'.] सत्यलोकासी ।

अनुक्रमणिका

प्रळयो नाही या तिहीसीं । बोलिला ऋषि याज्ञवल्क्य ॥ १२० ॥

तरी हे तीन्ही प्रळयातीत । म्हणो नये गा निश्चित । अत्यंत प्रळयें प्रळयो होत । प्रळयो प्राप्त तैं यासी ॥ १२१ ॥ [ओवी १२१, १३३ व १३८ तं. प्रतीत नाहीत.]

ऐसे प्रळय आहेत किती । पुसों ऐसें वाटे चित्तीं । पंच प्रळयो जाण निश्चिती । तेहि विज्ञप्ति अवधारी ॥ १२२ ॥

पहिला जाण नित्यप्रळयो । दुसरा [मु. 'मरण'.] अव्हांतर प्रळयो । तिसरा दैनंदिन प्रळयो । ब्रह्म प्रळयो तो चौथा ॥ १२३ ॥

पांचवा प्रळयो अत्यंतिक । त्यासी नेणती तिन्ही लोक । त्याही पांचाचा विवेक । आईक निष्टंक सांगैन ॥ १२४ ॥

नित्य प्रळयो ते सुषुप्ति । अव्हांतर प्रळयो होतां मरती ।
ब्रह्मप्रळयाचे गा दिनांती । महप्रळयो म्हणती दैनंदिन ॥ १२५ ॥

विरोनिया सप्तावरण । ब्रह्मांड विरे गा संपूर्ण । सृष्टिकर्ता मरे आपण । ब्रह्मप्रळयो तो जाण चौथा ॥ १२६ ॥

अत्यंत प्रळयाची गोष्टी । लोक न देखती सृष्टी । तो तंव बह्मज्ञानाचां पोटीं । गुरुवाक्यें उठी लखलखित ॥

बापु गुरुवाक्याची सृष्टी । सान थोर समूळ निवटी । कैंचा देव कैंची सृष्टी । नळी निमटी जीव शिवा ॥ १२८ ॥

ज्ञेय ज्ञान ध्येय ध्यान । दृश्य द्रष्टा आणि दर्शन । त्रिगुण त्रिपुटी निर्दाळून । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ १२९ ॥

जेथें जीव शिवत्व नाहीं । तेथ कैंचे वैकुंठ शेषशायी । मी तूं पण मुळींच नाही । ब्रह्म पाही परिपूर्ण ॥ १३० ॥

विरे वैकुंठेसी विष्णु । विरे शेषेसी नारायणु । कैलासेसी त्रिनयनु । जाय विरोन परब्रह्मीं ॥ १३१ ॥

गुरुवाक्याचें निज बोलें । अत्यंत प्रळयाचें रूप केलें । ब्रह्मचि एक एकलें । असें कोंदलें परिपूर्ण ॥ १३२ ॥

आईकतां सुग्रीवाची गोष्टी । श्रीरामा सुखाचिया कोटी । हर्षें दोघां पडिली मिठी । सुख संतुष्टी स्वानंदें ॥ [ओवी १२१, १३३ व १३८ तं. प्रतीत नाहीत.]

सुग्रीवां नाठवे वानरपण । श्रीरामा नाठवे रामपण । [तं. 'ऐसें'.] ऐक्य देखतां संपूर्ण । [पै. 'सुख लक्ष्मण वीराला'.] सुखीं लक्ष्मण विराला ॥ १३४ ॥

ऐक्यें पडतांचि मिठी । तिघांची विराली त्रिपुटी । हर्षें कोंदाटली सृष्टी । सुख संतुष्टी श्रीरामा ॥ १३५ ॥

अनुक्रमणिका

अत्यंत प्रळयीचें ज्ञान । स्वयें श्रीरामुचि जाणे आपण । सन्मुख देखतांहि सगुण । ब्रह्म परिपूर्ण श्रीरामु ॥ १३६ ॥

सीता शुद्धीची व्युत्पत्ति । शुद्ध ब्रह्म रघुपती । वानरां जाली पूर्ण प्राप्ती । सुख संचितीं श्रीरामें ॥ १३७ ॥

श्रीरामाच्या निज संगती । वानरां पूर्ण ब्रह्मप्राप्ती । बाप सत्संगाची ख्याती । नींद्य ते होती अति वंद्य ॥ [ओवी १२१, १३३ व १३८ तं. प्रतीत नाहीत.]

एका जनार्दना शरण । श्रीरामु कारणा कारण । [कं. 'रामायणें ब्रह्मपूर्ण'; तु. दै. 'श्रीरामें रम्य रामायण'.] राम रम्य ब्रह्म परिपूर्ण । नाम स्मरण तारक ॥ १३९ ॥

नामें अहिल्या उद्धरण । नामें गणिका अतिपावन । नामें भुक्तिमुक्ति पूर्ण । श्रीराम पूर्ण परब्रह्म ॥ १४० ॥ [ओवी १४० कं. प्रतीत नाही.]

श्रीराम सगुण दिसे पाही । परि तो देहींच विदेही ।
दीनोद्धारा लागीं पाही । वना निज पायीं स्वयें आला ॥ १४१ ॥

जो देवा दुर्लभु नमस्कारा । जो नाकळें वेद शास्त्रां । तो सखा जाला वानरां । [कं. तं. मु. 'रामे वनचरां उद्धारू'.] श्रीराम चराचरां आधारू ॥

एका जनार्दना शरण । श्रीरामें दीनोद्धरण । नामें तरती दीन जन । नाम छेदन भवपाशा ॥ १४३ ॥

श्रीराम नामा परतें । आन साधन नाहीं सरते । एका शरण श्रोतयातें । राम कथेतें अवधारा ॥ १४४ ॥

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां सीताशुद्ध्यर्थवानरप्रेरणं नाम एकादशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग बारावा

## सीता शुद्धयर्थ वानर गमन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

नाना स्थानें [कं. 'दुर्ग'.] स्वर्गवासी । तेथ शोधावया सीतेसी । सुग्रीवें सांगोनी तारुपासी । वेगीं स्वर्गासी धाडिला ॥ १ ॥

पूर्व पश्चिम उत्तर । स्वर्ग पाताळा धाडिले वीर । दक्षिण दिशेचा विचार । सांगो कपीश्वर विसरला ॥ २ ॥

ऐसे न म्हणावें श्रोतीं । दक्षिण दिशेचिये गति । आहे सीतेची निजप्राप्ती । गोड घांसार्थी [पै. 'ऐकावे'.] राखिली ॥ ३ ॥

गोड घास रामायणांतु । तो हा सीता शुद्धीचा ग्रंथु । ख्याति करील हनुमंतु । लंके आंतु तें ऐका ॥ ४ ॥

दक्षिण दिशेचा विचार । सीता प्राप्तीचें मुख्य घर । तेथें धाडिला महाशूर । वीर दिनकर प्रतापी ॥ ५ ॥

> पितामहसुतं वीरं जांबवंतं महाबलम् । नीलमग्निसुतं चैव विजयं गंधमादनम् ॥ १ ॥
> गजं गवाक्षं शरभं मैंदं द्विविदमेव च । अंगदं प्रमुखान्वीरान्कपीन्कपिवरेश्वरः ॥ २ ॥
> विधाय हरिवीराणामादेशं दक्षिणां दिशम् ॥ ३ ॥

ब्रह्मयाचा निजसुतु । जो रीस यातीचा निजनाथु । महाबळी जांबुवंतु । दक्षिण शुद्धयर्थु नेमिला ॥ ६ ॥

नीळ सेनानी [पै. 'वायु'.] अग्निअवतार । [मु. 'विश्वकर्म्याचा अवतार'.] नळवीर अग्नीचा कुमर । गज गवाक्ष शरभ वीर । वानरभार दक्षिणे ॥ ७ ॥

मैंद आणि द्विविद । दोघे वीर अति अगाध । त्यामाजीं युवराजा अंगद । सेना सबंध त्या अधीन ॥ ८ ॥

अंगदराजा महावीर । सवें सेनानी श्रेष्ठ वानर । दक्षिण शोधावया सत्वर । केला भुभुःकार वानरीं ॥ ९ ॥

पूर्व पश्चिम उत्तर । शोधु निघाले वानर । तिहीं केला भुभुःकार । नादें अंबर दुमदुमिलें ॥ १० ॥

नाद कोंदला उद्भट । ध्यानीं गजबजिला नीळकंठ । नादें हो पाहे ब्रह्मांड स्फोट । भय दुर्घट कळिकाळां ॥ ११ ॥

जातां देखोनि वानर । हनुमंतासी चिंता थोर । मज नाठवीच सुग्रीव वीर । श्रीरामचंद्र विसरला ॥ १२ ॥

सीता शुद्धीचा कार्यार्थु । जैं मज आजि नव्हे प्राप्तु । तैं माझे व्यर्थ जीवितु । धिक् पुरुषार्थु तैं माझा ॥ १३ ॥

**जातां वानरांचें पाळें । हनुमान** [तु. दै. मु. मुं. 'पिटी'.] **कुटी निज कपाळें । अदृष्टें घातलें ये वेळें । दुःखें लोळे गडबडां ॥ १४ ॥**

**वानर जातां पैं देखोन । हनुमंतासी आलें रुदन । तें जाणोनि रघुनंदन । होय हांसोन बोलता ॥ १५ ॥**

**हनुमंताची तीव्र व्यथा । कळों सरली श्रीरघुनाथा । तो तंव अंतर्यामीं जाणता । होय सांगता सुग्रीवां ॥ १६ ॥**

**सीताशुद्धीचा कार्यार्थु । मुख्य साधक हनुमंतु । त्याच्या आंगीं अति पुरुषार्थु । त्यासी हा** [दै. तु. 'वृत्तांतु'.] **अर्थु सांगावा ॥ १७ ॥**

**ऐसें बोलतां रघुनाथा । सुग्रीवें चरणावरी ठेविला माथा । मीं विसरलों हनुमंता । धन्य जाणता श्रीरामु ॥ १८ ॥**

**ऐसें सांगतां श्रीरघुनाथा । उल्हास सुग्रीवाच्या चित्ता । पाचारोनियां हनुमंता । होय सांगता उल्हासें ॥ १९ ॥**
[ओवी १९ तं. प्रतीत नाही.]

> विशेषतस्तु सुग्रीवो हनुमंतमुवाच ह । स हि तस्मिन्हरिश्रेष्ठः संभावयति विक्रमम् ॥ ४ ॥
> न भूमौ नांतरिक्षे वा नांबरे नामरालये । नाप्सु वा गतिसङ्गं ते पश्यामि हरिपुंगव ॥ ५ ॥

**सुग्रीव म्हणे हनुमंता । सीता शुद्धीच्या कार्यार्था । तुवां निघावें शीघ्रता । श्रीरघुनाथा सुखार्थ ॥ २० ॥**

**तुवां जावोनिया तत्त्वतां । सीताशुद्धि आणिसी आतां । तुझिया** [मु. 'ज्ञान बळाची'.] **बळाची समता । नाहीं सर्वथा तिहीं लोकीं ॥**

**देव दानव मानव दैत्यां । तुझ्या बळाची नाहीं समता । जळ स्थळ खेचरां भूतां । तुजसी समता असेना ॥ २२ ॥**

**यालागीं स्वयें आपण । शीघ्र करावें गमन । हनुमंतें करितां उड्डाण । धरिलें धावोन सुग्रीवें ॥ २३ ॥**

**तूं एकला शीघ्र जासी । सीता शुद्धि घेउनी येसी । हें मानलें आम्हासी । निश्चयेसीं हनुमंता ॥ २४ ॥**

**आंगीकारोनी युवराजासी । त्यासी न्यावें सीता शुद्धीसी । यश द्यावें अंगदासी । हें मीं तुजपासीं** [कं. 'सांगतो'.] **मागतसें ॥**

**ऐकोनि सुग्रीव वचन । हनुमंतें केलें नमन । तूं राजा मी तुज अधीन ।** [तं. कं. पै. खेरीज इतरत्र 'आज्ञा प्रमाण'.] **आज्ञापन मज पूज्य ॥ २६ ॥**

**सुग्रीवें आणूनि अंगदासी । स्वयें दीधला हनुमंतापासी । वंदूनि राया युवराजासी । निघे शुद्धीसी हनमंतु ॥ २७ ॥**

अनुक्रमणिका

**वानर धाडिले शुद्धीसी । निघाले नेमिल्या दिशांसी । चौ दिशांच्या** [मु. 'गति-मानासी'.] **गति गमनासी । सुग्रीव त्यासी सांगतु ॥**

पूर्वां तु दिशमास्थाय विनतः प्लवगोत्तमः । प्रतस्थे हरिशार्दूलो वानरैर्बहुभिर्वृतः ॥ ६ ॥

**वीर शार्दूल सुग्रीव पति । पूर्वे शोधावयाचे अर्थी । साक्षेपे सांगे विनताप्रति । गमन स्थिती ते ऐका ॥ २९ ॥**

**पूव जातां महावीरीं । शुद्धि घ्यावी नानापरी । महाविदेश देशांतरी । गिरीं गव्हरीं ते ऐका ॥ ३० ॥**

**मंदराचळ अरुणाचळ । मुख्य शोधावा कुळाचळ । पूर्व पर्वत सकळीं सकळ । शिखरें शैलें शोधावीं ॥ ३१ ॥**
[ओवी ३१ तं. प्रतीत नाही.]

**अंग वंग कारुष कलिंग । गौड** [तु. 'बंगाल'.] **विदेह पौंड्र भृंग । कामरूप कामाक्ष देश अनेग । समूळ सांग शोधावे ॥ ३२ ॥**

**मंदरगिरीच्या येके भागीं । लोक वसताती पापमार्गी । ऐक त्याचीहि महा मागीं । विकटांगी विक्राळ ॥ ३३ ॥**

**कर्ण प्रावर्ण विकर्ण येक । बर्बर खरमुख घोडमुख । हबसी किरात नर्तनादिक । काळमुख महायवन ॥ ३४ ॥**

**कोळी माळी निषाद** [दै. 'वर्ण'.] **हूण । केश कंबली केशावरण । लोमधारी लोम प्रावर्ण । विक्राळ वदन विकटाक्ष ॥ ३५ ॥**

**ऐसिया पापियामाजीं जाण । असेल महापापी रावण । तेथें शोधावें आपण । सौभाग्य रत्न सीतेसी ॥ ३६ ॥**

**जळवासी जळमाणुसें । आरक्तवर्ण अतिकर्कशें । रुम शाम फिरंग** [तु. खेरीज इतरत्र 'वेषें'.] **देशे । सागर प्रदेश शोधावें ॥ ३७ ॥**

**मधु मर्दिला मुरारी । तें रक्त पडिलें सागरीं । लोह समुद्राचे तीरीं । रत्नागिरी पर्वतु ॥ ३८ ॥**

**तेथ गरुडाची नित्य वस्ती । तेणें गांजूनि लंकापती । सोडवोनी सीतासती । रामार्पणार्थी प्रतिपाळिली ॥ ३९ ॥**

**तेथें जाऊनी आपण । घ्यावें गरुडाचें दर्शन । सीता पुसावी करुनी नमन । नाहीं तरी गमन करावें ॥ ४० ॥**

**त्याचि सागरामाझारीं । गोमंत नाम पर्वत थोरी । उंच येक लक्ष योजनांतरी । वस्ती त्यावरी मंदेहा ॥ ४१ ॥**

**मंदेह राक्षसाची थोरी । असंख्य उपजती सागरीं । सूर्योदयीं सूर्यावरी । शत सहस्र धांवती ॥ ४२ ॥**

अनुक्रमणिका

तें द्विज संध्योदकें करीं । पडोनि निमती सागरीं । सवेंचि उपजती रात्रीं । लक्षांतरीं असंख्य ॥ ४३ ॥

धन्य द्विजांचें अर्घ्य दान । संध्योदकें दुष्टां दलन । सूर्यास करावया गमन । मार्गदान द्विज संध्या ॥ ४४ ॥

यालागीं सूर्याची नित्य गती । आहे ब्राह्मणाच्या हातीं । ब्राह्मण महिमा वानूं किती । भुक्ति मुक्ति चरणतीर्थ ॥

ब्राह्मणाच्या सेवावृत्ति । तेथें तुम्हां होईल गती । सीता शोधावी सावध वृत्ति । श्रीरामभक्ति प्रतापें ॥ ४६ ॥

वालखिल्य तेचिं पर्वतीं । अंगुष्ठ मात्र देहाकृति । वैखानस त्यांसि म्हणति । सामर्थ्य शक्ति अनिवार ॥ ४७ ॥

त्यांच्या अनुवृत्ति आपण । साष्टांगीं करुनि नमन । सीता शोधावी सावधान । नाहीं तरी गमन करावें ॥ ४८ ॥

पूर्वे जगन्नाथ स्थळ । उदारु ब्रह्ममूर्ति मंगळ । तेथील महिमा अति प्रबळ । ऐका सकळ सद्‍भावें ॥ ४९ ॥

ब्रह्म ब्रह्मभावो आणि चिच्छक्ति । मूर्तिमंता तिन्ही मूर्ति ।
कृष्ण बळिभद्र सुभद्रा [मु. ‘पति’.] म्हणती । लोक वंदिती [तं. ‘प्रयाग’.] पर्यावो ॥ ५० ॥

प्रथम शक्तिचें दर्शन । तो नरु होय सभाग्य पूर्ण । प्रथम बळिभद्राचें दर्शन । धर्मपरायण तो होये ॥ ५१ ॥

प्रथम देखिलीया भगवंत मूर्ति । त्यासी सद्य भगवत्प्राप्ती ।
पायां लागती चार्‍ही मुक्ति । भुक्ति मुक्ति त्या आंदणिया ॥ ५२ ॥

तेथें जाऊनिया आपण । करावें त्रिमूर्ति दर्शन । सीता शोधावी सावधान । नाहीं तरी गमन करावें ॥ ५३ ॥

कोणें येकें अवसरीं । स्वभावें कोपला श्रीहरि । तो निक्षेपितां सागरीं । अग्नि समुद्रीं लागला ॥ ५४ ॥

जळचरां परम दुःख । कढों लागलें समुद्रोदक । कृपा उपजोनिया देख । पवन चोख निर्मियला ॥ ५५ ॥

तेणें दाहक दीप्ति काढुनी बाहेरी । त्याचा रचिला कनकगिरी ।
उरला जो कां सागरोदरीं । त्याची थोरी वडवाग्नी ॥ ५६ ॥

वडवानळा भक्षासी देख । बारा गांवें समुद्रोदक । सभवंतें देउनी चोख । ठेविला निष्टंक सागरीं ॥ ५७ ॥

सागरु आपल्या जळसत्ता । विझवूं न शके त्या सर्वथा । सागरां शोषुनी समस्तां । होय भक्षितां प्रळयकाळीं ॥

तेथुनी उडतां महावीरीं । जळती वडवाग्नी भीतरी । वाट न चले पुढारी । शीघ्र वानरीं परतावें ॥ ५९ ॥

अनुक्रमणिका

पश्चिमां तु दिशं धीरः सुषेणः प्लवगैः सह । प्रतस्थे कपिशार्दूलो दिशं वरुणपालिताम् ॥ ७ ॥

**सुग्रीव वीर पंचानन । पाचारूनिया सुषेण । पश्चिम दिशेचें शोधन । सांगे आपण तें ऐका ॥ ६० ॥** [ओवी ६० नंतर तु. प्रतीत खालील श्लोक आहे :––'सौराष्ट्र सिंधु सौवीर महिमेघातृपृथ्विषु । सावरं चैव जायंते मतिरेवा मधुर्मति ॥ ७ ॥']

**सौराष्ट्र सिंधु सौवीर । उखामंडळ द्वारकापुर । त्रिगर्त गांधार काश्मीर । देश समग्र शोधावे ॥ ६१ ॥**

**मही मेधा तप्ती साबरमती । रेवा मधुमती वेदवती । पंचनद प्राची सरस्वती । पृथोदकाप्रति पाहावी सीता ॥**

**कुरुक्षेत्र गयावट । ज्वालामुखी नागरकोट । नेपाळ जयपाळ नीळकंठ । काश्मीर** [तु. 'पीठ'; मु. 'तट'.] **घाट शोधावे ॥ ६३ ॥**

**केतकीखंड शंखनाळ वन । केशरोत्पत्ति सुगंध स्थान । जांगाळादि पिंपळवन । सीता शोधून आणावी ॥ ६४ ॥**

**प्राग्जोतिष नाम नगर । हेममय मनोहर । महादुष्ट वसे नरकासुर । त्यासी नित्य मैत्री रावणेसी ॥ ६५ ॥**

**त्याचेनि बळें रावण तेथ । असेल सीता समवेत । शोधुनी धरावा जित । बांधोनि येथ आणावा ॥ ६६ ॥**

**सागरीं मधुकैटभ स्थान । त्या नांव दशावर्तजाण । तेथें मधु मर्दी मधुसूदन । तें** [मु. कं. दै. 'विजयस्थान'; तं. 'निज'.] **जपस्थान हरीचें ॥ ६७ ॥**

**तेथें पंचजन वधून । शंखु काढिला पांचजन्य । ज्याचेनि नादें त्रिभुवन । कंपायमान सुरासुर ॥ ६८ ॥**

**तेचि समुद्रीं** [दै. तु. 'चंद्रगिरी'.] **चक्रगिरीं । वज्रनाभ वज्रशरीरी । नित्य वसे तयावरी । सुरासुरीं दुर्धर्ष ॥ ६९ ॥**

**त्यातें वधूनी चक्रधर । त्याच्या शरिराचें करवी चक्र । आणि इंद्राकारणें वज्र । निर्मी मयासुर लघुलाघवें ॥**

**ऐसें अति दुर्गम स्थान । रामनामें रिघोनी जाण । शोध घेऊनी सावधान । जीता रावण धरावा ॥ ७१ ॥**

**याही पुढें अस्तुगिरी । सूर्य मावळे सचक्रीं । पुढें मार्गु न चले अंधारीं । शीघ्र वानरीं परतावें ॥ ७२ ॥**

उत्तरां तु दिशं दिव्यां गिरिजालसमावृताम् । वीरः शतबलिर्नाम प्रययौ स पदानुगः ॥ ८ ॥

**उत्तरदिशा गिरिआगळी । शोधूं निघाला शतबळी । सुग्रीव सांगे त्या जवळी । देश समूळीं शोधावे ॥ ७३ ॥**

**मद्रक माथुर शूरसेन । कुरु कैकेय मालव मान । मच्छ पुलिंदादि यवन ।** [तु. 'विशेषें वनें'.] **चीन महाचीन शोधावे ॥ ७४ ॥** [ओवी ७४ तं. व मुं. प्रतींत नाही.]

अनुक्रमणिका

**उत्तर कुरुदेशाचे ठाईं । शीतोष्ण बाधा न बधी पाही । जरा रोग शोक नाही । ते ठायीं नाही तस्कर ॥ ७५ ॥**

**त्या त्या देशामाजीं जाण । सीता समवेत रावण । अवश्य शोधावा आपण । सावधान समस्तीं ॥ ७६ ॥**

**मेरु मांदार सोम हेमाद्रि । भृगुत्तुंग भ्रमरगिरी । क्रौंच कलिंग विधुनगरी । सीता सुंदरी शोधावी ॥ ७७ ॥**

**सुगंध सुरभी पीत पलाक्ष । देवदारु तरु वृक्ष । भूर्जपत्र वल्कल वृक्ष । सीता स्वयमेव शोधावी ॥ ७८ ॥**

**गंगा यमुना सरस्वती । तमसा कौशिकी गोमती । प्रयाग** [पै. कं. मुं. 'तीर्थराजाप्रति'; मु. 'प्रयागतीर्थ महाराज ख्याती'.] **तीर्थराज प्रांतीं । सीता सती शोधावी ॥ ७९ ॥** [ओवी ७९ तु. प्रतीत नाही.]

**मानससरोवराच्या ठायीं । जे जन्मली निज प्रवाही । शरयू तिचें नाम पाही । सीता ते ठायीं शोधावी ॥ ८० ॥**

**नारायणाचें निज मंदीर । बद्रिकाश्रम अति पवित्र । पंचप्रयागादि केदार । सीता सुंदर शोधावी ॥ ८१ ॥**

**कनक गिरीं शिखरीं देख । कृत्तिका गर्भीं स्वामी कार्तिक । शरबिल्वचि वीर्योद्रेक । जन्म षण्मुख पावला ॥**

**ते पर्वतीं अति एकांत । रावण सीता समवेत । शोधुनी पहावा निश्चित । तुम्ही समस्त मिळोनी ॥ ८३ ॥**

**मानससरोवराचा प्रांत । मेरु पाठार अति शोभित । सीता शोधावी तेथ । तुम्ही बळिवंत वानरीं ॥ ८४ ॥**

**तेथुनी पुढें हिमाचल । वाट न चले हिम कल्लोळ । तेथुनी परतावें तात्काळ । हिवें प्रबळ पीडाला ॥ ८५ ॥**

तारांगदाभ्यां सहितः प्लवंगः पवनात्मजः । अगस्तिसेवितामाशां प्रतस्थे हनुमान्कपिः ॥ ९ ॥

**अंगद युवराजा कुमर । नळनीळ जांबुवंत दुर्धर । दक्षिण शोधावया सत्वर । हनुमान वीर चालिला ॥ ८६ ॥**

**दक्षिण शोधावयाचे अर्थीं । सुग्रीव सांगे तयाप्रती । किती पर्वत देश किती । शोधी ती स्थिति अवधारा ॥ ८७ ॥**

**विंध्याद्रि सह्याद्रि मलयाद्रि । मातंगी श्रीशैल अनंतगिरी । व्यंकटाद्रि चंद्रगिरी । सीता महेंद्रीं शोधावी ॥ ८८ ॥**

**नर्मदा तपती गोदावरी । कृष्णा वेण्या मलप्रहारी । पाताळगंगेच्या** [मुं. 'प्रेमपुरी'.] **परिसरी । सीता सुंदरी शोधावी ॥ ८९ ॥** [ओवी ८९ तु. प्रतीत नाही.]

**अहोबळ महोबळ धूत शंकरी । पांडुरंग महाक्षेत्रीं । श्रीवेणुनादीं भीमातीरीं । सीता सुंदरी शोधावी ॥ ९० ॥** [ओवी ९० मु. इं. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

प्रतीचि मैना ताम्रपर्णी । कृतमाला पयस्विनी । उभय कावेरी श्रीरंगस्थानीं । रामपत्नी शोधावी ॥ ९१ ॥

अगस्त्याश्रम कन्याकुमारी । मच्छतीर्थ चिदंबरीं । कर्दळीवन मंगळागौरी । सीता सुंदरी शोधावी ॥ ९२ ॥
[ओवी ९२ कं. दै. प्रतीत नाही.]

कानडें तेलंग त्रिगुळिं तऱ्ही । वैज मल्याळ पंचभर्तारीं । चोलमंडळामाझारीं । सीता सुंदरी शोधावी ॥ ९३ ॥
[ओवी ९३ इं. प्रतीत नाही.]

पांचाळ देश मधुरा मान । अती रमणीय कर्दळीवन । चंद्रहास गुप्तार्जुन । सीता शोधून पाहावी ॥ ९४ ॥

अहोबलाद्रि नृसिंहस्थान । चौकोन मधुरा दारुकाबन । अनंतशयन कुंभकोण । श्रीरंगपटण शोधावें ॥ ९५ ॥

तेथुनि पुढें लंकापूर । राक्षस वसती अतिक्रूर । आडवा दुस्तर सागर । जावों वानर न सकती ॥ ९६ ॥

दक्षिण सीता प्राप्तिस्थान । म्यां सांगितलें स्थूळमान । तुम्ही अवघे बळवाहन । सीता शोधून [मु. 'आणावी'; मुं. 'पाहावें'.] साधावी ॥ ९७ ॥

नळ नीळ प्राज्ञ जांबुवंत । आतुर्बळी वीर हनुमंत । अंगद राजा तुम्हा आंत । सीता शुद्ध्यर्थ [मु. 'साधावया'.] साधावा ॥ ९८ ॥

सीता शुद्धि आणिल्या देख । माझें श्रीरामीं सरतें मुख । तेणें श्रीरामा सुखसंतोष । हें आवश्यक साधावें ॥ ९९ ॥

पालव पसरुनि तुम्हासी । मी मागतों अवघ्यासीं । आणूनि सीतेच्या शुद्धीसी । श्रीरामासी सुखी कीजे ॥ १०० ॥ [ओवी १०० दै. प्रतीत नाही.]

सुखी केलिया श्रीरघुनाथा । परम सुख आम्हा समस्तां । सीता शुद्धि शीघ्र आणितां । वदे वरदार्था सुग्रीव ॥

> यो मां निवृत्तो युष्मांक दृष्टा सीतेति वक्ष्यति । मम तुल्यो भवेन्नित्यं राजसत्तासमन्वितः ॥ १० ॥
> नखिलेन विचेतव्यं यथादिष्टं वनौकसः । अर्धमासं न वस्तव्यं वसन्वध्यो भवेन्मम ॥ ११ ॥
> एवमेतद्विचेतव्यं भवाद्भिर्वानरोत्तमैः । तदुग्रशासनं भर्तुर्विज्ञाय हरिपुंगवाः ॥ १२ ॥

तुम्हां मधून भलता । यथार्थ शुद्धि सांगेल सीता । मज समान राज्यसत्ता । नृपपूज्यता मीं देईन ॥ १०२ ॥

मुकुट कुंडले कटिसूत्र । कंठी पदक विचित्र हार । श्वेत छत्र युग्मचामर । राज्य धर मीं करीन ॥ १०३ ॥

सीता शुद्धि जो सांगता । परम आप्त तो रघुनाथा । भुक्तिमुक्तिचा होय दाता । एकात्मता आलिंगी ॥ १०४ ॥

अनुक्रमणिका

**अंतरी आलिंगी एकात्मता । बाह्य स्थापी देवभक्तता । राज्य वैभवीं नित्य मुक्तता । शुद्धि सांगतां हे प्राप्ति ॥**

**सीता शुद्धीचे यथार्थी । भुक्ति मुक्ति परमगती । संतोषोनि दे रघुपती । येवढी प्राप्ती शुद्धयर्था ॥ १०६ ॥**

**सीताशुद्धीचें यथार्थी । प्राण्या आहे परमप्राप्ती । माझेनि भुक्ति श्रीरामें मुक्ति । जाण निश्चिती समग्रा ॥**

**ऐसें बोलतां सुग्रीवासीं । उल्हासु जाला वानरासी । शुद्धि मर्यादा कैस कैसी । ते आम्हासी सांगावी ॥ १०८ ॥**

**सुग्रीव सांगे हो आपण । म्यां सांगितलें जें जें स्थान । तें तें शोधुनी सावधान । यावें आपण मासांतीं ॥ १०९ ॥**

**जा राहेल मासावरता । त्यासी मी दंडीन तत्वतां । त्याच्या न करी जीवघाता । दंडन वार्ता ते ऐका ॥ ११० ॥**

**श्रीरामभजनीं विलंबन । विषयीं लोलुप्त संपूर्ण । त्याच्या मस्तका मूतें वपन । काळें वदन पैं त्याचें ॥ १११ ॥**

**उपानह माळा पूर्ण । त्याहि वरी रासभारोहण । गोमय सुमनीं वर्षति जन । हें दंडन विलंबियां ॥ ११२ ॥**

**श्रीरामभजनी करितां आळस । ऐसें पावाल सायास । यालागी धरुनी उल्हास । राम कार्यास साधावें ॥ ११३ ॥**

स्वां स्वां दिशमभिप्रेत्य समेताः संप्रतस्थिरे । नंदंतश्चोन्नदंतश्च गर्जंतश्च प्लवंगमाः ॥ १३ ॥
प्रतिज्ञां चक्रिरे वीराः प्लवनामा महौजसः । आनयिष्यामहे सीतामपि मृत्युमुखात् हृताम् ॥ १४ ॥
अहमेको हनिष्यामि रावणं दृप्तमाहवे । ततश्चोन्मथ्य तरसा हरिष्ये जनकात्मजाम् ॥ १५ ॥

**ऐकोनि सुग्रीवाचें वचन । वानरां आंगीं आलें स्फुरण । स्व स्व दिशाप्रति गमन । गिरा गर्जोन निघाले ॥ ११४ ॥**

**वानरीं करितां भुभुःकार । दुमदुमिले चराचर । प्रतिज्ञा बोलती वीर । दशशीर ग्रहणार्थ ॥ ११५ ॥**

**कळिकाळाचें तोंड फाडून । आम्ही जानकी आणूं हिरोन ।**
**रावण बापुडें तें कोण । देखिलीया प्राण घेऊं त्याचा ॥ ११६ ॥**

**येक प्रतिज्ञा बोले पूर्ण । युद्धीं मिनलीयां रावण । जेंवी गजु विभांडी पंचानन । तेवीं दशानन मर्दूं आम्ही ॥ ११७ ॥**

अनुक्रमणिका

येक प्रतिज्ञा बोले वानरू । युद्धीं मिनलीयां दशशिरू । जेंवि उंदीर धरी मांजरू । तेवी दशग्रीव आणीन ॥ ११८ ॥

एकाची प्रतिज्ञा दारूण । जेवीं पारधी बांधे हरिण । तेंवि बांधोनी रावण । येथें [तु. दै. 'हा माझा पण'.] आणीन श्रीरामा ॥ ११९ ॥

जेवीं चिडीमार आपण । चांचूनें चिडी धरी जाण । तेवीं तो देखिलिया रावण । येथें आणीन सीतेसी ॥ १२० ॥ [ओवी १२०, १२२ व १२३ इं. प्रतीत नाहीत.]

जेंवी गळीं घालिजे मासा । तेवीं पुंसी बांधोनि लंकेशां । येथें आणीन राघवेशा । माझा भरवंसा [दै. कं. तु. 'तूं मानीं'.] यथार्थ ॥ १२१ ॥

जेंवी पारधीयांचें श्वान । आणिजे गळां बांधोन । तेवीं आणीन दशानन । सत्यवचन श्रीरामा ॥ १२२ ॥ [ओवी १२०, १२२ व १२३ इं. प्रतीत नाहीत.]

जेंवी हुरडियाचें लोंबट । बळें रगडी कुनबट । तेंवी रावणाचे दाही कंठ । निमटुनी येथ आणीन ॥ १२३ ॥ [ओवी १२०, १२२ व १२३ इं. प्रतीत नाहीत.]

[मु. मधील खालील ओवी हस्तलिखितांतून नाही :—'ऐसी नानापरी प्रतिज्ञा करिती । रावण धरून मारूं म्हणती । हें ऐकोनि श्रीरघुपती । परमचित्ती आनंदु ॥'] ऐकोनि वानरांचें वचन । श्रीराम हांसे खदखदोन । लक्ष्मण हांसे गिरा गर्जोन । बळवाहन वानर ॥ १२४ ॥

वंदूनि श्रीरामाचें चरण । सीताशुद्धी लागी जाण । वानरीं केलें उड्डाण । चालिले गगन व्यापूनी ॥ १२५ ॥

जेविं शलभ आकाशीं । तेवीं वानर चौपासीं । धांविनले देशोदेशीं । सीताशुद्धि साधावया ॥ १२६ ॥

दक्षिण शोधावया सत्वर । अंगद चालिला महावीर । सवें वानर दुर्धर । सपरिवार निघाले ॥ १२७ ॥

हनुमंत विनवी अंगदासी । पुसों चुकलों श्रीरामासी । वेगीं वंदूनिया त्यासी । मी तुजपासीं येईन ॥ १२८ ॥

सीताशुद्धि वानरगमन । देखोनि सुखी रघुनंदन । [पै. 'सौमित्रा'.] सुग्रीवां दिधलें आलिंगन । सुख संपन्न सौमित्र ॥ १२९ ॥

देखोनि वानरांचे गमन । सुखी श्रीराम लक्ष्मण । एका जनार्दना शरण । हनुमंत कथन अवधारा ॥ १३० ॥

एकांता हनुमंत येऊन । पुसेल सीतेचें लक्षण । सीता वस्तीचें महिमान । रघुनंदन सांगेल ॥ १३१ ॥

एका जनार्दनी विनंती । किष्किंधाकांडाच्या अनुवृत्ती ।

अनुक्रमणिका

**हनुमंताची उद्भट ख्याती । सावधान** [मुं. 'वृत्तिअवधारा'. मु. मध्ये पुढील ओवी अधिक आहे :—'हनुमंत चरित्र आहे बहुत । परी मी अल्पमतीनें सांगत । कथा सांगविता श्रीरघुनाथ । परिपूर्ण करिता जनार्दनु ॥ १३३ ॥'] **श्रोतीं परिसावीं ॥ १३२ ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां सीताशुद्ध्यर्थे वानरगमनं नाम द्वादशप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग तेरावा

## सीता स्वरूप वर्णन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

**सीताशुद्धीसी गेले वानर । दक्षिणेसी वालीकुमर । निघालेति सपरिवार । अति सत्वर रामकार्या ॥ १ ॥**

स तारांगदाभ्यां तु प्रस्थितो हनुमान्कपिः । सुग्रीवेण यथोद्दिष्टं तं तु देशं दुरासदम् ॥ १ ॥

**सुग्रीवें आणोनी हनुमंता । हातीं दिधलें तारासुता । सीताशुद्धि रामकार्यार्था । तुझेनी समस्तां विजयत्व ॥ २ ॥**

**अंगदवीर अतिविख्यात । सवें नळनीळ जांबुवंत । वानरवीर असंख्यात । दुर्धर पंथ दक्षिणे ॥ ३ ॥**

**सिद्धि न्यावया रामकार्यार्था । शुद्धि साधावया सीता । मुखरी करूनी हनुमंता । होय धाडिता सुग्रीव ॥ ४ ॥**

**सीताशुद्धि माझिये माथां । सुग्रीवें ठेविली तत्वतां । तेणें उल्हासु हनुमंता । श्रीरामकांता शोधावया ॥ ५ ॥**

**कैसी आहे पां ते सीता । गुण लक्षण स्वरूपता । समूळ पुसों रघुनाथा । वनीं गवसिता ओळखावया ॥ ६ ॥** [ओवी ६ व ७ कं. प्रतीत नाहीत.]

**सद्‌गुरु मुखेवीण सद्भावें । स्वरुपता निश्चयो न करवे । तरी त्या वस्तुप्राप्ति नोहे । व्यर्थ भोवें वनवासी ॥ ७ ॥** [ओवी ६ व ७ कं. प्रतीत नाहीत.]

**स्वरुप निश्चयों न करितां । वानर पाहों गेले सीता । त्यासी न लभे ते** [तु. दै. ‘तत्वता’.] **सर्वथा । येती आतां परतोनी ॥ ८ ॥**

**स्वरुप निश्चयो** [तं. मुं. मु. खेरीज इतरत्र ‘योगावीण’.] **झाल्यावीण । वस्तुप्राप्ति नव्हे जाण । हीन दीन खालती मान । येती परतोनी अवघेहि ॥ ९ ॥**

**वस्तु प्राप्तिवीण देख । परते त्याचें काळें मुख । देव पितर त्यासी विमुख । एकें एक उपहासिती ॥ १० ॥**

**तैसें न करावें आपण । निश्चयो करूनी संपूर्ण । सर्व भूतीं सावधान । सीता चिद्रत्न शोधावें ॥ ११ ॥**

**ऐसें धरूनि मानसीं । हनुमंत पुसे अंगदासी । नमस्कारूनि श्रीरामासी । शीघ्र तुजपासी येईन ॥ १२ ॥**

**सुग्रीवें तुजसवें धाडितां । हरिख वोसंडला चित्तां । पुसो विसरलों रघुनाथा । नमुनी आतां येईन ॥ १३ ॥**

अनुक्रमणिका

ऐकोनि हनुमंताचें वचन । अंगदें घातलें लोटांगण । नमस्कारोनि श्रीरामचरण । शीघ्र आपण येथें यावें ॥ १४ ॥

तुझेनि सुग्रीव सनाथ । तुझेनि पिता वाली निर्मुक्त । तुझेनि आम्हा रघुनाथ । स्वामी [दै. इं. ‘स्वतंत्र’; तं. ‘सत्य’.] सतत जोडला ॥ १५ ॥

तुझेनि श्रीरामदर्शन । तुझेनि वानरा [तु. ‘यशो पावोन’.] भवतारण । तुझेनि आम्ही पशु पावन । तुझें महिमान अगाध ॥ १६ ॥

तूं स्वामी आम्ही दास । तूं माउली आम्ही पोष्य । तू सद्गुरु आम्ही शिष्य । सत्य भाष हे माझी ॥ १७ ॥

ऐसें असोनि तत्वता । सेवकु म्हणविसी हनुमंता । ऐसी तुझी अगाधता । वेदशास्त्रार्थां अगम्य ॥ १८ ॥

ऐकोनि अंगदाचें वचन । नळ नीळ जांबुवंत सुषेण । हनुमंतासी लोटांगण । अवघेजण घालिती ॥ १९ ॥

धन्य अंगदा तुझी वाणी । धन्य अंगदा तुझी जननी । धन्य अंगदा तुझी करणी । वानरसैन्यीं तूं धन्य ॥ २० ॥

ऐसे वानर समस्त । अंगदाचें गुण वर्णित । हनुमंतासी शरणागत । अभिवंदित दोघांतें ॥ २१ ॥

कुमार आणि विनीतता । राजा आणि विवेकता । यथार्थवादी रसाळ वक्ता । तेणे हनुमंता आल्हादु ॥ २२ ॥

चुंबूनि अंगदाचें वदन । हरिखें दिधलें आलिंगन । दोघां सुख समाधान । आनंदघन श्रीराम ॥ २३ ॥

गहन गंभीर हनुमंत । आपुला निज निश्चितार्थ । कळों नेदीच लोकांत । [पै. ‘तेण वदे’.] पुसे गुह्यार्थ श्रीरामा ॥ २४ ॥

ऐसे पुसोनी अंगदासी । हनुमंत आला श्रीरामापासी । बैसोनिया एकांतासी । सीता [पै. कं. मु. ‘त्यापासी’.] स्वरूपासी पुसतु ॥ २५ ॥

गवसतां दक्षिणेसी । सीता भेटल्या आम्हासी । आम्ही ओळखावी कैसी । तिच्या स्वरूपाची मज सांगा ॥ २६ ॥ [ओवी २६ व २७ तु. कं. प्रतींत नाहीत.]

रूप रेखा ठाण मान । गुण गरिमा लक्ष लावण्य । वसति स्थिति गति महिमान । कृपा करून मज सांगा ॥ २७ ॥ [ओवी २६ व २७ तु. कं. प्रतींत नाहीत.]

ऐकोनि हनुमंत वचन । संतोषला रघुनंदन । निज शक्तीचें महिमान । निज लक्षण सांगतु ॥ २८ ॥

ऐके बापा हनुमंता! । पुसों आलासी एकांता । मज तुज नाहीं भिन्नता । यथार्थ सीता सांगेन ॥ २९ ॥

अनुक्रमणिका

माझें स्वरूप चैतन्यघन । सीता चिच्छक्ति संपूर्ण । सीतेसी मज वेगळेपण । अणुप्रमाण असेना ॥ ३० ॥

श्रीराम गोडी सीता साखर । श्रीराम रस सीता [तं. जिव्हार.] नीर । श्रीराम घृत सीता क्षीर । चिद्‍चिन्मात्र राम सीता ॥

मेळवितां द्रव्यांतर । अग्नी भासे सुमनाकार । तेविं सीता चिद्‍चिन्मात्र । दिसे साकार [मु. 'विश्वरूपें'.] स्वरूपें ॥ ३२ ॥

नाबदेचें ['मराठवाड्यातील बोली विशेष'.] नारेळ पूर्ण । कवटें काढी तो करंटा जाण । तेवि सीता सच्चिदानंद घन । माणुसपण तीसीं नाहीं ॥ ३३ ॥

नारेळ सर्वांगे साखर । सीता चैतन्यें साकार । तिचा इंद्रिय व्यापार । चिद्‍चिन्मात्र स्वभावें ॥ ३४ ॥

अर्ध नारी नटेश्वर । दोरूपीं एक शरीर । तेवी सीता रामचंद्र । अभिन्नाकार भिन्नत्वें ॥ ३५ ॥

पुरुष भाव स्वयें लपवी । स्वइच्छा प्रकृतीतें [दै. तं. मु 'नाचवी'.] दावी । प्रकृती भाग जैं लपवी । तैं प्रकटे पदवी पुरुषाची ॥ ३६ ॥

भ्रांति पडळ सोडितां जाण । मिथ्या प्रकृति पुरुष भान । तेवी सीता रघुनंदन । चैतन्यघन स्वरूपें ॥ ३७ ॥

असतां भ्रांति पडळ साचार । तिथेंचि नाहीं निज निर्धार । शोधुनि न पाहाती नर । तोही विचार अवधारी ॥

दोही भागांचा विचार । जेवीं चालवी नटेश्वर । तेवी सीता आणि श्रीरामचंद्र । धरीती अवतार [तं. तु. इं. 'स्वलीळा'.] देवकार्या ॥ ३९ ॥

स्वपदीं स्थापावया सुर नर । भक्ता द्यावया सुख [मु. 'साचार'.] सार । सीता आणि श्रीरामचंद्र । धरीती अवतार स्वलीळा ॥

अवताराच्या स्वलीळा । साकार शोभे जनकबाळा । तिच्या स्वरुपाचा सोहळा । ऐके कुशळा हनुमंता ॥ ४१ ॥

सीतेसी नित्य [जो. खेरीज इतरत्र 'गमना गमन'.] अगम्यागमन । हे मुख्य ओळखावी खूण । सीतेचें अचरण चलन । चरणेवीन गतीं तीसी ॥ ४२ ॥

द्वंद्वेवीन पद द्वंद्व । तेंचि सीतेचें निजपद । जीवशिव पदाचा उच्छेद । तो पदबंध सीतेचा ॥ ४३ ॥

फडा पूंस वाकुडा नाग । तो नाग म्हणतां सोनेचि चांग ।
तेविं गुलफें जानु ऊरू विभाग । सीताचि चांग चिन्मात्र ॥ ४४ ॥

अनुक्रमणिका

सीता गुह्येंद्रीय विचार । तिचें निजगुह्य श्रीरामचंद्र । तेथिल्या रतिसुखाचें सार । असार सार श्रीरामें ॥ ४५ ॥

सीतेचें जें कां निज उदर । मळेंवीण निर्मळता साचार । चैतन्याग्नि वसवी जठर । ते माहेर जीव शिवा ॥ ४६ ॥

सीतेचे जे हृदय भुवन । नित्य वसवी रघुनंदन । हे नित्य हनुमंता ओळखण । सुखसंपन्न श्रीरामें ॥ ४७ ॥

आंगीच्या आंगी वाढोनी दोन्हीं । जीवशिव कुच दोहीं स्थानीं ।
जय जीववी कुचपानी । कुचकामिनी कुचभारें ॥ ४८ ॥

जीव शिव कुच आच्छादूनी । विद्या अविद्या पांखें दोन्ही ।
बांधले त्रिगुणाचे कसणी । श्रीरामा वाचोनि कोण सोडी ॥ ४९ ॥

जीव शिव कुचांचें मर्दन । करितां एक रघुनंदन । येर बापुडें मशक कोण । मरेल रावण अभिलाषी ॥ ५० ॥

श्रीराम नाम निजमणी । गाठ्याळ फिरकी सांडूनी । अनुस्यूत तंतू घेऊनी । अनुसंधानी ओविले ॥ ५१ ॥

सौभाग्य कल्याण श्रेणी । जे अतर्क्य जन नयनी । कंठी श्रीराम आहेव मणी । जो शिरोमणि अळंकारू ॥ ५२ ॥

कंठावरती चुबुका । राम शामें गोंदिली देखा । रावणें पाहतां तिचिया मुखा । शाम शंका तो मानी ॥ ५३ ॥

[मु. 'जाण'.] जन मुखींचे अधर अधर । सीता मुखीचें अधर सधर । आवडी चुंबी श्रीरामचंद्र । तें सुख सार सीतेसी ॥ ५४ ॥

मुक्तपणाच्या विलासा । वनिता अधरी सुवर्ण फांसा । पडोनी मुक्त आलें नाशा । राम परेशा न भजोनी ॥

जानकी नाकीचे निजमोती । सहजीं देखेल रघुपति । अधोमुखीं वोळकंबती । मुक्ता मुक्ति श्रीरामें ॥ ५६ ॥

जगा मुखीचें नासिक । श्लेष्मागमें पावे दुःख । जानकी मुखीं नाकांबिक । चढले देख श्रीरामें ॥ ५७ ॥

जानकीचे निजनयन । देखणेपणे सुनयन । तेणें देखणेपणे जाण । राम परिपूर्ण ते देखे ॥ ५८ ॥

जानकीचे देखणे नेत्र । सांडूनिया क्षराक्षर । भूत मात्रीं देखें अक्षर । चिद्चिन्मात्र श्रीराम ॥ ५९ ॥

सीतेचे निज श्रवण । [मु. दे. तं. 'सावधान, समसमान'.] सावधानें समाधान । वचना अक्षरें रघुनंदन । समाधान श्रवणार्थे ॥ ६० ॥

धन्य सीतेचे कपाळ । श्रीराम नमनें नित्य सफळ । प्रेम कुंकुम सोज्वळ । सुख कल्लोळ श्रीरामे ॥ ६१ ॥

सीता हस्तक्रिया समस्त । कर्ता देखे श्रीरघुनाथ । श्रीराम हाताचें निज हात । कर्म निर्मुक्त श्रीरामें ॥ ६२ ॥ [ओवी ६२, ६८ व ७४ कं. प्रतीत नाहीत.]

सीता सतीच्या निजशिरीं । राम शिरोमणी शिरावरी । चिद्रत्नाच्या अळंकारी । फरा त्यावरी शोभतु ॥

गाळूनिया परम पीयूष । [मु. 'सोलीव'.] शोधीत सुखाचेहि सुख । तेणे वोतीव श्रीमुख । अलौकिक रामप्रिया ॥ ६४ ॥

जानकीचें मनसुमन । श्रीरामध्यानें तें परिपूर्ण । मनींत मनचि निर्मन । [मु. 'सावधान'.] समाधान श्रीरामें ॥ ६५ ॥

सीता चिंती रामचिंतन । तेणें चित्त चिंत्ता विहीन । चित्तीं चित्तचि चैतन्यघन । समाधान श्रीरामे ॥ ६६ ॥

जानकी देहीचा अभिमान । अहं सोहं कोहं विहीन । करितां श्रीराम स्मरण । अहं परिपूर्ण परब्रह्म ॥ ६७ ॥

समुद्रीं विरोनी लवण । स्वयें होय समुद्र पूर्ण । तेंवी सीतेचा अभिमान । होय परिपूर्ण परब्रह्म ॥ ६८ ॥ [ओवी ६२, ६८ व ७४ कं. प्रतीत नाहीत.]

सीता देहींची निजबुद्धि । नाहीं प्रपंच परत्र आधि । नाहीं जन्म मरण व्याधि । नित्य समाधी श्रीरामें ॥ ६९ ॥

जानकीच्या निज देहीं । देहा देहत्वचि नाहीं । देहीं वर्ततां विदेहीं । हे खूण पाही [मु. 'नित्यत्वें'.] मुख्यत्वें ॥ ७० ॥

ऐसें सीतेचें लक्षण । ऐक आतां तिचें गुण । गुणागुणी नित्य अगुण । स्वयें सगुण दिसतांहि ॥ ७१ ॥

जानकीचें पहातां [तु. 'वदन'.] ठाण । सर्वांसी दिसें साधारण । परि तिसीं ठेंगणे गगन । स्वरूपें सामान्य दिसतांहि ॥ ७२ ॥

सीतेचें निज महिमान । वेदशास्त्रां अगम्य जाण । सांगों जाता ठाणमान । पडे मौन चहुंवाचा ॥ ७३ ॥

सीता रूपरेखा गुण लक्षण । सांगितलें ठाण मान । [तं. अंतरस्थिति गति'.] आतां स्थितीचें महिमान । सावधान अवधारीं ॥ ७४ ॥ [ओवी ६२, ६८ व ७४ कं. प्रतीत नाहीत.]

सीतेची जेथें वस्ती घडे । तेथें रामनाम स्मरतीं झाडें । पशुपक्षियां स्मरण जोडे । पाषाण खडे राम स्मरती ॥

जानकी स्पर्शाचें जीवन । नित्य स्मरे रघुनंदन । जानकी जीवनीं जे निमग्न । त्यां समाधान श्रीरामें ॥ ७६ ॥

सीता वस्तीची निज धरा । नित्य स्मरे त्या श्रीरामचंद्रा ।

अनुक्रमणिका

सीता आंग स्पर्शाचा वारा । श्रीराघवेंद्रा स्मरणेसीं ॥ ७७ ॥

सीता स्वरूप वृत्तांतु । आदरें सांगतां रघुनाथु । तें ऐकोनि हनुमंतु । पडे मूर्छितु स्वानंदें ॥ ७८ ॥

सप्रेम प्रेमें प्रेम युक्त । मूर्च्छित पडे हनुमंत । कृपेनें [पै. मु. 'कवळिला'.] कळवळीला रघुनाथ । हृदया आंत आलिंगी ॥ ७९ ॥

देतां हनुमंता आलिंगन । श्रीरामा नाठवे रामपण ।
मारुतीसी नाठवे वानरपण । ब्रह्म परिपूर्ण स्वयें जाले ॥ ८० ॥

विरोनी गेलें मीतूंपण । खुंटला बोल तुटलें मौन । दोघे जाले चैतन्यघन । वस्तु परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ८१ ॥

जीचें स्वरूप सांगतां । धणी न पुरे रघुनाथा । धन्य धन्य श्रीराम कांता । तेणे हनुमंता उल्हासु ॥ ८२ ॥

तुम्ही सीताशुद्धी करितां । या खुणा पहाव्या हनुमंता । ऐसें श्रीरामें सांगतां । मारुती चित्ता उल्हासु ॥ ८३ ॥

हनुमंत म्हणे रघुनाथा । येहीं लक्षणीं लक्षितां । मी जाणेन जनकदुहिता । परि सीता सर्वथा मज नेणें ॥ ८४ ॥

पूर्वीं मज नाहीं देखिलें । पूर्वीं मज नाहीं ऐकिलें । अकस्मात रामें धाडिलें । सत्यत्व बोले मानीना ॥ ८५ ॥

श्रीरामाच्या गोड गोष्टी । शुद्धि [दै. 'सांगें तों'.] सांगतो गोमटी । परी हा वानरू कपटी । विश्वास पोटी मानीना ॥ ८६ ॥

ऐसाचि रावण कपटी । संन्यास वेषें घेऊनी भेटी । मज सिंतरिले भिक्षेसाठीं । त्याच परिपाठी वानरू हा ॥

जेथें विश्वासु नाहीं पोटीं । तेथें झाली ते व्यर्थ भेटी । भावार्थाच्या गुह्य गोष्टी । सीता गोरटी सांगेना ॥ ८८ ॥

नाहीं भेटी नाहीं गोष्टी । दुरुनि सीता देखिली दृष्टी । ऐसिया शुद्धीचे परिपाठीं । तृणासाठीं सरेना ॥ ८९ ॥

सीता [मु. 'सुकुमार जनक बाळ'.] मनोगत सकळ । सीता रक्षितें कवण स्थळ । रावणाचें कितीबळ । तें मी समूळ [कं. 'तुकीन'.] शोधीन ॥ ९० ॥

ऐसें मनोगत रघुनाथा । जेणे मज आप्त मानी सीता । तैसिया देखांवे कार्यार्था । चरणीं माथा ठेविला ॥ ९१ ॥

ऐसें बोलतां हनुमंता । परम सुख श्रीरघुनाथा । [तु. 'करमुद्रा'.] निजात्म मुद्रा होय देतां । [दै. 'विश्वासार्थ सीतेच्या'.] ठेऊनी माथा वरद हस्तु ॥ ९२ ॥

ददौ तस्मै ततः प्रीतस्वनामांकोपशोभितम् । अंगुलीयमभिज्ञानं राजपुत्र्याः परंतपः ॥ २ ॥
एतद्दृष्ट्वा हरिश्रेष्ठो दर्शने जनकात्मजा । मस्यंते रामभक्तं त्वां प्रेणितं राघवेण हि ॥ ३ ॥

**मुद्रिका देखिलियां दृष्टी । सीता तुज न मनीं कपटीं । म्यां धाडिलासी शुद्धी साठीं । सत्य गोष्टी** [नि. तं. मुं. 'गोरटी'.] **मानील ॥ ९३ ॥**

**श्रीराम नामांकित मुद्रा । ते देखतांचि सीता सुंदरा । आप्त मानील कपींद्रा । श्रीरामचंद्राचेनि धर्में ॥ ९४ ॥**

**मुद्रा देखोनि नामांकित । जीवाहूनिया अति आप्त । सीता मानील हनुमंत । रामकार्यार्थ साधेल ॥ ९५ ॥**

**अधींच वानर बळिवंत । वरी मस्तकीं श्रीराम हस्त । श्रीराम मुद्रा जाली प्राप्त । उल्हासीत हनुमंत ॥ ९६ ॥**

**घेईन त्रिभुवन घरधांडोळी । शोधूनिया जनकबाळी । करीन राक्षसां रवंदळी । हरिखें टाळी पिटीतु ॥ ९७ ॥**

**श्रीराममुद्रा आली हातां । लंका जाळीन मी आतां । कितीबळ लंकानाथा । तेहि सर्वथा तुकीन ॥ ९८ ॥**

**इंद्रजीत बळी निशाचरीं । त्यासी घेईन झुंजारी । रावणा करूनि पोतमारी । करीन बोहरी राक्षसां ॥ ९९ ॥**

**येणें हरिखें हनुमंतु । जोहारुनि श्रीरघुनाथु । वेगीं उडाला गगना आंतु । रामकार्यार्थु साधावया ॥ १०० ॥**

**श्रीराम मुद्रा घालिता हातीं । उडतां गळोन पडेल क्षिती ।**
**वस्त्रनाहीं त्या मारुती । पालवा प्रती बांधावया ॥ १०१ ॥**

**गांठी घालितो गाळ्याळ ।** [दै. 'रुप विटंबितो'.] **विकल्प मानितो जट्याळ । आळसु करी तो खट्याळ । आचांडाळ नाठवीतो ॥**

**नाम नावडे जयासी । तो जाणा पापराशी । सकळ दोष तयापासीं । क्षयो त्यापासी आकल्प ॥ १०३ ॥**

**नाम न मने जयासी ।** [तु. दै. 'अनर्थवादु'.] **अर्थवादू म्हणे नामासी । जितांचि प्रेतत्व त्यासी । नये त्यासी आतळों ॥ १०४ ॥**

**धन्य युक्ति त्या कपींद्रा । हातां येतां श्रीराममुद्रा । मुखीं घालूनि वानरां । केला थारा निज हृदयीं ॥**

**वानरांचें ठेवणें । गालफडां भरावें चणें । हनुमंतेहि तेचि करणें । मुखीं घालणें श्रीराममुद्रा ॥ १०६ ॥**

**जिव्हें पासूनि हृदय भुवन । राम** [दै. तु. 'नामासी'.] **मुद्रेसी सांठवण । हनुमंतें करुनि जाण । केलें उड्डाण रामकार्या ॥ १०७ ॥**

**नळ नीळ जांबुवंत युक्त । जेथें अंगद वाट पहात । तेथें आला हनुमंत । सीताशुद्धयर्थ साधावया ॥ १०८ ॥**

आला देखोनि हनुमंत । अंगद जाला हर्षयुक्त । वानरा उल्हास अद्भुत । दक्षिण पंथ शोधावया ॥ १०९ ॥

एका जनार्दना शरण । शोधावया [तं. ‘द्वीपांतर’.] दिशा दक्षिण । वानरवीरां उल्हास पूर्ण । तेहीं निरोपण अवधारा ॥ ११० ॥

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां [कं. ‘हनुमंत श्रीराम एकांत निश्चयोन्नाम नि श्रीराम हनुमत्संवादोनाम’.] सीतास्वरुपवर्णनं नाम त्रयोदशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग चौदावा

## वानर बिल प्रवेश

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

**पूर्व पश्चिम वायव्य ईशान्य । उत्तर नैऋत्य आग्नेय कोण । पाताळादि स्वर्गभुवन । आले शोधून वानर ॥ १ ॥**

> तदहः प्रथमं कृत्वा मासे प्रस्रवणं गताः । कपिराजेन संगम्य निराशाः कपिकुंजराः ॥ १ ॥
> समेत्यमासे संपूर्णे सुग्रीवमुपचक्रमेः । तं प्रस्रवणमुपतिष्ठतमभिगम्याभिवाद्य च ॥ २ ॥
> सुग्रीवं प्लवगाः सर्वे सुषेणप्रमुखाः क्रमात् ।

[पै. तु. 'राम'.] **राया सुग्रीवाचें आज्ञापन । मासें येकें गा संपूर्ण । अवघी यावें सीता शोधून । न ये त्या** [दै. 'जाण'; कं. 'संपूर्ण'.] **दारुण राजदंड ॥ २ ॥**

**प्रस्रवण गिरीवर । जेथें वसे श्रीरामचंद्र । तयापासीं सुग्रीव वीर । नित्य तत्पर सेवेसी ॥ ३ ॥**

**श्रीराम पुसे सुग्रीवासी । वानर गेले देशोदेशीं । कोण्ही नाहीं आला शुद्धीसी । विलंबु त्यांसी कां जाला ॥ ४ ॥**

**ऐसा करिती जंव विचारु । सुग्रीव राजाज्ञा दुर्धरु । तेणें भेणें वानर वीरु । आले समग्रु मासांती ॥ ५ ॥**

**शुद्धि न लभेचि साचार । अति सलज्ज वानर वीर । न येती श्रीरामासमोर । करिती जोहार सुग्रीवां ॥ ६ ॥**

**प्रतिज्ञा करुनि केलें गमन । शेखीं आले शुद्धीवीन । लाजेनें न बोलवें वचन । अधोवदन तटस्थ ॥ ७ ॥**

**तटस्थ देखोनि वानर । वाली सुग्रीवांचा श्वशुर । पुढें होऊनी सुषेण वीर । सांगे विचार शुद्धीचा ॥ ८ ॥**

> विचिताः पर्वताः सर्वे वनानि नगराणि च । गुहाश्च विविधाः सर्वा विवराः परिकीर्तिताः ॥ ३ ॥
> निम्नगाः सागरांताश्च सर्वे जनपदास्तथा । सत्वान्यतिप्रवृद्धानि त्रासितान्याहतानि च ॥ ४ ॥
> राक्षसान्मन्यमानाश्च तत्र तत्र प्लवंगमाः । ये चैव गर्हणा देशा विचितास्ते पुनः पुनः ॥ ५ ॥
> प्रवृत्तिं चैव वैदेह्या नानुविंदामहे प्रभो ॥ ६ ॥

**क्षीरसमुद्र क्षारसमुद्र । दधिसमुद्र घृतसमुद्र । सहावा तो इक्षुसमुद्र । सुरासमुद्र सातवां ॥ ९ ॥**

**शाल्मलीद्वीप शाकद्वीप । क्रौंचद्वीप कुशद्वीप । पुष्करद्वीप प्लक्षद्वीप । जंबुद्वीप सातवें ॥ १० ॥**

**अयोध्या मथुरा माया जे** [तु. 'देखा'.] **कां । काशी कांची अवंतिका । बळीचेनि द्वारें आलों देखा । ते द्वारका सातवी ॥ ११ ॥**

अनुक्रमणिका

दंडकारण्य खंडारण्य । चंपकारण्य वेदारण्य । निमिषारण्य ब्रह्मारण्य । धर्मारण्य सातवें ॥ १२ ॥

सरें सरिता गुहा गव्हर । खेटक खर्वट ग्राम नगर । जन विजन गिरि कंदर । विवरें विवर शोधिलें ॥ १३ ॥

निंद्य देश निंद्य स्थान । दुर्धर राक्षसांचे वन । तेथ तेथ प्रवेशोन । केलें शोधन सीतेचें ॥ १४ ॥ [ओव्या १४, १५ व १६ तं. व मुं. प्रतींत नाहीत.]

आळस सांडूनी वानर । आतुर्बळी महावीर । भूगोळ शोधिला समग्र । सीता सुंदर शुद्धयर्थ ॥ १५ ॥ [ओव्या १४, १५ व १६ तं. व मुं. प्रतींत नाहीत.]

सप्तद्वीपें सप्तसागर । सप्तपुरी [मु. 'शिखर'.] सप्तउखर । सप्तारण्यें सप्तकंधर । सीता सुंदर शोधिली ॥ १६ ॥ [ओव्या १४, १५ व १६ तं. व मुं. प्रतींत नाहीत.]

जळ स्थळ आणि निराळ । शोधून पाहतां जनकबाळ । शुद्धि न लभेचि अळुमाळ । आलों सकळ मासांतीं ॥ १७ ॥

राजाज्ञा अति दुर्धर । समयीं न येतां विटंबु थोर । तेणें भेणें आम्ही समग्र । आलों सत्वर मासांतीं ॥ १८ ॥

सलज्ज लज्ञा वानर पंक्ति । श्रीरामा सन्मुख न येती । काय मुख दाखऊं तया प्रती । सीता सती नुमगेचि ॥ [ओवी १९ कं. प्रतीत नाही.]

श्रीराम आम्हां पुसेल सीता । आम्ही काय सांगावी वार्ता ।
आम्हां वानरां समस्तां । बैसली माथां [कं. खेरीज इतरत्र 'महालाज'.] अपकीर्ति ॥ २० ॥

वानरवीरांचें मनोगत । श्रीरामें जाणोनी समस्त । त्यासीं स्वयें आश्वासित । युक्ता युक्त विभागें ॥ २१ ॥

तुम्हासी दिशा नेमिल्या आम्ही । सीता नाही तये भूमी । कैंची शुद्धि आणाल तुम्ही । अति आक्रमीं शोधूनी ॥

सीता नाहीं तेथ तेथ । हें वचन सत्य सत्य । सत्यास मानी जो असत्य । रासभ मत तयापासी ॥ २३ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । वानरीं मस्तकीं धरिलें चरण । रामें दिधलें आलिंगन । समाधान वानरां ॥ २४ ॥

साधावया श्रीरामकाज । वानरीं सांडूनियां लाज । करावया रावणेसी झुंज । नाचती भोज स्वानंदें ॥ २५ ॥

समयो लोटला साचार । न येतीच दक्षिणेचे वीर । ते शुद्धि आणिती साचार । श्रीरामचंद्र अनुवादें ॥ २६ ॥

येरी कडे दक्षिणेसी । वानरवीर पराक्रमेसी । सीता शुद्धि करिती कैसी । [तु. 'सावधानेसी'.] सावकाशीं अवधारा ॥ २७ ॥ [ओवी २७ मु. प्रतीत नाही.]

सह तारांगदाभ्यां तु प्रस्थितो हनुमान्कपिः । स तद्वनमुपागम्य सह तैर्हरिभिर्हरिः ॥ ७ ॥

अनुक्रमणिका

**श्रीराममुद्रा जालियां प्राप्त । वेगीं निघाला हनुमंत । नळ नीळादि जांबुवंत । वाट पाहात** [मु. 'तिष्ठती'.] **अंगदु ॥ २८ ॥**

**तेथ येऊनियां हनुमंत । दक्षिण दिशा शोधनार्थ । अंगद अति उल्हासत । कपि समवेत निघाला ॥ २९ ॥**

**गुहा गहन गव्हरें । शैलं कक्षा वनकुहरें । विवरें उखरें शिखरें । गिरी कंदरें शोधित ॥ ३० ॥**

**खाती नानाविध फळें । सेविती सरितांचीं निर्मळ जळें ।** [पै. 'विधीनें'.] **विपिनें शोधिती जंगलें । निजबळें वानर ॥ ३१ ॥**

**वानर वीर अति उद्भट । अटवी शोधितां अति विकट । पुढें वोढवले दुर्घट । अति संकट तें ऐका ॥ ३२ ॥**

> यत्रैव निष्फलावृक्षा निष्पत्रा पुष्पवर्जिताः । निस्तोयाः सरितो यत्र मधु मूलं सुदुर्लभम् ॥ ८ ॥
> दंडी नाम महाभागो सत्यवादी तपोधनः । तस्य तस्मिन्वने पुत्रो बालको दश वार्षिकः ॥ ९ ॥
> प्रनष्टो जीवितो यत्र क्रुद्धस्तत्र महामुनिः । तेन वै मुनिना शप्तं कृत्स्नं तेन महद्वनम् ॥ १० ॥

**पुढें वन अति विक्राळ ।** [मु. 'तेथ नाहीं नांवासी जळ'.] **वृक्ष खांकरले सकळ । नाहीं पत्र पुष्प फळ मूळ । शुष्क जळ सरितांचें ॥ ३३ ॥**

**वनीं नाहीं मुंगी मासी । नाहीं पशु पक्षी कीटकासी । सूर्य तपे** [मु. 'निजदाघेसी'.] **निदाघतेसी । तेणें कासावीसी वानर ॥ ३४ ॥**

**नाहीं फळमूळ भक्षावयासी । पाला न मिळें खावयासी । जल न मिळे प्राशनासी । कासावीसी वानर ॥ ३५ ॥**
[ओवी ३५ कं. मुं. व तं. प्रतींत नाही.]

**त्यजावया तें दुष्ट स्थान । वानर करिती उड्डाण । उडी पडे तेथें तें वन ।** [मुं. 'फळ जीवन असेना'.] **निर्गमन दिसेना ॥ ३६ ॥**

**निर्गमु न पुरे बाहेरी । क्षुधा तळमळिजे वानरीं । जळेंवीण येती लहरी । उष्णें करी तगमगिती ॥ ३७ ॥** [ओव्या ३७, ३८ व ३९ तु. प्रतीत नाहीत.]

**ऐसें वानरां परम कष्ट । ओढवलें दुःख दुर्घट । बाहेरी जावया न फुटे वाट । प्राणसंकट मांडलें ॥ ३८ ॥**
[ओव्या ३७, ३८ व ३९ तु. प्रतीत नाहीत.]

**आतां कायिसी सीताशुद्धि । आम्हासी आली जीवित्वावधि ।**
**येथें निर्गम न दिसें बुद्धि । आम्ही त्रिशुद्धी निमालों ॥ ३९ ॥** [ओव्या ३७, ३८ व ३९ तु. प्रतीत नाहीत.]

**ये वनीं रिघतां यावें मरण । ऐसा ऋषिशाप दारुण । वानरां नित्य नामस्मरण । तेणें प्राण वांचले ॥ ४० ॥**

अनुक्रमणिका

श्रीराम भक्ताचा साहाकारी । नामें दैन्य दुःख निवारी । शापदग्ध वनांतरीं । नामोच्चारीं वांचले ॥ ४१ ॥
[ओवी ४१ मुं. प्रतीत नाही.]

त्या वनाचें समूळ वृत्त । वानरां सांगे हनुमंत । दंड ऋषीनें वन हे शप्त । निर्गमु येथ असेना ॥ ४२ ॥

ऐसा शाप अति दारुण । द्यावयासी काय कारण । त्या शापाचें मूळ लक्षण । सांगे आपण हनुमंतु ॥ ४३ ॥

दंड ऋषीचा निजसुत । दश वार्षिक प्रज्ञावंत । वनदेवतीं करूनि घात । मांस समस्त भक्षिलें ॥ ४४ ॥

त्याचिया अस्थिचर्म जाण । पशु पक्षीं केलें भक्षण । ऋषीनें जाणोनिया ज्ञान । शाप दारुण दीधला ॥ ४५ ॥

दुर्धर शापे जाणा येथ । हें वन जालें असें उपहत । जो जो प्राणी ये वनांत । त्यासी प्राणांत ऋषिशापें ॥ ४६ ॥ [ओवी ४६ नि. प्रती खेरीज व ओवी ४७ पै. प्रती खेरीज इतरत्र नाहीत.]

विद्यासंपन्न ऋषीसुतु । वेद शास्त्रार्थें अति उन्मत्तु । वादीं ब्राह्मणां निर्भर्त्सितु या लागीं घातु भूतीं केला ॥
[ओवी ४६ नि. प्रती खेरीज व ओवी ४७ पै. प्रती खेरीज इतरत्र नाहीत.]

जो वादी ब्राह्मणा देत त्रास । तो जातीचा ब्रह्मराक्षस ।
त्याचा देह तो भूत-ग्रास । या लागीं नाश भूतीं केला ॥ ४८ ॥

ऐकतां हनुमंताची मातु । वानरां जाला अति आकांतु । सवेंचि दुसरा अनर्थु । त्या वनांतु ओढवला ॥ ४९ ॥

त्या ऋषि निजसुतु । ब्रह्मराक्षसत्व त्यासी प्राप्तु । तो राहोनी त्या वनांतु । स्वयें भक्षितु प्राणिमात्र ॥ ५० ॥

> ददृशुः सुमहाकायमसुरं भीमविक्रमम् । सहितान्वानरान्सर्वान् तिष्ठ तिष्ठेति चाब्रवीत् ॥ ११ ॥
> तमापततं सहसा वालिपुत्रोंगदस्तदा । रावणोयमितिज्ञात्वा तलेनाभिजघानह ॥ १२ ॥
> स वालिपुत्रोभिहतो मुखाच्छोणितमुद्वहन् । असुरोऽप्यपतद्भूमौ पर्यस्त इव पर्वतः ॥ १३ ॥

विकळ देखोनी वानर । स्वयें भक्षावया समग्र । वेगीं धाविन्नला [इं. 'शीघ्र'.] निशाचर । गिरा गंभीर गर्जोनी ॥ ५१ ॥

अग्निकुंडें जेंवि [तु. नि. 'सोज्वळें'.] जाज्वळें । तैसें आरक्त दोन्ही डोळे । वानर गिळावया सगळे । धांवे आवाळे चाटितु ॥ ५२ ॥

येतां देखोनि राक्षसांसी । वानर चालिले युद्धासी । अंगदें उडोनी [दै. मुं. तं. तु. 'आकाशीं'.] आवेशीं । तळ हातेसीं ठोकिला ॥ ५३ ॥

अंगदु म्हणे पैं आपण । हा राक्षस होय रावण । बळें हाणोनी चडकन । घायें प्राण घेतला ॥ ५४ ॥

घावो हाणितां निष्ठुर । नाकीं तोंडीं वमुनी रुधिर । अचेतन पर्वताकार । निशाचर पाडिला ॥ ५५ ॥

अनुक्रमणिका

**श्रीराम भक्तांच्या हातीं । ब्रह्मराक्षसा जाली मुक्ति । ऋषि सुखावोनी चित्तीं । शापोन्मुक्ति** [तु. दै. 'वानरां'.] **वना केली ॥ ५६ ॥**

**वानरांचे वनप्रवेशन । तंव शापमुक्त जाले वन । जेथे जेथे जाती भक्तजन । तें तें स्थान अति मुक्त ॥ ५७ ॥**

**रणीं पाडिला निशाचर । अंगद विजयी राजकुमर । वनीं न मिळे आहार नीर । तेणें वानर तळमळिती ॥ ५८ ॥**

**सुग्रीवें सांगीतलें ज्या रीतीं ।** [मु. 'निबरें'.] **विवरें उखरें विपिनें क्षिती । सीता शोधिती शतावर्ती । नाना पर्वतीं सायासें ॥ ५९ ॥**

**सीता शुद्धीची निज कथा । लागुमागु न लगे वार्ता । काय करावें आम्ही आतां । चिंता समस्तां वानरां ॥ ६० ॥**

> गजो गवाक्षो गवयो शरभो गंधमादनः । मैदश्च द्विविदश्चैव हनुमान्जांववान्नलः ॥ १४ ॥
> अंगदो युवराजश्च नीलश्च वनगोचरः । भुभुक्षिताः परिश्रांता स्तृषिताः सलिलार्थिनः ॥ १५ ॥

**गज गवाक्ष गवय** [तु. 'अद्धुत'.] **युक्त । शरभ गंधमादन विख्यात । मैंद द्विविद जांबवंत । वीर हनुमंत नळ नीळ ॥ ६१ ॥**

**अंगद युवराजा आपण । क्षुधेने जावों पाहे प्राण । तृषा फुटे अंतःकरण । आलें मरण वानरां ॥ ६२ ॥**

**वानर वीर अति विख्यात । पाला न मिळे आहारार्थ । मुखासी खरस येत । मग प्रार्थित हनुमंता ॥ ६३ ॥**

**अवघे म्हणती हनुमंता । आम्ही शरण आलों आतां । शरणागतां आम्हां समस्तां । प्राणदाता तूं होई ॥ ६४ ॥**

**आमचा वांचवावया प्राण । तुझे आंगी सामर्थ्य गहन । तुज देवांचें वरदान । जीवा जीवन देई आम्हां ॥ ६५ ॥**

**वानर वीर ऐसियारीती । पीडले येती काकुलती । त्यासी वांचवावयाचे अर्थी । वन मारुती निरीक्षी ॥ ६६ ॥**

> ततः पर्वतसंकाशो हनुमान्वानरर्षभः । अवलोक्य वनं सर्वमपश्यत्स्थिरचक्षुषा ॥ १६ ॥
> महबलो महोत्साहो ददर्श विवृतं विलम् । अब्रवीद्वानरान्सर्वान्विषण्णमनसा स्थितान् ॥ १७ ॥
> नूनं सलिलवानत्र भविष्यति न संशयः । बिलादस्मात्तु सहसा हंससारसवंजुलाः ॥ १८ ॥
> जलार्द्राश्चक्रवाकाश्च निष्क्रामंति सहस्रशः ॥ १९ ॥

**वन निरीक्षी हनुमंत । तंव विवर देखे त्या वनांत । वृक्ष जाळी माजीं अति गुप्त । जळ पक्षी तेथ निघतां देखे ॥ ६७ ॥**

अनुक्रमणिका

**क्षुधा तृषा अत्यंत क्षीण । त्यां वानरां सांगे आपण । येथें आहे जळ फळ स्थान । सावधान तुम्ही पाहा ॥ ६८ ॥**

**चांचू धरुनिया फळें ।** [मु. 'आंतून'.] **आर्द्र निघती पक्षीकुळें । हंस सारस बक वंजूळें । निघती समेळे चक्र वाकें ॥ ६९ ॥**

**मत्स्य धरुनी मुखेसी । ढोक निघती विवर देशी । फळ जळ आहे निश्चयेसीं । तृप्ति तुम्हांसी मीं देईन ॥ ७० ॥**

**आम्ही श्रीरामाचे भक्त । भक्त संरक्षी श्रीरघुनाथ । क्षुधा केंवि करील घात । राम समर्थ तुष्टला ॥ ७१ ॥**

**ऐकोनि हनुमंताची मातु । वानरां** [तु. दै. 'तुष्टला'.] **आठवला रघुनाथु । श्रमु गेला निमिषार्धांतु । विवरार्थु पाहों गेले ॥ ७२ ॥**

**चांचू धरुनियां फळें । असंख्यात निघती पक्षी कुळें । ते देखोनि वानर** [तं. 'सकळे'.] **पाळें । सुख समेळे हरिखेले ॥ ७३ ॥**

**वानर बोलती विस्मित । धन्य धन्य देखणा हनुमंत । गुप्त विवरजाळी आंत । जळफळयुक्त लक्षिलें ॥ ७४ ॥**

**ऐसें विनउनी हनुमंता । अवघीं चरणीं ठेविला माथा ।**
**तूं** [मु. 'असली'.] **आम्हासी जीवदाता । प्राण रक्षिता तूं आमुचा ॥ ७५ ॥**

**तूं तंव सर्वार्थी अदट । तुझा सत्संग आम्हांसी श्रेष्ठ । आम्हां बाधेना संकट । तूं वरिष्ठ रक्षिता ॥ ७६ ॥**

**हनुमान म्हणे वानरां जवळीं । अवघे प्रवेशोनी बिळीं । तृप्त होऊन फळ जळीं । मग जनकबाळी** [तु. 'शोधावी'.] **स्वयें शोधु ॥**

प्रविश्यात्र विचेष्यामो रावणं पाप चेतसम् । तां च सीता महाभागां सर्व एव महद्विले ॥ २० ॥
इत्युक्त्वा तद्विलं सर्वे प्रविष्टास्तिमिरावृतम् । अचंद्रसूर्यं हरयोर्ददृशुर्लोमहर्षणम् ॥ २१ ॥
ततस्तस्मिन्विले दुर्गे शालां निर्जनसंवृते । अन्योन्यं संपरिष्वज्य जग्मुयोजनमुत्तमम् ॥ २२ ॥
ते नष्टसंज्ञाः संश्रांतास्तृपिताः सलिलार्थिनः । परिपेतुर्बिले तस्मिन्मासमेकं बुभुक्षिताः ॥ २३ ॥

**ते देखोनिया विवर । गजबजिले वानर वीर । भीतरीं गडद धुप अंधार । रवि चंद्र भासेना ॥ ७८ ॥**

**प्रवेशतां विवरा आंतु । वानरा थोर भय संकेतु । पुढें चालिला हनुमंतु । विवर प्रांतु शोधावया ॥ ७९ ॥**

**येर येरांचा धरुनी हातु । वानर हनुमंता कवळितु । प्रवेशले विवरा आंतु । भय भीतु** [मु. कं. 'अवधारीं'.] **अंधारीं ॥ ८० ॥**

अनुक्रमणिका

विवर मार्ग अति कठीण । आपणा न देखती आपण । ऐसें आंधारी दारुण । उबीं प्राण रिघों पाहे ॥ ८१ ॥

वानर वीरां एक मास । निखळ पडिले उपवास । अन्नोदकें वीण कासावीस । विवरीं त्रास पावले ॥ ८२ ॥

शक्ति नाहीं पुढें जावयासी । मागें परतोनि निघावयासी । मार्ग लक्षेना तयांसी । वानरांसी अति दुःख ॥ ८३ ॥

विवर मार्ग अति दारुण । [मु. 'वनामाजी-नि-तमामाजीं'.] तयामाजीं एक योजन । अति संकटीं केलें गमन । मूर्छापन्न मग जालें ॥ ८४ ॥

तमें गिळिली प्रज्ञा संज्ञा । निराहारें गेली चेतना । तृषेनें शोखिलें वदना । शब्दसंज्ञा निमाली ॥ ८५ ॥

जेवीं प्रळयकाळीं जीव । [पै. 'महानेमीं'.] महातमीं होतीं आप्लव । तेवी वानरवीर सर्व । पूर्वापूर्व विसरले ॥ ८६ ॥

वानर पडतां अचेतन । हनुमंत बळिया संपूर्ण । एकें एक पूंसीं बांधोन । करी गमन तेणेसीं ॥ ८७ ॥

देखोनी वानरांची अवस्था । मागें सरणें नाहीं हनुमंता । विवर शोधावयाचे अर्था । घेउनी समस्तां निघाला ॥ ८८ ॥

हनुमंताचे देखणे नेत्र । आवरूं न सके अंधार । पूंसीं वानरांचा भार । घेऊनी सत्वर चालिला ॥ ८९ ॥ [ओवी ८९ कं. व तुं. प्रतींत नाही.]

समूळ शोधावया विवर । पूंसीं बांधोनी वानर भार । हनुमंत चालिला महावीर । जो दुर्धर कळिकाळा ॥ ९० ॥ [ओवी ९० मु. प्रतीत नाही.]

वांचवावया वानरांचे प्राण । हनुमंतें केलें विंदान । पिता पाचारुनि पवन । सांगे आपण तें आईका ॥ ९१ ॥

श्रीरामकार्यालागीं जाण । वानरां परमानंदु मरण । [दै. 'परी तूं'.] तुवां रक्षावा यांचा प्राण । सेवा संपूर्ण श्रीरामीं ॥ ९२ ॥

श्रीराम सेवा हित वचन । तेणें संतोषोनि पिता पवन । वानरांचा निज प्राण । स्वयें आपण संरक्षी ॥ ९३ ॥

श्रीरामाचे निज भक्त । जऱ्ही अदृष्टें जाले मूर्छित । तऱ्ही काळाचा न चले घात । श्रीरघुनाथ संरक्षी ॥ ९४ ॥

भक्त सावधान असावधान । त्यासी न विसंबे रघुनंदन । बाधूं न सके जन्म मरण । काळें वदन त्या काळाचें ॥ ९५ ॥

नामें गर्जती अखंड । त्याचेनि पवित्र ब्रह्मांड । भक्तां करुं जातां दंड । काळें तोंड कळिकाळा ॥ ९६ ॥

अनुक्रमणिका

भक्त श्रीरामाचा ललेवाड । श्रीराम त्यांचें पुरवी कोड । नामें गर्जोनी वितंड । हेंची तोंड काळांचे ॥ ९७ ॥

हनुमंतें देखोनी रामदूत । कळिकाळ चळीं कांपत । हरिभक्ता करावया घात । नव्हे समर्थ कळिकाळु ॥ ९८ ॥

हनुमंते अति आवेशीं । वानर तारिले बांधोनी पुंसीं । सद्‌गुरु शिष्या निज कासेसी ।[द. मु. 'अनाथासी'.] अनायासीं तारक ॥ ९९ ॥

वानरां मूर्छा [मुं. 'जाली'.] जऱ्ही प्राणांत । जवळी सद्‌गुरु हनुमंत । तेणे सत्संगें चुकला घात । अति समर्थ तारकु ॥ १०० ॥

आतांहि हनुमंताची गोष्टी । नाम आठविल्या संकटी । विघ्न पळें बारा वाटीं । नामें जगजेठी तारकु ॥ १०१ ॥

श्रीराम भक्ताची निज कथा । ग्रंथु नावरे आकळितां । एका शरण साधु संतां । विवर वार्ता अवधारा ॥ १०२ ॥

पुसीं बांधोनी वानर कोटी । हनुमंत चालिला जगजेठी ।
पुढें प्रकाश देखिला दृष्टी । सुख संतुष्टी [पै. 'तिहीं लोकां'.] सर्वांसी ॥ १०३ ॥

होतां प्रकाशाचें भान । अमृतमय प्रभा पूर्ण । वानर जाले सावधान । देखोनि स्थान [मुं. 'विपरीत'.] विस्मित ॥ १०४ ॥

आम्ही मूर्छित पडिलों क्षिती । अद्भुत हनुमंताची शक्ति ।
सकळ श्रमा करूनि शांती । स्वस्थ गती आणिले ॥ १०५ ॥

आम्हासी मूर्छित सांडून । एकला न वचेची आपण । कोट्यानकोटी वीर उचलून । आला घेऊन कृपाळू ॥ १०६ ॥

नळ नीळादि जांबुवंत । स्वयें अंगद गुण वर्णित । अवघीं वंदूनि हनुमंत । स्वस्थ चित्त राहिले ॥ १०७ ॥

एका जनार्दना शरण । निधडी हनुमंता आंगवण । अचेतन वानर सैन्य । आला घेऊनि [तं. 'वीर राजा'.] विवरांतु ॥ १०८ ॥

त्या विवरा माजील उद्बोधु । तापसी हनुमंत संवादु । एका जनार्दनीं विनोदु । परमानंदु रामायणीं ॥ १०९ ॥

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां वानरबिलप्रवेशो नाम चतुर्दशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग पंधरावा

## तापसी हनुमंत संवाद

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

वानर होऊनी सावधान । पाहती तंव हेमभुवन । हेमशय्या हेमासन । परिस्तरण हेमाचें ॥ १ ॥

हेममय तेथीची क्षिती । हेममय अवघ्या भिंती । हेमदीपिका हेमदीप्ति । पात्र पंक्ति हेमाची ॥ २ ॥

हेमविमानें अपारें । हेमबद्ध सरोवरें । [तु. 'हेम स्तंभ, हेमघरें'.] हेममत्स्य हेममगरें । जळचरें हेममय ॥ ३ ॥ [ओवी ३ मुं. तं. प्रतींत नाहीं.]

मुक्ताफळें हिरें रत्नें । हेमपदकें हेमभुवनें । हेममय उपकरणें । हेमाभरणें पशुपक्षां ॥ ४ ॥

विवरीं धनधान्य समृद्धि । विवरीं परमामृत नदी । विवरामाजीं ऋद्धिसिद्धि । सुख त्रिशुद्धी वानरां ॥ ५ ॥

नसोनी रवीचंद्र अभास । विवरांमाजीं नित्य प्रकाश । तेणें वानरीं अति उल्हास । पाहाती वास वायु पुत्राची ॥

ऐसीये रमणीय स्थानी । हनुमंतु पाहे नयनीं । मनुष्य मात्र न दिसे कोण्हीं । सकळ भुवनीं शोधितां ॥ ७ ॥

तया मंदिरा माझारीं । चीर कृष्णा जिनधारी । तापसी बैसली महानारी । तेजें करी दैदीप्य ॥ ८ ॥

तपप्रतापु आगळा । आंगीं तेजाचा उमाळा । तिसीं देखतांची डोळां । वानर पाळा शंकला ॥ ९ ॥

तिचा शोधावया मुख्यार्थु । पुसता झाला हनुमंतु । तूं कवण या भुवनाआंतु । बिळ वृत्तांतु मज सांग ॥ १० ॥

आत्मानमनुभावं च कस्य चेदं महद्बिलम् । अभ्यागतानामस्माकं सर्वमाख्यातुमर्हसि ॥ १ ॥

तूं एकाकी स्त्री अबळ । तप प्रभावें तेज प्रबळ । कोणें निर्मिलें हें बिळ । तुज हें स्थळ केविं प्राप्त ॥ ११ ॥

विवरीं समृद्धि संपूर्ण । सुखरुप शोभे वन । येथील राजा सांग कोण । तेणें हें स्थान कां त्यजिलें ॥ १२ ॥

आश्रमासी आलों येथ । आम्ही तुझे अभ्यागत । पुसिला सांगोनिया वृत्तांत । करी स्वागत अतिथींचे ॥ १३ ॥

एवंमुक्ता हनुमंता तापसी ब्रह्मचारिणी । प्रत्युवाच हनुमंतं सर्वभूतहिते रता ॥ २ ॥
मयो नाम महातेजा मायावी दानवर्षभः । पुरा दानवमुख्यानां विश्वकर्मा बभूव सः ॥ ३ ॥
तेनेदं निर्मितं सर्वं मायया काञ्चनं वनम् । कथं चेदं बिलदुर्गं युष्माभिरुपलक्षितम् ॥ ४ ॥

अनुक्रमणिका

ऐसें पुसतां हनुमंत । तापसी जाली अति विस्मित । हें विवर अत्यंत गुप्त । वानर येथ केंवि आले ॥ १४ ॥

यक्ष राक्षसां दुर्गम नित्य । देवां दानवां विवर गुप्त । तुम्ही काय श्रीरामाचे भक्त । तरीच येथें आलेती ॥ १५ ॥ [ओवी १५ तु. प्रतीत नाही.]

रामनामाचा विश्वासु ज्यासीं । नामीं आवडी अहर्निशीं । दुर्गमीं रिगमु त्या भक्तांसी । निश्चयेसीं मीं जाणें ॥

नाम नावडें मानसी । स्मरण न करी अति आळसी । वांझ गाय [दै. मु. 'कपिला'.] कळपीं जैसी । जाण तैसी ते भक्ति ॥ १७ ॥ [१७ व्या ओवी नंतर दै. प्रतीत या दोन ओव्या अधिक आहेत :—'तंव बोलीला हनुमान । आम्ही श्रीरामाचे बंदीजन । भक्तासी कैचें बंधन । अगम्य गमन श्रीराम ॥ १८ ॥ येरी होऊनी सावचित्त । तपें ज्ञानें कळलें वृत्त । म्हणे तुम्ही श्रीराम भक्त । तरीच येथें आलेती ॥ १९ ॥']

श्रीराम नाम आवडे पोटीं । नामें विण ते टवाळ गोठी । तेहि आवडी समूळ खोटी । न ये शेवटी उपेगा ॥ १८ ॥

मुलाम्याचीं नाणीं जैसीं । घातकें होतीं ज्याचीं त्यासीं । दांभिक भक्तिजाण तैसी । साधकांसी अपघाती ॥ १९ ॥

निजात्म प्रतीतीचे कसीं । भजन नुतरे ज्याचें त्यासीं ।
विकल्प डोळ पडिले भक्तीसी । लोभें त्यासी नागविलें ॥ २० ॥

तुम्ही नेटाचे श्रीराम भक्त । विवरीं प्रवेशतां येथ । देह लोभा नित्य निर्मुक्त । तुम्ही समस्त मज पूज्य ॥ २१ ॥

जन्म मरणाची भयशारी । तुम्ही घालूनी तोडरीं । प्रवेशलेती विवरीं । नामें निर्धारी रामाचे ॥ २२ ॥

नामस्मरण अहर्निशीं । विघ्नें निर्विघ्न होतीं त्यासी । तो प्रताप तुम्हां वानरांसी । तुमची दासी मी आतां ॥ २३ ॥

तुम्हां वानरांमाजी समस्तां । मुख्य भक्ति श्रीहनुमंता । श्रीराम भजनीं एकाग्रता । तुम्हां समस्तां तारकु ॥ २४ ॥

म्यां जें केलें अनुष्ठान । तेणें मज आहे हें ज्ञान । हनुमंताचे भक्ति समान । नाहीं आन तिहीं लोकीं ॥ २५ ॥

ऐसें बोलतां तापसी । प्रेम लोटलें तियेसी । लोटांगण घाली हनुमंतासी । उकसाबुकसी फुंदत ॥ २६ ॥

आगी कापुरा होतां भेटी । विरोनिया येरयेरांचे पोटीं । निरालंब उरें सेवटीं । तैसीच गोष्टी येथ जाली ॥ २७ ॥

निर्धारितां हनुमंत रुप । तापसी रुपी जाली अरुप । पाहतां तापसीचें रुप । सुख स्वरुप हनुमंत ॥ २८ ॥

अनुक्रमणिका

**भक्त भेटीचें लक्षण । लक्ष लक्षातीत गहन । मनींमन चैतन्यघन । [दै. 'समान ज्ञान'.] समाधान येरयेरां ॥ २९ ॥**

**म्या तप केलें निष्काम [मु. 'मति'.] प्रीति । त्या तपाची फळप्राप्ति । भाग्ये भेटला मारुती । भव निर्मुक्ति तारकु ॥ ३० ॥**

**श्रीरामभक्त ज्यासी भेटती । दर्शन स्पर्शन संवाद प्रीति ।**
**भावें भवपाश निर्मुक्ति । हेहि प्रतीती मज आली ॥ ३१ ॥**

**ऐसें बोलोनी तत्वता । हनुमंत चरणी ठेविला माथा । जें तुवा पुसिलें हनुमंता । समूळ कथा सांगेन ॥ ३२ ॥**

**मय दानव तेजोराशीं । माया विंदान तयापासीं । दानवीं देखोनी लाघवासीं । केलें त्यासी विश्वकर्मा ॥ ३३ ॥**

**दानवांचीं पुरें मंदिरें । कवचें यंत्रें शस्त्रास्त्रें । हेम विमानें छत्रें चामरें । अति विचित्रें निर्मिली ॥ ३४ ॥**

**मुक्ताभरणें हिरें रत्नें । हेमभूषणें हेमोपकरणें । [कं. 'अति विचित्रे निर्मिली त्यानें'.] माया लाघव विंदानें । जें करणें तें मायिक ॥ ३५ ॥**

**माया लाघवी चपळ । निज वस्ती लागी प्रबळ । तेणें निर्मिले हें बिळ । अतर्क्य स्थळ अति गुप्त ॥ ३६ ॥**

**येथें नसतां रवि चंद्रासी । नित्य प्रकाशु विवरासी । हें लाघव मयापासी । अतर्क्य कोण्हासी तर्केना ॥ ३७ ॥**

**हेमतरुवर [तुं. 'स्वानंद फळी'.] स्वादुफळी । हेमसरोवर अमृत जळी । हेमजळचरें क्रिडतीं तळीं । हेमकमळीं सुगंध ॥ ३८ ॥**

**हेममंदीरें हेमभिंती । हेमभूमिका शोभती । मये केली मायिक कृति । जाण निश्चिती कपिराजा ॥ ३९ ॥**

शतवर्षसहस्राणि तपस्तप्त्वा महावने । पिता महावरं लेभे सर्वशत्रुनिर्वहणम् ॥ ५ ॥
वयसां न कुतो मृत्युः सर्वकामेश्वरः सुखी । एवं स उषितः कालं क्वचिदस्मिन्महाबिले ॥ ६ ॥

**तेणें मयासुरें येथ । बैसोनि महावना आंत । ब्रह्मा प्रसन्न केला तपोयुक्त । तप नियमार्थ साधुनी ॥ ४० ॥**

**मयू वर मागे आपण । म्यां शत्रु मारावें संपूर्ण । मज न यावें मरण । हें वरदान मज द्यावे ॥ ४१ ॥**

**ऐकोनि मयाचें वचन । ब्रह्मा जाला हास्य वदन । जन्मासवें नित्य मरण । हें वरदान केविं लाभे ॥ ४२ ॥**

**[दै. तं. तु. 'निर्वाण'.] निर्मरण वरु मागता । हिरण्यकश्यप निज योग्यता । सजीवें निर्जीवें नको म्हणता । नखाग्रता निमाला ॥ ४३ ॥**

अनुक्रमणिका

मयासुरा तेचि कथा । मरण नको वरु मागता । यासी आली मरणावस्था । [मु. 'निर्मरणता केवि लाभें'.] हा ही तत्वता निमेल ॥ ४४ ॥

देहाभिमानाचियें माथा । नित्य वसें मरणावस्था । अहंममता न संडिता । निर्मरणता केविलाभे ॥ ४५ ॥

ऐकें माझें वरदान । विवरी असतां न ये मरण । बाहेरी येताचि जाण । वैरी प्राण घेतील ॥ ४६ ॥

वैरी आलिया विवरांत । तुझेनि हातें पावती घात । बाहेरी निघों न सकत । तेथिचे तेथ निमतील ॥ ४७ ॥

मयासुरा ऐक निश्चित । जो जाला विषयासक्त । त्याचा काळ करी घात । सत्य वाक्यार्थ ब्रह्मवाणी ॥ ४८ ॥

ब्रह्मा वदोनी वरदार्थ । सवेंचि पडिला विचारात । सुरवर [तं. 'भेटी घेती'.] लोभें रिघतां येथं । विवरीं समस्त निमतील ॥ ४९ ॥

यालागीं सुरवरां अतर्कित । बिळ द्वार केलें गुप्त । मयासुर होता नांदत । तोही मरणार्थ पावला ॥ ५० ॥

तापसीस पुसें हनुमंतु । मरण न ये विवरा आंतु । ऐसा ब्रह्मयाचा वरदार्थु । तरि कां मरणार्थु पावला ॥ ५१ ॥

मयू बैसोनी विवरा प्रती । जारण मारण इंद्र वधार्थी । दैत्य दानवां सांगे युक्ति । मंत्र तंत्रोक्ति मोह का ॥
[ओवी ५२ तु. प्रतीत नाही.]

या लागीं मयासुर वधार्थ । इंद्र साक्षेपें टपत । रिघो न लाहे विवरा आतं । द्वारी तिष्ठत सर्वदा ॥ ५३ ॥

बाहेरीं येणें नाहीं मयासी । इंद्र मारुं न सकें त्यासी । तो स्वये पुसे ब्रह्मयासी । मय मारावयासी कोण युक्ति ॥

बह्मा सांगे इंद्रा प्रति । मयासी कामिनी कामप्रीति । बाहेर आणूनी प्रमदा युक्ति । त्यासी निगुती मारावें ॥

तमप्सरसि हेमायां सक्तं दानवपुंगवम् । शनैर्निष्कांतमालोक्य निजधामपुरंदरः ॥ ७ ॥

हेमा अप्सरा सुंदरी । माझी सखी निज निर्धारी । ब्रह्मेनें घातली विवरी । मयासुरीं मरणार्थ ॥ ५६ ॥

कामिनी कामाचा आल्हादु । शुंभ निशुंभ सुंदोपसुंदु । पुरुष निमाले विविधु । मरण प्रसिद्ध स्त्री कामें ॥ ५७ ॥

कामिनीकामाच्या आसक्ति । मागें निमालें नेणो किती । पुढें हि स्त्रीकामें निमती । अधोगती स्त्री कामें ॥

हेमा अप्सरा सुंदरी । येतां देखोनि विवरीं । मयासुर पडिला फेरी । म्हणे भाग्यें करी आलीसी ॥ ५९ ॥

हेमा कामिनीस काम गहन । दोघीं केलें मद्यपान । करीत गायन नर्तन । बाहेरी आगमन दोघांचे ॥ ६० ॥

अनुक्रमणिका

कामिनी काम गती नृत्य करी । तीसवें आला विवराबाहेरीं । इंद्रे साधूनिया वैरी । वज्रें करीं मारिला ॥ ६१ ॥

मय मायिक हेम मंडन । ब्रह्मा होऊनी प्रसन्न । हेममय करुनी भवन । दिधलें स्थान हेमासी ॥ ६२ ॥

> तदयं ब्रह्मणा दत्तो वरो हृष्टेन हेमया । एवमेतत्तु भुवनं ग्रहं चेदं हिरण्मयम् ॥ ८ ॥
> दुहिता मनुसावर्णेरहं नाम्ना स्वयंप्रभा । मम प्रियसखी हेमा सुरकार्यविशारदा ॥ ९ ॥
> अंहं दत्तवरा चेदं रक्षामि भवनोत्तमम् ॥ १० ॥

ब्रह्मा होऊनी सुप्रसन्न । हेमेसी हेममय भुवन । स्वयें दिधलें संतोषोन । आणिका हें स्थान अति दुर्गम ॥ ६३ ॥

सावर्ण्य मनूची मीं दुहिता । स्वयंप्रभा नामांकिता । हेमा माझी सखी आप्तता । एकात्मता दोघींसी ॥ ६४ ॥

तेचि काळीं म्यां आपण । ब्रह्मयासी मागीतलें वरदान । द्यावें निष्काम अनुष्ठान । मुक्तत्व पूर्ण मज द्यावे ॥ ६५ ॥

ऐकोनि माझी विनंती । संतोषला प्रजापती । आवडी मानूनि वचनोक्ति । अति प्रीति स्वयें वदला ॥ ६६ ॥

धन्य निष्कामाचें वदन । धन्य निष्कामाचें [दै. 'ध्यान'.] वचन । धन्य निष्कामाचें आगमन । जग पावन निष्कामें ॥ ६७ ॥

निष्कामाचें मज कौतुक । निष्कामाचें मज सुख । देखतां निष्कामाचें मुख । परम हरिख हरिहरा ॥ ६८ ॥

ये विवरीं [मु. 'हरिहरस्थान'.] एकांत स्थान । पावसी निष्काम अनुष्ठान । स्वयंप्रभे सत्यजाण । हें वरदान तुज माझें ॥ ६९ ॥

आणिका रिगमु नाहीं येथं । विवरायेती श्रीरामभक्त । त्यांचे केलिया आतिथ्य । नित्य मुक्त त्यांचेनी ॥ ७० ॥

हरिदासांचें दर्शन स्पर्शन । अभिवंदन संभाषण । आतिथ्य करितां संपूर्ण । मुक्तपण निज नित्य ॥ ७१ ॥

हरिदासांची संगती । भाग्येविण नव्हे प्राप्ती । हरिदासांची सद्भक्ति । नित्य निर्मुक्ति [तु. दै. नि. 'स्वभावें'.] स्वयंप्रभे ॥ ७२ ॥

ऐसे मज देवोनि वरदान । अदृश्य जाला चतुरानन । हेमा माझी सखी जाण । तीचें हें भुवन ब्रह्मदत्त ॥ ७३ ॥

हेमास काम कामासक्ति । येथें नाहीं पुरुष [मु. दै. 'व्यक्ति'.] प्राप्ति । मज ठेऊनी रक्षाणार्थी । स्वर्गाप्रती ते गेली ॥ ७४ ॥

अनुक्रमणिका

**ब्रह्मवाणी सत्यभूत । ते हे तुम्ही रामभक्त । माझेनि भाग्यें आलेति सत्य । मज निर्मुक्त करावया ॥ ७५ ॥**

**ऐसें वोलोनियां जाण । तापसीं घाली लोटांगण । वंदूनि हनुमंताचे चरण । काय आपण विनवीत ॥ ७६ ॥**

**क्षुधेनें पीडिले वानर । वनीं रिघोनी समग्र । फळें भक्षावी मधुर । प्राशावें नीर स्वादिष्ट ॥ ७७ ॥**

एतच्छुत्वा शुभं वाक्यं तापस्या धर्मसंहितम् । हनूमान् हरिशार्दुलो प्रत्युवाच स्वयंप्रभाम् ॥ ११ ॥
अर्थिन स्मः प्रयच्छाशु चर धर्ममनुत्तमम् । प्रीयमाणान्निराहान्संजीवय तपोधने ॥ १२ ॥

**ऐकोनि तापसीचें वचन । हनुमंत बोले आपण । भुके वानरांचा जातो प्राण । वृक्षा** [मुं. ‘न करवे उड्डाण वृक्षावरी’; तं. ‘न करवें पूर्ण शब्दासी’.] **रोहण न करवे ॥ ७८ ॥**

**वानर असते सावधान । मघांचि विध्वंसिते वन । तुज पुसावया राहतें कोण । क्षुधेनें क्षीण बळ शक्ति ॥ ७९ ॥**

**वानरांची शक्ति क्षीण । वृक्षी न करवे उड्डाण । आणूनि देईजे आपण । वांचवी प्राण क्षुधितांचें ॥ ८० ॥**

अभिगम्योत्तमं दानं दानमाहूय मध्यमम् । याच्यमानंत्वधमं सेवकायाधमाधमम् ॥ १३ ॥

**आणूनि देईजे आपण । हें दानामाजी उत्तमदान । जे द्यावे घरां पाचारुन । मध्यम दान त्या नांव ॥ ८१ ॥**

**वेळोवेळां याचक मागती । येवोनिया काकुळती । ऐसेनि देणें तया प्रती । दानस्थिति तें निंद्य ॥ ८२ ॥**

**वसवसूनि देती अन्न । एक देती निर्भत्सून । ते अधमाहूनी अधम दान ।** [दै. ‘शुद्धदान ते नव्हे’.] **पात्र निंदूनि जे देती ॥ ८३ ॥**

**सेवा घेऊनी आपण । द्विजा दीजे जें दान । दान नव्हे ते मजूरी जाण । दातृत्व पूर्ण अधमाधम ॥ ८४ ॥**

**या लागीं स्वधर्म रक्षण । करावया स्वयंप्रभे जाण । अतिथीसीं फळें अर्पून । वांचवी प्राण वानरांचे ॥ ८५ ॥**

सा तु तस्य वचः श्रुत्वा तापसी ब्रह्मचारिणी । आदाय फलमूलानि विधिनोपाहरत्तदाः ॥ १४ ॥
भक्षयित्वा च ते सर्वे पीत्वा च विमलं जलम् । प्रसन्नवदना सर्वे सर्वे संतुष्टमानसाः ॥ १५ ॥
संजातबलवीर्याश्च तन्नासन्हरियूथपाः । अपश्यन् सर्व एवैते दिशं वानरपुंगवाः ॥ १६ ॥

**ऐकोनि हनुमंताचे वचन । तापसी फळें आणून पूर्ण । करुनि विधियुक्त पूजन । दिधलें भोजन तें ऐका ॥ ८६ ॥**

**पृथु** [तं. ‘चतुर्विधि’.] **चक्रवर्ति आपण । जैसें करी भगवत्पूजन । तेंवि हनुमंतादि वानरगण । पूजी संपूर्ण उल्हासें ॥ ८७ ॥**

अनुक्रमणिका

जया जैसें आवडे फळ । जया जैसें आवडे मूळ । धालिया अर्पी निर्मळ जळ । सुपरिमळ शिखरणी ॥ ८८ ॥

वानरां कनकांचीं ताटें । फळें वोगरिलीं चोखटें । नाना रसें भरिली वाटें । अपूर्ण कोठें पडोनेदी ॥ ८९ ॥

आम्ररसें मधुरसें । अमृत कंद सुरसरसें । [तु. 'प्राशन करिती इच्छावसे'.] वानर पीडिले मासोपवासें । अति उल्हासें जेविती ॥ ९० ॥ [ओवी ९० दे. कं. प्रतीत नाही.]

एकें विजळली सकाम वाते । एकें हिरवीं कर करिते । एकें बहुबीजें बुचबुचिते । एकें कच कचितें अर्धकाची ॥ ९१ ॥

एकें जड जाड्यें जारटली । एकें सकाम सारटली । विकल्प मुरंडी मुरकुटली । झडोनी पडली आडमार्गी ॥ ९२ ॥

एकें अभाव वातें झडली । एकें वनिताकुचकर्दमीं पडली । सवेंचि तेथून गडबडिली । तें बुडाली अंधतमीं ॥ ९३ ॥

एकें वेद वाद कर्मठे । विधि निषेधें अति आंबेटे । एकें तपो तेजे तिखटे । एके तुरटे मतमुद्रा ॥ ९४ ॥

एके वरिवरि बरवंटे । आंत द्विज द्वेषाचे खोटे । एक दिसताहि चोखटे । आत कडवटे परनिंदा ॥ ९५ ॥

एकें भेदवाद खणुवळी । [तं. 'स्त्री भेदाच्या'.] स्वभेदाच्या बुचबुचित आळी ।
त्यासी न शिवती काऊळी । पडिल्या धुळीं ते मिळती ॥ ९६ ॥

गारटलीं फळें [नि. 'अशांत'.] आळसांत । पडोनी सडली जेथिचीं तेथ । वानर त्यासी न लाविती हात । दुर्गधांत अति दुष्ट ॥

एके [कं. 'सबळ बळें'.] सम फळ धड गाढे । आदळले पाषांडाचे फळे । फुटोनी होतां पैं तुकडे । पडती किडें सुळबुळीत ॥ ९८ ॥

एक सज्ञानाच्या शिखरी । पडोनी जाली काचरी । त्यासी न सेविजे वानरीं । झडपिती घारी गर्वाच्या ॥ ९९ ॥

वनितां हातीहुनी निसटलीं । अहंममता देठीहुनी सुटली । संकल्प विकल्पे तुटली । फळें आलीं परिपाका ॥ १०० ॥

नित्य निर्विकारें पाडा आलीं । शांति सेजें स्वयें मुराली । जे नैराश्यें मधमधिली । ते फळें सेविलीं वानरीं ॥ १०१ ॥

शांति दांति अरुवारली । आंत बीज ना बाहेरी साली । सुख स्वरुपें साकारली । फळें सेविलीं वानरीं ॥

अनुक्रमणिका

१०२ ॥

निजात्म बोधें मधमधीत । नित्य नैराश्यें रस गळत । जेथें हंस शुक झेपावत । तें फळे भक्षीत वानर ॥ १०३ ॥

अहं कोहम् सोहं विहीत । ब्रह्मी ब्रह्मत्व लीन । सांडूनिया मी तूं पण । फळें परिपूर्ण सेविती ॥ १०४ ॥

बहुकाळीचे बुभुक्षित । केलें परिपूर्ण नित्य तृप्त । बाप कृपाळू श्रीरघुनाथ । [तु. दै. 'भक्त निर्मुक्त श्रीराम'; तं. 'सकळ'.] संकटी भक्त वांचविले ॥ १०५ ॥

संकटीं बाधूं जातां भक्त । संकटीं निकट रघुनाथ । द्वंद्व तेथें निर्द्वंद्व होत । भक्त निर्मुक्त श्रीरामें ॥ १०६ ॥

ऐसिया पूर्णत्वाचे सिद्धी । वानरां जाली पारणाविधि ।
श्रीराम कृपाळू द्वंद्व न बाधी । भक्त त्रिशुद्धि वांचविले ॥ १०७ ॥

ग्रंथी बोलती त्रिशुद्धि । ते त्रिशुद्धीची कोण विधि । सद्‌गुरुवीण नव्हे त्रिशुद्धि । सावध [दै. खेरीज इतरत्र 'बुद्धि'.] विधी अवधारा ॥ १०८ ॥

शब्दीं शब्द निशब्दें शुद्धि । आशा नैराश्यें मनोशुद्धि । देहीं विदेहत्वें देहशुद्धि । जाणां त्रिशुद्धि यां [मुं. 'पावन'.] नांव ॥ १०९ ॥

ऐसिया त्रिशुद्धि वानर । पावोनि तृप्ति अभयंकर । देती स्वानंद ढेकर । तेणें अंबर गर्जत ॥ ११० ॥

फळें खाती गटगटा । [मु. 'मिठिया देती भटभटा'.] मिटक्या देती मटमटा । लाळ येतसे नीळकंठा । भक्त सुख वांटा सेवावया ॥ १११ ॥

[तु. 'बोटे दाविती नृपवरा'.] वांकुल्या दाविती ऋषीश्वरा । वांकुल्या दाविती सुरवरां । फळें सेवितां वानरां । दुःख दुस्तरा चूकलें ॥ ११२ ॥

वानर भोजन समाजे । मिठिया देता अंबर गाजे । तापसी धाडिली रघुराजे । कपि समाज वांचवावया ॥ ११३ ॥

संरक्षावया निज भक्तांसी । रामें निर्मिलें विवरासी । रामे धाडिली तापसी । [तं. 'वाचवावया निज भक्ता'.] वानरासी वाचवावया ॥ ११४ ॥

बुभुक्षितां तृप्ति भोजन । तेणें सुखी श्रीभगवान । तापसीचें भाग्य धन्य । श्रीराम जन सुखी केलें ॥ ११५ ॥
[ओवी ११५ दै. प्रतीत नाही.]

दुष्काळाचें द्विजभोजन । राजसूय यागाहुनी गहन । अश्वमेधादिक यज्ञ । मशक [नि. 'होय'.] कोण त्यापुढे ॥

अनुक्रमणिका

११६ ॥

बुभुक्षितांसी दिधल्या अन्न । सुखी होती दीन जन । तेणे सुखावे श्रीभगवान । यज्ञादि पुण्य ते मशक ॥ ११७ ॥

तापसीचें भाग्य गहन । फळें आणूनी संपूर्ण । वानरां देतांची भोजन । सावधान ते जाले ॥ ११८ ॥

विधिना चोपहस्तदा । याचि धरुनी श्लोकीच्या पदा । वानर भोजन संपदा । ग्रंथानुवादां मी वदलों ॥ ११९ ॥

व्यर्थ वाढविलें ग्रंथा । ऐसे न म्हणावें श्रोता । [मु. 'मुनीच्या'.] मुळीच्या धरुनि पदपदार्था । ग्रंथी ग्रंथार्था [कं. 'मी वदलो'.] हरिवदवी ॥ १२० ॥

नेणें वेदशास्त्र श्रवण । माझे आंगी मूर्खपण । माझे हिरोनी मी पण । राम रामायण स्वयें वदवी ॥ १२१ ॥

श्रोते म्हणती नवलावो । वानरां भोजन अभिप्रावो ।
शुद्ध साधूनि भक्ति सद्भावो । ब्रह्म आम्नावो संस्थापिला ॥ १२२ ॥

आधीच रम्य रामायण । वरी हें रसाळ निरोपण । कथानक नव्हें हें ब्रह्म पूर्ण । सुखी संपूर्ण [तु. 'आम्ही जालों'.] आम्हां केलें ॥ १२३ ॥

ऐकोनि श्रोतयाचें वचन । एका जनार्दनीं [तु. 'शरण'.] लोटांगण । जें जें माझें देखाल न्यून । तें तें संपूर्ण तुम्ही कीजे ॥ १२४ ॥

श्रोतें म्हणती नवल आतां । स्वयें श्रीरामु वदनी वक्ता । रामे रम्य रामकथा । न्यून पूर्णता असेना ॥ १२५ ॥

एका जनार्दना प्रबोधी । वानराजाली पारणा विधी । पुढें लागेल सीताशुद्धि । शोधन विधि अवधारा ॥ १२६ ॥

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां तापसीहनुमंतसंवादो नाम पंचदशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सोळावा

## संपाती उद्धरण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

**वानरां** [तं. 'होता'.] **मास उपोषण । तापसी फळें अर्पूनि पूर्ण ।** [मु. पै. 'दिधलें यावतृप्ति भोजन'.] **दिधलीया तृप्त** [तं. खेरीज इतरत्र 'वानरगण'; तु. 'वानर गमन'.] **आरोगण । वानर गण उल्हासी ॥ १ ॥**

> तर्पिता विविधैर्मूलैः फलैः शीतलवारिणा । भक्षवित्वा च ते सर्वे पीत्वा च विमलं जलम् ॥ १ ॥
> प्रसन्नवदनाः सर्वे सर्वे संतुष्टमानसाः । संजातबलवीर्याश्च तन्नासन्हरिपुंगवाः ॥ २ ॥

**भक्षितां तें फळ मूळ । सेवितां तें निर्मळ जळ । वानर** [तु. दै. 'प्रबळले'.] **सुखी जालें सकळ ।** [तं. 'जनकबाळ शोधावया'.] **हर्ष प्रबळ तृप्तीचा ॥ २ ॥**

**वानरांचें सकळ दळ । पुर्विल्या पेक्षां अति प्रबळ । शत गुणें वाढलें बळ । जनक बाळ शोधावया ॥ ३ ॥**

**वानर म्हणती हनुमंतराया । येथें काय आलों फळें खावया । किंवा सीता शोधावया । राम कार्या उपपादी ॥**

**शोधितां या विवरांत । सीता न लभेची निश्चित । पुढील सांग कार्यार्थ । दक्षिण पंथा शोधावया ॥ ५ ॥**

**रवी शशी विरहित । नित्य प्रकाश विवरांत । वानर दश दिशा पाहात । दक्षिण तेथें लक्षेना ॥ ६ ॥**

**पूर्व कोण पश्चिम कोण । न कळे उत्तर दक्षिण । न लभे दश दिशांचे** [मु. 'ज्ञान'.] **भान । केउतें गमन करावे ॥ ७ ॥**

> अथतानब्रवीत्सर्वान्विश्रांतान्हरियूथपान् । किं कार्यं कस्य वा हेतोः कांताराणि च गच्छथाः ॥ ३ ॥
> इदं वचनमेकैव तापसी धर्मचरणी । यदि चेदं मया शक्यं श्रोतव्यं साधु कथ्यताम् ॥ ४ ॥

**अत्यंत भारू जयाच्या माथा । कां जो त्वरेनें धांवता । अतिशयेंसी उन्मत्तता । त्यासी कथावार्ता नये पुसों ॥ ८ ॥**

**जो कां ज्ञानगर्वी** [मु. 'पीडित'.] **पंडितु । जो कां विषय मदें उद्धतु । जो कां अतिशयें क्षुधितु । त्यासि ही वृत्तांतु नये पुसों ॥ तापसी म्हणे वानरनाथा । वार्ता पुसों नये क्षुधार्ता । फळभोजनें सावधानता । सांग आतां निज वृत्त ॥ १० ॥**

**विवर गूढ अति** [मु. तं. 'कांतार'.] **अंधार । मिळोनिया वानर भार । येथें कां आलेती समग्र । तो ही विचार मज सांगा ॥ ११ ॥**

अनुक्रमणिका

तुम्ही श्रीरामाचे भक्त । माझेनि भाग्यें आलेति [दै. कं. मु. 'येथ'.] सत्य । विवर प्रवेशावया गुप्त । कोण कार्यार्थ तो सांगा ॥ १२ ॥

मी तंव केवळ तुमची दासी । कार्य सांगावें मजपासी । ऐसें मानेल तुम्हांसी । तरी कार्यासी मज सांगा ॥ १३ ॥

तस्यास्तद्वचनं श्रुत्वा हनूमान्मारुतात्मजः । आर्जवेन यथातत्त्वमाख्यातुमुपचक्रमे ॥ ५ ॥

ऐक तापसी पूर्व वृत्तांतु । पूर्ण ब्रह्म श्रीरघुनाथु । अवतरला सूर्य वंशांतु । कौसल्यासुत दाशरथी ॥ १४ ॥

पितुआज्ञेच्या निज नेटी । बंधु सौमित्र सीता गोरटी । राम वनवासी पंचवटी । गंगातटीं रहिवासु ॥ १५ ॥

राम लक्ष्मण मृगापाठीं । मागें शून्य पंचवटी । [तु. 'भिक्षा करूनी'.] भिक्षुक रुपें रावण कपटी । सीता गोरटी चोरिली ॥ १६ ॥

तीचें करावया शोधन । किष्किंधे आले रघुनंदन । वाली भ्रातु-भार्या-हरण । विंधोंनि बाण मारिला ॥ १७ ॥

राज्य दिधलें सुग्रीवासी । युवराज्य अंगदासी । सुग्रीवें धाडिलें आम्हासी । सीता शुद्धीसि दक्षिणे ॥ १८ ॥

दक्षिण शोधिली शतावर्ती । शुद्धि नलगे सीतासती । सीता शोधन शुद्धयर्थी । विवराप्रति आम्ही आलों ॥ १९ ॥

सुग्रीव आज्ञा अति दारुण । मासा यावें शुद्धि करुन । न ये त्यासी रासभारोहण । विटंबन अपमान ॥ २० ॥

विवरीं करितां प्रवेशन । महिना लोटला संपूर्ण । विवर दुर्गम गहन । [तु. 'उत्तर दक्षिण'.] निर्गमन आम्हां दिसेना ॥ २१ ॥

बिळीं होतां प्रवेशन । आम्ही जालों मूर्छापन्न । कैसेनि येथें आगमन । हें हि ज्ञान आम्हां नाहीं ॥ २२ ॥

विवराचें अभिनव चिन्ह । न कळे उत्तर दक्षिण । न कळे दश दिशांचें भान । केउतें गमन करावें ॥ २३ ॥

आमुची विवरांत आगती निर्गती । आम्हासी न कळे निश्चिती ।
तुज अधीन आमुची गती । कृपा मूर्ति कृपा करी ॥ २४ ॥

आमची विवरा बाहेरी गती । आम्हासी भेटे सीता सती । ऐसी कृपा करी [मु. 'शीघ्रगती'.] निश्चिती । वानरपंक्ति उद्धरी ॥

ऐसें ऐकतां वचन । तापसी जाली सुप्रसन्न । विवराचें गमनागमन । नेणती सज्ञान द्विज देव ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

**ब्रह्मयाचे वरदोक्ति । विवरा आलिया नव्हे त्या निर्गती । बाहेरिले विवराप्रती । यावया युक्ति शक्ति लक्षेना ॥**

**मज ब्रह्मा सुप्रसन्न । विवरीं आगमन निर्गमन । करावया मी सज्ञान । हें वरदान ब्रह्मयाचें ॥ २८ ॥**

**ज्यासी श्रीरामाची भक्ती । दुर्गमीं त्यासी सुगम गती । रामनाम प्रताप शक्ति । भव निर्मुक्ति हरिभक्तां ॥ २९ ॥**

**श्रीराम नामाचेनि कैवाडें । कळिकाळ** [तं. खेरीज इतरत्र 'पळे पुढे'.] **पाया पडे । विवर कायसें बापुडें । तुम्हा पुढें बाधावया ॥ ३० ॥**

**श्रीराम सेवा नित्य कर्म । हृदयीं श्रीरामाचें नित्य प्रेम । मुखीं नित्य रामनाम । सर्वत्र सुगम गती त्यासी ॥** [ओवी ३१ कं. प्रतीत नाही.]

**पैल हनुमंत मुखरी वीर । भक्ति प्रतापें प्रतापशूर । श्रीरामनामें गुणगंभीर । येणें उद्धार वानरां ॥ ३२ ॥**

**आजि माझें सफळ अनुष्ठान । होतां हनुमंत दर्शन । मी जाले सुखसंपन्न । महिमा गहन सत्संगा ॥ ३३ ॥**

**जप तप ध्यान स्थिति । अवघीं सार्थक सत्संगती । सत्संगाची अगाध ख्याति । भव निर्मुक्ति सत्संगें ॥ ३४ ॥**

**श्रीराम भक्ताचिया पंक्ति । आलेति माझिया भाग्य गती । सेवा करीन यथा शक्ति । बिळ निर्मुक्ति वानरां ॥**

> सर्वानेव बिलादस्मान्निष्क्रामिष्यामि वानराः । संमीलयत नेत्राणि सर्वे वानरपुंगवाः ॥ ६ ॥
> न हिनिष्क्रामितुं शक्यं चक्षूंषि त्वनिमीलिते । ततस्ते हरयः सर्वे सुकुमारांगुलैः करेः ॥ ७ ॥
> समावृण्वंश्च नेत्राणि तुष्टा गमनकांक्षिणः ॥ ८ ॥

**बिळा बाहेरी निर्गती । होवया वानरी समस्ती । डोळे झांकावे निज हस्तीं । माझिया वचनोक्ति विश्वासें ॥ ३६ ॥**

**डोळे उघडे असतां । देवां दानवां ऋषि महंतां । विवरा बाहेरी निर्गमता । कदा कल्पांतीं घडेना ॥ ३७ ॥**

**ऐकोनि तापसीचें वचन । वानरीं आपुले आपण । निज करीं झाकूनि नयन । सावधान** [मुं. खेरीज इतरत्र 'निर्गमार्थी'] **तिष्ठति ॥ ३८ ॥**

**वानरीं झांकोनियां डोळे । मुहूर्त एक उगेचि राहिले । उघडा ऐसें कोण्ही न बोले । पाहों लागले उघडोनी ॥ ३९ ॥** [ओवी ३९ त. प्रतीत नाही.]

> सुमुहूर्तेन कालेन चक्षूंष्युन्मील्य संगताः । ततस्ते ददृशुर्घोरं समुद्रं वरुणालयम् ॥ ९ ॥
> मयस्य मायाविहितं गिरिदुर्गं विचिन्वताम् । स नो मासो व्यतिक्रांतो यो राज्ञा समयः कृतः ॥ १० ॥

अनुक्रमणिका

वानरीं उघडूनिया नेत्र । पाहाती तंव पुढां समुद्र । अतिशयेसीं दुर्धर । गर्जे घोर गडगर्जे ॥ ४० ॥

पुढां देखोनी समुद्र । विस्मयो करिती वानर । येथें कैसेनि आलों समग्र । केलें विचित्र तापसीया ॥ ४१ ॥

नाहीं चालविलों धरुनी करीं । नाहीं घेतलों कडियेवरीं । आम्हासी विवरा बाहेरी । कवणे परी आणिले ॥ ४२ ॥

पुंसीं बांधोनी समस्त । हनुमंतें नेलें विवरा आंत । तैसेहि केलें नाहीं येथ । न हालवितां आणिलें ॥ ४३ ॥

येव्हढें लाघव जियेपासी । केऊती आहे ते तापसी । पाहातां न दिसे चौपासीं । वानरांसी अति विस्मयो ॥ ४४ ॥

अति आवेशीं वानर वीर । वन शोधिती समग्र । ना ते तापसी ना तें विवर । विस्मयो थोर वानरां ॥ ४५ ॥

मयमायेची मायिक शक्ति । विवरीं वानरां अति भ्रांति । रामनामाचिया ख्याती । विवरोन्मुक्ति वानरां ॥ ४६ ॥

निरसावया वानर भ्रांति । तापसी नव्हे ते श्रीरामशक्ति । कृपेनें आली विवरांप्रती । वानरांप्रती तारावया ॥

करितां श्रीरामाची भक्ति । भक्तां बाधूं न शके भ्रांती । रामनामाचिया आवृत्ती । विवरोन्मुक्ति वानरां ॥ ४८ ॥

श्रीरामाचिया नामाभेण । माया पळे घेऊनी प्राण । विवर बापुडें तें कोण । भक्त जन भुलवावया ॥ ४९ ॥

[मु. 'क्षुधार्थे'.] क्षणार्ध हनुमंताचे भक्ति । तापसी पावली नित्य मुक्ति ।
या लागीं हरिभक्त संगती । भय निर्मुक्ति भाविकां ॥ ५० ॥

तापसी तरली वानू किती । रामनामाच्या आवर्ती । विवरीं वानरीं केली ख्याती । सावधान वृत्ति अवधारा ॥

नामें गर्जतां वानर वीर । नामें कोंदलें विवर । तेणें जाला विवरोद्धार । जगदोद्धार रामनामें ॥ ५२ ॥

भक्त ज्या ज्या ठाया जाती । त्या त्या ठाया नित्य मुक्ति । रामनामाच्या आवर्ती । उद्धरती जड जीव ॥ ५३ ॥

वनीं वानर विवर पाहाती । नामे [तं. खेरीज इतरत्र 'विवरा'.] वानरा नित्य मुक्ति ।
वानर वीरांचिया प्राप्ती । जड उद्धरती [दै. 'नामें तरती सर्वस्वें'.] रामनामें ॥ ५४ ॥

या परी ते वानर वीर । करुनी विवराचा उद्धार । [मुं. 'पुढें'.] स्वयें पावले समुद्र तीर । सीता सुंदर शोधावया

अनुक्रमणिका

॥ ५५ ॥

**मागां शोधिले गिरी गव्हर । तेथ न लभेचि सीता सुंदर । पुढां वोडवला समुद्र । अति दुस्तर वानरां ॥ ५६ ॥**

**सुग्रीवें केली मासावधी । ते लोटली विवरामधीं । तेथें हि न लभे सीताशुद्धि । कार्य सिद्धि नव्हेची ॥ ५७ ॥**

**सीताशुद्धि नव्हेचि पूर्ण । आम्हासी जातां परतोन । सुग्रीव करील अपमान । आज्ञालंघन** [तु. 'होताची'.] **रायाचें ॥ ५८ ॥**

> सुग्रीवोऽयं विरोक्तः स्याद्रामेणाक्लिष्टकर्मणा । अंगदः परिपाल्यस्ते कार्येऽस्मिन्स्यामहं हतः ॥ ११ ॥
> घातयिष्यति दंडेन तीव्रेण सुमहज्ञनम् । इहैव प्रायमाशिष्ये रम्ये सागररोधसि ॥ १२ ॥

**सीता शुद्धीलागी जाण ।** [तं. 'समूळ'.] **शतधा शोधिली दक्षिण । पुढें समुद्र दारुण । गती गमन खुंटलें ॥ ५९ ॥**

**पुढें गती खुंटली उदधी । आतां न लगे सीताशुद्धि । मागें जावों नये त्रिशुद्धि । प्राणावधी वानरां ॥ ६० ॥**

**ऐसें बोलोनी अंगद । दुःखें दुर्धर करी खेद । अवश्य सुग्रीव करील विरोध । तोहि संबंध अवधारा ॥ ६१ ॥**

**युवराजा! तूं त्रिशुद्धि । तुज आधीन वानर मांदी । न करितां सीताशुद्धि । मजची आधीं विटंबील ॥ ६२ ॥**

**थोर करील अवकळा । रासभारोहण** [तु. 'मुखचंद्रकाळा'.] **मुख्य सोहळा । उपानहमाळा गळां । गोमय जळां अभिषेकु ॥ ६३ ॥**

**सोसितां अवकळा दारुण । लोक लाजा येईल मरण । त्यापरीस येथें आपण । द्यावा प्राण तें श्रेष्ठ ॥ ६४ ॥**

**सीता शुद्धी नव्हतां दृढ । मुख्यत्वें माझी न राखे भीड । दुसरियांचा कोण पाड । दुःख दुर्वाड वानरां ॥ ६५ ॥**

**धन्य जटायू तो जाण । रावणेसीं करुनी रण । सीता सोडवीन म्हणऊन । दिधला प्राण रणरंगीं ॥ ६६ ॥**
[ओवी ६६ कं. दै. प्रतींत नाही.]

**ऐकोनी अंगदाची गोष्टी । वानरीं भय घेतलें पोटीं । प्राण द्यावा** [तं. 'उठा-उठी'.] **सिंधू तटीं । अवकळा मोठी कोण सोसी ॥ ६७ ॥**

**देह लोभें वाचों जातां । अवकळा बैसेल माथां । रामस्मरणें प्राणु देतां । परमार्थता पावेन ॥ ६८ ॥**

**या लागीं आम्ही अवघेजण ।** [तं. 'सिंधुतटाकीं'.] **अवश्यमेव देणें प्राण ।** [मुं. तं. 'येथूनि कोठें नवजाणें'.] **घालूनिया कुशास्तरण । मरणा धरणें बैसले ॥ ६९ ॥**

अनुक्रमणिका

उपविष्टाश्च ते प्रायः सर्वे तस्मिन्महीधरे । हरयो गृध्रराजोऽथ तं देशमुपचक्रमे ॥ १३ ॥

तृण घालूनिया मुष्टी मुष्टी । प्रायोपवेशें सिंधू तटीं । वानर पडतां कोट्यानु कोटी । देखिले दृष्टि संपातीनें ॥ ७० ॥

जे जे आले समुद्रतीरा । ते ते संपातीचा चारा । वेगीं भक्षावया वानरां । संपाती त्वरा तेथें आला ॥ ७१ ॥

बहुता दिसांचा उपवासी । देवें कृपा केली कैसी । मज भक्षावया वानरांसी । या ठायासीं आणिले ॥ ७२ ॥

संपाती स्वयें पुसें आपण । या ठाया आले जे जाण । माझेनि भक्षें त्यासी मरण । तुम्ही कोण कोणाचे ॥ ७३ ॥

तृणासनी समुद्र तटीं । वानरांच्या कोट्यानुकोटी । पडोनी करितां श्रीरामगोष्टी । नाहीं पोटीं मरण भय ॥ ७४ ॥

माझेनि अति उग्र दर्शनें । प्राणियां प्राणांत पळणें । तुम्ही गजबजा ना मनें । मरणा धरणे बैसलेती ॥ ७५ ॥

तुम्ही काय मरों टेकलेती । जे या ठाया आलेती । माझिया भोजन प्रयुक्ति । वानर पंक्ति फळाहार ॥ ७६ ॥

करितां रामनाम चावटी । सांगा श्रीराम कोण तो सुष्टि ।
तुम्हासी कोठें जाली भेटी । समूळ गोष्टी मज सांगा ॥ ७७ ॥

ऐकोनी संपातीचें वचन । अंगदु म्हणे आम्ही धन्य । अनायासें आलें मरण । गृध्रा भक्षण वानर ॥ ७८ ॥

अन्नोदक त्यजूनी जाण । चरफडूनी द्यावा प्राण । श्रीरामें कृपा केली पूर्ण । आलें मरण [तु. 'वानरा'.] अनायासें ॥ ७९ ॥

अंगदु म्हणे संपातीसी । श्रीराम कथा कां पुससी । तूं आज अतिथी आम्हासी । वानरांसीं सुखें भक्षी ॥ ८० ॥

[तं. 'सिद्ध तापसा'.] क्षुधार्तासी द्यावें अन्न । हें तों शास्त्र सनातन । आम्ही तुज दिधलें देहदान । करी भक्षण वानरां ॥ ८१ ॥

संपाती बोले आपण । तुम्ही करितां रामस्मरण । माझेनि न करवे भक्षण । राम रक्षण निज भक्ता ॥ ८२ ॥

जेथें रामनाम स्मरण । तेथें रिघों न शके मरण । माझेनि न करवे भक्षण । नाम रक्षण निज भक्ता ॥ ८३ ॥
[ओवी ८३ तु. व. कं. प्रतींत नाही.]

राम नामाचिया स्मरणीं । जन्ममरणा महा पळणी । श्रीरामभक्त तुम्ही निर्वाणी । भाग्यें माझेनि आलेती ॥ ८४ ॥

अनुक्रमणिका

मुखीं रामनाम आवृत्ती । हृदयीं श्रीरामाची मूर्ती । देह विकिलें श्रीराम भक्ति । भाग्य किती मी वानूं ॥ ८५ ॥

अतिथीचिया मज भोजनी । तुम्ही समस्त देह दानीं ।
श्रीरामभाग्यें सभाग्य जनीं । धन्य त्रिभुवनीं तुम्ही एक ॥ ८६ ॥

कोणा कार्याचिये विधि । तुम्ही आलेती भाग्य निधी । तें मज सांगावें त्रिशुद्धि । कार्य सिद्धि मी करीन ॥ ८७ ॥

अत्यंत आवडी माझे पोटीं । ते मी पुसेन गुह्य गोठी । तुम्ही श्रीराम देखिला दृष्टी । कैसेंनि भेटी श्रीरामीं ॥ ८८ ॥

श्रीराम राजा ईश्वरेश्वर । तुम्ही वनचर वानर । कैसेनीं रामभजनीं तत्पर । सविस्तर मज सांगा ॥ ८९ ॥

ऐकोनि संपातीचें वचन । वानर जाले विस्मयापन्न । करितां रामनाम स्मरण । गीध भक्षण करुं न सके ॥ ९० ॥

जे जे आलेति या समुद्र तीरा । ते ते संपातीचा चारा । त्यासी भक्षवेना वानरां । श्रीरामचंद्राचेंनि नामें ॥ ९१ ॥

करितां रामनाम स्मरण । स्मरे त्या मारूं न सके मरण । आम्हासी प्रत्यक्ष प्रमाण । गीधा भक्षण न करवे ॥ ९२ ॥

करितां रामनाम स्मरण । मृत्यु त्याचे वंदी चरण । [मु. त. ‘आम्ही वानर अभागी पूर्ण’.] आम्हासी कृपाळू रघुनंदन । गीध भक्षण न करीचि ॥ ९३ ॥

मरण न ये रामनामोक्ति । समुद्र बापुडें तें किती । नाम स्मरणाची [त. ‘युक्ति’.] निजशक्ति । अपांपती आम्ही लंघू ॥ ९४ ॥

धरुनी नामाचा निर्धारू । आम्ही तरों भवसागरु । तेथ कायसा हा समुद्र । भाग्यें हा गीध भेटला ॥ ९५ ॥

ऐकतां नामाची निजख्याति । उल्हासु हनुमंताच्या चित्तीं । लंघावया अपांपती । पुसे संपातीसी [तं. खेरीज सर्वत्र ‘नाम’] निज महिमा ॥ ९६ ॥

तूं अंडज पक्षी पूर्ण । रामनामीं नाहीं मरण । हें तुज कैसेनि गुह्य ज्ञान । मूळ कथन मज सांग ॥ ९७ ॥

श्रीराम भक्ताचे संगती । संपातीची गेली भ्रांती । पूर्व स्मरणाच्या अनुवृत्ती । मारुती प्रती सांगतु ॥ ९८ ॥

कश्यपाच्या निज कुळीं । अरुण वीर्याच्या निजमेळीं । जटायू संपाती जावळी । बंधु आतुर्बळी जन्मलों ॥ ९९ ॥

अनुक्रमणिका

**दैत्य दानव मानव प्रौढी । सहित देव तेहतीस कोडी । आमुचे दृष्टी ते घुंगुरडी । बळाची गाढी अति मस्ती ॥**

> आदित्यमनुधावंतौ ज्वलंतं रश्मिमालिनम् । आपामनित्यमार्गेण जवे नोपगतौ भृशम् ॥ १४ ॥
> मध्यें प्राप्ते तु सूर्ये वै जटायुर्विषसाद ह ॥ १५ ॥

**आंगी बळाची आंगवण । त्यावरी आलें तरूणपण । पैज घालूनी दोघे जण । सूर्य चरण वंदनार्था ॥ १०१ ॥**
**पक्ष बळाचेनि झडाडे । येक धावों येका पुढें । एक एका वरी चढे । सुभानु पुढें लक्षूनी ॥ १०२ ॥**

**वेगीं येतां सूर्यापासीं । तंव तो आला माध्यान्हासी । जटायू जाला कासाविसी । रवि किरणीं पोळोनी ॥ १०३ ॥**

**तो रिगाला मजतळीं । मी श्लाघलों तयें वेळीं । तंव पांखांची जाली होळी । गर्वानुमेळीं श्लाघतां ॥ १०४ ॥**

**जटायूचे वांचले पांख । माझिया पांखांची जाली राख । बाप गर्वाचें कवतिक । परम दुःख पावलों ॥ १०५ ॥**

**माझिया पांखांची होता होळी । थोर दिधली म्यां आरोळी ।**
**अरुणें देखतांची तये वेळीं । थोर कळवळी पुत्र स्नेहें ॥ १०६ ॥**

**सूर्या प्रती सांगे आपण । माझे पुत्र हे दोघेजण । स्वामीचे वंदू येती चरण । पक्ष दहन केलें तेजें ॥ १०७ ॥**

**भूतळीं जन करिती नमन । तें मी देखणा स्वयें सुभान । मज दावितां आंगवण ।** [तु. खेरीज इतरत्र गर्वें.] **जालें दहन दोहीं पक्षां ॥ १०८ ॥**

**माझिया तेजाचे निज दीप्ति । गर्वी तितुके भस्म होती ।**
**अरुणा! तुझी हे निज संतती । म्हणोनी संपाती वांचला ॥ १०९ ॥**

**अरुणा तुझा राखावया मान । पुत्र पक्षार्थी देतों वरदान । तें तू ऐक सावधान । पुत्र संतान उद्धारा ॥ ११० ॥**

**तूं तंव माझा निज सारथी । तुज मज नित्य येकी गती ।**
**तुझी उद्धरावया संतती । शुद्ध वरदोक्ति अवधारी ॥ १११ ॥**

**श्रीराम भक्तांचे संगती । ऐकतां रामनाम वरदोक्ति । निरभिमानें पक्ष प्राप्ति । स्वयें संपाती पावेल ॥ ११२ ॥**

**होता रामनाम श्रवण । उभय पक्षीं निरभिमान । पक्ष पावोनियां संपूर्ण । अवश्य गमन करील ॥ ११३ ॥**

**निरभिमानें पक्षप्राप्ती । आगमा निगमा अगम्य गती । तेथ पावेल संपाती । सुखानुभूतीं श्रीरामें ॥ ११ ४ ॥**

**रामनामें दुःख निवृत्ती । राम नामें सुख संपत्ती । रामनामें अगम्य गती । जाण निश्चिती सारथिया ॥ ११५ ॥**

अनुक्रमणिका

जेथें श्रीराम आगमन । जटायू पावे ते स्थान । करितां सीताहरण रावण । रामें उद्धरण जटायू ॥ ११६ ॥

दशरथ कौसल्येचे कुसीं । श्रीराम अवतरेल सूर्यवंशी । या लागी मैत्री दशरथेसीं । करी [तु. 'विशेषेसी'.] विश्वासेसीं जटायू ॥ ११७ ॥

जनस्थाना माझारीं । जटायू गेला पक्षें करीं । दक्षिण समुद्राचिया तीरीं । मी विंध्याद्रि येथ पडिलों ॥ ११८ ॥

दग्ध पक्ष देहीं व्यथा । काय खावों हें नित्य चिंता । रामु नाठवे सर्वथा । वरद वार्ता विसरलों ॥ ११९ ॥

नेणें मी जटायू गेला केउता । तोहि नेणे माझी वार्ता । जटायू धन्य तुम्ही म्हणतां । आजि म्यां आतां आयकिले ॥

कृपा करावी हनुमंता । म्हणोनी चरणीं ठेविला माथा । जटायूची समूळ कथा । मज सर्वथा सांगावी ॥ १२१ ॥

ऐकतां जटायूचें नाम । संपातीसी आलें प्रेम । धन्य जटायूचा धर्म । तेणें श्रीराम सेविला ॥ १२२ ॥

मी करंटा पक्षहीन । राम नाठवे पापी मीं पूर्ण । धन्य धन्य वानरांचें दर्शन । [कं. तं. दै. 'स्मरण'.] श्रीरामश्रवण मज जालें ॥ १२३ ॥

श्रीरामाची कवण स्थिती । जटायूची कवण गती । तुम्हीं कां अवघे प्राणत्यागार्थी । येथें आलेती तें सांगा ॥ १२४ ॥

नामधेयमिदं भ्रातुश्चिरस्याथ मयाश्रुतम् । तत्वमिछामि विज्ञातुं विनाशं वांधवस्य च ॥ १६ ॥

शतानुशतां वर्षां पाठीं । तुम्हां वानरांच्या वाक्पुटीं । ऐकली जटायूची गोठी । ज्याची मजपोटीं अवस्था ॥ १२५ ॥

जटायू पडला कवणे क्षिती । जटायूची कवण गती ।
ऐसी चिंता वाहातां चित्तीं । शुद्धि निश्चिती जाहली आजी ॥ १२६ ॥

रावणें करितां सीता हरण । जटायू रावणेसी रण । कैसेनी जटायू पावला मरण । रामें उद्धरण केले कैसें ॥ १२७ ॥

जटायू सबळ संपूर्ण । मारूं न शके त्यासी [दै. खेरीज इतरत्र 'रावण'] कवण । कैसेनी तो पावला मरण । समूळ कथन मज सांगा ॥ १२८ ॥

ऐकतां संपातीची वार्ता । कृपा उपजली हनुमंता । जटायूची समूळ कथा । होय सांगता उल्हासें ॥ १२९ ॥

**दाशरथी रघुनंदन । पितृ वाक्यें वनाभिगमन । सीता समवेत लक्ष्मण । आला टाकून जनस्थाना ॥ १३० ॥**

**जाहाली जटायूसी भेटी । स्वामी सेवकत्वें पडिली मिठी । आश्रमु केला गंगातटीं । पंचवटी अतिरम्य ॥ १३१ ॥**

**रामाश्रमीं अहोरात्र । जाटायू जाला घरटीकार । जनकनंदिनी अति सुंदर । आठहि प्रहर संरक्षी ॥ १३२ ॥**

**जटायू गेला वन भ्रमण । मृगें छळिलें रामलक्ष्मण । भिक्षा मिसें पैं रावण । सीता हरण तेणें केलें ॥ १३३ ॥**

> ददर्श सीतां वैदेहीं ह्नियमाणां विहायसा । रावणं विरथं कृत्वा मोक्षयित्वा च जानकीम् ॥ १७ ॥
> छलेन युद्धधर्मेण रावणेन हतो रणे ॥ १८ ॥

**सीता आक्रंदतां जाण । जटायू आला पैं धांवोन । रावणेंसी केलें रण । अति** [इ. 'दारुण'.] **निर्वाण तें ऐका ॥ १३४ ॥**

**भंगिलें चाप छेदिले शर । मारिले पिशाचवदन खर । झडपा हाणोनी रंहवर । अति सत्वर भंगिला ॥ १३५ ॥**

**शिरीचे पाडूनिया मुगुट । दाही झांबाडिले कंठ । रावणा भुलऊनी वाट । प्राण संकट मांडिलें ॥ १३६ ॥**

**नख क्षतीं वाहे रुधिर । वीसहि भुजा केल्या चूर । सांडऊनि सीता सुंदर । दशशिर गांजिला ॥ १३७ ॥**

**जटायू पुरे पुरे रण । माझा रिघों पाहे प्राण । रावणें दातीं धरिलें तृण । जीवदान** [तु. 'मागीतलें'.] **मज देई ॥ १३८ ॥**

**रावण स्वयें जाहाला शरण । जटायू त्याचा नेघेचि प्राण । सीता घेऊनी हिरोनी । जीवदान दीधलें ॥ १३९ ॥**

**पक्षेनी गांजिलो निश्चिती । धुळीस मिळाली यश किर्ती । रावण परतला पुडती । छळनार्थी युद्धासी ॥ १४० ॥**

**घालूनी श्रीरामाची आण । जटायूसी मृत्यू पुसे रावण ।** [तं. प्रतीत 'तोही पुसे तुझें मरण कैसेन । सांगे रावण अंगुष्ठ नखाग्रीं ॥'.] **वामांगुष्ठीं माझें मरण । सांगे रावण छळनोक्ती ॥ १४१ ॥**

**ऐकतां निजबंधूची ख्याती । उल्हासु संपातीच्या चित्ती । तंव तंव निज पक्ष वाढती । जेवीं वसंती वृक्षाग्रें ॥ १४२ ॥**

**श्रीरामाची निर्वाण आण । जटायू मानूनि प्रमाण । उभयपक्षीं सांगे मरण । युद्धा रावण पेटला ॥ १४३ ॥**

अनुक्रमणिका

जटायूने येका येक । अंगुष्ठ छेदिला सनख । रावणें उपडिले दोन्ही पांख । पावला दुःख जटायू ॥ १४४ ॥

पंख उपडिलिया यावे मरण । घ्यावया श्रीरामदर्शन । करीत रामनाम स्मरण । कंठी प्राण राखिला ॥ १४५ ॥

श्रीराम कृपाळू पूर्ण । दिधलें जटायूसी दर्शन । येरें सकळ वृत्तांत सांगोन । चरणा शरण म्हणे रामा ॥ १४६ ॥ [ओवी १४६ व १४७ दै. प्रती खेरीज इतरत्र नाही.]

श्रीराम तुष्टोनियां पूर्ण । वांचवीन म्हणे तुझा प्राण । तेणें धरोनिया चरण । युक्त वचन विनविलें ॥ १४७ ॥ [ओवी १४६ व १४७ दै. प्रती खेरीज इतरत्र नाही.]

तुज पुढें त्याजितां प्राण । मी होईन ब्रह्म पूर्ण । पुढें वांचलिया लाभ कोण । ऐसें मरण मग कैचें ॥ १४८ ॥

ऐसें ऐकतां वचन । श्रीराम जाला सुप्रसन्न । देहीं विदेह ब्रह्मपूर्ण । जाला आपण जटायू ॥ १४९ ॥

ऐशिया परी रघुनाथें । उद्धरूनी जटायूतें । पुढें सीतेचेनि शुद्धयर्थे । आला निश्चिते किष्किंधें ॥ १५० ॥

तेथ वधूनी वालीसी । राज्य दिधलें सुग्रीवासी । युवराज्य अंगदासी । वाली सुतासी दिधलें ॥ १५१ ॥

तो अंगदु दक्षिणे प्रती । संवे देऊनी जुत्पती । रामे धाडिला सीता शुद्धयर्थी । यावें मासांतीं मर्यादा ॥ १५२ ॥

दक्षिण शोधिली समस्त । सीताशुद्धि न लभे तेथ । मर्यादा लोटली विवरांत । तेणें धांकत अवघेहि ॥ १५३ ॥

अवकळा करुनीया थोर । सुग्रीव दंडील निष्ठुर । तेणें भयें वानर वीर । आले समग्र प्राणत्यागा ॥ १५४ ॥

शद्धि न लभेची सीता । काय सांगावे रघुनाथा । थोर लाज बैसली माथा । प्राणत्यागार्था येथ आलों ॥ १५५ ॥

ऐकोनी हनुमंताचें वचन । संपाती घाली लोटांगण । तुम्ही त्यजू नका प्राण । सीता सांगेन तुम्हांलागीं ॥ १५६ ॥

तुम्ही श्रीराम सेवक । माझे भवपाश मोचक । मी तंव चरणरजरंक । शुद्धि निर्दोष अवधारा ॥ १५७ ॥

शत योजने समुद्र पारीं । लंका गड दुर्गा माझारी । अशोक वना अभ्यंतरीं । सीता सुंदरी दिसताहे ॥ १५८ ॥

राम नाम नित्य वाक्पुटीं । रामस्मरणाचिया निज पुष्टी ।
पैल पैल सीता गोरटी । मज निज दुष्टी दिसताहे ॥ १५९ ॥

मज जरी पांख असते येथ । मर्दूनिया लंकानाथ । सीता आणितों [पै. तं. मु. 'त्वरित'.] यथार्थ । श्रीरघुनाथ

अनुक्रमणिका

सुखार्थ ॥ १६० ॥

ऐसें बोलतां वचन । संपातीसी निरभिमान । पक्ष निघाले संपूर्ण । पूर्व वरदान सूर्याचें ॥ १६१ ॥

दृष्टी पाहाता वानरगण । पक्ष निघाले निरभिमान । निरभिमानाचें [त. 'राज चिन्ह'.] निज चिन्ह । सावधान अवधारा ॥ १६२ ॥

मर्दूनिया लंकापती । म्यां आणावी सीता सती । जगीं व्हावी यश कीर्ति। हे ही अहं कृति तेथ नाहीं ॥ १६३ ॥

सोडवोनी सती सीता । सुख द्यावें श्रीरघुनाथा । मी येक सेवकु पढियंता । हे ही अहंता त्या नाहीं ॥ १६४ ॥ [ओवी १६४ मुं. प्रतीत नाही.]

निरभिमानाची निजकळा । मी-तू-पण न दिसे डोळां । श्रीराम मजहुनी वेगळा । कदा काळां स्मरेना ॥ १६५ ॥ [ओवी १६४ ते १६६ तं. प्रतींत नाहीत.]

श्रीराम-भक्ताचे संगती । संपातीसी एव्हढी प्राप्ती । ऐकतां श्रीरामाची कीर्ति । निज विश्रांती पावला ॥ ओवी १६४ ते १६६ तं. प्रतींत नाहीत.]

निरभिमानाचें वचन । लंघू न शके त्रिभुवन । भूगोल भेदूनिया [तु. दै. 'महिमान'.] जाण । जाला परिपूर्ण परब्रह्म ॥ १६७ ॥

ऐकतां श्रीरामाची कीर्ति । पशु पक्षी उद्धरती । वनाभिगमन रघुपती । त्रिजगतीं उद्धारू ॥ १६८ ॥

एका जनार्दना शरण । राम नाम ब्रह्म पूर्ण । कथा ऐकतां रामायण । [तं. खेरीज इतरत्र 'उद्धरण जडजीवा'] उद्धरती जन जड जीव ॥ १६९ ॥

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां संपातीउद्धरणं नाम षोडशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सतरावा

## समुद्र मध्यागमन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

आख्याते गृध्रराजेन समुत्पत्य प्लवंगमाः । संगताः प्रीतिमंतश्च विनेदुः सिहसंघवत् ॥ १ ॥

**संपातीने सीताशुद्धि । यथार्थ सांगितली** [मु. 'बुद्धि'.] **विधी । तेणें वानरांची मांदी । जय जय शब्दें गर्जत ॥ १ ॥**

**मिळोनी वानरांचा भारू । सिंहनादाहुन थोरू ।** [त. 'स्वानंदे देती'.] **करिते जाले भुभुःकारु । सीता सुंदरु सांपडली ॥ २ ॥**

**येरयेरां आलिंगन । येरयेरां अभिवंदन । सीता सापडली चिद्रत्न । हरिखें उड्डाण ते करिती ॥ ३ ॥**

**आमच्या कष्टांची जाली अवधी । आजी लाधली सीताशुद्धि ।**
**म्हणौनी वानरांची मांदी । हरुषानंदीं डुल्लत ॥ ४ ॥**

**येरयेरां दाविती वांकुली । येरयेरां करिती गुदगुली । सत्य सीताशुद्धि जाली । आमची फिटली आशंका ॥ ५ ॥**

**अंगद बैसोनी सपरिवार । शत योजने सागर । उलंघू शके कोण वीर । तोची विचार पूसतु ॥ ६ ॥**

**पाचारुनियां जुत्पती । समुद्र लंघनाचे अर्थी । कोणासी कैसी आहे शक्ति । ते समस्तीं सांगावी ॥ ७ ॥**

अथांगदवचः श्रुत्वा ते वै वानरपुंगवाः । स्वं स्वं गतिसमुत्साहमूचुस्ते तु समाहिंताः ॥ २ ॥
गजो गवाक्षः शरभो ऋषभो गंधमादनः । मैंदश्च द्विविदश्चैव सुषेणो जांववान्नलः ॥ ३ ॥

**ऐकोनी अंगद वचनोक्ती । अकराजण सेनापती । समुद्र लंघनाचे अर्थी । आपुलाली शक्ति सांगत ॥ ८ ॥**

**गजु सांगे निज निर्वाण । दश योजन माझें उड्डाण । गवाक्ष बोले पैं आपण । याहुनी द्विगुण शक्ति माझी ॥ ९ ॥**

**शरभु सांगे अति निगुती । तीस योजने माझी शक्ति ।**
**चाळीस योजने माझी गती । बोले पुरुषार्थी ऋषभवीरु ॥ १० ॥**

**शक्ति बोले गंधमादन । प्रन्नास योजनें मज उड्डाण । मैंद बोलिला पैं आपण । साठी योजने निजशक्ति ॥ ११ ॥**

अनुक्रमणिका

**द्विविद बोले आपुली थोरी । उड्डाण योजनें सत्तरी । सुषेण महावीर वानरीं । सरी नांवावरी** [दै. खेरीज इतरत्र 'नेवों नये'.] **जाऊं नये ॥ १२ ॥**

**तारेचा पिता जो सुषेण । पश्चिम शोधूं धाडिला जाण ।**
**त्याचेनि नामें** [दै. तु. 'वीर आपण'.] **हा ही आन । याचें उड्डाण चारी-विसा ॥ १३ ॥**

**सांगावया निज पुरुषार्थु । लज्जायमान जांबुवंतु । सुखी न करवे श्रीरघुनाथु । बळाचा घातु वार्धक्यें ॥ १४ ॥**

**मज तारुण्य अवस्था असती । क्षणें आणूनि सीता सती । सुखी करितों रघुपती । गेली शक्ति वार्धक्यें ॥ १५ ॥**

> किं तु वक्ष्याम्यहं वीर्यमात्मनो यौवनोदये । सुषेणेन मया चैव बलियज्ञे समानतः ॥ ४ ॥
> विक्रमान्त्रीन्क्रमान्विष्णुस्त्रिप्रदक्षिणमावृतान् । विक्रमेण मया तात सशैलवनकाननम् ॥ ५ ॥
> त्रिः सप्तकृत्वा पृथिवी परिक्रांता प्रदक्षिणम् ॥ ६ ॥

**माझिया तारुण्य पुरुषार्था । लज्जा वाटे मज सांगतां । परी किंचित सांगतों आतां । समूळ कथा अवधारा ॥ १६ ॥**

**बळि-यज्ञी नारायण । वामन रूपें येऊनी जाण । करावया बळीचें छळण । जाला आपण त्रिविक्रम ॥ १७ ॥**

**ते काळीं मी आणि सुषेण । दोघांसी पूर्ण तारुण्य । करावया त्रिविक्रम प्रदक्षिण । दोघे जण निघालों ॥ १८ ॥**

**त्रिवार करितां प्रदक्षिण । सुषेणाची शक्ति जाली क्षीण । चालतां मेट वळलें जाण । मूर्छापन्न तो पडिला ॥ १९ ॥**

**ते काळीं माझी आंगवण । लक्षूनि त्रिविक्रम चरण । सशैल पृथ्वी वन कानन । केलें प्रदक्षिण त्रिसप्त ॥ २० ॥**

**येकवीस वेळ एकें उच्छ्वासीं । करूनी पृथ्वी प्रदक्षिणेसी ।** [मुं. 'सवेग'.] **सवेंचि गेलों कैलासासीं । महेशासी वंदावया ॥ २१ ॥**

> गत्वा प्राप्यं च कैलासं गच्छामि विबुधालयम् । दैत्यः पर्वतहस्तस्तु विश्वेन्द्रानब्रवीत्तदा ॥ ७ ॥
> पशूंस्तानजितासूश्च न भविष्यति मत्क्षुधा । इत्युक्त्वा पर्वतं दौर्भ्यां चिक्षेपासुरनंदनः ॥ ८ ॥
> तदा पतनखेदात्तु पर्वतो जानुना धृतः । तेन भग्नश्च मे जानुः खंजः शिथिलविक्रमः ॥ ९ ॥
> स कदाचिद्गतो हंतुं यज्ञस्थानृषिसत्तमान् । बलपुत्रमहं हत्वा क्रुद्धं मृत्युमिवांतकः ॥ १० ॥

**वेगें जाऊनी कैलासासी । वंदूनी येतां महेशासी । बळपुत्र आला स्वर्गासी । इंद्रादिकांसी वधावया ॥ २२ ॥**

अनुक्रमणिका

बळ दैत्य माझा पिता । इंद्रे वधिला अवचिता । त्याचा सूड घेईन आतां । करीन घातां इंद्राच्या ॥ २३ ॥

येणें रागें दैत्यसुतें । मारावया इंद्रातें । पर्वत उचलूनिया हातें । कोपें अद्भुतें चालिला ॥ २४ ॥

इंद्रें हाणीतलें वज्रघातें । वज्र झेलुनी डावेनि हातें । तारावया इंद्रातें । कोपें अद्भुतें चालिला ॥ २५ ॥ [ओवी २५ मुं. तं. त. या प्रतींत नाही.]

बळपुत्र महाबळी । पर्वत झेलुनी करतळीं । करावया इंद्राची रांगोळी । क्रोधानळीं चालिला ॥ २६ ॥ [ओवी २६ व ३० मुं. प्रतीत नाहीत.]

येतां देखोनी गिरिवर । स्वर्गी कांपती सुरवर । तो म्या झेलावया [तु. प्रती खेरीज इतर 'सत्वर'.] साचार । उडी अतिशीघ्र घातली ॥ २७ ॥

पर्वत झेलितां त्वरें करी । तो निष्टला दोहीं करीं । मग म्या धरूनी जानूवरी । अमर पुरी वांचविली ॥ २८ ॥

क्रोध येतां बळपुत्रासी । म्यां घोर युद्ध केलें त्यासी । मद्बळें होतां कासाविसीं । लघु लाघवेसीं पळों पाहे ॥ २९ ॥

पर्वतघायें भग्न चरण । तेणेंसीं करूनी उड्डाण । बळपुत्राचा घेतला प्राण । तेणें सुरगण सुखावले ॥ ३० ॥ [ओवी ३० तं. प्रतीत नाहीं.]

तै पासूनि भग्न चरण । माझी वार्धक्यें शक्ति क्षीण । तऱ्हीं समुद्री उड्डाण । नव्वद योजन उडेन ॥ ३१ ॥

नळ बोलिला आपण । समुद्रामाजीं उड्डाण । सत्याणऊ योजने करीन जाण । या वरतें त्राण मज नाहीं ॥ ३२ ॥ [ओवी ३२, ३३, व ३४ तु. प्रतीत नाहींत. ॥ओवी ४९ मु. प्रतीत नाही.]

नीळु बोलिला वचन । येकें उड्डाणें शत योजन । करीन समुद्रलंघन । हें आंगवण पैं माझी ॥ ३३ ॥ [ओवी ३२, ३३, व ३४ तु. प्रतीत नाहींत. ॥ओवी ४९ मु. प्रतीत नाही.]

वाली सुत राजकुमर । अंगद जो कां महावीर । समुद्र लंघन प्रकार । निज निर्धार सांगतु ॥ ३४ ॥ [ओवी ३२, ३३, व ३४ तु. प्रतीत नाहींत. ॥ओवी ४९ मु. प्रतीत नाही.]

शत योजनें अब्धि लंघन । येकें उड्डाणें करीन जाण । पुढती यावया [पै. त. मुं. 'आपण'; तं. 'आंगवण'.] परतोन । संदेहापन्न मति माझी ॥ ३५ ॥

येकें उड्डाणें उठाउठी । जाईन समुद्र परतटीं । तेथें आलिया राक्षसथाटी । युद्ध निज [तं. त. कं. 'नेहटी'.] नेटीं होय नव्हे ॥ ३६ ॥

माझिया आंगी बाळपण । नाहीं निवडली आंगवण । तऱ्ही स्मरोनी राम चरण । सीता शोधीन क्षण मात्रें ॥ ३७ ॥

अनुक्रमणिका

करितां राम नाम स्मरण । राक्षस बापुडे ते कोण । कायिसा बळियाढा रावण । सीता आणीन निमिषार्धे ॥ ३८ ॥

ऐकोनी अंगदाचें उत्तर । वानर वीरीं केला जय जयकार ।
जुत्पती करिती जोहार । तू राजकुमर आतुर्बळी ॥ ३९ ॥

आम्ही असतां सेवक [तु. तं. कं. मु. 'सकळ'.] सबळ । राजकुमर आणि तूं बाळ ।
समुद्रलंघनाचें कार्य स्थूळ । तुजवरी केवल नये घालूं ॥ ४० ॥

अंगदु म्हणे हें न करितां । प्राण देणें लागेल समस्तां ।
सीताशुद्धीवीण [पै. कं. त. मुं. 'जातां'.] अपमानता । आम्हां समस्तां अनिवार ॥ ४१ ॥

तंव बोलिला जांबवंतु । हनुमंतु वीर अति विख्यातु । हा कां उगलाचि असे पाहातु । अति अद्भुत प्रतापी ॥ ४२ ॥

बाळपणीं कवळिला भानू । राहूचा निर्दळिला अभिमानू । याचा पिता प्रभंजनु । बळ वाहनु हनुमंत ॥ ४३ ॥

यासी गर्भी ब्रह्मचर्य-कौपीन । त्याचा देखणा रघुनंदन । माता अंजनी न देखे नग्न । ब्रह्मचारी पूर्ण कपिराज ॥ ४४ ॥

ऐसे बोलतां जांबुवंत । स्तवनें हरिखेला हनुमंत । लांगूल त्राहाटुनी [त. 'रामचिंतित'.] रोमांचित । आल्हाद युक्त ऊठीला ॥ ४५ ॥

शत योजनें अब्धिलंघन । तें माझें पाद क्रमण । तुम्हासी संदेहो तो कोण । सीता आणीन निमिषार्धें ॥ ४६ ॥

करूनी रावणा उपहती । राक्षसां लाऊनिया ख्याति । प्रतापें आणीन सीता सती । श्रीरघुपती सुखार्थ ॥ ४७ ॥

अवज्ञेनें आणितां सीता । कोपु येईल श्रीरघुनाथा । तरी गांजोनी लंकानाथा । शुद्धी मी आतां आणीन ॥ ४८ ॥

आणीक एक विचार । तुम्हांसी सांगेन साचार । जेणें सुखी होय रघुवीर । तोही प्रकार करीन मी ॥ ४९ ॥

> महासंहननोपेतौ मंहातौ पुरुषर्षभौ । ऋष्यमूकात्पुनः शैलादुभौ तौ रामलक्ष्मणौ ॥ ११ ॥
> आनयिष्यामि वैदेह्याः सकाशं वानरर्षभ । आनयिष्यामि तां देवीं रामस्य महिषीं प्रियाम् ॥ १२ ॥

राक्षसारी रामलक्ष्मण । वीर शूर दोघे जण । सीतेपासीं मी नेइन । सकुळीं रावण निर्दळावया ॥ ५० ॥

अनुक्रमणिका

ऋष्यमूक पर्वतीहुनी जाण । घेऊनियां रामलक्ष्मण । घालीन लंकेसी उड्डाण । सकुळीं रावण निर्दळावया ॥ ५१ ॥

अथवा मीं आतुर्बळी । करूनि राक्षसांची रवंदळी । सीता आणीन रामाजवळीं । हरिखाची टाळी पिटीतु ॥

सीता आणीन रामापासीं । कां रामु नेईन सीतेपासीं ।
अथवा शुद्धि आणीन तुम्हापासीं । या कार्यासी मी करीन ॥ ५३ ॥

लंका द्वारीं रणकल्लोळीं । खेळेन शिरांची चेंडूफळी । लंकेची करीन होळी । तरीच बळी मी हनुमंतु ॥ ५४ ॥

सीता शुद्धि ते तंव किती । यालागीं कायिसी कुंथाकुंथी । सुखी राहाणें तुम्ही समस्तीं । लंकेप्रती मी जातो ॥

ऐसें बोलोनी आपण । समस्तां घांतलें लोटांगण । [मुं. 'आनंदें'] अंगदें दिधलें आलिंगन । गर्जे गगन आल्हादें ॥ ५६ ॥

कपि हरिखले समस्त । त्यांसी हनुमंत बोलत । माझा उड्डाण आंगवात । साहावया शक्त तुम्ही नव्हां ॥ ५७ ॥

नमेम मम महावेगं प्लवतुर्धारयिष्यति । एतानि हि नगस्यास्य शिलासंकटशालिनः ॥ १३ ॥
शिखराणि महेंद्रस्य स्थिराणि च महांति च । एतानि मम निःशेषं पादयोः प्लवगोत्तमाः ॥ १४ ॥

माझिया उड्डाणाच्या निज नेटें । महेंद्र पृथ्वी माजीं दाटे । पर्वतशिखरें होतीं पीठे । कडे कपाटे बुजतील ॥ ५८ ॥

उड्डाणाचा आंगवात । पर्वत तुटोनी भूमीं पडत । शिखरें तृणप्राय उडत । वृक्ष उपडत समूळीं ॥ ५९ ॥

वृक्ष उपडोनी समूळीं । परिभ्रमती अंतराळीं । शुष्कपर्णे वाहटुळीं । तैशा वेळुजाळी उडतील ॥ ६० ॥

उचंबळेल समुद्र जळ । तेणें तिंबेल धृवमंडळ । दिग्गज कांपतील चळचळ । अति तळमळ जळचरां ॥ ६१ ॥

आंगवाताचेनि घर्घर घोरें । बैसती मेघांचीं दांतौरे । समुद्र गड गर्जन वोसरे । येईल शारें कळिकाळां ॥ ६२ ॥

त्या नादाचा धाकु मोठा । उमा झोंबेल नीलकंठा । रमा थापटील वैकुंठा । भय संकटा निवारावया ॥ ६३ ॥

उड्डाण काळ अति दुर्धर । सुर नर धाकती निशाचर । तेथ तुम्ही हो वानर । कैसेनी धीर धराल ॥ ६४ ॥

या लागीं तुम्ही वानर गण । हात धरण्या अवघे जण । पर्वत कवळावे सत्राण । तरीच प्राण वांचती ॥ ६५ ॥

अनुक्रमणिका

**दक्षिणेचे पर्वतकडे । उपडोनी पडती झाडें । तुम्ही राहावें उत्तरेकडे । होवोनी गाढे सुलीन ॥ ६६ ॥**

**जैसा श्रीरामाचा बाण । तैसें करीन उड्डाण । लंकेमाजीं प्रथम कंदन । बोहणी जाण पैं** [तं. खेरीज इतरत्र 'मी करीन'.] **माझी ॥ ६७ ॥**

**घेईन इंद्रजीतासी सळ । तुकीन रावणाचें बळ । राक्षसांचे अमित दळ । तें मी सकळ गांजीन ॥ ६८ ॥**

**पाडूनि राक्षस दांताळीसी । त्यांच्या करीन मी राशी । मग मवीन कुडवेसी । घालीन** पै. खेरीज इतरत्र 'सळेसी'; तु. 'सुवेळेसी'.] **सकळेसीं रावणु ॥ ६९ ॥**

**घेतां लंका घरधांडोळी । जरी न लभे जनकबाळी । लंका उपडूनी समूळीं । रामाजवळीं आणीन ॥ ७० ॥**

> इति तस्य ब्रुवाणस्य सर्वे वानरपुंगवाः । चक्रुः प्रणामं मुदिताः शक्रस्येव मरुद्‌गणाः ॥ १५ ॥
> तस्य पुष्पवतीं चित्रां वनमालां महात्मनः । चक्रुस्ते वानरश्रेष्ठाः वाहुभ्यां मंगलानि च ॥ १६ ॥
> स तैः परिवृतः श्रीमान्वानरैर्वानरर्षभः । आरुरोह नगश्रेष्ठं महेंद्रमरिमर्दनः ॥ १७ ॥

**ऐसें हनुमंताचें वचन । ऐकोनिया वानर गण । हरिखें वंदिलें त्याचे चरण । जेवीं मरुद्‌गण इंद्रासी ॥ ७१ ॥**

**श्रीराम स्मरणे सुमन लीळा । त्याची सुमनाची निजमाळा ।**
**वानरीं विचित्र घातली गळां । वनीं** [दै. 'विजयमाळा'.] **वनमाळा शोभत ॥ ७२ ॥**

**परिवारला वानर भारीं । इंद्रासमान ज्याची थोरी । त्या चढला महेंद्र गिरिवरी । लंकापुरी लक्षोनी ॥ ७३ ॥**

**करोनी श्रीराम स्मरण । देऊनी वानरां आलिंगन । करावया सिंधु उड्डाण । आल्हाद पूर्ण हनुमंतां ॥ ७४ ॥**

**मुखीं श्रीराम नाममुद्रा । हृदयीं धरुनी श्रीरामचंद्रा । उल्लंघावया समुद्रा । कपि कुंजरा आल्हादु ॥ ७५ ॥**

**पहातां निज** [मुं. तं. 'विजय'.] **बाहूंचें त्राण । आंगा आलें जी स्फुरण । लांगूल त्राहाटितांची जाण । रोमांच पूर्ण थरथरती ॥ ७६ ॥**

**पूंस आदळितां बळी । शिळा शिखरें जालीं रांगोळी । वृक्ष मिळाले पैं धुळी । पुष्प-फळीं समवेत ॥ ७७ ॥**

**पक्षीं किलकिलती आकाशीं । महा प्रलयो दिग्गजांसी । तरस तगर बिळवासीं । सिंह सूकरासीं अति त्रासु ॥ ७८ ॥**

**उड्डाण करितां महाबळी । पर्वत दडपला पायातळीं । तेणें तो रूतला भूतळीं । सर्प पाताळीं दडपले ॥ ७९ ॥**

**अर्ध सर्प दडपतां येक । बाहेरीं काढूनिया मुख । सक्रोधें वमितां पैं विख । शिळा निःशेख भस्म होती ॥ ८० ॥**

अनुक्रमणिका

जैसीं उभारिलीं छत्रें । तैसी सर्पफणा तदाकारें । अर्ध दडपलीं शरीरें । फूंफूंकारें गर्जती ॥ ८१ ॥

सर्पीं वमितां पैं गरळ । उठिले अग्नीचे कल्लोळ । वीख सरलिया सकळ । अति विकळ तळमळिती ॥ ८२ ॥

पर्वतीं दिव्य औषधीं अनेक । दाटलिया स्रवती पियूख । तो रसु लागलियांचि देख । वीख निःशेष निमाले ॥ ८३ ॥

भारें दडपला पर्वतु । श्वेत पीत आरक्त धातु । धारावर्ती पैं स्रवतु । तेणें [त. 'गर्जतु'.] शोभतु गिरिराजु ॥ ८४ ॥

वामनु जाला त्रिविक्रम । तैसा वाढला वानरोत्तम । दृढ धरिला आक्रम । पराक्रम स्वामिकार्या ॥ ८५ ॥

पर्वणीस वाढे जेवी समुद्र । तैसा वाढला कपींद्र । देखोनि दचकला कालाग्नि रूद्र । ऐसा भयासुर भासतु ॥ ८६ ॥

समुद्र लंघन कवतिक । पाहों आले ब्रह्मादिक । सुरवर दाटले अनेक । सिद्ध गुह्यक गंधर्व ॥ ८७ ॥

नानापरीच्या विमान पंक्ति । नभीं दाटल्या नेणों किती ।
कैसा कैसा उडेल मारुती । पाहावया समस्तीं आल्हादु ॥ ८८ ॥

उमा रमा सावित्री । पाहों आल्या तिन्हीं नारी । समुद्रामाजीं वानरीं । कैशापरी उडिजेल ॥ ८९ ॥

समुष्टी बाहु धरूनी पुढां । वळूनी पुंसाचा आंकुडा । बळें उडतां पैं माकडां । पडला तडा गिरीकुटीं ॥ ९० ॥

कडे खचले सागरीं । शिखरें उडाली अंबरीं । समूळ वृक्ष वारेंनि करीं । गगनांतरीं परिभ्रमत ॥ ९१ ॥

जैसा बोळऊनी अति आप्त । सुहृद माघारें परतत । तेंवि पाषाण वृक्ष [दै. तु. खेरीज इतरत्र 'समस्त'] पर्वत । माघारें पडत सागरीं ॥ ९२ ॥

विटंक वानरें दिधली हांक । दुमदुमले तिन्ही लोक । कळिकाळें घेतला धांक । सुर साशंक [तं. 'मानसी'] विमानीं ॥ ९३ ॥

जिणोनी पवनाची शक्ति । उलंघूनिया मनोगती । लंका लक्षूनी मारुती । शीघ्र गती निघाला ॥ ९४ ॥

वेगें उडतां वानर । क्षोभें खळबळिला सागर । भेणें भुलले जळचर । येर येरां झोंबती ॥ ९५ ॥

आंगवातें मारुती । खुंटली रविचंद्राची गती । ग्रह नक्षेत्रें डळमळिती । निजात्म गती खुंटली ॥ ९६ ॥

हनुमंताच्या आंगदीप्ति । नभीं शशि सूर्य लोपती । नक्षत्रांच्या लाह्या होती । तेजें मारुती दैदीप्य ॥ ९७ ॥
बाळसूर्याचा बोतिला । कीं सेंदुराचा डंवरिला । [इं. 'किंशुकपुष्पीं फुलला'.] ना तो कुंकुमाचा घडिला । तैसा

अनुक्रमणिका

शोभला हनुमंत ॥ ९८ ॥

हनुमंताचिया आंगप्रभा । नभत्व लोपताहे नभा । दिव्य तेजाचा निज गाभा । तैसी शोभा शोभत ॥ ९९ ॥

जैसा रामबाण नभाआंत । तैसा हनुमंत असे जात । साधावया स्वामिकार्यार्थ । त्वरें जात मारुती ॥ १०० ॥

जैसा तेजस्वी दिवाकर । तैसा जातुसे वानर । विश्रांति द्यावया सत्वर । सांगे सागर मैनाद्रि ॥ १०१ ॥

मी सगराचा स्थापितु । सूर्यवंशीचा नित्यांकितु । त्वरेने जातसे हनुमंतु । रामकार्यार्थु साधावया ॥ १०२ ॥

> अस्य साह्यं मया देयमिक्ष्वाकुकुलवर्तिनः । मम हीक्ष्वाकवः पूज्याः परं पूज्यतमास्ततः ॥ १८ ॥
> कुरु साचिव्यमस्माकं नातः कालात्ययो भवेत् । सलिलादूर्ध्वमुत्तिष्ठ विश्रमेत यथा कपिः ॥ १९ ॥

मज पूज्यता सूर्यवंशीं । साह्य होआवें हनुमंतासी । विसांवा द्यावा वानरांसी । अति त्वरेसी [मुं 'भागल्या'.] भागला ॥ १०३ ॥

या लागीं तुवां गा मैनाद्री । वेगीं निघोनी [तं. 'जाय'.] जळाबाहेरी । सामोरा होऊनी वानरीं । द्यावी कपींद्रा विश्रांती ॥

हनुमंत जातो त्वरें करी । विलंबू करितां जाईल दूरी । इतुकें माझें प्राधान्य करी । देई वानरीं विश्रांती ॥ १०५ ॥

विश्रांती दिधलिया वानरीं । सेवा उपतिष्ठेल श्रीरामचंद्रीं । पुढील मार्ग लंकापुरीं । क्षणामाझारीं पावेल ॥ १०६ ॥

ऐके मैनाद्रि गिरिनाथा । विश्रांति दिधलीया हनुमंता । सुख संतोष श्रीरघुनाथा । हें कार्य सर्वथा त्वां कीजे ॥

ऐसे सांगतां सागर । उल्हासें वाढला गिरिवर । सुस्वादु फळें अरुवार । निर्मळ नीर कपिपूजे ॥ १०८ ॥

विश्रांती स्थळ अति प्रबळ । मंद सुगंध मलयानीळ । पंचमे कूजती कोकिळ । सुमनीं अलिकुळ [तं. 'संगम प्रिय'; तु. पै. मु. 'सामग प्रायै'.] झुंकारती ॥ १०९ ॥

मागील जाऊनी सकळ श्रम । पुढें विश्रांती पावेल परम । ऐसा साधिला आराम । वानरोत्तम विश्रांती ॥ ११० ॥

ऐसिया आराम कैवाडें । हनुमंताचिया मार्गा पुढें । गिरी वाढला वाडें कोडें । विश्रांती [मुं. 'मार्ग पुढें रोधला'.] चाडें कपींद्रा ॥ १११ ॥

वाढला देखोनी पर्वतु । उंची चढे हनुमंतु । गिरी वाढला मार्ग रोधितु । त्याहूनि मारुती उंचावला ॥ ११२ ॥

अनुक्रमणिका

जंव जंव पर्वत वरता वाढे । तंव तंव हनुमंत गगना चढे । श्रमुन बाधी तयाकडे । [त. 'नघडे तयासी'.] विश्रांती चाड असेना ॥ ११३ ॥

नभीं चढला योजनें शत । द्विगुणें वाढला पर्वत । हनुमान चढला पंचशत । गिरी सप्तशत वाढला ॥ ११४ ॥

हनुमान चढला सहस्त्र भरी । तितुकाची स्वयें वाढला गिरी ।
कपि चढला त्याही वरी । समुद्र परपारीं पावावया ॥ ११५ ॥

पर्वत वाढतां लक्ष कोटी । कपी चढताहे नभोपृष्ठी । पर्वतु स्वयें कपाळ पिटी । चरण भेटी मज नव्हे ॥ ११६ ॥

लंघूनि जातां हनुमंतु । [तं. 'मगतो'.] ग्लानी मैनाक विनवितु । तूं कृपाळू रामदूतु । उपेक्षितु कां जासी ॥ ११७ ॥

तुझा लागलीया चरण । मी होईन अती पावन । या लागीं वाढलों जाण । नाहीं अभिमान तूजसी ॥ ११८ ॥

सागरें सांगीतलें मजप्रती । हनुमान पूजावा अतिथी । या लागीं आलों तुज प्रति । घ्यावी विश्रांती रामभक्ता ॥

सगरीं स्थापिला साचार । यालागीं नांवें तो सागर । तोहि सूर्यवंशीं किंकर । आम्ही समग्र दास तुझे ॥ १२० ॥

तुझिया पित्याचा स्थापितु । मी वसताहे समुद्रांतु । तोहि अवधारी वृत्तांतु । उपेक्षितु जावों नको ॥ १२१ ॥

पूर्वी पर्वत पक्षधर । उड्डाण देती अति दुर्धर । पुरें पाटणें करितीचूर । नगरें नगर भंगिती ॥ १२२ ॥

इंद्रे घेवोनिया वज्र । गिरी पक्ष छेदिले समग्र । माझेहि छेदावया दुर्धर । [तु. दै. 'दुर्धर वज्र घेतलें'.] वज्रधर चालीला ॥ १२३ ॥

मज होतां पलायमान । साह्य तुझा पिता पवन । समुद्रीं आला कांखें घेऊन । तेणें हा प्राण [मुं. तं. तु खेरीज इतरत्र 'वांचला'.] वांचविला ॥ १२४ ॥

तुझिया पितयाचा स्थापितु । समुद्रा माजीं होतों गुप्तु । येतां देखोनी हनुमंतु । विश्रांती हेतु वाढलों ॥ १२५ ॥

ऐकोनी मैनाद्रि वृत्तांता । कृपेने सांगे निज कार्यार्था । शोधावया राम-कांता । अति शीघ्रता मी जातों ॥ १२६ ॥

[तं. 'साधावी सीता'.] आधीं असावी श्रांतता । मग घ्यावी विश्रांतता । नामस्मरणें रघुनाथा । श्रमाची वार्ता मज

**नाहीं ॥ १२७ ॥**

**ज्यासी नाहीं नामीं विश्वासु । त्यासी बाधी श्रम शोक त्रासु ।**
**मी श्रीरामाचा निजदासु । श्रमाचा लेशु मज नाहीं ॥ १२८ ॥**

**ऐकोनी हनुमंताचें वचन । मैनाद्रीसी आलें रुदन । भाग्यें अभाग्य मी पूर्ण । हनुमंत चरण अप्राप्त ॥ १२९ ॥**

**पर्वताचा खेद देखोन । हनुमंत बोलिला कृपें करून । तुझें ने घे फळ मूळ जीवन । अंगुली स्पर्श तुज करितों ॥**

**पर्वत म्हणे हनुमंता । कृपेनें करूं ठेवी माथा । इतुकेनि मी सनाथतां । आणीक सर्वथा मागेना ॥ १३१ ॥**

**तंव इंद्र म्हणे मैनाद्रि । जालासी हनुमंता साहाकारी । तुज मी सर्वथा न मारी । समुद्रा बाहेरी सुखें विचर ॥**

**हनुमंतें तयें वेळीं । पर्वतीं ठेवितां आंगोळी । भारें बैसला समुद्रातळीं । उठी पाताळीं हाहाःकारु ॥ १३३ ॥**

**पन्नग म्हणती पर्वतावरी । अतिशय भारू पडिला भारी ।**
**करील सप्त पाताळांची चुरी । नव नागांतरीं हाहाःकार ॥ १३४ ॥**

**आंगोळी ठेवितांचि शिरीं । पर्वत बुडाला सागरीं । कपि जरी बैसतांवरी । तैं होता चकचूरी** [मुं. खेरीज इतरत्र ‘निर्नाम’.] **निमिषार्धें ॥ १३५ ॥**

**इतुकी करोनिया ख्याति । पुढें चालिला मारुती । ब्रह्मादिकां विस्मयो चित्तीं । जय जय करिती सुरसिद्ध ॥ १३६ ॥**

**हे प्रथमारंभ ख्याती । उद्धरोनी मैनाद्रीप्रती । उल्लंघावया अपांपती । शीघ्र गती निघाला ॥ १३७ ॥**

**देव दानव अवघे जण । हनुमंताचें मार्ग रोधन । करावया सूचिलें विघ्न । तें हि कथन अवधारा ॥ १३८ ॥**

> ततो देवा सगंधर्वा सिद्धाश्च ऋषिभिःसह । अब्रुवन्सूर्यसंकाशाः सुरसां दनुमातरम् ॥ २० ॥
> अयं वातात्मजः श्रीमान् प्लवते सागरोपरि । हनूमान्नाम तस्य त्वं मुहूर्तं विघ्नमाचर ॥ २१ ॥
> बलमिच्छामहे ज्ञातुं भूयश्चास्य पराक्रमम् । किं करिष्यत्युपायं वा विषादं वा करिष्यति ॥ २२ ॥

**किती बळ आहे हनुमंता । पाहावया आवडी देवां समस्ता । दानवाची दनू जे माता ।** [मुं. ‘देवी समस्ता’.] **ते विघ्नार्था धाडिली ॥**

**सागरावरी शीघ्र गमन । करिताहे वायूनंदन । राक्षस रुपें** [कं. खेरीज इतरत्र ‘करावे विघ्न’.] **त्वां जाउन । गमनागमन खुंटावें ॥ १४० ॥**

अनुक्रमणिका

जावों शकेल निजात्मशक्ति । किंवा येईल काकूलती । काय करील मारुती । तें निश्चितीं पाहों आम्ही ॥ १४१ ॥

दनू सुरसा दानवमाता । कपट तेजें सतेजता । ऐकोनी देवांची हे कथा । विघ्न हनुमंता करुं आली ॥ १४२ ॥

आश्रयूनी समुद्र जळ । जाली राक्षसी विक्राळ । मुख पसरुनी [मु. दै. 'कराळ'; तं. 'विकराळ'.] कंकाळ । कपि तत्काळ गिळूं आली ॥ १४३ ॥

येणें मार्गे जे जे येत । ते ते माझें भक्ष निश्चित । तुज मी गिळीन पूंसयुक्त । रीघ मुखांत वानरा ॥ १४४ ॥

सीता शुद्धि जातां लवलाहे । श्रीरामकार्या साह्य होये । विघ्न न करी वो माये । तुझे पाये वंदितो ॥ १४५ ॥

भोजनीं वारी क्षुधिता । तो सज्ञान अति मूर्खता । कैंचा राम कैंची सीता । तुज मी आतां भक्षीन ॥ १४६ ॥

आपुलें चुकवावया मरण । मज सांगसी ब्रह्मज्ञान । क्षुधेनें निमालियां [मुं. 'जाण'.] प्राण । सुकृत कोण भोगील ॥ १४७ ॥

राक्षसी पसरी वदन । हनुमान जाला एक योजन । येरी मुख पसरी द्विगुण । दश योजन कपि जाला ॥ १४८ ॥

मुख पसरी योजने वीस । हनुमान जाला योजने तीस । येरीं मुख पसरी चाळिस । कपि पन्नास हों सरला ॥

शत योजने पसरी वक्त्र । हनुमान जाला अंगुष्ठ मात्र । मुखीं रिघाला सत्वर । नभीं सुरवर देखती ॥ १५० ॥

देव म्हणती हनुमंता । सुरसेनें गिळिलें तत्वतां । शुद्धिकरणें राहिली सीता । अति मूर्खता [मुं. खेरीज इतरत्र 'आम्ही केली'.] आमुची ॥ १५१ ॥

हनुमान शीघ्र करितां गमन । आम्ही कां करविलें विघ्न । आम्हां कोपेल रघुनंदन । सुरगण धांकती ॥ १५२ ॥

हनुमंत रिघें राक्षसीवदनी । अंतरीं पाहातां कश्यप पत्नी । दानवांची सख्खी जननी । माता सापत्न देवांची ॥

पवन जो कां माझा पिता । तयाची हे सावत्र माता । ईच्या करुं नये घातां । हृदयीं हनुमंतां मानलें ॥ १५४ ॥

राम कार्याचे त्वरें करी । येथुनी निघावें बाहेरी । वानराची युक्ति भारी । देखे कर्णरंध्रीं निर्गमु ॥ १५५ ॥

सुरसा चाटी आवाळे । वानर दांतातळीं नाडळे । मुखीचें मुखीं हारपलें । किंवा गुंतले दशनांतरीं ॥ १५६ ॥

अनुक्रमणिका

राक्षसी घे वदन धांडोळी । तंव हनुमंत निघे कर्णबिळीं । भुभुःकारें देत आरोळी । पिटिली टाळी सुरवरीं ॥

हनुमंत विवेकी अति विख्यातु । न करुनी सुरसेचा घातु । निर्गमु देखिला श्रवणांतु । विघ्नातीतु राम नामें ॥

विघ्नातीत श्रीराम भक्त । त्या माजीं मुखरी हनुमंत । श्रीरामनाम जे स्मरत । ते यशवंत तिहींलोकीं ॥ १५९ ॥

सुमने वरुषती देव । जयजयकार करिती सर्व । हनुमंताचें लघु लाघव । अति अपूर्व तिहीं लोकीं ॥ १६० ॥
[ओवी १६० तु. तं. प्रतीत नाही.]

मुखीं श्रीराम नाममुद्रा । हृदयीं धरिलें श्रीरामचंद्रा । कैंचे विघ्न त्या कपींद्रा । क्षणे समुद्रा लंघील ॥ १६१ ॥

न करी माझा जीवघात । हनुमंत निजबळे निर्मुक्त । देखोनि सुरसा संतोषत । आशीर्वाद देत हनुमंता ॥ १६२ ॥

अब्रवीत्सुरसादेवी स्वेन रुपेण वानरम् । अर्थसिद्धिहरिश्रेष्ठ गच्छ सौम्य यथासुखम् ॥ २३ ॥
समयाय च वैदेही राघवेण महात्मनः ॥ २४ ॥

सांडोनी राक्षसी [तं. खेरीज इतरत्र 'क्रूरता'.] कुरुपता । सरसा जाली शांत रुपता । अर्थसिद्धि पावसी हनुमंता । श्रीराम सीता संयोगे ॥ १६३ ॥

श्रीरामनामीं तुझी मिठी । यालागीं तूं दाटुगा सृष्टी ।
तुझेनी श्रीरामा सीतेसी भेटी । रामराज्य सृष्टीं तुझेनी ॥ १६४ ॥

सीता शुद्धीची [त. 'श्रमशुद्धि'.] समयसिद्धि । तुझेनि होईल त्रिशुद्धि । निमिषें लंघिसील उदधी । तूं सद्बुद्धि कपींद्रा ॥ १६५ ॥

ऐसे बोलोनी उत्तर । सुरसेनी वंदिला वानर । येरु निघाला सत्वर । समुद्र पार लंघावया ॥ १६६ ॥

सुरसा रचिलें विघ्न । कपीनें जिंकिली न मारुन । पुढें सागरीं बलवान । केले कंदन तें ऐका ॥ १६७ ॥

सकळ ग्रंथांचे माहेर । तें हें श्रीरामचरित्र । पवित्र वदतयाचे वक्त्र । पवित्र श्रोत श्रोतियांचे ॥ १६८ ॥

स्वामीसेवेसी विकिला प्राण । ब्रह्मज्ञानाचें भूषण । नवविध भक्तीचें जीवन । कपी कथन शिववंद्य ॥ १६९ ॥

करितां हनुमंताचें स्मरण । विघ्न तेंचि होय निर्विघ्न । स्मरणें सुलभ ब्रह्मज्ञान । कथा पावन हनुमंतें ॥ १७० ॥

येका जनार्दना शरण । कपिप्रतापें कथा गहन । पुढें काय केलें [तं. खेरीज इतरत्र 'कथन'.] कंदन । सावधान

अवधारा ॥ १७१ ॥

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां समुद्रमध्यागमनं नाम सप्तदशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग अठरावा

## हनुमंत लंकाभिगमन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**सुरसा देवी विघ्नातें । स्वयें जिणोनी हनुमंतें । पुढें लंघितां समुद्रातें । सिहिंका त्यातें ग्रासूं आली ॥ १ ॥**

प्लवमानं तथा तंतु सिंहिका वीक्ष्य वानरम् । मनसा चिंतयामास प्रवृद्धा कामरूपिणी ॥ १ ॥
इदं हि सुमहत्संत्त्व चिरस्य वशमागतम् । इति संचित्य सा तस्य छायामस्यसमाक्षिपत् ॥ २ ॥

**गगनीं उडतां हनुमंत । छाया पडली समुद्रांत । सिहिंकेचा मनोरथ । ग्रासावया मारुती वाढिन्नली ॥ २ ॥**

**शिव वरद सिंहिकेसी । छाया धरी ते प्राणी ग्रासी । छायाग्रहो नाम तीसी । ते हनुमंतासी गिळूं आली ॥ ३ ॥**

**कपि छाया पडतां जळीं । सिंहिका ते छाया गिळी । हनुमंताची गती खुंटली । देहाची वळली मुरकुंडी ॥ ४ ॥**

छायायां स गृहीतायां चिन्तयामास वानरः । समाक्षिप्तोऽस्मि सहसा विरुद्ध इव पर्वतः ॥ ३ ॥
तिर्यगूर्ध्वमधश्चापि वीक्ष्यमाणस्ततः कपि : । छायाग्राही महावीर्यो भविष्यति न संशयः ॥ ४ ॥

**छाया ग्रासितां सिंहिकेसीं । गती खुंटली हनुमंतासी । तेणे तो जाला कासाविसी । पाहे चौपासीं गजबजिला ॥**

**मग स्मरोनिया रघुनाथ । अध ऊर्ध्व हनुमंत पाहत । तंव देखिली जळां आंत । अति अद्भुत राक्षसी ॥ ६ ॥**

**छाया ग्रहो निज नामता । ते हे राक्षसी तत्वता । वैरिया राहूची होय माता । इचिया घातां मी करीन ॥ ७ ॥**

**समुद्रामाजीं हें महाविघ्न । तें मी करीन निर्विघ्न । म्हणऊनी हनुमंतें आपण । साटोप पूर्ण मांडिला ॥ ८ ॥**

**सिंहिका पसरोनी मुख । आली हनुमंता सन्मुख । कपि वाढला अधिकाधिक । तेहि अत्यंत मुख पसरी ॥ ९ ॥**

**येक जाभाडें पाताळीं । दुजें लाविलें नभोमंडळी । हनुमान गिळावया महाबली । गर्जोनि** [मुं. 'किंकाळी टाकिली'.] **कंकाळी चालिली ॥ १० ॥**

**तिचिया मुखामाजीं उडी । हनुमान घाली लवडसवडी । दांतातळीं जंव ते रगडी । तंव घाटीं बुडीं रिगाला ॥**

अनुक्रमणिका

तस्यास्त्वावृते वक्त्रे निष्पपात महाबलः । अंत्राण्यादाय सर्वाणि वेगेनोदपतन्मुखात् ॥ ५ ॥
हृतजीवा हनूमता न्यपतल्लवणांभसि ॥

**रिघोनी तिच्या उदरा भीतरीं । काळीज चिरिलें नखाग्रीं । अंत्रमाळा घेउनि करीं । निघे बाहेरी वानरू ॥ १२ ॥**

**नाहीं दांतातळीं आडळलें । नाहीं चवीतें चाखिलें । नाहीं मेदमांस भक्षिलें । जीव घेतला वानरें ॥ १३ ॥**

**मी म्हणे हे अल्प पशू । तंव हा वानर कर्कशु । भरूं न सकतां ग्रासू । जीवा नाशू येणें केला ॥ १४ ॥**

**याची धरूं जातां छाया । माझी यानें नासिली काया । उद्धरिलें मज कपिराया । तुझियां पायांचेनि रजें ॥**

**श्रीराम भक्ताचे रजःकण ।** [मुं. 'लागतां नाहीं'.] **निःशेष नाशी जन्ममरण । घातक्यां देती ब्रह्मपूर्ण । साधू सज्जन कृपाळू ॥ १६ ॥**

**करावया श्रीरामाची भक्ति । पढावी श्रीरामाची कीर्ति ।**
**श्रीराम नामाच्या आवृत्ती । जड उद्धरती तिहीं लोकीं ॥ १७ ॥** [ओवी १७ कं. प्रतीत नाही.]

**ऐसी देवोनी आरोळी । सिंहिका पडे समुद्र जळीं । स्वर्गीं देवीं पिटिलीं टाळी । आतुर्बळी हनुमंत ॥ १८ ॥** [ओव्या १३ ते १८ तं. प्रतीत नाहीत.]

**ग्रहणा पासूनी सुटे चंद्र । तैसा शोभताहे कपींद्र । त्यातें स्तविती सुर सुरेंद्र । ब्रह्मा शंकर तोषोनी ॥ १९ ॥**

भीममद्य कृतं कर्म महत्सत्वं त्वया हतम् । यस्य वैतानि चत्वारि वानरेंद्र यथा तव ॥ ६ ॥
धृतिर्मतिर्बलं दाक्ष्यमात्मनः प्लवतांवर । चतुर्थकर्म तं दुष्ट्वा दुष्करं कृतमोजसा ॥ ७ ॥

**छायाग्रहो जीवें मारी । दुष्ट नष्ट कामाचारी । भयानक क्रूर भारी । ते त्वां नखाग्रीं विदारिली ॥ २० ॥**

**करितां समुद्रीं उड्डाण । चाऱ्ही पराक्रम दारुण । तुवां दाविली आंगवण । श्रीराम भजन** [तं. खेरीज इतरत्रं 'निज नेटे'.] **निज नेहटीं ॥ २१ ॥**

**श्रीराम नामीं दृढ** [कं. खेरीज इतरत्र 'वृत्ति'.] **धृती । रामस्मरणीं दृढ मती । अति दक्षता राम भक्ति । श्रीराम शक्ति बळिष्ठ ॥ २२ ॥**

**तेणें बळें आपांपती । उल्लंघितां केली ख्याती । येवढी हनुमंताची कीर्ती । स्वर्गीं वानिती सुरवर ॥ २३ ॥**

**प्रथम उड्डाणीं** [दै. 'महाशैली'.] **महाबळी । महेंद्रु दाटला भूतळीं । सर्प दडपले पर्वतातळीं । नाग पाताळीं हडबडिले ॥ २४ ॥**
**हे प्रथम उड्डाणाची ख्याति । दुसरी हनुमंताची कीर्ती । मैनाद्रि देतां विश्रांती । नेघे कपिपती महाबाहो ॥ २५**

अनुक्रमणिका

॥

विश्रांती नेघोनी महाबळी । पर्वतीं ठेवितां आंगोळी । भारें बुडाला समुद्र जळीं । बैसला तळीं भारभूत ॥ २६ ॥

तेणें अतळ वितळ सुतळ । रसातळ तळातळ । हडबडिले सप्त पाताळ । भारें प्रबळ गिरिदाटीं ॥ २७ ॥

आंगोळी लावितां हनुमंतु । भारें आक्रांतला पर्वतु । हा दुजा पवाडा समुद्राआंतु । केली ख्याति वानरें ॥ २८ ॥

उल्लंघितां अपांपती । तिसरी केली महाख्याती । सुरसा [दे. मु. ‘केवळ’.] परम कपटमूर्ति । निजात्म शक्ति जिंतिली ॥ २९ ॥

सुरसा दनु दानवमाता । छळणें छळिलें समस्तां । ते छळण न चलेचि हनुमंता । होय निघतां पुरुषार्थी ॥ ३० ॥

ऋषि आणि दानव मानवां । सुरसा छळणें छळिलें देवां । ती माजीं करूनी रिघावा । केला निघावा हनुमंतें ॥

सुरसा हनुमंत गिळिला । परी तो जिवें नाहीं मेला । तिचा घातु नाहीं केला । झाडा घेतला कपटाचा ॥ ३२ ॥

तिच्या कपटाची करितां झाडी । सुरसा जाहाली बापुडी । पायां लागली लवड सवडी । वंदी आवडी हनुमंता ॥

आजीपासोनियां आतां । निमाली कपट कथा वार्ता । विजयी होसील हनुमंता । श्रीरघुनाथा कृतकार्या ॥ ३४ ॥

करूनी कपटाची झाडी । राम कार्याची तांतडी । हनुमान निघाला आवडी । घालावया उडी लंकेसी ॥ ३५ ॥

तिसरी हनुमंताची ख्याती । अतिपावन त्री जगतीं । देव ब्राह्मण वंदिती । [तु. ‘अवघी’; दे. ‘आवडी’.] अगाध कीर्ति हनुमंता ॥ ३६ ॥

आणीक चौथा पवाडा । हनुमंते केला गाढा । सिंहिका निर्दळूनी होडा । निघाला पुढा लंकेसी ॥ ३७ ॥

सिंहिका राक्षसी दुर्धर । हनुमान गिळिला सत्वर । नखें निवटूनि जिव्हार । निघे वानर [मुं. ‘बाहेरी’.] गर्जतु ॥ ३८ ॥

अनुक्रमणिका

[मुं. खेरीज इतरत्र ‘ग्रहण’.] छाया ग्रहो दुष्ट भारी । जळींची जळचरें संहारी । स्थळजरातें जिवे मारी । घोट भरो खेचरांचा ॥ ३९ ॥

तिचे उघडूनिया पोट । समुद्रीं वाहती केली वाट । चौथी कीर्ति हे उद्भट । केली वरिष्ठ वानरें ॥ ४० ॥

त्रिविधा भूतांची भक्षक । प्राणिमात्रां तिचेनी दुःख । कपीनें मारितां निःशेख । तिन्ही लोक सुखी जाले ॥

ऐसी चतुर्विध कीर्ति । करूनी निघाला मारुती । पुढें जे जे केली ख्याती । तेही ग्रंथार्थी अवधारा ॥ ४२ ॥

सिंहिकेच्या उदराप्रती । विदारण केलें मारुती । तेचि त्यासी विश्रांती । पुढील ख्याती अवधारा ॥ ४३ ॥

सिंहिका विदारण स्थिती । विश्रांती जाली मारुती । तेणें चौगुणीं वाढली शक्ति । लंके प्रती जावया ॥ ४४ ॥

करूनी सिंहिका विदारण । हनुमंतें केलें उड्डाण । लंका सांडूनिया जाण । गेला आपण पडलंके ॥ ४५ ॥

पडलंका [मुं. तु. दै. तं. खेरीज इतरत्र ‘राज्यस्थानी’.] राजधानी । क्रौंचा रावणाची बहिणी । घर्घर राक्षसाची पत्नी । [मुं. तं. दै. ‘राज्यस्थापनी’.] राज्य स्थानीं ते मुख्य ॥ ४६ ॥

रावणा इंद्रेसी युद्ध थोर । घर्घर क्रौंचेचा भर्तार । युद्धीं पडला महावीर । राक्षस भार गांजूनी ॥ ४७ ॥

इंद्रे युद्ध केलें दारूण । राक्षसीं दांतीं धरिलें तृण । युद्धीं आक्रंदे रावण । रण कंदन देखौनी ॥ ४८ ॥ [ओवी ४८ कं. प्रतीत नाही.]

रावणें तृण धरितां रणांगणीं । पाठीराखा नाहीं कोण्ही । सेना प्रधान गेले पळोनी । निद्रा स्थानी कुंभकर्ण ॥

युद्धा साह्य झाला घर्घर । युद्ध केलें अति दुर्धर । इंद्रे मारिला हाणोनि वज्र । केला चकचूर हाडांचा ॥ ५० ॥

शिववरदाचिये शक्ति । इंद्रजीत आला गुप्तगती । अतर्क्य अभिचाराचे युक्ती । अमरपती तेणें धरिला ॥

इंद्रा लाऊनिया गळबंधन । लंकेसी आणिला [तु. ‘बांधून’.] आपण । इंद्रजीत हे अभिधान । तैं पासून पावला ॥ ५२ ॥

रावणाचिया निज साह्यासी । घर्घरू पडिला रणभूमीसी । तेणें आभारें क्रौंचेसी । दिधलें राज्यासी पडलंका ॥

चौदा सहस्त्र निशाचरी । ठेविल्या क्रौंचेचिये सेवेकरी । अतिशयेसीं दुर्धरी । निज झुंझारी खेचरा ॥ ५४ ॥

ते पडलंका पडिपाडी । उत्तर [मुं. ‘सिधूचिये’.] स्त्रोताचिये थडी । हनुमंताची पडली उडी । अति कडाडी दुर्धर ॥ ५५ ॥

अनुक्रमणिका

दुमदुमिलें पडलंका पीठ । दुमदुमिलें लंका त्रिकूट । निकुंभिलेसी कडकडाट । अति उद्भट ऊठिला ॥ ५६ ॥

भूकंप लंके भीतरीं । तेणें कांपती नरनारी । सीता आणिली करोनी चोरी । तैंहूनि नगरीं बहूविघ्नें ॥ ५७ ॥

तेणें नादें पडलंकेसी । [दै. 'आक्रोशें'; तु. 'अतिक्रोधें'.] बाहेरी धांविन्नल्या राक्षसी । तिहीं देखिलें हनुमंतासी । मग चौपासी वेढिला ॥ ५८ ॥

हनुमंत बाळ ब्रह्मचारी । पुरुषार्थ न करी स्त्रियांवरी । तेणें बांधोनी खेचरीं । नेला भीतरीं पडलंके ॥ ५९ ॥

हनुमंत रुप धरी सान । क्रौंचा देखे दीन वदन । लाविलें देखोनी गळबंधन । वानर कोण कोणाचा ॥ ६० ॥

तीसीं सांगती खेचरी । दणका उठिला उड्डाणासरी । तो हा आणिला भक्षा-वारी । शीघ्र करी फळाहारू ॥ ६१ ॥

करावया कपीचा घातु । क्रौंचा घाली शस्त्रा हातु । देखोनी हनुमंत हांसतु । माझा भक्षार्थु तुम्ही नेणां ॥ ६२ ॥

जडत्वें मांस नाहीं अंतरी । म्हणोनी उडों झाडावरी । निष्काळजी निज शरीरीं । गिरि गव्हरीं तेणें वसों ॥ ६३ ॥

रुधिरें पूर्ण देह स्थिति । छेदू करितां जिरेल क्षितीं । काय खासील वोली माती । ऐसी युक्ति न करावी ॥ ६४ ॥

मांस नाहीं मज अंतरीं । मरण भयाची नाहीं शिरीं । देह लागावा परोपकारी । सगळाचि करी भक्षण ॥ ६५ ॥

मज सगळें गिळिलियावरी । चवी चाखसी तोंड भरी । माझे निजपुष्टीची थोरी । क्षणा माझारीं पावसील ॥ ६६ ॥

ऐकोनि हनुमंताची युक्ति । क्रौंचा सत्य मानी चित्तीं । [मु. 'सवेंचि'.] सवेग गिळावया मारुती । वदन वृत्ति पसरिली ॥ ६७ ॥

तिनें पसरिली जाभाडी । हनुमंत सवेग घाली उडी । आकळितां जिव्हा लडबडी । घाटीबुडीं रिघाला ॥ ६८ ॥

ना कळेंचि जिव्हा मेळीं । नाडळेचि दांतातळीं । वदन वाफा जाली होळी । चाटी आंवाळी राक्षसी ॥ ६९ ॥

आंबट तिखट कीं खारट । गोड अथवा ते तुरट । चवी न कळेचि स्पष्ट । करी कटकट राक्षसी ॥ ७० ॥ [ओवी ७० तु. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

ऐशा सांगता निजगोष्टी । कपीने काळिज धरिलें मुष्टी । तंव तीस शूळ उठें पोटीं । लोळे सृष्टीं गडबडां ॥ ७१ ॥

काळीज धरूनी मुष्टीसी । वानर पाहे विस्मयेसी । बांधावया कोटी कुंजरासी । देखे [मुं. 'उदरवासी वाढला'.] दोही कुसी [तु. 'विस्तीर्ण'.] बहुवाडी ॥

जठराग्नी माजीं जाणा । पडिलें पर्वत होती चुना । असो हे तिची विवंचना । कपी कथनअवधारा ॥ ७३ ॥

काळीज धरितांची रोकडें । क्रौंचा लोळे गडबडे । सगळे गिळूनी केलें कुडें । अति वावडें वानर ॥ ७४ ॥

वानर नाडळेची दांतीं । शेखीं जाऊनी बैसलें पित्तीं । वोखद घ्यावयाची उपपत्ती । केली आईती ते ऐका ॥ ७५ ॥

निंबाची शतानुशतें झाडें । ते खसखसा रगडी दाढे । चुळोदकीं हनुमंत बुडे । तेणें तो उडे उदरांत ॥ ७६ ॥

उदरीं वानर उडतां । क्रौंचा पावे परम व्यथा । तिच्या करावया निजघाता । बुद्धी हनुमंता [मुं. तं. 'उपजली'.] आठवली ॥ ७७ ॥

पूस वाढऊनी वानरें । कंठी सूदले पूंसाग्रें । तेणें ते खोकोनी गजरें । मग वोकारें सूटले ॥ ७८ ॥

पुढें देता पैं वोकारें । मागें अधोवात सरे । गांजू आदरिली वानरें । डोळें अंबरें लाविली ॥ ७९ ॥

अधोवाताचिये गजरीं । अवघ्या उडविल्या निशाचरी । परि भ्रमोनीयां अंबारी । पडोनी सागरीं बुडाल्या ॥ ८० ॥

[कं. 'अरे जीचें'.] आईजीचें [मु. 'अति श्रद्धेने'.] अति पादणें । दुर्गंधें निर्बुजलीं घ्राणें । राक्षसी धांकती निज प्राणें । मागे राहणे धड नव्हे ॥ ८१ ॥

दीर्घ देतां पै वोकरी । पूंस आले मुखां भीतरीं । क्रौंचा धरूनिया करीं । वोढी बाहेरी अति कष्टें ॥ ८२ ॥

वोढा वोढा गे झडकरी । वोढिती दहावीस नारी । तंव ते [पै. दै. तु. तं. 'वाढलें'.] वोढेना अति भारी । शत सहस्त्रीं वोढितां ॥ ८३ ॥

चौदा सहस्त्र राक्षसी श्रेष्ठ । वोढिताती अति उद्भट । तरी पूंसाचा नव्हे शेवट । फुगलें पोट क्रौंचेचें ॥ ८४ ॥

पहिले सामान्य दिसे वानर । उदरीं वाढलें महाथोर । न लाभे पूंसाचा पैं [मु. 'परपार'.] पार । येर शरीर कोण जाणे ॥ ८५ ॥

आइजीचें भाग्य थोर । वमनें उलटले वानर । येऱ्हवीं हे करितें संहार । वोढा समग्र समयोगें ॥ ८६ ॥

अनुक्रमणिका

चौदा सहस्त्र निशाचरी । पूंस ओढिती बळें करी । काळीज घेउनियां करीं । निघे बाहेरी हनुमंतु ॥ ८७ ॥

काळीज उपडितां समूळीं । क्रौंचेनें दिधली आरोळी । आदळोनिया भूतळीं । प्राण तत्काळीं सोडीला ॥ ८८ ॥

क्रौंचेचिया शरीर भारीं । निधा उठिला गिरिकंदरी । तेणें निकुंभिला थरारी । लंकेमाझारी भूकंप ॥ ८९ ॥

चौदा सहस्त्र निशाचरी । आवळूनि पूंसे करीं । झुगारिल्या पैं सागरीं । नेल्या जळचरी भक्षावया ॥ ९० ॥

हनुमंता पडलंके उड्डाण । हें काळिका खंडीचें निरूपण । श्रोती पाहावे सावधान । वृथा भाषण न म्हणावें ॥ ९१ ॥

हें [दे. तु. खेरीज इतरत्र 'तव'.] शिवरामायणीं कथा । जऱ्ही मी बोलिलो वृथा । तऱ्ही तारक तत्वता । याही वरी श्रोतां क्षमा कीजे ॥ ९२ ॥

पडलंके जी माझारी । येकी उरली वृद्धा नारी । येरी मारिल्या जी समग्री । केली बोहरी हनुमंते ॥ ९३ ॥

वृद्धेकडे हनुमंतु । कृपादृष्टी असे पाहातु । पुसेन तो सांग वृत्तांतु । नाहीं तरी घातु मी करीन ॥ ९४ ॥

येथूनिया पुढारी । लंका आहे किती दूरी । येरी म्हणे राहिली माघारी । पाहे पां हारी कळसांचिया ॥ ९५ ॥

परतोनी पाहे लंकापुरी । रावण मंदिराची थोरी । कनक कळसांचिया हारी । माडिया गोपुरी रत्नखचित ॥ ९६ ॥

कैसे शोभती रत्न कळस । तेजें लोपत चंडांश । लंका देखोनी सावकाश । अति उल्हास हनुमंता ॥ ९७ ॥

शोधावया श्रीरामकांता । घर धांडोळी घेईन आतां । जांचूनिया लंकानाथा । करीन घाता राक्षसां ॥ ९८ ॥

मर्दूनी [पै. तु. मुं. मु. 'इंद्रजीताचा मान'] इंद्रजिताची मान । त्यासी करीन रणकंदन । रणीं मारीन राक्षस गण । सीता रत्न शोधावया ॥ ९९ ॥

ऐकोनी राक्षसीचें वचन । मागां देखोनि लंका भुवन । करोनी उफराटें किराण । आला आपण लंकेसी ॥ १०० ॥

रावणाचा विजय केतु । त्याचा पुंसें केला घातु । सन्मुख पाडिला [तु. दै. कं. 'सभेआंतु'.] लंकेआंतु । तेणे आकांतु राक्षसां ॥ १०१ ॥

सहित [पै. खेरीज इतरत्र 'शिखरे'.] शिरें विजयकेतु । पाडिला देखोनि सभेआंतु । तेणें दचकला लंकानाथु । आला अनर्थु लंकेसी ॥ १०२ ॥

अनुक्रमणिका

नाहीं वायूचा झडाड । नाहीं मेघांचा गडाड । शिखरें खचलीं धडाड । भंगला दृढ विजयकेतु ॥ १०३ ॥

रावणें हरिली रामरमा । येथूनि विजयो नाहीं आम्हां । राजा रातला अधर्मा । मरण धर्मा पावेल ॥ १०४ ॥

ऐकोनि जनाचिया गोष्टी । उल्हासु हनुमंताचिया पोटीं । पुंसीं बांधिली शकुन गांठी । राक्षसा कोटी मारावया ॥

शोधावया सीतारत्न । स्वरूपें धरी आनें आन । कैस कैसें करील चिन्ह । सावधान अवधारा ॥ १०६ ॥

> सचारुनानाविधरूपधारी । समीक्षितात्मा समवेक्षितार्थम् ॥
> सकेतकोद्दालकनारिकेलिम् । ददर्श लंकाममरावतीमिव ॥ ८ ॥

अति दुर्धर हनुमंत वीर । वाढिला होता पर्वताकार । शोधावया सीता सुंदर । करी विचार निज मानसीं ॥

साधावया श्रीरामकांता । स्थूळ रूपें शोधितां सीता । शुद्धि न लाभे पैं सर्वथा । तरि कां वृथा कष्टावें ॥ १०८ ॥

ऐसा करूनिया विचारू । जाला सामान्य वानरू । कोठें गोचरू कोठें अगोचरू । सीतार्थ नगर शोधावया ॥

माझा आत्मा श्रीरामचंद्र । हा हनुमंतीं निज निर्धार । तेणें [मु. 'जाणोनी'.] जिणोनि विघ्न संभार । हेळा समुद्र लंघिला ॥

भंगूनी रावणाचा विजयकेतु । आला केतकी वना आंतु । सीता शोधावया हनुमंतु । करील [पै. 'अंतु'.] आकांतु लंकेसी ॥

करूनी पडलंकेची झाडी । आतां लंकेसी आली धाडी । मारूनी राक्षसांचिया कोडी । सीता [तु. 'रोकडी'; दै. कं. 'गोरटी'.] धडफुडी शोधीन ॥ ११२ ॥

सीतेचिये शुद्धींसाठीं । पुरवीन इंद्रजीताची पाठी । मारूनी राक्षसांचिया [तु. मु. 'थाटी'.] कोटी । सीता गोरटी शोधीन ॥ ११३ ॥

करितां सीतेचे शुद्धीसी । रावण गांजीन सभेसी । [तं. 'भोवंडूनिया'.] क्षोभलेनी पूंसेसी । लंका चौपासी जाळीन ॥ ११४ ॥

ऐका हनुमंताचा आंवाका । समूळ शोधावया लंका । जें जें विंदान केलें देखा । तें तें आईका चरित्र ॥ ११५ ॥

रावणाचे उपरियांवरी । नारीकेलाचिया हारी । हनुमंत सामान्य रूप धरी । चढला त्यावरी अति गुप्त ॥ ११६ ॥

तेथूनि पाहे लंकापुरी । जैसी अलंकावती नगरी । ना ते अमरावती दुसरी । त्याहूनी थोरी लंकेची ॥ ११७ ॥

त्रैलोकीचें वैभव । लंकेसी आणिलेसें सर्व । अमरावतीहून अपूर्व । दिसे गौरव लंकेचें ॥ ११८ ॥

ख्याती करूनी समुद्रा आंत । लंके आला स्वयें हनुमंत । किष्किंधाकांडाचा अर्थ । [मुं. खेरीज इतरत्र 'जाला'.] केला समाप्त श्रीरामें ॥ ११९ ॥

व्यर्थ वानिलें हनुमंता । जिव्हा झडेल ऐसें म्हणता । श्रीराम बळें तो पुरता । आणि पढियंता रामाचा ॥ १२० ॥

सीता शुद्धीचा कैवाड । सुंदर कांड अति गोड । हनुमंत ख्याती [तं. 'कार्यउदंड'.] करील दृढ । [कं. 'मुख्य'.] सुख सुरवाड [तं. 'होवयासी'.] श्रोतयांसी ॥ १२१ ॥

हनुमंताचिया बळबंडा । बाण पिसारा लाविला भवंडा । राम भजनीं होऊनि गाढा । किष्किंधाकांडा संपविलें ॥

सुग्रीवाचिया दुःख दुर्वाडा । छेदूनिया सप्त ताडा । ठेंचूनिया वालीचिया [मुं. खेरीज इतरत्र 'तोंडा'.] दाढा । किष्किंधाकांडा संपविलें ॥

सुग्रीवें सीता शुद्धीचिया कैवाडा । वानर धाडिले चहूंकडा ।
हनुमंतें अर्थ साधूनी गाढा । किष्किंधाकांडा संपविलें ॥ १२४ ॥

सीता शुद्धीचेनि कैवाडें । वानर [कं. 'वानरां मरण आलें रोकडें'.] धाडिले चहुंकडे । संपाती सीता दाऊनि पुढें । किष्किंधाकांडा संपविलें ॥ १२५ ॥

समुद्र उल्लंघावया पुढां । वानर पडिलें अति सांकडा ।
हनुमंत कैवारी धडफुडा । किष्किंधाकांडा संपविलें ॥ १२६ ॥

सीता शुद्धीचिया चाडा । घेऊनी [मु. 'हेमा तापसीचा'.] दक्षिणेचा झाडा । समुद्र लंघूनि रोकडा । किष्किंधाकांडा संपविलें ॥ १२७ ॥

संपलें किष्किंदाकांड कैवाड । पुढें सुंदरकांड अति गोड । पुरेल श्रोतयांचें कोड । सरेल चाड वक्तयाची ॥ १२८ ॥

एका जनार्दना शरण । कथा कौतुक रामायण । श्रोतां दिधलियां अवधान । ब्रह्म समाधान श्रवणार्थे ॥ १२९ ॥

कथा आईकता [मुं. 'सविस्तर'.] सादर । निरसूनियां क्षराक्षर । राम पाविजे चिन्मात्र । कथा सन्मात्र रामायणी ॥ १३० ॥


अनुक्रमणिका

राम कथेचें अक्षर । क्षराक्षरातीत पर । अवघी कथा चित्सन्मात्र । चिदचिन्मात्र रामायण ॥ १३१ ॥

एका जनार्दना शरण । रामें किष्किंधाकांड संपूर्ण । पुढें रसाळ निरूपण । सावधान अवधारा ॥ १३२ ॥

इति श्रीभावार्थरामायणे किष्किंधाकांडे एकाकारटीकायां हनुमंतलंकाभिगमनं नाम अष्टादशप्रसंग : ॥

अनुक्रमणिका




अनुक्रमणिका

# सुंदरकांड

## प्रसंग पहिला

## लंका शोधन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

**श्रीरामें पावन कथा । श्रीरामें पावन वक्ता । श्रीरामें पावन श्रोता । श्रीरामें** [मु. 'स्वतां'] **सरता** [तु. 'ग्रंथार्था पावन'.] **ग्रंथार्थु ॥ १ ॥**

**श्रीरामें धन्य धरणी । श्रीरामें धन्य करणी । श्रीरामें धन्य वाणी । जें रामायणीं विनटली ॥ २ ॥** [कं. प्रतीत ही ओवी पहिली आहे.]

**श्रीरामें पावन संसार । श्रीरामें पावन चराचर । श्रीरामें पावन नर । जे नाम निरंतर** [मुं. मु. 'जे तत्पर नित्य'; दै. 'पावन ग्रंथार्थ'.] **नैराश्यें स्मरती ॥ ३ ॥**

**रामनाम शुद्ध साधन । रामनाम शुद्ध** [मुं. 'ज्ञान'.] **ध्यान । रामनामें** [वि. 'शुद्धस्मरण'.] **समाधान । नाम पावन सर्वार्थी ॥ ४ ॥**

**रामनामें सरतें तोंड । रामें संपविलें किष्किंधाकांड । आतां** [मु. 'उगवले'.] **उठावलें सुंदरकांड । अति प्रचंड प्रतापी ॥ ५ ॥**

**मुख्यत्वें सुंदरकांड । छेदी सगुण संसार बंड । निर्गुण सौंदर्याचें कोड । पुरवूनी गोड कथार्थु ॥ ६ ॥**

**सुंदरकांडाची कथा वृत्ती । आदि मध्य आणि** [दै. वि. 'अंती'.] **प्रांतीं । हनुमंताची परम ख्याती । सीता शुद्धयर्थी प्रतापु ॥ ७ ॥**

**त्याच्या प्रतापाची थोरी । राहोनी लंकेच्या शिखरीं । शोधावया सीता सुंदरी । विचार करी तो आईका ॥ ८ ॥**

> गिरिमूर्ध्नि स्थितामुच्चैः पांडुरैर्भवनोत्तमैः । पालितां राक्षसेंद्रेण निर्मितां विश्वकर्मणा ॥ १ ॥
> कैलासशिखरप्रख्यामालिखंतीमिवांबरम् । लीयमानामिवाकाशे कांचनंनैर्भवनोत्तमैः ॥ २ ॥
> ददर्श लंकां हनुमान्दिवि देवपुरीमिव ॥ ३ ॥

[मु. 'वेंधोनिया पाहे चौफेरी । तंव देखे कनक कळसाचिया हारी ॥'] **त्रिकुटाचां शिखरावरी । लंकेची परम थोरी । कनक कळसांचिया हारी । गगनोदरीं लखलखती ॥ ९ ॥**

**जैसीं नक्षत्रें नभाचां पोटीं ।** [तु. दै. 'सुप्रसन्न'.] **प्रसन्न शोभतीं गोमटीं ।**
**तेवी कनककलश लंका त्रिकुटीं । कोट्यानुकोट्या लखलखित ॥ १० ॥**

अनुक्रमणिका

**द्यावी अमरावतीची उपमा । त्याहूनि अधिक इची महिमा । लंका निर्माण** [वि. तु. ‘करी’.] **करवी ब्रह्मा । विश्वकर्मा प्रेरुनी ॥**

**कुबेराची अळंकावती । रावणें हिरोनि घेतां वस्ती । त्यासी** [वि. ‘ठकुनी’.] **शंकुनी उमापती । अळंकावती सोडवी ॥ १२ ॥**

**ते काळीं विश्वकर्म्या हातीं । लंका करवी** [तु. दै. ‘उमापति’.] **प्रजापती । बहु** [तु. वि. मुं. दै. तं. ‘दुर्गदुर्गम’.] **दुर्गम अति निगुती । अगम्य गति सुरां असुरां ॥ १३ ॥**

**अमरावती अळंकावती । नोकुनीया भोगावती । देखोनि लंका अधिक स्थिती । संतोषें वसती रावणें केली ॥ १४ ॥**

[दै. ‘पहा कैलासा’; मुं. पहातां कैलासा’.] **कैलासा समान । शोभे लंकेचें** [कं. ‘लावण्य’.] **महिमान । दुर्धर राक्षसांसहित जाण । दशानन संरक्षी ॥ १५ ॥**

**उत्तम मध्यम अधम नरीं । नांदिजे कनकाच्या मंदिरीं । अटालिका उपराउपरी । लंकेची थोरी अनुपम्य ॥ १६ ॥**

**अगाध लंकेचें महिमान । स्वयें संरक्षी रावण । कोटिकोटी** [कं. तं. त. ‘रक्षोगण’.] **राक्षस गण । परिभ्रमण सदा करिती ॥ १७ ॥**

**तेथ रिघावया जाण ।** [मु. ‘सिद्धि’; त. ‘निर्गमो’.] **संधी न लभे अणुप्रमाण । लंकादुर्ग अति दारुण । केवि आपण रिघावें ॥ १८ ॥**

> अवकाशो न साम्नोऽस्ति राक्षसैश्चाधिगम्यते । न दानस्य न भेदस्य नैव युद्धस्य दृश्यते ॥ ४ ॥
> ततः स चिंतयामास मुहूर्तं कपिकुंजरः । गिरिशृंगे स्थितस्तस्मिन् रामस्याभ्युदये रतः ॥ ५ ॥
> अनेन रूपेण मया न शक्या राक्षसी पुरी । प्रवेष्टुं राक्षसैर्गुप्तां नागैर्भोगवतीमिव ॥ ६ ॥
> अपि राक्षसरूपेण न शक्यमटितुं मया । वायुरप्यत्र नाज्ञातो न चरेदिति मे मतिः ॥ ७ ॥

**लंका** [दै. ‘द्वारीं’.] **दुर्गीं निघोनि वारा । स्वयें वागो न सके सैरा । त्यासीहि रावणाचा दरारा । केला कामारा केरु काढी ॥ १९ ॥**

**जेथ पुंज्या गदळली वाट । तेथ वायूस वाजे साट । ते लंकेमाजि मी मर्कट । कैसेनि पष्ट वागवे ॥ २० ॥**

**वानररूपें लंकेआंत । हिंडतां होयील अनर्थ । कवतिकें धरील** [तु. दै. ‘जातां’.] **जो तो येथ । राम कार्यार्थ नाशेल ॥ २१ ॥**

**राक्षसरूप धरूं क्रूर । तेथहि अनर्थ आहे थोर । ब्राह्मणमांसाचा आहार । निशाचर करविती ॥ २२ ॥**

अनुक्रमणिका

राक्षस जातीचा [कं. 'परिपक्षी'.] परीक्षी । द्विजमांस स्वेच्छा भक्षी । तो तो राक्षस शुद्ध पक्षी । येरु विपक्षी [वि. 'मानिती'.] मारिती ॥ २३ ॥

द्विजमांस मज भक्षितां । समुद्रलंघन गेलें वृथा । कैंचा राम कैंची सीता । अधःपातां मी जाईन ॥ २४ ॥

राक्षस रूपाचा विटाळु । मज न व्हावा अळुमाळु । [त. 'कार्य नव्हे गेला वेळु'.] कांटाळूनि गोलांगुळू । विचार स्थुळू [तु. कं. दै. मुं. मु. 'मांडिला'.] सांडिला ॥ २५ ॥

मग स्मरोनि रामनाम । हनुमान पावला विश्राम । लंका प्रवेशु अति दुर्गम । नीतिधर्म उपपादी ॥ २६ ॥

करूं जातां स्वयें शिष्टाई । गर्वे रावण न मनी पाही । [वि. 'सीता सुटका साधन नाही'.] सीता सुटेसें दान नाहीं । दानें वैदेही सुटेना ॥ २७ ॥

राक्षसेसीं करितां भेदु । न घडे [तु. 'आत्मत्वाचा'.] आप्तत्वाचा बोधु । [त. 'हा हीन घडे जी समंधु'.] मांसभक्षण समंधु । आप्तवादु तेथ कैचा ॥ २८ ॥

भेदु करितां राक्षसांसी । भेदु जाय त्यातेंचि ग्रासी । भेदु न चले तयासी । युद्धहि त्यांसीं दुर्धर ॥ २९ ॥

लंकादुर्ग अति दुर्धर । इंद्रजीत कुंभकर्ण झुंजार । भवंता परिघी सागर । नर वानर केवि येती ॥ ३० ॥

श्रीराम निधडा झुंजार । रावण छेदील सपरिवार । आडवा सागर दुस्तर । लंकापुर केवि पावे ॥ ३१ ॥

नीतिशास्त्रांचा अवबोधु । सामदाम युद्ध भेदु । रावणीं न चले समंधु । नीति विरुद्धु राक्षसां ॥ ३२ ॥

बैसोनि लंकेच्या शिखरीं । ऐसा नाना विचार करी । लंकादुर्ग अटक भारी । कैशा परीं शोधावें ॥ ३३ ॥

असो हा लंकेचा वृत्तांत । मज साह्य रघुनाथ । लंका शोधीन समस्त । सीता शुद्धयर्थ [तु. 'प्रतापें'.] निजांगें ॥ ३४ ॥

> वंचनीया मया सर्वे जानकीं परिमार्गतः । लक्ष्यालक्ष्यात्मरूपेण द्रक्ष्यामि जनकात्मजाम् ॥ ८ ॥
> इति संचिंत्य हनुमान्वैदेह्या दर्शनं तदा । द्विदंशमात्रः स कपिः वभूवाद्भुतदर्शनः ॥ ९ ॥

लक्षालक्ष स्वरूपविधी । ठकूनि राक्षसांच्या बुद्धि । मी करीन सीताशुद्धी । कार्यसिद्धी श्रीरामें ॥ ३५ ॥

सुरां असुरां निशाचरां । अलक्षगति मज वानरा । घरधांडोळी घेऊनि नगरा । सीता सुंदरा पाहेन ॥ ३६ ॥

ऐसा करुनी विचार । हनुमान जाला मशकमात्र । दो मशकांचा अधिक भार । ऐसा लघुतर कपी जाला ॥ ३७ ॥

अनुक्रमणिका

**मुंगीचिया नयनाआंतु । खुपो नेणेजी हनुमंतु । येणें रूपें लंकेआंतु । असे पाहतु रामकांता ॥ ३८ ॥**

**हनुमान निघतां नाकाआंत । कोणा न वचे पैं उशित । जगाचें न दुखवितां चित्त । असे पाहत रामप्रिया ॥ ३९ ॥**

**खंदक पाळी आणि अटाळी । उपरिया उपरी माळ्यामाळी । दुर्गाचिया पवळोपवळी । जनकबाळी पहातुसे ॥**

**वने उपवनें काननें । देवालयें शिवस्थानें । मठमठिका ध्यान भुवनें । सीते कारणें शोधितु ॥ ४१ ॥** [ओवी ४१ मुं. प्रतीत नाही.]

**कडेकपाटे श्रौत कांतारें । गिरीच्या गुहा** [तु. कं. मु. त. दै. तं. 'गिरिकंदरें'.] **गिरिदरें । शिखरें उखरे विवरें ।** [तु. 'ते ही वानरें'; दै. 'विवरें वानरें'.] **स्वयें वानरें शोधिलीं ॥ ४२ ॥**

**आराम विराम उपरम । समविषम विषमसम ।** [तु. दै. 'श्रमाचे'.] **आश्रमाचें विश्रामधाम । प्लवंगम स्वयें शोधी ॥ ४३ ॥**

**चूतखंडे अच्युतखंडे । कुशकर्दमपाणि पाखांडे । डावलूनि निबिडें उदंडें । मध्यमादंडें सीता पाहे ॥ ४४ ॥**

**तत्वें निरसूनि समस्त । साधक आत्मासाधिती** [मु. 'निश्चित'.] **गुप्त । तेवीं घरोघरीं हनुमंत । धांडोळीत जानकी ॥ ४५ ॥**

**ऐसा शोधुनिया बाह्य प्रांतु । मग रिघाला** [वि. तं. त. 'लंके आंत'.] **नगराआंतु । सीता शोधावया हनुमंतु । अतिउद्यतु साक्षेपी ॥ ४६ ॥**

**पहातां लंकेमाझारी । ब्रह्मराक्षस वसती नगरीं । त्यांच्या निवासाची थोरी । निज निर्धारी अवधारा ॥ ४७ ॥**

> दीक्षितान् जटिलान्मुंडान्गोजिनांबरवाससः । दर्भमुष्टि प्रहरणाग्निकुण्डायुधांस्तथा ॥ १० ॥ [श्लोक १० मु. प्रतीत नाही.]
> स्वाध्यायनिरतांस्तत्र यातुधानान् ददर्श सः ॥ ११ ॥

**एक राक्षस लंकेमाझारी । शैवदीक्षा** [वि. 'अवधारी'.] **दीक्षाधारी । रुद्राक्षमाळा शिरींकरीं । त्रिपुंडधारी मंत्रोक्त ॥ ४८ ॥**

[मु. 'दान अन्न'.] **अभयदान देऊनि** [वि. 'भक्तासी'.] **भूतांसी । काषायवासें एक संन्यासी । दृष्टीं देखिलिया मनुष्यांसी । साक्षेपेसी गिळीत ॥ ४९ ॥**

**सवेंचि करुनि आचमन ।** [तु. दै. 'संपादिता संन्यास कारण'.] **संपादिता कर्ता कोण । समूळ कपटाचें लक्षण । धरिती ध्यान आहारार्थ ॥ ५० ॥**

अनुक्रमणिका

एक नागवे जटाधारी । भस्मोद्धूळण शरिरीं । रिघोनि [तं. 'विमाना'; मुं. 'वनांतरी'; मुं. 'जीवना'.] विजेना माझारीं । गाई मारी भक्षार्थ ॥ ५१ ॥

तेंचि गोचर्म धरुनि करीं । [तं. 'म्हणती आम्ही'.] आम्ही गोजिनांबरधारी । ऐसें मिरविती लोकांचारी । वेषधारी राक्षस ॥ ५२ ॥

मांस [मुं. 'लक्षितां'.] भक्षितां स्वेच्छेसी । वांटा नेंदिती कोणासी । संन्यासाचें [तु. 'खातां'.] घेता तुम्हासी । नरकवासी व्हाल तुम्ही ॥ ५३ ॥

मांस भक्षावयाचा स्वार्थु । [तु. दै. 'कैसी'.] ऐसी संपादिती मातु । ऐसे राक्षस लंकेआंतु । देखे हनुमंतु विचरतां ॥ ५४ ॥

अग्निहोत्री राक्षस तेथ । कुंड मंडप वेदियुक्त । दोन्ही कर [तं. 'कलश.'] कुशमंडित । सायंप्रातर्होम देती ॥ ५५ ॥

मुष्टी मुष्टी कुश करीं । देखिलिया मनुष्य तेणें चिरी । मांस भक्षावया होम करी । पापाचारी राक्षस ॥ ५६ ॥

होत्यांपोत्यांचा पुरोडांश । त्याचाहि [तु. दै. 'समूळ'.] स्वयेंच करी ग्रास । वांटा नेदी कोणास । अति कर्कश [तु. दै. 'सामर्थी'.] मांसार्थी ॥ ५७ ॥

जेथ जेथ अति लोलंगता । तेथें कैंचा राम कैंची सीता । तेथुनी निघतां हनुमंता । होय देखता आश्चर्य ॥ ५८ ॥

वेदपाठक लंकेआंत । विजनीं आरण्यकें पढत । मनुष्य देखिलीयां तेथ । स्वयें भक्षीत फळाहांरा ॥ ५९ ॥

अग्निहोत्राणि वेदांश्च राक्षसानां गृहे गृहे । दया सत्यं च शौचं च राक्षसानां न विद्यते ॥ १२ ॥

अग्निहोत्रें वेदाध्ययन । राक्षसा घरोघरीं संपूर्ण । दया सत्य शुचित्वपण । राक्षसां जाण असेना ॥ ६० ॥ [ओवी ६० तं. प्रतीत नाही.]

सर्व भूतीं [कं. मुं. 'असे'.] स्वये भगवंत । ऐसी भूतदया नाहीं जेथ । कैंची रामसीता तेथ । मुद्रा मत्त ते दीक्षा ॥ ६१ ॥ [ओवी ६१ त. प्रतीत नाही.]

ऐंसी शोधितां ब्रह्मपुरी । ब्राह्मण गोविलेति दोरीं । कर्माभिमान [कं. 'त्याचे'.] त्यावरी शिरीं । सीतासुंदरी तेथ नाहीं ॥ ६२ ॥

पाहातां क्षत्रियांच्या थाटा । वांठीवेचा थोर [वि. 'वाटा'.] ताठा । लागतां हनुमंताचि झंझटा । [त. 'सारे'.] स्वयें पटपटा पडतील ॥ ६३ ॥

अनुक्रमणिका

नाहीं वीरवृत्ती [पै. 'फुडी'.] पुरी । मरणभयाची न फिटे शारी । ऐशा भेडा क्षत्रियां घरीं । सीतासुंदरी भेटेना ॥ ६४ ॥

मरणभय पोटां आंत । ते तंव क्षत्रि अति अशक्त । त्यातें नपुंसक म्हणतात । सीता निश्चित तेथ नाहीं ॥ ६५ ॥

ऐसी शोधितां क्षात्रपुरी । तेथ न लभे सीतासुंदरी । मग रिघाला वैश्यांचां घरीं । श्रीरामनारी शोधावया ॥ ६६ ॥ [ओवी ६६ तु. प्रतीत नाही.]

वैश्यांचें कृपण मन । कवडे नि कवडा सांचिति धन । त्यांच्या घरीं सीतानिधान । हनुमान आपण न लभेचि ॥ ६७ ॥ [ओवी ६७ वि. प्रतीत नाही.]

वैश्याचें उद्यमीं चित्त । अति लौलूप्य वांछी वित्त । तें घरें शोधितां हनुमंत । सीता शुद्धयर्थ न लभेचि ॥ ६८ ॥

आतां शोधूं शूद्र जाती । तीमाजीं अठराहि पगड याती । तेहि घरधांडोळी घेईल मारुती । सीतासती शोधार्थ ॥ ६९ ॥

पाहातां चाटियांची [वि. कं. 'मांदी'.] मार्गी । गारींत घातलीं गुडघीं । हनुमान निज पुच्छ संयोगी । जाळील आगी [कं. 'स्वहस्तें'.] सस्नेह ॥ ७० ॥

चाटे असत्यवादी [कं. 'ऐका'.] देख । अंगळुमंगळु बोली एक । हनुमान जाणे नंदभाक । लावील शीक पुरदहनीं ॥ ७१ ॥

ऐसी शोधितां चाटेवोळीं । तेथ न लभे जनकबाळी । पाहावया सोवनियांची आळी । आतुर्बळी निघाला ॥ ७२ ॥

सोवनियांचें कर्म खोटें । खारु लाविती नेटेपाटें । बाहेर मुदियांचे साटे । सोस कांटे भांडवली ॥ ७३ ॥

रूपलग लाविजे कीं । सीसलग तंव आणिकीं । पाहातां अवघे हीण तुकीं । तेथ जानकी [दै. 'असेना'.] दिसेना ॥ ७४ ॥

सोनाराचा परिपाकु । अवघे करिती ठकूठकू । द्याहाचा चोर येकयेकु । नाडिती लोकु विश्वासें ॥ ७५ ॥

काडलग मोतिलग । दाविति झळकेचि झगझग । परि तें अवघें डाकलग । नगेंनग हीणकस ॥ ७६ ॥

सोनार कामाचा विवेकु । समूळ विश्वास घातकु । लटके तुक देति तुकतुकूं । घेती जोखजोखूं दोही हातीं ॥ ७७ ॥

सांगोनि विश्वासाच्या गोठी । खार लाविति पाठीपोटीं । घालुनी सलोभा पुटीं । पाडिती तुटी मुदलेसी ॥ ७८

अनुक्रमणिका

॥

साडे पंधरें घेऊनि हातीं । देतां जस्त नागवले बहुतीं । सोनारकर्मांची हे ख्याती । सीतासती तेथ नाहीं ॥ ७९ ॥

कांसारकामाचें कवतिक । एकें एक ते नाळिक । अवघी कावळेचि देख । तुकातुक तूटले ॥ ८० ॥

कांसारकामाची परिपाटी । अवघीजणीं केली तुटी । तेथ कैंचीं सीता गोरटी । निघे उठाउठी हनुमंत ॥ ८१ ॥

वेव्हाऱ्याची कैसी दशा । कळांतराचिया आशा । मुद्दल घालिताती फांसा । लाविले झासा अति लोभें ॥ ८२ ॥

लक्ष्मी देऊन पुढिलां हातीं । काळा कागद लिहोनि घेती । तेणेंचि काळमुखे होती । [तु. वि. दै. 'खंती'.] खंत करिती जीवासी ॥ ८३ ॥

देहीच्या खता देहेंच वेथा । त्याहोनि थोर कागदीच्या खता ।
त्याची व्यथा जिवाचे माथां । तिहीं अवस्था अति दुःखी ॥ ८४ ॥

देखोनि खतीची संपत्ती । वेव्हारे [तु. 'थोर'; दै. 'सदा'.] स्वयें उल्हासती । मागों गेल्यां नये माती । मग कुंथती धरणेनी ॥ ८५ ॥ [ओवी ८५ मु. प्रतीत नाही.]

खतें पाडिलें खत खती । जो भेटे त्यासी साक्षी करिती । स्वप्नीं वेव्हार सांगती । वोसणती दे म्हणोनी ॥ ८६ ॥

वेव्हारियाची ऐसी गती । धरणें करितां न लभे युक्ती । धनलोभ्याशी कैंची मुक्ति। सीतासती तेथ नाहीं ॥ ८७ ॥

पाहातां तेलियांचीं घरें । [वि. 'अवघे'.] नित्य करितीं [वि. 'मग.'] करकरें । अवघीं म्हणतीं पाहारोंपाहारें । भेटा रामचंद्रे उचटिलिया ॥ ८८ ॥

जैंहोनी आणिली जनकबाळ । तैंहुनी येथीचे तुटले [वि. 'बळ'.] तीळ ।
हनुमान कोंदी करील सकळ । होईल तळमळ पुरदाहें ॥ ८९ ॥

तेलियांचे निज जाती । नीच नवे फेरे खाती । तेथें कैंची सीतासती । निघे मारुती पुढारां ॥ ९० ॥

मुळीचा तंतु तुटतां सांग । साळी विसरले मागेमाग । पाजणी परजणीचे उद्योग । अति लगबग खळीलागीं ॥ ९१ ॥

अनुक्रमणिका

खांचेरीं घाले जिवें जीत । घडिया घडी न [कं. तं. त. 'साधे'.] सधे तेथ । स्वरुप नुतरेचि समसुत । मग तणतणीत ताणोनी ॥ ९२ ॥

अहर्निशीं धोटे हाणितां । स्वरुप नुतरेची सर्वथा । साऊटबारुट गेले वृथा । तेथेंहि सीता नलभेचि ॥ ९३ ॥

रुसण्याफुगण्याचें कारण । पानापासीं अति सन्मान । तेणें अंतरीं सडलीं जाण । पडलें खाण निजलाभा ॥ ९४ ॥

तांबोळी सन्मान पानभरें । देठझडी जालें येकसरें । म्हणती फेरारे फेरारे । अभ्यंतरें मुरकुटलीं ॥ ९५ ॥

पान सन्मानें [कं. दै. खेरीज इतरत्र 'आम्ही'.] अति दाटुगी । सडलीं अभिमानें टुगी । तोंडें तांबडीं अति आळुगी । तेथ जानकी असेना ॥ ९६ ॥

शिंपियाची अति कुसरी । घेउनि लोभाची कातरी । अखंड खंडी नानापरी । गुप्तत्वें चोरी त्यामाजीं ॥ ९७ ॥

पहिलें अखंड खंडिलें । शिविल्या म्हणती तें दंडिलें । सिंपी ऐसें कर्म केलें । बाधक जालें ज्याचें त्या ॥ ९८ ॥

अखंड खंडनीं करिती चोरी । तेणें शृंगारिती कुंवारी नारी । बिरडें लावी गळ्यावरी । घरोघरीं टांचूनी ॥ ९९ ॥

ऐसें कर्म केलिया पाठीं । सिंपी सलोभ बोटें चाटी । पोट न भरे शिवण्यासाठीं । सीता गोरटी तेथ [तु. मु. 'नाहीं'] कैंची ॥ १०० ॥ [ओवी १०० दै. प्रतीत नाही.]

[तु. मु. 'रंगशाळा'; वि. तं. त. 'रंगारशाळा'.] रंगार साळी अलोलिक । काळें करिती शुद्धसात्विक । काळे हात काळें मुख । अति रंगीक रंगारे ॥ १०१ ॥

नामरुपाच्या ठशावरी । काळेबेरें पालव धरी । ऐशिया रंगाऱ्याच्या घरीं । सीतासुंदरी लाभेना ॥ १०२ ॥

वेदपाठकां नवल परी । अनाध्यायी स्वाध्यावो धरी । उदात्त अनुदात्त स्वरीं । वर्णोच्चारीं अभिमानु ॥ १०३ ॥

सानुनासिक अनुनासिक । उच्चारु नेंणें तो निर्नासिक । त्यासी हांसती वेदपाठक । येकयेकां उपहासी ॥ १०४ ॥

ऐसें करितां वेदपठण । कोरडी [तु. 'करिती'.] शब्दांची ठणठण । न वचती मानाभिमान । सीता चिद्रत्न तेथें [तु. 'साधेना'; मु. 'तेथ कैंचे.'] नाहीं ॥ १०५ ॥

पाहातां विद्वांस व्याख्यान । शास्त्र व व्युत्पत्ती अती सज्ञान । ज्ञातेपणें गर्वाभिमान । जडला जाण सोडीना ॥ १०६ ॥

अनुक्रमणिका

[तं. 'जों जों'.] जंवजंव शास्त्राची व्युत्पत्ती । [तं. 'तों तों'.] तंवतंव अभिमानाची वस्ती ।
तेणेंचि गर्वाचीहि स्फूर्ती । सीतासती तेथ नाहीं ॥ १०७ ॥

पाहातां ज्योतिषांची स्थिती । ते गोविले गृहगती । अवघ्या गृहगती लाविती । सीतासती तेथ कैंची ॥ १०८ ॥

हाट चोहटे पण विपण । शोधशोधूं पाहे आपण । [कं. 'परोपरी'.] पदोपदीं सावधान । सीता चिद्रत्न [कं. 'शोधू'.] स्वयें पाहे ॥ १०९ ॥ [ओवी १०९ वि. प्रतीत नाही.]

देखंता कणाचिया राशी । निज बीजत्व पाहे सीतेसी । फुलें गुंफितां फुलाऱ्यासी । पाहे सुवासीं सीतेतें ॥ ११० ॥ [ओवी ११० मुं. प्रतीत नाही.]

वाणी पसारे पाहातां । सीता पाहे आंतुलें पोतां । अंतर सांठवणें आंतौता । होय पाहता सीतेतें ॥ १११ ॥

जे जे मार्गीं जन भेटती । त्यामाजीं पाहे सीतासती । अश्वगजाहि आंतौती । सीतासती [कं. 'स्वयें पाहे'.] पाहातसे ॥ ११२ ॥

उत्तम देखोनि पक्वान्न । सबाह्य सीता पाहे सावधान । हनुमंता ना ठावे [तु. कं. मुं. 'आन'.] अन्न । लागलें ध्यान सीतेचें ॥ ११३ ॥

घरे चत्वारें परस [तु. 'सप्तद्वारें'.] दारें । उपऱ्या अटालिया वोवरें । सीतेलागूनि वानरें । सर्वांतरें शोधिजे ॥ ११४ ॥

अंतरीं देखोनि [तु. 'विषय'.] विषम स्थिती । सीता न लभे म्हणे मारुती ।
लंका शोधितु ऐसिया रीती । सीतासती भेटावया ॥ ११५ ॥ [ओवी ११५ मुं. प्रतीत नाही.]

दृष्टि पडे जिकडे जिकडे । सीता पाहे तिकडे तिकडे । सवेग तेथूनिया उडे । सीता पुढें पुढें [मु. 'पाहतसे'.] पहावया ॥ ११६ ॥

सांदीकोंदीं नदोनदीं । सीता पाहे [अं. 'पदोपदी'.] बिदोबिदीं । शोधितां लंकेची पैं मांदी । कोणीहि शुद्धी सांगेना ॥ ११७ ॥

पाहातां जंबुमाळि मळे । तंव ते लवलवीत [वि. कं. मुं. तं. 'पोकळे'.] कोंवळे । हनुमान [तु. 'पाडील'.] उपडील समूळें । जनकबाळें शोधावया ॥ ११८ ॥

शोकु नाहीं जिये स्थानीं । सीता वसे अशोकवनीं । ते तंव वार्ता न [मु. 'वदे'.] लभे जनीं । शुद्धि कैसेनि होईल ॥ ११९ ॥
घरें शोधिलीं विचित्र । तेथ न लभे सीतासुंदर । [तु. 'अद्भुत'.] उद्भट घरें थोर थोर । तेंहि वानर शोधील ॥

अनुक्रमणिका

१२० ॥ [ओवी १२० वि. प्रतीत नाही.]

इंद्रजीत कुंभकर्ण स्थान । श्रेष्ठ सेनान प्रधान । रावणाचें निजभुवन । निद्रास्थान शोधील ॥ १२१ ॥

हनुमान बळिया आतुर्बळी । घेईल रावणाची घरधांडोळी ।
नगरीं माजवील कळी । करील [तु. वि. तं. 'रांगोळी'.] रांडोळी सभेमाजी ॥ १२२ ॥

ऐसें [मु. 'आश्चर्य'.] अपूर्व आचरत । हनुमान करील अत्यद्भुत । श्रोतां व्हावें [दै. 'साव'.] दत्तचित्त । कथा विख्यात श्रीरामें ॥ १२३ ॥

एका जनार्दना शरण । गोड घासु रामायण । तें हें सुंदरकांड जाण । समाधान [तु. वि. कं. मुं. दै. 'शिवा'.] जिवींजिवा ॥ १२४ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां लंकाशोधनं नाम प्रथमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग दुसरा

## लंका गृहशोधन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

हनुमान महावीरें । लंका शोधिली घरोघरें । हाट चोहटे चौबारें । गुप्त वोवरें [तु. दै. 'शोधिलीं'.] स्त्रियांचीं ॥ १ ॥

ऐसे शोधितां नगरां आंतु । न लभेचि सीता शुद्ध्यर्थु । राजवर्गाच्या गृहांतु । सीता हनुमंतु पाहों रिघे ॥ २ ॥

> आक्रम्य च महावेगः प्रहस्तस्य निवेशनम् । ततो न देवीति गृहं महापार्श्वस्य वीर्यवान् ॥ १ ॥
> महोदरस्य च तथा महाकायस्य चैव हि । विद्युज्जिव्हस्य भुवनं जांबुमालेस्तथैव च ॥ २ ॥
> वज्रदंष्ट्रस्य च तथा शुकस्य सारणस्य च । विद्युन्मालेः सुमालेश्च विकटस्याप्यतुर्बलेः ॥ ३ ॥

करुनि उड्डाणचि थोरी । रिघे प्रहस्त मंदिरीं । शोधिलीं घरें वोवरीं । स्त्रियांमाझारीं जानकी ॥ ३ ॥

तेथें न लभेचि जाण । मग करूनि उड्डाण । प्रहस्त महाबळी प्रधान । त्याचेंहि भुवन शोधिलें ॥ ४ ॥

तेथुनि उडोनी झडकरी । शोधावया सीतासुंदरी । रिघोनी महापार्श्वदा घरीं । अंतःपुरीं शोधितु ॥ ५ ॥

तेथ न लभेचि सीता शुद्ध्यर्थुं । तेथुनि उडोनी हनुमंतु । महोदराच्या गृहाआंतु । असे शोधितु जानकी ॥ ६ ॥

अतिकाय महाकाये । यांचीं घरें शोधित जाये । अखयाकुमराचे ठाये । शोधुनि पाहे जानकी ॥ ७ ॥

वज्रदंष्ट्र आणि जंबुमाळी । तेथ शोधिली जनकबाळी । विद्युज्जिव्ह महाबळी । तेथ घरधांडोळी घेतली ॥ ८ ॥

रावणाचे आप्तपूर्ण । शुक आणिक सारण । त्या दोघांचीं घरें जाण । पाहे आपण हनुमंतु ॥ ९ ॥

विद्युन्माळी आणि सुमाळी । [मुं. 'विकटाक्ष'.] विकटास्य अतुर्बळी । यांचा घरीं जनकबाळी । घेतां धांडोळी न लभेचि ॥ १० ॥

बहुशत्रु आणि सूर्यशत्रु । अमित्र कुमित्र आणि शठमित्रु । अतिगर्वी चित्रविचित्रु । पवनपुत्र घरें शोधी ॥ ११ ॥

धूम्राक्ष आणि ताम्राक्ष । विरुपाक्ष मकराक्ष । शोधावया मृगशावाक्ष । घरें अति दक्ष कपि शोधी ॥ १२ ॥ [ओवी १२ वि. प्रतीत नाही.]

घस प्रघस महाघस । चौथा जो कां वीर विघस । हनुमान शोधी सावकाश । घ्यावया घस रावणासी ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

शठ निशठ महाशठ । भट उद्भाट महाभट । येहीं घरी शोधुनि [कं. मुं. 'स्पष्ट'.] पष्ट । निघे मर्कट पुढारा ॥ १४ ॥

युद्धोन्मत्त महामत्त । वीर वाठिवां अति उन्मत्त । घरें शोधूनि समस्त । निघे हनुमंत पुढारा ॥ १५ ॥ [ओवी १५ तु. वि. दै. प्रतींत नाही.]

भीम महाभीम सभीम । तिहींचीं रूपें अति दुर्गम । देखतां काळासी पडे भ्रम । सुखें प्लवंगम शोधी ॥ १६ ॥

वज्रजिव्हा वीर उद्भट । जिव्हा वज्रप्राय तिखट । [कं. 'तेणें'.] जिव्हाघायें पर्वत पीठ । करी शतकूट गिरिवरां ॥ १७ ॥

जिव्हा लांब योजन एक । [तु. मुं. 'सुरवर'.] सुरनर पन्नगा धांक । तेहि घरें एके एक । शोधी निःशंक मारुती ॥ १८ ॥

विद्युजिव्हा नांवें देख । जिव्हा विजूतेज [मुं. 'देख'.] भयानक । विजु कडकडी तैसी हांक । लोकालोक कांपती ॥ १९ ॥

ऐसे वीर अति विख्यात । त्यांच्या त्यांच्या घरां आंत । हनुमान घरधांडोळी घेत । सीता शुद्धयर्थ साधावया ॥

नांवें विकर्ण वीर निधडा । कर्णस्थानीं विकट दाढा । वृक्ष पर्वतां करी रगडा । मुखापुढें कोण राहे ॥ २१ ॥

त्याच्या दाढांच्या भयाभेणं । वारा वाजों न सके पूर्ण । हनुमान तेथें निघोनि [वि. 'संपूर्ण'.] जाण । सीता शोधूनि स्वयें पाहे ॥

जैसें शुकाचें चांचुवडें । तैसें तिखट [वि. 'नख'.] नाक [तं. मुं. 'गाढें'.] वाढे । शुकनासिक नांव पडे । [मुं. 'नखें'.] नाकें रगडे गिरीकूट ॥ २३ ॥

लागतां नाकाचा आघात । दैत्यदानव चळीं कांपत । हनुमान रिघोनिया तेथ । [तु. 'आशे'.] असे पाहात जानकी ॥ २४ ॥

अश्वमुख गुजमुख । तरसतगर व्याघ्रमुख । तें तें घरें हनुमान देख । शोधी सम्यक् जानकी ॥ २५ ॥

कराळाक्ष विकराळाक्ष । श्रोणिताक्ष आणि भीमाक्ष । हनुमान शोधुनिया [मु. 'अति'; वि. 'परम'.] दक्ष । एकेंएक घरें शोधी ॥ २६ ॥

सूर्यरथीचें जेवढें चाक । तेवढें एकाचें पैं मुख । यालागिं नांव चक्रमुख । देख निर्दोष तयासी ॥ २७ ॥

मुख पसरिलिया रणा आंतु । तिहीं लोका अति आकांतु । गिळूं सके मेरु पर्वतु । वीर विख्यातु चक्रमुख ॥ २८ ॥

अनुक्रमणिका

वाफ निघतां वदनीं । सूर्यबिंब [तु. 'जाई आच्छादुनी'.] आच्छादुनी । धुई दाटताहे [मुं. 'गगनीं'.] जनी । तैंपासुनी अद्यापि ॥ २९ ॥

ऐसीं घरे पैं समस्त । हनुमान साक्षेपें शोधित । स्त्रीपुरुषांचें एकांत । सुरतरत स्वयें देखे ॥ ३० ॥

स्त्रीपुरुष एकांत स्थानीं । उन्मादमदें मद्यपानी । नागवीं नाचतीं पैं दोन्ही । निज मैथुनीं [वि. 'रमताती'.] रममाणें ॥ ३१ ॥ [ओवी ३१ ते ४५ मुं. प्रतीत घेतल्या नाहीत.]

स्त्रीपुरुषांचें आळिंगण । स्त्रीपुरुषांचें मुखचुंबन । स्त्रियांचें कुचमर्दन । देखे आपण हनुमंतु ॥ ३२ ॥

हावभाव कटाक्ष गोठी । डोळे मोडणें चिमटचिमटी । येरयरां झोंबोनि कंठीं । सुखसंतुष्टीं रममाण ॥ ३३ ॥

करितां स्त्रियेचें अधरपान । सकळ गोडी त्यापुढें तृण । सोमपान अमृतपान । निंबलोण स्त्रीभोगा ॥ ३४ ॥

स्त्रीपुरुष एकांत [मुं. 'मति'.] गती । विपरीत रतीची [तु. 'गती'.] प्रीती । नाना जातीची मैथुनस्थिति । स्वयें मारुती देखतु ॥ ३५ ॥

पुरुष होय स्त्रियेची नारी । स्त्रियेसि पुरुष भर्तार करी । तिसी बैसुनी कामसंचारी । विपरीत परी संभोगा ॥ ३६ ॥

एक स्त्रिये तें करी अश्विनी । घोडी होय होंहों करूनी । तिची स्वयें योनि हुंगोनी । अश्वमैथुनी [वि. 'रमताती'.] रममाण ॥ ३७ ॥

एकु स्त्रिये तें करि खरी । भुंकतु धांवे खराच्यापरी । [तं. 'लाथा साहोनी'.] वदळा साहोनि उरावरि । खरसंस्कारीं विचलत ॥ ३८ ॥

एक राक्षस अति मूढ । स्त्रियेचें स्तन्य चोखी दुढ । तुझें दुध मज लागतें गोड । पुरतें कोड तेणें माझें ॥ ३९ ॥

एकु तो अतिशयें कुश्चित । स्त्रियेचे योनिसी [दै. 'सदा मर्दित' (कदाचित तेथें 'दांत' असा शब्द असेल).] दाम देत । केस निघालिया मुखा आंत । मग कोपत स्त्रियेवरी ॥ ४० ॥

केस वाढले योनीवरी । तूं तंवं निसंगल भारी । म्हणोनी तीतें स्वेच्छा मारी । पाय धरी रुसूं नको ॥ ४१ ॥

अपत्य मायेतें मारी । माता त्याचा कोप न धरी । तूंहि मज तैसिया परी । क्षमा करी बाळकत्वें ॥ ४२ ॥

ऋषि रामायणी वितंड । लिहलें असें भंडउभंड । तितुकें वाढवितां बंड । ग्रंथ उदंड वाढेल ॥ ४३ ॥ [ओवी ४३ कं. मुं. प्रतींत नाही.]

स्त्रीपुरुषांचां एकांतीं । नाना परीच्या देखोनि रती । हनुमान उद्वेगला चित्तीं । तेचि श्लोकोक्ति स्वयें बोले ॥

अनुक्रमणिका

४४ ॥

> परदारावरोधस्य प्रसुप्तस्य निरीक्षणम् । इदं खलु ममात्यर्थं धर्मलोपं करिष्यति ॥ ४ ॥
> न हि मे परदाराणां दृष्टिर्विषयवर्तिनी । अयमद्य मया दृष्टः परदारपरिग्रहः ॥ ५ ॥

**हनुमंत म्हणे निज चित्तीं । श्रमतां सीतेच्या शुद्धयर्थी । हें मज मुख्यत्वें गृहगति । आली उपहति ब्रह्मचर्या ॥ ४५ ॥**

**नाहीं परदारादर्शन । नाहीं परदारासंभाषण । त्या मज स्त्रीपुरुष मैथुन । योनिदर्शन एकांतीं ॥ ४६ ॥** [ओवी ४६ वि. प्रतीत नाही.]

**घरोघरीं सीतासती । पाहातां स्त्रीपुरुष एकांतीं । देखिल्या नाना परीच्या** [मुं. 'रीती'.] **रति ।** [दै. 'अति'.] **आली उपहति ब्रह्मचर्या ॥ ४७ ॥**

**देखतां प्रसुप्त स्त्रिया नग्न । हेंचि ब्रह्मचर्या मुख्य विघ्न । त्यां स्त्रियांचे अतिमैथुन । अन्योन्य देखिलें ॥ ४८ ॥**

**सर्पवेष्टन स्त्रिरमण । करकर करीतें घारिरमण । खराचे परि नरमैथुन । अन्योन्य देखिलें ॥ ४९ ॥** [ओवी ४९ मु. प्रतीत नाही; ४९ ते ५८ या ओव्या मुद्रितात घेतलेल्या नाहीत.]

**श्वानाचें हेंड तत्काळ सुटे । त्याहुनि नराचें पैं मोठें । जन्म शतांचि संकटें । हेंड न सुटे** [कं. 'देहींचें'.] **दोंहिंचें ॥ ५० ॥**

**अनेक पुण्य जोडूनि जीवीं । स्वर्गीं हेळगुंड गोवी ।** [मुं. दै. 'पावोनी'.] **पावो नरदेहाची पदवी । योनि वैभवीं निमग्न ॥ ५१ ॥**

**श्वान मैथुन करुनि सोडी । मोथड्ड बुंथड्ड सुनीसन घडी । धन्य नरदेहीं आवडी । कडो विकडी योनिपूजा ॥ ५२ ॥**

**योनीसी पाटावें पिवळी । योनीसी घाली मोतिया जाळी ।**
**योनीच्या चवरांचवरें ढाळी । योनि प्रतिपाळी छत्रछायें ॥ ५३ ॥**

**ऐसी नरदेहाची ख्याति । योनिद्वारां नरका जाती । सर्वेचि योनिद्वारें जन्मती । अधोगति योनिसंगें ॥ ५४ ॥**

**योनि जन्मोनि योनीसी रमणें । तें तंव नरकाचे पाहुणे । योनि** [तु. वि. कं. मुं. दै. तं. 'संभोगा'.] **संयोगा बैसलें धरणें । नरकी रमणें स्त्रियांसी ॥ ५५ ॥**

**उदरीं वाहे नव मासांत । नरक वोक सोसी मुत । ते मातेतें त्यागुनि सुत । मानी अति आप्त स्त्रीयोनि ॥ ५६ ॥**

**योनिभोगाचें संगतीं । अमित गेले अधोगती । ऐसिया योनि आजिच्या रातीं । नेणों किती देखिल्या ॥ ५७ ॥** [ओवी ५७ दै. प्रतीत नाही.]

**श्रीरामसेवा अति प्रीति । लंघुनी आलों अपांपति । येथ शोधितां सीतासती । अधोगति मज आली ॥ ५८ ॥**

**नग्न स्त्रियेचें दर्शन । तेंचि ब्रह्मचर्या नागवण । तेथ देखतां अति मैथुन ।** [कं. मुं. 'अरूढ पतन'.] **आरुह्म पतन मज आलें ॥ ५९ ॥**

तस्य प्रादुरभूच्चिंता पुनरेव मनस्विनः । तिष्ठत्येकांतचित्तस्य कार्यनिश्चयदर्शिनः ॥ ६ ॥

**सीता शोधिता संकटीं । ब्रह्मचर्या होईल तुटी । न शोधितां उठाउठी । राम जगजेठी क्षोभेल ॥ ६० ॥**

**क्षोभलीया रघूत्तम । वृथा जन्म वृथा कर्म ।** [तु. दै. 'वृथा ब्रह्मचर्य धर्म'.] **वृथा गेलें भजन धर्म । अति दुर्गम मज** [वि. 'जाले'.] **आले ॥ ६१ ॥**

**शुद्धी करितां न करितां । अपेश** [तु. वि. कं. मु. दै. तं. 'येईल'.] **होईल माझे माथां । काय करूं रघुनाथा । बुद्धिदाता मज होई ॥ ६२ ॥**

**बुद्धिर्बुद्धिमतामस्मि । प्रतिज्ञा तुझी आगमी निगमीं । माझे संकट** [दै. 'दुर्गमीं'.] **संभ्रमीं । कृपानुधर्मी पावावे ॥ ६३ ॥**

**नमे भक्तः प्रणश्यति । तुझीं बिरदें गा रघुपती । सीता शुद्धीचे आकांतीं । कृपामूर्ति पाव वेगीं ॥ ६४ ॥**

**हे हनुमंताची अति चिंता । कळों** [कं. तं. 'आली'.] **सरली श्रीरघुनाथा । प्रगटला हृदया आंतौता । भक्तसाह्यार्था श्रीराम ॥ ६५ ॥**

**मुखीं श्रीरामनाममुद्रा । हृदयीं स्मरतां श्रीरामचंद्रा ।**
**उल्हास** [मु. 'जाला'.] **आला जी कपींद्रा ।** [मु. 'भद्रा'.] **श्रीरामभार्या शोधावया ॥ ६६ ॥**

**करितां श्रीरामाचें स्मरण । हृदयीं** [कं. दै. 'झाली'.] **आली आठवण । देखतां परदारा मैथुन । बाधकपण मज नाहीं ॥ ६७ ॥**

कामं दृष्टा मया सर्वा विवस्त्राभरणाः स्त्रियः । न तु मे मनसः किंचिद्वैरूप्यमुपजायते ॥ ७ ॥
मनी हि हेतुः सर्वेषामिंद्रियाणां प्रवर्तते । शुभाशुभास्ववस्थासु तच्च मे शून्यवत्स्थितम् ॥ ८ ॥
नान्यत्र हि मया शक्या वैदेही परिमार्गितुम् । स्त्रियो हि स्त्रीषु दृश्यन्ते सदैव परिमार्गणा ॥ ९ ॥

**देखतां परदारा नग्न । देखतां परदारा मैथुन । मज नाहीं काम कामन । श्रीरामचरण प्रसादें ॥ ६८ ॥** [ओवी ६८ तु. दै. प्रतींत नाही.]

अनुक्रमणिका

**देखतां परदारा रति । अल्पहि कामाचि स्फूर्ति । बाधीना** [मु. 'ज्ञानियाचें'.] **माझां चित्तीं । श्रीरघुपति प्रसादें ॥ ६९ ॥**

**चित्तामाजीं कामाची वस्ति । तेणें चित्तें करितां श्रीरामभक्ति ।**
**चित्त पावलें चैतन्य स्थिति । कामनिवृत्ति सहजेची ॥ ७० ॥**

**जेविं अंधारे रातीं । खद्योतनक्षत्रें लखलखिति । तेथ उगवलिया गभस्ति । अस्तु पावती अवघीहिं ॥ ७१ ॥**

**तेविं कामक्रोधलोभ चित्तीं । तेणें चित्ते करितां भक्ती । राम प्रगटलिया सर्वभूतीं । अस्तु पावती कामक्रोधु ॥ ७२ ॥**

**इंद्रिया प्रवर्तक मन । मनाचां पोटीं स्त्रीपुरुष** [मुं. 'भिन्न'.] **भान । सकळ कामासी कारण । मनचि जाण बाधकत्वें ॥ ७३ ॥**

**जेविं समुद्रीं लवणकण । विरोनी समुद्र होय आपण । तेविं करितां श्रीरामस्मरण । मनचि परिपूर्ण परब्रह्म ॥ ७४ ॥**

**मनाचि मालवली मनोवृत्ति । स्त्रीपुरुषाचां एकांतीं । शोधितां सीतासती । बाधक चित्तीं मज नाहीं ॥ ७५ ॥**

**मन मालवतांचि पाही । मी देहींच जालों विदेही । आतां नग्न स्त्रियांचां ठाई । शोधीन वैदेही विदेहत्वें ॥ ७६ ॥**

**नग्न देखतां शूकरश्वान । पुरुषासी नव्हे काम कामन । तेवीं देखतां** [तु. दै. 'स्त्री नग्न'; मु. 'स्त्रीपुरुषमैथुन'.] **स्त्रीमैथुन । बाधकपण मज नाहीं ॥ ७७ ॥**

**शस्त्र घालितां दळा आंतु । पुरुष नव्हे** [वि. 'शक्त'.]**कामासक्तु । तेविं लिंग रिघतां योनि आंतु । कामकामार्थु मज नाहीं ॥ ७८ ॥**

**माशीवरी बैसतां माशी । काम नुपजे कोण्हासी । तेविं देखतां मैथुनासी । शंका मानसीं मज नाहीं ॥ ७९ ॥**
[ओवी ७९ तु. प्रतीत नाही.]

**पाविजे सद्गुरू एकांतु । तैंचि कामाचा समूळ घातु । तो मज तुष्टला श्रीरघुनाथु । कामकंदनार्थु मज नाहीं ॥ ८० ॥** [ओवी ८० कं. प्रतीत नाही.]

**स्त्री चुकली सीतासती । ते शोधावी स्त्रियांप्रति । त्यां स्त्रियांची देखतां रती । कामस्फुर्ति मज नाहीं ॥ ८१ ॥**
[ओवी ८१ कं. प्रतीत नाही.]

यस्य सत्वस्य या योनिः तस्यां स परिमार्ग्यते । न शक्या प्रमदा नष्टा मृगीषु परिमार्गितुम् ॥ १० ॥
तदिदं मार्गितं तावच्छुद्धेन मनसा मया । इदानीं शोधयिष्यामि सीतां जनकनंदिनीम् ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

स्त्री चुकली सीतासुंदरी । ते शोधावी स्त्रियांमाझारीं ।
वांचुनि शोधितां श्वानसूकरीं । श्रीरामनारी तेथ कैंची ॥ ८२ ॥

सीता चुकली यासाटीं । वना धावोनि उठाउठी । शोधुं जातां मृगींच्या थाटी । मूर्खदृष्टी शोधक ॥ ८३ ॥

तें मज नाहीं मूर्खपण । सीताशुद्धयर्थी मी [कं. मु. 'सावधान'.] सज्ञान । शोधीन [तु. वि. कं. मुं. 'समस्त'.] समर्थभुवन । [कं. 'गृह'.] गुह्यस्थान [दै. 'सीतेचें'.] स्त्रियांचें ॥ ८४ ॥

जें कां अत्यंत विषमस्थान । जेथ रिघतां संकट गहन । तेथतेथें प्रवेशोन । सीता शोधीन साक्षेपें ॥ ८५ ॥

मागें शोधिलीं भुवनें भुवन । आतां शोधीन दुर्गमस्थान । ऐसी धरुनि आंगवण । उठी आपण हनुमंतु ॥ ८६ ॥

> अथ मेघप्रतीकाशं कुंभकर्णनिवेशनम् । बिभीषणस्य च तथा पुप्लुवे स महाकपिः ॥ १२ ॥
> ततश्चेन्द्रजितो प्रेश्मं जगाम हरिपुंगवः ॥ १३ ॥

हनुमान उडो पाहे आपण । तवं देखिलें इंद्रजीतभुवन । अनर्घ्यरत्नीं विराजमान । [तं. 'तेणें'.] तेजें गगन लखलखित ॥ ८७ ॥

घरावरी घरें कुसरी । उपरियांवरी उपरी । आटाळिका थोरिया थोरी । त्याहि वरि चौबारें ॥ ८८ ॥

रावणाच्या [तु. कं. मुं. दै. 'घराहुनी'.] घरा होउनि । शोभा इंद्रजीताचां भुवनीं । कनककळस जडितरत्नीं । लागले गगनीं लखलखित ॥ ८९ ॥

श्वेत पीत आरक्त भारी । पताका झळकती अंबरीं । जागल घालिती महा असुरी । [वि. 'अहोरात्री'.] हारोहारी दीपिका ॥ ९० ॥

हांकुनिया उपराउपरीं । घरटी घालिजे महावीरीं । वायूसी रिगु नाहीं भीतरीं । पाहे चौफेरी हनुमंत ॥ ९१ ॥

तीखणें चौखणें पांचखणें । सप्तखणें नवखणें । [वि. तु. 'वरी'; दै. 'त्याही वरी'.] त्यामाजीं आहे महा दुखणें । नित्य [वि. 'कुंठणें'.] कुंथणें वांठिवां ॥ ९२ ॥

आतुंल्या दुखण्याचें छेदन । करील लक्ष्मणाचा बाण । युद्धचर्या झाडील [दै. 'जाण'.] पूर्ण । पाडील खण गर्वाचें ॥ ९३ ॥

देखोनि इंद्रजीतभुवन । हनुमान खवळला आपण । भीतरीं रिघावया जाण । अणुप्रमाण स्वयें जाला ॥ ९४ ॥

रिघोनिया गवाक्षद्वारीं । वेगें पाहिलीं घरे च्यान्ही । शोधुनी वोवऱ्यावोवरी । उपऱ्याउपरी धांडोळी ॥ ९५ ॥

अनुक्रमणिका

आटाळिकाहि माझारीं । हनुमान पाहे सीतासुंदरी । तंव देखिली नवल परी । सहित अंतुरी इंद्रजीत ॥ ९६ ॥

मरकत मंचक सुंदरू । त्यावरी त्राहटिले हंसमयूरु । सेज रची कुसुमाकरु । सुमन अरुवारु सुगंध ॥ ९७ ॥

मुक्तघोषीं मुक्तवितान । घवघवीत शोभायमान । कर्पूरवाती तेज गहन । पीकदान रत्नाचें ॥ ९८ ॥

अति सुगंधा सुवर्ण भिंती । पाचु निबद्ध अवघी क्षिती । सुलोचना महासती । विडिया देती इंद्रजिता ॥ ९९ ॥

सुलोचना पतिव्रता । कदानुलंघी पतिवचनार्था । तिसी देखोनि हनुमंता । म्हणे ही सीता निश्चित ॥ १०० ॥

नागकन्या सुलोचना । ते तंव पद्मिणी [तु. वि. दै. मु. 'नयना'.] पद्मवदना । देखोनि हनुमान म्हणे जाणा । रामांगना हे होय ॥ १०१ ॥

पद्मिनी [मुं. 'जातीचा'.] स्त्रियेचा विचार । पाउलापाउला भंवती भ्रमर । अंगसुवास मनोहर । सीतासुंदर हे होय ॥ १०२ ॥

माझ्या स्वामीची हे कांता । अनुसरली [तु. वि. कं. मुं. दै 'रावण सुता'.] इंद्रजिता । दोहींच्या करीन मी घाता । कोप हनुमंता पैं आला ॥ १०३ ॥

डोळे आरक्त क्रोधकडाडी । वळिली पुंसाची पै वेढी । दोहिंची मुरडावया नरडी । शेंडी तडतडी हनुमंता ॥ १०४ ॥

अधर्मा रातली हे सीता । उभय वर्गे मारीन आता । कोपु आलियां रघुनाथा । दोहींच्या प्रेतां दावीन ॥ १०५ ॥

अथवा निज पुंसीं बांधोनी । [दै. 'पुच्छें'.] जीत धरुनि नेईन दोन्ही । रागें घुलकावितु गगनीं । उडी घालूनि मारावया ॥ १०६ ॥

सुलोचना पतिव्रता । पतीच्या चरणी ठेविला माथा । कांही एक पुसेन आतां । प्राणनाथा क्षमा कीजे ॥ १०७ ॥

यावज्जन्म तुम्हाप्रती । नाहीं केली म्यां विनंती । घातु देखोनी [वि. 'लंकेप्रती'.] लंकापती । काकुलती पुसते ॥ १०८ ॥

राखों जातां अशोकवन । तुम्ही पावाल अपमान । अखयाकुमरा येईल मरण । कुळ निर्दलन राक्षसां ॥ १०९ ॥

इंद्रजीत पुसे प्रियेप्रति । ऐसें होईल कैसिया रीती । रावणें आणिली सीतासती । कुळसमाप्ति राक्षसां ॥

अनुक्रमणिका

११० ॥

वनीं छळूनि [कं. 'नारी'.] रामबळी । येथें आणिली जनकबाळी । [मुं. 'तेणें तो'.] ते करील लंकेची होळी । राक्षसकुळीं आकांतु ॥ १११ ॥

तुम्हांचिवरी वोखटें चिन्ह । देखोनि धांकताहे माझें मन । [तु. दै. मु. 'प्रार्थूनी'.] पाचारूनि दशानन । बुद्धी आपण सांगावी ॥ ११२ ॥

तूं तंव त्याचा ज्येष्ठकुमर । तुझा विश्वास त्यासी थोर । सीता देऊनि [कं. 'साचार'.] सुंदर । श्रीरामचंद्र करी सखा ॥ ११३ ॥

सखा केलिया श्रीरघुनाथ । राक्षसकुळ होईल स्वस्थ । तुम्ही अक्षयी समस्त । यशवंत तिहीं लोकीं ॥ ११४ ॥

इंद्रजीत सांगे अति एकांतु । रावण सीता सन्यपातु । जो जो सांगे हित स्वार्थु । त्याचाचि घातु करूं धांवें ॥ ११५ ॥

सख्य करुनी रघुनाथा । सीता सोडी मज म्हणतां । माझ्याचि करूं धांवेल घाता । बैसेल माथां पितृद्रोहो ॥ ११६ ॥

ऐके प्रिये सावधान । चुकविल्यां न चुके मरण । होणार तें होईल जाण । बुद्धी आपण न सांगावी ॥ ११७ ॥
ऐसी दोहींची एकांत कथा । ऐकूनिया आश्चर्य हनुमंता । सुलोचना नव्हे सीता । हें तत्वता कळों आलें ॥ ११८ ॥

इंद्रजीत सुलोचना एकांतीं । कोणें ठाई सीतासती । राखिली आहे लंकेप्रती । नेमस्त मारुती नायिकेची ॥ ११९ ॥

लंकेमाजीं आहे सीता । शुद्धी लागली हनुमंता । तिसीं शोधावया तत्वतां । होय निघतां तेथुनी ॥ १२० ॥

मेघाहूनी उंच घर । मेघवर्ण दिसे शिखर । तेथ शोधावया सीतासुंदर । उडे सत्वर मारुती ॥ १२१ ॥

सादरें शोधुं जातां घर । हनुमान दचकला [वि. 'महावीर'; मुं. 'थोर'.] वानर । कुंभकर्ण महाथोर । निशाचर पहुडला ॥ १२२ ॥

घर्घरित महाघोर । नादें कोंदलें अंबर । शंख केलियाहि समोर । कानीं उत्तर पडेना ॥ १२३ ॥

श्वासोश्वासाचा आवर्ती । शतानुशतें पडिले हस्ती । निर्गमु नाहीं तळमळिती । म्हैसे आरडती त्यामाजीं ॥ १२४ ॥

दोहीं नासापुटरंध्री । सगळे कळप रिघती कर्‍हीं । त्याचा निर्गमु नव्हे बाहेरी । प्राण मारी प्राण्यातें ॥ १२५ ॥

अनुक्रमणिका

गाई म्हैसी बैल घोडी । श्वासोश्वासीं तें घुंगुरडीं । निदसुरया नाक रगडी । मरती कोडी प्राण्यांच्या ॥ १२६ ॥

हनुमान म्हणे आपुलां चित्तीं । जैं रचिली याची [कं. 'माती'; मुं. 'मूर्ती'.] व्यक्ति । तैं [दै. 'सीनला असेल'.] आळसेला प्रजापति । अमुप माती रचियेली ॥

बाबरझोटी अति केसाळ । जैसे भाले आणियाळ । आंगीच्या रोमा जैसे शूळ । दाढा विक्राळ खंताळ्या ॥ १२८ ॥

शेवाळले दिसती दशन । [मुं. 'कदा न'.] कवण करी दांतवण । देखोनियां त्याचें वदन । आलें वमन हनुमंता ॥ १२९ ॥

येथ आलियां रघुनंदन । याची पाहावया आंगवण । प्रथम यासी [तु. वि. कं. मुं. दै. तं. 'माझें रण'.] मारण । केला पण हनुमंतें ॥ १३० ॥

देखोनि याची हे देहस्थिति । कांटाळला स्वयें मारुती । येथें कैंची सीता सती । निघे [दै. 'अति गती'.] मारुती त्रासला ॥ १३१ ॥

अति त्रासला उबगला । अत्यंत खेदें खिन्न जाला । ब्राह्मण जन्म हा पावला । व्यर्थ गेला अति निद्रा ॥ १३२ ॥

निद्रया हीयते नक्तं संभोगेन च रात्रयः । दिवा चार्थेहया राजन् कुटुंबभरणेन वा ॥ १४ ॥

अर्धायुष्य हातोहातीं । बळेंचि हिरोनि नेती राती । जागा झालिया स्त्रियेसी रती । कामासक्ति कामाची ॥ १३३ ॥

कुटुंबचिंता बैसली चित्तीं । ते तंव न सोडी कल्पांतीं । आयुष्य गेलें याचि रीतीं । द्रव्यासक्ति अति तृष्णा ॥ १३४ ॥

अशनशयन द्रव्यासक्ती । जन नागवले याचि रीती । कुंभकर्ण नागविला सुषुप्ती । सीता सती येथ कैंची ॥ १३५ ॥

तेथुनि करुनिया उड्डाण । [मु. 'देखिलें'.] ठाकिलें बिभीषणभुवन । टके पताका वृंदावन । हरिकीर्तन रामाचें ॥ १३६ ॥

टाळ घोळ मृदंग मेळीं । नैराश्य निधडे वैष्णव बळी । नामासरिसी वाजे टाळी । सुख संमेळीं डुल्लत ॥ १३७ ॥

कीर्तनसुखे सुखावले । आपआपणियां विसरले । परमानंदें तृप्त जाले । गावों लागले [तु. दै. 'हरि'.] रामगुण

॥ १३८ ॥

निज निरपेक्षें विचक्षण । श्रुती उपरमे सावधान । श्रीराम सगुण निर्गुण । करिती कीर्तन तें ऐका ॥ १३९ ॥

श्रीरामें घरा अति पावन । राम जीवन राम दहन । रामु [मुं. 'तपन'.] पवन राम [तं. 'गहन'.] गगन । राम परिपूर्ण परब्रह्म ॥ १४० ॥

राम मनाचें उन्मन मन । राम चित्ताचें चैतन्य घन । राम बुद्धीचें सज्ञान भुवन । राम परिपूर्ण परब्रह्म ॥ १४१ ॥

राम जंगमीं स्थावरीं । राम सबाह्य अभ्यंतरीं । राम परमात्मा श्रीहरी । जगदोद्धारी श्रीरामु ॥ १४२ ॥

देखोनी कीर्तनाची गोडी । हनुमान अत्यंत आवडी । रंगीं घालोनियां उडी । गुप्त गडाडी नाचतु ॥ १४३ ॥

रंगी नाचतां हनुमंतु । रंगीं वोसंडला परमार्थु । तेणें बिभीषण मूर्छितु । परमभक्त परमार्थी ॥ १४४ ॥

हनुमंता स्वेदरुदन । नाठवे देहविदेहभान । बिभीषण मूर्छापन्न । आपणया आपण विसरला ॥ १४५ ॥

दोघांहीं वोळखी नसतां । दोघांही भेटीगोठी नव्हतां । दोघांही जाली एकात्मता । श्रीराम कथा कीर्तनें ॥ १४६ ॥

हरिकीर्तन तें स्वकर्म । हरिकीर्तन तो स्वधर्म । हरिकीर्तनीं [तं. 'प्राण'.] परमप्रेम । जें परब्रह्म प्रापक ॥ १४७ ॥

बिभीषणाचे पूजेप्रति । दिग्विजयी श्रीराममूर्ति । ते देखोनियां मारुती । परमप्रीति सुखावे ॥ १४८ ॥

बिभीषण श्रीरामभक्तु । हनुमान आनंदे नाचतु । भावें भजतां श्रीरघुनाथु । नित्यमुक्तु बिभीषण ॥ १४९ ॥

राक्षसीं श्रीरामाची भक्ती । हरुषें उपरमतु मारुती । रामें रावणाची केलिया शांती । राज्यप्राप्ती बिभीषणा ॥

माझिया श्रीरामाची भक्ती । राज्य करितां नित्य मुक्ती । असतां स्त्रीपुत्रसंतती । [तु. वि. 'भक्ति'.] भुक्ति मुक्ती [कं. 'आंदण्या'.] भंगेना ॥ १५१ ॥

हनुमंतें केला पण । रामें मर्दूनी रावण । लंकापती बिभीषण । हें शुभ चिन्ह सत्य माझें ॥ १५२ ॥

जेथें श्रीरामाची भक्ती । तेथ आहे श्रीरामशक्ती । रामराज्य लंकेप्रती । सीतासती येतांची ॥ १५३ ॥

जेथ रिघाली श्रीरामभक्ती । भुक्ति मुक्ती तेथेंचि शक्ती । रामराज्याचि तेथेंचि स्थिति । केला मारुती निश्चयो ॥ [ओवी १५४ कं. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

सीता आगमन लंकेप्रती । रावणासी परममुक्ती । बिभीषण राज्य प्राप्ती । केला मारुती निश्चयो ॥ १५५ ॥

मागील श्रम खेद उपहती । येथ आलिया जाहाली शांति । धन्य वैष्णव संगती । महिमा किती मी वानूं ॥ १५६ ॥

संतसंगे निरसे भ्रांती । संतसंगे जड उद्धरती । संतसंगें ब्रह्मप्राप्ती । नित्य मुक्ती संतसंगें ॥ १५७ ॥

संतचरणीचे रजकण । हनुमान वंदी आपण । चरणरजीं [कं. 'कपी लोटांगण'.] करी लुंठण । पांशुस्नान पदरजें ॥ १५८ ॥

बिभीषणाच्या भुवनाप्रती । हनुमान पावला [कं. मु. 'सुख विश्रांती'; तं. 'सुख संगती'.] स्वसंपत्ति । भगवद्भक्त जेथ भेटती । [मु. 'भ्रम'.] श्रमनिवृत्ती आकल्प ॥ १५९ ॥

चरणरज स्नानापुढें । तीर्थ [तु. दै. 'यात्रा'.] मात्र तें बापुडें । चरणरजें मुक्ती जोडे । ब्रह्म आतुडे पदरजें ॥ १६० ॥

अर्थीस्वार्थी कां परमार्थी । गेलियां भक्तभुवनाप्रति । त्याचेनि संगें [मुं. 'सेविती'; मु. 'प्राप्ती'.] सुखसंवित्ति । श्रमनिवृत्ती आकल्प ॥ १६१ ॥ [ओवी १६१ वि. कं. प्रतींत नाही.]

एका जनार्दना शरण । दुरुनि देखिलिया भक्तभुवन । हनुमान जाला सुखसंपन्न । समाधान [तु. वि. मुं दै. मु. 'जीवशिवां'.] जिवींजीवा ॥ १६२ ॥

प्रत्यक्ष जालिया भक्त भेटी । त्यासी पुसतां गुह्य गोठीं । परमानंदे पडे मिठी । धन्य सृष्टीं हरिभक्त ॥ १६३ ॥

एका जनार्दनी विनंती । शोधूं जातां सीतासती । बिभीषणाच्या भुवनाप्रती । [मुं. 'संगती'.] सुखसंवित्ति [तु. दै. 'हरिभक्तां'.] हनुमंता ॥ १६४ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां लंकागृहशोधनं नाम द्वितीयप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग तिसरा

## रावणसभा शोधन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

शोधितां बिभीषणमंदिर । सुखी जाला तो कपींद्र । शुद्धी न लभेचि सीता सुंदर । तेणें वानर उद्वेगीं ॥ १ ॥

शोधिलें समस्तहि नगर । शोधिलीं अटके घरें नि घर । शुद्धि न लभेचि अणुमात्र । तेणें वानर उद्विग्न ॥ २ ॥

जन वन आणि विजन । स्वयें शोधिलें सावधान । शुद्धि न लभेचि अणुप्रमाण । तेणें उद्विग्न वानर ॥ ३ ॥

तनस्तां हनुमान् चिंतामवधूय व्यवस्थितः । जगाम चिंतामपरां सीतां प्रति महाकपिः ॥ १ ॥

सीता शुद्ध्यर्थी [तु. वै. दै. 'अति उद्विग्न'.] उद्विग्न । अति चिंता कंपायमान । आतां करुं बुद्धि [वि. 'कोण'; मु. 'आपण'.] आन । सीता चिद्रत्न जेणें लाभे ॥ ४ ॥

येथ [मु. 'शोधावया'.] साधावया सीता शुद्ध्यर्थ । कळि माजवूं लंके आंत । लागतां निष्ठुर आघात । सीता [तु. तं. 'गुह्यर्थ'.] शुद्ध्यर्थ वदतील ॥ ५ ॥

रावण आज्ञा अति दारुण । भेणें न सांगती [कं. 'जाण'.] जन । बुद्धि निर्धारी आपण । कळहकारण शुद्ध्यर्थी ॥ ६ ॥

आपण राहुनियां गुप्त । कळि लावू जेथिचा तेथ । [तु. दै. 'कर्माकर्म'.] वर्मे कर्मे आक्रंदत । सीता शुद्धयर्थ वदतील ॥ ७ ॥

ऐसें विचारूनी जाण । प्रवेशला लंकाभुवन । राजद्वारीं पैं संपूर्ण । करी विंदान कलहाचें ॥ ८ ॥

गुप्त राहोन जगा आंत । वानर चेष्टा चेष्टवित । कलह माजवी जेथचा तेथ । कथा अद्भुत अवधारा ॥ ९ ॥

हनुमान विनोदी जाण । निज पुच्छासी करी नमन । सीता शुद्ध्यर्थी आपण । साह्म संपूर्ण मज व्हावें ॥ १० ॥

पुसें गोवूनि फोडी घागरी । तीवरी पाडी पैं दुसरी । संवेचि ढकली तिसरी । चौथी तीवरी घटस्फोटें ॥ ११ ॥

पांचवी जातां पैं चांचरी । साहावीचा आधार धरी । शतानुशतें असंख्य नारी । फोडी घागरी निज पुच्छें ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

कोण गे मेला आम्हा आंत । रिघोनि घागरी फोडित । हनुमान पुंस भवंडी [तु. कं. मुं. दै. तं. 'कानांत'; वि. मु. 'नाकांत'.] आंत । नारी नाचत चवंकोनी ॥ १३ ॥

पुढीला चवंकोनी नाचती । मागिला फडकोनि [तु. कं. दै. तं. 'बिचकती'.] नाचती । नाक पूंस भवंडी मारुती । नारी शिंकती खसखसां ॥ १४ ॥

नारी शिंकती धडधडां । घागरी फुटती भडभडां । नगरीं उदकाचा तढां । लाविला वेढा निजपुच्छें ॥ १५ ॥

भरली घागरी नगरां आंत । रिघों नेदी पैं हनुमंत । द्वंद्व मांडलें अति गुप्त । तढा नगरां आंत उदकाचा ॥ १६ ॥

राजा निमाला ये नगरीं । घटस्फोट [कं. 'महाद्वारी'.] राजद्वारीं । शंख करिती [वि. मुं. मु. 'नरनारी'.] नगरनारी । सीतासुंदरी क्षोभली ॥ १७ ॥

श्रीरामाची निज कांता । तिणें या उठविले आकांता । चोरुनी आणिली सती सीता । लंकानाथा वधावया ॥ १८ ॥

सीता क्षोभली दारुण । शोखिलें राक्षसांचें जीवन । आतां कैसेनि वांचती प्राण । जीवनेंविण [मु. 'जिणें कैसें'.] मराल ॥ १९ ॥

आंगोळ्या मोडिती नगरनारी । क्षोभें क्षोभली सीतासुंदरी ।
आतां राक्षसां नुरे उरी । करील [तं. 'होळी'.] बोहरी लंकेची ॥ २० ॥ [ओवी २० वि. प्रतीत नाही.]

राजद्वारीं घटस्फोट । खापरें [मु. 'पडली'.] दाटलीं घनदाट । बुजाली राजद्वाराची वाट । विघ्न दुर्घट [मु. 'लंकेसी'.] लंकेशा ॥ २१ ॥

[मुं. मु. 'ऐसा'.] असो हा घटस्फोट वृत्तांतु । वेगळा बैसुनी हनुमंतु । कलह [कं. 'मांडिला'.] माजवी नगरा आंतु । सीता शुद्ध्यर्थू साधावया ॥ २२ ॥

राजसन्मान महावीरीं । अश्वीं चढोनी राजद्वारीं । हो हो मा मा जी जी कारी । नानापरी नाचविती ॥ २३ ॥

पुंस गोवूनि अश्वपायांत । वीर तोंडघसी पाडित । दांत घालुनी घश्या आंत । करी आरक्त मुख त्यांचें ॥ २४ ॥

पूंसें अश्वपाय उखळीत । वीरां मुखीं रुधिर वाहात । ऐसे योद्धे असंख्यात । येती कुंथत निजधामा ॥ २५ ॥

ऐशिया वीरांचिया कोडी । उचक उचकु त्यांची घोडी । राजद्वारीं घाली उबडी । दांत पाडी वीरांचे ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

तोंडे ठेचिलीं अश्वपति । तैसी गजा ग्रहगती । पूंसें दंडील मारुती । तेहि ख्याति अवधारा ॥ २७ ॥

गज योद्धे महाशूर । चरणीं ब्रीदांचा तोडर । माथां धरुनि आतपत्र । राज्यद्वार टाकिले ॥ २८ ॥

राजद्वारीं प्रवेशती । पूंसें खंडूनिया [तु. दै. 'मागें'.] गजगती । मागील वोढूनिया हस्ती । हाणे दांतीं पुढिलातें ॥ २९ ॥

माझिया हस्तिवरी हस्ती । कां रे आणिला उद्धती । वीर वीरांतें हाणिती । गज [तु. दै. 'भाडंती'.] भिडती गजेसीं ॥ ३० ॥

गज दंताची खणाण । शस्त्रें सुटती सणाण । राजद्वारीं महारण । अति दारुण मांडलें ॥ ३१ ॥

पुढील पडिल्या महावंत । पार्श्ववर्ती पुढें बैसत । गज गजासी [तं. 'झुंज'; वि. 'वेंझ'.] वेझ देत । अत्यद्भुत गजयोद्धे ॥ ३२ ॥

वीर विजयो पाहात । गुप्त पूंसाचा वाजे घात । गज गडबडिती जैसें प्रेत । वीरे कुंथत रगडोनी ॥ ३३ ॥

ऐसिया नेणों किती हस्ती । गुप्त पूंसाचां आघातीं । लोळविलीयां कुंथती । गजपति गांजुनी ॥ ३४ ॥

रथीं बैसोनि राजकुमर । कनकदंडें ढाळिती चंवर । पुढें वाजंत्रांचा भार । राजद्वार टाकिलें ॥ ३५ ॥

गुप्त गती [वि. मु. 'थोकिली'.] ठाकिली घोडीं । पूंसें सारथ्यातें झोडी । लाग वेगें ध्वजु आसुडी । कुमर पाडी क्षितीतळीं ॥ ३६ ॥

महावीर पडतां क्षितीं । त्याचा रथु त्यावरी उलथी । च्याऱ्ही घोडी होती पालथी । कुमर कुंथती दडपोनी ॥ ३७ ॥

वारु सारथी महारथी । एकवेळे ते कुंथती । वाजंत्री शंख वाजविती । क्षितीं हुंबती चंवरधर ॥ ३८ ॥

ऐसिया रथांचिया [तु. दै. मु. 'कोडी'.] जोडी । हनुमान गुप्त घातें मोडी । पूंसें नाचविलीं धांदडी । रथीचीं घोडी [वि. 'चडफडीती'.] फडफडिती ॥ ३९ ॥

ऐसे वीर नेणों किती । पडिले राजद्वारीं हुंबती । खाटा दांडियां उचलूं जाती । तेहि भीती गुप्त घाता ॥ ४० ॥

मागिलामागें आपपरी । पुढील पुढें रानभरी । येवढा वळसा कोण करी । निज निर्धारीं लक्षेना ॥ ४१ ॥

क्षोभली श्रीरामाची कांता । तेणें सोडिलें [तु. 'पुच्छ केता'.] अति गुप्तता । करील राक्षसांचां घाता । लंकानाथा समवेत ॥ ४२ ॥

अनुक्रमणिका

प्रधान वर्ग राजसन्मानी । बैसोनि येतां सुखासनीं । पूंस भवंडितां भोयांचां कानीं । दोघे दचकोनि चवंकले ॥ ४३ ॥

भोई नाचती तडतडां । कान झाडिती फडफडां । घेवों विसरले सूडा । पालखी पुढां आदळली ॥ ४४ ॥

भुयीं आदळतां पालखी । दांडी मोडोनि वाजे मस्तकीं । प्रधानवर्ग जाले शंकी । अधोमुखीं [कं. 'तळमळिती'.] आदळतां ॥ ४५ ॥

बोंबारड केला सेवकीं । एक सिंपिती उदकीं । सावध होतां येकायेकीं । हांसिजे लोकीं लंकेचां ॥ ४६ ॥

रावणापासीं अति सन्मान । त्यांसी राजद्वारीं अपमान । हांसतां देखोनिया जन । क्षोभायमान [कं. 'तेणें'.] ते जाले ॥ ४७ ॥

सघृत भाते नित्य चौसेरी । यावेगळे भोजन घरीं । उचित वेतन देतां करीं । राजद्वारीं पाडिले ॥ ४८ ॥

भोयांसी देतां बुक्यालाता । ते म्हणती कां [मुं. त. मु. 'मारितां'.] मारा वृंथा । भूत चेतविलें श्रीरामकांता । अपमानता तेणें तुम्हां ॥

ऐसिया पालखियांच्या हारी । हनुमान उलथी पूंसें करी । अवकळा करूनी भारी । धुळी माझारीं मेळवी ॥ ५० ॥

पालखी मोडली नये कामासी । खाट दांड्या प्रधानासी । कुंथत धाडिले घरांसी । अपमानेसीं राजवर्गी ॥ ५१ ॥

लंकेमाजि आहे सीता । ऐकतां आल्हादु हनुमंता । तिच्या साधावया इत्यर्था । कळि [कं. 'कार्यार्थां'.] कळहार्था उपपादी ॥ ५२ ॥

पुढां बिरूदांचे माल जात । मागांहि येति माल [तु. वि. कं. मुं. दे. मु. 'उन्मत्त'.] उन्नत । हनुमान उचलूनि त्याची [वि. 'अवचित'.] लात । वेगें हाणत पुढिलातें ॥

कांरे हाणीतलें लाता । तो म्हणे चांचरलों अवचिता । तूं तंव मातलासी [त. 'तत्वतां'.] सर्वथा । तुझिया घातां मी करीन ॥ ५४ ॥

दांत खाऊनि सवोठीं । भंवया चढवूनि नाकाटी । येरयेरां हाणती मुष्टी । क्रोध दृष्टी खवळोनी ॥ ५५ ॥

उरीं शिरीं मुडपीं देखा । बाहु आळिंगणें लाविती सडका । परस्परें हाणिती थडका । गुढगा ढका हाणोनी ॥ ५६ ॥

तडवे हाणिती रागें करी । वर्मी हाणिती कोंपरीं । उफराटा निजकरीं । शिरोदरीं [तु. वि. तं. मु. 'चंडघात'.] चपेटे

घात ॥ ५७ ॥

वेगें आणावया तळासी । दोघें उडती आकाशीं । सीस हाणोनियां सिसीं । निजबाहूसीं आस्फाळी ॥ ५८ ॥

येकू रिघे येका तळीं । तवं तो त्यासी चेपी भूतळीं । वरिला उलथूनि तात्काळीं । धरी नळी निमटावया ॥ ५९ ॥

नळी चेपितां प्रबळ । पायामाजीं लावी कळ । तेणें तो [मु. 'होवोनी'.] जाऊनि विकळ । नळी तात्काळ सोडिली ॥ ६० ॥

सवेंचि धरुनि दोहीं पायीं । उपटावया उचली पाही । बळें आदळतां भुयीं । तळपोनि हृदयीं हाणे लाता ॥ ६१ ॥

ऐसी [दै. मु. 'मल्लविद्या'] मालविद्या गाढी । दोहिंची समान घडमोडी । झोंबी घेतां कडोविकडी । सम परवडी दोहींची ॥ ६२ ॥

घेता मालविद्येचा [वि. 'धडा'.] झाडा । मृदंग्या वादु लाविला गाढा । त्यापुढें राउतांचा झगडा । काढुनी जमदाढा [वि. कं. 'हाणिती'.] हाकिती ॥

त्यापुढें ब्राह्मण [मु. 'वेदांती'.] वेवादती । घटपटादि बोलती युक्ती । कोडें आहे सीतासती । हेंहि नेणती निश्चयो ॥ ६४ ॥

वेदपाठकांचा वेवाद । अक्षर चुकलें स्वर अबद्ध । सीताशुद्धीचा अनुवाद । तेहि विशद न बोलती ॥ ६५ ॥

ऐसिया लावितां नगरकळी । ठायीं न पडे जनकबाळी । आतां रावणाजवळी । [कं. 'सीता'.] सभा [वि. 'समेळी'.] समुळी शोधूं पां ॥ ६६ ॥

तवं जाहाले निशीथ । रावणाचे सभे आंत । रिघतां जाला जी हनुमंत । तोहि वृत्तांतु अवधारा ॥ ६७ ॥

सिंहासनी दशानन । सभेसी राक्षस आणि प्रधान । निज [वि. 'आयुधी'; मु. तं. 'निजायुधीं'.] युद्धीं सावधान । पार्श्वदगण असंख्यात ॥ ६८ ॥

सभेसी येऊनी घरटीकार । करुनी रावणासी जोहार । सांगती नगरीचा विचार । विघ्न दुस्तर दिसताहे ॥ ६९ ॥

जितुकीं दुश्चिन्हें संसारीं । तितुकीं आजिचां प्रथम प्रहरीं । अवघीं उठलीं राजद्वारीं । [तु. दै. 'क्षमा करी'.] क्षयकारी नृपनाथा ॥ ७० ॥

अमर वरद खटाटोप । धरुनि [तु. दै. 'वैरी'.] अरिष्टे [तु. दै. 'मारितां'.] मानितां अल्प । स्वयें निमाला

अनुक्रमणिका

हिरण्यकश्यप । सताप सैन्येसी ॥ ७१ ॥

ज्याचें अवंतणें घेउनु । त्याचां घरीं अन्न खाउनु । अधर्में हरितां द्विजधेनु । सहस्त्रार्जुनु निमाला ॥ ७२ ॥

याचि दुश्चिन्हाचा संधी । सहस्त्रभुजांचे खांदी । सपुत्र सहितमांदि । त्यातें वधी द्विजपुत्रु ॥ ७३ ॥

[मु. 'मग'.] मज सांगती ज्योतिषी । जाऊन सांगा रायासी । अधर्में आणिले सीतेसी । विघ्नें नगरासी [तं. 'त्या होती'; मु. 'पै आलें'.] या हेतु ॥ ७४ ॥

अश्वपति गजपति । अतिरथी महारथी । राजद्वारीं स्वयें उलथती । घायीं हुंबती दडपोनी ॥ ७५ ॥

कोण्ही न दिसती आघाती । वीर मरणांत कुंथती । अश्वगज तळमळिती । मूर्छा येती प्राणांत ॥ ७६ ॥

आणीक अनिष्टाची थोरी । घटस्फोट राजद्वारीं । असंख्यात शतसहस्त्री । करिती नारी महा [कं. मुं. तं. मु. 'शब्द'.] शंख ॥ ७७ ॥

पालखीपदस्थ अतुर्बळी । सिबिकाभंगें मिळाले धुळीं । म्हणती क्षोभली जनकबाळी । करील होळी [कं. 'लंकेची'.] नगराची ॥

रावणें सादर ऐकोनी कथा । म्हणे करा याच्या घाता । दुष्ट वदताहे वार्ता । दंडी सर्वथा हा होय ॥ ७९ ॥

[तु. 'अधोमुख'; मु 'आणासन्मुख'.] अन्योन्मुख बांधा हात । जिव्हा छेदा रे सदांत । नाक कान कापुनी येथ । न्या नगरांत [तु. 'रोहणी'.] खरारोहे ॥ ८० ॥

ऐकोनि रावणाचें वचन । हनुमान क्षोभला दारुण । असत्य मानि तो [कं. 'माझें विघ्न'.] विघ्न चिन्हे । सत्य करुन दावूं यासी ॥ ८१ ॥

विघ्नें समस्त सत्य मानिती । रावणु चळी कांपे चित्तीं । ऐसी सभेसी लाविन ख्याती । कोपें मारुती खवळला ॥ ८२ ॥

माझीं दुश्चिन्हें सांगतां जरी । दंडु पाविजे घरटीकारी । तरी मी भूयी भार संसारीं । आतांचि बोहरी [तु. 'करीन'.] भोवंडीन ॥

आयुष्य होआवें माझ्या पूंसासी । रावणसभा ते कायसी । ख्याति लावूनि सकळांसी । रावणासी गांजीन ॥ ८४ ॥

सभा समवेत प्रधानी । रावणु बैसला सिंहासनी । हनुमान ते काळीं क्षोभोनी । केली करणी ते ऐका ॥ ८५ ॥

सुगंधस्नेह दीपिका अनेक । कर्पूरदीपिका अठरालक्ष । दोहीं बाहीं लखलख । सभा सम्यक शोभत ॥ ८६ ॥

अनुक्रमणिका

तव हनुमंता आला तवंक । पूंसें हाणोनियां देख । विझविल्या येकें [तु. 'समस्तीक'.] येक । चंवकले लोक सभेचे ॥ ८७ ॥

सभेसी पडतांचि अंधारी । हनुमंतें मांडिली चोरी । मुकुट कुंडलें वस्त्रें हरी । शस्त्राअस्त्रीं नागवी ॥ ८८ ॥

एक म्हणे नेलीं त्वां माझीं वस्त्रें । तो म्हणे नेली त्वां माझीं शस्त्रें ।
भट म्हणती गेलीं धोत्रें । सभा वानरें नागविली ॥ ८९ ॥

कुंडलें घेतां कानची तोडी । [मु. 'दुजा'.] उलिशें [मुं. 'पाहतां'.] घेतां डोळे फोडी । अंगदे घेतां बाहूचि मोडी । केली धांदडी राक्षसां ॥ ९० ॥

मुकुट घेतां मस्तक फोडी । कटीसूत्री माजूचि मोडी । मुद्रिका घेतां अंगुलिया उपडी । केली धांदडी राक्षसां ॥ ९१ ॥ [ओवी ९१ वि. प्रतीत नाही.]

कंठमाळा कंठचि [तु. वि. कं. मुं. दै. तं. 'मुरडी'.] उपडी । पदका [मु. 'काढितां'.] साठीं हृदय फोडी । नेसणें घेतां लिंगची तोडी । केली बापुडी राक्षसें ॥ ९२ ॥

नेसणीं सांडा लौकरी । नाहींतरि लिंगा करी बोहरी । नपुंसकता संसारीं । कैशिया परी सोसेल ॥ ९३ ॥

पायीं बिरूदें वीरांसी पूर्ण । तयासाठीं मोडी चरण । बोंबलू जातां छेदी घ्राण । फें फें वचन राक्षसां ॥ ९४ ॥

येरयेरांसी सांगती बुद्धि । बोंबलूं नकारे त्रिशुद्धी । बोंबलूं जातां नाकचि छेदी । निःशब्दवादी रहा उगे ॥ ९५ ॥

वस्त्रें अळंकार जोडतीं पुढें । तैसें नाक [तु. 'नवें'.] तंव न जोडे । ख्याति लाविली माकडें । येरु दडे येरा मागें ॥ ९६ ॥

जें बोलिला घरटीकार । तें विघ्न आलें गा दुस्तर । सीता क्षोभली साचार । दशशिर वधार्थ ॥ ९७ ॥

जानकी क्षोभु अत्यद्भुतु । तिणें सोडिला पुच्छकेतु । रावणु मेला कीं जितु । कोण्हीहि मातु न [तु. वि. कं. दै. मु. 'सांगें'.] संगे ॥ ९८ ॥

रावण निमाला अंधारीं । विघ्न आलें त्याचिवरी । बोंब [वि. 'उठिली'.] पडली सभेमाझारीं । अपांपरी राक्षसां ॥ ९९ ॥

मारिले इंद्रजीत कुंभकर्ण । तयामागें येथ रावण । आतां धांवण्या धांवेल कोण । रक्षोगण [कं. मुं. 'कोण पुसे'.] कांपती ॥ १०० ॥

सभेसी पडतांचि अंधार । जिहीं बांधला घरटीकार । ते धुमसुनी निशाचर । करी वानर मुक्त त्यांसी ॥ १०१

अनुक्रमणिका

॥ [ओवी १०१ वि. कं. मुं. तं. मु. प्रतींत नाही.]

घरटीकार करुनी मुक्त । सभेसी करुनी हताहत । गांजावया लंकानाथ । जाला उद्यत ते ऐका ॥ १०२ ॥

पिता क्षोभविला पवन । दीपिका जाती विझोन । राक्षसां वोडवलें [दै. 'दैन'.] कंदन । [मुं. 'म्हणती'.] दशवदन [तु. 'समवेत'.] निमाला ॥ १०३ ॥

भंगले [दै. 'राजहृदयींचें'.] राजाज्ञाचें सूत्र । सभेमाजीं रिघाले चोर । नागविले थोरथोर । निशाचर पळों पाहाती ॥ १०४ ॥

जो कोण्हीं निघे सभेबाहेरीं । त्यासी पूंसें सुबद्ध मारी । अवघी दडाली अंधारीं । अपांपरी राक्षसां ॥ १०५ ॥

सीता क्षोभली उद्भट । आम्हांसी [तु. दै. 'मांडले'.] आलें अति संकट । बाहेरी जावया न फुटे वाट । [मु 'विघ्न'.] मरण दुर्घट ओडवलें ॥ १०६ ॥

[मु. 'पुढें'; कं. 'दुर्धर'.] पूंसें रावणाचा मुगुटु । अतिबळें वोढी मर्कटु । तेणें धाकें दशकंठु । म्हणे सेवटु मज आला ॥ १०७ ॥

रावणाचिया उरीं शिरीं । हनुमान सुबद्ध टोले मारी । तेणें त्यासी आली अंधारी । भयंकरी न बोलवे ॥ १०८ ॥

अंधारीं न दिसे व्यक्त । आंगीं वाजती अति आघात । तेणें भयें लंकानाथ । [वि. 'वेगीं'.] चळी कांपत थरथरां ॥ १०९ ॥

सत्य बोलिला घरटीकार । विघ्न मज आलें [तु. वि. कं. मुं. दै. तं मु. 'साचार'.] थोर । गुप्तघात अति दुर्धर । लागती निष्ठुर प्राणांत ॥ ११० ॥

हनुमान कानीं सांगे बीजाक्षर । तुवां चोरिली सीतासुंदर । तुझें छेदावया शिर । आलों साचार रामदूतु ॥ १११ ॥

रावणाचीं दाही शिरें । हनुमान छेदीता नखाग्रें । वारिला होता रामचंद्रें । म्हणोनी वानरें [तु. वि. कं. मुं. मु. 'राखिला'.] सोडिला ॥ ११२ ॥

तुज मारितां लंकानाथु । माझा पुरुषार्थ होईल व्यर्थु । ऐसें बोलिला रघुनाथु । तेणें हनुमंतु न मरीचि ॥ ११३ ॥

नागवूनि राक्षसपंक्ती । गांजुनिया लंकापती । सभेसी लावूनिया ख्याती । मग मारुती निघाला ॥ ११४ ॥ [ओवी ११४ मु. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

वानरें लावितांचि हातु । रावणु जाला अतिभ्रांतु । कानीं [तु. दै. 'पडला'; मु. 'जो पडला';] जपला जो गुह्यार्थु । लंकानातु तो नेणें ॥ ११५ ॥

दीपिका आणितांचि तेथ । अवघे नागवे हलहलित । [वि. 'शिश्न'.] शष्पें लांब हातहात । मग लाजत एकमेकां ॥ ११६ ॥

एकाच्या लिंगा केलें वपन । एकाचि लिंग त्वचा [वि. 'त्वचा हीन'.] छिन्न । एकाचीं लिंगे [तु. दै. 'वृषणी'.] तृणे निमग्न । अवघे नग्न हळहळीत ॥ ११७ ॥

एकाचें लिंग ते राखोटें । एकाचें लिंग निलाग थोटें । एकाचें लिंग अत्यंत मोठें । पांढरी शेटें शोभतीं ॥ ११८ ॥

एक उभ्या उभ्या मुतत । एक ढरढरी पादत । एक जाहले भ्रांत। पुच्छकेतु लागला ॥ ११९ ॥

एकाच्या वळल्या बोबडी । एक धाकें धाकें उभडी । एक केवळ [दै. मु. 'जाहली'.] वेडीं । आली धाडी पुच्छकेतु ॥ १२० ॥

एका जाहाली दांतपाडी । येकें केवळ जाली मडी । एक धांकती बापुडी । आली धाडी पुछकेतु ॥ १२१ ॥
[ओवी १२१ वि. प्रतीत नाही.]

एका जाहाला अधःपातु । येका सुटला कंपवातु । सभेचा निमाला पुरुषार्थु । पुच्छकेतु [कं. 'अनिवारू'.] लागला ॥ १२२ ॥

रावणाचे सभेआंतु । करुनी राक्षसां आकांतु । [मु. 'नागवूनि'.] निघोनि गेला स्वयें हनुमंतु । लंकानाथु काळमुखा ॥ १२३ ॥

राक्षस गांजिले उदंड । सभेचें निमालें बळबंड । रावणाचें [तु. दै. 'केलें काळें तोंड'.] काळे तोंड । तोहि वितंड गांजिला ॥ १२४ ॥

सन्मुख देखतां दशानन । सभेमाजीं पडलें खान । अवघे हळहळीत नग्न । दंतभग्न [तु. दै. 'केलें'.] राक्षसां ॥ १२५ ॥

सभेसीं रिघोनी हनुमंतु । रावणाराक्षसां अति आकांतु । हनुमन्महात्मीचा हा अर्थु । व्यर्थ ग्रंथु न म्हणावा ॥ १२६ ॥

जगाम चिंतामपरां सीतां प्रति महाकपिः ॥ २ ॥

ये श्लोकीच्या श्लोकार्धांत । इतुकाहि आहे गुप्त अर्थ । श्रोतां पाहावा सावचित्त । मी अपत्य संताचें ॥ १२७ ॥

अनुक्रमणिका

अपत्य होवावया भाग्य कैंचे मज । मी तंव त्यांचें चरणरज । ग्रंथार्थाची निजवोज । श्रीरघुराज स्वयें [वि. 'दावी'.] वदवी ॥ १२८ ॥

माझे भावार्थरामायण । याचें मूळ म्यां दावावें कोण । श्रीराम मुळीं मूळ कारण । कथार्थ गहन श्रीरामें ॥ १२९ ॥

श्रीराम माझें वदतें [तु. वि. कं. मुं. दे. 'वदन'.] वचन । अक्षरीं अक्षर श्रीराम पूर्ण । माझे बुद्धीचें गुह्य ज्ञान । चैतन्यघन श्रीराम ॥ १३० ॥

हृदयीं राम रिघोनी जाण । बळेंचि करवी रामायण । ग्रंथाचे मूळ रघुनंदन । कथार्थु गहन श्रीरामें ॥ १३१ ॥

नेणे वेद नेणें शास्त्रार्था । माझे आंगीं नित्य मूर्खता । ग्रंथ आवडला रघुनाथा । वदनीं [मु. 'वदविता'.] वदतां श्रीराम ॥ १३२ ॥

एका जनार्दना शरण । रामें रम्य रामायण । रामें रम्य कथार्थ गहन । कथा पावन श्रीरामें ॥ १३३ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणसभाशोधनं नाम तृतीयप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग चौथा

## रावणभुवन प्रवेश

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**रावणाच्या सभे आंतु । न लभे सीताशुद्धीची मातु । तेणें दुःखे हनुमंतु । चिंताग्रस्त दृढ जाला ॥ १ ॥**

दृढं कृत्वा प्रयत्नं तु प्रयत्नं भजते विधिः । न ददर्श ततः सीतां निरीक्ष्य च मुहुर्मुहुः ॥ १ ॥
चतुरंगुलमात्रोऽपि नावकाशः स विद्यते । न दुष्ट्वा जानकीं तत्र हनुमान्मारुतात्मजः ॥ २ ॥
चितामुपजगामाशु शोकोपहतचेतनः । नेह सीतेति हनूमांश्चक्रें बुद्धिं महाकपिः ॥ ३ ॥

**दृढ प्रयत्न केला भारी । समस्त शोधिली लंकापुरी । धांडोळिली घरोघरीं । सीतासुंदरी** [तु. कं. मु. 'तेथ'.] **येथ नाहीं ॥ २ ॥**

**विनोदवाटिका आरामसरी । नदोनदी** [वि. दै. तं. 'बावी'.] **वापी पोखरी । राजकुमारादि घरोघरीं । सीतासुंदरी तेथ नाहीं ॥ ३ ॥**

**प्रत्यावर्ती लंकापुरी । शतावर्ति घरोघरीं । शोधी घेतां नानापरी । सीतासुंदरी येथ नाहीं ॥ ४ ॥** [ओवी ४ वि. तं. प्रतींत नाही.]

**स्त्रीपुरुषांचे** [मु. 'शेजारीं'.] **सेजेमाझारीं । रतिस्थानें उपराउपरी । शोधितां कोट्यानुकोटि नारी । सीतासुंदरी तेथ नाहीं ॥ ५ ॥**

**रावणाचे सभेमाझारीं । धुराचि गांजिल्या नानापरी । शुद्धी न लभेचि निर्धारी । लंकेमाझारीं नाहीं सीता ॥ ६ ॥**

**म्यां तंव आपुलिया निजबुद्धी । जानकी शोधिली नानाविधी । विधाता** [वि. 'पाहो'.] **पावो नेदी** [वि. मुं. 'शुद्धि'.] **सिद्धि । लंकेमध्यें नाहीं सीता ॥**

**मज शोधितां गुप्तगति । लंकेमाझारीं लक्षिती । च्यारी अंगुळे नुरेचि** [मुं. तं. 'क्षिती'.] **रिती । सीतासती येथ नाहीं ॥ ८ ॥**

**शुद्धि न लभेचि सीता । हनुमंतासी परम चिंता । उकसाबुकसी होय फुंदता । केवि** [कं. मुं. 'मी आतां'.] **रघुनाथा मुख दाऊं ॥ ९ ॥**

क्षिप्रमुत्पतितो मन्ये सीतामादाय राक्षसः । वित्रस्तो रामबाणानामंतरा पतिता भवेत् ॥ ४ ॥
रावणस्योरुवगैन भुजाभ्यां पीडनेन च । विचेष्टमाना पतिता समुद्रे जानकी ध्रुवम् ॥ ५ ॥

अनुक्रमणिका

आणिक एकी [तु. वि. कं. मुं. दै. तं. मु. ‘उपपत्ती’.] उपरति । पडतां रावणाचां हातीं । देहो त्यागिला [तु. दै. ‘वियोग’.] योगगति । सीतासती येथ नाहीं ॥ १० ॥

किंवा रामबाण धाकें । रावणु पळतां आत तवंकें । सीता निसटोनियां कांखें । पडोनि कुटके होऊनि गेली ॥ ११ ॥

अथवा रावण वेगें पळतां । दृढ आंवळितां रामकांता । कळ लागोनि निमाली सीता । कैंची आतां शुद्धी लाभे ॥

रावणापासूनि एकसरी । निष्टोनि पडली सागरीं । सीता भक्षिली मच्छमगरीं । कैशिया परी शुद्धी लाभे ॥ १३ ॥

म्यां चाळिल्या ज्या ज्या युक्ती । माझ्या मिथ्या मजचि प्रती । संपातीनें लंकेप्रती । सीतासती सांगितली ॥ १४ ॥

मिथ्या नव्हे संपातीवचन । सीता लंकेसी [मु. ‘आहे’.] होती जाण । दुष्ट नष्ट हा रावण । सीताभक्षण तेणें केले ॥ १५ ॥

हरिखें नेलीया येकांता । वश्य नव्हेचि जनकदुहिता । रावणें रागें भक्षिली सीता । कैंची आतां शुद्धी लाभे ॥ १६ ॥

रावण पत्न्या नेणों किती । सुंदर देखोनि सीतासती ।
अवघिया वरिष्ठ होईल सवती । म्हणोनि समस्तीं खादली ॥ १७ ॥

राक्षसी स्वयें खादली सीता । ऐसें मानलें [कं. ‘हनुमंता’.] कपीच्या चित्ता । कैंची शुद्धी लाभेल आतां । म्यां कां वृथा कष्टावें ॥

अश्रुपूर्ण जाहले डोळे । दुःखें गडबडा लोळे । न भेटतां जनकबाळे । कष्ट केले ते वृथा ॥ १९ ॥

वृथा समुद्रलंघन । वृथा लंकेचें शोधन । व्यर्थ माझें दादुलपण । सीताचिद्रत्न न [कं. मु. ‘शोधीचि’.] साधेचि ॥ २० ॥

घेऊनि आलों राममुद्रा । ते न सधेचि रामभद्रा । कैसेनि भेटों श्रीरामचंद्रा । आणि कपींद्रा सुग्रीवा ॥ २१ ॥

> जनकस्य कुले जाता रामपत्नी सुमध्यमा । विनष्टा वा प्रणष्टा वा मृता वा जनकात्मजा ॥ ६ ॥
> रामस्य प्रियभार्यस्य न निवेदयितुं क्षमम् । निवेद्यमाने दोषःस्याद्दोषःस्यादनिवेदने ॥ ७ ॥
> कथन्नु खलु कर्तव्यं व्यसनं खल्विदं महत् ॥ ८ ॥

सीता मारिली कीं तेचि मेली । किंवा रामविरहें निमाली । अथवा तरळ भरोनी गेली । कीं उतटली अति

अनुक्रमणिका

**दुःखें ॥**

**सीता निःशेष नाशली । श्रीरामापासीं वार्ता** [मु. 'नेली'.] **वहिली । ऐसी** [मु. 'ऐकतांचि'.] **बोलतांचि बोली । मजचि आली अपख्याती ॥ २३ ॥**

**सीता प्रियकांतेकारणें । राम बैसला असे धरणें । तिचे ऐकतां मरणें । जिवें प्राणें तो नुरे ॥ २४ ॥**

**वेगें लंघूनि उदधी । जेणें श्रीराम मरे त्रिशुद्धि । ऐसी आणिली शुद्धि । म्हणती दुर्बुद्धि वानर ॥ २५ ॥**

**सेवकु नव्हे हा** [दै. मु. 'अधःपाती'.] **अंतपाती । आप्त नव्हे हा अति विघाती । कुशळू नव्हे मंदमति । श्रीरामघाती हनुमंतु ॥ २६ ॥**

**म्हणती हनुमान बुद्धिवंतु । तरि कां केला अनर्थु । याचेनि निमाला रघुनाथु । येणें कार्यार्थु नाशिला ॥ २७ ॥**

**सांगतां सीतेची हे कथा । ऐसें अपेश येईल** [कं. मु. 'माझें'.] **माथां । राहों नये न सांगतां । तेणें माथां अति दोषु ॥ २८ ॥**

**स्वामीपासीं सत्य गोष्टी । न संगे तो सेवकु कपटी । नरका जाईजे उठाउठी । होईन सृष्टीं अति दोषी ॥ २९ ॥**

**जैसे तैसें मनोगत । गुरुसीं सांगावे इत्थंभूत । ऐसा विश्वासु नाहीं जेथ । नरक** [कं. 'प्राप्त'.] **पात त्या नरा ॥ ३० ॥**

**गुरुसी सांगतां मनोगत । संकल्प विकल्प विनिर्मुक्त । ऐसा विश्वासु नाहीं जेथ । नरक** [कं. 'प्राप्त'.] **पात त्या नरा ॥ ३१ ॥**

**सांगो** [तु. 'तरी'.] **जातां अति अनर्थ । न सांगतां नरकपात । कांहीं उपायो न चले येथ । चिंताग्रस्त मारुती ॥ ३२ ॥**

> अस्मिन्नेवं गते कार्ये प्राप्तकालं क्षमं च किम् । भवेदिति मतिं भूयो हनुमान्प्रविचारयत् ॥ ९ ॥
> यदि सीतामदृष्ट्वांह वानरेन्द्रपुरीमितः । गमिष्यामि ततः को मे पुरुषार्थो भविष्यति ॥ १० ॥
> न सीतामधिगच्छामि रामस्त्यक्ष्यति जीवितम् । भृशानुरक्तो मेधावी न भविष्यति लक्ष्मणः ॥ ११ ॥
> विनष्टौ भातरौ श्रुत्वा भरतोऽपि मरिष्यति । भ्रातृन्विनष्टान् ज्ञात्वा तु शत्रुघ्नोऽपि मरिष्यति ॥ १२ ॥
> मृतान्पुत्रान्समीक्ष्याथ ता मरिष्यन्ति मातरः । रामं कृच्छ्रगतं दुष्ट्वा सुग्रीवोऽपि मरिष्यति ॥ १३ ॥

**लंघुनियां सागरा । मज आलिया लंकापुरा । सीता न भेटेचि सुंदरा । पुढिला विचारा विवंची ॥ ३३ ॥**

**मज कल्याण येथें राहतां । किंवा किष्किंधेसी जातां । ऐसे चिंतिंता हनुमंता । अति उत्पाता पावला ॥ ३४ ॥**

अनुक्रमणिका

तेथें जाऊनि आपण । सांगतां सीतेचें मरण । श्रीराम सांडील पैं प्राण । आणि लक्ष्मण तात्काळ ॥ ३५ ॥

राम आणि लक्ष्मण । दोघे निमाले ऐकोन । दुःखें भरत देईल प्राण । आणि शत्रुघ्न [तु. दै. 'हि'.] त्यासंवें ॥ ३६ ॥

ऐकतां पुत्राचें निधन । तिघी माता पावती मरण । प्रधान सांडितील प्राण । [तं. 'वानरगण'.] अयोध्या जन निमतील ॥ ३७ ॥

निमाला देखोनि रघुनंदन । दुःखे सुग्रीवा येईल मरण । त्यासवें अंगदु देईल प्राण । वानरगण निमतील ॥ ३८ ॥

नळनीळ जांबुवंत । आणीक जुत्पति समस्त । श्रीराम अंतें त्या प्राणांत । निमिष्यार्धांत निमतील ॥ ३९ ॥

निधन सुग्रीवा श्रीरामा । देह त्यजिती तारारुमा । अति दुःख प्लवंगमा । मरण धर्मा रिघतील ॥ ४० ॥

श्रीराम दुःख अति अचाट । दुसरें सुग्रीवाचें दुःख श्रेष्ठ । वानर होतील सपाट । कडेलोट करकरुं ॥ ४१ ॥
मज तेथें करितां गमन । सूर्यवंशी निसंतान । वानरवंशा पडेल शून्य । तो मज कोण पुरुषार्थु ॥ ४२ ॥

मज येथेंचि राहातां । श्रीरामा माझी परमावस्था । गुरुवंचकता बैसेल माथां । [तु. 'अधःपाता जाईन'.] केविं रघुनाथा उपेक्षु ॥ ४३ ॥

उपेक्षुनी रघुनाथा । मज तेथें पैं न वचतां । पृथ्वीचे दोष माझे माथा । अधःपाता जाईन ॥ ४४ ॥

अति अनर्थु तेथें जातां । परम दोष येथें राहातां । अति [मु. 'विचार'.] चिंता हनुमंता । कर्तव्यता लक्षेना ॥ ४५ ॥

मज राहातां निज निवाडें । सीताशुद्धी मागिली कडे । माझीच शुद्धी पडेल पुढें । अति सांकडे श्रीरामा ॥ ४६ ॥

माझे शुद्धीचेनि कैवाडें । अगाध उदधी कवण उडे । श्रीराम सुग्रीवां सांकडें । राहणें कुडें येथें माझें ॥ ४७ ॥

अति सांकडां त्यजूं प्राण । तवं मज न ये मरण । जाळूं न शके हुताशन । न शके पवन मज मारुं ॥ ४८ ॥

जरी करुं पर्वतपतन । तरि तें माझें नित्य उड्डाण । बुडऊं न शके मज जीवन । मारतां मरण मज नये ॥ ४९ ॥

वज्रदेही जो मी लाठा । सीताशुद्धीचिया वांटा । तो मी जालों अति करंटा । मरण कटकटा मज न ये ॥ ५० ॥

म्हणोनि क्षितितळीं पडे । धाया मोकलूनि दीर्घ रडे । माझें दुस्तर सांकडें । कोणापुढें मी सांगू ॥ ५१ ॥

अनुक्रमणिका

**ऐसिया माझिया आकांता । धांव पाव गा रघुनाथा । मज नुपेक्षी सर्वथा । कृपावंता श्रीरामा ॥ ५२ ॥**

**भावे स्मरतां श्रीरघुनाथा । चित्त चैतन्यें निमाली चिंता । परमानंद हनुमंता । श्रीराम कांता शोधावया ॥ ५३ ॥**

**सीता न साधेचि शोधितां । इंद्रजीत कुंभकर्ण समवेता । करीन रावणाचिया घाता । आणि समस्ता राक्षसां ॥**

**नाहीं तरी जिवें जिता । पुंसीं बांधोनि लंकानाथा । श्रीरामापासीं होईन नेता । त्यासी तो सीता पुसेल ॥ ५५ ॥**

**रांडवे बाइलेच्या परी । मी कां रडतों लंकापुरीं । स्वामी श्रीराम माझां शिरीं । भक्त साहाकारी श्रीरघुनाथु ॥ ५६ ॥**

**मज साह्य श्रीरघुपती । म्हणोनि उल्हासे मारुती । सीता शोधीन मागुती । प्रत्यगावृत्ती साक्षेपें ॥ ५७ ॥**

> अनिर्वेदो हि सततं सर्वार्थेष्वनुवर्तकः । करोति सफलं जंतोर्जीवितं जीवितेष्वपि ॥ १४ ॥
> भूयस्तावद्विचेष्यामि न यत्र विचयः कृतः । तस्मादनिर्वेदकरं यत्नं चेष्टेऽहमुत्तमम् ॥ १५ ॥
> यावत्सीतां न पश्यामि रामपत्नीं यशस्विनीम् । तावदेव पुरीं लंकां विचिनोमि पुनःपुनः ॥ १६ ॥

**आळस सांडूनि संभ्रम । त्यजूनि विषयीं विषयकाम । प्रयत्न करितां पैं परम । परब्रह्म आंतुडे ॥ ५८ ॥**

**प्रयत्न करूनि विचक्षण । वैकुंठवासी होती संपूर्ण । शेषशयनीं नारायण । होती आपण अति प्रयत्नें ॥ ५९ ॥**

**अतिप्रयत्न तो मानसिक । तेणें पावती** [तु. 'दुःख'.] **परमसुख । मी तवं श्रीरामसेवक । सीता सम्यक् शोधीन ॥ ६० ॥**

**उल्हास हनुमंताचिया चित्तां । आळस सांडूनि विकल्पवार्ता ।**
[कं. 'आधीं'.] **अति साक्षेपें शोधीन सीता । श्रीरघुनाथाचेनि बळें ॥ ६१ ॥**

**पूर्वी केलें स्वयें शोधन । समस्तहि लंकाभुवन । शोधितां राहिलीं जें जें स्थान । सावधान अवधारा ॥ ६२ ॥**

**रावणाचें शयनभुवन । आणीक कामग विमान । तेथहि रिघोनि सावधान । सीता चिद्रत्न शोधीन ॥ ६३ ॥**

**न साधितां सीतासती । लंका शोधीन पुडतपुडती । रावणाचिया भुवनाप्रती । गुप्त गती शोधीन ॥ ६४ ॥**
[ओवी ६४ कं. मु. मु. प्रतींत नाही.]

**आडवे आल्या राक्षसकोटी । त्यातें मर्दीन उठाउठी । कायसी रावणाची गोठी । सीता गोरटी शोधीन ॥ ६५ ॥** [ओवी ६५ कं. मुं. मु. प्रतींत नाही.]
**ऐसा करुनि इत्यर्थु । रावणाचिया गृहा आंतु । रिघावया** [मु. 'पाहे'.] **पैं हनुमंतु । स्मरे रघुनाथु सद्भावें ॥ ६६ ॥**

अनुक्रमणिका

उदतिष्ठन्महाबाहुर्हनुमान्मारुतात्मजः । नमोऽस्तु रामाय सलक्ष्मणाय देव्यै च तस्यै जनकात्मजायै । भूयश्च रामाय सलक्ष्मणाय देव्यै च तस्यै जनकात्मजायै ॥ १७ ॥

**श्रीरामा तुज अनन्यशरण । लक्ष्मणा तुज नित्य नमन । जनकात्मजे लोटांगण । निज दर्शन मज देई ॥ ६७ ॥**

**मी तंव तुझें अनन्य तान्हें । मज धाडिलें रघुनंदनें । वत्साप्रति धेनु धांवणें । तैसी देणें मज भेटी ॥ ६८ ॥**

**तूं तवं श्रीरामाची शक्ती । तुझेनि** [तं. 'नामाची'; मु. 'मजला'.] **माझी** [तं. 'निज'.] **नित्य गती । म्हणोनि लोटांगण क्षिती । करी** [तु. 'मागुती'.] **मारुती जानकीये ॥**

**स्वयें सीतेच्या शुद्ध्यर्था । नमूनियां श्रीरामसीता । जानकी शोधावया मागुता । होय निघतां हनुमंतु ॥ ७० ॥**

**शोधावया रावणाचें भुवन । सूक्ष्म रूप धरुनि सान । कपी करितां जाला गमन । सीता चिद्रत्न शोधावया ॥ ७१ ॥**

**रावणगृहीं उपराउपरीं । येकवीस माड्यावरी गोपुरी ।** [मुं. मु 'गोपुरीं'.] **दीपदीपिका हारोहारी । घरटीकारी गड गर्जे ॥ ७२ ॥**

**सेंदुरारक्तीं श्वेतपीत । गज गर्जती चतुर्दंत । स्तोमें स्तोमसमस्त । वीर जागत गड गजरें ॥ ७३ ॥**

**अश्वगज** [वि. 'रथ'.] **पदपदाती । सेनाधर सेनापती । राजगृहीं नित्य जागती । शस्त्रसंपत्ति** [तु. दै. 'गजरेसी'.] **अतिगजरें ॥ ७४ ॥**

**ढोल** [मु. 'दमामे'.] **टमक शंख विकंटी । वीराणें वाजतीं थापटीं । घरटीकार देती घरटी । सावधान दृष्टी** [मु. 'क्षोभक'.] **शोधक ॥ ७५ ॥**

**आयणीपायणी एकमेक । उपराउपरी जागती देख ।** [तु. दै. 'हलकल्लोळें'.] **हललोगजरें देऊनि हांक । एकें एक गर्जती ॥ ७६ ॥**

**धडाधडा निशाण भेरी । त्राहाटलिया राजद्वारीं । काहाळा चिणकाहाळा थोरी । बुरंगे गजरें गर्जती ॥ ७७ ॥**

**सप्तकक्षांतर वाट । ऐसेंचि सैन्य घनदाट । वारिया तेथ न फुटे वाट । दृढ कपाट राजद्वारीं ॥ ७८ ॥**

**हनुमान सप्तद्वारांतरीं । रिघोनि सैन्याहि भीतरीं । शोधितु सीतासुंदरी । गुप्ताचारी अति युक्ति ॥ ७९ ॥**

[तु. वि. मुं. दै. तं. मु. 'राजपत्न्या'.] **राजकन्या सिबिके आंत । बैसोनि जाती अति गुप्त ।**
**हनुमान निघोनी घुंगटाआंत । सीता शोधित अति युक्ति ॥ ८० ॥**

अनुक्रमणिका

अश्वशाळा गजशाळा । शस्त्रशाळा [कं. 'चित्र'.] अस्त्रशाळा । चित्रशाळा विचित्रशाळा । जनकबाळा शोधितु ॥ ८१ ॥

स्नानशाळा पानशाळा । गायनशाळा शयनशाळा । पट्टिशाळा अतिविशाळा । यज्ञशाळा शोधितु ॥ ८२ ॥

शाकशाळा पाकशाळा । लतागृहें [तं. 'सोम'.] सुमनशाळा । रत्नशाळा प्रयत्नशाळा । टांकशाळा शोधितु ॥ ८३ ॥

धनशाळा वस्त्रशाळा । गंधशाळा सुगंधशाळा । ब्राह्मणाच्या ब्रह्मशाळा । अतिविशाळा शोधितु ॥ ८४ ॥ [ओवी ८४ मु. प्रतीत नाही.]

कर्मशाळा धर्मशाळा । मठमठिका पर्णशाळा । देवगृह पूजाशाळा । जनकबाळा शोधितु ॥ ८५ ॥ [ओवी ८५ तं. प्रतीत नाही.]

बावनचंदन इंधनशाळा । कंडणीपेशणी अन्नशाळा । यंत्रतंत्र नाटकशाळा । [कं. 'वाद्य'.] रंगशाळा शोधितु ॥ ८६ ॥

नानापरीचीं [तु. 'वार्तास्थानें'; मु. 'वृंदावनें'.] वातायनें । नानापरीची वितानें । गोपुरें उपऱ्या शय्याशयनें । गौप्य स्थानें शोधितु ॥ ८७ ॥

ऐसीं शोधिलीं बाह्यभुवनें । आतां रावणाची शयनस्थानें । आणीक कामग विमानें । कपी सावधानें शोधुं पाहे ॥ ८८ ॥

> तस्यालयप्रविष्टस्य मध्ये विपुलमायतम् । दश योजनविस्तीर्णं साग्रयोजनमायतम् ॥ १८ ॥
> ब्रह्मार्थं हि कृतं दिव्यं दिवि यद्विश्वकर्मणा । विमानं पुष्पकं नाम सर्वकामगमं शुभम् ॥ १९ ॥
> परेण तपसा लेभे यत्कुबेरः पितामहात् । कुबेरात्तेजसा लेभे रावणस्तद् गृहोपमम् ॥ २० ॥

ऐसिया भुवना माझारीं । रावणशयनाची वोवरी । दहा योजनें तीची थोरी । रुंदीचि परी तदर्ध ॥ ८९ ॥

रत्नजडित सुवर्ण भिंती। घोंटीव पाचुबंध क्षिती । सुर्यप्रभासम ज्योती । रत्नदीप्ति दीपिका ॥ ९० ॥

वोवूनियां मुक्ताफळा । वातायनी [कं. 'मंडपशाळा'; मु. वि. 'हेममाळा'.] हेमजाळा । हेममंचक माणिक कीळा । हेममाळा मोतिलग ॥ ९१ ॥

हेममणिमुक्त विराजमान । हेमसूत्रें शोभें वितान । सुवासें कोंदलें गगन । वसंत पवन कामारे ॥ ९२ ॥

[मुं. 'विमान'.] वितानतळीं [तु. मुं. दै. तं. 'वातायनें'.] वितायनें । सुगंध सुवास झळके पवनें । त्यामाजी कामग विमानें । दैदीप्यमानें तेजस्वी ॥ ९३ ॥

ब्रह्म्याकारणें दैदीप्यमान । विश्वकर्मा करी विमान । तेथ बैसोनि चतुरानन । सुखसंपन्न विचरतु ॥ ९४ ॥

अनुक्रमणिका

त्याचि विमानाकारणें । कुबेर [मुं. 'प्रयत्न'.] तप करी यत्नें । एकांगुष्ठ धरुन [मु. मुं. 'चरणें'.] करणें । एकाग्र राहाणें निराहार ॥ ९५ ॥

करितां तप शतानुशत । ब्रह्मा प्रसन्न होऊनि तेथ । कुबेरासी विमान देत । हरुषयुक्त तो [कं. मु. 'जाला'.] आला ॥ ९६ ॥

घेऊनि कामग विमान । चैत्यवन चैत्रवन । तपोवन नंदनवन । सुखसंपन्न क्रीडतु ॥ ९७ ॥

तें देखोनियां रावण । सांडुनि बंधु सुहृदपण । कुबेरासी करुनि रण । घेतलें विमान हिरोनी ॥ ९८ ॥

तें हें विमान पैं येथ । रावणाचिया घराआंत । येथ बैसोनि लंकानाथ । सुखें क्रीडत स्त्रियांसी ॥ ९९ ॥

विमानशोभा पुष्कळ । खांबोखांबीं इंद्रनीळ । त्यावरि [तु. दै. 'जडिले'.] वटि महानीळ । अति सुनीळ भुमिका ॥ १०० ॥

विमानी मुक्ताफळ झल्लरी । रत्नें जडलीं उपराउपरीं । पाचू प्रदीप्त हारोहारी । चढे त्यावरी हनुमंत ॥ १०१ ॥

अति सूक्ष्मता हनुमंतु । लघुलाघवें विमाना आंतु । रिघोनि पाहातसे वृत्तांतु । सीता शुद्ध्यर्थु साधावया ॥ १०२ ॥

रावणाचें निज भुवन । अति शोभा दैदीप्यमान । त्यामाजीं शोभित विमान । विराजमान [कं. 'स्त्रियांसी'; दै. मु. 'निजस्त्रिया'.] निजश्रिया ॥ १०३ ॥

> या च लक्ष्मीःसुरेंद्रस्य चंद्रस्य च यथा श्रिया । यादृशं हि कुबेरस्य यमस्य वरुणस्य च ॥ २१ ॥
> तादृशं तद्विशिष्टं वा तस्य रक्षपतेर्गृहम् । सदा तिष्ठति वै पद्मा नित्यमेवानपायिनी ॥ २२ ॥

जे लक्ष्मी [कं. मु. 'स्वयें'.] स्वर्गी इंद्रापासीं । जे लक्ष्मी [वि. 'शरत्कालाची दासी'.] शरत्काळीं चंद्रासी ।
त्याहोनि लक्ष्मी विशेषीं । [कं. 'रावणापासी'.] रावणगृहासी शोभत ॥ १०४ ॥

जें वैभव कुबेरासी । जें वैभव [कं. 'व्योम'.] यम वरुणासी । त्याहोनि लक्ष्मी विशेषीं । [तु. दै. 'श्रीशोभेसी'.] रावणगृहासी शोभत ॥ १०५ ॥

नित्य नूतन अनपायिनि । श्री विराजे दशाननी । [दै. 'नित्याचिया'.] त्याचिये शयनस्थानीं । दिव्य योगिनी योषिता ॥ १०६ ॥

शुद्ध पद्मिणीची जाती । नागकन्या नेणों किती । देवकन्या दिव्य दीप्ती । असंख्याती राजकन्या ॥ १०७ ॥

सुरनर [मुं. 'नर'; कं. मु. 'वीर'.] किन्नर कन्यका । गंधर्वाचिया निजनायका । दैत्यीं दानवीं अनेका । रावणें देखा

अनुक्रमणिका

आणिल्या ॥ १०८ ॥

जें जें [मु. 'अपूर्व'.] अनर्घ्य स्त्रीरत्न । तें तें करुनि भोगायतन । स्वयें आणी दशानन । विराजमान स्त्रीरत्नीं ॥ १०९ ॥

ऐसिया भोगिल्या अमित कांता । तैसीच आणूं गेला सीता । तें तंव न जिरे लंकानाथा । अपमानता हनुमंतें ॥ ११० ॥

रावणाच्या [मु. 'शयन'.] निज [कं. 'सेजागारी'.] सेजारी । ऐसिया स्त्रियांचिया हारी । सुकुमारा अतिसुंदरी । साळंकारी शोभती ॥ १११ ॥

एकी बद्रिकी [तु. दै. 'कुच'.] पंचकल्याणी । नारंग कुचे कुच कामिनी । एकी निंबुकी पीनस्तनी । घनस्तनी मातुलिंगी ॥ ११२ ॥ [ओवी ११२ मु. प्रतीत नाही.]

एकी वृंतांकी सदेठीं । एकी [तं. 'भोगिलिया'.] भोपळिया कुचतटी ।
कुष्मांडकुची एकी सारटी । एकी चिरमुटी काचरिया ॥ ११३ ॥

ऐसिया योषिता नेणों किती । नाना यंत्रें घेऊनि हातीं । रावणाचे सेजेप्रती । वोळग करिती गीतनृत्यें ॥ ११४ ॥

[दै. 'वृथा'.] वृद्धा नाचती वित्पत्ती । वोपत्रिप तळप देती । संगीताच्या गति विगुती । आंग मोडिती थैंथाके ॥ ११५ ॥

तरुणा कामिनी कामसक्ती । न [तु. दै. 'नव्हता'.] लभे पुरुषेसी संगती । उन्माद कामें कामार्थी । दुःखी होती अति कामें ॥ ११६ ॥

न पवे कामाचा संभव । [मु. 'नाडळे'.] नावडे भोगभववैभव । जळो हें रावणाचे [तु. दै. 'वैभव'.] दैव । रती गौरव आम्हां नाहीं ॥ ११७ ॥

> अन्या बक्षसि चान्यस्या अन्या चाप्यपराकुचौ । उरूपार्श्वकटिपृष्ठमन्योन्यस्याः समश्रिताः ॥ २३ ॥
> परस्परनिविष्टांग्या मदस्नेहवशानुगाः ॥ २४ ॥

ऐसिया योषिता नेणों किती । परस्परें आळंगिती । परस्परें कुच मर्दिती । मुख चुंबिति [तु. दै. 'विनोदें'.] परस्परें ॥ ११८ ॥

गाढ देती आळिंगण । तरी न रति समाधान । मग करिती अन्योन्य । [तु. दै. 'रतिरमण तें ऐका'.] सावधान अवधारा ॥ ११९ ॥

भक्षिती उन्मादाचें अन्न । करिती उन्माद मद्यपान । तेणें स्त्रिया [मु. 'आनेआन'.] अन्योविन्य । [वि. कं. मु तं.

'करिती'.] रतिरमण तें ऐका ॥ १२० ॥

करुनिया मायिक शिश्न । त्याचे [कं. मु. 'करिती कटी'.] कटी पुष्टी बंधन । येरीयेरीचे धरुनि चरण । करिती मैथुन परस्परें ॥ १२१ ॥ [ओवी १२१ मु. प्रतीत नाही.]

ऐसिया रावणाचे घरीं । मद विव्हळिता अमिता नारी ।
फुलें गुंफी जेविं फुलारी । तैसिया हारी स्त्रियांच्या ॥ १२२ ॥

हनुमान रिघोनिया त्या माझारीं । शोधितां श्रीराम-अंतुरी । त्या तवं अवघ्या सकामखरी । सीतासुंदरी तेथ नाहीं ॥

शोधितां असंख्यात नारी । येथ नाहीं सीतासुंदरी । तेंचि शोधावया पुढारीं । साटोपु धरी हनुमंतु ॥ १२४ ॥

पुढें जातां येकायेक । देखिला रावणाचा मंचक । रत्न खचित अलोलीक । सेज सम्यक् सुमनांची ॥ १२५ ॥

पहुडावया दशशिरु । पवनें त्राहाटिले [तु. 'हंसवरू'; मुं. 'हंसिरु'.] स्वरु । सेज रची कुसुमाकरु । सुगंध [कं. 'सेजेवरी उधळत'.] सेजारु वसंतें ॥ १२६ ॥

तया मंचकाचां सेजारी । एकली निजली मंदोदरी । हनुमान म्हणे हे सीता [कं. 'सुंदरी'.] खरी । शोभा साजिरी देखोनी ॥

श्रीरामाची निज कांता । मज सांपडली सीता । उल्हास हनुमंताचिया चित्ता । होय नाचतां स्वानंदें ॥ १२८ ॥

रावणाची क्रिया भली । सुमन सेजें सीता एकली । असे निष्पाप राखिली । नाहीं आणिली अभिलाषें ॥ १२९ ॥

सीतासती निरोपम । अभिलाषितां करील भस्म । रावणाचा हा परमधर्म । सीता निर्धर्म राखिली ॥ १३० ॥

जागी जालिया सीता गोरटी । रावणु कपटी कीं निष्कपटी ।
हे पुसावया गुह्य गोठि । मंचकानेहटीं अति गुप्त ॥ १३१ ॥

सभेसी देखोनि अति विघ्न । त्याचें करावया शांतिविधान । रावण करुं गेला हवन । अति उद्विग्न भयभीतु ॥ १३२ ॥

सभेचें आठवितां विघात । रावणा हो पाहे प्राणांत । तेणें भयें होम करित । विघ्न शांत्यर्थ अनुतापी ॥ १३३ ॥

यालागीं एकली मंदोदरी । निजेली देखिली सेजेवरी ।
हनुमान मानी सीतासुंदरी । निज जिव्हारीं निश्चित ॥ १३४ ॥

अनुक्रमणिका

मंदोदरीसी रावण भेटी । त्या दोघांच्या गुह्य गोठी । हनुमान ऐकतां कर्णपुटी । होईल भेटी सीतेसी ॥ १३५ ॥

एका जनार्दना शरण । सीताशुद्धीचें महिमान । कथा कौतुक गहन । अति पावन पवित्र ॥ १३६ ॥

सीताशुद्धीची हे विधी । श्रवणें जाती आधिव्याधी । छेदुनिया दुष्ट बुद्धी । चित्तशुद्धी श्रीरामें ॥ १३७ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणभुवनप्रवेशो नाम चतुर्थप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग पाचवा

## अशोकवन प्रवेश

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**विघ्नें देखिलीं सभेआंत । रावण होम करी शांत्यर्थ । मंदोदरी सेजे** [तं. 'सुप्त'.] **गुप्त । देखे हनुमंत येकाकी ॥ १ ॥**

**हेचि निश्चयेसी सीता ।** [मुं. कं. 'कैसें'.] **ऐसें मानलें हनुमंता । तेंची अवधारा पैं** [तु. वि. कं. मुं. दै. तं. मु. 'कथा'.] **श्रोता । श्लोकीं श्लोकार्था अनुवादु ॥ २ ॥**

> तासामेकांतसंन्यस्ते शयने च यथा शुभे । ददर्श रूपसंपन्नां सुश्रोणीं स कपिः स्त्रियम् ॥ १ ॥
> दुष्ट्वा मंदोदरीं तत्र यौवनोत्तमशालिनीम् । तां समीक्ष्य महाबाहुर्हनुमान्मारुतात्मजः ॥ २ ॥
> तर्कयामास सीतेति रूपयौवनसंपदा । हर्षेण महताविष्टो ननंद कपिकुंजरः ॥ ३ ॥
> आस्फोटयामास चुचुंव पुच्छं ननर्त चिक्रीड जगौ च वल्गुः ।
> स वानराणामृषभः प्रतीतो ज्ञात्वा नरेंद्रस्य सुतां च सीताम् ॥ ४ ॥

**विमानीं उपराउपरीं । शोधितां एकांत वोवरीं । तेथ रावणाचे सेजेवरी । मंदोदरी देखिली ॥ ३ ॥**

**ठाण मान गुण लक्षण ।** [मु. 'रेखास्थान'.] **रूपरेखास्तन यौवन । सीतेसी समसमान । दोघी अन्यून स्वरूपें ॥ ४ ॥**

**हेचि श्रीरामाची कांता । हेचि माझी स्वामिनी सीता । ऐसें मानलें हनुमंता । उल्हासता नाचतु ॥ ५ ॥**

**मज जोडिली सीताशुद्धि । जाहाली श्रीराम कार्यसिद्धी । जानकी होय हे त्रिशुद्धि । हरुषानंदीं नाचतु ॥ ६ ॥**

**हरुषें निजबाहु आस्फाळी । पूंस चुंबी सुखसंमेळी । परमानंदें पिटी टाळी । जनकबाळी भेटली ॥ ७ ॥**

**आतां फिटलें सांकडें । कायिसें रावण** [मु. 'या पुढें'.] **बापुडें । वांकुल्या दावी देवांकडे । वेगें उडे स्वानंदें ॥ ८ ॥**

**हनुमान आनंदें डुल्लतु । माझा जाहाला निजस्वार्थु । मज तुष्टेल रघुनाथु । चुकला अनर्थु वानरांचा ॥ ९ ॥**

**ऐकतां सीताशुद्धीची गोठी । श्रीरामासी आनंद कोटी । हरिखें माझी थापटील पाठी ।** [वि. 'मुख्य'.] **सुख संतुष्टी वानरां ॥ १० ॥**

**हरिखें जातां हनुमंतु । रावणें करुनि होम समाप्तु । सेजे आला लंकानाथु । चिंता युक्तु उद्वेगी ॥ ११ ॥**

देखोनि विघ्नाची पैं थोरी । रावणासी भय भारी । नुठवितां मंदोदरी । सेजेवरी पहुडला ॥ १२ ॥

रावणाचिया सांचलें करी । जागी जाली मंदोदरी । वेगें उठोनि चरण धरी । नमस्कारी सद्भावें ॥ १३ ॥

घेऊनि जांबुनद तस्त । पतिचरण प्रक्षाळित । तें देखोनिया हनुमंत । अत्यद्भुत कोपला ॥ १४ ॥

माझिया स्वामीची हे कांता । अनुसरली लंकानाथा । मी काय उगाचि [मु. 'राहो'.] पाहो आतां । करीन घातां दोहोंच्या ॥

दहा शिरें लंकानाथा । अकरावां सीतेचा माथा । नखें खुडुनिया आतां । नेईन रघुनाथा भेटीसी ॥ १६ ॥

सीता रातली लंकानाथा । त्या दोहोंच्या केलें म्यां घाता । कोपों नको रघुनाथा । चरणीं माथा ठेवीन ॥ १७ ॥

[कं. 'निज'.] जीत पूंसेसीं बांधोनी । श्रीरामापासी नेईन दोन्ही । मग तो दंडील निजबाणीं । ऐसेंहि मनीं विचारी ॥ १८ ॥

अथवा करुं आणीक एक । पूंसी बांधोनि मंचक । दोघे किष्किंधे नेलिया देख । दोष निर्दोष राम जाणें ॥ १९ ॥

ऐसें न करितां जाण । श्रीरामें सांगितली खूण । आधीं पाहों पां आपण । नाम महिमान सीतेचें ॥ २० ॥

स्तंभ भिंती लावितां कान । तेथ [तं. 'तुटी'.] नुठी रामस्मरण । कानीं लावितां पाषाण । नामोच्चारण तेथ नाहीं ॥ २१ ॥

पतिव्रता त्यागितां पती । तेथुनी पळे नामशक्ति । सीतासती ते असती । नामकीर्ति मावळली ॥ २२ ॥

सीता रातली अनाचारी । नाम नुठी चराचरीं । इसी मी आतां जीवें मारी । आला वानरीं अति कोपु ॥ २३ ॥

रागें कापतु थरथरां । दांत खातसे करकरां । डोळे भवंडितु गरगरां । रोम थरथरां थरकती ॥ २४ ॥

दोघे मारावया कडाडी । वळिली पूंसाचि पैं वेढी । रागें पिंजारली दाढी । सेंडी तडतडी माथाची ॥ २५ ॥

कोपामाजीं हनुमंतु । अतिशयें बुद्धिमंतु । ऐकतां सुलोचना वृत्तांतु । इंद्रजीतु वांचला ॥ २६ ॥

आतांहि कोपु करुनी शांतु । या दोहोंची ऐकों मातु । विचारूनियां शब्दार्थु । [तु. दै. 'मग'.] निज कार्यार्थु साधावा ॥ २७ ॥

कोपु आलिया दुर्धर । जयाचा लोपेना विचार । तोचि [कं. मुं. 'मोक्षाधिकारी'.] मोक्षगामी नर । परमधीर तो एकु

॥ २८ ॥ [ओवी २८ तु. दै. प्रतींत अशी आहे :— 'कोप आलियाहि मना । जयाचा सत्वगुण लोपेना । तयाचा प्रताप वर्णवेना । परोपकारी जाणा तो येकु ॥']

कोपामाजीं सावधान । अवतार पुरुषाचें हें चिन्ह । तें चालतें ब्रह्मज्ञान । जग पावन त्याचेंनि ॥ २९ ॥

लोभु क्रोधाचें कारण । तो हनुमंता नाहीं जाण । यालागीं क्रोधीं सावधान । रघुनंदन गुरुकृपा ॥ ३० ॥

कपि कोपु शांत करुनी । दोहोंची कथा ऐकावया कानीं । राहिला गुप्त होउनी । सावधानी सादर ॥ ३१ ॥

तंव मंदोदरी म्हणे लंकानाथा । दुष्ट स्वप्न म्यां देखिलें आतां ।
तेणें पावलें अति आकांतां । [कं. 'साद्यंत आतां'.] सादरता अवधारी ॥ ३२ ॥

ऐसें स्वप्न देखिलें नयनीं । पडलंके क्रौंचा निर्दळुनी ।
[कं. 'पुच्छ'.] तो पुरुष रिघोनी अशोकवनीं । श्रीरामपत्नी शोधितु ॥ ३३ ॥

तो रिघतां अशोकवनीं । त्रिविध शोक लंकाभुवनीं । पुत्रशोक पति अपमानी । पुरदहनीं आकांतु ॥ ३४ ॥

अशोकवनीं अति आप्त । केला सीतेसी एकांत । करूनी बनकराचा घात । समुद्रांत निक्षेपी ॥ ३५ ॥

अशोकवनाचां रवंदोळी । तेणें मारिला जंबुमाळी । राक्षसकुमरा करुनि होळी । उपटिलें पौळी अखयातें ॥ ३६ ॥

सैन्यास करुनियां निपात । इंद्रजीत दमिला युद्धाआंत । करितां राक्षसांचा घात । भेणें [कं. 'लपत'.] पळत इंद्रजीत ॥ ३७ ॥

ब्रह्मेनि आणिला बांधोनी । रागें पूंस पैं पेटवोनी । तुमच्या दाढ्यामिशा दाहुनी । प्रथम कंदन हें केलें ॥ ३८ ॥

लंका जाळीत भडभडां । पूंसें नगर लाविलें वेढां । निघों नेदी मागांपुढां । चहूकडां आकांतु ॥ ३९ ॥

ऐसें दुःस्वप्न देखोनी । वेगें उठलें गजबजोनी । थोर धाकु लागला मनीं । निद्रा नयनीं लागेना ॥ ४० ॥

चरणक्षाळण करुनी । शुद्धाचमनें स्वीकारुनी । सदाशिवातें स्मरोनी । डावें कानीं निजेलें ॥ ४१ ॥

तवं स्वप्न देखिलें दुर्धर । शिळीं बांधोनि सागर । लंके आले नरवानर । निशाचर [कं. 'निर्दळावया'.] निर्दळुनी ॥ ४२ ॥

इंद्रजीत कुंभकर्ण दोन्ही । दोघे मारिले दोघीजणीं । तुमची [कं. 'शरीरें'.] शिरें श्रीरामबाणीं । गिधाच्या चरणीं लोळती ॥ ४३ ॥

अनुक्रमणिका

रणीं निमाला दशानन । माझिया चुड्याशीं पडिलें खाण । ऐसें करीतचि रुदन । आक्रंदुन ऊठिली ॥ ४४ ॥

ऐसे सांगतां एकाएक । मंदोदरी भुलली देख । बैसोनि रावणासन्मुख । करी महाशंख [तु. वि. दै. तं. मु. 'अति'.] पतिदुःखें ॥ ४५ ॥

बोंब पडिली लंकेआंत । रणीं निमाला लंकानाथ । म्हणोनि महाशब्द करित । हडबडित रावणु ॥ ४६ ॥

मग धांवोनि लंकानाथ । तिचे धरिले दोन्हीं हात । मी तवं आहे जिवें जीत । तूं कां व्यर्थ तळमळसी ॥ ४७ ॥

सावध म्हणे लंकानाथा । माझें स्वप्न नव्हे मिथ्या । अशोकवनीं राखिली सीता । तुमचिया घाता ते करील ॥ ४८ ॥ [ओवी ४८ पै. प्रतीत नाही. ओवी ४९ इतर प्रतींत अशी आहे :— 'सख्य करोनी श्रीरघुनाथा । त्यासी संतोषे देइजे सीता । तेणें तुज कल्याण लंकानाथा । आणि समस्तां राक्षसां ॥']

मी तवं होय तुमची दासी । म्हणोनि लागली पायांसी । मुक्तीभुक्ती होय आम्हांसी । सीता रामासी अर्पितां ॥ ४९ ॥

सीता ऐकतां अशोकवनीं । हनुमान उल्हासला मनीं । हरिखें न माय त्रिभुवनीं । श्रीरामपत्नी चोजवली ॥ ५० ॥

सीता आहे अशोकवनीं । ते अशोकवन कोणें स्थानीं । तें समूळ आयकावया [तु. वि. कं. मुं. तं. दै. मु. 'कानीं'.] वाणी । सावधानी हनुमंतु ॥ ५१ ॥

रावण मंदोदरी एकांतु । समूळ परिसावया वृत्तांतु । गुप्त राहिलासे हनुमंतु । चित्तीं सावचित्त वचनार्थी ॥ ५२ ॥

जानकी आठवतां चित्तां । कामु खवळला लंकानाथा । अशोकवना जाऊनि आतां । बळेंचि सीता भोगीन ॥ ५३ ॥

नाठवे सभेचें अति विघ्न । नाठवे मंदोदरीचें स्वप्न । आतां बळे निजबळें करुन । श्रीरामपत्नी भोगीन ॥ ५४ ॥

[तु. दै. 'स्वामित्व हीन'.] सामहिने अशोकवनीं । म्यां कां ठेविली जनकनंदिनी । सीताभोगीं दशाननी । अति उद्विग्न कामार्थी ॥ ५५ ॥

सीताकामें सकामता । संनिपातु लंकानाथा । विसरला हिताहिता । नाठवे चित्ता निजस्वार्थु ॥ ५६ ॥

सीताचिंता नित्य चिंतनीं । [तु. दै. 'वाणी'.] सीतानाम नित्य वदनीं । सीता स्मरें अनुदिनीं । ध्यानीं मनीं जानकी ॥ ५७ ॥

अनुक्रमणिका

सकाम स्मरतां पैं सीता । पापधुणी लंकानाथा । हें सामर्थ्य रामभक्तां । भेटी रघुनाथा तीचेनी ॥ ५८ ॥

रावणाची सकामता । कळली मंदोदरीच्या चित्ता । सीता अर्पावी रघुनाथा । लंकानाथा [मु. 'नमनेसी'.] नमनेची ॥ ५९ ॥

सीता करावी रामार्पण । कदा न मनी दशानन । मंदोदरीस कळलें चिन्ह । हितवचन अनुवादे ॥ ६० ॥

मीचि जाऊनि आपण । इंद्रजीत आणि कुंभकर्ण । पाचारुनि प्रधान । रामर्पण करुं सीता ॥ ६१ ॥

सीताकामें रावण वेडे । सांगो नये तयापुढें । सीता अर्पितां [मु. 'मज'.] राम जोडे । फिटे सांकडें [मु. 'भवाचें'.] भयाचें ॥ ६२ ॥

सखा जोडलिया रघुनंदन । विघ्न तेंचि होय निर्विघ्न । चिंता होय चैतन्य [तं. 'गहन'.] घन । दुःख संपूर्ण सुख होय ॥ ६३ ॥

श्रेष्ठ दुःख तें तंव मरण । मरतां स्मरलिया श्रीरामचरण । मरण होय ब्रह्मपूर्ण । सुखैकघन श्रीराम ॥ ६४ ॥

ऐसेंचि करीन मी आतां । शरण रिघोनी रघुनाथा । स्वयें अर्पितांचि सीता । लंकानाशा कल्याण ॥ ६५ ॥

ऐकतां मंदोदरीचें वचन । रावणु जाला अति उद्विग्न । प्रिया नव्हे हे परम विघ्न । सीता हिरोनिया नेईल ॥ ६६ ॥

मंदोदरीचें वचन । करितील इंद्रजीत कुंभकर्ण । नुलंघिती अणुप्रमाण । प्रधानजन अवघेहि ॥ ६७ ॥

मंदोदरीच्या वचनार्था । करिती मजहि न पुसतां । इणें हिरोनि नेली सीता । दुःखावस्था रावणां ॥ ६८ ॥

अत्यंत कळवळला रावण । करावया मंदोदरीचें छळण । युक्ति करी दशानन । सावधान अवधारा ॥ ६९ ॥

विघ्न निरसावया समस्त । अनुसरावा श्रीरघुनाथ । आधीं पूजूं उमाकांत । कुळदैवत तो आम्हां ॥ ७० ॥

ऊष्णोदक अग्रोदक । पोतास कापुराचे दीपक । सुमनें बेलपत्रीं निर्दोख । जेणें त्र्यंबक सुखावे ॥ ७१ ॥

सदाशिवाचे आज्ञेवरी । श्रीरामा अर्पूं सीतासुंदरी । यापरी छळुनी निजनारी । कार्यांतरीं गोविली ॥ ७२ ॥

रावणु पूजील शंकर । मंदोदरीस हरिख थोर । येरीकडे दशशिर । करीं विचार तो ऐका ॥ ७३ ॥

दूतिका [मु. 'पाठऊनि'.] पाचारुनि विश्वासी । वेगीं जाय अशोकवनासी । सरमा आणि विकटासी । गुप्त त्यांपासी सांगावें ॥ ७४ ॥

अनुक्रमणिका

[तं. 'ऐसा'.] अति सन्मान इंद्रजिता । जन्हिं तो माझा पढियंता । तेणेंहि सोडी म्हणतां सीता । तुम्ही सर्वथा न सोडावी ॥ ७५ ॥

कुंभकर्ण माझा भ्राता । तोहि सोडी म्हणतां सीता । तुम्ही न सोडावी [दै. 'तत्वता'.] सर्वथा । सोडिलिया घातां मी करीन ॥ ७६ ॥

मंदोदरी माझी कांता । [मु. 'आवडती'.] अतिशयें पतिव्रता । तिणेंहि सोडी म्हणतां सीता । तुम्ही सर्वथा न सोडावी ॥ ७७ ॥

अति महिमेचा सन्मान । सोडावी म्हणती श्रेष्ठ प्रधान । तऱ्ही न सोडावी आपण । सोडिलिया प्राण घेईन मी ॥ ७८ ॥

भट ज्योतिषी विद्वज्ञन । मज पूज्यत्वें अति सन्मान । त्यांचेनि सीता सोडिलिया जाण । तुमचा प्राण घेईन मी ॥ ७९ ॥

आलिया स्वर्गींचे देवगण । स्वयें आलियां चतुरानन । सीता न सोडावी आपण । आज्ञा प्रमाण हे माझी ॥ ८० ॥

ऐसे रावणाचें वचन । ऐकोनियां गुह्यज्ञान । अशोकवना शीघ्र गमन । करी सावधान दूतिका ॥ ८१ ॥

दूतिका चालतां [मुं. 'मागेमागें'; मु. 'लगबगें'.] लागवेगें । हनुमान लागला [कं. 'तिज'; मुं. 'तिच्या'.] मागेंमागें । कृपा केली पैं [तु. 'मज'.] श्रीरंगें । अनुद्वेगें सीताशुद्धी ॥ ८२ ॥

दूतिका सवेग चालतां । अति उल्हास हनुमंता । कृपा केली रघुनाथा । भेटली सीता अनायासें ॥ ८३ ॥

दूतिका चालतां पुढेंपुढें । हनुमान मागें नाचे उडे । हरिखें लोळतु गडबडें । कृपा चंद्रचूडें मज केली ॥ ८४ ॥

पूंस नाचवी कडोविकडी । मान हालवी देव्हडी । आडवेतिडवे डोळे मोडी । परम आवडी सीतेची ॥ ८५ ॥
[ओवी ८५ मु. प्रतीत नाही.]

आपआपणया दावी वांकोली । आपआपणया करी गुदगुली ।
सीता माझी निज माउली । मज भेटली अनायासें ॥ ८६ ॥

रावणें मंदोदरी छळिली । ना ते मजवरी कृपा केली । सीता माझी निज माउली । भेटविली अनायासें ॥ ८७ ॥

रावणाचा उपकार । आजि मज घडला थोर । न [मु. 'शोधिता'.] सोसितां अति दुस्तर । सीतासुंदर भेटविली ॥ ८८ ॥

अनुक्रमणिका

ऐसा हरिखाचेनि पूरें । हनुमान चालिला गडगजरें । पुढां अशोकवन साजिरें । स्वयें वानरें देखिलें ॥ ८९ ॥

श्रीरामाची निज पत्नी । सीता नाही शोकस्थानीं । नित्य [कं. मु. 'असे'.] वसे अशोकवनी । सत्य मानी हनुमंतु ॥ ९० ॥

सोडूनि अशोकाची गती । सीता शोधितां अशोक प्राप्ती ।
अशोकवनी सीतेची वस्ती । सत्य मारुती स्वयें मानी ॥ ९१ ॥

अशोक सीतेचां चरणी । अशोक सीतेचां दरुषनी । सीता [तु. दै. तं. 'वसे'; वि. कं. मुं. 'असे'.] अशोक वनीं । सत्य मानी हनुमंतु ॥ ९२ ॥

अशोक सीतेचां वचनीं । अशोक सीतेचां नयनी । सीता वसे अशोकवनीं । सत्य मानी हनुमंतु ॥ ९३ ॥ [ओवी ९३ तु. दै. प्रतीत नाही.]

अशोक सीतेचां अंगुष्ठी । अशोक सीतेचां पैं पोटीं । अशोकीं वसे सीता गोरटी । मानी जगजेठी हनुमंतु ॥ ९४ ॥

अशोक वस्ती सीतेचां पोटीं । कीं अशोकीं वसे सीता गोरटी । अशोक सीतेचेनि पुष्टी । अशोक सृष्टी सीतेनें ॥ ९५ ॥

रावणें आणिली हरुनी । शोक न देववे त्याचेनी । [तु. वि. कं. मु. दै. तं. 'तेणें हि'.] तेहि ठेविली अशोकवनीं । श्रीरामपत्नी अशोक ॥ ९६ ॥

होतां सीतेची पैं वस्ती । सकळ शोकां जाली शांती । अशोकवन यालागीं म्हणती । मानी मारुती निश्चयें ॥ ९७ ॥

परम आल्हादें हनुमंतु । आला अशोकवनां आंतु । सीता देखोनि हर्षयुक्तु । उल्हासतु स्वानंदें ॥ ९८ ॥

सीता देखतांचि जाण । हनुमान घाली लोटांगण । [तु. मुं. दै. तं. 'राम'.] रामनाम स्मरती पाषाण । अणुरेणु तृण राम जपे ॥ ९९ ॥

वृक्षपानें वातगतीं । श्रीरामनामें घुमघुमिती । धरा रामनामें दुमदुमिती । सीतासती हे होये ॥ १०० ॥

तेथील करितांचि आचमन । श्रीरामें स्वादिष्ट जीवन । मंद सुगंध लागतां पवन । होत [वि 'दर्शन'; कं. 'संपूर्ण'.] स्पर्शन रामनामें ॥ १०१ ॥

सावध पाहातां साचार । रामनामें गर्जे अंबर । सीतासती हे सुंदर । सत्य वानर स्वयें मानी ॥ १०२ ॥

जेथें हरिभक्तांची वस्ती । नाम कोंदें पंचभूतीं । नामें वोसंडत क्षिती । सीतासती हे होये ॥ १०३ ॥

अनुक्रमणिका

रामें सांगीतली खूण । येथें बाणली संपूर्ण । नामें गर्जताहे तृण । वृक्ष पाषाण नामेंसी ॥ १०४ ॥

एका जनार्दना शरण । नाम जीवन नाम दहन । नाम पवन नाम गगन । नामें त्रिभुवन कोंदलें ॥ १०५ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां अशोकवनप्रवेशो नाम पंचमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सहावा

## मंदोदरी जन्म प्रभव

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीरामाच्या [तु. दै. 'शक्ति'.] निजभक्ती । भजन दाटुगी सीतासती । तृण पाषाण नामें गर्जती । नामें त्रिजगती कोंदली ॥ १ ॥

श्रीरामाची परम भक्ती । स्वयें जाणें सीतासती । तिच्या भजनाची हे स्थिती । भजन युक्ती अवधारा ॥ २ ॥

हृदयीं आत्मा श्रीरघुपती । पाहातां वेदशास्त्र व्युत्पती । ऐसी जे कां निज [कं. 'प्राप्ती'.] प्रतीती । मुख्यत्वें भक्ती ती नांव ॥ ३ ॥

तेचि भक्ती धरितां चित्तीं । श्रीराम दिसे सर्वभूतीं । हे दृष्टीची भजनस्थिती । केला वेदांतीं निश्चयो ॥ ४ ॥

याचि स्थिती वचनोच्चार । श्रीराम अक्षरीं अक्षर । हेचि वाचिक भजन सधर । नामोच्चार श्रीरामु ॥ ५ ॥

श्रीराम जयराम अक्षरें । क्षराक्षरातीत परें । भवानीसि श्रीशंकरें । अत्यादरें सांगीतलीं ॥ ६ ॥

यांचि स्थिती करितां श्रवण । अक्षरार्थु श्रीराम पूर्ण । [मु. 'सांगता'.] सावधानता रघुनंदन । हें निज भजन श्रवणाचें ॥ ७ ॥

रसासी श्रीरामें रससवादता । रसनें रामें रसज्ञता । ऐसेनि रसभोग भोगितां । श्रीरघुनाथा निज भजन ॥ ८ ॥

याचि परी गंधग्रहण । सुगंधा श्रीराम जीवन । तोचि अवघ्राणी [तु. वि. कं. मुं. दै. तं. मु. 'सर्वज्ञ'.] संपूर्ण । हें निज भजन घ्राणाचें ॥ ९ ॥

त्वचेन करितां स्पर्शन । त्वचेची त्वचा रघुनंदन । स्पर्शा सबाह्य श्रीराम पूर्ण । हें निज भजन त्वचेचें ॥ १० ॥

श्रीराम [कं. 'नामें'.] मनाचें निज मन । राम चित्ताचें चैतन्यघन । श्रीराम बुद्धीचें समाधान । विवेक सज्ञान श्रीरामें ॥ ११ ॥

अहंसोहं परता । श्रीराम [कं. मुं. दै. 'वर्ते'; तु. 'तो'.] वसे स्वभावतां । ऐसे ऐसिया [वि. 'आनंदता'.] अनन्यता । भजे रघुनाथा जानकी ॥ १२ ॥

श्रीरामगतीची हि गती । श्रीराम [वि. 'स्थिती'.] शक्तीची निजशक्ती । श्रीराम सबाह्य सर्वभूतीं । भजे या स्थिती जानकी ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

ऐसिया श्रीराम भजनापुढें । रावणभय तें बापुडें । येवों न सके सीतेकडे । सीताहि रडे लटकेंचि ॥ १४ ॥

राम सीतेचि अनन्यता । श्रीरामा वेगळी नव्हे सीता । सीतें वेगळें रघुनाथा । नाहीं सर्वथा दूरि जाणें ॥ १५ ॥

ऐशापरी भजे सीता । समूळ कळलें हनुमंता । भक्तरक्षणें श्रीरघुनाथा । तेहिं मज आतां कळों आलें ॥ १६ ॥

मंदोदरी मानुनी सीता । हे कां रातली लंकानाथा । कोपें करूनी दोहोंच्या घाता । रामें अनर्था चुकविले ॥ १७ ॥

मी तवं वानर उन्मत्तु । समूळ विचार न करितु । दोहोंचा करीत होतों घातु । रामें अनर्थु चुकविला ॥ १८ ॥

मंदोदरी हेचि सीता । कैसेनिं मानलें हनुमंता । [तु. दै. ‘ते संपूर्ण’.] मंदोदरी विष्णुसंभूता । समूळ कथा अवधारा ॥ १९ ॥

रावणाची माता केकसी । पंचधान्याच्या पिष्टासी । पंचवक्त्र भावुनी त्यासी । करी पूजेसी शिवलिंग ॥ २० ॥

पंचधान्य तो पंचवदन । ऐसी भावना भावून । पूजा करी अनुदिन । सावधान केकसी ॥ २१ ॥

पंचधान्याचा पंचवक्त्र । पूजितां अक्षयीं दशवक्त्र । अक्षयी होती माझे पुत्र । हें निजसूत्र पूजेचें ॥ २२ ॥

शिवरात्रीचां दिवसीं । येऊनि समुद्रतीरासीं । निर्मुनियां शिवलिंगासी । करी केकसी महापूजा ॥ २३ ॥

षोडशोपचार पूजा जाली । त्यावरी बेलाचि लाखोली । [मु. ‘तिपानी’.] तिवनी शिवनामें वाहिलीं । पूजा केली अनुपम्य ॥ २४ ॥

तिवनी बेलाचें बिल्वपत्र । एकेक शिवनामें स्वतंत्र । भावें पूजिला शंकर । मनोहर ते पूजा ॥ २५ ॥

ऐसें करुनी पूजन । लाऊनियां दोन्हीं नयन । केकसी बैसता धरुनी ध्यान । [वि. ‘अन्नेवीन’.] आने आन तेंथ जालें ॥ २६ ॥

राक्षसवेषें इंद्र येऊन । लिंग समुद्रीं करी निमग्न । सागरु न करी लिंग भग्न । स्थापी सर्वज्ञ हाटकेश्वरीं ॥ २७ ॥

त्या लिंगाची हाटकेश्वरी । पूजा होतसे अद्यापिवरी ।
बेलप्रवाहे [तु. .मुं .कं ‘गोमती’. तु. ‘गोतमी’.] गोमांतसागरीं । देखिजे शिवरात्रि लोकीं सकळीं ॥ २८ ॥

केकसी जंव उघडी नयन । सपूजा लिंगासी पडिलें खान । पुत्रपौत्र निमे संतान । हें अति विघ्न लिंगहानी ॥ २९ ॥

अनुक्रमणिका

केकसी दीर्घ रुदन करी । माझी देवपूजा नेलीं चोरीं । जळो रावणाची राज्य थोरी । काय संसारीं नांदतु ॥ ३० ॥

ऐकतां मातेंचें [वि. 'वचन'.] रुदन । रावणु आला स्वयें धांवोन । येरी म्हणे लिंगा पडिलें खाण । काय वदन दावितोसी ॥ ३१ ॥

न करितां विसर्जन । जै लिंगासी [मुं. 'होय विघ्न'.] पडे खान । तैं संतान निसंतान । शिववचन शैवागमी ॥ ३२ ॥

येरु म्हणे माते अवधारी । उतरलें साही सूत्रीं । रत्नलिंग आहे घरीं । पूजा करी तूं त्याची ॥ ३३ ॥

अनेक लिंगांची पैं थोरी । बोलिली आहे आगमशास्त्रीं । केकसी त्यातें हातीं न धरी । अनाचारी केवी रिघों ॥ ३४ ॥

माझें लिंग न येतां हातां । आणीक नेघे मी सर्वथा । शैव दीक्षेची [वि. 'हे सत्ता'.] संस्था । लिंग न येतां प्राणत्यागु ॥ ३५ ॥

अद्यापि वरी शैवमार्गी । दुजिया लिंगाची सांडूनि मागी । पवाडा करिती लिंगालागीं । प्राण त्यागी निजनेटें ॥ ३६ ॥

रावणु विनवी मातेसी । तूं कां व्यर्थ प्राण देसी । मी जाऊनि शिवापासीं । तुझिया लिंगासी आणीन ॥ ३७ ॥

शिवुस्वामी माझे माथा । तूं तवं जाणसी तत्वतां । प्रसन्न करुनी विश्वनाथा । लिंग मी आतां आणीन ॥ ३८ ॥

केकसी सांगे रावणासी । नारदें सांगीतलें मजपासी । आत्मलिंग [तु. कं. 'आहे'.] शिवापासीं । तें आणिसी तैं धन्य ॥ ३९ ॥

ऐकोनि मातेचें वचन । सवेग निघोनी दशानन । शिवापासीं स्वयें [तु. दे. 'जाऊन'.] येऊन । करी नमन साष्टांग ॥ ४० ॥

जवळी आलिया रावणासी । शिवु न पुसे तूं कां आलासि । आजि जाहाला उदासी । रावणासी पुसेना ॥ ४१ ॥

बाण आणीक रावण । शिवाचे पढियंते पूर्ण । त्याचें वचन अणुप्रमाण । शिवु आपण नुलंघी ॥ ४२ ॥

त्याचि रावणासी आतां । शिवु न पुसे सर्वथा । परमचिंता उपजली लंकानाथा । यासी मी आतां काय करूं ॥ ४३ ॥

जंव भक्तासी निष्काम भाव । तंव सन्मुख सदाशिव । तोचि सकाम होतां पाहा हो । शिव स्वयमेव पुसेना ॥

अनुक्रमणिका

४४ ॥

रावणें देखिली शिवाची कांता । जे कां पार्वती जगन्माता । हे मी शिवासी मागेन आतां । सकामता दुसरी ॥ ४५ ॥

रावण [वि. 'उन्मादोनी'.] उभा दोनी प्रहर । सदाशिवु नव्हे सादर । कोठें विगुंतला शंकर । पाहे अंतरीं रावणु ॥ ४६ ॥

भृंगीचां झणत्कारीं । शिवु विगुंतला नादांतरीं । ऐसें जाणोनि निर्धारी । रावणु करी तें ऐका ॥ ४७ ॥

उतरूनि निजमाथा । शिरा लाऊनियां [कं. 'तात'; तं. 'मुक्ता'.] युक्ता । रावणें केला [मु. 'विना हाता'.] वीणा हाता । होय वाजवितां [तं. 'अन्य युक्ति'.] अत्युक्ति ॥ ४८ ॥

रावण हाताचा पैं स्वर । मधुर मंजुळ अति अरुवार । तेणें सुखावला शंकर । गौरीहर तुष्टला ॥ ४९ ॥

रावणा माग म्हणतां । मागतां नये मोडिला माथा । कृपा उपजली विश्वनाथा । [दै. 'वरदाता'.] वरद वदता स्वयें जाला ॥ ५० ॥

तुवां मोडूनि निज शिर । मज सुखी केलें अपार । तूं होसील दशशिर । वीर शूर तिंहीं लोकीं ॥ ५१ ॥

शिरा काढुनी दोन्ही कर । तंतीं लाविल्या साचार । एक एकाचे दहा दहा कर । भुजाभार विंशती ॥ ५२ ॥

वरद वदतां वृषभध्वजा । दहा शिरें वीस भुजा । उभा ठेला राक्षसराजा । बळ समाजा अतुर्बळी ॥ ५३ ॥

शिवु म्हणे लंकानाथा । जें जें आवडे तुझिया चित्ता । तें तें देईन मी आतां । प्रसन्नता गर्जतु ॥ ५४ ॥

सदाशिवु स्वयें भोळा । नेणें राक्षसाची कळा । दुष्ट बुद्धी [वि. कं. मुं. दै. मु. 'त्याचा डोळा'.] त्या चांडाळा । मागती कळा ते ऐका ॥ ५५ ॥

पार्वती लावण्याची राशी । ते मज द्यावी निज भोगासी । आत्मलिंग आहे पूजेसी । केकसीसी तें द्यावें ॥ ५६ ॥

रावण मागणें ऐकतां । गेली वरद उल्हासता । परम क्षोभु शिवाच्या चित्ता । नेदी म्हणतां म्हणवेना ॥ ५७ ॥

माता सुतु पाळी [तु. कं. मुं. तं. दै. मु. 'सुतें'.] उल्हासता । मातेसी रती मागतां । प्राणांत क्षोभे माता । शिवाचिया चित्ता तैसें जालें ॥ ५८ ॥

गुरुपत्नी ते शिष्यासी माता । तिचा अभिलाषु करितां । रावणा आली गुरुतल्पगता । कैसेनि आतां वांचेल ॥ ५९ ॥

अनुक्रमणिका

पार्वती देतां रावणाच्या हातीं । ईचेनिं तुम्हां सर्वशांती । न कळोनि ते वदंति । लंकापती उल्हासें ॥ ६० ॥

शिवु म्हणें रावणासी । आत्मलिंग देतां तुजपासी । शुचित्व पाहिजे अहर्निशीं । ठेविल्या भुईसी न ये हातां ॥ ६१ ॥

आकर्षुनी चैतन्य ज्योति । तेज मुसाऊनि आत्मशक्ति । तें आत्मलिंग उमापति । नित्य पूजिती नेमस्त ॥ ६२ ॥

तें लिंग देतां रावणाहाती । लिंग जाईल हातोहातीं । तृतीय नेत्र क्षोभक शक्ती । लावील ख्याती रावणा ॥ ६३ ॥ [ओवी ६३ वि. प्रतीत नाही.]

रावणें घेऊनि पार्वती । आत्मलिंग घेऊनि हातीं । उल्हासत चित्तवृत्ती । लंकेप्रती निघाला ॥ ६४ ॥

रावणासी [मु. 'देखतां'; कं. 'लिंग'.] देतां जाण । उमा जाली हीन दीन । चिंतातूर [वि. 'उद्विग्न'.] अतिगहन । दीन वदन ते जाली ॥ ६५ ॥

शिवें दीधलें रावणासीं । माझी सुटिका होय कैसी । उमा चिंती श्रीविष्णूसी । पाव वेगेसीं कृपाळुवा ॥ ६६ ॥

ग्रहग्रस्ता गजेंद्रासी । उद्धरिलें अति वेगेसीं । रावणग्रस्ता मज दीनासीं । शीघ्रतेसी पावावें ॥ ६७ ॥

राम उच्चारिल्या साठीं । कुंटिणी वाहिली वैकुंठीं । तैसिया [तु. 'वेगा'.] गा कृपादृष्टी । पाव जगजेठी कृपाळुवा ॥ ६८ ॥

महापातकांच्या राशी । नामें उद्धारु अजामेळासी । मी तवं तुझी [तु. दै. 'निःशंक'; मु. 'निज'.] निष्पाप दासी । पाव वेगेसी कृपाळुवा ॥ ६९ ॥ [ओवी ६९ वि. तं. प्रतींत नाही.]

शिवासी छळितां भस्मासुरें । तुवां तारिलें कृपाकरें । ऐकोनि उमेचीं उत्तरें । हरि सत्वरें धांविन्नला ॥ ७० ॥

शिवाची जे निजकांता । ते तवं माझी सखी माता । तिचा अभिलाषु करितां । लंकानाथ गांजीन ॥ ७१ ॥

पार्वती सोडवितां येकायेक । गणेश स्वामिकार्तिका अटक । शिववरद होता लटिक । शिवु सम्यक् कोपेल ॥ ७२ ॥

रावणाचिया पाडूनि दांतां । निमिषें सोडवीन माता ।
शिववरद मिथ्या होतां । आमचिया घातां शिवु करिल ॥ ७३ ॥

सोडवावया पार्वतीसी । धांवण्या येतां श्रीविष्णूसी । दोघे भेटले तयासी । वृत्तांत त्यासी सांगतु ॥ ७४ ॥

पूर्ण छळावया रावण । विष्णूनें मांडिलें विंदाण । द्विजगौचें रक्षण । सांगे आपण गणेशा ॥ ७५ ॥

अनुक्रमणिका

आपण जाला ब्रह्मऋषि । शिष्य केले गुहकासीं । उल्हासें येतां रावणासी । [वि. 'मार्गीं'.] सन्मुख त्यासी भेटले ‖ ७६ ‖

[मु. 'ऐसा'.] कायिसा उल्हासु लंकापती । शिवें दिधली पार्वती । आत्मलिंग कृपामूर्ति । तेंहि मजप्रति वोपिलें ‖ ७७ ‖

ऋषी रावणातें सांगती । आत्मलिंग [मुं. 'सद्य'.] सत्य प्राप्ती । परी हे नव्हे गा पार्वती । शिवें तुजप्रति ठकिलें ‖ ७८ ‖

शिवु देईल निजकांता । हें तवं न घडे गा सर्वथा । ठकिलें ठकिलें लंकानाथा । पाहे तू आतां पार्वती ‖ ७९ ‖

जावं पाहे दशानन । उभा न दिसे शोभायमान । निंद्य कुश्चित हीन दीन । देखे उद्विग्न मुख तिचें ‖ ८० ‖

डोळे [मु. 'पिचके'; तु. दै. 'चिपडे.'] पिटले वाहे पाणी । वदनीं माशांची गोंगाणी । श्लेष्मा बिडबिडित घ्राणीं । मुखीं पोहाणी घाणत ‖ ८१ ‖

तिच्या देखतांचि वक्त्रा । रावणा आला अति ओकारा । विष्णु लाघविया खरा । दशशिरा छळियेले ‖ ८२ ‖

रावण म्हणे ऋषीप्रती । माझेनिं भाग्यें भेटलेती । आतां जाऊनि शिवाप्रती । मुख्य पार्वती मागेन ‖ ८३ ‖

शिवें राखोनि निज दशा । तुज दिधली अवदशा । त्रिसत्य मानी लंकेशा । भोळे महेशा मानूं नको ‖ ८४ ‖

उमा लपवी उमापती । ते खूण सांगों तुजप्रती । आसनातळीं लखलखिति । ते पार्वती तूं माग ‖ ८५ ‖

ऐकोनि रावणु आवेशीं । धांविन्नला शिवापासीं । विष्णु [तु. वि. कं. मुं. तं. दै. 'लघु'.] मग लाघवेसी । [कं. 'पार्वतीसी'.] मंदोदरीसी निर्मितु ‖ ८६ ‖

केशराची अति गोमटी । रमेनें दिधली होती उटी । उदरीं आडळतां मळवटीं । केली गोरटी मंदोदरी ‖ ८७ ‖

निर्मावया सुंदर पुतळी । कांहीं नाडळे हातातळीं । उदरीं गोरोचनाची मळि । त्याची निर्मिली मंदोदरी ‖ ८८ ‖ [ओवी ८८ कं. मुं. प्रतींत नाही.]

श्रीविष्णूचां उदरोदरीं । मृदु सुगंध चंदन [तु. मुं. दै. 'केशरी'.] करी । विष्णु मध्यांगीं जन्मली नारी । मंदोदरी तेणें नांव ‖ ८९ ‖

माज समाये मुष्टी माझारीं । या लागी म्हणती मंदोदरी । विषयतृष्णा नाहीं उदरीं । मंदोदरी तेणें नांव ‖ ९० ‖
जे जन्मली विष्णुचा करीं । संकल्प विकल्प नाहीं उदरीं । यालागीं म्हणती मंदोदरी । शोभा सुंदरी शोभत

अनुक्रमणिका

॥ ९१ ॥

नयन वदन श्रवण घ्राण । रुपरेखा ठाणमाण । गुण गांभीर्य वदान्यमान । श्रीसमान करी विष्णु ॥ ९२ ॥ [ओवी ९२ कं. प्रतीत नाही.]

विष्णु लघुलाघव मेळीं । ऐसी निर्मुनी पुतळी । घातली शिवासनातळीं । तेजें [मुं. 'आगळी'.] वेल्हाळी घवघवित ॥ ९३ ॥

रावण म्हणे शिवाप्रती । तुवां लपऊनि पार्वती । [कं. 'आपदा'.] अवदसा दीधली माझां हातीं । धन्य वरदोक्ती हे तुझी ॥ ९४ ॥

शिवु विचारी निज चित्तीं । येणें अभिलाषिली पार्वती । तेचि अवदशेची प्राप्ति । छळिला निश्चिती जगदंबा ॥ ९५ ॥

तिसीं श्रीविष्णु जाला साह्य । तेणें रावणा आले अपाय । तेथ न चलती उपाय । यासी म्यां काय करावें ॥ ९६ ॥

रावण [कं. मु. 'पटाचा'.] पदाचा माझा गण । उमा अभिलाषें पापी पूर्ण । गुरुतल्पगता दोष दारुण । अचूक मरण या आलें ॥ ९७ ॥

जेचि उमा तेचि सीता । तीचेनि अभिलाषें तत्वतां । मरण येईल लंकानाथा । पेटला घातां श्रीविष्णु ॥ ९८ ॥

रावणु पेटला [तु. त 'आवेशा'.] अभिलाषा । म्हातारपणीं स्त्रीलोभु कैसा । तुज वाढला महेशा । [तु. दे. 'तुंवा'.] मज अवदसा बा दिधली ॥ ९९ ॥

"तथास्तु" म्हणे सदाशिवु । बहु अवदसा भोगील जीवु । रावण विषयांध बहु । त्यावरी गर्वु [तु. 'विषयाचा'.] वरदाचा ॥ १०० ॥

रावण म्हणे शिवाजवळीं । उमा लपविली आसनातळीं ।
मज दिसताहे सोज्वळी । किती चंद्रमौळी चाळविसी ॥ १०१ ॥

आसनीं देखोन सुंदरकांता । अती विस्मयो विश्वनाथा ।
उमा सोडवूनी [कं. .मुं 'जगन्नाथा'.] जगन्माता । दिल्ही लंकानाथा मंदोदरी ॥ १०२ ॥

रावणु बोलिला क्षोभेकरी । म्हातारपणी स्त्रीलोभु भारी ।
माझी प्रिया जगन्म्हातारी । अभिलाषी [तु. 'उदरीं'; तं. 'उत्तरी'.] उरी उरो नेदी ॥ १०३ ॥

अनुक्रमणिका

असोतु या उपपत्ती । रावणें सांडूनि पार्वती । मंदोदरी अति प्रीती । घेऊनि [मु. 'चित्ती'.] हातीं निघाला ॥ १०४ ॥

काखेसूनि मंदोदरी । आत्मलिंग घेऊनि करी । रावणु निघतां झडकरी । नानापरी छळी विष्णु ॥ १०५ ॥

रावणु पावोनि हरिखा । अनुलक्षूनिया लंका । जातां लागली लघुशंका । पाऊल देखा नघलवे ॥ १०६ ॥

लिंग देऊं कोणाच्या हातीं । कैसेनि करुं शंकानिवृत्ति । रावणा थोर पडली गुंती । पुढारी गती खुंटली ॥ १०७ ॥

अभिलाषितां शिवाची नारी । रावणु अशुची चराचरीं । मृत्तिका जळें शौचाचारी । शुचित्व तऱ्ही उपजेना ॥ १०८ ॥

मृत्तिका जळें धुती गुद । तैसें हृदय न करिती शुद्ध । शौचाचार तो अबद्ध । कर्ममंद कर्मठ ॥ १०९ ॥

लिंग द्यावें कोणापासीं । रावणु पाहे चौपासीं । तवं देखिलें गणेशासी । द्विज गौसी रक्षित ॥ ११० ॥

दर्भ पवित्र यज्ञोपवीत । टिळे द्वादश नामांकित । गणेश देखे लंकानाथ । लिंग द्यावयार्थ प्रार्थु ॥ १११ ॥

जंव मी करि शंकानिवृत्ति । तवंवरी लिंग धरावे हातीं । गणेशु म्हणे गाई जाती । वत्सें पीती धेनूसीं ॥ ११२ ॥

गाई पाजलियावरी । द्विज कोपतील [तु. दै. 'मजवरी'.] भारी । तुझें लिंग मी न [तं. 'न धरी करीं'.] अंगिकारी । पाय धरी रावणु ॥ ११३ ॥

गणेशु त्यासी [तु. दै. 'नमस्कारी'.] नेमुकरी । तुज न येतां झडकरी । लिंग ठेवीन भूमिवरी । निज निर्धारी नेमु माझा ॥ ११४ ॥

त्रिवार सिंहगर्जनेसीं । मज पाचारी तूं कृपेसी । वेगें न येतां तुजपासीं । लिंग भूमिसी तैं ठेवी ॥ ११५ ॥

ऐसी निगुती करुनि देखा । करुं गेला लघुशंका । मुतें गुंतविलें दशमुखा । कांहीं आंवाका चालेना ॥ ११६ ॥

आत्मलिंग त्यागितां देखा । रावण लिंगीं लावी तिडका । उदरीं व्यथेचा भडका । शिवु निजसखा क्षोभला ॥ ११७ ॥

कष्टी मूत्र मोकळें होत । तंव तें जाहालें अतिमुक्त । धारावर्ती प्रवाहत । मुतीं लंकानाथ गुंतला ॥ ११८ ॥

गणेश गर्जे सिंहगर्जनेसीं । रावणु गुंतला मुतापासीं । लिंग ठेऊनि भूमीसी । घेऊनि गाईसी तो गेला ॥ ११९ ॥

अनुक्रमणिका

रावणें करुनि शौचाचारीं । वेगे येतां पैं झडकरी । लिंग देखोनि भूमीवरी । श्रद्धें करीं घेऊं गेला ॥ १२० ॥

एकें हातें दोहीं हातें । उचलितां रावणु कुंथें । नुचलेचि वीसां हातें । म्हणती लिंगातें महाबळ ॥ १२१ ॥

आहाच दिसे भूमीवरी । परी तें सबळ भारी । उचलीतां वीसें करीं । तिळभरी नुचलेची ॥ १२२ ॥

सर्वशक्ती अतिप्रबळ । रावणें वेचितां सकळ बळ । लिंग नुचलेची आळुमाळ । महाबळ तें लिंग ॥ १२३ ॥

रावणें आपुलां निजकरीं । आंदोळिला कैलासगिरी । महाबळ लिंग हें भारी । तिळहिभरी नुचलेची ॥ १२४ ॥

लिंग भुई ठेऊनि गेला । रावणें गणेशा दिधला टोला । अद्यापि असे [मुं. 'उभा केला'.] उभा ठेला । रावण क्षोभला निवेशें ॥ १२५ ॥

आत्मलिंग न येचि हातासीं । उपावो कांहीं न चले त्यासी । रावण फुंदे उकसाबुकसी । केकसीसी काय सांगों ॥ १२६ ॥

लिंग गेलें अतिमूत्रता । कांहीं केलिया न येचि हातां । नगरा जातां क्षोभेल माता । उभयतां अपावो ॥ १२७ ॥

नाहीं देव ना पितर । उभयतां अपवित्र । विष्णूनें छळिला अपार । दशकंधर तळमळी ॥ १२८ ॥

लिंगबंधनी अभयमुद्रा । शिवे लाविला तो शिवदोरा । रावणें सांडितां [वि. 'प्रहरा प्रहरा'.] अऱ्हापऱ्हा । पंचमुद्रा पंचलिंग ॥ १२९ ॥

मुरडूनियां सांडितां वस्त्र । तेथें जाहाला मुरडेश्वर । मुद्रिका टाकितां पवित्र । गुप्तेश्वर तेथ जाला ॥ १३० ॥

रागें टाकितां शिवदोरु । तेथें जाहाला [तु. वि. तं. दै. 'गुणकेश्वर'. मुं. 'गणकेश्वर'.] गुणतेश्वरु । कानडे म्हणती [मुं. 'धनेश्वर'.] धारेश्वरु । लोक वेव्हारु तो ऐसा ॥ १३१ ॥

शिवसेज टाकितां साचार । तेथें जाला सेजेश्वर । ऐसियापरी पंचवक्त्र । स्वये शंकर नांदतु ॥ १३२ ॥

गोकर्ण तवं हें अनादिक्षेत्र । तेथ महाबळ ईश्वर । यालागीं गोकर्ण महाबळेश्वर । लोक वेव्हार प्रसिद्ध ॥ १३३ ॥

[मु. 'गौतम'.] गोमंतक पर्वत समुद्रतीर । तेथें गोकर्ण महाबळेश्वर । वांईचा महाबळ [कं. मुं. 'ईश्वर'.] विचार । [तं. 'भिन्न परब्रह्म त्यालागीं'.] भिन्न प्रचार [कं. मु. 'ब्रह्मगिरी'.] ब्रह्मयागी ॥ १३४ ॥

ब्रह्मेनी याग करितां प्रबळ । प्रगटला तो [दै. 'वायू'; मु. 'ठायीं'.] वांई महाबळ । दोहींचे भिन्नभिन्न स्थळ । लोक सकळ जाणती ॥ १३५ ॥

अनुक्रमणिका

**असो हे तीर्थाची पैं वार्ता । संख्या करितां असंख्याता । कैसेनि वाढली हे कथा । मूळ सांगतां अवधारा ॥ १३६ ॥**

**मंदोदरीसी समान सीता । केवीं मानली हनुमंता ।** [मु. 'ब्रह्मोत्तर'.] **ब्रह्मांड खंडीची हे कथा । विष्णुसंभूता मंदोदरी ॥ १३७ ॥** [ओवी १३७ वि. प्रतीत नाही.]

**मंदोदरी सुंदर कांता । स्वयें श्रीविष्णु निर्मिता । तिसीं सीतेसी समानता । स्वभावतां पैं आली ॥ १३८ ॥**

**श्रीविष्णु करी अवलोकन ।** [तु. दै. 'तवं ते'; मु. 'ते तंव'.] **ते ते होती श्रीसमान । मंदोदरी विष्णु निर्माण । सीतेसमान मानी कपी ॥ १३९ ॥**

**दोघी अयोनिजा तत्वतां । दोघीजणी पतिव्रता । मंदोदरीसी समान सीता । येणें हनुमंता मानली ॥ १४० ॥**

**रावणाच्या अति एकांता । मंदोदरीच्या ऐकोनि कथा । अशोकवनीं हनुमंता । भेटली सीता ते ऐका ॥ १४१ ॥**

**अशोक वनामाजीं मारुती । नमस्कारुनी सीतासती । श्रीरामाचिया** [मु. 'कथानुवर्ती'.] **कथानुवृत्ति ।** [तु. वि. कं. मुं. दै. तं. मु. 'सुखानुभूती'.] **सुखानुभवी दोहींसी ॥ १४२ ॥**

**एका जनार्दना शरण । हनुमान लाघवी आपण । करील वनविदारण । राक्षसकंदन तें ऐका ॥ १४३ ॥**

**इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां मंदोदरीजन्मप्रभवो नाम षष्ठमप्रसंगः ॥**

अनुक्रमणिका

## प्रसंग सातवा

## रावण अशोकवन आगमन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

पूर्व प्रसंगा [पै. मु. 'प्रति'.] अंतीं । दूतिके मागें मागें मारुती । आला अशोकवनाप्रती । सीतासती वंदावया ॥ १ ॥

देखोनियां अशोकवन । हनुमान घाली लोटांगण । करुनी श्रीरामस्मरण । सीतादर्शन करुं रिघे ॥ २ ॥

स मुहूर्तमिव ध्यात्वा संहृष्टमनसा कपिः । ज्यामुक्त इव नाराचः पुप्लुवे वृक्षवाटिकाम् ॥ १ ॥
आपुप्लुवे महातेजाः प्राकारं तस्य वेश्मनः । स तु संहृष्टसर्वांगः प्राकारस्थो महाकपि : ॥ २ ॥

साधावया सीता चिद्रत्न । हनुमान क्षणेंकु धरी ध्यान । देखोनिया अशोकवन । आलें स्फुरण वानरा ॥ ३ ॥

जैसा श्रीरामाचा बाण । तैसें करुनी उड्डाण । अशोकवनामाजीं जाण । आला आपण हनुमंतु ॥ ४ ॥

वृक्ष सफल आणि सरळ । वन देखोनी विशाळ । करीत हरिखाचा गोंधळ । घोंटी लाळ [तु. दै. तं. मु. 'मिटक्या'.] मिठ्या देतु ॥ ५ ॥

दाट देखोनियां झाडा । उल्हास आला पैं माकडां । वृक्षावृक्षीं उडे तडतडा । नाचवी पुढां निज पुच्छ ॥ ६ ॥

सांपडली श्रीरामकांता । फिटली आधीव्याधी चिंता । विचकुनी निज दांता । देवां देवतां [मु. 'वाकुल्या दावी'.] वेडावी ॥ ७ ॥

नारळी घडघडीत घडे । हनुमान पाहे [दै. 'इकडे तिकडे'.] तिकडे । पक्क खर्जूरी देखोनि पुढें । वेगें उडे गटकावया ॥ ८ ॥

पिकले आंबे देखोनी तेथ । हनुमान डोळे मिचकावीत । द्राक्षीचे घड डोल देत । हालवी तेथ निज पुच्छ ॥ ९ ॥ [ओवी ९ वि. प्रतीत नाही.]

मातुलिंगी आणि नारंगी । माझे दांत सभाग्य भागीं । देखोनि हनुमान नाचे [तु. दै. 'वेगीं'.] रंगीं । फळालागीं करंडावया ॥ १० ॥ [ओवी १० वि. प्रतीत नाही.]

फणसें परिपक्कें घनदाटें । हनुमान [तु. वि. कं. मुं. दै. मु. 'नखें'.] देखे सोली कांटे । पिकलीं केळें चेपुनी बोटें । निंबे [तं. 'आंबे'.] अंबटे मी नेंघे ॥ ११ ॥

जांबुळें देखोनि कुळकुळितें । हनुमान विचकावी दांते । आंवळे न [मु. 'न सेवीच'.] सिवे तो हातें । कार्तिकव्रतें

व्रतधारी ॥ १२ ॥

देखोनि उंबरें टेंभरें । बिबवि धामणें चारे बोरें । पिकली करवंदें नागरें । मिठिया वानरें देइजती ॥ १३ ॥

तोरणे यर्मणे मव्हे गोटी । वाळुकें कांकड्या भरल्या पाठीं । मोहाळें मधु देखोनि दिठी । लाळ घोटी वानरू ॥ १४ ॥

भरले खर्बुजाचे भारे । देखोनि पिकलीं भोकरें । उल्हास कीजे पैं वानरें । पुच्छाग्रें नाचवितु ॥ १५ ॥

देखतां साखरेच्या राशी । हनुमान खाजवी दोन्ही कुसी । कोण खाईल गुळासी । नाबदेसी गटकाऊं ॥ १६ ॥

देखोनियां ऊंस रणी । वानरू नाचवू पैं [तु. दै. मु. 'रंगणी'.] रणीं । रसें भरली देखोनि मांदाणी । पूंस न्हाणी त्यामाजीं ॥ १७ ॥

तें प्रक्षाळुनी निर्मळजळीं । गूज सांगे पूंसाजवळीं । भेटलीयां जनकबाळी । वन रवंदोळी मग करुं ॥ १८ ॥

हनुमान पूंसेंसीं करी एकांतु । सीतेसी पुसोनि वृत्तांतु । मग या फळांसी लावूं हातु । तवं त्वां सुशांतु असावें ॥ १९ ॥

ऐसी सांगोनि निज खूण । वेगीं करुनियां उड्डाण । [वि. शिखरा.] प्राकारावरी जाण । हनुमान आपण [कं. 'बैसला'.] वळंघला ॥ २० ॥

अशोकवनामाझारीं । रावणाची शृंगार वोवरी । उपरिया उपरी गोपुरीं । हनुमान त्यावरी वळंघला ॥ २१ ॥

त्यावरी बैसोनि आपण । अवलोकी अशोकवन । नित्य वसंतें शोभायमान । सदा संपन्न फळीं पुष्पीं ॥ २२ ॥

अशोकवनाआंतु । नित्य नांदे वसंतु । सदा सुफळित सर्व ॠतु । देखे हनुमंतु स्वानंदु ॥ २३ ॥

शालानशोकान्भव्यांश्च चंपकानविसुप्तकान् । उद्दालकान्नागवृक्षांश्चूतान्नीपांश्च पादपान् ॥ ३ ॥

शाल ताल तरु तमाल । सरळ शोभा अति विशाल । कर्णिकारीं पुष्प प्रबळ । अशोकीं प्रबळ विश्रांती ॥ २४ ॥

कपित्य बिल्व च्यूत चंपक । पिचुबंद निंब किंशुक । अमली शाल्मली मधुक । वृक्ष अनेक शोभती ॥ २५ ॥

नागचंपक उद्दालक । मंदार कल्पतरु पारिजातक । पलक्ष पाटल नंदक । वट विट शोभती ॥ २६ ॥

रजतवृक्ष कैलासगिरी । रावणें प्रार्थुनी त्रिपुरारी । सार्द्र सुगंध सुमनसंभारीं । अशोकामाझारीं रजतवृक्ष ॥

अनुक्रमणिका

२७ ॥

**विभांडोनि कुबेरनगरी । सुवर्ण वृक्ष सुमन संभारीं । सुगंध न माय अंबरीं । अशोकामाझारीं रावणु आणी ॥ २८ ॥**

**यक्ष राखिती सुगंधिनी । सार्द्र सुवर्ण कमळिनि । रावणें आणिल्या हिरोनी । अशोकवनीं मघमघिती ॥ २९ ॥**

**सुवर्ण रजत वृक्षमेळीं । पुष्पें सुगंधें पांढरीं पिवळीं । फळें स्वादीं चवीं आगळीं । बीजें रत्नाळी त्यामाजीं ॥ ३० ॥**

**तया बीजापासुनी पुढती । नव्हे वृक्षाची उत्पत्ती । एकवेळें तें फळा येती । मग शोभती नुसधेचि ॥ ३१ ॥**

> राजतैः कांचनैश्चापि पादपैः सर्वतोऽवृताम् । अशोकवनिकां स्फीतां प्रविवेश महाकपिः ॥ ४ ॥
> मनोहरां नेत्रहरां सौगंधां घ्राणहारिणीम् । स ददर्श विहारं च चैत्यं प्रासादमुत्तमम् ॥ ५ ॥
> धृतं स्तंभसहस्रेण स्थितं कैलासपांडुरम् । प्रवालकृतसोपानं तप्तकांचनवेदिकम् ॥ ६ ॥
> गदापाणिभिरेकाग्रैरासीनैर्द्वारिराक्षसैः । गुप्तद्वारां महाद्वारामनाधृष्यां सुरैरपि ॥ ७ ॥
> सबलं तत्समावृत्त्य हनुमान्प्रविवेश ह ॥ ८ ॥

**ऐसिया वृक्षांचिया जाती । अशोकवनीं नेणों किती । निज शोभा स्वयें शोभती । उडे मारुती त्यामाजीं ॥ ३२ ॥**

**वृक्षशोभा देखिल्यावरी । मन मूर्छित त्यामाझारीं । दृष्टीहि जावों विसरे बाहेरीं । सुगंध हारी घ्राणातें ॥ ३३ ॥**

**ऐसिया वृक्षोवृक्षीं जाण । गदापाणी वीर दारुण । राक्षस ठेविले राखण । पाहे कोण त्याकडे ॥ ३४ ॥**

**दुर्धरां वृक्षांहि माझारीं । हनुमान स्वेच्छा क्रीडा करी । राक्षस बळाची तो थोरी । तृणावाऱ्ही गणीना ॥ ३५ ॥**

**अशोकवनीं** [कं. 'शिवालय'.] **देवालय । रावणें केलें अति विशाळ । सहस्त्र स्तंभाचें प्रबळ । रत्न प्रवाळ** [मुं. 'मेळविलें'.] **मेखळे ॥ ३६ ॥**

**पाचु पाचिका माणिकें वरी । हिरे मुक्ताफळें हारोहारीं । कळस लखलखीत अंबरीं । त्याहि वरी पताका ॥ ३७ ॥**

**सुवर्ण वेदिका दोहीं बाहीं । रत्नें जडिलीं त्यावरी पाही । वोटंगणें ठाईं ठाईं । दिसे भुई** [कं. मुं. 'प्रतिबिंब'.] **प्रतिरुप ॥ ३८ ॥** [ओवी ३८ वि. प्रतीत नाही.]

**नंदनवन चैत्रवन । त्याहोनि दिसे शोभायमान । आनंदवनेसी समान । कैलासभुवन तैसी शोभा ॥ ३९ ॥**

**वनद्वारीं प्रासादद्वारीं । राक्षस सावध शस्त्रांस्त्रीं । वारया वाट नव्हे भीतरीं । सुरासुरीं दुर्धर ॥ ४० ॥**

अनुक्रमणिका

बोट दावी त्या हातूचि तोडी । डोळा दावी त्या डोळाचि फोडी ।
दुर्धर राक्षस परवडी । कडोविकडी वन राखती ॥ ४१ ॥

लंकाप्राप्तीं आड सागर । पुढें दुर्ग अति दुर्धर । त्यामाजीं रावणमंदिर । अति दुस्तर प्रवेशावयां ॥ ४२ ॥

त्याहिमाजीं स्त्रियांचें भुवन । अतिशयेंसीं दुर्गम गमन । त्याहिमाजीं अशोकवन । दुर्गमन सुरांअसुरां ॥ ४३ ॥

दुर्गमीं रिघावया हनुमंतु । अतिदक्षु आणि समर्थ । हेमरजत वृक्षाआंतु । निशंक क्रीडतु वनराजीं ॥ ४४ ॥

असो हा वनविहार । सीतादर्शनीं अति सादर । सन्मुख चालिला वानर । धरुनी सूत्र लक्ष्याचें ॥ ४५ ॥

तस्मिन्मलेन संवीतां राक्षसीभिः समावृताम् । उपवासकृशां दीनां भर्तुर्दर्शनलालसाम् ॥ ९ ॥
ददर्श हनुमान्सीतां रुद्धां गजवधूमिव । क्लिष्टेनैकेन संवीतां पीतेनोत्तरवाससा ॥ १० ॥
ऊरुभ्यां सानुजाताम्यां प्रतिच्छन्नकुचोदरीम् ॥ ११ ॥

वरिवरी दिसे सीता सभळ । अंतरीं रामध्यानें निर्मळ ।
बाह्य अति चिंता व्याकुळ । अंतरीं निश्चळ चिन्मयरामें ॥ ४६ ॥

बाह्य उपवासी दिसे क्षिप्त । अंतरीं परमानंदें तृप्त । बाह्य दिसे बंदी प्राप्त । अंतरीं निर्मुक्त चहूं देहां ॥ ४७ ॥ [ओवी ४७ मुं. प्रतीत नाही.]

बाह्य रोडेली दिसे काष्ठ । अंतरीं रामप्रेमें धष्टपुष्ट ।
बाह्य राक्षसी मानी दुष्ट । अंतरीं निर्दुष्ट आत्मा मानी ॥ ४८ ॥ [ओवी ४८ वि. .प्रतीत नाही]

बाह्य रामेसीं दिसे वियुक्त । अंतरीं श्रीरामीं नित्ययुक्त ।
बाह्य दिसे दुःखाभिभूत । अंतरीं सदोदित स्वानंद सुखें ॥ ४९ ॥

बाह्य दिसे हीन दीन। अंतरीं रामें सुप्रसन्न । बाह्य दिसे अति खिन्न । अंतरीं चैतन्य चिन्मात्र ज्योति ॥ ५० ॥

बाह्य दिसे लंकें नेली । ते रामापासुनी नाहीं ढळली । बाह्य दिसे कोमायिली । अंतरीं टवटविली श्रीरामें ॥ ५१ ॥

बाह्य दिसे मलिनांबर । अंतरीं शोभे चिदांबर । बाह्य दिसे अनालंकार । अंतरीं शृंगार श्रीरामें ॥ ५२ ॥

दिसे श्रीरामावेगळी । परि ते सबाह्य रामें [वि. 'संचली'.] रचिली । ऐसी देखोनि जनकबाळी । पिटिली टाळी हनुमंतें ॥ ५३ ॥ [ओवी ५३ कं. मुं. प्रतींत नाही.]

सीता अनुभवी श्रीरामचंद्रा । कैसेंनि कळलें वानरां । श्रीरामें दीधली निजमुद्रा । तेणें कपींद्रा अनुलक्षे ॥ ५४

अनुक्रमणिका

॥

सांगतां सीतेच्या लक्षणा । रामें सांगितल्या खुणा । त्याची स्थिती पाहातां जाणा । देखे पूर्णपणा वानरु ॥ ५५ ॥

ऐसें सीतेचें पूर्णपण । हनुमान लक्षी स्वयें आपण । बाह्य लौकीक लक्षण । [मु. 'दिसे तें'.]दिसतें चिन्ह अवधारा ॥ ५६ ॥

निधाना भंवतीं जैसी विवसी । तैसिया राक्षसी सीतेपासीं । खावों गिळों पेवों रक्ताशी । देखे चौपासी हनुमंतु ॥ ५७ ॥

गजपतीते चुकोनी । पांगडीमाजी पडे हस्तिनी । तैसी सीता अशोकवनी । दीनवदनी दिसत ॥ ५८ ॥

नाहीं अभ्यंग नाहीं स्नान । तेणें सर्वांगीं मळ पूर्ण । वस्त्र पीतांबर अति जीर्ण । नाहीं प्रावरण दूसरें ॥ ५९ ॥

कुचेसी उदर आच्छादूनी । दोन्ही गुडघे हृदयीं धरुनी । बैसली असे श्रीरामपत्नी । चिंती अनुदिनीं श्रीराम ॥ ६० ॥

घ्यावया श्रीरामाची भेटी । आत्मा धरिला असे कंठीं । ऐसें परीचि सीता गोरटी । देखे निजदृष्टी हनुमंतु ॥ ६१ ॥

कराळ विक्राळ दुष्टीनष्टी । भंवत्या राक्षसी कोट्यानुकोटी । सीतेसि त्यांचें भय नुठी । निर्भय पुष्टी श्रीरामें ॥ ६२ ॥

जंव नाठवे रघुनाथु । तंवचि भयाचा आवर्तु । श्रीराम आठवलिया हृदयांतु । भयभयार्थु निर्भय ॥ ६३ ॥

> राक्षसीर्वीक्षते नैषा नेमान्पुष्पफलद्रुमान् । एकस्थहृदया शंके राममेवानुपश्यति ॥ १२ ॥
> धारयत्यात्मनो देहं न शोकेनावसीदति । भर्ता नाम परं नार्याः शोभनं भूषणादपि ॥ १३ ॥

देखतां राक्षसी क्रूर दर्शन । सीता श्रीराम देखे संपूर्ण । वृक्ष वल्ली तृण पाषाण । देखे परिपूर्ण श्रीराम ॥ ६४ ॥

हृदयीं श्रीराम प्रतीती । तो राम देखे सर्वांभूतीं । भयामाजीं निर्भय प्राप्ती । सीतासती स्वयें भोगी ॥ ६५ ॥

श्रीराम देखतां सर्वभूतीं । सकळ भयां सद्य समाप्ती । भय तें होय ब्रह्ममूर्ती । सुखसंविति श्रीरामें ॥ ६६ ॥

भय पावलें अभयप्राप्ती । दुःख पावलें सुखसंविती । ऐसिया निष्ठा सीतासती । देखे मारुती स्वानंदें ॥ ६७ ॥

ऐसिया अनुभवासी जाण । श्रीरामनाम मुख्य साधन । नाम निरसी जन्ममरण । नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ ६८ ॥

अनुक्रमणिका

**नामापासीं विरक्ती** [वि. 'मुक्ति'.] **शांती । नामस्मरण परम भक्ती । नामापासीं** [वि. 'चारी'.] **भुक्ती मुक्ती । नाम निश्चिती परब्रह्म ॥ ६९ ॥**

**नामें दूषण होय भूषण । नामें पापी अति पावन । नाम स्मरल्या यमु ये शरण । नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ ७० ॥**
[ओवी ७० मुं. प्रतीत नाही.]

**नामापासीं नाहीं स्नानबंधन । नामापासीं विधी विधान । अबद्ध नाम अति पावन । नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ ७१ ॥**

**नामासीं नाहीं कर्मबंधन । विकल्प कर्मासी नाम साह्यपूर्ण । अच्युत नामें कर्म पावन । हें श्रुतिवचन श्रुत्यर्थे ॥ ७२ ॥**

**नामासीं नाहीं अनाध्यावो । नामापासीं नित्य स्वाध्यावो । नाम परब्रह्म स्वमेवो । नामीं निर्वाहो सभाग्य ॥ ७३ ॥**

**नाम चैतन्याचा** [तु. दै. 'चुडा'.] **मुडा । नाम परब्रह्माचा हुडा । ब्रह्म नाचे नामापुढां । लोळे गडबडा स्वानंदें ॥ ७४ ॥**

**स्त्रियांसी रामनामस्मरण । तें भूषणा निज भूषण । आहेवपणा अहेवपण । नामें पावन स्त्री** [तु. दै. कं. 'शूद्र'.] **शुद्ध ॥ ७५ ॥**

**स्त्रियांसी गळसरी कृष्णमणी । पुरुषांसी गळसरी नामस्मरणीं ।**
**तें तुटलीयां रांडवपणीं । काळक्रमणा करावी ॥ ७६ ॥**

**सीतेसी श्रीराम स्वधर्म । सीतेसी श्रीराम नित्यकर्म । सीतेसी भर्तार श्रीराम । राम परब्रह्म सीतेसी ॥ ७७ ॥**

**श्रीरामनामस्मरणें सीता । देहीं वर्ते विदेहता । भय न मानी लंकानाथा । हेंहि हनुमंता कळो सरलें ॥ ७८ ॥**

**श्रीरामनामें ते सीता पत्नी । भूषण भूषणीं शिरोमणी मानी । नामें निशंक अशोकवनीं । अनुदिनीं निर्द्वंद्व ॥ ७९ ॥**

**ऐसी देखोनि जनकबाळी । हनुमान भेटीसी तळमळी । क्रूरा राक्षसी** [तु. दै. 'कराळी'.] **कंकाळी । देखोनि जवळी** [वि. 'क्षोभला'.] **शंकला ॥ ८० ॥**

> रामस्य महिषी देवी लक्ष्मीर्नारायणस्य च । न शक्या प्रसभं द्रष्टुं राशसीसन्निधौ मया ॥ १४ ॥
> शंकेयुर्मा हि राक्षस्यः कार्यनाशस्ततो भवेत् । एता वा यद्यहं हन्मि ह्यदृष्ट्वा जनकात्मजाम् ॥ १५ ॥
> कार्यतत्त्वमविज्ञाय विक्रमो मे भवेद्वृथा ॥ १६ ॥

**जैसी नारायणाची रमा । तैसीच सीता श्रीरामा । तिची भेटी घेतां आम्हां । राक्षसी अधमा प्रतिबंदी ॥ ८१ ॥**

अनुक्रमणिका

यां देखतां भेटी घेवों जातां । या मज झोंबती [कं. 'सर्वथा'.] समस्ता । यांचिया मज करितां घातां । रावणु सीता वधील ॥ ८२ ॥

वधिलियां रामकांता । माझे कष्ट जाती वृथा । मियां मारिलिया लंकानाथा । सुख रघुनाथा उपजेना ॥ ८३ ॥

यालागीं आपण तत्वतां । जंव राक्षसी होती निद्रिस्ता । तंव वृक्षीं राहावें गुप्तता । एकांतीं सीता जंव भेटे ॥ ८४ ॥

ऐसे स्वयें विचारून । हनुमान वृक्षीं होय लीन । जेवीं कां चपळ पवन । होयें सुलीन आकाशीं ॥ ८५ ॥

जेवीं अभ्रामाजीं भास्वत । स्वयें असोनि अति गुप्त । तेवीं वृक्षामाजीं हनुमंत । सावचित्त गुप्तत्वें ॥ ८६ ॥

जेवीं आत्मा हृदया आंत । असोनि [तु. दै. 'नेणती'.] न देखती समस्त । तेवीं वृक्षीं हनुमंत । न दिसे व्यक्त कोणासी ॥ ८७ ॥

जेवीं वेदींचा वेदार्थु । असोनि कोणा नव्हे व्यक्तु । तेवी वृक्षीं हनुमंतु । अति गुप्त राहिला ॥ ८८ ॥

वृक्षीं लीन राहातां मारुती । जाली अरुणोदय प्राप्ती । गोवत्स दोहावा करिती । गोपी आरंभिती गोरंभणें ॥ ८९ ॥

वेदपाठकां वेदध्वनी । राजद्वारीं मंगल ध्वनी । ललित गंधर्व मधुर ध्वनी । जयजयकार ध्वनी देवद्वारीं ॥ ९० ॥

अग्निहोत्री होमाज्यगंध । उन्मत्त गजाचा मदगंध । शुद्ध सुमनाचा सुगंध । सुधूपगंध देवालयीं ॥ ९१ ॥

रुसली प्रिया काळिमाबुंथी । सांडूनि पीतांबर दे पती । तेवी अंधार त्यजुनी राती । दे गभस्ती [तु. 'प्रति प्रभा'; मुं. पै. 'प्रभा'.] पीत प्रभा ॥ ९२ ॥

जाहाली सूर्योदय प्राप्ती । व्यवहार पर त्रिजगतीं । निशाचर लीन होती । सुखसंभूती [कं. 'विचारा'; अं. 'निशाचरां'.] दिवांचरां ॥ ९३ ॥

हनुमानपि संहृष्टः सीतासंभाषणोत्सुकः । सूर्यास्तमानमाकांक्षः तस्थौ वृक्षांतरे स्थितः ॥ १७ ॥

हनुमंताचां निज चित्तीं । एकांतीं भेटावया सीतासती । अति शीघ्र होवावी राती । वृक्षांतरवर्ती तिष्ठतु ॥ ९४ ॥

ऐसें हनुमान धरितां चित्तीं । श्रीराम कार्याचें निज स्वार्थी ।
कपीसी भेटावया सीतासती । गेला गभस्ती अस्तमाना ॥ ९५ ॥

अनुक्रमणिका

जैसी शामसुंदर बाळी । लेईली मोतियांची जाळी । तैसिया नक्षत्रांच्या वोळी । नभोमंडळीं शोभती ॥ ९६ ॥

रात्री नव्हे ते सखी हनुमंता । भेटवावया श्रीरामकांता । दोघां संवाद गुप्त कथा । साधु एकांता आली असे ॥ ९७ ॥

भेटवावया सीता स्वामिणी । रात्री नव्हे ते सखी जननी । जानकीसंवाद पान्हा पाजुनी । समाधानी बैसवील ॥ ९८ ॥

संवाद पान्ह्याचे पुष्टीतुष्टी । अक्षया क्षयासी करील [तु. 'तुटी'.] भेटी ।
इंद्रजीताची पुरवूनी पाठी । राक्षस कोटी गांजील ॥ ९९ ॥

राती नव्हे ते महाकाळी । येऊनि हनुमंताजवळी । भेटवूनी जनकबाळी । [कं. मुं. अं. तं. 'करवील'.] करील होळी लंकेची ॥ १०० ॥

रात्री नव्हे हे सप्तशती । शुंभनिशुंभा केली समाप्ती । आतां येऊनि हनुमयाप्रती । करवील शांती राक्षसां ॥ १०१ ॥

रात्री नव्हे हे वनचामुंडा । धरुनि काळिमेच्या बळबंडा ।
छेदावया रावणाचिया मुंडा । कपी प्रचंडा भेटों आली ॥ १०२ ॥

रात्री नव्हे हे काळरात्री । ते प्रवेशोनियां कपींद्रीं । रिघोनि लंके पैं माझारीं । करी बोहरी राक्षसां ॥ १०३ ॥

ऐसी देखोनियां राती । आनंदें उल्हासे मारुती । पुढील कथेची अनुवृत्ती । सावध श्रोतीं परिसावी ॥ १०४ ॥

आली देखोनियां राती । रावणा आठवे सीतासती । जाहाली विरहज्वर प्राप्ती । सीता कामार्थी सकाम ॥ १०५ ॥

> दिव्यमालांबरधरो वैदेहीमनुचिंतयन् । भृशं नियुक्तस्तस्यां हि मदनेन मदोत्कटः ॥ १८ ॥
> न शशाकात्मनः काममागतं विनिगूहितुम् ॥ १९ ॥

वस्त्राभरणीं भूषितु । दिव्यचंदनागरु लिप्तु । सीता कामें लंकानाथु । पुष्पसेजे आंतु तळमळी ॥ १०६ ॥

जैसे कां खदिरांगार । तैसे लागे सुमन सेजार । नावडे गीतनृत्य संचार । नावडे मधुर रसपान ॥ १०७ ॥

नावडे भोगोपचार । नावडे स्त्रियांसी सेजार । सुमनमाळा पोळवी जिव्हार । चंदनें शरीर संतप्त होये ॥ १०८ ॥

जैसी देखिली स्वयंवरीं । तैसी आठवली सीतासुंदरी । सेंदुर चर्चितु भांगशिरीं । चांफेगोरी सुकुमार ॥ १०९ ॥

अनुक्रमणिका

**कमळनयन कमळवदन । ठाणमान गुण लक्षण । आठवतां घनस्तन । मूर्छापन्न रावणु ॥ ११० ॥**

**नावडे दुजयाचा संचार । नावडे वीणातंती मधुर । सीता झडपिला दशशिर । भूत संचार जानकी ॥ १११ ॥**

**सीता लागली महद्भुत । जिवें घेईल लंकानाथ । झाडणी भारणी न चले तेथ । सांडणी चित्तां मानीना ॥ ११२ ॥**

**आवरूं न सके निज चित्तां । सीता लागली तिहीं अवस्था । धीरु न धरवे लंकानाथा । सकामता विव्हळ ॥ ११३ ॥**

**सीताकामें कामातुर । त्यजिले स्त्री शय्या सेजार । अल्पही होता संचार । कोपे दुर्धर सेवकां ॥ ११४ ॥**

> ब्रह्यन्नध्ययनस्य नैष समयस्तूष्णीं बहिःस्थीयताम् । स्वल्पं जल्पबृहस्पते जडमते नैषा सभा वज्रिणः ॥ २० ॥
> बीणां संहर नारद प्रियतमालापैरलं तुंवर । सीतारल्लकभल्लभग्नहृदयः स्वस्थो न लंकेश्वरः ॥ २१ ॥

**ब्रह्मा वेदपाठें घडघडाट । पढतां नित्य शांतिपाठ । त्यासी वारिती राजभट । मौननिष्ठ राहा स्वामी ॥ ११५ ॥**

**दूत म्हणती ब्रहस्पती । वृथा बडबड करिसी किती । जल्पसी इंद्रसभेप्रती । तैसी वदंती न करावी ॥ ११६ ॥**

**नारदा वीणा आवरी । तुंबरा आलाप पुरे करी । रावणा स्वस्थ नाहीं शरीरीं । नाचणी दुरी दवडाव्या ॥ ११७ ॥**

**भाटीं गर्जावे ना बाहेरी । ब्रीदें पढावी ना कैवारी । उगें राहावें समग्रीं । रावणा शरीरीं अति व्यथा ॥ ११८ ॥**

**दूत ब्रह्मयातें नमस्कारिती । समयो नव्हे अध्ययनाप्रती । कोण व्यथा लंकापती । पुसे प्रजापती दूतांसी ॥ ११९ ॥**

**दूत म्हणती हे गुप्त मातु । प्रगट करुं नये लोकांआंतु । तुमचा समर्थ वचनार्थु । ऐका वृत्तांतु व्यथेचा ॥ १२० ॥**

**सीतेचा भांग** [तु. दै. 'देखोनी'.] **सेंदुरार्चितु । तोचि भाला धगधगितु । रुतला रावण हृदयांतु । तेणें अस्वस्थु लंकेशु ॥ १२१ ॥**

**जानकी कामें रावण भ्रांतु । सर्वथा नेणें निज स्वार्थु । हित सांगे त्या करी घातु । सीता सन्निपातु लंकेशा ॥ १२२ ॥**

**ब्रह्मवंशजु लंकानाथु । न सांगावा जानकी मुक्त्यर्थु । करूं धांवेल अनर्थु । सीता सन्निपातु रावणा ॥ १२३ ॥**

अनुक्रमणिका

ऐसिया सांगतां एकांत गोष्टी । अशोकवन सूनि दिठी । रावणु कामक्षोभें उठी । सीता गोरटी भोगावया ॥ १२४ ॥

च्यारी महिने [तु. क. मुं. अं. मु. दै. 'मियां'.] सीता । अशोकवनीं ठेविली वृथा । बळेंचि भोगीन मी आतां । [दै. 'म्हणोनी'.] सकामता ऊठिला ॥ १२५ ॥

> अशोकवनिकामेव विवेश बलवाहनः । अंगनाशतसंयुक्तो रावणः काममोहितः ॥ २२ ॥
> क्षीबो विचित्राभरणः शंकुकर्णो महाबलः । जगाम मदनोन्मत्तो दशग्रीवोऽतिविव्हलः ॥ २३ ॥
> दीपिकाभिरनेकाभिः समन्तादवभासितम् । गंधतैलावसिक्ताभिर्ध्रियमाणाभिरग्रतः ॥ २४ ॥
> द्वारदेशमनुप्राप्तं ददर्श हनुमान्कपिः ॥ २५ ॥

कामोन्मत्त लंकापती । सवें योषिता शतानुशती । सुवर्णदीपिका हातीं । तैलाभिषिक्ती सुगंधा ॥ १२६ ॥

कनकदंडयुक्त माणिकी । शशांक छत्र धरिती एकी । विडिया देती अनेकी । चवरें अनेकी ढाळिती ॥ १२७ ॥

कासे पाटोळा नीळांबर । त्यावरी कटिसूत्र कटार । किंकिणी ज्वाळमाळा विचित्र । ब्रह्मसूत्र सांगद ॥ १२८ ॥

मुकुटकुंडलें अलंकार । मणि मुक्तमाळा सुनीळ हार । वांकी आंदुवाचे गजर । चरणीं तोडर ब्रीदांचें ॥ १२९ ॥

सुगंध चंदनाची उटी । पदकें शोभती दशकंठीं । स्वर्ग आसडूनि मुष्टी । सीतासंदृष्टी चालिला ॥ १३० ॥

चालिला अशोकवनाप्रती । सवें स्त्रिया नेणों किती । एकी दीपिका दाखविती । बीळ ये म्हणती पैं एकीं ॥ १३१ ॥

दडपती द्राक्षीचीं आळीं । खचती नाववेलिचिया पाळी । खुंदळतील सोनकेळी । वरिला पौळी चालिला ॥ १३२ ॥

देखोनी बनकराची वाट । स्त्रियां चालतां घडघडाट । वाळोनी वृक्ष होती सपाट । स्पर्श दुष्ट स्त्रियांचा ॥ १३३ ॥

स्त्रियांचिया स्पर्शांचळी । वाटिका वाळती समूळी । वृक्ष झडती फळीं फुलीं । वरिला पौळी चालिला ॥ १३४ ॥

दीपिका तेजाचां कडाडी । वृक्षा होईल फळपानझडी । अमृतवल्ली तडातोडी । रोपें रोकडीं वाळतील ॥ १३५ ॥
स्त्री आघातें मोडती चापे । मळती हेमकमळिणी वाफे । वरिला पौळीचेनि साटोपें । सीतासमीपे तो आला ॥

अनुक्रमणिका

१३६ ॥

रावणु येतां सीतेप्रती । कोपु हनुमंताचे चित्तीं । वृक्षीं सरसावला मारुती । लंकापती धुमसावया ॥ १३७ ॥

रावणु झोंबतां सीतेसी । बोंब नेतां रामापासीं । सांगों जातां सुग्रीवासी । लागेल मसी पुरुषार्थ ॥ १३८ ॥

हेंचि वानरां सांगों जातां । म्हणती हनुमान नपुंसकता । घायें मारीन लंकानाथा । न पुसतां श्रीरामा ॥ १३९ ॥

मज देखतां श्रीरामभाजा । गांजुं जातां राक्षसराजा । दाही शिरें वीस भुजा । घायें पूजा करीन ॥ १४० ॥

आधींच न करावा घातु । सीतेपासी लंकानाथु । कैसा कैसा [मु. 'बोली बोलत'.] चालिला मातु । तो वृत्तांतु ऐकोपां ॥ १४१ ॥

सीता अनुसरेल रावणासी । हें न घडे कदा काळेसी । जरी हा भोगील बळेसी । तरी मी यासी धुमसीन ॥ १४२ ॥

पानोन्मत्त धनोन्मत्त । राजोन्मत्त बलोन्मत्त । ज्ञानगर्वें ज्ञानोन्मत्त । पंचोन्मत्त रावण ॥ १४३ ॥

पंचोन्मत्त अति उन्मत्त । यालागीं त्यातें क्षीब म्हणत । सीताकामें अति भ्रांत । भ्रमोन्मत्त रावणु ॥ १४४ ॥

यापरि अशोकयनां आंतु । लंकानाथु आणि हनुमंतु । साधु पाहाती निजस्वार्थु । तोचि कथार्थु अवधारा ॥ १४५ ॥

एका जनार्दना शरण । रामें गोड रामायण । त्याहीमाजीं हनुमंतकथन । सावधान अवधारा ॥ १४६ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणअशोकवनआगमनं नाम सप्तमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग आठवा

## सीता रावण संभाषण

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**पूर्वप्रसंग संपतां येथ । रावण पंचोन्मत्तें उन्मत्त । येऊनि अशोकवनांत । सीता पाहात भोगेच्छा ॥ १ ॥**

तस्मिन्नेव ततः काले राजपुत्री त्वनिंदिता । मलसंदिग्धसर्वाङ्गी आसीना धरणीतले ॥ १ ॥
सा तं दृष्ट्वा च वैदेही रावणं राक्षसेश्वरम् । प्रावेपत वरारोहा कदलीवानिलाहता ॥ २ ॥
प्रच्छाद्योदरमूरुभ्यां बाहुभ्यां च पयोधरौ । आच्छादयन्ती सव्रीडा पीतस्यांतेन वाससा ॥ ३ ॥

**रावणें कैसी देखिली सीता । कंपायमान अति भयार्ता । जेवीं कर्दळी वायु आघाता । श्रीरामकांता तेवीं कांपे ॥ २ ॥**

**देखोनियां दशानन । ऊरु उदर बाहु** [पै. 'बाहुभूषण'.] **स्थान । पीतांबर अति जीर्ण । तेणेंचि आपण आच्छादी ॥ ३ ॥**

**पीतांबर अती जीर्ण । तेणें अवयव आच्छादून । जानकी अति लज्जायमान । अधोवदन राहिली ॥ ४ ॥**

**नाहीं अभ्यंगु नाहीं स्नान । सर्वांग मळींमळ क्लिन्न । नाहीं आस्तरण आच्छादन । नाहीं आसन बैसावया ॥ ५ ॥**

**सीता धरणिजा आपण ।** [तु. 'धरा आपण'.] **धरासनें सुखसंपन्न । बैसली असे सावधान । लज्जायमान दशवक्त्रा ॥ ६ ॥**

**धनलोहें खतली असे । तीमाजीं निजनिधान वसे । सीता बाह्य समळ भासे । अंतरीं वसे श्रीरामु ॥ ७ ॥**

**सीता बाह्य भासें भयखिन्न । अंतरीं निःशंक सावधान । हें नेणोनी दशानन । करी प्रार्थना भोगार्थ ॥ ८ ॥**

सांत्वयन्मधुरैर्वाक्यैन्र्यदर्शयत रावणः । मां दृष्ट्वा नागनासोरु गूहमाना स्तनोदरम् ॥ ४ ॥
अदर्शनमिवात्मानं भयान्नेतुं त्वमिच्छसि । रमेयं त्वां विशालाक्षी पतिं मन्यस्व मां प्रिये ॥ ५ ॥
त्वां समासाद्य चार्वंगीं रूपयौवनशालिनीम् । कःपुमान्नाभिवर्तेत साक्षादपि पितामहः ॥ ६ ॥
भव मैथिलि भार्या मे राममोहं विसर्जथ । बळीनामुत्तमस्त्रीणां ममाग्रमहिषी भव ॥ ७ ॥

**स्वमुखें रावण म्हणे सीते । भयभेवों नको प्रियकांते ।**
**मज देखोनी निजांगातें । वृथां आपणयातें गुप्त कां करिसी ॥ ९ ॥**

**मी प्रार्थितों दशानन । मज त्वां होआवें सुप्रसन्न । सकळ लज्जा त्वां सांडून । सुखसंपन्न रम मजसी ॥ १० ॥**

अनुक्रमणिका

सांडी श्रीरामाची आस । हे घे माझी सत्यभाष । मज तुज जाहालियां शेष । भोगीं [तु. दै. 'विशेष मजसी'.] अशेष निज राज्य ॥ ११ ॥

ऐंशी सहस्त्र माझ्या नारी । मुख्य जे को मंदोदरी । तुझी करीन [तु. दे. मु. 'किंकरी'.] फुलधरी । अवघियावरी तूं पट्टराणी ॥ १२ ॥

इंद्रादिक देव समग्र । तुझे करीन किंकर । मीहि होईन आज्ञाधर । साक्षी शंकर प्रमाण ॥ १३ ॥

स्वर्ग मृत्यु पाताळाची । संपत्ती आणिळी त्रिभुवनिची । तेहि अर्पीन तुज साची । घे आमची [कं. मुं. 'सत्य भाष'.] निज भाक ॥ १४ ॥

सवेग मलिनांबरें फेडी । माझी दिव्यांबरें वेढी । सांडुनि श्रीरामाची वोढी । भोगी [मुं. कं. मुं. 'आवडी'.] पां गोडी तूं माझी ॥ १५ ॥

मस्तक दिसताहे मळीन । करी जवादि मंगळस्नान । तुज मी चर्चीन चंदन । तुझें तनमन निववावया ॥ १६ ॥

रत्नजडित अळंकार । फरा कुंडलें पदकहार । कंकणें बाहुवटें मनोहर । अर्द्धचंद्र रत्नांक ॥ १७ ॥

सहिंत किंकणी ज्वाळमाळा । कटीं विराजे कटिमेखळा । वांकी आंदुवांच्या खळाळा । कळिकाळा भेवों नको ॥ १८ ॥

तुझें देखोनि रूप यौवन । ब्रह्मा पडे मूर्च्छापन्न । माझें उतावीळ मन । दे आलिंगन जानकीये ॥ १९ ॥

[तु. 'न मनीं शेषांचे महिमान'; दै. 'त्रिलोंकी अजिंक्य जाण'.] त्रिदशां न खालवी मान । तो मी येतों लोटांगण । तुझे धरितों वो चरण । पाणिग्रहण करी [कं. 'माझें'.] सीते ॥ २० ॥

कुंभकर्ण दारवंठेकार । इंद्रजीत करीन फुलधर । अखयादि समग्र कुमर । करीन [तु. दै. 'सेवेतत्पर'.] किंकर नित्य अंकित ॥ २१ ॥

मंदोदरी स्वयें आपण । नित्य करील चरणक्षाळण । मी करीन चरणसंवाहन । अंग स्पर्शन [दे. 'सुखस्वार्थ'.] सुखार्थ ॥ २२ ॥

तुझा अंगस्पर्श सहज । घडावया भाग्य कैंचे मज । माझी सांडूनियां लाज । भोगी निर्लज्ज भोगु माझे ॥ २३ ॥

सिद्ध कामग विमान । दोघे एकत्र बैसोन । चैत्रवन नंदनवन । अशोकवन क्रीडेसी ॥ २४ ॥ [ओवी २४ कं. मुं. अं. प्रतींत नाही.]

सांडूनिया श्रीरामचंद्र । माझा करी अंगिकार । रामु बापुडें कोण किंकर । मजसमोर यावया ॥ २५ ॥

अनुक्रमणिका

किं करिष्यसि रामेण सुभद्रे चीरवाससा । निक्षिप्तविजयी रामो गतश्रीर्वनगोचरः ॥ ८ ॥
जटीं स्थंडिलशायी च शंके जीवति वा न वा । न च वैदेहि रामस्त्वां श्रोतुमप्युपलप्स्यते ॥ ९ ॥
न चापि मम हस्तात्त्वां प्राप्तुमर्हति राघवः । न रामस्तपसा सीते न बलेन च पराक्रमैः ॥ १० ॥
न धनेन मया तुल्यस्तेजसा यशसाऽपि वा । पिव विहर रमस्व भुंक्ष्व भोगान्धनानि च ॥ ११ ॥

**राम बापुडे तें किती । तूं कां त्याची करिसी खंती । ऐक त्या रामाची स्थितिगती । ते मी तुजप्रती सांगेन ॥ २६ ॥**

**वनवासी अचीरवासी । अन्नेंवीण उपवासी । काय तूं त्यातें भोगिसी । भोगी मजपासीं विविध भोग ॥ २७ ॥**

**जटाधारी बीभत्सवेषी । प्रेतप्राय भूमि शयनेसीं । तूं काय त्यातें भोगिसी । भोगी मजपासीं विविध भोग ॥ २८ ॥** [ओवी २८ मु. वि. प्रतींत नाही.]

**गतविजयो श्रीरामचंद्र । गतश्री वनगोचर । त्यासी तूं काय भोगिसी सुंदर । भोगी निरंतर भोग माझे ॥ २९ ॥**

**रामासी नाहीं** [मु. 'शौर्य'.] **तपसाटोप । स्त्री हरविली अल्पतप । नाहीं पराक्रम प्रताप । धैर्यहि स्वल्प श्रीरामा ॥ ३० ॥**

**धैर्यें रामु निधडा असतां । तरी कां स्त्रीलागीं रडता पडता । झाडोपाडीं कां खेंव देता । सीता सीता म्हणोनी ॥ ३१ ॥**

**नाहीं धैर्य मजसमान । नाहीं मजसीं समानधन । राम सर्वदा निर्धन । हीन दीन श्रीरामु ॥ ३२ ॥**

**नाहीं राज्य मजसमान । नाही समान सेना सैन्य । न चले मजसीं अंगवण । हीन दीन श्रीराम ॥ ३३ ॥**

**नाहीं यश मजसमान । स्त्री हरविली अपेश गहन । वनोपवनीं करी रुदन । हीन दीन श्रीराम ॥ ३४ ॥**

**श्रीरामाची कथावार्ता । तुज मी ऐको नेदी सर्वथा । मजपासुनी न सुटसी आतां । केवीं रघुनाथा पावसी ॥ ३५ ॥**

**व्यर्थ जातें तुझें यौवन । सेजे भोगी दशानन । ते तवं नये वो परतोन । सुखसंपन्न** [तु. दै. 'उभयतांसी'.] **तूं होसी ॥ ३६ ॥**

**परदारा स्वयें भोगितां । पाप लागेल लंकानाथा । राक्षसांची स्वधर्मता । ऐक आतां जानकीये ॥ ३७ ॥**

**आम्ही हरुनि परनारी । बळेंचि भोगाव्या पैं घरीं ।** [तु. दै. 'परम ज्याची'.] **परराज्याची जे जे थोरी । बळेंचि करीं हरावी ॥ ३८ ॥**

अनुक्रमणिका

**दैवदैत्य दानव मानव । बळें विभांडूनि सर्व । स्त्रियादि अपूर्व वैभव । आम्ही स्वयमेव भोगावें ॥ ३९ ॥**

**आग्रहो सांडूनि आपुला । सीते ऐक माझिया बोला । राम अतिदुःखें निमाला । प्राण दीधला लक्ष्मणें ॥ ४० ॥**

**रामलक्ष्मण आहे कीं नाहीं । हा संदेहो फिटला पाही । सुखें अनुसर माझां ठाईं । म्हणोनि पायीं लागला ॥ ४१ ॥**

**तुझी भीड म्यां धरिली भारी । राखिलीसी षण्मासावरी । आतां भोगीन बळात्कारीं । अंगिकारी मज सीते ॥ ४२ ॥**

**आणा पालखी धरा छत्र । सीतेनें वरिला दशवक्त्र । निशाणें त्राहाटा रे सर्वत्र । करा गजर वाद्यांचा ॥ ४३ ॥**

**ऐसें रावणाचें वचन । सीता सांडी हेळसून । गजापासीं भुंके श्वान । दशानन तेविं भुंके ॥ ४४ ॥**

**देखोनि उत्तम पक्वान्न । स्वयें वसवसिजे श्वान । रावण दहा तोंडाचें शुन । सीतेकारणें वसवसी ॥ ४५ ॥**

**देखोनि दहिभाताचा गोळा । झडपूं धांवें जेविं कावळा । तेविं देखोनि जनकबाळा । रावणु काळा डोंबकागु ॥ ४६ ॥**

> तस्य तद्वचनं श्रुत्वा तदा रौद्रस्य रक्षसः । संचिन्त्य रामं वैदेही पतिमेव पतिव्रता ॥ १२ ॥
> तृणमंतरतः कृत्वा प्रत्युवाच सुविस्मिता । निवर्तय मनो मत्तः स्वजने क्रियतां मनः ॥ १३ ॥
> न मां प्रापयितुं शक्तस्त्वं सिद्धिमिव पापकृत् । अकार्यं न मया कार्यमेकपत्न्या विगर्हितम् ॥ १४ ॥
> एवमुक्त्वा तु वैदेही रावण तं तपस्विनी । राक्षसं पुष्ठतः कृत्वा भूयो वचनमब्रवीत् ॥ १५ ॥
> यथा तव तथाऽन्येषां रक्ष्या दारा निशाचर । आत्मानमुपमां कृत्वा स्वेषु दारेषु रम्यताम् ॥ १६ ॥

**रावणा देखोनियां सीता । अल्पहि भय न बाधी चित्तां । बैसली असे निःशंकता । श्रीरघुनाथाचेनि** [तु. 'प्रेमें'.] **नेटें ॥ ४७ ॥**

**सीता पतिव्रता आपण । सबाह्य श्रीरामें परिपूर्ण । हें स्मरणेविणा नित्य स्मरण । मानी रावण तृणप्राय ॥ ४८ ॥**

**ऐकोनी रावणवचन । प्रलोभयुक्त समाधान । साधु पुढें भुंके श्वान । तत्समान मानी सीता ॥ ४९ ॥**

**जेवीं दहातोंडाचें घुबड । तैसी रावणाची बडबड । ते सीतेसी न लगे गोड । तद्विधि चाड अपवित्रत्वें ॥ ५० ॥**

**आमिषालागीं तळपे मासा । परदारा भोगीं रावणु तैसा । श्रीरामबाणाचा पडेल फांसा । हें लंकेशा लक्षेना ॥ ५१ ॥**

अनुक्रमणिका

कामुसर्प लागला रावणासीं । कडू परदारा गोड त्यासीं । लहरी येतां रामबाणेसीं । क्षणार्द्धेसीं निमेल ॥ ५२ ॥

असो हें सावधान सीता । लोकलज्जेच्या लौकिकार्था । आडकाडी धरुनि हातां । लंकानाथा शिकवीत ॥ ५३ ॥

जन्मोनि ब्रह्मयाचां वंशीं । रावणा भाग्यें वेद विभागिसी । तो तूं परदारा अभिलाषिसी । वृथा मरसी अधर्में ॥ ५४ ॥

जेवीं अशुचि विकल्पवंतां । ऋद्धि सिद्धि न ये हातां । तेवीं मी सती श्रीरामकांता । तुज लंकानाथा [मु. 'अपवित्रा'.] अभोग्य ॥ ५५ ॥

[मु. 'साळी भोज्य'.] साळी फोडी त्या शुकासीं । सांडूनि जातां नारळीसी । तें फळ भक्षूं जातां त्यासी । चंचुभंगेसी तळमळी ॥ ५६ ॥

तेवीं त्यजूनि स्वदारा । भोगूं जातां परदारा । दुःखी होसील दशशिरा । बाण धारां श्रीरामें ॥ ५७ ॥

तुझ्याचि स्त्रिया लंकानाथा । स्वेच्छें परपुरुषीं रमतां ।
त्यांची तुज न माने पवित्रता । दोहींच्या घातां तूं करिसी ॥ ५८ ॥

तेंवीं मी श्रीरामाची कांता । तुजसी बोलणें अपवित्रता । कायसी अंगसंगाची कथा । मरसी वृथा अभिलाषें ॥ ५९ ॥

आत्मौपम्येन सर्वत्र । जो पाहे तो ज्ञाता नर । जैसी रक्षावी स्वदार । तेंवी परदार संरक्षी ॥ ६० ॥

म्हणसी श्रीराम [मु. 'जरी'.] तंव दूरी । परी तो मज तुज माझारीं । नांदतांहे निरंतरीं । त्यासी चोरी चालेना ॥ ६१ ॥

भोयीभेणें जो पळों जाये । जिकडे पळे तिकडे भोये । तैसाचि श्रीरामु पैं पाहे । सबाह्य आहे परिपूर्ण ॥ ६२ ॥

त्यासी न चले चोरीमारी । त्याची भोगितां पैं नारी । घसा निमटील सेजेवरी । संसारीं उरी उरों नेदि ॥ ६३ ॥

मजपासूनि न सुटे सीता । ऐसें वदलासि तूं वृथा । रामें गिळिलासि लंकानाथा । सबाह्यता निवटूनी ॥ ६४ ॥

जोचि भोगु स्वदारेसीं । तोचि भोगु परदारेसीं । एकें पाविजे स्वधर्मासी । एकें नरकासी जाइजे ॥ ६५ ॥

जो भोग सूकरा सूकरीसी । तो भोगु इंद्रा उर्वशीसी । भोगसमता सर्वांसी । परदारेपासीं अधःपातु ॥ ६६ ॥

अनुक्रमणिका

हित सांगते दशशिरा । सुखें भोगावी स्वदारा । मज अर्पावें श्रीरामचंद्रा । कुळगोत्र रक्षणार्थ ॥ ६७ ॥

परदारा ते तव माता । सकळ संमत वेदशास्त्रार्थां । मातृगामी परदारा भोंक्ता । अधःपाता जासील ॥ ६८ ॥

ऐसें बोलोनि सीता सुंदरी । रावणु महापापी भारी । त्याचें मुखावलोकन न करी । झाली पाठमोरी जानकी ॥ ६९ ॥

सीता होतांचि विमुख । रावणा झालें परम दुःख । क्रोधलोभु सांत्वनपूर्वक । दशमुख अनुवादें ॥ ७० ॥

> सीतायास्तद्वचः श्रुत्वा परुषं राक्षसेश्वरः । प्रत्युवाच ततः सीतां विप्रियं प्रियदर्शनाम् ॥ १७ ॥
> भाषसे परुषाण्येव विश्रब्धं गतसाध्वसा । न युक्तं परुषं वक्तुमीश्वरे ह्यप्रियाणि च ॥ १८ ॥
> ममांय चावमानोऽयं प्रभविष्णोर्विशेषतः । यादृशोऽयं मम क्रोधो यथा च त्वमवस्थिता ॥ १९ ॥
> वधाय विसृजेयं त्वां स्त्रीभावेनाभिसार्यते । सन्नियच्छति मे क्रोधं त्वयि कामः समुच्छ्रितः ॥ २० ॥

ऐकोनि सीतेचें दुष्टवचन । क्रोधाविष्ट दशानन । सर्वांगें कंपायमान । काय आपण बोलतु ॥ ७१ ॥

मी तंव स्वयें राक्षसराजा । देवदानव माझ्या प्रजा । दुष्टवचनें अपमानु माझा । श्रीराम [वि. ‘माझा’.] भाजा तूं वदसी ॥ ७२ ॥

मज रावणा देखतां दृष्टी । देवदानव कांपती पोटीं । तूं तवं धीट आहेस मोठी । वदसी गोष्टी अपमानें ॥ ७३ ॥

माझिया स्त्रीपुत्रादेखतां । मज निर्भर्त्सिलें लंकानाथा । तुझ्या करावें म्यां घाता । तरी स्त्री वधितां निषिद्ध ॥ ७४ ॥

तुझिया अंगसंगाचे प्रीती । कामक्रोधाची [मुं. ‘करूनी’; मु. ‘करीन’; तु. दै. वि. ‘करी’.] केली शांती । तुझी मज अति आसक्ती । वधू तदर्थीं करवेना ॥ ७५ ॥

सेखि तूं न देसी अंगसंग । तुझा करीन अंगभंग । [तु. वि. कं. मुं. दै. अं. ‘वेगवेगळे’; मु. ‘वेगवेगळाले’.] वेगळे करीन विभाग । तुझें सर्वांग छेदीन ॥ ७६ ॥

वानीसी श्रीरामाची शक्ती । ते तंव मनुष्य बापुडें किती । केंवीं येईल लंकेप्रती । विचारु चित्तीं न करिसी ॥ ७७ ॥

सीता नेली मियां लंकेसी । कोण सांगेल रामापासीं । दुर्घट मार्गु न कंठे त्यासी । समुद्रासी काय करिल ॥ ७८ ॥

श्रीराम बापुडें चरणचाली । सीता विरहें भुलले भुली । अगाध समुद्राची खोली । उतरवली केंवि जाय ॥ ७९ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम राक्षसां भातुकें । तो मी भक्षीन [पै. तु. दै. मुं. कं. अं. तं. 'हाततुकें'.] महाकौतुकें । लक्ष्मण गिळीन चुळोदकें । यथासुखें मज भज ॥ ८० ॥

सीतेसी श्रीरामसंगती । कदा न घडे कल्पांतीं । मज अनुसरे अनन्य [तु. दै. 'गती'.] प्रीती । सांडी आसक्ति रामाची ॥ ८१ ॥

पित्यानें घातला दवडून । राज्यहीन स्वधर्महीन । नाहीं अन्न नाहीं धन । अति दीन श्रीरामु ॥ ८२ ॥

नित्य तृणाचें शयन । मुखीं घालावया नाहीं पान । वनवासीं न मिळे अन्न । अति दीन श्रीरामु ॥ ८३ ॥ [ओवी ८३ वि. प्रतीत नाही.]

नाहीं वस्त्र नाहीं भूषण । नाहीं अभ्यंग मर्दन । जटा वल्कलें परिधान । अति दीन श्रीरामु ॥ ८४ ॥ [ओवी ८४ कं. प्रतीत नाही.]

श्रीरामासी बळ असतें । तरी कां वनीं रडत राहातें । तयासी न येववें येथें । राम निश्चितें अति दीन ॥ ८५ ॥

मजसमान नाहीं बळ । मजसमान नाहीं दळ । मजसी न करवे सळ । राम केवळ अति दीन ॥ ८६ ॥

वसोनियां वनवासीं । झुंजावया राक्षसांसीं । रामें मेळविलें वानरांसी । तेही आम्हांसी निजभक्ष ॥ ८७ ॥

श्रीराम होऊनी वनचंर । वनीं मेळविले वानर । त्यातें गिळिती निशाचर । भक्ष साचार ते आम्हां ॥ ८८ ॥

> भवित्री रंभोरु त्रिदशवदनग्लानिरधुना । स ते रामः स्थाता न युधि पुरतो लक्ष्मणसखः ।
> इयं यास्यत्युच्चैर्विपदमधुना वानरचमूर्लधिष्ठेदं षष्ठाक्षरविपरिलोपात्पठ पुनः ॥ २१ ॥

रावणु सांगे साक्षेपूनी । मृषा भाष्य [मु. 'उमरू पुराणीं'; पै. अं. मुं. तं. 'उमर'.] अमरपुराणीं । जें भाष्य म्यां ऐकिलें कानीं । सीते सावधानी अवधारी ॥ ८९ ॥

रंभास्तंभगर्भसुकुमारु । त्याहूनि अरुवार तुझ्या ऊरु । यालागीं बोलिजे रुंभोरु । श्लोकार्थ सधरु अवधारी ॥ ९० ॥

त्रिदशवदन जे कां देव । थोर आपत्ती पावती सर्व । माझां रंगी भंगेल राघव । विमुख स्वयमेव लक्ष्मणेसीं ॥ ९१ ॥

माझियां रणकंदना आंत । रणीं भंगलियां रघुनाथ । वानर होती हताहत । राक्षस समस्त भक्षिती त्यांतें ॥ ९२ ॥

सीता [तु. 'सती'; दै. 'सरसावोनी'.] संज्ञान बोले सुंदर । रावणा श्लोक हा साचार । लोपुनी [कं. मुं. तं. दै. मु. 'तीन सप्त अक्षर'.] तिन्हीं समाक्षर । करी पां उच्चार श्लोकाचा ॥ ९३ ॥
रावणा तूं अति लघिष्ट । मुर्खत्वें वाहासी दशकंठ । सातवें अक्षर लोपुनी स्पष्ट । वाची घडघडाट श्लोकार्थु

अनुक्रमणिका

॥ ९४ ॥

ऐके निज भाष्य लंकानाथा । असत्य न वदे वाग्देवता । श्लोकीचिया भविष्यार्था । सावधानता अवधारी ॥ ९५ ॥

भविष्यार्थ अति गहन । ग्लानी पावेल दशवदन । रणीं विजयी रघुनंदन । सखा लक्ष्मण समवेत ॥ ९६ ॥

वानरसेना आघवी । उंचावेल विजयगौरवीं । रावणा निर्दाळूनि राघवीं । रामराज्य [तु. 'पावे'; दै. 'पाही'.] पदवी तिहीं लोकीं ॥ ९७ ॥

सीतेनें अर्थितां श्लोकार्थु । कोपें तिचा करावया घातु । रावणें उचलितां हातु । वृक्षीं हनुमंतु खवळला ॥ ९८ ॥

रावणें उचलितां हात । सीता निर्भर्त्सी लंकानाथ । कामोन्मत्त गर्वोन्मत्त । मरणोन्मत्त झालासी ॥ ९९ ॥

उवाचात्महितं वाक्यं वृत्तसौंदर्यगर्विता । तस्य राक्षसराजस्य सीता न ममृषे वचः ॥ २२ ॥

कोपला देखोनि लंकानाथ । सीता मशकप्राय मानित । श्रीराम स्मरणें अति समर्थ । निःशंक नित्यजानकी ॥ १०० ॥

दुःखदायक रावणवचन । तेणें डळमळिना सीतेचें मन । अखंड धारा वर्षतां घन । जेविं कां [दै. 'पर्वत ढळेना'.] गगन तिबेंना ॥ १०१ ॥

रावणाचें वचन लाघवें । मानी मृगजळाचे हेलावे । त्याची झाडावया गर्वपर्वे । निजानुभवें बोलतु ॥ १०२ ॥

सीतेचें वचन निज गुह्यार्थ । स्वहित आणिक [दै. तु. 'परमार्थ'] परहित । दोहीं अर्थी अति समर्थ । शुद्ध शब्दार्थ अनुवादे ॥ १०३ ॥

जेविं का शुद्ध पुण्य कीर्ती । तीसी नातळे अपकीर्ती । तेविं रावणाची दुष्ट दुरुक्ती । सीतासती स्पर्शेना ॥ १०४ ॥

देवदानव सेवा करिती । लंकाराज्य [दै. तु. 'ऐसी'.] यश कीर्ती । यावरी जोडिली अपकीर्ती । सीतासती चोरुनी ॥ १०५ ॥

शिवाचा सेवकु प्रसिद्धु । कुबेराचा [वि. 'धाकटा'.] सखा बंधु । चोरितां श्रीरामाची वधु । पापबद्धु जालासी ॥ १०६ ॥

चोरी करुनि लंकानाथा । पळों पाहासी तूं केउता । श्रीराम बाणाच्या आघाता । कोण तुज आतां राखील ॥ १०७ ॥

अनुक्रमणिका

धाता पिता सोम सविता । अनळ अनिळु यमु विधाता । कोपलियां रघुनाथा । हेहि सर्वथा न राखिती ॥ १०८ ॥

[कं. 'भेणें'.] लपों जातां शिवपुरीं । शिवु मारील त्रिशुळें करीं ।
माझिया स्वामीची चोरिली नारी । प्रत्यक्ष वैरी तूं माझा ॥ १०९ ॥

श्रीरामकांता जगज्ञननी । विशेष माझी ते गुरुपत्नी । कां चोरिली अभिलाषूनी । तृतीय नयनीं जाळील ॥ ११० ॥

यापरि गा लंकानाथा । चोरिलिया श्रीरामाची कांता । कोण्ही नाहीं राखिता । तूं तत्वतां मरसील ॥ १११ ॥

म्हणसी मज आहे दळबळ । श्रीराम एकाकी निर्बळ । श्रीरामाचें प्रबळ बळ । ऐक प्रांजळ सांगेन ॥ ११२ ॥

ताटिका मारिली आणि सुबाहु । मरीचि मारिला त्याचा भाऊ ।
विरोधु करितां गर्व बहु । रणगौरव बाणें येकें ॥ ११३ ॥

एकलेनि एके रामें जाण । चौदा सहस्त्र राक्षसगण । त्रिशिरा मारिले खर दूषण । रणकंदन जनस्थानीं ॥ ११४ ॥ [ओवी ११४ वि. कं. मुं. तं. मु. या प्रतीत नाही.]

स्वयंवरीं वाहतां हरकोदंड । तुझें झालें काळें तोंड । तऱ्ही वानिसी बळबंड । तू तंव लंड निर्लज्ञत्वें ॥ ११५ ॥

लाज नाहीं तुज लागुनी । शूर्पनखा सखी बहिणी । तिचे नाक कान कापुनी । विटंबूनी धाडिली ॥ ११६ ॥

तुज येतां तिचे कैवारी । प्रथम झालासी भिकारी । चोरुनी श्रीराम अंतौरी । भयें करी पळालासी ॥ ११७ ॥

मुख न दाखवितां रामासीं । बाणभयें पळालासी । धाकें लंकेमाजी लपसी । आणिक जल्पसी वांटिवा ॥ ११८ ॥

जटायूसी करितां रण । मज देखतां आपण । दांतीं तुवां धरिलें तृण । काय आंगवण वानिसी ॥ ११९ ॥

सीता निर्भर्त्सितां लंकानाथु । हनुमान हांसे वृक्षाआंतु । देखोनि जानकी पुरुषार्थु । अति विस्मितु वानरु ॥ १२० ॥

त्रिशिरा मारुनि खर दूषण । दोघे भाऊ स्वयें बैसोन । वांटा केला आपणा आपण । सावधान अवधारी ॥ १२१ ॥

जेष्ठ वांटा श्रीराम द्विगुण । रावण आणि कुंभकर्ण । कनिष्ठ वांटा लक्ष्मण । इंद्रजीत [तु. दै. 'प्राण.'] जाण एकाकी ॥ १२२ ॥

उद्बट वीर वांटिवेसी । वांटा दीधला हनुमंतासी । शिष्टाई [कं. 'नेमिली'.] संधी अंगदासी । नळनीळासी सेतुबंध ॥ १२३ ॥

येर समग्र सैन्यासीं । श्रीरामें दिधलें सुग्रीवासीं । वीरवृत्ती विभागेसी । वानरांसी समजावी ॥ १२४ ॥

श्रीरामु स्वयें सच्चिद्घन । त्यासी तूं म्हणसी अति दीन । श्रीरामाचें निज महिमान । सावधानें अवधारी ॥ १२५ ॥

श्रीरामनाम नित्य स्मरणीं । शिवु वंदी पायवणी । ब्रह्मा [तु. दै 'जातो'.] घाली लोटांगणी । देवशिरोमणि श्रीराम ॥ १२६ ॥

एकांतीं बैसोनि चंद्रचूडें । नित्य श्रीरामनाम पढें । त्यातें निंदिजे तुवां मूढें । मरण रोकडें तुज आलें ॥ १२७ ॥

जो जाण श्रीरामनिंदा करी शिवु साक्षेपें त्यातें मारी । आपुला स्वामि तुवां केला वैरी । मूर्ख संसारीं तूं एकु ॥ १२८ ॥

श्रीरामु निंदितांचि जाणा । जिव्हा झडेल रावणा । होसील नरकाचा पाहुणा । आणि आंदणा महादुःखां ॥ १२९ ॥

निंदितां ऐकोनि रघुनंदन । सीता जाहाली कोपायमान । रावणा [तु. कं. दै. अं. 'तुज'.] तुझें भस्म करीन । अर्ध क्षण न लागतां ॥ १३० ॥

बळेंचि भोगीन म्हणसी सीता । आणि निंदीसी रघुनाथा ।
तुज मी भस्म करीन आतां । क्षणु न लागतां रावणा ॥ १३१ ॥

परि आज्ञा समर्थ रघुनाथा । लागलीयां अति आघाता । कोपु न यावा सर्वथा । केंवीं [कं. 'आतां'.] लंकानाथा भस्म करूं ॥ १३२ ॥

क्रोधु आंगा येतां सांग । म्हणती आंगा आला मांग । क्रोधें अपवित्र सर्वांग । तपोभंग होय क्रोधें ॥ १३३ ॥

यज्ञ दान वृत दक्षणा । जप तप तीर्थ [कं. 'नाना यज्ञा'.] प्रदक्षणा । कोपु येतांचि पैं जाणा । करी उगाणा तपाचा ॥ १३४ ॥

छिद्र पडतां घटू गळे । क्रोधानळें तप जळें । योगी संन्यासी पंडितमेळे । क्रोधु निजबळें नागवी ॥ १३५ ॥

बाह्य मांगाचा विटाळु । जलमार्जनें फिटे मळु । क्रोधु अतिशयें चांडाळु । न होय निर्मळु प्रयागीं ॥ १३६ ॥

करितां काशीवास स्नान । तवं तंव क्रोधु खवळे गहन । क्रोधा ऐसा पापी पूर्ण । नाहीं आन संसारीं ॥ १३७ ॥

अनुक्रमणिका

कामक्रोधलोभ [मुं. अं. दै. 'भावन'.] भान । हेंचि नरकाचें निजस्थान । तिन्ही त्यजावी आपण । आज्ञा संपूर्ण रामाची ॥ १३८ ॥

श्रीरामआज्ञा प्रतिपाळितां । क्रोधु आतळों नेदी चित्तां । तेणें वांचलासी लंकानाथा । [वि. 'अधःपाता'.] अपघाता चुकलासी ॥ १३९ ॥

आतां मी वांचलों तत्वतां । ऐसें न मानी लंकानाथा ।
श्रीराम करील तुझ्या घाता । हेहि [पै. 'आतां'.] कथा अवधारी ॥ १४० ॥

रामस्य धनुषः शब्दं श्रोप्यमि त्वं सुदारुणम् । शरास्तीक्ष्णाः पतिष्यंति रामलक्ष्मणलक्षिताः ॥ २३ ॥
रक्षसां हन्यमानानामस्यां पुर्यां समन्ततः । तोयमल्पमिवादित्यः प्राणानादास्यते शरैः ॥ २४ ॥

श्रीराम धनुष्याचा ध्वनी । पडतांचि लंकाभुवनीं । राक्षस पडती मूर्छापन्नी । त्रिकुटें खचोनि पडती धाकें ॥ १४१ ॥

पायीं उतरोनि अपांपती । शरवृष्टीच्या संपातीं । वीरेवीरु पाडील क्षितीं । अश्वगजरथी समवेत ॥ १४२ ॥

इंद्रजीत लक्ष्मणाचा भाग जाण । तो निकुंबळें घालील [दै. 'ठाण'.] खाण ।
मेघनादाचा घेईल प्राण । [मु. 'शस्त्रें'.] शर दारुण वर्षोनी ॥ १४३ ॥

श्रीरामें विंधोणी बाण । बाणीं [तु. दै. 'पाडील'.] फोडील कुंभकर्ण । रावणा तुझा घेईल प्राण । अर्ध क्षण न लागतां ॥ १४४ ॥ [ओवी १४४ वि. प्रतीत नाही.]

जेवीं थिल्लरीचें अल्प जळ । रवि शोषितां न लगे वेळ । तेवीं श्रीरामाचे बाण प्रबळ । प्राण तत्काळ घेतील ॥ १४५ ॥

राजा उन्मत्त कामासक्ती । तोहि काम अधर्म रति । त्याची राष्ट्रें पुरें नासतीं । राज्यसंपत्ति समवेत ॥ १४६ ॥

लंका रत्नाढ्य कनकगिरी । रावणा तुझिया परदाराचोरी ।
भस्म होईल क्षणामाझारी । सहपरिवारीं [मु. 'निमसील'.] सपुत्रां ॥ १४७ ॥

निवारेल वज्रधार । निवारेल काळचक्र । रामबाण अनिवार । दशशीर वधार्थी ॥ १४८ ॥

पाठीं लागलियां काका । ज्याचे हातीची दर्भशिखा । निवारेना तिहीं लोकां । शिवादिकां [तु. 'सम संकट'; मु. 'समवेत'.] समसकट ॥ १४९ ॥

त्या रामाचे सकोप बाण । तेथें निवारुं शके कोण । घेतील राक्षसांचा प्राण । मुख्य रावण लक्ष्मूनी ॥ १५० ॥
म्हणसी सबळ दशानन । रामु नव्हे मजसमान । श्रीराम सिंह तूं तवं श्वान । पलायमान स्त्रीचोरा ॥ १५१ ॥

अनुक्रमणिका

मुखीं धरुनिया पक्वान्न । हाडिहाडी करितां पळे श्वान । सीता चोरुनि चिद्रत्न । पलायमान तुंहि तैसा ॥ १५२ ॥

श्रीराम चिन्मात्र गजेंद्र । रावणा [तु. दै. मु. 'विषयाचा काळ'.] तूं काळाकोळ उंदिर । घरीं चिंचाय निदसुर । तेवीं गुरुगुर करिसी लंकें ॥ १५३ ॥

तुं तंव शूर्पनखासमान । चोरी करुनी सिंमुर पूर्ण । त्याहिवरी बुचाट आंगवण । काळें वदन रावणा ॥ १५४ ॥

ऐकोनि सीतेचा अनुवादु । रावणा आला सुबद्ध क्रोधु । तिचा करावया वधु । झाला [मु. 'सिद्ध'.] सन्नद्धु साटोपें ॥ १५५ ॥

सीतायास्तद्वचः श्रुत्वा रावणो राक्षसाधिपः । विवृत्य नयने क्रूरे जानकीमन्वधावत ॥ २५ ॥

सीता वचनाचें बाणाग्रीं । रावणु खोंचला जिव्हारीं । दांत खाऊनियां करकरी । नेत्र वाटारी अति क्रोधें ॥ १५६ ॥

संताप क्रोधें उचंबळे । फोडा इचे दोन्ही डोळे । वेगीं मोडारे सिसाळे । अंत्रमाळे काढा इची ॥ १५७ ॥

जिव्हा छेदा रे सवेग । वेगें करा अंगभंग । विदारुनी अष्टांग । भिन्न भाग करा ईचे ॥ १५८ ॥

तिचा करावया घातु । रावणु शस्त्रेंसी धांवतु । तें देखोनि हनुमंतु । रागें कांपतु थरथरां ॥ १५९ ॥

दोन्ही हात तो कुसकरी । पुंच्छ भवंडी चक्राकारी । शेंडी माथांचि थरारी । वृक्षावरी पिलंगतु ॥ १६० ॥

डोळे भवंडितु गरगरां । दांतु खातसे करकरां । रोम थरकती थरथरां । आला वानरां अति कोपु ॥ १६१ ॥

सीतेसी लावितांचि हातु । करीन रावणाचा घातु । येणें साटोपे हनुमंतु । घुलकावितु वृक्षेसी ॥ १६२ ॥

कोपलें देखोनी वानरां । हाहाकारु सुरवरां । कोपलें देखोनी दशशिरां । स्त्रिया [मु. 'समग्रा'.] थरथरां कांपती ॥ १६३ ॥

सीता गांजितां रोकडी । हनुमंते घालावी उडी । मंदोदरीची प्रज्ञा गाढी । आली तांतडी ते संधीं ॥ १६४ ॥

खर्ग घेऊनि लंकानाथ । करितां सीतेचा पैं घात । मंदोदरी धांवोनि तेथ । धरिला हात खर्गेंसी ॥ १६५ ॥

मंदोदरी धरितां हात । दचकला लंकानाथ । हनुमान वृक्षीं राहिला गुप्त । पुढील कथार्थ अवधारा ॥ १६६ ॥

ऋषी रामायणा आंत । सीता रावण शब्दोन्मथित । कथा आहे अत्यद्भुत । तितुका ग्रंथ न धरेची ॥ १६७ ॥

अनुक्रमणिका

कथा सांगतां संकळित । इतुका वाढला पैं ग्रंथ । वदनिं वदतां श्रीरघुनाथ । गुह्य गुह्यार्थ तो जाणें ॥ १६८ ॥

श्रीराम आणि जनार्दन । दोहीं नांवीं ब्रह्म परिपूर्ण । एका जनार्दना शरण । कथा पावन श्रीरामें ॥ १६९ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीतारावणसंभाषणं नाम अष्टमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग नववा

## दशरथ कौसल्या सुलग्न

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

रावणें सीते लावितां हात । हनुमंत त्याचा करील घात । तों मंदोदरी येउनी तेथ । अति अनर्थ चुकविला ॥ १ ॥

> उपगम्य ततस्तूर्णं राक्षसी वनमालिनी । परिष्वज्य दशग्रीवमिदं वचनमब्रवीत् ॥ १ ॥
> मया क्रीड महाराज सीतया किं करिष्यसि । अकामां कामयानस्य शरीरमुपतप्यते ॥ २ ॥
> इच्छन्त्याः कामयानस्य प्रीतिर्भवति शोभना ॥ ३ ॥

अतिकायाची जननी । रावणप्रिया वनमालिनी । तिणें रावणा आलिंगूनी । युक्त वचनीं बोलत ॥ २ ॥

स्वदारा सकाम मानसी रम । मजसीं रमणें हा स्वधर्म । सीता आकाम तिचा काम । परम अधर्म अधःपाती ॥ ३ ॥

सांडी अकाम काम सीतेसी । स्वेच्छा सकाम [मु. 'रमावें'.] क्रीडे मजसी । माझेनि कामें सुखी होसी । सीतेपासी अति दुःख ॥ ४ ॥

श्रीरामकांता सीतासती । तिच्या कामाची आसक्ती । राक्षसांची जाती व्यक्ती । होईल समाप्ती वंशाची ॥ ५ ॥

कुमर प्रधान सेना संपत्ती । अश्व गज रथ आणि पदाती । इंद्रजित कुंभकर्ण लंकापती । भस्म होती सीताक्षोभें ॥ ६ ॥

सर्व रस चाखी माशी । दीप चाखितां दाहो तिसी । तेंवी सांडोनि स्वदारेसी । सीतेपासी भस्मार्थ ॥ ७ ॥

निज पुत्राचा द्वेष करी । खांब हाणितां शस्त्रधारी । हिरण्यकशिपू नखाग्रीं । सहपरिवारीं निमाला ॥ ८ ॥

खांबीं उठिला नरहरी । येथें वनीं उठेल वनकेसरी । सीतासती क्षोभलियावरी । होईल बोहरी राक्षसां ॥ ९ ॥

जानकीचे निज गुह्यांत । हो कां भरलें अमृत । आमचें गुह्य विषप्रयुक्त । कडू लागत रावणा ॥ १० ॥

स्वस्त्री परस्त्री काम कामुक । समानसुखाचे परीपाक । स्वदाराकामें [पै. वि. तु. दै. कं. मुं. अं. 'स्वधर्मसुख'.] परमसुख । परमदुःख परदारा ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

परदारेची आसक्ती । पूर्वजा होय अधोगती । आपण पावे नरकाप्रती । वंशसमाप्ती परदारें ॥ १२ ॥

वनमालिनी नाना युक्तीं । शिकवितां त्या लंकापती । मंदोदरीनें धरुनि हातीं । नेला एकांतीं रावण ॥ १३ ॥

बैसवोनी प्रिया एकांतीं । नारदभाष्याच्या पूर्वोक्ती । सांगत असे रावणाप्रती । मुनी निश्चिती जें वदला ॥ १४ ॥

अंगीच्या बळाची मस्तीं । तुवां पुसिलें नारदाप्रती । मज वधी कोण त्रिजगतीं । देवीं दैत्यीं कीं दानवीं ॥ १५ ॥

देवां अवध्य तूं दशकंठ । दैत्य तुजपुढें फळकट । दानवेसी धीट तिखट । परी पोचट नरसंग्रामीं ॥ १६ ॥

भविष्य नको पुसो हो रावणा । संकल्पविकल्प हो भविष्य भावना ।
भविष्य चुकवावया जाणा । नाना विंदान करी प्राणी ॥ १७ ॥

रावणें धरिले मुनीचे चरण । मज सांगावें माझें मरण । नारद जाणें रामायण । सत्य भाषण तो वदला ॥ १८ ॥

रावणा तुझिया वधार्थी । कौशल्यासुत राम दाशरथी । तो येऊनी लंकेप्रती । करील समाप्ती राक्षसां ॥ १९ ॥

ऐसें सांगोनी रावणाप्रती । नारद निघे ऊर्ध्वपंथीं । त्याच्या गमनाची गती । त्रिजगती अनुपम्य ॥ २० ॥

रामनामें वीणा वाजत । श्रीरामनाम मुखीं गात । [वि. 'नामानंदे'.] नामामृतें नित्य तृप्त । स्वयें डुल्लत स्वानंदें ॥ २१ ॥

कीर्तनाचिया संतुष्टी । रामरुप देखे सृष्टी । पदोपदीं आनंद कोटी । सुख संतुष्टी उल्हासे ॥ २२ ॥

ऐसें नारदें केलिया गमन । मागें रावण अति उद्विग्न । पाचारुन चतुरानन । पुसे आपण तें ऐका ॥ २३ ॥

कौसल्या ते कोण कैसी । दशरथ तो कोणे वंशीं । त्याची वस्ती कोणे देशीं । हें मजपासी सांगावें ॥ २४ ॥

नाहीं कौसल्येचा विवाह झाला । नाहीं दशरथ [मु. कं. तं. वि. 'उपजला'.] उजवला । नाहीं श्रीराम उपजला । तैं बोलिला नारद ॥ २५ ॥

ऐकोनी रावणाचें वचन । चहूं मुखीं हांसे चतुरानन । नारदाचें [पै. दै. अं. तु. तं. 'संभाषण'.] सत्य भाषण । अन्यथा कोण करुं शके ॥ २६ ॥

ब्रह्मा सांगे रावणासी । कौसल्या कन्या कोसलरायासी । दशरथ तो सूर्यवंशी । अयोध्येसी निज राजा ॥ २७

॥

त्या दोहींचे पाणिग्रहण । होतां रावणें केलें विघ्न । अन्यथा नव्हे नारदवचन । लागलें लग्न समुद्रीं ॥ २८ ॥

कौसल्या आणि दशरथ । केंवि पां गेले समुद्रांत । कैसेनि लग्न लागलें तेथ । श्रोते वृत्तांत पूसती ॥ २९ ॥

हे तवं जुनाट परिपाठी । काळिकाखंडीं गुह्य गोष्टी । नारदें देखोनी ज्ञानदृष्टी । वदे जगजेठी निःशंक ॥ ३० ॥

सेतुबंध महात्म्यांत । दुसरे एके लघु महात्म्यांत । थोरलिया महात्म्यांत । ग्रंथ समस्त लिहिला असे ॥ ३१ ॥

असो ही ग्रंथाची ग्रंथोक्ती । झाडा सुचावा पैं किती । वदनीं वदवितां श्रीरघुपती । कविता करिता श्रीराम ॥ ३२ ॥

अहिरावण महिरावण । त्याचें रण आणि मरण । कौसल्या दशरथ पाणिग्रहण । तेथें संपूर्ण लिहिला असे ॥ ३३ ॥ [ओवी ३३ अ. कं. प्रतींत नाही.]

माझे अंगीं मूर्खपण । लटिकें लिहिलें रामायण । तेहि वाचितां पैं [वि. 'आपण'.] जाण । होय क्षालन महापापा ॥ ३४ ॥

ग्रंथ असंख्य आणि आनान । तेथेंहि आनान निरूपण । माझें भावार्थरामायण । सावधान अवधारा ॥ ३५ ॥ [ओवी ३५ कं. मुं. प्रतींत नाही.]

कौसल्या दशरथ पाणिग्रहण । रावणें करितां अति विघ्न । समूद्रामाजीं लागलें लग्न । तें अति विंदान अवधारा ॥

ब्रह्मा सांगे रावणापासी । कौसल्यादशरथ लग्नासी । वऱ्हाड जाते कोसलदेशीं । पांचवें दिवशीं लग्नसिद्धी ॥ ३७ ॥

ऐसा रावणें ऐकतां गोष्टी । [मुं. 'करुनी'.] कोसलेवरी क्षोभक दृष्टी । धाडी घालूनी उठाउठी । हरिली गोरटी कौसल्या ॥ ३८ ॥

रावण पोटीं भयभीत । कौसल्या न ठेवी लंकेआंत । देव चिंतिताती माझा घात । ते विपरीतार्थ करतील ॥ ३९ ॥

देव कामारे मजपासी । माझा मृत्यू आवडे त्यांसी । ते कौसल्या दशरथापासी । लघु लाघवेसी नेतील ॥ ४० ॥

ऐसा धांक रावणासी । कौसल्या न ठेवीच लंकेसी । तीतें घालूनी पेटीसी । समुद्रापासी ठेवणें धाडी ॥ ४१ ॥

अनुक्रमणिका

दीप द्राक्षें अमृतफळें । लाडू पक्वान्नें राजकेळें । पात्रें भरुनी सीतळ जळें । पेटीमाजीं सगळें ठेऊनिया ॥ ४२ ॥ [ओवी ४२ वि. प्रतित नाही.]

त्या पेटीमाजीं कौसल्येसी । घालूनी धाडी समुद्रापासी । समुद्र ठेवी मीनापासी । मीनें दाढेसी घातिली ॥ ४३ ॥

मीन क्रीडतां समुद्रीं । त्यासीं तिमि धांवे युद्धावारी । मीन म्हणे युद्धाचे संचारी । पेटी चकचुरी होईल ॥ ४४ ॥

म्हणोनिया उठाउठी । पेटी ठेऊनिया समुद्रबेटीं । मीन परतला [मु. 'युद्धासाठीं'.] कडकडाटी । सक्रोध दृष्टी संग्रामा ॥ ४५ ॥

दशरथ लग्न त्वरें करी । पायवाट मार्ग दूरी । तारीं बैसूनी समुद्रीं । जावे त्रिरात्री कोसल [तु. दै. 'पुरी'.] देशा ॥ ४६ ॥

चेउली होऊनी जेंवी द्वारका । पायवाट दुरी देखा । तारीं बैसोनी जातां लोकां । दिवसा दो कां [मु. 'जाऊं पावती'.] पुरी प्राप्ती ॥ ४७ ॥

दशरथ याची परी । वऱ्हाड घालूनिया नावेवरी । स्वयें निघाला समुद्रीं । त्वरें करी जावया ॥ ४८ ॥

टके पताका नावेवरी । निशाणें त्राहाटीलिया भेरी । वऱ्हाड चाललें समुद्रीं । अति गजरीं उल्हासें ॥ ४९ ॥

रावणें पाळती करुनी पुरी । विमानबळें येउनी अधारीं । दशरथ बैसला जे नावेवरी । ते निशाचरीं फोडिली ॥ ५० ॥

बाप होणार कैसें बळी । तें न चुके कदा काळीं । दशरथ बुडतां पैं जळीं । झालें ते काळी अपूर्व ॥ ५१ ॥

दशरथ बुडतां तळवटीं । रामनाम स्मरे वाक्पुटी । तंव सांपडली फुटकी पाटी । नाम संकटीं तारक ॥ ५२ ॥

श्रीराम दशरथाचे कुसीं । म्हणोनी नाम आठवे त्यासी । बुडतां नव्हेची कासाविसी । नामें रायासी तारिलें ॥ ५३ ॥

नाम आठवलिया आकांतीं । आकांतामाजीं अती विश्रांती । नाम तारक त्रिजगतीं । सुखसंविती हरीनामें ॥ ५४ ॥

सांपडतां फुटकी पाटी । समुद्रलाटांच्या पैं लोटीं । जेथें कौसल्याची पेटी । राजा त्या बेटीं लागला ॥ ५५ ॥

दशरथ पैं उठाउठी । सवेग [मु. 'चालिला'.] चढला तिये बेटीं । सन्मुख देखोनिया पेटी । आश्चर्य पोटीं मानिलें ॥ ५६ ॥

अनुक्रमणिका

भोंवती समुद्राची घरटी । येथें कोणी ठेविली पेटी । पाहातां दुजे न दिसे दृष्टीं । विस्मय पोटीं अनिवार ॥ ५७ ॥

तेणें ती पेटी हातीं धरिली । हुणेरें किल्ली उघडली । भीतरीं कौसल्या देखिली । असे बैसली सचिंत ॥ ५८ ॥

दशरथ पुसे येथें तूं कोण । येरी विस्मयो पावली पूर्ण । तुम्ही कोणाचे पैं कोण । येथें आगमन कैसेनि ॥ ५९ ॥

पयोनिधी अगाध गहन । मच्छ मगर अति दारुण । दुस्तर दुर्धर अगम्य स्थान । येथें आगमन कैसेनि ॥ ६० ॥

राजा म्हणे ये गोरटी । तुज कैसेनी प्राप्त पेटी । तुज कोणें ठेविलें बेटीं । समूळ गोष्टी सांगावी ॥ ६१ ॥

कौसल रायाची मी राजबाळा । रायें दथरथु वरुनी मला । तंव रावणें घालुनी घाला । घेऊन आला मज लंकें ॥ ६२ ॥

भविष्यें रावण दचके पोटीं । भयेची मज घालुनी पेटीं । ठेऊं धाडिलें समुद्रपोटीं । तेणें ये बेटीं ठेविलें ॥ ६३ ॥

न व्हावें दशरथाचें लग्न । यालागीं रावणें केलें विघ्न । दशरथा करावया भग्न । सवेगें सैन्य मोकलिलें ॥ ६४ ॥

ऐसिया सांगतां पै गोष्टी । कौसल्या बाष्पें दाटली कंठीं । भाग्यें अभाग्यें मीच सृष्टीं । नव्हेची भेटी दशरथी ॥ ६५ ॥

जळो जळो तो दशानन । स्वप्नींहि न करी संभाषण । धरुनी दशरथाचें ध्यान । प्राण त्यागीन स्वानंदें ॥ ६६ ॥

ऐकोनी कौसल्येचें वचन । राजा झाला. विस्मयापन्न । सप्त सागरीं होतां [कं. 'गमन'; वि 'निमग्न'; तु. दै. 'भग्न'.] मग्न । होणार पूर्ण चुकेना ॥ ६७ ॥

राजा सांगे निज वृत्तांत । रावणें माझा करितां घात । रक्षिता झाला श्रीरघुनाथ । समुद्रा आंत बुडवितां ॥ ६८ ॥

तो मी समुद्र [कं. 'भरिल्या'.] भरीत्या आंत । येथें आलों दशरथ । येरी पुसे तूं अजाचा सुत । रघूचा नातू सूर्यवंशीं ॥ ६९ ॥

ऐकोनी निश्चय वचन । कौसल्या निज संपन्न । मज तुष्टला जनार्दन । केलें सुलग्न एकांतीं ॥ ७० ॥

अनुक्रमणिका

नाहीं कर्माची खटपट । नाहीं लौकीक [मु. 'अंतःपट'; दे. कं. अं. 'चाट'.] कचाट । नसतां [मु. 'लोकी'; तु. दै. 'समतेची'.] ममतेची कटकट । लग्न निर्दुष्ट लागलें ॥ ७१ ॥

दोहींचा जो निज हरिख । तोच तयाचा मधुपर्क । बोल बोलती अती [मु. 'अनेक'.] निष्टंक । मंगलाष्टक तें तेथें ॥ ७२ ॥

विकल्पाची झाडिली पळें । संकल्पाची मूद वोवाळे । स्वधर्माचा दीप उजळे । सुख कल्लोळें लग्नार्थ ॥ ७३ ॥

अनोळखतां मार्गे [पै. अं. 'झाडे'.] सांडे । तेचि पायीं पायमांडे । परमानंद वाडे कोडे । सुखसुखोड लग्नार्थ ॥ ७४ ॥

उदरा येईल रघुनाथ । लग्नीं पावला अभिजित । लग्नघटिका पाहे भास्वत । काळ सांगत सावधान ॥ ७५ ॥

दोंहींसी ओळखी होतां स्पष्ट । सुटोनी गेला अंत्रपाट । ॐपुण्याहवचन श्रेष्ठ । मौननिष्ठ होउनी ठेले ॥ ७६ ॥

[पै. वि. कं. मुं. मु. 'धरा'.] लग्नघरा समुद्रबेटीं । बोहलें मुख्य तेची पेटी । लग्न लागलें उठाउठी । दृष्टादृष्टी होतांची ॥ ७७ ॥

यापरी कौसल्या निजकांत । लग्नीं वरिला श्रीदशरथ । पुढील कथेचा कथार्थ । आश्चयार्थ अवधारा ॥ ७८ ॥

कौसल्या आणि दशरथ । दोघे बैसोनी पेटी आंत । फळें पक्वान्नें लाडू भक्षित । जळ प्राशित स्वानंदें ॥ ७९ ॥

कौसल्या पुसे दशरथासी । [मु. 'पुढें निर्गती'.] पुढारी गती आमुची कैसी । राजा सांगे कौसल्येसी । रामनामेंसी आम्हा मुक्ती ॥ ८० ॥

वसिष्ठ सद्‌गुरुवचन । करितां रामनाम स्मरण । भवभयाचें निर्दाळण । बंदीमोचन ते किती ॥ ८१ ॥

आम्ही तुम्ही मिळोनी आतां । सावधान एकाग्रता । भावें स्मरतां श्रीरघुनाथा । भय सर्वथा आम्हां नाहीं ॥ ८२ ॥

पृथ्वी उलथावया हडबडे । आकाश तुटोनिया पडे । तरीहि नामस्मरत्याकडे । भय बापुडें केंवि रिघे ॥ ८३ ॥

ऐकतां रामनाम गोष्टी । विघ्नें पळती बारावाटीं । भिवों नको वो गोरटी । सुखसंतुष्टी श्रीरामें ॥ ८४ ॥

[वि. तं. मुं. 'उद्धरावया'.] उदरा यावया रघुनाथ । निज सामर्थ्य प्रतापवंत । प्रवेशला दशरथा आंत । नामीं भावार्थ तेणें त्यासी ॥ ८५ ॥

ऐसी दोघे करितां गोष्टी । मीनें तिमिंगिल जिणोनी हटी । दोघांसहित घेऊनी पेटी । उठाउठी निघाला ॥

अनुक्रमणिका

८६ ॥

ब्रह्मयासी पुसे दशानन । कौसल्या लग्न समयो कोण । आजिचा होतांची माध्यान्ह । लागलें लग्न दशरथी ॥ ८७ ॥

ऐकोनी ब्रह्मयाची मात । रावण खदाखदा हासत । पहा हो सत्यलोकनाथ । असत्य वदत मजपासी ॥ ८८ ॥

सत्यलोकीं मज असतां । माझ्या वाक्यासी सत्यता । असत्य मानिसी लंकानाथा । तुज तत्त्वता कळलें नसे ॥ ८९ ॥

मियां दशरथा केला घात । कौसल्या घातली समुद्रांत । आतां लग्नीं कैचा दशरथ । वचन असत्य तेणें मानें ॥ ९० ॥

जिथे मरणें भगवत्सत्ता । ते तुज आली लंकानाथा ।
म्हणसी म्यां मारिलें दशरथा । हें तरिहि तत्त्वतां असत्य होय ॥ ९१ ॥

ऐसी वक्रोक्ती ब्रह्मवचन । ऐकोनी कोपिजे दशानन । पेटी आणुनी पाहतां तेंण । दोघेजणें निघालीं ॥ ९२ ॥

प्रथम निघतां दशरथ । दचकला लंकानाथ । त्याचा करावया घात । शस्त्रां हात घातला ॥ ९३ ॥

पुढां देखोनी रावण । दशरथा आलें स्फुरण । दाही कंठ वीस नयन । भुयीं पाडीन करघाते ॥ ९४ ॥

ते काळीं श्रीरघुनाथ । पूर्ण प्रतापें दशरथा आंत । यालागीं रावणा नाहीं भीत । निशंकित पुरुषार्थ ॥ ९५ ॥

निःशंक देखोनि दशरथ । रावण तद्वधी उद्यत । मंदोदरी येऊनी तेथ । निवारीत रावणा ॥ ९६ ॥

त्यासी नेउनी एकांता । बुद्धी सांगेल लंकानाथा । मारुं जातां दशरथा । तूं अपघाता पावसी ॥ ९७ ॥

पेटी आंतुनी अकस्मात । आतांची निघाला दशरथ । तैसाचि निघालिया रघुनाथ । मरण प्राप्त रावणा ॥ ९८ ॥

ऐसी ऐकतांचि गोष्टी । रावणा भय कोट्यानुकोटी । डोळां देखतांचि पेटी । रामभयें पोटीं चळी कांपे ॥ ९९ ॥

दशरथलग्नाकरितां विघ्न । रावण झाला अती उद्विग्न । दाही मुखीं हीनदीन । कंपायमान भयभीत ॥ १०० ॥

बुद्धि सांगतां रावणासी । कांहीं न चले होणारासी । कौसल्येसहित दशरथासी । अयोध्येसी धाडी वेगीं ॥ १०१ ॥

अनुक्रमणिका

कौसल्या आणि दशरथासी । मारितां न मारवे आम्हांसी । ठेऊं नये गा लंकेसी । अयोध्येसी धाडा वेगीं ॥ १०२ ॥

अन्यथा करूं जातां आपण । यासी सर्वथा न ये मरण । रावणा मानलें तें वचन । वेगीं विमान आणविलें ॥ १०३ ॥

आणूनिया विमानासी । कौसल्यायुक्त दशरथासी. । विमानीं वाहुनी दोघासी । अयोध्येसी स्वयें धाडी ॥ १०४ ॥

राजा बुडाला समुद्रांत । अयोध्यनगरीं अति आकांत । तंव तेथे आला दशरथ । कौसल्यायुक्त सुलग्नें ॥ १०५ ॥

राजा आला देखोनि नगरीं । निशाणें त्राहाटिलिया भेरी । गुढिया मखरें घरोघरीं । नरनारी आल्हाद ॥ १०६ ॥

ऐसा पूर्वील वृत्तांत । मंदोदरी सांगे साद्यंत । रावणा तूं कां होसी भ्रांत । होणारार्थ चुकेना ॥ १०७ ॥

ऐसें शिकवुनी रावणासी । सांडवुनी सीता प्रलोभासी । हातीं धरोनी त्यासी । निज भुवनासी त्या नेलें ॥ १०८ ॥

एका जनार्दना शरण । कौसल्या दशरथ सुलग्न । गूढ गुह्य निरोपण । जनार्दन स्वयें वदवी ॥ १०९ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां दशरथकौसल्यासुलग्नं नाम नवमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग दहावा

## सीता हनुमंत दर्शन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

रावणें भेडसावितां सीता । त्याच्या पत्न्या ज्या समस्ता । आश्वासिती श्रीरामकांता । नेत्र [पै. तं. कं. 'वक्रता'.] वक्त्रा खुणाउनी ॥ १ ॥

> देवगंधर्वकन्याश्च विषेदू राक्षसीस्तदा । ओष्ठप्रकारैरपरा नेत्राकारैस्तथा पराः ॥ १ ॥
> सीतामाश्वासयामासुस्तर्जितास्तेन रक्षसा ॥ २ ॥

सीतेसी स्वयें म्हणे रावण । माझी भार्या न होतां जाण । तुझा घेईन मी प्राण । नाक कान छेदुनी ॥ २ ॥

फोडा इचे दोनी डोळे । वेगीं मोडारे सिसाळें । स्तन कापा मांस गोळे । अंत्रमाळे काढुनी ॥ ३ ॥

तुझिया पतीव्रताची थोरी । भीड धरली षण्मासवरी । आतां भोगीन बळात्कारीं । राम भिकारी वनवासी ॥ ४ ॥

ऐसी गांजिता नानापरी । क्षोभोनी रावणाचे नारी । आश्वासिती सीता सुंदरी । भय न धरी तूं याचें ॥ ५ ॥

देवीं गंधर्वी निशाचरीं । नागकन्या अति सुंदरी । आश्वासिती नानापरी । खुणें करी तें ऐका ॥ ६ ॥

एकी खुणाविती नेत्रांतरीं । एकीची संज्ञा ओष्ठांतरीं । एकी त्या निवारिती करीं । आंगोळ्यावारी त्या एकी ॥ ७ ॥

ब्रह्मशाप रावणाशिरीं । झोंबों न सके परनारी । त्याचें भय कांहीं न धरी । धरी धीर [मु. 'कांतें'.] रामनामें ॥ ८ ॥

सत्यलोक वनप्रदेशीं । रावण झोंबतां ऊर्वशीसी । आजी नेम नळ कुबेरासी । तू कां झोंबसी परदारे ॥ ९ ॥

बळें झोंबतां दशानन । ऊर्वशी करी आक्रंदन । तेथें आला चतुरानन । कोपायमान रावणा ॥ १० ॥

दुष्टा नष्टा लंकानाथा । येथुनी परदारेसी झोंबतां । पावसील मस्तकपाता । ब्रह्म शापता दुर्लंघ्य ॥ ११ ॥

ज्याचा निजभाव निर्मळ । त्यावरी कृपा करिती सकळ । रावण शापाचें निज मूळ । स्त्रियां समूळ सांगितलें ॥ १२ ॥

असो हा मागील वृत्तांत । स्वयें देखतसे हनुमंत । मंदोदरिया लंकानाथ । नेला घरांत तें ऐका ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

इत्युक्तो महिषीं राजा रावणः शत्रुकर्षणः । समादिश्य ततः सर्वा राक्षसीर्निर्जगाम ह ॥ ३ ॥
निष्क्रांते राक्षसेन्द्रे तु पुनरन्तःपुरं गते । राक्षस्यो भीमरूपास्तां सीतां समभिदुद्रुवुः ॥ ४ ॥
पौलस्त्यानां वरिष्ठस्य रावणस्य महात्मनः । दशग्रीवस्य भार्यात्वं सीते न बहु मन्यसे ॥ ५ ॥
ततः शूर्पनखी नाम राक्षसी वाक्यमब्रवीत् । सुरां आनीयतां क्षिप्रं सर्वशोकविनाशिनीम् ॥ ६ ॥
मानुषं मांसमश्नीमो विभज्य च समन्ततः । तेन उन्मादमोदेन नृत्यामश्च निकुंभिले ॥ ७ ॥

**मंदोदरिया नाना युक्ती । कौसल्या दशरथ उपपत्ती । शिकवूनिया लंकापती । निज धामाप्रती नेला पैं ॥ १४ ॥**

**विकटा विक्राळा अतिक्रूरी । राक्षसीं पाचारुनी समग्री । रावण त्यांसी एकांत करी । सीतासुंदरी वश्यत्वा ॥ १५ ॥**

**भय दाखवावें गाढे । जें भय देखतांची पुढें । वश होय मजकडे ।** [कं. 'असे रोकडे करा तुम्ही'.] **तैसी चाभाडे पसरावीं ॥ १६ ॥**

**सामदामभेद करी । भय दावूनिया भारी । वश्य केलिया सीतासुंदरी । कृतोपकारी मी तुमचा ॥ १७ ॥**

**ऐसा करुनी एकांत । मंदोदरी समवेत । रावण गेला निजधामांत । राक्षसी येत परतोनी ॥ १८ ॥**

**रावणें प्रेरिल्या सत्वर । विकटा विक्राळा विकट नेत्र । मुखें पसरोनिया क्रूर । सीतेसमोर धांविन्नल्या ॥ १९ ॥**

**एक जटा क्रूर भारी । हरित जटा ती दुसरी । विनिता जे कां निम्नोदरी । प्रलंबोदरी विक्राळा ॥ २० ॥**

[कं. 'अधो'; मु. 'अही'.] **अजामुखी हयमुखी महामारी । विकटा तिखटा चंडोदरी । आणिक राक्षसी घर्घरी । सीतेवरी धांविन्नल्या ॥ २१ ॥**

**शूळ फरशू मुद्गल लहुडी । शस्त्रें लखलखीत गाढीं । इची करा ताडातोडी । भीड एवढी ते काय ॥ २२ ॥**

**मांस नेऊं रक्त पीऊं । ईचें काळीज भाजुनी खाऊं । इच्या हाडाचे मणी लेऊं । शिरा घेऊं वोरपोनी ॥ २३ ॥**

**रावणा वरिना जनकबाळा । इच्या काढूं अंतरमाळा । वेगीं निमटोनी गळा । खाऊं सगळा वांटुनी ॥ २४ ॥**

**काढा मारा** [वि. कं. दै. 'आगीं'.] **अंगीं धरा । इची शतखंडे करा । हांका मारिती दुर्धरा । दशशिरा वरीना ॥ २५ ॥**

**आवघिया शेवटीं । आली शूर्पनखा** [तु. वि. कं. मुं. तं. दै. अं. मु. 'नकटी'.] **कपटी । सीता लक्षूनिया दृष्टी । सांगे गोष्टी फेफांत ॥ २६ ॥**
**ऐक सीते रावणोत्पत्ती । मुख्य ब्रह्मयाचा पौलस्ती । त्याचा विश्रवा प्रजापती । रावण निश्चिती तयाचा ॥ २७**

अनुक्रमणिका

॥

रावण ब्रह्मयाची चौथी पिढी । वेद विभागीं प्रज्ञा गाढी । राज्य प्राप्त चौदा चौकडी । त्यासी तूं वेडी वरिसीना ॥

रावण ब्रह्मवंशीं ब्राह्मण । राम सूर्यवंशी क्षत्रिय हीन । त्याची तुज आवडी कोण । श्रेष्ठ वर्ण रावणाचा ॥ २९ ॥

रावणसत्ता सुरीं असुरीं । राम केवळ भिकारी । ऋद्धि सिद्धि रावणा घरीं । राम फळाहारी वनवासी ॥ ३० ॥

माझा बोल ऐक आतां । होई रावणाची प्रिय कांता । दिव्य भोग भोगी तत्त्वतां । सभाग्य सीता जग मानी ॥ ३१ ॥

सांडूनिया खर वाहान । गजस्कंधीं बैसतां जाण । जग वानी सभाग्यपण । तैसे वरणें रावणाचें ॥ ३२ ॥

शूर्पनखेचें ऐकोनी वचन । सीता सांडी हेळसून । जैसें हंस न पाहे शेण । तैसें वचन उपेक्षी ॥ ३३ ॥

सीता नेदी प्रतीवचन । शूर्पनखा कोपायमान । इची जिव्हा खावों कापून । रक्त पिईन नळीचें ॥ ३४ ॥

आणा मद्य मैरेयासी । इच्या मांसे करुं [मु. दै. ‘उपहारासी’.] उपदंशी । आंग विभागु सकळांसी । खाऊं सीतेसी अवघ्यांहि ॥ ३५ ॥

सीता [तु. दै. ‘मद्य’.] मेदमांस मेळें । मद्येसी इचे चाखिले । खातां आनंद कल्लोळें । नाचूं [तं. ‘निःशंकु बळें’.] निकुंबळे गोंधळी ॥ ३६ ॥

राक्षसी ऐसऐसियापरी । भेडसाविती अति विकारी । सीता त्याचें भय न धरी । श्रीरामचंद्र निबोध ॥ ३७ ॥

न करी रुदन नव्हे दीन । श्रीरामसुखें सुखसंपन्न । राक्षसींचें भयमान । तृणासमान सीतेसी ॥ ३८ ॥

नित्य श्रीराम स्मरतां । सीता देहीं विदेहता । शंका न मनीं देह छेदीतां । तोचि श्लोकार्था अनुवादे ॥ ३९ ॥

> छिद्यतां भक्ष्यतां वापि शरीरं विसृजाम्यहम् । चरणेनापि सव्येन न स्पृशेयं निशाचरम् ॥ ८ ॥
> छिन्ना भिन्ना विभक्ता वा दीप्ते वाग्नौ प्रवेशिता । रावणं नोपतिष्ठेयं किं प्रलापेन वश्चिरम् ॥ ९ ॥

नांवें वैदेही सीतासती । देहभयाची नाहीं भ्रांती । श्रीरामध्यानें भयनिवृत्ती । न मनीं खंती देहाची ॥ ४० ॥
[ओवी ४० व ४१ वि. प्रतीत नाही.]

छेदा भेदा खा समस्तीं । श्रीराम भोक्ता सर्वांभूतीं । परी [पै. कं. मुं. तं. ‘डावेन पाये’.] नांवें न पाहे लंकापती । स्वप्नस्थिती स्पर्शेना ॥ ४१ ॥

अनुक्रमणिका

**देह ठेवितां कृमी होती । तो लावावा उपकारार्थी । मज भक्षावें तुम्ही समस्ती । भोक्ता भूतीं श्रीराम ॥ ४२ ॥**

**देह करावा रामार्पण । तुम्हांत सबाह्य राम परिपूर्ण । तुम्ही करितांची भक्षण । ब्रह्मार्पण देह माझा ॥ ४३ ॥**

**देह छिन्नभिन्न करा समस्तीं । अथवा घाला अग्नीप्रती । परी ना तळे लंकापती । स्वप्न सुषुप्ती जागृती ॥ ४४ ॥**

**कराल विक्राळ वदनाकृती । घर्घर हांका माराल किती । नाहीं वरणें लंकापती । जाणा निश्चिती नेम माझा ॥ ४५ ॥**

**निधडी देखोनिया सीतासती । राक्षसी चळचळां कांपती । हे क्षोभल्या आम्हांप्रती । नेईल भस्मांतीं अवघ्यांसी ॥**

**आमचा द्वेष न करी सीता । सर्वांभूतीं देखे रघुनाथा । रावण आज्ञा ईसी छळीतां । आम्ही समस्ता निमूत ॥ ४७ ॥**

**इचेनी अभिलाषें रावण । सन्निपातें पावेल मरण । ऐशा राक्षसी आपआपण । स्वयें गुणगुण** [मु. 'त्या करिती'.] **चाळिती ॥ ४८ ॥**

> राक्षसी त्रिजटा वृद्धा शयाना वाक्यमब्रवीत् । आत्मानं खादतानार्या न सीतां भक्षयिष्यथ ॥ १० ॥
> स्वप्नोऽप्ययं मया दृष्टो दारुणो रोमहर्षणः । राक्षसानामभावाय भर्तुरस्या भवाय च ॥ ११ ॥
> सर्वा एवाब्रुवन्भीता स्त्रिजटां तामिदं वचः । अशेषं श्रोतुमिच्छामः तव दुःस्वप्नदर्शनम् ॥ १२ ॥
> राघवश्च मया दुष्टः चतुर्दन्तं महागजम् । आरूढः शैलसंकाशं सीतया सहलक्ष्मणः ॥ १३ ॥

**दावोनि** [तु. दै. 'हावभाव'.] **महाभय गर्जन । करितां सीतेसी तर्जन । वृद्ध त्रिजटा क्षोभोन । कोपायमान बोलत ॥ ४९ ॥**

**त्रिजटा बिभीषणाची भगिनी । राक्षसी सत्व शिरोमणी । क्रूरा राक्षसीतें निवारूनी । सत्यवचनीं अनुवादे ॥ ५० ॥**

**सीतेसी खाऊं पाहातां राक्षसी । तुम्ही खावें आपआपणासी । सीतासती सत्वराशी । विरुद्ध ईसीं न वदावें ॥ ५१ ॥**

**मियां हो केलें असतां शयन । सभाग्य भाग्य देखिलें स्वप्न । सीतेसी घालोनी लोटांगण । विरुद्ध वचन न वदावें ॥ ५२ ॥**

**सीता सर्व भूतीं समान । तुम्ही कां वदावें विरुद्ध वचन । जानकी जगदंबा संपूर्ण । वंदा चरण तुम्ही इचे ॥ ५३ ॥**

अनुक्रमणिका

ऐकोनि त्रिजटेचें वचन । राक्षसी झाल्या कंपायमान । कैसें [कं. 'तुवां'.] कैसें देखिलें स्वप्न । कृपा करुन सांगावें ॥ ५४ ॥

स्वप्नीं देखिला श्रीरघुनाथ । श्वेत गज चतुर्दन्त । सीतासती समवेत । लक्ष्मण युक्त गज स्कंधीं ॥ ५५ ॥

चवरे ढाळिती सुरासुर । [मु. अं. 'वाटीव'; तु. 'कटकीं हाका'.] भाटीव करिती नरवानर । ऋषी करिती जयजयकार । वाद्यें अपार वाजतीं ॥ ५६ ॥

श्रीरामसीता अभेद स्थिती । मियां देखिली स्वप्नाप्रती । तेहि ऐका उपपत्ती । यथानिगुती सांगेन ॥ ५७ ॥

सूर्यासवें [तु. 'प्रभा निगुती'; मु. 'प्रभा संगती'.] प्रभाप्रभुती । चंद्री चंद्रिका निववित्ती । वायूसवें जैसी गती । सीतासती तेंवि रामीं ॥ ५८ ॥

गुळासवें सुस्वादता । कर्पूरासवें सुगंधता । जळासवें शीतलता । तैसी सीता श्रीरामीं ॥ ५९ ॥

ऐसी श्रीराम सीतासती । स्वप्नीं देखिली सभाग्य स्थिति ।
देखिली रावणाची दुर्गती । तेहि उपपत्ती अवधारा ॥ ६० ॥

> वराहेण दशग्रीवः शिशुमारेण चासकृत् । उष्ट्रेण च मया दृष्टो रक्तमाल्यानुलेपनः ॥ १४ ॥
> प्रयातो दक्षिणामाशां प्रविष्टो गोमये ऱ्हदे । कुंभकर्ण इंद्रजिच्च सर्वे राक्षसपुगवाः ।
> पीत्वा तैलं प्रतप्ताश्च क्रीडंतो गोमये ऱ्हदे ॥ १५ ॥

स्वप्नीं रावण देखिला दृष्टीं । सर्वांगीं शेंदुराची उटी ।
शेंदूर ओतिला लल्लाटीं । नग्न माळ कंठीं आरक्त पुष्पें ॥ ६१ ॥

दाहीं बोडकें शिरें शिरीं । मसीचा टिकला नाकावरी । सुसरी रावणाते धरी । अधोद्वारीं न्यावया ॥ ६२ ॥

सवेंचि बैसोनी कऱ्ह्यावरी । दक्षिण दिशे गमन करी । सवेंचि देखे सूकरावरी । [मु. 'वैश्वानरी'.] विष्ठांतरी क्रीडत ॥ ६३ ॥

गोमयाच्या डोहा आंत । स्वेच्छा क्रीडे लंकानाथ । आणिक स्वप्नीचा वृत्तांत । अत्यद्भुत तो ऐका ॥ ६४ ॥

इंद्रजीत ससैन्य कुंभकर्ण । करुनिया [वि. 'तैलाभ्यंजन'.] तैलपान । गोमय ह्रदीं क्रीडती नग्न । उन्मज्जन निमज्जनीं ॥ ६५ ॥

रावण निद्रा गृहावरी । विज पडली एकसरी । ऐसें देखिलें स्वप्नांतरीं । रावणावरी दुश्चिन्ह ॥ ६६ ॥

यालागीं सभाग्य सीतासती । तुम्ही वंदावी सद्भावार्थी । ऐकोनि त्रिजटा [तु. दै. 'वचनोक्ती'.] वदंती । गेल्या समस्ता वोसरुनी ॥ ६७ ॥

अनुक्रमणिका

**हनुमान म्हणे त्रिजटा भली । राक्षसी सात्विक देखिली । अतियुक्त बोलली बोली । साह्य झाली सीतेसी ॥ ६८ ॥**

**सीता सबाह्य अशोक । अशोकवनीं बैसली देख । लौकिक भाग करी दुःख । तेहि कौतुक अवधारा ॥ ६९ ॥**

> राक्षसीवशगा याऽहं भर्त्स्यमाना सुदारुणम् । न शक्यं यत्परित्यक्तुमात्मच्छेदेन जीवितम् ॥ १६ ॥
> मोघं चरित्वा च तपोव्रतं च त्यक्षामि धिग्जीवितमल्पभाग्या ।
> विषस्य दाता न तु मेऽस्ति कश्चित् शस्त्रस्य वा वेश्मनि रावणस्य ॥ १७ ॥
> इहस्थां मां न जानीते शंके लक्ष्मणपूर्वजः । हतेति का मां गत्वा च राघवाय निवेदयेत् ॥ १८ ॥
> सुमहत्तेन कल्याणं कृतं स्याल्लोकनंदनम् ॥ १९ ॥

**रावणाचे बंदीं मी येथ । राक्षसी आधीन वनांत । स्वयें देऊं न शके जीवित । रक्षण समस्त राक्षसी ॥ ७० ॥**

**राक्षसी असतां राखणी । जीव तंव न देववे माझेनि ।**
**मज येथें वीष देतें कां कोणी । रावणजाचणी चुकती माझी ॥ ७१ ॥**

**शस्त्र घालावें मियां पोटीं । शस्त्रदाता न दिसे दृष्टीं । रामें माझी सांडिली गोष्टी । थोर संकटीं मी पडलें ॥ ७२ ॥**

**रावणें हरोनी वेगेसी । मज आणिलें लंकेसी । हें नाहीं कळलें श्रीरामासी ।** [तु. दै. 'माझिया मागासी'; मु. कं. 'म्हणोनि लागासी'.] **मग लागासी न पवेची ॥ ७३ ॥**

**मज राखिलें लंकेसी । ऐसें कोणी सांगेल श्रीरामासी । अमित पुण्य होईल त्यासी । संख्या पुण्यासी असेना ॥ ७४ ॥**

**कोटी अर्बुदें राजसूययज्ञ । ग्रहणीं कोटी कोटी गोदान । सुवर्णपूर्ण धरा नित्य दान । शुद्धीसमान हे नव्हती ॥ ७५ ॥**

**अन्नदान उदकदान । सांग वेदाचे अध्ययन । द्विजदारा बंदी मोचन । शुद्धीसमान हे न होती ॥ ७६ ॥**

**सीता शुद्धीचे उत्तर एक । श्रीरामासी परम सुख । ब्रह्मज्ञान त्यापुढें रंक । होय अल्पक निज मोक्ष ॥ ७७ ॥**

**श्रीराम पावे परम सुखा । भ्रांतीगत मोक्ष न ये त्या तुका ।**
**ब्रह्मज्ञान तें तैसेंचि देखा ।** [तु. .दै 'येरें'.] **यज्ञ दानादिकां कोण पुसे ॥ ७८ ॥**

**माझे व्रत तपदानशील । पातिव्रत्य नित्य निर्मळ । माझी मजसी नव्हती सफळ । झाली निर्फळ रामेविण ॥ ७९ ॥**

**घाटीं पडलिया हिरवा चणा । घाटा दिसे परि नाहीं दाणा । तेंवी निर्फळ व्रत तपदाना । रघुनंदनावांचुनी ॥**

अनुक्रमणिका

८० ॥

श्रीराम पुरुष प्रकृती सीता । जो करी [मु. 'नित्य'.] निज ऐक्यता । पुण्य पुरुष त्याही परता । नाहीं सर्वथा तिंहीं लोका ॥ ८१ ॥

त्याचेनि सुखी इहलोक । त्याचेनि सुखी परलोक । त्याचेनि पितरा मोक्षसुख । शिवादिक तेणे सुखी ॥ ८२ ॥

सीतेसी सांगतां श्रीराम गोष्टी । मज होतील पुण्य कोटी । हनुमानाचें वृक्षसंपुटी । लाळ घोटी भेटावया ॥ ८३ ॥

धन्य धन्य सीता गोरटी । अनुवादली गोड गोष्टी । कार्मामृतें [तु. 'लाळ'; मु. 'कर्ण'.] शब्द [दै. 'गोष्टी'.] घोटी । अर्थ चाटी अक्षराचा ॥ ८४ ॥

कानीं पडतां संत शब्द । अर्थ न घे तो महामंद । हनुमान तदर्थी अति प्रबुद्ध । अर्थावबोध घुटकुनी ॥ ८५ ॥

बुद्धी स्फुरली हनुमंता । आतांची इची भेटी घेतां । विकल्प मानील पैं सीता । आला मागुता रावण ॥ ८६ ॥

तें आला होऊनी संन्यासी । आतां आला वानरवेषीं । विकल्प रिघालिया सीतेसी । मग भेटीसी ठाव कैंचा ॥ ८७ ॥

भेटी न घेउनी स्वयें जातां । काय सांगू श्रीरघुनाथा । दूरुनी देखिली मियां सीता । हेंचि सांगतां मूर्खत्व ॥ ८८ ॥

जो तो पुसेल हनुमंता । कैसे कैसे बोलिली सीता । काय सांगू मी समस्तां । वानरनाथा सुग्रीवा ॥ ८९ ॥

एकांतीं श्रीराम आपण । मज पुसेल ऊणखूण । तेव्हां माझें काळें वदन । प्रतीवचन न देववे ॥ ९० ॥

समुद्र लंघुनी हनुमंता । आला गेला अवघे वृथा । वानर टोले देतील माथा । फटमरता करतील ॥ ९१ ॥

सीतेची न घेतां एकांत भेटी । ईच्या न पुसतां गुह्य गोष्टी । मज गेलीया परतटीं । राम जगजेठी क्षोभेल ॥ ९२ ॥

> सीतासंदेशरहितं मामितस्त्वरया गतम् । निर्दहेदपि काकुत्स्थः क्रुद्धःस्निग्धेन चक्षुषा ॥ २० ॥
> यद्यनाश्वास्य गच्छामि शोकेनाभिप्रपीडिताम् । सर्वथा नास्ति संदेहो देहं त्यक्ष्यति जानकी ॥ २१ ॥
> प्राप्तदोषो भविष्यामि दोषश्चाकथने महान् । यदि चेद्योजयिष्यामि भर्तारं रामकारणात् ॥ २२ ॥
> व्यर्थमागमनं तस्य ससैन्यस्य भविष्यति ॥ २३ ॥

एकांतीं न भेटतां सीता । तिच्या गुह्य गोष्टी न पुसतां । जरी मी भेटलों रघुनाथा । काळ कृतांत क्षोभेल ॥ ९३

॥

श्रीरामनेंत्रीचा क्रोधाग्नी । मज जाळील तत्क्षणीं । भेटी न घेतां सीताजननी । जातां येथुनी प्रमाद ॥ ९४ ॥

राक्षसी गांजिलीसे सीता । श्रीराम विरहें अति दुःखिता । तिसीं आश्वासन न देतां । प्राण तत्त्वतां सांडील ॥ ९५ ॥

सीतेने सांडितां प्राण । अवघे खुंटेल रामायण । तेहि अपेश मजसी जाण । राम संपूर्ण क्षोभेल ॥ ९६ ॥

सीतेने सांडितां प्राणासी । तेहि अपयश माझिया शिसीं । हे न सांगतां श्रीरामापासी । महादोषी मी होईन ॥ ९७ ॥

शुभाशुभ यथार्थ वार्ता । सद्‌गुरुसी न सांगतां । परम दोष शिष्याचे माथां । वंचकता गुरुद्रोहीं ॥ ९८ ॥

दुःख होय लंकानाथा । सुख पावे सती सीता । सुख उपजे श्रीरघुनाथा । युक्ती हनुमंता आठवली ॥ ९९ ॥

न कळतां राक्षसासी । खांदी वाहोनी सीतेसी । स्वयें नेतां श्रीरामापासी । सुख रामासी [पै. ‘उपजेल’.] उपजेना ॥ १०० ॥

घेउनी वानराचें सैन्य । [मु. ‘करीं’.] रणीं सज्जुनी धनुष्यबाण । मारावे रावणकुंभकर्ण । सपुत्र प्रधान सैन्येसी ॥ १०१ ॥

सोडावी देवांची बांदवडी । तोडावी नवग्रहांची बेडी ।
उभारावी रामराज्याची गुढी । कीर्ति चोखडी श्रीरामाची ॥ १०२ ॥

तेथे मज नेतां सीतासती । एवढी श्रीरामाची कीर्ती । माझेनि होऊं पाहे अपकीर्ती । हेहि युक्ती नये करूं ॥ १०३ ॥

एवं अवश्य भेटावी सीता । तेहि भेटी अति गुप्तता । रावण राक्षसीं न देखतां । अति एकांतां भेटावे ॥ १०४ ॥

मज भेटतां सीतेसी । विकल्प धरील मानसीं । पुर्वी छळिले संन्यासवेषीं । वानरवेषीं छळूं आला ॥ १०५ ॥

विश्वसावया श्रीरामभद्रा । आधीं टाकूं श्रीराममुद्रा । भावार्थ देखोनि सीतासुंदरा । भेटी वानरा ते संधीं ॥ १०६ ॥

सीता श्रीराम मुद्राभेटी । सीता मुद्रिका संवाद गोष्टी । अनुपम्य कथा कसवटी । गोड गोष्टी सीतेच्या ॥ १०७ ॥

सीता मुद्रिका संवाद कथा । अति गोड त्या हनुमंता । तीपुढें फिकेपण अमृता । सावधानता अवधारा ॥

अनुक्रमणिका

१०८ ॥

याचे नांव सुंदरकांड । अमृतापरीस अति गोड । पुरवी ब्रह्मज्ञानाचे कोड । करीन चाड श्रोतयांते ॥ १०९ ॥

एका जनार्दना शरण । गोडी गोड निरोपण । कथा नव्हे हे ब्रह्म परिपूर्ण । समाधान जीव शिवां ॥ ११० ॥

करितां कथा निरोपण । जीवाचें उडे जीवपण । शिवाचें उडे शिवपण । ब्रह्म परिपूर्ण कोंदाटें ॥ १११ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीताहनुमंतदर्शनो नाम दशमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग अकरावा

## सीता हनुमंत परिचय

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

सवेग भेटावी श्रीरामकांता । परम उल्हास हनुमंता । तिच्या [मु. 'निरपेक्ष'.] निरीक्षित एकांता । वृक्षा आंतौता बैसलासे ॥ १ ॥

स्वस्थानीं राक्षसी समस्ता । स्वभावें झालीया निद्रिस्ता । अशोक वृक्षातळीं सीता । सावधानता बैसली असे ॥ २ ॥

म्हणे मज नाहीं पापकर्मता । तरी कां भोगी दुःखावस्था ।
वृथा लक्ष्मण अभिशापिता । पापें [वि. 'रघुनाथा अंतरलें'.] लंकानाथा आतुडलें ॥ ३ ॥

लक्ष्मणाची मर्यादरेखा । मज उल्लंघितां देखा । अंतरोनी श्रीरामसुखा । दशमुखा आतुडलें ॥ ४ ॥

छळूं जातां श्रीरामभक्ता । तेणें मुकलें मी रघुनाथा । तेंही पाप माझें माथा । [तु. दै. 'उद्वद्धता'; मु. 'दुःखावस्था मी भोगी'.] उद्वंधनता राक्षसी ॥ ५ ॥

मी तंव जगाची जगज्ञननी । भक्त छळणें महापापिणी । मज रावण म्हणे होय पत्नी । श्रीराम स्वप्नीं न देखे ॥ ६ ॥

छळण पाप सबळ जनीं । त्या पापाची पाहे पां करणी । राम नायके मी कानीं । श्रीराम स्वप्नीं न देखे ॥ ७ ॥

यालागीं कोणाचेंहि छळण । [मु. 'प्राणांतीही'.] प्राणांतें न करावें आपण । छळणाचें पाप पूर्ण । आपलें आपण मी भोगीं ॥ ८ ॥

छळण पापाचें पातकीं । कैसी अनुतापली जानकी । बैसोनिया एकाकी । [मु. 'पुढील श्लोकीं'.] पूर्वानूलोकीं अनुवादे ॥ ९ ॥

नूनं स कालो मृगरूपधारी मामल्पपुण्यां लुलुभे तदानीम् ।
मोहान्मया तत्र तु तौ नियुक्तौ रामानुजो लक्ष्मणपूर्वजश्च ॥ १ ॥
जितात्मानौ महात्मानौ ययोर्न स्तः प्रियाप्रिये । प्रियाप्रियवियुक्तानां नमस्यामि महात्मनाम् ॥ २ ॥

निश्चयें मानिलें निज निष्ठा । मृग नव्हे तो काळ कळीकांटा ।
तिघां केल्या तीन वाटा । हेंहि कटकटा म्यांची केलें ॥ १० ॥

अनुक्रमणिका

मृगरूपी केवळ काळ । माझा [तु. दै. 'भोग'.] लोभ तो काळवेळ । [मु. 'खवळोनिया'.] दोन्ही मिळोनी तात्काळ । मज म्यां केवळ नाडिलें ॥ ११ ॥

माझ्या लोभाची कुबुद्धि मोठी । मृगलोभाच्या सलोभ दृष्टी ।
म्यां रामा लाविलें मृगपाठीं । तेव्हांचि करंटी मी झालें ॥ १२ ॥

करंटी बुद्धि बाणली कैसी । लक्ष्मण रक्षण सत्व राशी । रामे ठेविला मजपासीं । छळूनी त्यासी म्यां दवडिलें ॥ १३ ॥

लक्ष्मण न मानी अल्प छळासी । माझी पापबुद्धि कैसी । एकला राहतोसी मजपासीं । रामप्रियेसी भोगावया ॥ १४ ॥

धांवण्या न वचोनी रामापासी । स्वये भोगावया सीतेसी ।
तूं काय राहातोसी मजपासीं । वक्रोक्तेसी छळियला ॥ १५ ॥ [ओवी १५ तु. दै. प्रतींत नाही.]

ऐकतां माझ्या पापगोष्टी । बोटें घालुनी कर्णपुटीं । लक्ष्मण पळे उठाउठी । ऐसी मी खोटी पापिणी ॥ १६ ॥

श्रीराम आज्ञा लक्ष्मणा । मजपासीं संरक्षणा । ते राम आज्ञा उल्लंघना । छळणें लक्ष्मणा पळवीलें ॥ १७ ॥

श्रीराम आज्ञा उल्लंघितां । भेटणें ठेलें रघुनाथा । आंतडोनी लंकानाथा । दुःखावस्था तेणें पापें ॥ १८ ॥

लक्ष्मण सर्वत्र सुमित्र । तो म्यां छळुनी केला कुमित्र । तेणें पापें दशवक्त्र । मज अपवित्र झोंबला ॥ १९ ॥

धन्य लक्ष्मणाची मर्यादरेखा । नुलंघेची दशमुखा । ते म्यां उल्लंघितां देखा । परम दुःखा पावलें ॥ २० ॥

राम पाठविला मृगापाठीं । हेचि माझी बुद्धि खोटी । तेणें श्रीरामें पडली तुटी । दुःख कोटी मज [पै. वि. कं. मुं. तं. अं. 'माझें'.] प्राप्त ॥ २१ ॥

भ्रतारापासीं स्वयें मागणें । हेंचि स्त्रियांचे निंद्य जिणें । तेणें निंद्यत्वें मज रावणें । धरुनी आणिलें लंकेसी ॥ २२ ॥

लोभें मागतां मृगकांचोळी । माझ्या व्रततपाची झाली होळी ।
श्रीराम अंतरला महाबळी । दुःख समेळीं निज [कं. 'मेळे'.] लोभें ॥ २३ ॥

श्रीराम केवळ आत्माराम । लक्ष्मण सबाह्य नित्य निष्काम ।
[कं. .मुं 'लाभला'.] लाभालाभ दोहींसी सम । [कं. वि. पै. मु. अं. तं. 'द्वंद्वीं'.] देहीं आराम निर्द्वंद्व ॥ २४ ॥

अनुक्रमणिका

**लाभालाभीं समसमान । निधडे दोघे रामलक्ष्मण । त्यासी माझें लोटांगण । अनन्य शरण मी त्यांसी ॥ २५ ॥**

**देखोनि अनुतापी सीता । कृपा उपजली हनुमंता । श्रीराममुद्रा होय टाकितां । दुःखावस्था शमावया ॥ २६ ॥**

**श्रीराम मुद्रेचा बडिवार । दुःख निर्दाळुनी समग्र । सुख द्यावया अपरंपार । चिदचिन्मात्र श्रीराममुद्रा ॥ २७ ॥**

**दीपिका तेज** [मु. दै. 'अंधार गुप्त'.] **आधारयुक्त । श्रीराममुद्रा क्लेशग्रासी समस्त ।**
**करुनी शशीसूर्य खद्योत । प्रकाशवंत श्रीराममुद्रा ॥ २८ ॥**

**श्रीराममुद्रा प्रकाशवंत । सीता देखोनि अकस्मात । स्वयें झाली अति विस्मीत । कैसेनि येथ ही आली ॥ २९ ॥**

> रामनामांकितं देवि दिव्यं पश्यांगुलीयकम् । सुवर्णस्य सुवर्णस्य सुवर्णस्य च भामिनी ॥ ३ ॥
> गृहीत्वा प्रेक्षमाणा सा तद्भर्तुःकरभूषणम् । मुमोच हर्षजं वारि सव्रीडितमधोमुखी ॥ ४ ॥
> भर्तारमिव संप्राप्य जानकी मुदिताभवत् । कुशली यदि काकुत्स्थो लक्ष्मणेन यवीयसा ॥ ५ ॥
> किं न लङ्कामपिदहेद्युगान्ताग्निरिवोत्थितः ॥ ६ ॥

**सुवर्णमुद्रा वरी सुवर्णवर्ण । श्रीरामसंगे शुद्ध सुवर्ण । जानकी स्वयें सुवर्णवर्ण । देखे सुवर्णमुद्रिका ॥ ३० ॥**

**मुद्रिका पीठ पत्रावळी । सहस्त्रनाम प्रभावळी । अक्षरीं अक्षर लिहिल्या ओळी । अक्षरें न्याहाळी जानकी ॥ ३१ ॥**

**अक्षरीं निबद्ध मुद्रिका । दशावताराची टीका । जडित चरित्र माणिका । सुखदायका सीतेसी ॥ ३२ ॥**

**मुद्रिका गर्भ अति पवित्र । त्याहीमाजीं परात्पर । श्रीरामनाम निजाक्षर । चिदचिन्मात्र मुद्रिका ॥ ३३ ॥**

**ऐसी मुद्रिका देखोनि तेथ । सीता झाली सद्गदित । नेत्रीं आनंदजळ स्त्रवत । हर्षयुक्त जानकी ॥ ३४ ॥**

**मुद्रिका शोभे नामें करीं । श्रीरामनाम मुद्रिकेवरी । राममुद्रिके सबाह्यांतरीं । सीतासुंदरी स्वयें देखे ॥ ३५ ॥**

**देखतांची** [तु. दै. 'नमस्कार केला'.] **चमत्कार झाला । स्वयें श्रीरामची आला । सीतेसी ऐसा भाव गमला । सरसाविला अंचल ॥ ३६ ॥**

**श्रीराम आला एकाएकी । लाजा झाली अधोमुखी । सर्वांगें हरिखेली जानकी । सुखोन्मुखी डुल्लतु ॥ ३७ ॥**

**केउता आहे तो लक्ष्मण । दुष्ट दुरोक्त केलें छळण । त्याचे केशीं झाडीन चरण । लोटांगण घालुनी ॥ ३८ ॥**

**सावधान होतां देखा । पुढा देखे अंगुळी एका । ओळखुनी श्रीराममुद्रिका । प्रेमोन्मुखा जानकी ॥ ३९ ॥**

अनुक्रमणिका

पहिलें वंदिली निडळीं । मग आलिंगिली हृदयकमळीं । स्वानंदे चुंबी जनकबाळी । सुखें वेल्हाळी आलीसी ॥ ४० ॥

म्हणोनी घाली लोटांगण । बैस करुं दे चरणक्षाळण । तुझें तीर्थ मी सेवीन । करीन संवाहन चरणांचें ॥ ४१ ॥

तू तंव सखी श्रीराममुद्रा । घालुनी सेजे करी निद्रा । श्रमलीसी उतरतां समुद्रा । आणि गिरीवरा लंघितां ॥ ४२ ॥

न म्हणे सचेतन अचेतन । सद्गुरुभक्ती प्रेमपूर्ण । तेणें हनुमंतां आलें रुदन । करी स्फुंदन वृक्षांत ॥ ४३ ॥

आम्ही म्हणवितों भक्त । हें प्रेम नाहीं आम्हांत । जानकी प्रेमें सदोदीत । इसी रघुनाथ तुष्टला ॥ ४४ ॥

अचेतनीं प्रेम [मु. 'पान्हा हो'.] पाहा हो । ऐसा कोणासी नाहीं सद्भावो । इसी तुष्टला श्रीराम रावो । वंद्य स्वयमेवो सर्वांसी ॥ ४५ ॥

सगुण निर्गुण सद्गुरुभक्त । जो वंदी तो नित्य मुक्त । जो निंदी त्या नरकपात । वेदशास्त्रार्थ संमत ॥ ४६ ॥

मुद्रिका देखतांची दृष्टीं । अत्यादरें मानी गोरटी । तिसीं सप्रेम पुसे गोष्टी । अवस्था पोटीं जे वर्ते ॥ ४७ ॥

कुशल असतां रामलक्ष्मण । तरी कां माझी सोडवण । करावया न करितां [तु. दै. 'आठवण'.] आंगवण । दुर्धर बाण असतांहि ॥ ४८ ॥

सुटलिया श्रीरामाचा बाण । समुद्र शोषुनी संपूर्ण । सलंका निवटुनी रावण । माझी सोडवण करितां कीं ॥ ४९ ॥

त्या दोहीं वीरीं त्यजिली सृष्टी । हें न सांगावे [तु. दै. वि. मुं. कं. मु. 'कोटी'.] दुःखगोष्टी ।
यालागीं सुचली [तु. .दै 'गोष्टी'.] मौननिष्ठी । सज्ञान मोठी तूं होसी ॥ ५० ॥

श्रीराम गेला परलोकता । तूं मज मूळ आलीस आतां । तो जरी येथ स्वस्थ असतां । मज सोडवितां निमिषार्धें ॥

मुद्रिके सांग सत्य गोष्टी । मज रावणें हरिल्या पाठीं । दोघे येऊनी पंचवटी । अतिसंकटीं काय केलें ॥ ५२ ॥

मज न देखतां पर्णकुटीं । दोघे झाले कडेलोटी । अथवा शस्त्रें घातलीं पोटीं । केला कंठीं गळफांस ॥ ५३ ॥

किंवा लोकलज्जें भ्याले । दोघे विष घेऊनी निमाले । माझेनि शोकें मुर्छित झाले । मुर्छेसवें गेले प्राण त्यांचे ॥ ५४ ॥

अनुक्रमणिका

सीता सीता आक्रंदोनी । प्राण सांडोनि दोघाजणीं । नातरी मागतां पाणी पाणी । ताहाना फुटोनी निमाले ॥ ५५ ॥

माझेनि दुःखेंदुखी प्रबळ । त्यजिलें फळमूळजळ । दोघां भरोनिया तरळ । प्राण तात्काळ सोडिले ॥ ५६ ॥

पर्वतकडा कां प्रचंड धोंडीं । दोघीं घातल्या मुरकुंडी । तेथें वाळोनी झाली कर्वडी । दुःख निरवडी निमाले ॥ ५७ ॥

विजनीं मूर्छित पडले । कीं वृकव्याघ्री फाडिले । किंवा सिंहें विभांडिले । कीं रगडिले वनगजीं ॥ ५८ ॥

अथवा बुडाले सागरीं । गिळिले मच्छमगरीं । रिघतां गिरींगव्हरीं । तरसीं तगरीं भक्षिलें ॥ ५९ ॥

ते तंव दोघे वीर निधडे । सिंह, सर्प, व्याघ्र बापुडे । शार्दूळ पळती तयांपुढे । केलें कुडें रावणें ॥ ६० ॥

रावणें छळुनी केलें घातां । स्नानतर्पण करितां । अथवा फळेंमुळे खातां । दोघां निद्रिस्ता मारिले ॥ ६१ ॥

देखतां श्रीरामाचा बाण । रावण भयें पलायमान । श्रीराम नित्य सावधान । त्यासी छळण [तु. दै. ‘बाधीना’.] चालेना ॥ ६२ ॥

विश्वामित्र यागाप्रती । श्रीराम सावध अहोरातीं । करितां सुबाहू छळणोक्ती । तोहि रघुपतीं मारिला ॥ ६३ ॥

छळावया सुंदरपण । शूर्पणखा आली आपण । तिचें केलें विटंबन । न चले छळण रामासीं ॥ ६४ ॥

माझे नि दुःख शोकें जाण । स्वयें श्रीराम सांडिला प्राण ।
येऱ्हवी निवटोनी रावण । माझी सोडवण तो [मु. ‘येता की’.] करिता ॥ ६५ ॥

श्रीरामभातां दुर्धर शर । निवटूं शके चराचर । शोषोनिया पैं सागर । नरवानर येथें येते ॥ ६६ ॥

वर्षोनिया बाणजाळी । लंका करुनिया होळी । रावण निर्दाळुनी [मु. ‘समूळी’.] सकुळीं । जनकबाळी सोडवितां ॥ ६७ ॥

विराधें लावितांची हात । एकेंचि बाणें केला घात । तो राम असतां जैं [तु. पै. ‘जीवित’; ‘जीवें जीत’.] जीत । लंकानाथ निर्दाळिता ॥ ६८ ॥

चौदा सहस्त्र राक्षसगण । त्रिशिरा मारिले खरदूषण । त्यासी मारितां पैं रावण । अर्ध क्षण न लागतां ॥ ६९ ॥

श्रीराम सहजेची उदासी । रावणें हरितां स्त्रियेसीं । न्यस्तशस्त्र झाला संन्यासी । वनवासी विचरत ॥ ७० ॥

अनुक्रमणिका

संन्यासियाची स्वभावतां । धरुं नये देहाची ममता । करूं नये स्त्रियेची चिंता । खुंटली कथा धांवण्याची ॥ ७१ ॥

संन्यासधर्म स्वभावतां । अभयदान दिधलें भूतां । आतां वधूं नये लंकानाथा । खुंटली कथा [मु. 'लंकेची'.] धांवण्याची ॥ ७२ ॥

अथवा आणिक आहे गुज । श्रीराम आत्माराम सहज । रावणें हरितां [मु. 'भाज'.] मज । समाधी सेज प्रवेशे ॥ ७३ ॥

समाधिसुखीं स्वभावता । कैंचा राम कैंची सीता । रावणें हरिली माझी कांता । हेंहि रघुनाथा नाठवे ॥ ७४ ॥

समाधीसुखें सुखसंपन्न । मिथ्या देहादि प्रपंचभान । मिथ्या रामसीतारावण । धांवण्या कोण तेथें धावें ॥ ७५ ॥

मुद्रिके सत्य सांग मजसी । श्रीराम झाला संन्यासी । अथवा समाधिसेजेसीं । किंवा देहासी त्यागिलें ॥ ७६ ॥

मुद्रिके मौनाचें [वि. तु. कं. मुं. दे. 'कारण'; मु. 'वचन'.] लक्षण । निमाले रामलक्ष्मण । हेचि तुझ्या मौनाचें कारण । अति सज्ञान निज मौन ॥ ७७ ॥

अबोलणें ज्याचें ठायीं । त्याचिया ज्ञाना मर्यादा नाहीं । तें तंव वर्तते तुझिया ठायीं । वानूं कायी गुण तुझे ॥ ७८ ॥

माझी वस्ती वामभागीं । तूं [पै. मुं. अं. तं. 'वर्तसी उत्तमांगीं'.] वससी दक्षिणांगीं । श्रीरामाचे अंगसंगीं । तूं सर्वांगें सर्वज्ञ ॥ ७९ ॥

सद्‌गुरू आंगीचें अचेतन । मिथ्या न मानी सीता सज्ञान । तिचें न करीची हेळण । उपेक्षमान न करीची ॥ ८० ॥


श्रीराममुद्रा अचेतन । तिसी देऊनी अती सन्मान । मृदु मंजूळ विनऊन । काय आपण पुसतसे ॥ ८१ ॥

कैसेनि चालवले वाटा । कैसेनि उलंघिले घाटा । समुद्र तरणीं दुस्तर मोठा । केंवि परतटा आलिसी ॥ ८२ ॥

मज संबोखावया येथ । तुज काय धाडिलें श्रीरघुनाथ । ऐसें बोलत बोलत । पडे मूर्छित [कं. 'धरणीये'.] जानकी ॥ ८३ ॥

अनुक्रमणिका

**सीतेला श्रीराममुद्रिकेचे दर्शन**



अनुक्रमणिका

श्रीराममुद्रा प्रकाशवंत । सीता देखोनि अकस्मात । स्वयें झाली अति विस्मित । कैसेनि येथ ही आली ।

अनुक्रमणिका

सीता पडतांची मुर्छित । हनुमान झाला साशंकित । श्रीरामविरहें अति संतप्त । प्राण निश्चित त्यागील ॥ ८४ ॥ [ओव्या ८४, ८५ आणि ८६ तु. दै. प्रतींत नाहीत.]

देखतां श्रीराममुद्रेसी । राम निमाला वनवासीं । धरुनी निश्चयो मानसीं । निजदेहासी त्यागील ॥ ८५ ॥

देह त्यागिताची सीता । श्रीराम म्हणेल हनुमंता । समुद्र लंघुनी तत्वतां । कोण्या अर्था साधिलें ॥ ८६ ॥

मज आलिया लंकेआंत । ना सीता ना रघुनाथ । ऐसा ओढवला अनर्थ । तेणें हनुमंत अति दुःखी ॥ ८७ ॥

इति संचिन्त्य हनुमांश्चकार मतिमान्मतिम् । राममक्लिष्टकर्माणं सबन्धुमनुकीर्तयन् ॥ ७ ॥

सीता पडतां मुर्च्छापन्न । हनुमंत अतिउद्विग्न । हृदयीं स्मरतां रघुनंदन । बुद्धि निर्विघ्न आठवली ॥ ८८ ॥

सीता व्हावया सावधान । करुं श्रीराम कीर्तन । यालागीं श्रीरामकथागायन । करी आपण मारुती ॥ ८९ ॥

कौसल्यागर्भी गर्भातीत । दाशरथी श्रीरघुनाथ । परब्रह्म मूर्तिमंत । [मु. 'सूर्यवंशीं अवतरला'.] सूर्यवंशांत अवतार ॥ ९० ॥

श्रीराम पुरुष सीता प्रकृती । राम चैतन्य सीता चित्‌शक्ती । श्रीराम धैर्य सीता धृती । अनन्यगती अवतार ॥ ९१ ॥

साखर आणि गोडी पाहतां । दोनांवीं एकची वस्तुता । तेंवी श्रीराम आणि सीता । एकात्मता अवतार ॥ ९२ ॥ [ओवी ९२ मुं. कं. वि. मु. प्रतींत नाही.]

श्रीरामाचें आचरित । गुरुपितृ आज्ञा नित्य विक्रीत । ब्राह्मणाचा निजभक्त । सुर साह्यार्थ अवतार ॥ ९३ ॥ [ओवी ९३ तु. दै. प्रतींत नाही.]

कैकयी वरदे दशरथ । श्रीराम धाडी दंडकारण्यांत । सीता लक्ष्मण समवेत । निघे रघुनाथ वनवासा ॥ ९४ ॥ [ओवी ९४ वि. प्रतीत नाही.]

वनवास गंगातटीं । वसतीस्थान पंचवटीं । श्रीराम राहिला जगजेठी । सीता गोरटी समवेत ॥ ९५ ॥

शूर्पणखा करितां छळण । तें जाणोनि श्रीराम सज्ञान । तिचे घेऊनी नाक कान । विटंबोनी सोडिली ॥ ९६ ॥

तिचे कैवारी दारुण । त्रिशिरा मारिले खरदूषण । रामें घेऊनी जनस्थान । दिधलें दान द्विजांसी ॥ ९७ ॥

मृग कंचुकीस लोभतां । मृगामागें धाडी रघुनाथा । छळणें सौमित्र दवडीतां । हरिली सीता रावणें ॥ ९८ ॥

श्रीराम आणि लक्ष्मण । करितां सीता गवेषण । जटायु रावणा रणांगण । दोघेजण तेथें आले ॥ ९९ ॥

अनुक्रमणिका

रथपात छत्रपात । पक्षें गांजिला लंकानाथ । जटायु रावणें पाडिला जेथ । श्रीरघुनाथ तेथ आले ॥ १०० ॥

श्रीराम कृपाळू परिपूर्ण । करुनी जटायु उद्धरण । कबंध मारुनियां जाण । आले आपण किष्किंधे ॥ १०१ ॥

रामें निर्दाळूनि वालीसी । राज्य दिधलें सुग्रीवासीं । युवराज्य अंगदासीं । वानरांसी निजसख्य ॥ १०२ ॥

तुझेनि शुद्धीसी निश्चितें । श्रीरामें पाठविलें मज येथें । तुझे भेटीलागीं सीते । व्रत रघुनाथें धरिलेसें ॥ १०३ ॥

शिळीं बांधोनी सागर । सपुत्र प्रधान निशाचर । येणेंसी वधोनि दशशिर । सीतासुंदर उद्धरणें ॥ १०४ ॥

विश्वास न मानिसी वानरा । म्हणोनी खूण मियां आणिली मुद्रा ।
सांडूनिया निद्रातंद्रा । भेट कपींद्रा रामदूता ॥ १०५ ॥

ऐकोनि श्रीरामचरित । सीता झाली सावचित्त । [तु. दै. 'कोण'.] कथा अनुवाद वृक्षाआंत । अति विस्मित जानकी ॥ १०६ ॥

कृपेनें [तु. दै. वि. 'कळवळिला'.] कोंवळा श्रीरघुनाथ । मज आश्वासावया येथ । वृक्ष कथा अनुवादत । आला निश्चित श्रीराम ॥ १०७ ॥

वृक्षासी पुसे करुनी नमन । कोण करितों रामकीर्तन । त्याचें पाहीन मी वदन । लोटांगण त्यासी माझें ॥ १०८ ॥

ज्यासी श्रीराम कथेची शैली । त्याचे चरणरजधुळी । मी वंदीन सुख [तु. दै. 'मोळी'.] समेळी । मुख मजजवळीं दाखवावें ॥ १०९ ॥

ज्याच्या मुखीं श्रीरामकीर्तन । त्याचें मज देखतां वदन । परम सुख समाधान । कृपा करून भेटावें ॥ ११० ॥

सीता सप्रेम निजचित्तें । परमोत्कट अति भावार्थें । जेणें खूण मुद्रा आणिली येथें । तेणें कृपावंतें भेटावें ॥ १११ ॥

तामब्रवीत्पुनर्धीमान्हनूमान्मारुतात्मजः । शिरस्यंजलिमाधाय वैदेहीं प्रतिपूजयन् ॥ ८ ॥

ऐकोनि सीतेचें वचन । हनुमंत स्वयें उतरोन । सीतेसी घाली लोटांगण । मस्तकीं चरण वंदिले ॥ ११२ ॥

सीता देखोनिया दिठीं । तिची होतां निकट भेटी । हनुमंतासी हर्ष कोटी । आनंद सृष्टीं न समाये ॥ ११३ ॥

महानिधीचा लाभ झाला । सुधाब्धि चुळोदकें प्राशिला ।
कीं कळीकाळ जिणोनी आला । तो पाडु जाहाला हनुमंता ॥ ११४ ॥

अनुक्रमणिका

तेणें हरिखाचेनि मेळें । गडबडा पायावरी लोळे । आनंदाश्रु स्रवती डोळ । सुखसमेळे नाचत ॥ ११५ ॥

धांवधांवोनि पाया पडे । स्वेदसद्‍गदें सप्रेम रडे । पुच्छ नाचवोनिया पुढें । हरुषें उडे वानर ॥ ११६ ॥

येथें सांपडली सीता । कार्यसिद्धी श्रीरघुनाथा । यश आलें हनुमंता । उल्हासता उपरमत ॥ ११७ ॥

सीता विचारी पोटांत । हा म्हणवितो श्रीरामदूत । रामापासीं कैंचा हनुमंत । पूर्व वृत्तांत मी जाणें ॥ ११८ ॥

रामलक्ष्मण दोघे वीर । त्यासवें नाही [पै. अं. 'ही'.] वानर । कैंचे नेणो हें [तु. दै. कं. मुं. 'नरवानर'.] वनचर । नाना विकार करिताहे ॥ ११९ ॥

हा तंव रावण निश्चयेंसी । पहिलें आला होऊनी संन्यासी । आतां आला वानरवेषीं । न ये यासीं विश्वासों ॥ १२० ॥

परि हा वदतो रामकथा । कपटी म्हणो नये हनुमंता । मी काय देखते स्वप्नावस्था । तेंचि सीता अनुवादे ॥ १२१ ॥

> स्वप्नो मयायं विकृतोऽथ दुष्टः । शाखामृगो धिग्मम भागधेयम् ।
> स्वप्नोऽस्ति नायं नहि मेऽस्ति निद्रा । भयेन शोकेन च पीडितायाः ॥ ९ ॥

मज श्रीरामाचें नित्य ध्यान । तेणें मी देखतें स्वप्न । रामदूताचें आगमन । सर्वथा जाण घडेना ॥ १२२ ॥

दुर्गम दुर्ग लंकापुर । आडवा दुर्धर सागर । अशोकवन अति दुस्तर । केंवी वानर प्रवेशे ॥ १२३ ॥

रावण राणिवंसा आंत । अशोकवन अति गुप्त । तेथें प्रवेशे रामदूत । हा सत्यार्थ घडेना ॥ १२४ ॥

जरी हें मानू दिसतें स्वप्न । तरी मी आहे सावधान । नाहीं निद्रा ना स्वप्नभान । सत्य आगमन वानरु ॥ १२५ ॥

श्रीरामकथा अनुवादत । धन्य धन्य हे श्रीराम भक्त । माझेनि भाग्यें [वि. 'लंके आंत'.] हनुमंत । आला [तु युद्धयर्थ.] शुद्धयर्थ कैवारी ॥ १२६ ॥

मिथ्या म्हणों नये हनुमंता । जें बोले तें सत्य वार्ता । याचिया पूर्व वृत्तांता । पुसों आतां यापासीं ॥ १२७ ॥

सीता पुसेल वृत्तांत । सत्य सांगेल हनुमंत । तेचि कथेचा कथार्थ । मुख्य मोक्षार्थ मुमुक्षा ॥ १२८ ॥

एका जनार्दना शरण । सीता मारुती संभाषण । हें रामायणीं गोड रामायण । श्रोतीं अवधान मज द्यावें ॥ १२९ ॥

अनुक्रमणिका

श्रोतीं दिधलिया अवधान । कथा होय चैतन्यघन । श्रोतीं कथेसी निज जीवन । एका जनार्दन कृपाळु ॥ १३० ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीताहनुमंतपरिचयो नाम एकादशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग बारावा

## सीता हनुमंत सुखसंवाद

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

एकाएकी अशोक वना आंत । आला देखोनि हनुमंत । त्याचा समूळ वृत्तांत । पुसे साद्यंत जानकी ॥ १ ॥
[[1]तु. दै. प्रतींत पहिली ओवी अशी आहे :— 'भक्त भावार्थ कटीं मेखळा । क्षुद्र घंटिका ज्वाळा माळा । झालिया सगळ्या ऋद्धि मेळा । देखिला डोळां हनुमंत ॥ १ ॥']

मज वनवासीं असतां । तैं तूं नव्हतासी हनुमंता । कैंचा आलासी तूं आतां । निज वृत्तांत मज सांग ॥ २ ॥

कैसेनि राम देखिला दृष्टीं । तुम्हां श्रीरामा कैसी भेटी । कैशा कैशा केल्या गोष्टी । जेणें कां पोटीं अति प्रिती ॥ ३ ॥

कैसा बाणला तो वचनार्थ । साधावया श्रीराम कार्यार्थ । हनुमान प्राणत्यागें उल्हासित । तो गुह्यार्थ मज सांग ॥ ४ ॥

श्रीराम भेटलिया कैसें सुख । श्रीराम वचनें कैसें पियुष । श्रीराम संगें कैसें हरिख । योग्य परिपाक मज सांग ॥ ५ ॥

> तां तु रामकथां श्रुत्वा वैदेही वानरर्षभम् । उवाच वचनं सीता प्रियं मधुरया गिरा ॥ १ ॥
> क्व ते रामेण संसर्गः कथं जानासि लक्ष्मणम् । वानराणां नराणां च कथमासीत्समागमः ॥ २ ॥
> रामस्य यानि लिंगानि लक्ष्मणस्य च वानर । तानि भूयस्त्वमाचक्ष्व न मां शोकःसमाविशेत् ॥ ३ ॥

श्रीरामाचे ठाणमान । रुपरेखा गुण लक्षण । कैसा आहे सखा लक्ष्मण । जीवीची खूण मज सांग ॥ ६ ॥

ऐकतां श्रीरामाची कथा । दुःख शोक नाठवे चित्तां । निमे संसार [तु. दै. मु. 'व्यथा'.] भयवार्ता । कथा ऐकतां आनंद ॥ ७ ॥

याचलागीं पुढतपुढती । कथा पुसें मी अति प्रिती । कथेमाजीं निज विश्रांती । जाण मारुती निश्चित ॥ ८ ॥

केलिया कथेचें श्रवण । नाहीं मनन नाहीं निदिध्यासन । ते ते कथा जाय वाळोन । जीवनेवीण जेंवि धान्य ॥ ९ ॥

श्रद्धा श्रीराम कथा श्रवण । ऐक त्याचें निज महिमान । मननें मनचि होय उन्मन । अहं विरोनी होय सोऽहम् ॥ १० ॥

चित्त चिंतन होय चैतन्य । बुद्धि सम साम्य समाधि घन । कर्मचि होय ब्रह्मपूर्ण । इंद्रिया चरण चिन्मात्र ॥ ११

अनुक्रमणिका

॥

**ऐसी श्रीराम स्वरुप** [वि. 'सत्ता'.] **संस्था । सादरें पुसतां पैं स्वयें सीता । ठक पडिलें हनुमंता । कथावार्ता विसरला ॥ १२ ॥**

**धन्य हनुमंताचें** [तु. दै. 'ध्यान'.] **ज्ञान । करितां श्रीराम चिंतन । आठव विसरातें गिळोन । सावधान स्वयें झाला ॥ १३ ॥**

> एवमुक्तस्तु वैदेह्या हनुमान्मारुतात्मजः । ततो रामं यथा तत्त्वमाख्यातुमुपचक्रमे ॥ ४ ॥
> देवि रामस्य लिंगानि लक्ष्मणस्य च यानि मे । लक्षितानि विशालाक्षि वदतः श्रुणु तत्त्वतः ॥ ५ ॥

**सीता पुसे श्रीरामकथा । तेंचि श्रीरामस्वरुप संस्था । हनुमंत होय सांगतां । यथार्थता स्वरुप ॥ १४ ॥** [ओवी १४ तु. दै. मुं. प्रतींत नाही.]

**लक्ष्मणाचें निज लक्षण । ठाणमान सगुण गुण । समूळ सांगेल आपण । सावधान अवधारा ॥ १५ ॥** [ओवी १५ तु. दै. मु. प्रतींत नाही.]

**सांगावया श्रीरामकथा । उल्हास हनुमंताच्या चित्तां । देखोनि सीतेची सादरता । होय सांगतां स्वानंदें ॥ १६ ॥**

**श्रीराम रुपें अति स्वरुप । रुपें जिंकिला कंदर्प । परि तो रुपेंचि अरुप । चित्स्वरुप श्रीराम ॥ १७ ॥**

**राम राजीव लोचन । जगाचे नयनाचे नयन । परि तो देखणा डोळेविण । देखणेंपण हें जानकी ॥ १८ ॥**

**दृश्य देखणें हें तंव गौण । श्रवणांत देखणें नयन । देखणया देखणा श्रीराम संपूर्ण । डोळ्याविण देखतसे ॥ १९ ॥**

**कुंडलें वर्णिती साकार । एक म्हणती मकराकार । श्रवणें मालवती विकार । निर्विकार निज लेणें ॥ २० ॥**

**श्रीरामाचें निज श्रवणें । श्रवणा होतीं निज भूषणें । श्रवणा श्रवणेंचि लेणें । श्रवणें देखणें परब्रह्म ॥ २१ ॥**

**परमार्थाचें मुख्यबीक । निरपेक्षा तें नासिक । तेणेंविण तें निर्नासिक । कैंचें** [मुं. मु. 'सुख साक्षेपें'.] **सुख सापेक्ष ॥ २२ ॥**

**श्रीरामाची नासिक स्थिती । प्राणप्राण्या नित्य विश्रांती । श्रीराम प्राण्या प्राणगती । गतीसी विश्रांती श्रीरामें ॥ २३ ॥**

**श्रीरामाचा मुखमयंक । नित्यानंदें निष्कलंक । ब्रह्मादि देवां सुखदायक । जीवशिवां सुख श्रीरामें ॥ २४ ॥**

**जीव शिव तें दोन्ही अधर । श्रीराम अधरीं झाले सधर । मिळणी मिळती एकाकार । शिव सुखसार श्रीराम ॥**

अनुक्रमणिका

२५ ॥

श्रीराममुखीच्या दंतपंक्ती । जेंवी ओंकारामाजीं श्रुती । श्रुतीची ही निज विश्रांती । श्रीराममूर्ति मुखचंद्र ॥ २६ ॥

श्रीरामाचां निज निडळी । सच्चिदानंद हेंचि त्रिवळी । त्याचें ललाट भाग्यमेळीं । लोकीं सकळीं नांदिजे ॥ २७ ॥

प्रेम केशर [तु. दै. 'प्रेमळा'.] समेळा । टिळक रेखिला पिवळा । निर्धार अक्षता निडळा । राम प्रेमळा पढियंता ॥ २८ ॥

अहं मृग वधिला निर्लोभेंसी । सोहं काढोनि मृगनाभिसी । तेहि अर्पिली श्रीरामासी । निजांगासी चर्चुनी ॥ २९ ॥

जन विजन विवंचून । काढिला निज धैर्य चंदन । त्याचेंहि सुगंध काढून । उद्वर्तन श्रीरामा ॥ ३० ॥

त्यजुनी स्वधर्म कर्म फळा । तेंची मुक्ताफळ माळा । शोभे श्रीरामाच्या गळा । राम प्रेमळा पढियंता ॥ ३१ ॥

ओंकार तोची कंबुकंठ । तेथोनि वेदासी वाहती वाट । गर्जती विधीवादें उद्भट । होती प्रकट त्रिकांडीं ॥ ३२ ॥

त्वं पद तत्पदातीत । हृदयीं पदक सदोदीत । साधु चिद्रत्नीं रत्नजडीत । लखलखीत निज तेजें ॥ ३३ ॥

म्हणती कासे कसिला पितांबर । श्रीराम कासे चिदंबर । झांकी शून्यत्वाचें छिद्र । कासें अछिद्र श्रीराम ॥ ३४ ॥

श्रीराम कासे दृढभारी । एक पत्नी व्रतधारी । कासेलागलियातें तारी । भवसागरीं तारक ॥ ३५ ॥

श्रीराम आकळे सगळा । भक्त भावार्थ कटी मेखळा । क्षुद्रघंटिका ज्वाळमाळा । झाल्या सकळा ऋद्धिसिद्धी ॥ ३६ ॥

सूक्ष्म मध्याची रचना । होता अभिमान पंचानना । श्रीराम देखोनि नयना । लाजोनी रानां तो गेला ॥ ३७ ॥

पाहावया श्रीराम मध्यासी । शाहडे झाले मेखळेसी । सर्वस्वें लोधले श्रीरामासी । जावों वनासी विसरले ॥ ३८ ॥

श्रीराम चरणाची स्थिती । रामगतीची निजगती । श्रीरामें गतीसी विश्रांती । जाण निश्चिती जानकिये ॥ ३९ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम चरणाचें निजभूषण । वाकीने वेदां आणिले उणं । तें तंव धरूनी ठेलें मौन । रामकीर्तन हें गर्जे ॥ ४० ॥

चहु वाचा परात्पर । चरणीं गर्जत तोडर । श्रीरामपद चिदचिन्मात्र । श्रीरामचंद्र परब्रह्म ॥ ४१ ॥

लक्षितां श्रीरामाचें ठाण । त्यासी ठेंगणें दिसें गगन । पाहातां श्रीरामाचें [वि. मु. 'श्रीरामाचें मन'.] मान । पडिलें मौन श्रुतीशास्त्रां ॥ ४२ ॥

पाहातां श्रीरामाचे गुण । सगुण दिसतांहि अगुण । रामनामें हरे त्रिगुण । निज निर्गुण श्रीराम ॥ ४३ ॥

लक्षितां श्रीराम [मुं. दै. 'लक्ष्मण'.] लक्षण । जो लक्षी तो विलक्षण । ऐसा श्रीराम विचक्षण । लक्षणालक्षण त्या नाहीं ॥ ४४ ॥

श्रीराम मुखीचीं अक्षरें । अमृतापरिस अती मधुरें । सभाग्य सेविती श्रवणद्वारें । आनंद सुभरे सर्वांगीं ॥ ४५ ॥

देखतां श्रीरामाचें मुख । फिके होय समाधिसुख । स्वप्नींहि न देखीजे दुःख । हरिखें हरीख कोंदाटें ॥ ४६ ॥

कोंदाटलें परब्रह्म । ब्रह्मरुप क्रियाकर्म । हारपलें धर्माधर्म । झाला उपरम वेदवादां ॥ ४७ ॥

ऐसा श्रीराम नेटका । तैसाचि सौमित्र निजसखा । दोघां अभिन्नत्व देखा । भिन्न आवांका दिसताहे ॥ ४८ ॥

घालोनिया लोटांगण । तुज कुशल कल्याण । स्वयें पुसे लक्ष्मण । पुसे कल्याण श्रीराम ॥ ४९ ॥

ऐसें हनुमंतां सांगतां । तटस्थ ठेली श्रीरामकांता । आपआपणा विसरे सीता । हनुमंताचेनि बोलें ॥ ५० ॥

हनुमंते बोला आंत । अवघा आणिला रघुनाथ । तेणें सीतेचा मनोरथ । सदोदीत स्वानंदें ॥ ५१ ॥

हरुष न समाय पोटीं । होत हरुषाचिया कोटी । तेणें हरुषें सीता गोरटी । घाली मिठी हनुमंता ॥ ५२ ॥

वानर वदे मनुष्यवाणी । श्रीरामकथा त्याचे वदनीं । जे कथेचां निजश्रवणीं । भवबंधनीं निर्मुक्त ॥ ५३ ॥

ऐकतां वानराच्या गोष्टी । सत्य श्रीरामीं झाली भेटी । निरसोनिया दुःखकोटी । ओतली सृष्टी सुखरुप ॥ ५४ ॥

हरिखाचिया लवलाह्या । स्वानंदें पसरोनिया बाह्यां । आलिंगिलें कपीराया । जेंवि कां माया प्रिय पुत्रा ॥ ५५ ॥

सीतेसी सुख झालें गाढें । पुत्रसुख तृण त्यापुढें । हनुमंत वाडेकोडें । प्रेम पडीपाडें पढियंता ॥ ५६ ॥

अनुक्रमणिका

कपे त्वामभिनंदामि चिरंजीवी सुखी भव । सानुजः कुशली भर्ता येन मेऽद्य निवेदितः ॥ ६ ॥
बलेन यशसा चैव वर्धस्व प्रज्ञयापि च । शतयोजन विस्तीर्ण सागरं मकरालयम् ॥ ७ ॥
विक्रमश्लाघनीयेन क्रमता गोष्पदीकृतः । न हि त्वां प्राकृतं मन्ये वानरं वानरर्षभ ॥ ८ ॥
येनायं रक्षसां वासस्त्वयैकेन प्रधर्षितः ॥ ९ ॥

**राम भ्रतार लक्ष्मण दीर । दोघे सुखसंपन्न वीर । हें ऐकतांचि उत्तर । सुख अपार मज झालें ॥ ५७ ॥**

**मज येथें सा मासापाठीं । श्रीराम कथेचिया गोष्टी । आज ऐकिल्या तुझ्या वाग्पुटीं । धन्य सृष्टी हनुमंता ॥ ५८ ॥** [ओवी ५८ व ५९ वि. कं. मुं. तं. प्रतीत नाही.]

**मरतियासी अमृतपान । सुकल्या मीनासी मिळें जीवन । दुकाळाला जेंवी मिष्टान्न । तेंवि वचन कपीचें ॥ ५९ ॥**

**श्रीरामस्वरुपाची कथा । जे वदलासी हनुमंता । तेणें सुखें ब्रह्मसायुज्यता । न ये तुकितां तुकासी ॥ ६० ॥**

**श्रीराम कथा अनुवादन । तेणें मी झालें सुखसंपन्न । तुज मी वदते वरदान । सावधान अवधारी ॥ ६१ ॥**

**हनुमंता होई चिरंजीवी । तेहि जीवित्वा ज्ञानानुभवी । नित्य नवा सुखसंभवी । श्रीराम पदवी वैभवें ॥ ६२ ॥**

**तुज कळिकाळ कांपे चळी । ऐसा होसी अतुर्बळी । यश पावसी भूमंडळी । नाम समेळी श्रीरामें ॥ ६३ ॥**

**निरसोनियां ज्ञानाज्ञान । श्रीरामभजनें प्रबुद्ध प्रज्ञान । ज्ञेय मुकेल ज्ञेयपण । श्रीरामस्मरणाचेंनि बळें ॥ ६४ ॥**

**श्रीरामनामाच्या स्मरणीं । अपयश निमे तत्क्षणी । यश न समाये त्रिभुवनीं । नामस्मरणीं प्रताप ॥ ६५ ॥**

**चिरंजीवी सुखानुभवी । बळ प्रज्ञा आणि यशस्वी । याहूनी तुझी अधिक पदवी । देवीं दानवीं देखिजे ॥ ६६ ॥**

**शतयोजनें सिंधु अगाध । तुवा लंघिला जैसें गोष्पद । त्यापुढें कायसें माझें वरद । प्रज्ञा प्रबुद्ध हनुमंत ॥ ६७ ॥**

**तुज म्हणों नये वानर । सुरासुरां तूं दुर्धर । धांडोळोनि लंकापुर । निशाचर गांजिले ॥ ६८ ॥**

**एकला एक हनुमंत । रावणाचे सभे आंत । राक्षसा करोनि आकांत । लंकानाथ गांजिला ॥ ६९ ॥**

**लंकेमाजीं कडोविकडी । गांजिल्या राक्षसांच्या कोडी । रावणाची सभा उघडी । केली रोकडी तुवां एकें ॥ ७० ॥**

**देखतांहि दशानन । सभेमाजीं घालोनि खाण । तुवां नागविले राक्षसजन । शेखीं रावण गांजिला ॥ ७१ ॥**

अनुक्रमणिका

**एवढा करितांहि आकांत । येथें आला हनुमंत । नाहीं कळले लंके आंत । ऐसा समर्थ तूं एक ॥ ७२ ॥**

**ऐसा प्रताप शिरोमणी । पावलासी अशोकवनीं । तूंचि जनक तूंचि जननी । श्रीराम घेवोनि शीघ्र यावें ॥ ७३ ॥**

**तुझी होईन मी दासी । तुझे चरण झाडीन केशीं । शीघ्र आणावें श्रीरामासी । म्हणोनि पायासीं लागली ॥ ७४ ॥**

**आलें हनुमंतासी स्फुरण । व्यर्थ कशाला करिसी रुदन । वेगीं देई आपली खूण । श्रीरघुनंदन आणावया ॥ ७५ ॥**

**तुज म्यां खूण आणिली मुद्रा । तेणें तू** [मु. 'ओळखसी'.] **मानसी वानरा । खूण देई श्रीरामचंद्रा । सत्य कपींद्रा मानावया ॥ ७६ ॥**

**काय करिसी ऊणखूण । न लगे भाक नं लगे आण । मज आठवलें आहे आन । सावधान अवधारी ॥ ७७ ॥**

> पृष्ठमारोह मे देवि मा भूत्कालस्य पर्ययः । त्वय्यहं पृष्ठलीनायां संतरिष्यामि सागरम् ॥ १० ॥
> शक्तिरस्ति हि मे वोढुं लंकामपि सकाननाम् । द्रक्ष्यस्यद्यैव वैदहि राघवं सहलक्ष्मणम् ॥ ११ ॥
> न हि मे संप्रयातस्य त्वां गृहीत्वा वरानने । अनुगंतुं गतिं शक्ताः सर्वे लंकानिवासिनः ॥ १२ ॥

**माझिये पृष्ठीं बैसलिया सीता । येचि क्षणीं रघुनाथा । तुज मी भेटवीन आतां । विलंब वृथा करुं नको ॥ ७८ ॥**

**शुद्धि सांगावया रघुनाथा । तुज मज येथें सांडोनि जातां । तुज राक्षसीं केलिया घातां । शुद्धी वृथा होईल माझी ॥ ७९ ॥**

**येथें मजचि देखतां । रावण वधूं आला सीता । दैवें चुकविलें अनर्था । सांडुनी जातां मज नये ॥ ८० ॥**

**शूर्पणखा केली नकटी । तुझा राग तिच्या पोटीं । तुज मारील उठाउठी । महा खोटी राक्षसी ॥ ८१ ॥**

**सांडूनी जाणें न घडे गोष्टी । वेगीं बैस माझे पृष्ठीं । करीन श्रीरामासी भेटी । विकल्प पोटीं धरुं नको ॥ ८२ ॥**

**लंका त्रिकुट कनक गिरी । उपडुनी निज बळें करीं । एके उड्डाणें समुद्रीं । नेईन परतिरीं जानकीये ॥ ८३ ॥**

**करोनी एकची उड्डाण । भेटवीन राम लक्ष्मण । वाहतो श्रीरामाची आण । करी आरोहण पृष्ट भागीं ॥ ८४ ॥**

**तुज मियां नेतां अति त्वरेंसी । राक्षसा वीरां महाशूरांसी । वेगें न येववे मजपासीं । त्यां मशकांसी केविं ठाके ॥ ८५ ॥**

अनुक्रमणिका

**आलिया इंद्रजीत कुंभकर्ण । त्यासी रणीं विभांडून । रावणातेंहि गांजून । भेटवीन श्रीरामा ॥ ८६ ॥**

अहमाकाशमापन्ना ह्युगर्ह्युपरि सागरे । प्रपतेयं हि ते पृष्ठाद्भयाद्वेगेन गच्छतः ॥ १३ ॥
ततो मां पतितां तत्र सागरे मकरालये । भक्षयेयुरप्रतिभया ग्रहाः सागरवासिनः ॥ १४ ॥
न्हियमाणां तु मां दृष्ट्वा राक्षसा भीमविक्रमाः । सायुधा बहवो व्योम्नि राक्षसास्त्वं निरायुधाः ॥ १५ ॥
कथं शक्ष्यसि संयातुं मां चापि परिरक्षितुम् । युद्धमानस्य रक्षोभिस्ततस्तैः क्रूरकर्मभिः ॥ १६ ॥
प्रपतेयं च ते पृष्ठाद्भयार्ता कपिसत्तम । अथवा युद्धमानस्य पतेयं विमुखस्य ते ॥ १७ ॥
पतितां मां नयेयुस्ते राक्षसा भीमविक्रमाः ॥ १८ ॥

**सीता म्हणे अवधारी । बैसतां तुझे पाठीवरी । तुझिया उड्डाण वेगेंकरी । पडेन सागरीं हिसळोनी ॥ ८७ ॥**

**पडतां समुद्राप्रती । मच्छमगर मज गिळिती । तेव्हां तू पडसी आवर्ती । केंवि मारुती म्यां यावें ॥ ८८ ॥**

**कां धांवण्या आलिया लागवेगीं । तूं युद्धा परतसी वेगीं । झाडा देतां युद्धभागीं । मी रणरंगीं पडेन ॥ ८९ ॥**

**मज पडतांची क्षिती । क्षोभे राक्षस मज घातीं । हेंही न घडें गा युक्ती । केंवि मारुती म्यां यावें ॥ ९० ॥**

**मज मारिलिया पाठीं । जरी तुवां मारिल्या राक्षसकोटी । तरी सुख नव्हे श्रीरामापोटीं । बुद्धी खोटी हे हनुमंता ॥ ९१ ॥**

**सीते ऐक सावध गोष्टी । मज न लगे युद्ध आटाटी । माझें पुच्छ कोपलिया पाठीं । मारील कोटी राक्षस ॥ ९२ ॥**

**तुज मी सुखी राखेन स्वस्थ । माझें पुच्छ प्रतापवंत । करील राक्षसांचा घात । अर्बुदांत जरी आले ॥ ९३ ॥**

**सीता म्हणे तूं अल्प मारुती । तुझें पुच्छ ते तंव किती । केविं राक्षसा लावील ख्याती । सत्यत्वें चित्तीं मानेना ॥ ९४ ॥**

न मे जानासि सत्त्वं वा प्रभावं वाऽसितेक्षणे । तस्मात्पश्यतु वैदेहि यद्रूपं परमं मम ॥ १९ ॥
विंध्यमंदरसंकाशो वभौ दीप्तानलप्रभः । अग्रतो व्यवतस्थे स सीताया वानरर्षभः ॥ २० ॥

**सीते म्हणसी वानर किती । कायसी पुच्छाची पैं शक्ती । पाहे माझी स्वरुपस्थिती । म्हणोनी मारुती वाढला ॥ ९५ ॥**

**विंध्य मेरु आणि मांदार । त्याहोनि वाढला वानर । जैसा प्रळय काळाग्नीरुद्र । तैसा दुर्धर भासत ॥ ९६ ॥**

**सीते नेणसी माझें सत्व । पाहे माझें स्वरुप प्रभाव । देव दानव आणि मानव । राक्षस सर्व गांजीन ॥ ९७ ॥**

**माझें पुच्छ पाहे प्रतापवंत । राक्षस गांजुनी समस्त । सगळी लंका तुज समवेत । निमिषार्धांत नेईन ॥ ९८ ॥**

अनुक्रमणिका

विकल्प सांडोनियां पोटीं । सीते बैस माझें पृष्ठीं । करीन श्रीरामासी भेटी । सुखसंतुष्टी स्वानंदें ॥ ९९ ॥

तुज न्यावया रामाप्रती । पाहे माझी दुर्धर शक्ती । विकल्प सांडोनियां चित्तीं । बैस मारुती पृष्ठभागीं ॥ १०० ॥

दुर्धर देखोनि मारुती । देवदानव चळी कांपती । निधडी निःशंक सीतासती । अनुवादती स्वधर्म ॥ १०१ ॥

तं दृष्ट्वाचलसंकाशमुवाच जनकात्मजा । भर्तुर्भक्तिं पुरस्कृत्य रामादन्यस्य वानर ॥ २१ ॥
न युक्तो गात्रसंस्पर्शः पुरुषस्य मयाऽनघ ॥ २२ ॥

मज भेटवावया रघुपती । निधडी शक्ती तुज मारुती । तुझी देखोनि अचळ स्थिती । मज निश्चिती मानलें ॥ १०२ ॥

एका श्रीरामावांचोनि जाण । परपुरुषीं आरोहण । तेंचि पतिव्रतेसी दूषण । वेदपुराणसंमत ॥ १०३ ॥

सांडोनि श्रीराम उत्तम पुरुष । नरवानरीं गात्रस्पर्श । तो पतिव्रता महादोष । [कं. 'होय उपहास लौकिकीं'.] हाची इतिहास हरिहरां ॥ १०४ ॥

अंगाअंगीं प्रवेशोन । करितां गुरुपत्नी रक्षण । तेंचि विपुलासी दूषण । झाला संपूर्ण प्रायश्चिती ॥ १०५ ॥

देवशर्मा गुरू विपुलासी । गुरूची सुंदर पत्नी त्यासी । ऋषीनें जातां पैं तयासी । विपुलापासीं ठेविली ॥ १०६ ॥

इंद्र करुं पाहे इचें छळण । विपुल म्हणे मी रक्षीन । इंद्रियीं इंद्रिया संरक्षण । झाला संपूर्ण प्रायश्चिती ॥ १०७ ॥ [ओवी १०७ वि. कं. मुं. तं. मु. प्रतींत नाही.]

तैसाची मज खांदीं वाहातां । दोषी होसील हनुमंता । मी तंव न यें गा सर्वथा । दोहींचे माथां महादोष ॥ १०८ ॥

परपुरुषीं अनुसरोन । एकाकी सहगमन । करितां दोहींसी दूषण । सत्य जाण हनुमंता ॥ १०९ ॥

ऐसे जानकी बोलतां । हांसें आलें हनुमंता । मज श्रीरामासी अती आप्तता । समूळ कथा अवधारी ॥ ११० ॥

म्यां अंजनीसी पुसिली गोष्टी । माझा स्वामी कोण तो सृष्टीं ।
ते म्हणे सगर्भ कांसोटी । देखे जो [मु. 'दृष्टी'.] सृष्टी तो स्वामी ॥ १११ ॥

राम निजेला तरुतळवटीं । मज बैसतां वृक्षसंपुटीं । सगर्भ ब्रह्मचर्य कांसोटी । देखे दृष्टीं श्रीराम ॥ ११२ ॥

श्रीराम सांगे सुमित्रासी । गर्भीं ब्रह्मचर्य वानरासी । सगर्भ कौपीन [कं. 'आहे'.] पाहे यासी । आश्चर्यासी सांगत

अनुक्रमणिका

॥ ११३ ॥

ऐकोनि श्रीराम वचन । माझे ठायीं [तु. दै. मु. 'हे लक्षण'.] हेळसण । दोघे मनुष्य हीन दीन । स्वामी [मु. 'तयातें'.] संपूर्ण केंवि मानूं ॥ ११४ ॥

सेवक सबळ स्वामी निर्बळ । तें स्वामित्व समूळ विफळ । पाहावया श्रीरामाचे बळ । रणकल्लोळ म्यां केला ॥

वृक्ष सोडिले शतानुशत । निर्वाणीं सोडिले पंचपर्वत । निद्रा न सांडुनी रघुनाथ । वृक्षपर्वत छेदिले ॥ ११६ ॥

श्रीराम कृपाळू पैं [कं. तु. दै. 'खरा'.] पूरा । बाणीं न मारुनी वानरा । बाणीं पिसारा सोडूनी वारा । मज अंबरा उडविलें ॥ ११७ ॥

बाण पिच्छाचेनि झडाडे । हातपाय वळले देव्हडे । दांत विचकिले म्यां माकडें । ढुंगीं दडे निज पुच्छ ॥ ११८ ॥

ऐसी पडतां पैं मुरकुंडी । पिता पवन लवडसवडी । येऊनियां अति तांतडी । बुद्धि गाढी सांगितली ॥ ११९ ॥

श्रीराम परमात्मा परीपूर्ण । याची पाहातां आंगवण । तुझा तात्काळ जाईल प्राण । रामार्पण करी देहें ॥ १२० ॥

रामाझें विकावें जीवित । रामसेवें देह विक्रीत । श्रीरामसेवा नित्य [मु. 'तृप्त'.] निरत । द्वंद निर्मुक्त तूं होसी ॥ १२१ ॥

ऐकोनि पितयाचें वचन । कायावाचामनें अनन्यशरण । मस्तकीं वंदूनियां रामचरण । रामार्पण देह केला ॥ १२२ ॥

राम ध्यानीं राम मनीं । राम नित्य निदिध्यासनीं । राम कानीं राम नयनीं । वसती वदनीं रामनामा ॥ १२३ ॥

श्रीराम आसनीं शयनीं । श्रीराम नित्य गमनागमनीं । राम सुस्वादु भोजनीं । जागृतीं स्वप्नीं श्रीराम ॥ १२४ ॥

ऐसा मी अनन्य श्रीरामभक्ती । तुझा विकल्प परपुरुषार्थी । सावध ऐक तेहि अर्थी । अति गुह्यार्थी सांगेन ॥ १२५ ॥

गर्भीं ब्रह्मचर्य कौपीन । अंजनीमाता न देखे नग्न । माझ्या लिंगाचें दर्शन । स्त्रष्टा आपण पावेना ॥ १२६ ॥

ऐसी देखोनि माझी स्थिती । मुद्रिका देवोनि माझे हातीं । मज धाडिलें तुजप्रती । तुझ्या चित्तीं विकल्प ॥ १२७ ॥

अनुक्रमणिका

श्रीरामें सांगितली खूण । [मु. 'करविली'.] कैकयी वल्कलें परिधान । तुज नेसतां न येती जाण । रामें आपण नेसविलीं ॥ १२८ ॥

खूण सांगतां हनुमंता । चित्तीं चमत्कारली सीता । विकल्प [तु. दै. 'सांडोनिया चित्ता'.] सांडोनि तत्त्वतां । गुज एकांता अनुवादे ॥ १२९ ॥

श्रीराम आज्ञा वंद्य आम्हांसी । रामें काय सांगितलें तुजपासीं ।
तुंवा [अं. 'जावें'.] आणावे सीता शुद्धीसी । किंवा सीतेसी आणावें ॥ १३० ॥

जरी आणविलें सीतेसी । तरी मी येईन तुज सरसी । आणविलें असेल शुद्धीसी । तरी वेगेसी तुं जाये ॥ १३१ ॥ [ओवी १३१ वि. प्रतीत नाही.]

ऐसें सीतेनें पुसतां । गहिंवर आला हनुमंता । धन्य धन्य सती सीता । निर्लोभता-सज्ञान ॥ १३२ ॥

सावध अवधारी वो माते । असत्य न बोले मी येथें । रामें आणविलें शुद्धीतें । हेचि निश्चितें रामाज्ञा ॥ १३३ ॥

सीता म्हणे हनुमंता । विलंब न करावा सर्वथा । शीघ्र जावोनिया आतां । शुद्धी रघुनाथा सांगावी ॥ १३४ ॥

माझी कृपा आहे हनुमंता । तरी जाऊनिया [कं. मुं. 'तुवां तत्वता'.] शीघ्रता । शुद्धी सांगावी रघुनाथा । चरणीं माथा ठेवोनी ॥ १३५ ॥

सीता अश्रुमुखी दीन । करितां हनुमंतासी [मु. 'गमन'.] नमन । वानरें आंगुठें दांतीं धरुन । घातलें लोटांगण सीतेसी ॥ १३६ ॥

ऐकतां सीता कारुण्यवचन । तेणें हनुमंता आलें [कं. 'रूदन'.] स्फुरण । शीघ्र दे वो आपली खूण । आतांची गमन मी करितों ॥

मुद्रिका देवोनियां जाण । निरोपें सांगितली खूण । तैसेंचि तुवांही देऊनिया भूषण । मुखवचन मज सांग ॥ १३८ ॥

तुवां निजवस्त्रां भूषणासी । सांडिली किष्किंधें वानरापासीं । तेचि दाखवितां श्रीरामासी । उकसाबुकसी स्फुंदत ॥

ऐसी तुझी वो अवस्था । अतिशयें श्रीरघुनाथा । नित्य स्मरणीं सीता सीता । प्रिय कांता पढियंती ॥ १४० ॥

सत्य [कं. 'माझें'.] मानी लंकागमन । तैसें देई निज भूषण । तैसेंचि सांगे मुखवचन । तेणें श्रीराम संपूर्ण सुखावे ॥ १४१ ॥

अभिज्ञानं तु रामस्य ददौ मणिविभूषणम् । क्षिप्तामिषीकां काकस्य कोपादेकांगनाशिनीम ॥ २३ ॥

अनुक्रमणिका

मनः शिलायास्तिलको गंडपार्श्वे निवेशितः ॥ २४ ॥

ऐसें हनुमंतें सांगतां । सुखें सुखावोनि सीता । वेणीं मणी होता माथां । धाडी रघुनाथा खुणेंसी ॥ १४२ ॥

श्रीरामें सुख समेळा । मनशिळेचा युक्त टिळा । निज हस्तें लाविला कपाळा । हेंहि गोळांगुळां खूण सांग ॥ १४३ ॥

माझे ऐकतांचि उत्तर । कागावरी सोडिलें ब्रह्मास्त्र । हें सांगतां गुह्य गंभीर । राम साचार मानील ॥ १४४ ॥

काग हिंडतां तिहीं लोकां । कोणा निवारेना ईषिका । तो शरण आला रघुटिळका । दर्भईषिका निवारी ॥ १४५ ॥

वामनेत्र घेवोनि जाण । कागाचा वांचविला प्राण । हें सांगतां निजखूण । श्रीरघुनंदन सुखावे ॥ १४६ ॥

ऐसीं शस्त्रास्त्रें तुजपासीं । तरी कां धांवण्या न धांवसी । मृगापाठी धाडिलासी । तेणें रुसलासी श्रीरामा ॥ १४७ ॥

तो अपराध करोनि क्षमा । धांवण्या येवोनि श्रीरामा । बंदीमोचन करी आम्हां । पुरुषोत्तमा कृपाळुवा ॥ १४८ ॥ [ओवी १४८ वि. प्रतीत नाही.]

लक्ष्मणासी लोटांगण । तुझें मिया व्यर्थ केलें छळण । त्या पापाचें फळ हें जाण । मज रावण गांजितो ॥ १४९ ॥

छळण पाप अत्यद्भूत । सीते आणि रामा आंत । आडवे आले सिंधु पर्वत । दूरीदूरस्थ निर्बंध ॥ १५० ॥

छळण पापाची हे ख्याती । पापिष्ठ रावणाचे हातीं । बंदी पडली सीतासती । श्रीरघुपती क्षोभला ॥ १५१ ॥

छळण पाप अति दारुण । ना राम ना लक्ष्मण । राक्षसांचे नित्य छळण । मज मियां पूर्ण गांजिलें ॥ १५२ ॥

लक्ष्मणा लोटांगण सांग आतां । अनन्यशरण श्रीरघुनाथा । शुद्धी सांगतां हनुमंता । अति शीघ्रता पावावें ॥ १५३ ॥

एका जनार्दना शरण । पुढें गोड निरोपण । वानर वनविध्वंसन । करील निर्दाळण राक्षसां ॥ १५४ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडें एकाकारटीकायां सीताहनुमंतसुखसंवादो नाम द्वादशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग तेरावा

## किंकर वध

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

मणि दत्वा ततः सीता वानरं वाक्यमब्रवीत । मणिं तु रामो वै त्रयाणां संस्मरिष्यति ॥ १ ॥
वीरो जनन्या मम च राज्ञो दशरथस्य च । त्वमस्य कार्यनिर्योगे प्रमाणं हरियूथप ॥ २ ॥
स तथेति प्रतिज्ञाय मारुतिर्भीमविक्रमः । शिरसावंद्य वैदेहीं गमनायोपचक्रमे ॥ ३ ॥

**मणी देवोनि हनुमंता हातीं । स्वयें बोले सीतासती । मणी देखोनि सीतापती । स्मरेल चित्तीं तिघांतें ॥ १ ॥**

**कौसल्या माता आणि सीता । आठवेल दशरथ पिता । तिघें आठवती रघुनाथा । कोण्या अर्था तें ऐका ॥ २ ॥**

**पूर्वीं समुद्रमंथनीं । तेथें निघाला कौस्तूभ मणी । तो घेतांचि श्रीविष्णूंनीं । इंद्र ते** [कं. 'मनीं'.] **क्षणीं तळमळी ॥ ३ ॥**

**ब्रह्मशापाच्या शापोक्ती । सिंधू निमग्न** [पै. तु. दै. वि. 'स्वर्ग'.] **सर्व संपत्ती । त्यांतील कौस्तुभ श्रीपती । माझा मजप्रती देई स्वामी ॥ ४ ॥**

**इंद्र मणी मागे करुनी ग्लानी । विष्णू फणिमणी दे बदलोनी । इंद्र देखतांचि नयनीं । केला कंठमणी आल्हादें ॥ ५ ॥**

**इंद्रें नमुचीचिया युद्धासी । साह्य नेले दशरथासी । रायें निर्दाळोनिया दैत्यासी । युद्धीं इंद्रासी जयो दिधला ॥ ६ ॥**

**युद्धीं इंद्र संतोषोनी । दिधला दशरथा कंठमणी । रायें निज नगरासी आणुनी । दिधला प्रियपत्नी कौसल्ये ॥ ७ ॥**

**कौसल्येनें अति प्रीतीसी । तो मणी दिधला जानकीसी । तिणें घालोनि वेणीसी । वनवासासी आणिला ॥ ८ ॥**

**तोचि मणी हनुमंता हातीं । खूण पाठवती रघुपती । राजा माता आणि सीतासती । तिघे आठवती श्रीरामा ॥ ९ ॥**

**ही खूण देवोनि तत्वतां । शीघ्र आणावें रघुनाथा । हेंचि कार्य प्रमाणता । तुझे माथां कपिराजा ॥ १० ॥**

**हनुमान म्हणे न करी चिंता । शीघ्र आणीन रघुनाथा । साष्टांगें नमिली सीता । येरी हनुमंता कुरवाळी ॥ ११**

अनुक्रमणिका

॥

> इदं वनमशोकं च नंदनोपममुत्तमम् । बलाद्विध्वंसयिष्यामि शुष्केंधनमिवानलः ॥ ४ ॥
> ततो महत्साश्वमहारथद्विपम्। बलं समानेष्यति राक्षसाधिपः ।
> निहत्य तद्रावणचोदितं बलम् । सुखी गमिष्यामि कपीश्वरालयम् ॥ ५ ॥

**खूण पुसोनि सीतेपासीं । हनुमान विचारी मानसीं । युद्ध न करितां राक्षसांसी । श्रीरामापासीं मी** [तु. दै. 'नव जाये'.] **न वचे ॥ १२ ॥**

**येथें कलहासी कारण । रावणाचे अशोकवन । नंदनवनासी समान । विध्वंसीन निजबळें ॥ १३ ॥**

**ऐकोनि वन विध्वंसित । कोपोनिया लंकानाथ । धाडील अश्वगज रथ ।** [तु. दै. 'द्वंद्व'.] **दृढ युद्धार्थ महावीर ॥ १४ ॥**

**युद्ध करुनियां सैन्यासी । निर्दाळूनी राक्षसासी । इंद्रजीतां करुनी कासाविसी । श्रीरामापासीं मग जाणें ॥ १५ ॥**

**मारोनि राक्षसांचिया कोडी । लंका करुनी फाडाफोडी । मग रामासी भेटतां गोडी । ऐसी आवडी हनुमंता ॥ १६ ॥**

**इतके करूनियां जातां । सुख कपिकुळां समस्तां । सुख होईल श्रीरघुनाथा । सुख हनुमंता** [पै. वि. कं. मुं. तं. अं. मु. 'युद्धाचें'.] **शुद्धीचें ॥ १७ ॥**

**सीतेचें न घेतां आज्ञापन । मज विध्वंसिता न ये वन । सीतेसी पुसावया जाण । करी विंदान हनुमंत ॥ १८ ॥**

**पुढती सीतेसी लोटांगण । येरी म्हणे गा शीघ्र करी गमन । हनुमान खालती घाली मान । लज्जायमान बोलेना ॥**

**सीताशुद्धी सांगावया जाण । उल्हास न देखे संपूर्ण । दिसतोसी अति उद्विग्न । काय कारण मज सांग ॥ २० ॥**

**तुझे करितां वो शोधन । नाहीं अन्न ना जीवन । क्षुधेनें जाऊं पाहे प्राण । सिंधुलंघन न करवें ॥ २१ ॥**

**ऐकतां हनुमंताचें वचन । सीतेसी आलें पैं रुदन । यासी नेदितां समाधान । केविं गमन मी करवी ॥ २२ ॥**

**याचें न पुसतां स्वागत । नाहीं केलें अभ्यागत । महा पापिणी मी येथ । धाडी रामभक्त भुकेला ॥ २३ ॥**

**ऐके सखया हनुमंता । शिणलासी मज शोधितां । जीवें ओवाळीन तत्वतां । सांगेन आतां तें करी ॥ २४ ॥**

अनुक्रमणिका

हें घे माझें करकंकण । लंकेमाजीं जावोनि आपण । घेवोनि चतुर्विध अन्न । करी भोजन यथेष्ट ॥ २५ ॥

हनुमान पुसे सीतेपासी । अन्नाची चवी आहे कैसी । सीता विस्मीत मानसीं । तरी तुम्हासी भक्ष काये ॥ २६ ॥

जे वो खाती अन्न लवण । त्यासी शीघ्र ये म्हातारपण । सचुना तांबोल भक्षण । दंत भग्न तेणें त्यासी ॥ २७ ॥

आम्ही रामदूत वानर । वनवासी निरंतर । नित्य वनफळाचा आहार । सत्य साचार जानकीये ॥ २८ ॥

माझें मोडोनि कांकण । लंकेमाजीं फळें संपूर्ण । आवडतीं ते घेऊन आपण । फळभोजन करी बापा ॥ २९ ॥

सीते ऐक माझें शील । मी तंव स्वयंपाकी केवळ । ज्यासी मनुष्याचा विटाळ । तें तें फळ [मु. 'अपवित्र वानरा'.] नये भक्षू ॥ ३० ॥ [ओवी ३० तु. दै. प्रतींत नाही.]

स्वहस्तें तोडोनि संभार । स्वयें भक्षूं आम्ही वानर । आतळलिया सुरनर । तें फळ अपवित्र वानरा ॥ ३१ ॥

सीता म्हणे या वनाआंत । मधुर सुंदर फळें अद्भुत । तुंवा लावितांचि हात । करिती घात राक्षस ॥ ३२ ॥

तूं निमालिया हनुमंत । तोचि जाण मज प्राणांत । दुःखें निभेल रघुनाथ । समवेत सौमित्र ॥ ३३ ॥

श्रीराम निमालिया पाठी । निमती सुग्रीव कपीकोटी । भरत शत्रुघ्न जगजेठी । उठाउठी निमतील ॥ ३४ ॥

या फळांसी लावितां हात । येवढा होईल आकांत । हनुमान म्हणे असो वृत्तांत । जाईन कुंथत भुकेला ॥ ३५ ॥

वन दिसताहे सफळ । माझेंचि कपाळ निष्फळ । निरोप नेदी जनकबाळ । काळवेळ मज आली ॥ ३६ ॥

मार्गीं क्षुधेनें जातील प्राण । श्रीरामा शुद्धी सांगेल कोण । तुझी न होईल सोडवण । विघ्न दारुण ओढवलें ॥ ३७ ॥

क्षुधा नव्हे हा कल्पांत । माझा होईल प्राणांत । ऐसें बोलतां हनुमंत । सीता हृदयांत कळवळली ॥ ३८ ॥

जंव होय क्षुधाहरण । पडलीं फळें खाई संपूर्ण । घालिते श्रीरामाची आण । फळें तोडून न खावीं ॥ ३९ ॥

ऐकोनि सीतेचे [कं. 'आज्ञेसी'.] आणेसी । हनुमान खाजवी [कं. वि. मु. 'दोन्ही'.] डावीकुशी । सीता क्षोभली वनासी । आला वृक्षासी पै अंत ॥ ४० ॥

सांडोनि सीता वन पैसार । दुरी जावोनि बैसला वानर । करावया फळाहार । करी विचार मारुती ॥ ४१ ॥

मेळऊनी प्रळयकाळाग्नी । निमंत्रिला जठराग्नी । मग बैसला फळभोजनीं । सावधानी हनुमंत ॥ ४२ ॥

अनुक्रमणिका

भोजनसमयींचें अतीत । मुख्य द्विज मुखा आंत । आधीं यासी करोनि तृप्त । धर्मयुक्त भोजन ॥ ४३ ॥

द्विजीं न घेतां आवदान । स्वयें घेवों नये अन्न । प्रथम द्विजाचें भोजन । करी सर्वज्ञ मारुती ॥ ४४ ॥

द्विज दोन्ही पंक्ती सादर । पुच्छा आज्ञा देवोनि वानर । वेगीं अर्पी फळ संभार । रुचीकर स्वादिष्ट ॥ ४५ ॥

देखोनि साखरेचें टेक । [पै. 'निंबरसें सेवी'.] निंबरसेसी आवश्यक । आधीं सेवूं पित्तशामक । मग अनेक फळें भक्षूं ॥ ४६ ॥

उपडोनिया निंबोणीनारंगी । साखर निंबे मातुलिंगी । मेळवोनि साखरेच्या भागीं । मग आरोगी गटगटां ॥ ४७ ॥

श्रीरामाची आण पाळीत । वृक्ष उपडोनिया तळीं [मुं. 'आदळीत'.] झाडीत । पडलीं फळें खाय हनुमंत । आज्ञा नेमस्त सीतेची ॥ ४८ ॥ [ओवी ४८ तु. दै. प्रतींत नाही.]

आंबे जांबुळें फणस जंबीरी । कर्दळी फळें गटका करी । पिंपळ्या मिरें घोस माझारीं । लोणच्यावारी भक्षित ॥ ४९ ॥

द्विजांसी सांगे हनुमंत । भोक्ता म्हणा श्रीरघुनाथ । द्विज कांहीं न बोलत । अति लोलूप रसस्वादा ॥ ५० ॥

द्विप द्राक्षाचे घड । खर्जुरी फळें अति गोड । पुच्छ पुरवीजे कोड । करुनी उपाड झाडांचा ॥ ५१ ॥

हनुमान आपोशन न सोडी । बैसली बैसका न सोडी । पुच्छ करी [पै. वि. कं. मु. तं. अं. मु. 'वाढावाढी'.] ओढाओढी । फळां झाडी उपाडी ॥ ५२ ॥

चारें बोरें मोहे भोकरें । आंवळे तुपी उंबरें टेबरें । भोक्ता श्रीराम येणें [मु. 'उत्तरें'.] मंत्रें । फळें वानरें भक्षिजे ॥ ५३ ॥

धामणे यरमणे तोरणे । सेंबें पाणावलें गोंदणे । पिकल्या करवंदाचें खाणें । रामार्पणें गटकावी ॥ ५४ ॥

पिकलें खाय गटागटां । हिरवें खाय तोंडपालटा । जारसे खाय मटामटा । सुरांश्रेष्ठां विटावित ॥ ५५ ॥

ऊंसरसें भरली मांदाणी । जेवी तान्हेला प्राशी पाणी । तेंवी नेलें प्राशुनी । ढेंकर देऊनी डरकत ॥ ५६ ॥

डोळे मिचकावी देवाकडे । आंगुष्ठा दावी दैत्याकडे । वांकुल्या दावी दानवाकडे । मानवापुढें घुलकावी ॥ ५७ ॥

हनुमंताचेनि आंगवातें । सुमनें सुगंध पारिजातें । चंदनागरु तरु समस्तें । उन्मळीत समूळीं ॥ ५८ ॥

अनुक्रमणिका

भोंवता पुच्छाचा आवर्त । पक्षी किलकिलती गगना आंत । वृक्ष कडकडा मोडित । होत आवर्त वक्षांसी ॥ ५९ ॥

उपडोनिया पोफळी । मुखशुद्धीच्या पैं मेळीं । पोफळी घाली दाढांतळीं । वनरांगोळी मांडिली ॥ ६० ॥

शाल ताल तमाल [तु. 'नारळी केळी'.] नारिकेळी । उपडोनिया केली वडवाळी । घेतां राक्षसासवें फळी । हातातळीं हाणावया ॥ ६१ ॥

ऐसी युद्धाची सामग्री । रचोनिया देवाद्वारीं । हनुमान बैसे शिखरावरी । त्याहुनी दुरी वृक्ष टाकी ॥ ६२ ॥

> तद्वनं मथितैर्वृक्षैर्भग्नैश्च सलिलाशयैः । लतागृहैश्चित्रगृहैर्नाशितं च गृहांतरैः ॥ ६ ॥
> तत्कृत्वा सुमहत्कर्म हनूमान्दर्शयन्बलम् । चकार सुमहद्रूपं राक्षसीनां भयावहम् ॥ ७ ॥
> ततो गतायां निद्रायां राक्षस्यो विकृताननाः । तद्वनं ददृशुर्भग्नं तं च वीरं महाकपिम् ॥ ८ ॥

ऐकोनि वनभंग आघात । बनकर भयें चकित । राक्षसी उठिल्या समस्त । ज्या कां विकृत विक्राळा ॥ ६३ ॥
स्वयंभु वृक्षाचें उत्पाट । मोडिल्या सारणी रहाटपाट । विचित्रगृहें केलीं पीठ । केलीं सपाट लतागृहें ॥ ६४ ॥

न लाऊनी देवालया हात । माड्या गोपुरें गृहें समस्त । अंतरगृहें विध्वंसीत । तेणें विस्मित बनकर ॥ ६५ ॥

राक्षस वृक्षातळीं निद्रित । जे कां सबळ राखणाइत । ते वृक्ष उपडोनी समस्त । नेले दूरस्थ हनुमंतें ॥ ६६ ॥

बनकर जागे होत । वृक्षमात्र न दिसती तेथ । तेणें ते अवघे विस्मित । केलें विपरीत महेशें ॥ ६७ ॥

मागोनि आणिले महेशापासी । ते वृक्ष नेले कैलासासी । किंवा उडाले आकाशीं । बनकरांसी लक्षेना ॥ ६८ ॥

दुर्धर रावणाचें स्वप्न । मिथ्या वन विध्वंसन । आम्ही देखतों हे स्वप्न । म्हणोनि नयन लाविती ॥ ६९ ॥

तंव राक्षसी कळवळीत । वानर नव्हे हा काळकृतांत । संचरोनि वनाआंत । राक्षसां घात करुं आला ॥ ७० ॥

ऐकोनि बनकर धांवती । कोठें कोठें तो मारुती । धरा धरा बहुतां हातीं । रावणाप्रती नेऊं आम्ही ॥ ७१ ॥

बनकर अति दुर्धर । एकवटलें चौदा सहस्त्र । स्वयें धरावया वानर । अति सत्वर धांवले ॥ ७२ ॥

एक विंधिती लक्षुनी कांडें । एक हाणीती गोफणगुंडे । एक सवेग टाकिती धोंडे । हनुमान पुढे लक्षुनी ॥ ७३ ॥

बनकर आले अति गर्जत । हनुमान बैसला सावचित्त । करावया बनकरांचा घात । पुच्छ प्रेरीत साटोपें ॥

अनुक्रमणिका

७४ ॥

पुच्छ आघात उद्भट । धरीतां ओढोनि करी पीठ । शस्त्रें करोनिया सपाट । वीर उद्भट गांजीले ॥ ७५ ॥

वाजतां पुच्छाचा पैं साट । बनकरां भोंवलासे आट । पुच्छें कवळिलें समसगट । हृदयस्फोट राक्षसां ॥ ७६ ॥

जो जो पळो जाय जिकडे । पुच्छ आडवें तिकडे तिकडे । राक्षसां वोढवलें सांकडें । मागेंपुढें निघवेना ॥ ७७ ॥

ऐसे गोवोनि बनकरांसी । हनुमंतें बांधुनी पुच्छीं । निक्षेपिले समुद्रासी । मच्छमगरांसी आहारार्थ ॥ ७८ ॥

भूतें जाहालीं दोन वदन । बनकर चौदा सहस्त्र जाण । दिधलें सागरीं मीनभोजन । आम्हां लंघन न चुकेची ॥ ७९ ॥

तंव बोलली महाकाळी । हनुमान मारील राक्षस बळी । मेदमांस रुधिरांजुळी । भूतें सकळीं अतितृप्त ॥ ८० ॥ [ओवी ८० तु. दै. प्रतींत नाही.]

दिधलें मीनां मीनभोजन । देईल भूतां भूतभोजन । वृक जंबूक घारी गीधगण । तृप्त भोजन काळिके ॥ ८१ ॥

भूतें पुसतीं जगदंबेसी । ऐसें होईल कोणें समयेसी । येचि क्षणीं आजच्या दिवसीं । तृप्ती [कं. 'तुम्हांसी'.] सर्वांसी हनुमंतें ॥ ८२ ॥

> राक्षस्यो वानरं दृष्ट्वा पप्रच्छुर्जनकात्मजाम् । कोऽयं कस्य कुतो वायं किन्निमित्तमिहागतः ॥ ९ ॥
> वैदेह्या वचनं श्रुत्वा राक्षस्यो भयविव्हलः । स्थिताः काश्चिद्गता काश्चिद्रावणाय निवेदितुम् ॥ १० ॥

चौदा सहस्त्र बनकरांसी । हनुमान निर्दाळी पुच्छेसी । तेणें भयभीत राक्षसी । सीतेपासी पुसती ॥ ८३ ॥

कोण कोणाचा कैंचा थोर । येथ आला हा वानर । तुज करुनी नमस्कार । कोण विचार दृढ केला ॥ ८४ ॥

तुझे घेउनी आज्ञेसी । येणें मारिले बनकरांसी । तुझे बोलें वन विध्वंसी । तुवां द्वंद्वासी पेटविलें ॥ ८५ ॥

सीते सभोंवतीं या राक्षसी । कलकलिती चौपासीं । धरा मारा बांधा केशीं । वानरासी चेतविलें ॥ ८६ ॥

सीता निःशंक मानसीं । भय न मनी राक्षसीसी । यथोचित बोले त्यांसी । राक्षसांपासी बहु मावा ॥ ८७ ॥

शूर्पणखा सुंदर वेषीं । छळूं आली लक्ष्मणासी । कपटें नाडिलें [कं. अं. 'नाक कानासी'.] नाकासी । राक्षसांपासी बहु मावा ॥ ८८ ॥ [ओवी ८८ व ८९ तु. दै. प्रतींत नाहीत.]

अनुक्रमणिका

मारीच होउनी मृगवेषी । सिंतरीतां श्रीरामासी । स्वयें मुकला निज देहासी । राक्षसांपासी बहु मावा ॥ ८९ ॥

छळुनी हरावया सीतेसी । रावण होतांची संन्यासी । मुळींच भीक लागली त्यासी । राक्षसांपासी बहु मावा ॥ ९० ॥

अमित मावा राक्षसांपासी । कोण कोणाचा वानर वेषी । हे काय [मु. 'पुसतां'.] पुसा मजपासी । निज मावेसी तुम्ही जाणा ॥ ९१ ॥
राक्षसी देखोनी सीतेपासी । हनुमान गुरुगुरीतां त्यासी । वेगीं पळती विव्हळतेसी । अति भयेसी भयभीता ॥ ९२ ॥

एकी चळचळा कांपती । एकी फळफळा मुतती । एकी भयें भुली भुलती । एकी त्या पडती मूर्छिता ॥ ९३ ॥

बोंब न करवे गाढी । जिव्हेसी वळली बोबडी । एकी अंधारी देती दडी । आंत तोडी पैं एकी ॥ ९४ ॥

एकी भयाचे अति भ्रांती । नेसणीं गळालीं नेणती । नागव्या रावणापासी येती । मग सांगती वनवृत्त ॥ ९५ ॥

एकी त्या भयाचेनि भरें । राक्षसां म्हणती पळा पळा रे । पूसें मारिलीं बनकरें । घायवारें घेतलें ॥ ९६ ॥

एकी दडती सीतेपासीं । एकी पळती चौपासी । आपपर नसे राक्षसीसीं । हनुमंतासी देखोनी ॥ ९७ ॥

करितां हनुमंतें गर्जन । सीता जाहली निर्बंधन । रामभक्ताचें वचन । बंदीमोचन तत्काळ ॥ ९८ ॥

राक्षसीं सांगतां रावणापासीं । वानरवीर प्रतापराशी । विध्वंसूनिया वनासी । बनकरांसी मारिलें ॥ ९९ ॥

नेणों कैंचा वीरवानर । बळें जैसा काळाग्नी रुद्र । सीतेसी करुनी जोहार । केला मार बनकरां ॥ १०० ॥

जे प्रदेशीं जनकबाळी । तेंची वन राखिलें पुष्पींफळीं । येरा वनाची केली रवंदळी । वृक्ष समूळी उपटोनी ॥ १०१ ॥

सीतेसी करुनी एकांत । मग मांडिला वनविघात । ऐसा ऐकोनि वृत्तांत । लंकानाथ क्षोभला ॥ १०२ ॥

पाचारोनि घरटीकार । त्यासीं सांगे दशशिर । धरूनी आणा तो वानर । वन विचित्र विध्वंसी ॥ १०३ ॥

रावणा राक्षसी सांगती । घरटीकार बापुडें किती । त्याचिया पूंसाची दुर्धर शक्ती । लाविली ख्याती बनकरां ॥

चौदा सहस्त्र बनकरांसी । भारा बांधोनि पूंसेसी । निक्षेपिले समुद्रासी । जलचरासी आहारार्थ ॥ १०५ ॥

रणीं मर्दुनी राक्षसांसी । मेदमांसे तृप्ती भूतांसी ।

अनुक्रमणिका

द्यावया आवंतिले महाकाळीसी । आजिच्या दिवशीं हनुमंतें ॥ १०६ ॥

धरुनी आणावया वानर । तेथ कायसे घरटीकार । समूळ करुनी विचार । दुर्धर भार प्रेरावा ॥ १०७ ॥

ऐसें राक्षसी सांगती । स्वयें चळचळा कांपती । महुतां नाटोपे मारुती । दुर्धर शक्ती पूंसाची ॥ १०८ ॥

सीतेपासील वन सकळ । नाहीं मोडिलें देऊळ । [मु. 'वानर दिसे'.] वानराचें स्वधर्मशीळ । त्यावरी प्रबळ प्रतापी ॥ १०९ ॥

ऐकोनि राक्षसींचें वचन । दचकला दशानन । सभा झाली कंपायमान । बळें संपूर्ण वानरु ॥ ११० ॥

राक्षसीनां वचः श्रुत्वा रावणो राक्षसाधिपः । आत्मनः सदृशान्वीरन्किंकरान्नाम राक्षसान् ॥ ११ ॥
व्यादिदेश महातेजा निग्रहार्थं महाकपेः । तेषामशीतिसाहस्त्रं किंकराणां तरस्विनाम् ॥ १२ ॥
निर्ययुर्भवनात्सर्व हनूमच्छासनोत्सुकम् ॥ १३ ॥

ऐकोनि वनविंध्वंसन । रावण झाला कोपायमान । आपलिया बळें समान । योद्धे दारुण अनिवर्ती ॥ १११ ॥

युद्ध देखिलिया दृष्टी । नाहीं परतावयाच्या गोष्टी । रणीं पाडणें कोट्यानुकोटी । महा हटी रण [मु. 'रणगाढे'.] रगडे ॥ ११२ ॥

किंकर नांवें अति दुर्धर । नांवाजिल महावीर । पाचारुनी ऐंसी सहस्त्र । धरुं वानर धाडिले ॥ ११३ ॥

रावण जाणे आमची ख्याती । शेखीं धाडी वानरांप्रती । वानर बापुडें तें किती । इतुकिया हातीं केंवि उरें ॥ ११४ ॥

ऐसें करुनिया गर्जन । शस्त्रास्त्रीं सन्नद्धपूर्ण । धांवोनिया अवघेजन । अशोकवन ठाकिलें ॥ ११५ ॥

अशोकवनीच्या प्रासादांतू । पुढीलिया [मु. 'दुर्धर'.] द्वार तोरणांतू । टेकोनि बैसला हनुमंतु । काळकृतांतु प्रळयाग्नी ॥ ११६ ॥

वानर देखतांची दृष्टीं । शस्त्रें [मु. 'कवळोनिया'.] आसडूनी मुष्टी । किंकर धांवले उठाउठी । शस्त्रवृष्टी समकालें ॥ ११७ ॥ [ओवी ११७ व ११८ पै. प्रतीत नाहीत.]

शूळ मुद्गल गदा फरश । त्रिशूल तोमर पट्टिश । चेंडू चक्रें लहुडी पाश । केली बहुवस शरवृष्टी ॥ ११८ ॥

खंगला भंगला तुटला । शस्त्रास्त्रीं निवटला । घायीं तिळप्राय झाला । म्हणती निमाला वानर ॥ ११९ ॥

किंकर पिटिती टाळ्याटाळी । म्हणती वानर [वि. 'निर्बळी'.] आतुर्बळी ।
आम्हांसी न करीच समफळी । रणरांगोळी होऊनी गेला ॥ १२० ॥

अनुक्रमणिका

ऐंशी सहस्त्र महावीर । बळें हाणीती निजशस्त्र । जैशा पर्वती पर्जन्यधार । तैसें वानरा शस्त्रपात ॥ १२१ ॥

जरी कपी महाबळी । आम्ही यशस्वी रणकल्लोळीं । तें देखोनि हनुमान बळी । क्रोधानळीं खवळला ॥ १२२ ॥

समाविध्य च लांगूलं ननाद च महास्वनम् । संभूत्वा च महाकायो हनुमान्मारुतात्मजः ॥ १४ ॥
पुच्छमास्फोटयामास लंकां शब्देन पूरयन् । जयत्यतिबलो रामो लक्ष्मणश्च महाबलः ॥ १५ ॥
राजा जयति सुग्रीवो राघवेणानुपालितः । दूतोऽहं कोशलेन्द्रस्य हनूमान्शत्रुसूदनः ॥ १६ ॥
राक्षसानां सहस्त्रं तु जघान कपिकुंजरः ॥ १७ ॥

स्वयें पूंसाची पाठी थापटी । पुंसासी सांगे गुह्य गोष्टी । मारावया राक्षसांचिया कोटी । निज [मु. 'निज बुद्धि'.] पुष्टी प्रतापें ॥ १२३ ॥

ऐसी चाळीतां गुह्य गोष्टी । लांगूल त्राहाटिलें उठाउठी । निधा उठिला गिरीकूटीं । लंका त्रिकुटीं आकांत ॥ १२४ ॥

राक्षसांचा प्राण हरु । दुर्धर केला भूभूकारु । तेणें किंकराचा संभारु । झाला भुइभारू दचकोनी ॥ १२५ ॥

धांकें टंवकारिल्या दृष्टी । शस्त्रें गळालीं निजमुष्टीं । राक्षसीं धांक घेतला पोटीं । पूंसें पाठी पुरविली ॥ १२६ ॥

राक्षस धांके पळों जाती । पूंसें बांधोनि मारी मारुती । एक मारिले शिळाघातीं । पर्वतपातीं समस्त ॥ १२७ ॥

मारोनि राक्षस समस्त । वानर स्वानंदें गर्जत । मी श्रीरामाचा दूत । नामें हनुमंत मारुती ॥ १२८ ॥

येथें मारुनी दशकंधर । विजयी स्वामी श्रीरामचंद्र । विजयी लक्ष्मण महावीर । विजयी वानरेन्द्र सुग्रीव ॥ १२९ ॥

मी आलोसें सीताशुद्धीसी । मियां विध्वंसिलें या वनासी ।
जावोनि सांगा रावणापासी । मियां राक्षसांसी मारिलें ॥ १३० ॥

एका जनार्दना शरण । आलें हनुमंता स्फुरण । करील थोरथोरां दलन । रणकंदन अवधारा ॥ १३१ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां किंकरवधो नाम त्रयोदशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग चौदावा

## अखयाकुमर वध

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

किंकरान्सुबहून्हत्वा हनूमान्मारुतात्मजः । द्रुमान्बभंज परमान्वृक्षपालान् जघान च ॥ १ ॥
निहतान्राक्षसान् श्रुत्वा रावणो लोकरावणः । प्रहस्तस्य सुतं वीरं जंबुमालिनमादिशत् ॥ २ ॥
नाहत्वा वानरं वीरं विनिवर्तितुमर्हसि ॥ ३ ॥

**किंकर मारिले ऐंशी सहस्त्र । चौदा सहस्त्र बनकर । वन विध्वंसिलें मनोहर । तेणें दशशिर कोपला ॥ १ ॥**

**वानर जाणोनि महाबळी । प्रहस्तसुत जंबूमाळी । रावणें पाचारोनि** [वि. 'ते वेळीं'.] **जवळीं । गुज त्याजवळीं सांगत ॥ २ ॥** [ओवी २ तं. प्रतीत नाही.]

**मारिले किंकर बनकर । वन विध्वंसिलें** [कं. 'परिकर'.] **मनोहर । तो तुंवा मारावा वानर । युद्धीं दुर्धर गांजोनी ॥ ३ ॥**

**वानर न मारितां देख । तुज परतलिया एकाएक । तरी तुवां हरविलें नासिक । नपुंसक राक्षसीं ॥ ४ ॥**

**वानरा न करवें मर्दन । तेव्हांची तुझें काळें वदन । रासभारोहण अपमान । मूतें वपन मस्तका ॥ ५ ॥**

**ऐसी ऐकवोन वचनावळी । युद्धा धाडिला जंबूमाळी । तोहि वीर अतुर्बळी । क्रोधानळीं चालिला ॥ ६ ॥**

**महाखरीं जुंपिला रथ । शस्त्रसामग्री घालुनी समस्त । धनुष्य घेउनी अत्यद्भुत । आला युद्धार्थ जंबूमाळी ॥ ७ ॥**

**टणत्कारुनिया मेंढा । क्रोधें गर्जे वानरापुढां । किंकरा बनकरांच्या सूडा । घ्यावया रोकडा मी आलों ॥ ८ ॥**

**हनुमान सांगे गोड गोष्टी । तुम्ही चोरिली सीता गोरटी । मारीन राक्षसांच्या कोटी । अवघ्या शेवटीं रावण ॥ ९ ॥**

**जंबू तुझी आवडी मोठी । किंकराबनकरांसी भेटी । तुज मी करीन उठाउठी ।** [पै. तु. वि. मुं. तं. अं. दै. 'संतुष्टी'.] **रथसंपुटी समवेत ॥ १० ॥**

**अर्धचंद्र बाण समेळीं । हनुमान विंधिला कपाळीं । बाण हिसळोनी ते काळीं । लागला निढळी जंबूच्या ॥ ११ ॥**

**लागतां बाणाचा आघात । जंबुमाळी पडे मूर्छित । हनुमान गदगदा हांसत । विपरीतार्थ येथें जाहाला ॥ १२**

अनुक्रमणिका

॥

सावध होउनी जंबुमाळी । वर्षलासे बाणजाळी । बाण कोंदले नभस्थळीं । भूमंडळी शरजाळ ॥ १३ ॥

रामस्मरणें अति समर्थ । बाणामाजीं हनुमंत । रणधेंडा स्वयें नाचत । अंगीं आघात लागेना ॥ १४ ॥ [ओवी १४ तु. दै. प्रतींत नाही.]

पंचक्रोश शिळा सोज्वळी । हाणीतला जंबूमाळी । येरें विंधोनी बाणजाळीं । केली रांगोळी शिळेची ॥ १५ ॥

कोपोनियां हनुमंतें । [मु. दै. तु. 'विशाल'.] शालवृक्षें घेउनी हातें । वेगें हाणितां जंबूतें । बाणें वृक्षातें छेदिलें ॥ १६ ॥

लागवेगाचेनि लवलाहें । चौबाणीं विंधोनी पाहे । वृक्ष केला तिळप्राये । जाहालें आश्चर्य हनुमंता ॥ १७ ॥

जीवें घ्यावया हनुमंत । निर्वाण [वि. 'बाण'.] परिघ घंटायुक्त । रागें काढिला धगधगीत । करावया अंत वानरा ॥ १८ ॥

परीघ घेऊनी करतळीं । गर्जिन्नला जंबुमाळी । वानरा तुझी करीन होळी । घावो सांभाळी हनुमंता ॥ १९ ॥

माझिया परिघाचा आघात । निश्चयें निमाला हनुमंत । कैसेनि राखेल रघुनाथ । रणवृत्तांत पाहो याचा ॥ २० ॥

रावणें नेमिले आहे मातें । जीवें मारावया वानरातें । कोण निवारील माझ्या परिघातें । हनुमंतातें वांचवाया ॥

परिघ येतां अति वेगेंसी । हनुमान जाणें लघु विद्येसी । अंग चुकविलें [कं. 'परिघासी'.] घायासी । वेगें आकाशीं उडाला ॥ २२ ॥

शस्त्रदेवता पैं लाठी । परीघ लागे हनुमयापाठीं । पुंसें परिघा घालितां मिठी । चेपली घाटी देवतेची ॥ २३ ॥

देवता म्हणे हनुमंता । तुज मी शरण आले आतां । शस्त्रशक्ती ज्या समस्ता । शरणांगता तुज होती ॥ २४ ॥

शस्त्रशक्ती भूतशक्ती । आणि मंत्राच्या मंत्रशक्ती । अवघ्या तुज शरण येती । मज मारुती वांचविलिया ॥ २५ ॥

सोडुनी पूंसाचें बंधन । शस्त्रदेवता वांचवून । शक्तीमंडळा लोटांगण । घाली आपण हनुमंत ॥ २६ ॥

मारुं नये शरणांगता । म्हणोनी वांचविली शस्त्रदेवता ।
भूतीं भजावया श्रीरघुनाथा । या बुद्धि समस्तां शक्ति वंदी ॥ २७ ॥

अनुक्रमणिका

तंव त्या शक्ती पैं समस्ता । वोवाळिती हनुमंता । करितां राक्षसांचिया घातां । आम्ही युद्धार्थ तुज साह्य ॥ २८ ॥

सीता आमची आद्य शक्ती । तीसी गांजितों लंकापती ।
राक्षसा विमुख आम्ही ते अर्थीं । साह्य सर्वार्थीं रामभक्तां ॥ २९ ॥

हनुमान म्हणे पूंजा जगजेठी । युद्धां माझी राखिली पाठी ।
साह्य शक्ती कोट्यानुकोटी । पूंसासाठीं मज जाहल्या ॥ ३० ॥

ऐसें पुच्छाचें स्तवन । करुनी पुच्छाचें लालन । देऊनी पुच्छासी चुंबन । जाहाला सावधान युद्धार्थीं ॥ ३१ ॥

परिघ घेवोनिया हातां । येतां देखोनि हनुमंता । जंबू पावला परम चिंता । शस्त्रदेवता परतली ॥ ३२ ॥

माझा परिघ हा तत्वतां गेला हनुमंताचिया हातां । मज क्षोभल्या शस्त्रदेवता । माझा निज घात करावया ॥ ३३ ॥ [ओवी ३३ मु. प्रतीत नाही.]

रावणें परदारा अधर्म । पापें शक्ती क्षोभल्या परम । नाशाला आक्रम पराक्रम । मरणानुक्रम राक्षसां ॥ ३४ ॥

गृहीत्वा परिघं घोरं भ्रामयामास वानरः । सोऽतिवेगोऽतिवेगेन भ्रामयित्वा महाबलः ॥ ४ ॥
परिघं पातयामास जंबूमाले रथोपरि । तस्य चैव शिरो नास्ति न वाहू जानुनी न च ॥ ५ ॥
न धनुर्न रथो नाश्वास्तत्र किंचिन्न दुश्यते ॥ ६ ॥

करावया वानराच्या घातां । राक्षसें परिघ सोडिला होता । तो गेला हनुमंताचे हातां । जंबूचा माथा छेदावया ॥ ३५ ॥

कोप आला हनुमंता । परिघ भोवंडीला साटोपतां । लक्षुनी जंबूचिया रथा । होय हाणितां तें ऐका ॥ ३६ ॥

वेगें उडोनि अंबरा । दांत खावोनि करकरा । परिघ भोवंडुनी गरगरा । रहंवरा ठोकिलें ॥ ३७ ॥

निधडी हनुमंताची शक्ती । ना तें शीर ना त्या अस्थी । हातपाय न दिसती । न दिसे व्यक्ती राक्षसां ॥ ३८ ॥

ना तो रथ ना तो वारु । ना तें धनुष्य ना शस्त्रसंभारु । वानरें केला [तु. दै. 'अति'.] अव्यक्त मारु । न दिसे गोचरु राक्षसां ॥ ३९ ॥

दुर्धर हनुमंताचा घात । जीव जाऊनियां तेथ । घायवट न दिसें प्रेत । केला भस्मांत राक्षसा ॥ ४० ॥

हनुमंत महाबळी । ऐशापरी जंबुमाळी । घायें मेळविला धुळीं । रणरांगोळी करुनिया ॥ ४१ ॥

जंबू मारिला मारुती । प्रहस्त बोंबली दोहीं हातीं । द्यावया मंत्राग्नी पुरती । शोधितां अस्थी न मिळेची ॥ ४२

अनुक्रमणिका

॥

**पावोनिया पुत्रशोक । येउनी रावणा सन्मुख । प्रहस्त करी महा शंख । दुर्धर दुःख घोटेना ॥ ४३ ॥**

**झोंटी सुटली मोकळी । प्रहस्त लोळे क्षितीतळीं । ज्येष्ठ पुत्र जंबुमाळी । वानरें धुळीं मेळविला ॥ ४४ ॥**

**युद्धीं पडिला प्रहस्तकुमर । इतर प्रधानाचे पुत्र । वेगीं मोकली दशशिर । रणीं वानर मारावया ॥ ४५ ॥**

> ततस्ते राक्षसेंद्रेण नोदिता मंत्रिणां सुताः । हेमजालपरिक्षिप्तैर्ध्वजवद्भिः पताकिभिः ॥ ७ ॥
> कृतास्त्राः परमेष्वासाः परस्परकृतोद्यमाः । विस्फारयन्तः संहृष्टाः सर्वे युद्धजिगीषवः ॥ ८ ॥
> जनन्यस्तास्ततस्तेषां विदित्वा किंकरान्हतान् । बभूवुः शोकसंतप्ताः सवांधवसुहृज्जनाः ॥ ९ ॥
> सृजन्तो बाणवृष्टिं ते रथस्वनमहास्वनाः । अभिपेतुर्हनूमन्तं तोरणाग्रमवस्थितम् ॥ १० ॥

**रावणाचे सभे आंत । प्रधानपुत्र अति गर्वित । महावीरातें दृष्टी** [मु. 'न गणित'.] **नाणीत । बलोन्मत्त प्रतापें ॥ ४६ ॥**

**ऐसे बलोन्मत्त अति तृप्त । शस्त्रास्त्रीं निपुण नित्य । येरयेरां नापेक्षित ।** [पै. 'आप्त'.] **अति समर्थ युद्धार्थी ॥ ४७ ॥**

**युद्धाग्रणी प्रधानसुत । निवडोनियां समस्त । हनुमंतासी युद्धार्थ । धाडी लंकानाथ साक्षेपें ॥ ४८ ॥**

**तुमचें अंगीं युद्धकर्म । नित्य वानितां निज पराक्रम । वन विध्वंसिला प्लवंगम । त्यासी संग्राम करावा ॥ ४९ ॥**

**तुम्ही अवघे युद्धीं समर्थ । बांधोनि आणावा हनुमंत । नातरी करावा त्याचा घात । पाहों पुरुषार्थ तुमचा ॥ ५० ॥**

**थोर वाढिवेची मात । नित्य सांगां सभे आंत । तोच दावावा पुरुषार्थ । युद्धीं हनुमंत जिंकोनी ॥ ५१ ॥**

**ऐसें सांगतां लंकानाथ । प्रधानपुत्र समस्त । वेगें सज्जूनिया रथ । शीघ्र युद्धार्थ निघाले ॥ ५२ ॥** [ओवी ५२ मु. प्रतीत नाही.]

**हेममाला विराजीत । हे शृंगारिले अश्वरथ । ध्वज पताका डोलत । रथ शोभत अतिशोभा ॥ ५३ ॥**

**मारिल्यावांचोनि हनुमंत । परते त्या मातृगामी येथ । ऐशी करोनिया शपथ । आले समस्त युद्धार्थी ॥ ५४ ॥**

**रथारूढ धनुष्य हातीं । पुढें वाजंत्रें वाजती । मागें माता शंख करिती । पुत्रसंतती निमाली ॥ ५५ ॥**

**प्रहस्त दुःखासमान । दुःखी करावया प्रधान । हट्टीं पेटला दशानन । युद्धीं संतान मोकलिलें ॥ ५६ ॥**

अनुक्रमणिका

प्रहस्तपुत्र महाबळी । रणीं मारिला जंबुमाळी । किंकराची केली होळी । केली रांगोळी बनकरां ॥ ५७ ॥

तेथ प्रधानसंतान । आजीच जाहलें निसंतान । वानरू नव्हे महाविघ्न । आलें निदान राक्षसां ॥ ५८ ॥

स्त्रिया सुहृद तळमळिती । मातापिता शंख करिती । वधूं धाडितां मारुती । पुत्रसमाप्ती वानरें ॥ ५९ ॥

येरीकडे कडकडाट । प्रधानपुत्र घनदाट । रथचक्रांचा घडघडाट । आले निकट हनुमंता ॥ ६० ॥

देवालयीं महाद्वारीं । बैसला आहे तोरणावरी । देखोनि प्रधानपुत्र हारी । उल्हास भारी हनुमंता ॥ ६१ ॥

जैसे पतंग दीपावरी । तैशा प्रधानपुत्र हारी । लोटले हनुमंतावरी । शरधारीं वर्षती ॥ ६२ ॥

बाण सुटती सणसणा । शस्त्रें वाजतीं खणखणा । वीर विंधिती अंगवणा । [कं. मु. 'काल कंडना'.] कालकंदना मांडिली ॥ ६३ ॥

समकाळें [तु. 'सरसावत'.] शरसंपात । हनुमान बैसला सावचित्त । बाण चुकऊनी पिलंगत । अमात्यसुत मारावया ॥ ६४ ॥

बाण वर्षले अत्यद्भूत । जैसे मेघ पर्वतांत । अचूक हस्तीं आम्ही समस्त । मारा हनुमंत विंधोनी ॥ ६५ ॥

एक म्हणती विंधा शिरीं । एक म्हणती विंधा उरीं । एक म्हणे उदरोदरीं । दोहीं करीं म्हणे एक ॥ ६६ ॥

एक म्हणे विंधा पोटीं । एक म्हणे विंधा पाठीं । एक म्हणे विंधा कंठीं । फोडूं घाटी पैं याची ॥ ६७ ॥

एक म्हणे माझें अनुसंधान । याचें नासिक छेदीन । एक म्हणे छेदूं दोन्ही कान । पुच्छ छेदीन म्हणे एक ॥ ६८ ॥

ऐशा ऐकोनिया गोष्टी । हनुमान हांसिन्नला पोटीं । मग उठोनी जगजेठी । लांगूल त्राहाटी सत्राणें ॥ ६९ ॥

देतां भूभुःकार उद्भट । अवघियां झाला हृदयस्कोट । पूंसें कवळोनी एकवट । केलें पिष्ट निज घातें ॥ ७० ॥

उडो टाकितां हनुमंत । अवघियां एकची प्राणांत । दडपले पृथ्वी आंत । समवेत रथ घोडीं ॥ ७१ ॥

प्रेतें नुरतींच भूतळां । आतळावितळा ना सुतळा । हनुमान निज बळें आगळा । रसातळां ते नेले ॥ ७२ ॥

लागतां हनुमंताचा घावो । प्रेतपणा [मु. 'नुरेचि देहो'.] मुकला पहा हो । रसातळीं न मिळे ठावो । धाडी महाबाहो वैकुंठा ॥ ७३ ॥

ऐसियापरी हनुमंत । निर्दाळिले प्रधानसुत । बोंब सांगावया तेथ । केले निर्मुक्त अवघेही ॥ ७४ ॥

अनुक्रमणिका

**दुरुनी पाहाती सुहृदलोक । अवघे करिती महाशंख । प्रधानपुत्र एकाएक । रणीं निःशंक मारिले ॥ ७५ ॥**

**हांका बोंबांचा कल्लोळ । लंकेमाजीं हलकल्लोळ । रावणा आली काळवेळ । करी निर्मूळ राक्षसां ॥ ७६ ॥**

**प्रहस्तादि मुख्य प्रधान । रावणापासीं येऊनि जाण । अवघे करिती शंखस्फुरण । निसंतान त्वां केलें ॥ ७७ ॥**

**तो वानर नव्हे केवळ । सीता कोपाग्नी काळकल्लोळ । वनीं वाढलासे प्रबळ । राक्षस** [मु. 'कुळ'.] **सकळ निर्दळावया ॥ ७८ ॥** [ओवी ७८ वि. प्रतीत नाही.]

> हतान्मंत्रिसुतान्सर्वान्वानरेण महात्मना । रावणः संवृताकारश्चकार मतिमान्मतिम् ॥ ११ ॥
> सविरूपाक्षयूपाक्षौ दुर्धरं च महाबलम् । प्रघसं भास्वकर्णं च पंचसेनाग्रयायिनः ॥ १२ ॥
> संदिदेश दशग्रीवो वीरान्नयविशारदान् । हनुमद्ग्रहणे व्यग्रान्हनुमन्निग्रहं प्रति ॥ १३ ॥
> महागणपरिख्यातान् रणकर्मविशारदान् ॥ १४ ॥

**प्रधानपुत्र संतती । रणीं मारिली मारुती । तें ऐकोनि लंकापती । चिंता चित्तीं अनिवार ॥ ७९ ॥**

**जो जो धाडी युद्धाप्रती । त्याची कपी करितो समाप्ती । रावण पांचही सेनापती । संग्रामार्थी पाठवी ॥ ८० ॥**

**यूपाक्ष विरुपाक्ष दोघेजण । दुर्धर प्रघस भासकर्ण । हे सेनानी वीर दारुण । पांचैजण दृढ योद्धे ॥ ८१ ॥**

**रावण त्यासी सांगे युक्ती । तुम्ही दुर्धर** [मु. 'पुरुषार्थी'.] **वीरवृत्ती । वानर धरावा युद्धशक्ती । तुम्हीं समस्तीं मिळोनी ॥ ८२ ॥**

**सन्मुख येतां प्रधानसुत । त्याचा वानरें केला घात । तुम्ही युद्धिबळें प्रतापवंत । युद्ध** [मु. 'प्रशस्त'.] **पंचस्थ करावें ॥ ८३ ॥**

**चौघीं राहुनी चौदिशाप्रती । येके नभीं राहावे नभस्थिती ।** [पै. कं. वि. तुं. अं. मुं. 'जाजाऊनि'.] **दावोनिया निज शक्ती । युद्धीं मारुती धरावा ॥ ८४ ॥**

**युद्धीं धरितां न ये हातां । तरी करावें त्याचिया घातां । ऐसें सांगोनि समस्तां । होय धाडितां लंकेश ॥ ८५ ॥**

**रथपताका डोलायमान । पांचजण युद्धप्रवोण । पांचाठायीं विखरोन । युद्ध दारुण मांडिलें ॥ ८६ ॥**

> तं समीक्ष्य कपिं सर्वे दिक्षु सर्वास्ववस्थिताः । तैस्तैः प्रहरणैर्भीमैरभिपेतुस्टातस्ततः ॥ १५ ॥

**गांचा ठायी पांचजण । हनुमंतातें वेढून । युद्धां झगटले दारूण । शस्त्रास्त्रीं संपूर्ण हाणित ॥ ८७ ॥**

**दुर्धर पंचमुख पंचबाण । मस्तकीं विधिलें संमुख येऊन । पाठीसीं तो भासकर्ण । हाणी दारूण गदाघात ॥**

अनुक्रमणिका

८८ ॥

दक्षिणबाहू यूपाक्ष । वामांगीं विरूपाक्ष । शूळ हाणिती प्रत्यक्ष । कुक्षोपकुक्ष लक्षोनी ॥ ८९ ॥

घ्यावया हनुमंतासीं घस । गगना चढला तो प्रघस । बाण वर्षे असमसाहस । जेंवी आकाशीं मेघधारा ॥ ९० ॥

पांचाची उडी अवचितीं । आली हनुमंताभोंवतीं । तेव्हां पुच्छें केली ख्याती । साह्य युद्धार्थी सर्वदा ॥ ९१ ॥

भोंवता पुच्छाचा आवर्त । त्यांच्या शस्त्रां करोनि घात । पांचहि आकळिले पुच्छा आंत । वीर विख्यात सेनानी ॥ ९२ ॥

जेवीं योगिया आपण । स्वयें निरोधी पंचप्राण । तेवीं पुच्छें पांचहीजण । आकळोनी राखिले ॥ ९३ ॥

जेवीं काळ प्रळयांत । पंचभूतां करी आवर्त । तेवीं पांचही पुच्छाआंत । बांधी हनुमंत वधार्थी ॥ ९४ ॥

जेवीं विवेकी साधुजन । पंचही विषयां करिती दमन । तेंवीं वीर पांचही जण । पुच्छें गोवोनी राखिले ॥ ९५ ॥

अभवद्वानरश्रेष्ठो बालसूर्यसमप्रभः । समुत्पाट्य गिरेःशृंगं जघान पंचराक्षसान् ॥ १६ ॥

कोपें वानर अति आरक्त । बालसूर्यासम भासत । रागें उपडोनी पर्वत । करील कल्पांत पांचाही ॥ ९६ ॥

उपडोनियां महागिरी । घालितांचि पांचावरी । घायें जाहले चकचुरी । केली बोहरी पांचांची ॥ ९७ ॥

पांचहि विषय जैं निर्दळिती । तैं सुख पावें परमार्थी । वधोनी पांचही सेनापती । सुखें मारुती उल्लासे ॥ ९८ ॥

श्रीरामभक्ताचे आघातीं । अस्थिमांस ना गुणव्यक्ती । अवघे नेले गुणातीतीं । धन्य मारुती सुखमरण ॥ ९९ ॥

श्रीरामभक्ताचें कौतुक । मारून द्यावें परमसुख । कोटी जन्मांचें हरोनी दुःख । सुखदायक संग्रामीं ॥ १०० ॥

निर्दळोनि पांचही जण । भुभुःकारें देऊनी किराण । देवालयाचें तोरण । धरोनि स्थान बैसला ॥ १०१ ॥

पंचभूतांची निवृत्ती । साधकां परमानंद प्राप्ती । वधोनी पांचही सेनापती । सुखें मारूति उल्लासें ॥ १०२ ॥
[ओवी १०२ केवळ मुद्रितातच आहे.]

मारिलें पांचही सेनापती । बोंब गेली लंकेप्रती । दचकलासे लंकापती । वानरें ख्याती लाविली ॥ १०३ ॥

अनुक्रमणिका

पारखें केलें अशोकवन । सहजें सीमा नेईल हिरोन । क्रोधें कांपे दशानन । पाहे आपण कोण धाडूं ॥ १०४ ॥

तंव देखिला समोर । जो कां लाडका अखयाकुमर । त्यासी सांगे दशशिर । मारी वानर प्रतापें ॥ १०५ ॥

> कुमारमक्षं प्रसमीक्ष्य संयुगे पताकिनं छत्रविभूषितध्वजम् ।
> रथं समास्थाय ययौ स वीर्यवान् सदृप्तमासीनमुप्रागमत्कपिम् ॥ १७ ॥
> तुरंगमातंगमहा रथस्वनैः बलैः समेतैः सहितो रणें स्थितम् ।
> स तं समासाद्य हरिं हरीक्षणो । युगान्तकालाग्निमिव प्रजाक्षये ॥ १८ ॥

आज्ञा देतां दशशिर । वेगें निघाला अखयाकुमर । छत्रपताका मनोहर । ध्वज रहंवर रत्नाढ्य ॥ १०६ ॥

आठ वारु शिरोमणी । हेम चाप सबाण तूणीं । पाठिसीं राजकुमर श्रेणी । निपुण रणीं रणयोद्धे ॥ १०७ ॥

अंगीं बळाचा गर्व थोर । रथीं बैसोनि अखयाकुमर । जेथें आहे हनुमान वीर । तेथें सत्वर पैं आला ॥ १०८ ॥

प्रधान आप्त थोर थोर । करिती रावणा मरमर । मरों धाडिला अखयाकुमर । बळें दुर्धर वानर ॥ १०९ ॥

चौदा सहस्त्र बनकरां । पुच्छें बांधोनिया भारा । मच्छमगरां दिधला चारा । आणि किंकरां मारिलें ॥ ११० ॥

प्रधानपुत्र गर्वभरित । अति बळें सदा कुंथत । त्या अवघियांचा केला घात । केला निःपात जंबूचा ॥ १११ ॥

घालोनि पूंसाची आवर्ती । पांचै मारिले सेनापती । अखया बापुडें तें किती । क्षणें मारुती मारील ॥ ११२ ॥

तुझा हा लाडिका कुमर । जाणोनि हनुमान करील मार । रावणा चुकलासी थोर । तेथें कां कुमर धाडिला ॥ ११३ ॥

दृष्टी पडलिया हनुमंता । अखया परतेना मागुता । त्याचें रक्षणीं लंकानाथा । वीरां समर्था धाडावें ॥ ११४ ॥
[ओवी ११४ तु. दै. प्रतींत नाही.]

रावणें निवडोनिया [पै. कं. 'वांठ'.] चोखट । रण रगडे अति उद्भट । महायुद्धाचा कडकडाट । शौर्यें श्रेष्ठ धाडिले ॥ ११५ ॥

चतुरंग एकवट । निधडे धाडिले महावाट । अश्वगजरथीं घडघडाट । आले निकट हनुमंता ॥ ११६ ॥

न येतां मागिले वीरांसी । अखया भिडला हनुमंतासी । लघु लाघवें शरधारांसी । हनुमंतासी आच्छादी ॥ ११७ ॥

अमित बाणीं विंधिला शिरीं । बाणीं विंधिला भुजांवरी । बाणीं विंधिला स्तनावरी । सर्वांग शरीं व्यापिलें ॥ ११८ ॥

अनुक्रमणिका

तेंचि समयीं मागील वीर । वर्षती शस्त्रसंभार । तेणें आच्छादिला वानर । दिवाकर जेवीं अभ्रीं ॥ ११९ ॥

गडगर्जना [तु. 'प्रचंड'.] पर्जन्यधारा । कदा न रूपती गिरिवरां । तेंवी राक्षस शस्त्रसंभारा । अंगीं वानरां न बाधती ॥ १२० ॥

निधडी हनुमंताची शक्ती । बाण लागले ते पीठ होती । शस्त्रें भंगोनी पडती क्षितीं । रणीं मारुती नाटोपे ॥ १२१ ॥

व्यर्थ करोनि शत्रुशस्त्रांसी । हनुमान उसळला गगनासी ।

[तु. दै. 'ते देखोनि दृष्टीस । विचार मानसीं करीतुसे ॥'] अखयाची शक्ती कैसी । रथ आकाशीं चालविला ॥ १२२ ॥

कुमर आणि हनुमानवीर । दोघे भिडती निराधार । बळ वानिती सुरासुर । [कं. 'चमत्कार'.] चक्राकार संग्रामीं ॥ १२३ ॥

रथाची गती विगती । तैसाची पिलंगत मारुती । क्षणैक नभीं क्षणैक क्षितीं । दुर्धर शक्ती दोघांची ॥ १२४ ॥

अखया मारूं पाहे हनुमंत । त्यासी तो घाय नाटळत । कपी कुमराचा करितां घात । त्यासी तो रथ नाटोपे ॥ १२५ ॥

क्षणैक रथ दिसे भूतळीं । क्षणैक दिसे नभस्थळीं । क्षणैक दिसे समूद्रजळीं । त्रिकुटाचळीं क्षणैक ॥ १२६ ॥

अखयाकुमर अति समर्थ । [मु. 'वेडाविला'.] वेढा लाविला हनुमंत । तेणें वानर अति विस्मित । कैसेनि घात करुं याचा ॥ १२७ ॥

तंव बोलती सैन्यसंभार । निधडा योद्धा अखयाकुमर । जाणोनि धाडी दशशिर । घायें वानर मारील ॥ १२८ ॥

ठकनिया अखयाकुमर । पळोनि जातां हा वानर । आम्ही धांवोनि [मु. 'संग्राम थोर'.] समग्र । तीरमार करुं यासी ॥ १२९ ॥

> वधे कुमारस्य महाबलस्तदा चकार बुद्धिं हनुमान्महाकपिः ।
> रथे नियुक्तान्निजघान वाजिनः तलैश्च तालैश्च कपिर्महाबलः ॥ १९ ॥
> प्रभग्ननीडेषु युगाक्षकूबरः पपात भूमौ हतवाजिसारथिः ।
> स तं परित्यज्य महारथो रथं सकार्मुकः खड्गधरोऽभिपुप्लुवे ॥ २० ॥

रणीं नाटोपे अखयाकुमर । त्यासी मारावयाचा विचार । हनुमान विचारी साचार । गुप्त प्रकार तो ऐका ॥ १३० ॥
कैसेंनि मारुं अखयासी । ऐसें विचारितां मनासीं । कोप आला पैं पूंसासी । राजपुत्रासी वधावया ॥ १३१ ॥

अनुक्रमणिका

कामग रथ अखयासी । रणीं नाटोपे तो कोण्हासी । पूंस लागोनि पाठीसी । रथ चौपासी बांधिला ॥ १३२ ॥

स्वर्ग मृत्यु कैलास पृष्ठीं । रथ पळवितां संकटीं । पूंसें पुरवोनि पाठी । कडकडाटी बांधिला ॥ १३३ ॥ [ओव्या १३३ व १३४ तु. दै. प्रतींत नाहीत.]

लाता हाणोनि छत्रपात । करतळें ध्वजासी घात । तालवृक्षाचा आघात । भंगिला रथ [मु. 'ते. काळी'.] तो ऐका ॥ १३४ ॥

आंख चक्र रथ कुबर । पवळवेलीच्या धुरा थोर । आठहि वारु सारथीवीर । केला चकचूर एकें घायें ॥ १३५ ॥

पूंसें नाचविले धांदडी । रथ उपडिला कडाडी । अखयाकुमरें लवडसवडी । घातली उडी अती वेगें ॥ १३६ ॥

वोडण खांडें घेउनी करीं । मारावया खर्गधारी । धांविन्नला हनुमियावरी । गिरा गजरीं गर्जोनी ॥ १३७ ॥

राहे साहे हनुमंता । तुझ्या करीन मी घातां । रणीं भंगीले माझिया रथा । क्षणीं शलाघ्यता मानिसी ॥ १३८ ॥

थरकत सरकत चवंकतू । वोडण धडकूनि [कं. 'हाणतू'.] धांवतु । खर्ग लघुविद्या तळपतू । उपमतू अति बळें ॥ १३९ ॥

> स मारुतिर्मारुतवेगविक्रमं करेण जग्राह च पादयोर्दृढम् ।
> कुमारमक्षं प्रविकीर्णभूषणं हतः क्षितौ वायुसुतेन राक्षसः ॥ २१ ॥

कुमर आणि वानरासी । क्षणां भुमीं क्षणां आकाशीं । युद्ध होत अति आक्रोशीं । येर येरांसी वधावया ॥ १४० ॥

वानर मारावया ठायीं । अखया उपमे लवलाही । हनुमान वायूवेगें पाही । धरी पाय [कं. तु. दै. 'लघुलाघवें'.] लघुवेगें ॥ १४१ ॥

हनुमान अति आवेशेसीं । भवंडीता अति आक्रोशीं । भवंडी दाटली तयासी । देहभावासी विसरला ॥ १४२ ॥

वोडण पडलें त्रिकुटावरी । खर्ग पडिलें सागरीं । मुकुट पडिला सभेमाझारीं । अपांपरी भूषणां ॥ १४३ ॥

आवांकूनी महाबळी । आपटितां शिळातळीं । लंकादुर्ग कांपे चळी । निधा पाताळीं ऊठिला ॥ १४४ ॥

दिग्गजां टाळी बैसली कानीं । पन्नगां पाताळीं पळणी । मेरु पडला तुटोनी । कांपे अवनी येणें मानें ॥ १४५ ॥

हनुमान श्रीरामभक्त चिद्रत्न । युद्धामाजीं कृपाळू पूर्ण । अखया न देखे जन्ममरण । ऐसा संपूर्ण मारिला ॥ १४६ ॥

अनुक्रमणिका

अखया राखावया [कं. खेरीज इतरत्र 'साठी'.] संकटीं । रावणें धाडिले कोट्यानुकोटी ।
अश्व गज रथ पळतां थाटी । पूंसें पाठी पुरविली ॥ १४७ ॥

पूंसें केला कोंडमार । वानरें करुनी शिळामार । रणीं पाडिले वीरवीर । धरणीं रुधिर प्रवाहे ॥ १४८ ॥

हनुमंतें ऐसिया रीतीं । केली अवघियांची समाप्ती । सुरनर ऋषीश्वर वर्णिती । अगाध कीर्ती हनुमंता ॥ १४९ ॥

सुरवर वर्षती सुमनीं । जयजयकार ऋषीजनीं । कीर्ती पावन त्रिभुवनीं । धन्य अंजनी निजसुत ॥ १५० ॥

एका जनार्दना शरण । जाहालें अखया निर्दळण । पुढें इंद्रजीत हनुमंत रण । सावधान अवधारा ॥ १५१ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां अखयाकुमरवधो नाम चतुर्दशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग पंधरावा

## इंद्रजित अपमान

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

अखयाकुमर [पै. मुं. मु. खेरीज इतरत्र 'पडिला'.] पडला रणीं । रावणें ऐकतांचि कानीं । शंख करी दाही वदनीं । लोळे धरणीं गडबडा ॥ १ ॥

मुकुट पडिला सभास्थानीं । प्रत्यक्ष देखोनिया नयनीं । रावण रडे आक्रंदोनी । विरुद्ध करणी मियां केली ॥ २ ॥

बुद्धिभ्रशं मजपासी । कुमर धाडिला युद्धाली । रणीं वानरें मारिलें त्यासी । बोल कोणासी ठेवावा ॥ ३ ॥

माझें जें कां अशोकवन । तें मज झालें शोकस्थान । कपीनें लंके घालुनी खान । पुत्रनिधान तेणें नेलें ॥ ४ ॥

आम्हा अवध्या देखतां जाण । देहामाजीं घालोनि खान । अखया नेलें निजनिधान । नागवण मज आली ॥ ५ ॥

नव्हे त्याची चोरीमारी । हनुमान नव्हे पैं खानोरी । लाज लावोनि आमच्या शिरीं । अखया मारी पुरुषार्थें ॥ ६ ॥

अवघे बोलती प्रधान । आमचे पुत्र पडिलिया जाण । स्वयें संपादी रावण । श्रेष्ठ मरण संग्रामीं ॥ ७ ॥

आपला पुत्र पडिल्या रणीं । शंख करितो दाहीं वदनी । बोलासारखी नाहीं करणी । निंद्याभिमानी रावण ॥ ८ ॥

सैन्य धाडिलें कोट्यानकोटी । तें मारिलें पूंसासाठीं । वानरें पुरविली पाठी । रावणापोटीं धुकधुकी ॥ ९ ॥

अभिलाषिली शिवाची कांता । उमा मागितली भोगार्था । तें पाप बैसले माथा । रुद्र तत्वतां क्षोभला ॥ १० ॥

उमा ते तंव जगज्जननी । विशेषें माझी सद्‌गुरु पत्नी । ते मीं अभिलाषिली [पै. 'जनी'.] नयनीं । रुद्र क्षोभोनि स्वयें आला ॥ ११ ॥

अखयासी क्षयो झाला । सत्य स्वयें रुद्र क्षोभला । राक्षसासी क्षयो आला । तो मियां केला महादोष ॥ १२ ॥

हा तंव नव्हे गा वानर । क्षोभोनि आला [पै. 'महारूद्र'.] काळाग्नीरुद्र । कायसा राक्षसाचा भार । सर्व संहार येथें आला ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

जो जो धाडिला अशोकवनीं । तो तो पडिला काळाचें वदनीं ।
आतां धादिला नवचे कोण्ही । रावण मनीं विचारी ॥ १४ ॥

अखयाचे कैवारासी । धाडितां न ये आणिकासी । मीचि जाईन संग्रामासी । कांस सरिसी तेणें केली ॥ १५ ॥

मियां वानरु मारिल्या पाठीं । लंका निर्मुक्त संकटीं । वानरें मज मारिलिया पाठी । सीता गोरटी निर्मुक्त ॥ १६ ॥

लाज [पै. 'लाविली'.] लागली रावणासी । न सांगतां कोणापासीं । अंगीं बाणलें कवचासी । संग्रामासी निघावया ॥ १७ ॥

ऐसें ऐकतांचि कानीं । इंद्रजीत आला गजबजोनी । रावणातें नमस्कारुनी । सिंहासनीं बैसविला ॥ १८ ॥

एकलें एक पैं वानर । वनवासीं पाले खाईर । त्यावरी जाणें दशशिर । [अं. 'युद्ध'.] शुद्ध विचार हा नव्हे ॥ १९ ॥

वीरीं घेतला वानरधांक । धाडितां कोण्ही न वचे देख । मी तंव घरगुती सेवक । अवश्यक मज धाडी ॥ २० ॥

वीर वाठीवेचे बोल । रणांगणीं होती [तं. 'सफल'.] फोल । माझे बोल सत्य सखोल । जाणती सकळ सुरसिद्ध ॥ २१ ॥

माझिया प्रतापाची ख्याती । तूंही जाणसी लंकापती । मज धाडावे [कं. 'संग्रामासी'.] शीघ्र गती । क्षणें मारुती आणीन ॥ २२ ॥

एकलें एक वानर किती । तुज जावों नये लंकापती । मज धाडावें संग्रामार्थी । क्षणें मारुती आणीन ॥ २३ ॥

धरुनी रावणाचे चरण । इंद्रजीत घाली लोटांगण । मागतां युद्ध आज्ञापन । आलें रुदन रावणा ॥ २४ ॥

> तथा वानरमंग्रामं दृष्ट्वा श्रुत्वा परंतपः । न खल्वियं मतिर्मह्यं यत्त्वां संप्रेषयाम्यहम् ॥ १ ॥
> वनकराः किंकराः सर्वे जंबुमाली च राक्षसाः । अमात्यपुत्रा वीराश्च पंचसेनाग्रगास्तथा ॥ २ ॥
> अक्षःकुमरोऽतिबलो हताः सर्वे रणाजिरे । न तु तस्य रणें कश्चित्तुल्योऽस्ति कपिकुंजरः ॥ ३ ॥

चौदा सहस्त्र बनकर । ऐंशी सहस्त्र किंकर । जंबुमाळी प्रधानपुत्र । मारिले शूर सेनानी ॥ २५ ॥

देवांदानवां दुर्धर । बळिया बळी वीर शूर । तुझा बंधू अखयाकुमर । वानरें मार दृढ केला ॥ २६ ॥

पाचारुनी रणांगणीं । वीर मारिले आयिनीपायिनी । वानर दुर्धर [वि. 'दर्शनीं'.] रणीं । सन्मुख कोण्ही उरेना ॥ २७ ॥

अनुक्रमणिका

**वानरेसी समान बळी । कोणी न दिसे भूमंडळी । त्यासी तुज घेतां फळी । करील होळी रणमारें ॥ २८ ॥**

**जे गती जाहाली अखयासी । ते गती होईल इंद्रजीतासी । पुत्र धरोनि पोटासीं । उकसाबुकसी स्फुंदत ॥ २९ ॥**

**इंद्रजीत म्हणे लंकानाथा । कायसी वानराची कथा । तूं कां करिसी व्यर्थ** [वि. तु. दै. मु. 'चिंता'.] **व्यथा । बांधोनि आतां आणीन ॥ ३० ॥**

**युद्धसंधी गळा बांधोन । इंद्र आणिला जिंतोन । इंद्रजीत हें अभिधान । तैं पासून मज आलें ॥ ३१ ॥**

**त्या मज वानरेसी रण । करितां तुज संदेह कोण । वेगीं देई आज्ञापन । कपी बांधोन आणीन ॥ ३२ ॥**

**वाहतों सदाशिवाची आण । शिवतों । स्वामी तुझे चरण । वानराचा गळा बांधोन । येथें आणीन भाक माझी ॥ ३३ ॥** [ओवी ३३ मु. प्रतीत नाही.]

**ऐकोनि इंद्रजिताचें वचन । सुखावला दशानन । दुर्धर धाडी निज सैन्य । देउनी सन्मान पाठवी ॥ ३४ ॥**

> ततस्तु रक्षोऽधिपतिर्महात्मा हनूमताक्षे निहते कुमारे । मनःसमाधाय विवृद्धरोषः समादिदेशेन्द्रजितं रणाय ॥ ४ ॥
> त्वमस्त्रविच्छस्त्रविदां वरिष्ठः प्रमन्नबुद्धिःसमरेष्वधृष्यः । सुरेषु सेंद्रेषु च दृष्टकर्मा पितामहाराधानसंचितास्त्रः ॥ ५ ॥
> नहि ते समरे कश्चित्तुल्योऽस्ति रिपुसूदन । तस्माद्गच्छाद्य वै पुत्र युद्धाय विजयाय च ॥ ६ ॥

**ऐकोनि इंद्रजीताचें वचन । रावण विचारी आपण । निराहारी ब्रह्मचारी पूर्ण । त्याचेनि मरण मेघनादा ॥ ३५ ॥**

**वानरा यथेष्ट फळभक्षण । याचेनि इंद्रजीत न पावे मरण । तरी युद्धाचा संदेह कोण । धाडी रावण आल्हादें ॥ ३६ ॥**

**अखया मारिला जगजेठी । तेणें रावण क्रोधदृष्टी । इंद्रजीतासी सांगे गोष्टी । वानर कपटी मारावा ॥ ३७ ॥**

**ब्रह्म्यापासुनी विद्या सकळ । शिकलासी अस्त्रबळ । तुजपासीं शस्त्रें प्रबळ । सृष्टीं सबळ तूं एक ॥ ३८ ॥**

**इंद्रादिदेवां रण धांदाडी । जिंतोनी अमर तेहतीस कोडी । घातले लंकेचे बांदवाडी । गाढी प्रौढी तुज पुत्रा ॥ ३९ ॥**

**करोनि मेघांचे तर्जन । हिरोनी त्यांचें गडगर्जन । मेघनाद हे अभिधान । शोभे संपूर्ण तुज पुत्रा ॥ ४० ॥** [ओवी ४० तु. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

**अस्त्रबळ शस्त्रबळ । बुद्धिबळ निजांगबळ । बळ मेळवोनिया सकळ । धरीं तात्काळ वानर ॥ ४१ ॥**

**जरी नाटोपे करितां बळ । तरी तुवां त्याचा करावा छळ । तुजपासी विद्या प्रबळ । गोळांगुळ धरावया ॥ ४२ ॥**

**प्रबळ बळें हनुमंत । तुजसीं तुकों नये एथ । तुजपासीं शस्त्रास्त्रें समस्त । समयीं लागत तीं घेईं ॥ ४३ ॥**

**वेळ पाहोनि सावचित्त । युद्धा निघावें त्वरित । जयो पावसी निश्चित । लंकानाथ अनुवादे ॥ ४४ ॥**

> ततः पितुस्तद्वचनं निशम्य प्रदक्षिणं दक्षसुतप्रभावः । चकार भर्तारमदीनसत्वो रणाय वीरः प्रतिपन्नबुद्धिः ॥ ७ ॥
> अयं ह्यदृश्यः परमो वलेषु कपिप्रभावश्च पराक्रमश्च ।
> त्वमात्मनश्चैव समीक्ष्य तत्त्वम् कुरुष्व वीर्यस्व गुणानुरूपम् ॥ ८ ॥

**पितृवाक्य आशीर्वचन । इंद्रजित ऐकोन आपण । परम भक्तीं प्रदक्षिण । मस्तकीं चरण वंदिले ॥ ४५ ॥**

**इंद्रजित निघतां उल्लासेंसी । नग्न कुमारी शिंके पाठीसी । दचक पडला रावणासी । इंद्रजितासीं आशंका ॥ ४६ ॥**

**शिंक झाली पाठिसीं । भविष्य पुसे ब्रह्मयासी । ब्रह्मा सांगे रावणासी । अति गुह्यासी गुप्तत्वें ॥ ४७ ॥**

**अपेश यशीं यश अपेशी । मरण नाहीं इंद्रजितासी । वानर आणील लंकेसी । तुजपासी रावणा ॥ ४८ ॥** [ओवी ४८ तु. दै. प्रतींत नाही.]

**रणीं धरिजेल वानर । ऐकोनि ब्रह्म्याचें उत्तर । अवघे करिती जयजयकार । सैन्यसंभार सज्ञुनी ॥ ४९ ॥**

**गुह्य सांगे स्वयें रावण । वानर नव्हे साधारण । रणकर्कश अति दारुण । जाण संपूर्ण** [कं. 'निजपुत्रा'.] **कृतांत ॥ ५० ॥**

**जे जे गेले अशोकवनीं । ते ते पडले काळाचें वदनीं । सैन्य अश्वरथ गांजोनी । वीर मर्दुनी निर्दाळिले ॥ ५१ ॥**

**जें जें देखिलें हनुमंतें । तें तें निमालें निश्चितें । बोंब सांगावया पुरते । नेदि वीरातें उरीउरो ॥ ५२ ॥**

[तु. दै. 'कपट'.] **कवच न चले तयाकडे । वोडण खांडें तें बापुडें । कोण राहे तयापुढें । घायें रोकडे विभांडी ॥ ५३ ॥**

**शस्त्रें न रुपती बाण । न चले अस्त्रांचे प्रेरण । आपुले वांचवुनी प्राण । रणांगण साधावें ॥ ५४ ॥**

अनुक्रमणिका

**गुह्य सांगतों तुजपासी । परम शक्ती पूंसासी । पूंसें निर्दाळिलें सैन्यासी । महावीरासी मारक ॥ ५५ ॥**

**इंद्रजीत म्हणे असोत युक्ती । सत्य ब्रह्म्याची** [वि. 'वरदोक्ती'.] **वचनोक्ती । गळां बांधोनि मारुती । लंकेप्रती आणीन ॥ ५६ ॥**

**ऐकोनि इंद्रजीताचें उत्तर । वीरीं केला जयजयकार । जाहला वाद्यांचा गजर । सैन्यसंभार चालिला ॥ ५७ ॥**

> रथैर्मत्तैश्च मातंगैर्वाजिमिश्च खरोष्ट्रकैः । शस्त्रैश्च विविधैस्तीक्ष्णैः भृशं चोपचिताबलैः ॥ ९ ॥
> छत्रध्वजपताकैश्चालंकृता महतीचमूः । रथेनादित्यवर्णेन तं वानरमुपाद्रवत् ॥ १० ॥
> मृदंगशंखाः पटहाः स्वननन्ति विशालभेर्यश्च स्वनन्ति दुंदुभीः ।
> तूर्याण्यनेकानि च डिंडिमाश्च युद्धे जयायैव रथस्वनश्च ॥ ११ ॥

**मत्त मातंग महाथोर । शाऐंशी प्रयुतें कुंजर । शतानुकोटी रहंवर । असिवार असंख्य ॥ ५८ ॥**

**एक ते वळंघले उष्ट्रावरी । एक बैसले महाखरीं । एक चढले अश्वांतरी । गिरा गजरी गर्जत ॥ ५९ ॥**

**वारु उडविती जेंवी केसरी । नाचती तीच पायांवरी । हो हो मा मा जी जी करी । यावा स्वारीं दाविजे ॥ ६० ॥** [ओवी ६० मुं. कं. प्रतींत नाही.]

**आंगत्राणें पैं वीरांसी । लखलखीत तेजोराशी । हिरे माणिकें जडलीं त्यासीं । रवी प्रभेसी समप्रभा ॥ ६१ ॥**

**वीर वांटीव अतुर्बळी । हस्तसन्नाह करतळीं । कंगल टोप राघावळी । मुक्त मणि मेळीं पाखरा ॥ ६२ ॥**

**शेळी साबळी शक्ती तोमर । आढाउ चव्हाण कोडतेकार । शूळ त्रिशूळ फरशधर । धनुर्धर पायांचे ॥ ६३ ॥**

**भिंडी माळा चेंडू चक्रें । गदा मुद्‌गल परिघ पत्रें । सज्ज केली अग्नीशस्त्रें । नाना यंत्रें रणमारा ॥ ६४ ॥** [ओवी ६४ कं. मुं. प्रतींत नाही.]

**अलंगाइत बाणाइत । तुळवे वोडणें धडकित । कोयतीकार पैं तळपत । जेठी पिलंगत मुष्टीघातें ॥ ६५ ॥**

**खर्गहस्त खट्‌वांगवहस्त । पटाईत पट्टिशहस्त । जमदाढा कटारहस्त ।** [मुं. 'असिपात'.] **अश्मपात पैं एका ॥ ६६ ॥**

**ऐसे पायाचे मोगर । वीर चालिले अपार । भाट गर्जती कैवार । गजगंभीर गडगर्ज ॥ ६७ ॥**

**पुढें पायाचे निधडे वीर । तयामागें असिवार । त्यांचे पाठीसी रहंवर । राजकुमर त्यामाजीं ॥ ६८ ॥**

**दांतीं लोहसेंब्या तिखट । वारिया वळंघले वाट । दोही बाहीं गजथाट । मदोत्कट चालती ॥ ६९ ॥**

अनुक्रमणिका

श्वेतपीत अति आरक्त । बहु पताकीं सैन्य शोभत । पताकी वाढवावया पुरुषार्थ । ब्रिदाईत वागविती ॥ ७० ॥

सूर्य प्रभा समयुक्त । रथ निज तेजें लखलखित । ध्वज पताका डोलत । वोळकंबत बहु माळा ॥ ७१ ॥

तडक फुटलें एकसरें । भिंडीमाळांचे पागोरे । खाखाइली रणतुरें । वीर गजरें गर्जती ॥ ७२ ॥

धडधडा विघात वाही । निशाणें लागली एकी घाई । विराणी वाजती लवलाही । दुंदुभी पाहे त्राहाटिल्या ॥ ७३ ॥

शंख मृदंग टाळ घोळा । वाजती काहाळा चिनकाहाळा । घर्घरीत घोगर गळा । ध्वनी आगळा बुरुंगांचा ॥ ७४ ॥

पावे वाजती थापटेकारी । पट त्राहटिल्या भेरी । खाखाइल्या रणमोहरी । निशाणें गजरी गर्जतीं ॥ ७५ ॥

रणीं वाजतां गिडबीडी । भेडां मळमूत्र लिडबिडी । ऐकोनि हनुमंताची प्रौढी । भय धाकडी घेतला ॥ ७६ ॥

हनुमान एकला एक वानर । त्यावरी अमित दळभार । तरी धाकती समग्र । झणीं वानर मारील आम्हां ॥ ७७ ॥

ऐकोनि वाजंत्रांचा नाद । सैन्य देखोनि सन्निध । हनुमान करितो आल्हाद । रामगोविंद तुष्टला ॥ ७८ ॥

करावया राक्षसांसी झगडा । मुहूर्तें केला वनउपाडा । इंद्रजिताचा पादाडा । रणीं रोकडा झाडीन ॥ ७९ ॥

माझें पुरवावया मनोरथ । आजि तुष्टला श्रीरघुनाथ । रणीं निर्दाळोनी समस्त । इंद्रजित गांजीन ॥ ८० ॥

अखया मारोनि रणीं । प्रथम केली म्यां बोहणी । येथोनि वीरांचिया श्रेणी । रणीं मर्दुनी मारीन ॥ ८१ ॥

पुच्छ नाचतें पैं धरणीं । सैन्य मारोनिया रणीं । पूजूं चामुंडा भवानी । मांसाची धणी भूतांसी ॥ ८२ ॥

पुच्छ अतिशयें सज्ञान । भूतां दिधलें आमंत्रण । मांसभोजन रुधिरापान । कृपा करोनि सेवावें ॥ ८३ ॥

ज्याचें पोटीं जे आवडी । ते मज सांगावी रोकडी । ते ते पुरवीन परवडी । राक्षस कोडी मारोनी ॥ ८४ ॥

आजि हेचि भाजीभाकरी । तुम्ही करावी न्याहारी । श्रीराम पुढें रणकेसरी । पंचधारीं निववील ॥ ८५ ॥

पुच्छासी गुज सांगे हनुमंत । जो जो आला सैन्यांत । परतों न द्यावा नगरांत । करावा घात अवघ्यांचा ॥ ८६ ॥

जो जो होईल शरणागत । त्यासी राखावें निश्चित । येर मारावे समस्त । आज्ञा समर्थ मानी पुच्छा ॥ ८७ ॥

अनुक्रमणिका

मानोनि स्वामीचें वचन । लंकाद्वारीं पुच्छ रक्षण । जो परतेल रक्षोगण । त्याचा प्राण घ्यावया ॥ ८८ ॥

असो हे बहुसाल व्युत्पत्ती । पुढील कथेची संगती । इंग्रजीत आरुढला रथीं । रथ प्रयुक्ती अवधारा ॥ ८९ ॥

स पक्षिराजोत्तमतुल्यवेगैर्व्याघ्रैश्चतुर्भिः सिततीक्ष्णदंष्ट्रैः ।
रथं समायुक्तमसह्यवेग : समारुरोहेन्द्रजिदिंद्रकल्पः ॥ १२ ॥

रथचक्र ते प्रवाळ । आख मरकताचा सुनिळ । धुऱ्या आणि जूंतीतें इंद्रनिळ । उपराड सकल रत्नांक ॥ ९० ॥

रथीं जुंतिले प्रबळबळ । नखीं दंष्ट्रीं सिंहशार्दूळ । मुखें भयानक अति विक्राळ । जिव्हा जाज्वल आग्नीप्राय ॥ ९१ ॥

रथसारथी कपटराशी । अश्ववागोरे तयापासी । इंद्रजीत बैसला रथासी । निज चापासी सज्जुनी ॥ ९२ ॥

रथ ध्वज सुनीळ निळा । ध्वजीं पताका विचित्र लीळा । रत्नें मुक्ताफळमाळा । रथीं बैसला इंद्रजित ॥ ९३ ॥

जैसा इंद्र सुरसेनेसी । तैसा इंद्रजित राक्षसेसी । रथीं बैसला अति गर्वेंसी । वानरासी संग्रामा ॥ ९४ ॥

मेघ डंबर छत्र शिरीं । मुक्ताफळांच्या झल्लरी । कनकदंड युग्म चामरी । जयजयकारी निघाला ॥ ९५ ॥

जैसी गरुडा गमनशक्ती । तैसीच रथीं सवेग गती । रणीं जिणावया मारुती । शीघ्र गती निघाला ॥ ९६ ॥

इंद्रजित येतां [मु. 'समदळी'; मुं. 'सदळी'.] संवदळी । पुढें धांवली असाळी । जेणें मारिला अखयाबळी । त्याची होळी मी करीन ॥ ९७ ॥

एकले एक पालेखाइर । त्यावरी [मु. 'कोपे'.] कां पा सैन्यसंभार । पिसाळले निशाचर । तें मी वानर मारीन ॥ ९८ ॥

टाकुनी आली अशोकवन । सन्मुख हनुमंत देखोन । विकट वाटारिले नयन । विक्राळ वदन पसरुनी ॥ ९९ ॥

एक चाभाडें भूतळीं । दुजें लाविले नभोमंडळीं । कराल विक्राळ दांताळी । जिव्हा काळी [मु. 'मसमसीत'.] समसमीत ॥ १०० ॥

करितां स्वानंदे युद्धासी । आडवी आली हे राक्षसी । जेंवी साधितां निधानासी । पहिले विवसी पैं उठी ॥ १०१ ॥

अनुक्रमणिका

युद्ध निधानाजवळीं । प्रथम विवशी हे असाळी । पहिलें इची देवों बळी । काळीकंकाळी चामुंडें ॥ १०२ ॥

भोजन करावया संतृप्ती । पहिलें लहाना प्राणाहुती । ते संग्रामसमयीं तृप्ती । प्राणाहुती असाळी ॥ १०३ ॥

प्रथम समिधा होमून । मग होमिती प्रधान । तैसीच असाळी हें जाण । समिधावदान संग्रामीं ॥ १०४ ॥

असाळी पसरिलें जाभाडें । न पाहतां मागें पुढें । हनुमंताची उडी पडे । मशकापरी धरी रूप ॥ १०५ ॥

नाडळता तिचिया दांता । जिव्हेसिंही नातळता । उदरीं प्रवेशतां हनुमंता । नेणें तत्वता राक्षसी ॥ १०६ ॥

वानर मुखीं प्रवेशलें । मुखींचा मुखीं हरपलें । किंवा दांतातळीं रगडले । नाडळे पाहिले जिव्हाग्रें ॥ १०७ ॥

लीन जाहाले [मु. 'मुखापासीं'.] मुखावकाशीं । कीं पळालें श्वासोश्वासीं । कोण गती वानरासी । असाळीसी लक्षेना ॥ १०८ ॥

आंबट तिखट कीं खारट । गोड कडू कीं तुरट । चवी न कळेचि स्पष्ट । करी कटकट राक्षसी ॥ १०९ ॥

जिव्हा दांतीं नाडळे होटीं । शेखी तृप्ती नव्हेची पोटीं । वानरें ठकिलें उठाउठी । अतर्क्य दृष्टी [कं. 'फडकला'; मु. 'कळेना'.] टणकली ॥ ११० ॥

असाळीनें गिळिला हनुमंत । लोकीं विस्तारिली मात । इंद्रजिताचा अनर्थ । रणकंदनार्थ सैन्याचा ॥ १११ ॥

पहिलेंच गिळिती वानर । तरी कां मरता अखयाकुमर । किंकर आणि बनकर । प्रधान वांचते ॥ ११२ ॥

ऐसे लोक सांगती गोष्टी । तंव असाळीस शूळ पोटीं । हनुमान काळीज धरी मुष्टीं । लोळे सृष्टीं गडबडीत ॥ ११३ ॥

करावया इंद्रजितासी रण । हनुमंताची आवडी पूर्ण । तिचे उदरीं न राहे क्षण । केलें विंदान ते ऐका ॥ ११४ ॥ [ओवी ११४ वि. प्रतीत नाही.]

उपडोनिया काळिजाचा देठ । बोंबीपासी फाडोनि पोट । हनुमान निघोनिया प्रकट । केला उद्भट भुभुःकार ॥ ११५ ॥

ऐकतां तयाचा भुभुःकार । कापीन्नले निशाचर । मुख्य दचकला धुर । सैन्यसंभार खळबळला ॥ ११६ ॥

रावणापासीं सांगती मात । असाळीनें गिळिला हनुमंत ।
सवेंची दुसरी बोंब सांगत । केला निःपात असाळीचा ॥ ११७ ॥

राक्षस मावकर भारी । त्याहुनी वानरी विद्या थोरी । रिघोनि तिचिया उदरीं । महामारी मारीत ॥ ११८ ॥

अनुक्रमणिका

जैसी बहिण शूर्पणखा । तैसीच हे असाळिका । हनुमंते मारितांचि देखा । दशमुखा बहु दुःख ॥ ११९ ॥

वानर पेटला द्वंद्वासी । करुं कोणकोण दुःखासी । काय होईल इंद्रजितासी । निज मानसीं धांकतु ॥ १२० ॥

केला असाळीचा घात । इंद्रजित ऐकोनि मात । कोपें चालिला कृतांत । हनुमंत दंडावया ॥ १२१ ॥

देखोनिया हनुमंता । धिंवसा नव्हे सैन्यासमस्तां । ऐसें कळलें इंद्रजिता । होय पेलितां निजरथ ॥ १२२ ॥

विजू गडगर्जे अंबर । तैसा धनुष्यीं [मुं. 'चमत्कार'.] टणत्कार । इंद्रजित निधडा महाशूर । रहंवर पेलिला ॥ १२३ ॥

ऐकोनि धनुष्यीं टणत्कार । वानरें केला भुभुःकार । नादें कोंदलें अंबर । गिरीकंदर दुमदुमिले ॥ १२४ ॥

निधा उठिला पाताळीं । भूतें कळवळीती [मु. 'अंतराळी'.] निराळीं । पक्षी भ्रमले अंतराळी । बैसली टाळी दिग्गजांची ॥ १२५ ॥

इंद्रजिता युद्धाची आवडी । रथ पेलितां कडाडी । वानरें उभवुनी पूंसाची गुढी । नाचे आवडी रणरंगीं ॥ १२६ ॥

एक रावणराजकुमर । दुजा रामदूत वानर । एक राक्षसीं राक्षसेंद्र । दुजा कपींद्र कपीमाजीं ॥ १२७ ॥

दोघे वीर अति प्रबळ । समान बळ समान शीळ । दोघे संग्रामीं कुशळ । दोघे चपळ रणमारा ॥ १२८ ॥

दोघे भिडतां महावीर । पाहों आले सुरवर । सिद्ध गंधर्व ऋषीश्वर । नर किन्नर विमानीं ॥ १२९ ॥

शचीसहित शचीपती । सावित्रीसहित प्रजापती । उमेसहित उमापती । पाहूं येती संग्रामा ॥ १३० ॥ [ओवी १३० व १३७ कं. प्रतीत नाही.]

खवळले दोघे वीर । काळकृतांत अति दुर्धर । दोघे जैसे काळाग्नी रुद्र । युद्धीं सत्वर मिसळले ॥ १३१ ॥

एक तो गज एक केसरी । एक हिरण्यकशिपु एक नरहरी । सहस्त्रबाहो फरशधारी । ऐसियापरी मिसळले ॥ १३२ ॥

एक सर्प एक सर्पारी । एक त्रिपुर एक त्रिपुरारी । एक मुरू एक मुरारी । ऐसियापरी मिसळले ॥ १३३ ॥

इंद्रजित हाणें दुर्धर घाये । हनुमान फळें खाये विटाये । कुशी खाजवी डोळे मिचकाये । दाविताहे आंगोठा ॥ १३४ ॥

इंद्रजित खवळोनि रणीं । वर्षला दुर्धर बाणीं । वानर वर्षला पाषाणीं । रणांगणीं गर्जोनी ॥ १३५ ॥

अनुक्रमणिका

विंधे सुवर्ण पुंख भालीं । वानर हाणें सबळा शिळीं । एक हाणें गदा मुद्‌गलीं । शाळताळीं पैं दुजा ॥ १३६ ॥

एक चेंडू चक्रें सोडी । दुजा हाणें प्रचंड धोंडीं । सवेग हाणितां लहुडी । समूळ [मुं. अं. 'धाडी'; तु. तं. दै. 'सोडी'; मु. 'धोंडीं'.] झाडी पैं दुजा ॥ १३७ ॥ [ओवी १३० व १३७ कं. प्रतीत नाही.]

इंद्रजित वर्षे विचित्र कांडे । वानर वर्षे चापट धोंडे । रागें उडोनि हाणतां खांडे । वृक्ष खंडे ठोकिला ॥ १३८ ॥

साटोपे हाणतां [मु. 'शिव'.] शूळशक्ती । वानर वर्षे अति पर्वती । इंद्रजित थोटावला चित्तीं । रणीं मारुती नाटोपे ॥ १३९ ॥

पट्टिश हाणतां पैं तवकें । वानरें हाणितला खडकें । फुटलें इंद्रजिताचें धैर्य मडकें । पडिला अडके पूंसाचें ॥ १४० ॥

इंद्रजिताची रणव्युत्पत्ती । फावल्या रणीं लावी ख्याती । नाटोपतां पळे मागुती । पूंसाप्रती तें न चले ॥ १४१ ॥

सैन्य सभोंवता चहूंकडा । पडिला पूंसाचा पैं वेढा । सरो नये मागां पुढां । वानरें वेढा लाविले ॥ १४२ ॥

पाषाणीं बाण करितां कूट । बाणीं पाषाण करी पीठ । युद्ध मांडलें अचाट । अति संकट इंद्रजितां ॥ १४३ ॥

वानर नाटोपे निजशक्ती । कपटें मारावा मारुती । कपट न चले पूंसाप्रती । कपटघातीं कपिपुच्छ ॥ १४४ ॥

इंद्रजित वर्षे शरधारी । वानर वर्षे शिळा शिखरीं । सैन्या होतसे चकचुरी । आपांपरी राक्षसां ॥ १४५ ॥

बोंब उठली सैन्या आंत । इंद्रजित मेला कीं जीत । वानरें केला पर्वतघात । रणीं हुंबत राक्षस ॥ १४६ ॥

न चले शस्त्रास्त्र युक्ती । मागें सरो नये पूंसाहातीं । पुढें नाटोपे मारुती । चिंतावर्तीं इंद्रजित ॥ १४७ ॥

चिंतातुर देखोनि त्याते । हनुमान म्हणे इंद्रजितातें । शिळावृक्षीं न हाणें तूतें । न हाणे पर्वतें भाक माझी ॥ १४८ ॥

इंद्रजित नामाची हे ख्याती । जिहीं बाणीं जिंकिला अमरपती ।
ते बाण विंधोनी मजप्रती । विजयवृत्ती [कं. 'पावावी'.] साधी पां ॥ १४९ ॥

जया बाणांच्या कडाडी । देव घातले बांदवडी । ते बाण मज विंधोनि प्रौढी । विजयाची गुढी उभवी पां ॥ १५० ॥

ऐसे बोलतां हनुमंता । राग आला इंद्रजिताच्या चित्ता । मंत्रयुक्ता [मु. 'अस्त्र समस्ता'.] शस्त्रसंपाता । होय

अनुक्रमणिका

विंधिता अति कोपें ॥ १५१ ॥

> शराणामग्रतस्तस्य पुनः समभ्यवर्तत । प्रसार्य हस्तौ मतिमानुत्पपातानिलोपमम् ॥ १३ ॥
> परस्परं दुर्विषयं बभूवतुः समागतौ मारुततुल्यविक्रमौ । ततस्तु लक्ष्ये प्रतिहन्यमाने शरेष्वमोघेषु च संपतत्सु ॥ १४ ॥

मंत्रयुक्त अस्त्रप्रयुक्ती । इंद्रजित वर्षे शरसंपातीं । परता सरेना मारुती । शंका चित्तीं मानीना ॥ १५२ ॥

माझिया अंगीं बाण रुपती । शंका नाहीं मारुती । सुरनर आश्चर्य मानिती । तैसी ख्याती तेणें केली ॥ १५३ ॥
रामनामाचिया शक्ती । नित्य निर्द्वंद्व स्थिति मारुती ।
तेणें इंद्रजितां लाविली ख्याती । तेहि उपपत्ती अवधारा ॥ १५४ ॥

पसरुनी दोन्ही हात । बाण कवळुनी समस्त । उसळोनि गगनाआंत । बाण हाणित राक्षसा ॥ १५५ ॥

पडता बाणांचा संपात । सैंघ सैन्या होय निःपात । घाई राक्षस कुंथत । जाहाले विपरीत संग्रामीं ॥ १५६ ॥

हनुमंतासी करितां रण । इंद्रजित भुलला संपूर्ण । आपले सैन्य मारी आपण । निर्वाण बाण वर्षोनी ॥ १५७ ॥

धनुष्यबाण हनुमंतासी । हा [मु. पं. ‘संग्राम’.] संग्रह नाहीं त्यापासीं । [कं. अं. तु. दै. ‘आली’; मु. ‘आवेशें’.] पडली भुली इंद्रजितासी । निज सैन्यासी मारीत ॥ १५८ ॥

माझे निर्वाणीचे बाण । वानरें कवळुनी संपूर्ण । आमच्या शस्त्रीं आम्हासी जाण । रणकंदन मांडिलें ॥ १५९ ॥

इंद्रजिताच्या बाणाआंत । हनुमान स्वानंदें विचरत । बाण मंत्रशक्तीयुक्त । केले व्यर्थ हनुमंतें ॥ १६० ॥

नचले शास्त्रांची खटपट । न चले अस्त्रांचा पैं [मु. ‘बेट’.] नेंट । न चले वानरेसीं कपट । रणीं उद्भट गांजिलें ॥ १६१ ॥

दिव्यास्त्रे एक एक । वानरें केलीं निरर्थक । इंद्रजितानें घेतला धांक । जीवीं धुक धुक लागली ॥ १६२ ॥

इंद्रजित बाणांची शरसुटी । वानरें करुनिया उठी । धांवोनि झोंबिन्नला कंठीं । धनुष्य मुष्टीं भंगिलें ॥ १६३ ॥

सरली बाणांची निजओढी । तऱ्ही वानरा प्रौढी गाढी । मल्लविद्येचे परवडी । कडोविकडी भीडती ॥ १६४ ॥

उरीं शिरीं आणि कोपरीं । तडवे हाणिती परस्परीं । कळ लावोनि भूजांवरीं । हाणिती उदरीं चपेट घात ॥ १६५ ।

सांभाळितां वानर लात । तंव मस्तकीं हाणें हात । सांभाळितां दक्षिण हस्त । तंव गांजीत डावेनी ॥ १६६ ॥

अनुक्रमणिका

करितां मल्लविद्या व्युत्पत्ती । मागें पूंसाच्या [अं. 'आवर्तीं'.] आघातीं ।
[मु. 'सव्याघ्र'.] सव्याग्र रथ आणि सारथी । नेले [मु. 'समाप्ती'.] भस्मांतीं वानरें ॥ १६७ ॥

मारुनि सारथी भंगिला रथ । इंद्रजित केला [मु 'दैवहत'.] हताहत । न टळे पूंसाचा आवर्त । रणीं हनुमंत नाटोपे ॥ १६८ ॥ [ओवी १६८ व १६९ वि. प्रतीत नाहीत.]

ध्वज भंगिला आघातें । छत्रें भंगिलीं हाणोनि लातें । मुकुट पाडोनिया तेथें । इंद्रजितातें गांजिलें ॥ १६९ ॥

भूतळीं समस्त ऋषीश्वर । गगनीं समस्त सुरवर । अवघे करिती जयजयकार । विजयी वानर श्रीरामें ॥ १७० ॥

एका जनार्दना शरण । जाहाला इंद्रजिताचा अपमान । पुढें सैन्य निर्दाळण । कपी बंधन अवधारा ॥ १७१ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां इंद्रजितअपमानो नाम पंचदशप्रसंगः ॥

## प्रसंग सोळावा

## रावण सैन्य वध

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

इंद्रजित पावोनि अपमान । अतिशये जाहला उद्विग्न । हनुमंताचें बळ लक्षण । सर्वथा संपूर्ण लक्षेना ॥ १ ॥

हनुमंताची [कं. 'धर्मवृत्ती'.] धैर्यवृत्ती । हनुमंताची सवेग गती । हनुमंताची संग्राम शक्ती । अतर्क्य स्थिती लक्षेना ॥ २ ॥

> हनूमतो वेद न राक्षसोऽन्तरम् । न मारुतिस्तस्य महात्मनोऽन्तरम् ।
> जगाम चिंतां महतीं महात्मा । विगर्ह्य चात्मानमघोरकर्मा ॥ १ ॥

अतर्क्य हनुमंताची गती । ते लक्षेना नाना युक्ती । इंद्रजिताची खुंटली शक्ती । रणीं मारुती नाटोपे ॥ ३ ॥

रणीं नाटोपे मारुती । आपली पूर्व शौर्य कीर्ती । वानरें [कं. 'हरिली निश्चिती'.] नेली निंदे प्रती । सलज्ज चित्तीं इंद्रजित ॥ ४ ॥

रणीं इंद्राते जिंकोन । पावलों इंद्रजित अभिधान । वानरेसीं करितां रण । तृणा समान मज केलें ॥ ५ ॥

मी एक गाढा वीर सृष्टीं । ऐसा फुगारा होता पोटीं । रणीं वानरे पुरवूनी पाठी । तृणा [दै. खेरीज इतरत्र 'साठी'.] समान मज केलें ॥ ६ ॥

जळो माझी शौर्य शक्ती । जळो माझी वीर वृत्ती । रणीं नाटोपे मारुती । कीर्ति अपकीर्ति मज माझी ॥ ७ ॥

भंगिला रथ आणि सारथी । भस्म केली शस्त्र संपत्ती । रणीं न जिंकवे मारुती । क्षीण शक्ती इंद्रजित ॥ ८ ॥

न चले शस्त्र अस्त्र युक्ती । न चले मल्ल विद्या व्युत्पत्ती । कपट न चले वानराप्रती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ ९ ॥

कोणी एखादीही युक्ती । न चले वानरा प्रती । जळो माझी यशकीर्ती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ १० ॥

माझ्या वरदाची वरोक्ती । मारूं न सके मारुती । धरूनी नेलिया श्रीरामाप्रती । विटंबती वानरें ॥ ११ ॥

रावणें आणिलें सीतेसी । बदले मज नेईल रामापासी । तेथें करितां अपमानासी । वानरासी कोण वारी ॥ १२ ॥

रावणें होऊनिया भिकारी । चोरुनी आणिली सीता सुंदरी । वानरें करूनी जुंझारी । मज निर्धारी नेईल ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

अंगदाचिया पाळण्यासी । खेळणें बांधिलें दशमुखासी । पौलस्तीनें मागतां त्यासी । अपमानासी सोडिला ॥ १४ ॥

मुंडूनिया दाढ्या मिशासी । मसी लावूनिया दाही मुखांसी । पांच पाट काढुनी शिरासी । ऐसा लंकेसी धाडिला ॥ १५ ॥

मज धरूनी नेलिया मारुती । माझीहि होईल तैसीच गती । कांही न चले उपपत्ती । चिंतावती इंद्रजित ॥ १६ ॥

पूंसी बांधोनि हनुमंता । येथुनी मज धरोनि नेता । धांवण्यां कोण्ही न ये सर्वथा । परम चिंता इंद्रजिता ॥ १७ ॥

सुबद्ध धांक घेतला पोटीं । रणीं वानरा देउनी पाठी । इंद्रजित पळे उठाउठी । पूंसासाठीं धांकोनि ॥ १८ ॥

पळतां न पळवे पुढें । पडिलें पूंसाचें बिरडें । तेथिल्या विवरामाजीं दडे । बहू माकडें गांजिलें ॥ १९ ॥

दुस्तर धांक घेउनी मनीं । गुप्त विवर अशोकवनीं । इंद्रजित गेला तेथें पळोनी । सुलीन होउनी दडाला ॥ २० ॥

हनुमान वीर जगजेठी । न लगेंची पळत्याचिया पाठीं । समूळ विचार करूनी पोटीं । विवेक दृष्टी राहिला ॥ २१ ॥

इंद्रजिताचें निज मरण । सर्वथा मज अधीन । तरी कां वृथा करूं निर्वाण । आंगवण कां नांसू ॥ २२ ॥

इंद्रजितासी मज मारितां । क्षण न लगे पै आंता । ब्रह्मवरदाची वार्ता । मिथ्या सर्वथा मी न करीं ॥ २३ ॥
[ओवी २३ दै. प्रतीत नाही.]

ऐस ऐसिया विवेक दृष्टी । हनुमान न लागे इंद्रजिता पाठीं ।
सैन्य अवलोकिलें दृष्टी । धांवे कडकडाटी वधावया ॥ २४ ॥

पूंस म्हणे स्वामीनाथा । कवळोनि राखिले समस्तां । तूं भागलासी युद्ध करितां । मज वधार्था नेम आज्ञा ॥ २५ ॥

हनुमान म्हणे तुझें नि बळें । मियां महावीरां मांडिलें खळें । आतां विभांडूनी दळें । रण कल्लोळे विचारोनी ॥ २६ ॥

मी जातें तु घाली वैरण । ऐसेनि भरडूं राक्षस [वि. 'गण'; मु. खेरीज इतरत्र 'सैन्य'.] धान्य । डोळ उरतील जे सधन । रण कंदन करूं त्यासी ॥ २७ ॥
करावया सैन्य संहार । करूनी पूंसासी विचार । मग दिधला भुभुःकार । निशाचर खळबळिले ॥ २८ ॥

अनुक्रमणिका

अश्वैरश्वान्गजैर्नागान्योधैर्योधान्रथै रथान् । लांगूलेनाप्यनेकांश्च सैनिकान्समपोथयत् ॥ २ ॥
तलेनाभ्यवधीत्कांश्चित्पद्भ्यां कांश्चित्परंतपः । मुष्टिभ्यामवधीत्कांश्चिन्नखैः कांश्चिद्व्यदारयत् ॥ ३ ॥
प्रममाथोरसाकांश्चिदूरुभ्यामपरान्कपिः । केचित्तस्यैव नादेन तत्रैव पतिता भुवि ॥ ४ ॥
विनेदुर्विवस्वरं नागा निपेतुर्भुवि वाजिनः । भग्ननीडध्वजच्छत्रैर्भुवि कीर्णोऽभवद्रथैः ॥ ५ ॥
स कपिर्नाशयामास राक्षसान्वलदर्पितान् ॥ ६ ॥

**हनुमान देखोनिया महाबळी । असुरीं मांडिली** [वि. तु. 'समफळी'; दै. 'फळीस फळी'.] **तंव फळी । शस्त्रें सुटलीं समकाळीं । नभीं भूतळीं न समाती ॥ २९ ॥**

**अतिरथी महारथी । अश्वपती गजपती । शस्त्रें हाणती पदाती । रणीं मारुती लक्षुनी ॥ ३० ॥**

**शस्त्र घाताचां समेळीं । हनुमान नाचत गोंधळी । पूंसे शस्त्रांची करूनी होळी । रण समेळीं विचरत ॥ ३१ ॥**

**हनुमान रणीं निगरघट । वीर हाणत सुभट । हाणती शस्त्रें होतीं पीठ । हा हा कट कट राक्षसां ॥ ३२ ॥** [ओवी ३२ वि. प्रतीत नाही.]

**अश्वीं अश्वातें मारीत । गजीं गजाते संहारीत । रथीं रथ उपडीत । वारु** [दै. 'सहित'.] **निमत सारथी ॥ ३३ ॥**

**करावया सैन्य समाप्ती । रणीं खवळला मारुती । सर्व मारका निजशक्ती । रण व्युत्पत्ती अवधारा ॥ ३४ ॥**

**पायींची पायीं रगडीत । वीरें वीर पैं झोडीत । ध्वज छत्रेसी मोडीत । रण पाडित** [वि. मुं. अं. तु. दै. मु. 'अति'.] **अरिमारें ॥ ३५ ॥**

**हनुमान युद्ध करी भिन्न । पुच्छ करी भिन्न कंदन । तेंहि ऐका सावधान । रण मर्दन पुच्छाचें ॥ ३६ ॥** [ओवी ३६ मु. प्रतीत नाही.]

**पूंसीं कवळोनि गजकोटि । हनुमान उसळोनि आपटी । गजीं गजांतें उपटी । पडिली सृष्टी गजदळें ॥ ३७ ॥**

**विदारितां कुंभस्थळें । निघती गज मुक्ताफळें । रणीं पाडिलीं गजकवळे । पुच्छ बळें उपडोनि ॥ ३८ ॥**

**शाऐंशी प्रयुत्ते मत्त हस्ती । पुच्छें केली रण समाप्ती ।**
**हस्तीच्या पिष्ठ करुनी अस्थी । लाविली ख्याती कपिपुच्छें ॥ ३९ ॥**

**पूंस रिघोनि सैन्यातळीं । महावीरा बांधोनि मोळी । आपटितां त्यासी भूतळीं । जाहाली रांगोळी** [मु. खेरीज इतरत्र 'तळिल्यांची'.] **सैन्याची ॥ ४० ॥**

**खर उष्ट्र अश्वेतर । पूंसीं बांधोनि अपार । तळी उभे अश्वभार । घाये चकचूर करी त्यांचा ॥ ४१ ॥**

**पूंसें करितां महामार । रणीं उठिला हा हा कार । येरीकडे हनुमान वीर । करी वीरमार तो ऐका ॥ ४२ ॥**

अनुक्रमणिका

एक मारी करतळीं । असंख्य रगडी पायांतळीं । अमित मारिले मुष्टीतळीं । नखें चिरफळी एकैकां ॥ ४३ ॥

एकें मारिले जानुचक्रीं । [मु. 'वीरीं केली'.] जानुपातें बहू मारी । एके मारिली अर्धचंद्री । गिरीवरी मारिले ॥ ४४ ॥

आंवळूनी उरावरी । वीर मारिले [कं. 'शस्त्रास्त्रीं'.] शत सहस्त्री । तडवे हाणोनि उपराउपरी । लक्षांतरी मारीत ॥ ४५ ॥

देतां भुभुःकार प्रबळ । रणीं उठिला हलकल्लोळ । भेडीं करूनी मुत्रमळ । प्राण तत्काळ सांडिला ॥ ४६ ॥

भुभुःकार अति तवकें । एके निमालीं [पै. वि. दै. मु. तं. 'अपधाकें'.] अति धांकें । एके पाडिली अधोमुखें । मेलीं अनेके अंगवातें ॥ ४७ ॥

हनुमंताची गिरा गजरीं । वाजंत्री निमाले नादें करी । जो तो रणीं शंख करी । आपांपरी राक्षसां ॥ ४८ ॥

भोंवता पूसाचा आवर्त । मध्यें मारितो हनुमंत । जाहाला संन्यासी अंत । आला प्राणांत राक्षसां ॥ ४९ ॥

पूंसें पुरविली पाठी । होऊं नेदी कुटुंब भेटी । लंका पाहो नेदी दृष्टीं । जीवासाठीं राक्षसां ॥ ५० ॥

रणीं मारितो हनुमंत । पूंस पळो नेदि नगरांत । [कं. खेरीज इतरत्र 'जो तो येउनी'.] जो जो येत युद्धांआत । पडे मूर्छित अति धांकें ॥ ५१ ॥

एके घायें [कं. 'वळली वेंगडी'; तु. 'घाबरली वेडी'; पै. तु. दै. विं. अं. तं. 'वारिली'.] झाली वेडीं । एके पडलीं उपडी । एके नागवी उघडीं । मेलीं मडीं होवोनि ठेलीं ॥ ५२ ॥

झाडिला इंद्रजिताचा पादाडा । केला सैन्याचा नितोडा । राम नामें हनुमान गाढा । केला झगडा निज नेटें ॥ ५३ ॥

रथ भंगिले कोट्यानुकोटी । मारिले अश्व गजांच्या थाटी ।
छत्र भंग लोळती सृष्टी । ध्वजा कोट्यानुकोटी [अं. 'लोळती'.] विखुरल्या ॥ ५४ ॥

अशुद्ध वाहतें गडाडी । तेचि रण नदी गाढी । जाहाल्या प्रेतांच्या दरडी । गज करवडी तेच ग्रह ॥ ५५ ॥

तीर तरती सपिच्छ । तेचि रण नदीचे मत्स्य । वोडणें वाहतीं तें कच्छ । सर्पसपिच्छ रण भाले ॥ ५६ ॥

मेद मांस अति दुर्गम । तोचि दोही तिरीं कर्दम । वीर [मु. 'मिसळले'; तु. दै. 'विशाळ'.] सिसाळे विक्रम । सुसरी परम दोहीं भागीं ॥ ५७ ॥

अनुक्रमणिका

मोक्ष सुखाचां सुरवाडी । रण नदी वाहे पुराडी । सर्वस्व त्यागें घालिती उडी । ज्याची जोडी तो जोडी ॥ ५८ ॥

ध्वजेसी वाहे रहंवरू । तेचि शीडेसहित तारुं । तेथें तारकु श्रीरामचंद्रु । [तु. 'परापरू पद'; कं. वि. 'परा परपार'.] परात्पर पारु पावविजे ॥ ५९ ॥

रिघोनिया रण समुद्रीं । जो बैसे या तारुवरी । त्यासी श्रीराम सूत्रधारी । परपारीं पाववी ॥ ६० ॥

या तारुवातें दृढ जो धरी । त्यासी श्रीराम स्वयें तारी । या तारुवाची कीर्ति जो करी । राम परपारीं पाववी ॥ ६१ ॥

या रणाची युद्ध ख्याती । जे आवडी नित्य गाती । श्रीराम सुखावोनि चित्तीं । त्यासी तारी स्वानंदे ॥ ६२ ॥

उदो म्हणूनि भद्रकाळी । घेऊनि आली भूतावळी । खाती मांसाच्या वडवाळी । रुधिरांजुळी प्राशित ॥ ६३ ॥

काळिजे घेऊनि हातीं । रणीं यक्षिणी वाणें देती । शंखिणी उंखिणी वाणें घेती । मग भक्षिती स्वानंदें ॥ ६४ ॥

आनंदे नाचे क्षेत्रपाल । शिरें चौंडकें वाहे वेताळ । भूतें मिळोनिया सकळ । रण गोंधळ नाचतीं ॥ ६५ ॥

बहुतां दिवसांचें धरणें । दिधलें हनुमंतें पारणें । अवघे घालितीं लोटांगणें । [मु. 'करिती कल्लोळ'.] विजयी होणें रणरंगीं ॥ ६६ ॥

पिके पिकलीं रणनगरीं । राक्षस दातांच्या राशी थोरी । भूतें मोजिती कुडवेवरी । [मु. खेरीज इतरत्र 'कौलकरी'.] पाहे क्रीडेसी हनुमंत ॥ ६७ ॥

देव ब्राह्मण भैरवासी । बलुतें दिधलें वेताळासीं । खळे दान ते भूतासीं । महाकाळीसी राजभाग ॥ ६८ ॥

खळे मातेरें मारकोसीं । मेसको तिचे घरची दासी । वेसपेंडी सटवीसी । पाळीच्या माऱ्यासी काळिका ॥ ६९ ॥

अग्रपिकाची उत्पत्ती । विभागिली स्वयें मारुती । पश्चिम धान्याची महाख्याती । रघुपती विभागील ॥ ७० ॥

करोनि सैन्याचा नितोडा । काढोनि पुच्छाचा पैं वेढा । देवळाचा पहिला हुडा । हनुमान गाढा बैसला ॥ ७१ ॥

गेला देखोनि हनुमंत । सबळ वीर समस्त । आणीक घायाळ कुंथत । स्वनगरांत निघालें ॥ ७२ ॥

एक कण्हत एक कुंथत । एक हुंबत एक हुंबरत । एक पाणी पैं मागत । एक खुणा हात दावोनि ॥ ७३ ॥

अनुक्रमणिका

एक रडत एक पडत । एक अतिशयें चडफडत । एक अति दुःखें तडफडित । एक खुरडत कटिभंगे ॥ ७४ ॥

एका फुटलें कपाळ । एक तें अशुद्ध बंबाळ । एकाची [तं. 'बोटें'.] ओढे अंतरमाळ । एक तळमळ अति घातें ॥ ७५ ॥

एकाच्या मस्तका झाला भंग । एकाचे पर्वतीं चेंदलें अंग ।
एकाचे चरण पडिले व्यंग । एका क्षयरोग शालतालीं ॥ ७६ ॥

पाडोनि राक्षसांचें दांत । मुष्टिघातें घातलें घशांत । नखें नाकें छेदिलीं बहुत । वीर कुंथत अति लाजें ॥ ७७ ॥

रण शोधावयां देख । अशोकवनीं न येती लोक । पुच्छे लाविलासे धांक । एकाएकीं धावतीं ॥ ७८ ॥

समस्त सैन्या केली बोहरी । कळकळिती नरनारी । बोंब सुटली घरोघरीं । लंकानगरीं आकांत ॥ ७९ ॥

काळतोंडी रावणाची थोरी । चोरोनि आणिली सीता सुंदरी । केलीं राक्षसांची बोहरी । महामारी वानरें ॥ ८० ॥

दशमुख तो काळमुखा । सीता चोरुनि आणिली देखा । मारविलें सकळ कटका । दुःखे लंका लवंडिली ॥ ८१ ॥

मुळींच राजा झाला भिकारी । त्यावरी निंद्य कर्म चोरी । तेंही हरण परनारी । आली महामारी राक्षसां ॥ ८२ ॥

रणीं रावण मरता । तै लंकालोक स्वस्थ होता । करविलें इंद्रजिताचें घातां । रणीं हनुमंतावरी धाडूनी ॥ ८३ ॥

करितां अखयाचा कैवार । रणीं मारविला जेष्ठ कुमर । शंख करिती निशाचर । दशशीर हडबडीला ॥ ८४ ॥

इंद्रजित मेला किंवा जीत । कोणी न सांगती मात । तेणें हडबडीला लंकानाथ । केला घात वानरें ॥ ८५ ॥

शोधू जावे जंव रणासी । भूतीं भक्षिलें प्रेतासी । तेथें ओळखी कायसी । रावणासी अति दुःख ॥ ८६ ॥

रणीं निमाला जेष्ठ सुत । रावण मुखीं धुळी घालित । दाही मुखीं शंख करित । आक्रंदत अति दुःखें ॥ ८७ ॥

दुःखे गडबडीत लोळे । केश सुटले मोकळे । अश्रुधारा स्रवती डोळे । पिटी कपाळें अति दुःखें ॥ ८८ ॥ [ओवी ८८ वि. तु. दै. तं. प्रतींत नाही.]

अनुक्रमणिका

इंद्रजिताच्या केलें घाता । काय करावें मी आतां । रणीं न धरवे हनुमंता । परम चिंता रावणा ॥ ८९ ॥

ब्रह्मेनी सांगितलें मजपासी । गळा बांधोनि वानरासी ।
इंद्रजित आणील तुजपासीं । असत्य त्यासी केंवि आलें ॥ ९० ॥

ब्रह्मयाचे ब्रह्मवाणीसी । नाहीं विटाळ असत्यासी । भय नाहीं इंद्रजितासी । निश्चयेसीं मी जाणें ॥ ९१ ॥

पाचारोनि चतुरानन । त्यासी पुसें दशानन । इंद्रजित आणील कपी बांधोन । तें सत्य वचन करावें ॥ ९२ ॥

इंद्रजिताची स्थिती गती । राक्षस आणू न शकती । वनीं बैसलासे मारुती । राक्षसघाती महावीर ॥ ९३ ॥

मीच जावोनि अशोकवना । इंद्रजिताची विवंचना । समूळ आणोनिया मना । दशानना सांगेन ॥ ९४ ॥

ऐसे सांगोनि लंकापती । वना आला प्रजापती । हनुमंते ब्रह्मयाप्रती । घातलें क्षिती लोटांगण ॥ ९५ ॥

ब्रह्मा हनुमंता सांगत । आला राक्षसांसी अंत । अवश्य तुवां करावा घात । लंकानाथ न मारूनी ॥ ९६ ॥

कुंभकर्ण आणि लंकानाथ । यांसी वधील श्रीरघुनाथ । लक्ष्मण वधील इंद्रजित । येरांचा अंत वानरीं ॥ ९७ ॥

हनुमान सांगे ब्रह्मयापासी । माझी आवडी आहे ऐसी । भेटी घेउनी रावणेसी । करुं लंकेसी हताहत ॥ ९८ ॥

ब्रह्मा सांगे हनुमंतासी । इंद्रजित तुझेनि भयेसी । लपला विवर प्रदेशीं । मी त्यापाशीं जातसे ॥ ९९ ॥

तुज न लगे पाशबंधन । हें मज आहे निजज्ञान । माझें ऐकावे वचन । ब्रह्म बंधन मानावें ॥ १०० ॥

इंद्रजित घालील ब्रह्मपाशासी । तुवां बद्ध मानुनी आपणासी ।
[कं. 'स्वस्थ'.] स्वयें जावे गा लंकेसी । रावणासी भेटावया ॥ १०१ ॥

रावणाची घ्यावी भेटी । आवडी आहें तुझें पोटीं । ब्रह्मपाश मानोनि कंठी । यावें त्रिकुटीं लंकेसी ॥ १०२ ॥

इंद्रजिताचेनि हस्तपातें । हनुमान मानी पाशबंधाते । ब्रह्मदेवा तुझेनि हातें । ब्रह्म बंधातें मानीन ॥ १०३ ॥

ब्रह्म म्हणे ऐसेंचि घडे । माझेनि हातें वाडें कोडें । हनुमंता पाशबंधनीं पडे । रावणापुढें न्यावया ॥ १०४ ॥

इंद्रजित वानरां देउनी पाठी । विवरीं [मु. 'पळता'.] लपतां अति संकटी ।
अनुतापला कपाळ पिटी । उडाली गोठी वाढिवेची ॥ १०५ ॥

इंद्रजित अति लज्ञामान । विवरामाजीं बैसोन । वानरां ब्रह्मपाशबंधन । करी तें विंदान अवधारा ॥ १०६ ॥

अनुक्रमणिका

एका जनार्दना शरण । वानरा ब्रह्मपाश बंधन । बंधनीं मारुती निर्बंधन । कथा विंदान अवधारा ॥ १०७ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणसैन्यवधो नाम षोडशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सतरावा

## रावण हनुमंत संभाषण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

रणीं पाठी देऊनि वानरा । लपला असतां विवरा । परम लज्ञा राजकुमरा । काय महावीरा मुख दावूं ॥ १ ॥

माझी वीरवृत्ति अतिलाठी । इंद्रजित नामाची ख्याति मोठी । वानरें नेली पुच्छासाठीं । रणसंकटीं गांजोनी ॥ २ ॥

कपिपुच्छाचा दुर्धर मार । रणीं [वि. 'भंगिला'.] गांजिला राजकुमर । सैन्या जाला समूळ मार । काय करूं मी आतां ॥ ३ ॥

कैसेनि भेटों महावीरां । केवीं मुख दावूं राक्षसेंद्रा । आतां न वचे लंकापुरा । लाजेचें वीरा अति दुःख ॥ ४ ॥

वाहिली सदाशिवाची आण । शिवलों रावणाचे चरण । प्रमाणें जालीं अप्रमाण । वानरें पूर्ण गांजिलें ॥ ५ ॥

मज रणीं येतें मरण । तरी पावतों कृतकल्याण । अवकळा वाचले प्राण । वरदान जळो माझें ॥ ६ ॥

अवकळेचें जें जिणें । त्याहूनि श्रेष्ठ रणीं मरणें । जळोत माझीं वरदवचनें । वरदानें नागविलें ॥ ७ ॥

पोटीं घालावयापूरतें । शस्त्र नुरेचि माझे हातें ॥ लाजें जीव द्यावा येथें । वरदान मातें मरों नेदी ॥ ८ ॥

रणीं गांजिलें माकडें । कांहीं उपाय न चले पुढें । इंद्रजित खळखळा रडे । अति साकडें ओढवलें ॥ ९ ॥

मुख दांवू नये लाजें हातीं । मरण नये वरदोक्ती । इंद्रजित पडला अति आकांती । तंव ब्रह्मोक्ती आठवली ॥ १० ॥

गळा बांधोनि मारुती । इंद्रजित आणील लंकेप्रती । ऐसें बोलिला प्रजापती । त्यासी निश्चिती पाचारुं ॥ ११ ॥

मिथ्या नव्हे ब्रह्मवाणी । तरी कां मी भंगलों रणीं । हनुमान न बांधवें बंधनीं । सत्यवचनीं केविं ब्रह्मा ॥ १२ ॥

पाचारावया चतुरानन । धाडावया नाहीं सेवकजन । बाहेरीं निघतां आपण । रोकडें मरण कपिपुच्छें ॥ १३ ॥

मज बाहेरीं निघतां । पुच्छ करील माझिया घातां । हनुमान लागला मज भोंवता । नेदि विधाता मज भेटों ॥ १४ ॥

अनुक्रमणिका

**माझिया पित्याच्या पित्याचा पिता । कैसेनि भेटे मज विधाता ।**
**ऐसी इंद्रजित करितां चिंता । तंव आला अवचित परमेष्ठी ॥ १५ ॥**

**ब्रह्मा देखोनि अवचिता । हर्ष इंद्रजिताच्या चित्तां । चरण वंदोनिया माथां । होय सांगता उल्हासें ॥ १६ ॥**

**स्वामी बोलिलेति वचनोक्ती । गळा बांधोनि मारुती । तूं आणसील लंकेप्रती । मज उपहती कां जाली ॥ १७ ॥**

ततो मतिं राक्षसराजसूनुश्चकार तस्मिन् हरिवीरमुख्ये ।
अवध्यतां तस्य कपेः समीक्ष्य कथं नियच्छेदिति निग्रहार्थम् ॥ १ ॥
ततःपैतामहं वीरः पाशं शस्त्रविदांवरः । संदधे सुमहातेजास्तं हरिप्रवरं प्रति ॥ २ ॥
अवध्योऽयमिति ज्ञात्वा तमस्त्रेणास्त्रशस्त्रवित् । अवध्यः सर्वभूतानां तदस्त्रेण बबंध तम् ॥ ३ ॥

**तो राक्षस राजसुत । स्त्रष्ट्याप्रती असे पुसत । कैसेनि बांधवे हनुमंत । त्यासी निग्रहार्थ मज सांगा ॥ १८ ॥**

**हनुमान** [कं. 'आहे'.] **हरिहरां अवध्य । माझेनि न करवे** [तु. दै. मु. 'बंध'.] **वध । कपीसी न चले माझा बंध । वाक्य अबद्ध बंधनीं ॥ १९ ॥**

**इंद्रजिताच्या निज हस्तीं । बंधन पावोनि मारुती । आणिजेल लंकेप्रती । ते वचनोक्ति सत्य करा ॥ २० ॥**

**असत्य नव्हे ब्रह्मवचन । कपीस ब्रह्मपाशबंधन । नारदें सांगितलें आपण । आठवण मज जाली ॥ २१ ॥**

**स्वामीनें मज कृपाकरून । द्यावें ब्रह्मपाशबंधन । तेणें मी हनुमंत बांधीन । मग शलाघ्ये न वाटिवा ॥ २२ ॥**

**यासी ब्रह्मपाश नेदितां । मिथ्या माने ब्रह्मवाक्यता । दिधलिया न बांधवे हनुमंता ।** [कं. 'प्रतिज्ञार्थां'.] **प्रतिपत्यर्था दीधले ॥ २३ ॥**

**इंद्रजित ब्रह्मपाश घेऊन ।** [तं 'सूक्ष्मबुद्धि'.] **मोकली मारुती लक्षून । कपीसी न लगे पाशबंधन । निर्बंधन ब्रह्मपाशीं ॥ २४ ॥**

**इंद्र यम वायू वरुण । यांचें हनुमंता वरदान । शशी सूर्य वन्ही ईशान । यांचें वरदान हनुमंता ॥ २५ ॥**

**हरी वरदान हर वरदान । ब्रह्मयाचे ब्रह्मवरदान । कपीसी ब्रह्मपाशबंधन । न बाधी जाण वरदानें ॥ २६ ॥**

**कर्मपाश धर्मपाश । ब्रह्मयाचे ब्रह्मपाश । बांधूं न सके जन्मपाश । नित्य नैराश्य हनुमंत ॥ २७ ॥**

**हनुमान सबाह्य नित्य निरास । निरपेक्षाचे हरीहरदास । त्यासी कैसेनि बांधिती पाश । नित्य नैराश्य हनुमंत ॥ २८ ॥**
**पाश न लगती हनुमंता । इंद्रजितासी परम चिंता । ब्रह्मपाश गेला वृथा । तेंचि श्लोकार्था अवधारा ॥ २९ ॥**

अनुक्रमणिका

अहो महत्कर्म कृतं निरर्थकम् । न राक्षसैर्मत्रगतिर्विमृष्टा ॥
पुनश्च नास्त्रोपहृतेऽस्त्रमन्यत्प्रवर्तते संशयिताः स्म सत्यम् ॥ ४ ॥
अस्त्रं तद्वितथं दृष्ट्वा चिंतयामास राक्षसः । अथागत्य ततो ब्रह्मा मारुतात्मजमब्रवीत् ॥ ५ ॥

**इंद्रजित ब्रह्मपाश घालितां । ते न लागती हनुमंता । वानरें मत्कर्म केलें वृथा । जघन्यता मज आली ॥ ३० ॥**

**जेथें न चले माझी मंत्रशक्ती । न चले ब्रह्मपाश ब्रह्मशक्ती । तेथें राक्षस मंत्रयुक्ती । कैशा रिती सरतील ॥ ३१ ॥**

**माझी अस्त्रशस्त्रशक्ती । ब्रह्मपाश ब्रह्मशक्ती । अवघी वृथा केली मारुती । राक्षसयुक्ती अति मिथ्या ॥ ३२ ॥**

**ज्यासी बांधीना ब्रह्मपाशशस्त्र । त्यावरी न चले** [कं. 'अनिवार'.] **आणिकाचें अस्त्र ।**
**वानर सर्वार्थी दुर्धर । यासी कपींद्र नाटोपे ॥ ३३ ॥**

**ब्रह्मानें दिधली खोटी शक्ती । म्हणोनिं न बांधवे मारुती । इंद्रजित कोपला प्रजापती । दुष्टमती आम्हांवरी ॥ ३४ ॥**

**तूं आमचा मूळ पुरुष । तुंवाची मांडिला आमचा द्वेष । रणीं मारावे राक्षस । देसी उपदेश वानरां ॥ ३५ ॥**

**ब्रह्मा म्हणे तूं विकल्पमूर्ति । ब्रह्मद्वेष तुझे चित्तीं । तुज नातळे ब्रह्मशक्ती । रणीं मारुती केंवि बांधवे ॥ ३६ ॥**

**निष्कपट निर्मळ वृत्ती । शमदमसत्यशांती । त्याचेनि हातीं ब्रह्मशक्ती । विजयप्राप्ती स्वानंदें ॥ ३७ ॥**

**माझी शक्ती दे मजप्रती । बांधोन** [वि. 'नेईन'.] **देईन मी मारुती । तुमच्या न चलती युक्ती । तुम्हां मारुती न बांधवे ॥ ३८ ॥**

**मापेंविण कणांच्या राशी । न मोजवती अनेकांसी । राक्षसीं पीडावे भूतांसी । हनुमंतासी न बांधवे ॥ ३९ ॥**
[ओवी ३९ मुं. कं. प्रतींत नाही.]

**डोळां देखे सर्व रुपासी । देखों न शके आपणासी । जीवपीडा राक्षसापासी । हनुमंतासी न बांधवे ॥ ४० ॥**

**पाशशक्ती घेवोनि हातीं । सन्मुख येऊनी प्रजापती । स्वयें बोलतो हनुमयाप्रती । तेही उपपत्ती अवधारा ॥ ४१ ॥**

नानृतं मद्वचोकार्षीर्ग्रहणं कुरु वानर । एवमुक्तस्तथेत्युक्तवांऽवदत्कपिवरात्मजः ॥ ६ ॥
अभिवंद्य विचेष्टश्च पपात धरणीतले । अस्त्रेण चापि बद्धस्य भयं मम न जायते ॥ ७ ॥

**ब्रह्मा म्हणे हनुमंतासी । तुज न बांधवे ब्रह्मपाशीं । माझें वचन सत्यत्वासी । मानी** [मुं. 'अपमानासी'.] **आपणासी पाशबंध ॥ ४२ ॥**

अनुक्रमणिका

**असत्य वाद माझे माथा । येवों नेदी हनुमंता । ब्रह्मवाक्यें बंधनता । पाशबंधता मानावी ॥ ४३ ॥**

**ब्राह्मणाचें ब्रह्मवचन । नुलंघिसी अणुप्रमाण । माझे पाळूनि वचन । पाशबंधन मानावे ॥ ४४ ॥**

**ऐकोनि ब्रह्मयाचे वचन । हनुमान घाली लोटांगण । तुझेनि बोलें देह त्यागीन । पाशबंधन तें किती ॥ ४५ ॥**
[ओवी ४५ अं. प्रतीत नाही.]

**ऐसें बोलोनि हनुमंत । ब्रह्मपाशीं पडे मूर्च्छित । धरणीवरी निचेष्टित । धकधकीत जेंवी भेड ॥ ४६ ॥**

**ब्रह्मपाशीं हनुमंत । पडिला दिसे निचेष्टित । परि तो बंध मोक्षा अतीत । नित्य निर्मुक्त रामभक्त ॥ ४७ ॥**
[ओवी ४७ मुं. वि. प्रतींत नाही.]

**ब्रह्मपाशीं हनुमंत । निश्चयेसीं नित्य निर्मुक्त । ब्रह्माज्ञा बंधत्व दावीत । प्राकृत मानीत बांधला ॥ ४८ ॥**

**जेवीं रवी थिल्लरात । लोक मानिती थिल्लरस्थ । तेवीं कपी ब्रह्मपाशांत । बांधला दिसत परी मुक्त ॥ ४९ ॥**

**विजयी वीर इंद्रजित । ब्रह्मपाश बांधला हनुमंत । ऐशिया गोष्टी लंके आंत । सांगती मात घरोघरीं ॥ ५० ॥**

**ब्रह्मेनि बांधला हनुमंत । परि तो ब्रह्मबंधा अतीत । देखोनि इंद्रजित विस्मित । तेंचि बोलत श्लोकार्थ ॥ ५१ ॥**

> अथ तं राक्षसा दृष्ट्वा निर्विचेष्टमरिंदमम् । बबन्ध रज्जुपाशैश्च द्रुमचीरैश्च मारुतिम् ॥ ८ ॥
> स बद्धस्तेन बंधेन विमुक्तस्तेन वीर्यवान् । अस्त्रबंधः स चान्यं हि न बंधमनुवर्तते ॥ ९ ॥
> कृष्यमाणश्च रक्षोभिस्तैश्च बंधैर्निपीडितः । हन्यमानस्ततः क्रूरे राक्षसैः काष्ठमुष्टिभिः ॥ १० ॥
> अथेंद्रजितं द्रुमचीरबंधं समीक्ष्य वीरं कपिराजमुख्यम् ।
> विमुक्तमस्त्रेण जगाम चिंतां न बंधमन्यं ह्यनुवर्ततेऽस्त्रम् ॥ ११ ॥

[तं. 'पाशजाळीं'.] **क्षितीतळीं निर्विचेष्टित । पडिला देखोनि हनुमंत । राक्षस धांवोनि समस्त । त्यासी बांधत वेलवाखी ॥ ५२ ॥**

**एक** [तु. वि. दै. 'तृणवेली'; कं. 'तृणवेणी'.] **तृणवेठी वळिती । एक वृक्षसाली काढिती । एक द्रुमचिरफाळिती । रणीं मारुती बांधावया ॥ ५३ ॥**

**एक आणिती चऱ्हाटें । एक वळिती सलंब फाटे । देखोनि हांसिजे मर्कटें । बंधन** [पै. 'कोठें'.] **खोटे मज न लागे ॥ ५४ ॥** [ओवी ५४ तं. प्रतीत नाही.]

**राक्षसें बापुडे हे वेडी । व्यर्थ करिताती ओढाओढी । फोडीन लंकेच्या उतरंडी । पाडीन दरडी दुर्गाच्या ॥ ५५ ॥**

**रावणा देखोनिया दृष्टीं । त्याचा घावो साहोनिया पुष्टी ।**

अनुक्रमणिका

तो घावो नेवोनि तृणासाठीं । लंका [तु. .दै 'उफराटी'.] उठाउठी जाळूं आजी ॥ ५६ ॥

ऐसा आवांका धरोनि पोटीं । द्रुमचीरबंधन मानुनी कंठी ।
घ्यावया रावणाच्या भेटी । जातो जगजेठी हनुमंत ॥ ५७ ॥

जातां हनुमंताप्रती । भेणें पळाली ब्रह्मशक्ती । ब्रह्मपाशीं मुक्त मारुती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ ५८ ॥

जो बांधवेना ब्रह्मपाशीं । तो केंवी बांधवे [अं. 'रज्जुपाशीं'.] द्रुमपाशीं । बंधनमिसें जातो लंकेसी । रावणासी गांजावया ॥ ५९ ॥

बंधन नाहीं हनुमंता । मिथ्या मानोनि बंधनता । स्वयें लंकेशी जातो आतां । लंकानाथा गांजावया ॥ ६० ॥
[ओवी ६० कं. प्रतीत नाही.]

आम्हांसी गांजिले अशोकवनीं । रावणा गांजील लंकाभुवनीं ।
परम चिंता इंद्रजिताचें मनीं । अपेश जनीं मज आले ॥ ६१ ॥

इंद्रजितानें हनुमंत । बांधोनि आणिला लंकेआंत । हेंचि लोकीं रुढली मात । करील अनर्थ तें [कं. 'लंकेसी'.] न कळे ॥ ६२ ॥

ब्रह्मेनीं सांगितलें कानीं । ते हनुमंत धरुनी मनीं । प्रवेशतो लंकाभुवनीं । इंद्रजिताचें मनीं चळकांप ॥ ६३ ॥

इंद्रजित म्हणे राक्षसांसीं । हनुमान द्यावा [तु. दै. 'आम्हांसीं'.] ब्रह्म्यापासी ।
ब्रह्मपाश बंधन माहीं कपीसी । तो तुम्हांसी न धरवे ॥ ६४ ॥

राक्षस म्हणती वानर कती । सापडले आमुच्या हातीं । आम्ही याची करूं शांती । तूं कां चित्तीं भीतोसी ॥ ६५ ॥

> तं मत्तमिव मातंगं बद्धं कपिवरोत्तमम् । रक्षोभिर्विकृताकारैः कृष्यमाणं ततस्ततः ॥ १२ ॥
> हन्यमानस्ततः क्रूरै राक्षसैः काष्ठमुष्टिभिः । राक्षसा राक्षसेन्द्राय रावणाय बभाषिरे ॥ १३ ॥
> हन्यतां दह्यतां चापि भक्ष्यतामितिचाब्रुवन् । राक्षसास्तत्र संक्रुद्धाः परस्परमथाब्रुवन् ॥ १४ ॥
> स हन्यमानो बहुभिश्चतत्र समेत्य रक्षोधिपदृष्टिमूले ।
> न तस्य चिंता न शरीरभंगः ते राजदूता व्यथिता बभूवुः ॥ १५ ॥

मत्त मातंग महाबळी । वृथा बांधिजे [पै. 'तृणाली'.] कमलमृणालीं । तेविं हनुमंत महाबळी । बांधिजे सकळीं [तु. दै. मु. 'वृक्षशाखीं'.] वृक्षवाखीं ॥ ६६ ॥

एक बांधिती रज्जु बंधनीं । एक बांधिती वाख वळुनी । एक बांधिती मुंज चिरुनी । कपी धरुनी आणिला ॥ ६७ ॥

अनुक्रमणिका

एक ओढिती पूर्वेसी । एक ओाढिती पश्चिमेसी । एक ओाढिती उत्तरेसी । दक्षिणेसी ते एक ॥ ६८ ॥

एक रागें हाणे बुक्की । जो हाणी तो होय दुःखी । मनगटें मोडोनि तंवकी । महाशंखी वामहस्तें ॥ ६९ ॥

एक आक्रोशें हाणें मुसळें । मुसळ पीठ होय तात्काळें । हाणे त्याचा हात उखळे । पडे तात्काळ मूर्च्छित ॥ ७० ॥

एक धांवोंनि टोला हाणत । घायें रुधिर स्त्रवें हात । हनुमान गदगदा हांसत । व्यर्थ पुरुषार्थ राक्षसां ॥ ७१ ॥

ओढाओढी हनुमंतासी । राक्षस करिती कासाविसी । कपि कुंथत लौकिकेसी । निज मानसीं उल्लास ॥ ७२ ॥

धरुनी नेलिया रावणाप्रती । मी गांजीन लंकापती । राक्षस माझा घात करिती । वानर चित्तीं नाहीं शंका ॥ ७३ ॥

राक्षस अट्टहासें गर्जती । अखयासा जीवघाती । सांपडला आमुचिया हातीं । प्राणाहुती करुं याची ॥ ७४ ॥

हनुमान पुढें नेईजेत । धरोनि इंद्रजिताचा हात । ब्रह्मा त्यामागे पैं जात । मंत्र जपत ते ऐका ॥ ७५ ॥

गृहा वै प्रतिष्ठा हे सूक्त । ब्रह्मा स्वानंदें जपत । रामराज्य लंकेआंत । हनुमंत प्रवेशे ॥ ७६ ॥

वेगें आणिला रावणापासीं । कोप आला दशमुखासीं । रागे सांगे राक्षसांसी । भक्षा यासी सगळेचि ॥ ७७ ॥

रावण दांत खाय करकरां । मज देखतां शस्त्र धारा । वानरा तिळप्राय करा । निशाचरां प्रेरिले ॥ ७८ ॥

कोट्यानुकोटी जे पार्श्वद । धांविन्नले [तु. दै. 'उद्भट'; पै. 'उदार'.] गदायुद्ध । घाय हाणती सुबद्ध । करावया छेद कपीचा ॥ ७९ ॥

बाण सुटती सणसणा । शस्त्रें वाजती खणखणा । घाय हाणती दणदणा । कपीच्या प्राणा घ्यावया ॥ ८० ॥

एक खोचिती सबळ शूळें । एक हाणिती सांबळें । एक हाणिती कत्त्या त्रिशुळें । गदामुद्‌गलें पैं एक ॥ ८१ ॥

अलंगाइत कोइतेकार । आढाऊ [तु. 'लव्हंडी'.] चव्हाण चेंडू चक्र । फरश पट्टीश तोमर । हाणती वानरां जमदाढा ॥ ८२ ॥

वानरेसी सवतोडी । हाणती भाले ओढण खांडीं । एक ते हाणती लहुडी । प्रचंड धोंडीं पैं एक ॥ ८३ ॥

जीवें मारावया वानर । अवघेही निशाचर । वर्षती शस्त्रांचे संभार । अति निष्ठुर निघातें ॥ ८४ ॥
ऐसिया शस्त्रघाताआंत । रामनामें सदोदित । हनुमान सदा सावचित्त । शस्त्रसंपात तृणप्राय ॥ ८५ ॥

अनुक्रमणिका

वीर वाठिवा हाणत । शस्त्रें मोडिलीं समस्त । एकाचे उखळले हात । वीरीं दांत विचकले ॥ ८६ ॥

घाय हणतां पैं वाट । धापा फुगले त्यांचे पोट । अशुद्ध वमिती समसगट । हृदयस्फोट अवघ्यांहि ॥ ८७ ॥

एकें एक पैं समस्त । वीर पडले मूर्च्छित । हनुमंतासी नव्हेची घात । लंकानाथ क्षोभला ॥ ८८ ॥

हनुमंताचें अभ्यंतरीं । श्रीराम नांदे बाह्यातरीं । शस्त्रें न रुपतीं तीळभरी । वीर महामारी मूर्च्छित ॥ ८९ ॥

नव्हेची हनुमंताचा घात । मारिते वीर पैं समस्त । पडिले देखोनि मूर्च्छित । कोपें कृतांत रावण ॥ ९० ॥

क्षोभोनिया लंकानाथ । चंद्रसेन खर्गा घालुनी हात । कोपें हाणतां हनुमंत । कपी हांसत गदागदा ॥ ९१ ॥

घावो हाणतां प्रचंड । त्याचेनि दणाणिलें ब्रह्मांड । सरलें रावणाचें बळबंड । खालतें तोंड तेणें केलें ॥ ९२ ॥
[ओवी ९२ तु. वि. कं. मुं. तं. दै. प्रतींत नाही.]

रावण म्हणे हनुमंता । तूं हांसलासी कवणिया अर्था । कपी म्हणे लंकानाथा । ऐक आतां सांगेन ॥ ९३ ॥

राक्षसस्वामी तूं लंकानाथा। तुझिया बळाचा मज भ्रम होता । घावो हाणोनि त्वां आतां । केला वृथा पुरुषार्थ ॥

राक्षस घायाचा समेळु । जैसी पिसाची बुळबुळु । तुझा घावो अति निर्बळु । जैसी पेळु कापुसाची ॥ ९५ ॥

रावण निर्बळ हीन दीन । केंवी रामेसी करिसी रण । [अं. पै. खेरीज इतरत्र 'जगीं'.] जनीं निर्लज्ज तूं एक जाण । हास्य संपूर्ण तेणें मज ॥ ९६ ॥

स्वयंवरीं [मु. दै. 'पाहाता'.] वहातां हरकोदंड । तुझें जाहालें काळे तोंड । श्रीरामें केलें दुखंड । युद्ध वितंड केलीं त्यासी ॥ ९७ ॥

सन्मुख न येववे रघुनाथा । चोरुनी पळालासी सीता । त्यासी युद्ध करीन म्हणतां । निर्लज्ज्ञता रावणा ॥ ९८ ॥

तुझें शुभचिन्ह कळलें आतां । भीक लागली चोरितां सीता । त्यासी तुझी राज्यसत्ता । नुरे सर्वथा रावणा ॥ ९९ ॥

तुझा हात हळुवट । घावो अतिशयें पोंचट । माझी लोम न तुटे पैं स्पष्ट । अहा कटकट रावणा ॥ १०० ॥

संमुख बैसोनि लंकानाथा । निःशंक बोलतां हनुमंता । चिंतां रावणाचिया चित्ता । अवध्यता वानरीं ॥ १०१ ॥

अवध्य जाणोनि वानरासी । प्रहस्ताहातीं पुसवी त्यासी । तूं कोण कोणाचा कां आलासी । वन भंगिसी

अनुक्रमणिका

**किमर्थ ॥**

**रावणराजा प्रतापराशी । भेटी न घडे वानरेसी । म्हणोनि भंगिले वनासी । दशमुखासी भेटावया ॥ १०३ ॥**

**राक्षस आले मारावयासी । म्हणोनि युद्ध केलें त्यांसी । वाचवावया निज देहासी । राक्षसांसी मारिलें ॥ १०४ ॥**

**ऐसें सांगोनि प्रहस्तासी । हनुमान बोले निजवृत्तांतासी । दृष्टी नाणी प्रहस्तासी । राक्षसांसी गणीना ॥ १०५ ॥**

**दशमुखाचें संमुख । पुच्छासनीं बैसला देख । हनुमान अतिशयेंसी निःशंक । नव्हे साशंक रावणा ॥ १०६ ॥**

**रावणा संमुख हनुमंत । बैसला वांकुल्या दावित । सवेंचि डोळे मिचकावीत । अंगोठा दावीत नोकूनी ॥ १०७ ॥**

**हनुमान न भिये राक्षसांसी । दृष्टी नाणी प्रधानासी । रावण जाणोनि मानसीं । स्वमुखें त्यासी पुसतसे ॥ १०८ ॥**

> रे रे वानर को भवानिह कथं त्वत्सूनुहंताहवे । दूतोऽहं खरखंडनस्य नृपतेः कोदंडदीक्षागुरोः ॥ १६ ॥
> मद्दोर्दन्डकठोरपाटनपटुः को वा त्रिकूटाचले । को मेरौ क्व च रावणौघगणनाकोटिस्तु कीटायते ॥ १७ ॥
> धिक्ते रावण पौरुषं कुलमपि श्रीर्धिग्यशो राजसम् । धिक्खड्गं सुरदर्पनोदनकरं धिग्धिग्वृथा जीवनम् ।
> यस्माद्राघववाणभीतमनसा सीता परीक्षे हृता । तद्वैरादमागतोऽस्मि हनुमान् दूतो वधार्थं तव ॥ १८ ॥

**रावण** [कं. 'आलक्षूनी'.] **हेळसुनी बोले उत्तर । अरे तूं कोणाचा वानर । ऐक रे रावणा! प्रत्युत्तर । सत्य साचार सांगेन ॥ १०९ ॥**

**मारिले बनकर किंकर । जंबुमाळी निशाचर । रणीं मारिले प्रधानकुमर । तो मी वानर महावीर ॥ ११० ॥**

**पंच सेनानी मारिला शूर । निर्दाळिला सैन्यसंभार । रणीं मारिला अखयाकुमर । तो मी वानर** [अं. 'महाबळी'.] **महावीर ॥ १११ ॥**

**मारिला अखया लाडिका सुत । जेष्ठ गांजिला इंद्रजीत ।**
**त्याचिया सैन्या केला निःपात । तो मी हनुमंत महावीर ॥ ११२ ॥**

**वनविध्वंस कवणिया चाडा । जैसें उपडिलें झाडा । तैसें राक्षसकुळ उपाडा । करुं रोकडा मी आलों ॥ ११३ ॥**

अनुक्रमणिका

तूं कोणाचा कैंचा कोण । येथें यावया काय कारण । ऐसा पुसिला जो प्रश्न । सावधान अवधारी ॥ ११४ ॥

सुबाहू ताटिका निर्दळण । त्रिशिरा मारिला खरदूषण । श्रीरामाचा दूत मी जाण । तुझा प्राण घेवों आलों ॥ ११५ ॥

चौदा सहस्त्र रक्षोगण । वधूनी घेतलें [तं. 'जनकस्थान'.] जनस्थान । त्या श्रीरामाचा दूत मी जाण । तुझा प्राण घेवों आलों ॥ ११६ ॥ [ओवी ११६ तु. वि. दै प्रतींत नाही.]

विराध मारिला विंधोनि बाण । मारीच मारिला कपटी पूर्ण ।
त्या श्रीरामाचा [मु. 'भक्त'.] दूत मी जाण । तुझा प्राण घेवों आलों ॥ ११७ ॥
[ओवी ११७ तु. .प्रतींत नाही .दै]

कोदंड धारियां [दै. 'परम गुरु'.] दीक्षा गुरु । सूर्यवंशी श्रीरामचंद्रु । त्याचा दूत मी वानरु । तुझा संहारु करूं आलों ॥ ११८ ॥

दंड धारिया परम गुरु । काम क्रोधावधी रघुवीरु । त्याचा दूत मी वानरु । तुझा संहारु करूं आलों ॥ ११९ ॥

म्हणसी वधावया रावण । तुज कैंची रे आंगवण । माझें बळ असाधारण । नाहीं प्रमाण रणमारा ॥ १२० ॥

लागतां बाहूबळ चपेट । मेरुमांदार होती पीठ । रावण दशमुख कीट । लंका त्रिकूट तें किती ॥ १२१ ॥

दशमुखांचिया हारी । शिरें छेदीन नखाग्रीं । जेवीं पतंग अग्नीवरी । तैसी परी राक्षसां ॥ १२२ ॥

रावणा ऐसें दशकंठी । वीर मीनलिया कोट्यानुकोटी । ते मी मर्दीन वामांगुष्ठीं । लंकात्रिकूटी समवेत ॥ १२३ ॥

जळो ते रावणा पुरुषार्थ थोरी । जळो तो राजा होय भिकारी । जळो तें कर्म करणें चोरी । परनारी पतिव्रता ॥ १२४ ॥

जळो तें रावणा तुझे कूळ । जळो तें रावणा तुझें शीळ । जळो तें रावणा तुझें बळ । पापी तूं केवळ परद्वारी ॥ १२५ ॥

धिक् धिक् रावणा राक्षसजाती । धिक् धिक् रावणा तुझी ख्याती ।
धिक् धिक् रावणा तुझी कीर्ती । जाहाली अपकीर्ती तिहीं लोकी ॥ १२६ ॥

धिक् धिक् रावणा तुझी श्रीमंती । धिक् धिक् रावणा तुझी शक्ती ।
धिक् तो खड्ग तुझिया मुष्टीं । लोम मारुती न तुटेची ॥ १२७ ॥

अनुक्रमणिका

धिक् धिक् रावणा तुझें जन्म । धिक् धिक् रावणा तुझा धर्म ।
धिक् धिक् रावणा तुझें कर्म । निंद्य [तं. 'कर्म'.] परम तिहीं लोकीं ॥ १२८ ॥

धिक् धिक् जीवित तुझें क्षितीं । धिक् धिक् रावणा तुझी शौर्यवृत्ती ।
परोक्ष हरिली सीतासती । बाण भयभीती श्रीराम ॥ १२९ ॥

माझिया स्वामीची चोरिली नारी । तूं तंव माझा प्रत्यक्ष वैरी ।
मी तंव सीतेचा धांवणेकरी । तुज मी मारी आतांची ॥ १३० ॥

तुजसी प्रत्यक्ष घ्यावया भेटी । वनीं वृक्षा केली अटाटी । राक्षस मारिले कोट्यानुकोटी । तुज दृष्टीं देखावया ॥

तुज म्यां देखावया दृष्टीं । बंधन लाऊं दिधले कंठीं । लाता टोले साहोनि मुष्टी । तुझिये भेटीं मी आलों ॥ १३२ ॥

तुझे भेटीचें हेंचि फळ । तुज मियां मारावें तत्काळ । सिद्धीं नेवोनि श्रीराम सळ । जनकबाळ सोडवावी ॥ १३३ ॥

त्या तुज मज जाली भेटी । तुवां पुसिल्या गुह्य गोष्टी । ते मियां सांगितली परीपाटी । मरण शेवटीं उरलेसें ॥ १३४ ॥

तुझिया अंगीं सबळ बळ । सैन्य सेनानी प्रधान प्रबळ । मज मारुनी तत्काळ । जनकबाळ भोगावी ॥ १३५ ॥

राक्षसां देखतांची स्पष्ट । तुझे मर्दीन मी ओठ । तुझे छेदावया दशकंठ । आलों मी वांटा रामाचा ॥ १३६ ॥

ऐसें बोलतां महाबळी । पिंजारिल्या रोमावळी । लांगूल त्राहाटिलें भूतळीं । वाढलें निराळीं कपिपुच्छ ॥ १३७ ॥

माथाची शेंडी थरथराट । वाटारिले नेत्रवाट । कांपिन्नला दशकंठ । [कं. 'प्राणसंकट'.] समसकट राक्षसा ॥ १३८ ॥

करावया सर्व संहार । जैसा वाढे प्रळयरुद्र । तैसा वाढला वानर । निशाचर कापती ॥ १३९ ॥

> एकोऽहं पवनात्मजो दशमुखस्त्वं चापि कोटीश्वरस्त्वां जित्वा समरे प्रभोः प्रणयिनीं सीतां च नेतुं क्षमः ।
> किं तत्स्यादनृतं बलं बलवता रामेण सुश्रीमता हत्वा दक्षिणपाणिना वमुमतीं त्वां हर्तुमुक्तं वचः ॥ १९ ॥

मी तंव एकलें एक वानर । श्रीरामाचें निज किंकर । तुझे कोट्यानुकोटी जुंझार । मजसमोर [तु. दै. 'केवीं'.]

अनुक्रमणिका

करी उभे ॥ १४० ॥

मशकें कोट्यानुकोटी झुंजार । मज मारितां दशशिर । कोण राखेल निशाचर । सुरासर पाहों पां ॥ १४१ ॥

क्षोभला देखोनि हनुमंत । इंद्रजित चळचळा कांपते । आजी निमाला लंकानाथ । करील घात वानर ॥ १४२ ॥

निश्वयें रावणा आला अंत । ऐसें इंद्रजित चिंतित । तंव बोलिला हनुमंत । तोही वृत्तांत अवधारा ॥ १४३ ॥

रणीं मारुनी रावण । करुनी सीता सोडवण । श्रीरामापासीं नेतां जाण । मज कोण निवारी ॥ १४४ ॥

इतकें करितां न लगें क्षण । परी श्रीरामें वाहिली आण । दक्षिण हस्तें विंधोनि बाण । रणीं रावण मारणें ॥ १४५ ॥

मारुनिया दशशिरा । स्वस्थ करावी वसुंधरा । सुखी करावें चराचरां । श्रीरामचंद्रा निज नेम ॥ १४६ ॥

सोडावी देवाची बांधवडी । तोडावी नवग्रहांची बेडी ।
उभारावी रामराज्याची गुढी । मर्यादा गाढी श्रीरामें ॥ १४७ ॥

श्रीराम बळवंताचें बळ । श्रीराम बळें वीर सबळ । श्रीरामाचें सत्य शीळ । प्रतिज्ञा अढळ रामाची ॥ १४८ ॥

रामें मारावें लंकानाथा । सत्य प्रतीज्ञा श्रीरघुनाथा । माझेनि न करवे अन्यथा । केंवी मी आतां तुज मारुं ॥ १४९ ॥

सन्मुख देखिलिया दशानन । वानरें उडोनि घ्यावा प्राण ।
रामें वांचविला रावण । स्वहस्तें आपण मारावया ॥ १५० ॥

श्रीराम प्रतिज्ञेची पांखर । तेणें वांचला दशशिर । रावणा न मारीच वानर । मर्यादा मेरु नुलंघी ॥ १५१ ॥

रावणा तुज मारीन आतां । ऐसें हनुमंत बोलतां । इंद्रजितासी परम चिंता । आला लंकानाथा अपघात ॥ १५२ ॥

इंद्रजित बिभीषणा सांगत । आजी निमाला लंकानाथ । क्रोधें खवळला हनुमंत । उपाय येथें चालेना ॥ १५३ ॥

न चले शस्त्र अस्त्र [मु. 'सकळ'.] सळ । न चले वानरेसीं बळ । न चले कपटविद्या [मुं. 'सकळ'.] छळ । बळें प्रबळ वानर ॥ १५४ ॥

मंत्रशक्ती तंत्रशक्ती । ना कळे आकमविक्रम शक्ती । न चले माया मोहक शक्ती । रणीं मारुती नाटोपे ॥

अनुक्रमणिका

१५५ ॥

वानर नाटोपे सैन्यासी । शेखीं नाटोपे ब्रह्मपाशीं । तो केवीं आटोपे रावणासी । बिभीषणासी सांगत ॥ १५६ ॥

जें जे बांधावें बंधन । वानर ना न म्हणे आपण । तृणासमान त्यासी मरण । निर्बंधन पाशबंधीं ॥ १५७ ॥

ऐसें इंद्रजित सांगतां । बिभीषण म्हणे लंकानाथा । वानर अवध्य तत्वतां । तुज वधितां वधवेना ॥ १५८ ॥

वानर न वधवे सर्वथा । ऐसें कळलें लंकानाथा । श्रीरामा अर्पुनिया सीता । शरण रघुनाथा रिघावें ॥ १५९ ॥

श्रीरामा रिघालियां शरण । आम्हांसी नाहीं जन्ममरण ।
त्रिसत्य सत्य रावणा जाण । विचार आन न करावा ॥ १६० ॥

अन्यथा विचार करुं जातां । रोकडें हनुमान करील घातां । उपावो न चले सर्वथा । लंकानाथा भुलों नको ॥ १६१ ॥

श्रीरामाचें एक वानर । आम्हां नाटोपे साचार । कोपोनि आलियां रघुवीर । [मु. 'रणीं'.] शर दुर्धर कोण साहे ॥ १६२ ॥

अर्पुनिया जानकीतें । काया वाचा चित्तें वित्तें । शरण रिघालिया श्रीरामातें । कल्याणातें पावाल ॥ १६३ ॥

एका जनार्दना शरण । सत्व बुद्धी बिभीषण । ते बुद्धी न मानी रावण । गर्वाभिमान तो ऐका ॥ १६४ ॥

वानरां वनचरां भेण । रिघतां श्रीरामा शरण । तैं मज आलें उणेपण । जग जघन्य वांठिवे ॥ १६५ ॥

मरण पुसोनि कपिनाथा । त्याचेनि बोले त्याचिया घातां । बुद्धीनें [मु. 'विचारोन'.] मारीन हनुमंता । कुबुद्धिता रावणीं ॥ १६६ ॥

जटायुनें केलें कासाविसी । सिंतरुनि मियां मारिले त्यासी ।
तैसेंची करीन हनुमंतासी । रावणापासून कुबुद्धी ॥ १६७ ॥

एका जनार्दना शरण । पुसतां हनुमंताचें मरण । दाहीमुखें होरपळून । करील दहन लंकेचें ॥ १६८ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणहनुमंतसंभाषणं नाम सप्तदशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग अठरावा

## पुच्छ प्रदीपन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

**हनुमंतासी न चले घात । स्वयें सांगे इंद्रजित । अवध्य वीर हा हनुमंत । साक्षेपें सांगत बिभीषण ॥ १ ॥**

निश्चितार्थस्ततः साम्ना पूज्यं शत्रुजिद्ग्रजम् । उवाच हितमत्यर्थं वाक्यमेतद्विभीषणः ॥ १ ॥

**इंद्रजित जो कां श्रेष्ठ सुत । नाना युक्ती स्वयें सांगत । शस्त्रास्त्रीं ब्रह्मपाशांत । नचले पात हनुमंता ॥ २ ॥**

**शस्त्रशक्ती अस्त्रशक्ती । मंत्रशक्ती तंत्रशक्ती । कपटमाया मोहनशक्ती । रणीं मारुती न** [कं. दै. तु. 'धरवे'.] **वधवे ॥ ३ ॥**

**कर्मपाश धर्मपाश । ब्रह्मयाचा ब्रह्मपाश । बांधो न शकें वानरास । जन्मपाश मुख्यत्वें ॥ ४ ॥**

**बिभीषण प्रिय भ्राता । सांगतसे परम हिता । शरण रिघावें श्रीरघुनाथा । काय म्यां आतां करावें ॥ ५ ॥**

**सर्वथा अवध्य हा मारुती । इंद्रजिताची उपपत्ती । बिभीषणाची भिन्नयुक्ती । लंकापति संचित ॥ ६ ॥**

राक्षसाधिपतिः क्रुद्धः तदकार्यमुपस्थित्म । विदित्वा चिंतयामास कार्यं कार्यविदांवरः ॥ २ ॥

**राग आला रावणासी । तरी मारवेना हनुमंतासी । अवध्यता देखोनी त्यासी । दशमुखासी अति चिंता ॥ ७ ॥**

**हनुमंतासी न वधितां । सकळ कुळाच्या करील घातां । हा न मरे मारुं जातां । परम चिंता लंकेशा ॥ ८ ॥**

**आण घालोनि श्रीरघुनाथा । मरण पुसे कपीनाथा । मरणानुक्रम आणूनि हातां । मग हनुमंता मारावें ॥ ९ ॥**

**ऐसें विचारोनि चित्तीं । पुसावया मरणयुक्ती । स्तवूं आदारिला मारुती । लंकापतीनें निजमुखें ॥ १० ॥**

**ऐके वीरा हनुमंता । श्रीरामाचिया परमभक्ता । तुज मी पुसतसें आतां । सत्य तत्वतां सांगावे ॥ ११ ॥**

**असत्य वदों नये हरिभक्ता । शपथ घालितों रघुनाथा । मरण कैसेनि हनुमंता । यथार्थता सांगावें ॥ १२ ॥**

**ऐकोनी श्रीरामाची आण । हनुमान घाली लोटांगण । मज सर्वथा नाहीं मरण । सत्य जाण लंकेशा ॥ १३ ॥**

**ऐकोनि हनुमंताचें वचन । गदगदा हांसे रावण । जन्मामागें अखंड मरण । मिथ्या भाषण अमरत्व ॥ १४ ॥**

अनुक्रमणिका

म्हणती अमर निर्जरां देवां । तेही पावती मरणार्णवा । तेथें तुझा कायसा केंवा । मिथ्या हेवा अमरत्वें ॥ १५ ॥

चौदा कल्पायुषी गरिमा । मार्कंडेयाचा मुख्य महिमा । तो जैं जाय मरणग्रामा । तैं झडे रोमरोम हर्षणाचा ॥ १६ ॥

युगानुयुगीं लोम झडे ज्यासी । ऐसा तो लोमहर्षण ऋषी ।
तोही मरे बकदाल्भाचे श्वासीं । मरण बकदाल्भ्यासी हंसपक्षें ॥ १७ ॥

हंसाचा पंख जेव्हां झडे । तंव बकदाल्भाचें आयुष्य उडे । त्या हंसासी मरण रोकडें । जैं कां नख खंडें भृशुंडीचे ॥ १८ ॥

कूर्म हालवी निमिष । तंव भृशुंडीसी देख । मरण पावे अवश्यक । मरण अचुक सर्वांसी ॥ १९ ॥

एवं मरण परंपरा । कदा न सोडी थोरथोरां । तेथें तूं पालेखायिरा । केवीं वानरा अमरत्व ॥ २० ॥

तपोतेजें महाऋषी । ते काळाची आंदणी दासी । श्रीरामनामीं प्रेम ज्यासी । काळ त्यापासीं कामारा ॥ २१ ॥

जागृती सुषुप्ती सहित स्वप्न । ज्यासीं अखंड नामस्मरण । काळ त्यांचे वंदी चरण । नेणें रावणा हे महिमा ॥ २२ ॥

भक्त भावार्थ भजन । स्वयें जाणें श्रीभगवान । रावण विषयीं अति दीन । त्यासी हें ज्ञान केवी लाभे ॥ २३ ॥

असो हे रावणाची स्थिती । मज श्रीरामाची भक्ती । माझिया अमरत्वाची ख्याती । दावूं प्रतीती रावणा ॥ २४ ॥

हनुमंत श्रीरामभक्ती लाठी । तरी कां बोले मिथ्या गोष्टी । मिथ्या वदलासी चावटी । कशासाठीं मज सांग ॥ २५ ॥

आदरें पुसतां रावणासी । बुद्धी स्फुरली वानरासी । अपमानावया लंकेशासी । गुह्य त्यापासीं अनुवादे ॥ २६ ॥

रावण अतिशये कपटी । सत्य वदलों ज्या मी गोष्टी । सत्य वार्ता मानी खोटी । विकल्प पोटीं रावणा ॥ २७ ॥

सबाह्य सत्य सदोदीत । त्यासी न मानीती समस्त । सत्यासी सत्य मानी भावार्थ । रावणांत तो नाहीं ॥ २८ ॥

रावणाचा विकल्प झडे । माझें सत्यत्व दिसे रोकडें । तैसें साधावया धडपडे । रावणापुढें गुह्य सांगे ॥ २९ ॥

अनुक्रमणिका

मरण पुसोनि विश्वासेसीं । तुवां मारिलें जटायूसी । तैसेंच मजही करिसी । तेणें धांकेसी वदे मिथ्या ॥ ३० ॥

रावण म्हणे हनुमंतासी । मरणभय जयापासीं । श्रीरामभक्ती कैंची त्यासी । देहलोभ्यासी राम कैचा ॥ ३१ ॥

हनुमान म्हणे लंकानाथा । परोपदेशी अति योग्यता । तुझी मी देखतों तत्वतां । शेखीं कपटता तुजपासी ॥ ३२ ॥

कपटें होऊनी संन्यासी । चोरुनी आणिला सीतेसी । सदाशिवें सोडिलासी । कपटें पावसी कुळक्षयो ॥ ३३ ॥

ऐसें हनुमंत सांगतां । वर्म खोचलें लंकानाथा । ऐक माझी मरणावस्था । तुज तत्त्वतां सांगेन ॥ ३४ ॥

ऐकावया मारुतीचें [मु. कं. 'वचन'.] मरण । सरसावला दशानन । कपी सांगे विंदान । सावधान अवधारा ॥ ३५ ॥

असत्य नाहीं वदलों तुजसी । मरण नाहीं माझिया देहासी । मरण आहे पूंसापासीं । तें मारिसी तैं मी मरी ॥ ३६ ॥

ऐकोनि कपीचें वचन । जेष्ठ इंद्रजित श्रेष्ठ प्रधान । अवघे म्हणती सत्यभाषण । सेनानि सैन्य समवेत ॥ ३७ ॥

वायूपरीस पुच्छ चपळ । याचे पूंसाचें प्रबळ बळ । पुच्छें निर्दाळिले सकळ । बळें [मु. 'गोलागुल'.] लांगूल न मरवे ॥ ३८ ॥

पुच्छें मारिला रथसारथी । पुच्छें इंद्रजित हताहती । पुच्छें रणीं लाविली ख्याती । वीर विघाती कपिपुच्छ ॥ ३९ ॥

इंद्रजित बोले देखोनि रण । पूंस अतिशयेसी दारुण । पूंस मारुं जातां आपण । रणकंदन [मु. 'करील'.] होईल ॥ ४० ॥

पूंस खवळलिया अद्भूत । वीर मारील समस्त । लंका करील हताहत । लंकानाथ केवीं वांचे ॥ ४१ ॥

इंद्रजित सेनानी प्रधान । अवघे कांपती पुच्छाभेणं । देखोनि दशानन । स्वयें आपण विचारी ॥ ४२ ॥

हनुमंतासी पुसे रावण । पूंस अतिशय दारुण । तें कैसेनि पावें मरण । सत्य संपूर्ण सांगावें ॥ ४३ ॥

हनुमान म्हणे दशशिर । पूंसाचें मरण अति दुस्तर । तेलें तुपें भिजवूनि वस्त्र । पूंस समग्र गुंडावें ॥ ४४ ॥

हनुमान मारावया निर्धारीं । अग्नी लावावा पूसाग्रीं । धडाडिलिया अंबरीं । मरण वानरीं तत्काळ ॥ ४५ ॥

अनुक्रमणिका

उघडे राहिल्या तिळभरी । मरण नये पुच्छावरी । येईल राक्षसां महामारी । करील बोहरी लंकेची ॥ ४६ ॥

हनुमान न म्हणावा कपटी । मी सांगतों सत्य गोष्टी ।
ऐसी आंगवण असेल लाठी । तरी [वि. 'संतुष्टी'.] तूं वेष्टी कपिपुच्छां ॥ ४७ ॥

ऐसी असेल तुज शक्ती । हें घे पुच्छ देतों हातीं । शीघ्र तें [तु. दै. मुं. अं. वि. कं. तं. 'सघृत स्नेह'.] स्नेहवस्त्र प्रयुक्तीं । अति निगुतीं गुंडाळावें ॥ ४८ ॥

पुच्छ गुंडाळावया ओढाओढी । स्त्रीपुरुषें नागवीं उघडीं । लंका नागविली रोकडी कडोविकडी पुच्छाची ॥ ४९ ॥

सभा नागविली म्यां निशीं । लंका नागविली दिवसीं । पुच्छें करोनी कासाविसी । राक्षसांसी उगाणु ॥ ५० ॥

पुच्छ गुंडाळावयाचें मिसीं । राजद्वारीं चोहट्यापासीं । लंका नागवी करीन दिवसीं । राक्षसांसी [मु. 'नागऊनी'; मु. 'गर्जोनी'.] गांजोनी ॥ ५१ ॥

पुच्छ गुंडाळावयाचें चाडा । साठवणें कापड तडतडां । तेलासाठीं लावूं झगडा । तेलिया राजदंडा करूं ठावों ॥ ५२ ॥

आवडी हनुमंताचे पोटीं । नगर नागऊं पुच्छासाठीं । अग्नी लावूं लंका त्रिकूटीं । राक्षस कोटी आजी भाजूं ॥ ५३ ॥

ऐसें विचारोनी चित्तीं । पुच्छ दिधलें रावणा हातीं । पुढें पुच्छाची व्युत्पत्ती । लावली ख्याती तें ऐका ॥ ५४ ॥

> आज्ञापिता रावणेन पार्षदाः पुच्छवेष्टने । तस्य तद्वचनं श्रुत्वा राक्षसाः क्रोधकर्कशाः ॥ ३ ॥
> वेष्ट्यन्ति स्म लांगूलं जीर्णकार्पासिकैः पटैः । संवेष्ट्यमाने लांगूले व्यवर्द्धत महाकपिः ॥ ४ ॥

रावण सांगे निजदासांसी । आगी लावा कपिपुच्छासी । भिजवोनी तैल घृतांसीं । जीर्ण वस्त्रांसी गुंडाळावें ॥ ५५ ॥

ऐकोनी रावणांचे वचन । वीर शूर क्रोधी पूर्ण । क्रूर कर्कश अती दारुण । पुच्छा वेष्टण करूं आले ॥ ५६ ॥

वस्त्रें सरलीं पैं जीर्ण । नवीं गुंडाळावीं म्हणे रावण । नवींही सरलीयां जाण । पुच्छ संपूर्ण गुंडेना ॥ ५७ ॥

घोंगडी बारीक सकटें । सस्नेहें गुंडिलीं धुवटें । सखरें गुंडिलीं चोखटें । तरी न वेष्टे कपि पुच्छ ॥ ५८ ॥

घोंगडी पांगडी गुंडगी खांडें । संखरें निखरें गुंडिलीं उदंडें । आणिलीं सगळीं दिंडें । तरी न गुंडें कपि पुच्छ ॥ ५९ ॥ [ओवी ५९ कं. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

चाटबोळी पडली ओस । तरी न पुरती पुच्छास । राजगृहींचीं असमसाहस । कपि पुच्छास न पुरती ॥ ६० ॥

समस्त चाटियांचें वस्त्रभार । राजगृहींची वस्त्रें मात्र । पुच्छ न गुंडेची [पै. खेरीज इतरत्र 'चौतकर'.] चमत्कार । अति दुर्धर वाढलें ॥ ६१ ॥

पुच्छ वाढलें दुर्धर । धांकिन्नला दशशिर । इंद्रजितादिक निशाचर । सहपरिवार धांकती ॥ ६२ ॥

कपीचें मरण पुच्छापासीं । निश्चयें मानिलें आम्हांसीं । पुच्छ गुंडाळावे साक्षेपेंसीं । येरेयेरांपासीं सांगत ॥ ६३ ॥

पडदे गुंडिती फाडफाडूं । बैठका गुंडिती उधडउधडूं । चांदवें गुंडिती सोडसोडूं । पुच्छ माकडू नाटोपें ॥ ६४ ॥

पुच्छ गुंडिलें बहुतेक । उरलें असें भाग एक । तें गुंडाळावें अवश्यक । सकळ लोक सांगती ॥ ६५ ॥

पुच्छ गुंडाळावया लवडसवडीं । सभेची घेतली लुगडीं । वानरें सभा केली उघडी । कडोविकडीं नागविलीं ॥ ६६ ॥

सभा नागविली वीरें । आणिलीं रावणाचीं वस्त्रें । तरी पुच्छासी न पुरे । ओढा वानरें लाविला ॥ ६७ ॥

सेवकां सांगे दशवक्त्रें । नगरामाजीं राहिलीं वस्त्रें । हिरोन आणारे [तु. 'सर्वत्र'.] सत्वरें । पुच्छीं वानर [तु. 'वधावा'.] बांधावा ॥ ६८ ॥

जांवई आणिला दिवाळसणा । कोणाचा पाहुणा कोणाचा मेहुणा । दूत करिती वस्त्र हरणा । शंखस्फुरणा ते करिती ॥

नगरीं नरनारी वागती । दूत त्यांचीं वस्त्रें हरितीं । नागवी पळती हळहळती । शंख करिती चहूकडें ॥ ७० ॥

नोवऱ्या कुंवारी कां गरोदरी । सौभाग्याचिया निजगजरी । वाणें देती घरोघरीं । सालंकारी शोभती ॥ ७१ ॥

कपि पुच्छ वेष्टनावारी । राजदूत वस्त्रें हरी । लाजा [तं. मु. 'उघडिया'.] उबडिया पडती नारी । लंकापुरीं आकांत ॥ ७२ ॥

राजगृहीं ज्यांची चाली । नेसोनिं धोत्रें वोलीं । भटमंडळी निघाली । वस्त्रें हरिलीं [वि. 'नागउनी'.] बुकलनी ॥ ७३ ॥

भट वस्त्रें न सोडिती । दूत निःशंक [तु. दे. मु. 'झोंबती'.] झोडिती । महाशब्द नाना युक्ती । शंख करिती [वि. 'अन्योन्य'.] व्युत्पन्न ॥ ७४ ॥

अनुक्रमणिका

ओष्ठ मणगट जिव्हायुक्त । स्वरवर्ण अक्षरोक्त । शंख करिती वेदोक्त । रावण जीत कीं मेला ॥ ७५ ॥

अनुनासिक सानुनासिक । स्वरप्रयुक्त वेदपाठक । वेदव्युत्पत्ती करिती शंख । दशमुख निमाला ॥ ७६ ॥

द्याहा ढवळ्या नगरांत । रानद्वारीं वाट पडत । राजा असतां जीवें जीत । पारिपत्य तो करितां ॥ ७७ ॥

बोंब करितां फुगले [मु. 'पोट'.] ओठ । हांक देतां सुकले कंठ । राजा निमाला पैं स्पष्ट । हा हा कटकट ब्राह्मणां ॥ ७८ ॥

हनुमान वीर जगजेठी । लंका नागविली पूंसासाठीं । शिणतां राक्षस कोट्यानुकोटी । पुच्छ शेवटीं वेष्टेना ॥ ७९ ॥

इंद्रजितानें करुनी कपट । नगरा आणूनी मर्कट । राजा मारविला आपणांसकट । हा हा कटकट [तु. दै. 'राक्षसां'; अं. 'रावणा'.] ब्राह्मणां ॥ ८० ॥ [ओवी ८० मु. प्रतीत नाही.]

अद्यापी पूंसाचा अगरडा । बुजाला नाहीं दिसे उघडा । पूंसें वेष्टनीं लावोनि वेढा । केला बापुडा रावण ॥ ८१ ॥

पुच्छ वेष्टावयासाठीं । शिणतां राक्षसांच्या कोटी । पुच्छ वेष्टवेना वेष्टीं । अग्र शेवटीं उघडेंचि ॥ ८२ ॥

पुच्छ गुंडितां [मु. 'केवढें'.] कैवाडें । अग्र अधिकाधिक वाढे । वेड लाविलें माकडें । मरण रोकडें राक्षसां ॥ ८३ ॥

चाटे रडती राजद्वारीं । कळकळती नरनारी । बोंब सुटली घरोघरीं । लंकानगरीं आकांत ॥ ८४ ॥

[तु. दै. 'दुर्गम गृह'.] दुर्गसंग्रह परवडी । तेलातुपाचीं टाकीं गाढीं । अवघीं पडलीं कोरडीं । तिंबिंता लुगडीं [तु. दै. 'पुरुषार्थें'.] पुच्छार्थ ॥ ८५ ॥

तेलातुपाचा पैं तडा । नगरीं पाडिला रोकडा । पूंस गुंडितां माकडा । लाविले वेडा [मु. अं. 'लंकेशा'.] लंकेसी ॥ ८६ ॥

तूप न मिळे खावया पुरतें । रावणा लागे कोरडें भातें । माखून खावया [पै. खेरीज इतरत्र 'लेकरातें'.] पुरतें । तुप [मु. कोणातें.] कल्पांतें मिळेना ॥ ८७ ॥

टाके टांक स्नेहसमाप्ती । घरोघरीं मालवे वाती । गडद पडले लंकेप्रती । लाविली ख्याती कपिपुच्छें ॥ ८८ ॥

हनुमंताची कैसी युक्ती । ज्याचें नगर त्याचें हातीं । नागवितां नानायुक्ती । लाविली ख्याती कपिपुच्छें ॥ ८९ ॥

अनुक्रमणिका

नाहीं झगडा ना भांडण । करितां कपिपुच्छाचें वेष्टण । तृणप्राय केला रावण । गाढी आंगवण हनुमंता ॥ ९० ॥

अल्प उरलें आहे अग्र । ऐसें सांगे दशशिर । यासी वेष्टोनी पीतांबर । मारूं वानर पुच्छ दाहें ॥ ९१ ॥

पीतांबरे श्वेतांबरें । पटकुळें मनोहरें । गुंडिताहि क्षौमांबरें । पुच्छ नावरे कपीचें ॥ ९२ ॥

इंद्रजित धांके जीवाआंत । पुच्छें नाटोपे हनुमंत । अग्नि लाविलिया तेथ । करील अनर्थ लंकेसी ॥ ९३ ॥

रावणहि धांके मानसी । पूंस न गुंडवे आम्हांसी । केवीं मारावें वानरासी । उपाय यासी दिसेना ॥ ९४ ॥

तंव बोलिला विद्युन्माळी । वानरा आवरावया अति बळी । उघडी करा जनकबाळी । पुच्छ तत्काळीं आकळेल ॥ ९५ ॥

ऐसें ऐकतां हनुमंतें । आवरिलें निज पुच्छातें । दूत सांगती रावणातें । आम्ही पुच्छातें आकळिलें ॥ ९६ ॥

आम्ही सेवक अतुर्बळी । पुच्छ आकळिलें समूळीं । म्हणोनिया पिटिली टाळी । केला सकळीं गडगर्ज ॥ ९७ ॥

रावण सांगे सेवकांतें । अग्नि लावारे पुच्छातें । पाचारोनि लोहकारातें । लाविले भाते अग्नीसी ॥ ९८ ॥

तिये काळीं हनुमंतें । विनविले निज पितयातें । वायु [अं. 'निज'.] सत्य सखा अग्नीतें । ज्वाळा येथें होऊ नेदी ॥ ९९ ॥

ज्वाला होऊं न द्यावी येथें । ऐसें नमुनी वायूतें । गांजावया राक्षसांतें । हनुमान [वि. 'पुरुषार्थें'.] पुच्छार्थें खवळला ॥ १०० ॥

भाते फुंकितां चौपासी । अग्नि लागेना पुच्छासी । राक्षस होती कासाविसी । अग्नि पुच्छासी स्पर्शेना ॥ १०१ ॥

रावण म्हणे हनुमंतासी । अग्नि कां न लागे पुच्छासी । हनुमान म्हणे रावणाशी । तूं तंव आहेसी [कं. मुं. तं. 'अतिमूर्ख'; तु. दै. 'हाडमूर्ख'.] हाट मूर्ख ॥ १०२ ॥

वेद विभाग केला व्युत्पत्ती । तोहि न [पै. 'कळेचि वेदोक्ति'.] सरेचि वेद व्यासोक्ती ।संतासंत न कळे स्थिती । तूं तंव मुर्ति गर्वाची ॥ १०३ ॥

संतासंत विवेक अणूवी । समूळ नाहीं जयाच्या जीवीं । तयासी न साजे राजपदवी । वृथा गर्वी तूं रावणा ॥ १०४ ॥

अनुक्रमणिका

भाते फुंकितां अचेतन । केवीं जाळवे सचेतन । हें तुज नाहीं विवेकज्ञान । परम अज्ञान रावणा ॥ १०५ ॥

वचन मानलें रावणासी । पाचारुनी निज विश्वासी । फुंकूनी अग्नि लावा पुच्छासी । [मु. 'राक्षसापासी'.] साक्षेपेसी सांगत ॥ १०६ ॥

राक्षस फुंकितां चौपासी । पूंसें दडपिले अग्नीसी । खौट घाण निघे [मु. 'घ्राणासी';वि. दशशिरासी.] घशासी । कासाविसी राक्षस ॥ १०७ ॥

खौट घाणी अति प्रबळ । डोळां आसुवें मुखीं लाळ । एके श्वासें खोकिती [मु. 'सबळ'.] सकळ । हलकल्लोळ ऊठिला ॥ १०८ ॥

रावण म्हणे हनुमंता । पूस कां न जळे फुकफुंकितां । हनुमान म्हणे लंकानाथा । ऐक तत्वतां सांगेन ॥ १०९ ॥

धन्यानें अवंतणें नेदितां । भोजनीं न येववे गृहस्था । तेंवी तुवां न फुंकितां । अग्नि सर्वथा प्रबळेना ॥ ११० ॥

पोफळ नेदितां यजमानासी । होम न करवे हो त्यासी । तुंवा न फुंकितां अग्नीसी । तो पुच्छासी स्पर्शेना ॥ १११ ॥

गृहस्थें न करितां ब्रह्मार्पण । आपोषण न घेती ब्राह्मण । अग्नि न फुंकितां रावण । हुताशन प्रबळेना ॥ ११२ ॥

एक मुखें एक फुंकिती । दहा मुखें तुज आहेती । तुवां फुंकितां लंकापती । पुच्छ प्रदीप्ती हुताशें ॥ ११३ ॥

हनुमंताच्या निज युक्ती । सत्य मानल्या लंकापती । पुच्छासी फुंकावयाप्रती । केली आयती ते ऐका ॥ ११४ ॥

करुनिया शुद्धाचमन । प्रथम देउनी घृतावदान । फुंकावया हुताशन । दशवदन बैसला ॥ ११५ ॥

हनुमान मारावा जाळुन । येणें आक्रोशें रावण । फुंकावया हुताशन । दशवदन बैसला ॥ ११६ ॥ [ओवी ११६ मु. प्रतीत नाही.]

रावणाचिया पोटीं कपट । कपी जाळावा पूंसेसगट । येणें आवेशें दशकंठ । फुंकू हव्यवाट बैसला ॥ ११७ ॥

घृतेन परिषिच्याथ तेऽग्निं तत्रावपातयन् । लांगूलेन प्रदीप्तेन राक्षसांस्तान्विलोकयन् ॥ ५ ॥

रावणाचें निज चित्तीं । माझेनि मुखें पुच्छप्रदीप्ती । सांग जाळिलिया मारुती । जगीं मत्कीर्ति [वि. 'फांकेल'; तु. 'उरेल'; दै. 'पुरेल'; मु. 'स्फुरेल'.] स्फारेल ॥ ११८ ॥

ऐसा धरुनी अभिमान । रावणें फुंकितां हुताशन । भडका एकसरें उठोन । जाहले दहन दाढ्यामिशा ॥ ११९

अनुक्रमणिका

॥

रावण तोंड परतें करी । हनुमान पूंस उचली वरी । पहिला अपमान राजशिरीं । केली बोहरी खांड मिशा ॥ १२० ॥

प्रथम प्रारंभीं अपमान । दाढ्यामिशा झालें दहन । सिंहासनीं काळें वदन । लज्ज्ञायमान रावण ॥ १२१ ॥

कीर्ती झाली अपकीर्ती । दुसरी लज्ज्ञा रावणा चित्तीं । पुढें काय करील मारुती । चिंतावर्तीं रावण ॥ १२२ ॥

एका जनार्दना शरण । हें प्रथम पुच्छ प्रकरण । पुढां असून गंजन । पुरदहन अवधारा ॥ १२३ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां पुच्छप्रदीपनं नाम अष्टादशप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग एकोणिसावा

## राक्षसदमन लंकादहन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

[तु. वि. दै. ‘पुच्छाग्री’.] **पुच्छाग्नि फुंकितां रावण । भडकोनि उठिला हुताशन ।**
**हनुमान पितयासी सांगे आपण । करी अपमान रावणाचा ॥ १ ॥**

**ऐकोनि पुत्राचें वचन । वायूनें वन्ही प्रज्वळून । रावणाचें मुख पोळवून । केलें दहन खांडमिशा ॥ २ ॥**

**अपमानला दशानन । ओठ पोळले दारुण । शंख करुं न सके रावण । टिरी थापटून आक्रंदे ॥ ३ ॥**

**उफराटें शंखस्फुरण । गुद त्राहटुनी करी रावण । प्रथम पावला अपमान । पुच्छदहन भलें नव्हे ॥ ४ ॥**

लांगूलेन प्रदीप्तेन बालसूर्यसमाननः । ततश्छित्वात्मनः पाशं वेगवान्स महाकपिः ॥ १ ॥
उत्पपाताथ वेगेन ननाद च महाबलः । सपुरद्वारमाश्रित्य शैलश्रृंगमिवोन्नतम् ॥ २ ॥
प्रदीप्तोग्नी रथं कस्मान्न करोति च मेरुजम् । रामप्रसादादाश्चर्यं न मां दहति पावकः ॥ ३ ॥
शिशिरस्येव संघातो लांगूले मे प्रतिष्ठितः । अथोपस्थितसर्वांगः स्वस्थसर्वेंद्रियक्रियः ॥ ४ ॥
हनुमान् चिंतयामास कर्तव्यं शेषकर्मवित् ॥ ५ ॥

**रावण विचारी विवेकमार्गी । आम्ही पूंसासी लाविली आगी ।**
**ते हित नव्हेची आम्हांलागीं । वानर सर्वांगीं निःशंक ॥ ५ ॥** [ओवी ५ मु. प्रतीत .नाही]

**छळुनी जाळितां कपीसी । छळण न चले रामभक्तासी ।**
**छळुनी जाळिले माझिया मुखांसी । दाढ्यामिशासी दाहूनी ॥ ६ ॥**

**पुच्छदीप्तीं हनुमंत । शोभे जैसा बालादित्य । पुच्छतेजें तो किरणावर्त । निशाचरांत कपिपुच्छ ॥ ७ ॥**

**उगवलिया कपि दिवाकर । अस्त पावती निशाचर । रावण निर्दळील अंधार । घेउनी समग्र** [दै. ‘राशी’; वि. ‘गती’.] **गर्वरात्री ॥ ८ ॥**

**उड्डाण देतां वानरास । छेदिले रज्जु दृढ पाश । निर्दळुनी ब्रह्मपाश । नामें भवपाश छेदिले ॥ ९ ॥**

**रामनामाचिया आवर्तीं । सप्तपाश विनिर्मुक्ती । पावोनिया स्वयें मारुती । गर्जे त्रिजगती स्वानंदें ॥ १० ॥**

**काळपाश कर्मपाश । धर्मपाश ब्रह्मपाश । मायापाश मोहपाश । जन्मपाश सातवा ॥ ११ ॥**

अनुक्रमणिका

काळपाश तो आयुष्यघात । कर्मपाश तो अनैश्वरवंत । धर्मपाश तो आश्रमगत । वेद विहितार्थ ब्रह्मपाश ॥ १२ ॥

देहममता मोहपाश । मुख्य माया तो आशापाश । कनककांता हा जन्मपाश । सप्तपाशीं जीव बद्ध ॥ १३ ॥

सप्त पाशांची निवृत्ती । रामनामें करी मारुती । येरांच्या न चले युक्ती । पडे गुंती देहपाशीं ॥ १४ ॥

आठवा पाश तो वितंड । त्याचे पोटीं पाश उदंड । ज्याचें नांव पाषांड । काळें तोंड पैं [मु. 'कर्त्याचें'.] त्याचें ॥ १५ ॥

सकळ पाशांचे छेदन । करावया रामनाम प्रवीण । नामें हनुमंत संपन्न । पाश छेदन तेणें केलें ॥ १६ ॥

पूंसीं धडाडितां वन्ही । हनुमान लोळे गडबडुनी । पाश धारी गेले पळोनी । धुकधुकुनी अपधांके ॥ १७ ॥

जंव जंव पूंस धडाडित । तंव तंव [वि. 'पोळेना'.] पळेना हनुमंत । द्वंद्व निराशी साह्य रघुनाथ । नित्य निजभक्त साहाकारी ॥ १८ ॥

द्वंद्वनिराशी वाडेंकोडें । सूक्ष्मरूपें निजनिवाडें । श्रीरामभक्ता मागेंपुढें । चहुकडें कोंदाटे ॥ १९ ॥

ऐसा साह्य श्रीरघुनाथ । द्वंद्वबाधा कैंची तेथ । द्वंद्व तें सुखरूप होत । द्वंद्वनिर्मुक्त हनुमंत ॥ २० ॥

पुच्छीं धडाडी हुताश । हनुमंतासी अति संतोष । पुच्छीं बांधिला अमृतांश । ऐसा उल्लास वानरा ॥ २१ ॥

पुच्छीं पेटला वैश्वानर । खेवां आला शरच्चंद्र । ऐसा उल्लासे कपींद्र । रामचंद्र निजसाह्य ॥ २२ ॥

रामनामाची नवलगोष्टी । द्वंद्वाचिये पाठींपोटीं । राम चिद्रूप दावी दृष्टी । निर्द्वंद्व सृष्टी रामनामें ॥ २३ ॥

रामनामा परतें । साधन नाहीं सरतें । अग्नि बांधूं न शके मातें । कृपा रघुनाथें मज केली ॥ २४ ॥

पुढील कथेचा कथितार्थ । जंव जंव पुच्छ धडाडित । तंव तंव हनुमान तळमळित । राक्षसां [मु. 'शांत'.] अंत करावया ॥ २५ ॥

नेत्रीं लाविली अर्धचंद्री । खरसी आणिली मुखांतरीं । पुच्छ पसरोनी धरेवरी । मरणानुकारी निचेष्ट ॥ २६ ॥

राक्षस येऊनि समस्त । त्यातें हालवोनी पहात । तंव तो न हालवी पायहात । वानरे दांत विचकिले ॥ २७ ॥

एक उलथें पालथें करिती । एक उफराटे धरिती । तंव पुच्छाग्नीनें पोळती । मग पळती माघारें ॥ २८ ॥

एक ढुंगी घालिती काड्या । एक हाणिती फडाफडा । वानरु मिषकरु गाढा । दांत दाढा हलवीना ॥ २९ ॥

अनुक्रमणिका

मीस करोनी अति निगुती । हालों नेदी पातयापाती । म्हणती निमाला मारुती । करुनी ख्याती [तु. 'वानरू'.] रणमारें ॥ ३० ॥

वानर वीर जगजेठी । मारिल्या राक्षसांचिया कोटी ।
इंद्रजिता रावणा धुकधुक मोठी । अवघियांचें पोटीं अति धांक ॥ ३१ ॥

जरी हा मरण न पावता । करिता अवघियांचें घातां । गाढी बुद्धि लंकानाथा । छळें हनुमंता मारिलें ॥ ३२ ॥

आमुचें दळीं इंद्रजित बळी । त्याची केली रणरांगोळी । वीर मारिले आतुर्बळी । कोण त्यासवें फळी घेऊं शके ॥ ३३ ॥

रावणासी नाहीं बळ । परी करु जाणें स्वयें छळ । पेटवोनिया लांगूळ । गोळांगुळ मारिला ॥ ३४ ॥

सत्यवादी वानर पूर्ण । पाळोनि श्रीरामाची आण । सांगोनिया निजमरण । आपणा आपण मारविलें ॥ ३५ ॥

वैद्य पाहती विचक्षण । म्हणती हृदयीं आहे प्राण । तोही अतिशयेसी क्षीण । क्षणार्धें पूर्ण निमेल ॥ ३६ ॥

हनुमंत निमाला ऐकोनि वाणी । घावो घातला निशाणीं । इंद्रजित हर्षला मनीं । रावणें शेरणी वाटिली ॥ ३७ ॥

राक्षसी सांगती सीतेपासीं । तुवां संवाद केला ज्या कपीसी ।
आगी लावोनि त्याचें पुच्छासी । रावणें त्यासी मारिलें ॥ ३८ ॥

श्रुत्वा तद्ववचनं क्रूरमात्मप्रहरणोपमम् । जानकी शोकसंतप्ता हुताशन मुपागमत् ॥ ६ ॥
यद्यस्ति गुरुशुश्रुषा यद्यस्ति चरितं तपः । तदिमं तारयत्वार्यः शिवो भव हनुमतः ॥ ७ ॥

मारिलें ऐकोनि कपीसी । सीता जाहली कासाविसी । जठराग्नी आणोनि ध्यानासीं । स्वयें त्यासी प्रार्थित ॥ ३९ ॥

जरी मज श्रीरामाची गुरुभक्ती । श्रीरामसेवा तपःसंपत्ती । श्रीरामभक्ती जरी हनुमंतीं । तरी मारुती वांचवी ॥ ४० ॥

ऐकोनि सीतेचें वचन । अग्नि घाली लोटांगण । वाहतों श्रीरामाची आण । नाहीं मरण हनुमंता ॥ ४१ ॥

ऐकें हनुमंताची प्रौढी । लंका जाळील रोकडी । मारील राक्षसांचिया कोडी । जाळीली दाढी रावणाची ॥ ४२ ॥

रावणाचा अपमान । हनुमान करील [मु. 'पुरदहन'.] मुखदहन । ऐसें ऐकोनिया वचन । सुखसंपन्न जानकी ॥ ४३ ॥

अनुक्रमणिका

हनुमान निमाला निःशेष । पाहों आले अवघे लोक । त्याचें पहावया मुख । एक एक दाटलें ॥ ४४ ॥

मिळवावया राक्षसमांदी । मीस घेतलें निजबुद्धी । अवघियां वधावया त्रिशुद्धी । पेटलें द्वंद्वीं तें ऐका ॥ ४५ ॥

दाटलिया राक्षसांचिया हारी । जळत पुच्छ घाली त्यांवरी ।
तंव पोळती उरीं शिरीं । आली महामारी राक्षसां ॥ ४६ ॥

घुसघुसऊं बाबर झोंटी । [अं. 'लोळविल्या'.] लोंबलिया [अं. 'राक्षश कोटी';] राक्षसपृष्ठीं । पुच्छ तयामाजी दाटी । बोंब उठी देहदाहें ॥ ४७ ॥

पळों जातां पैं बाहेरी । जळत पुच्छ लावी द्वारीं । अवघियां केली कोंडमारी । निशाचारीं आकांतु ॥ ४८ ॥

एकाच्या वस्त्रा लाविली आगी । तेणेंचि जळती सर्वांगीं ।
पुच्छ घाली एकाचें ढुंगीं । नेसणिया आगी लावी एकां ॥ ४९ ॥

एकाची मुंडासीं जळत । फेडूं जातां पोळले हात । वीरमस्तका दाहो होत । एकाचे जळत कटिबंध ॥ ५० ॥

आगी लागली धोत्रासी । द्विज पोळलें लिंगप्रदेशीं । नागवे नाचती रावणापासीं । दाविती त्यासी निजलिंग ॥ ५१ ॥

रावण तेथें लावी हात । काहीं तरी व्यथा होईल शांत । वेद विभागी तूं पुण्यवंत पद्महस्त पैं तुझा ॥ ५२ ॥

कन्या संक्रांतीं दुष्कर्म । करूं नये श्मश्रुकर्म । शष्पें वाढलीं पैं परम । कोपानुक्रम न करावा ॥ ५३ ॥

हनुमान मारिला राजद्वारीं । निशाणें त्राहाटिल्या भेरी ।
जळो जळो रावणा तुझी थोरी । जोहारमारी त्वां केली ॥ ५४ ॥

लंका नागविली वस्त्रासाठीं । तेलातुपा पाडिली तुटी ।
दीप लावणें खुंटली गोष्टी । शेखी [मु. 'आटी'.] जिवासाठीं मांडिली ॥ ५५ ॥

रावण म्हणे गा हनुमंता । लोकां जाळिसी कवण्याअर्था । सावध ऐके लंकानाथा । तुज तत्वतां सांगेन ॥ ५६ ॥

पुच्छासी मरण आलें निश्चित । मरण भयें झडा देत । भेणें लोकांमाजी दडत । त्यासी म्यां येथ काय कीजे ॥ ५७ ॥

एकाचे चरण धरित । एकाचे पाठी रिघत । एकाचे पाळवा झोंबत । मरणभयातें चुकवावया ॥ ५८ ॥

एकासी होतें शरणांगत । एकाचे गळां पडत । विनवोनिया लंकानाथ । मरणमुक्त करा म्हणे ॥ ५९ ॥

अनुक्रमणिका

उरीं शिरीं जाळी सर्वांसी । या नांव तूं शरण म्हणसी । भली बुद्धि तुज हनुमंतासी । राक्षसांसी मारावया ॥ ६० ॥

पुच्छ खवळलिया येथ । रावणा चुकलासी निश्चित । तोही सांगेन गुह्यार्थ । सावचित्त अवधारी ॥ ६१ ॥

पुच्छ उघडें पडलिया तिळभरी । मरण न ये पुच्छावरी । करील लंकेची बोहरी । महामारी राक्षसां ॥ ६२ ॥

पूर्वी म्यां सांगितलें होतें । तुवां उपेक्षोनिया त्यातें । न सांभाळितां पुच्छातें । अग्नि तेथें लाविला ॥ ६३ ॥

पुच्छ तींठाई उघडें होतें । तेणें मरण न येचि त्यातें । परतलें अग्निक्षोभार्थे । विविध घातें घातावया ॥ ६४ ॥

राक्षस मारील महाबळी । करील लंकेची होळी । बुजोनी खंदकाची पाळी । पाडील पौळी दुर्गाची ॥ ६५ ॥

पूंस क्षोभलें अति क्षोभतां । माझेंनि वारेना माझिया हातां । सत्य जाण लंकानाथा । करील घाता लंकेचा ॥ ६६ ॥

जरी असेल आंगवण । तरी पुच्छेसी करावें रण । माझेनि निवारेना जाण । क्षोभलें पूर्ण कपिपुच्छ ॥ ६७ ॥

ऐसें बोलतां हनुमंतां । जळत पुच्छ राक्षसांचे माथां । वाजलें पैं अति निघातां । वीर विघातां मांडिलें ॥ ६८ ॥

पुच्छाभिघात महाबळी । संवेचि अग्नि सर्वांग जाळी । राक्षसां मांडली महाहोळी । रणरांगोळी महावीरां ॥ ६९ ॥

रावणापासीं हनुमंत । निःशंक बैसला सावचित । पूंसें मांडिला आकांत । अग्निसंपात राक्षसां ॥ ७० ॥

राक्षस सैन्यामाझारीं । बोंब सुटली एकसरी । अग्नि पोळीत उरींशिरीं । पुच्छ महामारीं मारित ॥ ७१ ॥

मिळोनी महावीर समस्त । मारावयां हनुमंत । धांविन्नले शतसहस्त्र । जेवीं कां मत्त मातंग ॥ ७२ ॥

वीर करूं येतां घात । हनुमंत स्वानंदें नाचत । उड्डाण करोनी उद्धुत । मग गर्जत भुभुःकारें ॥ ७३ ॥

जैसे गिरिशिखराकार । तैसे राजगृहाचें पूर्व द्वार । तेथें बैसला वानर । निशाचर लक्षोनी ॥ ७४ ॥

पूर्वद्वारीं आगळ होती । तीच घेवोनिया हातीं । रणीं मिसळला मारुती । राक्षसां शांती करीतचि ॥ ७५ ॥

पुच्छ महावीरांतें जाळी । हनुमान मारी आतुर्बळी । राक्षसांची रणरांगोळी । केली तत्काळीं वानरें ॥ ७६ ॥

हनुमान निमाला म्हणोनी । निशाणघाई वांटिली शिरणी । तोंची उठिला राक्षसदळणी । महापळणी मांडिली ॥

अनुक्रमणिका

**पळावया पैं पुरती । सवडी नाहीं यथा रीती । लंका पेटली दहनावर्ती । द्वंद्वा मारुती पेटला ॥ ७८ ॥**

**पुच्छ म्हणिजे अग्निकल्लोळ । लंकापौळी जाळी सकळ । राक्षस करिती तळमळ । न चले बळ पुच्छासीं ॥ ७९ ॥**

**रावण अन्यायी परोपरी । वस्त्रें नागविलीं नगरी । तेलतुपा करोनी बोहरी । पुच्छ वानरी पेटविलें ॥ ८० ॥**

**पुच्छ पेटविलें मारायासी । तेंचि हत्यार जाहलें त्यासी । जाळों लागलें लंकेसी । राक्षसांसी देहदाहो ॥ ८१ ॥**

> यो ह्ययं मम लांगूले दीप्यते हव्यवाहनः । तस्य संतर्पणं न्याय्यं कर्तुमेभिर्गृहोत्तमैः ॥ ८ ॥
> ततः संदीप्तलांगूलः सविद्युदिव तोयदः । भवनाग्रेषु लंकायाः विचचारानिलात्मजः ॥ ९ ॥
> मुमोच हनुमानग्निं प्रदीप्तश्च हुताशनः । साचिव्यं तस्य कुर्वाणः सुतस्य सुतवत्सलः ॥ १० ॥
> ततोऽनलानिलौ क्रुद्धौ हनुमांश्चैव वीर्यवान् । परितप्य तदा लंकामासमंताददीपयत् ॥ ११ ॥
> विमानानीव सिद्धानामंबरात्पुण्यसंक्षये । दग्ध्वा ज्वालाभिरग्नेश्च निपेतुर्धरणीतले ॥ १२ ॥

**हनुमान विचारी निज मानसीं । अग्नि लागला माझे कांसेसी ।**
**परमातिथ्य करू यासी । देऊं भक्षादयासी गृहें उत्तम ॥ ८२ ॥**

**विचारितां मूळानुवादु । वेदानुवादें सखे बंधु । दोहींचा वायु पिता प्रसिद्धु । परम सुहृदु आप्तत्वें ॥ ८३ ॥**

**सखा बंधु साचोकारें । तृप्ती देऊं परमादरें । रत्नखचित माडिया गोपुरें । हेममंदिरें मणियुक्त ॥ ८४ ॥**

**ज्येष्ठ बंधु अतिवरिष्ठ । भोजनीं लंकाभुवन ताट । राजमंदिरें परमश्रेष्ठ । भक्ष्य चोखट तें ऐका ॥ ८५ ॥**

**श्वेत पीत क्षौमांबरें । प्रथम भोजनीं क्षीरशर्करें । मणिमुक्तहार संभारें । घृताभिधारें शोभती ॥ ८६ ॥**

**चंदनमंदिरें तें ओदन । उपस्कर ते वरान्न । पताका खडिखडिती जाण । अथिका पूर्ण फुरफुरीत ॥ ८७ ॥**

**तिळ तांदुळ कणांचिया राशी । घृतशर्करा प्राणाहुतीसी । नगरगृहें ग्रासोग्रासीं । पूर्ण तृप्तीसीं भक्षावया ॥ ८८ ॥**

**जे जे आवडेल गोडी । ते ते पुरवीन रोकडी । घरोघरींच्या उतरंडी । स्वेच्छा परवडी सेवावी ॥ ८९ ॥**

**जे जे गृहीं गृहसामुग्री । ते ते लोणची कोशिंबिरीं । तिखट शस्त्रें रायतीं खरीं । कवाडें करी पापड ॥ ९० ॥**

**विचित्र पडदे आणि वितानें । नानाकुसरीची वरासनें । तींचि परवडी पक्वान्नें । चांदवे ते चाकुळिया ॥ ९१ ॥**

**बांधलें बोचकें लाडूभक्षण । स्त्रियांची पोती तिळवे जाण । पर्यंक आणि परिस्तरण । फेणिया पूर्ण सपदरा ॥**

अनुक्रमणिका

९२ ॥

गादिया पसारे पोतडीं । सांड्या काचऱ्या कुरवंडी । तेथेच पैं भुगवडी । तबक परवडी आंबवडें ॥ ९३ ॥

ध्वजस्तंभ वरी लवण । मंडपदाह दधिओदन । तृणघराचें जें दहन । उत्तरापोशन समाप्तीं ॥ ९४ ॥

सखा बंधु हुताशन । आदरें द्यावया भोजन । हनुमंतासी उल्लास पूर्ण । पुरदहन अवधारा ॥ ९५ ॥

अनिळानळ हनुमंत । तिघे क्षोभलें अत्यद्भुत । लंका करावया भस्मांत । तिघे समवेत चालिले ॥ ९६ ॥

पुच्छाग्नी अति प्रदीप्त । हनुमान विचरे लंकेआंत । अग्नि लावी जेथिच्या तेथ । अति आकांत लंकेसी ॥ ९७ ॥

कपि बैसोनि लंकाशिखरीं । आगी लावी घरोघरीं । कळकळती नरनारी । आपांपरी राक्षसां ॥ ९८ ॥

जळतीं घरें धवलारें । हाट हाटवटिया चौबारे । माडिया उपरीया गृहेंगोपुरें । अग्नि वानरें लाविला ॥ ९९ ॥

घरें तळघरें वोवरें । पीतांबर सांठवण पेटारे । मठ मंडपचत्वरे । आगी वानरें लाविली ॥ १०० ॥

पाकशाळा पाठशाळा । आगी लावी विचित्र शाळा । यंत्र तंत्र मृदंगशाळा । निघती ज्वाळा धडधडीत ॥ १०१ ॥

शस्त्रशाळा अस्त्रशाळा । कंडणी पेशणी दासी तत्वशाळा । मनी मयूप सुमनशाळा । जीवनशाळा जाळित ॥ १०२ ॥ [ओवी १०२ मु. प्रतीत नाही.]

अश्वशाळा गजशाळा । कनक कोठारें संग्रहशाळा । रंगशाळा भोगशाळा । गंधर्वशाळा जाळित ॥ १०३ ॥

लंकादुर्गीं सभोंवत । गडपाळ पैं सैन्य जाळित । तेही छळे बळे समस्त । हनुमंतें जाळिलें ॥ १०४ ॥

लंकादुर्ग दारवंटे । जाळिल्या अर्गळा कपाटें । मोकळे सातही दारवंटे । आगड मर्कटें बुजविलें ॥ १०५ ॥

आगी लावोन प्रबळबळी । खचले हुडे दुर्गाच्या पौळी । आगड बुजिलें तत्काळीं । मांडिली होळी दुर्गाची ॥ १०६ ॥

आगी लावोनी भडभडां । दुर्गाचे हुडे चहूंकडां । खचोनि पडती धडधडां । होत रगडा राक्षसां ॥ १०७ ॥

हुडे खचती धडधडां । तळीं राक्षसांचा होय चुराडा । तेणेंचि बुजित आगडा । पुढें झगडा जिंतावया ॥ १०८ ॥

अनुक्रमणिका

पाडित दुर्गाचिया पौळी । आगड बुजीत समूळीं । श्रीराम यावया सदळीं । वाट मोकळी करितसे ॥ १०९ ॥

हनुमान बैसला निवांत । पुच्छ धांवें जेथींचें तेथ । आगी लावोन समस्त । ज्वाळाकुळित केली लंका ॥ ११० ॥

कपि म्हणे पितया पवनासी । भोजन देतां सख्या बंधूसी । ज्येष्ठ बंधू पूज्य आम्हांसी । साह्य त्यासी त्वां व्हावें ॥ १११ ॥

ऐसें विनवितां मारुती । वायु सुखावला चित्तीं । दोघे पुत्र पढियंती । साह्य सर्वार्थी तो जाहला ॥ ११२ ॥

अग्नि वायूचा ज्येष्ठ सुत । भेटला कनिष्ठ हनुमंत । सुतें आलिंगिला सुत । उल्लासत स्वयें वायु ॥ ११३ ॥

वायू साह्य जाहला अग्नीसी । लंका कवळोनि चौपासीं । ज्वाळा उठिल्या बहुवर्णेसी । सावकासीं अवधारा ॥ ११४ ॥

> क्वचित्कांचनवर्णाभस्तपनीयनिमः क्वचित् । क्वचिदायसवर्णाभः क्वचिच्च रजतोमः ॥ १३ ॥
> फुल्लाशोकनिभः क्वापि क्वचित्किंशुकसन्निभः । क्वचिद्धूमावृतः श्यामो विधूमो ज्वलनः क्वचित् ॥ १४ ॥
> इंद्रायुधनिभो भूत्वा नानावर्णः क्वचित्क्वचित् ॥ १५ ॥

कोठें कांचवर्णज्वाळा । कोठें केवळ पिवळा । कोठें कर्कोटक काळा । भासती ज्वाळा अग्नीच्या ॥ ११५ ॥

कोठे हिरण्यवर्ण निर्मळा । भासती अतिशुभ्र ज्वाळा । कोठें अशोककुसुमकळा । आरक्त ज्वाळा भासती ॥ ११६ ॥

किंशुक फुललें वसंतीं । तैंसी सिंदूरदीप्ती । कोठें ज्वाळा धूमाकुलिती । कोठें लखलखिती सोज्ज्वळा ॥ ११७ ॥

आरक्तश्याम एकत्र प्रभा । इंद्रधनुष्यासम शोभा । नीलोत्पलसन्निभा । पद्मगर्भा भासती ॥ ११८ ॥

ज्येष्ठ पुष्करीं कमळानेका । तैसी ज्वाळाकुळित लंका । विमानीं आभासत लोकां । आणि सकळिकां भूतळीं ॥ १ १९ ॥

ज्वाळा भरतांचि गगनीं । जावोनी झोंबलिया विमानीं । ज्वाळमाळा किंकीणी । पडतीं धरणीं विमानें ॥ १२० ॥

वेंचलिया निजपुण्यसंपत्ती । जेवीं स्वर्गस्थां होयच्यूती । तेवीं विमानें ज्वाळाकुळिती । सवेग पडती भूतळीं ॥ १२१ ॥

जैसा प्रळयकाळींचा अग्नी । जाय सत्यलोकां ठाकोनी । तेवीं लंकादहनवन्ही । झोंबे धांवोनि निराळीं ॥

१२२ ॥

**श्वापदें पळाली जीव घेऊनी । पक्षी किलकिलिती गगनीं । देव पळती विमानीं । पाताळीं पळती पन्नग ॥ १२३ ॥**

**मारुत मारुती आणि वन्ही । लंका जाळिती तिघीजणी । तापें तापली धरणी ।** [मु. 'सर्व'; तु 'शेष सर्प'.] **सर्प फणी पोळले ॥ १२४ ॥**

**सर्प पोळोनिया फणी । दडाले अर्णवियां जीवनीं । शेष पोळेना फणिमणीं । शेषशयनीं श्रीराम ॥ १२५ ॥**

**लंका जाळितां मारुती । तापें तापली त्रिजगती । लंकाजन अति आवर्ती । आली शांती राक्षसां ॥ १२६ ॥**

**खळबळला हव्यवाट । वंश फुटती तडतडाट । वन्हीशब्द चटचटाट । अती आकांत राक्षसां ॥ १२७ ॥** [ओवी १२७ मु. प्रतीत नाही.]

> ततस्ते राक्षसाः सर्वे सरावणमहाबलाः । बालवृद्धाश्च शोचंतो निर्ययुर्नगराद्बहिः ॥ १६ ॥
> परस्परमवष्टभ्य हस्तं हस्तेन वेश्मनि । धूमाश्रुवद्भिर्नयनैः क्रोशंतश्चेतरेतरम् ॥ १७ ॥
> स्त्रियश्च ज्वलनाविद्धा भ्रमंत्यो वै ततस्ततः । आक्रोशात् पतनासक्ताः धरण्यां रजनीचराः ॥ १८ ॥
> बभ्रमुस्तत्र तत्रैव ज्वालामालाकुले पथि ॥ १९ ॥

**राक्षस सांगती रावणातें । तुवां पुच्छ पेटवोनिया येथें । कां खवळिले वानरातें । मारिलीं समस्त कपिपुच्छें ॥ १२८ ॥**

[दै. तु. 'पीडिले'.] **पहिलें कपिपुच्छ दुर्धर । त्यासी अग्नि जाहला साहाकार । लंका जाळिली गिरिकंदर । दुर्ग समग्र जाळिले ॥ १२९ ॥**

**अग्निबळाच्या समेळी । दुर्गाचि रे करोनि होळी । पाडोनि दुर्गांचीया पौळी । खंदक समूळीं बूजिला ॥ १३० ॥**

**बळें दुर्धर माकड । आवळीला हाणोनि झड । दुर्ग पाडोनि आगड । सभोंवतां बूजिला ॥ १३१ ॥**

**दुर्गासभोंवतीं चौफेरे । भरली होतीं अग्नियंत्रें । आगी लावितां वानरें । तीं एकसरें सूटलीं ॥ १३२ ॥**

**एकवेळें समकाळ । सुटले यंत्रांचे यंत्रगोळ । नगरीं उठला हल्लकल्लोळ । वीर सबळ निमाले ॥ १३३ ॥**

**पाडोनि दुर्गाची पैं भटी । नगर जाळिलें उठाउठीं । वृद्धें आतुरें अति संकटीं । स्त्रिया बाळापाठीं लावी अग्नि ॥ १ ३४ ॥**

**जरी वीरांचें बळ गाढें । काय करिती अग्नीपुढें । रावणा तुवां केलें कुडें । मरण रोकडें तुज आलें ॥ १३५ ॥**

अनुक्रमणिका

अग्नि लाविला चौफेरीं । बोंब उठली एकसरी । अति आकांत घरोघरीं । आपांपरी स्त्रियाबाळां ॥ १३६ ॥

अगे तूं जळसी रोकडी । दुजी पाउलें आंसुडी । तंव ते नागवी उघडी । पडे उपडी लोकलाजें ॥ १३७ ॥
[ओवी १३७ मु. मुं. पै. खेरीज इतरत्र नाही.]

पुच्छ येतां देखोनि बिदीं । जन पळती सांदोसांदीं । जेथें देखें बहुत मांदी । पुच्छ त्रिशुद्धी घाली तेथें ॥ १३८ ॥

बाबर झोटिया पोळी शीरीं । लोवाळे अंगें जाळे चौफेरी । पुच्छ दाटतां एकसरी । जळती निरी स्त्रियांच्या ॥ १३९ ॥ [ओवी १३९ मु. प्रतीत नाही.]

आगी लाविली वस्त्रांत । मरणभयें तें फेडीत । मागेंपुढें देवोनि हात । स्त्रिया धांवत नगरीं पैं ॥ १४० ॥

अग्नीनें पोळिले बहुते । एके कण्हते कुंथते । एके अतिशये [तु. दै. 'धाकिते'; तं. 'थुंकिते'.] थकिते । तळमळीते पैं येके ॥ १४१ ॥

आगी देखोनि चौफेर । बाळवृद्ध दीन आतुर । स्त्रिया घेवोनि कुमर । अति सत्वर धांवती ॥ १४२ ॥

येर येराचा धरुनी हात । हाका बोंब शंख करीत । पिता पुत्रातें पाचारीत । पुत्र हाकीत पितयातें ॥ १४३ ॥

दाहो देखोनि स्वधामा । आपांपरी [कं. 'राक्षस'.] सकळ ग्रामा । राम्या शाम्या धांवे धर्म्या । [मुं. 'तारी आम्हां'.] पावरे पद्म्या आकांती ॥ १४४ ॥

धांव [तु. दै. मुं. 'वेंकटेशा'.] विकटास्या पाव विमुखा । धांवरे सुपुत्रा दुर्मुखा । ऐशा आक्रंदे देती हांका । वानरें लंका जाळिली ॥ १४५ ॥

निघावया गांवा बाहेरी । मिळोनि [तु. दै. 'लहानथोरी'.] जनांचिया हारी । वेगीं येतां नगरद्वारीं । तंव चौफारी कपिपुच्छ ॥ १४६ ॥

जे जे द्वारीं निघों जात । पूंस धगधगीत तेथ । निर्गम न पुरे निश्चित । जन भ्रमत अति भ्रांती ॥ १४७ ॥

जळत्या घरामाझारीं । माता सांडोनी म्हातारी । खांदीं घेवोनि निज नारी । पळे बाहेरी स्त्रीलोभी ॥ १४८ ॥

पति सांडोनि जळत्या घरीं । हातीं कुमर कडियेक्रांरी । स्त्री निघे घराबाहेरी । तुम्ही बरव्यापरी घर राखा ॥ १४९ ॥

जळत चण्याचे पडिले टेक । फुटाणे खावे लागलिया भूक । माथणी भरली शीतलोदक । घर [मु. 'सम्यक'.] समग्र राखावें ॥ १५० ॥

अनुक्रमणिका

घरधणी राखण घरीं । बाळें पडोत अग्निबाहेरी । लेकरें घेवोनि कडियेवरी । पळती नारी सवेग ॥ १५१ ॥

एकी एकासी म्हणे आतां । तुझी होईन मी कांता । स्वपती न भेटे आकांता । म्यां तो सर्वथा सांडिला ॥ १५२ ॥

एक भुलली सुंदर । भेटे त्यासी म्हणे भर्तार । मी तंव तुमची स्वदार । [वि. तं. 'आज्ञाधार'; मु. 'अंगिकार'.] अग्नोद्धार करी माझा ॥ १५३ ॥

ऐसी भ्रमली नेणो किती । नगरामाजीं परी भ्रमती । धूमाकुल ते नेत्र स्त्रवती । आक्रंदती अति दुःखें ॥ १५४ ॥

> वज्रविद्रुमवैदूर्यमुक्तारजतसंहतान् । विचित्रान्भवने धातून् स्पन्दमानान्ददर्श सः ॥ २० ॥
> नाग्निस्तृप्यति काष्ठानां नाग्नेः स हरिपुंगवः ॥ २१ ॥

हिरे वैदूर्य प्रवाळें । रत्न माणिकें मुक्ताफळें । रत्नखचित राउळें । जाळिलीं सकळे वन्ही ज्वाळीं ॥ १५५ ॥

जंव जंव जाळी लंकाभुवन । तृप्ती न पवेचि हुताशन । लंका न जाळावी आपण । न मानी मन मारुतीचें ॥ १५६ ॥

अग्नि आणि हनुमंत । पिता वायू साह्य तेथ । लंका जाळूनी समस्त । केले हताहत राक्षस ॥ १५७ ॥

ऐसी जाळूनिया नगरीं । आला रावणाचिया गृहावरी ।
अग्नि लाविला राजमंदिरी । आपांपरी राणिवसा ॥ १५८ ॥

> रक्तोत्पलनिकाशाश्च दृश्यन्ते पावकार्चिषः । रावणांतःपुरं चैव दह्यते सर्वतोऽग्निना ॥ २२ ॥

रावणाचीं घरानघरें । सातखणी नवखणी मंदिरे । माड्या उपऱ्या गोपुरें । घरें तळघरें जाळिलीं ॥ १५९ ॥

रावणाचें [मु. 'सेजागार'.] सेजार । निद्रा करिते निज मंदिर । राणिवंसाचे घरानघर । वानरें समग्र जाळिलीं ॥ १६० ॥

लंकेच्या कड्या कपाटांत । मंदोदरी समवेत । राण्या लपल्या समस्त । अग्नि तेथ पावेना ॥ १६१ ॥

रावण बैसला होता जेथ । कपिपुच्छ पावले तेथ । राक्षस मिळोनि समस्त । अति आकांत मांडिला ॥ १६२ ॥

रावण काढावा बाहेरी । नाहींतरी [मु. 'पाडील'; कं. मुं. 'जळेल'.] पडेल पुच्छ जोहरीं । दुर्ग पाडुनी निशाचरीं । कष्टांतरीं मार्ग केला ॥ १६३ ॥

बाप कपिपुच्छाची थोरी । जळत [वि. 'ठेलें'; तु. दै. 'ठेविलें'; मुं. 'वेढिलें'.] टेकिलें तेंहि द्वारी । निर्गम पुरेना बाहेरी ।

अनुक्रमणिका

हाहाकारी गर्जती ॥ १६४ ॥

विघ्न आलें रावणावरी । बोंब सुटली निशाचरीं । इंद्रजित धांकें निज जिव्हारीं । होईल बोहरी रायाची ॥ १६५ ॥

तिये काळीं निशाचरीं । निवडोनिया निधडे वीरीं । सन्नद्ध बद्ध शस्त्रास्त्रीं । वानरावरी लोटले ॥ १६६ ॥

ते प्रदीप्तैश्च शालाग्रैः पाशैः खड्गैः परश्वधैः । हनूमंतं महावेगैरक्षुण्वन्नैकृतर्षभाः ॥ २३ ॥
ते राक्षसा भीमबला नाना प्रहरणान्विताः । आजघ्नुर्वानरश्रेष्ठं बाणैरादित्यसन्निभैः ॥ २४ ॥
परिक्षिप्य हनूमंतं स बभौ रक्षसां गणः ॥ २५ ॥

सतेज शूळ असम सहास । वोडण खर्ग पाश फरश । [कं. 'आणि निर्वाणशस्त्रें' मुं. 'अनिर्वाण बाण'.]
आदित्य वर्ण बाण बहुवस । हाणती राक्षस हनुमंता ॥ १६७ ॥

हाणिती नानापरीचीं शस्त्रें । सोडिती नानापरीचीं यंत्रें ।
फोडिती भिंडी माळा पांगोरे । [मु. 'राक्षस समग्र क्षोभले'.] गिरा गजरें गर्जती ॥ १६८ ॥

रावणाचे दृष्टीपुढें । युद्ध मांडलें रोकडें । वीर वांटिवे अति निधडे । रणीं वेंगाडे उठावलें ॥ १६९ ॥

निशाणें त्राहाटिल्या भेरी । चिन काहाळा रणमोहरी । सिंहनाद करोनि वीरीं । वानरावरी लोटले ॥ १७० ॥

इकडे वाजंत्रे विविध । वीर करिती सिंहनाद । तिकडे हांकाबोंबा प्रसिद्ध । महाशब्द जनांचे ॥ १७१ ॥

मध्यें हनुमंत अग्रगणी । आलिया देखोनि वीरश्रेणी । पुच्छ नाचवीत रणांगणीं । घेई धणी युद्धाची ॥ १७२ ॥

कपी म्हणें निज पुच्छांसी । लंका जाळितां चौपासी । तूं अतिशयें भागलासी । विसावियासी घेई आतां ॥ १७३ ॥

आलियां राक्षस वीरश्रेणी । त्या मारीन अर्धक्षणीं । पूंस धांवोनि लागे चरणीं । ऐसें स्वामीनीं न करावें ॥ १७४ ॥

[मु. 'अर्ध'; कं. 'राक्षस'.] युद्ध संग्राम सुग्रासिता । मुखीचा ग्रास हनुमंता । काढूं नये गा सर्वथा । [मु. 'राजधर्मता'.] रणधर्मता विचारी ॥ १७५ ॥

तूं स्वामी मी सेवक तुझा । माझा संग्राम पाहे कपिराजा ।
आलिया राक्षसांच्या फौजा । रणसमाजा मर्दीन ॥ १७६ ॥

राक्षस बापुडी ते कायिसी । तूं कां यासाठीं उठसी । तूं असतां माझे पाठीसी । या मशकांसी कोण पाड ॥

अनुक्रमणिका

१७७ ॥

ऐसें निजपुच्छ सांगतां । हांसूं आले हनुमंता । आलिंगूनिया सप्रेमता । होय चुंबितां निज पुच्छ ॥ १७८ ॥

कपी पुच्छासी होय सागतां । माझें मज स्फुरण नावरे आतां ।
आम्हीं तुम्ही समसाम्यता । वीरां समस्तां निर्दाळूं ॥ १७९ ॥

पुच्छ म्हणे ऐसेंचि भले । स्वामीचे वचन पाहिजे केलें । ऐसें कपि पुच्छ समजलें । सरसावलें संग्रामा ॥ १८० ॥

कपी पुच्छासी करी एकांता । मारूं नको लंकानाथा । त्याचा श्रीराम करील घाता । इंद्रजिता लक्ष्मण ॥ १८१ ॥

उरले राक्षस समस्त । त्यांचा आम्ही करूं घात । ऐसा करुनी इत्यर्थ । मग युद्धार्थ चालिले ॥ १८२ ॥

तूं आकळी मी निर्दळी । ऐसी राक्षसमंडळी । करुं आजी रणीं रांगोळी । पिटिली टाळी कपी पुच्छें ॥ १८३ ॥

करितां वाद्यांचा गजर । राक्षसभार अति दुर्धर । येवोनि हनुमंतासमोर । शस्त्रसंभार [वि. 'मांडिला'; मु. 'सोडिती'.] सोडिला ॥ १८४ ॥

रावणाचिया दृष्टी पुढां । होईल निर्वाण झगडा । हनुमान करील रणरगडा । करील नितोडा राक्षसांचा ॥ १८५ ॥

राक्षसवीर अत्यंत क्रूर । करीत आले हाहाकार । हनुमान स्वस्थानीं सुस्थिर । अणुमात्र ढळेना ॥ १८६ ॥

अंगीं राक्षसांचे घाये । लागती तंव उगाची राहे । मग उठोनियां लवलाहें । केलें काय तें ऐका ॥ १८७ ॥

राक्षसांचिया शस्त्रघातां । भय नाहीं हनुमंता । करावया राक्षसांचिया घाता । केलें ते आतां अवधारा ॥ १८८ ॥

रत्नखचित हेमालंकार । सभामंडपीं खांब थोर । वानरें उपडिला सत्वर । निशाचर मारावया ॥ १८९ ॥

ततो वातात्मजः क्रुद्धो हेमरौप्यसमन्वितम् । प्रासादस्य समुद्धृत्य स्तंभं हेमविभूषितम् ॥ २६ ॥
भ्रामयित्वा शतगुणं नाम विश्राव्य चात्मनः । जघान राक्षसान्संख्ये वज्रेणेंद्र इवासुरान् ॥ २७ ॥
निहत्य च वरांस्तत्र दिवमेवोत्पपात ह । सर्वतो हनुमानेकः संपतत्स व्यराजत ॥ २८ ॥
हुताशनेनाथ सम्ववृता सा । हतप्रवीरा परमार्थयोधा ।
हनूमतः कोपबलाभिभूता बभूव कालोपहतेव लंका ॥ २९ ॥

शस्त्रें हाणत दुर्धर । आला राक्षसांचा भार । खांब उपटूनी अष्टधार । रणीं वानर मिसळला ॥ १९० ॥

अनुक्रमणिका

मी रामाचा रामदूत । आलों राक्षसांचा करावया घात । बाणें सारोनिया तेथ । खांब भवंडीत शतावर्ती ॥ १९१ ॥

वीर हाणिती शस्त्रअस्त्रीं । पूंस निवारी वरच्यावरी । खांब हाणितां वीरांवरी । करीत चुरी शतसहस्त्रीं ॥ १९२ ॥

पुच्छ स्वेच्छा वीरांतें जाळी । उरीं शिरीं [तु. दै. 'वीराते'; मु. 'सर्वांग'.] सर्वांतें पोळी ।खांब हाणोनि हनुमानबळी । करी रांगोळी वीरांची ॥ १९३ ॥

कपीसी मारावया रोकडे । कवची खड्गी वीर गाढे । थरकोनी सरकोनी चहूंकडे । घाय देव्हडे हाणिती ॥ १९४ ॥

चुकवोनि पूंसाचा आघात । संमुख चुकवोनिया घात ।
वीर तळपोनियां घाय हाणित । रणीं हनुमंत मारावया ॥ १९५ ॥

हनुमान विचारी पोटांत । वीर खवळले समस्त । यांचा पाहों पां पुरुषार्थ । अंगीं आघात साहोनी ॥ १९६ ॥

यांचिया शस्त्रांचां समेळीं । माझी न तुटे रोमावळी । शस्त्रें हाणिती महाबळी । रण कल्लोळीं भिडोनी ॥ १९७ ॥

दडाला त्यांचिया शस्त्रांतळीं । तंव वीरीं दिधली आरोळी ।
म्हणती अवघे बळी रे बळी । कपी भूतळीं पाडिला ॥ १९८ ॥

सन्मूख हाणिती तोमर । मागुनी हाणिती महावज्र । वामसव्य विंधोनि तीर । वर्षती शस्त्रें गगनीहुनी ॥ १९९ ॥

राहिलें उड्डाण किराण । निःशेष याचा गेला प्राण । आमची गाढी आंगवण । भेरी निशाणें त्राहाटिली ॥ २०० ॥

एक म्हणे मियां शस्त्रघातू । सन्मूख पाडिला हनुमंतु । एक म्हणे मियां[मु. 'उरा'.] उदराआंतु । शूळ साद्यंतु खोचिला ॥ २०१ ॥

एक म्हणे मियां खड्गधारी । पुरा केला मस्तकावरी । एक म्हणे बाण शरधारी । सर्वांग शिरीं खीळिलें ॥ २०२ ॥

ऐसा वांठिवा गर्जती वीर । हर्षे वाटिती साकर । आतां विझवा लंकापुर । रणीं वानर मारिला ॥ २०३ ॥

वानरें थोर केली ख्याती । तऱ्ही आम्ही भद्रजाती । [मु. 'हारी'.] रणा आणिला मारुती । शस्त्र प्रयुक्ती रणमारें ॥ २०४ ॥

अनुक्रमणिका

रण शोधा रे सत्वर । कोणे ठाई मेला कपिकुंजर । तंव तेणें देऊनी भुभुःकार । वेगीं वानर उसळला ॥ २०५ ॥

ऐकोनि कपीचें गर्जन । कांपिन्नला दशानन । राक्षसांचा पळाला प्राण । रोकडें मरण देखोनी ॥ २०६ ॥

पूंसें कवळोनि समसकट । अवघे केले एकवट । खांब हाणोनि घनदाट । केलें पीठ अवघ्यांचें ॥ २०७ ॥

हातपाय ना मनगट । ना त्या अस्थि शिर ना कंठ । पाठीचें पोटीचें करूनी पीठ । केली एकवाट अवघियांसी ॥

ना ते भूतळीं ना पाताळीं । शेखीं न [मु. 'नेलेच'.] घालीच रसातळीं । हनुमंत तो महाबळी । नेलें तत्काळीं निर्गुणत्वा ॥ २०९ ॥

इंद्रिय [मुं. अं. कं. मु. 'अव्यक्त'.] आवेव देहाभिव्यक्ती । नांवरुप त्रिगुण जाती । निर्दळूनियां मारुती । गुणातीतीं ते नेले ॥ २१० ॥

श्रीरामभक्ताच्या निजहस्तीं । जे जे निमती मारकयुक्ती ।
ते ते पावती गुणातीतीं । भक्तीची ख्याती पैं ऐशी ॥ २११ ॥

श्रीरामभक्ताच्या दृष्टीपुढें । मरें त्याचें भाग्य चोखडें । जिणोनी त्रिगुणाचें सांकडें । पावे रोकडें परब्रह्म ॥ २१२ ॥

अंतीं श्रीराम वसलियां वदनीं। अथवा सार्थक ऐकिलियां कानीं । कर्माकर्मा होऊनी धुनी । निजनिर्गुणी तो पावे ॥

श्रीरामनाम ज्याचिया वदनीं । श्रीराममूर्ती ज्याचिया मनीं ।
नित्य सावधान रामभजनीं । धन्य त्रिभुवनीं तो एक ॥ २१४ ॥

ऐसी श्रीरामाची भक्ती । नित्य नांदे हनुमंती । रणीं राक्षसां लाऊनी ख्याती । दिधली मुक्ती कपिराजे ॥ २१५ ॥

रावणासी म्हणे हनुमंत । तुझा सर्वथा न करी घात । आजी सोडीला जिवें जीत । तुज रघुनाथ वधील ॥ २१६ ॥

एका जनार्दना शरण । जाहलें लंकापूर दहन । हनुमंताचें पुनरागमन । सावधान अवधारा ॥ २१७ ॥

कैसी घेईल श्रीराम भेटी । कैसिया सांगेल सीतेच्या गोष्टी । कथा अति गोड गोमटी । कृपादृष्टी अवधारा ॥ २१८ ॥

अनुक्रमणिका

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां राक्षसदमनलंकादहनं नाम एकोनविंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग विसावा

## पुनरागमने जानकी आश्वासन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

स राक्षसांस्तांन्सुबहून् निहत्य । वनं च भंङक्त्वा बहुपादपं तत् ।
विसृज्य रक्षोभवनेषु वन्हिम् । जगाम रामं मनसा महात्मा ॥ १ ॥

कोट्यानुकोटी वीर मर्दून । लंका भुवना करूनी दहन । रावणातें अपमानून । कपी परतोन निघाला ॥ १ ॥

वीर मर्दितां समस्त । सापडला लंकानाथ । हनुमान न करीच त्याचा घात । श्रीरघुनाथ क्षोभेल ॥ २ ॥

रामें वाहिली असे आण । विंधोनिया निजबाण । रणीं मारीन रावण । असत्य कोण करूं शके ॥ ३ ॥

हातीं सांपडला लंकानाथ । मारितां क्षोभेल रघुनाथ । यालागीं न मारीच हनुमंत । जीवें जीत सोडिला ॥ ४ ॥

असत्य देउनी स्वामीचे माथा । म्यां मिरवावी वाढिवता ।
जळो ते श्लाघ्य हनुमंता । भेणें लंकानाथा न मारीचि ॥ ५ ॥

रावणासी जीवें मारितां । क्षणही न लगे मज आतां । मर्यादा नु लंघवे रघुनाथा । तेणें लंकानाथा न मारीचि ॥ ६ ॥

अशोक वनीं वृक्ष उपाडा । करूनी पेटविला झगडा । निधड्यां वीरां करूनी रगडा । इंद्रजित गाढा गांजिला ॥ ७ ॥

बळें मारूनी जंबु माळी । अखया उपडोनिया पौळी । राक्षसाभुवनां करूनी होळी । कपी महाबली परतला ॥ ८ ॥

वने उपवनें शोधितां । भाग्यें सांपडली सीता । शुद्धि सांगावया रघुनाथा । उल्हासता हनुमंतीं ॥ ९ ॥ [ओवी ९ तु. दै. प्रतींत नाही.]

एकेच उड्डाणें रघुनाथा । चरणीं ठेवावया माथा । शुद्धि सांगावया सीता । उल्हासता हनुमंती ॥ १० ॥

केव्हां देखेन रघुनाथा । केव्हां शुद्धि सांगेन सीता । ऐसी आवडी हनुमंता । उल्हासता परतला ॥ ११ ॥

जळत पूंस धरूनी वरी । [तु. दै. 'रिघू'.] विझवूं जातां पै समुद्रीं । सागरें निवारिला [पै. मुं. कं. तं. वि. 'हरी'.] लहरीं । ऐसें न करी हनुमंता ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

**पूंस बुचकळीतां सागरा । कढ सुटेल समुद्रा । उकाडा होईल जलचरां । ऐसें कपींद्रा न करावे ॥ १३ ॥**

**पिता पवनातें प्रार्थुनी । पुच्छाग्रीं पेटविला वज्राग्नि । तेणें कढेल समुद्रपाणी । मरती श्रेणी जळजंतू ॥ १४ ॥**

**पूंस पसरिल्या समुद्रतीरीं । सिंधु म्हणे मी घालुनी लहरी ।**
**विझवीन क्षणा माझारीं । युक्ती कपींद्री मानिली ॥ १५ ॥**

स दीर्घं लीलयोद्धृत्य । लांगूलं भीमदर्शनम् । निर्वापयामास तदा समुद्रे हरिपुंगवः ॥ २ ॥

**धरिलें होतें रुप दारूण । पूंस वाढलें गगन व्यापून । तें तें उग्रपण सांडून । धरी सामान्य कपिरूप ॥ १६ ॥**

**सामान्य रूप समूद्रतीरीं । पुच्छ पसरितां लीळे करीं । क्षणार्धे विझविलें लहरी । जाहली वानरीं विश्रांती ॥ १७ ॥**

**स्वेद निपटोनि शरीरीं । स्वयें सांडितां सागरीं । पडतां ग्रासियलें मगरीं । तेणेचि उदरीं गर्भ तिसीं ॥ १८ ॥**

**मगरोदरीं गर्भ संभुजु । हनुमंताचा पुत्र स्वेदजु । जन्म पावला मकरध्वजु । बळ समाजु कपिसम ॥ १९ ॥**

**हनुमंतें ऐशिया परी । पूंस विझवोनि सागरीं । कथा चालली पुढारी । निज निर्धारी अवधारा ॥ २० ॥**

प्रदीप्यमाने लांगूले हनुमन्ते महाबले । जानकीं शोकसंतप्तां सरमा वाक्यमब्रवीत् ॥ ३ ॥
प्रशमं गच्छ वैदेहि हनुमंतं प्रति प्रिये । गतःसंप्रति दूतस्ते छित्वा पाशमपि दृढम् ॥ ४ ॥
स राक्षससहस्राणि विद्राव्य हरिपुंगवः । लंकामादीपयामास वायुपत्रो महाबलः ॥ ५ ॥
निहत्य राक्षसांस्तत्र दिवमेवोत्पपात ह । शरीरं स्वामिकार्येभ्यो ददाति मकरालये ॥ ६ ॥

**आगी लावोनि पूंसासी । रावणें मारिलें हनुमंतासी । राक्षसीं सांगतां सीतेपासीं । तेणें तिसी अति चिंता ॥ २१ ॥**

**करोनिया वन उपाडा । राक्षसांसी केला झगडा । मारोनि धुरा बुजोनि आगडा । आपणहि पुढां निमाला ॥ २२ ॥**

**धुरा मारिल्या करूनी रण । आपणही दिधला प्राण ।**
**हे वानराचे उन्मत्तपण । स्वामी काज संपूर्ण न साधेची ॥ २३ ॥**

**वानर पालाखाइर किती । मारुं गेला लंकापती । तेणें जाळिला पुच्छ दीप्ती । शुद्धि सीतापती न पवेचि ॥ २४ ॥** [ओवी २४ वि. प्रतीत नाही.]

**आणिक एक मूर्खपण । कां सांगितलें आत्ममरण । आपणया मारविलें आपण । हें अभाग्यपण मजमाझें ॥ २५ ॥**

अनुक्रमणिका

रावणें मारिलें हनुमंता । शुद्धि न पवेचि रघुनाथा । यासी मियां काय करावें आतां । शोके सीता संतप्त ॥ २६ ॥

दुस्तर सागर शत योजन । कोणा न येववे करूनी उड्डाण । शुद्धि न पवे रघुनंदन । अभाग्य पूर्ण हें माझें ॥ २७ ॥

ऐकोनि हनुमंताचें मरण । अश्रुधारा स्त्रवती नयन । अति दुःखें आक्रंदोन । मूर्च्छापन्न जानकी ॥ २८ ॥

हनुमंताचिया मरणा पुढां । पुत्र शोक तो बापुडा । अघात वाजला एवढा । अति चरफडा तळमळी ॥ २९ ॥

माझे आकांतिचा सांगाती । तोही निमाला मारुती । कैसेनि भेटे रघुपती । चिंतावर्तीं जानकी ॥ ३० ॥

त्रिजटेची सखी परमा । हरिखें सांगों आली सरमा । मरण नाहीं प्लवंगमा । पराक्रमा ऐक त्याच्या ॥ ३१ ॥

तोडितां कमळ मृणालास । गजासि न पडती सायास । तेंवि कपीने छेदोनि पाश । घेवोनि मीस राहिला ॥ ३२ ॥

पूंसीं पेटवितां हुताशन । रावणाचे दशवदन । खांड मिशातें जाळून । पाहिला अपमान लंकेशा ॥ ३३ ॥

पूंस पेटविलिया पाठीं । भट सुभट जगजेठी । वीर मारिले कोट्यानुकोटी । पूंसासाठी वानरें ॥ ३४ ॥

लंके माजीं भुवनें भुवन । पुच्छें केलें पुरदहन । वानरा गाढी आंगवण । गेला गांजोन लंकेशा ॥ ३५ ॥

तुझें वस्तीचें अशोकवन । तें न जाळीच हुताशन । येर लंकेचें केलें दहन । भुवनें भुवन शोधुनी ॥ ३६ ॥

इतुके करोनिया कंदन । समुद्रीं पूंस विझवोन । तुझी निजशुद्धी घेवोन । गेला ठाकोन श्रीरामा ॥ ३७ ॥

हनुमान जाऊनीया तेथें । घेवोनिया श्रीरामातें । शीघ्र येईल वो येथें । जाण निश्चितें जानकीये ॥ ३८ ॥

ऐकोनि सरमेचें वचन । सीता झाली सुखसंपन्न । तिसीं देवोनि आलिंगन । दिधलें भूषण निजमुद्रा ॥ ३९ ॥

सरमा म्हणे अहो माते । आम्ही तुझी नित्यांकितें । कायसा सन्मान आमुतें । राक्षसी मातें म्हणों नको ॥ ४० ॥

सीता म्हणे आकांतसांगातिणी । आम्ही तुम्ही निर्वाण बहिणी ।
विकल्प न धरी वो [कं. 'मनीं'.] साजणी । सरमा चरणीं लागली ॥ ४१ ॥

ऐकोनि सरमेचें वचन । सीता पावली समाधान । येरीकडे हनुमान आपण । अति उद्विग्न स्वयें जाहला ॥ ४२ ॥

अनुक्रमणिका

संदीप्यमानां विध्वस्तां त्रस्तरक्षोगणां पुरीम् । अवेक्ष्य हनुमान्लंकां चिंतयामास विप्लवम् ॥ ७ ॥
यदि दग्धा मया लंका नूनमार्याऽपि जानकी । दग्धा तेन मया भर्तुर्हतं कार्यमजानता ॥ ८ ॥
तस्य क्रोधाभिभूतेन मया मूलक्षयः कृतः । विनष्टा जानकी व्यक्तं न ह्यदग्धा प्रदृश्यते ॥ ९ ॥
तस्यासीत्सुमहान्त्रासः कुत्सा चात्मन्यजायत । लंकां प्रदहता कर्म किं धिक्कृतमिदं मया ॥ १० ॥

**पूंस समुद्रीं विझवून । घ्यावया श्रीराम दर्शन । आलें हनुमंता स्फुरण । करावया उड्डाण सज्ज जाहला ॥ ४३ ॥**

**मागील पाहातां आंवाका । ज्वलनाकुल देखिली लंका ।**
**कपीसी पडली आशंका । सीता निःशेखा भस्म जाहली ॥ ४४ ॥**

**अति चिंता हनुमंता । जाळुनी स्वामिची कांता । काय शुद्धी सांगों रघुनाथा । केलें अनर्था मर्कटत्वें ॥ ४५ ॥**

**लंका साटोपें जाळितां । न पाहे स्वामी कार्यार्था । न पाहेचि निजस्वार्था । केलें अनर्था मर्कटत्वें ॥ ४६ ॥**

**मारिले वीर कोट्यानुकोटी । लंका जाळिली उठाउठी । जळाली सीता गोरटी । ही बुद्धि खोटी** [मु. वि. कं. मुं. तं. दै. अं. ‘माझी’.] **मजपासी ॥ ४७ ॥**

**ज्या ज्या केलें म्यां पुरुषार्था । तो तो झाला मज निंद्यार्था ।**
**जाळिली श्रीरामाची कांता । काय रघुनाथा मुख दांवू ॥ ४८ ॥**

**दहनीं जळाली सीता सती । जळो जळो ते माझी ख्याती ।**
**कीर्ती ते झाली अपकीर्ती । केंवी रघुपती मुख दाखवूं ॥ ४९ ॥**

**जिची शुद्धि सांगों जाता । दहूनीं जळाली ती सीता । अपयश आलें मज हनुमंता । केंवी रघुनाथा मुख दाखवूं ॥ ५० ॥**

**पुच्छाग्नीच्या आंवर्ती । लंका जाळिली सहित क्षिती । अदग्ध चारी बोरी** [तु. दै. ‘नुसती’.] **नुरती । सीता केउती वांचेल ॥ ५१ ॥**

**विचार न करितां मर्कटा । करुनिया मर्कटा चेष्टा । बारा जणां श्रेष्ठ श्रेष्ठां । केल्या बारा वांटा त्या ऐका ॥ ५२ ॥**

**ऐकतां सीतेचें मरण । श्रीराम सांडील प्राण । प्राण सांडील लक्ष्मण । भरत शत्रुघ्न निमतील ॥ ५३ ॥**

**निमतील तिघी माता । मरण नळ नीळ जांबुवंता । मरण सुग्रीवा कपिनाथा । अंगद तत्वता निमेल ॥ ५४ ॥**

**ऐस ऐशिया श्रेष्ठ श्रेष्ठां । माझेनि ऐशा बारा वाटा ।**
**त्याहोनी जेष्ठा आणि कनिष्ठा । मरण** [तु. दै. वि. मु. ‘बळकटा’; मु. तं. ‘बळवटा’.]

अनुक्रमणिका

वळवटा माझे नि ॥ ५५ ॥

अयोध्येचे नारी नर । मरतील समग्र वानर । एवढ्या अपयशा मी पात्र । सीता सुंदर जाळूनी ॥ ५६ ॥

क्रोध केवळ पै मांग । क्रोधें अपवित्र सर्वांग । साधिलिया कार्या केला भंग । क्रोंधे सांग नागविलें ॥ ५७ ॥

शुद्धी साधिलिया पाठीं । क्रोध संचारोनिया पोटीं । लंका जाळितां क्रोध दृष्टीं । सीता गीरटी जाळिली ॥ ५८ ॥

क्रोध मांगटा अति चांडाळ । जळें निरसे मांग विटाळ । क्रोध त्याहूनी प्रबळ । नव्हे निर्मळ स्नानदानें ॥ ५९ ॥

क्रोधा ऐसा महावैरी । जडला असतां जिव्हारीं । जो ज्ञानाची मानी थोरी । तो संसारी [कं. वि. 'महामुर्ख'.] हडमूर्ख ॥ ६० ॥

धन्यास्ते पुरुषश्रेष्ठा ये बुद्ध्या कोपमूर्जितम् । निरुन्धन्ति महात्मानो दीप्तमग्निमिवांभसा ॥ ११ ॥

क्रोध येऊ न देतां दृष्टी । धन्य धन्य ते नर सृष्टीं । क्रोध आलियाहि पोटीं । जे विवेक दृष्टी निर्दळिती ॥ ६१ ॥

ऐसिये निष्ठेचे जे नर । ते चैतन्याचें निज मंदिर । परब्रह्माचें भांडार । ब्रह्मसाकार ते पुरुष ॥ ६२ ॥

भूतीं पाहतां भगवद्भवो । काम क्रोधा कैंचा ठावो । ऐसा ज्याचा [तु. दै. 'निज स्वभावो'; कं. 'निज निर्वाह'.] नित्य सद्भावो । तेचि स्वमेव परब्रह्म ॥ ६३ ॥

ऐसा समूळ विचार । न करीचि मी पामर । क्रोधें नागविलों साचार । सीता सुंदर जाळिली ॥ ६४ ॥

क्रोध आलिया तत्वतां । अणुमात्र न करी स्वार्था । करविलें कोटी कोटी अनर्था । जघन्यता जगनिंद्य ॥ ६५ ॥

मज आली अति निंद्यता । ऐसेनि श्रीरामा भेटतां । प्रळयो होईल समस्ता । निमाली सीता ऐकोनि ॥ ६६ ॥

इहैव प्राणसंन्यासो ममापि ह्यद्यरोचते । किमग्नौ निपताम्यद्य आहोस्विद्वडवामुखे ॥ १२ ॥

न वचोनिया श्रीरामापासी । येथेंचि घ्यावे संन्यासासी । तंव [मु. 'वैर पडले'.] हड द्वंद राक्षसांसी । या प्रदेशीं न ये राहों ॥ ६७ ॥

आतां देवों आपला प्राण । मज सर्वथा न ये मरण । तेंहि निजात्म लक्षण । आपल्या आपण अनुवाचे ॥ ६८ ॥

जाळूं न सके वैश्वानर । बुडवूं न शके मज सागर । भक्षूं न शकती मच्छ मगर । वज्र शरीर पैं माझें ॥ ६९ ॥

अनुक्रमणिका

**जाणोनि वज्र देह मारुती । सिंह व्याघ्र वडवाजाती । सर्वथा मजला न भक्षिती । मृत्यू हनुमंतीं असेना ॥ ७० ॥**

**भेटवेना श्रीरघुनाथा । मरण न ये मरों जातां । संन्यास न घेववे पै घेंतां । काय म्यां आतां करावें ॥ ७१ ॥**

**ऐसा हनुमंत आपण । सीता निमाली मानून । तेणें जाहला अति उद्विग्न । समाधान पावेना ॥ ७२ ॥**

**मग म्हणे रघुनाथा । पाव माझिया आकांता । काय करावें मियां आतां । बुद्धि दाता होई मज ॥ ७३ ॥**

**ऐसी करितां विनंती । श्रीराम नांदे सर्वभूतीं । तेंचि काळीं पै मारुती । अगाध युक्ती आठवली ॥ ७४ ॥**

रामस्य च मनःकांता कथं सा नाशमाप्नुयात् । यद्वादहनकर्मायं सर्वत्राप्रभुरव्य यः ॥ १३ ॥
नादहन्मम लांगूलं कथमार्या प्रधक्ष्यति । तपसा सत्यसंवादादनन्यत्वाच्च भर्तरि ॥ १४ ॥
असौ विनिर्दहेदग्निं न तामग्निः प्रधर्षयेत् ॥ १५ ॥

**श्रीराम एक पत्नी धारी । श्रीराम सेवा तप सामग्री ।**
**सत्य श्रीराम नाम माझे जिव्हाग्रीं । वन्ही कैशा परी जाळील ॥ ७५ ॥**

**श्रीराम व्रतें सीता सती । श्रीरामाची अनन्य भक्ती । श्रीराम नामीं अनन्य प्रीती । अग्नि कैशा रीतीं जाळील ॥ ७६ ॥**

**रावणें आगी लावितां पूंसासी । पूंस न जाळवे अग्नीसी । तो केवीं जाळील सीतेसी । विशेषेसीं रामप्रिया ॥ ७७ ॥**

**श्रीरामाची प्रिय कांता । अग्नीसी न जाळवे सर्वथा । अग्नी जाळू न सके सीता । श्रीराम सत्ता प्रतापें ॥ ७८ ॥**

**श्रीरामाचे निज किंकर । पालेखाईर मी वानर । पूंस न जाळी वैश्वानर । सीता चिन्मात्र केवीं जाळी ॥ ७९ ॥**

**जरी जाळिलें वन्हिनें सीता । तरी मी त्यासी दंडीन आतां । कोप आला हनुमंता । शेंडी माथा थरथरली ॥ ८० ॥**

**करकरिल्या दांत दाढा । वळिला पूंसाचा आंकुडा । वन्हि दंडावया पुढां । हनुमान गाढा खवळला ॥ ८१ ॥**

**पिता पवन सांगे कानीं । जेष्ठ बंधु तुझा वन्ही । त्यासी करुं नये दंडनी । सीता जननी ते स्वस्थ ॥ ८२ ॥**

**अग्नीनें सीता अभिवंदुनी । स्वस्थ ठेविली अशोकवनीं । ऐसें ऐकतांची कानीं । उल्हास मनी वानरा ॥ ८३ ॥**

**अभिवंदोनि हुताशन । घालुनी पितयासी लोटांगण । घ्यावया सीतेचें दर्शन । केलें उड्डाण हनुमंतें ॥ ८४ ॥**

अनुक्रमणिका

ततः कपिः प्राप्तमनोरथार्थस्तामक्षतां राजसुतां विदित्वा ।
प्रत्यक्षतस्तां पुनरेव दृष्ट्वा प्रतिप्रयाणाय मतिं चकार ॥ १६ ॥
ततस्तु शिंशपामूले जानकीं पर्यवस्थिताम् । अभिवाद्याब्रवीदृष्ट्वा दिष्ट्या पश्यामि चाक्षताम् ॥ १७ ॥
ततस्तं प्रस्थितं दुष्ट्वा वीक्ष्यमाणं पुनःपुनः । भर्तुःस्नेहादिदं भर्तुः सुहृदं तमथाब्रवीत् ॥ १८ ॥
यदिदं मन्यसे तात विश्राम्य त्वमरिंदम । क्वचित्सुसंवृते देशे विश्रान्तःश्वो गमिष्यसि ॥ १९ ॥
ममैव भाग्यभावेन सान्निध्यात्तव वानर । शोकसंतापनिर्मुक्तिर्मुहूर्तेन महाकपे ॥ २० ॥
अदर्शनं च ते वीर भूयो मां तापयिष्यति ॥ २१ ॥

**उड्डाण करुनी हनुमंता । लंके माजी स्वयें येतां । दग्ध गज भग्नदंता । होय देखता** [पै. 'पुरध्वजु'.] **पुरध्वंस ॥ ८५ ॥**

**विमानाकार पुर मंदिरें । जाळूनि पाडिलीं समग्रें ।** [मु. 'भक्ष्य'.] **पक्ष दग्ध पैं मयुरें । वैश्वानरें पुरदाहो ॥ ८६ ॥**

**पुच्छाग्नि दग्ध लंकाभुवन । त्यामाजी अदग्ध अशोकवन । सीता देखोनि सुख संपन्न । केलें लोटांगण वानरें ॥ ८७ ॥**

**घालोनिया लोटांगण । आवडी वंदिले चरण । सीता चरण क्षाळण । केलें** [कं. 'संपूर्ण'.] **कपीने नयनाश्रु ॥ ८८ ॥**

**वेगें येवोनि मारुती । मागें पुढें पाहे सीता सती । पाहे मागुत मागुती । पुनरावृत्ती साक्षेपें ॥ ८९ ॥**

**नाहीं जळाली पोळली । नाहीं लोंव हुरपळली । सीता सुखरुप देखिली । टाळी पिटिली हनुमंतें ॥ ९० ॥**

**सीता देखोनि अक्षत । हनुमान आनंदें नाचत । माझा फळला पुरुषार्थ । राम कार्यार्थ साधला ॥ ९१ ॥**

**सीता शुद्धी लाभली येथ । जाहलें सीता मनोगत । साधला श्रीराम कार्यार्थ । माझा पुरुषार्थ मज फळला ॥ ९२ ॥**

**सीतेचिया चरणीं ठेवोनि माथा । कपी म्हणे तूं न करी चिंता ।**
**घेवोन येईल वो रघुनाथा । हे घे तत्वतां भाक माझी ॥ ९३ ॥**

**वानर श्रीरामाचा आप्त । माझाहि सखा हनुमंत । संकटीं भेटोनि वनांत । भयभयार्थ** [वि. 'चुकविला'.] **निरसिला ॥ ९४ ॥**

**राक्षस मारोनि** [वि. कं. मुं. 'समस्त'.] **समर्थ । लंका करोनि हताहत । गांजोनिया लंकानाथ । रामपुरुषार्थ प्रकटिला ॥ ९५ ॥**

**ऐकतां हनुमंताच्या गोष्टी ।** [तु. दै. मु. 'फळोत्कट'.] **फळकट जनकाची भेटी । ऐसी जाहली सुखसंतुष्टी । हनुमान दृष्टी देखोनि ॥ ९६ ॥**

अनुक्रमणिका

जो आकांती संरक्षिता । तो मज हनुमान मातापिता । हनुमान प्रिय श्रीरघुनाथा । वेद शास्त्रार्था मज पूज्य ॥ ९७ ॥

लंका जाळितां चौपासीं । युद्ध करितां भागलासी । तुज द्यावया विश्रांतीसी । नाहीं मजपासी शेजबाज ॥ ९८ ॥

सेवा न घडे हनुमंता । एक माझी अभाग्यता । निर्वात स्थळीं एकांतता । विश्रांति तां आजि घ्यावी ॥ ९९ ॥

आजी घेवोनि विश्रांती । प्रातःकाळीं गा मारुती । भेटी जावें रघुपती । माझी विनंती अवधारी ॥ १०० ॥

ऐकोनि सीतेचें वचन । हनुमान जाहला हास्यवदन । ऐक वो माते सावधान । विश्रांती स्थान पैं माझें ॥ १०१ ॥

जन्म मरणाची निवृत्ती । सकळ श्रमाची विश्रांती । राम नामाचिया आवृत्ती । जाण निश्चिती जानकिये ॥ १०२ ॥

युद्ध करितां रणावर्ती । सबाह्य कवच रामचिन्मूर्ती । एकाकी जातां दुर्गम पंथीं । नाम सांगातीं निर्भय ॥ १०३ ॥

आसनी भोजनीं शयनीं । नित्यावर्तीं गमना गमनीं । राम सांगाती जागृतीं स्वप्नीं । सत्यवाणी हे सीते ॥ १०४ ॥

ऐकोनि हनुमंताची स्थिती । जीवें ओवाळी सीता सती । सबाह्य [दै. 'अविकळ'; तु. 'अखिल'.] विकलें श्रीरामभक्ती । धन्य मारुती जन्म तुझा ॥ १०५ ॥

ऐकोनि हनुमंताची युक्ती । अकृत्रिम श्रीराम भक्तीं । तेणें सुखावे सीता सती । धन्य मारुती जन्म तुझा ॥ १०६ ॥

सुखावोनि सीता सती । सवेंचि दचकली पैं चित्तीं । आतां जाईल मारुती । केंवीं मागुती देखेन ॥ १०७ ॥

तुझें प्रयाण ऐकतां । प्राण निघों पाहे आतां । काय करुं रे हनुमंता । आवरितां नावरे ॥ १०८ ॥

आणिक एक हनुमंता । संदेह वर्तताहे चित्तां । तोहि सांगेन मी आतां । सावधानता अवधारी ॥ १०९ ॥

तानि हर्यृक्षसैन्यानि वानराश्च हि कोटिशः । कथं नु खलु दुष्पारं संतरिष्यंति सागरम् ॥ २२ ॥
त्रयाणामेव भूतानां सागरस्यातिलंघने । शक्तिःस्याद्वैनतेयस्य तव वा मारुतस्य च ॥ २३ ॥
किं पश्यसि समाधानं त्वं हि कार्ये विशारदः । काममस्य त्वमेवैकः कार्यस्य परिसाधने ॥ २४ ॥

अनुक्रमणिका

कोटी कोटी वानर भार । कैसेनि लंघती सागर । केविं पावती परपार । दशशिर दंडावया ॥ ११० ॥

समुद्र लंघनाप्रती । तिघा जणांसी आहे शक्ती । वैनतयो [मु. 'वायु'.] मरुत् मारुती । चौथियाची गती चालेना ॥ १११ ॥

मिळोनिया नर वानर । केंवीं लंघती सागर । हेचि मज चिंता थोर । सत्य साचार हनुमंता ॥ ११२ ॥

समुद्र लंघूनिया कार्यार्थी । आलें हनुमंता तुझे माथां । राक्षस दमनीं तुज दक्षता । तुझा लंकानाथा अति धांक ॥ ११३ ॥

नांव ऐकोनि हनुमंत । रावण उभ्या उभ्या [मु. 'चळकांपत'.] कांपत । तुज इंद्रजित सदाधाकंत । तुझा पुरुषार्थ अनुपम्य ॥ ११४ ॥

ऐकोनि सीतेचें उत्तर । हनुमान म्हणे मी किंकर । श्रीराम प्रताप दुर्धर । ऐक साचार सांगेन ॥ ११५ ॥

श्रीराम भातां दुर्धर शर । बाणीं वाहोनि नर वानर । राम पाववील समुद्र पार । श्रीरामचंद्र प्रतापी ॥ ११६ ॥

स वानरसहस्त्राणां कोटिभिरभिसंवृतः । तारयिष्यति रामेण शरेणोन्नतपर्वणा ॥ २५ ॥
तौ च वीरौ नरवरौ सहितौ रामलक्ष्मणौ । आगम्य नगरीं लंकां सायकैर्वधमिष्यतः ॥ २६ ॥
सगणं रावणं हत्वा त्वचिराद्रघुनंदनः । त्वामादाय वरारोहे स्वां पुरीमभियास्यति ॥ २७ ॥
एवमाश्वास्य वैदेहीं हनुमान्मारुतात्मजः । गमनाय मतिं कृत्वा वैदेहीमभ्यवादयत् ॥ २८ ॥

वानर सैन्याचिया हारी । श्रीराम बैसवुनी शराग्रीं । उतरोनिया समुद्रीं । लंका परपारीं आणील ॥ ११७ ॥

राम लक्ष्मण वीर वरिष्ठ । धनुर्विद्या अति श्रेष्ठ । बाण वर्षोनि उद्भट । दशकंठ छेदील ॥ ११८ ॥

रणीं पाडितां दशकंठ । इंद्रजित कुंभकर्ण वरिष्ठ । प्रधान मारोनि समसगट । करील सपाट राक्षसां ॥ ११९ ॥

इतुकें करावया येथ । शीघ्र आणितो रघुनाथ । विलंब न लगे वो निश्चित । त्रिसत्य सत्य हें माझें ॥ १२० ॥

वाहतो श्रीरामाची आण । शिवतों तुझे श्रीचरण । शीघ्र आणीन रघुनंदन । निज प्रमाण हें माझें ॥ १२१ ॥

हनुमंते ऐसिये परी । आश्वासोनि सीता सुंदरी । सिंधू उडावया परपारीं । नमस्कारी सीतेतें ॥ १२२ ॥

कपीनें करितां नमस्कार । सीतेसी आला गहिंवर । तिसीं विनंती करी वानर । शुद्धि निर्धार लक्षोनि ॥ १२३ ॥

श्रीराम ध्यानीं धरूनी आतां । सकळ सांडावी चित्तचिंता । तेणें सत्यप्राप्ती श्रीरघुनाथा । स्वानंदता उल्हासें

॥ १२४ ॥

ध्यानीं धरूनी राघवा । चिंता सांडावी देहभावा । तेणें ब्रह्मत्व जीवीं जीवा । तो हा विसांवा जीवशिवां ॥ १२५ ॥

जीवत्व नाठवोनि जीवा । शिवत्व नाठवोनि शिवा । नित्य श्रीराम स्मरावा । तो हा विसांवा जीवशिवां ॥ १२६ ॥

चित्त चिंता चिंतनवृत्ती । सांडुनी स्मरावा रघुपती । हाची विसांवा विश्रांती । जीवशिव होती परब्रह्म ॥ १२७ ॥

परब्रह्माचें ब्रह्मपण । राम स्मरतां विरे आठवण । ऐसें श्रीराम स्मरण । विसांवा जाण जानकिये ॥ १२८ ॥

ऐकोनि हनुमंताचें वचन । सीता जाहली सुख संपन्न । एका जनार्दना शरण । गोड निरोपण पुढें आहे ॥ १२९ ॥

कपि काकुत्स्थ आनंद भेटी । सीता शुद्धीची गोड गोष्टी । ऐकतां परमानंद [मु. 'सृष्टी'.] पुष्टी । कथा कसवटी अनुपम्य ॥ १३० ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां पुनरागमने जानकीआश्वासनं नाम विंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग एकविसावा

## नक्र गजेंद्र आख्यान

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीराम भक्ताचें महिमान । अगाध गहन अति पावन । हनुमंतें करतां लंकादहन । ओतिली संपूर्ण सुवर्णाची ॥ १ ॥

श्रीराम भक्त करिती कंदन । तो कंदनची होय सुखसंपन्न । ऐसें भक्तीचें महिमान । कृपा संपूर्ण रामाची ॥ २ ॥

हनुमंतें जाळिलें लंकेसी । तूं नव्हेची काळी [कं. अं. मु. वि. तं. मुं. ‘मसी’; तु. दै. ‘कोळसी’.] कोळसा ऐसी । सुवर्णें ओतिली चौपासी । पीत प्रभेसी शोभत ॥ ३ ॥

करितां लंकेचें दहन । लंका ओतिली सुवर्ण । याचें मूळ मुख्य कारण । गजेंद्रोपाख्यान अवधारा ॥ ४ ॥

भगवंताचें कृपाळूपण । नाम स्मरणाचें महिमान । गजेंद्राचे उद्धरण । ते प्रसंगी पूर्ण सुवर्णमय लंका ॥ ५ ॥

चालतां कथा रामायण । त्यामाजीं गजेंद्र उद्धरण । लंका ओतिली सुवर्ण । तें कारण सांगावया ॥ ६ ॥

> आसीद्गिरिवरो राजन् त्रिकूट इति विश्रुतः । क्षीरोदेनावृतः श्रीमान्योजनायुतमुच्छ्रितः ॥ १ ॥
> तावता विस्तृतः पर्यक् त्रिभिः शृंगैःपयोनिधिम् । दिशःखंरोचयन्नास्ते रौप्यायसहिरण्मयैः ॥ २ ॥
> अन्यैश्च कुकुभः सर्वा रत्नधातुविचित्रितैः । नानाद्रुमलतागुल्मैर्निर्घोषैर्निझरांभसाम् ॥ ३ ॥

जो योगियांचा योगाग्रणी । जो ब्रह्मचर्य शिरोमणी । जो ज्ञानियांचा मुकुटमणी । तो शुक मुनि सांगत ॥ ७ ॥

जो कां वैराग्याचा निधी । ज्ञान विज्ञान उदधी । जो कां सुबुद्धीची बुद्धी । तो शुक त्रिशुद्धी बोलत ॥ ८ ॥

पांडव कुळीं कुळ दीपक । कौरव कुळीं कुळनायक । श्रोता परिक्षिती त्यक्तोदक । श्रवणचातक कथार्थी ॥ ९ ॥

त्या परिक्षितीसी जाण । गजेंद्राचें उद्धरण । श्रीशुक सांगे आपण । वसतीस्थान गजाचें ॥ १० ॥ [ओवी १० तु. दै. प्रतींत नाही.]

त्रिकुट नामा गिरीवर । योजनायुत्त दशसहस्त्र । गंडकी पासून क्षीरसागर । येवढा थोर पर्वत ॥ ११ ॥

जितुका पृथ्वीवरी विस्तार । तितुका उंचदश सहस्त्र । त्रिकूट नामा त्रिशिखर । गिरिवर शोभत ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

नाना रत्नांचिया खाणी । नानाधातूंचिया भरणी । निर्मळ जळांचिया श्रेणी । सरें पुष्करणी तेणें भरतीं ॥ १३ ॥

पर्वताचें निज महिमान । नानावर्णी विराजमान । श्वेतश्याम सुवर्णवर्ण । शोभा संपूर्ण गिरिवरा ॥ १४ ॥

वृक्षवल्लीलता द्रुम । सिंगव्याघ्रादि प्लवंगम । नाना जातींचे विहंगम । ऋषिआश्रम सिद्धांचे ॥ १५ ॥

निर्मळ [मु. 'झरे'.] जळें सरें संपूर्ण । नानापक्षी कुळभाषण । गोचमरींचें वसतीस्थान । शोभायमान पर्वत ॥ १६ ॥

सुवर्ण ताम्र रौप्यखाणी । लोहो निपजे लोह पाषाणी । नाना धातू प्रवाह श्रेणी । पर्वतीहूनि प्रसवती ॥ १७ ॥

तया पर्वताची दरी । वनोपवनें अति साजिरी । जे लागली गंडकीगिरी । नाना वृक्षांतरी गंभीर ॥ १८ ॥

> तस्य दिव्यं भगवतो वरुणस्य महात्मनः । उद्यानं ऋतुमन्नाम आक्रीडं सुरयोषिताम् ॥ ४ ॥
> सर्वतोऽलंकृतं दिव्यैर्नित्यं पुष्पफलर्द्रुमैः । मंदारैः पारिजातैश्च पाटलाशोकचंपकैः ॥ ५ ॥
> चूतैःप्रियालैः पनसैराम्रैराम्रातकैरपि । क्रमुकैर्नारिकेलैश्च खर्जूरैर्बीजपूरकैः ॥ ६ ॥
> मधूकैः श्यालतालैश्च तमालैरसनार्जुनैः । द्राक्षेक्षुरंभाजंबूभिर्बदर्यक्षाभयामलैः ॥ ७ ॥
> अरिष्टोदुबरप्लक्षैर्वटैः किंशुकचंदनैः । पिचुमंदैः कोविदारैः सरलैर्देवदारुभिः ॥ ८ ॥

जे देखतां उपवन । विश्रांतीतें पावें मन । छाया शीतल सुगंध पवन । कोकिळ कुंजन सुखकारी ॥ १९ ॥

सर्वां ऋतूंचें एकायतन । सर्वां ऋतूंचे फळपुष्प जाण । त्या वनीं सदा सुख संपन्न । तें क्रीडास्थान अप्सरां ॥ २० ॥

अमृता परीस फळें सुस्वाद । कस्तुरीहुनी सुगंध । मलयानिल [मु. 'सुस्वर'.] सुख संबंध । क्रीडती षट्पद सुखरुप ॥ २१ ॥

कृष्णसाचार कृष्ण भ्रमर । सुमनीं प्रवेशोनि साचार । आमोद सेविती सुखसार । केवीं केसर कुचंबे ॥ २२ ॥

वृक्ष [तु. दै. 'शेवती'.] शोभती देवतरु । पाटल परिजातक मांदारु । संतानादि कलातरु । वृक्ष विस्तारु चंदनादि ॥ २३ ॥

चंदन चंपक हरिचंदन । चूतवन अशोकवन । खर्जूरी शालताल वन । नंदनवन समशोभा ॥ २४ ॥

[तु. दै. 'बोध'.] राय केळी सोनकेळी । मधमधीत कर्पूर कर्दळी । धडधडीत नारिकेळी । शोभावनफळीं सफळीत ॥ २५ ॥

मधुकवन विमलार्जुन । औदुंबर अति गहन । तमालवृक्ष शोभायमान । बिल्ववन साजिरे ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

द्राक्षी मंडप शोभायमान । जांबुळी वृक्ष एक समान । इक्षूदंड श्वेत कृष्ण । रस उलोन स्त्रवती ॥ २७ ॥

कंटकहीन बदरी [मु. 'रसाळी'.] सरळी । आंवळी वृक्ष राय आवंळी । फणस मधमधीत फळीं । मधुवृक्षांतळीं फळशोभा ॥ २८ ॥

पिचुमंद सुशीतल । सकळ व्याधी निरसी सबळ । गुगुळ वृक्ष सोवन सरळ । वट पिंपळ पलाश ॥ २९ ॥

निंबोणी नारंगी पोफळी । [कं. 'नागवल्लीच्या'.] रायणीच्या हारी विशाळी । कपीत्थवनाची नवाळी । वर्तुळाफळीं परिपक्व ॥ ३० ॥

कोरांटे जे कोविदार । वटवृक्षाहूनि थोर । श्वेत पीत पुष्पीं सुंदर । आणि बिजपूर मातुलिंगी ॥ ३१ ॥

सुरभी वृक्ष देवदार । भल्लातळी वृक्षविस्तार । इंगुदिवृक्ष अपार । फळभार सुपुष्पित ॥ ३२ ॥

ऐसिया वृक्षांचिया जाती । असंख्यात नेणों किती । तेणें शोभा शोभे पर्वतीं । ऋषी वसती मुनिसिद्ध ॥ ३३ ॥

तस्मिन्सरः सुविपुलं लसत्कांचनपंकजम् । कुमुदोत्पलकल्हारशतपत्रश्रियार्जितम् ॥ ९ ॥
मत्तषट्पदनिर्घुष्टं शकुंतैश्च कलस्वनैः । हंसकारंडवाकीर्णं चक्राख्यैः सारसैरपि ॥ १० ॥
मत्स्यकच्छपसंचारचलत्पद्मरजः पथः । मल्लिकाशतपत्रैश्च माधवीजालकादिभिः ॥ ११ ॥
शोभितं तीरजैश्चांन्यैः सर्वर्तुभिरलंकृतैः ॥ १२ ॥

ते गिरीदरींच्या ठाईं । अगाध सरोवर पाही । तेथिंच्या जळमर्यादा नाहीं । पूर्णत्वठाईं परिपूर्ण ॥ ३४ ॥

न्यूनपूर्णता जळीं । असेना कोण्हें काळीं । रातोत्पळीं श्वेतोत्पळीं । हेमकमळीं शोभत ॥ ३५ ॥

कुमुदें कल्हारें नीलोत्पळें । मल्लिका शतपत्रें कुडमळे । जळ चांचल्यें चळत्कमळें । जळ परिमळें स्वादिष्ट ॥ ३६ ॥

समस्त ऋतु एका काळें । सुपुष्पित सदा फळें । सरोवरीचेनि जळें । क्रीडती सकळें जळचरें ॥ ३७ ॥

सरोवरीं जळचर । मच्छ कच्छ पर्वताकार । त्यांतेहि ग्रासी ऐसा नक्र । थोरां थोर गजग्रहो ॥ ३८ ॥

तेंचि वनीं वसे गजेंद्र । तेचि सरोसरीं वसे नक्र । दोघांसही [तु. दै. 'संपूर्ण'.] पूर्व वैर । अति दुर्धर ब्रह्मशापें ॥ ३९ ॥

पूर्वीं इंद्रद्युम्न राजा राजेंद्र । ब्रह्मशापें जाला गजेंद्र । हूहू गंधर्व अति [मु. 'दुर्धर'.] सुंदर । तो जाहला नक्र ब्रह्मशापें ॥ ४० ॥ [ओव्या ४०, ४३ व ४४ वि. प्रतीत नाहीत.]

एवढी ब्रह्मशापाची थोरी । त्यांसी घडली कैशापरी । तेहि कथा निज निर्धारी । पूर्वानुस्मरीं अवधारा ॥ ४१

अनुक्रमणिका

॥

[अं. ‘पांड्य’.] **पौंड्रदेशीं राजा इंद्रद्युम्न । भगवद्भक्तिपरायण । तो या सरोवरां येऊन । एकांत देखोन राहिला ॥ ४२ ॥**

**एकांत आणि अति** [कं. ‘विरक्त’] **विश्रांत । रायाचें सुखावलें चित्त । तेथ राहोनि नेमस्त । व्रत चालवी तपश्चर्या ॥ ४३ ॥** [ओव्या ४०, ४३ व ४४ वि. प्रतीत नाहीत.]

स एकदाराधानकाल आत्मवान् । गृहीतमौनव्रत ईश्वरं हरिम् ॥
जटाधरस्तापस आप्लुतोऽच्युतं समर्चयामास कुलाचलाश्रमः ॥ १३ ॥
यदुच्छया तत्र महायशा मुनिः । समागमच्छिष्यगणैःपरिश्रितः ॥
तं वीक्ष्य तूष्णीमकृतार्हणादिकम् । रहस्युपासीनमृषिश्चुकोपह ॥ १४ ॥
तस्माइमं शापमदादसाधुरयं । दुरात्मा कृतबुद्धिरद्य ॥
विप्रावमंता विशतां तमोऽन्धं । यथा गजः स्तब्धमतिः स एव ॥ १५ ॥
एवं शप्त्वागतोऽगस्त्यो भगवान्नृप सानुगः । इन्द्रद्युम्नोऽपि राजर्षिर्दिष्टं तदुपधारयत् ॥ १६ ॥
आपन्नः कौंजरीं योनिमात्मस्मृतिविनाशिनीम् ॥ १७ ॥

**तोचि राजा इंद्रद्युम्न । त्रिकाळ करितां संध्यास्नान । केश वळिले जटाग्रंथन । तपस्वी पूर्ण तापसत्वें ॥ ४४ ॥** [ओव्या ४०, ४३ व ४४ वि. प्रतीत नाहीत.]

**तो एके काळी इंद्रद्युम्न । आराधन काळ लक्षून । ते सरोवरोदकीं करोनि स्नान । घालोनि आसन बैसला ॥ ४५ ॥**

**तेचि काळीं अगस्तीमुनी । आला शिष्येसी परिवारोनि ।**
**रायें अभ्युत्थान न करोनी । बैसला आसनीं ध्यानस्थ ॥ ४६ ॥**

**ऋषी येतां देखोन । रायें सांडिला उपेक्षून । नाहीं नमन अभ्युत्थान । बैसला ध्यान धरूनी ॥ ४७ ॥**

**साधू सर्वांगीं चैतन्यघन । त्यासीं न भजोनि जो धरी ध्यान ।**
**तें ध्यान नव्हे परम विघ्न । अधःपतन ध्यान गर्वें ॥ ४८ ॥**

**ध्यान गर्व ज्याचें ठाईं । ज्ञान गर्व जो उताणा पाही । विद्या गर्वें मुसमुस देहीं । तो नर पाही अधःपाती ॥ ४९ ॥**

**साधुसच्चिदानंद व्यक्ती । ध्यानीच काल्पनिक मूर्ती । साधु उपेक्षा ध्यानाप्रती । ते अधः पाती ध्यान गर्वें ॥ ५० ॥**

**उपेक्षुनी साधु सज्जन । जो साक्षेपें आदरी ध्यान । ध्यान नव्हे ते नागवण । आपणया आपण नाडिले ॥ ५१ ॥**

अनुक्रमणिका

ब्राह्मणीं नाहीं ब्रह्मभावो । भूतीं नाहीं भगवद्भावों । त्याचें ध्यानीं चित्तवावो । आला अपावो ध्यानगर्वें ॥ ५२ ॥

ब्राह्मणीं नाहीं ब्रह्मत्व भक्ती । भगवद्भाव नाहीं [मु. 'सर्वां'.] भूतीं । रायाची खोटी ध्यानस्थिती । तेणें अगस्ती कोपला ॥ ५३ ॥

राजा सावधान भगवद्ध्यानीं । परि उपेक्षा साधुसज्ञनीं ।
परम विघ्न ध्यान स्थानीं । देखोनि मुनी क्षोभला ॥ ५४ ॥

रायाचा झडे ध्यानाभिमान । भगवत्प्राप्ती पावे पूर्ण । ऐसी कृपा अनुलक्षून । शापवचन वदे मुनी ॥ ५५ ॥

परम कृपाळु अगस्ती । शाप वदला [अं. मु. 'कृपामूर्ती'.] कृपानुवर्ती । साधु सज्ञनी गर्वोन्मती । गजत्व प्राप्ती पावसी ॥ ५६ ॥

साधु सज्ञनीं गर्वोन्मत्त । तो तूं होसी गज उन्मत्त । ऐसें अगस्ती जवं वदत । गजत्व प्राप्त रायासी ॥ ५७ ॥

ब्राह्मणाचिया [तु. दै. 'अभ्यागती'.] अभक्ती । साधु सज्ञनीं ध्यानोन्मत्ती ।
रायासी गजत्वाची प्राप्ती । मुनी अगस्तिचेनि शापें ॥ ५८ ॥

ब्राह्मणशाप अति दुर्धर । तेचि वनी तो राजेंद्र । जाहला उन्मत्त गजेंद्र । बळोद्गार महाबळी ॥ ५९ ॥

ऐसी इंद्रद्युम्नाची गती । हू हू गंधर्व याचिरीती । ब्रह्मशापाचे शापोक्ती । नक्रत्व [मु. 'गती'.] प्राप्ती पावला ॥ ६० ॥

तेचि सरोवरीं मध्यान्हकाळीं । देवलऋषी करितां आंघोळी ।
हू हू गंधर्व तेचि काळीं । आला जलकेली स्त्रियां युक्त ॥ ६१ ॥

देवलऋषी जळां आंत । उभा सूर्यसूक्त जपत । हू हू गंधर्व जळीं गुप्त । येवोनि धरीत ऋषीपायी ॥ ६२ ॥

गुप्त ग्रहो जैसा उदकीं । येवोनि झोंबे एकाएकी । तैसाचि गंधर्व अविवेकी । झोंबला तवकीं ऋषीपायीं ॥ ६३ ॥

पायीं झोंबतां सत्वर । कोपोनि शापी ऋषीश्वर । गुप्त गती जळचर । होसी तूं नक्र गजग्रहो ॥ ६४ ॥

ब्रह्मशाप ऐकोनि कानीं । गंधर्व इंद्रद्युम्न दोन्ही । उःशाप मागावया लागुनी । कर जोडुनी विनविती ॥ ६५ ॥

आमचे आम्ही गर्वोन्मत्त । ब्रह्मशापें जाहलों प्राप्त । तुम्ही दोघे कृपावंत । शापोन्मुक्त करावें ॥ ६६ ॥

आम्ही दोघे अति अपराधी । तुम्ही दोघे कृपानिधी । तुम्ही अक्षोभ्य अगाधबुद्धी । आम्हा त्रिशुद्धी उद्धरावें ॥ ६७ ॥

अनुक्रमणिका

तुम्ही मायबापाहोनि आप्त । आम्ही [मुं. अं. 'अत्यंत'; मु. 'अपराधी अत्यंत'.] अपत्यें अति उद्धत । दोघे कृपाळूं समर्थ । शापोन्मुक्त करावें ॥ ६८ ॥ [ओवी ६८ वि. प्रतीत नाही.]

ऐसें ऐकतां प्रार्थन । कृपेनें द्रवले दोघेजण । वदले उःशाप वचन । सावधान अवधारा ॥ ६९ ॥

जळीं एक एकवनस्थळीं । वैरी व्हाल अतुर्बळी । युद्ध करितां जळ कल्लोळीं । तुम्हां वनमाळी तारील ॥ ७० ॥

युद्ध करितां अत्यंत । जेव्हां मांडेल प्राणांत । तेव्हां पावोनि भगवंत । नित्य निर्मुक्त करील ॥ ७१ ॥

शापोन्मुक्त जन्मोन्मुक्त । हरी करील भव निर्मुक्त । ऐसें वदले वरदोक्त । ऋषीसमर्थ कृपाळू ॥ ७२ ॥

ब्राह्मण शापिती अति क्षोभोन । हे समूळ मिथ्या वचन । ऋषी कृपाळू दीनोद्धरण । वरद वदोन उद्धरिलें ॥ ७३ ॥

उद्धरावयाची नवलपरी । काढिले जन्ममरणा बाहेरी । एवढी कृपेची पैं थोरी । कोपामाझारीं ऋषींच्या ॥ ७४ ॥

जैसा मातेचा निज कोप । वरी कठिण आंत सुखरुप । तैसाच ब्राह्मणाचा शाप । शापें चिद्रूप पावती ॥ ७५ ॥

ब्राह्मणांचिया कोपानुवृत्तीं । पाप निर्दळूनी ब्रह्मप्राप्ती । संतोषल्या काय देती । श्रुति स्मृती अगम्य ॥ ७६ ॥

ऐसी वरदोक्ती वदोन । ऋषी गेला करोनि स्नान । गजग्रहो दोघेजण । जाले आपण ऋषीशापें ॥ ७७ ॥

राजा गजेंद्र वनस्थळी । गंधर्व नक्र जाहला जळीं । दोघेजण अतुर्बळीं । जळीं स्थळीं विचरत ॥ ७८ ॥

जळीं नक्र महाबळी । तिमिंगिलांतें सगळें गिळी । जळचरे कांपती [तु. दै. मु. 'जळी'.] चळीं । जळ कल्लोळीं विचरतां ॥ ७९ ॥

लहानसान नाणी दृष्टी । पर्वत प्राय मच्छ घोटी । ऐसा नक्र जगजेठी । [मु. 'सुख'; कं. 'सरिता'.] सर संतुष्टी राहिला ॥ ८० ॥

शापें स्मृती गेली समस्त । तऱ्ही माझा वैरी उदकांत । ऐसें गजेंद्र नित्य स्मरत । न ये उदकार्थ सरोवरा ॥ ८१ ॥

गजेंद्र जो कां माझा वैरी । येचि वसतो वनांतरीं । हे आठवण नित्य नक्रीं । न ये बाहेरी आहारार्थ ॥ ८२ ॥

नक्रजळीं अतुर्बळी । गजेंद्रवनीं बळिया बळी । दोघे जण शाप समेळी । जळींस्थळीं विचरत ॥ ८३ ॥

अनुक्रमणिका

तत्रैकदा तद्गिरिकाननाश्रयः करेणुभिर्वारणयूथपश्चरन् ।
सकंटकान्कीचकवेणुबेत्रवद्विशालगुल्मान्प्ररूजन्वनस्पतीन् ॥ १८ ॥
यद्गंधमात्राद्धरयो गजेंद्रा व्याघ्रादयो व्यालमृगाः सखड्गाः ।
महोरगाश्चापि भयाद्द्रवंति सगौरकृष्णाः शरभाश्चमर्यः ॥ १९ ॥
वृका वराहा महिषर्क्षशल्या गोपुच्छशाला वृकमर्कटाश्च ।
अन्यत्र क्षुद्रा हरिणा शशादयश्चरंत्यभीता यदनुग्रहेण ॥ २० ॥

**तें गजेंद्र गिरीकंदरीं । गजी गजशाव सपरिवारी । क्रीडा करीत वनांतरीं । वनविहारी उन्मत्त ॥ ८४ ॥**

**चैत्रमासींच्या वनशलाकीं । तेणें सेवितां एकाएकी । मद चालला पैं तंवकी । अति उद्रेक उन्माद ॥ ८५ ॥**

**तेणें उन्मादें आपण । मांडिलें वन विहरण । वेळू जाळी उपडून । वेत्रवन विध्वंसी ॥ ८६ ॥**

**गुल्मलता थोर थोर । गगनचुंबी तरुवर । काटेसांवरी अपार । उन्मळी समग्र** [मु. दंताग्रें’.] **पुच्छाग्रें ॥ ८७ ॥**

**हाणतां दातांची पैं झडे । पाडीत पर्वताचे कडे । त्याच्या मदगंधापुढे । पळती रोकडे वन सिंह ॥ ८८ ॥**

**गजेंद्र मदाचें अवघ्राण । दिग्गज कांपती संपूर्ण । शरभ शार्दूल पलायमान । सांडिती प्राण सिंह व्याघ्र ॥ ८९ ॥**

**अस्वल वराह महिष वृक । गौरवानर खग जंबूक । गोचमरी शाळ शशक । मृगादिक** [मु. ‘भये’.] **स्वयें** [पै. ‘लपती’.] **पळती ॥ ९० ॥**

**पळत्या पशू नाभिकार । देऊनी त्या राखें गजेंद्र । तैं ते घेती उदकचार । दर्प दुर्धर साहवेना ॥ ९१ ॥** [ओवी ९१ तु. दै. प्रतींत नाही.]

स धर्मतप्तः करिभि : करेणुभिर्वृतो मदच्युत्कलभैरनुद्रुतः ।
गिरिं गरिम्णा परितःप्रकंपयन् निषेव्यमाणोऽलिकुलैर्मदाशनैः ॥ २१ ॥

**पर्वतीं चालतां गजेंद्र बळी । पर्वत दडपत पाताळीं । सर्प चेपले फणामंडळी । पन्नगकुळीं आकांत ॥ ९२ ॥**

**गजेंद्र उन्माद मदमेळीं । करीतां वन रवंदोळी । चैत्रीचा रवी मध्यान्हकाळीं । कुंभस्थळीं पोळला ॥ ९३ ॥**

**गजी गज शाव समस्त । उष्णें जालीं अति संतप्त । अवघीं जाहली तृषार्त । उदकार्थ तळमळिती ॥ ९४ ॥**

**करुनी पंचयोजन गमन । नित्यकरी गंडकी पयपान । परी सरोवरीचें जीवन । नक्राभेण स्पर्शेना ॥ ९५ ॥**

**गंडकी न ठके उष्ण समेळी । किरणीं पोळला कुंभस्थळीं । आला सरोवरा जवळीं । भय संमेळी तृषार्त ॥ ९६ ॥**

अनुक्रमणिका

**सोंड घालितां सरोवरीं । गजेंद्र धांकत जिव्हारी । झणी मज झोंबेल वैरी । भयभारी जळपानीं ॥ ९७ ॥**

**सोंड घालितांची जळीं । गज मदगंध सेवावया अळी । रुंजी करिती गंडस्थळी । भ्रमरावळी रुणझुणती ॥ ९८ ॥**

**गजी गजशाव संयुक्त । तृषा पीडिली जळार्थ । गजेंद्रेसी समवेत । आली धांवत सरोवरा ॥ ९९ ॥**

> सरोनिलं पंकजरेणुरूषितं जिघ्रन्विदूरान्मदविव्हलेक्षणः ।
> वृतः स्वयूथेन तृषार्दितेन तत्सरोवराभ्याशमथागमद् द्रुतम् ॥ २२ ॥
> विगाह्य तस्मिन्नमृतांबु निर्मलं हेमारविंदोत्पलरेणुवासितम् ।
> पपौ निकामं निजपुष्करोद्धृतमात्मानमद्भिः स्नपयन्गतक्लमः ॥ २३ ॥
> स्वपुष्करेणोद्धृतसीकरांबुभिर्निपाययन्संस्नपयन्यथा गृही ।
> घृणी करेणूःकलभांश्च दुर्मदो नाचष्ट कृच्छ्रं कृपणोऽजमायया ॥ २४ ॥

**तें तडाग अति पुष्कळ । माजी निर्मळ जळ सुनीळ । कमळ गंध सुपरीमळ । अति शीतळ सीकरांबू ॥ १०० ॥**

**गज राहोनि जळा बाहेरी । सोंडी घालोनि सरोवरीं । जळ प्रशिलें स्वइच्छेकरी । मस्तकावरी शिंपिलें ॥ १०१ ॥**

**जळ प्राशनें गजपती । जाहाली सकळ श्रमाशांती । जळ सिंचनें जाहाली विश्रांती । चढला पुढती गजमद ॥ १०२ ॥**

**रिघोनि सरोवर जळीं । उन्मादें मांडिली** [मु. 'जळकेळी'; वि. 'क्रीडाखेळी'.] **क्रीडारोळी । कमळा करिती रवंदोळी । जळ कल्लोळीं क्रीडत ॥ १०३ ॥**

**गजी गजशाव उदकाप्रती । रिघावया अवघी भीती । शुंडा दंडें गजपती । जळ पाजिती सर्वांसी ॥ १०४ ॥**

**पहिले पाजी प्रिय भार्येसी । भार्या पाजिती प्रिय पुत्रासी । मग पाजी इतरांसी । जेंवीं कुटुंबासी गृहस्थ ॥ १०५ ॥**

**विसरोनि निजमरण । गृहस्था कुटुंब पोषण । तैसाची गजेंद्र आपण । नक्र ग्रहण विसरला ॥ १०६ ॥**

**प्राणी विसरे निजमरणासी । काळ टपतसे तयासी । तेंवी नक्र गजेंद्रासी । जळ सहवासी टपतसे ॥ १०७ ॥**

**जेंवी कां काळ पाहोनि अंत । मग प्राण्याचा करी घात । तेंवी गजेंद्र सरोवरा आंत । नक्र धरीत साटोपें ॥ १०८ ॥**

**माया केला विपरितार्थ । विसरोनियां आत्मघात । स्त्रीपुत्रीं अति मोहित । केला भ्रांत मोहममता ॥ १०९ ॥**

अनुक्रमणिका

तं तत्र कश्चिन्नृप दैवचोदितो ग्राहो बलीयांश्चरणे रुषाऽग्रहीत् ।
यदृच्छयैवं व्यसनं गतो गजो यथाबलं सोऽतिबलो विचक्रमे ॥ २५ ॥
तथातुरं यूथपतिं करेणवो विकृष्यमाणं तरसा बलीयसा ।
विचिक्रुशुर्दीनधियोऽपरे गजाः पार्ष्णिग्रहास्तारयितुं न चाशकन् ॥ २६ ॥
नियुद्धयतोरेवमिभेंद्रनक्रयोर्विकर्षतोरंतरतो बहिर्मिथः
समा सहस्त्रं व्यगमन्महीपते सप्राणयोश्चित्रममंसतामराः ॥ २७ ॥

**अंगीं देहलोभाचा मद । दुसरा** [कं. 'जळाचा'.] **बळाचा उन्माद । तिसरा गजमदाचा मद । जाला मदांध गजेंद्र ॥ ११० ॥**

**जन्म मरणाचा बाध । ज्या नाठवे तो मोहांध । न देखे नरकपात बाध । तो बुद्ध्यंध महामूढ ॥ १११ ॥**

**त्रिविध मदें अतिमोहित । बुद्धी अंधत्व गजेंद्र भ्रांत । विसरोनि नक्र घात । जळीं क्रीडत स्त्री लोभें ॥ ११२ ॥**

**ऐसें क्रीडतां जळस्थानीं । नक्रें धांवोनि धरिला चरणीं । गजें निजबळें ओढुनी । बाहेरी आणूनी मारुं पाहे ॥ ११३ ॥**

**तवं तो नक्र महाबळी । हबका हाणोनि नेला जळीं । गजें युद्ध केलें ते काळीं । सोंडें कवळी नक्रातें ॥ ११४ ॥**

**सोंड हाणता तंवके** [मु. 'शिरीं'.] **करी । सोंड आदळे जळावरी । नक्र निश्चळ जळांतरीं । भय न धरी सोंडेचें ॥ ११५ ॥**

**सोंड बुडवितां जळ संपुटी । नक्रें खुडिली सोंड आनकुटी । तेणें गज झाला कष्टी । मगर मिठी सुटेना ॥ ११६ ॥**

**नक्र जाणें गजवर्मस्थ । सोंडेची अणी टपोनी खुडित । अमित प्रवाहे पैं रक्त । गज किरकिरित अति दुःखें ॥ ११७ ॥**

**गज ओढीत भूतळीं । नक्र निजबळें ओढी जळीं । सहस्त्र वर्षे रण रवंदोळी । जळ कल्लोळीं भिडिन्नले ॥ ११८ ॥**

**सहस्त्र वर्षें करितां रण । दोघे सबळ सप्राण । तें देखोनि अमर गण । आश्चर्य पूर्ण प्रशंसिती ॥ ११९ ॥**

**नक्रासी जळीं जळाहार । गजा पडिले निराहार । भूतळा नाणवेंचि नक्र । शक्ती समग्र क्षीण झाली ॥ १२० ॥**

**खुडीतां सोंडेच्या अणीसी । गजेंद्र जाला कासाविसी । मग बोभाय स्त्री पुत्रासी । ओढुनी पूंसीं मज काढा ॥ १२१ ॥**

अनुक्रमणिका

**पूंसी लागोनि समग्र । बळें ओढितां स्त्रीपुत्र । तिळभरी [मु. 'ढळेना'.] ओढेना तो नक्र । केलें विचित्र तें ऐका ॥ १२२ ॥**

**समस्तीं ओढितां पूंसासी । न सोडवे गजेंद्रासी । शेखीं न ओढवेची नक्रासी । अति बळेसीं कष्टतां ॥ १२३ ॥**

**नक्रें आसुडितां तेथ । गजी गजशाव समवेत । गजेंद्र नेला सरोवरांत । भयभीत जळमग्न ॥ १२४ ॥**

**नक्रभयें भयभीत । जळीं निमग्न निर्बुजत । गजेंद्र सांडुनी समस्त । आलीं पळत तीरासीं ॥ १२५ ॥**

**स्त्रिया म्हणती भाग्यथोर । संकटीं वांचले कुमर । नक्रें गिळिला गजेंद्र । अक्षत पुत्रकडे आले ॥ १२६ ॥**

**माता पुत्रांसी कृपादृष्टी । बुद्धी सांगती गोमटी । सांडा गजेंद्राचि गोष्टी । जळ संकटीं न रिघावे ॥ १२७ ॥**

**आयुष्य व्हावें निजपुत्रासी । उदक पाजोनि समस्तांसी ।**
**संकटीं सांडोनि भ्रतारासी । घेवोनि पुत्रांसी वना गेल्या ॥ १२८ ॥**

ततो गजेंद्रस्य मनोबलौजसाम् कालेन दीर्घेण महानभूद् व्ययः ।
विकृष्यमाणस्य जलेऽवसीदतो विपर्ययोऽभूत्सकलं जलौकसः ॥ २८ ॥
इत्थं गजेंद्रः स यदाऽऽप संकटं प्राणस्य देही विवशो यदृच्छया ।
अपारयन्नात्मविमोक्षणे चिरं दध्याविमां बुद्धिमथाभ्यपद्यत ॥ २९ ॥
न मामिमे ज्ञातय आतुरं गजाः कुतः करिण्यः प्रभवंति मोचितुम् ।
ग्राहेण पाशेन विधातुरावृतोऽप्यहं च तं यामि परं परायणम् ॥ ३० ॥

**सहस्त्र वर्षें पुरुषार्थी । युद्ध करितां नक्रापती । निराहरीं युद्धावर्ती । क्षीण शक्ती गजेंद्र ॥ १२९ ॥**

**क्षीण शरीर बळशक्ती । येतां स्त्रीपुत्रां काकुलती । सांडोनि गेलीं पतिप्राणांतीं । कोणी अंतीं न ये कामां ॥ १३० ॥**

**ऐसा गजेंद्र क्षीण शक्ती । मनोशक्तीं प्राणशक्ती । क्षीण इंद्रियें इंद्रियशक्ती । ग्रहगती गजेंद्रा ॥ १३१ ॥**

**गजेंद्र पाहे ममता धरूनी । अंतीं सोडिले सुहृदस्वजनीं ।**
**जेष्ठ कनिष्ठादि असंख्य पत्नी । अंतीं त्यागुनी मज गेल्या ॥ १३२ ॥**

**मज समान बळें दुर्धर । शतानुशत माझे कुमर । अंतीं विमुख समग्र । कळत्र पुत्र न ये कामां ॥ १३३ ॥**

**सुहृद आणि पुत्र प्रौढ । तींही सांडिली माझी चाड । हस्तिणीचा कोण पाड । अति अवघड प्राणांत ॥ १३४ ॥**

**सोडवावया नक्रावर्तीं । गजें वेंचिली निजशक्ती । कळत्र पुत्र सुहृदज्ञाती । न येचि अंतीं उपयोगा ॥ १३५ ॥**

अनुक्रमणिका

सार्थक करावया अंतकाळु । एक भगवंत कृपाळू । नामें मोक्षाचा सुकाळु । कळिकाळु आंकणा ॥ १३६ ॥

ज्याचें आदरें करितां स्मरण । निःशेष निमे जन्ममरण । त्याचिया चरणा रिघे शरण । भवबंधन छेदावया ॥ १३७ ॥

जीवशिवांहोनिपर । चहूं वाचा परात्पर । गुणागुणीं अनावर । त्यासी साचार शरणार्थी ॥ १३८ ॥

हरीसी जाहलिया शरणागत । देहीं असोनी देहातीत । कळी काळाचे पाडीन दांत । फाडीन खत विषयाचें ॥ १३९ ॥

गर्जतां रामनाम पवाडे । कर्मबंधन समूळ उडे । यम अंतक पायां पडे । नक्रबापुडे तें किती ॥ १४० ॥

ऐसी मज जे आठवण । हेचि हरीची कृपापूर्ण । हरी अनुग्रहेविण । नामस्मरण नाठवे ॥ १४१ ॥

एवं व्यवसितो बुद्धया समाधाय मनो हृदि । जजाप परमं जाप्यं प्राग्जन्मन्यनुशिक्षितम् ॥ ३१ ॥

करावें हरीचें स्मरण । ऐसी युक्ती विवंचून । मन बुद्धी हृदयीं समाधान । देऊनी आपण स्वस्थ जाला ॥ १४२ ॥

नक्रें केला जो कां व्यग्र । ते व्यथा निरसावया समग्र । धैर्य धारणा होउनी अव्यग्र । जपे परात्पर ते ऐका ॥ १४३ ॥

धैर्य नाहीं जयापासी । ते जन्ममरणाचे आंदणी दासी । पूर्व भजन संस्कारेसी । धैर्य गजासी हरिस्मरणीं ॥ १४४ ॥

पूर्व भजन परीपाटी । हरिस्मरणीं धृष्टी पुष्टी । मंत्र जपावया वाक्पुटीं । उल्हास पोटीं गजेंद्रा ॥ १४५ ॥

एका जनार्दना शरण । गजेंद्र मुखींचें स्तवन । अनुतापें पशुपावन । त्याचें ज्ञान अवधारा ॥ १४६ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां नक्रगजेंद्रुआख्यानं नाम एकविंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग बाविसावा

## गजेन्द्र उद्धरण

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

गजेन्द्र उवाच

ॐनमो भगवते तस्मै यत एतच्चिदात्मकम् । पुरुषायादिबीजाय परेशायाभिधीमहि ॥ १ ॥
यस्मिन्निदं यतश्चेदं येनेद य इदं स्वयम् । योऽस्मात्परस्माच्च परस्ते प्रपद्ये स्वयं भुवम् ॥ २ ॥
न विद्यते यस्य च जन्म कर्म वा । न नामरूपे गुणदोष एव वा ।
तथापि लोकाप्ययसंभवाय यः । स्वमायया तान्यनुकालमृच्छति ॥ ३ ॥
तस्मै नमः परेशाय ब्रह्मणेऽनंतशक्तये । अरूपायोरुरूपाय नम आश्चर्यकर्मणे ॥ ४ ॥

**हृदयीं अंतरात्मा सर्वज्ञ । त्याचेनि बुद्धींद्रियें सज्ञान । तेणें कायावाचामनें** [कं. 'आपण'.] **नमन । अनन्यशरण गजेन्द्र ॥ १ ॥**

**भगवंतासी अनन्यशरण । होतां पालटें देहचिन्ह । इंद्रियांचें विपरीत ज्ञान । तेंहि लक्षण अवधारा ॥ २ ॥**

**अनन्यत्वीं मन उन्मन । चित्त होय चैतन्यघन । बुद्धि होय समाधान । अहंता संपूर्ण सोहंत्वीं विरे ॥ ३ ॥**

**तेव्हां भूतें होती चिदाकार । विषय होती तन्मात्र । अनन्यशरणत्वाचें सूत्र । संसार चरित्र परब्रह्म ॥ ४ ॥**

**होवावया अनन्यशरण । पाहिजे भाग्य सत्वसंपन्न । तेणें भाग्यें गजेंद्र गहन । करितो नमन भगवंता ॥ ५ ॥**

**ओंकार ब्रह्मरूप पूर्ण । त्यासी प्रकाशी चैतन्यघन । त्या भगवंतासी नमन । कायावाचामनें अनन्यत्वें ॥ ६ ॥**

**ओमित्येकाक्षरं ब्रह्म । हें भगवद्गीतेचें निजवर्म । स्वयें बोलिला पुरुषोत्तम । ॐकार ब्रह्मवेद बीजत्वें ॥ ७ ॥**

**ॐकारबीज सनातन । स्वरवर्ण उच्चार ब्रह्मपूर्ण । भूतभौतिकें चैतन्यघन । त्या भगवंता नमन अनन्यत्वें ॥ ८ ॥**

**जो या सर्वां आदिकारण । स्वयें अकारण आपण । त्या पुरुषोत्तमासीं नमन । अनन्यशरण अनन्यत्वें ॥ ९ ॥**

**ब्रह्मा विष्णु आणि महेश । हेहि ज्याचे अंशांश । ऐसा परमेशाचा जो ईश । नमन माझें त्यास अनन्यत्वें ॥ १० ॥**

**त्याचें करूं जातां ध्यान । ध्येय ध्याता होय शून्य ।**
**ध्यानेंचि होय चैतन्यघन । त्यासी माझें नमन अनन्यत्वें ॥ ११ ॥**

अनुक्रमणिका

हें सर्व भासे ज्याचे ठायीं । ज्याचेनि सर्व प्रकाशलें पाहीं ।
जो सर्वी कोंदला ठायींच्या ठायीं । जो कीं सर्वही आपण ॥ १२ ॥

जेंवी गुळाचें कारलें केलें । देठ काठियेनसीं गोडिये आळें । तेवीं हें सर्वही संचलें । असे आतलें चिद्रूपत्वें ॥ १३ ॥

नाबदेचें नारळ गोमटें । कवटे काढीती ते करंटे । तेवीं चैतन्येंचि नेटेंपाटें । भासे समसकट सर्वरूप ॥ १४ ॥

तेथें जो देखे दोषगुण । तोचि नरकासी जाय आपण । मुनीचेनि शापें जाण । निजात्मखूण मी पावलों ॥ १५ ॥

जो कां मीतूंपणा परता । अनन्यशरण त्या भगवंता । ज्यासी नाहीं जन्मकथा । मरणवार्ता तो नेणें ॥ १६ ॥

ज्यासी नाहीं [तु. 'मरण धर्म'.] जन्मकर्म । त्यासी कैंचें रूपनाम । देहाविणें गुणदोषकर्म । धर्माधर्म असेना ॥ १७ ॥

ऐसा जो कां भगवंत । स्वलीला लोकसंग्रहार्थ । ब्रह्मा विष्णु शिव समस्त । अवतार धरीत गुणकर्में ॥ १८ ॥

उत्पत्तिकाळीं चतुरानन । तोचि स्थितिकाळीं विष्णु जाण । तोचि प्रळयीं त्रिनयन । नामाभिधान गुणकर्में ॥ १९ ॥

जोचि पेरी तोचि सोकरी । तोचि संवगणीही करी । तैसा एकचि श्रीहरी । गुणावतारी त्रिरूप ॥ २० ॥

नटु नाना वेष मांडी । संपादूनि सवेंचि सांडी । नटासि नाहिं घडिमोडी । तैसी परवडी भगवंतीं ॥ २१ ॥

नाना अवतार धरितां । श्रीहरीस नाहीं जन्मकथा । धरिले अवतार सांडितां । मरणवार्ता तो नेणें ॥ २२ ॥

ऐसा परेशा परेशु । अनंत शक्तीचा जो ईशु । ब्रह्मण्यदेवो जगदीशु । परम पुरुषु परमात्मा ॥ २३ ॥

जो अरूप रूपें परिपूर्ण । जो अनंतरूपें धरी आपण । त्या भगवंतासी लोटांगण । अनन्यशरण अच्युता ॥ २४ ॥

> मादृक् प्रपन्नपशुपाशविमोक्षणाय । मुक्ताय भूरिकरुणाय नमोऽलयाय ।
> स्वांशेन सर्वतनुभृन्मनसि प्रतीतप्रत्यग्दृशे भगवते बृहते नमस्ते ॥ ५ ॥

मजसारिखे अति दीन । स्वार्थी विमुख पशुसमान । तुज [मु. 'आलिया'.] जालिया अनन्यशरण । पाशछेदन तूं करिसी ॥ २५ ॥

नक्र पशु पाश ग्रहण । त्या तुच्छासी मानी कोण । कर्मपाश जो अति दारुण । कृपा करून छेदिसी ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

शरणागताचे पाश छेदून । स्व स्वरुपीं होती लीन । ऐसी पूर्ण कृपा करून । आपलें मुक्तपण त्यासी देसी ॥ २७ ॥

त्यासी देसी निजात्ममुक्ती । तेहि विशीं एक युक्ती । त्याची छेदिसी समूळ भ्रांती । नित्य मुक्ती सहजेची ॥ २८ ॥

ऐसिया हरी कृपावंता । माझें नमन अनन्यता । तुझेनि नमनें भगवंता । दिसे [कं. 'आत्मता'.] आप्तता सर्व भूतीं ॥ २९ ॥

सर्व भूतीं हृदयस्थ । अंतरात्मा भगवंत । दृष्टेपणें सदोदित । असे नांदत प्रतिशरीरीं ॥ ३० ॥

भगवंताची सर्वाभूतीं । मनोन्मनें नित्य प्राप्ती । भगवत्कृपेची हे ख्याती । भक्त पावती अनन्य ॥ ३१ ॥

प्रत्यग्दृशा हे मात । भूतां सबाह्य सदोदित । देखणेपणें भगवंत । दृश्य दृष्ट्यांत कोंदला ॥ ३२ ॥

बृहद्‌ब्रह्म सनातन । हें भगवंताचें अभिधान । त्यासी माझें अनन्य नमन । पाशबंधन छेदावया ॥ ३३ ॥

भगवंताची कृपा नव्हता । कदा न तुटे अहंममता । ते अहंममतेची कथा । ऐक आतां सांगेन ॥ ३४ ॥

> आत्मात्मजाप्तगृहवित्तजनेषु सक्तैर्दुष्प्रापणाय गुणसंगविवर्जिताय ।
> मुक्तात्मभिः स्वहृदये परिभाविताय ज्ञानात्मने भगवते नम ईश्वराय ॥ ६ ॥

मी म्हणणे हा खोडा जाण । माझी स्त्री हे खीळ कठीण । गृहसामग्री हे विविध धन । पाचरा पूर्ण सुबद्धा ॥ ३५ ॥

तेथें अपत्याची आनंद गुढी । तो खोडा घातल्यावरी बेडी ।
कर्म लौकिक स्वजन आवडी । ये बेडीची कडी खळखळीत ॥ ३६ ॥

खोडा खिळी त्यावरी बेडी । कृपणतेची हातकडी । हे कुटूंबधाडीची बांधवडी । त्याहिवरी भरडी नित्य विषयो ॥

खोडाची खीळ ते स्त्री कठीण । त्या कठीणपणाचें विंदान । निज मातेतें त्यागून । स्त्री आपण आप्त होये ॥ ३८ ॥

मातृसेवा वेद विहिती । ते सोडूनिया निश्चिती । स्त्रीं कामाचिया आसक्ती । वश करिती पुरुषातें ॥ ३९ ॥

[मु. 'दरंवेशियाचें'.] गारुडियाचें वानर जैसें । पुरुषासी वश करिती तैसें । नाचवी तैसें नाचे बैसे । अनारिसे न करवे ॥ ४० ॥

अनुक्रमणिका

जैसें पाळिलें कां श्वान । तैसा होय स्त्री अधीन । लाविल्या लागे वसवसून । वारिल्या मौन धरोनि राहे ॥ ४१ ॥

मातृसेवा भुक्तिमुक्ति । जे म्हणती ते माता त्यागिती । स्त्री कामाचिया आसक्ती । ज्ञाते होती अति भ्रांत ॥

मातृसेवा भुक्तिमुक्ती । स्त्री [दै. 'स्त्रियासेवा'.] आसक्ती नरकप्राप्ती । ऐसें व्याख्यान जें करिती । तेही मानिती स्त्री आप्त ॥ ४३ ॥

भ्रांतीमाजीं सप्तपाश । अहंदारा पुत्र पाश । गृह स्वजन धन पाश । आशा पाश सातवा ॥ ४४ ॥

सत्संगति नाहीं ज्यासी । रामनाम नाठवे त्यांसी । ते गुंतले कर्मपाशीं । हृदयस्थेसीं नव्हे भेटी ॥ ४५ ॥

सप्त पाशांचें छेदन । करावया सत्संग गहन । त्या सत्संगाचें महिमान । सावधान अवधारा ॥ ४६ ॥

अत्यद्भुतं तच्चरितं सुमंगलम् । गायंति आनंदसमुद्रमग्नाः ॥ ७ ॥

नाना चरित्रें हरिची ख्याती । अगाध कर्मे पावनकीर्ति । जे उल्हासें सदा गाती । धन्य त्रिजगतीं ते साधु ॥ ४७ ॥

अजन्माजन्म सोमवंशीं । अयोनिज सूर्यवंशीं । एकें शोषिले पूतनेसी । त्राटिकेसी पैं एकें ॥ ४८ ॥

एकें गुरुपुत्र आणिला । एकें गुरुयाग सिद्धी नेला । एकें गोवर्धन उचलिला । एकें बांधिला शिळासेतु ॥ ४९ ॥

एकें सोडोनि मातेसी । स्वयें गेला गोकुळासी । एकें सांडोनिं निज राज्यासी । वनवासी दंडकीं ॥ ५० ॥

जागे नव्हता कोणासी । मथुरा नेली द्वारकेसी । रामें अयोध्या निज गजरेसी । वैकुंठासी स्वयें नेली ॥ ५१ ॥

एक लोण्या लागी आपण । मातेपासीं करी रुदन । एक सीता शोकें जाण । करी रुदन वनवासीं ॥ ५२ ॥

ठकोनि मारिला काळयवन । वाली मारिला सिंतरोन । शिशुपाळादि दैत्यकंदन । खरदूषण श्रीरामें ॥ ५३ ॥

कंसचाणूर निर्दळण । मारिले रावण कुंभकर्ण । उग्रसेना राज्यस्थापन । लंकाभुवन बिभीषणा ॥ ५४ ॥

श्रीरामव्रत एकपत्नी । कृष्ण ब्रह्मचारी स्त्रिया भोगुनी । कृष्णें तारिले गोकुळ अवनी । जगदोद्धरणीं रामनाम ॥ ५५ ॥

ऐसें करितां हरिकीर्तन । व्यास जारपुत्र पावन । चोरट्या वाल्मिकाचें जाण । रामायण शिववंद्य ॥ ५६ ॥

अनुक्रमणिका

वानितां श्रीहरीची पदवी । दोघे जाले महाकवी । त्या दोघांचे ग्रंथ गौरवीं । मुक्ती सर्वी पाविजे ॥ ५७ ॥

अमंगळा करी मंगळ । ऐसी हरिकीर्ति निर्मळ । परम मंगळा मंगळ । सुमंगळ हरी कीर्ति ॥ ५८ ॥

रामनामाचिया परिपाटी । दोष जळती आकल्प कोटी । भुक्तीमुक्ती लागे पाठीं । पावन सृष्टी रामनामें ॥ ५९ ॥

यमयातनेचे पितर । चिंतिताती निरंतर । एकादशी हरिजागर । वंशीं तत्पर होऊं कोणी ॥ ६० ॥

पुत्र अथवा भ्रातृपुत्र । दुहिता अथवा दौहित्र । करिता एकादशी जागर । यमप्रहार तैं चुके ॥ ६१ ॥

नामें नरकीं उद्धरती । नामें स्वर्गस्थासी मुक्ती । ब्रह्मादिक अमरपती । जन्म वांछिती कलियुगीं ॥ ६२ ॥

कलियुगाची थोर ख्याती । नामासाठीं लाभे मुक्ती । स्त्रियादी अंत्यज उद्धरती । नामकीर्ति दाटुगी ॥ ६३ ॥

नामासी नाहीं स्नानबंधन । नामासी नाही विधि विधान ।
आसनीं भोजनीं शयनीं जाण । नामपावन हरीचें ॥ ६४ ॥

निदसुरिया निज शेजेसीं । नामस्मरण जयापासीं । ब्रह्मादिक वंदिती त्यासी । चहूं मुक्तीसी माहेर ॥ ६५ ॥

नामासरजीं वाजे टाळी । आशापाश होती होळी । तयें कीर्तन समेळीं । रंगीं वनमाळी [पै. ‘नाचत’.] डुल्लत ॥ ६६ ॥

हरिकीर्तनीं भक्तां आंत । हरिखें नाचे भगवंत । चरणरजें धूळी भूषित । असे डुल्लत स्वानंदें ॥ ६७ ॥

नाहं वसामि वैकुंठे योगिनां हृदये रवौ । मद्भक्ता यत्र गायंति तत्र तिष्ठामि नारद ॥ ८ ॥

कीर्तनसुखोचेनि उद्भटें । मज वैकुंठीं न कंठे । रवि बिंबाहि आंतुवटे । सुख न वटे मज तैसें ॥ ६८ ॥

उमरडुनि योगियांचा मानसीं । धांवोनि जाय कीर्तनापासीं । तेथेंचि तिष्ठे अहर्निशीं । स्वानंदेंसी डुल्लत ॥ ६९ ॥

माझिया [मु. ‘भक्तांचे’.] भेटीची आवडी । हरिकीर्तनीं घालावी उडी । कीर्तनसुखाची मज गोडी । कडोविकडी नाचत ॥ ७० ॥

भगवंते निज गुह्यासी । सांगितलें नारदापासीं । म्हणोनी तोही [अं. वि. ‘नामकीर्तनासी’.] नामकीर्तीसी । अहर्निशीं डुल्लत ॥ ७१ ॥

नामें निर्मुक्त महादोषी । ओस वस्ती यमलोकासी । तीर्थें मरती उपवासी । यम नेमासी लंघन ॥ ७२ ॥

अनुक्रमणिका

**नामें** [मु. 'नाम गजरेचि'.] **जगचि निर्मुक्त । वही पाहे चित्रगुप्त । कोरी पानें अवघीं तेथ । कर्मनिर्मुक्त हरिनामें ॥ ७३ ॥**

**रामनामाची प्रभा गाढी । वहीचीं पानें खोडी ना मोडी । अवघी वहीच उघडी । केली रोकडी हरिनामें ॥ ७४ ॥**

**ऐसें करितां कीर्तन । श्रोते वक्ते दोघे जण । होती आनंदें निमग्न । आनंदघन हरिनाम ॥ ७५ ॥**

यस्य ब्रह्मादयो देवा वेदा लोकाश्चराचराः । नामरूपविभेदेन फल्गव्या च कलया कृताः ॥ ९ ॥

**रामनामाचिया आवर्तीं । ज्यासी झाली स्वरुप प्राप्ती । त्याचिये दृष्टीं । त्रिजगतीं । मिथ्या प्रतीती फल्गुत्वें ॥ ७६ ॥**

**आदि ब्रह्माइंद्रादि देव । लोकपाळादिक विश्व । वेदानुवादें रुपनांव । मिथ्या सर्व रामनामें ॥ ७७ ॥**

**एका रामनामासाठीं ब्रह्मादि देवांची ही गोष्टी । फल्गुप्राय उडाली सृष्टी । रामनाम पुष्टी अगाध ॥ ७८ ॥**

**रामनाम हे चित्कळा । आवडी आलिया हृदयकमळा ।**
**नामकळा कोंदलिया डोळा । संसार सगळा तृणप्राय ॥ ७९ ॥**

**रामनामापासीं विरक्ती । रामनामें भुक्तीमुक्ती । रामनामें परम प्राप्ती । यथानिगुती अवधारा ॥ ८० ॥**

विष्णोर्नामैव पुंसः शमलमपहरेत्पुण्यमुत्पादयेच्च । ब्रह्मादिस्थानभोगाद्विरतिमथ गुरोः श्रीपदद्वंद्वभक्तिम् ।
तत्तवज्ञानं च विष्णोरिह मृतिजननभ्रांतिबीजं च दग्ध्वा ।
संपूर्णानंदबोधे महति च पुरुषं स्थापयित्वा निवृत्तम् ॥ १० ॥

**रामनाम स्मरतां नित्य । पाप निर्दळी आकल्पांत । पुण्य उपजवी अत्यद्भुत । जे नित्यानित्य छेदक ॥ ८१ ॥**

**करितां नित्य नामस्मरण । तेणें उपजे परम पुण्य । जे भोगक्षयें नव्हे क्षीण । ब्रह्म परिपूर्ण** [कं. 'व्यापक'; वि. 'पूर्णत्वें'.] **प्रापक ॥ ८२ ॥**

**नाम स्मरता वैराग्यपूर्ण ।** [तु. दै. मु. 'इंद्र'.] **इहलोकादि ब्रह्मसदन । मिथ्या देखे जैसे** [कं. 'श्वान'.] **स्वप्न । वैराग्य गहन या नांव ॥ ८३ ॥**

**ऐसी जालिया विरक्ती । सद्‌गुरु तोचि ब्रह्ममूर्ती । ऐसे उपजे अभेद भक्ती । सर्वांभूतीं भगवंत ॥ ८४ ॥**

**अभेद गुरुभक्तीचें ज्ञान । सर्व भूतीं भगवद्भजन । भूत भौतिकें चैतन्यघन । ब्रह्मज्ञान या नांव ॥ ८५ ॥**
**ऐस ऐसिया ब्रह्मस्थिती । जन्म मरणा सहज शांती । सबीज निर्दळे पैं भ्रांती । तेहि उपपत्ती अवधारा ॥ ८६**

अनुक्रमणिका

॥

प्रपंच येथें जाला होता । हे समूळीं मिथ्यावार्ता । पुढें होईल मागुता । कदा कल्पांता घडेना ॥ ८७ ॥

ऐसी जे कां सहज स्थिती । या नांव सबीज निरसे भ्रांती ।
पुरुषा परमानंद प्राप्ती । हे निज [वि. 'शांती'.] ख्याती नामाची ॥ ८८ ॥

देऊनी परमानंद प्राप्ती । नाम परते मागुती । राम नामाचिया आवर्ती । जडासी मुक्ती द्यावया ॥ ८९ ॥

रामनाम स्मरणासाठीं । परमानंदीं पडे मिठी । ब्रह्मरुपें प्रकटे सृष्टी । आनंद कोटी हरिनामें ॥ ९० ॥

ज्याचिया नामाचें ऐसें महिमान । तो स्वामी जनीं जनार्दन । त्यासी कायावाचामन । अनन्यशरण सद्भावें ॥

सद्भावेंसी अनन्यशरण । ऐकतांची दीन [मु. कं. 'वदन'.] वचन । स्वयें धांवला जनार्दन । कृपाळू पूर्ण दीनांचा ॥ ९२ ॥

एवं गजेन्द्रमुपवर्णितनिर्विशेषं ब्रह्मादयो विविधलिंगभिदाभिमानाः ।
नैते यदोपससृपुर्निखिलात्मकत्वात् तत्राखिलामरमयो हरिराविरासीत् ॥ ११ ॥
तं वै ग्रहार्तमुपलभ्य जगन्निवासः स्तोत्रं निशम्य दिविजैः सह संस्तुवद्भिः ।
छंदोमयेन गरुडेन समूह्यमानः चक्रायुधोऽभ्यगमदाशु यतो गजेन्द्रः ॥ १२ ॥

दीनोद्धारीं त्वरान्वित । परम कृपाळू भगवंत । तेणें श्रीशुक हर्षयुक्त । असे सांगत परिक्षिती ॥ ९३ ॥

सगुण तेंचि निर्गुण । निर्गुण तेंचि सगुण । नामें ब्रह्मप्राप्ती पूर्ण । जगदोद्धारण हरिनामें ॥ ९४ ॥

सविशेषीं निर्विशेष स्थिती । ऐसी गजेंद्रें केली स्तुती । तेणें तुष्टला श्रीपती । कृपामूर्ती कृपाळु ॥ ९५ ॥

शक्र विरिंची शंकर । इत्यादिक सुरवर । पदाभिमानी थोर थोर । त्यासी गजेंद्र नुद्धरवे ॥ ९६ ॥

समस्तांही सुरवरांसी । शिणता निज सामर्थ्येंसी । न सोडवे गजेंद्रासी । हृषिकेशी वांचूनी ॥ ९७ ॥

पृथक् इंद्रियांची सत्ता । नित्य [कं. 'ध्यान'.] अधीन श्रीभगवंता । तयावांचूनि सर्वथा । दीनोद्धारता न करवे ॥ ९८ ॥

समस्तांही सुरवरांसी । नुद्धरवे गजेंद्रासी । तयें काळीं हृषीकेशी । अति त्वरेसीं निघाला ॥ ९९ ॥

ऐकोनि गजेंद्रस्तवन । सुदर्शन हातीं वसवून । शीघ्र गरुडावरी वळंघोन । श्रीभगवान चालिला ॥ १०० ॥

सकळ [मु. तु. दै. 'जीवांचा जीव'.] देवांचा देव । सकळ देव ज्याचे अवयव । सर्वात्मक श्रीकेशव । स्वयें स्वमेव [मु.

'चालिला'.] पावला ॥ १०१ ॥

ऐकोनि गजेंद्रस्तवन । येतां देखोनि गरुडवाहन । देव करिती दिव्य स्तवन । कृपाळु पूर्ण दीनांचा ॥ १०२ ॥

जय जय दीन संरक्षण । जय जय दीन परिपालन । जय जय दीनोद्धरण । कृपाळु पूर्ण पूर्णत्वें ॥ १०३ ॥

जय जय भवभाव भावना । जय जय भवमूळ निर्दळणा । जय जय भवगज पंचानना । जय जनार्दना जगद्गुरो ॥

येतां देखोनि श्रीपती । आपुल्याला निज युक्ती । नानापरी करित स्तुती । विमान पंक्ती सुरवर ॥ १०५ ॥

गरुडारुढ मेघश्याम । दोहीं पंखांचा आक्रम । [कं. 'रथारथ'.] रंथंतर बृहत्साम । मनोरम सामग ॥ १०६ ॥

वामें रथंतर साम । दक्षिण पक्ष बृहत्साम । नादें डुल्लत पुरुषोत्तम । गरुडागम स्वानंदें ॥ १०७ ॥

यालागी छंदोमय नाम । स्वयें पावला गरुडोत्तम । त्याचे गतीचा संभ्रम । अनुपम्य अवधारा ॥ १०८ ॥

पृष्ठभागीं भगवंत । हरिचरण [तु. दै. 'हृदयांत'.] दोहीं हातांत । मुखें हरिनाम स्मरत । सामगीत दोहीं पक्षीं ॥ १०९ ॥

दोहीं हातीं चरणानुक्रम । पृष्ठीं श्याम हृदयीं राम । मुखीं नेमस्त हरिनाम । बृहत्साम दोहीं पक्षीं ॥ ११० ॥

ऐसी गरुडाची हे स्थिती । सबाह्य व्यापिली हरिभक्ती । यालागीं छंदोमय [तु. दै. मु. 'गाती'.] गती । वेदानुवृत्ती अनुवाद ॥ १११ ॥

सपर्वत धरा सागरेसी । तुकितां तृणप्राय हरीसी । एसियातें अहर्निशी । गरुड पृष्ठीसी वाहतसे ॥ ११२ ॥

ऐसा गरुडारूढ भगवंत । येतां परमानंदें डुल्लत । तंव गजेंद्र ग्रहग्रस्त । आर्तभूत देखिला ॥ ११३ ॥

चक्र सरसावुनीं हातीं । हरि म्हणे गरुडाप्रती । तुवां चलावें शीघ्रगती । गजपती उद्धरावया ॥ ११४ ॥

मनोवेगाचिये स्थिती । सहस्त्रधा अधिक गरुडगती । तोही चालतां सर्वशक्ती । गती भगवंतीं मानेना ॥ ११५ ॥

करावया गजेंद्र उद्धहरण । हरिसी आलें पैं स्फुरण । बाहु थरकती सकंकण । आपणया आपण विसरला ॥ ११६ ॥

पिंजारल्या रोमावळी । वीरगुंठी सुटली मोकळी । पुष्पें स्त्रवती क्षीतीतळीं । अतुर्बळी चालिला ॥ ११७ ॥

अनुक्रमणिका

सांडुनी गरुडवाहन । सवेग वेगें उडी घालून । जेथें गजेंद्र ग्रहण । शीघ्र आपण तेथें आला ॥ ११८ ॥

येरीकडे गजेंद्र जाण । ग्रहग्रस्त अति दीन । काय बोलिला करुणावचन । जेणें भगवान पावला ॥ ११९ ॥

> सोऽन्तः सरस्युरुबलेन गृहीत आर्तो दृष्ट्वा गरुत्मति हरिं ख उपात्तचक्रम् ।
> उत्क्षिप्य सांबुजकरं गिरमाह कृच्छ्रान्नारायणाखिलगुरो भगवन्नमस्ते ॥ १३ ॥

तये अगाध सरोवरीं । नक्रें [मु. 'गर्जून आक्रमिला'.] गजु आक्रमें करी । धरुनिया जलांतरीं । बलात्कारीं गांजिला ॥ १२० ॥

ग्रहग्रस्त मज देखोनी । मज सांडिले माझा पत्नी । पुत्रीं सांडिलें स्वजनीं । अंतीं कोण्ही न ये कामां ॥ १२१ ॥

मज ग्रहमुखीं अर्पूनी । अवघीजणीं जळ प्राशूनी । आम्ही वांचलों महा विघ्नीं । उल्हास करोनी गेलीं वना ॥ १२२ ॥

ऐसें तिहीं मज सांडितां । म्यांहि सांडिली त्यांची ममता । तेव्हां आठवलें चित्तां । हरि रक्षिता [तु. दै. 'कृपाळू'.] प्राणांतीं ॥

कृपा उपजली भगवंता । तरी तुटली दुस्तर ममता । आतां आठवते चित्तां । हरि रक्षिता कृपाळू ॥ १२४ ॥

अंतकाळीचा सखासोयरा । एक श्रीहरिचि खरा । ऐसें मानलें गजेंद्रा । [मु. 'स्वपुत्रदार'.] स्वदारा मोहत्यागें ॥ १२५ ॥

निःशेष गेलिया मोहममता । स्मरणादर पढिये चित्ता । भजनीं आवडी भगवंता । उल्हासता स्वानंदें ॥ १२६ ॥

कांहीं अर्पावे भगवंता । अंतीं संचितार्थ नये हातां । त्यावरी स्त्रीपुत्राची सत्ता । स्वयें मागता नेदिती ॥ १२७ ॥

अंतीं मागती कांहीं नेदिती । शेखीं सन्निपातला म्हणती । संचितार्थी तोंडीं माती । नागविती स्त्रीपुत्र ॥ १२८ ॥

म्हणती आतां हा मरेल । मरतां द्रव्यार्थ वेंचील । आम्हांस भिकेसी लावील । याचा बोल नायकावा ॥ १२९ ॥

ऐसे सुहृदाचें संमत । अंतीं संचितार्थ नागवीत । गृहस्थ मरे चरफडत । तैसाच प्राप्त गजेंद्रा ॥ १३० ॥

अर्पावया हरिजवळी । कांहीं नाहीं हातातळीं । शोधितां सरोवरजळीं । कमळ ते काळीं सांपडलें ॥ १३१ ॥

अनुक्रमणिका

शुंडादंडी कमळप्राप्ती । उल्हास गजेंद्राचें चित्तीं । आक्रोशें स्मरावया श्रीपती । विकळ गती वाचेची ॥ १३२ ॥

प्राण होता पैं विकळ । वाचा अतिशयें विव्हळ । तरी पशुजन्में [मु. दै. 'प्रबळ'; तं. 'प्रेमबळ'.] प्रेमळ । स्मरणशीळ गजेंद्र ॥ १३३ ॥

कमळ उचलोनि ऊर्ध्वगती । गजेंद्र पाहे अति प्रीतीं । गरुडारूढ लक्ष्मीपती । [मु. 'शंखचक्र'.] सचक्र हातीं देखिला ॥ १३४ ॥

दोघां होतां दृष्टादृष्टी । प्रेम उथळले पोटीं । सुखें कोंदाटले सृष्टी । आनंद कोटी [अं. 'न समाये'.] आल्हाद ॥ १३५ ॥

पूर्वीं वाचा अति विकळ । हरि देखतां निजात्ममूळ । अक्षरीं अक्षर अविकळ । वाचा सफळ अनुवादें ॥ १३६ ॥

अच्युत अव्यय अव्यक्त । व्यक्ताव्यक्तत्वें अनंत । स्वप्रकाशें सदोदित । अजन्मा नित्य अविनाशी ॥ १३७ ॥

नराचे नित्य आयतन । यालागीं नांवें नारायण । जगद्‌गूरु जनार्दन । अनन्य नमन तुज माझें ॥ १३८ ॥

भूतां संसार गती निर्गती । भूतां जन्म मरणप्राप्ती । विद्या अविद्या विदित गती । भगवन्मूर्ती नमस्ते ॥ १३९ ॥

वैराग्य आणि ऐश्वर्य । अद्वैतज्ञान आणि औदार्य । श्री अनुवादें यशस्कार्य । तया नमस्कार भगवंता ॥ १४० ॥

> तं वीक्ष्य पीडितमजः सहसावतीर्य सग्राहमाशु सरसः कृपयोज्जहार ।
> ग्राहाद्विपाटितमुखादरिणा गजेन्द्रं संपश्यतां हरिरमूमुचदुच्छ्रियाणाम् ॥ १४ ॥

ऐकतां गजेंद्र आर्तवचन । स्वयें गरुडासन सांडून । सरोवरीं उडी घालून । आला भगवान कृपाळु ॥ १४१ ॥

चक्रें हाणोनिया नक्र । चक्रधारें फोडिलें वक्त्र । मगरमिठी अति दुस्तर । नक्र गजेंद्र सोडीना ॥ १४२ ॥

लागतां श्रीहरीचें चक्र । रुधिरें न्हाणिला नक्र । तरी न सोडी गजेंद्र । दृढ वैर द्विजशापें ॥ १४३ ॥

बाप कृपाळु भगवंत । दोही तळीं घालोनि हात । जळाबाहेर अकस्मात । काढिलें त्वरित भगवंतें ॥ १४४ ॥

लागतां भगवंताचा हात । दोघेजण अति उद्धत । तेहि जाले शापोन्मुक्त । भाग्यवंत सभाग्य ॥ १४५ ॥

विमानीं देखती सुरवर । भूतळीं देखती ऋषीश्वर । गगनीं देखतीं खेचर । गजेंद्र नक्र उद्धरण ॥ १४६ ॥

भगवंतें कृपा करून । दोघे बाहेर आणून । गजेंद्र विमानीं घालून । श्रीभगवान निघाला ॥ १४७ ॥

अनुक्रमणिका

जातां देखोनि भगवंत । नक्र गदगदा हांसत । तयासी श्रीहरि पुसत । हास्य किमर्थ तुज आलें ॥ १४८ ॥

सर्वभूतीं हरि समान । गर्जे वेदशास्त्रपुराण । त्या तुजपासीं विषमपण । आजि संपूर्ण देखिलें ॥ १४९ ॥

उद्धरिलें गजेंद्रातें । मज कां उपक्षिलें येथें । याचि देखोनि विषमातें । अत्यद्भूतें हांसिलों ॥ १५० ॥

हरि स्वमुखें सांगे आपण । गजे केलें नामस्मरण । पापपुण्या निर्दळण । उद्धरण पावला ॥ १५१ ॥

तुझें जालिया दर्शन । माझें पाप नव्हे क्षीण । पापबळें म्यां आपण । श्रीभगवान जिंतिला ॥ १५२ ॥

तुझेनि नामें पाप निर्दळें । तुज देखलिया पाप न ढळे ।
माझिया पापाभेणें हरि पळे । मियां जिंकिलें गोविंदा ॥ १५३ ॥

सकळ पापाते संहारी । यालागीं नामें म्हणिजे हरि । माझिया पापांची त्याहूनि थोरी । तुज म्यां हरि जिंकिलें ॥

अति वक्रोक्ती नक्रवचन । ऐकोनि तोषला श्रीभगवान । तुझें पहावया निजज्ञान । उपेक्षण म्यां केलें ॥ १५५ ॥

माझिया दर्शनाची प्राप्ती । तुज जाहाली ज्ञानस्फूर्ती । ऐसें बोलुनी श्रीपती । नक्र गजपती भेटविले ॥ १५६ ॥

नक्रें धरिलें गजाचें चरण । तुझें करितां चरण गृहण । मज भेटला श्रीभगवान । तुझेनि जाण गजेंद्रा ॥ १५७ ॥

गजें घातलें लोटांगण । तुवां धरिले माझे चरण । मज आठवला श्रीभगवान । उद्धरण तुझेनि ॥ १५८ ॥

येरयेरांचा उपकार । परस्परें मानिती थोर । श्रीहरि भेटलिया साचार । पूर्व वैर उपशमे ॥ १५९ ॥

आम्ही तुम्ही दोघेजण । पूर्वीं सखे बंधु ब्राह्मण । धनलोभें शापून जाण । गजनक्रपण पावलों ॥ १६० ॥

त्याही वैराची उपशांती । आजि पावलों निश्चिती । पूर्वापूर्व वैरशांती । भगवन्मूर्ति भेटलिया ॥ १६१ ॥

श्रीहरि समान समता । दोघे पावले स्वरुपता । त्याही स्वरुपाची व्यवस्था । यथार्थता अवधारा ॥ १६२ ॥

श्याम राजीव लोचन । ठाणमाण गुणलक्षण । रूपरेखा समसमान । दोघे अनन्य हरिरुप ॥ १६३ ॥

शंखचक्रगदापद्म । तिघे दिसते समानसम । मुख्य कोण पुरुषोत्तम । देवां दुर्गम लक्षेना ॥ १६४ ॥

अनुक्रमणिका

रमा देखोनि तिन्ही मूर्ती । म्हणे भजावें कोणा प्रती । ब्रह्मादिक विस्मित चित्तीं । मूळमूर्ति लक्षेना ॥ १६५ ॥

संतोषोनि श्रीभगवान । स्वरुपता दे संपूर्ण । नेदी श्रीवत्सलांछन । मज अधीन नाहीं म्हणे ॥ १६६ ॥

ब्राह्मणाचिया दुर्वाक्यता । हृदयीं साहिल्या द्विजलाता । तैं श्रीवत्स लाभे हातां । सत्य वाक्यता वेदार्थ ॥ १६७ ॥

ज्यासी श्रीवत्सलांछन । तोचि स्वामी श्रीभगवान । येर ते भक्त तत्समान । साधु सज्ञान लक्षिती ॥ १६८ ॥

भगवद्भक्त इंद्रद्युम्न । त्याचे करितां उद्धरण । धरितां भक्तांचे चरण । उद्धरण नक्रासी ॥ १६९ ॥

भक्तसंगती जे जे लागत । ते ते तारी श्रीभगवंत । ऐसें गर्जे भागवत । ते पद प्राप्त नक्रासी ॥ १७० ॥

कृपाळु श्रीभगवंत । उद्धरिले निज भक्त । अवघे जयजयकार करीत । सुर वर्षत सुमनीं ॥ १७१ ॥

तंव गरुड धांपा देत । वेगें येतां त्वरान्वित । पुढें देखोनि श्रीभगवंत । लज्जान्वित तो जाला ॥ १७२ ॥

मज न पुसतां श्रीपती । पुढें गेलासी कैशा रीतीं । गरुडा देखोनि मंदगती । गजेंद्रार्थी धाविन्नलों ॥ १७३ ॥

ऐकोनि हरिचें वचन । गरुड जाला लज्जायमान । मग घालुनी लोटांगण । धरिले चरण हरिचे ॥ १७४ ॥

आमुचिया गतीची तूं गती । आमुचिया शक्तीची तूं शक्ती ।
आमुचे मतीची तूं मती । कृपामूर्ति श्रीरामा ॥ १७५ ॥

मज येतां त्वरायुक्त । क्षुधेनें पीडिलों बहुत । तूं तंव कृपाळु भगवंत । कांहीं आहारार्थ मज देई ॥ १७६ ॥

श्रीहरि सांगे कृपाकरून । गजनक्र देह गहन । माझेनि हातें अति पावन । करी भक्षण आहारार्थ ॥ १७७ ॥

गरुड जंव आला तेथ । तंव देखिलें विपरीत । भ्रूभंग पक्षी आहारार्थ । सवेग धरित ते दोन्ही ॥ १७८ ॥

> तत्रापि पक्षी गगने भ्रमते च महाजवः । तावेकत्र यदा दृष्टौ भक्षार्थमग्रहीत्तदा ॥ १५ ॥
> नखेन गजमेकेन नक्रमेकेन चाक्षिपत् । चंच्वग्रे पक्षिणागृह्य तदोत्पत्य गरूत्मता ॥ १६ ॥

भ्रूभंग पक्षी भ्रमे गगनीं । गजेंद्र नक्र एकत्र दोनी । तेणें देखतांचि नयनीं । झड मारोनि धरियले ॥ १७९ ॥

भ्रूभंग धरिता ते दोन्ही । [कं. 'खगेन्द्र'.] ताराक्ष देखे स्वयें दुरुनी । गरुड येतांचि तळपोनी । भ्रूभंग धरुनी उडाला ॥ १८० ॥

तळी गजेंद्र त्यावरी नक्र । भ्रूभंग पक्षी महाथोर । गरूडें उचलिता सत्वर । माळा विचित्र [मु. तु. वि. मुं. दै.

अनुक्रमणिका

'परिलंबे'.] **परिबळें ॥ १८१ ॥**

**गरुडें भिडतां भ्रूभंगासी । तेणें सोडिलें गजनक्रांसी । गरुडें धरिले नखाग्रेसी । घेवोनी तिघांसी उडाला ॥ १८२ ॥**

> एषा मम महाशाखा शतयोजनमायता । एतामास्थाय शाखां त्वं खादेमान्त्रीन्खगेश्वर ॥ १७ ॥
> ततो द्रुमं पतगसहस्त्रसेवितं महीधरप्रतिमवपुः प्रकंपयन् ।
> खगोत्तमो द्रुतमभिपत्य वेगवान् बभंज तामविरलपत्रसंचयाम् ॥ १८ ॥
> स्पृष्टमात्रा तु सा पद्‌भ्यां गरुडेन बलीयसा । अभज्यत तरोः शाखा भग्नां चैनामधारयत् ॥ १९ ॥
> ता भग्नां स महाशाखां स्मयमानो विलोकयन् । अथात्र लंबतोऽपश्यद्वालखिल्यानधोमुखान् ॥ २० ॥

**मुखीं धरोनि भ्रूभंगासी । नखाग्रीं गजनक्रांसी । गरुड पाहे सुस्थानासी । स्वयें आहारासी सेवावया ॥ १८३ ॥**

**येतां देखोनि गरुडासी । उल्हास कनक जांबूसी । स्वयें बोले आल्हादेसीं । खगेश्वरासी तें ऐका ॥ १८४ ॥**

**हरिहस्ते गजनक्र पुनीत । गरुड केवळ भगवद्भक्त । याचा स्पर्श जालिया येथ । मी नित्य मुक्त होईन ॥ १८५ ॥**

**गजेंद्र भक्ताचे संगतीं । घातकी नक्र पावला मुक्ती । मीहि याचिये सत्संगतीं । नित्य मुक्ती पावेन ॥ १८६ ॥**

**जे जे लागले सत्संगतीं । ते ते पावले नित्य मुक्ती । कनकजंबू तदर्थी । गरुडाप्रती विनवीत ॥ १८७ ॥**

**शतयोजन सविस्तर । माझी शाखा अति थोर । येथ बैसोनि खगेश्वर । करीं आहार तिहींचा ॥ १८८ ॥**

**गरुड क्षुधेनें पीडिला । तिहींसी उडतां भागला । ऐकोनि कनकजांबूचिया बोला । स्वयें बैसला** [कं. 'सावकाशी'.] **शाखेसी ॥ १८९ ॥**

**गरुड पाहे तो तरुवर । जैसा का मेरु गिरिवर । भोंवत्या शाखा शतसहस्त्र । योजनविस्तार शतसंख्या ॥ १९० ॥**

**पक्षियांचीं निडें तयावरी । शतसहस्त्र लक्षांतरी । फळ पुष्पित संभारी । तरुवरीं विश्रांती ॥ १९१ ॥**

**पाहावया गरुडाची थोरी । वालखिल्य साठी सहस्त्रीं । गुप्त पावले शाखांतरीं । गरुड जीवरी बैसला ॥ १९२ ॥**

**गरुड बैसतांचि तेथ । शाखा मोडली कडकडीत । गरुड पाहे साशंकित । ऋषी लोंबत शाखेसीं ॥ १९३ ॥**

**ऋषी लोंबता अधोमुख । शाखा सांडो नये देख । ऋषी पावतांचि दुःख । घोर नरक पावेन ॥ १९४ ॥**

अनुक्रमणिका

शाखा धरोनि वामचरणीं । गजनक्र दक्षिण चरणीं । मुखीं भ्रूभंगा धरोनि । गेला उडोनी आकाशा ॥ १९५ ॥

शाखा शतयोजन विस्तार । साठी सहस्त्र ऋषीश्वर । दक्षिण चरणीं गजेंद्र नक्र । मुखीं महाथोर भ्रूभंग ॥ १९६ ॥ [ओवी १९६ तं. प्रतीत नाही.]

इतुकेनसीं समवेत । गरुड आकाशीं भ्रमत । बैसो न [मु. 'यथा'.] लाहे तो स्वस्थ । ऋषी समस्त दुखवती ॥ १९७ ॥

मज बैसतांचि तळीं । भारें ऋषी होती रांगोळी । येणें धाकें महाबळी । नभोमंडळी भ्रमतसे ॥ १९८ ॥

घेवों न लाहे आहारातें । बैसों न लाहे स्वस्थ चित्तें । परम संकट गरुडातें । तेणें श्रीहरितें स्मरत ॥ १९९ ॥

थोर पावलों आकांता । वेगीं पाव गा भगवंता । काय म्यां करावें आतां । अनाथनाथा उद्धरी ॥ २०० ॥

जोहरि रक्षिलें पांडवासी । नग्न करितां द्रौपदीसी । पितेनि गांजितां प्रल्हादासी । तेंवि मजपासीं पावावें ॥ २०१ ॥

आतां उद्धरिलें गजेंद्रासी । तो तूं मज विसरलासी । उडी घालावया वेगु तुजपासीं । कां रुसलासी गोविंदा ॥ २०२ ॥

जना सबाह्य जनार्दन । तुझें नांव जगजीवन । मी तुझें अनाथदीन । माझें विघ्न निवारी ॥ २०३ ॥

गरुड हरिचा प्रिय भक्त । तोही आदरें नामस्मरत । नामापासीं भगवंत । असे डुल्लत स्वानंदें ॥ २०४ ॥

करितां हरिनामस्मरण । स्वयें विघ्न होय निर्विघ्न । गरुड पावला समाधान । तेंही विंदान अवधारा ॥ २०५ ॥

गरुड भ्रमतां आकाशीं । भगवंताची कृपा कैसी । देखिले पितया कश्यपासी । तेजोराशी तपस्वी ॥ २०६ ॥

> स गत्वा पर्वतश्रेष्ठं गंधमादनमंजसा । ददर्श कश्यपं तत्र पितरं तपसि स्थितम् ॥ २१ ॥
> प्रजाहितार्थमारंभो गरुडस्य तपोधनाः । चिकीर्षति महत्कर्म तदनुज्ञातुमर्हथ ॥ २२ ॥
> एवंमुक्ता भगवता मुनयस्ते समाययुः । मुक्ता शाखां गिरिं पुण्यं हिमवंतं तपोधनाः ॥ २३ ॥

गंधमान पर्वतांत । कश्यप पिता तप आचरत । नभींहूनी देखिला अकस्मात । आला त्वरित त्यापासीं ॥ २०७ ॥

येतां देखोनि गरुडासी । वृत्त कळलें कश्यपासी । देखोनि वालखिल्य ऋषी । कश्यप त्यासी प्रार्थित ॥ २०८ ॥

घालोनिया लोटांगण । कश्यप विनवी कर जोडोन । गरुड माझे अपत्य दीन । कृपा करोन सोडावें ॥ २०९

अनुक्रमणिका

॥

**गरुडाचें मनोगत । आणूनिया परमामृत । माता करावी निर्मुक्त । तदर्थी सामर्थ्य तुम्ही द्यावें ॥ २१० ॥**

**तुज करितां अनुष्ठान । नाहीं याचें सामर्थ्यज्ञान । येणें माता मुक्त करून । जाला वाहन विष्णूचें ॥ २११ ॥**
[ओवी २११ तु. दै. तं. कं. मु. वि. प्रतींत नाही.]

**पहावया गरुडाचे सामर्थ्य । शाखेसीं बैसलों समस्त । तंव हा बळिया बळवंत । विजयी निश्चित तिहीं लोकीं ॥ २१२ ॥**

**करोनि कश्यपासी नमन । देवोनि गरुडासी आशीर्वचन । वालखिल्यीं शाखा सोडोन । गेले तपोधन बदरीसी ॥ २१३ ॥**

**वालखिल्य गेले देखोन । गरुड पावला समाधान । करोनि पितयासी नमन । पुसे आपण तें ऐका ॥ २१४ ॥**

> भगवन् क्क विमुंचामि तरुशाखामिमामहम् । वर्जितं ब्राह्मणैर्देशमाख्याहि भगवन्मम ॥ २४ ॥
> ततो निष्पुरुषं शैलं सागरोदरसंस्थितम् । अगम्यं मनसा प्येतैस्तदाचख्यौ स कश्यपः ॥ २५ ॥

**गरुड लोटांगण घाली । थोर जाजावलों वालखिल्यीं । मुक्त जालों तुझें बोलीं । शाखा आणिली ऋषी बाधें ॥ २१५ ॥**

**कनकजांबू शाखा सधर । शत योजन विस्तार । इशीं सांडावया कोण थार । कोठें आहार म्यां घ्यावा ॥ २१६ ॥**

**देखोनि कनकजांबूसी । ब्राह्मण धांवती छळावयासी । धनलोभ बहु द्विजांसी । बळ ब्राह्मणासी चालेना ॥ २१७ ॥**

**जेथ न पावती ब्राह्मण । तैसें सांगावें मज स्थान । तेथ शाखा निक्षेपून । करीन भोजन क्षुधार्थी ॥ २१८ ॥**

**क्षुधित ऐकोनि गरुडासी । कृपा उपजली कश्यपासी । दुर्गम स्थान सांगे त्यासी । अगम्य सर्वांसी मनें वाचा ॥ २१९ ॥**

**दक्षिण समुद्रामाझारी । सुनाभी** [मु. 'पर्वत'.] **परता लंकागिरी । शाखा ठेऊनी त्यावरी । भोजन करी सुपुत्रा ॥ २२० ॥**

**ऐकोनि कश्यपाचें वचन । स्वयें सुवर्ण शाखा घेऊन । गजनक्र भ्रूभंगेसी उडोन । आला आपण लंकेसी ॥ २२१ ॥**

> ततस्तस्य गिरेः श्रृंगमास्थाय स खगोत्तमः । भक्षयामास गरुडस्त्रीनपि क्षुधयार्दितः ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

लंका पाठार निरंजन । सुवर्ण शाखा तेथ ठेवून । गरुडें केलें पैं भोजन । सावधान हरिस्मरणें ॥ २२२ ॥

करिता भ्रूभंग भक्षण । ग्रासोग्रासीं कृष्णार्पण । करी नक्राचें भोजन । ब्रह्मार्पण स्मरणेंसी ॥ २२३ ॥

भक्षितां गजेंद्रासी । भोक्ता म्हणे हृषीकेशी । भक्त सेविती ज्या ज्या अर्थासी । हरिस्मरणेसी [कं. 'सादर'.] सावध ॥ २२४ ॥

गरुड पीडिला क्षुधेसी । भोजन करितां ये विधीसीं । पावला परम तृप्तीसी । आल्हादेसी हरिस्मरणें ॥ २२५ ॥

फळ मूळ [तु. दै. मु. 'आणि जीवन'; वि. 'गंगा जीवन'.] अन्न भोजन । जें भक्त सेविती आपण । तें तें करिती ब्रह्मार्पण । तृप्ती संपूर्ण तेणें त्यांसी ॥ २२६ ॥

अन्न ब्रह्म अहंच ब्रह्म । हृदयीं भोक्ता आत्माराम । त्याचें कर्मचि परब्रह्म । हें जाणती वर्म ते धन्य ॥ २२७ ॥

भोजन करितां ऐसिये पंक्ती । आसहस्त्रां पंक्ती पुनाति । ऐसें बोलती वेदश्रुती । सभाग्या पंक्ती हरिभक्त ॥ २२८ ॥

ग्रासो ग्रासीं रामस्मरण । ऐसे जे करिती भोजन । तेथ भोक्ता श्रीभगवान । भोक्तेपण त्या नाहीं ॥ २२९ ॥

ऐसिये भोजन प्रयुक्तीं । गरुडा झाली परम तृप्ती । तेणें घ्यावया विश्रांती । केली आइती ते ऐका ॥ २३० ॥

भारेसीं भ्रमतां अंतराळीं । गरुड भागला महाबळी । तेणें पावोनि पांखांतळी । केली ते वेळीं निजनिद्रा ॥ २३१ ॥

ऐसी घेऊनी विश्रांती । गरुड कैसा गेला शीघ्रगती । भगवद्भक्तपद प्रयुक्ती । भाग्य प्राप्ती लंकेसी ॥ २३२ ॥

गरुडाची नखें स्पष्ट । लंकेसी रुतली तिखट । पडतां पर्जन्य वाहावट । जाले त्रिकूट अति थोर ॥ २३३ ॥

कुबेराची अलकावती । रावणें हिरोनी घेतां वस्ती । त्यासी वारोनि प्रजापती । लंकापति तो केला ॥ २३४ ॥

विश्वकर्मयातें घेऊन । स्वयें येवोनि चतुरानन । निर्माण केलें लंकाभुवन । दुर्ग दारुण दुर्गम ॥ २३५ ॥

विश्वकर्म्यानें झाडोनि कडे । त्रिकुट सज्ज केले गाढें । लाग न लगे मागें पुढें । चहूंकडे दुर्धर ॥ २३६ ॥

पडलंका मागिलीकडे । सुवेळा शोभे लंकेपुढें । निकुंबळागड अवघडे । दक्षिणेकडे दुर्गम ॥ २३७ ॥

तये लंकेच्या शिखरीं । कनक शाखा होती वरी । आगी लावितां पूंसें करी । शाखा एकसरी रस जाली ॥

अनुक्रमणिका

२३८ ॥

हनुमंतें जाळितां लंका । सुवर्णाची ओतिली देखा । भगवद्भक्ताचा आवांका । दुःखदायका सुखरुप ॥ २३९ ॥

शाखा बहुकाळ पडलीं राहे । शेवाळली खडकप्राये । तेणें उपेक्षिली जाये । लक्षा न ये कोणासी ॥ २४० ॥

मरूत मारुत प्रलयवन्ही । लंका जाळितां तिघीजणीं । शाखा ओतली रस होऊनी । लंकाभुवनी हेममय ॥ २४१ ॥

हनुमंतें जाळितां देखा । हेममय ओतली शाखा । तैंपासोनि सोन्याची लंका । समस्त लोकां अनुवाद ॥ २४२ ॥

कपीनें करितां लंकादहन । लंका जाली सुवर्णपूर्ण । मग सीतेपासीं येऊन । केलें नमन साष्टांगीं ॥ २४३ ॥

नमस्कारोनि सीतेसी । शीघ्र भेटावया श्रीरामासी । हनुमान आज्ञा पुसे तिसीं । अति त्वरेसीं जावया ॥ २४४ ॥

भेटावया निज स्वामीसी । स्फुरण आले हनुमंतासी । बाहु थरकती उल्हासी । तळपे आकाशीं कपिपुच्छ ॥ २४५ ॥

मने कळविलें श्रीरामासी । श्रद्धा सीतेच्या पायांपासी । आज्ञा पुसावया तिसीं । एकाग्रतेसी तिष्ठत ॥ २४६ ॥

ऐसें देखोनि हनुमंता । उल्हास जानकीचे चित्तां । [मु. 'मारावया लंकानाथा'.] कुडावया कपिनाथा । शीघ्र रघुनाथा आणावें ॥ २४७ ॥

ऐक हनुमंता सावधान । तुज मी देते आशीर्वचन । मार्गीं बाधूं न शके विघ्न । राम चिद्घन पावसी ॥ २४८ ॥

ऐकोनि सीतेचें वचन । हनुमान घाली लोटांगण । वंदोनिया तिचे चरण । केले उड्डाण वानरें ॥ २४९ ॥

एका जनार्दना शरण । हनुमया श्रीरामदर्शन । तेथील गोड निरोपण । सावधान अवधारा ॥ २५० ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां गजेंद्रउद्धरणं तथा सुवर्णलंकापूर्ण नाम द्वाविंशतितम प्रसंगः ॥

## प्रसंग तेविसावा

## सीता शुद्धि हनुमंत दर्शन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

आश्वासोनि श्रीरामकांता । भेटावया श्रीरघुनाथा । हनुमंत होय निघतां । तेचि कथा अवधारा ॥ १ ॥

> पुनर्दृष्ट्वा च वैदेहीं मैथिलीमभिवाद्य च । प्रत्यागंतुं मनश्चक्रे पुनर्मध्येन सागरम् ॥ १ ॥
> ततः स कपिशार्दूलः स्वामिसंदर्शनोत्सुकः । आरुरोह गिरिं मुख्यमरिष्टमरिसूदनः ॥ २ ॥
> स च भूमिधरः श्रीमान्बलिना प्रतिपीडितः । सवृक्षशिखरोदग्रः प्रविवेश रसातलम् ॥ ३ ॥
> दशयोजनविस्तारो विंशद्योयोजनमुच्छ्रितः । धरण्यां समतां प्राप्तो बभूव स धराधरः ॥ ४ ॥

लंका दहन [तु. दै. 'लंका दग्ध सुवर्ण'; मु. 'करुनी संपूर्ण'.] करूनी सुवर्ण । हनुमंतासी करितां प्रयाण । घ्यावया सीतेचें दर्शन । आला परतोन सीतेपासीं ॥ २ ॥

सीता सर्वांगीं अक्षत । पाहोनिया सावचित्त । हनुमंत हर्षयुक्त । निघे त्वरित तें ऐका ॥ ३ ॥

घ्यावया श्रीरामाची भेटी । हनुमंतासी त्वरा मोठी । वंदूनिया सीता गोरटी । उठाउठी निघाला ॥ ४ ॥

वेगीं उल्लंघावया सागर । चौफेर अवलोकी वानर । देखिला अरिष्ट गिरिवर । [वि. तु. दै. तं. मु. 'तेथें सत्वर वळंघला'.] त्याचा विस्तार अवधारा ॥ ५ ॥ [ओवी ५ अं. मुं. कं. पै. प्रतींत नाही.]

दश इंद्रियीं विक्षेपता । दश योजन रुंदी पर्वता । वासना विस्तार ऊर्ध्वता । [मु. 'शत'.] वीस योजन ते उंची ॥ ६ ॥

जागृती स्वप्न सुषुप्तिता । श्रीराम स्मरण हनुमंता । या लागीं चढला अरिष्ट माथां । हाणें लाता नाम नेटें ॥ ७ ॥

पूर्ण कृपा श्रीरघुनाथा । पूर्ण प्राप्ती ते हनुमंता । चढोनि अरिष्टाचे माथां । हाणें लाता नाम नेटें ॥ ८ ॥

हनुमंताचा [मु. अं. 'नाम'.] निज नेट । उड्डाणाचा कडकडाट । पृथ्वी रुपला अरिष्ट । केला सपाट भूमिसम ॥ ९ ॥ [ओवी ९ व १० वि. प्रतीत नाही.]

वृक्ष शिखरें सम सकट । भूमी दाटला गिरीकूट । श्रीराम भजनीं निजनेट । अरिष्ट सपाट हनुमंतें ॥ १० ॥ [ओवी ९ व १० वि. प्रतीत नाही.]

हनुमान राम नामें अतुर्बळी । उड्डाणाचिया कल्लोळी । अरिष्ट मेळविला धुळी । करूनी रांगोळी नाम नेटें ॥ ११ ॥

अनुक्रमणिका

**स्वयें अरिष्टाचिये माथां । निर्दळणें हाणोनि लाता । हें ब्रीद साजे हनुमंता । श्रीरघुनाथाचेनि भजनें ॥ १२ ॥**

> येऽन्येऽरविंदाक्ष विमुक्तमानिनः त्वय्यस्तभावादविशुद्धबुद्धयः ।
> आरुह्य कृच्छ्रेण परं पदं ते पतन्त्यधोऽनादृतंयुष्मदंघ्रयः ॥ ५ ॥
> तथा न ते माधव तावकाः क्वचित् भ्रश्यंति मार्गात्वयि बद्धसौहृदाः ।
> त्वयाभिगुप्ता विचरन्ति निर्भया विनायकानीकपमूर्धसु प्रभो ॥ ६ ॥

[तु. दै. 'अमर'.] **परम भाग्याची भाग्यस्थिती । मनुष्य जन्मातें नर येती ।**
**शोधित सत्वाची सत्व वृत्ती । जन्म प्राप्ती ब्राह्मणत्व ॥ १३ ॥**

**तेथेंही वेदशास्त्र व्युत्पत्ती । जेणें परब्रह्म आतुडे हातीं । तें सांडुनी मूढमती । बुद्धिवादार्थी अति योग्य ॥ १४ ॥**

**मुक्तत्वाचा निजाभिमान । वाग्वादी अति निपुण । नाहीं भगवद्भाव भजन ।** [मु. 'अलोट'.] **आरूढ पतन तयांसी ॥ १५ ॥**

**येउनी ब्रह्मप्राप्तीच्या घरा । मुक्ताभिमान नागवी नरा ।**
**भावो भगवद्भजनीं पाठिमोरा । ऐशिया नरा अधःपात ॥ १६ ॥**

**भगवद्भजनी जो पाठिमोरा । त्यासी जन्ममरण येरझारा । कोट्यानुकोटी** [तु. दै. 'फेरा'.] **योनिद्वारा । अधःपात खरा या नांव ॥**

**करोनि पात्रावलंबन । परीक्षा म्हणे माझें ज्ञान । हें ज्ञान कीं ज्ञानाभिमान । अधःपतन तयासी ॥ १८ ॥**

**अहं सोहं कोहं अभिमान । भक्त न धरिती अति सज्ञान ।**
**त्यांसी बाधूं न शके विघ्न । विघ्नासी दमन राम नामें ॥ १९ ॥**

**राम नामाचिया निजशक्ती । भक्त विघ्न माथा चढती । शेखीं विघ्नातें निर्दळिती । नित्यानुवृत्ती राम नामें ॥**

**चारा घालोनि मुखाआंत । जेंवि पक्षिणी पिलीं पोशित । तेंवि आपुले निजभक्त । रक्षी भगवंत अहर्निशीं ॥ २१ ॥**

**विघ्नें न येती नामापासी । तें केवि येति भक्तांपासी । भगवंत रक्षिता अहर्निशीं । विघ्नें भक्तांसी निर्विघ्न ॥ २२ ॥**

**विघ्न करूं नये छळणार्थ । विघ्नाचा आत्मा तो भगवंत । विघ्न निर्विघ्न होय तेथ ।** [कं. 'गुंते'.] **भूतें भगवंत भक्तांसी ॥ २३ ॥**

**सर्वाभूतीं भगवद्भावो । तेथें विघ्नासी कैंचा ठावो । विघ्नीं विघ्नत्वा अभावो । विघ्न स्वयमेवो देव जाला ॥**

अनुक्रमणिका

२४ ॥

भगवद्भावें चालतां भक्तां । विघ्नें वोढविती माथा । ऐसी हरिभक्ति हनुमंता । श्रीरघुनाथाचेनि नामें ॥ २५ ॥

श्रीराम नामें हनुमानबळी । अरिष्ट पर्वत पायातळीं । करोनिया पैं रांगोळी । मेळविला धुळीं हरि नामें ॥ २६ ॥

अरिष्टाचें भाग्य श्रेष्ठ । लागतां हनुमंताचा अंगुष्ठ । विरोनियां गिरिकूट । जाला प्रविष्ट परब्रह्मीं ॥ २७ ॥

अरिष्टाचें भाग्य बळीं । हनुमंताचिया पायांतळी । नुरेचि भूतळीं पाताळीं । मीनला तत्काळीं परब्रह्मीं ॥ २८ ॥

[मु. 'दशशत'.] दशवीस योजन विस्तारा । नामें अरिष्ट गिरिवरा । हनुमंतेनि हाणोनि पांपरा । केलें उद्धारा अरिष्टाचा ॥ २९ ॥

कपीनें हाणोनि पांपरा । जडत्व दवडोनि भूधरा । ऐक्य केलें धराधरा । गिरिवरा अरिष्टा ॥ ३० ॥

करावया अरिष्टा उद्धारु । श्रीराम भक्त हनुमान वीरु । जो करी जडत्वाचा उद्धारु । तोचि साचारु हरिभक्त ॥

धरा धरी तो धराधरु । त्यासी अरिष्टा ऐक्या कारु । श्रीराम भजनें करी वानरु । जगदोद्धारू हनुमंतें ॥ ३२ ॥

पुढील कथेची संगती । समुद्र लंघावया मारुती । चढला अरिष्ट पर्वतीं । ते ही उपपत्ती अवधारा ॥ ३३ ॥

> पीडितं तं नगवरं त्यक्त्वा गगनमास्थितः । आप्लुत्य च महावेगः पक्षवा निव पर्वतः ॥ ७ ॥
> हनुमान्मेघजालानि विकर्षन्निव गच्छाति । भुजयोरंतरासक्तं मेघजालं स पांडुरम् ॥ ८ ॥
> उत्तरीयमिवासक्तमासीत्तस्य महाकपेः । ज्यामुक्त इव नाराचो महावेग उपागमत् ॥ ९ ॥
> स किंचिदनुसंप्राप्तः समालोक्य महागिरिम् । ननाद सुमहानादं मेघनादसमस्वनः ॥ १० ॥

हनुमान उडतां महाबळी । पर्वत दाटला पायातळीं । सर्प दडपले पाताळीं । वमिती [कं. 'जाळी'; मु. 'ते काळीं'; तु. दै. 'जळीं'.] ज्वाळीं विषगरळा ॥ ३४ ॥

भारें दडपतां पर्वतु । श्वेतपीत आरक्त धातू । स्रवोनि निज शोभा शोभतु । जेवीं वसंतु निज सुमनीं ॥ ३५ ॥

जैसा पर्वत पक्षमेळीं । तैसा कपी जात नभोमंडळी । अभ्रें अडकली बाहूमुळीं । वक्षस्थळीं कपीच्या ॥ ३६ ॥

उत्तरीयवास राज लीळा । वानरा आली राजकळा । सुनीळ भासते नीळा । घनसांवळा मारुती ॥ ३७ ॥

अनुक्रमणिका

**अभ्रें अडकलीं हनुमंता । अंगा आली घनश्यामता । पावला श्रीराम** [मु. 'सारूप्यता'.] **सायुज्यता । भासे समस्तां सुरसिद्धां ॥ ३८ ॥**

**श्रीराम चापीं सुटला शर । तैसा लंघीत सागर । सवेग जातसे वानर । सुरासुर विस्मित ॥ ३९ ॥**

**देखोनिया महेंद्रगिरी । हर्ष कोंदला वानरीं । प्रळयांबुद गिरा गजरीं । भुभुःकारी गर्जिन्नला ॥ ४० ॥**

**नाद कोंदला अंबरीं । नाद कोंदला सागरीं । नाद ऐकिला कपींद्रीं । जे महेंद्रीं राहविले ॥ ४१ ॥**

> स दृष्ट्वा पर्वतश्रेष्ठं सुहृद्दर्शनहर्षितः । जांबुवांश्च हरिश्रेष्ठः प्रीतिसंहृष्टमानसः ॥ ११ ॥
> उपामंत्र्य हरीन्सर्वान्सांगदान्वाक्यमब्रवीत् । सर्वथा कृतकार्योऽसौ हनुमान्नात्र संशयः ॥ १२ ॥
> नह्यस्याकृतकृत्यस्य वेग एवं विधोभवेत् । तस्य बाहुरुवेगं च निनदं च महात्मनः ॥ १३ ॥
> संश्रुत्य हरयो हृष्टाः समुत्पेतुः समन्ततः ॥ १४ ॥

**ऐकोनि गिरा गजर । महेंद्रीं राहविलें वानर । तेही** [मु. 'सावधान'.] **सुखी होती समग्र । तैसें गंभीर गर्जिन्नला ॥ ४२ ॥**

**गजर ऐकोनि अत्यद्भुत । वानरां सांगे जांबुवंत । पैल आला रे हनुमंत । सीता शुद्धयर्थ साधूनी ॥ ४३ ॥**

**साधोनिया सीताशुद्धयर्थ। हर्षें गर्जे हनुमंत । अंगदादि वानरांआंत । सांगे जांबुवंत दूतचिन्ह ॥ ४४ ॥**

**कार्य न साधितां जाण । मुख्य** [मु. 'दुश्चित'.] **दूतचि म्लान वदन । त्याचे वाचेसि पडे मौन । गिरा गर्जन त्या कैंचें ॥ ४५ ॥**

**सीता शुद्धिचा इत्यर्थ । साधूनि आला हनुमंत । तेणें आल्हादें गर्जत । केला निश्चितार्थ जांबुवंतें ॥ ४६ ॥**

**ऊरु वेग बाहुवेग । हनुमंताचा अंगवेग । कार्य साधोनियां सांग । येतो सवेग मारुती ॥ ४७ ॥**

**ऐसा जांबुवंत इत्यर्थ । ऐकोनि वानर समस्त । अत्यंत आल्हादें नाचत । सीता शुद्धयर्थ साधिला ॥ ४८ ॥**

> तमभ्रघनसंकाशमापतंतं महाकपिम् । दृष्ट्वा ते वानराः सर्वे तस्थुः प्रांजलयस्तदा ॥ १५ ॥
> स तस्यैव गिरेः शृंगे निपत्य च महाजवः । निषसाद महेंद्रस्य शिखरे पादपाकुले ॥ १६ ॥
> ततस्ते प्रीतमनसः सर्वे वानरपुंगवाः । हनुमंतं महात्मानं परिवार्योपतस्थिरे ॥ १७ ॥
> हनुमांश्च गुरुमृक्षं जांबुवंतं महाकपिम् । कुमारमंगदं चैवाप्यवंदत महाबलः ॥ १८ ॥
> स ताभ्यां पूजितः पूज्यः कपिभिश्च सभाजितः । दृष्टा देवीति विश्रांतः संक्षेपेण न्यवेदयत् ॥ १९ ॥

**साधुनियां सीता शुद्धयर्थ । पैल आला रे हनुमंत । इंद्रनीळ कीळ पर्वत । तैसा शोभत मारुति ॥ ४९ ॥**

**येतां देखोनि हनुमंत । वानर वीर हर्षयुक्त । उभे ठाकले समस्त । उभय हस्त जोडुनी ॥ ५० ॥**

अनुक्रमणिका

फळित पुष्पित वृक्षींयुक्त । महेंद्रगिरी सुशोभित । हनुमान सवेग आला तेथ । वानर जेथ उभे असती ॥ ५१ ॥

एकें उड्डाणें हनुमंत । समुद्र लंघोनि समस्त । वेगें आला महेंद्रांत । वानर जेथ उभे असती ॥ ५२ ॥

धांवतां हनुमंताचेनि वेगें । वायु टणकोनि राहिला मागें । मनोवेगाहुनी वेगें । आला सवेगें मारुति ॥ ५३ ॥

नाहीं लागली पैं धाप । नाहीं स्वेद नाहीं कंप । श्रीराम स्मरतां चिद्रूप । आला सुखरुप मारुति ॥ ५४ ॥

जैसा श्रीरामाचा बाण । कार्य साधुनी संपूर्ण । परतोनि हातां ये आपण । तैसें आगमन कपीचें ॥ ५५ ॥

नळनीळ जांबुवंत । अंगदादि वीरसमस्त । त्यातें देखोनि हनुमंत । नामें गर्जत [मु. 'आनंदे'.] रामनामें ॥ ५६ ॥

श्रीराम जयराम नाम गजरीं । हनुमान गर्जत अंबरीं । वानरीं गर्जविला गिरी । नामोच्चारीं जयराम ॥ ५७ ॥

श्रीराम जयराम जयजयराम । नामें गर्जती प्लवंगम । [मु. 'नादें'.] नामें गर्जवित व्योम । आला सप्रेम हनुमंत ॥ ५८ ॥ [ओवी ५८वि. प्रतीत नाही.]

नाभें कोंदलें अंबर । नामें कोंदलें गिरिकंदर । करीत नामाचा गजर । आला सत्वर हनुमंत ॥ ५९ ॥

देखोनिया वानर गण । करीत श्रीराम नाम स्मरण । हनुमान घाली लोटांगण । वंदीत चरण सर्वांचे ॥ ६० ॥

साधोनि आलों सीता शुद्ध्यर्थ । गर्व नाहीं हनुमंतांत । ज्यातें त्यातें अभिवंदित । भूतीं भगवंत देखोनि ॥ ६१ ॥

वृद्धत्वें जांबुवंत गुरु । प्रथम त्यासी नमस्कारु । अंगद जो कां राजकुमरु । केला नमस्कारु मग त्यासी ॥ ६२ ॥

एवंयुक्त परंपरा । हनुमान वंदीत वानरां । तेणें आल्हाद समग्रां । पवनपुत्रा देखोनि ॥ ६३ ॥

सन्मानोनि हनुमंतातें । मध्यें बैसवोनि तयातें । वानर बैसले सभोंवते । सीता शुद्धीतें पुसावया ॥ ६४ ॥

जांबुवंतादि पूज्य समस्त । तिहीं पूजिला हनुमंत । तेणें आल्हादें सांगत । सीताशुद्ध्यर्थ [तु. वि. कं. मुं. दै. मु. 'साक्षेपें'.] संक्षेपें ॥ ६५ ॥

लंका नगरी वसे सागरीं । तेथें रावण राज्य करी । तेथील प्रवेश अटक भारी । सुरासरीं दुर्धर ॥ ६६ ॥

रामनामाचे निज नेटें । उड्डाण करोनिया नेटेपाटें । लंका शोधिली त्रिकुटें । समसगटें पुरगृहें ॥ ६७ ॥
रावणाचिया निजभवनीं । सीता भेटली अशोकवनीं । तिथें धाडिले खूण देऊनी । मस्तकमणी हा सीतेचा ॥

अनुक्रमणिका

६८ ॥

**मणी देखोनि अलंकार । वानरीं केला जयजयकार । राम नामाचा गजर । नामें वानर गर्जती ॥ ६९ ॥**

**सीता भेटली साचार । मणी मस्तक अलंकार । ते देखोनियां वानर । केला भुभुःकार स्वानंदें ॥ ७० ॥**

ते नगात्तु नगाग्राणि शिखराच्छिखराणि च । प्रहृष्टा समपद्यन्त मणिरत्नदिदृक्षवः ॥ २० ॥
ते प्रीताः पादपाग्राणि दुमशाखाश्च पुष्पिताः । वासांसि न प्रकाशानि समाविध्यंत लांगुलैः ॥ २१ ॥
क्ष्वेडंत्यन्ये हसंत्यन्ये गर्जंत्यन्ये क्षिपंति च । चक्रुः किलकिलामन्ये प्रतिनर्दंति चापरे ॥ २२ ॥
कैचिदुच्छ्रितलांगूलाः प्रहृष्टाः कपिकुंजराः । अंवरायतदीर्घाणि लांगूलानि विचिक्षिपुः ॥ २३ ॥
अपरे नु हनुमंतं वानरा वारणोपमाः । आप्लुत्य गिरिशृंगेभ्यः संस्पृशन्ति प्रहर्षिताः ॥ २४ ॥
स्तुवंति च नमस्यंति परिष्वजंति चापरे ॥ २५ ॥

**वृक्षीं होउनी वृक्षांतरीं । पर्वतीं होउनी पर्वतावरी । हरिखें उडिजे वानरीं । सीता सुंदरी सांपडली ॥ ७१ ॥**

**श्वेत सुनील पीत आरक्त । शाखा कपिपुच्छी आरक्त । जैशा वस्त्र गुढिया गगनांत । तैंसीं शोभत कपिपुच्छें ॥**

**फळित पुष्पित शाखांवरीं । पुच्छ गुढिया गगनांतरीं । उभवोनि नाचिजे वानरीं । सीता सुंदरी सांपडली ॥ ७३ ॥**

**सीता मस्तकमणी रत्न । पाहावया अवघेजण । हरिखें** [मु. ‘करुनी’.] **किराण उड्डाण । वानर गण दाटले ॥ ७४ ॥**

**मस्तकमणी देखोनि डोळां । हरिख वानरां सकळां । पुच्छ उभऊनी अंतराळां । स्वानंद लीळा नाचती ॥ ७५ ॥**

**येरयेरां हाणिती थडका । येरयेरां लाविती चडका । येरयेरां देती धडका । पाडिती देखा थोरथोरां ॥ ७६ ॥**

**येर येरां वांकुलिया । येर येरां गुदगुलिया । येर येरां गटांगळिया । कर्णांगुळिया येरयेरां ॥ ७७ ॥**

**येरयेरां कौतुकी । जानु अपानें हाणिती ढकी । येरयेरां हाणिती बुक्की । वानर हरिखीं उपमोनि ॥ ७८ ॥**

**येरयेरां निरवंदित । येरयेरां उपहासित । येरयेरां निर्भर्त्सित । वीर गर्जत आल्हादें ॥ ७९ ॥**

**एक किलकिलिती वानरजाती । एक रामनामें गर्जती । एक भुभुःकार देती । सीतासती सांपडली ॥ ८० ॥**

**आधींमधीं हनुमंता । कोण वंदील पाहों आतां । उडिया टाकोनि अंसख्याता । चरणीं माया ठेविती ॥ ८१ ॥**

जीव देणें हे गोड गोष्टी । हनुमान वीर जगजेठी । शुद्धी आणिली उठाउठीं । वानर कोटी नाचती ॥ ८२ ॥

विचित्र शाखा धरोनि पुच्छाग्री । पुच्छ उभवोनि अंबरीं । वानर नाचती सुखोद्‍गारी । सीता सुंदरी सांपडली ॥

वानरीं मिळोनि [मु. 'एक मेळीं'.] एके वेळीं । रामनामाचा कल्लोळीं । अवघीं मिळोनिया पिटिली टाळी । अभिवंदित स्वानंदें ॥

वानरीं मिळोनि समस्त । हनुमंताची स्तुती करीत । अनुक्रमें आलिंगित । [वि. 'अवघे वंदित'.] अभिवंदित स्वानंदें ॥ ८५ ॥ [ओवी ८५ पै. प्रतीत नाही.]

> तमागतं महावीर्यं राक्षीसैः क्षतविग्रहम् । समीक्ष्य हरयः सर्वे परिवार्य समासते ॥ २६ ॥
> ततस्तमब्रवीद्वाक्यं हरीणां प्रवरोंऽगदः । ब्रूहि वानर शार्दूलकृत्वा कर्म सुदुष्करम् ॥ २७ ॥
> अपि दृष्टा त्वयासीतारामस्य महिषी प्रिया । प्रशस्तवर्णो हि शुभस्तवांगुलिगतो मणिः ॥ २८ ॥

अंगद युवराज प्रज्ञावंत । नळनीळ पनस जांबुवंत । गजगवय गवाक्ष [तु. दै. 'सुत'.] युक्त । जुत्पत्ती समस्त बैसलें ॥ ८६ ॥

मध्यें बैसविला हनुमानवीर । घायीं सर्वांग जर्जर । तें देखोनि वीर झुंझार । विस्मय थोर पावले ॥ ८७ ॥

हनुमंत वज्रदेही । तोही वरखंडला घायीं । दारुण युद्ध जालें पाही । कपी तें कांहीं सांगेना ॥ ८८ ॥

आणिकही वानरभार । देखोनि हनुमान घायीं जर्जर । म्हणती युद्ध घोरांदर । अति दुस्तर येणें केलें ॥ ८९ ॥

ऐकावया हनुमंताचेंरण । वानरां येतसें स्फुरण । करोनि सीता शुद्धी प्रश्न । रणकंदन पुसावें ॥ ९० ॥

हा तंव बलाढ्य स्वयें । हनुमंतें युद्ध केलें आहे । हनुमंताचे निज घाये । कोण साहे रणरंगीं ॥ ९१ ॥

सिंह बोरांटी वोरबडे । तैसे शस्त्राचे वरखडे । हनुमंताचे मागेपुढें । चहूंकडे दिसताती ॥ ९२ ॥

आपुलिया युद्धाची निजख्याती । स्वमुखें न सांगे मारुती । सीता शुद्धीच्या प्रश्नोक्ती । युद्ध व्युत्पत्ती पुसावी ॥

अंगद जो कां युवराजा । वार्ता पुसें पवनात्मजा । कैसेनि भेटली श्रीरामभाजा । समूळ वोजा मज सांग ॥ ९४ ॥

कोणें भुवनीं कोणें स्थानीं । तुज भेटली सीता जननी । कैसेनि दिधला मस्तकमणी । समूळ काहणी मज सांगे ॥

अनुक्रमणिका

**ऐकोनि अंगदाचा प्रश्न । हनुमंत अति विचक्षण । सीताशुद्धीचें लक्षण । स्वमुखें आपण सांगत ॥ ९६ ॥**

एतच्छ्रुत्वा शुभं वाक्यमंगदस्य विपश्चितः । हनुमानब्रवीद्धृष्टः सर्वांस्तान्हरियूथपान् ॥ २९ ॥
अशोकवनिकामध्ये दृष्टा मे जनकात्मजा । रक्ष्यमाणा सुघोराभी राक्षसीभिर्यशस्विनी ॥ ३० ॥
एकवस्त्रधरा बाला रामदर्शनलालसा । उपवास परिश्रांता जटिला मलिना कृशा ॥ ३१ ॥
यत्नेन महता दृष्टा सा मया जनकात्मजा । तया च सह जल्पित्वा पुष्ट्वा चैनामनामयम् ॥ ३२ ॥
अभिज्ञानं गृहीत्वा च सिद्धार्थोऽहमिहागतः ॥ ३३ ॥

**अंगदाचें शुभवचन । ऐकोनि हनुमान हास्य वदन । सीता शुद्धीचें लक्षण । करोनि** [वि. 'गौण'.] **गौरव सांगत ॥ ९७ ॥**

**अंगद युवराजा समर्थ । नळनीळ जांबुवंत । ऐका वानर वीर समस्त । सीता शुद्धयर्थ** [तु. वि. कं. मु. तं. दै. 'साक्षेपें'.] **संक्षेपें ॥ ९८ ॥**

**लंका दुर्ग अति दुर्धर । सभोंवता समुद्र दुस्तर । त्यामाजीं रावणाचें नगर । लंकापुर जया नांव ॥ ९९ ॥**

**तेथें रिघतां अति दुर्घट । मीहि पावलों परम कष्ट । नामें निरसोनि संकट । विघ्नें सपाट रामनामें ॥ १०० ॥**

**त्यांही माजीं** [तु. 'वन'.] **रावण भुवन । त्यामाजीं राणिवंसा गहन । त्याही माजीं अशोकवन । सीता चिंद्रत्न त्या माजीं ॥**

**सीतेपासीं संरक्षण । कराळ विक्राळ दारुण । भयानक राक्षसी रक्षण । तेथें कोण रिघों शके ॥ १०२ ॥**

**दुष्ट दुर्मुख दारुण ।** [मु. 'ब्रह्मराक्षस'.] **बाह्य राखिती रक्षोगण । सप्तावर्ती** [कं. वि. 'वर्ण'.] **भ्यासुरपूर्ण । तेथें कोण रिघों शके ॥ १०३ ॥**

**अशोकवन अति दुर्घट । वारया तेथें न फुटे वाट । तेथेंही निघालों करोनि कष्ट । अति संकट सोसूनी ॥ १०४ ॥**

**सीता स्वमेव देखिली दृष्टी । तरी घेवों न शके भेटी । भोंवती राक्षसांची घरटीं । वृक्षसंपुटी मी लपालों ॥ १०५ ॥**

**सीता निज दुःख दर्शन । नाहीं आस्तरण ना प्रावरण । एक वस्त्र परिधान । अति मळीन मळ** [मु. 'गंधी'.] **दग्ध ॥ १०६ ॥**

**नाहीं स्नान ना भोजन । उपवासी कृशदीन । वेणी वळिली जटाबंधन । मंगल स्नान असेना ॥ १०७ ॥**

**तरी धन्य सीतासती । श्रीराम भजनीं अति प्रीती । जागृती स्वप्न आणि सुषुप्ती ।** [वि. दै. तु. 'मूर्ती'.] **श्रीरामस्मृती विसरेना ॥**

अनुक्रमणिका

सीता सती सावधान । करितां श्रीराम स्मरण । वृक्षवल्ली रामस्मरण । तृण पाषाण राम जपती ॥ १०९ ॥

धन्य सीतेची श्रीरामभक्ती । सर्वेंद्रियीं श्रीराम स्फूर्ती । रामदेखे सर्वभूतीं । त्रिजगती रामनामें ॥ ११० ॥

ऐसीं असतां [कं. मुं. अं. मु. 'सहज'.] निजस्थिती । श्रीराम भेटीची अति आसक्ती । मजलागीं काकुळती । रघुपती भेटवी ॥ १११ ॥

मियां सांगितली गुह्य गोष्टी । श्रीरामा तुझी आवडी मोठी । मज धाडिलें शुद्धीसाठीं । सीता गोरटी कोठें आहे ॥

तुझी ठायीं पडलिया शुद्धी । घेवोनि वानरांची मांदी । श्रीराम येईल त्रिशुद्धी । दिधली मुदी रामाची ॥ ११३ ॥

मुद्रिका देखतांची दृष्टी । हरिखेली सीता गोरटी । हरुषें माझी पाठी थापटी । जायी उठाउठीं शुद्धी सांगे ॥

सखा जिवलग मज तूं आतां । तुझे चरणीं ठेविते माथा । शीघ्र जावोनि हनुमंता । श्रीरघुनाथा आणावें ॥ ११५ ॥

शीघ्र करावया गमन । मियां मागितलें अभिज्ञान । मस्तकमणि घेवोनि खूण । आलों धांवोनि तुम्हांपासी ॥
[ओवी ११६ व ११८ दै. प्रतीत नाहीत.]

लंकेसी आहे सीता सती । शुद्धि म्यां आणिली निश्चिती ।
विकल्प न धरावा चित्तीं । चला रघुपतीला शुद्धि सांगों ॥ ११७ ॥

ऐकोनि हनुमंताचें वचन । वानरां तळमळ पूर्ण । न सांगेचि युद्ध दारुण । बुद्धि कोण करावी ॥ ११८ ॥ [ओवी ११६ व ११८ दै. प्रतीत नाहीत.]

ऐकोनि हनुमंताचें वचन । अंगद सुखावला आपण । सीता शुद्धि तुवां आणून । रामाचा प्राण वांचविला ॥ ११९ ॥

वानरांच्या कोट्यानुकोटी । पडल्या होत्या प्राण संकटीं । तुवां वांचविल्या उठाउठीं । शुद्धिसाठीं सीतेच्या ॥

धन्य जीवित हनुमंता । शुद्धि आणिली तत्वतां । हरिख सांगावया रघुनाथा । उल्हासता अंगदा ॥ १२१ ॥

तंव बोलिला जांबुवंत । निधडा वीर हनुमंत । कैसेनि भेटला लंकानाथ । युद्ध कंदनार्थ कां जाला ॥ १२२ ॥

जांबुवान्सर्ववृत्तांतमपृच्छत्मरुतात्मजम् । कथं दृष्टा त्वया सीता कथं वा तत्र वर्तते ॥ ३४ ॥
संवादश्च कथं वृत्तः क्रूरकर्मा हि रावणः । एतत्सर्वं समासेन प्रब्रुहि त्वं महाभुज ॥ ३५ ॥

जांबुवंत म्हणे हनुमंता । तूं वज्रदेही तत्वतां । तुझे अंगीं देखों शस्त्रघाता । त्या युद्धार्था सांगावें ॥ १२३ ॥

अनुक्रमणिका

रावण क्रूर आणि कपटी । कैसेनि जाली त्यासी भेटी । सीता भेटली संकटीं । त्या गुह्य गोष्टी सांगाव्या ॥ १२४ ॥

तुवां गांजिला इंद्रजित । पिता पवन होता सांगत । त्यासी नीळेसी अति एकांत । पुत्र पुरुषार्थ तो वदला ॥ १२५ ॥

त्या युद्धाची समूळकथा । कृपेनें सांगावी हनुमंता । समुद्र लंघनाची वार्ता । तेही तत्वतां सांगावी ॥ १२६ ॥

येचिविशीं हनुमंतीं । पूर्वीं बुद्धि स्फुरली होती । वार्ता पुसलिया श्रीरघुपती । स्वमुखें कीर्ति नये सांगों ॥ १२७ ॥

स्वामीनें पुसिलिया जाण । वार्ता वंचूं नये आपण । वंचिता लागे दूषण । बुद्धि कोण करावी ॥ १२८ ॥

स्वमुखें सांगों नये कीर्ती । वंचूं नये स्वामीप्रती । ऐसिये संकटीं मारुती । प्रजापती विनविला ॥ १२९ ॥ [ओवी १२९ व १३० तं. प्रतीत नाहीत.]

वंदोनि ब्रह्मयाचे चरण । हनुमान विनवी पैं आपण । लंके माजील माझें कथन । पुत्र लेहोन मज द्यावें ॥ १३० ॥ [ओवी १२९ व १३० तं. प्रतीत नाहीत.]

स्वामीपासी निजपुरुषार्थ । जो सांगे तो मूर्खोन्मत्त । वंचिता पावे अधःपात । हा शास्त्रार्थ स्वामीचा ॥ १३१ ॥

नाहीं दुसरा सांगाती । तो सांगता माझी कीर्ती । मज माझी पडली गुंती । पत्र तदर्थी मज द्यावें ॥ १३२ ॥

माझा समस्तही पुरुषार्थ । ब्रह्महस्तीचें ब्रह्मलिखित । सत्य मानील रघुनाथ । निश्चितार्थ मज माझा ॥ १३३ ॥

ऐकोनि हनुमंताचें वचन । हासिंन्नला चतुरानन । परमप्रीती आलिंगून । पत्र लेहोन दीधलें ॥ १३४ ॥

वीरशूर गुणगंभीर । शास्त्रवेत्ता अति चतुर । समयोचित जाणें विचार । निधडा वीर हनुमंत ॥ १३५ ॥

उल्लासोनि प्रजापती । आदरें स्तवोनि मारुती । [तु. वि. दै. मु. ‘अत्यंत’.] आद्यंत कपीची ख्याती । पतप्रीती दीधलें ॥ १३६ ॥

तेंचि ब्रह्मपत्र घेवोनि हातीं । वंदोनिया सीतासती । उल्हासें उडोनि मारुती । वानरांप्रती स्वयें आला ॥ १३७ ॥

जांबुवंते पुसतां ख्याती । ब्रह्मलिखित दिधलें हातीं । [तु. दै. ‘तरी त्यासी’.] रीसांसी नव्हे अर्थप्राप्ती । पडली गुंती गुणगुणी ॥ १३८ ॥

अनुक्रमणिका

लक्ष्मणासीं वाचक शक्ती । तो तंव शेषावतारमूर्ती । कां अर्थ जाणें रघुपती । येरांची युक्ती सरेना ॥ १३९ ॥

जांबुवंताची बुद्धि कैसी । अर्थ न कळे आपणासी । कळों नेदिच वानरांसी । युक्ति विशेषीं चालिली ॥ १४० ॥

ब्रह्मलिखित संपूर्ण । श्रीरामावांचोन आपण । वाचितां लागे दूषण । पत्र घेवोन तेथें जावें ॥ १४१ ॥

बैसवोनि श्रीराममूर्ती । सुग्रीव बैसवोनि कपिपती । पत्र देवोनि सौमित्राप्रती । अर्थयुक्ति वाचावें ॥ १४२ ॥

युक्ति मानली समस्ता । शुद्धि सांगोनिया सीता । अवश्य भेटावें रघुनाथा । मग पत्रार्था वाचावें ॥ १४३ ॥

ऐसा करोनि संप्रधार । उठिला वानरांचा भार । अवघीं केला जयजयकार । श्रीरामचंद्र लक्षोनि ॥ १४४ ॥

एका जनार्दना शरण । हनुमंतासी रामदर्शन । आनंदें वोसंडले गगन । सुखसंपन्न श्रीराम ॥ १४५ ॥

वाचितां ब्रह्मलिखितार्थ । उल्हासेल श्रीरघुनाथ । वानरां उल्हास उद्भुत । तो कथार्थ अवधारा ॥ १४६ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सीताशुद्धिहनुमंतदर्शन नाम त्रयविंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग चोविसावा

## मधुवन विध्वंस

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

सर्वथा सीतया दग्धस्तपसा च निशाचरः । निमित्तमात्रं रामस्तु वधे तस्य भविष्यति ॥ १ ॥
तस्य तद्वचनं श्रुत्वा वालिसूनुरभाषत । जांबुवत्प्रमुखान्सर्वाननुमान्य महाकपीन् ॥ २ ॥
अहं तं रावानं संख्ये ससैन्यं च पुरःसरम् । सहपुत्रं वधिष्यामि सुमहद्वान्धवैर्युधि ॥ ३ ॥
किं पुनःसहितो वीरैर्बलवद्भिःकृतात्मभिः । लंकां च त्वरया हंतुं रावणं च बलोत्कटम् ॥ ४ ॥

**हनुमंत सांगे वीरांप्रती । सीता तपस्विनी श्रीरामसती । तिनें राक्षसांची वीर्यशक्ती । नेली भस्मांती कोपाग्नीं ॥ १ ॥**

**रावणाची शक्ति तेजोराशी । सीतेनें भस्म केलें त्यासी । राम निमित्त मारावयासीं । रावणासी रणरंगीं ॥ २ ॥**

**सीताक्षोभें दशानन । जळोन भस्म जाहला जाण । पतीस यश दिधलें पूर्ण । रामें रावण मारिला ॥ ३ ॥**

**सीता जाळीं श्रीराम मारीं । ऐसेनि राक्षसांची बोहरी । क्षणें होईल लंकेमाझारीं । सांगे वानरीं हनुमंत ॥ ४ ॥**

**ऐकोनि हनुमंताचें वचन । अंगदा आलें अति स्फुरण । सीतेनें जाळिला दशानन । मारितां आपण भय काय ॥ ५ ॥**

**एकला एक मी अंगदु । छेदोनि रावणाचा कंदु । स्वजन सुहृद सखे बंधू । करीन वधू ससेनेसीं ॥ ६ ॥**

**सखा सुहृद वीर जगजेठी । तुम्ही राखिलिया माझी पाठी । ते मी लंकेच्या त्रिकुटीं । राक्षसकोटी मारीन ॥ ७ ॥** [ओवी ७ दै. प्रतीत नाही.]

**कुंभकर्णेसी दशवक्त्र । इंद्रजितासहित राजपुत्र । प्रधान मारीन सर्वत्र । सैन्यसमुद्र मंथीन मी ॥ ८ ॥**

**हनुमंतें मारिलें वीर समर्थ । इंद्रजित केला मेला ना जित । रावणा केलें हताहत । असे धुकधुकित वांचला ॥ ९ ॥**

**हनुमंता समवेत । आम्हीं गेलिया पैं तेथ । धाकेंचि मरतील समस्त । लंकानाथ तो किती ॥ १० ॥**

**रणीं मारोनि रावण । सीता घेवोनि आपण । यावें विजयेंसीं गर्जोन । गुढी उभवून** [वि. 'विजयाची'.] **स्वानंदें ॥ ११ ॥**

अनुक्रमणिका

पुढे ठेवोनियां सीता । [कं. 'शीघ्र'.] श्रेष्ठ भेटी श्रीरघुनाथा । तेणें उल्लास समस्तां । कपिनाथा सुग्रीवा ॥ १२ ॥

सीतेवीण रामापासीं । जावोनि काय सांगावें त्यासी । बहुत दिवस लागले शुद्धीसीं । लाज आम्हांसीं भेटतां ॥

भेटी घेतां रिते हातीं । पहिले रिते आले जुत्पत्ती । तेचि आम्हा [वि. 'उणें'; मु. 'चाळविती'; तं. 'गुन्यो'.] हुरो लाविती । कपिपति क्षोभेल ॥ १४ ॥

राम लक्ष्मण म्हणती । करंटी वानरांची शक्ती । ऐसी पावोनि उपहती । माझी विनंती नायकतां ॥ १५ ॥

जाहलें मर्यादोल्लंघन । त्याहीवरी रितें जावोन । तेव्हां सुग्रीव क्षोभोन । करील अपमान तो ऐका ॥ १६ ॥

काळें वदन खरारोहण । उपानहमाळाचें भूषण । गोमय सुमनीं अभिसिंचन । स्तुती स्तवन फाल्गुनीचें ॥ १७ ॥

तुम्हां वानरां समस्तां । माझें लोटांगण आतां । सीते वांचोनि सर्वथा । भेटी रघुनाथा न जावें ॥ १८ ॥

तेथें सहावा अपमान । त्याहोनि लंकेसी जाऊन । ससैन्य रावण निर्दळून । सीता घेवोन शीघ्र यावें ॥ १९ ॥

ऐसें बोलता अंगदासीं । अति स्फुरण आलें त्यासी । रोमां थरकती सर्वांगासी । पुच्छ आकाशीं तळपत ॥ २० ॥

रण आवेश अंगदातें । देखतां आलिंगिलें हनुमंतें । वीर शूर तूं पुरषार्थे । जांबुवंतें [कं. 'देखिला'.] वदिलें ॥ २१ ॥

वानर लागोनिया पायांसी । शांत करिती युवरायासी । जांबुवंतें अति युक्तीसीं । अंगदासी समजावी ॥ २२ ॥

> अंगदस्य वचः श्रुत्वा जांबुवान्वाक्यमब्रवीत् । नैषा बुद्धिर्महाबाहो यां ब्रवीषि महाकपे ॥ ५ ॥
> विचेतुं वयमाज्ञप्ता दक्षिणां दिशमुत्तमाम् । नानेतुं कपिराजेन नैव रामेण धीमता ॥ ६ ॥
> कथंचिन्निर्जितां सीता मस्माभिर्नाभिरोचयेत् । प्रतिज्ञा यस्य रामस्य सीताविजयमग्रतः ॥ ७ ॥
> सर्वेषां कपिमुख्यानां कथं मिथ्या करिष्यति ॥ ८ ॥

अंगदाचें प्रतापवचन । जांबुवंतें ऐकोन । त्यासी द्यावया समाधान । पूर्व [क. 'कथन'; तु. दै. वि. 'प्रश्न'.] प्रस्थान अनुवादे ॥ २३ ॥

आम्हां धाडितां दक्षिणेसी । श्रीराम सुग्रीव आज्ञा ऐसी । तुम्ही आणावें सीता शुद्धीसी । मर्यादेसी मासांतीं ॥

मारुनिया रावणासी । शीघ्र आणावें सीतेसी । श्रीरामाज्ञा नाहीं ऐसी । नाहीं नेमेसी राजाज्ञा ॥ २५ ॥

अनुक्रमणिका

रावण मारितां आज्ञेविण । श्रीराम क्षोभेल संपूर्ण । सुग्रीव कोपेल दारुण । तेंही कारण अवधारी ॥ २६ ॥

श्रीरामें वाहिलीसे आण । स्वहस्ते विंधोनिया बाण । रणीं मारोनि रावण । सीता आपण सोडवणें ॥ २७ ॥

तो आम्ही मारोनि रावण । सीता आणितां आपण । आम्ही भंगिता रामपण । तिघेजण क्षोभती ॥ २८ ॥

मिथ्या करितां श्रीरामपण । सुग्रीव कोपेल दारुण । कोपा चढेल लक्ष्मण । श्रीरामपूर्ण क्षोभेल ॥ २९ ॥

रावण जरीं मारुं येतां । तरी कां हनुमंत सोडितां । निर्दळूनी लंकानाथा । सीता आणितां निमिषार्धें ॥ ३० ॥

धन्य हनुमंत सज्ञान । श्रीराम मर्यादा पाळून । या लागीं न मारीच रावण । आला [मु. 'घेवोनी'.] आपण शुद्धीसी ॥ ३१ ॥

ऐसा निश्चयो ऐकतां । अंगदें वंदिलें हनुमंता । वीरशूर विवेक ज्ञाता । तुज परता आन नाहीं ॥ ३२ ॥

> तस्माग्दच्छामहे सर्वे यत्र रामः सलक्ष्मणः । सुग्रीवश्च महातेजाः कार्यस्यास्य निवेदने ॥ ९ ॥
> बाढमित्येव चोक्त्वा वै प्रस्थानं समरोचयन् । प्रीतिमन्तस्ततः सर्वे वायुपुत्रपुरः सराः ॥ १० ॥
> महेंद्राग्रं परित्यज्य पुम्लुवुर्वानरोत्तमाः ॥ ११ ॥

जांबुवंताचा वचन मेळीं । शुद्धि सांगावया जनकबाळी ।
शीघ्र जावया श्रीरामाजवळीं । पिटिली टाळी वानरीं ॥ ३३ ॥

पुढां करुनी हनुमंत । अंगदादि वीर समस्त । रामनामें स्वयें गर्जत । भुभुःकार करीत ऊठले ॥ ३४ ॥

आधीं वंदोनि श्रीरामासी । संवेंचि वंदू लक्ष्मणासी । लोटांगण सुग्रीवासी । सीता शुद्धीसी सांगावया ॥ ३५ ॥

त्यजोनिया महेंद्रगिरी । उड्डाण केलें पै वानरीं । एकाहूनि एकावरी । वीर अंबरी दाटलें ॥ ३६ ॥

हस्तचित्रांचें आभाळ । जेंवी आच्छादी रविमंडळ । तैसें वानर सकळ । उतावीळ चालिलें ॥ ३७ ॥

उड्डाण करितां वानरीं । पर्वत खचती धरणीवरी । समूळ उपडोनि तरुवरीं । गगनांतरीं परिभ्रमती ॥ ३८ ॥

करीत उल्हासें आल्हाद । कपिकूळ चालिले विविध । पुढें मधुवनाचा गंध । आला सुगंध वानरां ॥ ३९ ॥

गंध येतां नासापुटीं । एक वानर लाळ घोटी । एक मटामटा देती मिठी । वानर कोटी तळमळिती ॥ ४० ॥

हें तंव सूग्रीवाचें वन । दधिमुख नित्य राखण । येथें रिघों शके कोण । काय आपण करावें ॥ ४१ ॥

सीता शुद्धीहोनि देख । आम्हां [दै. तु. मु. 'मधुवन'.] मधुपान अधिक । कृपा करो रघुकुळटिळक । एकें एक

अनुक्रमणिका

तळमळिती ॥ ४२ ॥

राम सर्वात्मा सर्वज्ञ । ऐसें सत्य वदे पुराण । आम्हा दिधलिया मधुपान । आम्ही सर्वज्ञ सत्य मानूं ॥ ४३ ॥

जिभेनें घातली लोळणी । थाया घेतला होटीं दोन्हीं । मुख करताहें ग्लानी । मधुपानीं श्रीरामा ॥ ४४ ॥

मनासी मधुपानीं वणवण । चित्तासी मधुपानीं चिंतन । [मु. 'लोलुपाये अतिगहन'.] केल्यावीण मधुपान । पुढे मन ढळेना ॥ ४५ ॥

सुग्रीवाचें मधुवन । सुरांअसुरां अगम्य स्थान । यें वनीचें मधुपान । केवीं आपण पाविजे ॥ ४६ ॥

ऐसें वानर समस्त । मधुपानीं अति आसक्त । कृपा करील रघुनाथ । तैंच प्राप्त होय आम्हां ॥ ४७ ॥

राम सर्वांचे हृदयदेशीं । वानरा बुद्धी दिधली कैसी । प्रार्थोनियां हनुमंतासी । अंगदापासीं [तु. दै. 'वन मागा'.] मागावें ॥ ४८ ॥

सुग्रीव कपिराजा [तु. दै. 'समर्थु'.] प्रसिद्धु । तैसाचि युवराजा अंगदु । हनुमंतें मागतां मधु । देईल आल्हाद करोनि ॥ ४९ ॥

> ततस्ते वानरा हृष्टा दृष्ट्वा मधुवनं महत् । हनुमंतमयाचंत जांबुवत्प्रमुखास्तथा ॥ १२ ॥
> स चांगदमुपागम्य याचंते ते तदा मधु । सिद्धार्थानां किलास्माकं प्रसादं कर्तृमर्हसि ॥ १३ ॥
> श्रुत्वा हनूमतो वाक्यमंगदः प्रवरांगदः । प्रत्युवाच महातेजाः पिबन्तु हरयो मधु ॥ १४ ॥
> अवश्यं कृतकार्यस्य वाक्यं हनुमतो मया । अकर्तव्यमपि प्राज्ञैः किमंग पुनरीदृशम् ॥ १५ ॥
> ततः कुमारस्तान् सर्वान् जांबुवत्प्रमुखान्हरीन् । अनुमान्य ददौ तेषां निसर्गं मधुभक्षणम् ॥ १६ ॥

जांबुवंतादि वानरांसी । अवघे आले हनुमंतापासीं । आम्हांसी मधु भक्षावयासी । अंगदापासीं वन मागे ॥ ५० ॥

हनुमंत म्हणे अंगदासी । तूं तंव युवराजा आम्हांसी । कांहीं एक मागणें तुजपासी । अति कृपेसीं मज देई ॥ ५१ ॥

अंगद म्हणे हनुमंता । तुझेनि बोलें देईन जीविता । इतर अर्थाची कोण कथा । सांग पां आतां काय देऊं ॥ ५२ ॥

वानर [पै. खेरीज इतरत्र 'पीडिले'.] पडले परदेशीं । श्रमले येतां अति वेगासी । मागताती मधुपानासी । तुजपासीं महाराजा ॥ ५३ ॥

माझिया पित्याचें हें वन । सत्ता आहे मज अधीन । वनीं रिघोनि वानरगण । करा मधुपान यथेष्ट ॥ ५४ ॥

अनुक्रमणिका

**बाळवृद्धादि अकर्मवंत । त्यांसी न मागतां राय देत । दीन दयाळ ब्रीदें पढवित । तुम्ही समस्त कृतकार्य ॥ ५५ ॥**

**तुम्हांसही न मागतां । म्या अर्पावें निज जीविता । कायसी मधुवनाची कथा । हनुमंताचेनि बोलें ॥ ५६ ॥**

**ऐक हनुमंता सावधान । वाहतों श्रीरामाची आण । वानरीं आलोडोनी वन । मधुपान करावें ॥ ५७ ॥**

**जांबुवंतादि वीर प्रसिद्ध ।** [कं. 'तयासी आज्ञा करी'.] **आलिंगी कनकांगदी अंगद । हनुमंताचे वंदोनि पद । करावें विविध मधुपानें ॥**

**ऐकोनि अंगदाचें वचन । उल्हासले वानरगण । आक्रमोनियां तें वन । मधुपान मांडिलें ॥ ५९ ॥**

> पूजयित्वांगदं सर्वे यूथपालाश्च यूथपाः । ताडंयति स्म शतशः ते द्रवंति दिशो दश ॥ १७ ॥
> त्रासयित्वा तु तानाशु वानरास्ते बलोत्कटाः । लोडयंति स्म शतशः सर्वं मधुवनं तदा ॥ १८ ॥
> भक्षयंति सुगंधीनि मधूनि रसवंन्ति च । जग्मुः प्रहर्षं ते सर्वे बभुवुश्च मदोत्कटाः ॥ १९ ॥

**अंगदधीर वीर महाशूर । राजकुमार अति उदार । जुत्पत्ती श्रेष्ठ सेनाधर । सहित वानर वानिती ॥ ६० ॥**

**धन्य अंगदाची** [अं. 'नीती'; तु. दै. मुं. 'गती'.] **मती । धन्य अंगदाची स्थिती । अंगदाची उदार कीर्ती । स्वयें वानिती वानर ॥ ६१ ॥**

**लाहोनि अंगद आज्ञापन । वनीं रिघोनि वानरगण । केलें बनकरां ताडण । जानुअपान महामारु ॥ ६२ ॥**

**नाहीं घेतलें तोंडावरी । नाहीं मारिले बुकीवरी । गांड गुडघिच्या महामारी । वनाबाहेरीं घातले ॥ ६३ ॥**

**जान्वापान मारासाठीं । राखणें पळतीं बारावाटीं । पळता धाप लागली पोटीं । सांगती गोष्टी दधिमुखा ॥**

**पळवोनिया बनकर । वनी आलोढिती कपींद्र । मधु प्राशिती अति मधुर । देती वानर** [अं. कं 'महामिटक्या'; मु. 'वारंवार महामिटक्या'.] **महामिठ्या ॥ ६५ ॥**

**प्रत्येक एक एक वानर । मधु प्राशिती** [कं. 'पात्र'.] **द्रोणमात्र । मदें डुल्लती कपींद्र । वनसमग्र व्यापुनी ॥ ६६ ॥**

**किराणें करिती तरुवरी । एक उडती एकाचे शिरीं । एक** [मु. 'लपती'.] **लोंबती शाखांतरीं । एक वृक्षाग्रीं नाचतीं ॥ ६७ ॥**

**एक निजती वृक्षमुळीं । एक त्यांचिया पूसांतळीं । घालिती मद्याची गुरळी । मदविव्हळी उन्मत्त ॥ ६८ ॥**

**वानर तृप्त मद्यपानीं । उर्वरित मद्य घेउनी । खेळती मद्याची शिंपणी । आक्रमूनीं येरयेरां ॥ ६९ ॥**

अनुक्रमणिका

**येरयेरां पुच्छ हाणिती । येरयेरांपाठीं लागती । एक पडती अडखळती । एक लोळती उन्मादें ॥ ७० ॥**

खादंति केचिद्विहरंति केचिद्रुदंति केचित्प्रहरंति केचित् ।
केचिन्नदंति प्रहसंति केचित्क्रुध्यंति केचित्प्रलपंति केचित् ॥ २० ॥
पिबंति केचित्प्रवदंति केचित्स्मयंति केचित्प्लवगाः प्रहृष्टाः ॥ २१ ॥

**एक तें मद्यपान करिती । एक कोशिंबिरीसी मद्यखाती । एक एकाचें मद्य हरिती । पात्रें घेती हिसडोनी ॥ ७१ ॥**

**एक तें रडती पडती । एक ते ठायीं ठायीं अडखळती । एक ते मद्यांनंदें नाचती । एक ते गाती रामकथा ॥ ७२ ॥**

**एक ते अति रागें रुसती । एक त्यातें बुझाविती । एक मद्यसुखें सुखावती । एक डुल्लती मदमोहें ॥ ७३ ॥**

**एक उन्मादका वृत्ती । अति दीर्घ हांका देती । एक ते गोड गोष्टी सांगती । विध्वंसती वन एक ॥ ७४ ॥**

**वृक्ष मोडिती वानरें । उलंडिती मद्यपात्रें । फोडिती मद्यसाधक यंत्रें । वनचरें उन्मादें ॥ ७५ ॥**

**वानरीं त्रासिले वनपाळ । दुःख पावलें प्रबळ । दधिमुखापासीं सकळ । आले विव्हळ अति दुःखी ॥ ७६ ॥**

अब्रुवन् परमोद्विग्नाः गत्वा दधिमुखं तदा । तारांगदहनूमद्भिर्हतं मधुवनं कपे ॥ २२ ॥
वयं विकृष्टा जानुभ्यां देवमार्गं च दर्शिताः । यदत्रानंतरं कार्यं तत्त्वं कर्तुमिहार्हसि ॥ २३ ॥

**आमचे वानर वीर समस्त । मधुवन विध्वंसित । आम्हासी निवारितां तेथ । दुःखाभिभूत आम्हां केलें ॥ ७७ ॥**

**लाता बुक्या सुबद्ध घाये । त्या घायांचें भय काये । शीळा शाळ ताळ येतां पाहें । झेलिले जाये तळपोनि ॥ ७८ ॥**

**हाणितां नेटे जान्वापान । गुदें आलीं गा सुजोन । जळो तुझें तें मधुवन । गुद कंदन कोण सोसी ॥ ७९ ॥**

**गांड गुडघ्याचा आघात । पूंसें रिघालीं ढुंगा आंत । दधिमुखासी दुःख सांगत । सुजलें दावित निज गुह्य ॥ ८० ॥**

**तु तंव आमचा गा नाथ । दुःख सांगितलें समस्त । यावरी जो कार्यार्थ । कर्तव्यार्थ** [मु. तो 'करी'.] **विचारी ॥ ८१ ॥**

ततो दधिमुखः क्रुद्धो वनपाधिपतिस्तदा । हतं मधुवनं श्रुत्वा हतांश्चाश्वारायन्हरीन् ॥ २४ ॥
एतागच्छत गच्छामो वानराननतिदर्पितान् । बलेन वारयिष्यामः भक्षमाणान्मधूत्तमम् ॥ २५ ॥
श्रुत्वा दधिमुखस्यैवं वदतो वानरर्षभाः । पुनर्वीरा मधुवनं तेनैव सहिता ययुः ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

**ऐकोनि वानरांचें वचन । दधिमुख क्रोधायमान । वानर सैन्य आश्वासून । आले परतून मधुवना ॥ ८२ ॥**

**अंगद हो कां राजसुत । हनुमंत हो कां अति आप्त । राजाज्ञा जे उल्लंघित । तेही समस्त दंडीन ॥ ८३ ॥**

**वाली सुग्रीवाचा पिता । ऋक्षराजादारभ्यता । मी या वनाचा रक्षिता । कपी समस्तां कळलेसें ॥ ८४ ॥**

**त्या मजही न पुसतां । राजाज्ञाहि स्वयें न घेतां । केली मधुवनीं उद्धतता । त्यां समस्तां दंडीन ॥ ८५ ॥**

**ऐसें सांगोनि बनकरांसी । क्रोध आला दधिमुखासी । दंडिले माझ्या सेवकांसी । मीही त्यांसी दंडीन ॥ ८६ ॥**

> ते स्वामिवचनं वीरा हृदयेष्ववसज्ययन् । हरयः संपृधृष्यंतः शालतालशिला युधाः ॥ २७ ॥
> मध्ये चैषां दधिमुखः प्रगृह्य द्रुममुत्तमम् । समभ्यधावन्वेगेन ते च सर्वे प्लवंगमाः ॥ २८ ॥
> वृक्षरस्थाश्च स्थलस्थाश्च वानरा बलदर्पिताः । अतिचक्रमिरे वीरान्पालान्शतसहस्रशः ॥ २९ ॥
> सवृक्षं तं दधिमुखमापतंतं महाबलम् । वेगवंतं निजग्राह बाहूभ्यां कुपितोऽगदः ॥ ३० ॥
> मदान्धो न कृपांचक्रे आर्य कोऽयं ममेति सः । अथैनं निष्पिपेषाशु वेगेन वसुधातले ॥ ३१ ॥

**ऐकोनि दधिमुखाचा बोल । वानर वीर वनपाळ । घेवोनि शिळा शाळ ताळ । सन्नद्ध सकळ चालिले ॥ ८७ ॥**

**गांडी सुजली गांड गुढघ्यासी । तो राग बनकरां मानसी । घेवोनि आले दधिमुखासीं । वानरांसी त्राहटिले ॥**

**जळ स्थळस्थ आणि वृक्षस्थ । वानर सुग्रीवाज्ञें भयभीत । अंगदापासीं आले पळत । दुरोनि दावित दधिमुखा ॥**

**मध्यें दधिमुख वीरु । हातीं प्रचंड तमाल तरू । भोंवता वानरांचा भारु । अति दुर्धर लोटला ॥ ९० ॥**

**जांबुवंतासीं समानबळी । दधिमुख अतुर्बळी । वृक्ष घेवोनि करतळी । करील रंवदोळी वानरां ॥ ९१ ॥**

**सुग्रीव आज्ञा अति समर्थ । मधुवन केलें उपहत । दधिमुख धाडिला दंडार्थ । कपी सांगत अंगदा ॥ ९२ ॥**

**दधिमुख अविचार । अंगद हनुमंतादि वीर । यांचा न घेतां विचार । कोपें तरुवर सोडिला ॥ ९३ ॥**

**तमाल वृक्ष येतां वरी । अंगदें उडोनि ते अवसरीं । वृक्ष झेलुनी वरिच्यावरी । सवेंचि मारी दधिमुखा ॥ ९४ ॥**

**अंगद कोपला महावीरु । मदोन्मत्त अति दुर्धरु । पित्याचा मातुळ नये मारुं । हा ही विचारु विसरला ॥ ९५ ॥**

**दधिमुख कपि वृद्धता । परम पूज्य अति श्रेष्ठता । हे ही नाठवे अंगदाचें चित्तां । क्रोधोन्मत्तता मारिला ॥ ९६**

अनुक्रमणिका

॥

> सभग्नबाहूरुमुखो विव्हलः शोणितोक्षितः । स मुमोह महावीर्यो मुहूर्तं कपिकुंजरः ॥ ३२ ॥
> स कथं चिद्विमुक्तस्तैर्वानरैर्वानरर्षभः । उवाचैकांतमागत्य तान्भृत्यान्समुपागतान् ॥ ३३ ॥
> तत्र गच्छत गच्छामो भर्ता नो यत्र वानरः ॥ ३४ ॥

**दधिमुखें हाणतां तरुवरीं । अंगदें झेलोनि वामकरीं । दधिमुख हाणोनि सव्यकरीं । धरणीलरी पाडिला ॥ ९७ ॥**

**हातपाय अव्यवस्थ विकळ । भग्न मस्तक नेत्र विव्हळ । अशुद्धें जाहला बंबाळ । मुख विक्राळ विचकिलें ॥ ९८ ॥**

**दधिमुख उचलोनि वानरीं । टाकिला मधुवना बाहेरीं । उदक सिंपोनि बनकरीं । वारा वानरीं घालिजे ॥ ९९ ॥**

**दधिमुख सावध जाला । सांगे बनकरां सकळां । सुग्रीवापासीं सांगों चला । आम्हांसी केला अपमान ॥ १०० ॥** [ओवी १०० वि. प्रतीत नाही.]

**ऐसे सांगोनि बनकरांसी । दधिमुख उडाला आकाशीं । निमिषें आला सुग्रीवापासीं । बनकरांसी समवेत ॥ १०१ ॥**

**श्रीराम स्वामी आणि सौमित्र । उभे वानर जोडोनि कर ।**
**सुग्रीव बैसला कपिराजेंद्र । आज्ञा दुर्धर जयाची ॥ १०२ ॥**

**आज्ञा उल्लंघिता अणुप्रमाण । दंडकरी अति कठीण । नाक कान सरकटून । खरा रोहण तत्काळ ॥ १०३ ॥**

> ततो मुर्ध्ना निपतितं वनपालं कपीश्वरम् । दृष्ट्वैवोद्विग्नहृदयं वाक्यमेतदुवाच ह ॥ ३५ ॥
> उत्तिष्ठोत्तिष्ठ कस्मात्वं पादयोः पतितो मम । अभयं वच्मि ते वीर तत्त्वमेवाभिधीयताम् ॥ ३६ ॥

**दधिमुख रडत उकसा बुकसी । आडवा पडला सुग्रीवापासीं ।**
**वानरें दिधलें अपमानासी । पारपत्त्यासी करी** [मु. 'तया'.] **राया ॥ १०४ ॥**

**सुग्रीव बोलिला वचन । तुज दिधलें अभयदान । कोण वानर कैसा अपमान । विशद करुन मज सांग ॥ १०५ ॥**

**दधिमुख दुःख सांगत । अंगदादि हनुमंत । मधुवन विध्वंसित । मधुभक्षित राजपेय ॥ १०६ ॥**
[ओवी १०६ कं. मुं. मध्ये नाही.]

**ऋक्षराज तुझा पिता । तैं पासुनी मी वन रक्षिता । वनावरी माझी सत्ता । तुज मागतां मी नेदी ॥ १०७ ॥**

अनुक्रमणिका

तुझी राजाज्ञा नसतां । मजही ते न पुसतां । केलें मधुवन विघाता । मद्यपानता उन्मत्त ॥ १०८ ॥

स्वाद मधुसुगंध राजपान । वानरीं करितां भक्षण । राजाज्ञा करावया दंडन । कोपें धांवोन मी [कं. मु. 'गेलों'.] आलों ॥ १०९ ॥

अंगद मज [तु. दै. मु. 'उपमर्दोन'.] उपटून । वनीं सांडिलों मूर्च्छापन्न । [मु. 'बनकरा'.] वानरां आघात जान्वापान । गुदें सुजवोन सोडिले ॥ ११० ॥

बनकर वीर व्यथित । सघृत तेलें गुद शेकित । निंदापमानें अति गांजित । शरणागत तुज आलों ॥ १११ ॥

तूं स्वामि असतां शिरीं । आम्ही गांजिलों ऐशिया परी । आमचा होवोनि कैवारी । स्वयें उद्धरीं राजाज्ञा ॥ ११२ ॥

राजाज्ञाचें राहे बिक । आमचें निरसें निजदुःख । ऐसी उद्धता लावी शीक । दधिमुख विनवीत ॥ ११३ ॥

ऐकोनि दधिमुखाचें वचन । सुग्रीव आणि लक्ष्मण । दोघे विचारविचक्षण । कार्यकारण लक्षक ॥ ११४ ॥

क्षुधित तृषित परदेशी । वानर पीडिले उपवासी । साधिलें सीताशुद्धि लक्ष्यासी । वनभक्षासी तरी दिधलें ॥ ११५ ॥

अंगद वीर विचार श्रेष्ठ । राजपुत्र अति वरिष्ठ । जाणोनि सीताशुद्धीचे कष्ट । मधु यथेष्ट पाजिले ॥ ११६ ॥

साधिली सीता शुद्धि इत्यर्थ । तेणे वानरां ऐसें सामर्थ्य ।
मधुवनासी विध्वंसित । आणि धुमसित बनकरां ॥ ११७ ॥

ज्याचेनि कार्य न साधे जाण । तो सदाचा हीन दीन । मुखीं होनि न निघे वचन । काळें वदन तयाचें ॥ ११८ ॥

कार्य न साधे जयासी । मुख दावितां लाज त्यासी । मुखीं उतरती [मु. 'तया'.] तिन्ही मसी । सामर्थ्य त्यासी असेना ॥ ११९ ॥

सीता शुद्धि लाधली खरी । म्हणोनि मधुवना माझारी । वानरीं केली आपांपरी । मारामारी बनकरीं ॥ १२० ॥

जांबुवान्यत्र नेता स्यादंगदश्च महाबलः । हनुमांश्च प्रतिष्ठाता न तत्र गतिरन्यथा ॥ ३७ ॥
दृष्टा मन्ये च वैदेही न चान्येन हनूमतः । व्यवसायश्च वीर्यं च सूर्यतेज इव ध्रुवम् ॥ ३८ ॥

जांबुवंत मंत्री जेथें । अंगद वीर बळोद्धतें । सीता शुद्धि केली हनुमंतें । मज निश्चितें मानिलें ॥ १२१ ॥

अनुक्रमणिका

हनुमंतें सिद्धी नेलें सकळ । निश्चयें शोधिली जनकबाळ । तेणें विजयी वानर सकळ । बळें प्रबळ हनुमंत ॥ १२२ ॥

हनुमंता वांचून । आणिका न साधे सीता चिद्रत्न । सीताशुद्धि साधोनिपूर्ण । मधुवन भक्षिलें ॥ १२३ ॥

सीताशुद्धि जाली संपूर्ण । सुग्रीव आणि लक्ष्मण । निश्चय करोनि आपण । कृत कल्याण पावले ॥ १२४ ॥

सुग्रीव म्हणे दधिमुखासी । तूं तंव परम मूर्ख होसी । न पुसतां हनुमंतासी । त्वां कां त्यासीं युद्ध केलें ॥ १२५ ॥

मद्यपानी नव्हे हनुमंत । आणि तो तुझा परम आप्त । त्यासी न पुसतां वृत्तांत । युद्धकंदनार्थ कां केला ॥ १२६ ॥

सीताशुद्धि स्वयें साधून । वना आले वानरगण । तेहीं केलें मधुपान । सुख संपन्न आम्ही तेणें ॥ १२७ ॥

तुज जो दिधला अपमान । क्षमा करावा मज लागून । अंगदासी त्वां भेटोन । समाधान साधावें ॥ १२८ ॥

सीताशुद्धि स्वयेंसाधून । वना आले वानरगण । तेणें दधिमुख [मुं. अं. 'हरिखे जाण'.] हरिखेजोन । केले नमन सुग्रीवा ॥ १२९ ॥

दधिमुख वना येवोन । अंगदा घाली लोटांगण । माझा अपराध संपूर्ण । क्षमा आपण करावा ॥ १३० ॥

अंगद म्हणे उन्मादका । [अं. मुं. मु. 'तेव्हां'.] केव्हां केली अपमानता । ते मज नाठवे गा [मुं. कं. तं. मु. 'आतां'; वि. 'तत्त्वता'; तं. 'गतागता'.] ताता । क्षमा [वि. 'सर्वथा'.] तत्वता करावी ॥ १३१ ॥

येरयेरां अभिवंदन । येरायेरां अलिंगन । अंगद दधिमुखासी जाण । समाधान स्वानंदें ॥ १३२ ॥

तुम्ही आलेति सीता शुद्धीसी । परम सुख सुग्रीवासी । शीघ्र बोलाविलें तुम्हांसी । श्रीरामासी भेटावया ॥ १३३ ॥

श्रीराम प्रेम वानरांत । जरी जाले मदोन्मत । तरी राम नाम स्मरत । विव्हळित मदभरें ॥ १३४ ॥

एक मद्याचे उन्मत्तीं । रामनामें हांका देती । एक ते रामनामें डुल्लती । एक म्हणती रामनामें ॥ १३५ ॥

एक मद मोहें अडखळती । एक अडखळतां रामनाम स्मरती ।
एक राम नामें लवंडती । एक उपरमती रामनामें ॥ १३६ ॥

एक मदमोहें नाचती । एक उन्मादें गीत गाती । गातां नाचतां रामस्मरती । विटाविती रामनामें ॥ १३७ ॥

वानर देखोनि मदमोहित । हनुमान रामकार्य उद्यत । वंदावया श्रीरघुनाथ । शीघ्रवत निघाला ॥ १३८ ॥

अनुक्रमणिका

एका जनार्दना शरण । हनुमंता रामदर्शन । अति गोड निरोपण । सावधान अवधारा ॥ १३९ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां वानरमधुवनविध्वंसो नाम चतुर्विंशतितमप्रसंगः ।

अनुक्रमणिका

## प्रसंग पंचविसावा

## हनुमंत आगमन—अंगद संवाद

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

वानर गेले दक्षिणेसी । मर्यादा लोटली तयांसी । कोणी नाणीच सीता शुद्धीसी । श्रीरामासीं अति चिंता ॥ १ ॥

मजसी करुनि एकांत । मुद्रा घेवोनि गेला हनुमंत । तो कां न येचि त्वरित । अति सचिंत श्रीराम ॥ २ ॥

हनुमंत कार्यकर्ता । मजही भरंवसा होता । तोही न येचि वाट पाहातां । परम चिंता श्रीरामा ॥ ३ ॥

ऐसी श्रीरामाची चिंता । कळों सरली हनुमंता । शुद्धि सांगावया सीता । होय निघतां अति शीघ्र ॥ ४ ॥

श्रीरामाची परम चिंता । सांगता अंगदा जांबुवंता ।
घांसा आड येऊं नये हनुमंता । घेवों दे आतां धणी आम्हां ॥ ५ ॥

वानरें पीडिली अतिदीन । भाग्यें मिळालें मधुपान । त्यांसी त्वां न करावें विघ्न । तूं सज्ञान दीनदाता ॥ ६ ॥

विषय रस भोगा पुढें । परमार्थ समूळ उडे । वानर मद्यपानें [मु. 'जाले वेडे'.] वेडें । श्रीरामाकडे न चले ॥ ७ ॥

वानर गुंतले मद्यपानांत । मद्यपानें बोधेना परमार्थ । ऐसें जाणोनिया हनुमंत । निघे त्वरित एकाकी ॥ ८ ॥

वानरीं भक्षिलें मधुपानासी । सीता शुद्धि साधली त्यासी । निश्चयो मानला सुग्रीवासी । सौमित्रेसी [तं. 'संमत'; कं. अं. मुं. वि. 'समवेत'.] सांगतं ॥ ९ ॥

सौमित्र सुग्रीव अति हरिखेसी । सीताशुद्धि सांगतां श्रीरामापासी ।
श्रीरामें देखिलें हनुमंतासी । येतां आकाशीं अति शीघ्र ॥ १० ॥

येतां देखोनि हनुमंता । अति आल्हाद श्रीरघुनाथा ।
धांवोनि आकाशाही वरौता । सीता शुद्धयर्थ पुसों पाहे ॥ ११ ॥

ऐसें जाणवलें हनुमंता । उठो नेदितां रघुनाथा । दुरुनी सीता शुद्धीची कथा । होय सांगता तें ऐका ॥ १२ ॥

> दृष्टा सा जनकात्मजा रघुपते युष्मत्प्रसादान्मया । लंका नाम पुरी समुद्रजठरे तत्रास्ति वीरप्रभो ॥ १ ॥
> राहुग्रस्तनिशापतेरिव कला लावण्यहीनप्रभा । सीताजीवनकारणं वद सखे रामामृतं मानसे ॥ २ ॥

उठो नेदितां रघुनाथा । दुरुनी सांगणें हनुमंता । तुझिया कृपा म्यां तत्वतां । देखिली सीता जनकात्मजा ॥

अनुक्रमणिका

१३ ॥

समुद्रामध्यें महागिरी । त्यावरी वसे लंकापुरी । रावणाचिया निजमंदिरीं । सीता सुंदरी राखिली ॥ १४ ॥

केवळ नाहीं रावणाघरीं । अशोक [कं मु. 'वाटिके'.] वनिके माझारीं । रावण विक्राळ खेचरी । त्या माझारीं जानकी ॥ १५ ॥

एक वस्त्र भूमिशायी । मळिनांबरे मळिन देही । मंगळ स्नान करणें नाहीं । मस्तकीं पाही दृढजटा ॥ १६ ॥

जैसाचि श्रीराम जटाधारी । तें व्रत चालवी सीता सुंदरी ।
स्नेह दुष्टीचा हातीं न धरी । जटाधारी जानकी ॥ १७ ॥

नेघे अंजन चंदन । न करी भोजन रसपान । केवळ तिसीं उपोषण । जळप्राशन तेंही नाहीं ॥ १८ ॥

नित्य तृप्तीचें अवदान । [मु. 'ब्राह्मणा नेदितां'] ब्रह्मेनि देतां ब्रह्मोदन । सीता न पाहे सर्वज्ञ । निंद्य म्हणोनि नातळे ॥ १९ ॥

परपुरुषाचें घ्यावे अन्न । ते परदारा जाले आपण । सीतेनें सांडिले थुंकोन । जैसें वमन श्वानाचें ॥ २० ॥

श्रीराम वियोगाचें अन्न । तें श्वान विष्ठेसी समान । रजस्वलेचें रुधिरपान । [तु. दै. 'तुच्छमान'.] तत्समान रस भोग ॥ २१ ॥

तुज वांचोनि रघुपती । जळ स्पर्शेना ते हातीं । किती सांगों उपपत्ती । सीता सती पतिव्रता ॥ २२ ॥

चंद्र ग्रहणीं हीनकळा । तैसी हीन दीन जनकबाळा । स्वयें देखिली मियां डोळा । वीर वेताळा श्रीरामा ॥ २३ ॥

नेघे अन्न ना जीवन । कैसेनि तिचे वांचती प्राण । श्रीराम पुसे कळवळोन । दीनजन कृपाळू ॥ २४ ॥

निज सखया हनुमंता । कैसेनि [मु. कं 'वांचली'.] वांचे माझी सीता । हें मज सांगावें तत्वतां । होय पुसतां श्रीराम ॥ २५ ॥

हनुमान अति विचक्षण । सीता सती निज जीवन । कैसें सांगेल आपण । सावधान अवधारा ॥ २६ ॥

हृदयीं श्रीरामा चिदचिन्मूर्ति । मुखीं रामनाम अहोरातीं ।
राम न्याहाळी सर्वांभूती । श्रीराम [अं. मुं. तं. मु. वि. 'चित्तीं'.] चिंतीं अहर्निशीं ॥ २७ ॥

राम धराधारक पूर्ण । श्रीराम जीवनाजीवन । रविचंद्र दीप्ति [तु. दै. मु. 'गहन'.] दहन । विराजमान श्रीराम ॥

अनुक्रमणिका

२८ ॥

श्रीराम वायूचा निजप्राण । श्रीराम गगनाचें चिद्गगन । श्रीराम बुद्धि समाधी धन । प्राण पोषण श्रीराम ॥ २९ ॥

श्रीराम अहं सोहं निमग्न । श्रीराम मनाचें उन्मन । श्रीराम चित्त चैतन्य घन । जीवा जीवन श्रीराम ॥ ३० ॥

ऐस ऐसिया निज स्थितीं । मीतूंपणाहोनि परती । सीता जीवन श्रीराममूर्ति । सत्य रघुपती [तु. दै. मु. 'बुद्धि'.] शुद्धि माझी ॥

निर्विकल्पा भजनविधी । काया वाचा सुबुद्धि । मियां आणिली सीताशुद्धी । सत्य त्रिशुद्धी श्रीराम ॥ ३२ ॥

श्रीरामनाम परमामृत । अमृत पानें अमर मरत । राम नाम ज्यासी प्राप्त । मरण मरत त्याचेनि ॥ ३३ ॥

रामनामीं श्रद्धा अढळ । त्यासी बाधीना हळाहळ । पोळूं न शके प्रळयानळ । द्वंद्व सकळ निर्द्वंद्व ॥ ३४ ॥

ऐसें श्रीराम नामामृत । तेंचि सीतेसी जीवन नित्य । श्रीराम जाणें त्रिसत्यसत्य । श्रीरघुनाथ सर्वज्ञ ॥ ३५ ॥

ऐकोनि हनुमंताचें वचन । श्रीरघुनाथ संतोषोन। परमानंदे बाहु पसरोन । दिधलें आलिंगन निज ऐक्यें ॥ ३६ ॥

स्वामित्व विसरे रघुनाथ । दासत्व विसरे हनुमंत । परमानंद सदोदित । जगा आंत कोंदला ॥ ३७ ॥

अहं सोहं कोहं ज्ञान । तें समरसीं गेलें विरोन । हरपलें मीतूंपण । सुख संपन्न स्वानंदे ॥ ३८ ॥

दोघे होतां सुखसंपन्न । विरोनि गेलें ज्ञानाज्ञान । खुंटला बोल तुटलें मौन । चैतन्य घन कोंदलें ॥ ३९ ॥

दृश्य दृष्टा आणि दर्शन । ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान । ध्येय ध्याता ध्यान । गेलीं विरोन स्वानंदीं ॥ ४० ॥

देवो देवपणें दाटला । भक्त भावार्थ आटला । परमानंद प्रकटला । तटका तुटला आशेचा ॥ ४१ ॥

भजन आवडी भावार्थ । भक्त गिळिला रघुनाथ । रामें गिळिले देवभक्त । मुख्य परमार्थ या नांव ॥ ४२ ॥

ऐसा पावोनि परमार्थ । श्रीरामीं भजे हनुमंत । भजनें [तु. वि. मुं. तं. दै. अं. मु. 'दास'.] दास यशवंत । द्वंद्व निर्मुक्त हरिभजनें ॥ ४३ ॥

पावोनिया स्वरुपप्राप्ती । ज्यासी [मु. 'अखंड'.] आवडे सद्गुरुभक्ती । देव वानिती त्याची कीर्ती । त्यासी वंदिती [वि. 'सुरसिद्ध'; कं. 'शिवशक्र'.] शिवश्रेष्ठ ॥

अनुक्रमणिका

ऐसी दाटुगी भगवद्भक्ती । भक्तीच्या दासी चारी मुक्ती । भजनें भगवंत सर्वांभूतीं । ब्रह्मप्राप्ती हरिनामें ॥ ४५ ॥

ऐसी हनुमंताची स्थिती । भक्ती कीर्ति [मु. 'विजय'; कं. 'विजयप्राप्ती'.] विजयवृत्ती । तिहीं लोकीं दुर्धर ख्याती । सूक्ष्म शांति श्रीरामें ॥ ४६ ॥

सूक्ष्म शांतीचें लक्षण । मारितां कोट्यानकोटी रण । शांती न मोडे अणुप्रमाण । दुजे नविणें संग्राम ॥ ४७ ॥

बुद्धिबळाचे खेळाकडे । तेथे मारितां हस्ती घोडे । मारित्यासी हिंसा न घडे । तेणें पाडें संग्राम ॥ ४८ ॥ [ओवी ४८ पै. प्रतीत नाही.]

ऐसी हनुमंताची गती । साधुसज्ञन अनुलक्षिती । येरां भासे [कं. 'व्यक्ति'.] वानरवृत्ती । दुर्धरशक्ती मारक ॥ ४९ ॥

हनुमान आणि रघुनंदन । अनन्य पडलें आलिंगन । पूर्ण पावोनि समाधान । जाहले [तु. दै. मु. 'अभिन्न'.] भिन्न देवभक्त ॥ ५० ॥

सीता मस्तकीचा मणी । ठेवोनिया श्रीरामचरणीं । हनुमेनि घालोनि लोटांगणी । कर जोडोनि राहिला ॥ ५१ ॥

वानर समूह मदोन्मत्त । पुढे गेला हनुमंत । अंगद नळ नीळ जांबुवंत । हा वृत्तांत नेणती ॥ ५२ ॥

हनुमेनि वंदोनि रघुनाथ । सांगोनि सीतेचा वृत्तांत । संवेचि आला [मु. 'मधुवनांत'; कं. 'वानरांत'.] अंगदांत । पूर्व स्थित जैसा तैसा ॥ ५३ ॥

जावोनि आला हनुमंत । नेणें अंगद जांबवंत । इतरांची कायसी मात । कपिवृत्तांत जाणावया ॥ ५४ ॥

सुग्रीव सौमित्रा सांगत । आम्हां देखतां आला हनुमंत । सांगतां सीतेचा वृत्तांत । श्रीरघुनाथ आलिंगी ॥ ५५ ॥

दोघे देतां आलिंगन । परस्परें जालें लीन । नाहीं देखिलें होतां भिन्न । धन्य महिमान हनुमंता ॥ ५६ ॥

हनुमान नांदे श्रीरामांतु । श्रीराम नांदे हनुमंतांतु । ऐसी ऐकतांचि मातु । पडे मूर्च्छितु सौमित्र ॥ ५७ ॥

जैसी रामभक्ति हनुमंतासी । तैसेंचि भजन लक्ष्मणासी । एकात्मता त्या तिघांसी । येरयेरांसी अभिन्न ॥ ५८ ॥

ऐसें देखोनि अनन्य भजन । सुग्रीव घाली लोटांगण । श्रीरामें दिधलें आलिंगन । समाधान सुग्रीवा ॥ ५९ ॥

अनुक्रमणिका

**अनन्य भक्तीचा वृत्तांत । सुखकारी श्रीरघुनाथ । भजन भावें भाविक मुक्त । नावें निर्मुक्ति महादोषी ॥ ६० ॥**

**एक एक रामनाम । नामें ब्रह्मप्राप्ती सुगम । चहूं मुक्तींचा उडवोनि भ्रम । नामेंचि परम परमार्थ ॥ ६१ ॥**

**सुग्रीव सौमित्र तयेवेळीं । निवोनियां सुख कल्लोळीं । परमानंदें पिटोनि टाळी । श्रीरामा जवळी राहिले ॥ ६२ ॥**

**येरीकडे सीता शुद्ध्यर्थ । स्वयें साधोनिया इत्यर्थ । मुखरी करोनि हनुमंत । अंगद** [तु. दै. ‘युक्त’; मु. ‘समवेत’.] **येत युवराजा ॥ ६३ ॥**

**दधिमुख येवोनि जाण । घालोनिया लोटांगण । कथा सांगे सुखसंपन्न । सावधान अवधारा ॥ ६४ ॥**

**सीताशुद्धी पुढें जाण । मधुवन तृणा समान । सुग्रीव बोलिला आपण । जीवे निंबलोण करुं पाहे ॥ ६५ ॥**

**शरीर चर्माचे मोचे । केलिया उत्तीर्ण नव्हे तुमचें । परम भाग्य अंगदाचे । कपिवंशाचें उद्धरण ॥ ६६ ॥**

**अंगद कपिवंशा मंडण । अंगद कपिवंश भूषण । अंगद कपिवंश उद्धरण । वदला आपण सुग्रीव ॥ ६७ ॥**

**ऐकतां दधिमुख वचनार्थ । वानरीं स्मरला रघुनाथ । श्रीरामनामें गर्जत । उल्लासयुक्त निघाले ॥ ६८ ॥**

ततः किलकिलाशब्दं शुश्रावासन्नमंबरे । हनुमत्कर्म दृप्तानां नदतां काननौकसाम् ॥ ३ ॥
किष्किंधामुपयातानां सिद्धिं कथयतामिव । ततः श्रुत्वा निनादं तं कपीनां कपिकुंजरः ॥ ४ ॥
आयतांचितलांगूलः सोऽभवद्धृष्टमानसः । आगतास्तेऽथ हरयो रामसुग्रीवदर्शनम् ॥ ५ ॥
अंगदं पुरतः कृत्वा हनूमंतं महाबलम् । तेंऽगदप्रमुखा वीराः संहृष्टाश्च मदान्विताः ॥ ६ ॥

**नमस्कारावया रघुवीर । गगनीं उसळलें वानर । रामनामाचा गजर । भुभुःकार महावीरीं ॥ ६९ ॥**

**हनुमंताचिया विजयवृत्ती । उल्हासें उपरमले जुत्पत्ती । नामें गर्जवित त्रिजगती । किष्किंधे प्रती पातले ॥ ७० ॥**

**वानरांचा गिरा गजर । नादें कोंदलें अंबर । दणाणिले गिरीकंदर । शैल शिखर दुमदुमिले ॥ ७१ ॥**

**कपीकुळाच्या नादोक्ती । नादामाजी सीतासती । भेटो आलिसे आइती । ऐसा रघुपती सुखावें ॥ ७२ ॥**

**ऐकतां अंगदादिकांचा गजर । सुग्रीव सुखावे कपींद्र । पुच्छें थरकोनि समग्र । केला भुभुःकार वानरीं ॥ ७३ ॥**

**ऐकोनि सुग्रीव भुभुःकार । किष्किंधा भूतळीं वानर । उतरले पैं समग्र । हर्ष निर्भर उल्हासें ॥ ७४ ॥**

अनुक्रमणिका

**श्वेत सुनीळ पीत आरक्त । सुवास सुमनीं सुफळित । अंगदसेना संभारांत । टके शोभत वृक्षांचें ॥ ७५ ॥**

[तुं. दै. 'केशर'.] **किंशुक फुलले मनोहर । शाल ताल तमाल थोर । विचित्र पताका अनुकार । तेंवी वानर झेलिती ॥ ७६ ॥**

**सोवन वृक्ष प्रभाकर । वानर पुच्छीं शाखा विचित्र । गुढिया उभवितां पुच्छाग्र । तेणें अंबर शोभत ॥ ७७ ॥**

**अंगद युवराज वीर विख्यात । नळ नीळ जांबुवंत । मुख्य मुखरी हनुमंत । यशवंत त्याचेनि ॥ ७८ ॥**

**ऐसा अंगद संभार । शोभाशोभे मनोहर । हरिखें नाचती वानर । करीत गजर नामाचा ॥ ७९ ॥**

**देखोनि अंगदाचा यावा । सुख संतोष सुग्रीवा । परम सुख श्रीराघवा । सुख सर्वां अंगदें ॥ ८० ॥**

**अंगदें देखोनिया दृष्टी । लक्ष्मणासी आनंद कोटी । अति आल्हादें टाळी पिटी । सीता गोरटी साधली ॥ ८१ ॥**

**भेटावया श्रीरामचंद्रा । अंगद हनुमंतादि धुरा । उल्हास समस्तां कपींद्रां । बहुवानरां आल्हाद ॥ ८२ ॥**

> ते तु प्रस्रवणं शैलमागताश्चित्रकाननम् । प्रणम्य शिरसा रामं लक्ष्मण च महाबलम् ॥ ७ ॥
> युवराजं पुरस्कृत्य सुग्रीवमभिवाद्य च । आख्यातुं तत्र सीतायाः प्रवृत्तिमुपचक्रमुः ॥ ८ ॥

**प्रस्रवण महागिरी । जेथ वस्ती श्रीरामचंद्रीं । वनें काननें साजिरीं । यावा वानरीं तेथ केला ॥ ८३ ॥**

**सन्मुख देखोनि रघुनंदन । अश्रुधारा स्रवती नयन । अंगद हनुमतें पूर्ण । लोटांगण घातलें ॥ ८४ ॥**

**मस्तकीं धरिले दृढचरण । श्रीरामें दिधलें आलिंगन । कोटी जन्मांचें श्रमहरण । दोघेजण पावले ॥ ८५ ॥**

**सवेंचि वंदिला लक्ष्मण । मस्तकीं धरिले त्याचे चरण । सौमित्रें दिधलें आलिंगन । कुमित्रपण निमालें ॥ ८६ ॥**

**सुमित्र जाहलें निजमन । सुमित्र जाहले चित्तचिंतन । सुमित्र जाला अभिमान । मती सद्धन सौमित्र ॥ ८७ ॥**

**श्रीराम भजनीं तत्पर । इंद्रियें जालीं सुमित्र । जिंव्हा रामनामीं एकाग्र । वाचा सुमित्र स्वयें जाली ॥ ८८ ॥**

**हरिदासाचें आलिंगन । ऐसें सबाह्य करी पावन । अभाग्य देखती दोष गुण । सभाग्या पूर्ण सद्भावें ॥ ८९ ॥**

> सद्दर्शनमनुष्ठानं संलापः परमं तपः । अंगांगसंगः कैवल्यमहो सज्जनसंगतिः ॥ ९ ॥

**साधूचें जें दर्शन । तेंचि परम अनुष्ठान । साधूसी जें संभाषण । तपश्चर्या पूर्ण पूर्णत्वें ॥ ९० ॥**

अनुक्रमणिका

साधूचे चरण स्पर्शन । कैवल्य त्यापुढें तृण । अगाध साधूंचें चरण । रजें पावन महादोषीं ॥ ९१ ॥

सज्ञनाचा [कं. मु. 'पादस्पर्श'.] पदपांश । तेणें कर्मा कर्म निरास । जन्म मरणा करी नाश । दे रहिवास परब्रह्मीं ॥ ९२ ॥

सज्ञनेंसी आलिंगन । तेणें सर्वांग पावन । देहेंचि होय चैतन्यघन । कृपा सज्ञन जैं करिती ॥ ९३ ॥

साधू सज्ञन संगती । सभाग्य भाग्याचे पावती । सत्संगें भव निर्मुक्ती । वेद शास्त्रार्थी संमत ॥ ९४ ॥

[मु. 'सौमित्र'.] सुमैत्र साधू श्रीरामभक्त । त्याचिया आलिंगनांत । अंगद आणि हनुमंत । आनंद भरीत स्वयें जालें ॥ ९५ ॥

हातीं धरुनी अंगदासी । हनुमान आला सुग्रीवापासी । सप्रेमें वंदितां त्यासी । तोही उल्हासी आलिंगी ॥ ९६ ॥

सुग्रीव म्हणे हनुमंता । तुझेनि अंगदासी श्लाघ्यता । तूं समस्तांसी जीवदाता । संरक्षिता तूं आम्हां ॥ ९७ ॥

जांबुवंतादि वानरवीर । तिहीं वंदोनि श्रीरामचंद्र । करुनी सुग्रीवासी जोहार । सभा सादर बैसली ॥ ९८ ॥

सीताशुद्धीचा इत्यर्थ । स्वयें पुसे रघुनाथ । येथोनि कैसा क्रमिला पंथ । समूळ वृत्तांत मज सांगा ॥ ९९ ॥

ऐसें पुसतां रघुनंदन । हनुमंतें धरिले मौन । तेव्हां अंगद आपण । सांगे गौण सीताशुद्धि ॥ १०० ॥

घेवोनि स्वामीचें आज्ञापन । शतधा शोधिली दक्षिण । सीताशुद्धीचें लक्षण । अणुप्रमाण न लभेचि ॥ १०१ ॥

पुढती करावया शोधन । वानरीं केली आंगवण । ब्रह्मशापें उपहत वन । तेथें उड्डाण पाडियेलें ॥ १०२ ॥

नाहीं पाला ना हिरवें पान । शोधितां न मिळे जीवन । वृक्ष ठेले खाकरेजोन । पडे लंघन वानरां ॥ १०३ ॥

दंडिनामा ऋषी समर्थ । वेदशास्त्र संपन्न त्याचा सुत । विद्यागर्वें अति उन्मत्त । त्याचा केला घात वन देवतीं ॥

जे विद्यागर्वें अति उद्धत । वादीं ब्राह्मणांनिर्भर्त्सित । तो ब्रह्मराक्षस जीवें जीत । यालागीं घात भूतीं केला ॥

जाणोनि पुत्र निधन । ऋषीनें शापिलें तें वन । येथें ज्याचें आगमन । नव्हे निर्गमन प्राणांतीं ॥ १०६ ॥

आम्हांसीं पडतांची तें वनी । प्राण जाते तत्क्षणीं । वांचलो रामनामस्मरणीं । संकट रक्षणीं श्रीराम ॥ १०७ ॥

वनी नाहीं मुंगी माशी । ठाव नाहीं श्वापदांसी । तृण शलाका नाहीं भूमीसीं । पडे वानरांसी लंघन ॥ १०८ ॥

अनुक्रमणिका

तें त्यजावया दुष्ट वन । सबळ बळें करोनि किराण । तरी तेथेंचिये उड्डाण । नाहीं निर्गमन ब्रह्मशापें ॥ १०९ ॥

त्या ऋषीचा ऋषिसुतु । ब्रह्मराक्षस त्या वना आंतु । भक्षूं आला वानरांतु । त्याचा निःपातु आम्ही केला ॥

हनुमंता देखतां मरण । ब्रह्मराक्षसां उद्धरण । रामनामाचा प्रतापपूर्ण । जड तारण श्रीराम ॥ १११ ॥

जाहलें पुत्रउद्धरण । तेव्हां दंडी ऋषी संतोषोन । शापोन्मुक्त केलें वन । हें महिमान हरिभक्तां ॥ ११२ ॥

जेथ जाती श्रीरामभक्त । तें वन पुण्याश्रम [कं. 'होत'.] म्हणत । ऐसें अंगद सांगत । सुखें डुल्लत श्रीराम ॥ ११३ ॥

ऐकोनि कृपाळु रघुनाथ । सौमित्र स्वानंदे स्फुंदत । वानर सभा पैं तटस्थ । जाला विस्मित सुग्रीव ॥ ११४ ॥

वन मुक्त केलें द्विजवरीं । वानरां लंघन पडलें भारी । निघवेना वना बाहेरीं । येती लहरी क्षुधा तृषा ॥

हनुमंतें तिये काळीं । वनबिल्वजाळीतळीं । विवर देखिलें सफळ जळीं । आम्ही तें बिळीं प्रवेशलों ॥ ११६ ॥

पुढें करोनि हनुमंत । विवरीं रिघतां समस्त । तेथें मांडला प्राणावर्त । रक्षी हनुमंत श्रीरामतेजें ॥ ११७ ॥

विवरीं [मु. 'गुडुप'.] घडधूप अंधार । स्वयें स्मरेना स्वशरीर । उबेनें निर्बुजले वानर । पडले समग्र अचेतन ॥ ११८ ॥

मज अंगदा समवेत । नळनीळ जांबुवंत । विवरीं अचेतन समस्त । [तु दै. मु. 'सावधान'.] धन्य हनुमंत श्रीरामें ॥ ११९ ॥

क्षुधेनें आमचा क्षीण प्राण । तेणें विसरलों राम स्मरण । हनुमंते केलें सावधान । [वि. 'सभाग्य'.] सबाह्य पूर्ण श्रीरामें ॥ १२० ॥

श्रीराम हनुमंताचा प्राण । श्रीराम तेजें देखणें नयन । सर्वेंद्रियीं राम आपण । अंधारीं पूर्ण देखणा रामें ॥ १२१ ॥

निधडा वीर हनुमंत । पुच्छीं बांधोनि कपी समस्त । शत योजन विवरांत । नेलें मूर्च्छित निजांगें ॥ १२२ ॥

पाचारुनी पिता पवन । हनुमान गुज सांगे संपूर्ण । वांचवी वानरांचें प्राण । रघुनंदन सुखार्थ ॥ १२३ ॥

ऐसें सांगताची जाण । वानरांसी आला प्राण । अवघे जाले सावधान । विवर देखोनि विस्मित ॥ १२४ ॥

ते हेमाहेप विवरभुवनीं । भेटली सुरसा तपस्विनी । तिनें हनुमंता देखोनि । जाली मनीं विस्मित ॥ १२५ ॥

अनुक्रमणिका

सुरसा पुसें तूं कोण येथ । हनुमान सांगे मी श्रीरामभक्त । विवरीं आलों सीताशुद्ध्यर्थ । समवेत वानरेसीं ॥ १२६ ॥

सुरसा म्हणे तुम्ही रामभक्त । तरीच तुम्हां येववलें येथ । येरांसी हें स्थळ अप्राप्त । मी सनाथ तुमचेनि ॥ १२७ ॥

ब्रह्म वरद मज येथ । तुज भेटती श्रीरामभक्त । तेणे तूं होसी निर्मुक्त । तें भाग्य प्राप्त मज आजी ॥ १२८ ॥

विकळ देखोनि वानरांसी । सुरसा ते सज्ञान कैसी । जेणें विश्रांती होय त्यांसी । त्या उपयासी आदरिलें ॥ १२९ ॥

दिधलें विश्रांती रसपान । दिधलें स्वानंद जीवन । सुख स्वादिष्ट फळें संपूर्ण । राम स्मरणेसीं सेवितीं ॥ १३० ॥

ग्रासो ग्रासीं राम स्मरण । रसपान हरिचिंतन । वानरीं सेवितां जीवन । गडगर्जन नामाचें ॥ १३१ ॥

क्षुधा निमाली नित्य तृप्ती । तृषा निमाली स्वानंद प्राप्ती ।
निद्रा निमाली सुख संविती । परम विश्रांती वानरीं ॥ १३२ ॥

राम नामें तृप्तवानर । नामें कोंदलें विवर । नामें व्यापिलें चराचर । नामें कपींद्र गर्जती ॥ १३३ ॥

नामे कोंदले वैकुंट पीठ । नामें डुल्लत नीळकंठ । सुरसेचें भाग्य उत्कृष्ट । हनुमंत श्रेष्ठ सभाग्य ॥ १३४ ॥

हरिभक्तांचे संगतीं । जड मूढ उद्धरती । सुरसा सभाग्य वानूं किती । हनुमंतीं विश्वास ॥ १३५ ॥

हनुमंत निष्ठा रामस्मरण । कळीकाळाची बोळवण । नामें जन्ममरणा मरण । नाम परिपूर्ण परब्रह्म ॥ १३६ ॥

वानरां जाहली नित्य तृप्ती । सुरसा पावली अति विश्रांती । हनुमंताचें संगतीं । अवघीं डुल्लंती स्वानंदें ॥ १३७ ॥

ऐकता अंगदाच्या गोष्टी । श्रीरामा सुखानुकोटी । हरिखें त्याची पाठी थापटी । स्वानंद पुष्टी डुल्लत ॥ १३८ ॥

ऐकतां भक्ताची निजकथा । परम सुख श्रीरघुनाथा । त्यांमाजी हनुमंत पढियंता । त्याची कथा अति गोड ॥ १३९ ॥

अंगदासी म्हणे रघुनाथ । पुढील सांग तूं कथा वृत्तांत । आवडताहे हनुमंत । त्याचा पुरुषार्थ ऐकावया ॥ १४० ॥

अंगद म्हणे रघुपती । वानरां जाली विश्रांती । शोधावया सीता सती । स्वयें पुसती हनुमंता ॥ १४१ ॥

अनुक्रमणिका

नाहीं रविचंद्राचां विलासा । विवरीं स्वप्रकाश ठसा । येथें लक्षेना दक्षिण दिशा । शुद्धीसी धिंवसा काय करुं ॥ १४२ ॥

सुरसा सांगे वानरांप्रती । ब्रह्म वरदें गती निर्गती । मीच जाणें विवर स्थिती । तुमचिया शक्ती न निघवे ॥ १४३ ॥

सुरसा विनवी हनुमंतीं । शुद्धि पावेल सीता सती । यश पावाल परम कीर्ती । सत्य वचनोक्ती हे माझी ॥ १४४ ॥

हनुमान सांगे सुरसेसी । वेगीं काढी वानरांसी । येरी लागली पायांसी । सांगेल तैसी स्थिती कीजे ॥ १४५ ॥

डोळे उघडे असतां । बाहेर न काढवे सर्वथा । डोळे झांकिलिया समस्तां । निमिषार्धता काढीन ॥ १४६ ॥

डोळे झांकितां वानरीं । ना कडिये ना धरिले करीं । अवघे विवरा बाहेरीं । समुद्रतीरीं स्वयें उभे ॥ १४७ ॥

डोळे उघडितां वानर । पुढें गडगर्जे समुद्र । मागें न दिसे विवर । विस्मयो थोर वानरां ॥ १४८ ॥

राम नामाचिया आवर्ती । सुरसे सहित विवरोन्मुक्ती । वानर विवरातें पाहती । तंव ते व्यक्ती लक्षेना ॥ १४९ ॥

असो हे नव्हेचि सीताशुद्धी । पुढें [मु. ‘अडविलें’.] वोडवला उदधी । मागें जावें तंव लोटली अवघी । वानरमांदी सचिंत ॥ १५० ॥

मागें जातां अपमान । पुढें समुद्र नव्हे गमन । सुग्रीव दंडील दारुण । द्यावया प्राण सिद्ध जालों ॥ १५१ ॥

लक्षोनिया समुद्रतीर । पडतां प्रायोपवेशीं वानर । संपाती पक्षी महाथोर । आला समग्र भक्षावया ॥ १५२ ॥

करोनि बहुकाल लंघन । मग वानरीं त्यजावा प्राण । श्रीरामें कृपा केली संपूर्ण । सद्य मरण पक्षी भक्षे ॥ १५३ ॥

व्यर्थ देह जावा समुद्रतीरीं । तें लागलें परोपकारीं । अति उल्हास वानरी । स्मरती गजरीं श्रीराम ॥ १५४ ॥

होतां रामनाम स्मरण । फिटलें संपातीचें मूढपण । त्यासी उपजलें परमज्ञान । सावधान अवधारा ॥ १५५ ॥

जेथ श्रीरामनाम स्मरण । तेथ कल्पांतीं न रिघे मरण । संपाती घाली लोटांगण । तुम्ही धन्य कोणकोणाचे ॥ १५६ ॥

ज्याचिया स्मरणीं श्रीरामनाम । सफळ जन्म सफळ कर्म । सफळ त्याचा देहधर्म । भाग्य परम भेटलेति ॥ १५७ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम जयराम स्मरत । अवघे आलेति कां येथ । देहो त्यागावया उदित । तुम्ही किमर्थ तें सांगा ॥ १५८ ॥

ऐकोनि संपाती वचन । अंगद म्हणे करी भक्षण । संपाती बोले सत्यसंपूर्ण । न रिघे मरण रामस्मरणीं ॥ १५९ ॥

ऐकोनि संपाती वृत्तांत । बोलतां जाला हनुमंत । आम्ही श्रीरामाचे भक्त । सीता शुद्ध्यर्थ येथें आलों ॥ १६० ॥

शोधितां [तु. दै. 'समुद्र'.] दक्षिण समग्र । न भेटेचि सीतासुंदर । लोटली श्रीराम मर्यादा मेर । मरणतत्पर या लागीं ॥ १६१ ॥

ऐकोनि हनुमंताचें वचन । संपाती जाला हास्यवदन । मज आहे सीतेचें ज्ञान । सावधान अवधारा ॥ १६२ ॥

सिंधु मर्यादा शतयोजन । तेथें आहे लंकाभुवन । त्याहि माजीं अशोकवन । सीता चिद्रत्न तेथें आहे ॥ १६३ ॥

मज असती पक्षगती । तरी आणितों सीतासती । ऐसें बोलतां संपाती । पक्ष प्राप्ती पावला ॥ १६४ ॥

सूर्य वरद संपातीसी । भेटलिया श्रीराम भक्तेंसी । निर्विकल्प पक्ष पावसी । सीता शुद्धीसी सांगतां ॥ १६५ ॥

निर्विकल्प पक्षप्राप्ती । सांडोनि त्रिगुण गुणवृत्ती । संपाती पावला गुणातीतीं । पुनरावृत्ती खंडली। ॥ १६६ ॥

श्रीरामभक्तांचें संगतीं । उद्धरले नेणों किती । आतांचि उद्धरला संपाती । धन्य संगती संतांची ॥ १६७ ॥

सिंधु मर्यादा शतयोजन । वानरां न करवे उल्लंघन । एकेंचि उड्डाणें पैं जाण । गेला आपण हनुमंत ॥ १६८ ॥

स्वयें उडतां बळेंकरी । गिरीकडे खचले सागरी । शिखरें उडालीं अंबरीं । आपांपरी पशुपक्षां ॥ १६९ ॥

आम्ही वानर बळवंत । दक्षिणे राहतां होईल अनर्थ । उत्तर भागीं ठेवी हनुमंत । धरोनि पर्वत राहिलों ॥ १७० ॥

हनुमान उडतां बळेंकरीं । कडे खचले सागरीं । जळ उसळलें अंबरीं । आपांपरी विमानां ॥ १७१ ॥

श्रीराम बाणाचिया गती । सवेग गेला पैं मारुती । जें जें लंकेसी केली ख्याती । तें तें रघुपती पुसावें ॥ १७२ ॥

ऐसें अंगद सांगत । सुखावला श्रीरघुनाथ । त्यासी धरोनि हृदयांत । स्वयें हनुमंता पाचारी ॥ १७३ ॥

एका जनार्दना शरण । हनुमंताचा प्रताप पूर्ण । ब्रह्मयाचें लिखित अनुसंधान । गोडगहन श्रोत्यांसी ॥ १७४

अनुक्रमणिका

॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमंतआगमनं (अंगदहनुमंतसंवादो) नाम पंचविंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## ब्रह्मपत्र प्रबोध

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

स्वमुखें निज कीर्ती । सर्वथा न सांगे मारुती । हें जाणोनि रघुपती । स्वयें प्रश्नोक्ती चाळित ॥ १ ॥

आदरें पुसें श्रीरामचंद्र । हनुमंता तूं वनचर । कैसेनि तरलासी सागर । सत्य साचार मज सांगे ॥ २ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । हनुमान घाली लोटांगण । श्रीरामप्रताप महिमान । समुद्र तरणें वानरां ॥ ३ ॥

> राम राम तव नाम जपन्तः पामरा अपि तरंति भवाब्धिम् ।
> अंगसंगभवदगुलिमुद्राभृन्न चित्रमतरत्कपिरब्धिम् ॥ १ ॥

श्रीरामनामाचा उच्चार । जड मूढ तरती भवसागर । राममुद्रांकित वानर । तेणें परपार पावला ॥ ४ ॥

रामनामाचा कडकडाट । भवसमुद्रीं पायवाट । पायरी करोनि वैकुंठ । होती प्रविष्ट परब्रह्मीं ॥ ५ ॥

रामनामांकित नर । बुडवूं न शके सागर । श्रीराम मूद्रांकित वानर । सुखें परपार पावलों ॥ ६ ॥

श्रीराम मुद्रा दिधली हातीं । तेव्हांच मज विजयवृत्ती । श्रीराम मुद्रेची निज ख्याती । श्रुती बोलती पुराणें ॥ ७ ॥

श्रीराममुद्रा समुद्रतरण । श्रीराममुद्रा सीता दर्शन । श्रीराममुद्रा रणकंदन । लंकादहन श्रीराममुद्रा ॥ ८ ॥

श्रीरामनाम [कं. 'मज प्राप्ती'; तु. दै. 'निजप्राप्ती'; मु. 'विजय प्राप्ती'.] मुद्रा प्राप्ती । लंकाभुवनी केली ख्याती । आडनांवें मी मारुती । अगाध कीर्ति मुद्रेची ॥ ९ ॥

नित्य रामनामस्मरण । तेथें वीर्य धैर्य यश कल्याण । ब्रह्म पावती सनातन । हे महिमान स्मरणाचें ॥ १० ॥

जेथ श्रीराम विस्मरण । अकीर्ति अपेश अकल्याण । अति निंद्यत्वें पापी पूर्ण । अधःपतन महानरकीं ॥ ११ ॥

यालागीं साक्षेपें आपण । समूळ सांडावें विस्मरण । नित्य करितां श्रीरामस्मरण । कीर्ति कल्याण निज विजयीं ॥

श्रीराममुद्रा निज प्राप्ती । म्हणती हनुमंताची ख्याती । जें जें केलें लंकेप्रती । ते ते कीर्ति मुद्रेची ॥ १३ ॥

हनुमंताची निज स्थिती । स्वमुखें न सांगे निज कीर्ति । करोनि मुद्रिकेचि स्तुती । सांगितली ख्याती श्रीरामा

अनुक्रमणिका

॥

हनुमंताचें मनोगत । अंतर्यामीं जाणें रघुनाथ । हृदयीं धरिला आनंद युक्त । स्वामी सद्भक्त आल्हादी ॥ १५ ॥

हनुमंताची युद्ध ख्याती । ऐकावया वानर तळमळती । हेंही जाणोनि रघुपती । पुसे पुढती हनुमंता ॥ १६ ॥

श्रीराम म्हणे गा मारुती । समुद्रलंघन लंकाख्याती । तुवा सांगितली यथानिगुती । संकळित अति गौण ॥ १७ ॥

> वैदेहीमक्षतां श्रुत्वा रामश्चोत्तरमब्रवीत् । क्व सीता वर्तते देवि कथं वा समवर्तते ॥ २ ॥
> राक्षसानां त्वया सार्धं किमर्थं युद्धदारुणम् । एतन्मे सर्वमाख्याहि वैदेहीं प्रति वानर ॥ ३ ॥

सीता ऐकोनि अक्षत । संतोषला श्रीरघुनाथ । राक्षसांसी युद्ध कंदनार्थ । घडला किमर्थ तें सांग ॥ १८ ॥

तेंचि आतां विशदस्थिती । तुवां सांगावी लंकाख्याती । ऐसें बोलतां रघुपती । वंदी मारुती श्रीचरण ॥ १९ ॥

स्वमुखें सांगो नये स्वकीर्ति । वंचूं नये स्वामी प्रती । हनुमंते येंचि अर्थी । प्रजापती प्रार्थिला ॥ २० ॥

माझे समुद्रलंघन । लंकेमाजीं सीताशोधन । स्वामीने कृपा करोन । पत्र लिहून मज द्यावें ॥ २१ ॥

तुझें हातीचें ब्रह्मलिखित । देखोनि सीता शुद्ध्यर्थ । सत्य मानील श्रीरघुनाथ । शीघ्र कार्यार्थ साधेल ॥ २२ ॥

ऐकोनि कपीचें वचन । संतोषला चतुरानन । हनुमंताचें कीर्तिकथन । दिधलें लिहून [वि. 'साक्षेपें'.] साद्यंत ॥ २३ ॥

संतोषोनी प्रजापती । पत्र देवोनि हनुमंता हातीं । आलिंगिला अति प्रीती । विजयो सर्वार्थीं पावसी ॥ २४ ॥

तें पत्र घेवोनि हनुमंत । स्वयें श्रीरामासी विनवित । ब्रह्म्याचें ब्रह्मलिखित । वाचूनि कार्यार्थ [मु. 'जाणावा'.] साधावा ॥ २५ ॥

पत्र घेवोनि रघुपती । वंदोनिया अति प्रीतीं । दिधलें लक्ष्मणाचें हातीं । पत्र प्रयुक्त वाचावें ॥ २६ ॥

पत्र लिहितां प्रजापती । श्रोता सादर रघुपती । वाचितां सौमित्र शेषमूर्ती । पत्र [वि. मु. 'प्रयुक्ती'.] व्युत्पती अवधारा ॥ २७ ॥

ऐकावया हनुमंताची ख्याती । सुग्रीवादि जुत्पत्ती । सादर बैसल्या वानरपंक्ती । हनुमत्कीर्ती चातक ॥ २८ ॥

अनुक्रमणिका

ॐनमो श्रीरामचंद्रा । क्षराक्षरातीत परा । त्रिगुणातीत चिदचिन्मात्रा । परात्परा परब्रह्मा ॥ २९ ॥

जेथ नाहीं मी तूं पण । ब्रह्मीं नाठवे ब्रह्मस्फुरण । तो तूं श्रीराम सगुण । पूर्णत्वें पूर्ण परब्रह्म ॥ ३० ॥

ब्रह्मा तुझेनि ब्रह्मत्व । धर्मा तुझेनि धर्मत्व । कर्मा तुझेनि कर्मत्व । तूं स्वयमेव [वि. 'परब्रह्म'; मु. 'चिन्मात्र'.] सन्मात्र ॥ ३१ ॥

तुज निर्विकार श्रुती म्हणती । तो तूं भाससी विश्वमूर्ती ।
विश्व तूं मानितां निश्चिती । तंव ते श्रीपती तुझी माया ॥ ३२ ॥

तूं साकार ना निराकार । तूं [मु. 'विश्वनाथ'.] विश्व ना विश्वंभर । तुझा स्वरुपाचा निर्धार । न कळे साचार श्रुतिशास्त्रां ॥ ३३ ॥

श्रुती म्हणती नेति नेती । शास्त्रें थोटावली अती । चारी वाचा मौनावती । तो तूं रघुपती परमात्मा ॥ ३४ ॥

आतां जैसा आहेसि तैसिया । नमो तुज श्रीरामराया । तुझिया कृपा रघुवर्या । स्तुती वदावया सामर्थ्य ॥ ३५ ॥

तो तूं अपरंपार अनंत । अवतारा अवतारी रघुनाथ । तुझा सेवक हनुमंत । त्याचा अत्यद्भुत पवाडा ॥ ३६ ॥

उल्लंघूनी अपांपती । येवोनिया लंके प्रती । हनुमंतें केली जे जे ख्याती । ते ते रघुपती अवधारी ॥ ३७ ॥

तूं अवतार श्रीरामचंद्र । तुझें अगम्य चरित्र । तुझें रंक [तु. दै. 'किंकर'.] पालेखाईर । हनुमान वानर अगम्य ॥ ३८ ॥

अगम्य हनुमंताची गती । अगम्य हनुमंताची ख्याती । अगम्य हनुमंताची कीर्ती । ऐक रघुपती पुरुषार्थ ॥ ३९ ॥

समुद्र लंघोनि हनुमान बळी । महेंद्र गिरी चेपिला तळीं । सर्प दडपले पाताळीं । तोंडें ते काळीं वासिती ॥ ४० ॥

अंगवाताचेनि झडाडें । समुद्रीं खचले पर्वतकडे । शिखरें उडाली पैं पुढें । जेवीं घुंगुरडें आकाशीं ॥ ४१ ॥

उड्डाण वाताचेनि घर्घरें । बैसलीं मेघांची दांतौरें । दिग्गज कांपती थरथरे । आले शाहरे कळिकाळां ॥ ४२ ॥

उड्डाण काळाचा कल्लोळ । उचंबळले समुद्रजळ । सत्यलोकीं [तु. दै. 'प्रळय काळ'.] पर्जन्यकाळ । ध्रुवमंडळ [तु. दै. 'पडती बळें'; मु. 'तिमिन्नलें'.] तिंबलें ॥ ४३ ॥

अनुक्रमणिका

उड्डाण काळ दुर्धर मोठा । उमा झोंबे नीळकंठा । रमा थापटी वैकुंठा । भय संकटा संरक्षी ॥ ४४ ॥

उड्डाण काळीं कपि दुर्धर । सुरासुर धाकती खेचर । सिद्ध गंधर्व विद्याधर । नरकिन्नर कांपती ॥ ४५ ॥

जैसा श्रीरामाचा बाण । तैसें सवेग उड्डाण । कपीसी आलें पैं स्फुरण । दुर्धर कोण आवरी ॥ ४६ ॥

पाहावया हनुमंताची शक्ती । मिळोनिया देवीं समस्ती । सुरसा धाडिली छळणोक्ती । मार्ग रोधार्थी हनुमंता ॥ ४७ ॥

दनु जे कां दानवजननी । सुरसानामें कश्यपपत्नी । विक्राळ मुख योजनमानी । कपि लागोनि गिळावया ॥ ४८ ॥

हनुमान जाला वीस योजन । सुरसामुख तीस योजन । हनुमान जाला शत योजन । तत्समान मुख पसरी ॥ ४९ ॥

हनुमान अणुमात्र होऊनी । प्रवेशला तिचें वदनीं । न मारुनी कश्यप पत्नी । गेला निघोनि कर्णद्वारें ॥ ५० ॥

हनुमान आवळी चाटित । देवदानव शिव विस्मित । हनुमान गेला हातोहात । बळन्वित श्रीरामें ॥ ५१ ॥

सुरसा कश्यपाची पत्नी । पितया वायु सापत्न जननी ।
कपि न मारीच विवेक [तु. दै. ‘करुनी’.] ज्ञानी । गेला निघोनि रामनामें ॥ ५२ ॥

हनुमान गेला न मारून । सुरसा तेणें संतोषोन । कपीसी दिधलें आशीर्वचन । विजयी पूर्ण तिहीं लोकीं ॥ ५३ ॥

विसावा घ्यावया मारुती । जळफळ स्थळ प्रयुक्ती । मैनाक वाढला ऊर्ध्वगती । द्यावया विश्रांती हनुमंता ॥ ५४ ॥

कपि गिरिवर नातळत । ऊर्ध्वगती निघे हनुमंत । मार्ग रोधें वाढे पर्वत । योजन शत अति दीर्घ ॥ ५५ ॥

पर्वत देखोनि योजन शत । हनुमान चढला पंचशत । गिरि वाढला सप्तशत । [मु. ‘सहस्र शत’.] सहस्त्रांत कपि गेला ॥ ५६ ॥

हनुमान जाता उल्लंघून । पर्वतासी आलें रुदन । हरिभक्ताचें पदस्पर्शन । अभाग्य पूर्ण न पवेचि ॥ ५७ ॥

पर्वताचि सप्रेम बोली । तेणें हनुमंतासी कृपा आली । मस्तकीं ठेवितां आंगोळी । गिरि पाताळीं बैसला ॥ ५८ ॥

अनुक्रमणिका

आंगोळीसाठीं गेला पाताळीं । कपि बैसता होती रांगोळी । सुरासुरी पिटिली टाळी । आतुर्बळी हनुमंत ॥ ५९ ॥

सिंहिका राक्षसी दारुण । छायाग्रहें ग्रासी पूर्ण । तिचें करोनि विदारण । केलें उड्डाण हनुमंतें ॥ ६० ॥

जीवें मारोनि सिंहिका । उड्डाण करितां अति तवका । मागें सांडोनिया लंका । पडलंका पावला ॥ ६१ ॥

तेथें क्रौंचा निशाचरी । हनुमान तिसी जीवें मारी । चौदा सहस्र निशाचरी । घातल्या सागरीं पुच्छाग्रें ॥ ६२ ॥

तेथोनि आला लंके आंत । सीता शुद्धीचा कार्यार्थ । घरें शोधिली समस्त । साक्षेपयुक्त वानरें ॥ ६३ ॥

साधावया सीता शुद्ध्यर्थ । कलहो लाविला नगरांत । सभा नागविली समस्त । हळहळित नागवे ॥ ६४ ॥

अनेक दीपिका लक्षांवरी । वानरें विझविल्या पुच्छेंकरी ।
रावणा टोले दिधले शिरीं । सभा अंधारीं नागउनी ॥ ६५ ॥

प्रधानवर्ग थोराथोरी । घेतली घर धांडोळी वानरीं । इंद्रजिताचें निजमंदिरीं । जाली परी ते ऐका ॥ ६६ ॥

देखोनि सुलोचना नारी । हेचि [मु. 'होय'.] होईल सीतासुंदरी । अनुसरली रावणपुत्रीं । दोहीतें मारीन मी आतां ॥ ६७ ॥

तंव सुलोचना वदे कथा । रावणें चोरोनि आणिली सीता ।
तिसी सोडवावें इंद्रजिता । येऱ्हवी कुळघाता ते करील ॥ ६८ ॥

इंद्रजित म्हणे ऐक आतां । सोडी म्हणों जातां सीता । रावण करुं धांवे घाता । सुहृदता सांडोनि ॥ ६९ ॥

रावणा सीता सन्निपात । बुद्धि सांगतां करील घात । आपण न वदावी हे मात । कुलक्षयार्थ ते सीता ॥ ७० ॥

ऐसें इंद्रजित सांगतां । सुलोचना नव्हे सीता । खूण पावली हनुमंता । होय निघता तेथूनी ॥ ७१ ॥

वेगीं उडोनि मारुती । गेला कुंभकर्ण गृहाप्रती । घोर गर्जत त्रिजगतीं । श्वासावर्तीं गज म्हैसे ॥ ७२ ॥

नासिकेच्या केशांतरीं । ओरडती गुंतली कऱ्ही । मातले हस्ती घेती जुंझारी । घशामाझारीं जाती सिंह ॥ ७३ ॥

प्रबळ देखोनि कुंभकर्णार्थ । हनुमान म्हणे जीवाआंत । याचा पहावया पुरुषार्थ । प्रथम युद्धार्थ मी करीन ॥

नाहीं दांतवण पाणी । वेखंडल्या दंतश्रेणी । मुखीं उठिली पोहाणी घाणी । कंटाळोनि कपि गेला ॥ ७५ ॥

अनुक्रमणिका

बिभीषणाचें मंदिरीं । शोधू जातां सीता सुंदरी । कीर्तनाचे निज गजरीं । सुख वानरीं उलथलें ॥ ७६ ॥

ताळ छंद गीत नृत्य । ऐकतां श्रीरामचरित्र । हनुमान स्वानंदें डुल्लत । रंगीं नाचत गुप्तत्वें ॥ ७७ ॥

लंका घेतलिया रघुपती । बिभीषण लंकापती । करणें निश्चयो हनुमंती । निश्चितार्थी [पै. 'यथार्थ'.] निश्चयो ॥ ७८ ॥

परम पावोनि विश्रांती । रावण गृहें सीता शुद्ध्यर्थी । शोधावयासी मारुती । शीघ्र गती निघाला ॥ ७९ ॥

रावणाचे भुवनें भुवन । कपीनें पाहिलीं शोधून । लंकेशाचे निद्रास्थान । सीता शोधन करूं आला ॥ ८० ॥

रावणासहित सेजेवरी । हनुमान देखें मंदोदरी । हेचि मानोनि सीता सुंदरी । अभ्यंतरीं [तु. दै. 'खोंचला'.] क्षोभला ॥ ८१ ॥

मी काय नाटी करुं आतां । रडत सांगों रघुनाथा । रावणा अनुसरली सीता । दोहींच्या घातां मी करीन ॥ ८२ ॥

करकरां खात दांतदाढा । वळिला पुच्छाचा आंकोडा ।
दोहींचा करावया नितोडा । हनुमान गाढा क्षोभला ॥ ८३ ॥

दहा शिरें रावणातें । सीतेचें अकरावें तेथें । खुडूनिया वामहस्तें । नेईन भेटीतें श्रीरामाच्या ॥ ८४ ॥

नातरी बांधोनिया पूंसीं । दोन्ही नेईन रामापासीं । श्रीराम दंडील दोहींसी । अधर्मासी देखोनि ॥ ८५ ॥

ऐसें चिंतितां हनुमंता । मंदोदरी लंकानाथा । स्वयें सांगे स्वप्नावस्था । दुःखवार्ता अति दुःखी ॥ ८६ ॥

आतांचि देखिलें मियां स्वप्नीं । सीता ठेविली अशोकवनीं ।
तिचे कैवारा लागोनी । आला क्षोभोनि महारुद्र ॥ ८७ ॥

क्रौंचा प्रियभगिनी तुम्हासी । ते मारोनि पडलंकेसी । सवेंचि आला तो लंकेसी । सीता शुद्धीसी साधावया ॥

माझे तुम्हासी विज्ञापन । समूळ ऐका माझें स्वप्न । सीता रक्षणीं अशोकवन । दूत धांवोन तेथें गेला ॥ ८९ ॥

घेवोनि सीतेसी तेणें भेटी । अशोकवनाची उत्पटी । स्वप्न देखिलें म्यां दृष्टी । राक्षस कोटी मारिल्या ॥ ९० ॥

चौदा सहस्त्र बनकर । ऐंशी सहस्त्र किंकर । जंबुमाळी प्रधानपुत्र । अखयाकुमर मारिला ॥ ९१ ॥

अखया आपटिला शिळीं । त्याचा कैवारी सवंदळी । इंद्रजित गांजोनि महाबळी । लंका होळी तेणें केली ॥

अनुक्रमणिका

९२ ॥

ऐसें देखोनि कंदन । जागी जाले गजबजोन । शिवस्मरणें शुद्धाचमन । केलें शयन वामभागीं ॥ ९३ ॥

तंव देखिले दुर्धर स्वप्न । शिळीं सागर बुजोन । लंके आलें वानरसैन्य । राक्षस दळण करितचि ॥ ९४ ॥

रामें मारिला कुंभकर्ण । इंद्रजितासी वधिला लक्ष्मण । तुम्हांवरी ओंखटें स्वप्न । मियां संपूर्ण देखिलें ॥ ९५ ॥

दाही शिरें भुमीवरी । लोळतीं श्रीराम बाणधारी । सांगतां भुलली मंदोदरी । शंख करी पतीशोकें ॥ ९६ ॥

रावणा संमुख बैसोन । म्हणे चुडियासी पडिलें खान । [दै. 'तिनें'; तु. 'तियेसी'.] पुढती करितां शंख स्फुरण । धरी रावण धांवोनि ॥ ९७ ॥

रावण म्हणे मज जिता । तूं कां खेद करिसी वृथा । शिर न देखे तुमचे माथां । मिथ्या वार्ता जिण्याची ॥ ९८ ॥

रावणें पोटासी धरोन । [तु. दै. मु. 'प्रियेसी करी समाधान'.] प्रिया करी सावधान । येरी म्हणे मिथ्या नव्हे स्वप्न । आलें विघ्न अनिवार ॥ ९९ ॥

चरणीं ठेवोनिया माथा । मंदोदरी म्हणे लंकानाथा । अशोकवनीं ठेवितां सीता । कुळघाता ते करील ॥ १०० ॥

स्वयें अर्पोनिया सीता । शरण रिघावे श्रीरघुनाथा । निवारे [कं. वि. 'वेथा'.] जन्ममरणकथा । अक्षयता सुखरुप ॥ १०१ ॥

श्रीरामा जालिया अनन्यशरण । कदा बाधेना जन्ममरण । रावणा पावसी कृतकल्याण । सत्य भाषण हें माझें ॥ १०२ ॥

माझें न करिशील वचन । तै इंद्रजित कुंभकर्ण । पाचारोनि दोघेजण । रामार्पण करीन सीता ॥ १०३ ॥

रावणा सकळ कुळ हितार्था । रामार्पण करी सीता । ऐसें रावणें ऐकतां । उद्वेगता पावला ॥ १०४ ॥

मंदोदरीचें वचन । सर्वस्वें मानी कुंभकर्ण । इंद्रजित वचनाधीन । रामार्पण करतील सीता ॥ १०५ ॥

रावण सांगे मंदोदरीसी । निवारावया स्वप्नविघ्नासी । आधीं पुजूं सदाशिवासी । उपचारांसी तूं आणी ॥ १०६ ॥

कार्यी गोवोनि निजांगना ।विश्वासी राक्षसी दुर्मना । रावण धाडी अशोकवना । सीतेचिया यत्ना करावया ॥

अनुक्रमणिका

१०७ ॥

इंद्रजित अथवा कुंभकर्ण । मंदोदरी कां बिभीषण । याचेनि बोलें सीता आपण । सर्वथा जाण न सोडावी ॥

अशोकवना निघे राक्षसी । हनुमान लागला तिचे मागेसी ।
श्रीरामें कृपा केली कैसी । सीता अनायासी भेटेल ॥ १०९ ॥

सीता देखिलिया दृष्टी । हनुमान घेवों न शके भेटी । राक्षसी कोट्यानुकोटी । वृक्षसंपुटी राहे गुप्त ॥ ११० ॥

एकांतीं भेटावया सीतेसी । हनुमान गुप्त वृक्षवासी । तेथ सीतेची स्थिती कैसी । वृक्षवल्लीसी रामस्मरण ॥ १११ ॥

अशोकवनीचे पाषाण । गुल्मलता पक्षी तृण । अवघीं करितीं रामस्मरण । प्रभावो पूर्ण सीतेचा ॥ ११२ ॥

जागृती स्वप्न तुर्या सुषुप्ती । हनुमान शोधितां सीतासती । मी तूं पणा ही परती । सहज स्थिती शोधीत ॥ ११३ ॥

परिसोनि सीता स्वरुपस्थिती । ऐकोनि हनुमान शोधकशक्ती ।
सुखावोनि श्रीरघुपती । नयना स्त्रवती स्वानंदाश्रू ॥ ११४ ॥

नव्हेती नयनाश्रु जीवन । पूर्णानंद अभिषिंचन । हनुमंतासी रघुनंदन । संतोशोन करितसे ॥ ११५ ॥

धन्य सीतेचें मनोगत । नित्य श्रीराम अनुरक्त । धन्य हनुमंताचें जीवित । सेवानुरत श्रीरामीं ॥ ११६ ॥

धन्य ब्रह्म्याचें ब्रह्मलिखित । अर्थी ओसंडे परमार्थ । श्रवणमात्रें श्रीरघुनाथ । स्वयें डुल्लत स्वानंदें ॥ ११७ ॥

परिसोनि सीता स्वरुपस्थिती । ऐकतां हनुमंताची ख्याती । संतोषोनिया रघुपती । हरिखें मारुती आलिंगी ॥ ११८ ॥

दोघां पडिलें आलिंगण । खुंटला बोल तुटलें मौन । एका जनार्दना शरण । रामायण रम्य रामें ॥ ११९ ॥

श्रीरामें विश्रांती हनुमंती । हनुमंतेनि श्रीरामा विश्रांती ।
एक पिंडत्वें अनन्य प्रीती । अगम्य स्थिती श्रुतीशास्त्रां ॥ १२० ॥

भक्त भावार्थाचें प्रेम । स्वयें जाणें पैं श्रीराम । भजन व्युत्पत्तीचें वर्म । प्लवंगम स्वयें जाणे ॥ १२१ ॥

करितां बहुसाल व्युत्पत्ती । भक्त भावार्थ प्रेम प्रीती । सहसा नये अभिव्यक्ती । कथासंगती अवधारा ॥ १२२ ॥

अनुक्रमणिका

एका जनार्दना शरण । हनुमान पावला अशोकवन । पुढील ब्रह्मपत्र लेखन । सावधान अवधारा ॥ १२३ ॥

इति श्रीभावार्थरामायणे एकाकारटीकायां ब्रह्मपत्रप्रबोधो नाम षडविंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सत्ताविसावा

## हनुमत्पराक्रम वर्णन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

धन्य धन्य तें ब्रह्मलिखित । धन्य धन्य आणिता हनुमंत । सौमित्र वाची सावचित्त । अर्थे रघुनाथ सुखावें ॥ १ ॥

सौमित्र वाची ब्रह्मलिखित । ऐकतां पत्रिकेचा अर्थ । श्रीराम स्वानंदें डुल्लत । हनुमंत चरित्र परिसोनी ॥ २ ॥

शुद्धि न लभतां सीता सती । कळी लाविला [मु. 'लंकेप्रती'.] नगराप्रती । सभा नागविली रातीं । हनुमंत ख्याती ते ऐका ॥ ३ ॥

हनुमंताचें आचरित । अचळ समूळ पैं समस्त । ब्रह्मेनि लिहिलें ब्रह्मलिखित । सावचित्त अवधारा ॥ ४ ॥

गुप्त राहोनि नगरद्वारीं । वानर चेष्टा नानापरी । कलहो लाविला निशाचरीं । कपिकुसरी तें ऐका ॥ ५ ॥

पूंसें गोवोनि नगरनारी । कलश स्पोट राजद्वारीं । भरली जाऊं नेदी घागरी । तडा नगरीं उदकाचा ॥ ६ ॥

राजा निमाला दशकंठ । त्याचेनि नांवें कलश स्फोट । राजद्वारीं होताती स्पष्ट । नारी यथेष्ट कळकळिती ॥

गजारूढ गजपती । त्या गजांची खुंटुनी गती । मागील महामत्त हस्ती । आणी त्याप्रती संग्रामा ॥ ८ ॥

गज भिडती गजांसी । महावत महावतेसी । कपि गुप्तत्वें बांधोनि पूंसीं । दोन्ही तोंडघसी आदळती ॥ ९ ॥

गज आदळले तडफडती । वीर रगडले चरफडती । राजद्वारीं ऐशा रीतीं । कलह प्राप्ती कपिपुच्छें ॥ १० ॥

अश्व स्वारांचिया हारी । हो हो मामा जी जी करी । नाचती तीच पायावरी । राजद्वारीं कपि पाडी ॥ ११ ॥

अश्व पाडोनि ऐशा रीतीं । हनुमान गांजी कलहप्राप्ती । तैसेचि अतिरथी महारथी । गांजी मारुती गुप्तत्वें ॥ १२ ॥

पुढील मल्लाची शेंडी ओढी । मागील मल्ल त्यावरी पाडी । मल्ल विद्या कडोविकडी । केली बापुडी हनुमंतें ॥

मल्ल अति बळें उन्मत्त । परस्परें [तु. दै. कं. 'कलहो करीत'; मु. 'कलहो होत'.] कलहाआंत । हनुमंतें करोनि गुप्त घात । पाडिले कुंथत राजद्वारीं ॥ १४ ॥

अनुक्रमणिका

विवादती वेदपाठक । सानुनासिक अनुनासिक । राम स्मरणीं नाहीं विवेक । निर्नासिक कपिमानी ॥ १५ ॥

अस्मात् कस्मात् उपपत्ती । विद्वांसी वाद वेवाद युक्ती । रामस्मरणीं नाहीं मती । मानी मारुति भूभार ॥ १६ ॥

प्रधान गर्वें अति सन्मानी । बैसोनि येतां सुखासनीं । हनुमान अत्यंत विंदानी । भोयांचा कानीं पूंस भवंडी ॥

भोई वोसरतां दचकोनी । धूर आदळतां धरणीं । धुळी रिघाली वदनीं । दंत भग्नीं कुंथत ॥ १८ ॥

रायापासी अति सन्मान । त्यासी राजद्वारीं अपमान । हांसतां पैं लंकेचें जन । तेणें प्रधान क्षोभले ॥ १९ ॥

सघृत भातें नित्य चौशेरी । उंच वरान्न भोजन घरीं । आम्हांसी पाडिलें राजद्वारीं । सुबद्ध मारी भोयातें ॥ २० ॥

भोई म्हणती ऐका मात । व्यर्थ कां करतां आमचा घात ।
सीतेने सोडिला पुच्छकेत । दंत भग्नार्थ तेणें तुम्हां ॥ २१ ॥

सीता आहे लंकेप्रती । नगर लोक अनुवादती । कोणे ठायीं नेम निश्चिती । शुद्धि मारुती न लभेचि ॥ २२ ॥

ऐसें करितां जाली राती । शुद्धि साधावया सीतासती । रिघाला रावणसभेप्रती । केली जे ख्याती ते ऐका ॥

सिंहासनीं दशशिर । सभेसी निशाचर वीर । निकट प्रधान आणि कुमर । सभा सुंदर शोभत ॥ २४ ॥

सभेसी येवोनि घरटीकार । करोनि रावणासी जोहार । सांगे नगरीचा विचार । विघ्न दुर्धर दिसताहे ॥ २५ ॥

मुख्य विघ्नाची पैं थोरी । अतर्क्य कलहो राजद्वारीं । रथ गज [तु. दै. 'अश्ववीर'; मु. 'यासी हारी'.] असिवारी । महावीरी अपमान ॥ २६ ॥

राजगृहीं अति सन्मान । पालखी पदस्थ प्रधान । शिबिका राजद्वारीं भंगोन । दंत भग्न पावले ॥ २७ ॥

घटस्फोट राजद्वारीं । कळकळती नगरनारी । उदकाचा तडा नगरीं । घरोघरीं आकांत ॥ २८ ॥

लोक जल्पती समसकट । नगरीं निमाला दशकंठ । त्याचेनि नांवें घटस्पोट । नारी यथेष्ट कळकळती ॥ २९ ॥

रावणें ऐकतां उत्तर । कोपा जडला दुर्धर । धरामारा घरटीकार । अपवित्र अनुवादें ॥ ३० ॥

माझा सांगतां विघ्न प्रकार । जरी मारिला घरटीकार ।

अनुक्रमणिका

तरी मी हनुमान भूमिभार । केला चमत्कार तो ऐका ॥ ३१ ॥

सुगंध स्नेह दीपिका अनेक । कर्पूर दीपिका अठरा लक्ष । दोहीं बाही लखलख । सभा सम्यक शोभत ॥ ३२ ॥

तंव वानरा आला तवंक । पूंसें हाणोनिया देख । विझविल्या एक एक । सभा सकळीक गजबजिली ॥ ३३ ॥

सभेसी पडतांची अंधार । जेही बांधला घरटीकार । ते धुमसोनि निशाचर । करी वानरमुक्त त्यासी ॥ ३४ ॥

घरटीकार करुनी मुक्त । सभेसी क्षोभला हनुमंत । जें जें केलें अत्यद्भुत । सावचित्त अवधारा ॥ ३५ ॥

सभेसी पडतांची अंधारी । हनुमंतें मांडिली चोरी । वस्त्रें अलंकार हारी । शस्त्रास्त्रें नागविलीं ॥ ३६ ॥

एक म्हणे नेली त्वां माझी वस्त्रें । तो म्हणे नेली माझीं शस्त्रें ।
भट म्हणती नेलीं धोत्रें । गुप्त वानरें नागविजे ॥ ३७ ॥

कुंडलें घेतां कानची तोडी । [मु. 'वस्त्रें'.] उष्णीशें घेतां डोळेचि फोडी । बाहुवटें घेतां बाहूचि मोडी । गांजी कडाडी राक्षसां ॥

मुकुट घेतां मस्तक फोडी । कटिसूत्रीं माजचि मोडी । मुद्रिका घेतां अंगोळ्या उपडी । केली धांदडी राक्षसां ॥ ३९ ॥

कंठ माळा कंठचि मुरडी । पदकासाठीं हृदय फोडी । नेसणें घेतां लिंगचि तोडी । केली बापुडी राक्षसें ॥ ४० ॥

नेसणीं सोडारे लौकरी । नाहीं तरी लिंगा करील बोहरी । नपुंसकता संसारी । कैशा परी सोसेल ॥ ४१ ॥

येरयेरांसी सांगती बुद्धी । बोंबलूं नकारे त्रिशुद्धी । बोंबलू जातां नाक छेदी । निशद्ववादी राहा उगें ॥ ४२ ॥

पायीं बिरदें वीरांसी पूर्ण । तयासाठीं मोडीचरण । बोंबलूं जातां छेदी घ्राण । फें फें वचन राक्षसां ॥ ४३ ॥

वस्त्रें अलंकार जोडती पुढें । तैसें नाक तंव ना जोडें । ख्याती लाविली माकडें । येरुं दडे येरामागें ॥ ४४ ॥

जे बोलिला घरटीकार । तें विघ्न आलें पैं साचार । सीता क्षोभली दुर्धर । दश शिर वधार्थी ॥ ४५ ॥

जानकी क्षोभ अत्यद्भुत । तिणें सोडिला पुच्छकेत । रावण मेला कीं जित । कोणी मात न सांगे ॥ ४६ ॥

रावण निमाला अंधारी । विघ्न आलें त्याचियें वरी । बोंब पडली सभेमाझारीं । आपांपरी राक्षसां ॥ ४७ ॥

अनुक्रमणिका

मारिलें इंद्रजित कुंभकर्ण । तया मागें येथ रावण । आता धांवण्या धांवे कोण । रक्षोगण कांपती ॥ ४८ ॥

पिता क्षोभविला पवन । दीपिका ते जाय विझोन । राक्षसां होताहे कंदन । दशानन निमाला ॥ ४९ ॥

भंगलें राजाज्ञेचें सूत्र । सभेमाजीं रिघालें चोर । नागविले थोरथोर । निशाचर पळों पाहती ॥ ५० ॥

जो कोणी निघे सभेबाहेरी । त्यासी पूंसें सुबद्ध मारी । अवघीं दडालीं अंधारी । कोंडमारी राक्षसां ॥ ५१ ॥

सीता क्षोभली उद्भट । राक्षसां आलें अति संकट । बाहेर जावया न फुटे वाट । मरण दुर्घट ओढवलें ॥ ५२ ॥

अंधारी रावणाचा मुकुट । पुच्छाग्रें वोढी मर्कट । तेणें धाकें दशकंठ । म्हणे शेवट मज आला ॥ ५३ ॥

रावणाचिया उरीं शिरीं । हनुमान सुबद्ध टोले मारी । तेणें त्यासी आली अंधारी । धांके करी न बोलवे ॥ ५४ ॥

अंधारी न दिसे पैं व्यक्त । आंगी वाजती अति आघात । तेणें भयें लंकानाथ । चळीं कांपत थरथरां ॥ ५५ ॥

सत्य बोलिला घरटीकार । विघ्न मज आलें साचार । गुप्त आघात दुर्धर । लागती निष्ठुर प्राणांत ॥ ५६ ॥

हनुमान सांगे [पै. कं. 'बीजाक्षर'.] दशशिर । तुवां चोरली सीता सुंदर । तुझें छेदावया शिर । आलों साचार मी रामदूत ॥ ५७ ॥

रावणाची दाहीशिरें । हनुमान छेदितां नखाग्रें । वारिला होता श्रीरामचंद्रें । म्हणोनि वानरें सोडिला ॥ ५८ ॥

तुवां मारिल्या लंकानाथ । माझा पुरुषार्थ होईल व्यर्थ । ऐसें बोलिला रघुनाथ । तेणें हनुमंत न मारीच ॥ ५९ ॥

नागवोनि राक्षस पंक्ती । गांजोनिया लंकापती । सभेसी लावोनिया ख्याती । मग मारुती निघाला ॥ ६० ॥

वानरें लावतांची हात । रावण जाला मूर्च्छाभ्रांत । कपि कानीं जो जपला गुह्यार्थ । लंकानाथ तो नेणें ॥ ६१ ॥

दीपिका आणितांची पैं तेथ । अवघे नागवे हळहळीत । शष्पें लांब हात हात । मग लाजत येरयेरां ॥ ६२ ॥

एकाच्या लिंगा केलें वपन । एकाची लिंगें त्वचा छिन्न । एकाची तें तृणे निमग्न । अवघे नग्न हळहळती ॥ ६३ ॥

एकाचें लिंग तें राखोंडे । एकाचे लींग निलाग थोटें । एकाचें लिंग अत्यंत मोठें । पांढरी शष्पें कुळकुळीत ॥

अनुक्रमणिका

नांव ऐकतां हनुमंत । एकें चळचळा मुतत । एकाचे सुटले अधोवात । झाला भ्रांत रावण ॥ ६५ ॥

ऐसें वाचितां ब्रह्मलिखित । लक्ष्मण गदगदां हांसत । वानरां मुरकुंडी वळत । हास्य करी श्रीराम ॥ ६६ ॥

गांजोनियां लंकापती । सभा नागविली काळेरातीं । ऐकतां हनुमंताची कीर्ती । श्रीरघुपती सुखावें ॥ ६७ ॥

सुखावला लक्ष्मण । सुग्रीव सुखावें संपूर्ण । सुखावले वानरगण । गाढी आंगवण हनुमंता ॥ ६८ ॥

गांजोनि सभेचा पुरुषार्थ । रावणा करोनि हताहत । आला अशोकवनाआंत । हनुमंत महाबळी ॥ ६९ ॥

सीतेसी करावया एकांत । हनुमान वृक्षीं अति गुप्त । सीता विरहें [अ. मु. ‘विषयासक्त’.] विरहासक्त । लंकानाथ तेथ आला ॥ ७० ॥

सीतेसी सांगे स्वयें रावण । माझें करावें त्वां वरण । तुज मी महिषी करीन । आण प्रमाण शिवसाक्षी ॥ ७१ ॥

श्रीराम वनवासी हीन । राज्य भ्रष्ट अति दीन । त्याचें सांडोनिया ध्यान । राजा रावण वरी सीते ॥ ७२ ॥

सीते तूं तंव समूळ वेडी । पाहें माझी प्रताप प्रौढी । देव जे कां तेहतीस कोडी । बांधवडी पैं माझें ॥ ७३ ॥

इंद्रबारी चंद्र कऱ्हेरी । वसंत सेजेचा फुलारी । रावणा वारिलिया सीता सुंदरी । सुरासुरीं वंदिजे ॥ ७४ ॥

मुख्य करोनि मंदोदरी । ऐंशी सहस्त्र माझिया नारी । त्या करीन तुझ्या किंकरी । आज्ञाधारी सेवेसी ॥ ७५ ॥

माझें करावया वरण । तुज मी होतों अनन्य शरण । तुझें वंदितों मी चरण । पाणीग्रहण करी माझें ॥ ७६ ॥

जो मी प्रतापी लंकानाथ । सुरनरां काळ कृतांत । तुझा होतों शरणांगत । त्यजी रघुनाथ भजे मज ॥ ७७ ॥

ऐकोनि रावणाचें वचन । सीता बोले हास्यवदन । जळो तुझें हें महिमान । काळें वदन लंकेशा ॥ ७८ ॥

स्वयंवरी वाहतां हर कोदंड । तुझे जाहलें काळें तोंड । श्रीरामें केलें तें दुखंड । वृथा बळबंड जल्पसी ॥ ७९ ॥

बाळपणीं विंधोनि बाण । घेतला ताटिकेचा प्राण । सुबाहु मारोनियां जाण । केला संपूर्ण गुरुयाग ॥ ८० ॥

शूर्पणखा विटंबून । चौदा सहस्त्र राक्षसगण । मारिले त्रिशिरा खरदूषण । जनस्थान द्विजदाना ॥ ८१ ॥

नाहीं रथ सारथी । श्रीराम एकला पदाती । तेणें एवढी केली ख्याती । तुझी अपकीर्ती तूं ऐक ॥ ८२ ॥

सहित भवानि त्रिपुरारी । आंदोळिला कैलासगिरी । तो तूं श्रीराम भयेंकरी । झालासी भिकारी संन्यासी ॥

अनुक्रमणिका

८३ ॥

कपटी होवोनि संन्यासी । शेखीं परदारा चोरिसी । नाहीं पुरुषार्थ तुजपासीं । वृथा जल्पसी वाढीव ॥ ८४ ॥

श्रीराम परब्रह्म पुतळा । रावण काळा डोंबकावळा ।
सीता मानी त्याचें विटाळा । [तु. दै. अं. 'कल्पकाळा'; 'कल्पांतकाळी'.] कल्पांत काळा स्पर्शेना ॥ ८५ ॥

चोरितां श्रीराम नायिका । निंद्य जालासी तिहीं लोकां । रावणा तूं तंव शूकरमुखा । तुज मी देखा नातळे ॥ ८६ ॥ [ओवी ८६ तु. दै. प्रतींत नाही.]

वायसाचा पांथीकर । जेंवी नव्हेच चंद्रचकोर । तेंवी सांडोनि श्रीरामचंद्र । दशवक्त्र स्पर्शेना ॥ ८७ ॥

लक्ष्मण मर्यादेची रेखा । नुलंघवेची दशमुखा । श्वान शूकर तूं काळमुखा । तुज मी देखा स्पर्शेना ॥ ८८ ॥

साधु सज्ञन सौम्यसंत । कदा विष्ठेसी न लावी हात । तेवी तूं अपवित्र लंकानाथ । तुज मी तंव स्पर्शेना ॥ ८९ ॥

ऐकोनि सीतेचें वचन । वर्मी खोंचला दशानन । जिव्हा सांडारे छेदून । निंद्य वचन वदताहे ॥ ९० ॥

बळेंचि मज इसी भोगितां । कोण निवारील आतां । केंवीं राखवेल रघुनाथा । सती पतिव्रता पाहों कैसी ॥ ९१ ॥

ऐसें बोलतां लंकानाथ । ऐकोनि क्षोभला हनुमंत । करावया रावणाचा घात । वृक्षा आंत खवळला ॥ ९२ ॥

टंवकारिलें नेत्रवाट । वळिला पुसाचा पैं साट । छेदावया दशकंठ । बळें उद्भट गुरगुरी ॥ ९३ ॥

मज देखतां गांजी सीता । मी काय वार्तिकार आतां । रडत सांगों रघुनाथा । नपुंसकता मज आली ॥ ९४ ॥

सीतेसी लावितांची हात । जीवे मारीन लंकानाथ । येणें बळें हनुमंत । वृक्षा आंत गुरगुरी ॥ ९५ ॥

त्याची ऐकतां गुरगुर । कापिन्नला दशशिर । सीता रक्षणी श्रीरामचंद्र । अति सत्वर पावला ॥ ९६ ॥

रावण पडिला विचारीं । तंव पातली मंदोदरी । लंकापती धरोनि करीं । निज मंदिरीं तया नेला ॥ ९७ ॥

गुज सांगे तयासी । अखंड राम सीतेपासी । हात लावितांची तिसीं । वृथा तूं मरसी रावणा ॥ ९८ ॥

ऐसी सांगताची गोष्टी । रावणा धुकधुक पोटीं । येरीकडे सीता गोरटी । वृक्ष संपुटीं विलपत ॥ ९९ ॥

अनुक्रमणिका

लक्ष्मण छळितां श्रीरामभक्त । पापें अंतरला श्रीरघुनाथ । मज आकळी लंकानाथ । भक्त छळणार्थ महापाप ॥ १०० ॥

श्रीरामआज्ञेचें रक्षण । मजपासी लक्ष्मण । त्याचें करितां मियां छळण । बंदीं रावण मज घाली ॥ १०१ ॥

छळवाद्याचें वदन । कदा न पाहे रघुनंदन । मज सांडिलें निंद्य म्हणोन । शोक निमग्न छळणार्थें ॥ १०२ ॥

श्रीरामभक्ताचें छळण । पंचमहा पातकाहोनि दारुण । मज क्षोभला रघुनंदन । बंदीमोचन कोण करी ॥ १०३ ॥

श्रीराम भातां दुर्धर शर । लंका विध्वंसी [तु. दै. मु. 'साचार'; वि. 'समग्र'.] ससागर । रावण निर्दळी सहपरिवार । मज रघुवीर क्षोभला ॥ १०४ ॥

सुटलिया श्रीरामाचा बाण । मशक बापुडें तें रावण । मज क्षोभला रघुनंदन । सखा लक्ष्मण छळितांचि ॥ १०५ ॥

न लागतां निमिष मात्र । श्रीराम वधितां दशवक्त्र । मियां छळिला सखा सौमित्र । तेणें रघुवीर क्षोभला ॥ १०६ ॥

दासींदंडण शिरमुंडण । स्त्रियेसी दंडण उपेक्षण । ऐसें बोलोनि आपण । दीर्घ रुदन करी सीता ॥ १०७ ॥

श्रीरामें उपेक्षिलियां पाठीं । जीवें जीत मी करंटी । प्राण द्यावया उठाउठी । सीता गोरटी अनुतापी ॥ १०८ ॥

करितां श्रीरामस्मरण । स्वेद रोमांच अश्रुपूर्ण । सीतेसी करितां स्फुंदन । आलें रुदन हनुमंता ॥ १०९ ॥

कळवळ उपजली कपींद्रा । तेव्हां टाकिली श्रीराममुद्रा । मुद्रा देखोनि सीता [वि. दै. अं. तं. तु. मु. 'सुंदरा'.] सुभद्रा । निद्रा तंद्रा विसरली ॥ ११० ॥

दोन्ही टंवकारले नयन । चिंता गेली हरपोन । मनीं पांगुळलें मन । विस्मयापन्न जानकी ॥ १११ ॥

श्रीराममुद्रेचा बडीवार । दुःख निर्दळुनी समग्र । सुख द्यावें अपरंपार । चिदचिन्मात्र मुद्रिका ॥ ११२ ॥

दीपिका तेज अंधारयुक्त । श्रीराममुद्रा ग्रासी समस्त । करोनि शशी सूर्य खद्योत । प्रकाशवंत राममुद्रा ॥ ११३ ॥

मुद्रिका शोभे नामें करी । श्रीराम नाम मुद्रिकेवरी । राम मुद्रिकेआंत बाहेरी । सीता सुंदरी स्वयें देखें ॥ ११४ ॥

मुद्रिका पीठ पत्रावळी । सहस्त्र नाम प्रभावळी । अक्षरीं अक्षर लिहिल्या ओळी । अक्षरें न्याहळीं जानकीं ॥

अनुक्रमणिका

११५ ॥

अक्षरीं अक्षर मुद्रिका । दशावतार त्यावरी टीका । जडीत चरित्र [मु. 'मालिका'.] माणिका । सुखदायका सीतेसी ॥ ११६ ॥

मुद्रागर्भ अतिपवित्र । त्याहिमाजीं परात्पर । श्रीराम नाम निजाक्षर । क्षराक्षर अतीत ॥ ११७ ॥

ऐसी मुद्रिका आनंद युक्त । देखोनि सीता सद्‍गदीत । नेत्रीं आनंद जळ स्रवत । रोमांचित जानकी ॥ ११८ ॥

मुख्य मुद्रा ते सुवर्ण । त्यावरी श्रीराम सुवर्णवर्ण । देखोनि मुद्रेचें महिमान । सुख संपन्न जानकी ॥ ११९ ॥

तेथ चमत्कार जाला । मुद्रा नव्हे हा श्रीराम आला । ऐसा सीतेसी भाव गमला । सरसाविला अंचळ ॥ १२० ॥

श्रीराम आला एकाएकी । लाजे जाली अधोमुखी । सर्वांगें हरिखेली जानकी सुखोन्मुखीं डुल्लत ॥ १२१ ॥

केउता आहे तो लक्ष्मण । दुष्ट दुरुक्ति केलें छळण । त्याचें केशी झाडीन चरण । लोटांगण त्यासी माझे ॥ १२२ ॥

सेवेचि श्रीरामेसी गोडी । घ्या पां फोडी देईन विडी ।
आलेति मज लागीं तांतडी । चरण झाडी निजकेशीं ॥ १२३ ॥

ब्रह्मलिखित निरोपम । सीताचरित [मु. 'अनुपम'; तु. 'निरोपण'.] अनुक्रम । ऐकतां श्रीरामा आलें प्रेम । अति संभ्रम तो ऐका ॥ १२४ ॥

सीते दे दे आलिंगन । म्हणोनि उठिला रघुनंदन । सुग्रीव पडिला मूर्च्छापन्न । मूर्च्छित लक्ष्मण पत्रार्थी ॥ १२५ ॥

दोन्ही बाह्या पसरोन । हरुषें धांवें रघुनंदन । पैल पैल सीता चिद्रत्न । आली धांवोन भेटीसी ॥ १२६ ॥

हरुष न संडे रघुनाथा । पदोपदीं होय नाचतां । धन्य [तु. दै. मु. 'सुदिन'.]
शुद्धि हनुमंता । माझी मज सीता भेटविली ॥ १२७ ॥

ऐकोनि म्हणें हनुमंत । थोर चुकलों मी तेथ । सीता आणितों मी येथ । श्रीरघुनाथ सुखावता ॥ १२८ ॥

अति अनुताप हनुमंता । चुकलों चुकलों मी सर्वथा । मज काय आली नपुंसकता । निमेषें सीता आणीन ॥ १२९ ॥

अनुक्रमणिका

क्षण धीर धरी रघुनाथा । सवेग आणीन मी सीता । चरणीं ठेवोनियां माथा । होय उडतां हनुमंत ॥ १३० ॥

वेगें उडतां हनुमंता । उमज पडिला श्रीरघुनाथा । स्वयें धांवोनि होय धरितां । ऐक आतां सांगेन ॥ १३१ ॥

ब्रह्मलिखित ऐकतां । प्रेम उसळलें चित्तां । दुश्चित तें वदलों सीता सीता । तुंवा त्या अर्था न धरावें ॥ १३२ ॥

घेवोनि श्रीरघुनाथ । वेगें उडो पाहे हनुमंत । अंगदें देखोनि तो अर्थ । धांवोनि धरित हनुमंता ॥ १३३ ॥

अंगद श्रीराम समवेत । उडो पाहें हनुमंत । ते देखोनि जांबुवंत । स्वयें धरीत तिघांसीं ॥ १३४ ॥

घेवोनिया तिघेजण । हनुमान करुं पाहे उड्डाण । सुग्रीव होवोनि सावधान । धरी धांवोन हनुमंता ॥ १३५ ॥

सुग्रीवेसी समवेत । उडो पाहे हनुमंत । लक्ष्मण धावोनियां तेथ । आंवरीत निजबळें ॥ १३६ ॥

स्फुरणें खवळला हनुमंत । अंगद सुग्रीव जांबुवंत । राम लक्ष्मण समवेत । लंके आंत नेवों पाहे ॥ १३७ ॥

पंच फळें वृक्षावरी । तेंवी पांचातें आंवरी । नेवों पाहे लंकेभीतरीं । तेही परी अवधारा ॥ १३८ ॥

श्रीराम मारील रावण । इंद्रजित मारील लक्ष्मण । आम्ही मर्दूं राक्षसगण । सीता घेवोनि येवों सुखें ॥ १३९ ॥

ऐसें कपीचें मनोगत । जाणोनियां श्रीरघुनाथ । हनुमंताचे चरण धरित । क्षमा निश्चित मज कीजे ॥ १४० ॥

श्रीरामें धरितां चरण । हनुमान घाली लोटांगण । तुझी आज्ञा अणुप्रमाण । प्राणांतें पूर्ण नुल्लंघी ॥ १४१ ॥

तुज कळली सीतेची अवस्था । तिसीं आणावया शीघ्रता ।
धीटपण केलें मियां आतां । क्षमा सर्वथा मज कीजे ॥ १४२ ॥

ऐसें बोलोनि आपण । धरिलें श्रीरामाचे चरण । रामें दिधलें आलिंगन । समाधान स्वामीभक्तां ॥ १४३ ॥

एका जनार्दना शरण । हनुमंताचें बळ संपूर्ण । सुग्रीव आणि लक्ष्मण । वानरगण वानिती ॥ १४४ ॥

बलोद्धूत हनुमंता । पुढील सीतेची अवस्था । ब्रह्मलिखिताची कथा । सावधानता अवधारा ॥ १४५ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखिते हनुमत्पराक्रमवर्णनं नाम सप्तविंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग अठ्ठाविसावा

## जानकी हनुमंत प्रेम वर्णन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

मागील प्रसंग संपतां । अंगद सुग्रीव जांबुवंता । लक्ष्मणेसी रघुनाथा । घेवोनि उडतां हनुमंत ॥ १ ॥

हनुमंताची प्रताप कीर्ती । गगनीं सुरवर वानिती । भूतळीं वानितीं जुत्पत्ती । वानी कपिकीर्ती श्रीराम ॥ २ ॥

आवडी म्हणे श्रीरघुनाथ । सौमित्रा वाची ब्रह्मलिखित । मुद्रिका देवोनि हनुमंत । करी एकांत सीतेसी ॥ ३ ॥

धन्य ब्रह्मयाचें ब्रह्मपत्र । धन्य श्रवणार्थी श्रीरामचंद्र । धन्य वाचक सखा सौमित्र । धन्य कपींद्र कपिकुळें ॥ ४ ॥

मुद्रिका तेज दैदीप्यता । श्रीराम आला मानी सीता । तेणें होवोनि सलज्ञता । सप्रेमता घाबरी ॥ ५ ॥

सावधान पाहतां देखा । पुढे देखिली अंगुळिका । जाणोनि श्रीराम मुद्रिका । सुखोन्मुखा जानकी ॥ ६ ॥

पहिलें वंदिलें निढळी । मग आलिंगी हृदयकमळी । चुंबुनी पुसे जनकबाळी । सुखें वेल्हाळी आलीसी ॥ ७ ॥

म्हणोनि घाली लोटांगण । भागलीसी दुरा गमन । तुझें करीन चरणक्षाळण । तीर्थसेवन हितार्थ ॥ ८ ॥

तुझे सेवितां तीर्थचरण । लक्ष्मणासी केलें छळण । त्या पापाचें निर्दळण । प्राप्ती संपूर्ण श्रीरामीं ॥ ९ ॥

तूं तंव सखी श्रीराममुद्रा । घालूं सेज करिसी निद्रा ।
श्रमलीसी उतरतां समुद्रा । मार्गी गिरीवरां लंघितां ॥ १० ॥

मी वामांगी तूं दक्षिणी । आम्ही दोघी स्वानंद बहिणी । श्रीरामाची समूळ कहाणी । कृपा करोनि मज सांग ॥

नाठवे चेतन अचेतन । सद्‌गुरुभक्ती प्रेम पूर्ण । तेणें हनुमंता आलें रुदन । धन्य भजन सीतेचें ॥ १२ ॥

आम्ही म्हणवितों श्रीरामभक्त । हे प्रेम नाहीं आम्हां आंत । जानकी सप्रेम सदोदित । ईसी रघुनाथ तुष्टला ॥

सगुण निर्गुण सद्‌गुरुभक्त । जो वंदितो नित्य मुक्त । जो निंदी त्या नरकप्राप्त । वदे हनुमंत वेदार्थें ॥ १४ ॥

मुद्रिका देखतांची दृष्टीं । अत्यादरें मानी गोरटी । तिसीं पुसे सप्रेम गोष्टी । राम जगजेठी काय करितो ॥ १५ ॥

अनुक्रमणिका

स्वस्थ श्रीराम लक्ष्मण । तरी कां माझी सोडवण । करावया न करी आंगवण । दुर्धर बाण असतांहि ॥ १६ ॥

श्रीराम भातां दुर्धर शर । समूळ शोखुनी सागर । निवटूनियां दशशिर । सीता सत्वर सोडवितां ॥ १७ ॥

तिहीं दोघीं त्याजिली सृष्टी । हें न सांगवे [मु. 'कोटी'; कं. 'गुह्य गोष्टीं'.] दुःखगोष्टी ।
म्हणोनि सुचविसी मौन निष्ठी । सज्ञान मोठी राममुद्रा ॥ १८ ॥

श्रीराम गेला परलोकता । मौन मुद्रा सांगे वार्ता । तो जरी येथें स्वस्थ असतां । मज सोडविता निमिषार्धें ॥

श्रीरामाचा एक बाण । करी त्रैलोक्या कंदन । त्यापुढें कायसें दशवदन । गेला त्यजून परलोका ॥ २० ॥

सखा छळिला मियां लक्ष्मण । तेणें क्षोभला रघुनंदन । मज बंदीं सांडोन । गेले दोघेजण परलोकां ॥ २१ ॥

मुद्रिका सांग सत्य गोष्टी । मज रावणें हरिल्या पाठीं । दोघे येवोनि पंचवटी । अति संकटीं काय केलें ॥ २२ ॥

मुद्रिका नेदि प्रतीवचन । तुझ्या मौनाचें हेंचि कारण । माझेनि विरहें दोघे जण । राम लक्ष्मण निमाले ॥ २३ ॥

किंवा लोक लज्रे भ्याले । दोघे विष घेवोनि निमाले । माझेनि दुःखें दुखावले । मूर्छेसवें गेले प्राण त्यांचें ॥ २४ ॥

सीता सीता आंक्रदोनि । प्राण सांडिला दोघाजणीं । नातरी मागतां पाणी पाणी । ताहना फुटोनि निमाले ॥ २५ ॥

माझेनि दुःखें दुःखी प्रबळ । त्यजिला आहार फळ मूळ जळ ।
दोघां भरोनियां तरळ । प्राण तात्काळ सांडिला ॥ २६ ॥

मज न देखतां पर्णकुटीं । दोघे जाले कडेलोटी । अथवा शस्त्रें घातलीं पोटीं । केला कंठीं गळफांस ॥ २७ ॥

पर्वत कडा कां प्रचंड धोंडी । दोघीं घातल्या मुरकुंडी । तेथें वाळोनि जाल्या करवडी । दुःख दुर्वाडी निमाले ॥

विजनीं मूर्च्छित पडलें । वृक व्याघ्रीं ते फाडिलें । सिंह शार्दुळीं विभांडिलें । किंवा रगडिलें वनगजीं ॥ २९ ॥

ते तंव दोघे वीर निधडे । सिंह शार्दूळ [मु. 'बापुडे'.] पळे त्यापुढें । अथवा रावणें केलें कुडें । छळूनी रोकडे मारिले ॥ ३० ॥
विश्वामित्र यागाप्रती । श्रीराम सावध अहोरातीं । करितां सुबाहू छळणोक्ती । तो ही रघुपतीं मारिला ॥ ३१ ॥

अनुक्रमणिका

छळावया श्रीरामलक्ष्मण । शुर्पणखा सुंदरपूर्ण । तिचें केलें विटंबण । न चले छळण श्रीरामीं ॥ ३२ ॥

श्रीराम सहजचि उदासी । रावणें हरिता सीतेसी । न्यस्त शस्त्र जाला संन्यासी । वनवासी वनस्थ ॥ ३३ ॥

अथवा आणिक आहे गुज । श्रीराम आत्माराम सहज । रावणें हरितांची मज । समाधि सेज प्रवेशे ॥ ३४ ॥

जन्ममरणादि आधी । जेथ शमती त्रिशुद्धी । श्रीराम सेवि ते समाधि । देह उपाधी जेथ नाहीं ॥ ३५ ॥

देह बुद्धीचिया माथां । मी श्रीराम सीता कांता । हें ही नाठवे रघुनाथा । समाध्यवस्था समपदीं ॥ ३६ ॥

समाधि सुखी स्वभावतां । कैंचा राम कैंची सीता । रावणें हरिली माझी कांता । हें ही रघुनाथा नाठवे ॥ ३७ ॥

समाधि [मु. 'सेजे'.] सखें सुखसंपन्न । मिथ्या देहादि प्रपंच भान । मिथ्या रामसीता रावण । धांवण्या कोण धांवेल ॥ ३८ ॥

ऐसें एकतां ब्रह्मलिखित । श्रीराम जाला समाधिस्थ । सर्वेंद्रियीं उपरमत । कर्तव्यार्थ नाठवे ॥ ३९ ॥

जे लिहिलें ब्रह्मलिखितीं । जे बोलिली सीता सती । तेंचि जाहला रघुपती । स्वरूप स्थिती स्वभावें ॥ ४० ॥

श्रीराम परब्रह्म मूर्ती । ब्रह्मलिखितीं ऐकोनि स्थिती । स्वयें पावला उपरती । स्वरूप स्थिती स्वभावें ॥ ४१ ॥

नेत्र जाले अर्धोन्मीलित । प्राण पांगुळला जेथिचा तेथ । चित्त चैतन्यीं समरसित । जाला सदोदित परब्रह्म ॥

ब्रह्मस्थितीचें लक्षण । तेथ नाहीं मीतूंपण । कैंचा राम सीता रावण । आपणया आपण विसरला ॥ ४३ ॥

लक्ष्मणा खुंटली वाचकशक्ती । स्वरुपीं सुलीन रघुपती । सुग्रीव कळवळी कपिपती । तळमळती वानर ॥ ४४ ॥

लक्ष्मणा खुंटली वाचा सिद्धी । श्रीराम पावला समाधि । सीता न सुटे लंका बंदीं । कार्य त्रिशुद्धी नासलें ॥

हनुमंतें धरिलें दृढ मौन । कथा ऐके कर जोडोन । देखोनि समाधि विंदान । हनुमान संपूर्ण खवळला ॥ ४६ ॥

श्रीराम समाधि ते उपाधी । मज कळलीसे त्रिशुद्धी । हनुमेनि कैसी केली बुद्धी । विंदान विधी अवधारा ॥ ४७ ॥

मियां आणिली सीता शुद्धी । मिथ्या हो पाहे त्रिशुद्धी ।

अनुक्रमणिका

पुढील खुंटली कार्य सिद्धी । रामसमाधि भली नव्हे ॥ ४८ ॥

मियां सीतेसी दिधली भाक । येथ आणीन रघुटीळक ।
कायसें बापुडे समाधिसुख । माझी भाक नव्हे मिथ्या ॥ ४९ ॥

समाधिव्युत्थानापरता । श्रीराम स्वयें स्वभावता । त्यासी कायसी समाधिअवस्था । सावध आतां मी करीन ॥

श्रीराम स्वरूप स्थिती । सकळ जाणें स्वयें मारुती । प्रबोधावया रघुपती । केली युक्ती तें ऐका ॥ ५१ ॥

स्थूल लिंग आणि कारण । तिहीं वेगळा होवोन । जेथें नाहीं मीतूंपण । तेथें आपण प्रवेशे ॥ ५२ ॥

महाकारणी प्रवेशोन । प्रबोधावया रघुनंदन । वाचेवीण अनुवादोन । गुरु वचन प्रतिपादी ॥ ५३ ॥

अंतरेको बहिर्नाना अंतर्बोधो बहिर्जडः । अंतस्त्यागी बहिर्भोगी लोके विहर राघव ॥ १ ॥

श्लोक श्रीसद्गुरुवसिष्ठाचा । हनुमान वदे पांचव्या वाचा । तोडावया बंध समाधीचा । अर्थ तेथींचा अवधारा ॥

हातीची हातीं घेतां वस्तू । शब्देवीण अर्थ प्राप्तु । पांचवे वाचेचा हा अर्थु । श्रोता समर्थु श्रीराम ॥ ५५ ॥

अंतरीं अद्वैत ते एक । बाह्य स्वधर्म पाळी लोक । अंतरीं निजबोध चोख । वेद विवेक बाह्य पाळी ॥ ५६ ॥

अंतरीं सर्वस्वाचा त्याग । बाह्य अवतार भोगी भोग । सांडोनि समाधि निज योग । उद्धरीं जग निज कीर्ती ॥

सांडोनि समाधि सांकडी । तोडी नव ग्रहांची बेडी । सोडी देवांची बांदवाडी । उभारी गुढी रामराज्यें ॥ ५८ ॥

सद्गुरु वसिष्ठाचें वचन । ऐकोनियां रघुनंदन । स्वयें होवोनि सावधान । दिधलें आलिंगन हनुमंता ॥ ५९ ॥

श्रीरामाचे जें हृद्गत । हनुमान जाणें भगवद्भक्त । हनुमंताचा भक्तिभावार्थ । जाणें रघुनाथ हृदयस्थ ॥ ६० ॥

कपीसी देवोनि आलिंगन । श्रीराम जाला सावधान । देवाभक्ताचें अनन्यपण । अगम्य जाण श्रुतिशास्त्रां ॥ ६१ ॥

श्रीरामीं अनन्य भक्तसीता । अनन्य भक्ति हनुमंता । दोहींची ऐकावया कथा । श्रीरघुनाथा आल्हाद ॥ ६२ ॥

अनुक्रमणिका

ब्रह्मलिखिताचिया अर्था । ऐकावया आवडी रघुनाथा । अशोकवनीं वदली सीता । ते कथा अति गोड ॥ ६३ ॥

श्रीराममुद्रा अचेतन । तिसी देवोनि अति सन्मान । घालोनियां लोटांगण । सीता आपण पूसत ॥ ६४ ॥

कैसेनि चालवलें वाटा । कैसेनि उल्लंघिले घांटा । समुद्र तरणी दुस्तर मोठा । केवीं परतटा आलीसी ॥ ६५ ॥

तुज आणिले रघुपती । किंवा आणीक सांगाती । तें तें सांग मज प्रती । सीता सती पूसत ॥ ६६ ॥

राम नाम तुजवरी । अटक नाहीं चराचरीं । सुखें तरसी भवसागरीं । धन्य संसारीं तूं मुद्रे ॥ ६७ ॥

श्रीराममुद्रा ज्यासी लागे । तो संसारी तरे सर्वांगें । हें तुज पुसणेंचि नलगे । कृपानुरागें आलीसी ॥ ६८ ॥

मी वामांगी तूं दक्षिण भागीं । आम्ही तुम्ही बहिणी दोघी । मजलागीं लागवेगीं । कृपानुरागी आलीसी ॥ ६९ ॥

माझी कृपा तुझां पोटीं । तरी सांग पां गुह्य गोष्टी । मजमागें पंचवटीं । रामें संकटीं काय केलें ॥ ७० ॥

मुद्रिका नेदी प्रतिवचन । तुझिया मौनाचें कारण । निमाले रामलक्ष्मण । न सांगोन सांगसी ॥ ७१ ॥

श्रीराम गेला निज धामासी । तुज धाडिलें सांगावयासी । मीही त्यजीन देहासी । कास सरसी तियां केली ॥ ७२ ॥

साक्ष करोनि मुद्रिकेसी । मुद्रा धरोनि ह्रदयेसीं । आठवितां श्रीरामासी । पडे भूमीसी मूर्च्छित ॥ ७३ ॥

सीता पडतांची मूर्च्छित । गजबजिला हनुमंत । श्रीराम विरहें सीता संतप्त । प्राण निश्चित त्यागील ॥ ७४ ॥

देखतां श्रीराममुद्रेसी । राम निमाला वनवासी । धरोनि निश्चयो मानसीं । निज देहासी त्यागील ॥ ७५ ॥

येथें निमालियां सीता । काय मुख दाखवूं रघुनाथा । तुझी मारूनियां कांता । आलों मी आतां पुरुषार्थी ॥ ७६ ॥

करोनि समुद्र लंघन । मीचि सीतेसी जालों विघ्न । श्रीराममुद्रा स्वयें टाकोन । घेतला प्राण सीतेचा ॥ ७७ ॥

श्रीरामें मुद्रा दिधली खूण । ते मियां आणोनि आपण । घेतला सीतेचा प्राण । अति उद्विग्न हनुमंत ॥ ७८ ॥

खूण दावोनि आणावी सीता । शेखीं खूणेंनि मारिली तत्वतां ।
कैसेनि भेटों श्रीरघुनाथा । प्राणांतावस्था हनुमंती ॥ ७९ ॥

अनुक्रमणिका

मुद्रिका टाकिली उठाउठी । हेंचि बुद्धि म्यां केली खोटी । श्रीराम विरहासाठीं । सीता गोरटी [तु. वि. कं. मुं. दै. तं. अं. मु. 'निमाली'.] मूर्च्छित ॥ ८० ॥

मज येवोनि लंके आंत । ना सीता ना रघुनाथ । ऐसा वोढवला अनर्थ । तेणें हनुमंत अति दुःखी ॥ ८१ ॥

माझेनि निमाली पैं सीता । अपेश बैसलें माझें माथां । काय करूं रघुनाथा । बुद्धिदाता मज होई ॥ ८२ ॥

श्रीरामा तुझें मी अति दीन । माझें माथां बैसलें विघ्न । तूं कृपाळु रघुनंदन । नित्य निर्विघ्न मज करी ॥ ८३ ॥

इति संचिंत्य हनुमांश्चकार मतिमान्मतिम् । राममक्लिष्टकर्माणं सबंधुमनुकीर्तयन् ॥ २ ॥

आदरें स्मरतां रघुनंदन । बुद्धी आठवली अति निर्विघ्न । सीता होवावया सावधान । श्रीराम कीर्तन करावें ॥ ८४ ॥

श्रीराम कीर्ती हनुमंत । आदरें गाय वृक्षाआंत । जेणें जोडे स्वार्थ परमार्थ । तैसा अर्थ अनुवादें ॥ ८५ ॥

ऐकतां श्रीरामकीर्तन । सीता होय सावधान । तैसें हनुमंतें आपण । हरिकीर्तन मांडिलें ॥ ८६ ॥

कौसल्या गर्भींगर्भातीत । दशरथी श्रीरघुनाथ । परब्रह्म मूर्तिमंत । सूर्यवंशांत अवतार ॥ ८७ ॥

श्रीराम पुरुष सीता प्रकृती । राम चैतन्य सीता चिच्छक्ती । श्रीराम धैर्य सीता धृती । [मु. 'धन्य जगतीं'.] अनन्य गती अवतार ॥ ८८ ॥

गोडी आणि साखर पाहतां । दो नामीं एकचि वस्तुतां । तेंवी श्रीराम आणि सीता । एकात्मता अवतार ॥ ८९ ॥

श्रीरामाचें आचरित । गुरुपितृआज्ञा नित्य विक्रीत । ब्राह्मणांचा अनन्य भक्त । सुरसाह्यार्थ अवतार ॥ ९० ॥

कैकयी वरदें दशरथ । श्रीरामा धाडिलें दंडकारण्यांत । सीतालक्ष्मण समवेत । रिघे रघुनाथ वनवासा ॥ ९१ ॥

वनवास गंगातटीं । वस्तीस्थान पंचवटीं । राम राहिला जगजेठी । सीता गोरटी समवेत ॥ ९२ ॥

शूर्पणखा विटंबन । मारिले त्रिशिरा खरदूषण । श्रीरामें घेवोनि निजस्थान । दिधलें दान द्विजासी ॥ ९३ ॥

मृग कंचुकीस लोभतां । मृगा मागें धाडिलें रघुनाथा । छळणें सौमित्र दवडितां । हरिली सीता रावणें ॥ ९४ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम आणि लक्ष्मण । करितां सीता गवेषण । जटायू रावणाचें रण । दोघे जण तेथ आले ॥ ९५ ॥

श्रीराम कृपाळू पूर्ण । करोनि जटायु उद्धरण । कबंधातें मारोनि जाण । आलें आपण किष्किंधें ॥ ९६ ॥

रामें निर्दळुनी वालीसी । राज्य दिधलें सुग्रीवासीं । युवराज्य अंगदासीं । वानरांसी निज सख्य ॥ ९७ ॥

तुझें शुद्धी लागी येथें । मज धाडिलें श्रीरघुनाथें । तुझें भेटी लागीं सीते । धरिली व्रतें श्रीरामें ॥ ९८ ॥

विश्वासून मनासीं वानरां । म्हणोनि श्रीरामें दिधली मुद्रा । सांडोनियां निद्रातंद्रा । भेटे कपींद्रा रामदूता ॥ ९९ ॥

ऐकोनि श्रीराम कथामृत । सीता उठली हर्षयुक्त । कथानुवाद वृक्षाआंत । तेणें विस्मित जानकी ॥ १०० ॥

कृपेनें कोवळा श्रीरघुनाथ । मज आश्वासावया येथ । वृक्षकथानुवादत । आला निश्चित श्रीराम ॥ १०१ ॥

वृक्षांसी पुसे करोन नमन । कोण करितो कीर्तन । त्याचें पाहीन मी वदन । लोटांगण त्या माझें ॥ १०२ ॥

ज्यासी श्रीराम कथा शैली । त्याचे चरण रजधुळी । मी वंदीन सुख समेळीं । मुख मज जवळी दावावें ॥ १०३ ॥

ज्याचिया मुखीं रामकीर्तन । त्याचें मज देखतां वदन । परमसुख समाधान । कृपा करोन भेटावें ॥ १०४ ॥

सीता सप्रेम निज चित्तें । अति उत्कंठित भावार्थें । जेणें खूण मुद्रा आणिली येथें । कृपावंतें भेटावे ॥ १०५ ॥

तामब्रवीत्पुनर्धीमान्हनुमान् मारुतात्मजः । शिरस्यंजलिमाधाय वैदेहीं प्रतीपूजयन् ॥ ३ ॥

ऐकोनि सीतेचें वचन । हनुमंते स्वयें उतरोन । सोतेसी घालोनि लोटांगण । मस्तकीं चरण वदिंले ॥ १०६ ॥

सीता देखतांची दृष्टी । वानरासी हर्ष कोटी । तिसीं होता निकट भेटी । आनंद कोटी न समाय ॥ १०७ ॥
[ओवी १०७ मु. प्रतीत नाही.]

महानिधीचा लाभ जाला । सुधाब्धि चूळोदकें प्राशिला ।
किंवा कळिकाळ जिंकोनि आला । तो पाडु जाहला हनुमंता ॥ १०८ ॥

तेणें हरिखाचेनि मेळें । गडबडां पायांवरीं लोळे । आनंदाश्रु स्त्रवती डोळे । सुख संमेळें डुल्लत ॥ १०९ ॥

धांव धांवोनि पायांपडे । स्वेदगद्‌गदें सप्रेम रडे । पुच्छ नाचवोनि पुढें । हरुषें उडे वानर ॥ ११० ॥

येथें सांपडली सीता । जाली कार्य सिद्धी रघुनाथा । यश आलें मज हनुमंता । उल्हासता नाचत ॥ १११ ॥

अनुक्रमणिका

सीता विचारी पोटांत । हा म्हणवितो श्रीरामदूत । रामा सवें कैंचा हनुमंत । पंचवटींत पैं नव्हता ॥ ११२ ॥

राम लक्ष्मण दोघे वीर । त्यासवें नाहीं नर वानर । कैचें नेणें हें वनचर । नाना विकार करिताहे ॥ ११३ ॥

पूर्वीं जटायू देखिला होता । नाहीं देखिलें हनुमंता । येथें आलासें अवचिता । सीता छळणार्था रावण ॥ ११४ ॥

पूर्वीं होवोनि आला संन्यासी । आतां आला वानरवेषीं । केंवी विश्वासू मी यासी । सीता मानसीं विचारी ॥ ११५ ॥

श्रीराम-कथा अनुवादत । धन्य धन्य हा श्रीरामभक्त । कपटी नव्हे हा हनुमंत । मज निश्चित मानलें ॥ ११६ ॥

मिथ्यां म्हणो नये हनुमंता । सत्य सांगितली श्रीराम कथा । त्याचिया पूर्वा पर वृत्तांता । यासी मी आतां पूसेन ॥

सीता पुसेल वृत्तांत । सत्य सांगेल हनुमंत । तेचि कथेचा कथार्थ । मुख्य मोक्षार्थ [मु. ‘अवधारा’.] मुमुक्षा ॥ ११६ ॥

एकाएकी अशोक वानाआंत । आला देखोनि हनुमंत । त्याचा समूळ वृत्तांत । पुसे साद्यंत जानकी ॥ ११९ ॥

> तां तु रामकथां श्रुत्वा वैदेही वानरर्षभम् । उवाच वचनं सीता प्रियं मधुरया गिरा ॥ ४ ॥
> क्व ते रामस्य संसर्गः कथं जानासि लक्ष्मणम् । वानराणां नराणां च कथमासीत्समागमः ॥ ५ ॥

मज वनवासी असतां । तैं तूं नव्हतासी हनुमंता । कैंचा आलासी तूं आतां । निज वृत्तांता मज सांग ॥ १२० ॥

> रामस्य यानि लिंगानि लक्ष्मणस्य च वानर । तानि भूयस्त्वमाचक्ष्व न मां शोकः समाविशेत् ॥ ६ ॥

कैसेनि राम देखिला दृष्टी । तुम्हां श्रीरामीं कैसी भेटी । कैस कैस्या केल्या गोष्टी । [तु. दै. ‘कथा मी पुसें’.] जेणे कां [वि. मु. ‘पोटी’.] मोठी अति प्रीती ॥ १२१ ॥

कैसा बाणला वचनार्थ । साधावया श्रीरामकार्यार्थ । हनुमान सर्वांगीं उल्हासत । तो गुह्यार्थ मज सांगें ॥ १२२ ॥

श्रीराम भेटलियां कैसें सुख । श्रीराम वचनीं परमपीयूख ।
श्रीरामसंगें कैसा हरिख । योग परिपाक मज सांग ॥ १२३ ॥

श्रीरामाचें ठाणमाण । रूपरेखा गुणलक्षण । कैसा आहे सखा लक्ष्मण । दोहींची खूण मज सांग ॥ १२४ ॥

ऐकतां श्रीरामाची कथा । दुःख शोक नाठवे चित्तां । निमे भव भयाची वार्ता । कथा ऐकतां आनंद ॥ १२५ ॥

याचिलागी पुढतपुढती । कथा मी पुसे अति प्रीती । कथेमाजीं अति विश्रांती । जाण मारुती हरिभक्तां ॥ १२६ ॥

केलिया कथेचें श्रवण । नाहीं मनन निदिध्यासन । तरी ते कथा होय शून्य । जेंवी मैथून वंध्येचें ॥ १२७ ॥

श्रद्धा श्रीरामकथा श्रवण । ऐक तीचें महिमान । अहं सोहं कोहं विरोन । ब्रह्मपरीपूर्ण स्वयें होती ॥ १२८ ॥

चित्त चिंतन होय चैतन्य । बुद्धि समसाम्य समाधिघन । कर्मचि होय ब्रह्म परिपूर्ण । इंद्रिया चरण चिन्मात्र ॥ १२९ ॥

ऐसी श्रीराम स्वरुप संस्था । सादर पुसतां पैं सीता । ठक पडलें हनुमंता । कथा वार्ता विसरला ॥ १३० ॥

श्रीराम स्वरुप वदे सुंदरा । तेणें अवस्था वानरां । नेत्री अश्रूंचिया धारा । थरथरां कांपत ॥ १३१ ॥

अंग जालें रोमांचित । स्वेद आला डबडबीत । मूर्च्छापन्न पडे हनुमंत । तेणें विस्मित जानकी ॥ १३२ ॥

वानर वनचर पालेखाईर । त्यासी श्रीरामीं पडीभर । लंघूनी आला हा सागर । भक्त साचार हनुमंत ॥ १३३ ॥

ऐसें जाणोनि तत्वतां । आवडी आश्वासी त्या सीता । सावधान करी हनुमंता । श्रीराम वार्ता पुसावया ॥ १३४ ॥

एका जनार्दना शरण । सीता हनुमंत संवाद कथन । गोड गोड निरोपण । सावधान अवधारा ॥ १३५ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखिते जानकीहनुमंतप्रेमप्रसंगो नाम अष्टविंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग एकोणतिसावा

## हनुमत्प्रताप ब्रह्मलेखन पत्र

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

सीतेनें पुसिलें श्रीरामज्ञान । तें सांगावया हनुमान जाण ।
गिळोनिया ज्ञानाज्ञान । जाला सावधान श्रीरामें ॥ १ ॥

एवमुक्तस्तु वैदेह्या हनुमान्मारुतात्मजः । ततो रामकथातत्वमाख्यातुमुपचक्रमे ॥ १ ॥
देवि रामस्य लिंगानि लक्ष्मणस्य च यानि मे । लक्षितानि विशालाक्षि तानि वै श्रुणु तत्वतः ॥ २ ॥

सीतेनें पुसिली श्रीरामकथा । तेचि सांगावया स्वरुप संस्था । उल्हास हनुमंताचें चित्तां । यथार्थता सांगत ॥ २ ॥

लक्ष्मणाचें निज लक्षण । ठाणमाण सगुण गुण । समूळ सांगेल आपण । सावधान अवधारा ॥ ३ ॥

सादर श्रवणार्थी स्वये सीता । तेणें आल्हाद हनुमंता । सावधान मिळालिया श्रोता । वदे वक्ता उल्हासें ॥ ४ ॥

श्रीरामरुपें अति स्वरुप । रुपें जिंतला कंदर्प । परी तो रुपेंचि अरुप । चित्स्वरुप श्रीराम ॥ ५ ॥

राम राजीव लोचन । जगाचे नयना [कं. 'सबाह्य'; मु. तु. दै. 'सादृश्य'.] साह्य तें नयन । परी देखणा डोळेविण । देखणेंपण पैं त्याचें ॥ ६ ॥

दृश्य देखणें हें तंव गौण । श्रवणांत देखणें नयन । सर्वांग देखणा रघुनंदन । डोळेवीण देखत ॥ ७ ॥

कुंडलें वर्णिती साकार । एक म्हणती मकराकार । श्रवणें मावळती विकार । निर्विकार निजलेणें ॥ ८ ॥

श्रीरामाचेनि श्रवणें । श्रवणा होतीं निज भूषणें । श्रवणा श्रवणाची लेणें । श्रवणें देखणें परब्रह्म ॥ ९ ॥

परमार्थाचें मुख्य बीक । निरपेक्षा तेंचि नासिक । तेणेंविण तें निर्नासिक । कैंचें सुख सापेक्षा ॥ १० ॥

श्रीरामाची नासिक स्थिती । प्राणिया प्राणें नित्य विश्रांती ।
श्रीराम प्राणें [तु. .दै 'प्रतापगती'.] प्राणिया गती । गतीसी विश्रांती श्रीरामें ॥ ११ ॥

श्रीरामाचा मुखमयंक । नित्यानंदें निष्कलंक । ब्रह्मादि देवां सुखदायक । जीवाशिवां सुख श्रीरामें ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

जीवशिव ते दोन्ही अधर । श्रीराम अधरीं जाले सधर ।
मिळणीं मिनले एकाकार । शिवसुख सार श्रीरामें ॥ १३ ॥

श्रीराममुखीं दंतपंक्ती । जेवीं ओंकारामाजी श्रुती । श्रुती स्मृती निज विश्रांती । श्रीराम मूर्ति मुखचंद्र ॥ १४ ॥

श्रीरामाचे निज निढळी । सच्चिदानंद हेचि त्रिवळी । त्याचें ललाट [तु. 'साम्य'; कं. 'निज'.] भाग्यसमेळी । लोकीं सकळीं नांदिजे ॥

प्रेमकेशरसमेळा । टिळक रेखिला पिवळा । निर्धार अक्षता निढळा । राम प्रेमळां पढियंता ॥ १६ ॥

अहं मृग वधिला निर्लोभेसी । काढिले सोहं मुगनाभिसी । तेही अर्पिलें श्रीरामासी । निजांगासी चर्चोनी ॥ १७ ॥

जन विजन विवंचून । साधिलें निज धैर्य चंदन । त्याचाही सुगंध काढून । उद्वर्तन श्रीरामा ॥ १८ ॥

विद्या अविद्या सूक्ती पटला । त्यजोनि काढिले मुक्ता माळा । तेचि श्रीरामाचे गळा । मुक्तामाळा शोभत ॥

ॐकार तोचि कंबुकंठ । तेथुनी वेदां वाहती वाट । गर्जती [कं. 'विवादें'.] विधिवादें उद्भट । होती प्रकट त्रिकांडें ॥ २० ॥

त्वंपदतत्पदा अतीत । हृदयीं पदक सदोदित । साधुचिद्रत्नीं रत्नखचित । लखलखीत निजतेजें ॥ २१ ॥

म्हणती कसिला पितांबर । श्रीराम कांसे चिदंबर । झांकी शून्यत्वाचें छिद्र । कांसे अच्छिद्र श्रीराम ॥ २२ ॥

श्रीराम कांस दृढ भारी । एकपत्नी व्रतधारी । कांसे लागलिया तें तारी । भवसागरीं तारक ॥ २३ ॥

श्रीराम आकळे सगळा । भक्त भावार्थ कटी मेखळा ।
किंकिंणी जाळ माळा । जालिया सकळा ऋद्धी सिद्धी ॥ २४ ॥

सूक्ष्म मध्याची रचना । अभिमान [मु. 'होता'.] पंचानना । देखोनि श्रीराममध्यरचना । लाजोनि राना तो गेला ॥ २५ ॥

पहावया श्रीराम मध्यासी । शाहडे दडले मेखळेसी । सर्वस्व वेधलें श्रीरामासी । जावों वनासी विसरले ॥ २६ ॥

श्रीराम चरणाची ख्याती । जडपाषाण [कं. तु. दै. मु. 'उद्धरती'.] उत्तम गती । श्रीराम सकळां गतीची गती । गती सद्‌गती श्रीरामें ॥ २७ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम चरणाचें [तु. दै. 'स्पर्शन'.] भूषणें । वांकीनें वेदां आणिलें उणें । ते तंव धरोनि ठेले मौन । हरि कीर्तन हे गर्जे ॥ २८ ॥

चहूं वाचा अगोचर । चरणीं गर्जत तोडर । श्रीराम चिदचिन्मात्र । परात्पर परब्रह्म ॥ २९ ॥

लक्षितां श्रीरामाचें ठाण । त्यासी ठेंगणें दिसे गगन । पाहतां श्रीरामाचे [मु. 'मन'.] मान । पडिलें मौन श्रुतिशास्त्रां ॥ ३० ॥

पाहतां श्रीरामाचे गुण । सगुण दिसतांहि अगुण । राम नामें हरे त्रिगुण । निज निर्गुण श्रीराम ॥ ३१ ॥

लक्षितां श्रीराम लक्षण । जो लक्षी तो विलक्षण । ऐसा श्रीराम विचक्षण । लक्ष लक्षण त्या नाहीं ॥ ३२ ॥

श्रीराम मुखीचीं अक्षरें । क्षराक्षरातीत परें । सभाग्य सेवितां श्रवणद्वारें । सर्वांगीं सुभरे स्वानंद ॥ ३३ ॥

देखता श्रीरामाचें श्रीमुख । फिके होय समाधि सुख । स्वप्नीं न देखिजे दुःख । हरिखें हरिख कोंदाटे ॥ ३४ ॥

कोंदाटलिया परब्रह्म । ब्रह्मरुप क्रियाकर्म । हारपले धर्माधर्म । जाला उपरम वेदवादा ॥ ३५ ॥

ऐसा श्रीराम नेटका । तैसाचि सौमित्र निजसखा । दोघां अभिन्नत्व देखा । भिन्न आवांका दिसताहि ॥ ३६ ॥

घालोनिया लोटांगण । तुज कुशल कल्याण । स्वयें पुसे लक्ष्मण । पुसे कल्याण श्रीराम ॥ ३७ ॥

ऐसें हनुमंतें सांगतां । तटस्थ ठेली श्रीरामकांता । आप आपणया विसरे सीता । हनुमंताचेनि बोलें ॥ ३८ ॥

हनुमंतें बोला आंत । अवघा आणिला श्रीरघुनाथ । तेणें सीतेचा मनोरथ । सदोदित स्वानंदें ॥ ३९ ॥

हरुष न समाय पोटीं । अवघा हरुषाचिया कोटी । तेणें हरुषें सीता गोरटी । घाली मिठी हनुमंता ॥ ४० ॥

वानर वदे मनुष्य वाणी । श्रीराम कथा त्याचे वदनीं । जे कथेचा निज श्रवणीं । भव बंधनीं निर्मुक्ती ॥ ४१ ॥

ऐकतां वानराचिया गोष्टी । सत्य श्रीरामीं जाली भेटी । निरसोनियां दुःख कोटी । ओतली सृष्टी सुखरुप ॥

हरिखाचिया लवलाह्या । स्वानंदें पसरोनि बाह्या । अलिंगिलें कपिराया । जेंवी कां माया प्रियपुत्र ॥ ४३ ॥

सीतेसी सुख जालें गाढें । पुत्रसुख तृण त्यापुढें । हनुमंत वाडे कोडें । प्रेम पडिपाडें पिढियंता ॥ ४४ ॥

कपे त्वामभिनंदामि चिरंजीव सुखी भव । सानुजः कुशली भर्ता येन मेऽद्य निवेदितः ॥ ३ ॥
बलेन यशसा चैव वर्धस्व प्रज्ञयापि च । शतयोजनविस्तीर्णं सागरं मकरालयम् ॥ ४ ॥

अनुक्रमणिका

विक्रम्य श्लाघनीयेन क्रमता गोष्पदीकृतः । नहि त्वां प्राकृतं मन्ये वानरं वानरर्षभ ॥ ५ ॥
येनायं राक्षसावासस्त्वयैकेन प्रधर्षितः ॥ ६ ॥

**श्रीराम भर्तार लक्ष्मण देवर । दोघे सुखरुप महावीर । हे ऐकतांचि उत्तर । सुख अपार मज जालें ॥ ४५ ॥**

**मज येथें सामासापांटी । श्रीरामाची कथा गोष्टी । आजि ऐकली तुझें वाक्पुटीं । धन्य सृष्टी हनुमंता ॥ ४६ ॥**

**मरतया अमृतपान । सुख त्या मीना मिळे जीवन । दुकाळलिया जेंवी मिष्टान्न । तेंवी तुझें वचन हनुमंता ॥ ४७ ॥**

**श्रीराम स्वरूपाचिया कथा । जेंवी वदलासी हनुमंता । ते सुखीं ब्रह्मसायुज्यता । न ये तुकितां तुकेसी ॥ ४८ ॥**

**श्रीराम कथा अनुवादन । तेणें मी जालें सुखसंपन्न । तुज मी वदतें वरदान । सावधान अवधारी ॥ ४९ ॥**

**हनुमंता होई चिरंजीवी । तोही जीवित ज्ञानानुभवी । नीच नवा सुख संभवी । श्रीराम पदवी वैभवें ॥ ५० ॥**

**तुज कळिकाळ कांपे चळी । ऐसा होसी अतुर्बळी । यश पावसी भूमंडळी । नाम समेळी श्रीरामें ॥ ५१ ॥**

**निरसोनि ज्ञानाज्ञाना । श्रीराम भजनें प्रबुद्ध प्रज्ञा । ज्ञेय मुके ज्ञेयपणा । श्रीराम** [पै. 'चरणाचेनि'.] **स्मरणाचेनि बळें ॥ ५२ ॥**

**शत योजने सिंधु अगाध । तुवां लंघिला जैसा गोष्पद । त्यापुढें माझें वरद । प्रज्ञा प्रबुद्ध हनुमंता ॥ ५३ ॥**

**तुज म्हणों नये वानर । सुरासुरां तूं दुर्धर । धांडोळिलें लंकापूर । निशाचर गांजोनी ॥ ५४ ॥**

**एकला एक हनुमंत । रावणाचे सभे आंत । करोनि राक्षसां आकांत । लंकानाथ गांजिला ॥ ५५ ॥**

**लंकेमाजीं कडोविकडी । गांजिल्या राक्षसांचिया कोडी । रावणाची सभा उघडी । केली रोकडी तुंवा एकें ॥ ५६ ॥**
**एवढा करतांही आकांत । येथें आलासी हनुमंत । नाहीं कळलें लंकेआंत । ऐसा समर्थ तूं एक ॥ ५७ ॥**

**रावण-मंदोदरी एकांत । तिचा ऐकोनि स्वप्नवृत्तांत । आलासी अशोकवनाआंत । अति समर्थ तूं एक ॥ ५८ ॥**

**ऐसा प्रताप शिरोमणी । पावलासी अशोकवनीं । तूंचि जनक तूंचि जननी । राम घेवोनि शीघ्र यावे ॥ ५९ ॥**

**तुझी होईन मी दासी । तुझे चरण झाडीन केशीं । शीघ्र आणावें श्रीरामासी । म्हणोनि पायांसी लागली ॥ ६० ॥**

अनुक्रमणिका

**तुंवा वंदिलें माझे चरण । मियां काय व्हावें उत्तीर्ण । आलें हनुमंतासी स्फुरण । भेटवीन श्रीरामा ॥ ६१ ॥**

**तुज एवढी अवस्था । विलंब कायसा वो आतां । शीघ्र भेटवीन श्रीरघुनाथा । बैसें आतां ममपृष्ठीं ॥ ६२ ॥**

पृष्ठमारोह हे देवि मा भूत्कालस्य पर्ययः । त्वय्यहं पृष्ठलीनायां संतरिष्यामि सागरम् ॥ ७ ॥
शक्तिरस्ति हि मे वोढुं लंकामपि सकाननाम् । द्रक्ष्यस्यद्यैव वैदेहि राघवं सहलक्ष्मणम् ॥ ८ ॥
न हि मे संप्रयातस्य त्वां गृहीत्वा वरानने । अनुगंतुं गतिः शक्तिः सर्वलंकानिवासिनाम् ॥ ९ ॥

**माझिये पृष्ठीं बैसलिया सीता । येच क्षणीं श्रीरघुनाथा । तुज मीं भेटवीन आतां । विलंब वृथा करूं नको ॥ ६३ ॥**

**शुद्धि सांगावया रघुनाथा । तुज मज येथ सांडोनि जातां । मागें राक्षसी केलिया घातां । शुद्धि वृथा होय माझी ॥ ६४ ॥**

**येथें मजचि देखतां । रावण मारूं आला** [मु. 'होता'.] **सीता । दैवें चुकविलें अनर्था । सांडोनि जातां मज नये ॥ ६५ ॥**

**शूर्पणखा केली नकटी । तुझा राग तिच्या पोटीं । तुज मारील उठाउठीं । महाखोटी राक्षसीं ॥ ६६ ॥**

**सांडोनि जाणें न घडे गोष्टी । वेगें बैस माझे पुष्ठीं । करीन श्रीरामेसी भेटी । विकल्प पोटीं धरू नको ॥ ६७ ॥**

**लंका त्रिकुट महागिरी । उपडोनि बळें करीं । एके उड्डाणें समुद्रीं । नेईन परतीरीं जानकिये ॥ ६८ ॥**

**करोनि एकचि उड्डाण । तुज भेटवीन रामलक्ष्मण । वाहातों श्रीरामाची आण । करीं आरोहण पृष्ठिभागीं ॥ ६९ ॥**

**तुज मियां नेतां अति त्वरेसीं । राक्षसवीरां महासुरासी । वेगें न येववे मजपासीं । त्या मशकांसी केंवी ठाके ॥ ७० ॥**

**आलिया इंद्रजित कुंभकर्ण । त्यासी रणीं विभांडून । रावणातें ही गांजून । भेटवीन श्रीरामा ॥ ७१ ॥**

**ब्रह्मलिखिताची व्युत्पत्ती । पूर्व संवाद सीता मारुती । रामें परिसावया हनुमत्कीर्ती । नानायुक्ती लिहिलेसें ॥ ७२ ॥**

अहमाकाशमापन्ना ह्युपर्युपरि सागरम् । प्रपतेयं हि ते पृष्ठाद्भयाद्वेगेन गच्छतः ॥ १० ॥
ततो मां पतितां तत्र सागरे मकरालये । भक्षयेयुर्हि मां मत्स्याः ग्राहाः सागरवासिनः ॥ ११ ॥
ऩ्हियमाणां तु मां दृष्ट्वा राक्षसा भीमविक्रमाः । सायुधा बहबो व्योम्नि राक्षसास्त्वं निरायुधः ॥ १२ ॥
कथं शक्ष्यसि त्वं पातुं मां चापिपरिरक्षितुम् । युद्धमानस्य रक्षोभिस्ततस्तैः क्रुरकर्मभिः ॥ १३ ॥
प्रपतेयं च ते पृष्ठाद्भयार्ता कपिसत्तम । अथवा युद्धमानस्य पतेयं विमुखस्य ते ॥ १४ ॥

अनुक्रमणिका

पतितां मां नयेयुस्ते राक्षसा भीमविक्रमाः ॥ १५ ॥

**सीता म्हणे अवधारी । बैसतां तुझे पाठीवरी । तुझिया उड्डाण वेगेकरी । पडेन सागरीं हिसळोनी ॥ ७३ ॥**

**पडतांचि सागराप्रती । मच्छ मगर मज गिळिती । तेव्हां तूं पडसी आवर्तीं । केवी मारुती मियां यावें ॥ ७४ ॥**

**कां धांवणें आलियां लागवेगीं । तूं परतसी युद्धा लागीं । झडा देतां युद्ध भागीं । मी रणरंगीं पडेन ॥ ७५ ॥**

**मज पडताचि क्षिती । क्षोभें राक्षसा मज मारीती । हें ही न घडे गा युक्ती । केंवी मारुती मियां यावे ॥ ७६ ॥**

**मज मारिलियां पाठीं । जरी तुवां मारिल्या राक्षसकोटी । सुख नव्हे श्रीरामाच्या पोटीं । बुद्धि खोटी हनुमंता ॥ ७७ ॥**

**सीते ऐक सावध गोष्टी । मज न लगे युद्ध अटाटी । माझें पुच्छ कोपलिया पाठीं । मारील कोटी राक्षसां ॥ ७८ ॥**

**तुज मीं सुखी राखेन स्वस्थ । माझें पुच्छ प्रतापवंत । करील राक्षसांचा घात । अर्बुदांत जरी आले ॥ ७९ ॥**

**सीता म्हणे तूं अल्प मारुती । तुझें पुच्छ तंव तें किती ।**
**केंवी राक्षसां लावील ख्याती । सत्यत्व चित्ती मानेना ॥ ८० ॥**

न मे जानासि सत्वं वा प्रभावं वाऽसितेक्षणे । तस्मात्पश्यतु वैदेही यद्रूपं परमं मम ॥ १६ ॥
विंध्यमंदरसंकाशो बभौ दीप्तानलप्रभः । अग्रतो व्यवतस्थे च सीताया वानरर्षभः ॥ १७ ॥

**सीते म्हणसी वानर किती । कायसी पूंसाची ते शक्ती ।**
**पाहा माझी स्वरुप स्थिती । म्हणोनि मारुती वाढला ॥ ८१ ॥**

**विंध्य मेरू आणि मंदार । त्याहोनि वाढला वानर । जैसा प्रळय काळाग्नी रुद्र । तैसा दुर्धर भासत ॥ ८२ ॥**

**सीते नेणसी माझें सत्व । पाहे माझा स्वरुप प्रभाव । देवदानव आणि मानव । राक्षस सर्व मारीन ॥ ८३ ॥**

**माझें पुच्छ पाहे प्रतापवंत । राक्षस दळणीं अति समर्थ । सगळी लंका तुज समवेत । निमिषार्धांत नेईन ॥ ८४ ॥**

**विकल्प सांडोनियां पोटीं । बैस सीते माझी पृष्ठीं । करीन श्रीरामेसी भेटी । सुख संतुष्टी स्वानंदें ॥ ८५ ॥**

**पर पुरुषीं आरोहण । हेंचि पतिव्रता दूषण । ऐकोनि सीतेंचे वचन । पूर्व कथन कपि सांगें ॥ ८६ ॥**

**राम सर्वार्थी सर्वज्ञ । गर्भी ब्रह्मचर्य कौपीन । माझी श्रीराम देखोन । धाडी आपण तुजपासी ॥ ८७ ॥**

अनुक्रमणिका

माझी जाणोनि समूळ स्थिती । स्त्रियेसी भेटी एकांतीं । ऐसें जाणोनि रघुपती । मज तुजप्रती धाडिलें ॥ ८८ ॥

तुझा विकल्प जावया जाण । निज मुद्रा देवोनि खुण । श्रीरामें धाडिलें आपण । अपत्य जाण मी तुझें ॥ ८९ ॥

आणिक सांगितली खूण । कैकयी वल्कलें परिधान । तुज नेसतां न येतीं जाण । श्रीरामें आपण नेसविलीं ॥ ९० ॥

खूण सांगता हनुमंता । चित्तीं चमत्कारली सीता । विकल्पा सांडोनि तत्वतां । गुज एकांता पूसत ॥ ९१ ॥

श्रीरामें आणविलें शुद्धीसीं । किंवा आणविलें सीतेसी । सत्य सांग मजपासी । त्या कार्यासी मी करीन ॥ ९२ ॥

श्रीरामें आणविली सीता । आतांच येईन हनुमंता । ऐसें सीतेनें पुसतां । आला कपिनाथा गहिंवर ॥ ९३ ॥

आपुला दावोनि पुरुषार्थ । शीघ्र नेईन म्हणे हनुमंत । अगाध सीतेचें सामर्थ्य । पुसे इत्यर्थ आज्ञेचा ॥ ९४ ॥

सावध अवधारी वो माते । असत्य न बोले मी येथें । श्रीरामें आणविलें शुद्धीतें । हेचि निश्चिती रामाज्ञा ॥ ९५ ॥

सीता म्हणे हनुमंता । विलंब न करावा सर्वथा । शीघ्र जावोनियां आतां । शुद्धि रघुनाथा सांगावी ॥ ९६ ॥

माझी कृपा आहे हनुमंता । तरी जावोनि अति शीघ्रता । शुद्धि सांगावया रघुनाथा । चरणीं माथा ठेविला ॥

सीतेने करितांच नमस्कार । पायीं गडबडे लोळे वानर । अहो मी तुझे रंक किंकर । आज्ञाधार नेमस्त ॥ ९८ ॥

श्रीराम सेवक जो जो कोण्ही । तो मज वंद्य मुकुटमणी । त्याचे चरणीं लोटांगणीं । सत्य ही वाणी हनुमंता ॥ ९९ ॥

ऐकतां सीता सद्भाववचन । आलें हनुमंता स्फुरण । आतांचि देवो आपली खूण । शीघ्र गमन मी करितों ॥ १०० ॥

सत्य मानावया वानरा । खूण म्यां आणिली श्रीराममुद्रा ।
तूं ही खूण दे श्रीरामचंद्रा । सत्य कपींद्रा मानावया ॥ १०१ ॥

ऐकोनि कपीचे वचन । सीता खूण दे कळवळोन । कैस कैसी दिधली खूण । सावधान अवधारा ॥ १०२ ॥

अनुक्रमणिका

एष चूडामणिर्दिव्यो मया सुपरिरक्षितः । मनः शिलायास्तिलक संस्मरन्नेव साऽब्रवीत् ॥ १८ ॥
अखिलेनेह यदृष्टमिति मामाह जानकी । चित्रकूटे महाप्राज्ञ वायसं प्रति मानद ॥ १९ ॥
खेदमानस्य काकस्य मां सर्वः स्मर्तुमर्हसि । क्षिप्तां हि इषिकां तत्र रोषादेकांगनाशिनीम् ॥ २० ॥
ऐषिकास्त्रमपि ते भार्यार्थे सन्निपातितम् । जहि पायमिदं रक्षः क्रूरं दारापहारकम् ॥ २१ ॥

**उकलोनियां निजवेणी । खुणेसीं दिधला चूडामणी ।**
**खूण सांगितली मुखवचनीं । श्रीरामालागोनी सांगावया ॥ १०३ ॥**

**श्रीरामें स्वहस्तें स्वलिळा । उगाळोनि मनशिळा । माझे कपाळीं लाविला टिळा । गोळांगुळा हे खूण सांग ॥ १०४ ॥**

**चित्रकूट पर्वतांत । काकें मज क्षत विक्षत । करितां कुचाग्रीं रक्तांत । तेणें रघुनाथ क्षोभला ॥ १०५ ॥**

**कोपें इषीकास्त्र सोडितां । काक तिहीं लोकीं पळतां । शिव शक्र यम विधाता । कोणी रक्षिता नव्हेचि ॥ १०६ ॥**

**नारद वचनें तो मागुता । शरण आला श्रीरघुनाथा ।**
**डाव्या डोळ्याचिया करोनि घाता । होय रक्षिता श्रीराम ॥ १०७ ॥**

**ऐसीं दिव्यास्त्रें तुजपासीं । तरी कां मज उपेक्षिसी । मृगा मागें मियां धाडिलासी । तेणें रुसलासी श्रीरामा ॥ १०८ ॥**

**महा पापिणी मी सीता । स्वामी वरी केली सत्ता । तेणें आतुडलें लंकानाथा । अधर्मता महादोषें ॥ १०९ ॥**

**लक्ष्मण ठेविला त्वां रक्षण । त्याचेंहि म्यां केलें छळण । ऐसी पापिणी मी जाणोन । सोडवण न करिसी ॥ ११० ॥**

**सकळ दोष श्रीरघुनाथा । क्षमा करी कृपावंता । ऐसें हनुमंतासी सीता । अति दीनता अनुवादे ॥ १११ ॥**

एवमुक्तो हनुमता रामो दशरथात्मजः । तं मणिं हृदये कृत्वा रुरोद सहलक्ष्मणः ॥ २२ ॥
अयं हि जलसंभूतो मणिः परमभूषणः । युद्धे परमतुष्टेन दत्तः शक्रेण मे पितुः ॥ २३ ॥
अस्याद्य दर्शनेनाहं तां प्राप्तामिव चिंतये । किमाह सीता वैदेही ब्रूहि सौम्य पुनः पुनः ॥ २४ ॥

**हनुमंतेसी संभाषण । ऐकोनि सीता** [तु. दै. 'दैन्य वदन'; वि. मु. 'दीन वदन'.] **दीनवचन । तिचा मणी हृदयीं धरोन । करी स्फुंदन कृपाळु ॥ ११२ ॥**

**श्रीरामासी आलें रूदन । अश्रुधारा स्त्रवती नयन । मस्तकमणी हृदयीं धरून । करी स्फुंदन कृपाळु ॥ ११३ ॥**

अनुक्रमणिका

वारिज समूद्रमणी । युद्धीं इंद्रें संतोषोनी । दिधला दशरथा लागोनि । नमुचि जैं रणीं पराभविला ॥ ११४ ॥

तो हा दशरथें महामणी । दिधला कौसल्या प्रियपत्नी । तिनें दिधला सीते लागोनी । प्रथमदर्शनी सुनमुखा ॥ ११५ ॥

मणी देतां हनुमंता । माता पिता प्रियकांता । तिघे भेटलीं तत्वतां । ऐसी मज चित्तां होतसे ॥ ११६ ॥

मणी मजपासी देतां । प्रत्यक्ष भेटलीसे सीता । ऐसा आल्हाद श्रीरघुनाथा । हनुमंता आलिंगी ॥ ११७ ॥

आलिंगुनी हनुमंता । पुढें काय वदली सीता । तें तें सांग समूळ वार्ता । पुसे सादरता श्रीराम ॥ ११८ ॥

ऐसें पुसतां रघुनंदन । हनुमान घाली लोटांगण । पुढील सीता अनुवादन । वाची लक्ष्मण ब्रह्मलिखित ॥ ११९ ॥

समुद्रलंघनीं दिसे अभावो । स्वयें सीतेसी अति संदेहो । तोचि हनुमंताची पहा हो । स्वयें स्वमेव पूसत ॥ १२० ॥

> अयं च वीर संदेहस्तिष्ठतीव ममाग्रतः । कथं नु खलु दुष्पारं तरिष्यंति महोदधिम् ॥ २५ ॥
> तानि हर्यक्षसैन्यानि तौ वा नृपवरात्मजौ । त्रयाणामेव भूतानां सागरस्यातिलंघने ॥ २६ ॥
> शक्तिः स्याद्वैनतेयस्य तव वा मारुतस्य च ॥ २७ ॥

ऐक बापा हनुमंता । माझे पोटीं परमचिंता । समुद्रलंघनीं तिघांची सत्ता । न देखे चौथा पुरुषार्थी ॥ १२१ ॥

गरुड वायो कीं हनुमंता । दुर्धर समुद्र येरां समस्तां । नरवानर श्रीरघुनाथा । केंवी येथें आतां येववे ॥ १२२ ॥

नुलंघवेगा सागर । न आणावे वानरांचा भार । येवो न सके राम सौमित्र । केंवी दशवक्त्र मारवे ॥ १२३ ॥

ऐकोनि सीतेंचे वचन । हनुमान जाला हास्यवदन । नेणसी श्रीराम महिमान । बाण [मु. 'प्रेरण'.] प्रमाण अनिवार्य ॥ १२४ ॥

श्रीरामभाता दुर्धरशर । बाणीं वाहोनि नरवानर । उतरोनि परपार । निशाचर दमील ॥ १२५ ॥

निर्दळूनी निशाचर । विध्वंसोनि लंकापुर । मारोनिया दशशिर । तुझा उद्धार करील ॥ १२६ ॥

ऐसें उत्तर ऐकतां । सुखे उल्लासली सीता । वेगीं जाई बा हनुमंता । शीघ्र रघुनाथ आणावया ॥ १२७ ॥

न करितां युद्ध कंदन । न करितां राक्षसांचें दमन । न करितां लंकादहन । उगा येथोन मी न वचे ॥ १२८ ॥

अनुक्रमणिका

मी काय आलों नाटीकार । [मु. 'मी नेऊंतें'.] मग नेऊं उगें प्रतीउत्तर । लंके माजीं करीन क्षेत्र । दशवक्त्र गांजीन ॥ १२९ ॥

राक्षसांचे बळ किती । किती सैन्य [पै. 'संपत्ती'.] शस्त्र शक्ती । अवधी तुकीन मी मारुती । रण व्युत्पत्ती भिडोनी ॥ १३० ॥

राक्षसांसी करावया झगडा । मुख्य मूळ वन उपाडा । हनुमंत बुद्धीवंत गाढा । केलें पुढां तें ऐका ॥ १३१ ॥

ऐसें विचारी जव आपण । सीता म्हणे करी गमन । हनुमान घाली खालती मान । लज्ञायमान बोलेना ॥ १३२ ॥

भेटावया श्रीरघुनाथा । उल्लास न देखे हनुमंता । ऐसी प्रबळ कोण चिंता । मज तत्वतां सांगावी ॥ १३३ ॥

माझे सांगतां निज वृत्तांता । तुज लागेल अतिचिंता । तुझे शोध वो न करितां । अन्न पानता मज नाहीं ॥ १३४ ॥

नाहीं अन्न नाहीं जीवन । क्षुधेनें जावों पाहे प्राण । न करवे समुद्र लंघन । अति उद्विग्न तेणें मी ॥ १३५ ॥

कपीचें वचन ऐकतां । गहिंवरें रूदन करी सीता । महा पापिणी मी तत्वतां । धाडीं हनुमंता भुकेला ॥ १३६ ॥

हें घें माझें कर कंकण । लंके माजीं जावोनि आपण । घेवोनि चतुर्विधा अन्न । करी भोजन यथेष्ट ॥ १३७ ॥

हनुमान पुसे सीतेपासी । अन्नाची चवी आहे कैंसी । सीता पुसे हनुमंतासी । तरी तुम्हांसी भक्ष काय ॥ १३८ ॥

आम्ही वानर वनचर । वनवासी निरंतर । नित्य वनफळांचा आहार । अन्न मात्र स्पर्शेना ॥ १३९ ॥

माझें मोडोनि कंकण । लंके माजीं फळें संपूर्ण । आवडे तें घेवोनि आपण । फळ भोजन करी बापा ॥ १४० ॥

ऐक वो माते माझें शीळ । मी तंव स्वयंपाकी केवळ । ज्यासी मनुष्याचा विटाळ । तें मज फळ अपवित्र ॥ १४१ ॥

हाटवटीचें विक्रीत अन्न । जेंवी न घेती सुब्राह्मण । तैशींच फळ विक्रीत जाण । मज लागून अपवित्र ॥ १४२ ॥

ऐकोनि कपीच्या वृत्तांता । साशंकित जाली सीता । हनुमंतासी आहारार्था । काय म्यां आता [कं. मुं. अं. मु. 'अर्पावें'.] करावें ॥ १४३ ॥

अनुक्रमणिका

याचि अशोक वना आंत । फळें आहेत अत्यद्भुत । यांसी लावितांचि हात । करतील घात राक्षस ॥ १४४ ॥

कपि तुझा करितां घात । तोचि माझाही प्राणांत । साधला प्रयत्न होईल व्यर्थ । स्वामी कार्यार्थ नासेल ॥ १४५ ॥

हनुमान म्हणे असो वृत्तांत । जाईन भुकेला कुंथत । क्षुधा नव्हे हा कल्पांत । आला प्राणांत मज लागीं ॥ १४६ ॥

बोलतां बोलतां गेला चाचरीं । मूर्च्छित पडला धरणीवरी ।
दोहीं डोळां लाविली चंद्री । सीता सुंदरी गजबजली ॥ १४७ ॥

थापटोनिया हनुमंता । स्वयें सावध करी सीता । कोणासही कळों न देतां । गुप्त आहारार्था तूं सेवी ॥ १४८ ॥

जोवरी होय क्षुधा हरण । पडली फळें खावीं आपण । घालितें श्रीरामाची आण । फळें तोडोनि न खावीं ॥ १४९ ॥

ऐकोनि सीतेचिया वचनासी । हनुमान खाजवी दोन्ही कुसी ।
मग आला वनवृक्षांपासीं । निजमानसीं विचारी ॥ १५० ॥

सीता वचन आणि प्रमाण । पाळोनि श्रीरामाची आण । वृक्ष उपडोन झोडीन । फळें खाईन पडलीं तें ॥ १५१ ॥

ऐकोनि हनुमंताचे वृत्त । श्रीराम गदगदां हांसत । सुग्रीवादि कपि समस्त । स्वयें हांसत सौमित्र ॥ १५२ ॥

श्रीराम म्हणे गा सौमित्रा । कपीने दमिले निशाचरां । लंकेमाजीं केले क्षेत्रा । त्या ब्रह्मपत्रा वाची वेगें ॥ १५३ ॥

कैसें विध्वंसिलें वन । कैसें केलें राक्षस कंदन । इंद्रजित गांजिला दशानन । ब्रह्मलेखन तें वाचीं ॥ १५४ ॥

एका जनार्दना शरण । हनुमंताचे लंकादहन । श्रोता श्रीराम सावधान । वक्ता लक्ष्मण ते ऐका ॥ १५५ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां हनुमंतप्रतापब्रह्मलेखनपत्रविवरणं नाम एकोनत्रिंशतितमप्रसंगः ॥

## प्रसंग तिसावा

## ब्रह्म लिखित असाळी वध

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

हनुमंताचे युद्धकंदन । मुख्यत्वें वन विध्वंसन । घेवोनि सीता आज्ञापन । फळ भोजन मांडिलें ॥ १ ॥

जंव होय क्षुधा हरण । पडलीं फळें खावीं वेचून । घातली श्रीरामाची आण । फळें तोडून न खावीं ॥ २ ॥

जानकी आज्ञा वंदोनि शिरीं । वनाची करावया बोहरी । हनुमान जावोनियां दूरीं । फळहारीं बैसला ॥ ३ ॥

काळाग्नी आव्हानूनी जठरीं । मग बैसला फळाहारीं । वना आली महामारी । वन संहारीं कपिपुच्छ ॥ ४ ॥

सीतेची आज्ञा प्रमाण । घातली श्रीरामाची आण । पुच्छें वृक्ष उपडोन । तळीं झाडोन फळें खाये ॥ ५ ॥

पहिलें साखरेचें टेक । स्वयें सेवी पित्तशामक । वृक्ष उपाडा फळें अनेक । भक्षोनि वृक्ष झुगारी ॥ ६ ॥

हनुमान आपोशन न मोडी । बैसली बैसका न सोडी । पूंस पुरवी नाना परवडी । वन उपाडी समूळ ॥ ७ ॥

कपि भोजन धर्मस्थिती । पहिलें द्विजा द्यावी तृप्ती । ते बैसविले दोहीं पंक्ती । अति प्रीती फळें अर्पी ॥ ८ ॥

द्विज शेष सेवी हनुमंत । तेणें होवोनि नित्य तृप्त । धालेपणाचे ढेंकर देत । वन विघात कपिपुच्छ ॥ ९ ॥

अनुसंधाना वांचून । हनुमान नेघे अवदान । वनफळाचें भाग्यगहन । ब्रह्मार्पण कपिमुखे ॥ १० ॥

पिकलीं फळें रामार्पण । जारसी करी कृष्णार्पण । हिरवी करी ब्रह्मार्पण । सावधान प्रति ग्रासी ॥ ११ ॥

फळें खात गटगटां । मिटक्या देत मटमटां । वांकुल्या दावी सुर श्रेष्ठां । दावी अंगोठा दैत्यासी ॥ १२ ॥

पिकली खाय आवडी करी । हिरवी तोंड पालटावारी । पिंपल्या मिरे [मु. 'कोशिंबिरी'.] घोष मंजरी । लोणच्या वारी खातसे ॥ १३ ॥

अलवणता वाटे ज्यासी । सामुद्रिक मेळवी त्यासी । पुच्छ विध्वंसी वनासी । वृक्ष चौपासी उपडोनि ॥ १४ ॥

ताळ तमाळ वृक्ष सरळी । खर्जुरी पोफळी नारिकेळी । उपडोनि करी वडवाळी । रणकल्लोळी हाणावया ॥ १५ ॥

राक्षस सैन्य आतुर्बळी । रणीं करितां रवंदळी । हाणावया हातातळीं । करी वडवाळी वृक्षांच्या ॥ १६ ॥

अनुक्रमणिका

युद्ध होईल निश्चित । ऐसें जाणोनि हनुमंत । शिळा पाषाण वृक्ष पर्वत । आणिले तेथे युद्धार्थी ॥ १७ ॥

वृक्ष उपडितां कपींद्रें । जागी जालीं बनकरें । म्हणती मारा रे मारा रे । वन वानरे भंगिलें ॥ १८ ॥

बोंब उठली एकसरी । वन भंगिलें चौफेरीं । शस्त्र घेवोनि बनकरीं । वानरावरी लोटलें ॥ १९ ॥

एक तळपती वोडणखांडें । एक विंधिती लक्षोनि कांडें । एक हाणती गोफणगुंडे । एक ते धोंडे टाकिती ॥ २० ॥

वन उपडिलें माकडें । सांगतां राजा मानील कुडे । यासी धरावें रोकडें । रावणापुढें न्यावया ॥ २१ ॥

पूंस लांबवावे विशेख । टपोनि धरा म्हणती एक । एक म्हणती अवश्यक । घालूनी सडक धरूं यासी ॥ २२ ॥

ऐसी बनकरांची मात । ऐकोनियां हनुमंत । त्यांचा करावया घात । मग कृतांत खवळला ॥ २३ ॥

हाणतां पुच्छाचा पैं साट । त्यांचीं शस्त्रें करोनि पीठ । अवघे कवळोनि एकवाट । बांधे मोट बनकरांची ॥ २४ ॥

चौदा सहस्त्र बनकरां । पुच्छें बांधोनियां भारा । निक्षेपिलें पैं सागरा । मच्छ मगरां आहारार्थ ॥ २५ ॥

राक्षसी आटिती सीतेसी । तुवां संवाद केला जयासी । तेणें मारोनि बनकरांसी । केला वनासीं विध्वंस ॥ २६ ॥

द्वंद्वा पिटविला वानरू । तुज धरूं चिरूं मारूं । तुझ्या रक्तांचा घोट भरूं । गटका करूं सगळाचि ॥ २७ ॥

सीता गांजितां सुंदरी । हनुमान गुरगुरी तयांवरी । भेणें पळाल्या निशाचरी । आपांपरी ते ऐका ॥ २८ ॥

एकी सुटलें अधोवात । एकी फळफळां मुतत । एकी चळचळां कांपत । मूर्च्छागत पै एकी ॥ २९ ॥

भेणें पळाली देहस्मृती । नेसणीं गळालीं नाठवे चित्ती । नागव्या येवोनि रावणाप्रती । मग सांगती वन बोंब ॥ ३० ॥

कैंचें नेणों आलें वानर । वन विध्वंसिलें परिकर । चौदा सहस्त्र बनकर । पुच्छें समग्र मारिले ॥ ३१ ॥

भरवशांचे निधडे वीर । ऐंशी सहस्त्र किंकर । रावणें धाडिले सत्वर । आणावा वानर बांधोनी ॥ ३२ ॥

रणीं रगडोनि मारावी धूर । ऐसें ऐंशी सहस्त्र किंकर । शस्त्रें वर्षतीं [मु. 'अपार'; कं. 'सभार'.] शरधार । शरीं वानर बूजिला ॥ ३३ ॥

अनुक्रमणिका

हनुमान विचारी पोटांत । मज न रूपतीं शस्त्रघात । साहोन पाहों शस्त्र संपात । काय समस्त करतील ॥ ३४ ॥

हनुमान निश्चळ शस्त्रांतळीं । तंव किंकरीं पिटिली टाळी ।
वानरू केला रणरांगोळी । आम्ही महाबळें रणमारें ॥ ३५ ॥

घायीं तुटला निवटला । बाणीं तिळप्राय केला । ऐकोनि किंकरांचिया बोला । कपि कोपला रणरंगें ॥ ३६ ॥

कपि पुच्छासी सांगे गोष्टी । आजि निर्दाळूं राक्षस कोटी । हाणितां पुच्छाचिया आघाटी । जीवा साटीं किंकरां ॥ ३७ ॥

लागतां पुच्छाचा आघात । त्यांच्या शस्त्रां करोनि भस्मांत ।
किंकर मारिलें समस्त । कपि गर्जत जयरामें ॥ ३८ ॥

मी तंव श्रीरामाचा दूत । सीता शुद्धीसी आलों हनुमंत । सीता सांपडली येथ । आला अंत राक्षसां ॥ ३९ ॥

राक्षसा करोनि रगडा । झाडीन इंद्रजिताचा पादाडा । रावण गांजोनियां गाढा । राम रोकडा आणीन ॥ ४० ॥

ऐकतां हनुमंताची मात । बोंब उठली लंकेआंत । ऐकोनि किंकरांचा घात । लंकानाथ दचकला ॥ ४१ ॥

प्रहस्तसुत अतुर्बळी । रागें धाडिला जंबुमाळी । कपि बांधोनि गळसमेळीं । मजजवळी आणावा ॥ ४२ ॥

जरी येसी कपि न मारून । तरी तुझें मस्तका मूतें वपन । शेखीं नासिक छेदीन । खरारोहण विटंब ॥ ४३ ॥

जंबुमाळी क्रोधायमान । वर्षला शरधारा दारुण । पृथ्वी आकाश व्यापून । शरीं संपूर्ण कोंदलें ॥ ४४ ॥

माझिया आंगीं बाण रुपती । शंका न मानीच मारुती । रामनामाच्या आवृत्ती । निशंकस्थिती विचरत ॥ ४५ ॥

पंचक्रोश शिळाप्रचंड । वानरें हाणितली वितंड । जंबु धनुर्वाडा अखंड । केली शतखंड बाणें एकें ॥ ४६ ॥

कपि हाणितां वृक्ष घाय । तोही केला तिळप्राय । हनुमान म्हणे धन्य माय । योद्धा होय जगजेठी ॥ ४७ ॥

माझे शिळाघात वृक्षसमेळीं । [पै. 'राक्षस निमे'.] निवारोनि महाबळी । योद्धा होय राक्षस कुळीं । जंबुमाळी महावीर ॥ ४८ ॥

अर्धचंद्र बाण समेळीं । कंपीद्र विंधिला कपाळीं । बाण हिसळोनि ते काळीं । लागला निढळीं जंबूच्या ॥ ४९ ॥

अनुक्रमणिका

लागतां बाणाचा आघात । जंबुमाळी पडे मूर्च्छित । हनुमान गदागदां हांसत । विपरितार्थ येथें जाला ॥ ५० ॥

मज न रूपती तुझे बाण । तुझाचि घेवों पाहती प्राण । आतां कायसे रे रण । जाय परतोन मी न मारी ॥ ५१ ॥

ऐकोनि कपीचें वचन । जंबु विचारी आपण । परतलियां दंडील रावण । करुं निर्वाण युद्ध यासीं ॥ ५२ ॥

वनचांमुडावरददत्त । परिघ [मु. 'टाकिला'.] काढिला घंटायुक्त । करावया हनुमंताचा घात । रागें सोडित राक्षस ॥ ५३ ॥

माझे परिघाचा घात । आजि निमाला हनुमंत । कैसेनि राखेल रघुनाथ । रण पुरुषार्थ पाहों याचा ॥ ५४ ॥

परिघ येतां आंगापासीं । हनुमान उडाला आकाशीं । वरद सामर्थ्यशक्ती कैसी । लावी कपि पाठीसी परिघ ॥ ५५ ॥

सवेग जातां हनुमंतासी । परिघ न संडी पाठिलागासी ।
विस्मयो करी कपि मानसीं । शस्त्राची ऐसी निजशक्ती ॥ ५६ ॥

विचारीं पडतां वानर । स्वर्गीं उठिला हाहाकार । परिघ सुटला दुर्धर । आजि कपींद्र वांचेना ॥ ५७ ॥

ऐशा ऐकतां गोष्टी । परिघ येतां देखोनि [पै. तु. दै. 'दृष्टी'.] पाठी । कपिपुच्छें घातली आठी । चेपिले घांटी देवतेची ॥ ५८ ॥

देवता म्हणे श्रीरामभक्ता । तुज मी शरण आले आतां । शस्त्रदेवता समस्ता । शरणगता तुज होती ॥ ५९ ॥

शस्त्र शक्ती भूतशक्ती । मंत्र यंत्र तंत्र शक्ती । अवघ्या तुज शरणा येती । मज मारुती वांचविल्या ॥ ६० ॥

सोडोनि पुच्छाचें बंधन । शस्त्र देवता वांचवून । शक्तिमंडळा लोटांगण । घाली आपण हनुमंत ॥ ६१ ॥

मारुं नये शरणागता । वांचविली शस्त्रदेवता । भूतीं देखोनि रघुनाथा । शक्ति समस्तां वंदिल्या ॥ ६२ ॥

उदो म्हणोनि समस्त शक्ती । हनुमंताते ओंवाळिती ।
राक्षसां विमुख आम्ही समस्ती । साह्य युद्धार्थी श्रीराम ॥ ६३ ॥

सीता आमुची आदिशक्ती । तिसी गांजितो लंकापती ।
रणीं राक्षसां लावोनि ख्याती । आम्ही युद्धार्थीं तुजसाह्य ॥ ६४ ॥

हनुमान म्हणे पुच्छा जगजेठी । युद्धीं माझी राखोनि पाठी ।

अनुक्रमणिका

साह्य शक्ती कोट्यानुकोटी । पुच्छासाठीं मज जाल्या ॥ ६५ ॥

करोनि पुच्छाची पैं स्तुती । युद्धा परतला मारुती । परिघ देखोनि त्याचे हातीं । जंबूचे चित्ती चळकांप ॥ ६६ ॥

माझा परिघ हा तत्वतां । गेला हनुमंताचे हातां । रावणाचिया अधर्मता । शस्त्र देवता क्षोभलिया ॥ ६७ ॥

ऐसे जंबु जंव विचारी । तंव परिघ वाजला शिरीं । रथ सारथीची चकचुरी । जंबुही उरीनुरेचि ॥ ६८ ॥

रथ वारु ना सारथी । ना तें शिर ना अस्थी । पाहतां त्याची न दिसे व्यक्ती । नेलें अव्यक्तीं वानरें ॥ ६९ ॥

हनुमंतें जंबुमाळी । घायें केली रवंदळी । बोंब गेली रावणाजवळी । क्रोधानळीं भयभीत ॥ ७० ॥

मारावया पैं वानर । प्रधानपुत्र शतसहस्त्र । रागें धाडी दशशिर । महावीर रणयोद्धे ॥ ७१ ॥

ध्वजपताका [मु. 'रण'.] रथ प्रयुक्ती । पुढें वाजंत्रें वाजतीं । मागें माता शंख करिती । पुत्र संतती निमाली ॥ ७२ ॥

प्रधानपुत्र गजभारीं । येतां देखोनि गजरी । हनुमान गर्जे भुभुःकारी । पुच्छ अंबरीं तळपत ॥ ७३ ॥

पुच्छें कवळोनि समस्त । हनुमान करी पर्वतघात । घायें निमाले समस्त । जाला प्राणांत समकाळें ॥ ७४ ॥

प्रधान पुत्रां केला घात । ऐकोनि धाके लंकानाथ । अतुर्बळी हा हनुमंत । काळ कृतांत रणमारे ॥ ७५ ॥

रावण पडिला चिंतावर्ती । रणीं नाटोपे मारुती । वीर मारोनि भद्रजाती । लाविली ख्याती राक्षसां ॥ ७६ ॥

रण कर्कश रण रगडे । पांच सेनानी निधडे । कपीसी मारावया रोकडे । धाडी वेगाढे युद्धासीं ॥ ७७ ॥

चौघे राहोनि चहूं दिशांसी । एक राहोनि आकाशीं । मारावया हनुमंतासी । विकट विन्यासीं विंधिती ॥ ७८ ॥

कपिपुंच्छ महाबळी । त्यांचे शस्त्रा करोनि होळी । पांच जणांतें आकळी । पुच्छ समेळीं कवळोन ॥ ७९ ॥

स्वयें योगिया आपण । जेंवी निरोधी पंचप्राण । तेंवी कपिपुच्छें पांचजण । आकळोन राखिले ॥ ८० ॥

विवेक वैराग्यसंपन्न । पंचविषया करी दमन । तेंवी कपिपुच्छें पांचैजण । निर्बंधून राखिले ॥ ८१ ॥

पंच भूतांची निवृत्ती । केलिया सुख पावे परमार्थी । पांचै मारोनि पर्वत घातीं । सुखें मारुती सुखावे ॥ ८२ ॥

अनुक्रमणिका

एकेचि घायें कपि आपण । घेतला पांचांचाही प्राण । ऐकोनि दचकला रावण । सेना प्रधान कांपती ॥ ८३ ॥

रावणा कोप आला दुर्धर । रणीं मारावया वानर । स्वयें धाडिला अखयाकुमर । रण चतुर दिव्य मारें ॥ ८४ ॥

अखया जाणे रण कंदनार्थ । शस्त्रीं अस्त्रीं अतर्क्य घात । निरालंबीं चढवोनी रथ । मारी हनुमंत साटोपें ॥ ८५ ॥

आज्ञा देतां दशानन । अखया आला अशोकवन । तुरें वाजती निशाण । रथछत्रसेनागजदळें ॥ ८६ ॥

अखया शर संपातीं । रणीं आच्छादिला मारुती । वीर सिंह नाद करिती । मारिला म्हणती वानर ॥ ८७ ॥

अखया विजयाची नवाई । वाजंत्र्यांची लागली एकचि घायी । हनुमंतें तिये समयीं । केले कायी तें ऐका ॥ ८८ ॥

भोवतां पुच्छाचा पैं साट । त्यांची शस्त्रें करोनि पीठ । सैन्य मारिलें समसगट । अखया उद्भट त्रासिला ॥ ८९ ॥

पुच्छें आकळितां अखयासी । रथ उडविला आकाशीं । धरितां न धरवे हनुमंतासी । लघु लाघवेसीं [पै. 'निघाला'.] तळपत ॥ ९० ॥

हनुमान अखया दोघे वीर । युद्ध करिती निराधार । विस्मयो करिती सुरवर । चक्राकार परिभ्रमती ॥ ९१ ॥

क्षणैक क्षितीं क्षणैक अंबरी । क्षणैक रथ दिसे सागरीं । क्षणैक दिसे त्रिकूटावरी । अखया भारी लाघवी ॥ ९२ ॥

पुच्छ कोपोनि लागे पाठी । रथ पळवितां दिग्पुटीं । पुच्छें बांधोनि कडकडाटीं । रागें आपटी भूतळीं ॥ ९३ ॥

रथा अपटितांचि क्षिती । वोडण खांडे घेवोनि हातीं । अखया उसळोनि लघुगती । मारूं मारुती धांविन्नला ॥ ९४ ॥

मारावया हनुमंत । वोडण खांडेसीं तळपत । कपीचा करावया घात । गगना आंत उसळला ॥ ९५ ॥

अखया उडतां आकाशीं । हनुमंतें धरिला पायांसी । गरागरां भोवंडितां त्यासी । देह भावासी विसरला ॥ ९६ ॥

खर्ग पडिलें मातेचे वाडा । मुकुट पडिला रावणापुढां । वोडण पडिलें लंकेच्या कडां । केला नितोडा बळांचा ॥ ९७ ॥

अनुक्रमणिका

आपटितांचि शिळा तळीं । निधा उठिला पाताळीं । दिग्गजांची बैसलीं टाळीं । जाली रांगोळी हाडांची ॥ ९८ ॥

करितां अखयाची समाप्ती । हनुमंताची अगाध कीर्ती । स्वर्गीं सुरवर वानिती । वानिती क्षितीं ऋषीश्वर ॥ ९९ ॥

मुकुट पडतांचि पुढें । वार्ता ऐकतां रावण रडे । म्हणे म्यांच केलें कुडें । पुत्र कां पुढें धाडिला ॥ १०० ॥

वानरें अखया पाडिला रणीं । बोंब आली वनींहूनी । रावण धुळी घाली वदनीं । पडिला धरणी मूर्च्छित ॥ १०१ ॥

पुत्र शोकें कंपायमान । क्रोधें जाला सावधान । माझें जें कां अशोकवन । शोकस्थान तें झालें ॥ १०२ ॥

रणीं मर्दिलें वानरें । वीरीं घेतलें घायवारें । अखयाचेनि कैवारें । धाडावया दिसेना ॥ १०३ ॥

घ्यावया अखयाचिया सूडासी । करावया युद्ध वानरेसी । मीच जाईन वनासी । कास सरिसी घेतली ॥ १०४ ॥

मियां मारलिया तो वानर । स्वस्थ होईल लंकापूर । वानरें मारलिया दशशिर । सीता सुंदर निर्मुक्त ॥ १०५ ॥

ऐसा करोनि विचार । युद्धा निघाला दशशिर । तंव वेगें धांविला जेष्ठ कुमर । महावीर इंद्रजित ॥ १०६ ॥

म्हणे एकलें वनचर । केवळ जें कां पालेखाईर । त्यावरी जाणें लंकेश्वर । श्रेष्ठ विचार हा नव्हे ॥ १०७ ॥

वीरीं घेतला रणधांक । म्हणोनि जाणें दशमुख । मी तंव घरगुती सेवक । अवश्यक मज धाडी ॥ १०८ ॥

वाहतों सदाशिवाची आण । शिवतों स्वामी तुझे चरण । वानरा रणीं न मारून । गळां बांधोन आणीन ॥ १०९ ॥

निराहारी ब्रह्मचारी । तो इंद्रजितातें मारीं । इंद्रजित न मरे कपिकरीं । हा फळाहारी येथेष्ट ॥ ११० ॥

ऐसें विचारोनि रावण । इंद्रजितासी दिधलें आज्ञापन । रणीं वानरां गांजून । गळां बांधोन आणावें ॥ १११ ॥

इंद्रजित युद्धा निघतां बळी । निशाण त्राहाटिले तें काळी । कंगल टोप रागावळी । केली आरोळी महावीरीं ॥

शाऐंसीं प्रयुत मत्तहस्ती । कोट्यानुकोटी महारथी । असिवार नेणों किती । वीर पदाती असंख्यात ॥ ११३ ॥

अनुक्रमणिका

वीरां कवचें रत्न खचित । शस्त्रें सैन्य लखलखीत । पाखरां तेजीं झळकत । वीर गर्जत सिंह नादें ॥ ११४ ॥

तडक फुटलें एकसरें । भिंडीमाळाचें पांगोरें । खाखायिलीं रणतुरें । निज गजरें चालिलें ॥ ११५ ॥

इंद्रजित निघतां उल्हासीं । नग्न कुमारी शिंके पाठीसीं । आशंका पडली इंद्रजितासीं । रावणासी चळकांप ॥

चिन्ह पुसतां ब्रह्मयासी । भविष्य कळलें तयासी । तोही तैसेंचि सांगे त्यासी । अति गुह्यासी गुह्योक्ती ॥ ११७ ॥

युद्ध करितां वानरांसीं । अपेश यशीं यश अपेशीं । इंद्रजित बांधोनि कपीसी । तुज पासी आणील ॥ ११८ ॥

ऐकोनि ब्रह्मयाचें वचन । जयजयकार स्वयें गर्जोन । इंद्रजितें केलें [मु. ‘नमन’.] गमन । पुढील कथन अवधारा ॥ ११९ ॥

येतां देखोनि इंद्रजित । आनंदे नाचे हनुमंत । पुरवावया युद्ध मनोरथ । श्रीरघुनाथ तुष्टला ॥ १२० ॥

पुच्छ नाचवीत रणीं । चौफेरेसीं सैन्य आकळोनी । रणीं मारोनि वीर श्रेणी । रुधिर धरणीं न्हाणीन ॥ १२१ ॥

कपिपुच्छ विचक्षण । भूतां दिधले निमंत्रण । मांस भक्षण रुधिरपान । रण भोजन करावें ॥ १२२ ॥

वधोनि राक्षसांचिया कोडी । ज्याचे पोटीं जे आवडी । ते तें पुरवीन परवडी । वाढावाडी रणमारें ॥ १२३ ॥

आतांचि हे भाजी भाकरी । तुम्हीं करावी न्याहारीं । पुढे श्रीराम केसरीं । पंचधारीं निववील ॥ १२४ ॥

इंद्रजित येतां [मु. ‘सहदळी’.] संवदळी । पुढें धाविन्नली असाळी । जेणें मारिला अखयाबळी । त्याची होळी मी करीन ॥ १२५ ॥

ठाकोनि आली अशोकवन । पुढां हनुमंतें लक्षोन । विकट वटारिलें नयन । विक्राळवदन पसरोनी ॥ १२६ ॥

एक चाभाडे भूतळीं । दुजे लाविले नभोमंडळीं । कराळ विक्राळ दांताळी । जिव्हा काळी [मु. ‘लवथवित’.] समसमीत ॥ १२७ ॥

अणुप्रमाण होवोनि तेथ । जिव्हा दांतां नातळत । वेगीं रिघाला घशांत । गेला उदरांत मारुती ॥ १२८ ॥

मुखीं रिघाला मारुती । नातळेचि जिव्हा दांतीं । असाळीं विस्मयो मानी चित्तीं । ठकिलें निश्चितीं वानरें ॥

गोड कडु कीं खारट । आंबट तिखट कीं तुरट । कांही चवी न कळें स्पष्ट । अहा कटकट राक्षसी ॥ १३० ॥

अनुक्रमणिका

कपि न मरेचि माझे हातीं । वानर गेला अतर्क्य गती ।
पुढें काय करील ख्याती । जीवीं धांकती असाळी ॥ १३१ ॥

इंद्रजितासी करावया रण । हनुमंतासी आवडी पूर्ण । तिचिया उदरीं न राहे एकक्षण । केलें विंदान तें ऐका ॥

काळीज उपडोनि सदेठ । बोंबीपासी फाडोनि पोट । हनुमान रिघोनिया स्पष्ट । केला उद्भट भुभुःकार ॥ १३३ ॥

असाळियें गिळिला हनुमंत । कथा विस्तारिली लोकां आंत ।
चुकला इंद्रजिताचा अनर्थ । युद्ध कंदनार्थ सैन्याचा ॥ १३४ ॥

पूर्वींच गिळिती वानर । तरी कां मरता अखयाकुमर । बनकर किंकर प्रधानपुत्र । जंबुवीर वांचता ॥ १३५ ॥

रावणा हरिखें सांगे दूत । असाळिये गिळिला हनुमंत ।
सवेंच दुसरी बोंब सांगत । केला निःपात असाळीचा ॥ १३६ ॥

क्रौंचा मारिली पडलंका । विटंबिली शूर्पणखा । आतां मारिली असाळिका । कोण कोण दुःखा मी सोसूं ॥ १३७ ॥

जो रिघोनि उदरां आंत । करी राक्षसीचा निःपात । तो इंद्रजिताचा करील घात । चळी कांपत रावण ॥ १३८ ॥

एका जनार्दना शरण । जाहलें असाळी निर्दळण । पुढे इंद्रजित हनुमद्रण । सावधान अवधारा ॥ १३९ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखिते असाळीवधो नाम त्रिंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग एकतिसावा

## इंद्रजित अपमान तत्सैन्य निर्दलन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

इंद्रजित [कं. तु. 'निधानासी'; दै. 'निघावयासी'; मु. 'निघतां आवेशीं'.] युद्धनिधानापासी । असाळी उठली विवंसी । श्रीरामें निरसिले तिसीं । अति उल्हासी हनुमंत ॥ १ ॥

गजदळेसी अति उन्नद्ध । सैन्य देखोनि सन्नद्ध । हनुमंतासी अति आल्हाद । राम गोविंद तुष्टला ॥ २ ॥

राक्षस मारावया अत्यद्भुत । वन उपाड हें सुमुहूर्त । इंद्रजित गांजोनिया येथ । गर्वहत करीन ॥ ३ ॥

माझे पुरवावया मनोरथ । आजि तुष्टला श्रीरघुनाथ । इंद्रजित आला सैन्य समवेत । हनुमान नाचत स्वानंदे ॥ ४ ॥

पुच्छ नाचत पैं रणीं । मारोनिया वीर श्रेणी । पूजूं चामुंडा चवंडायणी । भूतां देऊं धणी मांसाची ॥ ५ ॥

अखयाकुमराची बोहणी । प्रथम केली म्यां रणांगणीं । येथोनि वीरांचिया श्रेणी । मारीन रणीं रणमारें ॥ ६ ॥

हनुमान पुच्छासी करी एकांत । जो जो आला रणाआंत । परतों ने द्यावे नगरा आंत । करावा घात अवघ्यांचा ॥ ७ ॥

जो जो येईल शरण । त्यासी येवों न द्यावें मरण । याचि नांवें दादुलेपण । येरां मर्दन रणमारें ॥ ८ ॥

पुन्हा आलिंगोनि पोटीं । हनुमंताची गोड गोष्टी । पुच्छें कवळोनि [मु. 'सैन्यसकटी'.] सैन्यसंकटी । राक्षस कोटी मारीन ॥ ९ ॥

स्वामिवचन मानोनि शिरीं । पुच्छ रक्षण लंकाद्वारीं । मागें परतलिया निशाचरीं । महामारी मारावया ॥ १० ॥

कपिपुच्छ संवादमेळीं । करावी वीरां रणरांगोळी । युद्धानंदें पिटीन टाळी । आतुर्बळी खवळलें ॥ ११ ॥

ऐकोनि कपिपुच्छ संवाद । वानरां वाढिवेचा आल्हाद । ऐकावया हनुमंत युद्ध । अति सावध स्वानंदें ॥ १२ ॥

सुग्रीवें उठोनि आपण । धरिले लक्ष्मणाचे चरण । इंद्रजित हनुमंतांचें रण । सांग संपूर्ण वाचावें ॥ १३ ॥

उगे रहावया अवघेजण । घातली श्रीरामाची आण । वानर वीर सावधान । हनुमद्रण परिसावया ॥ १४ ॥

अनुक्रमणिका

परिसावया युद्ध उद्भट । टंवकारोनि नेत्रवाट । वळोनि पुच्छाचा पैं साट । वीर मर्कट सावध ॥ १५ ॥

कैसें पत्र वाचील पुढें । लक्ष्मणाचिया तोंडाकडे । पाहात ठेली पैं माकडें । युद्धचाडें श्रवणार्थ ॥ १६ ॥

परिसावया कपि पुरुषार्थ । अति उल्हासला श्रीरघुनाथ । लक्ष्मण वाची ब्रह्मलिखितार्थ । युद्धकंदनार्थ कपीचा ॥ १७ ॥

ऐसें ऐकतां वानरीं सकळीं । हर्षानंदें पिटिली टाळी । जें आमचे हृदयकमळीं । तेंचि [मु. 'सुखमेळीं'.] मुखमेळीं रामाचिया ॥ १८ ॥

ऐसियापरी वानरगण । ऐकावया हनुमद्रण । अवघे बैसले सावधान । पत्र वाचणें सौमित्रा ॥ १९ ॥

ऐकोनि असाळीचा घात । कोपें खवळला इंद्रजित । कपीचा करावया घात । रथ त्वरित पेलिला ॥ २० ॥

तडक फुटलें अति दुर्धर । निशाणें भेरी [मु. 'शृंगाकार'.] शृंगेंश्वर । इंद्रजित आला गडगजर । रणतुरें वाजतीं ॥ २१ ॥

एकलें एक पैं वानर । यावरी येतां असंख्य भार । चळी कांपती महाशूर । दुर्धर मार कपीचा ॥ २२ ॥

जाणोनि सैन्याचा वृत्तांत । इंद्रजितें रथ प्रेरिला त्वरित । पुढें लक्षोनि हनुमंत । शर वर्षत पैं आला ॥ २३ ॥

धनुष्याचा करितां टणत्कार । दुमदुमिलें गिरिकंदर । नादें कोंदलें अंबर । वीर दुर्धर इंद्रजित ॥ २४ ॥

कपीनें करितां भुभुःकार । खळबळिले सप्तसागर । ध्यानी दचकला पंचवक्त्र । सुरासुर कांपती ॥ २५ ॥

नक्षत्रें तुटोनि पडतीं तळीं । तेचि रणरंगी रांगोळी । भूतें कापती कपि आरोळी । भद्रकाळी आश्वासी ॥ २६ ॥

याचिया रणमारा आंत । अति कृपाळु हनुमंत । [मु. मेदमांसे'; तु. दै. 'मेदमांसें'.] मदेंमांसें करील तृप्त । भय निश्चित तुम्हां नाहीं ॥ २७ ॥

ऐकतां कपि गिरागजर । मरणोन्मुख निशाचर । खळबळिलें रथकुंजर । निधडे वीर कांपती ॥ २८ ॥

इंद्रजितें युद्धाचे कडाडी । रथ प्रेरिला लवडसवडीं । कपि पुच्छाची उभवोन गुडी । नाचे आवडीं रणमारा ॥ २९ ॥

एक रावण राजकुमर । दुजा रामदूत वानर । एक राक्षसी राक्षसेंद्र । दुजा कपींद्र कपिकुळी ॥ ३० ॥

दोघे वीर अति प्रबळ । समान बळ समान शीळ । दोघे संग्राम कुशळ । दोघे चपळ रणमारा ॥ ३१ ॥

अनुक्रमणिका

दोघे भिडतां महावीर । पाहूं आले सुरवर । सिद्ध गंधर्व विद्याधर । [मु. 'नाग किन्नर'.] नरकिन्नर ऋषीश्वर ॥ ३२ ॥

सावित्रीसहित चतुर्मुख । उमेसहित पंचमुख । शक्तीसहित षण्मुख । आला [कं. तु. दै. तं. 'देवमुख'; मु. 'देवमुख्य'.] देख हव्यवाट् ॥ ३३ ॥

शचीसहित सुरेंद्र । विकटेसहित वीरभद्र । सिद्धिबुद्धिसीं गणेंद्र । युद्धीं कपींद्र पाहूं आले ॥ ३४ ॥

दोघे खवळले महावीर । काळकृतांत अति दुर्धर । दोघे जैसे काळाग्नि रुद्र । युद्धासत्वर मिसळले ॥ ३५ ॥

एक [मु. 'त्रिपुर'.] जालंधर एक शंकर । एक मदन एक शंबर । अनिरुद्ध बाणासुर । जेंवी सूकर हिरण्याक्ष ॥ ३६ ॥

एक गज एक केसरी । एक सर्प एक सर्पारी । वृत्र आणि [तु. दै. वि. तं. मु. 'वज्रधारी'.] वृत्रारी । ऐसियापरी मिसळले ॥ ३७ ॥

एक मुरु एक मुरारी । एक त्रिपुर एक त्रिपुरारी । सहस्र बाहू फरशधारी । जेंवी नरहरि हिरण्यकशिपूसीं ॥ ३८ ॥

एकासीं रथाची रथगती । दुजिया निजपुच्छ सारथी । दोघे भिडती विजयार्थी । रणीं व्युत्पत्ती महामारें ॥ ३९ ॥

क्षेणेक भिडती भूतळीं । क्षणैक भिडती नभोमंडळीं । क्षणैक भिडती समुद्रजळीं । कुळाचळीं पैं दोघे ॥ ४० ॥

जैसी इंद्रजिताची गती । त्याहूनि सवेग हनुमंती । न चले शक्ती छळणोक्ती । रणीं मारुती नाटोपे ॥ ४१ ॥

इंद्रजित म्हणे दुर्धर घात । हनुमान विटावी फळें खात । कांखा पिटोनि घुलकावित । मग दावित आंगोठा ॥ ४२ ॥

इंद्रजित खवळोनि रणीं । वर्षलासे दुर्धर बाणीं । हनुमान वर्षला पाषाणीं । रणांगणीं गर्जोनियां ॥ ४३ ॥

बाणीं पाषाण करी तो कूट । पाषाणीं बाण होती पीठ । दोघांजणां समसकट । कडकडाट युद्धाचा ॥ ४४ ॥

विंधी सुवर्ण पुंखे भाळीं । वानर हाणी सबळ शिळीं । भाळीं करोनि रांगोळी । मुकुट तळीं पाडिला ॥ ४५ ॥

इंद्रजित तेव्हां मुक्तकेशी । शस्त्रें हाणी अति आवेशी । जे ते तोडोनियां पुच्छीं । इंद्रजितासी गणीना ॥ ४६ ॥

रागें हाणे चेंडूचक्रें । वानर हाणी शिळाशिखरें । सवेग हाणितां तोमरें । पर्वताग्रें टाकिलीं ॥ ४७ ॥

अनुक्रमणिका

इंद्रजित वर्षे [मु. 'चक्रकांडें'.] विचित्र कांडें । वानर वर्षे पर्वत [तु. दै. वि. 'धोंडे'.] खंडे । उडोनि हाणितां पैं खांडे । ठोकिलीं तोंडें चडकणा ॥ ४८ ॥

इंद्रजित गांजिला पुरा । मुखीं सुटल्या रुधिरधारा । मारावया पैं वानरा । निर्वाण शस्त्रा घेतलें ॥ ४९ ॥

साटोपें हाणितां शूळशक्ती । जाजावला अति पर्वती । इंद्रजित थोंटावला चित्तीं । रणीं मारुती नाटोपे ॥ ५० ॥

मंत्रादि शस्त्रें हाणितां तंवकें । वानरे ढिलाविला खडकें । फुटलें इंद्रजिताचें धैर्यमडकें । पडिलें अटकें पुच्छाचें ॥ ५१ ॥

इंद्रजिताची रणव्युत्पत्ती । फावलिया रणीं लावावी ख्याती । नाटोपतां पळे मागुती । पुच्छाप्रती तें न चाले ॥ ५२ ॥

सैन्यासभोंवतीं चहूंकडां । पडिला पुच्छाचा पैं वेढा । सरों [तु. कं. दै. वि. मु. 'सरो नये'; तं. 'सरो न राहे'.] नेदी मागांपुढां । वानरें वेढा लाविलें ॥ ५३ ॥

मेघांकित इंद्राजितासी । पळोनि जावें मेघा पाठीसीं । कपिपुच्छ तळपे आकाशीं । पळावयासी वाट नाहीं ॥ ५४ ॥

इंद्रजित हाणी निर्वाण घात । वानर वर्षे गिरिपर्वत । सैन्यासीं चकचुरी होत । अति आकांत महावीरां ॥ ५५ ॥

बोंब सुटली सैन्याआंत । इंद्रजित मेला किंवा जीत । वानरें केला पर्वत घात । रणीं हुंबत राक्षस ॥ ५६ ॥

वानर न धरवे बळें । जरी धरावा कपटमेळें । कपट निर्दळीं लांगूळें । गुळांगुळें लाजविलें ॥ ५७ ॥

कपि नाटोपे शस्त्रघातीं । [मु. असे. . . . . गळती.] शस्त्रेंशक्ती धांके पळती । रणीं ना कळे मारुती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ ५८ ॥

न चले शस्त्रअस्त्रांची शक्ती । मागें न चलवे पुच्छ हातीं । पुढें नाटोपे मारुती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ ५९ ॥

चिंताग्रस्त देखोनि त्यातें । हनुमान म्हणे इंद्रजितातें ।
शिळाशिखरे न हाणी तूंतें । न हाणी पर्वते भाक माझी ॥ ६० ॥

इंद्रजित नामाचा बडीवार । जिहीं बाणीं त्वां जिंतिला इंद्र ।
तिहीं बाणीं दंडोनि वानर । करी गजर विजयाचा ॥ ६१ ॥

जया बाणांचि कडाडीं । देव घातले बांधवडीं । ते बाणीं मज विंधोनि प्रौढी । उभारी गुढी विजयाची ॥ ६२ ॥

अनुक्रमणिका

ऐसें बोलतां वानर । इंद्रजित कोपला दुर्धर । निर्वाण शस्त्रांचा विविध घोर । महामार मांडिला ॥ ६३ ॥

> शराणामग्रतस्तस्य पुनः समभिवर्तत । प्रसार्य हस्तौ मतिमानुत्पपातानिलोपमः ॥ १ ॥
> परस्परं दुर्विषयं बभूवतुः समागतौ मारुततुल्यविक्रमौ ।
> ततस्तु लक्ष्ये प्रतिहन्यमाने शरेष्वमोघेषु च संपतत्सु ॥ २ ॥

रणीं [तु. 'हाणावया'; मु. 'पाडिल्या'.] पाडावया मारुती । मंत्रयुक्ति शरशक्ती । इंद्रजित विंधी व्युत्पत्ती । कपि-प्रयुक्ती ते ऐका ॥ ६४ ॥

इंद्रजित विंधी मारकाशक्ती । हनुमानाचे रण व्युत्पत्ती । रामनामाचिया आवर्ती । निःशंकस्थिती वानर ॥ ६५ ॥

निर्वाणबाण वीर मोकली । हनुमान वरचेवरी झेली । पुच्छें करोनि गटांगुळी । दावी वाकुली वानरें ॥ ६६ ॥

कोपें भडका उठोनि पोटीं । इंद्रजित वर्षे बाण कोटी । हनुमान सावधान दृष्टीं । शरवृष्टी झेलिली ॥ ६७ ॥

कवळोनियां त्याचे बाण । हनुमान गगनीं उसळोन । त्याचेनि बाणें त्यासचि जाण । रणकंदन मांडिलें ॥ ६८ ॥

कपीनें करितां [तु. दै. 'विघात'.] बाणसंपात । इंद्रजित कासावीस होत । सैन्य पडिलें [तु. वि. दै. अं. तं. मु. 'बहुत'.] हुंबत । जालें विपरित संग्रामा ॥ ६९ ॥

हनुमंतेसी करितां रण । इंद्रजित भुलला संपूर्ण । आपुलें सैन्य मारी आपण । निर्वाण बाण वर्षोनी ॥ ७० ॥

धनुष्यबाण कपिपासीं । हे सामुग्री नाहीं त्यासी । [तु. दै. 'अवघी'; वि. 'युद्ध भुली'.] आलीसे भुली इंद्रजितासी । निज सैन्यासी मारित ॥ ७१ ॥

माझें निर्वाणीचें बाण । वानरें कवळोनि संपूर्ण । आमचिया बाणीं आम्हांसी जाण । रणकंदन मांडिलें ॥ ७२ ॥

माझे सुटलिया शर । भेणें पळती सुरासुर । निःशंक निधडा वानर । बाण समग्र झेलिले ॥ ७३ ॥

आमचीं शस्त्रें आम्हांवरी । परतलीसे महामारी । आतां राक्षसा कायसी उरी । कपि केसरी नाटोपे ॥ ७४ ॥

कपि पुच्छाची व्युत्पत्ती । धनुष्य भंगियले हातीं । रथ उपटितांचि क्षिती । वारू सारथी निमाले ॥ ७५ ॥

इंद्रजित उडोनि सत्वर । तेणें सांडिलां रहंवर । रणीं उठिला हाहाकार । राजकुमार मारिला ॥ ७६ ॥

रामनामाचिया निजशक्ती । निधडा निःशंक मारुती । इंद्रजितासी लाविली ख्याती । केला विरथी रणरंगीं

अनुक्रमणिका

॥

बाण मंत्रशक्तियुक्त । रणीं वानरें केले व्यर्थ । मारिला सारथी भंगिला रथ । तेणें धांकत इंद्रजित ॥ ७८ ॥

दिव्यास्त्रें एके एक । वानरें केलीं निरर्थक । इंद्रजितें घेतला धांक । जीवीं धुकधुक लागली ॥ ७९ ॥

न चले शस्त्रांची खटपट । न चले मंत्रास्त्रनेट । न चले कपिपुच्छासी कपट । रणीं उद्भट गांजिले ॥ ८० ॥

खुंटली शस्त्रास्त्रांची युक्ती । वानर विचारीत चित्तीं । [मु. दै. 'मल्लविद्येची'.] मालविद्येची व्युत्पत्ती । शरीरशक्ती पाहूं याची ॥ ८१ ॥

इंद्रजित पडला अति संकटीं । तंव वानर झोंबला कंठीं । दोघां जाली लटापटी । [पै. अ. तं. 'धष्टामुष्टी'; वि. 'द्रष्टाद्रष्टी'.] धिंगामस्ती मिसळलें ॥ ८२ ॥

उरीं शिरीं आणि कोपरीं । तडवे हाणिती परस्परीं । कळा लावोनि भुजांतरीं । हाणती उदरीं चपेट घात ॥ ८३ ॥

[वि. 'सज्ञन सेविती'; कं. 'नित्य सेविसी'; मु. 'सदा तूं सेविसी'.] सदन्न सेवी [तु. 'घृत'; दै. 'युद्ध'.] सघृत क्षीर । आतुर्बळी राजकुमार । मी वानर पालेखाईर । मजसमोर राहें पां ॥ ८४ ॥

ऐसें बोलोनि हनुमंत । मल्लव्युत्पत्ती हाणी लात । ते जंव चुकवी पिलंगत । तंव ठोकी [मु. 'तळवेनी'.] तडावेन ॥ ८५ ॥

तो जंव चुकवी आघात । तंव तळपोनियां हनुमंत । उरीं शिरीं [तु. दै. 'उदंड'; मु. 'ललाटीं'.] उलट घात । स्वयें हाणत अनुबंधें ॥ ८६ ॥

करितां मल्लविद्यामार । रणीं गांजिला निशाचर । भंवडोनिया सांडी चक्राकार । जीवें वानर न मारिच ॥ ८७ ॥

इंद्रजित रुधिर वमून । रणीं पडिला मूर्च्छापन्न । त्यासी न मारीच आपण । श्रीलक्ष्मण यासी हंता ॥ ८८ ॥

भूतळीं समस्त ऋषीश्वर । गगनीं सुरनर किन्नर । अवघे करिती जयजयकार । विजयी वानर श्रीरामें ॥ ८९ ॥

रणीं इंद्रजित मूर्च्छापन्न । स्वयें होवोनि सावधान । अतिशयेंसीं लज्ञायमान । अति उद्विग्न इंद्रजित ॥ ९० ॥

हनुमंताची धैर्यवृत्ती । हनुमंताची शौर्यशक्ती । हनुमंताची संग्रामगती । अतर्क्य स्थिती तर्केना ॥ ९१ ॥

रणीं इंद्रातें जिंकोन । पावलों इंद्रजित अभिधान । वानरेंसी करितां रण । तृणासमान मज केलें ॥ ९२ ॥

अनुक्रमणिका

मी एक गाढा वीर सृष्टीं । ऐसा फुगारा होता पोटीं । कपिपुच्छें पुरविली पाठी । तृणासाठी मज केलें ॥ ९३ ॥

जळो माझी वीर्यवृत्ती । जळो माझी शौर्यशक्ती । रणीं नाटोपे मारुती । किर्ती अपकीर्ती मज माझी ॥ ९४ ॥

कोणी एखादीही [तु. दै. 'एकी बुद्धि'.] युक्ती । न चले वानर [तु. दै. 'बाण छळणोक्ती'.] निग्रहार्थी । जळो माझी यशकीर्ती । चिंतावर्ती इंद्रजित ॥ ९५ ॥

माझिया वरदाची वरदोक्ती । मारुं न शके मज मारुती । धरोनि नेलिया रामाप्रती । विटंबिती वानर ॥ ९६ ॥

रावणें आणिलें सीतेसी । बदली मज नेईल रामापासीं । तेथें करितां अपमानासीं । वानरांसी कोण [मु. 'वारी'.] मारी ॥ ९७ ॥

रावण होवोनि भिकारी । चोरोनि आणिली सीता सुंदरी । वानरें करोनि जुंझारीं । मज निर्धारीं नेईल ॥ ९८ ॥

पूर्वीं अंगद पाळण्यासी । खेळणें बांधिलें रावणासीं । पौलस्तीनें मागतां त्यासी । अपमानेंसीं सोडिलें ॥ ९९ ॥

मुंडोनियां खांड मिशी । मसी लावोनि दशमुखांसी । पांच पाट काढोनि शिरांसीं । ऐसा लंकेसीं झुगारिला ॥

पडतां लंकेचे चौबारां । हुऱ्यो लाविला दशशिरा । कोण आवरी लहान थोरा । लंकेश्वरा अति लज्ञा ॥ १०१ ॥

मज धरोनि नेलिया पाठीं । माझीही होईल ऐसीच गोष्टी । वानर नाटोपे जगजेठी । पुच्छें पाठी पुरविली ॥

पुच्छीं बांधोनि तत्वतां । मज हनुमंतें धरोनि नेतां ।
धांवण्या कोणी न ये सर्वथा । परम चिंता इंद्रजिता ॥ १०३ ॥

अखयाचिया कैवारासी । कोणा न येववे वानरापासीं । मज बांधोनि नेतां पुच्छीं । धांके धांवण्यासी कोणी न ये ॥

ऐसा धांक घेवोनि पोटीं । रणीं वानरा देवोनि पाठी । इंद्रजित पळे उठाउठी । पुच्छासाठीं धांकोनी ॥ १०५ ॥

पळतां न पळवे पुढें । पडिलें पुच्छाचें बिरडें । तेथिलें विवरामाजीं दडे । बहु माकडें गांजिलें ॥ १०६ ॥

दुस्तर धांक घेवोनि मनीं । गुप्त विवर अशोकवनीं । इंद्रजित तेथें गेला पळोनी । अती दडोनी राहिला ॥ १०७ ॥

अनुक्रमणिका

लागों नये पळत्या पाठी । हें तंव स्वधर्म [दै. 'युक्त'; कं. 'युगायुगीं'.] युद्धगोष्टी । इंद्रजिता मारणें नाहीं पोटीं । यालागीं पाठीं न लागेचि ॥

पुच्छ म्हणे कपिनाथा । कोंडोनि राखिलें सैन्या समस्ता ।
तूं भागलासी इंद्रजित दमितां । मज युद्धार्था दे आज्ञा ॥ १०९ ॥

हनुमान म्हणे तुझेनि बळें । मियां महवीर मांडिलें खळें । आतां निर्दाळू हें दळें । रण-कल्लोळें विचारोनी ॥

मी जातें तूं घाली वैरण । ऐसें भरडूं राक्षससैन्य । डोळ जे उरती सघन । [तु. दै. 'शोधन'; कं. 'रंधन'.] रणकंदन करुं यासी ॥ १११ ॥

करावया सैन्यसंहार । कपिपुच्छासी करोनि विचार । मग दिधला भुभुःकार । राक्षस-भार खवळला ॥ ११२ ॥

अश्वैरश्वान् गजैर्नागान् योधैर्योधान् रथैरथान् । लांगूलेनाप्यनेकाश्च गजवाजिखरोष्ट्रकान् ॥ ३ ॥

येतां देखोनि हनुमंत । राक्षसवीर समस्त । होवोनिया एकभूत । शस्त्रें वर्षत समकाळें ॥ ११३ ॥

बाणीं खिळिलें पृथ्वीसी । शस्त्रें न समातीं आकाशीं । शस्त्रीं बुजिलें हनुमंतासी । वीरीं राक्षसीं गर्जोनी ॥ ११४ ॥

हनुमान युद्धीं [तु. दै. 'निष्ठुर निकट'.] निघरघंट । राक्षस हाणिती भटसुभट । हाणितां शस्त्रें होतीं पीठ । अहा कटकट राक्षसां ॥ ११५ ॥

हनुमंत निधडा वीर । साहोनि त्यांचा शस्त्रसंभार । करावया सर्व सैन्या संहार । रणीं वानर खवळला ॥ ११६ ॥

अश्वीं अश्वांतें मारीत । गजींगजां संहारित । रथीं रथाते उपटित । [कं. 'वीर निमत'.] वारुनी मत्त सारथीसीं ॥ ११७ ॥

पायींचा पायीं रगडीत । वीरें वीर पैं झोडित । ध्वज शस्त्रें छत्रें मोडित । रणीं पाडित महामारें ॥ ११८ ॥

हनुमान युद्ध करी भिन्न । पुच्छें करी भिन्नकंदन । तेंही ऐका सावधान । रणमर्दन पुच्छाचें ॥ ११९ ॥

शांयसी प्रयुतें मत्त हस्ती । पुच्छें उपटोनि मारुती । हस्तींच्या पिष्ट केल्या अस्थी । रणसमाप्ती गजदळा ॥

विदारितां कुंभस्थळा । विखरां होय गजमुक्ताफळां । त्याचि रणरंगीं रंगमाळा । अति सोहळा युद्धाचा ॥ १२१ ॥
पुच्छ रिघोनि सैन्यातळीं । महावीरां बांधोनि मोळी । उपडी त्यांसी भूतळीं । करी रांगोळी तळिलियांची ॥

अनुक्रमणिका

अश्वतर खर उष्ट्र । पुच्छीं बांधोनि अपार । तळीं उभे अश्वसंभार । घायीं चकचूर करी त्यांचा ॥ १२३ ॥

कपिपुच्छाचा महामार । रणीं उठिला हाहाकार । येरीकडे हनुमान वीर । करी रणमार तो ऐका ॥ १२४ ॥

तलेनाभ्यवधीत्कांश्चित्पद्भ्यां कांश्चित्परंतपः । मुष्टिभ्यामवधीत्कांश्चिन्नखैः कांश्चिद्व्यदारयत् ॥ ४ ॥
प्रममाथोरसा कांश्चिदुरुभ्यामपरान्कपिः । केचित्तस्यैव नादेन तत्रैव पतिता भुवि ॥ ५ ॥
विनेदुर्विस्वरान्नादान्निपेतुर्भुवि वाजिनः । भग्ननीडध्वजछत्रो भुवि कीर्णो भवद्रथः ॥ ६ ॥
सकपिर्नाशयामास राक्षसान्बलदर्पितान् ॥ ७ ॥

रागें हाणितां थापडी । वीर मारीत लक्ष कोडी । कोट्यानुकोटी पायीं रगडी । मुष्टिपडिपाडीं असंख्य ॥ १२५ ॥

बहुत चिरफाळी नखाग्रीं । एकें मारिले जानुचक्रीं । जानापाना पहुतां मारी । अर्धचंद्रीं पैं एकें ॥ १२६ ॥

आंवळोनि उरावरी । वीर मारीत शतसहस्त्रीं । तडवे हाणोनि उपराउपरीं । लक्षांतरीं मारित ॥ १२७ ॥

देतां भुभुःकार प्रबळ । रणीं उठिला हलकल्लोळ । भेणें करोनि मूत्रमळ । प्राण तत्काळ सांडिला ॥ १२८ ॥

हनुमंताचेनि गिरागजरें । आक्रंदोनि वाजीकुंजरे । रणीं निमाली अपारे । लक्षांतरें वीरश्रेणी ॥ १२९ ॥

भोंवता पुच्छाचा आवर्त । मध्यें मारितो हनुमंत । जाला सैन्याचा अंत । आला प्राणांत राक्षसां ॥ १३० ॥

पुच्छें पुरविलीसे पाठी । होवो नेदी कुटुंबभेटी । लंका पाहो नेदी दृष्टीं । जीवासाठीं राक्षसां ॥ १३१ ॥

रणीं महामारी हनुमंत । पुच्छ पळों नेदी नगरांत । जो तो लपे प्रेता आंत । मिथ्या मूर्च्छित वीरश्रेणी ॥ १३२ ॥

एक घायें घाबरली वेडी । एक नागवी उघडी । एक पडिली उपडी । मेलीं मढीं होवोनि ठेलीं ॥ १३३ ॥
[ओवी १३३ पै. अं. प्रतींत नाही.]

झाडिला इंद्रजिताचा पादाडा । केला सैन्याचा नितोडा । रामनामें हनुमान गाढा । केला झगडा निजनेटें ॥ १३४ ॥

युद्ध जालें अति कर्कशीं । रणीं निर्दाळिलें समस्तांसी । हाव न बाणे हनुमंतासी । राक्षसांसी मारित ॥ १३५ ॥

रथ भंगिले कोट्यानुकोटी । मारिल्या अश्वगजांचिया थाटी ।
छत्र भंग लोळती सृष्टीं । ध्वजा कोटी विखरल्या ॥ १३६ ॥

अनुक्रमणिका

अशुद्ध वाहत गडगडाडी । तेचि रणनदी गाढी । जाहल्या प्रेतांचिया दरडी । गजकरवडी महाग्राह ॥ १३७ ॥ [ओवी १३७ कं. प्रतीत नाही.]

तीर वाहती सपिच्छी । तेचि मासे रणनदीसी । वोडणे वाहती कासवें जैसी । सर्प सपुच्छी रणभाले ॥ १३८ ॥

मेदमांस अति दुर्गम । तोचि दोन्ही तीरीं कर्दम । विक्राळ सिसाळें विक्रम । सुसरी परम दोहीं भागीं ॥ १३९ ॥

मोक्षसुखाची सुरवाडी । रणनदी वाहे पूराडी । सर्वस्व त्यागें जो घाली उडी । त्याचिये जोडी तो जोडे ॥ १४० ॥

ध्वजेंसीं वाहे रहिंवरु । तेंचि शिडेंसहित तारूं । येथें तारक श्रीरामचंद्रू । परात्पर पारु पाववी ॥ १४१ ॥

उदो म्हणोनि भद्रकाळी । घेवोनि आली भूतावळी । खाती मांसाच्या वडवाळी । रुधिरांजुळी प्राशिती ॥ १४२ ॥

आनंदें नाचे क्षेत्रपाळ । शिरें चौंडकें वाहे वेताळ । भूतें मिळोनिया सकळ । रणगोंधळ नाचती ॥ १४३ ॥

यक्षिणी बहुकाळाच्या वृत्ती । लाखोलीं काळिजें घेवोनि हातीं ।
शंखिणी डाकिणी वानें देती । मग भक्षिती स्वानंदें ॥ १४४ ॥

बहुता दिवसांचें धरणें । दिधलें हनुमंतें पारणें । अवघे घालती लोटांगणें । विजयी होणें रणरंगी ॥ १४५ ॥

पीक पिकले [वि. 'रणसागरीं'; तु. दै. मु. 'रणचत्वारीं'.] रणनागरी । राक्षस दांताचियां [पै. अं. 'हारी'.] राशी थोरी । भूतें मोविती कुडवेवरी । कौल करी हनुमंत ॥ १४६ ॥

देवो ब्राह्मण भैरवासी । बलुतें देती वेताळासी । खळें दान तें भूतासी । महाकाळीसी राजभाग ॥ १४७ ॥

खळें मातरें मारकोसी । मेसको तिचे घरची दासी । वेसी पेंढी तें सटवाईसी । पाळ भारियासी काळिका ॥ १४८ ॥

अग्र पिकाची व्युत्पत्ती । विभागिली स्वयें मारुती ।
पश्चिम धान्याची महाख्याती । श्रीरघुपती विभागील ॥ १४९ ॥

कुडवे दांत मेविजेती । ऐसी हनुमंतें केली ख्याती । हर्षानंदें कपि गर्जती । स्वयें उपरमती आल्हादें ॥ १५० ॥

आमुचा हनुमान आतुर्बळी । रणीं राक्षसां केली रांगोळी । वानरीं पिटोनिया टाळी । सुखसमेळी नाचती ॥

अनुक्रमणिका

१५१ ॥

सुग्रीव राजा तयेवेळीं । आणोनियां द्रव्यांजुळी । हनुमंतावरी ओंवाळी । हृदयकमळीं आलिंगी ॥ १५२ ॥

तूं विसांवा कपिकुळासी । सुखी केलें श्रीरामासी । वांचविलें वानरांसी । यश आम्हासी दीधलें ॥ १५३ ॥

स्फुरण आलें अंगदासी । खांदी घेवोनि हनुमंतासी । हरिखे नाचतां चौपासी । कळिकाळासी विटाये ॥ १५४ ॥

धरिलिया हनुमंताचे चरण । कळिकाळ बापुडें तें कोण ।
करोनि हनुमंताचें स्मरण । मरणा मारीन मी आतां ॥ १५५ ॥

हनुमंताचे अगाध चरित्र । ऐकोनिया ब्रह्मलिखित । श्रीराम होवोनि विस्मित । आलिंगीत हनुमंता ॥ १५६ ॥

परमामृतें अभिषिंचन । नेत्रद्वारां रघुनंदन । हनुमंतासी करी आपण । स्वर्गीं सुरगण विस्मित ॥ १५७ ॥

कृपा करील रघुनंदन । हनुमंताचें भाग्य गहन । स्वमुखें वानी त्रिनयन । भेरी निशाण लावोनी ॥ १५८ ॥

आलिंगीतां हनुमंता । राम विसरे श्रीरामता । कपि विसरला वानरता । एकात्मता आल्हाद ॥ १५९ ॥

सांडोनिया मीतूंपण । देवांभक्तां आलिंगन । खुंटला बोल तुटलें मौन । सुखसंपन्न श्रीरामें ॥ १६० ॥

निबिड आणि नित्य निघोट । सुख कोंदलें घनदाट । नाहीं आदिमध्य शेवट । नचले वाट वेदवादा ॥ १६१ ॥

जेथें मौनावल्या श्रुती । तेथें पावला मारुती । सार्थक हनुमंताची भक्ती । पावनकीर्ति तिहीं लोकी ॥ १६२ ॥

स्वयें सुखावे श्रीरघुनंदन । ऐसें हनुमंताचें भजन । एका जनार्दना शरण । ब्रह्मज्ञान हरिभजनीं ॥ १६३ ॥

नित्य श्रीरामनाम स्मरण । नित्य श्रीरामनाम प्रेमभजन । पायां लागे ब्रह्मज्ञान । एका जनार्दन उपदेश ॥ १६४ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखित-इंद्रजित-अपमानं तत्सैन्य निर्दलनं नाम एकत्रिंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग बत्तिसावा

## रावण गर्व हरण

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

श्रीराम होवोनि सावचित्त । लक्ष्मणासी स्वयें सांगत । पुढारां वाची ब्रह्मलिखित । अनुचरित कपीचें ॥ १ ॥

राक्षस दातांचियां रासी । पाडोनि केलिया रणभूमीसीं । पुढें काय केलें लंकेसी । तें मजपासी परिसवीं ॥ २ ॥

ऐकोनि श्रीरामाची गोष्टी । सुग्रीवासी आल्हाद पोटीं । हरिखेल्या वानरकोटी । कथाकसवटी ऐकावया ॥ ३ ॥

वानरांच्या निजकोडी । सभा बैसली परवडी । हनुमंताची प्रतापप्रौढी । अति आवडी ऐकावया ॥ ४ ॥

हनुमंताची प्रतापकीर्ती । वाचितां लक्ष्मणा परम प्रीती । अनुलक्षोनि श्रीराममूर्ती । पत्र प्रयुक्ती वाचित ॥ ५ ॥

झाडोनि इंद्रजिताचा [तं. 'पवाडा'.] पादाडा । करोनि सैन्याचा नितोडा ।
काढोनि कपिपुच्छाचा वेढा । हनुमान गाढा बैसला ॥ ६ ॥

पुढती करावया रण । कोण कोण धाडील रावण । त्यांचें करावया निर्दळण । सावधान बैसला ॥ ७ ॥

गेला देखोनि हनुमंत । मीस करोनि वीर समस्त । आणिक घायाळ कुंथत । नगराआंत निघाले ॥ ८ ॥

वीरीं घेतलें घायवारें । रावणाचे सभे माझारें । म्हणती पळारे पळारे । रणीं वानरें मारिजेल ॥ ९ ॥

रावण बापुडे तें किती । युद्धीं नाटोपे मारुती । सेनानी सैन्य नेलें भस्मांतीं । करील शांति लंकेची ॥ १० ॥

समस्त सैन्या केली बोहरी । बोंब सुटली घरोघरीं । कळकळती [पै. तं. अं. मुं. 'नरनारी'.] नगरनारी । लंकापूरीं आकांत ॥ ११ ॥

[वि. तं. 'जळों'; तु. दै. 'भिक्षुक'.] समरीं रावणाची थोरी । चोरोनिया परनारी । केली राक्षसांची बोहरी । महामारी वानरें ॥ १२ ॥

रणीं रावण मरतां । लंका-लोक स्वस्थ होता । करविले इंद्रजिताच्या घातां । रणीं हनुमंता खवळोनी ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

करितां अखयाचा कैवार । रणीं मारविला ज्येष्ठ कुमर । बोंब करितां निशाचर । दशवक्त्र हडबडिला ॥ १४ ॥

इंद्रजित मेला किंवा जीत । कोणी न सांगती मात । तेणें गजबजिला लंकानाथ । केला रण घात वानरें ॥ १५ ॥

इंद्रजित मारिला रणीं । तरीच मारिल्या सैन्य [तु. दै. 'क्षौणी'.] श्रेणी । तो जरी असता सावधानी । कपि कैसेनि मारिता ॥ १६ ॥

शोधूं जावें जरी रणासीं । राक्षस भीती कपिपुच्छासी । भूतीं भक्षिलें प्रेतांसी । तेथें कायसी ओळखी ॥ १७ ॥

रणीं निमाला ज्येष्ठसुत । रावण मुखीं धूळ घालित । दाही मुखीं शंख करीत । आक्रंदत अति दुःखें ॥ १८ ॥
[ओवी १८व २३ वि. प्रतीत नाही.]

दुःखें गडबडा लोळे । केश सुटले मोकळे । अश्रू स्त्रवती वीसही डोळे । पिटी कपाळें अति दुःखें ॥ १९ ॥

इंद्रजिताचा केला घात । रणीं नाटोपे हनुमंत । वानरीं न चले पुरुषार्थ । लंकानाथ अति दुःखी ॥ २० ॥

ब्रह्मयानें सांगितलें मजपासी । गळां बांधोनि वानरासी ।
इंद्रजित आणील तुजपासीं । असत्य त्यासी केवीं आलें ॥ २१ ॥

पाचारोनि चतुरानन । त्यासी पुसे दशानन । इंद्रजित आणिल कपि बांधोन । ते तूं वचन करी सत्य ॥ २२ ॥

आम्ही तंव तुझी संतती । तुझेनि वरदें दाटुगे क्षितीं । मज भेटवी पुत्रसंतती । चरण तदर्थी वंदिले ॥ २३ ॥
[ओवी १८व २३ वि. प्रतीत नाही.]

इंद्रजिताच्या निज वृत्तांता । तुझेनि नाणवे गा दूता । करितो कपि राक्षसघाता । त्यासी सर्वथा न [कं. 'चोजवे'.] वंचवे ॥ २४ ॥

मीच जावोनि अशोकवना । इंद्रजिताची विवंचना । समूळ आणोनिया मना । मग दशानना सांगेन ॥ २५ ॥

इंद्रजित मेला किंवा जीत । ग्लानी पुसे लंकानाथ । वानरें गांजिला अत्यद्भुत । आहे तो गुप्त म्हणे ब्रह्मा ॥

ऐसें सांगोनि लंकापती । वना आला प्रजापती । ब्रह्मा देखोनि मारुती । घातलें क्षितीं लोटांगण ॥ २७ ॥

कपि पुसे ब्रह्मयाप्रती । ऐसी आवडी आहे चित्तीं । तुकोनि रावणाची शक्ती । करावी ख्याती लंकेसी ॥ २८ ॥

ब्रह्मा स्वयें सांगे आपण । श्रीराम मारील रावण । इंद्रजितासी मारील लक्ष्मण । येरांचें कंदन तूं करी ॥ २९ ॥ [ओवी २९ कं. तु. दै. प्रतींत नाही.]

अनुक्रमणिका

ब्रह्मा सांगे हनुमंतासी । इंद्रजित तुझेनि भयेंसीं । लपाला आहे विवर प्रदेशीं । मी त्यापासी जातसे ॥ ३० ॥

इंद्रजिताचां करसंपुटी । ब्रह्मपाश मानोनि कंठीं । यावें रावणाचे भेटी । लंका त्रिकुटी कंदनार्थ ॥ ३१ ॥

कपि म्हणे इंद्रजिताचे हातें । सर्वथा न मानी पाशबंधातें । ब्रह्मदेवा तुझेनि हातें । ब्रह्मबंधातें मानीन ॥ ३२ ॥

ब्रह्मा म्हणे ऐसेंचि घडे । माझेनि हातें वाडेंकोडें । हनुमंत पाशबंधनीं पडे । रावणापुढें न्यावया ॥ ३३ ॥

रणीं वानरा देवोनि पाठी । पळतां [कं. 'संकटी'.] विवरसंपुटीं । इंद्रजितासी चिंता मोठी । लागली पोटीं धुकधुक ॥ ३४ ॥ [ओवी ३४ वि. प्रतीत नाही.]
रणीं गांजिलें माकडें । काय मुख दावूं रावणापुढें । इंद्रजित खळखळां रडे । अति सांकडें ओढवलें ॥ ३५ ॥

रणीं मज येतें मरण । तरी पावतों कृतकल्याण । वाचल्याचें फळ कोण । काळें वदन तिहीं लोकीं ॥ ३६ ॥

इंद्रजित नांवाची हे ख्याती । तिहीं लोकीं माझी कीर्ती । [वि. 'ते हे व्यर्थ जाली निश्चिती'.] कीर्ती ते जाली अपकीर्ती । रणीं मारुती नाटोपे ॥

कपि केवळ पालेखाईर । आम्ही निधडे महावीर । रणीं न जिंकवे वानर । लज्ञा थोर मज माझी ॥ ३८ ॥

काळें वदन लज्ञान्विती । मरण न ये मज वरदोक्ती । इंद्रजित पडतां चिंतावर्ती । तंव ब्रह्मोक्ती आठवली ॥

गळां बांधोनि मारुती । इंद्रजित आणील लंकेप्रती । स्वमुखें बोलिला प्रजापती । तो मज प्रत्यय यावा कीं ॥ ४० ॥

पाचारावया चतुरानन । रणीं नुरेचि सेवकजन । माझा वांचलासे प्राण । विवरीं दडोन राहिलों ॥ ४१ ॥

धाडावया नाहीं सेवकजन । बाहेर निघतां आपण । रोकडें कपिपुच्छें मरण । करी रुदन इंद्रजित ॥ ४२ ॥

माझे पितयाच्या पित्याचा पिता । कैसेनि भेटे मज विधाता ।
ऐसी इंद्रजित करितां चिंता । आला अवचितां परमेष्ठी ॥ ४३ ॥

डोळां देखतांच परमेष्ठी । इंद्रजित धीर धरीं पोटीं । समूळ सांगे युद्धगोष्टी । केलों कष्टी वानरें ॥ ४४ ॥

ततः पैतामहं वीरः पाशं शस्त्रविदां वरः । संदधे सुमहातेजास्तं हरिप्रवरं प्रति ॥ १ ॥
अवध्योयमिति ज्ञात्वा तमस्त्रेणास्त्रशस्त्रवित् । अवध्यं सर्वभूतानां तदस्त्रं न बबंध तम् ॥ २ ॥

रणीं गांजिलों मारुती । तो बांधवे माझे हातीं । ऐसी स्वामीची पूर्वोक्ती । कृपामूर्ती सत्य कीजे ॥ ४५ ॥

असत्य नव्हे ब्रह्मवचन । नारदें सांगितलें आपण । कपीसी पाशबंधन । कृपा करोन मज द्यावें ॥ ४६ ॥

अनुक्रमणिका

**मज दिधलिया पाशबंधन । तेव्हां रणरंगीं गर्जोन । बह्मपाशीं कपिबंधन । मग मी श्लाघेन वांठिवा ॥ ४७ ॥**

**विरिंची देतां पाशबंधन । इंद्रजित मोकली कपिलक्षोन । वानरासी ब्रह्मपाशबंधन । सर्वथा जाण** [अं. मु. ‘बांधीना’.] **बाधीना ॥ ४८ ॥**

**हनुमंतासी निंबलोण । करोनि गेलें पाशबंधन । करी गर्जोनि बंधन । पाशबंधन बाधीना ॥ ४९ ॥** [ओवी ४९ तु. दै. प्रतींत नाही.]

**हरिवरदान हरवरदान । ब्रह्मयाचे ब्रह्मवरदान ।** [कं. मु. ‘पाश गेला’; पै. ‘तुटोन’.] **बांधूं न शके पाशबंधन । निर्बंधन मारुती ॥ ५० ॥**

**ब्रह्मपाशाचिया अनुवृत्तीं । रणीं खवळला मारुती । मरण मज आलें पुढती । इंद्रजिताचें चित्तीं चळकांप ॥ ५१ ॥**

> अहो महत्कर्म कृतं निरर्थकं न राक्षसैर्मंत्रकृतिर्हि शक्या ।
> पुनश्च नास्त्रे विहितेऽस्त्रमन्यत् प्रवर्तते संशयिताः स्म सर्वे ॥ ३ ॥
> अस्त्रं तद्वितथं दृष्ट्वा संजगर्ह पितामहम् । अथागत्य ततो ब्रह्मा मारुतात्मजमब्रवीत् ॥ ४ ॥

**इंद्रजित ब्रह्मपाश घालितां । ते न लगती हनुमंता । माझा रणधर्म गेला वृथा । जघन्यता मज आली ॥ ५२ ॥**

**माझी अस्त्रशक्ती शस्त्रशक्ती । ब्रह्मपाश ब्रह्मशक्ती । अवघी वृथा केली मारुती । राक्षसशक्ती केंवी चाले ॥**

**ब्रह्मपाशास्त्र वृथा जाय । आणीक अस्त्र करील काय । वानरीं न चालती उपाय । आला अपाय राक्षसां ॥ ५४ ॥**

**ब्रह्मोनि दिधली खोटी शक्ती । यालागी न धरवे मारुती ।**
**इंद्रजित कोपला ब्रह्मयाप्रती । तुझी दुष्टमती आम्हांवरी ॥ ५५ ॥**

**रावणें** [तु. दै. ‘हरिले सीतेसी’.] **विभागिलें वेदांसी । त्याचा राग तुझें मानसीं । निर्दाळावया राक्षसांसी । बुद्धी सांगसी हनुमंता ॥ ५६ ॥**

**तूं आमची मूळमूर्ती । आम्ही तुझी** [मुं. ‘पुत्र’.] **ब्रह्मसंतती । आम्हांसी देवोनि खोटी शक्ती । कपि हातीं कां** [पै. खेरीज इतरत्र ‘कां’ पद नाही.] **मारविसी ॥**

**ब्रह्मा म्हणे तूं विकल्पमूर्ती । ब्रह्मद्वेषी ब्रह्मघाती । तुझी नातळे ब्रह्मशक्ती । केंवी मारुती बांधवे ॥ ५८ ॥**

**ब्रह्मानुवादाचें उत्तर । गळां बांधोनि वानर । इंद्रजित आणील** [वि. ‘सत्वर’.] **महावीर । ते साचार करीं वाक्य ॥ ५९ ॥**

अनुक्रमणिका

**ब्रह्मा म्हणे इंद्रजिता प्रती । माझे पाश दे माझे हातीं । गळा बांधोन देईन मारुती । लंकेप्रती न्यावया ॥ ६० ॥**

**इंद्रजित म्हणे ब्रह्मयासी । म्यां मोकलिलें ब्रह्मपाशासी ।**
**हनुमंतें बांधोनि राखिले पुच्छीं । म्यां तुम्हांसीं काय द्यावें ॥ ६१ ॥**

**ऐकोनि इंद्रजिताचें वचन । ब्रह्मा झाला हास्यवदन । कपीस ब्रह्मपाशबंधन ।** [तु. दै. 'फळविधान'.] **केले विंदान तें ऐका ॥ ६२ ॥**

> नानृतं मद्वचो कार्षीर्गुहाणास्त्रं हि वानर । एवमुक्तस्तथेत्युक्त्वा बद्धः कपिवरात्मजः ॥ ५ ॥
> अभवन्निर्विचेष्टश्च पपात धरणीतले ॥ ६ ॥

**ब्रह्मा म्हणे हनुमंता । तुज न लागे पाशबंधता । माझें वचन सत्यार्था । ब्रह्म बद्धता मानावी ॥ ६३ ॥**

**ऐकोनि ब्रह्मयाचें वचन । हनुमान घाली लोटांगण । तुझेनि बोलें देईन प्राण । पाशबंधन तें किती ॥ ६४ ॥**

**ऐसें बोलोनि हनुमंत । ब्रह्मपाशीं पडे मूर्च्छित । धरणीवरी निचेष्टित । धुकधुकीत भयभीत ॥ ६५ ॥** [ओवी ६५ वि. प्रतीत नाही. ६६ व्या ओवीचे २ रे व ३ रे चरण असे दोनच चरण आले आहेत.]

**ब्रह्मपाशीं हनुमंत । पडिला देखोनि निचेष्टित । परी तो बंध मोक्षातीत । नित्य निर्मुक्त श्रीरामें ॥ ६६ ॥**

**जेंवी रवि थिल्लरांत । मूर्ख मानिती थिल्लरस्थ । तेंवी कपि ब्रह्मपाशांत । बांधला म्हणत राक्षस ॥ ६७ ॥**

**हनुमान बांधिला ब्रह्मपाशांत । विजयी वीर इंद्रजित । निशाण पिटिले लंकेआंत । लंकानाथ आल्हादी ॥ ६८ ॥**

**ब्रह्मेनि बांधिला हनुमंत । परी तो ब्रह्मबंधातीत । देखोनि इंद्रजित धाकीत । करील अनर्थ लंकेसी ॥ ६९ ॥**

> अथ तं राक्षसो दृष्ट्वा निर्विचेष्टमरिंदमम् । बबंध रज्जुपाशैश्च द्रुमचीरैश्च मारुतिम् ॥ ७ ॥
> कृष्यमाणश्च रक्षोभिस्तैश्च बंधैर्निपीडितः । हन्यमानस्ततः क्रूरै राक्षसैः काष्ठमुष्टिभिः ॥ ८ ॥

**क्षितीतळीं निर्विचेष्टित । पडिला देखोनि हनुमंत । राक्षस धांवोनि समस्त । त्यासी बांधीत वेलवाखीं ॥ ७० ॥**

**एक बांधिती चऱ्हाटें । सालीं बांधिती वृक्षफाटें । देखोनि हांसिजे मर्कटें । बंधन खोटें मजलागीं ॥ ७१ ॥**

**जो न बांधवे ब्रह्मपाशीं । तो केंवी बांधवे द्रुमपाशीं । बंधनमिसें जातो लंकेसी । रावणासी गांजावया ॥ ७२ ॥**

**आम्हांसि गांजिले अशोकवनीं । रावणा गांजील लंकाभुवनीं ।**
**परम चिंता इंद्रजिताच्या मनीं । अपेश जनीं मज आलें ॥ ७३ ॥**

अनुक्रमणिका

इंद्रजितें हनुमंत । बांधोनि आणिला लंकेआंत । हे [मु. 'जगीं विस्फारिली मात'.] अवघीच मिथ्या मात । जातो अनर्थ करावया ॥ ७४ ॥

जें ब्रह्मेनि सांगितलें कानीं । तेंचि हनुमंतें धरोनि मनीं । प्रवेशतों लंकाभुवनीं । इंद्रजित मनीं भयभीत ॥ ७५ ॥

वानर वनचर पालेखाईर । त्याचा इंद्रजितासी धाक थोर । आम्ही निधडे निशाचर । क्षणें कपींद्र मारुं [मुं. 'वेगें'.] या ॥

म्हणोनि बांधिती रज्जुबंधनीं । एक बांधिती वाख वळोनि ।
एक बांधिती मुंजी चिरोनी । कपि बांधोनी आणिती ॥ ७७ ॥

पूर्व पश्चिम उत्तरेसी । एक ओढिती दक्षिणेसी । हनुमाना करिती कासाविसी । कपि मानसीं हांसत ॥ ७८ ॥

राक्षसें केवळ बापुडीं । व्यर्थ करिती ओढाओढी । लंका करीन कडाफोडी । पाडीन दरडी दुर्गाच्या ॥ ७९ ॥

मज नेलिया [कं. 'लंकेआंत'; मु. 'दुर्गाआंत'.] नगरांत । महावीरां करीन घात । मुख्य गांजीन लंकानाथ । दहनावर्त लंकेसी ॥ ८० ॥

कपि बांधिला महाबळी । म्हणोनि राक्षसी पिटिली टाळी ।
गुढी आणिली रावणाजवळी । सभामंडळी लंकेचिया ॥ ८१ ॥ [ओवी ८१ तं. प्रतीत नाही.]

वज्रदेही हनुमंत । बुकी हाणे तो [दै. तु. तं. 'कुंथत'; मु. 'पडे मूर्च्छित'.] हुंबत । मुसळघातें उखळे हात । वीर मूर्च्छित कपिघातें ॥ ८२ ॥

इंद्रजितासी समवेत । हनुमान नेतां लंकेआंत । ब्रह्मा स्वमुखें मंत्र जपत । विपरितार्थ तो ऐका ॥ ८३ ॥

ग्रहावे प्रतिष्ठा हें सूक्त । ब्रह्मा गडगर्जे गर्जत । रामराज्य लंकेआंत । हनुमंत प्रवेशें ॥ ८४ ॥

रावणें देखोनि वानरां । दांत खाये करकरां । जीवें मारिलें अखयाकुमरा । यासी करा तिळप्राय ॥ ८५ ॥

सकळ सैन्य समसगट । शस्त्रें हाणिती कडकडाट । लागतां शस्त्रें होतीं पीठ । हृदयस्फोट राक्षसां ॥ ८६ ॥

एकाचे उखळले हात । वीरीं विचकले पैं दांत । धांपा दाटोनि समस्त । जाले मूर्च्छित एकें एक ॥ ८७ ॥

हनुमान रामनाम जपत । [तु. दै. 'शतसहस्र राक्षस'.] सशस्त्र सैन्य हताहत । तें देखोनि लंकानाथ । [त. 'शस्त्रघात चुकला'; दै. 'चुकविला'.] कोपें कृतांत पैं जाला ॥ ८८ ॥

अनुक्रमणिका

रावणें खर्गा घालोनि हात । बळे हाणितां हनुमंत । झणाणिला लंकानाथ । शस्त्राचा हात उखळला ॥ ८९ ॥

घावो हाणितां प्रचंड । दणाणिलें त्याचें ब्रह्मांड । सरलें रावणाचें बळबंड । खालतें तोंड तेणें केलें ॥ ९० ॥

घावो न गणीच हनुमंत । रावण जाला चिंताग्रस्त । हनुमान गदगदां हांसत । व्यर्थ पुरुषार्थ रावणा ॥ ९१ ॥

राक्षस घायाचा समेळ । ढेंकणा ऐसी त्याची बुळबुळ । तुझा घावो अति निर्बळ । जैसी पेळ कापसाची ॥ ९२ ॥

सावध ऐके लंकानाथा । तुझा मज थोरं [दै. 'भय'.] भ्रम होता । घावो हाणोनि त्वां आतां । [तु. दै. 'पुरुषार्थ व्यर्थ जल्पसी'.] केला वृथा पुरुषार्थ ॥ ९३ ॥

तुझ्या घायाचा समेळी । माझी न तुटे रोमावळी । श्रीरामेसीं रणकल्लोळी । केंवी समफळी घेसील ॥ ९४ ॥

स्वयंवरीं [तु. दै. 'पाहातां'.] वाहतां हरकोदंड । तुझें जालें काळें तोंड । तें श्रीरामें केलें दुखंड । युद्ध प्रचंड केंवी त्यासी ॥ ९५ ॥

तुझें शुभचिन्ह कळलें आतां । स्वयें जालासी भीकमागता । भिकेमाझी तुझी कपटता । श्रीरामकांता चोरिली ॥

गृहस्थाची जे कां पत्नी । भिक्षुकाची [दै. 'होय'.] निज जननी । तूं तंव केवळ मातृगमनी । [कं. 'तिचा हरणीं'.] सीतावरणीं उद्यत ॥ ९७ ॥

भिक्षा दे वो म्हणसी माते । शेखीं अभिलाषिसी सीते । महापापी तूं सर्वार्थे । सन्निपातें घेतलासी ॥ ९८ ॥

बाप होणाराची थोरी । राजत्व सांडोनियां दूरी । झोळी घेवोनियां करीं । स्वयें भिकारी जालासी ॥ ९९ ॥

स्वयें होतांचि भिकारी । राजत्व पदवी पळे दूरी । जळो ते [कं. 'वैभव'.] वेदभाष्य तुझी थोरी । परनारी चोरिसी ॥ १०० ॥

अवध्यता वानरासी । मारितां न मरवे आम्हांसी । नोकोनि बोलतां सभेसी । रावणासी अति चिंता ॥ १०१ ॥

येथें आणिलिया हनुमंत । आम्हांसी न जोडे पुरुषार्थ । हनुमान माझा करील घात । चळी कांपत रावण ॥

रावणाचें सिंहासन । तयासी समान पुच्छासन । हनुमान बैसला सावधान । दशानन लक्षोनि ॥ १०३ ॥

दशमुखेंसी संमुख । वानर बैसला निःशंक । रावणा लागली धुकधुक । अधोमुख स्वयें जाला ॥ १०४ ॥

इंद्रजितानें हनुमंत । धरोनि आणिला लंकेआंत । सत्य जाला ब्रह्म वाक्यार्थ । मज अपघात ओढवला ॥

अनुक्रमणिका

१०५ ॥

रावणाची चिंता ऐसी । कळो सरली हनुमंतासी । वानरचेष्टा मांडिल्या त्यासी । लंकेशासी गांजावया ॥ १०६ ॥

रावणा संमुख हनुमंत । बैसोनि वांकुल्या दावित । कांखाकुशी खाजवीत । पुच्छ लावीत नाकासीं ॥ १०७ ॥

पुच्छ लावितांचि नाकीं । केश भरले नासिकीं । रावण शिंकावरी शिंकी । दशमुखीं खोकीत ॥ १०८ ॥

दाहीं नाकीं शिंकी थडथडां । होत शेंबुडाचा थडा । सिंहासनीं पैं रोकडा । वानरें गाढा गांजिला ॥ १०९ ॥

पुढें शिंकेचें पडतां नेट । बृहती वाजे टरटराट । वानर चेष्टा अति वरिष्ठ । दशकंठ गांजिला ॥ ११० ॥ [ओवी ११० तु. दै. प्रतींत नाही.]

राजसन्मान राजाभिमान । वानरें उडविला संपूर्ण । सिंहासनीं दशानन । लज्ञायमान बैसला ॥ १११ ॥

वानर न गणी राक्षसांसी । दृष्टीं नाणी प्रधानासी । रावणें जाणोनि मानसीं । स्वमुखें कपीसी पूसत ॥ ११२ ॥

> रे रे वानर को भवानहमरे त्वत्सूनुहंताऽहवे । दूतोऽहं खरखंडनस्य जगतां कोदंडदीक्षागुरोः । मद्दोर्दंडकठोरपाटनपटुः को वा त्रिकूटाचले । को मेरुः क्व च रावणोऽद्य गणना कोटिस्तु कीटायते ॥ ९ ॥

रावण हेळसोनि बोले उत्तर । अरे तूं कोण रे वानर ।
तैसाचि हेळसोनि बोले कपींद्र । ऐक रे साचार रावणा ॥ ११३ ॥

एक म्हणतांचि अरे । सवेंचि दुसरा म्हणे कां रे । तैसाचि मांडिले वानरें । निशाचरें हेळसोनि ॥ ११४ ॥ [ओवी ११४ व ११५ पै. प्रतीत नाहीत.]

मारिले बनकर किंकर । जंबुसगट प्रधानकुमर । पंचसेनानी मारिले शूर । तो मी [वि. 'साचार'.] वानर हनुमंत ॥ ११५ ॥

करोनि वृक्षांचा उपाडा । झाडिला इंद्रजिताचा पादाडा । अखयाकुमर मारिला गाढा । तो मी निधडा हनुमंत ॥

तूं कवणाचा कैंचा कोण । येथें यावया काय कारण । पुसिलिया प्रश्नाप्रतीवचन । सावधान अवधारी ॥ ११७ ॥

सुबाहु ताटिका निर्दळण । त्रिशिरा मारिलें खरदूषण । त्या श्रीरामाचा दूत मी जाण । तुझा प्राण घेवों आलों ॥

अनुक्रमणिका

कोदंडधारि दीक्षागुरु । सूर्यवंशी श्रीरामचंद्रू । त्याचा दूत मी वानरू । तुझा संहारू करुं आलों ॥ ११९ ॥
[ओवी ११९ तु. व दै. प्रतींत नाही.]

राक्षसमहाराज रावण । तुज वधावया कैंची आंगवण । माझें बळ असाधारण । नाहीं प्रमाण [मु. 'मारावया'.] रणमारा ॥

लागतां बाहुचा चपेट । मेरुमंदार होती पीठ । रावण दशमुख कीट । लंका त्रिकुट तें किती ॥ १२१ ॥

रावणा [तु. दै. 'ऐसिया संकटी'.] ऐसे दशकंठी । रणीं मीनलिया कोट्यानुकोटी । तें मी लंकेचा त्रिकुटी । वामांगुष्ठीं मर्दीन ॥ १२२ ॥

म्हणसी तुजसवें वानर । असती पाठीराखे अपार । मी एकला एकांगवीर । दशशिर दंडावया ॥ १२३ ॥

> एकोऽहं पवनात्मजो दशमुखस्त्वं चापि कोटीश्वरस्त्वां जित्वा समरे प्रभुः प्रणयिनीं सीतां च नेतुं क्षमः ।
> किं तत्स्यादनृतं बलं बलवता रामेण सुश्रीमता हत्वा दक्षिणपाणिना वसुमतीं त्वां हंतुमुक्तं वचः ॥ १० ॥

मी तंव एकला एक वानर । श्रीराम कटकींचे [वि. 'दुर्धर'.] किंकर । तुझे कोटि कोटि जुंझार । मज समोर करी उभे ॥

मशकें कोटि कोटि जुंझार । मज मारितां दशशिर । कोण राखेल निशाचर । सुरांसुर पाहूं पां ॥ १२५ ॥

सदाशिव तुज रक्षिता । तुवां चोरिली श्रीरामकांता । शिव पेटला तुझिया घाता । चोरी करितां कोण राखे ॥

ब्रह्मा तुज नित्य साहाकारी । त्याचे वंशीं तूं दुराचारी ।
चोरी मारी आणि [तु. दै. 'परनारी'.] परद्वारी । ब्रह्मा तुजवरी क्षोभला ॥ १२७ ॥

मुख्य तुवां चोरिली सीतासती । जटायु मारिला विश्वासघाती ।
पतिव्रतेसी मागतां रती । प्रजापती क्षोभला ॥ १२८ ॥

ब्रह्मा शिव आणि शक्र । तुज क्षोभले सुर समग्र । मज मारितां दशशिर । कोण समोर राहील ॥ १२९ ॥

मज मारितां दशशिर । कुमार प्रधान सैन्य समग्र । रणीं मर्दोनि निशाचर । सीतासुंदर मग नेईन ॥ १३० ॥

ऐकोनि हनुमंताची मात । इंद्रजित चळीं कांपत । धाकें बिभीषणा सांगत । आला अपघात रावणा ॥ १३१ ॥

हनुमंताचा रणावर्त । भोगोनि इंद्रजित असे भीत । न साहवे पुच्छघात । लंकानाथ केंवी वांचे ॥ १३२ ॥

अनुक्रमणिका

लंके आणोनि हनुमंत । कांहीं नव्हेचि पुरुषार्थ । आजि निमाला लंकानाथ । आला अंत राक्षसां ॥ १३३ ॥

इंद्रजित बिभीषण सचिंत । कैसेनि वांचेल लंकानाथ । तंव बोलिला हनुमंत । अति पुरुषार्थ रामाचा ॥ १३४ ॥

रणीं मारोनि रावण । करोनि सीता सोडवण । श्रीरामापासी नेता जाण । आडवा कोण येऊं शके ॥ १३५ ॥

इतुकें करितां न लगे क्षण । परी श्रीरामें वाहिली आण । स्वहस्तें [वि. 'मारणें'.] मारीन रावण । मिथ्या कोण करूं शके ॥

मारोनिया दशशिरा । स्वस्थ करावी वसुंधरा । सुखी करावें चराचरा । श्रीरामचंद्रा निज नेम ॥ १३७ ॥

सोडावी देवांची बांधवडी । तोडावी नवग्रहांची बेडी ।
उभारावी रामराज्याची गुढी । मर्यादा गाढी श्रीरामीं ॥ १३८ ॥

वानरें करोनि उड्डाण । जीवें मारावा दशानन । श्रीराम प्रतिज्ञा पाळुन । कपि रावण न मारीच ॥ १३९ ॥

रावणाची दाही शिरें । हनुमान खुडितां नखाग्रें । मर्यादा केली श्रीरामचंद्रें । म्हणोनि वानरें राखिला ॥ १४० ॥

श्रीराममर्यादेचें उत्तर । [तु. दै. 'शिरीं वाहे'.] सर्वथा नुल्लंघी कपींद्र । यालागी दशशिर । जीवें वानर न मारीच ॥ १४१ ॥

जीवें न मारीच वानर । मरणापरीस हे दुर्धर । निर्भत्सिला दशशिर । तेही सादर अवधारा ॥ १४२ ॥

> धिक् ते रावण पौरुषं कुलमपि श्रीर्धिग्यशस्तेजसी । धिक् खड्गं सुरदर्पनाशनकरं धिग्धिग्वृथा जीवनम् ।
> यस्माद्राघवबाणभीतमनसा सीता परोक्षे हृता । तद्वैरादहमागतोऽस्मि हनुमान् दूतो वधार्थं तव ॥ ११ ॥

जळो ते रावणा तुझी थोरी । जळो तो राजा होय भिकारी ।
जळो तें [मुं. 'जिणें'.] कर्म करणें चोरी । परनारी पतिव्रता ॥ १४३ ॥

जळो तें रावणा तुझें कुळ । जळो ते रावणा तुझें शीळ । जळो तें रावणा तुझें बळ । पापी केवळ परद्वारी ॥

धिग् धिग् रावणा तुझा पुरुषार्थ । धिग् धिग् रावणा तुझा कर्तव्यार्थ ।
धिग् धिग् रावणा तुझें [तु. दै. 'पाप स्वार्थ'.] वृत्त । [तु. दै. 'तुवां'.] स्वार्थ परमार्थ नासिला ॥ १४५ ॥

धिग् धिग् रावणा राक्षसजाती । धिग् धिग् रावणा तुझी ख्याती ।

अनुक्रमणिका

धिग् धिग् रावणा तुझी कीर्ती । जाली अपकीर्ती तिहीं लोकीं ॥ १४६ ॥

धिग् धिग् रावणा तुझे जन्म । धिग् धिग् रावणा तुझें कर्म ।
धिग् धिग् रावणा तुझे धर्म । निंद्य परम तिहीं लोकीं ॥ १४७ ॥

धिग् धिग् रावणा तुझी श्रीमंती । धिग् धिग् रावणा तुझी शक्ती ।
धिग् धिग् तो खड्ग तुझें हातीं । लोम मारुती न तुटेचि ॥ १४८ ॥

धिग् धिग् जीवित तुझें क्षितीं । धिग् धिग् रावणा शौर्य शक्ती ।
[मु. 'अपरोक्ष'; तु. दै. 'प्रत्यक्ष'.] परोक्ष चोरिली सीतासती । बाण भयभिती श्रीरामें ॥ १४९ ॥

चोरिली माझिया स्वामीची नारी । त्या तुझी म्यां धरिली चोरी ।
चोर तो तंव प्रत्यक्ष वैरी । सपरिवारी मारीन ॥ १५० ॥

देखतां सैन्य भटसुभट । तुझे मर्दीन वीसही ओठ । तुझे छेदावया दशकंठ । आलों मी [वि. 'भाट'; पै. अं. 'वाठ'.] वाट रामाचा ॥ १५१ ॥

ऐसें बोलतां महाबळी । पिंजारिल्या रोमावळी । लांगूल त्राहाटिलें भूतळीं । वाढले निराळीं कपिपुच्छ ॥ १५२ ॥

सवेंचि आठवलें हनुमंता । श्रीराम वधील लंकानाथा । व्यर्थ मी कां [वि. मु. 'क्षोभूं'; मुं. 'नासूं पुरुषार्था'.] झोंबों आतां । केला शांतता निजकोप ॥

एका जनार्दना शरण । केलें लंकेशा गर्वहरण । हनुमंते जाळिलें लंकाभुवन । रणकंदन अवधारा ॥ १५४ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां रावणगर्वहरणं नाम द्वात्रिंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग तेहतिसावा

## ब्रह्मलिखित समास

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

[मुं. 'रावणासी समसमान'.] रावण सिंहासनासमान । घालोनियां पुच्छासन । हनुमान बैसला सावधान । दशानन [तु. दै. 'छळोनी'.] लक्षोनी ॥ १ ॥

सिंहापुढें गजाचा दर्प । कीं गरुडापुढें कांपती सर्प । तैसा देखोनि कपि प्रताप । [मुं. 'महा'; कं. 'आला'; तु. 'कोप महा'.] अहा कंप रावणा ॥ २ ॥

रावण देखोनि भयभीत । इंद्रजित बिभीषण संयुक्त । लंकेशासी बुद्धि सांगत । अवध्य हनुमंत सर्वार्थी ॥ ३ ॥

मारूं जातां हनुमंतासी । [मुं. 'गांजिले'; तु. 'संहारिले'; कं. 'निर्भत्सिले'.] विभांडिलें महावीरांसी । पुच्छें निर्दाळिले सैन्यासी । कपि कोणासी नाटोपे ॥ ४ ॥

बुझावया हनुमंता । श्रीरामीं अर्पावी सीता । शरण रिघालिया रघुनाथा । आम्हासमस्तां कल्याण ॥ ५ ॥

श्रीरामाचें एक वानर । केवळ जें कां पालेखाईर । तें आम्हां [तु. दै. कं. मु. 'नाटोपे'.] नांगवें दुर्धर । आलियां रघुवीर कोण साहे ॥ ६ ॥

ऐकोनि बिभिषण उत्तरा । परम चिंता दशशिरां । इंद्रजितासी रणभेदरा । [मुं. 'रावण सत्वर विचारी'.] देखोनि वानरा चळकांप ॥ ७ ॥

इंद्रजिताची बुद्धि भिन्न । बिभीषण म्हणे रिघावें शरण । काय करावें आपण । स्वयें रावण विचारी ॥ ८ ॥ [ओवी ८, १०, ११ व १३ मुं. प्रतीत नाहीत.]

एकलिया एक वानराभेण । रिघतां श्रीरामासी शरण । तैं मज आलें उणेपण । करोनि छळण कपि मारुं ॥ ९ ॥

जैसा जटायु नाटोपतां जाण । म्यां मारिला करोनि छळण ।
तैसेंचि यासी घालोनि आण । पुसोनि मरण कपि मारुं ॥ १० ॥ [ओवी ८, १०, ११ व १३ मुं. प्रतीत नाहीत.]

श्रीरामभक्त सत्यवादी । असत्य न बोलती त्रिशुद्धी । याच्या मरणा हेचि बुद्धि । [मु. दै. 'छळनानुवादी'.] छळनानुबंधीं मारावे ॥ ११ ॥ [ओवी ८, १०, ११ व १३ मुं. प्रतीत नाहीत.]

ऐसी विचारोनि युक्ति । दाहीं मुखीं लंकापती । स्तऊं आदरिला मारुती । मरण युक्ति पुसावया ॥ १२ ॥

ऐकें कपि सावधान । घालितों श्रीरामाची आण । तुज कैसेनि ये मरण । सत्य वचन मज सांग ॥ १३ ॥ [ओवी ८, १०, ११ व १३ मुं. प्रतीत नाहीत.]

ऐकोनि श्रीरामाची आण । हनुमान घाली लोटांगण । मज सर्वथा नाहीं मरण । सत्यवचन लंकेशा ॥ १४ ॥

परिसतां कपीचें वचन । गदगदां हांसे दशानन । जन्मा आधीं गर्भीमरण । अमरपण तुज कैंचें ॥ १५ ॥ [तु प्रतीत १५ व्या ओवीनंतर पुढील दोन ओव्या अधिक आहेत :— 'प्राण्याचा गर्व होता उत्पन्न । हानी लाभ यश मरण । हें सत्य ब्रह्म्याचें लेखन । अमरपण त्रैलोक्यांत नाही ॥ २२ ॥
प्राण्याचे जैसें पापपुण्य । पुण्यें होय सुख गहन । पापें सर्वदा हानी जाण । देह्या मरण हें सत्य ॥ २३ ॥']

रावण म्हणे हनुमंता । मिथ्या वदों नये श्रीरामभक्ता । तूं कां वदसी मिथ्या वार्ता । निज वृत्तांता मज सांग ॥

जैसें जटायूसी पुसोनि मरण । त्यासी मारिलें करोनि छळण ।
तैसेंचि मजही करिसी जाण । तेणें भेणें वदे मिथ्या ॥ १७ ॥

मरण भय जयाचें चित्तीं । त्यासी कैचीं श्रीरामभक्ती । देहलोभ्यां श्रीरामप्राप्ती । कदा कल्पांती घडेना ॥ १८ ॥

परोपदेशीं प्रबळ ज्ञान । योग्यता वदे दशानन । परदारा चोरणें आपण । हें कोण ज्ञान रावणा ॥ १९ ॥ [ओवी १९ तु. प्रतीत अशी आहे :—
'परोपदेशीं धर्माचार । स्वयें नष्ट अनाचार । ऐसे कित्येक कपट व्यवहार । परोपकार कदा न घडे ॥ २४ ॥']

मरणभय कासाविसी । सीता चोरोनि स्वयें पळसी । तो तूं आम्हां शिकविसी । मरणभयासी कां भीतां ॥ २० ॥

वर्मी खोचला लंकानाथ । त्यासी सांगें हनुमंत । ऐक माझा मरणार्थ । तुज यथार्थ सांगेन ॥ २१ ॥

असत्य वदलों नाहीं तुजसी । मरण नाहीं माझिया देहासी । मरण आहे पुच्छापासीं । तें मारिसी तैं मरे ॥ २२ ॥

कपि पुच्छासी केलिया दहन । अवश्य हनुमंतासी मरण । इंद्रजित सत्य मानी आपण । सैन्य प्रधान [दै. 'सांगत'; कं. 'समवेत'; मुं. 'सत्य मानिती'.] सेनानी ॥ [ओवी २३ व २४ मुं. प्रतीत नाहीत.]

श्रीराम आणें भयभीत । सत्य वदला निजमरणार्थ । पुच्छ दाहें मरेल हनुमंत । लंकानाथ सत्य मानी ॥ २४ ॥ [ओवी २३ व २४ मुं. प्रतीत नाहीत.]

स्वयें पुसें दशानन । कोण्या युक्ती पुच्छदहन । जाळावया लंकाभुवन । [तु. 'कपींने विंदान मांडिले'.] करावया छळण कपि सांगे ॥ २५ ॥

अनुक्रमणिका

वस्त्रें तेलें तुपें भिजवोन । पुच्छ गुंडाळावें संपूर्ण । मग जाळावें अग्नि लावोन । तेणें मरण वानरा ॥ २६ ॥

मरणवर्म आलें हातां । अति उल्हास लंकानाथा । होय दूतासी सांगतां । वेष्टनार्था कपिपुच्छा ॥ २७ ॥

पुच्छ गुंडाळितां तांतडी । सरली जुनीपानी लुगडीं । मग गुंडिती नवी घोंगडी । धुवट घडी उकलोनी ॥ २८ ॥

दिंडें आणिलीं उदंडें । तरी कपिपुच्छ न गुंडें । चाटे भाटे फोडिती धोंडे । करिती तोंडें [दै. 'महाशंख'.] महाशब्द ॥ २९ ॥

शेले खारिवे बोजवटे । काळीं बेरीं समसगंटें । सखरें निखरें [कं. 'चोखटे'; दै. 'धारवटे'.] धुवटें । परी पुच्छ न वेष्टे कपीचें ॥ ३० ॥

राजगृहींची [दै. 'विचित्र वस्त्रें'.] वस्त्रें वस्त्र । नगरीचें वस्त्र मात्र । सभा नागविता समग्र । पुच्छ [तु. वि. 'अणुमात्र'; कं. 'अग्र'.] चतकोर गुंडेना ॥ ३१ ॥

[कं. 'प्रेतांचीं'.] पोतांचीं वस्त्रें घेती काढकाढूं । आणि पडदे गुंडीती फाडफाडूं ।
दुसे गुंडिती उघडउघडूं । द्वंद्वां माकडू पेटला ॥ ३२ ॥

कोणाचा मेहुणा कोणाचा पाहुणा । जांवाई आणिला दिवाळसणा ।
त्याच्या करितां वस्त्रहरणा । शंख स्फुरणा ते करिती ॥ ३३ ॥

जें जें देखती वस्त्रयुक्त । तें तें दूत नागवीत । नगरी भोंवे पुच्छावर्त । कळकळत नरनारी ॥ ३४ ॥

पुरुष नागविले हळहळीत । काळे नि तृणें लिंग झांकित । मागें पुढें देवोनि हात । स्त्रिया पळत अतिनग्न ॥ ३५ ॥

मग राणीवंसाचीं लुगडीं । करोनि आणिलीं उघडीं । लंका नागविली रोकडी । कडोविकडी कपिपुच्छें ॥ ३६ ॥

नगर नागवें हळहळीत । सभा नागवी समस्त । नग्न स्त्रिया राणीवंसांत । पुरविला अंत कपिपुच्छें ॥ ३७ ॥

दुर्ग सांटवण निवडी । तेला तुपाची टांकीं [तु. कं. 'काढी'; दै. 'प्रौढी'.] गाढी । कपिपुच्छें केली रोकडी । घोंगडी पांगडी भिजती ॥ ३८ ॥

[वि. 'लेश'.] घृतस्नेह नाहीं नगरांत । वाती मालवल्या समस्त । गडद पडले लंके आंत । लंकानाथ धुकीधुकी ॥ ३९ ॥

नगरीं तेलातुपाचा तढा । भंवती वस्त्रांचा हरडा । तरी पुच्छ न गुंडे पुढां । लाविलें वेढा वानरें ॥ ४० ॥

अनुक्रमणिका

सभा नागविली [तु. 'नरनारी'; तं. 'रावण वीरीं'.] वीरानुवीरीं । लंगोटी लाविलें घरोघरीं ।
वस्त्रमात्र न मिळे नगरीं । कपिपुच्छ तरी न गुंडे ॥ ४१ ॥

पुच्छ गुंडावयाची व्युत्पत्ती । ज्याची नगरीं त्याचे हातीं ।
स्वयें नागवी मारुती । लाविली ख्याती कपिपुच्छें ॥ ४२ ॥

वानर वीर जगजेठी । लंका नागविली पुच्छासाठीं । शिणतां राक्षस कोट्यानुकोटी । पुच्छ शेवटीं गुंडेना ॥ ४३ ॥

पुच्छ गुंडिता [दै. 'वाडेकोडे'.] कैवाडें । अग्र अधिकाधिक वाढे । [मु. 'ऐसी ख्याती'.] वेढा लाविली माकडें । मरण रोकडें [कं. पै. 'आले'.] राक्षसां ॥ ४४ ॥

नाहीं झगडा ना भांडण । करितां कपिपुच्छ वेष्टण । तृण प्राय केला रावण । गाढी आंगवण हनुमंता ॥ ४५ ॥

पुच्छ वेष्टिलें समग्र । अल्प उरलें आहे अग्र । ऐसें ऐकोनि दशशिर । पीतांबर म्हणे गुंडाळा ॥ ४६ ॥

इंद्रजित प्रधान समवेत । रावणासी स्वयें सांगत । पुच्छ दाहें मरे हनुमंत । पुच्छ समस्त वेष्टावें ॥ ४७ ॥

पीतांबरें श्वेतांबरें । पट्टकुळें मनोहरें । गुंडितांही क्षोमांबरें । पुच्छ [मु. 'नभरे'.] नावरे कपीचें ॥ ४८ ॥

इंद्रजित अतिशयें धांकत । जरी वांचला हनुमंत । तरी समस्तां करील घात । पुच्छ दहनांत मारावा ॥ ४९ ॥

रावण धांके निज मानसीं । पुच्छ न गुंडवें आम्हांसी । [कं. 'वेगीं मारावे'; दै. केवी मरण.] कैंवी मारवे हनुमंतासी । उकसाबुकसी स्फुंदत ॥ ५० ॥

तंव बोलिला विद्युन्माळी । वानर आवरावया [तु. 'या वेळीं'.] महाबळी ।
उघडी करा जनकबाळी । मग पुच्छ तत्काळीं आकळेल ॥ ५१ ॥

ऐसें ऐकतां हनुमंतें । आवरिलें निज पुच्छातें । दूत सांगती रावणातें । आम्ही पुच्छातें आकळिलें ॥ ५२ ॥

आम्ही सेवक आर्तुबळी । पुच्छ आकळिले समूळीं । म्हणोनि पिटिली टाळी । केला सकळीं [कं. 'सिंहनाद'.] गडगर्ज ॥ ५३ ॥

रावण सांगे [तु. 'सेवकातें'.] अति क्रोधार्थे । अग्नि लावारे पुच्छातें । आणोनिया लोहकारांते । लाविले भाते अग्नीसी ॥ ५४ ॥

लंकानाथ सुखसमेळीं । पुच्छ [तु. मु. 'करावया'; कं. 'करा म्हणे'.] करोनिया होळी । हनुमान मारावया महाबळी । अग्नीजवळी स्वयें आला ॥ ५५ ॥

अनुक्रमणिका

अग्नीच्याही पोटांत । अपमानावा लंकानाथ । तेंचि करूं पाहे हनुमंत । तोही गुह्यार्थ अवधारा ॥ ५६ ॥

तिये काळीं हनुमंतें । विनविलें स्वयें पितयातें । वायू निज सखा अग्नीतें । ज्वाळा तेथें होवों नेदी ॥ ५७ ॥

ज्वाळा होवो नेदी येथे । ऐसें [कं. मु. 'नमूनिया'.] नेमूनी वायूतें । अपमानावया रावणातें । कपि पुच्छार्थें खवळला ॥ ५८ ॥ [ओवी ५८ दै. प्रतीत नाही.]

भातें फुंकितां चौपासीं । [तु. दै. 'धूम्र उठिला आकाशीं'.] अग्नि स्पर्शेना पुच्छासी । राक्षस होती कासाविसी । अग्नि पुच्छासी लागेना ॥ ५९ ॥

रावण पुसे हनुमंतासी । अग्नि कां न लागे तुझ्या पुच्छासी ।
हनुमान म्हणे रावणासी । तूं तंव आहेसी अति मूर्ख ॥ ६० ॥

[मु. दै. 'सद्‌सद्विवेक'.] संतासंत विवेक ज्ञान । ज्यासी नाहीं तो अज्ञान । तूं तंव ज्ञानगर्वी पाषाण । धर्मलक्षण लक्षेना ॥ ६१ ॥

भाते फुंकितां अचेतन । केंवी जाळवे सचेतन । हे तुज नाहीं निजज्ञान । अति अज्ञान लंकेशा ॥ ६२ ॥

वचन मानलें रावणासी । पाचारुनी निज विश्वासी । फुंकोनि अग्नि लावा पुच्छासी । साक्षेपेंसीं सांगत ॥ ६३ ॥

राक्षस फुंकितां चौपासी । पुच्छें दडपिलें अग्नीसी । खउट घाणी रिघे घशासीं । कासाविसी राक्षसें ॥ ६४ ॥

खउट घाणी अति प्रबळ । डोळां आंसुवें मुखी लाळ । ऊर्ध्व श्वासें खोकती सकळ । हलकल्लोळ ऊठिला ॥ ६५ ॥

द्वंद्वां पेटला हनुमंत । सभा जाली धूमांकित । वानरें मांडिला अनर्थ । लंकानाथ [तु. दै. 'गांजिला'.] गजबजिला ॥ ६६ ॥

रावण म्हणे हनुमंता । पुच्छ कां न जळे फुंकितां । हनुमान म्हणे लंकानाथा । ऐक आतां सांगेन ॥ ६७ ॥

पोफळ नेदितां यजमानासी । होम [तु. निर्फळ मुख्य'.] न करवे तयासी । न फुंकितां रावण अग्नीसी । अग्नि पुच्छासी स्पर्शेना ॥ ६८ ॥

गृहस्थें न करितां ब्रह्मार्पण । द्विज न घेती आपोशन । न फुंकितां दशानन । हुताशन प्रबळेना ॥ ६९ ॥

एके मुखें फुंकिती किती । दहा मुखें तुज [पै. तं. अं. 'आयती'.] आहेती । तुंवा फुंकिलिया लंकापती । पुच्छ प्रदीप्ती हुताशें ॥ ७० ॥

अनुक्रमणिका

हनुमंताची विवेक युक्ती । सत्य मानलें लंकापती । पुच्छाग्नि फुंकावया प्रदीप्ती । केली आइती तें ऐका ॥ ७१ ॥

करोनियां शुद्धाचमन । प्रथम देवोनि घृतावदान । फुंकावया हुताशन । दशानन बैसला ॥ ७२ ॥

रावणाचें पोटीं कपट । कपि जाळावा पुच्छें सगट । येणें आवेशें दशकंठ । हव्यवाट फुंकित ॥ ७३ ॥

रावणाचे निज चित्तीं । माझेनि मुखें पुच्छ प्रदीप्ती । सांग जाळिलियां मारुती । जगीं मत्कीर्ती वाढेल ॥ ७४ ॥

हनुमान म्हणे पितया पवनासी । अग्नि फुंकितां रावणासी ।
अति अपमान द्यावा त्यासी । मुख कोणासी न दाखवे ॥ ७५ ॥

अति [दै. 'द्वेषें'.] आवेशें दशानन । आक्रोशें फुंकितां हुताशन । भडका एकसरें उठोन । केलें दहन खांडमिशा ॥ ७६ ॥

रावण तोंड परतें करी । हनुमान पुच्छ उचली वरी ।
पहिला अपमान राजशिरीं । केली बोहरी खांडमिशा ॥ ७७ ॥

होतां खांडमिशा दहन । मुखीं पोळला रावण । शंख करी गुद त्राहाटोन । काळें वदन लंकेशा ॥ ७८ ॥

अभिनव कपीची ख्याती । ऐकोनि हांसे रघुपती । सुग्रीवादि जुत्पती । स्वयें हांसती स्वानंदें ॥ ७९ ॥

पत्र वांचितां लक्ष्मण । तोही जाला हास्यवदन । हनुमंताचें अति विंदान । काळें वदन लंकेशा ॥ ८० ॥

आमुचा हनुमान आतुर्बळी । धुरेच्या मुखा केली होळी । वानरें पिटोनियां टाळी । सुखसमेळीं गर्जत ॥ ८१ ॥

विजयी हनुमान महावीर । हरिखें नाचती वानर । अवघे करिती जयजयकार । श्रीरामचंद्र स्मरोनि ॥ ८२ ॥

अंगदें उठोनि आपण । भेरी त्राहाटिलें निशाण । सुमन वर्षती सुरगण । सुखसंपन्न श्रीराम ॥ ८३ ॥

ऐकतां सेवकाची ख्याती । स्वयें सुखावे रघुपती । धन्य धन्य तो मारुती । पावन [अं. 'करी'.] कीर्ती तिंहीं लोकीं ॥ ८४ ॥

सौमित्रासी श्रीराम सांगत । पुढारा वाची ब्रह्मलिखित । पुच्छ दहनीं हनुमंत । पुढें पुरुषार्थ काय केला ॥ ८५ ॥

वंदोनि श्रीरामाचे चरण । पत्र वाची लक्ष्मण । आवडी परिसत रघुनंदन । सावधान अवधारा ॥ ८६ ॥

अनुक्रमणिका

श्रीरामातें अनुलक्षून । हनुमान उभा कर जोडोन । नाहीं श्लाघ्यता अभिमान । [तु. ‘अति दुर्धर’.] निराभिमान मारुती ॥ ८७ ॥

पालेखाईर मी वानर । कीर्तीकर्ता श्रीरामचंद्र । रणीं रामनाम महाशूर । रण दुर्धर हरिनाम ॥ ८८ ॥

श्रीराम हाताचेही हात । श्रीराम शस्त्राचें सामर्थ्य । श्रीराम करितां राक्षसघात । रणकंदनार्थ श्रीरामें ॥ ८९ ॥

श्रीराम प्राणाचाही प्राण । श्रीराम बाणाचाही बाण । श्रीराम माझी अंगवण । [मु. ‘श्रीरामीं समर्पण पै माझें’.] माझे मीपण श्रीराम ॥ ९० ॥

ऐकतां हनुमंताचे बोल । श्रीरामा येती सुखाचे डोल । भक्तीभावार्थाची ओल । अति सखोल श्रीरामीं ॥ ९१ ॥ [ओवी ९१ नंतर तु. प्रतीत पुढील ओव्या आहेत :—]

[‘श्रीराम शरणागता वज्रपंजरू । श्रीराम कृपाळू साचारु ।
श्रीराम सर्व सौख्य दातारू । महिमा अपारु वेदां न कळे ॥ ११२ ॥
जेथे श्रीरामनामस्मरण । तेथे सर्व शत्रु संहरण ।
विघ्नें नाशतीं गहन । सुखनिधान श्रीराम कृपें ॥ ११३ ॥
जेथें श्रीरामकथा । तेथें हात जोडोनी श्रवणार्था ।
अत्यंत सावधानता । पवित्र श्रोता हनुमंत ॥ ११४ ॥
सकळहि लीला तुझी जाण । एकासी अधिक एकासी न्यून ।
एकासी सौख्य एकासी दुःख गहन । हें चाळकपण तुझें रामा ॥ ११५ ॥
प्राण्यासी लाविसी कर्मबंधता । तुझी तरी सर्वार्थी अलिप्तता ।
पुण्यपापें प्राणी भोगितां । हा पदार्थ तुझीच लीला ॥ ११६ ॥’]

पुढें ब्रह्मयाचें ब्रह्मलिखित । हरिखें सौमित्र वाचित । अपमानला लंकानाथ । सभेआंत सलज्ज ॥ ९२ ॥

प्रथम [वि. ‘प्रहरीं’.] प्रारंभीं पुच्छकंदन । दाढ्यामिशा जालें दहन । सिंहासनीं काळें वदन । लज्जायमान रावण ॥ ९३ ॥

कीर्ती जाली अपकीर्ती । थोर लज्जा रावणाचित्ती । पुढें काय करील मारुती । पुच्छदहनार्थी कळेना ॥ ९४ ॥

छळोनि जाळितां वानरासी । छळण न चले रामभक्तासीं ।
छळणे जाळिलें माझिया मुखासी । खांडमिशांसी पुच्छ दाहो ॥ ९५ ॥

वानरें उडतां रामनामेंसीं । छेदिले दुर्धर सप्तपाशांसी । द्रुमपाश [दै. ‘राजपाशासी’.] रज्जुपाशासी । या [मु. ‘यमपाशासी’.] मश्यकासी कोण पाडु ॥ ९६ ॥

काळपाश कर्मपाश । धर्मपाश ब्रह्मपाश । मायापाश मोहपाश । जन्मपाश सातवा ॥ ९७ ॥

काळपाश तो आयुष्यघात । कर्मपाश तो [दै. ‘अरिष्टवंत’.] अनिश्वरवंत । धर्मपाश तो आश्रमगत । वेदविहितार्थ ब्रह्मपाश ॥ ९८ ॥ [ओवी ९८ तु. प्रतीत नाहीं.]

देहममता मोहपाश । मुख्य माया तो आशापाश । कनककांता हा जन्मपाश । सप्तपाश जीवबंधा ॥ ९९ ॥

अनुक्रमणिका

सप्त पाशांची [तु. ‘निश्चिती’.] निवृत्ती । रामनामें करी मारुती । येरांच्या न चलती युक्ती । शास्त्रव्युत्पत्ती शिणतांही ॥ १०० ॥

श्रीरामाचें रामनाम । तेंचि केवळ [तु. ‘तारक ब्रम्ह’.] परब्रह्म । नाम निर्दळी कर्माकर्म । धर्माधर्म छेदक ॥ १०१ ॥
[ओवी १०१ नंतर तु. प्रतीत पुढील ओव्या अधिक आल्या आहेत :—
‘लौकिकीं बोलती ज्ञानवचन । युक्तीनें दाविती गृह्यज्ञान ।
परी ते शब्दचातूर्य जाण । ठकवण स्त्रियां पुरुषां ॥ १२६ ॥
जेथें प्रगटलें आनंद ज्ञान । तेथें खुंटले युक्तिवचन ।
परांस गोवावया ज्ञान । सर्वजण बुडविती ॥ १२७ ॥’]

अबद्ध पढतां पैं वेद । अनिवार बाधी निषेध । नाम स्मरतां अबद्ध । होती निर्द्वंद्व श्रवणार्थी ॥ १०२ ॥

अबद्ध मंत्राच्या प्रयुक्ती । जापक चळले नेणों किती । अबद्ध नामाच्या आवर्ती । जडमूढ तरती [मु. ‘असंख्य’.] भवसिंधू ॥

करितां कर्मक्रिया व्युत्पत्ती । विधि [दै. ‘विधानोक्त याग’.] विधाने व्यंग होती ।
व्यंगलिया कर्मा उद्धरागती । [क. ‘तत्काळ होती कर्त्यासी’.] हरिनामोक्ती अच्युतें ॥ १०४ ॥

नामासीं नाहीं कर्मबंधन । नामासीं नाहीं विधिविधान ।
आसनीं शयनीं भोजनीं जाण । नाम पावन हरीचें ॥ १०५ ॥

स्वप्नीं स्मरतां रामनाम । तिन्ही अवस्था करी भस्म । ऐसें दाटुगें हरीचें नाम । नाम परब्रह्म प्रत्यक्ष ॥ १०६ ॥

स्वप्नीचिया स्वप्नस्थिती । कौशिका रामरक्षेची प्राप्ती । जे कां दाटुगी त्रिजगतीं । उद्धरणार्थी [दै. ‘जगाचिया’.] दीनांच्या ॥

रामरक्षा ज्याचे हातीं । कळिकाळ त्यासी कांपती । यमधर्म पायां लागती । तीर्थें मागती चरणतीर्थ ॥ १०८ ॥

असो रामरक्षा व्युत्पत्ती । दोनी [मु. ‘दोनचि’.] अक्षरें रामनामोक्ती । चहूं मुक्तींची फिटे भ्रांती । ब्रह्मप्राप्ती ठसावे ॥ १०९ ॥

श्रीराम स्मरणाचेनि [तु. मु. ‘योगें’.] पांगे । ब्रह्मस्थिती घर रिघे । कळिकाळासी करी उगें । नाम दाटुगें हरीचें ॥ ११० ॥ [ओवी ११० नंतर तु. प्रतीत पुढील ओव्या आल्या आहेत :—
‘जेथे रामनाम स्मरणोक्ती । जेथे रामकथेची भक्ती ।
तेथे चारी मुक्ती वोळंगती । अष्टसिद्धी द्वारीं उभ्या ॥ १३९ ॥
रामनाम कथा कल्पवृंक्ष । मनी जें जे असेल अपेक्ष ।
सद्भावे कार्य होय दक्ष । अनेक लक्ष सौख्य प्राप्ती ॥ १४० ॥’]

ऐसी रामनामाची [दै. वि. ‘कीर्ती’.] स्थिती । पूर्ण बाणली हनुमंतीं । तेणें त्याची पावन कीर्ती । त्रिजगतीं निज विजयी ॥ १११ ॥ [ओवी १११ तु. प्रतीत व ११२ दै. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

ऐसी हनुमंताची स्थिती । ब्रह्मयानें लिहिली ब्रह्मलिखितीं । पुढें कपिपुच्छ प्रदीप्ती । केली ख्याती ते ऐका ॥
[ओवी १११ तु. प्रतीत व ११२ दै. प्रतीत नाही.]

पुच्छीं धडाडितां हुतांशु । हनुमंतासी अति संतोशु । खेवा आलिया अमृतांशु । ऐसा उल्हासु वानरां ॥ ११३ ॥

रामनामाही परतें । नाहीं नाहीं साधन सरतें । अग्नि बाधूं न शके मातें । कृपा रघुनाथें मज केली ॥ ११४ ॥
[ओवी ११४ नंतर तु. प्रतीत पुढील ओवी आली आहे :—
'पंचभूतांचा स्वामी रघुनाथु । सूत्रधारी सर्वांचा अंतर्गतु ।
दुःखी न करितो स्वभक्तु । ब्रम्ह सदोदितु श्रीराम ॥']

श्रीरामनामें हनुमंत । सप्तपाश [कं. 'देह'; दै. 'वंधनी'; मु. 'बद्ध'.] द्वंद्व निर्मुक्त । तोही पुच्छदाहे तळमळीत । राक्षसां अंत करावया ॥ ११५ ॥

नेत्रीं लाविली अर्धचंद्री । खरसी आणिली मुखाभीतरीं ।
पुच्छ पसरोनि धरणीवरी । मरणानुकारी कपि पडे ॥ ११६ ॥

राक्षसीं येवोनि समस्त । त्यातें हालवोनि पहात । कपि हालविना पायहात । वानरे दांत विचकिले ॥ ११७ ॥
[ओवी ११७ नंतर तु. प्रतीत पुढील ओवी आली आहे :— 'एक मिरे घालिती नाकांत । पाणी सोडिती कानांत । वैद्य येवोनि पाहती हात । नाडींत जीव कांही नाहीं ॥ १४७ ॥']

एक उलथें पालथें करिती । एक उफराटे धरिती । तंव ते पुच्छाग्नीनें पोळती । मग पळती माघारे ॥ ११८ ॥

एक ढुंगी घालिती काड्या । एक हाणिती फडाफडां ।
ऐसा वानर मीसकरूं गाढा । दांत दाढा हालविना ॥ ११९ ॥

मीस करोनि अति निगुती । हालों नेदि पातयापाती । म्हणती निमाला मारुती । करोनि [तु. 'हा मेला'.] ख्याती रणमारें ॥

वानर वीर जगजेठी । मारिल्या राक्षसांचिया कोटी ।
इंद्रजित रावणा धुकधुकी मोठी । अवधियांच्या पोटी अति धांक ॥ १२१ ॥

जरी हा मरण न सांगतां । तरी करितां अवधियांच्या घाता ।
तीक्ष्ण बुद्धि लंकानाथा । छळोनि हनुमंता मारिलें ॥ १२२ ॥

वानर सत्यवादी पूर्ण । पाळोनि श्रीरामाची आण । सांगोनियां निजमरण । आपणया आपण मारविलें ॥ १२३ ॥

वैद्य पाहती विचक्षण । कपीचें हृदयीं आहे प्राण । तोही अतिशयें क्षीण । क्षणार्धें पूर्ण निमेल ॥ १२४ ॥

हनुमान निमाला ऐकतां वाणी । घाव घातला निशाणीं । इंद्रजित हरिखला मनीं । वाटिली शेरणी [दै. 'लंकेशा'.] लंकेसी ॥

अनुक्रमणिका

रावणें मारिला मारुती । लंका लोक पाहूं येती । राक्षस वीरांचिया पंक्ती । अमित क्षिती दाटलिया ॥ १२६ ॥

मिळावया राक्षसाची मांदी । मीस घेतलें [तु. 'युक्ति बुद्धि'.] निज बुद्धि । अवघियां वधावया त्रिशुद्धि । पेटला द्वंद्वीं ते ऐका ॥

दाटल्या देखोनि राक्षस [दे. 'भारी'.] हारी । जळत पुच्छ [कं. तं. वि. तु. दै. मु. 'घाली'.] ठेवी त्यावरी । तंव ते पोळती उरीं शिरीं । अपांपरी राक्षसां ॥ १२८ ॥

पळो जातां पैं बाहेरी । जळत पुच्छ लाविलें द्वारीं । अवघियां केली कोंडमारी । ऐसा निशाचरी आकांत ॥ १२९ ॥

जनांच्या वस्त्रां लाविली आगी । तेणें ते जळती सर्वांगी । पुच्छ घाली एकाएकाचें ढुंगीं । नेसणियां आगी लावोनी ॥ [ओवी १३० नंतर वि. प्रतीत–– 'स्त्रियांच्या लुगडियांशी आगी लाविता । त्या घरासी नागव्या धावतां । भेणें वाढेसी अडखळतां । तोंडा दांता रक्त प्रवाहे ॥ १६२ ॥']

आगी लागल्या धोत्रांसी । द्विज पोळले लिंग प्रदेशीं । नागवे नाचती रावणापासीं । दाविती त्यासी लिंगव्यथा ॥ [ही ओवी अधिक आहे. ओवी १३१ नंतर तु. प्रतीत–– 'कोणाची जळाली तोंडे । जळत जळतां उरली रोडें । संपूर्ण जळालीं ब्रह्मदंडें । आकांत उदंडे हनुमंते केला ॥ १६४ ॥' ही ओवी अधिक आहे.]

हनुमान मारिला राजद्वारीं । निशाण त्राहाटिलिया भेरी ।
जळो ते रावणा तुझी थोरी । जोहारवोहारी त्वां केली ॥ १३२ ॥

लंका नागविली [तु. दै. 'वस्त्रासाठी'.] वस्त्रपरिपाटी । तेलातुपाची पडली तुटी ।
दिवा लावणें खुंटली गोष्टी । शेखीं जीवासाठी कपिपुच्छें ॥ १३३ ॥

आधींच वानर सबळ । पुच्छ पेटविलें प्रबळ । लंका जाळील तत्काळ । आणि सकळ राक्षसां ॥ १३४ ॥

रावणा तुझें पोटीं कपट । कपटें मांडिलें तळपट । पुच्छें प्रज्वळला मर्कट । करील सपाट सर्वांचे ॥ १३५ ॥

रावण म्हणे हनुमंता । लोक जाळिसी कवण्या अर्था । सावध ऐक लंकानाथा । तुज तत्वतां सांगेन ॥ १३६ ॥

पुच्छासी मरण आलें निश्चित । मरणभयें झाडा देत । भयें लोकांमाजीं लपत । त्यासी म्यां येथ काय कीजे ॥

एकाचे चरण धरीत । एकाचे पोटीं [कं. 'खुपसित'; दै. तु. 'घालीत'.] डोयीसुत । एकाचे पालवीं पिळा घेत । मरणभयार्थ चुकवावया ॥ १३८ ॥

[ओवी १३८ वि. प्रतीत नाही.] एकासी होत शरणांगत । एकाचे गळांचि पडत । विनवूनी लंकानाथ । मरणोन्मुक्त करा म्हणे ॥ १३९ ॥

रावणा मी ही करितों विनंती । जें जाजावोनी दहनार्थी । पुच्छ येता काकुळती । तरी मरणोन्मुक्त करी

अनुक्रमणिका

त्यासी ॥

उरीं शिरीं स्वयें जाळीत । या नांव म्हणसी शरणांगत ।
पुच्छे मांडिला मरणावर्त । मरणान्मुक्त करा म्हणसी ॥ १४१ ॥ [ओवी १४१ दै. प्रतीत नाही.]

करावया राक्षसांचा घात । द्वंद्वा पेटला हनुमंत । देखोनि पुच्छ दहनावर्त । लंकानाथ चळीं कांपे ॥ १४२ ॥

रावण कपिभयें कांपत । निःशंक बैसला हनुमंत । पुच्छें मांडिला आकांत । दहनावर्त राक्षसां ॥ १४३ ॥

दशमुखेंसीं संमुख । हनुमान बैसला निःशंक । पुच्छें सेनानी सैनिक । एकेएक [तु. 'कवळिले'.] पोळविलें ॥ १४४ ॥

राक्षससैन्या पैं माझारीं । बोंब सुटली एकसरी । अग्नि पोळतां उरीं [तु. 'शरीरीं'.] शिरीं । पुच्छ महामारीं पेटलें ॥ १४५ ॥ [ओवी १४५ तु. प्रतीत नाही.]

पुच्छ तंव तें अग्निकल्लोळ । लंका वेढिली सकळ । राक्षसे करिती तळमळ । न चले बळ कपिपुच्छीं ॥ १४६ ॥

हनुमान विचारी मानसीं । अग्नि लागला माझे कांसेसी । तरी परम तृप्ती देवों यासी । ऐसें अति उल्हासी वानर ॥

विचारितां मूळानुवादु । वेदानुवादें सखे बंधू । दोहींचा पिता वायु प्रसिद्धु । परम सुहृदु आत्मत्वें ॥ १४८ ॥

अग्नि वायूचा जेष्ठ सुत । कनिष्ठ भेटला हनुमंत । [तु. 'सुखें'.] सुते आलिंगिला सुत । उल्हासत स्वयें वायु ॥ १४९ ॥

जेष्ठ बंधु अति वरिष्ठ । भोजनीं लंकाभुवन ताट । राजमंदिरीं परवडी श्रेष्ठ । भक्ष चोखट तें ऐका ॥ १५० ॥

रावणाचा छत्र दाहो । प्रथम प्राणाहुति पहा हो । माड्या गोपुरें गृहसमुदावो । निज निर्वाहो भोजनीं ॥ १५१ ॥

चंदनमंदिरें तेंचि ओदन । गृह सामग्री तेचि वरान्न । [मु. 'पताका कथिका'.] आसनें वितानें पक्कान्न । घृतें जाण मणिमाळा ॥ १५२ ॥

नाना परीचे वृक्ष दहन । शाखा स्वादिष्ट संपूर्ण । गुप्त धन तें वरी लवण । दधी ओदन [तु. दै. 'तळघरे'.] तणघरें ॥ १५३ ॥

जाहलिया तणघरांचें दहन । सवेंचि उत्तरापोषण । जेष्ठ बंधूसी भोजन । लंकाभुवन अर्पित ॥ १५४ ॥

अनुक्रमणिका

हनुमान बैसोनि पुरद्वारीं । पुच्छ प्रेरिलें नगरीं । आगी लावितां घरोघरीं । नरनारी आकांत ॥ १५५ ॥

नवल लाघवी वानर । पुच्छें करोनि चौफेर । सबाह्य आकळिलें नगर । निशाचर तळमळती ॥ १५६ ॥

निर्गम न पुरे नगरीं । जळत पुच्छ नगरद्वारीं । तळमळीत नरनारी । [कं. 'आपदा भारी'.] आपांपरी राक्षसां ॥ १५७ ॥ [ओवी १५७ तु. प्रतीत नाही.]

नेसणिया आगी लावी आधीं । नरनारी नागव्या बिदीं । हळहळीत राक्षस मांदी । सांदीकोंदीं कळकळिती ॥ १५८ ॥

लेंकीस माय म्हणे तूं कां बुची । तंव ते सांगे माझी पोळली खोची ।
जांवाई आला नागवाची । तो देखे सासूची नग्नता ॥ १५९ ॥

म्हणे आजि माझे सफळ नयन । देखिलें स्त्रियेचें जन्मस्थान ।
लाजे सासू झांकी नयन । अवघे नग्न हळहळीत ॥ १६० ॥

एके पोळली स्तनांतरीं । एके पोळली योनिद्वारीं । एके पोळली उरीं शिरीं । गुदद्वारीं पैं एके ॥ १६१ ॥

ऐसा राक्षसांसी आकांत । नगरी भोवतां पुच्छावर्त । काळें तोंड लंकानाथ । जे नगरदाहार्थ तेणें केला ॥ १६२ ॥

पुच्छाग्नीं मारावा वानर । अग्नि तेणें केला हतियेर । लंका जाळिली समग्र । निशाचर देहदाहें ॥ १६३ ॥

निघावया नगराबाहेरीं । येतां जनांचिया हारी । जळत पुच्छ तें चौफेरी । लंकापुरी कवळोनी ॥ १६४ ॥

जे जे द्वारीं रिघों जात । पुच्छ धगधगीत तेथ । निर्गम न पुरे अति आकांत । जन भ्रमत अति भ्रांतीं ॥ १६५ ॥

आगी लावोनि प्रबळ बळी । पाडिले हुडे दुर्गांच्या पौळी । अगड बुजाले पैं तळीं । मांडिली होळी दुर्गाची ॥ १६६ ॥

हुडे खचती दडदडां । तळीं राक्षसा होत रगडा । सैन्य मारोनि बुजीत अगडा । पुढील झगडा जिंतावया ॥ १६७ ॥

पाडोनि दुर्गांच्या पौळी । खंदक बुजिला समूळीं । श्रीराम यावया सवंदळी । वाट मोकळी कपि करीत ॥ १६८ ॥

लंका दुर्गी सभोवतें । गडपाळ सैन्य जागतें । तें तें स्थळ बळें समस्तें । दृढें कपिनाथें जाळिलें ॥ १६९ ॥

लंका दुर्गिचीं दुर्घटें । जाळिलीं अर्गळा कपाटें । मोकळे सातही दारवंठे । ख्याती मर्कटें लाविली ॥ १७० ॥

अनुक्रमणिका

दुर्गा सभोवतीं चौफेरें । भरली होतीं अग्नियंत्रें । आगी लावितां वानरें । तें एकसरें सूटलीं ॥ १७१ ॥

एकवेळ समकाळ । सुटलें यंत्राचे यंत्रगोळ । नगरीं उठिला हलकल्लोळ । वीर प्रबळ निमाले ॥ १७२ ॥

हनुमान वायु आणि वन्ही । लंका जाळितां तिघीजणीं । तापें तापली धरणी । सर्प फणीं पोळले ॥ १७३ ॥

सर्प पोळोंनि फणीमणी । बुडी देती आवरण जीवनीं । शेष पोळेना सहस्त्र फणी । शेषशयनी श्रीराम ॥ १७४ ॥

जेंवी प्रळयकाळीचा अग्नि । राहे [कं. 'सप्त'.] सत्यलोका जाळूनी ।
तैसा लंकादाहे दहनवन्ही । झोंबे धांवोनि [तु. 'संहारी'.] निराळी ॥ १७५ ॥

लंका जाळितां मारुती । तापें तापली त्रिजगती । लंकाजन अति आवर्ती । आली शांती राक्षसां ॥ १७६ ॥

रावणाचिया राणीवंसांत । आगी लावी स्वयें हनुमंत । रावण बैसला होता जेथ । आलें तेथ कपिपुच्छ ॥ १७७ ॥

रावणा मांडिला अति आकांत । तेणें राक्षस धांकती [तु. 'बळवंत'.] समस्त ।
इंद्रजित जाला शोकाकुळित । लंकानाथ केंवी वांचे ॥ १७८ ॥

युद्ध करितां मारुती । आमचिया खुंटल्या समस्त [तु. दै. 'युक्ति'.] शक्ती । मरण आलें लंकापती । कैशा रीतीं तो वांचे ॥ १७९ ॥

रावण काढा रे बाहेरी । नाहीं तरी पडेल पुच्छ जोहरीं । दुर्ग पाडोनि निशाचरीं । कष्टांतरीं मार्ग केला ॥ १८० ॥

नवल कपिपुच्छाची थोरी । जळत पुच्छ टाकिलें द्वारीं । निर्गम न पुरे बाहेरीं । हाहाकारी गर्जत ॥ १८१ ॥

तिये काळीं निशाचरीं । निवडोनिया निधडे वीरीं । रागें लोटले कपीवरी । शस्त्रास्त्रीं सन्नद्ध ॥ १८२ ॥ [ओवी १८२ वि. प्रतीत नाही.]

वोडण खड्गें शूळ त्रिशूळ । फरश पट्टिश गदामुद्गल । बाणीं कोंदलें नभ भूतल । रणकल्लोळ वीरांचा ॥ १८३ ॥

रावणाचे दृष्टी पुढां । होईल निर्वाणीचा झगडा । हनुमान होवोनिया गाढा । रणीं वेंगाढा ऊठिला ॥ १८४ ॥

कपीनें बहुता लाविली ख्याती । आजि याची करुं शांती । [तु. कं. दै. 'गांजोनिया रण विख्याती'.] गर्जोनियां रणविघातीं । शस्त्रसंपातीं मारणें ॥ १८५ ॥

अनुक्रमणिका

कपीस मारावया रोकडे । कवची खड्गी वीर गाढे । सरकोनि थरकोनि चहूंकडे । घाय देव्हडे हाणिती ॥ १८६ ॥

येतां कपिपुच्छ आघात । लघुलाघवें चुकवित । सन्मुख [तं. वि. तु. मु. 'वंचोनी'; दै. बोलोनी पुरुषार्थ'.] चुकवोनि आघात । रणकंदनार्थ मांडिला ॥ १८७ ॥

हनुमान विचारी पोटांत । वीर खवळले अत्यद्भुत । यांचा पाहों पां पुरुषार्थ । [वि. 'काय समस्त करतील'.] अंगीं आघात साहोनि ॥ १८८ ॥

यांचिया शस्त्रांच्या समेळीं । माझीं न तुटे रोमावळी । शस्त्रें हाणितां महाबळी । घायातळीं राहिला ॥ १८९ ॥

हनुमान आला घायातळीं । वीरीं दिधली आरोळी । म्हणती [तु. 'आम्ही आतुर्बळी'.] अवेध बळी रे बळी । कपि भूतळीं पाडिला ॥ १९० ॥

सन्मुखें हाणिती तोमरें । मागुतीं हाणिती महावज्रें । एके वेळें नाना शस्त्रें । अति दुर्धरें हाणिती ॥ १९१ ॥

वीर वर्षती शरजाळीं । हनुमान दडाला बाणातळीं । मारुती मारिला आतुर्बळी । पिटिली टाळी राक्षसीं ॥ १९२ ॥

राहिलें उड्डाण किराण । निःशेष याचा गेला प्राण । आमची गाढी आंगवण । भेरी निशाण त्राहाटिले ॥ १९३ ॥

वानरें केली थोर ख्याती । तरी आम्ही भद्रजाती । रणा आणिला मारुती । अति व्युत्पत्ती रणमारें ॥ १९४ ॥

अति [तु. 'अभिमानें'.] वाढिवां गर्जती वीर । हरिखें वांटिती साखर । आतां विझवा लंकापुर । रणीं वानर मारिला ॥ १९५ ॥

रण शोधारे सत्वर । कोणे घायीं निमाला कपींद्र । तंव तें करोनि भुभुःकार । वेगीं वानर उसळला ॥ १९६ ॥

ऐकतां कपीचे गर्जन । धांकिन्नला दशानन । राक्षसांचा पळाला प्राण । अचुक मरण ओढवलें ॥ १९७ ॥

लंका पडिली दहनावर्ती । पळावया वाट नाहीं रिती । पुढें खवळला मारुती । मरणप्राप्ती राक्षसां ॥ १९८ ॥

सभामंडपीचा थोर । खांब उपटोनि अष्टधार । कवळोनि निशाचर । घायें चकचूर करीतसे ॥ १९९ ॥

पूंसें कवळोनि समसगट । अवघे करोनि एकवट । खांब हाणोनि अति उद्भट । केलें पीठ अवघ्यांचें ॥ २०० ॥

हातपाय ना मनगट । ना त्या अस्थि शिरकंठ । पोटापाठीचे करोनि पीठ । केली एकवट अवघ्यांसी ॥ २०१

अनुक्रमणिका

॥

ऊर्ध्वगती ना अधोगती । पुढती नव्हे मरणप्राप्ती । राक्षस मारोनि मारुती । गुणातीतीं ते नेले ॥ २०२ ॥

इंद्रिय आवेव त्रिगुणवृत्ती । इंद्रिय देवता नाना रुपज्योती । जीवत्व मारोनि मारुती । गुणातीतीं ते नेले ॥ २०३ ॥

श्रीराम भक्ताचे निजहस्तीं । जे जे निमती मारकयुक्ती ।
ते ते पावती गुणातीतीं । भक्ताची ख्याती पैं ऐसी ॥ २०४ ॥

हरिभक्ताचे दृष्टीपुढें । मरे त्याचें भाग्य गाढें । जिणोनि त्रिगुणांचें सांकडें । पावे रोकडें परब्रह्म ॥ २०५ ॥
[ओवी २०५ नंतर तु. प्रतीत पुढील ओव्या अधिक आहेत :—
‘जेथे हरिभक्ताचे हस्त स्पर्शन । तेथ नासे जन्ममरण ।
चरणतीर्थ प्राशन । गहन हरिभक्त कृपें ॥ २४० ॥
हरिभक्ताचे जे गृहस्थान । तें त्रिसत्य वैकुंठ भुवन ।
अनेक तीर्थे वसती जाण । पुण्यपावन हरिभक्त सेवा ॥ २४१ ॥
श्रीराम भक्ताशी सादर । नमस्कारावें निरंतर ।
सेवा केलिया पुण्य अपार । परात्पर रामकृपें ॥ २४२ ॥
असो हे विशेष वचन । जेथे जन्मांतरीची बुद्धि कारण ।
कोण कोणासी सांगेल कोण । स्वाभाविक गुण जन्मोजन्मीचा ॥ २४३ ॥’]

ऐसऐशा रणव्युत्पत्ती । सैन्य मारिलें [दै. ‘अपरमिती’.] मारुती । संमुख उरला लंकापती । मरणानुवृत्ती धांकत ॥ २०६ ॥

रावण धांकत निज चित्तें । सैन्य मारिलें हनुमंतें । आतां आलें मज भोंवतें । कोण कपीतें निवारी ॥ २०७ ॥

अखयाकुमार केला पुरा । इंद्रजितास युद्ध भेदरा । रणीं मारिलें निशाचरा । कोण वानरा निवारी ॥ २०८ ॥
[ओवी २०८ वि. तं. तु. प्रतींतून नाही.]

रावणा तुझें दाही माथे । कपि म्हणे छेदितों डावे हातें ।
मज वारिलें रघुनाथें । तुज निज हस्तें मारावया ॥ २०९ ॥ [ओवी २०९ कं. प्रतीत नाही.]

श्रीरामाची मर्यादरेखा । कपीसी नुलंघवे देखा । तेणें वांचविलें दशमुखा । मरणोन्मुखा चूकला ॥ २१० ॥

गांजोनिया दशानन । जाळोनिया लंकाभुवन । कपि परतला आपण । श्रीरामचरण वंदावया ॥ २११ ॥

सीतेसी घालोनि लोटांगण । तिसीं होवोनि अनन्यशरण ।
कपि परतला आपण । श्रीरामचरण वंदावया ॥ २१२ ॥ [ओवी २१२ व २१३ दै. प्रतीत व २१३ तु. प्रतीत नाहीत.]

मस्तकमणी घेवोनि खूण । खूण पुसोनि मुखवचन । कपि परतला आपण । श्रीरामचरण वंदावया ॥ २१३ ॥
[ओवी २१२ व २१३ दै. प्रतीत व २१३ तु. प्रतीत नाहीत.]

अनुक्रमणिका

मुखीं श्रीराम नामावृत्ती । हृदयीं श्रीरामाची मूर्ती । देह विकला श्रीराम कार्यार्थीं । अनन्य भक्ती हनुमंता ॥ २१४ ॥

श्रीराम देखे सत्य सर्वार्थी । श्रीराम देखे निजस्वार्थी । श्रीराम देखे सर्व भूतीं । अनन्य भक्ती हनुमंता ॥ २१५ ॥

श्रीराम देखे वाच्यवचनार्थी । श्रीराम देखे गतीची गती ।
श्रीराम देखे विषयस्वार्थी । भक्त परमार्थी हनुमंत ॥ २१६ ॥

श्रीरामरूप इंद्रिय स्थिती । श्रीरामरूप [मु. कं. 'नानावृत्ती'; तु. 'प्रवृत्ती निवृती'.] मनोवृत्ती । श्रीरामरूप स्वप्न सुषुप्ती । भक्त परमार्थी हनुमंत ॥ २१७ ॥

एका जनार्दना शरण । जाहलें ब्रह्मलिखित संपूर्ण । पुढां श्रीरामगमन । सेतुबंधन अवधारा ॥ २१८ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां ब्रह्मलिखितसमासो नाम त्रयस्त्रिंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग चौतिसावा

## श्रीराम समुद्र तीराभिगमन

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

ब्रह्मा म्हणे ब्रह्मलिखितीं । कपीची लिहिली अल्पकीर्ती ।
याहोनि हनुमंताचि ख्याती । अगाध कीर्ती लिहावी ॥ १ ॥

श्रीरामा तुझें हें वानर । लंके आलें पालेखाईर । त्याची कीर्ती अति दुर्धर । मज साचार लिहवेना ॥ २ ॥

अठरालक्ष दीपिकापूर्ण । कपीनें पुच्छें विझवोन । रावणसभा करोनि नग्न । दशानन गांजिला ॥ ३ ॥

रिघोनि रावण शय्यास्थाना । परिसोनि मंदोदरीचें [पै. अं. 'प्रश्ना'.] स्वप्ना ।
सीताशुद्धि आणोनि मना । अशोकवना कपि आला ॥ ४ ॥

देवोनिया श्रीराम मुद्रा । [मु. 'सुखी करोनी सीता सुंदरा'.] वश करोनि श्रीरामभद्रा । गांजावया राक्षसेंद्रा । केला तरुवरां वनभंग ॥ ५ ॥

मारिलें बनकरां किंकरां । पंच सेनानी प्रधानपुत्रा । जंबुमाळी करोनि पुरा । निशाचरां निर्दळिलें ॥ ६ ॥

मुख्य मारावया धुरा । प्रथम बोहणी अखयाकुमरा । इंद्रजितासी लावोनि रणभेदरा । अदटां वीरां मारिलें ॥ ७ ॥

राक्षस सैन्याचिया श्रेणी । अर्बुदांत पडिलयां रणीं । रुधिर प्रवाहत धरणी । भूतां पारणी मेदमांसें ॥ ८ ॥

रणनदी रूधिर स्नान । मेदमांसें तृप्ती भोजन । भूतें प्रेतें पिशाचगण । [तु. 'रणमर्दन'.] रणनर्तन ते करिती ॥ ९ ॥

दशमुखाची दाढी जाळिली । लंकापुर करोनि होळी । हनुमान आला तुज जवळीं । आतुर्बळी महावीर ॥ १० ॥

ब्रह्मा म्हणे माझे युक्ती । [कं. 'जाहली'.] धरवली ते लिहिली कीर्ती ।
मजही न कळे कपीची ख्याती । ते मी लिखितीं केवीं लिहूं ॥ ११ ॥

जैसा अवतार श्रीरामचंद्र । तैसाच हनुमंत साचार । वीर धीर महाशूर । गुण गंभीर गांभीर्यें ॥ १२ ॥

श्रीराम देव हनुमान भक्त । दोहींच्या स्वरुपाचा इत्यर्थ । करूं न शके श्रुतीशास्त्रार्थ । इत्थंभूत मी जाणें ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

**श्रीराम जीव हनुमान प्राण । श्रीराम शिव हनुमान ज्ञान । श्रीराम ब्रह्म हनुमान पूर्ण । दोघे परिपूर्ण परब्रह्म ॥ १४ ॥**

**ब्रह्मयानें लिहिलें ब्रह्मलिखितीं । ऐकोनि हनुमंताची ख्याती । संतोषोनि रघुपती । अति प्रीतीं आलिंगी ॥ १५ ॥**

**हृदयां हृदय लागतां देख । दोन्ही हृदयीं श्रीराम एक । एक तोचि पैं अनेक । अनेकीं एक श्रीराम ॥ १६ ॥**

**हनुमान अवघाचि रामा आंत । हनुमया सबाह्य श्रीरघुनाथ ।**
**लवण समुद्रीं समुद्र होत । तैसा हनुमंत श्रीरामीं ॥ १७ ॥** [ओवी १७ व २० वि. प्रतीत नाहीत.]

**देवा भक्ताची जाली भेटी । निर्विकल्पें पडली मिठी । परमानंदें कोंदली सृष्टी । आनंद कोटी सुग्रीवा ॥ १८ ॥**

**विजयी आमुचा हनुमानवीर । वानर करिती भुभुःकार । अवघीं केला जयजयकार । श्रीरामचंद्र स्मरोनी ॥ १९ ॥**

**अगाध हनुमंताची ख्याती । ऐकोनियां श्रीरघुपती । स्वमुखें आदरली स्तुती । अति प्रीती हनुमंता ॥ २० ॥**
[ओवी १७ व २० वि. प्रतीत नाहीत.]

**वानितां हनुमंताची कीर्ती । करितां हनुमंताची स्तुती । धणी न पुरे रघुपती । तेचि श्लोकार्थीं अनुवादे ॥ २१ ॥**

> श्रुत्वा हनुमतः कीर्तिं यथावदभिभाषिताम् । रामः प्रीतिसमायुक्तमुत्तरं वाक्यमब्रवीत् ॥ १ ॥
> नूनं हनुमतः कृत्यं सुमहद्भुविदुष्करम् । मनसापि यदन्येन कर्तुं खलु न शक्यते ॥ २ ॥
> न हितं प्रतिपश्यामि यस्तरेत महार्णवम् । अन्यत्र गरुडाद्वायोरन्यत्र च हनूमतः ॥ ३ ॥
> देवदानवयक्षाणां गंधर्वोरगरक्षसाम् । अप्रधृष्या पुरी लंका रावणेनाभिपालिता ॥ ४ ॥
> गुप्ता दुर्गगिरेर्मूर्ध्नि वीरेणैकेन धर्षिता ॥ ५ ॥

**उल्लंघोनि अपांपती । लंके जावोनियां मारुती । अतर्क्य श्रुतिशास्त्र प्रयुक्ती । ते ते ख्याती येणें केली ॥ २२ ॥**

**एकें उड्डाणें समुद्रलंघन । करी ऐसा आहे कोण । गरुड वायु कां वायुनंदन । अन्यत्रा गमन न करवे ॥ २३ ॥**

**गरुडा गमन पक्षगती । वायूसी सर्वत्र गमन शक्ती । एकें उड्डाणें मारुती । समुद्रीं ख्याती करोनि गेला ॥ २४ ॥**

**सुरसा सिंहिका** [मु. 'मैनाक गिरी'.] **सुनाभिगिरी । कपि मार्ग रोधिला सागरीं ।**
**एका सोडी एका मारी । एकाचा गर्व हरी स्पर्शमात्रें ॥ २५ ॥**
**अगाध उड्डाणाची थोरी । लंका सांडोनि माघारी । जावोनि पडलंकेभीतरीं । कौंचा सहपरिवारी वधियेली ॥**

अनुक्रमणिका

२६ ॥

लंकादुर्ग सागरोदरीं । अति दुर्गम गिरीशिखरीं । रावण रक्षी सहपरिवारीं । दुर्धर थोरी दुर्गाची ॥ २७ ॥

जया दुर्गाची निरवडी । देव बंदी तेहतीस कोडी । नवग्रहाचे पायीं बेडी । येरे बापुडीं कोण पुसे ॥ २८ ॥

देव [मुं. तु. 'ग्रह'.] दैत्य गुह्यक दानव । यक्ष रक्ष सिद्ध गंधर्व । पन्नग ऋषीश्वर मानव । कांपती सर्व लंकेशा ॥ २९ ॥

ऐसिया दुर्धर लंकेप्रती । नाहीं साह्य न सांगाती । एकला रिघोनियां मारुती । अभिनव ख्याती तेणें केली ॥ ३० ॥

इंद्रजित दांतीं धरी तृण । ऐसें दुर्धर केलें रण । रावणाचें मुख जाळोन । केलें दहन लंकेचें ॥ ३१ ॥

सीता सावकाश घेवोनि भेटी । तिच्या पुसोनि गुह्य गोष्टी । मणी घेवोनि जगजेठी । उठाउठीं येथें आला ॥ ३२ ॥

न चात्मा लघुतां नीतः सुग्रीवश्चापि तोषितः । अहं च रघुवंशश्च लक्ष्मणश्च महाबलः ॥ ६ ॥
वैदेह्या दर्शनेनाद्य धर्मतः परिरक्षिताः ॥ ७ ॥

रण कंदन सीता शुद्धयर्थ । सुखी सुग्रीव कपिनाथ । ऐकोनि सीता गुजगुह्यर्थ । श्रीरघुनाथ सुखी जाला ॥ ३३ ॥

ऐकोनि सीता अनुताप वचनें । लक्ष्मण सुखावे जीवें प्राणें । वानरां होतसें सुख पारणें । कपीचें बोलणें ऐकोनि ॥ ३४ ॥

लघुत्व न येतां वानर जाती । कपीनें केली रणख्याती । तेणें सुग्रीव वानरपती । सुख संविती पावला ॥ ३५ ॥

करोनि राक्षस कंदनार्थ । कपीनें आणिला शुद्धयर्थ । आम्हां अवघियां पुरुषार्थ । संरक्षित हनुमंतें ॥ ३६ ॥

श्रीरामें करितां स्तुती । हनुमान अति विनतवृत्ती । लोटांगणें घालोनि क्षितीं । स्वयें रघुपतीतें विनवीत ॥ ३७ ॥

तुझिया रामनाम निजशक्ती । तेणें म्यां केली लंकेची ख्याती ।
त्या मज रंकाची स्तुती । केवीं रघुपती तूं करिसी ॥ ३८ ॥

ऐकोनि हनुमंत वचन । संतोषोनि रघुनंदन । पुढती पुसतसे आपण । [पै. अं. 'दुर्गम'.] दुर्गलक्षण लंकेचें ॥ ३९ ॥

अनुक्रमणिका

पुनरेवाथ पप्रच्छराघवः पवनात्मजम् । कानि दुर्गाणि दुर्गायाः लंकायास्तद्ब्रवीष्व मे ॥ ८ ॥
बलस्य परिमाणं च द्वारदुर्गक्रियामपि । गुप्तिकर्म च लंकायां रक्षसां सदनानि च ॥ ९ ॥
यच्च यावच्च यादृक्च लंकायामभिदृष्टवान् । तथा तत्सर्वमाचक्ष्व सर्वथा कुशलो ह्यसि ॥ १० ॥
स पृष्टो राजपुत्रेण रामेणाक्लिष्टकर्मणा । आचचक्षे हनुमता यथा दृष्टार्थमर्थवत् ॥ ११ ॥
परां गुप्तिं च लंकायाः सागरस्य च भीमताम् । विभागं च बलौघस्य निर्दिष्टं रावणस्य च ॥ १२ ॥

**लंका दुर्ग हे कैंचे काय । कोणाची कैंची कैसी आहे । दुर्गीचें बळदळ समुदाय । साभिप्राय मज सांग ॥ ४० ॥**

**दुर्गद्वारीं क्रिया स्थिती । दुर्गाचीं यंत्रें गुप्तगती । द्वाररक्षण सैन्य** [दै. 'किती'.] **संपत्ती । रिघूंनिघूं युक्ती मज सांग ॥ ४१ ॥**

**दुर्ग शोधिलें तुंवा समूळीं । घेतली लंकेची घरधांडोळी । किती सैन्य रावणाजवळी । आतुर्बळी वीर किती ॥ ४२ ॥**

**आम्हांसी मांडिलिया रण । संमुख येती कोण कोण । तूं तंव तेथिचा रणप्रवीण ।** [तु. 'रक्षण'.] **रणलक्षण मज सांग ॥ ४३ ॥**

**श्रीराम** [दै. 'पूर्ण'.] **राजपुत्र सज्ञान । हनुमंत अनुलक्षोन । पुसिला लंकादुर्ग प्रश्न । तेंची आपण कपि सांगें ॥ ४४ ॥**

**लंका दुर्गीं समुद्र आगड । तेणें करितां अति अवघड । कळे सुरासुर चडफड । परम गूढ समुद्रीं ॥ ४५ ॥**

**मद गजांचियां हारी । मद स्त्रवती लंकानगरीं । मदगंध न माये अंबरीं । मत्त भ्रमरी झंकार ॥ ४६ ॥**

**अश्व रथांचियां थाटी । पदरज न माये अंबुटीं । सैन्य असंख्य कोट्यानुकोटी । वीर जगजेठी राक्षस ॥ ४७ ॥**

**लंकादुर्ग अतिशय दुर्धर । खंदकीं जळ अपरंपार । माजीं मीन मगर नक्र । जळीं जळचरें असंख्य ॥ ४८ ॥**

**उभवोनि यंत्रावरी यंत्र । परसैन्याचे देखोनि भार । दुरोनि करिती चकचूर । यंत्रमार महागोल ॥ ४९ ॥**

**नवनिगिया अरिमर्दनी । ज्या कां शतघ्नी सहस्त्रघ्नी । दुर्ग चौफेर** [मु. 'सहस्रकोनी'.] **चहूंकोनीं । यंत्र श्रेणी मारका ॥ ५० ॥**

**चोरद्वारांची व्युत्पत्ती । इंद्रजित कपटी** [कं. 'गुप्त घाती'] **गुप्तगती । घाला घालोनि रातोरातीं । धुरा मारिती** [पै. अं. खेरीज इतरत्र 'अस्र बंधे'.] **अश्वबंधें ॥ ५१ ॥**

**दुर्गीं शतानुशत दारवंटे । मुख्य वागणें चहूं वाटे । आगळा सांखळा घडघडाटें । दृढ कपाटे लोहबंध ॥ ५२ ॥**

अनुक्रमणिका

**श्रीरामेसीं करावया युद्ध । रावणासी अति आल्हाद । सैन्यासैनी युद्धबाध । द्वंद्वयुद्ध धुरेसी ॥ ५३ ॥**

> शैलाग्रे रुचिरा दिव्या सा पुरी देवनिर्मिता । वाजिवारणसंपन्ना लंका परमदुर्गमा ॥ १३ ॥
> अयुतं रक्षसां तत्र पूर्वद्वारमुपाश्रितम् । शूलहस्ता दुराधर्षाः सर्वे खड्गास्त्रयोधिनः ॥ १४ ॥
> अर्बुदं रक्षसां तत्र पश्चिमद्वारसंस्थितम् । नियुतं रक्षसां तत्र दक्षिणद्वारसंस्थितम् ॥ १५ ॥
> शतंशतसहस्राणां महतां गुल्ममास्थिताः । उत्तरद्वारमास्थाय रावणं पर्युपासते ॥ १६ ॥

**समुद्रमध्य गिरिचे माथा । वसावया लंकानाथा । लंका करवी विधाता । दुर्गकर्ता विश्वकर्मा ॥ ५४ ॥**

**विश्वकर्मा निज व्युत्पत्ती । लंका निर्मिली दुर्गम गती । ते लंकेची दुर्गम ख्याती । म्यां तुज प्रती सांगितली ॥ ५५ ॥**

**चहूंद्वारी संरक्षण । भटसुभट वीर दारुण । रावणें ठेविले आपण । रक्षोगण ते ऐका ॥ ५६ ॥**

**पूर्वद्वारीं दहासहस्र । निधडे निःशंक निशाचर । शूळ हस्तीं खड्गधर । अति दुर्धर ते द्वारीं ॥ ५७ ॥**

**पश्चिम द्वारीं महाशूर । अर्बुदांत निशाचर । शस्त्रास्त्रीं प्रवीण वीर । तें ते द्वार राखिती ॥ ५८ ॥**

**लक्षानुलक्ष निधडे वीर । रथ गज बाजी महाशूर । ते रक्षिती दक्षिणद्वार । अहोरात्र गर्जोनी ॥ ५९ ॥** [ओवी ५९ वि. प्रतीत नाही.]

**उत्तर द्वाराचा पैं धांक । स्वयें वाहे दशमुख । येणें द्वारें रघुकुलटिळक । अवश्यक येईल ॥ ६० ॥**

**शतानुशतें सहस्त्रें सहस्त्री । गुल्मा गुल्मीं हारोहारी । स्वयें रावण सहपरिवारी । उत्तरद्वारीं संरक्षी ॥ ६१ ॥**

**लंका समुद्राचें** [मुं. 'पोटीं'] **बेटीं । वसताहे गिरीत्रिकुटीं । भोंवतीं राक्षसांचीं घरटीं । पारखे दृष्टी केवीं देखें ॥ ६२ ॥**

**लंकागड अतिगूढ । ऐकतां वाटे अवघड । तो ही केला म्यां निवाड । कडेफोड दुर्गाची ॥ ६३ ॥**

> ते मया संक्रमा भग्नाः परिखाश्चापि पूरिताः । दग्धा च नगरी लंका साद्रिप्राकारतोरणा ॥ १७ ॥
> दृढा पारे समुद्रस्य दूरं पारस्य राघव । नौपथश्चापि नास्त्यत्र निरुद्देशश्च सर्वतः ॥ १८ ॥
> येन केन तु मार्गेण तरामो वरुणालयम् । हतैव नगरी लंका वानरैरुपधार्यताम् ॥ १९ ॥

**लंका दुर्ग रघुपती । म्यां** [दै. मु. 'पाहिले'] **पाडिले जाण निश्चिती । म्हणसी चोरोनि रातोरातीं । वीरां रणख्याती लावोनी ॥ ६४ ॥**

**रावणें पुच्छा लावितां आगी । लंका जाळितां उभयभागीं । वीर मारिलें ते प्रसंगीं । रणरंगीं भिडोनी ॥ ६५ ॥**

अनुक्रमणिका

**उपऱ्या धवलारे गोपुरे । सप्तखणी दामोदरें । लंका जाळिली घरोनघरें । राजमंदिरें मुख्यत्वें ॥ ६६ ॥**

**आगळा सांखळा दुर्गाचे ओटे । लोह निबद्धें कपाटें । जाळिलें दुर्गाचे दारवंठे । राम मर्कटें हनुमेनी ॥ ६७ ॥**

**मच्छ मगर झशाकुळीं । खंदक भरले होते जळीं । तें म्यां बुजिले समूळीं । दुर्गाच्या पौळी पाडोनी ॥ ६८ ॥**

**दुर्ग जाळितां नानापरी । मुख्य दुर्ग वसतीचा जो गिरी । तो म्यां जाळिला पुच्छें करी । करोनी महामारी राक्षसां ॥ ६९ ॥**

**रावणासी करोनिया दीन । म्यां जाळिलें लंकाभुवन । राखिलें** [कं. 'सज्जन'] **बिभीषणसदन । भक्तपूर्ण परमार्थी ॥ ७० ॥**

**जो जो श्रीरामाचा भक्त । तो तो आमचा परम आप्त । रावणाचिया राण्या** [कं. मुं. वि. मु. 'समस्त'.] **स्वस्थ । त्यांच्या घरांत वांचल्या ॥ ७१ ॥**

**श्रीराम निघावया सवंदळी । सदुर्ग लंका केली होळी । समुद्र तरलिया गोळांगुळीं । लंका तत्काळीं घेतील ॥ ७२ ॥**

> तपसा सेतुबंधेन सागरोच्छोषणेन वा । सर्वथा हि समर्थोऽहं सागरस्य विलंघने ॥ २० ॥

**समुद्र परपारीं निश्चिती । लंका दुर्गीं रावणावस्ती । नावांची तेथे न चले गती । मत्स्य गिळिती महामीन ॥ ७३ ॥**

**मत्स्य मीन आणि मगर । नावा गिळिती महानक्र । समुद्र अतिशयें दुस्तर । केंवी परपार पावाल ॥ ७४ ॥**

**समुद्र तरावया आतां । उपाव चिंतावा सर्वथा । दुस्तर सांगता हनुमंता । आलें रघुनाथा स्फुरण ॥ ७५ ॥**

**सोडोनिया अग्निबाण । करील समुद्राचें शोषण । जळ जंतूंचे जातील प्राण । तरी मी आन करीन ॥ ७६ ॥**

**तीव्र तप सत्वनिष्ठ । समुद्रीं करुनि पायवाट । वानर वीर सुखें** [मु. 'संतुष्ट', कं. दै. 'सन्निष्ठ'] **संनिष्ठ । परतट पावती ॥ ७७ ॥**

**समुद्र लंघन तें किती । त्यास कां वेंचू तप संपत्ती । सेतु बांधोनि सिंधूप्रती । नेईन जुत्पत्ती परतटा ॥ ७८ ॥**

**सुग्रीवासी पाचारोन । गर्जोनि सांगे रघुनंदन । आजचि करावें प्रयाण । रणीं रावण मारावया ॥ ७९ ॥**

> अस्मिन् मुहूर्ते सुग्रीव प्रयाणमभिरोचते । युक्तो मुहूर्तो विजयः प्राप्तो मध्यं दिवाकरः ॥ २२ ॥
> अभिप्रयाम सुग्रीव सर्वानीकसमावृताः । निमित्तानीह धन्यानि यानि प्रादुर्भवंति मे ॥ २३ ॥
> निहत्य रावणं सीतामाहरिष्ये न संशयः ॥ २४ ॥

अनुक्रमणिका

**विजयादशमी सुमुहूर्तीं । जयो पावला रघु चक्रवर्ती । प्रपितामह तो आम्हांप्रती । त्याची ख्याती तूं ऐक ॥ ८० ॥**

**शमी तळीं प्रथमवस्ती । धनेश्वर तेचि रातीं । अपार वर्षला संपत्ती । विखुरलें क्षिती बहुधन ॥ ८१ ॥**

**तैं पासोनि अद्यापि जाण । आणावया बहुसाल धन । विजयादशमी सीमोल्लंघन । शमीपूजन जन करिती ॥ ८२ ॥**

**पूर्वजांचें सुमुहूर्त । आजि मज जालें प्राप्त । लंकेसी जावया त्वरित । सेना समस्त सज्ज करी ॥ ८३ ॥**

**रणीं दंडावया लंकापती । शुभ लोचन माझे लवती । आलिंगावया सीतासती । बाहु स्फुरती स्वानंदें ॥ ८४ ॥**

**मध्यान्ही येतांचि आदित्य । रणविजयी अभिजित । प्रयाण करावें निश्चित । ऐसें रघुनाथ बोलिला ॥ ८५ ॥**

**ऐकोनि श्रीरामाचें वचन । सुग्रीवा आलें अति स्फुरण । भेरी त्राहाटिल्या निशाण । लंका प्रयाण गडगर्जे ॥ ८६ ॥**

**अंगद हरिखेला तत्काळीं । वानर सैन्यीं पिटिली टाळी ।**
**रावण मारोनि महाबळी । जनकबाळी आणावया ॥ ८७ ॥**

**सुग्रीव राजाज्ञेची नीती । वानरांची** [तु 'निज स्थिती'] **निघती स्थिती । ज्यासी जैसी नेमिली गती । तिहीं त्या रीती चालावें ॥ ८८ ॥** [ओवी ८८ दे. प्रतीत नाही.]

> अग्रे यातु बलस्यास्य नीलो मार्गं प्रवीक्षितुम् । वृतःशतसहस्रेण वानराणां तरस्विनाम् ॥ २५ ॥
> फलमूलवता चैव शीतकाननवारिणा । पथा मधुमता चाशु सेनां सेनापते नय ॥ २६ ॥
> सागरौघनिभं भीमं वानराणां महद्बलम् । कपिसिंहाः प्रकर्षंतु शतशोऽथ सहस्रशः ॥ २७ ॥
> गजश्च गिरिसंकाशो गवयश्च महाबलः । गवाक्षश्चाग्रतो यातु गवां पृष्ठ इवर्षभः ॥ २८ ॥
> वारो वानरवाहिन्या वानरौघवतां यथा । बलवद्दक्षिणं पार्श्वं ऋषभः परिरक्षतु ॥ २९ ॥
> गंधहस्ती च दुर्धर्षस्तरस्वी गंधमादनः । यातु वानरवाहिन्याः वामपार्श्वमनुष्ठितुम् ॥ ३० ॥

**वानर सेना आज्ञावर्ती । नीळ महावीर सेनापती । तेणें चालावें ऐशियारीतीं । मार्ग गती शोधोनि ॥ ८९ ॥**

**धाडोनि तरस्वी तराळ । फळ मूळ जळ स्थळ । सेना चालवावी सुख समेळ । यावे तत्काळ पाहोनि ॥ ९० ॥**

**जिकडे नाही फळ मूळ जळ । तिकडे चालवितां दळ । वानर कष्टतील सकळ ।** [दै. 'दुःख प्रबळ'] **सेना विकळ होवों नेदी ॥ ९१ ॥**

[कं 'बरवी'] **यालागीं शोधोनि मार्ग स्थिती । वानरां पदोपदीं विश्रांती । सेना चालवावी ऐशिया रीतीं ।**

अनुक्रमणिका

सेनापती सज्ञानें ॥ ९२ ॥

ऐकोनि श्रीरामाचा वचनार्थ । वानर हरिखेले समस्त । बाप कृपाळु रघुनाथ । आम्ही सनाथ श्रीरामें ॥ ९३ ॥

जरी आम्ही वानर उद्धत । तरी आम्ही रामदूत । हरिखें हरिनामें गर्जत । आम्ही सनाथ श्रीरामें ॥ ९४ ॥

मार्ग गतीचें लक्षण । श्रीराम वदला आपण । नीळें घालोनि लोटांगण । मस्तकीं [वि. तु. कं. मुं. मु. 'चरण'] वचन वंदिले ॥ ९५ ॥ [ओवी ९५ मु. प्रतीत नाही.]

नीळासवें निज परिवार । शतसहस्त्र वानर वीर । अवघिया पुढें चालिला भार । जयजयकार करोनी ॥ ९६ ॥

गज गवाक्ष [वि. तु. कं. तं. मु. 'शरभ'] गवय वीर । नीळा मागें सहपरिवार । चालिला तिघांचाही भार । जयजयकार करोनी ॥ ९७ ॥ [ओवी ९७ दे. व मुं. प्रतींत नाही.]

गाईं मागें जैसे गोऱ्हें । नीळा मागें तेणें प्रकारें । वानर चालिले निजभारें । जयजयकारें गर्जत ॥ ९८ ॥ [ओवी ९८ वि. व कं. प्रतींत नाही.]

वृषभ वीर [मुं. कं. तं. 'वेगी'] वानरवोघीं । तेणें चालावें दक्षिणभागीं । गंध हस्ती दे. तु. कं. मुं. मु. वि. 'दोघीं'.] गंधमादनवोघीं । वामभागीं चालावें ॥ ९९ ॥

कोट्यानुकोटी वानरभार । युवराजा राजकुमर । अंगदें येवोनि सहपरिवार । केला नमस्कार रामासी ॥ १०० ॥

निशाणें त्राहाटिल्या भेरी । तडक फुटला एकसरी । काहाळा चिनकाहाळा थोरी । रण मोहरी गर्जती ॥ १०१ ॥

जाहाला तुरांचा गजर । सुग्रीव राजा सहपरिवार । वानरीं केला जयजयकार । संख्या संभार अवधारा ॥ १०२ ॥

शतैः शत सहस्त्रेष्व कोटीभिश्चायुतैरपि । अर्बुदैरर्बुदशतैर्वानरेंद्रो महाबलः ॥ ३१ ॥

शतानुशत श्र्याममुखवानर । गोळांगुळें शतसहस्त्र । कोट्यानुकोटी केवळ [दे. कं. 'भद्र'] शुभ्र । असंख्य वानर हेमवर्णी ॥ १०३ ॥

एक ते डाळिंबी कुसुमाकार । शेंदूरवर्णी वीर अपार । सुनीळ निळे वानरभार । अंजनाकार असंख्य ॥ १०४ ॥

एक बालार्कसम तांबडें । एक तें चंद्रबिंब सम चोखडें । इंद्र चापा समान गाढे । एक रोकडे स्फटिकाभ्र ॥ १०५ ॥

अनुक्रमणिका

कोट्यानुकोटी अयुतेंअयुत । अर्बुदें निर्बुदें शतानुशत । वानर वीर असंख्यात । हरि गर्जत हरिनामें ॥ १०६ ॥

ऐसा वानर राजभार । शशांक छत्र युग्मचामर । सुग्रीव निघाला राज्यधर । जाहला गजर वाद्यांचा ॥ १०७ ॥

वृक्ष फळित पुष्पित । किंशुक फुलें झेलीत । टके पताका त्या सैन्यांत । वीर गर्जत रामनामें ॥ १०८ ॥

वानर वीरां अत्यंत हरिख । मारोनियां दशमुख । सीता आणावी आवश्यक । देती हांक हरिनामें ॥ १०९ ॥

एक रामनामें उपरमत । एक ते आनंदें नाचत । वानर सैन्य उल्हासत । अभिषेकार्थ रामसीता ॥ ११० ॥

श्रीरामांकित आम्ही जुत्पत्ती । रावण बापुडें ते किती । आणोनियां सीतासती । श्रीरघुपती अभिषेकूं ॥ १११ ॥

ऐसा देखोनि सुग्रीव भार । संतोषला श्रीरामचंद्र । निघावया अति सत्वर । केलें [मुं. 'विचार'.] विचित्र तें ऐका ॥ ११२ ॥

अभिरुह्य हनूमंतमैरावतमिव प्रभुः । अंगदं च समारुह्य लक्ष्मणस्त्वंतकोपमः ॥ ३२ ॥
भूतयानेन भूतेशो कैलासाधिपतिर्यथा । जांबवांश्च सुषेणश्च वेगदर्शी च वानरः ॥ ३३ ॥
ऋक्षराजश्च दुर्धर्षः कक्षां रक्षतु मे स्वयम् । जगाम रामो धर्मात्मा ससैन्यो दक्षिणां दिशम् ॥ ३४ ॥
मध्ये राजा च सुग्रीवो रामो लक्ष्मण एव च । बलिभिर्हरिभिर्भीमैर्वृतः शस्त्रुनिबर्हणः ॥ ३५ ॥

इंद्र चढे ऐरावता । तैसा श्रीराम चढला हनुमंता । अंगद अति उल्हासता । होय उचलिता सौमित्र ॥ ११३ ॥
[ओवी ११३ ते ११९ कं. प्रतीत नाहीत.]

जैसा भूतारुढ भूतनाथ । तैसा अंगदें उर्मिलाकांत । देखोनि उल्हासें श्रीरघुनाथ । अति उल्हासित सुग्रीव ॥ ११४ ॥

श्रीराम लक्ष्मण वीर वरीष्ठ । सुग्रीव राजा तया निकट । दक्षिण पंथे घडघडाट । वीर उद्भट चालिले ॥ ११५ ॥

सुषेण आणि जांबुवंत । जांबुवंताचा जेष्ठ भ्रात । जो कां ऋषराज विख्यात । नाम संकेत धूम नामें ॥ ११६ ॥

सुषेण वीर जगजेठी । जांबुवंत वीर निकट निष्ठी । श्रीराम लक्षोनियां दृष्टी । सुख संतुष्टी चालिलें ॥ ११७ ॥

श्रीरामाचे पाठी जाण । जांबुवंत आणि सुषेण । हे ही चालती सावधान । यांसी हें स्थान नेमस्त ॥ ११८ ॥

वानर वीर श्रेष्ठ श्रेष्ठ । त्यांसी वांटोनि दिधली वाट । ऐका सांगेन ते स्पष्ट । वीर वरिष्ठ मार्ग भाग ॥ ११९ ॥

अनुक्रमणिका

हरिं :शतबलिर्भीमः कोटिभिर्दशभिर्वृतः । दक्षिणं पार्श्वमासाद्य ररक्ष हरिवाहिनीम् ॥ ३६ ॥
शतकोटिपरीवारः केशरी गवयो गजः । रभश्चातिबलः पार्श्वं सैन्यमध्यमपालयत् ॥ ३७ ॥
दधिमुखः प्रजंघश्च जंघश्च शरभः कपिः । सर्वतश्चाभिधावंतो रक्षणार्थं नृपाज्ञया ॥ ३८ ॥
उल्कामुखः प्रभावश्च इंद्रजानुस्तथा कपिः । सर्वतस्ते ययुर्वीरास्त्वरयंतः प्लवंगमान् ॥ ३९ ॥

**शतबळी नामें कपीश्वर । दशकोटी सपरिवार । श्रीरामाचा दक्षिणपार । राखे वानर उल्हासें ॥ १२० ॥**

**केसरी हनुमंताचा पितासावत्र । अंजनीचा पूर्व भ्रतार । सेना शतकोटी संभार । वीर वानर आतुर्बळी ॥ १२१ ॥**

**त्याही सवें वीर प्रबळ । गज गवाक्ष शरभ अति बळ । गवय वानर विक्राळ । सकळ दळ संरक्षी ॥ १२२ ॥**

**उल्कामुख महावीर । प्रभाव नामा अति दुर्धर । इंद्रजानु त्याहोनी थोर । आले सत्वर रामकाजा ॥ १२३ ॥**

**दधिमुख प्रजंघ जंघ । शरभ सुरभ कपि अनेग । श्रीरामाचे सैन्य सांग । आठै दिग्भाग राखिती ॥ १२४ ॥**

**राजाज्ञा दुर्धर गाढी । नेमिलिया मार्गाचे परवडी । चालती वानराच्या कोडी । समुद्रथडी लक्षोनी ॥ १२५ ॥**

आप्लवंत प्लवंतश्च नदंतश्च प्लवंगमाः । क्ष्वेडंतो विहरंतश्च जग्मुस्ते दक्षिणां दिशम् ॥ ४० ॥
पुरस्तात्पनसो वीरो नलः कुमुद एव च । पंथानं शोधयं तश्च वानरैबहुभिर्वृताः ॥ ४१ ॥
तेषां सेनापतिर्वीरो नीलो वानरपुंगवः । न्यपतत्पततां श्रेष्ठस्तद्बलं पर्यवारयत् ॥ ४२ ॥

**समस्तांही सीता प्राप्त्यर्थ । वानरां उल्हास अत्यद्भूत । येरयेरां पुढें उडत । उपरमत आल्हादें ॥ १२६ ॥**

**येरयेरां वरी चढती । येरयेरां वरी उडती । येरयेरांतें पाडिती । आसुडिती येरयेरां ॥ १२७ ॥**

**येरयेरां तिरस्कारिती । येरयेरां निर्भर्त्सिती । येरयेरां निरवंदिती । नाकोचिती येरयेरां ॥ १२८ ॥** [ओवी १२८ वि. प्रतीत नाही.]

**येरयेरांतें दाविती वांकुली । येरयेरां करिती गुदगुली । रामनामें गर्जती महाबळी । बाहु आफाळोनि मर्दिती ॥** [ओवी १२९ व १४४ कं. प्रतीत नाहीत.]

**वांकुल्या दाविती सुग्रीवाकडे । पिलंगती वाडें कोडें । अवघे नाचती रामापुढें । मातली माकडें रामनामें ॥ १३० ॥**

**सैरां जातां वानरपंक्ती । निशाचरां शिंतरती । मार्ग शोधावयाच्या अर्थी । पुढें जुत्पत्ती धाडिले ॥ १३१ ॥**

**राक्षस मारोनि उद्भट । पुढील शोधावया वाट । नळवीर अति अदट । वीर वरिष्ठ पैं पनस ॥ १३२ ॥**

अनुक्रमणिका

**राक्षसांची गती अगती । पनस जाणें अतर्क्यवृत्ती । कुमुदवीर महामती । राक्षसजाती घातक ॥ १३३ ॥**

**वानर सैन्य** [मुं. ‘समुद्र जळा’.] **समुद्रबळा । नीळ सेनानी तोचिवेळा । आंवरोनी सकळदळा । वीरार्गळा प्रतापी ॥ १३४ ॥**

**नीळाची निग्रह आज्ञावृत्ती । ऋक्ष वानर आणि जुत्पत्ती । कोणी उल्लंघू न शकती । प्रतापमूर्ती सेनानी ॥ १३५ ॥** [ओवी १३५ अं. प्रतीत नाही.]

> अथावृत्य महीं कृत्स्नां जगाम महती चमूः । ऋक्षवानरसंपूर्णा नखदंष्ट्रप्रहारिणी ॥ ४३ ॥
> कराग्रैश्चरणाग्रैश्च वानरैरुद्धतं रजः । भीममंतर्दधे लोकं निवार्य सवितुः प्रभाम् ॥ ४४ ॥
> सा स्म याति दिवा रात्रौ महती हरिवाहिनी । समानिनीषवः सीतां मुहूर्तं नाश्वसन्कचित् ॥ ४५ ॥
> एवं ते हरिशार्दूला गच्छंतो बलदर्पिताः ॥ ४६ ॥

**नेमूनि बोलिला रघुपती । मध्यें न करोनी वस्ती । आजिच्या आजी शीघ्रगती । समुद्राप्रती स्वयें जाणें ॥ १३६ ॥**

**ऐकोनि श्रीरामउत्तर । पृथ्वी कवळोनि समग्र । चालिले वानरांचे भार । हातियेर नखदंष्ट्रा ॥ १३७ ॥**

**रामनामाची गुणगुण थोर । चालिले अस्वल अपार । नामें गर्जत वानर । असंख्य भार चालिले ॥ १३८ ॥**

**नद नदिया देशोदेशीं । गिरी कंदर विवर वासी । वानर आलें रामकार्यासी । मही चौपासी कवळोनी ॥ १३९ ॥**

**चारी बोटें रिती क्षिती । नाहीं उरली वानरा हातीं । सोडवावया सीता सती । शीघ्रगती चालिले ॥ १४० ॥**

**वानर वीर चालतां धरणीं । रज कोंदले गगनीं । सूर्य लोपला मध्यान्हीं । काळाचिया मनीं चळकांप ॥ १४१ ॥**

**सूर्य लोपतां मध्यान्हीं । गाई परतल्या गोठणी । पक्षी कळकळती गगनीं । देव विमानीं कांपती ॥ १४२ ॥**

**वानर वीर अहोराती । वाटे नेघोनि विश्रांती । सोडवावया सीता सती । शीघ्र गती चालिले ॥ १४३ ॥** [ओवी १४३ मुं. प्रतीत नाही.]

**श्रीराम कार्याचें निजसुख । वानरां नाठवे तहानभूक । निद्रा विसरोनि निःशंक । दक्षिण मुख चालिले ॥ १४४ ॥** [ओवी १३५ अं. प्रतीत नाही.]

> सविंध्य गिरिमासाद्य मलयं च महागिरिम् । वनानि चाप्यतिक्रम्य नदीश्च विमलोदकाः ॥ ४७ ॥
> आससाद क्रमेणैव समुद्रं भीमनिस्वनम् । सा महार्णवमासाद्य तस्थौ वानरवाहिनी ॥ ४८ ॥

अनुक्रमणिका

उल्लंघोनि विंध्याद्री । उल्लंघोनि मल्याद्री । नाना वनें वानरीं । क्षणामाझारीं लंघिली ॥ १४५ ॥

नदी नद थोर थोर । क्षणें उतरोनि वानर । तंव पुढे देखिला सागर । गर्जत घोर गडगर्जे ॥ १४६ ॥

ऐकोनि समुद्राचा गजर । रामनामें [मु. 'घेती'] पैं वानर । अवघीं केला भुभुःकार । नादें अंबर कोंदलें ॥ १४७ ॥

नामें कोंदलें अंबर । नामें कोंदला सागर । नामें कोंदले चराचर । नामें वानर गर्जती ॥ १४८ ॥

गिळोनि समुद्राचा ध्वनीं । नाम कोंदलें जीवनीं । नामें कोंदली अवनी । नाम त्रिभुवनीं कोंदलें ॥ १४९ ॥

पुढें जलाब्धी महासागर । पाठीसी वानर सेना समग्र । मध्यें शोभे श्रीरामचंद्र । मर्यादा मेरू धैर्याचा ॥ १५० ॥

गंगा यमुना संगमांत । शोभे प्रयागवट मध्यस्थ । तेंवी सैन्यजलसिंधू आंत । शोभे रघुनाथ प्रतापें ॥ १५१ ॥

पावोनियां समुद्रतीर । कटक उतरलें समग्र । उल्लंघावया सागर । वानर वीर उल्लासें ॥ १५२ ॥

समुद्रीं महामीन चळकत । तैसेचि वानर तळपत । समुद्रीं मत्स्य उल्लाळे देत । कपि उपरमत आकाशीं ॥ १५३ ॥

अतिशयें निबरा पाठीं । कमठ देखोनिया दृष्टी । शिळा बांधोनिया पाठीं । वानर कोटी नाचती ॥ १५४ ॥

तीक्ष्ण दंष्ट्रा देखोनि मगर । दांत विचकोनि वानर । स्वयें धांवती त्या समोर । कपि पुच्छाग्र तोचि फडा ॥ १५५ ॥

समुद्रीं मत्स्यांची चळवळ । तैसी वानरा कळकळ । आणावया जनकबाळ । उतावीळ अवघेही ॥ १५६ ॥

समुद्रीं येती दुर्धर लाटा । तैसा वानरीप्रताप लाठा । वेगीं जावोनि परतटा । दशकंठा मारावया ॥ १५७ ॥

मर्यादा नुल्लंघवे सागरा । श्रीरामआज्ञा तेंवी वानरा । अवघे आलें समुद्रतीरा । लंकापुरा जावया ॥ १५८ ॥

एका जनार्दना शरण । पुढें गोड निरोपण । श्रीरामा भेटेल बिभीषण । सेतु बंधन अवधारा ॥ १५९ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां श्रीरामसमुद्रतीराभिगमनं नाम चतुस्त्रिंशततमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग पस्तिसावा

## प्रधानादि अपमान

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**वानरसेना संभार । पावोनियां समुद्रतीर । कटक उतरलें समग्र । श्रीरामचंद्रासमवेत ॥ १ ॥** [तु. कं. मुं. आणि मु. मध्ये १ ली ओवी अधिक असून ती कमी अधिक फरकाने अशी आहे :—
‘श्रीराम जगदानंदकंद । श्रीराम सच्चिदानंद । श्रीरघुपती नित्य शुद्ध । नाहीं भवबंध स्मरणें तुझ्या ॥ १ ॥’]

**येरीकडे लंकेआंत । नगर जाळोनि गेला हनुमंत । तेणें कैकसीसी आकांत । राक्षसां अंत दृढ आला ॥ २ ॥**

> ततः परमदुःखार्ता जननी रक्षसां पतेः । सुतं विदितवृत्तांतमित्युवाच बिभीषणम् ॥ १ ॥
> इष्टां दारां मृगयता प्रेषितो हनुमानिह । रामेण विनयज्ञेन स ते दृष्टो बिभीषण ॥ २ ॥
> तदिदं गर्हितं कर्म कृतं भ्रात्रा तवानघ । न प्रीणयति मां भुक्तमपथ्यमिव भोजनम् ॥ ३ ॥

**कैकसी रावणाची जननी । लंका गडदाहो देखोनि । परम दुःखार्त होवोनी । स्त्रवती नयनी अश्रुधारा ॥ ३ ॥**

**येवोनि बिभीषणापासी । निज दुःख सांगे त्यासी । मरण आलें रावणासी । राक्षसासी कुळ क्षयो ॥ ४ ॥**

**यासी मूळ तुझा ज्येष्ठ बंधू । चोरोनि आणिली श्रीराम वधू । राम रावणा करील वधू । सकळ** [वि. ‘बंधु’.] **छेदू राक्षसां ॥ ५ ॥**

**सीता श्रीराम प्रियकर । शुद्धी धाडिलें वानर । तेणें जाळोनि नगर । निशाचर निर्दळिले ॥ ६ ॥**

**इंद्रजित आम्हांमाजि उद्भट । कपीने त्याचे काढिले** [कं. ‘चरपट’] **चारट । रणीं खवळोनिया मर्कट । दशकंठ गांजिला ॥ ७ ॥**

**सविष उत्तम पक्वान्न । सेविलिया अवश्य आणी मरण । तैसे सीताभिलाषण । कुळ निर्दळण राक्षसां ॥ ८ ॥**

**संतान होय निःसंतान । ऐसें अलोट आलें विघ्न । बिभीषणासी आलिंगूनी । करी रुदन कैकसी ॥ ९ ॥**

**ऐकें श्रीरामाची गोष्टी । जो जो वीर पडला दृष्टी । तो तो निर्दळी शरवृष्टी । वीर जगजेठी श्रीराम ॥ १० ॥**

**ताटिका मारिली उठाउठी । सुबाहु मारिला यज्ञवाटी । विराधु मारिला वनदिग्पटीं । पडिलिया दृष्टी न सोडी ॥ ११ ॥**

**श्रीराम पदांती एकला जाण । मारिला त्रिशिरा खरदूषण । चौदा सहस्त्र रक्षोगण । रण कंदन केलें रामें ॥ १२ ॥**

अनुक्रमणिका

कबंध निर्दळिला बळी । बाणीं निर्दळिला वाली । सुग्रीव मीनला त्याजवळी । वानर-दळा समवेत ॥ १३ ॥

त्यामाजील हनुमंत एक । लंका जाळोनि निःशंक । गांजोनिया दशमुख । लाविला धाक राक्षसां ॥ १४ ॥

येथें आलिया रघुनाथ । कोण साहेल शरसंपात । होईल राक्षस कुळघात । लंकानाथ अविवेकी ॥ १५ ॥

अति गर्वी दशानन । माझी नायके शिकवण । तुझें मानितो वचन । हित संपूर्ण उपदेशी ॥ १६ ॥

श्रीरामा अर्पोनि सीता । सख्य करावें रघुनाथा । तेणें कल्याण लंकानाथा । आणि समस्ता राक्षसां ॥ १७ ॥

ऐसी देतां शिकवण । रावण करील अपमान । तोही साहोनि आपण । हित संपूर्ण उपदेशी ॥ १८ ॥

बिभीषणा तुज परम शांती । सर्वथा क्रोध नये चित्तीं । करोनी अपमान निवृत्ती । लंकापती उपदेशी ॥ १९ ॥

ऐसें बोलोनियां वचन । उकसाबुकसी करी रुदन । माझें वांचवीं संतान । अनन्य शरण यालागीं ॥ २० ॥

ऐकोनी मातेचें वचन । बिभीषणें वाहिली आण । प्राणांत साहोनि अपमान । हित सांगेन लंकेशा ॥ २१ ॥

रावणा हित शिकवितां । सीता सन्निपात लंकानाथा । करूं धांवेल माझे घाता । शरण रघुनाथा मी होईन ॥ २२ ॥

तुज श्रीरामा निघालिया शरण । तुझेनि माझा कुसवा धन्य । तुझेनि रावणा कृतकल्याण । वंशवर्धन तुझेनि ॥ २३ ॥

> कुलं पवित्रं जननी कृतार्था । वसुंधरा पुण्यवती च तेन ।
> अपारसंवित्सुखसागरेऽस्मिन् । लीनं परब्रह्मणि यस्य चेतः ॥ ४ ॥
> तथैव मुक्तश्चरणौ निपीड्य तौ । शुभौ जनन्या विषयेष्वलोलुपः ।
> कृताभ्यनुज्ञः स यथा कृतांजलिर्जगाम रक्षोधिपदर्शनोत्सुकः ॥ ५ ॥

श्रीरामा रिघालिया शरण । त्याचेनि कुळ पवित्रपूर्ण । त्याचेनि घरासुख संपन्न । तीर्थ पावन त्याचेनि ॥ २४ ॥

शरण रिघालिया रघुनाथा । कृतार्थ होय त्याची माता ।
त्याचेनि पूर्वजां होय सुखरुपता । उद्धरी समस्तां समागमें ॥ २५ ॥

त्याचेनि सुखरूप संसार । त्याचेनि सुखी सुरवर । त्याचेनि सुखी चराचर । जे श्रीरामचंद्र सेविती ॥ २६ ॥

श्रीरामासी रिघालिया शरण । [दै. 'तृणप्राय'] स्वप्नप्राय जन्ममरण । कळिकाळ घाली लोटांगण । श्रीराम चरण सेविलियां ॥ २७ ॥

अनुक्रमणिका

श्रीराम रावणाचा वैरी । कैकसी त्याचा द्वेष न करी । ऐकोनि मातृवचन थोरी । आल्हाद भारी बिभीषणा ॥ २८ ॥

निर्मत्सर मातृवचन । तेणें बिभीषणा हरिख पूर्ण । मस्तकीं वंदोनि तिचे चरण । लोटांगण घातलें ॥ २९ ॥

मातृवचन महाबळी । वोडवोनि कृतांजुळी । हरिखें निघाला रावणाजवळीं । जनकबाळी सोडवावया ॥ ३० ॥

जातां देखोनि बिभीषण । मातेनें केलें निंबलोण । तुझी कीर्ति होईल पावन । सुखसंपन्न तूं होसी ॥ ३१ ॥

माता आशीर्वचन गोष्टी । तेणें बांधिली शकुन गांठी । मग निघाला उठाउठी । घ्यावया भेटी लंकेशा ॥ ३२ ॥

इंद्रजित अतिकाय पुत्र दोन्ही । सभा शोभत प्रधानी । रावण बैसला सिंहासनीं । येतां देखोनि बिभीषण ॥ ३३ ॥

उठिले समस्त राजकुमर । उठिले प्रधान चतुर । बिभीषण होवोनि एकाग्र । केला नमस्कार रावणा ॥ ३४ ॥

रावणें देवोनि सन्मान । अति प्रीती बिभीषण । देवोनिया हेमासन । आपणा समान बैसविला ॥ ३५ ॥

रावणासी सांगे बिभीषण । समस्त मीनले प्रधान । राक्षसां आलें दुर्धर विघ्न । केलें कंदन हनुमंतें ॥ ३६ ॥
[ओवी ३६ वि. प्रतीत नाही.]

> आसाद्य भ्रातरं श्रेष्ठं साध्वसोपक्रमस्थितम् । देशकालार्थसंवादी दृष्टवाचारपराक्रमम् ॥ ६ ॥
> यदा प्रभृति वैदेही संप्राप्रेह परंतप । तदा प्रभृति दृश्यंते निमित्तान्यशुभानि ह ॥ ७ ॥
> अनिष्टान्यग्निशालासु तथा ब्रह्मासनेषु च । सरीसृपा विसर्पंति हव्येषु च पिपीलिकाः ॥ ८ ॥

हनुमंतें ख्याती केली भारी । हा हा भूत लंका नगरी ।
सर्प उठिले अग्नि होत्रीं । हविर्द्रव्या माझारीं पिपीलिका ॥ ३७ ॥

ब्रह्मयाच्या ब्रह्मसदनीं । दंश मशक वृश्चिक श्रेणी । समस्त व्याकुळ लंकाभुवनीं । स्वस्थ कोणी असेना ॥ ३८ ॥

जाणोनि भविष्याची गती । हित सांगे रावणाप्रती । जैंहूनि आणिली सीता सती । विघ्नांची ख्याती तैंहूनी ॥ ३९ ॥

मी कनिष्ठ तूं तंव ज्येष्ठ । बुद्धि सांगों नये स्पष्ट । विघ्न आलें अति [दे. 'निकट'.] अनिष्ट । विचार श्रेष्ठ विचारी ॥ ४० ॥

एकलें श्रीरामाचें वानर । मारिले असंख्य निशाचर । विध्वंसिले लंकापुर । तुम्ही समग्र असतांही ॥ ४१ ॥

अनुक्रमणिका

**तुमचे माथा देवोनि पावो । मारिला अखया महाबाहो । इंद्रजितासी जीव संदेहो । केला दाहो लंकेचा ॥ ४२ ॥**

**तुम्ही असतां वीर समग्र । कोणा न धरवे वानर । कैसेनि जिंकवे रामचंद्र । पुढें विचार तो कैसा ॥ ४३ ॥**

**वैर करितां रघुपती । राक्षसकुळा आली शांती । उपावो सांगोन तदर्थी । स्वार्थ परमार्थी उपयोगी ॥ ४४ ॥**

> तदेवं प्रस्थिते कार्ये प्रायश्चित्तमिदं महत् । रोचये वीर वैदेही राघवाय प्रदीयताम् ॥ ९ ॥
> प्रापणे ह्यस्य कार्यस्य निवृत्तास्तव मंत्रिणः । अवश्यं तु मया वाच्यं शुभं वा यदि वाशुभम् ॥ १० ॥
> संप्रधार्य यथा न्यायं तद्भवान्कर्तुमर्हति ॥ ११ ॥

**तुंवा चोरोनि आणिली सीता । तया अपराध प्रायश्चित्ता । मी सांगेन लंकानाथा । ते तुवां तत्वतां करावें ॥ ४५ ॥**

**अर्थ स्वार्थ परमार्था । साधावया लंकानाथा । श्रीरामा अर्पोनि सीता । सख्य रघुनाथा करावें ॥ ४६ ॥** [ओवी ४६ तु. व मु. प्रतींत नाही.]

**येणें तुज भुक्ती मुक्ती । येणें तुज यश कीर्ती । येणें सकळ कुळा विश्रांती । जाण निश्चिती लंकेशा ॥ ४७ ॥**

**सकळ पापांचें प्रायश्चित्त । नाम स्मरावें रघुनाथ । तो तुवां सेविलिया सीता कांत । सुख स्वार्थ पावसी ॥ ४८ ॥**

**आंगीं आदळलियाही विघ्न । उपाय न सांगती प्रधान । विचारी प्रवेशेना त्यांचें मन । धरोन मौन राहिले ॥ ४९ ॥**

**देखोनि कपीचा युद्ध प्रभाव । पळाली त्यांच्या बळाची हांव । निमाला वाटिवेचा गर्व । परम संदेह प्रधाना ॥ ५० ॥**

**श्रुत दृष्ट अनुमान चिन्ह । तुज म्यां सांगीतलें येवोन । न सांगतां न राहवे जाण । सखेपण आम्हां तुम्हां ॥ ५१ ॥**

**यावरी पुढील कार्यार्थ । रायें पाहोनि हिताहित । दृढ करावा इत्यर्थ । स्वार्थ परमार्थ जेणें साधे ॥ ५२ ॥**

**ऐकोनि बिभीषणाचें वचन । संतोषला दशानन । प्रधानावरी कोपायमान । अति उद्विग्न स्वयें जाला ॥ ५३ ॥**

> लंकायां तत्कृतं दृष्ट्वा घोरकर्म भयावहम् । राक्षसेंद्रो हनुमता श्लाघनीयं सुदुष्करम् ॥ १२ ॥
> अमात्यानब्रवीत्सर्वाराक्षसान्स नराधिपः । संरब्धो रक्तनयनो कोपात्किंचिदवाङ्मुखः ॥ १३ ॥
> दृष्ट्वा तेन च वैदेही प्रधृष्यांतःपुरं मम । तेन वानरमात्रेण प्राकृतेन कुबुद्धिना ॥ १४ ॥

**कंदन करोनि राक्षसांतें । लंका विध्वंसिली हनुमंतें । तें देखोनि लंकानाथें । हनुमंतातें मानवला ॥ ५४ ॥**

अनुक्रमणिका

एकला एक वानर । रणरंगीं वीर धीर । स्वामिकाजीं महाशूर । दाटुगा वीर मारुती ॥ ५५ ॥

प्रधान सेनानी रक्षोगण । त्यावरी रावण कोपायमान । आरक्त करोनियां नयन । कठिण वचन बोलत ॥ ५६ ॥

कळिकाळा माझी दुर्धर नगरी । ते शोधोनियां लंकापुरी । सीता शुद्धी घेवोनि खरी । करोनि बोहरी कपि गेला ॥

अखयादि सैन्य सेनागण । तुम्हां देखतां कपि करी कंदन । जळो तुमचें काळें वदन । वाटिव वल्गना मृषा जल्प ॥ ५८ ॥

जळो तुमची वाटिवेची थोरी । जावोनि करा आडविहिरी । नातरी पोटी घाला सुरी । वानरें नगरी [वि. दै. मु. 'नागविली'.] गांजिली ॥

एकलें एक वानर । तुम्हां न राहवे त्यासमोर । पुढें आलिया श्रीरामचंद्र । युद्धीं समग्र पळाल ॥ ६० ॥

इत्युक्ता राक्षसेंद्रेण राक्षसास्ते महाबलाः । ऊचुः प्रांजलयः सर्वे रावणं राक्षसाधिपम् ॥ १५ ॥

कोपला देखोनि रावण । अवघेही प्रधानगण । बोलों लागले आंगवण । सोळाही जण साटोपें ॥ ६१ ॥

सुप्तघ्न आणि [मु. 'यज्ञगोपास्य'.] यज्ञकोपास्य । यज्ञ केतु आणि दुर्धर्ष । रश्मिकेतु आणि प्रघस । विरुपाक्ष महाबाहु ॥ ६२ ॥

वज्रदंष्ट्र आणि धूम्राक्ष । वज्रनाभि आणि विद्युन्मुख । विद्युज्जिव्ह आणि त्रिशिख । मेघवर्ण महामारी ॥ ६३ ॥

कुंभ निकुंभ दोहींच्या बळा । नाहीं करावया कांटाळा । ऐसे हे प्रधान सोळा । उठिला पाळा सन्नद्ध ॥ ६४ ॥

रश वाजि पदाति कुंजर । शस्त्रास्त्रीं सन्नद्धवीर । येवोनि रावणासमोर । स्वयें बडिवार बोलती ॥ ६५ ॥

तेऽब्रुवन् रावणं सर्वे प्रदीप्ता इव तेजसा । वयं रामं हनिष्यामः सुग्रीवं सहलक्ष्मणम् ॥ १६ ॥
कृपणं च हनूमंतं लंका येन प्रधर्षिता । तानगृहीतायुधान्सर्वान्वारायित्वा बिभीषणः ॥ १७ ॥
अब्रवीत्प्रांजलिर्वाक्यं पुनः प्रत्युपवेश्य तान् ॥ १८ ॥

जैशा पतंगांचिया हारी । उडी घालिती वणव्यावरी । तेंवी राक्षस शस्त्रास्त्रीं । श्रीरामावरी निघाले ॥ ६६ ॥

रावणा ऐक सावधान । न लागतांचि अर्धक्षण । आम्ही मारूं रघुनंदन । सुग्रीव लक्ष्मण समवेत ॥ ६७ ॥ [ओवी ६७ वि. प्रतीत नाही.]

जुत्पत्ती जे थोर थोर । अंगदादि वानर वीर । रणीं मारोनि समग्र । धरणी रुधिर प्रवाहे ॥ ६८ ॥

अनुक्रमणिका

जेणें येवोनि लंके आंत । केला पुरदाहो राक्षसा अंत । तो मारुं आम्ही हनुमंत । निमेषार्धांत उपडोनि ॥ ६९ ॥

पुढें भरला आहे उदधी । नसतां तरणोपायविधी । अवघे धांवती दुर्बुद्धी । मरणोन्मादी उन्मत्त ॥ ७० ॥

यापरी वीर समस्त । युद्धा धांवती मरणोन्मत्त । त्यासी बिभीषण निवारित । युक्तायुक्त विचारें ॥ ७१ ॥

बिभीषण म्हणे तुम्ही वीर । युद्धीं कुशळतें अति दुर्धर । न करितां बळाबळविचार । युद्धा समग्र केंवी जातां ॥

श्रीरामाचें एक वानर । मारले कुमर निशाचर । जेव्हां जाळिलें लंकापुर । तेव्हां त्या समोर कां न व्हाच ॥ ७३ ॥

आला देखोनि हनुमंत । तुम्ही रांड महामिणी ऐसे लपत । आतां मिरवितां पुरुषार्थ । लंकानाथ प्रलोभा ॥ ७४ ॥

अशोकवनीं होतां रण । तुम्ही पळाला अवघेजण । अखया धाडितांचि जाण । घेतला प्राण हनुमंतें ॥ ७५ ॥

अखयाचिये कैवारा । धाडितां न देखतां निशाचरा । मग धाडिलें जेष्ठ कुमरा । महावीरा इंद्रजिता ॥ ७६ ॥

विश्वांसता तुमच्या [कं. मुं. वि. 'बोला'.] बळा । अखया कुमर जीवें गेला । इंद्रजित रणांगणीं गांजिला । लंकेचा केला पुरदाहो ॥ ७७ ॥

धिग्धिग् तुमचा पुरुषार्थ । धिग्धिग् तुमचें जीवित्व । वृथा चाळवा लंकानाथ । रावण निश्चित महाभोळा ॥ ७८ ॥

रावण भोळें बापुडें । तुम्हासी विश्वासलें वेडें। तुमच्या पोटीं आहे कुडें । हें धडफुडें लक्षेना ॥ ७९ ॥

ऐकोनि बिभीषणाचें वचन । समस्त जाले लज्ञायमान । तंव उठिलें पंचप्रधान । आपुली आंगवण वर्णित ॥ ८० ॥

प्रहस्त महोदर पार्श्वद देख । यज्ञहनु आणि दुर्मुख । या पांचाचें पंच श्लोक । अलौकिक आंगवण ॥ ८१ ॥

रावणाचिये निजदळीं । प्रहस्त वीर महाबळी । तो आपली प्रताप नव्हाळी । रावणा जवळी सांगत ॥ ८२ ॥

युद्धामाजीं ज्याचे हात । अरिनिर्दळणीं अति समर्थ । यालागीं नांवें प्रहस्त । अति आप्त लंकेशा ॥ ८३ ॥

> सुव्यक्तं तृषिता भूमिः शोणितं पातुमिच्छति । हतानां संयुगेऽस्माभिर्वानराणां महेश्वर ॥ १९ ॥
> लक्ष्मणः सह रामेण युद्धेषु शयनं गतः । गदाखड्गैश्च पाशैश्च राक्षसैर्बाहुशालिभिः ॥ २० ॥
> रणं तालवनाकारं भवत्यद्भुतदर्शनम् ॥ २१ ॥

अनुक्रमणिका

**खड्ग चाप शूळ फरश । गदापाणी वीर राक्षस । मारावया वानरांस । आम्ही बहुत रणयोद्धें ॥ ८४ ॥**

**बहु काळाची तृषित भूमी । वानर रुधिरें तृप्त करीन मी ।**
**रणी मारुं वानरस्वामी । विजयो आम्ही पावोनी ॥ ८५ ॥** [ओवी ८५,८६ व ८७ तं. प्रतीत नाहीत.]

**लक्ष्मणासहित रामस्वामी । ठायीं पाडोनि रणभूमीं । आम्हांसी विचारितां संग्रामीं । पराक्रमी कोण राहे ॥ ८६ ॥** [ओवी ८६ व ८७ वि. प्रतीत नाहीत.]

**राम लक्ष्मणां करोनी घात । सुग्रीव अंगदा करोनि अंत । वानर मारीन मी समस्त । तरी प्रहस्त वीर तुझा ॥**

**ताळफळें गळती वनीं । तैशा पाडीन वानर श्रेणी । राम लक्ष्मणा पाडोनी रणीं । अर्ध क्षणीं येईन ॥ ८८ ॥**

**ऐसें बोलतां प्रहस्त । महोदर उठिला गर्जत । नरवानरां करीन घात । निज पुरुषार्थ प्रतापें ॥ ८९ ॥**

> इदं मतिमतां मध्ये मतियुक्तो महोदरः । उवाच वाक्यं राजेंद्रं विशिष्टं विस्मयावहम् ॥ २२ ॥
> ममापि वचनं राजन् वृत्तांतं श्रोतुमर्हसि । राघवं च रणे राजन् हनिष्यामि सलक्ष्मणम् ॥ २३ ॥
> निकृत्तानां रणे तावद्वानराणां महेश्वर । पिबंतु रुधिरं साधु राक्षसास्तृषिता इव ॥ २४ ॥

**बळवंत बुद्धिवंत । रावणाचा परम आप्त । महोदर निज पुरुषार्थ । असे सांगत साटोपें ॥ ९० ॥**

**जयाचें कां उदर । दुष्ट दुराश दुर्भर । यालागीं नांवें महोदर । जेंवी विखार महोरग ॥ ९१ ॥**

**ऐक राया सावधान । माझिया शस्त्रा अस्त्रीं जाण । रणीं पाडीन रामलक्ष्मण । विगत प्राण रणरंगीं ॥ ९२ ॥**

**अंगद सुग्रीव जांबुवंत । या जुत्पत्तींचा करीन घात । वानरसेना समस्त । क्षितीं विक्षत पाडीन ॥ ९३ ॥**

**वानराचें पैं रुधिर । तृषार्त प्राशिती निशाचर । ऐसें बोलोनि महोदर । उठें सत्वर युद्धार्थे ॥ ९४ ॥**

**महोदर निघतांचि देख । महापार्श्वदें दिधली हांक । माझा पुरुषार्थ अलोलिक । स्वयें दशमुख अवधारुं ॥ ९५ ॥**

**सकळ पार्श्वदमुख्यता यासी । म्हणोनि महापार्श्व म्हणती त्यासी ।**
**रावणा एकांतवासीं । विचारासीं अति आप्त ॥ ९६ ॥**

> बृहस्पतिसमो बुद्धया समरे च दुरासदः । महापार्श्वो रणापेक्षी वचनायोपचक्रमे ॥ २५ ॥
> मच्छस्त्रपातात्प्रथमं हनिष्ये रामलक्ष्मणम् । राक्षसैर्निहतानां च शरीराणि विभागशः ॥ २६ ॥
> दृश्यतां वानरेंद्राणां सुसुप्ताः कलभा इव । बाहुभिः पीडिताः संतु गैरिकाणामिवाकरः ॥ २७ ॥
> अस्माकमपि हस्तानां वागुरा इव वानराः । शेरते रुधिरांगा हि मच्छस्त्रक्षतवीक्षिताः ॥ २८ ॥

अनुक्रमणिका

**तो महापार्श्व आपण । संमुख लक्षोनि रावण । बोले आपुली आंगवण । योद्धा दारुण संग्रामीं ॥ ९७ ॥**

**बृहस्पती समान बुद्धी । विचाराचा महोदधी । योद्धा दारुण निर्वाण युद्धीं । वीरधीर त्रिशुद्धी महापार्श्व ॥ ९८ ॥**

**माझ्या प्रथम शस्त्रघायीं । राम लक्ष्मण पाडीन ठायीं । सुग्रीवादि वानर पाही । हुंबत घायीं लोळवीन ॥ ९९ ॥**

**आमच्या बाहु त्याचि वागुरा । तेचि दृढ बंधन वानरां । बळें रगडितां कपींद्रा । रुधिर धारा सुटतील ॥ १०० ॥**

**जैसा महामेरू पर्वत । गैरका धातू तें सेवत । तैसा वानराचें रक्त । प्रवाहत देखाल ॥ १०१ ॥**

**जैसा पंचाननाचे चपेट ।** [मु. 'लागातां'] **रणीं पाडिती गजघंट । तेंवी वानर घायवट । पडले स्पष्ट देखाल ॥ १०२ ॥**

**माझिया शस्त्रघातें करीं । वानर पडिले पृथ्वीवरी । राक्षस रुधिरें स्नानें करी । मांसाहारीं अति तृप्त ॥ १०३ ॥**

**श्रीराम आणि लक्ष्मण । सुग्रीव आणि वानरगण । म्यां मारिलें गा संपूर्ण ।** [वि. 'सत्य'.] **ऐसें तूं जाण लंकेशा ॥ १०४ ॥**

**निकटवर्ती मी असतां । रावणा तुज कायसी चिंता । सुखें भोगावी त्वां सीता । विमानस्था महावनीं ॥ १०५ ॥**

**ऐसें बोलितांचि देख । तंव रागें उठिला दुर्मुख । हनुमयानें गांजिला दशमुख । तें मज दुःख साहवेना ॥ १०६ ॥**

> अब्रवीच्च सुसंक्रुद्धो दुर्मुखो नाम राक्षसः । इदं न क्षमणीयं मे सर्वेषां नः प्रधर्षणम् ॥ २९ ॥
> अयं परिभवो घोरो वानरेण विशेषतः । श्रीमतो राक्षसेंद्रस्य पुरस्यांतःपुरस्य च ॥ ३० ॥
> अस्मिन् मुहूर्ते हत्वा तं निवर्तिष्यामि वानरम् । प्रविष्टं सागरं घोरमथवा धरणीतले ॥ ३१ ॥
> अद्य रामं ससुग्रीवं परिघेण सलक्ष्मणम् । आगमिष्यामि हत्वैको विक्षोभ्य हरिवाहिनीम् ॥ ३२ ॥

**तो हनुमंत अति दुर्धर । मारीन तरी मी दुर्मुखवीर । गर्जोनि बोले निशाचर । संप्रधार बळाचा ॥ १०७ ॥**

**वानरांची चपळप्रकृती । मज येतांचि पळे मारुती । तरी मी त्याची करीन शांती । ऐकें निश्चिती निर्धार ॥**

**अतळ वितळ सुतळ । भेणें लंघिती सप्त पाताळ । तेथेंही धरोनि गोळांगुळ । तो मी तत्काळ मारीन ॥ १०९ ॥**

अनुक्रमणिका

**मज भेणें पळतां सागरीं । उडी घालोनि पुच्छीं धरी । मग काढोनि बाहेरी । भूमीवरी आपटीन ॥ ११० ॥**

**आधीं मारीन हनुमंत । मग मारीन रघुनाथ । लक्ष्मणाचा करोनि घात । करीन अंत सुग्रीवा ॥ १११ ॥**

**वानरांची मांदियाळी । रगडोनि** [मु. 'घायातळीं'] **पायांतळीं । एकला एक आतुर्बळी । तुज जवळीं येईन ॥ ११२ ॥**

**दुजयाचा पाहे सांगातु । जळो त्याचा पुरुषार्थु । राम लक्ष्मण वानरांतु । रणकंदनार्थु माझेनि ॥ ११३ ॥**

**दुर्मुख बडिवार ऐकोन । रागें उठिला यज्ञहन । संमुख करोनि दशानन । स्वयें गर्जोन बोलत ॥ ११४ ॥**

> ततो यज्ञहनुर्नाम राक्षसः पर्वतोपमः । क्रुद्धः परिलिहन् वक्त्रं जिव्हया वाक्यमब्रवीत ॥ ३३ ॥
> एकोऽहं भक्षयिष्यामि सर्वां तां हरिवाहिनीम् । सर्वे भवंतस्तिष्ठंतु महाराजेन संगताः ॥ ३४ ॥
> अहं रामं हनिष्यामि सुग्रीवं सहलक्ष्मणम् । सांगदं सहनूमंतमनांश्च कपिकुंजरान् ॥ ३५ ॥
> मोदन्तां राक्षसाः सर्वे प्रियाभिः सह संगताः ॥ ३६ ॥

**पदाति रथ वाजी कुंजर । सुखें राहोत निशाचर । संहारावया नर वानर । माझें** [मुं. 'वस्र'; तु 'शस्र'; दै मु. 'चक्र'.] **वक्त्र उदंड ॥ ११५ ॥**

**प्रहस्त महोदर हरिखें । महापार्श्वदादि दुर्मुखे । रावणापासी राहावे सुखें । वानर कटके मी जाईन ॥ ११६ ॥**

**न लगे शस्त्रास्त्रभरण । आम्हांसी न लगे रणरंगण । नर वानरांसी मरण । माझेनि जाण जिव्हाग्रें ॥ ११७ ॥**

**लक्ष्मणा समवेत । प्रथम गिळिन रघुनाथ । अंगद सुग्रीव जांबुवंत । हनुमंत महावीर ॥ ११८ ॥**

**नीळ नळ तरस तरळ । सुषेण आदि सकळ । माझेनि दर्शनें वानरदळ । प्रळयकाळ पावेल ॥ ११९ ॥**

**पर्वताकृति निशाचर । जिव्हेनें चाटितसे वक्त्र । दांत खातसे करकर । नर वानर भक्षावया ॥ १२० ॥**

**जिव्हाकाळीं सकंटक । दशन विक्राळ विटंक । येवोनि रावणा संमुख । देवोनि हांक गर्जत ॥ १२१ ॥**

**जारे सांगा लंकानाथा । म्यां मारिलें रघुनाथा । आणीक वानरां समस्ता । सुखें त्वां सीता भोगावी ॥ १२२ ॥**

**आजि पासोनि लंकापुरा । भय नाहीं निशाचरां । स्वभोगीं भोगाव्या निजदारा । सुमन सेजारा संयुक्त ॥ १२३ ॥**

**ऐसें राक्षस बहुवस । मिळोनियां अति कर्कश । बोलाचें मिरवितां यश । आलें अपेश चुकेना ॥ १२४ ॥**

**देखोनि राक्षस उद्धती । बिभीषण महामती । तेणें निवारिलें पुढती । युक्ता युक्ति** [दै. 'विवेक'] **विभागें ॥ १२५**

अनुक्रमणिका

॥

धर्मे चार्थे च कुशलो वीर्येण च समन्वितः । अब्रवीन्मधुरं वाक्यमिदं भूयो बिभीषणः ॥ ३७ ॥

हात जोडोनि समस्तां प्रती । मृदु मंजुळ मधुरावृत्तीं । बिभीषण बोले पुढती । स्वधर्मनीती धर्मार्थ ॥ १२६ ॥

तुम्ही प्रधान बुद्धिवंत । धर्माधर्म विचार येथ । राम रावणाचा वैरार्थ । अधर्म तो येथ मुख्यत्वें ॥ १२७ ॥

श्रीरामाची दारा हरण । किमर्थ करी पैं रावण । हेंचि वैराचें कारण । प्राण हरण परदारा ॥ १२८ ॥

सीता परम सती सृष्टीं । तिचिया अभिलाष दृष्टी । रावणाची बुद्धि खोटी । महापापी सृष्टीं तो एक ॥ १२९ ॥

त्यासी न सांगता सुबुद्धि । तुम्ही साह्य होता युद्धीं । पहा अवघेचि मंदबुद्धि । महा मूढधी प्रधान ॥ १३० ॥

विष खातियाचे पातीं । जो बैसे तो मरणार्थी । धरितां पाप्याची संगती । तुम्ही अधोगती पावाल ॥ १३१ ॥

विचारोनि बळाबळ । मग करावें युद्ध प्रबळ । तदर्थीं तुम्ही मूर्ख सकळ । अवघे निर्मूळ युद्धार्थी ॥ १३२ ॥

सुबुद्धि सांगता वाटे दुःख । साच बोलतां वाटे विख ।
आदि करोनि दशमुख । तुम्ही अवघे मूर्ख अविवेकी ॥ १३३ ॥

त्या अविवेकाचें लक्षण । तुम्हांस सांगेन संपूर्ण । पाहोनि पराची आंगवण । फावलिया आपण युद्धकीजे ॥ १३४ ॥

रावण बापुडें भोळें येथ । प्रधान मिथ्यावादी समस्त । जैसे झकवा तैसें झकत । हिताहित जाणेना ॥ १३५ ॥

कुष्ठ्यासी कुष्ठित्व सांगतां । कोप येतसे तत्वतां । कां रांडवेसी रांड म्हणतां । अति क्षोभता संतापे ॥ १३६ ॥

तेंवी मज सत्य बोलतां । कोप येतसे तत्वतां । तरी रावणाचिया हितार्था । यथार्थता बोलेन ॥ १३७ ॥

प्रहस्त म्हणवितो बळी । पुत्र निमाला जंबुमाळी । हनुमान मारीच ते काळीं । रण कल्लोळीं उपटोनि ॥ १३८ ॥

पुत्र शोकें दुःखाभि भूत । रावणापासी आला रडत । श्रीराम सौमित्र हनुमंत । मारीन म्हणत ते मिथ्या ॥ १३९ ॥

मिथ्या त्याचे बळबंड । बोल बोलतो वितंड । प्रहस्ताचें काळें तोंड । परमलंड प्रधान ॥ १४० ॥

मिथ्यावादी महोदर । जेंव्हा मारिला अखयाकुमर । तेव्हां होवोनि कपिसमोर । रणीं वानर न मारीच ॥ १४१

अनुक्रमणिका

॥

अखया मारिला देखोन । महोदर पलायमान । आतां मिरवितो आंगवण । रामलक्ष्मण मारावया ॥ १४२ ॥

सूर्य जिणावया साठी । खद्योत निज तेजें हुटहुटी । तैसी महोदाराची चावटी । मिथ्या गोष्टी महामूर्ख ॥ १४३ ॥

इंद्रजित गांजिला सुबद्ध । तेंव्हा धांवोनि महापार्श्वद । हनुमंतासी न करी युद्ध । पळाला प्रसिद्ध पडलंके ॥

तोही मिरवितो आंगवण । मी मारीन रामलक्ष्मण । अंगद सुग्रीव वानर गण । हे चाळवण लंकेशा ॥ १४५ ॥

यापरी महापार्श्वद । वृथा जल्पतां मिथ्यानुवाद । प्रधाना माजी महामंद । अति निंद्य नपुंसक ॥ १४६ ॥

दुर्मुखाचें काळें मुख । जेव्हां गांजिला दशमुख । तेव्हां वानरां संमुख । [कं. 'होवोनी निःशंक'] युद्धोन्मुख न मारीच ॥ १४७ ॥

आतां बोलत बळ नवाळी । जेणें केली लंकाहोळी । तो मी मारीन जळीं स्थळीं । सप्त पाताळीं शोधोनी ॥

लंका जाळिली तुम्हा देखतां । तेव्हां न मारीच हनुमंता । आतां मारीन म्हणतां । लाज सर्वथा असेना ॥ १४९ ॥

असत्यवादी सदा देख । यालागीं नांवें तो दुर्मुख । त्याचें बोलणें एक एक । अवघे लटिक लंकेशा ॥ १५० ॥

[दै. 'अग्निहन'; मु. 'वज्रहन'.] यज्ञहनु बोलतो बळी । राम लक्ष्मणेसी वानरगिळी ।
हनुमेनि करितां लंका होळी । तो तत्काळी न गिळीची ॥ १५१ ॥

कपीनें करितां लंका होळी । यज्ञहनूची बैसे दांतखिळी । धांकें लपाला अर्धजळीं । राया जवळी तैं नव्हता ॥

ऐसी प्रधानाची वार्ता । समूळ मिथ्या लंकानाथा । श्रीरामा अर्पूनिया सीता । कुळसर्वथा वांचवी ॥ १५३ ॥

ऐकोनि बिभीषणाचें वचन । प्रधान सेनानी रावण । अवघे जाले लज्ञायमान । अधोवदन राहिले ॥ १५४ ॥

अपमानिता सर्वांसी । ते देखोनि क्षोभ इंद्रजितासी । तो ही आपण अति आवेशीं । बिभीषणासी बोलत ॥ १५५ ॥

पुढील प्रसंगीं अनुवाद । संवादामाजीं अति विवाद । दोघां बंधूसी विरोध । परम क्रोध खवळेल ॥ १५६ ॥

एका जनार्दना शरण । श्रीरामासी अनन्य शरण । स्वयें होईल बिभीषण । तेंचि निरोपण अवधारा ॥ १५७ ॥

अनुक्रमणिका

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां प्रधानादि अपमान नाम पंचत्रिंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग छत्तिसावा

## विभीषण अपमान

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**कपि पुरुषार्थ अति प्रचंड । राक्षसाचें बळबंड । प्रतापें** [मु. 'ऐकतां'] **करितां काळे तोंड । लज्ञा वितंड लंकेशा ॥ १ ॥** [तु. कं. मु. प्रतींमध्ये पहिली ओवी अशी आहे :——'जगदादि आनंदकंदा । निजानंदें अभयवरदा । परस्पर प्रबोधा । चिदानंदा गुरुराया ॥ १ ॥']

**हनुमंताचें अति प्रबळ । बिभीषणें वानिलें बळ । तेणें राक्षस सकळ । तळमळ पैं करिती ॥ २ ॥**

**राक्षस सेनानी प्रधान । अवघे जाले हीनदीन । सभा समस्त लज्ञायगान । म्लान वदन दशमुख ॥ ३ ॥**

**हें देखोनि इंद्रजित । कोपें जालासे कृतांत । बिभीषणासी बोलत । निजपुरुषार्थ** [कं. 'लक्षोनी'.] **वर्णोनी ॥ ४ ॥**

ब्रहस्पतेस्तुल्यमतेर्वचस्तम् । निशम्य वाक्यं तु बिभीषणस्य ।
इदं वभाषे वचनं महामनास्तस्मै तदा नैर्ऋतराजपुत्रः ॥ १ ॥
इदं हि ते तात कनिष्ठ वाक्यं । धर्मान्वितं चैव सूनीतिवच्च ।
अस्मिन्कुले नाम कथं नु जातस्त्वमीदृशं व्याहरसि प्रगल्भम् ॥ २ ॥
किन्नामतौ पार्थिव राजपुत्रावस्माकमेकेन निशाचरेण ।
सुप्राकृतेनापि रणे प्रसह्यौ । प्रशंसि त्वं सुमहागुणेषुच ॥ ३ ॥
त्रिलोकराजो ननु देवराजः । शतक्रतुर्भूमितले निविष्टः ।
भयार्दिताश्चापि दिशः प्रपन्नाः । मत्तेजसा देवगणाश्च सर्वे ॥ ४ ॥
सोऽहं सुराणामपि दर्पहन्ता । दैत्योत्तमानामपि पक्वबुद्धिः ।
कथं न हन्यां तरसा प्रसह्य । मनुष्ययोनी किमु तौ रणाग्रे ॥ ५ ॥

**इंद्रजित बोले कोपायमान । काका तूं तंव धर्मसंपन्न । बुद्धियुक्ति प्रज्ञापन्न । कनिष्ठ वचन कां वदसी ॥ ५ ॥**

**निंदोनि सेनानी रक्षोगण । निर्भर्त्सोनिया प्रधान । रामलक्ष्मणाची आंगवण । परम दारुण वानिसी ॥ ६ ॥**

**आदेशूनि एक एक । तुवां निंदिले आमचें कटक । श्रीरामाची आगळिक । आत्यंतिक वानिसी ॥ ७ ॥**

**तू तंव प्रबुद्ध प्रज्ञा प्राज्ञ । युवराजाचें महिमान । रायाचें खोंचें अंतःकरण । ऐसें कठिण कां वदसी ॥ ८ ॥**

**पाठी थापटिलिया येडका । अधिक हाणी चारी भडका । तैसे सेनानी सैनिका । सन्मान देखा तुवां द्यावा ॥ ९ ॥**

**सन्मान देतां निज सैन्यासी । अति उल्हास संग्रामासी । शेखीं त्यातें निर्भर्त्सिसी । श्रीरामासी वानोनी ॥ १० ॥**

अनुक्रमणिका

**तूं रायाचा कनिष्ठ बंधु । अति कनिष्ठ वदसी वादु । तेणें युवराज संबंधु । अति विरुद्धु वाढविला ॥ ११ ॥**

**जैसा पिता तैसा चुलता । युवराज्य असे तुझें माथां । ज्येष्ठा निंदोनि लंकानाथा । श्रीरघुनाथा वानिसी ॥ १२ ॥**

**आमचा एक रक्षोगण । करील दोघांचें भक्षण । यासी कायसें रणांगण । रामलक्ष्मण ते किती ॥ १३ ॥**

**बापुडें रामलक्ष्मण । आमचे दृष्टी ते तंव तृण । परिस माझी आंगवण । चरणा शरण नृप येती ॥ १४ ॥**

**वलयांकित राजे किती । यज्ञ भोक्ता अमरपती । तो मियां आणिलासे क्षिती । लंकेप्रती कामारा ॥ १५ ॥**

**आसुडोनिया ऐरावतीं । आवडत पाडिलासे क्षितीं । दांत उपटोनि घेतां हातीं । त्रिजगती चळी कांपे ॥ १६ ॥**

**माझी ऐकतांची हांक । सुरगण एकाएक । अवघे पळती अधोमुख । जेंवी रंक अति दीन ॥ १७ ॥**

**इंद्रासहित अमर कोडी । ते म्यां घातलें बांधवडी । कायसी श्रीरामाची प्रौढी । साह्य माकडी** [तु. वि. कं. मु. 'वानिसी'.] **वानरेसी ॥ १८ ॥**

**अंगद सुग्रीव हनुमंत । नळनीळादि जांबुवंत । राक्षस भक्षिती समस्त । दांतें दांत न लागतां ॥ १९ ॥**

**मनुष्य आमचे आहारीं । वानरें तंव** [पै. अं. तं. 'पशूंबरी'.] **कोशिंबिरी । त्यासी कायसी झुंजारी । क्षणामाझारीं मारीन ॥ २० ॥**

**रणीं भिडोनि साटोपता । करीन श्रीरामाचिया घाता । रावणें सांडोनि सकळ चिंता । सुखें सीता भोगावी ॥**

**राम आणि लक्ष्मण । रणीं पाडीन विंधोनि बाण । निर्दळीन वानरगण । आंगवण पाहे माझी ॥ २२ ॥**

**निंदोनियां रघुनंदन । ऐकतां इंद्रजिताचें वचन । बिभीषण कोपायमान । काय आपण बोलत ॥ २३ ॥**

> अथेन्द्रकल्पस्य महारथस्य महोजसस्तद्वचनं निशम्य ।
> ततो बभाषे वचनं महार्थं बिभीषणो धर्मभृतां वरिष्ठः ॥ ६ ॥
> न तात मंत्रे तव शक्तिरस्ति बालस्त्वमद्याप्यविपक्वबुद्धिः ।
> तस्मात्वयात्मविनाशनाय वचोर्थहीनं बहु विप्रलब्धम् ॥ ७ ॥
> पुत्रप्रवादादसि रावणस्य त्वमस्य जातः कथमेव शक्तः ।
> त्वमेव वध्यश्च सुदुर्मतिश्च स चापि वध्यो य इहानयत्त्वाम् ॥ ८ ॥
> बालं दृढं साहसिकं च भूयः । प्रवेशितं चाविदितं समीपे ॥ ९ ॥

**ऐक बा इंद्रजिता साचार । तूं तंव अपक्व बालत्व** [तु. 'साहंकार'; वि. कं. 'निर्धार'] **साकार ।**

अनुक्रमणिका

माथ्याचा वाळला नाही जार । स्वहित विचार तुज नाहीं ॥ २४ ॥

अवधारी विचार कोटी । विवेक धरोनिया पोटीं । समूळ ऐके माझे गोष्टी । स्वहित दृष्टी तुज नाहीं ॥ २५ ॥

स्वहित दृष्टी तुज नाहीं । जें बोलसी तें मिथ्या पाही । त्याही बोलाची नवलाई । मूळान्वयी अवधारीं ॥ २६ ॥

म्हणसी आमचा एक रक्षोगण । भक्षील रामलक्ष्मण । ऐकोनि श्रीराम आंगवण । मिथ्या भाषण कां वदसी ॥ २७ ॥

बाळपणीं विंधोनी बाण । ताटिकेचा घेतला प्राण । सुबाहु मारिला करितां रण । सैन्य सगण समवेत ॥ २८ ॥

बाण पिसाऱ्याचा वारा । तेणें मारीच उडविला अंबरा । श्रीराम अंतक निशाचरा । तूं निंद्य सुरा उन्मादें ॥

स्वयंवरीं वाहतां हरकोदंड । रावणाचें जालें काळें तोंड । तें श्रीरामें केलें दुखंड । बळें प्रचंड श्रीराम ॥ ३० ॥

येचि सीतेची अभिलाखा । विराध मारिलासे देखा । तेचि गती दशमुखा । तुम्हां मूर्खाचेनि बोलें ॥ ३१ ॥

शूर्पणखा करितां छळणा । स्वयें मुकली नाककाना । गाऱ्हाणें देतसे खरदूषणा । तेही जाणा मारिलें ॥ ३२ ॥

त्रिशिरा आणि खरदूषण । चौदा सहस्त्र रक्षोगण । रामें मारिले करोनि रण । दुर्धर बाण वर्षोनीं ॥ ३३ ॥

नाहीं रथ सैन्य संपत्ती । एकला श्रीराम पदाती । त्याची ऐसी ऐकोनि ख्याती । तूं कां दुर्मति वदलासी ॥ ३४ ॥

नकटी शूर्पणखीचा बोलीं । रावणें पापबुद्धि केली । सीता चोरितां भीक लागली । तैसी आली आवदसा ॥

चोरावया परनारी । राजा आणि होय भिकारी । जळो ते वांटिवेची थोरी । निर्लज्ज भारी तूं एक ॥ ३६ ॥

दुजी वांटिव लंकानाथा । सन्मुख न येववे रघुनाथा । मरण देवोनि मारीच माथां । चोरोनि सीता पळाला ॥

लक्ष्मणाची [दै. मु. 'मर्यादरेखा'] धनुष्यरेखा । नुल्लंघवेची दशमुखा । मिथ्या बोला बळ आंवाका । काळमुखा पुरुषार्थ ॥ ३८ ॥

जटायूसी करितां रण । रावणें दांतीं धरिलें तृण । त्यासी मारिलें करोनि छळण । पापी पूर्ण तुम्ही एक ॥ ३९ ॥

चोरी मारी पापी परदारी । इतुकें रावणाचे शिरीं । तेथें तुझें श्रेष्ठत्व भारी । बाजीगिरी [तु. 'जेंवी विद्या'मु. 'जैसी विद्या'] जेंवि सांदी ॥ ४० ॥

अनुक्रमणिका

म्हणसी जिंकिला अमरपती । म्यां उपटिला ऐरावती । सुरवरांसी लाविली ख्याती । श्रीरामाप्रती ते [कं. मु. 'न चाले'.] मश्यक ॥

वरुण शक्रादि ब्रह्माईश । श्रीरामाचे अंशा अंश । हे तूं नेणसी बाळभाष्य । जगीं जगदीश श्रीराम ॥ ४२ ॥

म्हणसी दमिला ऐरावती । चरणीं शिळा उद्धरती । श्रीरामाची परम शक्ती । बाळमती तूं नेणसी ॥ ४३ ॥

बोलसी स्वयें निज पुरुषार्था । मी मारीन श्रीरघुनाथा । रावणें सुखें भोगावी सीता । परदारता तूं महापापी ॥

रायासी सांगतां पापबुद्धि । तो वधावा सभेमधीं । राजपुत्र तूं दुर्बुद्धी । महामूढधी कुळघाती ॥ ४५ ॥

तूं एक मारिलिया जाण । सकळ कुळासी कल्याण । हे बुद्धि नायकतां रावण । कुळनिर्दळण पावेल ॥ ४६ ॥

इंद्रजित बोलतो निजबळ । तें तें मिथ्या पैं समूळ । सभासर्वज्ञ ऐका सकळ । रायें प्रांजळ परिसावें ॥ ४७ ॥

[वि. प्रबोधावया'.]प्रलोभावया लंकानाथा । मारीन म्हणसी तूं रघुनाथा । हनुमंतेसी युद्ध करितां । तुझें पुरुषार्था देखिलें ॥ ४८ ॥

हनुमंतासी रणीं भिडतां । शस्त्रेंअस्त्रें गेलीं वृथा । कपिपुच्छ वाजतां माथा । धीर सर्वथा न धरवे ॥ ४९ ॥

दुर्धर शस्त्रांचें संपात । वानरें झेलोनि समस्त । तुझिया सैन्या केला घात । रणीं हुबंत पाडिलें ॥ ५० ॥

सांगावया लंके आंत । कोणीही नुरेची जीवंत । कपीनें अवधियांचा केला घात । तुज देखत इंद्रजिता ॥ ५१ ॥

त्यांची करावया सोडवण । तुझी न चलेची आंगवण । कपीनें गांजिले संपूर्ण । घायें प्राण जावो पाहे ॥ ५२ ॥

लघुलाघवी हनुमंत । मारिला सारथी भंगिला रथ । रणीं इंद्रजित केला विरथ । छत्रपात कपिपुच्छें ॥ ५३ ॥

मल्लविद्येची कुसरी । चपेट हाणितां उरींशिरीं । अशुद्ध वमित जासी चांचरी । पळावया दुरी ठाव नाहीं ॥ ५४ ॥

तुझिया युद्धाची गती ऐसी । फावलियां मारावें शत्रूसी । नातरी पळावें मेघापासी । कपिपुच्छासीं तें न चले ॥ ५५ ॥

पडिलें पुच्छाचें बिरडें । सरो नये मागें पुढें । इंद्रजित खळाखळा रडे । वानरें गाढे गांजिलें ॥ ५६ ॥

रडत पडत अशुद्ध वमित । कपिपुच्छा भेणें [मु. दै. 'धांवत'.] धांकत । पळोनि गेलासी विवरांत । मुख्य पुरुषार्थ हा तुझा ॥ ५७ ॥

अनुक्रमणिका

रायासंमुख निज निर्धारी । म्हणसी एकला मी श्रीराम मारी ।
मिथ्या जल्पसी सभेमाझारीं । निर्लज्ज भारी तूं एक ॥ ५८ ॥

वानरा रणीं देवोनि पाठी । पळालासी उठाउठी । ऐसी तुझी वाटिव मोठी । समूळ खोटी बुद्धि तुझी ॥ ५९ ॥

तुझी ऐकतांचि बुद्धि । रावण मरेल पैं आधीं । मरेल राक्षसांची मांदी । कुळ त्रिशुद्धी निमेल ॥ ६० ॥

राया संमुख आपण । सभेसी वदे मिथ्या वचन । त्याचें काळें करोनि वदन । जिव्हा [मु. दै. 'कर्ण'.] दशन छेदावे ॥ ६१ ॥

राजनीति ऐसी येथ । कुळघातकी मारावा सुत । जेणें आणिला सभेआंत । तोही निश्चित मारावा ॥ ६२ ॥

जेणें प्रवेशिला द्वारीं । तोही मारावा निर्धारी । कायसी इंद्रजिता तुझी थोरी । निशाचरीं कुळपाश ॥ ६३ ॥

रावणाचा ज्येष्ठ सुत । यालागीं राखिला मियां हात । तुझा अवश्य करावा घात । कुळक्षयार्थ चुकवावया ॥ ६४ ॥

ऐकोनि बिभीषणाची मात । प्रधानसैनिक वीरां आंत । चढला क्रोधाचा आवर्त । जाला कृतांत लंकेश ॥ ६५ ॥ [ओवी ६५ तं. प्रतीत नाही.]

> संक्रुद्धास्ते यतस्तत्र बहवः प्रियवादिनः । मुह्यमानाः सुबहुशश्चुक्रुशुः सहरावणाः ॥ १० ॥
> रोषाच्चान्ये प्रजहसुर्भृशमन्येऽतिनिःश्वसन् । समीक्ष्यान्योन्यमाजल्पन्बभक्षुर्दशनानपि ॥ ११ ॥
> तस्मिंस्तथोक्ते वचने महापार्श्वः प्रतापवान् । शिरस्यंजलिमाधाय रावणं वाक्यमब्रवीत् ॥ १२ ॥

ऐकोनि बिभीषणाचें वचन । प्रधान जाले कोपायमान । सेनानी वटारिले नयन । खाती दशन सेनाधर ॥ ६६ ॥

एक अधरोष्ठ चाविती । एक करकरां दांत खांती । एक ते हात कुस्करिती । एक वळिती वज्रमुष्टि ॥ ६७ ॥

बिभीषणाचे उत्तरीं । एक [तु. मुं. तं. 'श्वसिती'; पै. अं. 'विश्वसिती'; वि. कं. 'निश्वसिती'.] निश्चिती धुधुःकारी । एक हांसती क्रोधाकारीं । क्षोभोनि सारे डुल्लत ॥ ६८ ॥

एक परस्परें बोलत । बिभीषण जाला उन्मत्त । इंद्रजितातें मारीन म्हणत । संमुख [कं. तु. मुं. 'बदत'.] निंदित लंकेशा ॥ ६९ ॥

चोरी मारी पापी परद्वारी । ऐसें बिभीषणाचें उत्तरीं । रावण खोंचला जिव्हारीं । क्रोधें करी तळमळ ॥ ७० ॥

संमुख न राहवेचि वानरीं । पळोनि रिघालासी तूं विवरीं ।
इंद्रजित लाजिला यें उत्तरीं । मौन धरोनि राहिला ॥ ७१ ॥

अनुक्रमणिका

बिभीषणासी संमुख । बोलो न शके दशमुख । मग इतर कोण बोले रंक । टकमक अवधियांसीं ॥ ७२ ॥

एक बोलती सर्वज्ञ । बिभीषणाचें धर्मवचन । न मानितांचि दशानन । कुळ निर्दळण सपुत्र ॥ ७३ ॥

सभा देखोनि तटस्थ । महापार्श्वद उठिला गर्जत । बिभीषण जालासे उन्मत्त । राजा राजसुत निंदिला ॥ ७४ ॥

संमुख निंदिला राजारावण । वानितो श्रीरामाचे गुण । याची येथें भीड कोण । अवघेजण काय पाहती ॥ ७५ ॥

युवराज [अं. कं. दै. तु. मु. 'प्रतापसिंधु'.] प्रतापप्रसिद्धु । रावणाचा कनिष्ठ बंधू । येणें सांडिला सुहृदसंबंधु । याचा वधू करावा ॥ ७६ ॥

मारा न म्हणेचि लंकानाथ । तरी आम्ही करुं याचा घात । गलका उठिला सभे आंत । अति उन्मत्त हा जाला ॥ ७७ ॥

बिभीषणाची शांति भारी । क्रोध न येचि तिळभरी । मारावा म्हणतां निशाचरीं । भय भीतरीं बाधेना ॥ ७८ ॥

जैसा सागर अगाध । तैसा बिभीषणाचा बोध । निंदोनि बोलिला महापार्श्वद । स्वयें विषाद न मानीच ॥ ७९ ॥

जेंवी सिंहापासी घुंगुरडें । तेंवी महापार्श्व बिभीषणापुढें । विरुद्ध बोलतां कैवाडें । कोप न चळे बिभीषणा ॥ ८० ॥

महापार्श्वदेसी बिभीषण । स्वमुखें न बोलेचि आपण । तृणप्राय उपेक्षून । धरिलें मौन निज शांती ॥ ८१ ॥

बिभीषणाचा अनुचर । परम आप्त प्रधान हेर । महापार्श्वेसीं उत्तर । गिरागंभीर बोलिला ॥ ८२ ॥

बंधुबंधूचिया निजहिता । राजा युवराज बोलतां । तूं कां मध्यें कुंथसी वृथा । महामूर्खता तुझें अंगीं ॥ ८३ ॥

दोनी धुरा अति आप्तता । स्वहिताचा विचार [मु. न. 'करिता'] करितां । मध्यें बोलों नये सर्वथा । बोलें तो तत्वता महामूर्ख ॥ ८४ ॥

जैसा राजा रावण । तैसाच युवराज बिभीषण । त्यासी बोलतां कठिण । तुझा प्राण वांचेना ॥ ८५ ॥

न ते महापार्श्व जिजीविषास्ति त्वं रावणस्य प्रियकृन्निकामम् ।
बिभीषणं वाक्परुषं ब्रवीषि राज्ञस्ततोर्थं तरसा निहंसि ॥ १३ ॥
अयं सुनीतेः कुरु ते सुवाक्यं व्यर्थं कथं निंदसि मूढबुद्धे
प्रकोपितेनापि कृते सुमंत्रे त्वया महापार्श्वे न कुत्सनीयाः ॥ १४ ॥

अनुक्रमणिका

रावणाचिया कनिष्ठ बंधूसी । संवाद करितां धुरेसी । तूं कां वृथा निंदा करिसी । निज प्राणासी मुकावया ॥ ८६ ॥

ऐसी आहे राजनीती । दोनी धुरा संवाद करिती । त्यामाजी मध्यें निंदा करिती । त्यातें मारिती नृपनाथ ॥ ८७ ॥

राजा युवराज निज हितीं । वाद करित राजनीती । येरयेरांतें निखंदिती । तेथें तूं किती रंक मशक ॥ ८८ ॥

बंधुबंधूच्या हितानुवादी । युक्ति निग्रह येती क्रोधीं । तेथें महापार्श्वा दुर्बुद्धी । निंदानुवादी जल्पसी ॥ ८९ ॥

आला देखोनि हनुमंत । राया देखतां तुम्ही पळत । आतां वाटिवे गर्जत । अति समर्थ निर्लज्ञत्वें ॥ ९० ॥

तुम्ही राक्षस रणीं दीन । नपूंसकाहूनि हीन । वाटिवे चाळवा दशानन । अति बोलोन पुरुषार्थें ॥ ९१ ॥

श्रीरामाचें एक वानर । मारिला अखया सैन्य समग्र । दमिला इंद्रजित ज्येष्ठकुमर । लंकापुर जाळोनी ॥ ९२ ॥

वानर वनचर पालेखाईर । त्यापुढें पळालें समग्र । येथें आलिया श्रीरामचंद्र । दुर्धर शर कोण साहे ॥ ९३ ॥

सुटलिया श्रीरामाचा बाण । राक्षसकुळासी निर्दळण । तदर्थी हितवादी बिभीषण । तें रावण नायके ॥ ९४ ॥

सीता अर्पोनि रघुपती । स्वस्थ राहावे समस्तीं । ऐसी बिभीषणाची युक्ती । तूं कां [वि. 'व्यर्थ'] कुत्सितोक्ती निंदिसी ॥ ९५ ॥

ऐकोनि हेराचें वचन । महापार्श्व लज्ञायमान । खालती घालोनिया मान । दीनवदन राहिला ॥ ९६ ॥

> ततः सागरगंभीरः सत्ववान्विजितेंद्रियः । अब्रवीद्रावणं धीमान् पुनरेव बिभीषणः ॥ १५ ॥
> यावद्धि केशग्रहणात्सुहृद्भिः। समेत्य सर्वैः परिपूर्णकामैः ।
> निगृह्य राजन्परिरक्षितव्यो भूतैर्यथा भीमबलैर्गृहीतः ॥ १६ ॥
> तथा स्वपक्षेऽप्यनुमृश्य मार्गम् । ब्रवीमि वो भर्तृहितं यथावत् ॥ १७ ॥

सत्ववंत धैर्यवंत । वीर्य माधुर्य बुद्धिवंत । ऐसा बिभीषण क्षमायुक्त । रावण हितार्थ बुद्धि सांगे ॥ ९७ ॥

बुद्धिसांगतां पुढतपुढती । न माने रावणाचें चित्तीं । तरी सांगे पुनरावृत्ती । सीता रघुपती अर्पावया ॥ ९८ ॥

प्रहस्त महापार्श्व महोदर । इंद्रजित मुख्यकुमर । शुकसारणादि थोरथोर । ऐका समग्र बुद्धि माझी ॥ ९९ ॥

करोनि रावणा केशाकर्षण । सुबुद्धि सांगेन आपण । सीता करावी रामार्पण । कुळनिर्दळण चुकवावया ॥ १०० ॥

अनुक्रमणिका

**भूत लागलें होय ज्यासी । मंत्रवादी त्राहटी धरोनि केशीं ।**
**तेंवी सुबुद्धि सांगे रावणासी । सीता श्रीरामासी अर्पावया ॥ १०१ ॥**

**सीता सन्निपात रावणासी । तेणें कुळक्षयो राक्षसांसी । यालागीं धरोनियां केशीं । सुबुद्धि त्यासी शिकवीन ॥ १०२ ॥**

**याचि नांवे परम आप्त । याचि नांवें सुहृद समस्त । अपायीं पडतां लंकानाथ । त्यासी निश्चित वांचवावे ॥ १०३ ॥**

**कुटुंब निजवोनि गृहाप्रती । जो गृहा दाहो करी प्रदीप्ती । त्यासी सज्ञान निवारिती । तैसी गती रावणा ॥ १०४ ॥**

**करितां श्रीरामासी वैर । समस्त मरती निशाचर । सपुत्र मरेल दशशिर । प्रतिज्ञोत्तर हें माझें ॥ १०५ ॥**

**श्रीरामाचें एफ वानर । त्यापुढें पळालेति समग्र । सुटलिया श्रीरामाचा शर । कोण दुर्धर साहेल ॥ १०६ ॥**

तीक्ष्णा न यावन्नव कंकपत्राः । दुराधरा राघव विप्रयुक्ताः ।
भीत्वा शरीरं प्रविशन्ति बाणाः प्रहस्त तेनेह विकत्थसे त्वम् ॥ १८ ॥
न रावणो नापि महोदरोऽयं न कुंभकर्णोऽपि न चातिकायः ।
नचेंद्रजिद्दाशरर्थि प्रसोढुं शक्तोऽस्ति तं शक्रसमप्रभावम् ॥ १९ ॥
न ते पौरुषं वा युधं वलं वा प्रपश्यामि रामो रणे येन शक्यम् ।
सती वासती वा समुत्पत्य सीता प्रदानप्रणम्या न शक्यापहर्तुम् ॥ २० ॥

**तेल साहणे खरसाहाणे फुडा । लावी श्रीरामाचा बाण कुऱ्हाडा ।**
**कंक पत्राचा झडाडा । कोण त्या पुढां साहों शके ॥ १०७ ॥**

**सुटला श्रीरामाचा बाण । धाकें मरेल रावण । अतिकाय इंद्रजित कुंभकर्ण । सेनानी प्रधान निमतील ॥ १०८ ॥**

**प्रहस्त महोदर सोडिती प्राण । धाकें मरेल शुकसारण । सैन्य मरेल संपूर्ण । श्रीराम बाण येतांचि ॥ १०९ ॥**

**दुर्धर श्रीरामाचें बाण । समुद्र शोषोनिया पूर्ण । लंका निर्दळिती रावण । सत्यवचन हें माझें ॥ ११० ॥**

**इंद्रादिकांचिया कोडी । न साहे श्रीरामबाण वोढी । धाकेंच पडती मुरकुंडी । राक्षसें बापुडी तीं किती ॥ १११ ॥**

**यालागीं गा लंकानाथा । शीघ्र श्रीरामीं अर्पी सीता । तुझे चरणीं ठेवितों माथा । विकल्प आतां धरुं नको ॥ ११२ ॥**

अनुक्रमणिका

**जरी विकल्प धरिसी चित्ता । तरी न जिंकवे श्रीरघुनाथा । श्रीरामाची प्रतापकथा । ऐक आतां सांगेन ॥ ११३ ॥**

> न ते पौरुषं वा युधं वा बलं वा । प्रपश्यामि रामो रणे येन शक्यम् ।
> सतो वासतो वा समुत्पत्य सीता । प्रदान प्रणम्या न शक्यापहर्तुम् ॥ २१ ॥
> सपत्नस्तु रामोऽभिपन्नो विधाता स्वयं भूतनाथः प्रशस्तः स्वयंभूः ॥ २२ ॥

**वेगें आलिया रघुनाथ । तुज साहावया नाहीं पुरुषार्थ । गर्वें प्राण** [मु. 'वेचिसी'.] **देसी व्यर्थ । सत्यवचनार्थ हा माझा ॥ ११४ ॥**

**निवारे श्रीराम बाणजाळ । तैसें तुज नाहीं शस्त्रबळ । करितां श्रीरामासी सळ । रणीं विकळ पडसील ॥ ११५ ॥**

**रणीं जिणावया रघुनाथा । तुझिया आंगीं नाहीं सबळता । पडलासी धनुष्य वाहतां । सभे देखता स्वयंवरीं ॥**

**तुझें करोनि काळें तोंड । रामें धनुष्य केलें दुखंड । वृथा वाहसी बळबंड । तूं तंव लंड निर्लज्ज ॥ ११७ ॥** [मु. प्रतीत ११७ वी ओवी अशी आहे :— 'तुज देखतां पुरदहनीं । हनुमंतातें देखोनी । पळती प्रधान वीरश्रेणी । केंवी राम रणीं जिकवेल ॥ ११७ ॥']

**श्रीराम पाहावया संमुख दृष्टी । धैर्य नाहीं तुझें पोटीं । श्रीरामा लावोनि मृगापाठीं । सीता गोरटी चोरिली ॥ ११८ ॥**

**व्हावया श्रीरामा संमुख । तुझें न सरेचि काळें मुख । वृथा वल्गसी मी दशमुख । लाज** [वि. तु. दै. 'निःशंक'.] **निःशेष तुज नाहीं ॥ ११९ ॥**

**हरावया सीता सुंदरी । सामर्थ्य नाहीं तुझें शरीरीं ।**
**मग तूं जालासी भिकारी । तरी गुंफे माझारीं रिघवेना ॥ १२० ॥** [ओवी १२० वी. प्रतीत नाही.]

**लक्ष्मणाची धनुष्यरेखा । तुज नुल्लंघवे दशमुखा । रणीं पाहावया रघुकुळटिळका । व्यर्थ आंवाका जल्पसी ॥ १२१ ॥**

**तुझ्या आंगीं नाहीं बळ । म्हणसी युद्ध करील दळ । ते तंव पुरदाहें सकळ । केलें विकळ हनुमंतें ॥ १२२ ॥**

**तुज देखतां पुरदहनीं । हनुमंतातें गा देखोनि । पळती प्रधान वीरश्रेणी । केवीं राम रणीं साहवेल ॥ १२३ ॥**

**इंद्रजिताचें बळ अद्भुत । कपीनें केलें हताहत । येथें आलिया श्रीरघुनाथ । कोणा सामर्थ्य साहावयासी ॥ १२४ ॥**

**यालागीं गा लंकानाथा । तुज सर्वथा न जिरे सीता । शरण रिघावे श्रीरघुनाथा । जनकदुहिता अर्पावी ॥ १२५ ॥**

अनुक्रमणिका

श्रीरामा अर्पिलिया सीता । सकळ कल्याण समस्ता । हे सुबुद्धि ऐकें लंकानाथा । कुळाभिघाता चुकवावया ॥ १२६ ॥

नानापरिच्या विवेक युक्ती । मियां सांगितल्या हितोपपत्ती । नाइकतां लंकापती । रणाभिवर्ती मराल ॥ १२७ ॥

राम अवतारां अवतारी । पूर्ण ब्रह्म चराचरीं । त्याची कांता सीतासुंदरी । तुज तिळभरी जिरेना ॥ १२८ ॥

म्हणसी श्रीराम मनुष्य बापुडें । तरी कां लपसी मागिलीकडे । चोरी करोनि पळसी पुढें । कर्मकुडें लंकेशा ॥

मारिलें त्रिशिरा खरदूषण । श्रीरामासी करावया रण । संमुख न वचे तुझें सैन्य । आंगी आंगवण असेना ॥ १३० ॥

श्रीराम शक्त अथवा अशक्त । तुझा करुं शके घात । सीता अर्पोनि निश्चित । श्रीरघुनाथ [तु. कं. मुं. मु. 'सुखी'; दै. 'सेवा'.] सखा करी ॥ १३१ ॥

हे माझी बुद्धि नाइकतां । वैर केलिया श्रीरघुनाथा । तो तुझिया करील घाता । सैन्य [तं. 'संतापा'; दै. वि. 'संपदा'; मु. 'समवेता'.] संपता सपुत्रा ॥ १३२ ॥

साह्य केलिया कळिकाळ । अनिवार श्रीरामबाणजाळ । [कं. मुं. 'लंका'.] काळा गांजोनि तत्काळ । तुझें कंठनाळ छेदील ॥ १३३ ॥

माझा नाइकतां वचनार्थ । पाडोनि कळिकाळाचे दांत । श्रीराम तुझा करील घात । जाण निश्चित लंकेशा ॥ १३४ ॥

साह्य केलिया [कं. मुं. तु. 'शंकर'.] ब्रह्मशक्र । निवारेना श्रीरामशर । शिव रामाचा किंकर । त्यासमोर तो न ये ॥ १३५ ॥

श्रीराम शिवाची ध्येयमूर्ती । त्याची चोरिली सीतासती ।
तेणें क्षोभला उमापती । वांचती गती तुज नाहीं ॥ १३६ ॥

चोरी मारी आणि परद्वारी । कपटवेषी संन्यास धारी । ब्रह्मा क्षोभला तुजवरी । वांचती परी तुज नाहीं ॥ १३७ ॥ [ओवी १३७ कं. मु. तं. प्रतींत नाही.]

राजा आणि अधर्मशीळ । त्यासी निर्दाळी कळिकाळ । काळें ग्रासिलें तुझें बळ । रणीं तत्काळ निमसील ॥ १३८ ॥

शक्तीमाजी आदि शक्ती । तुवां चोरिली सीता सती ।
क्षोभल्या [तु. वि. कं. मुं. तं. दै. मु. 'शस्त्र देवता'.] शक्ती देवतां समस्तीं । तुझ्या

अनुक्रमणिका

निज घातीं उद्यत ॥ १३९ ॥

विचारितां विवेकविधी । तुज क्षयो आला त्रिशुद्धी । माझी नाइकतां बुद्धी । रणाभिमर्दी निमसील ॥ १४० ॥

रावणा ऐके स्वहितवचन । श्रीरामासी रिघोनि शरण । सीता अर्पिलिया जाण । सकळ कल्याण पावसी ॥

श्रीरामासी रिघालिया शरण । तुज बाधेना जन्ममरण । बाधूं न शके द्वंद्वभान । कृत कल्याण पावसी ॥ १४२ ॥

गर्व न करी लंकानाथा । श्रीरामचरणीं ठेवोनि माथा । सद्भावें अर्पिलिया सीता । स्वार्थ परमार्था पावसी ॥

ऐकोनि बिभीषणाचें वचन । क्रोधें [कं. 'स्तब्ध'.] संतप्त रावण । त्याचे क्रोधाचें दारुणपण । श्लोक लक्षण अवधारा ॥ १४४ ॥

बिभीषणवचः श्रुत्वा बलवान्राक्षसेश्वरः । अभवत्क्रोधसंरब्धः संध्यारक्त इवांशुमान् ॥
अब्रवीद्रावणः क्रोधाद्बिभीषणमिदंवचः । परेषां गुणसत्कारं मम चानर्थबुद्धिताम् ॥ २३ ॥

एकोनि बिभीषणाचें वचन । रावण जाला क्रोधसंपन्न । आरक्त वटारिले नयन । जैसे जास्वंद फुलफुलित ॥ १४५ ॥

क्रोधेंचि म्हणे बिभीषणा । नष्टा चांडाळा दुर्जना । मज हीनत्व स्थापोनि जाणा । रघुनंदना वानिसी ॥ १४६ ॥

सपुत्र प्रधान अवघे जणीं । आम्हासी म्हणसी मराल रणीं । रामा स्थापिसी विजयस्थानीं । धन्य वाणी हे तुझी ॥

राम मनुष्य बापुडें । तें काय वानिसी मज पुढें । घायें चूर करीन हाडें । रडत त्याकडे तूं जाय ॥ १४८ ॥

जेवीं कां बोका पाहे । आपुली पिल्लिं आपण खाये । तैसाचि तूं राक्षसान्वयें । [दै. 'कुळक्षया कुळघात'.] कुळक्षयें कुळकेतू ॥ १४९ ॥

आम्हांसी भेडसाविसी कैवाडें । म्हणसी तुम्हांसी मारितील माकडें ।
हीनदीन तूं बापुडें । श्रीरामाकडे सुखें जाये ॥ १५० ॥

ऐक माझें सत्यभाषण । आजिच निमाला बिभीषण । घटस्फोट सांडा त्यालागुन । कुळदूषण कुळपाश ॥ १५१ ॥

ऐकोनि रावणाचें वचन । बिभीषण हास्यवदन । मुख्य धुरेसीच मूर्खपण । तेथें शिकवण चालेना ॥ १५२ ॥

अनुक्रमणिका

इह नेता च विगुणः सहाया गुणवर्जिताः। एवं कृत्वा किमप्येतद्वर्तते मंत्रसंज्ञता ॥ २४ ॥
न युक्तं कैतवं कर्तुं हिताद्विप्रतिपादितम्। त्यक्त्वा कामपरं मंत्रमर्थधर्मविवर्जितम् ॥ २५ ॥
राममेव गमिष्यामि धर्मार्थपरमं नृपम्। चित्रमेतद्द्विषं भुक्त्वा कृत्स्नं साभिजनं घनम्।
धर्महेतोर्गमिष्यामि राममेव शुभव्रतम् ॥ २६ ॥

**कनकबीज खाय आवेशें । तो बडबडी व्याघ्र ससे मासे । रावणा तुज जालें तैसें । सीता अभिलाषें सन्निपात ॥ १५३ ॥**

**रावणा सीतासंनिपात । प्रधान गर्वें** [मु. 'मदोन्मत्त'.] **कामोन्मत्त । विचार विवेक स्वहितार्थ । कोणें येथ मानावें ॥ १५४ ॥**

**कपट काम कामासक्ती । परदारा अधर्मरती । रावणा तुज मरणप्राप्ती । ससैन्य संपत्ती सपुत्र ॥ १५५ ॥**

**करितां दुर्गाभिलाषण । शुंभ निशुंभ निमाले ससैन्य । चंडमुंड रक्तबीज जाण । घेतला प्राण जगदंबें ॥ १५६ ॥**

**तैसी श्रीरामाची सीतासती । अभिलाषितां लंकापती । वृथा मरसी रणावर्ती । सपुत्र संपत्ती ससैन्य ॥ १५७ ॥**

**विष भक्षी त्याचे पांती । जो बैसे त्या मरण प्राप्ती । त्यागोनि जाय तो सुमती । हे परम युक्ती लंकेशा ॥ १५८ ॥**

**शरण रिघोनि श्रीरघुपती । प्रेमें अर्पिलियां सीता सती । अर्थ स्वार्थ परमार्थ प्राप्ती । यशकीर्ति लंकेशा ॥ १५९ ॥**

**माझी नायकतां युक्ती । तुज जिरेना सीता सती । गर्वें मरसी लंकापती । प्रतिज्ञा निश्चितीं हे माझी ॥ १६० ॥**

**तुम्ही सांडिलें मी मेलों म्हणोन । आतां सुहृदत्वें उरलें कोण ।**
**खुंटली स्वहित शिकवण । श्रीरामा शरण मी जातों ॥ १६१ ॥** [ओवी १६१ तं. प्रतीत नाही.]

**श्रीरामा गेलिया शरण । मी पावेन कृत कल्याण । तुम्हांसी अवश्य आलें मरण । श्रीरामबाण प्रतापें ॥ १६२ ॥**

**शरण गेलिया श्रीरघुपती । चारी मुक्ती दासी होती । आनंदे ओसंडेल त्रिजगती । एवढी प्राप्ती श्रीरामें ॥ १६३ ॥**

**श्रीरामा न रिघतां शरण । अवश्य मरेल रावण । सपुत्रा आणि सप्रधान । राक्षससैन्य समवेत ॥ १६४ ॥** [ओवी १६४ मु. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

**श्रीराम मारील एकेंएक । क्रियाकर्ता नुरेल देख । मीच देईन तिलोदक । आवश्यक तुम्हांसी ॥ १६५ ॥**

**ऐकोनि बिभीषणाची गोष्टी । रावणा राग न माय पोटीं । खड्ग** [तु. मुं. मु. 'वसवोनि'.] **आसुडोनि मुष्टी । दांतहोटीं चाविलें ॥ १६६ ॥**

> एतच्छ्रुत्वा तु संरब्धो रावणः क्रोधमूर्च्छितः । नेत्रे प्रकृतिताम्रे च भूयस्ताम्रत्वमागते ॥ २७ ॥
> क्रोधेन तु भृशं तस्य लाक्षारंगसमप्रभः । उत्पपात सनिस्त्रिंशो वेगेन भृकुटीमुखः ॥ २८ ॥
> एकविद्युद्गतः क्रुद्धः ननर्द इव तोयदः । आसनात्तूर्णमुत्पत्य पादेनाभिजघान तम् ॥ २९ ॥
> रावणः क्रोधसंवेगादासनस्थो बिभीषणः । अभवत्पतितो भूमावासनात्स महाबलः ॥ ३० ॥
> वज्रपातहतः श्रीमान् विशीर्ण इव पर्वतः । प्रहस्तस्तस्य हस्तं तं कुपितं राक्षसेश्वरम् ॥ ३१ ॥
> शनर्निवारयामास कोशेऽचाप्यकरोदसिम् ॥ ३२ ॥

**ऐकोनि बिभीषणाची मात । ह्रदयीं पोळला लंकानाथ । रागें तयाकडे पाहत । जेंवी कां कृतांत काळाग्नि ॥ १६७ ॥**

**स्वभावें आरक्त नयन । त्यावरी जाला क्रोधसंपन्न । लाक्षारंगासमान । वीशीं नयन वटारिलें ॥ १६८ ॥**

**नयन आरक्त कल्लोळ । क्रोधें नेत्रीं निघती ज्वाळ । धाकें कांपती लोक सकळ । जाली खळबळ सभेसी ॥ १६९ ॥**

**बिभीषणावरी घालावया उडी । कोशाबाहेरी खड्ग काढी । विजूतेजसम परवडी । पडली झांपडी सभेसीं ॥ १७० ॥**

**प्रळयमेघ गर्जे कडाडीं । तेंवी रावण रागें गडाडी । घावो हाणावया निर्वडी । शस्त्र झाडी साटोपें ॥ १७१ ॥**

**ऐकतां रावणाची हांक । धांकें कांपती सकळ लोक । बिभीषण निधडा निःशंक । न मानी धाक रामनामें ॥ १७२ ॥**

**माझा स्वामी श्रीशंकर । त्यासी म्हणसी रामकिंकर । तरी छेदीन तुझें वक्त्र । शस्त्र सत्वर उचलिलें ॥ १७३ ॥**

**उडोनियां आकाशा आंत । घावो हाणितां लंकानाथ ।**
**रावणाचा लचकला हात । श्रीराम रक्षित निजभक्ता ॥ १७४ ॥**

**चमत्कारें सुटली मुष्टी । शस्त्र गळोनि पडलें** [मु. 'भूपृष्ठी'.] **सृष्टी ।**
**रावणें धांक घेतला पोटी । गोष्टी उफराटी येथें झाली ॥ १७५ ॥** [ओवी १७५ व १७६ वि. प्रतीत नाहीत.]

**रावण चांचरें घावो हाणितां । पडला सिंहासना खालता ।**
**राज पुरुषार्थ करोनि वृथा । राम रक्षिता भक्तासी ॥ १७६ ॥**

अनुक्रमणिका

पुढती रावणें खड्ग घेतां । प्रहस्तें धांवोनि धरिलें हातां ।
कोप न सांवरे लंकानाथा । हाणिल्या लाथा बिभीषणा ॥ १७७ ॥

रावणें हाणिताचि लाथा । बिभीषणें चरण वंदिले माथां । शरण जावया श्रीरघुनाथा । सुमुहूर्तता हे माझी ॥ १७८ ॥

कोपा चढला लंकानाथ । त्यासी प्रहस्तें करोनि शांत । खड्ग घालोन दळा आंत । बैसविला स्वस्थ सिंहासनीं ॥

रावणाची लागली लात । जेंवी पर्वतीं वज्रघात । बिभीषण पडतांचि मूर्च्छित । द्वंद्व निर्मुक्त श्रीरामनामें ॥ १८० ॥

अगाध बिभीषणाची शांती । अणुमात्र क्रोध न ये चित्तीं । कांहीं न बोलेचि दुरुक्ती । स्वस्थ [दै. मुं. मु. 'चित्ती'.] स्थितीं बैसला ॥ १८१ ॥

सुबुद्धि सांगावी सुहृदता । ते गोष्टी खुंटली आतां । स्वस्थ असावें लंकानाथा । शरण रघुनाथा मी जातो ॥ १८२ ॥

स्वयें हाणोनियां लाथ । मज तुष्टला लंकानाथ । स्वामी भेटेल श्रीरघुनाथ । हें भाग्य प्राप्त तुझेनि ॥ १८३ ॥

एका जनार्दना शरण । राम आश्वासील बिभीषण । तें अति गोड निरोपण । श्रोतीं अवधान मज द्यावें ॥ १८४ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां बिभीषणअपमानो नाम षड्त्रिंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग सदतिसावा

## विभीषण लक्ष्मण निरुपण

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**बिभीषणासी अपमान । जालिया नव्हे क्रोधायमान । स्वयें श्रीराम स्मरोन । सावधान बैसला ॥ १ ॥**

**कांहीं न बोलोनि उपपत्ती । विचारोनि विवेकयुक्ती । शरण जावें श्रीरघुपती । निश्चयो चित्तीं दृढ केला ॥ २ ॥** [ओवी २ तं. प्रतीत नाही.]

> अभिवाद्य ततो भूमौ रावणं क्रोधमूर्छितम् । चतुर्भिः सचिवैः सार्धं निश्चक्राम बिभीषणः ॥ १ ॥
> स शांतकोपं संपूर्णं मोहात्त्यक्तमिव श्रिया । रावणं मधुरं वाक्यं बभाषे स बिभीषणः ॥ २ ॥
> सुहृदामर्थकामेन वाक्यमुक्तं दशानन । न प्रियत्वाद्गुणांस्तस्य राघवस्य ब्रवीमि ते ॥ ३ ॥
> हितार्थं धर्म्यमेवैतन्मया वाक्यमुदाहृतम् । मंत्रं ज्ञात्वा मया प्रोक्तं वाक्यं राक्षससंसदि ॥ ४ ॥

**चौघे घेवोनि प्रधान । स्वयें निघाला बिभीषण । रावणासी मधुर वचन । काय आपण बोलत ॥ ३ ॥**

**आम्ही तुम्ही सखे बंधु । अणुमात्र नाहीं विरोधु । सांगता तुजला हितानुवादु । वृथा क्रोधु तुवां केला ॥ ४ ॥**

**निंदोनिया लंकानाथा । श्रीरामा वानिले स्वपक्षार्था । तरी मी जाईन अधःपाता । जाण तत्वता लंकेशा ॥ ५ ॥**

**हनुमंतापुढें तुझें दळ । तुज देखता पळालें सकळ । तेंचि म्यां करोनि विवळ । तुज प्रांजळ सांगितलें ॥ ६ ॥**

**तेणें राग प्रधानचित्ता । तेणें राग सैन्यासमस्ता । तूंही कोपलासी लंकानाथा । निज स्वार्था नेणोनि ॥ ७ ॥**

**चोरी मारी आणि परद्वारी । हा अधर्म तुझें शिरीं । अनुताप रिघावया तुजमाझारीं । निज गजरीं बोलिलों ॥ ८ ॥**

**राक्षसांची सभा खोटी । मियां सांगितली स्वहित गोष्टी । तेच करोनि उफराटी । धरिला पोटीं महाक्रोध ॥ ९ ॥**

**जेंवी ज्वरितांचें मुख । दूध मानी कडू विख । तैसें रावणा जालें देख । मानिसी असुख स्वहिताचें ॥ १० ॥**

**अति कोपें लंकानाथा । तुवां मजला हाणितल्या लाथा ।**
**तरी काय जिंकिलें रघुनाथा । किंवा स्वस्थता तुज जाली ॥ ११ ॥**

**कोप जगामाजीं अपकारी । त्याची वस्ती तुजमाझारी । तेणें विवेकाची केली बोहरी । स्वहित दुरी दुराविलें**

अनुक्रमणिका

॥

अपकारिणि कोपश्चेत्कोपे कोपः कथं न ते । धर्मार्थकाममोक्षाणां प्रसह्य परिपंथिनि ॥ ५ ॥

भलताहि क्रोधानुकारी । कोपें अल्प अन्यायमात्रीं । कोप परम अपकारी । कोणी त्यावरी कोपेना ॥ १३ ॥

उन्मत्त गज जीवें मारी । थापीं सिंह पाडी धरेवरी । परी कोपावरी कोप करी । ऐसा संसारीं वीर नाहीं ॥ १४ ॥

क्रोध एकला एक । चहूं पुरुषार्थ घातक । ऐक त्याचाही विवेक । दुष्ट परिपाक क्रोधाचा ॥ १५ ॥

क्रोध येतांचि [मु. 'मानसी'.] कामनासी । स्वधर्म कर्म क्रोध त्रासी । क्रोध अर्थ स्वार्थ विध्वंसी । मोक्ष क्रोधापासी कदा न घडें ॥

क्रोध आलिया धर्मसंधी । स्त्रीपुरुषा कलहोत्पती । धक्काबुक्की मध्य रात्रीं । काम विघाती समूळ क्रोध ॥ १७ ॥

क्रोध आलिया धर्मसंधी । मुख्य ब्राह्मणांते स्वयें निंदी । परापवादचिया अनुवादीं । क्रोधें धर्मसिद्धी कदा न घडे ॥

अक्रोध नैशौच पदीं । वेदानुवादीं धर्मसिद्धी । क्रोध धर्मातें उच्छेदी । निंदानुवादी जल्पोनी ॥ १९ ॥

क्रोध पितयातें निर्भर्त्सी । क्रोध मातेतें म्हणे दासी । क्रोध स्वधर्मातें नासी । क्रोधापासी अधर्म ॥ २० ॥

बंधुबंधु अति आप्त । अर्थस्वार्थे क्रोधाभिभूत । स्वबंधूसी हाणवी लाथ । अति अनर्थ तो क्रोध ॥ २१ ॥

उत्तम अर्थाचिये प्राप्ती । क्रोध मुख्य विश्वासघाती । अर्थापासी क्रोध अनर्थी । जाण निश्चिती लंकेशा ॥ २२ ॥

अंधारीं जरी सूर्य बुडे । तरी क्रोधापासी मोक्ष न जोडे । काम क्रोध लोभ जैं झडे । तैंच आतुडे निजमोक्ष ॥ २३ ॥

धर्म अर्थ काम मोक्षता । चहूं पुरुषार्था क्रोध नागविता । तो तुजमाजीं वसे लंकानाथा । जेणें मज लाथा हाणविल्या ॥

मज हाणितलिया लाथा । पावलासी कोण्या निजस्वार्था ।
किंवा पावलासी परमार्था । जासी अधःपाता श्रीरामद्रोहें ॥ २५ ॥

परम कृपा श्रीरघुनाथा । तुवां हाणितल्याहि लाथा । अल्पही क्रोध न येचि चित्ता । निजशांतता श्रीरामें ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

तुवां हाणितांचि लाथा । पावली परम वैराग्यता । सांडोनि सुहृदराज्यता । शरण रघुनाथा निघालों ॥ २७ ॥

सापत्ने ध्रुवा हाणितला लाथा । तेणें तो पावे परमार्था । तैशाच रावणा तुझा लाथा । श्रीरघुनाथा प्रापक ॥ २८ ॥

श्रीराम कृपाळु दयाळु । श्रीराम भक्तवत्सळु । तूं तें नेणसी बरळु । क्रोधें विव्हळु केलासी ॥ २९ ॥

गर्व सांडोनि लंकानाथा । श्रीरामा अर्पिलियां सीता । तूं पावसी निज स्वार्था । येऱ्हवी वृथा मरसील ॥ ३० ॥

सुटलिया श्रीरामाचा बाण । तुज येथें राखेल कोण । पळालेति हनुमयाभेण । कैंची आगवण राक्षसां ॥ ३१ ॥

ऐसें बोलोनि बिभीषण । निघाला श्रीरामा शरण । वचनें खोंचला रावण । कंपायमान स्वयें जाला ॥ ३२ ॥
[ओवी ३२ कं. प्रतीत नाही.]

माझी अल्पबुद्धि अपूर्ण । लाथा हाणतांचि जाण । सखा अंतरला बिभीषण । तो गेला शरण श्रीरामा ॥ ३३ ॥

आठवलें बिभीषणाचिया चित्ता । आधीं अभिवंदोनि माता ।
तीस सांगोनि निजवृत्तांता । शरण रघुनाथा जाईन ॥ ३४ ॥

स मातरं पुनर्दृष्ट्वा तत्सर्वं विनिवेद्य च । जगामाकाशमास्थाय यत्र रामो महाबलः ॥ ६ ॥
उत्पपात गदापाणिश्चतुर्भिः सचिवैः सह । अब्रवीच्च पुनर्वाक्यं बिभीषणो महामनाः ॥ ७ ॥
अंतरिक्षे स्थितः श्रीमान् भ्रातरं धनदानुजम् । सत्यं भ्रातासि मे राजन् ब्रूहि मां यद्यदिच्छसि ॥ ८ ॥

कुळक्षयो देखोनि जाणा । सुबुद्धि सांगावया रावणा । मातेनें धाडिलें बिभीषणा । हितोपसंज्ञा शिकवावया ॥ ३५ ॥

रावणासी हित सांगता । कोप आला लंकानाथा । बिभीषणा हाणितल्या लाथा । ऐकोनी माता अति दुःखी ॥

बिभीषणा भाग्यवंता । तूं पावलासी रघुनाथा । कंदन आलें लंकानाथा । कुळा समस्तां समवेत ॥ ३७ ॥

माता तुष्टली बिभीषणासीं । तुझेंनि धन्य माझी कुशी । श्रीरामीं तूं विनटलासी । सकळ कुळासी तूं भूषण ॥ ३८ ॥

तुझेनि सकळ कुळ पुनीत । तुझेनि वंश हा सनाथ । तुझेनि मी नित्य मुक्त । श्रीरघुनाथ निजसेवा ॥ ३९ ॥

ऐकोनि मातेचें वचन । बिभीषण घाली लोटांगण । पुढती वंदोनि तिचे चरण । निघाला शरण श्रीरामा ॥ ४० ॥

बिभीषण [तु. 'निघोनी वेगेसी'.] उडोनि आकाशीं । निराळी राहोनि सावकासी । पुढती बोले रावणासी । सत्यत्वें

अनुक्रमणिका

होसी सखा तूं माझा ॥

मोह ममतेचें सखेपण । हीन दीन अति गौण । कोपामाजी कृपाळुपूर्ण । सखा रावण सत्यत्वें ॥ ४२ ॥

हाणोनिया निज लाथा । शरण धाडिलें रघुनाथा । ऐसा सखा तुजहि परता । नाहीं तत्वता तिहीं लोकीं ॥ ४३ ॥

जन्म मरणाचियां कोडी । लाथा हाणोनि तोडिली बेडी ।
रावणकोपकृपा परवडी । जोडिला जोडी श्रीराम ॥ ४४ ॥

ऐसी रावणाची स्तुती । बिभीषण वदे निजशांती । तें ऐकोंनि लंकापती । आश्चर्यें चित्तीं [मु. 'वचकला'.] चंवकला ॥ ४५ ॥

जाला अनुतापी रावण । माझी अपक्व बुद्धि पूर्ण । सखा अंतरला बिभीषण । गेला शरण रघुनाथा ॥ ४६ ॥

सैन्य सेनानी प्रधान । अवघे [तु. वि. कं. मुं. दै. मु. 'वानिती'.] मानिती बिभीषण । अणुमात्र कोप न येच जाण । व्यर्थ रावण क्षोभला ॥ ४७ ॥

धन्य बिभीषणाची शांती । धन्य बिभीषणाची कीर्ती । धन्य बिभीषणाची स्थिती । शरण रघुपती तो गेला ॥ ४८ ॥

राक्षसांच्या घातका युक्ती । हा सांगेल श्रीरामाप्रती । आली राक्षसां समाप्ती । केला समस्तीं निश्चयो ॥ ४९ ॥

बिभीषण म्हणे रावणासी । जे जे इच्छा तुझे मानसीं । ते ते सांग मजपासी । सिद्धी सर्वांसी श्रीराम ॥ ५० ॥

कृपेनें हाणोनिया लाथा । शरण धाडिलें श्रीरघुनाथा । ऐक माझी प्रत्युपकारिता । तुज मी आतां सांगेन ॥ ५१ ॥

सावध ऐकें दशशिरा । मी अंतकाळीचा सोयरा । तुवा द्वेषितां श्रीरामचंद्रा । नरकद्वारा जावों नेदी ॥ ५२ ॥

अंती होय परम मुक्ती । ऐसी श्रीरामनाम कीर्ती । केलिया श्रीरामाची भक्ती । उद्धारगती वंशस्था ॥ ५३ ॥

ऐसे बोलोनि बिभीषण । करोनि रावणासी नमन । घेवोनिया चौघे प्रधान । निघाला शरण श्रीरामा ॥ ५४ ॥

जैसे चारी पैं पुरुषार्थ । जीवासी करिती नित्य मुक्त । तैसेचि चारी प्रधान तेथ । साह्य [वि. 'सर्वार्थें'.] सतत बिभीषणा ॥ ५५ ॥

नातरी जैसे चारी वेद । उपनिषदीं करितां बोध । जीवासी पावे परमानंद । तैसे प्रबुद्ध प्रधान ॥ ५६ ॥

अनुक्रमणिका

हो कां जैशा चारी मुक्ती । जीवासी देती ब्रह्मप्राप्ती । तैसे प्रधान परमार्थी । नित्यानुवर्षी बिभीषणा ॥ ५७ ॥

नातरी जैशा वाचा चारी । नित्या नित्य विवेक करी । जीवासी नेती साक्षात्कारीं । तैसे चारी प्रधान ॥ ५८ ॥

ऐसें घेवोनि चारी प्रधान । मेरुमांदारांसमान । येतां देखोनि बिभीषण । वानरगण [दै. 'खळबळले'.] खवळलें ॥ ५९ ॥

तं मेरुशिखराकारं ज्वलंतमिव पावकम् । गगनस्थं महीस्थास्ते ददृशुर्वानरर्षभाः ॥ ९ ॥
एष सर्वायुधोपेतश्चतुर्भिः सचिवैः सह । राक्षसोऽभ्येति पश्यध्वमस्मान्हंतुं न संशयः ॥ १० ॥

बिभीषण राक्षसेश्वर । गगनीं मेरुशिखराकार । त्यातें भूमिस्थ वानर । देखोनि सत्वर ऊठिले ॥ ६० ॥

बिभीषण शांत दांत । विवेक वैराग्यें विरक्त । श्रीरामदर्शनीं अनुरक्त । तेणें आरक्त तो भासे ॥ ६१ ॥

रजतम धूम जाय विरोनी । लखलखीत भासे चैतन्याग्नी । तैसा तेजस्वी बिभीषण गगनीं । वानरगणीं देखिला ॥

पुढील वीर धीर विराजमान । मागील ते चारी प्रधान । आमचें करावया हनन । आले धांवोनि सायुध ॥ ६३ ॥

वोडण खर्ग गदापाणी । धनुष्यबाण पाठीस तूणी । आम्हासी मारावया लागोनी । आले धांवोनि राक्षस ॥ ६४ ॥

आमचा करावया घात । पांच जण आले नेमस्त । पांचही निर्दळिलियां येथ । रामकार्यार्थ साधेल ॥ ६५ ॥

जो पांचाचा करील घात । तोच पुरुषार्थी समर्थ । तोच श्रीरामाचा परम आप्त । युद्ध कंदनार्थ मग कैंचा ॥ ६६ ॥

पुढिलिया पांचाची मोहर । मारोनि केलिया चकचूर ।
मग मेलिया न येती निशाचर । वानरी विचार दृढ केला ॥ ६७ ॥

देखोनि राक्षसांची जाती । वेगें उठिलें जुत्पत्ती । शाळताळ शिळा हातीं । हाणावया पर्वतीं पेटले ॥ ६८ ॥

मिळोनिया वानर वीर । अवघीं केला भुभुःकार । तेणें खळबळिला सेनासागर । नादें अंबर कोंदलें ॥ ६९ ॥

पाडीं पाडीं म्हणता जाण । एकापुढें एक उड्डाण । करीत आलें वानरगण । तेणें बिभीषण दचकला ॥ ७० ॥

शरण जातां श्रीरघुपती । मध्येंच वानर मज मारिती । तेव्हां हे गती ना ते गती । आली ग्रहगती मुख्यत्वें ॥ ७१ ॥

अनुक्रमणिका

मुख्य विरोधाचां संबंधु । मी रावणाचा निजबंधु । वानरीं माझा करितां वधु । रामे विमर्दु चुकवावा ॥ ७२ ॥

करितां श्रीरामनाम स्मरण । दीनाचें चुके जन्ममरण । मी तंव श्रीरामीं अनन्यशरण । वानर विघ्न कां आलें ॥

येथे भेटतां कीं हनुमंत । तो तंव माझा परम आप्त । मज भेटवितां श्रीरघुनाथ । कपि कंदनार्थ चुकवोनी ॥ ७४ ॥

आतां असोत बहुत युक्ती । लोटांगण वानरांप्रती । मी अनन्यशरण रघुपती । तुम्ही कां युद्धार्थी धांवतां ॥ ७५ ॥

ऐसें बोलोनिया देख । बिभीषणें दिधली हांक । तोचि बिभीषणाचा श्लोक । अर्थ विशेष अवधारा ॥ ७६ ॥

> उवाच स महाप्राज्ञः स्वरेण महता महान् । सुग्रीवंवानरांस्तांश्च स्वस्थ एव बिभीषणः ॥ ११ ॥
> भो भो शाखामृगाः सर्वे वचनं मे निबोधत । रामायाख्यातुमिच्छामि कोसलेंद्राय धीमते ॥ १२ ॥
> रावणस्यानुजो भ्राता बिभीषण इति श्रुतः । चतुर्भिः सचिवैः सार्ध शरणार्थी न संशयः ॥ १३ ॥
> प्राप्तोऽहं राघवं द्रष्टुमिति मां वेत्थ वानराः ॥ १४ ॥

देखोनि वानर युद्धतवंक । गगनिहूनी बिभीषण देख । दीर्घ देतांचि पैं हांक । कपि कटक चवंकले ॥ ७७ ॥

काय गर्जतो निशाचर । ऐको ठेले वानरवीर । म्हणे मी शरणागत साचार । श्रीरामचंद्राचे चरणीं ॥ ७८ ॥

तो म्हणे सुग्रीवा कपिपती । वानरस्वामित्व तुझे हातीं । शरणागतासी मारुं येती । तूं हे निश्चिती निवारी ॥

रावणाचा निज बंधू । म्हणोनि माझा करिती वधू । हनुमान जाणे माझा निज बोधू । मी तंव शुद्धू शरणार्थी ॥ ८० ॥

येथें असतां हनुमंत । तो सांगता माझा वृत्तांत । मज भेटवितां श्रीरघुनाथ । शरणागत म्हणोनि ॥ ८१ ॥

श्रीरामाचे सत्यव्रत । मारुं नये शरणागत । कपि मज मारावया उद्यत । ते तूं समस्त निवारी ॥ ८२ ॥

सुग्रीवा तुझे चरणीं माथा । वृत्तांत सांगे श्रीरघुनाथा । रावणाचा कनिष्ठ भ्राता । शरण तत्वता आलासे ॥ ८३ ॥

चौघे प्रधान समवेत । बिभीषण शरणागत । [मु. 'ऐसेनि'.] ऐकोनि सांगेल रघुनाथ । तोचि कार्यार्थ करावा ॥ ८४ ॥

कैसल्येचा निजसुत । कौसलेंद्र रघुनाथ । त्याचा अनन्यशरणागत । [मु. 'बिभीषण नाम पैं माझें'.] सुग्रीवा मात मानली ॥ ८५ ॥

अनुक्रमणिका

**बिभीषण अनन्यशरणागत । सुग्रीवा मानली हे मात । तोचि श्रीरामासी वृत्तांत । वानरनाथ स्वयें सांगें ॥ ८६ ॥**

एतत्तु वचनं श्रुत्वा सुग्रीवो वानरेश्वरः । लक्ष्मणस्याग्रजं राममिदं वचनमब्रवीत् ॥ १५ ॥
रावणस्यानुजो वीरो बिभीषण इति श्रुतः । चतुर्भिः सचिवैः सार्धं शरणार्थं किलागतः ॥ १६ ॥

**ऐकोनि बिभीषणाचें वचन । सुग्रीव येवोनि आपण । रामलक्ष्मणा करोनि नमन । सांगे आगमन बिभीषणाचें ॥**

**श्रीरामासी अर्पावी सीता । हे हीत सांगता लंकानाथा । त्यासी हाणोनि लाथा । अनाप्तता दवडिला ॥ ८८ ॥**

**नगरी धेडें पिटोनि पूर्ण । नगर त्यागें बिभीषण । दवडितां बोलिला रावण । जाय तूं शरण श्रीरामा ॥ ८९ ॥**

**श्रीराम जालिया पक्षपाती । कैसा येईल लंकेप्रती । कंवी राक्षसां करील ख्याती । तेही प्रतीती** [मु. 'अवधारा'; वि. 'पावला'.] **पाहो पां ॥ ९० ॥**

**तो बिभीषण सद्भावता । शरण आलासे रघुनाथा । काय करावे त्यासी आतां । सांग समर्था श्रीरामा ॥ ९१ ॥**

**घेवोनियां चौघे प्रधान । बिभीषण अनन्यशरण । काया वाचा उदित मन । तुझे श्रीचरण सेवावया ॥ ९२ ॥**

प्राप्तं बिभीषणं श्रुत्वा रामः सुग्रीवमब्रवीत् । स्मयन्निव स्पृशन्हस्तं स्तेहेनामित्रतापनः ॥ १७ ॥
हरिश्रेष्ठ महाबाहो वचनं श्रूयतां मम । हनूमत्प्रमुखान्सर्वान्सचिवांश्च समाव्हय ॥ १८ ॥
तैः समुह्य तु कर्तव्यं करिष्यामि परिक्षणम् । इत्युक्त्वा राघवः सर्वान्प्रहृष्टान्हरियूथपान् ॥ १९ ॥
मतिमान्वानरः सर्वमिदं राममुवाच ह ॥ २० ॥

**बिभीषण आला भेटी । तेणें श्रीरामास आनंद कोटी । हरिखें सुग्रीवाची पाठी थापटी । आल्हाद पोटीं प्रेमाचा ॥ ९३ ॥**

**बिभीषणाचें मनोगत । अनन्यभावें शरणागत । जाणें अंतर्यामीं श्रीरघुनाथ । हृदयस्थ निवासी ॥ ९४ ॥**

**बिभीषण शरणागत परम । स्वयें जाणें आत्माराम । सुग्रीवाप्रती राजधर्म । अनुक्रमें अनुवादे ॥ ९५ ॥**

**हनुमंतादि मुख्य प्रधान । पाचारिले वानरगण । बिभीषण येतो शरण । त्यांचें लक्षण लक्षावया ॥ ९६ ॥**

**बिभीषणाचें मनोगत । सत्य किंवा असत्य । निर्धारावया इत्थंभूत । कपी समस्त पाचारिले ॥ ९७ ॥**

**ऐकोनि श्रीरामाचें वचन । उल्हासले वानरगण । बिभीषणाचें लक्षण । अनुवादन ते करिती ॥ ९८ ॥**

**मुख्य सुग्रीव राजानुवादु । हा तंव रावणाचा बंधू । अवश्य याचा करावा वधु । म्हणे कुमुदु मारावा ॥ ९९ ॥**

अनुक्रमणिका

नळनीळ सांगती गोष्टी । तेचि तरसतराळाचें पोटीं । रावणानुज हा तंव कपटी । उठाउठी मारावा ॥ १०० ॥

गजगवय सांगती जाण । शत्रुबंधु हा कपटी शरण । यासी न [मु. 'वरावें'.] मारावे आपण । द्यावा दवडोन लंकेसी ॥ १०१ ॥

कपटी रावणाचा बंधु । हा मारावा म्हणे मैंदु । तैसाचि अनुवादे द्विविदु । करावा वधु पैं याचा ॥ १०२ ॥

सुषेण पनस दधिमुख । तिघे होवोनि एकमुख । यासी राखितां परमदुःख । आवश्यक मारावा ॥ १०३ ॥

मग बोलिला जांबुवंत । बिभीषणा पाचारा येथ । त्याचें लक्षितां चेष्टित । मनोगत कळेल ॥ १०४ ॥

स्थिती गती गमनागमन । नेत्र वक्त्र संभाषण । येणें पराचें लक्षण । विचक्षण लक्षिती ॥ १०५ ॥

अंगद बोले अति कौतुक । एकलें बिभीषण रंक । त्यासाठीं हदादिलें कटक । कपि नेटक निज योद्धे ॥ १०६ ॥

धन्य वाटिव वानरां । शरण आले निशाचरां । जो तो म्हणे मारा मारा । हा काय खरा पुरुषार्थ ॥ १०७ ॥

नेणोनि श्रीरामाची स्थिती । वृथा वानरें जल्पती । पैल बैसलासे मारुती । त्याची युक्ती अवधारा ॥ १०८ ॥

सकळ लंकेचें शोधन । हनुमंतें केलें आपण । साधु कीं दुर्जन बिभीषण । त्याचें लक्षण तो जाणें ॥ १०९ ॥

हनुमंतासी अविदित । नाहीं उरला लंकेचा अर्थ । तो सांगेल इत्थंभूत । ते समस्त उगें ऐका ॥ ११० ॥

राम म्हणे हनुमंता । बिभीषण शरणागता । काय काय करावें गा आतां । ते तत्वता मज सांगे ॥ १११ ॥

ऐकोनि स्वामीचें वचन । हनुमान घाली लोटांगण । वंदोनि श्रीरामचरण । युक्त वचन अनुवादे ॥ ११२ ॥

> युक्तस्त्वष्टांगया बुद्धया हनुमान्सचिवोत्तम : । उवाच मधुरं सूक्ष्ममर्थवच्च ततो वचः ॥ २१ ॥
> तं ब्रुवंतं हरिश्रेष्ठं सर्वे ते हरिपुंगवाः ॥ २२ ॥
> अर्थानर्थनिमितं हि यदुक्तं सचिवैस्तदा । तत्र दोषं न पश्यामि क्रिया न ह्युपपद्यते ॥ २३ ॥
> अदेशकाले संप्राप्त इत्ययं यद्बिभीषणः । विवक्षा तत्र मेऽस्तीयं तान्निबोध यथामति ॥ २४ ॥

हनुमंत सर्वांगें सज्ञान । सर्वेंद्रियीं पक्व विज्ञान । जें बोले तें युक्त वचन । श्रीरघुनंदन सुखकारी ॥ ११३ ॥

हनुमान श्रीरामाचे लळिवाड । त्याचा बोल अमुतापरीस गोड ।
पुरते [तं. 'श्रोतयाचें'.] वेदशास्त्राचें कोड । श्रवणीं चाड श्रीरामा ॥ ११४ ॥

हनुमान बोलतां आपण । टंवकारोनि वानरगण । पाहत ठेले त्याचें वदन । अवघेजण टकमकीत ॥ ११५ ॥

अनुक्रमणिका

बृहस्पती करितां निरुपण । अति एकाग्र अमरगण । ऐकतां हनुमंत वचन । कपि संपूर्ण तटस्थ ॥ ११६ ॥

हनुमद्वाक्याची घडमोडी । वानरां टकटक लक्ष कोडी ।
वचनीं सत्यत्वाची प्रौढी । तेणें अति गोडी श्रीरामा ॥ ११७ ॥

खिरी तुपावरी साखर । तैसें वचन अति मधुर । सत्यवादी रामानुचर । श्रीरामचंद्र सुखकारी ॥ ११८ ॥

सावध ऐकें श्रीरघुनाथा । नेणोनि बिभीषणा [तु. वि. कं. मुं. मु. दै. 'हृदयस्था'.] हृद्गता । कपि प्रधान बोलती वृथा । अनुमानता मिथ्यात्वें ॥ ११९ ॥

न कळोनि बिभीषणाचा बोधु । शरण रिघोनि शत्रुबंधु ।
म्हणती आमचा करील वधु । वानरानुवादु अति मिथ्या ॥ १२० ॥

लंका शोधितां त्रिकुटीं । मियां देखिले आपुले दृष्टीं । बिभीषण हा नव्हे कपटी । सत्य गोष्टी हे माझी ॥ १२१ ॥

बिभीषण नव्हे हा शठ । बिभीषण नव्हे हा नष्ट । बिभीषण नव्हे कपट । वाक्य निर्दुष्ट हें माझें ॥ १२२ ॥

लंका शोधितां समस्त । राक्षसांचें हृदयस्थ । जाणोनि वदे हनुमंत । अति समर्थ सत्यत्वें ॥ १२३ ॥

श्रीरामसेवा तपोबळें । सर्वा हृदयीं हनुमान खेळें । तेणें सत्यासत् कळे । बोले प्रांजळें [कं. 'सत्यभूत'.] सत्यधूत ॥ १२४ ॥

कपि प्रधान जे बोलती । कपटी बिभीषणाची स्थिती । त्याची मिथ्या ते वदंती । शुद्ध [पै. 'शुद्ध भावार्थी'.] शरणार्थी बिभीषण ॥ १२५ ॥

बिभीषणाची धर्मस्थिती । बिभीषणाची धर्मकीर्ती । बिभीषणीं भगवद्भक्ती । शुद्ध भावार्थी बिभीषण ॥ १२६ ॥

बिभीषणीं नाही अकर्म । बिभीषणीं नाही विकर्म । बिभीषणीं नाही अधर्म । सत्यत्व [मु. 'वचन'.] परम हें माझें ॥ १२७ ॥

बिभीषणीं नित्य निवृत्ती । बिभीषण धर्ममूर्ती । बिभीषणीं निज शांती । शुद्ध भावार्थी बिभीषण ॥ १२८ ॥ [ओवी १२८ वि. तु. दै. तं. प्रतीतून नाही.]

सांडोनि यौवराज्य संपूर्ण । त्यजोनियां बंधु रावण । युद्धसमयीं आला शरण । त्यासी आपण नये मारुं ॥ १२९ ॥

पहिलेंचि श्रीरामीं सप्रेमता । त्यावरी रावणें हाणिल्या लाथा ।
शरण आला श्रीरघुनाथा । भावार्थता स्वानंदें ॥ १३० ॥

अनुक्रमणिका

भावार्थी अथवा कपटी पूर्ण । जो कां म्हणे मी आलों शरण । त्यासी मारितां आपण । लागेल दूषण सूर्यवंशा ॥

शिबी हरिश्चंद्र रुक्मागंद । वंशींचे क्षोभती धर्मविद । शरणागताचा पैं वध । अति विरुद्ध तिंहीं लोकीं ॥ १३२ ॥

स्वर्गीं क्षोभेल दशरथ । अधर्मी जाला रघुनाथ । मारुं नये शरणागत । हा निश्चितार्थ श्रीरामा ॥ १३३ ॥

एकला एक बिभीषण । त्याचें आम्हांसी भय कोण । वधावा म्हणती वानरगण । त्यांची आंगवण अति तुच्छ ॥ १३४ ॥

तुटोनि पडतां गगन । गजबजीना रघुनंदन । तेथें बापुडें बिभीषण । त्याचें भय कोण आम्हांसी ॥ १३५ ॥

ऐसें बोलतां मारुती । संतोषला श्रीरघुपती । सवेंच कपि बोले पुढती । ते उपपत्ती अवधारा ॥ १३६ ॥

बिभीषणाचिये संगतीं । राक्षसांचिया दुर्गम गती । वश्य होतील श्रीरघुपती । विजयप्राप्ती बिभीषणें ॥ १३७ ॥

अभिचारिक विघ्नानुवृत्ती । स्वयें श्रीरामा वश्य होती । बिभीषणाचे संगतीं । विजय प्राप्ती श्रीरामा ॥ १३८ ॥

अलक्ष्य अगम्य अतर्क्यगती । पृथ्वी करोनि धूर चोरिती । तेथेंही बिभीषण संगती । विजय प्राप्ती श्रीरामा ॥ १३९ ॥

संकट विकट अति दुर्घट । जेथें रिघतां परम कष्ट । बिभीषणा संगती होती सपाट । [कं. दै. मु. 'विजयपट'; तु. 'विजयवाट'.] विजयपाट श्रीरामा ॥ १४० ॥

बिभीषणाची शुद्ध मती । बिभीषण केवळ परमार्थी ।
विकल्प न धरावा चित्तीं । शुद्ध शरणार्थी बिभीषण ॥ १४१ ॥

लंका शोधितां सकटीं । म्यां देखिले आपुले दृष्टीं । त्रिसत्य सत्य माझी गोष्टी । नव्हे कपटी बिभीषण ॥ १४२ ॥

वाहातो श्रीरामाची आण । भावें वंदितों तुझें चरण । कपटी नव्हे हा बिभीषण । सत्य भाषण हें माझें ॥ १४३ ॥

ऐकतां हनुमंताची गोष्टी । श्रीरामासी आनंद कोटी ।
हरिखे खेंवा [मु. 'पडली'.] घातली पोटीं । आल्हाद सृष्टी न समाय ॥ १४४ ॥

जैसें श्रीरामाचें मनोगत । तैसेंचि बोलिला हनुमंत । तेणें उल्हासें रघुनाथ । असे गर्जत स्वानंदें ॥ १४५ ॥

अनुक्रमणिका

मज मारावया जाण । कपटी रावण आलिया शरण ।
त्यासीही माझें अभयदान । मग बिभीषण केंवी त्याज्य ॥ १४६ ॥

बिभीषण माझा आत्मा जाण । बिभीषण माझा जीवप्राण ।
माझेनि चिरंजीव बिभीषण । जन्ममरण त्या नाहीं ॥ १४७ ॥

बिभीषणा शरणागता । वेगीं पाचारी बा आतां । लंका दिधली तत्वतां । निजराज्यता संकल्पें ॥ १४८ ॥

जा रे म्यां मारिला रावण । लंकेसी स्थापिला बिभीषण । शरणागतीं प्रेमपूर्ण । आपणा आपण विसरला ॥ १४९ ॥

ऐसिया राम उत्तरीं । हनुमान लोळे पायांवरी । जे म्यां नेमिले जिव्हारी । तेचि निर्धारी श्रीरामवाणी ॥ १५० ॥

भेटावया निजभक्ता । बाहु थरकती श्रीरघुनाथा । वेगीं बोलावी हनुमंता । शरणागता बिभीषणा ॥ १५१ ॥

ऐकोनि हनुमंताचें वचन । सुग्रीवें खालती घातली मान । वानर जाहाले लज्ञायमान । रघुनंदन उल्हासे ॥ १५२ ॥

बिभीषणाचें भाग्य पूर्ण । श्रीराम तुष्टला संपूर्ण । एका जनार्दना शरण । भेटीचें लक्षण अवधारा ॥ १५३ ॥

कैसी दोघांची दृष्टा दृष्टी । कैसी दोघांची होईल भेटी ।
कैसे दोघे करतील गोष्टी । ते कथा कसवटी अनुपम्य ॥ १५४ ॥

देवा भक्ताचें दर्शन । ते कथा तंव अतिपावन । एकाजनार्दना शरण । रामायण अतिरम्य ॥ १५५ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां बिभीषणलक्षणनिरूपणं नाम सप्तत्रिंशतितमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग अडतिसावा

## विभीषण आश्वासन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**बिभीषणाचा वृत्तांत । समूळ सांगे हनुमंत । तेणें तुष्टला श्रीरघुनाथ । उल्हासत स्वानंदें ॥ १ ॥**

> रामस्तेषां वच : श्रुत्वा शरणागतवत्सलः । पूरयन्निव घोषेण श्लक्ष्णं वचनमब्रवीत् ॥ १ ॥
> उक्तवाक्ये तु सुग्रीवे तस्मिन्हरिगणेश्वरे । उवाच राघवः श्रीमान् धर्मार्थसहितं वचः ॥ २ ॥
> स दुष्टो वाप्यदुष्टो वा किमेष रजनीचरः । सूक्ष्ममप्यहितं कर्तु न मे शक्तः प्लवंगमाः ॥ ३ ॥

**ऐकोनि हनुमंताचें वचन । संतोषला रघुनंदन । सुग्रीवादि वानरगण । त्याप्रति आपण स्वधर्म सांगे ॥ २ ॥**

**सद्भावेंसीं संपूर्ण । अथवा कपटें आलिया शरण । त्यासी नाहीं सर्वथा मरण । सत्य भाषण हें माझें ॥ ३ ॥**

**माझा करावया घात । शरण आलिया लंकानाथ । त्यासीही माझा अभयहस्त । जाणा निश्चित कपि सर्व ॥ ४ ॥**

**शरणागतापासाव मरण । आम्हांसी सर्वथा नाहीं जाण । हेंही माझें सत्य भाषण । वानरगण तुम्ही जाणा ॥ ५ ॥**

**शरणागतासीं क्रोधानळीं । जो कोणी उचलील आंगोळी । त्याची करीन मी होळी । शरजाळी वर्षोनी ॥ ६ ॥**

**जो कोणी माझा शरणागत । त्यासी जेणें लाविला हात । त्याचा मी करीन घात । निश्चितार्थ माझा ॥ ७ ॥**

**श्रीराम कृपेचा कल्लोळ । श्रीराम शरणागतवत्सल । श्रीराम तो दीनदयाळ । प्रेग प्रांजळ श्रीराम ॥ ८ ॥**

**श्रीराम स्वानंदें गर्जत । बिभीषण जो शरणागत । त्यासी माझा अभयहस्त । आणा त्वरित भेटींसी ॥ ९ ॥**

> आनयध्वं हरिश्रेष्ठं दत्तमस्याभयं मया । बिभीषणो वा सुग्रीवो यदि वा रावणः स्वयम् ॥ ४ ॥
> रामेणाप्यभयं दत्ते स ततो वानरर्षभः । उत्पपात दिवं हृष्टः सर्वैरनुचरैः सह ॥ ५ ॥
> स समेत्य कपिश्रेष्ठः संश्लिष्य च बिभीषणम् । सांत्वयित्वा च मेधावी दर्शयामास राघवम् ॥ ६ ॥

**ऐसें बोलतां श्रीरधुनाथ । सुग्रीवासहित हनुमंत । उडाले पैं आकाशांत । जुत्पत्तीयुक्त स्वानंदें ॥ १० ॥**

**देखोनियां वानरजात । पुढती बोले रघुनाथ । शरण आलिया लंकानाथ । अभयहस्त त्या माझा ॥ ११ ॥**

**शरण आलिया सर्वथा । बिभीषणाहून अधिकता । सुखी करीन लंकानाथा । जाण तत्वतां वानरेशा ॥ १२ ॥**

अनुक्रमणिका

रावण अथवा बिभीषण । दुष्ट नष्ट हो दुर्जन । मज आलिया शरण । अभयदान त्या माझें ॥ १३ ॥

जो भीतसे शरणागता । मरणभय ज्याचें चित्ता । जय न पावे तो सर्वथा । जाण तत्वतां कपिराजा ॥ १४ ॥

ज्याचे [पै. अं. 'चित्तीं'.] पोटीं सभयता । कैंचे निर्भय शरणागता । तैसें नाहीं श्रीरघुनाथा । निःशंकता निर्भय ॥ १५ ॥ [ओवी १५ दै. प्रतीत नाही.]

ऐकोनि श्रीरामाचें वचन । अवघे विस्मित वानरगण । गाढी श्रीरामाची आंगवण । निधडापूर्ण निःशंक ॥ १६ ॥

श्रीराम चित्तीं नाही चिंता । मरणभय नाहीं रघुनाथा । हाचि शरण्य शरणागता । ऐसें समस्तां मानलें ॥ १७ ॥

ऐसा श्रीराम समर्थ । अवघे अति प्रीती बोलतं । जेथें बिभीषण शरणागत । तेथें समस्त [वि. पैं. 'आले'; मु. 'पातले'.] पावले ॥ १८ ॥

देखतांचि बिभीषण । सुग्रीवें दिधलें आलिंगन । बिभीषण भाग्याचा संपूर्ण । वानरगण मानिती ॥ १९ ॥

नळनीळादि समस्त । अंगद आणि जांबुवंत । अवघे आलिंगन देत । भाग्यवंत बिभीषण ॥ २० ॥

देखतांचि हनुमंता । उल्हास बिभीषणाचिया चित्ता । त्याच्या चरणीं ठेवोनि माथा । सप्रेमता [तु. 'सदोदित'.] सद्गदित ॥ २१ ॥

माता पिता तूं जननी । तूंचि सखा मज लागून । तुजवांचोनि त्रिभुवनीं । आन कोणी असेना ॥ २२ ॥

रावणाची संपूर्ण कथा । सांगितली हनुमंता । स्वराज्य सुहृद त्यजोनि माता । शरण रघुनाथा मी आलों ॥ २३ ॥

ऐसें सांगतांचि गोष्टी । हरिखें बाष्प दाटें कंठी । सुख स्वानंदें पडोनि मिठी । पडिला सृष्टी मूर्च्छित ॥ २४ ॥

त्यासी मूर्च्छित पडतां । उल्हास हनुमंताचे चित्ता । उचलोनिया स्वानंदता । उल्हासता आलिंगी ॥ २५ ॥

अंगा अंगस्पर्शन । हनुमंतासी आलिंगन । तेणें पावला समाधान । सुखसंपन्न बिभीषण ॥ २६ ॥

कृपेनें बोलें हनुमंत । बिभीषणा तूं भाग्यवंत । तुज तुष्टला श्रीरघुनाथ । कृपावंत कृपाळु ॥ २७ ॥

श्रीरामें बोलाविलें भेटी । वेगें चाल उठाउठीं । म्हणोनि धरिला बाहुवटीं । वानरां [मुं. वि. 'पोटीं'.] कोटी आल्हाद ॥ २८ ॥

अनुक्रमणिका

पादयोःस तु रामस्य निपपात बिभीषणः । उवाच मधुरं वाक्यं सखा मम भवानिति ॥ ७ ॥
अब्रवीच्च तदा राममुक्तवाक्यं बिभीषणः । अनुजो रावणस्याहं तेन चास्म्यवमानितः ॥ ८ ॥
परित्यक्ता मया लंका मित्राणि च धनानि च । सर्वतः सर्वभूतानां शरण्यं शरणागतः ॥ ९ ॥
राक्षसानां वधे साह्यं लंकायाश्च प्रधर्षणे । करिष्यामि यथा प्राणं नेष्याम्यपि च वाहिनीम् ॥ १० ॥

**भेटावया श्रीरघुपती । बिभीषणासी धरोनि हातीं । वेगें उठिला मारुती । वानरपंक्ती समवेत ॥ २९ ॥**

**श्रीरामनामाचा गजर । करित चालिले वानर । नामें उचंबळिला सागर । नामें अंबर दुमदुमलें ॥ ३० ॥**

**भेटावया शरणागता । बाहू स्फुरती श्रीरघुनाथा । आलिंगावया अति शीघ्रतां । श्रीरामचित्ता आल्हाद ॥ ३१ ॥**

**शुभ चिन्हें डोळे लवती । हरिखें अष्टांगें थरकती । शरणागता श्रीरामप्रीती । आल्हाद चित्तीं भेटीचा ॥ ३२ ॥**

**अवलोकावया शरणागत । नेत्रपल्लव न हालत । येणें उल्हासें श्रीरघुनाथ । उत्कंठित भेटावया ॥ ३३ ॥**

**येरीकडे हनुमंत । धरोनि बिभीषणाचा हात । सुग्रीवादि कपि समस्त । आले गर्जत हरिनामें ॥ ३४ ॥**

**देखतां श्रीरामदर्शन । बिभीषण घाली लोटांगण । मस्तकीं धरितां त्याचे चरण । आपणा आपण विसरला ॥ ३५ ॥**

**विसरला यौवराज्य संपत्ती । विसरला स्त्रीपुत्र संपत्ती । विसरला राक्षसजाती । श्रीराममूर्ती देखतां ॥ ३६ ॥**

**विसरला जीवित्व जीव । विसरला देह अहंभाव । विसरला** [वि. 'संसार सर्व'.] **शिवत्व शिव । श्रीराघव देखतां ॥ ३७ ॥**

**राम देखतांचि दृष्टी । विसरला द्वंद्व दुःख त्रिपुटी । विसरला स्वदेहेंसी सृष्टी । आनंद कोटी** [वि. 'न समाय'.] **श्रीरामा ॥ ३८ ॥**

**ऐसिया परी बिभीषण । श्रीरामासी अनन्यशरण । स्वयें घालितां लोटांगण । समाधान पावला ॥ ३९ ॥**

**मनबुद्धि चित्त अभिमान । साधुराखे सावधान । तैसेंचि चौघेही प्रधान । आणिले शरण श्रीरामा ॥ ४० ॥**

**धर्म अर्थ काम मोक्ष पूर्ण । साधक करी ब्रह्मार्पण । तैसें चौघेही प्रधान । आणिले शरण श्रीरामा ॥ ४१ ॥**

**साधनचतुष्टय संपत्ती । साधुनी ब्रह्मार्पण करिती । तैसेचि सचिव चारी मूर्ती । केले शरणार्थी श्रीरामा ॥ ४२ ॥**

**ऐसियापरी बिभीषण । अनन्यभावें लोटांगण । श्रीरामें उचलोनि आपण । आलिंगन दिधलें ॥ ४३ ॥**

अनुक्रमणिका

लवणजळा होय भेटी । तैसी दोघा पडली मिठी । विरालें येरयेरांचे पोटी । आनंद सृष्टी न समाये ॥ ४४ ॥

दोन्ही दीप मेळवीजती । दोन्ही मिळोनिया [मु. 'एक होती'.] एकचि दीप्ती ।
तैसें आळंगिता रघुपती । अद्वैत स्थिती बिभीषणा ॥ ४५ ॥

जेंवी कां अलंकारें आपण । सुवर्णा दिधलें आलिंगन । ऐसिया स्थिती बिभीषण । भेटला संपूर्ण श्रीरामीं ॥ ४६ ॥

ऐसें देवोनि आलिंगन । श्रीराम बोलिला गर्जोन । सखा माझा तूं संपूर्ण । जीव प्राण तूं आम्हां ॥ ४७ ॥

जेंवी जळीं मिळोनि साखर । स्वयें विरोनी होय नीर । साखरा उदक केलें मधुर । तेंवी रामचंद्र बिभीषण ॥ ४८ ॥

श्रीरामाचें पूर्णपण । भक्तीं बिंबलें संपूर्ण । भक्त भावाचें गोडपण । बिंबलें संपूर्ण श्रीरामीं ॥ ४९ ॥

ऐसियापरी दोघेजण । पूर्ण पावोनि समाधान । हरिखेजोनि बिभीषण । काय आपण बोलत ॥ ५० ॥

राक्षस [मु. मुं. कं. 'मारावयाची'; वि. 'रायाची'.] माराची निज ख्याती । मुख्य मुख्य धुरा रणीं पडती । तैसी सांगेन मी युक्ती । रणसमाप्ती राक्षसां ॥ ५१ ॥

दुर्गीं रिघावया झडझडां । युक्ती जाणोनि मी गाढा । परि ते न चले वानरा पुढां । उडोनि कडां चढतील ॥ ५२ ॥

सवेग करोनिया उड्डाण । दुर्गीं रिघती वानरगण । तेथें माझी युक्ती कोण । मूर्खपण हें माझें ॥ ५३ ॥

सुटलियां श्रीरामाचे बाण । समेरुंसिंधूसी निमे रावण । तेथें माझी युक्ती कोण । मूर्ख संपूर्ण मी एक ॥ ५४ ॥

ऐसें बिभीषण सांगता । कृपा उपजली रघुनाथा । अभयहस्त ठेवोनि माथा । होय बोलतां तें ऐका ॥ ५५ ॥

> इति ब्रुवाणं तं रामः परिष्वज्य बिभीषणम् । उवाच लक्ष्मणं वीरं समुद्रजलमानय ॥ ११ ॥
> अभिषिंचस्व लंकायामिमं सौम्य बिभीषणम् । राक्षसं राक्षसेन्द्र त्वं प्रपन्नं मयि लक्ष्मण ॥ १२ ॥

ऐसें बोलतां बिभीषण । संतोषला श्रीरघुनंदन । पुढती देवोनि आलिंगन । तुष्टमान स्वयें जाला ॥ ५६ ॥

बिभीषण लंकापती । अभिषेकावया रघुपती । समुद्रजळ आणावया अर्थी । लक्ष्मणाप्रती स्वयें सांगे ॥ ५७ ॥

तीर्थोदक पृथोदक । चतुःसमुद्रीचे उदक । वानरीं आणिलें अवश्यक । रघुटिळक निजाज्ञा ॥ ५८ ॥

व्याघ्रचर्म पैं सनख । सप्तमृत्तिका कुशोदक । औदुंबरीं पीठ अति सुटंक । लंकाभिषेक बिभीषणा ॥ ५९ ॥

अनुक्रमणिका

[ओवी ५९ वि. प्रतीत नाही.]

घडेंसहित सोनकेळी । घडीं घडघडीत नारळीं । वानर [मु. 'हाणिती'.] आणिती सुखसंमेळीं । पुष्पीं फळीं अभिषेका ॥ ६० ॥

दशानन न वधितां । बिभीषण अभिषेकितां । अवघे वानर म्हणती मिथ्या । युक्ती रधुनाथा आठवली ॥ ६१ ॥

श्रीराम म्हणे हनुमंता । लंका देखिली तुवां तत्वतां । समुद्रतीरीं करोनि आतां । यथार्थता मज [वि. 'सांग'.] दावी ॥ ६२ ॥

ऐकोनि श्रीरामाचें वचन । हनुमान घाली लोटांगण । समुद्रतीरीं आपण । करी निर्माण लंकेचें ॥ ६३ ॥

भोंवता समुद्रपरिघ देखा । सव्य निकुंबळा मागें पडलंका ।
मध्यें निर्माण केली लंका । ध्वज पताका शोभती ॥ ६४ ॥

[दै. 'गडप्रदेशें'.] गडप्रवेश अति अवघड । चोर द्वारें मारे गूढ । बिकट यंत्रें मारक दृढ । भरलें अगड [तं. बहुजड'.] बहुजळें ॥ ६५ ॥

महाद्वारा संमुख । गुप्त द्वारें हुडे मारक । अग्नियंत्राचे भडक । पारखी कटक मारावया ॥ ६६ ॥

उलट लोट अतर्क्य घात । पारखे वीर ठायीं पडत । ऐसा मार दुर्गाआंत । दावी हनुमंत गडभागें ॥ ६७ ॥

फाजी पौळी निघोटकडे । दुर्धर मार दोहीं कडे । ढळोंनये मागें पुढें । दावी निवाडे हनुमंत ॥ ६८ ॥

रचिली लंकेची आकृती । तीपुढें तुच्छ अमरावती । राजमंदिरें शोभतीं । टके झळकती पताका ॥ ६९ ॥

माड्या गोपुरें सातखणी । उपऱ्यांउपरी नवखणी । घरोघरीं पै दुखणीं । लंकाभुवनीं अपार ॥ ७० ॥

राणिवंसा शोभायमान । त्याही माजीं अशोकवन । तेथें सीतेसी निर्बंधन । संरक्षण राक्षसी ॥ ७१ ॥

एकवस्त्रें अतिदीन । मळीन केश कंपायमान । ऐसिये सीतेतें देखोन । रघुनंदन मूर्च्छित ॥ ७२ ॥

बिभीषण चंवके चित्तें । उपडोनिया हनुमंतें । तेचि लंका आणिली येथें । आत विस्मितें विस्मित ॥ ७३ ॥

लंका देखतांचि पुढे । तंवकें उडाली माकडें । दुर्धर दुर्गाचे पै [मु. 'हुडे'.] कडे । उड्डाण पडे माघारे ॥ ७४ ॥

अवघे करा आंगवण । शोधोनि काढा रे रावण । ऐसे भुलले वानरगण । केले [वि. 'उड्डाण'.] विंदान हनुमंतें ॥ ७५ ॥

अनुक्रमणिका

सावध पाहे रघुनंदन । तंव वाळूचें लंकाभुवन । हनुमंतेनि केलें शोभायमान । समसमान लंकेसी ॥ ७६ ॥

ऐसें स्वयें दुर्ग देखोन । विस्मयो पावला लक्ष्मण । अंगद सुग्रीव आपण । विस्मयापन्न होऊन ठेले ॥ ७७ ॥

देखोनि हनुमंताची लंका । टक पडिलें ब्रह्मादिकां । ब्रह्मांडकर्ता ब्रह्मादिकां । पाहे टकमका विस्मित ॥ ७८ ॥

हनुमंताचे मिथ्या रचन । ब्रह्मादिकां दिसे प्रमाण । ऐसें देखोनि विंदान । सुखसंपन्न श्रीराम ॥ ७९ ॥

यापरी लंका देखोनि दृष्टी । उल्हास श्रीरामाचें पोटीं । हनुमंताची पाठी थापटी । हरिख सृष्टी न समाये ॥ ८० ॥

श्रीराम बोलिला आपण । मारोनि रावण कुंभकर्ण । मुख्य लंका देईन दान । सत्य जाण बिभीषणा ॥ ८१ ॥

मुख्य लंका देईन जंव दान । तंव हे हनुमत्कृत लंका जाण ।
तुजपासीं म्यां दिधली गहाण । सोडवण रावणांतीं ॥ ८२ ॥

बहुत दिन न ठेवी गाहण । आम्हां तुम्हां वाईनी हेचि जाण । निर्दळोनिया रावण । सोडवण पैं इची ॥ ८३ ॥

लंकेहूनि ही देखा । कोटि गुणे या मोल अधिका । माझिया हनुमंताची लंका । ते तुज देखतां डुलोनेदी ॥ ८४ ॥

प्रीति प्रेम ज्ञान धन । तुज यथेच्छ देईन जाण । हनुमंत लंका सोडविन । सत्य जाण बिभीषणा ॥ ८५ ॥

ऐकोनि श्रीरामाचें उत्तर । संतोषोनियां वानर । अवघे करिती जयजयकार । सुखनिर्भर सौमित्र ॥ ८६ ॥

हनुमंत लंका अद्यापवरी । आहे समुद्राचें तीरीं । काळ धांके जतन करी । भय भारी हनुमंताचें ॥ ८७ ॥

राज्याभिषेकाची सामग्री । सिद्ध केली वानरीं । सौमित्र तिहीं उपचारीं । अभिषेक करी बिभीषणा ॥ ८८ ॥
[ओवी ८८ अं. प्रतीत नाही.]

रामवाक्यात्तु सौमित्रिरभिषिच्य बिभीषणम् । मध्ये वानरमुख्यानां राजानं रामशासनात् ॥ १३ ॥
तं प्रसादं तु रामस्य दृष्ट्वा सद्यः प्लवंगमाः । प्रचक्रुश्च महानादान्साधु साध्विति चाब्रुवन् ॥ १४ ॥

श्रीराम आज्ञा लहोन । बिभीषण राज्याभिषेचन । करितां जाला लक्ष्मण । वानरगण समवेत ॥ ८९ ॥

राज्यपाट अभिषेचन । अंगदसुग्रीवासमान । बिभीषणासी सिंहासन । रामवरदान प्रयोगें ॥ ९० ॥

बिभीषणासी लंकादान । श्रीरामें दिधलें संतोषोन । तें देखोनि वानरगण । आल्हादें पूर्ण हरिखेले ॥ ९१ ॥

अनुक्रमणिका

जयजयकाराचा गजर । करिते जाले वानरवीर । श्रीरामनामाचा उच्चार । तेणें अंबर गर्जलें ॥ ९२ ॥

श्रीराम निजभक्त कृपाळु । श्रीराम शरणागत वत्सलु । श्रीराम प्रेमळ प्रांजळु । दीनदयाळु श्रीराम ॥ ९३ ॥

साधु स्वामी श्रीरघुनाथ । साधु बिभीषण शरणागत । साधु साधु तो हनुमंत । स्वामिकार्यार्थ साधक ॥ ९४ ॥

जैसा राजा श्रीरघुपती । जैसा सुग्रीव कपिपती । तैसाचि बिभीषण लंकापती । केला निश्चिती श्रीरामें ॥ ९५ ॥

विकल्प न धरोनि चित्तीं । शत्रु बंधु तो शरणार्थी । आपणासमान पदप्राप्ती । दिधली निश्चिती श्रीरामें ॥ ९६ ॥

शरणागता संरक्षणें । शेखीं आपणासमान करणें । हें कर्तव्य श्रीराम जाणे । अनन्याकारणें कृपाळु ॥ ९७ ॥

न जिणतां दशानन । बिभीषणासी लंकादान । श्रीराम कीर्ति अति पावन । दीनोद्धरण श्रीराम ॥ ९८ ॥

कीर्ति वानिती सुरगण । कीर्ति वानिती ऋषीजन । कीर्ति वानिती वानरगण । कीर्ति पावन तिहीं लोकी ॥ ९९ ॥

एका जनार्दना शरण । शत्रुबंधु बिभीषण । स्वयें श्रीरामें आश्वासून । लंकादान दिधलें ॥ १०० ॥

[मु. ‘सत्यबंधु बिभीषण’.] शत्रुमित्र समसमान । कर्ता एक रघुनंदन । त्यासी जालिया अनन्यशरण । जन्ममरण मग कैंचें ॥ १०१ ॥

एका जनार्दना शरण । पुढें गोड निरोपण । सागरीं तरतीं पाषाण । सेतुबंधन अवधारा ॥ १०२ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां बिभीषण आश्वासनं लंकाभिषेचनं नाम अष्टत्रिंशत्तमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग एकोणचाळिसावा

## श्रीराम समुद्र संवाद

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

बिभीषणासी लंकादान । देवोनियां रघुनंदन । सभा बैसली सावधान । सुप्रसन्न स्वानंदें ॥ १ ॥

वानर करिती गदारोळ । बिभीषणासी सुखकल्लोळ । सुग्रीवा उल्हास प्रबळ । सबळ बळ देखोनि ॥ २ ॥

वानरांचे महाभार । करुं येती नमस्कार । रामनामाचा गजर । देती भुभुःकार आल्हादें ॥ ३ ॥

तेथें येवोनि हनुमंत । सुग्रीवासी करी एकांत । सीता सोडवावया मुख्यार्थ । लंकानाथ वधावा ॥ ४ ॥

समुद्राचिया ऐल तीरीं । बैसल्या वानरांच्या हारी । कैसेनि जाववेल पैलपारीं । ते विचारी कपिनाथा ॥ ५ ॥

> अब्रवीत्तं हनूमंतं स च राजा वनौकसाम् । कथं सागरमक्षोभ्यं तरेम वरूणालयम् ॥ १ ॥
> उपायैरभिगच्छामो यथा नदनदीपतिम् ॥ २ ॥

नदी पर्जन्यें भरोनि येती । तेणें सिंधू प्रवाहेना क्षिती । उष्णकाळीं नदी सुकती । तेणें अपांपती आटेना ॥ ६ ॥

ऐसा नित्य पूर्णत्वें गंभीर । अगाध अक्षोभ्य सागर । आमची सेना तें वनचर । केंवी परपार पावेल ॥ ७ ॥

समुद्रलंघनीं उपावो । आम्हांसी सर्वथा न दिसे पहाहो । तूं तंव वानरांचा रावो । काय [मु. ‘उपावो’.] महाबाहो करावें ॥ ८ ॥

बैसोनिया समुद्रतटीं । वानर करिताती लांब गोष्टी । ते तंव मिथ्या गा चावटी । जावया परतटीं शक्ती नाहीं ॥ ९ ॥

सुग्रीव म्हणे हनुमंता । काय बुद्धि करावी आतां । समुद्रलंघनीं तत्वतां । उपावो सर्वथा असेना ॥ १० ॥

कैसेनि वधावें लंकानाथा । कैसेनि आणावी ते सीता । सुखी न करवे रघुनाथा । ऐसी अवस्था दिसताहे ॥ ११ ॥

तुज पुसतों अति आप्तता । समुद्रलंघनीं उपावो वृथा । कार्य न साधवे श्रीरघुनाथा । काय म्यां आतां करावें ॥ १२ ॥

कार्य न साधवे रघुनाथा । ऐसें उत्तर ऐकतां । स्फुरण आलें हनुमंता । साटोपता ऊठिला ॥ १३ ॥

अनुक्रमणिका

निर्दळावया लंकापती । प्रळय रुद्राचिया आकृती । वेगें वाढला मारुती । भेणें कांपती सुरवर ॥ १४ ॥

पिंजारिल्या रोमावळी । शेंडी थरथरीं समूळीं । पुच्छ वाढलें निराळीं । आतुर्बळी खवळला ॥ १५ ॥

तुम्ही अवघे वानरगण । करा माझे [तु. 'पुच्छाग्र रोहण'; दै. 'पृष्ठी आरोहण'.] पुच्छग्रहण । रामलक्ष्मणा खांदी वाहून । घेवोनि जाईन लंकेसी ॥ १६ ॥

बिभीषण शरणागत । त्यासी धरोनिया हृदयांत । एकेचि खेपा पैं समस्त । नेईन [कं. 'त्वरीत'.] निश्चित लंकेसी ॥ १७ ॥

हनुमान अतिबळें [मु. 'आतुर्बळी'.] उद्भट । वटारिलें नेत्रवाट । बाहु स्फुरती थरथराट । वळिला साट पुच्छाचा ॥ १८ ॥

देखोनि हनुमंताची शक्ती । सुग्रीव दचकला चित्तीं । गजबजिलें जुत्पती । शांत मारुती केंवी होय ॥ १९ ॥

देखोनि हनुमंताचें त्राण । वेगें उठिला [कं. 'लक्ष्मण'.] रघुनंदन । त्यासी हृदयीं आलिंगून । मधुर वचन शांतवी ॥ २० ॥

समुद्र बापुडें तें कोण । अग्निबाणें कोरडा करुन । पायीं नेईन वानरगण । लंकाकंदन करावया ॥ २१ ॥

कायिसा रावणाचा पुरुषार्थ । [मु. 'अर्धक्षणें'.] अर्धचंद्रें करीन घात । ऐसा शांतवोनि हनुमंत । स्वस्थ [मु. 'रघुनाथें बैसविला'.] रघुनाथ बैसला ॥ २२ ॥

ऐकोनि श्रीरामवचन । सुखावला बिभीषण । सुखोपायें समुद्रतरण । मूळ कारण सांगत ॥ २३ ॥

> रामेणोक्तस्तु सर्वज्ञ : प्रत्युवाच बिभीषणः । समुद्रं शरणं राजन् गंतुमर्हसि राघव ॥ ३ ॥
> खानितः सगरेणायमप्रमेयो महोदधिः । सागरश्च हि रामस्य श्रूयते प्रतितामहः ॥ ४ ॥
> तस्य पुत्रः समुद्रोऽ यं ज्ञातिसाह्यं करिष्यति ॥ ५ ॥
> एवं बिभीषणेनोक्तं राक्षसेन विपश्चिता । प्रकृत्या धर्मशीलस्य राघवस्याप्यरोचत ॥ ६ ॥

श्रीरामवाक्य प्रतापपूर्ण । ऐकोनियां बिभीषण । स्वयें घालोनि लोटांगण । कर जोडुनि विनवित ॥ २४ ॥

सोडोनिया अग्निबाण । सिंधू शोषितां न लगे क्षण । परि तें नव्हे गा भूषण । अति दूषण सूर्यवंशीं ॥ २५ ॥

सावध परिसे रघुनाथा । सांगेन समूळ मूळ कथा । समुद्र पूर्वज तत्वतां । मूळानुवार्ता अवधारीं ॥ २६ ॥

तुझे पूर्वज सगर जाण । त्याचेनि समुद्र निर्माण । यालागीं सागर हें अभिदान । वेद पुराण अनुवादें ॥ २७ ॥

पूर्वी समुद्र काय नव्हता । आवरणोदकीं अति गुप्तता । सगरीं खणोनि तत्वता । प्रकटार्था आणिला ॥ २८ ॥

अनुक्रमणिका

[ओवी २८ कं. प्रतीत नाही.]

**सगरापासोनि सागरता । तो तुज पूर्वज रघुनाथा । कैसेनि याच्या करिसी घाता । निजवंशस्था समुद्रा ॥ २९ ॥** [ओवी २९ वि. प्रतीत नाही.]

**वेगळें करोनि दशरथा । सगर सातवा प्रपिता । ऐसी सूर्यवंशाची कथा । होय सांगतां बिभीषण ॥ ३० ॥**

**समुद्र पूज्य पुर्वज जाण । त्यासी श्रीराम रिघतां शरण । तो तुज भेटोनि आपण । सागरोत्तरण सांगेल ॥ ३१ ॥**

**तुझा प्रताप रघुनाथा । समुद्र जाणतो तत्वतां । तुझे भेटीची परम आस्था । मज सर्वथा कळलीसे ॥ ३२ ॥**

**तूं तंव प्रतापी रघुराज । सगरवंशीं वंशध्वज । समुद्र तुझा निज पूर्वज । करील काज वंशाचें ॥ ३३ ॥**

**निज पूर्वजा सिंधूसी शरण । रिघतां तुज लज्जा कोण । सुखोपायें समुद्रतरण । स्वयें आपण सांगेल ॥ ३४ ॥**

**धर्मशील सज्ञानता । समूळ निज वंशीची कथा । बिभीषण स्वयें सांगतां । श्रीरघुनाथा आल्हाद ॥ ३५ ॥**

**बिभीषणाची जे गोष्टी । ते रुचली श्रीरामाचे पोटीं । लक्ष्मण सुग्रीव लक्षोनि दृष्टीं । तेंचि जगजेठी अनुवादे ॥ ३६ ॥**

> बिभीषणस्य मंत्रोऽयं मम लक्ष्मण रोचते । ब्रूहि तावच्च सुग्रीव तवापि यदि रोचते ॥ ७ ॥
> एवंमुक्तौ तु रामेण तदा सुग्रीवलक्ष्मणौ । समुदाचारसंयुक्तमिदं वचनमूचतुः ॥ ८ ॥
> किमर्थं नौ नरव्याघ्र नैतद्रोचिष्यते वचः । बिभीषणोक्तं हृद्यं च युक्तं चैव विशेषतः ॥ ९ ॥

**सागरासी रिघावें शरण । गोड बोलिला बिभीषण ।**
**सुग्रीव राजा सखा लक्ष्मण । तुम्हांसी हें वचन रुचे कीं न रुचे ॥ ३७ ॥**

**सुग्रीव आणि लक्ष्मण ।** [तु. 'पुढती'.] **वदति वंदोनि श्रीरामचरण । बिभीषण वाक्य अति प्रमाण । तेंचि आपण करावें ॥ ३८ ॥**

**सत्यवादी बिभीषण । सिंधु पूर्वजा रिघतां शरण । अनायासें समुद्रतरण । तेंचि आपण करावें ॥ ३९ ॥** [ओवी ३९ कं. व वि. प्रतींत नाहीं.]

**ऐकोनि त्या दोघांचे वचन । रिघावया समुद्रासी शरण । श्रीराम करी सिंधु पूजन । सुमन चंदन फळ मूळें ॥ ४० ॥**

> सागरं द्रष्टुमिच्छामि रूपिणं सरितांपतिम् । कर्तमर्हसि साहाय्यं भव त्वं शरणं मम ॥ १० ॥
> एवमुक्त्वा कुशास्तीर्णे रम्ये सागररोधसि । संविवेश तदा वीरो वेद्यामिव हुताशनः ॥ ११ ॥
> तस्य रामस्य सुप्तस्य कुशास्तीर्णे महीतले । नियतस्याप्रमेयस्य निशास्तिस्रोऽपचक्रमुः ॥ १२ ॥

अनुक्रमणिका

[वि. 'रामें'.] रम्य समुद्राचे तटीं । पसरोनि कुश मुष्टीमुष्टी । दर्भशयनीं रामजगजेठी । घ्यावया भेटी सागरेसी ॥ ४१ ॥

तूं आमुचा पूर्वज । आम्ही तुझें वंशबीज । माझें सिद्धी पाववी काज । शरण तुज अनन्यत्वें ॥ ४२ ॥

ऐसा बोलोनि रघुनंदन । दर्भशयनीं करी शयन । जेंवी पुरिला हुताशन । दैदीप्यमान अग्नीहोत्री ॥ ४३ ॥

यापरि श्रीरघुनाथ । साधावया निजकार्यार्थ । त्रिरात्र सिंधू शरणागत । दिसे निद्रित सावधत्वें ॥ ४४ ॥

जागृती स्वप्न सुषुप्ती । तुर्यातीत श्रीराममूर्ती । तोही शरण सिंधू शरणार्थी । दिसे प्रतीती सुरनरां ॥ ४५ ॥

ऐसा प्रसुप्त श्रीरामचंद्र । देखोनि तळमळती वानर । केव्हां पावो समुद्रपार । दशशिर वधार्थ ॥ ४६ ॥

अनुलक्षोनि श्रीरघुनाथ । हनुमान निज गुह्य सांगत । निद्रा करितांचि येथ । व्यर्थ पुरुषार्थ दिसताहे ॥ ४७ ॥

स्वयें बोलती वानरगण । श्रीराम भाता दुर्धर बाण । तरी कां निघाला शरण । गाढेपण धरोनि ॥ ४८ ॥

हनुमान मी तंव निजसेवक । समुद्रतरणीं कायसी अटक । पुच्छाग्रीं सकळ कटक । एकीएक उतरीन ॥ ४९ ॥

अंतर्यामीं श्रीरघुनाथ । जाणोनि हनुमंताचें मत । स्वयें ऊठिला सावचित्त । निज पुरुषार्थ दावावया ॥ ५० ॥

> ततः क्रुद्धो महाबाहू रामो रक्तान्तलोचनः । समीपे लक्ष्मणं वीरं सरोषो वाक्यमब्रवीत् ॥ १३ ॥
> चापमानय मे शीघ्रं शरांश्चाशीविषोपमान् । अद्याक्षोभ्यमपि क्रुद्धः क्षोभयिष्यामि सागरम् ॥ १४ ॥
> न साम्ना कथ्यते कीर्तिर्नसाम्ना लभ्यते यशः । न साम्ना वीर्यशौर्ये च न साम्ना विजयी भवेत् ॥ १५ ॥
> सविनम्य धनुर्घोरं कंपयित्वा शरैर्जगत् । ततो बाणधनुष्पाणिः क्रोधविस्फारितेक्षणः ॥ १६ ॥
> मत्कार्मुकविनिर्मुक्तैः शरैः शुष्कमहोदधौ । अद्य त्वां संतरिष्यंति पद्भिरेव प्लवंगमाः ॥ १७ ॥

तीन दिवस लोटलियापाठी । स्वयें समुद्र न येचि भेटी । श्रीराम कोपला जगजेठी । रक्तांत दृष्टी कृतांत ॥ ५१ ॥

आमचा पूर्वज हा पूर्ण । म्हणोनि सद्भावें रिघालों शरण । तंव याचें दुर्जनपण । नयेचि आपण भेटीसी ॥ ५२ ॥

याचा वाढवोनि सन्मान । करोनि अर्घ्यपाद्य पूजन । अनन्यभावें रिघतां शरण । नयेचि आपण भेटीसी ॥ ५३ ॥

याचे सर्वांगीं गर्व मोठा । अक्षोभ्यत्वें अगाध ताठा । यासी मी लक्ष्मणा सुभटा । लावीन वाटा निधनाचे ॥ ५४ ॥

अनुक्रमणिका

शरण रिघालिया पुरुषार्थी । कीर्ति ते होय अपकीर्ती । शरण रिघावें अशक्तीं । ते केलिया शक्तीं लाभ कैंचा ॥

शरण रिघतांचि वाठीं । वांठीव पळे उफराटी । तेथ कायसी यशाची गोष्टी । अपेश वाक्पुटीं जगवदे ॥ ५६ ॥

शरण रिघतां बळवंतीं । समूळ पळे शौर्य शक्ती । त्यासी कैंची विजय प्राप्ती । अवघे म्हणती अशक्त ॥ ५७ ॥

समुद्रा स्वयें [मु. 'अभक्त आपण'.] अशक्तपण । त्यासी मी [मु. 'भक्त'.] शक्त रिघालों शरण ।
तंव त्यासी गर्व चढला पूर्ण । केलें उपेक्षण माझेंचि ॥ ५८ ॥

मृदुपणें नाहीं यशकीर्ती । मृदुपणें नाहीं लाभप्राप्ती । मृदुपणें नाहीं विजयवृत्ती । जाण निश्चितीं सौमित्रा ॥ ५९ ॥

मृदत्वें संन्यासीं धरावी शांती । तेणें त्यासीं परमार्थप्राप्ती । मृदत्व आम्हा रायांप्रती । जाण अपकीर्ति कारण ॥

अदंडयातें राजें दंडिती । अधर्म्यातें राजे दमिती । ते राजे जैं शांति धरिती । तेचि अपकीर्ति तयासी ॥ ६१ ॥

समुद्राचा गर्व पूर्ण । तो नाशीन न लागतां क्षण । दे दे माझे धनुष्यबाण । अति दारुण सर्पप्राय ॥ ६२ ॥

सर्प लागलिया उतरे विख । त्याहूनि माझे बाण तीख । सुरां असुरां प्राणांतक । जीवातेंही देख [दे. मुं. 'घाती'.] जीव घेती ॥ ६३ ॥

ऐसें बोलोनि आपण । कोपें धनुष्या वाहिला गुण । अग्नि अस्त्र सज्ञोनि बाण । वोढी काढोन चालिला ॥ ६४ ॥

क्षोभला श्रीराम देखोन । स्वर्गी देव कंपायमान । तळमळिती मगरमीन । आलें निदान सिंधूसी ॥ ६५ ॥

समुद्र शोषितां राघव । पाताळीं कांपती दानव । दैत्य सर्प नागमानव । धांकती सर्व श्रीरामबाणा ॥ ६६ ॥

बाण पडतां समुद्रजळीं । सप्त पाताळां करील होळी । पाताळवासी कांपती चळी । राम महाबळी क्षोभला ॥ ६७ ॥

धनुष्य वोढितां श्रीरामा । धांकें रविचंद्रा काळिमा । नक्षत्रें तुटोनि पडतीं व्योमा । ऋषी स्वधर्मा विसरले ॥ ६८ ॥

शोषितां समुद्राचें पाणी । बाणाग्नि मिळोनि अर्णवाग्नि । दोनी भस्म करिती अवनी । ब्रह्मा मनीं सचिंत ॥ ६९ ॥

अनुक्रमणिका

ब्रह्मा देखोनि सचिंत । ब्रह्मभुवनीं अति आकांत । सिंधु निर्दळणीं रघुनाथ । करील अंत सृष्टीचा ॥ ७० ॥

ऐकें सौमित्रा साचार । शोषोनि समुद्राचें नीर । पायीं उतरीन वानर । निशाचर वधार्थ ॥ ७१ ॥

धनुष्य ओढितां सत्राण । दोनी वटारिलें नयन । श्रीराम दिसे काळासमान । वानरगण कांपती ॥ ७२ ॥

क्षोभला देखोनि रघुनाथ । स्त्रियांपुत्रांसमवेत । समुद्रासीं अति आकांत । आला प्राणांत श्रीरामें ॥ ७३ ॥

सुटलिया श्रीरामाचा बाण । [मु. 'त्यातें'.] येथे निवारूं शके कोण । त्यासी नव्हता अनन्यशरण । आलें मरण निश्चित ॥ ७४ ॥

परम कृपाळु श्रीरघुनाथ । शरणागता न करी घात । यालागीं स्त्रीपुत्रांसमवेत । समुद्रांत प्रगटला ॥ ७५ ॥

> तत : समीपे रामस्य विधायोर्मीः सहस्त्रशः । स्वयं मध्यात्समुत्पत्य सागरः परमं वपुः ॥ १८ ॥
> स राममुपसंगम्य पूर्वमामंत्र्य वीर्यवान् । मध्ये वानरकोटीनां कृतांजलिरुपस्थितः ॥ १९ ॥
> भो भो राम महाबाहो रघुवंशविवर्धन । श्रुणु मे वचनं सौम्य माक्रुध्याद्य रघूत्तम ॥ २० ॥

श्रीरामा निकट सागरीं । सहस्त्रोर्मि महालहरी । सिंधु प्रकटला त्यामाझारी । स्वरुपधारी साकार ॥ ७६ ॥

द्वादशनामांकित टिळे । कंठीं यज्ञोपवीत रुळे । सपुत्रस्त्रियांकुटुंब मेळें । येता सिंधुजळें देखिला रामें ॥ ७७ ॥

स्त्रियांपुत्रांसमवेत । समुद्र पायवाटे येत । तें देखोनि श्रीरघुनाथ । अति विस्मित स्वयें जाला ॥ ७८ ॥

पूर्वीं ब्रह्मयानें केला निर्माण । यालागीं सिंधु शुद्ध ब्राह्मण । सगरीं पुढें केलें खनन । सागर अभिधान तेणें त्यासी ॥

ऐसा ब्राह्मण देखोनि येत । कृपाळु तो श्रीरघुनाथ । न करीच शरसंपात । द्विजघात चुकवावया ॥ ८० ॥

बाहेर आलिया ब्राह्मण । मग समुद्रीं सोडीन बाण । श्रीरामें विचारोनि पूर्ण । वोढी काढोन राहिला ॥ ८१ ॥

मग ब्राह्मण उदकाआंतौता । शरण शरण म्हणे श्रीरघुनाथा ।
माझ्या करुं नको घाता । शरण तत्वतां मी आलों ॥ ८२ ॥

कोणें अपमानिलें द्विजवरा । धनवृत्ती कीं हरिली दारा । ते मज सांग रघुवीरा । तुझिया कैवारा मी करीन ॥ ८३ ॥

आधी साधीन द्विजकार्यार्था । मग मी सोडवीन सीता । त्रिसत्य सत्य हे रघुनाथा । सांग मी आता काय करुं ॥ ८४ ॥

अनुक्रमणिका

मज श्रीरामा आलिया शरण । तुज कल्पांतीं नाहीं मरण । रामें वंदोनि द्विजचरण । पुसे आपण काय करुं ॥ ८५ ॥ [ओवी ८५ नि. प्रतीत नाही.]

द्विज म्हणे गा रघुनाथा । मी समुद्र शरण आलों आतां । सोडोनि अग्नि शरसंपाता । माझिया घाता कां करिसी ॥

तूं पूर्वज सनातन । तुज देवोनि सन्मान । तीन दिवस निरान्न । म्यां दर्भशयन सेविलें ॥ ८७ ॥

तुझे आंगीं गर्व पूर्ण । भेटी न देसीच जाणोन । आतां वाचवावया निजप्राण । आलों शरण म्हणतोसी ॥ ८८ ॥

तुझेनि थोर अपकीर्ती । झाली सूर्यवंशा अपख्याती । येणें क्षोभे गा रघुपती । भेटी निश्चितीं न घेंचि ॥ ८९ ॥

आतां धरिली तुंवा आंगवण । तरी मी घेवों आलों दर्शन ।
तरी गुह्य सांगणें आहे आन । सावधान अवधारी ॥ ९० ॥

देखतां वानरांचिया कोटी । रत्नांजळी घेवोनि मुष्टी । अर्पोनि श्रीराम अंगुष्टीं । चरण ललाटी वंदिले ॥ ९१ ॥

तूं श्रीराम अवतार पूर्ण । मीही जाणतों संपूर्ण । पुढती पुढती लोटांगण । पुढती श्रीचरण वंदिलें ॥ ९२ ॥

श्रीरामा ऐक सावध दृष्टी । सांगणें आहे गुह्य गोष्टी । सूर्यवंशी कीर्ति लाठी । ते उफराटी तुंवा केली ॥ ९३ ॥

हरिश्चंद्राची कीर्ती । वाखाणिली त्रिजगतीं । शिबी मांस तुकोनि कपोती । वैकुंठा प्रती पुरी नेली ॥ ९४ ॥

रुक्मांगद धर्मांगदेंसीं । व्रत पाळुनी एकादशी । नगरी नेली वैकुंठासी । जाले जगासी उपकारी ॥ ९५ ॥

माझी सूर्यवंशीं उत्पत्ती । जाली असे कैशा रीतीं । तेंही सांगेन रघुपती । सावधवृत्ती अवधारी ॥ ९६ ॥

सागरः सगरात्कीर्तिर्गंगाकीर्ति र्भगीरथात् । रामस्याभिनवा कीर्तिरेका भार्या न रक्षिता ॥ २१ ॥

सगरापासाव सागर । हे भागवतीं कथा सविस्तर । कपिलमुनीश्वर चरित्र । अति विचित्र तिहीं लोकीं ॥ ९७ ॥

तयाच्या चरित्राचिया पोटीं । कपिलमुनी क्षोभक दृष्टी । सगरवीर सहस्त्र साठी । वाग्वज्रदंष्ट्री शापिलें ॥ ९८ ॥

बळोन्मत्त साठी सहस्त्र । नाहीं भूतदया अणुमात्र । जळत असाल अहोरात्र । हें वाग्वज्र सोडिलें ॥ ९९ ॥

वज्रघावो एकातें मारी । वाग्वज्राची त्याहूनि थोरी ।

अनुक्रमणिका

साठी सहस्त्र कवळोनि वीरीं । आगी एकसरी लाविली ॥ १०० ॥

वज्रधावो येतां दारुण । शूर छेदि ती विंधोनि बाण । वाग्वज्रासी निवारण । सर्वथा जाण असेना ॥ १०१ ॥

ढवळेना ब्रह्मशापा हातीं । मागेपुढें न चले गती । धडधडां पैं जळती । अहोराती महावीर ॥ १०२ ॥

जळत देखोनि सगरासी । कृपा उपजली शनिश्चरासी । प्रार्थोनिया कपिलमुनीसी । उश्शापासी मागितलें ॥ १०३ ॥

भगापासूनि उत्पन्न भूत । वंशीं जन्मला भगीरथ । गंगा आणोनिया येथ । सागर समस्त उद्धरील ॥ १०४ ॥

तेचि वंशीं भगीरथ । गंगा आणोनि प्रयत्नयुक्त । पूर्वज तारिले समस्त । जग पुनीत तेणें केलें ॥ १०५ ॥

ऐसी पुर्वजांची ख्याती । पुण्य पूज्यत्वें पवित्र कीर्ती । तेचि वंशीं रघुपती । थोर अपकीर्ति तुज आली ॥ १०६ ॥

कळिकाळ घालोनि तोडरीं । दोघे बंधु धनुर्धारी । शेखीं बाईल नेली चोरी । लोकांतरी अपकीर्ति ॥ १०७ ॥

पाठीची हारवितां कांता । लाज लाविली वंश पुरुषार्था ।
थोर अपकीर्ति तुझे माथा । श्रीरघुनाथा बैसली ॥ १०८ ॥

श्रीराम आमचा वंशस्थ । सीता विरहें रडत पडत । ऐसा ऐकोनि वृत्तांत । दुःखाभिभूत मी जालों ॥ १०९ ॥

तुंवा सेविलिया दर्भशयन । येणें क्षोभे क्षोभायमान । तुझें न घेचि दर्शन । सत्य जाण श्रीरामा ॥ ११० ॥

शक्त असोनि संपूर्ण । अशक्तबुद्धि आलासी शरण । येणेंही क्षोभे क्षोभायमान । तुझें दर्शन न घेचि ॥ १११ ॥

सीता नेतां पैं रावण । तेथें न कराचि आंगवण । मज पूर्वजाचा घ्यावया प्राण । अग्निबाण सज्जिला ॥ ११२ ॥

ऐकोनि समुद्राचें वचन । श्रीराम जाला लज्जायमान । गळो पाहाती धनुष्यबाण । स्वेद संपूर्ण चालिला ॥ ११३ ॥

ऐसें देखोनि रघुनाथा । समुद्रें चरणीं ठेविला माथा । जें बोलिलों उद्धतता । क्षमा सर्वथा मज कीजे ॥ ११४ ॥

अति आवेशें सज्ञोनि चाप । मजवरी धरुं नको कोप । सिंधु तरणें हे तंव अल्प । कार्य स्वल्प श्रीरामा ॥ ११५ ॥

मी तंव वंशस्थ कैवारी । दशरथाचा कृतोपकारी । तीही कथा निज निर्धारी । अवधारी श्रीरामा ॥ ११६ ॥

अनुक्रमणिका

**तारकामय युद्धाआंत । मी आणि दशरथ । इंद्रासी साह्य गेलों तेथ । युद्धकंदनार्थ दृढ जाला ॥ ११७ ॥**

**माझा दैत्यीं करितां घात । साह्य जाला दशरथ । दैत्य दमोनि समस्त । मज निर्मुक्त रायें केलें ॥ ११८ ॥**

**कष्टी करोनि अरिमंडळ । दैत्य निर्दाळिले सकळ । इंद्र सुखावोनी तत्काळ । प्रीतीं भूपाळ पूजिला ॥ ११९ ॥**

**इंद्रें अत्यंत सुखावोनी । राया दिधला मुकुटमणी । आम्हां दोघांतें पूजोनी । अति सन्मानीं बोळविलें ॥ १२० ॥**

**तोचि मणी दशरथें । अति आवडी दिधला सीतेतें । जे खूण आणिली हनुमंतें । शुद्धि निश्चितें मानावया ॥ १२१ ॥**

**ऐसा मी दशरथाचा उपकारी । कांहीं नव्हेचि प्रत्युपकारी ।**
**तुज मी होईन साहाकारी । सैन्य सागरीं उतरावया ॥ १२२ ॥**

अयं कपिर्नलो नाम तनुजो विश्वकर्मणः । पित्रा दत्तवरः श्रीमान्युज्यते सेतुकर्मणि ॥ २२ ॥
तमहं धारयिष्यामि तावाप्येष महान्सुहृत् । ग्राहानानुचरिष्यंति प्रवहष्यति मारुतः ॥ २३ ॥
सलिलं स्तंभयिष्यामि नलस्य वचनादहम् । एवमुक्तः समुद्रेण समुत्थाय नलस्तदा ॥ २४ ॥
अब्रवीद्वानरश्रेष्ठो वाक्यं राममिदं शुभम् । अहं सेतुं करिष्यामि विस्तीर्णे वरुणालये ॥ २५ ॥
पितृसामर्थ्यमाश्रित्य सत्यमाह महोदधिः ॥ २६ ॥
नलस्य वचनं श्रुत्वा रामः परमहर्षितः । समुद्रमभिसंपूज्य वचनं चेदमब्रवीत् ॥ २७ ॥

**सागर श्रीरामा सांगतु । पैल तो विश्वकर्म्याचा सुतू । नळनामा कपि विख्यातु । बांधेल सेतु समुद्रीं ॥ १२३ ॥**

**त्यासी पित्याचें वरदान । सेतुकर्मीं हा विचक्षण । आज्ञा देवोनि आपण । सेतुबंधन करवावें ॥ १२४ ॥**

**तूं तंव वंशस्थ रघुनाथा । मी कृतोपकारी दशरथा । ऐसियापरी परम सुहृदता । करीन साह्यता तें ऐके ॥ १२५ ॥**

**मीन महाग्राह न येती तेथ । लहरी शांत करीन समस्त । कुवायु वाजेना सेतुबंधांत । ऐसा साह्यार्थ करीन रामा ॥**

**लाहोनि पितयाचें वरदान । नळ करील सेतुबंधन । आणीक एक आहे चिन्ह । सावधान अवधारी ॥ १२७ ॥**

**नळा आंगीं वानरी धर्म । सागरीं सांडिले शाळिग्राम । कोपोनिया ऋषी सत्तम । शाप परम दिधला ॥ १२८ ॥**
[मुद्रितात पुढील दोन ओव्या अधिक आहेत :— ‘माझ्या तीरीं ऋषि बैसोन । करिती संध्या अनुष्ठान । पुढें मांडोनी शाळिग्राम । ध्यानस्थ होवोनि बैसती ॥ १२९ ॥
तेथें नळकपि येवोन । ऋषींचे शाळीग्राम करीं घेवोन । समुद्रामाजीं दे टाकोन । ऋषि कोपोन शाप देती ॥ १३० ॥]

**तुझेनि हातें सागरीं शिळा । न बुडती कदाकाळा । हा ही सेतुबंधनीं नळा । असे आगळा पुरुषार्थ ॥ १२९ ॥**

अनुक्रमणिका

**ऐकोनि समुद्राचें वचन । नळें वंदोनि श्रीरामचरण । स्वयें बोलिला गर्जोन । सेतु निर्माण मी करीन ॥ १३० ॥**

**सिंधु बोलिला सत्य गोष्टी । सेतुबंधन हातवटी । सामर्थ्य आहे माझें पोटीं । उठाउठी निर्मीन ॥ १३१ ॥**

**सिंधु अगाध अत्यंत थोर । सेतुबंधन अति सत्वर । पर्वत आणावया वानर । स्वामीनें शीघ्र धाडावें ॥ १३२ ॥**

**सेतु बांधीन अर्धक्षणें । ऐकोनि नळाचें बोलणें । श्रीराम संतोषला सहस्त्रगुणें । अति सन्मानें प्रीतीं पूजी ॥ १३३ ॥**

**सवेंचि सिंधूसी अनुवादन । मृदुमंजुळ मधुर वचन । वाक्पुष्पीं प्रीतिपूजन । रघुनंदन सांगत ॥ १३४ ॥**

**तुझ्या कोपाचिये कडाडी । अग्निबाण जोडिला जोडी । चाप ओढिले परम प्रौढी । तो मी न काढी माघारा ॥ १३५ ॥**

**सोडोनियां अग्निबाण । सांग कोणाचा घेऊं प्राण । माझा बाण अति निर्वाण । सत्य जाण समुद्रा ॥ १३६ ॥**

**समुद्र म्हणे पश्चिम तीरीं । मरु दैत्य दुराचारी । मज पिडितो नानापरी । तो संहारी येणे बाणें ॥ १३७ ॥**

> तस्य तद्वचनं श्रुत्वा सागरस्य महात्मनः । मुमोच तं शरं तत्र भास्करोपममूर्जितम् ॥ २८ ॥
> तच्च देशं चकाराशु मरुं सागरशासनात् । ततस्तस्य वचः श्रुत्वा समुद्रस्य रघूत्तमः ॥ २९ ॥
> शोषयित्वा तु तत्कक्षं राघवोमितविक्रमः । विननाद धरा तत्र सुगाढं परिपीडिता ॥ ३० ॥
> रामस्य वरदानेन शिवः क्षेमो बभूव ह ॥ ३१ ॥
> पशवश्चैव निर्व्यालाः बहुमूलफलोदकाः । बहुक्षीरो बहुस्नेहः सुगंधिर्विविधौषधिः ॥ ३२ ॥

**एकोनि समुद्राचें वचन । श्रीरामें सोडिला अग्निबाण । मरु मारिला न लागतां क्षण । झालें शोषण समुद्राचें ॥ १३८ ॥**

**श्रीराम बाणाचिया कल्लोळीं । उदक आटलें समूळीं ।**
**धरा पोळोनि अग्निज्वाळीं । श्रीरामाजवळी शरण आली ॥ १३९ ॥**

**धरा देखोनिया दीन । वरद वदोनि रघुनंदन । केला मरुदेश पावन । तेंही चिन्ह अवधारा ॥ १४० ॥**

**धरेसी तुटलियाही जळ । पृथ्वी पिके सर्वकाळ । फळमूळांचा बहु सुकाळ । अति रसाळ सुस्वाद ॥ १४१ ॥**

**घरोघरीं मागता नीर । स्त्रियां संतोषे अर्पिती क्षीर । गाईसी उदक पंचरात्र । तरी अपार क्षीर दुभती ॥ १४२ ॥**

**पशूंसीं प्रत्यही नाहीं जीवन । पांचा दिवसा उदकपान । तरी घृतक्षीर परमान्न । नित्य भोजन घरोघरीं ॥**

अनुक्रमणिका

१४३ ॥

नानापुरीच्या दिव्यौषधी । ज्यांच्या अंगी सुगंध गंधी । श्रीरामाचे निजवरदी । सुखानुवृद्धी मरुदेशी ॥ १४४ ॥

तिळाचे ठायीं स्नेह पूर्ण । या अर्थाचें मवल कोण । अतिथीचे स्नेह संपूर्ण । मरुदेशीं जाण घरोघरीं ॥ १४५ ॥

त्यातें म्हणती मरुवाड । तेथें जीवाचे पुरत कोड । श्रीराम वरदाचें कैवाड । सुखसुरवाड मरुदेशीं ॥ १४६ ॥

देखोनि श्रीरामाची ख्याती । समुद्र आश्चर्य मानी चित्तीं । हरुषें वंदोनि रघुपती । सप्रेम पुढतीं बोलत ॥ १४७ ॥

सोडोनिया निजशर । वधिला मरुदैत्य दुर्धर । पावन केलें मरुकांतार । श्रीरामचंद्र कृपाळु ॥ १४८ ॥

तुझिया प्रतापापुढें । मी समुद्र कायसे बापुडें । मज सुखी केलें रोकडें । फेडिलें सांकडें दुःखाचें ॥ १४९ ॥

रामः समुद्रं संपूज्य वचनं चेदमब्रवीत् । भवान् पितृसमो मह्यं पितुश्च दयितः सुहृत् ॥ ३३ ॥

स्वयें श्रीरामें संतोषोनी । अति प्रीतीं समुद्र पूजूनी । आल्हादें वदे हास्यवदनीं । अति सन्मानी संबोधी ॥ १५० ॥

जैसा पिता दशरथ । तैसा पूज्य पूर्वज तूं निश्चित । सेतुबंधाचा कार्यार्थ । सुगम समस्त त्वां केला ॥ १५१ ॥

तूं दशरथाचा आवडता । त्याहूनि मज पढियंता । तुझा उपकार महामहंता । मज रघुनाथा थोर जाला ॥ १५२ ॥

ऐकोनि श्रीरामवचन । समुद्र घाली लोटांगण । वंदोनि श्रीरामाचे चरण । गेला आपण निजधामा ॥ १५३ ॥

एका जनार्दना शरण । श्रीरामाचा प्रताप पूर्ण । समुद्रीं तरती पाषाण । सेतुबंधन अवधारा ॥ १५४ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां श्रीरामसमुद्रसंवादो नाम एकोनचत्वारिंशततमप्रसंग : ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग चाळिसावा

## सेतुबंधन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**नळ हस्तें सेतुबंधन । समुद्रें श्रीरामासी सांगोन । वंदोनिया श्रीरामचरण । आज्ञा पुसोन स्वयें गेला ॥ १ ॥**

**ऐकोनि समुद्राचें वचन । संतोषला रघुनंदन । त्यासीं स्वमुखें आपण ।** [तु. कं. मुं. 'प्रतिवचन'.] **प्रीती पुन्हा बोलत ॥ २ ॥**

> प्रीत्या च परया रामस्तं नलं प्रशशंस च । क्रियतां मम कार्यार्थः सखे सौम्य महामते ॥ १ ॥
> समुद्रे बध्यतां सेतुः सह सर्वैः प्लवंगमैः । ततः सुग्रीवसचिवान् हनुमत्प्रमुखान्हरीन् ॥ २ ॥
> तदा दाशरथी रामो हर्षयुक्तोऽब्रवीद्वचः । श्रुतं भवद्भिर्वचनं समुद्रस्य महात्मनः ॥ ३ ॥
> अत्र यत्संविधातव्यं तत्सर्वं संविधीयताम् ॥ ४ ॥

**प्रीती प्रेमाचें वचन । नळासी बोले रघुनंदन । सखा माझा तूं जीवप्राण । सेतु निर्माण करी** [मु. 'आतां'.] **बापा ॥ ३ ॥**

**समुद्रें सांगितलें आपण । तुझेनि हातें सेतुबंधन । घेवोनियां वानरगण । सेतु निर्माण करी बापा ॥ ४ ॥**

**स्वयेंचि श्रीरघुनाथ । स्वमुखें सुग्रीवासी सांगत । प्रधान जुत्पती समस्त । आदि हनुमंत करोनि ॥ ५ ॥**

**नळ हस्तें सेतुबंधन । समुद्रें सांगितलें आपण । राजा सुग्रीव** [दै. 'संतोषोन'.] **ससैन्य । सेतुविधान करावे ॥ ६ ॥**

**सेतुबंधाची सामग्री । सवेग आणावी वानरीं । ते देवोनि नळाच्या करीं । सेतु सागरीं बांधावा ॥ ७ ॥**

**परम आल्हादें हर्षयुक्त । परमानंदें सांगे रघुनाथ । तेणें सुग्रीव सुखोद्भुत । जुत्पसीयुक्त ऊठिला ॥ ८ ॥**

> रामस्य वचनं श्रुत्वा निर्दिष्टास्ते प्लवंगमाः । अभिपेतुर्महारण्यं हृष्टाः शतसहस्रशः ॥ ५ ॥
> वचनात्तस्य सुग्रीवस्तमेवाभिप्रहर्षयन् । स्वयं राजाथ सुग्रीवो नलो नीलश्च वानरः ॥ ६ ॥
> गजो गवाक्षो गवयः शरभो गंधमादनः । युवराजोंऽगदश्चैव तारश्चान्ये वनेचराः ॥ ७ ॥
> अन्ये च वानराः श्रेष्ठाः शतशोऽथ सहस्रश : । आस्फोटयंतः संहृष्टाश्चक्रुः किलकिलामपि ॥ ८ ॥

**ऐकोनि श्रीरामाचें वचन । सुखावले वानरगण । आणावया पर्वत पूर्ण । केलें उड्डाण शतसहस्त्रीं ॥ ९ ॥**

**वानर सेतुबंधनार्थ । जातां देखोनि समस्त । स्वयें सुग्रीव विचारित । विलंब येथें नये करुं ॥ १० ॥**

**विलंबे सेतु बांधिता । जरी कळेल लंकानाथा । तरी तो करील सेतुघाता । अतर्क्यता साटोपें ॥ ११ ॥**

अनुक्रमणिका

ते खेचर आम्ही भूचर । मध्यें भरलासे सागर । युद्धा अप्राप्त वानर । सेतु सत्वर बांधावा ॥ १२ ॥

ऐसें बोलोनिया जाण । सुग्रीव राजा अंगें आपण । उठिला बाहु आफळोन । सेतुबंधन शीघ्रत्वा ॥ १३ ॥

अंगें न उठता स्वयें धूर । सेवकासेवकीं वानर । सेतुबंधन नव्हे शीघ्र । उठिला सत्वर स्वयें राजा ॥ १४ ॥

धुरेंवांचोनि वृथा कर्षण । धुरेंवांचोनि वृथा रण । धुरेंवांचोनि सेतुबंधन । अति शीघ्र जाण साधेना ॥ १५ ॥

हेंचि आवडे रघुनाथा । सेतु बांधोनि शीघ्रता । वधोनिया लंकानाथा । स्वानंदें सीता आणावी ॥ १६ ॥

ऐसी आवडी श्रीरामा पोटीं । यालागी स्वयें सुग्रीव उठी । सेतु बांधावया जगजेठी । वानर कोटी समवेत ॥ १७ ॥

सुग्रीव उठतांचि जाण । सवेग उठिले वानरगण । मुख्य मुख्य धुरा दारुण । ते कोण कोण अवधारा ॥ १८ ॥

नळनीळ जाबुवंत । गज गवाक्ष गवययुक्त । शरभ गंधमादन समस्त । निघाले त्वरित सेतुबंधा ॥ १९ ॥

अंगद युवराजा आपण । अंगें उठतांचि जाण । उठावले वानरगण । संख्या कोण करी तेथ ॥ २० ॥

तर तराळ मैंद द्विविद । कोट्यानुकोटी अर्बुद अर्बुद । वानर झेपावले निर्बुद । सेतुबंध बांधावया ॥ २१ ॥

नळ बैसविला सेतुबंधासी । वृद्ध देखोनि जांबुवंतासी ।
सुग्रीवें ठेविले नळापासी । विषमसाम्येसी सांगावया ॥ २२ ॥

सेतुबंधासी सत्वर । असंख्य निघाले वानरभार । वानरीं व्यापिलें अंबर । दिग्दिगांतर कोंदलें ॥ २३ ॥

बाहु आफळोनि वानर । करोनि रामनामाचा गजर । सवेग निघाले सत्वर । करीत भुभुःकार नामाचा ॥ २४ ॥

किल किल शब्द वानरजाती । किल किल म्हणिजे निर्धार स्थिती ।
श्रीरामनामें नित्य गर्जती । शब्द व्युत्पत्ती इत्यर्थ ॥ २५ ॥

यालागी किलकिला शब्द । ते रामनाम अतिशुद्ध । वानरां परम आल्हाद । सेतुबंध बांधावया ॥ २६ ॥ [ओवी. २६ दै. प्रतीत व ओवी २७ मुद्रित प्रतीत नाहीत.]

नळाचिया हातातळीं । पर्वत द्यावया तत्काळीं । वानर ठेविले त्याजवळी । संख्या समेळीं अवधारा ॥ २७ ॥ [ओवी. २६ दै. प्रतीत व ओवी २७ मुद्रित प्रतीत नाहीत.]

दशकोटिपरीमाणा षष्टिः समधिकारिणः । पर्वतैः तृणकाष्टैश्च सागरं समपूरयन् ॥ ९ ॥

अनुक्रमणिका

पांच कोटींचिया हारी । दक्षिण बाहूसी वानरीं । पर्वत देती नळाच्या करीं । त्वरें करी अति शीघ्र ॥ २८ ॥

वामबाहूच्या सेतुप्रकारीं । पांच कोटी वानर हारी । पर्वत वृक्ष देती गजरीं । त्वरें करी अति शीघ्र ॥ २९ ॥

नळें [कं. तु. मु. 'मांडिलें'.] मानिलें शुद्धशीळ । साठीजण अति कुशळ । नळाजवळीं सर्व काळ । सामग्री प्रबळ ते देती ॥ ३० ॥

नळाची परमख्याती । सेतु बांधी दोहीं हातीं । तेथें जाली विपरीत गती । पर्वत बुडती समुद्रीं ॥ ३१ ॥

नळें लाविलियाही हात । पर्वत स्वयें समुद्रीं बुडत । तोही राहिला तटस्थ । सेतुबंधनार्थ चालेना ॥ ३२ ॥

समुद्रें सांगितलें येथ । नळाचेनि हातें पर्वत तरत । शेखीं त्याचेनि हातें बुडत । दुःखाभिभूत सुग्रीव ॥ ३३ ॥

नळ हस्तें पर्वत बुडत । हिंवासले सुग्रीवादि समस्त । वृत्तांत श्रीरामा सांगत । सेतुबंधनार्थ चालेना ॥ ३४ ॥

ऐकोनि वानरांची मात । हांसिन्नला श्रीरघुनाथ । सेतुबंधनाचा गुह्यार्थ । सांगेल हनुमंत ते करा ॥ ३५ ॥

हनुमान सांगे नळ वरदोक्ती । श्रीरामापुढें त्या न चालती । जेंवी खद्योत हारपती । सूर्यदीप्ती प्रकाशें ॥ ३६ ॥

श्रीरामप्रतापापुढें । समुद्र कायसे बापुडें । नळ ते तंव केवळ [तु. वि. कं. मुं. तं. मु. 'किडे'.] कुडें । वरदोक्ति वेडें अभिमानग्रस्त ॥ ३७ ॥

माझेनि हातें तरती पाषाण । ऐसा नळासी अभिमान । अभिमानें पर्वत मग्न । सेतुबंधन चालेना ॥ ३८ ॥

अभिमान बैसला ज्याचे माथा । ते ते बुडाले तत्वतां । युक्ति सांगेन मी आतां । सेतुबंधनार्थ अति [दै. 'गुह्य'.] शुद्ध ॥ ३९ ॥

पर्वत अथवा वृक्ष पाषाण । ज्यासी लागेल श्रीरामचरण । त्यासीं समुद्रतरण । सत्य जाण सुग्रीवा ॥ ४० ॥

श्रीरामचरणीचें पर्वत । तेचि समुद्रीं स्वयें तरत । तेणेंचि सेतुबंधन सिद्धयर्थ । गुह्य हनुमंत बोलिला ॥ ४१ ॥

ऐकोनि हनुमंताचें वचन । वानरां पावली जीवींची खूण । पुढती करावया सेतुबंधन । हनुमत् चरण वंदिले ॥ ४२ ॥

लागतांचि चरणकमळा । अहिल्या तरली महादुःशीळा । श्रीरामपदीं पर्वत शिळा । समुद्रजळा [दै. 'स्वयें'.] सुखें तरती ॥ ४३ ॥

ये मज्जंति निमज्जयंति च परान् ते प्रस्तरा दुस्तरे । वार्धौ वीर तरंति वानरभटान् संतारयन्तेऽपि च ॥

अनुक्रमणिका

नैते ग्रावगुणा न वारिधिगुणा नो वानराणां गुणाः । श्रीमद्दाशरथेः प्रतापमहिमा सोऽयं समुज्जृंभते ॥ १० ॥

**श्रीरामचरणीचें महिमान । अवघे ऐका सावधान । उल्हासें सांगे वायुनंदन । प्रताप पूर्ण हरिचरणीं ॥ ४४ ॥**

**श्रीरामपदींचे शिळापर्वत । समुद्रीं घाली हनुमंत । त्यातें वानर बळें बुडवित । तरी ते तरत न बुडोनी ॥ ४५ ॥**

**एकएका पर्वतावरी । बैसलिया वानर लक्षांतरी । तरी ते न बुडती समुद्रीं । तारिती सागरीं वानरां ॥ ४६ ॥**

[मु. 'स्वयें बुडोनि'.] **बुडोनि आणिका बुडविती । ऐसी पाषाणाची जाती । तेही सागरीं तरती । आणि तारिती वानरां ॥ ४७ ॥**

**नव्हे हा पाषाणाचा गुण । नव्हे समुद्र लक्षण । नव्हे वानर वरदान । श्रीरामचरण प्रताप ॥ ४८ ॥**

**श्रीराम चरणींचे पर्वत । पुष्पप्राय उचलित । येर जडत्वें जडोद्भूत । मग बुडत सागरीं ॥ ४९ ॥**

**श्रीरामचरणाचें महिमान । सिद्धी पावे सेतुबंधन । स्वयें हनुमंत सांगतां जाण । पावली खूण वानरां ॥ ५० ॥**

**ऐकोनि हनुमंताचें वचन । सुग्रीवें दिधलें आलिंगन । अंगद घाली लोटांगण । वंदिले चरण वानरीं ॥ ५१ ॥**

**हनुमंतें विघ्नाचें निर्विघ्न । हनुमंतें सेतुबंधन । हनुमंतें भवाब्धितरण ।** [पै. अं. खेरीज इतरत्र 'जण'.] **अवघे जाण वानिती ॥ ५२ ॥** [ओवी ५२ वि. प्रतीत नाही.]

**सुग्रीव बोलें संतोषोन । अगाध श्रीराम महिमान । अति गुह्य गुप्त ज्ञान । जाणें संपूर्ण हनुमंत ॥ ५३ ॥** [ओव्या ५३, ५६ य ६३ वि. प्रतीत नाहीत.]

**करोनि हनुमंताची स्तुती । सेतु बांधावया पुढती । वानर चालिले शीघ्रगतीं । भुभुःकार करिती** [दै. 'स्वानंदें'.] **रामनामें ॥ ५४ ॥**

**सुग्रीव सांगे स्वयें गर्जोन । पूर्व पश्चिम दिशा दक्षिण । तेथील बुडती पाषाण । ते आपण नाणावे ॥ ५५ ॥**

**उत्तरेचे जे पर्वत । वृक्ष पाषाण शिळा समस्त । श्रीराम पायें अति पुनीत । सेतुबंधार्थ शीघ्र आणा ॥ ५६ ॥** [ओव्या ५३, ५६ य ६३ वि. प्रतीत नाहीत.]

**उत्तरेचे जे पर्वत । तेचि आणावे सेतुबंधनार्थ । ऐसा ऐकोनि इत्यर्थ । वानर समस्त चालिले ॥ ५७ ॥** [ओवी ५७ मुं प्रतीत नाही.]

**जैसे आकाशीं विखुरती टोळ । तैसे वानरांचें दळ । सेतुबंधनार्थ सकळ । प्रतापें प्रबळ चालिले ॥ ५८ ॥** [ओवी ५८ तु. व दै. प्रतीत नाही.]

अनुक्रमणिका

**गगनीं नक्षत्रें पैं थोडीं । तैशा वानरांचिया कोडी । सेतुबंधनाची तांतडी । कपि कडाडी चालिले ॥ ५९ ॥**

**सेतु बांधावया सत्वर हांव । अहंपूर्वमहंपूर्व । वानरीं घेवोनिया धांव । आणिती सर्व गिरिवर ॥ ६० ॥**

> खर्जुरैरर्जुनैस्तालैस्तमालैस्तिलकैर्धटैः । अन्यैश्च विविधैवृक्षैर्गिरीणां शिखरैरपि ॥ ११ ॥
> सागरे सलिले सेतुं चक्रुः शतसहस्रशः । दशयोजनविस्तारमायतं शतयोजनम् ॥ १२ ॥
> नलश्चक्रे महासेतुं मध्ये नदनदीपतेः । तत्र शाखामृगाः सर्वे पुष्पितान्विहगैर्युतान् ॥ १३ ॥
> पर्वतंस्तूर्णमुत्पाट्य चिक्षिपुर्लवणांभसि ॥ १४ ॥

**वानर अतिबळें समर्थ । समूळ उपडोनि पर्वत । घेवोनि येती सेतुबंधनार्थ । ते कैसे शोभत ते ऐका ॥ ६१ ॥**

**पर्वतमाथा खर्जुरी वृक्ष । अर्जुन वृक्ष ते असंख्य । शाल ताल तमाल तिलक । घटक वृक्ष विस्तीर्ण ॥ ६२ ॥**

**आणिक पर्वत असंख्यात । आणिती शिखरें समवेत । नाना जातींचे वृक्ष तेथ । फळपुष्पित आणिलें ॥ ६३ ॥**
[ओव्या ५३, ५६ य ६३ वि. प्रतीत नाहीत.]

**माथां घेवोनि पर्वत । शतसहस्त्र असंख्यात । वानर येती गात नाचत । नामें गर्जत श्रीराम ॥ ६४ ॥**

**श्रीराम जयराम गजरीं । आणिती पर्वतांचिया हारी । सवेंचि घालिती सागरीं । आल्हाद भारी सेतुबंधा ॥ ६५ ॥**

**लांब संख्या योजन शत । रुंदी दश योजन तेथ । सेतु निर्माण नळ प्रयुक्त । समुद्रांत अतिशीघ्र ॥ ६६ ॥**

[तु. दै. मुं. तं. मु. ‘पडती’.] **पुढती पर्वतांचिया कोडी । दोरी धरोनि अति निखडी । नळ पर्वतें पर्वत जोडी । रितीं सवडी उरों नेदी ॥ ६७ ॥**

**पर्वत द्यावया उठाउठीं । नळाजवळीं दहाकोटी । वानर ठेविले जगजेठी । अधिकासाठीं अतिकुशळ ॥ ६८ ॥**

> नगान्नगमहावेगाः कपयः कामरूपिणः । पर्वतानेव वर्षंति नखैः परिलिखंति च ॥ १५ ॥
> ददृशुः सर्वभूतानि सागरे सेतुबंधनम् । कृतानि प्रथमेनान्हा योजनानि चतुर्दश ॥ १६ ॥

**पर्वतांचिया कोट्यानुकोटी । वानर आणिती जगजेठी । सवेंचि धांवती उठाउठीं ।** [मुं. ‘गिरि सृष्टी’.] **गिरिवरिष्टी आणावया ॥**

**पर्वत पडतां उपराउपरी । गाहाळु न करावा सागरीं । नांवें लिहितीं पर्वतांवरी । कपि नखाग्रीं कोरोनी ॥ ७० ॥**

**नवल वानरांची कथा । संख्या सांगावया रघुनाथा । नांवें लिहितीं पर्वतमाथा । सेतुबंधार्थी** [कं. ‘आवेशें’.]

अनुक्रमणिका

**अभिनव ॥ ७१ ॥**

**सेतुबंधन समुद्रजळीं । श्रीराम बांधी आतुर्बळी । स्वर्गमृत्युलोक पाताळीं । पिटिली टाळी अति गजरें ॥ ७२ ॥**

**प्रथम दिवशीं समुद्रांतु । बुडाला पर्वत पर्वतु । तेणें खोळंबला सेतु । अल्प कार्यार्थु चालिला ॥ ७३ ॥**

**चवदा योजने** [तु. 'समस्तु'.] **नेमस्तु । प्रथम दिवसीं बांधिला सेतु । सुग्रीव श्रीरामा सांगतु । हर्षयुक्तु स्वानंदें ॥ ७४ ॥**

**अति सज्ञान हनुमंतु । तेणें चालता केला सेतु । आमचा पाहे पां पुरुषार्थु । बांधूं सेतु अतिशीघ्र ॥ ७५ ॥**

**आजि माझें कौतुक पाहे । सेतु बांधीन लवलाहे । म्हणोनि आफळोनि बाहे । निघाला स्वयें अतिशीघ्र ॥ ७६ ॥** [ओवी ७६ तु. दै. व कं. प्रतींत नाही.]

> प्रियकामस्तु रामस्य सुग्रीवः संप्रहर्षयन् । स्वयं वानरराजेन पंचयोजनपर्वतम् ॥ १७ ॥
> अर्ध योजन विस्तीर्णं विंध्यस्य शिखरं महत् । सुषेणः पाणिनागृह्य पातयामास सागरे ॥ १८ ॥
> नीलेन मलयस्याथ शृंगं द्रुमशताकुलम् । दोर्भ्यामुत्पाट्य तरसा क्षिप्तं लवणसागरे ॥ १९ ॥
> शृंगं सचंदनं गृह्य सर्वतः पुष्पितं महत् । आरुह्याजह्रतुः श्रीमान् मैंदश्च द्विविदश्च ह ॥ २० ॥
> गजो गवाक्षो गवयः शरभो गंधमादनः । पंचैते शिखरान्गृह्य महेंद्रादागता द्रुतम् ॥ २१ ॥
> चिक्षिपुः सागरेसर्वे पर्वतान्पर्वतोपमान् ॥ २२ ॥

**श्रीरामासी सुखार्थ । पंच योजन पर्वत । सुग्रीवें उपटोनि त्वरित । समुद्रांत निक्षेपी ॥ ७७ ॥**

**अर्ध योजन महाथोर । विंध्याद्रीचे दीर्घ शिखर । सुषेणें उपटोनि सत्वर । समुद्रीं गिरिवर निक्षेपी ॥ ७८ ॥**

**नीळें मलयाद्री शिखर । बळें उपटिलें महाथोर । त्यावरी वृक्ष शतसहस्र । टाकिले सत्वर सागरीं ॥ ७९ ॥**

**चंदन वृक्षेसी गिरिवर । सुगंध सपुष्प तरुवर । मैंद द्विविद दोघे वीर । समुद्रीं शीघ्र टाकिती ॥ ८० ॥**

**गज गवाक्ष गवय युक्त । शरभ गंधमादन अद्भुत । पांचजण पांच पर्वत । समुद्रांत निक्षेपिती ॥ ८१ ॥**

**आणीकही वानर वीर । पर्वत आणिती थोर थोर । सेतु बांधावया सत्वर । गिरी वानर वर्षती ॥ ८२ ॥**

> दिवसेन द्वितीयेन षड्विंशद्योजनानि तु । बद्धानि वानरैतत्र समुद्रे सेतुकर्मणि ॥ २३ ॥
> पश्चिमायां तु संध्यायां यथा स्थानानि भेजिरे । कर्माणि कथयंतस्ते स्वानि स्वानि प्लवंगमाः ॥ २४ ॥
> रामाय कथयंति स्म पश्य सेतुं महादधौ ॥ २५ ॥

**वानरवीर अति उल्हासीं । सेतुबंधन दुसरे दिवसीं । सव्वीस योजने नेमेसी । श्रीरामापासी सांगत ॥ ८३ ॥**

अनुक्रमणिका

**तंव जाहालें अस्तमान । परतले वानरगण । रामापासीं येवोनि जाण । आंगवण सांगती ॥ ८४ ॥**

**साटोपें बोलती वानर । आम्ही आणिले पर्वत फार । एक म्हणती थोर थोर । आम्ही गिरिवर आणिलें ॥ ८५ ॥**

**एक म्हणती न बोला वृथा । नांवें लिहिलीं पर्वतमाथा । तें तें पाहोनि रघुनाथा । कपि पुरुषार्था** [मु. 'वानावें'.] **मानावें ॥ ८६ ॥**

**एक साक्षेपें सांगती गोष्टी । आम्ही आणिल्या पर्वतकोटी ।**
**स्वामींनीं येवोनि उठाउठीं । सेतु निजदृष्टी पाहावा ॥ ८७ ॥**

**व्यर्थ कां बोलाल पुरुषार्थ । जाणता सर्वज्ञ रघुनाथ । सुग्रीवें सांगोनि वृतांत । स्वयें परतत कपियुक्त ॥ ८८ ॥**

**सवेग आणितां पर्वत । वानर कष्टले समस्त । कोणासी जागवेना तेथ । निद्राभिभूत कपिकुळें ॥ ८९ ॥**

**कोणा न घालवे घरटीं । कायशा जागरणाच्या गोष्टी । वानर निजले कोट्यानुकोटी । शिळा संपुटीं सुषुप्त ॥ ९० ॥**

**चाळीस योजनें संख्या गोष्टी । वानरीं बांधिला सेतु संकटीं । पुढें उरला योजनें साठी । सहसा कांठीं पावेना ॥ ९१ ॥**

**श्रीरामांचें मनोगत । जाणोनियां हनुमंत । दडोनि राहिलासे तेथ । व्हावया प्रभात पहातसे ॥ ९२ ॥**

**कायसी सेतुबंध सांकडी । बांधीन न लागतां घडी । सूर्योदयाचें सांकडी । देवोनि दडी राहिलासे ॥ ९३ ॥**

ततः प्रभातसमये कृत्वा पौर्वाह्णिकीं क्रियाम् । परस्परं समुत्सृज्य प्रस्थिताः सर्वतो दिशः ॥ २६ ॥
हनूमता च वीरेण सत्कृते सेतुकर्मणि । सप्तयोजनविस्तीर्णान्पर्वतान्सप्तपाणिना ॥ २७ ॥
लवणांभसि चिक्षेप मध्ये कपिवृषस्तदा । गिरीणां भिद्यमानानां सागरे सेतुकर्मणि ॥ २८ ॥
भुवि दिव्यंतरिक्षे च श्रूयते निनदो महान् । प्रक्षिप्यमाणशिखरैः जलराशिः समुत्थितः ॥ २९ ॥
आकाशाभिमुखो गत्वा विससर्प समंततः । दिवसेन तृतीयेन पंचाशद्योजनानि तु ॥ ३० ॥
बद्धोऽतिकपिभिर्वीरैः शेषं तु दशयोजनम् । मुंचन्तः पुष्पवर्षाणि सुराः संहृष्टमानसाः ॥ ३१ ॥
दिवि दुंदुभयोर्नेदुर्ननृतुश्चाप्सरोगणाः ॥ ३२ ॥

**अरुणोदय होतां प्राप्त । सवेग उठोनि हनुमंत । पूर्वान्हिक क्रिया करोनि तेथ । सेतुबंधनार्थ उडाला ॥ ९४ ॥**

**न पुसतां श्रीरामासी । न सांगतां सुग्रीवासी । कळो ने दितां वानरांसी । अति वेगेसीं उडाला ॥ ९५ ॥**

**पुढें गेला रे हनुमंत । ऐकोनि वानर समस्त । पूर्वान्हिकें करोनि तेथ । शीघ्र धांवत दशदिशा ॥ ९६ ॥**

अनुक्रमणिका

महावीर हनुमंत । उपटोनि पर्वत सात । एकैक योजन संख्या सप्त । घेवोन येत उल्हासें ॥ ९७ ॥

दोन पर्वत दोहीं हातीं । दोन दोहीं कांखे प्रती । एक मस्तकीं रामकार्यार्थी । [वि. तं. मुं. दै. म. 'पुच्छावर्ती'.] पुच्छा प्रती पैं एक ॥ ९८ ॥ [ओवी ९८ कं. प्रतीत नाही.]

एक पर्वत हनुवटी तळीं । आकळोनि महाबळी । गात नाचत रामसमेळी । सेतु जवळी स्वयें आला ॥ ९९ ॥

घेवोनिया सप्तपर्वत । येतां देखोनि हनुमंत । श्रीराम जाला अति विस्मित । बळें अद्भुत मारुती ॥ १०० ॥

प्रभातीं नळें आवो साधोन । सेतु बांधता एक योजन । सप्त पर्वतेसी पूर्ण । आलें उड्डाण हनुमंताचें ॥ १०१ ॥

पर्वत टाकितां उद्भट । ध्वनी उठला कडकडाट । सागर गर्जे घडघडाट । नादें वैकुंठ कोंदलें ॥ १०२ ॥

पर्वत सांडितां सागरीं । नांदे कोंदला कैलासगिरी । ध्यान सांडोनि ते अवसरीं । पाहे बाहेरी नीलकंठ ॥ १०३ ॥

समुद्रीं पाषाण तारितु । देखोनि श्रीरामाचा सेतु । हर्षे सदाशिव डुल्लतु । श्रीरघुनाथु परब्रह्म ॥ १०४ ॥

सप्त पर्वतीं समस्तु । हनुमंतें सिद्धि नेला सेतु । आला रावणासी अंतु । शिव सांगत प्रियेसी ॥ १०५ ॥

पर्वत सांडितां सिंधूसी । जळ उसळलें आकाशीं । भिजवोनिया ध्रुवमंडळासी । सत्यलोकासीं आदळलें ॥ १०६ ॥

बाप बळिया हनुमंत । स्वर्ग केला सचैल स्नात । देवा देतसे प्रायश्चित । आला सिंहस्त [वि. 'आल्हादयुक्त'; मु. 'आलें हास्य'; तु. दै. 'सचैल स्नान'.] सुरवरां ॥ १०७ ॥

रावण बंदीं देव निर्मुक्त । सोडविले पैं समस्त । अवश्य पाहिजे प्रायश्चित्त । सचैल स्नात हनुमंतें ॥ १०८ ॥

घालितां सप्तपर्वत पूर्ण । एकुणपन्नास योजन । हनुमंतें केलें सेतुबंधन । विस्मित मनें [वि. कं. मुं. 'वीरांचे'; तु. दै. 'विचारी'.] विरिंचि ॥ १०९ ॥

विस्मय करिती सुरवर । विस्मय करिती ऋषीश्वर । विस्मय करिती नरवानर । श्रीराम सौमित्र विस्मित ॥ ११० ॥

आतुर्बळी हनुमंत । देव दुंदुभि स्वर्गी गाजत । सुरवर सुमनीं वर्षत । नृत्यान्वित अप्सरा ॥ १११ ॥

तंतीवीणा स्वरयुक्त । स्वर्गांगना नृत्यांकित । हर्षे वानर नाचत । सेतु समाप्त श्रीरामें ॥ ११२ ॥

तृतीय दिवसाचा वृत्तांत । सुग्रीव श्रीरामा सांगत । तुझा निजदास हनुमंत । सेतु समाप्त त्याचेनि ॥ ११३ ॥

अनुक्रमणिका

आमचा वाढवावया सन्मान । राखिला दशयोजने न्यून । एऱ्हवी करितां संपूर्ण । अर्धक्षण न लागतां ॥ ११४ ॥

वानरीं आणोनिया पर्वत । दशयोजनें ऊर्वरित । नळ स्वानंदें सेतु बांधित । हर्षयुक्त वानर ॥ ११५ ॥

अन्ये च सूत्रं गृह्णंति दृष्टिं सधारयंत्यपि । समश्च क्रियतां सर्वे नलमेवं वभाषिरे ॥ ३३ ॥
बद्धो बद्धेति वदतां सिद्धानामंबरे स्वनाः । वानराणां प्रहृष्टानां महान्नादो वभूव ह ॥ ३४ ॥
गिरिशृंगाणि चाप्यन्ये शिलाशैलान्यथा परे । अन्ये च वारयंति स्म वहूनां किं प्रयोजनम् ॥ ३५ ॥
दशयोजन विस्तारमायतं शतयोजनम् । नलश्चक्रे महासेतुं मध्ये नदनदीपतेः ॥ ३६ ॥
मलयाद्रिसमारब्धो लंकामूले प्रतिष्ठितः । नलेन बद्धं ददृशुः सेतुं मंदरसन्निभम् ॥ ३७ ॥

एकोणपन्नास योजने सेतु । भरोनि गेला हनुमंतु । दश योजनें उर्वरितु । नळ बांधितु पुढारां ॥ ११६ ॥

तंव नळासी सांगिजे वानरीं । हनुमियानें बांधिला जैशापरी ।
त्यासमान अवघा करीं । धरोनि दोरी कपि पाहाती ॥ ११७ ॥

हनुमंताची क्रियासम । तुझी क्रिया दिसे विषम । मुळानुसूत्रें प्लवंगम । [मु. 'त्यासी सम'.] विषमसम करविती ॥ ११८ ॥

बांधिला बांधिला सेतु समग्र । सिंहानुवादें गर्जे अंबर । स्वर्गी गर्जती सुरवर । सेतु समग्र बांधिला ॥ ११९ ॥

समुद्रीं सेतु अति दुर्धर । वानरीं बांधिला समग्र । स्वयें बोलती ऋषीश्वर । थोराथोर देवऋषी ॥ १२० ॥

वानरवीर कोट्यानुकोटी । पर्वत आणिती उठाउठीं । त्यातें वारिती वीर जगजेठी । सेतुपरतटीं पावला ॥ १२१ ॥

सेतु सिद्ध जाहाला संपूर्ण । कटकीं त्राहाटिलें निशाण । तें एकोनि वानरगण । त्यक्त पाषाण पर्वत ॥ १२२ ॥

पर्वत पाषाणांचिया हारी । वानरीं टाकिल्या धरेवरी । सेतुबंधन यात्रा नरीं । अद्यापवरी देखिजे ॥ १२३ ॥

रुंदी संख्या दशयोजन । लांबी समग्र शतयोजन । नळें केलें सेतुबंधन । रघुनंदन [मु. 'प्रतापें'.] निजकृपा ॥ १२४ ॥

नवल कैसे पैं विंदाण । सागरीं तरोनि पाषाण । वानरीं केलें सेतुबंधन । रघुनंदन प्रतापें ॥ १२५ ॥ [ओवी १२५ मु. प्रतीत नाही.]

सेतुबंधना मूळ मलयाद्री । तेथोनि लंका मूळवरी । नळें बांधिला बरव्यापरी । मंदरगिरिसम प्रभा ॥ १२६ ॥
सेतु पावला परतटीं । रामनामें वानरकोटी । गर्जगर्जोनि नाचती सृष्टी । न समाती पोटीं नभाचिया ॥ १२७

अनुक्रमणिका

॥

येरयेरांवरी किराण । हर्षें नाचती वानरगण । श्रीरामापुढें येवोनि जाण । लोटांगण घालिती ॥ १२८ ॥

येरयेरांतें गुदगुली । येरयेरांतें वांकुली । श्रीराम आमची माउली । संतोषली सेतुबंधें ॥ १२९ ॥

सेतु जाला समाप्त । वानर वीर हरिखें गर्जत । श्रीरामापासीं आले समस्त । [मु. 'हर्षोन्मत्त'.] हर्षयुक्त स्वानंदें ॥ १३० ॥

समुद्रीं सेतुबंधन स्थिती । देखोनि स्वर्गीं सुर बोलती । श्रीरामाची अगाध कीर्ती । त्रिजगतीं विस्तारली ॥ १३१ ॥

सेतु पावतां समाप्ती । नळें येवोनि शीघ्रगती । नमस्कारिला रघुपती । रामें अति प्रीतीं आलिंगिला ॥ १३२ ॥

आलिंगोनि सुखसमेळीं । पाठी थापटी वेळोवेळीं । तंव वानरीं पिटिली टाळी । दिधली आरोळी अंगदें ॥ १३३ ॥

सिद्धी पावलें सेतुबंधन । कायसें बापुडें रावण । इंद्रजित आणि कुंभकर्ण । निर्दाळीन राक्षसां ॥ १३४ ॥

नरांतक सुरांतक । अतिकायादि कुमर अनेक । रणीं मारीन एकेंएक । युद्धीं सन्मुख दशमुखा ॥ १३५ ॥

महोदर प्रहस्त जाण । महापार्श्व शुकसारण । रणीं देखतां दशानन । करीन कंदन प्रधाना ॥ १३६ ॥

निर्दाळोनि लंकानाथा । अर्धक्षणें श्रीरघुनाथा । तुझी आणीन मी सीता । उल्लासतां गर्जत ॥ १३७ ॥

मज म्हणों नको लेकरुं । मी तंव वालीचा कुमरुं । करीन सीतेचा उद्धारु । दशकंधरु वधोनी ॥ १३८ ॥

आडवा होता जंव सागर । तंव विराले होते वानर । आतां घ्यावया लंकापुर । अति सत्वर उपरमती ॥ १३९ ॥ [ओवी १३९ प्रतीत नाही.]

अवघे मिळोनि मर्कट । छेदावया दशकंठ । तुझे आज्ञेची पाहाती वाट । भट उद्भट वानर ॥ १४० ॥

सेतु पावला लंकामूळी । वानरीं पिटिली टाळी । नामें गर्जोनि आतुर्बळी । सुख समेळीं नाचती ॥ १४१ ॥

राममामाचा गजर । वानरीं केला भुभुःकार । देवीं करोनि जयजयकार । सुमन संभार वर्षती ॥ १४२ ॥

एका जनार्दना शरण । सिद्धि पावलें सेतुबंधन । पुढें गोड निरुपण । श्रीराम गमन लंकेसी ॥ १४३ ॥

नादद रवियाचा पडिपाड । जो जो चाखिजे तो तो गोड । तैसे रामायणी कोड । सुखसुरवाड स्वानंदें ॥

अनुक्रमणिका

१४४ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां सेतुबंधन नाम चत्वारिंशततमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग एकेचाळिसावा

## श्रीराम सैन्य सिंधू परपार प्रवेश

॥ श्रीरघुनाथाय नमः ॥

नळें बांधिला सेतु समाप्तु । यालागीं म्हणती नळसेतु । परी तो श्रीराम पुरुषार्थु । जाला विख्यातु तिहीं लोकीं ॥ १ ॥

> बध्वा तु तं महासेतुं सुग्रीवो वाक्यमब्रवीत् । कृतकृत्योऽसि राजेंद्र हता लंका न संशयः ॥ १ ॥
> रावणश्च हतः शत्रुः समाप्तः स परिच्छदः ॥ २ ॥

सेतु जालिया समाप्त । सुग्रीव संतोषें डुल्लत । वंदोनिया श्रीरघुनाथ । स्वयें बोलत स्वानंदें ॥ २ ॥

समुद्रीं लाभली पायवाट । आमचे चुकले परम कष्ट । आतां लंका करीन सपाट । दशकंठ वधोनी ॥ ३ ॥

प्रधान सेनानी सपरिवार । राक्षसांचे भारसंभार । रणीं मारीन दुर्धर वीर । तरी किंकर मी तुझा ॥ ४ ॥

सेतु होतांचि समाप्त । लंका जाली हताहत । रणीं निमेल लंकानाथ । संदेह येथ असेना ॥ ५ ॥

ऐकोनि सुग्रीवाचें वचन । सेतु देखोनि संपूर्ण । उल्हासला श्रीरघुनंदन । शीघ्र गमन करावया ॥ ६ ॥

सोडवावया सीतासती । सवेग जावें लंकेप्रती । लक्ष्मणा धरोनि हातीं । शीघ्रगतीं निघे राम ॥ ७ ॥

ते काळीं जांबुवंतें गर्जोन । हांक देवोन बोलें वचन । पायीं चालतां रघुनंदन । आनेंआन हों पाहें ॥ ८ ॥

श्रीराम चरणीं शिळा तारी । दोघें जातां सेतु उद्धरी । आम्ही राहोनि ऐलतीरीं । किलकिल करीती तेचि पैं ॥ ९ ॥

लागतां श्रीरामाचे चरण । सेतु पावेल उद्धरण । दोघे जातील निघोन । आम्ही राहों [दै. कं. मुं. तु. तं. मु. 'ऐलिकडे'.] आडकले ॥ १० ॥

एकला जावोनि रघुनाथ । सकळ साधील कार्यार्थ । आमचा नव्हे रणसाह्यार्थ । ऐसा अनर्थ होऊं पाहे ॥ ११ ॥

ऐकोनि जांबुवंताची मात । सकळा मानला [पै. व अं. खेरीज इतरत्र 'सत्यार्थ'.] इत्यर्थ । सुग्रीव निघाला धांवत । श्रीरघुनाथ थांबवावया ॥ १२ ॥

सुग्रीवें घालोनि लोटांगण । दृढ धरिलें श्रीरामचरण । स्वयें बोलिला युक्त वचन । सावधान अवधारा ॥ १३

अनुक्रमणिका

॥

**वानरें समस्त शरणागत । आम्हांसी सांडोनिया येथ । एकलें जाणें लंकेआंत । नव्हे उचित श्रीरामा ॥ १४ ॥**

**लागतां तुझे गा श्रीचरण । सेतु पावेल उद्धरण । आम्ही वानरें अडकोन । सर्वथा गमन न करावें ॥ १५ ॥**

**कष्टलों आणोनि पर्वत । हर्षे सेतु केला समाप्त । एकला जाईल रघुनाथ । धिग् जीवित तैं आम्हां ॥ १६ ॥**

**एकला साधिसी कार्यार्थ । आम्हांसी मानलें निश्चित । तेव्हां आमचें व्यर्थ जीवित । धिक् पुरुषार्थ वाटिवां ॥ १७ ॥**

**रावण मारोनि सगण । सीता सोडवी रघुनंदन । तेव्हां आमचें काळें वदन । भूभारपण कपिकुळा ॥ १८ ॥**

**सवें घेवोनि कपि समस्तां । लंकेसी जावें श्रीरघुनाथा । म्हणोनि चरणीं ठेविला माथा । सप्रेमता सुग्रीवें ॥ १९ ॥**

**ऐकोनि सुग्रीवाचें वचन । श्रीराम जाला सुखसंपन्न । हनुमान येवोनि आपण । जाहला वाहन श्रीरामा ॥ २० ॥**

> सुग्रीवस्य वचः श्रुत्वा रामो दशरथात्मजः । अधिरुह्य हनुमतः पृष्ठे नीलस्य लक्ष्मणः ॥ ३ ॥
> अग्रतः सर्वसैन्यस्य श्री मान्बलसमन्वितः । जगाम धर्मी धर्मात्मा सुग्रीवेण समन्वितः ॥ ४ ॥
> आप्लवंतः प्लवंतश्च गर्जंतश्च प्लवंगमाः । केचिज्ञवेन धावंति सेतुना केचिदेव तु ॥ ५ ॥
> केचिदाकाशमाविश्य सेतुं नैव स्पृशंति च । अन्ये मध्ये च गच्छन्ति पार्श्वे चान्ये च वानराः ॥ ६ ॥
> सलिले प्रपतंत्यन्ये पंथानं ये न लेभिरे ॥ ७ ॥

**जेंवी अपत्याचें केलें भाषण । पिता न करी उपेक्षण । तेंवी सुग्रीवाचें वचन । श्रीरघुनंदन स्वयें मानी ॥ २१ ॥**

**ऐकोन सुग्रीव वचनार्था । श्रीराम चढला** [मु. 'स्कंधीं हनुमंता'.] **हनुमंता । सौमित्रासी उल्हासता । पृष्ठीं बैसवितां नीळ जाला ॥ २२ ॥**

**सज्ञन चढती गुणातीतीं । तैसा श्रीराम हनुमंतीं । अवघे जयजयकार करिती । सुरवर वर्षती सुमनातें ॥ २३ ॥**

**जेंवी निजबोधाचे माथा । साधकु चढे निरपेक्षता । तेंवी नीळ पृष्ठीं तत्वतां । होय शोभता सौमित्र ॥ २४ ॥**

**रामनामाचा गजर । हर्षें करिती वानरवीर । आनंदें नाचती थोर थोर । देती भुभुःकार हरिनामें ॥ २५ ॥**

**एक गर्जती नर्दत । एक आल्हादें नाचत । लंकेसी निघाला श्रीरघुनाथ । उल्लहसित वानर ॥ २६ ॥**

अनुक्रमणिका

कोट्यानुकोटी पैं वानर । अर्बुदें निर्बुदेंहूनि अपार । सेतूसी दाटला वानरभार । करिती गजर रामनामें ॥ २७ ॥

एक रामनामें स्पर्द्धती । एक रामनामें नर्दती । एक रामनामें गर्जती । हांका देती हरिनामें ॥ २८ ॥ [ओवी २८ वि. प्रतीत नाही.]

सुग्रीव बिभीषण दोहींकडे । श्रीरामापासीं निज निवाडें । नळनीळ अंगद अवघ्यापुढें । पाठीसी गाढे तार तरळ ॥

श्रीरामापासीं जांबुवंत । निकटवर्ती बुद्धिवंत । सुषेण वैद्यराज समर्थ । तो अति आप्त सुग्रीवा ॥ ३० ॥

श्वेत पीत रक्त पुष्पित । वृक्ष उभविले सैन्या आंत । कर्दळी पत्रें टके डोलत । सेना शोभत अति शोभा ॥ ३१ ॥

शाल ताल झेलिती गंभीर । तेचि महाकेतु दुर्धर । नामें गर्जती वानर । गति प्रकार तो ऐका ॥ ३२ ॥

एक समुद्रीं घालिती उडिया । एक आल्हादें देती बुडिया ।
एक धांवती थडिया थडिया । उभवोनि गुढिया [मु. 'पुच्छांच्या'.] वृक्षाचिया ॥ ३३ ॥

एक ते श्रीरामा [तु. मुं. दै. मु. 'सांगती'.] संगती । जलतरणें दाविती गती । एक ते सेतु धारा चालती । एक नाचती जळस्थळीं ॥ ३४ ॥

नातळोनियां सेतूसीं । एकाची गती ते आकाशी । एक स्वयें श्रीरामापासी । अति उल्हासी चालती ॥ ३५ ॥

सेतूसीं दाटले जुत्पत्ती । एका न लभे मार्गप्राप्ती । एक खचोनि समुद्रीं पडती । [मु. 'सवेंचि घेती उड्डाण'.] एक काढिती वोढुनी ॥ ३६ ॥

सेतूचिया कांठावरी । चालती वानरांचिया हारी । एक ते उडोनि अंबरीं । लंका परपारीं पावले ॥ ३७ ॥

> तानि कोटि सहस्राणि वानराणां महौजसाम् । तीर्त्वा तत्र महासेतुं जग्मुः पारं महोदधेः ॥ ८ ॥
> सा मुहूर्तेन संतीर्णा वाहिनी नलसेतुना । तीरे विवेश रम्ये तु बहुमूलफलाशये ॥ ९ ॥
> ततः पारे समुद्रस्य गदापाणिर्बिभीषणः । परेषामभिघातार्थं चतुर्भिः सचिवैः सह ॥ १० ॥
> यूथपानां सहस्रौघैः प्रस्थितो लघुविक्रमः ॥ ११ ॥

वानरवीर प्रतापवंत । कोट्यानुकोटी अर्बुदांत । समुद्र उतरले समस्त । श्रीरघुनाथ अनुलक्षीं ॥ ३८ ॥

शतयोजने सेतुप्रती । मध्यें न करितां वस्ती । मुहूर्तें [कं. 'आणिलें'.] आले लंकेप्रती । शीघ्रगती हनुमंतें ॥ ३९ ॥

अनुक्रमणिका

पृष्ठीं वाहोनि रघुनंदन । हनुमंताचें शीघ्र गमन । तयासवें वानरगण । चालतेपण विसरलें ॥ ४० ॥

श्रीराम लक्षोनियां दृष्टी । चालतां वानरांच्या कोटी । श्रम पळाला उठाउठीं । आले परतटीं स्वानंदें ॥ ४१ ॥

श्रीरामासवें करितां गमन । श्रम निमाला संपूर्ण । विरोनि गेलें भागलेपण । आले कपिगण स्वानंदें ॥ ४२ ॥

श्रीरामासवें श्रमनिवृत्ती । श्रीरामासवें सुगमगती । श्रीरामासवें परमपद प्राप्ती । आले जुत्पत्ती स्वानंदें ॥ ४३ ॥

परतटा येतां वानरगण । पुढें देखिलें लंकाभुवन । रत्नकळशीं विराजमान । तेजें परिपूर्ण [पै. अं. 'पूर्णत्वें'.] तेजस्वी ॥ ४४ ॥

अलकावती भोगावती । कायसी बापुडी अमरावती । कैलासासम दैदीप्ती । लंका शोभती अति शोभा ॥ ४५ ॥

लंका देखतांचि दृष्टि । वानरवीर जगजेठी । उडोनि निघावया त्रिकुटीं । कोट्यानुकोटी खवळलें ॥ ४६ ॥

ते देखोनि बिभीषण । निवारोनि वानरगण । अवघियांपुढें आपण । गदा घेवोन चालिला ॥ ४७ ॥

राक्षस कपटी गुप्तघाती । छळोनि वानरांतें मारिती ।
त्यासी निर्दळावया निज प्रयुक्ती । जाणें अत्युक्ती बिभीषण ॥ ४८ ॥

राक्षस गती निर्बंधन । करूं जाणती चवघे प्रधान । सवें घेवोनि वानरगण । पुढें बिभीषण निघाला ॥ ४९ ॥

गदापाणी बिभीषण । त्यापुढें राक्षस ते तंव तृण । संमुख येवों शके कोण । धांकेंच प्राण सांडिती ॥ ५० ॥

बिभीषण पुढें जातां । श्रीराम सांगे हनुमंता । त्यासी जावो नेदी सर्वथा । ऐक तत्वतां विचार ॥ ५१ ॥ [ओवी ५१ दे. प्रतीत नाही.]

बिभीषण पुढें जात । छळोनि राक्षसीं केलिया घात । व्यर्थ जीवित पुरुषार्थ । याहूनि अनर्थ तो ऐका ॥ ५२ ॥

शरणागत मारिलिया जाण । आम्हीच स्वयें सोडूं प्राण । कोण करील सीता सोडवण । अति दारुण अनर्थ ॥ ५३ ॥

यालागीं साक्षेपेंसी रघुपती । बिभीषणा धरोनि हातीं । बैसविला आपणाप्रती । कृपामूर्ति कृपाळू ॥ ५४ ॥

राक्षसगती निर्बंधन । करुं धाडिले चवघे प्रधान । तेही अतिशयें सावधान । विचक्षण रणयोद्धे ॥ ५५ ॥

समुद्राचे परतीरीं । फळमूळजळ सुखसंभारीं । बैसल्या वानरांचिया हारी । स्वानंदें करी डुल्लत ॥ ५६ ॥

अनुक्रमणिका

जयस्व शत्रुं नरदेव मेदिनीम् । ससागरां पालय शाश्वतीः समाः ।
इति स्म रामं जलदेवसत्कृतम् । शुभैर्वचोभिर्विबुधाः प्रपूजिरे ॥ १२ ॥
ततो महात्मा कृतसेतुमीश्वरम् । प्रतीतरूपं विजयाभिनंदनः ।
पुनः समुद्रोऽभिजगाम राघवम् । प्रभावमस्यैव वचोभिरर्हयन् ॥ १३ ॥
प्रणम्य रामं सगरस्य चात्मजम् । स दिव्यरूपाभरणो महाद्युतिः ॥ १४ ॥

**श्रीराम समुद्र परतटीं । सुग्रीव सैन्य वानरकोटी । बैसला देखोनि जगजेठी । केली पुष्पवृष्टी सुरसिद्धी ॥ ५७ ॥**

**शत्रु जिणोनि समस्त । पृथ्वी समुद्रमेखलान्वित । प्रतिपाळावया तूं समर्थ । सुर गर्जत स्तुतिवादें ॥ ५८ ॥**

**दशसहस्त्र वर्षाआंत । निष्कंटक राज्य प्राप्त । देव करावया बंदीमुक्त । तुझा पुरुषार्थ श्रीरामा ॥ ५९ ॥**

**बंधमुक्तता सुरवरीं । आम्ही तुझे कृतोपकारी । स्मरोनि जन्मजन्मांतरी । जयजयकारी गर्जती ॥ ६० ॥**

**देखोनि सेतुबंधु । ससैन्यासी राम उतरला सिंधु ।** [मु. 'उतरला वानरांचा वृंदु'.] **ऐसा श्रीरामाचा स्तुतिवादु । ऐकतां सिंधु अनुतापी ॥ ६१ ॥**

**पूर्वीं भेटलों श्रीरघुवीरांसी । युक्ति सांगितली सेतुबंधासी ।
नाहीं पूजिलों श्रीरामासी । मूढता ऐसी मज माझी ॥ ६२ ॥**

**मी ज्येष्ठ श्रीराम कनिष्ठ । ऐसें मानितों पापिष्ठ । तेणें अभिमानें मी दुष्ट । श्रीराम वरिष्ठ न पूजीच ॥ ६३ ॥**

**कनिष्ठ मानितां श्रीराममूर्ती । महापापी मी त्रिजगतीं । त्या मज पापियाची पापमुक्ती । सेतु समाप्ती न पवेचि ॥ ६४ ॥**

**सेतु नव्हेचि माझिया पापोक्ती । वृथा गेली नळवरदोक्ती । श्रीराम पायें पर्वत तरती । सेतुसमाप्ती श्रीरामें ॥ ६५ ॥**

**समुद्रीं पर्वत तरती स्पष्ट । तो श्रीराम मी मानी कनिष्ठ । मजही परता पापिष्ठ । अति दुष्ट आन नाहीं ॥ ६६ ॥**

**ऐसी ऐसिया अनुतापवृत्तीं । पूजावया श्रीराममूर्ती । घेवोनिया अलंकार संपत्ती । श्रद्धान्विती सिंधु आला ॥ ६७ ॥** [ओवी ६७ वि. प्रतीत नाही.]

[वि. 'ऐसि ऐसेया अनुताप वृत्ती'.] **विजय लाभाचिया अनुवृत्ती । सेतु पावला समाप्ती ।
परतीरीं देखिला श्रीरघुपती । सुग्रीव कपिपती समवेत ॥ ६८ ॥**

**संमुख लंका देखोनि दृष्टी । बैसलिया वानरांच्या कोटी । रावण मारावया उठाउठी । उल्हास पोटी वानरां ॥ ६९ ॥**

**ऐसा देखोनि रघुनंदन । समुद्र घाली लोटांगण । श्रीराम वंदी सिंधुचरण । ज्येष्ठ संपूर्ण तूं आम्हां ॥ ७० ॥**

**ज्येष्ठ कनिष्ठ हा अभिमान । तेणें मजमाजी पडिलें खाण ।**
**श्रीरामाचें निज महिमान । ज्येष्ठाभिमान कळो नेदी ॥ ७१ ॥**

**खांबीं उपजला सिंहवदन । तो काय धाकुटा प्रल्हादाहून । तेंवी ज्येष्ठांज्येष्ठ रघुनंदन । धाकटेपण तुज नाहीं ॥ ७२ ॥**

**पायें तारिसी पाषाण । तो तूं परमात्मा परिपूर्ण । तुज कैचें धाकुटेपण । ज्येष्ठांज्येष्ठपण श्रीरामीं ॥ ७३ ॥**

**तूं परब्रह्म ब्रह्मस्थिती । तूं परमात्मा परंज्योती । तूं चिदात्मा चिन्मूर्ती । सगुणावृत्ती निर्गुणत्वें ॥ ७४ ॥**

**तुज देखतांहि सगुण । तुं सर्वांगीं नित्य निर्गुण । हें मी जाणें** [कं. 'निज खूण'.] **ऊणखूण । श्रीराम पूर्ण परब्रह्म ॥ ७५ ॥**

समागतौ लक्ष्मणवानराधिपौ बिभीषणश्चर्क्षपतिश्च जांबवान् ।
मुदा प्रतीता हरयो वरप्रदं प्रणेमु रामं सगरस्य चात्मजम् ॥ १५ ॥
स दिव्यरूपाभरणो महाद्युतिः दृष्ट्वा तु रामं मुनिवेषधारिणम् ।
शिरस्तु चाघ्राय जयाय युङक्ष्व समीक्षमाणोऽनुससार सागरम् ॥ १६ ॥
न वत्स युद्धे मुनिवेष इष्यते विभज्य कर्माणि चरन्ति पार्थिवाः ।
स रामराजाभरणैरलंकृतो जयाय गच्छेति चकार सत्वरः ॥ १७ ॥
तथेति चोक्त्वा वचनं महोदधेर्विसृज्य चीराणि जटा नियम्य च ।
शुभानि राजा भरणानि चाददे समुद्रदायं कवचायुधानिवै ॥ १८ ॥

**सिंधु उतरला रघुनाथ । समुद्र स्वरूपें आला तेथ । त्या दोघांसी समस्त । स्वयें वंदित ते ऐका ॥ ७६ ॥**

**लक्ष्मण सुग्रीव जांबुवंत । बिभीषणादि वानर समस्त । श्रीरामा सिंधूसी वंदित । दोघे समर्थ अति श्रेष्ठ ॥ ७७ ॥**

**समुद्रें करोनि स्तवन । स्वयें घालोनि लोटांगण । श्रीराम वंदी सिंधुचरण । ज्येष्ठ संपूर्ण तूं आम्हां ॥ ७८ ॥**

**ज्येष्ठकनिष्ठपणाची कथा । मागें वदलों मी यथार्थता । कांहीं एकी विनंती रघुनाथा । कृपावंता अवधारी ॥ ७९ ॥**

**मुनिवेषें श्रीरघुनाथा । युद्ध नये गा रणीं करितां । ऐक वेषाची कथा । तुज तत्वतां सांगेन ॥ ८० ॥**

**मुनिवेषें पाहिजे निवृत्ती । मुनिवेषें पाहिजे शांती । मुनिवेष पाहिजे परमार्थी । युद्ध कंदनार्थीं न ये कामा ॥ ८१ ॥**
**संन्यासी आणि झांपदे राऊत । हा आहाणा होईल प्राप्त । मुनिवेषें युद्धकंदनार्थ । नव्हे शास्त्रार्थ श्रुतिमूळ ॥**

अनुक्रमणिका

८२ ॥

मागील राजे नरवीर । युद्धार्थ करिती वीरशृंगार । युद्धीं आलिया मुनिवेषधर । वीर जुंझार न मानिती ॥ ८३ ॥

मुनिवेषाचें लक्षण । स्वभावें केलें निरुपण । मारिले त्रिशिरा खरदूषण । मुनिवेषपण असतांचि ॥ ८४ ॥

निधडा वीर तूं समर्थ । कांहीं एक माझें मनोगत । श्रद्धें पूजावा श्रीरघुनाथ । अलंकारयुक्त [मु. 'उल्हासें'.] आलोंसें ॥ ८५ ॥

सर्वालंकार भरणीं । उभा ठाकिलिया रणांगणीं । आमचिया डोळ्यांची पुरेल धणी । म्हणोनि चरणीं लागला ॥ ८६ ॥

पुढती अलंकारयुक्त । कैं मी देखेन श्रीरघुनाथ । माझें पुरवावे मनोरथ । सिंधु विनवीत अति श्रद्धें ॥ ८७ ॥

सुग्रीव अंगदादि जुत्पत्ती । सालंकृत श्रीरघुपती । पहावया उल्हास चित्तीं । आल्हादती स्वानंदें ॥ ८८ ॥

श्रीराम बाणलिया रत्नाभरणें । फिटेल डोळ्यांचें पारणें । उठेल वल्कलाचें धरणें । बोळवणें मुनिवेषा ॥ ८९ ॥

लेईलियां अलंकार विचित्र । सुखी होतील आमचे नेत्र । तुझें देखतांचि वक्त्र । सुख चिन्मात्र कोंदाटे ॥ ९० ॥

श्रीराम देखिलिया कृपानिधी । मनाच्या जाती आधिव्याधी । अहं कोहं सोहं सिद्धी । यांही उपाधी हरपती ॥ ९१ ॥

चित्त होय चैतन्य । बुद्धि होय [मु. 'समाधान'.] समाधिघन । प्रपंच होय [मु. 'ब्रह्मार्पण'.] ब्रह्मपूर्ण । श्रीरामदर्शन अति श्रेष्ठ ॥ ९२ ॥

सिंधु सुग्रीव आणि वानर । अवघे करोनि जयजयकार । भावें प्रार्थितां रामचंद्र । कृपें रघुवीर तुष्टला ॥ ९३ ॥

सिंधु सुग्रीव प्रार्थन । ऐकोनिया रघुनंदन । स्वयें जाला सुप्रसन्न । मुनिवेषपण त्यागार्थ ॥ ९४ ॥

फेडोनियां वल्कलांबरें । श्रीराम वेष्टी पीतांबरें । जे कां अत्यंत मनोहरें । स्वयें समुद्रें आणिलीं ॥ ९५ ॥

श्रीराम कासेसी लागोन । वीज विसरली अस्तमान । तैसा पीतांबर जाण । दैदीप्यमान निजतेजें ॥ ९६ ॥

स्वयें श्रीराम आपण । सुमनीं जटा आच्छादोन । त्यावरी समुद्रें आपण । मुकुट संपूर्ण बाणला ॥ ९७ ॥

अनुक्रमणिका

अनर्घ्य रत्नीं रत्नघन । मस्तकीं मुकुट दैदीप्यमान । तेणें शोभला श्रीरघुनंदन । जन नयन सुखकारी ॥ ९८ ॥

निज तेजें घवघवोनी । मुकुटमाथा अनर्घ्यमणी । श्रीराम शिरोमणींचा शिरोमणी । तोही आभरणीं शोभत ॥ ९९ ॥

कुंडलें [मु. 'शोभतीं'.] साकार मकराकार । हा लौकिक बाह्य विचार । तें मुख्य मूळीं निर्विकार । श्रवणें विकार निर्दाळी ॥ १०० ॥

उभय बाहीं बाहुवटे । वीर कंकणें उद्भटे । मुक्ताफळें श्रेष्ठ श्रेष्ठें । शोभतीं मनगटें सुंदर ॥ १०१ ॥

मनगटें बाणलीं सुंदरें । कंठीं बाणलीं चौसरें । श्रीरामा आवडें एकसरें । गुह्य समुद्रें नेणिजे ॥ १०२ ॥

गुणातीत परिपाक । तेंचि श्रीरामा ह्रदयीं पदक । पाहतां जीवशिवा पडलें टक । अलौलिक निजशोभा ॥ १०३ ॥

कटीं बाणली कटिमेखळा । क्षुद्र घंटिका ज्वाळमाळा । कंठीं अनर्घ्य रत्नमाळा । मुक्ताफळा [कं. 'समवेत'.] समयोगें ॥ १०४ ॥

वांकी आंदुवांचा मेळा । ज्यांचा धांक कळिकाळा । वैरी कांपती चळचळां । तो चरणकमळा तोडरू ॥ १०५ ॥

श्रीरामाचा [मु. 'मुख मृगांक'.] मुखमयंक । परिपूर्णत्वें निष्कळंक । त्याचें उपमें न ये शशांक । तो सकलंक क्षयरोगी ॥ १०६ ॥

मुकुट कुंडलें मेखळा । कासें कसिला सोनसळा । घवघवीत घनसांवळा । देखोनि डोळां विश्रांती ॥ १०७ ॥

टिळक रेखिला पिंवळा । आपाद कंठीं रत्नमाळा । घवघवीत घनसांवळा । देखोनि डोळां निवाले ॥ १०८ ॥

कंठीं कौस्तुभ तेजाळा । कटिसूत्रीं किंकिणी जाळमाळा । ऐसा घवघवीत घनसांवळा । देखोनि डोळां निवाले ॥ १०९ ॥

मुक्तीचा दुकाळ मुक्ताफळां । ते पडली श्रीरामाचिया गळा । मुक्ती देवोनि मुक्ताफळां । घनसांवळा शोभत ॥ ११० ॥

अम्लान पंकजांची माळा । श्रीरामा तुळसीमाळ गळा । तोडर गर्जे चरणकमळा । घनसांवळा घवघवीत ॥ १११ ॥

ह्रदयीं पदक अति गंभीर । बाही बाहुवटे मनोहर । ऐसा देखोनि श्रीरामचंद्र । नाचती नेत्र सुखोर्मी ॥ ११२ ॥

अनुक्रमणिका

वीर कंकणीं झणत्कार । करमुद्रिका दशावतार । ऐसा देखोनि श्रीरामचंद्र । नाचती नेत्र सुखोर्मी ॥ ११३ ॥

चरणकमळीं संत भ्रमर । वांकी अंदुवांचा गजर । ऐसा देखोनि श्रीरामचंद्र । नाचती नेत्र सुखोर्मी ॥ ११४ ॥

ठाण माण गुणलक्षण । रुपरेखा अतिलावण्य । ऐसा देखोनि रघुनंदन । नाचती [दे. 'भक्तजन'.] नयन सुखोर्मी ॥ ११५ ॥ [ओवी ११५ व ११७ वि. प्रतीत नाहीत.]

मांडोनि माहेश्वरी ठाण । वोढी विन्यासें धनुष्यबाण । ऐसा देखोनि रघुनंदन । नाचती नयन सुखोर्मी ॥ ११६ ॥

नेत्र निवाले देती ढेकर । मन निवालें निर्विकार । बुद्धि दोंदिल सन्मात्र । चित्त चिन्मात्र श्रीरामें ॥ ११७ ॥ [ओवी ११५ व ११७ वि. प्रतीत नाहीत.]

अहं कोहं सोहंपण । सांडोनि अभिमान आपण । वंदितां श्रीरामाचे चरण । स्वानंद पूर्ण निवाला ॥ ११८ ॥

वीरशृंगार श्रीराममूर्ती । देखतांचि इंद्रियवृत्ती । परमानंदें नित्य तृप्ती । सिंधु कपिपती तटस्थ ॥ ११९ ॥

टक पडिलें [मु. 'सुरनरां'.] समुद्रा । टक पडिलें वानरां । टक पडिलें सुरनरां । श्रीरामचंद्रा देखोनि ॥ १२० ॥

वाहों विसरलें जीवन । [मु. 'जावो'; मु. 'वाहों'.] वाजों विसरला पवन । रवि विसरला दिनमान । श्रीरघुनंदन देखोनि ॥ १२१ ॥

देखतां श्रीरामाची मूर्ती । समुद्र सुखावला चित्तीं । सुग्रीव सुखावला कपिपती । सुखी जुत्पत्ती वानर ॥ १२२ ॥

सुखावोनि वानर । अवघे करिती जयजयकार । देतां रामनामें भुभुःकार । नादें अंबर कोंदलें ॥ १२३ ॥

समुद्रें श्रीराम धरोनि हाती । नेला वरुणालया प्रती । वरुणासी नमस्कारी श्रीरघुपती । वृद्धमूर्ती देखोनी ॥ १२४ ॥

वरुण घाली लोटांगण । श्रीराम अवतार ब्रह्मपूर्ण । शीघ्र करी लंकागमन । विजयी पूर्ण तूं होसी ॥ १२५ ॥

जैसा शृंगारिला श्रीरामचंद्र । तैसाचि सखा सौमित्र । दोघे महावीर शूर । जेंवी रविचंद्र आकाशीं ॥ १२६ ॥

समुद्रें आणोनियां जाण । रत्नांजुळी भरोनि पूर्ण । श्रीरामासी ओंवाळून । सांडिली आपण स्वानंदें ॥ १२७ ॥

[मु. 'पृथ्वी'.] सुग्रीवें येवोनि उठाउठी । ओवाळोनि धनकोटी । वाटूं जातां समुद्रतटीं । मागतें दृष्टी दिसेना ॥ १२८ ॥

अनुक्रमणिका

श्रीरामाचिये संगती । लोलुपता निमाली निश्चिती । मागण्याची समूळ शांती । स्वानंदें तृप्ती सर्वांसी ॥ १२९ ॥

मागतें न देखोनि दृष्टी । वानरी उडोनि उठाउठी । रावणाचे [मु. ‘निकटी’.] सभासंनिष्टी । केली वृष्टी धनरत्नें ॥ १३० ॥

कायसी धनरत्नांची वृष्टी । पाहूं धाडिल्या राक्षसथाटी ।
घेवोनि वानर सेना कोटी । आला जगजेठी श्रीराम ॥ १३१ ॥

आला ऐकोनि श्रीरामासी । दशानन चिंता मनासीं । पाहो धाडिलें प्रधानांसी । आणि लंकेसी आकांत ॥ १३२ ॥

मागें पळावया नाहीं वाडी । पुढें आली वानरधाडी । रावणाची बुद्धिकुडी । बांदवडी स्त्रीपुत्रां ॥ १३३ ॥

एका जनार्दना शरण । हदादिलें लंकाभुवन । श्रीराम येवोनि आपण । करील कंदन राक्षसां ॥ १३४ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां श्रीरामलंकाआगमनं नाम एकचत्वारिंशततमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

## प्रसंग बेचाळिसावा

## श्रीराम लंका आगमन

**॥ श्रीरघुनाथाय नमः ॥**

**आला ऐकोनि रघुनंदन । स्वयें भयभीत दशानन । प्रधान सेना उद्विग्न । लंकाजन** [दै. 'उद्विग्न'.] **सकंप ॥ १ ॥**

**चाकाटला रावण । तंव भेरी लावोनि निशाण । स्वयें आला रघुनंदन । वानर सैन्य** [वि. 'समवेत'.] **संभारी ॥ २ ॥**

> ततः शंखविमिश्रेण भेरीशब्देन नादिता । राघवस्यागमत्सेना नानाप्रहरणान्विता ॥ १ ॥
> समागतां तु तां सेनां दृष्ट्वा राजा दशाननः । मुहूर्तं ध्यानमास्थाय सचिवानभ्यभाषत ॥ २ ॥
> वाक्यं वाक्यविदां श्रेष्ठाः श्रृणुध्वं मम राक्षसाः । न चोद्योगे मनोबोधः अयं प्राप्तः स राघवः ॥ ३ ॥
> सहितः सर्वसैन्येन वानराणां सलक्ष्मणः । हेलना न च कर्तव्या वानरेषु रणाजिरे ॥ ४ ॥
> यैस्तृणीकृत्य नः सर्वान्सेतुर्बद्धो महोदधौ । भवंतश्चैव रागांधाः सुखं सुप्ताः प्रसंगिनः ॥ ५ ॥

**शंख भेरी टाळ घोळ । काहळ वाजती चिनकाहळ । ढोल पटह मांदळ । ध्वनि आगळा बुरुंगें ॥ ३ ॥**

**धडांधडां विघातवाही । निशाणें लागलीं एक घायीं । विराणी वाजताती** [मु. 'दोहीं बाहीं'.] **पाही । गिडीबिडी ठायी गर्जती ॥ ४ ॥**

**ऐसा वाजंत्र्यांचा गजर । घेवोनि कपिकुळसंभार । लंके आला श्रीरामचंद्र । केला भुभुःकार वानरीं ॥ ५ ॥**

**देखोनि श्रीरामाचा यावा । कल्पांत रावणाचिया जीवां । कायसा प्रधानांचा केवा । दुःख कालोवा राक्षसां ॥ ६ ॥**

**श्रीराम आला वानरभारीं । अति आकांत लंकापुरीं । शंख करिती घरोघरीं । नरनारी कळकळती ॥ ७ ॥**

**वानरदळ देखोनि गाढें । एक** [मु. 'दडे'.] **पळे एकापुढें । एक एकामागें दडे । कोणीकडे पळावें ॥ ८ ॥**

**पळावया वाट नाहीं पुढें । वानरीं बळकाविले हुडे । रावणाचें कर्मकुडें । मरण रोकडें सर्वांसी ॥ ९ ॥** [ओवी ९ तं. प्रतीत नाही.]

**रावण अपराधासाठीं । मरती राक्षसांचिया कोटी । घरोघरीं बोंब उठी । वानर दृष्टीं देखोनि ॥ १० ॥**

**पापबुद्धि लंकानाथा । चोरोनि श्रीरामाची कांता । करविलें लंकेच्या घाता । उपाव आता चालेना ॥ ११ ॥**

अनुक्रमणिका

पूर्व सूचना बिभीषण । सीता देवोनि रिघावें शरण । पापी नायिकेचि रावण । आणिलें मरण सर्वांसी ॥ १२ ॥

आला देखोनि रघुनंदन । अति क्षोभला दशानन । पाचारोनियां प्रधान । क्रोधायमान बोलत ॥ १३ ॥

घेवोनियां वानरसैन्य । लंके आला रघुनंदन । तरी तुम्हांसी नाहीं ज्ञान । मद्यमैथुन विषयांध ॥ १४ ॥

समुद्रीं तारोनि पाषाण । सेतु बांधिला संपुर्ण । हेंही तुम्हांस नाहीं ज्ञान । मद्यमैथुन विषयांध ॥ १५ ॥

श्रीराम येवोनि सहपरिवारीं । बाण [मुं. 'ठोकिल; तु. तं. 'ठोकील.] टेकिलें उरावरी । तुम्ही सुषुप्त स्त्रीशेजारीं । विषयसंचारी विषयांध ॥ १६ ॥

सहलक्ष्मण वानरभारीं । श्रीराम आला लंकेवरी । तुम्ही [मु. 'विषयांध निंदसुरी'.] सुषुप्त स्त्रियांनुसारीं । आदळलें वैरी तुम्ही नेणा ॥ १७ ॥

मद्यमैथुनीं तत्पर । नाहीं हेरचार विचार । वैरिये घेतलें घर । तुम्ही पामर तें नेणा ॥ १८ ॥

पंच विषय पंचभूत । तुम्हांस लागलें निश्चित । लंके आला श्रीरघुनाथ । तुम्ही [मु. तु. तं. मुं. कं. 'संभ्रांत'.] स्त्रीभ्रांत तें नेणा ॥ १९ ॥

पूर्वील तुमचा बडिवार । म्हणा बापुडे तें वानर । वनचर पालेखाईर । आम्हांसमोर केंवी [पै. अं. 'राहे'.] येती ॥ २० ॥ [ओवी २० चे शेवटचे दोन चरण कं. प्रतीत असे आहेत :- 'शेखीं तुम्हीच पामर । विषयपर निदसुरे ॥']

तेचि वानर महावीर । सेतु बांधोनि समग्र । लंके आले अति दुर्धर । देती भुभु :कार रामनामें ॥ २१ ॥

काळ कृतांत दशानन । त्या मज करोनि तृणासमान । सेतु बांधोनि वानरगण । युद्ध दारुण करूं आले ॥ २२ ॥

उपेक्षोनि वीर समस्त । मजचि लक्षोनि निश्चित । वानर युद्धासी [पै. अं. 'निश्चित'.] उद्यत । अति समर्थ रणयोद्धे ॥ २३ ॥

रोकडें मांडलें असें रण । तुम्ही करितां कपिहेळण । अवश्य तुमचा घेतील प्राण । कपि विचक्षण रणयोद्धे ॥ २४ ॥

तुमचिया असावधानता । लंके येणें श्रीरघुनाथा । वानरीं सेतुबंधनता । नेणों सर्वथा अति गर्वें ॥ २५ ॥

> बध्यमानं तथा सेतुं यन्नवेत्थ निशाचराः । चारो नात्र प्रयुक्तश्च सर्वैर्मन्त्रिपदस्थितैः ॥ ६ ॥
> हितं मंत्रयते राज्ञस्तेन मंत्री निगद्यते । मंत्रिभिः सह कार्यार्थाः कार्या नित्यमसंशयम् ॥ ७ ॥
> एवं भवद्भिर्विश्रंभाद्वंचितोऽहं निशाचराः । मामकं यदि वः कार्यं नास्ति कार्यं महद् हृदि ॥ ८ ॥

अनुक्रमणिका

वानरवीर स्वयें समस्त । कडकडाटे सेतु बांधित । तें तुम्ही नेणा गर्वोन्मत्त । मद्याभिरत स्त्रीगामी ॥ २६ ॥

धनोन्मत्त मदोन्मत्त । स्त्रीकामें कामोन्मत्त । गर्वोन्मत्त बलोन्मत्त । पंचोन्मत्त तुम्ही सर्व ॥ २७ ॥ [ओवी २७ कं. प्रेतीत नाही.]

पंचोन्मत्त [कं. 'मैत्रीपूर्ण'] मत्तपूर्ण । चार हेर पाठवी कवण । माझ्या कार्याची आठवण । तुम्हांसी विस्मरण उन्मादें ॥ २८ ॥

सर्वदा रायाचें हित विचारी । यालागीं त्यासी म्हणिजे मंत्री ।
तें कार्य नाहीं तुम्हां माझारीं । विषयसंचारी विषयांध ॥ २९ ॥

सकल कार्यार्थ प्रधानाहातीं । ऐसी अनादि राजनीती । तुम्ही माझे विश्वासघाती । ठकिले निश्चिती निजस्वार्था ॥

तुम्हांसी मज विश्वासता । तुम्ही पेटलेति माझिया घाता । लंके आणिले श्रीरघुनाथा । कुळक्षयार्था समूळीं ॥ ३१ ॥

बिभीषण माझा धर्ममूर्ती । तो बोलिला सत्य युक्ती ।
प्रधान तुझेचि विश्वासघाती । हेहि प्रतीति मज आली ॥ ३२ ॥

उन्मादमदें मत्त प्रधान । अविश्वासी यांचें वचन । ऐसें बोलिला बिभीषण । सत्यप्रमाण मज जालें ॥ ३३ ॥

माझा बिभीषण येथ असता । तो सेतु बांधों नेदितां । येवो नेदिता रघुनाथा । माझिया निजहिता कृतकारी ॥ ३४ ॥

अमात्य वचना विश्वासोन । सखा दवडिला बिभीषण । आंगीं आदळला रघुनंदन । कपटी प्रधान मज माझे ॥ ३५ ॥ [ओवी ३५ वि. प्रतीत नाही.]

> रावणेनैवमुक्तास्ते राक्षसा व्रीडिताभवन् । व्रीडितानां ततस्तेषां मेघनादो ह्यभाषत ॥ ९ ॥
> किमर्थं तप्यसे तात राघवो लक्ष्मणस्तथा । किं करिष्यंति ते राजन् वानरा वनचारिणः ॥ १० ॥
> तौ वा मनुष्यमात्रौ च भ्रातरौ रामलक्ष्मणौ । व्येतु ते संभ्रमो राजन् अहं हन्मि प्लवंगमान् ॥ ११ ॥
> रामं च लक्ष्मणं चैव हतौ पश्य मया रणे । हनुमंतं स सुग्रीवं सांगदं गंधमादनम् ॥ १२ ॥
> सुषेणं जांबुवंतं च तथान्यान्वनगोचरान् ॥ १३ ॥

लंके आला रघुनंदन । सकोप रावणाचें [मु. 'वदन'.] वचन । ऐकोनि सेना प्रधान । लज्जायमान [मु. 'जाहले'.] राक्षस ॥ ३६ ॥

गजरें आला रघुनंदन । आंगीं आदळलें विघ्न । लज्जा प्रधान अति उद्विग्न । कंपायमान भयभीत ॥ ३७ ॥

अनुक्रमणिका

**आला देखोनि रघुनाथ । रावण कोपें जाला कृतांत । प्रधान राक्षसेसीं आकांत । प्राणावर्त सर्वांसी ॥ ३८ ॥**

**अधोवदनें अवघे स्तब्ध । कांहीं न बोलती शब्द । तये काळीं मेघनाद । करी अनुवाद जनकेसी ॥ ३९ ॥**

**आला देखोनि श्रीरघुनाथा । तूं कां व्यर्थ भीसी ताता । कायसी रामलक्ष्मणाची कथा । कपि समस्तां कोण गणी ॥**

**इंद्र आणिला बांधोन । बंदीं घातले सुरगण । रामलक्ष्मण** [मु. 'ते'.] **केवा कोण । वानरगण ते किती ॥ ४१ ॥**

**वानर स्वयें पालेखाईर । रामलक्ष्मण मनुष्यमात्र । ते तंव आमचा नित्य आहार । भय दुर्धर तुज कैंचें ॥ ४२ ॥**

**स्वामीनें राहावें सुखें स्वस्थ । तूंही जाणसी माझा पुरुषार्थ । जे जे आले आहेत येथ । ते मी समस्त मारीन ॥ ४३ ॥**

**विकट बाण विषमश्रेणी । रामलक्ष्मण पाडीन रणीं । अंगद सुग्रीव राजे दोनी । रणीं शोधोनी मारीन ॥ ४४ ॥**

**जयाचे पवाडे अद्भुत । कंदन केलें लंकेआंत । तो मी मारीन हनुमंत । जांबुवंत दूसरा ॥ ४५ ॥**

**नळनीळा गंधमादन । तरस तरळ पनस सुषेण । एकैक वानर सैन्य । निर्दळीन बाणाग्रें ॥ ४६ ॥**

**माझिया बाणाची झडाडी । रामलक्ष्मणा प्रेत परवडी । मारीन वानरांच्या कोडी । तें बापुडीं वनचरें ॥ ४७ ॥**

> मेघनादवचः श्रुत्वा प्रहस्तो वाक्यमब्रवीत् । मुसलायोधिनों मह्यं कः स्थास्यति रणाजिरे ॥ १४ ॥
> मुसलं भ्रममाणंतु रावणस्त्वमवेक्षथाः । अहमेको वधिष्यामि तव शत्रुं दशानन ॥ १५ ॥
> सुखी भव महाराज यथेष्टं विचर स्वयम् ॥ १६ ॥

**ऐकोनि इंद्रजिताचें वचन । प्रहस्त बोले अति गर्जोन । राया तुझें शत्रुदमन । मी करीन एकला ॥ ४८ ॥**

**माझिया मुसळ घायापुढें । रामलक्ष्मण बापुडें । कायसे वानरबळ गाढें । रणीं रोकडे मारीन ॥ ४९ ॥**

**मुसळसाधन चक्राकार । अष्टांगीं विषम मार । प्रहस्त दावी महावीर । दशशिर अनुलक्षी ॥ ५० ॥**

**राया तुझा शत्रूसंभार । मियां मारिला मानी साचार । सेवोनि पद्मिनी कामसेजार । भोग विचित्र सुखभोगी ॥ ५१ ॥**

> एवमुक्ते प्रहस्तेन धूम्राक्षो वाक्यमब्रवीत् । लंकामूले स्थितास्तस्मात्सन्नह्यध्वं निशाचराः ॥ १७ ॥
> गच्छामस्त्वरितास्तत्र यत्र तद्वानरं बलम् । सुखसुप्तान्हनिष्याम एतद्धि मम रोचते ॥ १८ ॥

अनुक्रमणिका

**ऐकोनि प्रहस्त वाक्य नव्हाळी । धूम्राक्ष गर्जे वचनाळी । वानरसेना लंकामूळीं । आतुर्बळी आदळली ॥ ५२ ॥**

**सन्नद्ध आम्ही अवघेजण । रात्रीं जावोनि आपण । निजले असतांचि जाण । वानरगण निर्दळूं ॥ ५३ ॥**

**सौमित्र आणि रघुपती । सुग्रीव अंगदादि जुत्पत्ती । जावोनि मारुं रातोराती । रण समाप्ती शत्रूसी ॥ ५४ ॥**

**ऐसी करोनियां ख्याती । यश देऊं लंकापती । हेंचि आवडे माझे चित्तीं । वीराप्रती सांगत ॥ ५५ ॥**

**ऐसी धुम्राक्ष उत्तरें । निर्भर्त्सिली महोदरें । श्रीरामें नित्य रक्षिली वानरें । सहपरिवारें सुग्रीवें ॥ ५६ ॥**

> महोदरोऽथ निर्भर्त्स्य धूम्राक्षं वाक्यमब्रवीत् । सुरक्षितं श्रीरामेण सुग्रीवेण च तद्वलम् ॥ १९ ॥
> वानरैश्च महावीर्यैः समंतात्परिरक्षितम् । न तत्र गमनं युक्तं पुरगुप्तिर्विधीयताम् ॥ २० ॥
> एतस्मिन्नंतरे वीरः प्रगृह्य विपुलं भुजम् । अतिकायो महावीर्यो रावणं वाक्यमब्रवीत् ॥ २१ ॥
> रक्षितव्याः प्रजा राज्ञा रक्षितव्या द्विजातयः । दस्यवश्च निहंतव्याः परिपाल्याश्च साधवः ॥ २२ ॥
> रामेण विनयज्ञेन व्यलीकं किं कृतं हि नः । जनस्थानगता येन तस्य भार्या त्वया हृता ॥ २३ ॥
> बलेन गर्विता यूयं विनाशाय कुलस्य नः । तन्मह्यं रोचते बुद्धया सीता रामाय दीयताम् ।
> एवमुक्त्वातिकायस्तु तूष्णीं भूतो बभूव ह ॥ २४ ॥

**निजलिया वानरां करावा घात । हा कोण तुझा पुरुषार्थ । धूम्राक्षासी सभेआंत । निर्भर्त्सित महोदर ॥ ५७ ॥**

**श्रीराम नित्य सावधान । छळितां मारीच पावला मरण । शूर्पणखा स्वयें आपण । करितां छळण विटंबिली ॥ ५८ ॥** [ओवी ५८ वि. व तं. प्रतींत नाही]

**ऐसा श्रीराम सावधान । स्वयें संरक्षी वानरगण । सुग्रीव राजा आपण । करी रक्षण अहोरात्रीं ॥ ५९ ॥**

**तेथें वानरांच्या निज घातीं । तुम्हांसी जातां रातोरातीं । श्रीराम बाणांच्या संपाती । मराल निश्चितीं एकैक ॥ ६० ॥**

**श्रीराम नित्य देखणा जाण । परी त्याचिया भात्याचे बाण । आंधारीं देखणें पूर्ण । घेतील प्राण गिवसगिवसूं ॥ ६१ ॥**

[मु. 'देखोनि'.] **देखणी श्रीराम दर्भशिखा । पाठी लागोनिया काका । हिंडवोनि तिहीं लोका । वामनेत्र देखा घेतला ॥ ६२ ॥** [ओवी ६२ कं प्रतीत नाही.]

**ऐसिया श्रीरामापुढें । घाला घालणें केंवी घडे । तुम्ही राक्षस उन्माद वेडे । मराल रोकडे श्रीरामबाणीं ॥ ६३ ॥**

**तुम्ही ऐका अवघे सावध । वानर आले अति उन्नद्ध । दुर्ग करा सन्नद्धबद्ध । दुर्गबळें युद्ध करुं त्यासी ॥ ६४ ॥**

अनुक्रमणिका

हुडे आटोळे पौळी पागरे । ठायीं ठायीं [मु. 'जडा'; कं. 'जाड'.] जोडा यंत्रे । सन्नद्धबद्ध वीरानुवीरें । दुर्गद्वारें रक्षावीं ॥ ६५ ॥

दुर्धर या वानरबळा । कपाटीं घाला रे आगळा । दृढ देखोनिया सांखळा । दळ समेळा संरक्षा ॥ ६६ ॥

ऐकोनि महोदराची मात । अतिकाय गदगदा हांसत । जो जो बोलिला पुरुषार्थ । तो तो व्यर्थ दिसताहे ॥ ६७ ॥

वानरांच्या उड्डाणापुढें । लंका दुर्ग तें बापुडे । अर्गळा सांखळा कवाडे । कोणीकडे आंवरती ॥ ६८ ॥

त्रिकुटाचिया शिखरांवरी । उडो शकिजे वानरीं । तेथें तुमच्या दुर्गाची थोरी । तृणावरी [मु. 'गणीना'] सरेना ॥ ६९ ॥

स्वहित सांगता बिभीषण । त्यासी केलें नगर निर्याण । मजहि बोलतां स्वधर्मपूर्ण । अवघेजण क्षोभाल ॥ ७० ॥

क्षमा कराल अवघेजण । तरी मी यथार्थ सांगेन । सत्यसंकल्प रघुनंदन । वृथा वल्गन प्रधानां ॥ ७१ ॥

इंद्रजित माझा ज्येष्ट बंधू । पुरुषार्थ बोलतो संबद्धू । करितां कपीसी युद्धासंबंधू । तेणें सुबद्धू गांजिला ॥ ७२ ॥

तोचि इंद्रजित आतां । लाजेना वाटीव बोलतां । मिथ्या बोले रायादेखतां । अति पुरुषार्था वल्गोनी ॥ ७३ ॥

मारीन लक्ष्मण रघुनाथ । सुग्रीव अंगदादि जांबुवंत । मारीन म्हणतां हनुमंत । सभेआंत लाजेना ॥ ७४ ॥

तैसाचि प्रहस्त प्रधान । जंबुमाळी मारिलिया जाण । पुत्रशोकें करी शंखस्फुरण । हनुमंतीं रण न करीचि ॥ ७५ ॥

हनुमंतेसीं युद्ध न करवे । तो प्रहस्त मुसळेसीं धांवे । [मु. 'सुग्रीवादि कपि'.] रामलक्ष्मणादि आघवे । मारीन [मु. 'लाघवें'; तु. 'वाटिवें'.] आघवें मृषा जल्पे ॥ ७६ ॥

धूम्राक्ष महाबळवंत । निजलिया वानर समस्त । याचा म्हणे मी करीन घात । थोर पुरुषार्थ हा त्याचा ॥ ७७ ॥

ऐसें मिथ्यावादी प्रधान । वृथा मिरविती आंगवण । त्यासी विश्वासतां रावण । दुःख दारुण पावेल ॥ ७८ ॥
[ओवी ७८ वि. प्रतीत नाही.]

> एतस्मिन्नंतरे वीरः प्रगृह्य विपुल भुजम् । अतिकायो महावीर्यो रावणं वाक्यमब्रवीत् ॥ २५ ॥
> रक्षितव्या प्रजा राज्ञा रक्षितव्या द्विजातयः । दस्यवश्च निहंतव्याः परिपाल्याश्च साधवः ॥ २६ ॥

अनुक्रमणिका

रामो विनयसंपन्नस्तस्य भार्या त्वया हृता । तेनैव गर्विता यूयं विनाशाय कुलस्य च ॥ २७ ॥
तन्मह्यं रोचते बुद्धया सीता रामाय दीयताम् । एवमुक्त्वातिकायस्तु तूष्णीं भूतो बभूव ह ॥ २८ ॥

**तेचि समयीं वीराधिराजे । उभवोनियां दक्षिण भुजे । अतिकाय स्वधर्म गर्जे । अवधारिजे राजेंद्रा ॥ ७९ ॥**

**रायें रक्षावे गोब्राह्मण । निर्भय प्रजासी संरक्षण । करावें दुष्टाचें निर्दळण । परिपाळण साधूंचें ॥ ८० ॥**

**ऐसियागा धर्मनीती । ज्या रायाच्या वर्तली स्थिती । ते राजे सदा सुखी असती । धरा भोगिती निर्भयें ॥ ८१ ॥**

**हित सांगतां बिभीषण । लाताघाते नगरनिर्याण । मजही बोलतां स्वधर्मपूर्ण । दुष्ट दुर्जन न म्हणावे ॥ ८२ ॥**

[तु. दै. मुं. मु. 'सुबुद्धि'.] **सुबंधु बिभीषण पवित्रु । दवडिला तुम्ही करोनि शत्रु । तूं पिता मी निजपुत्रु । धर्म विचारु अवधारी ॥ ८३ ॥**

**जिकडे नित्य पापाचरण । अकीर्ति अपेश अकल्याण । अति निंद्यत्वें पावे मरण । सत्य जाण लंकेशा ॥ ८४ ॥**

**जेथें नित्य धर्माचरण । यश कीर्ति कृत कल्याण । त्रैलोक्यीं विजयी होय आपण । सत्य जाण लंकेशा ॥ ८५ ॥**

**श्रीराम धर्मात्मा अतिशुद्धु । तुझा न करितां अपराधु । तुंवा कां चोरिली त्याची वधू । पापी सुबद्धू जालासी ॥ ८६ ॥**

**सीता पतिव्रता संपूर्ण । करितां परदारहरण । जालासि पापी तूं पूर्ण । कूळनिर्दळण अति पापें ॥ ८७ ॥**

**सीता आणितां लंकेआंत । तैंहूनि उठिलें अति उत्पात । अखयादि वीर समर्थ । केला अति घात हनुमंतें ॥ ८८ ॥**

**परदारा पाप संनिष्ठी । वानरां देवोनि पाठी । इंद्रजित पळे उठाउठी । सैन्य कोटी मारवूनी ॥ ८९ ॥**

**परदारादि हरण । ते पाप अति दारुण । वानरें गांजिला रावण । लंकाभुवन जाळोनि ॥ ९० ॥**

**ऐसी देखतां प्रतीती । वृथा माना बलोन्मत्ती । गर्वें निमसील लंकापती । सैन्य संपत्ती सकुळ ॥ ९१ ॥**

**साष्टांग नमन रावणासी । दुसरें नमन इंद्रजितासी । तिसरें नमन प्रधानासी । निज हितासी अवधारा ॥ ९२ ॥**

**माझे आवडीची कथा । श्रीरामासी अर्पोनि सीता । वांचवावें लंकानाथा । आणि समस्तां राक्षसां ॥ ९३ ॥**

अनुक्रमणिका

श्रीरामा रिघोनियां शरण । सीता अर्पितां आपण । अक्षयीकुमर आणि रावण । सत्यवचन हें माझें ॥ ९४ ॥

सैन्य सेनानी प्रधान । अक्षय राक्षस लंकाभुवन । भुक्तिमुक्ति अक्षयपूर्ण । त्रिसत्य वचन हें माझें ॥ ९५ ॥
[ओवी ९५ दै. व मुं. प्रतींत नाही.]

सीता अर्पोनि आपण । श्रीरामा रिघतांचि शरण । स्वप्नीं नाहीं जन्ममरण । परम कल्याण अति कीर्ती ॥ ९६ ॥

ऐसें स्वहिताचें उत्तर । स्वयें न मानी दशशिर । प्रधान न मानिती कुमर । मरणातुर उन्मादें ॥ ९७ ॥

मद्योन्मत्त धनोन्मत्त । बळोन्मत्त राज्योन्मत्त । अति गर्वें गर्वोन्मत्त । पंचोन्मत्त मरणार्थी ॥ ९८ ॥

पतंग दीपातें झडपिती । जळोनि मरती स्नेहीं बुडती । तरी मागील झडप देती । मरणोन्मत्ती उन्मत्त ॥ ९९ ॥

अभिलाषितां सीसासती । विरोधितां श्रीरघुपती । रावणा मरसी गर्वोन्मती । सैन्यसंपत्ती समवेत ॥ १०० ॥

रावणा देखतां लंकेआंत । कपीनें केला अति आकांत । तेंही माना तुम्ही समस्त । गर्वोन्मत्त [वि. ‘सर्वार्थी’.] मरणार्थी ॥ १०१ ॥

भीड सांडोनि बोलिलों कठीण । यालागी माझें लोटांगण । क्षमा करावें संपूर्ण । बाळभाषण हें माझें ॥ १०२ ॥

स्वहिंत नायके दशानन । अतिकायासी आलें रुदन । अश्रुपूर्ण जाले नयन । धरोनि मौन राहिला ॥ १०३ ॥

दुःख पावे [मु. ‘माता’.] निजपिता । ऐसिया बोलण्याची कथा । येवो नेदीच वाक्पथा । अति मौनता राहिला ॥ १०४ ॥

ऐकोनि अतिकायाचें वचन । जीवीं खोंचला दशानन । इंद्रजित आणि खोचले प्रधान । प्रतिवचन न [मु. ‘न देती’.] देववे ॥ १०५ ॥

एका जनार्दना शरण । श्रोत्या वक्त्या पडलें मौन । सुंदरकांड जालें संपूर्ण । श्रीजनार्दन निजकृपा ॥ १०६ ॥

छेदोनि वालिचें बळबंड । कपिसैन्य आणोनि उदंड । सुग्रीवा राज्य दिधलें [कं. ‘अखंड’.] प्रचंड । सुंदरकांड संपविलें ॥ १०७ ॥

सीता शुद्धीचिया चाडा । वनोपवनीं देती झडां । हेम विवरीं घेवोनि झाडा । सुंदरकांडा संपविलें ॥ १०८ ॥

अनुक्रमणिका

देखोनि समुद्र गडाडा । वानरीं प्राण देतां फुडां । संपाती भेटोनि रोकडा । सुंदरकांडा संपविलें ॥ १०९ ॥

सीता शोधोनि धडफुडां । समुद्र उल्लंघोनि हनुमान गाढा । करोनि अशोकवन उपाडा । सुंदरकांडा संपविलें ॥ ११० ॥

मिस करोनि वनउपाडा । [मु. 'वनीं'.] रणीं राक्षसां करोनि रगडा । इंद्रजित गांजोनि गाढा । सुंदरकांडा संपविलें ॥ ११० ॥

किंकर बनकरांचा नितोडा । अखया उपटोनियां दुर्गापुढां । लंका जाळोनि धडधडा । सुंदरकांडा संपविलें ॥ ११२ ॥

शुद्धि सांगोनिं श्रीरामापुढां । सिंधुपासी आणोनि रोकडा ।
झाडोनि समुद्राचा पादाडा । सुंदरकांडा संपविलें ॥ ११३ ॥

दश योजन देव्हढा । शत योजनें सेतु गाढा । आणोनिया लंकापुढां । सुंदरकांडा संपविलें ॥ ११४ ॥

संपवोनि सुंदरकांडा । पुढें युद्धकांडाचा झगडा । श्रीराम करील राक्षसरगडा । प्रताप पवाडा अवधारा ॥ ११५ ॥

एका जनार्दना शरण । सुंदरकांड संपवून । पुढें युद्धकांड निरुपण । गोड रामायण अवधारा ॥ ११६ ॥

इति श्रीभावार्थरामायणे सुंदरकांडे एकाकारटीकायां श्रीरामलंकाआगमनं नाम द्विचत्वारिंशततमप्रसंगः ॥

अनुक्रमणिका

**शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई**

<u>अनुक्रमणिका</u>



# अनुक्रमणिका

पाहो जातां निजस्वभावीं ।
श्रीराम रामायण स्वयें वदवी ।
ओवी चढीत दाउनी ओवी ।
कथा वदवी श्रीराम ॥

निजलो असता स्वप्नीपूर्ण ।
श्रीराम दाखवी रामायण ।
आपुले गुह्य निरूपण ।
सांगे आपण बोलोनी ॥

सांडोनि रामकथा लेखन ।
मजकरिता गमनागमन ।
मार्गी श्रीराम आपण ।
स्वयें संपूर्ण प्रकाशी ॥

या लागी कथा भूषण दूषण ।
माझे अंगीं नलगे जाण ।
कर्ता श्रीराम आपण ।
माझे मीपण तो जाला ॥

काय नेणो श्रीरघुनाथा ।
माझी आवडे मऱ्हाठी कथा ।
बळात्कारे होय वदवितां ।
न करिता राहो नेदी ॥

गाळीव भावाचा भावार्थ ।
सर्वभूतीं श्रीभगवंत ।
हाचि मुख्यत्वे परमार्थ ।
निजस्वार्थ परमार्थ ॥

अनुक्रमणिका



पैठण प्रतीच्या फळीवर असलेले रेखाचित्र, शके १६७३

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

अनुक्रमणिका